म. रा. सं. ठाणें
विषय मिलाफ
सं. क्र. ७५९९

समग्र सावरकर वाङ्मय

खंड ४ था

वाङ्मय विभाग

या खंडात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी बाल वयात लिहिलेले निबंध, विलायतेत असताना लिहिलेलीं 'लंडनचीं वातमीपत्रें,' श्रद्धानंद साप्ताहिकात लिहिलेले निवडक निबंध व 'गरमागरम चिवडा,' किर्लोस्कर, स्त्री इत्यादि मासिकांतून लिहिलेले निबंध, सावरकरांचीं विविध विषयांवरील निवडक भाषणें व अगदी अलीकडे त्यांनी लिहिलेलीं 'हिंदुराष्ट्राच्या अतिहासातील महा सोनेरी पानें' या सर्वांचा समावेश केला आहे.

卐

REFBK-0015915

सावरकर वाङ्मय प्रकाशन समिति
हाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, पुणें


मूल्य रु. २/-

मराठा ग्रंथ संग्रहालय ठा. .. स्थळ
अनुक्रम ..३८८५६ वि: निबंध
क्रमांक .....७५९५..... नोंद दि: ...१९/७/८

समग्र सावरकर वाङ्मय

खंड ४ था

वाङ्मय विभाग



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८९७९६ विभाग निबंध
क्रमांक ९५९५ दिनांक 23/11/95


समग्र सावरकर वाङ्मय

खंड ४ था

वाङ्मय विभाग

या खंडात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी बाल वयात लिहिलेले निबंध, विलायतेत असताना लिहिलेलीं 'लंडनचीं बातमीपत्रें,' श्रद्धानंद साप्ताहिकात लिहिलेले निवडक निबंध व 'गरमागरम चिवडा,' किर्लोस्कर, स्त्री इत्यादि मासिकांतून लिहिलेले निबंध, सावरकरांचीं विविध विषयांवरील निवडक भाषणें व अगदी अलीकडे त्यांनी लिहिलेलीं 'हिंदुराष्ट्राच्या अतिहासातील सहा सोनेरी पानें' या सर्वांचा समावेश केला आहे.

REFBK-0015915



समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशन समिति
महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, पुणें
मूल्य रु. १५

प्रकाशक :

महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या
समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशन
समितीच्या वतीने
शंकर रामचंद्र दाते
टिळक स्मारक मंदिर,
टिळक रस्ता, पुणें २

✦ ✦ ✦

प्रथमावृत्ति १९६५

✦ ✦ ✦

मुद्रक :

शंकर रामचंद्र दाते
यशवंत मुद्रणालय,
१८३५ सदाशिव पेठ, पुणें २

३८९७५ दि: निषेध.....
७५९६ नों: दि: 13/11/1945

प्रकाशकाचें निवेदन

समग्र सावरकर वाङ्मय या ग्रंथमालेतील हा चौथा खंड आहे. यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी शाळेत शिकत असताना स्पर्धेसाठी लिहिलेले निबंध, त्यानंतर विलायतेत असताना तेथून पाठविलेलीं 'लंडनचीं बातमीपत्रें', स्वामी श्रद्धानंद यांच्या स्मृत्यर्थ काढलेल्या 'श्रद्धानंद' या साप्ताहिकात त्यांनी लिहिलेले राजकीय व अितर विषयांवरील निवडक निबंध व 'गरमागरम चिवडा' या सदराखाली त्यांनी व्यक्त केलेले टीकात्मक स्फुट विचार, तसेंच त्यांनी किर्लोस्कर, स्त्री अित्यादि मासिकांतून विविध विषयांवर लिहिलेले अभ्यासपूर्ण निबंध, राजकीय, सामाजिक व वाङ्मयीन विषयांवर त्यांनी दिलेलीं व्याख्यानें व लिहिलेले निबंध आणि अलीकडे त्यांनी लिहिलेले 'हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सहा सोनेरी पानें' हे ग्रंथ या सर्वांचा या खंडात समावेश करण्यात आला आहे

समग्र सावरकर वाङ्मय हे मूळ योजनेप्रमाणे सहा खंडांत प्रसिद्ध व्हावयाचें होतें. त्यांपैकी चार मराठी खंड प्रत्येकी अंदाजे सात-साडेसातशे पृष्ठांचे, व दोन अिंग्रजी खंड प्रत्येकी सुमारे पांचशे पृष्ठांचे अशीं एकंदर चार हजार पृष्ठें प्रसिद्ध करण्याची योजना होती. परंतु प्रकाशनाचें कार्य सुरू झाल्यानंतर जसजसे लेख अुपलब्ध होत गेले, तसतशी पहिली योजना बदलणें भाग पडलें. लेखांची संख्या पुष्कळच वाढली, व त्या सर्वांचा समावेश या समग्र वाङ्मयात करणें अवश्य वाटल्याने अेक खंडच वाढविण्यात आला तोच हा वाङ्मय खंड होय. नुसता अेक खंडच वाढला असें नाही, तर त्यांची पृष्ठसंख्याही अपेक्षेबाहेर बरीच वाढली. हा चौथा खंड सुमारे अेक सहस्र पृष्ठांचा झाला आहे. तथापि सर्व खंडांचे मूल्य सारखेंच ठेवावें असें आरंभी ठरल्यामुळे व ग्राहकांस तसें आश्वासन दिलें असल्यामुळे ह्या ग्रंथाचेंही मूल्य अितरांइतकेंच ठेविलें आहे.

याशिवाय स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहिलेलें 'अठराशे सत्तावनचें स्वातंत्र्यसमर' या अितिहासग्रंथाचें मूळ हस्तलिखित पन्नास वर्षांनंतर सुदैवाने अुपलब्ध झाल्याकारणाने त्याही ग्रंथाचा याच ग्रंथमालेत समावेश करण्याचें ठरलें व त्यामुळे आणखी एका खंडाची या योजनेत भर पडून मूळच्या योजनेतील सहा खंडांचे आता आठ खंड होत आहेत.

या आठ खंडांपैकी आतापावेतो या चौथ्या खंडासह अेकंदर सहा खंड (चार मराठी व दोन इंग्रजी) प्रसिद्ध झाले असून अद्याप दोन खंड प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. त्यांपैकी अेकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें समग्र काव्य व नाटकें यांचा

प्रामुख्याने समावेश असून दुसऱ्यात त्यांचा आजपर्यंत कधीच प्रसिद्ध न झालेला '१८५७ चें स्वातंत्र्यसमर' हा मराठी ग्रंथ व त्यांचे अितर काही निवडक लेख व महत्त्वाचीं भाषणें यांचा समावेश होईल.

हे दोन्ही ग्रंथही लौकरच प्रसिद्ध करण्यात येतील.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें हें अमर वाङ्मय मराठी व अिंग्रजी वाचकांच्या हाती देण्यात प्रकाशकांना अत्यंत आनंद होत असून भावी पिढ्यांना मार्गदर्शक ध्रुवताऱ्यासारखा त्यांचा अुपयोग होणार आहे.

मकरसंक्रमण, १८८६
दि. १४ जानेवारी १९६५

प्रकाशक

३८६५ दि. १९६५.....
७५९५. दि. 731/65

समग्र सावरकर वाङ्मय

खंड ४ था – वाङ्मय विभाग

अनुक्रमणिका

बालपणचे निबंध

१. सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण व ते कां याचीं कारणें १
२. ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव कां करावे ? ४
३. वन्दे मातरम् १३
४. बाजीरावाची पुण्यतिथि २१

लंडनचीं बातमीपत्रें

५. लंडन टॉवर २४
६. सत्तावनचे डोहाळे २६
७. हिंदुस्थाना, तुला पचेल तें तू खा. ३०
८. राष्ट्रीय तरुण सेना ३२
९. समाप्तीचा आरंभ ३७
१०. राष्ट्रीय सभेच्या शेळ्या ४२
११. हिंदुस्थानचे गारुडी ४५
१२. याचा अर्थ काय ? ४६
१३. क्रांतीचे प्रवाह ४९
१४. अिंग्लंडातील स्त्रिया व हिंदुस्थानातील पुरुष ५३
१५. वर्षारंभ ५९
१६. विमानांची युक्ति ६३
१७. दे. श्यामजी कृष्णवर्मा यांचें औदार्य ६६
१८. स्वदेशाशी कृतघ्नपणा ७०
१९. सावधान ७४
२०. अप्रत्यक्ष प्रतिकाराचा जय व विजय ७८
२१. प्रकाश आणि काळोख ८३
२२. लंडनमधील पहिला शिवोत्सव ८६
२३. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा जंगी उत्सव ८९
२४. पदवीदान समारंभ ९१

२५. बरें झालें !	९२
२६. विद्यार्थ्यांचा तेजोभंग	९४
२७. लोकमान्यांना काळे पाण्याची शिक्षा	९६
२८. लंडन टाअिम्सचा संताप	९८
२९. अिंग्लंडच्या व्यापाराची स्वदेशीमुळे पिछेहाट	१०१
३०. सरदार अजितसिंह व सैय्यद हैदर रेझा यांचें अभिनंदन	१०३
३१. दे. लो. बिपिनचंद्र पाल यांचें आगमन	१०४
३२. राखीबंधन समारंभ	१०५
३३. हिंदी विद्यार्थ्यांसाठी कोंडवाडा	१०७
३४. राष्ट्रीय परिषद	११०
३५. श्रीगुरु गोविंदसिंह महाराजांचा जन्मोत्सव	११३
३६. स्वराज्याच्या जयघोषाचा परिणाम	११५
३७. द्वन्द्वयुद्ध	११८
३८. शिवीगाळीचा परिणाम	१२०
३९. जहालांचा निःपात करा	१२२
४०. सर कर्झन वायलींना ठार मारलें !	१२६
४१. मदनलाल डिंगरा	१२९
४२. सावरकरांवरील 'ग्रेज इन' मधील खटला	१३२
४३. भयंकर नाटकाचा शेवटचा पडदा	१३४
४४. अिंग्रज येथून तेथून सारखेच !	१३८
४५. भरतवाक्य	१४०
४६. दे. सावरकरांचें पत्र	१४३
४७. विजयादशमीचा अुत्सव	१४४

'श्रद्धानंद' पत्रातील निवडक लेख

४८. श्रद्धानंदांची हत्या आणि गांधींचा निःपक्षपाती पक्षपात	१४७

श्रद्धानंद पत्रातील 'गरमागरम चिवडा'

(१) महमंद अल्ली नि हसन निजामी यांची लाथाळी	
(२) पत्वाखाली सत्याग्रहाला आठ महिने झाले	१५२
(३) शहाबादच्या मुसलमानांची हिंदु होण्याची धमकी	१५५
(४) हिंदूंनी मशिदीवरून वाजवावें	१५९
(५) धमकीचीं पत्रें	१६२
(६) अरेरे ! नीलच्या पुतळ्याच्या घोड्याचा पाय तोडला	१६८
	१७३

(७) हाती आलेलीं चार प्रमाणपत्रें १७५
(८) भरतपूरच्या महाराजांस गादीवरून काढावें,
कारण काय तर मशीद पाडली! १७९
(९) शुद्धीच्या नांवाखाली गोमंतकात राजकीय चळवळ
—टाअिम्सचा शोध १८२
(१०) तुर्की मुलींना अमेरिकन शाळेत घालू नका १८६
(११) निजामाची तळी अुचलणारे मुसलमान १८९
(१२) संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य ह्या शब्दांनी चिडलेले
गांधीजी नि अिंग्रज १९५
(१३) हुतात्मा अंदमानात मेले कां नाहीत ? २०१
(१४) राष्ट्रीय सभेपेक्षा सर्वपक्षीय सभा मोठी २०५
(१५) लालाजींवर लाठीमार २०८
(१६) काशीतील दोन संमेलनें—माकडमहासंमेलन
नि भाकडमहासंमेलन २०९
(१७) मुंबईचा दंगा २१३
(१८) नेपाळचा दगडी प्रासाद नि सय्यद अहमदचें काचघर २१८
(१९) हुतात्मा राजपाल आणि महात्मा गांधी २२३
(२०) शंकराचार्य महाराजांची नि जॉन बुल महाराजांची सूचना २३०
(२१) सर टेगार्टच्या दंड्याविरुद्ध चितगांवचा प्रतिदंडा २३४
(२२) ही सुडाची ब्याद किंवा हत्येची ब्याद २३९
(२३) 'थू: तुमच्या जिनगानीवर' २४६

मनुस्मृतीतील महिला

(पूर्वार्ध) लेखांक १ ला २५४
लेखांक २ रा २६२
लेखांक ३ रा २७२
लेखांक ४ था २८१
(अुत्तरार्ध) व्रतविधि आणि विवेक २९५
विटाळाचें वेड ३०८
अज्ञानयुगातून विज्ञानयुगाकडे – किलोस्कर मासिकाचें कार्य ३१९

स्वा. सावरकरांचीं भाषणें

१. मध्यप्रांतीय हिंदु परिषद ३२६
२. बंगाल हिंदु प्रांतीय सभा ३३१

३. बिहार प्रांतीय हिंदु संमेलन	३३३
४. प्रांतिक स्वराज्य कोणी आणलें ?	३४२
५. हिंदुसभेचें राष्ट्रीयत्व	३४५
६. जातिनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा	३४८
७. हिंदुत्वाचा अभिमान	३५०
८. हिंदूंचें संघटन	३५२
९. हिंदूंची अेकजट करा	३५५
१०. हिंदुधर्म व हिंदु संस्कृति	३५७
११. माझें राजकीय धोरण	३६०
१२. टिळक पंथ	३६४
१३. आद्य राष्ट्रध्वज	३७१
१४. हिंदुसभेने काय केलें ?	३७६
१५. निजामाला पेशवाअीची आठवण	३७८
१६. रडगाणीं नव्हेत, रणगाणीं	३८१
१७. टीकाकारांना अुत्तर	३८३
१८. काँग्रेसचा विपर्यस्त दृष्टिकोन	३८७
१९. सन १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध	
(१) पुणें येथील व्याख्यान	३९०
(२) अमरावती येथील व्याख्यान	३९५
(३) स्वातंत्र्यलक्ष्मीचें पुण्यस्मरण – ग्वाल्हेर येथील व्याख्यान	४०१
२०. लाला हरदयाळ	४०४
२१. आधी स्वदेशाचें दास्यमोचन	४११
२२. त्यांचा शत्रु तो आमचा मित्र	४१५
२३. जागतिक राजकारणातील नीति	४२१
२४. परराष्ट्रीय धोरणाचें मर्म	४२५
२५. सशस्त्र व संघटित व्हा	४२८
२६. सैनिक शिक्षण	४३३
२७. मराठी भाषेचें शुद्धीकरण	४३४
२८. बडोदें साहित्य संमेलन	४३६
२९. मध्यप्रांतीय साहित्य संमेलन	४३९
३०. महाराष्ट्र साहित्य संमेलन – अध्यक्षीय भाषण	४४४
३१. युरोपीय महायुद्ध व हिंदुमहासभा	४८८
३२. आत्यंतिक अहिंसा हें पाप होय	४९४
३३. राष्ट्ररक्षणासाठी केली जाणारी हिंसा पुण्यकारक होय	५०२

३४. पाकिस्तानरूपी रोगावर औषधयोजना ५०६
३५. अखंड भारताच्या स्वातंत्र्यार्थ लढण्याचा आम्ही निर्धार केला आहे ५११
३६. सावरकरांचा दक्षिणसंचार ५१७
३७. हिंदुराष्ट्राच्या अुज्ज्वल भवितव्याचें स्फूर्तिदायक गान ५२५
३८. तामिळनाड हिंदु परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें भाषण ५३२
३९. महासभेचा त्याग नि काँग्रेसचा त्याग ५३९
४०. हिंदूंकरिता महासभेने काय केलें ? ५४२
४१. हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व ५४५
४२. भागलपूरचें विमल यश ५४८

प्राचीन यहुदी योषिता

लेखांक १ ला ५५३
लेखांक २ रा ५६३
लेखांक ३ रा १७२

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सहा सोनेरी पानें

सोनेरी पान पहिलें – चंद्रगुप्त चाणक्य ५८३
सोनेरी पान दुसरें – यवनान्तक सम्राट् पुष्यमित्र ६३०
सोनेरी पान तिसरें – शककुशाणांतक विक्रमादित्य ६५२
सोनेरी पान चौथें – हूणांतक यशोधर्मा ६७१
सोनेरी पान पांचवें – महाराष्ट्रीय पराक्रमाचा उच्चांक
– अटकेवर जरिपटका फडकतो

(पूर्वार्ध) प्रकरण

१ लें – प्रास्ताविक ६८४
२ रें – केवळ हिंदुनिंदक अितिहास ६८६
३ रें – हया शतकव्यापी हिंदु-मुस्लिम महासंघर्षातील
मुस्लिम धार्मिक अत्याचाराचें वैशिष्ट्य ७०१
४ थे – सद्गुणविकृति ७१९
५ वें – मुसलमानांच्या हया राक्षसी धार्मिक अत्याचारांवर
रामबाण अुपाय होता अेकच तो म्हणजे
सवाअी राक्षसी प्रत्याचार ! प्रत्याक्रमण ७३७

६ वें – अधूनमधून का होअीना, पण हिंदूंनीही
मुसलमानांवर अुगविलेला धार्मिक आक्रमणाचा सूड ७४५
७ वें – हिंदूप्रपीडक क्रूरकर्मा टिपू सुलतान ७६५
८ वें – पूर्वार्धाचा समारोप १०/०

(अुत्तरार्ध) प्रकरण
१ लें – विषयानुबंध ७९१
२ रें – हिंदुस्थानचे नि अरबांचे पूर्वापार संबंध ७९५
३ रें – इ. सनाच्या बाराव्या शतकापासून ते तेराव्या
शतकाच्या शेवटाशेवटापर्यंतचा कालखंड ८००
४ थें – दक्षिण भारतावर मुसलमानांच्या स्वाऱ्या – चौदाव्या
शतकाच्या आरंभापर्यंतचा नि आरंभीचा काळ ८१३
५ वें – खुश्रूखान आणि देवलदेवी ८२४
६ वें – मुस्लिम साम्राज्यसत्तेच्या अंतिम अितिश्रीची अथश्री ८४८
७ वें – विजयनगरच्या विजयशाली नव्या
स्वतंत्र हिंदुराज्याची स्थापना ८६१
८ वें – अिसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या अंतापर्यंत
आणि नंतर
९ वें – आले, मुसलमानी राजसत्तेचे कर्दनकाळ मराठे आले ९१४
१० वें – अटकेवरच नव्हे तर अटकेपलीकडेही ९४७

सोनेरी पान सहावें
इंग्रजही गेले; हिंदुराष्ट्राचें स्वातंत्र्य सिद्ध झालें. ९५१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८९७२ वि. १७.६.६५...
क्रमांक ... १५८ ... दि: २३.११.८८



स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

मराठा विः ...
अनुक्रम ३८ ...
क्रमांक ...२५५...

समग्र सावरकर वाङ्मय

...ग्रंथालय दान
दि. क. ...
२५१५
...

खंड ४ था

वाङ्मय विभाग

१. सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण व ते कां याचीं कारणें

रत्न म्हटलें की तें टाकाऊ असें नसावयाचेंच; परंतु त्यातल्या त्यात कोहिनूरची दीप्ति जशी काही निराळीच; किंवा देव म्हटले की सर्व वंद्य, पण त्यांतही महादेव जसे सर्व जगास महावंद्य होऊन बसले आहेत, त्याचप्रमाणे ज्यांनी प्रथम मोडकळीस आलेल्या स्वातंत्र्यप्रासादाचा जीर्णोद्धार केला ते बाळाजी विश्वनाथ, ज्यांनी आपल्या बाहुबलाने व सद्गुरुप्रसादाने सत्कीर्तीचे मजले त्या प्रासादावर उठविले ते बाजीराव–चिमणाजी, व ज्यांनी आपल्या पितृपितामहांच्या अचाट धाडसाला व कीर्तीला साजेल अशा रीतीने कैक शत्रूंस दाती तृण धरावयास लावून त्या विस्तीर्ण व भव्य प्रासादाची पूर्णता करून त्यावर हिंदुपदपादशाहीचा देदीप्यमान जरीपटका रोविला ते बाळाजी-बाजीराव व दादा-भाऊ, हे सर्व थोरांतले थोर व वीरांतले वीर होतेच; पण ह्या अमोल वैजयंती-मालिकेत कौस्तुभमणीचे ठायी शोभणाऱ्या राव माधवरावांची थोरवी काही विलक्षणच ! जमीन कितीही जरी सुपीक असली, तरी काही काळाने जशी ती निःसत्त्व होत जाते त्याचप्रमाणे भट-कुलभूमिकेने माधवरावांना जन्म दिल्यापासून ती निःसत्त्व होत गेलीसें दिसतें. कारण त्यांच्या मागून जेवढे पेशवे गादीवर आले, तेवढ्यांत एखादाही माधवरावा-पर्यंतच्या पेशव्यांसमान झाला नाही; मग त्यास कारण भोवतालची परिस्थिति असो, वा अंगची कर्तृत्वहीनता असो. तेव्हा माधवरावांच्या अंगच्या अमोल गुणांची कसोटी पाहण्यास त्यांची, त्यांच्यापूर्वीच्या पेशव्यांशीच तुलना केली पाहिजे व त्यांत जर ते श्रेष्ठ ठरले तर ते सर्व पेशव्यांत थोर होते हेंही कबूल केलें पाहिजे.

करमणूक पत्राने लावलेल्या निबंधस्पर्धेत हा निबंध सावरकरांनी वयाच्या १७ व्या वर्षी लिहिला होता व त्यास त्या स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचें पारितोषिक मिळालें होतें.

आता हेंही खरें आहे की, प्रसंग हा मानवी प्राण्यांच्या गुणसिंधूला भरतें आणणारा चंद्र होय. प्रसंगाशिवाय मनुष्याच्या अंगचे गुण वनात सुकलेल्या गुलाबाच्या पुष्पाप्रमाणे होत. माधवरावांच्या अंगी जे-जे गुण वास करीत असलेले आपणांस दिसतात, ते-ते पूर्वीच्या पेशव्यांचे अंगी नसतील असें नाही; व त्याच कारणांनी त्यांच्या त्या अदृश्य गुणांची आपल्याला कल्पना होणें नाही. माधवराव गादीवर आले त्या वेळची संकटपरंपरा व अत्यंत दुस्तर परिस्थिति, व त्यातून माधवराव निभले हीं गोष्ट, ह्यां दोन गोष्टी ऐकताच त्यांच्या अजव कर्तृत्वशक्तीने मनुष्य थक्क होतो ! ' व्यावर्तितातपरुजः प्रथमाभ्रवृष्ट्या वृक्षस्य वैद्युत इवाग्नि-रिव स्थितोऽयम् ।' याप्रमाणे हिंदुपदपादशाहीची पानपतच्या भयंकर रणकंदनाने दुर्दशा झाली आहे; दोन लाख बांगडी फुटल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक घरातून अबलांच्या हृदयद्रावक किंकाळ्या व वृद्ध मातापितरांचे हंवरडे ऐकू येताहेत; स्वराज्यप्रासादाचे स्तंभ जे सरदार लोक, ते खाल्ल्या घरचे वासे मोजू लागले आहेत; नुकताच अुद्गीरचे लढाअीत वडविलेला निजाम, म्हैसूरचा हैदर, रोहिल-खंडचा नजीव, अयोध्येचा नवाव असे अेक ना अनेक कोल्हे क्षणभर क्षीण झालेल्या मराठी सिंहास मृतप्राय मानून त्याच्या मांसाची वाटणी करण्यास अुद्युक्त झाले आहेत; एका दोन महिन्यांत स्वकुलगृहाचे तीन आधारस्तंभ पडल्याने वरली अिमारत डळमळू लागली आहे; आजपर्यंत कोणत्याही पेशव्याला अननुभूत असा फितूरराहू महाराष्ट्रराज्येंदूला ग्रासू पाहत आहे व होळकर, भोसले, बुंदेले अित्यादि कृतघ्न सरदार ज्याचें अन्न खाल्लें त्याची अशी स्थिति असता खुशाल तमाशा पाहत अुभे आहेत व आपापली तुवडी कशी भरते या आपस्वार्थी चिंतेत निमग्न आहेत – अशा अत्यंत आणीवाणीच्या प्रसंगी १७ वर्षाचें पोर, की ज्या वयात स्वत:चे शरीराचीही शुद्ध नसते, अशा अल्प वयात आमचा राजबिंडा माधव, प्रपितामहांनी संपादन केलेल्या व पितृपितामहांनी अटकेस नेअून भिडविलेल्या जरीपटक्याचा असह्य तोल संभाळण्यास दंड ठोकून अुभा तो काय राहतो व कविकुलमुकुटमणीच्या

' भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं परिरक्षितुं
न खलु वयसा जात्यैवायं स्वकार्यसहोभर: ।'

ह्या वचनास यथार्थ करून अेका दहा वर्षांत झंझावाताप्रमाणे वरील अभ्रपटल पार विध्वंसून टाकून महाराष्ट्रस्वराज्याकाश निर्मल तें काय करतो ! ! खरोखर असल्या प्रसंगी जर थोरले माधवरावांविरहित कोणताही पेशवा गादीवर असता तर त्याला अितक्या वेमालूम रीतीने हीं सर्व संधानें साधणें अशक्य होतें ! कारण माधव-रावांच्या वेळेला अितकी कठीण परिस्थिति आली होती की, ती पूर्वी कोणत्याच पेशव्याच्या वाट्यास आली नव्हती. शिवाय माधवरावांपेक्षा पूर्वीच्या तिघाही पेश-व्यांना पुष्कळ अधिक सवलती होत्या. वाळाजी विश्वनाथाला जसा शाहू महाराजांचा

जबर पाठपुरावा होता तसा माधवरावांना कोणाचाच नव्हता. शिवाय बाळाजी विश्वनाथांपेक्षा राज्यशकटपालन माधवरावांचे वेळेस किती पट तरी दुस्तर झालेलें होतें, हें वरील वर्णनावरून दिसेलच. बाजीरावांशी तुलना करू लागले असताही असें आढळून येअील की, त्यांच्यापेक्षा जास्त जबाबदारीचीं कामें माधवरावांस पार पाडावीं लागलीं. त्यांस अेक तर चिमणाजी अप्पासारखा कोणी जोडीदार सहकारी नव्हता. शिवाय शिंदे-होळकरादि सरदारांचीं प्रस्थें बाजीरावाच्या वेळेस बिलकुलच डोअीजड नव्हती व अितकीं कृतघ्नही बनलीं नव्हतीं. बाजीरावाला मोठा व कायमचा शत्रु म्हटला म्हणजे काय तो अेकटा निजाम; पण माधवरावांच्या वेळेला तो निजाम तर होताच, पण हैदर व अिंग्रज, रोहिले, रजपूत ! सारांश हिंदुस्थानी सर्व राजे पेशवाअीच्या नाशाकरिता ' व्रणार्त पशुच्या शिरावरि वनीं अुभे काकसे ' राहिले होते ! बाजीरावाला कर्जाचा जाच सोसावा लागला तर तो आमच्या माधवरावांनाही सुटला असें नाही ! अशा रीतीने बाजीरावापेक्षा खडतर स्थितीत सापडूनही ज्यांनी खच्ची झालेल्या राज्यवृक्षाचा जोम ' की तोडिला तरु फुटे आणखी भराने ' ह्या न्यायाने वृद्धिगत केला त्यांची थोरवी काय वर्णन करावी ? आपल्या नातवाचें हें अवर्णनीय चातुर्य पाहून त्या पितामहांनी मात्सर्यरहित होअून स्वर्गी आश्चर्याने तोंडात बोटच घातलें असेल ! आता नानासाहेबांसंबंधाने पाहिलें तर त्याना शूर, चतुर व कारस्थानी अशा भाअू-दादांचें साह्य होतें; सर्व सरदार लोक आपापल्या अिमानास जागत होते; 'विभवयशाचे सदैव पोशिंदे ' असे तुकोजी, दत्ताजी व जनकोजी शिंदे व ' रिपुंसि महादर देते ' राजेबहाद्दर व समशेरबहाद्दर असलेला अेकेक वीर हातावर शिर घेअून अुच्चारलेला शब्द सिद्धीस नेण्यास खडे होते व छत्रपतींच्या वेळेपासून मराठ्यांचा वसलेला अद्भुत दरारा कायम होता ! शिवाय घरात फितुराने पोखरण्यास आरंभ केला नव्हता. पण ह्या सवलतींपैकी अेक तरी सवलत रावसाहेबांस मिळाली काय ? नाही, अगदी नाही ! सर्व प्रकार याच्या अगदी उलट ! पण त्या पठ्ठ्याने या संकटास भीक घातली काय ? बिलकुलच नाही. त्यांनी भ्रातृपितृपितृव्यशोकाचे असह्य अुमाळे दाबून टाकून काकांचा शक्य तिथवर बोज ठेवला व तोच त्यांचा क्रम जेव्हा मर्यादातिक्रम करू लागला त्या वेळेस कोणाच्याही आधाराची वा दपटशहाची पर्वा न करता सामदंडादि साधनाने योग्य शासन देअून आधी घरातील कलह मिटविला; ' सख्या विठ्ठलाच्या ' जगप्रसिद्ध शहाणपणाला बिल्ली मांजर बनविलें; राक्षसभुवनच्या लढाअीत स्वतःच्या शौर्याची व कर्तबगारीची कमाल करून निजामाची हड्डी नरम केली; फितुरी रघुजीला यथेच्छ चोप दिला; हैदरला तर वेळोवेळी चीत केलें; रोहिल्यांचा सूड अुगविला; रजपुतांना वठणीवर आणलें व शिवाय दिल्ली बहुतेक हाताखाली घातली ती निराळीच ! सारांश, भयंकर वादळाच्या तडाख्यात गवसलेल्या व समोरील खडकावर आपटून छिन्नविछिन्न

होण्याच्या वेतात आलेल्या तारवास जसा अेखादा कुशल कर्णधार मिळावा व त्याने त्यास अलगत तीरास न्यावें, त्याचप्रमाणे मोठ्या शिताफीने माधवरावाने स्वराज्यास त्या वेळेस जगविलें !

ही नुसती राजकीय गोष्टीत तुलना झाली. पण प्रजावात्सल्य, मनुष्याची पारख, अिभ्रत, शौर्य, कारस्थानीपणा वगैरे जें-जें काही म्हणून राजाला अवश्य पाहिजे तें-तें माधवरावांच्या अंगी अेकवटलें होतें ! माधवरावांच्या अंगी बाळाजी विश्वनाथाप्रमाणे व बाळाजी बाजीरावाप्रमाणे कारस्थानपटुत्व होतें; बाजीरावाप्रमाणे शूरत्व, व धाडस होतें; शिवाय मनुष्याची पारख करण्याच्या कामात तर त्यांची कमाल होती ! तसल्या अल्पवयात जीं-जीं मनुष्यें त्यांनी निवडलीं त्यात अेकही टाकाअू निघाला नाही ! नाना फडणीस, रामशास्त्री, महादजी शिंदे, त्रिंवकराव मामा पेठे अित्यादि त्यांची मंडळी यच्चयावत् आपापल्या सद्गुणतेजोराशीने भारतेतिहासात लखाखत आहेत ! तसेंच प्रजावात्सल्याच्या कामी ते किती दक्ष असत हें, बिगारी धरण्याची त्यांनी बंदी केली ह्या गोष्टीवरूनही दिसून येअील. सारांश, पूर्वीच्या सर्व पेशव्यांचे गुण पुष्कळ पटीने गुणीभूत होअून माधवरावांच्या अंगात अेकवटले होते व म्हणूनच ते म्हणजे श्रीमंत माधवराव बल्लाळ अुर्फ थोरले रावसाहेब पेशवे, हे सर्व पेशव्यांत अति थोर होत. अितकेंच नव्हे तर, जगात आजवर जे कोणी नामांकित राजे होऊन गेले त्यांच्या मालेच्या मध्यभागी आमच्या ह्या भारतीय रत्नाला गुंफण्यास बिलकुल हरकत नाही.

—करमणूक दि. २८-१२-१९००

✦ ✦ ✦

२. अैतिहासिक पुरुषांचे अुत्सव कां करावे ?

विश्व हें अवाढव्य कुटुंब आहे, व परमेश्वर हा ह्या कुटुंबाची कार्यधुरा धारण करणारा अक्षय, अनंत व सर्वशक्तिमान् धुरीण आहे. ह्या कुटुंबात समाविष्ट झालेल्या असंख्य कौटुंबिकांचा योगक्षेम सुरळीत चालावा, त्यांच्याकडून घडलेल्या कृत्यांचें वारीक रीतीने निरीक्षण करून त्यात जीं जीं सत्कृत्यें असतील त्यांस व त्यांच्या

नाना फडणीस यांच्या शतवार्षिक पुण्यतिथीनिमित्त सन १९०० या वर्षी वेळास येथे झालेल्या महोत्सवप्रसंगी 'अैतिहासिक पुरुषांचे अुत्सव कां करावेत ?' या विषयावर निबंधस्पर्धा ठेवण्यात आली होती. त्या स्पर्धेसाठी सुमारे १०० निबंध आले होते त्यांत 'नाशिकचे विनायक दामोदर सावरकर' यांचा हा निबंध सर्वोत्तम ठरला. हा निबंध १९०२ या वर्षी त्यांनी लिहिला.

कत्यांस अुत्तेजन द्यावें व जीं जीं दुष्कृत्यें असतील तीं तीं पुनः न घडतील असा बंदोबस्त करावा, त्या सर्वांनी अेकमेकांशी अीश्वरदत्त नीतीचें अतिक्रमण न करता प्रेमाने वागावें व हें कुटुंब न्याय, पुण्य व आनंद ह्यांचें माहेरघर बनावें याबद्दल तो विश्वसृट् परमेश्वर नेहमी तत्पर झालेला असतो. आपल्या असंख्य कौटुंबिकांपैकी स्वभाव-सादृश्यानुरूप तो निरनिराळे वर्ग करतो व त्या प्रत्येक वर्गास तत्तद्रुचि-सादृश्याच्या अनुरोधाने तो वर्तनाचे अुत्तम नियम घालून देतो. ह्याचे वर्तन-नियमांस धर्मपंथ म्हणतात. ज्याप्रमाणे तो नियमांचें हें वर्गीकरण करतो त्याचप्रमाणे ह्या नियमांस व ज्या वर्गासाठी ते नियम केलेले असतात त्या वर्गास अनुकूल, व अवश्य अशी अेखादी स्वतंत्र खोली तो आपल्या विश्वरूपी विस्तीर्ण गृहात निवडून देतो. आपल्या सामान्य खोलीला पाण्याचे जसे नळ आणलेले असतात त्याप्रमाणे तोही त्या खोलीत मोठमोठ्या नद्या आणून पाण्याची अुत्कृष्ट सोय करतो. त्याच्या आहारास अवश्य तेवढें खाद्य देअील असें धान्याचें कोठारही जमिनीचे रूपाने तेथे तयार केलेलें असतें. दुसऱ्या कोणी ह्या खोलीस अुपरोध करू नये व सीमेसंबंधाने घोटाळा अुडू नये म्हणून ह्या खोल्यांभोवती तो परमेश्वर पर्वतांच्या भिंती घालतो व ह्या सर्व कौटुंबिकांचें दळणवळण कायम राहावें म्हणून त्या पर्वतांच्या भिंतींना खिंडीचे रूपाने मोठमोठीं दारें ठेवतो. अशा या निरनिराळ्या खोल्यांना व्यावहारिक भाषेमध्ये देश अशी संज्ञा आहे. या निसर्गविरचित खोल्यांमध्ये जेथे ज्यांची योजना असेल तेथे व तेवढ्यातच त्यांनी सुखासमाधानाने राहावें अशी त्या परमजनकाची आज्ञा असते. सर्वांचें कल्याण सारखेंच करण्याची त्याची अिच्छा असल्याने वरील निवडणुकीत त्याजकडून यत्किंचितही पक्षपात झालेला नसतो. पण हें त्यांचें निःपक्षपातित्व कित्येक अदूरदर्शी मूर्ख लोकांस न कळून ते महत्त्वाकांक्षेच्या फेऱ्यात सापडतात. त्यांस जी खोली परमेश्वराने दिलेली असते तिने त्यांची तृप्तता होत नाही. त्यांस दुसऱ्यांच्या खोल्या हिसकावून घेण्याची अपहारबुद्धि उत्पन्न होते व बळी तो कान पिळी ह्या न्यायाने हे दुष्टबुद्धि स्वजातीयांवरच हल्ला करून त्यांना आपल्या कब्जात आणतात. मग आपले वर्तननियमच सर्वोत्कृष्ट अशी चुकीची समजूत करून घेअून ते त्या जित लोकांनी पाळावेत असा जुलूम करू लागतात. अशा रीतीने त्या सर्वशक्तिमानाच्या अिच्छेविरुद्ध व मानवी जातीच्या कल्याणा-विरुद्ध जेव्हा जेव्हा कोणच्याही प्रकारचा घोटाळा अुडतो व विश्वकुटुंबाची व्यवस्था डळमळते तेव्हा तेव्हा तो घोटाळा मोडून टाकून न्यायाचा विजय करून 'अधमासी मारोनी सुजना तारावा' तो जगत्पालक, निरनिराळ्या अंशांनी निरनिराळ्या विभूतींचे ठायी दृग्गोचर होतो व त्यांचेकडून तीं तीं अुद्दिष्ट महत्कार्यें घडवून आणतो. ह्याच विभूतींना परमेश्वराचे अंशभूत म्हणून कोणी अवतारी किंवा दैविक पुरुष म्हणतात किंवा त्यांच्या महत्कृत्यांनीच अितिहास अुत्पन्न होत असल्याने कोणी त्यांस अैतिहासिक पुरुष म्हणतात.

असल्या सत्पुरुषांचें आयुष्य हें त्यांच्या स्वतःसाठी नसतें. ते 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' असतात. त्यांच्या ठायी ईश्वरी अंशाचा संभव असल्याने त्यांचें सर्व काही आपणा सामान्य जनांहून अुच्चतर असतें. त्यांचे हात स्वोदरपूर्तीस्तवच नसून अन्यायास रट्टे देअून न्यायास कुरवाळण्यासाठी असतात. त्यांची दृष्टि स्वहित पाहण्यासाठीच नसून सर्व जगाचे कल्याणाकडे तिचा रोख असतो. फार काय पण 'भवो हि लोकाभ्युदयाय तादृशां' अशी त्यांची थोरवी असल्याने त्यांचें वैभव सामान्य मतीला अेकदम ग्रहण करिता येत नाही. त्यांचे पराक्रम अशक्य भासतात व त्यांच्या कृत्यांचीं वर्णनें कादंव-या वाटतात. अुघडच आहे, अेकाद्या कूपदर्दुराला जर 'अगाध-जल-संचारी' देवमाशाचें वर्णन सांगितलें तर त्यास तें शक्य कसें वाटावें! गावाखालील ओहळालाच ज्याने पाहिलें आहे त्यास समुद्राची कल्पना कशी व्हावी व जरी प्रत्यक्ष समुद्रावर नेअून त्यास अुभा केला तरी स्वतःचे दृष्टीवर पूर्ण विश्वास ठेवून आपण पाहत आहोत हें सत्य आहे अशी त्याची खात्री कशी व्हावी? तद्वतच स्वार्थपरायण, महत्त्वाकांक्षी व नीचहेतु अशा आपणा सामान्य जनांस त्या परार्थसाधु, निरपेक्ष व अुच्चहेतु अशा ईश्वरी विभूतींच्या महत्त्वाचें अेकदम मापन करणें हें अगदी असंभवनीय आहे.

परतु अशा थोर विभतींच्या महत्त्वाचें मापन करणें जरी अशक्य असलें तथापि त्यांनी केलेल्या कृत्यांचें महत्त्वमापन करणें सामान्य जनांसही शक्य होतें. श्रीरामचंद्राचे पराक्रम जरी प्रत्यक्ष कोणास करता येणारे नाहीत, तथापि त्यांनी केलेल्या रक्षःक्षयाने वसुंधरा हतभारा झाली हें सर्वांस आकलन करता येतें व आदिकवींची 'सरसा सालंकरा सुपदन्यासा सुवर्णमयमूर्ति' अशी वाणी जरी साध्य होणें अशक्य असलें, तत्रापि त्या वाणीने विरचित झालेल्या रामायणाने जगत्त्रयावर केवढा उपकार केला आहे हें सर्वांस समजतें. सारांश, थोर लोकांचीं कृत्यें करण्यास जरी सामान्यजन असमर्थ असतात तरी त्या कृत्यांची व त्यांच्या सुपरिणामांची थोरवी त्यांस कळते व त्या योगानेच ते लोक त्या ईश्वरी तेजापासून संभूत झालेल्या विभूतीवर फार प्रेम ठेवतात.

ज्यावर आपलें प्रेम असतें, त्यासंबंधी साहजिक रीतीने आपल्या मनात अेक-प्रकारचा पूज्यभाव अुत्पन्न होतो. ज्या मानाने तें प्रेम मोठें त्या मानाने तो पूज्य-भावही मोठा असतो. अवतारी पुरुषांचीं कृत्यें विश्वकल्याणास्तव असल्यामुळे त्यांवर जगताचें विशेष प्रेम बसतें व तें अेकसारखें वृद्धिगत होत असतें. ते प्रथम त्या सत्पुरुषाला अवतारी समजतात, पण पुढे तर प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूपी मानतात. त्यांनी ज्या मानाने जगास अुपकृत केलेलें असेल त्या मानाने त्यांचेवर सामान्य जनसमूह प्रेम व अर्थात् पूज्यभाव ठेवितो. त्या सत्पुरुषांच्या परोपकारी कृत्यांनी त्यांचीं अंतःकरणें आर्द्र होतात. ते त्या थोरांचीं कृत्यें जगाला कशीं फायदेशीर झालीं हें सांगू लागतात. पूज्यभावाने त्यांचीं नामस्मरणें करतात. ज्या ज्या ठिकाणी

व ज्या ज्या रस्त्यांनी ते सत्पुरुष गेलेले असतील तीं तीं सारीं स्थळें क्षेत्रें होतात. ज्या नद्यांचे ते पाणी प्यायले असतील त्या नद्या परम पवित्र मानल्या जातात व ज्या दिवशी त्यांचे जन्म किंवा निधन झालें असेल त्या दिवशी त्यांनी केलेल्या अुपकारी कृत्यांची आठवण होअून जनसमूहाचीं हृदयें प्रेमरसाने भरून येतात ! त्या त्यांच्या अमर्यादित अुपकारांची यत्किंचित् तरी फेड व्हावी म्हणून त्यांचें पूजन केलें जातें, त्यांचें भजन केलें जातें, त्यांचा जयजयकार होतो, व त्यांच्या परम पवित्र कृत्यांचीं गुणवर्णनें गात गात सकल जनसमूह त्यांचे ठायी तल्लीन होअून जातो ! त्या अैतिहासिक सत्पुरुषांचे अुत्सव करू लागतो ! !

अैतिहासिक अुत्सवांचें महत्त्व ध्यानात यावयास व ते कां करावे हें पूर्णपणे जाणण्यास या अुत्सवाची ही अुत्पत्ति ध्यानात ठेवली पाहिजे. आपणांवर अेखाद्याने अुपकार केला असता त्याच्या अुपकाराची फेड यथाशक्ति करावी किंवा निदान त्या त्याच्या अुपकृतीबद्दल त्याचें अखंड आभारी तरी व्हावें हा मनुष्यजातीचा निसर्गजन्य धर्म होय, व अुपकारकर्त्याशी कृतघ्न न होता कृतज्ञ राहावें हें नीति-शास्त्राचें सार होय. याच मानवी धर्माला अनुसरून व याच नीतिशास्त्राच्या अनुरोधाने थोर सत्पुरुषांचे अुत्सव करण्याची ही चाल पाडली आहे, किंवा पाडली आहे म्हणण्यापेक्षा पडली आहे म्हणणेंच ज्यास्त योग्य होय ! कारण मानवी धर्माला धरून ज्या चाली असतात त्या पाडाव्या लागत नाहीत. त्या चालींची अुत्पत्तिही मानवी धर्माप्रमाणेच निसर्गजन्यच असते. अेखाद्याने आपल्यावर अुपकार केला म्हणजे त्याचेबद्दल कृतज्ञता जशी आपोआपच जागृत होते व तिची जागृति व्हावी म्हणून जशीं व्याख्यानें झोडावीं लागत नाहीत तद्वतच ज्यांनी आर्यधर्मास ग्लानि आली असताना नास्तिकांचे धांगडधिंग्यास आळा घालून आपल्या सर्वसमर्थ वाणीने पर-पक्षीयांस दीनवाणी केलें व धर्माचें संस्थापन केलें त्या शंकराचार्यांचें, ज्यांनी सर्व देश पारतंत्र्याच्या वणव्यात होरपळत –नव्हे– जळत असता आपल्या समशेरीच्या पाण्याने त्या वणव्यास विझवून वर स्वातंत्र्यामृताची वृष्टि करविली त्या छत्रपतींचे, ज्यांनी महाप्रयासाने अुभारलेला स्वातंत्र्यप्रासाद आमूलाग्र डळमळत असताना केवळ आपल्याच बुद्धीच्या व लेखणीच्या टोकावर त्यास थोपवून धरून गोकुळात श्रीकृष्णाने अेक्या करांगुलीवर गोवर्धन कसा धारण केला हें सर्व जगाच्या प्रत्ययाला आणून दिलें त्या फडणिसांचे व तत्सदृश अीश्वरी-अंशभूत थोर सत्पुरुषांचे अुत्सव करण्याची चाल ही पाडावयास नको आहे ! त्यांचे अुत्सव हे लोकांच्या मनोमंदि-रात अक्षय चाललेले असतात, सदसद्विवेक बुद्धीचीं त्यांच्या महत्त्वकथनाचीं व्याख्यानें तेथे अखंड सुरू असतात ! कृतज्ञता आपल्या हाती नीरांजन घेअून त्यांच्या अगणित सत्कृत्यांवर ' सूर्यबिंब लाजेल जयाला ' असा प्रकाश सतत पाडीत असते ! त्यांचे हे अुत्सव स्वयंभू असतात. अितकेंच नव्हे तर अेकदा का ते सुरू झाले म्हणजे मग ते कोणाच्यानेही बंद करवत नाहीत. जेव्हा सद्गुणांची किंमत मनुष्यजातीस कळू

लागली तेव्हापासून हे अुत्सव सुरू झालेले आहेत. जोपर्यंत सद्गुणांची ही किंमत मनुष्यजाति विसरणार नाही तोपर्यंत हे अुत्सव अबाधित व अखंड चालावयाचे आहेत. थोडक्यात म्हणावयाचें म्हणजे जगाच्या अुत्पत्तीवरोवर हे अुत्पन्न झाले आहेत व जगाच्या अंतापर्यंत हे अनंत राहणार आहेत.

सारांश, हे अैतिहासिक अुत्सव अनादिकालापासून चालत आलेले असून त्यांची अुत्पत्ति ही मानवी स्वभावास अनुसरून असणारी जी कृतज्ञता-वुद्धि तिच्यापासून झालेली आहे. मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच असल्याने कृतज्ञतावुद्धीपासून अुद्भूत झालेली ही अैतिहासिक अुत्सव करण्याची चाल ह्या जगतीतलावरील झाडून साऱ्या राष्ट्रांत थोडयावहुत अंशाने प्रचलित असतेच. ते करण्याच्या पद्धतीत कालस्थित्यनुरूप भेद असेल व होअील, परंतु मूलतत्त्वामध्ये कोठेही भेद नाही. श्रीरामचंद्राने दुष्ट राक्षसांचा संहार करून यज्ञयागादिकांस निर्विघ्नता, ऋषिजनांस अभयता व सर्व धरित्रीस निर्भयता दिली म्हणून कृतज्ञ होअून आम्ही रामजयंतीचा अुत्सव करतो. तर प्रत्यक्ष सुळावरूनही तारण्यास समर्थ असा अुपदेश केला म्हणून कृतज्ञ होअून ख्रिस्ती लोक ख्रिस्तजयंतीचा अुत्सव करितात. पारतंत्र्याने वद्धीभूत झालेली आर्यभूमि सुलतानी तरवारीच्या धारेवर त्या सुलतानाच्या मानेच्या तालाबरहुकूम नाचत असताना व क्षणोक्षणीं पाय चुकून किंवा जोराने पडून तिच्या सुरम्य शरीराचे तुकडे तुकडे होतात कीं काय, अशी भीति पडली असताना आपल्या महाराष्ट्रीय भाल्याने त्या तरवारीला अचूक अुडवून त्या आर्यभूमीला अलगत मुक्त करणाऱ्या छत्रपतींचे, त्यांच्या या अनन्य-सामान्य अुपकृतीने कृतज्ञ होअून आम्ही अुत्सव करतो, तर रावर्ट ब्रूसचे स्कॉटलंडातील लोक कृतज्ञता-वुद्धिपूर्वक अुत्सव करतात !! मुसलमान लोक पैगंवराचा अुत्सव करतात, ग्रीसचे लोक लिऑनिडॉसचा करतात, अमेरिकन लोक वॉशिंग्टनचा करतात, व अिटलीचे लोक ग्यारिबॉल्डीचा करतात. पहिले आपणांस मर्दानि दिलें म्हणून, दुसरे आपल्यासाठी प्राण दिला म्हणून व बाकीचे आपणांस पारतंत्र्यशृंखलेतून मुक्त केलें म्हणून त्या त्या व्यक्तीबद्दल कृतज्ञ होअून त्यांचे अुत्सव करू लागतात ! आम्ही अुत्सवात कथा करू तर अिंग्रज लोक व्याख्यानें देतील व मुसलमान भपकेदार पोशाख व दिखाअू रोषणाअी करून त्यांचे अुत्सव साजरे करतील. परंतु त्या साऱ्या अुत्सवांची कृतज्ञता हीच जननी होय ! रूपें निरनिराळीं असतील, पण हेतु मात्र अेकच.

परंतु हेतूंची सिद्धता ही पुष्कळ अंशीं रूपावरच अवलंबून असते. कालस्थिती- व परिस्थितीप्रमाणे ही रूपें वदललींच पाहिजेत. लोकाभिरुचि ही जशी पालटेल तशी, हेतूच्या सिद्धतेला जास्त वळकटी ज्या ज्या दिशेने येण्याचा संभव असेल तशी तशी व त्या त्या दिशेने ह्या रूपांमध्ये अदलाबदल केली पाहिजे. असलीं अवश्य रूपांतरें होत असताना सामान्य जनसमूह अेकदम थोडासा चकित झाल्यास

नवल नाही. कथेची संस्कृत पद्धति किंचित् ढिली होअून जेव्हा भजनपद्धति सुरू झाली व पायांत घुंगरें घालून व अेका हातांत वीणा व अेकात चिपळ्या घेअून 'तुझे नामीं प्रेम देअी अखंडीत । नेणें तप व्रत दान काही ॥' असा करुणारव फोडीत तुकोबा पंढरीरायांचे समोर 'ब्रह्मानंदी लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ॥' अशा स्थितीमध्ये जेव्हा प्रथम दिसू लागले तेव्हा त्या त्यांच्या करुण-रवावरोबर जरी लोकांचीं अंत:करणें त्यांस न जुमानता प्रेमरसाने विरघळत जात व त्यांचीं नयनें त्या 'वैराग्यें डोलविला, माथा जेणें मुनींद्र सनकाचा।' अशा भगवद्भक्तास पाहून भक्तिरसाच्या अश्रूंनी भरून येत, तथापि फक्त परंपरागत संस्काराने त्या पद्धतीस अुघड रीतीने तत्कालीन समाजास अनुमोदन देता येअीना! अितकें लांब कशाला ! श्रीगणपत्युत्सवाला राष्ट्रीय वळण देअून त्यात जेव्हा मेळ्यांची नवीन पद्धति सुरू केली तेव्हा त्या पद्धतीवर प्रतिपक्षाचा कोण मारा झाला हें अजून प्रत्येकाला स्मरत असेल ! पण मजा काय की, ते प्रतिपक्षी तोंडाने मेळ्यांस शिव्या देत असतानाच त्यात नाचावयास प्रवृत्त झाले व ही पद्धति हानि-कारक आहे हें सिद्ध करण्यासाठी त्याच्या बाजूचे म्हणून पुरावे मांडीत असतानाच त्या पद्धतीची अुपयुक्तता सिद्ध करू लागले !! दुष्यंताने शापमूढ स्थितीमध्ये शकुंतलेचें रमणीय रूप पाहताच त्याची जी अवस्था झाली तीच अवस्था मनोहर पण नवीन रूपें पाहून सामान्य समाजाची होते व 'न च खलु परिभोक्तुं नापि शक्नोमि हातुम् ' अशा विलक्षण बुचकळ्यात पडून तो समाज भांबावून जातो !!

परंतु अशा भांबावून गेलेल्या समाजास त्याचा भास दूर करून खरा प्रकार खऱ्या रीतीने कळविणें हें समाजधुरीणांचें आद्यकर्तव्य होय. समाजास आजपर्यंतचे पद्धतीप्रमाणे पुराण, कथा, भजन वगैरे प्रकारच अुत्सवात असतात असें वाटणें साहजिक आहे व जेव्हा पुराणांचे अैवजी कोणी व्याख्यान देअू लागेल तेव्हा तो अेक प्रकारचा विलक्षणपणा होतो आहे असें वाटून त्यास चुकल्यासारखें होअील. फार काय, पण समाजाच्या ओळखीचें 'दैविक पुरुष ' हें नांव काढून त्याच्या बदला 'अैतिहासिक पुरुष ' हें नांव घातलें असताही समाजास तें नवीन वाटेल. पण त्यास नीट समजाविलें पाहिजे की, अैतिहासिक पुरुषांचे अुत्सव हे काही नवीन नाहीत. ज्यांना तुम्ही दैविक म्हणत होतेत त्यांनाच आम्ही अैतिहासिक हें जास्त व्यापक नांव देतो. हें आपलेंच आहे, हें परकीयांपासून अुसनवार घेतलेलें नाही. श्रीरामाचे अुत्सव काय आपण आज करू लागलो आहोत ? श्रीकृष्णाचे अुत्सव काय आजच सुरू झाले आहेत? आळंदीची यात्रा काय यंदाच भरू लागली आहे ? व जर या सर्व गोष्टी पूर्वापार चालत आल्या आहेत तर मग अैतिहासिक पुरुषांचे अुत्सवांची चाल नवीन कशाने झाली ? का हे सर्व प्रकार अैतिहासिकच नव्हत ? श्रीरामाने रावणाचा नाश करून कित्येक राष्ट्रें स्वतंत्र केलीं; श्रीकृष्णाने सत्पक्ष स्वीकारून पानिपतच्या रणभूमीवर अन्यायी व अपहारी कौरवांचा नाश केला व

ज्ञानरायांनी ' श्रीमद्भगवद्गीता व्याख्या केली जनांसि ताराया ।' ह्या गोष्टी ऐतिहासिक नाहीत काय ? अितिहास ह्याच गोष्टींनी झाला नाही काय ? व जर यांनी झाला नाही तर झाला तरी कशांनी ? व्यर्थ नामभेदांनी फसण्याचें कारण नाही दैविक पुरुषांचे अुत्सव हे निराळे नसून ते ऐतिहासिक पुरुषांच्या अुत्सवांतच अंतर्भूत आहेत. व ज्या अर्थी दैविक अुत्सव पूर्वीचे आहेत हें तुम्ही कबूल करता त्या अर्थी ऐतिहासिक अुत्सवांची चालही पूर्वीचीच आहे. श्रीरामाने आपणांवर अुपकार केला. त्याशी आम्ही कृतज्ञ झालो व त्याचे अुत्सव करू लागलो. श्रीशिव-राजानेही आपणांवर अुपकार केले आहेत. अर्थात् आपण त्याशी कृतज्ञ झालें पाहिजे व त्यांचे अुत्सव केले पाहिजेत. कोणी म्हणतात की, अशा दृष्टीने पाहिलें तर आपणां हिंदुस्थानवासीयांस शेकडो अुत्सव दररोज करावे लागतील. होय, करावे लागतील. पण त्यात बिघडलें काय ? असले अुत्सव जितके करावे लागतील तितके हवेच आहेत. असले अुत्सव करावे लागणें ही सामान्य गोष्ट नाही; ही असामान्य गोष्ट आहे. हें भाग्य लाभण्यास पदरी फार मोठी पुण्याअी लागते. हे अुत्सव म्हणजे कोणाचे अुत्सव ? हे ऐतिहासिक सत्पुरुषांचे अुत्सव होत; व यांची संख्या आमचे राष्ट्रात जास्त आहे म्हणजे काय ? तर अितक्या सत्पुरुषांनी आमचें राष्ट्र युक्त आहे असेंच म्हणणें होय. अितक्या रत्नांनी ही आमची राष्ट्रदेवी भूषित आहे. तिच्या कंठामध्ये अितक्या कोहिनुरांची माळ आहे ही यथाथ गर्वोक्ति करण्याचें नशिबी असणें म्हणजेच सर्व पुण्याचा अुत्कर्ष होय !!! आज काय शिवाजीचा अुत्सव आहे, अुद्या गुरु नानकाचा आहे, परवा नाना फडणिसाचा आहे, असें होता होता ज्या राष्ट्रात वर्षातील ३६५ दिवस सारखे सत्पुरुष-महोत्सव सुरू राहून शिवाय बाकी अुरतातच, जेथे वर्षातील दिवस कमी पडतात पण सत्पुरुषांची संख्या कमी पडत नाही त्या राष्ट्राचे भाग्याशी कशाची तुलना करावी ? क्षीरसागर, मेरुपर्वत व पंराडाअिज् हे सर्व अेकत्र झाले तरी त्या राष्ट्राच्या भाग्याचें पारडें त्यास हार जाणार नाही ! ऐतिहासिक अुत्सवात फार श्रम व फार खर्च होतो हें म्हणणाऱ्या मूर्ख व अन्ध लोकांनी ही गोष्ट लक्षात ठेवावी की, गोठा मोठा करावा लागेल म्हणून कोणी कामधेनूना का हुसकून दिलें आहे ? नवी पेटी करावी लागेल म्हणून कोणी रत्नांना का झुगारून दिलें आहे ? श्रम व खर्च होतो म्हणून कोणी ऐतिहासिक अुत्सव का बंद केले आहेत ? असल्या अुत्सवांस ते दररोज कितीही करावे लागले तरी कोण कंटाळणार आहे ? हे अुत्सव म्हणजे मिल्टनने म्हटल्याप्रमाणे–

" Not harsh and crabbed as dull fools suppose.
But musical as is Appollo's lute.
And a perpetual feast of nectared sweet
When no crude surfeit reigns ! ! !

तेव्हा ऐतिहासिक अुत्सव परकीयांपासून घेतले आहेत म्हणून किंवा त्या अुत्सवांस आजचें रूप मिळालें आहे म्हणून ते अुत्सवच नकोत असें म्हणणाऱ्या आक्षेपकांचा विचार झाला. रूपांसंबंधी जे प्रश्न आहेत त्यांचा अेकाच प्रकारचा निकाल कधी लागणार नाही. त्यास अुत्तर अितकेंच की ज्या पक्षास जें रूप संमत असेल त्या रूपात त्यांनी तो अुत्सव करावा. अखेर सद्रूपाचाच जय होअून सर्वजण त्याचेंच रूप स्वीकारतील; पण रूपाशिवाय आणखीही असा अेक ऐतिहासिक अुत्सवापासून तोटा दाखविण्यात येतो की, केव्हा केव्हा त्या अुत्सवापासून अेकीचा भंग होण्याचा संभव असतो; श्रीशिवाजीच्या अुत्सवापासून मुसलमानांना चीड येअील व ते आपला पुरातन द्वेष पुन्हा माजवितील. पण असें होअील हें जरी गृहीत घेतलें तरी यात शिवोत्सवाचा तो दोष काय ? भारतधर्ममहापरिषद भरविल्याने व तीत श्रीमच्छंकराचार्याचा सन्मान केल्याने सर्व वुद्धधर्मीयांशी वैर होअून मंडनमिश्राच्या वंशजास वाअीट वाटेल म्हणून ती धर्मपरिषद भरवू नये असें म्हणणें किंवा ऑस्ट्रियाला, आपल्या तोंडातून अिटली कसा हिसकावून घेतला याची आठवण होअून तो धायधाय रडू लागेल म्हणून ग्यारिबॉल्डीचा अुत्सव अिटली देशाने करू नये असें बरळणें हें जितकें वेडेपणाचें व अविचाराचें होअील तितकेंच किंबहुना त्याहून अधिक असंमजसपणाचें शिवोत्सवाने मुसलमान नाखूष होतात सबब तो करू नये असें म्हणणें होणारें आहे. जर मुसलमान नाखूषच होत असतील तर तो मुसलमानांचा अदूरदर्शीपणा होय. वामनपंडितांनी म्हटलें आहे, ' देखोनी परिपूर्ण सुधाकर सर्व सुखी परि चोर रडे ।' शिवाय हेंही ध्यानात ठेविलें पाहिजे की, जे समंजस व सुशिक्षित मुसलमान आहेत ते वरील मूर्खपणास आपलें बिलकुल अनुमोदन देत नाहीत. साराश काय ? ऐतिहासिक अुत्सवांपासून हा तोटा होतो हें म्हणणें फोल आहे. खर्च जास्त लागत असेल तर तो कमी करा, समाज प्रथम दचकत असेल तर त्यास नोट समज द्या, पण ऐतिहासिक सत्पुरुषांचे अुत्सव बंद करू नका. कृतज्ञताबुद्धीने मनात अुद्भवणारा जो पूज्यभाव तोच ह्या अुत्सव-पद्धतीत फलद्रूप झालेला असतो व अेवढ्याचसाठी ते अुत्सव न करणें म्हणजे कृतज्ञताबुद्धीचा खून करणें होय.

परंतु कृतज्ञतेसाठी व फक्त कृतज्ञतेसाठीच हे अुत्सव करावयाचे असें मात्र नाही. ज्याप्रमाणे सूर्य अमक्याचसाठी प्रकाशतो हें सांगता येणार नाही तद्वतच हे अुत्सव अमक्याच अेका फायद्यासाठी केले पाहिजेत हें विशेष रीतीने सांगता येणार नाही. सूर्य जगताला प्रकाश देण्यास्तव प्रकाशतो, किंवा प्राणिमात्राला आवश्यक अशी अुष्णता देण्यास्तव प्रकाशतो, किंवा पंकजश्रीला हसविण्यासाठी प्रकाशतो, किंवा समुद्राचें खारें पाणी नेअून जगत्कल्याणास्तव तें गोडें करून मेघांकरवी परत धाडण्यासाठी प्रकाशतो का त्या मेघांनी ' धाराशरशतविकीर्णा ' केलेली वसुमती

पुनः 'हरिततृणसस्यां कुर्वती' करण्यासाठी प्रकाशतो !!! तद्वतच हे ऐतिहासिक अुत्सव कशासाठी करावयाचे ? का कृतज्ञताबुद्धिस्तव करावयाचे, कां सत्पुरुषांचीं स्मारकें म्हणून करावयाचे; का नवीन पिढीला सद्गुणांचे हे अुत्तम कित्ते होतील म्हणून करावयाचे, का दुष्कृत्यांचा अपजय कसा होतो व सत्कृत्यांचा जय कसा होतो हें कळण्यासाठी करावयाचे, कां करावयाचे तरी कशासाठी ? याला अेकच अुत्तर देता येअील व तें हेंच की, या कार्यांपैकी अमकें अेकच कार्य करण्यासाठी ते करावयाचे नसून हीं सर्वच कार्यें करण्यासाठी ते करावयाचे आहेत. हा सूर्य अमक्याच कार्यासाठी प्रकाशत नसून तो या सर्वच कार्यांसाठी प्रकाशतो.

हीं सर्व कार्यें अितकीं महत्त्वाचीं आहेत की, त्यांपैकी प्रत्येक कार्यासाठी अनेक अडचणी सोसूनही आम्ही हे अुत्सव करावयास पाहिजे आहेत. ह्या ऐतिहासिक अुत्सवांनी जगाचें स्वरूप कैक वेळा बदललें आहे ! अितिहासाचीं पुस्तकें हीं फक्त सत्पुरुषांच्या कुडीची कल्पना देतात, पण हे ऐतिहासिक अुत्सव ह्या कुडीत प्राणप्रतिष्ठा करून ह्या सत्पुरुषांस आपणांपुढे मूर्तिमंत अुभे करतात ! त्यांचे सद्गुण आपणाला दृश्य रीतीने दिसू लागतात व प्रत्यक्ष त्यांच्या दर्शनापासून अुत्पन्न होणाऱ्या स्फूर्तीचा प्रेक्षकांच्या शरीरात संचार होअू लागतो ! नवीन मुलगा अितिहास वाचू लागला असता शिवभूपाच्या वर्णनाने त्याचें अंतःकरण जितकें वेधलें जाअील त्याच्या शतपट रीतीने तो शिवोत्सवात दंग झाला असताना वेधलें जाअील. सत्पुरुषांचे अितिहास हे सद्गुणांचे ठसे होत. पण ते ठसे नूतन पिढीच्या मनःपटावर बरोबर रीतीने अुमटविणारा ऐतिहासिक अुत्सव हा कुशल छापणारा आहे. 'अुत्सवप्रियाः खलु मानवाः' हा मानव जातीचा निसर्ग आहे व मनोवृत्ति ह्या निसर्गजन्य आहेत, म्हणून त्या मनोवृत्तींना अुद्दीपित करून जें सुशिक्षण या अुत्सवांनी दिलें जातें तें अितर साधनांनी अितक्या सोप्या व अितक्या पूर्ण रीतीने कधीही देता येणार नाही ! ऐतिहासिक अुत्सवांत प्रेक्षकांना तुम्ही या विभूतीप्रमाणे वागा म्हणून सांगावें लागत नाही. त्या विभूतींचें तसल्या ठिकाणी दर्शन होण्याचा अवकाश की प्रत्येक अंतःकरणात दैविक शक्ति अुत्पन्न झालीच पाहिजे व त्या विभूतीच्या वैभवाचा परिणाम त्या व्यक्तीच्या हृदयावर घडलाच पाहिजे ! त्यातही आपणा मूर्तिपूजक लोकांना तर याचा अनुभव पदोपदी घेता येणारा आहे ! व जो अनुभव व परिणाम व्यक्तीच्या हृदयावर घडतो तोच त्या व्यक्तींनी संभून झालेल्या समाजावर घडलाच पाहिजे व म्हणूनच कार्लाअील म्हणतो,

'There is no better means than this identical hero-worship to secure the existence and ensure the prosperity of a community.'

तेव्हा ऐतिहासिक सत्पुरुषांचे अुत्सव कां करावे ? तर निसर्गजन्य कृतज्ञतेसाठी ते करावेत ! त्या सत्पुरुषांनी जगावर जे अनंत अुपकार केले आहेत त्यांचें

स्मारक म्हणून करावेत ! ते अनादिसिद्ध परंपरेने चालत आलेले आहेत म्हणून करावेत ! ते अुपदेशामृताचा वर्षाव करणारे मेघ आहेत; तीं सद्‌गुणांचीं मूर्तिमंत स्वरूपें आहेत; मनोवृत्तींना अुद्दीपन देणारीं तीं रसायनें आहेत; तरुणांना सच्छिक्षण देणारे ते शिक्षक आहेत व सत्पुरुषांच्या कृत्यांचे ते जिवंत अितिहास आहेत; असे ते आहेत म्हणून ते करावेत. त्यांपासून अितके फायदे आहेत म्हणून ते करावेत. त्यापासून खरोखर तोटे मुळीच नाहीत म्हणून ते करावेत !!! पण आम्ही हिंदु लोकांनी ते विशेषत: सांप्रतच्या स्वाभिमान-व कर्तव्य-शून्यतेमुळे प्राप्त झालेली अवनत स्थिति जाअून अुन्नतावस्था प्राप्त होण्यासाठी अवश्यमेव करावेत. कारण राष्ट्रोन्नतीला हा अेकच सोपा जिना आहे !!!

✦ ✦ ✦

३. वन्दे मातरम्

भरतखंडाला स्वदेश म्हणण्याचें भाग्य परमेश्वराने कोणत्या लोकांच्या ललाटांना अलंकृत करण्यासाठी राखून ठेवलें आहे ? भरतभूमि मातृस्थानी मानण्याच्या पवित्र अधिकाराचा अभिषेक जगच्चालकाने कोणत्या लोकांवर केलेला आहे ? व ह्या भक्तीच्या सुधाधवल स्तन्याचा दिव्य आस्वाद घेअून व तिला ' हे मातर् ' ' हे आअी ' असें म्हणून कोणाच्या जिव्हा धन्य झाल्या आहेत ? ती धन्यता केवळ आमच्या जिव्हांना लाधली आहे ! भरतभूमीला मातृस्थानी मानण्याच्या अधिकाराचा अभिषेक अेकट्या आम्हा भारतीयांवरच जगच्चालकाने केला आहे ! व भरतखंडाला ' स्वदेश ' म्हणण्याच्या महद्‌भाग्याने आम्हां भारतीयांविना जगावरील कोणच्याही लोकांचें ललाट अलंकृत झालेलें नाही ! आम्ही सर्व हिंदी बांधव हे हिंदमातेचीं खरीं लेकरें आहोत. हिंदमाता ही आमची जन्मदात्री आहे. हिंदमाता ही आमची परिपालयित्री आहे. तिच्या दुधावर आम्ही वाढलो आहोत. तिच्या दुधावर आमचे पूर्वज वाढले, तिच्या दुधावरच आमचे वंशज वाढणार आहेत. ही आमची भारतभूमि वात्सल्याची पुतळी आहे. ही आमची भारतभूमि मूर्तिमंत प्रेमलता आहे ! ती वेदांत गाअिल्याप्रमाणे 'पुराणी देवी युवतिः पुरंध्री ' आहे. ती अनुभवाने वृद्ध आहे. ती सौंदर्याने तरुण आहे. आम्हां तीस कोटी लोकांवर तिची समान ममता आहे. तीस कोटी कंठांतील ' वंदे मातरम् 'चा मंजुळ कलरव अैकून तिला प्रेमाचें भरतें येतें ! अशा प्रेममयीला ' आअी ' म्हणण्याचें महद् भाग्य जिच्या प्रसादानें आम्हांस लाभलें आहे त्या

पारलौकिक चिच्छक्तीला व आमच्या ह्या ऐहिक परमेश्वरी आर्यभूमातेला आमचा सदैव प्रणाम असो !

आर्य भूमातेच्या भाग्याची गणना कोण करू शकणार आहे ? ' असितगिरि-समं स्यात् कज्जलं सिंधुपात्रे सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी । लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालम् ' तथापि हे आर्यमाते, तुझ्या गुणांचा पार लागणार नाही ! सर्व जगतीतलावर पसरलेल्या हजारो भूभागांमध्ये आर्यभूसारखी रमणीय भूमि दुसरी कोणची आहे, हें पाहण्यासाठी हिमालय पर्वत अुठून अुभा राहू लागला. त्याने आपलें डोकें सर्व विश्वातील भूप्रदेश दिसतील अितकें अुंच केलें, तरी त्याला अितकी रमणीयता अन्यत्र कोठेच आढळेना. भूलोकावर जिच्याअितकी रमणीयता नाही, तिच्यासमान स्वर्गलोकात तरी काही आहे कीं नाही म्हणून तो अुत्साह पावलेला हिमालय, स्वर्गाचीं कपाटें अुघडून आत घुसला. परंतु तेथे, हे आर्यभू, तुझ्याअितकी मंगलमय वस्तु सांपडण्याचे अैवजी काही निराळाच प्रकार झाला ! या हिमालयाचीं तीं हिमधवल सौध शिखरें पाहून अिंद्राच्या अमरावतीतील अप्सरांची अेकच त्रेधा अुडाली ! त्या सर्वजणी हिमालयाच्या गळ्यात मिठ्या मारू लागल्या. अमरावतीचा त्याग करून तेव्हापासून त्या हिमालयावर स्वच्छंदाने विहार करीत असतात. ही वातमी पोचताच आश्चर्योत्सुक गिरिजेने, गिरिजारमणासह आपलें बिऱ्हाड त्या प्रासादसुंदर हिमनगरावरील कैलासात नेअून ठेवलें! श्रीशंकराला जो आपल्या अस्तित्वाने पूत करावासा वाटला, त्या हिमालयाने हे आर्यभूमि तू युक्त आहेस ! ' यं सर्वशैलाः परिकल्प्य वत्सं, मेरौ स्थिते दोग्धरि दोहदक्षे ।। भास्वन्ति रत्नानि महौषधींश्च पृथूपदिष्टां दुदुहुर्धरित्रीम् ' अशा त्या हिमालयाने, हे आर्य-भूमि, तू संपन्न आहेस ! सूर्याशी प्रतिरोध करू अिच्छिणाऱ्या महानुभाव विंध्याद्रीने तू संपन्न आहेस ! रायगड व सिंहगड ह्या रत्नांनी ज्याचा कळस शोभिवंत झालेला आहे, त्या स्वतंत्रतेच्या देव्हाऱ्याने–सह्याद्रीने तू संपन्न आहेस ! हिमालय, विंध्याद्रि व सह्याद्रि ह्या प्रमुख नगवरांनी अधिष्ठित असलेल्या भूमातेला आमचा प्रणाम असो ! मनुष्यापेक्षा देव श्रेष्ठ, देवांमध्ये महादेव श्रेष्ठ. परंतु त्या महादेवाचे मस्तकावर आरूढ झालेल्या भागीरथीने, हे आर्यभू, तुला पुनीत केलेलें आहे. सिंधु, शतद्रू, ब्रह्मपुत्रा व यमुना ह्यांच्या रूपाने, हे भूमाते तू तुझ्या लाडक्या लेकरांसाठी स्वर्गीय पयःसुधेचें अखंडौघ सोडले आहेस. सिंधु व ब्रह्मपुत्रा, गंगा नि यमुना, नर्मदा नि गोदा, कृष्णा नि कावेरी ह्या तरंगिणींनी संपन्न असलेल्या भूमातेला आमचा नमस्कार असो ! ज्यावरील प्रफुल्ल कलांविना लक्ष्मीला दुसरें निवासस्थान प्रिय नाही, जेथील हंस हे कनकारविंदें जेवितात व ' मृदुलनालमृणालकंदां'चा फराळ करतात त्या मानससरोवरांनी, हे आर्यभूमि, तू विभूषिता झाली आहेस ! अिदं तीर्थसमं सौम्यं सुतलं सूक्ष्मवालुकम् । रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ' अशा मानसप्रमुख सरोवरांनी मनोरम झालेल्या भूमातेला आमचें वंदन असो ! सर्व जगाचें जहाज

केलें असता तें गच्च भरून जाअील अितकें सोनें व अितकीं रत्नें, हे आर्यमाते, तू शेकडो भुयारांतून आमच्यासाठी जतन करून ठेविलीं आहेस. त्यावाचून कोहिनुरांनी भरलेली पेटी गोवळकोंड्याकडे आहे ती वेगळीच ! अपरिमित सुवर्णाने सुशोभित असलेल्या 'सुवर्णभू'ला व अनंत कोहिनुरांनी तेजोमय झालेल्या आर्यवसुंधरेला आमची प्रणति असो !

विश्वामित्राला मोह पाडण्यास्तव मेनकेने ज्याचे साह्याची याचना करावी असा तो वसंत ऋतु; वसुमतीला हिरवा शालु नेसविणारा तो वर्षाऋतु, ह्या ऋतुप्रमुखांनी जी ऋतुमती आहे, त्या आर्यभूला आमचें वंदन असो ! पार्वतीच्या स्तनांग्रमाणे मधुर आम्रफलांच्या व अप्सरांच्या अधरोष्ठाप्रमाणे असणाऱ्या सरसमृदुल द्राक्षांच्या लता ह्या बालकांच्या चिमुकल्या मुखात स्तन पोचावे म्हणून वाकलेल्या युवतीप्रमाणे ज्या भूमीमध्ये किंचिन्मात्र लवलेल्या आहेत, त्या आर्यभूमातेला आमचें वंदन असो !

ज्यांच्या कोमल कंठातून आपलें नांव अुंच व मधुर लकेऱ्यात गाअिलें जावें म्हणून श्रीरामचंद्रांनी यशःसंपादन केलें अशा शुककोकिलांही ज्या भूमीमधील कल्पवृक्ष सप्तसुरांना आलापीत आहेत; त्या विविधविहंगमा भारतीला आमचें वंदन असो ! जिला पाहून ब्रह्मदेवाने रंभेचें नाक कसें असावें हें ठरविलें त्या चंपककलिकेने व ज्याच्या प्रतिबिंबाने लक्ष्मीचे गालांवर आपांडुर लाली आली आहे त्या गुलाब, मालतीने नि जाअीजुअीने जी सुगंधित झाली आहे, त्या विकसितकुसुमा भूमातेला आमचें वंदन असो. ह्या भारतीयांच्या विस्तीर्ण राष्ट्राला अत्यंत अुच्च प्रकारच्या जीवनशक्ति जिच्या कृपेने आज सहस्रावधि वर्षें मिळत आहेत व पुढे भविष्यकाल कायम आहे तोपर्यंत मिळतील त्या भूमातेला आमचें वंदन असो ! जीमधील शेतें हीं नेहमी धान्याच्या मुठी भरलेले आपले हस्त अुंच करून डुलत डुलत सर्व मनुष्यजातींचा योगक्षेम चालविण्यास आपण समर्थ आहोत असें यथार्थ स्वाभिमानाने दर्शवीत असतात, जीमध्ये भूमि सस्यशालिनी नि जीमध्ये जलाशय फुल्लारविंद असे असतात, जिच्या रथाच्या अश्वांच्या पाठी परमात्म्याच्या हाताच्या खराऱ्यांनी पूत झालेल्या आहेत, जीमधील गाअी नेहमी दुभत्या असतात अशा त्या सुभगा भूदेवीला आमचें वंदन असो ! चीन देशाच्या बादशहाने चीनची भिंत बांधून तो देश जास्त बळकट केल्याचा वृथा गर्व करू नये म्हणून जिला अुत्तरेकडे स्वतः निसर्गदेवीने हिमालयाची अत्युच्च व दुर्भेद्य भिंत अुभवून दिली आहे व जिला दक्षिण, पूर्व व पश्चिम या दिशानी समुद्राचा विस्तीर्ण खंदक संरक्षण करीत आहे त्या आमच्या भूदेवीला आमचें वंदन असो ! जिला अुत्तरेकडून सर्व स्थलदेवता व अितर दिशांनी जलदेवता संरक्षीत आहेत त्या भूमातेतील सर्व क्षेत्रांना आमचें वंदन असो. अशा या आमच्या भारतमातेचा सर्वत्र जयजयकार असो !

जगतीतलावरील प्रत्येक देशाला, निसर्गदेवतेने काही फायदे दिलेले असतात. अेखाद्या देशात अुंच पर्वत असतात तर दुसऱ्यात अेक ओळही नसते. अेखाद्यात सोन्याच्या खाणी असतात, तर दुसऱ्यात कोळशाच्या देखील नसतात. अेखाद्या देशाला समुद्राचें पूर्ण रक्षण असतें तर दुसऱ्याला समुद्राची कल्पनाही नसते. परंतु आपल्या भरतभूमीला कशाचीही ददात नाही. जें जें अुत्तम आहे, जें जें अुदात्त आहे, जें अभिलषणीय आहे व जें जें अभीप्सित आहे तें तें सर्व या भारतीत परमेश्वराने भरून ठेविलें आहे ! ही अतिशयोक्ति नाही. ही यथार्थोक्ति आहे. हिमालया-सारखा पर्वत जगातील कोणत्या देशाजवळ आहे ? कोहिनूर हिरा कोणची अन्य खनि प्रसवू शकणार आहे ! गंगेसारखी नदी व दुआबापेक्षा सुपीक भूमि आणखी किती देशांत आहे ! हिमालयाहून अधिक वळकटपणे अन्य किती देश संरक्षित झालेले आहेत ! जितक्या कोळशाच्या खाणी पुष्कळ, तितक्याच सोन्याच्या खाणी मुबलक. यांपैकी अेकेक गोष्ट ही कित्येक देशांच्या दैवी नसून आमच्या या भारतीला मात्र ह्या सर्व अद्वितीय वस्तूंनी संपन्नत्व आलें आहे. अुत्तम वस्तूचें हें अेक निसर्गनिर्मित पदार्थसंग्रहालय आहे. येथे नाही असें जगात काय आहे ? अुलट, जें जगात अन्यत्र कोठें नाही, तें मात्र या आमच्या मातृभूमीत परमेश्वराच्या कृपेने लाभलेलें आहे. सारांश अत्युच्च पर्वत, सखोल नद्या, सुपीक वसुंधरा, सुरस फलें, सुवासिक फुलें, सर्व धातूंच्या खाणी, विविध पक्षी, विस्तीर्ण समुद्र, सुंदर सरोवरें अित्यादि जें जें म्हणून निसर्गदेवतेला देता येणें शक्य होतें तें तें सर्व संपूर्ण रीतीने लाभल्यामुळे जिला अद्वितीय चारुता नि श्रीमंती प्राप्त झालेली आहे, त्या भगवती आर्य भूजननीला आमचें सदैव वंदन असो !

परंतु नुसत्या नैसर्गिक सौंदर्यानेच ह्या भरतखंडाचें गुणवर्णन झालेलें नाही. तर नैसर्गिक सौंदर्य व संपन्नता ह्या दोन गोष्टींत आमची भूमाता ही जगती तलावर श्रेष्ठ आहे. अितकेंच नव्हे, तर आपल्या आर्य भूमातेच्या गुणवर्णनाचा हा अेक अंश आहे. तिच्या अनंत गुणसंचयातील तो अेक लहानसा गुण आहे. कारण स्वाभाविक सुंदरता असणें हा गुण निसर्गाचे हाती असतो. स्वभावसुंदरता असणें ही पूर्वभाग्याची द्योतक असली तरी कर्तृत्वाची द्योतक नसते. गोरा गोमटा चेहरा असूनही जर अेखादा मनुष्य कर्तृत्वशालीही असेल तर तो, ज्याचा फक्त चेहरा गोरा आहे परंतु कर्तृत्वाचे नांवाने शून्य आहे अशा करंट्याहून शतपट अधिक मानार्ह समजला पाहिजे. तेव्हा जरी परमेश्वराने सर्व स्वाभाविक चारुता या आर्य-भारतीला अर्पण केली असली तरी तिच्या सद्गुणांची व थोरवीची खरी कसोटी ही तिच्या स्वत:च्या कर्तबगारीवरूनच पाहावयास पाहिजे. अुत्तम नदी ती की, जी अत्यंत गोड व विमल पाणी देते, अुत्तम शेत तें की, जें धान्याच्या कणसांनी सदैव आंदोलन घेत असतें व अुत्तम वृक्ष तोच की, ज्याचीं फळें अत्यंत मधुर व रसाळ असतात; त्याचप्रमाणे अुत्तम देश तो होय की, ज्याच्या पुत्रांचे अंगी काही तरी

असामान्यता असते. देशभूमीची खरी चारुता तिच्या स्वत:च्या महत्त्वाने जितकी प्राप्त होते तिच्या शतपट अधिक रीतीने त्या देशभूचे पुत्रांचे कृतीवरून ठरत असते. ह्या वीरमातृत्वात जी भूमि सर्व जगात श्रेष्ठ ठरेल ती खरी श्रेष्ठ होय ! ही कसोटी जर आर्य भूमातेला लावावयाची असेल तर आमची भूमाता वीर्यवान् पुत्रांची जननी आहे हें सिद्ध करण्यासाठी तिच्या वीर्यवान् पुत्रांपैकी काहींचा जरी नामनिर्देश करू लागलो तरी, हे चंद्रा व सूर्या, तुमचीं तेजें फिकी पडू लागतील. कारण वीर-मातृत्वात ही भूमि मृत्युलोकातच काय, पण सूर्यलोकात व चंद्रलोकात श्रेष्ठ ठरविली जाईल. अिंग्लंड, अमेरिका, जपान, चीन, वगैरे अर्भकांबरोबर तुलना करणें यात काहीच अर्थ नाही. ज्या वेळेस रोमचें नांव अैकू येत नव्हतें व ग्रीस देशात वस्तीही झाली नव्हती तेव्हा ही आर्यभूमि वीरप्रसवा व मानवी समाजाची अधिदेवता होती. अिजिप्त, खाल्डिया, व असीरिया यांच्याही कित्येक शतकें आधी आमच्या अिकडे मानवी जातीची अुत्क्रांति तत्त्वांच्या नि दर्शनांच्या सूत्रीकरणापर्यंत आलेली होती. जगातील कित्येक भाषांत ५००।६०० शब्दांचा भरणा नव्हता, त्या वेळेस ह्या भारतातील ऋषिवरांनी संस्कृत भाषेला संस्कृत करून तिला सूक्ष्म विचारप्रदर्शनात प्रवीण केलें होतें. अितकेंच नव्हे, तर तिला छंदात बद्ध करून तालसुरांवर लीलानर्तन करण्याला लाविलें होतें. जेथे अितिहासाचा प्रदीप प्रवेश करू धजत नाही किंवा जेथे दंतकथेचें तीव्र टोकही बोथट होत आहे अशा सहस्रा-वधि वर्षांपूर्वीच्या कालातूनही ज्या भूमीमध्ये वेदघोष अैकू येत आहे, त्या भूमीचे भाग्याची तुलना कोणाशी करता येणार आहे ? सर्व जगात अत्यंत जुना असा ऋग्वेद ह्या भूमीमध्ये निर्माण झाला. तत्त्वज्ञानाला १० हजार वर्षांपूर्वी शोधून काढणारे वीर्यवान् ऋषि जगावर अितरत्र कोठे आढळणार आहेत ? त्या ऋषींच्या तपोवनांनी व त्यांच्या तपांनी पूत झालेल्या भूमातेला आमचें वंदन असो ! वशिष्ठ-वामदेवांनी अभिमंत्रित असलेल्या जलांच्या सिंचनाने ही पुनीत झालेली आहे. होम हवनांच्या पुण्यसमयी देव-देवतांचा संतोष अग्नीच्या दक्षिणार्ची ज्वालांनी ह्या भूमीत व्यक्त झालेला आहे. होमामध्ये दग्ध होणाऱ्या घृताचे सुवासाने दुरून स्वर्गातील अिंद्र व वरुण या भूमीवर अवतरत असत. वीर्यवान् नि ब्रह्मवेत्ते ऋषींच्या समिति या भूमीवर तत्त्वज्ञानाचा वाद-विवाद करीत असताना आपले आजपर्यंतच्या गौप्याचें आता स्फोटन होतें की काय म्हणून परब्रह्माला काळजी वाटे !

ऋग्वेद या भूमीचा आहे ! अथर्ववेद या भूमीचा आहे. यजुर्वेद या भूमीचा आहे. सामवेद या भूमीचा आहे. ब्राह्मणें व अुपनिषदें या भूमीचीं आहेत ! तत्त्व-ज्ञानाची भागीरथी या भूमीच्या चरणकमलापासून अुगम पावली आहे. शुक व वसिष्ठादिक परब्रह्मवेत्ते ब्राह्मण याच भूमीत निर्माण झाले होते ! अंगिरस, वसिष्ठ वामदेव, याज्ञवल्क्य, भृगु हीं विभूतिमान् नांवें अैकताच कोणाचे मनास एकदम

अुदात्तता प्राप्त होत नाही ? असे हे तत्त्ववेत्ते ज्या भूमीच्या कुसुंव्याला धन्य करीत आहेत त्या तत्त्ववेत्त्या भूमीला आमचें वंदन असो ! ! ! न्यायशास्त्राचे प्रणेते व सांख्य-शास्त्राचे प्रणेते ह्याच भूमीच्या अन्नावर वाढले ! बुद्धीवर अंधश्रद्धेचा पगडा पडूं लागताच ज्या कपिल महामुनींनी अंधपरंपरेला झुगारून देअून विचारशक्तीचा पहिला जयजयकार केला ते सांख्यशास्त्रप्रणेते कपिल महामुनिदेखील आपल्या ह्या भारतीला ' हे मातर् ' म्हणून वंदन करीत असत ! सर्व जगाला अजून वंद्य असलेल्या कपिल महामुनींनी जिला ' आअी ' म्हणून वंदन करावें अशी भूमि ह्या जगादर किंवा, चंद्र, मंगळ वुधादि ग्रहहो, तुमच्याकडे तरी अेखादी आहे काय ? भास्कराचार्यांनी, आर्यभट्टांनी व वराहमिहिरानीं भूगोलाचे, ज्योतिषशास्त्राचे व गणितशास्त्राचे शोध ह्या भूमीतील अन्नसेवनाने आलेल्या तीव्रतेने लाविले. दशांशाचा शोध ह्या भूमीचा आहे. गुरुत्वाकर्षणाचा शोध ह्या भूभीचा आहे. भूमिति ह्या भूमीत जन्मास आली, त्रिकोणमिति (Trigonometry) ह्या भूमीतील यज्ञवेदीतून अुत्पन्न झाली. सप्तसुरांचा अुदय ह्या भूमीच्या कोमल कंठातून झाला. मत्स्ययंत्र (होकायंत्र) ह्या भूमीत जन्मास आलें. जगात व्याकरणशास्त्राची पद्धति ह्या भूमीने दिली. पहिली सशास्त्र लिपि व वर्णमाला ह्या भूमीत निर्माण झाली. मयसभेला अुत्पन्न करणारें शिल्पशास्त्र ह्या भूमीच्या मालकीचें आहे. नाट्यशास्त्र, वैद्यशास्त्र ह्याच भूमीत अुत्पन्न झालें. कणाद, कपिल, भास्कर, आर्यभट्ट वराह-मिहिर, भरत, पाणिनि, विश्वकर्मा, वाग्भट, गौतम, असल्या तेजोभास्करांना – ह्या स्वतंत्र शास्त्रप्रणेत्यांना – अुत्पन्न करण्याअितकें ज्या भूमीचें अन्न वीर्यवान् आहे त्या शास्त्रविद् भूमीला आमचें सदैव वंदन असो ! ! !

परंतु हे तत्त्ववेत्ते हो ! व शास्त्रप्रणेते हो ! सर्व जगाला ललामभूत झालेले असे तुम्हीच काय ते ह्या भूमीत अुत्पन्न झालेले आहात असा वृथा गर्व वाहू नका ! वाल्मीकीच्या ' सरसा सालंकारा सुपदन्यासा, सुवर्णमय ' मूर्तीला ह्या स्वर्ग-मृत्यु-पातालात कोण भुलत नाही ? रामायणाअितकें सरस असें ह्या जगावर कोणतें काव्य आहे ? तरी अप्सरांच्या अधरोष्ठांनी व द्राक्षांच्या लतांनी त्या रामायणा-तील रस कितीदा तरी चोखून नेलेला आहे ! ' पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थ-गंधात्कटम् । नानाख्यानककेसरं हरिकथासंबोधनाबोधितम् । लोके सज्जन षट्-पदैरहरहः पेपीयमानं मुदा ' ! अशा प्रकारचें ' भारत ' रचणारा व्यास भरतभूमी-शिवाय अितर कोठे जन्माला येणार आहे ? जगावरील सर्व शास्त्रें वुडालीं व ' भारत 'च काय तें राहिलें तरी सर्व शास्त्रांची आठवण होअू देणार नाही तें ' भारत ' या भूमीचें आहे. तुम्हांला काय पाहिजे आहे ? नीतिशास्त्र पाहिजे आहे ? भारता-कडे वळा ! तत्त्वज्ञान पाहिजे आहे ? भारताकडे वळा. कवित्व पाहिजे आहे ? भारतसुधामाधुरीकडे वळा. अितिहास, सृष्टिवर्णन, काय पाहिजे आहे ? ' व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् ' अशी ज्याच्या कीर्तीची, संघशक्तीची नौबत झडत

आहे, त्या व्यासाला जन्म ह्या आर्यभूमीने दिला. रामायण आमचें आहे. महाभारत आमचें आहे. शाकुंतल आमचें आहे. यांपैकी अेक आमचें असतें, तरी सर्व जगाहून आम्ही श्रेष्ठ ठरलो असतो. आता तर सर्व आमचें आहे. आता भारतभूमि सोडून क्षीर-सागराला कोण जातो ! रामायण हा आमचा क्षीरसागर, भारत हा आमचा दुसरा क्षीरसागर, शाकुंतल आमचा तिसरा क्षीरसागर व अुत्तर रामचरित्र हा आमचा चौथा क्षीरसागर. अितक्या क्षीरसागरांपुढे त्या अेकाची काय किंमत आहे ! अेका क्षीरसागरात राहणाऱ्या त्या लक्ष्मीकांताहून आम्ही भारतभूमीचे रहिवासी चौपट भाग्यशाली आहो. आमच्या कवितेत लक्ष्मी आहे, पण त्याच्या लक्ष्मीत कविता कुठे आहे ? या कवितेचे कान्त वाल्मीकि, व्यास, कालिदास व भवभूति ह्या सर्वांना ज्या भूमीकडून दिव्य प्रतिभास्फूर्ति झाली, त्या भूमीला आमचें वंदन असो ! ! ! परंतु ही प्रतिभास्फूर्ति काव्यातच झाली असें नाही. मानवी समाजाला धर्मतत्त्वांनी जर काही फायदा झाला असेल, तर त्याचें सर्व श्रेय आमच्या या आर्यभूमीला आहे. जगताची सर्व धर्मपरंपरा येथून अुद्भूत झालेली आहे. वेदप्रणीत धर्माचीं तीं सर्व लेकरें आहेत. हिंदुधर्मापासून महात्म्या बुद्धाने बुद्धधर्म प्रतिपादन केला. त्या बुद्धधर्माची अेक प्रत अुतरून घेअून जीजसने ख्रिस्तीधर्म तयार केला. त्यात तरवारीचें पाणी ओतून महंमदी धर्म झाला व त्या महमदी धर्माचा ओघ नानकाने पुन्हा मूळ आर्य धर्माशी आणून भिडविला. धर्म हा जर तुमचा प्राण असेल व जर तुम्ही धर्मच्युत झालेले नसाल, तर हे जगतावरील सर्व समाजांनो, तुम्हांला तुमचा तो प्राण दिल्याबद्दल ह्या आमच्या आर्यभूला वन्दन करा ! वैदिक धर्म तर ह्या भूमीचा प्राणच आहे. त्याचे रक्षणार्थ देह कष्टविणारे शंकरा-चार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, वगैरे सर्व धर्मवीर आमच्या भूमीत जन्माला आलेले आहेत. वीर्यशाली जपाना, ज्या भाग्याकरिता तू आणखी दहा सुशिमाच्या लढाया जिंकल्यास तरी तुला जें लाभणार नाही, असलें बुद्ध महर्षींना जन्म देण्याचें भाग्य या आमच्या आर्य वसुंधरेला आहे ! अितकेंही असून अम-क्यांनी अमक्याच मार्गाने परमेश्वराकडे जावें असा ह्या अुदारचरितेचा बिलकुल आग्रह नाही. तिच्या मुलांपैकी काहीजण, देवाला विष्णु म्हणून म्हणोत ! कोणी नानकास धर्मप्रणेता म्हणोत, किंवा कोणी बुद्धाला म्हणोत. असल्या गोष्टीत त्या मातेचा आपल्या कोणच्याही मुलावर अनुदारपणाचा दाब नाही. तिच्या तीस कोटी लेकरांतील हिंदु जितके तिला प्रिय आहेत, तितकेच बौद्ध आहेत, तित-केच जैन आहेत. निसर्गाने जिला सर्व जगतात अत्यंत सुंदर केली आहे तीच ही भारतमाता आपल्या वीर्यवान् प्रसवांनीही सर्व जगात श्रेष्ठ आहे. ही स्तुति काव्याच्या भाषेत केलेली नाही. ही स्तुति यथार्थ आहे हें दाखविण्यासाठी वर अैतिहासिक भाषाच वापरली आहे. पौराणिक व दंतकथायुक्त अशा माहितीला जर क्षणभर बाजूला ठेवलें तरी वर वर्णन केलेल्या अैतिहासिक व्यक्तींपैकी

अेकेकाची योग्यता अशी आहे की, तसल्या अेकेका व्यक्तीला जन्म देताच अितर भूमि निःसत्त्व होअून गेल्या असत्या ! परंतु आज सतत अनंत वर्षे अनंत वीरांनी वीरप्रसवा झालेल्या सत्त्वमती भारतीला आमचें वंदन असो ! परंतु मातृभूमि नुसती सत्पुत्रांना अुत्पन्न करीत नाही. ह्या भाग्यशाली भूमीच्या पोटी जशीं व जितकीं नररत्नें आलेलीं आहेत, तशींच व तितकींच स्त्रीरत्नेंही येथे पैदा झालीं आहेत. तिच्यामध्ये ऋषिवृंदांना भरसभेत ब्रह्मविचारात जिंकून टाकणारी गार्गेयी जन्मास आलेली आहे; ह्या भूमीमध्ये लोपामुद्रा जन्माला आलेली आहे ! ह्या भूमीत अहिल्या जन्माला आलेली आहे ! ह्या भूमीत तारा जन्माला आलेली आहे ! ह्या भूमीत मंदोदरी जन्माला आलेली आहे ! ह्या भूमीत दमयंती जन्माला आलेली आहे ! व ह्याच भूमीत सावित्री जन्माला आलेली आहे. भूदेवीच्या मुलीही मुलांअितक्याच पावन आहेत. याचेसाठी आणखी किती नांवें द्यावीत ! तथापि अजून कोणाची खात्री होत नाही काय ? नसेल तर अैका ! आम्ही अेकच पवित्र नांव सांगतो तें अैका. सद्गुण, औदार्य, धाडस, पातिव्रत्य, सदयता, निसर्गगंभीरता आणि दिव्य सुंदरता ह्या सर्व सद्गुणांना ज्या अेका नांवाने संबोधिता येअील असें आम्ही आता अेक नांव सांगतो तें अैका ! ज्या नामोच्चारणाने आम्ही नि आमचा देश हे सदैव पावन होतील असें आता अेक नांव सांगतो तें अैका. हे जगावरील सर्व प्राणिमात्रहो नि स्वर्गातील सर्व देवहो, तें नांव श्रीसीतादेवीचें होय! सीतादेवी ह्या भूमीच्या अुदरी पैदा झाली. ज्या भूमीच्या अुदरी श्री जानकी पैदा झाली, त्या भूमीच्या अुदरी आमचाही जन्म झाला आहे ही कल्पना मनात प्रवेश करिताच तें आकाशाहूनही विस्तृत होतें ! जें क्षेत्र अुत्तम धान्य देतें तें श्रेष्ठ, तसेंच जो देश अुत्तम स्त्रीपुरुषांना प्रसवतो तो श्रेष्ठ आहे असें समजून आपण ह्या भारतात श्रेष्ठत्व पाहू लागलो तों काय आढळलें ? अंगिरस, गर्ग, वसिष्ठ, वामदेव, याज्ञवल्क्य, जनक अित्यादि महातत्त्ववेत्ते, कणाद, कपिल, भास्कर, आर्यभट्ट वराहमिहिर, भरत, पाणिनि, वाग्भट, चरक अित्यादि शास्त्रवेत्ते; व्यास, वाल्मीकि कालिदास, भवभूति अित्यादि कवितादेवीचे लाल, गोतमबुद्ध, शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, गुरु नानक अित्यादि धर्मसंस्थापक; श्रीराम, नल, युद्धिष्ठर यांसारखे रंजनशील राजे, अर्जुन, श्रीकृष्ण नि कर्णादिकरून अतिरथी महारथी; चंद्रगुप्त, शालिवाहन, अशोक, विक्रमाजित् वगैरे साम्राज्यसंस्थापक; शुकाचार्य व हरिश्चंद्र ह्यांच्यासारखे मूर्त सद्गुणी; गार्गेयी, लोपामुद्रा, अहिल्या, तारा, मंदोदरी, सावित्री व सीता अित्यादि युवती ! ह्या भाग्याची गणना आता कशी करावी ? ह्या विभूतींचें हें नामोच्चारण नुसतें मासल्यासाठी म्हणून केलेलें आहे ! तरी हिंदुस्थानचा प्राचीन अितिहास अुपलब्ध नाही. जो आहे तो व्यवस्थित रीतीने संकलित केलेला नाही, व जो संकलित आहे तो संबंध आकलन करण्याची ग्रहणशक्ति नाही ! भारतमहोदधीच्या अुदराशी जाअून त्यातील हें—

चोचीभर पाणी ह्या टिटवीने आणलें आहे परंतु अितक्यानेच काय झालें आहे ? केलेलें वर्णन तर आमच्या अितिहासाचा पूर्वार्धच आहे ! आधुनिक कालातील रत्नांची यादी तर अजून अलाहिदाच आहे. चितूरचे प्रतापसिंह, बुंदेलखंडाचे छत्रसाल, बंगालचे प्रतापादित्य, रायगडचे हिंदुपदपादशाह, पुण्याचे शनवारवाड्याचे मालक, ग्वाल्हेरचे महादजी, पानिपतचें मैदान, सिंहगडची दरड, रांगण्याची खिंड, ज्ञानेश्वराची लेखणी, विठोबाचा भक्त, समर्थाचे दास, किती सांगावे, कसें सांगावें ? कोठवर सांगावें ? योद्धयांची यादी द्यावी का तत्त्ववेत्त्यांची द्यावी का शास्त्रवेत्त्यांची द्यावी, का कवींची द्यावी, का देशभक्तांची द्यावी, का स्वातंत्र्यवीरांची द्यावी का मुत्सद्दयांची द्यावी? हे आर्यवसुंधरे, तू सुभग आहेस, सुजला आहेस, सुवर्णा आहेस, सुरत्ना आहेस. तुला आमचें वंदन असो. हे ऋतुमती, वसुमती, सुलते व सुफलिते, तुला आमचें वंदन असो ! हे विविधविहंगमे, विविधकुसुमे, तुला आमचें वंदन असो ! हे निसर्गरम्ये व निसर्गरक्षिते तुला आमचें वंदन असो. हे पुराणी देवी युवती, पुरंध्रि, तुला आमचें वंदन असो. हे तत्त्वज्ञे व शास्त्रज्ञे, तुला आमचें वंदन असो ! हे प्रभामयी व धर्ममयी तुला आमचें वंदन असो ! हे सत्त्वमती व वीर्यवती, तुला आमचें वंदन असो. हे स्वातंत्र्यतिलकभूषिते, तुला आमचें वंदन असो ! श्रीशंकरादि त्रिदश देव जिचें संरक्षण करताहेत, त्या तुला आमचें वंदन असो! नारद, तुंबर, व्यास, वाल्मीकि तुझ्याभोवती तुझीं स्तोत्रें गात आहेत. तुला आमचें वंदन असो ! श्री शिवप्रतापादि तुझ्या शत्रूंच्या नरडीचा घोट घेत आहेत, त्या तुला आमचें वंदन असो ! !

वंदे मातरम् ! वंदे मातरम् ! वंदे मातरम् ! ! !

—(विहारी, चैत्र शु २, शके १८२८)

✦ ✦ ✦

४. बाजीरावाची पुण्यतिथि !

वसअीस चला ! !

सांगे वडिलांची कीर्ति । तो अेक मूर्ख ॥

श्रीमंत बाजीराव पेशवे यांची पुण्यतिथि ह्या वर्षी महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी मानण्यात येअून त्या हिंदु वीराच्या पराक्रमाचें संकीर्तन केलें गेलें तें ठीकच झालें. महाराष्ट्राबाहेरही दिल्ली, कलकत्ता, सिंध अित्यादि प्रांतांतून हिंदु वीरवराच्या ह्या संकीर्तनात यथाशक्ति भाग घेअून अनेक तत्रस्थ पत्रांत त्यांच्या अतुल पराक्रमाचीं वर्णनें आम्हीही दिलीं आहेत. परंतु ज्या महाराष्ट्रसेनानीने आपल्या बालवयात आपल्या बालकोषातून लहानग्या म्यानातून, कर्माची तरवार जी वाहेर

काढली, ती केवळ अेका मृत्यूच्या म्यानातच परत आत घातली, त्या कर्मवीराची पुण्यतिथि ही निष्फळ वाचाळतेनेच जर सार्थ झाली असें समजावयाचें असेल, जर बाजीराव असे होते नि तसे होते या गप्पा झोडण्यातच सर्व दिवस गमावून लहान असो वा मोठें असो, परंतु त्या वीराच्या अिच्छा तृप्त करण्यासारखें कोणतेंही कृत्य जर करावयाचें नसेल, तर त्या महान् कर्मवीराचा मी वंशज आहे असें म्हणण्यास महाराष्ट्राचा अधिकार महाराष्ट्राने गमावला असेंच म्हणावें लागेल.

केवळ वडिलांची कीर्ति सांगूनच जो आळशी व अकर्मण्य मनुष्य आपणांस धन्य मानून घेतो तो खरोखरच अेक मूर्ख होय. खरोखरच पुण्यतिथीच्या काय वा जन्मतिथीच्या काय, नुसत्या ह्या वाचाळ समारंभाचा, या नाटकांचा, या नुसत्या सव्यापसव्यांचा आता आम्हांस अगदी तिटकारा आला पाहिजे. बाजीरावांची पुण्यतिथि साजरी करावयाची आहे ना ? तर मग अेक कणभर का होअीना, पण काम करून दाखवा ! बाजीरावाची पुण्यतिथि सांग करावयाची आहे ना, तर मग वसअीस चला व या वर्षाच्या आत पोर्तुगीजांचे कालात त्यांच्या बलात्काराने व आपल्या गयाळपणाने जे हजारो महाराष्ट्रीय हिंदु आपल्या धर्मास व संस्कृतीस आंचवून ख्रिश्चन झाले, त्यांस शुद्ध करून पुनरपि आपल्या या हिंदुत्वाच्या पैतृक माहेरास परत आणण्याची भव्य व सबळ अशी महान् चळवळ अुडवून द्या.

कारण बाजीरावाच्या पिढीच्या पराक्रमाने पोर्तुगीजांपासून वसई परत मिळविली ; परंतु तिच्या अगावर लागलेले जातिच्छेदाचे, धर्मग्लानीचे व संस्कृतिभंगाचे खोल घाव ती पिढी भरून काढू शकली नाही. तें कार्य जर आपली पिढी करील, तर त्या वीराच्या अनेक अिच्छांपैकी निदान अेक तरी अिच्छा पुरी होअून, या पुण्यतिथीस त्याचा आत्मा काहीतरी संतोष पावेल. त्याच्या अितर महान् अिच्छा, त्यांनी साधिलेलीं व घडवून आणलेलीं परंतु आता पुन्हा बिघडलेलीं महत्कार्यें कोणी करू शकत असेल, तर शुभस्य शीघ्रं ! परंतु जर व ज्यांना तीं अितर महत्कार्यें करवत नाहीत, तर त्यांनी तरी हें अेक शक्य असलेलें परंतु अंतीं तितकेंच महत्फलदायी ठरणारें कार्य तरी या पुण्यतिथीच्या निमित्ताने करून दाखवावें. अितकेंही जर आपल्या हातून होणार नाही, तर बाजीरावाची पुण्यतिथि आम्ही केल्यापेक्षा केली नसती तर बरें झालें असतें, असें त्या महावीरास वाटल्याविना खचित राहणार नाही.

वसअी, ठाणें, माहीम, अित्यादि भागांतून हजारो ख्रिश्चन झालेले परंतु मनापासून आपल्या पूर्वजपूजित हिंदुधर्मासच चिकटून राहिलेले आपले महाराष्ट्राच्या रक्ताचे, बीजाचे, भाषेचे बंधु वसअीत आहेत हें अनेकांस माहीत आहेच. केवळ आपण त्यांना आपल्या घरांत घेत नाही म्हणून ते परक्या घरांत डांबून राखले जात आहेत. त्यांच्याप्रमाणेच त्या प्रांतातील हिंदुमात्र बाटवून ख्रिस्ती करावा अशी पोर्तुगीजांची प्रचंड खटपट चाललेली होती. हिंदु संस्कार व हिंदुपूजा हीं शासनाने बंद व निषिद्ध केली होती. तें शासन भंगिल्यासाठी शेकडो हिंदु हुतात्म्यांना ठार

करण्यात येत होतें व थोडेच दिवसांत तो प्रांतच्या प्रांस निर्हिंदु झालाही असता जर का श्रीमंत बाजीरावांची पिढी वसअीवर चढून जाअून, रोखून रेटून त्या किल्ल्यास वेढा देअून वसती ना; माझें शिर तरी आत पडू दे म्हणून गर्जणाऱ्या हट्टी शौर्याने पोर्तुगीजांची सत्ता पादाक्रांत करती ना. पण बाजीरावाच्या पिढीने वसअी घेतली व 'कोकणात हिंदुधर्म राखिला,' परंतु पोर्तुगीजांचो तरवार तोडून तिला हिंदुत्वावर अधिक घाव घालणें अशक्य करण्याचें कार्य जरी बाजीरावाची वीर पिढी करू शकली तरी लागलेले घाव भरून काढण्याचें, परक्यांचे गोटात गेलेल्या हिंदूंस सोडवून पुन्हा परत घरी आणण्याचें कार्य करण्यास त्यांस समय सापडला नाही. तें कार्य आपल्या पिढीने केलें असता बाजीरावाची अेक अिच्छा तरी पूर्ण होणारी आहे. तीही पूर्ण न करणें, हें शक्य असलेलें कामही हाती न घेणें आणि बाजीरावाच्या पुण्यतिथीच्या गप्पा मारणें म्हणजे त्या वीर पुरुषाच्या स्मृतीची केवळ अप्रतिष्ठा करणें होय. म्हणून वसअीकडे ढाला फिरवा. महाराष्ट्रातील सर्व हिंदुसभांचा या वर्षाचा हा मुख्य कार्यक्रम असला पाहिजे. त्वरित ज्या त्या सभेने अितरांची वाट न पाहता वसअीस प्रचारक पाठवून द्यावे. या यःकश्चित् कामासही हजार निमित्तें काढून लांबणीवर टाकण्याची प्रवृत्ति आता पुरे झाली. अुत्तरेस मलकाना रजपुतांच्या मुसलमान झालेल्या साठ हजार माणसांना आर्य समाजाने परत हिंदु करून घेतलें. काय महाराष्ट्रास स्वतःच्या रक्ताच्या व जवळ जवळ हिंदुच असलेल्या आपल्या वसअीच्या पतित हिंदूंस शुद्ध करण्याअितकाही आटोप अुरला नाही? काय आर्यसमाजास जें शक्य झालें तें महाराष्ट्रास अशक्य व्हावें?

आणि कोणती गोष्ट शक्य किंवा अशक्य हें केव्हा ठरणार? ती करण्याचा काहीतरी प्रयत्न केल्यावर ना? का दुपारी चापून जेवून आराम खुर्चीवर पडले असता अडचणीच्यांवर अडचणींचे मजले जी शिथिल कल्पना वसल्यावसल्याच अुभारते तिच्या सांगण्यावरून? वसअीचे हजारो हिंदुबंधु परत स्वधर्मात येणें अशक्य आहे, अकाली आहे हें तेव्हाच सिद्ध होअील की, जेव्हा महाराष्ट्रीय प्रचारकांच्या सेना चिमाजी अप्पांच्या सेनेसारख्या सर्व दिशांनी अुठून ठाणें, माहीम घेत घेत गोमांतकाचे सीमेत घुसतील व माझें शिर तरी किल्ल्यात पडू दे म्हणून गर्जणाऱ्या चिकाटीने निदान अेक वर्षभर तरी वसअीस झुंजत राहतील! अजून अेक प्रचारकही तिकडे गेला नाही. तिकडच्या हिंदु संघटनेच्या पुरस्कर्त्यांनी अजून अिकडची काडी तिकडे केली नाही; तोंच बसल्या बसल्या हें अशक्य, तें अशक्य, ह्याची वेळ आली नाही, त्याची अितकी घाअी कां, म्हणून बरळत बसण्याचा आपणांस काय अधिकार आहे? वेळ आली नाही? ती आणण्याचा बाजीरावी प्रयत्न केल्यावरही जर वेळ आली नाही, तर म्हणावें वेळ आली नाही! निजलेल्या सिंहाचेही तोंडात पशु आपण होअून प्रवेश करीत नाही! 'न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।' —(लोकमान्य, दि. ७-६-१९२५)

✦ ✦ ✦

लंडनचीं बातमीपत्रें

५. लंडन टॉवर

अिंग्लंडच्या अितिहासप्रसिद्ध लंडन टॉवरमध्ये असणाऱ्या शस्त्रागारामध्ये श्री-शिवछत्रपतींनी ज्या वाघनखाने अफजुलखानास मारलें तीं वाघनखें आहेत असा महाराष्ट्रात साधारण बोलवा असल्याने तीं वाघनखें पाहण्यास मी फारच अुत्सुक झालो होतो, असें आपल्या वाचकांना वाटेल. हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचीं आतडीं ज्या वाघनखाने अुपसून बाहेर काढलीं व जीं शिवछत्रपतींच्या करस्पर्शाने पवित्र झालीं तीं मराठी वाघाचीं वाघनखें लंडन टॉवरमध्ये पडलेलीं पहावयास मी अुत्सुक झालो असेन असें आपल्या वाचकांना वाटत असेल. परंतु मला ती अुत्सुकता मुळीच वाटेना. श्रीकृष्णाच्या विश्वरूपाला पाहण्यास अर्जुनालाही दिव्य चक्षु दिलेले होते, तरी देखील त्याच्याच्याने त्या विश्वरूपाला पाहवेना. मग त्या वाघनखाकडे दृष्टि फेकणाऱ्या माझ्या ह्या गुलामगिरीच्या डोळ्यांची कशी छाती होणार ! मला कंप भरू लागला. माझीं गात्रें विगलित होअू लागलीं. छत्रपतींच्या त्या वाघनखांना मी कसा पाहू ? अितिहासाच्या वाचनाने मला अशी माहिती झालेली होती की, त्या मराठी वाघाच्या नखांना गुलामगिरीच्या रक्ताची फार चटक लागलेली आहे, मग अशी माहिती असताना मी तिकडे जाण्यास कसा धजू ? जर करिता मी त्यांच्या-कडे दबून पाहत असताना त्यांची अर्धसुप्त दृष्टि मजकडे गेली व माझ्या गुलाम-गिरीचा त्यांना वास आला तर स्तंभ कडाडदिशी फोडून तो शिवनृहरि बाहेर येअून गुलामगिरीचा वास कोठून येत आहे म्हणून गर्जना करणार नाही का ? अफजुलखानाच्या आतड्यावर यथेच्छ ताव मारून शिवाजीचीं वाघनखें झोपीं गेल्याला बरीच वेळ झालेली आहे, आता त्यांच्या अुठण्याचा समय जवळ आलेला असल्याने या निद्रेमध्ये सर्व अन्न जिरून जाअून ज्यांची क्षुधा प्रदीप्त झालेली आहे, तीं गुलामगिरीच्या रक्तास चटावलेलीं वाघनखें माझ्यामागे अुड्या घेत येतील नि मला व माझ्या राजनिष्ठेला फाडफाडून भरभर मिटक्या देअून घटघट त्या 'स्वहितासृगुदका' पिणार नाहीत काय ? अशा धास्तीत मी गर्क झालो असतानाच मला त्या वाघनखांचे अेवजी टिपूची तरवार दिसली. त्या तरवारीच्या दर्शनावरोवर अेक विलक्षण संचार अंगात संचारू लागला व ह्या गुलामगिरींत जगण्यापेक्षा श्री-छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनखांनी मेलेलेच फार बरें असा माझा ग्रह होअू लागला व मी त्या वाघनखांना पाहण्यास खरोखरच अुत्सुक झालो. त्या पवित्र वस्तूच्या दर्शनास जाण्यापूर्वी काहीतरी नजराणा न्यावा असें मला वाटू लागलें. परंतु त्यांना जो अेकच नजराणा पाहिजे आहे तो मला कोठून मिळेल ? पारतंत्र्याचें

रक्त त्यांना नजराण्यादाखल देण्यासाठी मी टिपूच्या तरवारीची करुणा भाकू लागलो; परंतु तिने मला अेकच जवाब दिला की ' टिपूची तरवार सज्ज आहे पण टिपूचा हात कोठें आहे ?'

टिपूचा हात कोठे आहे हें मी अैकतो न अैकतो तोंच माझी दृष्टि त्या वाघनखावर गेली. परंतु छत्रपतींचे वाघनखांत जी दिव्यता असेल असें वाटत होतें ती दिव्यता त्यांत नव्हती, म्हणून संशय येअून मी जास्त जवळ गेलो तों मला आढळून आलें की ही महाराजांच्या हातातील अस्सल वाघनखें नाहीत. त्या वाघ-नखांपाशी जी माहितीची चिठ्ठी आहे तीत हें स्पष्ट लिहिलेलें आहे. ती माहिती अशी आहे.

' Waghnakh or tiger's claws, a weapon for concealment in the hand. It was a similar instrument with which the famous Shivaji destroyed Afzulkhan, a Vijapur general while entertaining him. These are from Mysore used by robbers. '

या वरील अक्षरशः अुतरून घेतलेल्या माहितीवरून श्रीशिवाजीमहाराजांची वाघनखें 'अशींच' होतीं अितकाच अुल्लेख केलेला आहे. तींच हीं नव्हत. पुढे तर स्पष्टच अुल्लेख आहे की, हीं म्हैसूरमधून तिकडील दरोडेखोरांपाशीं असलेलीं अिकडे आणलीं आहेत. श्रीछत्रपतींचीं वाघनखें टॉवरमध्ये नाहीत. तीं अितर कोठे आहेत हेंही अजून नक्की बाहेर आलेलें नाही. अशा रीतीने ज्यांच्या दर्शनासाठी मी अुत्सुक झालो होतो तीं वाघनखें न दिसल्याने क्षणभर माझी निराशा झाली. परंतु लगेच मला थोडा तरी हुरूप वाटू लागला. कारण छत्रपतींचीं वाघनखें लंडनच्या टॉवरमध्ये बंदीत पडण्यापेक्षा तीं मला न दिसतील तरी काही वाअीट नाही. तीं मला दिसण्यासाठी लंडनला येण्यापेक्षा माझ्या आर्यभूला दिसण्यासाठी हिंदुस्थानातच असलेलीं बरीं. वाघनखें प्रदर्शनासाठी नसतात. त्यांना पारतंत्र्याची पोटें फाडण्यासाठीच काय तीं बाहेर काढणें अिष्ट आहे. ज्यांना तीं वाघनखें पहा-ण्याची अुत्कंठा लागलेली असेल त्यांनी पारतंत्र्याचीं आतडीं अुपसण्यास तयार असलें पाहिजे. त्यांनी त्यासाठी बद्धपरिकर व सज्जखड्ग झालें पाहिजे. अितकी ज्याची तयारी असेल त्याला श्रीछत्रपतींचीं वाघनखें सापडणें कठीण नाही. कारण प्रतापगडचे देवीला वरील सज्जतेचा अर्ज केल्याबरोबर तीं त्या देवीचे दरबारातून देवविण्यात येतात.

— (विहारी, चैत्र शु. ९ शके १८२९).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ✦ ✦ ✦

६. सत्तावनचे डोहाळे

सूक्ष्मदृष्टीच्या लोकांना गेल्या आठवड्यातील हिंदुस्थानातून आलेल्या वातम्या व त्यांच्यावर येथील अिंग्रजी पत्रांतून झालेल्या टीका, या दोहोंमध्ये राजकारणाचा नवीन भाग सुरू झाला असें आढळल्याशिवाय राहणार नाही. हिंदुस्थानातील 'स्वातंत्रयुद्धाच्या पुण्याहवाचनाला' या १९०७ साली पन्नास वर्षें होत आहेत. या अेका गोष्टीनेच या वर्षी हिंदुस्थानाकडे जगातील लोक निराळ्या दृष्टीने पाहू लागले आहेत. गेल्या पन्नास वर्षात जगाची दृष्टि आकर्षिण्यासारखें हिंदुस्थानात काय होतें ? गुलामगिरीत तृप्तता, राजद्रोहीपणाचा डौल, प्लेगाचा कहर, दुष्काळाचा जबडा, भिकारीपणाचा सुकाळ, ह्याशिवाय हिंदुस्थानात गेल्या पन्नास वर्षांत जगाला आकर्षून घेण्यासारखें काय होतें? परंतु १९०७ साली जगाला हिंदुस्थानातील १८५७ च्या सालची आठवण झाल्याने त्या महनीय स्वातंत्र्यसंग्रामाचीं चित्रें जनतेच्या कल्पनेसमोर येअू लागलीं आहेत, व म्हणून या सालाच्या जानेवारीपासून हिंदुस्थान हें अगदीच मेलेलें नाही अशी भावना किंचित् होअू लागली. अिंग्रजी पत्रांतून हल्ली सत्तावनच्या हकीकती प्रसिद्ध होत असतात. त्या संग्रामातील नकाशे देण्यात येतात. अेका बाजूला हिंदु व मुसलमान अेकत्र होअून तरवारी व बंदुका रोखीत आहेत व दुसऱ्या बाजूला अिंग्रजी पलटणें या अभूतपूर्व देखाव्याने स्तिमित होत्सातीं आ वासून अुभीं आहेत ! अशीं चित्रें, भारतच्या अुठावणीचे दिवशी अिंग्रजी पत्रांतून आलेलीं होतीं ! त्या योगाने रस्त्यांतून अिंग्लिश लोकांत हिंडताना हिंदी हृदयास अेक प्रकारची स्वप्रतिष्ठा वाटू लागते. स्वातंत्र्यसंग्रामार्थ हिंदुस्थान लढत आहे हें चित्र पुढे असता आपण १९०७ सालात आहोत ही भावना सुटून जाअून, आपण १८५७ च्या सालातील अुच्च वातावरणातच आहोत असें वाटू लागतें, व शेजारच्या अिंग्रजाकडे जरा सुप्रतिष्ठित मुद्रेने बघण्याची स्फूर्ति होते. ह्या सत्तावनच्या जागृतीने आणखीही अेक गोष्ट घडून आलेली आहे. ती ही की, यंदा हिंदी मनुष्यास अिंग्रजांशी बरोबरीने व सन्मानाने बोलण्यासारखा काही तरी विषय झाला. आजपर्यंतचे विषय म्हणजे 'तुम्ही आमच्यावर जुलूम करता', 'तुम्ही आमच्यापासून मिठावर कर घेता', 'तुम्ही आम्हांला अस्वलें म्हणून ठार मारता' असले दास्यत्व, गुलामगिरी व नामर्दपणा ह्यांचेच द्योतक असत. परंतु यंदाचा विषय फार निराळा आहे. बंडाची माहिती सांगत असलेल्या अिंग्रजांना यंदा असें सांगण्यात येतें की, स्वातंत्र्यासाठी आम्ही रणांगणात 'हरहर महादेव' केला. आम्ही कानपूरला तुमची कत्तल केली. आमच्या नानांचें नांव अेकताच कलकत्त्यासही तुमचे साहेब लोक ऑफिसें सोडून पळत असत. आमच्या हिंदुस्थानाने ५० वर्षांपूर्वी जें स्त्रीरत्न पैदा केलें तसें तुमच्या अिंग्लंडने त्याच्या अस्तित्वापासून आजपर्यंत कधीही उत्पन्न केलेलें नाही. अिंग्लंडच्या सर्व अितिहासात अेकही झांशीची लक्ष्मी झालेली नाही.

सत्तावन झालें म्हणून हिंदुस्थानाला काहीतरी अभिमानास्पद बोलणें शक्य होतें आहे. ५७ ने गेलें शतक अगदीच नामर्द राहू दिलें नाही. सत्तावनने हिंदुस्थानच्या भूतकाळाची काही तरी अब्रू राखली व सत्तावनने हिंदुस्थानाच्या भविष्यकाळाला काही तरी आशा जिवंत ठेवली !!

या सालाला आरंभ झाल्यापासून काय कारणाने असेल तें असो, परंतु अिंग्लंडभर अेक प्रकारची धास्ती उत्पन्न झालेली आहे. सत्तावनच्या सालाला १९०७ साली पन्नास वर्षे होत असल्याने हिंदुस्थानात यंदा काही विलक्षण प्रकार होणार अशी अिकडे सर्वसाधारण समजूत झालेली आहे. ही समजूत प्रथम लाजत लाजतच पुढे येत होती. परतु मे महिन्यापासून तिची सार्वत्रिक चर्चा अुघड रीतीने होअू लागली. कर्मधर्मसंयोगाने पंजाबमधल्या चळवळीला चांगलें स्वरूप आलें व सत्तावनच्या अितिहासाचे लेख अिंग्रजी पत्रांतून येतात न येतात तोंच 'रावळपिंडीचा दंगा' म्हणून पताका फडकू लागल्या ! पंजाबीच्या शेवटच्या निकालाचे दिवशी जो दंगा झाला त्याची बातमी आली. तेव्हाच अिंग्रजी समाजात जरा गडबड अुडाली होती. पण ती तशीच दाबून ठेवण्यात आली. परंतु रावळपिंडीची तार येताच अिंग्रजी पत्रांचा धीर सुटला ! अितक्यात पठाणांच्या तुकडीमध्ये संप झाल्याची वार्ता आली. तेव्हा हिंदुस्थानातील असंतोषाचें बीज लष्करामध्ये शिरू लागलें आहे, हें अगदी अुघड झालें. तथापि गेल्या महिन्यातच मोर्लेने भर पार्लमेंटात 'हिंदुस्थानात खरा खरा असंतोष मुळीच नाही' असें आश्वासन दिलेलें होतें त्याचे अुतारे देअून वर्तमानपत्रें आपलें समाधान करून घेअू लागलीं तोंच अजितसिंहाने हजारो लोकांना लाठ्या घेअून लाहोरास जमविलें आहे अशी तार आली. त्या दिवशी मात्र अिंग्रजांचा खरोखरीच धीर सुटला ! त्यांची पक्की खात्री झाली की, १८५७ चें पन्नासावें वर्ष आता हिंदुस्थानातील लोक सुनें जाअू देत नाहीत ! काही तरी भयंकर प्रसंग गुदरणार खास ! ही भीति त्या दिवशी अितकी वाढली, की बाजारात सरकारी नोटांची किंमत खाडदिशी अुतरू लागली ! गोखल्यांच्या हजारो व्याख्यानांनी जी चळवळ अुडेना ती अेका तारेने अुडवून दिली, व जो तो हिंदुस्थानाबद्दल काही माहिती मिळेल कीं नाही याची चौकशी करू लागला. त्या दिवशी आगगाडीत, ट्रामवेत, रस्त्यात, कुठेही थांबलें कीं, हिंदी मनुष्याला पाहिल्याबरोबर अिंग्रजी लोक भोवती जमत व आदबीने काय चाललें आहे याची चौकशी करू लागत ! व्याख्यानांनी जें लक्ष हिंदुस्थानाकडे वळतें त्याच्या हजारो पटीने जास्त लक्ष लाहोरात तरवारी किंवा बंदुका राहोतच, पण नुसत्या लाठ्या नेल्याने दिलें जातें या गोष्टीचें तात्पर्य फार महत्त्वाचें आहे. हिंदुस्थानावर मधून मधून लेख लिहीत जावें अशा अटीवर डेली न्यूजसारख्या पत्राला हजारो रुपये देत बसणाऱ्या मूर्ख लोकांनी हें ध्यानात ठेवावें की, अजितसिंगाने काही लोकांच्या हाती लाठ्या दिल्याची तार येताच अिंग्लंडातील अेकूण अेक पत्राने हिंदुस्थानावर कॉलमचे कॉलम खरडले आहेत.

या वर्तमानपत्रांत दोन भेद आहेत. अेक टोरी पक्षाचीं पत्रें व अेक लिबरल पक्षाचीं पत्रें. ह्यांपैकी हिंदुस्थानाबद्दल पहिल्या वर्गाचे लेख फार महत्त्वाचे असतात. कारण त्या पक्षाच्या पत्रांतून गळेकापूपणाचा भाग फार कमी असल्याने त्यांच्या अुद्‌गारांत अिंग्रजांचें अंतःकरण स्पष्ट रीतीने कळून येतें. त्या पत्रांतील गेल्या महिन्यातील हिंदुस्थानविषयक लेख फार वाचनीय आहेत. डेली ग्रॅफिक म्हणतें, 'सत्तावन सालापासून हिंदुस्थानात आमच्या अधिकाराचा व कायद्यांचा असा अुघड अुपमर्द कधीच झाला नव्हता. या सर्व असंतोषाचें बीज म्हणजे हिंदुस्थानांतील लोकांस स्वातंत्र्य पाहिजे आहे हें होय. कर वाढविले म्हणून दंगे होतात हीं सर्व दिखाअू कारणें होत. ह्या स्वतंत्र होण्याच्या अिच्छेला जागच्या जागीच दाबून टाकिलें पाहिजे. कारण आताचें जें बंड होअील तें सत्तावनपेक्षाही जास्त भयंकर होअील!' डेली टेलिग्राफ पत्राने तर हिंदुस्थानावर शिव्याशापांची अखंड गळती धरलेली आहे! काही टोरी पक्षांनी सूचना केली की, अशा स्थितीत अुत्तम अुपाय म्हटला म्हणजे हिंदुस्थानचा सर्व छापखाना बंद करून टाकणें होय. परंतु ह्या अुपायावर दुसरें अेक टोरी पत्र म्हणतें की, ह्या अुपायाने आपल्यास अपाय होअील. हिंदुस्थानचा छापखाना हा आपल्या हाती दिला आहे. तोच फोडला तर आपल्यास मग अंधारात अेकाद्या सत्तावन-सारख्या भयंकर खळग्यात पडावें लागेल. टोरी पत्रांचा संताप तर किती अतिरेकाला गेलेला आहे व तीं पत्रें तो संताप कसा स्पष्ट रीतीने व लिबरलसारखा मानभावी-पणा न करिता प्रकट करितात हें पुढील अुताऱ्यात कळून येअील. अीव्हिनिंग न्यूज, Indian Unrest या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखात म्हणालें, 'The trouble which has long been fermenting in India, and which has now reached the stage of open riot and flouting of Authority is only what might have been expected from the attitude allowed to certain sedtion-mongers in the past. We have allowed these self-important agitators to say what they pleased and the natural result has becn that considerable section of the native population has come to believe that we are afraid to punish the insults which have been hurled at us. We cannot feel thankful to what Mr. Morley seems to be in the present instance quite agreed with the Viceroy as to the necessity of muzzling India's Mad dogs. If we have a regret, it is that they were not muzzled earlier.'

हा टोरी लेखक झाला. आता लिबरल म्हणून जो अेक पक्ष आहे व ज्याला आपले नेमस्त लोक स्वतःचे पितृस्थानी मानीत आहेत, त्या पक्षाने तर ह्या गेल्या आठवड्यात नादिरशहालाही लाज वाटेल अशीं कृत्यें केलेलीं आहेत! खरोखर बारीक रीतीने विचार केला असता अिंग्रजी जुलुमाला नादिरशहाची अुपमा देणें म्हणजे नादिरशहाचा अपमान करणें होय! देशभक्त, लोकमान्य, व परोपकारात

ज्यांनी आपलें शरीर चंदनासारखें झिजविलेलें आहे, त्या महानुभाव लजपतरायांना हद्दपार करण्याचें धाष्टर्य आजपर्यंत कोणच्या टोरीने केलेलें आहे ? फुलरच्या नांवाने खडे फोडणाऱ्या लोकांनी ह्या मोर्लेमध्ये किती फुलर भरलेले आहेत हें अजून तरी समजावून घेतलें आहे कीं नाही ? लाला लजपतराय यांना हद्दपार केल्याची बातमी तारेने येताच त्याबद्दल अेकाही लिबरल पत्राने तक्रार केलेली नाही. लिबरल पेपर-मध्ये अत्यंत प्रमुख असलेलें ट्रायब्यून नांवाचें दैनिक पत्र तर स्पष्ट म्हणतें की, 'कोणा लजपतरायाला हाकलून दिल्याची बातमी आलेली आहे... We do not question the need of these measures. या कृत्यांच्या आवश्यकतेबद्दल आम्हांला काही अेक शंका नाही ! ' पार्लमेंटमध्ये उलटसुलट प्रश्नांची गर्दी चाललेली असता त्या सर्वाचा मथितार्थ अेकाच वाक्यात मोर्लेने सांगितला. तो हा की, 'अशा रीतीने प्रश्नोतरें होअून हिंदुस्थानचे बाबतीत पार्लमेंटमध्ये मतभेद आहेत, असें नेटिव्हांना वाटण्यास जागा ठेवणें हें धूर्तपणाचें नाही ! ' लजपतराय व अजितसिंह यांना हद्द-पार करणें, बंगाल्यात व पंजाबात सार्वजनिक सभांची बंदी करून टाकणें, विद्या-र्थ्यांना व शिक्षकांना स्वदेशभक्ति करू नका म्हणून हुकूम सोडणें, वाटेल त्याला वाटेल तेव्हा अुचलून तुरुंगात टाकणें, हे प्रकार जे लिबरल करतात तेच लिबरल व तेच त्यांचें राष्ट्र अुद्या वेळ येताच गावेंचीं गावें तोफेच्या तोंडी देतील व सर्व देशाला आग लावून देअून हिंदुस्थान बेचिराख करतील, याचा विशेषतः passive resistance च्या रडक्या प्रतिकारवाद्यांनी अवश्य विचार करावा. अजून तर काहीच झालेलें नाही. आताशी कोठे अेकटी दुकटी तुकडी गडबड करू लागल्याची बातमी आली आहे तोंच या शूर राष्ट्राने आपले पंजे फिस्कारले आहेत. असल्या वीरांपुढे आम्ही कर देत नाही जा असें नुसतें रडून कर देणें चुकेल असें वेडयांच्या अिस्पितळातही कोणास खरें वाटणार नाही. यंदा अिंग्लंडमध्ये जी गडबड अुडालेली आहे ती रडक्या प्रतिकाराची नसून ती सत्तावनच्या पन्नासाव्या वर्षाची होय. ती नानांच्या कानपूरचें स्मरण होय !

हें स्मरण फक्त अिंग्रजांनाच होत आहे असें नाही. तें लंडनमधील हिंदी लोकांनाही होत आहे. गेल्या मे ११ ला येथील हिंदी लोकांची सभा या सत्तावनच्या स्वातंत्र्यसंग्रामाची सोनेरी ज्युबिली करण्यासाठी भरली होती व तीत त्या संग्रामात पडलेल्या देशवीरांचें भजनपूजन करण्यात आलें. अशा रीतीने सध्या लंडनमध्ये अुभय पक्षांनाही सत्तावनचे डोहाळे होत आहेत ! नानांच्या देहाची छबी अिंग्रजांच्या व हिंदूंच्या अंतःकरणावर अेकाअेकी अुठून आलेली आहे ! या विलक्षण चमत्काराचा अर्थ काय व सत्तावनचे डोहाळे कोणाच्या जन्माचे द्योतन करीत आहेत याचा अुलगडा भविष्यकाळ लवकरच करो !

—(विहारी, वैशाख व. ३०, शके १८२९)

✦ ✦ ✦

७. हिंदुस्थाना ! तुला पचेल तें तू खा !

गेल्या आठवड्यात लंडन शहरी अनेक महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. ता. २० रोजीं अिंडियन बजेटवर वादविवाद होणार होता. त्या वादविवादात आपल्या देशच्या वतीने भिक्षा मागत फिरत असलेल्या प्रतिनिधींचा सर्व जीव गुंतून राहिला होता. बजेटच्या दिवशी सकाळी ' डेली न्यूज ' अित्यादि पत्रांत भिक्षांदेहीची आरोळी ठोकली गेली होती. 'My nation stands expectant म्हणून ना. गोखले यांनी धडधडीत असत्य विधान केलें. ना. गोखले यांना आशा असेल. परंतु ती हिंदुस्थानातील लोकांची आशा नव्हती ! बेडरबर्न व सर हेन्री कॉटन यांच्या टुरटुरीत ज्यांना हिंदुस्थान देशाची खरी कळकळ दिसते त्यांना हिंदुस्थानामधला किती पैसा यंदा लुटला व पुढच्या साली किती व कसा लुटावयाचा हें ठरविण्यासाठी होणाऱ्या बजेटावरील वादविवादात अभागी हिंदुस्थानाची अुन्नति दिसावी हें ठीकच आहे. शेवटी काय झालें ? कोणाची आशा सफल झाली ? लिबरल मोर्लेनी काय दिलें ? आज अेक शतकभर भिक्षा मागत असता परवांच्या अिष्ट घटिकेला मार्लेच्या त्या अत्यंत कुटिल भाषणाशिवाय झोळीत काय पडलें ? राष्ट्रीय सभेचे पुढारी Opium eaters अफू खाणारे आहेत हीच पदवी त्यांना मिळाली ना ? भ्रमिष्ट लोकांनो ! तुम्ही केव्हा शुद्धीवर येणार ? हेन्री कॉटनच्या चर्चेवरील थर्मामीटरप्रमाणे कडक किंवा सौम्य भाषा वापरून देशाला Self-Government मिळविण्याच्या तुमच्या प्रयत्नांचा सर्व राष्ट्र तिरस्कार करीत आहे हें तुम्हांला केव्हा कळणार ? व जगातील सर्व स्वतंत्र व मानधन पुरुषांत तुमची छी थू होत आहे याची तुम्हांला लाज केव्हा वाटणार ?

अिकडे पार्लमेंट सभेत हा तमाशा संपतो न संपतो तो चंडास हॉलकडे काही वेगळाच प्रकार होअू पाहत होता. सोशल डेमोक्रॅटिक फेडरेशन नांवाच्या प्रसिद्ध संस्थेची व्याख्यानमालिका सुरू झालेली आहे. तीमध्ये ता. २२ रोजी देशबंधु पारेख, बॅरिस्टर अॅट लॉ यांचें 'The Recent Persecution in Bengal' या विषयावर व्याख्यान झालें. दे. पारेख हे अिंग्लंडमध्येच प्रॅक्टिस करीत असतात. ते अिंडियन होमरूल सोसायटीचे व्हाअिस प्रेसिडेंट आहेत. त्यांचें भाषण सुमारे तासभर चाललेलें होतें. त्यात त्यानी अेकदा बंगाली अित्यादि विद्यार्थ्यांवरच्या जुलमाची काही अुदाहरणे देअून असें विचारलें की, 'पारतंत्र्याने जेथील लोक नाडले आहेत व कायदेशीर रीतीने जाण्याचे मार्ग जेथे बंद झालेले आहेत अशा माझ्या राष्ट्राने आता काय करावें ?' अशा आशयाचे अुद्‌गार काढताच अेक सभासद अेकदम ओरडला 'काय करावें ?' हा प्रश्न ज्यांनी विचारला ते सोशल डेमोक्रॅटिक पुढाऱ्यांपैकी अेक आहेत. त्यांची लांब व शुभ्र दाढी, ताठ दृष्टि व सुरकुत्या पडलेले गाल यांच्या योगाने त्यांच्या मुद्रेत सर हेन्री कॉटनच्या मुद्रेहून काही निराळाच प्रकार दृष्टीस पडत होता ! पुढे व्याख्यात्यांचे जोरदार व स्वतंत्र विचारांचें भाषण झाल्यावर प्रश्नोत्तरांस

आरंभ झाला. अेका आयरिश तरुणाने—तो आयरिश असावा असा माझा अजमास आहे—हिंदुस्थानने अशा वेळी आयरिश नॅशनॅलिस्ट ह्या स्वावलंवी पक्षाप्रमाणे ब्रिटिशांना कोणतेंही साह्य करू नये व आयर्लंडने व हिंदुस्थानने अेकदमच अेकमेकांच्या साह्याने अुभयतांचें कल्याण करून घ्यावें असें सुचविलें. नंतर मिस्टर हार्वे नांवाच्या अेका पुढाऱ्याचें भाषण झालें. त्याचा सारांश असा होता की, जेथे परवशतेचा कळस झाला आहे व कायदा सत्ताधारी लोकांच्या तरवारीनेच चिरला गेला आहे, तेथे राष्ट्रचैतन्य राखावयाचें असल्यास दोनच अुपाय असतात. अेक 'जनरल प्यासिव्ह रेझिस्टन्स' किंवा दुसरा 'गुप्त मंडळ्या.' Passive Resitance' हा अप्रत्यक्ष प्रतिकार आहे. परंतु गुलामगिरीत पडलेल्या राष्ट्राची हा अप्रत्यक्ष प्रतिकार जालीम रीतीने अमलात आणण्याअितकी तयारी बहुधा झालेली नसते. कोणीही सरकारला मदत न करण्याची वुद्धि अुत्पन्न होण्यास व त्याप्रमाणे सर्वांकडून वर्तन घडण्यास समाज राजकीय शिक्षणाने फारच सुसंस्कृत केलेला पाहिजे व तें राजकीय शिक्षण परक्यांच्या करड्या सत्तेखाली स्पष्ट रीतीने देणें अशक्य झालेलें असतें. म्हणून प्रथम दुसरा अुपाय योजला जातो, व तो 'Secret Societies' गुप्त मंडळ्या हा होय. या गुप्त मंडळ्यांनी स्वदेशप्रेम अुत्पन्न करावें व रचनाकौशल्याने प्रचंड संघ अुभारावे. रशियामध्ये याचें ताजें अुदाहरण घडत आहे व रशियाचें स्वातंत्र्य आता दूर नाही. हें सर्व कृत्य गुप्तमंडळ्यांचें आहे. इ. इ.' त्यानंतर अेका बाअीचें भाषण झालें. त्या बाअीची शांत व अुदात्त मुद्रा व त्यांचें मानसिक शास्त्राच्या आधाराने झालेलें भाषण यावरून त्या फारच सुशिक्षित असाव्या. त्या आयरिश असाव्या असें दिसतें. त्यांनी रशियाची व हिंदुस्थानाची तुलना केली व जेथे जेथे मानव जात परवशतेत खितपत असेल तेथे तेथे माझें अंत:करण गुंतलें आहे व जगतात कोणीही परतंत्र नाही अशी स्थिति येअीतोपर्यंत मला चैन पडावयाचें नाही असें सांगितलें. अितक्यात अेक साहेब अुठले व त्यांनी दे. पारेख यांना 'लेबर पार्टीला' पैशाची मदत हिंदुस्थानने करावी म्हणजे लेबर पार्टी येथे अधिकारावर आली की हिंदुस्थान वर येअील म्हणून सांगितलें. यांना आजपर्यंत हिंदुस्थानने केलेली 'पैशाची मदत' पुरेशी झाली नाही. दे. पारेख यांनी व सोशियालिस्ट लोकांनी त्या गरीव साहेवाची फारच टर अुडविली. अध्यक्षांनीही 'हिंदुस्थानांतील लोकांनी हिंदुस्थानातच काम केलें पाहिजे, अमका पक्ष अिंग्लंडमध्ये अधिकारावर येअील म्हणून पैसे धाडून व त्यांना हिंदुस्थानच्या स्थितीची माहिती देण्यासाठी प्रतिनिधि धाडून काही अेक व्हावयाचें नाही' असें सांगितलें व मोर्लेनी हिंदुस्थानातील लोकांस लेखनस्वातंत्र्य व वाक्स्वातंत्र्य आहे असें पार्लमेंट सभेत विधान करावें व बंगाल्यात ही स्थिति ठेवावी हें फार लांछनस्पद आहे' असें प्रतिपादिलें.

अशा रीतीने हिंदुस्थानच्या रोगावर दोन औषधें मिळालीं आहेत. House of Commons मधल्या दवाखान्यात देशभक्त गोखल्यांना अेका मोर्ले नांवाच्या

डॉक्टरांनी अेक बाटली दिली व चंडास हॉलमधल्या आरोग्यभुवनात मि. हार्वे या नांवाच्या भिषग्वर्याने दे. पारेख यांना अेक औषधि दिली.

हिंदुस्थाना ! तुला पचेल तें तू खा !

– दि. १७ ऑगस्ट १९०६

✦ ✦ ✦

८. राष्ट्रीय तरुण-सेना

लंडन :– 'बडें घर व पोकळ वासा' अशी ब्रिटिश साम्राज्याची स्थिति झालेली आहे. या साम्राज्याच्या बाह्य अंगाला पाहूनच जे चकित होतात त्यांना हें साम्राज्य आतून किती पोखरलेलें आहे याची कल्पना देखील नसते. हिंदुस्थानसारख्या सहा-सात हजार कोसांवरील जित झालेल्या देशास अिंग्लिशांचें केवढें भय वाटतें ! हिंदुस्थानातील तीस कोटी लोकांनाच काय, परंतु सर्व जगाला ताब्यात ठेवील अशी अिंग्लंडची शक्ति आहे, ही सर्वसाधारण समजूत असते. अिंग्लंड म्हणजेच नंदनवन आहे, का कामधेनू आहे, का स्वर्ग आहे, असें वाटत असतें. परंतु अिकडे प्रत्यक्ष स्थिति पाहिली म्हणजे काय आढळतें आहे ? पार्लमेंटच्या जागा पैशाने विकल्या जात आहेत. खायला मिळत नाही म्हणून हजारो लोक अुपाशी मरत आहेत. काम नाही म्हणून अुडाणटप्पूचे दंगे होत आहेत. लाच खाणें, खोटें बोलणें, रानटीपणाची कामें करणें, हीं कृत्यें अितकीं सर्वसाधारण आहेत की, त्यांची चौकशी देखील होत नाही. प्रत्येक सार्वजनिक चव्हाट्यावर व बागेमध्ये, प्रत्येक अैतिहासिक जागी व प्रदर्शनस्थलामध्ये मनुष्य शिरू लागला की अेक भली मोठी पाटी टांगलेली असते. तिच्यावर 'Beware of the pickpockets' 'खिसेकातरूंना जपा' म्हणून अक्षरें लिहिलेलीं असतात. हीं अक्षरें काय दाखवितात ? अिंग्लंडमध्ये अितके खिसेकातरू आहेत की, प्रत्येक जागेवर पोलिसबरोबर त्यांचाही पहारा वसलेला आहे. परंतु अिंग्लंडमध्ये कोण खिसेकातरू नाही ? 'Beware of the pickpockets' ही पाटी अिंग्लंडपुरतीच लावलेली नसती व जर परमेश्वराने ती प्रत्येक देशाच्या दारावर लावली असती, तर किती बरें झालें असतें ! कारण अिंग्रजी खिसेकातरूंची भीति ही अिंग्लंड देशातच फक्त नसून ती जगावरील सर्व देशांत शिरलेली आहे. अिंग्लिश लोक व्यावहारिक शास्त्रांत पटाअीत झालेले आहेत याचें हें अेक प्रत्यंतरच आहे. कारण या खिसे कातरण्याच्या धंद्यातदेखील त्यांनी अर्थशास्त्राच्या तत्त्वाप्रमाणेच काम चालविलें आहे. ते तत्त्वाला सोडून कधीही वागत नसतात ! त्यांनी या खिसे-कातरूपणाचे धंद्यात श्रमविभाग केलेला आहे. खिसे दोन प्रकारचे असतात. व्यक्तीचा

खिसा व राष्ट्राचा खिसा. पैकी व्यक्तींचे खिसे कातरण्यासाठी अिंग्लंडमध्ये लोक किती अिमाने अितवारे खटपट करीत असतात हें प्रत्येक स्थली असलेल्या त्यांच्या वरील जाहिरातीवरून दिसून येअील व राष्ट्राचे खिसे कापण्यात तर अिंग्लिश किती पटाअीत आहेत हें हिंदुस्थानातील लोकांस सांगत बसणें म्हणजे अिंग्लिशांच्या या सद्गुणाची 'नेटिव्हांना' काहीच माहिती नाही असें म्हणण्यासारखें आहे. झुलू लोकांशी झालेल्या लढाअीत अिंग्रजांनी पशुहूनही रानटीपणा दाखविला अशी त्यांचींच पत्रें ओरड करीत आहेत! अेक झुलूबाअी आपल्या मुलास घेअून अुभी होती व त्याची समजूत घालीत होती. अितक्यात अेक शूर अिंग्रज शिपाअी आला व त्याने म्हटलें, 'बाई तूं नको त्रास घेअू! मी तुझ्या मुलाची समजूत घालतो' व असें म्हणून त्याने त्या मुलाला गोळी घातली. शेकडो अधम कृत्यांपैकी मी हें अुदाहरणार्थ देत आहे. हीं कृत्यें अिंग्रज शिपाअीच आता अिंग्रजी पत्रांना कळवीत आहेत. बोअर वॉरमध्ये बोअर लोकांना शस्त्रें अिंग्लंडमधून मिळालीं अशी गुणगूण होती. परंतु आता झुलूवारमध्येही त्या सद्गुणात अिंग्रजांची वरीच प्रगति झालेली आहे. झुलूंना बंदुकांचा पुरवठा अिंग्लंडमधून झाला अितकेंच नव्हे, तर लष्करी कमिशनच्या चोकशीवरून असें सिद्ध झालें आहे की, कोटयवधि रुपयांची अफरातफर होअून मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या साह्याने लाचलुचपतही राजरोसपणे चालू होती. अशा हजारो गोष्टींवरून अिंग्लंडमधील अंतर्गत स्थिति किती कुजत आली आहे याचा अंदाज करता येअील. परंतु बाहेरचा भपका पाहून गरीब व हताश लोक भिअून जातात व त्यांना अिंग्लंड म्हणजे अेक अजरामर, मोठा थोरला राक्षस आहे असें वाटू लागतें. परंतु तसें काही अेक नाही. अिंग्लंडचें मन कुजलें आहे. त्याच्यातील थोर सद्गुण पूर्वी कधीकाळी असतील तर ते नष्ट झालेले आहेत. साम्राज्याच्या अुतरत्या काळात जीं चिन्हें व्हावयाचीं तीं सर्व दृग्गोचर होत आहेत व हीं त्यांना स्वत:लाच जितकीं कळत आहेत तितकीं अितर कोणालाही कळत नसतील. आपल्या हिंदुस्थानात अशी समजूत आहे की अिंग्लंडचें मन नीतिभ्रष्ट झालेलें आहे; तथापि त्याचें सामर्थ्य मात्र फारच मोठें आहे. ज्या राष्ट्राला अेखादी मोडकी तरवार किंवा फुटकी नाव देखील माहीत नाही, त्याला अिंग्रजांपाशी 'म्यक्झिम' बंदुका व लढाअू जहाजें आहेत हें अैकताच भयग्रस्तता प्राप्त व्हावी यामध्ये काहीअेक नवल नाही. पण अिंग्लंडच्या ताब्यात असलेलें साम्राज्य किती अवाढव्य आहे, याचा विचार केला तर त्याची शक्ति किती अल्प आहे हें आपल्यास समजून येअील. जर जर्मनीने अिंग्लंडवर स्वारी केली तर खुद्द अिंग्लंडचे संरक्षणाचीही भ्रांति पडणार आहे! मग आयर्लंड, अिजिप्त, झुलूलंड यांच्या संरक्षणाचें नांवच नको; व तो हिंदुस्थान देश! तीस कोटी लोकांनी गजबजलेला, हिमालयादि पर्वतांनी व समुद्र-देवतांनी संरक्षिलेला, शिवाजी, प्रतापसिंह, गुरु गोविंदसिंह यांच्या पितृस्थानी असलेला, असा तो हिंदुस्थान देश अनंतकाल ताब्यात ठेवण्याची व्यवस्था कशी करावयाची? हिंदु लोकांची

राजनिष्ठा ती व्यवस्था करीत आहे तोपर्यंत ठीक आहे. पण हिंदु लोकांत देशनिष्ठा अुत्पन्न झाली तर पुढे काय करावें याचा विचार अिंग्रजांनी केलाच पाहिजे व याचा विचार करू लागताच ते गोंधळून जातात. हिंदुस्थान देशनिष्ठ झाल्यावर मि. सिली हे आपल्या पुस्तकात म्हणतात की मग अेक दिवसभर देखील हिंदुस्थानात राहण्याची सोय नाही. अिंग्लंडचें भिकारडें आरमार हिंदुस्थानला काय ताब्यात ठेवणार! अिंग्लंड साम्राज्य सांभाळण्यास किती असमर्थ आहे हें धूर्त अिंग्रजांनी केव्हाच ताडलें आहे. आपलें साम्राज्य बुडणार हें त्यांना पूर्णपणे कळलें आहे. आता त्यांचे सर्व प्रयत्न फक्त अशाचसाठी आहेत की, जितकी जास्त चिकाटी टिकविता येअील तितकी टिकवावी. परिणामाचा प्रश्न नसून दिरंगाअीचा प्रश्न आहे. कारण अिंग्रज लोक आपल्या अिकडे वाटतात तितके काही सशक्त नाहीत. आपल्या तिकडे निवडलेले सुदृढ लोक येतात व वाटेल तितके वाढतात, परंतु खुद्द त्यांचे देशात पाहावें तों आपल्या सामान्य मनुष्यांत व त्यांच्या सामान्य मनुष्यांत काही भीतिदायक भेद नाही. काही वर्षांपूर्वी राज्यारोहणानिमित्त हिंदी शिपाअी अिकडे आले होते. नेपाळी, शीख व मराठा शिपाअी कंटकपणात व धाडसात अिंग्रजी शिपायांपेक्षा काकणभर जास्तच आहेत. स्वदेशाभिमानात ते कमती आहेत व म्हणूनच अिंग्रजी अंमलाखाली रावत आहेत. अिंग्रजांची शारीरिक अवनति झपाट्याने होत आहे. गेल्या पंचवीस वर्षात सैन्याला अुपयोगी म्हणून अुंची व वजन ठरविलेलें होतें तितकें आता शेकडा दहांत आढळत नसल्याने ती अट कमी करण्यात आली आहे. शिपायाचा धंदा सोडून अिंग्रजी तरुण दुकानाकडे धावत जातो. म्हणून लॉर्ड रॉबर्टस् रागे भरत आहेत व त्यांनी या अिंग्रजी शरीरक्षयाला भिअून जाअून 'रायफल क्लब'ची स्थापना करण्याची खटपट जारीने चालविली आहे. बहुतेक पत्रांतून या विषयाची चर्चा सुरू झालेली आहे, व जो तो आपापल्या परीने अिंग्रजांची अशक्तता दूर करण्यास काय युक्ति योजावी ह्या विचारात आहे. अिंग्लिश लोक आता अगदी घाबरले आहेत. त्यातूनही आयर्लंडची चळवळ, अिजिप्तमधील चळवळ, हिंदुस्थानातील चळवळ, जर्मनीची तुर्कस्थानातील चळवळ, वगैरे चळवळींनी लंडनच्या अुरात धडकी भरली आहे. ज्या आरमाराला व सैन्याला पाहताच आपण हिंदुलोक गर्भगळीत होतो त्या आरमाराची व सैन्याची खरी योग्यता अिंग्लंडच्या पूर्ण ध्यानात आलेली आहे. जर आयर्लंडने व हिंदुस्थानने आपापले लोक परत बोलावले तर अिंग्लंडचें सैन्य किती अुरणार? तें अिंग्लंडच्या निम्या भागाचे रक्षणास देखील पुरणार नाही! अशा भीतीने कंपित होअून हल्ली अिंग्लंडमध्ये दैनिक पत्रांतून वरील आशयाच्या चर्चा चाललेल्या आहेत. पैकी अुदाहरणार्थ अेका पत्राची हकीकत खाली देतो.

'डेली मिरर' या नांवाचें अेक दैनिक पत्र लंडनमध्ये प्रसिद्ध होत असतें. ह्या पत्राच्या लाखो प्रती दररोज खपत आहेत. हें पत्र लहान मुलांत फारच प्रिय असल्याने त्या मुलांसाठी लष्करी शिक्षणाच्या आवश्यकतेवर या पत्रात लेखमाला सुरू झाल्या आहेत. अिंग्रजी तरुणांची शरीरप्रकृति दिवसेंदिवस किती विलयाला जात

आहे याचें पूर्ण दिग्दर्शन करून हिंदुस्थानातील स्वदेशी चळवळ, अिजिप्तमधील गडबड वगैरे चिन्हांवरून अिंग्रजांचे दुसऱ्याचे कुरणावर चरण्याचे व दुसऱ्यांच्या पायावर अुभे राहण्याचे दिवस संपत आले असून आता स्वतःचें सामर्थ्य निदान अिंग्लंडच्या संरक्षणापुरतें तरी वाढवावें असा अुपदेश देण्यात आला. स्वयंसेवकांचें सैन्य तयार केल्याशिवाय अिंग्लंडची धडगत नाही, ही गोष्ट लॉर्ड रावर्टस्पासून तों वर्तमानपत्रांच्या चालकांपर्यंत सर्वांच्या ध्यानात आता आली आहे. सक्तीचें लष्करी शिक्षण द्यावें असें अेका पक्षाचें म्हणणें आहे व दुसऱ्याचें म्हणणें की लष्करी शिक्षणाचीं महत्त्वाचीं अंगें अितकीं लोकप्रिय करून सोडावीं की, लोकांनी आपण होअूनच लष्करी शिक्षण घ्यावें. ही स्थिति घडवून आणण्यास मुख्य अुपाय म्हणजे तरुणपणीच विद्यार्थ्यांस शारीरिक शिक्षणाची गोडी लावणें. 'डेली मिरर' मध्ये अेक लष्करी ऑफिसर म्हणतो की लहानपणी विद्यार्थ्यांस जर व्यायामाची गोडी लॉवली तर तो जन्मभर व्यायाम सुरू ठेवल्याशिवाय राहणार नाही. तेंच अेखाद्या बावीस वर्षाच्या तरुणाला व्यायामाचा नाद लाव्रू म्हटलें तर तें अतिशय कठीण होतें असा अनुभव आहे. शिवाय लहानपणी तोलेल अितका व्यायाम करीत गेले तरी शरीराला वळण ताबडतोब लागतें व अंगातील रग वाढत जाते. परंतु अेकदा हाडें व स्नायु कठीण झाले म्हणजे मग त्यांना वळण लावणें अशक्य होअून जातें. म्हणून लहान मुलांना १४ वर्षांपासून तालीम शिकवलीच पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु तालीम करून नुसते लठ्ठ होण्यात खरी शक्ति नसते. हल्लीच्या काळी स्वदेशरक्षणाला नुसत्या तालमीहून अधिक शिक्षण पाहिजे आहे व तें शिक्षणही तरुणपणीच देअू लागावें असें येथे सर्वानुमतें ठरत आलें आहे. हें शिक्षण तालमीबरोबर दिलें गेलें म्हणजे लष्करी शिक्षण स्वयंसेवक शिपायापुरतें मिळणारें आहे. आपल्याकडे लष्करी शिक्षणाबद्दल लोकांची फार विलक्षण समजूत झालेली आहे. लष्करी शिक्षण म्हणजे अेक मोठें भानगडीचें, धोक्याचें व कठीण काम आहे असें त्यांना वाटतें. वर्षानुवर्षें शिकत बसल्याशिवाय लष्करी शिक्षण मिळत नाही, अशी अेक घातकी समजूत प्रचलित आहे. परंतु खरी गोष्ट याच्या अगदी अुलट आहे. अुत्तम सेनानी व्हावयास वर्षानुवर्षे तर काय, पण जन्मभर शिक्षण घेतलें तरी हवेंच आहे. नेपोलियनने देखील लष्करी डावपेचात चुका केल्या. परंतु स्वदेशाच्या संरक्षणार्थ स्वयंसेवकत्व करण्याअितकें, सैन्यामधील शिपायांअितकें, मनुष्यात मर्दपणा येण्याअितकें लष्करी शिक्षण घेणें फार सोपें आहे. वाटेल तो मनुष्य शिपाअी होअू शकेल, या शिपाअीगिरीच्या शिक्षणाला मोठीशी बुद्धि वा मोठासा काळही लागत नाही. अत्यंत अडाणी व मतिमंद अिंग्रज अुत्तम शिपाअी होतो, व काळ किती लागतो हें मी 'स्पेक्टेटर' नांवाच्या पत्राच्या शब्दांतच सांगतो. Soldiers can be thoroughly trained in six months and made to enjoy their training instead of dragging through it as they do at present. अुत्तम शिपाअी बनण्यास सहा महिन्यांहून अधिक काळ लागत नाही व त्या सहा महिन्यांतही

तें काम हसतखेळत करता येतें. लष्करी शिक्षणात तीन मुख्य गोष्टी आहेत; Riding घोडयावर बसणें, Shooting अचूक नेम मारणें व Drill कवाअीत; किंवा गनिमी काव्यात कवाअितीचें माहात्म्य फारच थोडें असल्यामुळे कंटकपणा. हे तिन्हीही गुण लहानपणी फारच अुत्तम शिकविता येतात. ' It is much easier to teach boys to shoot and ride and soldier, generally than it is to teach young men. अितकें शिक्षण १४–१५ वर्षांपासून दिलें कीं, त्या तरुणास शिपाअीगिरीचा छंद लागतो, त्याचें शरीर सुदृढ होतें. क्रिकेटच्या अैवजी नेम मारण्यात, तालीम करण्यात व घोडयावर बसण्यात तो जास्त वेळ आनंदाने व हौसेने खर्च करतो, व स्वदेशावर जर कोणी स्वारी केली व मातृ-भूमीचे अंगावरील स्वातंत्र्यशालूच्या पदराला स्पर्श करण्याचें मनात आणलें तर त्या दुष्टाच्या छातीवर नाचण्याचें व कंठ चिरण्याचें सामर्थ्य त्या तरुणाचे अंगात आलेलें असतें. डेली मिरर म्हणतें, अशा रीतीने सर्व अिंग्लंड शिपायांचें राष्ट्र बनविता येअील. स्वदेशस्वातंत्र्यासाठी बळी देण्यास प्रत्येक तरुणाचा देह योग्य होअील, याहून धन्यता ती कोणती? व म्हणून 'डेली मिरर'नें Boy army for Britain ब्रिटनसाठी तरुणसैन्य तयार करण्यास आरंभ केला व त्या पत्राच्या तरुण वर्गणीदारांपैकी ज्यांची खुषी असेल त्यांनी अर्ज करावेत असें लिहिलें. अितक्यांत 'A striking and patriotic response to our proposal' म्हणून लेख आला व त्यात अेका देशभक्ताने दीड दोन महिन्यांत आपण शिक्षण देअून १४।१५ वर्षाच्या अेका पथकास बंदूक मारणें, घोडयावर बसणें, कवाअीत व तरवारीचे हात शिकवतो असें अभिवचन दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे व आता ही तरुणसेना तयार होणार यात काही शंका नाही. या सर्व तयारीचा अुद्देश काय तर 'in case a foreign foe invaded our shores every Englishman ought to be in a position to assist to repel the invader. अिंग्लंडवर दुसऱ्याने स्वारी केली तर प्रत्येक तरुणाने आपल्या देश-स्वातंत्र्यासाठी रणांगणात अुतरावें म्हणून!

प्रत्येकाने आपल्या स्वदेशस्वातंत्र्यासाठी रणांगणात अुतरण्याची तयारी करावी ही पवित्र महत्त्वाकांक्षा आहे. राष्ट्राचें चैतन्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य हें होय. हें कायम असलें तर राष्ट्र आपली अुन्नति करून घेण्यास समर्थ होतें. हें स्वातंत्र्य राष्ट्राचे मानसिक शिक्षणावर व शारीरिक सैनिक शिक्षणावर अवलंबून असतें. परतु काही अदूरदर्शी पुढारी तशा शारीरिक शिक्षणाकडे अगदीच दुर्लक्ष करतात. या जगात नेभळयाचा निभाव लागणार नाही. प्रत्येक देशाने वर वर्णन केल्याप्रमाणे 'राष्ट्रीय तरुण सेना' तयार केली पाहिजे. हें काम फार सोपें आहे. परंतु तिकडे कोणाचें लक्ष गेलेलें नाही. पण तेंच बरें आहे! नाहीतर क्रिकेटचा वेळ मोडेल!

—दि. २८ सप्टेंबर १९०६

✦ ✦ ✦

९. समाप्तीचा आरंभ

गेल्या आठवड्यात लंडन शहरात हिंदुस्थानाबद्दल जितकी खळबळ अुडाली आहे तितकी खरोखरच ५७ चे सालापासून आजपर्यंत अुडाली नव्हती ! १८५७ चे सालानंतर अिंग्रज लोक आपणांला अगदीच विसरले होते असें म्हणून त्यांच्या हिंदुस्थानविषयीच्या प्रेमाला मी बाध आणीत आहे असें बिलकुल नाही. ५७ सालापासून ह्यम, वेडरबर्न, कॉटन वगैरे स्नेह्यांचा ताडांचा तांडा हिंदुस्थानचे कुरणात चरत चरत आपल्याशी स्नेह संपादून होता हें मी नाकबूल करीत नाही. त्याचप्रमाणे आधुनिक मॅझिनी नामदार गोखले सी. आय. अी. यांच्या अिंग्लंडवरील स्वाऱ्यांचे वेळी हिंदुस्थानने अिंग्लंडला जवळजवळ पादाक्रांत केलेलें आहे हें मी कबूल करीत आहे. परंतु गेल्या आठवड्यात या सर्व प्रसंगांहून जास्त अशी खळबळ सुरू झाली आहे. ना. गोखले सी. आय. अी. यांनी अिंडिया पत्राने म्हटल्याप्रमाणे 'आपली कामगिरी फत्ते ' करून लंडनकडे पाठ वळविली तोंच अपशकुनांना आरंभ झाला. गोखल्यांनी मोर्ले यांच्या कानाच्या जितकें जवळ तोंड नेता येअील तितकें नेअून हिंदुस्थानात राजद्रोह नाही असें सांगून सर्व व्यवस्था करून ठेवली होती. 'डेली न्यूज ' च्या वातमीदारास फुल्लरचा राजीनामा पसंत झाला असें कळताच ना. गोखले यांनी असें स्पष्ट अभिवचन दिलें की ' The public opinion will come to its normal state. आता सार्वजनिक चळवळ शांत होअील.' अुघडच आहे. कारण, सर्व चळवळ फुल्लर साहेबाविरुद्धच होती. देशांतील चाळीस कोटी रुपये लुटले जात आहेत म्हणून काही आम्ही चळवळ करीत नव्हतो ! दुष्काळाने रूसो-जपानी युद्धाअितके लोक दरवर्षी मरत आहेत म्हणून आमची चळवळ किंवा स्वदेशाला दारिद्र्याचे नरकात बसावें लागत आहे म्हणूनही आमची चळवळ नव्हती. तर आमची गेल्या वर्षांतील चळवळ फुल्लरच्या राजीनाम्यासाठी होती व आता तो राजीनामा मिळताच लोकांचीं मनें पुन्हा पहिल्यासारखींच थंडगार होतील ! मग स्वदेशाच्या पायातील बेडी अेक रतीभरही सैल न कां होअीना ? पण ' The public opinion will come to its normal state ! ' अशा रीतीने सर्वांची समजूत घालून व ब्रिटिश राज्य 'Providential dispensation' आहे अशी स्वत:चीही समजूत घालून ना. गोखले सी. आय. अी. हिंदुस्थानाकडे जावयास निघाले तोंच अेक भयंकर तार येअून थडकली. अेडवर्ड बादशहा पदच्युत झाले ! व बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी भारतभूच्या राजचिन्हांनी मंडित झाले !

ही तार संध्याकाळच्या पत्रात प्रसिद्ध होताच सर्व लंडन हलू लागलें. कोणास काहीच अुमज पडेना. आज सकाळी हिंदुस्थान आपल्या ताब्यात होता व अेका बारा तासांचे आत तो अेका बंगाली बाबूंच्या ताब्यात गेला हें अैकून कोणास अन्न रुचेना. व्यापारी लोक आपल्या व्यापाराचें काय होअील म्हणून चिंतातुर झाले

पेन्शनर लोक आपल्या पेन्शनचें काय होअील म्हणून चिंतातुर झाले; सर हेन्री कॉटन व वेडरबर्न हे आता हिंदुस्थानचें काय होअील म्हणून चिंतातुर झाले. परंतु ह्या अिंग्लिश लोकांतील चिंतेपेक्षा ब्रिटिश काँग्रेस कमेटीतील अिंडियन सभासदांना तर रात्रभर झोप येअीना. या सर्वांना गोखल्यांनी नुकतेंच वजावून सांगितलें होतें की, हिंदुस्थानवर अिंग्रजांचें राज्य परमेश्वरानेच आपल्या फायद्यासाठी आणलेलें आहे व म्हणून मी या अीश्वरी कृपेचा स्वीकार करून आपण यावच्चंद्रदिवाकरौ तिला अगदी अुराशी धरून बसलें पाहिजे. परंतु बाबू सुरेंद्रनाथाने स्वत: अभिषिक्त होअून अीश्वरदत्त अिंग्रजी राज्याला झुगारून दिलें ! आता हें जर अीश्वराच्या कानावर गेलें तर तो काय म्हणेल ? दु:खात सुख अितकेंच की अिंग्लिश लोक मूर्तिपूजक नसल्याने त्यांच्या अीश्वराला कान नाहीत ! नाही तर यापूर्वीच त्याला ही गोष्ट अैकू गेली असती. परंतु सर हेन्री कॉटनला कान आहेत याची वाट काय लावावी? त्यांना ही गोष्ट हिंदुस्थानपासूनच अैकू आली असेल ! ते हिंदुस्थानच्या हिताकरताच पण रागावले असतील; व हेन्री कॉटन रागावले असता अीश्वर रागावला काय, न रागावला काय सारखाच! तेव्हा सुरेंद्रनाथांनी हें किती घोर पाप केलें! आता याचें क्षालन कसें तरी केलेंच पाहिजे म्हणून दे. दत्त यांनी लंडन टाअिम्सला अेक पत्र टाकलें. नव्हे, अेक नव्हे दोन पत्रें टाकलीं व त्याच्यात सुरेंद्रनाथांना ब्राह्मणांनी नुसते आशीर्वाद दिले व अशा प्रकारचे आशीर्वचनविधि हिंदुलोकांत वारंवार करण्यात येतात म्हणून त्यात भीति वाटण्यासारखें काहीअेक कारण नाही, असें प्रसिद्धपणे कळवून पुढे लिहिलें आहे की सुरेंद्रनाथांना हल्ली फार गर्व झालेला आहे व त्यामुळे त्यांच्या हातून असले हास्यास्पद प्रकार घडत आहेत. ब्राह्मणांच्या आशीर्वचनाची सुरेंद्रनाथांना भूक कां लागावी हें मला काही समजत नाही. अितकें लिहून R. C. Datt म्हणून खाली सही केली आहे. पण पुन्हा शंका आली की आपल्यावर अिंग्लिश लोकांचा विश्वास कसा बसेल ? असें काय आपल्या अंगी आहे ? थोडा वेळ विचार करून त्यांनी अुत्तम तोड काढली व वरील नुसत्या सहीखाली 'Late Civil Servant' 'आपलाच अेक वंदा गुलाम' म्हणून असलेल्या थोर पदवीनें राजनिष्ठा नम्रतापूर्वक नमूद केली. हें पत्र प्रसिद्ध झाल्यावर लंडनच्या साहेबलोकांस जरा धीर आला. हिंदुस्थान अजिबात सुटलें नाही, म्हणून आनंद झाला व जो तो दे. दत्तांची पाठ थोपटू लागला.

परंतु संकटें कोसळू लागलीं म्हणजे अेकदम कोसळतात. दे. दत्तांनी सुरेंद्रनाथांच्या राज्याभिषेकाचें संकट टाळलें व अिंग्लिश लोक आपल्या या अेका गुलामाच्या आश्वासनावर स्वथ वसले न वसले तोंच बंगालमध्ये सुरेंद्रनाथांच्या राज्याभिषेकाहूनही अेक भंयकर प्रकार चालू असल्याची वातमी आली. 'डेली न्यूज' नांवाच्या दैनिक पत्रात प्रसिद्ध झालें की बंगालमध्ये 'Golden Bengal' म्हणून गुप्त संस्था असल्याचा तपास लागत आहे. तिच्या शाखा फार विस्तृत पसरलेल्या

आहेत व तिने नुकतेंच अेक हस्तपत्रक प्रसिद्ध करून त्यात 'Why Cry ? Drive out the Saheb' म्हणून मजकूर प्रसिद्ध केला आहे ! सुरेंद्रनाथांनी आपल्या राज्यारोहणाच्या भाषणात असें सांगितलें की विलायती साखरेत डुकराचें व गाअीचें रक्त मिसळलेलें असतें. अशा रीतीने सर्व बंगालमध्ये १८५७ च्या वेळेस सुरू असलेल्याच गोष्टी सुरू झालेल्या आहेत. 'वंदे मातरम्' नांवाच्या "चटोर' पत्रात 'They (The English) desire to make the Government of India popular, without ceasing in any sense to be essentially English. We desire to make it autonomous and absolutely free of British control' म्हणून मजकूर प्रसिद्ध झाला आहे. 'अिंग्लिश लोकांचे मनातून आपली सत्ता हिंदुस्थानावर कायम राहावी; परंतु आमची अशी अिच्छा आहे की आमच्यावर ब्रिटिशांचा यत्किंचितही अंमल न राहता आम्ही पूर्ण स्वतंत्र व्हावें.' या लांबलचक तारेने अिंग्रजांचा खरोखरच धीर सुटला आहे. भित्यापाठी ब्रह्मराक्षस म्हणतात तें काही खोटें नाही. अिंग्लंडमध्ये हल्ली काय स्थिति आहे हें थोडें तरी लक्षात यावें यासाठी अिंग्लंडमधल्या प्रमुख पत्रांतील काही अुतारे देतो.

डेली क्रॉनिकल :– 'Hindu unrest' या सदराखाली लिहितो की 'The Coronation of king Banerjee in Bengal is the climax of political unrest in Bengal. He is a typical Babu, a frothy speaker with no backing of judgement or character. The cry 'Vande mataram' has a seditious meaning attached to it. Partition of Bengal was the greatest mistake of Lord Curzon' वगैरे. राजा बानर्जी यांच्या राज्याभिषेकात बंगालमध्ये तर या चळवळीचा कळस झाला आहे.

डेली मिररने आपल्या वातर्मीदार दादाभाअींकडे धाडला व बंगालमध्ये अुठावणी होणार कीं काय म्हणून विचारलें ? दादाभाअींनी सांगितलें की तें सर्व सरकारच्या वर्तनावर अवलंबून आहे. परंतु अुठावणी वगैरे काहीअेक होणार नाही.

डेली टेलिग्राफ : He (Banerjee) has just surpassed himself by being crowned and anointed king whether of India or of Bengal only is not stated. In the old days the shift of such an imposter would have been short. The Government would either have clapped him under restraint as a dangerous lunatic or ended his days in summary fashion. But now Banerjee's neck is quite safe ... mined up with the swadeshi movement there is a vague, elusive nationalist feeling which is fostered by a cheap national press. None can form any clear idea as to how much of this wild inflamatory oratory is merely the talk of Banderlog.'

सुरेंद्रबाबूवर या पत्रात शिव्यांचा भडिमार झालेला आहे. हिंदुस्थान बंडाच्या काठावर आहे व ही चळवळ आणखी थोडे दिवस चालली तर या वर्तमानपत्रांनी व वक्त्यांनी जोपासना केलेल्या चळवळीतून भडका अुडेल असें या भविष्यवाद्यांचें म्हणणें आहे.

The Standard :—या पत्रात तर फारच लांब लेख आलेला आहे. "It appears that we are on the eve of an eruption, which though it might take a different form would be hardly less deplorable than the storm that was brewing half a century ago. There is certainly an active and malignant agitation against the Government. Sedition is openly preached and authority defied. To the cry 'India for the Indians' has been added the watchword 'Down with the master foe." The Coronation of the Babu king cannot be overlooked, etc.' हिंदुस्थान १८५७ च्या बंडाच्या तयारीत आहे ! अिंग्लिशांचा अुघड अुघड द्रोह शिकविला जात आहे व हिंदी लोकांसाठीच हिंदुस्थान !' या महामंत्राचा अुच्चार चालला आहे! हें पत्र पुढे म्हणतें की अशाने हिंदुस्थानचें कल्याण होणार नाही. ब्रिटिश राज्यात मिळणाऱ्या नोकऱ्या वगैरे सवलती त्यांना अितरत्र मिळणार नाहीत.

डेली ग्रॅफिक :—या पत्रात Emperor Banerjee म्हणून मथळ्याखाली लेख आलेला आहे. या पत्राने सुरेंद्रनाथांचा अेक फोटोही दिला आहे. 'वंदे मातरम्' पत्रातील हा अुतारा तर बहुतेक पत्रांतून प्रसिद्ध झाला आहे. डेली न्यूजच्या बातमीदारापुढे हेन्री कॉटन यांनी अेक लांब चऱ्हाट वळून असें सिद्ध केलें आहे की, हिंदुस्थानला आता काही सवलती दिल्याशिवाय त्यातील सुशिक्षितांचा ब्रिटिशांच्या सत्तेत असलेला विश्वास व त्यांची राजनिष्ठा अभंग राहणार नाही. लंडन टाअिम्सनेही गडबड अुडवून दिली आहे. स्काटलंडमधल्या प्रमुख दैनिक पत्रानेही बंडाची आरोळी केली आहे.

अेका संस्कृत पंडिताने तर मातरम् शब्दाची व्युत्पत्ति करता करता असें सिद्ध केलें आहे की माता म्हणजे कालीदेवता होय व काली म्हणजे संहारकर्ती देवता होय. म्हणून' 'वंदे मातरम्' म्हणजे 'हे काली, तू अिंग्लिशांचा संहार कर'!

अिंग्लिशांचा संहार कर ! हीं दुःस्वप्नें अिंग्लिशांना कां पडू लागलीं आहेत? परमेश्वराच्या मनात जें असेल तें तो करतो असा आमचा हिंदूंचा भरंवसा आहे, म्हणून देवा, तू अमुकच कर हें त्याला बळे बळे सांगण्याअितके आम्ही अुर्मट झालो नाही. देवाच्या मनात आलें तर संहार किंवा संरक्षण हें त्याला अेका क्षणात करण्याची शक्ति आहे. त्याला तू संहारच कर अशी आज्ञा करण्याची आमची अिच्छा नाही, आमची योग्यता नाही. त्याला आम्ही वंदन करू मग त्याला योग्य वाटेल तें तो करील. हिंदुस्थानातील लोकांत दृढ श्रद्धा अुत्पन्न होते आहे ही गोष्ट

सत्य आहे. आमचें राष्ट्र अुन्नतीच्या मार्गाकडे जात आहे यात शंका नाही. परंतु म्हणून तेथे गुप्त मंडळांची जाळीं पसरलीं आहेत किंवा तेथे अुद्याच बंड होणार आहे अशी भीति अुगीच अिंग्लिशांनी कां वाळगावी ? गुप्त मंडळ्या करावयास आम्ही का रशियन लोक आहोत ? आम्ही हिंदुस्थानचे हिंदी लोक आहोत ! अिंग्रजी राज्य हा अीश्वरी प्रसाद आहे म्हणून आमचे पुढारी शपथेवर सांगत आहेत. अितकी 'राजनिष्ठा' असता वरील तर्क संभवनीय दिसत नाहीत. तें काहीही असो, परंतु अेका पत्रकाराने केलेली सूचना मात्र आपल्या देशबांधवांनी लक्षात ठेवण्यासारखी आहे. ती सूचना अशी की स्वदेशी चळवळीने मुसलमान लोकांचा फार तोटा होत आहे म्हणून आपण ती चळवळ बंद ठेवून आपल्या मुसलमानभाअीशी स्नेह संपादन करावा यातच हिंदुस्थानचें खरें हित आहे.

अशा रीतीने हल्ली हिंदुस्थानाबद्दल भवति न भवति चालू आहे. टोरी किंवा कॉन्झरव्हेटिव्हच्या मताने हिंदुस्थानातील धाडसी चळवळ जुलमाने मारून टाकावी व ब्रिटिश अंमल चिरस्थायी करावा. लिबरल पत्रांच्या मताने जास्त जुलूम जर आता सुरू केला तर हिंदी लोक जास्त चिरडीस जातील. याकरिता किंचित् सवलती देअून त्यांस संतुष्ट करावें व ब्रिटिश सत्ता चिरस्थायी करावी. या पक्षांमध्ये साधनासाधनांमध्ये जरी फरक आहे तरी सुदैवाने ब्रिटिश सत्ता चिरस्थायी करावी हें साध्य उभयतांसही मनापासून आवडतें आहे ! व हेंच साध्य हिंदु लोकांसही आवडतें आहे असें सिद्ध करण्यासाठी हेन्री कॉटनने दे. दत्त व गोखले यांचा सन्मानपूर्वक उल्लेख करून त्यांचीं मनें हिंदुस्थानच्या अंतिम कल्याणाला मिळवितील अशी शिफारस केली आहे! हें अंतिम कल्याण म्हणजे gradually हळूहळू, सरपटत येणारें ब्रिटिश साम्राज्याखालील स्वराज्य हें होय ! हिंडमन यांच्या जस्टिस पत्राच्या ताज्या अंकात त्यांनी लिहिलें आहे की 'अखेर इंग्लंड हिंदुस्थानची काळजी वाहू लागलें. कारण हिंदुस्थान हिंदुस्थानची काळजी वाहू लागलें ! हिंदुस्थान जागे झालें आहे. हल्लीची चळवळ म्हणजे 'The Beginning of the End' आहे. जिकडे सत्य त्याचा विजय असो !'

—ता. ५ ऑक्टोबर १९०६

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. [illegible]

१०. राष्ट्रीय-सभेच्या शेळ्या

लंडन : अेकदा संकटें येअू लागलीं म्हणजे तीं अनेक द्वारांनी आत घुसतात. अिंग्लंडच्या नशिबाला काय झालें असेल तें असो, हातीं सोनें धरावयास जावें तों माती होते, अशी स्थिति चाललेली आहे. आयर्लंड, अिजिप्त, हिंदुस्थान, जिकडे पाहावें तिकडे अनिष्ट ग्रहांचाच अुदय झालेला दिसत आहे. आयर्लंडमध्ये शांतं पापम् करावयासाठी ' होमरूल ' देण्याचा घाट घातला. परंतु त्यायोगाने आयरिश लोक फसण्याचे अैवजी जास्तच दंडेलपणा करू लागले आहेत. अिजिप्तमध्ये अिंग्रजी अिभ्रत कायम राहावी म्हणून काही मुसलमानांना अत्यंत क्रूरतेने शिक्षा दिल्या. परंतु त्याचा परिणाम दरारा राहण्याचे अैवजी द्वेष वृद्धिगत होत चालला. ही द्वेषबुद्धि नुसती अिजिप्तमध्येच थांबती तर बरें होतें, परंतु आपल्या धर्मातील निरपराधी लोकांना पशूहून निंद्य अशा क्रूरतेने अिंग्रजांनी मारावें हें पाहून अस्सल मुसलमानी जातींचे व धर्माचे जेवढे महंमदीय लोक आहेत तेवढ्यांची या क्रूरतेने अिंग्रजांविरुद्ध आग करून सोडली आहे. हिंदुस्थानात तर काय पुसावयासच नको. सुरेंन्द्रनाथ बानर्जीच्या छत्राखाली स्वराज्याचा जयजयकार चाललेला आहे ! अशा स्थितीत कोणाही विचारी मनुष्यास कंप भरल्याशिवाय राहणार नाही हें साहजिक आहे. असा कंप अिंग्रजी पत्रकारांस किती भरला आहे हें मी आपल्यास धाडलेल्या अिंग्रजी उतार्‍यांवरून कळलेंच असेल. परंतु त्यानंतर अेक अतिशय वाअीट गोष्ट घडून आली आहे. हिंदुस्थानात वाटेल ती चळवळ चालली व हवा तो पोरकटपणा सुरू असला तरी जोपर्यंत हेन्री कॉटन हे त्याची काळजी वाहत आहेत तोपर्यंत हिंदुस्थानच्या कल्याणाची काही अेक काळजी नको अशी आशा व खात्री ठेवून अिंग्रज स्वस्थ बसले होते व ती त्यांची खात्री काही अुगीच झालेली नव्हती. राष्ट्रीय सभेच्या शेळ्यांनी आपण होअून हेन्री कॉटनच्या गळ्यात माळ घातली होती या स्वयंवरावरून हें अुघड होतें की, त्या शेळ्याचा त्या हेन्री कॉटनवर स्वयंभू विश्वास होता. बरें, या विश्वासाला व प्रेमाला आपण पात्र व्हावें म्हणून तेही काही थोडें झटले नाहीत. स्वतः ते अजाशत्रूंच्या जातीचे असूनही राष्ट्रीय मेंढवाडग्यात अुगीच धडकी भरेल या भीतीने त्यांनी अेक शेळीचें कातडें पांघरलें होतें. ' रोममध्ये असाल तेव्हा रोमसारखें करा ' अशी अेक म्हण आहे. तीप्रमाणे हेन्री कॉटन ' शेळ्यांमध्ये असू तेव्हा शेळ्यांसारखे दिसू ' या न्यायाने वागले हें ठीकच झालें. परंतु परवा चटकन त्यांच्या हातून अेक फार मोठा प्रमाद घडला. सुरेंद्रनाथ बॅनर्जीच्या व विपिनचंद्रांच्या चळवळी अैकून अिंग्रजाला राग येणें हें अगदी साहजिक होतें. परंत तो राग दाखवीत का कोणी असतो ! अशा वेळेस आत्मसंयमनच केलें पाहिजे. शेळीचें कातडें जसें आजपर्यंत पांघरण्यात जबर आत्मसंयमन केलें

तसेंच अितका दम धरून प्रसंग टाळला असता की बहार अुडाली असती. परंतु ' काम अेष क्रोध अेष ! ' रागाच्या झटक्यात झालें काय की, हेन्रीचें अंगावरचें कातडें त्यांनी फाडून पार झुगारून दिलें ! परवा कै. तय्यबजींच्या दुःखप्रदर्शनाचे वेळी सर हेन्री कॉटन यांनी भाषण केलें व त्यात जुन्या पुढाऱ्यांच्या राजनिष्ठेवद्दल व नेमस्तपणावद्दल स्तुति करून ते रडत ओरडत व जळफळत म्हणते झाले की, " माझ्यापुढे तरुण अिंडियन वसले आहेत. त्यांना माझें कळकळीचें – हिंदुस्थानच्या कळकळीचें सांगणें आहे की, त्यांनी या जुन्या महात्म्यांचें अनुकरण करावें. हिंदुस्थानात हल्ली जे अतिरेकी व अघोरपंथी लोक निघाले आहेत त्यांचें अैकू नका. ते म्हणतात, की आम्हांस पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे, म्हणजे आमचा हिंदुस्थानावरचा अिंग्रजी अंमल नाहीसा करावयाचा. अरेरे, असें करू नका वरें ! राष्ट्रीय सभा मागते आहे तें ठीक आहे. पण ब्रिटिशांचा अंमल नाहीसा करून पूर्ण स्वतंत्रता मिळवावयाची हें म्हणणें अनर्थाचें आहे." सभेत आरोळी अुठली (नाही नाही !) नाही काय, तें अनर्थाचें आहेच आहे ! हेन्री कॉटन हिंदुस्थानचे मित्र ! लांडगा आला रे आला ! राष्ट्रीय मेंढवाडचातील शेळ्या जितक्या लवकर सावध होतील तितक्या बऱ्या !

हेन्री कॉटनची डेलीन्यूजच्या वातमीदाराशी भेट झाल्याचें मागे कळविलेंच आहे. त्यावर या पाळीच्या ' अिंडियन सोशियालॉजिस्ट' मधील टीका वाचण्यासारखी आहे. हिंदुस्थानात पुष्कळ लोक स्वातंत्र्य मागत आहेत म्हणून हेन्री कॉटन त्यांना अघोरी पंथात काढीत आहेत तें ठीकच आहे. परंतु हा अघोरी पंथ केवळ हिंदुस्थानातच आहे असें नाही. अिंग्लंडमध्येही अेक अघोरी पंथ राजकीय स्वातंत्र्य मागत आहे. या अघोरी पंथाची अेक टोलेजंग सभा नुकतीच हाअिड पार्कमध्ये झाली. या अघोरी पंथात सर्व स्त्रियांनी आपलीं नांवें नोंदवून घेतलीं आहेत. अिंग्लंडमधल्या स्त्रियांना राजकीय स्वातंत्र्य पाहिजे आहे ! या सभेत मिस पँथर्स बाअीचें भाषण झालें. त्यातील अेक अुतारा देतो. " आम्ही हें पक्कें जाणून आहो की स्त्रियांचे अिंग्लंडमध्ये जे अत्यंत हाल होत आहेत त्यांचें मुख्य कारण आमचें राजकीय पारतंत्र्य होय. आम्हांला पूर्ण राजकीय स्वातंत्र्य पाहिजे आहे. या कामी पुरुषांनी आम्हांस साह्य द्यावें अशी आमची अिच्छा आहे. परतु जर ते खुषीने आम्हांस राजकीय स्वातंत्र्य देत नसतील तर आम्ही साफ सांगतो की, आम्ही स्त्रिया तें त्यांचेपासून हिसकावून घेण्यास समर्थ आहोत. आम्ही मनात आणताच सर्व अिंग्लंडचे व्यवहार अेका दिवसात बंद पाडू शकू व राजकीय स्वातंत्र्य हिसकून जिंकून घेअू शकू ! ' हिंदी देशबंधूनो ! ही अेक स्त्री बोलते आहे व आपण अजून नेमस्त पुरुष आहोत ! गुलामगिरीचा वरवंटा पुन्हा कोणत्याही देशावरून न फिरो !

गुलामगिरीचा वीट येणें हें काही मोठें नवल नाही. तो वीट आजपर्यंत आला नाही हेंच खरें नवल आहे. परंतु आता हेन्री कॉटन कितीही रागावले तरी गुलामगिरीचा शेवट जवळ आला आहे यात शंका नाही. दादाभाईंच्या अध्यक्षत्वाचे आड लपून हेन्री कॉटनने ज्या अघोरी पंथावर गोळ्या झाडल्या त्या पंथातच देशभक्त शामजी कृष्णवर्मा यांची गणना आहे. त्यांच्यावर अिंग्रजी पत्रें कितीही बोटें मोडीत असलीं तथापि हिंदुस्थानच्या भाग्याचे जे काही किरण हल्ली चमकत आहेत त्यांत त्यांची गणना अितिहासास करावी लागणार यात शंका नाही. देशभक्त शामजींनी अेडमंड बर्क नांवाची स्कॉलरशिप आपले महाराष्ट्रातील देशबंधु प्रधान बी.अे., अेल. अेल. बी. यांना दिल्याचें सर्वविश्रुतच आहे. त्या लेक्चरशिपच्या नियमाप्रमाणे ठरलेला निबंध परवा दे. प्रधान यांनी वाचून दाखविला. 'भावी भारतनिर्मिति' हा विषय होता. त्या विषयाचें दे. प्रधान यांनी फारच विस्तृत, जोरदार, सुंदर व यथार्थ विवेचन केलें. तो निबंध बहुतेक प्रसिद्ध होअीलच. त्यांनी भावी भारताचो निर्मिति कशी करावयाची हें सांगण्याच्या आधी प्रस्तुत स्थितीची शोचनीयता फार मार्मिक रीतीने वर्णन केली. मुसलमानी आमदानीपेक्षा अिंग्रजी वरवंटा अनंत रीतीने स्वदेशभूमीच्या नाशास कारणीभूत झालेला आहे. हल्ली जी शांतता दिसत आहे ती जिवंत लोकांची शांतता नसून मेलेल्यांची शांतता आहे. या शांततेबद्दल अिंग्रजांचे आभार मानावयाचे तर स्मशानशांततेबद्दल मृत्यूचेही आभार कां मानू नयेत हें समजणें फार कठीण आहे. सध्याची झालेली ही दुःस्थिति टाळण्यास दे. प्रधान म्हणाले की पूर्ण राजकीय स्वातंत्र्य हीच अेक मात्रा आहे. स्वातंत्र्य हें निसर्गदत्त आहे. तें आज मिळविणें कठीण दिसतें म्हणून अुद्या तें मिळविता येणार नाही असें कशावरून? अिटलीचे स्वातंत्र्याला कालपर्यंत 'स्वप्नसृष्टि' म्हणत होते! पण आज तीच स्वप्नसृष्टि खरी झालेली आहे व अिटली, तिचें रोम व तिचा आल्प्स हे स्वातंत्र्याच्या निशाणाला आपल्या पवित्र मस्तकावर धारण करून सर्व जगाला स्वातत्र्यागमाची ललकारी देत आहेत! तेव्हा सद्यःस्थितीला टाळण्यास दुसरी तोड नाही. म्हणून पूर्ण राजकीय स्वातंत्र्य पाहिजे आहे! हें मिळविण्याचे अेक दोन अुपायही त्यांनी सुचविले की चहूकडे शिक्षण-वृद्धि करावी. लोकांना राजकीय हक्क समजावून द्यावे; मुसलमान-बंधूनी व सर्व हिंदी लोकांनी अेक व्हावें व स्वातंत्र्याशिवाय थांबावयाचें नाही असा निश्चय करावा. आपण पात्र झालो म्हणजे प्रतिनिधि, स्वातंत्र्य वगैरे देण्याचें अिंग्लिशांनी अभिवचन दिलेलें आहे वगैरे आशयाचें दे. प्रधान यांचें निबंध वाचन झाल्यावर देशभक्त लोकमान्य शामजी यांचें आभारप्रदर्शक भाषण झालें व 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत देशबंधु टागोर—बंगालचे महर्षि टागोर यांचे पणतू—यांनी सुस्वर सुमंगल रीतीने गाअिल्यावर सभेचें काम संपविण्यात आलें.

ही बातमी हेन्री कॉटनला कळेल तर त्यांना काय वाटेल? परमेश्वर त्यांना शांतता देवो!

—ता. २६ ऑक्टोबर १९०६

✦ ✦ ✦

११. हिंदुस्थानचे गारुडी

लंडन : ता. ५–१०–१९०६ शनवारचा दिवस. करमेना म्हणून व्हरायटी 'हिपोड्रोम' मध्ये गेलो होतो. व्हरायटी थिअेटरें आपल्या लोकांना नवीन आहेत म्हणून त्यांची थोडक्यात कल्पना द्यावी असें वाटतें. या थिअेटरमध्ये गाणाऱ्यांचें गाणें, नाचणाऱ्यांचा नाच, खुषमस्कऱ्यांचा खुषमस्करेपणा, पशुपक्ष्यांचे नाना तऱ्हेचे खेळ, बायसिकलवरचें प्रेक्षणीय काम, तालमी, मनुष्यांचीं सुंदर शरीरें, ट्रॅपीझवरचीं कामें, कुस्त्या, जुजुत्सूचे खेळ, अिंग्रजी जादूगार, अित्यादि सर्व गोष्टी पाहावयाला व अैकावयाला सापडतात. ती अेक प्रकारची खिचडीच आहे म्हणावयाची. हिपोड्रोममध्ये गेल्यानंतर अेक प्रोग्राम विकत घेतला व वाचावयास लागलो तों त्यात 'Indian Fakirs, Hindu Conjurers' हीं अक्षरें दिसलीं. हे काय करून दाखविणार यावद्दल मोठी अुत्सुकता प्राप्त झाली. काही वेळाने ते आले. त्यांचा पोषाक, ती त्यांची पुंगी, डमरू व पोतडी अगदी हिंदुस्थानातल्याप्रमाणे. प्रेक्षकांना त्यांच्या पोषाकात तर नवीनपणा वाटलाच, पण त्यांनी जे खेळ करून दाखविले तेही तेथील लोकांना नवीनच होते. अेकंदर ते सर्व खेळ फारच सफाअीने केलेले पाहून त्यांना फार कौतुक वाटलें. त्यांनी ज्या टाळ्या वाजविल्या त्यावरून अमें मानण्यास जागा आहे. खेळ आपल्या अिकडे जे अगदी साधारण आहेत त्यांपैकीच होते. त्या गारुडी लोकांनी आपल्यापैकी अेकाला अेका पेटाऱ्यात अेका जाळ्यात घालून नाहीसा केलेला व फिरून त्याच पेटाऱ्यातून मोकळा बाहेर काढलेला पाहून येथल्या लोकांना फार आश्चर्य वाटलें. खेळ सर्वांच्यासमोर व अगदी नजीक करून दाखविले. त्यांच्याकडे कित्येकांचे डोळे लागलेले होते ! कित्येकांच्या बायनाक्युलर्स लागलेल्या होत्या. पण त्यांनी आपलें काम फार हुषारीने व हातचलाखीने केलें. लोक त्यांची करामत पाहून फार खूष झाले व गारोड्यांनाही मॅनेजराकडून बरेच पैसे मिळाले असतील. शेवटी सॅनफ्रान्सिस्कोच्या भूकंपाचा देखावा पाहून घरी आलो व काही वेळाने झोपी गेलो असता अेक सुंदरसें स्वप्न पडलें · हिंदुस्थानच्या स्टेजवर हिंदु गारुडी मोठे आश्चर्यकारक व साहसाचे खेळ करून दाखवीत आहेत. त्यांच्याकडे दूरदूरच्या राष्ट्रांतील लोकांचे डोळे लागले आहेत. कित्येक छिद्रान्वेषी लोक आपल्या दुर्बिणी लावून बसले आहेत व त्या गारोड्यांचें कोठे बिनसतें अिकडे त्यांचें लक्ष गुंतून गेलें आहे. कित्येक हे काय करून दाखविणार अशा विचारात गटांगळ्या खात आहेत. खेळ खेळावयास चंगभंगाने आव्हान केलें आहे. या लोकांनी काँग्रेसरूपाच्या तोंडातून नेहमी धूर काढावा व अग्नीच्या ज्वाला दाखवाव्या; पण यामध्ये प्रेक्षकांना काही विशेष वाटत नव्हतें व याचा परिणामही त्यांच्यावर काही विशेष झाला नाही. वऱ्याच वेळाने त्यांनी स्वदेशीचा खेळ खेळावयास सुरवात केली. सर्व प्रेक्षक बारकाअीने

पाहू लागले. छिद्रान्वेषी लोक हा खेळ फसणार म्हणून म्हणू लागले. तोंच त्यांची निराशा झाली म्हणून अितर हसले. हा खेळ तर बहारीने पार पडला. दुसऱ्या अेका खेळाला सुरवात झाली. अेका पेटाऱ्यात हिंदुस्थान देश दारिद्र्य, प्लेग आपसांतील तंटे, मत्सर, वाअीट राज्यव्यवस्था, पारतंत्र्य यांच्या जाळ्यात फसलेला दिसला. त्याला या स्थितीतून सर्वांच्या समक्ष नाहीसा करून फिरून त्याच पेटाऱ्यातून बंधरहित व मोकळा करण्याचा विचार त्या हिंदु गारोड्यांचा चालला होता. ते काय करणार अिकडे सर्वांचें लक्ष लागून गेलें होतें व सर्व मोठ्या अुत्सुकतेने व अेकचित्ताने पाहत होते. अितक्यात मी जागा झालो. अरेरे ! कोण वाअीट गोष्ट ! केवढी निराशा ! ! काय झालें तें पहावयाला सापडलें नाही. फिरून निजावयाचा विचार केला. डोळे मिटले तों निराळेंच स्वप्न पडलें. तें थोडक्यात असें : ज्या ज्या हिंदु गारोड्याला म्हणून अिंग्लंडच्या स्टेजवर येअून काम साधून घ्यावयाचें आहे व काही लभ्यांश मिळवावयाचा आहे त्याचा भिक्षा मागून कधीही मतलब साधणें नाही. भिक्षेकऱ्याला अिंग्लंडच्या स्टेजवर जागा नाही. जागा तर नाहीच नाही पण तो अुपहासास मात्र पात्र होअील. येथे येणाऱ्या गारोड्यांनी हा धडा अवश्य घेतला पाहिजे.

—ता. २ नोव्हेंबर १९०६

✦ ✦ ✦

१२. याचा अर्थ काय ?

लंडन, ता. २।११।१९०६. लंडनमध्ये पार्लमेंट सभेत अलीकडे हिंदुस्थानच्या प्रश्नावर काही प्रश्नोत्तरें होत असतात. देशभक्त सुरेंद्रबाबूंना अिकडून याच अर्थी काही पत्रें गेलेलीं सर्वांस माहीत आहेतच. त्यांपैकी अेका पत्रात बंगालची चळवळ जर अशीच नेटाने चालविली व अर्जांची काही भेंडोळीं जर अिंग्लंडमध्ये पुन्हा आलीं तर विभागणी रद्द करण्याचा प्रधानमंडळाचा हेतु आहे असा अर्थ त्यात ध्वनित केला होता. हें पत्र प्रसिद्ध होताच लॉर्ड मोर्लेवर पार्लमेंटमध्ये प्रश्नांचा भडिमार अुडाला. विभागणी रद्द होण्याचा काही संभव आहे का ? अशा आशयाच्या प्रश्नांनी त्रासून जाअून मोर्लेसाहेबांनी असें पुन्हा ओरडून सांगितलें की, ' विभागणी कायम झाली आहे. ती कालत्रयीही रद्द होणार नाही ! ' राजकारस्थानी पुरुषांमध्ये स्पष्ट व सत्य बोलण्याचा दुर्गुण कधीही नसावा. अस्पष्ट, खरेंही नाही व खोटेंही नाही, पूर्ण खोटें असलें तरी चालेल, पण पूर्ण खरें मात्र केव्हाही नाही असेंच बोलणें

कारस्थानी लोकांस शोभतें. हें तत्त्व मोर्लेसाहेबांना माहीत नाही असें नाही. स्पष्ट व सत्य बोलण्याचा दुर्गुण त्यांच्यामध्ये आहे असें म्हणण्याचें धाडस मोर्लेच्या वजेटवरील भाषणानंतर ना. गोखले देखील करू शकणार नाहीत. हिंदुस्थान श्रीमंत होत आहे या वाक्यात मोर्लेच्या वजेटवरील भाषणाचें सर्वस्व आलेलें आहे. आता हिंदुस्थान श्रीमंत होत आहे या वाक्यात सत्याचे दुर्गुणाचा लवलेश तरी आहे काय ? आपलें कारस्थानीपणाचें कर्तव्य पार पाडीत असताना या सत्याच्या दुर्गुणाचा स्पर्शही होऊ नये म्हणून मोर्लेसाहेब यथाशक्ति व यथामति प्रयत्न करीत असतात, परंतु परवा संतापाचे भारात ते स्पष्ट बोलून गेले. विभागणी रद्द होणार नाही असें सांगितल्याने हिंदुस्थानावर काय परिणाम होतील याची ज्याला चांगली कल्पना आहे त्यांना हें स्पष्ट अुत्तर अेकून फार वाअीट वाटलें. त्यांना आपला डाव फसल्यासारखा वाटला. गवताची पेंढी दाखवीत दाखवीत गाय कसाअीखान्यात जितकी लवकर व सुलभ रीतीने आणता येते तितकी तिला खरी हकीगत सांगून कधीही आणता येणार नाही. शिवाय अशा रीतीने फसवीत रंजवीत गाय कसाअीखान्याकडे आणण्यात अेक प्रकारची मजा वाटत असते ती निराळीच ! विभागणी रद्द करतो, आज करतो, अुद्या करतो, केव्हातरी करतो, असें सांगत राहिल्याने बंगालच्या गाअी पृष्ठावरी पुच्छभार वाहोन वाटेल तिकडे पळत सुटल्या व त्यांच्या भरणाऱ्या सभा, त्यांचे होणारे अर्ज, त्यांचीं पोकळ अवसानें, वगैरेंची मजाही वधावयास सांपडली. परंतु ही संधि आता व्यर्थ जाअील असें पाहताच अिंग्लंडमधील आपल्या जिवलग मित्राचें अंतःकरण तळमळू लागलें आहे. बंगालच्या गाअी राजनिष्ठ असल्याने पुन्हा अेकदा जमलें तर पहावें म्हणून कालपासून 'फिरून यत्न करून' पाहण्यात येत आहे. काल मि. रेडमंड व लेबर पक्षाच्या अेकदोन सभासदांनी मोर्लेला प्रश्न विचारले की, 'विभागणीचे कागद पार्लमेंटपुढे हजर कराल का ?' मोर्ले : 'त्या कागदपत्रात काही विशेष माहिती नाही.' प्रश्न— 'पार्लमेंटपुढे आणण्यात विशेष हरकत कोणती ?' अुत्तर : 'ते मागे अेकदा पार्लमेंटपुढे मांडण्यात आलें होतें. नक्की तारीख मला माहीत नाही. मी त्यावेळेस अिकडे लक्ष देत नव्हतो.' मोर्लेसाहेबांना हिंदुस्थानविषयी पूर्ण सहानुभूति आहे. त्याबद्दल आपल्यातील कित्येक जहालात-सुद्धा मतभेद नाही. परंतु अशी ही 'पूर्ण सहानुभूति' मोर्लेसाहेब स्टेटसेक्रेटरी झाल्या-पासूनच अुत्पन्न झाली आहे, हें अैकून मतभेद नसलेल्यांचा विरस होअील. परंतु याचा अुलगडा करणें अगदी सोपें आहे. या जागेवर येण्यापूर्वी मोर्लेचा खिसा व मन रिकामें होतें. जोपर्यंत यांच्या खिशाचें लक्ष हिंदुस्थानाकडे नव्हतें तोपर्यंत यांच्या मनाचेंही लक्ष हिंदुस्थानकडे नव्हतें. परंतु पुढें ही जागा मिळाली तेव्हा अर्थातच ही स्थिति पालटली. कोटाचा खिसा जसजसा हिंदुस्थानच्या पगाराने भरत चालला तसतसा मनाचा खिसा हिंदुस्थानच्या सहानुभूतीने भरत चालला! पार्लमेंटमध्ये काल झालेल्या या प्रश्नांची व अुत्तरांची बातमी वाचून अेक हिंदी तरुण मला म्हणाला

लिबरल गव्हर्नमेंट झाल्यापासून हिंदुस्थानाबद्दल किती चर्चा होऊ लागली पाहिलेत का ? अशात अर्ज करून व सभासदांच्या भेटी घेऊन नेट धरला तर काम फत्ते होईल ! ' असलें वाक्य म्हणणारे हिंदी तरुण अजून निघताहेत हें खरोखर दुर्भाग्य आहे ! पार्लमेंटमध्ये जर हिंदुस्थान आज काय करतें आहे अिकडे अिंग्रजांचें लक्ष लागलें असेल तर, तें अर्जांनी नव्हे किंवा तें. गोखल्यांच्या भेटींनीही नव्हे. तें लक्ष हिंदुस्थानात अुदयोन्मुख होऊ घातलेल्या स्वातंत्र्यपक्षाच्या अवसानाने लागलेलें आहे. अिंग्रजी पार्लमेंटचें लक्ष आता हिंदुस्थानाकडे पहिल्यानेच लागत आहे अशी दुसरी अेक वेडगळ कल्पना आपल्यात प्रचलित आहे. पण आज आहे याहून लाखो पटीने जास्त लक्ष हिंदुस्थानाने अेकदा आकर्षिलें होतें. १८५७ च्या वणव्याचा भयंकर चटका लागताच अिंग्लंडच्या पार्लमेंटमध्येच तर काय, पण अिंग्लंडच्या प्रत्येक झोपडीत सुद्धा हिंदुस्थानाबद्दल प्रश्नोत्तरें झालेलीं आहेत !

तसाच वणवा पेटविण्यासाठी दे. दादाभाअी नौरोजी हिंदुस्थानात जाणार आहेत म्हणे ! पण त्यांस काँग्रेसच्या अध्यक्षत्वाचा सन्मान तिसऱ्यांदा मिळाला म्हणून येथे अेक मेजवानी होणार आहे व त्यात कित्येक एम्. पी. पुढाकार घेणार आहेत! हिंदुस्थानच्या राष्ट्रीयसभेचें अध्यक्षस्थान दे. दादाभाअींना मिळालें म्हणून अिंग्लिशांना अितका आनंद कां वरें झाला असावा ? लो. टिळकांची निवड झाली असती तर हिंदुस्थानवासीयांना जितका आनंद व हर्ष झाला असता, तितका दादाभाअींची निवडणूक होताच अिंग्लिशांना होत आहे याचा अर्थ काय ?

दे. पांडुरंग महादेव वापट बी. अे. यांनी काही दिवसांपूर्वी हिंदुस्थानास होमरूल पाहिजे आहे अशा आशयाचें अेक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. या त्यांच्या स्वदेशाला ' स्वराज्य ' मागण्याच्या अपराधाबद्दल मुंबअी युनिव्हर्सिटीने त्यांची ' मंगळदास नथुभाअी ' स्कॉलरशिप काढून घेतली असल्याची वातमी अिकडे आली आहे. स्वदेशाने गुलामगिरीत पडावें असें म्हणेल त्यासच ही माझी स्कॉलरशिप द्यावी अशी अेखादी शर्त मंगळदास नथुभाअींनी स्कॉलरशिप ठेवते वेळेस घातली होती कीं काय ? हिंदुस्थानच्या तरुण रक्तात निसर्गनिच पेरलेली स्वातंत्र्यभक्ति आता असला वेडगळ धाक दाखवून मारण्याचे दिवस राहिलेले नाहीत!

—ता. २३ नोव्हेंबर १९०६

✦ ✦ ✦

१३. क्रांतीचे प्रवाह

लंडन: विश्वनियमानुरूप क्रांति व अुत्क्रांति यांचे प्रवाह अखंड व सतत वाहत असतात. कालाच्या अुतरणीवरून अकल्पनीय जोराने आपटत आपटत कोसळणाऱ्या प्रपातांना क्रांति म्हणतात व समप्रदेशावर वाहत असणाऱ्या नदीप्रमाणे विश्ववृत्तीचे जे प्रगमनात्मक मंदौघ त्यांना अुत्क्रांति म्हणतात. क्रांति व अुत्क्राति हीं अेकमेकांचीं कार्यें व कारणें होत. क्रांतीतून अुत्क्रांति व अुत्क्रांतीतून क्रांति अुत्पन्न होते. हें अुत्क्रांति-क्रांतिचक्र कालचक्राच्या आरंभापासूनच गतिमान् झालेलें आहे. तत्त्व-क्रांति, धर्मक्रांति, राज्यक्रांति, निरनिराळ्या स्वरूपाने भिन्न भिन्न काली विश्व-वृत्ति प्रगमन करीत आलेल्या आहेत व पुढेही प्रगमन करीत राहतील. साचलेल्या व प्रवाह नसलेल्या डबक्यातील पाणी जसें कुजतें त्याचप्रमाणे स्थिरत्व व शिथिलत्व पावलेल्या मनुष्याच्या किंवा राष्ट्रांच्या अंगांतील पाणीही कुजू लागतें. हें कुजणें नाहीसें करण्यास त्या साचलेल्या पाण्याचा, त्याची गति अडकवून ठेवणाऱ्या बांधाऱ्याचा विध्वंस करून, प्रवाह सुरू करावा लागतो. प्रवाह ही विश्वाची निसर्ग-वृत्तिच असल्याने, लवकर किंवा अुशिरा, मूळरूपाने किंवा रूपांतराने, पण गति-शून्यांना चलन मिळू लागतें. ह्या चलनाच्या आरंभाला, निर्बंधाला फोडून बाहेर घुसणाऱ्या ओघाच्या पहिल्या धडकीला, किंवा गतिशून्य मनुष्याच्या व कुजू पाहणाऱ्या राष्ट्राच्या पायांना बद्ध करणाऱ्या शृंखला प्रगतीच्या घणाखाली तुटत असताना ताडकन होणाऱ्या आवाजाला क्रांति असें म्हणतात. व हा प्रतिक्रियेचा विशेष वेग कमी होअून मूल व सामान्य गति प्राप्त झाली म्हणजे या गतीने होणाऱ्या प्रगमनास अुत्क्रांति म्हणतात. जगातील धर्मक्रांति संपून हल्ली धर्माची अुत्क्रांति सुरू आहे. परंतु जगाच्या राजकारणाची अुत्क्रांति होण्यास शेकडो आप-मतलबाचे व अन्यायाचे बंधारे अडथळे करीत असल्यामुळे अजून बऱ्याच राज्य-क्रांत्या व समाजक्रांत्या अवश्य आहेत. त्या झाल्याशिवाय जगाचें प्रगमन होणार नाही; व प्रगमन ही विश्ववृत्ति असल्यामुळे ह्या क्रान्त्याही झाल्याशिवाय राहणार नाहीत. अशा या प्रगमनात्मक क्रांत्यांपैकी हल्ली किती क्रांत्या सुरू आहेत किंवा सुरू होऊ पाहत आहेत, किती साचलेलीं डबकीं भूकंपाच्या अुसळीने आपले बंधारे फोडण्यासाठी धडकी मारीत आहेत किंवा मारण्याच्या तयारीत आहेत व किती राष्ट्रें आपल्या गुलामगिरीच्या साखळदंडावर घाव घालीत किंवा घाव घालण्याची संधि व साधनें जुळवीत आहेत याचा आढावा काढणें अत्यंत महत्त्वाचें आहे. या महत्त्वाच्या विषयावर मि. हिंडमन या सोशियालिस्ट महनीय विद्वानांचे ' क्रांतीचे प्रवाह ' (The Rapids of Revolutions) या नामाभिधानाखाली अेक अत्यंत महत्त्वाचें जे भाषण झालें तें आपल्या वाचकांसाठी देत आहे. त्यात हिंदी लोकांना शिकण्याचें धैर्य असल्यास पुष्कळ शिकता येअील.

प्रथमतः मि. हिंडमन यांनी इंग्लंडमधील हल्लीच्या निरनिराळ्या राजकीय पक्षांचें व त्यांच्यातील असलेल्या विरोधांचें विवरण केलें. त्यात हिंदुस्थानातील लोकांना रुचण्यासारखें जरी नसलें–कारण गुलामांना स्वतंत्र विचार सहसा रुचत नाहीत–तरी शिकण्यासारखें हें होतें की, मि. हिंडमन यांचे मताने लिबरल व कान्झर्व्हेटिव्ह या दोन पक्षांत नांवाचें तेवढें भिन्नत्व आहे. बाकी हे दोघेही अनुदार मताचेच आहेत. अेक पक्ष जरा भडभड्या स्वभावाचा आहे म्हणून मनातील दुष्ट हेतु तो अुघड बोलून दाखवितो. दुसरा पक्ष थोडा कावेबाज असल्यामुळे दुष्ट हेतूंना गोड भाषेत छपवून ठेवतो. पहिला नुसता दुष्ट आहे. परंतु दुसरा लिबरल पक्ष हा दुष्ट व विश्वासघातकी आहे. या विश्वासघातकी लोकांचे हाती अिंग्लंडचें राज्यसूत्र येअून आज अेक वर्ष होत आलें आहे. या अेका वर्षात त्यांनी कोणतें अुदार कृत्य केलें आहे? जीं कृत्यें केलीं आहेत तीं कान्झर्व्हेटिव्हांच्या कृत्यांहून कोणत्याही रीतीने भिन्न नाहीत. त्यांनी अिजिप्तसाठी काय केलें आहे? हिंदुस्थानासाठी काय केलें आहे? अन्यायाने व अधमपणाने कोटचवधि रुपये लुटून आणले जातात, त्यांतील अेक दमडी तरी यांनी कमी केली आहे काय? मग या पक्षाने फरक तो काय झाला? (मि. हिंडमन येथे जरा चुकले असें मला वाटतें. लिबरल पक्ष आल्यापासून अगदीच फरक झाला नाही हें खोटें आहे. अुदाहरणार्थ, मोर्लेंघ्या. पुस्तकें विकता विकता पोट भरण्याची पहिली अवस्था व लिबरल पक्ष अधिकारावर येताच हिंदुस्थानच्या पगाराने प्राप्त झालेली अवस्था—मोर्लेची गेल्या वर्षाची मुद्रा व आता वर्षभर हिंदुस्थानच्या पैशाने लालबुंद पडलेली मुद्रा यांत असलेला फरक मि. हिंडमनने विसरावयास नको होता.) मि. बाल्फर म्हणतात त्याप्रमाणे लिबरल व कान्झर्व्हेटिव्ह हे अेकमेकांच्या सोंगांची बतावणी करण्यापुरते तेवढे मात्र भिन्न आहेत. बाकी अधमपणात दोघेही भागीदार आहेत. परंतु अिंग्लंडमध्ये हीं दोन्ही डबकीं साचून कुजत चाललीं आहेत हें जरी खरें आहे तरी क्रांतीचा प्रवाह सुरू झाला असल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. लोकपक्ष बळावत चालला आहे. समता व स्वातंत्र्य यांचा विजय नुसत्या अिंग्लंडमध्येच नव्हे– तर सर्व जगावर व्हावा असें म्हणणारा पक्ष बळावत आहे. रशियामध्ये तर लोकशक्तीच्या आघाताने जुलमाचा बंधारा जवळजवळ फोडलाच आहे. मी ज्या वेळी येथे बोलत आहे त्याच वेळेला रशियामध्ये जुलमी जमीनदारांचे हक्क नाशाबीत ठरून भांडवलवाल्यांवर जोराचा घाला पडत आहे व लवकरच रशियामध्ये क्रांतिपक्षाचा विजय झालेला पाहून न्यायप्रिय लोकांना आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. क्राति ही दाबून दवणारी नाही. तिला जितकें दाबावें तितकी ती वर अुसळते. प्रगमनाकडे नेणारी असल्याने क्रांति ही पवित्र वृत्ति आहे असें मी समजतो. हा क्रांतीचा प्रवाह म्हणजे जिवंतपणाचें चिन्ह आहे. हा क्रांतीचा प्रवाह हल्ली तर फारच जोराने सुरू झाला आहे. तो या शतकाच्या आरंभापासून

945945

अतक्या वेगाने धो धो करीत फुगत चाललेला आहे की, त्याच्या अनिवार्य वेगाने पूर्वदिग्भाग आपली झोप सोडून देऊन खडवडून अुठू लागला आहे. अशियात राज्यक्रांति सुरू झाली आहे. आता तिला कोणालाही थांवविता यावयाचें नाही. तिला थांबविण्यासाठी जो कोणी तिच्यापुढे अुभा राहील त्याला अुलथून अेखाद्या नजीकच्या खडकावर छिन्नभिन्न करून टाकून आपला मार्ग साफ करून हा क्रांति-प्रवाह आपल्या अनुकूल वेगाने असाच धावत जाणार ! कोणीही आपल्या गर्वाने फुगून त्याला अडथळा करू नये. कारण तें गर्वाचें फुगणें या अेशियाच्या राज्य-क्रांतीपुढे चेंडूप्रमाणे चिरडून जाईल. हें मी नुसत्या अजमासाने सांगत नाही. हें जपानच्या आधारावर सांगत आहे. ह्या भातखाअू बुटक्या राष्ट्राने मांसखाअू व अगडवंब रशियाला चीत केला. तो या राज्यक्रांतीच्या जोरावर होय. ह्या राज्य-क्रांतीच्या प्रवाहाला थांबवून धरण्यासाठी हा टीचभर रशिया वाटेत आला मात्र, तोंच त्याला अेखाद्या गवताच्या काडीपेक्षाही यःकश्चित् समजून ह्या प्रचंड ओघाने अुलथून दूर झुगारून दिलें; अितका दूर की, पुन्हा त्या प्रवाहाचे आड येण्यासाठी तो पुढे सरू म्हणेल तर त्याला तोंड नाही ! जपानातून निघून तो प्रवाह आता चीनमध्ये शिरत आहे—नव्हे शिरला आहे. मला खात्रीने असें माहीत झालें आहे की, चीनमध्ये भयंकर जागृति अुत्पन्न झाली आहे. चीनमध्ये शिक्षण, राजकारण, सामर्थ्य व स्वदेशाभिमान यांचा प्रसार अत्यंत त्वरेने होत आहे व चीनच्या जागृतीचा परिणाम सर्व जगावर झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु राज्यक्रांतीचा हा अेकच प्रवाह आहे असें नाही. चीनमध्ये स्वातंत्र्य थोडयाबहुत प्रमाणाने कायम होतें व म्हणून तेथे जागृति व क्रांति करणारा प्रवाह कितीही जोराने असला तथापि तो परतंत्रांना स्वातंत्र्यार्थ चेतना देणाऱ्या प्रवाहापेक्षा कमी जोराचाच असला पाहिजे. परंतु सुदैवाने अेशियामध्ये परतंत्रांना स्वतंत्र करण्याची शक्ति धारण करणारा असा अेक राज्यक्रांतीचा प्रचंड प्रवाह सुरू झाला आहे. हा प्रवाह म्हणजे हिंदुस्थानची जागृति होय. अनंत यातनांनी बधिर झालेल्या हिंदुस्थान देशात अखेर चेतना अुत्पन्न झाली आहे. स्वस्वातंत्र्यासाठी सामर्थ्य आणावयाचे त्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. असले स्वातंत्र्यगामी प्रयत्न आपल्या सोशिया-लिस्ट लोकांना सदोदित वंदनीय असलेच पाहिजेत. हिंदुस्थान स्वतंत्र झालें तर आपली कोणतीही हानि होणार नाही, अितकेंच नव्हे, तर आपल्या व्यापाराची त्या योगाने वृद्धिच होअील. दुकानदाराला गिऱ्हाअिकांच्या श्रीमंतीतच फायदा आहे. आपण हिंदुस्थानच्या ह्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांना साह्य केलेंच पाहिजे. कारण भूतदया हा मनुष्यत्वाचा विशेष धर्म आहे. हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा आता डिसेंबरमध्ये भरणार आहे. तिच्या प्रयत्नांना आपली सहानुभूति असलीच पाहिजे. अितकेंच नव्हे तर या प्रचंड सभेला आम्ही अशी विनंती करतो की, हिंदुस्थानचे लोक स्वातंत्र्यसंपादनासाठी राज्यक्रांति करण्यास अुठताच त्यांना शक्य ती मदत

व पूर्ण सहानुभूति देऊ अशी अिच्छा आपण मजबरोवर प्रदर्शित करावी. (येथे त्या प्रचंड सभेत टाळ्यांचा कडकडाट सुरू झाला.) व मी अशी आशा धरतो की, हें तुम्ही दिलेलें वचन कधीही विसरणार नाही. अेशियाचें भाग्य अेशियाच्या प्रयत्नाने व अेंशियानेच अुदयास आणावें ही अभूतपूर्व गोष्ट घडवून आणण्या-साठीच क्रांतीचे प्रवाह अेशियामध्ये कसे सुरू झाले आहेत हें मी आपणांस सांगितलें. फ्रान्स व जर्मनी येथेही राज्यक्रांतीचे नसले तरी समाजक्रांतीचे प्रवाह इंग्लंड-प्रमाणेच वाहत आहेत. हजारो मजूरदारांनी कावाडकष्ट करूनही अुपाशी मरावें, मूठभर आळशी लोकांनी सर्व संपत्तीचा अुपभोग घ्यावा ही अन्यायमूलक पद्धति जितक्या लवकर बदलेल तितकी बदलली पाहिजे. सामाजिक अर्थशास्त्र सुधारणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. अमेरिकेतही अुपाशी मरणारे लोक अिंग्लंडप्रमाणेच लक्षावधि आहेत. तेव्हा राजा असला काय किंवा प्रेसिडेंट असला काय, लोक-स्थिति जर अितकी भयंकर असेल, तर तेथे क्रांति झालीच पाहिजे व म्हणूनच हे क्रांतीचे निरनिराळे प्रवाह सर्व जगभर सुरू झाले आहेत. अिंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, चीन, जपान, अिराण, हिंदुस्थान अित्यादि सर्व पृथ्वीवर निरनिराळ्या स्वरूपाने पण अेकाच हेतूसाठी क्रांतीचे प्रचंड प्रवाह सुरू आहेत. आणि तो अेकच हेतु कोणता ? तो अेकच हेतु मानवी प्रगमन हा होय. या अेकाच अुदात्त हेतूसाठी होणाऱ्या क्रांत्या कोणत्याही भागात झाल्या तथापि त्या सर्वांना अभिनंदनीय असल्या पाहिजेत ! अशा आशयाचें भाषण करून मि. हिंडमन हे टाळ्यांच्या व स्तुतिनादाच्या घोषात खाली बसले.

हिंदुस्थाना ! हें भाषण तू सारग्रहणचिकित्सेने वाच. सावधगिरीने वाच. नाही तर कॉन्झर्व्हेटिव्ह व लिबरल यांच्या कडेवर बसून आपली अुन्नति करून घेण्याची मूर्ख आशा धरून तू जसे आजपर्यंत दिवस घालविलेस, तसेच आता सोशि-यालिस्ट व हिंडमन यांनी मला कडेवर घ्यावें असा खुळा हट्ट धरण्यात बाकीचे दिवस खर्च लागशील; लोकांच्या – ते कितीही गोड बोलले व सज्जनतायुक्त असले तरी – लोकांच्या कडेवर बसून तुला चालता येण्याचें शिक्षण संपादन करता येणार नाही. हिंडमन असें बोलले म्हणून हुरळून जाऊ नकोस. हिंडमनच काय, पण तू कर्तबगारी करून दाखविलीस तर सर्व जग असें बोलेल, हें तुझ्या कर्तबगारीवर अव-लंबून आहे. हिंडमन किंवा कोणीही महात्मा जर खरी सहानुभूति दाखवीत असेल तर ती साभार स्वीकार ! सहानुभूति स्वीकार, पण मागू नकोस ! सन्माननीय आमंत्रण आल्यास जेवावयास जा, परंतु आगंतुकी मात्र करू नकोस. स्वतः कर्तबगारी करून अन्न संपादन कर. परमेश्वराने तुला भारतभूसारखी शेती दिली आहे. त्या विस्तीर्ण शेतीला गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी, सिंधु व ब्रह्मपुत्रा हे अखंड कालवे देवाने तयार करून ठेवले आहेत. ह्या दिव्य शेतीत ह्या अखंड कालव्यांच्या पाण्याने तुझ्या पूर्वजांनी धान्यच नव्हे तर प्रत्यक्ष सोनें पिकविलें आहे ! परंतु

देवाने या शेतीच्या करारात अेक शर्त घातली आहे; ती ही की, ही शेती तूच नांगरली पाहिजेस. तूच ही शेती करशील तर हीत सोनें पिकेल. परंतु दुसऱ्याचा नांगर हिच्यावर फिरला की, हीत प्लेग पिकेल, दुष्काळ पिकेल, पारतंत्र्य पिकेल! मग हा नांगर बाल्फरचा असो किंवा मोर्लेचा असो. ही देवाची शर्त तू पाळलीस की हिंदुस्थाना, पुढच्या हंगामात तुझ्या या दिव्य शेतीत पाअूस पडो किंवा न पडो, कोहिनूर पिकतील, मयुरासनें पिकतील, कालिदास पिकतील, शिवाजी पिकतील!

आत्मैव ह्यात्मनो बंधुः ।

—ता. २०।१२।१९०६.

✦ ✦ ✦

१४. अिंग्लंडातील स्त्रिया व हिंदुस्थानातील पुरुष

लंडन : राजकीय स्वातंत्र्य असलें म्हणजे मानवी शक्तींचीं विकसनें कशीं होअू लागतात, अेक विकसन हें दुसऱ्या विकसनाचें कसें प्रवर्तक होतें व व्यक्ति, राष्ट्र व मनुष्यजाति हीं अभ्युन्नतीकडे कशीं चढूं लागतात याचें अगदी ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे अिंग्लंडमधली सध्या चालू असलेली स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ. होय. प्रथम अिंग्लंडला अप्रतिहत पारतंत्र्य आलें. तेथून रोमन साम्राज्याच्या नाशकाली सुटका होअून तें अप्रतिहत राजसत्तेखाली स्वतंत्र झालें. पुढे राजसत्तेचें अप्रतिहतत्व जाअून तीवर सरदारांचा वचक बसला. नंतर लोकपक्ष आत घुसला व व्यापारीवर्गानेही राजकारणात आपला हक्क शाबीत केला व आता पुरुषांचें राजकीय स्वातंत्र्य स्थापित झालेलें पाहून स्त्रीवर्गाने आपला त्यात असलेला हिस्सा संपादन करण्यास कंबर कसली आहे. ह्या त्यांच्या चळवळीपासून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या असल्याने त्याविषयी थोडीशी संगतवार माहिती आज धाडीत आहे.

स्त्रीस्वातंत्र्याची ही चळवळ सुमारे पन्नास वर्षांपासूनच सुरू आहे. राजकीय भविष्यवेत्ता मॅझिनी याने शेवटी शेवटी हें स्पष्ट रीतीने सांगितलें होतें की, पुढील शतकात स्त्रीजाति आपले राजकीय हक्क स्थापित केल्यावाचून राहणार नाही. अिंग्लंडमध्ये ही चळवळ जरी पन्नास वर्षांपासून सुरू आहे, तरी त्या वेळेस तिच्याकडे कोणाचेंही लक्ष गेलें नव्हतें. त्या वेळच्या काही अुदार पुरुषांनी या चळवळीला अनुमत दिलें होतें; परंतु स्त्रीजातीला राजकीय व्यवहारात हिस्सा मिळविण्यास काही शतकें अुलटावीं लागतील अशीच सर्वत्र समज होती. पार्लमेंटचा

तावा ज्यांच्या हाती होता त्यांनी या चळवळीकडे अुपहासपूर्वक दुर्लक्ष केलेलें होतें. परंतु या दुर्लक्षाला न जुमानता त्या वेळच्या काही पुढारी स्त्रियांनी ही चळवळ तशीच पुढे चालू ठेवली. त्यांचा असा अजमास होता की, या चळवळीबद्दल जनसमाजास माहिती दिली व त्यांच्या सहानुभूतीने पार्लमेंटच्या सभासदांकडे अर्ज केले व निवडणुकीच्या वेळेस विनंतीपत्रें काढलीं की, आपल्यास लवकरच मतदारीचा व पार्लमेंटमध्ये वसण्याचा हक्क मिळेल. या समजुतीप्रमाणे त्यांनी ही चळवळ चालू ठेवली. काही दिवसांनी या चळवळीला व्यावहारिक स्वरूप देण्यासाठी स्त्रियांनी निरनिराळ्या ठिकाणी व्याख्यानमाला सुरू केल्या. मासिक पुस्तकांत लेख येअू लागले व वर्तमानपत्रांतून चर्चा होअू लागल्या. स्त्रीवर्गामध्ये दिवसेंदिवस पार्लमटमध्ये निवडून येण्याचा हक्क आपणांस मिळावा यावद्दल जोरदार व दृढ निश्चयाची अिच्छा वळावत चालली; परंतु या चळवळीस प्रत्यक्ष अमलात आणण्याची अुचल कोणत्याच पक्षाकडून होअीना. स्त्रियांना शिक्षण कमी आहे, त्यांना शिपाअीगिरी करता येणार नाही, त्यांना राजकीय हक्क संभाळण्याचें बुद्धिसामर्थ्यही निसर्गतःच कमी आहे वगैरे मुद्द्यांवर पुरुषवर्गापैकी कोणीही त्यांची दाद घेत नाही, अितकेंच नव्हे तर ह्या पुरुषवर्गाच्या कोट्या खऱ्याच आहेत असें समजून कित्येक स्त्रीपक्षीय पुढारी स्त्रियाही या अडचणी कशा दूर कराव्या ह्या विचारात गढून गेल्या ! परंतु लवकरच त्यांच्या ध्यानात असें आलें की जुलमी लोकांचीं हीं शिळीं विधानें सर्वथैव खोटीं आहेत. स्वतःच्या हातातील सत्ता सोडून देण्यास जुलमी मनुष्य तयार होणार आहे ? व ती आपली सत्ताप्रियता छपवून ठेवण्यासाठी स्त्रिया ती सत्ता चालविण्यास योग्य नाहीत ही सबब आजच पुढें आली आहे कीं काय ? अमेरिका राजसत्ता हिसकून घेअीतोपर्यंत ती अशिक्षित व राजधुरा धरण्यास असमर्थ आहे म्हणून जुलमी राजे म्हणत नव्हते काय ? अिटालीला स्वातंत्र्य सांभाळण्याची अक्कल नाही म्हणून आम्ही तेथे राज्य करतो, हें ऑस्ट्रिया शेवटपर्यंत म्हणत नव्हता काय ? खुद्द अिंग्लंडमध्ये मजूरदारांना पार्लमेंटमध्ये निवडून येण्याचे आधीचे दिवशी, ते त्या हक्कास पात्र झाले म्हणजे आम्ही ते हक्क खुषीने देअू; परंतु आज ते अपात्र आहेत म्हणून त्यांस हक्क देअू नये असें जुलमी बोलले नाहीत काय ? तेव्हा आपण पात्र आहोत किंवा अपात्र आहोत हें आपल्या दात्यावर, मजा मारणाऱ्या जुलमी लोकांच्या म्हणण्यावर ठरविणें, हें केव्हाही अिष्ट नसून तें आपण स्वतःच ठरविलें पाहिजे असें स्त्रियांनी ओळखलें. त्यांनी अिंग्लंडमधील स्त्रीसमाजाचें सूक्ष्म अवलोकन केलें व त्यांच्या लक्षात आलें की, स्त्रीवर्ग पार्लमेंटमध्ये निवडून येण्याचा हक्क मिळविण्यास पूर्ण योग्य आहे. अितकेंच नव्हे तर स्त्रियांचे असामर्थ्याविषयी जो वभ्रा करण्यात येतो त्याचें मुख्य कारण हें राजकीय पारतंत्र्यच आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आपली दुर्बलता व अशिक्षितता जाणार नाही व हे जुलमी लोक तर म्हणतात की ती

दुर्बलता व अशिक्षितता नाहीशी झाल्याशिवाय आम्ही तुम्हांला राजकीय स्वातंत्र्य देणार नाही ! पाण्यात अुतरल्याशिवाय आम्हांस पोहता येणार नाही व हे जुलमी सत्ताधीश म्हणतात की, पोहता आल्याशिवाय आम्ही तुम्हांला पाण्यात अुतरू देणार नाही ! 'अुतरू देणार नाही ? आम्ही अुतरणार ! आम्ही स्वातंत्र्य मिळविणार !' स्त्रियांचे पुढाऱ्यांनी असा निश्चय केला व तो जाहीर केला. हें पाहताच मग पुरुषमंडळात काही स्त्रीमित्र अुत्पन्न झाले व त्यांनी सांगितलें की, स्त्रियांना पार्लमेंटात हक्क मिळावा हा तुमचा अुद्देश स्तुत्य आहे. त्याबद्दल तुमच्या चळवळीस आमची पूर्ण सहानुभूति व मदत आहे. परंतु तुमची ही चळवळ कायदेशीर व सभ्य स्त्रियांना शोभेल अशी असावी. हा अुपदेश त्या वेळच्या स्त्रीपुढाऱ्यांना मानवला व त्यांनी कायदेशीर पद्धतीने भांडण्यास आरंभ केला. कायदेशीर पद्धतीने म्हणजे पुरुषांनी केलेल्या कायद्यांना अनुसरून ! ह्या कायदेशीर पद्धतीमध्ये अेक महत्त्वाचा मुद्दा पुष्कळ लोक विसरत. जेव्हा दोन पक्षांमध्ये स्वामित्वाबद्दल वाद अुत्पन्न होतो तेव्हा वास्तविक रीत्या प्रत्येक पक्षाने आपल्या विजयाला योग्य त्याच हालचाली केल्या पाहिजेत. परंतु सत्ताधीश स्वतंत्र होअू पाहणाऱ्या गुलामांना सांगतात की तुम्ही सांगितलेल्याच हालचाली करून सुटावयाचा प्रयत्न करा! पण कायदेशीर रीतीने चळवळ करा ! दोन पहिलवानांची कुस्ती चालली असता त्यातील अेक दुसऱ्यास सांगतो की, मला पाडण्याच्या अुद्देशाला माझी पूर्ण सहानुभूति आहे. पण तू मला मी सांगतो तेच पेच मारीत रहा. अर्थात ज्या पेचांवरच्या तोडी आपल्याला माहीत आहेत तेच पेच प्रतिपक्षाने आपल्याला मारावे असा त्याचा अर्थ असतो. प्रत्येक व्यक्तीला किंवा राष्ट्राला काही काळाने पारतंत्र्याचा तिटकारा येअू लागतो व ज्या जुलमी राक्षसाने आपणांस परवश केलेलें असेल त्याच्या हातून सुटण्याचा प्रयत्न करण्यास ते गुलामगिरीत पिचणारे लोक सिद्ध होतात. जुलमी लोक गुलामांची ही सिद्धता आता काहीही केल्याने ढिली होत नाही असें पाहून मग तिचा जोर भलत्याच मार्गात फुकट दडवण्यासाठी ही कायदेशीर चळवळीची तोड काढतात ! कायदे कोणी केलेले असतात ? जुलमी लोकांनी आपल्या संरक्षणासाठी व आपले जुलूम अव्याहत राहण्यासाठीच ते कायदे केलेले असतात. असल्या कायद्यांच्या शिरस्त्याने जोपर्यंत अेखादा गुलाम चालतो तोपर्यंत त्याची गुलामगिरी कशी सुटणार ? गुलामाची गुलामगिरी कायम राहावी म्हणूनच त्याच्यावर कायद्याची ही बेडी चढवलेली असते. ही बेडी कायम ठेवून तू पाहिजे तर गुलामगिरी सोड हें म्हणणें लबाडीचें असतें. गुलामगिरी म्हणजेच दुसऱ्याच्या कायद्यांनी बद्ध होणें व तो कायदा कायम ठेवणें म्हणजेच गुलामगिरी कायम ठेवणें ! अशा परिस्थितीत कायदेशीर पद्धतीने गुलामगिरी घालविणें या वाक्याचा आत्मनाशापेक्षा दुसरा कोणताच अर्थ होणें शक्य नाही. पौराणिक भाषेच्या गोष्टीत बोलावयाचें असल्यास, पारतंत्र्य-राक्षसाचें मरण त्याच्या कायद्याचे पुस्तकात असतें-

जोपर्यंत त्याचीं कायद्याचीं पुस्तकें शाबूद आहेत, तोपर्यंत तो कधीही मरणार नाही. आपल्याला कोणी मारण्याला आलें तर त्यास तो मोठा वीरतेचा आव घालून सांगतो की, मानवा, मी लढण्यास सिद्ध आहे. परंतु तू अेक अट पाळली पाहिजेस. ती हीच की, मी मेल्याशिवाय तू माझ्या या कायद्याच्या पुस्तकांचा नाश करू नकोस. गरीब विचारा मानव ! त्याला यातील खोल अर्थ कळत नसतो. या अटीत काहीच नाही असें वाटून तो मानव त्या कायद्याच्या पुस्तकास जपण्याविषयी वचन देतो. आपणांस मारल्याशिवाय आपल्या कायद्यांच्या पुस्तकांचा हा नाश करीत नाही व कायद्याचे पुस्तकात आपलें मरण असल्यामुळे त्यांचा नाश झाल्याशिवाय आपण मरणार नाही असें जाणून पारतंत्र्य-राक्षस मनामध्ये हसत हसत पण वाहेरून मोठ्या काळजीची मुद्रा धारण करून लढाअीस सिद्ध होतो. त्या सबल राक्षसावर तो दुर्बल मानव आघातावर आघात करतो. राक्षसही केव्हा केव्हा मोठी जखम झाल्याचें ढोंग करतो. हें पाहताच आणखी आशेने तो दुर्बल मानव आणखी निकराचा हल्ला करतो. परंतु राक्षस मरत नाही. त्याच्या त्या कायद्याच्या पुस्तकाच्या मर्मस्थळी अेक घाव घालून जें काम व्हावयाचें तें त्याच्या शरीरावर अनंत घाव घालूनही होत नाही. दुर्बल मानव दमून जाअून किंवा राक्षसाची अेखादी थप्पड लागून मरूनही जातो. तरी राक्षस जिवंतच्या जिवंत ! पारतंत्र्य-राक्षसाने या कायदेशीर चळवळीच्या अटींच्या युक्तीने आजपर्यंत जरी पुष्कळ कुस्त्या मारल्या आहेत, तरी केव्हा केव्हा त्याच्याहून वस्ताद गड्यांचा त्याच्या कायद्याच्या मर्मस्थळी घाव लागताच त्याने य:पलायही केलें आहे. अिटलीमध्ये मॅझिनीने या राक्षसाची ही खुबी ओळखली व त्याचें ज्यात मरण आहे त्या कायद्याचे पुस्तकालाच आग लावली ! नेदर्लंडने तेंच केलें. श्रीशिवछत्रपतींनी तेंच केलें व तेंच मर्म जाणून अिंग्लंडमधील स्त्रियांच्या तरुण पुढाऱ्यांनी ह्या कायद्याच्या पुस्तकाला नुकतीच आग लावून दिली. काही दिवसांपूर्वी त्यांनी असा निश्चय केला की पुरुषांनी केलेल्या कायद्यांना जोपर्यंत आम्ही मान देत आहोत तोपर्यंत स्त्रियांची चळवळ यशस्वी होणार नाही. तेव्हा प्रथमत: हे कायदे जुमानावयाचे नाहीत; कायदे मोडताच पुरुष बळाचा अुपयोग करणार, तेव्हा वलाचा प्रतिकार वलानेच करावयाचा असा निश्चय करून तरुण सुशिक्षित स्त्रियांची अेक टोळी तयार झाली. गेल्या निवडणुकीचे वेळी शेकडो अुमेदवारांकडून स्त्रियांना पार्लमेंटचा हक्क देण्याचें वचन घेअून त्यांना निवडून दिलें. परंतु दिलेलें वचन मोडण्यास वेळ किती लागणार ! त्या निवडून आलेल्या पार्लमेंटच्या सभासदांनी स्त्रियांचे वतीने काहीही खटपट केली नाही हें पाहताच स्त्रीवर्गात भयंकर क्षोभ माजला. परंतु त्यांत दोन पक्ष झाले. अेक नेभळा व दुसरा जहाल. नेभळ्या पक्षात म्हाताऱ्या जुन्या पुढारणी आहेत, परंतु जहाल पक्षात सर्व तरुण स्त्रिया आहेत. पहिल्यांचे मताने सभा भरवून 'पुनः अर्ज' करावे असें ठरलें. परंतु या जहाल पक्षाने असा

निश्चय केला की, आता या ' पुनः अर्जा 'च्या शिळ्या पद्धतीला झुगारून देणें भाग पडत आहे. अर्जाचा काळ संपला. आता प्रतिकाराचा काळ आला आहे असें ठरवून प्रतिकार कसा करावयाचा याचा विचार चालला, तेव्हा या जहालपक्षातही दोन भेद झाले. अेक रडक्या प्रतिकाराचे किंवा अप्रत्यक्ष प्रतिकाराचे Passive-resistance चे अभिमानी व दुसरे लढाअू प्रतिकाराचे किंवा प्रत्यक्ष प्रतिकाराचे अभिमानी. प्रतिकार म्हटला की तो रडून कधीही करता यावयाचा नाही. अप्रत्यक्ष प्रतिकाराला प्रत्यक्ष प्रतिकाराचा पाठिंबा असल्याशिवाय नेभळ्या पक्षाहून त्यास जास्त यश कधीही येणार नाही हें ओळखण्याअितक्या अिंग्लंडच्या स्त्रिया अितिहास-शून्य नसल्याने हल्ली या लढाअू प्रतिकाराच्या पक्षात बहुतेक तरुण स्त्रिया मिसळल्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्या पोलिसांशी धक्काबुक्की करीत पार्लमेंट-मध्ये घुसल्या व आत शिरून पार्लमेंटचें काम चाललें असता अेकदम आपली अेक सभा भरवू लागल्या ! ' स्त्रियांस स्वातंत्र्य द्या ' ! म्हणून निशाण फडकलें व व्याख्यानास आरंभ झाला ! तेव्हा अर्थात् पकडापकड होअून त्यांस बाहेर घालविलें गेलें. पुढे कोर्टात चोकशी चालली तेव्हा कोर्टाच्या प्रश्नांस स्त्रियांकडून अुत्तरें दिलीं जात की तुम्हांला आम्ही अुत्तरें देत नाही. कारण तुम्हांला स्त्रियांचें मत न घेता न्यायासनावर वसविलेलें आहे! कायदा कां मोडला या प्रश्नास अुत्तर की तो कायदाच नव्हता. त्यास पुरुषांनी स्त्रियांची संमति घेतल्याशिवाय कायदा बनविला आहे. पुढे त्यांस शिक्षा झाल्या. अेक महिन्याने सर्वांची सुटका होताच पुन्हा मारामारीस आरंभ ! ट्रायब्यूनच्या ऑफिसात अेक सभा भरली व तेथे अेका नेभळ्या पक्षातील स्त्रीचें भाषण झालें. तिने पार्लमेंटमध्ये स्त्रियांनी केलेल्या प्रकाराला नाक मुरडलें न मुरडलें तोंच अेक स्त्री अुभी राहिली व म्हणाली 'आज पन्नास वर्षें तुम्ही ' सभ्य स्त्रियां'सारखें वर्तन करून काय दिवे लावलेत ? कोणता जय मिळविलात ? आजच्या सभेअितके लोक आज ५० वर्षांत तुमच्या अेका सभेला तरी आले होते काय ? पार्लमेंटमध्ये आज जी जिवंत चर्चा चालली आहे हें कशाचें फळ आहे ? हें आमच्या लढाअू प्रतिकाराचें फळ आहे. आम्हीच खऱ्या खऱ्या कुलस्त्रिया आहोत. तुम्ही गुलाम स्त्रिया आहात कारण तुम्ही गुलाम-गिरीतच सभ्यता मानीत आहात !' थोड्याच दिवसात अेका प्रमुख पार्लमेंटच्या मेंबरचें व्याख्यान व्हावयाचें होतें. त्या मेंबरने पार्लमेंटमध्ये स्त्रियांना निंदात्मक शब्द योजिले होते. त्याचे व्याख्यानाचे ठिकाणी व्याख्यान सुरू होताच पांचसहा स्त्रिया व्यासपीठावर अेकदम चढल्या व त्याच्याबरोवर आपणही व्याख्यान देअू लागल्या. ' ह्याने पार्लमेंटमध्ये तुमच्या आयाबहिणींना दुःशब्द लावल्याची तुम्हांस काही शरम असेल तर ह्यांचें भाषण तुम्ही अैकू नये.' असा त्यांनी धुमाकूळ मांडला. तो बोलू लागला की, आपण बोलावयाचें असा अुपक्रम सुरू केला. त्याच वेळेस दुसरीकडे जंगी सभा करून त्यात मुख्य अध्यक्ष स्त्रीने असें जाहीर केलें की:

'आम्ही आता प्रत्यक्ष प्रतिकार करणार आहोत. कोणतीही राज्यक्रांति प्रत्यक्ष प्रतिकाराशिवाय झाली नाही. आम्ही स्पष्ट सांगतो की, अेकाच काय परंतु आमच्याविरुद्ध जाणाऱ्या सर्व पार्लमेंटच्या सभासदांना आम्ही रडावयास लावू, आता त्यांनी सावध असावें.' अशा रीतीने जेव्हा ही जिवंत चळवळ सुरू झाली तेव्हा अिंग्लंड हलकेंच जागें झालें डेली न्यूज, ट्रायब्यून अित्यादि वजनदार पत्रें सहानुभूतीचे लेख लिहू लागलीं. मिसेस फासेस या प्रसिद्ध स्त्रीने स्त्रियांच्या या प्रत्यक्ष प्रतिकारपक्षाविषयी असें म्हटलें आहे की 'यांनी स्वदेश जागा केला.' आज पन्नास वर्षांत जी गडबड झाली नव्हती ती अेकदोन आठवड्यात केली गेली. अेक स्त्री परवा वक्तृत्वपूर्ण भाषेत म्हणाली की, आमच्या या कृत्यांचा महत्त्वाचा अुपयोग म्हणजे स्त्रीवर्गाची जागृति हा होय. सर्व देशभर 'आमच्या भगिनी आपल्या हक्कांची चर्चा करू लागतील व दुसरें असें की जुलमी मदांध सत्ताधीशांच्या डोळ्यात हें चरचरीत अंजन गेल्याने ते खडबडून जागे होतील.' हें अंजन घालण्याचें काम किती नेटाने चाललें आहे याचें प्रत्यक्ष अुदाहरण काल घडलें. काल संध्याकाळी हाअुस ऑफ कॉमन्सवर दुसरी स्वारी करण्याचा बेत ठरला व सुमारे पन्नास स्त्रिया तेथे जमल्या. कायद्याप्रमाणे पार्लमेंटपासून अेक मैलाचे आत सभेचें काम चाललें असता कोणताही सार्वजनिक जमाव वा गलबला करू नये असें आहे, म्हणून मुद्दाम अगदी पार्लमेंटला खेटून स्त्रियांनी व्यासपीठ अुभारलें व दाराकडे अुभे राहून व्याख्यान सुरू झालें. पोलिस तेथून जावयास सांगू लागताच लिबरल गव्हर्नमेंटवर शिव्यांचा वर्षाव सुरू झाला. ते देशबुडवे आहेत, विश्वासघातकी आहेत, अधम आहेत, खोटीं वचनें देणारे आहेत, असा अेकच गलका सुरू झाला ! कसची पार्लमेंट, कसचें काय ! शेकडो स्त्रिया भराभर जमल्या व पार्लमेंटवर तुटून पडल्या ! पार्लमेंटचीं द्वारें बंद केलीं गेलीं असें पाहताच मारामारीस सुरवात झाली. अेक व्याख्यात्री पोलिसाने धरून नेताच दुसरी पुढें येअून अुभी राहिली. तिला धरताच तिसरीने व्यासपीठावर अुडी घेतली ! अेक बाअी आपलें तान्हें मूल घेअून अुभी राहिली व म्हणाली यापुढे आम्ही सर्वजणी आमचीं तान्हीं मुलें घेअून येथे येअू व मग आम्हांस तुम्ही धक्के मारा ! पुरुषांना वाढविण्यास स्त्रियांस काय कष्ट होतात हें जगताला दिसून येअील ! पकडलेल्या स्त्रियांत बॅरिस्टर झालेल्या स्त्रिया प्रमुख आहेत ! ह्या स्वत:च्या बापाच्या, भावाच्या किंवा पतीच्याही अन्यायी परवशतेला न जुमानणाऱ्या अिंग्लंडच्या स्त्रिया स्वदेशावर जर परक्यांचें राज्य असतें तर काय करत्या व काय न करत्या ! अिंग्लंडच्या स्त्रिया व हिंदुस्थानचे पुरुष ! हिंदुस्थाना, तुझ्या विमल यशाला आम्ही कलंकभूत झालो आहोत ! त्यापेक्षा तुझें निसंतान कां झालें नाही !

—ता. ४ जानेवारी १९०७

✦ ✦ ✦

१५. वर्षारंभ

लंडन : ख्रिस्तमसचा सण संपून युरोपमध्ये नवीन वर्ष सुरू झालें. आपल्या अिकडे दिवाळीच्या सुमारास व्यापारी लोक आपापला आढावा काढून व नफ्या-तोट्याचा अंदाज घेअून नंतर ज्याप्रमाणे नवीन प्रपंच सुरू करतात, त्याप्रमाणे अिकडील व्यापाऱ्यांनी आपापल्या धंद्याचे वार्षिक रिपोर्ट तपासून नवीन वर्षी कशा धोरणाने चालावयाचें हें नुकतेंच ठरविलें आहे. व्यक्तिविषयक धोरण कसें ठेवावयाचें हें खाजगी व्यापाऱ्यांनी ठरविलें व राष्ट्राविषयक धोरण या नवीन वर्षात कसें ठेवावयाचें हें राष्ट्रीय व्यापाऱ्यांनी ठरविलें. वर्षारंभ होताच प्रत्येक सार्वजनिक संस्थेमध्ये सभासदांचीं मंडळें जमलीं व आपल्या संस्थेच्या भावी अुत्कर्षासाठी काय केलें पाहिजे याचा विचार करण्यात आला. युरोपच्या वर्षा-रंभाला निरनिराळ्या संस्थांचीं व राष्ट्राचीं अंदाजपत्रकें प्रसिद्ध झालीं. फ्रान्स-मध्ये पोपच्या अधिकारासंबंधी बरीच खडाजंगी अुडालेली आहे. त्या तंट्यात फ्रान्सच्या राजमंडळाला धक्का बसतो की काय याची फार भीति वाटत होती; परंतु आता तशी भीति वाटण्याचें काही अेक कारण नाही अशी वार्ता आलेली आहे. जर्मनीमध्ये पार्लमेंट सभेला केसरने किंचित् अुद्दामपणाने अेकदम खलास केल्याचें अैकल्यावरून सर्व युरोपभर जनक्षोभ झालेला होता. परंतु आता नवीन निवडणुकीस आरंभ झाल्याने वातावरण शांत होत चाललें आहे. अिटलीमध्ये यंदा अखेर समाधानाचा व प्रगतीचा वारा वाहू लागला हें अैकून कोणास आनंद होणार नाही ? महाभाग मॅझिनीच्या लेखणीने व धनुर्धर ग्यारिबॉल्डीच्या तर-वारीने अिटलीच्या 'वसुंधरेला स्वातंत्र्याचा सुंदर रत्नमंडित हार' घालून तिला धन्यता दिली. परंतु त्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जें भयंकर दिव्य करावें लागलें त्यायोगाने अिटलीची तनुलतिका फार क्षीण झालेली होती. परंतु जिच्या हाती स्वातंत्र्याची संजीवनी लागली आहे त्या अिटलीच्या भूमीला क्षीणता किती दिवस त्रास देअू शकणार ? अिटलीच्या यंदाच्या रिपोर्टावरून तेथील लोकांची प्रगति झपाट्याने होअू लागल्याचें अैकून सर्व प्रमुदित झाले आहेत. अिटलीचा खजिना भरू लागला आहे. अिटलीचा जोम वाढू लागला आहे व अिटलीचा देह सबल होत चाललेला आहे. स्वातंत्र्याचा हार अिटलीच्या कंठात पडल्यास तो तिला सोसेल कीं नाही याबद्दल नुकतीच—चाळीस वर्षांपूर्वी—चर्चा सुरू होती ! स्वातंत्र्याचा हार हा सुवर्णरत्नमौक्तिकांनी खचलेला असल्याने तो तोलण्यास जड असतो यात काही शंका नाही; परंतु त्या हारामध्ये अीश्वरी कृपेने असा अेक गुण आहे की, त्याचा स्पर्श होताच तो तोलण्याची शक्ति यावी. हा त्या स्वातंत्र्याच्या हाराचा गुण फार थोड्या धन्वंतऱ्यांना माहीत असतो. ग्यारिबॉल्डीलाही तो माहीत होता व मॅझिनीलाही तो माहीत होता. त्यांना पूर्णपणे माहीत होता म्हणूनच त्यांनी

सर्व जग साशंक असताही तो स्वातंत्र्याचा रत्नखचित कंठा भूदेवीच्या कंठामध्ये घातला व तिला अक्षय्य सालंकृतता दिली. स्वातंत्र्यमालेने जिची तनु विभूषित झालेली आहे त्या अिटलीचा सदोदित अुत्कर्ष असो ! अिटली, फ्रान्स, जर्मनी ह्या राष्ट्रांप्रमाणेच अिंग्लंडमध्येही या वर्षाचीं अंदाजपत्रकें प्रसिद्ध होत आहेत. गेल्या आठवड्यात चंडास हॉलमध्ये मि. हिंडमन याचें 'नूतन वर्ष' या विषयावर जें अेक महत्त्वाचें भाषण झालें त्या भाषणात त्यांनी अिंग्लंडमधल्या राजकीय वातावरणात काय हालचाली होतील याचें सुरेख विवेचन केलें. त्या भाषणात हिंडमन म्हणाले की, यंदा हिंदुस्थानच्या क्रांतीला फार महत्त्व आलेलें आहे. त्या विस्तीर्ण व प्रथित भूमीला स्वातंत्र्यसंपादनार्थ जें युद्ध करावें लागत आहे त्याच्या निकालाकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. हिंदुस्थानाबद्दल हिंडमनने हा जो अुल्लेख केला त्याबद्दल अेका हिंदी गृहस्थाने त्यांचे आभार मानल्यावर ते पुन्हा म्हणाले, 'सुमारे २५ वर्षांपूर्वी जे जे हिंदी तरुण येत ते ते मला म्हणत की, हिंदुस्थानाविषयी तुमचीं मतें फारच कडक आहेत. अितकी कडकी आम्हांस सोसत नाही. परंतु हल्ली येणारे हिंदी तरुण पाहून मला माझींच मतें फार नेमस्त आहेत असें वाटू लागतें. तुमच्या देशात हा सतेज पंथ प्रकट होत असलेला पाहून आम्हांला समाधान वाटतें. हें समाधान काही केवळ भूतदयेनेच वाटतें असें समजू नका. सोशियालिस्ट लोकांची हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यगामी प्रयत्नाला जी सहानभूति आहे तिचें खरें कारण असें आहे की, हिंदुस्थान जोपर्यंत अिंग्लंडच्या ताब्यात आहे तोपर्यंत येथील जुलमी लोकांस जिंकण्याची आम्हांस आशा नाही. हिंदुस्थानात चरून पुष्ट झालेले हे प्राणी फार मारके होतात. त्यांचा माज अुतरविण्याची युक्ति म्हटली म्हणजे त्यांचें चरावयाचें कुरण अजिबात बंद करणें हीच होय व म्हणूनच आमची अशी अिच्छा आहे की, हिंदुस्थानने पूर्ण स्वतंत्र व्हावें. हिंदुस्थानातील चारा बंद झाल्यावर मग आमच्या श्रीमान् व जुलमी वर्गाचा अुद्दामपणा आम्ही अेका क्षणात नाहीसा करू शकू. हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याचे प्रयत्न तुम्ही म्हणता त्याप्रमाणे हिंदुस्थानातच केले पाहिजेत. त्यासाठी तुमचे नेमस्त पुढारी अिंग्लंडमध्ये जो अवाट खर्च करीत बसले आहेत, तो अगदी व्यर्थ आहे. हिंदुस्थानात असताना तेथे लुटलेला पैसा अपुरा वाटूनच की काय कोण जाणे, आमचे परत आलेले अिंग्लिश अधिकारी तुमच्या मोठ्या पुढाऱ्यांना फसवून तुमच्यासाठी झटण्याच्या मिषाने हजारो रुपये लंडनमध्ये गिळंकृत करीत आहेत. हेन्री कॉटन व वेडरबर्न हे तुम्हांला स्वराज्याच्या थापा मारतात व त्या अैकून तुम्ही भुलता ! परंतु मी तुम्हांला स्पष्ट सांगतो की, ही सर्व लबाडी आहे. आमचे देशबंधु कसे आहेत, हे आमचें आम्हांला पूर्ण माहीत आहे व म्हणून मी तुम्हांस अशी विनंती करतो की, तुम्ही या मानभावीपणास अितःपर भुलू नका.' मि. हिंडमन यांनी वर्षारंभीच्या आपल्या अेवढ्याशा भाषणात कितीतरी कोडीं

सोडविलीं आहेत ! आपले देशबंधु अगदी लवाड आहेत हें त्यांनी स्पष्ट सांगितलें. अिंग्लंडमध्ये लोकमत अनुकूल करून घेणें हें किती वेडगळ व अशक्य आहे याचा त्यांनी खुलासा केला. अिंग्लंडचें मत अनुकूल करून घेण्यास अेकच अुपाय आहे व तो हाच की अिंग्लंडच्या मताची कवडीचीही पर्वा न करणें ! १८५७ साली अिंग्लंडमध्ये कोणी डेप्युटेशनें धाडलीं होतीं किंवा कोणी व्याख्यानें दिलीं होतीं ? परंतु ५७ साली अिंग्लंडचें जितकें लक्ष हिंदुस्थानकडे वेधलें होतें त्याच्या शतांशही लक्ष गोखल्यांच्या हजारो व्याख्यानांनीही वेधलें नाही. आपण कृति करू लागलो की अिंग्लंडचें लक्ष आपण नको नको म्हटलें तरी आपल्यामागे धावत सुटेल ! मि. हिंडमनने आणखी अेका मुद्द्याचा स्पष्ट निकाल केला. सोशियालिस्ट लोक हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळावें हें केवळ त्यांचा त्यात फायदा असल्यानेच म्हणत आहेत. अर्थात अुद्या जर अिंग्लंडमधले श्रीमान् लोक व सोशियालिस्ट या दोघांचा मिलाफ झाला तर हिंदुस्थानची संपत्ति लंडनच्या भिकाऱ्यास वाटून देण्यास हे सोशियालिस्ट लोक मागे घेणार नाहीत कशावरून ? तें काहीही होवो, हिंदुस्थानने अेक लक्षात ठेवावयाचें की, आपण स्वतःचे पाय व स्वतःचे हात सवळ केले पाहिजेत. मग सोशियालिस्ट मित्र म्हणून आले तर सलाम करू, शत्रु म्हणून आले तर अर्धचंद्र देअू. अिंग्लडच्या वर्षारंभात अितकें शिकल्यावर आपण आता आयर्लंडच्या वर्षारंभाकडे वळू.

युरोपमध्ये अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अिटली हे देश स्वतंत्र झालेले आहेत. रशिया हा ह्या वरील देशांअितका जरी स्वतंत्र नसला तरी तेथील झार हा त्यांच्या स्वतःच्या देशबंधूंपैकीच आहे. रशियातील पैसा झार नेतो म्हणजे मास्कोहून सेंटपीटर्सबर्गला जातो. यापेक्षा जास्त अन्याय काही होत नाही. परंतु ह्या सर्व देशांहून आयर्लंडची स्थिति फारच भिन्न आहे. युरोपमध्ये हंगेरीसारखे देशही जवळ जवळ पूर्ण स्वतंत्र असता अेकटें आयर्लंड काय तें परकीयांच्या तुरुंगात पडलेलें आहे. सर्व युरोप स्वतंत्रतेचा श्वासोच्छ्वास करीत असताना आयर्लंडची हतभागी भूमि मात्र गुलामगिरीच्या घाणीत कुजत आहे! आयर्लंडला स्वतःचा देश नाही. स्वतःचें नांव नाही. स्वतःचें निशाण नाही ! आयर्लंड हिंदुस्थान झालेलें आहे ! व म्हणूनच गोखले हिंदुस्थानातील लोकांना अुपदेश करतात की, तुम्ही आयर्लंडसारखे नेमस्त व्हा ! नेमस्त ? खरोखर आयर्लंडसारखा नेमस्तपणा धरण्याचें जर हिंदुस्थान मनात आणील तर हिंदभू अुद्या स्वतंत्र होअील ! आयर्लंड नेमस्तपणा धरतें म्हणजे काय करतें आहे याची थोडीशी कल्पना आपल्या वाचकांना देण्यासाठी आयर्लंडमध्ये वर्षारंभाला काय काय सुरू झालें आहे हें थोडक्यात सांगतो. आयर्लंडमध्ये तरुणांचीं मनें अितकीं खवळलेलीं आहेत की, God save the king' हें ठराविक गीत म्हणण्याचें नाकारून ते वर्षारंभाला 'God save Irland' हें राष्ट्रगीत म्हणत आहेत. आयर्लंडची ग्यालिक भाषा अिंग्रजीच्या

चरकात गतप्राण झाली होती. मोठमोठाल्या सभेत आयरिश भाषा कळणारे शंभरांत दहाही निघत नसल्याने इंग्रजी हीच जन्मभाषा होत आलेली आहे ! अुद्या पंढरीच्या यात्रेत चोहोकडे इंग्रजी सुरू होअून वारकऱ्यांत मराठी बोलणारे दोन चार जणच निघावे तशी आयर्लंडची विचित्र स्थिति आज झालेली आहे ! या दुःखदायक गुलामगिरीचा पूर्ण वैताग येअून आयर्लंडला जीवित दुःसह झालेलें आहे. आता स्वतंत्र होअू किंवा मरू, परंतु गुलामगिरीत जिवंत राहावयाचें नाही असा निश्चय तरुण लोक राजरोस रीतीने करू लागले आहेत. स्वदेशी चळवळ जोरावत आहे. अप्रत्यक्ष प्रतिकारही सुरू झाला आहे. लोकांनी दारू पिअू नये, सरकारी नोकऱ्या धरू नयेत, परका माल घेअू नये, इत्यादि निरनिराळ्या रूपाने स्वदेश स्वतंत्र करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. परंतु हे सर्व प्रयत्न सुरू केले तरी राष्ट्रस्वातंत्र्य मिळणें शक्य आहे काय? Passive Resistance अप्रत्यक्ष अूर्फ रडक्या प्रतिकाराने जुलमी मदांधांच्या तावडीतून आपलें आयर्लंड आपणांस मुक्त करता येणें शक्य आहे काय ? 'आम्ही कर देत नाही जा' 'आम्ही अप्रत्यक्ष प्रतिकार करीत आहोत, खबरदार आमच्या अंगाला हात लावशील तर !' अशा नुसत्या दरडावणीला शत्रु भीक घालील काय, वगैरे प्रश्न आपल्या मनाला विचारून आयर्लंड ह्या वर्षारंभाला काही निराळींच अुत्तरें देअू लागलें आहे. अेक आयरिश प्रमुख पत्र म्हणतें, 'आयर्लंडला स्वतंत्र करण्याचा अेकच मार्ग आहे. तो मार्ग म्हणजे इंग्लिशांना हुसकून देणें हा होय.' परंतु इंग्लिशांना हुसकून कसें द्यावयाचें? अर्जानी कीं व्याख्यानांनी, कीं विनंत्यानी, कीं Passive resistance च्या रडक्या प्रतिकारांनी ? तें पत्र म्हणतें की, That can only be done by physical force only; no matter how many little things can be got by other means, there can be no substitute for force to acheieve complete freedom !' बारीकसारीक व अुष्टे तुकडे जरी विनंत्यांनी, लांगूलचालनांनी किंवा पोकळ गुरगुरण्यांनी मिळाले तरी पूर्ण स्वातंत्र्य हें लढाअीशिवाय कधीही मिळणार नाही ! परंतु लढाअी ही तर फार कठीण गोष्ट आहे अशी परतंत्र देशात नेहमीच समजूत असते. पण हें पत्र आपल्या देशबांधवांना म्हणतें की, लढाअी ही गोष्ट फारशी कठीण आहे असें मुळीच नाही. दुष्काळाने व रोगाने काय थोडे आयरिश लोक मरताहेत ! गुलामगिरीत जे जिवंत आहेत ते खरोखरी पाहता मेलेलेच आहेत. मग लढाअीत कठीण तें काय ? लढाअीत शिस्त व कवाअीत फार लागते अशी सर्वसाधारण कल्पना आहे. ही शिस्त मिळविणें हें किती सोपें आहे हें मागे Daily mirror च्या 'तरुण सेने' संबंधाने मी जी हकीकत कळविली आहे तिजवरून दिसून येअीलच. त्याच मुद्द्याचा अनुवाद करून तें पत्र म्हणतें की, 'The essential thing in modern warfare is good shooting' अलीकडच्या लढाअीत कवाअितीचें वगैरे माहात्म्य फार थोडें आहे. कारण

परतंत्रतेतून सुटणाऱ्या देशाला गनिमी काव्यात पळण्याशिवाय अितर कवाअीत फारशी लागत नाही. जपानने रशियाच्या सैन्यादर चाल केली त्या वेळेस त्याच्या सैन्यातील भरती अितकी कच्ची होती की, त्यांना सारखे पायही टाकता येत नसत. परंतु लढाया व विशेषत: स्वातंत्र्याच्या लढाया मनानेच बहुतांशी लढल्या जातात. ज्या मनाला जर नेम अचूक मारण्याचें साह्य असलें तर जयश्री हटकून माळ घालते. परंतु हें अचूक नेम मारणें म्हणजे काही मोठी अजब विद्या आहे असें नाही. हें पत्र म्हणतें की, The boys of fifteen in the Boer ranks were as effective as grown up men. One Boer boy of that age, young Snyman, took five regular British soldiers prisoners. अेका पंधरा वर्षांच्या बोअर मुलाने पांच ब्रिटिश कवाअीतबाज शिपायांना कैद केलें. कारण त्याला अुत्तम नेम मारता येत होता. हे नेम मारणें ही चातुर्याची गोष्ट नसून ती फक्त सवयीची गोष्ट आहे. आता ही सवय आयरिश लोकांनी करावयाची कशी? तर त्यालाही या पत्रकाराने तोड काढली आहे की, ज्याअर्थी आयर्लंडमध्ये सशस्त्र संस्थानें नाहीत त्याअर्थी तरुण लोकांनी अमेरिकेत जाअून नेम मारण्यास शिकावें. याप्रमाणे हजारो आयरिश लोक अमेरिकेत नेम शिकत आहेत अितकेंच नव्हे, तर त्यांनी तेथे आपल्या स्वतंत्र पलटणीही तयार केलेल्या आहेत व त्या पलटणी आपल्या मातृभूमीला सोडविण्यासाठी युद्धभूमीचें आमंत्रण केव्हा येअील याची मार्गप्रतीक्षा करीत सज्ज आहेत !

आयर्लंडचा हा नेमस्तपणा हिंदुस्थानने अुचलावा असा गोखल्यांचा मानस आहे की काय ?

—ता. ८।२।१९०७

✦ ✦ ✦

१६. विमानांची युक्ति

लंडन : गेल्या शतकात विमानांची युक्ति निघाली. तेव्हा अितक्या थोड्या अवधीत त्यांची अितकी प्रगति होअील हें फारच थोडयांच्या लक्षात आलें असेल. अेकोणविसावें शतक बाष्पशक्तीचें शतक होतें. विसावें शतक विद्युत्शक्तीचें शतक आहे. वाफेच्या दिव्यांचे अैवजी विद्युद्दीप व वाफेच्या यंत्रांचे अैवजी विद्युत्यंत्रें चोहोकडे सुरू होअून जगातील कित्येक व्यवहारात फरक घडून आलेला आहे; परंतु हल्ली हवेवर चालत जाण्यासाठी जे प्रयोग सुरू झाले आहेत त्यांच्या साह्याने आजपर्यंत कल्पनातीत वाटणारा असा फरक लवकरच घडून येअील असें आता

निश्चयाने म्हणता येतें. हवेतून गाडी हाकण्याची युक्ति ही आता मनुष्याच्या पूर्ण ताब्यात आलेली आहे. आजपर्यंत विमानांची शक्ति फारच संकुचित असे. फ्रान्समधून अिंग्लंडमध्ये विमानात बसून येता आलें म्हणजे मोठा विजय समजण्यात येत असे. लढाअीतही यापूर्वी थोडाबहुत विमानांचा अुपयोग करण्यात येत असे. ह्या विमानांना अितके दिवस अेक मजेची वस्तु अितकाच काय तो मान असे. परंतु याच्यापलीकडे जगातील सर्व व्यवहार अेकदम बदलून टाकणारा विलक्षण फरक विमानें करू शकतील हें मुळीच शक्य वाटत नव्हतें. या युक्तीचें बहुतेक श्रेय फ्रेंच शोधकांकडे आहे. फ्रान्समध्ये विमानांच्या गतीवर आजपर्यंत शेकडो प्रयोग करण्यात आले व त्या प्रयोगांचा विजय होअून आता लवकरच सर्व जग विहंगावरोवर स्पर्धा करीत आकाशात अुडू लागेल. जमिनीच्या किंवा पाण्याच्या पृष्ठभागावरच काय तो मनुष्यजातीचा अंमल चालावा व आकाशात अुडून चिमण्यांनी देखील मनुष्यजातीचा अुपहास करावा ही लज्जास्पद स्थिति नाहीशी करण्याचें श्रेय ज्या फ्रेंच शोधकांनी घेतले त्यांचे मनुष्यजातीवर अखंडित अुपकार झालेले आहेत. गुलामगिरीच्या वेडया ठोकून मनुष्यजातीला जमिनीवरही चालणें अशक्य करण्यात राक्षसी अिंग्लंड गुंतलें असतांना फ्रान्स देशात स्वर्गीय पंख शोधून काढून मनुष्यजातीला आकाशात स्वच्छंद विहार करण्यास समर्थ वनविण्याचे दीर्घ अुद्योग चाललेले असावे, ही गोष्ट त्यास भूषणावह नाही असें कोण म्हणेल ? हल्ली विमानांत अत्यंत प्रवीणता मिळविलेले शोधक अेम्. डयूमंड हे आपले प्रयोग फ्रान्समध्येच करीत आहेत. आजपर्यंत हवेपेक्षा हलक्या वस्तूंचीं विमानें करण्यात येत असत; परतु या प्रसिद्ध वैमानिकाने आता असें सिद्ध केलें आहे की, हवेहून भारी असणाऱ्या पदार्थाची विमानेंही अुत्तम रीतीने अुडू शकतात. विमानाला आजपर्यंत दोन चाकें लावीत असत. परंतु नुकत्याच केलेल्या प्रयोगावरून अेम्. डयुमंडने असें सिद्ध केलें आहे की अेकचाकी विमान समतोलाने तयार केलें असता तें फार त्वरित हवेत अुडत जातें. विमानाला हल्ली जी अितकी विलक्षण गति देता आली आहे याचें मुख्य कारण मोटार फोर्सची योजना होय. या मोटार फोर्सने जमिनीवरच मनुष्याची गति वाढविली नमून त्याला आकाशात भराऱ्या मारण्यासही मदत केलेली आहे. विमानाला दोन बाजूनी हवा कापीत वर चढण्यासाठी दोन पख जोडलेले असतात. त्या पंखांना हा मोटार फोर्स लावलेला असतो. आजपर्यंत विमानांना पंख लावलेले नसत. ग्यासची अेक पिशवी विमानाचे अग्रभागी लावून हवेपेक्षा हलका असणारा ग्यास त्या पिशवीसुद्धा वर चढू लागला की त्या अुद्गमनशक्तीने विमान वर चढविण्यात येत असे. परंतु हल्ली पंखांची युक्तिही फार पसंत पडत चाललेली आहे. या युक्तीने आता अेम्. डयुमंड हे कित्येक विलक्षण प्रयोगानंतर ५० घोडयांच्या शक्तीचें विमान वर अुडवू शकतात. आजपर्यंत सुमारे १८ मैल अुड्डाण अेका तासात करता येअी. परंतु परवा अेम. डयुमंडने सर्व जगाला

थक्क करणारें आश्वासन दिलें आहे. ते म्हणतात, आता १०० हार्सपॉवरचें विमान अुडविता येअील ! व तें दर ताशी २५० मैल अुडत जाअील ! या शोधाने जगात अतर्क्य फेरफार होणारे असल्याने या आश्वासनाचा व या सुयशाचा सर्व जगभर जयघोष चाललेला आहे. राष्ट्रांना आता पाण्यावरचीं जहाजेंच ठेवून भागणार नाही. तर हवेत तरणारीं प्रचंड लढाअू विमानें अुभारावीं लागणार आहेत. फ्रान्सने तर आजच ८० लढाअू विमानें सज्ज करून ठेवलेलीं आहेत ! जेथे जमिनीवरून जाता येत नसे तेथे मनुष्य पाण्यावरून चालत जाअी. परंतु आता तर जेथे जमिनीवरून वा पाण्यावरूनही जाता येणार नसेल, तेथे मनुष्य हवेवरून अुडत जाणार ! अुत्तर ध्रुवावर बर्फ झालेल्या पाण्यातून किंवा जमिनीवरून जाता येत नाही. अेकूण आता ध्रुवांचा कबजा घेण्यासाठी अेक वैमानिक हवेतून जाणार आहेत व त्यांना प्रेसिडेंट रूजव्हेल्ट हे स्वतः सर्व खर्च देणार आहेत.

अेका प्रचंड गाडीला सतेज, पाणीदार व ज्वान घोडे जोडलेले आहेत व त्यांच्या गाडीवानाची शिटी अैकताच ते हवेत दर तासात २५० मैल आकाश आक्रमीत भरधाव अुडत आहेत अशी कल्पना डोळ्यापुढे आणली व नंतर त्या अवाढव्य कल्पनेला दाबून अेका लहानशा आटोपसर यंत्राच्या स्वरूपात आणली म्हणजे या विमानाचें चित्र बरोबर होअील.

परंतु जों जों मनुष्यजातीचें अुद्धरण हो त आहे तों तों अिंग्लंडचें मरण जवळ येत आहे. पाण्याचें चोहोकडून वेष्टण असलेल्या आपल्या वेटाला अिंग्लंड आजपर्यंत अजिंक्य मानीत आलें आहे फ्रान्स व अिंग्लंड यांचेमध्ये अिंग्लिश चॅनल आहे. त्यातून अेक बोगदा काढून युरोपखंडाशी निकट संबंध व दळणवळण जोडावें अशी शेकडो लोकांनी विनंती केली. परंतु या तुसडया व स्वापराधजन्य भित्रेपणाने सर्वांशी अविश्वास राखणाऱ्या राष्ट्राने तें म्हणणें अैकलें नाही. कारण त्यांना अशी खात्री असे की, पाण्यावर आपला पराभव करून अिंग्लंडवर येण्याची कोणाची ताकद नाही. तें पाण्याचें संरक्षण सोडून देअून अिंग्लंडचा व फ्रान्सचा जर चॅनेलमधल्या बोगद्यातून आगगाडीने संबंध जुळला, तर अेखादे दिवशी फ्रान्सचा नेपोलियन अिंग्लंडच्या सिंहासनावर चढू लागेल. अिंग्लिश चॅनेलमध्ये बोगदा पाडून त्यातून आगगाडी नेल्यास व्यापाराचा फार विस्तार होअील व अिंग्लडला अेकंदरीत फार फायदा होअील हें कळत असूनही आजपर्यंत अिंग्लंड आपल्या पाण्याच्या गुर्मीत चूर असे. परंतु धूर्त फ्रान्सने जेव्हा दर तासाला २५० मैल अुडत जाणारें लढाअू विमान तयार केलें, तेव्हा या स्वयंप्रतिष्ठित अिंग्लंडची जी तारांबळ अुडाली आहे ती काही विचारू नका ! आता अिंग्लिश चॅनेलमध्ये आगगाडी नेली काय व न नेली काय ? हवेतून फ्रेंच विमानें क्षणार्धात अिंग्लंडवर मारा करतील असें पाहून व हिरमुसलें होअून अखेर अिंग्लंड आता व्यापार तरी साधावा म्हणून फ्रान्सशी आगगाडीचा संबंध जोडणार आहे ! —(ता. १५ मार्च १९०७)

१७. दे. श्यामजी कृष्णवर्मा यांचें औदार्य !

लंडन: हिंदुस्थानातील लोकांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून ज्यांचें नांव प्रिय व प्रथित झालेलें आहे त्या देशभक्त श्यामजी कृष्णवर्मा यांनी हिंदभूच्या अुद्धारार्थ जी १०००० रुपयांची नूतन देणगी दिली तिची त्रोटक व संक्षिप्त वार्ता तारेने यापूर्वीच तिकडे आलेली असेल. देशभक्त श्यामजी यांनी 'अिंडियन सोशियालिस्ट' पत्र काढल्यापासून हिंदुस्थानातील पुष्कळ लोकांना त्यांच्या विषयीची माहिती मिळवावी अशी अुत्कंठा असेल म्हणून या प्रसंगाचा फायदा घेअून त्यांच्या व्यक्ति-विषयक चरित्रावद्दल थोडीशी माहिती दिल्यास ती आपले वाचकांना शिक्षणप्रद झाल्यावाचून राहणार नाही. देशभक्त श्यामजी हे आपल्या विद्यार्थीदशेत असतानाच संस्कृत भाषेमध्ये फार प्रवीण झाले होते. त्यांच्या त्या गीर्वाण भाषा नैपुण्यावर लुब्ध होअून श्रीदयानंद स्वामी यांची त्यांच्यावर अितकी मर्जी बसली की, त्यांनी श्यामजींना जवळजवळ पट्टशिष्यच बनविलें होतें. निरनिराळ्या संस्कृत पंडितांशी वादविवादाचा प्रसंग आला म्हणजे श्रीदयानंदांनी प्रथम आपल्या लाडक्या शिष्यांकडून त्यांचें खंडन करवावें व मग जरूर लागल्यास स्वतः शस्त्र अुपसावें. श्रीदयानंदांच्या सहवासाने देशभक्त श्यामजींचें गीर्वाणवाणीप्रावल्य अितकें वाढलें की, धर्मोपदेशकाचें व्रत घेअून ते हिंदुस्थानभर संस्कृत भाषेत भाषणें करीत हिंडू लागले. पुणें, नाशिक, कलकत्ता वगैरेंसारख्या संस्कृत विद्येच्या आद्यपीठस्थानी जाअून देशभक्त श्यामजींनी आपल्या अस्खलित, मधुर व युक्तिप्रचुर भाषणांनी त्या वेळच्या जुन्या व नव्या विद्वानांवर आपली पूर्ण छाप बसविली होती. कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर, रानडे वगैरे विद्वानांनीही पंडितांचा लौकिक व त्यांची विद्वत्ता यांची फार वाखाणणी करावी. श्रीस्वामी दयानंद यांच्या आर्यसमाजातर्फे हें धर्मोपदेशकाचें काम अधिकारयुक्तत्वाने वजावीत असता पं. श्यामजींची संस्कृत भाषानैपुण्याची कीर्ति द्वीपान्तरीही जाअून धडकली होती व दयानंदांच्या अनुमतीने व शिफारशीने त्यांची केंब्रिज कॉलेजच्या संस्कृताध्यापकत्वाचे जागेवर निवडणूक होअून ते अिंग्लंडमध्ये आले. त्या वेळेस ह्या तरुण हिंदी प्रोफेसरास संस्कृत भाषेचें शिक्षण देताना केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या व्यासपीठावर पाहून कित्येक अिंग्रजांस फार चमत्कार वाटे व ते पंडितजींच्या कर्तृत्वाबद्दल फार धन्यवाद गात. परंतु त्या वेळेस कौतुकास्पद झालेले पंडित श्यामजी अेकाअेकी अिंग्लिशांच्या नापसंतीला अुतरून आज दोषास्पद झालेले आहेत ! कारण त्या वेळेस जे 'पंडित श्यामजी' होते ते आज 'देशभक्त श्यामजी' आहेत ! अिंग्रजांच्या रक्तात औदार्य व निःपक्षपात हे गुण सदोदित खेळत असतात असें वाटणाऱ्या मूर्ख लोकांनी हें अुदाहरण सदोदित ध्यानात बाळगावें. पंडितजींची त्या वेळची विद्वत्ता व आजची विद्वत्ता यात जर काही भेद असला तर तो अधिकत्वातच आहे. परंतु अिंग्रजांची प्रीति ही वरवर

वाटते तशी खरोखर सद्गुणसंपन्नतेवर नसून त्यांच्या दास्यलोलुपत्वावर असते. जोपर्यंत तुम्ही त्यांची गुलामगिरी करण्यास कंटाळले आहात हें त्यांच्या नजरेस आलें नाही तोपर्यंत ते तुमच्या संस्कृतप्रावीण्याची स्तुति करतील व तुमच्या वक्तृत्वाची तारीफ करतील; परंतु हें सर्व त्यांच्या जोखडाला मान देण्यास तयार आहात तोपर्यत ! गाडी सुरळीतपणे ओढीत आहेत तोपर्यंत गाडीवाला आपल्या बैलाला कुरवाळतो, थोपटतो, त्याची स्तुति करतो; परंतु बैलाने जरा मान चोरण्यास आरंभ केला की, त्याचे अितर सद्गुण अेका क्षणात दुर्गुण होअून त्याच्या पाठीवर गाडीवानाचे चाबूक अुडू लागतात ! फक्त नवल हें की मानवी बैलांना हें रहस्य अजून कळू नये व त्याने आपल्या पाठीवर चाबूक अुडविणाऱ्यांस निःपक्षपाती म्हणून संबोधू लागावें ! पंडित श्यामजींनी केंब्रिजमध्ये अध्यापकत्व करीत असतानाच तेथील अेम. अे. ची पदवी घेतली व बॅरिस्टरची परीक्षाही दिली. नंतर ते हिंदुस्थानात परत गेले व रतलाम, अुदेपूर वगैरे कित्येक संस्थानांत दिवाणगिरीचीं कामें करून काही दिवस बॅरिस्टरीचें कामही करीत होते. ते काठेवाडात दिवाण असता त्यांच्याच शिफारशीने तेथे आलेला अेक गोरा आपल्या जातिस्वभावास अनुसरून त्यांचेवरच कित्येक आरोप आणू लागला. त्या संस्थानातच नव्हे, तर कोणत्याही संस्थानात काम करण्यास ते नालायक आहेत असें सिद्ध करण्याचा मेक्यानकी नांवाच्या फिरंग्याने घाट घातलेला पाहून देशभक्त श्यामजींनी त्याचें खरें स्वरूप अुघड करण्यास आरंभ केला. हिंदुस्थान सरकारापर्यंत तें भांडण जाअून देशभक्त श्यामजी पूर्ण रीतीने निर्दोष होअून बाहेर आले. नंतर त्यांस अुदेपूरच्या महाराजांनी पुन्हा दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. हें काम काही दिवस केल्यानंतर दे. श्यामजी हे अिंग्लडात आले व प्रसिद्ध तत्त्वज्ञानी हर्बर्ट स्पेन्सर यांच्या ग्रंथाध्ययनात कालक्रमण करू लागले. त्यावेळेस त्यांच्या मनात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीबद्दल जबरदस्त अुत्कंठा अुत्पन्न होअून त्यांना आपल्या राष्ट्राच्या दास्याची शरम वाटू लागली. रात्रंदिवस हिंदुस्थान व त्याचें स्वातंत्र्य याची तळमळ लागलेल्या ह्या स्वदेशभक्ताने अखेर १९०५ च्या जानेवारी महिन्यात आपल्या राजकीय चरित्राला आरंभ केला व हिंदुस्थानातील राजकीय वातावरणात ज्याने महत्त्वाचा फरक पाडलेला आहे त्या 'अिंडियन सोशियालॉजिस्ट मासिक पत्रकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. देशभक्त श्यामजींच्या प्रयत्नांचें विशिष्टत्व हें आहे की, प्रथमपासूनच त्यांनी स्वराज्याचें निशाण अुभारलेलें आहे. अिंग्लंडच्या गुलामगिरीला पूर्णपणाने झुगारून देअून हिंदुभूमि सर्वांग स्वतंत्र झाल्याशिवाय तिचा अुद्धार होणें अशक्य आहे, हें राजकीय सत्य निर्भेळ रीतीने व सुप्रसिद्धपणे अुपदेशिण्याचें प्रथम श्रेय ज्या थोड्या महात्म्यांना आहे त्यात दे. श्यामजींची गणना आहे. 'अिंडियन सोशियालॉजिस्ट' पत्राबरोबरच त्यांनी 'होमरूल सोसायटी' स्थापन केली. त्या सोसायटीचें मुख्याध्यक्षत्व श्यामजींकडेच

आहे व त्यांचेकडे आहे म्हणूनच त्या सोसायटीची स्वातंत्र्यप्रीति व स्वराज्यनिष्ठा जाज्वल्य रीतीने कायम आहे. अिंग्लंडमध्ये अिंग्रजांच्या व विशेषत: मानभावी अिंग्रजांच्या दावाखाली चाललेल्या हिंदी चळवळीचा धिक्कार करून स्वतंत्र व म्हणूनच खरी हिंदी चळवळ अिंग्लंडमध्ये प्रथमत: देशभक्त श्यामजींनी सुरू केल्यापासून हिंदी राजकारणाची दुसरी व सत्य बाजू जगाचे निदर्शनास येऊ लागली. हेन्री कॉटनला वंशपरंपरेने संपादकत्व देणारें अिंडिया व स्वराज्याची पवित्र पताका अुभारणारें 'अिंडियन सोशियालॉजिस्ट' आणि हिंदुस्थानच्या गुलामगिरीवर पोसलेल्या कॉटन, वेडरबर्नच्या मुठीतील ब्रिटिश काँग्रेस कमिटी व स्वदेशाचें स्वातंत्र्य संपादण्यासाठी जन्म घेंगारी व केवळ हिंदी लोकांनीच चालविलेली होमरूल-सोसायटी, या दुकलीतील ध्रुवविरोधावरून हिंदुस्थानच्या राजकारणाचें स्वरूप दे. श्यामजींनी कसें वदलून टाकलें हें सर्वांच्या ध्यानी येअील.

याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे अिकडे येणा-या हिंदी विद्यार्थ्यांचें मन:संक्रमण ही होय. आजपर्यंत जे जे हिंदी तरुण अिकडे आले ते ते नेमस्तांच्या अमलाखाली 'ब्रिटिश न्यायवुद्धि व नेभळेपणा' शिकून परत जात व हिंदुस्थानात अिंग्लंडच्या लोकांबद्दल अद्वातद्वा स्तुतिस्तोत्रें गाअून लोकांना भिक्षांदेहीकडे नेत. परंतु आता देशभक्त श्यामजींच्या 'सोसायटी'ने व मासिक पत्राने मानभावी कॉटनार्चीं कृत्यें कळू लागतात व ते स्वराज्यनिष्ठ होअून स्वदेश स्वातंत्र्यार्थ प्रयत्न करू लागतात. या विद्यार्थ्यांच्या मन:संक्रमणासाठी श्यामजींनी काढलेल्या अिंडिया हाअूस' या संस्थेची अुपयुक्तता फार आहे. या 'अिंडिया हाअूसचा 'चा अिंग्रजांना अितका वचक वसला आहे की अेखाद्या लायब्ररीत वगैरे हा अिंडिया हाअूसचा पत्ता दिला की अेखादा अंग्लो अिंडियन चटकन विचारतो की, 'Then you belong to the Revolutionary Party !' मग आपण राज्यक्रांतिकारक असालच ! या लहानशा प्रसंगावरूनही देशभक्त श्यामजींची अिंग्रजांना किती दहशत वसली आहे हें दिसून येअील. या निरनिराळ्या संस्था काढून अिंग्लंडात स्वातंत्र्याचें अुपदेशकेंद्र काढल्यानंतर देशभक्त श्यामजींनी तरुण लोकांस स्वतंत्र देशात राहून स्वातंत्र्याची प्रत्यक्ष महती कळावी म्हणून 'लेक्चरशिप्स' टेवल्या व प्रत्येकी २००० रुपयांच्या 'राजा प्रतापसिंह, 'शिवाजी', 'अकबर' 'दयानंद' 'फेलोशिप्स 'ही दिल्या. या कामी त्यांना वॅरिस्टर राजा ह्या स्वातंत्र्यनिष्ठाचें फार साह्य झालें. दे. श्यामजी येथेच थांबले नाहीत. हिंदुस्थान स्वतंत्र कसें करावयाचें हा जितका महत्त्वाचा मुद्दा आहे तितकाच स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानात स्वराज्यरचना कशी ठेवावी हा मुद्दाही महत्त्वाचा असल्यामुळे त्या विषयावर अेक अुत्तम व विद्वत्तायुक्त निबंध जो लिहील त्यास रु. ७५० चें बक्षिसही त्यांनी लावलेलें आहे. त्या बक्षिसाची जाहिरात येअून अजून पुरे दोन महिनेही झाले नाहीत तोच परवा होमरूल सोसायटीच्या द्वितीय वार्षिक संमेलनाचे प्रसंगी हिंदुस्थानात स्वराज्योपदेशक

प्रांतोप्रांती धाडण्यासाठी त्यांनी १०००० रुपये दिल्याचें जाहीर केलें. स्वराज्याचा अुपदेश करीत सर्व हिंदुस्थानभर संचार करण्यास जे राजकीय संन्यासी तयार होतील त्यांना या १०००० रुपयांतून साहाय्य होणार आहे. स्वराज्याची अुदात्त कल्पना प्रथम प्रभु रामदासांच्या व श्रीशिवछत्रपतींच्या मनात व तरवारीत प्रादुर्भूत झाली. 'स्वराज्य' शब्द प्रथम छत्रपतींनी महाराष्ट्रदेशात रूढविला. त्या वेळेपासून या पवित्र व तेजोमय शब्दाने मराठ्यांचा जरीपटका अटकेपर्यंत नेला आहे. महाराष्ट्राच्या अितिहासात स्वराज्य व सरदेशमुखी या ओजस्वी शाब्दद्वयाचा शिक्का प्रत्येक पानावर व ओळीवर पडलेला आहे. महाराष्ट्राच्या अंगात चैतन्य ओतणारा तोच हा 'स्वराज्य' शब्द आता हिंदुस्थानात फिरून दुमदुमू लागला आहे. हा अैतिहासिक तेजाने दीप्तिमान् झालेला शब्द – हा शिवछत्रपतींनी अुच्चारलेला शब्द – सर्व हिंदुस्थानचें अंतिम लक्ष्य म्हणून आता समुद्रवलयांकित भरतखंडाचे कंठातून ध्वनित होत आहे. नकळत का होअीना, परंतु ज्या क्षणी दादाभाअींनी हा शब्द राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षपीठावरून तीस कोटी लोकांचें अंतिम लक्ष्य म्हणून अुच्चारला तो क्षण खरोखरीच दैविक होय ! आता पूर्व परंपरागत व अैतिहासिक स्मृतिपूर्ण 'स्वराज्या'चा व 'सरदेशमुखी'चा हक्क आर्यभूपासून दूर ठेवण्याची कोणाची छाती आहे ? स्वराज्याच्या झेंड्याखाली सर्व हिंदुस्थान जमू लागलें आहे व तो जमाव लवकर व्हावा म्हणून स्वराज्योपदेशक धाडण्यासाठी १०००० रुपये देशभक्त श्यामजींनी दिले आहेत. कारण त्यांची अत्यंत अुत्कट अिच्छा आहे की 'मी माझ्या डोळ्यांदेखत माझें परमप्रिय हिंदुस्थान स्वतन्त्र व स्वराज्ययुक्त झालेलें पहावें !'

देशभक्त श्यामजी ! तुम्ही आपले भाषणाचे शेवटी दर्शविलेली ही अिच्छा शीघ्र फलदायी होवो ! त्या स्वराज्यासाठी तीस कोटी आत्मे तळमळोत ! तीस कोटी मनें झुरणीस लागोत ! विशेषत: त्या स्वराज्यासाठी साठ कोटी हात कार्यास लागोत !

—(ता. १५।३।१९०७)

✦ ✦ ✦

१८. स्वदेशाशी कृतघ्नपणा

लंडन – हिंदुस्थानच्या भाग्योदयाचीं जीं कित्येक सुचिन्हें प्रादुर्भूत होऊ लागलीं आहेत, त्यांत अेक महत्त्वाचें चिन्ह म्हटलें म्हणजे हिंदी तरुणांची परदेशातही वाढत जाणारी स्वात्मनिष्ठा हें होय. वाहेरच्या भपक्याला भुलून व देखाव्याला दिपून जाऊन अिंग्लंडमध्ये येणारे हिंदी तरुण हिंदुस्थानच्या असामर्थ्याविद्दल व अिंग्लंडच्या सामर्थ्याविद्दल भलतेच ग्रह आजवर करून घेत आले आहेत. हे हिंदी तरुण परत आपल्या स्वदेशाला जाताना आपण अेखाद्या मोठ्या स्वर्गातून भूलोकाकडे अध्र:पतन करीत चाललो आहोत असें समजत असत. अेखादा मनुष्य अिंग्लंडमधून जाऊन आला की, त्याच्यात सर्व दिव्य गुणांचा समावेश झाला असलाच पाहिजे, अशा भोळसर समजुतीने अिंग्लंडमध्ये परकीय आचारविचारांनी नखशिखान्त बाटलेल्या हिंदी तरुणांच्या वर्तनास फार मान देण्याची चटक गुलामगिरीत रुतलेल्या हिंदी लोकांस आजपर्यंत लागलेली होती. त्या योगाने तर या अर्ध्या हळकुडात पिवळ्या होणाऱ्या परदेशी हिंदी तरुणांस फारच शेफारल्यासारखें होत असे व अिंग्लंडच्या मोठेपणाविषयी, त्याच्या सुधारणेविषयी, त्याच्या अैश्वर्या-विषयी, त्याच्या बलत्वाविषयी निरर्गल अतिशयोक्तीचीं वर्णनें करण्यात व याहून दु:खाची गोष्ट की स्वकीयांच्या व स्वदेशाच्या दारिद्र्याविषयी, अवनतीविषयी व दुर्वलतेविषयी अद्वातद्वा कारणपरंपरा लावून हिंदुस्थानाहून अिंग्लंड हें अनंतपटीने व सर्वतोपरी श्रेष्ठ आहे असें भासविण्यात या निमगोऱ्या साहेबांस फार डौल वाटत असे. अिंग्लंडचा थोरपणा आपण गायला म्हणजे असल्या थोर अिंग्लंडला पाहिलेले आपणही फार थोर आहोत अशी सामान्य जनांची समजूत होअील अशा स्वार्थबुद्धीने या मूठभर बाटग्यांनी आजपर्यंत आपल्या देशाचा तेजोभंग केला. अिंग्लंडला पाहून दिपलेले हिंदी तरुण असे अुपयोगी पडतील ही गोष्ट अिंग्लंडच्या फार दिवसांपूर्वी लक्षात आलेली आहे. अिंग्लंडने हिंदु लोकांस परोपकारबुद्धीने शिक्षण दिलें किंवा नाअिलाजाने व दुष्टबुद्धीने दिलें हें आता हिंदुस्थानातील तरुण पिढी तरी समजून चुकलेली आहे. पूर्वी या शिक्षणाबद्दल अगदी प्रथम नुसती चर्चा सुरू झाली तेव्हा अीस्ट अिंडिया कंपनीने अेक अत्यंत महत्त्वाचा खलिता अिंग्लंड-मध्ये Lord Wilberforce ह्यांना धाडलेला होता. त्यात कंपनी म्हणते ' We have lost America by our folly in allowing the establishment of schools and colleges. Let us not repeat this. Let the Hindus come to England if they want education.' ह्या अत्यंत अनुदार व कुटिल वाक्यात गर्भितार्थ काय आहे ? जें शिक्षण हिंदुस्थानात दिलें असताना आपल्या अंमलास अमेरिकेप्रमाणे विघातक होअील तें शिक्षण हिंदु लोकांस अिंग्लंडात आल्यावर मिळालें असता अपायकारक होणार नाही या म्हणण्याचा अर्थ काय ?

अेक तर अिंग्लंडमध्येच खरें शिक्षण द्यावें कारण फारसे हिंदी तरुण अिकडे येअू शकणार नाहीत असा अर्थ असेल. परंतु हा अर्धा कच्चा अर्थ होय. कारण बंगाल्यातल्यासारखी अेखादी असोसिअेशन स्थापून हिंदुस्थानला हजारो विद्यार्थी परदेशी धाडणें अगदी सुलभ आहे. हें कळण्याअितकें शहाणपण वरील मुत्सद्द्यांस खात्रीने होतें. परंतु त्यांचा मनातील संपूर्ण हेतु असा आहे की, हिंदी तरुण अिंग्लंड-मध्ये शिक्षण घेअू लागला म्हणजे त्या शिक्षणाने त्याचें मन आत्मनिष्ठ होण्याचे स्थली अिंग्लंडचा डामडौल पाहून तें दुर्बल व परदेशी मात्र होअील व त्याच तरुणास अुत्तम विद्वान्, अनुभवी म्हणून लेखणारी हिंदुस्थानची जनता त्यांच्या घातक व भ्रामक शब्दांस यथार्थ समजून अिंग्लंडच्या अिभ्रतीला वचकून राहत जाअील. अिंग्लंडच्या या कौटिल्याचीं अुदाहरणें अितरत्रही शेकडो आढळतात. लॉर्ड डलहौसीच्या राज्यतृष्णेने हिंदुस्थानात भयंकर असंतोष माजला, व त्या वेळच्या तेजस्वी पुरुषांना फिरंग्यांच्या अंमलाचा नायनाट करून टाकण्याची स्फूर्ति अुत्पन्न झाली असें पाहताच अिंग्लंडने हीच तेजोवधाची युक्ति अमलात आणलेली होती. निजामचे दिवाण सर सालरजंग ह्यांना अिंग्लंडला आणलें व ग्वाल्हेरचे दिवाण दिनकरराव व महाराज जयाजीराव ह्यांना ५७ चे आरंभी कलकत्त्यास पाहुण-चारासाठी नेलें! या पाहुणचाराने व देखाव्याने हे तिन्ही मुत्सद्दी कसे भ्रष्ट झाले व स्वदेशाशी निमकहरामपणा करून परपक्षाला त्यांनी कसें साह्य केलें हें स्वत: अिंग्रजी अितिहासकारच हसत हसत सांगतात व म्हणतात की अिंग्लंडच्या वैभवाला यांनी पाहिलें नसतें तर हेंही राष्ट्रविक्षोभात सामील झाले असते! नुकतेच येथे दक्षिण आफ्रिकेकडील काही निग्रो संस्थानिक आपल्या तक्रारी मांडण्यासाठी म्हणून आले होते. त्या संस्थानिकांस राजा अेडवर्डच्या भेटीस नेण्यात आलें. तेथील वैभव, कृत्रिम भव्यता दाखवून त्यांना निम्मे ठार केल्यावर मग राजा अेडवर्डचा हस्त-स्पर्शही करविला केला. ह्या गर्दीत ते भोळे संस्थानिक अितके अुल्लू झाले की, त्यांच्या कामाची बिलकुल दाद लागली नसताही त्यांना अिंग्लिशांच्या स्नेहाची व थोरवीची अत्यंत धन्यता वाटली व त्यांनी वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस कळविलें की, Now we are bigger – bigger indeed! We have shaken hands with the great white father !! कर्णाच्या तेजोवधासाठी जशी शल्याची योजना झालेली होती, तशीच हिंदुस्थानच्या तेजोभंगासाठी या निमगोऱ्या साहेबास अिंग्लंडने योजलेलें होतें व अिंग्लंडच्या सामर्थ्याबद्दल किंवा सुधारणेबद्दल जर आपल्या अिकडे विचित्र कल्पना प्रचलित असल्या तर या घातक परिणामाचें अुत्तर-दायित्व अिंग्लडला जाअून आमच्याच पैशाने शिकून आलेल्या या हिंदी तरुणांच्या भ्रष्ट व भ्रमिष्ट अतिशयोक्तीवरच आहे. आपल्यात अेक म्हण आहे की, 'शेळ्यांत मुंडी गाय प्रधान,' त्याचप्रमाणे निरुपद्रवी राष्ट्रांस लुबाडून घेणाऱ्या ह्या अिंग्लिश राष्ट्राची स्थिति आहे. हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचें जर कोणतें कारण असेल तर तें

स्वदेशाभिमानाचा गेल्या शतकाचे आरंभी असलेला अभाव हेंच होय. परंतु हें कारण लपवून ठेवून गुलामगिरीच्या चरकात चिरडून गेलेल्या हतबल लोकांस अिंग्लड असें सांगत, शिकवीत व पटवीत आलें आहे की, तुम्ही गुलामगिरीलाच पात्र आहात व आम्ही राज्य करण्यासाठीच अुत्पन्न झालेले आहोत. त्या अिंग्रजी तुणतुण्याची झील ओढून अिंग्रजांच्या अन्नाने वाटलेल्या हिंदी तरुणांनीही म्हणावें की, खरोखरीच अिंग्रज लोक फार शूर, धाडसी, दृढनिश्चयी, विद्वान्, शास्त्रकला-कोविद; अिंग्लंडचें वायुमान काय, अिंग्लंडची शोभा काय, अिंग्लंडची भव्यता काय, अिंग्लंडमध्ये सर्व अवर्णनीय आहे! अिंग्लंडमधील लोक अुद्योगी व शूर निपजतात याचें कारण तेथील थंड वायुमान व निसर्गरचना होय! असें हे लोक अजून वेधडक सांगत नाहीत काय? अिंग्लंडमधील लोक राक्षसासारखे धिप्पाड आहेत, हें विधान हजारो वेळा केलें जात नाही काय? अिंग्लंडमध्ये अन्याय व अनीति मुळीच नाही व अिंग्रज व्यापारी फार प्रामाणिक असतात, हें म्हणणाऱ्या वेझंट-बाया व बाया-वापड्या काय थोड्या आहेत? अिंग्लंड शस्त्रविद्येत विलक्षण प्रगमन झालेलें आहे ही समजूत आपल्या तिकडे काय थोड्यांची आहे व विशेषतः अत्यंत खेदकारक गोष्ट ही की, हिंदुस्थानचा धर्म, हिंदुस्थानची निसर्गरचना, सबलता, सामर्थ्य, नीति, बुद्धिमत्ता, शौर्य हीं सर्व अिंग्लंडच्यापेक्षा फार फार कमी आहेत, ही आत्मघातकी, असत्य व कुलकलंकदायिनी समजूत विशेषतः सुशिक्षित वर्गात आजपर्यंत किती रूढ होअून बसलेली आहे? अशा स्थितीत अखेर हिंदी तरुणांचे डोळे अुघडलेले पाहून हें हिंदुस्थानच्या अभ्युन्नतीचें अत्यंत महत्त्वाचें चिन्ह आहे असें कोण म्हणणार नाही?

ह्या आत्मनिष्ठ जागृतीचीं प्रत्यंतरें येथे दरक्षणी घडत आहेत. हिंदुस्थाना-सारखा भाग्यवान्, निसर्गसुंदर व रमणीय देश व हिंदु लोकांसारखे वेदप्राचीन, नीतिसंपन्न, प्रेमळ व वीररसभाजन आर्य लोक, अशी जोडी लाभणें हें महद्भाग्याचें फल आहे. असें आता हिंदी तरुणांस कळू लागलें आहे. हिंदुस्थानचे धर्म, रीति-भाति, हिंदुस्थानच्या समाजवृत्ति, हिंदुस्थानचे अितिहास व हिंदुस्थानची आज-पर्यंतची कर्तृत्वशक्ति हीं अितर अुपऱ्या व हंगामी राष्ट्राच्यापेक्षा शतपटीने स्पृहणीय व वंदनीय आणि माननीय आहे व तिला मूर्ख व अंधळ्या सुधारकांच्या अुतावळे-पणाने लाथाडीत सुटण्यासारखें भयंकर पाप केवळ रौरवदायक आहे असें आता तरुण अंतःकरणांस कळत आहे. स्वदेशाभिमानाची ज्योत जी मालवली गेली होती ती अेकदा का पेटली की त्या प्रकाशाने आजपर्यंत आपणांस अडखळून पाडण्या-साठीच ज्या वस्तु अुत्पन्न झाल्या आहेत असे स्वकीय परशत्रु आपल्यास सांगत आले त्याच गोष्टीचें मनोरमत्व व पुण्यपावनत्व पाहून जग तोंडात बोट घालील हें तरुण पिढीस कळू लागलें आहे व अिंग्लडमध्ये येणें म्हणजे स्वदेशाशी कृतघ्न-पणा व अिंग्लडच्या साम्राज्याशी राजनिष्ठा धरणें नव्हे, हेंही त्यांना हळूहळू समजून येत आहे. याचीं अेक दोन अुदाहरणें मासल्यासाठी देतो.

पंजाबी पत्राच्या संपादकांस झालेली क्रूर व राक्षसी शिक्षा अैकताच तरुणांच्या रोषास पारावार नाहीसा झाला. त्यांना आपल्या हतबलत्वाची लाज वाटू लागली व मनगटाच्या ढिलेपणाने आलेलें हतबलत्व मनगटें जोरदार केल्यास अजूनही निघून जाअील ही त्यांची खात्री पटू लागली. जोपर्यंत कायदे करणें व त्या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी तरवार लटकत ठेवणें हें फिरंग्यांच्या स्वाधीन आहे, तोपर्यंत नेमस्तपणा काय किंवा Passive Resistance चा अप्रत्यक्ष किंवा रडका प्रतिकार काय सारखेच विफल होत असे अुद्गार बहुतेकांच्या तोंडून निघू लागले आहेत व खरा मार्ग, यशदायी मार्ग अितिहाससूचित मार्ग कसा स्वीकारावा, याचा हिंदी अंत:करणात अूहापोह होत आहे. मध्यंतरी येथून पंजाबीला सहानुभूति व आनंदप्रदर्शक तारा पाठविण्यात आल्या. आनंद अशासाठी की आपल्यावर अमले अुघड जुलूम करण्याची बुद्धि अखेर मानभावी सत्तेस होअू लागली. अिंडिया हाअूस, केंब्रिज व सायरेन्सेस्टर येथून तारा गेल्या होत्या. नंतर पंजाबीसाठी अेक फंडही काढण्यात आला. या फंडाचें नांव 'पेनीफंड' आहे. या फंडाला येथील मूठभर हिंदी तरुण किती अुत्कटतेने साह्य करीत आहेत हें कळण्यासाठी अेक अुदाहरण देतो. सायरेन्सेस्टरच्या शेतकी कॉलेजात देशबंधु हरनामसिंग बी. अे. (शीख) अित्यादि पांचच हिंदी आहेत. परंतु त्यांनी तत्काल ८० रुपये पाठवून दिले आहेत ! व विशेष महत्त्वाचें हें की, या सहानुभूतीच्या तारा किंवा फंड यांच्यापेक्षा आता वेळ न दवडता काही तरी शेवटचा सोक्षमोक्ष केला पाहिजे अशी सर्वांस अुत्कंठा लागली आहे.

आपल्या महाराष्ट्रात देशभक्त अंताजी दामोदर काळे यांच्या अविश्रांत, असहाय्य व अविरत श्रमाने अुत्पन्न झालेला व त्यांच्याच नेटाने चिरस्थायी झालेला पैसाफंड हा आता लंडनमध्येही गाजत आहे. दे. अंताजी दामोदर काळे यांचें अत्यंत वर्णनीय चरित्र व अेका व्यक्तीने खरा खरा स्वार्थत्याग करून दृढश्रद्धेने अेखादें राष्ट्रकार्य हाती धरलें असता त्यात अेका व्यक्तीलाही किती कार्य करता येतें याचा वृत्तान्त अेकून सर्वांना – रजपुतांना, शिखांना, बंगाली लोकांना, मद्रासी लोकांना, सर्वांना फार धन्यता वाटते. 'पैसाफंडाचे' अुत्पादक याच अर्थपूर्ण व महनीय पदवीने दे. काळे यांचा नामोच्चार येथे होत आहे व या पदवीची किंमत अितर अुसन्या व व्यापारी पदव्यांहून अनंतपटीने जास्त आहे अशी येथे सर्वांची खात्री आहे. पैसाफंडासाठी जवळ जवळ ५० रुपये आधीच जमलेले आहेत व कोणातरी खात्रीचे येणाराबरोबर ते हिंदुस्थानात रवाना होतील. आणखी अेक अुपदेशपर व अुत्साहक गोष्ट घडून आली. अमेरिकेहून देशबंधु देव (बंगाली) हे कृषिकर्मशास्त्रात अेम्. अेससी.ची पदवी घेअून येथे आले. हे बंगालच्या राष्ट्रीय अॅसोसिअेशनचे द्वारा गेले होते. गेल्या आठवड्यात हिंदुस्थानांत जावयाचे पूर्वी ते लंडनमध्ये फेटा मिळेल कीं नाही याची चौकशी करीत होते ! 'आपण हिंदुस्थानात

गेल्यावर फेटा कां घेत नाही ? ' असें विचारता ते म्हणाले ' कलकत्त्यास अुतरताच डोक्यावर जर टोपी पाहिली तर रस्त्यात राप्ट्रपक्षीय मुलें हुर्यो करतात व शिवाय आपण आपल्या देशात परत जाताना स्वदेशीच पोषाख घालणें जास्त भूषणास्पद आहे ! ' ह्या अेका लहान गोष्टीत किती अर्थ भरलेला आहे ! पंचवीस वर्षांपूर्वी अिंग्लंडहून आलेले भ्रष्ट लोक स्वकीय वस्तूंचा तिरस्कार करीत व वाटेपणातच महती मानीत. हिंदुस्थानच्या वाजारात विलायती छपरी टोपींचा शोध करीत असत. आज स्वदेशी पोरें हुर्यो करतील या भीतीने व स्वकीयत्वाच्या यथार्थाभिमानाने अुद्दीपित होअून पदवीधर लोक लंडनच्या वाजारात हिंदी जरतारी फेट्यांचा शोध करीत आहेत !

—दि. १२ अेप्रिल १९०७

✦ ✦ ✦

१९. सावधान !

काळ जातो क्षणक्षण । मूळ येअील मरण
काही धावाधाव करी । जव तो मृत्यु आहे दुरी

लंडन:— कवीचे हे वरील उद्गार हिंदुस्थानच्या सद्य:स्थितीला किती बरोबर लागू पडत आहेत ! ज्या रोगाने हिंदभूची तनु क्षीण होत चाललेली आहे त्या पारतंत्र्याचा दिवसेंदिवस बळावत जाणारा जोर पाहून कोणाच्या जिवास हळहळ वाटणार नाही व कोण असें म्हणणार नाही की ' काही धावाधाव करी । जव तो मृत्यु आहे दुरी '। मृत्यूचे दरवारात काय बेत चाललेले आहेत ते, हिंदसुंदरी, तुला माहीत आहेत काय ? तुझ्या गळ्यात पडणारे त्याचे पाश कसे हळूहळू परतु झपाट्याने करकचले जात आहेत याची, हिंदसुंदरी, तुला कल्पना तरी आहे काय ? क्षण क्षण काळ चालला आहे. त्या प्रत्येक क्षणाबरोबर तुझें क्षीण क्षीण होत जाणारें शरीर अनिवार्य व क्रूर अशा यमसदनाकडे फरफर ओढून नेलें जात आहे, हें तुझ्या नि:संज्ञ गात्रांना संवेदित होत आहे काय ? मृत्यु दूर होता तेव्हाच वास्तविक धावाधाव करावयास पाहिजे होती ! पण आता मृत्यु अगदी नजीक आला आहे. अजून तरी ह्या पवित्र भारताचे प्राण वाचविण्यासाठी कोणी धावाधाव करील काय ? कोणी धावत येअून हिचें रक्षण करील काय ?

कारण आता अवधि अगदी अुरलेला नाही. हिंदुस्थानला नामशेष करण्याचे दुहेरी प्रयत्न कसे चालले आहेत हें जो किंचित् तरी लक्ष देअून पाहील त्याच्या तेव्हाच ध्यानात येअील. आता अवधि अगदी अुरलेला नाही ! सुमारे पन्नास वर्षांपूर्वी हिंदुस्थानचे शरीरात व हिंदभूचे कुसव्यात अितकें सत्त्व होतें की तींत तात्या टोपे, कुमारसिंह व नानासाहेब निपजत असत; रणजितसिंह नवीन साम्राज्यें रचीत असत व वीर लोक चिलियनवालाच्या व कानपूरच्या लढाया लढत असत. परंतु अेका ह्या पन्नास वर्षांत तें सत्त्व क्षीण होत होत हल्लीच्या स्मशानशांततेपर्यंत आलेलें आहे. म्हणजे ५० वर्षांपूर्वी पारतंत्र्यरोगाचा आपले शरीरात झालेला प्रादुर्भाव हाणून पाडण्याची जी शक्ति हिंदभूमध्ये होती ती आज नाममात्रही अुरलेली नाही व जी आज अुरलेली आहे ती अुद्या अुरलेली नसणार ! भयानक पारतंत्र्यरोगाचा प्रादुर्भाव २० वर्षांपूर्वी होता त्याहून आज कितीतरी वाढला आहे व दिवसेंदिवस झपाटयाने वाढत जात आहे ! हिंदुस्थानच्या अंगातील शक्ति कमी होत चाललेली व पारतंत्र्यरोग बळावत चाललेला ! अशी दुहेरी वाणी आलेली आहे ! अशा दुहेरी जबडयात मृत्यु हिंदभूला भरडू पाहत आहे !

हा मृत्युचा जबडा हिंदुस्थानच्या अगदी कंठनालाशी कसा भिडलेला आहे हें कोणास पाहावयाचें आहे काय ? व त्या जबडयात असलेल्या विषमय दातात आणखी नवीन विषमय दातांची भरती कशी होत आहे हें पाहावयाचें आहे काय ? असेल तर हल्ली अिंग्लंड व युरोपखंडात चाललेले प्रयत्न लक्षपूर्वक पहा! वर्तमान-पत्रांत प्रसिद्ध झालेल्या भपकेदार वृत्तान्ताने फसू नका. तर त्या वृत्तान्तात प्रसिद्ध न झालेल्या हेतूकडे लक्ष द्या. गेल्या आठवडयात सर्व अिंग्लंडभर अिंग्रजी साम्राज्या-तील सर्व स्वतंत्र वसाहतींचें जंगी संमेलन भरविण्याची गर्दी अुडून गेली होती. ह्या वसाहतींमध्ये अिंग्लंडच्या अधिपतित्वाचा द्वेष बऱ्याच लोकांत अुत्पन्न होअू लागला आहे व जर साम्राज्य ठेवावयाचेंच असेल तर आम्हांस व तुम्हांस सारखेच हक्क असले पाहिजेत असें चोहोकडून प्रतिपादन होअू लागलें आहे. ह्या कॉलनीच्या द्वेषाचा वेळीच अुपशम व्हावा व त्यास साम्राज्याचें ममत्व वाटू लागावें म्हणून हें संमेलन भरविण्यात येत आहे. हें दृश्य व तात्पुरतें कारण आहे. परंतु याचें मूळ कारण फारच भिन्न आहे. आयर्लंड, अिजिप्त व हिंदुस्थान. ह्या देशांमध्ये ह्या अिंग्रजी व फिरंगी साम्राज्याची बेडी आपल्या पायात न ठेवण्याची अिच्छा बळावत चाललेली पाहून ह्या आधीच निर्बल करून टाकलेल्या राष्ट्रांची ही स्वातंत्र्य-गामी अिच्छा वेळ पडल्यास ठिकाणच्या ठिकाणी दाबून टाकण्याची शक्ति असावी, अेतदर्थ हे सर्व ढंग चाललेले आहेत. वेळ पडल्यास अिंग्लंडला वसाहतींचें पूर्ण लष्करी साह्य व्हावें म्हणून अेव्हापासून हे संघ तयार करण्यात येत आहेत. या वसाहतींपैकी थोरली वसाहत कॅनडा ही होय. हिची लोकसंख्या ५७,६६,६०६ आहे व हिचे हल्लीचे मुख्यप्रधान सर विल्फर्ड लारियर हे आहेत. न्यूफाअूंडलंडची

लोकसंख्या २,१७,०३७ आहे व तिचे मुख्यप्रधान सर रावर्ड बाड हे आहेत. ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या ५०,००,००० आहे व तिचे हल्लीचे मुख्यप्रधान आलफ्रेड डीकन आहेत. न्यूझीलंडची लोकसंख्या ८,८८,५७८ असून तिचे मुख्यप्रधान सर जोसेफ वार्ड हे आहेत. केपकॉलनीची लोकसंख्या जवळ जवळ २४ लक्ष असून त्यापैकी दहा लक्ष गोरे लोक आहेत. तिचे मुख्यप्रधान जेमसन हे आहेत. नाताळची लोकसंख्या जवळजवळ २१ लक्ष असून त्यापैकी १ लक्ष गोरे लोक आहेत व तिचे मुख्यप्रधान मूर हे आहेत व अगदी सर्वांत धाकटी स्वतंत्र वसाहत ट्रान्सवाल हिची लोकसंख्या १२ लक्ष असून त्यापैकी ३ लक्ष गोरे लोक आहेत व तिचे मुख्यप्रधान जनरल बोथा हे आहेत. अशा या सात वसाहतींचे मुख्यप्रधान हल्ली लंडनला आलेले आहेत व त्या सर्वांचें संमेलन भरवून त्यात साम्राज्याचे संरक्षणाची चर्चा चाललेली आहे. त्या सर्वांत विशेषतः जनरल बोथा यांजकडे सर्वांचें लक्ष वेधलेलें होतें यात काही नवल नाही. ह्या कान्फरन्सचे दुसरे दिवशी लंडन शहरात या ब्रिटिश साम्राज्यातील वसाहतींच्या मुख्यप्रधानांची जंगी मिरवणूक निघाली होती. सर्व रस्त्यांतून कागदांचीं सुंदर फुलें कातरून त्यांच्या लांब माळा अेकसहा बांधलेल्या होत्या. त्या माळांच्या मध्यभागी अिंग्रजी राष्ट्राचीं निशाणें टांगलेलीं होतीं. विशेषतः सेंटपालच्या भव्य व प्राचीन चर्चपुढील देखावा फारच मनोरम केलेला होता. अेक अतिशय मोठें निशाण मध्यभागी फडकत होतें व बाजूला निरनिराळ्या वसाहतींचीं निरनिराळीं लहान लहान निशाणें लावलेलीं होतीं. चोहोबाजूंनी त्या रस्त्याला अेखाद्या अत्यंत सुंदर लग्नमंडपाप्रमाणे शृंगार चढविलेला होता. सर्व रस्त्यांवरील भागांत लाखो लोक दाटीने अत्यंत टापटिपीने अुभे होते. स्वतंत्र राष्ट्रात आपलें भाग्यशाली स्वतंत्र राष्ट्रीय निशाण विजयानंदात फडकत असता ज्या मनोवृत्ति जागृत होत असतात त्या त्यांच्या अंतःकरणात व चेहऱ्यावर नाचत असलेल्या दिसत होत्या. सेंटपालमधून तेथील भिन्न-भिन्न घंटांचा घणघणाट सुरू झालेला होता व त्या नादातील स्वागतरवाने तो प्रचंड जनसमूह डुलू लागला होता. अितक्यात सुंदर व अुघड्या वाहनात वसलेले प्रधान येण्यास सुरवात झाली. त्यांतील पहिला मान जनरल बोथास मिळालेला होता. त्यांची बग्गी पहिल्याने येताच बोथांचा जयजयकार सर्व दिशांतून अुठला व टोप्यांला व हातातील छत्र्यांला व रुमालांला अुडवीत 'यावें महाराज !' 'बोथांचें स्वागत असो !' असे आनंद-ध्वनि अेकसारखे अुठत होते. नंतर ही मिरवणूक गिल्डहॉलमध्ये गेली व तेथे ह्या मुख्यप्रधानास 'फ्रीडम ऑफ दि सिटी ऑफ लंडन'चा सम्मान देण्यात आला. त्या लंडनच्या फ्रीडमचा मान घेते वेळेस 'मी अिंग्रजी राज्याबद्दल नेहमी राजनिष्ठ राहीन' अशी शपथ घेण्याची पद्धत आहे व त्याप्रमाणे या सर्व प्रधानांस ही शपथ घेणें भाग पडलें. अशा युक्तीने बोथांकडून राजनिष्ठेची शपथ घेवविली गेली ! या सर्व मिरवणुकीचा परिणाम काय झाला ? तर लंडन हे नुसत्या अिंग्लंडच्या

अनुक्रम ३८७८ वि: नि.५५
सावधान ! क्रमांक १५८ दि: ७७

नव्हे तर सर्व वसाहतींच्या स्वतंत्र सैन्यास आपले रक्षणार्थ अेकत्र करण्याची अुत्कंठा धरीत आहे हें सिद्ध झालें. ही मिरवणूक संपल्यावर कान्फरन्सपुढे जे विषय मुख्यत्वेंकरून आलेले आहेत त्यात तुझें नांव घेतलेलें नाही, तरी हिंदुस्थाना, तू तिकडे नीट लक्ष दे. अगदी महत्त्वाचा व सर्वत्रांना जवळजवळ पूर्ण संमत झालेला विषय म्हणजे 'साम्राज्याचें संरक्षण' हा होय म्हणून हेन्री कँवेल बॅनरमन ह्या अिंग्लंडच्या मुख्य-प्रधानाने सांगितलें आहे ! अिंग्लंडचें आरमार जें आहे तें क्वचित् हिंदुस्थान राखण्यास समर्थ होणार नाही, म्हणून कॉलनी व अिंग्लंड मिळून अेक संघटित व समाअीक आरमार तयार करावें हा अिंग्रजांनी घाट घातलेला आहे व हा खर्च व बोजा सांभाळण्यास कॉलनींनी तयार व्हावें म्हणून अेक पार्लमेंट सभा स्थापण्याची व व्यापारविषयक विशेष सवलती देवविण्याची कॉलनीज्ला लालूच लावलेली आहे ! हिंदुस्थान व अिजिप्त हे कॉलनींना व अिंग्लंडला चरण्याचें कुरण आहे. हें समाअीक कायम ठेवणें हें सामान्य अुद्दिष्ट असल्याने साम्राज्यसंरक्षक आरमार अुत्पन्न करावें व साम्राज्यातून कोणीही सुटण्याचा किंवा कोणास सोडविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास संघबलाने तुडवून टाकावें असा हा कावा आहे. आजपर्यंत अेकटें अिंग्लंडच गुलामांच्या अुरावरील दडपण असे. पण आता या सात मुलीदेखील आपल्या आअीला साह्य करण्यास येणार, हा या कान्फरन्सचा सरळ अर्थ आहे.

परंतु अिंग्लंडची अेकच हालचाल हल्ली चाललेली आहे असें नाही. पार्लमेंटमध्ये हाल्डेनने अेक सैन्य सुधारणेचें विल आणलेलें आहे. त्यात लष्करी खर्च जास्त झाला तरी बेहेत्तर, परंतु अिंग्लंडचें सैन्य अत्यंत तयार जालीम ठेवण्याची खटपट चालविली आहे. ज्यांचीं साम्राज्यें अन्यायाच्या व गुलामगिरीच्या पायावर अुभीं राहिलेली आहेत त्यांना आपल्या प्राणधारणाचा अेकच अुपाय अुरतो व तो म्हणजे राक्षसी बल संपादणें हा होय.

तिसरी महत्त्वाची हालचाल म्हणजे अेडवर्ड राजाचा हल्ली सुरू असलेला प्रवास ही होय, अिंग्लंडचें साम्राज्य अितकें अवाढव्य वाढलेलें आहे की आता जगात सर्वत्र शांतता असल्याशिवाय त्याची धडगत नाही. अेखाद्याची प्रकृति अति नाजूक झाली म्हणजे त्याला दुसरीकडे दंगा चाललेला असला तर बिलकुल सहन होत नसतो. म्हणून येत्या हेग परिषदेत आता यापुढे कोणीही आपलें आरमार वाढवू नये असा ठराव आणण्याची अिंग्लंड खटपट करीत आहे. आता स्वत:चें आरमार अितरांचे तिप्पट झाल्यावर आता यापुढे कोणीही आपलें आरमार वाढवू नये हें म्हणणें स्वार्थाचें व दुष्टबुद्धीचें असल्यामुळे जर्मनी, आस्ट्रिया अित्यादि राष्ट्रें यास विरुद्ध आहेत व म्हणून प्रत्यक्ष भेटीने त्यांचीं मनें वळविण्यासाठी अिंग्लंडचे राजे फिरतीवर निघालेले आहेत. स्पेनला तर आधीच वळविलेलें असून आता अिटलीच्या राजाशी भेट होत आहे !

हे वरील तीन प्रयत्न अितरांनी कोठेही गडवड करू नये, आपलें सैन्य जय्यत तयार असावें व अितक्यावरही प्रसंग पडल्यास वसाहतींच्या खर्चाची व सैन्याची मदत घेअून आपली गुलामगिरीची बेडी आपल्या भक्ष्याचे पायात जखडता यावी – या तीन प्रयत्नांचा काय हेतु आहे व विशेषतः याचा परिणाम काय होणार आहे, हें हे हिंदुस्थाना ! तू लक्षपूर्वक पहा ! तू दिवसेंदिवस क्षीणसत्त्व होत चाललेला व तुझा रोग क्षणोक्षणी जोराने वळावत चाललेला आहे. हे हिंदुस्थाना, तू लक्षपूर्वक पहा ! तुझे जे पुत्र तू हलके हलके वरा होशील म्हणतात, ते तुझी ही अत्यंतावस्था पाहत नाहीत. मी बहुतेकांचे असे अुद्‌गार अैकतो की, स्वतंत्रता ही हलके हलके सुमारे शंभर वर्षांनी मिळेल ! शंभर वर्षे ? शंभर वर्षें हिंदुस्थान या दुखण्यात खिचपत पडेल व मग हें दुखणें जाअील ? या भविष्यवादाला किंवा या भविष्याच्या अभावाला धिक्कार असो. शंभर वर्षेंच काय, पण आता २५ वर्षें जर हिंदुस्थान असेंच परतंत्र राहिलें तर पुन्हा ही हिंदभू हाती लागणार नाही !

म्हणून आता कांही तरी शेवटचा प्रयत्न करू लागा. काही तरी सोक्ष किंवा मोक्ष जर होणार असेल तर तो आताच होय; जो दिवस अुजाडतो तो तुमच्या जयाचा संभव कमी करीत आहे ! अजून वेळ आहे म्हणून म्हणतो की, ' काही धावाधाव करा ! ' तुमचा पक्ष सत्य आहे व कितीही संघ तुमच्या विरुद्ध झाले तरी देवांचे संघ तुमच्याकडे आहेत. तुम्हीही समदुःख्याचे – अिजिप्त, आयर्लंडचे संघ करा. पण हें सर्व आताच झालें तर होअील ! क्षणानंतर हिंदभू हातची गेली असें समजा ! म्हणून पुनः म्हणतो ' अति समयो वर्तते ! सावधान !! '

– ता. १७ मे १९०७

✦ ✦ ✦

२०. अप्रत्यक्ष प्रतिकाराचा जय व पराजय

लंडन : फ्रान्स देशामध्ये राजकारणशास्त्रातील सर्व प्रश्नांना काही विलक्षण वहर येतो यात शंका नाही. राजा हा विष्णूचा अंश आहे हें दोषत्वपोषक थोतांड फ्रान्समध्येच फोफावलें होतें. पण त्या थोतांडाचा नायनाट करण्यासही फ्रान्समध्येच लोक प्रथम पुढे आले. अठराव्या शतकात रुसो व व्हालटेअर या तत्ववेत्यांचा फ्रान्समध्येच अुदय झाला. ' The Declaration of the Rights of Man ' या अभूतपूर्व लेखाचा प्रादुर्भाव फ्रान्समध्ये झाला. ज्या तत्त्वाने सर्व

जगात नवीन युगाला आरंभ केला, अन्यायमूलक व जुलमी राजसत्तेच्या भूगोलावर ज्याने घाव घातला व ज्याचा दिग्विजय होण्यासाठी सर्व चराचर अुत्सुक झालेले आहेत तें लोकसत्तेचें तत्त्व प्रथम फ्रान्समध्येच भरभराटीस आलें. १७८९ पासून १८४८ पर्यंत फ्रान्समध्ये अितक्या निरनिराळ्या प्रकारच्या राज्यरचना झाल्या आहेत की, सर्व जगाला भिन्नभिन्न राज्यरचनेचे गुणधर्म शिकविण्यासाठी फ्रान्स ही सृष्टिकर्त्याने अेक मोठी प्रयोगशाळाच अुघडलेलो आहे कीं काय असा भास होअू लागतो. अप्रतिहत राजसत्ता, नियमित राजसत्ता, अराजकता, लोकनियुक्त राजसत्ता, लोकप्रतिनिधिता, संयुक्त लोकसत्ता, अशा परंपरेने शक्य तेवढ्या निरनिराळ्या राज्यरचना योजीत योजीत हल्ली फ्रान्सने लोकसत्ता पसंत केलेली आहे. फ्रान्समध्ये गेल्या दोनशे वर्षांत ह्या राज्यरचना अितक्या वेळा बदलल्या गेल्या आहेत की सरासरीने दर दहा वर्षांना फ्रान्समध्ये अेक नवीन व घनघोर राज्यक्रांति होत होती; सुमारे पन्नास वर्षे जर कोणची राज्यरचना फ्रान्समध्ये अेकसारखी टिकली असेल तर ती हल्लीची लोकसत्ताच होय. अितक्या राजक्रांत्या झालेल्या असल्यामुळे राज्यक्रांतीच्या बहुतेक साधनांचा अुपयोग फ्रान्सने केलेला आहे. त्यातही फ्रेंच लोकांचीं मनें निसर्गतःच अत्यंत सूक्ष्मचेतन व प्रतिकारमय असल्याने त्यांच्या देशातील कोणत्याही चळवळीत अेकप्रकारचें अद्भुतत्व व मनोरमत्व दिसून येतें. त्यांच्या अितिहासात क्रांतीच्या सर्व आयुधांचे विशिष्ट गुणधर्म अितक्या स्पष्ट रीतीने दृग्गोचर झालेले आहेत व ते प्रयोग अितक्या कवित्वयुक्त भाषेत लोककृतींनी कालाच्े पुस्तकात लिहिलेले आहेत की, राजकारणशास्त्राचा सप्रयोग सुलभ व मनोरंजक ग्रंथ फ्रान्सचे अितिहासाशिवाय अितरत्र आढळणें बरेच दुर्मिळ आहे.

अशा या प्रयोगशाळेत राज्यक्रांतीचें नवीन साधन म्हणून सर्वत्र विकलें जाणारें Passive Resistance चें, अप्रत्यक्ष प्रतिकाराचें जें तत्त्व त्याचें रासायनिक पृथक्करण करणें सांप्रत अत्यंत अिष्ट आहे. अप्रत्यक्ष प्रतिकार हा बहुतेक देशांच्या कायदेशीरपणाच्या कक्षेत आलेला असतो; म्हणजे अप्रत्यक्ष प्रतिकार करणें हा राजद्रोह होत नाही. ज्या सरकाराविरुद्ध आपणांस जाणें असेल, त्या सरकारच्या हाताखालो नोकरी न करणें, अितरांनी नोकरी न करावी असा अुपदेश करणें, त्या सरकारच्या शाळांशी, संस्थांशी व न्यायसदनांशी कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवणें, त्या सरकारला पैशांचें साह्य होऊ नये म्हणून त्याला कर्ज न देणें, त्यांच्या बँकांतून पैसे ठेवणें बंद करणें, फार काय, पण त्या सरकारला करही न देणें हे सर्व अप्रत्यक्ष प्रतिकाराचे मार्ग आहेत. सरकारचा कायदा प्रत्यक्ष शस्त्र घेअून न मोडता अप्रत्यक्ष रीतीने तो निरुपयोगी करणें व तिकडे पूर्ण दुर्लक्ष करून त्या सरकारास पदोपदी अडविणें ही अप्रत्यक्ष प्रतिकाराची विधिनिषेधात्मक व्याख्या होय. सरकारच्या राज्ययंत्रावर प्रत्यक्ष हल्ला न करता त्याचें चालन न करण्याचा

संप त्या यंत्रावरील मजुरांकडून करविणें हाच अप्रत्यक्ष प्रतिकार होय. मुंबईच्या अेखाद्या गिरणीचा धनी आपलें म्हणणें अैकत नसला म्हणजे त्याला तसें करणें भाग पाडण्याकरिता त्याचे गिरणीत कोणी कामच करू नये म्हणून जसा मजूर लोकांचा संप होतो, तसाच सर्व लोकांचा संप करून सरकारचें राज्ययंत्र बंद पाडण्याचा जो प्रयत्न तो अप्रत्यक्ष प्रतिकार होय. अशा या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा आश्रय धरून वाटेल त्या सरकारास ताळ्यावर आणता येअील अशी हल्ली बऱ्यांच लोकांची कित्येक देशांमध्ये प्रवृत्ति होत चाललेली आहे. त्यांचें असें म्हणणें असतें की जर आह्मी सर्वांनी सरकारची नौकरी सोडून दिली तर कर वसूल कोण करणार ? पोलिस कोण होणार ? आणि सरकारला शिपाअी कोठून मिळणार ? अशा अवस्थेत सापडलेलें सरकार अेका दिवसात अेक नामशेष तरी झालें पाहिजे किंवा अेक शरण तरी आलें पाहिजे. शस्त्र हाती न घेता, रक्ताचा अेक थेंबही न सांडता, फार काय परंतु राजद्रोहाची जोखीम अंगावर न घेता राज्यक्रांतीसारखें प्रचंड कृत्य करण्याचें अप्रत्यक्ष प्रतिकार हें अेक अभूतपूर्व साधन आपण शोधून काढलें आहे, असा ह्या विसाव्या शतकाला यथार्थ गर्व वाटत असे. तथापि या नवीन साधनाचा अुपयोग मात्र आजपर्यंत अगदी वेमालुम रितीने कोणीही केलेला नसल्याने राज्यक्रांति करण्यास हें साधन किती उपयोगी पडेल याचा व्यावहारिक निकाल अजून लागलेला नव्हता.

परंतु अितर सर्व साधनांप्रमाणेच राज्यक्रांतीच्या या नवीन साधनाचाही प्रयोग फ्रान्समध्ये गेल्या पंधरवड्यात करण्यात आला. फ्रान्सच्या दक्षिणेकडच्या सर्व प्रांतात दारूचे मळेवाल्यांचा व फ्रान्सचे सरकारचा कराचे बाबतीवरून तंटा पडला. आपलें म्हणणें त्या हजारो शेतकरी लोकांनी सरकारचे कानावर टोलेजंग सभा भरवून व अर्ज करून घातलें. परंतु या अर्जाप्रमाणे वागण्याचें सामर्थ्य नसल्याने वा अिच्छा नसल्याने फ्रेंच सरकारकडून त्याचा समाधानकारक निकाल लागला नाही. दक्षिणेकडच्या फ्रेंच लोकांचा अुद्देश जरी राज्यक्रांति करण्याचा नव्हता, तथापि सरकारास आपलें म्हणणें अैकण्यास भाग पाडण्यासाठी निर्वाणीचें शस्त्र अुपसावें असा त्यांनी निश्चय केला व या कामी कोणत्याही जुन्या साधनांची योजना न करता त्यांनी नवीन प्रचलित होअू पाहणाऱ्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब केला. कोणतीही गोष्ट संघशक्तीने कशी करावी ह्याचें फ्रेंच लोकांस बाळकडूच मिळालेलें असल्यामुळे व त्यांच्या प्रतिभामय व अुत्साही स्वभावामुळे गेल्या आठवड्यात अभूतपूर्व, मनोहर व अत्यंत बोधप्रद अशा रीतीने अप्रत्यक्ष प्रतिकाराचा प्रयोग फ्रान्सचे रंगभूमीवर करून दाखविण्यात आला. त्या प्रयोगात अणुरेणूअितकी काटकसर किंवा हयगय झालेली नव्हती. नारबोने ह्या शहरी प्रथमतः मुख्य पुढाऱ्यांची गाठ घेण्यास दक्षिण प्रांताचे लोक येअू लागले. हजारो लोकांच्या हजारो मिरवणुकी निरनिराळ्या शहरांपासून निघून नारबोनेकडे वळल्या. त्या

रात्री नारबोने शहरात अितका अफाट समाज जमला होता की त्यांना निजावयास शहरात जागा मिळेना. चर्चेस व सार्वजनिक स्थलें सर्व अुघडीं केलीं तरी लाखो शेतकरी बाहेर राहिले व मग रस्त्यांतून लोकांनी निजण्यास आरंभ केला. रस्त्यांना जणू काय माणसांचीच फरसबंदी केलेली आहे अितकीं दाट माणसें, स्त्रिया, पुरुष, मुलें सर्व शहराच्या रस्त्यांत निजलीं, तरी समाज अजून अुरलेलाच होता. म्हणून शहराच्या नजीकच्या शिवारात लोक शिरले; पहाट होताच तिथिनिश्चयाची सभा भरली व जमलेल्या कमेटीने कोणच्या तिथीला सर्व दक्षिण प्रांतात अप्रत्यक्ष प्रतिकाराला अेकदम आरंभ करावयाचा हें सर्वत्रास कळविलें. या वेळेस कोठेही बेकायदेशीर वर्तन घडलें नाही. अखेर संकेतसमय आला व अप्रत्यक्ष प्रतिकाराला आरंभ झाला. परंतु तो अितर देशांत जसा झाला असता तसा नव्हे. फ्रान्समध्ये सर्व चळवळींना चालन जसें कवित्वपूर्ण व अद्भुततेने देण्यात येतें तसेंच येथेही घडलें. ठरलेल्या वेळेला नारोवोने येथील चर्चेसमधील घंटा वाजू लागल्या व लगेच दक्षिणेतल्या शेकडो शहरी व खेडेगावी अप्रत्यक्ष प्रतिकार सुरू झाला ! हजारो कारकुनांनी नोकऱ्या सोडल्या, मुलांनी शाळा सोडल्या, शहरांतील म्युनिसिपालिट्या मोकळ्या झाल्या, सर्व दक्षिणेतील शहरांच्या मुख्य मेंबरांनी त्या ठरलेल्या तासाला राजिनाम्याच्या तारा पॅरिसला धाडल्या व खुद्द पॅरिसच्या लोकसभेतील दक्षिणेकडचे सभासद सभा सोडून चालते झाले ! सरकारी बिल्ले व पट्टे व अधिकारदंड हजारोंनी व लाखांनी झुगारून देण्यात आले व अशा रीतीने अेका तासात फ्रान्सच्या दक्षिणेकडील विस्तीर्ण प्रांतात राज्यरचना नामशेष झाली ! पोलिस अुरले नाहीत, सैन्याने गोळ्या घालण्याचें नाकारलें ! ह्याहून अप्रत्यक्ष प्रतिकाराची अशी चांगली रचना करणें हें अगदी अशक्य आहे, राजकारणशास्त्रातील अितर गोष्टींप्रमाणेच अप्रत्यक्ष प्रतिकार किती पूर्ण रीतीने व कशा कौशल्याने करावा हें सर्व जगास फ्रान्सनेच शिकविलें ! अप्रत्यक्ष प्रतिकाराचा हा पूर्ण विजय होय !

परंतु फ्रान्समध्ये अप्रत्यक्ष प्रतिकार काय करू शकतो हें जसें त्या लोकांनी सप्रयोग सिद्ध करून दाखविलें त्याचप्रमाणे तो काय करू शकत नाही हेंही गेल्या आठवड्यात तेथेच सिद्ध झालें. मानवी मनाच्या हल्लीच्या स्थितीत अप्रत्यक्ष प्रतिकाराने सर्व निकाल लागणें दुर्घट आहे. त्या मताला सत्याच्या तत्त्वापेक्षा अजून बळाच्या सामर्थ्यानेच सर्व गोष्टींचा निकाल लावण्याची कशी चटक लागलेली आहे व म्हणून सामर्थ्याच्या–शरीरसामर्थ्याच्या – लष्करीसामर्थ्याच्या अभावी अप्रत्यक्ष प्रतिकार कसा लंगडा पडतो हें फ्रान्समध्ये फार चांगल्या रीतीने सिद्ध झालेलें आहे. अप्रत्यक्ष प्रतिकाराने सर्व काम होअील असें वाटणाऱ्या पुढाऱ्यांना दुसरे प्रांतातून आणलेल्या लोकांकडून पकडण्यात आलें, सर्व दक्षिणेभर शिपायांचा गराडा पडला, लष्करी कायदा सुरू झाला. वक्तृत्व व सभा बंद पडल्या व लोकांना नुसत्या धाकदपटशाने सरकार गांगरेल ही जी आशा होती ती नष्ट झाली ! अर्थात् लोकांनीही शस्त्रें अुपसलीं. आपल्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा त्याग करून

प्रत्यक्ष प्रतिकाराकडे ते वळले व आता दोन हात होऊन शेवटचा काय निकाल लागतो हें कळणें हें त्या अुभयतांच्या हातातील जोरावर अवलंबून राहणार ! म्हणजे अप्रत्यक्ष प्रतिकाराचे मागे लष्करी सामर्थ्य असलें तरच तो विजयी होतो, नाही तर त्याचाही – त्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचाही दुर्बलत्वाने पराजय होतो हें सप्रयोग सिद्ध केलें गेलें !

सरळ विचारपद्धतीनेही हेंच सिद्ध होतें. अप्रत्यक्ष प्रतिकारात अेकणअेक मनुष्य अत्यंत अुदात्त होअील असें गृहीत धरलेलें असतें. सर्वजण सरकारी नोकऱ्या सोडतील हा त्याचा मुळारंभ असतो. परंतु दारिद्र्याने निष्कांचन झालेल्या लोकांत अिच्छा असली तरीही अितकी अुच्चस्वार्थपरा वृत्ति तोलून धरण्याची शक्ति नसते. दुसरी गोष्ट अशी की, अप्रत्यक्ष प्रतिकारात विरुद्धपक्षही अत्यंत अुदात्त आहे; ठरविलेले कायदे तो कधी मोडणार नाही व नवीन जुलमी कायदे तो कधी करणार नाही, असें गृहीत धरून चालण्यास आरंभ होतो. परंतु ही गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे. जो लोकसंमतीच्या विरुद्ध जाण्याअितका नीच असतो तो वेळेवर नवीन कायदे करून वा जुने अुकरून काढून ती लोकसंमति व तिचा अप्रत्यक्ष प्रतिकार बळाने दाबून टाकण्याअितका क्रूरही असतो. अिंग्लंडमध्ये काही स्त्रियांनी आम्ही कर देत नाही असें म्हणताच सरकारने त्यांस अुचलून तुरुंगात फेकलें ! तरी अिंग्रजी बायका व अिंग्रजी पुरुष यांचा हा आपला आपसाआपसातील प्रेमकलह आहे ! संप करून खाजगी गिरण्यांचे मालकांनाही ताळ्यावर आणणें मजुरांना कठीण जातें ! मग ज्या सरकारला पैशाचें, सैन्याचें व शस्त्रास्त्रांचें सबलत्व आहे, तें सरकार नुसत्या रडक्या प्रतिकाराला भीक कधीही घालणार नाही.

ह्या फ्रान्समधल्या प्रकरणावरून जगाने जो बोध घ्यावयाचा तोच आपल्या पुराणातील अेका कथेतही फार मार्मिक रीतीने दिलेला आहे. वसिष्ठाची कामधेनु ही विश्वामित्र मागू लागला. वसिष्ठऋषीने ती न देण्याबद्दल शक्य ते आढेवेढे घेतले. त्यानंतरही जेव्हा विश्वामित्र अैकेना, तेव्हा मग वसिष्ठाने अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या तत्त्वाप्रमाणे निदान त्याला साहाय्य तरी करावयाचें नाही असा निश्चय केला. मी तरी माझ्या कामधेनूला जावयाला सांगत नाही, मी तिला सोडणार नाही, मी ती नेण्याचे कामी तुला कोणतेंही साह्य देणार नाही, अितकें सांगून तो तपोधन मुनि स्वस्थ अुभा राहिला. परंतु विश्वामित्राने ती कामधेनु सोडण्यासाठी स्वतःचे सैनिकांस आज्ञा दिली. त्या वेळी 'दंडें ताडुनि नेता फोडी ती धेनु फार हंबरडे । तेव्हा आश्रमवासी द्विज मृग खग देवता कदंब रडे' परंतु या देवतादिकांच्या रडक्या प्रतिकाराने काम भागेना! अखेर 'धेनुमिषें त्या मुनिची सुतपस्यासिद्धि' जेव्हा कोपली व त्या कामधेनूच्या अंगात दबून बसलेल्या हजारो क्षत्रियांनी जेव्हा तरवारीवर तरवारी आदळल्या, तेव्हाच मात्र वसिष्ठांची कामधेनु वसिष्ठांना परत मिळाली !

—ता. १९ जुलै १९०७

✦ ✦ ✦

२१. प्रकाश आणि काळोख

लंडन : मानवी अितिहास फार चमत्कारिक आहे. या अितिहासातील पुष्कळ गोष्टींचीं कारणें व त्यांचे परिणाम बरोबर रीतीने समजणारा प्राणी विरळा. त्रिकालज्ञान ज्याप्रमाणे मनुष्याला दिलेलें नाही, त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीचें अंतिम निदान समजण्याची शक्तिही मनुष्यास दिलेली नाही, परवा पोर्तुगालचा राजा व युवराज यांचा बंदुकीचे गोळ्यांनी देहपात घडवून आणला. युवराजाचा धाकटा भाअू गादीवर बसला, रशियाचे झारने व अिंग्लंडच्या राजाने सहानुभूतीच्या तारा पाठविल्या. फ्रेंच प्रतिनिधिसभेंत सहानुभूतीचे ठरावासंबंधी खल चालला असता साम्राजसत्तावादी प्रतिनिधींनी पोर्तुगालच्या राजाच्या व युवराजाच्या खुनाचे मुळाशी केवळ खुनीपणापेक्षा अधिक महत्वाचीं कारणें आहेत व त्या कारणांचा लोक-सत्तावादित्वाशी संबंध आहे आणि म्हणून सहानुभूतीच्या ठरावास विरोध केल्यामुळे सहानुभूतिवाल्यांचा विरस झाला. पोतुर्गालमध्ये अनियंत्रित प्रधान (Dictator) फ्राँको याने राजीनामा दिला व नवीन जें संयुक्त प्रधानमंडळ नेमण्यात आलें त्याच्या मुख्याने छोट्या राजाला आग्रहाने सांगितलें की मला १३० प्रतिनिधींना हद्दपार करण्याची जर अनुज्ञा मिळेल तर राज्यात लवकर शांतता होअील. त्याप्रमाणे वर्तमान आलें आहे. राजा व युवराज यांची हत्त्या कां झाली आहे ? ती कोणी केली ? ही हत्त्या करण्यामध्ये कोणत्या तरी लोकपक्षाचें अंग होतें काय ? हत्या तर झालीच; यापासून त्या पक्षाची हानि होणार कीं लाभ होणार ? झारने व अिंग्लंडच्या राजाने सहानुभूतीच्या तारा पाठविल्या यातील अिंगित काय आहे ? मानवाचे हृदयाला मोठा धक्का बसण्यासारखी ही गोष्ट झाली की, आल्हाद व अुत्साह येण्यासारखी ही गोष्ट झाली अित्यादि प्रश्न अुद्भवतात. हत्त्या कां झाली याचें कारण धुंडता असें दिसून येतें की, राजाने नुकतीच सर्व सरळ राज्यपद्धति सोडून देअून अेक अनियंत्रित प्रधान पोर्तुगालची शांतता राखण्याकरिता नेमला होता. पोर्तुगालच्या अशांततेचें कारण, जें लोकपक्षाच्या अशांततेचें कारण, चहूकडे सर्वदेशी आहे तेंच होतें व आहे. लोकांना हा फार्स नको आहे. लोकांना सिंहासनावर वसणारी बाहुली किंवा म्हसोबा नको आहेत. अेक किंवा थोडेसे दुढ्ढाचार्य यांच्या हाती लोकांचे सम्मतीशिवाय, मताविरुद्ध अधिकार अेकवटला म्हणजे कधीना कधी असाच परिणाम घडावयाचा. रात्र अुजाडून दिवस यावयाचाच. लोकांना हाणून, दडपून अज्ञानात ठेवलें तरी सज्जन आहेत तोपर्यंत हें अज्ञान चिरकालीन होअील अशी भीति नको. ज्ञानार्जन व ज्ञानदान सतत करीत राहणें हा कर्तव्याचा ओनामा आहे. हा ओनामा जे सतत गिरवीत राहणार ते संतसज्जन लोकांचे नजरेपुढे सत्यासत्य ठेवण्याचें काम सतत करीत राहणारच व सत्यासत्य लोकांपुढे मांडलें म्हणजे

सत्याची वाजू अुचलून धरणें व असत्याचा वडेजाव कमी करणें हें स्वभावतः सत्य-शील असणारा लोकसमाज करू लागतो. पोर्तुगालमध्ये ज्या गोष्टी घडून आल्या आहेत, त्यामध्ये या द्वंद्वाचें —सत्यासत्याच्या द्वंद्वाचें प्रतिबिंब स्पष्ट दिसतें. लोक-समाजाला भेवडावणारा किंवा त्याच्या अुरावर वसणारा म्हसोवा ज्याप्रमाणे शत्रु-वत् झाला आहे, त्याप्रमाणे सूत्रधार कावेबाजांचे हाती नाचणारी व राजा शब्दाने आव्हान केली जाणारी वाहुलींही शत्रुवत झालीं आहेत. सत्ता अेका राजाचे हाती असो किंवा अनेक राजांच्या हातो असो, जोपर्यंत ती लोकांचे हाती नाही तोपर्यंत लोकांचे त्या शासनपद्धतीशो वैर असणारच. यावरून लोकसत्तात्मक पद्धति म्हणजे अगदी निर्दोष अशी सामान्य जनांची समजूत असते असा सिद्धान्त वाटला तर तो चुकीचा होअील. लोकांना, वहुजनसमाजाला पूर्णपणे कळतें की, लोकसत्तापद्धतीतही दोष आहेत; कारण निर्दोप पद्धति या दोषयुक्त मानवी स्वभावाचे व्यवहारात मिळावयाचीच नाही, हेंही लोकांना माहीत आहे. असें असल्याने अनेक शासनपद्धतीत सगळ्यांत कमी दोषयुक्त पद्धति आजमितीला कोणती आहे हें ठरवून तिचा पुर-स्कार करायचा, असें सामान्यजनांचें मत त्यांना नेहमी सांगत असतें. युरोपमध्ये संतसज्जनांच्या सतत परिश्रमाने लोकांना शासनपद्धतीची शिकवणी मिळालेली आहे. युरोपियनांना राजा, सरदार अित्यादि असमतादर्शक शव्ददेखील कडू वाटू लागले आहेत. त्यांची मनुष्यसमतेकडे धाव आहे व ही त्यांची धांव (संतसज्जनांच्या अव्याहत परिश्रमानेच, लोकांचे मनामध्ये ही श्रेष्ठ समतावुद्धि अुत्पन्न झाली.) आमच्या पोटा-विरुद्ध आहे, आमचे मजा करण्याचे हक्काविरुद्ध आहे, असें राजांना व सरदार-प्रभृति हक्कांचे अुपभोगाने बिघडलेल्या स्वयंमन्य श्रेष्ठांना पूर्णपणें कळून चुकलें आहे. कोण अधिक बलवान आहे हें स्वतंत्रविहारी काल ठरवील. गतकालाने अेवढें तरी ठरविलें आहे की, ज्या ज्या ठिकाणी लोकांना संतसज्जनांकडून शासनपद्धतीची संथा दिली गेली, त्या त्या ठिकाणी स्वयंमन्य श्रेष्ठांची कमी अधिक पिछेहाट झाली. आपणांस अिंग्लंडचा व फ्रान्सचा अितिहास हें शिकविण्यास पुरें आहे. असो. पोर्तुगालमध्ये जी गोष्ट घडून आली, तिचे मुळाशी लोक व लोकशत्रु यांचे चिरकालीन द्वंद्वाचा संबंध आहे असें आम्हांस वाटतें. मुख्य प्रधानाने १३० प्रतिनिधींची अुचल-बांगडी केल्याने देशात शांतता होअील असें स्पष्ट सांगितलें, यावरून आमचे मताची सत्यता सिद्ध होते. झारच्या व अिंग्लंडच्या राजाच्या हृदयाला फार मोठा धक्का बसला; फ्रेंच प्रतिनिधिसभेंत सहानुभूतीचा ठराव पास झाला नाही, या गोष्टीही आमच्या मताचा पुरस्कार करतात. लोकांच्या हृदयातील काळोख कमी होत जाअून, प्रकाश अधिक होत चालला आहे, हें पाहून आमच्या मनाचा अुत्साह वाढत आहे. राजांचे हृदयाला धक्का बसला की मानव्याच्या हृदयाला धक्का बसलाच पाहिजे असें राजा म्हणजेच देश असें मानणाऱ्या मुकुटवाल्यांना वाटणें साहजिक आहे.

राजांवरोबर त्यांचे बगलबच्चे व आश्रित यांनीही आसवें ढाळावीं, हेंही सृष्टि-नियमानुसार आहे. परंतु राजे रडोत, राजाश्रित रडोत, त्यांचे रडण्याने लोकांचे हृदयाला पाझर फुटण्याचे दिवस निघून गेले व ही आम्ही फार आनंदाची गोष्ट समजतो. सृष्टिक्रांतिशास्त्राचे साधारण नियम मानवी हृदयाचे वाढीला साहजिकपणे लागतात. या नियमाप्रमाणे पहिलें जें केवळ व्यक्तीला ओळखणारें हृदय (ती व्यक्ति स्वतः असो किंवा राजा अित्यादि असो) तें हळूहळू समाजाला, राष्ट्राला व मानव्याला ओळखू लागतें व जशी जशी मानवी हृदयाची अेकाहून अेक विस्तृत अशा लोकसमूहाशी सलगी होअू लागते तशी तशी त्याची वृत्ति अधिक गंभीर होत जाते. व्यक्तीचे अभ्युदयाची किंवा पराभवाची वार्ता अैकूनच केवळ तें हृदय हेलकावे खात नाही. मला पूज्य झालेल्या विस्तृत लोकसमूहाचे हिताहिताशी या अभ्युदय-पराभवाचा काय संबंध आहे ही पृच्छा अेकदम मनात अुभी राहते व हृदयाचें अुडणें किंवा आल्हादवर्तन हें पूज्य लोकपक्षाचा मानभंग किंवा विजय यावर अवलबून असतें. पोर्तुगालचें वर्तमान मानव्यहिताकांक्षी हृदयाला आल्हादजनक आहे, कारण लोकपक्षाने आपले शत्रूवर घाव करणें हें अुदाहरण हृदयाला अत्यंत अुत्साहजनक होय. निंद्य राजमुकुटाचा पोर्तुगालमध्ये झालेल्या मानभंगाचा तेथील लोकपक्षाचे आजचे कार्यावर कसा परिणाम होअील, याचें आजच भाकित करण्यापेक्षा थोडे दिवस घडतील त्या गोष्टी डोळ्यांत तेल घालून पाहणें ज्यास्त श्रेयस्कर आहे. आज अेवढें मात्र निश्चितपूर्वक सांगता येअील की सर्व देशांतील लोकक्षाला या राजमुकुटाच्या झालेल्या मानभंगापासून हुरूप आला आहे. हीं प्रकाशाचीं चिन्हें आहेत, हीं काळोख दूर होत असल्याचीं चिन्हें आहेत.

वरचा मजकूर लिहिल्यानंतर दोन दिवसांत ज्या हकीकती लंडनला आल्या आहेत त्यावरून राजमुकुटाला दिलेल्या शिक्षेचा देशावर सुपरिणाम झाला आहे असें स्पष्ट दिसतें. लोकसत्तावादी प्रमुख प्रतिनिधींनाही कारागृहांतून सोडून दिलें आहे. छोट्या राजाने वचन दिलें आहे की, मी अनियंत्रित प्रधान कधीही नेमणार नाही. प्रधानमडळात सर्व पक्षांचे लोक आहेत; भवति-न-भवति होअून श्रेष्ठांचे सभेचा (House of peers) अध्यक्ष प्रगमनशील (progressive) पक्षाचा असावा असें ठरून फोकांस फाल्काओ या प्रमुख माणसास अध्यक्ष नेमलें आहे. परवांचा अनियंत्रित प्रधान फ्रँको यास नव्या सरकारने लिस्बनहून निघून जाण्याची 'शिफारस' केल्यावरून तो लिस्वन सोडून माद्रिद येथे गेला आहे. त्याने आपले सर्व पैसे पोर्तुगाल बँकांमधून काढून फ्रेंच आणि अिंग्लिश बँकांत ठेवले आहेत व स्वतः 'स्वित्झर्लंड येथे जाअून राहणार आहे. लोकसत्तावाद्यांचा पुढारी 'माकाडो' याने प्रसिद्धपणे सांगितलें की, पोर्तुगालची राजसत्ता वयातीत होअून मृत्युपंथाला लागलेली आहे. नवीन प्रधानमंडळ कर्त्या माणसांचें आहे व तें राजसत्ता अुचलून

धरण्याचा प्रयत्न करील. परंतु तिला कोणत्याही वैद्याचें औषध चालणार नाही. तीन वर्षांत राजसत्तेचा निकाल लागेल व लोकसत्ता तिची जागा घेअील,' आपण 'तथास्तु' असा आशीर्वाद देअू या ! हिंदुस्थाना ! तुझें कसें काय !

—ता. २८ फेब्रूवारी १९०८

✦ ✦ ✦

२२. लंडनमधील पहिला शिवोत्सव

लंडन : मनुष्यें मरतात पण त्यांचीं सत्कृत्यें जिवंत राहतात. सत्कृत्यें या मर्त्य जगात अमरत्व देणारीं अपूर्व रसायनें आहेत. त्या सत्कृत्यांतील लवमात्र ग्रहणही आत्म्याचें अमरत्व सिद्ध करतें. मग ज्याने सत्कृत्यांच्या अुत्कर्षस्थानी बसणाऱ्या स्वदेशस्वातंत्र्याचें प्रस्थापन केलें त्या महात्मा शिवभूपाचें नांव प्रत्येक येणाऱ्या वर्षी अमरत्वाचे नवीन ताम्रपट मिळवीत आहे ह्यात काय नवल असणार? शिवनेरीच्या डोंगरात १६२७ त जन्मलेलें बालक १९०८ साली जिवंत आहे, तारुण्यभरात आहे, दिग्विजयात दंग आहे, दरसाल नवीन समुद्र पादाक्रांत करीत आहे, नवीन किनारे गाठीत आहे, नवीन भाषांना मोहीत आहे, व नवीन कंठातून, हृदयात, वाङमयांतून त्यांचीं सिंहासनें व त्यांचे जयजयकार दुमदुमत चालले आहेत ! मृत्यूचा पाश कोणाला तोडावयाचा आहे काय ? काळाअितकेंच अमर्यादित अमरत्व कोणास पाहिजे आहे काय ? असेल तर अेक अुपाय म्हणजे स्वदेश स्वातंत्र्याच्या रणांगणात त्याने हरहर म्हणावा ! कधीही मरण न येण्याचें अेक साधन म्हणजे स्वदेश स्वातंत्र्यास्तव तत्काल मरण हें होय !

असा न मरण्यासाठी जो मेला त्या शिवभूपाच्या जयजयकाराने लंडननगर गेल्या आठवड्यात प्रथम निनादन पावलें. येथील फ्री अिंडिया सोसायटीद्वारा गेल्या शनिवारी श्रीशिवरायाचा जन्मोत्सव करण्यात आला. त्याच्या अुच्चासनस्थित मूर्तीपुढे व त्याच्या स्वतंत्र निशाणाखाली मद्रास, बंगाल, मुंबअी, पंजाब असे सर्व दिशांचे व हिंदु, मुसलमान, पार्शी, यहुदी असे सर्व धर्मांचे हिंदी लोक शिवभूपाची पूजा बांधीत होते. असले अुत्सव व असले प्रसंग म्हणजे कित्येकांनी अशक्य म्हटलेल्या हिंदी राष्ट्रैक्याची मूर्त शक्यता होत. दे. आयर बी. अे. यांनी शिवाजीच्या चरित्राचें तात्त्विक स्वरूप सांगताना म्हटलें की, शिवाजीसारख्या विभूतींचे जन्म म्हणजे आमची आर्यजाति अजून वेदकालाअितकीच व जरूर तर त्याहून जास्तही

चैतन्याने युक्त आहे आहे असें प्रथित करणारी गर्जना होय. जो शिवाजी त्या वेळेस मुसलमानांविरुद्ध लढला तोच शिवाजी न्यायी मुसलमानांच्या वतीने लढला असता. कारण शिवाजीचें लढणें हें विशिष्ट जातीविरुद्ध नसून अन्यायाविरुद्ध आहे. तें दास्याविरुद्ध आहे, तें गुलामगिरीविरुद्ध आहे. ज्या मराठी भात्यातून हा बाण निघाला त्याच मराठी भात्यातून आणखी असले बाण कधी निघतील म्हणून आम्ही सर्व हिंदुस्थानवासी शिवाजीच्या महाराष्ट्रभूमीकडे अपेक्षाविव्हलतेने पाहत आहोत. दे. आयरप्रमाणेच दे. येरुलकर (यहुदी) दे. मास्तर (पारशी) अित्यादि गृहस्थांनीही वक्तृत्वपूर्ण स्तुतीने श्रीशिवरायाचा सत्कार केला. शेवटी दे. सावरकर यांचे अध्यक्षाच्या नात्याने जवळजवळ अेक तासभर आवेशयुक्त भाषण झाल्यावर शिवभूपाच्या स्वातंत्र्याच्या जयजयकारात मंडळी परत फिरली. या अुत्सवाचें श्रेय दे. देशमुख, दे. रत्नभू (मद्रास) अित्यादि गृहस्थांकडे आहे.

श्रीशिवाजीच्या जयजयकाराने हिंदुस्थानवासीयांचीं अंत:करणें अभिमानाने स्फुरण पावत असतानाच हल्ली अिंग्लंडच्या रंगभूमीवर चाललेल्या 'बंडाचे नाटका'नें त्यांच्या हृदयाला संतापाचे चटके बसत आहेत. १८५७ च्या बंडाला ५० वर्षे नुकतीच झाल्यामुळे अिंग्लंडमध्ये त्याचें स्मरण विशेषच जोराने अिंग्लिश लोकाच्या झोपा मोडीत आहे. लॉर्ड राबर्टसनने अिंग्लिश व्हेटरन्सकरिता काढलेला फड हिंदुस्थानाने अेकलाच असेल. त्या फंडाच्या जागृतीचा परिणाम हल्ली अिंग्लंड-मधल्या कित्येक रगभूमीवर दिसू लागला आहे. ५७ चें बंड म्हणून एक नाटक कित्येक रंगभूमींवर हल्ली होत असतें. त्यात प्रथम बंडाच्या गुप्त सभा दाखविण्यात येतात. फिरंग्यांना हिंदुस्थानांतून हुसकून द्या म्हणून अुपदेश होअून बंडास प्रारंभ होताच बहादुरशहा येतो व हिंदुस्थानचा मुकुट सर्व बंडवाले त्याच्या मस्तकावर ठेवतात. हा प्रकार चालला असता सर्व अिंग्रजी प्रेक्षक धिक्काराच्या आरोळ्या ठोकतात. पुढे कानपूरची कत्तल होते. बंडवाले 'फिरंगी फिरंगी' असें म्हणत नाशाचा जवडा अुघडतात. नंतर हिंदुस्थानचें स्वतंत्र निशाण फडकावीत बंडवाले मिरवणुकी काढतात. हें पाहताच अिंग्रजी प्रेक्षक संतापाच्या आरोळ्या ठोकू लागतात. शेवटी बऱ्याच लढाया होअून बंडवाल्यांना तोफेच्या तोंडी देण्यात येते व त्यांचे हाल हाल करण्यात येतात, तेव्हा अिंग्लिश थिअेटरें टाळ्यांचे गजराने दणाणून जातात !

या 'बंडाचे नाटका'ने अिंग्रजांच्या मनोवृत्ति संतोष पावत आहेत; परंतु या योगाने सत्तावनचें बंड म्हणजे काय होतें हें जाणण्याची हिंदी लोकांची उत्कंठाही जास्तच वाढत आहे. तिचें फल पुढील आठवड्यात होणाऱ्या सत्तावनच्या जन्म-तिथीच्या अुत्सवात दिसून येईल. ता. १० मेला सत्तावनचा टोलेजंग अुत्सव करण्यासाठी लंडनमध्ये हिंदी लोकांची सिद्धता चाललेली आहे व तिचा वृत्तान्त

पुढील बातमीपत्रात वाचकांस कळविण्यातही येईल. सदर अुत्सवाची आमंत्रणपत्रिका व कार्यक्रमपत्रिका पुढे दिल्याप्रमाणे आहे.

Bande Mataram

*

To Commemorate
The Anniversary of the
INDIAN NATIONAL RISING OF
1857

A

Meeting of Indians in England
will be held at India House, 65 Cromwell
Avenue, Highgate N.
on
Sunday, the 10th of May, 1908. at
4 P. m.

You and all your Indian friends are cordially invited
to be present.

—o—

PROGRAMME

1 National Songs
2 National Prayer
3 Tributes to the sacred memory of,
Emperor Bahadur Shah
Shrimant Nanasaheb
Rani Lakshmibai
Moulavi Ahmad Shah
Raja Kuvar singh
And other martyrs.
4 Declaratien of Self-denial
5 President's speech
6 Distribution of Prasad
7 National Songs.

—(ता. २९ मे १९०८)

✦ ✦ ✦

२३. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा जंगी अुत्सव

लंडन : गेल्या आठवड्यात अिंग्लंडमध्ये राहत असलेल्या हिंदी जनसमूहात आजपर्यंत केव्हाही अनुभवास न आलेली विलक्षण चळवळ अुडालेली होती. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची जन्मतिथि जसजशी जवळजवळ येअू लागली तसतशी हिंदी लोकांमध्ये तो जन्मोत्सव अपूर्व थाटाने साजरा करण्याची स्फूर्ति अधिकाधिक स्फुरण पावू लागली. मे महिन्याला आरंभ होताच प्रत्येक गल्ली-गल्लीतून हिंदी लोकांच्या टोळ्या जमवून, त्यांना जन्मोत्सवाचें महत्त्व, तत्प्रीत्यर्थ केला जाणारा स्वार्थत्यागाचा तपस्यामास, त्या समारंभाचा अेकंदर कार्यक्रम, सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचें खरें स्वरूप अित्यादि गोष्टी विवरण करून सांगण्यासाठी प्रत्यही लहान लहान सभा भरत होत्या व त्यातून अुत्साही देशसेवक अुपदेश देत हिंडत होते. या त्यांच्या विवरणाचें व ह्या प्रत्यही चालू असणाऱ्या गल्ल्यागल्ल्यांमधील छोटेखानी सभांचे ओघ अेकत्र होत होत अखेर ता. १० मेच्या पुण्यदिवशी त्यांचा प्रचंड व अेकत्रित ओघ अिंडिया हाअुसकडे लोटू लागला. कारण अिंडिया हाअुसच्या हॉलमध्येच ता. १० मेची टोलेजंग सभा भरण्याचें ठरलें होतें. अिंडिया हाअुसचा हॉल या कार्याकरिता फारच सुंदर रीतीने शृंगारलेला होता. श्रोतृसमाजाच्या समोरील बाजूला अेक भव्य रक्तवस्त्र लावलेलें असून त्यावर पुष्पमालांच्या पंक्ति गुंफलेल्या होत्या व त्या नानाविध रंगांच्या पुष्पमंडपात अर्धाफूट जाडीच्या अक्षरांनी सोनेरी, हिरव्या, श्वेत व गुलाबी रगात राजा बहादुरशाह, श्रीमंत नानासाहेब, राणी लक्ष्मीबाअो, मौलवी अहमदशाह, राजा कुवरसिंह व १८५७ साली झुंजलेले आणखी काही योद्धे या सर्वांचीं नांवें अभिनंदनार्थ स्मरण म्हणून कोरून लिहिण्यात आलेलीं होतीं. या भव्य स्मृतिपटाचे भोवती निरनिराळ्या देशभक्तांच्या तसविरीही लावलेल्या असून, त्या हॉलमध्ये मनोहर पुष्पांच्या लहान झाडांच्या कुंड्या सर्वत्र खुल्या ठेवलेल्या होत्या. अुदबत्यांच्या सुवासाचा अेकच दाट परिमळ येअून, पेटीच्या सुस्वर सुरांनी व दे. वर्मा यांच्या राष्ट्रगीत-गायनांनी सर्वत्र अुदात्त स्फूर्तीचा संचार झाला होता. वंदेमातरम्च्या घोषाने तो सर्व रस्ता दुमदुमून गेलेला असतांना सभेत दुपारी ४।। वाजता अध्यक्षांची स्वारी निवडक मंडळींसह प्रवेश करती झाली. अध्यक्षांची स्वारी म्हणजे दुसरी कोणी नसून पॅरिसचे प्रसिद्ध देशभक्त राणासाहेब हेच होत. हे पॅरिसहून मुद्दाम या समारंभासाठी आलेले होते. त्यांच्याबरोबर पॅरिसहून दुसरी मंडळीही आलेली असून त्यांच्या आगमनाने समारंभास विशेष शोभा आलेली होती. प्रख्यात देशभक्त विदुषी मिसेस कामा यांचें अेक स्फूर्तिदायक पत्रही अध्यक्षांबरोबर आलेलें होतें. प्रथमतः राष्ट्रीयगीतें झाल्यावर देशभक्त आयर बी. अे. यांनी राष्ट्रीय प्रार्थना केली. याच सुमारास लोकांची अितकी दाटी झाली की, हॉलच्या बाहेर रस्त्यापर्यंत लोकांना अुभें राहणें

"भाग पडलें. केंब्रिज, ऑक्सफर्ड, सारेन्सेस्टर, रेडिंग असल्या दूरच्या ठिकाणांहूनही हिंदी लोक या सभेला लोटले होते. त्यांतही देशभक्त हिंदी स्त्रीजनांच्या आगमनाने व राष्ट्रगीतगायनाने सर्वांस अुत्साह आणून दिलेला होता. राप्ट्रप्रार्थना झाल्यावर राजा बहादूरशाह व श्रीमंत नानासाहेब यांचा स्मृतिगौरव करण्यासाठी दे. सावरकर यांनी सत्तावनच्या क्रांतीचें अितिहासस्वरूपसंबोधनपर भाषण केल्यानंतर वंदेमातरम्च्या घोषात सर्व सभा अुभी राहून, त्या अुभयवीरांच्या नांवाचा त्रिवार जयघोप करण्यात आला. दे. खान यांनी राजा कुवारसिंग यांचा स्मृतिगौरव केला. दे. दास. बी. अे. यांनी राणी लक्ष्मीबाअीचा व मास्तर (पारसी) व दे. येरुलक. (यहुदी) व अितर वक्ते ह्यांनी अितर देशवीरांचा स्मृतिगौरव केल्यानंतर अध्यक्षांचें अुत्साहक भाषण झालें व त्या भाषणाच्या शेवटी स्वार्थत्यागाच्या शपथा घेण्यात आल्या. जेव्हा डॉक्टर, प्लीडर, बॅरिस्टर, अेडिटर, युनिव्हर्सिटी पदवीधर, व्यापारी, मोतीवाले, तरुण व वृद्ध, स्त्रिया व पुरुष अेकामागून अेक या स्वार्थत्यागी मासात कडक तपस्या करण्याच्या प्रतिज्ञा करू लागले, तेव्हाचा अुत्साह अवर्णनीय आहे. सर्व जणांचे हृदयावर ह्या तपस्यामासाकरिता मुद्दाम तयार केलेल्या वीर-स्मृतिमुद्रा झळकत होत्या. कोणी महिनाभर अुपास करण्याच्या शपथा घेतल्या, कोणी मद्यपान सोडलें, आणि कोणा धूम्रमान सोडलें. महिनाभर थिअेटरमध्ये जाणें नाही, कोणतेंही चैनीचें कृत्य करणें नाही व या रीतीने जे जे पैसे वांचतील ते ते सत्तावनच्या देशवीरांसाठी अुभारलेल्या कोषात देअून टाकावयाचे! या फंडाचे वसुलीसाठी पदवीधरानी भिक्षेच्या शपथा घेतल्या व मुद्दाम केलेल्या झोळ्या घेअून हे राष्ट्रीय भिक्षेकरी आज सर्व आठवडाभर घरोघर भिक्षा मागत हिंडत आहेत व या योगाने सर्वत्र राजकीय चर्चेचीं पारायणें अिंग्लंडमध्ये प्रत्येक हिंदी घरी चालले‌लीं आहेत. फंडास मिसेस कामाने पंचाहत्तर रुपये धाडले ते प्रसिद्ध करण्यात आले. दे. राजाजीनेही आपलें मे महिन्याचें सर्व अुत्पन्न देशवीरांस अर्पण केलें. हे व अितर स्वार्थत्यागविधि झाल्यावर पुनः मिसेस दत्त या देशभक्त विदुषीने राष्ट्रगीतें गायलीं. प्रसादासाठी बनविलेल्या चपात्या वाटण्यात आल्या व वंदे मातरम्च्या जयघोषात व देशवीरांच्या स्मृतिघोषात ती अभूतपूर्व सभा विसर्जन पावली. अितका हिंदी समाज व अितका अमर्याद अुत्साह या लंडन शहरी पाहिल्याचें कोणासही आठवत नाही! चपात्याच प्रसादासाठी अशाकरता वाटल्या कीं सत्तावनचे क्रांतियुद्धाचे आधी अशाच 'चपात्या' देशभर गुप्तरूपाने वाटल्या गेल्या होत्या!

—ता. ५ जून १९०८

✦ ✦ ✦

२४. पदवीदान समारंभ

लंडन : सत्तावनचे देशवीरांच्या सन्मानाप्रीत्यर्थ स्मृतिमुद्रा धारण केल्यावरून येथील दे. हरनामसिंग बी. ए. व दे. खान आर. एम्. या दोघा देशभक्त तरुणांनी आपला पुढील सर्व अभ्यासक्रम (कोर्स) सोडून दिला व ज्याने सत्तावनच्या नानांना व लक्ष्मीबाईला ' रामोशी, खुनी व मांग ' म्हटलें, त्या प्रिन्सिपालचे कॉलेजमध्ये पाय ठेवण्याचें नाकारलें, हें आपले वाचकांस कळविलें आहे. हे दोन विद्यार्थी हिंदु असते तर त्यासंबंधी अितकें पार्लमेंटमध्ये प्रश्नोत्तरें होण्यासारखें काही झालें नसतें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, त्यातील अेक शीख व दुसरा मुसलमान पडला ! अिंग्रजी राज्याचे भक्कम आधारस्तंभ म्हटले म्हणजे शीख व मुसलमान अशी अलीकडे अिंग्रज लोक आपली समजूत मुद्दामच करून घेत असतात. तेव्हा त्या भक्कम म्हणून गाजविलेल्या झाडातच ही कीड लागलेली पाहून, अर्थातच तेथील पार्लमेंटपर्यंतच्या सर्व ' रिसां 'ना चटका बसल्यासारखें झालें. त्यानी वरील दोघा गृहस्थांना कॉलेजमध्ये जाण्याचा खाजगी आग्रहही केला. ' तुम्ही पंजाबी व त्याहूनही शीख, तुम्हांस हें द्वेषबुद्धीचें वर्तन शोभत नाही ! तुम्ही कॉलेजमध्ये परत जाल, तर पुनः अुर्मट वर्तन न करण्याबद्दल आम्ही तेथील प्रिन्सिपालास बजावून ठेवतो ' अशा मजकुराचें अेक लांब पत्र पंजाब व बंगालमध्ये अधिकारावर असलेल्या अेका पेन्शनर अँग्लोअिंडियनने धाडलें होतें. अितरांनीही धाकाचे व कुरवाळण्याचे प्रयोग केले; परंतु वरील कडव्या देशभक्तांनी असल्या प्रयोगास न भुलता व न भिता आपल्या देशाच्या सन्मानासाठी घरच्या पालकांचीही गैरमर्जी सोसण्याची तयारी केली.

पन्नास वर्षांत बराच बदल झाला म्हणावयाचा. कारण १८५७ साली याच श्रीमंत नानांचा व बहादुरशहांचा सर्वांहून जास्त द्वेष शिखांनी केला. आज त्या देशवीरांच्या सन्मानासाठी जर सर्वांत कोणी जास्त स्वार्थत्याग केला असेल, तर तो अेका शीख ग्रॅज्युअेटाने होय.

असल्या ह्या करारी वर्तनाबद्दल रीस अेम्. पी. हे पार्लमेंटमध्ये ह्या तरुणांना शिव्या देत असता त्यांचा गौरव करण्याची तयारी हिंदी जनतेत चालली होती व गेल्या आठवड्यात याप्रीत्यर्थ अेक जंगी मेजवानी करण्यात आली. पंजाबच्या अेका प्रसिद्ध कुलातील देशभगिनी धनदेवी ह्या समारंभाचे अध्यक्षस्थानी स्थानापन्न झाल्यावर ' स्वतंत्र हिंदुस्थान ' चा पहिला टोस्ट पिण्यात आला. नंतर दुसरा घोट देशवीरांचा ' असून त्यावर भाषण करताना दयानंद कॉलेजचे प्रोफेसर गोकुलचंद अेम. अे. यांनी केलेलें सुश्राव्य विवेचन हें सर्वांच्या हृदयांना अुल्हास, आशा व देशभक्ति यांचें दिव्य तेज देतें झालें. तिसरा घोट त्या दोघा हिंदी तरुणांचा होता.

नंतर अध्यक्षांनी त्या दे. हरनामसिंग बी. अे. व दे. खान, आर. अेम्. यांच्या करारी देशभक्तीची स्तुति करून त्याप्रीत्यर्थ त्यांना लंडनमधील हिंदी देशबांधवांतर्फे यार-अे-हिंद ही पदवी देण्यात येत आहे असें जाहीर केलें व ती पदवी कोरलेलीं दोन रौप्यपदकें त्या दोघांस श्रोत्यांच्या तालनिनादात अर्पण करण्यात आली. अध्यक्षांनी सांगितलें की, 'पदवी देणें हा हक्क लोकांचा आहे. अितकेंच नव्हे तर जी स्वदेशाने दिलेली किंवा मानलेली नव्हे ती पदवीच नव्हे. या हक्काची फार दिवस न केलेली अंमलबजावणी करण्याची स्फूर्ति आज माझ्या या तरुण लेकरांनी करून दिली हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. मला तीन मुलें आहेत. त्यांनी अशी देशाची पदवी मिळविली, तरच मी त्यांची आअी आहे असें मी म्हणू शकेन. नाही तर परक्यांनी दिलेल्या पदव्या असल्या मुलांच्या छातीला डसताना पाहण्यापेक्षा आर्यांचें निसंतान होणेंच अधिक श्रेयस्कर आहे !'

—ता. ३१ जुलै १९०८

✦ ✦ ✦

२५. बरें झालें !

लंडन : आता कोठे हिंदुस्थानच्या राजकारणात थोडीशी चळवळ सुरू झाली आहे असें म्हणावयास हरकत नाही. तरुण लोक कुटुंबाच्या क्षुद्र महत्त्वाकांक्षा सोडून देअून जेव्हा रस्तोरस्ती देशासाठी फिरू लागतात, शाळेतील मुलें आअीबापांच्या व्यक्तिमय व अप्पलपोटेपणाच्या निंद्य व अज्ञानजनक अुपदेशांना व धाकांना न जुमानता जेव्हा स्वराज्याच्या दिव्यात पटापट अुड्या घेतात, जेव्हा अेकेका पत्राचे तीन तीन लेखक तुरुंगात जातात, तोच चार चार लेखक त्या पत्राचे स्तंभ भरण्यास पुढे सरसावतात तेव्हा थोडीशी चळवळ सुरू झाली असें म्हणण्यास हरकत नाही. जेव्हा दंड भरण्यापेक्षा तुरुंगात जाण्यास स्वयंसेवक तयार होतात, जेव्हा ब्रह्मबांधव अुपाध्याय मरतात, जेव्हा सुशीलकुमार सेन पाठीवर फटके सपासप अुडत असता राष्ट्रीय धैर्याला काळिमा न लागावा म्हणून पाठ रतीभरही हलवीत नाहीत वा मुद्रा पालटवीत नाहीत, जेव्हा चिदंबरम् पिले आपणांस जामीन मिळत असता काही मजुरांना जामीन मिळत नाहीत, अेतदर्थ आपणही तुरुंगाबाहेर येण्याचें नाकारतात, जेव्हा टिळक, परांजपे धरले जातात, तेव्हा हिंदुस्थानात थोडीशी चळवळ सुरू झाली आहे असें म्हणावयास हरकत नाही.

"मेली आहे ! मेली आहे ! !' म्हणून जगाने जिच्या संबंधाने कंडी अुठविली होती ती भूमाता हिंदभू हलके हलके का होअीना, पण स्पष्ट श्वासोच्छ्वास करू लागली आहे. परमेश्वराचे किती अुपकार आहेत !

परंतु हिंदभू याप्रमाणे श्वासोच्छ्वास करू लागताच चोहोकडे अेकच गोंधळ अुडालेला आहे. जे आजपर्यंत दुर्लक्ष करीत होते वा निराश होते, ते आमचे लोक आम्हांकडे धावू लागले; कोणी जवळ आले, कोणी येअू लागले, जगातील जे तिन्हाअीत होते त्यांनी आजपर्यंत सिद्धान्तभूत मानलेले विचार पुन्हा परीक्षावयास आरभ केला व हिंदभू मेली या कंडीवरील विश्वास त्यांनी सोडून दिला. विपक्षीय जे होते त्यांची तर सर्वांहून जास्तच धांदल अुडाली. त्यांना त्यांचें असत्य डाचू लागलें. त्यांना क्षणात लज्जा वाटे, क्षणात संताप येअी, क्षणात धाक, क्षणात आशा क्षणात आश्चर्य, क्षणात निराशा, असा त्यांच्या मनोविकारांचा गोंधळ अुडाला. सर्व मतें मतांतरें झुंजू लागलीं. हिंदुस्थानची वार्ता जगाला लागू द्यावयाची नाही म्हणून हजारो रुपये दिले तरी जीं अिंग्लंडमधील पत्रें हिंदुस्थानचे लेख लिहीत नसत तीं पत्रें रोज आपले पत्रांचे स्तंभ हिंदुस्थानचे लेखांनी भरू लागलीं. ज्या हिंदुस्थानी लोकांना प्रदर्शनात जास्त गिऱ्हाअिकें जमविण्यासाठी विदुषकांचीं कामें देण्यासाठीच केवळ परस्थ लोक भेटत असत, त्याच हिंदुस्थानी लोकांचा दर्जा परदेशात अेकदम वाढला व अमेरिका, फ्रान्स व अिंग्लंड येथील प्रमुख पत्रांचे बातमीदार हिंदी लोकांच्या भेटीचा लाभ घेण्यास अुत्सुक होअू लागले. हिंदी लोकांतील तरुणांची ओळख व्हावी, म्हणून जपानी लेखक सकाळ-संध्याकाळ लंडनच्या हिंदी हॉटेलात खेटे घालू लागले. हाअूस ऑफ कॉमन्समध्ये हिंदुस्थानचीं दोन प्रश्नोत्तरें होणें दुर्मिळ होतें. आता हाअूस ऑफ लॉर्डसमध्ये परवांचा सारा दिवस हिंदुस्थानातील अस्वस्थतेच्या वादविवादात लार्ड कर्झन व व्हायकाअुंट मोर्ले असल्यांच्या कुस्तीत गेला. कुस्ती करावी तरी पंचाअीत न करावी तरी पंचाअीत ! लॉर्ड कर्झन हिंदुस्थानसंबंधी तासभर चर्चा करतात व अितर लोकांना दोष देतात की पार्लमेंटात हिंदुस्थानाबद्दल पक्षभेददर्शक प्रश्न करू नयेत. लॉर्ड मोर्ले पुन्हा तासभर कर्झनवर टीका करतात व शेवटी अिषारा देतात की, आपलें बोलणें लांब अैकू जातें तर मुळी कोणी बोलूच नये ! न बोलणें हें शहाणपणाचें व मुत्सद्देगिरीचें आहे हें सिद्ध करण्याकरताच तास-तास बोलावें लागतें ! अिकडे हिंदी तरुणांचाही जोम वाढतच चाललेला पाहून बोलल्याशिवाय वर्तमानपत्रें स्वस्थ बसत नाहीत. सत्तावनच्या अुत्सवसभेसंबंधाने सर्व अिंग्रजी वर्तमानपत्रांनी अेकच आरोळी अुठविली आहे. सत्तावनची स्मृतिमुद्रा कोटावर धारण करून हिंदी विद्यार्थी ऑक्सफर्ड, लंडन; सायरेन्सेस्टर अित्यादि शहरी अुघडपणे कॉलेजात जाअू लागले, तेव्हा त्यांना अटकाव न करणेंच प्रशस्त अशी क्लृप्ति योजण्याचें ठरलें. पण सायरेन्सेस्टरच्या

प्रिन्सिपालने छाती करून माझ्या कॉलेजात तरी ही धुन्हा धारण करू नये म्हणून आज्ञा केली तो काय प्रकार झाला ? हिंदी विद्यार्थ्यांनी धडाक्यात कॉलेज सोडून दिलें ! तेव्हा प्रिन्सिपॉल पत्र लिहू लागले की तुम्ही कॉलेजमध्ये या ! पण पहिल्या धाकाप्रमाणे या दुसऱ्या मोहालाही धुडकावून देऊन सत्तावनच्या देशवीरांची ज्याने निंदा केली, त्याच्या कॉलेजात पाऊल न टाकण्याचा निश्चय करून, दे. हरनामसिंग व दे. खान हे दोन वर्षांच्या श्रमावर व पशांवर पाणी सोडते झाले. वरें, या अुदाहरणाने तरी हिंदी विद्यार्थी भितील म्हणून रीस अेम्. पी. ने पार्लमेंटात प्रश्न विचारून दरडावलें, तों काय परिणाम झाला ? जास्तच चिडलेल्या हिंदी लोकांनी या स्वार्थत्यागी तरुणांचे सन्मानार्थ जंगी मेजवानी देअून त्यांना पदकें बक्षीस दिलीं !

हिंदुस्थानातील अत्युच्च पीठावरील निवडक तरुणांचें हें वर्तन पाहून असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही की, हिंदूभू हलके हलके का होअीना पण स्पष्ट श्वासोच्छ्वास करू लागली ! तिच्या निधनाची कंडी मात्र निधन पावली! बरे झालें की त्या निराशेतही आम्ही आशेला सोडली नाही !

—ता. ७ ऑगस्ट १९०८

✦ ✦ ✦

२६. विद्यार्थ्यांचा तेजोभंग

लंडन : हिंदुस्थानच्या विद्यार्थ्यांना होता होअील तो अिंग्लंडमध्ये धाडण्याचा त्यांच्या पालकांचा कल असतो. परंतु ही कल्पना आपलें राष्ट्र जितकी लवकर सोडून देअील तितकें अुत्तम होणारें आहे. आजपर्यंत हिंदुस्थानी मनामध्ये हीनस्थितीच्या अपमानाची कल्पना शिरली नसल्यामुळे त्या मनाला अिंग्लंडमध्ये काहीच बोचणी लागत नसे. आजपर्यंत हिंदुस्थानच्या प्राणेंद्रियाला सूक्ष्म विचारांचें तैक्ष्ण्य आलेलें नसल्याने त्याला हीनस्थितीच्या नरकाची घाण मुळीच येत नसे. परंतु ते राजकीय सूक्ष्मतेचें तैक्ष्ण्य आलेल्या तरुण हिंदुस्थानाला आता क्षणोक्षणी अिंग्लंडसारख्या स्वतंत्र हवेतही हिंदुस्थानच्या लोकांसाठी सर्वत्र हीनस्थितीची दुर्गंधिच कशी भरलेली आहे हें अनुभवास येअू लागलें आहे.

अिंग्लंडमध्ये येणाऱ्या तरुण अंत:करणावर पहिला जो घातकी परिणाम होतो तो तेजोभंग हा होय. त्यांचे राजवाडे, त्यांची निशाणें, त्यांचे आरमार व त्यांचें वैभव पाहून हताश हिंदुस्थानच्या हताश तरुणांचे हृदयांत आत्मदौर्बल्याचीं बीजें

आपलें विषारी जाळें पसरवूं लागतात. अशक्य व सूक्ष्म विचारास असमर्थ असणारी ती तरुण दृष्टि वरवरच्या भपक्याला पाहून भिते, दचकते व तेजोभंगाच्या विषारी दंशाने निर्जीव होऊन जाते. दास्यातील लोकांना खरें शिक्षण म्हणजे तेजोभंगच होय हें जाणून अिंग्लिश कारस्थानपटूंनी हिंदुस्थानच्या विद्यार्थ्यांना अिंग्लडांत जें आजपर्यंत अुत्तम प्रकाराने वागविलें तें अेवढ्यासाठीच होय. आजपर्यंत वरवर सभ्यतेनें व दिखाअू प्रेमानें हिंदी विद्यार्थ्यांना वागविण्यात येअी व त्या योगाने ते विद्यार्थी 'अिंग्लंडमध्ये अिंग्लिश लोक फारच चांगले असतात, केवळ तिकडेच अंग्लो-इंडियन लोक काय ते अुर्मट असतात' असा समज करून घेत. त्यांच्या अंतःकरणात आत्मदौर्बल्य व बुद्धीत अिंग्लिशांच्या सौजन्याचा मिथ्याभास अशी फसवणूक हिंदी विद्यार्थ्यांची होत असे.

परंतु आता गेल्या दोन तीन वर्षांत असल्या देखाव्याला न भिणारी हिंदुस्थानची आत्मजागृति होताच पूर्वी ज्या फसवणुकी ध्यानात येत नसत त्या आता अुघड होअू लागल्या. अेकाच कॉलेजात व क्लबात अिंग्रजी विद्यार्थ्यांनी प्रश्न– मग तो कितीही मूर्खपणाचा असो, केला की प्रोफेसर अर्धा अर्धा तास त्याचें समाधान करतात. परंतु हिंदी विद्यार्थ्यांनी केलेल्या मार्मिक प्रश्नांसही ते कसे फेटाळून लावतात हें दृष्टीला राजकीय सूक्ष्मता येताच अुघड कळू लागतें. केंब्रिजसारख्या ठिकाणीही हिंदी विद्यार्थ्यांना जाणूनबुजून आत न घेणारीं कॉलेजे निघू लागलीं. एडिंबरोमध्ये सर्व विद्यार्थ्यांना आपल्या कह्यांत ठेवता यावें म्हणून अिंग्रजांच्या अधिकाराखाली बोर्डिंग्ज निघाली व त्यांचा पहिला नियम ' येथील विद्यार्थ्यांनी राजकीय कामात कोणतीही चर्चा करू नये ' हा झाला ! साम्राज्यदिनाला खेडेगांवांतील शाळांतूनही अिंग्रज लहान लहान मुलांस राजकीय शिक्षण देण्यांत येते. परंतु हिंदी तरुणांतील ग्रॅज्युएटांसही राजकीय चर्चा करता कामा नये या अिंग्लंडमधल्या शाळांत व हिंदुस्थानांतील शाळांत आता भेद तो काय अुरला ? हिंदुस्थानी लोकांस दोहोमध्येही दास्याशिवाय दुसरें शिक्षण व अपमानाशिवाय दुसरें बक्षीस तें काय मिळणार? मग लोकांनीं आपल्या लोकांनी अिंग्लंडमध्ये काय म्हणून यावें ? अुद्योगधंद्याचें शिक्षण जपान, जर्मनी, अमेरिका येथे जितकें मिळतें तितकें अिंग्लंडमध्ये मुळीच मिळत नाही. जगाच्या प्रगतीत अिंग्लंड अर्ध्या शतकाने मागे आहे. आपल्या लंगड्या हिंदुस्थानात अिंग्लंड जरी भरभर चालत असलें तरी अमेरिकेच्या व जर्मनीच्या गतीने त्याला कधीच मागे टाकलेलें आहे. अिंग्लंडमधून आजकाल जर्मनीत व अमेरिकेत विद्यार्थी जात असतात. आपण ह्या शतकामागच्या शिक्षणासाटी अिंग्लंडकडे कां यावें ? खर्चाच्या बाबतीतही अितकेंच नव्हे, तर याहूनही स्वस्त पडेल. शिवाय अमेरिकेत स्वतंत्र विद्यार्थ्याला आपलें पोट चालविण्याअितकें कामही मिळतें. मग अिंग्लंडमध्ये येण्याची ही दरिद्री हौस आपले लोक केव्हा सोडतील?

खरें शिक्षण जपान, जर्मनी, अमेरिका यांतच मिळेल. शास्त्रीय व व्यापार-विषयक शिक्षणही तिकडेच मिळेल व अिंग्लंडमध्ये होणाऱ्या तेजोभंगाचा विषारी दंशही टाळता येईल.

—ता. १४ ऑगस्ट १९०८.

✦ ✦ ✦

२७. लोकमान्यांना काळेपाण्याची शिक्षा !

लंडन : महाराष्ट्राच्या विभूषणाला, आर्यधर्माच्या अभिमानाला, नीति-मत्तेच्या निपुणतेला व स्वदेशप्रीतीच्या अुद्भवाला, त्या बाल गंगाधर तिलकाला काळे पाण्यावर धाडण्याची शिक्षा झाल्यापासून ज्याच्या हृदयात त्वेष आलेला नाही व ज्याच्या मस्तकात भयंकर खळबळाट झाला नाही असा खऱ्या अंत:करणाचा एकही हिंदु आढळणें दुर्मिळ आहे. व्यापाऱ्यांनी आपलीं दुकानें बंद ठेवलीं, गिरणीवाल्यांनी गिरण्या बंद ठेवल्या, विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्या, नागरिकांनी अुपवास केले, देशाच्या रंध्रारंध्रातून सहानुभूतीच्याच नव्हे, तर अकृत्रिम कृतज्ञतेचा संचार सुरू झाला. मुंबईसारख्या बकाल वस्तीच्या शहरात व राजकारणात अनभिज्ञ असणाऱ्या लोकांनी संप केले, त्यांचीं मनें क्षुब्ध झालीं, ते रागाने वेडे होअूब व जिवाची पर्वा सोडून युरोपियनांवर हल्ले करू लागले व गोळ्यांच्या पहिल्या फेरीसरशीच आपल्या नि:शस्त्रतेने आलेल्या दौर्बल्यासह घरचा रस्ता न सुधारता सतत आठ दिवस बंदुकांच्या प्राणघातक गोळ्याशी दगडांचा सामना करू लागले या सर्व प्रकारच्या प्रक्षोभाचे वृत्तान्त रोज तारेने येत गेल्याने येथील समाजाला विलक्षण स्तिमितता आल्यासारखी झालेली होती. राष्ट्रीय मताच्या प्रगतीचे या वेळी दिसून आलेलें अेक द्योतक म्हटलें म्हणजे टिळकांच्या शिक्षेबद्दल सर्व वर्तमानपत्रांचे व लेखकांचे लेखात दिसून आलेली वृत्तीची एकतानता होय. आपापसात किती ही पक्षभेद, व्यक्तिद्वेष व मतवैचित्र्य असलें तरी, राष्ट्राचा प्रश्न येताच व्यक्तित्व व अंतर्भिन्नता विसरून, आम्ही १०५ आहोत या अुदात्त तत्त्वाचें अनुकरण करण्याअितकी राष्ट्रीय मताची प्रगति झालेली आहे. हें सुधारक, चिकित्सक, वंदे मातरम्, हिंदु, ज्ञानप्रकाश, अिंदुप्रकाश, बंगाली, गुजराथी, पंजाबी अित्यादि सर्व भिन्नमार्गी पंथप्रचारकांनी श्रीमत् तिलकांचे शिक्षेचे प्रसंगी जे अेकवृत्तिमय व निर्मत्सर लेख लिहिले त्यावरून स्पष्ट होणार आहे. जहालांना चिरडताना नेमस्तांची सहानुभूति मिळेल या स्वप्नात दंग असलेल्या अँग्लोअिंडियन हितशत्रूंना देशद्रोह्यांचे

दिवस हिंदुस्थानात संपत आलेले आहेत, हें सुचविण्याची ही अुत्कृष्ट संधि साधल्याबद्दल आमच्या सर्व लेखकांची अुदात्तता वाखाणावी तितकी थोडीच आहे.

अशा संधीस या स्वयंस्फूर्त राष्ट्रीय अेकवृत्तीला दे. गोपाळ कृष्ण गोखले यांनी गालबोट लावलें नसतें तर किती तरी चांगलें झालें असतें ! टिळकांच्या शिक्षेची वार्ता व त्या आघाताने दबून न जाता कर्तव्य करण्याची महाराष्ट्राचे अंगात संचारलेली जास्तच दृढनिश्चयात्मकता यांची हकीकत अैकून अिंग्लंडमधील अेकूण अेक हिंदी मनुष्याच्या मनाची काही विलक्षण स्थिति झालेली होती. ज्या महात्म्याने राष्ट्रासाठी सोसलेल्या विपत्तीने आज मुंबअीसह सर्व महाराष्ट्रात ही अपूर्व अेकता संचारलेली आहे, त्या महात्म्याचे गुणवर्णनासाठी व त्या महाराष्ट्राचे सहानुभूतीसाठी अिंग्लंडमधल्या हिंदी समाजातर्फे अेक सभा भरलीच पाहिजे अशी प्रत्येकाच्या मनात साहजिकपणे अुत्कंठा लागली. वास्तविक दे. गोखल्यांनीच या कामी पुढाकार घ्यावयास पाहिजे होता. परंतु ते पुढे आले नाहीत म्हणून अितर अुभय पक्षांतील लोकांनी सर्व हिंदी रहिवाशांची सभा बोलावली. नेमस्त व जहाल हा भेद यत्किंचितही मनात न आणता सर्व दर्जांची व मतांची मंडळी त्या सभेस आली होती. सभेचें ठिकाण कॅक्स्टन हॉलसारखें विस्तृत असताही हिंदी व युरोपियन स्त्रीपुरुषसमाजाने तें भरलें होतें, व अध्यक्षस्थानी दे. बॅ. पारेख हे नेमस्त पक्षाचे अध्वर्यु व दादाभाअींचे वेळेपासून राजकारणात झटत असलेले गृहस्थ होते. अशा या सभेला गोखल्यांनी मदत देअू नये हें फारच अुद्वेगजनक होय. त्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल जेव्हा विचारलें गेलें तेव्हा त्यांनी तें नाकारलेंच ! सभेत शिक्षेचा निषेध करण्याविषयी काही बोलाल का म्हणून विनंती केली असता तीही त्यांनी मान्य केली नाहीच, पण याहीपेक्षा पुढे जाअून सभेला हजर रहाण्याअितकीही त्यांनी तसदी घेतली नाही! प्रत्येक फाटक्या साहेबाच्या घराचे अुंबरठे झिजविण्याची संधि जे फुकट दवडीत नाहीत त्यांना टिळकांच्या शिक्षेबद्दल अुघडपणें निषेधाचा अुच्चार करण्याची व तशा सभेला हजर राहण्याचीही आवश्यकता कळू नये हें काही सौजन्याचें निदर्शक खात्रीने नव्हे ! दे. गोपाळराव गोखल्यांसंबंधी अजूनपर्यंत जी काही पूज्यबुद्धि लोकांत आहे, तिच्या योगाने लोक त्यांच्या हजिरी-गैरहजिरीस महत्त्व देत असतात. परंतु सर्व राष्ट्राच्या स्वयंस्फूर्त विचाराला व मनोवृत्तीला टिळकांच्या हद्दपारीसारख्या अत्यंत कोमल प्रसंगी असा निरर्थक अडथळा करून त्यांनी काय महत्त्वाची देशसेवा बजावली तें गोपाळरावांचें गोपाळरावांनाच माहीत ! बाकी सर्वांना त्यांच्या त्या संदिग्ध व अप्रस्तुत वर्तनाचा वीट येअून त्याच कॅक्स्टन हालात भरलेल्या सभेत गोखल्यांच्या या कर्तव्यपराङ्मुखतेचा निषेध करण्याचा ठराव पास करण्यात आला. मुंबअीला ओरिअेंटल रिव्ह्यू या पत्राने व अिंग्लंडात दे. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी राष्ट्राच्या अेकतानतेचा जो हा भंग केला त्याने राष्ट्राचें तर राहोच, पण त्यांचें तरी हित होवो म्हणजे झालें!

—ता. २१ सप्टेंबर १९०८

✦ ✦ ✦

२८. लंडन टाअिम्सचा संताप

लंडन:—आपल्या कित्येक भोळ्या लोकांना वाटत असतें की तुसडेपणा व स्वार्थलंपटतेचें वारें फक्त हिंदुस्थानात येणाऱ्या अिंग्रजांच्याच अंगात काय तें भरलेलें असून अिंग्लंडमध्ये असलेले सर्व अिंग्रज हे सदोदित न्यायी, निर्मत्सर व दयाशीलच असतात. गेल्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानच्या राजकारणाला निर्जीव, रूक्ष व नाशकारक अशा·मवाळ चळवळींच्या वाळवंटातून ज्या पक्षाने फरपटत नेलें आहे, त्या पक्षाचे पुढारी आमच्या देशात वरील समजूत प्रचलित करण्यास बहुतांशी कारण झालेले आहेत. हिंदुस्थानला न्याय देण्यास जे आडकाठी आणतात ते अँग्लोअिंडियन लोक होत. बाकी अिंग्लंडमधले कोणते लोक त्याबद्दल जबाबदार नाहीत तर ते निसर्गत:च अतिशय न्यायी व स्वातंत्र्यावर प्रेम करणारे असल्याने, हिंदुस्थान देशाने अँग्लोअिंडियनांकडे लक्ष न देता अिंग्लंडला आपलीं खरीं गाऱ्हाणीं सांगितलीं की, हिंदुस्थानचें काम भागलें अशी हे नेमस्त पक्षाचे धुरीण आजपर्यंत आपली चुकीची समजूत करून घेऊन आपल्याबरोबरच आपल्या लोकांनाही या निष्फळ आशेचा अुपदेश करीत आलेले आहेत. वास्तविक अिकडे जसे काही अँग्लोअिंडियन आमच्या आड येअू पाहतात, त्याप्रमाणे खुद्द अिंग्लंडमध्येसुद्धा सर्वच अिंग्लिशमन आम्हांस अनुकूल आहेत असें नाही. अुदाहरणार्थ लॉर्ड मोर्ले हे अँग्लोअिंडियन आहेत की अिंग्लिशमन आहेत ? हिंदुस्थानला आपल्या जोखडाखाली चिरडून टाकणाऱ्या काही अधिकाऱ्यांचें अभिनंदन करणारे डेली टेलिग्राफचे संपादक, टाअिम्सचे संपादक, डेली मेलचे संपादक हे अँग्लोअिंडियन आहेत की अिंग्लिशमन आहेत ?

व हे जर सर्व अिंग्लिशमन आहेत, तर मग हिंदुस्थानच्या हिताच्या आड फक्त काही अँग्लोअिंडियन काय ते येतात ही अडाणी समजूत नाहीं काय ? जोपर्यंत अिंग्लंडमध्ये मदिरापानात सक्त होण्यासाठी वा अुदरपरायणतेसाठी चार हिंदी श्रीमंतांची जडबुद्धि मुलें हिंदुस्थानातून येत होतीं व जात होतीं तोपर्यंत अिंग्लंडमध्ये हिंदी लोकांस पूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव घ्यावयास मिळे ! वाटेल तेव्हा वाटेल तितकी दारू त्याने प्यावी, वाटेल तेव्हा वाटेल त्या प्रकारची ख्याली खुशाली करावी; रस्त्यातील वाटेल त्या गोऱ्या मुलीचा हात धरून तिच्याशी चर्चमध्ये वा अितरत्र लग्न लावावें; अिंग्लंडमध्ये हिंदी विद्यार्थ्याला पूर्ण स्वातंत्र्य ! वाटेल त्या साहेबास वाटेल तितका लवून सलाम करावा; अिंग्रजी समाजाने हिंदी लोकांच्या मूर्तिपूजेची व सतीच्या चालीची वाटेल ती विटंबना करावी; घरून येणाऱ्या मुबलक पैशाचा पाण्यासारखा खर्च करून आपल्या भाडयाच्या घराच्या मालकिणीला तिच्या मुलांवाळांसुद्धा वाटेल तितके वेळा थिअेटरात घेअून जावें; अिंग्रजी क्रिकेट क्लबाला वाटेल तितक्या पैशाच्या देणग्या द्याव्या, त्या प्रकरणी हिंदी विद्यार्थ्यांच्या

वर्तनस्वातंत्र्यास अिंग्लंडमध्ये पारतंत्र्याचा स्पर्श देखील होणें नाही ! हिंदी तरुणांच्या अंगातील दुर्गुणांस भरभराटविण्यास पूर्ण स्वातंत्र्य अिंग्लंडमध्ये होतें...आणि, अजूनही आहे ! या वरील सुखलंपटतेच्या भोवतीच घिरट्या घालणारे चटोर हिंदी विद्यार्थी जोपर्यंत अिंग्लंडमध्ये येत होते, तोपर्यंत त्यांना मन मानेल तसें वागू दिलें जात असल्याने, या चटोरपणालाच ते स्वातंत्र्य समजू लागले; पण हिंदुस्थानात परत जाअून या अिंग्लंडात मुबलक असलेल्या वर्तनस्वातंत्र्याची ते वाहवा करू लागले. अिंग्लंडची हवाच स्वतंत्र विचारांना पोषक आहे, हिंदुस्थानात अरेरावी गाजविणारे काही अँग्लोअिंडियन काय ते खराब आहेत, बाकी अिंग्लंडमध्ये लोक मात्र झाडून सगळे अुदार आहेत, असे या मूठभर विदेशाहून परत आलेल्या लोकांच्या वलगनांना अैकून आपणही विश्वासू लागलो.

परंतु जेव्हा सुखलंपटतेला लाथ मारून देशासाठी तळमळणारे विद्यार्थी अिंग्लंडला पोचले, ज्यांनी देशस्वातंत्र्यास्तव संन्यास स्वीकारलेला आहे, ज्यांनी आपले पुष्कळ देशबांधव अन्नासाठी मरत असल्यामुळे आपणही अुपवास करण्याच्या प्रतिज्ञा केलेल्या आहेत, व व्यक्तिविषयक सुखसाधनें कमी नसताही त्या साधनांना देशभक्तीच्या सेवेला अर्पण करून जे थंडीपुरतें वस्त्र व भुकेपुरतेंच अन्न ग्रहण करीत आहेत, असे हिंदी तरुण अिकडे येअू लागताच, अिंग्लंडमध्ये मिळतें म्हणून ज्याची कंडी पिकली होती तें वर्तनस्वातंत्र्य व तें मतस्वातंत्र्य हें मृगजलातल्या लाटात पोहू लागलें. अिंडियन विद्यार्थ्यांच्या स्वछंदी वर्तनास आळा घालण्यासाठी टाअिम्सपासून डेली मिररपर्यंत व लॉर्ड मोर्लेपासून तो रीससाहेबापर्यंत सर्व दांत-ओठ खाअून धावत सुटले.

आणि कारण असें सांगण्यात येत आहे की हिंदी तरुण लोकांना अेकटे राहू देणें हें त्यांच्या चारित्र्यास घातक होणारें आहे. जोपर्यंत अिंडियन तरुण दारू पीत, नाच करीत, तमाशे पाहत बाहेरख्यालीच्या रंगात दंग होत होते, तोपर्यंत त्यांना वर्तनस्वातंत्र्य घातक नव्हतें—परंतु देशभक्तीच्या वेडाने त्यांना पछाडताच व त्यांच्या तरुण नेत्रांत विषयी रंगेलपणाचे स्थळी पवित्र स्वार्थत्यागाच्या लकेऱ्या दिसू लागताच त्यांना वर्तनस्वातंत्र्य घातक होअू लागलें !

म्हणून हिंदी लोकांच्या वर्तनाची चौकशी करण्यास लॉर्ड मोर्ले यांनी ली वॉर्नर, सर कर्झन वायली अित्यादींची कमिटी नेमली होती व तिचा रिपोर्ट नुकताच तयार होअून त्यातील मुख्य मुद्दे लंडन टाअिम्स पत्राने गेल्या मंगळवारी प्रसिद्ध केले. लंडन टाअिम्सचा तो लेख अनेक रीतींनी फार महत्त्वाचा आहे. त्यात तो लेखक म्हणतो, 'निरनिराळ्या खेळात हौसेने मिसळण्याचे स्थलीं, अिंग्रजी लोकांत मजा मारणें, चहा पिणें, त्यांच्याशी गोडीगुलाबीने राहणें वगैरे स्नेहवर्धक गोष्टी शिकविण्यासाठी हिंदी विद्यार्थ्यांना अेकत्र करणाऱ्या ज्या संस्था अिंग्रजांनी काढल्या आहेत, त्यांत कोणताही भाग न घेता हिंदी तरुण अलीकडे राजकारणाच्या

वाळवंटात गुरफटलेले दिसतात. आम्ही त्यांना त्यांच्या तारुण्याला साजेल अशा आनंदी वृत्तींत ठेवण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न विफल होतात. कारण अुलट दिशेने प्रयत्न करणारे जहाल तरुण आपल्या वजनाने अर्भक लोकांना राजकारणाच्या क्षुब्धतेत सहज ओढू शकतात. सर्व अिंग्लंडभर पसरलेल्या व अेकट्या अेंडिवरो-मध्येच १५० पर्यंत असलेल्या, या पांचशे अेक तरुण हिंदी लोकांतून गेल्या ता.१७ मेच्या सभेला अिंडिया हाअूसमध्ये 'देशवीरस्मृती 'प्रीत्यर्थ शंभरावर अिंडियन जमावे ही अेकच गोष्ट आमच्या म्हणण्याची सिद्धता करीत आहे !' नंतर टाअिम्सने अितर पुष्कळ मुद्द्यांचें विवरण केलें आहे व शेवटी सर्व हिंदी विद्यार्थ्यांना अेका कोंडवाड्यात कोंडून त्यावर अिंग्लिशांची सक्त देखरेख अुर्फ पहारा ठेवावा अशी सूचना दिलेली आहे. लवकरच सुटी संपताच अिंडियन विद्यार्थ्यांना या राजनिष्ठेच्या कोंडवाड्यात कोंडण्यात येअील हें निश्चित आहे. जें निश्चित नाही तें हें की अशा कोंडवाड्यांनी कधी अंत:करणें वळतील काय ?

गेल्या सोमवारी लोकमान्य टिळकांच्या अपिलासाठी श्री. दादासाहेब खापर्डे हे लंडनमध्ये आले. ते येण्यापूर्वी फक्त तीन तास आधी त्यांच्या आगामी आग-मनाची वार्ता लंडनला मिळाली, तरी ज्या स्वातंत्र्यध्येयाचे दादासाहेब हे पुरस्कर्ते आहेत, त्या तत्त्वावर प्रीति करणाऱ्या येथील हिंदी समाजाने ह्या पुढाऱ्याचें स्वागत करण्यासाठी त्वरित स्टेशनकडे धाव घेतली. गाडी येण्याचे आधीच प्लॅटफॉर्मवर सर्व हिंदी लोक दाट जमलेले दिसत होते. गाडी स्टेशनमध्ये शिरताच व दादासाहेबांची भव्य मूर्ति दिसू लागताच जयघोषाने आणि पुष्पांनी सर्व स्टेशन फुलून व दणाणून गेलें ! दादासाहेब येताच त्यांच्या हाती ताजी तार वर्तमान-पत्रातून जी पडली ती ही होय की, नरेंद्रनाथ गोस्वामी याचा तुरुंगात खून पडला व श्रीमंत दादासाहेब सर्वांचे आभार मानीत आपल्या विऱ्हाडी निघून गेले !

ज्या दिवशी स्टेशनवर गोखले आले, त्या दिवशी तीन चार हिंदी लोक व बाकी अॅंग्लोअिंडियन सामोरे गेले व ज्या दिवशी खापर्डे आले त्या दिवशी सर्व हिंदी समाज दाटी करू लागला. त्यात अेकही अॅंग्लोअिंडियन दिसला नाही. लंडनला हिंदी समाज कोणत्या ध्येयाच्या भजनी आहे ह्याचें हें आणखी अेक प्रत्यंतर !!

—ता. २५ सप्टेंबर १९०८

✦ ✦ ✦

दा. म. १५१२५

२९. अिंग्लंडच्या व्यापाराची स्वदेशीमुळे पिछेहाट

लंडन:— आज दोन वर्षेपर्यंत छपवून ठेवलेलें सत्य अखेर जगापुढे मांडणें अिंग्लंडला भाग पडलें आहे. हिंदुस्थानात स्वदशी चळवळ व आयर्लंडात सिनफिन चळवळ सुरू झाल्यापासून या चळवळीचा आपल्या व्यापारावर काहीच परिणाम होणारा नाही व झालेला नाही अशा दिमाखाने त्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांना निराश करण्याचा अिंग्रजांनी प्रयत्न चालविलेला होता. हिंदुस्थानात स्वदेशी चळवळीमुळे बाजारात विलायती मालास मागणी नसताही आपल्या निर्यात व्यापारावर व हिंदुस्थानातील विलायती आयात मालावर त्याचा रतिभरही परिणाम होत नाही हें दाखविण्यासाठी आज दोन साल हिंदुस्थानकडे मागणी नसताही माल धाडण्यात येतच होता. हिंदुस्थानच्या बाजारात विक्री न झाली तरी हरकत नाही परंतु गेल्या वर्षापर्यंत हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर विलायती माल आल्याचे आकडे जसेच्या तसेच फुगलेले राखले होते. तिकडे हिंदुस्थानी गिरण्यांतून तर माल जोराने बाहेर पडत होता व बाजारात स्वदेशीच खपत होता. परंतु सरकार तर अिकडे हिंदुस्थानात विलायती माल पूर्वीअितकाच येतो, हें बंदरातील आकड्यावरून प्रसिद्ध करून स्वदेशीच्या पुरस्कर्त्यांस खोटें पाडीत होतें. या परस्परविरुद्ध गोष्टींचें हृद्गतही अेका अँग्लोअिंडियन पत्राने थोडे दिवसांपूर्वी प्रसिद्ध केलें होतें की, दोन्हीही गोष्टी खऱ्या आहेत. फरक अेवढाच की, बाजारात स्वदेशी माल जास्त खपत चाललेला आहे ! व गोदीमध्ये विलायती माल जास्त साचत चाललेला आहे ! तथापि अजूनपर्यंत अिंग्लंडच्या लोकसमाजात स्वदेशीचा खरा चटका बसण्याअितका अुघड परिणाम दिसून आलेला नव्हता. वास्तविक पाहता आपल्या हिंदुस्थानचे पैसे संरक्षण करणें हा स्वदेशी बहिष्काराचा मूळ व मुख्य अुद्देश आहे. अिंग्लंडचा व्यापार बुडाला, तरच स्वदेशी चळवळ यशस्वी झाली, असा आमचा समज नाही. अिंग्लंडने हिंदुस्थानविरहित वाटेल तेथल्या बाजारात जाअून आपला व्यापार खुशाल वाढवावा. त्याला हिंदुस्थानची स्वदेशी काय म्हणून आड येअील ? व अेतदर्थच जोपर्यंत हिंदुस्थानात नवीन गिरण्या, नवीन कारखाने, नवीन धंदे भराभर अुघडत आहेत, तोपर्यंत अिंग्लंडच्या व्यापाराचे आकडे वाढत गेले असते, तरी देखील आमच्या स्वदेशीचा विजयच झाला असता. परंतु हिंदुस्थानाअितका भोळसट बाजार जगावर अितरत्र अिंग्लंडला कोठेही सापडणारा नसल्याने, त्या बाजारात अिंग्रजी माल कमी संपतो कीं नाही हें ठरविण्यास अिंग्लंडच्या व्यापाराचे आकडे हें अेक साधन आहे व त्या साधनाने देखील आता हें निर्विवाद सिद्ध होतें आहे की, गेल्या दोन वर्षाच्या परिश्रमाने स्वदेशी-बहिष्काराचा विजय झालेला आहे. कारण आठ महिन्यांत अिंग्लंडच्या परदेशाशी चाललेल्या व्यापाराचा आढावा नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. त्यावरून असें स्पष्ट

होत आहे की, अिंग्लंडच्या व्यापाराला स्वदेशीने जखम केलेली आहे. या गेल्या आठ महिन्यांत परदेशी व्यापाराचा आढावा देताना बोर्ड ऑफ ट्रेड म्हणतें:–

" Our Foreign Trade
Decrease of £ 72,000,000
In Eight Months

Again we have to record a falling off in trade which is sufficiently serious. Decrease in the imports is £42,045,186 and decrease in the exports is £30,083,043 making an aggregate shrinkage during the present year of upwards of £72,000,000,

अशा रीतीने अिंग्लंडला ७ कोटी पौंडांची गेल्या साली ठोकर बसली आहे. अिंग्लंडमधून माल बाहेर देशी किती कमी गेला याचे सविस्तर आकडेही महत्त्वाचे आहेत:—

तेलाचें वी, तेल, डिंक अित्यादि		३।। लक्ष पौंड कमी गेले
कागद अित्यादि	...	२ ,, ,, ,, ,,
लोकर अित्यादि	...	५।। ,, ,, ,, ,,
लोखंडी सामान पेट्या अि...		६।। ,, ,, ,, ,,
कापसाचे कपडे	...	६।। ,, ,, ,, ,,
लोकरीचे कपडे	...	४ ,, ,, ,, ,,
अितर कापड	...	३ ,, ,, ,, ,,
कातडी सामान	...	५।। ,, ,, ,, ,,

अित्यादि आकड्यांवरून अिंग्लंडला बहिष्काराचा केवढा आघात सोसावा लागत आहे हें स्पष्ट होणारें आहे. परदेशात जाणाऱ्या मालाची पिछेहाट जें सांगत आहे तेंच जी मालाची वाढ झालेली आहे ती वाढही सांगत आहे. कारण सर्व प्रकारच्या पिछेहाटीत अिंग्लंडातून बाहेरदेशी जाणाऱ्या यंत्रसामग्रीची मात्र वाढ झालेली आहे. कारण या वर्षी २।। लक्ष पौंडांचीं यंत्रें मात्र अिंग्लंडमधून जास्त बाहेर गेलीं. ही वाढही तेंच सांगत आहे की हिंदुस्थानात स्वदेशी चळवळ जोरावत आहे व म्हणून यंत्रें जास्त मागविण्यात येत आहेत! परंतु अिंग्लंडपेक्षा जर्मनी-जपानमधून यंत्रें घेण्याचा बहिष्कारवादी लौकर निश्चय करतील, तर पुढील साली हीही वाढ कमती होअील. तसेंच यंत्राला लागणारा कोळसाही अिंग्लंडने ६३ लक्ष पौंडांचा बाहेर जास्त धाडला. अिकडेही हिंदुस्थान लवकरच लक्ष देअील व जपानी कोळसा घेअू लागेल. ७ कोटि पौंडांपेक्षा अिंग्लंडची खरी नुकसानी अधिकच झालेली आहे. कारण हें ७ कोटि पौंडांचें नुकसान गेल्या वर्षीच्या आकड्यांशी तुलना करून ठरविलें असल्याने व गेल्या वर्षीही असाच तोटा असल्यामुळे ३।४ वर्षांपूर्वीच्या आकड्यांचे मानाने

अिंग्लंडचें खरें नुकसान फारच जास्त झालेलें असलें पाहिजे. या पिछेहाटीचा परिणामही तावडतोव अिंग्लंडमध्ये होअून आपापसात वेवनाव सुरू झालेला आहे. मँचेस्टर व लँकेशायरच्या व्यापाऱ्यांवर या पिछेहाटीचा वहुतेक ताण पडलेला असल्याने तेथील गिरण्यांच्या मालकांनी मजुरांस शेकडा ५ कमी पगार देण्याचें ठरविले. परंतु मजुरांनी तसें करण्याचें नाकारून पगार कमी झाल्यास काम वंद पाडू म्हणून जाहीर केलें. प्रत्येक दैनिकात Cotton crisis वर आर्टिकलें येत आहेत. ग्लासगो येथे तर काम नसलेल्या मजुरांनी हजारो लोकांचे थवे करून दंग्यास आरंभ केलेला आहे. सोशियालिस्ट लोकही दंग्यात मिसळत आहेत. या दंग्याची शांतता करण्यासाठी, मुंवअीच्या दंग्यानंतर जसे तिकडले गव्हर्नर समाचारास जात होते तसेच येथील राजपुत्रही मुद्दाम गेले होते. परंतु त्यांनाही वेवनाव झालेल्यांनी धिक्कारून परत धाडलें. सभेत राजपुत्राच्या सन्मानार्थ राष्ट्रीय गीत God Save the King हें सुरू होताच मजुरीवाल्यांनी हुर्यो करण्यास सुरुवात केली! व आपल्या अनंत कंठांनी " Down with the Tyrant " ह्या अर्थाच्या प्रख्यात मार्सेलिसच्या गाण्यास आरंभ केला !! तरी ह्या लोकांवर मुंवअीच्या शांतताप्रिय दयाळू गव्हर्नराप्रमाणे गोळ्या सोडण्याचा हुकूम राजपुत्राने दिल्याचें अैकिवात नाही ! अितकेंच नव्हे, तर त्यातील लोकांची धरपकडही चाललेली नाही !!

...—ता. २ ऑक्टोबर १९०८
अनुक्रम ३८९७ विः निबंध
क्रमांक ७५९ नोंः दिः 73/111/45

✦ ✦ ✦

३०. सरदार अजितसिंह व सय्यद हैदर रेझा यांचें अभिनंदन

लंडन:—गेल्या रविवारी फ्री अिंडिया सोसायटीतर्फे भरलेल्या लंडन येथील हिंदी रहिवाशांच्या सभेत खालील ठराव सर्वानुमते पसार झाले. सभेच्या अध्यक्षस्थानी दे. अलीखान हे होते व सभेत हिंदु, मुसलमान, पार्शी अित्यादि सर्व पंथांचे लोक अुपस्थित होते.

दे. सावरकर यांनी पहिला ठराव पुढे आणला व त्याला डॉक्टर राजन व लाला हरदयाळ यांनी अनुमोदन दिलें. 'देशभक्त सरदार अजितसिंह यांनी स्वदेशाची जी सेवा अखंड रीतीने चालविलेली आहे तीबद्दल आमचे सर्वांचे मनात प्रथमपासून वसत असलेला पूज्यभाव त्यांच्या तिलकाश्रमाची वार्ता अैकून अितका

प्रबळ झालेला आहे की, आज ही संधि साधून आम्ही फ्री इंडिया सोसायटीचे आमंत्रणावरून जमलेले सर्व गृहस्थ सरदार अजितसिंह यांच्या ह्या धैर्ययुक्त देश-भक्तीचें सार्वजनिक अभिनंदन करीत आहो. दाखविलेल्या भयाने वा मूर्खपणाच्या लटपटीने आपल्या मार्गापासून च्युत न होता, सरदार अजितसिंह हे ज्या राष्ट्रीय पक्षाचे ते अेकदा भक्त बनले, त्या पक्षाची सेवा आजपर्यंत अेकनिष्ठेने करीत आले आहेत व त्यांची ही सेवा पुढेही अखंड चालणार अशी आम्हांस खात्री वाटत आहे.'

दे. आयर, वी. अे. यांनी दुसरा ठराव पुढे आणला व त्याला वी. के. दास बी. अे. बॅरिस्टर अॅट लॉ यांनी अनुमोदन दिलें. 'दे. सय्यद हैदर रेझा हे गेलीं दोन वर्षे पंजाब व संयुक्तप्रांत यांमध्ये आपल्या देशबांधवांना मातृभूमीच्या प्रेमाची व देशाच्या अभिमानाची जी दीक्षा देत आहेत त्याबद्दल ही सभा त्यांचें अभिनंदन करीत आहे. विशेषत: हिंदुस्थानातील पंथभेद असलेल्या भिन्नवर्गीयांना मातृप्रेमाच्या अेकाच निशाणाखाली अेक करण्यास्तव चाललेले त्यांचे प्रयत्न, त्यात त्यांना येत असलेलें यश व त्या राष्ट्रीय अैक्याचा राष्ट्रीय दास्यविमोचनाकडे ते करीत असलेला अुपयोग याबद्दल ही सभा त्यांची फार आभारी आहे.'

–ता. १६ ऑक्टोबर १९०८

✦ ✦ ✦

३१. दे. लो. बिपिनचंद्रपाल यांचें आगमन

लंडन:–ज्याच्या दिव्य प्रतिभाशक्तीला, जवळजवळ सर्व राष्ट्र अज्ञान-निद्रेत गुरफटलेलें असताना, हिंदुस्थानच्या राजकीय आकाशातील क्षितिजावर स्वराज्यसूर्याचा अरुणोदय प्रथम दृष्टिगोचर झाला, ज्यांनी तें आपलें भविष्यदर्शन अितर स्थूलदृष्टि अपमानीत असताही, आपल्या भूमातेला अखंड विश्वासाने आजपर्यंत प्रथम केलें व शेवटी ज्यांच्या या मंगलभूपालीरवाने अखेर जागृत झालेली हिंदसुंदरी आज त्या पूर्वसूचित स्वराज्यसूर्याचे दर्शनासाठी हुतात्मतेची आरती घेअून अुत्सुकतेने अुभी आहे, अशा सूचक भविष्यवाद्यांमध्ये जे आपल्या अलोट बुद्धिमत्तेने व वक्तृत्वाने अग्रेसरत्व पावलेले आहेत ते श्रीयुत देशभक्त बाबू बिपिन-चंद्र पाल हे गेल्या आठवड्यात लंडनला येअून पोचले. त्यांच्या आगमनसमयाची वार्ता जरी अगदी फक्त दोन तीन तासच आधी लंडनला मिळाली तरी चेरिंगक्लास स्टेशनवर गाडी येण्याचे पूर्वीच हिंदी लोकांची गर्दी लोटू लागली. बाबू बिपिनचंद्र

पाल यांचें दर्शन गाडीच्या खिडकीतून होण्याचा अवकाश तोंच वंदे मातरम्च्या ध्वनीच्या सरीवर सरी वर्षू लागल्या! बाबूसाहेब गाडीतून अुतरताच चोहो बाजूंनी पुष्पांची वृष्टि व पालचे जयजयकार ह्यांशिवाय दृष्टीला वा कर्णाला अन्य विषय गोचर होअीनासे झाले. स्टेशनवर असलेल्या अिंग्रज गृहस्थांना हा प्रकार अभूतपूर्व वाटावा हें साहजिकच होतें. पाल येण्याचे आधीच त्यांच्या संबंधाने निरनिराळे अुद्गार अिंग्लिशपत्रें काढीत होतीं. 'That irreconcilable agitator Bipin Chandra Pal is coming to England' म्हणून वार्ता अिंग्लिश पत्रांनी आधीच पसरवलेली असल्यामुळे पालना भेटण्यासाठी अलीकडे अिंग्रजी लेखकांच्या व वृत्तपत्रकारांच्यामध्येच चढाओढ चाललेली आहे. ज्यांच्या जयजयकाराने कलकत्त्यास लोकांच्या कानठळ्या बसविल्या तो पाल आपल्या जयजयकारासह अखेर लंडनमध्येही शिरू लागला! अिंडिया हाअुसकडे बाबूसाहेब आले व तेथे त्यांचें थोडें भाषणही झाल्यावर राष्ट्रगीत होअून मंडळींना निरोप देण्यात आला. विपिन बाबूंबरोबर त्यांचा मुलगाही आहे. येत्या रविवारी विपिन बाबूंचें Nationalism वर प्रथम भाषण होणार असून येथील सर्व अिंडियनांचीं मनें त्यांच्या या प्रथित पुढाऱ्याच्या भाषणश्रवणासाठी अुत्सुक झालेलीं आहेत.

—ता. २३ ऑक्टोबर १९०८

✦ ✦ ✦

३२. राखीबंधन समारंभ

लंडन:—सुमारे पंधरा दिवसांपूर्वी लंडनला रूटरची तार आली होती की नाशिकला हिंदुमुसलमानांचा जंगी दंगा झालेला आहे व शहराच्या सुरक्षिततेसाठी देवळालीहून युरोपिअन लष्कर मागवलेलें आहे. ही तार वाचताच तिचा अर्थ सर्वांनाच चमत्कारिक वाटू लागला. त्या वेळेसच नाशिकच्या देशभक्त ब्राह्मणांनी गणपति अुत्सवासारख्या प्रसंगी सय्यद हैदर रेझा यांना बोलावून नेअून हिंदुस्थानभर सर्वांनाच आश्चर्यभरित करणारें अुदाहरण घालून दिलें. ही वार्ता येअून पुरते आठ दिवसही लोटले नव्हते तोंच नाशिकला हिंदुमुसलमानांचा दंगा व्हावा ही चमत्कारिक गोष्ट अैकून बहुतेकांनी असा तर्क बांधला की नाशिकच्या गणपति अुत्सवातील तें धाडसी वर्तन पाहून, त्याचा हिंदुमुसलमानांच्या सलोख्यावर होणारा परिणाम नाहीसा करण्यासाठी बंगालप्रमाणे हा भाडोत्री दंगा सजविला असेल. कित्येकांनी

तर तेव्हाच बोलून दाखविलें की, आपसात वितुष्ट वाढविणें हा मूर्खपणा आहे, हें न कळणारे त्या रामप्रभूच्या नगरात फारसे वेडे सापडणें दुर्मिळ आहे. हे तर्क धावतात तोंच दुसरे दिवशी पुन्हा रूटरची तार फडकली की, 'कालची हिंदुमुसलमानांच्या दंग्याची धाडलेली तार निराधार होती !' मग रूटरने कोणत्या दंग्याची बातमी धाडलेली होती ? का दंगा वगैरे मुळीच झालेला नसून ही सर्व रूटरची कादंवरी होती ? तथापि त्यावद्दलची हिंदुस्थानची सविस्तर वार्ता येअीतोपर्यंत मौन धरणेंच अिष्ट होतें. आता जी वार्ता गेल्या मेलने आली, तीवरून तो नाशिकच्या हिंदुमुसलमानांचा ' दंगा ' नसून पोलिसांचा होता हें अुघडकीस आलें आहे! हैदर रेझांच्या आगमनाने नाशिकच्या देशभक्त हिंदुमुसलमानांनी देशविघातक दुहीवर केवढा भयंकर आघात केला, हें ती दुही ज्यांना अिष्ट आहे त्यांच्या या खोट्या वातम्यांवरून अुघड होत आहे. त्या स्वातंत्र्यप्रिय नाशिककरांवर आज प्रस्तुत सत्तेची जरी वक्रदृष्टि झालेली आहे, तरी श्रीरामचंद्राचे प्रत्यक्ष चरणधूलीने पवित्र झालेलें, श्रीगोदेच्या तुषारांनी अखंड सिंचित होणारें, श्रीरामदासांच्या तपश्चर्येने व गुप्त रचनेने अमित सामर्थ्य पावलेलें व स्वातंत्र्यलक्ष्मीचे जयजयकार जेथील तरुण कंठांतून प्रत्येक अुषःकालाला कलकलनिनादाने अडवीत आहेत तें तें देशक्षेत्र ह्याच काय, परंतु तत्त्वजयासाठी सोसाव्या लागणाऱ्या वाटेल त्या भावी यातनांना आनंदाने व अचंचल धैर्याने तोंड देअीलच देअील.

राखीबंधन समारंभ आणि साअुथ आफ्रिकन हिंदी जनतेस सहानुभूति !

गेल्या शुक्रवारी ता. १६ ऑक्टोबर होती. हा शुक्रवारचा दिवस येथील हिंदी समाजाला कलकत्त्याचे नागरिकांप्रमाणेच अत्यंत अुत्साहाचा गेला. त्या दिवशी आपण परदेशात आहोत, ही भावना सुटून जाअून हिंदभूच्या अंगांवरच क्रीडत असल्याचा सर्वांस भास होअू लागला. हिंदुस्थानच्या सुंदर सृष्टिवैभवाचे देखावे मनाला दिसू लागले. हिंदुस्थानच्या सुवासिक फुलांचे मनोहर परिमल भोवती दरवळू लागले. हिंदुस्थानच्या भीतीने मध्ये आडवे पडलेले समुद्र आटविले व डोंगर सपाट केले, आणि अंतःकरणाला, पवित्र प्रेमाला त्याच्या प्रीत वस्तूशी तल्लीन करवून दिलें.

त्या दिवशी दुपारी ३ वाजता येथील मागे पार्लमेंटमध्ये निवडून गेलेले दे. सर मंचरजी भावनगरी यांचे अध्यक्षतेखाली साअुथ आफ्रिकेतील हिंदी लोकांना सहानुभूति दाखविण्यासाठी हिंदी लोकांची सभा भरली होती. कॅक्स्टनहॉलचे विस्तृत जागेत हिंदी लोकांची दाटी सभेचे आधीच जमलेली असून त्यात पुष्कळ अिंग्लिश गृहस्थही आलेले होते. भावनगरींचें भाषण त्या दिवशी अगदीच स्पष्ट, करारीपणाचें व प्रसंगास अनुसरून असें झालें व त्यांनी आता बॉयकॉटवर सर्व

भर घाला असा राष्ट्रास आग्रहाने अुपदेश केला ! पहिला ठराव लाला लजपतराय यांनी पुढे आणला व त्याला दे. पारेख यांनी अनुमोदन दिलें. दुसरा ठराव सहानुभूतीचा असून तो दे. विपिन बाबूंनी आपल्या वक्तृत्वपूर्ण तेजस्वी वाणीने पुढे आणला व त्याला दे. सावरकर यांनी अनुमोदन दिलें. तिसरा ठराव बायकॉटचा होता व तो दे. खापर्डे यानीं पुढें आणला व त्याला दे. रामपेन वी. अे. बॅरिस्टर अॅट लॉ यांनी अनुमोदन दिलें. सभेचे रिपोर्ट टॉअिम्स वगैरे पत्रांतून जे प्रसिद्ध झालेले आहेत व त्यावर डेलीन्यूज वगैरेंनी जे लेख लिहिलेले आहेत त्यांवरून ह्या सभेचें महत्त्वाचें स्वरूप दिसून येअील. त्या सभेचें काम साडेपांचला संपलें व लगेच सहाला राष्ट्रजयंतीचे सभेस आरंभ झाला. १६ ऑक्टोबरला देशभूने राष्ट्रपक्षाला कसा जन्म दिला, ह्याचें अत्यंत अुत्साहक, यथार्थ व देशभक्तिपूर्ण विवेचन देशभक्त लाला लजपतरायांनी केल्यावर डॉ. कुमारस्वामी, दादासाहेब करंदीकर, खापर्डे अित्यादींचीं भाषणें झालीं. नंतर राखीबंधनास प्रथमतः बिपिन बाबूंनी आरंभ केला. राष्ट्रगीताच्या गायनानंतर बिपिनबाबूचें अमूल्य वक्तृत्वाचें भाषण सुरू झालें. त्यांनी सांगितलें की, मी गेल्या वर्षी या वेळेस तुरुंगात होतो व आज वनवासात आहे. परंतु माझें सर्व अंतःकरण तिथे तुरुंगामध्ये अरविंद घोष वसलेले आहेत, तिथे राहिलेलें आहे ! जेथे बाल गंगाधर आहे, तिथे त्या देशतिलकापाशी गुंतलेलें आहे ! अरविंद व तिलक या दोन नांवांचें अुच्चारण होण्यास तीस चाळीस मिनिटें लागलीं. कारण प्रत्येक नांवासाठी टाळ्यांचा कडकडाट व वंदेमातरम्‌चा गजर पंधरा मिनिटांवर सतत चालत होता ! नंतर बिपिनबाबूंनी ज्या तरुणांनी राष्ट्रासाठी अमर्याद यातना सोसून देहाच्या ममतेला ठार मारलें त्यांचें स्मरण केलें आणि पुन्हा सर्व हॉलभर टाळ्यांच्याशिवाय काही अैकू येत नाहीसें झालें. त्या प्रचंड कडकडाटातून वंदेमातरम् हा ध्वनि मात्र सर्वांहून वर चढत जाताना अैकू येअी. सभेला युरोपियन रिपोर्टर्स व इतर अिंग्रजही आलेले होते. त्यांचे मुखावर बिपिन बाबूंच्या वक्तृत्वाची छाप हुबेहूब पडलेली होती !

—ता. १३ नोव्हेंबर १९०८

✦ ✦ ✦

३३. हिंदी विद्यार्थ्यांसाठी कोंडवाडा

लंडन:—गेल्या दोन वर्षांमध्ये अिंग्लंडमध्ये आलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या देशभक्तीने, त्यांच्या स्वार्थत्यागाने त्यांच्या दुर्वर्तनपरावृत्तीने व त्यांच्या वाढत्या अैक्याने व प्रेमाने ज्यांच्या अंतःकरणात काळजीचें विष पसरू लागलें आहे, त्या-आपल्या अत्यंत हितचिंतक (!) अँग्लोअिंडियन वीरांनी गेल्या आठवड्यात

अेकदाची वरेच दिवस भरवू घातलेली सभा अुरकून घेतली. पूर्वीचे ख्यालीखुशालीचे रंगात दंग होण्याचे अैवजी अलीकडील हिंदी विद्यार्थी नेहमी सन्मानवृत्तीने राहू लागले, तारुण्यात हसत खेळत दिवस घालविण्याचे अैवजी ते चिंतामग्न दिवस व अस्वस्थ रात्री कंठू लागले ! व्यक्तिविषयक चैनवाजीचे अैवजी पैसे असूनही अुपास करू लागले व अँग्लोअिंडियनांचीं आमंत्रणें येत असताही नाच-तमाशांना जाण्याचें नाकारू लागले ! राजकीय विषयात जितकें त्यांना लक्ष द्यावेसें वाटतें त्याचे सहस्रांशही लक्ष ख्यालीखुशालीत ते देते, तरी देखील आपल्या या 'हितचिंतकांना ' अितकी काळजी लागली नसती. परतु हिंदी तरुणांची चित्तवृत्ति अितकी काही स्वार्थपरावृत्त व स्वदेशहितरत होत चालली आहे की, त्यांच्या या नीतिच्युततेला लवकर आळा घातल्याशिवाय त्यांचें हित करण्यास दुसरा मार्ग नाही हें अुघड दिसू लागलें !

मंझिनीला त्याच्या वयाच्या विशीच्या आत जेव्हा चिंतामग्नतेत दिवस घालविण्याची सवय लागली, तेव्हा अिटलीचे व ऑस्ट्रियनांचे हितचिंतकांकडून असेंच स्पष्ट सांगण्यात आलें होतें की, तरुण मुलांनी ख्यालीखुशालीत आनंद करण्याअैवजी राजकीय गूढ विचारात गुंगणें व रात्री अेकटे व अुदासीन संन्यस्त वृत्तीने विचार करीत फिरणें, हें सरकारास कधीही खपणार नाही ! !

अिंग्लंडमधील अँग्लोअिंडियनांची व हिंदुस्थानच्या गोऱ्या हितचिंतकांची ही काळजी अतिशय वाढत चाललेली आहे. दर आठवड्यास परमेश्वरभजनाअितके नियमाने आज सतत दोन वर्षें, अीश्वरी ध्येयाचें मूर्त चिन्ह असलेल्या देशभूमीचे भजनासाठी हिंदी विद्यार्थ्यांची अखंड चाललेलीं कीर्तनें, त्यातील त्यांच्या दिसून आलेल्या देशमय चित्तवृत्ति, पालकांच्या आज्ञा मोडूनही कित्येकांनी सोडलेले सिव्हिल सर्व्हिसचे कोर्स, सत्तावनचे देशवीरांची टोलेजंग सभा, देशातील लोकांसाठी महिनाभर केलेले अुपवास, सायरेन्सेस्टर कॉलेजामधील वाणेदार वर्तन, टिळक, साअुथ आफ्रिका, राष्ट्रजयंती वगैरे प्रसंगांच्या त्यांनी भरविलेल्या टोलेजंग सभा व त्यांत वृद्ध लोकांचा त्यांचेवर परिणाम होण्याअैवजी, त्यांच्या अुल्हासाने वृद्धांच्याच अंगात शिरत चाललेलें नवीन वारें, या सर्व परंपरेने चिंतामग्न झालेल्या अिंग्रजी सद्गृहस्थांनी परवा या विषयाचा आजपर्यंत चाललेला निमसरकारी व वर्तमानपत्री खल संपवून अुघड चर्चा करण्याकरिता सभा भरविली. सरकारच्या कृपेतील दे. गुप्त, अमीरअल्ली, कहानसिंग, वगैरे वजनदार लोक दे. भावनगरी वगैरे जबाबदार लोक, सर कर्झन वायली, मिस बेक, डॉ. पोलन व अितर कित्येक सरकारी व निमसरकारी अिंग्रज देशभक्त, विपिनचंद्र, खापर्डे, करंदीकर वगैरे पुढारी व तरुण विद्यार्थ्यांची बहुतेक मंडळी यांनी कॅक्स्टन, हॉल भरलेला होता. अध्यक्षस्थानी मुंबअीचे माजी गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन हे

होते. डॉ. पोलन सी. आय ओ. यांनी अिंडियन विद्यार्थ्यांना अेका केंद्रात आणणें व त्यांचे चळवळीला त्यांच्याच हितासाठी दाबात ठेवणें किती अवश्य आहे याचा विवरणात्मक निबंध वाचला व हिंदी विद्यार्थ्यांची वर्तणूक अलीकडे फार बिघडून नीतिच्युत होत चाललेली आहे वगैरे विधानें केलीं. नंतर लॉर्ड लॅमिंग्टन हेही त्याला मान डोलवून म्हणाले की, अिंडिया ऑफिसनेही (सरकारी मुख्य कचेरी) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने या होतकरू कल्पनेला साहाय्य करून हिंदी विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवणें हें हिंदी विद्यार्थ्यांच्या फार फार हिताचें आहे. अशा या सभेत काय प्रकार घडला हें अिंग्रजी पत्रांच्या भाषेतच सांगणें अिष्ट आहे. डेली क्रॉनिकल म्हणतें—

DISLOYAL STUDENTS

Indian Hostile Demonstration at London Meeting

A demonstration of disloyalty on the part of the Indian Students was witnessed yesterday. Lord Lamington referred to the King's proclamation and said that the proclamation, that very great Document, which was promulgated yesterday (loud hissings and derisive laughter) stated our feelings towards them. We do wish them well. (booing and laughter by the students and cheers by the Britishers). When an Indian student affirmed that there must be awakening in the Indian students first and foremost of a senese of loyalty to the English throne and to the person of the King (The hissings and the derisive laughter were tremendous and the Chairman had to call for order). ह्याप्रमाणे अितर पत्रांतूनही मोठमोठाले मथळे देअून छापलें आहे की, 'राजद्रोही हिंदी विद्यार्थी कालच्या सभेत जेथे तेथे हुश-हुशचा प्रचंड मारा सुरू करीत. फार काय पण लॉर्ड लॅमिंग्टनने परवाच्या जाहीरनाम्याचा अुल्लेख करताच हसणें, ओरडणें हुश हुश करणें यांच्या वादळात अध्यक्षांना तें वाक्य सोडणें भाग पडलें ! अेक हिंदी विद्यार्थी म्हणाला की राजाचें राज्यपद व मुकुट यांच्याबद्दल राजनिष्ठा व प्रीति हिंदी विद्यार्थ्यांनी प्रथमतः संपादिली पाहिजे. तेव्हा पुन्हा हुश्शचा मारा चालला ! तो हिंदी विद्यार्थी (हे गृहस्थ मुंबअीचे वकील वेलिणकर असून ते अितके वृद्ध आहेत की त्यांना विद्यार्थी म्हणणें हें अुद्धटपणाचेंच लक्षण होअील.) संतापून पुन्हा पुन्हा म्हणाला : 'ह्या धिक्कारांचा अर्थ काय ? राजाचे मुकुटाबद्दल व व्यक्तीबद्दल आम्ही अप्रतिम पूज्य भाव ठेवलाच पाहिजे.' हें तो म्हणताच पुन्हा धिक्कार शब्दांचा अितका मारा झाला की त्याला भाषण संपवून बसावें लागलें! अितक्यात अेक अिंग्रज गृहस्थ संतापून अुभा राहिला व अेका हिंदी गृहस्थाकडे

बोट दाखवून म्हणाला की मी ह्या मनुष्याला आमच्या राजाच्या नांवाचा धिक्कार करताना पाहिलें तर त्याला आता काढून दिलें पाहिजे ! परंतु ह्या संतापाचा काही अेक परिणाम न दिसून सभेत अुलट बाचाबाचीच अधिक वाढत चालल्याने तें प्रकरण शेवटास नेता येणें दुष्कर झालें व तेथेच संपलें ! लॉर्ड लॅमिंग्टन यांनी मुंबअी अिलाख्यावर राज्य केलें त्यांना टाळी नाही, अुत्थापन नाही; परंतु जेव्हा विपिनचंद्र पाल नांवाचा बंगाली अुठला तेव्हा हिंदी विद्यार्थ्यांनी त्याचा अप्रतिम सत्कार करण्यास आरंभ केला व जयजयकार अेकसारखा सुरू ठेवला. (Bipin Chandra Pal received quite an ovation, when he got up, from Indian Students, which lasted for several minutes) अशा घोटाळ्यात व बाचाबाचीत ती सभा पार पडली ! पुन्हा अशी सभा न भरविणेंच अिष्ट आहे, असा धडा यापासून शिकणें अिंग्लिश लोकांच्याच हिताचें आहे, नव्हे काय ?

—ता. २७ नोव्हेंबर १९०८

✦ ✦ ✦

३४. राष्ट्रीय परिषद !

लंडन:—देशभक्त बिपिन बाबू यांच्या व्याख्यानमालेला शुक्रवार ता. १८ डिसेंबर रोजी कॅक्स्टन हॉलमधील भव्य हॉलमध्ये आरंभ होअून गेल्या सोमवारी तिची समाप्ति झाली. या व्याख्यानांतील अुदात्त तत्त्वविचार, अुत्साहक वक्तृत्व, अलोट देशभक्ति, कुशाग्र तर्क व अमोघ कोटिक्रम यांच्या योगाने या व्याख्यानातील सारांश देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांचें स्वारस्य विघडविणें होय; व त्यांच्या श्रवणाने मोहित झालेल्या श्रोत्यांच्या आग्रहावरून तीं व्याख्यानें लवकरच समग्र छापावयाचीं असल्याने त्यांचे सारांश देणें म्हणजे नावीन्य घालविणें होय. अेतदर्थ आजच्या वातमीपत्रात त्या व्याख्यानांविषयी काहीच विशेष न लिहिता फक्त अितकेंच सांगणें बस्स आहे की, गेल्या दहा बारा दिवसांत लंडनच्या हिंदी लोकांतच नव्हे, तर बऱ्याच अिंग्रजी मंडळांतही व्याख्यानाशिवाय दुसरी चर्चा अैकू येत नाही. तिकिटांना अडीच रुपये किंमत होती व सर्व व्यवस्था अेका आठवड्यात घाअीघाअीने केलेली होती. तथापि बहुतेक हिंदुस्थानी व कित्येक अिंग्लिश लोक यांच्या झुंडी व्याख्यानास लोटत होत्या. संध्याकाळ कधी होते व हॉलमध्ये शिरण्यास कधी मिळतें, असें सर्वांस होअून जात असे. दुसरे दिवशी

विपिनबाबूंच्या नंतर देशभगिनी विदुषी कामाबाई यांचेंही अेक स्वातंत्र्यपोषकतेचें व्याख्यान झालें. त्यांनी आपलें राष्ट्रीय निशाण हातात धरून फडकविताच सर्व सभा अुभी राहिली व वंदेमातरम्च्या गर्जनांचा वर्षाव सुरू झाला. हीं व्याख्यानें सुरू असताच रविवार ता. २० डिसेंबर रोजी सर्व हिंदुस्थानी लोकांची राष्ट्रीय परिषद भरविण्याची सूचना शुक्रवारी सभेपुढे मांडण्यात आली होती. प्रथमत: ही परिषद नागपुरास भरणाऱ्या टिळकपक्षीय काँग्रेसच्या पुष्टीप्रीत्यर्थ भरविणें होतें. परंतु सरकारच्या हटवादी आततायीपणाने नागपूरच्या काँग्रेसची गळेदाबी झाल्याची वार्ता त्याच सुमारास आल्याने सर्वानुमते ही परिषद स्वतंत्र त्याच लंडनमध्ये भरवावी असें ठरलें व त्याप्रमाणे दि. २० रोजी कॅक्स्टन हॉलमध्ये येथील सर्व दर्जाच्या, वयांच्या व ठिकाणांच्या लोकांची गर्दी होअू लागली. ऑक्स-फर्ड, केंब्रिज, सायरेन्सेस्टर वगैरे सर्व ठिकाणांहून हिंदी लोक आलेले होते. पॅरिसहून देशभक्त राणा हेही आलेले होते. अध्यक्षस्थानी देशभक्त खापर्डे यांची सर्वानुमते निवडणूक झाली व त्यांनी राष्ट्रीय पक्षाची बाजू सत्याला व अेक्याला धरून आहे हें प्रमाणसिद्ध करून दाखविलें. ' आमच्या करण्यात व आमच्या मागण्यात भयंकर तें काय आहे ? अिंग्रज लोक अिंग्लंडात जसे आहेत, फ्रान्स देशात फ्रेंच लोक राहतात व अमेरिकन लोक अमेरिकेत ज्या हक्कांचा अुपभोग घेतात त्या हक्कांचा अुपभोग आम्ही आमच्या देशात घेअू अिच्छितो. अिंग्लंडमध्ये अिंग्लिश लोक जसे राहतात तसें राहणें जर तुम्हांला भयंकर वाटत नाही तर हिंदी लोक हिंदुस्थानात तसे राहू अिच्छितात, त्यात तुमचा अितका संताप व गलबला कां व्हावा अित्यादि आशयाचें लो. दादासाहेबांचें भाषण झाल्यावर दे. डॉक्टर कुमार-स्वामी (अेक देशभक्त व विद्वान युरेजियन हिंदी) यांनी स्वराज्याचा पहिला ठराव सभेपुढे मांडला. डॉ. कुमारस्वामी यांचें लेखनकौशल्य व कलाप्रवीणता अिंग्लंडमध्ये मान्य व प्रसिद्ध आहे. त्यांनी आणलेला ठराव ' हिंदुस्थानच्या अत्युच्च लक्षाचा होय. हिंदुस्थानसाठीच नव्हे, तर दडपशाहीच्या सवयीने अंगात शिरलेली अनीतिमत्ता नाहीशी होअून अिंग्लंडचें कल्याण व्हावें, यासाठीही हिंदुस्थानने पूर्ण स्वतंत्र झालेंच पाहिजे.' स्वराज्याचा ठराव असा होता:—' आपल्या राष्ट्राच्या पूर्ण व सर्वांगीण अुन्नतीला व आमच्या अीश्वरदत्त अधिकाराच्या अुपभोगाला ज्याच्या प्राप्तीनेच सुसाध्यता येणारी आहे, त्या स्वराज्याच्या, पूर्ण स्वातंत्र्याच्या अंतिम साध्याला ही परिषद पूर्ण मान्यता देत आहे. ' डॉ. कुमारस्वामी यांनी मांडलेल्या या ठरावाला दे. सावरकर यांनी अनुमोदन दिलें स्वराज्याचा सत्य अर्थ, पूर्ण स्वातंत्र्य हाच असून अितक्या स्पष्ट अुच्चाराने ह्या साध्याला तुम्ही संमति देत आहात. परंतु ती संमति देण्यापूर्वी त्या शब्दांचा खरा अर्थ लक्षात बाळगा. या अंतिम साध्याला संमति देण्यापूर्वी तुरुंगाच्या भिंती व अंधाराच्या

गुहा अित्यादिकांचीं चित्रें डोळ्यांपुढे आणा. त्या चित्रांच्या भयानक देखाव्यात तुम्हांला आकर्षण करणारें मनोहरत्व दिसतें आहे कीं नाही हें पहा. विस्तवाच्या निखाऱ्यावर पाय ठेवून तो मृदु गादीवर ठेवल्याप्रमाणे अचंचल पडत आहे कीं नाही हें निश्चित करा व मग ह्या असाह्य यज्ञात – आनंदात बलिदान करण्याची अुत्कट अिच्छा होत आहे, असें जर तुम्हांस वाटत असेल, तरच ह्या ठरावास आज संमति द्या. नाहीतर घाअी करण्यात काही हशील नाही. स्वराज्य हें दिव्य आहे व दिव्य अंत:करणातच तें वृद्धिगत होअू शकतें.' हें अनुमोदन संपताच टाळ्यांच्या अलोट नादाला आरंभ झाला, अेकहीजण विचारलें असता विरुद्ध गेला नाही व सर्वानुमतें ह्या पूर्ण स्वातंत्र्यात्मक स्वराज्याचा ठराव पसार झाला; दुसरा ठराव बायकॉटचा असून तो देशभगिनी विदुषी कामाबाअी यांनी पुढे मांडला. अमेरिकेच्या बायकॉटचा अितिहास सांगून त्या म्हणाल्या, 'हिंदुस्थानातील तरुणांनो ! 'बहिष्कार' हाच जयघोष चालू केला पाहिजे. ठराव हेंच सांगतो की, बहिष्कार हें स्वराज्याचें अेक महत्त्वाचें साधन असून त्याची अंमलबजावणी प्रत्येक दिशेने करण्यात आली पाहिजे.' देशभगिनी कामाबाअींच्या भाषणानंतर दे. वर्मा यांनी अनुमोदन दिलें व ठरावही सर्वानुमते पसार झाला. नंतर तिसरा ठराव तुर्कस्थानच्या लोकांनी लोकसत्तेच्या तत्त्वावर राज्यपद्धति नेल्याबद्दल त्यांचा गौरव करण्याचा असून, तो दे. आयर यांनी पुढे आणला. चौथा ठराव ठिकठिकाणी राष्ट्रजागृति होअून स्वातंत्र्यप्राप्तीचे जे प्रयत्न सुरू झालेले आहेत, त्या सर्व प्रयत्नांस व अिजिप्त, अिराण व आयर्लंड येथील प्रयत्नांस आमची पूर्ण संमति असल्याबद्दलचा होता. तुर्कस्थानच्या ठरावावर दे. आगाखान यांनी देशभक्तिपरिप्लुत असें भाषण केलें व ऑस्ट्रियन मालालाच नव्हे, तर हिंदुस्थानने ब्रिटिश मालावरही बहिष्कार घालावा, असें जसें सांगितलें, तसेंच अिजिप्शियन संस्थेचे सेक्रेटरीने सांगितलें की, 'हिंदुस्थान व अिजिप्त यांची अमर दोस्ती राहो. मी बाहू पसरून तुम्हांस सांगतो की, हे हिंदी जनहो, या व अिजिप्तला आलिंगन द्या. तुम्ही तुमचा माल अिजिप्तमध्ये धाडा, आम्ही आमचा बाजार तुमच्या मालाला खुला केला आहे. अिजिप्त तुमच्यावर भावासारखें प्रेम करीत आहे.' याच्या दुसऱ्या दिवशी बिपिनबाबूचें भाषण झाल्यावर अिजिप्तच्या सेक्रेटरीने प्लॅटफार्मवर जाअून बिपिनबाबूना आलिंगन दिलें ! पांच मिनिटें अिजिप्त व अिंडिया आलिंगन देत व्यासपीठावर अुभे होते. सर्व अुभे असून अिजिप्तचा जयजयकार व वंदेमातरम्‌चा तालनिनाद यांनी सभास्थान दुमदुमून राहिलेलें होतें ! !

यापुढील ठराव मि. मोर्लेच्या सुधारणांबद्दलचा असून त्यात म्हटलेलें होतें की, सुधारणा अितक्या क्षुल्लक व फसवणुकीच्या आहेत की, त्यांच्या योगाने देशप्रगतीला अडथळा होअील व नोकरीच्या तुकड्यासाठी भांडणाची पद्धति वाढून जातीजातीत वैमनस्यें अुत्पन्न होतील. ह्या सुधारणा आमच्या बुद्धिमत्तेचा अुपमर्द-

करणाऱ्या असून आमच्या आशेवर कुठार होणाऱ्या आहेत.' दे. विपिनचंद्र पाल यांचें यावर फारच मुद्देसूद भाषण झालें. नंतर स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षण यांचे ठराव कलकत्त्याच्या राष्ट्रीय काँग्रेसने पसार केलेले जसेच्या तसेच पसार करण्यात आले. मद्रासची स्वयंमन्य नेमस्त काँग्रेस ही राष्ट्रीय काँग्रेस होऊच शकत नाही व वसाहतीचें स्वराज्य ही अशक्य, अंधळी व अनर्थक अेतदर्थच त्याज्य कल्पना आहे वगैरे ठरावही पास करण्यात आले व अशा रीतीने अुत्साहात व अेकमताने ही परिषद पूर्ण झाली.

—ता. १५ जानेवारी १९०९

✦ ✦ ✦

३५. श्रीगुरु गोविंदसिंह महाराजांचा जन्मोत्सव

लंडन :— मातृभूमीपासून हजारो मैलांवर दुरावले असताही गेल्या आठवड्यात क्षणभर आपण हिंदुस्थानच्या वातावरणातच प्रवेशलो आहोत की काय असा भास होत होता. युरोपियन देशात जन्मास आला असता, तर ज्या पुरुषाचें नांव जगातील प्रत्येक मनुष्याच्या तोंडी झालें असतें, त्या श्रीगुरु गोविंदसिंह महाराजांची जन्मतिथि लंडनमध्ये अितक्या अुत्साहाने, डौलाने व अश्रुतपूर्व दणक्याने गाजविली जाअील ह्यें दोन वर्षांपूर्वी कोणास खरें देखील वाटलें नसतें. परंतु राष्ट्रीय क्रांतीच्या लाटा जों जों आत्मबलाच्या अविश्वासाला फेकून देअून आत्मबलाच्या विश्वासाला अुत्पन्न करीत आहेत, तों तों परराष्ट्रातील थोर पुरुषांपुढे दास्यात्मक नमन करणें सोडून देअून स्वकीय थोर पुरुषांच्या चरित्राला माननीय व मानवर्धक प्रणिपात करण्याकडे तरुणांचा कल वाढत चाललेला आहे. राष्ट्रीयत्वाचा पाया म्हणजे राष्ट्रीय विभूतींचे अितिहास होत. हिंदुस्थानात श्रीगुरुगोविंदांचा राष्ट्रीय अुत्सव अजून झालेला नसतानाही लंडनसारख्या आजपर्यंत हिंदी तरुणांना जास्त नीतिभ्रष्ट व परस्तुतिपाठक बनविणाऱ्या शहरात तो प्रसंग अशा दिमाखाने गाजला जावा, यापेक्षा वृद्धिगत देशभक्तीचें दुसरें चिन्ह तें काय असू शकणार? ह्या आमच्या वृद्धिगत देशभक्तीलाच डॉ. पोल व अितर अँग्लोअिंडियन 'नीतिभ्रष्टता' म्हणत आहेत! त्याच्या म्हणण्याप्रमाणे ही तरुण भारताची वृद्धिगत 'नीतिच्युतता' गेल्या आठवड्यात अननुभूत जोराने प्रत्ययास आली. कॅक्स्टन हॉलमध्ये ता. २९ डिसेंबर रोजी हिंदी व अिंग्रज लोकांची गर्दी होअू लागली. जरी त्या दिवशी लंडन शहरच्या मानाने हवा वाअीट होत होती, तरी समाजाची अनपेक्षित संख्या

जमलेली होती. सभास्थानी गुलाबी रंगाची भव्य पताका लावलेली असून तिच्यावर अत्यंत कुशल रीतीने 'देग तेग फत्ते' हीं अक्षरें लिहिलेलीं होतीं तीं खालच्या गुलाबी रंगात फारच खुलत होतीं. Honour to the sacred memory of Shree Guru Govind Singh. ह्या खाली Prophet, Poet and Warrior हीं अक्षरें निरनिराळ्या युक्त रंगांत लिहिलेलीं होतीं. हें भव्य व शुभसूचक निशाण, पुष्पें, धूपाचा सुगंध, व प्रख्यात विभूतींचें नामस्मरण व राष्ट्रीय पताकांचे अुज्ज्वल रंग ह्यामुळे सर्व हॉलला अेखाद्या देवालयाचें पावित्र्य प्राप्त झालेलें होतें. अध्यक्षस्थानी देशभक्त बिपिनचंद्र पाल यांची योजना झाल्यावर राष्ट्रगीतांचें गायन झालें. बंगाली, 'आमार देश' व मराठी 'प्रियकर हिंदुस्थान'! हीं गीतें अुदात्त मनोवृत्तींना अुचंबळवींत असताना दोघा शीख तरुणांनी गुरु नानकांच्या ग्रंथातून धार्मिक प्रार्थना पंजाबीत आहेत त्या म्हणून दाखविल्या. नंतर प्रो. गोकुलचंद अेम् अे. (दयानंद कॉलेज) यांचें निबंधवाचन सुरू झालें. गुरु गोविंदसिंह यांच्या चरित्राचें कथन अितिहासात्मक सुरस व आवेशयुक्त केल्यावर गोकुलचंद म्हणाले की, ह्या अत्यंत प्रख्यात पुरुषाचा नामोच्चार आम्हा हिंदूच्या हृदयाला जो अभिमान, प्रेम, आत्मनिष्ठा व पूज्यभाव देतो तो, ख्रिश्चन लोकांना ख्राअिस्टचे नामोच्चाराबरोबर जी मनोभावना अुत्पन्न होते, तिच्याशीच काय तो तुलला जाअू शकेल! श्रीगुरु गोविंदांनी आपल्या देशाविरुद्ध व स्वराज्याविरुद्ध जाणाऱ्या हिंदु देशद्रोह्यांनाही म्लेच्छांअितकेंच सळो का पळो केलेलें होतें. देशबंधु गोकुलचंद यांचे व्याख्यानानंतर लो. लाला लजपतराय ह्यांचें व्याख्यान झालें. ते म्हणाले की, गुरु गोविंद हे हिंदुस्थानातील अत्यत थोर विभूतींतील अेक असून पंजाबमधली तर अनन्य, अत्यंत थोर विभूति होत. या थोर विभूतींचीं चार लहान अर्भकें त्याच्या शत्रूंच्या रोषाला बळी पडलीं श्रीगुरु गोविंदसिंह हे खरे सिंह होते. लाला लजपतरायांनतर अध्यक्ष विपिन बाबू यांचें सुश्राव्य व स्फूर्तिदायक भाषण झालें. ते म्हणाले की, हिंदुस्थानात जी नवी जागृति, नवा पक्ष म्हणून म्हणत आहेत ती जागृति नवी नाही व पक्षही नवा नाही. मनुष्याच्या दैविक शक्तीचा विकास करण्यासाठी श्रीगुरु गोविंदसिंह झटले. अध्यक्षांचें भाषण झालें तरी श्रोत्यांचा हट्ट सावरकरांनी बोलावें असा वाढत चालेला पाहून बिपिनबाबूंनी दे. सावरकरांना बोलण्यास भाग पाडलें. दे. सावरकर म्हणाले की, निशाणाच्या वरती लिहिलेले तीन शब्द जे 'देग, तेग, फत्ते' यांचा अर्थ पुष्कळांना कळणार नाही शीख धर्माची व गुरु गोविंदसिंहांच्या चरित्राची ही तीन शब्दांची फुली आहे व ती श्रीगुरु गोविंदसिंहांनीच अुच्चारलेली आहे. देग म्हणजे तत्त्व होय, तेग म्हणजे तरवार होय व फत्ते म्हणजे विजय होय. तरवारीवाचून तत्त्वही पंगू पडतें असें पाहून गोविंदसिंहांनी तरवार अुपसली आणि हिंदुपक्ष शेवटी विजयी झाला.

नंतर कलाप्रसादाची वाटणी झाल्यावर गुरुगोविंदांच्या जयजयकारात व वंदे मातरम्च्या जयघोषात सभा बरखास्त झाली. ह्या सभेत हिंदुस्थानच्या वृद्धिगत होणाऱ्या राष्ट्रैक्यासाठी हिंदु, मुसलमान, पार्शी वगैरे सर्वजणांनी राष्ट्रीय विभूतींचा सन्मान करण्यासाठी अेकत्र जमावें या देखाव्याची कल्पना अिंग्रजी लोकांना येती झाली. टाअिम्स, डेली टेलिग्राफ, मिरर, डेली अेक्स्प्रेस वगैरे अुभय पक्षांच्या प्रमुख पत्रांनी सभेवर प्रशंसात्मक मजकूर लिहिलेला आहे. डेली मिररने त्या प्रसंगी फोटो घेअून तो काल प्रसिद्ध केला.

माझी अशी अिच्छा आहे की, पुढील साली डिसेंबरच्या सा २९ व्या तारखेस सर्व महाराष्ट्रभर गुरु गोविंदांचा जयजयकार होणें अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक पत्रातून, प्रत्येक व्यासपीठावरून, प्रत्येक सभागृहातून व प्रत्येक कंठातून गुरु गोविंदांचा जयजयकार दणाणून रहावा व त्यायोगे या राष्ट्रविभूतीच्या स्मृतीला महाराष्ट्राने आपला नम्र प्रणिपात अर्पण करावा. कारण त्या महात्म्याचा देह पंजाबच्या स्वातंत्र्यास्तव झटून अखेर जेव्हा श्रमी झाला तेव्हा विश्रांतीसाठी तो गोदावरीच्या तीरी नांदेड येथे येअून राहिला व त्या पवित्र देहाच्या तेजस्वी भस्माचें रक्षण अजून महाराष्ट्रच करीत आहे जेथे श्रीगुरु गोविंदसिंहांची पुनीत देहरक्षा साठविलेली आहे, त्या नांदेड गावी हजारो शीख यात्रेला येतात. तेथेच महाराष्ट्रानेही यात्रा न्यावी अशी माझी अुत्कट अिच्छा आहे ! !

—ता. २२ जानेवारी १९०९

अनुक्रमांक ३८१९६ दिः १३।।।।
क्रमांक ५५१८ नोंद दिः १३।।।।

✦ ✦ ✦

३६. स्वराज्याच्या जयघोषाचा परिणाम

लंडन :— हल्ली अिंग्लंडात असें अेक पत्र नाही की, ज्यात हिंदुस्थानविषयी प्रत्येक दिवशी काही ना काही तरी मजकूर, चर्चा व वादविवाद सुरू राहत नाही. पांच वर्षांपूर्वी अेक महिन्याला अेक आर्टिकल लिहिलें, म्हणजे तें पत्र हिंदुस्थानचें कैवारी होत असे. डेलीन्यूजचे शेअर देखील दादाभाअींनी विकत घेतले, कां तर त्या पत्राने काहीतरी हिंदुस्थानबद्दल खरडावें म्हणून ! आज अिंग्रजी पत्रें हिंदुस्थानी लेखक धुंडीत फिरत आहेत, की त्यांनी हिंदुस्थानबद्दल काही तरी माहिती लिहावी ! हा फरक कसा झाला ? गोखल्यांचीं 'लेक्चरें' तर पूर्वीही होत होतीं व हल्लीही होत आहेत. तेव्हा हा फरक त्यांनी केला असें म्हणता येत नाही. नवीन कारण काय घडलें ? असा कोणता आवाज गेल्या दोन वर्षांत झाला की, अेकदम अिंग्लंडची बसलेली कानठळी खुली होअून त्यांना हिंदुस्थानचें नांव अैकू येअू लागलें ?

स्वराज्याच्या जयघोषाचा तर परिणाम नसेल ना? अिंग्लंडकडे दुर्लक्ष करण्याची जी स्वदेशी चळवळीची प्रवृत्ति आहे तिचा तर हा परिणाम नसेल ना! कसेंही असो, कोणता तरी विलक्षण आवाज, गोखल्यांच्या निरुपद्रवी भाषणें करण्याहून भिन्न, असा अिंग्लंडने अैकला आहे खास व तें आपण होअूनच हिंदुस्थान आहे तरी काय हा प्रश्न विचारीत दचकल्यासारखें, गांगरल्यासारखें, भीत भीत पण दिमाखी डौलात तपास करीत फिरत आहे.

मॉर्लेच्या सुधारणात आम्हांला काहीच मिळालें नाही म्हणून मुसलमान लोक कुरकूर करू लागले; तेव्हा टाअिम्सने व अिव्हनिंग न्यूजने लेख लिहून ठाम मत दिलें की आपण हिंदुस्थान मुसलमानांपासून जिंकलें आहे व मुसलमान प्रथमपासून राजनिष्ठेचे खांब आहेत. तेव्हा त्यांना नेहमी खूष राखलें पाहिजे. डेली न्यूजने तितकेंच ठासून मत दिलें की, आपण हिंदुस्थान मराठ्यांपासून जिंकलें आहे व मुसलमानांना पंक्तिप्रपंच दाखविण्याअितकी दुसरी कोणतीच गोष्ट हानिकारक नाही. अेतदर्थ मुसलमानांची हाकाटी व्यर्थ आहे! अशी अुपदेशाची बेबंदशाही चाललेली आहे.

पण स्टँडर्ड पत्र म्हणतें की, या क्षुल्लक गोष्टी आहेत. त्यांच्या गर्दीत सरकारने गुप्त राजद्रोही चळवळीकडे दुर्लक्ष करावें ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. हें म्हणतें: 'A striking example may be given of the atrocious endeavour of Indian residents in England, to inflame the discontent that infects some classes among their countrymen, and sows among their young men the seeds of rebellion. Grossly seditious pamphlets are sent out in large quantities headed 'Two Historic Documents', the obvious intention being to counteract any good effect produced by His Majesty's Proclamation. नंतर या 'Two Historic Documents' नांवाच्या पत्रकातील अुतारे देअून स्टँडर्ड अेक अग्रलेखही खरडू लागलें. त्याच्या हिंदुस्थानच्या बातमीदाराने गुप्त बातमी अुजेडात आणली व हें पत्रक स्टँडर्डला दीड महिन्यांत धाडलें याबद्दल अितर पत्रांपेक्षा आपल्या पत्राच्या बातमीदाराच्या चापल्याने स्टँडर्डला खूप धन्यता वाटते आहे! तें असें म्हणतें की, असलीं पत्रकें स्फोटकारक द्रव्यापेक्षाही फार भयंकर आहेत. सरकार तीं थांबविण्याचा आजपर्यंत कसून प्रयत्न करीत आहेच. पण It is manifest, however, that the vigilance of the Home authorities has been unavailing. नंतर शेवटी सर्व राग येथील हिंदी विद्यार्थ्यांवर काढून स्टँडर्डने पुन्हा अेकदा सरकारला बजावून It is beyond question not a few of highly intelligent Indians in our universities and reading for Bar are striving their utmost by such means, particularly to accustom the minds of young rising generation to the idea of an armed revolt! मग अेडिटराने वाचकांची रजा घेतली आहे.

असाच एक जाज्वल्य लेख लिहिता लिहिता येथील मॉर्निंग पोस्ट पत्राने पॅरिसच्या राजद्रोही कटाची माहिती देण्याचे भरात देशभक्त सरदार राणासाहेब व त्यांची जर्मन पत्नी विदुषी राजाबाअी यांचेवर निंदात्मक व व्यक्तिविषयक शिंतोडे अुडविले आहेत. परंतु हे शिव्याशूर अेडिटर त्या शिवराळपणाचें प्रायश्चित्त मिळण्याचा संभव दिसताच गर्भगळीत झाले व परवाच्या आपल्या पत्राचे अंकात देशभक्त राजाद्वयांची सपशेल माफी मागून मोकळे झाले ! ! त्यांनी प्रसिद्ध केलें होतें की, पॅरिसमध्ये अेका जर्मन बाअीचे हाती सर्व क्रांतिसूत्रें असून ती अेका हिंदी मनुष्याची वायको 'म्हणवीत असते.' असल्या या अश्लील निंदकाला राजांनी चांगलें अंजन घातलें हें फार अुत्तम झालें !

परंतु त्याच सुमारास अेका बंगाली तरुणाने अेका प्रख्यात साहेबावर हात टाकल्याची दाट वदंता पसरून जिकडे तिकडे गुप्त पोलिसांचा सुळसुळाट सुरू झाला ! ली वार्नर साहेब 'सिटिझन ऑफ अिंडिया'चे कर्ते, यांचें नाव व दर्जा सर्व हिंदुस्थानात माहीतच आहे. या दर्जावंत ली वार्नराकडे अेक बंगाली भिकारी गेला, व त्यांच्या हाती अँग्लोअिंडियन लोक कसे अत्याचार करतात याची तक्रार लिहिलेला अर्ज देअून म्हणाला की, हा अर्ज तुम्ही मोर्ले यांच्याकडे धाडा. सर ली वार्नर यांची व त्या तरुणाची पूर्वीची ओळख होती. त्या योगाने ते दोघेही बोलू लागले व अर्ज वाचू लागले. थोडक्या वेळातच बोलणें राहून बाचाबाची सुरू झाली व ली वार्नर त्या तरुणाला झिटकारून पुढे जाअू लागले. तो त्यांचेबरोबर वळेच जाअू लागला. अेका मोठ्या चौकात अेका प्रख्यात लिबरल क्लबाचे समोर रस्त्यावर ही जोडी चालली होती तों ली वार्नर म्हणाले 'चल हट जाव निगर !' 'निगर' हें आपल्यास म्हटल्याचें अैकताच त्या बंगाल्याने सर ली वार्नरचा हात खेचला व क्रोधायमान होअून ताडकन् त्यांच्या श्रीमुखात लगावली !!! पोलिस धावपळ करतात तों ली वार्नर त्याच्या धक्क्यासरशी पांच यार्ड लांव कोलमडत गेले होते. त्या तरुण बंगाली भिक्षेकऱ्याचें नांव 'भट्टाचार्यजी' असें आहे. या विलक्षण प्रकारची बातमी अैकून खूप खळबळ अुडाली आहे. परंतु भट्टाचार्य अजून पकडला गेला नाही! फक्त पोलिसांचा त्याच्यावर पहारा आहे असें म्हणतात. त्या भट्टाचार्याचें म्हणणें की, ली वार्नरनी आपणांस फार व निरर्थक शिवीगाळ केली होती.

—ता. १२ फेब्रुवारी १९०९

✦ ✦ ✦

३७. द्वंद्वयुद्ध

लंडन :— गेल्या पंधरा दिवसांपूर्वी देशभक्त भट्टाचार्य नांवाच्या बंगाली तरुणास शिवीगाळ केल्यावरून सर ली वार्नर के. अेस्. ओ. यांच्या श्रीमुखात बसल्याची गोष्ट घडल्यापासून येथील पत्रांत या विलक्षण तरुणाची वरीच हकीकत प्रसिद्ध झालेली आहे. डेली डिस्पॅच नांवाच्या पत्राने तर भट्टमहाशयांचा फोटोही देअून टाकला ! तथापि असली क्षुल्लक गोष्ट आपण होअून चव्हाट्यावर आणू नये म्हणून सर विल्यम ली वार्नरनी फिर्याद वगैरे काहीअेक केली नाही. हिंदुस्थानात ज्याने राजामहाराजांस आपल्या तोऱ्याने कापावयास लावलें त्या सर ली वार्नरांच्या श्रीमुखात अेका बंगाल्याने भडकावून द्यावी ही गोष्ट सामान्य नाही – क्षुल्लक तर नव्हेच नव्हे ! म्हणून अिंग्रजी पत्रांनी ती प्रसिद्ध केली. परंतु आपल्याला सर ली वार्नरनी ' हट जाव निगर ! ' असें म्हटलें ही गोष्ट वर्तमानपत्रांत आलेली पाहताच दे. भट्टाचार्य याला अधिक संताप आला असें दिसतें. कारण गेल्या आठवड्यात त्याच्या अेका स्नेह्याने या अपराधाबद्दल ली वार्नरनी माफी मागावी म्हणून अेक पत्र लिहिलें व तें तो ली वार्नरच्या हाती देण्यास निघाला. या नवीन तरुणाचें नांव वासुदेव भट्टाचार्य असें असून तो अेक सुशिक्षित बंगाली विद्यार्थी आहे. "अेका कुलीन ब्राह्मणास तुम्ही ' निगर ' ही अश्लील शिवी देअून सर्व हिंदुधर्माचा अुपमर्द केलेला आहे. सबब तुम्ही यावद्दल माफी मागावी अशी माझी विनंती आहे" असें हें पत्र होतें. सर ली वार्नर पत्र पाहून संतापले व त्या तरुणास 'सुवरका बच्चा ' असें म्हणाले ! हें अैकताच वासुदेवाने त्यांना धमकावलें. ली वार्नरने छत्रीने त्याला टोचलें. त्यासरशी दे. वासुदेव भट्टाचार्य याने आपली लाठी गरगर फिरवीत तेथल्या तेथेच ली वार्नरला रट्टे लगावण्यास आरंभ केला ! ! ही गोष्ट भर रस्त्यावर घडली असल्याने अेकदम अनेक लोक जमले. त्या गडबडीत अेका मोटारमध्ये चढून सर ली वार्नर निघून गेले. परवा कोर्टात आपल्याला छत्री मारल्याबद्दल दे. वासुदेवभट्ट ह्याने ली वार्नरवर फिर्याद केली होती ? पण ती मॅजिस्ट्रेटने काढून टाकली. काल दुपारी बो स्ट्रीटच्या कोर्टात अखेर भट्टाचार्य यांजवर फिर्याद करण्यात आली आहे व त्यांत खुद्द हिंदुस्थानच्या सत्तेचें मुख्य केंद्र अिंडिया ऑफिसनेच फिर्यादीची भूमिका स्वीकारली आहे ! अिंग्रजी पत्रें खालील हकीकत देतात.

'The Brahmin solicited Sir Lee Warner to read his letter. Sir Lee Warner declined to do so, and the Brahmin brandished a stick and struk him on his legs. The incident was reported to Lord Morley, the Counsel of India, and it was officially decided that a summons should be applied for' व त्याप्रमाणे हिंदुस्थान सरकारच्या शिरोभागावरील सत्तेने त्या ब्राह्मण तरुणावर काल फिर्याद दाखल केली ! !

दे. वासुदेव भट्टाचार्य हे बंगालमध्ये 'संध्या' पत्राचे संपादक व बंगाली भाषेतील प्रवीण वक्ते होते. हे युगांतर पत्राचेही शेवटी संपादक होते असें प्रसिद्ध झालें आहे. ज्या तरुणाने ली वार्नरवर पहिला प्रहार केला त्याचें नांव कुंजविहारी भट्ट असें आहे व याचाच फोटो येथे प्रसिद्ध झाला आहे.

हिंदुस्थानांतील सद्य:स्थिति प्रत्यक्ष पाहण्यासाठी टाअिम्सने प्रख्यात बातमीदारास हिंदुस्थानात धाडलेलें आहे व अिंग्लंडमध्ये फार वजनदार मानलेली त्याचीं पत्रें प्रसिद्ध होण्यास आरंभ झालेला आहे. त्या पत्रात हल्ली दक्षिणेची स्थिति वर्णन करताना तो फारच चमत्कारिक विचार प्रसिद्ध करीत आहे. नवीन चळवळीचें वर्णन हे राजश्री असें देतात :—

It must plainly be said that Extremism as the public have agreed to term the movement which is frankly hostile to the permanent continuance of the British rule, is not dead, nor is it likely to die. Some of its leaders are behind the prison walls but the movement still goes on. All the reforms in the world will not terminate its uncompromising activities. The Extremists attract young men to their ranks and they preach a gospel which exercises a fascination over most wild and ardent spirits. Their adherents are perhaps far more numerous than is commonly supposed; The number of their passive sympathisers must be very great. Extremism has no intention of coming out into the arena at present. Its devotees mean to work as they have worked hitherto in secrecy and stealth. Isolated assasinations, the insidious cultivation of animosity in the rural districts; the acquisition of control over large bodies of workers in the industrial centres – these are among methods that they adopt. अशा काल्पनिक भराऱ्या मारीत मारीत हे लेखक शेवटी महाराष्ट्रावर येअून आदळतात. 'महाराष्ट्र हें मराठ्यांचें पोळें आहे. ज्या राष्ट्राने सर्व हिंदुस्थान जिंकून तें पचवीतही आणलें होतें त्या मराठ्यांचा हा पाळणा आहे. नवीन राष्ट्रीय जागृति ही महाराष्ट्रात प्रथम झाली. The emotional Bengali calls along the whole world to witness his deeds. The Chitpavan Brahmin whose bent of mind is far more practical, works in silence, and he persits. मराठ्यांना शिवाजीचा अभिमान वाटतो. व त्यांच्यातील चित्पावन ब्राह्मणांचा कावा शिवाजीप्रमाणे ब्रिटिश राज्य अुलथून टाकून हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा आहे. बंगाली ओरडतात पण महाराष्ट्र हा खरोखर राजद्रोहाचें भुयार आहे : 'Even in Bengal, the Bengalees did the shouting; it was Poona, that provided the brains that directed the Bengali Extremists.' नंतर श्रीशिवोत्सव, गणपत्युत्सव-

प्रसंगी जेवढा जातिवंत मराठा, तेवढा कसा अेकदिलाने अेक होअू शकतो व त्या अेकीतून राष्ट्रजागृतीची–लेखकाचे भाषेंत राजद्रोहाची – कोण अूर्मि त्यांना प्रस्फुरित-हृदय करते याचें वर्णन देअून मग लेखक म्हणतो, 'महाराष्ट्रातील निदान चार जिल्ह्यांत तर राजद्रोह तत्त्वाच्या थरापर्यंत भरलेला आहे हें सिद्ध झालेलें आहे. गावांतून व खेडयांतून ब्राह्मण वक्ते,पुराणिक राजद्रोह अुपदेशीत फेऱ्या घालीत जातात. Even certain good educational institutions are known to contain students who are extremists to a man.' नंतर नाशिक व सोलापूर शहरांचा नामनिर्देश होअून त्यालाही शेलापागोटें अर्पिलेलें आहे व मराठ्यांचा हा Extremism व शिवाजीचा अभिमान लिहून थकल्यामुळे की काय लेखक थोडक्यात म्हणतो – 'The Deccan is honeycombed with secret societies', सर्व दक्षिण भाग (महाराष्ट्र) गुप्तमंडळांच्या भुयारांनी पोखरलेला आहे ! ' बाकीचें पत्र लो. टिळकांना दिलेल्या शिव्यांनी भरलेलें असल्यामुळे फक्त अेकच वाक्य ज्यास्त दिल्यास पुरें आहे :– ''It may be said with reasonable certainty that the predominent feeling in this large and important area is very different from that expressed at the Madras Congress !'

अशा लोकांच्या वातम्यांवर अिंग्लंड विश्वास ठेवणार ! !

—ता. २६ फेब्रुवारी १९०९

✦ ✦ ✦

३८. शिवीगाळीचा परिणाम

लंडन, ता. १२ फेब्रुवारी १९०९ – काल रोजी बोस्ट्रीट कोर्टात सर ली वार्नर यांच्यावर हल्ला केल्याबद्दल दे. वासुदेव भट्टाचार्य यांजवर खटला चालून त्यांनी महा महिनेपर्यंत वीस पौंडांचा जात मुचलका व दहा दहा पौडांचे दोन जामीन द्यावे अगर अेक महिना कैद भोगावी असा निकाल देण्यात आला. खटल्यात फिर्यादीतर्फे सर विल्यम यांची व ले. थॉम्सन यांची अशा दोन साक्षी झाल्या. आरोपीतर्फे आरोपीची व दे. कुंजविहारी भट्टाचार्य यांची अशा दोन साक्षी झाल्या. सर विल्यम अुलट तपासात म्हणाले,'आरोपीच्या अगर त्याच्या मित्राच्या अर्जामुळे माझ्या मनावर काहीही परिणाम झाला नव्हता.' आरोपीतर्फे मि. रिच यांनी विचारलें की तुम्ही आरोपीला 'Go away, you dirty niggar' असें म्हणालात का ? सर ली म्हणाले – असे शब्द मी अुच्चारले असावेत हें शक्यच नाही. सर विल्यम यांनी पूर्वी कुंजविहारी

यांस 'सुवरका वच्चा' म्हटल्याचें अगर शिवीगाळ दिल्याचेंही साफ नाकबूल केलें. आपल्या हातात छत्री असून आपण तिचा अुपयोग केला नाही असेंही त्यांनी सांगितलें. आरोपीचें म्हणणें असें की, आपल्या हिंदी मित्राला घाणेरडी शिवी देण्यासंबंधी सर त्रिल्यमचें काय म्हणणें आहे तें त्यांनी सांगावें अगर माफी मागावी अशा आशयाचें पत्र तिसऱ्या वेळी त्यांना रस्त्यात समक्ष नेअून देण्यास गेलो असता तें अर्धवट वाचून त्यांनी आपल्याला 'Get away dirty Niggar' म्हणून ढकलून दिलें, तेव्हा आपणही त्यांना परत ढकललें. परंतु त्यांनी आपल्याला पुन्हा छत्रीचा तडाखा दिला म्हणून आपणही त्यांना परत आपल्या काठीचा तडाखा दिला. मॅजिस्ट्रेट सर ऑलवर्ट डिरटझेन म्हणाले की, आरोपी आपल्या मित्राचा अुपमर्द झाला होता अशी समजूत होअून बराच क्षुब्धवृत्ति झाला असावा असें दिसतें; तरी असें वर्तन करणें गैर आहे. देशभगिनी मिसेस कामा व देशबांधव चौधरी व रॉय हे जामीन राहण्यास तयार असूनही दे. वासुदेव भट्टाचार्य यांनी तुरुंगात जाण्याचेंच कबूल केलें. दे. वासुदेव भट्टाचार्य यांनी घडलेली हकीकत जशीच्या तशीच सर विल्यम यांनी सांगितली नसून आपण त्यास 'खरा अिंग्रज' समजत नाही असें आपल्या शपथेवर दिलेल्या जवाबात सांगितलें. त्यांच्या मनात फौजदारी व दिवाणी कोर्टात काम चालवून या गोष्टीचा निकाल लावावयाचा होता व त्यासाठी त्यांनी ता.५ फेब्रुवारी रोजी आपल्या देश-बांधवांना अुद्देशून अेक विनंतीपत्र काढलें होतें. त्याची नक्कल सोबत पाठविली आहे व त्याचप्रमाणे दे. वासुदेव यांनी सर विल्यम यांस लिहिलेलें पत्रही त्या विनंतीपत्रावरोबरच प्रसिद्ध झालेलें आहे. त्याची नक्कलही सोबत ठेवलेली आहे. हें काम ह्यापुढे दिवाणीत चालू करून याचा योग्य निकाल लावून घेण्याचें दे. भट्टा-चार्य यांचे मनात आहे व त्यासंबंधाने कोणी वर्गणी पाठविल्यास त्याचा ते अत्यंत आभारपूर्वक स्वीकार करतील. वर्गणी त्यांचे सल्लागार दे. बी. सी. बंगाली C/o थॉमस कुक अॅन्ड सन्स, लडगेट स्ट्रीट, लंडन, B. C. या पत्त्यावर पाठवून द्यावी.

दे. वासुदेव भट्टाचार्य याने सर विल्यम यांना ता. २६।१।१९०९ रोजी लिहिलेल्या पत्रांतील सारांश:— परवा झालेल्या तंट्याचें महत्त्व आपल्या ध्यानात आलें नसावें असें वाटतें. एका अति धार्मिक बंगाली घराण्यातील गृहस्थाला 'सुवरका' बच्चा असें गालिप्रदान करण्याचें अक्षम्य ... वर्तन करून आपण वऱ्याच इंग्लंडवासी हिंदु लोकांच्या मनास डागून सोडलें आहे. आपल्यासारख्या इतिहास-प्रवीण व विद्वान् माणसाला अशा हिंदी धर्मात गलिच्छ मानलेल्या जनावराचें नांव घेअून गालि करण्याच्या परिणामाचा विसर पडावा ही खरोखर मोठ्या खेदाची गोष्ट होय. आपल्या पूर्वीच्या गैरवर्तनामुळे हिंदुस्थानातील लोकांचें मत किती वाअीट आहे, तें अेक अीश्वरासच ठाअूक व आपल्या या उद्दामपणाची बातमी तिकडे समजली म्हणजे हल्लीची तिकडील स्थिति जास्तच कठीण होणार आहे, म्हणून आपण माझ्या गरीब मित्राची सपशेल माफी मागावी, म्हणजे मी ती इकडे

व हिंदुस्थानात प्रसिद्ध करून या वातमीने होणारा चित्तक्षोम शांत करण्याचा होअील तितका प्रयत्न तावडतोव करीन.

दे. भट्टाचार्य यांनी ता. ५।२।१९०९ रोजी प्रसिद्ध केलेल्या विनंतीपत्रातील सारांश :— कुंजविहारी यांना 'सुवर का बच्चा' म्हटल्याची हकीगत अैकून मला हा राष्ट्रीय अपमान वाटला व मी सर विल्यम यांना माफी मागण्याबद्दल अेक पत्र लिहिलें; परंतु त्या गृहस्थाने (?) उत्तर पाठविण्याचीही तसदी घेतली नाही. मग मी ता. १।२।१९०९ रोजी त्यांना समक्ष भेटलो. तेव्हा त्यांनी माफी वगैरे तर मागितली नाहीच परंतु पुन्हा चिडून जाअून 'Dirty Niggar' म्हणून छत्रीही मजवर अुगारली आणि या अुद्दामपणाबद्दल मी त्यांस काठीचा एक टोला मारून योग्य शासन केलें; या क्षुल्लक गोष्टीचें टाअिम्स आदिकरून पत्रें बरेंच स्तोम माजवीत आहेत व या कामी मला समन्स निघावें म्हणून अिंडिया कौन्सिल-तर्फे अर्ज होणार आहे असें समजतें. या कामी अँग्लोअिंडियन लोक न्याय मागत आहेत व त्यांना भरपूर न्याय मिळवून द्यावा असें मला वाटतें.

हें सर्व राष्ट्राचें काम आहे व या कामी कायदेशीर सल्ला मिळण्याच्या वगैरे कामी लागणाऱ्या खर्चाचा वाटा आपण अुचलणार नाही काय ? (दे. वासुदेव भट्टाचार्य यांचा पत्ता :—40 Fitzory street, Fitzory square, London W.)

—ता. ५ मार्च १९०९

✦ ✦ ✦

३९. जहालांचा निःपात करा !

लंडन, ता. १९ मार्च १९०९ – 'Crush the extremists; rally round the moderates.' 'जहालांचा निःपात करा व मवाळांशी मिळतें घ्या' या सूत्राचा अवलंब केल्याने हिंदुस्थानातील आपली सत्ता पुन्हा सवल व सतेज होअील असा ब्रिटिश लोकांना स्वतः लॉर्ड मोर्ले यांचेकडून अुपदेश देण्यात आला व या रामवाण औषधाचा प्रयोग करण्यास निरकुंशत्वाने आरंभ केला.

परंतु मवाळांना मिळतें घेणें कितीही सुलभ जात असलें तरी जहालांचा निःपात करणें हें तितकें काही सुलभ नाही. निःपात कसा करणार ? मायावी थापांनी ? तो काळ आता निघून गेला आहे! तुरुंगाने ? बंदी नसे त्यांतिल कोण बोला । जो लोक दैवें परदास्य केला ॥ तो बंदि तद्भूहि तुरुंगशाळा । कारागृहाचें भय काय त्याला ! ! ॥ १ ॥ हद्दपारीने ? सक्तमजुरीने ? फासाने ? बंदुकीने ?—

कशाने त्यांचा निःपात करणार ? प्रल्हादाचें हरिनाम व गोकुळचा गोविंद — त्यांच्या निःपातासाठी जें शस्त्र उपसलें जाई त्या शस्त्राचाच निःपात होत असे ! ! सुप्त क्रांतीचीं हीं बीजें वेगाने फोफावत अुत्पतन पावत असताना त्यांचा निःपात आता कोण करू शकणार ? कसा करू शकणार ! !

आणि निःपात करण्याचा निश्चय करून जरी कोणी सज्ज झाला तरी ज्याचा निःपात करणें आहे तो जहाल ओळखणेंही काही सुगम नाही. कोण जहाल ठरविता येअील ? आता पांच सहा वर्षांपूवी दे. गोखले जहाल होते, व तीन चार वर्षांपूर्वी सुरेंद्र बाबू जहाल होते; परंतु त्यांच्या निःपाताची जर कोणाला आता जास्त भीति वाटत असेल तर ती खरी सरकारलाच होय ! त्यांना हद्दपारी न व्हावी म्हणून लोकपक्षापेक्षा इंग्रजच देवाची व सरकारची जास्त प्रार्थना करीत आहेत. काल मारक्या वाटणाऱ्या या गाअी आज इतक्या ज्या निरुपद्रवी वाटू लागल्या आहेत त्या त्यांचेमध्ये काही फेरफार झाल्यामुळे नव्हे, तर गाअीहून जास्त भयंकर प्राणी क्षितिजावर येअू लागल्यामुळे होय व म्हणूनच १–१॥ वर्षांपूर्वी विपिनचंद्र पाल म्हणजे जहालांचे अेक अग्रणी समजले गेले व आता मात्र खरा जहाल हाती लागला असें वाटून सरकार त्याचा निःपात करण्यास सोटा अुगारू लागलें तोंच पंडित श्यामजींची डरकाळी अैकू आली. काल महा-बलाढ्य वाटणारा विपिनचंद्र पालच आज सरकारला अेक साधारण कायदेशीर, फक्त जरा जास्त कुरकुऱ्या स्वभावाचा नेमस्त बाबू आहे असें वाटू लागलें. तेव्हा दिवसेंदिवस जहालांचा निःपात करणें हें जितकें कठीण होत आहे तितकाच खरा जहाल कोण हें ओळखणेंही अशक्य होत चाललेलें आहे.

प्रयत्नांती आपल्यास यश येईल असें जाणून या दुर्घट कार्याला सरकारने हात घातला. हिंदुस्थानात अेकीकडे चाबकाचे मार देत दुसरीकडे ममताळूपणे कुरवाळणें सुरू झालें व जी मात्रा हिंदुस्थानात लागू पडेल असें वाटतें, तीच अिंग्लंडमधल्या या दोन वर्षांत फारच अुन्मत्त होत चाललेल्या हिंदी विद्यार्थ्यांनाही देण्यात आली. पार्लमेंटमध्ये सुधारणा देण्याविषयी रोज रात्री वाद चालू आहे; हिंदुस्थानच्या अितिहासातही अत्यंत प्रागतिक वस्तुक्रांति घडवून आणण्याची दवंडी पिटविली जात आहे व त्या योगाने नेमस्त पक्षाला – परंतु लंडनमध्ये या पक्षाचें नांवही अुरलेलें नाही म्हणा – मिळवून घेण्याचा ज्या समयी दिमाख दाखविला जात आहे त्या समयी लंडनमधल्या अेकूणअेक विद्यार्थ्यांवर अपमानास्पद आरोप सुरू आहेत. अिंडिया हाअूसवर रात्रंदिवस सक्त पहारा बसला आहे. पंडित श्यामजींच्या नांवाने सर्वत्र खडे फुटत आहेत. विपिनचंद्र पाल व अितर गृहस्थ यांचे पायात डिटेक्टिव्हांची लुडबूड चालली आहे ! परंतु या सर्व द्वेषाचा व संशयाचा परिणाम काय झाला ? एका गुप्त पोलिसाला विचारता त्यांनी

सांगितलें की, ह्या धास्तीने हिंदी विद्यार्थी भिऊन राजकारण सोडतील अशी सरकारची अटकळ आहे. या अटकळीचें प्रत्यंतर हेंच मिळालें की अिंडिया हाऊस-मधल्या सभांना कधीही लोटत नसे अितकी गर्दी आता दर रविवारी लोटत आहे ! पंडित श्यामजींची आक्सफर्डमधील हर्बर्ट स्पेन्सरची देणगी त्या युनिव्हर्सिटीने झिडकारून परत करावी म्हणून युनिव्हर्सिटीत चळवळ होताच लंडनमध्ये भर सभेत पंडितजींच्या देशभक्तीचा गौरव करून अभिनंदनपर ठराव त्यांना धाडण्यात आला. लंडनमध्ये या सरकारी निःपात मोहिमेला लोक किती दवले आहेत हें समजण्यास अेकच गोष्ट सांगणें वस्स होईल की हिंदुस्थानात सुरेंद्र हे जसे सरकारला नेमस्त वाटले तसें लंडनमध्ये सरकारला–कृपेला पात्र नसला तरी भीतीला–आपला पुरुष म्हटला म्हणजे विपिनचंद्र पाल हे होत ! लंडनमध्ये बिपिनबाबू नेमस्त आहेत असें अिंग्लिश पत्रें अुघड म्हणतात. अितकी लंडनची व अिंग्लंडची हिंदी वसाहत सरकारच्या निःपात मोहिमेला भ्यायली ! ! !

अर्थात्च अिंग्लंडचीं सर्व पत्रें चिडून गेलीं. पंडित श्यामजींनी देशवीरांचें स्मारक अुभारावें व 'दे. खुदीराम बोस, कन्हय्यालाल वगैरे तरुणांना देश-वीरत्वाचा मान मिळणें योग्य आहे' हें राजद्रोही 'अिंडियन सोशियालॉजिस्ट' पत्रात प्रसिद्ध केल्यापासून त्यांचेवर शिव्याशापांचा वर्षाव सुरू झाला. विपिन-चंद्रांनीही या कागदी लढाअीत अेक फेर झाडून दिली. अिव्हनिंग स्टँडर्ड या दैनिक पत्राने विद्यार्थ्यांवर हल्ला करण्याचें पत्करलें व Seditious students, Rebellious Indians' वगैरे मथळ्यांखाली प्रथम आडून गोळीवार सुरू केले. परंतु शेवटी आड पडदा सोडून दे. सावरकर यांचेवर अुघड रीतीने दोषारोप करण्यास त्याने आरंभ केला. सर्व विद्यार्थ्यांना वेवंद करण्यास प्रवृत्त करणारे हेच गृहस्थ होत असा त्यांचा अजमास आहे ! या निरर्गल लेखाला दे. सावरकर यांच्या एका स्नेह्याने कडक व धमकावणीचें अुत्तर धाडताच स्टँडर्डचे संपादक जरा स्वस्थ बसले व अेक दिवस आश्चर्यचकित करून टाकणारा देखावा घडून आला. तो असा :—

ह्या दैनिक स्टँडर्डचे प्रतिनिधि दे. सावरकर ह्यांना भेटावयास आले ! पंधरा दिवस ज्याने अद्वातद्वा टीका केली त्यांनी ही भेटीची तसदी आधीच घेतली असती तर काही बिघडलें नसतें ! तथापि त्या प्रतिनिधींने दे. सावरकरांची मनःपूर्वक भेट घेतली. खुद्द एडिटर म्हणतात :— 'Presently a suspected Indian, with youth and intelligence stamped upon his greetings' It was Mr. V. D. Savarkar.' अिंडियन-राजकारण, अिंडिया हाअूस, हिंदी विद्यार्थी व अितर चळवळी वगैरे विषयांवर तासभर संवाद झाला व ती हकीगत काही खरी काही खोटी–दुसऱ्या दिवशी स्टँडर्डमध्ये प्रसिद्ध झाली. तथापि अितर पत्रांनी शिवीगाळ अजून चालविली आहे. त्यातल्या त्यात 'Sunday Chronicle'

या पत्राच्या वातमीदाराने जराशी वस्तुस्थितीस धरून हकीकत दिलेली असल्याने त्याचे अेक दोन अुतारे दिल्यास खरी स्थिति थोडीबहुत अुघडकीस येअील.

Sunday Chronicle चा बातमीदार अिंडिया-हाअुसमध्ये दे. सावरकरांच्या भेटीला आला. अिंडिया-हाअूसवर अितर पत्रकार जे आरोप करतात त्याप्रमाणे तेथे भयंकर असें काही अेक दिसलें नाही असें स्पष्ट म्हणून लेखक Campel Green म्हणतो ' It may be that any eyesight is not good ! It is a house of mystry. Mr. Shyamji Krishnawarma works for the independence of India. If he does not approve the assassinations of British officials who accidently or incidently suffer thereby he excuses them. He has offered five thousand Rupees towards a fund of Indian Martyrs' Memorial for the men hanged in Bengal. Anyhow the shadow of Krishnavarma is on India-House. That is to be fair and to say the least. Now what is the answer ? I had an opportunity of a long friendly discussion with Mr. V. D. Savarkar, who seems to be not only the spokesman for the students but the spokesman for Mr. Shyamji Krishnavarma. He is a young Grey's Inn Law student, 23 years age at a guess. He has a clear olive complexion, clear, deep penetrating eyes, a width of jaw, such as I have seen in few men. His English is excellent. If I mistake not Mr. Savarker will go far – I hope he will go far in the right direction. अिंडिया हाअूससंबंधीचीं प्रश्नोत्तरें देताना तो म्हणतो, 'मी विचारल्यावरून ते म्हणाले की, ' अिंडिया हाअूस ही अेक विद्यार्थी निवास संस्था आहे. येथे येण्यास अमुकच राजकीय मतें लागतात असा विलकुल नियम नाही. एक जो नियम आहे तो अेवढाच की, रहिवाशाने अेक पौंड द्यावा व राहणें व खाणें अुपभोगावें. कृष्णवर्मा घराच्या भानगडीत कधीच पडत नाहीत. होय, तेथे राजकीय विवाद होतात, पण तसे तुम्ही खुद्द सरकारी निवासस्थान स्थापलें तरी तेथेही चालल्याशिवाय कधीही राहणार नाहीत. राजकारण प्रस्तुत प्रसंगी आमचा प्राण आहे. अिथे तुम्ही म्हणता तसे म्हणणारी व ब्रिटिशांचें राज्य कल्याणकारक आहे असें म्हणणारी मंडळीही येतात. वादविवाद चालतात. सत्य व कोटिक्रम ज्यांचे बाजूला असतो त्यांचीं मतें प्रसार पावतात.' ते लेखक म्हणतात–' Let me state a fact before an impression. The fact is Mr. V. D. Savarkar believes in India for Indians, in the complete imanciptation of India from the British rule. He says India has nothing for what to thank the English, or less it be the denationalisation, as he calls it, of the Hindus.' स्वतःचे विचार बरेच विस्तृत रीतीने देअून ते लेखक अेक गोष्ट वगळतात. असें म्हणतात की हे गृहस्थ रॅडिकल म्हणजे

लेखल्यांच्या आशाकेंद्र लिबरलाहूनही लिबरल आहेत. तरी त्यांनी असें स्पष्ट कबूल केलें की, हिंदुस्थानच्या पदरात आम्ही कितीही सुधारणा टाकल्या तरी हिंदुस्थानवर ब्रिटिशांचें राज्य आम्ही तसूही न मागे फिरता गाजविणार. तरवारीने आम्हास घालविल्याविना आम्ही जाणारे नाही व तरवार तुम्हापाशी शिल्लक नाही. सबब उभयहितासाठी ब्रिटिश राज्यच हिंदुस्थानात असणें उत्कृष्ट आहे. अितर पुष्कळ संवाद झाला. हें लक्षात ठेवण्याजोगें आहे की, हे लेखक इतर पत्रकारांनी केलेले आक्षेप यथातथा नसावे असें कबूल करतात. " Mr Savarkar said, 'We do not mind detectives watching outside and following us, if the climate suits them !' That last is a quite English touch. It shows how the British hand has moulded the intellect of young India. It has even breathed into it the British Joke.....I have no evidence of fact which would justify me in traversing the statement of this nimble-minded young leader of India-House."

डेलीमेल, मँचेस्टर, डिस्पॅच वगैरे पत्रांनीही सावरकरांच्या भेटी घेऊन हकीगती दिलेल्या आहेत.

—ता. ९ अेप्रिल १९०९

✦ ✦ ✦

४०. सर कर्झन वायलींना ठार मारलें !!

लंडन:—खुद्द लंडन शहरामध्ये, हिंदी, अिंग्रजी डिटेक्टिव्हांची आज दीड महिना येथील झाडून हिंदी लोकांवर सक्त पाळत असतानाही, सर कर्झन वायली-सारख्या अिंडिया ऑफिसच्या केवळ अत्यंत प्रमुखच नव्हे, नावाजलेल्या अधिकाऱ्याचा खून झाल्याची वार्ता हिंदुस्थानात विद्युन्मार्गाने येअून आता शिळीही झाली असेल. सर कर्झन वायली हे अिंडिया ऑफिसचें मुख्य केंद्र असून येथील हिंदी विद्यार्थ्यांच्या सहवासासाठी व त्यांना मदत करावी म्हणून सरकारी धोरणा-प्रमाणे सतत अविश्रांतपणे झटत असत. सेक्रेटरी ऑफ स्टेट हे प्रत्येक अुगवत्या मावळत्या प्रधानमंडळाबरोबर बदलतात; परंतु हिंदुस्थानच्या कारभाराचीं सारीं सूत्रें व खरी दिशा, अिंडिया ऑफिसमध्ये कायम असलेल्या अधिकाऱ्यांच्याच हाती असतात. ह्या अधिकाऱ्यांत सर कर्झन वायली हे अप्रतिम चातुर्यसंपन्न असत. यांना माहीत नाही असा हिंदी मनुष्य अिंग्लंडात नसे. राजकारणातील व व्यक्ति-विषयक प्रत्येक बातमीची अित्थंभूत माहिती या पुरुषाजवळ ठेवलेली असे. फार

काय, पण हिंदुस्थानच्या कारभाराचीं सूत्रें वाह्यतः हाती असलेल्या सेक्रेटरी ऑफ स्टेटचे सर कर्झन वायली हे प्रत्यक्ष नयनच होते. हिंदुस्थानातही अिंग्रजी राज्याच्या अिमानी सेवेने २० वर्षेंपर्यंत यांनी नांवलौकिक संपादिला होता.

लॉर्ड मोर्लेहूनही अॅग्लोअिंडियन लोकांत ज्याची अुणीव जास्त भासणारी आहे अशा या महापुरुषास भयंकर व निर्दयपणाने मारल्याचा आरोप ज्या तरुणावर आहे त्याचें नांव दे. मदनलाल डिंगरा असें आहे. या तरुणाची चौकशी अजून चाललेली आहे. दे. डिंगरा यांच्या पूर्ववृत्तान्तातील काही काही गोष्टी आता प्रसिद्ध होत आहेत. गेल्या साली यांनीही अितरांप्रमाणे आपल्या कोटावर ५'७ ची वीरस्मृतिमुद्रा धारण केलेली होती. परंतु कॉलेजमध्ये कोणा अेका स्नेह्याने चेष्टेने मुद्रा दूर फेकली हें पाहताच हा तरुण अितका चवताळला की तो अेक सुरा घेअून त्याच्या अंगावर तुटन पडला ! दुसरे अेके समयी जपानी लोकांच्या शौर्यावद्दल गोष्टी चाललेल्या असताना दे. डिंगराला या गोष्टी फार वेळ न रुचून तो तरुण म्हणाला की त्यात काही विशेष नाही. माझें हिंदुराष्ट्रही तितकेंच शूर व साहसी आहे व लवकरच आमच्याही धाष्टर्याचीं लोक कीर्ति गाअू लागतील. अितर हिंदी तरुण म्हणाले, ' हा पोकळ डौल आहे. शरीरकष्ट व देशवीरत्वात आमचे लोक अढळ राहत नाहीत. शेवटी वाद पैजेवर आला व हिंदु लोकांच्या साहसाची चुणूक तर पाहू या, म्हणून अेकाने अेक टाचणी घेअून डिंगराच्या हातावर टोचण्यास आरंभ केला. डिंगराने तो हात जसाच्या तसाच अढळ ठेवला – टाचणी सर्व आत रोवली व रक्त बाहेर अुसळलें तरी डिंगराने हात हलविला नाही.

या खुनाचा निषेध करण्यासाठी सोमवारी दे. भावनगरीचे खटपटीने अेक हिंदी लोकांची सभा भरली होती. अध्यक्षस्थानी दे. आगाखान हे होते. सभेला पुष्कळ हिंदी लोक जमलेले होते. पहिला ठराव दे. भावनगरीने पुढे आणला. त्यात व त्यांचे भाषणात ज्या मनुष्याची खुनाचे आरोपावरून चौकशी व्हावयाची आहे, अशावर तो आरोप शाबीत झाल्यावर करावा तसा भडिमार त्यांनी चालविला. नंतर दे. अमीर अल्ली अुठले. त्यांनीही तोच प्रकार पण जरा कमी प्रमाणावर केला व वेळ थोडा आहे म्हणून अध्यक्षांनी ठराव सभेपुढे वाचून दाखवून अेकदम कितीकांना तो पसंत आहे असें विचारलें. पुष्कळसे हात अुभारलेले दिसताच त्यांनी सांगितलें की, ' सर्वानुमतें पास.' हें वाक्य अैकताच ' नाही, नाही, विरुद्ध मतेंही येथे आहेत ' असें म्हणून शब्द अुठला. ' काय ? विरुद्ध मत ?' अध्यक्ष ओरडले, व सर्व मागे वळून पाहू लागले. ' होय, होय माझें मत विरुद्ध आहे ' म्हणून अधिकच जोराचा प्रतिशब्द अुसळला. ' त्याचें नांव टिपून घ्या ! त्याला अुभा करा ! कोण आहे तो ?' असा अेकच गलका अुडाला. ' हा मी येथे आहे व पुन्हा अध्यक्षांना अशी विनंती करतो की ठराव सर्वानुमते पास झालेला नाही.'


आता सभेत ' सावरकर, सावरकर ' अशी कुजबूज सुरू झाली. सर्वानुमते ठराव पास करण्याची ज्यांना अत्यंत उत्कंठा लागलेली होती त्यांनी संतापून जाऊन दे. सावरकरांना पुन्हा दटावण्याचा प्रयत्न केला. परंतु सभेचे मध्यभागी उभे राहून अधिकच शांततेने त्यांनी पुन्हा आपलें मत विरुद्ध असल्याचें कळविलें. तेव्हा दे. भावनगरी संतापाने लाल होऊन व प्लॅटफॉर्मवरून उडी मारून खाली आले व ' पकडा त्याला ! धरा त्याला! ' म्हणून गर्जू लागले ! तीन मिनिटेंपर्यंत विलक्षण स्तब्धता दिसली व मग अेकदम ' धरा ! बाहेर घालवा! ' वगैरे किंकाळ्या फोडीत खुर्च्या व काठ्या सर्व बाजूनी उठू लागल्या. 'माझें मत कां विरुद्ध आहे हें अध्यक्षांनी अैकावें ' म्हणून दे. सावरकर हे बोलत होते. परंतु त्यांचें तें बोलणें ह्या चवताळलेल्या मूठभर लोकांच्या किंकाळ्यांत अैकू येअीना. अध्यक्षांनी दे. भावनगरीस मागे ओढून ह्या अतिरेकाबद्दल कानउघाडणीही केली. परंतु आता सर्व सभेत पक्षविपक्ष होऊन अेकच आरोळी उठलेली होती. ह्या सर्वाचे मध्ये दे. सावरकर शांतपणे उभे असताना अेक पामर नांवाचा युरेजियन त्यांच्या अंगाला भिडला व त्याने त्यांच्या डोळ्यावर आघात केला. तरीही सावरकरांनी स्थलावरून अिंचही मागे न सरता व अुलट आघात न करता ' तरीही माझें मत विरुद्धच आहे' असें सांगितलें. त्यांच्या डोळ्याला जखम होऊन रक्त भळभळा वाहू लागलें व हें पाहताच सर्वांचा संताप विकोपास गेला. दे. सुरेंद्रनाथ बानर्जींनी संतप्त होऊन ' सावरकरांना स्वमत देण्याचा पूर्ण अधिकार होता. त्यांच्यावर हात टाकणें Outrageous आहे ' असें म्हणून सभा सोडून दिली. स्त्रीजन भयाने किंचाळत हॉलचे बाहेर गेला. हॉलमध्ये खुर्च्या झुगारल्या जाऊ लागल्या. शिव्या-प्रतिशिव्यांचा गोंधळ अुडाला व अितक्यात हिंदी तरुणांतील अेकाने दे. सावरकरांवर ज्याने प्रथम आघात केला होता त्या पॉमरचे डोक्यात काठी घातली व तोही रक्ताने भिजून चिंब झाला. पोलिस लोक सभेत शिरलेलेच होते व सुमारे अर्ध्या अेक तासात ठराव कसेबसे वाचून अध्यक्षांनी सभा संपली असें कळविलें. दे. सावरकर यांना आधीच बाहेर नेलेलें होतें व स्नेह्यांबरोबर त्यांना घरीही पोचविण्यात आलें होतें. दुसरे दिवशी त्यांनी लंडन टाअिम्सला आपलें मत विरुद्ध कां होतें वगैरे सर्व खुलासा करून अेक पत्र लिहिलें व त्यातील त्यांच्या समर्थनाचा परिणाम होऊन बहुतेक पत्रांनी तें पत्र आपण होऊन छापून प्रसिद्ध केलें. त्या पत्राने सर्व क्षुब्ध वातावरण निवळलें आहे. तें पत्र आपल्या वाचकांसाठी पुढील पाळीला धाडीन. डेली डिस्पॅच नामक पत्रातील अेक अुतारा मासल्यासाठी दिला आहे.

'The pale youth' who made so dramatic a protest at yesterday's meeting of Indians held to denounce the murder of Sir Curzon Wyllie turns to be Mr. Vinayak Damodar Savarkar. He is a fervent nationalist. Mr. Savarkar who is an extemely brilliant

scholar, is at present, an individual of interest, apart from his appearance at yesterday's meeting. He is the law-student here whom the Benchers of his Inn refused to call, and at present, I understand he is waiting for the decision of the House of Lords to whom he has appealed. Like most of his nationalists he is a political theorist, and is deeply versed in all the literature of political liberty. He translated Mazzini's writings into Marathi.'

यात मला असलेल्या माहितीवरून अेक चूक दिसत आहे की दे. सावरकर ह्यांच्यावरील ग्रेज अिनमधील केस अजून निकालात आलेली नाही. जुलै १४ ला ती पुन्हा अेकदा चालणार आहे व तिचा निकाल महाराष्ट्र वाचकांना पुढे कळवीन.

—ता. ३० जुलै १९०९



✦ ✦ ✦

४१. मदनलाल डिंगरा !

लंडन ता. १६ जुलै—ज्या तरुणाने कर्झन वायली यांचा भयंकर खून केला त्याच्याविषयीची माहिती आता वर्तमानपत्रांतून सविस्तर रीतीने प्रसिद्ध होत आहे. टाअिम्स, डेली न्यूज, डेली क्रॉनिकलपासून तों तहत अत्यंत क्षुल्लक ग्रामपत्रिकेपर्यत सर्व छापखाना हल्ली दररोज व दरघडी हिंदुस्थानच्या चर्चेने, या खुनाच्या विवरणाने, डिंगराच्या वर्णनाने भरलेला असतो ! ज्या दिवशी सकाळी खुनाची पहिली वार्ता कळली त्या दिवशी रस्त्यारस्त्यातून वर्तमानपत्रविके मोठमोठ्याने ओरडत सर्व दिवसभर हिंडत होते. 'डिंगराने केलेला खून ! हिंदुस्थानचा द्वेष ! अेका हिंदूचें निधडें धाडस ! वगैरे कर्कश किंकाळ्या अैकून मी घराचे खिडकीतून डोकावू लागलो तों प्रत्येक घराचे दाराशी वर्तमानपत्रांचे अंक विकत चाललेले होते. त्या दिवशी सर्व ब्रिटिश द्वीपामध्ये अेकूण अेक मनुष्याचे तोंडी 'हिंदुस्थान ! हिंदुस्थान !' हा अेकच शब्द होता. तेव्हापासून आतापर्यंत वर्तमानपत्रात हिंदुस्थानच्या चर्चेपुढे दुसऱ्या कोणत्याही विषयाला थारा मिळेनासा झाला आहे. क्रिकेटची चर्चा देखील बंद पडली. तेव्हा अितर विषयांची काय कथा !

ज्या दिवशी रात्री डिंगराने सर कर्झन वायलीवर चार गोळ्या झाडल्या त्या दिवशी डिंगरा खुनाचे अेक अर्धा तास आधी मिस बेक या आंग्ल स्त्रीबरोबर—ही बाअी त्या दिवशी ज्या संस्थेचा अुत्सव होता त्या संस्थेची सेक्रेटरी आहे—

आपल्या नुकत्याच झालेल्या परीक्षेच्या गप्पा मारीत शांतपणे वसलेला होता व तेव्हाही तो जवळ दोन पिस्तुलें, सुरी व खंजीर अशीं शस्त्रें ठेवून सर कर्झनवर पाळत ठेवीत होता ! नंतर जेव्हा कर्झन आले तेव्हा तो दारापाशी गेला व काही बोलावयाचें निमित्त करून सर कर्झनजवळ अुभा राहिला. बोलण्यास आरंभ होताच त्याने पिस्तुल झाडलें नाही; तर अगदी हलकें बोलण्याचें मिष करू लागला. तेव्हा कर्झन अधिकच जवळ आले. त्यांचें तोंड अगदी जवळ येताच त्यांचें डोळ्याचें पातें लवतें न लवतें अितक्या अवकाशात चार गोळ्या मारल्याही होत्या ! जवळ असलेले अेक पारशी डॉक्टर लालकाका हे त्याला पकडू लागताच त्यांनाही अेक गोळी घातली व ते खालो कोसळले. सर प्रोवेन हे मागून धावले तरी डिंगरा न कचरता त्यांच्याकडे झटकन् फिरून कुस्ती करू लागला व त्याचे हात पकडण्यात अितर दोन गृहस्थ गुंतले असताही त्याने त्या सर्वांना झिडकारीत सर प्रोवेन ह्यांना अितक्या जोराने खाली आदळून दिलें की, त्यांच्या दोन बरगड्या चिरडून गेल्या व त्यांचा चेहरा विद्रूप झाला. त्या वेळेस आणखी काही अिंडियन त्याचे अंगाशी लगटलेले होते व त्यानेही आपलें पिस्तुल पुन्हा सरसावलें होतें. परंतु अिंडियन लोकांवर तें न झाडणें ठीक असें बहुधा वाटून त्याने तें परत फिरविलें व शांतपणे तो अुभा राहिला. तो अितका शांत की, त्याची नाडी त्वरित पाहताच डॉक्टरने म्हटलें की, येथे असलेल्या या भयंकर देखाव्याला पाहणाऱ्या सर्व लोकांत डिंगराची नाडी अधिक शांत व सुव्यवस्थित रीतीने चाललेली होती ! त्याच्या खिशात दोन कागद त्याच्या कबुलीजबाबाने व स्वसमर्थनाने भरलेले सापडले. त्याला सगळ्यांनी मिळून हातापायांनी जखडून बांधलें असता ' माझा चष्मा जरा नीट घालू द्या व मग मी पुन्हा हात बांधू देअीन ' असें तो म्हणाला व चष्मा नीट बसविण्यात आला. पोलिस कचेरीत नेल्यावर तो डोळे मिटून भितीशी डोकें टेकून काही मिनिटें बसला व मग हमून गप्पा करू लागला. त्या रात्री त्याला गाढ झोप लागली होती. दुसरे दिवशी जेवणावरही त्याने यथेच्छ ताव मारला. काही दिवसांनी त्याचे अेक दोन स्नेह्यांनी त्याला भेटण्यासाठी खटपट केली व अेकजणाला परवानगी मिळून तो त्याला भेटला. तेव्हा डिंगरा अितका निर्भय व अुल्हासी होता की, त्यांनी मागितलेल्या जिनसांमध्ये अेक आरसाही मागितला होता ! ' मला ड्रेस करण्यासाठी येथे अेक आरसा नाही तर अेक छानदार आरसाही धाडून दे ! ' म्हणून तो म्हणाला. जणू काय त्याला लग्नाचीच तयारी करावयाची आहे ! असली निधड छाती पुण्यकर्मात खरोखरीच अभिलषणीय असते. पापकर्मात ती मनुष्याला जास्तच हिडीस स्वरूप देते !

त्याला भेटण्याची हिंदी लोकांना सक्त मनाओ करण्यात आलेली आहे. गेल्या वर्षापासून हिंदी विद्यार्थ्यांना अिंग्रजी वळण लावण्यासाठी व त्यांचेवर सूक्ष्म

नजर ठेवून त्यांना राजकारणापासून परावृत्त करण्यासाठी ज्या ज्या अनेक निर-निराळ्या संस्था निघालेल्या होत्या त्यांपैकी मोठमोठ्या अँग्लोइंडियनांनी आपल्या घरी इंडियन विद्यार्थ्यांस चहा पिण्यास बोलवावयाचें व अेक मोठा समारंभ करावयाचा यासाठी अेक संस्था होती. डिंगरा हा सर्व राजनिष्ठ व अँग्लोइंडियनांनी चालविलेल्या संस्थेचा नियमित सभासद होता व कित्येक अँग्लोइंडियनांचा त्याचेवर फार विश्वास व त्याच्या राजनिष्ठेवर फार भरंवसा असे. अशा अत्यंत भरंवशाच्या मनुष्यानेच व जिथे सच्छील विद्यार्थ्यांशिवाय राजकारणी चटोर विद्यार्थी कधी येऊ शकत नाहीत अशा चहासमारंभातच सर कर्झन सारख्यांचा खून केल्यापासून अँग्लोइंडियनांनी सार्वजनिक पत्रें लिहून कळविलें आहे की, इंडियन विद्यार्थी दुष्ट राजकारणापासून परावृत्त व्हावे म्हणून हा चहासमारंभ करण्याचें आपणांस आजपर्यंत कबूल होतें. पण आता तसे समारंभ आपण कधीही करणार नाही. सर चार्लस इलियट यांनीही त्यांची समारंभ करण्याची पाळी जवळ आली असल्याने आपण तो समारंभ करीत नाही असें स्पष्ट पत्र प्रसिद्ध केलेलें आहे. हिंदुस्थानी विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्यासाठी नुकतीच नेमली गेलेली व आज-पर्यंत रात्रंदिवस नको नको होअीतोपर्यंत काम करणारी कमिटीही आज-काल वर डोकें काढीत नाही. प्रथम प्रथम गुप्तकटाचे शोधासाठी पोलिसने अचाट प्रयत्न केले असताही गुप्त कट मिळेना. तेव्हा चौकशी झटकन थांवली; अितकेंच नव्हे तर प्रत्येक हिंदी विद्यार्थ्याचे पायात लुडबुडणारे डिटेक्टिव्ह या खुनापासून जास्त होण्याचे अेवजी मुळीच नाहीसे झाले आहेत. परंतु त्याचें मुख्य कारण असें आहे की, अितःपर इंग्लिश डिटेक्टिव्हांचे अेवजी इंडियन डिटेक्टिव्ह ठेवण्याचें ठरलेलें आहे. मोठमोठ्या वर्तमानपत्रांतून तक्रारी आल्या आहेत की, इंडियन लोकांची भाषा माहिती नसल्याने त्यांचेवर इंग्लिश डिटेक्टिव्ह ठेवल्याने काडीचाही फायदा होत नाही. हिंदी समजणारा इंग्लिश डिटेक्टिव्ह ठेवला तर हे इंडियन पंजाबीत बोलतात, मराठीत बोलतात, बंगालीत बोलतात; तेव्हा हिंदुस्थानातून अुत्तम स्वदेशी डिटेक्टिव्ह आणावेत ही सूचना सर्वांस पसंत पडलेली आहे. परंतु आजपर्यंत काय अिथे थोडे इंडियन डिटेक्टिव्ह होते तर आता जास्त आणवून अधिक अुपयोग होणारा आहे ! डिटेक्ट करण्यास जर काही नसेल तर कितीही डिटेक्टिव्ह जमले तरी काय करणार ? आणि दुर्दैवाची कहाणी अशी की, अितर गरीबगुरीब विद्या-र्थ्यांच्यामागे रात्रंदिवस डिटेक्टिव्ह लागलेले असताना मुख्य डिंगरासारख्या भयंकर मनुष्याच्यावर यत्किंचितही दाब नव्हता. खुद्द डिटेक्टिव्हांचे मालक सर कर्झन वायली यांचा खून ज्यांना डिटेक्ट करता आला नाही, त्या डिटेक्टिव्ह खात्याची आदीपासून आजपर्यंत सुधारणा झालीच पाहिजे अशी सर्व राजनिष्ठ व शांतताप्रिय हिंदी लोकांची मनापासून अिच्छा व विनंती आहे.

गेल्या आठवडचात डिंगराला सेशनकमिट केलें. त्या दिवशी संध्याकाळी सर्व लंडन शहरात डिंगराने दिलेला जवाब हाच अेक विषय होता. त्या विस्तीर्ण शहराच्या भिंतीभिंतीवरून दुकानादुकानावरून डिंगराचें नांव अेकसारखें लटकलेलें होतें. 'डिंगराचा विलक्षण जबाब' 'तो म्हणतो माझा सूड, माझे देशबांधव घेतीलच.' 'डिंगरा स्वसमर्थनात म्हणतो, मी देशभक्त आहे.' 'डिंगरा हिंदुस्थानच्या अभ्युदयासाठी मरतो.' वगैरे मोठमोठ्या टाअिपांनी छापलेलीं पत्रकें भिन्नभिन्न वर्तमानपत्रांच्या जाहिरातीसाठी अेकाच रांगेने सर्व शहरभर – नव्हे सर्व अिंग्लंडभर लटकत होती ! त्याने केलेल्या क्रूर खुनाने केली नाही अितकी अुत्क्षोभक चळवळ अिंग्लंडात त्याच्या कोर्टातील जबाबाने केलेली आहे ! सेशनमध्ये काम चालेल तेव्हा ती हकीकत देअीन. डिंगराला फाशी होअीलच. परंतु त्याला तीच गोष्ट पाहिजे आहे. कारण परवा कोर्टाचे जबाबाचे शेवटी तो म्हणाला —

I made the statement not because I wished to plead for mercy or anything of that kind. I wish that the English people should sentence me to death for in that case the vengeance of my countrymen will be all the keener. I put forward this statement to show the justice of my cause to the outside world, especially to our sympathisers in America and Germany.

—ता. ६ ऑगस्ट १९०९

✦ ✦ ✦

४२. सावरकरांवरील 'ग्रेज अिन'मधील खटला !

लंडन, ता. २३ जुलै १९०९.–दे. सावरकर यांच्यावर ग्रेज अिनमध्ये चालले्या खटल्याचा निकाल गेल्या आठवडचात अेकदाचा लागला आहे. या खटल्यात पुरावा वगैरे गोळा करण्याचा सर्व खटाटोप हिंदुस्थान सरकारच्या साह्याने झालेला आहे अितकें सांगितलें म्हणजे या प्रश्नात मुख्य हट्ट कोणता होता हें अुघड होणारें आहे. प्रथमत: बॅरिस्टरची परीक्षा पास झाल्यानंतर सनद मिळण्यासाठी दोघा बेंचरांची शिफारस जी लागत असते ती मिळविण्यासाठी जेव्हा दे. सावरकर हे काही गृहस्थांकडे गेले तेव्हाच त्यांच्यापैकी दोघांनी साफ कळविलें होतें की 'आम्ही हिंदी लोकांस शिफारस जी देतो ती यापुढे अिंडिया ऑफिसच्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्याशिवाय देणार नाही; तर मी तुमच्याबद्दल आज त्या अिंडिया ऑफिसकडे तपास करतो व अुद्या तुम्हांला नक्की काय तें कळवितो.' याच वेळेस

मराठा इंस्टि. ऑफ. हि. इतिहास
३-६०५२ वि: ५९१
क्रमांक ५५८ नों. दि: ३१.१.५

सर्व अिंग्लंडात हिंदी मनुष्यासंबंधी हिंदुस्थानाहून जास्त अुदारता दाखविली जाणें हें किती अयथार्थ व अनैसर्गिक आहे हें अुघड झालेलें होतें. तथापि ग्रेज अिन-मधल्या दोघा बेंचरांनी दे. सावरकरांची जेव्हा शिफारस केली तेव्हा मग त्यांच्या-वर अुघड आरोप करण्याशिवाय अन्य मार्ग राहिला नव्हता व म्हणून त्यांना त्यांचेवर असलेल्या आरोपांची नोटीस देण्यात आली. आरोप तर जितके भयंकर ठेवणें शक्य तितके ठेवले गेले. राजक्रांति करणें, हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्याची महती गाणें, रक्तपात व युद्ध यांचा अवलंब करण्यास अुत्तेजन देणें वगैरे कायद्यात सापडणारे सर्व भयंकर शब्द अेकत्र करून ते आरोप ठेवण्यात आले ! अितकेंच नव्हे तर निम्मा खटला होअून गेलेला असतानाही नवीन आरोप जोडण्यात येतच होते. सार्वजनिक कोर्टात अेक क्षणही जो पुरावा येअू शकला नसता तो सर्व या खाजगी चौकशीत गुपचूप रीतीने चालू देणें भाग पडलेलें होतें. पुराव्यासाठी दे. सावरकरां-वर आज दोन वर्षें ठेवलेल्या डिटेक्टिव्हांची साक्ष झाली. त्यांचे रिपोर्ट हजर करण्यात आले. हिंदुस्थान सरकारजवळ असलेली व नाशिकच्या खटल्यात दाखल झालेलीं दे. सावरकरांचीं सर्व पत्रें भाषांतर करून देण्यात आलीं व अशा रीतीने जितकें शक्य तितकें साहित्य अेकत्र करून हा खटला सजविण्यात आला व ही सर्व चौकशी अशा गृहस्थांकडे चाललेली होती की, हिंदुस्थान व त्याबद्दलचें राजकारण या विषयाबद्दल त्यांच्या ज्ञानाची अगाधता वर्णावी तितकी थोडीच ! अुदाहरणार्थ, दे. सावरकर यांच्या गुरु गोविंदसिंहाच्या सभेतील भाषणाबद्दल चर्चा चालली असता अेक जण विचारतात 'गुरु गोविंदसिंह कोण ?' 'हा शीख लोकांचा गुरु आहे' 'पण याचा तुम्ही अुत्सव काय म्हणून केला ?' 'हा हिंदुस्थानच्या थोर पुरुषां-पैकी अेक होता.' तेव्हा अुत्सुकतेने विचारण्यात आलें, 'Yes; but was he prosecuted for sedition ? त्याजवर राजद्रोहाचा खटला भरला गेला होता काय ? '

अशी ही चौकशी चालता चालता अखेर तिचा निकाल लागला. दे. सावर-कर यांची अुलट तपासणी तीन तास चालली व कसलेल्या बॅरिस्टरांनी त्यांची कसून अुलट तपासणी केल्यानंतरही जेव्हा काहीच तथ्य वाहेर येअीना तेव्हाच आरंभी केलेल्या अवडंबराचा नायनाट होणार असें दिसलें. अितक्यात त्याच आठवड्यात कॅक्स्टन हॉलमध्ये जो सभेचा प्रकार घडला तोही आरोप आणखी वदविला गेला ! परंतु टाअिम्स पत्रामध्ये दे. सावरकरांचें पत्र छापलें गेल्यापासून तो आरोपही पोकळ झाला. शेवटी असा निकाल लागला की दे. सावरकर यांज-वर कोणताही गुन्हा शाबीत झालेला नाही व म्हणून ते ग्रेज अिनचे कायमचे मेंबर आहेत. त्यांना मेंबरशिपचे सर्व अधिकार आहेतच; परंतु त्यांच्यावर संशय आलेला असल्यामुळे त्यांना आजच सनद देण्यात येत नाही.

अशा रीतीने दे. सावरकर यांना आज मज्जाव झालेला आहे. पुढे त्यांना सनद देण्यात येअील – जर मध्यंतरी त्यांचें वर्तन निरुपद्रवी राहील तर ! परंतु मला असें कळलेलें आहे की, दे. सावरकर हे ग्रेज अिनची मेंबरशिप सोडून देअून व पैसे परत घेअून आपण होअून या वकिलीच्या धंद्यास रामराम ठोकणार आहेत. आणि त्यांनी तसें कां करू नये ? लो. सुरेंद्रनाथ बानर्जी यांची सिव्हिल सर्व्हिसची नोकरी अेका खाजगी वादाकरता गेली व लो. अरविंद बाबू हे घोड्यावर चढता न आल्याने आपल्या सिव्हिल सर्व्हिसच्या धंद्याला मुकले. परंतु त्यांच्या या मुकण्यानेच देशसेवेला त्यांना तनमनधनाने वाहून घेता आलें. दे. सावरकर यांना तर वकिलीच्या धंद्याला सध्या तरी जें मुकावें लागत आहे तें खाजगी वादासाठी किंवा कोणत्याही शारीरिक कमतरतेसाठी नसून देशाच्या भक्तीसाठीच होय. व म्हणूनच त्यांच्यावर या क्षुद्र महत्त्वाकांक्षेला लाथाडून देशसेवेला सर्वस्वी वाहून घेण्याची जास्तच जबाबदारी आलेली आहे.

रत्न शाणोल्लीढ झाल्याने, चंद्रकला शेष झाल्याने, जलसंचय शारदक्षीणतेने व दाता विभवतेने जसे अधिकच शोभतात, तसेच देशभक्त त्यांच्यावर आलेल्या संकटपरंपरेने जास्तच विलसत असतात. राष्ट्राने जगावें म्हणून ते मरतात; राष्ट्र श्रीमंत असावें म्हणून ते दारिद्र्यात पडतात; राष्ट्राने पोटभर खावें म्हणून ते अुपास करतात, हें अुपास करण्याचें महद्भाग्य दे. सावरकरांचे घराकडे वळेवळेच येत असता ते त्याचा स्वीकार करतील अशी त्यांच्या देशबांधवांची अुत्कट आशा असल्यास त्यात काही नवल नाही. देशाला त्यांच्या बॅरिस्टरीपेक्षा त्यांच्या भिक्षावृत्तीचीच जास्त जरुरी आहे !

—ता. १३ ऑगस्ट १९०९

✦ ✦ ✦

४३. भयंकर नाटकाचा शेवटचा पडदा

लंडन, ता. ३० जुलै १९०९—सर कर्झन वायली व लालकाका यांच्या अमानुष खुनाचा आरोप ज्या तरुणावर ठेवलेला होता त्याची चौकशी पुरी होअून त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. ह्या कहाती तरुणाला तुरुंगात ठेवला असता त्याचेवर फार सूक्ष्म पहारा ठेवला होता. परंतु त्याचे वर्तनात कोणतेंही वेडेपणाचें वा मेंदू विघडल्याचें प्रत्यंतर देणारी गोष्ट घडली नाही. इतकेंच नव्हे, त्याला भेटावयास गेलेल्या त्याच्या काही ओळखीचे गृहस्थांबरोबर तो अत्यंत हसून

खेळून गप्पा करीत असे, त्याला भेटण्याला जाण्याची हिंदी गृहस्थांना प्रथम सक्त मनाई होती. परंतु मागाहून परवानगी देण्यात आली. आत जाणारांचा प्रथम सक्त झाडा घेण्यात येत असे. तुरुंगात डिंगरावरोवर हिंदी भाषेत न बोलण्याची ताकीद देण्यात येत असे व मग अिंग्रजी पहारेकऱ्यांचे अगदी सन्निध डिंगराबरोवर भाषणाची संधि देण्यात येत असे. डिंगराला हस्तस्पर्श करणें वा मिठाअी वगैरे कोणतेंही अन्न देणें हें जरी सक्त रीतीने बंद करण्यात आलें होतें तरी बाकी सर्व गोष्टी करण्यास मुभा होती. त्याप्रमाणें रोज अेक-दोन हिंदी गृहस्थ जाअून डिंगरांशी बोलत असत. १५ मिनिटांपेक्षा जास्त बोलण्याची मनाअी असे. डिंगराने त्याचा भाअू त्याला भेटावयास गेला असता त्याची भेट घेण्याचें मात्र साफ नाकारलें. दोनदा त्याने आपल्या भावाचें तोंडही न पाहता त्याला परत फिरविलें. याचें कारण असें आहे की कॅक्स्टन हॉलमध्ये भरलेल्या हिंदी लोकांच्या सभेत ह्या डिंगराच्या भावाने मिस्टर मॉरिसन यांच्या प्रेरणेने 'आपण त्या मनुष्याचा भाअू असल्यावद्दल आपणांस लज्जा व धिक्कार वाटत आहे' असें सार्वजनिक रीतीने म्हटलेलें होतें ! परंतु आता त्या भावाला आपल्या या कृत्या-वद्दल अत्यंत खेद वाटत असून तो मरणाचे आधी आपल्या भावाने आपणांस भेटावें म्हणून अश्रु गाळताना पुष्कळांनी त्याला पाहिलेलें आहे ! या अेका हिंदी गृहस्थाशिवाय बाकी जितके हिंदी गृहस्थ जात तितक्यांना तो भेटण्याचें नाकारीत नसे. परंतु कोणीही अिंग्लिश गृहस्थ गेला असता तो त्याला भेटण्याचें नाकारी. ज्या दिवशी फाशीची शिक्षा झाली त्या दिवशीचे आधल्या दिवशी डिंगराने त्याला भेटण्यास गेलेल्या त्याच्या पूर्व स्नेही सावरकरांना नम्र प्रणिपात करून आपले दोन तीन हेतु सिद्धीस नेण्याची विनंती केली होती. हे हेतु त्या तरुणाच्या विलक्षण व निधडचा मनाची थोडी तरी कल्पना देतात. त्याला हें पक्कें माहीत होतें — नव्हे, मॅजिस्ट्रेटचे कोर्टात त्याने होअून हट्ट धरला होता की, 'I do not plead for mercy; nor do I recognize your authority over me. All I wish is that you should at once give me the capital punishment. I want to be hanged, for then the vengeance of my contrymen will be all the more keen.' परंतु आपल्या क्रूर व निर्दय कृत्याचें प्रायश्चित्त आपल्या देहान्तातच आहे हें जाणत असतानाही तो म्हणाला की माझा पहिला हेतु हा आहे की माझ्या देहाची अुत्तरक्रिया हिंदु धर्माप्रमाणे झाली पाहिजे व माझ्या प्रेताला कोणाही अहिंदूचा व माझ्या भावाचा स्पर्श न व्हावा; माझी दुसरी अिच्छा ही आहे की माझ्या दहनकाली कोणा तरी ब्राह्मणाने मंत्राग्नि द्यावा; (डिंगरा जातीने क्षत्रिय आहे.) माझी तिसरी अिच्छा अशी आहे की माझ्या खोलीत काही कपडे व पुस्तकें आहेत, तीं लिलावाने विकून त्याचे पैसे येथील राष्ट्रीय फंडास देण्यात यावेत ! भयंकर वेडा हा मनुष्य ! विचाऱ्याचें सर्व जीविताचें बिऱ्हाड

अुचललें जात असता तो त्याची दादही घेत नाही. परंतु खोलीतील विन्हाडात फाटके कपडे व दहापांच पुस्तकें अनाठायी न जाता तीं राष्ट्रीय फंडास द्यावी म्हणून वारंवार बजावून सांगत आहे !! कोण अमानुष वेडेपणा हा !

ता. २० जुलै रोजी डिंगराला कोर्टात आणलें. कोर्टाबाहेर शंभरावर हिंदी विद्यार्थी व गृहस्थ आत घुसण्यासाठी अुभे होते. परंतु कोणाही हिंदी मनुष्याला आत जाण्याची मनाअी होती. डिंगराला कोर्टात आणलें तेव्हा अत्यंत निष्काळजीपणाने व धीट रीतीने तो अुभा होता. शेवटपर्यंत त्याचें वर्तन व चेहरा अुद्दामपणाचा व तिरस्कारदर्शक असून तो चाललेल्या प्रकाराकडे अत्यंत अुपहास-मुद्रेने व बेमुर्वतखोरपणाने (defiant attitude) पाहत होता असें सर्व अिंग्रजी पत्रें म्हणत आहेत. त्याने कोर्टास कळविलें की, मी तुमची सत्ता मान्य करीत नाही व ज्याअर्थी माझ्या देशाच्या अुद्धारार्थ मी हें कृत्य केलें आहे त्याअर्थी मी पूर्ण निर्दोषी (Not guilty) आहे. डिंगराने सॉलिसिटर वगैरे देण्याचें नाकारलेंच होतें व म्हणून त्याला तुझ्या समर्थनार्थ काही बोलावयाचें असल्यास बोल असें सांगितलें, तेव्हा तो म्हणाला की, माझ्या खिशात लिहून ठेवलेली माझी अेक जवानी तुम्ही घेतलेली आहे तीच वाचली जावी; परंतु वर्तमान पत्रकाच्या सूक्ष्म शोधाची वा डिंगराने वारंवार केलेल्या विनंतीची दाद लागू न देता डिंगराच्या खिशात व घरात सापडलेल्या या जवानीच्या प्रती प्रसिद्ध करण्याचें पोलिसने साफ नाकारलें. ही जवानी काय आहे व सरकार काय म्हणून ती लपवून ठेवीत आहे यावद्दल सर्वत्र चर्चा व तर्क चालू आहेत. परंतु ती जवानी वाचणें नाही असें समजल्यावरून निरुपायाने मॅजिस्ट्रेटपुढे दिलेली जवानीच वाचून दाखविण्यात आली. त्यांत डिंगरा म्हणाला: 'माझ्या देशात तरुण लोकांना देशभक्तीकरिता फाशी देण्यात येत आहे व जन्मठेपेच्या शिक्षा ठोठावण्यात येत आहेत. अिंग्लंडसाठी अिंग्लिशांनी जें करावें म्हणून शिकविण्यात येतें तेंच माझे तरुण देशबंधु माझ्या देशासाठी करीत असता त्यांच्या दुर्बलतेचा फायदा घेअून त्यांना मारण्यात येत आहे. याचा सूड म्हणून मी हें कृत्य केलें. हिंदुस्थानात जाणारा व तेथे दहा हजार रुपये मिळविणारा प्रत्येक अिंग्लिश मनुष्य माझ्या गरीब देशबांधवांतील एक हजार देशबांधवांचे खूनच करीत असतो. कारण तो चैनीत जे पैसे खातो त्यावर हे हजार लोक जिवंत राहू शकतात. ज्याप्रमाणे जर्मनीला अिंग्लंडवर ज्या बलात्काराने राज्य करण्याचा कोणताही हक्क नाही, त्या बलात्काराचा सूड म्हणून मी हें कृत्य केलें. माझ्या देशातील स्त्रियांवर बळजबरीचे अत्याचार होत आहेत. माझ्या देशातील लाखो लोक दरसाल अुपाशी मारण्यात येत आहेत. गेल्या पन्नास वर्षांत अब्जांनी गणती व्हावी अितकी संपत्ति माझ्या देशातून लांबविण्यात आली आहे व हें मी पहात असता जेव्हा अिंग्लिश लोक रशियाबद्दल व कांगो लोकांच्या दुःस्थितीबद्दल हळहळत असताना माझ्या नजरेस पडतात तेव्हा मला त्या

मानभावीपणाचा असहनीय तिरस्कार वाटतो व अशा स्थितीत अिंग्लंडला जिंकून त्यावर राज्य करणाऱ्या एखाद्या जर्मनाला अुद्दामपणाने लंडन शहरात वावरताना पाहून अिंग्लिश तरुणाने त्याला मारला असता त्याची जी देशभक्ति तुम्ही वाखाणली असती त्याच देशभक्तीने मी हें कृत्य केलें आहे. मी हें सत्य सर्व जगास विशेषतः अमेरिका व जर्मनी येथील आमच्या हितचिंतकांस सांगत असून तें तुम्हासाठी सांगत नाही!' वगैरे आशयाची जबानी झाल्यावर न्यायाधीशांनी काळी टोपी घातली व कोर्टाने डिंगरास पुन्हा विचारलें की, 'तुला फाशीची शिक्षा कां देण्यात येअू नये याबद्दल जर काही सांगणें असेल तर सांग.' तेव्हा तो म्हणाला 'मी अेकदा सांगितलेंच आहे की, तुमच्या कोर्टाची सत्ता मी मानीत नाही. तुम्हांला जें योग्य वाटेल तें तुम्ही माझें करा. मला त्याची पर्वा नाही. पण ही खात्री बाळगा की, अेक दिवस असा येणार आहे की त्या दिवशी आम्ही सबल व सत्ताधीश असू व तेव्हा जें आम्हांला वाटेल तें तुमचें आम्हीही करू!' या अुत्तरानंतर न्यायाधीशांनी म्हटलें, 'मदनलाल डिंगरा' माझ्या कोणत्याही बोलण्याचा तुझ्यावर यत्किंचित् परिणाम होणार नाही हें मी जाणून आहे. तुजवर खून केल्याचा आरोप शाबीत झालेला आहे व म्हणून तुला फाशीची शिक्षा देण्यात येत आहे. रीतीप्रमाणे धर्माधिकाऱ्याने 'परमेश्वर तुला क्षमा करो' म्हणून म्हटलें तोंच डिंगरा अुभा राहिलेला दिसला व म्हणाला 'मला फाशी दिलीत ही तुमची फार मेहेरबानी झाली; कारण माझ्या पवित्र देशभूमीसाठी माझा तुच्छ देह बळी देण्याचा सन्मान मला जो मिळाला त्याचा मला गर्व वाटत आहे. मला कशाचीही चिंता नाही.' त्वरित तीन पहारेकऱ्यांसह हसत हसत तो पिंजऱ्यातून चालता झाला.

अशा या भयंकर नाटकाचा हा शेवटचा पडदा उघडला व त्यानंतर हा भयानक देखावा दिसला. आता फक्त अेक प्रवेश अुरलेला आहे व तो संपताच ह्या नाटकाचें भरतवाक्य होअील अशी आशा आहे.

ह्या खटल्याचा निकाल होतो ना होतो तोंच दुसरा अेक निराळ्याच प्रकारचा खटला अुपस्थित झालेला आहे. दे. सावरकर यांनी कॅक्स्टन हॉल-मधील डिंगराविरुद्ध असलेल्या आगाखानाच्या ठरावाचा जो योग्य निषेध केला त्यानंतर त्यांनी टाअिम्समध्ये अेक पत्र लिहून आपण ठरावाला कां विरोध केला तें त्यांत स्पष्ट लिहिलेलें होतें. पत्र सावरकरांनी ज्या दिवशी लिहिलें त्या दिवशी रस्त्यांतील सर्व बाजूंना वर्तमानपत्रांच्या जाहीर पत्रकांवर 'सावरकरांचें समर्थन' वगैरे मोठमोठ्या शब्दांनी छापलेले मथळे दिसत होते. ह्या सर्व पत्रांनी तें पत्र प्रमुखत्वाने छापलें, अितकेंच नव्हे तर त्या विरुद्ध टाअिम्ससारख्यांनीसुद्धा ब्रही काढला नाही. अितकेंच नव्हे तर हेन्री काटन वगैरेंच्या सभेने नंतर जो ठराव पास केला तो फक्त सहानुभूतीचा करून त्यांत आरोप ठेवलेल्या तरुणाबद्दल चकार

शब्द काढलेला नव्हता. कारण तसें करणें ही कोर्टाची वेअदबी होती. ह्या प्रकारानंतर श्री. चट्टोपाध्याय यांनी टाअिम्सला अेकदोन खरमरीत पत्रें लिहून सावरकरांचें समर्थन केलें. अितकेंच नव्हे तर 'Had I been present there I would have done exactly the same and would have supported Mr. Savarkar even at the risk of being ejected.' असें स्पष्ट लिहिलेलें होतें. त्याच पत्रात त्यांनी सद्यःस्थितीसंबंधानेही खरमरीत टीका करून म्हटलें होतें की, असे भयंकर खून हे भयंकर परिस्थितीचे अपरिहार्य परिणाम असतात व ते परिहरण करण्याचा मार्ग म्हणजे हिंदुस्थानला स्वराज्याचे पूर्ण अधिकार असणें हाच होय. ह्या स्पष्टवक्तेपणाबद्दल श्री. चट्टोपाध्याय यांना मिडलटेंपलच्या बेंचर्सनी, नोटीस दिली आहे की, 'तुम्हांस ह्या अिनमधून मेंबरशिपचे हक्क काढून घेअून बाहेर कां घालविण्यात येअू नये?' काम चालू आहे व तें संपताच पुढे कळवीन.

—ता. २० ऑगस्ट १९०९

✦ ✧ ✦

४४. अिंग्रज येथून तेथून सारखेच !

लंडन, ता. ७ ऑगस्ट १९०९—या चारपांच दिवसांत हिंदुस्थानातून रूटरने बंगालमधील बायकॉटच्या वाढदिवसानिमित्त भरणाऱ्या सभेविरुद्ध अिंग्रजांकडून तारा धाडण्याचा सपाटा चालविलेला आहे. ती सभा हिंदुस्थान सरकारने बंद करावी म्हणून अिंग्लिश लोकांचा आग्रह व्हावा अेतदर्थ हा तारांचा मारा सुरू असावा व त्याप्रमाणे आजच्या प्रात्यहिक पत्रात ह्या सभेविरुद्ध कडक लेख आलेले आहेत. डेली टेलिग्राफ हें वजनदार पत्र आपल्या पत्राचे तीन रकाने भरून राहिलेल्या मुखलेखात म्हणतें की, ब्रिटिश व्यापाराची जर धडगत राखणें असेल तर हा बहिष्कार बंद केला पाहिजे व विशेषतः परवा कलकत्त्यास होणारी बहिष्कार-जयंती व मिरवणूक बंद झालीच पाहिजे. कारण की अरविंद नांवाच्या गुप्तकटाचा खटला झालेल्या (पण ते निर्दोषी म्हणून सुटले हें लेखकाने अजिबात वगळलेलें आहे.) गृहस्थाच्या बहिणीने केलेलें निशाण मिरवणुकीत लोक अुभारणार आहेत!

श्री. वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांजवरील खटल्याचा निकाल लागला. मिडल टेंपलचे बेंचर्सनी, त्यांच्या परीक्षा होअीपर्यंतही वाट न पाहता, त्या संस्थेतील सभासदपणाचे हक्क काढून घेअून त्यांना संस्थेतून काढून दिलें ! श्री. चट्टोपाध्याय

हे विद्वान् व प्रसिद्ध लेखक असून ते आज दहा वर्षें अिंग्लंडात पत्रलेखनाचा व्यवसाय करीत होते. त्यांचे वडील हे हैद्राबाद व बंगाल या प्रांतांत नांवाजलेले गृहस्थ आहेत. दे. सावरकरांप्रमाणे अुघडपणे समर्थन करण्यासाठी यांनी टाअिम्सला पत्रें धाडलीं होतीं व त्यात ' 'I do not believe in the old-world idea of 'peaceful revolution' of Bipin Chandra Pal' वगरे मजकूर प्रसिद्ध केलेला होता. दे. सावरकरांना फक्त सनद देण्याचें नाकारलें असून त्यांचें संस्थेचें सभासदपण व अधिकार कायमच टेवलेले आहेत. परंतु दे. चट्टोपाध्याय यांजवर तीही मेहेरबानी झालेली नाही. दे. सावरकरांची चौकशी चालली तेव्हा भोळे लोक म्हणत की फक्त ग्रेज अिन वाअीट आहे. आता मिडल टेंपलने तीवरही ताण केली ! ज्यांस काही स्वाभिमान व प्रतिष्ठितता आहे त्यांनी पुन्हा अिंग्लंडात कायद्याच्या अभ्यासाला न शिवणेंच बरें. अिंग्रज येथून तेथून अेकच. मग ते हिंदुस्थानात असोत कीं अिंग्लंडात असोत; ग्रेज अिनचे मेंबर्स असोत वा मिडल-टेंपलचे बेंचर्स असोत ! अितके जरी हिंदी तरुण शिकले तरी दे. सावरकर व चट्टोपाध्याय यांचे छळाचा उपयोग झाला असें मानण्यास हरकत होणार नाही ! मृत्यूची शिक्षा झालेला मदनलाल डिंगरा ह्याचा कॉलेजातील अभ्यासक्रम फारच अुत्तम होता व तो परीक्षेत पहिला आलेला होता. तीन वर्षांचा अभ्यासक्रम संपवून शेवटची परीक्षाही त्याने अुत्कृष्ट रीतीने दिलेली होती व महिन्या दोन महिन्यांत तो हिंदुस्थानातही परत जाता ! त्याची फाशी रद्द व्हावी म्हणून स्टेडसाहेब फार खटपट करीत आहेत. त्यांचे मते त्याला जन्मठेप व्हावी. परंतु डिंगरा फाशी जाण्याविषयीच अधिक अुत्सुक आहे! आपलें प्रेत दहन करण्यात यावें अशी त्याची अिच्छा असल्याने व ही धार्मिक बाबत असल्याने येथे हिंदु लोकांनी सह्या केलेला अेक अर्जही सरकारकडे धाडण्यात येत आहे की, डिंगराचा मृत देह हिंदूचे स्वाधीन करण्यात यावा. या अर्जावर सह्या भरपूर होत आहेत. त्याचप्रमाणे डिंगराने मला ब्राह्मणांनी अुपदेश द्यावा म्हणून अिच्छा केलेली असून तें धर्मकृत्य करण्यासाठी पदवीधर व धर्मज्ञ ब्राह्मणांनीही आपण तयार असल्याचें सरकारास कळविलें आहे.

—ता. २७ अॉगस्ट १९०९

✦ ✦ ✦

४५. भरतवाक्य

लंडन, ता. २१ ऑगस्ट—लंडनमध्ये सुरू झालेल्या महाभयंकर नाटकाचा शेवटचा पडदा पडून भरतवाक्यालाही सुरवात झालेली आहे ! ज्या तरुणाने सर कर्झन वायली या इंडिया ऑफिसच्या व इंडियन सरकारच्या मुख्य अधिकाऱ्याचा निर्दय व क्रूर वध केला त्या डिंगराला गेल्या मंगळवारी फाशी दिली गेली ! त्याला फाशीची माफी होऊन जन्मठेप मिळावी अशी काही इंग्रज लोकांनी खटपट चालविली होती; परंतु ती गोष्ट सरकारास रुचली नाही. इतकेंच नव्हे तर सरकारपेक्षा मि. डिंगरालाच जास्त रुचली नाही ! तो सारखा हट्टच धरून बसला की, मला फाशी झालीच पाहिजे. कारण 'So that the vengeance of my countrymen will be all the more keen !' अुभय पक्षांनाही फाशी रुचली होती. डिंगरा तुरुंगात गेल्यापासून त्याचेकडे भेटण्यास त्याचे पुष्कळ इंडियन स्नेही जात असता त्यांच्याशी तो अत्यंत हसून खेळून गप्पा करी, तुरुंगात तो पुस्तक वाची व लेख लिही. त्याला मरणानंतर जाळावें म्हणून त्याने फार प्रयत्न केलेले होते. त्याचप्रमाणे येथील लोकांनी देखील सह्या करून अर्ज केला की, डिंगरा हा हिंदु असल्याने व त्याची हिंदुधर्माप्रमाणे अुत्तरक्रिया व्हावी अशी फार इच्छा असल्यामुळे त्याचें प्रेत जाळण्यात यावें. परंतु सरकारने त्या अर्जाची काही अेक दाद न घेता त्याला जाळण्याचें साफ नाकारण्यात आलें. मेल्यानंतरही डिंगराच्या प्रेताला ही और्ध्वदेहिक शिक्षा दिली नसती तर काही वावगें झालें असतें असें नाही.

मंगळवारी सकाळी डिंगरा गाढ झोपेतून जागा झाला. त्याने अुत्तम प्रकारे पोशाक केला. सकाळचा फराळही थोडासा केला. सुमारे ९ वाजता ठरलेली घंटा वाजू लागली. त्या दिवशी आत कोणालाच, वर्तमानपत्राच्या वार्तमीदारांनाही येअू दिलें जाणार नाही असें आधीच सक्त हुकमाने प्रसिद्ध झालें असल्याने नुसती दरवाज्याबाहेर गर्दी होती. आज्ञा नसताही आत जाण्यासाठी धडपड करीत हिंदी लोक तुरुंगाभोवती घिरट्या घालीत फिरत होते. अिंग्रजही दोनतीनशे जवळजवळ अुभे होते. परंतु आत कोणालाही जाता आलें नाही. घंटा वाजू लागताच डिंगराकडे ख्रिस्ती धर्माचे धर्माधिकारी आले; परंतु त्यांचा अुपदेश आपल्याला नको, आपण हिंदु आहोत व हिंदुधर्माप्रमाणेच आपण मरणार असा त्याने हट्ट धरला. नंतर अनावृत मस्तकाने व दृढ पदन्यासाने तो वधस्तंभाकडे चालला. वधस्तंभावर चढला तेव्हा तो अितका बेफिकीर होता की त्याला कोणत्याही प्रकारचा हात देणें जरूर पडलें नाही. वधपाशात मान गुंतली. ठोकळा अुडाला व मदनलाल डिंगरा आठ फूट उंचीवरून मृत्यूचे जबडयात कोसळला. थोडया वेळाने प्रेताची रीतसर चौकशी चालताना दे. मास्तर या पारशी गृहस्थांना आत आणविलें गेलें. ते डिंगराचे व सावरकरांचे अेक स्नेही होते. त्यांचे समक्ष डिंगराचे प्रेताची चौकशी

झाली. त्या वेळेस डिंगराच्या प्रेताचें दर्शन भयप्रदच होणारें होतें! त्याचे चेहऱ्यावर दुःखाची वा भयाची छटा नव्हती. त्याचें अंग ताठ झालेलें होतें. त्याचे डोळे वटारलेले होते. अंगात नेहमी जो पोशाख घालून तो कॉलेजात जाअी तोच पोशाख चढलेला व त्याची मान कंठमणी फुटल्यामुळे लुळी पडलेली!

डिंगराचा मृत्यु तत्काळ झालेला होता. अेका मिनिटात सर्व निकाल लागला. अेका मिनिटात शेवटचा पडदा पडला !

परंतु या अपूर्व नाटकाचें शेवटचें भरतवाक्य तो पडदा पडण्यापूर्वी सुरू झालेलें होतें. डिंगराची केस चालली असताना त्याने अेक स्वसंरक्षणार्थ लिहिलेला जवाव त्याचे खिशात सापडलेला होता. तो जवाव कोर्टात वाचावा असा त्याचा अत्यंत हट्ट असताही व तो जवाव आपणांस मिळावा म्हणून सर्व पत्रकर्त्यांचा आटोकाट प्रयत्न चालला असताही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व पोलिसांनी तो लेख प्रसिद्ध करण्याचें साफ नाकारून आतल्या आत दडपून टाकलेला होता. ही गोष्ट सर्वत्र वर्तमानपत्रातून प्रसिद्ध आहे. ह्या दस्तअैवजाची प्रसिद्धि पूर्ण अशक्य होती. परंतु डिंगरा फाशी जाण्याचे आधीच अेक दिवस सर्व लंडन शहर अेखाद्या भूतबाधेसारखें दचकून वेडावलें. झालें तरी काय ? तर ह्या ब्रिटिशांच्या व पोलिसांच्या तिजोरीत दाबून टाकलेल्या अेकुलत्या अेक दस्तअैवजाची चोरी होअून कोण्या अेका हिंदूने तो छापून प्रसिद्ध केला. त्याच्या हजारो प्रति रस्त्यात हातोहात वाटल्या जाअू लागल्या! पोलिसांना तर तोंड बाहेर काढवेना. त्यांची तिजोरीतील प्रत तशीच त्यांचेपाशी, मग ही दुसरी प्रत कशी पैदा झाली ? अनेक शंका ! ब्रिटिश तुरुंगातील कोणी गोरा अधिकारी तर हिंदी लोकांना फितूर नाही ? कोणी म्हणे डिंगराचें कृत्य हें अेका गुप्त कटाचेंच अंगभूत असलें पाहिजे, त्याशिवाय ही त्याची जवानी दुसऱ्यास कशी माहिती असणार ? कोणी म्हणाले, कट आधी नसावा, पण तुरुंगात असताना त्याचे कपड्याची ने आण होत असताना ही प्रत बाहेर छपवून धाडली असावी ! अेकच गोंधळ चाललेला आहे. ती प्रत अस्सल आहे यात शंका नाही. कारण डेली मिरर म्हणतें की, "त्यात चक्क असें लिहिलेलें आहे की, 'ही प्रत डिंगराचे लेखाची हुवेहूव नक्कल आहे असें आम्ही प्रतिपादन करतो. जर ब्रिटिश सरकार तसें नाही असें म्हणत असेल तर त्यांना We challenge them to prove otherwise before the whole world' सर्व जगासमोर आव्हान करतो की, तसें त्यांनी मूळ नक्कल प्रसिद्ध करून सिद्ध करावें !" पोलिसही कबूल करतात की ही अस्सल प्रत आहे. ती निदान वर्तमानपत्रात तरी प्रसिद्ध होअू नये म्हणून सर्वांनी खटपट केली. पण तसें करणें निष्फळ होअून शेवटी खुद्द सरकारी प्रमुख पत्र डेली न्यूज ह्यानेच ती सर्व लेखी जबानी छापून काढली. टाअिम्स, स्टॅंडर्ड वगैरे पत्रें चिडून जाअून लेख लिहीत आहेत व गुप्त कटाबद्दल हिंदी लोकांना, ढिलेपणाबद्दल व गयाळवृत्तीबद्दल पोलिसांना व मूर्खपणाबद्दल 'डेली न्यूज' ला शिव्या हसडीत आहेत !

परंतु डेली न्यूजने तें वक्तव्य छापलें नाही. त्याने ही challenge (आव्हान) प्रसिद्ध केली नाही. तोंच अमेरिकेतून चवताळलेल्या अिंग्रजांच्या तारा आल्या की डिंगरा ज्या दिवशी फाशी गेला त्याच दिवशी अमेरिकन पत्रांनी हेंच हस्तपत्रक मोठमोठ्या टाअिपांत छापलेलें होतें ! ' ब्रिटिश सरकारला ठकविलें ! डिंगराची दाबून टाकलेली जवानी ! अद्भुत चमत्कार ! ' वगैरे विलक्षण मथळ्याखाली हें ' आव्हान' छापून अमेरिकन पत्रें विसावा घेतात न घेतात तोंच आयर्लंड दत्त म्हणून पुढे आलें ! फार काय, पण कालच चहूकडे तारा प्रसिद्ध झाल्या आहेत की ' Ireland honours Dingra ! Huge placards with deep black borders and with the inscription ' Ireland honours Madanlal Dhingra who was proud to lay down his life for the sake of his Country ' in letters twelve inches in length were found posted today on walls within few miles of Dublin ! अेकेक फूट जाडीच्या अक्षरांचीं जाहीरपत्रकें भितीवर डकवलेलीं की ' आयर्लंड डिंगराचा सन्मान करतें आहे ! '

सावरकरांचे स्नेही दे. मास्तर या पारशी गृहस्थाची डेली मिररच्या वातमीदाराने भेट घेतली तेव्हा त्याने विचारलें – ' Will he be considered as a martyr by the Indians ? दे. मास्तर म्हणाले की, certainly. He has laid down his life for his contry's good. Whether his idea of this ' good' was right or wrong is a matter of opinion. '

अेका अिटालियन वर्तमानपत्राने अेक चित्र दिलेलें आहे. त्यात अेक मोठा कडा काढलेला असून पायापाशी हिंदुस्थान, त्यावर अिजिप्त, सोमालीलॅंड वगैरे विटा, त्यावर वसाहती व त्यावर अिंग्लंड वसलेलें आहे; अितक्यात स्फोट होतो व ' हिंदु नॅशनॅलिस्ट ' वार अुडवितो. हिंदुस्थानला खिंडार पडतें व सर्व कडा डळमळू लागून घावरलेला जॉनवुल म्हणतो ' अरे हा वाडा ढासळला ! ह्याचा पायाच पोखरला गेला ! माझे अंगास कोण कापरें भरलें आहे ! '

जर्मनी व फ्रान्स या देशांतील पत्रांत तर हिंदुस्थानच्या चळवळीची हकीकत देअून अिंग्लंडविरुद्ध फार कडक लेख येत आहेत. हा सर्व मत्सराचा परिणाम असावा, झालें !

– ता. १० सप्टेंबर १९०९

✦ ✦ ✦

४६. दे. सावरकरांचें पत्र

लंडन:—इ. स. १८५७ सालच्या युद्धप्रसंगाचा लिहिलेला एक इतिहास कस्टम खात्याच्या नियमाप्रमाणे हिंदुस्थानात आणणें मना करण्याविषयी हिंदुस्थान सरकारने सोडलेला व अिंग्लंड व हिंदुस्थान यांतील बऱ्याच पत्रांत प्रसिद्ध केलेला एक हुकूम माझे नजरेस नुकताच आणण्यात आलेला आहे. त्या हुकमात माझे नांवाचा उल्लेख असल्याने मला त्यासंबंधी हें पत्र लिहावें लागत आहे.

हें पुस्तक अजून अप्रकाशित आहे हें सरकारासही कबूल आहे व म्हणूनच जें पुस्तक कोणत्या स्वरूपाचें आहे हें निश्चयात्मकतेने कोणासच ठरविणें अशक्य होणारें आहे, अशा अेखाद्या पुस्तकाला तें जन्म पावण्याचे आधीच राजद्रोही ठरवून तत्प्रसिद्धीची बंदी करणें हें कायदेशीर असेल वा नसेल—तरी हें न्याय्य नाहीच नाही. परंतु हें पत्र त्या मुद्द्याबद्दल नव्हे. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलने मला न कळविता वा यासंबंधी माझें म्हणणें अैकण्याची तसदी मुळीच न घेता त्या हुकमात माझें नांव वेधडक घुसवून देण्याचा जो अश्लाघ्य प्रकार केलेला आहे त्याबद्दल हें पत्र मी लिहीत आहे. सरकारला मिळालेली माहिती विश्वसनीय होती वा नव्हती; जर ती माहिती विश्वसनीय होती तर मजविरुद्ध आणलेल्या या आरोपांची मला सूचना देअून माझें म्हणणें अैकण्यात सरकारच्या सरळतेला वा माहितीच्या विश्वसनीयतेला काही कमीपणा आला असता असें नाही. आणि जर ती माहिती विश्वसनीय व पुरेशी नव्हती तर तिच्यावर अंधळा विश्वास ठेवून माझें नांव त्या पुस्तकाशी जोडण्याचे आधी मला त्याबद्दल स्वसमर्थन करण्यास सांगणें हें सरकारचें कायदेशीर व नैतिक कर्तव्यच होतें, परंतु घाअीने मजवर अचानक हल्ला करण्यातच सरकारला समाधान वाटलेलें दिसतें.

अेतदर्थ अशा स्थितीत मला जें करणें शक्य आहे व अिष्ट आहे तें अितकेंच की, सरकारच्या हुकमात केलेल्या अस्पष्ट अुल्लेखावरून त्यांच्या कल्पनेसमोर असलेल्या त्या अज्ञात पुस्तकाचे स्वरूपाचा जो काही थोडाबहुत बोध होण्यासारखा आहे तशा स्वरूपाच्या कोणत्याही पुस्तकाशी माझे नांवाचा अर्थाअर्थी काही अेक संबंध नाही हें सार्वजनिक रीत्या प्रसिद्ध करणें होय. व म्हणूनच मी हें पत्र आपणांस लिहिलें आहे. आपण व आपले व्यवसायबंधु हें पत्र छापतील अशी आशा करणारा,

वि. दा. सावरकर

—ता. १७ सप्टेंबर १९०९

✦ ✦ ✦

४७. विजयादशमीचा अुत्सव

लंडन, ५ नोव्हेंबर – हिंदुस्थानात ख्रिस्तमस साजरा करण्याची पद्धति जसजशी कमी होत व लज्जास्पद वाटत चालली तसतशी लंडनमध्ये विजयादशमीचे समारंभ करण्याची पद्धत माननीयतेची व वाढत्या जोराची होत चालली. थोड्या वर्षांपूर्वी विशेषत: बंगाल व मद्रासकडे ख्रिस्तमस हिंदुसणापेक्षा जास्त मानला जाअून 'सुशिक्षित' लोकांना ख्रिस्तमसचीं कार्डें शेकड्यांनी वाटलीं जात. जरी 'अशिक्षित' हिंदु समाज या अुपऱ्या सणाचा विटाळ न होअू देता अिमानीपणाने आपल्या वाड-वडिलांच्या अुत्सवांतच अुत्साह मानीत होता तरी अिंग्लंडमध्ये विजयादशमीच्या नांवावर राहो पण आम्ही हिंदु आहो म्हणून सांगणें ही शरमेची व फाजील धर्म-भोळेपणाची व रानटी आडदांडपणाची गोष्ट समजली जाअी ! तीन वर्षेंही झालीं नाहीत; अेके दिवशी अेका खानावळीत आम्ही जेवावयाला वसलों. आमचे शेजारी दुसरा अेक आमचा हिंदु स्नेही बसला होता. आम्ही येण्याचे सुमारे दोन वर्षें आधी हे गृहस्थ अिंग्लंडात आलेले असल्याने अिंग्लंडच्या चालीरितीविषयी केव्हा केव्हा साहजिकपणेच आम्हांस माहिती सांगत. टेबलावर दुसरे बाजूस दोन अिंग्रज स्त्रिया त्याच खाणावळीत राहणाऱ्या व म्हणून जरा ओळखीच्या बसलेल्या होत्या. गोष्टी-वरून गोष्ट निघता रविवारी चर्चमध्ये जाण्याचे प्रश्न चालले व माझे स्नेही म्हणाले 'होय, मीही रविवारी चर्चमध्ये जातो. प्रत्येक ख्रिश्चनने गेलेंच पाहिजे.' आम्हांला आमच्या या हिंदु स्नेह्याच्या अुत्तराचें मोठें गूढ पडलें. अितक्यात त्या अिंग्रजी स्त्रियांनी आम्हांलाही चर्चमध्ये जाण्याबद्दल विचारलें तेव्हा आम्ही म्हणालों, 'कधी कधी आम्ही पाहण्यासाठी जातो. बाकी आम्ही हिंदु लोक रविवारी चर्चमध्ये जाण्याची जरुरी मुळीच मानीत नाही.' 'तर आपण हिंदु आहा काय ?' मोठ्या दयार्द्र मुद्रेने ह्या स्त्रिया म्हणाल्या. स्वाभिमानस्वराने आम्ही अुत्तर दिलें, की, 'आम्हांस फार मोठी धन्यता वाटत आहे की आम्ही हिंदु आहो.' जेवणानंतर आमचा स्नेही म्हणाला, 'कशाला तुम्ही सांगितलेंत आपण हिंदु आहात ? हें जरा अिंग्रजांच्या कानाला ठीक लागत नाही.' आम्ही अुत्तर केलें, 'त्यांच्या कानाला तुमच्या वडिलांचेंही नांव ठीक लागत नाही मग तें तुम्ही फिरवाल काय ? कानाला वाअीट लागतें म्हणून जर धर्म छपविणें शिष्टसंमत आहे तर मग अिंग्रजच आम्ही हिंदु आहोत असें कां सांगत नाहीत ? त्यांचें ख्रिश्चन असणें हें आमचे कानाला वाअीट लागतें हें त्यांनाच आपण जाअून कळवा.'

ही तीन वर्षांच्या पूर्वीची स्थिति पालटली आणि आता हिंदुस्थानात ख्रिस्तमसचीं कार्डें वाटणें व अिंग्लंडात हिंदुस्थानची लज्जा वाटणें बंद पडलें व त्या जागी खुद्द लंडन शहरात विजयादशमीचे अुत्सव मोठ्या समारंभाने गाजू लागले

मी हिंदु आहे हें सांगण्यास तरुणांना कोण अभिमान वाटू लागला आहे! आज आमचा हिंदूंचा सण आहे. याची त्यांना कोण धन्यता वाटत आहे! श्रीरामाचे नांवाचा जयजयकार लंडनमध्ये कोण गजराने होत आहे! असें स्थित्यंतर तीन वर्षांत झालें!

विजयादशमीचे दिवशी सर्व हिंदी लोकांची अेक मेजवानी क्वीन्स्‌रोड हॉल-मध्ये झाली. 'श्रीरामो विजयते' या मथळ्याच्या सुवर्णपत्रिका सर्व लंडनमधील हिंदी गृहस्थांस वाटल्या होत्या. मेजवानीच्या पत्रिकेची वर्गणी तीन रुपये होती. तरी शंभरावर हिंदी समाज हॉलमध्ये जमलेला होता. त्यात मोठमोठे व्यापारी, प्रोफेसर, डॉक्टर, विद्यार्थी असून देशभक्त मोहनलाल गांधी हे अध्यक्ष होते. हिंदी स्त्रियाही हजर होत्या. हा निव्वळ भारतीय अुत्सव असल्याने हिंदी मनुष्याविरहित दुसरा मनुष्य कोणी येअू दिला गेला नाही. हॉलमध्ये मेजवानीच्या सुंदर पंक्ति, धूपाचा धार्मिक दरवळ, मध्यभागी लावलेलें भव्य राष्ट्रीय निशाण व त्यावरील अेकेक फूट जाडीची 'वंदे मातरम्' हीं अक्षरें व राष्ट्रीय गीताचे स्वर यांनी फार शोभा आलेली होती. हिंदु रीतीप्रमाणे समारंभ सुरू होअून दे. गांधींचें कळकळीचें भाषण झालें ते म्हणाले 'आजच्या प्रसंगी पानें वाढणें, पाणी घालणें, सैंपाक करणें वगैरे सर्व कामें प्रोफेसर, डॉक्टर वगैरे दर्जाच्या स्वयंसेवकांनी केलेलीं पाहून मला आमच्या लोकांत वाढत चाललेल्या लोकसेवातत्परतेची आणखी अेक प्रचितीच मिळाली. अशा प्रसंगी मला व आपणांला अेकत्र होअून भेटी घेता येतात ही किती आनंदाची गोष्ट आहे. लंडनमध्ये असला समारंभ होत असेल हें मला आतापर्यंत खरें वाटलें नसतें. हा समारंभ हिंदु असताही येथे माझे मुसलमान, पारशी वगैरे देशबंधु प्रेमाने येतात हेंही ध्यानात घेण्यासारखें आहे. श्रीरामाचे सद्‌गुण जर आपल्या राष्ट्रात पुन्हा अुतरतील तर आपल्या अुन्नतीला वेळ लागणार नाही. नंतर हिंदुस्थानच्या नांवाचा जयघोष होअून मातृभूला पुष्पांजलि अर्पण करण्यासाठी दे. गांधींनी त्यांच्याबरोबर आलेले साअुथ आफ्रिकेतील प्रसिद्ध देशभक्त प्रतिनिधि अल्ली अझीझ यांना सांगितलें. ही मातृभूला अर्पण होणारी पुष्पांजली देताना या मुसलमान देशभक्तांनी दोन मिनिटेंच चटकदार भाषण केलें व म्हटले की हिंदु व मुसलमान यांची जी भूमि ती हिंदुस्थानची भूमि त्वरित अुन्नत व समर्थ होवो. त्यांना अंतःकरणपूर्वक दुजोरा देण्यास दे. वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय अुठले तेव्हा लोकांनी त्यांचा सत्कार केला. त्यांचें भाषण तीन चार मिनिटें होअून मग मातृभूला सर्वांनी पुष्पांजलि अर्पण केली. अध्यक्ष दे. गांधी यांनी नंतर श्रीरामचंद्रास पुष्पांजलि अर्पण करावी म्हणून दे. सावरकर यांस सांगितलें व म्हणाले की, काही मतभिन्नता असली तरी मला दे. सावरकरांसन्निध बसण्याची संधि मिळाली याबद्दल अभिमान वाटत आहे. त्यांच्या स्वार्थत्यागाची व देशभक्तीचीं मधुर फळें आपल्या देशाला चिरकाल लाभोत. अध्यक्षांनी सांगितल्याप्रमाणे श्रीरामचद्रांचे चरणांवर पुष्पांजलि

अर्पण करण्यास अुठताना दे. सावरकर म्हणाले, 'मी भाषण करण्यास अुठताना आपण सारखा पांच मिनिटेंपर्यंत जो हा गजर करण्याची तसदी घेतलीत त्याबद्दल मी आपले फार आभार मानतो. कर्तव्य हें स्वत:च सुखदायी आहे. परंतु ज्यांच्यासाठी तें केलें जातें त्यांच्याकडून तें जेव्हा वाखाणलें जातें तेव्हा जास्तच सुखदायी होणारें आहे. आज मला आपले आभार आणखी अेका गोष्टीबद्दल मानणें आहे. ती गोष्ट ही की, मला आपण प्रस्तुतच्या कोणत्याही विषयावर बोलणें भाग न पाडता श्रीरामाच्या काळाबद्दल बोलण्याची सेवा सांगितलीत. प्रस्तुत स्थितीबद्दल काय बोलणार? प्लेग व दुष्काळ व शृंखला ! त्यापेक्षा अेक तासभरच का होअीना पण भारतभूमीच्या वैभवकालात संचरणें हें किती तरी महत् भाग्य आहे ! जेव्हा कालिदास कविता करीत, गौतम अुपदेश देत, विक्रम सिथियनांना व चंद्रगुप्त ग्रीक लोकांना जिंकीत, राम राज्य करीत व वाल्मीकि वीरकाव्य गात, त्या काळात मला आपण जाण्याची परवानगी दिलीत हे आपले आज मजवर दुसरे अुपकार आहेत !' नंतर रामायणातील निरनिराळे भाग वाल्मीकीचे सरस वाणीने वाचून व विवर्णून दे. सावरकर म्हणाले: 'जेव्हा श्रीराम आपले पित्याचे वचनासाठी वरवर, परंतु रक्ष:क्षयासाठी मुख्यत: राज्य सोडून वनवासात शिरले तेव्हा त्यांचें तें कृत्य महत् होतें. जेव्हा श्रीरामचंद्रांनी लंकेवर चाल केली व अपरिहार्य व धर्म्य युद्धाला सज्ज होअून रावणाला ठार मारलें तेव्हा तें कृत्य महत्तर होतें. परंतु जेव्हा शुद्धीनंतरही सीतेला अुपवनात 'आराधनाय लोकस्य मुञ्चतो नास्ति मे व्यथा' म्हणून सोडून दिली तेव्हा त्यांचें तें अवतारकृत्य महत्तम होतें ! ! ! रामाचे व्यक्तिविषयक वा कुलविषयक कर्तव्य त्यांनी त्यांच्या लोकनायकाच्या राजाच्या कर्तव्यासाठी बळी दिलें ! रामाचें अवतारकृत्य व श्रीरामचंद्राची मूर्ति जोपर्यंत तुम्ही दृढतेने हृदयात धराल तोपर्यंत, हिंदूंनो, तुमची अवनति सहज नष्ट होण्याची आशा आहे. तो दशरथाचा पुत्र, तो लक्ष्मणाचा भाअू, तो मारुतीचा स्वामी, तो सीतेचा पति, तो रावणाचा निहन्ता श्रीराम जोपर्यंत हिंदुस्थानात आहे तोपर्यंत हिंदुस्थानची अुन्नति सहजलब्ध राहणारी आहे. श्रीरामाचा विसर पडला की हिंदुस्थानातला राम नाहीसा झाला. हिंदु हिंदुस्थानचें हृदय आहे. तथापि अिंद्रधनुष्यांत जसें खरें सौंदर्य रंगांच्या अनेकतेने न बिघडता तें अधिकच खुलतें, तसेंच मुसलमान, पारशी, यहुदी वगैरे जगातील सर्व सुधारणेचे अुत्तमांश मिसळून घेअून हिंदुस्थानही कालाच्या आकाशात अधिकच खुलेल.' वगैरे आशयाचें सुमारे पाअूणतास भाषण झाल्यावर श्रीरामचंद्रांस पुष्पांजलि अर्पण केली गेली. नंतर सभाध्यक्ष गांधींनी सावरकरांचें भाषण सर्वांनी अक्षरश: लक्षात घ्यावें व त्यांतील शेवटच्या अुद्दीपक भागातील स्वार्थत्यागाच्या विनंतीची सर्वांनी पूर्णता करावी असें सांगितलें व नंतर राष्ट्रगीतें होअून समारंभ पार पडला. – २६ नोव्हेंबर १९०९

✦ ✦ ✦

४८. श्रद्धानंदांची हत्या आणि गांधींचा नि:पक्षपाती पक्षपात !

'केला यांहींच नृपा, धृतराष्ट्राच्या न घात लेकांनीं'

-- मोरोपंती भारत

स्वामी श्रद्धानंदांच्या क्रूर हत्येविषयी सर्व देशांतून दु:खाचा आक्रोश ऐकू यावा, हें साहजिकच होतें. बहुतेक नगरांतून, वृत्तपत्रांतून आणि प्रमुख हिंदी गृहस्थांकडून त्या वीर पुरुषाच्या ह्या अधम हत्येविषयी आणि तीमुळे अुपस्थित झालेल्या जातीय वैषम्याच्या प्रश्नाविषयी काही ना काही तरी सार्वजनिक अभिप्राय प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. ही हत्या करण्यात आपला काय हेतु होता, हें त्या हत्यारी मनुष्याने स्पष्ट सांगूनच टाकिलें होतें. अिस्लामाचा अध:पात आणि दुर्दशा टाळण्यासाठी आणि मलकाना रजपुतांचे शुद्धीकरणाविषयी सूड अुगविण्यासाठी मी श्रद्धानंदांस मारिलें म्हणून त्याने स्पष्टपणें कथन केलेलें आहे. त्यामुळे या हत्येचा दोष तरी कोणच्याही प्रकारे हिंदु लोकांवर टाकण्यास मुसलमानांतील पुढारीही सहसा धजले नाहीत.

परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, अशा प्रसंगीही हिंदु जातीवर दोषाचें खापर फोडणारा आणि या हत्येचें अुत्तरदायित्व मुसलमानांच्या वरोबरीनेच हिंदूंवरही लादणारा असा मुसलमानांत जरी कोणी प्रमुख मनुष्य निघाला नाही, तरी आपणांस हिंदु म्हणविणारांतच तसा अेक हिंदु निघाला. हें हिंदु जातीच्या आत्मघातकी वृत्तीस साजेसेंच आहे. हा हिंदु दुसरा कोणी नसून, अनेक वेळा अनुदारपणासच अुदारपणा म्हणून समजण्याच्या हिमालयाअेवढ्या घोडचुका— नव्हे पहाड चुका ज्यांच्या हातून घडलेल्या आहेत ते गांधीच होत !

आपल्या 'यंग अिंडिया'त ते श्रद्धानंदांच्याविषयी लिहिलेल्या लेखात म्हणतात, 'मी अबदुल रशीद—श्रद्धानंदांची हत्या करणारा मुसलमान याच्या पक्षाने बोलू अिच्छितो. या हत्येचा दोष आपला आहे. वर्तमान पत्रकार हा अेक चालता प्लेग झालेला आहे. तो असत्याचा आणि निंदेचा सारखा प्रसार करीत असतो. अबदुल रशीदला झालेल्या धर्मोन्मादाचें अुत्तरदायित्व, आम्हा शिक्षित, अर्धशिक्षित लोकांवर आहे. हिंदु आणि मुसलमान या दोन पक्षांत हा दोष कोणाचे माथी मारता येतो, याची चर्चा अनवश्यक आहे. कारण जेथे दोघेही अपराधी आहेत, तेथे कोण किती दोषाचा वाटेकरी आहे हें निश्चितपणे सोनेरी काट्याने तोलण्याचें काम कोणास साध्य होणारें आहे ?'

त्यांच्या या अेकंदर लेखात जीं विचित्र आणि विक्षिप्त विधानें केलेलीं आहेत, त्यांत वरील विधान अत्यंत भ्याड, अन्याय्य आणि पक्षपाताचें आहे. हिंदु आणि मुसलमान हे अुभयही दोषी आहेत, म्हणून शांतपणें सांगणें हें क्वचित्

त्यांच्या स्वत:च्या माहात्म्यास धक्का लावणारें नसेल, पण राष्ट्रहितास आणि विशेषत: ज्या सत्याच्या समर्थनाचें स्तोम गांधीजींच्या लेखांतून आणि भाषणांतून वेळी अवेळी माजविण्यात येत असतें, त्या सत्यासही वट्टा लावणारें आहे, यांत काहीअेक शंका नाही.

हिंदु मुसलमानांतील द्वेषाग्नि भडकविण्यास दोघेही सारखेच कारणीभूत झालेले आहेत हें सिद्ध करण्यास गांधीजींनी अेकतरी आधार दिला आहे काय ? हिंदी पत्रांतूनही किंवा प्रचारकांकडूनही क्वचित् प्रसंगी अन्याय्य किंवा अुत्क्षोभक टीका झालेली असेल, अमें आपण गृहीत धरू; परंतु त्यामुळे अितकेंच फार तर म्हणता येअील की हिंदूंचाही थोडा दोष आहे. परंतु हिंदु आणि मुसलमान ह्या दोघांचाही दोष समसमान आहे म्हणून म्हणणें हें 'रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति' असें म्हणून रामाकडून आणि रावणाकडून – दोघांकडूनही – मान्यतेची दक्षिणा अुपटू पाहणाऱ्या ढोंगी भट्टाचार्यांहून अधिक प्रामाणिकपणाचें आहे असें आम्हांस वाटत नाही. कारण हें विधान प्रचलित सार्वजनिक अुलाढालीशी अनभिज्ञ असणाऱ्या कोणा मूर्ख मनुष्याने केलेलें नाही, तर ज्या वर्तमानपत्रकर्त्यांच्या वर्गाला, 'चालता प्लेग' म्हणून गौरविण्यास गांधीजी धजले आहेत, त्याच वर्तमान-पत्रकारांचा धंदा आज वर्षों न् वर्षें करणाऱ्या आणि सार्वजनिक घटना पूर्णपणे अवगत असणाऱ्या मनुष्याने तें विधान केलेलें आहे.

अितर पुराव्यावरून वर्तमान पत्रकार हा असत्याचा आणि दुष्ट निंदेचा प्रचार करणारा चालता प्लेग आहे हें ठरत असो वा नसो, पण निदान महात्माजींनी आपल्या 'हिंदु आणि मुसलमान या हत्येच्या अपराधात समान वाटेकरी आहेत' या असत्य आणि दुष्ट विधानाचा प्रसार करून आपलें 'वर्तमानपत्रकार चालता प्लेग आहे' हें दुसरें विधान 'यंग अिंडिया' पुरतें तरी सिद्ध केलेलें आहे यात शंका नाही.

मलबारच्या वंडात शेकडो हिंदूंस बलात्काराने वाटवून, शेकडो देवालयें धुळीस मिळवून शेकडो हिंदूंस ते स्वधर्म सोडीनात म्हणून ठार मारून जें 'खिलाफती राज्य' केलें होतें तें हिंदूंनी कीं मुसलमानांनी ? 'यंग अिंडियात' अेक का दोन अुदाहरणेंच बलात्काराच्या धर्मप्रसाराचीं मुसलमानांच्या हातून घडलीं असावींत अशी शंका आहे म्हणून गांधीजींनी ज्या अेका मुसलमानाची साक्ष मोठ्या तोऱ्याने ग्रथित केलेली होती, त्या मुसलमानास आणि त्याच्या त्या महात्म्या गुरूस सोडून अुभ्या हिंदुस्थानात असा मनुष्य विरळाच की, जो मलबारमधील हे अत्याचार झालेच नाहीत असें आता म्हणू शकेल ! त्या अेका मुसलमानाची साक्ष गांधीजींनी अुल्लेखिली – पण ह्याच स्वामी श्रद्धानंदांनी, डॉ. मुंज्यांनी, श्री. देवधरांनी न्यायालयांतून चाललेल्या शेकडो मोपल्यांवरील खटल्यांतील न्यायाधीशांनी, अनपराध हिंदूंवर धर्मप्रसाराच्या निमित्ताने मोपल्यांनी राक्षसी अत्याचार केले हें

साधार सिद्ध करून दिलेलें होतें कीं नाही ? मग त्या अेका मुसलमानाची अत्यंत वेधडक असत्याची साक्ष ज्या 'यंग अिंडियात' अेक विचारणीय आधार म्हणून प्रसिद्ध केली, त्याच 'यंग अिंडियात' वरील सन्मान्य आणि शेकडो लोकांची साक्ष कां अुल्लेखिली गेली नाही ? खरोखर वर्तमानपत्रकार–निदान या विधानापुरता 'यंग अिंडिया'चा लेखक तरी–असत्याचा प्रसार करणारा चालता बोलता प्लेग आहे यांत शंका नाही !

अेक स्वामी श्रद्धानंद परवा दिल्लीस मारला गेला. तो प्रख्यात होता म्हणून त्याचा इतका बोभाटा झाला. परंतु हिंदु धर्म आम्ही सोडणार नाही म्हणून म्हणण्यासाठी असे कित्येक अप्रख्यात श्रद्धानंद मलबारमध्ये याहूनही क्रूरपणाने मारले गेलेले आहेत. ज्या महात्म्याने श्रद्धानंदास मारणाऱ्या हत्याऱ्याच्या दोषाचें खापर हिंदुमुसलमानांवर समसमान फोडिलें आहे, त्यानेच मलबारातील त्या शेकडो दीन, दरिद्री, अप्रख्यात हिंदुधर्मवीरांच्या प्राणघाताचें खापर देखील असेंच दोघांवरही फोडण्याचा घाट घातला होता, हेंही ध्यानात धरण्यासारखें आहे. ज्याला अबदुल रशीदचा पक्ष घेअून तो अज्ञानी होता म्हणून खरा दोषी दुसराच आहे, असें सांगण्याचें धाष्टर्य करवलें, त्यानेच त्या मलबारांतील शेकडो अबदुल रशिदांनाही 'माझे शूर मोपला बंधु' म्हणून संबोधून अज्ञानाच्या ढालेखाली त्यांचेही अपराध असेच दुसऱ्याच्या माथी लादण्याचा प्रयत्न केला होता.

मलबारनंतर गुलबर्गा, गुलबर्ग्यानंतर कोहाट, कोहाटनंतर दिल्ली, दिल्लीनंतर पानपत, कलकत्ता, पटना, अबधा पूर्वबंगाल फार काय ह्या गेल्या वर्षांतील तीनशे पासष्ट दिवसांत तीनशे पासष्ट लहान मोठे दंगे आणि मारामाऱ्या आणि अत्याचार जे झाले, ज्यांत शेकडो लोकांचे बळी पडले त्या दंग्यांतून किती दंगे हिंदूंनी आरंभिले होते, किती ठिकाणी पहिला वार हिंदूंनी केला होता, किती हिंदु भ्रष्ट केले गेले आणि किती मुसलमान भ्रष्ट केले गेले, हें गांधीजी स्पष्टपणें सांगू शकतील काय ? ह्या अुभ्या चार पांच वर्षांत किती हिंदु कुमारिका आणि अर्भक मुलें सिंध, पंजाब, बंगाल अित्यादि प्रांतांत बलात्काराने पळविण्यात आलीं ? आणि अुलटपक्षी किती मुसलमानी स्त्रिया वा मुलें हिंदूंनी बलात्काराने पळविलीं ?

स्वामी श्रद्धानंद हा अेकटाच पुढारी हिंदु संघटनाचें कार्यी बळी पडलेला नाही. यापूर्वीच अजमीरकडे मलकाना रजपुतांचे शुद्धीप्रीत्यर्थ हिंदु पुढाऱ्यांची आणि शुद्धीकृत हिंदूंची लागोपाठ हत्या करण्याचा कट अुघडकीस आला होता. जानराव पाटील यांची वऱ्हाडमध्ये हिंदूंचा पुढारी म्हणूनच हत्या करण्यात आली होती आणि बिहारमध्येही अेक हिंदु पुढारी, हिंदु संघटनाचे चळवळीसाठीच मारले गेले होते. पंडित लेखराम यांच्या शुद्धीकरणाविषयी झालेल्या हत्येची गोष्ट तर जुनी म्हणून सोडूनच देअू. पण मुसलमानांकरवी हिंदूंच्या पुढाऱ्यांच्या ऱ्या हत्या चालल्या असता आणि पंडित मदनमोहन आणि लालाजी यांच्याही

हत्या करण्याचा बेत होता हें अुघड झालें असता, आम्ही असें विचारतो की, कोणत्या हिंदूंने कोणत्या मुसलमानी पुढाऱ्यावर हत्येसाठी आक्रमण केलें ? अुलट त्यांच्या पुढाऱ्यांस, ते अिस्लामचे खिलापतीसाठी कारागृहात गेले म्हणून हिंदूंनी आपल्या खिशातले लाखो रुपये अुधळून आणि त्यांच्या मिरवणुकी काढून त्यांचे देव्हारे माजविले नाहीत का ? तरीही हिंदु मुसलमानांअितकेच ह्या हत्येच्या दोषाचे वाटेकरी होतात ! ! !

स्वजनांच्या अपराधावर पांघरूण घालणें हा प्राकृतांचा पक्षपात दोषार्ह आहे; परंतु स्वजनांवर राक्षसी अत्याचार होत असता केवळ 'येन केन प्रकारेण' आपलें माहात्म्य प्रदर्शित करण्यासाठी परकीयांच्या अपराधाचें खापर स्वजनांवरच फोडू पहाणें हा माहात्म्यांचा पक्षपात त्याहून शतपट दोषार्ह आहे. हें केवळ कातरपण आहे. भ्याडपण न म्हणता आम्ही मूर्खपणा म्हटला असता. परंतु ज्या व्यक्तीने हीं विधानें केलीं, त्या व्यक्तीस ह्या दोनचार वर्षांतील घटना पूर्णपणे अवगत आहेत. आम्ही वर विचारलेल्या प्रश्नास अुत्तर देणें त्यांस सर्वथा अशक्य आहे आणि म्हणूनच मुसलमानांचीच आगळीक हिंदूंच्या आगळिकीहून शतपटीने अधिक हें ढळढळीत दिसत असताही हिंदूंस मुसलमानांअितकेच दोषी लेखण्याचा जो प्रयत्न करण्यात येतो, तो त्या कारणांसाठीच मूर्खपणाचें द्योतक म्हणता येत नसून कातरपणाचेंच किंवा ढोंगीपणाचेंच द्योतक आहे असें म्हणणें भाग पडत आहे. हा दुरात्म्याचा पक्षपात आहे. महात्म्याचा निःपक्षपात नव्हे !

तें तसें नसेल तर हिंदूंस ह्या हत्येच्या किंवा जातिवैमनस्याच्या दोषाविषयी मुसलमानांअितकेंच दोषी कोणत्या पुराव्यावरून ते ठरवू शकतात हें गांधीजींनी अवश्य प्रसिद्ध करावें. ते स्वतःस अजून हिंदु म्हणवितात. आम्ही त्यांस आव्हान करितो की सर्व हिंदूंच्या आणि म्हणूनच आमच्या प्रत्येकाच्या बोडक्यावर हा जो भयंकर आरोप आपण लादू धजलात, त्याची अेकतर सिद्धता करा; नाहीतर आपल्या ह्या स्वपक्षघाती पक्षपाताची प्रकटपणे क्षमा मागा.

मुसलमानांनी मशिदीसमोर तर काय, पण घराघरातून टाळ, घंटा, शंख, वाजवू नयेत म्हणून मारामाऱ्या कराव्या, आपण हिंदु लोकांस छळाने वा बळाने बाटविण्याचा संघटित प्रयत्न सदासर्वदा चालविला असता हिंदूनी मन वळवून देखील शुद्धीकरण करू नये म्हणून हट्ट धरावा, मलबार, कोहाट सारख्या ठिकाणी हिंदूंचीं नगरेंच्या नगरें जाळपोळ आणि कत्तली करून उद्ध्वस्त करून टाकावीं आणि हिंदूंच्या श्रद्धानंद, लालाजी, पंडितजीसारख्या महनीय पुढाऱ्यांच्या हत्या कराव्या आणि हत्या करण्याचे कट करावे – अितकी त्यांची राक्षसी अरेरावी जी माजली आहे तिचा दोष गांधीजी, हिंदूंमध्ये आंशिकतः जर कोणावर पडतच असेल, तर खिलाफतीची आफत हिंदूंच्या खांद्यावर बळे बळे लादणाऱ्या आणि तें विषाचें बेडें पीक या देशात मुक्त हस्ताने पेरीत सुटणाऱ्या तुमच्या स्वतःच्या राजकारण-

दिङ्मूढ, परंतु अत्यंत अहंमन्य मस्तकावरच होय ! तो दोष हिंदु समाजावर पडत नाही. जर थोडासा दोष त्या समाजावर पडत असेल तर तो अितकाच की, अन्यायास आणि न्यायास, क्रौर्यास आणि कारुण्यास, छळकास आणि छळितास, पीडकास आणि पीडितास, रामास आणि रावणास, समान दोषी ठरविणें आणि सारख्याच दयेस आणि अुत्तेजनास पात्र समजणें, म्हणजेच नि:पक्षपातीपणा होय अशी भ्रामक समजूत करून घेणाऱ्या तुमच्यासारख्या 'महात्म्यास' तो हिंदुसमाज वारंवार जन्म देतो !

अिथेच काय आणि हिंदूविरुद्धच काय, पण मुसलमानांचीं धर्मक्षेत्रें भ्रष्ट करणारे वाहबी, कादियानीस दगडांनी मारणें हें धर्म्य समजणारे अफगाण व संगसारीही धार्मिक कर्तव्य आहे म्हणून घोषित करणाऱ्या मुसलमानी परिषदांपासून तो अबदुल रशीदला 'गाझी' म्हणून त्याचीं चित्रें विकणाऱ्या आणि घेणाऱ्या दिल्लीतील कागदविक्या मुसलमानी गटारगुंडांपर्यंत, धर्मोन्मादी हत्यांस धार्मिक कर्तव्य समजणारे शेकडो हजारो मुसलमान, मुसलमानी समाजात प्रमुख अप्रमुखपणे वावरत असता, 'अबदुल रशीदचें कृत्य व्यक्तीचें आहे—समाजावरच त्याचा दोष लादू नका' म्हणून शांतपणे सांगणारें माहात्म्यच हिंदूंच्या ह्या दुर्दशेचें आणि छळाचें अेक प्रमुख कारण होय.

रोगाची चिकित्सा चुकली तर औषधोपचारही विपरीत होतो; हिंदु-मुसलमानांतील वैमनस्याच्या भयंकर रोगापासून जर आपणां सर्वांस मुक्त होणें असेल, तर स्पष्टपणे आपण त्या रोगाची खरी चिकित्सा केली पाहिजे. ती चिकित्सा हेंच सांगते की, मुसलमानी समाजातील धर्मोन्मादाची प्रवृत्ति हेंच या रोगाचें मूळ कारण आहे आणि त्या प्रवृत्तीचें आविष्करण करण्यास भयाने किंवा भावडेपणाने किंवा मूर्खपणाने, स्वत:चें महत्त्व मुसलमानांत अधिक वाढावें अशा अक्षम्य अिच्छेने, हिंदुसमाज आणि मुसलमानी समाज सारखाच दोषी आहे म्हणून म्हणणारा हा नि:पक्षपाती पक्षपात हाच खरा राष्ट्रविघातक 'चालता प्लेग' आहे.

गांधींस प्रामाणिकपणें हिंदुसमाज—थोड्या अंशांनी नव्हे—तर सर्वथा मुसलमानी समाजाअितकाच या हत्येच्या प्रकरणी दोषी वाटत असेल, तर त्यांनी कारणें प्रसिद्ध करावीं. हिंदुसमाजाहून मुसलमानी समाजावर ह्या जातिवैमनस्याचा दोष अितक्या मोठ्या प्रमाणाने पडत आहे, की सूक्ष्मबुद्धीचा सोनेरी काटा जरी साबरमतीस मिळत नसला तरी तेथील स्थूल बुद्धीच्या गंजलेल्या लोखंडी काट्याने देखील मुसलमानी दोषांचें पारडें झटकन् भुअीस लागावें अितके या प्रकरणीं त्यांचे तामसी दोष भारी आहेत. हिंदुसमाजाचें वर्तन सापेक्षत: अितकें सात्त्विक आहे—आणि हिंदूंचा खरा दोष जर कोणचा असेल तर हाच असात्त्विक सात्त्विकपणा होय !

—श्रद्धानंद, ता. १० जानेवारी १९२७.

✦ ✦ ✦

गरमागरम चिवडा

(१)

महंमद अल्ली नि हसन निजामी यांची लाथाळी

महंमद अल्ली आणि हसन निजामी यांची प्रेक्षणीय लाथाळी दिवसेंदिवस खूपच रंगात येत चालली आहे. परवाच्या डावात तर महंमद अल्लींची लाथ अगदी अचूक निजामींच्या नाकाच्या अगदी वोंडीवर जाऊन बसली ! हुतात्मा श्रद्धानंदांच्या हत्येने चिडून काही क्रुद्ध हिंदु हसन निजामी यांची खोड मोडणार आहेत, असा धाक पडून हसन निजामी आजकाल शक्यतोवर आपल्या घराचे किल्ल्यात वसूनच मुसलमानांची जी काय उन्नति करिता येईल ती करीत आहेत, ही गोष्ट दिल्लीच्या बाजारात बहुतेकांच्या कानावर आलेलीच होती. पण अल्लींनी ती उभ्या हिंदुस्थानच्या कानावर घालण्यासाठी परवा निजामीवर प्रकटपणे उपाधिवर्षाव केला ! त्यात त्यांनी खालील पदव्या निजामीसाहेबास अर्पण केल्या. " सरकारी हेर ! निजामांचे अन्न खाऊन त्यांच्याच विरुद्ध, सरकारकडे चुगल्या करणारा, निमक हराम ! श्रद्धानंदांच्या हत्येनंतर भयभीत होऊन घरात दडून बसलेला भ्याड !!! "

या पदवीदानाचा स्वीकार केल्यानंतर अल्लीहून तरी आपण काही अधिक भ्याड नाही हें सिद्ध करण्यासाठी, महंमद अल्ली जसे अवदुल रशीदला बंदिगृहात जाऊन भेटून आले तसे निजामीही घरावाहेर पडून बंदिगृहाकडे भेटावयास गेले, पण अर्थात्च दहा पांच शरीररक्षकांच्या मंडलात आपला बिनमोल देह स्थापन करून !

✦ ✦ ✦

श्रद्धानंदांची हत्त्या हें एका व्यक्तीचें कृत्य आहे; अशा प्रवृत्तीविषयी मुसलमान समाजासच दोप देऊ नका, ही महात्मा गांधींची दिव्यवाणी किती अर्थपूर्ण होती हें प्रथम कोणाकोणास कळलें नव्हतें. ते म्हणाले, 'मुसलमानांची मनोवृत्ति ओळखण्याइतके गांधीजी चाणाक्ष नाहीत.' पण आता ती त्यांची चूक होती आणि गांधीजींच्या दिव्य दृष्टीस दिसलें तेंच सत्य होतें, हें प्रत्यही घडणाऱ्या मुसलमानी घटनांवरून सिद्ध होत आहे ! उदाहरणार्थ खालील घटना पाहून जाफरअल्ली म्हणाले, 'गाझी रशीदची तलवार मी चुंबिली असती ! – जर आज मुसलमानी

'गरमागरम चिवडा' या मथळ्याखाली स्वा. वीर सावरकरांनी चालू राजकारणावर लिहिलेले उपहासगर्भ लेख 'श्रद्धानंद' या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेले आहेत.

राज्य असतें !' कलकत्त्याच्या नगरसंस्थेत (म्युनिसिपालिटीत) श्रद्धानंदांच्या मृत्यूविषयी खेद व्यक्त करणाऱ्या ठरावास मुसलमानांनी एकजात अडथळा केला. मिरतच्या मशिदीतून मुसलमानांनी ती हत्येची वातमी ऐकताच दीपोत्सव केला. गोरखपूरला मुसलमानांनी मिठाई वाटली. दिल्लीच्या जुम्मामशिदीत हाजी महंमद अल्लींनी गाझी रशीदला या खटल्यातून निर्दोष होऊन सुटता यावें म्हणून सार्वजनिक प्रार्थना केल्या. पेशावरपासून तो महाराष्ट्रातील लहानसहान जिल्ह्यांच्या गावापर्यंत मुसलमानांतून रशीदचा खटला लढविण्यासाठी निधि जमविण्यात आला. कोठेही महत्त्वाच्या अशा मुसलमानांच्या सभा श्रद्धानदांच्या हत्येविषयी खेद प्रदर्शित करण्यास झाल्या नाहीत. अनेक ठिकाणी हरताळाचे दिवशी मुसलमानांनी आपलीं दुकानें बंद ठेवण्याचें नाकारिलें. मुसलमानांच्या कित्येक प्रमुख पत्रांतून श्रद्धानंदांच्या हत्येविषयी टर उडविणारे उद्‌गार काढण्यात आले. एकाने लिहिलें की, वहुधा श्रद्धानंदजींच्या सेवकाने (ज्याने त्यांचा प्राण वाचविण्याचे कार्यी स्वत:ही घायाळ करून घेतलें त्याने) वहुधा त्यांची हत्या केली असावी आणि मग रशीदला निष्कारण पकडलें असावें. दुसऱ्याने लिहिलें, अजी जनाव ऐसा नहीं !' एवीतेवी श्र ानंद रोगाने मरणारच आहेत असें पाहून त्या रोगाच्या अत्यवस्थ स्थितीत हिंदूनी विचार केला की, यांना गोळी घालून मारून हुतात्माच कां न करा ! मुसलमानांवर आग पाखडण्यास ही उत्तम संधि आहे !' आणि हिंदूंनी असा विचार करून श्रद्धानंदास स्वत:च गोळी घालून मारिलें ! जाफरअल्लीने लिहिलें,' श्रद्धानंद गायीच्या जन्मास आले देखील आणि कोण्या मुसलमानी कसायाच्या खुटयाशी वांधले देखील गेले असतील !'–आता या कसायाच्या खुंटयाची शपथ आहे, सांगा की श्रद्धानंदास मारणाऱ्या प्रवृत्तीचा सर्व दोष अेका अेकुलत्या व्यक्तीवरच असून त्याविषयी मुसलमान समाजातील मोठ्या भागाला दोषी धरू नका, हें आपल्या या गांधीजींचें मत किती न्यायसंगत आणि सत्य होतें तें ! अगदी चटकन् सत्य तें त्यांच्या दिव्य दृष्टीस दिसून आलें ! अेका क्षणाचाही विचार करावा लागला नाही ! महात्माच तो ! खरा खरा अंतर्ज्ञानी !!!

अशा अंतर्ज्ञानी आणि दिव्यदृष्टि पुढाऱ्याचे हाती राष्ट्राचीं सूत्रें सोपवून त्यास ' सर्वाधिकार ' (डिक्टेटर) नेमलें म्हणूनच तर लोकमान्यांचे मृत्यूनंतर एका चार वर्षांत हिंदुस्थानात राजकारण आणि धर्मकारण इतकें रंगारूपास आलें ! जिकडे पहावें तिकडे अेकीच अेकी, अुन्नतिच अुन्नति, जागृतिच जागृति, तेजच तेज!

केवळ हें हिंदुसंघटन तेवढें, काय मुर्दाडपणा करीत असेल तें असेल! जर का हें संघटनही मध्ये आलें नसतें तर या ' सर्वाधिकाऱ्याच्या अंतर्ज्ञानाने' प्रेरित झालेल्या या तेजाने आज हिंदुस्थान, निदान हिंदुजाति, स्वत: अुभीची अुभी जळू लागली असती जळू !

✦ ✦ ✦

मागे अेकदा महंमद अल्ली म्हणाले, ' अिव्न साअुदच्या विरुद्ध जीं गाऱ्हाणीं आहेत, तीं खरीं ठरलीं तर मी स्वत: जाअून अिव्न साअुदच्या विरुद्ध लढत मरेन! अल्ली तिकडे गेले, गाऱ्हाणीं खरीं ठरलीं. अिव्न साअुदविरुद्ध लढाअी सुरू झाली पण अल्ली जिवंतचे जिवंत परत आले. त्यांच्यावर दारूगोळा व्यय करण्याअितका रिकामटेकडा शिपाअी अिव्न साअुदच्या सैन्यात कोणीदेखील भेटला नाही. त्यांच्यावर त्यांना मारून टाकण्याचा देखील कोणी अुपकार करीना ! खरोखरच अिव्न साअुदचे लोक मोठे दुष्ट आहेत !

पुढे श्रद्धानंदजींच्या मृत्यूनंतर महंमद अल्ली म्हणाले,' आता ह्या पापाचें प्रायश्चित्त माझें स्वत:चें रक्त सांडून होत असेल तर मी तें आनंदाने करीन.' पण अिव्न साअुदसारख्या दुष्टांची गोष्ट तर दूरच; पण दानशूर म्हणून गाजलेल्या हिंदु लोकांतही कोणी अेवढा अुपकार श्रद्धानंदांचे नांवाने देखील अल्लींवर करीना. तेव्हा अल्लींच्या पदरी तेंही पुण्य पडलें नाही !

म्हणून आता चीनच्या विरुद्ध सैन्य धाडण्याचा निषेध करण्यास्तव भरलेल्या अेका सभेत महंमदअल्लींनी सगळ्या जगाला पुन: अेकदा स्वत: मरण्याचा धाक घातला होता ! चीनला जर सैन्य धाडाल तर ज्या आगगाडीने तें जाअील तिच्या रुळावर मी पडेन आणि माझ्या छातीवरून ती आगगाडी जाअीतो अुठणार नाही म्हणून ते गर्जले. रीतीप्रमाणे टाळ्या पडल्या आणि महंमद अल्ली आता मात्र वाचत नाहीत अशी आम्हांस धास्ती पडली. कारण चीनला सैन्य हें जाणारच ! महंमद-अल्ली मरणार, आता जगाचें कसें होअील म्हणून अुद्विग्न असता अेकाच पत्रात दोन्ही बातम्या वाचल्या ! चीनला सैन्य गेलें आणि महंमद अल्लीने जुम्मा मशिदीत हिंदु लोकांस आणि हसन निजामीस शिव्यांची लाखोली वाहिलेलें भाषण केलें ! महंमद अल्लींची मरणाची गाडी तिसऱ्यांदा हुकली ! पण हें झालें कसें हें काही कळेना !

क्वचित् असें झालें असेल की, चीनचें सैन्य आगगाडीत बसून निघतांना हा सत्यप्रतिज्ञ महावीर महंमद अल्ली आगगाडीच्या रुळावर पडण्यास गेला असेल. पण रुळावर न पडता घाअीघाअीत रुळांचे मधोमध पडल्याने रुळावरून गाडी निघून गेली तरी त्याचा प्राण काही गेला नाही. मरावें कसें याची देखील माहिती असावी लागते ! आता हा तिसरा योग तर गेला. आता पाहू. मरणाचा चौथा डोहळा महमदअल्लीस कोणच्या प्रकारचा होतो तो. भीति अेवढीच की, लांडगा आला, लांडगा आला ! असें गमतीने म्हणता म्हणता लांडगा खरोखरीच अेखादे वेळी आला नाही म्हणजे झालें ?

✦ ✦ ✦

अनुक्रमांक ३८५४ विषय निबंध
दिनांक ...२३/१/५५

पत्वाखाली सत्याग्रहाला आठ महिने झाले

पंडित मोतीलाल नेहरू व डॉ. किश्चलु आदि कित्येक निस्सीम देशभक्त पुढाऱ्यांनी पुनः वकिली सुरू करण्याचें ठरविलें आहे. ठीकच आहे. वकिली सोडून जो देशोद्धार व्हावयाचा तो झालाच आहे. अेका वर्षांत स्वराज्य मिळून पुनः निघून देखील गेलें ! तेव्हा आता ज्यांनी त्यांनी आपापले पोटापाण्याचे अुद्योग पहावे हें साहजिकच आहे. वकिली वाअीट म्हणून आपण वकिली थोडीच सोडली होती. लोक तिला वाअीट म्हणत आणि लोकांवाचून पुढारी कोणाचें व्हावयाचें तें कळेना म्हणून वकिली सोडली होती. आता लोक तसें फारसें म्हणत नाहीत आणि वकिली आणि पुढारीपण हे दोन्हीही तीर आपल्या मोठेपणाच्या भात्यात राहू शकतात. तेव्हा आता वकिली सुरू करण्यास काय प्रत्यवाय आहे ?

—श्रद्धानंद, ता. ३ मार्च १९२७

✦ ✦ ✦

अनुक्रमांक ३८५४ विषय निबंध
दिनांक ...२३/१/५५
(२)

पत्वाखाली सत्याग्रहाला आठ महिने झाले

पत्वाखालीचा सत्याग्रह आतापर्यंत अगदी नियमाने चालत आलेला आहे. मध्यंतरी सत्याग्रह करण्यासाठी आपले गुरखे बंधुही गेल्याची वार्ता 'श्रद्धानंदा'त आपण सर्वांनी वाचलीच आहे. शेवटी नमःशूद्र म्हणजे (नामशूद्रांनीही) बंगाल-मधील आजपर्यंत अस्पृश्यांतील अस्पृश्य गणल्या गेलेल्या आपल्या हिंदु बंधूनीही या सत्याग्रहास त्यांच्या जातीचे ५ स्वयंसैनिक पाठवून हिंदु जातीच्या झगडचात आपली स्वतःची वर्गणी सादर केली. श्रीहरीच्या ध्वजाखाली हिंदुधर्माचे रक्षणार्थ रण-क्षेत्रात स्पृश्यांवरोबर जे खांद्यास खांदा लावून झुंजले, त्यांची अस्पृश्यता भस्म झालेली आहे. आता 'तुम्ही आम्ही सकल हिंदु, बंधु बंधु !'

हा पत्वाखालीचा सत्याग्रह आरंभ होअून आता आठ महिने होत आले. प्रत्यही दहापांच हिंदु स्वयंसैनिकांसह भजनाची मिरवणूक निघते. मशिदीपर्यंत पोंचेतों हरिनामाचे गजराने त्या गावचें वातावरण दुमदुमवून देते आणि अंती सशस्त्र शिपाअी येअून त्यास धरीपर्यंत स्वयंसैनिक वाद्यें वाजवीत आणि हरिनामाचा घोष करीत मशिदीपुढील राजमार्गाने पुढे घुसतात. लगेच दुसरे दिवशी पुनः दुसरे भजनवीर हाच क्रम पुढे चालवितात. शेकडो तुरुंगांत गेले, अन्नत्याग झाले. मुसल-मानी गुंडांचे दंगे झाले, डोकीं फुटलीं, जादा पोलिस बसले, त्यांच्या करासाठी लिलाव पुकारले, गव्हर्नर फणफणले, मुसलमान जळफळले; पण हिंदूंचें हरिकीर्तन आणि सत्याग्रह जशाचा तसा चालू आहे !

मुसलमानांनी नसता दुराग्रह धरिला नसता तर ज्या मशिदीवरून हिंदूंच्या वाद्यांची मिरवणूक वर्षातूनही अेखादे वेळी क्वचितच जाती, त्याच मशिदीवरून तोच दुराग्रह मुसलमानांनी धरताच, हिंदूंच्या सत्याग्रहाचीं वाद्यें आठ महिने सारखी झडत आहेत. भजनाचे जयघोप सारखे अुठत आहेत, मिरवणुकी त्या मार्गावरून सारख्या वाजत गाजत जात आहेत ! याला म्हणतात चिकाटी ! ! !

अशी चिकाटी थोडी फार तरी या हिंदूंत आहे म्हणूनच तर तो 'या धका-धकीच्या मामल्यांत हजारो वर्षें 'जीता रहा है' ! आणखी हजारो वर्षें 'जीता रहनेवाला है ! ' हें आमच्या 'रहिम चाचांनी ' पक्कें समजून असावें.

रहिमचाचा आजपर्यंत बंगालमध्ये मुसलमान गुंड जेव्हा जेव्हा हिंदु कुमारिकांस घरातून बलात्काराने धरून किंवा मार्गाने चोरून पळवून नेत म्हणून बातम्या अैकत तेव्हा चकार शब्दही काढीत नसत आणि कदाचित् त्यांच्या 'मी बंगाल दुसरा पंजाब करीन ' ह्या आसुरी प्रतिज्ञेप्रमाणे हळुहळू बंगालमध्ये दृश्य दिसू लागलें याने मनात फिदी फिदी हसतही असतील. याच आठवड्यात बैत्कल ठाण्याच्या अनार्गत कपूरकठीच्या अेका अलकमयी नांवाच्या विवाहित हिंदु ललनेस मुसलमान गुंडांनी तिच्या बापाच्या घरावर छापा घालून बलात्काराने मार्च ११ तारखेस रात्री पळ-वून नेलें म्हणून 'स्वतंत्र ' दैनिकांत २८ व्या मार्चची बारिसालची तार आहे. पोलिसला बातमी दिली. पण अजून मुलीचा मुळीच पत्ता नाही ! काय, रहिमचाचा खुदकन् हंसलेतसे ?

पण रहिमचाचा, थोडे थांबा. ही पहा दुसरी अेक तार आली आहे ! तेव-ढीही वाचून टाकू आणि मग अेकदमच हंसू या ! जिल्हा सिल्हट कसवा अिच्छामती येथे फयाज अल्ली नांवाचा अेक मुसलमानी गुंड हिंदु स्त्रियांचा येता जाता अुपमर्द करावयास सवकला होता. तो अेका हिंदु स्त्रीचे घरातही अशा नेह-मीच्या धिटाअीने जो घुसू लागला तो गेल्या आठवड्यात अेके दिवशी शशिमोहन नांवाच्या अेका बंगाली नवयुवकाने त्याचा शेवट करून टाकिला. त्यास अचानक ठार मारून टाकिलें. 'आनंद बझार पत्रिका ' म्हणते की, शशिमोहनने आपल्या कथनात सांगितलें आहे की, 'हिंदु स्त्रियांच्या सन्मान आणि सतीत्व-रक्षणासाठी मी त्या अधमास कापून काढिलें.'

अैकलेत ना, रहिमचाचा ? शशिमोहन हा त्या तुमच्या खिदिखिदी हसणाऱ्या ध्वनीचा केवळ पडसाद अुठलेला आहे; नाही का ? अजून जपा. अिंग्लिशांच्या मशीनगन्सच्या आणि तोफांच्या तोंडांतून निघणाऱ्या ज्वालाग्राही गडगडाटाने जें कंपित झालें नाही आणि वेळप्रसंगी जें ब्रिटिश सिंहाच्या गव्हर्नर जनरली दाढीस हात घालून तिला अुपटण्यास कचरलें नाही, तें हें हिंदु युवकांचें धैर्य आहे. तेथे चाचाजी, तुमच्यातील गुंडगीर दाढीची काय कथा ! आजवर तुमच्या खिदिखिदी

हसण्याकडे हिंदु शशिमोहननी लक्ष दिलें नाही, तें त्यास तुमचें भय वाटत होतें म्हणून नाही,—तर महत्त्व वाटत नव्हतें म्हणून. हें पूर्वीही सांगितलें होतें. पुनः सांगतो. अैका, नीट अैका, रहीमचाचा, शशिमोहन काय म्हणतो, तें नीट अैका! 'मी माझ्या हिंदु भगिनीच्या सन्मान आणि सतीत्व रक्षणासाठी त्या अधमास कापून काढिलें.'

हिंदु स्त्रियांकडे पाहून खिदिखिदी हसणाऱ्या तुमच्या धर्मवेड्या गुंडगिरीचा हा शशिमोहन पहिला हिंदु प्रतिध्वनि आहे! रहिमचाचा, अजून तरी शुद्धीवर या. कारण तुमच्या हसण्याच्या प्रत्येक ध्वनीमागोमाग यापुढे शशिमोहनी प्रतिध्वनि गर्जत अुठतील असा संभव, क्रियेनंतर प्रतिक्रियेचा संभव जितका बळकट असतो, तितक्याच बळकटपणे दिसत आहे!

✦ ✦ ✦

कुजत पडलेलीं शस्त्रास्त्रें

बंगालमध्ये गेल्या महिन्यात आणखी काही क्रांतिकारक युवकांना पकडून त्यांना त्यांच्यापाशी सापडलेल्या अनेक भयंकर बाँब आणि पिस्तुलें अित्यादि हत्यारें बाळगण्यासाठी मोठमोठ्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. बंगालमध्ये जेव्हा पाहावें तेव्हा क्रांतिकारक शस्त्रास्त्रें बाळगूनच काय ते असतात. हजारो रुपयांचा चुराडा करून आणि वाटेल त्या संकटास तोंड देअून बिचारे बाँब आणि पिस्तुलें आणि हजारो गोळ्या जमवितात आणि पोलिस येअीपर्यंत वर्षानुवर्षें त्या शस्त्रागारास प्राणापलीकडे रक्षून, पोलिस येताच सरकारच्या हातात तीं सर्व शस्त्रें आयतींच सोपवून देतात. खरें पाहिलें असता, अशा प्रकारच्या नुसत्या शस्त्रें बाळगीत वसणाऱ्या क्रांतिकारकांना सरकारने अुलट पारितोषिकें देअून त्यांच्या या धंद्यास अुत्तेजन द्यावयास पाहिजे! कारण सरकारास कवडीचाही व्यय न करिता फुकट शस्त्रें आणि बाँब आयते पुरविण्याचा या क्रांतिकारकांनी जो हा अुपक्रम चालविला आहे, तो सरकारास सर्वस्वी लाभकारक आहे. शस्त्रें पुरविण्यास सरकार जे अितर अडते ठेविते त्यांना अडतीचे पैसे आणि शस्त्रांचें मूल्य असा दुहेरी खर्च द्यावा लागतो. या क्रांतिकारकांचीं साचविलेलीं शस्त्रें वेळ येताच फुकट फाकट सरकारास अुचलून नेता येतातच; पण त्यास त्यांच्या अपार परिश्रमांची अडत म्हणूनही कवडीचें प्रतिमोलही द्यावें लागत नाही! म्हणून सरकारास आमची साग्रह विनती आहे की, शस्त्रें आणि भयंकर बाँब नुसते जमवीत राहण्याचाच छंद असणाऱ्या या क्रांतिकारकांना सरकारने शिक्षाबिक्षा देअून असा अुपयुक्त धंदा बुडविण्याची चुकी करू नये!

हां; जर का शस्त्र वा वाँव हाती येताच त्याचा होअील तो अुपयोग करून टाकण्याची प्रवृत्ति या क्रांतिकारकांत असती, तर मात्र त्यांस भयंकर दंड देणें प्राप्तच होतें. मागे अशी प्रवृत्ति या वर्गात असे आणि त्यायोगे पिस्तुल हाती पडताच गोळीची देखील वाट न पाहता ते तेवढेंच अुडवून टाकीत! निष्कारण गंज खात शस्त्रें आणि वाँब साचवून ठेवून पोलिसांची मार्गप्रतीक्षा करीत ते बसत नव्हते. तेव्हा तशा भयंकर क्रांतिकारकांस भयंकर शिक्षा ठोठवाव्या लागल्या तें ठीकच झालें. पण नुसतीं शस्त्रें वाळगून तीं पोलिसच्या हाती निर्विघ्नपणे सोपविण्याऱ्या या क्रांतिकारकांची सरकारने द्वेषापेक्षा कीवच अधिक करावी आणि सरकारास फुकटचीं शस्त्रें मिळवून देणाऱ्या या संस्थेस प्रोत्साहन द्यावें!

✦ ✦ ✦

नादानांची क्षमाशीलता

असें अैकण्यात येत आहे की अध्यापक अिंद्र महाशय, त्यांच्या पित्याची,—श्री श्रद्धानंदांचो—हत्या करणाऱ्या अबदुल रशीदला क्षमा करावी म्हणून सरकाराकडे आवेदन धाडणार आहेत! अुत्तम! आता स्वामीजींच्या या अेका पुत्राने जो हा अुदारपणा अवलंबिला त्याचें अनुकरण त्यांच्या द्वितीय पुत्रानेही करावें आणि सरकारास दुसरें आवेदन करावें की, अिंद्र महाशयांच्या विनंतीप्रमाणे अब्दुलला दया दाखवून सोडून देण्यात येताच अेक बंगला आणि दहा पांच हजार अेकर भूमि पुरस्कार म्हणून देण्यात यावी! म्हणजे आपल्या दोन्ही सुपुत्रांनी हिंदु धर्माची लाज राखून पृथ्वीराजाची परंपरा बुडूं दिली नाही हें पाहून स्वामीजींचा आत्मा संतोष पावेल आणि अबदुल रशीदला फाशीची क्षमा व्हावी म्हणून प्रार्थना केली असता हिंदु अुदारपणाने द्रवून मुसलमान जी अेकी दोन हजार शतकांनी करणार आहेत ती अेकी अुलट त्यास अेक जहागीर हिंदु लोकांनी दिली हें अैकताच आणखी पांच सहा शतकांच्या आतच करू शकतील. जहागीरच काय, पण हिंदु महासभेने कोणा अेखाद्या रजपूत राजाची राजकन्याही अबदुल रशीदला सुटून परत घरीं येताच त्यास मधुपर्क म्हणून अर्पण करावी म्हणजे आपल्या हिंदूंच्या अहिंसक क्षमाशीलतेचा बाणा आपण योग्य रीतीने राखला असें होअील. मागे शहाजहानासही आपल्या पूर्वजांनी याच बाण्यासाठी अशीच अेक रजपूत राजकन्या अर्पण केलीच होती – आणि तिच्याच पोटी औरंगजेब जन्माला आला!!!

खरोखरच अबदूल रशीदला सध्याच फासावर लटकावणें हें निष्ठुरपणाचें आहे आणि कोणाही हिंदु रक्ताच्या मनुष्याने आपल्या दयाशीलतेच्या ब्रीदास कलंक लावून तशा निष्ठुरपणाचा भागीदार होअू नये अशी आमची विनंती आहे. बिचारा अबदुल रशीद स्वर्गप्राप्तीसाठी किती आतुर झालेला! श्रद्धानंदांस ठार करून

स्वर्गाची तो अेक पायरी चढला आहे. परंतु अजून त्याने स्वत:च कथन केल्याप्रमाणे स्वर्गाकडे नेणाऱ्या लालाजी आणि मालवीयजी यांच्या मस्तकांच्या अुरलेल्या दोन पायऱ्या त्याला अजून चढावयाच्या आहेत. तेव्हा त्याचें तें अवतारकृत्य पुरें होण्यापुरता आयुष्यकाळ त्यास लाभावा हें कोणीही परोपकारी हिंदु मनापासून अिच्छल्याविना राहणार नाही. तेव्हा पहिल्या पायरीवरूनच ढकलीत नेअून त्यास फांसावर लटकविण्याचें पाप अध्यापक अिंद्र यांनी करण्यास प्रवृत्त होअू नये! त्यांनी श्रद्धानंदांस डसलेल्या सापास दूध पाजावेंच. नाहीतर अितर हिंदूंस कोण डसेल? सनातनी लोक सापास पुजतातच. मग आर्यसमाजी मनुष्यानेही दया कां दाखवू नये! आपण हिंदु अिथून तिथून पृथ्वीराजाच्याच माळेचे मणी असलो पाहिजे!!!

त्याविरहित स्वत:च्या पित्यास मारणाऱ्या आततायासही मी क्षमा करितो, असें म्हणू अिच्छणाऱ्या श्रद्धानंदांच्या पुत्राच्या भाग्याचा आणि थोरपणाचा पंडित मालवीयजींच्या पुत्रास मत्सर वाटणें साहजिकच आहे. तेव्हा त्याच्या समाधानासाठीही अबदुल रशीदला काही दिवस जिवंत ठेवणें अिष्टच आहे. म्हणजे तो श्रद्धानंदांच्या पुत्राप्रमाणे जेव्हा मालवीयांच्या आणि आणखी कोण्या हिंदूच्या पुत्रास पितृहीन करील तेव्हा त्यांना, त्यांनाही 'दया करा' म्हणून आवेदन करिता येअील आणि या हिंदु राष्ट्रात आपल्या पित्याच्या हत्याऱ्यासही जीवदान देणारे अुदार पुरुष अेकटे अिंद्रच नसून तसे अनेक अिंद्र आहेत, असें सगर्व सांगण्याचें भाग्य अुभ्या हिंदु राष्ट्रासही लाभेल!!!

—ता. १८ एप्रिल १९२७

मराठी ग्रंथ ... अनुक्रमांक ३८९७५ वि: निषेध ... स्थानक ५५९९ (अ) दि: ...13/11/54

✦ ✦ ✦

शहाबादच्या मुसलमानांची हिंदु होण्याची धमकी

शहाबादच्या अेका मुसलमानाने ख्वाजा हसन निजामीला अेक पत्र लिहिलें आहे की, मी एका सावकाराचे अेक हजार रुपये देणें लागत आहे; आपण मला तेवढे देत असाल तर वरें, नाही तर मी शुद्ध होअून हिंदु होअून जाईन! या अुदाहरणावरून तरी आमचे मुसलमानबंधु शुद्धि चळवळीवर जळफळण्याचें सोडून अुलट तिला आशीर्वाद देअू लागतील अशी आशा आहे. कारण निर्धन मुसलमानांना शुद्धीच्या चळवळीने अेक नवीन धंदा मिळवून दिला; सावकाराचें ऋण फेडण्याचें अेक नवें साधन करून दिलें. शुद्धि चळवळ नव्हती आणि हिंदु होणें अशक्य होतें

तेव्हा मुसलमानीपणात अितका राम नव्हता. अेकदा अेखादा मुसलमान झाला की, त्याला कवडीचें मोल नसे. पण 'नाही तर हिंदु होतो' असें म्हणणें शुद्धि चळवळीने शक्य केल्यापासून मुसलमानीपणात थोडा राम शिरू लागला आहे. त्याला थोडें मोल येअू लागलें आहे. ज्या कोणा अिस्लामच्या भक्ताला घरादारा-वाचून पैसे काढण्याची आवश्यकता वाटेल, त्याने शुद्धीचें तारण लावून दिलें की, त्यावर हजारो रुपये त्याला ख्वाजा हसन निजामीचे पेढीवर मिळू शकतील. नुसतें म्हटलें की, 'नाही तर मी हिंदु होतो!' की पटलीच हुंडी!

✦ ★ ✦

मौलवी जाफरअल्ली 'रंगीला रसूल' विषयी म्हणतात की, जर आज मुसलमानी साम्राज्य असतें तर त्या लेखकास तें शंभर पानांचें पुस्तक लिहिण्या-साठी दगडफेकीने–संगसार–ठार करून टाकण्याचीच शिक्षा झाली असती! अगदी खरें; मिय्याजी, मुसलमानी साम्राज्याच्या या पुण्याअीमुळेच तर भाअूंच्या घणाखाली त्या साम्राज्याचें सिंहासन चूर्ण झालें! जर मुसलमानी साम्राज्य असतें तर!—जर आत्याबाअीला मिशा असत्या तर!— 'रंगीला रसूल'च्या कर्त्यास ठार मारण्यात आलें असतें; असें मौलवी जाफरअल्ली म्हणतात. जर हिंदु राज्य असतें तर मौ. जाफरअल्लीस असें विधान केल्याविषयी अेका अुंदराच्या पिंजऱ्यात बंद करून टाकण्यात आलें असतें असें आम्ही म्हणतो! हो, वचने किं दरिद्रता!

✦ ✦ ✦

मुसलमान बंधु आज पन्नास वर्षें आम्हांस 'विशिष्ट प्रतिनिधित्व द्या' म्हणून सारखी ओरड करीत आहेत. विधिमंडळात विशिष्ट प्रतिनिधित्व (special representation) त्यांस मिळून हिंदूंहून त्यांचे अधिक प्रतिनिधि प्रतिशेकडा निवडण्यात येतात, नोकऱ्यांतूनही त्यांना शेकडा अधिक जागा राखून ठेवण्यास सुरवात होत आहे. कलकत्ता नगरसंस्थेतही हिंदूंहून अधिक प्रतिनिधित्व मुसलमानांस प्रतिशेकडा मिळत आहे. तथापि अेका गोष्टीत मात्र हिंदूंनी मुसलमानांस विशिष्ट प्रतिनिधित्व देण्याची आजवर फारच टाळाटाळ चालविली होती; ती गोष्ट म्हणजे दंग्यांची.

कारण जितके दंगे गेल्या वर्षापर्यंत झाले त्या सर्वांत मेलेल्या आणि घायाळांच्या संख्येत हिंदुच आपली भर करून घेत. त्या सर्व जागांवर हिंदुच हिंदु नेमिले जात. मेलेल्यांत किंवा घायाळांत शेकडा अेक जागा देखील मुसलमानांस राखून ठेवण्यात येत नसे. हा हिंदूचा आपलपोटेपणा अक्षम्य होता.

अैहिक सुखाच्या–विधिमंडळ, नोकऱ्या, नगरसंस्था अित्यादि जागांवर जर मुसलमानांस विशिष्ट प्रतिनिधित्व मिळणें न्यायाचें आहे, तर अर्थात् त्याच भौतिक

सुखाहून अत्यंत उच्च असें जें स्वर्गीय सुख तें ज्या दंग्यात मरून किंवा घायाळ होऊन धर्मवीरांस मिळावयाचें, त्या दंग्याच्या प्रसंगी मुसलमानांतील कोणासही धर्मवीर म्हणवून घेण्याची संधि हिंदु मिळू देत नसत. हा त्यांचा आपलपोटेपणा अत्यंत निंदनीय होता यात शंका नाही. गेल्या वर्षापर्यंत जो दंगा पहावा त्यात मेलेले किंवा घायाळ आपले सगळे हिंदुच हिंदु ! दंग्यात अल्लाचे नांवाने मरून वा घायाळ होऊन 'शहीद' धर्मवीर होण्याची संधि मिळून स्वर्गात जाता येईल अितका चोप अेकाही मुसलमानास हे आपलपोटे हिंदु मुळीच देत नसत. अितर सर्व गोष्टींत मुसलमानबंधूंस विशिष्ट प्रतिनिधित्व आणि शेकडा अधिक जागा देत असताही पारलौकिक सुखासारख्या महत्त्वाच्या प्रकरणी हिंदूंनी प्रत्येक दंग्यात मेलेल्यांच्या आणि घायाळांच्या जागेवर आपलीच नेमणूक करून घ्यावी ही गोष्ट त्यांच्या औदार्याच्या लौकिकास साजेशी नव्हती.

मुसलमान बांधवांस दंग्यांतील प्रसादही विशिष्ट प्रतिनिधित्वाचे तत्त्वावर अधिक वाटणें तर राहोच; पण वरोबरीनेही न वाटण्याच्या हिंदूंच्या या कृपणते-मुळेच मुसलमानबंधु त्यांच्याशी अेकी करावयास मागे घेत. असा पंक्तिप्रपंच त्यांनी तरी काय म्हणून, किती दिवस सहन करावा ? दंग्याचा प्रसाद सर्व स्वत:च खाअून टाकणें हा हिंदूंचा पक्षपातच हिंदुमुसलमानांच्या एकीकरणास अशक्य करीत होता ह्या म्हणण्यात अितर सर्व म्हणण्यांहून अधिक तथ्य होतें हें उघड आहे.

पण सुदैवाची गोष्ट की, कलकत्त्याच्या दंग्यापासून हिंदूंनी हा आपलपोटेपणा सोडण्यास हळूहळू आरंभ करून या वर्षी तर मुसलमान बांधवांस बहुतेक दंग्यांत लोखंडी चण्यांचा बराचसा प्रसाद स्वहस्ते वाटण्यास मागे पुढे पाहिलें नाही, उदाहरणार्थ, बरेलीचा दंगा घेअू. गेल्या महिन्या दीड महिन्यात जे महत्त्वाचे दंगे झाले, त्यांत बरेलीचा दंगा मोडतो. त्या दंग्याचे वेळी घायाळ झालेल्या 'अर्धे धर्मवीरांचे' अधिकार आणि पदव्या सर्वस्वी हिंदूंनीच न उपटता आपले हातांनी जवळजवळ शेकडा पन्नास या प्रमाणात आपल्या मुसलमान बांधवांसही अर्पण केल्या आहेत. हिंदु घायाळ ५४ आहेत तर मुसलमान ४३ आहेत. हिंदूंनी घायाळ-पणात जर थोडा पंक्तिप्रपंच करून स्वत:च्या पोळीवर थोडें अधिक तूप ओढिलें असेल, तर 'मेलेपणात' पूर्ण धर्मवीरत्वाच्या स्वर्गीय अधिकारात अधिक उदारपणा दाखवून ती उणीव भरून काढली आहे. कारण दंग्यात मरून स्वर्गातील ज्या अधिकारांच्या जागा पटकवावयाच्या, त्यांपैकी हिंदूंनी ६ आपलेकडे ठेवून मुसलमानांना ७ जागा दिल्या आहेत ! दे. दासांनी केलेल्या शेकडा ५० जागांच्या करारावरूनही १ जागा मुसलमानांस अधिक देअून टाकली.

बरेलीस हिंदु ६ मेले आणि मुसलमान ७. कानपूरच्या हिंदूंनीही तितका अुदारपणा दाखविला नसला तरी आपलपोटेपणा काही केला नाही. कारण

घायाळात हिंदूंनी १०५ लोक आपले भरती केले तर ८१ मुसलमानांचे भरती करून, राष्ट्रीय सभेने मुसलमानांस जें शेकडा तीस विशिष्ट प्रतिनिधित्व अर्पण केलें आहे, तो करार पाळला. स्वर्गसुखाच्या वाटणीत तर मुसलमानांस अगदी दासांच्या कराराप्रमाणे शेकडा ५० जागा राखून ठेवून अेक हिंदु स्वर्गाच्या शिडीवर चढताच अेका मुसलमानासही त्याच्याच मागच्या पायरीवर चढवून देण्यात आलें.

पण नागपूरला तर हिंदूंनी उदारपणात काडीचाही कसूर ठेवला नाही. मुसलमान नोकऱ्यांतून, विधिमंडळांतून, नगरसंस्थेतून कुठेही मागत नाहीत असे भरपूर–स्पेशल रिप्रिझेटेशन–विशिष्ट अधिकार त्यांस अर्पण केले. शेकडचामागे हिंदूच्या बरोबरीनेच नव्हे तर अधिक अधिकाराच्या राखीव जागा त्यांच्यासाठी ठेवून, घायाळपणाचे किंवा मेलेपणाचे–म्हणजेच अर्ध धर्मवीरत्वाचे किंवा पूर्ण धर्मवीरत्वाचे स्वर्गीय अधिकारांत त्यांस हिंदूंहून कितीतरी अधिक भाग देऊन टाकला. कारण हिंदु ४७ घायाळ झाले तर मुसलमान ७७ आणि स्वर्गाकडे १० हिंदु धाडण्यात आले, तर १४ मुसलमान बंधु धाडण्यात आले.

—ता. ६ ऑक्टोबर १९२७

✦ ✦ ✦

(४)

हिंदूंनी मशिदीवरून वाजवावें मअूच्या मुसलमानांचा बनाव

आम्हांस कळविण्यास दुःख वाटतें की, वाद्यरोगाने पछाडलेल्या आमच्या मुसलमान देशबधूंस जी वार्ता अेकताच अगदी तीव्र वेदना होतील, अशी एक बातमी सांगण्याचें आमच्या दैवी आज यावें! हिंदुमुसलमानांत दंगेधोपे चालण्यावर ज्यांचा चरितार्थ चाललेला आहे, अशा अनेक मौलवीमौलानांस ती बातमी खरी असताही खरी वाटणार नाही. अशी ती बातमी ही की, झाशीकडील मअू नांवाच्या गावी हिंदुमुसलमानांची अेक मोठी सभा होअून, त्यांच्यापुरता त्यांनी वरील वाद्यांचा प्रश्न सामोपचाराने सोडवून टाकिला. आणि तो कशा प्रकारे? तर मुसलमानांनी मान्य केलें की, हिंदूंनी केव्हाही मशिदीवरून मिरवणूक चालली असता वाद्यें वाजवावींत! त्यांस मुसलमानांची काहीअेक हरकत होणार नाही!!

हा निर्णय होताच दुसऱ्या दिवशी तो तोंडी निर्णय लेखबद्ध करण्याकरिता उभय पक्षांची पुनः सभा भरली आणि खालील करारपत्र संमत होऊन त्यावर उभय पक्षांच्या स्वाक्षरीही (सह्या) झाल्या. तें करारपत्र असें :– " झाशी जिल्ह्यातील मऊ नगरच्या हिंदु आणि मुसलमान यांच्यामध्ये असा करार झाला की, मशिदी आणि मंदिरें यांजवरून वाटेल त्या वेळीं वाद्यें वाजवीत जाण्यास कोणीही कोणास प्रतिबंध करू नये. कारण की या मऊकडील भागात गावोगाव सर्व प्रकारच्या मिरवणुकी नाचरंग, वाद्यें अित्यादि थाटासह मंदिरावरून आणि मशिदीवरून जात आलेल्या आहेत. आणि म्हणूनच आम्ही हिंदु-मुसलमान आपसांत यापुढेही वाद्यांच्या यःकश्चित् प्रश्नासंबंधी तंटा करण्याचा मूर्खपणा न करिता जुन्या रूढीप्रमाणेच पुढेही वागणार. हा करार आम्ही उभयतांनी आपल्या अिच्छेने आणि कोणताही विकल्प चित्तात न ठेवितां केला आहे. '

ज्या वाद्यांच्या प्रश्नासाठी मौलाना महंमदअलीपासून तों पत्वाखालीच्या गावगुंडापर्यंत सर्व धर्मभिमानी आणि सुशिक्षित आणि सभ्य मुसलमान आज पिढ्यानपिढ्या शेकडो हिंदूंचीं डोकीं फोडीत आणि शेकडो मुसलमानांची डोकीं फोडून घेत आलेले आहेत, त्या अत्यंत बुद्धिमान् लोकांना अत्यंत बिकट वाटणाऱ्या प्रश्नास अगदी सोप्या रीतीने सोडवून या मऊच्या अडाणी मुसलमानांनी त्या गंभीर प्रश्नास अगदी गावठी स्वरूप दिलें, ही गोष्ट मुसलमानीपणाच्या बाण्यास फारच लांछनास्पद आहे, यात काही शंका नाही !

या करारपत्रातील दुसरा ठळक दोष म्हटला म्हणजे हा की, त्यामुळे अीश्वराच्या श्रवणशक्तीविषयी दाखविलेला अत्यंत अनादर हा होय. मशिदीपुढे वाद्यें वाजत असलीं तर आमच्या प्रार्थना भंग होतात, अर्थातच अीश्वरास त्या जाव्या तशा अेकू जात नाहीत, हा विद्वान् मौलवीमौलानांचा मूळ सिद्धान्त ! त्यास या करारपत्राने हरताळ फासला. कारण यात असें स्पष्ट सूचित केलें आहे की, वाद्यें वाजलीं तरीही भक्तांच्या प्रार्थना भंग पावत नाहीत आणि त्या अीश्वरास अेकू जातातच ! कोण हें अनुदार पाखंड ! अीश्वर काय अंतःसाक्षी आहे की, त्यास वाद्यांच्या कोलाहलातही भक्तांच्या प्रार्थना ऐकता याव्या ! आणि ज्यास वाद्यांच्या घणघणाटातही अेकाग्र मनाने प्रार्थना करता येते तो भक्त तरी कसला ! प्रार्थनेतील अक्षरापेक्षा हिंदूंचीं वाद्यें वाजतात केव्हा आणि मी त्यांचें डोकें फोडण्याच्या धार्मिक ढोंगाखाली लूटमार करण्यास बाहेर पडतो केव्हा, अिकडेच ज्याचें सारें लक्ष वेधलेलें असतें तो खरा भक्त – खरा 'दिल'दार ! बाकी सर्व काफर–नादार ! या मौलवींच्या मूळ सिद्धान्तास या मऊच्या मुसलमानांनी अगदी धाब्यावर बसविलें. आणि हिंदूंस म्हटलें खुशाल वाद्यें वाजवा. ज्या अल्लाला ' चिडियोंके पावमें घुंगुर बांधा वो भी अल्ला सुनता है ! ' मुंगीच्या पायांतील घुंगराचा आवाज देखील, मुंगीच्या मनातील विचार देखील ज्या अल्लाला अेकू जातात,

त्याला आमच्या प्रार्थना वाद्यांच्या घणघणाटामुळे ऐकू जाणार नाहीत, अितकी काही त्या अंतर्यामीची श्रवणशक्ति बहिर्गामी झालेली नाही !

या करारातील याहीपेक्षा महत्त्वाचा दोष म्हणजे त्यावर रक्ताचे चार थेंब-देखील सांडलेले नाहीत. नुसत्या काळचा शाअीचा करार ! हा शिष्टाचाराचा अक्षम्य भंग होत आहे. हिंदूंनो, तुम्ही मशिदींवर वाद्यें वाजवा, मुसलमानहो, तुम्ही मंदिरांवर वाद्यें वाजवा ! ! –या अेका लहान वाक्यात आज शेकडो हत्या करून आणि नदी नदी रक्त ओतूनही जो प्रश्न शेकडो शहाण्यांस सुटला नाही तो चार अनाडचांनी सोडविण्याचें धाष्टर्य करावें ! आणि पांच पन्नास डोकीं देखील फोडू नयेत ! हें केवढें पाजीपण आहे. असे करार रक्तात लिहावयाचे अशी स्पष्ट धर्माज्ञा–मौलवीय चालू आज्ञा (Order of the day) असता नुसत्या काळचा शाअीच्या अेका वाक्यात प्रश्न मिटवून टाकिला !

हाय हाय ! आम्ही आता अज्ञानी मुसलमानांपासून निधि कसल्या कर्तव्याच्या नांवाने जमवावा ! खिलाफत मेली तरी वाद्यांची आफत–आपत्ति हाताशी होती. हीही जर अशी अेका वाक्यात मरेल, तर मग कोणच्या तोंडाने आम्ही वर्गणी मागावी ! आणि निधि नसेल, दाम नसेल तर मग खिलापती मौलवीपणांत राम तो काय राहिला !

तरीही मौलानाजी, अगदी निराश होअू नका. खिलाफत गेली तशी वाद्याफत गेली तरी पुनः गुंडाफत म्हणून मुसलमानी समाजात उर्वरित आहेच आहे. तिच्या साह्याने आपल्या हिंदुविद्वेषाचे वळावरच जगू शकणारें मौलानापण टिकू शकेल. बंगालकडे थोडे पहा. मअूच्या तारेच्या अगदी अुलट तार तिकडून आली आहे ! मअू तें मअूच— पण बंगाल्यात मुसलमान पूर्वीअितकाच कणखर आहे. अैकलात त्यांचा अद्वितीय असा नवा पराक्रम ?

पिशाच्च वृत्तीचा प्रभाव

नसलात तर अैका –मुसलमानी गुंडपणास तर काय, परंतु प्रत्यक्ष पिशाच्चांच्या गुंडपणासही लाजविणारा तो पापी पराक्रम अैका :– लेखणीला सांगण्यासही थरकाप आणि लज्जा वाटते; पण कर्तव्यच म्हणून सांगतो :– राजशाही जिल्ह्यात भवानीपूर गावी पुजारी राजवंशी राहतात. त्यांच्यात पडदा नसतो. त्यांच्या काही स्त्रिया पुरुषांबरोबर बाजारातून परत येत असता रात्र पडली. तोंच मुसलमानांच्या धर्मवीरांनी त्यांस अडवून अेक तरुण स्त्री उचलून पळविली. ती गर्भवती होती. तिच्यावर त्या पिशाच्चांनी पाळीपाळीने बलात्कार करण्यास आरंभ केला. हें राक्षसी क्रौर्य चालता चालता ती स्त्री वेशुद्ध झाली – रक्तबंबाळ झाली--तरी ते मुसलमानी गुंड परावृत्त होअीनात. अितक्यात पुजारी पोलिसांसह धावपळ करीत तेथे आले. तों हे पराक्रमी धर्मवीर पळून गेलेले दिसले, ती

स्त्री रक्तात लोळत पडलेली दिसली—आणि हाय हाय ! तो तिचा गर्भ तडफडत बाहेर पतन पावून चेंदामेंदा झालेला दिसला ! त्या अधमांपैकी अेकास पकडलें असून दावा चालला आहे !

ज्या 'स्वतंत्र' पत्रात ही वातमी दिली आहे त्याच पत्रात लगेच दुसरीही बातमी प्रसिद्ध झाली आहे की, 'फॉर्वर्ड' म्हणतें की, प्रियसुंदरी नामक हिंदु स्त्रीच्या खटल्याचा कोर्टात निकाल होऊन त्यांतील अपराध्यांस सात सात वर्षं सश्रम कारावासाचा दंड मिळाला आहे ! हे अपराधी अर्थातच मुसलमानी धर्मवीर होते हें निराळें सांगणें नकोच. २४ सप्टेंबरला रात्री कुरबान आणि लतिफ, या दोघा मुसलमानांनी प्रियसुंदरीच्या घरात घुसून अितर मुसलमानांच्या धर्म-बंधुत्वाच्या पवित्र साहाय्याने तिला अेका भाताच्या शेतात अुचलून नेलें. त्या पाजी पशूंनी तिच्या सतीत्वावर घाला घातला. ती मरणोन्मुख होऊन रक्त-स्रावात न्हालेली तशीच तडफडत पडली असता रमाकांत हवालदाराने तिला पाहिलें. पोलिसांना वातमी कळताच त्यांनी दोघा आरोपींना पकडलें. पण ती साध्वी अवला अठ्ठाविसावे दिवशी रुग्णालयात मेली. डॉक्टरने ती निर्दोष अवला भीषण वलात्काराने मेली म्हणून प्रमाणपत्र दिलें. तिच्या लहानग्या मुलाने सांगितलें की, मला सुरा दाखवून माझ्या आअीला ह्यांनी ओढून नेली ! आपली ओळख पटू नये म्हणून त्या लतिफ आणि कुरबान यांनी आपलो दाढीमिशी मुंडून टाकिली होती. न्यायाधीशांनी त्यांस सात वर्षांची शिक्षा दिली.

यावर काय लिहावें ! ज्या संस्कृतीत हे असे शेकडो लोक जन्मास येतात किंवा नांदू शकतात किंवा संव्यवहार्य समजले जातात–नव्हे काही प्रत्यक्ष पुराव्यावरून असेंही म्हणता येतें की, हिंदूंच्या अनाथ अबलांना पळवून नेणारांची पाठही थोपटण्यात येते–त्या संस्कृतीचा त्रिवार धिक्कार असो. तिच्या सुधारणेचा एकच मार्ग म्हणजे तिचा आमूलाग्र नायनाट करणें हाच होय. दंडविधान (Criminal Law) पुरें पडत नसेल तर प्रत्यक्ष राजदंड हाती घेअून तो नायनाट केला पाहिजे!

या पैशाचिक प्लेगाची मुसलमान समाजात सध्या साथच आलेली आहे की काय अशी भीति वाटावी, अितक्या भीषण अनुक्रमाने प्रत्यही राक्षसी वृत्तीचे अत्याचारी स्त्रीपुरुष शेकडचांनी अुत्पन्न होत आहेत. स्त्रियादेखील! अुदाहरणार्थ ही खालची फ्री प्रेसची बातमी पहा : २४ सप्टेंबरला बदलापटिया नांवाच्या ठाण्यातील कुमारविल नांवाच्या ठिकाणी अेका मुसलमान वाअीने आपल्या नवऱ्या-साठी मांसाचें भोजन करून ठेविलें. पण नवरा परत येण्याचे आधी तें कुत्र्याने खाअून टाकिलें. तेव्हा अेका खडग्याने दोन्ही पक्षी मारावे अशा हेतूने तिने, दुसरें कशाचें मांस नाही आणि तिचा सावत्र मुलगाही नाहीसा करण्याचें अजून अुरलेलें आहे असें पाहून त्या लहान मुलाला मारून कापून त्याचें मांस शिजविलें

आणि तें आपल्या नवऱ्यास न सांगता मुलाचें मांस बापास जेवू घातलें ! असा सावत्र मुलाचा सूड अुगविला ! ती स्त्री सध्या अटकेत आहे. अशा पैशाचिक स्त्रिया जेथे आहेत त्या घरात त्यांचे पोटी वर वर्णिलेल्या नीचातील नीच 'धर्मवीरांची' वीणच अुत्पन्न व्हावयाची !

अेकदा पिशाच्चवृत्तीसच धर्मकर्तव्य समजण्यात आलें म्हणजे मग बापास बाप आणि मुलास मूल म्हणण्याअितकी माणुसकी मनुष्यात उरत नाही. कुत्रें पिसाळलें म्हणजे प्रथम दुसऱ्यास चावावयास धावतें, व रक्त जों जों तोंडी लागतें तों तों तें अधिकच पिसाळतें आणि शेवटी दुसऱ्यास चावता चावता स्वतःसही चावू लागतें. तसाच धर्मोन्मत्त पिसाट, 'काफर' म्हणून दुसऱ्याचें रक्त पिण्यास चटावता चटावता शेवटी रक्ततृष्णा अनिवार होअून स्वतःच्या घरातही रक्तपात करीत सुटतो. हा अितिहासाचा अनुभव आहे. सरसीमेवर हिंदूंस काफर म्हणून भयंकर रीतीने छळून मारून लुटून हुसकून दिलें. कारण ते अत्यल्प होते. पण ते गेल्यावर त्यांच्या रक्ताने पिसाळलेला धर्मोन्माद स्वतःच्या घराकडे वळताच आपल्या अंगासच फाडफाडून टाकू लागला. हिंदु काफर होते – पण मुसलमानात तरी सर्व मुसलमान कोठे धर्मनिष्ठ – अिमानदार – होते ! हे शिया पहा: सुनीच्या धर्ममताप्रमाणे तेही जवळ जवळ काफरच होते. हिंदु अत्यल्प होते तर ते शियाही अल्पच आहेत. ठीक तर मग, यांना आपला प्रांत जर निर्भेळ धर्मनिष्ठ मुसलमानांचाच देश करावयाचा असेल तर, जी हिंदूंची गत तीच शियांची नको का करावयास ! असा विचार करून सरसीमेवरील पिसाळलेल्या सुनी बहुसंख्याकांनी शियांवरही धर्मयुद्ध पुकारलें. हिंदूच्या रक्तास पिण्यासाठी शिया व सुनी अशा दोन्ही मुसलमानांच्या सुऱ्या चटावलेल्या होत्या. त्याच आता हिंदूंचें रक्त संपताच अेकमेकांचें रक्त पिअू लागल्या. सुनी मुसलमानांनी शिया मुसलमानासही 'अर्ध काफर' म्हणून हाणून, मारून, कापून काढीत ते अल्पसंख्याक असल्याने त्यांस हुसकून दिलें ! शिया मुसलमानांनी हिंदूंवर जे अत्याचार ज्या कारणासाठी हसत केले, तेच अत्याचार त्याच कारणासाठी त्यांस रडत भोगावे लागले.

हिंदूंना मारून लुटून हुसकून दिलें तेव्हा सरसीमेवरील मुसलमानांच्या या राक्षसी कृत्यावद्दल शिया मुसलमानांनी दुःखाचा अेक शब्दही काढला नव्हता. पण हिंदूंच्या मागोमाग शियांवरही तोच प्रसंग गुजरताच आता शिया मुसलमान मोठमोठ्या सभा करून ओरडत आहेत. 'अत्याचार ! सरकार, रक्षण करा ! हे सुनी आमचा नायनाट करीत आहेत ! हे सुनी राक्षस आहेत !' खानबहादुर सर सय्यद अिस्माअील यांनी देखील सुनींच्या या धर्मोन्मत्त क्रौर्याची निंदा केली ! –

पण हिंदूंना याच धर्मोन्मत्त क्रौर्याची सुरी जेव्हा भोसकीत होती, तेव्हा याच शियांस ती देवदूताची तलवार वाटत होती ! बाबांनो, द्यावें तसें घ्यावें, पेरावें तसें भरावें. धार्मिक मतभेद होताच 'कत्तल करा' हें भयंकर राक्षसी मत जोवर तुम्ही अुराशी धरीत आहा, तोवर मुसलमानहो, तुम्ही हिंदूंचेच नव्हे तर स्वतःचेही शत्रु आहात. कारण हिंदू मूर्तिपूजा करितात म्हणून त्यांना ठार मारणार, तर शिया अल्लीनंतरच्या खलिफांस मानीत नाहीत, अल्लीसही पैगंवराअितकाच पूज्य मानितात म्हणून तेही काफरच ठरून मारिले जाणार. जिथे शिया सवळ तेथे सुनी–अल्लींची कत्तल करणारे कुलांगार म्हणून मारिले जाणार. शिय्या मारिले गेले की, सुनीसुनीतही कत्तली होणार–झाल्या आहेत –होत आहेत. कारण त्यांच्यातही शेकडो धर्मपंथ आणि मतांतरें आहेत–आणि मत भिन्न की 'मारो वदमाश को' म्हणून धर्माज्ञा आहे ! – निदान अशी हजारो मुसलमानांची समज तरी आहे.

तीच खोजांची पाळी येणार ! कारण मुसलमानांतील शिया आणि सुनी हे दोन्ही पंथही खोजांस अितक्या तीव्र वैषम्याने लेखतात की, खोजांस मुसलमानांच्या मशिदीत निमाज पढण्याचीही बहुधा बंदी असते. मुसलमानांच्या आणि खोजांच्या धर्ममतांत तसाच मतभेद आहे. मनुष्यात अीश्वरांश असतो, या अवतारवादाच्या मुळाशी असलेल्या तत्त्वाची मुसलमानांस भयंकर चीड. पण खोजांचें मूळ धार्मिक तत्त्वच हें की, आगाखानच्या वंशात अीश्वरी अंश वसत असून आगाखानाच्या वंशालाच अीश्वरी विभूति म्हणून पूजा आणि भक्ति करणें हें प्रत्येक खोजाचें धर्मकर्तव्य आहे ! सध्याच खोजांच्या समाजात सुधारणेची अेक चळवळ अुत्पन्न झालेली असून तिच्या पुरस्कर्त्यांनी अेक अनावृत पत्र आगाखान यांस अुद्देशून लिहिलें आहे. त्याच्या प्रती सर्वत्र वाटण्यातही आलेल्या आहेत. त्या पत्रात तर असें स्पष्ट विधान केलेलें आहे की, स्वतः आगाखान यांनी म्हटलें आहे की, प्रस्तुतचे कुराणात प्रक्षिप्त भाग पुष्कळच आहे. मुसलमान म्हणणार महंमद शेवटचा पैगंवर. खोजे म्हणतात आगाखानांचें मूळ पुरुष हेही पैगंबर आणि आगाखानांनी स्वतः म्हटलें आहे की, अप्रकट असलेलें खरें कुराण लिहिण्यास मला सहा महिने तरी लागतील. आगाखानांचीं हीं वाक्यें त्यांच्याच अनुयायांनी प्रसिद्ध केलेलीं असल्याने आणि कुराणाची मूळ प्रत कोणची हा वाद, महंमद महाशयांच्या मृत्यूपासूनच मुसलमानांत पंथ विपंथ पाडण्यास कारणीभूत झालेला असल्याने खोजा समाजाच्या या मताविषयी मुसलमानांस किती तिटकारा येत असेल हें निराळें सांगणें नकोच. प्रस्तुत अनावृत पत्रात आगाखानांवर लाखो रुपये भोळ्या भावड्या लोकांकडून गोळा करून आणि वहिष्काराच्या धाकाने अुकळून विलायतेत स्वतःच्या विलासार्थ अुधळले जातात याविषयीही पुष्कळ कडक टीका करण्यात आली आहे. स्वतःच्या अनुयायांच्या

टीकांनीच जे धर्मगुरु असे 'कलंकित' झालेले आहेत, तेच भोळ्या हिंदूंस वाटविण्यासाठी 'निष्कलंकी' कलंकीचा अवतार म्हणून मिरवू पहातात हें आश्चर्य आहे !

—ता. ३ नोव्हेंबर १९२७

✦ ✦ ✦

(५)

धमकीचीं पत्रें

श्रीयुत राजपाल, स्वामी सत्यानंद, लाला नानकचंद या गृहस्थांच्या हत्या करण्याच्या पवित्र प्रयत्नास अपराध समजून काही मुसलमानांस फाशीच्या शिक्षा ज्या ऑजिल्व्हे साहेवांनी दिल्या, त्यांचेवरही मुसलमानी धर्मभक्तांचा रोष झालेला आहे. त्यांपैकी कोणा सात्त्विक साधु पुरुषाने मि. ऑजिल्व्हे साहेवासही अेक पत्र टाकून तुम्हांसही अिस्लामचा शत्रु म्हणून मानण्यात येणार आहे, असें कळविण्याची कृपा केली आहे. मि. ऑजिल्व्हेसाहेब या पत्राच्या धाकामुळे हिंदुस्थान सोडून येत्या बोटीनेच विलायतेस पळून जातील, यात काहीच शंका नाही !

पण मग हे अिस्लामी धर्मवीर नुसत्या ऑजिल्व्हे साहेबावरच अशी कृपा करून कां थांवतात ? अवदुल रशीदला फाशी देणारे साहेब आणि प्रीव्ही. कौन्सिलमध्ये त्याचें अपील अमान्य करणारे साहेबांचें टोळकेवें टोळकें – तर अजून जिवंतच आहे ! त्यांसही तावडतोब मृत्यूचीं वारंटें धाडून देण्यात आलीं पाहिजेत. म्हणजे तेही भयभीत होअून आपआपलीं कामें सोडून देतील. आणि दुसऱ्या अवदुल रशीदला आणखी कोण्या श्रद्धानंदाची हत्या केल्यानंतर वेडयाचें ढोंग करण्याची आणि फाशीच्या आधी भयाचा ताप भरून थरथर कापत रडण्याची पाळी येणार नाही !

तळेगावला दोघा मुसलमानी सज्जनांस हिंदूंच्या देवाच्या मूर्ति फोडण्याचें पवित्र कार्य केल्यासाठी काही पारितोषिक देण्यास हवें होतें. कारण मूर्तिभंजन हें अिस्लामचें ब्रीद आहे असें मौलवीमुल्ला म्हणत असतात. पण तेथच्या अेका दुष्ट मॅजिस्ट्रेटने त्या सज्जनांस दोन दोन महिन्यांची कठोर कारावासाची शिक्षा दिली! —या दुष्ट मॅजिस्ट्रेटलाही ऑजिल्व्हे साहेबाप्रमाणे धमकीचें पत्र रीतीप्रमाणे धाडण्यात यावें, म्हणजे तोही पळून जाईल.

माशीपूर ग्रामच्या अेम्. अी. शाळेतील अेक १२ वर्षांचा विद्यार्थी नरेन्द्रनाथ याला अकबर आणि त्याचा साथी या दोघा अिस्लामी धर्मभक्तांनी पळवून नेलें होतें. त्याला बलात्काराने मुसलमान करून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असून त्यांजवर खटला भरण्यात आला आहे. ज्या मॅजिस्ट्रेटपुढे हा खटला चालला आहे, त्यालाही त्वरित मृत्यूचें वारंट धाडून बजाविण्यात यावें म्हणजे तोही जागा सोडून पळून तरी जाअील नाही तर त्या सज्जन आणि काफरास बळाने वाटविण्याचें पुण्यकृत्य करणाऱ्या अिस्लामी धर्मभक्तास भयभीत होऊन सोडून तरी देईल. त्यास धाडल्या जाणाऱ्या धमकीच्या चिठ्ठीत असेंहि लिहिलें जावें की, त्या मुलास बाटविण्याचें अिस्लामी कर्तव्य करणाऱ्या मुसलमानांस सोड, अितकेंच नव्हे तर मुसलमानी धर्म, छळ होत असताही न स्वीकारणाऱ्या त्या १२ वर्षाच्या हिंदु मुलास या अुनाडपणा-विषयी वेत मारण्याची शिक्षाही ठोठाव ! नाहीं तर–अुघडच आहे काय तें !

जुबेरखां, युसुफशेट अित्यादि खुलना येथील अिस्लामी सज्जनांवरही असाच अेक प्रसंग ओढवला आहे. स्वर्णमयी नांवाच्या हिंदु कन्येला पळदून नेण्याचा त्यांनी यत्न केला. असे हजारो मुसलमान हिंदु कन्यकांस पळवीत असतात. ही त्यांची पिढीजात वहिवाट आहे. या वहिवाटीचा अुपभोग जुबेरखां आदींनी घेणें त्यांचें कर्तव्य होतें. पण खुलनाच्या सेशन्स कोर्टात त्यांचेवर ३६ आणि १४४ अित्यादि कलमांखाली खटला चालू असून ही अिस्लामी अनुयायांची धार्मिक वहिवाट बंद पाडण्याचा प्रयत्न होत आहे. तरी त्या सेशन्स जज्जासही तत्काळ अेक चिठी धाडण्यात यावी. म्हणजे तोही थरकाप भरून शुद्धीवर येअील आणि स्वर्णमयीला मुसलमानांचे हातीच सोपवून देअून तिचा अुद्धार करील.

लाला नानकचंदला ज्या गाझीनें मारलें त्याला तर फासावर लटकावले जाण्याची भयंकर शिक्षा झालीच. पण ज्या जागी ती हत्या झाली त्या मोची दरवाज्याच्या (लाहोर) वस्तीवर जादा पोलिस बसवून सरकारने तो व्यय तेथील मुसलमानां-पासूनच करावा म्हणून आज्ञा सोडली आहे ! मुसलमानांचा हा कोण छळ ! हत्यांवित्त्यांसारखे सहज घडून जाणारे किरकोळ अपराध घडताच विचाऱ्या हत्यारी धर्मनिष्ठांस धडाधड फाशीच्या शिक्षा देण्यात येतात. ते गाझी लोक रडले तरी त्यांच्या माना फासातून सुटत नाहीत !—तें राहोच, पण ज्या जागी हत्या झाल्या त्या जागेने काय केलें ? पण त्या जागेवरही जादा पोलिसांचा कर! निर्धन मुसलमान ' हाय तोबा ' करीत आहेत ! – या लाहोरच्या कमिशनरलाही अेक धमकीचें पत्र टाकलेंच पाहिजे. म्हणजे आता त्या भ्याडाची घाबरगुंडी अुडून तो ते जादा पोलिस अुठवील आणि फार्शा देअून टाकलेल्या मुसलमानांचे त्याने घेतलेले प्राणही परत देअून टाकील !

नागपूरलाही अेका गाझीचा असाच छळ चालला आहे. या गाझीचें नाव अबदुल कादर असें आहे. हिंदूंच्या कन्यका पळवून त्यांस बलात्काराने मुसलमान करण्याचें

जें महत्कार्य सध्या मुसलमानांतील अनेक साधूंनी हाती घेतलें आहे त्यात या गाझी-चीहि गणना आहे. सकू नांवाच्या अेका चालत्या हिंदु स्त्रीस तुझ्या वहिणीचें घर मला माहीत आहे, मी तुला तेथे पोचवितो अशी मार्गाने थाप मारून तिला अचानक आपल्याच घरी नेली. नंतर माझी बायको तुला आत बोलावते आहे म्हणून तिला आत नेली. तत्काळ तिला खोलीत बंद करून बंदूक दाखवून चूप करून टाकली. रात्री तिच्यावर बलात्कार करून, तांग्यात घालून दुसऱ्या अेका ठिकाणी आपल्या मुलीच्या घरी तिला घेअून गेला. त्यास त्याच्या दोघा मुलांनीही या पवित्र कार्यात साह्य केलें ! त्याच्या बायकोने आणि बहिणीनेही त्या स्त्रीवर होणाऱ्या बलात्कारास हातभार लावून तिला मुसलमान हो म्हणून स्वत: धमकावलें. शेवटी अेका कागदावर अेक्या मुसलमान दरोग्याचे घरी तिच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात आला – अर्थातच स्वसंतोषाने मी मुसलमान होत्यें अशा अर्थाच्या कागदावर ! योगायोगाने त्या हिंदु कन्यकेच्या प्रार्थनेस अीश्वर पावून पोलिसला ती भुमका कळली आणि आतां गझनिया पकडला गेला असून त्याच्यावर नागपूरला खटला चालला आहे ! वास्तविक पाहता हिंदु स्त्रीस पळवून बलात्कार, छळ अित्यादि पवित्र कोटिक्रमांनी मुसलमानी धर्माची महती पटवून वाटविणें, हें कृत्य मुसलमानी समाजात किती आदरणीय समजलें जातें ते, अबदुल्लाच्या या हिंदु कन्यकेला वाटविण्याच्या कामी प्रत्यक्ष त्याच्या आणि मुसलमान दरोग्याच्या मुसलमान स्त्रीने, वहिणीने, मुलांनी आणि आजूबाजूच्या मुसलमानी घरांनी साह्य दिलें यावरून स्पष्ट होत आहे. पण या नागपूरच्या दुष्ट सिटी मॅजिस्ट्रटने त्या लोकांवर खटले भरावे हें केवढें काफरपण आहे! एतदर्थ या मॅजिस्ट्रेटलाही मृत्यूच्या धमकीचें पत्र रीतसर धाडण्यात यावेंच !

हिंदु कन्यकांस आणि अनाथ मुलांस बलात्काराने वाटविणें हें कृत्य मुसलमानी स्त्रियाही किती पवित्र आणि आदरणीय मानतात याचें आणखी अेक अुदाहरण कटनी येथे नोव्हेंबरमध्येच घडलें आहे. अेका तेरा वर्षांच्या ब्राह्मण कन्यकेवर मार्गात अेकाकी पाहून खिस्तू नांवाच्या मुसलमानी साधु पुरुषाने झडप घातली, त्यासरशी ती पोरगी ओरडली. तत्काळ त्या साधूच्या धर्मशील पत्नीने तिचे हात धरून ओढले आणि तिच्या तोंडात बोळा कोंबून सुरा उपसला. या मुसलमानी साधूच्या साध्वीने मग त्या मुलीला दूर आपल्या चुलत्याच्या घरी पोचवून लपविलें. हिंदु कन्यकेस मुसलमानाने धरताच तें कृत्य पचविण्यासाठी झटणें हें प्रत्येक मुसलमानाचें कर्तव्य आहे ही भावना मुसलमानी समाजात किती खोल रुजली आहे तें त्यावरूनही व्यक्त होईल की पोलिस शोध चालू होताच त्या खिस्तूच्या चाचीने त्याच्या आईच्या हाती ती पोर लपवून ठेवण्यास दिली. ती खिस्तूची आई त्या मुलीस पळवीत असता धरली गेली ! आता गाझी खिस्तू आणि गाझिणी ती त्याची बायको हवालातमध्ये बंद आहेत! अेखाद्या हिंदु मुलाने अेखाद्या मुसलमान पोरीस पळवून आणिली असती, तर हिंदु आई त्याची धन्यता मानण्याचे स्थली त्याच्या हाताला

उलथणें तापवून डाग देती आणि त्याचे संबंधीच नव्हत तर उभे हिंदु गाव काशी-रामेश्वरपर्यंत ऐकू जाईल अशी बोंब मारून उठतें आणि तो हिंदु मुलगाच मुसलमान झाला असें म्हणून त्यास हुसकून देते. पण खिस्तूची आई पहा किती साध्वी आणि धर्मशील बाई ती ! तें राहोच, पण या गाझी-गाझिणी जोडप्यास हवालातमध्ये बंद करणाऱ्या प्रत्येक नराधमास मृत्यूचें वारंट सोडून पकडलेंच पाहिजे. त्याचा पत्ता आहे " कटनी, पोलिस हवालत ".

आणखी एका ज्या पत्यावर धमकीचें वारंट धाडलेंच पाहिजे तो हा : 'राम-स्वरूप मोटार ड्रायव्हर, बाजार मुहल्ला कानपूर.' – कारण एका मुसलमान स्त्रीला तिच्या नवऱ्याने टाकून दिल्यानंतर कित्येक दिवसांनी रामस्वरूपाने तिला शुद्ध करून हिंदु स्त्रीप्रमाणे तिच्याशी लग्न लावण्याचें निश्चित केलें. अर्थात् हा महान् अपराध मुसलमानांच्या धर्मभीरु हृदयास असह्य दुःख देता झाला. हिंदूच्या विवाहित स्त्रीला बंगालमध्ये यशोदा सुंदरीच्या आणि अन्य घटनात झालें तसें अगदी नांदत्या घरातून ओढून नेऊन बलात्कारून, मुसलमान करून घेणें हें असल्या मुसलमानांचें पवित्र कर्तव्यच आहे. तो त्यांचा, हे गाझी गुंड आणि मंडळ समजतात त्या अर्थी – धर्मच आहे. पण म्हणून हिंदुही मुसलमानांच्या टाकून दिलेल्या स्त्रियांना कां होईना पण शुद्ध करून त्यांच्याशी लग्न लावू पहाणार की काय ! काफर कुठले ! अर्था-तच शेकडो गाझी गुंड आणि मंडळींनी त्या रामस्वरूपाचे घरावर चढाई केली आणि मुलगीला पळविणार तोंच–पोलीस आले ! कोतवालीवर जाताच स्त्रीने सांगितलें ' मी शुद्ध होऊन हिंदु झालें आहे. रामस्वरूपावाचून परपुरुषास पाहणें हें मी पाप समजत आहे ! हें कथन होताच दुष्ट इंग्रजांच्या पापी निर्बंधाप्रमाणे ती स्त्री रामस्वरूपाला देण्यात आली. एतदर्थ रामस्वरूपाच्या पत्यावरही एक धम-कीची चिठ्ठी धाडण्यात यावी आणि ते दुष्ट निर्बंध असलेलें इंडियन पीनलकोडच जाळून टाकण्यात यावें !

बंगाल्यांत फेनी येथे हरचंद्रदासच्या शामनाद नामक स्त्रीला बलात्काराने लाल-मिया नांवाच्या गाझीने पळविली होती. त्याला दोन वर्षे सक्तश्रमाची शिक्षा झाली. तेंही अेकवेळ क्षम्य म्हणता येईल; पण अलीपूरच्या सबडिव्हिजन मॅजिस्ट्रेटच्यासमोर सहासात गाझींवर अेका सन्देशखाली गांवच्या शशिबाला नामक विवाहित हिंदु स्त्रीने जो कहर गुजरविला आहे त्याचा वचपा गाझी गुंड आणि मंडळ यांनी अगदी त्वरित काढलाच पाहिजे. शशिबालेचा नवरा अतिशय आजारी. ती सतरा वर्षांची घाबऱ्या घाबऱ्या औषध आणि साह्य मागण्यास शेजारीपाजारी फिरू लागली. अशा अवस्थेत तिची दया येणें साहजिकच होतें. तशी तिची दया येऊन अेका धर्मभीरु मुसलमानाने तिला औषधासाठी दुसऱ्याकडे नेलें. त्याला दया आली तशी आणखी अेकाला दया आली. होता होता दया हेंच ज्यांचें ब्रीद आहे असे सहासात गाझी अेकत्र जमले. त्यांनी त्या शशिबालेला अेकान्त स्थळी ओढली आणि प्रत्येकाने तिच्यावर

त्याची मुसलमानी दया करण्यास आरंभ केला ! सकाळी या अत्यंत यातनेने तळमळत अर्धमूर्च्छित अवस्थेत ती शशिवाला सडकेच्या वाजूस पडलेली होती. तिला पोलिसाने पाहिलें. आणि त्या दुष्ट पोलिसांनी तिच्यावर ' दया ' न करता तिला मॅजिस्ट्रेटसमोर नेलें आणि तिचें कथन घेऊन त्या सहा सात गाझींचीच पकडापकडी मांडिली ! न्यायालयांत ती १७ वर्षांची शशिवाला रडत रडत तिचे हाल जेव्हा सांगू लागली तेव्हा प्रेक्षकातील कित्येक निर्दय नरपशु त्या मुसलमान गाझींप्रमाणे हसण्याचें सोडून दु:खाने अश्रू गाळीत होते ! अर्थात् त्या शशिवालेचा कड घेऊन अश्रू गाळणाऱ्या या प्रेक्षकांस आणि त्या गाझींस पकडूं पाहाणाऱ्या सर्व मंडळीस, पोलिसांस, मॅजिस्ट्रेटास धडाधड धमकीचीं पत्रें धाडून साफ कळविलें पाहिजे की, जर शशिबालेची चौकशी वंद न पाडाल आणि केवळ दया केल्याच्या अपराधासाठी सहासात मुसलमानी धर्मभक्तांस पकडापकड करण्याचें क्रौर्य करण्याचें बंद न कराल तर–सहा आठवड्यांचे आत तुमच्यापैकी प्रत्येकास, गाझी गुंड आणि मंडळी आपल्या पवित्र सुऱ्याने भोसकण्याचें धर्मवीरत्व गाजविल्यावाचून राहणार नाहीत ! म्हणजे उभे कलकत्ता पोलिस भिऊन जाईल. टगार्ट साहेवही विलायतेस पळून जाईल ! !

अर्थात् आम्ही दिलेल्या शेकडो पत्र्यांवर निरनिराळीं पत्रें टाकण्यास व्यय अतोनात लागेल हें खरें आहे. त्यावाचून ठिकठिकाणी दंग्याचे अपराधाविषयी गेल्या केवळ दोन महिन्यांत दहा वारा मुसलमानांस जन्मठेप काळेंपाणी, वीस पंचवीस जणांस मुलें पळविण्यासारख्या य:कश्चित् गोष्टीसाठीही पांच पांच, सात सात वर्षांच्या कठोर कष्टाच्या शिक्षा आणि कित्येकांस दोन चार वर्षांच्या वेडंच्या, अंधार कोठड्या, तुरुंग अित्यादि अमानुष शिक्षा देण्यात आल्या आहेत. त्या सर्वांचा सूड अुगवावयाचा आहेच ! तेव्हा अितक्या ठिकाणी धमकीच्या चिठ्ठ्या धाडण्यास शाअीचा व्ययही शेंकडो रुपये करावा लागेल–पण यासही अेक तोड आहे—

मुसलमानी सज्जनांचा हा छळ कां होतो ? अर्थात् अिंग्रजी राज्याचे निर्वंध आपल्या गाझी गुंड मंडळाच्या मुसलमानी निर्वंधांशी जुळत नाहीत म्हणून. काफरांस वलात्काराने मुसलमान करणें हें पुण्यकृत्यही या अिंग्रजी निर्वंधान्वये पाप ठरतें ! तेव्हा ऑजिल्व्हे साहेव किंवा प्रिव्ही कौंसिलचे साहेवांचें टोळकें किंवा सैनिक, पोलिस आणि अलीगडचे मॅजिस्ट्रेट अित्यादि शेकडो लोकांस धमकीचीं पत्रें धाडीत बसण्यापेक्षा ज्या अिंग्रजी राज्याचे धनी जे जॉर्ज वादशहा, त्यांनाच अेक धमकीचें पत्र टाकलें की, काम होण्यासारखें आहे ! गाझी गुंड आणि मंडळाचे वतीने दिल्ली, मुंबई, कलकत्त्याच्या गल्ली कुचीतील कोण्या तरी भाजीविक्या मौलानांसारख्या अुतरदायी (जबाबदार) नागरिकाने लंडनच्या पत्त्यावर जॉर्ज महाराजांस निर्भीडपणे अेक चिठ्ठी धाडावी की, तुम्ही हिंदुस्थानचें राज्य ही

चिठ्ठी पोचताच अेका आठवड्याचे आत सोडून तो मुकुट अफगाणिस्थानच्या अमिराचे हाती सोपवून द्यावा !

अशा अेका चिठ्ठीसरशी मुसलमानी सज्जनांचा सर्व छळ बंद होअील ! अेका दोन आण्यांच्या तिकिटात काम ! अेकदा चिठ्ठी पोचली की, मग जार्ज महाराजांची काय छाती आहे की, ते ती अमान्य करतील ! गाझी गुंड आणि मंडळींची धमकीची चिठ्ठी आणि ती अमान्य ! शंकाच नको ! चिठ्ठी पोचण्याचा अवकाश की, ते हिंदुस्थानचा मुकुट पार्सलने परत धाडून देतील पार्सलने ! ! !

—ता. ९ डिसेंवर १९२७

✦ ✦ ✦

(६)

अरेरे ! नीलच्या पुतळ्याच्या घोड्याचा पाय तोडला

अत्यंत आनंदाची गोष्ट आहे की, नीलच्या पुतळ्यास हलविण्यासाठी चाललेला सत्याग्रह यशस्वी करण्याचें पूर्ण अहिंसात्मक साधन महात्माजींनी शेवटी शोधून काढलें.

अेका धटिंगण स्वयंसेवकाने नीलच्या पुतळ्याच्या घोड्याचा पाय अेका हातोड्याने तोडून टाकला ही बातमी अैकल्यापासून सर्व अहिंसात्मक अनत्याचारी बीरपुंगवांस, त्या दगडी घोड्यास झाल्या नसतील अितक्या असह्य वेदना होत होत्या ! मागे अेका कोकरास दुखापत झालेली पाहून बुद्ध भगवान् व्याकूळ झाल्याची अनुश्रुति सांगत असतात. पण तें जिवंत कोकरू होतें. जिवंत प्राण्याच्या दुखापतीने कासावीस कोणीही होअील; पण दगडास दुखापत झाल्यानेही ज्याचें अंत:करण तिळतीळ तुटेल तोच खरा अनत्याचारी वीरपुंगव ! असे अनेक वीर-पुंगव कळवळून अहिंसेच्या आचार्यकिडे गेले आणि रडू लागले. तेव्हा त्यांनी कळवळून मठाज्ञा सोडिली की, आता यापुढे कोणीही हातोडा घेअून सत्याग्रहात समाविष्ट होअू नये. लाठी, हातोडा हीं हत्यारें होत. भारतीय दंडविधानात (अिंडियन पीनल कोडात) त्यास शिक्षा नसेल; पण अहिंसात्मक भंडविधानात त्यासही शिक्षा असली पाहिजे. हत्यार हाती घेणेंच पाप आहे. नागपूरला हत्यारें धारण करण्याचा अधिकार मिळवावा म्हणून जेव्हा सत्याग्रह चालला, तेव्हा

आचार्यांनी अेवढ्याचसाठी साफ उत्तर दिलें होतें, की, ' शस्त्रासाठी आणि सत्याग्रह ! शस्त्र आणि सत्य एकत्र राहूच शकत नाहीत. शस्त्र धारण करण्याच्या अधिकारासाठी सत्याग्रह करणें म्हणजे सत्याग्रह शब्दाचा भयंकर दुरुपयोग करणें होय. शस्त्रें धारण करू नये, हा निर्बंध न्याय्य आहे. चोरी करू नये, दरोडा मारू नये, हें भारतीय दंडविधानातील निर्बंध तोडणें हें जसें पाप आहे, तसेंच शस्त्र धरू नये हा निर्बंध तोडणें हें अहिंसात्मक अनत्याचाराच्या शास्त्राप्रमाणे पाप आहे. ' म्हणून भारतीय दंडविधानाचे पुढे अेक पाअूल टाकून हातोडा – लाठी अित्यादि हत्यार तितके, अहिंसात्मक अनत्याचारी भंडविधान दंडनीय समजत असतें!

पण मग अनत्याचारी वीरपुंगवांनी प्रश्न केला की, ' महर्षे, मशीनगन्स मिळत नाहीत, हातोडे, लाठ्या, दगड हे मिळत असताही अहिंसेचे दृष्टीने आम्ही हाती घेअू नये म्हणून आपली आज्ञा सुटत आहे. तेव्हा आम्ही नीलच्या पुतळ्याकडे जाताना हाती तरी काय घेअून जावें ? '

तेव्हा मठाज्ञा सुटली की ' चिखल घेअून ' !

चिखल हाती घेअून प्रत्येक सत्याग्रही वीरपुंगवाने नीलच्या पुतळ्याकडे जावें आणि चिखलाचे गोळे त्या पुतळ्यावर, पोलिस पकडीतो मारीत राहावें ! हा निर्णय अैकून अनत्याचारी अहिंसाभक्तांच्या सैन्यांतील ते झाडून सारे सत्याग्रही वीरपुंगव आनंदाने पुलकित झाले. पुंगवच ते !

आम्ही त्या पुंगवातील अेक नसताही आणखी अेक तोड सुचवू अिच्छितो. हातोड्याने दगडास दुखापत होते तितकी चिखलाने होणार नाही. परंतु अहिंसेचें पवित्र व्रत धारण केलेल्या मनुष्याने चिखल तरी कसा मारावा ? कारण चिखल झाला तरी दगडाच्या डोळ्याविळ्यांत उडाला असता तो खपून दगडी पुतळ्यास शारीरिक दुःख थोडें वहुत तरी होणारच. अेतदर्थ आमची अशी नम्र सूचना आहे की, सत्याग्रही वीरांनी हातात चिखलही न घेता नुसतें नीलच्या पुतळ्यापर्यंत जावें आणि —

आणि दुरून त्या पुतळ्यास वाकुल्या दाखवीत उभें रहावें ! शुद्ध अहिंसात्मक सत्याग्रहास हें, चिखल मारण्यापेक्षा अधिक शोभेल. हातोडा, लाठी, दगड, याप्रमाणेच चिखल हेंही अेक हत्यारच आहे. अेतदर्थ चिखलही अहिंसात्मक अत्याचाराच्या भंडविधानात वहिष्कार्य समजला जावा.

वास्तविक हात देखील अेक हत्यारच आहे. आणि म्हणून तोही कापूनच टाकूनच सत्याग्रह्यानी जावें – पण जाअू द्या, हाताची गोष्ट तेवढी सोडून देअू ! जेवणाविवणाला आणि केळीं, नारिंगीं, सत्रीं अित्यादि खाण्यास उपयोगी पडणारी वस्तु आहे ती ! ! म्हणून या सत्याग्रही वीरपुंगवांनी नीलच्या पुतळ्यासमोर जाअून नुसत्या वाकुल्या दाखवाव्या !

—ता. १२ जानेवारी १९२८

✦ ✦ ✦

(७)

हाती आलेलीं चार प्रमाणपत्रें

नि:पक्षपाती तिऱ्हाअिताने तिऱ्हाअितास जर अेखादें प्रशस्तिपत्र दिलें, तर तें भूषणास्पद असतेंच. तें साहजिकही असतें. पण जर अेखाद्या मुलाने अेखाद्या पंडितास, 'भले पंडितजी?' म्हणून म्हटलें, अेखाद्या सुंता झालेल्याने अेखाद्या मुंज होणाऱ्या मुलावर आनंदाने चार तांदूळ फेकून तो समारंभ साजरा केला, अेखाद्या कर्झनने सुरेंद्रनाथांची वाहवा केली किंवा अेखाद्या कुत्र्याने तुकड्यासाठी भांडणाऱ्या दुसऱ्या कुत्र्यास, 'खूप भांडलास' म्हणून त्याची पाठ आपल्या पंजाने थोपटली, किंवा डायरने जालियनवालात कत्तल झालेल्या अेखाद्या मुलास पाहून अश्रु ढाळले, तर तीं प्रमाणपत्रें मात्र अगदी अपूर्व होत यात काही शंका नाही. अशाच प्रकारचीं दोन चार अपूर्व प्रमाणपत्रें आमच्या हाती आलेलीं आहेत, त्यांपैकी काही खाली देतो.

मुसलमानांचें हिंदूंस प्रमाणपत्र

हिंदु संघटनाविषयी मालवीयांनी किंवा मुंज्यांनी गोडवे गावे यात काही आश्चर्य नाही. ममत्वाने त्यांची बुद्धि अंधही झाली असल्याचा संभव आहे; पण मौलाना हजरत मोहानीही स्वत: म्हणतात की, 'संघटणाची चळवळ ठिकठिकाणी संघटित धोरणाने अेकसूत्री काम चालवीत आहे. कानपूर, नागपूर, बरेली अित्यादि सर्व जागी हिंदूंनीच दगा आरंभिला. त्या सर्व जागी हिंदूंनीच मुसलमानांना मारलें, पिटलें. हिंदु मुसलमानांपेक्षा फारच पुढे असून ते राजनीतिज्ञ आणि मोठे चलाख आहेत. त्याचा कट म्हणूनच मोठा पक्का आहे. प्रथम मुसलमानांना ते मारतात; मागून मुसलमानही मारू लागले म्हणजे लगेच हिंदु गवगवा करून आकाशपाताळ अेक करून टाकतात! जेव्हा अेकीचें ढोंग करून वसतात, तेव्हा मुसलमानांची सामाच्या ढालेखाली दडून हानि करितात. हिंदूंवर सरकारने खटले भरले की, हिंदु वकील त्यांचे खटले फुकट चालवितात. मुसलमानांचीं घरें-दारें व्ययाखाली अुजाड होतात. मुख्य काटा जर माझे मनात सलत असेल तर तो हा की, घरात छपून बसणारे हिंदु आज शक्तिमान् होअून बाहेर लढण्यास येतात! ते होअून टकरा घेतात ते अेवढ्यासाठी की, त्यांच्या मनात आमची शक्ति पारखून घ्यावयाचें असतें. हा संघटणाचा खेळ आहे.

मुसलमानांचें मुसलमानांस प्रमाणपत्र

विपक्षाने विपक्षाची स्तुति करणें हें प्रमाणपत्र जसें अपूर्व, तसेंच मित्राने मित्राची आणि गुरूने अनुयायांची निंदा करणें हें प्रमाणपत्रही तितकेंच विचारार्ह आणि अपूर्व होय यात शंका नाही. हिंदूंनी मुसलमानांविषयी काही म्हटलें, तर

तें खरेंच असेल असें नाही. पण मुसलमानांनी मुसलमानांविषयी जर काही म्हटलें तर तें तरी मुसलमानांना पक्षपाती म्हणून सहसा म्हणवणार नाही. अेतदर्थ स्वत: हसन निजामीसाहेव आपल्या 'मुनादी' पत्राच्या १४ सप्टेंवरच्या अंकात मुसलमानांस जें प्रशस्तिपत्र देते झाले आहेत, त्यातील काही अुतारे शुद्धि समाचारावरून देतो. हसन निजामी म्हणतात, 'आज आम्ही मुसलमान आर्यसमाजावर जळफळतो आणि सर्व जगास मुसलमान करू म्हणतो. पण खरी वस्तुस्थिति अशी आहे की (१) आम्ही मुसलमान केवळ नांवाचे मुसलमान आहो. (२) अल्लाने सांगितलें की खोटें वोलू नका; पण आजचे मुसलमान अितर सर्वांहून खोटें वोलणारे आहेत. (३) दारू पिअू नका म्हणून धर्माज्ञा; पण मुसलमान अुघड अुघड दारू पिअून झिंगतात. (४) चोरी करू नका म्हणून धर्माज्ञा; पण वंदिशाळांतून जाअून पहा की, अट्टल चोर तेवढे मुसलमानच अधिक. (५)धर्माज्ञा की वेश्यापण वाअीट; पण वाजारात जाअून पहा, वेश्यांमध्ये बहुतेक दुकानें मुसलमानिणींचीं ! त्यांच्याकडे जाणाऱ्या वेश्यागामी लोकांतही अधिक संख्या मुसलमानांचीच ! (६) आज सगळ्यांत आळशी आणि वाताडे आणि गावगुंड जर कोणी असतील तर ते मुसलमानच. (७) आमच्या पूर्वजांची कीर्ति कुठे ! आज लोकांत म्हणच पडली आहे, कोणी मनुष्य असा क्रूर—किंवा असा दुष्ट किंवा असा पापी आहे की, जसा मुसलमान ! वाअीट दुर्गुणांचे आम्ही अुपमान ठरलो आहो!'

(हें हसन निजामी असें म्हणत आहे – आपण नाही हो वुवा कधी मुसलमानांची अितकी अघळपघळ स्तुति करीत!)

हसन निजामीस 'दुर्रे' अुमरचें प्रमाणपत्र

वर हसन निजामीने मुसलमानांस दिलेलें प्रमाणपत्र दिलें आहे. आता मुसलमानांच्या 'दुर्रे अुमर' नांवाच्या पत्राने हसननिजामीस दिलेलें प्रशस्तिपत्र पहा : 'दुर्रे अुमर' आपल्या अेका लेखास 'पहिल्या प्रतीचा शिवराळ' म्हणून मथळा देअून त्यात म्हणतें :–हसन निजामी पहिल्या प्रतीचा शिवराळ आहे. तो आपल्या शिष्यांस आज्ञा देतो की, मला 'सिजदा' करा. 'सिजद्याचे 'चे वेळी शिष्यांना म्हणावें लागतें की, 'हे हसननिजामी अेकोजन – अिहलोक आणि परलोकचा तूच सरदार आहेस. तुझ्यावाचून 'सिजद्या 'चा कोण अधिकारी नाही ! !' महंमद अल्ली तर हसननिजामीस अुघड अुघड पैसे खाअू ! सरकारचा गुप्त हेर ! म्हणून गौरवीत असतात.

✦ ✦ ✦

कर्मठ हिंदूनीं अस्पृश्यांस दिलेलें प्रमाणपत्र

भडोच जिल्ह्यातील अंकलेश्वर गावी महारवाड्यातील महारांना पाण्याचा फार त्रास पडे. पण त्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर कोणी जाऊ देईना. तेव्हा त्रासून जाऊन आणि मुसलमानांच्या फुशीने उत्तेजित होऊन त्या महारांपैकी ३० महार मुसलमान झाले. तत्काल दुसऱ्या दिवशी कर्मठ हिंदूनी त्या महारांस मुसलमानी धर्माच्या सुंता नांवाच्या संस्काराने ते शुद्ध झाले असल्यामुळे त्यांस 'स्पृश्य' झाल्याचें प्रमाणपत्र दिलें! अितकेंच नव्हे, 'बोले तैसा चाले' ह्या अुच्च कर्मठ तत्त्वानुसार त्या मुसलमान होऊन शुद्ध झालेल्या महारांस त्याच सार्वजनिक पाणवठ्यावर त्याच दिवसापासून पाणी भरू देण्यास परवानगी दिली. जे महार त्या पाण्याच्या त्रासाने तळमळत असताही अजून मुसलमान झाले नाहीत ते अशुद्धच आहेत. पाण्यास त्यांस शिवता येत नाही हें सांगणें नकोच. त्या मुसलमान झालेल्या महारांस शुद्ध झाल्याचें प्रमाणपत्र लिहून देऊन आणि त्यांच्याबरोबर पाणी भरून 'बोले तैसा चाले' असें वागले. आमच्या वाचकांस म्हणूनच आमचा अनुरोध (शिफारस) आहे की आपण सगळ्यांनी प्रत्यही पहाटेस 'त्यांचीं वंदावीं पाअुलें!'

✦ ✦ ✦

शुद्धीच्या वातम्या देता देता 'श्रद्धानंद' थकत चालला! फेब्रुवारीत अेक हजार अहिंदु कुटुंबें म्हणजे तीन चार हजार लोक हिंदु मिशनने शुद्ध केले. समारंभ बारा तास चालला होता.

स्वामी श्रद्धानंदांनी जवळ जवळ ६०,००० मलकाना रजपूत मुसलमानांस शुद्ध करून घेतलें. तेव्हा त्यांची अेका मुसलमान हत्याऱ्याने पिस्तूल झाडून हत्या केली.

पण वर दिलेल्या कलकत्त्याच्या हिंदु मिशनच्या चालकांनीही श्रद्धानंदांनंतर गेल्या वर्षात, विशेषत: विहारमधील गद्दी मुसलमानांतील जवळजवळ १५००० मुसलमानांस शुद्ध करून घेतलें; आणि बंगालमध्ये ५०,००० हजारांवर शुद्धिकार्यें केलीं. या हिंदुमिशनच्या शुद्धिकार्याचा आकडाही अशा रीतीने साठ हजारांवर आल्याने त्याच्या चालकांचीही मुसलमानी आततायांकडून मारलें जाण्याची योग्यता सिद्ध झाली होतीच. तिचें सार्थक करण्यासाठी गेल्या महिन्यात श्रीमान् स्वामी परमानंदजी (प्रो. भाअी परमानंद नव्हेत) यांना अेका मुसलमानाने सुरा भोसकून घायाळ केलें आहे. हा मुसलमान ब्राह्मण वेषाने शुद्ध होणाऱ्या गद्दी मुसलमानांत छपून बसला होता. त्याचे अेकदोन वार होताच तो धरला गेला. परंतु परमानंदजी श्रद्धानंदांप्रमाणे मारले न जाता केवळ घायाळच होऊन सुटले.

हें फार वाअीट झालें; परमानंदजींवर श्रद्धानंदजींप्रमाणे वार झाला हें अितकें वाईट नव्हे; तर परमानंदजी श्रद्धानंदजींप्रमाणे हत्येस वळी न पडता वाचले हें फार वाअीट झालें.

कारण श्रद्धानंदजी वाचले नाहीत म्हणून जशी शुद्धि वाचली आणि त्यांच्यामागे त्यांच्या न वाचण्यानेच हिंदु मिशनकडून साठ हजार मुसलमान-ख्रिस्त्यांची

शुद्धि करवून घेतली, त्याप्रमाणे श्रीमान् परमानंदजींच्या न वाचण्याने आणखी कोणाकडून आणखी कोणा साठ हजार मुल्ला मिशनऱ्यांस शुद्ध करून घेवविलें असतें. पण परमानंद वाचल्याने शुद्धीस पुन्हा अेकदा जोराची चालना मिळण्याची संधि गेली.

परमानंद स्वामींच्या डाव्या हातास घाव झाला आहे. चिंता नाही. अजून अुजवा हात आहेच. त्याला घाव लागण्याची संधि येअीतो आणखी दहा वीस हजार गद्दी मुसलमानांस तो हात शुद्ध करीलच.

वीस हजार मुसलमानांच्या शुद्धीसाठी अेक हात –! काही फारसा महाग सवदा नाही झाला हा. अशा दराने आज अेक अेक हात कोणीही हाडाचा हिंदु मोठ्या आनंदाने विकील.

हो, हात जर चांगला दाखविता येत असेल तर गोष्ट निराळी. पण तो नुसताच खांद्यापासून लोंबकळत राहाण्यापेक्षा वरील बाजार भावाने विकला गेला तरी पुरे.

✦ ✦ ✦

लाला लजपतरायजींनी भर विधिसमितीत (लेजिस्लेटिव्ह असेंब्ली) ठासून सांगितलें की, त्यांनी अेकट्याने आजवर जितका पैसा आणि प्रयत्न 'दलित आणि अस्पृश्य' म्हणविल्या गेलेल्या जातींच्या अुन्नत्यर्थ व्यय केला आहे, तितका ब्रिटिश सरकारने अुभ्या शंभर वर्षांत केलेला नाही ! त्याचप्रमाणे अेकटे विर्ला शेठही दरमहा २,०००० रुपये अस्पृश्यांच्या अुन्नतीप्रीत्यर्थ व्यय करितात. पण सरकारने अस्पृश्यांच्या अुन्नतीसाठी वीस हजार कवड्या देखील दरमहा कधी व्यय केल्या नाहीत.

—आम्ही म्हणतो नसतील. अेक कवडी देखील अस्पृश्यांकरिता ब्रिटिश सरकारने व्यय केली नसेल. पण त्यामुळे सरकारवर आरोप तो कोणचा आणि कसा लागू होतो ? ब्रिटिश सरकार म्हणजे कर गोळा करणारी सत्ता आहे. ती काय मार्गाने भिकाऱ्यासाठी मोहरा अुधळीत जाणारी कोणी अहल्याबाअी आहे की काय ! अस्पृश्यांपासून अितरांप्रमाणेच कर अुकळण्यात ब्रिटिश सरकार काही कसूर करीत नाही ना ? झालें तर मग ! अस्पृश्यांसाठी काय अगर कोणाचसाठी काय कराचा व्यय करण्याचें काम काही सरकारी काम नव्हे. ब्रिटिश सरकारी काम अुकळण्याचें; — अुधळण्याचें नव्हे !

✦ ✦ ✦

बारडोली पुन्हा कर न देण्याचा सत्याग्रह करणार आहे म्हणे! चौरीचौऱ्याच्या कानात कोणी मध्येच ही वातमी पुटपुटला नाही म्हणजे पुरे ! नाही तर तिकडे पुन्हा अेखादी चोरवाट मोकळी पडावयाची ! चौरीचौऱ्याच्या चोरवाटेने पळून जाण्याची वारडोलीच्या सत्याग्रहाची पुरातन प्रसिद्धि आहे.

—ता. २२ मार्च १९२८

✦ ✦ ✦

(८)

भरतपूरच्या महाराजांस गादीवरून काढावें, कारण काय तर मशीद पाडली

भरतपूरच्या महाराजांस गादीवरून अुतरण्याचा प्रसंग आला होता. थोडक्यात निभावलें. पण तें निभावण्याच्या आधी हसन निजामीस स्वर्देव अल्लाजींचीं काही पत्रें सापडलीं. त्यावरून निजामीने आपल्या पत्रात प्रसिद्ध केलें की, ' भरतपूरच्या महाराजांवर हा दुर्धर प्रसंग गुदरला नसता. पण त्यांनी त्यांच्या राज्यात (ते नको म्हणत असता) बांधली गेलेली अेक मशीद पाडून टाकली. म्हणून अल्ला क्रुद्ध होअून हें संकट त्याने आणलें ! ' निजामीचें हें म्हणणें खरें आहे. अल्ला तसेंच जागृत दैवत आहे खरें !

पण रुद्रजीही आताशी काही निजूनच नसतात. तेही थोडेसे जागे झाले आहेत असें दिसतें. कारण अल्लाजी पाडलेल्या मशिदीचा सूड घेण्यास अुत्तरेस भरतपूरकडे गेले आहेतसें पाहून गुलबर्ग्यास आपल्या मंदिराची मागे जी निजामाने पायमल्ली केली तिचा सूड अुगविण्यास रुद्रजींनी दक्षिणेस हैद्राबादेवर स्वारी केली. निजामाची दाढी खेचून त्यासही गादीवरून कोलमडून पडू पाहीतो गदगद हलविला आणि हैदराबादेस प्लेगची आग लावून दिली ! अल्लाजी देव, तर रुद्रजी महादेव !

✦ ✦ ✦

हसन निजामीस अेका स्वर्देवाचीं हीं पत्रें अुपलब्ध होण्याचे संधीसच अिकडे भोळ्या भारतीयांस ' नाविष्णुः पृथ्वीपतिः ' या वचनाधारे भूदेव वाटलेले अिंग्लंडचे विगत महाराज अेडवर्ड यांचींही काही पत्रें सर सिडेन ली यांना अुपलब्ध झालीं आहेत. तीं वाचून नास्तिकांची देखील ' नाविष्णुः पृथ्वीपतिः ' या शास्त्रवचनावर अढळ निष्ठा वसल्यावाचून राहणार नाही.

त्या पत्रांपैकी अेकात ' कर्मवीर ' प्रसिद्ध करितें की, लॉर्ड मोर्लेने मि. सिंह यांना जेव्हा व्हाअिसरॉयच्या कार्यकारी मंडळात नेमण्याची व्यवस्था केली, तेव्हा राजे अेडवर्ड यांनी लिहिलेलें अेक अंतःस्थ पत्र आहे. त्यात अेडवर्ड १९०१ मध्ये लिहितातः–

' तुम्ही म्हणता व्हिक्टोरिया राणीने हिंदी लोकांस हें वचन दिलें, तें वचन दिलें; पण याविषयी मला वाटतें की, काळ्या मनुष्यास (Native) व्हिक्टोरिया अशा साम्राज्याच्या अगदी अंतरंगमंडळात नेमण्याच्या आज्ञेवर कधी स्वाक्षरी करती ना ! मला तर अशा घातक कागदावर केवळ निरुपायाने सही करावी लागत आहे ! '

राजभक्त म्हणून प्रख्यात असलेल्या भारतीयांस – या नेटिव्हांस – साम्राज्याचे अंतरंग मंडळात कां मज्जाव असावा या विषयाचा अधिक ऊहापोह दुसऱ्या अेका पत्रात राजे अेडवर्ड परम कारुणिकपणे करीत असता लिहितात:–

'साम्राज्याच्या अंतरंग मंडळात कोणत्याही काळ्या माणसास घेणें हें मला फारच धोक्याचें वाटत आहे ! कार्यकारी मंडळात अशा कितीतरी गोष्टींची चर्चा करावी लागते की जो 'नेटिव्हां'समोर करणें अगदी अनिष्ट आहे.' विचारा सायमन तो तरी अधिक काय म्हणतो आहे !

अेडवर्ड राजे पुढे लिहितात : काळा माणूस कितीही चतुर असो, तुमचें कार्यकारी मंडळ त्यास कितीही राजभक्त समजो, तरीही तो कधी आपल्या विरुद्ध जाअील हें कोणास सांगता येणार आहे ? तुमच्या गुप्त गोष्टी तो वेळप्रसंगी चव्हाठ्यावर आणणार नाहीच म्हणून हमी कशी देता येणार ! मी निरुपायाने सही केली तरीही माझें हें विरुद्ध मत नोंदवून ठेवू अिच्छितो. काळा मनुष्य प्रसंगी घातक आहे हें मत बदलणें शक्य नाही.'

अेडवर्ड महाराजांनी हेंही लिहिलें आहे की, 'व्हिक्टोरियाही याचे विरुद्ध जाती, अितकेंच नव्हे तर माझा पुत्र (आजचे राजे जॉर्ज हे) देखील माझ्याशी सहमत आहे !' बीज तैशीं फळें । अुत्तम वा अमंगळ ।

काळ्यांतील अेका चतुर मनुष्यास सुद्धा, तो राजभक्त असला तरी, सरकारच्या नेमणुकीनेही नुसत्या व्हाअिसरॉयच्या कार्यकारी मंडळात बसविण्या-अितका विश्वासदेखील त्या लोकांवर ठेवण्यास परमदयाळू महाराजे अेडवर्ड सिद्ध नव्हते, अितकेंच नव्हे, तर ते आणखी अेका पत्रात लिहितात की:–

'मला हें वाचून आश्चर्य वाटलें की, भारतमंत्र्याशी होणारा पत्रव्यवहार काळ्या लोकांस दाखविला जातो; अितकेंच नव्हे तर तुमच्या गुप्त कागदपत्रांच्या प्रती 'नेटिव्हच' करितात ! ही पद्धति फार भयावह आहे ! मला ती फारच आपत्तिजनक वाटते !'

कार्यकारी मंडळात अेक अधिकारी म्हणून नेमला जाणारा 'नेटिव्ह' अयोग्य आहे, अितकेंच नव्हे तर नुसत्या कागदांच्या प्रती करण्याच्या कारकुनीच्या जागेसही हे काळे पाय लागणें हितावह नाही !

तरी देखील परमदयाळू अेडवर्ड महाराजांनी शेवटी अेक 'नेटिव्ह' व्हाअिसरॉयचे कार्यकारी मंडळात नेमू दिला ! कोण प्रजावात्सल्य हें !

ही दु:खाची गोष्ट आहे की, ह्या प्रजावत्सल पुरुषाची ही मनीषा तेवढी अपूर्ण राहून गेली की, 'तुम्ही नेटिव्हांना हा जो चंचुप्रवेश करू दिलात त्याचा मुसलप्रवेश होण्याचे आधीच तो नेटिव्हांस दिलेला अधिकार परत घेण्याचें धैर्य दाखविण्यास आता दुसरा अेखादा तसाच निधडया छातीचा मनुष्य पाहिजे.'

हा जो तसाच निधडया छातीचा मनुष्य अेडवर्ड महाराजांस पाहिजे होता तोच तर हा सायमन नसेल ना ?

✦ ✦ ✦

असल्या दैवी राजवटीत साधारण सृष्टीतही दैवी विपर्यास घडणारच. तें पहा. बिहारमध्ये अेका बकरीने मनुष्यासारख्या प्राण्यास जन्म दिला आहे ! ठीकच आहे तें. जर मनुष्यप्राणी आज हिंदुस्थानात बकऱ्यासारख्या प्राण्यास धडाधड जन्म देत आहेत तर बकरीने मनुष्यासारख्या प्राण्यास जन्म द्यावा यात काय नवल !

जर रशियात अेखादी बकरी मनुष्यास जन्म देती तर नवल ! कारण तिथे मनुष्य–मनुष्यिणी बकऱ्यांस जन्म देत नाहीत ही गोष्ट तिकडच्या मनुष्यमनुष्यिणीचें वेलफर्ड वेलाकने काढिलेलें खालील चित्रच समर्थील. ते म्हणतात,

' मी रशियात शिरलो तेव्हा मला सांगण्यात आलें की, ब्रिटनने रशियाशी संबंधविच्छेद केला तेव्हा सर्व रशियाभर रणोत्साह पराकाष्ठेला पोचला. मातृभूवर परकीयांची स्वारी होण्याचा संभव आहे हें सिद्ध करण्यास जो तो पुढे येतो अेवढेच नव्हे तर मुलगे, मुलगेच नव्हत तर मुली सैनिकशिक्षण शिकू लागल्या. श्रमिक लोकां (Labourers) च्या शाळांतून देखील मुलींचीं सैनिक पथकें संघटविण्यात आलीं. सक्तीच्या सैनिक शिक्षणाअितकें वय झालेलें नसताही कोवळीं मुलें स्वेच्छेने हट्ट धरून बसलीं की, आपलींही सैन्यें संघटविण्यात यावीं. महा-युद्धाचे दिवस सोडले तर रशियात मला आज आढळत आहे असा रणोत्साह मी कधीही पाहिला नाही. विशेषत: सप्टेंबर चारला मी जें दृश्य पाहिलें त्याचा माझे मनावरच फार परिणाम झाला. तो युवक संघाचे प्रदर्शनाचा दिवस होता. जवळ जवळ पांच लक्ष तरुण मुलांचीं सैनिक पथकें मास्कोच्या लाल चौकातून त्या दिवशी चाल करून गेली. शेकडो प्रकारांनी त्या युवकसंघांनी रशियाचें सशस्त्र संरक्षण करण्याचा आपला निश्चय व्यक्त केला. त्या दिवशीचा तो अुत्साह आणि निर्धार अपूर्व होता. खरोखर रशियावर स्वारी करणाऱ्या कोणत्याही राष्ट्राची कीव यावी असें तें युवक संघीय प्रदर्शन होतें. कारण जगातील कोणत्याही राष्ट्राच्या धनिक सत्तेची अशा युवक सेनेविरुद्ध लढाअी करण्यासारखें सैन्य धाडण्याची छातीच नाही ! त्या सगळ्या रशियन तरुणांच्या क्रोधाचें मुख्य लक्ष्य अिंग्लंड होतें. ऑस्टिन चेंबर्लेनच्या पुठ्ठ्याच्या प्रतिमा ठिकठिकाणी अपमानित करण्यात येत होत्या. जो त्या प्रतिमेस अचूक वेधील त्या युवकास पहिल्या प्रतीचें पारितोषक मिळे ! '

असल्या सशस्त्र प्रदर्शनें करणाऱ्या सिंहासारख्या दंतनखयुक्त युवकसंघाचे देशात मनुष्यास जन्म देण्याची बकऱ्यांची काय माय व्याली आहे !

या दंतनखयुक्त क्रुद्ध युवकसंघाची सैनिक सशस्त्र प्रदर्शनें पाहून विल्फर्ड विलॉक यांच्या अंगावर जगात अजून भयंकर रक्तपातांचीं युद्धें घडणारच आहेत

असें वाटून शहारे अुभे राहिले, म्हणून ते म्हणतात, 'पण हे शहारे अुठवून घेण्यास ते त्या 'तामसी' रशियात गेलेंच कशाला ; युवकसंघाची सशस्त्र प्रदर्शनें पाहून त्यांच्या अंगावर जसे शहारे अुठले, तसेच या सात्त्विक हिंदुस्थानात जर ते आले असते तर आमच्या युवकसंघाच्या हसतमुख परिषदा पाहून त्यांच्या अंगास गुदगुल्या झाल्या असत्या गुदगुल्या ! सात्त्विक युद्धें जगानें कशीं लढवावीं हें जगास शिकविण्यासाठी परवा सायमन कमिशनची स्वारी हिंदुस्थानवर येताच युवक परिषदांनी नावांतून बसून नुसते हातरुमाल अुडवीत त्यांस अडथळा केला आणि सांगितलें की, 'जा ! परत जा ! तुमची स्वारी आम्हांस नको आहे.' अितकेंच नव्हे, तर अेका तामसी सार्जंटाने त्यांच्यावर सोटे चालविले तरीही आपलें सत्त्व ढळू न देता त्यांनी निधड्या छातीने कोर्टात फिर्याद देखील लाविली ! या विद्यार्थ्यांनी हा किंचिन्मात्र तरी तामसीपणा दाखविला पण वाकी हजारो हजार विद्यार्थी तर केवळ चहा, चिवडा आणि चिरूट पीत, खात आणि ओढीत आपल्या देशाचें तोंड निर्भेळ सत्त्वगुणाची सफेती फासून अुज्ज्वल करीत होते.

केवळ मद्रासला तेवढी थोडी दगडफेक दंडादंडी अित्यादि तामसी प्रकार झाले खरे; नाहीतरी मद्रासी लोक मिर्च्या फारच खातात !

असले तुरळक अपवाद सोडले तर वाकी सर्व दंतनखविहीन सात्त्विक कढीभात ! अुगीच नाही या देशात बकऱ्या मनुष्यास जन्म देत !

—मार्च १९२८

✦ ✧ ✦

(९)

शुद्धीच्या नांवाखाली गोमंतकात राजकीय चळवळ टाअिम्सचा शोध

मुंवअी 'टाअिम्स' ला असा अेक अद्भुत शोध लागला आहे की, गोमंतकात जें शुद्धिकार्य चाललें आहे त्याच्या वुरख्याखाली राजकीय चळवळे मोठी अुलाढाल करू पाहत आहेत. तें म्हणतें, 'ब्रिटिश हिंदुस्थानातील महाराष्ट्रीय जहाल पुर्तुगीज हिंदुस्थानातील तरुण जहालांशी संगनमत करीत आहेत की, गोमंतकास महाराष्ट्रात संयुक्त करून ह्या अखंड महाराष्ट्राचें अेक स्वतंत्र आणि बलाढ्य राज्य स्थापावें !' अीश्वर करो आणि बोलाफुलास गाठ पडो !!


'टाअिम्स'ने जसा हा अचूक शोध अिकडे महाराष्ट्रात लाविला, तसाच कलकत्त्यासही पोलंडच्या अेका गोऱ्या ज्योतिष्याने आणखी अेक त्याहूनही अद्भुत शोध लाविला होता. तो ज्योतिषी म्हणाला, 'मी बारा वर्षे हिंदुस्थानात ज्योतिषादिक अभ्यास करण्यात घालविलीं असून माझीं भविष्यें अचूक असतात. येत्या मार्च २२ ला फार मोठा भूकंप होअून सर्व हिंदुस्थान त्यात 'गडप होणार आहे!' ह्या भयंकर 'गडगडाटात' सायमन कमिशनसहच हिंदुस्थान गडप होणार होतें की अेकटेंच, तें त्याने काही स्पष्ट सांगितलें नाही.

मारवाडी बाजारात ह्या भविष्याने मोठी गडबड अुडविली. कित्येक लोक अत्यंत चिंतातुर झाले. परंतु अिंग्रजी राज्यातील हम करे सो कायद्यास कंटाळलेले चळवळे लोक मात्र अुलट अत्यंत आनंदभरित दिसू लागले. कारण त्या वेबंदशाहीतून हिंदुस्थानची सुटका करण्याचा अनत्याचारी अहिंसेहूनही हा सुलभतर आणि अुत्कृष्टतर मार्ग होता! आम्ही अेवढ्या चळवळ्यातील अेक अनत्याचारी, अहिंसक प्राणी असल्याने मार्चच्या २२ व्या तारखेस हिंदी स्वातंत्र्यदिनासारखा सुवर्ण दिवस समजून त्याची वाट पाहत बसलो. अेवढ्या भूकंपात – ज्यात हिंदुस्थानचें हिंदुस्थान गडप होणार – त्यात बूच न लावलें तर आपली दौत सांडून जाअीलच हीही गोष्ट आनंदाचे भरात आम्ही विसरून गेलो! आमच्या शेजारच्या पानविडीवाल्या दुकानदाराने मात्र 'भूकंप होअू देअू नकोस देवा! मी अेक मूठभर तांदूळ त्या ज्योतिष्यास देअीन' म्हणून नवस केला होता.

मार्चची २३ वी तारीख अुजाडली! पाहतो तो न हिंदुस्थान गडप झालें न अिंग्रजी राज्य! फार काय, बूच न घातलेली ती आमची दौत देखील अुपडी झाली नाही!

तो पानविडीवाला म्हणाला 'मोठें गंडांतर टळलें!' परंतु त्या भविष्यवादी गोऱ्यास जो तो सतावू लागला आहे की, तुझें भविष्य खोटें ठरलें, अशी बातमी आली. तेव्हा तत्काल त्या पानविडीवाल्याने आपण मूठभर तांदूळ अर्पिण्याचा केलेला नवस त्या ज्योतिषीबुवांस कळविला.

आता त्या ज्योतिषीबुवांनी घाबरून जाण्याचें काही कारण नाही. त्यांनी चापून सांगावें, 'भविष्य चुकलें नाही. भूकंप होअून हिंदुस्थान गडप झालेंच असतें पण गणित ज्योतिषांस फलज्योतिषाचा जो हातचा नेहमीच ठेवलेला असतो, त्याचे प्रतापाने ह्या पानविडीवाल्याने मूठभर तांदुळाचें जें दान दिलें त्यामुळे तो भूकंप टळला. नाही तर झालाच असता. गणित ज्योतिषही वरोवर ठरलें – फलज्योतिषही खरें ठरून भविष्यवाद्यांच्या पोटास भात मिळण्याचीही व्यवस्था अखंड राहिली.



ही झाली भविष्य कसें होअील हें सांगणारांची गोप्ट. आता भविप्य कसें व्हावें तें सांगणाराकडे थोडेसें वळू.

विलायतेच्या 'स्पेक्टेटर' नांवाच्या पत्रात भारताच्या सर्व आपत्तींचा परिहार करणारा भविष्यकाळ कसा आणता येअील याविषयी चर्चा करून त्याचा अुत्तम अुपाय म्हणून अेका मुसलमानाने असें सुचविलें आहे की, 'हिंदुस्थानचें सर्व राज्य दिल्लीच्या मोंगल वादशहाच्या कोणातरी वंशजाकडे सोपवावें म्हणजे तो ब्रिटिश सत्तेखाली हिंदुस्थानची वादशाही अुत्तमपणे चालवील.' असें झालें तर वारसाहक्काचा हा अेक अपूर्व विजय होअील. 'लॉ रिपोर्टर'चा जादा अंक काढावा लागेल !

मोगल वादशहाच्या कोणातरी वंशजाकडे भारताचें राज्य सोपविण्याच्या ह्या आमच्या मुसलमानबंधूच्या सूचनेस आमचा महाराष्ट्राच्या वतीने पूर्ण पाठिंवा आहे. कारण वारसाहक्काच्या ह्या विजयाने जुन्या मोगल वादशाहीच्या वंशजाकडे हिंदुस्थानची बादशाही येताच, जुन्या पेशव्यांच्या वंशजाकडे चोथाअी आणि सरदेशमुखीचा वारसाही महाराष्ट्राकडे अनायासेंच येअून तो वसूल करता करता महादजी शिंद्यांच्या कोणातरी वंशजासही त्या मोगल वादशहास पेनशन देअून सर्व वादशाही आपल्या खिशात केवळ त्याच वारसाहक्काने घालता येअील.

हिंदुसभेच्या वतीनेही ह्या सूचनेस अवश्य पाठिंवा मिळावा. कारण आता मुसलमानांस शुद्ध करून हिंदु करता येणें अगदी सुलभ झाल्याने त्या मोगलांच्या 'कोणातरी वंशजा'स बादशाही मिळताच त्यासच हिंदु करून घेता येअील. हिंदुसभेचे मुख्य कार्यवाह पं. नेकीराम दिल्लीसच वादशाहीवाडचाच्या अेका हाकेवर राहतात.

अेकवेळ ह्या मोगल वादशहाचा कोणीतरी वंशज पुरवेल. पण त्या क्रांतिकारकांच्या वंशजांचें नांव देखील अैकणें नको असें अिंग्रजांस झालें आहे. कारण वरील मुसलमानांच्या सूचनेचा कोणाही अिंग्रजी पत्रास राग आलेला दिसत नसला तरी सध्या गेल्या अेका वर्षाचे आतच ज्या क्रांतिकारकांच्या पांचसहा तुरळक अुठावण्या झाल्या आणि त्यांचे कटाचे खटले देवघर अित्यादि ठिकाणी अजूनही चालले आहेत, त्यांची वातमी अैकून पत्रें अगदी संतप्त झालीं आहेत. पंजावच्या श्रीमती पार्वतीदेवीचा अेक तरुण मुलगाही या कटात गवसल्याची वातमी आहे. अशा अुच्च कुलीन हिंदूंच्या डोक्यात हें वेड कसें संचरलें आहे तें अिंग्लिश लोकांस विशद करून दाखविण्याचें कार्य अे. जी. वुलेकाट नांवाच्या अिंग्लिश लेखकाने केलें आहे.

'भारतीय देशभक्त' ह्या मथळ्याखाली या वुलेकाटसाहेबाने गेल्या अेक दीड वर्षातील वऱ्याच क्रांतिकारक कटांची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यात

काकोरीच्या क्रांतिकारकांच्या कटाचें वर्णन अर्थातच पुष्कळ विस्ताराने दिलें आहे. त्याचा प्रत्येक शब्द रागाच्या लाल शाअीने अगदी रंगून गेलेला आहे.

स्वदेशस्वातंत्र्यार्थ आपल्या प्राणांचाही बळी देणाऱ्या ह्या 'भारतीय देशभक्तांस' वुलेकाटसाहेबांनी ज्या दहा शिव्या हासडल्या आहेत, त्यांचे स्थली दहा हजार हासडल्या असत्या तरी देखील ह्या 'भारतीय देशभक्तां'ची कहाणी त्याने युरोपच्या–निदान अिंग्लंडच्या तरी कानावर अेकदाची घातली ह्याविषयी आम्ही वुलेकाटसाहेबांचें मनःपूर्वक अभिनंदन करतो. हिंदुस्थानातील वर दिलेल्या अेक हजार गालभरू 'My, lord' वाल्या व्याख्यानांनी अिंग्रजांचे कान जसे टवकारले जात नाहीत, तसे केवळ ह्या अेका कहाणीने जातात. हिंदुस्थान दरिद्री आहे, आम्ही भुकेने मरतो अित्यादि डोळ्यात पाणी आणणाऱ्या 'डोळेभरू' कहाण्यांसच ह्या क्रांतिकारकांच्या 'डोळेवटारू' कहाण्या सांगण्याची हौस आम्हा कोणाही हिंदी मनुष्यास नसल्याने, तें कार्य वुलेकाटसाहेबांनी करून हिंदुस्थानचीं डोळेभरू आणि डोळेवटारू अशीं दोन्हीही स्वरूपें अिंग्रजांस परिचित करून दिलीं ह्याविषयी वुलेकाटसाहेबांस कोणीही सत्यप्रिय मनुष्य धन्यवादच देअील. त्यामुळे हिंदी राजकारणाच्या दोनही वाजू अिंग्रजांस कळतील.

त्यांच्यात फरक हाच असतो. या 'डोळेवटारू' देशभक्तांच्या अशा दांडग्या कहाण्या आमच्या आम्हांसही सांगताना देखील सभ्य लज्जाशीलतेमुळे आम्हा हिंदी लोकांना अगदी कसेसेंच वाटतें. त्या दुसऱ्यास कोणी सांगितल्या तर अैकता मात्र येतात चोरून चोरून.

सायमन कमिशनवर अविश्वास असल्याचा आरोप जेव्हा वरिष्ठ विधिसमितीत (लेजिस्लेटिव्ह असेंव्लीत) झाला, तेव्हा त्या अुत्तेजनेत 'हिंदुस्थान टाअिम्स'च्या वार्ताहराची लिहावयाची अेक हातपेटी वरून सज्जातून धाड्दिशी खाली पडली ! पडली तर पडली, पण अगदी नेमकी सर व्लॅकेटसाहेबांचे डोक्यावर पडली. तत्काळ व्लॅकेटना धक्का बसून क्षणभर मूर्च्छना आल्यासारखें झालें. पण अेकंदरीत निभावलें. फार वाअीट झालें !!

त्यातल्या त्यात अितकें वरें झालें की, त्या वार्ताहरावर खटला भरला गेला तेव्हा त्याने लप्पंछप्पं न करता आपलें खरें तें सांगून टाकलें की, 'सर बेसिल व्लॅकेट साहेबांच्या हिंदी हिताविरुद्ध झालेल्या भाषणामुळे मला अितकी अुत्तेजना आली की, माझ्या हातातील सामान मी कसें आणि कुठें ठेवीत आहे तें मला भानच राहिलें नाही.' त्या वेभान वृत्तीत तो पोकळीवरच हातपेटी ठेवता झाला. पण पोकळी बेभान झाली नसल्याने तिने तिच्या मूळस्वभावाप्रमाणे पेटीला तशीच खाली पडू दिली !

त्या वार्ताहाराला दंडाची का थोड्याशा बंदीची–पण लहानशी शिक्षा झाली आहे म्हणे. थोडी अधिक शिक्षा झाली असती तरी ठीकच होतें. कारण जर

का कागदाच्या त्या हातपेटीचे स्थली त्याचे हाती दुसरें तिसरें काही असतें तर केवढा आकांत अुडाला असता !

वेभान झाला म्हणून काय झालें – अिंग्रजांच्या डोक्यावरचें हाड हातपेटीने देखील दुखावण्याअितकेंच कोणाही हिंदी मनुष्याप्रमाणेच मानवी असतें – आणि अिंग्रजांसही मूर्च्छा येअू शकतें अितकें भान देखील त्यास राहू नये की काय ?

—ता. १९ एप्रिल १९२८

✦ ✦ ✦

(१०)

तुर्की मुलींना अमेरिकन शाळेत घालू नका !

आपल्या देशातील अमेरिकन शाळेत तुर्की मुली पाठविण्याचें काम चालतें असें दिसून आल्यावरून, तुर्की सरकारने ब्रुसा येथील मुलींची अमेरिकन शाळा बंद केली. तुर्कांनी आपल्या मुली तुर्की शाळेतच घालाव्या असें आज्ञापत्र तुर्की सरकारने काढलें आहे. केमाल पाशा स्वत: कुराण मानीत नसले तरी तुर्की मुलींनी ख्रिश्चन होअू नये यास्तव ते सरकारी सक्ती देखील अुपयोगात आणतात हें यावरून अुघड होत आहे. कारण असें वाटणें म्हणजे नुसत्या धर्मस्वातंत्र्याचा प्रश्न नव्हे, त्यात संस्कृतीचा, राष्ट्रीय अेकतेचा राष्ट्रीय संख्यावलाचा प्रश्न आहे, असें केमालपाशांना वाटत आहे. काय खुळा बेटा ! आमच्या अिकडचे काही 'शिवशिव न हिंदुर्न यवन:' बोल-शहाणे हे केमालपाशास, तुर्की काय, ख्रिश्चन काय ? तुर्कस्थानच्या राष्ट्रीय अैक्यासाठी द्यानात तुमच्या तुर्की मुली त्या ख्रिस्त्यांना' असा अनत्याचारी अुपदेश देतील तर वरें होअील.

म्हणूनच गेल्या अेका श्रद्धानंदात म्हटलें होतें की केमालपाशा जरी अुद्या हिंदुस्थानावर राज्य करण्यास आला, तरी तो महंमद अल्ली होणारच नाही असें आम्हांस म्हणवत नाही. कारण मुसलमानीपणा धर्म म्हणून त्यांनी अंगीकारला नसला, तरी तुर्की संस्कृति म्हणून तो काही तरी मानीत असलाच पाहिजे. ख्रिश्चनांच्या या तरुण तुर्कांनीच आर्मेनियात कत्तली केल्या, त्या काही कुराण बायबलातील अीश्वरविषयक तत्त्वज्ञानात, धर्मात भेद आहे म्हणून नव्हेत; तर ख्रिश्चन संस्कृति आणि तुर्की संस्कृति, या अुभयतांची जाति, नीति, राष्ट्रीयता यांत भेद आहे म्हणून होय. अेवढ्यासाठीच शुद्धि ही हिंदुत्वाची चळवळ आहे – नुसती

The Devil said with wink and nod
The wisest way to work my will
Is to call it the Will of God !

सैतान डोळे मिचकावीत आणि मान हलवीत अुद्गारला : अुत्तम युक्ति सुचली ! माझ्या सैतानी अिच्छा लोकांकडून पूर्ण करवून घेण्यास अुत्कृष्ट मार्ग म्हणजे त्या सैतानी अिच्छेस ही देवाची अिच्छा आहे म्हणून प्रसिद्ध करणें हा होय. देवाच्या नांवाने पुढे आलें की, भावडे लोक सैतानाची देखील पूजा करतील !

याच युक्तीचा अवलंब करून मुंबअी, ठाणें अित्यादि जिल्ह्यांतून काही पाताळ-यंत्री हसन निजामीवाले हिंदु अवधूताच्या वृत्तीने संचारत आहेत आणि जनतेस आकर्षित करीत आहेत म्हणे ! सुवर्णमृगात मारीच लपलेला असतो हें सीतेस देखील कळलें नाही ; मग जनतेची कथा काय ! लक्ष्मणाची चेतावणी व्यर्थ गेली, तिथे आम्ही काय चेतावणी देणार—पण आपलें सांगतो की हें खरेंच असलें, तर सावधान ! ब्राह्मणवेषात येअून अेका मुसलमानाने गेल्या महिन्यातच हिंदुसंघटक स्वामी परमानंद यांस विहारात भोसकलें होतें हें हिंदूंनी विसरू नये. नाणें पारखून घ्यावें—निदान वद् आवाज येताच दूर भिरकावून द्यावें.

ही चेताधणी हिंदूंस दिली ; त्यामुळे मुसलमान वंधूंसही लगेच अेक चेतावणी देअून टाकणें भाग आहे. नाही तर हिंदुमुसलमानांस समानतेने न वागविल्यामुळे तुम्ही 'अेकी' विघडविता म्हणून 'राष्ट्रीयता' रागावेल ! यासाठी मुसलमानांसही अेक चेतावणी देत आहों की,—

मथुरेत गेल्या महिन्यातच अेका धर्मनिष्ठ मुसलमानाने अेका हिंदु स्त्रीस आपले घरात कोंबून टाकिली. ही काही नवीन गोष्ट नव्हे. ही प्रत्यहीचीच घटना आहे. पण नवीन जें झालें तें हेंच की, त्याचा हिंदूंस राग आला ! याहूनही नवीन गोष्ट म्हणजे त्या नष्ट हिंदूंनी अेकत्र होअून मोठा दंगा केला ! आणि त्याहूनही नवीनतम नवलाची गोष्ट म्हणजे त्या हिंदु मुसलमानांचे दंग्यात हिंदूच हिंदु न मरता सारे मुसलमानच मुसलमान दगावले ! ! ! अेक बिचारा मुसलमान मारला गेला आणि वीस बिचारे मुसलमान घायाळ झाले. आता दंग्यानंतर पोलिसांनी अुत्कृष्ट बंदोबस्त केला आहे. लाठी घेअून फिरण्यास मनाअी करून धरपकड होअून खटलाही भरला आहे.

परंतु आता तें सर्व जरी अुत्कृष्टपणेच पार पडत आहे तरी मुसलमान वंधूंनी अेक गोष्ट मात्र आता विसरून चालणार नाही की, हिंदूंची अेखादी यःकश्चित् स्त्री देखील आता पूर्वीअितकी स्वस्त राहिली नाही ! मथुरेचा ७ मार्चचा दंगा मुसलमानांस हीच चेतावणी देत आहे की, यावरही तुम्हांस अेखादी दुसरी हिंदु स्त्री चालता चालता धरून घरात कोंबावीशीच वाटली, तर आपलें अेकाचें शिर आणि

विसांचे भयंकर घाव अेका रुमालात गुंडाळून घेअून मग त्या मुदलावारी तो सवदा करण्यास निघावें. कारण दिवसेंदिवस आताशी प्रत्येक हिंदु पदार्थाचे बाजारभाव असे वाढतच आणि कडाडतच जात आहेतसें दिसतें.

—ता. २६ एप्रिल १९२८

✦ ✦ ✦

अनु. क्र. ३८२७५ वि: निबंध ...
ग्रंथ क्र. १५१९ ... नों: दि: ...13/11/45

(११)

निजामाची तळी अुचलणारे मुसलमान

पुण्यास हैदराबादच्या अत्याचारी आणि हिंदुविद्वेषी राज्यपद्धतीविरुद्ध जी परिषद झाली, तिचा निषेध करण्याकरिता आणि निजामाची तळी अुचलून धरण्याकरिता मुसलमानांचीही सभा पुण्यास भरावी हें साहजिकच होतें. नोकऱ्यांप्रमाणे सभांमध्येही स्वतंत्र आणि विरोधी प्रतिनिधित्व हवेंच.

त्या सभेत मुसलमानांनी ठासून विचारलें आहे की, निजामाने जसें केव्हा केव्हा हिंदु दिवाण नेमले आहेत तसे कोणा हिंदु राजाने मुसलमान दिवाण नेमले आहेत की काय ? दाखवा !

या त्यांच्या आव्हानावरून म्हैसूरच्या महाराजांनी मध्यंतरी जो मुसलमान दिवाण नेमला होता तो हिंदु झाला की काय अशी शंका येते ! शुद्धीच्या युगात कोणचा मुसलमान केव्हा हिंदु होअील याचा काही नियम राहिला नाही बुवा !

सभेत मुसलमानांनी असाही अेक ठराव केला की, 'ब्रिटिश सरकारच्या आणि निजामाच्यामध्ये जो स्नेहसंबंध सतत वसत आला आहे, तो हिंदूच्या असल्या दुष्ट ओरडीने बिचकून बिघडून जाअू नये' ! आमचीही हीच प्रार्थना आहे. ज्या 'सतत आणि अखंड स्नेहसंबंधा'ने आणि सकोमल प्रेमभावनेने प्रेरित होअून ब्रिटिशांपाशी निजामाने आपल्या मित्राची आपण वाटेल ती वस्तु आपलीच समजून जशी संकोच सोडून मागतो, तसा बन्हाड मागितला आणि ब्रिटिश सिंहाने पण मित्रच मित्राला जसें प्रेमाने 'देत नाही जा !' म्हणून केव्हा केव्हा निःसंकोचपणे हसत म्हणतो तसें दात दाखवून 'देत नाही जा !' म्हटलें—अितकेंच नव्हे तर अगदी जीवश्चकंठश्च मित्राप्रमाणे निजामाच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या भावनेच्या जिवाशी लगट करून, कंठाशी चोवीस तासांच्या आत अुत्तर मागणारा पंजा बिलगविला—तशा प्रकारचा स्नेहसंबंध ब्रिटिशांच्या आणि निजामामध्ये

सतत टिको अशी आमची प्रार्थना आहे ! तो तसा लोभ आहे याहूनही थोडासा वाढला तरी देखील आमची ना नाही. ह्या निजाम आणि अिंग्रज ह्यांच्यात वसत आलेल्या स्नेहसंबंधाची पराकाष्ठा होअून, त्या दोन जिवांचा वऱ्हाडात कर्झनने जसा अेक करून टाकिला, तसा हैद्रावादेलाही होवो आणि आमच्या त्या स्नेह-संबंधास हपापलेल्या पुण्याच्या मुसलमानांचे तोंडात साखर पडो ! !

मुसलमानांचा ' मुवलिक अखवार ' आपल्या १ डिसेंवरच्या अंकात लिहितो की, महंमद फरुख साहेव ह्या ' अुमल-अि-अिस्लाम ' पत्राच्या संपादक असलेल्या पंजाबातील थोर गृहस्थांनी पंजाब गव्हर्नरला खालील तार देअून मुसलमानांची अेक महत्त्वाची मागणी पुढे आणली आहे. ' ज्या अर्थी मुसलमानांच्या धर्माचा रोख मूर्तिपूजेविरुद्ध आहे आणि ज्या अर्थी हिंदूंच्या मूर्तींच्या मिरवणुकी पाहताच त्यांस अुद्वेग येणें साजजिकच आहे, त्या अर्थी सरकारने हिंदूंच्या मूर्तींच्या मिरवणुकी मुसलमानांच्या मशिदीवरून नव्हे तर दुकानांच्याही समोरून जाअू देअू नयेत. सरकार न्यायी आहे आणि मुसलमानांचा अुत्क्षोभ भडकण्याचे आधीच तें त्यांची मागणी मान्य करून त्यांस संतोषित करील अशी आम्हांस आशा आहे. ' —(अर्जुन)

वरील मागणी करण्याचें धैर्य दाखविलें म्हणून ' अेडिटर साहेव ' महंमद फरुख यांचे आम्ही आभार मानतो. मुसलमानी पत्रातून काय चाललें असतें याची वार्ता आपणांस किती कमी मिळते याचें हें अुदाहरणच आहे की, या मुसलमानी पत्राच्या डिसेंवरच्या अंकात काय लिहिलें त्याचा पत्ता आज आम्हांस, आज सहा महिन्यांनी लागत आहे ! हिंदूंनी मूर्तिपूजा आणि मूर्तींच्या मिरवणुकी मुसलमानांच्या समोर, शेजारी किंवा जवळ करू नयेत. कारण मूर्तिपूजा मुसलमानी धर्माच्याविरुद्ध आहे ! ही मुसलमानांची मागणी त्यांनी अनेकदा स्पष्टपणे सांगून टाकिली हे त्यांचे हिंदूंवर खरोखर उपकार आहेत.

खरोखरच हे हिंदूवर अुपकार आहेत. कारण आम्ही मुसलमान म्हणूनच आमच्या धर्माचा खलिफा जो तुर्क त्याच्याशी लढणार नाही म्हणून जेव्हा मुसलमान म्हणाले आणि जेव्हा हिंदूनीही त्यांच्या त्या कोटिक्रमास त्याच धार्मिक कारणाकरिता दुजोरा दिला, तेव्हाच मुसलमानांच्या धार्मिक समजुती हिंदूनाही वंधनकारक आहेत हें तत्त्व सिद्ध झालें. खलिफाशी लढत नाही कारण तें मुसलमानी धर्माच्या विरुद्ध आहे आमच्या मशिदीसमोर वाद्यें वाजवू देणार नाही, कारण तें मुसलमानी धर्माविरुद्ध आहे. मशिदीसमोर तर काय, पण घराशेजारी शंख घंटाही वाजवू देणार नाही, कारण तें मुसलमानी धर्माच्याविरुद्ध आहे. अशी विचारपरंपरा ज्या मूलतत्त्वाच्या अुपजाअु कुसव्यातून आपोआप प्रसवली, त्या विचारपरंपरेला मान तुकवून मशिदीसमोर वाद्यें बंद करितो असें हिंदु मुसलमानांच्या अेकीचे हिंदु भोक्ते म्हणू लागताच त्या पुढची पायरी चढून मूर्तिपूजा

बंद करा, कारण तीही मुसलमानी धर्माच्या विरुद्ध आहे म्हणून मुसलमान मागणी करण्यास चुकणार नाहीत असें अपरिहार्य अनुमान आम्ही काढलें होतें. तेव्हा काही भावडे हिंदु आमच्यावर रागावत आणि म्हणत, 'छट् आमचे मुसलमान भाअी असले अतिरेकी नाहीतच. तुम्ही हिंदुच खोडसाळ आहा; नाही तर असें भंय, अशा शंका तुम्हांस आल्याच नसत्या!' पण आमच्या पंजाबातील मुसलमानां-पैकी काही पुढाऱ्यांनी तीच—अगदी तीच!—मागणी नाकावर टिचून केली आणि तर्कशास्त्राची लाज राखली! म्हणूनच आम्ही त्यांचे हे अुपकारच झाले असें म्हटलें आहे.

'वाद्यें बंद करा म्हणताच लोण्याहून मअू हिंदूंनी मंडळें नेमून मुसलमान मौलवींचीं मतें मागविलीं की, 'वाद्यें मुसलमानी धर्माविरुद्ध खरींच आहेत काय?' आता ते सद्गृहस्थ पुन्हा मूर्तिपूजेच्या प्रश्नास्तव मौलवी मंडळ नेमतील, आणि त्यांनी मूर्तिपूजा मुसलमानी धर्माविरुद्ध आहे असें मत देताच वरील पंजाबी गाऱ्हाणें खरें आहे असें मानून वाद्येंच नव्हेत तर मूर्तीच्या मिरवणूकीच,—आणि मशिदीसमोर नव्हे तर मुसलमानांच्या दुकानासमोर, शेजारी पुढे, मागे, वर, खाली बंद ठेवणें हेंच एकीच्या दृष्टीने हितावह आहे. 'वाद्यांच्या विषयीच नव्हे तर मूर्तिपूजा सोडून देण्याविषयीही आपल्या परम प्रिय मुसलमान बंधूंच्या भावना हिंदु विचारात घेतील'—असा ठराव पुढील राष्ट्रीय सभा संमत करील अशी आम्ही अुत्कट आशा करितो.

वाद्यबंदीची मागणी राष्ट्रीय सभेने विचारात घेतलीच आहे. आता या वर्षी मूर्तिपूजा बंदीची मागणी तिने विचारात घेअून मान्य करावी की, पुढील वर्षी मुंजबंदीची मागणी, मुंज ही मुसलमान धर्माविरुद्ध आहे याच सर्वमान्य आणि राष्ट्रीय सभा-संमत तत्त्वांचे आधारावर पुढे करता येअील. असें अेक अेक करून आपण हिंदुमुसलमानांत दुही माजविण्याचे सर्व प्रश्न हळूहळू सोडवून हिंदूना मुसलमानच करून टाकू आणि राष्ट्रीय हित साधल्याचें महत्तम पुण्य शीघ्रच गाठी बांधू शकू.

खरें पाहिलें असता वाद्यांपेक्षा किंवा मूर्तीपेक्षा मुसलमानांनी या मुंजीचाच समाचार आधी घेतला पाहिजे. कारण त्यांच्या तबलीगचा भयंकर शत्रु कोणी 'वाद्यें' किंवा 'मूर्ते' नसून अेक मुंजे'च आहे.

कोणचीही गोष्ट चांगली वा वाअीट हें मुसलमानी धर्मात ती आहे की नाही यावरून हिंदूंनी ठरवावें ही मुसलमानांची मागणी अगदी स्वाभाविक आहे. पण हा आर्यसमाज जिथे तिथे त्यास आडवा येतो. आणि आता हें संघटण: गंडस्यो-परि पिटिका संवृत्ता!

मुसलमानांनो स्वाभाविकपणेच म्हटलें, सत्यार्थप्रकाश जप्त करा. कारण त्यांत मुसलमानांच्या काही मतांचा निषेध आहे. लगेच आर्य समाज आणि संघटनावादी ओरडून अुठले, कुराण जप्त करा ! कारण त्यात हिंदु धर्माविरुद्ध पुष्कळ गोष्टी आहेत ! कोण ही खोडसाळ प्रवृत्ति या संघटनांची ! अशा बरोवरीने का राष्ट्रीय अेकी साधतें !

म्हणून आम्हांस ' मूर्ति वंद करा ' या मुसलमानांच्या नव्या मागणीस काही तरी अपशकुन हे संघटनवादी करतील अशी भीति वाटत आहे ! हो. कोणी सांगावें. मुसलमान अेडिटरांनी ' आमच्या धर्मात मूर्तिपूजा निषिद्ध आहे, म्हणून वाद्येंच तर काय पण आमच्या दुकानावरून मूर्तीची मिरकणूकच वंद करा ' म्हणून तार देताच, अेखादा आर्य समाजी अेडिटरही तार द्यावयाचा की, ' प्रेतें पुरणें हें हिंदु धर्मात निषिद्ध आहे. म्हणून प्रेतें पुरलेल्या आअीवापांच्या पोटचा कोणचाही सुपुत्र वा कुपुत्र आमच्या दुकानावरून जाता कामा नये ! ' मुसलमानी अेडिटरांस तार करता येते आणि हिंदु अेडिटरास नाही असें थोडेंच आहे !

✦ ✦ ✦

सिन्धमध्ये तालुका डोकरी येथील कोण्या सय्यद मुसलमानाच्या मुलीने ' कुराण ' ग्रंथाशीच आपला निका–लग्न–लाविलें ! अष्टपुत्रा सौभाग्यवती भव !

ह्या ' अष्टपुत्रा 'वरून आम्हांस छापखान्यांतील भुतांची भीति वाटू लागते आहे. मागे एकदा ' अष्टपुत्रा ' हा शब्द नीट वाचता न आल्याने किंवा वाचता यावा असा नीट लिहिला न गेल्याने, तो अेका वुद्धिमान् अुपमुद्रितें (प्रूफ्स्) पहाणाऱ्याने ' अुष्ट्रपुत्रा ' असा छापला होता ! तशी अेखादी चुकी या वरील आशीर्वादाच्या छापण्यात होअू नये म्हणून ही चेतावणी देत आहो.

अद्भुत लग्नाची सध्या नाही तरी साथच येअू पाहत आहे. ' कुराणा 'चीं लग्नें अशी होअू लागल्याचें पाहाताच ' पुराणा 'सही स्वस्थ बसवेना. त्यानेही दोन चार ठिकाणी चांगलाच हात मारला आहे.

कारण अेवढ्यात अनेक युरोपिअन मुलीनी हिंदुधर्म स्वीकारून हिंदूंशीं लग्नें लावल्याचें वृत्त येत आहे. ग्रुवेन हाफ नांवाच्या २३ वर्षांच्या जर्मन मुलीनें स्वा. सत्यानंदजींच्या हस्तें हिंदुधर्म ग्रहण केला आणि श्री. किरणचंद्र बागची यांच्याशी विवाह केला. कुमारीचें नांव अिंदुवाला असें ठेवण्यात आलें आहे. विवाहानंतर पेढे वाटण्यात आले आणि अुपस्थित असलेल्या अनेक हिंदूनी ते खाल्ले हें सांगितलेंच पाहिजे. श्रीमती रिबिट्रस नामक अिंग्रजी बाअीनेही हिंदुधर्म स्वीकारला आहे. आपल्या पतीच्या स्मृत्यर्थ ती काशीला अेक मंदिर बांधविणार आहे. शर्मिष्ठा देवींची गोष्ट तर त्रिखंडात माहीत आहे.

युरोपियन मुलींशी हिंदूंचीं लग्नें होणें हें काही नवीन नाही. तीं पूर्वीही होतच होतीं हें अमेरिकेपासून रशियापर्यंत पसरलेल्या प्रत्येक राजधानीतील हिंदी वसतीत डोकावताच दिसून येअील. पण आजपर्यंत हिंदूंचें युरोपिअन मुलींशी लग्न लागताच मुलगी घरी येण्याचे स्थली मुलगाच घरास पारखा होऊन ख्रिश्चन होअी आणि मुलगीच्या घरी जाअी. आता तसें न होता युरोपिअन मुलीच हिंदु होऊन आमच्या मुलाच्या घरी नांदण्यास येत आहेत. पूर्वी बायबलामागे हिंदु मुलें धावत. आता आमच्या 'पुराणा 'मागे नवीनांतील 'नवीन' ख्रिस्ती मुली धावत आहेत. म्हणतात ना दोन दिवस सासूचे, दोन दिवस सुनेचे ! चाललेंच आहे ! चांगलेंच आहे.

✦ ✦ ✦

सध्या हिंदुस्थानातील अिंग्रजी थोर पुरुषांच्या पुतळ्यांवर साडेसाती आल्यासारखेंच दिसतें. पंजाबातील लॉरेन्सचा पुतळा हलविण्यासाठी प्रथमतः स्त्रीपुरुष मुलांसह सर्व लाहोर नगराने तिथे जमावें – नुसतें जमावें, म्हणून गांधीजींनी त्यांच्या शेकडो सत्याच्या प्रयोगांपैकी अेक प्रयोग करताना आज्ञा सोडली होती. पण पुतळा हलविण्यापेक्षाही अुभें लाहोर हलविणें अर्थातच जड गेलें. अितक्यात कोणाच्या डोक्यात काय कल्पना घुसली अीश्वर जाणे – त्याने रातोरात जाअून त्या पुतळ्याच्या हातातील तलवारच मोडून टाकली. सरकारने लगेच त्या पुतळ्यावर लाजेचा पडदा सोडला. वादविषयक अुर्मटपणाचीं वाक्यें त्या पुतळ्यावरून खोडून टाकलीं आणि तें प्रकरण विझलें. सगळें लाहोर हलून जें साधावयाचें होतें तें अेक मनुष्य हलून साधलें गेलें. पुढे नीलच्या पुतळ्यावरून मद्रासला राग आला. पण तिथे दगडी पुतळ्यास घण किंवा दगड मारणें – दगडास दगड मारणें ! – ही हिंसा कीं अहिंसा हा अत्यंत गंभीर प्रश्न उत्पन्न होअून, शेवटी चिखल मारण्यास हरकत नाही असें ठरलें आणि त्या चिखलातच तो प्रश्न अजून रुतून बसलेला आहे. तोंच––

तोंच अिकडे मुंबअीची तार आली की, मुंबअीच्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याच्या हातातील राजदंड मोडून त्यास कोणी तरी मनुष्याने विद्रूप केलेलें आहे !

अेकाअेकी राजदंडालाच हात घातला ह्या मुंबअीच्या माणसाने ! लाहोरसारखे काही मुंबअीची मुंबअी हलवून स्त्रिया पुरुष मुलांसह तिथे जाण्याचा बेत केला नाही की, अहिंसेच्या चिखलात मअू गोळे वळीत बसला नाही. विक्षिप्त कुठला ! नसतीं कुलंगडीं अुपस्थित करण्यास मिळतें तरी काय या लोकांना ?

अशा अचंब्यात शहाणे लोक चिंतातुर झालेले आहेत, तोंच डोकें असलेल्या पोलिसास तो पुतळा विद्रूप कसा झाला याची कल्पना आली आणि त्याने प्रसिद्ध

केलें की, 'पुतळ्याच्या हातातील तो राजदंड रस्ते धुणाऱ्या नोकराच्या पाण्याच्या बंबातील फवाऱ्यासरशी निसटून पडला. अगदी सहज अपघाताची गोष्ट. दुसरें काही नाही.' तथास्तु ! दुसरें काही नसलें म्हणजे सगळ्यांसच बरें.

कारण मागेही अेकदा याच पुतळ्याची हालअपेष्टा झालेली होती. किंवहुना अिंग्रजी पुतळ्यांची अशी संभावना करण्याचा बूट, प्रथम या पुतळ्यास जें पंचवीस तीस वर्षांमागे विद्रूप करण्यात आलें होतें तेव्हापासूनच, हिंदुस्थानात निघाला आहे.

महाराणी व्हिक्टोरियाच्या अुत्सवाचा तो दुसरा दिवस होता. अगदी अचूक त्याच दिवशी या त्या विख्यात राणीच्या पुतळ्यास पहारा चुकवून कोणा धाडसी मनुष्याने त्या अुत्सवाच्या गुलाबी रंगाचा बेरंग करण्यासाठी डांबराचा रंग फासून त्याचे गळ्यात पादत्राणांची फाटकी माळ घातली होती ! पुढे तो डांबराचा रंग काढून पुतळा नीट करावयास हजारो रुपये व्यय करावे लागले. ज्या धाडसी मनुष्याने हें कृत्य केलें त्याचें नांव पुढे सर्वतोमुखी झालें. पुण्यात प्लेगचे दिवसांत रँड साहेबास मारणाऱ्या चाफेकर बंधूंनीच ह्या पुतळ्याची ही विटंबना केली होती असें मागून सिद्ध झालें.

या मागच्या अितिहासानेच ह्या पुतळ्यास पुन्हा विद्रूप केल्याच्या वातमीस थोडेसें महत्त्व आलेलें होतें. नाही तर कोण विचारतो, दगडी पुतळ्यांच्या हातातील राजदंडास !

पण पाण्याच्या फवाऱ्याने तो राजदंड निसटून पडला, हें सोपें आंणि अुभय पक्षांसही सोयीस्कर असें स्पष्टीकरण तत्काळ झाल्याने वरें झालें.

पण तो राजदंड पडला तर सापडला कसा नाही ? पाण्याच्या फवाऱ्या-वरोवर जो अुडाला तो अजूनही वर अुडतच चालला आहे ? आणि तो नोकर पळून गेला म्हणतात तो कां आणि दुसऱ्या हातातील 'भूगोल' (orb) विच्छिन्न झाल्याचें जें छापलें आहे तो गोळाही पाण्यानेच भंगला कीं काय ?

पण हे प्रश्न दुर्घ्यम आहेत. त्यांचें समाधानकारक अुत्तर केव्हाही देता येअील. आता सावधानता अितकी ठेवली पाहिजे की, हा राजदंड पाण्याच्या फवाऱ्यासरशी अुडाला या स्पष्टीकरणाचें अगदी दृढीकरण करीत राहिलें पाहिजे. आणि यापुढे प्रसंगी पाण्याच्या फवाऱ्यासरशी वाहून जातील असे कच्चे राजदंड हाती न देता त्या पुतळ्याच्या हाती पक्के राजदंड दिले जावेत. कारण पुतळ्यांचे हातातील कां होअीना, पण राजदंड गळून पडावेत हें भोळसट लोकांस अशुभ चिन्हसें वाटतें म्हणून जपावयाचें, दुसरें काय ?

—ता. २४ मे १९२८

✦ ✦ ✦

(१२)

संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य ह्या शब्दांनी चिडलेले गांधीजी नि अिंग्रज

राष्ट्रीय सभेने हिंदुस्थानचें ध्येय 'संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य' हेंच होय, स्वराज्य शब्दाचा हाच खरा अर्थ होय, असें गेल्या डिसेंबर महिन्यात मद्रासला घोषित केलें.

त्या वेळेस त्या 'स्वातंत्र्याच्या' ठरावाचा दोघा जणांना फार तिटकारा आला. दोघेजण त्या ठरावाला 'पोरकट, अशक्य, वेडगळ' म्हणून अगदी चिडल्यासारखे झाले. ते दोघेजण म्हणजे अेक अिंग्रज आणि दुसरा–दुसरा–दुसरा आमचे गांधीजी !!!

हिंदुस्थानने 'पूर्ण स्वातंत्र्य' हेंच राजकीय ध्येय ठरवावें याचा राग त्या दोघांपैकी अिंग्रजाला यावा हें साहजिकच आहे. अशा वेळी असें होतेंच.

अुदाहरणार्थ, परवाच मुंबअीतील अेका न्यायाधीशाने अेका धंदेवाअीक चोरा-विरुद्ध जेव्हा निकाल दिला की, त्याच्यापाशी धरलेली सर्व मत्ता ज्या सावाला लुबाडून त्याने घेतली होती त्या सावास देअून टाकावी. तेव्हा त्या चोरीचा प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या त्या चोरासही साहजिकच असाच राग आला ! तो म्हणाला देखील की, 'निढळाच्या घामाने मी ही मत्ता मिळविली होती. चोर लोकांच्या थोरवीचे गौरवार्थ जे म्हणतात अगदी तेंच वर्णन माझ्या प्रयत्नालाही लागू आहे. त्या सावाची मत्ता काही माझ्या अुशाशी कोणी आणून ठेविली नव्हती; तर सातव्या मजल्यावर तो साव निजला असता मी आपल्या बाहुबलाने त्या भयंकर अुच्चतेवर चढून गेलो.

The height that I too reached and kept !
Was not attained by a sudden flght ! !
But I while honest men had slept !
Was toiling upwards in the night ! ! !

जर त्या चोरास तसा राग येणें साहजिकच होतें, तर अिंग्रजासही स्वातंत्र्याच्या ठरावाचा असा राग येणें साहजिकच नव्हे काय ? तेही सहजच म्हणतात की, 'आमच्या बापजाद्यांनी हें हिंदी साम्राज्य निढळाच्या घामाने मिळविलें आहे, सातारचें, झाशीचें, लाहोरचें, पुण्याचें, अयोध्येचें–अेक का दोन ! अितके मुकुट, सिंहासनें, रत्नें, माणकें, रुपये–अहो नुसते अुचलून कोठारात भरावयाचे असते तरी भीमासारखा हमाल देखील थकला असता ! मग आम्ही तर ती सर्व अुचल

आमच्या बाहुबलाने प्रथम लुटून मग अुचलून घेतली आहे ! अितकेंच नव्हे तर या राजकीय लुटीला आणि अुचलीला आता आम्ही साम्राज्य हें नांव देखील देअून चुकलो आहोत. लुटीला 'साम्राज्य' म्हणून म्हटल्यानंतर देखील का ती ज्याची त्याला परत मिळण्याचा अधिकार अुरतो ! पण आता चार पिढ्या लोटल्यानंतर त्या साम्राज्यावर तुम्ही तुमचा अधिकार सांगता ! केवढा अन्याय ! आम्ही आपलें लक्ष देत नाही म्हणून, नाही तर १२१ चा आकडा माहीत आहे का ? तो १२१ चा आकडा ! असला तर सरळ, नाही तर काळाच्या गळ्यासारखा वाकडा! हें विसरू नका !'

स्वातंत्र्याच्या ठरावाची अशी अगदी चीड ज्या दोघांना – अिंग्रजाला आणि गांधीना – आली त्यांपैकी अिंग्रजाला चीड येणें साहजिकच आहे. हें बहुतेकांस समजतच असेल. पण महात्मा गांधींना – हिंदुस्थानच्या पोटी आलेल्या, या अेका वर्षात स्वराज्य मिळवू निघालेल्या महान् देशभक्तास, हिंदुस्थानने अिंग्रजांच्या पारतंत्र्यास झुगारून देण्याचा निश्चय करिताच अेवढी चीड कां यावी याचें पुष्कळांस कोडें पडलें आहे. त्यांच्या भक्तांस देखील तें कोडें अुलगडत नाही. त्यांपैकी दोघे तिघेजण परवा आजूबाजूस कोणी नाही असें पाहून आपसांत कुजबुजत होते 'हें कसें काय की बुवा ? स्वातंत्र्य हा सर्व राष्ट्रांचा, व्यक्तींचा, जसा जीवन तसा निसर्गसिद्ध अधिकार आहे. अिंग्रजी सत्तेस सैतानी म्हणणाऱ्या या न्यायपरायण गांधीजींना स्वातंत्र्याचा ठराव आवडू नये हें कसें ! हें त्यांच्या पूर्वचरित्रास अगदी विसंगत दिसतें खरें !'

परंतु या कोड्याची किल्ली या पूर्वचरित्रातच सापडणार आहे हें त्यांच्या या सहा सात वर्षांच्या आतच झालेल्या परिचित मंडळींस ठाअूक नाही म्हणून तर त्यांची ही फसगत झाली आहे. गांधींजींचें पूर्व चरित्रच नव्हे तर प्रस्तुत चरित्रही या विसंगततेच्या सूत्राने अगदी सुसंगतपणें ग्रथिलेलें आहे आणि तेंही त्यांनी स्वत:च ! आपल्या आत्मचरित्रात ते काय म्हणतात पहा !

झुलू लोकांशी अिंग्लिशांची कटकट चालू झाली. झुलूंनी हिंदुस्थानचें काही अेक घोडें मारलें नव्हतें. अिंग्लिशांचें देखील त्यांनी काय बुडविलें होतें हेंही गांधीजींस कळत नव्हतें. किंबहुना त्या झुलूंच्या रानटी स्वातंत्र्यास हिरावून त्यास ब्रिटिशांच्या नखांचा धाक बसविण्यासाठी अिंग्रजांनीच खाजवून खरूज काढिली असें सर्व जगाला कळत होतें ! पण अिंग्रजांनी झुलूंवर स्वारी केली. अिंग्रज हिंदुस्थानचे राजे, गांधी हिंदुस्थानचे अेक सुपुत्र–अर्थात् ते अिंग्रजांची प्रजा; तेव्हा अिंग्रजांनी स्वारी केली तर गांधींना त्या आपल्या आवडत्या साम्राज्याच्या आज्ञेस पाळण्याचा प्रजाधर्म सांभाळलाच पाहिजे ! ते त्या स्वारीबरोबर अिंग्रजांचे वतीने स्वयंसेवक होअून गेले. झुलूंना पशूहून क्रौर्याने अिंग्रज मारीत चालले हें ते पाहत

होते. झुलूंचें स्वातंत्र्य अिंग्रज हरण करीत आहेत हें ढळढळीत दिसत होतें. पण दयार्द्र गांधीजींनी झुलूविरुद्ध अिंग्रजी सैन्यात स्वयंसेवा करण्याच्या कार्याचें त्याग-पत्र दिलें नाही ! अिंग्रजी राज्याविषयी त्यांचे मनात जी कळकळ वाटे, तिला झुलूंच्या कत्तलींनी दयेचा पाझर फुटेना. हा सत्याचा अेक प्रयोग झाला.

बोअर युद्धाची गोष्ट तर बोलावयासच नको. त्या शूर राष्ट्राचें स्वातंत्र्य हरण करण्यास निघालेल्या अिंग्रजी सैन्यात हे हिंदुस्थानचे सुपुत्र, स्वत:चें स्वातंत्र्य गमावून बसलेले प्रामाणिक आणि अुपजत दास स्वयंसेवक बनून वळें बळें अिंग्रजी सैन्यात शिरले ! अेक दोघे नव्हत तर आणखी पांच पन्नास लोकांस अेकत्र करून! अुभें जगत् बोअरांच्या स्वातंत्र्य युद्धातील पराजयाने हळहळलें आणि अिंग्रजांच्या विजयाला धिक्कारू लागलें. पण बोअरांच्या स्वातंत्र्याची हत्या करण्याच्या पवित्र कार्यात ज्यांचे हात लाल रंगले होते त्यांस अिंग्रजांनी पारितोषकें वाटलीं, तेव्हा गांधीजींनाही अेक मिळालें आणि तें पदक–तो प्रामाणिक आणि लोचट दास्याचा पट्टा त्यांनी अभिमानाने आपल्या गळ्यात घालून घेतला. हा झाला सत्याचा दुसरा प्रयोग.

तरी पण हें स्वत:चें स्वातंत्र्य बुडवून मग दुसऱ्याचें स्वातंत्र्य, त्या स्वत:चें स्वातंत्र्य बुडविणाऱ्या तिसऱ्याचेसाठी, तुडवीत जगभर हिंडत फिरणारे ' सत्याचे प्रयोग ' तिकडे सुदूर आफ्रिकेत चालले होते. प्रत्यक्ष हिंदुस्थानास त्या सत्याची लस टोचावयाची अुरली होती. तेव्हा परमकारुणिकपणे सत्याचा तोही प्रयोग प्रत्यक्ष हिंदुस्थानातच करावा म्हणून गेल्या महायुद्धाचे वेळी अिंग्रजांच्या साम्राज्यास–म्हणजेच हिंदुस्थानच्या पारतंत्र्यास–प्रामाणिक लतकोडगेपणाने आपली निष्ठा विकलेल्या या अप्रामाणिक मूर्खतेचें प्रदर्शन हिंदुस्थानातही चालू झालें. त्या महायुद्धाचे सुवर्णसंधीस लोकमान्यांचा राष्ट्रीय पक्ष शक्य तितके हिंदी अधिकार अिंग्रजांचे हातून हिसकावण्यासाठी अिकडे पटांगणात बुद्धिबळाचे डावपेच खेळत होता, तर तिकडे तो अभिनव भारतीय क्रांतिपक्ष सर्व अधिकारांचें अधिष्ठान असलेला राज-दंडच अिंग्रजांचे हातून छिनावून घेण्यासाठी प्राण पणास लावून ' शक्तीने मिळतीं राज्यें ' म्हणून गर्जत, बैठे डाव अुधळून देअून, रणांगणात घुसत होता; त्याच वेळेस गांधीजी आपल्या ' सत्याचे प्रयोगात ' अथवा आत्मवृत्तात लिहितात की, ' त्या वेळेस या जर्मन महायुद्धात माझें कर्तव्य काय आहे हा प्रश्न माझ्या समोर अुभा राहिला. ..... कित्येक हिंदी लोक म्हणत त्याप्रमाणे अिंग्रज आपले बलात्कारी धनी, आपण दास, त्यांचा आमचा हा संबंध असल्याने त्यांच्यावरील संकटाचा अुपयोग आपण आपल्या मुक्तीकडे करावा हा अुपदेश माझ्या गळ्यात तेव्हा कसा अुतरू शकणार होता ! कारण मला माझी स्थिति अगदी दासासारखी वाटतच नव्हती. माझी धारणा ही की, दोष अिंग्रजी राज्यपद्धतीत आहे आणि अधिकत:

अिंग्रजी अधिकाऱ्यांत आहेत. हे दोष आम्ही प्रेमाने दूर करू शकू. राज्यपद्धति सदोष वाटे; पण ती आज जशी असह वाटते तशी तेव्हा वाटत नसे. परंतु आज या पद्धतीवरचा माझा विश्वास जितका अुडाला आहे तितकाच ज्यांचा त्या वेळेसच अुडाला होता, ते त्या संकटात अिंग्रजांच्या हातून शक्य ते अधिकार छिनावण्याच्या मार्गास लागले. ते अिंग्रजांस साह्य कसलें देणार ! पण मला अधिकार छिनण्याचें, तर बाजूसच राहो पण अधिकार मागण्याचेंही धोरण अशा अिंग्लंडवरील संकटाचे वेळी असभ्य आणि अदूरदृष्टीचें वाटलें. आणि अिंग्रजांस अुलट विनअट साह्य देणें हें आपलें श्रेष्ठ कर्तव्य होय असें मी निश्चित केलें.' ' या दूरदृष्टीच्या आणि सभ्य कर्तव्याचे पूर्तीसाठी ' गांधीजींनी प्रथम ८० अेक लोक जमवून त्या युद्धात स्वयंसेवा करण्याची परवानगी मिळविण्यासाठी अर्जावर अर्ज करण्यास आरंभ केला. पण शेवटी कुशाग्रबुद्धि अिंग्रजी राजकारणास त्या कोटयवधि लोकांच्या धुमाळीत ह्या मूठभर बापडयांची स्वयंसेवा दर्यामें खसखस वाटून त्यांचा अुपयोग त्यापेक्षा हिंदुस्थानातील लोकमान्यांच्या राष्ट्रीय पक्षाचे डावपेच हाणून पाडण्यात अधिक होअील असें तत्काल दिसून येअून या ' दीर्घ ' आणि ' सभ्य ' अिंग्रजी राजनिष्ठांस हिंदुस्थानकडेच त्यांनी वळविलें. अहिंसात्मक सभ्य सत्याने पुढे अिकडे मांडलेले थेर प्रसिद्धच आहेत. जर्मनांस सशस्त्र युद्धात ठार मारण्यासाठी हिंदुस्थानातल्या बिचाऱ्या शेतकरी लोकांस सेनेच्या कत्तलखान्यात धाडण्यास हीच अहिंसा अिंग्रजांची ' स्वयंसेवक रिक्रूटिंग ऑफिसर ' झाली होती ! जुने नीति-शास्त्रज्ञ कधी कधी लिहितात ' धर्मासाठी केलेली हिंसा हिंसाच नसते सज्जनांचे रक्षणार्थ करावी लागणारी हिंसा अहिंसाच असते. ' जुनी व्याख्या चुकीची आहे, निरपवाद अहिंसाच खरी अहिंसा असें म्हणणारे महंत त्या निरपवाद अहिंसेची सक्रिय व्याख्या अशी करितातसे दिसतें की, अिंग्रजांच्या साम्राज्यासाठी जी हिंसा ती हिंसाच नव्हे ! जर्मन, झुलू, बोअर वाटेल तो जो अिंग्रजांच्या साम्राज्याविरुद्ध लढत असेल, त्याची हिंसा करण्यासाठी ' रंगरूट ' भरती करण्याच्या निरपवाद अहिंसेच्या ' सभ्य ' कार्यक्रमात हिंसा संमत आहे !

गेल्या महायुद्धात गांधीजींनी राष्ट्रीय पक्षाच्या अडवणुकीच्या राजकारणास शक्य तो खो घालण्यास झटून त्यात थोडें यश मिळविलें. लोकमान्यांचे कार्यतिच ते थोडावहुत खो घालू शकतील अितकीच अिंग्रजांची अपेक्षा होती. कारण क्रांति-कारक महात्माजींच्या अहिंसात्मक ' सभ्य ' ' दूरदृष्टीस ' कवडीच्याही अुधारीने विचारीत नाहीत हें सरकार जाणूनच होतें.

गांधीजींच्या आत्मचरित्रातील वरील अुताऱ्यावरून त्यांनी मद्रासच्या राष्ट्रीय सभेने संमत केलेल्या स्वातंत्र्याच्या ठरावाने चिडून जावें हें किती साहजिक आहे हें कोणासही समजून येअील. त्यांचें पूर्ववृत्त आणि ' पहाडी चुकयां 'ची परंपरा ज्यांस माहीत नाही, त्यांसच त्याचें आश्चर्य वाटेल तर वाटो.

अनुक्रम लेखक वि. निबंध
संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य ह्या शब्दांनी चिडलेले गांधीजी नि अग्रज १९९
क्रमांक ... पृ. ... नो. दि: 13/11/44

गेल्या महायुद्धात त्यांस जी 'सभ्य' अहिंसात्मक 'दूरदृष्टीचीं' धोरणें आणि तत्त्वें वाटलीं, तीं त्यांनी त्याच अुतार्‍यात आज मला तशी वाटत नाहीत म्हणून म्हटलें आहे. म्हणजे त्या वेळेस जे लोक त्यांस त्यांचीं धोरणें आणि वृत्ति चुकीची आहे म्हणून म्हणत, तेच बरोबर होते हें त्यांनी मान्य केलें आहे. त्या लोकांस जे वीसपंचवीस वर्षांपूर्वी स्पष्ट दिसलें तें गांधीजींच्या 'दूरदृष्टीस' आज अंधुकपणे दिसत आहे. अितकी त्यांची राजकारणी 'दूरदृष्टि' अदूरदर्शी असते ! त्यांच्या जुन्या 'सत्याचे अनंत प्रयोगांत' जर कोणचें अेखादें सत्य सिद्ध झालें असेल, तर तें हेंच होय की त्यांना सत्य म्हणून जें जें वाटलें तें तें वहुशः असत्य असतें. प्रयोग करण्यास लागणारी चिकित्सक दृष्टि आणि वृत्ति त्यांच्यात वसतच नाही. आज जें 'सत्य' म्हणून ते मानतात, त्यासच अुद्या अेक 'पहाडी चूक' म्हणून तेच संवोधितात. कालचें त्रिकालावाधित सत्य आज 'पहाडी चूक' होतें, आजचें सत्य अुद्या पहाडी चूक होतें – अुद्यांचें सत्य परवा पहाडी चूक ठरतें–परवाचें तेरवा असा हा क्रम अव्याहत चालू आहे.

या परंपरेने पाहिलें असता मद्रासच्या स्वातंत्र्याच्या ठरावास पोरकट आणि अदूरदर्शी म्हणून आज जे गांधी म्हणतात, तेच अुद्या त्यांच्या या अुद्गारांसच 'पोरकट' म्हणून ही अेक Himalayan mistake होती म्हणून ठरविण्यास बहुशः पुढे येतील – पण ते आणखी काही वर्षे अुलटल्यावर ! जें जगाला आज दिसतें तें त्यांना दहावीस वर्षांनी दिसतें ! दूरदृष्टि ! दूर गेल्यावर मागचें दिसणारी दृष्टि !

पण हजार वेळा अनुभवास आलेली ही गोष्ट आज पुनः अेकदा सांगण्याचें कंटाळवाणें कर्तव्य करून टाकण्याचें मुख्य कारण हें की, त्यांच्या काही अनुयायांस स्वातंत्र्याच्या ठरावाला त्यांनी केलेला विरोध पाहून अजूनही बिचकल्यासारखें, बावरल्यासारखें होत आहे, तें न व्हावें. ज्याला ज्या सत्याची माहिती झालेली नाही, तो त्या विषयातील अज्ञ मनुष्य त्या सत्याचे प्रयोग करीत बसतो हें ठीकच; पण स्वातंत्र्य हें राष्ट्राचें, व्यक्तीचें जसें जीवन, तशी अुपजत, पूर्वार्जित, अहरणीय मत्ता आहे हें राजकीय सत्य ज्यांना सूर्यासारखें ढळढळीतपणे दिसत आहे, त्यांनी याविषयी आणखी प्रयोग ते काय करायचे ! पंचवीस वर्षांपूर्वी जीं राजकीय सत्यें अभिनव भारतास दिसलीं, तीं आज गांधीजींना दिसत आहेत ! त्यात त्यांचा अितकासा दोष नाही. परंतु राजकारणात काय किंवा धर्मकारणात काय, पण त्यांची दूरदृष्टि अितकी अदूरदर्शी असते. प्रत्यही त्यांच्या हातून त्यांनाच अुद्या तिरस्करणीय वाटणार्‍या घोडचुका घडतात, हें त्यांच्या आत्मवृत्तातील सत्याच्या प्रयोगशाळेत पदोपदी अुघडकीस येत असता पुनः त्यांच्या त्या अंधतमसावृत्ता दृष्टीलाच आपली राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गातील यष्टि करू पाहणार्‍या भोळ्या लोकांचाच हा दोष होय. अंध नेत्याचा जितका दोष तितकाच अंधेनैव नीयमानांचाही असतोच

पण सुदैवाने आणि अशा वारंवार केलेल्या निर्भीड दोषाविष्करणानेच आज त्या दोषाच्या रोगापासून हें हिंदी राष्ट्र बहुतेक मुक्त होत चाललें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. हिंदुस्थानचें ध्येय पूर्ण स्वातंत्र्यच ! हें महात्माजींना जरी आणि अिंग्रजांना जरी आवडलें नाही, तरी त्यांपैकी पहिल्यांच्या निर्जीव शापांची किंवा दुसऱ्यांच्या मारक चापांची चिंता न करिता अुभें भारत त्या स्वतंत्रता-भगवतीच्या चरणावरच आपली अढळ निष्ठा अर्पण करावयास येत आहे ! ती केरळ प्रांतीय परिषद आणि तिचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांचें भाषण पहा. ती कर्नाटक परिषद आणि तिचे अध्यक्ष नरिमन यांचें भाषण पहा. ती महाराष्ट्र परिषद आति तिचे अध्यक्ष सुभाष बाबूंचें भाषण पहा. जिकडे तिकडे स्वातंत्र्य-लक्ष्मीचा जयजयकार चालला आहे ! स्वातंत्र्यलक्ष्मीच्या नगाऱ्याची घाअी तेथे अिंग्रजी साम्राज्यावरील लतकोडग्या निष्ठे ! तुझ्या टिमकीचें काअी !

स्वातंत्र्यलक्ष्मीच्या जयनादाने मागेही अेकदा या भारतभूमीच्या देवालयाचा हा सभामंडप नसला, तरी तिचा तो गाभारा, असाच दुमदुमून गेलेला होता ! ती गर्जना–अभिनव भारताची गर्जना–गाभाऱ्यातून निघून आज सभामंडप दुमदुमवीत आहे. अुत्तम ! पण–पण—

पण अजून अेक मोठा फरक अुरला आहे. अेक मोठीच अुणीव भरून काढावयाची आहे ! तुम्ही सर्वांनी 'स्वातंत्र्य' हेंच ध्येय म्हणून ठराव केलेत. साध्य ठरविलेत पण हे महाराष्ट्र–कर्नाटक–केरळ–वंगा !—हे भारता, नुसता साध्याचा ठराव केलास ! पण साधनाचें नांव देखील तेथे कोणी कां बरें काढिलें नाही ?

स्वतंत्रता लक्ष्मीच्या पूजेचीं साधनें तिच्या गाभाऱ्यात जोवर जमलीं नाहीत, कोणी तीं जमविण्याचा चकार शब्द काढिला नाही, तोवर नुसत्या सभामंडपात तिच्या चालणाऱ्या या पारोशा आणि रिकाम्या जयघोषांनी तिचा अुत्सव साजरा कसा होणार ! पूजेवाचून, होमावाचून ती देवी कशी प्रसन्न होणार ?

म्हणून सावधान ! साधनाचा अेकही ठराव झाला नाही–म्हणून सावधान! नाही तर पुनः भलतेंच साधन भलताच मनुष्य योजू लागेल. ती लतकोडगी अहिंसा, तें परधार्जिणें प्रेम, तो स्वपक्षघातकी–न्यायपक्षघातकी–निःपक्षपात–ज्यांनी ज्यांनी गेल्या महायुद्धात सभ्यतेच्या आणि न्यायाच्या सोंगाखाली अन्यायापुढे धूप जाळले, ते ते सर्व आज अुद्यांच्या अेखाद्या नव्या सुवर्णसंधीत पुनः तसलींच खुळें अुभारण्यास कमी करणार नाहीत. म्हणून तर त्यांची ही सारखी झडती घ्यावयाची ! आणि चेतावणी द्यावयाची की—

सध्याचा ठराव झाला पण आता साधनाचें काय तें बोला ! कारण मुख्य गोम ती तेथेच आहे !

नाही म्हणावयास अेका पंजाबने मात्र साधनाचें अंधुक दिग्दर्शन केलें. 'पूर्ण स्वातंत्र्य हेंच आमचें ध्येय आणि त्यास जें प्राप्त करून देण्यास शक्त होअील तें आमचें साधन !'

संकल्प ठीक सुटला. देवालयाच्या सभामंडपात अितकें झालें तरी पुरें आहे. पण आता त्या गाभाऱ्यात चला. मुख्य पूजेचें साहित्य तेथे हवें पण तेथे अजून अेकही फूल, अेकही समिधा, हुताशनाची अेकही पेटलेली ठिणगी दिसत नाही !

—ता. २८ जून १९२८

✦ ✦ ✦

(१३)

हुतात्मा अंदमानांत मेले कां नाहीत ?

काही दिवसांपूर्वी आम्हांस अेकाने सांगितलें की, हिंदुसंघटनावर सदोदित शिव्याशापांची वृष्टि करून आपल्या हिंदुत्वाचें सार्थक करणाऱ्या, डॉ. मुंजे-केळकर यांच्या संघटन चळवळी देशद्रोही आहेत म्हणून समजणाऱ्या, सिंध प्रांत मुसलमानांस आंदण देअून टाकावा म्हणून तरवारलेल्या, कोणाअेका कानपूरच्या वीर पुरुषानें 'श्रद्धानंदा'च्या संपादकास, स्वातंत्र्याच्या ठरावास विरोध केला म्हणून 'श्रद्धानंदा'ने त्या विरोधकावर केलेल्या टीकेने चिडून, विचारलें आहे की, 'हुतात्मा' म्हणविणारांनी क्षमा कशी मागितली—ते तुरुंगात मरणी मरून कां गेले नाहीत ? नव्हे त्यांनी सरकारला अर्ज तरी कां केले ?

वास्तविक पाहता 'श्रद्धानंद'च्या संपादकाने बंदिगृहातून सुटण्यासाठी सरकारास अर्जबिर्ज कधीही केले नाहीत—मग क्षमेची गोष्ट तर दूरच. म्हणून आम्हांस प्रथम वाटलें की, 'श्रद्धानंदा'च्या संपादकाच्या नांवाचा अितर कोण्या तरी थोर हुतात्म्याच्या नांवाशी घोटाळा होअून आपली ही चूक झाली आहे असे त्या कानपूरच्या वीरपुंगवास कळवावें.

परंतु पुनः वाटलें की, ज्या अर्थी त्याने अगदी हुतात्मा असें स्पष्ट लिहून त्यांस क्षमा कां मागितली म्हणून हडसून विचारिलें आहे, त्या अर्थी ही अगदी चूकच नसावी. हुतात्मा म्हणून देशात ज्यांस आज गौरविलें जातें त्यांच्यात कोणीही क्षमा मागितल्याचें आम्हांस माहीत नाही. हां, अेक गोष्ट मात्र प्रसिद्धच आहे की, पंजाबपासून पांदेचरीपर्यंत आणि सिंधपासून बंगालपर्यंत शेकडो क्रांतिकारक—की ज्यांनी आपलें शिर आपल्या हातात घेअून आणि घरच्या संसारास आग लावून

स्वदेशाच्या संसारास थाटण्यासाठी राष्ट्रस्वातंत्र्यलक्ष्मीच्या जयजयकारात मृत्यूच्या खिंडीत 'मारिता मारिता' प्रवेश केला आणि त्या रणधुमाळीत आहत होऊन पाडाव झाल्यावर आणि वर्षानुवर्षें भयंकर छळ सोशिल्यावर पुनः देशसेवा करता यावी म्हणून थोडे दिवस झुंज सोडण्याची विपक्षाची अट मान्य करून त्यांचे हातून मुक्तता करून घेतली, त्यांसच हुतात्मे म्हणून संबोधिलें असेल – आणि त्यांच्या या अटीसच जर क्षमायाचना म्हटलें असेल तर ?

तर काय ? असल्या हुतात्म्यांस की, ज्यांच्या साहसाच्या, स्वार्थत्यागाच्या आणि व्रतनिष्ठेच्या पराक्रमाने शत्रूंनी देखील दिपून जावें – त्यांस ललकारीत तू कारागारात मरून कां गेला नाहीस ? म्हणून हटकणारा अेवढा वीर पुरुष असावा तरी कोण – आणि असले वीर कानपूरला जिवंत असता तेथून दोन हातांवर असलेला ब्रिटिश कमांडर-अिन-चीफ अजून जशाचा तसा राहिला तरी कसा याचें आम्हांस सभय आश्चर्य वाटून आम्ही क्षणभर स्तंभित होअून राहिलो !

शिवाजीला देखील शत्रूच्या हातात पडला असता तुरुंगात 'मरणी मरून जाण्याचें' हें आत्महत्यारी शौर्य करवलें नाही. त्याने अर्जाची भेंडोळीं तर किती धाडिलीं असतील याची गणतीच नाही. त्याने औरंगजेबाच्या पायाशी विनम्र विनंती केली, त्याने औरंगजेबाच्या हातावर तुरी दिल्या आणि त्याने औरंगजेबाच्या छातीवर हिंदुपदपादशाहीच्या सिंहासनाचा पाय दिला ! पण तो भित्रा दिल्लीच्या त्या कारागारात अन्न सोडून सत्याग्रह करीत मरणी मेला नाही. त्यास तें धाडसच झालें नाही. औरंगजेब जें साधू शकला नाही, तें स्वतः मरून त्यास साधून देण्याचें शहाणपण शिवाजीत कुठलें ! अफजुलखानापुढे तर तो हात जोडून गेला – ज्या हातांत वाघनखें होतीं ते हात जोडून ! त्या कपटाचा अधिक धिक्कार करावा की त्या हात जोडणाऱ्या भ्याडपणाचा हेंच समजत नाही! अहिंसेचीं कंकणें हाती भरून, सत्याच्या नांवाने आपल्या सेना कुठे कशा दवलेल्या आहेत तीं सर्व ठावठिकाणें अफजुलखानाला सांगत अफजुलखानाच्या मार्गात आडवें पडून अुपास करीत त्याने सत्याग्रह कां केला नाही, असें शिवाजीसही पुन्हा हटकलें जातें की काय म्हणून आम्हांस शंकाविव्हल भय वाटू लागलें की, शिवाजीने डोक्यावर गांधी टोपी घातली असती, तर किती वरें होतें – शौर्याची ही अपूर्व कल्पित आणि धृति सुचविणारी अचाट बुद्धिमत्ता त्या टोपीत अुवलेल्या डोक्यावाचून कोणा अितर डोक्यात अुपजणार आहे ? कारण शिवाजीला आणि प्रतापाला मी त्यांचे काळात असतो, तर हिंसात्मक सशस्त्र क्रांतीविषयी दोपीच ठरविलें असतें, असें जर्मनांस अिंग्रजासाठी मारणाऱ्या अहिंसेने अलीकडेच प्रसिद्धपणे सांगितलेंच होतें ! 'यंग अिंडिया'चे वाचकांस हें माहीत असलेंच पाहिजे.

पण भूतकाळाच्या कोठारात दडून वसल्यामुळे शिवाजी जरी सुटला, तरी आजकाल स्वातंत्र्ययुद्धातील पुरस्सर वीरपक्षाचा मान ज्या क्रांतिकारकांस मिळाला आहे, त्या पथकांत ज्याला The Morning Star of Indian Independence म्हणून सरोजिनींनी गौरवावें, आणि The Prince of Indian revolutionists म्हणून शत्रूंनीही संबोधावें त्या ' हुतात्म्या 'पासून तो कालच्या काकोरीच्या देशवीर रामप्रसाद, बिसमिल, सन्यालादिक मारणाऱ्या, फाशीवर मेलेल्या किंवा जिवंत फाशीवर–जन्मठेपीवर–लटकत असणाऱ्या क्रांतिकारक हुतात्म्यांपर्यंत सर्वांनीच सरकारास अर्ज केले आहेत. फाशी रद्द करा म्हणून अिंग्रजांच्या राजास दयेचे अर्ज देखील. सत्येंद्रापासून तों काकोरीच्या रामप्रसादादिक हुतात्म्यांपर्यंत सर्वांनी केले आहेत. पण त्यांस आजवर हे अर्ज करण्यापेक्षा मरणी मरून कां जात नाही म्हणून विचारणारा कोणी शहाणा भेटला नाही. पण आज त्या 'Prince of Indian Revolutionist ' ला देखील तसें हटकणारा मनुष्य कानपुरास अुत्पन्न झाला आहे हें कळताच, तो मनुष्यपुंगव असेल तरी कोण, दिसेल तरी कसा, त्याने असे अद्वितीय पराक्रम तरी कोणकोणते केले आहेत, या प्रश्नांनी सभय आश्चर्य वाटत आम्ही क्षणमात्र स्तंभित होअून राहिलो !

वाटलें की, 'को अेष सम्प्रति नवः पुरुषावतारो, वीरो न यस्य भगवान् भृगुनंदनोऽपि ! '

तोंच कलकत्त्याच्या प्रसिद्ध 'स्वतंत्र ' दैनिकाच्या ४ ऑगस्टच्या अंकात बातमी वाचली की, कानपूरच्या 'प्रताप ' नांवाच्या पत्राचे गणेश शंकर विद्यार्थी नामक कोणी संपादक आहेत. त्यांनी सरकारी कोर्टाची मानहानि करण्याच्या अभियोगातून आपली सुटका करून घ्यावी म्हणून सपशेल क्षमा मागितली. नुसतें दुःखदर्शन करून मुख्य न्यायाधीश सोडीना तेव्हा Unconditional apology–विनाअट क्षमा मागून, सरकारी कोर्टाच्या दयेवर आपणांस सोडवून घेअून, 'क्षमस्व ' म्हणून, सरकारची त्रिवार याचना केली–आणि सरकारचा सर्व व्यय भरून देअून आपली सुटका करून घेतली !

ही बातमी वाचताच तत्काल आम्हांस वाटलें की, होय रे होय ' हुतात्म्यांस ' अर्ज करून बंदीतून कां सुटलेत, मरणी मेला कां नाहीत, म्हणून हटकणारा तो 'नवः पुरुषावतारः ' तो कानपूरचा मनुष्यपुंगव हा 'प्रताप ' संपादकच असला पाहिजे ! पुंगवच तो ! आपलीं शिंगें आणि 'केसरी ' चीं नखाग्रें यांतील भेद अनुभवावाचून त्यास कसा कळणार !

कारण हुतात्म्यास मेला कां नाहीस म्हणून म्हणण्याचें धाडस असल्या कोणातरी ' क्षुद्रात्म्या'सच व्हावयाचें ! ! Fools rush where angels fear to tread.

स्वदेशस्वातंत्र्यार्थ झुंजताना शत्रूचे फासात गळा अडकून प्राणावरच बेतली असता, त्याच कार्यात पुनः झुंजता यावें म्हणून शत्रूच्या हातून निसटण्यासाठी अेखाद्या काकोरीच्या क्रांतिकारकाने अिंग्रजांच्या राजास दयेची याचना करण्याचें पत्र टाकिलें, तर त्यास हसण्याचें साहस तोच मनुष्यपुंगव करू शकेल की, जो प्राणांची तर गोष्टच दूर, पण अेखादें दुसरें वर्ष बंदीत पडण्याचा क्षुद्र प्रसंगही येताच – राजाविरुद्ध सशस्त्र युद्ध पुकारण्याच्या भयंकर आरोपाच्या भीषण दंडाची गोप्ट दूरच, पण अेका सरकारी न्यायालयाचा अपमान करणारा अेक यःकश्चित् लेख लिहिल्याचा आरोप येताच – गडबडून जाअून विपक्षाचे पाय चाटू लागतो !

तरीही हे 'प्रताप' संपादक ! 'हुतात्म्या'कडे ज्या मत्सराच्या अुलटच्या दुर्विणीतून पाहण्याचें धाडस तुम्ही केलेंत, त्याच दुर्विणीने तुम्हांकडे पाहिलें असता तुम्ही किती आणि कसे 'क्षुद्रात्मे' दिसता हें तुम्हांस दाखविण्यापुरताच हा त्या दुर्विणीचा अुपयोग दुःखाने पण निरुपायाने आम्ही केला आहे.

आणि म्हणूनच तुमचा निरोप घेण्याचे आधी आता ती तुमची भुक्कड मत्सराने तडकलेली दुर्बीण वाजूस फेकून देअून आपणांस सांगतो की, आपण कोर्टाच्या क्षमायाचनेत जें केलेत ती नीति त्या परिस्थितीत क्वचित् ठीकही असू शकेल. त्या थोर हुतात्म्यांचाच आदर्श आपण पुढे ठेविलात, तर आपणांस आढळून येअील की 'कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् । अतस्तपःसमेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः ! '

त्यातही नैनीतालच्या कारागृहातील बंदीवर अत्याचार होत असल्याविषयीच्या ज्या आरोपांची चौकशी न्यायालयात चालली आहे, त्याविषयी आपण जें लिहिलेंत तें लिहिण्यात आपला हेतु जनतेचीं दुःखें निवारण करण्याचाच होता आणि अशा प्रकारे पूर्वीही काही वेळा आपल्या 'प्रताप' पत्राने तत्रस्थ जनतेची सेवा भूषणावह रीतीने केलेली आहे हेंही येथेच सांगणें आम्ही आमचें कर्तव्य समजतो. कारण आम्हांशी अितरांनी अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही वाजू विचारात घेअून जसें न्याय्य बुद्धीने वागावें असें आम्हांस वाटतें, तसेंच आम्हीही अितरांशी वागण्याचा शक्य तो प्रयत्न करीत असतो.

महात्माजींसंबंधाने जें आपण लिहिलेंत त्याचा समाचार पुढे अेखादे वेळी घेअू. आणि तोही तेव्हा की जेव्हा गांधीजींसच त्याविषयी जर आणि जेव्हा काही विचारावेसें वाटेल तर आणि तेव्हा. महात्मा गांधींस आम्ही जाणतो आणि ते आम्हांस जाणतात. आमचें आम्ही आजपर्यंत पाहत आलो आहोत. पुढेही पाहून घेअू. कोणा गोमा गणेशास त्यात तोंड खुपसण्याची योग्यता नाही. अहिंसेस लतकोडगी म्हणणें आणि गांधीजींसच तसें म्हणणें या दोन भिन्न गोष्टी आहेत, अितकें कळण्याचेंही ज्ञान ज्यास नाही त्याच्याशी बोला तें काय ! महात्माजींस अुत्तर देअू पण पुढे. आज तो थोर देशभक्त बार्डोलीच्या रणांगणांत ज्या धोरणाने

लढत आहे तें धोरण अजून कुशल सेनापतीस योग्यच असल्याने आणि कोणच्याही राष्ट्रीय लढ्यात शक्यतो आपण सर्वांनी खांद्यास खांदा लावून एकजात लढणें युक्त असल्याने या वेळी आम्ही महात्माजींच्या सहकारितेस आणि साह्यास अुपयोगी पडतील तेच शब्द बोलू आणि तेंच आचरण करू अिच्छितो. राष्ट्रीय हिताचाच अगदी घात होतो तेथेच काय तें आडवें येणें प्राप्त होतें. आणि तेंही राष्ट्रकार्यापुरतेंच. व्यक्तिश: 'परैस्तु विग्रहे प्राप्ते वयं पंचशताधिकम्' हेंच आमचें सर्वांचें ब्रीदवाक्य असलें पाहिजे; आमचें आहे. गोमागणेशास आता तरी हें कळेल काय ?

—ता. ३ ऑगस्ट १९२८

✦ ✦ ✦

(१४)

राष्ट्रीय सभेपेक्षा सर्वपक्षीय सभा मोठी !

पं. मोतीलाल नेहरू म्हणतात की, 'सर्वपक्षीय सभेस मी राष्ट्रीय सभेपेक्षाही अधिक महत्त्वाची समजतो.' अेका अर्थी हें खरें आहे. कारण सर्वपक्षीय सभाच खरी राष्ट्रीय सभा—राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाचें पूर्ण प्रतिबिंब पडलेली सभा होय. क्रांतिकारक राष्ट्रीय सभेच्या जुन्या याचकशाहीच्या किंवा नव्या खादीशाहीच्या आज्ञांस राष्ट्रीय आज्ञा म्हणून मानीत नसत. तेव्हा ते याच कारणाचा अुच्चार करीत. सर्वपक्षीय परिषद ही अेका अर्थी राष्ट्रीय सभेहून राष्ट्राची खरी प्रातिनिधिक संस्था होय; तिचा ठराव प्रागतिक नसला तरी प्रातिनिधिक आहे खरा.

परंतु तो ठराव नेहरूंना कधी, कुठे, केव्हा अैकू आला ? आम्हांस तर ठराव झाल्याचीच नव्हे पण सर्वपक्षीय परिषद भरल्याची देखील बातमी नाही—शक्यता देखील दिसत नाही. कारण हिंदुस्थानच्या अभ्युदयासाठी या सर्व पक्षांमध्ये हातघाअीने आणि प्राण पणास लावून लढणारा जो क्रांतिकारक पक्ष, त्याला कोणत्याही परिषदेत आमंत्रण आल्याचें, आमंत्रण दिल्याचें, त्याचें पक्षीय अस्तित्वही मानल्याचें आमच्या अैकिवात नाही. आणि जर कधी क्रांतिकारक पक्ष अशा 'सर्वपक्षीय' म्हणविणाऱ्या परिषदेत, त्या नांवातील अर्थासच आमंत्रण समजून, मंडपाच्या पुढच्या दाराने आत शिरला, तर हे प्रागतिक, जागतिक, अगतिक अित्यादि सर्व पक्ष त्या मंडपाच्या मागच्या दाराने—सुरतेला ज्या दाराने मेथाप्रमुख गृहस्थ नाहीसे झाले त्याच दाराने—वाट काढून अदृश्य होतील हें अुघडच आहे.

क्रांतिकारकांचें नांव तर दूरच; पण राष्ट्रीय सभेत पं. जवाहरलालचा स्वातंत्र्यपक्ष देखील खपत नाहीसा, झेपत नाहीसा झाला आहे. तरी बरें, बिचारा जवाहरलालांचा 'स्वातंत्र्यसंघ'ही स्वातंत्र्याच्या साधनांचें नांव देखील घेत नाही. 'काय हवें' तेवढेंच काय तें ठरविणाऱ्या वादविवादांच्या दुदुंभि वाजविण्यात ते 'कसें घ्यावयाचें' ह्या विचाराचा अुच्चार देखील स्वतःचा स्वतःसही अैकू येता कामा नये – ही जी पुरातन परंपरा सर्व राष्ट्रीयपक्ष विपक्षांनी आजवर प्रामाणिकपणे पाळली, तिचा ह्या नवीनांतील नवीन 'स्वातंत्र्य संघाने'ही मुळीच अुच्छेद केलेला नाही. आम्हांस अधिकार हवेत, मवाळ म्हणाले; आम्हांस स्वराज्य हवें, जहाल म्हणाले; आम्हांस स्वातंत्र्य हवें, जवाहरलाल म्हणाले; पण तें आम्ही कसें घेणार हें सांगण्याचाच नव्हे तर योजण्याचा देखील अदूरदर्शीपणा त्यांतील कोणीही केला नाही! स्वातंत्र्य हवें! पण तें कसें मिळवावयाचें ह्याचा आचार किंवा विचार करण्यास आम्ही कोणी 'माथेफिरू' आहोत किंवा काय? स्वातंत्र्याचीं साधनें जुळविणें हें अेका चुटकीचें काम! असें – जसें – तसें – कसें तरी – वाटेल तेव्हा पाहता येअील!! माथेफिरू माणसावाचून, त्या साधनांची खटपट करण्याअितका कोण अुतावळा किंवा रिकामटेकडा आहे! माथें असलेल्यांनी स्वातंत्र्य कीं स्वराज्य या शब्दाच्या अुच्चारा-प्रत्युच्चारांच्या धुमाळीत राष्ट्रीयसभेचा आठवडा गाजविला की संपलें.

तथापि वैदिक क्रियेचे आधी वैदिक मंत्रांचे अुच्चार बरोबर करणें हेंही जसें आवश्यक असतें, तसेंच ध्येयाचा अुच्चार तरी आता बरोबर 'वर्णस्थानसमीरित' असा लोकांस करता येअू लागला. याविषयी तरुण पं. जवाहरलालांचे आणि वृद्ध पंडित आयंगारांचे आभारच मानिले पाहिजेत. गुप्त यज्ञागारातील यज्ञाग्नीतून आविर्भूत झालेला तो महामंत्र त्यांनी राष्ट्रीय सभेच्या सिंहासनावर आणून वसविला.

पण त्यामुळे राष्ट्रीय सभेच्या सिंहासनावर जी परधार्जिणी अवदसा आजवर बसलेली होती, तिचा, भयाने आणि त्रासाने जळफळाट होअू लागावा हें सहजच होतें. यास्तवच आणखी अेकदोन वर्षे राष्ट्रीय सभेच्या सिंहासनावर या अवदसेची झेप न पडेल अशी सावधगिरी ठेविली पाहिजे. स्वातंत्र्याचा महामंत्र राष्ट्रीयसभेच्या ध्वजावर, राष्ट्रीयसभेच्या सिंहासनावर, राष्ट्रीय हृदयाचे वेदीवर सारखा अुद्घोषित होत राहिला पाहिजे! 'ना तरी सटवी ती परवशता। करील निश्चित घाता' ही गोविंदाची सावधानता आपण विसरता कामा नये.

तरुण जवाहरलाल स्वातंत्र्याचा दीक्षित झाला ह्यात आश्चर्य नाही. पण श्रीमान् आयंगारांसारखा वृद्ध 'ऋषिः पुराणो'या पदवीस त्याच्या या ध्येयनिष्ठेने पात्र व्हावा हें आश्चर्य!

कोणी संशयतात की, आयंगार पूर्वी सरकारचे अॅडव्होकेट जनरल होते! असतील! पूर्वी राष्ट्रीय सभेचे पुढारी देशभक्तीच्या जिन्याने चढत राष्ट्रीय सभेच्या

अध्यक्षपदाच्या पायरीवरून सरकारचे परवशतेच्या हायकोर्ट जज्जाच्या जागेवर पाय ठेवीत. आज आयंगार त्या सरकारच्या परवशतेच्या पायरीवरून अुतरून राष्ट्रीय स्वातंत्र्याचा झेंडा अुचलीत आहेत. आधी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होअून मग हायकोर्ट जज्जशिपची जागा पटकविणाच्या परंपरेपेक्षा आधी अॅडव्होकेट जनरल असताही त्या पाशातून सुटून मग स्वातंत्र्याच्या दिव्य ध्येयाकडे चढत जाणाऱ्या आयंगारांची परंपरा पुष्कळच अधिक अनुकरणीय आहे.

आयंगारांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा हट्ट धरला, तर कोणी म्हणतात राष्ट्रीय सभेत वेकी होअील ! नेहरू-प्रतिवृत्तास संमति सुखाने द्यावी. ती संमति स्वातंत्र्यवाद्यांनीही तात्पुरती तोड म्हणून देणेच योग्य. परंतु म्हणून कोणी मद्रासच्या राष्ट्रीयसभेत सम्मत झालेल्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ध्वज खाली ओढू लागेल तर वेकीच्या बुजगावण्यास न भिता राष्ट्रातील सर्व तरुणांनी श्रीमान् स्वातंत्र्यवादी आयंगारांचे नेतृत्वाखाली झुंजून ती आपत्ति टाळली पाहिजे. अेकी राष्ट्रीय हिताकरिता हवी. राष्ट्रीय विमोचनाकरिता हवी – राष्ट्र अिंग्लंडच्या साम्राज्याच्या रथाच्या चाकाशी नित्याचें बांधून टाकण्यासाठी नको !

पन्नास आळशांशी अेकी व्हावी म्हणून स्वत:ही अधोगामी रिकामटेकडेपणा करीत बसण्यापेक्षा अेकी करून राष्ट्रीय अुद्धारासाठी निरलस मेहनत करणें बरें· दहा भ्याडांशी अेकीच्यासाठी संगमनत करून स्वत:ही भ्याड होण्यापेक्षा अेकटचाने त्या सगळ्यांशी बेकी करून राष्ट्रासाठी जो साधेल तो पराक्रम करण्यास वेछूट निघून जाणें चांगलें. कोटी कोटी लोकांबरोबर 'माझी मातृभूमि अिंग्लंडच्या साम्राज्याची शिक्का मारलेली बटीकच राहणार' म्हणून अेकीसाठी सांगण्यापेक्षा त्या सर्व बुद्धिभ्रष्ट जगाशी साफ वेकी करून अेकटा अेकाकी गर्जत राहणें वरें की नाही ! ही माझी मातृभूमि कोणाची बटिका – नांवालासुद्धा राहणार नाही ! दुसऱ्याचा शिक्का तिच्या राजमुद्रेवर तिला सहन होणार नाही ! ती स्वतंत्र होअू अिच्छते ! नाहीतर झुंजत मरू अिच्छते ! ! मला तरी तिचा हाच संदेश मिळाला आहे !

पूर्वी सुरतेला ह्याच अेकीच्या बुरख्याखाली 'स्वराज्या'च्या ठरावाची गळेचेपी होणार होती. पण टिळकांनी, राष्ट्रघात करते ती अेकीच खरी वेकी होय, असें म्हणून राष्ट्रहितकारक वेकीच पत्करली आणि 'स्वराज्या'चा ध्वज पडू दिला नाही. त्याचप्रमाणे स्वराज्य, म्हणजे अिंग्लंडच्या कक्षेतील अेक अुपग्रहाचें परावलंबी अस्तित्व, विनसैन्यी, बिनविमानी, बिनजलसेनी, विनराजमुकुटी, असे पंगु संस्थानी अस्तित्व – अशी व्याख्या जेव्हा होत आहे, तेव्हा हजार नव्हे लाख लाख लोक जरी त्या भ्रमात सापडले आणि अेकीसाठी तूही असाच भित्रा भ्रमिष्टपणा स्वीकार म्हणून सांगू लागले, तरी त्यातून तत्काल फुटून निघून स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ध्वज अुचलून धरण्यासाठी आपले अेकटचाचे हातांनी तरी आपलें शिर तुटून पडेतो झटलें पाहिजे. अशा परिस्थितीत अेकी हेंच पाप; बेकी हेंच पुण्य.

✦ ✦ ✦

मुसलमानांशी अेकी व्हावी म्हणून खिलाफतीची आफत अुरावर वसवून घेणाऱ्या सज्जनांनीच आजही ह्याच अेकीच्या नांवावर स्वातंत्र्याविरुद्ध कोल्हेकुअी चालविली आहे. राष्ट्रीय सभेस परावलंबित्वाचें लागलेलें हें ग्रहण मद्रासला सुटलें होतें–तें पुन्हा लागू नये म्हणून कलकत्त्यास सर्व स्वातंत्र्यवाद्यांनी श्री. आयंगारादि पुढाऱ्यांस पाठिंबा दिला पाहिजे.

अयंगार म्हणे नेहरूंचें पुढारीपण हिसकावून घेण्याकरिता स्वातंत्र्याचा जयजयकार करीत आहेत ! पण त्यात बिघडावयाचें तें काय ? गोखले–मेथांचे पुढारीपण न साहवल्यामुळे टिळक स्वदेशी बहिष्काराचा अुदो अुदो करीत होते म्हणून किंवदंती ओरडत असेच कीं नाही ! पण राष्ट्रहित त्यानेच साधलें म्हणून टिळकांकडेच पुढारीपण जाणें योग्य ठरलें; तीच स्थिति आजची. जर मोतीलाल नेहरू स्वातंत्र्याचे ठरावास हाणून पाडू म्हणतील—बहुधा ते तसें करणार नाहीत–तर ते किंवा आणखी कोणी अिंग्रजांच्या ऋणानुबंधाने मिधीं झालेलीं माणसें तसें करू लागतील, तर स्वातंत्र्याचे नांवाने त्यांचें पुढारीपण आयंगारांनी हिसकावून घेण्याचा प्रयत्न करणें हेंच योग्य आहे. पुढारीपण घेअू पाहणारास, तें पुढारीपण जाअू नये म्हणून झटणाऱ्यांना तरी काही दोष देता येणार नाही !

—ता. १३ डिसेंबर १९२८

✦ ✦ ✦

(१५)

लालाजींवर लाठीमार

देशवीर लाला लजपतरायजींस शस्त्रसंन्यस्त स्थितीत गाठून, हीन, दीन दुबळ्या अशा स्वदेश बांधवांच्या दुःखांचा परिहार करण्याचा यत्न केल्याच्या पापासाठी अिंग्रजांच्या अुन्मत्त लाठ्यांनी घायाळ केलें.

परंतु लालाजींस मारहाण करूनच ते थांबले असते तर त्यांच्या ख्रिस्ती धर्माच्या पुस्तकातील वाक्यांचें अर्धेंच अनुसरण झालें असतें. ख्रिस्ती धर्माच्या धर्मग्रंथातील भविष्य तंतोतंत खरें ठरविण्याचें पुण्य त्यांना लागलें नसतें. जें 'Prophets of Old' बोलले तें खरें व्हावें, 'should come to pass, म्हणून लालाजींना मारहाण केल्यानंतर अिंग्रजांनी अेक कमेटी नेमिली. आपण कोणीच अशी मारहाण केली नाही असें म्हणत ते लालाजींस विचारू लागले–

तुम्हांस कोणी मारलें तें तुम्हीच सांगा पाहू ? बघू बरं तुम्ही ओळखता का ? पाहू बरें तुम्हांला तेवढी तरी बुद्धि आणि धैर्य आहे कीं नाही ?

'For all this came to pass as foretold.' कारण हें सर्व त्यांच्या धर्मपुस्तकात, बायबलात ग्रथित केलें असेंच घडून आलें. त्या ख्रिस्ती अधिकाऱ्यांचा बायबलावर विश्वास होता. त्या शिकवणीचें, त्या अितिहासाचें अक्षरन् अक्षर आचरून दाखविणें येशूच्या भक्तांचें कर्तव्यच होतें.

म्हणून 'वॉअिड कमिटी' नेमली.

कारण बायबलात त्यांच्या या कृत्याचें जें भविष्य आधीच तंतोतंत वर्तविलेलें आहे त्यात स्पष्टच म्हटलें आहे की, 'They then spat at him in his face and did buffet him. They smote him in the face with the palms of their hands and jeeringly asked : prophesy unto us, oh Christ, who of us smote thee !'

या यमकाने सायमनप्रसंगीच्या मारपिटीचें आणि बॉअिड कमिटीचें तें भविष्य किती बरोबर वर्णिलें आहे ! बायबल खरोखरच भविष्यवादी ग्रंथ आहे. अिंग्रज सरकार खरोखर ख्रिस्तीच आहे. आणि वरील भविष्य परवाच्या घटनेचेंच असल्यामुळे वरील बायबलातील वाक्यात संबोधलेला ख्राअिस्ट शब्द लालाजींस संबोधूनच लावला आहे. कारण बॉअिड कमिटीने त्याच वाक्यात विचारलें आहे,' Prophesy unto us, oh Lalaji, who of us smote thee !!'

—ता. २० डिसेंबर १९२८

✦ ✦ ✦

३८९७६ वि. १९५१
१५१९ दि: १३।११।५५
(१६)

काशीतील दोन संमेलनें
माकड महासंमेलन नि भाकड महासंमेलन

काशी येथे गेल्या दोन महिन्यांपूर्वी जीं दोन महासंमेलनें अेकाच वेळी भरलीं त्यांची विस्तृत माहिती आता वाचकांना कळलेलीच आहे.

त्यांपैकी ज्ञानवापीजवळ भरलेलें पहिलें महासंमेलन म्हणजे मर्कट महासंमेलन हें होय. आणि दुसरें महासंमेलन म्हणजे अज्ञानवापीजवळ भरलेलें ब्राह्मण महासंमेलन होय. तेंच जरा प्राकृत भाषेत सोयीस्कर रीतीने सांगावयाचें तर पहिल्यास माकड-महासंमेलन आणि दुसऱ्यास भाकड-महासंमेलन म्हटलें असताही चालेल.

माकड महासंमेलनाची माहिती काशीच्या पत्रांतून जी आली ती सारांश-रूपाने अशी आहे की, काशीला काही दिवसांपासून विजेच्या तारा मार्गातून लावण्यात आल्या. त्यापूर्वी असलेल्या साध्या तारांवर, मग त्या कुंपणाच्या असोत, जाळीच्या असोत, काशीची माकड मंडळी पूर्वापार बसत आलेली असत. तारांवर वसणें, वेळी त्यास धरून लोंबकळणें हा माकडांचा जातिस्वभावच होऊन वसला होता. त्यायोगे त्यांस कोणतीही हानि होत नसल्याने तें कृत्य, ती रूढि त्यांच्या ज्ञाति-स्मृतीत शिष्टाचार म्हणून आजपर्यंत गणलेली असे. विजेच्या तारा जेव्हा नवीन आल्या, तेव्हा त्या तारांसही त्यातील विजेचें नावीन्य माहीत नसल्याने माकडें त्या आपल्या शिष्टसंमत रूढीप्रमाणे लोंबकळू लागलीं. परंतु विजेचे चटके बसून त्यांची अेकाअेकी फारच धांदल अुडाली. प्रथमप्रथम हे अपघात कां होतात हें त्यांच्या मुळीच ध्यानात येअीना. तीं अगदी गोंधळून गेलीं. शेवटी या अतर्क्य संकटाची काही चिकित्सा करावी आणि सर्वानुमते त्यावर काही तोड काढावी म्हणून त्या काशीच्या माकडांनी त्यांच्या जातीचें अेक महासंमेलन भरविलें. शेकडो माकडें अेका मैदानावर अेकत्र झालीं. त्यांच्यात किती वेळा तरी माकडी भाषेत गिचमिच चालून शेवटी काय ठरलें कोणास ठाअूक; पण त्यांतील अेक वृद्धमा माकड अुड्या मारीत वाहेर पडला. समस्त सभा त्याचेकडे टक लावून पाहत राहिली. तो हळूच त्या नवीन तारांच्या खांबावर चढला. मग हळूहळू हात पुढे करीत त्याने त्या खांबावरूनच त्या तारांस झटझट बोटें लावण्याचा प्रयत्न केला. अर्थातच त्यास काही चटके वसले. तत्काल तो खांवावरून अुतरला. परत आपल्या ज्ञातिसंमेलनात आला. पुन्हा थोडी गिचमिच झाली आणि त्या दिवसापासून सर्व माकडांनी तशा प्रकारच्या तारांवर चढणें अेकाअेकी सोडून दिलें. हें वृत्त आम्ही गमतीचें म्हणून कल्पितपणे देत नसून ही गोष्ट खरोखरच अशी घडली हें वृत्त वर्तमानपत्रे वाचणारांस माहीत आहेच.

वर दिलेली घटना जशी दिसली तशी स्थूल रूपाने वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केल्याप्रमाणे आम्ही वाचल्यानंतर त्या माकडांच्या सभेतील सूक्ष्म हेतुही कळावा म्हणून आमचे विशिष्ट वार्ताहर श्री. मनकवडे यास आम्ही तिकडे धाडलें होतें. त्यांनी माकडांच्या मनात शिरून त्या सभेविषयी काही अधिक माहिती जी धाडली तीही येथे देत आहो. अर्थात् तिला वाचकांनी कल्पित म्हटल्यास आमचा प्रत्यवाय नाही. कारण श्री. मनकवडयाप्रमाणे मनातलें जाणण्याची शक्ति सर्वांसच असते असें नाही. ते लिहितात : आजपर्यंत निरुपद्रवी असणाऱ्या तारांवर हे अपघात कां व्हावे हें न समजल्यामुळे माकडांनी तें महासंमेलन भरविलें होतें. त्यात कोणी हनुमान नांवाच्या माकडाने सुचविलें की, क्वचित् ह्या तारांत काही हानिकारक पदार्थ भरलेला असावा. ह्या तारा आजपर्यंतच्या तारांहून निराळ्या असाव्या. हें

अनुक्रम 31604 वि. नोंदणी
क्रमांक 1461 दि. 1/11/64

त्या माकडाचें बोलणें ऐकताच त्यांतील अेक पुच्छवान नांवाचा दुसरा माकड रागावून म्हणाला, ' छट् ! भलतीच शंका. तारांमध्ये अशा भयंकर तारा असू शकतात असें शक्य असतें, तर आपल्या त्रिकालदर्शी स्मृतिकारांनी तें पूर्वीच सांगून टाकलें नसतें कीं काय ? तार पाहिली चढावें, लोंबकळावें हा आपला ज्ञातिनियम आज हजारो वर्षें आपण अबाधित पाळीत आलो. पण असे अपघात कधी झाले नाहीत. तेव्हा तारांवरची ही शंका व्यर्थ आहे. हा आपल्या त्रिकालदर्शी पूर्वजांचा आणि सनातन स्मृतिकारांचा अपमान आहे ! हा त्या रागावलेल्या माकडाचा आक्षेप ऐकताच त्यांतील अेक वृद्ध शीर्षवान् नांवाचा माकड म्हणाला, ' आपल्या या आक्षेपकाचें नांव त्याच्या आअीबापांनी ' पुच्छवान् ' म्हणून जें ठेवलें तें योग्य आहे यात काही शंका नाही.' शीर्षाने विचार करण्याचें सोडून हा शेपटाने विचार करतो हें त्याच्या ह्या मूर्खपणाच्या आक्षेपावरूनच अुघड आहे. याचें अुत्तमांग मस्तक नसून पुच्छ आहे ! अरे वेड्या, तूच म्हणतोस, पाहतोस की, आजवर न झालेले नवीन अपघात आज घडत आहेत, तेव्हा ज्या अर्थी त्रिकालदर्शी पूर्वजांनी स्मृतीत न सांगितलेल्या आणि आजवर आपल्या जातीस ठाअूक नसलेल्या नवीन अपघातांस आपणास भोगावें लागत आहे, त्याअर्थी ते अपघात मानणें हा देखील त्या स्मृतिकारांचा अपमानच आहे कीं काय ? आणि नवीन अपघात जर मानतोस तर त्याची नवी चिकित्सा ठरविणें हाही जुन्या स्मृतीचा अपमान नाही हेंही तुला मानलेंच पाहिजे. तें काही नाही. या तारा अितर तारांहून नवीन आणि अधिक भयंकर आहेत कीं काय हें अेकदा अजमावून पाहिलेंच पाहिजे. मी पुढे होतो. आणि ह्या नव्या तारांतच त्या अपघाताचें कारण आहे की काय हें तुमच्यासमक्ष बघून येतो. समाजाचे कल्याणासाठी मला त्यापायी चटके बसले किंवा धक्का बसून मृत्यु आला तरी चिंता नाही !' हें त्या शीर्षवान् माकडाचें बोलणें ऐकताच सर्व सभेने त्याची फार वाहवा केली आणि त्यास त्या कार्यावर धाडलें. त्याने वरच्या बातमीत सांगितल्याप्रमाणे त्या तारांवर प्रयोग करून ठरविलें की, त्या तारा नवीन असून त्यात कोणचें तरी भयंकर दाहक द्रव्य असल्यामुळे त्यांना स्पर्श न करण्याची नवीन रूढि माकडांनी पाडल्यावाचून अपघातापासून त्यांचें रक्षण होणार नाही. हें मत त्याने परत येअून सभेत सांगितलें. 'परिस्थिति बदलली आहे. आता तारा तितक्या निर्दोष समजण्याच्या जुन्या रूढीत बदल करून अशा तारांना शत्रुवत् लेखण्याचा नवा नियम आपल्या स्मृतीत घातला पाहिजे !'

' परिस्थिति बदलली आहे ! ' हे त्या शीर्षवानाचे शब्द ऐकताच तो पुच्छवान् माकड रागाने म्हणाला, ' भलतेंच ! परिस्थिति हा शब्दच शास्त्रबाह्य आहे ! परिस्थिति काय, ती बदलली की काय याचा विचार करणें माकडधर्मविरुद्ध आहे ! ' हें त्याचें बोलणें ऐकताच सर्व माकड खो खो हसले आणि म्हणाले,

'परिस्थितीचा पालट विचारात न घेण्याचें ब्रीद बाळगण्यास आपण कोणी काशीचे राजेश्वर शास्त्री आहोत की काय ! अहो, ह्या पुच्छवानास काही समजतच नाही ! मनुष्य कुठला !' असा धिक्कारध्वनि अुठताच तो पुच्छवानही विरमला. आणि सर्व माकडांनी त्या नवीन तारांस न शिवण्याचा नवीन नियम करून बदललेल्या परिस्थितीस तोंड दिलें.

हें माकड-महासंमेलन अिकडे चाललें असतानाच तिकडे काशीच्या निवडक ब्राह्मणांचें भाकड-महासंमेलन चाललें होतें. हिंदुस्थानातील अनेक ब्राह्मण तेथे अेकत्र झाले होते. त्यांनी केलेले ठराव ब्राह्मण महासंमेलनाचे ठराव म्हणून आता सर्वत्र प्रसिद्ध झालेलेच आहेत. माकड महासंमेलनात पुच्छवान् माकडाची असंमत झालेली धिक्कृत सूचना या भाकड-महासंमेलनात संमत झाली. त्यात अेक शीर्षवानाचा अनुयायी जेव्हा म्हणाला, " परिस्थिति बदलली आहे ! तिला तोंड देण्यास आपण समर्थ होअू असा शास्त्रार्थ हवा. केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो विनिर्णयः । युक्तिहीनविचारे तु शास्त्रहानिः प्रजायते ! ! "—

–तेव्हा तो स्मृतिश्लोक अैकू येअू नये म्हणून त्या ब्राह्मण महासंमेलनात सर्वांनी अेकच गिल्ला करून सांगितलें की, ' छट् ! परिस्थिति हा शब्दच शास्त्र-बाह्य आहे ! ' परिस्थिति ' ' पालट ' ' विचार ' यांचा विचार देखील आम्हांस विचारात घेता येत नाही ! असें शुद्ध संस्कृत भाषेत ओरडत त्या प्राकृतांनी असा ठराव केला की, परिस्थितीचा पालट विचारात घेणें हें पाखंड आहे. माकडांपेक्षा त्या मनुष्यांच्या सभेतच पुच्छवानाच्या अनुयायांची फार मोठी संख्या आहे हें अशा प्रकारे दिसून आलें.

परंतु ह्या ब्राह्मण महासमेलनातील ठरावामुळे डार्विनच्या विकासवादाला मोठाच धक्का बसला. परिस्थितीचा पालट विचारात घेअून त्याप्रमाणे ज्या जाती आणि ज्या व्यक्ति आपापले व्यवहार पालटतात, त्याप्रमाणे त्या जगतात आणि विकसित होतात. त्या विकासवादाच्या (Evolution) व्याख्येनुरूप डार्विन आदि-कांनी माकडाची अुन्नति होत होत मनुष्य झाला म्हणून सिद्ध केलें. परंतु काशीच्या माकड-महासमेलनातील आणि भाकड-महासंमेलनातील हें ताजें वृत्त अैकून विकास-वादाच्या व्याख्येप्रमाणे मनुष्य हें माकडाचें विकसित रूप आहे ह्या आपल्या सिद्धान्तास अपवाद आहेत असें विकासवाद्यांना कळू लागणें साहजिकच आहे. कारण माकडें परिस्थितीच्या पालटास वर्तनाचें पालट करून तोंड देतात आणि मनुष्यातच परिस्थिति विचारात न घेणारे प्राणी निपजतात. अर्थात् निदान काशीच्या भाकड-महासमेलनातील पंडित हे तरी माकडांची विकसित श्रेणी नसून माकडें हींच त्या पंडितांचीं विकास पावून श्रेष्ठत्वास गेलेलीं रूपं होत असें मानणें प्राप्त होत आहे.

—ता. १९ जानेवारी १९२९

✦ ✦ ✦

(१७)

मुंबअीचा दंगा

झाला ! अेकदाचा मुंबअीचा दंगा अुद्भवला, चेकाळला, शमला. अुत्पत्ति, स्थिति आणि लय या पदार्थमात्रास भोगाव्या लागणाऱ्या तिन्ही अवस्थांतून तो गेला. आता शमल्यानंतर और्ध्वदेहिक विधिसंस्काराचे चितेचें दिव्य तेवढें अुरलें. दंग्याचें प्रेत चितेवर चढून भस्मावशेष होअीतो त्यात किती सर्पण टाकण्यात येतें आणि सुक्यावरोवर ओलेंही किती जळतें येवढेंच पाहणें बाकी आहे.

मुंबअीचा दंगा झाला पण हें काय ? मुंबअीस किती तरी हिंदु अजून जिवंत! किंवहुना किती मेले तेच सहज मोजता येत आहेत – बाकी सगळेच जिवंत! अगदी पूर्वीसारखे सहज मोजमापीच्या मापात न मावतील अितके चिकार जिवंत! आश्चर्य आहे बुवा !

कारण संघटन चालू झाल्यापासून आणि विशेषतः नेहरू प्रतिवृत्तानंतर, हिंदु जगताच्या अगदी जवळ आलेल्या प्रलयाविषयीचीं भयंकर भविष्यें मोठमोठे मुसलमानी पैगंबर अेकसारखे करीत होते. शौकतअल्लींची जळजळीत जीभ म्हणाली, 'हिंदु मला चिडवितात काय ? त्यांची खोड लवकरच जिरेल. हिंदूंनो, नेहरू प्रतिवृत्त सम्मत करता काय? War to the Knife! खंजिराखंजिरानिशी खडाजंगी! ' महंमद अल्ली म्हणाले, ' हिंदु कोणच्या झाडाचा पाला ! ' मुस्लिम औटलुक म्हणालें, 'जर वेळच पडली तर पठाणांना आत बोलावून हिंदूंच्या छातीवर मुसलमानी पाच्छाअी अुभारू ! ' अितर मुल्ला आणि मौलवींच्या फतव्यांची आणि फितव्यांची तर गणतीच नव्हती. त्यांचा मतभेद असा अेकाच गोष्टीवर होअी आणि तो म्हणजे या की, अेकंदरीत अेक मुसलमान लढाअीत किती हिंदूंच्या बरोबर असतो – किती हिंदूंस मारू शकतो – त्या खंजिराखंजिरानिशीच्या खडाजंगीत ! ! ' काही तज्ज्ञ म्हणाले, अेक मुसलमान ५ हिंदूंस मारू शकतो; काही म्हणाले १०; काही म्हणाले ५०; काही म्हणाले १०० ! या आणि अितर गणितज्ञांची सरासरी काढून आम्ही सिद्धान्त केला की, अेक मुसलमान निदान २८$\frac{3}{5}$ हिंदूंस तरी भारी असलाच पाहिजे! तोही हिंदुस्थानी मुसलमान ! ज्या पठाणास आत बोलावून हिंदूंच्या छातीवर मुस्लिम बादशाही स्थापिली जाणार आहे, त्या अेका पठाणास तर चटणीस देखील शंभर हिंदु पुरणार नाहीत. हा वरील सिद्धान्ताचा अुघड अुघड अुपसिद्धान्त होता. कलकत्त्यास झालेल्या मुसलमानांच्या शेकडो प्रकट (Public) अगर अंतःस्थ (Private) सभा-संमेलनातून हीं भयंकर भविष्यें जानेवारीत अेकामागून अेक आमच्या कानावर येअून आदळू लागलीं की, हिंदु जगताचा प्रलय कधी येअील

याचा नेम नाही! त्या दिवशी हिंदूंची पृथ्वी फिरावयाचें सोडून भयाने कापत अुभी राहिली.

अितक्यात वातम्यावर वातम्या आल्या की, मुंबअीस पठाणांची आणि हिंदूंची भिडली! शौकतअल्लींनी हीच आग हिंदुमुसलमानांचे दंग्याचें रूप घेणार म्हणून सांगितलें! आणि लगेच तसें झालें. पठाण, शेख, सय्यद, शिय्या, सुनी; मुसलमान तितका अेक झाला. अक्षरशः खंजिराखंजिरानिशी खडाजंगी चालली. मुसलमानांच्या हजारो हजारांच्या टोळ्या हिंदूंची कत्तल करीत अुठल्या, असे 'टाअिम्स'चे स्तंभचे स्तंभ भरत चाललेले पाहून अुभ्या हिंदु जगताची कंवर खचून गेली. वाटलें हाच तो हिंदु जगताचा येणार येणार म्हणून गाजलेला प्रलय! आला अखेर!! जो अेकेक मुसलमान निदान २८$\frac{3}{4}$ हिंदूंस अुपजतच भारी, तो सुरे घेअून हजारांच्या टोळ्यांनी बाहेर पडलेला! –आता मुंबअीस हिंदु म्हणून कुठला अुरणार? गणित करकरून पाहिलें तो अुत्तर हेंच. आता मुंबअी निर्हिंदु होणार! आणि त्यात पठाण मिळाले. आता अर्थात् मुस्लिम पाच्छाअीही हिंदूंचे छातीवर पुनः स्थापिली जाणार! भवितव्यता बलीयसी, असा निश्वास टाकून आम्ही आमची छाती त्या अुपजाअू मुस्लिम बादशाहाच्या तक्ताची पहिली पायरी व्हावी अशा बेताने पुढे करून दाराशी स्वस्थ अुभे राहिलो!

तोंच रस्तोरस्ती पठाण पहिल्या धडाक्यासच दिसू लागले; पण ते जीव घेअून पळताना, पडताना, मरताना, आणि हिंदूंच्या टोळ्या त्यांच्यामागे हातात सापडेल तें हत्यार घेअून लागलेल्या! पण मनात म्हटलें, हिंदूंच्या पुढे प्रथमप्रथम असे पडत, मरत आणि मग मेल्यानंतर अेकदम त्यांच्या अंगावर अुलट्न त्यांचा नायनाट करण्यासाठी पठाणांनी हा अेखादा गनिमी कावा चालविला असावा! तोंच मोठ-मोठ्याने अेखाद्या बंवासारखा गळा काढून कोणी 'तोबा तोबा,' म्हणून रडताना अैकू येअू लागलें. पहातो तों ते शौकतअल्ली ओरडत होते, 'माझे पठाण मारले जात आहेत, हिंदु लोक त्यांची पारध करीत आहेत. सरकार धावा, पोलीस धावा, मुसलमानांनो धावा! तोबा, तोबा!'

वाटलें; हें काय मुस्लिम पाच्छाअी हिंदूच्या छातीवर स्थापन करणाऱ्या आशेची ही अेकमात्र यष्टी –हेच ते पठाण; त्यांची हिंदु पारध करितात! खंजिरा-खंजिरानिशी खडाजंगी!' म्हणून गर्जणारा हा आगवंव असा अेकाअेकी विव्हळू लागतो! अेक पठाण पाहतांच चाळीच्या चाळी बंद करून घेणारे हिंदु पठाणांची पारध करीत रस्तोरस्ती हिंडू लागतील हें शक्य तरी कसें होअील! अेक मुसलमान २८$\frac{3}{4}$ हिंदूंबरोबर तरी आहेच आहे!

बरें. पठाणांची पारध केली तर केली; पण मुसलमानांचा जो अतियोग्य आक्षेप आहे की, पठाण जे हिंदूंनी चोपचोपून काढले ते पठाण म्हणून नाहीत तर मुसलमान म्हणून, त्यास हिंदूंचें काय अुत्तर आहे? हिंदूंची ही मात्र अक्षम्य चूक

होती. प्रत्येक पठाणाला हिंदूंचा जातिवंत छळक म्हणून मारताना त्यांच्यातला मुसलमानीपणा वगळून पठाणीपणा तेवढाच त्यांनी कां मारला नाही ? पण हिंदुच ते ! सगळाचा सगळा पठाण गिळंकृत करू लागले. मुसलमानी भाग म्हणून चित्रावतीपुरता देखील दंग्याच्या ताटाबाहेर टाकीनात. अर्थात् मुसलमानांनाही दंग्यात अुतरावें लागून ती होणार होणार म्हणून गाजलेली खंजिराखंजिरानिशीची खडाजंगी आजच होअून जाअू द्या म्हणून मुसलमानांचें रणशृंग फुंकलें गेलें.

वरें; अेवढ ावरच हिंदूंचे डोळे अुघडावयास पाहिजे होते. मुसलमानांचे वहिवाटीप्रमाणे सुरा अुगारला जाताच हिंदूंनी त्या जुनाट वहिवाटीसाठी, राष्ट्रीयअेकीसाठी निदान त्या २८$\frac{3}{4}$ हिंदु = १ मुसलमान या कोष्टकाच्या सन्मानासाठी तरी आपल्या माना चटाचट पुढे कराव्यात ना ? आपण मुमलमानांस मोठमोठे जमाव करून दंगा करण्याविषयी दोष देतो; पण हा तरी आपलाच दोष ना ? अेकदा पठाण – कामकरी स्वरूप जाअून हिंदुमुसलमानी स्वरूप त्या दंग्याला येताच जर अेक मुलमान पाहताच २८$\frac{3}{4}$ हिंदु त्याचे पुढे पटकन् जाअून आपल्या माना देते, तर मुसलमान मोठाले जमाव कां करते ? शंभर शंभर मुसलमान 'अरे मित्रा, तुझी मान कापू दे' अशी आपली न्याय्य मागणी मागत असता अेकेक हिंदु अुलट त्यांचेवर दगडफेक करताना जेव्हा कुठे कुठे आढळू लागला, तेव्हा मुसलमानांची ती २८$\frac{3}{4}$ ची धर्मभावना दुखविली जाअून ते जाळपोळ करीत चालले यात काय आश्चर्य ! काय अन्याय !

अितक्यावरही थांवलें नाही. हिंदूंच्या अंगात हें संघटनाचें भूत आजकाल शिरलेलें ! त्यामुळे त्या मूर्खांनीही हजारोंचे जमाव करून मुसलमानांवर अुलट हल्ले चढविले. बरें झालें ती शांतता समिति तरी निर्भेळ राष्ट्रीय ध्वजा हाती घेअून हिंदु रक्तपाताच्या सरीच्या सरीबरोबर 'हिंदुमुसलमानकी जय'च्या सरी पाडोत राहिली ! हा शुक्रवारच्या रात्रीचा 'हिंदुमुसलमानकी जय' आणि त्या मलवार रात्री मोपल्यांचा 'स्वराज्य की जय' – हे दोन जयजयकार आपल्या अितिहासात चिरस्मरणीय राहतील ! दुर्दैवाने मुंबअीत अेकच शांततासमिति होती – म्हणून अेकच शुक्रवारची रात्र 'हिंदु मुसलमानकी जय'च्या गर्जनेने राष्ट्रीय अैक्य अंशतः तरी दिग्घोषित करू शकली. जर का अशा दहापांच शांतता-समित्या स्थापन झाल्या असत्या, तर हिंदु तरी अगदी शांत झाले असते. अगदी म्हणजे अगदी शांत! अगदी स्मशान-शांत ! ! आणि मग त्या 'हिंदुमुसलमानकी जय'तील हिंदु शब्द व्युत्पत्ति शास्त्रान्वये लोपून केवळ 'मुसलमानकी जय' अुरता आणि राष्ट्रीय अैक्य स्थापण्याची या शांतताविशारद शांततासमितीला हिंदूंची आणि निर्भेळ मुस्लिम पाच्छाअी स्थापण्याची ती युद्धकलाविशारद खिलाफत समितीतील खलिफांची अशा अुभयआकांक्षा अेकसमयावच्छेदेकरून मुंबअीपुरत्या तरी सफल झाल्या असत्या.

पण या संघटनाने राष्ट्रीयत्वाला अगदी काळोखी लावली. हे आपले देशबंधु म्हणून मुसलमानी सुऱ्यास वळी पडण्याचें सोडून ते मुसलमानांसच अुलटें म्हणू लागले, आम्ही हिंदुही तुमचे देशबंधुच – म्हणून तुम्हीच आमच्या सुऱ्यास चकार शब्द न काढता वळी पडा ! आणि हिंदूंनी मशिदीवर हल्ले चढविले, रस्त्यारस्त्यांनी मुसलमानांस भोसकून काही भाग काही वेळ निर्यवन केले, हजारो मुसलमानी रुपयांची लूट केली, पुरभय्ये ट्रामा अडवून अडवून पठाण भेटला की ओढीत चोपीत चालले. म्हणे आम्हांस शुक्रवारचे रात्रीचा सूड घ्यावयाचा आहे ! मुसलमान पाहिला की, मारीत चालले ! हिंदुच ते ! वहकतील तिकडेच वहकतील. चार पांच वर्षांपूर्वी मरत तर मरतच असत; आता मारीत तर मारीतच सुटतात.

काय करावें 'हिंदुमुसलमानकी जय'चें दुर्दैव ! दुसरें काय ? मोपल्यांच्या बंडाचे वेळी जसें राष्ट्राचें पुढारीपण खिलाफतधुरंधर गांधींकडे होतें, तसें आज जर मुंवअीचें असतें तर मोपल्यांच्या त्या औरंगजेबी धांदलीत जसे अेक का दोन हिंदु कुठेसे बलात्काराने वाटले तसेच मुंवअीला 'अेक का दोन हिंदु कुठेसे' मरते आणि हिंदूंच्या त्या पापासाठी अेखादा राष्ट्रीय अुपास पाळून त्यांची आत्मशुद्धि करण्याची व्यवस्था सहज करून देता आली असती !

पण संघटनामुळे ही 'सुडाची' ब्याद हिंदूंचे मनात घुसली. त्यामुळे म्त्या-नाश झाला. विचारी शांततासमिति ! हेतु किती अुच्च ! — पण दोन तीन मुसलमान स्वयंसेवकांस या क्रूर हिंदूंनी जिवासह मारिलें, अेका पठाणानेही अुलट काठी मारली; पण ती बिचाऱ्या नरिमनांना !

मुसलमानांनी हिंदूंची कत्तल केली, लूट केली ती ? असा कोणी देशद्रोही प्रश्न करील. पण त्याने हें विसरू नये की ती मुसलमानांची वहिवाटच आहे. तो मुसलमानांतील दंगेखोर सज्जनांचा धर्मच आहे. त्या त्यांच्या कडवेपणाची 'My Brave Mohamadan Brothers' म्हणून हिंदूंनी प्रशंसा करायची की, 'सूड' म्हणून आमच्या 'हिंदुमुसलमानकी जय' वर वार करावयाचा ?

पण संघटणाने सगळा विचका केला. देशभक्त स्वातंत्र्यवादी 'महंमद अल्ली आणि अुजवे हात शौकतअल्ली भग्नहृदय होत्साते मुंबअीहून दिल्लीस चालते झाले. पुन्हा या देशद्रोही हिंदूंचें तोंड पाहणें नको अशी शेकडो वीरांनी हिंदूंकडे पाठ फिरवीत प्रतिज्ञा केली. अल्लींनी युद्धकला विशारद खरें डोकें खांद्यावर आहे तोंच दिल्लीचा रस्ता धरला. मुसलमानांचीं शेकडो प्रेतें आणि घायाळूंचीं कंदनें रस्त्यात आडवीं आलीं; पण थांबले नाहीत. दिल्ली गाठली तेव्हाच हूश्श म्हटलें तें ठीकच होतें. अनुयायांच्या जीवनाचें मरणापर्यंत संरक्षण त्यांनी केलेंच होतें. कोणाच्या प्रेताकरता का कोणी आपलें प्रेत पडेतो अडकून राहतो ?

गव्हर्नरांनी मात्र आपलें कर्तव्य चोख बजावलें. दंग्यानंतर ते दंग्याचे ठिकाणांची पाहणी करण्याकरिता दलबलसहित गेले होते. अेखादा घाबरट गव्हर्नर

असता, तर तो दंगा चालला असतानाच तिथे जाण्याचा गावढळपणा करता ! या गव्हर्नर महाशयांनी प्रजेच्या दंगा करण्याच्या अधिकारात तसा कोणताही अनधिकारी हस्तक्षेप न करता सर्व दंगा शमल्यानंतर त्या धर्मक्षेत्राची यात्रा केली. आपण नाही का महाभारतानंतर हजार वर्षांनी कुरुक्षेत्राची यात्रा करीत? गव्हर्नर आणखी अेखादें वर्ष जाअू देअून मग दंग्याचीं ठिकाणें पाहते तर ही तीर्थयात्रा अधिकच शोभिवंत दिसली असती !

त्याचप्रमाणे गव्हर्नरांनी मि. प्रिस्टले यांच्या कुटुंबासही त्यांच्या हत्येविषयी दु:खप्रदर्शक सहानुभूतीचें पत्र टाकलें. जे शेकडो अितरेजन दंग्यात मारले गेले त्यांचीं कुटुंबें बेपत्ता ! मूर्खांना घर ना दार त्यांना सहानुभूतीच्या चिठ्या टाकणें अशक्यच होतें.

अशा रीतीने अेक मुसलमान २८½ हिंदूंना मारणारा वीर असूनही आणि अशा वीरांच्या हजारोंच्या सेना 'दीन दीन' म्हणून तुटून पडल्या असताही दंगा होअूनही गेला, तरी मुंबअीत हिंदु जिवंतच जिवंत आहेत ! हजारो बाहेर गावी गेले खरे; पण त्या लुच्च्यांत दंग्यानंतरच्या धरपकडीच्या पारण्यास आपण होअून अुपस्थित राहण्याची फारशी आवश्यकता न वाटणारेही अनेक लोक असू शकतील.

सायमन कमिशनपुढेही बहिष्कारामुळे फारशीं माणसें साक्ष देण्यास जात नसलीं तरी हा दंगा जाअू शकेल. ब्रिटिश पोलीस नसले तर तुम्ही राज्य कसें कराल ? हा प्रश्न आता सायमनला विचारावयास नको. कारण या दंग्याने ती साक्ष आपण होअूनच देअून टाकली. अनेक भागांत मुंबअीस अेकही सबळ पोलीस ठाणें नव्हतें. ब्रिटिश सरकार असे दोन चार दिवस कोणत्याही उपयुक्त कामापुरतें तरी दिसलें नाही – तरी हिंदु जगलेच. चांगले चाळीचाळींतून ललकारीत जगले. अगदी मारीत मारीत जगले ! तसेंच हिंदुस्थानातही जगतील !

सरकारने अेक गोष्ट मात्र जरा विवंचून पाहावी. हे दंगे जर असेच चालले, जर गार्ड, मोटारी, मशीनगन्स, चिलखतें, गोळीवार लोकांच्या घरोघर सकाळी दूध आणणाऱ्या गवळ्यासारखे काहीही धामधूम अुत्पन्न न करता वारवार येअू जाअू लागले, तर या भुतांच्या भयंकर अवडंबराचें भय लोकांतून कमी होअून, हे दंग्याचे भस्मासुर प्रत्यक्ष भूतनाथाच्या डोक्यावरही हात ठेवण्यास धजावयाचे ! असले दंगे बंडाचे वस्तुपाठ असतात हें अैतिहासिक सत्य ब्रिटिश सरकारास काही कोणी शिकविणें नको. पण आपले राजनिष्ठ अंत:करणास राहवत नाही म्हणून सुचवून ठेविलें. मायबाप त्याचा योग्य तो विचार करतीलच !

—ता. २३ फेब्रुवारी १९२९.

✦ ✦ ✦

(१८)

नेपाळचा दगडी प्रासाद नि सय्यद अहमदचें काचघर

आपल्या काचेच्या घरात राहून नेपाळच्या चिरेबंदी राजवाड्यावर दगडफेक करणारे ते प्रख्यात कोणचेसे सय्यद अहमद खान सध्या कोठे आहेत कोणी सांगाल काहो ? 'श्रद्धानंदा'त काही दिवसांपूर्वी अफगाणिस्थानच्या मानाने नेपाळ हा किती तरी हीनतर देश आहे हें त्यांनी नव्हतें का सिद्ध करून दाखविलें ? ते सय्यद अहमद खान ! –ते सध्या कुठे आहेत तें सांगाल का कोणी ? आम्हांला त्यांना अेक अत्यंत आनंददायक वातमी सांगणें आहे.

ज्या काचेच्या घरातून ते अितरांवर दगड फेकीत होते, त्या पत्त्यावर त्यांचें नांव लिहून पत्र टाकलें; पण मृत-पत्रालयातून (Deadletter office) तें आमचें पत्रच तेवढे वेपत्ता म्हणून परत आलें नाही, तर त्यासोवत ही झणझणीत सूचनाही मिळाली की, 'यापुढे पत्त्यावरील नांवें काही विचार करून लिहावी. मागे अेकदा 'दिगंवर भट महार' म्हणून अेका पत्रावर नांव होतें. तेव्हा आम्ही ती वेडगळ चूक विचारात घेतली नाही. पण आता पुन्हा हें 'सय्यद अहमद खान' हें नांव या दुसऱ्या पत्रावर पाहून अशा चुकांकडे कानाडोळा करणें पोस्ट ऑफिसास शक्य नाही. सय्यदाचे नांवापुढें 'खान' म्हणजे ब्राह्मणाची जात महार लिहिल्या-सारखेंच आहे. तेव्हा अशी घोडचूक पुन्हा होअू नये, नाही तर दुप्पट दंड पडेल.'

पोस्ट ऑफिसातून ही शोभा झाल्यावर 'श्रद्धानंद' पुन्हा काढून पाहिला, तों तें नांव अगदी तसेंच 'सय्यद अहमद खान !' पण आता पोस्टाकडे परत तें नांव लिहिण्याचें साहस करण्यापेक्षा श्रद्धानंदातूनच सार्वजनिक पत्रव्यवहार करणें बरें असें वाटून हें विचारीत आहोत की, त्या सय्यद अहमद खानांचा पत्ता कोणास ठाअूक असल्यास आम्हांस सांगावा. निदान ही खालील अत्यानंदाची वातमी त्यांस परस्पर अवश्य कळवावी.

कीं, त्यांनी नेपाळहून अफगाणिस्थानचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी जे जे पुरावे दिले, ते ते त्या वेळेस काही हिंदु लोकांस जरी कडू आणि खोटे वाटले तरी त्या त्यांच्या 'श्रद्धानंदा'तील पत्रानंतर अफगाणिस्थानची जी अपूर्व भरभराट आणि कीर्ति झाली आहे तीवरून आज अफगाणिस्थानच्या शत्रूंनाही ते सय्यद-खानाचे सर्व पुरावे मान खाली घालून मानावे लागत आहेत. खरोखरच अफगाणिस्थान अत्यंत प्रगतिशील, अत्यंत बलिष्ठ, अत्यंत सभ्य राष्ट्र आहे यांत आता कोण शंका घेअू शकणार आहे ?

सय्यद खानांनी लिहिलें होतें, 'कोठे तो भिकार रानटी, जंगली नेपाळ ! परवाच अमिराचा केवढा गौरव झाला पाहिलात ना ? दळणवळणाचीं साधनें

अफगाणिस्थानात झपाट्याने वाढत आहेत. वाहतूक निर्विघ्नपणे होत आहे. अमीर क्रांतिकारक सुधारणा झपाट्याने करीत आहेत. अफगाणिस्थानची राज्यपद्धति किती प्रगतिपर नि बलिष्ठ. नाहीतर नेपाळची किती कुचकामाची. अफगाणिस्थान बलुचिस्थान घेअील. दुसऱ्या बाजूने तिबेट घेअील. नंतर त्यांच्या तटार्थ पंजाब सिंधही घेअील. अफगाणिस्थानच्या पाठीमागे अिराण, तुर्कस्थान, रशिया, अिजिप्त अित्यादि राष्ट्रें आहेत. अशी मुसलमानी राष्ट्रांची जूट आहे तशी तुमची कोठे आहे. ! अमीर अमानुल्लाचा केवढा दरारा ! '

सय्यद खानांनी जेव्हा हें अफगाणिस्थानचें सत्यदर्शन व्यक्त केलें, तेव्हा अनेक संशयवाज लोकांनी त्यास नाकें मुरडून म्हटलें, हो, हो, जरा थांबा. मोटारी-बरोवर धावण्यासाठी चेकाळून श्वान प्रथम असें बेफाम धावतें की, हे मोटारला मागे टाकतें की काय म्हणून उकिरड्यावरील त्याच्या जातभाअींस वाटू लागावें !

सय्यद खानाची हिंदूनी केलेली ही टवाळी शेवटी हिंदूंच्याच गळ्यात आली खरी. कारण सय्यद खानांनी वर सांगितलेल्या सर्व गोष्टींच्या यथार्थत्वाचा अमोघ पुरावा त्यांच्या सांगण्याच्या मागोमाग धावत आला. ' ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ! ' आता हिंदूंस तोंड अुघडण्यास जागा अुरली नाही.

प्रथमत: अमिराविषयी पहा ! ' अमिराचा केवढा दरारा, केवढा प्रताप ! ' म्हणून सय्यद खान म्हणाले. तें कसें अक्षरश: खरें ठरलें पहा ! भणंग, भामटे, भिकारडे, फकीर, भिस्त्यांचीं मुलें, चोरांच्या टोळ्या, दीडदमडीचे मुल्ला, जो तो अमीर अमानुल्लाच्या डोक्यावरील मुकुटाचा त्रासदायक भार अुतरून अमिरास आराम देण्यासाठी पहा कसा त्याच्या डोक्याशी झोंबत आहे ! अमिराचा हा केवढा दरारा ! आणि त्याच्या प्रतापाविषयी विचारूच नका, दुसरा अेखादा भेकड असता तर काबूलवर बच्चा साकूसारखा अुपटसुंभ चढून येत आहे हें कळताच आपल्या पूर्वार्जित राजधानीच्या वेशीपाशी झुंजत रणात पडता; पण जिवंतपणी पळता ना. परंतु अमानुल्लाने तसें कोणतेंही भ्याड कृत्य केलें नाही. जसा त्याचा प्रताप तशीच राज्यदक्षता ! अेक भिस्ती काबूलवर ससैन्य चढून येण्याअितका प्रवळ होतो याची क्रूर अमानुल्लाने प्रथम चौकशी ठेविली नाही. चौकशी झाली तेव्हा प्रतिवंध केला नाही आणि काबूलवर भिस्त्याचा मुलगा चढून आला तरी त्याच्यासारख्या य:कश्चित् प्रतिस्पर्ध्याशी आपणासारख्या राजकुलीन पुरुषाने लढणें हें आपल्या योग्यतेस काळिमा आणण्यासारखें आहे असें जाणून वंदुकीचा अेकही वार न काढता पराक्रमी अमानुल्लाने पाच पिढ्यांची पैतृक राजवट मुकुटासुद्धा जिथेच्या तिथे ठेवून कंदाहारला पलायन – नव्हे प्रयाण केलें. भिस्त्याशी तें काय लढायचें ! अशी लढाअी करण्याचा कलंक अमानुल्लाने स्वत:स आजपर्यंत नाही तर नाहीच लावून घेतला. तो शूर अमानुल्ला चोवीस तासांत राजधानी हरला, चार

तासांत राज्य सोडता झाला, चार मिनिटांत भावास राज्य देता झाला, पुन्हा चार मिनिटांनी त्याचें राज्यपद आपणांकडे घेता झाला आणि चार महिने झाले तरी कंदाहारच्या भितीच्या आडच्या आड ठाण देऊन राहता झाला. अमिरी गादीवर भिस्ती बसलेलाच आहे; अमानुल्लांच्या अंत:पुरातील नात्यागोत्याच्या राजकन्यका चोर पोर आपसांत वाटून घेतातच आहेत. अमानुल्लाच्या शयनागारांत वाटेचे चोर लोळत आहेत, प्रांतोप्रांतीचे अधिकारी ' भिस्ती अमीर की अमानुल्ला! की आम्हीच स्वत: ? म्हणून अमानुल्लाच्या अमिरी आज्ञेस अवहेलनेचीं अुत्तरें पाठवीतच आहेत. हा ' अमिराचा केवढा दरारा ! केवढा पराक्रम ! !'

'अफगणिस्थानात क्रांतिकारक सुधारणा होत आहेत ' सय्यद म्हणतात. अगदी खरें; दाढी करावी कीं वाढवावी, वाढविलीच तर किती अंगुलें, किती हात. टोपी घालावी कीं पगडी? टोपीच घातली तर ती कशी? वाटोळी कीं अुभी, कीं तिरपी कीं तुऱ्याची ! या अत्यंत गूढ प्रश्नास सोडविणाऱ्या सुधारणा—आणि त्यासाठी रक्ताचे सडे सांडणारी क्रांति ! बच्चा साकूने तर क्रांतिकारक सुधारणांत अमानुल्लासही मागे टाकलें, मुलींनीच नव्हे तर मुलांनीही पडदा राखावा, शाळा सगळ्या बंद ठेवाव्यात, रस्त्यात मुल्ला पाहिला की त्याला लोकांनी साष्टांग लोटांगण घालावें. राजकन्यकांना पवित्र आसुरी विवाहाने भिस्त्यांच्या, चोरांच्या, चिलटांच्या अंत:पुरांत दडपावें. शीख, अशीख हिंदु पाहिला की लुटावा, काफर म्हणून मारावा. कुराणावाचून कोणी दुसरें पुस्तक म्हणून ठेवू नये, वाचू नये. कुराणच वाचावें, तें धर्मपुस्तक वाचून बच्चा साकू वागतो तसें धर्मपरायणतेने वागावें ! ! सुधारणावर सुधारणा ! अगदी क्रांतिकारक सुधारणा ! आणि पुन्हा तें स्थान जेव्हा पिशाच्चस्थान म्हणून गाजत होतें त्या वेळच्या—पठाणांच्या परंपरेस अगदी धरून ! सेनापति नादिरखानच पहाना ! पांच वर्षें विलायतेत मुरून आले—पण स्त्रियांस पडदाच योग्य म्हणून मत देतात ! 'झपाटचाची सुधारणा ' दुसरें काय ?

सय्यदखान म्हणतात, ' नेपाळची राज्यपद्धति किती टाकाअू; अफगाणिस्थानचें राष्ट्रैक्य, जूट, राज्यपद्धति किती प्रगतिपर, किती बळकट! ' ते आता कोण नाकारू शकेल ? नेपाळात अजून अेकच प्रधान, अेकच राजधानी. तेंच आमचे अफगाणिस्थानात पाहा ! पांच अमीर ! पन्नास राजधान्या! प्रत्येकजण, अेक तर कुणी तरी अमीर आहे नाही तर कोण्या तरी अमिराचा प्रधान आहे. प्रत्येक जात दुसऱ्या जातीच्या कंठास बिलगलेली ! शिनवाऱ्यांच्या छातीत दुराण्यांची सुरी, शिय्यांच्या छातीत सुन्नींची सुरी ! राष्ट्रीय अैक्य अैक्य तें आणखी कसें असावयाचें? दर दिवसाला अेक दोन नवीन अमीर अुत्पन्न करणाऱ्या राज्यपद्धतीहून 'प्रगतिपर' पद्धत ती कोणची असणार ? टीचभर अफगणिस्तानांत तेहतीस टोळ्यांचीं द्वंद्वयुद्धें जुंपलेलीं पाहून ' राष्ट्रीय बळकटीचें दुसरें दर्शक तें काय दाखवावें !

'नेपाळ रानटी' अगदी खरें, राजकुमारींना भिस्त्यांचीं मुलें ओढीत नेऊन बलात्काराच्या वोहल्यावर नेपाळात कुठें लग्नें लावतात? अफगाणिस्थानात अमानुल्ला जसा संगसारीने अहंमदीयांस मारीत असे आणि बच्चा साकू हिंदु शिखांस मारीत आहे आणि सध्या सुन्नी जसे शियांना मारीत आहेत, तसें कोणतेंही 'सभ्य' धार्मिक कृत्य नेपाळचे हातून आज हजारो वर्षांत अेक तरी घडलें आहे का? तिथे न मुसलमानांचो काफर म्हणून कत्तल अुडत आहे. न हिंदूंत शैव वैष्णवांना मारीत आहेत. 'मुसलमानांची जूट पाहा!' पाहिली वावा! धन्य आहे मुसलमानांच्या जुटीची! अमानुल्ला बच्चाशी बिलगतो, बच्चा अहमंद खानाशी, शिनवारी दुराण्याशी, दुराणी खास खेलाशी! जूटच जूट! अेकीच अेकी. ज्याची त्याची जीवश्च कंठश्च गांठ पडलेली!

अशा जुटीचें अफगाणिस्थान 'अेका बाजूस तिबेट, दुसऱ्या बाजूस सिंध-पंजाब जिंकून घेअील' हें काय सय्यदांनीच सांगावयास पाहिजे! त्या वेळेस वीरवर अमानुल्लाच अफगाणिस्थानाचा पुढारी होता म्हणून सय्यद, तिबेट, पंजाबच्या विजयावरच संतुष्ट झाले. पण आता तर अमानुल्लाच काय, पण त्याची बायको, त्याची आअी, त्याचा भिस्ती, त्याचा भाअू, त्याचा हुजऱ्या, त्याचा सेनापती– सगळेच रणांगणात अुतरलेले, सगळेच अमीर. आता अफगाणिस्थान नुसत्या डाव्या अुजव्या, पुढच्या, मागच्या देशांसच जिंकून न थांबता खाली भूगर्भीय अग्नि-लोकावर आणि वर आकाशीय चंद्रलोकावरही स्वारी केल्यावाचून राहणार नाही.

'अफगाणिस्थानास जेव्हा समुद्राची आवश्यकता भासेल तेव्हा पश्चिम समुद्रास हस्तगत करण्यासाठी तो हिंदुस्थानचा सिंध ते काठेवाडपर्यंतचा देश जिंकील!' सय्यदांच्या या म्हणण्यात त्यांच्याच नव्हे तर अुभ्या अफगाण राष्ट्राच्या महत्त्वाकांक्षेचा स्पष्ट अुच्चार झालेला आहे. पण ही बातमी काही आजच आम्हांस कळली नाही ती लहानपणापासून अेकत आहोत. अमिराच्या बापाने त्याच्या आणि बापाच्या बापानेही हिंदी सागराच्या तटाकी अेकदा तरी समुद्रस्नान घडावें म्हणून धापा टाकीत जीव सोडले पण तें समुद्रस्नान घडलें नाही. सध्या अफगाणिस्थानच्या टीच-भर नद्यांतच जें राष्ट्र गटांगळ्या खात आहे, तें प्रथम त्या नद्या पार अुतरू द्या आणि मग जगलें वाचलें तर मग हिंदी महासागर आपल्या ओंजळीत भरून घेण्यास येअू द्या. हिंदीमहासागर ही वाटच पहात आहे. अफगाणांची समुद्रस्नानाचीच नव्हे तर समुद्रसमाधीचीही हौस फेडण्याअितका तो खोल आहे.

'अफगाणिस्थानात दळणवळण आणि वाहतूक निर्विघ्नपणे होत आहे.' कोण नाही म्हणतो! अेका प्रवाशास शंभर शिपायांचें सरक्षक सैन्य घेअून अेका मैलाला अेकशेअेक जिवावरच्या संकटांना गाठल्यानंतर जगला तर अगदी 'निर्विघ्नपणे'

दुसऱ्या मैलांत प्रवेशता येतें खरेंच ! पण अफगाणिस्थानच्या प्रबलतेची शेवटची साक्ष म्हणजे सय्यद खान आणि शौकत अल्लीखान आणि अहंमद अल्लीखान अित्यादि खिलाफतधुरंधर लोक म्हणतात की मुस्लिम जगाच्या अमानुल्लाला असलेल्या पाठिंब्याची होय. 'अिराण, तुर्कस्थान, अिजिप्त, अरब या सर्व मुस्लिम जगाचा अमानुल्लांना पाठिवा आहे.' आहे तर ! तसा तो पाठिंबा होता म्हणून तर अमानुल्लांना सिंहासनावरून ओढण्यासाठी बच्चा साकू २५ माणसांनिशी काबुलात आला आणि अमानुल्ला कंदाहारला निघून गेला ! अमानुल्ला नुकतेच युरोपातून, टर्कीहून, अिराणाहून त्या वेळेस देशी आलेले होते. मध्यंतरी रशियाच्या दिग्गजानेही आपल्या पाठीवर ही अफगाणी माशी क्षणभर वसू दिली होती. त्यामुळे रशियाही अमानुल्लाच्या कह्यात आहे, पाठीशी अुभा आहे असें सय्यदांनी म्हटलें तें ठीकच होतें. आम्हीही म्हणतो रशिया अफगाणिस्थानच्या पाठीशी आहे – जसा पारधी मृगाच्या पाठीशी असतो. रशियाच का, अिंग्लंडचा नाही का अफगाणिस्थानला पाठिंबा ? अमानुल्लांना नसेल तर बच्चा साकूला असेल – पण कोणा तरी अफगाणास अिंग्लंडचाही पाठिंबा आहेच ! खिलाफतवाल्यांनी वर्णिलेलें पॅन – अिस्लामी अैक्य खरोखर फार प्रबळ ! अमानुल्ला संकटात पडताच पाहा कसा केमालपाशा चार साडेचार तुर्की माणसें काबूलकडे धाडता झाला ! आणि तीं चार माणसेंही काबूलला जाण्याचे आधीच परत केमालकडे कशीं तातडीने निघून गेलीं !

आता पॅन-अिस्लामाच्या हितास्तव आणि प्रेमास्तव या खिलाफत धुरंधरांस – विशेषत: आमच्या हिंदी खिलाफतीस आमची अेक सूचना आहे. ती हीच की, यापुढे त्यांनी कोणावरही खलिफा म्हणून लालची दृष्टि टाकण्याची घाअी करू नये. कारण काय असेल तें असो, त्यांनी दृष्टि टाकली की ती दृष्ट लागते. प्रथम तो तुर्की खलिफा – बिचारा सुखासीन होता. पण या हिंदी खिलाफतवाल्यांनी त्याला 'खलिफा' म्हणून त्याचेसाठी खटपट करण्यास आरंभ करताच बिचाऱ्याचा सत्यनाश झाला. होती ती खिलाफत गेली. देशोदेशी भीक मागत फिरू लागला. तोंच यांची दृष्टि केमालवर पडली. पण केमालने तर कमालच केली. खलिफाचीच नव्हे तर खिलाफतीचीच त्याने खिरापत अुडविली. मध्यंतरी निजामला खलिफापणाचा टिक्का लावण्यास गेले तर त्या वापडयाची जी दैना अुडाली ती विचारूच नये. खिलाफतीच्या वाऱ्याने फुगलेला तो हैद्रावादी फुगा व्हाअिसरायांच्या चिमटीत सापडताच फटकन् फुटून गेला. कसला ठराव आणि कसला स्वतंत्र राजेपणा ! युरोपियन बवर्जीविरही सत्ता चालेनाशी झाली. अितक्यात खिलाफत लालसेस अमीर अमानुल्ला दिले. अल्ली बिल्ली जों आनंदातिरेकाने खलिफापणाचा अभिषेक अमानुल्लाच्या डोक्यावर धरावयास सतृष्ण दृष्टीने धजतात तों तीच दृष्ट लागून त्या अभिषेकपात्रातच अमानुल्लाची अमिरीही बुडून मेली ! म्हणून आता दुसऱ्या

कोणाला तरी त्या अशुभ पदवीची अवदसा न भोवो या सद्धेतूने आम्ही ही सूचना खिलाफतवाल्यांस करीत आहो ! कारण अलीकडेच ऐकलें की, गाजी बच्चा साकूशी महमदअल्ली सोन्याच्या दूरध्वनींतून – टेलिफोनमधून – बोलू लागले आहेत. म्हणून ही विनंती की, आता बच्चा साकूला तरी खलिफापणाची दृष्ट लावून त्याचा सत्यनाश करू नका ! अजून वच्चा आहे तो ! चार दिवस राजवाडयाची मजा मारू द्या त्याला ! पुढे मग त्याचा नाश जेव्हा अगदी जवळ येअील तेव्हा पॅन-अिस्लामचा खलिफा होण्याची आकांक्षा आपण होअून त्याचे डोक्यात येअीलच !

आता सय्यद खानाचा निरोप घ्यावयाचा. पण तो विचाऱ्या 'जंगली, असभ्य व असंघटित' नेपाळी भाषेत न घेता त्याच्या अफगाणिस्थानच्या पूज्य असलेल्या कवि हजरत शेख सादी यांच्याच शब्दांत घेणें वरें. सादी म्हणतात :—

फारसी

सादिया ! अज रोजे अजलहुस्न ब तुर्की दादन्द
अल्को दानाअी फअिम व यूना दादन्द
नाजो अजज क्रिश्मा हमा दर आलमे हिन्द
वेवकुफी व जहालत खास अफगां दादन्द.

अर्थात्: हे सादी ! सृष्टीची रचना होताना रूप तुर्कांना मिळालें, विद्या आणि बुद्धि यूनांना (ग्रीकांना) मिळाली, कोमलता, माधुर्य, हावभाव, सभ्यता हिंदुस्थानच्या वाटयाला आली. आणि अुनाड, मूर्खता नि पिशाच्चपणा अफगाणिस्थानला देण्यात आला ! '

नमस्कार सय्यदखान, येतो आता.

—ता. ३० मार्च १९३९

✦ ✦ ✦

३८६७५ वि. निबंध.....
१५९९..... नों: दि: 13/11/44
(१९)

हुतात्मा राजपाल आणि महात्मा गांधी

गेल्या पाळीला पार्लमेंट सभेत हिंदुस्थानला औपनिवेशिक सत्ता (Dominion status) द्यावयाचो कीं नाही याविषयी जो मनोरंजक वादविवाद झाला, त्यात अेका गंभीर दुःखाची जी वातमी वाहेर फुटली, तीविषयी अिंग्लिश असो वा हिंदी असो, पण प्रत्येक सहृदय मनुष्यास सहानुभूति वाटल्यावाचून राहणार नाही. त्या वादाचे भरात अिंग्लंडचे अेक प्रमुख पुढारी आणि अुभ्या जगतातील अेक प्रमुख

कारस्थानी मि. वाल्डविन हे म्हणाले की, ' तुमच्या आमच्या डोळ्यांदेखत तरी हिंदुस्थानला औपनिवेशिक सत्ता–वसाहतीचें स्वराज्य–मिळणें शक्य नाही ! ' कोण दुःखकारक बातमी ही !

हाय ! हाय ! मि. वाल्डविन आणि ज्या पार्लमेंटच्या सभासदांस अुद्देशून ते असें म्हणाले की, ' तुमच्या आमच्या डोळ्यांदेखत तरी हिंदुस्थानला स्वायत्तता मिळत नाही,' ते अिंग्लिश सभासद, ह्या साऱ्या सज्जनांचे डोळे अितक्या लवकर मिटणार ना ! आम्हांस बॉल्डविनसाहेब अवघ्या वर्षांचेच आत सोडून जाणार ना! हाय हाय !

कारण औपनिवेशिक स्वराज्य तर अेक वर्षाचे आतच मिळणार असें भगत-सिंगादिकांनी परवा लाहोर कोर्टात सांगून टाकलें; अितकेंच नव्हे तर त्या समयी आमची सर्वांची मुक्तता होणारी असल्याने तुम्ही या खटल्याचा नसता त्रास घेत बसण्याचें सोडून खुशाल विसावा घेत बसावें म्हणून कोर्टास अनुरोधही (शिफारसही) केला. तेव्हा औपनिवेशिक स्वराज्य–अेक वर्षातच मिळणार हें क्रांतिकारकांचें भविष्य आणि ते त्यास खरें करून घेणारच; आणि तिकडे बॉल्डविन म्हणतात की, आमच्या डोळ्यांदेखत तो दिवस अुजाडणें अशक्य आणि बॉल्डविनही काही भलतीच प्रतिज्ञा करणारे अनुत्तरदायी (irresponsible) गृहस्थ नाहीत ! अर्थात् अेक वर्षाच्या आत मि. बॉल्डविनांचे आणि पार्लमेंटातील त्यांच्या पुढच्या त्या दिवशीच्या सर्व सभासदांचे डोळे नित्याचे मिटणार हें अुघड आहे ! हाय हाय ! कोण हा दुःखद प्रसंग !

भारतभक्त भगतसिंग म्हणतात, अेक वर्षाचे आत स्वराज्य मिळणार ! ब्रिटनभक्त बॉल्डविन म्हणतात, माझ्या डोळ्यांदेखत तरी काही स्वराज्य मिळत नाही. या दोघांच्याही प्रतिज्ञा खोट्या होऊ नयेत अशी–

कारण ते दोघेही गृहस्थ आपल्या या ब्रिटिश साम्राज्यातील त्या त्या देशा-तील माननीय देशभक्त आहेत. कोणीही खोटा ठरला तरी तुम्हा आम्हां ब्रिटिश साम्राज्यांतर्गत सुराज्यात राहू अिच्छणाऱ्या अवघ्या हिंदी-अिंग्रजी नागरिकांच्या ब्रिटिश साम्राज्याच्या सामष्टिक अभिमानाला दुखापत होणारी आहे. तेव्हा या दोन्हीही प्रतिज्ञा खऱ्या ठरविण्याचा अेकच अेक जो अर्थ, जो मार्ग त्यातून निघतो तोच साम्राज्याभिमानी बॉल्डविनसाहेब स्वीकारतील आणि आपले डोळे या वर्षाच्या पहिल्या अर्ध्यातच नित्याचे मिटून ह्या वर्षाच्या दुसऱ्या अर्ध्यात हिंदुस्थानास औपनिवेशिक स्वराज्य मिळण्याचा दिवस अुजाडू देतील यात आम्हांस काहीच शंका वाटत नाही. तरीही बॉल्डविनसारखा मोहरा अितक्या अनपेक्षित शीघ्रतेने आम्हा सर्वांस अंतरणार ही बातमी त्यांच्या स्वतःच्याच तोंडून अैकल्यामुळे दुःख मात्र अत्यधिकपणें झाल्यावाचून राहत नाही. अिंग्लिश पार्लमेंटवर हा मोठाच प्रसंग कोसळणार खरा : गाय फॉक्सच्या वेळचें संकट देखील अितकें भयानक

नव्हतें ! जें हिंदुस्थानचें स्वराज्य अेका वर्षात मिळणारच्च आणि त्याच वेळी पार्लमेंटातील, ' तुमच्या आमच्या डोळ्यांदेखत काही मिळण्याचा संभव नाही ! ' अितक्या तरुण, बाल वृद्ध अशा थोर थोर ब्रिटिश सभासदांच्या आयुष्याची दोरी अशी अकस्मात् अितकी आखूड व्हावी ना ! हाय हाय ! अीश्वरेच्छा वलीयसी ! दुसरें काय !

तिकडे वर्कनहेडवर असा वाअीट प्रसंग गुजरणार तरी आहे. पण अिकडे धर्मवीर राजपाल यांची हत्या करणाऱ्या अिलामदिनावर तर याहूनही वाअीट प्रसंग गुजरून देखील गेला ! हिंदु धर्मवीर राजपालाची हत्या करणारा हा मुसलमान गाजी अिलामदिन—जीव वांचविण्याकरिता सारखी धडपड करीत असता ती सर्व निष्फळ ठरून शेवटी फासावर लटकला ! आणि अशा प्रकाराने ' रंगीला रसूल ' प्रकरणाला शेवटी अशी अगदी अक्षरश: मूठमाती दिली गेली. मुसलमानाचेंच प्रेत पुरताना ! हिंदूचें नव्हे !

कारण राजपालाला मारलें तेव्हा मौलवी जाफर अल्ली संतुष्ट अैटीत म्हणाले होते की, राजपालाच्या मृत्यूने ' रंगीला रसूल 'ला मूठमाती मिळाली; पण शेवटी ती त्यांची घोषणा फार घाअीची ठरली. कारण राजपालाचे प्रेताला हिंदूंनी अग्नि दिला—मूठमाती नाही. आणि त्या अग्नीच्या डोंवाने होरपळून आज जेव्हा अिलामदिन फासावर लटकला, तेव्हा त्याला दिलेल्या मूठमातीतच त्या ' रंगीला रसूल'ला खरी मूठमाती मिळाली.

आता ती मूठमाती मातीत मिळून गेली असल्याने या प्रकरणाचा अेकंदर आढावा काढून हाती काय राहतें तें पाहण्यासाठी जर आपण ती मातीची मूठ थोडीशी चाळून पाहू लागलो, तर असेंच दिसून येतें की, मुसलमानास तरी हा सवदा अेकंदरीत फारसा स्वस्त पडला नाही. कारण अेका हिंदु राजपालासाठी त्यांचीं तीन माणसें कामास आलीं. राजपालवर पहिला गाजी जो चालून आला, तो सात वर्षें तुरुंगात सडत आहे. दुसरा गाजी चालून आला तो चवदा वर्षें तुरुंगात डांबला गेला. ह्या तिसऱ्या गाजी अिलामदिनने राजपालला मारलें पण तो तर स्वत:च फांशीवर खेचला जाअून पुरता लंवा झाला अेका हिंदूसाठी मेले नि अर्धे मेले मिळून तीन मुसलमान खर्ची पडतात ! त्यावर पुन्हा पिंड दक्षिणा म्हणून खटल्यापायी प्रिव्ही कौन्सिलपर्यंत चार पांच लाखांवरचा व्यय ! अशा महाग दराने हें नसतें भांडण विकत घेण्याची मुसलमानांची खुमखूम अजूनही जिरली नसेल, तर त्यांनी तें सुखेनैव चालू द्यावें. प्रत्येक मुसलमान अेक गाजी अिलामदिन झाला तरी ते आहेत सात कोटी. अेक हिंदु राजपालास तीन मुसलमान—याप्रमाणे फार फार तर तीन कोटी हिंदूंवारी तो सात कोटी गाझींचा सगळा परिवार,

अगदी स-गळा कामास आला, तरी हिंदु १९ कोटी वाकी अुरणारच्च आणि मुसलमान ? शून्य !

ही गोष्ट ध्यानात ठेवून आता यापुढेही हा गुंडपणा चालविण्याची मुसलमानांची छाती असेल तर त्यांनी सुखाने चालवावा ! राजपालाला मारलें म्हणजे हिंदु दबतील ही त्यांची समजूत त्यांचाच सत्यनाश करण्यास कारणीभूत होअील हें या प्रकारावरून अुघड होत आहे. हिंदु पूर्वी केव्हा केव्हा गुंडगिरीने दबत. पण आता हें संघटनयुग आहे. आता ही तुमची गुंडगिरी तुम्ही थकाल तोपर्यंत सुखाने चालू द्या !

वास्तविक पाहता ' किशन तेरी गीता जलानी पडेगी ' अशा मुसलमानी कृष्णनिंदेस अुत्तर म्हणून राजपालाने ' रंगीला रसूल ' लिहिलें. त्यात महंमद-महाशयांच्या चरित्रातील अैतिहासिक गोष्टीच वहुशः असल्याने कोर्टाने राजपालास निर्दोषी म्हणून सोडून दिलें. पण मुसलमानास हवेंच होतें तर त्यांनी फारतर त्या पुस्तकातील विधानें खोडणारें दुसरें अेक पुस्तक प्रसिद्ध करावयाचें होतें. कोटिक्रमाला कोटिक्रम चालू राहता. पण नाही. मुसलमानांना कोटिक्रम कशाशी खातात हें काय ठाअूक ! त्यांनी लगेच आपला पैशाचिक लाठीक्रम मध्ये घुसडला ? पूर्वी त्या लाठीक्रमानेच केव्हा केव्हा काम भागे म्हणून त्यांस ती चटक लागली. पण आता ते दिवस गेले. राजपाल धीटपणाने आपलें आर्यसमाजी प्रचारकार्य करीतच चालला. मेला तेव्हा तीन मुसलमान खर्ची पाडून आणि हिंदूंपेक्षा मुसलनांसच तो सवदा महाग करून मेला. त्याने हिंदुधर्माचा पक्ष घेतला म्हणूनच त्यास मरण आलें. यास्तव हिंदु त्याचा धर्मवीर राजपाल म्हणूनच गौरव करू लागले आणि शेवटी जेव्हा दोन लाख मुसलमानांच्या डोळ्यांतून पाण्याचीं टिपें आलीं, त्यांनाही हाय तोवा ! करणारी प्रेतयात्रा ' गाझी ' अिलामदिनचें प्रेत घेअून काढावी लागली, तेव्हाच या 'रंगीला रसूल' प्रकरणास खरी मूठमाती मिळाली!!

ज्या मुसलमानाने ' किशन तेरी गीता जलानी पडेगी ' म्हणून म्हटलें आणि हा वाद माजविला, त्याच्या पापाचें प्रायश्चित्त दुसऱ्या मुसलमान अिलामदीनच्या फांशीवर द्यावें लागलें आणि दोन लाख मुसलमानांना आरडत ओरडत त्याला मूठमाती द्यावी लागली.

राजपालाच्या सवद्याअितका महाग जरी नसला, तरी अलिवागच्या पटवर्धनाचाही भवदा मुसलमानांना स्वस्त तरी पडला नाहीच. पठाणाने पटवर्धनांना सुरीने भोसकलें; पण पठाणास फांशीवर लटकून लंवे व्हावें लागलें. शेवटी अेकास अेक—डोळ्यास डोळा—दातास दात—गळ्यास गळा, जिवास जीव ह्या अटीवरही जरी मुसलमानांची हा खेळ असाच चालू ठेवण्याची छाती असेल, तरीही आमची ना नाही. त्यांच्या सात कोटीस आमच्या सात कोटींचा छेद गेला तरी बाकी अुरले पंधरा ! –कोटी ! ! –हिंदु ! ! !

कोणी भला माणूस सहज विचारील की, अहो, पण हें डोळ्यास डोळा आणि दातास दात असें चालायचें कुठपर्यंत ? तर मग आम्ही म्हणू ' भावड्या माणसा, जो आततायीपणाही होऊन होऊन खाजवून खरूज काढतो त्याचें अंग रक्तबंबाळ होऊन त्यास खाजविण्याचा कंटाळा येअीपर्यंत ! तें त्यास विचार ! आणि त्याची हौस नाहीच जिरली तर ? चाललाच आहे हा खेळ असा. आम्ही नको म्हणून काय होतें ? तो होऊन चालून येतो, तिथे रडून काय अुपयोग ? दोघांपैकी कोण्या अेकाचे तरी दोन्ही डोळे आणि बत्तीसही दात अुखडून पडेतो हें डोळ्यास डोळा आणि दातास दात असेंच चालणार असेल, तर अपापांचे सारे दात अुपटून खेळ बंद होण्यापेक्षा शक्य तर गपापांचे दात अुखडून तो खेळ बंद करणें निदान अधिक अन्यायाचें तरी होणार नाहीच नाही ? म्हणून पुन्हा अेकदा हमी देअून सांगतो को, यापुढे हिंदु काही ' सोड ' म्हणून म्हणत नाहीत. आततायीपणा चारी मुंड्या चीतच नव्हे तर अगदी निपचीत पडेपर्यंत – असेल ज्याची छाती त्याने झुंजून घ्यावें ! ह्या निश्चयास धर्मवीर राजपालाची चिता साक्ष ! दीनदयाळ पटवर्धनांचे प्राण साक्ष ! कारण ते दोन्हीही सौदे हिंदूंना काही महाग पडले नाहीत—मुसलमानांना स्वस्त तर पडले नाहीतच नाहीत. तेव्हा आणखी कोणा मुसलमान कवीची छाती असेल तर त्याने ' किशन तेरी गीता जलानी पडेगी ' अशी कविता पुन्हा लिहावी म्हणजे त्या सगळ्या नाटकाची पुनरावृत्ति होत होत पुन्हा अेखादा अिलामदीन फांसावर लटकत लंबा होअील; त्यास आमची काही आडकाठी नाही. तुम्हास परवडेल तो तुम्ही पाहिजे तर तुमच्या प्राणान्तापर्यंत देखील ह्या गाजीपणाच्या निशेचा अुपभोग घेत असावें.

हो; परंतु अिलामदीनला दोन लक्ष मुसलमान गाजी म्हणून, ' शहीद ' म्हणून, ' हुतात्मा ' म्हणून लाहोरला मिरवीत असता त्या गोंगाटाने आमच्या महात्मा गांधींच्या समाधीचा लवमात्र भंग झालेला दिसत नाही कसा ! ती अभंग समाधी आहे असें म्हणावें तर राजपालाच्या प्रेतास जेव्हा लाहोरच्या लाखो हिंदूंनी मिरवीत नेलें आणि ' धर्मवीर राजपालकी जय ' म्हणून गर्जना केल्या, तेव्हा हीच समाधि पिसाळून अुठून अेखाद्या लोहाराच्या भात्यासारखी फोफावत, अेखाद्या नागिणीसारखी फुत्कारत त्या मिरवणुकीस डसावयास धावली होती. राजपालाचें प्रेत मिळेना पण हिंदूंनी पोलिसांच्या मोठ्या मारहाणीस न जुमानता तें प्रेत सोडवून आणलें. अुभें हिंदु लाहोर त्या राजपालाच्या प्रेतावर फुलें अुधळीत आणि ' जय धर्मवीर ' म्हणून गर्जत चालले. मुसलमानांनी हिंदूच्या त्याच चिकाटीची नक्कल करून अिलामदीनचें प्रेत सोडविलें आणि ' गाझी ' म्हणून गर्जत मिरविलें. ह्या दोन गर्जनांत अिलामदीन आततायी असल्याने, सुरा अुपसून हत्या त्यानेच केली असल्याने वास्तविक पाहता कोणाही अहिंसेच्या खऱ्या भक्तास त्याच्या मिरवणुकीचा अधिक तिटकारा यावयास पाहिजे होता; पण नाही. तिचा तिटकारा महात्मा

गांधीस आला नाही. त्याला गाझी म्हटल्याविषयी मुसलमानांस दोष देणारा अेक शब्दही त्यांनी लिहिला नाही; पण राजपालला धर्मवीर म्हणून गौरविल्याविषयी मात्र त्यांची समाधि, शांति हिंदूंना शिव्या हासडण्याअितकी चिडून अुठली.

ते म्हणाले,– महाराष्ट्रीय वाचकांस माहीत नसेल म्हणून पंजाबच्या हिंदूंच्या जिव्हारी लागलेली ही गोष्ट सांगतो की,–गांधीजी चिडून म्हणाले,– राजपाल अेक केवळ पुस्तक विक्रेता. मुसलमानांच्या मनोवृत्ति दुखविणारें पुस्तक त्याने छापलें. त्यापायी तो मारला गेला. त्यामध्ये त्याने कोणतें मोठें धर्मवीरत्व दाखविलें ! त्याने छापलेलीं पुस्तकें सगळीं विकलीं गेलीं होतीं. तेव्हा त्याला कवडीचाही तोटा झाला नाहीं, मग कोणचा स्वार्थत्याग त्याने केला ?

म. गांधीच्या म्हणण्याचा अेकंदरीत मथितार्थ असा की, पोटासाठी पुस्तक छापलें. तें पैसे घेअून विकलें. त्या धंद्याच्या भानगडीत तो मारला गेला. त्यात धर्मवीरत्व तें कसलें ? यास्तव राजपालला ' हुतात्मा ' म्हणून गौरविणें हिंदूंचा केवळ मूर्खपणा आहे.

' राजपालच्या पुस्तकाची विक्री झाली होती ' म्हणून तो स्वधर्मार्थ मारला जात असताही त्यास हुतात्मा म्हणायचें नाही, मग गांधीजींची पुस्तकेंही ते नेहमीच विकीत आल्याने आणि विशेषत: त्यांचा ' यंग अिंडिया'ही वर्गणी अुकळूनच चाललेला असल्याने, त्यांस तरी महात्मा कां म्हणावें ? ' राजपालाला धंद्याच्या भानगडीत मृत्यू आला ! ' असें म्हणण्याचा निर्लज्ज कोटिक्रम असेंही म्हणू शकेल की, टिळकांनाही धंद्याचे – केसरी पत्राचे–भानगडीतच कारावास घडला, शिक्षा झाल्या; मग त्यांस लोकमान्य कां म्हणा !

' राजपालाची धंद्याच्या भानगडीत हत्या झाली.' समजा झाली. पण त्याने हत्त्या केली तर नव्हतीना ? मग धंदा करीत होता म्हणूनच राजपालला 'धर्मवीर' म्हणून म्हणताच चिडून जाणारे हे न्यायाचे आणि अहिंसेचे आचार्य, सुरा अुपसून दुसऱ्यास छपून भोसकीत सुटणाऱ्या भ्याड हत्यारी अिलामदीनला गाझी म्हणणाऱ्या मुसलमानांविषयी कां नाही निंदेचा अेक चकार शब्द काढीत ? न जाणो क्वचित् असेंही असेल की, हिंदूला मुसलमानांनी सुरा घेअून भोसकणें हें अहिंसेच्या तत्त्वास तितकेंसें जाचक नसेल – जसें अिंग्लिशांसाठी जर्मनांना ठार मारणें हेंही अहिंसे-विरुद्ध नव्हतें.

महाशय राजपालांनी केवळ धंदा करूनच जीवन घालविलें असतें, तर तो मुसलमानांच्या डोळ्यात अितका खुपताच ना ! ते आर्य समाजाचे कट्टर अभिमानी आणि सेवक होते. श्रीकृष्णाची मुसलमान करीत असलेली निंदा सहन होअीना म्हणूनच त्यांनी ' रंगीला रसूल ' हें पुस्तक त्यातील धोका माहीत असून जाणून वुजून प्रसिद्ध केलें आणि मुसलमानांचे डोळे त्या अंजनाने झणझणू लागताच ते अुलट प्रसन्न झाले. त्यांना धंदा करावयाचा होता, तर श्रद्धानंदांच्या मारेकऱ्याचें

अबदुल्ल्याचें चरित्र लिहून आणि त्यात ' भाअी अबदुल्ला ' म्हणून गौरवपर नांव देअून 'यंग-अिंडियासारख्या त्याच्या प्रती मुसलमानांत लाखांनी खपविल्या असत्या किंवा ' आपल्या त्या शूर मोपल्यांच्या ' धर्मनिष्ठेचे गोडवे गाणारें आणि नळ-बाजारात त्यांनी अत्याचार केलेच नाहीत म्हणून सांगणारें अेखादें कल्पित अिति-हासाचें पुस्तक प्रसिद्ध करून खिलाफत कमिटीकडूनच नव्हे तर साबरमती आश्रमातूनही त्या हिंदुद्वेषाच्या पाप पुण्याचा पुरस्कार शेकडो रुपयात मिळविला असता !

निदान पक्षी आपले भोपाळचे नबाब तर होतेच की नाही ! हिंदु जनता धर्मच्छलाने त्या दुष्ट राज्यात संत्रस्त होत असता मुसलमानी गुंडगिरीला बळी पडणाऱ्या त्या राज्यातील हिंदु मुलांमुलींचे आक्रोश 'कर्मवीर'सारख्या गांधीवेड्या पत्रातूनही प्रति अंकी अैकू येत असता, हिंदु भाषा, हिंदु धर्म, हिंदु संस्कृति यांस मारून सारखें मुसलमानीकरण त्या राज्यात चाललें असता महात्माजी जसे त्या भोपाळात जाअून जाणून बुजून सांगते झाले की, भोपाळची प्रजा नवावांच्या राज्यव्यवस्थेने संतुष्ट आहे ! ज्या नबाबाची नुसती अेक चैनीची मोटार अितकी मूल्यवान आहे की, तीत स्नानगृहें, पानगृहें, शय्यागृह असा राजवाड्याचा राज-वाडाच अुठवून दिला आहे आणि भर युरोपात तिला अेका चढाओढीत अलीकडेच भव्यतेत पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे– 'त्या नबाबाची, गांधीजी म्हणाले, ' राहणी अगदी साधी आहे ! आणि तो जवळजवळ रामराजाच आहे !' आम्ही म्हणतो, जर महाशय राजपालला केवळ पुस्तक विक्रीचा धंदाच करावयाचा असता, तर त्याने 'भोपाळचा रामराजा आणि त्याचा भाट साबरमतीचा वाल्मीकि' म्हणून अेक पुस्तक प्रसिद्ध करून हे गांधीविरचित भोपाळच्या नवाबाचें चरित्र त्यात छापलें असतें. म्हणजे महात्मा गांधींसारखा, महाशय राजपालांचा हातही भोपाळच्या नवाबांनी ओला केला असता; अितकेंच नव्हे तर त्या राज-पालालाही मुसलमान लोक महात्मा म्हणून म्हणू लागते; हिंदु तर म्हणतेच म्हणते. कारण जो सावावर पडलेल्या घावापेक्षा चोरावर पडलेल्या घावास पाहून अधिक दु:खार्तपणे रडतो, त्यासच ते महादयाळू म्हणतात. जो मनुष्याच्या मुलाच्या पुढचें दूध ओढून घेअून, सापाच्या पिलास पाजतो, त्यासच ते महासात्त्विक समजतात. जो दोन्ही पायांवर न चालता डोक्यावर चालतो त्यासच ते महान् तपस्वी मानतात.

हिंदु धर्माची निष्ठा आणि हिंदुत्वाचा यथार्थ अभिमान महाशय राजपालांनी तिनदा प्राणावर बेतली तरी सोडला नाही म्हणूनच तो खरा धर्मवीर होता. म्हणूनच संघटनाभिमानी लाखो हिंदूंनी त्याच्यावर कृतज्ञतेचीं फुलें अुधळलीं आणि म्हणूनच महात्मा गांधीस तें वावडें लागलें. कारण संघटणाची प्रचंड चळवळ त्यांच्या शिव्याशापास कवडीच्या अुधारीने न विचारता भरभराटत आहे. हें त्यास

सहन होत नाही हीच खरी गोष्ट आहे. त्याचा वचपा काढण्यासाठी ते संघटनावादी हिंदु ज्याला धर्मवीर म्हणतील त्याची हटकून निंदा करतात, आणि ज्याची निंदा करतील त्या भोपाळराज्यासारख्या हिंदुद्वेष्टचा संस्थानिकांची हटकून स्तुति करतात. संघटनात त्यांचा वडेजाव नाही म्हणून त्याचा द्वेष आणि संघटणास मिळावें तर मुसलनानांची लाठी आणि सुरे डोक्यावर गरगर फिरत राहणार–ही भीति; हा पेच आहे. दुसरें काय ?

वरें झालें; लंकेत सध्या रावणाचें राज्य नाही म्हणून. नाही तर हिंदु संघटणाच्या मत्सराने हिंदुद्वेष्टचा भोपाळच्या नवाबाची जशी त्यांनी हटकून धंदेवाल्या पाठकांनाही लाजवील अशी स्तुति केली, तशीच ते लंकेला खादी दौऱ्यावर जाऊन रावणाचीही स्तुति करावयास सोडतेना ! भोपाळच्या नवाबाविषयी म्हटलें तसेंच म्हटल्यावाचून राहतेना की, 'रावण राज्यात सर्व प्रजा संतुष्ट आहे–अशोक वनातील वंदिवान् सीतेसुद्धा ! रावण रामराजाच आहे!!'

—ता. ३० नोव्हेंवर १९२९

✦ ✦ ✦

(२०)

शंकराचार्य महाराजांची नि जॉनबुल महाराजांची सूचना

छळकांची ही अेक जात असते. जगभर छळकांची विचारपरंपराही म्हणूनच अेकसारखी आणि अेकसाची बनते. मग तो छळक कोट पाटलून टोपीधारी कोणी जॉनबुल असो किंवा काषायकौपीन मुंडधारी कोणी पीठेश्वराचार्य असो.

जर कोणास याचें प्रत्यंतर पहावयाचें असेल, तर त्यांनी शारदा पीठाच्या शंकराचार्यांच्या वतीने प्रसिद्ध झालेली अंत्यज वर्गाविषयीची घोषणा पहावी ! अंत्यज वर्गांना शिवणें हें देखील पाप असल्यामुळे त्या पापापासून या पापप्रवण प्राणिमात्रांचा बचाव करण्याच्या परम पवित्र अुद्देशाने ही घोषणा परमहंस परिव्राजकाचार्य अि. अि. अि. यांजकडून काढण्यात आली आहे. ती घोषणा अगदी नवीन असल्यामुळे तीत काही तरी नवीनच लिखाण असेल म्हणून आम्ही ती वाचू लागलो. तों त्यातील बहुतेक वाक्यें यापूर्वी कुठें तरी वाचल्याचें आम्हांस स्मरू लागलें. विचापरंपरा तर अगदी कोणत्या तरी जुन्या लेखातून चोरली असावी असा संशय येण्याअितकी परिचयाची भासली; पण ती पीठासारख्या अधिकारी

संस्थेची घोषणा असल्याकारणाने ती कोणाची तरी चोरून केलेली प्रत असें म्हणण्याचें धाडस आमचें हृदय करीना. तेव्हा शारदा पीठासारख्याच मानसिक परिस्थितीत असलेल्या दुसऱ्या कोणा तरी तशाच थोर आणि दलितांवर केवळ दया करण्यासाठीच त्यांना दळून काढण्याचें पुण्यकृत्य करण्यात निर्ढावलेल्या दयाळू व्यक्तीने पूर्वी अेखादी अशीच घोपणा काढली असावी, ती आपण वाचली असावी आणि ती जाणून वुजून प्रत करण्याचा हेतु नसताही मनुष्यत्व समान असल्यान समान मनःस्थितीत समान उद्‌गार सहज निघण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळे त्या जुन्या घोपणेसारखीच विचारपरंपरा या नव्या घोषणेत अुतरली असावी असा आमचा समज होअून जुनी घोपणा आपण कुठे पाहिली आणि कुठे ठेवली तें आम्ही आमच्या स्मृतींतील हृदयकपाटात आणि खोलीतील काष्ठकपाटांत शोधू लागलो.

काही वेळाने आम्हांस तो कागद सापडला. फार आनंद झाला. आमच्या कल्पनेप्रमाणे तीही अेका थोर अधिकारसंपन्न संस्थेची घोपणाच होती. अितकेंच काय, पण ही शारदापीठाची घोषणा जशी 'श्रीमद् राजराजेश्वर महाराज' यांच्या वतीची होती, तशीच तीही अगदी थेट त्याच राजराजेश्वर महाराज याच थोर नांवास अलंकृत करणाऱ्या विभूतीची होती! ह्या अैतिहासिक साम्याचें जसें आम्हांस कौतुक वाटलें, तसेंच वाचकांसही वाटेल या आशेने आम्ही त्या दोन्ही घोषणांतील महत्त्वाचा भाग वाजूस वाजू लावून छापीत आहो. या घोषणांपैकी शारदापीठाची घोषणा सध्या सर्वांसमोरच असल्याने तिचा अुतारा जो आम्ही देत आहोत तो अक्षरशः खरा आहे किंवा नाही हें कोणासही परीक्षून पाहता येअील. केवळ अर्थ स्पष्टीकरणार्थ कंसामध्ये कुठे कुठे जीं वाक्यें दिलीं आहेत तेवढीं आमचीं आहेत. वाकी आम्ही शारदापीठाची घोषणा जशीच्या तशीच दिली आहे. त्यातील अहिंदु शब्द देखील बदलले नाहीत; कारण न जाणो हिंदु शंकराचार्यांचे लिखाणात म्लेंच्छ शब्द वापरणें हाही सनातन धर्मच असेल! दुसरी घोषणा जी आहे ती मात्र केवळ आमच्या कपाटात असलेल्या अेका प्रतीवाचून वहुधा अनुपलब्धच झाली आहे. तरीही तीतील लिखाण कुठेंतरी वाचलेले हजारो लोक विद्यमान असल्याने तिच्यातील वाक्यांच्या यथावत्पणविषयीही शंकेस जागा अुरणारी नाही. ही नवी घोपणा शंकराचार्य महाराजांच्या वतीने अंत्यज वर्गास सूचना म्हणून निघाली आहे. ती अगदी तिच्याचसारखी असलेली जुनी घोषणा जॉनवुल महाराजांच्या वतीने शंकराचार्यांसुद्धा झाडून साऱ्या भारतीयांसच आज्ञापत्र म्हणून निघालेली आहे. शंकराचार्य शारदापीठ हे केवळ महार चांभारांना अंत्यज, अस्पृश्य म्हणून त्यांस ज्या त्यांच्या धर्माप्रमाणें राहण्याचा अुपदेश देत आहेत, त्याच अंत्यज धर्माप्रमाणें राहण्याचा अुपदेशही महाराज जॉनवुल यांची घोपणा शंकराचार्यांसुद्धा सर्व भारतीयांस अंत्यज, अस्पृश्य समजून हिंदी लोकांस देत आहे. त्या दोन्ही घोपणा अशा :—

शंकराचार्य महाराज यांची

धर्मनिष्ठ भारतीय अस्पृश्य वर्गास सूचना

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य जगद्गुरु श्रीशंकराचार्य शारदापीठाधीश्वर श्रीमद्राजराजेश्वराश्रम महाराज यांच्या वतीने अस्पृश्य वर्गास शुभ आशीर्वादपूर्ण सुचविण्यात येतें की,—

१. थोड्या दिवसांपासून लोभलालचीला वश होऊन कित्येक धर्मद्रोही लोकांनी स्पर्शास्पर्श मर्यादा म्हणजे सृष्टिक्रमाप्रमाणे चालत आलेली प्रणालिका तोडून टाकून सव गोलंकार करण्याकरिता अंत्यजस्पर्श करण्याचा आणि अंत्यजांना अुच्च वर्णीयांप्रमाणे देवमंदिर-प्रवेश अधिकार देअून अुच्चवर्णीय प्रजेला भ्रष्ट करण्याचा आपमतलवी आणि धर्मद्रोही यत्न चालविला आहे. या धर्मद्रोहाच्या वावटळीत तुझी अस्पृश्यांनी सापडू नये.

२. तुम्ही अंत्यज भारतवर्षाचीच प्रजा आहात व हिंदु जातीचें अेक अंगही आहात. भारतीयांचा मुख्य धर्म (अर्थात् गावात कुत्रें चालतें तितकें आम्हा स्पृश्यांशी लगटून मार्गाने न चालणें, म्हशी पाणी पितात त्या स्थळीही नदीचें पाणी न पिता त्याच्या अगदी खाली नदीला शिवणें, मुसलमान किटल्या धुतात आणि कुली पाणी पितात, त्या चवदार तळ्याची चव चाखून तो भ्रष्ट न करणें, आम्ही सर्व लाभकारक धंदे करीत असता तुम्ही गावच्या स्मशानाच्या पलीकडे अेखाद्या खोपटातच राहणें अित्यादि पवित्र धर्मसूत्रानुरूप) आपला धर्म पाळाल, तर त्यातच तुमचें कल्याण आहे.

३. ह्या नवीन धर्मद्रोही अंत्यजोद्धारण लोकांनी कधी तुम्हांस अन्नवस्त्र दिलें आहे काय? (जसे आम्ही ग्रहण सुटलें म्हणजे फाटक्या तुटक्या चिंध्या आणि सणावारास अुष्ट्या पत्रावळी यांचें सनातनी दान तुम्हांस देतो) तुमचें ज्यामध्ये खरोखर कल्याण आहे असें त्यांनी काय केलें आहे? (स्वामी श्रद्धानन्द, लाला लजपतराय, हिंदुसभा, यांच्या दलितोद्धार मंडळांसारख्या संस्थांनी हजारो अस्पृशांस पोटापाण्यास लावलें ही गोष्ट साफ खोटी आहे.) तुमचें ज्यामध्ये खरोखर कल्याण आहे त्यामध्ये आम्ही अुच्च सनातनी लोक तुम्हांला साहाय्य करण्यासाठी सदोदित तयार आहोत. ते धर्मद्रोही पुढारी तुमचे खरे शत्रु होत. त्यांच्या वावटळीत सापडाल तर त्याचा परिणाम तुम्हांस मुंशीगंज–पर्वतीप्रमाणे भोगावा लागेल; मोठे कलह अुत्पन्न होतील.

४. तेव्हा या धर्मद्रोही चळवळ्यांपासून सावध रहा. आपला अस्पृश्य धर्म पाळून रहाल, तर परमेश्वर तुमच्यावर कृपा करून तुम्हांला पुढच्या जन्मी अुच्च वर्णामध्ये जन्म देअील. (क्वचित् जसा आजचा अेखादा शंकराचार्य हा गेल्या जन्मीचा चांभार असू शकेल – तसाच अेखादा आजचा महार पुढच्या जन्मी अुच्च वर्णीयांत जन्मून पुढचा शंकराचार्यही होअू शकेल. याहून मेल्यानंतरचे आशादायी

भविष्य तें काय असणार ? म्हणून मरेतो या जन्मी कुत्र्याहूनही अस्पृश्यावस्थेतच आनंद मानून तोच धर्म मानून रहा.)

जॉनबुल महाराज यांची

राजनिष्ठ भारतीय प्रजावर्गास सूचना

श्रीमत्परमहंस (हंसाप्रमाणें अत्यंत गौरवर्ण असलेल्या) परिव्राजकाचार्य (चारी खंडांत ज्यांच्या स्वारीचा सारखा संचार चालू आहे ते) आंग्ल द्वीपाधीश्वर, श्रीमद्राजराजेश्वर (तुमच्या शंकराचार्यांसुद्धा सर्व राजामहाराजांचे अधिराज) श्रीमत् जॉनबुल महाराज यांच्या वतीने आमच्या भारतीय पददलित प्रजाजनांस शुभ आशीर्वादपूर्वक आज्ञापिण्यात येते की --

१. थोडया दिवसांपासून लोभलालचीला वश होऊन कित्येक राजद्रोही लोकांनी (अुदाहरणार्थ टिळक, लजपतराय, चाफेकर, सावरकर, अरविंद, गांधी, गोखले अित्यादि मोठाल्या नोकऱ्या न मिळाल्यामुळे असंतुष्ट झालेल्या दुष्टांनी) राज-प्रजा मर्यादा म्हणजे 'नाविष्णुः पृथिवीपतिः' ही सृष्टिक्रमाप्रमाणे चालत आलेली प्रणालिका मोडून आम्ही गोरे अिंग्रज पृथ्वीपति, तुम्हा काळ्या हिंदु लोकांचे राजे म्हणून विष्णूसारखे पूज्य; तुम्ही प्रजा म्हणूनच आमचे दास ही व्यवस्था भंगण्याचा आणि गोऱ्या अिंग्रजांशी काळ्या हिंदी लोकांचा बरोबरीचा अधिकार सांगून सब गोलंकार करण्याचा आणि आमच्या राजमंदिरातून या हीन-वर्णीय प्रजेस प्रवेशादिक अधिकार देअून भ्रष्ट करण्याचा राजद्रोही प्रयत्न चालविला आहे. ह्या राजद्रोहाच्या वावटळीत तुम्ही आमच्या काळ्या हिंदी प्रजेने सापडू नये.

२. तुम्ही हिंदी लोक आमची प्रजा आहात आणि आमच्या ब्रिटिश साम्राज्याचें अेक अंगही आहा. तुमच्या सनातन वर्णाश्रमधर्माप्रमाणे ह्या साम्राज्याचाही मुख्य धर्म वर्णाश्रमच म्हणजे colour bar हा आहे. तुम्ही हिंदी काळे दास, प्रजा, आणि आम्ही अिंग्रज गोरे, स्वामी, राजे. हा वर्णाश्रम धर्म तुम्ही पाळावा. (अर्थात् आम्ही फर्स्ट क्लासमध्ये असलो तर तुम्ही त्या डब्यात बरोबरीने न बसणें, रस्त्याने अिंग्रज पाहताच त्यास सलाम करणें, वरिष्ठ गोरा ऑफिसर रागावला तर त्याच्या लाथा प्रसाद म्हणून खाणें, आम्ही गव्हर्नर अित्यादि अधिकार चालविणें आणि तुम्ही खर्डेघाशी, चपराशी, बवर्जी वनणें, ऑफिस वगैरेमध्ये नगरातून आम्ही वसणें आणि तुम्ही गावाबाहेरच्या गचाळ 'Coloured area' तच बसणें, शाळांतून ट्राम्वेतून, मार्गावरून आमच्या बरोवरीने न चालणें--त्या गोऱ्यांच्या मार्गास न विटाळणें, आम्ही तुम्हावरचे स्वार, तुम्ही आमचे भारवाही पशु हा जो राजाप्रजासंबंधीचा सृष्टिनियम तो आनंदाने पाळणें) हा तुमचा धर्म तुम्ही पाळाल तर त्यांत तुमचें कल्याण आहे.

३. या नवीन राजद्रोही भारतोद्धारक म्हणविणाऱ्यांनी कधी तुम्हा हिंदी प्रजेस अन्नवस्त्र दिलें आहे काय ? त्यांची ही लबाडी अुघडकीस यावी म्हणून

तुमच्या कल्याणासाठीच आमच्या राज्यात आम्ही जवळ जवळ दरवर्षाआड मोठमोठे दुष्काळ पाडून दाखवितो आणि तुम्ही काळे लोक लाखांनी अन्न अन्न करून मरत असता आम्ही लाखांनी पगार अुपटीत विलायतेत धाडतो. (हेतु हा की, तुम्हांस हे राजद्रोही भरपूर अन्नवस्त्र देतात कीं नाही याची कसोटी तुम्हांस दाखवावी.) तुमचें ज्यामध्ये खरोखर हित आहे (अुदाहरणार्थ भाराभर कर विनबोभाट देणें, हिंदुस्थानातील सोनेंनाणें झाडून सारें विलायतेस वाहून नेअू देणें, आमच्या शत्रूची दारू संपेतो त्यांच्या तोफांचें खाद्य वनणें) अशा कार्यी आम्ही अुच्चवर्णीय (White Races) तुम्हांला मदत द्यावयास सिद्ध आहोत. हे टिळकादिक राजद्रोही पुढारीच तुमचे खरे शत्रु आहेत. त्यांच्या वावटळीत सापडाल तर त्याचा परिणाम (जालीयनवाला बागेप्रमाणे) तुम्हांस भोगावा लागेल. मोठा कहर गुजरेल.

४. तेव्हा या राजद्रोही चळवळ्यांपासून तुम्ही सावध रहा. राज्यकर्ते अिंग्रज ते विष्णु समजून प्रजेचा दासधर्म पाळून रहाल, तर परमेश्वर तुमच्यावर कृपा करून पुढच्या जन्मी अिंग्रज जातीतच, क्वचित् अिंग्लंडमध्ये तुम्हांस जन्म देअील. (न जाणो क्वचित् त्या मेल्यानंतरच्या पुढील जन्मी लॉर्डात जन्मून ब्रिटिश साम्राज्याचे मुख्य प्रधान व्हाल–नव्हे–राजवाड्यात जन्मून राजे व्हाल–पुढील जन्मी–मेल्यानंतर केवढें आशादायी भविष्य!)तेव्हा त्यावर दृष्टि ठेवून या जन्मी (मरेतो आमच्या पगाराचीं ओझीं वाहणारीं संतुष्ट गाढवें होअून) प्रजाधर्माचें यथावत् पालन करा.

—ता. १४ डिसेंबर १९२९

✦ ✦ ✦

(२१)

सर टेगार्टच्या दंडाविरुद्ध चितागांगचा प्रतिदंडा

जिकडे पहावें तिकडे निर्वंधभंग चाललेला आहे ! हिंदी लोकांचा निर्बंध-भंगाचा खेळ पाहता पाहता प्रत्यक्ष अिंग्रज सरकारला देखील निर्वंधभंगाच्या ह्या साथीत सामील होण्यावाचून राहवेनासें झालें.

अिंग्रज सरकारच्या सर्व खेळाडूंत कलकत्त्याचे सर चार्लस टेगार्ट हे अत्यंत तडफदार खेळाडू म्हणून पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहेत. तेव्हा या निर्वंधभंगाच्या खेळास अगदी रंग चढत असता त्यांस सगळ्यांचे आधी त्यात अुडी घ्यावीशी वाटावी आणि त्या अुडीसरशी त्यांनी सगळ्या सरकारी आणि निमसरकारी खेळ-गड्यांवर ताण करावी हें साहजिकच होतें.

वें. सेनगुप्त, सुभाषबाबू आणि मंडळी नुसत्या मिठाच्या निर्बंधाचा भंग करतात काय ! सर चार्लस टेगार्ट म्हणाले, थांबा मी निर्बंध-ग्रंथाचाच, अुभ्या भारतीय, दंडविधानाचाच, अिंडियन पीनल कोडाचाच, भंग करून टाकतो घ्या ! असें म्हणून ते बाहेर पडले आणि नीट जे बाहेर पडले आणि नीट जें पहिलें घर दिसलें, त्या सरस्वती छापखान्यात शिरून व्यवस्थापक मुखर्जी ह्यांच्या अंगाशी लगटले ! मुखर्जींनी विचारलें, 'पण तुमच्यापाशी 'वारंट' आहे का ?' सर टेगार्ट रागाने फणफणत ओरडले; 'चूप रहो ! वारंट ? हें वघ वारंट !!'

स्वत: त्या कलकत्याच्या पोलिस कमिशनरने मुखर्जी महाशयांच्या डोक्यावर आपला पोलिसी दंडा जोराने गरगर फिरवीत म्हटलें, 'हें वघ वारंट !' याच्यापुढे ह्या दंडा-वारंटानेच सर्व कारभार चालणार !

आपल्या थोर थोर पुढाऱ्यांनी मिठाचा निर्बंधभंग केला तर सरकारच्या प्रत्यक्ष पोलिस कमिशनरनेच सगळ्या अिंडियन पीनल कोडाचा आणि क्रि. प्रोसिजरचाच निर्बंधभंग करून टाकला ! सरकार देखील महात्मा गांधींच्या चळवळीत सामील झाले. आता मात्र निर्बंधभंगाच्या चळवळीस विरोध असा कोणाचाच राहिला नाही. दंडा हेंच वारंट ! गायींत जशा हिंदूंच्या तेहतीस कोटी देवता शिरून बसतात तशा या अेक्या 'दंड्यांत' अिंग्रजांचे तेहतीस कोटी निर्बंध घुसून सामावले जातात. आता अमकें कलम आणि अमकें कोड आणि अमका छेदक हे पाठ करावयास नको; अेक शब्द धान्यांत ठेवला की पुरे – दंडा ! दंडा हाच निर्बंध, हाच नियम, हीच नीति, हाच धर्म – हेंच वारंट ! दंडा : अिंग्रजी कारभाराचें सगळे मर्म अेका शब्दात येतें; पण जो शब्द आजवर अेखाद्या गुरुमंत्रासारखा गुप्त राखल्यामुळे मूर्ख लोक त्या अिंग्रजी सत्तेचीं घटनासूत्रें पीनल कोडादि पन्नास कोडांत धुंडीत बसत असत, तो शब्द सर टेगार्टने स्पष्टपणे अेकदाचा सांगून टाकला हें फार अुत्तम झालें – दंडा ! यात अिंग्रजाच्या शक्तीचें सारें मर्म आलें. 'दंडा' हेंच अिंग्रजी अस्तित्वाचें वारंट ! —आणि 'सँक्शन'हि ! ! !

'होय ना ? तर मग' चितागांगचे क्रांतिकारक म्हणाले, 'दंडा तर दंडा' निर्बंधनियम, भयभीति, चालचलणूक, सारी पायाखाली तुडवून अिंग्रजी सत्तेच्या ह्या 'चुप रहो ! दडा हेंच वारंट !' म्हणून दिलेल्या आव्हानासरशी दंड थोपटून चितागांगच्या क्रांतिकारकांनीही प्रत्याव्हान दिलें— 'चुप राहत नाही ! तुझ्या त्या दंड्यास हा घे प्रति दंडा! तुलाच दंड आहेत आणि आम्हांस नाहीत की काय! तुम्ही कागदी वारंटें नाचवीत होता तोवर त्या तालावर आम्हीही निर्बंधभंगाची गाणीं गात मिरवत होतो. पण आता जर तुम्ही हें वघ वारंट म्हणून आमचे डोक्यावर दंडा फिरवू पाहत असाल, तर आम्हीही पण त्या निर्बंधभंगाची ललित-गीतें संपवून हें प्राणभंगाच्या रणगीताचें पहिलें टिपरू मारलें बघ !' जणू असें म्हणत ते अुग्र क्रांतिकारक कोणास काही पत्ता देखील नसता अेकाअेकी चित्ता-गांगला प्राणभंगाची भयंकर खळवळ अुडवून देते झाले !

ते प्राणभंगाची चळवळ करू निघालेले लोक सारे मूठभर होते. पराकाष्ठा शंभर असतील नसतील. पण या मूठभर प्राणभंगाच्या गर्जनेने निर्बंधभंगाच्या मैलभर पसरलेल्या हजारो मिरवणुकीच्या स्वाहाकारांनी, हाहाकाराने किंवा जयजयकारांनी राजकीय वातावरण जितकें कधीहि हादरून गेलें नाही तितकें हादरून दिलें. कारण त्या कठोर हृदयांनी स्वातंत्र्य-मीठ टाकून अेकदम स्वातंत्र्य-पिस्तुलेंच मुठीत धरलीं. अेकदम प्राणाशीच गाठ घातली.

ती शुक्रवारची रात्र होती. त्यातही तो शुक्रवार 'चांगला शुक्रवार'! गुडफ्रायडे! अिंग्रजी अधिकारी सुटीची आणि सणाची मजा मारीत होते. अितक्यात रात्रीचा काळोख अेकदम चमकून अुठला! क्रांतिकारकांनी तीन तुकड्या करून अेकीने टेलिफोन अेक्स्चेंज कापून टाकला आणि पेट्रोल ओतून आग लावली. डाक्क्याची आणि कलकत्त्याची रेल्वे यांचा संबंध तोडून दूर अंतरावरील रूळ अुखडून टाकले. मालगाडी रुळाखाली ओढून गाडीमार्ग सगळा बंद केला. दुसऱ्या तुकडीने आसाम बंगाल रेल्वे अधिकाऱ्यांवर हल्ला चढवून बंदुकीच्या दस्त्याने त्याचें शिर ठेचून ठार मारलें. नंतर त्या स्टेशनलाही आग लावून त्यातील बंदुका आणि दारू छिनली.

तिसऱ्या तुकडीने तर राखीव पोलिसांच्या छावणीवरच छापा घातला. अिंग्रजी सार्जंट आदिक पहारेकऱ्यांना धडावयासरशी अेकदम मारून टाकून ते शस्त्रागारात घुसले आणि नेता येतील तितक्या बंदुका, दारूगोळ्या अित्यादि शस्त्रांची लूट करून त्यांनी नेता येअीना त्या दारूगोळ्यास आग लावून दिली.

अितका सगळा भयंकर प्रकार झाल्यावर मॅजिस्ट्रेटसाहेब मोटारीतून बंदोबस्तास निघाले. पण मार्गात त्यांचाच बंदोबस्त केला गेला. क्रांतिकारकांनी त्यांचीच मोटार अडवून गोळ्या झाडून गाडीहाक्यास घायाळ केलें, शिपाअी ठार केले—मॅजिस्ट्रेट मात्र मोठ्या कष्टाने जीव घेअून निसटू शकले.

अशा रीतीने बंड करून आणि शस्त्रें लूटून ते शंभर जणांचें पथक शेजारच्या दुर्गम पहाडात घुसून सुखरूपपणे नाहीसें झालें!!

चांगल्या शुक्रवाराची रात्र चटगावच्या अिंग्रजांना आणि अिंग्रजी सत्तेला अशी वाअीट गेली! सिंहाचें, ज्या नखांनी व दातांनी भय वाटावयाचें त्या त्याच्या नखा-दातांनाच हात घालून ज्या क्रांतिकारकांनी अुपटून काढले, त्यांना त्या सिंहाच्या शेपटाचें भय थोडेंच वाटणार? शस्त्रागाराच्या भयाने ब्रिटिश सत्तेचे भय! त्या शस्त्रागारालाच क्रांतिकारकांनी लुटून टाकलें. अिंग्रजांचींच शस्त्रें छिनावून अिंग्रजांची कत्तल केली. जुता भी अुसका और सिर भी अुसका! !सर टेगार्टने मुखर्जीच्या डोक्यावर जो दंडा गरगर फिरवून म्हटलें, 'हें बघ वारंट!' तोच दंडा चटगावला क्रांतिकारकांनी टेगार्टच्या अिंग्रजी भाअीबंदांचे डोक्यात हाणून म्हटलें, 'हें बघ मरण!'

कलकत्याला आणि कराचीलाही गेल्या महिन्यातच दंगे झाले. पण ते दंगे होते. हजारो लोक बेतबीत नसता पोलिसांच्या आणि सरकारच्या तत्कालच्या दडपशाहीने तत्काळ अुत्क्षुव्ध होअून ती मारहाण झाली. तरी देखील त्यात जो नेमका अिंग्रजांवर मार पडला आणि भारतीय पुढाऱ्यांवरच ज्या नेमक्या गोळ्या झाडल्या गेल्या, त्यामुळे निर्बंधभंगाचें पाअूल आपण होअून प्राणभंगाकडे पडू लागलें. परंतु या चितागांगचा प्रकार तसा नसून येथे जाणून बुजून क्रांतिकारकांनी अिंग्रजी सत्तेवर चढाअी केली. सत्तावनच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या अितिहासाचें फाडून नेलेलें तें अेक पान होतें. तो दंगा नव्हता; तो कोणा बंडाच्या अुठावणीचा हुंकार होता.

कारण सत्तावन साली प्रत्येक केंद्राचा हाच कार्यक्रम ठरलेला असे. अकस्मात् टपाल तार रेल तोडून दळणवळण बंद पाडणें, अिंग्रजी सत्ताधाऱ्यांवर होअून छापा, स्थानिक अधिकाऱ्याला तत्काल मारणें, शस्त्रागारावर अधिकार आणि क्रांतिकारकांच्या जयाची द्वाही फिरविणें, हाच कार्यकम तंतोतंत अगदी घड्याळासारखा पार पाडला गेला. अेक गोष्ट अुरली—सत्तावन साली सैनिक आणि पोलिस क्रांतिकारकांत प्रथम गुप्त रीतीने मिळून असत आणि अुठावणी होताच प्रकटपणे त्यांच्यात मिसळून जात ! आणि त्याहूनही महत्त्वाचा जो फरक ह्या बंडाच्या स्थानिक अभिनयात आणि त्या सत्तावन्नच्या प्रचंड प्रयोगांत अुरला तो हा की, त्या क्रांतिकारांचा तो प्रचंड प्रयोग अेकदम सर्वत्रच सुरू झाला होता. अेकट दुकट अुठावणी नव्हे तर सार्वत्रिक अुत्थान ! सर्वव्यापी अुठाव ! ! ह्या दोन गोष्टी सोडल्या तर चितागांगची अुठावणी सत्तावनच्या पूर्वनिश्चित आणि आक्रमणशील स्थानिक कार्यक्रमाची पुरी पुरी वजावणी होती. क्वचित् आगामी वादळाची पूर्व सूचना होती.

आणि म्हणूनच गव्हर्नर जनरल, गव्हनर, कलेक्टर, मॅजिस्ट्रेट, फार काय आमचे महात्मा गांधी देखील ह्या चितागांगच्या क्रांतिकारक हुंकारासरशी अकस्मात् चमकून, दचकून चिडून गेले ! नाही तर अिकडे लाख लाख लोक जशी चळवळीची मौज करीत होते, मिरवणुकी मिठाच्या मुठी, पोलिसांची गंमत, हडताळी बातम्या की, आज अमक्याला पोलिसांनी बोचकारलें, तमक्याने तरी देखील मीठ सोडलें नाही, तमक्या स्वातंत्र्यवीराला दोन महिने शिक्षा झाली, अमक्या देशवीराला तीन दिवस; सरकार आणि लोक दोघेही त्या चळवळीत कसे दंग झाले होते. पण तो सारा रंग ह्या चितागांगच्या मूठभर शंभरांनी साफ बिघडवून टाकला ! चळवळीच्या खेळात असे चिरडीवर कोणी येतें का ? त्या क्रांतिकारकांना खेळ म्हणून खेळताच येत नाही. अेकदम अेकेरीची बात ! त्यामुळेच जसें अिंग्रजांचें आमच्याशी पटतें तसें त्यांच्याशी पटत नाही !

आणि म्हणूनच आमची अिंग्रज सरकारला आणि लोकांना अशी साग्रह सूचना आहे की, अशा चिडक्या आणि अेकेरीवर येणाऱ्या ह्या लोकांचा वेळीच

नीट वंदोवस्त करावा. चितागांगचा हा क्रांतिकारक हल्ला त्यामागे अितका गाजावाजा झालेल्या चौरीचौऱ्याच्या दंग्याहूनही किती तरी भयंकर अर्थाने भरलेला आहे. त्यांतील स्वारस्य वेळीच ओळखावें. विशेषत: अिंग्रज सरकारने प्रत्येक ठिकाणी चितागांगची पुनरावृत्ति होण्याचे आधीच काही तरी मिटतें घ्यावें.

गांधीजींनी चितागांगच्या या भयंकर अुठावणीला दोन चार शिव्या हासडून आज्ञा सोडली आहे की, माझ्या चळवळीत अहिंसेचें धोरण म्हणून न पाळणाऱ्यांनी पडू नये, वाजूस रहावें. गांधीजींचे डोळे चौरीचौऱ्याच्या वेळेपासून अजूनपर्यंत अुघडू नयेत ही आश्चर्यकारक गोष्ट आहे ! ! अजून तरी त्यांनी ध्यानात आणावें की, अेकदा अेखादें प्रचंड राष्ट्रीय वादळ अुत्पन्न झालें की, त्यास कोणा वार्डोलीच्या बोळक्यात ' माझ्या ' नियमांचे वुचाखाली दाबून ठेवणें शक्य नसतें.


महात्माजी ! ही जी चळवळ चालली आहे ना, ही अेका अुभ्या क्रुद्ध राष्ट्राच्या अुत्थानासरशी होणाऱ्या हुंकाराचा प्रतिध्वनि आहे. ती माझी चळवळ नाही, ती तुझी नाही; ती भारताच्या युगोयुगांच्या संचित पापपुण्यांची, जयापजयांची, मानापमानांची, अेकत्रित अशा कोटी कोटी जीवांच्या तळमळीसरशी अुत्क्षुब्ध झालेल्या महाकालीची, प्रलयकारी क्रांति आहे. तीत 'माझा' 'तुझा' 'त्यांचा'–चा सगळ्यांचा भाग आहे. पण तिचें भाग्य, विधि, विधान आणि नियंत्रण हें 'माझ्या', 'तुझ्या', 'त्यांच्या' कोणाच्याच हाती नसून त्या महाकालीच्या अति-मानुष अिच्छेवरच अवलंबून आहे. क्रांतिकारकांस वाजूस रहा, हें सांगणारे तुम्ही कोण ? आम्ही कोण ? हें राष्ट्र सगळ्यांचें आहे. त्याच्या दास्याच्या वेडया तोडण्याची अुत्कंठा तुम्हांहूनही त्यांस अधिक अुत्कटपणे लागली आहे. त्या बेडया तुम्ही दर्भाने तोडू पाहता, आम्ही काठीने तोडू पाहतो, ते घणाने तोडू पाहतात. त्या बेडया तोडून ही भारतभूमि स्वतंत्र करण्यासाठी झटण्याचा आणि झुंजण्याचा अधिकार प्रत्येकाचा आहे. त्यास कोण कोणास म्हणणार वाजूस रहा ! तेव्हा हें असें होणारच असें गृहीत धरूनच आम्ही सर्वांनी त्या क्रांतीस तोंड दिलें पाहिजे. आता यापुढे तरी अशा भलत्या आज्ञा, भलत्या अपेक्षा, धरू नयेत.

यासाठीच आम्ही पूर्वी अेका अंकी "क्रांतिकारक पक्ष तीन वर्षे चूप वसणार आहे" म्हणून धाडलेल्या कोण्या कर्नल वीडच्या पत्रासरशी जे हुरळून गेले होते, त्यांस चेतावणी दिली होती ! तीन वर्षें काय पण तीन आठवडे झाले नाहीत तोच कलकत्त्याचा दंगा झाला, कराचीचा झाला आणि चितागांगचा हा क्रांतिकारक छापा तर अुभ्या हिंदुस्थानासच नव्हे तर अुभ्या अिंग्रजांसही तेंच पुनः 'वहिऱ्यासही अेकू जावें' अितक्या मोठ्याने वजावून सांगत आहे की, क्रांतिकारक जिवंत आहेत, वाढत आहेत आणि क्रांति यशस्वी झाल्यावाचून ते नाहीसे होण्याचें काहीच चिन्ह दिसत नाही. यास्तव ती क्रांति शक्य तो सामोपचाराने

अिग्रजाने व आम्ही मिळून घडवून आणावी हेंच योग्य आहे—अजूनही शक्य आहे. या अुपर भवितव्यता वलीयसी !

पण ती भवितव्यता काहीही असली तरी आणि अगदी आजच जरी स्वातंत्र्याचें पार्सल अिंग्लंडने धाडून दिलें, तरीही तें स्वातंत्र्य विनारक्तपात आणि विनाशस्त्राघात मिळालें असें म्हणण्यास आजही कोणासच तोंड अुरलेलें नाही. कारण रक्तारक्ती आणि शस्त्राशस्त्री आज वीस वर्षें तरी सारखी चालू आहे. आणि सर टेगार्टचा दंडा आणि हा चितागांगचा प्रतिदंडा ही तिच्या अगदी अद्यावधि (up-to-date) अस्त्वाची ताजी बातमी आहे !

—३ मे १९३०



(२२)

ही सुडाची व्याद किंवा हत्येची व्याद

लाहोरला साँडर्स या नांवाच्या अेका अ. पोलिस सुपरिंटेंडेंटला कोणी गोळी घालून मारलें आणि तें कृत्य लालाजींच्या हत्येचा सूड म्हणून करण्यात आलें असा संशय सर्व जगास येत आहे ही गोष्ट आता सर्वप्रसिद्ध झालेलीच आहे. लालाजींवर सायमनच्या बहिष्कार-प्रदर्शक मिरवणुकीत जो अत्याचारी मार पोलिसांकडून पडला, त्या प्रसंगी साँडर्स हा तिथे अधिकारी म्हणून अुपस्थित होता आणि अर्थातच त्या दंगलीत त्याचाही हात होता हीही गोष्ट अनेक पत्रांतून प्रसिद्ध झालेली आहे.

लालाजींनी स्वत: हाती छडी देखील घेतली नव्हती; अितकेंच नव्हे तर मिरवणुकीत अितर काही लोकांच्या हातांत लाठ्या होत्या, त्याही वेचून वेचून त्यांनी काढून घेतल्या आणि अशा लाठीशून्य समाजासह लाठीवाज बंदूकबाज, वेयोनेटवाज पोलिसांस तोंड दिलें. कारण अहिंसात्मक सत्याग्रहाच्या व्याख्येच्या चौकटीत ती मिरवणूक चपखल बसावी. तशी ती वसलीही आणि बिनलाठी जेव्हा लाठीशी तोंड देअू निघते, तेव्हा जो ह्या अलौकिक युद्धकलेचा लौकिक परिणाम व्हावयाचाच तो शेवटी निरपवादपणे झालाही. लाठीने बिनलाठीची छाती पहिल्या तडाख्यासरशी तडकविली; मिरवणूक अुधळविली गेली; लालाजी घायाळ झाले; पोलिसांची पाठ सरकारने थोपटली; आमची पाठ सरकारी लाठ्यांनी सडकून निघाली.

पुढे लालाजींचा अकस्मात् देहान्त झाला. लोक म्हणाले, लालाजी लाठीच्या घावास बळी पडले. सरकार म्हणालें, नाही; आणि पडले असले तरी 'शांतता आणि निर्बंध' तोडू पाहणाऱ्यांचा बंदोवस्त करीत असता तसें झालें तर तो आमचा दोष नाही. लोकांनी लालाजींच्या प्रेताची प्रचंड मिरवणूक काढली. लोकांनी लालाजींचें सुतक पाळलें. पण सरकारास त्यामुळे दुःख होण्याचें काही अेक कारण आढळलें नाही. लोकांनी दारें, दुकानें दुःखाने बंद केलीं. सरकारी ऑफिसें नेहमी-प्रमाणे डोळ्यांच्या खिडक्या अुघडून ती शोकयात्रा, 'तें सुतक तो हरताळ यांची गंमत पाहत अुभीं राहिलीं.

अितक्यात त्या लालाजींवर लाठ्या चालविणाऱ्या पोलिस तुकडीतील अेक वरिष्ठ अधिकारी साँडर्स हा अेका निरभ्र सकाळी ऑफिसबाहेर आला. त्याच्या मनात सायकलवर बसावें असें आलें. तो सायकलवर बसला. तोंच दुसऱ्या अेकाच्या मनात पिस्तुल झाडावेसें आलें. त्याने गोळ्या झाडल्या. आणि साँडर्स तत्काळ गतप्राण होअून धाडदिशी खाली पडला.

लाठीच्या मारानंतर काही दिवसांनी लालाजी मेले. तेव्हा ते लाठीने मेले नसावेत ही शंका सरकारास येणें साहजिक होतें. पण गोळी लागताच साँडर्स मेला तेव्हा तो गोळीनेच मेला हें निःशंक होतें, म्हणून सरकारास तत्काळ दुःख झालें. अशा वेळी कोणाही सहृदय मनुष्यास दुःख होतेंच. आणि सरकार सहृदय आहेच.

लालाजी मेले तेव्हा लोकांनी त्यांची शोकयात्रा काढली; पण साँडर्स मेले तेव्हा शोकयात्रा काढण्याचा प्रसंग स्वतः सरकारवरच आला. लालाजी मेले तेव्हा लोकांनी घरेंदारें बंद करून दुःखाचा हरताळ पाडला. आता सरकारवर आपलीं ऑफिसें बंद करून शोकप्रदर्शन करण्याचा दुःखद प्रसंग आला. लालाजी पंजाबचे पुढारी; पण त्यांच्या प्रेतयात्रेस शोकवेषात अुपस्थित राहण्याची गव्हर्नरास काही आवश्यकता दिसली नाही. पण साँडर्सच्या प्रेतयात्रेस गव्हर्नरसुद्धा झाडून सारे अधिकारी अुपस्थित होते. लालाजींसाठी लोकांना सुतकी व्हावें लागलें, तर साँडर्ससाठी सरकारलाही व्हावें लागलें. वास्तविक सरकारही सार्वजनिक संस्था – तिला लालाजींच्या आणि साँडर्सच्या दोघांच्याहीवर गुदरलेल्या संकटात समदुःखी व्हाययास पाहिजे होतें. पण लालाजींच्या प्रेतयात्रेस वीस तीस हजार लोकांची दाटी झाली असताही ह्या सार्वजनिक दुखःप्रदर्शनार्थं सार्वजनिक पैशाने विकत घेतलेला दारूगोळा अुडवून त्यांस विदायवंदनेची Last Post ची फैर झडली नाही आणि ज्या साँडर्सच्या प्रेतयात्रेस अधिकात अधिक दोन हजार लोक नव्हते त्याला अेकटयालाच ती विदायवंदना तोफांचे सैनिक सन्मानासह देण्यात आली.

त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट अितकीच की, लोकांच्या पुढाऱ्यांनी मात्र आपलें कर्तव्य चोख बजाविलें. त्यांनी लालाजींच्या वरील अत्याचाराच्या प्रतिध्वनीचाही जोराने निषेध केला. त्यांनी सरकारप्रमाणे अेककल्लीपणा न करता

लालाजींचेंही सुतक पाळलें आणि सॉंडर्सचेंही पाळलें : 'ब्राह्मणे गवि हस्तिनि शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः।'

आणि पंडितांची समान बुद्धि जें निःपक्षपाती दुःख करू शकते, त्याहून काही तरी विलक्षण असें दुःख महात्म्याच्या बुद्धीला झालें नाही तर मग महात्म्याची बुद्धि ती काय राहिली !

यास्तव तुम्हा आम्हा सर्वांना सॉंडर्सच्या प्रकरणाविषयी जें दुःख वाटतें त्याहून शतपट दुःख महात्मा गांधींना होणार हें अपेक्षितच होतें आणि तसेंच झालें. त्या विचाऱ्या महात्म्याचा आत्मा त्या दुष्ट वार्तेमुळे तळमळून गेला ! 'ही सुडाची व्याद' किंवा 'ही हत्येची व्याद' (This curse of assassination) नांवाचा जो अेक लेख त्यांनी 'यंग अिंडिया'त लिहिला आहे, त्यात त्यांच्या आत्म्यास झालेलें हें तीव्र दुःख त्यांनी शक्य तितकें ओकून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही तें सर्व बाहेर न पडता पोटातल्या पोटात अजून किती तरी मळमळत असलें पाहिजे. त्यांच्या अिंग्लिश मथळ्याचा सर्व अर्थ भाषांतरात चुकू नये म्हणून आम्ही त्याचें दुहेरी भाषांतर केलें आहे.

महात्माजींच्या सॉंडर्सच्या हत्येविषयी झालेल्या तीव्र दुःखाची जर कोणास कल्पना करावयाची असेल, तर ती या अेका गोष्टीने देखील स्पष्ट होअील की, स्वामी श्रद्धानंदांच्या वेळेस देखील 'हत्येच्या व्यादी'ची अितकी चीड त्यांच्या लेखांतून प्रकट झाली नव्हती. शहा मारले गेले; पशूसारखा त्यांचा देह वडवून चुरडला गेला. पण गांधीजींच्या स्थितप्रज्ञतेची अेकही किंकाळी त्या वेळी कोणास अैकू आली नाही. मलबारच्या हत्याकांडाचें हालाहल देखील ब्र न काढता त्या स्थितप्रज्ञतेने पचवून टाकिलें. अेका अश्रूने देखील 'यंग अिंडिया'चें पान भिजू दिलें नाही. पण ती स्थितप्रज्ञता सॉंडर्सच्या हत्येची बातमी अैकताच आम्हा प्राकृत जनांपेक्षाही विव्हल होअून दुःखाश्रूत बुडून गेली. अितकें तें कृत्य दुष्टपणाचें होतें! काय सांगावें ! !

ह्या दुःखाच्या अुद्रेकासरशी महात्माजींना ह्या शोचनीय घटनेतील अितरांस न दिसलेलीं अनेक हृद्गतें व्यक्त झाली आहेत. कोणाच्याही ध्यानात न आलेली पहिली महत्त्वाची गोष्ट जी महात्माजींनी ह्या लेखाच्या पहिल्या वाक्यात सांगून टाकली ती ही की, तें कृत्य अत्यंत भ्याडपणाचें होतें. 'It was a dastardly act' होतें कां यापूर्वी कोणाच्या ध्यानात आलें हें ! हिंदु पत्रें तर काय, हिंदुच तीं. पण मुसलमानी पत्रांतून वऱ्या वाअीट धाडसी कृत्यांविषयी यथेच्छ अनुभव असणाऱ्या मुसलमानी लोकांनीही त्या कृत्यात जें निधडें साहस दिसून आलें तें पाहून तोंडांत बोट घातलें होतें. फार काय अिंग्रजी पत्रांनी देखील ज्या अुग्र आणि कठोर अविचल धैर्याने तो तरुण हें भयंकर कृत्य करून पाठलगाची लांडगेतोड होत असता खिशात हात घालून गंभीरपणे निघून गेला त्याचा अुल्लेख केल्यावाचून राहिलीं नाहीत !

ह्या घटनेस तुम्ही आम्ही सर्वांनी कोणी शोचनीय म्हणून म्हटलें; कोणी निंद्य म्हणून म्हटलें, कोणी आततायी म्हणून म्हटलें–पण त्यात साहसाचा, धैर्याचा लवलेशही नव्हता अितकेंच नव्हे तर तें कृत्य अगदी भ्याडपणाचें होतें आणि तें करणारा कोणी भागूवाअीच होता ही गोष्ट अिंग्रजी पत्रांच्याही ध्यानात आली नाही ! पण गांधीजींनी कसें ओळखलें 'Dastardly !' दुसरें काय !

कोणी म्हणतील गांधीजींना अत्याचाराच्या म्हणून वाटणाऱ्या कृत्यांत धैर्य असूच शकत नाही असें वाटत असावें. अत्याचारास आततायीपणा आणि धाडस ह्या निरनिराळ्या बाजू असू शकतात हें गांधीजींस कळत नसल्यामुळे त्यांनी त्यास भ्याड म्हटलें आणि धैर्य, साहस, शौर्य अित्यादि गुण ज्यांच्या नित्य परिचयाचे आहेत त्या अिंग्रजांसच त्याची चटकन पारख झाली. पण धाडस कसें ओळखावें हें गांधीजींस समजत नाही असें समजणें हा त्यांचा अपमान करणें आहे. कारण मल-बारमध्ये जेव्हा मोपल्यांनी अत्याचारांची दंगल अुडवून दिली आणि सूड म्हणून नव्हे तर धर्म म्हणून, निरुपद्रव्यांसही अुपद्रव दिला तेव्हा त्या अत्याचाराकडेही दुर्लक्ष करण्याअितकें त्यांच्या धाडसाने आणि शौर्याने गांधीजींस विमोहित केलें होतें. याच 'यंग अिंडिया'त त्यांनी त्या मोपल्यास 'My brave Mopla brothers' म्हणून अुलट गौरविलें होतें ! तेव्हा गांधीजींस Brave कोणाला म्हणावें हें चांगलें कळतें. पण तरीही ते मोपल्यांसच शूर म्हणतात. अर्थात् अत्याचारी मोपलेच शूर आहेत आणि हा साँडर्सला मारणारा अत्याचारीच कोणी भागू-बाअी आहे, Dastardly ! दुसरें काय !

असेंही म्हणता येत नाही की गांधीजी अत्याचाराविषयीच्या क्रोधाने असें काही तरी लिहून गेले कारण श्रद्धानंदांच्या हत्येमुळे सर्व हिंदुसमाज क्रुद्ध झाला असताही ह्या हिंदु महात्म्याने शांत वृत्ति ठेवून त्या हत्याऱ्यास 'भाअी अवदुल रशीद !' म्हणून संबोधिलें आणि हिंदूंना सांगितलें की, त्याची फाशी रद्द करण्याचा हट्ट धरा ! हिंदु श्रद्धानंद मारले गेले असता अितके निर्विकार राहणारे गृहस्थ अिंग्लिश साँडर्स मारला जाताच जें बोलले तें विचारानेच बोलले असले पाहिजेत. Dastardly ! अगदी असेंच !

वरें, हा लेख त्यांच्यासाठी कोणी अुपसंपादकाने खरडला असेंही दिसत नाही. कारण त्यांच्यावाचून कोणालाही न साधणारी वदतो व्याघाताची मुद्रा त्या लेखास त्यांच्या अितर लेखांप्रमाणेच ढळढळीतपणे भूषवीत आहे. कारण त्या कृत्यास Dastardly भागूवाअीपणाचें कृत्य म्हणून ते लगेच पुढे सांगतात की, अशा कृत्यास जी लोकांची गुप्त सहानुभूति मिळते ती त्या कृत्यात जें निधडें धाडस प्रकट होतें त्यामुळे मिळते ! 'पाश्चात्त्य लोकांतील लुटारू, चाचे, दरवडेखोर यांचीं धाडसाचीं कृत्यें वाचण्याची चटक आम्हांसही लागल्यामुळे जिथे कुठें धाडस आणि निधडें शौर्य दिसेल तिथे तिथे त्याचा हेतु काय अिकडे न पाहता आम्ही चटकन त्यांची

वीरपुरुषांप्रमाणेच मान्यता करतो ! ही सवय चांगली नाही ! लोकांमध्ये साँडसंला ठार करणाऱ्याच्या धाडसामुळेच अशा कृत्याविषयी सहानुभूति आणि गुप्त आदर अुत्पन्न होत आहे याचें हें तात्त्विक कारण म्हणून गांधीजींनी दिलें आहे. अर्थातें त्या 'भागूबाअीपणा'च्या कृत्यात 'निधडें धाडस' होतें असा त्यांच्या लेखाचा मथितार्थ निघतो.

आहे कीं नाही वदतो व्याघाताचें हें अुत्कृष्ट अुदाहरण ! भ्याडपणाचें कृत्यात निधडें धाडस प्रकट होतें ! निधडें धाडस हा भागूबाअीपणा ! Dastardly ! दुसरें काय !

परंतु नुसत्या धाडसाने मोहून जाण्याची चटक लोकांस लागली म्हणावें तर ज्या युरोपियन चांचे लुटारू, दरवडेखोर यांचीं अुदाहरणें गांधीजींनी संकेतिलीं आहेत, त्यांच्यापैकी अेकाचेंही नांव कोणाच्या तोंडी झालेलें आढळत नाही; फार तर काय, परंतु हिंदुस्थानातील तुरुंगांतूनही अेकेकाने दहा दहा सशस्त्र दरवडे मारलेले अधम भरलेले असतात. पण त्यांचीं चित्रें लोकांच्या भितीवर काही आढळत नाहीत! भले वीर म्हणून त्यांस पाहताच त्यांची पाठ कोणी थोपटीत नाही !

ही पुढील बातमी पहा, 'ता. ३ रोजी पुण्याच्या लॉ कॉलेजातील कुर्लेकर नांवाच्या विद्यार्थ्याने भांबुर्ड्याजवळ रेल्वेवर पडून गाडीच्या चाकाखाली जीव दिला. आता केवळ प्राण देण्याच्याच धाडसाचा प्रश्न असेल तर हें धाडसच आहे. पण ह्याविषयी कोणी अग्रलेख लिहिले नाहीत. त्याची वाहवा करणारीं गुप्तपत्रकें छापलीं नाहोत. मग साँडर्सच्या कत्तलीतील धाडसच तेवढे लोकांस कां आकर्षितें ? असें गांधीजी म्हणतात हो, आम्ही नाही.

कारण गांधीजी स्पष्टच म्हणतात की, आता देशातील वातावरणात पुनः अेकदा अत्याचाराचें वारें संचरलें आहे – Violence is in the air ! आम्हांस तसें फारसें आढळत नाही. आणि आज आठ वर्षें अहिंसात्मक अनत्याचाराच्या गर्जनेने गुदमरून गेलेल्या ह्या देशाच्या वातावरणात जर पुन्हा खरोखरच अत्याचाराचे प्रतिकारी ध्वनि अुठत असतील तर हा गांधीजींचें वर्चस्व फोल झाल्याचाच पुरावा नव्हे काय !

मारेकरी काहीही म्हणोत. अैकोत न अैकोत. पण त्यास चार अुपदेशाचे शब्द सांगून शुद्धीवर आणणें हें आपणा सर्व शांत, शिष्ट, सोसाळू, राजनिष्ठ प्रजाजनांचें कर्तव्य आहे. आपणांस तो अुपदेश देण्याचा अधिकारच नसेल तर दुसऱ्या कोणास असणार ? गांधीजींचा अधिकार तर शिवाजी, प्रताप, श्रीकृष्ण ह्यांसही अुपदेश देण्याचा आहे, असें ते स्वमुखानेच सांगत आले आहेत; म्हणून मारेकऱ्यांना हितावह नव्हे तर तुम्हा आम्हांसही हितावह असा आणखी अेक लाखाचा बोल ते त्या लेखात बोलतात की पोलिस अधिकाऱ्याचें त्या वेळचें वर्तन अगदी निरुपद्रवी होतें.

The innocent police officer discharged his duty,however disagreeable its consequence may be for the community to which the assassin belongs. ज्या समाजात तो मारेकरी निपजला त्या समाजाला न पटणारे परिणाम जरी त्या पोलिस ऑफिसरच्या कृत्याने घडले असले तरी देखील त्या निरुपद्रवी पोलिसाचें तें वर्तन हें त्याचें कर्तव्यच होतें.

कळलें ना आता सर्वांना ? हेंच विधेय जवळजवळ ह्याच शब्दात पार्लमेंटात अिंग्रजी अधिकाऱ्यांनी सांगितलें होतें. पण त्या वेळेस लोकांस तें पटलें नाही. पोलिसांनी त्या प्रसंगी अत्याचारांचें वर्तन केलें असेंच बहुतेक पत्रकर्तेही म्हणत. मारेकऱ्यांची तर गोष्टच निराळी. ते लोक गांधीजींच्या 'त्यांचें तें कर्तव्यच होतें; मग परकीयांस त्याचा परिणाम कितीही अप्रिय वाटो' ह्या वाक्यातील हाच न्याय स्वत:चेंही समर्थन करण्यास अुपयोजिल्यावाचून राहणार नाहीत. पण आपणा अमारेकरी शिष्टांनी तरी आता त्या लाहोरच्या निरुपद्रवी कर्तव्यरत पोलिसांविषयी आपली कल्पना बदलली पाहिजे. गांधीजींच्या लेखाचा अर्थ ध्यानात धरला पाहिजे 'Dastardly !' ह्या अेका शब्दात तें सर्व काही येतें.

परंतु तरीही अेक विधेय मात्र त्या लेखाच्या सारांशाहूनही निराळें अुल्लेखिलेंच पाहिजे. अितकें तें विशिष्ट महत्त्वाचें आहे. 'माणसाचा काय दोष ह्या पद्धतीचा दोष आहे ! Whatever the Assistant superintendent did was done in obedience to instructions. No one person can he held wholly responsible for the assault and the aftermath. The fault is that of the Government system. What requires mending is not men but the system. लालाजींवर झालेल्या आघातांचा दोष कोणाही अेका माणसावर लादता येत नाही. त्या पोलिस सुपरिंटेंडेंटने जें केलें तें त्याचें कर्तव्यच होतें. त्यात त्याचा काय दोष ? दोष राज्यपद्धतीचा आहे. माणसांची सुधारणा करणें अवश्य नसून ती पद्धत सुधारली पाहिजे.' पाहिलीत ना ही सारासारविचारणा किती सूक्ष्म आणि तरीही किती स्थूल आहे. आणि ती आठवली तरी कशी अगदी वेळवर.

हो अगदी वेळेवर. कारण ओडवायर आणि डायर यांच्या वर्तनाविषयीच्या चौकशीमंडळात गांधीजींना ह्या महान् सिद्धान्ताचा किंचित् विसर पडलेला दिसला, तसा आता पडला नाही. ओडवायर आणि डायर ह्यांना गांधींनी दोष दिला आहे. मेण-मअू का होअीना, पण त्यांना शिक्षा त्यांनी सांगितली होती आणि ओडवायर डायर हीं माणसें होतीं असा सर्वसाधारण समज आहे. पण दोष माणसांचा नाही, पद्धतीचा आहे, ह्या महान् तत्त्वाचा महात्म्याला त्या वेळी विसर पडला. वास्तविक डायरांनी वरिष्ठांचेच हुकूम पाळले म्हणून तो निर्दोषी ठरावा. तथापि वरिष्ठांचे

हुकूम पाळले म्हणून कनिष्ठ माणसें निर्दोषी पण ते वरिष्ठ तरी माणसेंच ना? म्हणून माणसाचा दोष नाही! राज्यपद्धतीचा दोष आहे! हें महान् तत्त्व त्या वेळी महात्माजींना देखील झटकन न कळणें साहजिक होतें. पण आता शेवटी तें आठवलें· वेळच तशी आली. आता तरी सर्वांनी समजावें की हें कृत्य 'Dastardly' आहे, दुसरें काय!

'माणसांचा काय दोष, ती राज्यपद्धत सुधारा!' हें तत्त्व आजच आठवलें हेंही अेका परी वरें झालें. नाही तर त्या गोपीनाथ शहाच्या वेळेलाच गांधीजी (ultimatum) धाडते की 'गव्हर्नर साहेब! माणसांचा काय दोष : द्या त्या शहाला सोडून आणि चढवा त्या क्रांतिकारक पद्धतीला फाशी!' असें अेखादें अंतिमोत्तर (ultimatum) गांधीजी धाडते तर गव्हर्नर जनरललाही तें अैकावेंच लागतें. गाधीजींच्या अंतिमोत्तरांना – ultimatum ला गव्हर्नर जनरल कसे चळचळ कापतात हें त्या प्रख्यात अेकवार्षिक स्वराज्ययुद्धाचे वेळी प्रत्ययास आलेलेंच आहे. असें झालें असतें तर शहा फाशीवरून सुटता आणि समाजाला आणखी अेखाद्या 'सूडाच्या व्यादे'ची काळोखी लावीत फिरता! आता सॉंडर्सचा मारेकरी जर क्वचित् फाशीविशी चढू लागला, तर मात्र 'माणसाचा काय दोष? त्याला फाशी देणें म्हणजे ही हत्येच्या व्यादीची वीण वाढविणें आहे' असला अेखादा अर्ज गांधीजी करतात की काय अेवढीच भीति!

माणसांना कोणत्याही प्रकारे अुत्तरदायी न धरता केवळ 'पद्धतीस' काय तें शासन करण्याची ही कुशाग्र कल्पित जर माणसें व्यवहारात आणू शकतील, तर सत्ययुग आजच अुदयाला येअील. मनुष्य मनुष्याचें शत्रुत्व सोडून देअील. चोर पकडला जाताच त्यास गौरवाने निर्दोष म्हणून मुक्त करण्यात येअून त्याची ती चोरी तेवढी तुरुंगात टाकण्यात येअील. बिचारा सॉंडर्स! हा महान शोध जर तो जिवंत असता लागता तर तो किंवा त्याचे साथी देखील लालाजींच्या छातीपोटावर लाठीचे तडाखे न मारता मनुष्य म्हणून त्यांस सोडून त्यांचे भोवतालच्या पोकळ वातावरणात दडून बसलेल्या त्या अमूर्त सत्याग्रहाच्या 'पद्धतीच्या' पाठीवरच लाठीचे तडाखे लगावता! लखनौला सरकारी घोडेस्वार ती अनैबंधिक (illegal – बेकायदेशीर) मिरवणूक मोडण्यासाठी तीतील मनुष्यांना अुधळून न लावता त्यांच्यातील ती मिरवणूक तेवढी निवडून काढून तिच्यावरच घोडे घालते. घोडे चालले नसते तर त्यांना चाबूक न लगावता त्यांच्यातील शिथिलतेला तेवढे चाबूक लगावते! कारण जसा मनुष्यांचा दोष नसून ज्या पद्धतीस तो अंगीकारतो तिचा दोष आहे, तसाच मंदपणा हा घोड्याचा दोष नसून त्याच्यातील शिथिलतेचा दोष आहे.

अितकेंच नव्हे तर मूर्त मनुष्यांच्या व्यतिरिक्त जो वायुदेहधारी असा हा 'पद्धती'चा अमूर्त खवीस गांधींच्या सूक्ष्म दृष्टीस ह्या लेखाच्या शुभमुहूर्तावर

दिसला, तो जर का अेकदा सापडला तर मग मोठमोठीं महायुद्धें देखील लढलीं जाअूनही त्यांत मनुष्यरक्ताचा अेकही थेंब गळणार नाही. जर्मन महायुद्धात लाखो जर्मन लोक आणि अिंग्लिशलोक समोरासमोर अुभे राहून लाख लाख बंदुका सोडते पण कोणावर? – माणसांवर नव्हे. माणसांचा काय दोष? तर त्या पद्धतीवर. त्या System वर British Imperialism म्हणून जी पद्धत अिंग्लिश सैन्याच्या डोक्यावर आकाशात वायुरूपाने तरंगत होती, तिच्यावर तेवढ्या आपल्या तोफा अिंग्लिश माणसांच्या डोक्यावर तीनचार मैल अुंचीवर रोखून जर्मन लोक भडिमार चालविते आणि militarism म्हणून जी दुष्ट पद्धत जर्मन लोकांच्या आडून दडून सर्व खोड्या करीत होती, तिला शासिण्यासाठी जर्मनीतील रहिवाशांना प्रत्यही केशरी भातांचीं पक्वान्नें खुशाल झोडीत बसता येअील. अितकी अन्न सामग्री जर्मनीच्या नगरात पोचवीत राहून केवळ त्या 'पद्धती'ला मात्र अेक तांदूळही मिळू नये म्हणून ब्रिटिश राष्ट्र blocade सिंधुबंदी करीत राहतें!

असो. झालें तें झालें. आता पुढील महायुद्धात तरी ह्या मनुष्यावाचून जिवंत राहणाऱ्या 'पद्धत' नांवाच्या मायावी राक्षसाचा चक्काचूर अुडविता यावा यासाठी त्याचें राहण्याचें ठिकाण गांधीजींनी लवकरच प्रसिद्ध करावें. आजीबाअीच्या पाळण्याजवळचे बायकी बागुलबोवा ज्या किल्ल्यात राहतात, त्यातच हा 'पद्धत-बोवा'ही बहुधा राहत असलेला सापडेल!

साँडर्सची हत्या अत्यंत अनिष्ट हें सत्य खरें; परंतु तें सिद्ध करण्यास हें असलें असत्य, अतार्किक असंबद्ध कोटिक्रम लढविण्याची काय आवश्यकता? स्पष्ट तें स्पष्टच, सत्य तें सत्यच सांगता येतें.

—ता. १९ जानेवारी १९२९

✦ ✦ ✦

(२३)

'थूः तुमच्या जिनगानीवर'

काय? आज तीनशे वर्षानंतर मला शिवाजीला, तुम्ही मराठ्यांनी जे बोलाविलेत, माझा वाढदिवस साजरा करण्याकरिता म्हणून मोठ्या गाजावाजाने जें आमंत्रिलेंत तें काय माझी अशी संभावना करण्याकरिता? युद्धें, लढाया, सेना, सैनिक धावे, स्वाऱ्या, अंतिमोत्तरें, भगवे झेंडे, ताशे, ढोल, केवढा गाजावाजा आणि केवढा गोंधळ तुम्ही करीत होतात – तें अैकून मला वाटलें की, तुम्ही मला जें बोलावता

आहात तें अर्थात् कोणता तरी महान् पराक्रम करून दाखविण्यासाठीच होय. तीनशे वर्षांनी का होअीना, पण माझ्या मागे माझें घालविलेलें राज्य परत जिंकून तें माझ्या चरणीं अर्पण करण्याकरिताच तुम्ही मला आमंत्रिलें असाल—ह्या रण-गर्जना आणि कोलाहल चालविला असाल !

पण पाहतो तों काय ? नाटकगृहात चाललेलें अेखादें नाटक यापेक्षा अधिक रंगतें ! हे लोक सरड्यावर बसून स्वाऱ्या करीत आहेत, पिंडावर पोट भरू पाहत आहेत, जिभेचे पट्टे फिरवीत त्या पटाअीत धारकऱ्यास धाकवू अिच्छीत आहेत, युद्धाच्या भातुकली खेळत आहेत, स्वातंत्र्य, युद्ध, कूच, स्वारी—या शब्दांचीच नव्हे तर या वाचिवीरांनी माझ्या शिवाजी या नांवाची देखील अितकी विटंबना केली आहे की, त्याचा आता कोणास काडीचा देखील धाक वाटत नाहीसा झाला. माझें नांव घेताच अगदी तीस पस्तीस वर्षांपूर्वी देखील माझे शत्रु चमकून अुठत. त्यांना वाटे शिवाजीचें नांव म्हणजे रणदेवतेचा जाज्वल्य मंत्र आहे. जर का तें महाराष्ट्रात उच्चारू दिलें, जर का कोणास त्याच्या चित्राची मिरवणूक काढू दिली वा त्याचा जयजयकार करू दिला तर न जाणो महाराष्ट्र आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्यासाठी तानाजी, बाजीसारखे शिर हातावर घेअून शत्रूवर तुटून पडेल ! म्हणून तें नांव कोणच्याही कोनाकोपऱ्यात अेकताच माझे शत्रु चिडून जात, भिअून अुठत; त्या वासुदेव बळवंताने माझें नांव घेतलें होतें, त्या चाफेकराने माझ्यावर अेक कविता रचून म्हटली होती—तर केवढी खळबळ अुडाली, माझे अुत्सव भयंकर अपराध ठरले. माझ्या नांवास अुच्चारण्याची बंदी झाली. हरीच्या नांवाने राक्षस चिडत तसे माझे नांवाने ते चिडत. पण हाय हाय ! माझ्या नांवास तुमच्या करंट्या जिभेचा स्पर्श होताच त्यातील ती खरी जादू आज निघून गेलेली दिसत आहे. दगडावर ठिणगीचा जसा काही परिणाम होत नाही तसा आजकालच्या या मुर्दाड महाराष्ट्रावर माझ्या नांवाचा काहीच परिणाम होअीनासा झाला. पूर्वी त्यास वाटत होतें महाराष्ट्र हें दारूचें कोठार; त्यावर ही शिवाजीच्या स्मृतीची ठिणगी पडणें नको, पण आता त्यांना कळून चुकलें की, हें दारूचें कोठार राहिलेलें नसून नाल्याची घाणेरडी दलदल झाली आहे. शिवाजीच्या जळत्या नांवाने ही दलदल पेटणें तर दूरच, पण अुलट त्या नांवातील जळती ठिणगी तीवर पडताच ती ठिणगीच विझण्याचा पक्का संभव. म्हणूनच हे वाचिवीरांनो, तुम्हास आता माझ्या नांवाचे जयजयकार वाटेल तितके करू देण्यात येतात. कारण, माझ्या नांवाने तुमच्या मुर्दाड मनात काही अेक कर्तृत्वशील चेतना अुत्पन्न होणें अशक्य झालें आहे. त्या योगे माझ्या नांवाचा दराराही नाहीसा होअून माझे शत्रुदेखील माझे नांवाशी विषारी दात काढून टाकलेल्या सापाशी गंमतीने खेळावें तसें खेळत आहेत. माझ्या अपमानाची परमावधि म्हणजे ज्यांनी माझें राज्य घेतलें; माझ्या सिंहासनावर जे आज बसत आहेत, त्यांनीच माझा पुतळा अुभारावा! —भर महाराष्ट्रात

अभारावा ! अगदी पुण्यास अभारावा ! ज्या प्रांतात मी शाहिस्तेखानावर छापा घातला आणि अफजुल्ल्याला चिरून काढलें त्यात अभारावा आणि तसें करण्यात माझ्या शत्रूंना यत्किंचितही भीति वाटू नये !! तुम्हांवर त्याचा काही लवलेश तरी परिणाम होअील अशी धास्ती वाटू नये !!!

दगडांनो ! तुम्ही माझा या शिवाजीचा देखील अेक दगड करून टाकलात ! राखेत टाकलेली आहुति जशी निष्फळ होते, व्रतच्युताच्या तोंडी भैरवमंत्रही जसा निस्तेज होतो, प्रेताला वांधलेली तलवार जशी प्रेतासारखीच पडून राहते, तसा हा माझा ह्या पुण्यक्षयी, क्षयग्रस्त पुण्यास अुभारलेला पुतळा दगडासारखा अेक दगडच होअून पडला आहे आणि अेखाद्या साध्या दगडाची जितकी भीति वाटच्या चोरास वाटते, तितकी देखील त्या माझ्या पुतळ्याच्या दगडाची भीति त्यास वाटत नाही· कारण तुमचे हे लुळे हात, हे पंगु पाय, हीं मुर्दाड मनें ! ह्या माझ्या दगडी पुतळ्याच्या दगडाअितका देखील अुपयोग करून घेत नाहीत!!!

मग तुम्ही मला बोलाविलेत तरी का ? केवळ माझी अशी विटंवना करण्यासाठी ? ज्या प्रतापगडावर मी अफजुलखानाचें शिर टांगलें आणि शत्रूचा दहा हजार घोडा पाडाव करून वांधून टाकला – त्याच प्रतापगडाला अवघ्या दहा वारा पठाणांनी लुटावें, आणि माझ्या कुलस्वामिनीच्या मूर्तीस गदगदा हलवून सोडावें आणि त्या गडाच्या आजूवाजूस पसरलेल्या हजारो मराठ्यांनी बांगड्या भरून, लुगडीं नेसून परकी पोलिसांच्या पाया पडत फिरावें, ' ते वारा पठाण धरा ! आमची देवी लुटली !' थूः तुमच्या जिनगानीवर ! थूः तुमच्या जिनगानीवर !!

अिकडे प्रतापगडची ही अवस्था असता तुम्ही तिथे जाअून हा त्रिशत-वार्षिक शिवोत्सव – त्या प्रकारे, माझ्या मराठ्यांना शोभेल अशा प्रकारे त्या देवीच्या अपमानाचें अुट्टें काढून साजरा करावयाचा का तिकडे जुन्नरला जाअून मला अंगाअी गीतें गात वसायचें ! अरे, ह्या माझ्या महाराष्ट्राच्या अपमानास पाहून माझ्या अंगाची लाही लाही होत असता तुम्ही वायकासारख्या अंगाया गाअून का मला शांत, प्रसन्न करू शकाल ! आणखी मला पराक्रम असा कोणचा दाखविलात! होय, ती जुन्नर किल्ल्यावरची दौड ! वाः ज्या किल्ल्यावर मुलूखमैदान तोफा आहेत, शत्रूंचे झेंडे झुलताहेत, मारगिऱ्यातून आगीचा मारा चालला आहे अशा शतशः किल्ल्यावर भरधाव चालून जात जिवानिशी शत्रूंचे जीव घेणारे आणि किल्ले सर करणारे हजारो वीर ज्या म्या त्या महाराष्ट्रात पाहिले, त्या मला ह्या तुमच्या अेक गोटात देखील वरून फेकण्याची गोफण ज्या किल्ल्यावर नाही त्या किल्ल्यावर नुसतें दुडदुडत धावत जाण्याचा तो पराक्रम दाखविलात ! अशा प्रकारे तो किल्ला सर करून – पुनः तत्क्षणीच अिंग्रजांचा अिंग्रजास परत देअून मागचे पाअुली मागे फिरण्यात जो अुदारपणा दाखविलात, तो पाहून तर मी अगदी थक्कच झालो. पायात पैंजण

घालून किल्ल्यावर दुडदुड धावत जातेत तर याहूनही वहार होती ! खाली येताच लाडूचें जेवण; आणि मग ती भगव्याची मिरवणूक – तीं व्याख्यानें - माझ्यावरील तुमच्या अलोट प्रीतीचीं व्याख्यानें ! आणि माझ्या अितिहासाच्या साधनांचें भाराभर प्रसिद्ध केलेलें भारूड. वस्स, हे काय ते तुमचे पराक्रम तुम्ही मला दाखविलेत !

माझ्या देशबंधूंनो, माझें तुमच्यावर निरतिशय प्रेम आहे. ह्या माझ्या हिंदुस्थान देशासाठी आणि हिंदु जातीसाठी मी अनेकवार माझे प्राण धोक्यात घातले, जन्मच्या जन्म कष्ट काढले, म्हणूनच मला तुमचें काही चुकत असेल तर तें कडकपणे सांगण्याचा अधिकार आहे. यास्तव मी स्पष्टपणे सांगतो की, तुम्ही माझेवर प्रीति करता याचा मला मुळीच संतोष वाटत नाही. तोवर केव्हाही वाटणार नाही की, जोवर तुम्ही या माझ्या मातृभूमीच्या अुद्धारार्थ आणि हिंदु जातीच्या गोरवार्थ काही मिळवीत नाही, त्याग आणि शत्रूला धाकविणारें धाडस दाखवीत नाही, पराक्रम करीत नाही आणि नुसतीं माझीं स्तुतिस्तोत्रें गात वसता !

जें हरविलेंत तें मिळविलेंत का ? ज्या संकटाच्या कंसाने तुम्हांस बंदीत टाकलें त्या संकटाचा शिरच्छेद केला आहा का ? ज्या पूतनेने फसविलें तिची फासळी नि फासळी विदारली आहात का ? तुम्ही दासचे दासच आहात ना ? या भूमातेच्या पायात परवशतेच्या वेडया जशाच्या तशाच आहेत ना ? मग तुम्ही माझी नुसती स्तुति करीत काय वसला आहात ? त्या स्तुतीसारखी माझी दुसरी विटंबना नाही ! कारण ज्या भारतात मी शिवाजी जन्मलो तो भारत ज्याच्या हातात आहे तो मजहून, माझ्या जातीहून श्रेष्ठ ठरलाच पाहिजे. जितकी माझी अधिक स्तुति कराल तितक्या पटीने आपोआपच तो आपला विजेता अधिकाधिक श्रेष्ठ ठरत जातो. रावणाला दहा तोंडें आणि वीस हात होते म्हणून जितका अधिक गौरवाल, तितक्या अधिक पटीने त्यास जिकणारा राम अधिकतर पराक्रमी ठरणार. तेव्हा माझी खरी स्तुति करावयाची असेल तर हें भारत मुक्त करण्यासाठी, जनतेच्यासाठी तुम्ही काय केलेंत तें कळवून घेण्यास मी आलो आहे, तर तुम्ही मला शिवकालीन अितिहासाचे संशोधनात्मक भारूड घेअून सामोरे येता! अरे, शिवकालीन अितिहास मला माहीत आहे; तुम्हांला माहीत आहे त्याहून शतपटीने मला माहीत आहे. तुम्ही तुमच्या काली कोणता बंव वाजविलात तें मला सांगा. तुम्हा स्वत:ला कालच नाही की काय ? तो तुमचा काल अुत्पन्न करून तो मला वाचावयास द्या. ज्याला आपल्या स्वत:चे पौरुषानें स्वत:च्या कालाचा शककर्ता होता येत नाही, तो मुर्दाड देश, ती मुर्दाड पिढी, पूर्वजांच्याच कालाचें तुणतुणें तेवढें वाजवीत वसते. करंटाच आपल्या कोटयधीश पणजाचे नांवावर आपली पत नेहमी पटवू पाहतो. आजच्या करंटया महाराष्ट्रा, तीच स्थिति तुझी झालेली आहे ! जो अुठतो तो शिवकालीन म्हणून काही तरी खरड-

ण्यातच जन्मसाफल्य मानतो. जी कादंबरी पाह्यावी ती 'शिवकालीन', पोवाडा 'शिवकालीन', नाटकें 'शिवकालीन', पुतळा 'शिवकालीन', अितिहास 'शिवकालीन', संशोधन 'शिवकालीन!' शिवकालीन कालावाचून दुसऱ्या कोणा कालास शिवण्याची चोरी! प्रत्यक्ष मला शिवाजीला आणि माझ्या शिवकालीन पिढीला देखील या शिवकालीन स्मृतीचा अेखाद्या शिवीसारखा राग यावा तितका तिचा अतिरेक झाला आहे!

'देवा, माझ्या महाराष्ट्राच्या हितासाठी तरी आता महाराष्ट्राला माझा विसर पडू दे. माझ्या झाल्या गेलेल्या शिवाजीच्या स्मरणात गुंतलेला तो महाराष्ट्र अितका वेशुद्ध झाला आहे की, त्याला स्वत:ला देखील शुद्ध अुरली नाही. मी पूर्वीचा विगत शिवाजी त्यांना अितका आवडतो आहे की, त्यांना दुसरा अेखादा नवीन शिवाजी अुत्पन्न व्हावा ही अिच्छा देखील असह्य होते. मी, तानाजी, बाजी आणि आमचे अितर खरे खोटे लहान मोठे संवगडी जीं लहानमोठीं साहसें करीत होतो, परिस्थितीशी टक्कर देअून लाथेसरशी अुलटून पाडण्याची जी पौरुषी हाव धरीत होतो, तिची वाहवा करता करता या लोकांना पुरेसें होतच नाही. पण तसेंच लहान मोठें साहस, तशीच अेखादी पौरुषी हाव जर ह्यांच्यातीलच अेखादा धरू लागला, तर हेच लोक त्याला माथेफिरू, अत्याचारी, अराजक, वेडगळ म्हणून शिव्या हमडू लागतात. आम्ही मूठभर होतो तरी झुंजू निघालो म्हणून आमची जे लोक स्तुति करतात, तेच लोक त्यांच्यातील कोणी त्याच हेतूने झुंजू निघताच त्यांस 'मूठभर' म्हणून वेडगळ ठरवू लागतात! जो गुण आमच्या शिवकालीन कादंबऱ्यांत 'साहस' होतो, तोच प्रस्तुत कालातील अेखाद्यात दिसताच माथेफिरू अत्याचार ठरतो! आणि आमचे पाय मागे ओढणाऱ्या पण सद्धेतुक वृद्धांच्या साहसशून्य शहाणपणास जे 'शिवकालीन' वाङ्मयात दोष देतात, तेच ती साहसशून्यता यांच्या पिढीत दाखवतात व खरे शहाणे म्हणून मिरवू शकतात. फार काय सांगावें! पण आमच्या शिवकालीन आणि राजारामीय पिढीत जे काही देशभक्त जहागिरी अिनामावरच झुंजत, त्यांच्याही देशभक्तीचें यथार्थ गौरव आणि योग्य कौतुक करणारे हे लोक यांच्या पिढीत जे देशस्वातंत्र्यार्थ झुंजताना फाशीवाचून दुसऱ्या अितर कोणत्याही जहागिरीचें आमिष डोळ्यापुढे धरीत नाहीत, अशा जाज्वल्य देशवीरांनाही देशवीर म्हणावयास सिद्ध नसतात. त्यांच्यावर अेक अक्षरही लिहिणें म्हणजे असभ्यपणा होय असे समजतात आता हें मी जाणून आहे की, हा प्रभाव त्या अिंडियन पिनल कोडाचा असावा आणि जर कदाचित् त्या कोडात माझी स्मृति करणें दंडय अपराध गणला जाता, तर या शिवकालीन काळालाही त्यांच्या भीतीच्या काळोखातच तोंड खुपसून राहवें लागतें आणि आमचीही मराठी वाङ्मयात तशीच अेकेरी अुल्लेखिलेली संभावना होती की, जशी त्या वासुदेव बळवंतांची होते! त्या जाज्वल्य देशवीराचें अेक चरित्र

अलीकडेच माझे अवलोकनात आलें. त्यात न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांना कित्येक ठिकाणी सन्मानार्थ बहुवचनी अुल्लेखिलें आहे. सार्वजनिक काकांनाही अहो जाहो म्हटलें आहे. तें ठीकच आहे. तेही देशभक्त आणि त्यागी देशसेवकच होते; पण वासुदेव बळवंत फडक्यांना प्रत्यक्ष त्यांच्या चरित्रातच येथून तेथून अेकेरी अरे तुरेने संबोधिलें आहे. देशभक्तीत आणि देशसेवेसाठी केलेल्या त्यागात फडके त्यांच्या पिढीत अितके कमी प्रतीचे ठरले ! कारण त्यांनी देशहितार्थ आयुष्याच्या सायंकाळची शिळोप्याची वेळ किंवा पगाराचा अेक लक्षांश तेवढाच त्याग करण्याचा सभ्यपणा न करता आयुष्यचें आयुष्य आणि सर्वस्वचें सर्वस्व त्या देशासाठी त्यागाचे वेदीवर बळी देण्याचा हलकटपणा केला म्हणून त्यांना दीड दमडीच्या खर्डेघाशांनी देखील अरे तुरे करावी !! वासुदेव बळवंतांचें साहस अयशस्वी ठरलें; पण यश हेंच जर अहो जाहोचें अेकमात्र गमक असेल, तर माझें शिवाजीचें तरी काय ? अफजुलखानाच्या कैचीत मी सापडलो तिथे म्हणजे केवळ योगायोग होता. जर का मी मरतो, तर ह्याच जात्यावरच्या ओव्या गाणाऱ्या वाया त्या सगळ्या डावाला मूर्खपणाची पराकाष्ठा म्हणत्या—म्हणत्या, आपण होअून गाढवासारखा अफझुल्ल्याच्या तंबूत गेला ! आणि शाहिस्तेखानाच्या बंगल्यात ! रतिभर चाहूल अवेळी होती, अेक ढेकूण भलत्याच वेळी त्या सैंपाक घरातील मुसलमानांपैकी कोणास डसून जागृत करता—मी जिवंत धरलाच जातो! आणि दिल्लीस त्या पेटाऱ्यात ? ते मुसलमान मंत्री तंबाखूची पिचकारी टाकण्यासाठी जरी पुढें सरकते नि सहज जरा नुसते त्या पेटाऱ्यात डोकावते, अेखाद्या अुंदरासारखा सापडलो असतो ! केवळ योगायोग म्हणून निभावलो ! पण जर त्याच्या अुलट घडतें तर हेच ' शिवकालीन ' आजचे भाट, यशाचे भोपे, मजवर ' माथेफिरू ', ' गोंधळ्या ' ' अुल्लू ' म्हणून भुंकत सुटते ! म्हणून मला या तोंडपुज्या ' शिवकालीनांचा ' अगदी तिटकारा म्हणून येत आहे. कारण यांना पराक्रमाची पारख नाही. ते केवळ यशाचे भिंधे आहेत. त्यांना हेतूची आणि त्यागाची आणि अुत्कटतेची ओळख नाही. हे केवळ घुगऱ्या तिकडे अुदो अुदो करणारे आहेत! नाहीतर आमच्या पिढीतील वैयक्तिक पराक्रमाच्या तोडीस तोड देणारे पराक्रम आणि तेही क्वचित् आमच्या पिढीहून अेक रति अधिकच निर्भेळ अशा जाज्वल्य देशभक्तीने अुत्स्फूर्त झालेले—यांच्या ह्या स्वतःच्या पिढीत यांच्या डोळ्यासमोर घडत असताना यांना असलें देशवीरत्व, तें अजून अयशस्वी होत आहे, म्हणूनच काय तें हायकोर्ट जज्जपणापेक्षा किंवा वकीलपणापेक्षा सापेक्षतः असभ्य आणि हलकटपणाचें वाटतें ना ? दुर्लक्षार्ह भासतें ना ? आणि तेच गुण केवळ यशस्वी झाले म्हणून ' शिवकालीन पिढीत ' वर्णनीय ठरले ना ? यश ! ह्यांना अेक सैनिक पडला न पडला की, लढाजी जिंकली गेली पाहिजे; बीज टाकलें न टाकलें की, त्याचा आंबा होअून पाडास लागून अगदी आढीत पिकून यांच्या

ओठाशी आला पाहिजे. नाही तर तें बीज व्यर्थ गेलें, तो सैनिक माथेफिरूसारखा व्यर्थ मेला ! म्हणून देवा, या माझ्या ' शिवकालीन ' स्तुतिपाठांपासून माझें रक्षण कर. माझ्या राष्ट्राच्या हितासाठीच मी शिवाजी अशी विनंती करतो की, महाराष्ट्रास माझा थोडा विसर पडू दे. मी मागचा शिवाजी त्यांना अितका आवडलो आहे की, नवीन शिवाजी अुत्पन्न होण्याची अिच्छा देखील त्यांना आता असह्य होते! '

तुम्ही म्हणाल की, अेका ओसाड किल्ल्यावर दुडदुड धावून येणें, लाडूंच्या जेवणावळी झोडणें आणि माझ्या अितिहासाच्या संशोधनाचे भारूडाचा मला नैवेद्य अर्पिणें यापलीकडे या परिस्थितीत अधिक काही पराक्रम करून दाखविणें तुम्हांस अशक्य होतें – तर मी म्हणतो जोवर तुमच्या मुर्दाडपणाचें प्रतिबिंब असणारी ही परिस्थिति आहे तोवर यापुढे तुम्ही मला बोलावण्याचा मूर्खपणा तरी करू नये. हा तुमचा कार्यक्रम ज्यांच्या अुत्सवाला शोभेल अशा कोणाचा,अुदाहरणार्थ त्या पळपुट्या दुसऱ्या बाजीरावाचा अुत्सव करीत जा. त्याला किल्ल्यावर हल्ला करण्याची धमक नव्हती – त्याला तुमच्या या दुडदुड धावत जाण्यायेण्याचें देखील आश्चर्य वाटेल. परक्यांचे झेंडे आपल्या राजवाड्यावर अुडत असताही लाडूंचा नैवेद्य तो खाअील. मी अेका राज्यारोहणाच्या दिवशी तेवढा लाडूस शिवतो. तो दिवस येअील तेव्हा मला बोलवा ! सिंहाला आमंत्रण देअून त्याच्या पानात हिरव्या गवताच्या पेंढ्या सोडण्याचा मूर्खपणा तरी पदरी बांधून घेअू नका. तें आतिथ्य कोणा बैलोबाचा अुत्सव चालू करून त्याचे वाटण्यासाठी राखून ठेवा. अरे मी जर माझ्यापूर्वी होअून गेलेल्या विजयनगरच्या हरिहर बुक्कांचे नुसते शतसांवत्सरिक अुत्सव करून लाडू झोडतो किंवा त्यांच्या जन्मतिथींचा आणि लग्नतिथींच्या आणि मृत्युतिथींचा जत्र्या जुळविण्यातच जीवनास कृतार्थ मानतो तर मी हिंदुपदपादशाही स्थापू शकून त्या माझ्या पूर्वजांच्या ऋणातून मुक्त होतो का? मीही रामायण अैके. पण आजीबाअीसारखे तांदूळ घेअून जन्मभर तेंच नुसतें अैकत बसत नसे किंवा मेलेल्या रावणासच प्रतिवर्षी नाटकानाटकातून, पोवाड्यापोवाड्यातून मारीत बसत नसे. तर मी माझ्या बेळच्या जिवंत रावणास, रामायण अैकताच मारू धावे. मी अफजुल्यास मारलें, शाहिस्त्यास चिरलें, पांच पादशाह्या धुळीस मिळविल्या ! रामायण अैकताच रामासारखे पराक्रम केले. नुसत्या रावणाच्या दहा तोंडाच्या वीस मिशांस केस किती होते आणि मारुतीच्या अुड्डाणाच्या वेळी जी रेती वर अुसळली तिच्यात कण किती अुसळावे त्यांचें अैतिहासिक सशोधन करीत बसण्यातच रामायणाच्या वाचनाचें अुद्यापन केलें नाही. तर हनुमानाचे अुड्डाणाची कथा अैकताच जी तुम्हा अकर्मण्य भ्याडास, या माझ्या हिंदु जातीच्या आणि महाराष्ट्राच्या पोटी जन्मलेल्या पंगूहून पंगु पिढीस सदा भेडसावते, त्या परिस्थितीस, पायाखाली हनुमानाने जंबूमालीस

तुडविलें तसें तुडवून दहा शतकांच्या राष्ट्रीय अवनतीच्या भयंकर गर्तेच्या समुद्रावरून अुडी घेतली नि परदास्याची लंका जाळून भस्म केली.

तसें काही करा तर तुम्ही माझे नि मी तुमचा ! अरे, माझें नांव गल्लो-गल्ली गाणाऱ्या तुम्हा मुर्दाड महाराष्ट्रीयांपेक्षा आज जो माझे अुत्सव वित्सव कधी फारसे करीत नाही तो बंगाल नि तो पंजाब मला तुमच्याहून फार जवळ वाटत आहे. कारण माझ्या हिंदु जातीच्या अुद्धारार्थ माझ्या सैनिकाला शोभेल असें काही तरी साहस ते मधून मधून तरी करीत आहेत. जो माझ्या या कुलाचा, वंशाचा अुद्धार करण्यासाठी संकटावर चाल करून जाअून त्याचा शिरच्छेद करतो – तो माझा मुलगा. मग त्यास माझी नक्की जन्मतिथि कोणती तें जरी पाठ नसलें तरी चिंता नाही. पण जो माझ्या घरची अिकडची काडी तिकडे करीत नाही, तर चोर घरात वावरत असता तोंडावर वुरखा ओढून 'माझे बाबा, माझे बाबा !' 'माजा शिवाजी, माझा शिवाजी' म्हणून नुसती माझीच माळ जपत बसतो तो माझा मुलगा नव्हे. तो पोटी आलेला जंत होय !

मी विचारतो, माझें राज्य कुठे आहे ? माझा मुकुट कोठे आहे ? हें आम्हा भारतीयांचें आकाश, ही भूमि, हा समुद्र – यांवर स्वामित्व कोणाचें आहे ? का आहे ? माझ्या अंगाची लाही लाही होत आहे ! विचारू तरी किती, कसें ? – या प्रश्नांचीं, विचारलेल्यांचीं आणि न विचारलेल्यांची अुत्तरें द्या. परिस्थिति बदलली असेल, तर माझ्या मशालीने नसलें तर विजेच्या दिव्यांच्या प्रकाशाने नवीन मार्ग काढा, नवीन योजा. मी देखील काही रामाच्यासारखे धनुष्यबाणांनी लढलो नाही, मीही साधनें बदललींच पण माझ्या काळचा रावण मारला ! तुम्ही साधनें बदला. नवीन वैध पवित्रे टाका. काय वाटेल तें करा – पण झुंज जिंका ! आणि जोंपर्यंत तुम्हांस तसें काही करता येत नाही, वरील प्रश्नास अुत्तर देववत नाही, तुम्ही अेक वा अनेक शिवाजी अुत्पन्न करीत नाही, तोंवर महाराष्ट्रीयांनो, तुम्हांस माझी शिवाजीचीच शपथ आहे की, माझे पोवाडे तुम्ही गाअू नका, माझें नांव पुन्हा 'मी तुमचा' म्हणून घेअू नका. तुमच्यासारख्यांनी नव्हे तर माझ्यासारख्या

शूरमर्दाचा पोवाडा ॥ शूर मर्दाने गावा ॥

अनुस्मरणाने नव्हे, तर यथाकाल अनुसरणाने गावा.

—ता. ५ एप्रिल १९३०

✦ ✦ ✦

मनुस्मृतीतील महिला

(१)

वेदांच्या खालोखाल आपल्या हिंदु राष्ट्राचा अत्यंत पूज्य आणि आपल्या संस्कृतीचा, आचारांचा आणि व्यवहाराचा प्राचीन काळापासून आधारस्तंभ होऊन बसलेला असा जर कोणचा ग्रंथ असेल तर तो मनुस्मृति हाच होय. आपल्या राष्ट्राच्या ऐहिक आणि पारलौकिक जीवनयात्रेचें नियमन शतकानुशतकें हा ग्रंथच मुख्यत: करीत आलेला आहे. आजही कोटयवधि हिंदु ज्या निर्बंधान्वये (कायद्याने) आपलें जीवन आणि व्यवहार घालवीत आणि चालवीत आहेत ते निर्बंध (कायदे) तत्त्वत: तरी मनुस्मृतीवरच आधारलेले आहेत. मनुस्मृति हीच आजही तत्त्वत: हिंदु निर्बंध (हिंदु लॉ) आहे. मूळ तें; अितर स्मृति, सदाचार वा रूढि त्याचाच विस्तार आहेत वा असला पाहिजे असा आपला हिंदु निर्बंधशास्त्राचा सुप्रतिष्ठित संकेत आहे. ' वेदार्थोपनिबद्धत्वात्प्राधान्यं हि मनो: स्मृते:। मन्वर्थ-विपरीता तु या स्मृति: सा न शस्यते ॥ ' असें स्मृतिकार बृहस्पतिही म्हणतात.

हा ग्रंथ जसा पूज्य तसा प्राचीनही आहे. त्याच्या निश्चित कालासंबंधी निर्णय लागलेला नाही हाही अेका अर्थी त्याच्या प्राचीनत्वाचाच पुरावा आहे !

आमच्या या निबंधापुरतें अितकें सांगणें पुरें आहे की, आज जें पुस्तक मनुस्मृति म्हणून आपल्यापुढे आहे त्यातही काही भाग फारच प्राचीन – अिसवी सनापूर्वीच्या आठव्या शतकात म्हणजे अुण्यापुऱ्या अडीच हजार वर्षांपूर्वीचा आहे; आणि हे बहुतेक पुस्तक जवळ जवळ दोन हजार वर्षांपूर्वीचें आहे. रामायण, महाभारताचा अुल्लेखही त्यांत शोधता सांपडणें कठीण पडतें !

आपल्या पंजीच्या पंजीची दोनशावी पंजी ! !

अशा या आपल्या हिंदु राष्ट्राच्या पूज्य आणि प्राचीन स्मृतीत, कायद्याच्या पुस्तकात, निर्बंधग्रंथात, त्या प्राचीन काळीं आपला स्त्रीसमाज जीवन कसें घालवी, काय शिके, काय जेवी, कसा वागविला जाअी, कसा वागे, त्याचे अधिकार काय असत, कर्तव्यें काय असत, समाज स्त्रीविषयी काय म्हणे, कन्येची स्थिति काय असे, मातेची काय, पत्नीची काय याविषयी मिळणारी माहिती ही आजच्या अेकंदर स्त्रीवर्गासही आकर्षक आणि अुद्बोधक वाटल्यावाचून राहणार नाही. आपल्या पंजीच्या पंजीची दोनशावी पंजी ! – तिचें नांव काय असे, तिची मुंज केव्हा होअी, तिचें लग्न कसें होअी, श्राद्धाच्या दिवशी ती सैंपाक काय करी, तिची मुलें तिला नमस्कार कसा करीत, ती आशीर्वाद कसा देअी, तिला नवरा कसा

वागवी, तिच्या शेजारपाजारच्या आयाबायांचीं बोलणीं काय चालत, त्यांची चाल-चालणूक कशी असे, पुत्र व्हावा म्हणून त्यांना किती तळमळ वाटे, वंशाची वेली खुरटू नये म्हणून पुत्रप्राप्तीस्तव त्या काय काय अुपाय करीत, पतिनिधनानंतर वैधव्यात दिवस कसे काढीत, का पुन्हा विवाह करीत, त्यांना कोणी टोचून बोले की काय, त्यांची दागिन्याबिगिन्यांची पेटी किती मोठी असे ! –आपल्या पंजीच्या पंजीच्या दोनशाव्या पंजीच्या प्रेमळ घरी जाअून तिला अशी ममतेची मनोमय भेट देणें आणि डोळे भरून नसली तरी मन भरून पाहून येणें कोणासही कौतुकावह समाधानाचेंच वाटणारें आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांना तर दोन अडीच हजार वर्षांपूर्वीच्या हिंदु स्त्रीवर्गाच्या जीवनाचें यथावत् प्रत्यक्ष दर्शन घडविणारा –मनुस्मृति हा अेकच चित्रपट आहे. चित्रपटाची कला नव्हती तेव्हाही जेव्हाच्या तेव्हा यथावत् अंकण करून राखलेला खराखरा अैतिहासिक चित्रपट आहे !

महाराष्ट्र वाचकांसाठी आम्ही, यास्तवच, त्या पूज्य नी प्राचीन चित्रपटातील, 'मनुस्मृतीतील महिला' नावाची ही अेक 'चित्रावली' (फिल्म) स्त्री मासिकाच्या पडद्यावर दाखवीत आहो.

आपल्या अर्वाचीन स्त्रीविषयक भावभावनांच्या रंगाचे शितोडे कळत न कळत त्यांवर अुडून त्यांचें निर्भेळ अैतिहासिक स्वरूप लोपण्याची भीति मुळीच अुरू नये म्हणून आम्ही हीं शब्दचित्रें आमच्या शब्दांत न देता थेट मनुस्मृतीच्याच शब्दांत देणार आहोत. मनुस्मृतीतील श्लोकच शक्यतो प्रथम देअून मग आम्हांला काही विशेष सांगावयाचें तर तें स्वतंत्रपणे त्या त्या स्थळी वेगळें करून अुल्लेखू मूळ श्लोक पुढे असले म्हणजे आमच्याहून वेगळा अर्थ वा अनुमान कोणास सुचलें. वा रुचलें तर त्यासही या व्यवस्थेने तेंच अंगीकारणें अधिक सोयीचें होअील.

अपौरुषेय, त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य 'धर्मशास्त्र' म्हणून नव्हे,

तर बुद्धिमीमांस्य अशी केवळ अैतिहासिक माहिती म्हणून !

या लेखमालेच्या आरंभी आणखी काही विधेयांस अुल्लेखिणें अवश्य आहे. मनुस्मृति हें आपल्या हिंदु समाजाचें आजही तत्त्वतः तरी पुष्कळ अंशी प्रमाणभूत मानलें जाणारें 'धर्मशास्त्र' आहे. 'धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः' यात आजच्या प्रतिभापेत फोड करून सांगायचें म्हणजे, निर्बंध (कायदा) आणि आचार या दोन्हींचा समावेश असतो. पुरातन धर्मरचनेप्रमाणे हीं दोन्ही सारखींच अनुल्लंघ्य मानलेलीं असतात. आणि मनुस्मृतीत सांगितलेलें हें धर्मशास्त्र त्रिकालाबाधित नि अपरिवर्तनीय आहे असें समजलें जातें. त्यातही मनुस्मृतीची प्रतिज्ञाच आहे की, वेदाबाहेर ती काहीही सांगत नाही. ती स्पष्टपणे म्हणते,

यः कश्चित्कस्यचिद्धर्मो मनुना परिकीर्तितः ।
स सर्वोऽपि हितो वेदो सर्वज्ञानमयो हि सः ॥ –अ. २ : ७

या वेदबाह्याः स्मृतयो याश्च काश्च कुदृष्टयः ।
सर्वास्ता निष्फलाः प्रेत्य तमोनिष्ठा हि ताः स्मृताः ।।
—अ. २ : ९५

वेद अपौरुषेय आहेत नि जें वेदात सांगितलें तेंच मनुस्मृतीत; अर्थात् तें धर्मशास्त्रही अपौरुषेय आज्ञांसारखेंच त्रिकालाबाधित नि अनुल्लंघ्य आहे अशी पुरातन विचारसरणी, ही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रवृत्ति थेट मनुस्मृतीच्या कालापासूनच चालत आलेली आहे. मनुस्मृतीचें म्हणणें हें की, तीत जें धर्मशास्त्र सांगितलें तें अनुल्लंघ्य का, ग्राह्य का, तर तें श्रुतीला धरून आहे म्हणून ! – अुपयुक्त आहे की नाही, कोणच्या परिस्थितीत तें अुपयुक्त, अेखाद्या परिस्थितीत तें अनुपयुक्तच नव्हे तर चक्क हानिकारक ठरलें तर पालटावें वा गाळावें कीं नाही, हें सारें प्रश्न दुय्यम, नव्हे अुपमादर्शक ! तशी चर्चा, मीमांसा, हीही संशयार्थ, तरी सर्वस्वी निषिद्ध ! श्रुतीत आहे म्हणूनच तें अनुल्लंघ्य, त्रिकालाबाधित, तेंच स्मृतीत म्हणून तीही अनुल्लंघ्य, अमीमांस्य. हा स्वतः मनुस्मृतीचाच स्पष्ट दंडक आहे. आम्ही वर दिलेल्या वचनांसह हीं खालील वचनें वाचावीं.

श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः ।
ते सर्वार्थेष्वमीमांस्ये ताभ्यां धर्मो हि निर्बभौ ।। १०
योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद् द्विजः ।
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः ।। ११
—अ. १

आपल्या प्राचीन परंपरेप्रमाणे तरी जी आद्य स्मृति मानली जाते आणि जी प्राचीन तरी आहेच आहे, त्या स्मृतीतही ही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रवृत्ति तशी स्पष्टपणे अभिमानपुरस्सर अंगीकारिली असता प्रा. आळतेकरांसारखे काही विद्वान् ती मुसलमानी कालापासून काय ती अंगीकारली गेली असें 'केसरी' सारख्या पत्रातून म्हणतात तरी कसें हें कळत नाही. ती प्रवृति चांगली कीं वाअीट, ती ठेवूनही सुधारणा झाल्या की नाही, तिचे परिणाम हितावह झाले कीं अहितावह हे प्रश्न अगदी स्वतंत्र आहेत. ही प्रवृत्ति आपल्या अेकंदर धर्मशास्त्राची आभारस्तंभ होती कीं नाही हा प्रश्न आहे; आणि आम्ही सुधारक मंडळी त्या त्या प्रवृत्तीच्या अस्तित्वाची साक्ष देतो, त्याहून शतपट अधिक प्रबळतेने आमच्या लक्षावधि सनातन शास्त्री मंडळींचीही साक्ष या प्रकरणी आमच्याच वाजूला पडणारी आहे. कारण श्रुतींत जें आहे तें स्मृतीत आहे म्हणूनच तें अनुल्लंघ्य धर्मशास्त्र होय. तेंच स्मृतींत नि तेंच पुराणात आहे. त्यात सुधारणा होणेंच शक्य नाही; कारण तें मुळी 'असुधारणीय' 'अपरिवर्तनीय' आहे ! ही प्रतिज्ञाच जो नाकारील तो मुळी सनातनीच होअू शकत नाही !

धर्मशास्त्र म्हटलें म्हणजे तें वर दिलेल्या ह्या 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' भावनेनेच वाचावयाचें अशी ही समजूत अजूनही बहुसंमत असल्याने आम्ही ह्या लेखात स्त्रीवर्गाविषयी मनुस्मृतीचे कायकाय दंडक आहेत, त्या प्रकरणी ती काय म्हणते, तें स्पष्ट करण्यासाठी तीतील वचनें जीं देणार आहोत तीं त्याप्रमाणेच आजही स्त्रीविषयक विचारांचें नि आचारांचें, अधिकारांचें नि कर्तव्यांचें नियमन झालें पाहिजे अशा बुद्धीनेच देत आहो की काय असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. अुलटपक्षी ते दोन अडीच हजार वर्षांपूर्वीचे त्या काळात बरे वाटलेले, अत्यंत अुत्कृष्ट वाटलेले आचार वा विचार महिलावर्गाचें आजही तसेच्या तसें नियमन करण्याच्या कार्यी किती अप्रयोज्य, असमर्थ नि अपायकारक आहेत हेंच दाखविण्यासाठी आम्ही तीं वचनें अिथे देत आहो असेंही पुष्कळांस वाटू शकेल. पण या लेखात आमचा तसें काहीही सिद्ध करण्याचा हेतु नाही. मनुस्मृतीच्या काळी महिला वर्गाविषयी काय कल्पना, भावना नि दंडक असत ही नुसती वस्तुस्थिति काय ती दाखविण्यासाठी हा लेख लिहिला आहे. मनुस्मृतीतील तीं वचनें अनुल्लंघ्य दंडक म्हणून आजही तसेंच वागणें अवश्य आहे, श्रेयस्कर आहे, म्हणून आम्ही देत नाही. मनुस्मृतीस धर्मशास्त्र म्हणून न मानता तो अेक त्या काळचें आमचें समाजचित्र दाखविणारा सामाजिक अितिहासग्रंथ आहे—याच नात्याने काय तो या लेखात आम्ही त्याचा अुपयोग करणार आहोत. मनुस्मृतीतील महिला कशी होती? तर अशी, अितकेंच हा लेख सांगतो. ती तशी होती हें चांगलें का वाअीट, ती आजही तशीच असावी की काय, अित्यादि प्रश्नांचा अूह त्याच्या कक्षेत मुळीच पडत नाही. दुसरें असें की, अनुल्लंघ्य धर्मशास्त्र असें आम्ही मनुस्मृतीस जें मानीत नाही तें त्या थोर ग्रंथाविषयीची मान्यता लोकात कमी व्हावी म्हणून नव्हे, तर ती अुलट केव्हाही वास्तविक आहे त्याहून कमी होअू नये म्हणूनच होय.

आपल्या वेदस्मृतिप्रभृति महान् ग्रंथांची योग्यता अितकी मोठी आहे की, तिला टिकविण्यासाठी ते ग्रंथ अपौरुषेय वा त्रिकालाबाधित वा सर्वज्ञ आहेत अशा काहीच्या बाहीच अर्थवादाचें वा व्यर्थवादाचें स्तोम रचणें, हिमालय पर्वत डगमगू नये म्हणून त्याच्या पायथ्याला बांबूचे टेकू अुभारण्याअितकेंच अनवश्यक, अनिष्ट नि हास्यास्पदच व्हावें! अितकेंच नव्हे तर त्यांस, ते आहेत तसेच, पौरुषेय परिस्थितिसापेक्ष, त्या काळच्या भावभावना, नियमनिर्बंध, आचारविचार प्रदर्शविणारे आमचे प्राचीन धर्मग्रंथ या दृष्टीनेच संबोधण्याने त्यांच्याविषयीची पूज्यता चिरकाल टिकू शकते, जगन्मान्य राहू शकते. त्यांस आपण मूर्ख अट्टहासाने—त्रिकालाबाधित मानलें नाही तरच त्यांची मान्यता त्रिकाली अबाधित राहील!

ज्या वेळी कोणी राजांचे खरोखरच महाराज होते त्या वेळी त्यांना महाराज ही शोभत असलेली पदवी, ते स्वतःच दुसऱ्यांचे मांडलिक झाले असताही यथार्थपणे

जशी आचरून दाखविता येत नाही, आज मांडलिक असताही जुन्या महाराजपणास गाजवू जाता जशी त्या पदवीची अुलट विटंवनाच होते, आणि मांडलिक झालेल्या परिस्थितीत महाराज म्हणवून घेण्यात तो मनुष्य महाराज न होता तो महाराज शब्द मात्र मांडलिक या शब्दाचा पर्याय होअून वसतो, तशीच केविलवाणी स्थिति प्राचीन परिस्थितीत अनुल्लंघ्य धर्मशास्त्रत्व पावलेल्या, त्या काळी सर्वज्ञ वाटलेल्या या पूज्य ग्रंथास आजच्या काळीही अनुल्लंघ्य धर्मशास्त्र, त्रिकालावाधित निर्वंध-ग्रंथ, 'सर्वंज्ञानमयो हि सः' अशा स्तोमाने जगात मिरविलें असता या ग्रंथाचीही झाल्यावाचून राहत नाही. वेद काय, मनुस्मृति काय, कुराण-वायवल अवेस्ता-तौलिद हे ग्रंथ पौरुषेय मानले असता त्यांच्या कर्त्याविषयी, त्या परिस्थितीत त्यांनी केवढी प्रगति केली तें पाहून, कितीतरी जनहित साधलें तें ध्यानी येअून, आश्चर्याने मन थक्क होतें; योग्य तो आदर वाटल्यावाचून राहत नाही; आणि त्यांच्यात अपुरेपणा दिसतो तो अगदी क्षम्यच नव्हे, तर अगदी मनुष्यसुलभ नि साहजिक वाटू लागतो. त्यामुळें त्यांची योग्यता मुळीच कमी वाटत नाही. पण या वेद-अवेस्तांस, कुराण-पुराणांस, तौलिद-वायवलास अीश्वरी आदेश म्हटलें, अक्षर नि अक्षर त्रिकालाबाधित सत्य, अनुल्लंघ्य, अीश्वरी आज्ञा म्हटलें की त्यायोगे त्या ग्रंथांना तें अीश्वरीय पूर्णत्व येण्याचे ठायी अुलट अीश्वरासच अेखाद्या मनुष्यासारखें स्खलनशील दुर्बलत्व चिकटविलें जातें; तो ग्रंथकर्ता मनुष्य अीश्वरप्रेषित होण्याच्या ठायी अीश्वरच मनुष्य होअून वसतो! आणि ते ग्रंथही अुपहासास्पद बनतात, हानिकारक होतात!! हें कसें होतें तें ध्यानात येण्यासाठी या 'मनुस्मृतीतील महिला' नांवाच्या प्रस्तुत लेखमालेलाच अगदी तंतोतंत लागू पडेल असे या मनु-स्मृतीतीलच अेका लेखाचें उदाहरण घेअू.

स्त्रियांचीं नांवें कशीं असावींत आणि कशीं नसावींत?

कोणत्या कन्यकेशी विवाह करणें अुत्तम पक्ष यासंबंधी विवेचन करताना अध्याय तीनमध्ये ९, १० या श्लोकांत स्त्रियांचीं कोणचीं नांवें अुचित तेंही मनु-भगवानांनी सहजगत्या अुल्लेखिलें आहे.

नर्क्षवृक्षनदीनाम्नीं नान्त्यपर्वतनामिकाम् ।
न पक्ष्यहिप्रेष्यनाम्नीं न च भीषणनामिकाम् ॥ (उद्वहेत्) ९
अव्यंगांगीं सौम्यनाम्नीं हंसवारणगामिनीम् ।
तनुलोमकेशदशनां मृद्वङ्गीमुद्वहेत्स्त्रियम् ॥ १०

—अ. ३

नक्षत्रें, वृक्ष, नद्या, पर्वत, सर्प, सेवक आणि भीषणता यांचे वाचक असें नांव असलेली कन्यका विवाहास अयोग्य होय. जिचें नांव सौम्य आहे तिच्याशी विवाह

करणें युक्त, हा या श्लोकांचा भावार्थ आहे. अेक साधें अुपदेशवचन म्हणून वाचलें तर या सूचनेचा काही विषाद वाटत नाही. स्त्रियांचीं नांवें भीषण नसावीं तर त्यांचे विशिष्ट गुण जे वत्सलता, कोमलता, मार्दव ते सहज व्यक्तवितील अशींच 'सौम्य' नांवें कन्यकांचीं असावीं ही सूचना किती गोड आहे! मनूसारख्या तत्त्वज्ञ राजर्षीने धर्मशास्त्रासारख्या गंभीर ग्रंथास रचतानाही कोमल आणि सुंदर भावांची सुद्धा अशी विचारपूस करावी आणि लोकांस अितक्या बारीकसारीक प्रकरणीही सौम्य सूचना देण्यास विसरू नये याचें किती कौतुक वाटतें! आजही आपण भगवान् मनूंची ही सुंदरतेची आवड पुरवून आपल्या कन्यकांचीं सौम्य नांवें ठेवलीं असता तें किती शोभून जाअील, असेंही वाटल्यावाचून राहत नाही. बरें, त्या श्लोकांत अशीं नदी, पर्वत, भीषणता प्रभृतिवाचक नांवें असलेल्या कन्यकांशी विवाहच करणें अयुक्त हें जें कडक चरण आहे त्याचेंही, हे श्लोक अैतिहासिक दृष्टीनेच वाचले असता फारसें वावडें वाटत नाही. कारण मनुस्मृतीच्या त्या काळी पाप लागेल, नरकात पडाल, अित्यादि वाक्यें निषेधाचे ठरलेले पर्याय होते. आजही आअी मुलास जशी दिवसातून दहादा 'मेल्या' म्हणून चट्कन् म्हणून जाते, पण त्या शब्दांचा अर्थ तसा शब्दशः घेण्याचें तिच्या वा आपल्या स्वप्नांतही येत नाही. तसेंच ती त्या वेळची बोलण्याची अेक चाल-ढव होती, असें समजून आपण तें आज अुपेक्षणीय समजलें की झालें असा न सांगता सरळ अर्थ लागून ते श्लोक कौतुकास्पद वाटतात. अेका प्राचीन पूज्य ग्रंथकाराने सहजगत्या दिलेली नि त्या काळच्या लोकांस विशेष लागू पडणारी अेक गोड सूचना अशा अैतिहासिक दृष्टीने ते श्लोक वाचले तर!

पण जर का मनुस्मृतीतील शब्द नि शब्द त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य, म्हणजेच 'सनातन' धर्म म्हणून हे दोन साधे श्लोक आचरावयाचे असतील तर घरोघरी केवढा अनर्थ कोसळेल! आणि तोही सुधारकांच्या घरोघर नव्हे, तर सनातन बंधूंच्याच! कारण या प्रकरणीं मनुस्मृतीचा दंडक सुधारकच अधिक पाळतात. त्यांच्यात बहुधा कन्यकांचीं नांवें वत्सला, शालिनी, मंजुला अशी 'सौम्य असतात. पण मनुस्मृतीस शब्दशः त्रिकालाबाधित मानणाऱ्या 'सनातन' मंडळींतच मनूच्या या श्लोकांस पायाखाली तुडवून, नव्हे मनूंना आवडतात तींच नांवें ठेवणें छछोरपणा समजून आणि मनूने ठेवू नयेत म्हणून जीं नांवें सांगितलीं तींच धर्मानुकूल समजून बहुधा ठेवण्यात येतात. मनू म्हणतात, नद्यांचीं नांवें कन्यकांना ठेवणें अितकें पाप आहे की, यायोगे ती कन्यका वरण्यालादेखील निषिद्ध होते. पण आमच्या सनातनबंधूंच्या घरोघर गंगा, गोदावरी, सिंधु, कृष्णा, कावेरी, नर्मदा, यमुना, दुथडी भरभरून वहात आहेत! नक्षत्रनामें मनु अशींच ग्रह्य मानतात. पण आमच्या घरादारांत 'रोहिणी' दिवसाढवळ्या देखील सारख्या चकाकत आहेत! त्यांतही ज्यांना 'रात्रि' हें नांवच यथार्थ भासावें अशा काळच्या कुळकुळीत कन्यकां-

नाही 'तारे' म्हणून हाक मारून कळत न कळत त्या विचाऱ्यांचा निष्कारण अुपहास होत आहे आणि गोऱ्यापान मुलींना 'कृष्णे' म्हणून संबोधण्यात येत आहे! मनूसारख्यांच्या वेदाभ्यासकठोर श्रुतीलाही ललनांचीं ललित नांवें येता जाता अैकावीशीं वाटतात, पण त्यांच्या शब्दान्‌शब्दास अनुल्लंघ्य मानणाऱ्या या कट्टर सनातन्यांच्या घरी पाय ठेवण्याचा अवकाश की 'अक्का, दगडे, धोंडे, भिके, भिमे!' अशी अेकच हाकाहाक चालू झालीच म्हणून समजावें!

वृक्षांचीं नांवें कन्यकांना ठेवू नयेत म्हणून मनुभगवान् लिहितात तरीही त्यात फारसें स्वारस्य नसल्याने सुधारक तिकडे दुर्लक्ष करण्यास मोकळा आहे. जे धिप्पाड वा नीरस वा लालित्यहीन वृक्ष त्यांचीं नांवें ललनांना शोभत नाहीत हें खरें. मुलीला अे पिंपळे ! अे निवडुंगे! अे पोफळे ! अशीं नांवें शोभणार नाहीतच. पण कोमल कन्यकांना चंपा, जाअी, जुअी, मालती, गुलाव, हीं नांवें निदान त्या फुलांचीं नांवें म्हणून तरी, शोभूनच जातात. तसेंच नद्यांचीं कोमल वर्णाचीं असतील तर यमुना, सिंधु, गंगा, गोदा हीं नांवें मनूने त्याज ठरविलीं म्हणूनच आम्हीही त्याज्य मानण्याचें काहीही कारण नाही. तारा, रोहिणी, चंदु, अिंदु हीं नांवेंही तशा गोऱ्या, चुणचुणीत नि सुरेख मुलींना ठेवणें हें आल्हाददायकच भासतें. अर्थात् मनु भगवानांची व्यक्तिशः अेक साधी आवड या दृष्टीने या दोन श्लोकांत अुगीच ओझरतें वाचून पहाणाऱ्या सुधारकांसच काय ती ही निवड करणें शक्य आहे.

परंतु मनु शब्दशः आजही मानीत नाहीत म्हणून सुधारकांना पाखण्ड म्हणणाऱ्या सनातनी बंधूंना मात्र ही निवड करणें शक्य नाही. त्यांनी आजच्या आज मनुस्मृतीच्या ह्या स्पष्ट निवडक आज्ञेचें पालन करण्यासाठी गगा, गोदा, कृष्णा, भागीरथी, रोहिणी, चंपा, दगडी, धोंडी, भिकी प्रभृति सारीं नावें पालटून या साऱ्यांची वारशीं पुन्हा केलीं पाहिजेत. या श्लोकांना अक्षरशः त्रिकालाबाधित मानताच याच्याहीपेक्षा जो मोठा अनर्थ ओढवणारा आहे तो हा की, मनुस्मृतीप्रमाणे ज्या मुलींचीं अशीं निषिद्ध नांवें अेकदा ठेवलीं गेलीं त्या जन्मभर लग्नाला निषिद्ध ठरतात ! ! वारशास झालेली चूक त्यांच्या वाराव्यापर्यंत पुरून अुरणारी आहे ! नदी, वृक्ष, नक्षत्र, भीति प्रभृतिवाचक नांव असणाऱ्या कन्येस 'नोद्वहेत्!' वरू नये ! क्षय, व्यंग, खूळ प्रभृति अवरणीय कन्यादोषांतच मुलीचें असें निषिद्ध नांव पडलेलें असणें हाही दोष मनुस्मृतीने असा अेका पंगतींत बसवून त्यांना अेकच समान दंड सांगितला आहे – नोद्वहेत्! म्हणजे साऱ्या अुपवर गंगा, गोदा, भागीरथींचे प्रीतिजीवन आजचे आज आटून जाणार ! साऱ्या अुपवर ज्योति मावळणार ! चंपावतीची आशा जळून खाक होणार ! आमच्या भिमीलाच काय धोंडीला सुद्धा पाझर फुटून त्या धायधाय रडू लागणार ! अशीं नांवें विशेषतः महाराष्ट्रात घरोघर असल्यामुळे आजच्या अुपवर कन्यकांची ही पिढीची पिढी, वोहल्यावर चढता चढता अकस्मात् खाली ओढली जाअून, आजन्म अधवतेच्या खाअीत ढकलली

जाणार ! जर मनुभगवंतांचा प्रत्येक श्लोक अनुल्लंघ्य धर्माज्ञाच मानणें असेल तर! अितकेंच नव्हे तर अशीं नांवें असणाऱ्या आमच्या सहस्रावधि माता-भगिनींचीं झालेलीं लग्नेंही अधर्म्य ठरणार ! !

आणि हा सर्व अनर्थ कां ? त्या बिचाऱ्या अनागस कुमारींनी, कन्यकांनी वा विवाहितांनी स्वतः काही घनघोर अपराध केला म्हणून ? नव्हे ! त्यांच्या वारशास त्यांच्या आअीबापांनी त्यांचीं नांवें भिमी वा धोंडी, कृष्णा वा कावेरी ठेवलीं म्हणून! म्हणून त्यांना कोणीही वरू नये. त्यांचा रंग काळा कीं गोरा, रूप चांगलें वा वाअीट असणें हें जसें त्यांच्या हातचें नव्हतें तसेंच, आपलें नांव काय असावें हेंही वारशाचे दिवशी त्यांच्या हातचें नव्हतें, पण त्यांच्या आअीवापांच्या चुकीसाठी आजन्म अविवाहित राहण्याची शिक्षा मिळणार त्या अनपराधी कन्यकांना ! — नोद्वहेत् ! !

आणि अशीं नांवें ठेवण्यात आअीबापांची तरी अेवढी कोणती मोठी गळा घोटणारी चूक झाली ? नांव तें काय आणि शिक्षा कोणची ? भिमी नांव असलें तर त्याचें भामा करून टाका ! ही साधी सूचना करायची का क्षयी, व्यंगी,चोरटी, हत्यारी कन्यका वरू नये म्हणून सांगणाऱ्या महादोषातच, अेखादें चंपी, रोहिणी, गंगा-यमुना प्रभृति नुसतें नांव असणें हाही तसाच महादोष समजून तें नांव बदला असा अगदी सोपा अुपाय न सांगता, त्या कन्यकेसच 'नोद्वहेत्' म्हणून अेकदम धर्माज्ञा सोडायची ? मनुष्यस्मृतीची ही काय विवाहव्यवस्था कीं वैधव्यव्यवस्था ?

सनातनी भाष्य आमच्या श्रुतिस्मृतींना हास्यास्पद करून सोडतें तें असें !

कन्यकांचीं नांवें कशीं असावीं ही साधी सूचना सहजगत्या सांगणारे हे श्लोक अैतिहासिक दृष्टीने वाचले असता त्या प्राचीन ग्रंथकाराच्या ललितरुचीविषयी आपणांला कौतुक वाटतें, तेच मनुस्मृतीतील शब्द त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य, धर्म-शास्त्र होय म्हणून सनातनी दृष्टीने वाचू जाता किती हेकड नि भाकड ठरतात हें वरील अुलगडचावरून काहीतरी स्पष्ट होईल असें आम्हांस वाटतें. जी ह्या श्लोकांची दुर्गति तीच मनुस्मृतीतील शेकडो श्लोकांची हा सनातनी दृष्टिकोन करून सोडतो. त्या प्राचीन नि पूज्य ग्रंथाचें नसतें स्तोम माजविण्याचा मूर्खपणा, त्या ग्रंथाचे पदरीही नसता मूर्खपणा बांधून त्यास अगदी हास्यास्पदच नव्हे तर आजच्या प्रगतीसही अुपद्रव करून ठेवतो ! यास्तव त्या ग्रंथाची ही हेटाळणी होअू नये म्हणूनच, त्याची खरी योग्यताही अुणी होअू नये म्हणूनच आणि त्या प्राचीन नि पूज्य धर्मशास्त्रविषयाची आपणांस जी यथायोग्य पूज्यता वाटावयास हवी तीही निष्कारण अुणावली जाअू नये म्हणूनच आम्ही त्या मनुस्मृतीतील तत्कालीन महिला वर्गाची परिस्थिति दाखविणारीं वचनें ह्या लेखमालेत 'आजही अनुल्लंघ्य असणारें धर्मशास्त्र' म्हणून देत नसून मनुस्मृतीचे काही स्त्रीविषयक दंडक,

निर्वध, भाव आणि भावना अशा अशा असत अेवढी नुसती माहिती देण्याच्या बुद्धीनेच काय तीं देत आहोत. परंतु तीं सर्व केवळ अैतिहासिक दृष्टीनेच काय तीं वाचलीं जावीं हा आमचा अनुरोध (शिफारस) असला तरी ज्या कोणास तीं धार्मिक वा भाविक निष्ठेने वाचावयाचीं असतील त्यांनाही अडचण पडू नये म्हणून आम्ही ते मूळ श्लोकच अनुक्रमे देऊन त्यापुढे त्यांचा सरळ भावार्थ देऊ. जिथे कुठे त्याविषयी आम्हांस विशेष अुल्लेख करावासा वाटेल तिथे तो आमचा म्हणून निराळा देऊ. स्मृतीतील श्लोकांतच तिच्या शब्दाची वा अर्थाची ओढाताण करून तो दडपू पाहणार नाही.

या लेखमालेच्या हेतूचा विपर्यास होऊ नये म्हणून आणि यांतील सर्व श्लोक कोणत्या कसोटीने पारखले जावे तें प्रत्येकी वेगळें सांगत बसण्यापेक्षा कोणत्यातरी दोन तीन श्लोकांस ती कसोटी लावून बाकीच्यांनाही ती तशीच लावावी असा सर्वसामान्य अनुरोध (शिफारस) करण्यानेच काम भागावें म्हणून हा प्रास्ताविक लेखांक लिहिल्यानंतर आता पुढील लेखात स्त्रीवर्गाविषयीचे मनुस्मृतीतील ते अत्यंत अुद्‌बोधक नि आकर्षक श्लोक अनुक्रमाने दिले जातील.

✦ ✦ ✦

(२)

पहिल्या लेखांकात ह्या लेखमालेच्या भूमिकेविषयी जें विवेचन केलें त्याच्या अनुसंधानापुरता अितका सारांश सांगणें अवश्य आहे की, आम्ही यापुढे मनुस्मृतीतील जे श्लोक देणार आहोत ते त्रिकालाबाधित किंवा अनुल्लंघ्य नियम म्हणून नसून मनुस्मृतीच्या काळी आपल्या महिलावर्गाची स्थिति कशी होती ह्याचें अेक अैतिहासिक वृत्त म्हणूनच होत. त्या काळी आपल्या समाजात जे नियम नि निर्बंध (कायदे) अुचित वाटले, हितकारक वाटले, पण केवळ अेवढ्यासाठी ते आजही अुचित वा हितकारक असलेच पाहिजेत असें म्हटल्याने त्यांतील अनेक नियम नि निर्वध निष्कारण हास्यास्पदतेस तरी पात्र होतात किंवा समाजहानीस तरी कारण होतात, जसेच्या तसे स्वीकारले तर. आणि आजच्या परिस्थितीस हितकारक व्हावा असा त्यांच्यातून अर्थ काढण्याची नसती सक्ती केली तर त्या श्लोकांची कुतरओढ होऊन अेकेका श्लोकाचे अर्थ अकरा भाष्यकार करतात अकरा प्रकारचे! मिळून पुन्हा अेकवाक्यता होत नाही ती नाहीच. यास्तव हे श्लोक केवळ अैतिहासिक दृष्टीनेच वाचावे. आजच्या परिस्थितीतही त्यांत किती तरी हितकारक सापडेल. तें हितकारक म्हणून अनुसरावें. अनुल्लंघ्य शास्त्र म्हणून नव्हेच आणि जें

आज हानिकारक वा हास्यास्पद वाटेल तें आज अनुसरू नये – पण तेवढ्यासाठी ही स्मृतीची स्मृति हानिकारक वा हास्यास्पद असली पाहिजे अशी भलतीच समज करून न घेता, अुलट त्या काळच्या ज्या अितर संस्कृतींचे धर्मग्रंथ आज अुपलब्ध आहेत त्या बाबिलोन, अिजिप्त, ज्यू, ग्रीक, रोमन प्रभृति, प्राचीन थोर थोर धर्मग्रंथांशी नि निर्बंधग्रंथांशी तुलना करता आमची ही प्राचीनतम स्मृति अग्र-पूजेच्या मानास सर्वथैव पात्र आहे; आमच्या हिंदुराष्ट्राच्या त्या काळच्या जगास आश्चर्याने थक्क आणि पराक्रमाने कंपित करणाऱ्या अुत्तुंग, प्रबळ राजप्रासादाच्या पायाचा तो पूजनीय अवशेष आहे, अशाच सादर ममत्वाने त्या प्राचीन स्मृतीची स्मृति आम्ही सन्मानिली पाहिजे. ही झाली हे श्लोक वाचण्याची आमची ऐतिहासिक दृष्टि.

परंतु जर कोणास ते श्लोक अनुल्लंघ्य, त्रिकालाबाधित धर्मशास्त्र म्हणूनही अभ्यासिणें असेल तर त्यासही त्यांचा तसा अभ्यास करता यावा यास्तव आम्ही मूळचे श्लोक नि त्यांचा भावार्थ कोणतीही मल्लीनाथी मध्येच न घुसडता देणार आहो. आम्हांस जर काही विशेष सुचवावयाचेंच तर तें श्लोकाखाली कंसामध्ये वेगळे लिहून सुचवू.

जिला म्हणतात मनुस्मृति ती आहे भृगुस्मृति

आज मनुस्मृति म्हणून जो ग्रंथ आपणांशी आहे तो मनुभगवानांनी रचलेला नसून त्यांनी पूर्वी जें शास्त्र सांगितलें त्यांतील भृगुऋषींना जें स्वतःस आठवलें तें त्यांनी स्वतःच्या शब्दांत त्या ग्रंथात ग्रंथिलें असें प्रथमाध्यायातच स्पष्टपणे सांगितलें आहे.

यथेदमुक्तवाञ्छास्त्रं पुरा पृष्टो मनुर्मया ।
तथेदं यूयमप्यद्य मत्सकाशान्निबोधत ॥ ११९

—अध्याय १

प्रत्येक अध्यायाचें शेवटचें वाक्यही असेंच आहे की, 'अिति मानवे धर्मशास्त्रे भृगुप्रोक्तायां संहितायां (अमुक) अध्यायः।

अर्थात् प्रस्तुतच्या मनुस्मृतीचें अुत्तरदायित्व प्रथमतः आणि प्रत्यक्षपणे भृगु-ऋषींचें आहे. मनुभगवानांच्या अुपदेशाचें भृगऋषींनी काढलेलें हें अेक संस्करण आहे. भृगुसंहिता हेंच नांव ह्या ग्रंथास यथार्थपणे शोभते.

मनुस्मृतीचा काल

प्राचीन ग्रंथ म्हटला – मग आपल्याकडील असो वा अितरांचा असो – त्याच्या कालाचा वाद दत्त म्हणून पुढे अुभा राहतोच. आपल्या ह्या लेखाचा त्या वादाशी फारसा संबंध नसल्याने अितकें सांगितलें म्हणजे पुरें आहे की, आज जी प्रत प्रसिद्ध

आहे तीतील काही भाग अत्यंत प्राचीन काळातील त्रैवर्णिक आर्यराष्ट्राच्या समाज-स्थितीचा निदर्शक आहे आणि अेकंदर पुस्तकही काही झालें तरी—प्रक्षिप्त अपवाद वगळून – अिसवी सनाच्या पूर्वीची म्हणजे दोन सहस्र वर्षांपूर्वीच्या जवळपासची समाजस्थिति वर्णिणारें आहे. या अेवढ्या मोठ्या ग्रंथात रामायण, भारत, वा गीता यांचा अुल्लेख सापडणें दुर्घट होतें. पण महाभारतादि ग्रंथातून कोण्या प्राचीन मनुस्मृतीचा अुल्लेख तरी वारंवार सापडतो, जसे–

'तेषां धर्मान् यथापूर्वं मनुः स्वायंभुवोऽब्रवीत् ।।'

(आदिपर्व अ. ९६) ह्या ठळक वस्तुस्थितीवरूनही हा ग्रंथ, आज आहे असा देखील किती प्राचीन आहे हें दिसून येतें. आता मनूतील महिलाविषयक श्लोक अनुक्रमे देअू.

मुलींचीं नांवें

स्त्रीणां सुखोद्यमक्रूरं विस्पष्टार्थं मनोहरम् ।
मंगल्यं दीर्घवर्णान्तमाशीर्वादाभिधानवत् । ३३

—अ. २

सुखाने अुच्चारता येण्यासारखें, अर्थसूचक, मांगल्यमय, गोड आशीर्वादात्मक असें असून जें अंत्यवर्णी दीर्घ आहे असें नांव मुलीस ठेवावें. (जसें यशोदा, विदुला सीता, रमा)

स्त्रियांचे संस्कार

अमंत्रिका तु कार्येयं स्त्रीणामावदशेषतः ।
संस्कारार्थं शरीरस्य यथाकालं यथाक्रमम् ।। ६६
वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्निपरिक्रिया ।। ६७

—अ. २

स्त्रियांचे जातकर्मादि संस्कार योग्य वेळी यथाक्रम करावे, पण ते मंत्ररहित असावे. विवाह हा तिचा वैदिक संस्कार, पतिसेवा हा गुरुगृहवास, गृहकृत्यें हींच होमादिक अग्निसेवा होय.

स्त्रियांचें अभिवादन

परपत्नी तु या स्त्री स्यादसंबन्धा च योनितः ।
तां ब्रूयाद् भवतीत्येवं सुभगे भगिनीति च ।। १२९

मातृष्वसा मातुलानी श्वश्रूरथ पितृष्वसा ।
संपूज्या गुरुपत्नीवत्समास्ता गुरुभार्यया ॥ १३१

—अ. २

परस्त्रीस अभिवादिताना आप्त नसल्यास भवती, सुभगे, भगिनी, असें संबोधावें. मावशी, मामी, सासू, आत्या या गुरुपत्नीप्रमाणेच पूज्य मानाव्या.

गुरुपत्नीशी वर्तणूक

गुरुवत्प्रतिपूज्याः स्युः सवर्णा गुरुयोषितः ।
असवर्णास्तु संपूज्याः प्रत्युत्थानाभिवादनैः ॥ २१०

—अ. २

गुरुच्या सवर्ण स्त्रियांस गुरूप्रमाणेच मानावे, गुरूच्या असवर्ण पत्नीस अुत्थान नि अभिवादन अेवढा सन्मान द्यावा.

[या श्लोकावरून पूर्वी ब्राह्मण गुरूंनाही काही ब्राह्मण पत्नी असूनही काही क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र जातीच्या पत्नीही असू शकत हें स्पष्ट होतें. ब्राह्मण गुरूच्या या ब्राह्मणेतर पत्न्या धर्माविरुद्ध अविवाहित संबंधाच्या केवळ प्रीतिपात्रें म्हणून अुल्लेखिलेल्या नसून त्या धर्मानुकूल विवाहाच्या धर्मपत्न्याच असत. त्यांची संततिही विवाहित संततीप्रमाणेच गृहात अेकत्र वाढे. ब्राह्मणांचे ब्राह्मणेतर भार्यांपासून झालेलें संतान अेका काली ब्राह्मणच समजलें जाअी आणि त्याच-प्रमाणे यथाक्रमे क्षत्रिय-वैश्यांचीही व्यवस्था होती, हें पुढे अनुलोमविवाहविषयक श्लोकांत स्पष्ट होअीलच.]

अभ्यञ्जनं स्नापनं च गात्रोत्सादनमेव च ।
गुरुपत्न्या न कार्याणि केशानां च प्रसाधनम् ॥ २११
गुरुपत्नी तु युवतिर्नाभिवाद्येह पादयोः ।
पूर्णविंशतिवर्षेण गुणदोषौ विजानता ॥ २१२

—अ. २

(परंतु) गुरुपत्नीला न्हाअू घालणें, तेल मर्दिणें, हातपाय रगडणें, वेणीफणी करणें अशी सेवा करू नये. गुरुपत्नी युवती असेल तर तरुण शिष्याने तिच्या पायाला स्पर्शून नमस्कारू नये. (परंतु पुढे २१७ व्या श्लोकात ती प्रवासाहून आली असता पादस्पर्शपूर्वक वंदावें असा पुन्हा साधारण विधि सांगितला आहे.) या मर्यादेचें कारण असें की,

स्वभाव अेष नारीणां नराणामिह दूषणम् ।
अतोऽर्थान्नि प्रमाद्यन्ति प्रमदासु विपश्चितः ॥ २१३
अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः ।
प्रमदा ह्युत्पथं नेतुं कामक्रोधवशानुगम् ॥ २१४
मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा नाविविक्तासनो भवेत् ।
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ २१५

—अ. २

(कारण की) नारींचा स्वभावच पुरुषांना दोषप्रवण करण्याचा असल्याने बुद्धिवान् पुरुषाने प्रमदांच्या मोहात न फसण्याची फार काळजी घेतली पाहिजे. तरुणी ह्या अविद्वानालाच काय, पण विद्वानाला देखील कामक्रोधांच्या अनुषंगे अुत्पथाकडे सहज नेअू शकतात. (अितरांची तर गोष्टच नको, पण) आअी, भगिनी वा स्वतःची मुलगी असली तरी तिच्याशी अेकान्तात असू नये; कारण अिंद्रियांचा प्रबळ आवेग विद्वानाला देखील खेचून नेतो.

मातेची योग्यता

यं मातापितरौ क्लेशं सहेते संभवे नृणाम् ।
न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि ॥ २२७
त अेव हि त्रयो लोकास्त अेव त्रय आश्रमाः ।
त अेव हि त्रयो वेदास्त अेवोक्तास्त्रयोऽग्नयः ॥ २३०
यावत्त्रयस्ते जीवेयुस्तावन्नान्यं समाचरेत् ।
तेष्वेव नित्यं शुश्रूषां कुर्यात्प्रियहिते रतः ॥ २३५
त्रिष्वेतेष्वितिकृत्यं हि पुरुषस्य समाप्यते ।
अेष धर्मः परः साक्षादुपधर्मोऽन्य अुच्यते ॥ २३७

—अ. २

आपल्यास जन्म देताना जे कष्ट मातापितरांना होतात त्यांची शतवर्षांतही फेड होणार नाही. गुरु, माता, पिता हे तीन वेद, आश्रम, अग्नि, होत. त्यांच्या जन्मभर त्यांचीच शुश्रूषा अनन्यभावे करावी. तीच अितिकर्तव्यता. हा धर्म साक्षात नि श्रेष्ठ आहे, वाकी सारे अुपधर्म.

स्त्रीरत्नं दुष्कुलादपि—

श्रद्दधानः शुभां विद्यामाददीतावरादपि ।
अन्त्यादपि परं धर्मं स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥ २३८

स्त्रियो रत्नान्यथो विद्या धर्मः शौचं सुभाषितम् ।
विविधानि च शिल्पानि समादेयानि सर्वतः ॥ २४०

—अ. २

कनिष्ठ जातीपासूनही विद्या, चंडालापासूनही मोक्षधर्म, सुभाषित, रत्नें आणि स्त्रिया दुष्कुलातही सापडल्यास त्यांचें ग्रहण हवें तेथून करावें.

विवाहविचार

असपिण्डाच या मातुरसगोत्रा च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥ ५
हीनक्रियं निष्पुरुषं निश्छंदोरोमशार्शसम् ।
क्षय्यामयाव्यपस्मारिश्वित्रिकुष्ठिकुलानि च ॥ ७
नोद्वहेत् कपिलां कन्यां नाधिकाङ्गीं न रोगिणीम् ।
नालोमिकां नातिलोमां न वाचाटां न पिङ्गलाम् ॥ ८
नर्क्षवृक्षनदीनाम्नीं नान्त्यपर्वतनामिकाम् ।
न पक्ष्यहिप्रेष्यनाम्नीं न च भीषणनामिकाम् ॥ ९
अव्यङ्गांगीं सौम्यनाम्नीं हंसवारणगामिनीम् ।
तनुलोमकेशदशनां मृद्वङ्गीमुद्वहेत् स्त्रियम् ॥ १०

—अ. ३

मातेच्या नि पित्याच्या सपिंडातील नि सगोत्रातील कन्या वर्जून विवाह करणें द्विजातींना प्रशस्त आहे, संस्कारहीन, केवळ स्त्रियांचीच संतति होणाऱ्या, वेदाध्ययनशून्य, केसाळ, मूळव्याध, क्षय, अग्निमांद्य, अपस्मार, कोड या रोगांनी ग्रस्त अशा कुळातली, पिंगट केसांची, अधिक अवयवांची, रोगी, केशशून्य, वा केसाळ, बडबडी, पिवळ्या डोळ्यांची, त्याचप्रमाणे नक्षत्र, वृक्ष, नदी, पर्वत, सर्प, सेवक, अंत्यजादि अर्थ सुचविणारें किंवा भीषण असणारें जिचें नांव आहे, अशा मुलीशी विवाह करू नये.

भिन्नवर्णीय विवाह

(वधूवरांचा अेकच वर्ण असला पाहिजे अशी अट नव्हती.)

सवर्णाग्रे द्विजातीनां प्रशस्ता दारकर्मणि ।
कामस्तस्तु प्रवृत्तानामिमा. स्युः क्रमशो वराः ॥१२
शूद्रैव भार्या शूद्रस्य सा च स्वा च विशः स्मृते ।
ते च स्वा चैव राज्ञश्च ताश्च स्वा चाग्रजन्मनः ॥ १३

पाणिग्रहणसंस्कारः सवर्णासूपदिश्यते ।
असवर्णास्वयं ज्ञेयो विधिरुद्वाहकर्मणि ॥ ४३
शरः क्षत्रियया ग्राह्यः प्रतोदो वैश्यकन्यया ।
वसनस्य दशा ग्राह्या शूद्रयोत्कृष्टवेदने ॥ ४४

—अ. ३

प्रथमविवाह ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्याने सवर्ण स्त्रीशी करणें प्रशस्त. पुढे अिच्छा असल्यास अितरवर्णीय स्त्रीशीही खालीलप्रमाणे विवाह करावा. शूद्राने केवळ शूद्रिणीशीच विवाह करावा. वैश्याने वैश्य आणि शूद्री अशा दोन्ही वर्णांच्या स्त्रीला विवाहावें. क्षत्रियाने क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अशा तिन्ही वर्णाच्या स्त्रियांना विवाह-ण्यास हरकत नाही. आणि ब्राह्मणांना तर ब्राह्मणीप्रमाणेच क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या वर्णांच्या स्त्रियांशी विवाह करता येतो. सवर्णविवाही (म्हणजे ब्राह्मणाचा ब्राह्मणीशी अि.) वधूने वराचें पाणिग्रहण करावें, असवर्ण विवाहात (म्हणजे ब्राह्मण वर नि क्षत्रिय, वैश्य, वा शूद्र वधू अि.) क्षत्रिय वधूने वराच्या बाणास, वैश्य वधूनें क्षत्रिय वा ब्राह्मण वराच्या हातच्या चाबकाच्या वाजूस आणि शूद्र कन्येने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वराच्या अंगावरील वस्त्राच्या दशेस धरून विवाहसंस्कार पूर्णवावा. [या स्मृतीतील हे त्रैवर्णिकांनी आपसांत आणि शूद्रांसह असवर्ण विवाह धर्मसंस्कारपूर्वक करण्यास हरकत नाही म्हणून सांगणारे श्लोक वैदिक काळाच्या आगेमागे आपल्या राष्ट्राची कौटुंविक परिस्थिति चित्रिणारे अत अेव पुष्कळच प्राचीन असले पाहिजेत. ब्राह्मणाच्या घरी ब्राह्मण स्त्रीसहच शूद्र पत्नीही अेकाच पत्नीच्या धर्म्य अधिकाराने नांदे. ब्राह्मणाने वा क्षत्रियवैश्याने शूद्र स्त्रीशी 'संबंध' ठेवावा अितकाच याचा अर्थ नसून या असवर्ण स्त्रिया ब्राह्मणादिकांच्या घरी 'रखेल्या' म्हणूनच नांदत असें नसून त्या धर्मपत्नी म्हणून वैदिक धर्मसंस्कारांनी वरलेल्या विवाहित भार्या म्हणूनच नांदत. ही गोष्ट त्यांच्या विवाहसंस्कारांची पाणिग्रहण, शरग्रहणप्रभृति जी शेवटच्या श्लोकात फोड करून सांगितली आहे तीवरून निर्विवादपणे दिसून येतें. अितकेंच नव्हे तर त्या काळी ब्राह्मणांस वा क्षत्रियांस वैश्यशूद्र स्त्रीपासून झालेलीं मुलेंहीं ब्राह्मण वा क्षत्रिय वर्णांतच म्हणजे पित्याच्या वर्णातच मोडत हें पुढे पितृसावर्ण्य स्थापणारे जे श्लोक अेका प्रकरणात येणार आहेत त्यावरून स्पष्टिलें जाईलच. ब्राह्मणाच्या अेकाच घरात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारही वर्णाच्या स्त्रिया भार्या या नात्याने अेकत्रच बसत, अुठत, जेवीत, वेण्याफण्या करीत नि त्यांचीं मुलें सारीं ब्राह्मण म्हणूनच ब्राह्मणांचे अधिकार समतेने भोगीत. ब्राह्मणांस ब्राह्मण स्त्रियांपासून झालेल्या मुलांसहच शूद्र स्त्रियांपासून झालेलीं मुलेंही अेकाच बोहोल्यावर अुपनयिलीं जात; त्यांची मुंज अेकत्र वेदोक्त मंत्रांनी होअी; अेकाच वेदशाळेत तीं अेकवर्णीय म्हणून वेद पठत.

ब्राह्मणाची सख्खी नसली तरी सावत्र मावशी, मामी, आजी, भगिनी शूद्र कुटुंबातही असे. ब्राह्मणांचीं आजोळें शूद्रांच्याही घरी असत. तीच स्थिति क्षत्रिय वैश्यांची. अडचण काय ती शूद्राला असे. शूद्र आपली मुलगी ब्राह्मणाला देऊन त्याचा अगदी वेदोक्त सासरा होऊ शके. शूद्र आपली बहीण ब्राह्मणास वा वैश्यास देऊन त्याचा सख्खा मेहुणा होऊ शके. पण ब्राह्मणास मात्र आपल्या सासरेपणाचा मान देऊ शकत नसे. ब्राह्मणाच्या घरी दिलेल्या शूद्र महिलेची आजी—त्या ब्राह्मणाची सासू म्हणून स्वागतिली जाजी; त्या शूद्र महिलेला 'आजो आली!' म्हणून ब्राह्मणांचीं मुलें लडिवाळपणे धावत कवटाळू शकत. शूद्रिणीचा नातू ब्राह्मण असे, क्षत्रिय असे, वैश्य असे. तीच अुलटापालट, रक्तमिश्रण क्षत्रिय वैश्यांच्याही कुटुंबातून चालू असे. आज कोकणस्थ ब्राह्मणाची आजी वा मामा देशस्थ ब्राह्मण असणेंही जिथे दुर्घट, आचारवाह्य आहे, तेथे वरील वस्तुस्थिति कितीही विलक्षण वाटली, तरी 'सनातन'पक्षीय बंधूंनाही ती अेका काळी तशीच होती हें नाकारणें शक्य नाही. कारण मनुस्मृतीतलें अक्षर अन् अक्षर त्रिकालाबाधित सत्य आहे, हें त्यांचेंच वीद आहे—सुधारकांचें नव्हे! मनूचे हे श्लोक जातपाततोडक सुधारक या नात्याने होणाऱ्या सुधारणांचा अुपदेश म्हणून त्याने लिहिलेले नाहीत; तर ते त्या काळच्या प्रचलित समाजस्थितीस नियंत्रिणारे नि वर्णिणारे 'निर्बंध' आहेत; त्या काळच्या वैदिक नि पौराणिक अितिहासादि कथांतून ही समाजस्थिति अशीच असल्याचें प्रत्यंतरही मिळतें. अनुलोम विवाह नि पितृसावर्ण्य ह्या जोड निर्बंधामुळे त्या काळात अेकाच ब्राह्मणाचा मामा क्षत्रिय, मामी वैश्य, मामेभाअू शूद्र आणि आजी शूद्राणी असू शके! तीच स्थिति क्षत्रिय वैश्यांची. अर्थात् अनुलोमेकरून का होअीना, पण चातुर्वर्ण्यांचें रक्त वरपासून खालपर्यंत प्रत्येकाच्या नसानसातून संतत प्रवाहत जाअून सर्व राष्ट्र रक्तसंबंधाचें आप्तपणे एकजीव झालेलें, अत्यंत जिव्हाळ्याच्या सख्ख्या बंधुभगिनींच्या नात्यागोत्यांनी अेकहृदय झालेलें होतें. जिथे विवाहही धर्म्य, नैर्बंधिक होते, तिथे शूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण पत्नींचीं मुलें—मुलीं ब्राह्मणच समजलीं जात. अेकाच पाळण्यात भावंडें म्हणून तिथे त्या कुटुंबात, त्या वर्णात 'रोटीबंदीचा' प्रश्नही काढण्याची सोय नव्हती हें काही सांगावयास नको. जिथे शूद्र पत्नीचा पुत्र ब्राह्मणच होअी, तिथे तिच्या वा त्याच्या हातचें पाणी पिण्याने वा भात खाण्याने जात जाणें शक्यच नव्हतें! मनुस्मृतीचे हे श्लोक तरी जातपातरक्षक वर्णाश्रमी सनातन्यांच्या जातीचे नसून जातपाततोडक बेटीबंदी नि रोटीबंदी न मानणाऱ्या सुधारकांसच त्यातल्या त्यात जवळ करणारे आहेत. मनु भगवान् ह्या श्लोकापुरते तरी 'वर्णाश्रमी रोटीबंद व बेटीबंद' मंडळाचे सदस्य होण्याचा संभव नसून 'जातपात तोडक' मंडळाच्या पटावरच आपलें नांव नोंदवितीलसें दिसतें. अर्थात् मनु भगवानांचे हे श्लोक असवर्ण विवाहास अनुकूल आहेत म्हणूनच काही सुधारक रोटीबंदी नि बेटीबंदीच्या

आजच्या बोकाळलेल्या बेडच्या तोडतात असें नसून हेही श्लोक अुलट असते तरीही त्यांनी आज त्या हानिकारक आहेत असें पाहताच तत्काळ तोडून टाकल्याच असत्या !

आणि आता तोच आश्चर्यकारक 'दृश्यपालट' (ट्रॅन्स्फरसीन !) वाचकांस खालील श्लोकात अकस्मात् पाहण्यास मिळतो आहे ! ब्राह्मणाने शूद्रा भार्या करण्यास हरकत नाही म्हणून स्पष्ट सांगून विवाहाचा धर्मसंस्कार कसा असावा हेंही वर्णिलें असता हे खालील श्लोक अगदी लागोपाठ आणि अधेंमधेंच कसे दांडगाअी करीत घुसत आहेत पाहा !]

न ब्राह्मणक्षत्रिययोरापद्यपि हि तिष्ठतोः ।
कस्मिंश्चिदपि वृत्तान्ते शूद्रा भार्योपदिश्यते ।। १४
शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् ।
जनयित्वा सुतं तस्यां ब्राह्मण्यादेव हीयते ।। १७
वृषलीफेनपीतस्य निःश्वासोपहतस्य च ।
तस्यां चैव प्रसूतस्य निष्कृतिर्न विधीयते ।। १९
—अ. ३

कोणत्याही ब्राह्मण क्षत्रियाने अगदी वाटेल तें झालें तरी शूद्र स्त्रीशी केव्हाही विवाह लावू नये असेंच सर्व शास्त्रें सांगतात ! शूद्रा स्त्रीशी शयन करताच ब्राह्मण अधोगतीला जातो; तिच्या ठिकाणी पुत्र अुत्पादिता ब्राह्मण्यासच मुकतो. फार काय, शूद्राणीशी संभोग तर राहोच; पण तिच्या अधराचें चुंबन घेण्याने नव्हे, तिचा श्वास अंगावर पडेल अितक्या जवळ जाण्यानेही ब्राह्मण पतित होतो. तिच्या ठिकाणी सुत अुत्पादिण्याने लागणारें पाप तर अितकें भयंकर असतें, की त्याला प्रायश्चित्त देखील नाही !

[आता हे परस्परविरुद्ध निर्बंध अेकाच काळचे, समान अधिकाराचे, अेकाच लेखकाने संमतिलेले नि ग्रंथिलेले असणें हें किती अविश्वसनीय आहे हें काही सांगावयासच पाहिजे असें नाही. अिच्छा असल्यास शूद्राणीशी लग्न कर; त्यांस धर्माची हरकत नाही, अितकेंच नव्हे, तर तिच्यापासून झालेल्या तुझ्या मुलांस ब्राह्मणच समजलें जाअील असें लेखी वचन देअून पहिल्या श्लोकाचा मंत्र अुच्चारून त्या आधारावर तसें लग्न लावून टाकलेल्यास लगेच दुसऱ्या श्लोकाने सांगणें की, वाटेल तें झालें तरी शूद्र स्त्रीशी लग्न केलेस – आता तू नि तुझी संतति पतित होअून तुझें देखील ब्राह्मण्य नष्ट झालें ! – हें कृत्य करणारा धर्माध्यक्ष वा धर्मकार तर काय, पण असें नुसतें लिहिणारा ग्रंथकारही निव्वळ भ्रमिष्टच असला पाहिजे, नव्हे काय ? अर्थात् या ग्रंथाच्या पूज्य लेखकास भ्रमिष्ट म्हणण्याचें पातक ज्यास

करवत नाही ते आमच्यासारखे ऐतिहासिक दृष्टीनेच हा ग्रंथ वाचणारे लोक असेंच समजगार की, ह्या श्लोकांपैकी बहुधा प्रत्येक श्लोक विभिन्न काळी भिन्नभिन्न आचार्यांनी रचून या ग्रंथात त्या प्रकरणात गोवून म्हणा, घुसडून म्हणा, पण प्रक्षेपिलेला आहे.

भूगर्भात खणताना अेकेका संस्कृतीच्या रचनेचीं नगरें अेकाखालच्या अेकेका थरात जशीं दबलेलीं सापडतात तसेंच भूतकाळच्या गर्भात खचून अेकावर अेक चढलेले भिन्न काळच्या भिन्न समाजस्थितीचे थर म्हणजे अेकेक श्लोक होत. त्या थरांची परंपरा थोडक्यात अशी—

(१) प्राचीनतम काळी आर्य त्रैवर्णिक स्त्रीरत्नें 'समादेयानि सर्वशः' सापडेल तेथून स्वीकारावी; तें धर्मविरुद्ध नाही असें समजत. त्रैवर्णिकांस शूद्र स्त्रीशी विवाह अगदी धर्म्य समजला जाअी, अितकेंच नव्हे, तर शूद्र धर्मपत्नीचें संतान पित्याच्या वरिष्ठ वर्णाचें म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय वा वैश्यच गणलें जाअी. त्यामुळे ब्राह्मणांदिकात शूद्रादिकांचें रक्त सारखें मिसळत गेलें. आजच्या ब्राह्मणांत कित्येक कुळांच्या शंभराव्या पिढीतील आया शूद्राणीही असल्या पाहिजेत. अर्थात् आजचें चातुर्वर्णीय हिंदुराष्ट्र अेका रक्तवीजांचीच संमिश्र संतति आहे—अगदी रक्तसंबंधाने निगडित अशी अेकच जात आहे.

(२) पण त्या पूर्वकाळी शूद्र हे रंगाने काळे, रूपानें ढोवळ, बुद्धीने मंद असल्याने त्यांची ती हीनता मातेच्या बाजूने तरी आर्यांत मिसळून आर्यांचा त्या वेळचा श्वेततर रंग आदि गुण बिघडतात असें पाहून तें न आवडणारा अेक पक्ष प्रबळ होत गेला. त्याने अनुलोम विवाहही घातक आहेत असें ठरवून अशा विवाहापासून झालेली संतति वरच्या पित्याच्या वर्णात न ढकलता खालच्या मातेच्या वर्णात ढकलावी असें ठरविलें. हेंच मातृसावर्ण्य. म्हणजे पूर्वी शूद्रा भार्येपासून ब्राह्मणास झालेला पुत्र ब्राह्मणच ठरे; तो ह्या पुढच्या काळी शूद्र ठरू लागला. तीच गोष्ट अितर वर्णीय विवाहांची !

(३) पुढे तीच वर्णशुद्धतेच्या रक्षणाची प्रवृत्ति जास्तच मळमळ्या स्वभावाची होअून आर्यांनी शूद्रा स्त्रीशी विवाहच करू नये; ब्राह्मणांनी तर तिचा श्वास लागेल अितकेंही तिच्याजवळ जाअू नये असा कडक निर्बंध चालू झाला आणि हळूहळू त्याच न्यायाने ब्राह्मणाचा क्षत्रियादिकांशीही विवाह प्रथम अप्रशस्त नि नंतर धर्मबाह्य ठरत चालला. तोच निर्बंध अितर वर्णांनाही लागू पडत केवळ निर्भेळ सवर्ण विवाहच (म्हणजे ब्राह्मणांचे ब्राह्मणीशीच अित्यादि) चालू झाले; धर्म्य ठरले. त्यात ब्राह्मणादि वर्णांत देशस्थ, कोकणस्थ, बंगाली, पंजाबी, शैव, वैष्णव प्रभृति अनेक अुपजातींची भर पडताच त्या अेकाच वर्णाच्या अुपजातीतही विवाह निषिद्ध ठरले आणि हा आजचा नअू पुरभय्ये नि दहा चुलींचा हास्यास्पद बाष्कळपणा माजला !

या प्रत्येक पायरीवर समाज चढताच त्या त्या काळचा निर्बंध त्या त्या धर्मकारांनीच अनुष्टुपात गोवून ह्या मनुस्मृतीत घुसडून ठेवला. पण पहिले विरुद्धार्थी श्लोक न गाळता ! कारण ते गाळणें दुर्घट होतें; त्यात भर टाकणें ग्रंथाच्या निरनिराळ्या प्रतींच्या अुतार्‍यांच्या वेळी अधिक सोपें जाअी. त्या प्रत्येक नवीन अनुष्टुप रचणार्‍याने त्याच्या काळच्या परिस्थितीत तें अनुष्टुप लोकहिताचें समजून रचलें. कारण अुदाहरणार्थ, ब्राह्मणांना पूर्वी वाटेल त्या वर्णाची स्त्री स्वीकारण्याचा असलेला अधिकार त्यांना ह्या नव्या निर्बंधाप्रमाणे सोडावाच लागला. त्यांच्या अुपभोगाच्या आणि सुखाच्या कक्षेस आळाच बसला. त्यांनी आपणांवर संयमाचा हा सर्वांत अधिक भार जो लादून घेतला तो त्यांचा प्रामाणिक त्यागच वर्णशुद्धीच्या ध्येयार्थ होता. त्यांना योग्य वाटलें तें त्या त्या काळच्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांनी केलें. त्यांचा प्रश्न त्यांनी त्यांना परवडला तसा सोडवला.

चुकलें तें त्यांचें नव्हे, तर त्यांच्या ह्या तात्पुरत्या भिन्न आणि परस्परविरुद्ध निर्बंधांस सुसंगत नि त्रिकालाबाधित मानून अेकाच ग्रंथकाराच्या नांवावर अेकाच ग्रंथात दडपून देणार्‍या 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' सनातनी प्रवृत्तीचें होय. मनुस्मृतीतील शब्दन् शब्द आजही मान्य असलाच पाहिजे नि ती अगदी सुसंगत श्लोकांनीच भरली आहे; अेकाच मनूने लिहिली आहे असें मानणारे 'सनातनी' हें विसरतात की, त्या ग्रंथास असें सुसंगत ठरविण्यासाठी तो अेकाच ग्रंथकाराने लिहिला असें म्हणताच तो लिहिणारा मात्र भ्रमिष्ट ठरतो ! ग्रथाचा मान वाढविण्याच्या धांदलीत ग्रंथकारासच मूर्खांत ओढलें जात आहे याचें त्यांस भान राहत नाही !

पण अैतिहासिक दृष्टीने ही सारी आपत्ति टळते. हे श्लोक अेका ग्रंथकाराचे वा अेका काळचे नसून ते भिन्नभिन्न काळचे निर्बंध कोणीतरी पुढे संकलित करून ह्या 'संग्रहा'त गोविले. तो प्रत्येक श्लोक परस्परविरुद्ध असला तरी अेकेका काळच्या अितिहासाचें पान आहे आणि ते सारे अेकत्र ओळीने वाचले, की ह्या 'वर्ण नि विवाह' विषयाचा क्रमवार विकास नि अितिहास आपल्यापुढे चित्रपटासारखा आकर्षक सुसंगतीने अुभा राहतो.]

✦ ✦ ✦

(३)

गेल्या लेखांकात ब्राह्मणादिकांनी शूद्रा स्त्रीशीही लाविलेले अनुलोम विवाह धर्म्य आणि रूढ असत हें सांगणार्‍या श्लोकापर्यंत अनुक्रम आलेला होता.

विवाहविधि – प्रसिद्ध असलेले ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस नि पैशाच हे आठ प्रकार नि त्यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. पैकी —

षडानुपूर्व्या विप्रस्य क्षत्रस्य चतुरोऽवरान् !
विट्शूद्रयोस्तु तानेव विद्याद्धर्म्यानराक्षसान् ॥ २३

—अ. ३

पहिले सहा प्रकार ब्राह्मणांना, शेवटचे चार क्षत्रियांना, आणि आसुर, गांधर्व पैशाच हे वैश्यशूद्रास धर्म्य आहेत. (अर्थात् प्रत्येकाचे विशिष्ट प्रकार सोडले तर चारी वर्णांना आसुर आणि गांधर्व हे दोन प्रकारचे विवाह धर्म्य आहेत हें स्पष्ट होतें. पैकी कन्येला किंवा तिच्या आप्तेष्टांना धन देऊन तिला वरणें हा आसुर विवाह, आणि गांधर्वाचें लक्षण सांगितलें आहे तें असें) –

अिच्छयान्योन्यसंयोगः कन्यायाश्च वरस्य च ।
गांधर्वः स तु विज्ञेयो मैथुन्यः कामसंभवः ॥ ३२

—अ. ३

परस्परांच्याच अनुमतीने किंवा परस्परांचा कामसंभोग झाल्यानंतरही कन्या नि वर हे दोघे स्वतःच विवाहात अेकमेकास वरतात तो सहवासोत्तरच नव्हे, तर संभोगोत्तर विवाहही गांधर्वविवाह होय. तो ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सर्व वर्णांस वैध नि धर्म्य म्हणून सांगितला आहे आणि पैशाच विवाह ज्यात सुप्त, मत्त, वेशुद्ध कन्येचा भोग वळाने घेतला जातो तो प्रकार अधम होय.

स पापिष्ठो विवाहानां पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥ ३४

—अ. ३

ऋतुकालविचार – रजोदर्शनानंतर सोळा दिवसपर्यंत स्त्रियांचा ऋतुकाळ मानला आहे. पहिले चार स्पर्शास अनुचित. अकरावी नि तेरावी रात्रही समागमास निषिद्ध. शेषरात्री अुक्त.

ऋतुः स्वाभाविकः स्त्रीणां रात्रयः षोडश स्मृताः ।
चतुर्भिरितरैः सार्धमहोभिः सद्विगर्हितैः ॥ ४६ अि. पैकी –
युग्मासु पुत्रा जायन्ते स्त्रियोऽयुग्मासु रात्रिषु ॥ ४८

—अ. ३

सहाव्या, आठव्या, दहाव्या अशा समसंख्याक रात्री समागम झाला तर पुत्र; विषमसंख्याक रात्री कन्या. दुसरें कारण –

पुमान्पुंसोऽधिके शुक्रे स्त्री भवत्यधिके स्त्रियाः ।
समेऽपुमान्पुंस्त्रियौ वा क्षीणेऽल्पे च विपर्ययः ॥ ४९

—अ. ३

पुरुषवीर्य अधिक असल्यास पुत्र होतो; स्त्रीवीर्य अधिक असल्यास कन्या; समवीर्य असल्यास नपुंसक वा अेक मुलगा नि अेक मुलगी असें जुळें होतें, सत्त्वरहित वीर्यानें गर्भच राहत नाही. [जर गर्भविज्ञानाच्या प्रगतीमुळे याविषयीचीं हीं मतें खोटीं ठरलीं तर 'यन्मनुरवदत् तद्भेषजं' या सूत्रान्वये मनुस्मृतीत आहेत तींच मतें प्रयोगान्ती खोटीं ठरलीं तरी खरीं मानायचीं का ? 'वचनात्प्रवृत्ति' च्या शब्दनिष्ठ परंपरेने तीं खोटीं पडलीं तरी खरींच मानावीं लागणार ! ग्रहणांचें कारण राहू-केतूचें युद्ध हें नाही हें प्रयोगसिद्ध झाल्यावरही जसें अजून 'दे दान ! सुटे गिऱ्हाण !' हें चालू आहेच आपलें ! परंतु अद्यतन *–अप-टु-डेट–प्रवृत्तीच्या आम्हा मंडळींस ही दांभिक अडचण पडत नाही. मनुस्मृतीच्या काळच्या ज्ञानानुरूप त्यांनी सुचले ते सिद्धान्त लिहिले. दोन हजार वर्षांत मनुष्याचा अनुभव वाढून प्रयोगान्ती अधिक तथ्य नियम सापडताच ते स्वीकारून पूर्वीचीं चुकीचीं मतें सोडून देणें हेंच प्रगतीचें लक्षण. पूर्वजांच्या ज्ञानात भर टाकणें हाच पूर्वजांनाही अिष्ट वाटेल असा पूर्वजांचा खरा अभिमान होय. ह्या अद्ययावत्पणातच हिंदु राष्ट्राचें खरें कल्याण साधून जगाच्या पुढे दोन पावलें जाण्याची धमक त्यात अुत्पन्न होअू शकणारी आहे. पण मनूस त्रिकालाबाधित मानण्याच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्तीने दोन हजार वर्षांपूर्वीच्या विज्ञानाच्या मागासलेल्या स्थितीतून आपलें पाअूल पुढे पडण्याची शक्यताच खुंटते.]

गृहिणीची योग्यता– यापुढे सात आठ श्लोकांत नारीची योग्यता सुरसपणे वर्णिलेली आहे. अुदाहरणार्थ, खालील श्लोक पहा —

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिर्भिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥ ५५
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैस्तास्तु न पूजन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ५६
संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ ६०
यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ।
अप्रमोदात्पुनः पुंसः प्रजनं न प्रवर्तते ॥ ६१

—अ. ३

पित्याने, भावाने, पतीने, दिराने स्त्रियांना आदरावें, अलंकारावें. ज्या कुलात नारी पूजनीय मानल्या जातात त्यांत देवताही रमतात. ज्यांत नारी पूज्य

---

* अद्यतन शब्द 'अप-टू-डेट' ह्यास आमचे विद्वान् मित्र मालवणचे श्री. अबाराव देसाअी, संचालक कन्याशाळा ह्यांनी सुचविला असून तो अद्ययावत् शब्दास अेक आणखी प्रतिशब्द म्हणून आम्हांस पसंत आहे. 'पुरातन' च्या अुलट 'अद्यतन'

नाहीत त्यात सर्व धर्मक्रिया निष्फळ होतात. पतिपत्नी परस्परांस संतोषवितात त्या कुलाचेंच कल्याण होतें. पतिपत्नी परस्पर प्रमुदित असतील तर संततिही प्रसन्न असते. अप्रमुदित असतील तर संतति होतच नाही.

श्राद्धदिवस आणि मांसाशन – [या स्मृतीवरून हें निर्विवादपणे दिसून येतें की, ब्राह्मणांसुद्धा सर्व वर्ण मांस नि मत्स्य पूर्वी खात असत. त्यांत धर्माविरुद्ध आचरण समजलें जात नसे. मांस नि मासे खाणें हें धर्माविरुद्ध नसे; अितकेंच नव्हे तर यज्ञ, श्राद्धप्रभृति हव्यकव्यप्रसंगी तर मांसाचें नि मत्स्याचें भोजन हें ब्राह्मणांनीही केलेंच पाहिजे असा धर्म होता ! आज आपल्या द्राविड ब्राह्मणांच्या स्त्रियांस हें वाचून मोठा धक्का बसेल. परंतु अजूनही अनेक जातींच्या ब्राह्मणांत मास, बंगालीप्रभृति ब्राह्मणांत मासे प्रत्यही खातातच. केवळ मनुस्मृतीत आहे तोच धर्म मानावयाचा असेल तर मांस नि मासे खाण्यास अगदी जातिबहिष्कार्य असा महान् अधर्म समजणारे आजचे ब्राह्मणच 'सनातन' धर्माच्या अगदी अुलट वागणारे पाखंड लोक ठरत असून मांस नि मासे खाणारे सारस्वतप्रभृति ब्राह्मणच खरे पंक्तिपावन सनातनी ब्राह्मण ठरतात. मनुस्मृतीच्या काळी ब्राह्मण महिलांनाही नुसतें भातवरण करता येअून कसें भागत नसे; प्रत्येक सदाचारी ब्राह्मण स्त्रीला बकऱ्याची सागुती, पक्ष्यांची आमटी आणि मासोळीचे नाना प्रकार असणारा स्वयंपाक कसा करावा लागे त्याची थोडी कल्पना येण्यासाठी श्राद्धविधिविषयक काही श्लोक खाली देत आहो]—

भक्ष्यं भोज्यं च विविधं मूलानि च फलानि च ।
हृद्यानि चैव मांसानि पानानि सुरभीणि च ॥ २२७
हविर्यच्चिररात्राय यच्चानन्त्याय कल्प्यते ।
पितृभ्यो विधिवद्दत्तं तत्प्रवक्ष्याम्यशेषतः ॥२६६
द्वौ मासौ मत्स्यमांसेन त्रीन्मासान्हारिणेन तु ।
औरभ्रेणाथ चतुरः शाकुनेनाथ पंच वै ॥ २६८
षण्मासांश्छागमांसेन पार्षतेन च सप्त वै ।
अष्टावेणस्य मांसेन रौरवेण नवैव तु ॥२६९
दश मासांस्तु तृप्यन्ति वराहमहिषामिषैः ।
शशकूर्मयोस्तु मांसेन मासानेकादशैव तु ॥२७०
कालशाकं महाशल्काः खड्गलोहामिषं मधु ।
आनन्त्यायैव कल्प्यन्ते मुन्यन्नानि च सर्वशः ॥ २७२

—अ. ३

(श्राद्धसमयी ब्राह्मणांस्तव) नाना प्रकारचीं फळें, मुळें, रुचिर अशीं नानाप्रकारचीं मांसें नि पानद्रव्यें (वाढावीं). पितरांना कोणचे पदार्थ अर्पिले असता

किती दिवस तृप्ति होते तें कोष्टक असें–मत्स्यमांसाने दोन महिने, हरिणमांस दिल्यास तीन महिने, अजमांसाने चार, पक्षिमांसाने पांच, बकरा-चित्र-मृग-अेणमृग, रुरुमृग यांनी अनुक्रमे सहा ते नअू महिनेपर्यंत तृप्ति होते. रानडुकराच्या मांसाने नि रानरेड्याच्या मांसाने पितर दहा महिने तृप्त होतात; ससा नि कासव यांनी अकरा महिने; काळ्या भाज्या, महाशलक मत्स्य, तांबडा बकरा, गेंडा यांच्या मांसाने, मधाने, अनन्त काळ पितरांची तृप्ति होते !!

[त्या वेळेच्या ब्राह्मण स्त्रियानादेखील मासे नि मांस यांचीं किती प्रकारचीं पक्वान्नें करता येत असतील आणि आज श्राद्धाच्या दिवशी नाना भाज्यापाल्यांना चिरताचिरता सैंपाकघर जसें गजवजून जातें, तसें त्या काळी ब्राह्मणांच्या सैंपाकघरात मासे नि मांस चिरून धुअून साफसूफ करताना आमच्या सोंवळ्या माता-भगिनी किती गर्क होत असतील तें चित्र डोळ्यांपुढे अुभें राहतें. जर मनूचा प्रत्येक शब्द त्रिकालाबाधित धर्म मानायचा असेल तर या प्रकरणी तरी सुधारकांहून ब्राह्मण सनातनीच अत्यंत धर्मध्वंसी नि अपराधी ठरणारे आहेत ! वरील मांस नि मासे यांच्या केलेल्या नाना ' रुचकर ' पदार्थाची चटक नुसत्या आमच्या पितरांनाच लागलेली नव्हती. हें रानडुकरादिकांचें मांस त्यांनी नुसतें अदृश्यरूपाने हुंगूनच भागत नव्हतें; तर त्यांस तें पोचविण्यासाठी पितृस्थानी नियोजिलेल्या ब्राह्मणांच्या पोटांच्या टप्पालपेटीतच टाकावें लागे. परलोकी तें अन्न पोचविणारी दुसरी सोयच नसे. ह्यामुळे श्राद्धीय म्हणून जो जो पवित्र, शुचिर्भूत नि स्नानसंध्याशील विप्रवर बोलाविला जाअी, त्याने त्याने तें मांस नि मासे खाल्लेच पाहिजेत. असा मनु भगवानांचा कडक दंडक पुढील श्लोक अुद्घोषित आहे !]

नियुक्तस्तु यथान्यायं यो मांसं नात्ति मानवः ।
स प्रेत्य पशुतां याति संभवानेकविंशतिम् ।। ३५

—अ. ५

श्राद्धप्रसंगी नियुक्त असताही जो हट्टाने मांस खात नाही, तो मनुष्य मेल्यानंतर अेकवीस जन्म पशुयोनि पावतो ! यज्ञामध्ये तर मांस खाणें विप्राचें कर्तव्य आहे; अितकेंच नसून तो मारला जाणारा पशुपक्षीसुद्धा अुत्तम गतीला जातो ! या अर्थाच्या अनेक श्लोकांपैकी दोनतीन वानगीसाठी देत आहे––

प्रोक्षितं भक्षयेन्मांसं ब्राह्मणानां च काम्यया ।
यथाविधि नियुक्तस्तु प्राणानामेव चात्यये ।।२७
क्रीत्वा स्वयं वाप्युत्पाद्य परोपकृतमेव वा ।
देवान् पितॄंश्चार्चयित्वा खादन्मांसं न दुष्यति ।। ३२
नात्ता दुष्यत्यदन्नाद्यान्प्राणिनोऽहन्यहन्यपि ।
धात्रैव सृष्टा ह्याद्याश्च प्राणिनोऽत्तार अेव च ।। ३०

यज्ञार्थं पशवः सृष्टाः स्वयमेव स्वयंभुवा ।
यज्ञश्च भूत्यै सर्वस्य तस्माद्यज्ञे वधोऽवधः ॥ ३९
ओषध्यः पशवो वृक्षास्तिर्यंचः पक्षिणस्तथा ।
यज्ञार्थं निधनं प्राप्ताः प्राप्नुवत्युत्सृतीः पुनः ॥ ४०

—अ. ५

प्रोक्षण करून खाल्लें असता मांस खाण्यास हरकत नाही. श्राद्धात प्राण-संकटी किंवा अिच्छा झाल्यासही ब्राह्मणांनी मांस खावें. ज्या अर्थी खाणारा वर्ग देवाने अुत्पन्न केला, तसेंच खाद्य प्राणीही त्यानेच खाद्य म्हणून अुत्पादिले आहेत, त्या अर्थी खाणाऱ्याने तें खाद्य प्राण्याचें मांसादि अन्न प्रत्यही खाल्लें तरी दोष घडत नाही. [यज्ञाविषयी तर बोलणेंच नको. कारण –] पशु हे यज्ञार्थच स्वतः देवाने निर्मिले आहेत. सर्वांच्या कल्याणार्थ असणाऱ्या यज्ञात पशूंची हिंसाच खरी अहिंसा आहे. यज्ञात मारलेले पशु जन्मांतरी अुत्कर्षच पावतात.

[आपल्या सर्व वर्णांच्या माता-भगिनी मांस खात असत आणि तेंही धार्मिक कर्तव्य म्हणून. हें दाखविणाऱ्या अशा अनेक श्लोकांमध्ये आगेमागे या स्मृतीत नेहमी घडतें तसें याही प्रकरणी घडून काही झालें तरी कोणीही मांस खाअू नये अशा अर्थाचेही श्लोक घुसलेले दिसतात ! अैतिहासिक दृष्ट्या प्रथम मांस वेखटक ब्राह्मणादिक खात; पुढे तें वाअीट वाटू लागलें. तेव्हा काहीजणांनी ठरविलें की, केवळ वैदिक धर्मप्रसंगी श्राद्धयज्ञादि मंत्रपूत तेवढेंच मांस खावें; अितर प्रसंगी नाही. आणि दया, अहिंसाप्रभृति भावनांमुळे पुढेपुढे मांस मुळीच खाअू नये हाच धर्म असें मत वळावलें. ज्याने त्याने आपले श्लोक या स्मृतीत गोवले. मांशासना-विरुद्ध श्लोकांची वानगी म्हणून हे श्लोक पहा]—

मधुपर्के च यज्ञे च पितृदैवतकर्मणि ।
अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्यब्रवीन्मनुः ॥ ४१
अेष्वर्थेषु पशून् हिंसन्वेदतत्त्वार्थविद्द्विजः ।
आत्मानं च पशुं चैव गमयत्युत्तमां गतिम् ॥ ४२
नाकृत्वा प्राणिनां हिंसां मांसमुत्पद्यते क्वचित् ।
न च प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्मान्मांसं विवर्जयेत् ॥ ४८
समुत्पत्तिं च मांसस्य वधबंधौ च देहिनाम् ।
प्रसमीक्ष्य निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात् ॥ ४९

—अ. ५

मधुपर्क-यज्ञ-श्राद्ध ह्यांतच पशुहिंसा करावी. अितरत्र केव्हाही करू नये. जो वेदमूर्ति ब्राह्मण मधुपर्क-यज्ञ-श्राद्धादिकांत पशु मारतो तो स्वतःलाच नव्हे तर त्या

पशुलाही अुत्तम गति मिळवून देतो. [पण लगेच याच्याविरुद्ध अुलटी घेअून सांगतात –] प्राण्यांची हिंसा केली तरच मांस खाता येतें; हिंसा केव्हाही स्वर्ग्य नसते; यास्तव अुत्तम गति हवी असलेल्यांनी मांस खाअू नये. प्राण्यांचे हाल नि मांसाची (शुक्रशोणितादिकांपासून होणारी गलिच्छ) अुत्पत्ति विवंचून कोणाचेंही मांस खाणें मुळीच वर्ज्य मानावें !

[अशा प्रकारच्या अनेक परस्परविरुद्ध श्लोकांची खिचडी या प्रकरणी झालेली आहे. ती अेकाच ग्रंथकाराने केली असल्यास तो भ्रांतच असला पाहिजे किंवा हे परस्परविरुद्ध श्लोक अनेकजणांचे असून ह्या स्मृतीत नुसते संग्रहिले आहेत. या दोन अुलगड्यांपैकी मनुभगवानांवर पहिला अयोग्य आरोप करण्यापेक्षा प्रामाणिक सुधारक दुसराच मार्ग स्वीकारतात आणि मांशासन करावें कीं नाही हा प्रश्न प्रयोगान्ती पटणाऱ्या अद्ययावत् वैद्यक ज्ञानानेच सोडवितात. 'मांस खाल्लें तर त्या पशूसुद्धा खाणारा स्वर्गास जातो' किंवा 'माणसाचा जीव गेला तरी पशूचा जाअू नये म्हणून मांस खाअू नका' हें हजारो वर्षांपूर्वी अमुक ऋषीचें मत होतें अेवढ्या पोथीजात शास्त्राधारावरून नव्हे. जे असले 'शास्त्राधार' परस्परविरुद्धतेमुळे परस्परांस परभारेच लटके पाडतात त्यांच्या प्रकरणी प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, अद्यतन विज्ञान जें सांगेल तेंच आज त्यातल्या त्यात ग्राह्य होय.] आता ब्राह्मणवर्गाने कायकाय खाअू नये तें सांगताना मनुस्मृति कडक आज्ञा देते—

'छत्राकं विड्वराहं च लशुनं ग्रामकुक्कुटम् ।
पलाण्डुं गृंजनं चैव मत्या जग्ध्वा पतेद् द्विजः ॥' १९
—अ. ५

छत्र्या, गावडुक्कर, लसूण, गावकोंबडा, कांदा आणि गाजर हे पदार्थ द्विजाने कळून सवरून खाल्ल्यास तत्काल पतित होतो ! [नकळत खाल्ल्यासही प्रायश्चित्तावाचून शुद्धि नाही ! मनुस्मृति अपरिवर्तनीय आहे म्हणून जे म्हणतात त्या आमच्या सनातन बंधूंचाच आजचा आचार मनुस्मृतीपासून किती दूर गेला आहे तो पाहा! निषिद्ध नाही, खावें, म्हणून मनुस्मृति ज्यास म्हणते तें मांसमत्स्य आज सनातन ब्राह्मणांस अत्यंत निषिद्ध आणि मनुस्मृति जें खाल्लें असता ब्राह्मण तत्काल पतित होतो म्हणून म्हणते ते कांदे, लसूण, गाजर, खरवस, घारगेप्रभृति पदार्थ ब्राह्मणांच्या घरोघर खाल्ले जात आहेत. राष्ट्रहितासाठी अस्पृश्योद्धार, शुद्धिप्रभृति सुधारणा करू पाहणाऱ्यांवर 'मनुस्मृतीचा सनातन धर्म अुच्छेदिणारे पाखंड' म्हणून तुटून पडून थकल्यानंतर भटभिक्षुक मंडळी आपल्या अडुचात विसाव्याची करमणूक म्हणून त्याच कांद्याची भजी, भाजी, चिवडा अुडवीत आहेत आणि गाजरें तर अुजळ माथ्याने चालताचालता कच्चींच खात गर्जताहेत, की 'आमचा श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म अपरिवर्तनीय आहे ! वचनात् प्रवृत्तिर्वचनान्निवृत्तिः'!]

स्त्रीस्वभाव नि संरक्षण

अस्वतंत्राः स्त्रियः कार्याः पुरुषैः स्वैर्दिवानिशम् ।
विषयेषु च सज्जन्त्यः संस्थाप्या आत्मनो वशे ॥ २
पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्राः न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ ३
अरक्षिता गृहे रुद्धाः पुरुषैराप्तकारिभिः ।
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः ॥ १२
नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थितिः ।
सुरूपं वा कुरूपं वा पुमानित्येव भुंजते ॥ १४
अेवं स्वभावं ज्ञात्वासां प्रजापतिनिसर्गजम् ।
परमं यत्नमातिष्ठेत्पुरुषो रक्षणं प्रति ॥ १६
नास्ति स्त्रीणां क्रिया मंत्रैरिति धर्मे व्यवस्थितिः ।
निरिंद्रिया ह्यमंत्राश्च स्त्रियोऽनृतमिति स्थितिः ॥१८

—अ. ९

स्त्रियांना त्यांच्या विषयासक्तीपासून रक्षिण्यासाठी रात्रंदिवस पुरुषांनी आपल्या अधीन ठेवावें. कौमार्यांत पिता, यौवनात भर्ता, वार्धक्यात पुत्र हाच त्यांचा पालक. त्यांच्या अधीन स्त्रियांनी रहावें. स्त्रिया स्वातंत्र्याला योग्य नाहीत. पुरुषांनी अगदी घरात कोंडून ठेवलें तरी त्या सुरक्षित राहणार नाहीत. स्वतःलाच रक्षील तीच खरी सुरक्षित; कारण प्रजापतीने स्त्रियांचा स्वभावच असा घडवला आहे, की त्या रूपास वा वयास पाहत नाहीत. सुरूप वा विरूप, पुरुष म्हटला, की त्यांस हवासा होतो. यास्तव त्यांस परक्यांपासून दूर ठेवण्याची पराकाष्ठा करावी. स्त्रियांचे जातकर्मादि सारे संस्कार मंत्रहीन असतात. ना त्यांना मंत्र म्हणण्याचा अधिकार! स्त्री स्वभावतःच अनृत आहे असें शास्त्र सांगतें! [याहूनही कडक भाषेत लिहिलेलें अशाच विचारांचे स्त्रीदोषविषयक श्लोक बहुत आहेत. त्या प्रकरणी अितकेंच ध्यानी ठेवायचें की, शास्त्रकार पुरुष होते. जर शास्त्रकार स्त्रियाही असत्या तर पुरुषदोष वर्णितांना हेच श्लोक त्यांनी पुरुषांनाही अितक्याच यथातथ्यपणे लावण्यास सोडलें नसतें. पुन्हा स्त्रियांची थोरवी वर्णिणारे, या स्त्री-निंदेच्या अगदी अुलट असे श्लोकही आहेत. त्यांची वानगी पूर्वी दिलेलीच आहे. त्या परस्परविरुद्धतेच्या दोषांचें कारण, हीं मतें निरनिराळ्या काळी भिन्नभिन्न श्लोक-कारांचीं असताही अेका मनूच्याच नांवावर दडपून दिलीं आहेत हेंच होय. यास्तव त्यांत मनूचें कोणतें तेंही सांगणें कठीण पडतें. त्या काळी महिलांविषयी पुरुषवर्गाचे मतप्रवाह किती प्रकारचे होते, अितकी अैतिहासिक माहिती देण्यापुरताच त्यांचा

अुपयोग. हेंही विसरता कामा नये की, बायबलच्या जुन्या करारापासून तो अगदी अर्वाचीन करारापर्यंत स्त्रीवर्गाविषयीचें असेच आणि याहूनही निंदक विचार बहुतेक धर्मग्रंथांतून ठायीठायी विखुरलेले आढळतात.) स्त्रिया जात्या अशा 'चंचल' नि 'अशुभ' असल्या तरी नीट रक्षिल्या तर—

यादृग्गुणेन भर्ता स्त्री संयुज्येत यथाविधि ।
तादृग्गुणा सा भवति समुद्रेणेव निम्नगा ॥ २२
अक्षमाला वसिष्ठेन संयुक्ताऽधमयोनिजा ।
शारङ्गी मन्दपालेन जगामाभ्यर्हणीयताम् ॥ २३
अेताश्चान्याश्च लोकेऽस्मिन्नपकृष्टप्रसूतयः ।
अुत्कर्षं योषितः प्राप्ताः स्वैः स्वैर्भर्तृगुणैः शुभैः ॥ २४

—अ. ९

समुद्राने नदी तशी भर्त्याच्या संगतीने स्त्री अुत्कर्षही पावते. अक्षमाला ही नीच जातीची स्त्री वशिष्ठाने वरली. मन्दपाल ऋषीशी शारंगीचा संयोग झाला. अशा आणखी कित्येक चण्डालप्रभृति हीन जातीच्या स्त्रिया अुत्तम पति प्राप्त झाल्याने जगताला पूजनीय व्हाव्या अितक्या अुत्कर्षल्या ! [वशिष्ठाने चाण्डालीशी लग्न लावलें. 'वशिष्ठश्चाण्डालीमुपयेमे' अशी श्रुतिही आहे. वशिष्ठासारख्या पतीमुळे ती चांडालीही थोरपद पावली. सप्तर्षींच्यासह पूजनीय स्थान पावणारी अरुंधती ती हीच चण्डालकन्या अक्षमाला होय, स्कंदपुराणातही ती कथा आहे. या श्लोकात चाण्डालादि हीन समजलेल्या कन्यांचे ब्राह्मणांशी झालेले हे विवाह जातिवाह्य म्हणून निंदिलेले नाहीत; अितकेंच नव्हे, तर हितपरिणामी म्हणून प्रशंसेने अुल्लेखिले आहेत. ते अेकदोनच ठिकाणी झाले नाहीत तर 'अशा प्रकारचीं अनेक हितपरिणामी अुदाहरणें' ही स्पष्ट निर्देशिलीं आहेत. पुन्हा 'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' या मनूच्या दुसऱ्या अेका नियमाचाही हाच परिणाम होत असला पाहिजे. ब्राह्मणादिकांशी चण्डालांच्या स्त्रियादेखील धर्मविधियुक्त विवाह लावीत आणि त्यांची जात पतीची तीच ठरून त्या ऋषितुल्य थोरवीस चढून ऋषिवत् पूजिल्याही जाअू शकत. देशस्थ ब्राह्मणाची मुलगी कोकणस्थ ब्राह्मणांनीही करणें नाही; बंगाली ब्राह्मणाने तर नाहीच नाही, हाच आमच्या पूर्वजांचा अपरिवर्तनीय सनातन धर्म होय ! असें मनुस्मृतीच्याच शपथेवर सांगणारे आमचे सनातनी धर्मबांधव हे वशिष्ठादिक चाण्डालकन्यका वरणारे नि मनूने प्रशंसिलेले पूर्वज 'आमच्या पूर्वजांतले नव्हत !' म्हणून सांगू धजतील काय ? वशिष्ठादि गोत्रज ब्राह्मणांची कोणची ना कोणची प्रपितामही तरी चाण्डालकन्यका ही होती; आम्हा ब्राह्मणांत चांडालांचें रक्त आहे. 'हीनयोनि अस्पृश्यादिक' हे ब्राह्मणांचे मावसभाअू आहेत हें स्पष्ट आहे !]

(४)

मागील सर्व लेखांकांत बहुधा मनुस्मृतीतील अध्यायांचाच अनुक्रम अनुसरलेला असल्यामुळे महिलेच्या विवाह, योग्यता, राहणी प्रभृतिसंबंधीची माहिती त्या त्या विषयांच्या अनुक्रमाने अेकत्र संगतवार देता आली नाही. कारण मनुस्मृतीत प्रत्येक विषयाचे सारे निर्बंध अेकत्र दिलेलेच नाहीत. पूर्वी मनुस्मृतीच्या मूळ ग्रंथात तशी ज्या त्या विषयाची चर्चा त्या त्या अध्यायात संकलितपणे असावी हें अध्यायांच्या नामकरणावरून नि त्यातील अेकंदरीतल्या श्लोकांवरून स्पष्ट होतें; पण शतकानुशतकें ज्यास जें वाटेल तें मत जुळेल तिथे आगेमागे मध्ये प्रक्षिप्त श्लोक घालून गोवले जात जात आजची मतांची खिचडी, विषयांची संगति सुटून, झालेली त्या पुस्तकात आढळत असावी हेंच अनुमान करणें भाग पडतें. अुदाहरणार्थ, नववा अध्याय पहा. यात स्त्रीपुरुषांच्या संयोगविप्रयोगात काय संबंध असावे त्यात 'धर्म्यान् वक्ष्यामि शाश्वतान्' अशी पहिल्याच श्लोकात प्रतिज्ञा केली आहे. त्याप्रमाणे त्या अध्यायात प्रथम व्यवस्था असता अचानक द्यूतादिक प्रकरणीं, शूद्रप्रकरणी, राजाने काय दंड द्यावा, हेर कसे असावेत प्रभृति अगदी निराळ्या प्रकरणींच्या राजधर्मांनी तो अध्याय खच्चून भरला आहे!

यामुळे महिलासंबंधाच्या निरनिराळ्या प्रकरणांवरील मतें, स्त्रियांच्या स्तुतिनिंदा, अित्यादि विषय पुनः पुन्हा आल्यासारखे वाटले तरी अध्यायांच्या अनुक्रमास अनुसरणें तर अपरिहार्य होतें. तथापि विषय जरी तो तो फिरून आला तरी, मतें नि विधिनिषेध मागच्या अध्यायांहून जीं नवीन तींच तेवढीं आम्ही निवडल्यामुळे माहितीची मात्र पुनरुक्ति या लेखमालेत सहसा घडू दिली नाही.

पुनर्विवाहनिषेध

स्त्रीने, तिचा पति शीलरहित, गुणरहित, स्वेच्छाचारी असला तरी नेहमी देवाप्रमाणे त्याची शुश्रूषा करावी आणि तो मेल्यानंतरही पुत्र नसला तरीही आमरण ब्रह्मचर्य पाळून अविवाहित राहावें:—

विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वा परिवर्जितः ।
अुपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत् पतिः ॥ १५४
कामं तु क्षपयेद्देहं पुष्पमूलफलैः शुभैः ।
न तु नामापि गृह्णीयात् पत्यौ प्रेते परस्य तु ॥ १५७
मृते भर्तरि साध्वी स्त्री ब्रह्मचर्ये व्यवस्थिता ।
स्वर्गं गच्छत्यपुत्रापि यथा ते ब्रह्मचारिणः ॥ १६०

—अ. ५

स्वत:चा पति मेल्यानंतर ब्रह्मचर्यव्रताने फलमूलांनी देह झिजवीत, अन्य-पुरुषाचें नांवही न घेता स्त्रीने आमरण वागावें हा झाला सुशील स्त्रीचा धर्म. पण स्वत:ची सुशील स्त्री मेल्यावर पुरुषाने कसें वागावें? तर लगेच सांगतात :—

भार्यायै पूर्वमारिण्यै दत्वाग्नीनन्त्यकर्मणि ।
पुनर्दारक्रियां कुर्यात्पुनराधानमेव च ॥ १६८

—अ. ५

पत्नी मेली असता तिचे यथाविधि दहन करून पतीने पुन्हा लग्न करावें आणि गृहस्थाश्रमाची अग्निपूजा पुन्हा यथापूर्व चालवावी.

आता वरील विधवाधर्माच्या अगदी अुलट असा विधवाधर्म अध्याय ९ मध्ये कसा सांगतात तो पहा:—

नियोगविचार

यदन्यगोषु वृषभो वत्सानां जनयेच्छतम् ।
गोभिनामेव ते वत्सा मोघं स्कंदितमार्षभम् ॥ ५०
तथैवाक्षेत्रिणो बीजं परक्षेत्रप्रवापिण: ।
कुर्वन्ति क्षेत्रिणामर्थं न बीजी लभते फलम् ॥ ५१
फलं त्वनभिसंधाय क्षेत्रिणां बीजिनां तथा ।
प्रत्यक्षं क्षेत्रिणामर्थो बीजाद्योनिर्गरीयसी ॥ ५२
देवराद् वा सपिंडाद् वा स्त्रिया सम्यङ्नियुक्तया ।
प्रजेप्सिताधिगन्तव्या संतानस्य परिक्षये ॥ ५९
विधवायां नियुक्तस्तु घृताक्तो वाग्यतो निशि ।
अेकमुत्पादयेत्पुत्रं न द्वितीयं कथंचन ॥ ६०

—अ. ९

ज्याप्रमाणे गाअींना वृषभापासून शंभर वासरें जरी झालीं तरी तीं त्या त्या वृषभांच्या धन्यांचीं समजलीं जात नाहीत तर तीं ज्याची गाय त्याचींच वासरें समजलीं जातात, त्याचप्रमाणे स्त्रियेला झालेली संतति, कोणच्याही बीजापासून असली तरी ती ज्याची स्त्री त्याचीच समजली पाहिजे. क्षेत्रबीजाचा न्यायच येथे लागू. ज्याच्या शेतात अुगवतें त्याचें धान्य. मग त्याचें बीज [अुडत्या पाखराने, वाऱ्याने वा अन्य कोण्या स्वामी नसलेल्या पराने] टाकलेलें असो! संततीच्या स्वामित्वाच्या प्रश्नी 'बीजाहून योनिच श्रेष्ठ' हाच न्याय खरा. यास्तव स्वत:च्या बीजापासून पुत्र-प्राप्ति न झाली असता स्वत:च्या स्त्रीला नियुक्त अशा परपुरुष बीजापासून जो पुत्र होतो तो त्या परक्याचा न होता तो स्त्रीच्या पतीचाच ठरला पाहिजे. कारण

पत्नी ही पतीचें क्षेत्र आहे. त्या क्षेत्राच्या अुत्पन्नाचा स्वामी तो पतीच होय. म्हणून वंशक्षयाचें संकट टाळण्यासाठी अधिकृत अनुज्ञेने दिराकडून वा सपिंडातील पुरुषाकडून – ते परपुरुष असताही त्यांशी पतीप्रमाणे संबंध ठेवून – प्रजोत्पत्ति करावी. [पति जिवंत असलेल्या स्त्रीचा हा विचार झाला. तोच न्याय विधवेलाही लागू आहे. तिनेही वडील माणसांची अनुज्ञा घेअून संततिक्षय टाळण्यासाठी नियुक्त पुरुषाचें बीज धारण करावें.] अशा रीतीने जो पुरुष नियुक्त होअील त्याने त्या दुसऱ्याच्या पत्नीशी समागम करताना सर्वांगास तूप लावून, मौन धरून, रात्री अेकांतात भेटी घ्याव्या. अेक पुत्र होअीतोपर्यंतच त्याने त्या परस्त्रीशी रतावें. ही मर्यादा अुल्लंघून दुसरा पुत्र होअीतो केव्हाही तो नियुक्तसंबंध वाढवू नये. ('न द्वितीयं कथंचन !')

[पण अितक्या कडकपणे अेकाच पुत्रास अुत्पादिण्यापुरताच संबंध ठेवावा अशी स्पष्ट मर्यादा या श्लोकात घातलेली असताही लगेच खालच्या श्लोकात त्याच्या अगदी अुलट श्लोक येतो] की:—

द्वितीयमेके प्रजनं मन्यन्ते स्त्रीषु तद्विदः ।
अनिर्वृतं नियोगार्थं पश्यन्तो धर्मतस्तयोः ॥ ६१

—अ. ९

अेक मुलगा असून नसून सारखाच. कारण तो पटकन् मरता पुन्हा वंशक्षयाची भीति ! असें समजून ती भीति शक्यतो नक्की नाहीशी करण्याच्या हेतूने काही धर्मवेत्ते आचार्य दुसरा पुत्र होअीतो त्या परस्त्रीशी नियुक्ताने रतावयास धर्माची हरकत नाही असें मानतात. पण मग मात्र तीं दोघे पुन्हा पूर्ववत् पृथक् झालीं पाहिजेत. त्यापुढेही त्यांनी कामसंबंध ठेवल्यास तीं पतित होतील.

[वरील भागात नियोगविधीचें क्षेत्रबीजादि तात्त्विक सविस्तर कोटिक्रमासुद्धा समर्थन करून त्यात स्पष्टपणे धर्मानुकूल म्हटलें असताही लगेच पाठोपाठ त्याच्या विरुद्ध हे श्लोक कसे येतात तें पाहा ! !]

नान्यस्मिन्विधवा नारी नियोक्तव्या द्विजातिभिः ।
अन्यस्मिन्हि नियुञ्जाना धर्मं हन्युः सनातनम् ॥ ६४
नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित् ।
न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥ ६५
अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः ।
मनुष्याणामपि प्रोक्तो वेने राज्यं प्रशासति ॥ ६६
समहीमखिलां भुञ्जन् राजर्षिप्रवरः पुरा ।
वर्णानां संकरं चक्रे कामोपहतचेतनः ॥ ६७

—अ. ९

विधवा नारीला कोणत्याही पुरुषाशी नियोजू नये. विधवेला नियोगाने परपुरुषाशी रतू देणें हा सनातन धर्माचा घात होय! विवाहमंत्रात नियोग (श्रुतींनी) कुठेही सांगितलेला नाही. विधवाविवाहही सांगितलेला नाही. विधवा-विवाह आणि नियोग हा केवळ पशुधर्म होय! मनुष्यात ही दुष्ट रूढि 'राजर्षि-प्रवर' वेनराजाने कामलोलुपतेने त्याचा बुद्धिभ्रंश झाला असता पाडली आणि वर्णसंकर केला. पण तिला 'विगर्हन्ति साधवः' सज्जन लोक अत्यंत निंद्य, अधर्म्य, समजतात.

[नियोगाची 'पशुधर्म' म्हणून अितकी कडक निंदा केल्यानंतरही पुन्हा या अध्यायातच नव्हे, तर अितरत्रही 'धर्म्य' म्हणूनच त्या विधीचा प्रपंच केला आहे! असा अुलटसुलट मतांचा गोंधळ कसा सारखा चाललेला आहे, त्याची वानगी म्हणून याच अध्यायातील वरील श्लोकांनंतर आलेले खालील श्लोक पहा—]

यस्तल्पजः प्रमीतस्य क्लीबस्य व्याधितस्य च ।
स्वधर्मेण नियुक्तायां स पुत्रः क्षेत्रजः स्मृतः ॥ १६७
औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृत्रिम अेव च ।
गूढोत्पन्नोऽपविद्धश्च दायादा बांधवाश्च षट् ॥ १५९
औरसक्षेत्रजौ पुत्रौ पितृरिक्थस्य भागिनौ ।
दशापरे तु क्रमशो गोत्ररिक्थांशभागिनः ॥ १६५
हरेत्तत्र नियुक्तायां जातः पुत्रो यथौरसः ।
क्षेत्रिकस्य तु तद्बीजं धर्मतः प्रसवश्च सः ॥ १४५

—अ. ९

पति वारला असता विधवेने नियोगविधीने अुत्पादिलेला पुत्रच नव्हे तर पति जिवंत असताही तो क्लीब वा व्याधिग्रस्त असल्यास वडिलांच्या अनुज्ञेने त्याच्या स्त्रीस परपुरुषाशी नियोगविधीने समागम करून जो पुत्र होतो तोही क्षेत्रज पुत्र समजला जावा. औरसपुत्राप्रमाणेच हा क्षेत्रज पुत्रही धर्म्य असून त्याला पुत्राचे श्राद्धादिक सर्व अधिकार आहेत. कारण तो 'दायाद' आहे. अितकेंच नव्हे, तर तो क्षेत्रज पुत्र दत्तक पुत्राहून श्रेष्ठ आहे.

[मनूंनी दहा पुत्र सांगितले. औरस, क्षेत्रज, दत्त, कृत्रिम म्हणजे पुत्रवत् मानलेला; गूढोत्पन्न म्हणजे लग्नानंतर स्त्रीला कोण्या अज्ञात मनुष्यापासून पतीला न सांगता झालेला पुत्र; त्यावर त्या पतीचीच सत्ता असल्याने तो पुत्र होय. लग्ना-पूर्वी स्त्री कन्या असता तिला कोणाकडून गुप्तपणे जो पुत्र होतो तोही तिच्या लग्नानंतरच्या पतीचाच समजला जातो, तो कानीन. विवाह करताना स्त्री गर्भिणी असल्यास तें पतीला माहीत असो वा नसो, पण तिला होणारा पुत्रही तिच्या पती-चाच ठरतो, तो सहोढ. विकत घेतलेला तो क्रीत. विधवेने विवाह केला असता होतो तो पौनर्भव. टाकून दिलेला नि अितरांनी वाढविलेला तो अपविद्ध.

ह्या दहा प्रकारच्या पुत्रांत औरस नि क्षेत्रज हे श्रेष्ठ होत. ह्या पुत्रांच्या प्रकारांवरून स्त्रीपुरुषांसंबंधी मनुष्यांची प्रवृत्ति त्या त्या सत्ययुगातही आजच्या कलियुगापेक्षा कोणच्याही प्रकारे अधिक संयत होती असें फारसें दिसत नाही. स्त्रियांचे असले संबंध अगदी अपवाद म्हणून शास्त्रकारांनी दुर्लक्ष करण्याअितके तुरळकही नव्हते. अितकेंच नव्हे, तर वरील प्रकारचे संबंध अितके वारंवार घडत की, त्यांचें स्वतंत्र वर्गीकरण करून पितृसंपत्तीच्या वाटणीत त्या त्या पुत्रांचे अंश ठरविणें धर्मकारांनाही भाग पडावें !

विवाहसंबंध जितके संयत नि अेकान्तिक असतील तितकी त्या समाजाची वैवाहिक नीति प्रशस्ततर होय असें जर म्हणावयाचें तर ह्या कलियुगातील वैवाहिक नीति त्या सत्यत्रेताद्वापार युगातील नीतीपेक्षा अधिक श्रेष्ठ होय असेंही मानलें पाहिजे. कारण आजचें शास्त्र औरस नि दत्तक या दोन प्रकारच्या पुत्रांनाच पुत्र समजतें. कानीन, सहोढ, गूढोत्पन्न, क्षेत्रज प्रभृति पुत्रांना पूर्वीप्रमाणे मातापितरांस पुंनाम नरकांतून तारणारे 'पुत्र' न समजता आज अुलट तसे संबंध तशा मातापितरांस नरकात ढकलणारेच समजले जातात. पण सत्ययुगादिक पूर्वीच्या युगांत तर क्षेत्रज, गूढोत्पन्न, सहोढ, कानीन अशा संबंधांचे पुत्रही मातापितरांस 'पुं' नाम नरकातून तारणारेच समजले जात. क्षेत्रज नि गूढोत्पन्न हे तर 'दायादांच्या' प्रशस्त वर्गात मोडत नि त्यांस श्राद्धाचाही प्रकट अधिकार मिळे ! या प्रकरणी तरी कलियुग हेंच सत्ययुगाहून अधिक संयत नि धर्मशील मानणें भाग आहे !

ह्या दहा पुत्रांच्या वर्गीकरणात आणि गांधर्वादि विवाहात व्यक्त होणाऱ्या त्या सत्ययुगातील स्त्रीपुरुषसंबंधीय वैवाहिक नीतीवरून असें स्पष्ट म्हणावें लागतें की, रशियातील आजची जी स्त्रीपुरुषसंबंधीय नीति, 'नवी नीति' म्हणून म्हटली जाते ती फारशी नवी नसून स्वैरतेत तरी जवळजवळ 'जुनी नीति'च आहे, 'सनातन'च आहे आणि मनुस्मृतीला सनातन धर्माचा अपरिवर्तनीय आधारग्रंथ म्हणून म्हणणाऱ्या कोणाही 'सनातनीय' गृहस्थाला तरी त्या नव्या नीतिपंथाला पाखंड म्हणून नाकें मुरडण्यास तोंड नाही ! पाखंड असलेंच तर तें नवें पाखंड नाही, अगदी मनुप्रणीत, सत्ययुगीन, सनातन, पाखंड आहे !]

कन्यादानविचार

काममामरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ।
न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ ८९
त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥ ९०
पित्रे न दद्याच्छुल्कं तु कन्यामृतुमतीं हरन् ।
स हि स्वाम्यादतिक्रामेदृतूनां प्रतिरोधनात् ॥ ९३

त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम् ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः ॥९४

—अ. ९.

कन्या ऋतुमती होऊन जन्मभर तशीच राहिली तरी चालेल पण तिला गुणहीन अयोग्य वराला केव्हाही लग्नात द्यायची म्हणूनच देऊ नये. ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षेपर्यंत वडिलांकडून लग्न ठरविलें जाण्याची वाट पाहिल्यावर मग कुमारीने आपल्याला योग्य वाटेल तो समगुणशील पति स्वतः निवडावा, वरावा. अशा अुपवर कुमारीच्या पित्यास त्या वराने कोणचेंही शुल्क देण्याचें कारण नाही- तिचा वेळीच विवाह न केल्याने आणि ऋतुप्राप्तीनंतरही तिला संभोगसुखापासून वंचित केल्याने तिच्या पित्याचें तिच्यावरील स्वामित्व त्याच्याकडे राहिलेलेंच नसतें.

विवाहित जीवनाचा आदर्श धर्म

अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणान्तिकः ।
अेष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्री-पुंसयोः परः ॥ १०१
तथा नित्यं यतेयातां स्त्री-पुंसौ तु कृतक्रियौ ।
यथा नाभिचरेतां तौ वियुक्तावितरेतरम् ॥ १०२

—अ. ९.

पतीने पत्नीशी आणि पत्नीने पतीशी कोणाच्याही प्रकारचा व्यभिचार न करता, अेकत्र असो, दूर असो; पण आमरण परस्परांशी निष्कपटपणे वर्तावें, हाच संक्षेपतः विवाहित जीवनाचा आदर्श धर्म होय !

[स्त्री-पुरुषधर्माचा हा अुत्कट समारोप झाला. ह्या अेकंदर सर्व प्रकरणात अेक गोष्ट चटकन लक्षात आल्यावाचून राहत नाही ती ही की, पतिनिधनानंतर नियोग किंवा पुनर्विवाह किंवा आमरण ब्रह्मचर्ययुक्त जीवन नेण्याचें विधवेचे तिन्ही धर्मसंप्रदाय सांगितले असताही विधवेने पतीसह सती जावें. पतीमागे जगूच नये. असा विधि मात्र अिथे कुठेही धडधडीतपणे पुरस्कारिलेला नाही. सतीची रूढि प्रचलित झाल्यानंतरच्या कोण्या सतीच्या अभिमानी शास्त्रकाराने आपल्या त्या मताचेही पाचपंचवीस श्लोक ह्या स्मृतीत कसे घुसडले नाहीत देव जाणे ! क्वचित् तोपर्यंत ही मनुस्मृतीची शेवटची संकलित प्रत जी भृगुसंहिता ती अितकी मोजून मापून, लेखी तोंडी सर्वप्रसिद्ध झालेली असेल की, तिच्या त्या अनुक्रमणिकाध्यायांचीं पक्कीं कडीकुलपें ठोकून बंद केलेल्या पोलादी पेटीत वाहेरच्या अेका अक्षराची मुगीही घुसणें अशक्य व्हावें !]

पुत्र आणि पुत्री

यथैवात्मा तथा पुत्रः पुत्रेण दुहिता समा ।
तस्यामात्मनि तिष्ठन्त्यां कथमन्यो धनं रहेत् ॥ १३०

—अ. ९

मुलगा हा आपला आत्माच आहे. मुलगी ही पण मुलाप्रमाणेच आहे. तेव्हा ती जिवंत असता (निपुत्रिक पित्याचें धन) तिच्यावाचून कोण घेऊ शकणार!

अपुत्रोऽनेन विधिना सुतां कुर्वीत पुत्रिकाम् ।
यदपत्यं भवेदस्यां तन्मम स्यात्स्वधाकरम् ॥ १२७

—अ. ९

निपुत्रिकाने (मुलीच्या ठिकाणी अुत्पन्न होणारा पुत्र माझे श्राद्धादि विधि करो असें तिच्या लग्नाच्या वेळी ठरविणाऱ्या) विधीने मुलीलाच मुलाचे अधिकार अर्पावे; कारण—

पौत्रदौहित्रयोर्लोके न विशेषोऽस्ति धर्मतः ।
तयोर्हि मातापितरौ संभूतौ तस्य देहतः ॥ १३३

—अ. ९

मुलाचा मुलगा आणि मुलीचा मुलगा यात धर्मदृष्टीने मुळीच अंतर नाही; कारण तीं दोघेही आजाच्याच देहापासून निर्मिलेलीं असतात. (याच्या अुलटही काही वचनें आहेतच!)

स्त्रीवध

मनुस्मृतीत, ती आज ज्या भृगुसंहितेच्या रूपाने आपल्यापुढे आहे, अशा स्थितीतही, स्त्रियांना ब्राह्मणांप्रमाणेच अेक विशेष सवलत मात्र अेकंदरीत अगदीं स्पष्टपणे आणि जवळ जवळ विरुद्ध श्लोकांच्या अभावाने अेकमते दिलेली आढळते. ती म्हणजे, स्त्री ही अवध्य आहे, तिला मारणें हें 'महापाप' आहे. तिच्या हातून मोठमोठे अपराध घडले तरीही तिला वध-दंड होता कामा नये असा कडक दंडक घालून देणें ही होय. ह्या प्रकरणी मात्र स्त्रियांना आजच्या दंडविधानापेक्षा (क्रिमिनल लॉपेक्षा) मनुस्मृतीचें प्राचीन दंडविधानच परवडेलसें वाटतें! अुदाहरणार्थ, खालील श्लोक पहा—

बालघ्नांश्च कृतघ्नांश्च विशुद्धानपि धर्मतः ।
शरणागतहन्तॄंश्च स्त्रीहन्तॄंश्च न संवसेत् ॥ १९०

—अ. ११

धार्मिक म्हणजे तत्त्वज्ञानविषयक वितंडवाद नव्हे. ज्या कारणासाठी कुराणास आप्तवाक्य न मानणारा तुर्की राष्ट्रीय पक्ष खिश्चनांनी तुर्की मुली वाटवू नये म्हणून त्यांच्या शाळा सक्तीने बंद पाडतो, त्याच कारणासाठी हिंदु मुली वाटविल्या जाऊ नयेत म्हणून हिंदु संघटन झटतें. शुद्धि म्हणजे काय तें आम्हांस कळतच नाही असें म्हणणाऱ्यांनी तिचा अर्थ केमालपाशापासून तरी शिकावा.

✦ ✦ ✦

परम दयाळू हिंदुस्थान सरकारने चित्रकलेविषयी विशेष ज्ञान मिळविण्याकरिता काही हिंदी चित्रकारांस शिष्यवृत्या देऊन युरोपात पाठविण्याचें ठरविलें आहे ! झालें. आता हिंदुस्थानच्या भाग्योदयास काय अुशीर !

कारण हिंदुस्थानची जी अत्यंत दुर्बळ दास्यग्रस्त दरिद्रावस्था झालेली आहे ती त्यास 'चित्रकलेचें विशेष ज्ञान' नव्हतें म्हणूनच होय !

बाकी सारें ज्ञान विज्ञान त्याला करतलामलकवत् झालेलेंच आहे. मशीनगन्स, विमानपटुता, संचालन, विध्वंसिका, पाणबुड्या, सैनिक कौशल्य, विषारी धूर, विषारी धुराचा प्रतिकार करणारीं रसायनशास्त्रें अित्यादि प्रबल राष्ट्रास अत्यंत अवश्य, ती ती कला शिकण्यास हजारो विद्यार्थी हिंदुस्थान सरकारने आजवर विदेशी धाडून हिंदुस्थानात ते येताच त्यांचीं मोठ मोठीं सबल पथकें हिंदुस्थानचे संरक्षणार्थ सज्ज करून ठेविलेलींच आहेत ! राहता राहिली होती चित्रकला ! म्हणून आता तीही शिकण्यास विद्यार्थी विदेशात धाडण्यात येणार आहेत. ते अेकदा का परत आले की मग काय छाती लागली आहे, त्या रशियनांची किंवा अफगाणांची या हिंदुस्थानावर स्वारी करावयास ! ते तर काय, या चित्रकलेत अेकदा का हिंदुस्थान तज्ज्ञ झालें की, अिंग्रजी पलटणें देखील पळून जातील पळून !

✦ ✦ ✦

सिद्दीक नांवाच्या अेका मुसलमानाने आपल्या हिंदूंतील जैन पंथाचे स्थापक श्रीमान् चन्न बसवेश्वर यांचे आपण अनुयायी आहोत असें प्रथम प्रसिद्ध करून, आता त्याच श्रीबसवेश्वराचे नांवाखाली हिंदूंस मुसलमानी धर्म हाच अत्युत्तम धर्म आहे म्हणून दीक्षा देण्यास आरंभ केला आहे ! आगाखानही कलंकी अवताराच्या नांवानेच हिंदूंस मुसलमानी दीक्षा देत असतात ! ! तें ठीकच आहे. कारण –

खिस्ती पुराणात अशीं अेक अनुश्रुति आहे की, सैतान प्रथम आपल्या स्वत:च्या नांवानेच लोकांस सैतानी पंथाचा अुपदेश देअू लागला. पण आस्तिक लोक तें सैतानाचें मत आहे असें अैकताच तें अैकण्यास सिद्ध नसत. हें पाहून चिंतायुक्त स्थितीत सैतान विचार करीत असता त्याला आपल्या जाळ्यात आस्तिकांस देखील सहज ओढण्याची अेक युक्ति सुचली. तेव्हा

बालहत्या, कृतघ्नता, शरणागतहत्या आणि स्त्रीहत्या हीं घोर पापें करणाऱ्या मनुष्याशी (प्रायश्चित्त घेतलें तरीही) कोणी कोणच्याही प्रकारचा संबंध ठेवू नये.

आतेबहीण, मावसबहीण, प्रभृतींशीं विवाह करू नये !

पैतृष्वसेयीं भगिनीं स्वस्रीयां मातुरेव च ।
मातुश्च भ्रातुस्तनयां गत्वा चांद्रायणं चरेत् ।। १७१
एतास्तिस्रस्तु भार्यार्थे नोपयच्छेत्तु बुद्धिमान् ।
ज्ञातित्वेनानुपेयास्ताः पतति ह्युपयन्नधः ।। १७२

—अ. ११

आतेबहीण, मावसबहीण, मामेबहीण (किंवा भाची, पुतणी) ह्यासारख्या बहिणीप्रमाणे असणाऱ्या स्त्रियांशी लग्न लावणाऱ्या (वा संभोग करणाऱ्या) पुरुषास अधोगति प्राप्त होते, तो पतित होतो. [आज अनेक जातीतच काय पण प्रत्यक्ष ब्राह्मण जातीतही ह्या काही चाली धडधडीत चालू आहेत. आणि मनुस्मृतीत अस्पृश्यतादि जे आचार सांगितले आहेत त्यास तोडता म्हणून सुधारकांवर तुटून पडणारे अनेक ब्राह्मण–ब्राह्मणेतर सनातनी ह्या चाली पाळणाऱ्या जातीतही आहेतच ! त्यांनी स्वतःच पतित म्हणणें सोडून मनूंतील आचार परिवर्तनीय आहेत, त्रिकालाबाधित नाहीत आणि राष्ट्रहितास परवडतील ते घेऊन शेष सोडावे असें तरी मानलें पाहिजे. तीच स्थिति कन्येच्या शुल्काविषयी. शूद्रांनी देखील शुल्क घेऊ नये. शुल्क घेणें हें प्रच्छन्न कन्याविक्रयाचें पापच आहे असे अनेक कडक निषेधाचे श्लोक मनूत असताही कित्येक ब्राह्मण ज्ञातीसुद्धा, शुल्क धडधडीत धर्मसंस्कारपूर्वक घेतात नि तरीही ' मनूतील अक्षर नि अक्षर त्रिकालाबाधित धर्म ' आहे म्हणून ओरडतच असतात ! शुल्कनिषेधाचे वानगी दाखल म्हणून अनेक श्लोकांपैकी खालील श्लोक पाहा]—

आर्षे गोमिथुनं शुल्कं केचिदाहुर्मृषैव तत् ।
अल्पोऽप्येवं महान्वापि विक्रयस्तावदेव सः ।। ५३

—अ. ३

आर्ष नांवाच्या विवाहात, की जो विवाह ब्राह्मणांनाही युक्त असून ज्यांनी सात पिढ्या अुत्तम गति पावतात म्हणून (अ. ३: ३८ श्लोकात मनुभगवानांनीच सांगितलें आहे, त्यातही) कन्येच्या पित्याला वराने अेकदोन गायबैलांच्या जोड्या द्याव्या म्हणून जरी ' कित्येक ' म्हणतात तरी तें व्यर्थ आहे. कारण थोडें वा फार असो, पण शुल्क घेणें म्हणजे कन्यविक्रयच असल्याने तो प्रकार निंद्यच होय. [फारकशाला, ब्राह्मणांनी तर काय, पण शूद्रांनी सुद्धा या पापापासून दूर राहावें.]

आददीत न शूद्रोपि शुल्कं दुहितरं ददन् ।
शुल्कं हि गृह्णन्कुरुते छन्नं दुहितृविक्रयम् ॥ ९८
नानुशुश्रुम जात्वेतत्पूर्वेष्वपि हि जन्मसु ।
शुल्कसंज्ञेन मूल्येन छन्नं दुहितृविक्रयम् ॥ १००

—अ. ९

शूद्राने देखील कन्येचें मूल्यच असलेलें शुल्क घेऊ नये. त्याला शुल्क नाव दिलें तरी तो लवाडीने छपविलेला कन्याविक्रयच होय ! पूर्वीच्या युगातही कन्याविक्रयाचें पाप ज्या गोंडस नांवाने छपविलें जातें तें शुल्क कोणीही घेतल्याची गोष्ट आम्हांस ठाऊक नाही !

[मनुस्मृतीतले सारे श्लोक, जगदुत्पत्तीसहच मनुभगवानांनी सांगितले नि त्यातील अक्षर नि अक्षर अपरिवर्तनीय धर्म आहे या दोन्ही समजुती साफ खोटच्या पाडण्यास हे तीनचार श्लोकदेखील अगदी विनतोड पुरावा आहे ! जर जगदुत्पत्तीसहच ही स्मृति रचली तर तिच्यात वारंवार जे ' कित्येक अमुक म्हणतात ' अशीं भिन्न आचार्यांचीं मतें सांगून तीं खुडलीं आहेत ते आचार्य काय साऱ्या सृष्टीच्याही आधी झाले होते ? ' कित्येक असे पुढे म्हणतील ' अशी भाषा देखील नाही. ' म्हणाले म्हणतात ' अशी भाषा आहे. अर्थात् ऐतिहासिक दृष्टीनेच याचा अगदी नीट अुलगडा होतो की, भृगूने ही संहिता रचतेवेळी ज्या अनेक आचार्यांचीं मतें प्रचलित होतीं तीं अुल्लेखिलीं आणि प्राचीन मनुस्मृतीचे हे संस्कार सिद्ध केले. अनेक स्मृत्या त्या काळी असल्याचे कितीतरी अुल्लेख ' या वेदबाह्याः स्मृतयः ' प्रभृति श्लोकांतून स्पष्टपणे आलेले आहेत ! सर्व सृष्टि अेक दिवशी झाली नाही, मनुष्यच सृष्टीनंतर लाखो वर्षांनी झाला, तर मनूंची गोष्टच दूर ! ह्या सृष्टिविज्ञानाने सिद्ध झालेल्या घटना नाकारून या ग्रंथाचें योग्य तें महत्त्वही कमी करण्याचें पाप ' सनातन ' थोतांडाने कोणी करू नये हेंच युक्त. पुन्हा वरील श्लोकात ' शुल्क घेण्याची चाल आम्ही कधीही अैकली नाही ' असें ठासून सांगणारा हा ग्रंथकार स्वतःच ' आर्ष विवाहात शुल्क घेतात; ब्राह्मणांच्या सात पिढ्या तो विवाह अुद्धारतो ' हें याच ग्रंथाच्या तिसऱ्या अध्यायात तितकेंच ठासून सांगतो ! अर्थात् तो ग्रंथकार अेकच होता हें मानून त्यास भ्रमिष्टात ढकलण्यापेक्षा हे असले अगदी परस्परविरुद्ध असे अनेक श्लोक अनेक शास्त्रकारांनी वेळोवेळी रचलेले नि नंतर अेकत्र संकललेलेच मानणें हेंच त्या थोर स्मृतिकारांच्या योग्यतेस निष्कारण कमीपणा न आणणारें नाही काय ? सामान्य ग्रंथकारालाही जी गोष्ट सुसंगतपणे सांगता येते ती मनुभगवानांना सांगता आली नाही आणि त्यांच्या ग्रंथात अितकी विसंगतता आहे, की त्यांचा समन्वय लावण्यास मीमांसादिकांच्या अवडंबरी नि

अतथ्य गृहीतकृत्यांचें अुसनें साहाय्य घ्यावें लागावें असें मानण्यातच मनुभगवानांची असह्य निंदा आमच्या ' सनातनी ' थोतांडात घडत आहे !]

पुरुष हा स्त्रीहि आहे, पति हा पत्नीच्या अुदरीं जन्मतो–

पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वेह जायते ।
जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः ॥ ८
अेतावानेव पुरुषो यज्जायात्मा प्रजेति ह ।
विप्रा प्राहुस्तथा चैतद्यो भर्ता सा स्मृतांगना ॥ ४५

—अ. ९

पति हा गर्भरूपाने पत्नीच्या पोटी पुनः जन्मतो यास्तवच पत्नीला जाया म्हणतात. ज्या अर्थी पुरुष हा स्वयमेव पूर्ण शरीर नसून आपल्या स्त्रीशी समागम पावल्यावरच त्याचा देह पूर्णता पावतो नि प्रजोत्पादनक्षम होतो त्याअर्थी शहाणे लोक भर्ता हीच भार्या, पुरुष हाच स्त्री होय. (ते दोन्ही मिळूनच अेक देह, एक जीव होतो असें म्हणतात !)

प्रसंगी स्त्रीनें शिल्पवृत्ति करावी

विधाय वृत्तिं भार्यायाः प्रवसेत् कार्यवान्नरः ।
अवृत्तिकर्षिता हि स्त्री प्रदुष्येत्स्थितिमत्यपि ॥ ७४
विधाय प्रोषिते वृत्तिं जीवेन्नियममास्थिता ।
प्रोषिते त्वविधायैव जीवेच्छिल्पैरगर्हितैः ॥ ७५

—अ. ९

पतीने दूर प्रवासी जाताना पत्नीच्या पोषणाची व्यवस्था करून जावें. चरितार्थाची सोय नसली म्हणजे चांगली स्त्रीदेखील बिघडण्याचा संभव आहे. पतीमागे पत्नीने नियमपालनाने दिवस काढावे. अगदीच साधन नसेल तर योग्य तें शिल्पव्यवसायही करून पोट भरावें. [ह्या नि पूर्वी स्त्रीस्वभावाविषयी दिलेल्या अनेक श्लोकांवरून सत्ययुगातील माणसें कलियुगातील माणसांहून काही निराळीं नव्हतीं हें अुघड आहे. तींही ' बिघडत ' असत. अितकी वारंवार की, सत्ययुगा-मध्येही त्यांना निर्बंधाच्या कडीकुलपात ठेवता ठेवता स्मृतिकारांनीही हात टेकून म्हणावें की, ' मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नाविविक्तासनोऽभवेत् ! बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥']

अनुलोमविवाही वाटणी

ब्राह्मणस्यानुपूर्व्येण चतस्रस्तु यदि स्त्रियः ।
तासां पुत्रेषु जातेषु विभागेयं विधिः स्मृतः ॥ १४९

त्र्यंशं दायाद्धरेत् विप्रो द्वावंशौ क्षत्रियासुतः ।
वैश्याजः सार्धमेवांशमंशं शूद्रासुतो हरेत् ॥ १५०

—अ. ९

ब्राह्मणाला चारी वर्णाच्या चार लग्नाच्या भार्या असतील तर त्या चारींच्या मुलांनाही त्यांच्या मातेची वाटणी मिळावी. तीन भाग ब्राम्हणीपुत्र, दोनभागी क्षत्रियापुत्र, दीड वैश्यापुत्र नि अेक शूद्रपुत्र. [मातृसावर्ण्य चालू केल्यावरही ब्राह्मणांदिकांकडे भिन्नवर्णीय लग्नाच्या वायका असून त्यांचे पुत्र दायादाचा धार्मिक अधिकार अुपभोगीत हें ह्या प्रकारच्या अनेक श्लोकांवरून अुघड आहे. पण नेहमी-प्रमाणे त्या खाली लगेच अुलट श्लोक दत्त म्हणून अुभा आहे की, ' ब्राह्मणक्षत्रिय विशां शूद्रापुत्रो न रिक्थभाक् ! ' (अ. ९: ११५) शूद्रास्त्रीच्या पुत्राला वाटा मुळांच देअू नये !!]

[१० व्या अध्यायात प्रतिलोम विवाहापासून होणाऱ्या संतति कोणच्या जातीत मोडतात त्याचें वर्णन आहे. यावरून आज चंडाल, अग्र, मांग, निषादं, प्रभृति अस्पृश्य जाती आहेत त्या वहुतेक चातुर्वर्ण्याच्याच रक्तवीजाच्या आहेत असे मनु-स्मृतीस सर्वथैव प्रमाण मानणाऱ्यांनी तरी मानलेंच पाहिजे.] अुदाहरणार्थ—

शूद्रादयोगवः क्षत्ता चंडालश्चाधमो नृणाम् ।
वैश्यराजन्यविप्रासु जायन्ते वर्णसंकराः ॥ १२

—अ. १०

शूद्र पुरुषापासून वैश्यस्त्रीच्या ठायी झालेला तो अयोगव, क्षत्रिय स्त्रीच्या ठायी क्षत्ता नि ब्राह्मण स्त्रीच्या ठायी चांडाल अुत्पन्न झाला. [म्हणजे समजा, अेका ब्राह्मणास दोन मुली. अेक ब्राह्मणाला दिली तिचा पुत्र ब्राह्मण. दुसरी शूद्राला मिळाली तिचा पुत्र चांडाल. म्हणजे आजचे महार प्रभृति अस्पृश्य हें आम्हां ब्राह्मणा-दिकांचे सख्खे मावसभाअू आहेत !! त्यांच्यांत आमच्यांत अेकच रक्तबीज संचरतें आहे ! पुन्हा ब्राह्मणांनी चांडालादिक स्त्रियांशी विवाह केल्याचीं अुदाहरणें ह्याच स्मृतीतील मागे दिलेल्या श्लोकांतून दिलेलींच आहेत. त्या चंडाल स्त्रिया ब्राह्मणीच होअून ' जगद्वंद्य ' झाल्या !]

जे जे श्लोक प्रक्षिप्त ते ते वाईटच आहेत असें नाही !

मनुस्मृतीतील महिलाविषयक बहुतेक महत्त्वाचे श्लोक या लेखमालेची स्थल-मर्यादा सांभाळून देता आले तितके येथे दिले. मनुस्मृतीच्या यापुढच्या अकराव्या बाराव्या अध्यायांत या विषयाचे फारसे श्लोकही नाहीत. लेखावकाशही संपला. तेव्हा आता समारोपाच्या वेळी या लेखमालेत, प्रक्षेपक श्लोकांनी मूळ ग्रंथात पर-स्परविरुद्ध विधानांचा जो धुडगूस घातला आहे त्याविषयी वारंवार जें दोषसूचक

दंडक ! त्यामुळे पुढच्या शास्त्रकारांना आपल्या सुधारणा लोकांच्या गळी अुतरविण्यास आपले श्लोक मनूच्या प्राचीन स्मृतीतच दडपण्यावाचून गत्यंतर अुरलें नाही ! हा दोष मुख्यत: त्या प्रक्षेपकांचा नसून त्याचें खापर पुष्कळ अंशी ह्या आमच्या पूर्वापार 'शब्दनिष्ठ सनातन' प्रवृत्तीवरच फोडलें पाहिजे !

ऐतिहासिक दृष्टीनें मात्र ही अडचण मुळीच पडत नसून सारा उलगडा समाधानकारकपणे होतो.

परंतु कोणचा श्लोक प्रक्षिप्त, कोणचा मूळ, कोणचा वेदनिष्ठ नि कोणचा वेदवाह्य, ही भानगड ऐतिहासिक दृष्टीने हा ग्रंथ वाचणाऱ्या आम्हासारख्यांस मुळीच नडत नाही. तो अेक ऐतिहासिक चर्चेचा विषय अितकेंच त्याचें महत्त्व. राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत राष्ट्रधारणास जो श्लोक अुपयुक्त वाटेल तो, मनूचा असो, प्रक्षिप्त असो, तो आम्ही आचरू; जेथे तो परवडणार नाही तेथे राष्ट्रहितसाधक असे अद्ययावत् ज्ञानाच्या कसोटीस अुतरणारे नवीन निबंध करू. खरेंखोटें, चांगलेंवाअीट, हें ठरविण्याची 'अर्वाक्कालिकता' ही अेकमेव कसोटी आहे हें आम्हांस मुळीच मान्य नाही. तसेंच जुनें तें सोनें हें जसें कधी खरें असतें तसें जुनें तें शिळें हेंही खरेंच असतें.

मनूचें अक्षर नि अक्षर खरेंच, ती स्मृति सुसंगतच आहे असे मानणाऱ्या शब्दनिष्ठ सनातन्यांनाही तीतील शेकडो धडधडीत अन्योन्यविरुद्ध श्लोकांचा समन्वय लावता नाकी नव येअून शेवटी प्रत्येक टीकाकार मनुस्मृतीचे श्लोक जरी पालटत नाहीत तरी अर्थ फिरवून अेकेक नवीन मनुस्मृति लिहितो. मनूत मांस खाणें धर्म्य आहे असें म्हणून ब्राह्मणांच्या काही जातीच्या जाती मांस खातात. काही मांस वर्ज्य पण मासे धर्म्य म्हणून मनूच्या नांवे मासे खातात, काही मनू दोन्ही वर्ज्य मानतो असा समन्वय लावून केवळ शाकाहार करतात ! ही प्राचीन परंपरा आजही चालवून कोणी अनुलोम विवाह मनूच्या नांवे अधर्म्य समजतात तर कोणी त्याच मनूच्या नांवे आज धडधडीत प्रतिलोम विवाह 'शास्त्रोक्त' मानून ब्राह्मणाची मुलगी वैश्यास देतात ! अशी विचाऱ्या मनूच्या शब्दाशब्दाची कुतरओढ होअून आजही मनुस्मृतीच्या श्लोकांची अेकच प्रत असता तिच्या अर्थाच्या पांचशे-जणांनी पांचशे मनुस्मृत्या करून सोडल्या आहेत !

पण ऐतिहासिक दृष्टीच्या वाचकांना तसा दुसराही शब्दच्छल करण्याचें कारणच पडत नाही. आजची मनुस्मृति अेकटाकी, सुसंगत, अेका ग्रंथकाराची मूळस्मृति नाही; ती अेक भिन्न मतांची संकलित संहिता आहे. वेदकाळच्या अितिहासाप्रमाणे ज्या रूढि अत्यंत प्राचीन ठरतात त्यांचे समर्थक श्लोक पहिले, त्यानंतरच्या अितिहासकालात ज्या रूढी गळलेल्या आढळतात त्यांच्या – नियोग, मांसाशनप्रभृति – निषेधाचे श्लोक त्यानंतरचे प्रक्षिप्त, अशा अितिहासाच्या स्वतंत्र

पुराव्याने प्रक्षिप्त श्लोकांची छाननी अेकंदरीत वरोवर करता येते. तरीही अमुक श्लोक मूळचा वा प्रक्षिप्त आहेच आहे असा दुराग्रहही धरणें दुर्घट आहे – अितकी ती खिचडी शिजून अेकजीव झालेली आहे – हेंही अैतिहासिक वाचक विसरत नाही. शेवटी कोणचाही श्लोक मूळचा म्हणून चांगला, प्रक्षिप्त म्हणून वाअीट वा स्मृतीतला म्हणूनच अनुल्लंघ्य असें मानीत नाही; तर आजच्या राष्ट्रीय परिस्थितीत हितकारक असेल तर मानतो, नाहीतर तसा हितकारक तो नवीन निर्वध नवीन म्हणून चक्क सांगून स्वीकारतो. विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, अद्ययावत् प्रवृत्ति हीच. ह्याच प्रवृत्तीने नि ह्याच अैतिहासिक दृष्टीने मनुस्मृतिच नव्हे, तर श्रुतिही वाचल्या असता त्यांच्या अर्थाची दुर्दशा न होता तो पुष्कळ अधिक सरळपणे लागतो, त्या ग्रंथाची नसती विटंबना टळते.

शेवटी या लेखमालेच्या आरंभी दिलेल्या कारणासाठी या प्राचीन नि पूज्य महाग्रंथाची थोरवी आठवून नि त्याचे आमच्या हिंदुराष्ट्रावर शतकानुशतकें झालेले अुपकार स्मरून, अेका काळी जपानपासून यवनद्वीपापर्यत (ग्रीसपर्यत) धर्मग्रंथ वा निर्वधशास्त्र म्हणून मूर्धाभिषिक्त्व पावलेल्या नि शतभाषांतून भाषांतरिलेल्या त्या मनुस्मृतीस नि मनुभगवानांसच नव्हे तर, भृगुसंहितेस नि भृगुऋषींसही वारंवार वंदून आम्ही ही लेखमाला संपवितो.

✦ ✦ ✦

व्रतविधि आणि विवेक

(उत्तरार्ध)

'व्रतें आणि वैकल्यें' या विषयाच्या पूर्वार्धात जें विवेचन केलें त्यातील मुख्य विधेयें (पॉअिंट्स्) या अुत्तरार्धाच्या अनुसंधानार्थ अवश्य तितकीं प्रारंभीच अुल्लेखिणें भाग आहे. तीं विधेयें अशीं[1] –

(१) धार्मिक श्रद्धेच्या दृष्टीने देखील अीश्वर हा सत्यस्वरूप आहे. सत्य म्हणजे जें आहे तें आहे तसेंच मानणें. सृष्टीचें वा सृष्टिकर्त्याचें ज्ञान नि अुपासना म्हणजे त्या सत्याचीच अुपासना असली पाहिजे. 'न हि सत्यात्परो धर्मः नानृतात्पातकं परम्' हें लक्षण नुसतें सत्य बोलण्याच्या अेका व्यावहारिक आचाराचें

१. 'व्रतें आणि वैकल्यें' हा निबंध दुसऱ्या खंडात शेवटी आला आहे. त्याच विषयाचा हा अुत्तरार्ध आहे.

नसून तें वर दिलेल्या अत्यंत व्यापक अशा तात्त्विक अर्थीच सर्व सुसंस्कृत धर्मांत संमतिलेलें आहे. तेव्हा ज्या ज्या व्रतात आणि अुपासनेत सृष्टीच्या यथातथ्य स्वरूपाची विकृति गृहीत धरलेली असते तीं सर्व व्रतें असत्याचीच अुपासना होत असल्यामुळे अधर्म्य ठरतात. मनुष्यात सत्याचा प्रसार करण्याचें धर्मकृत्य त्या व्रतामुळे अडखळतें आणि असत्याचा प्रसार करीत राहण्याचें पाप मात्र पदरी पडतें. हजारो वर्षांपूर्वी अनेक वस्तूंच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान मनुष्यास नव्हतें. त्या वेळेस त्यांना जें स्वरूप त्या काळच्या अपक्व ज्ञानामुळे सत्य वाटलें त्याची अुपासना करणारीं व्रतें, कथा, आख्यानें त्यांनी प्रचलविलीं यात त्यांचा तितकासा दोष नाही. परंतु त्यावर त्रिकालावाधित धार्मिक सत्याचा छाप मारण्याच्या चुकीमुळे तें हजारो वर्षांपूर्वीचें मानवी अज्ञान चिरस्थायी करण्याचें मात्र पाप आता आम्ही करू नये. प्रत्यक्षनिष्ठा नि प्रयोगक्षम विज्ञानाच्या प्रगतीने ज्या ज्या पूर्वीच्या सृष्ट पदार्थविषयीच्या कल्पना आज साफ खोटच्या पडल्या आहेत, त्या आपण जरी पूर्वी त्यांस धर्म समजलें गेलें असलें तरीही असत्य म्हणून आज टाकून दिल्या पाहिजेत, आणि त्या असत्याच्या पायावर अुभारलेलीं तत्तद्विषयक जीं जीं व्रतें वा अुपासना असतील त्या साफ सोडून दिल्या पाहिजेत.

(२) आज केवळ असत्याचीच पूजा ठरणाऱ्या अशा शेकडो व्रतांचें अेक चटकन् लक्षात येण्यासारखें अुदाहरण म्हणजे ज्योतिर्गोलविषयक व्रतांचा गट होय. चंद्रसूर्यशनिशुक्रमंगळप्रभृति ज्योतिर्गोल ह्या स्वतंत्र नि सजीव अशा देवता असून मनुष्याच्या स्तुतिनिंदेने त्या प्रसादू वा प्रक्षोभू शकतात, अशी मनुष्याची पूर्वी जगभर समजूत होती. आपल्या हिंदूंतच नव्हे, तर प्राचीन काळच्या बहुतेक राष्ट्रांतून नि धर्मांतून ही समजूत आणि तीवर आधारलेल्या त्यांच्या अुपासना, व्रतवैकल्यें प्रचलित असत. पण आता ज्योतिषशास्त्राच्या प्रगतीमुळे हें प्रयोगसिद्ध झालेलें आहे की, हे सारे ज्योतिर्गोल निर्जीव पदार्थ असून त्यांच्या गतिस्थिति ह्या गणिताच्या कठोर नियमांनी बद्ध असून त्यांच्या प्रकाशघर्षणादिकांचे मनुष्यांवर होणारें परिणाम हे मनुष्यांच्या स्तुतिनिंदेने अथवा ब्राह्मणभोजनाने वा महारांस दान दिल्याने वा दगडास तेलशेंदूर फासल्याने वा शनिवारमंगळवारी अुपाशी राहिल्याने वा अर्घ्यप्रदानाने वा शनिमाहात्म्याच्या वा सूर्यमाहात्म्याच्या पारायणाने लेशमात्र बदलू शकत नाहीत. त्यांचे परिणाम टाळण्याचा मार्ग शनिमाहात्म्यातील भाकडकथांप्रमाणे वागणें हा नसून, गणितरसायनवैद्यक या प्रयोगक्षम विज्ञानांच्या नियमांस समजून घेणें आणि त्यांच्या आधारे ते ते वैज्ञानिक प्रत्यक्ष फलदायी अुपाय योजणें हा होय. मनुष्यास हें ज्ञान आता झालें असताही पूर्वीच्या अज्ञानाला 'धर्म' म्हणून अुराशी बाळगणें आणि त्याची ती ती अुपासना, व्रतवैकल्यें करीत राहणें ही असत्याचीच पूजा होणारी असल्यामुळे निर्भेळ अधर्म होय.

अगदी ताजें अुदाहरण आगगाडीचें घ्या. हिंदुस्थानात प्रथम आगगाडी आली,

तेव्हा शेकडो गावकऱ्यांना ती अेक देवीच वाटली. ना घोडा, ना बैल, ना गाढव जुंपलेलें; पण अेखाद्या वाघिणीसारखी धावते आहे भरमसाट! अेक अद्‌भुत प्राणीच कोण्या अगम्य जंगलातून सुटला नि गावात शिरला जसा! आणि त्याची वीण वाढून जिकडेतिकडे आगगाडीच आगगाडी झाली! अेखाद्या आता नसलेल्या भुयाराचें तोंड फटकन् दगड अुचलताच अुघडावें नि आतून सापाचें पेव फुटून भराभर सापच साप जिकडेतिकडे धावू लागावे तसें तें आश्चर्य! कित्येक वर्षें अनेक गावकरी लोहपथाच्या तारापाशी तिष्टत नि आगगाडी येताच त्या देवीस प्रसादविण्यास्तव नवसाचे नारळ खटाखट फोडीत! त्यातल्या त्यात जितकें वरें झालें, की केवळ अडाणी लोकांतच ही भावना राहिली आणि अुपाध्यायवर्गाने ती अंगीकारली नाही. पण जर का कोण्या पंडितास त्या देवतेवर काही संस्कृत अनुष्टुपें रचण्याची क्लृप्ति सुचली असती तर आगगाडीविषयीच्या त्या अडाणीपणावर 'धर्मा'चें पुट चढून आपल्या नवसास पावणाऱ्या देवतांत अेका आगगाडीची नि अेका आगगाडीवाराची वा व्रताची चिरंतन भर पडली असती! पण धार्मिक वर्गास दुसऱ्याच अेका कारणाकरिता अशी बुद्धि झाली नाही नि तें अडाणीपण त्यावर धार्मिक छाप पडून चिरंतन होण्याचें संकट टळलें. तें कारण असें की, ती आगगाडी तिच्या डब्यात महारांसुद्धा साऱ्यांना सरमिसळ बसवी – सोळें नेसून बसण्याची त्या बयाने कोणतीही स्वतंत्र सोय केली नव्हती! यामुळे ती धार्मिक पूजेस पात्र ठरली नाही, पण तरीही धार्मिक निंदेस पात्र ठरलीच! पुष्कळ वर्षांपर्यंत आगगाडी असताही अुपाध्याय नि भाविक वर्ग बैलगाडीतूनच तीर्थयात्रादिकांस जात नि आगगाडीतून वा आगनावेतून प्रवासल्यानंतर कपडयांसुद्धा स्नान केल्यावाचून घरात प्रवेशत नसत! पण आगगाडीची वा आगनावेची सारी कळ हजारो लोकांस प्रत्यक्षपणे कळताच आता आगगाडीस नुसता शिष्टाचाराचा कोणी नमस्कारदेखील करीत नाही – मग नवसाचा नारळ फोडणें दूरच! आगगाडी, आगबोट, मोटारी यांच्यातही अपघात होतातच, प्राणहानिही होते; पण ती त्या वस्तु रागावल्या म्हणून होते असें आता गृहीत धरून अडाणी खेडवळदेखील त्यात बसताना त्यांच्यासमोर कोंबडे मारून वा त्यांना कुंकू लावून त्यास प्रसादवीत बसत नाही. तर ते अपघात टाळण्यासाठी रस्ते नीट करणें, त्यांची अटक (ब्रेक) ठीक आहे कीं नाही तें पाहणें, त्यांचें अेंजिन-गति-पेट्रोल यथावत् प्रमाणात ठेवणें या प्रत्यक्षसिद्ध अुपायांसच तेवढा अवलंबतो.

आगगाडी, आगनाव, मोटारीप्रमाणे निर्जीव नि भावनाशून्य असणाऱ्या ह्या ज्योतिर्गोलांनासुद्धा आता यत्रें म्हणूनच लेखिलें पाहिजे. यापुढे प्रत्येक पंचांगात, निदान टिळक पंचांगात तरी मकरसंक्रमणाचा वैज्ञानिक अर्थ द्यावा; ग्रहणाचीं वैज्ञानिक कारणें द्यावीं; ग्रहांचे व्यास नि गति, सूर्यमालेची नि पृथ्वीची अवश्य ती आकृति वैज्ञानिक परिभाषेत निवेदावी आणि तें संक्रांतीचें सोंग नि तीं ग्रहणा-

दिकांचीं भाकड वर्णनें साफ काढून टाकावीं. लोकांना धडधडीत थापा मारून असत्यात नि अज्ञानात पंचांगप्रवर्तक मंडळासारख्या या सुज्ञ संस्थांना ठेववतें तरी कसें ! अशा विवेकाची कसोटी लावली असता विज्ञानाने जी गोष्ट धडधडीत असत्य म्हणून ठरविली आहे आणि प्रत्यक्ष प्रयोगाने जी तशी असत्य असल्याचें प्रत्ययास येऊ शकतें तिची अुपासना, पूजा, वा प्रचार करण्यास कारण होणारी ही चंद्र-सूर्य-ग्रहोपग्रहादि ज्योतिर्गोल नि ग्रहणांसुद्धा ज्योतिर्घटना यासंबंधीची पन्नाससाठ व्रत-वैकल्यें निव्वळ असत्याची पूजा, निव्वळ अधर्म ठरतात. पूर्वी अज्ञानाच्या अंधेरात दोरी साप म्हणून भासली त्यामुळें भीति वाटली ती साहजिक समजता येअील. पण आता ती साप नसून दोरीच आहे हें विज्ञानाच्या अुजेडात स्पष्ट झालें असताना सुद्धा तो साप आहे म्हणून लोकांस थापा मारीस सुटणें, भिवविणें नि काठ्या घेअून तीवर मारीत बसण्याचा वा तिला दूध पाजण्याचा देखावा करणें हा मात्र काही अंशी निव्वळ वेडगळपणा नि काही अंशी लुच्चेगिरीही होणारी आहे.

(३) विज्ञानाने आज जीं सत्यें निर्विवादपणें प्रत्यक्ष प्रत्ययाच्या आधारे सिद्धिलीं आहेत त्यांच्या प्रचारास अडथळा करणारीं अज्ञानमय व्रतें जशीं साफ सोडून दिलीं पाहिजेत तशींच या व्रतवैकल्याचीं रूपें कोणचेंही अैहिक फल न देता निव्वळ पुराणातील भाकडकथांच्याच आधारावर प्रचलविलीं जातात. त्या व्रत-वैकल्याचीं तीं रूपेंही बदललीं पाहिजेत. अशा प्रत्येक व्रतास जी कसोटी लावावयाची तो ही की, ह्या व्रताने ह्या लोकी स्वत:चा, स्वत:च्या राष्ट्राचा वा अेकंदर मनुष्यजातीचा काहीतरी प्रत्यक्ष लाभ होतो आहे की नाही ? तसा अैहिक प्रत्यक्ष लाभ होत असेल तरच त्या व्रतवैकल्यात दवडला जाणारा काल नि धन काहीतरी सत्कार्यी लागलें असें समजावें. नाहीतर तीं व्रतवैकल्यें अशा रूपाने करू नयेत. व्रतांचा पारलौकिक लाभ पदरी पडायचा असेल तर तो पडूनसुद्धा त्यावाचून अैहिक असा कोणचा तरी प्रत्यक्ष लाभही मनुष्यजातीच्या पदरात पडला पाहिजे. ह्या कसोटीस अुतरतील तींच व्रतवैकल्यें तशा दुहेरी लाभास देणाऱ्या रूपात नि पद्धतीने आचरावीं म्हणजे जरी क्वचित् त्यांच्यापासून होणारा कल्पित वा संभवनीय पारलौकिक लाभ लटका पडला, तरीही त्यात दवडलेल्या समयाचा नि द्रव्याचा अैहिक लाभ तरी निःशंकपणे पदरात पडणारा असल्याने ती केव्हाही अगदीच व्यर्थ जाण्याची आपत्ति येणार नाही. ह्या दुसऱ्या प्रकारच्या व्रतास ही कसोटी कशी लावावी हें विशदिण्यासाठी आता या लेखांकात अुदाहरणासाठी तशा काही व्रतांची छाननी करावयाचें योजलें आहे.

लक्षवातींचें वा लक्ष दूर्वाचें व्रत

देवाची सेवा म्हणून केलीं जाणारीं हीं व्रतें मकरसंक्रमणासारख्या अेका घटनेला नाक आहे नि ती घटना गाढवावर बसलेली आहे अशा निर्भेळ असत्यास

फैलावणाऱ्या थापेबाजीची नसून सोज्वळ असतात; यास्तव तीं तितकीं आक्षेपार्ह नसतात. पण त्यात विवेक अितकाच करावयाचा की, देवास प्रसन्नविण्यासाठी केलेल्या या खटपटींचा प्रत्यक्ष व्यवहारातही काही अुपयोग आज होत आहे का ? पूर्वी मोठमोठ्या देवळांचे गाभारे अंधकारमय असत. घरातही समया, लामणदिवे, पंथ्या यांचाच प्रचार असे. त्या कामी केलेल्या वाती अेक आवश्यकताच असे. देवळात त्या अुपयोगी पडत; घरातही लागत. पण हजारो वर्षांपूर्वीचें हातवातींच्याच अुजेडात चाचपडण्याचें युग आता बदललें आहे. जुन्या प्रख्यात देवालयांच्या गाभाऱ्यातही आता विजेच्या वा ग्यासच्या झगझगीत वस्त्यांनी वा बटनांनी सजावट होत आहे. घरीदारी तर खेड्यातूनही कंदीलचिमण्या नि नगरातून विजेचे वा ग्यासचे दिवे खोल्याखोल्यातून लखलखाटत आहेत. मग आता ज्या खोलीत, सभामंडपात वा गाभाऱ्यात ग्यासच्या वा विजेच्या प्रकाशाचा झगझगाट झालेला आहे, तिथेंच अेक लामणदिवा वा पंथी केवळ पणजोबांच्या वेळेस ती लावीत म्हणून लावून ठेवणें हास्यास्पद नाही काय ? मोटारीला बैल लावणें किंवा मशीनगनचा गोळा धनुष्याच्या तांतीने फेकणें हें जितकें विसंगत, वेडेपणाचें, तितकेंच विजेच्या झुंबरांनी दिवसासारख्या लख्ख प्रकाशलेल्या गाभाऱ्यात समईचा वा लामणदिव्याचा मिणमीण नंदादीप अुगीच धुरकटत ठेवणें हेंही ! तेव्हा ज्या देवळी वा ज्या घरी हातवातींच्या मिणमिणी दिव्यांचा मुळीच अुपयोग होत नाही, त्या ठिकाणी लाख वातींचें हें व्रत म्हणजे वेळेचा, कापसाचा नि तेलाचा निव्वळ अपव्यय आहे. पणजीचें युग पंथीचेंच असे. तेव्हा ती काडवाती करी तें शोभे. पण आता या लख्ख विजेच्या युगात लाखवातींच्या व्रतास देवही हसत असेल ! तेव्हा तें व्रत आता त्या जुन्या मोडीच्या लामणदिव्यांच्या अडगळीतच टाकून देणें बरें.

पण तरीही त्या व्रतातील जो देवाच्या सेवेचा श्रद्धावंत मनाला अुदार करणारा हेतु, तो मात्र सुटता कामा नये. त्याच हेतूने पण ज्यायोगे प्रत्यक्ष व्यवहारात आज मनुष्यजातीचें अल्पस्वल्प हितही साधता येअील अशा रूपाने तें व्रत आचरावें. अेक कोणचा तरी तसा प्रकार सुचवावयाचा तर असें सुचविता येअील की, त्या वेळेत टकळीवर सूत काढावयास शिकून तें फक्कड सूत अमुक प्रमाणात देवाच्या नांवें दान द्यावें अेखाद्या प्रामाणिक निर्धन विणकऱ्यास ! किंवा मागावर तें स्वतः विणावें नि ती खादी हीनदीन पण स्वतः शक्य ती मेहनत करणाऱ्या सच्छील कुटुंबास द्यावी. अशा लोकहिताने, नरांच्या सेवेने – जर लाखवाती नि तेल निष्कारण भुरुभुरू जाळण्याने तो संतोषत असेल तर—नारायण अधिकच संतोषेल यात शंका नाही !

तीच गोष्ट लाख दूर्वांची !

तासन्तास परडयातून नि खिडारातून त्या गवताची अेकेक काडी खुडीत वेळ गमवावयाचा आणि तो भारा गणपतीच्या डोक्यावर द्यायचा ! पत्र्या नि दूर्वा

वाहताना त्या भाऱ्याखाली बहुधा त्या गणपतिगौरींच्या टीचभर मूर्ति कापसाच्या ढिगात सरकी दबून गुदमरून जावी तशा नुसत्या गुदमरून जातात ! अेखाद्या अशा व्रतस्थ महिलेच्या भक्ताने जर स्वत:च्या महिलेला लाख कडव्यांच्या पेंढ्या वाहण्याचा प्रेमसंकल्प केला नि तिला मध्ये वसवून त्या पेंढ्या तिच्या औतीभौती, वरखाली, तिच्या कानात, नाकात, डोळ्यात, तोंडात त्या काड्या घुसतात की नाही तेंदेखील न पाहता म्हण 'अर्पयामि' की रच पेंढी अशा वाहिल्या तर त्या भक्ताची तशी भक्ति जीव गुदमरून गेलेली ती स्त्री किती वेळ सोशील ? मग सगुण भक्तीच्या दृष्टीने बोलायचें तर त्या गौरीगणपतींच्या मूर्तीस आपल्या गवत-पाल्यांच्या भाऱ्यात गुदमरून टाकताना त्यांची काय काय दुर्दशा होत असेल हें नको का बघायला ? श्वास घेण्यापुरती त्या मूर्तीच्या नाकापुढची जागा तरी रिकामी ठेवावी ! पुन्हा हा लाख दूर्वाच्या गवताचा भारा गणपतीस कां वाहायचा ? गणपति गवत का खातो ? गवताच्या भाऱ्यास वाहावयाचेंच, तर तो गायीस तरी वाहावा; तो भारा खाऊन झाल्यास पशु प्रसन्न होअील. या जगात पिता येअील असें दूध देअील. पण मोदक खाणाऱ्या गणपतीस लाखो दूर्वाच्या गवताचे भारे वाहावयाचे आणि गवत खाणाऱ्या नि ओखटवाणीच हौशीने खाणाऱ्या 'गोमातेस' माणसासारखे सुग्रास पंचपक्वान्नांचें पान वाढून तो ग्रोग्रास वाहायचा ! हीं काय व्रतें की विटंबना ? भाकड पोथ्यांच्या नादाने असला पात्रापात्रतेचा लवलेश विचार न करणारा हा वेडगळपणा अक्षरश: आज खरोखरीच आचरला जात आहे की नाही बरें ? पोथीच हवी तर ती भगवद्गीता नाही का ? श्रद्धादेखील तिला अुपनिषदासमान पूज्य मानते, तीत 'देशे काले च पात्रे' जें जें दान तें तेंच सात्त्विक नि 'अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते । दीयते बहुलायासं तत् तामस-मुदाहृतम्' असें सांगितलें आहे. त्या प्रकारे व्रतात्मक दानात नि दानात्मक व्रतात आम्ही आता 'देशा'प्रमाणे नि 'काला'प्रमाणे पात्रापात्रविवेक केलाच पाहिजे.

तेव्हा हिरव्या गवतासंबंधी वा वनस्पतिविषयकच व्रत करायचें तर शेत-करणीसारखा चक्क पातळाचा काचा मारून विळा घेऊन हिरव्यागार रानात जावें नि लाख दूर्वा खुडीत खिडारात जो तास घालवावयाचा त्यापेक्षा त्याच वेळात कचाकच गवताच्या पंधरावीस हिरव्यागार पेंढ्या कापून देवाप्रीत्यर्थ गाअीस घालाव्या किंवा सुवासिक सुदर फुलांरानफुलांच्या परड्या भरभरून आणून त्यांचे गजरे मोलकरी मुलींना भेंट द्यावे, किंवा आपल्या वा कोण्या आप्ताच्या अंगणात स्वत: पाणी भरून फुलवाडी लावावी आणि मालती, सोनचाफा, जाअीजुअी, गुलाबाचीं सुदर फुलें प्रत्यही देवास वाहावीं; सारीच्या सारीं अुगीच देवावर ढीग रचून नव्हे, तर देवघरात शोभतील तितकीं तिथे नि बाकी हार करून फुलपात्रातून घरात दाराशी नि घरात कुशलपणे विरचावीं. आपल्या घरच्या नि ज्यांना तीं मिळत नाहीत अशा दीन कुमारिकांच्या केसांतून आपण स्वत: पाणी भरून वाढ-

विलेल्या लतावेलींची तीं ताजीं टवटवीत फुलें गुंफावीं, की ज्यायोगे जिथेजिथे त्या वावरतील तिथेतिथे त्या त्या दिवशी नि रात्री सुरेखपणाचें नि सुवासाचें वातावरण दरवळत राहावें ! अशा आरोग्यप्रद नि आनंददायी सौंदर्याची पूजा हेंही अेक व्रतच आहे. वाल्मीकीसारख्या वानप्रस्थाने देखील सीतेसारख्या संयमशील ललनेस सुद्धा असेंच अेक व्रत सांगून लडिवाळ आश्वासन दिलें नाही का, की 'पयोघटैराश्रमबालवृक्षान् संवर्धयन्ति स्वबलानुरूपैः । असंशयं प्राक्तनयोपपत्तेः स्तनंधयप्रीतिमवाप्स्यसि त्वम ।'

वडपिंपळांना लाख प्रदक्षिणा

अशा वर्गातिल्या व्रतासही वरचीच कसोटी लावावी. वनस्पतींशी जीवैक्याची भावना अनुभवावयाची वा संवर्धावियाची तर त्यांच्या भोवतीभोवती फिरण्याचा मार्ग टाकाअू आहे. हे विशाल विस्ताराचे वृक्ष आपल्या अुष्ण प्रदेशातील लोकांस त्यांच्या छायाशीलतेने अत्यंत वत्सल वाटावे नि त्याविषयी कृतज्ञता व्यक्तविण्याची प्रवृत्ति व्हावी हें आपल्या लोकांच्या दयाशील संस्कृतीस साजेसेंच आहे. पण त्यासाठी त्या झाडांचा देवच करून टाकणें आपल्या संस्कृतीच्या पदरी बुद्धिहीनतेचा दोष बांधण्यासारखें आहे ! या विशाल नि अुपयुक्त वृक्षांची मनुष्याला अुपयुक्त होअील अशी लागवड वाढवणें, जोपासना करणें, अितर अुपयुक्त वनस्पतींना त्यांच्या त्यांच्या प्रकृतीप्रमाणे खतपाणी देणें हीच तें मतैक्य प्रदर्शविण्याची अुचित रीत. हींच झाडें चांगलीं का ? तर मनुष्याला अुपयुक्त म्हणून. मग भरवस्तीची शोभा बिघडविणारा वडपिंपळ किंवा ज्यांच्या फांद्या नि विस्तार पडावयास झालीं आहेत असा भरवाटेवरचा वडपिंपळ तोडून टाकणें हेंच जेव्हा मनुष्याच्या हितास अवश्य, तेव्हा तेंही केलें पाहिजे वडपिंपळ तोडायचाच नाही, ह्या हट्टापायी तो अेकदम वाऱ्यासारशी कोसळून त्याखाली माणसें मरतात अशा घटना या देशात ज्या घडतात त्या आपली सुसंस्कृत दयाशीलता दाखवीत नसून रानटी क्रूरपणा मात्र दाखवितात

वडपिंपळासारख्या झाडाखाली तापलेल्या वाटसरूस जशी छाया मिळते तशाच त्यांच्या प्रचंड फांद्या कोसळून प्रसंगी त्यांचा प्राणही जातो तीं निर्बुद्ध झाडें काही जाणूनबुजून आपलें रक्षण करीत नाहीत; त्यांना प्रदक्षिणा घातली काय नि लाथा मारल्या काय, फांद्या पक्क्या आहेत तों छाया देणें, पोखरल्या की अुन्मळून पडत खाली प्रदक्षिणा घालणारी बालबालिका जें सापडेल त्याचा चुराडा करणें, ह्या त्यांच्या भावनाशून्य यांत्रिक क्रिया ! अेक वेळ गाढवाच्या अंगावर हात फिरविला वा त्याला चुचकारलें तर तें संतोषून अंगास खेटू लागतें; काम अधिक हौसेने करते; त्याची खोडी केली तर लाथा झाडतें, पण त्या गाढवाअितकी-देखील मनुष्याच्या प्रेमलोभाची वा हिताहिताची सुसंवादी जाणीव ज्या वडपिंपळास

नाही त्यांना लाख प्रदक्षिणा घालण्यात काय अर्थ आहे ! झाडांना जाणीव आहे पण तशी सूक्ष्मार्थी दगडांनाही आहे; निवडुंगालाही आहे; पण म्हणून तो निवडुंग अुसासारखा सोलून का खायचा ?

ह्या पात्रापात्रतेच्या विचाराप्रमाणे अुपयुक्ततेच्या दृष्टीनेही अशीं व्रतें अधिकच टाकाअू ठरतात. जुनी भाबडी दृष्टि त्या वडपिंपळांना देवता समजून फेऱ्या घालते तेंही अेकवेळ परवडेल; पण अशा जुन्या वेडेपणास नव्या वैज्ञानिक वा व्यावहारिक दृष्टीनेही समर्थिणारें जें अेक पढतमूर्खाचें पथक अ़सतें, त्यांचें तें समर्थन तर त्या भाबडेपणास अधिकच धिक्कारार्ह करून सोडतें. कसें तें पहा – वडपिंपळाला लक्ष प्रदक्षिणा स्त्रियांनी घालाव्या या आमच्या दूरदर्शी दयाळू ऋषींनी सांगितलेल्या व्रताचें हे पढतमूर्ख असें समर्थन करतात की, घरात वसूनवसून बायकांस क्षयादिक विकार जडू नयेत, म्हणून ह्या व्रताच्या मिषें हा व्यायाम घालून दिला आहे ही त्याची अुपयुक्तता ! ह्याविषयी अितकेंच म्हणावयाचें की, क्षयादि विकार जडेतो वायकांस घराच्या खुराडयात कोंडून ठेवणाऱ्या क्रूरतेस साजेल अशीच ही त्यांना अंगणातल्या वडाभोवती पाळीव कोंबड्यांसारखी गरगर फिरू देणारी दया आहे ! वहुधा गावातल्या गाडीतळाच्या गदळ जागी वा अंगणात वा गल्लीकुचीच्या टोकाशी असलेल्या कोंदट वातावरणातच हे वडपिंपळही असतात. त्यांच्याभोवती सारख्या गरगर शेकडो फेऱ्या घालण्याच्या व्यायामाने क्षयरोग हटण्यापेक्षा होण्याचाच अधिक संभव; क्षयरोगी स्त्री लाख गिरक्या घेताघेता चक्कर येअून तिथल्या तिथे मुक्त झाली नाही म्हणजे भाग्य ! क्षयरोगापासून बचावणारा व्यायामच स्त्रियांस द्यावयाचा होता तर त्या 'दूरदृष्टि सर्वज्ञ ऋषींची' दृष्टि गावालगतचीं मोकळीं शेतें दिसण्याअितकीही दूरदर्शी नव्हती की काय ? प्रत्यही संध्याकाळी स्त्रियांनी त्या गावाबाहेरच्या मोकळ्या वातावरणात सलीलपणे हिंडून यावें असें व्रत असतें तर तें 'व्यायामा'र्थ म्हणता येतें. खरी गोष्ट अशी आहे की, पूर्वी साऱ्या जगभर झाडाझुडुपांना देवता मानून पुजण्याची जी चाल प्रचलित असे, त्याच चालीचें आपल्या हिंदुधर्मात अुरलेलें हें अेक अज्ञान आहे. त्याचा व्यावहारिक लाभ दमडीचाही नाही.

अेकदा असा अभिप्राय आम्ही व्यक्तवीत असता अेक जुन्याचे प्रामाणिक अभिमानी म्हणाले, 'त्यापासून काहीतरी व्यावहारिक लोकोपयोगी लाभही होअील असें वळण या वडपिंपळाच्या लक्ष प्रदक्षिणांच्या व्रतास लावा – तें अगदीच धिक्कारता काय ! ' तेव्हा आम्ही म्हटलें, 'त्या व्रतापासून अैहिक लाभही करून घेण्याची दुसरी तोड तर काही सुचत नाही. हां, अेक तोड आहे. त्या वडापाशी अेक चिमुकला तेलाचा घाणा वसवावा; त्याची साखळी त्या व्रतस्थ महिलेच्या कंबरपट्ट्यास अडकवावी; घाण्यात तीळ टाकून मग तिने प्रदक्षिणा घालण्यास आरंभावें म्हणजे ज्या हजारबाराशे तिच्या प्रदक्षिणा प्रत्यही व्हावयाच्या त्या संपताच शेर दीड शेर तेल

तरी त्या घाण्यात गळेल. तें देवाच्या नांवें कोणा मेहनती पण दरिद्री कुटुंबास दान द्यावें; म्हणजे अेका महिन्याचा फोडणीचा खर्च तरी निघेल ! तसें करवत नसेल तर हीं अशीं पारलौकिक दृष्ट्या अगदी भाकड नि व्यावहारिक दृष्ट्या अगदी कुचकामी व्रतें करण्यात समय नि श्रम दवडू नयेत.'

महिलांनो, फेऱ्या घालण्याचेंच व्रत करायवाचें, तर स्वदेशी वस्तूंच्या प्रचारार्थ प्रत्यही पन्नास घरांतील कुटुंबांत जाअून प्रचार करण्याचें व्रत घ्या. तुम्ही पांचपांचजणी, देवाचें कार्य म्हणून मानअपमान न पाहता जर पन्नास घरी प्रत्यही आळीपाळीने भेट द्याल नि त्या कुटुंबात स्वदेशी साखर, बांगड्या, स्टोव्ह, काचकाम, धारकाम (कट्लरी), कापडप्रभृति वस्तु वापरण्यासाठी स्त्रियांचीं मनें वळविण्यास झटाल; ज्यांनी तसें निश्चयिलें त्यांचा तो निश्चय टिकून आहे की नाही याची सतत वर्षभर पाहणी करीत राहाल; वेळी स्वतः तें तें विकाअू स्वदेशी सामान नेअून दुकानात असतें त्याहून स्वस्त द्याल तर आम्ही अशा चळवळीच्या अनुभवाची हमी देतो की, तुमचें गांव स्वदेशीचें तसें कट्टर गिऱ्हाअीक होअील की जसें शंभर व्याख्यानांनी वा वृत्तपत्रीय अग्रलेखांनी होअू शकत नाही ! व्याख्यानालेखांना महिन्या दीड महिन्याची हुल्लड होते. पण स्वदेशीची साथ नि संतत ज्योत तेवत ठेवली जाते अशा संतत नि घरोघरी केलेल्या प्रचारामुळे, पाहणीमुळे. वरें ह्या स्वदेशीच्या जाणिवेची ज्योत घरोघरी अशी तेवत ठेवल्याने जी मानसिक राष्ट्रीय शिकवण लोकांस मिळेल; जी आर्थिक अुन्नति होअून स्वदेशी कामकऱ्यांच्या तोंडात दोन घास पडतील, परदेशात जाणारा अितका पैपैसा स्वदेशात राहील त्या स्वदेशसेवेने, त्या नरनारींच्या सेवेने तो नारायण वडपिंपळाभोवती लाख वेळा बैलासारखें गरगर फिरल्याने वा लाखवातींचा कापूस अुगीच जाळून टाकल्याने वा लाख दूर्वांचा नि बेलांचा भारा वाहिल्याने तो नारायण संतोषतो त्याहून लाख पटीने अधिक संतोषणार नाही असें कधीतरी घडेल काय ? आणि त्या वडपिंपळाच्या प्रदक्षिणांनी मिळणारें जें काय तुमचें काम्य फल असेल, तेंही तो देव या व्रतानेही दिल्यावाचून राहील काय ? मिशनरी वाया जशा ख्रिस्ती धर्माचा उपदेश करीत तुमच्या वस्तीत फिरतात, तशा तुम्ही शुद्धीचा अुपदेश करीत बाटच्या ख्रिश्चन वस्तीत हिंडा; तें व्रत धरा ! अमुकच प्रकारची लोकसेवा करा, हा आग्रह नाही. तुम्हांस व्यक्तिशः जी झेपेल ती लोकसेवा करा; पण या लोकी लोकोपकारक कोणतें तरी प्रत्यक्ष फल देणारें पुण्यकृत्य ज्यांत साधतें अशींच व्रतें धरा म्हणजे राष्ट्रसेवा घडेल नि पारलौकिक दृष्ट्या ती लोकसेवा केव्हाही पुण्यप्रदच असल्याने व्रताने जो कोणचा सकाम वा निष्काम पारलौकिक लाभ तुम्हांस हवा तोही जर वडपिंपळाच्या सेवेने मिळत असेल तर त्या लोकसेवेच्या प्रत्यक्ष परोपकारी व्रतानेही मिळेलच मिळेल. कारण काही झालें तरी नारायणाची व्यक्ति वडपिंपळ, दगडधोंडा, शेणमाती, यांच्या जड मूर्तीहून नराच्या सचेतन मूर्तीतच अधिक अुत्कटत्वाने आलेली

आहे, हें नाकारण्याची छाती भाकडातील भाकड पोथीसही होणारी नाही ! नराच्या सेवेअितकी कोणतीही पूजा, कोणतेंही व्रत नारायणास संतोषवीत नाही. 'सारंसारं समुद्धृत्य' जें शास्त्रेंही सांगतात तें हेंच, की 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्!' विरक्त भक्तीच्या भररंगातही तुकोबा जाणून आहेत की,

'जे कां रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ।'

व्रताची पोथी म्हटली की ती प्रथम वाचावी
अथश्रीपासून नव्हे तर अितिश्रीपासून !

ज्योतिर्गोलविषयक व्रतांना सृष्टिनियमांच्या अज्ञानामुळे तीं प्रचलित झालेलीं म्हणून अज्ञानजन्य म्हणता येतील; वर दिग्दर्शिलेल्या लाख दूर्वा व्रतादिक वर्गास भावडें म्हणता येअील; पण त्यापेक्षा निराळा जो शेकडो व्रतांचा आणखी अेक वर्ग आहे त्यास तर भोंदू हेंच नांव लावणें भाग पडतें. त्यांचा मुख्य अुद्देश दक्षिणा नि दानें अुपटण्याचे शक्य तितके प्रसंग शोधून काढण्यावाचून दुसरा काहीही असेलसें त्या त्या पोथ्यांवरून दिसत नाही. त्या त्यांच्या भाकड अुपपत्त्या, तीं पोकळ फळें, तीं बाष्कळ विधिविधानें – आणि शेवटी ती ठराविक 'दक्षिणाः पान्तु' – तें सर्व वाचताच धडधडीत थोतांड वाटल्यावाचून राहत नाही. अुदाहरणार्थ अेकदोन भाकडकथा पाहा.

कोकिळा व्रत – सुसंस्कृत अनुष्टुपात लांबलचक रचलेल्या ह्या पोथीचा सारांश असा, की अेकदा दक्षयज्ञविध्वंसनार्थ शंकरपार्वतीचें भांडण झालें. शंकराच्या शापाने पार्वती कोकिळा झाली; अुःशाप होअून पुन्हा पार्वतीची पार्वती होअून नांदू लागली. यासाठी सर्व स्त्रियांनी युगानुयुगें कोकिळेचें व्रत करावें म्हणजे ठराविक दिवशी कोकिळा पुजावी. पण ती कशी ? तर अुत्तम पक्ष म्हणजे यथाशक्ति अेक सोन्याची कोकिळा करावी; डोळे मोत्यांचे, पाय रुप्याचे आणि रुप्याच्या वृक्षावर तिला बसवावी, स्नान, अुपास करून तिची पूजाअर्चा झाल्यावर शेवटी ती सोन्यामोत्याची कोकिळा त्या रुप्याच्या वृक्षासुद्धा दान द्यावी भटास ! आजही स्त्रिया हें व्रत असें आचरतात.

आता ही भक्ति की भामटेगिरी! शंकर-पार्वती लाखो वर्षांपूर्वी म्हणे भांडले ! पण त्यानंतर तें भांडण मिटून ते पुन्हा चांगले नांदू लागले, हसले, नाचले, सोंगट्या खेळले, त्यांना मुलेंलेकरें झालीं. ह्या सान्या बातम्या भूलोकांवर कधीच येअून पोचल्या आहेत आणि ज्याअर्थी ह्या विनतारेच्या युगातही त्या शंकरपार्वतीचें वेडेवाकडें झाल्याची बातमी आलेली नाही, त्या अर्थी ते अजूनही संसार थाटूनच आहेत हें अुघड आहे. मग आता कोणा अेक्या नवराबायकोच्या क्षणिक भांडणात पार्वती कोकिळा झाली म्हणून कर कोकिळा की पूज हा खाक्या युगानुयुगे हवा कशाला ?

पार्वती कोकिळाच राहिली असती तर तीच कोकिळा तेवढी भेटताच तिला कोणीही नमस्कार केला असता; पण ती पुन्हा पार्वतीची पार्वती झाली म्हणता. पार्वती अेक कोकिळा झाली म्हणून साऱ्या कोकिळा पार्वत्या होतात की काय? देव अेकदा डुक्कर (वराह) झाले म्हणून आजही घर डुक्कर की कर पूजा असें करायचें की काय? वरें, अेवढ्यावरही कोकिळाच पुजायची, तर अुत्तम मार्ग म्हणजे कोकिळेच्या अेका खऱ्या जिवंत पिलास धरून हिरव्यागार वृक्षावर स्थापून त्याची पूजा करावी; तें पाळावें हवें तर! पण मग भटास काय लाभ राहिला त्या अुठाठेवीत! म्हणून पार्वती जिवंत कोकिळा झाली असता पुजायची कोकिळा हवी निर्जीव सोन्याचीच! नि पार्वतीच्या कोकिळेचे डोळे चांगले सजीव पाणीदार असता पुजायच्या कोकिळेचे डोळे हवेत पांढरे झालेले मोत्यांचे! बरें, सोन्या-मोत्यारुप्यांची का कोकिळा होअीना; पूजल्यावर ती यजमानानेच भक्तिभावाने स्वत:च्या देव्हाऱ्यात ठेवावी हें साहजिकच! पण नाही! ती लगेच देअून टाकली पाहिजे भटाला! तरच तें व्रत सफळ; नाहीतर अित्थंभूत निष्फळ! अर्थात् त्या व्रताचें सारें मर्म पोथीच्या शेवटच्या पानात त्या दक्षिणा: पान्तूतच सापडणारें आहे!

संकटी सोमवार–सोमवारी सबंध दिवस शक्य तर पाणीही न पिता अुपास करावा. संध्याकाळी रोटाचे तूपगूळ घालून तीन लाडू करावेत; अेक गाअीला अेक देवाब्राह्मणास नि अेक आपण खावा. असे कडक अुपास सोळा सोमवारी करावे! नि शेवटी शक्यतो सोळा जोडपीं भटांचीं बोलावून त्यांस रोटतूपगुळांचे लाडू यथेच्छ जेववावे; गायीस पान वाढून द्यावें नि मग तें अुपासव्रत सोडून आपण जेवावें! त्या बिचाऱ्या स्त्रीने सोळा सोमवार कडकडीत अुपास करावे; त्याचें प्रत्यक्ष फळ मात्र मिळावें सोळा भटांच्या जोडप्यांस चमचमीत जेवण्याचें, आणि गायीस! माणसाने अुपाशी राहावें नि गायीस–पशूस लाडू चारावे! असल्या बाष्कळपणाने पोथी म्हणते तसा देव प्रसादत असो वा नसो; पण प्रत्यक्ष नि:शंकपणें जर कोणी प्रसादत असेल तर तीं सोळा भटांचीं जोडपींच होत! 'दक्षिणा: पातु'वाचून ह्या व्रताचें भारूड रचण्याचा दुसरा काय अुद्देश असणार!

यास्तव या व्रतांच्या पोथ्यांविषयी अेक सर्वसाधारण नियमच असा सांगावासा वाटतो की, अशी व्रतांची पोथी घेतली की ती अथश्रीपासून प्रथम वाचूच नये. कारण, देवांचीं मोठमोठीं नांवें, अद्भुत कहाण्या, स्वर्गाच्या पुष्पितवाक् गप्पा यांच्या ढिगांत पोथी रचणारांचा कावा अगदी छपून बसलेला असतो. पण तो शेवटच्या पानात मात्र न हुडकता सहज सापडतो तेव्हा पोथी घेताच तिचें शेवटून पारायण करू लागावें; अितिश्री प्रथम वाचावी: जर का त्या शेवटच्या पानात दक्षिणा:पांतूवरच मुख्य भर दिसला, तर शंभरी नव्वद असें हें व्रत कोण्या भक्ताने रचलें नसून भोंदूनेच रचलें असलें पाहिजे असें बेखटक समजावें नि तें टाकून द्यावें.

आणि स्वीकारावें कोणकोणचें व्रत ? तर ज्या व्रतामुळे आज विज्ञानाने साफ खोट्या पाडलेल्या कोणत्याही भौतिक वा भावनिक असत्याचा प्रसार करण्याचें पाप घडत नाही, ज्या व्रतात देवाप्रीत्यर्थ करावयाच्या दानाने वा स्वत:स भोगाव्या लागणाऱ्या अुपास, प्रदक्षिणा देहदंडप्रभृति कष्टांच्या योगाने प्रत्यक्ष व्यवहारात आपल्या हिंदुधर्माच्या नि राष्ट्राच्या सद्य:स्थितीत काहीतरी अैहिक हितही साधता येअील, मनुष्याची आज अिथे रोखठोक अशी काही हितावह सेवा केल्याचा परोपकार घडेल तें तेंच व्रत आचरावें. म्हणजे त्यायोगें अैहिक फळ तरी प्रत्यक्षपणे अिथल्या अिथे हाती पडेल.

व्रतें करावींत तर अशीं !

अुदाहरणार्थ, महिलावर्गापुरतेंच बोलावयाचें तर येत्या चातुर्मास्यात महिलांनो, तुम्ही यथाशक्ति, यथापरिस्थिति ह्या आपल्या अत्यंत अडचणीत सापडलेल्या प्राणप्रिय हिंदु राष्ट्राच्या सेवेप्रीत्यर्थ खाली दिग्दर्शिलेल्या किंवा त्या हेतूने त्यासारख्या व्रतांपैकी अेकेक जण अेकेक व्रत जर धराल तर केवढी राष्ट्रसेवा करू शकाल बरें ? 'आपल्या परसात स्वत: आपल्या मेहनतीने कोथिंबीर, वांगी, मिरच्याप्रभृति शाकभाज्या लावीन नि देवा, तुझ्या नांवे पुण्याच्या अनाथ विद्यार्थिगृहासारख्या अेका प्रामाणिक संस्थेस चार महिने प्रत्यही ताजी भाजी पुरवीन.' असें व्रत लाखवाती, फूलवेल वाहण्याच्या व्रताहून कितीतरी देवप्रिय नि राष्ट्रहितकर होअील बरें ? किंवा असें व्रत घ्या की, 'या चातुर्मास्यात आपल्या हाताने विणलेले वा शिवलेले पंचवीस सदऱ्यापोलक्यांचे जोड जीं हीनदीन पूर्वास्पृश्यांचीं मुलेंमुली शाळेत जातात त्यांतील योग्य मुलांत वाटीन.' चतुर्थीचे अेकवीस मोदक वा सोमवारचीं सोळा जोडपीं सावकारी वा विम्याची अडत वा व्यापार करणाऱ्या पोटभरू ठराविक भटांसाठी राखून ठेवण्यापेक्षा तितकें सामान वा पैसे दक्षिणा म्हणून आज हिंदुसंघटनाचें कार्य खऱ्या रामदासी बाण्याने करणाऱ्या मसूरकर महाराजांच्या आश्रमास दान करीन.' येत्या चातुर्मास्यात अेक स्वदेशी साखरेचाच प्रश्न हाती घेतला तरी जर प्रत्येक जिल्ह्याच्या नगरात दहावीस स्त्रियांनी प्रत्यही 'मी दहा कुटुंबांस भेट देअून स्वदेशी साखरेचा प्रचार करीन' असें व्रत घेतलें नि चालविलें तर त्या चार महिन्यांत त्या गावी चार हजार रुपये तरी परदेशी साखरेत जायचे वाचतील ! करून पाहा होतें कीं नाही असें तें. आमची हमी अनुभवाची आहे. किंवा अुभ्या वर्षात शंभर 'रुपयांची स्वदेशी बांगडी घरोघर फिरून खपवीन' किंवा 'तुळशीच्या लग्नासाठी ताशेवाजंत्री लावण्याचा मूर्खपणा सोडून तशा व्रतांचा खर्च राखून अनाथ पण सत्पात्र अशा दोन शुद्धीकृत हिंदूंच्या योगक्षेमाचा व्यय मी सोशीन वा त्या कार्यार्थ प्रत्यक्ष कार्यकर्त्या अशा हिंदुसभेस व आर्यसमाजास दान देअीन !' रत्नागिरी हिंदुसभेसारख्या ज्या संस्था शुद्धिकार्य

सारखें करताहेत त्यांना मुल्लामिशनच्या हातून सोडविलेल्या अर्भक वा अनाथ मुलांमुलींचें संगोपन करताना नाकी नऊ येतात. जर शंभर रुपये मिळताच शंभर विधर्मीयांस हिंदु करून दाखविणारी अुमरावतीची हिंदुसभा द्रव्यसाहाय्यास्तव अडकून पडत आहे तशा प्रत्यक्ष कार्यी तसा अेक रुपया दान दिलात तर अेक वंश हिंदुराष्ट्राच्या गोटात आणल्याचें श्रेय संपादाल ! हिंदुधर्माचा क्षय थांबविणारा निदान रक्ताचा अेक बिंदु त्यात भर टाकून वा गळताना वाचवून जें पुण्य लाभेल तें पांचशे अर्घ्य सूर्याला देअून लाभणार नाही ! पाणी ओतायचें तर तें व्रताचें पाणी तान्हेल्याच्या तोंडात ओता–ताम्हनात वा नदीत नव्हे ! तो मुंबईचा श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम पाहा ! त्याने मिशनमुल्लांच्या तावडीतून हजारो हिंदु स्त्रिया वाचविल्या; पण त्याला अजून अर्भकालय काढावयास दमडीही गाठी नसल्यामुळे त्या स्त्रियांच्या अर्भकांचें काय करावें हें सुचत नाही. सोन्याच्या कोकिला–सावकारीचा धंदा करणाऱ्या भटांना देण्यापेक्षा कोण्या श्रीमान् महिलेने जर त्या श्रद्धानंद महिलाश्रमास स्त्रियांसाठी बारा लुगडीं चातुर्मास्यानिमित्त दान दिलीं वा स्वत:च्या कुटुंबातील मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ अेक हजार वा अेक लाख जें यथाशक्ति तें दान, अर्भकालय बांधून देण्यासाठी दिलें तर तें अंत्येष्टीप्रीत्यर्थ गाय, भांडीं, वस्त्रें, दानें, गावच्या धंदेवाअीक भटास देण्यापेक्षा त्या दीन दयाळू देवास शतपटीने अधिक प्रिय होणार नाही काय ? किंवा विमानविद्या शिकणाऱ्या अेका सुयोग्य पण निर्धन विद्यार्थ्याचा खर्च सोसण्याचें व्रत घ्या !

महिलांनो, जर हें हिंदुराष्ट्र जगेल, तगेल, जिंकील तर हिंदुधर्मही जगेल; जिंकील ! जर हें हिंदुराष्टच मेलें, हिंदुस्थानचें अहिंदुस्थान झालें तर ही हिंदु-संस्कृति, हा हिंदुधर्मही मेलाच पाहिजे ! अशा स्थितीत तुम्हां हिंदुमहिलांस खरें धार्मिक व्रत आचरावयाचें असेल तर आजच्या परिस्थितीत ह्या हिंदुराष्ट्राची प्रत्यक्ष फल देणारी अशी काही तरी सेवा प्रत्यही करा ! तुमच्या द्रव्याचें दान, तुमच्या श्रमाचें दान, तुमच्या अन्नाचें दान, प्रसंगीं तुमच्या मानाचें नि अवश्य तर तुमच्या प्राणांचेंही दान ह्या प्राणप्रिय हिंदुराष्ट्रालाच द्या ! तोच आजचा अैहिक धर्म; तोच आजचा पारलौकिक धर्म ! व्रतविधीत जो विवेक आज करावयाचा तोही हाच !

✦ ✦ ✦

विटाळाचें वेड

'काळू ! आलास का अेकदाचा शाळेतून ? शाळेतलीं मुलं मघाच्च घरोघर जाअून जुनीपुराणीं देखील झालीं नि तू आता घराम पोचलास काय रे ? दहाला शाळा सुटायची नी तुला दहा पावलांवर घरी यायला अकरा वाजायचे ! थांब मेल्या, हें अुचटणं तर वघ कसं लाल करून ठेवलं आहे डाग देने थांव, ये असा ! हं हं हं, चुलीपाशी अरे चल ! हट् मागं, धटिंगण मेला ! पाय धुतल्यावाचून सैंपाकघरात पाअूल टाकता कामा नये ! जोडा घालूनच आत आला नाहीस हेच अुपकार !'

'कोणाचं अडलं होतं पाअूल टाकायला !' काळू ही: ही: ही: हसत आअीला म्हणाला, 'तूच म्हणालीस ये आत डाग देते, म्हणून आलो ! पण काकू, आज तापलेलं अुचटणं नाही अं – आज पहिल्यानं चाकोलेटची पेटी काढ कुठं आहे ती ! गेल्या महिन्यापर्यंत माझा मराठी चौथीत चौतिसावा क्रमांक असे, म्हणून हिणवीत होतीस नं ?'

'मग आज कोणचा असा पराक्रम करून आला आहेस काळू ? गेल्या महिन्यात तुझा क्रमांक चौतिसाचा तेहतीस तरी झाला का ? अेक क्रमांक जरी वर गेला असला न, तरी चाकोलेट देअीन बरं काळू !'

'तर मग अैक ! आज आमचे नवे क्रमांक लागले, त्यांत माझा अठरावा क्रमांक आला.

'काय म्हणतोस ? काळू, खोटं ठरल तर थोवाड फोडीन अं !'

'शपथ ! काकू ! माझा खरोखरच अठरावा क्रमांक आला आज वर्गात !'

'भले वीर ! आमच्या काळूची वुद्धि वाअीट नाहीच मुळी ! पण अुनाड नि अचरट ! या महिन्यात अभ्यास केलास तर वघ अेकदम सोळा क्रमांक वर चढलास न ! ही घे, चाकोलेटची भरलेली पेटीच घे हो वाळ ! वघ, पेटी दिली न ? जर तू पुढच्या महिन्यात आणखी सोळा क्रमांक वर गेलास न, तर अशा दोन पेट्या देअीन मी तुला ! अभ्यास केलास की क्रमांक वर गेलाच पाहिजे वर तुझ्यासारख्या वुद्धिमान् मुलाचा !'

'अग काकू, अभ्यास कशाला हवा ?' चाकोलेटांची पेटी घेअून सैंपाकघरातून मधल्या घरात सुरक्षित अंतरावर गेलेल्या नि चाकोलेटांचा वोकणा तोंडात कोंबलेल्या काळूने अडखळत बोलण्यास आरंभ केला, 'अभ्यासच ग कशाला हवा ? माझ्या वर्गात चौतिसाव्या क्रमांकावरून मी जो आज अेकदम सोळा क्रमांक वर चढून आलो, तो अभ्यास न करतासुद्धा वर आलो – हीच तर खुबी ! बघतेस काय अशी काकू ? शपथ ! अभ्यास मी मुळीच केला नाही. अग, तें असं झालं -- सांगतो अं –' चाकोलेटांचा आणखी अेक बोकणा भरून काळू अेक पाय मधून मधून वेळीत नि शांतपणे हसत हसत सांगू लागला, 'अग, माझ्या वर्गात चौतीस

मुलं नव्हतीं का ? तेव्हां मी चौतिसावा नव्हतो का ? आता आज काय झालं' की आमच्या शाळेच्या अुलट पक्षाची ती दांडेकर शाळा आहे ना ? त्यांनी पुष्कळ पालकांना आमच्या शाळेविरुद्ध मथविलं, आणि त्यामुळं आज आमच्या वर्गातील पंधरासोळा खालचीं मुलं आमची शाळा सोडून या महिन्यापासून दांडेकरांच्या शाळेत निघून गेलीं. अुरलीं अठरा. तेव्हा मास्तर म्हणाले, मिळून रांगेनं बसा नि नवे क्रमांक मोजा ! तेव्हा मी नुसता सरकलो नि अठरावा आलो ! असाच आणखी अेखादा लग्गा लागला तर पहिलाही पण येअीन हो काकू ! अभ्यासच ग कशाला हवा त्याला ?'

अितक्यात ताडदिशी अेक लाटणें काळू होता तिथे येअून आदळलें. पण अनुभवाने तें तिथे काकूकडून फेकलें जाणार हें आगाअूच ओळखून झटकन् मागे पळून जाण्यासाठी सज्ज असलेल्या काळूने अेक मागे अुडी घेतली, पुन्हा झेप घालून तें लाटणें अुचललें नि हटत हटत जोडे-वहाणा ओटीवर ठेवीत तिथपर्यंत तो खिदळत आला ! त्याचा पाठलाग करीत काकूबाअीही पुढे पुढे घुसल्या. पण काळू जोडे-वहाणा होत्या तिथे जातो हें पाहताच त्यांचें सारें अवसान खचून रागावण्याच्या ठायी त्या काकुळती येअून म्हणू लागल्या, 'अरे, जोडे ! शिवशील मेल्या माझं तें सोळचातलं लाटणं घेअून ! दे रे बाबा तें अिकडे अेकदाचं ! नाही, नाही, नाही, मारणार पुन्हा फेकून ! अरे शिवशील ! त्या वहाणा ! अरे– !'

'मग नाही ना मारणार ? नाही ना ?'

त्याचें हें करारपत्र नक्की होतें आहे तोंच अेक टपाली आवाज दाराकडून त्यांच्या कानांवर आला–'विष्णुपंत देवधर !' मागोमाग अेक पाकीट भिरदिशी दारात पडलें.

'बाबांचं आलं आहे पत्र ! फोडू काय ग काकू मीच ?' आअीला तोंडाने असें पुरतें विचारून संपलें नाही तोंच काळूच्या हातांनी तें पत्र फोडलेंही होतें !

'फोडलंस अेकदाचं पाकीट ! पण वाचता येतंय् का अेक अक्षर तरी ?'

'काय समजली आहेस तू काकू ? आता मराठी चवथीतला अठरावा क्रमांक आहे माझा ! वा, अक्षर पण स्वच्छ बाळबोध ! हात्येच्या ! हं, अैक, वाचतो.'

काही अडखळत पण अेकंदरीत स्पष्ट अर्थ कळेल असें काळूने वाचलेंही तें पत्र. दहापांचच ओळी होत्या त्या–पण त्या अैकताच अनुकाकू थंडगार होऊन अुभ्या राहिल्या ! त्या पत्राचा सारांश त्यांच्या लक्षात ठसठशीतपणे आला; तो हा की, ब्रह्मावर्तकिडे विष्णुपंत देवधरांच्या चुलत आजोबांच्या कुटुंबापैकी अेक वृद्ध गृहस्थ, 'दशांत'ला कोणी अेक आप्त वारला असून त्याला तो चवथा दिवस होता ! अर्थात् चुलत आजेसास-याच्या शाखेकडचें तें सुतक अनुकाकूनाही आलेंच होतें ! त्या बातमीने थोडा वेळ सुन्न होअून अनुकाकू अुभ्या होत्या तोंच काळू तें पत्र गाद्यांच्या ढिगाऱ्यावरच्या फळीवर ठेवण्यासाठी अुडी मारून त्या गाद्यांच्या ढिगावर चढला ! त्या धक्क्यासरशी अनुकाकू विंचू डसावा तशा अकस्मात् किंचाळल्या.

'अरे काळ्या, काळ्या, सुतक न मेल्या ! अुतर खाली ! कालविला ग वाअी विटाळ ह्या कारटयानं !'

काळू देखील त्या किंचाळण्याने थोडा दचकला, वाजूस झाला. तोंच विष्णुपंतही वाहेरून घरी आले, 'काय झालं काय ?' म्हणून आपल्या पत्नीस विचारताच अनुकाकूंनी त्या आपल्या पतीकडे जळफळत पाहून बातमी दिली.

" व्हायचं काय ! ते असतात न कोणीसे आपल्या चुलत आजोवांचे भाअी-बंद तिकडे ब्रह्मावर्तास ? कधी तुमच्या वा माझ्या जन्मात तोंडेदेखील पाहिलीं नाहीत अेकमेकांचीं ! त्यांचं कोणीसं मेलं आहे ! बर, मेलं तर मेलं, नवव्या दिवशी तरी कळवावयाच न की स्नान केलं नि सुतक फिटलं ! पण अुभ्या जन्मात ज्यांना अेकसुद्धा पत्र टाकायची घाअी कधी होत नाही, त्यांना मरताना मात्र सगळ्या भाअुबंदांना सात पिढ्यांची ओळख काढकाढून सुतकाचं पत्र टाकायची अगदी लगीनघाअी होते. आजचा चौथा दिवस सुतकाचा ! तोंच पत्र हातात ! सहा दिवस आता अस रखडत कुडकुडत पडायचं ! साधा मेल्यांनो काय गेल्या जन्माचं वैर होत तें ! अगवाअी, चुलीवरची डाळ करपू लागली ! अुतरायची तरी कुणी ती आता ? भिकी पण अजून येअीना शाळेतून !"

अनुकाकू अशा जळफळत ठिकच्या ठिकाणी अुभ्या होत्या तोवर विष्णुपंत तें पत्र सावकाशपणे वाचीत होते, काही आठवीत होते. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या सख्या आजोवांनाही पाहिलें नव्हतें. चुलत आजोवांच्या ब्रह्मावर्तांच्या शाखेचे नांव काय जें त्यांना ठाअूक होतें त्यापेक्षा काहीअेक ओळख नव्हती. काही वर्षांपूर्वी असेच अेकदा कुणी तिकडे वारले होते तेव्हा अेकदा सुतक आलें होतें. कुणी मेलें की जे कोणाचें पिढीत अेकाददुसरें पत्र येअील तेवढाच काय तो त्या दोन कुलशाखांतील भाअुबंदपणाचा पत्रव्यवहार !

अनुकाकू ही अेक देवलसी सोवळ्या ओवळ्याची आवड नि विटाळ-चंडाळाचा तिटकारा असलेली सुशील वाअी होती. जितकी प्रेमळ तितकीच तापट. विष्णुपंत त्या आपल्या वायकोच्या लहरीलहरीनेच घरातले व्यवहार ठेवीत. त्यांचें सोवळेंओवळें फार कडकही नसे, अगदीच सुटलेलेंही नव्हतें. त्यांच्या त्या पत्नीला अनुकाकूला—अलीकडे ताप येत असे, त्यामुळे त्या जास्तच चिडचिड्या झाल्या होत्या. पण घरात मोलकरीण अित्यादि ठेवण्याची शक्तिही त्या कुटुंबास नमल्याने नि अनुकाकूंच्या सोवळ्यालाही तें परवडणारें नसल्यामुळें त्या घरचें सारें काम स्वतःच करीत; आणि त्यामुळे त्यांचा ताप अधिकच रेंगाळून प्रकृति खालावत चालली होती. हें सुतकाचं विघ्न येताच नेसलेल्या सोवळ्यासुद्धा जिकडे तिकडे त्यांना विटाळच विटाळ दिसू लागून त्या भांबावल्यासारख्या झाल्या. चुलीवरची डाळ जों जों करपत चालली तों तों त्यांची बारा वर्षाची मुलगी भिकी शाळेतून येण्यास किती अुशीर करते याचा त्यांना अनावर राग येअू लागला.

शेवटी अेकदाची भिकी आली. भुकेलेली, नेहमीप्रमाणे येताच दफ्तर फेकून लडिवाळपणे कुरकुरतच आजीजवळ गेली, 'काकू खायला दे न आधी काही !' तोंच वसकन् तिच्या अंगावर अनुकाकू आल्या, 'अग शिवशील ! शिवशील ! भिके ! खा मेल्यांनो मलाच अेकदाचं. हट् मागं, मी सुतकी आहे !'

विचारी भिकी मागे हटत, हा सुतकाचा विटाळ म्हणजे काय अरिष्ट आहे काय की, अशी घाबरून पाहू लागली. ती मुलगी असल्यामुळे तिला सुतक नसते, स्वतः आंघोळून आता तिनेच काय येअील तसा सैंपाक करायचा नि सहा दिवस सुतक फिटेतो सारा पाणी-झाडलोटीसुद्धा संसार चालवावयाचा ही गोष्ट अनुकाकूनी समजावून देताच जड पावलांनी तें वारा वर्षाचें लेकरू चुपचाप कामाला लागलें. अनुकाकू अेका दूरच्या कोपऱ्यात राहून भिकीला आज्ञामागून आज्ञा सोडीत नि दर पळादोनपळामागे 'अग शिवशील !' म्हणून ओरडत काम करवीत बसल्या.

प्रत्येक पावलाच्या विटाळाचे, पदार्थाच्या विटाळाचें धर्मशास्त्र स्वतंत्र— सामान्य तत्त्व, नियम असा नाही. गव्हाला विटाळ नाही, ते निवडायचे, पण कणकीला विटाळ, ती शिवायची नाही; नदीला विटाळ नाही, विहिरीला विटाळ; विहिरीतल्या बेडकांचा, माशांचा. पाणी लाटतांना माळरहाटगाडग्यावर बसत्या अुडत्या कावळ्याचा विटाळ नाही, माणसाचा विटाळ; कोऱ्या कपड्यांना विटाळ नाही, धुवटांना विटाळ; तेल खायचें, तूप नाही; गोमूत्र प्यायचें, गोदुग्ध नाही; अुपरण्याची फेटयासारखी टापशी बांधायची, फेटा व पागोटें घालणें नाही; कारड्या भुअीवर सैंपाकघरात पाय पडला तरी विटाळ नाही, ओल्या भुअीवर पाय पडता कामा नाही; असे पोथीतले नि पोथीबाहेरचे अनुकाकूंना रूढि म्हणून सासरी माहेरी पाठ असलेले धर्मशास्त्राचे असंख्य नियम पावलोपावली मोडताना नि पाळताना विचाऱ्या लहानग्या भिकीला जीव नकोसा झाला ! तिला सुतक नव्हतें तरी काळूला होतें !

काळू हा अेक अुपजत सुधारक होता. सहजगत्या हसत हसत भिकीला चापटी मारून जाअी—काकूची दृष्टि चुकवून ! पण दिवसातून चारपांच वेळा तरी काकूच्या दृष्टीस भिकी सुतकाच्या विटाळलेल्या पदार्थांना वा सुतकी काळू भिकीला गमतीने शिवताना दिसेच, की अनुकाकूंच्या शिव्याशापांच्या वर्षावात विचाऱ्या भिकीला पहिल्याने तापावें लागून मग थंड पाण्यात सचैल आंघोळून कुडकुडावें लागे ! ते दिवस कडाक्याच्या थंडीचे ! पण अनुकाकूच्या सुतकशास्त्राचें विधान स्पष्ट होतें. थंड पाण्याच्या स्नानानेच काय तो विटाळ जाअू शकतो— अुष्ण पाण्याने नाही ! भिकी अवघी बारा वर्षांची शाळकरी पोर ! ती सैपाक ती काय करणार, मोठीं भांडीं काय अुचलणार, सोवळ्यातलें पाणी तें काय भरणार पण कच्चेपक्के काहीतरी शिजवून त्या कुटुंबाचा संसार तिलाच चालवावा लागला.

काळूची मात्र चैन होती. अनुकाकूंना तो भंडावून सोडी. गाद्यांच्या ढिगावर मघा काळू चढला होता; अनुकाकूंनी शास्त्रार्थ सांगितला की, 'भिके, गाद्या काही धूत नसतात, त्यावर गोमूत्र शिंपडलें की झालें; पण त्यांच्यातल्या चादरी तेवढ्या धुवायला काढ.' काळूचें मत की, धुवायच्या तर गाद्याही धू, नाहीतर चादरीवरही गोमूत्र शिंपडलें की विटाळ गेला पाहिजे ! अनुकाकूनी तें मत विचारात न घेता गाद्यांवर गोमूत्र शिंपडणेंच पुरें असें ठरवून त्या शुद्ध केल्या. हें पाहून काळू अेका हातात गोमूत्र घेऊन गाद्यांच्या ढिगावर जाऊन पुन्हा पुन्हा नाचे ! अनुकाकू ओरडत धावल्या की, हातातील गोमूत्र शिंपडून म्हणे, 'वघ गेला त्यांचा विटाळ ! अगदी तुझं शास्त्र पाळतो बरं !' अशा वेळी मात्र काळूला दोनचार चापटचा खाव्या लागत. तेव्हा कोणच्या तरी पोथीत सुतकामध्ये चापटचा मारू नयेत असाही नियम लिहिला असता तर त्यात काहीतरी अर्थ असता असें काळूला वाटल्यावाचून राहत नसे.

सुतकामध्ये साखर खाऊ नये हा नियम मात्र अनुकाकूंनी अेका प्रकरणापुरता कलिवर्ज्यांत काढला होता. त्या म्हणत, चहात साखर खायला हरकत नाही; नुसती साखर खाऊ नये. काळूचें मत अर्थातच असें पडे की, दोन्ही प्रकरणी साखर खावी किंवा खाऊ तरी नये. अनुकाकू आपल्या तत्त्वाप्रमाणे सुतकात चहा पीत. काळू आपल्या तत्त्वाप्रमाणे चहाच्या वेळी अुघडपणे काकूसमोर नि नुसती साखर गुपचूपपणे काकूच्या आड भिकीला पाणी भरण्यास साहाय्य देऊन त्याचें मूल्य म्हणून घेअी नि खाअी.

विष्णुपंत अेक शांत स्वभावाचे, आपल्या बाहेरच्या कामात गढलेले, नि घर अनुकाकूंच्या हाती देऊन टाकलेलें वापडें माणूस. ते अनुकाकूच्या तत्त्वाप्रमाणे अनुकाकूस वागू देत, भिकीच्या तत्त्वाप्रमाणे भिकीला, काळूच्या तत्त्वाप्रमाणे काळूला. आपण स्वतः घरी अनुकाकूच्या कलाप्रमाणे नि बाहेर त्यांचे मित्र डॉ. पुरंदरे यांच्या कलाप्रमाणे वागत.

त्याच डॉ. पुरंदऱ्यांकडे आज विष्णुपंताना जाणें अवश्यही झालें. ती थड पाण्याचीं स्नानें, ती झाडलोट, पाटपाणी, चूलपोतेरें नि दोन सांजा सैंपाक ही सारी खटपट त्या बारा वर्षांच्या भिकीला न झेपल्यामुळे तिला तिसऱ्या दिवशी ताप भरला. अिकडे अनुकाकूंच्या अंगी तर आधीच मुरलेला. त्यात चटअीवर थंडीत निजणें, गार पाण्याने अंघोळणें, भिकीचें कच्चेपक्कें जेवण खाणें, पथ्य तें सोडून जें कुपथ्य तोच सुतकातला धर्म ! त्यापायी अनुकाकूंचा तापही बळावला ! अंगाला सारखी ठणक. पण सुतकात गादी न घेता चटअीवर पडून दिवसरात्र कण्हत राहिल्या. घरात ही दुर्दशा पाहून कामकाज संपल्यावर तिसऱ्या दिवशी संध्याकाळी विष्णुपंत नोकरीवरून आले तेव्हापासूनच त्यांच्या ओळखीचे नि विश्वासाचे जे अेकच गृहस्थ होते त्या डॉ. पुरंदऱ्यांकडे काही औषध मागावयास नि थोडचा

गप्पाही छाटावयास गेले. सुतकापायी घरी किती अडचण आली आहे ते विष्णु-पंतांनी सांगितल्यावर डॉ. पुरंदरे तिथे बसलेल्या आपल्या दोघा स्नेह्यांकडे वळून म्हणाले,

'पाहिलंत ना ? ही सुतकाची आजची रूढि किती अर्थशून्य नि त्रासदायक झालेली आहे ती ? काय गोपूशास्त्री, सुतकात साखर खाऊ नये, गादीवर निजू नये, घरावाहेर पडू नये, थंडी असो नसो गार पाण्यानंच आंघोळावं, व कपड्यांचे ढीग स्वच्छ असले तरी बोट लागलं म्हणून धुवावे आणि अेका मनुष्याचा जीव गेला म्हणून दहा जिवंत माणसांना जीव नकोसा करावा, हा काय धर्म म्हणावयाचा ? ज्या रूढीच्या योगे लवलेश सामाजिक असा लाभ न होता मनुष्यमात्रास निष्कारण त्रासच त्रास होतो, तो अधर्म होय ! –ही सुतकाची रूढि त्यांपैकीच अेक अगदी बुद्धिशून्य भाबडटपणाची आहे. '

गोपूशास्त्री अुपहासले, ' तर तुमचं म्हणणं काय की, आपलं प्रिय मनुष्य मेलं म्हणजे दुःखी नातलगांनी बासुंदी, दूध, जिलब्या, लाडू, पेढे यथेच्छ खातपीत गाद्या-गिरद्यांवर लोळावं ? अहो, ज्याचा कोणी प्रियजन मरतो त्याला साखरच्ह सोमलासारखी लागते, हसूं येतच नाही, सुखोपभोग विषवत् होतात ! ह्यालाच आम्ही माणुसकी वा मनुष्यधर्म म्हणतो ! तिलाच सुतकाची रूढि म्हणतात, शास्त्र म्हणतात ! '

डॉ. पुरंदरे हसले, ' अहो अिथच तर मेख आहे. दुःख मानण्याचं शास्त्र—दुःख मानण्याची रूढि, या दोन परस्परविरुद्ध शब्दांत सुतकाच्या आजच्या ढोंगधत्तुऱ्याचं तुम्ही, मला केव्हाही करता आलं नसत असं, विडंबन केलं आहात !'

डॉ. पुरंदऱ्यांच्या म्हणण्याचा प्रत्यक्ष पुरावा हवा असल्यास आमच्या राणी-महाशय नी युवराज काळू यांचीच साक्ष काढा ! सुतक आल्याचं पत्र येताच माझ्या पत्नीच्या डोळ्यांत टचकन पाणी आलं – पण तें माझ्या चुलत आजोवांच्या शाखेतील अेक म्हातारे गोत्रज मेले म्हणून दुःखाने नव्हे ! -- तर ते मेल्याचं पत्र नवव्या दिवशी आमच्या हाती पडेल अशा बेतानं न टाकता आम्हांस सहा दिवस सुतकांत खितपत पडावं लागेल अितक्या लवकर त्यांनी टाकलं या रागान फणफणल्यामुळं ! ' काय गेल्या जन्माच वैर होतं तें साधा मेल्यांनो ! ' हाच आमच्या तापट राणीमहाशयांचा सुतकाची बातमी कळताना टाकलेला पहिला दुःखाचा सुस्कारा ! रूढि झालेलं दुःख म्हणजेच दुःखाचा मिथ्याचार ! लवलेश दुःख नसताना माझी बायको स्वतः आणि लेकरूं तापाने आजारी पडण्याअितकी जी सुतकाची दगदग अगदी मनोभावानं करते आहे ती केवळ सुतकात तसं करणं हें ' शास्त्र ' आहे म्हणून ! ' विष्णुपंतांनीही स्वतःचा अनुभव सांगितला.

' पुन्हा अस पहा –' डॉ. पुरंदरे शांतस्वरे म्हणाले, " अगदी सख्खी आअी वा बाप वारला तर त्याचं दुःख जस मुलांना तस मुलींनाही होतं. पण मुलींना, पोटच्या मुलींना सुतक नसतं ! आअी वारली तरी मुलींना साखर खायला'

गाद्यांवर निजायला धर्माची आडकाठी नाही; त्यांच्या कपड्यांना विटाळ नाही; पण पोटच्या मुलीपेक्षा त्या मृत स्त्रीचं दुःख ज्यांना शतपटीने कमीच वाटणार त्या चुलत चुलत दीर-जावा प्रभृतींना सुतक कडकपणानं पाळावं लागतं ! अुलटपक्षी ज्याच्याशी जन्मभर द्वेष, असाही भाअुबंद मेला की त्याचं मला सुतक; पण माझा अेखादा जिवलग मित्र वा मैत्रीण वारली आणि तिच्या दुःखानं मला जरी जीव-नही नीरस वाटण्याअितकं असह्य दुःख होत असलं, तरी मला त्याचं सुतक नसतं! तेव्हा दुःख होतं म्हणून माणसं शास्त्रोक्त सुतक पाळतात किंवा आजची सुतकाची पद्धत नि त्याची ती विटाळवेडाच्या व्यादीची साथ याचं समर्थन माणुसकीच्या समवेदनेनं होअू शकतं ही वलृप्ति, या दोन्हीही गोष्टी अगदी लटक्या पडतात.

'वरं, मृत व्यक्तीच्या वियोगानं हळहळून खरोखरच ज्यांना शोक धायधाय रडवोत आहे, विव्हळवीत आहे, त्यांना देखील दहा दिवस ह्या सुतकापायी आज आम्ही वळेवळे हाल अपेष्टा भोगणं जें भाग पाडतो – तो तरी धर्म म्हणता येअील का ? तो निव्वळ निर्दयपणा होतो. आरोग्यशास्त्राच्या दृष्टीने तर अशा शोक-विव्हल कुटुंबातील माणसांची मानसिक व्यथा वरी करावयासाठी आणि तिच्यापायी त्यांची शरीरप्रकृति ढासळून तेही रोगांना बळी पडू नयेत म्हणून त्यांना धीर देअून सत्त्वस्थ सुग्रास अन्न वळेंवळें जेवावयास वेळच्या वेळी द्यावयास हवं. थंडीअुन्हापासून बचाव होअील असे कपडे, असं स्नान, बाहेर हिंडणं फिरणं हेच अुपचार समजूत पाडून पाडून करावयास हवे. मायेच्या माणसांनी त्यांस पोटाशी घेअून, पाठीवर हात फिरवून, आपल्या घरी आदरानं नि ममतेनं शेजारी वसवून, त्यांना काही विरंगुळा पाडला पाहिजे. पण दुःखानं त्यांचीं मनं विव्हळ नि घायाळ जेव्हा झालेलीं असतात तेव्हाच सुतकानं आपण त्यांच्यीं शरीरंही विव्हळ नि घायाळ करून सोडतो ! अेखाद्या महारोग्यासारखं 'विटाळ विटाळ' म्हणून हडहड करीत कोणी त्यांना शिवणार नाही. चटअीवर निजणं, रूक्ष नी वेळीअवेळी कोणी दुसरा काय घालील तें खाणं, कामधंदा बंद, घराबाहेर पडण्याची चोरी ! जी ती वस्तु मागून घेणं, ताटकळत दिवसरात्र पडणं, ह्या आजकालच्या सुतकाच्या वाप्कळ नि अर्थशून्य रूढीमुळं मन नि शरीर ह्या दोहोंनाही मनाच्या दुःखाच्या भरीस सुत-काचा कठोर त्रासही सोसावा लागून अधिकच अुदास, भयाण, कंटाळवाणं वाटू लागतं. रोगापायी अेकजण मेलं नि सुतकापायी दोनदोन तीनतीन जणांची प्रकृति विघडून ते आजारी पडले अशीं कुटुंबें मी अनेकदा पाहतो. जेव्हा प्रियजन मेल्यामुळं जें कुटुंब खरोखरीच दुःखशोकानं विव्हळलं आहे त्यांतील लहान लेकरां-पासून थोरापर्यंत सुतकाच्या त्रासानं नसती आवाळ नि विटाळापायी हडहड करणं अगदी निर्दयपणाचं नि त्यांच्या आरोग्यास घातक आहे; म्हणून सुतकाची चाल टाकाअू. आणि ज्यांना सुतकाचं मुळी दुःखच नसतं त्यांच्याकडून सुतकाचं ढोंग करविणं हा निर्भेळ मिथ्याचार; म्हणून सुतक त्या प्रकरणीही टाकाअू ! अहो, धड-धडीत भाडचाचीं माणसं आणून प्रेतापुढं पैसापासरीसारखे दर ठरवून रडत ओरडत,

छाती पिटीत जाण्याच्या ज्या चाली आहेत, त्या तशा सुतकधर्मास वाण्कळ म्हणू नये तर म्हणावं तरी काय ? ' मोलें धातलें रडाया, नाहीं असू आणि माया ' अशी ही चाल आजही शेकडो लोकात अगदी तुमच्या अिकडच्या विटाळवेडया सुतकी चालीसारखीच ' धर्म ' म्हणून अक्षरश: पाळली जात आहे ! सुतकात जी विटाळाची साथ घरीदारी आपणांस पछाडते— तो तर अेक निव्वळ भ्रमिष्टपणाच नव्हे काय ? ''

' काय ? डॉक्टर ! आता मात्र तुम्ही पुरते वाहवत चालले आहा अं ! ' तिथे बसलेले अेक समाजशास्त्रज्ञ वी. अे. (ऑनर्स) आश्चर्यून मध्येच म्हणाले, ' अहो, युरोपातील साहेबलोक देखील आमच्या सुतकातील विटाळ मानण्याच्या आचारास आजकाल प्रशंसीत आहेत ! मृत्यु घडतो त्या कुटुंबात नि घरात जें बिघडलेलें वातावरण असतें त्याचा संपर्क समाजात फैलावू नये यास्तव त्या कुटुंबास कोणी शिवू नये, त्यांनी दहा दिवस घराबाहेर पडू नये, त्यांचे कपडे धुवून घ्यावे अित्यादि नियम आमच्या त्रिकालदर्शी पूर्वजांनी घातले आहेत महाराज, आहात कुठं ? अहो, गोपूशास्त्र्यांचें तें शास्त्रोक्त राहो, पण शहाणे साहेब लोकसुद्धा प्लेगमध्ये क्वारंटाअीन सेग्रिगेशन प्रभृति जे अुपाय योजितात, ते देखील आमच्या सुतकातील रूढीपासून सुचले बरं का त्यांना ? सुतक दहा दिवस स्मृति म्हणते, ते अेकवेळ खोटं म्हणाल पण क्वारन्टाअीनदेखील दहाच दिवस साहेब लोकांनी पाळावयाचं ठरविलं तें खोटं म्हणायची कोणाची छाती आहे ? साहेब देखील सुतकाचं समर्थन करतात, समजलात ! समाजशास्त्राचा प्रश्न आहे हा ! चेष्टा नाही ! '

' हो, हो, हो ! प्रोफेसर महाशय, खरं सांगू का, जुन्या रूढिच समर्थणारं तें ' शास्त्रोक्त ' अेक वेळ काहीतरी समंजसपणाचं असतं; पण हें तुमचं ' साहेबोक्तं त्या रूढीचं असह्य विडंबन करून सोडतं म्हणे साहेवदेखील सुतकास समर्थितात ! साहेवांत कोणी मूर्ख नसतात की काय ? मेयोदेखील अेक साहेबच आहे ! तिची निंदा साहेबोक्त असली तरी जशी कपटी, तशीच काही साहेबांनी आपल्या वेडगळ रूढींची केलेली स्तुतिही कपटी असते. आम्ही वेडेचार सोडू नयेत म्हणूनच काही हितशत्रु साहेब त्यांना वाखाणतात. आपण साहेबोक्त झालं तरी परीक्षून घ्यावं. पोथीनिष्ठ सुतकाचा विटाळ कुठं, नि क्वारंटाअीन सेग्रिगेशनची बुद्धिनिष्ठ पद्धत कुठं ! साथीच्या रोगानं मृत्यु झाला तर क्वारंटाअीन सेग्रिग्रेशन अुपयोगी, पण कोणाचाही मृत्यु साप डसून, खड्डयात, पडून, मोटार अपघातात झाला तरी सुतकाचा विटाळ धरतात. पुन्हा अगदी प्लेगन ! ' महामारीनं घरात बाप मेला तरी मुलांना सुतक—पण वापाच्या अुशाशी बसलेल्या मुलींना नाही ! मुलीच्या सर्वत्र वावरण्यानं काय साथ फैलावत नाहीं ? विष्णुपतांचा कोणीतरी आप्त मेला ब्रह्मावर्ताला--नि विटाळ विष्णुपंतांच्या नि त्यांच्या गोत्रजांच्या कुटुंबास पाळावा लागतो पुण्याला—मद्रासेला—सिंधला—विलायतेला!

आप्त मेल्याचं पत्र गोत्रजांतच तेवढं साथ पसरवीत जातं! तें पोचताच दूरदेशी केवळ त्या ठराविक नात्याच्या माणसांत तेवढे रोगाणू सळसळू लागावे नि त्याच घरी तेच जलवायु सेवणाऱ्या अितर, राहत्या माणसांना मात्र त्यांनी बाधू नये ? हें काय वैद्यक की वेड ? सुतक येअोल त्या घरी मृत्यु घडो न घडो, त्या माणसांनी म्हणे घराबाहेर पडू नये. पण गावच्या वाटेल त्या माणसानं त्यांच्या घरी सरसहा येत-जात, खात-पीत राहावं हें सुतकाचं शास्त्र ; हें काय सेग्रिगेशनचें तत्त्व ? प्लेगची साथ काय घरचा मनुष्य बाहेर गेला म्हणजे तेवढी पाळीव कुत्रीसारखी त्याच्याबरोबर जाते, पण बाहेरचीं माणसं घरी आलीं तर त्यांच्या मागं जात नाही, त्यांना चावत नाही ? भयंकर साथीतही सुतकाचा तोच ठराविक खाक्या! दहाव्या दिवशी गोमूत्र थोडंफार शिंपडलं की 'शुद्ध' झालं घर, कपडे, माणसं, सगळं ! पण याला का 'डिसअिन्फेक्शन' म्हणायचं ? कौलारं अुलथून, कडक जंतुघ्नें फवारून, औषधीय धुरांनी कपडेलत्ते, वस्तु वाफाळून ज्या साथीला आवरता येत नाही, ती काय घरातल्या वाटेवर चार थेंब गोमूत्र शिंपडून पळविता येते ? 'विटाळ' म्हटला की, ही धर्मभोळेपणावर आधारलेली भावना; डिसअिन्फेक्शन – क्वारंटाअीन प्रभृति 'निरोगीकरणा'चीं साधनं वैद्यकाचे प्रयोगसिद्ध अुपाय ! सुतकाच्या चालीशी वैद्यकीय हेतूंचा मूळ संबंध असा नाहीच ! मूलतः ती चाल धार्मिक, परलोककल्पनामूलक !'

विष्णुपंत – हेंच कारण माझ्या ध्यानात आलं होतं बरं का डॉक्टर, जेव्हा मी अिजिप्त प्रभृति देशांतील 'ममीं'ची नि 'पिरामिडस्'ची माहिती प्रथम वाचली तेव्हा अं ! मेलेला राजा वा रंक परलोकात जाताच अिथला संसार असाच पुढं थाटतो ही पूर्वीची धार्मिक समज असं म्हणूनच मनुष्य मरताच त्याच्या थडग्यात ताटवाटी, कपडे, दिवे, पलंग ज्याची जशी शक्ति तसं पुरीत, परगावी बिऱ्हाड करताना जसं आपण निवडक सामान बरोबर देतो.

डॉ. पुरंदरे – घरगुती सामान नव्हे तर माणसंही ! पूर्वकाली कोणी मेला की त्याच्या थडग्यात त्याच्या गुलामांनाही जिवंत पुरीत. थोर राजे असले तर त्यांच्या आवडत्या बायकांनाही जिवंत पुरीत ! जपानसारख्या देशात सम्राट मरताच त्याचा सेनापति, प्रधान, मंत्री अजूनही जो क्वचित् 'हाराकारी'(स्वतःच भोसकून घेअून प्राणार्पण) करतो ती देखील अतिप्राचीन अशा ह्याच सुतकी भावनेची अुरलेली स्मृति होय. पूर्वी असं मंत्रिमंडळदेखील राजावरोबर परलोकी धाडीत ! आमच्यात प्रेतावरोबर सती जाणारी पतिव्रताही परलोकी पतीच्या संसारात गृहिणीची तूट पडू नये याच मूळ भावनेची 'अुदात्तीभूत' (Sublimated) साक्ष होय. जी प्रेमविव्हल होअून प्रियासाठी प्राणार्पण करी, तिची गोष्ट न्यारी; तसं प्राणार्पण आअी आवडत्या लेकराच्या वियोगानं, वीर कीर्तीसाठी, हुतात्मे ध्येयासाठी करतात ! तें निराळं. पण सुतकातील 'कर्तव्य', 'शास्त्र' रूढि म्हणून ज्या स्त्रियांना सती जावं लागे, मृताला थंडीत अुपयोगी पडेल म्हणून घोंगडी, टेकावयास

काठी, दुधास गाय जी भटास द्यावी लागते, ती ह्याच भावनेचा अवशेष ! त्या काळी सायकली नव्हत्या, नाहीतर मृतास परलोकीच्या सडकांवरून झटपट जाता यावं यास्तव भटास अेकेक सायकल द्यावी असंही वचन गरुडपुराणातील सुतक-शास्त्रात सहज सापडू शकतं ! मुसलमान ख्रिश्चनांचे सुतकी आचारही त्याच आदि मानवांच्या धर्ममतांचे अवशेष, त्यांचीं थडगीं पिरामिडस्‌ची अगदी औरस संतति ! थडग्यात कृमिकीटकांनी रक्तमांसहृदय भक्षिलं तरीही अस्थिपंजर जे अुरतात, त्यांत जगाच्या शेवटच्या दिवशी श्वास फुंकून अीश्वर सर्वांना पुन्हा जिवविणार नि त्यांचा न्याय होणार ही मूळ भावना ! सारांश की मनुष्यजातीत जे सुतकीय आचार आज शास्त्र म्हणून रूढ आहेत, त्यांच्या बुडाशी वैद्यकीय वा वैज्ञानिक अशी कोणचीही कसोटी नसून ते मुख्यतः पारलौकिक नि जुनाट अशा धर्मकल्पनांचे भाबडे अवशेष आहेत. पूर्वीच्या ज्ञानाच्या नि अज्ञानाच्या मानानं पूर्वी ते शोभून गेले असं समजून तो प्रश्न टाळला, तरीही आता यापुढं तरी आपले सुतकाचे आचार आजच्या विज्ञानाच्या नि वैद्यकाच्या कसोटीस लावून, समाज-हितार्थ अुपयुक्त ठरतील तसेच नि तेच काय ते ठेवावेत. हें विटाळवेड तर तत्काळ सोडून द्यावं.

विष्णुपंत–पण मृताच्या स्मृतीप्रीत्यर्थ अेक सामाजिक संस्कार म्हणून तरी सुतक हवं, नव्हे काय ?

डॉ. पुरंदरे–अवश्य. तेवढाच त्याचा अुपयोग. पूर्वी राजा प्रभृति काहीजण मेले म्हणजे वर्षसहा महिने सुतक असे. सुतकाच्या अशा चाली समाजव्यवहारात अत्यंत त्रासदायक होतील, हें स्पष्टपणानं सांगून कित्येक स्मृतीतून राजा, मंत्री, सैनिक, शिल्पी प्रभृतींना 'सद्यःशौचाः प्रकीर्तिताः' म्हणून वगळून समाजाचीं कामं बंद न व्हावींत अशी सोय केली, लांब सुतकंही बंद केलीं. तीच विचारसरणी पुढं चालवून आता आपण बाकीच्या विटाळादि चालीही सोडाव्या. ज्यायोगे मृताच्या शोकानं विव्हळलेल्या कुटुंबीयांचं आरोग्य बिघडणार नाही, त्यांच्या हळु-वार मनास विरंगुळा पडेल, मुलांलेकरांचे हाल होणार नाहीत, अशी त्यांची शुश्रूषा आप्तेष्टांनी ठेवावी. वैद्यकीयदृष्ट्या अवश्य तितकी साफसफाअी, जंतुघ्न निरोगी-करण प्रभृति अुपायांनी गृहशुद्धि वा मनुष्यशुद्धि व्हावी. तो प्रश्न डॉक्टरवैद्यांचा–भटाभिक्षुकांचा नव्हे. जो मृत त्याची साधार कुळकथा नि नातं ही कुटुंब अेकत्र जमवून सांगावी, त्याचे गुण गावे, त्याच्या नांवे यथाशक्ति काही रक्कम अेखाद्या समाजहितकारक संस्थेस वा सुयोग्य नि सत्पात्र अशा विद्वानास वा विद्यार्थ्यास दान द्यावी. समाजीय प्रदर्शनार्थ सुतकाचं निदर्शक म्हणून अेखादं त्रासदायक नस-लेलं बाह्य चिन्ह दहा दिवस कुटुंबीयांनी वा दुःखितांनी वापरावं. थोडक्यात म्हणजे सार्वजनिक मनुष्य मेला असता आज सार्वजनिक सुतकं आपण जशी केवळ दुःखप्रदर्शक, स्मृतिमूलक नि कृतज्ञताव्यंजक अशा जनिक (Public) हेतूनंच नि पद्धतीनंच काय ती पाळतो तशीच कौटुंबिक सुतकंही पाळावीं.

विष्णुपंत— अहो, पण हें तत्त्वज्ञान आता आमच्या घरापुरतं कसं व्यवहार-वायचं ? आम्ही आता विटाळवेड सोडलं वघा; पण आमच्या सौभाग्यवती त्या तापात तशाच चरफडत राहतील, प्राण सोडतील, पण सुतकाची चाल सोडणार नाहीत ! खरोखर या सुतकापायी खरा त्रास घरच्या वायकांनाच होतो; पण त्याच सुतक पाळण्यात अगदी सुतळीत्रा फरक पडू देणार नाहीत !

डॉ. पुरंदरे—अेकंदरीतच तसं. बायकांचा छळ करणाऱ्या रूढि मोडण्यातही खरी अडचण वहुधा वायकांचीच येते. सुधारणांना नाक मुरडण्याकरिताच देवानं आपलं नाक वर केलं असाव अशी बहुतेक स्त्रियांची समज दिसते. वरं आज हीं दोन आषधं तेवढी तुमच्या कुटुंवाला नि मुलीला द्या, अुद्या मी येतो नि स्वतः प्रकृति पाहतो.

दुसऱ्या दिवशी डॉ. पुरंदरे विष्णुपंतांच्या घरी जाअून पाहतात तो अनुकाकूंचा ताप भलत्याच थरास चाललेला. छातीत कळ मारीत आहे, त्यांना नळी लावून परीक्षावयास डॉक्टर जाअू लागले तो अनुकाकूंनी शिवू देण्याचें नाकारलें. चटअी-चवघडीचीं टोकें आखडून आवरून 'कूर्मोऽगानीव सर्वशः' अशा त्या हटून वसल्या. डॉक्टर म्हणाले, 'अहो, मला विटाळ होअील, तुम्हांला नाही ना ?' अनुकाकू म्हणाल्या; 'म्हणूनच मी शिवू देणार नाही. कारण तुम्ही स्वतः आंघोळ-णार नाही नि गांवभर विटाळ कालवाल !'

भिकीही तापाने फणफणतच होती. आता दहावा दिवस अुजाडतो केव्हा असें विष्णुपतास होअून गेलें. काय अुपचार ते अनुकाकूला त्यानंतरच करता येणार. अशक्त, अुठवेना ! पण ती तशीच अुठून सारीं आन्हिकें करी. शेवटी चक्कर आली. रात्री अेक वातासारखा झटका ! पण तोच पहाटे अेकद्राचा दहावा दिवस अुगवला. त्यासरशी त्या दुःस्थितीतही अनुकाकू अगदी फुटतें न फुटतें तोंच अुठली, आपलें अंथरूण पांघरूण खाकोटीस मारलें, आणि दिसू लागल्यावर कुणी आपणास घरी थंड पाण्याने न्हाअूधुअू देणार नाही, सारा विटाळ कालवतील या भयाने तशा पहाटेस जावयास निघाली – गावच्या नदीवर !

तिथून तिला परत घरी जेव्हा आणली तेव्हा अुचलून आणली ! डॉक्टरांनी औषधपाण्याची पराकाष्ठा केली; पण वाताचा झटका अुतरेना. कोणी दिसलें की, अनुकाकू बेफामपणे किंचाळे, 'अरे दूर ! शिवशील ! सुतक !'

पहिल्या सुतकाच्या बाराव्या दिवशी अनुकाकू वारली नि विष्णुपंतास दुसरें नि खरेखुरें सुतक आलें. दुःखाची नि दुर्दशेची त्यांच्या घरावर खरीखुरी सुतकी छाया पडली. पण त्यांना नि त्यांच्या दोन्ही लेकरांना डॉ. पुरंदऱ्यांनी आपल्या घरी आणून पहिल्या दिवसापासून कोणचीही विटाळ-फिटाळ हडहड न करता आपल्या कुटुंबात बरोबरीने सांत्वन-सांभाळ केला म्हणून निभावलें.

✦ ✦ ✦

अज्ञानयुगातून विज्ञानयुगाकडे

किर्लोस्कर मासिकाचें कार्य

मी १९२४ व्या सनात अंदमानी नि हिंदी बंदिगृहाच्या आतिथ्याचा यथेष्ट अुपभोग घेअून स्थलबंदीची रुचि चाखण्यासाठी रत्नागिरीस ठाणें दिलें. स्थलबंदीची अट माझ्यावर लादली गेल्यामुळे अितर काय लाभालाभ झाले असतील ते असोत, पण भाषाशुद्धीच्या आंदोलनास मात्र अेक सांगण्यासारखा लाभ झाला. तो हा की, मला 'Internment' झाली आहे हें शुभ वृत्त सर्वांना कळविण्याचा प्रसंग गुदरल्यामुळे आणि शक्यतो अनावश्यक परकी शब्द वापरावयाचे नाहीत अशी मला अेक फार दिवसांची वाअीट खोड असल्यामुळे माझ्यावर सरकारने लादलेल्या त्या Internment & restraint on political movement, speeches etc.या दोन्ही अटींना मराठी शब्द अुद्भावणें मला भाग पडलें. त्यायोगे 'स्थलबद्धता' नि 'विषय बद्धता' हे दोन नवे शब्द मराठीत मी योजले. ते आज त्या अर्थी रुढावलेही आहेत.

'अरे रामा रामा! आली पुन्हा ह्यांची भाषाशुद्धि! देशकालपात्र न पाहता वाटेल त्या विषयात लिहायचें म्हटलें की भाषाशुद्धीचें घोडें सावरकरांनी पुढे दामटलेंच म्हणून समजावें!' असे आमचे अप्रिय वाचक वैतागाने ह्या लेखाचा आमचा हा पहिला छेदक वाचताच जळफळले असतील! पण अप्रिय वाचकहो, तुम्ही म्हणता तो आक्षेप खरा असला तरी ह्या प्रसंगी मात्र तो आम्ही खोटा पाडणार आहोत अं!

किर्लोस्कर विषयीच्या माझ्या आठवणीशी भाषाशुद्धीचा संबंध केवळ विषयांतराचा नसून अगदी मुख्य विषयाच्या मंगलचरणाचाच आहे! कारण की, किर्लोस्करांशी माझा प्रत्यक्ष नि प्रथम संबंध जो आला तो भाषाशुद्धीमुळेच होय.

किर्लोस्करांशी आमचा पहिला बादरायण संबंध

रत्नागिरीत स्थलबद्ध झाल्यावर तेथील किर्लोस्कर मंडळींचे अडते श्रीयुत खेर बंधु यांच्याकडे का अितर कुठेसें काय की, 'किर्लोस्कर खबर' नांवाचें अेक लहान मासिक माझ्या पाहण्यात आलें.

त्या वेळी भाषाशुद्धीविषयी आम्ही बहुतेक नियतकालिकांकडे पत्रव्यवहार करून त्या त्या व्यक्तींचें लक्ष या प्रश्नाकडे वेधीत होतो. त्या 'किर्लोस्कर खबर' मधील महजगत्या येणार तो 'खबर' शब्द आमच्या डोळ्यांना नाकात घुगुरूट शिरावें तसा त्रास देअू लागला. आपले वृत्त, वृत्तान्त, समाचार, बातमी असे तदर्थक शब्द आहेत; पण 'आजची बातमी काय?' विचारण्यापेक्षा 'आजची खबर काय?' हीच भाषा वायकामुलांच्या तोंडीसुद्धा रुळलेली! ज्यांना अर्थाच्या छटांची

अत्यंत चिंता लागलेली असते त्या चिंतातुर जीवांना देखील 'खवर' शब्दात वरील स्वकीय शब्दापेक्षा अधिक छटा जर कोणची आढळलीच तर ती त्या 'खबर' शब्दाने व्यक्तविली जाणारी त्यांच्या खुळचट सवयीचीच छटा काय ती होय, हें अुघड आहे. तेव्हा अगदी अनावश्यक असा हा परकी शब्द आपल्या भाषेत न वापरता, तो जसाजसा अधिकाधिक रुळत गेला तसतसे अपरिहार्यपणे स्वभाषेतून अधिकाधिक गळत चाललेले ते तदर्थक स्वकीय शब्द आपण निर्धाराने वापरू लागावे आणि 'किर्लोस्कर खबर' हें नांव बदलून 'किर्लोस्कर वृत्त' किंवा नुसतें 'किर्लोस्कर' हें नांव ठेवावें, अशी सूचना आम्ही किर्लोस्करांचे येथील अडते (अेजंट) श्रीयुत खेर यांच्या हस्ते त्यांच्याच पत्रातून कळविली. त्याविषयी अेकदोन पत्रेंही खेर यांजकडे आलीं गेलीं.

आणि अेक दिवस पाहतो तों 'किर्लोस्कर खबर' हें नांव गळून मासिकाचें नांव 'किर्लोस्कर' असें सुटसुटीत ठेवलेलें आढळलें ! तेंच आज महाराष्ट्रीयच नव्हे तर हिंदुस्थानीय मासिकांतील पहिल्या प्रतीचे पद पटकाविलेलें प्रख्यात 'किर्लोस्कर' मासिक होय !

माझी अिच्छा अशी होती की, 'खबर' हा अेक अनावश्यक परकी शब्द असल्यामुळे तो वहिष्कारण्यात आला आहे असा आमच्या सूचनेचा स्पष्ट अुल्लेख तो शब्द गाळताना यावा, म्हणजे त्यायोगे विदेशी शब्द टाळायची प्रवृत्ति चालू होण्यास थोडें अधिक साहाय्य होतें. पण तसें कोणतेंही कारण जरी तो शब्द गाळताना संपादकमहाशयांनी दिलें नव्हतें तरी दर महिन्यास त्या वेळी शेकडो आणि आता हजारो वाचकांच्या तोंडी 'खबर' हा वहिष्कार्य परको शब्द रुळविला जाण्याचें संकट तो ह्या प्रख्यात मासिकाच्या नांवातून गळल्यामुळे सहजीच टळलें हेंही त्या दृष्टीने काही थोडें अुपकारक झालें नाही.

अशा प्रकारे किर्लोस्कर मासिकाशी आमचा पहिला आणि अप्रत्यक्ष पत्रव्यवहार होण्यास आणि वादरायण संबंध जुळण्यास भाषाशुद्धिच कारण झाली असल्यामुळे ह्या लेखाच्या मैदानात तरी आम्ही आरंभीच भाषाशुद्धीचे घोडें अुगीचच्या अुगीच दामटलें नाही हें अुघड आहे.

स्वदेशीचे धुरंधर किर्लोस्कर

वरील अप्रत्यक्ष परिचयाच्याही आधीपासून आम्हांस किर्लोस्कर मंडळींच" विशेष अभिमान नि ममत्व वाटत असेच. तें त्यांच्या यशस्वी लोखंडाच्या स्वदेशी कारखान्यामुळे होय. महाराष्ट्रात तरी अेक स्वतंत्र औद्योगिक कारखाना अितक्या मोठ्या प्रमाणावर यशस्वी रीतीने चालवून दाखविणाऱ्या कुटुंबांत किर्लोस्कर कुटुंबाने अग्रमान पटकावलेला आहे. त्यांचे लोखंडी नि पोलादी, सजावट सामान (furniture) नांगर, पंप प्रभृति पदार्थ खपविण्याच्या कार्यी रत्नागिरी हिंदुसभेच्या द्वारे रत्नागिरी पुरते आम्ही प्रचारकाचें कार्य स्वदेशी आंदोलनाचा अेक भाग म्हणून

नेहमी करीत आलो आहोत. किर्लोस्कर लोखंडी सामानाचे आम्ही अेक फुकटे अडते आहोत. तीच गोष्ट डौलदार भाषेत सांगावयाची म्हणजे किर्लोस्कर स्वदेशी कारखान्याचे आम्ही अेक निरपेक्ष नि निर्वेतन प्रचारक आहोत. किर्लोस्कर मंडळींशी आमचा हा दुसरा संबंधही पहिल्याप्रमाणेच अगदी अेकमेकांना न विचारता पुसता, नि अेकमेकांची आजही तोंडओळख देखील नसता असा जुळून आला होता.

किर्लोस्कर मंडळींशी प्रत्यक्ष पत्रव्यवहाराचा परिचय

लहानशा 'किर्लोस्कर खबर' चें 'किर्लोस्कर' मासिक झाल्यानंतर त्याला सध्याचें सर्वांगसुंदर स्वरूप कसेंकसें प्राप्त झालें, तें आम्हांस सांगता येत नाही. कारण आमच्या वाचण्यात तें मासिक फारसें येत नसे. परंतु पुढे १९३४ च्या आगेमागे त्याचें नांव साहित्यसंसारात पुष्कळ वेळा अैकू येअू लागल्यामुळे, त्याचे दोनचार अंक आम्ही लक्षपूर्वक वाचले तेव्हा आम्हांस त्या मासिकाच्या टापटिपीचा आणि मार्मिक बुद्धिवादाचा बाणा अितका आवडला की, आमच्या मतप्रसारास हवें तसें क्षेत्र सध्याच्या परिस्थितीत याच मासिकात सापडणारें आहे असें आम्हांस वाटू लागलें. आम्ही त्यांना लगेच अेक पत्र टाकून विचारलें की, जन्मजात म्हणविणाऱ्या पण वस्तुतः निव्वळ पोथीजात असणाऱ्या प्रस्तुतच्या जातिभेदाच्या अुच्छेदनार्थ आम्ही जी चळवळ हाती घेतलेली आहे तिच्या प्रचाराचें कार्य आपल्या मासिकातूनही करता येअील का ? निरनिराळ्या नियतकालिकांतून आम्ही आधीपासूनच तो प्रचार चालविला होता; पण त्यांच्यात भरीस किर्लोस्करासारख्या खंद्या मासिकाचेंही साहाय्य मिळाल्यास केवळ जन्मजात जातिभेदासारख्या अेकटदुकट ठाण्यावरच नव्हे तर मानवी बुद्धीस नि यत्नास दुबळविण्याऱ्या धर्मभोळेपणाच्या नि धर्मवेडेपणाच्या यच्चयावत् दळबळावरच विज्ञानवादाचा चौफेर मारा चालू करता येअील.

आमच्या वरील आशयाच्या पत्रास संपादकमहाशयांचें लगोलग अुत्तर आलें की, 'किर्लोस्कर मासिकाशी आपला लेखनसंबंध कसा जुळवून आणता येअील याच विचारात आम्हीही होतो. आपले लेख किर्लोस्कर मासिकाच्या स्तंभांतून सादर अुत्सुकतेने स्वागतिले जातील. पहिला लेख लगेच पाठवावा. आपल्या लेखांतून 'अ'ची बाराखडी योजण्याची आपली अटही पाळली जाअील.' आम्ही आमच्या अुद्योगाला लागलो आणि लगेच किर्लोस्करच्या सन १९३४ च्या मार्चच्या अंकात आमचा 'रोटीबंदीची बेडी तोडून टाका !' हा पहिला लेख प्रसिद्ध झाला. किर्लोस्कर मासिकाची धर्मपत्नी 'स्त्री' नि त्यांचें 'मनोहर' अपत्य ह्यांनीही लवकरच आमच्या लेखांची मागणी केली. तेव्हापासूनच आजपावेतो ह्या तिन्ही मासिकांत आमचे लेख आदरपूर्वक बहुधा प्रत्येक अंकी प्रसिद्ध होत आले आहेत.

विज्ञाननिष्ठ बुद्धिवादाच्या प्रचारकार्यी ह्या तिन्ही मासिकांचा आम्हांस अत्यंत अुपयोग झाला आहे. आमच्या अपेक्षेहूनही अधिक विस्तृत नि अुपजाअू क्षेत्र ह्या

३८९७५ निबंध
३२२
१५११

मासिकांत आम्हांस लाभलें. ह्या तिन्ही मासिकांचें आकर्षण आणि महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गावरची पकड प्रथमपासूनच अगदी बिनतोड असल्यामुळे त्यांच्या त्या मिठ्ठास कादंबऱ्या, कथा, चित्रें, चरित्रें यांच्या मेवामिठाईस चटावलेल्या हजारो वाचकांनी त्या मिठाईत लपलेल्या आमच्या लेखांच्या विवनाअिनच्या कडू गोळ्याही अितक्या नकळत गटागट गिळण्यास आरंभ केला की, तोंड वाकडें करण्याचें सोडून अुलट आम्हांलाच हजारो वाचक अभिनंदू लागले की, 'वा! तुमचें विवनाअिन फारच गोड!' अशा तीन मासिकांचें अितकें अुत्कृष्ट संपादन करणारा श्री. शंकरराव किर्लोस्करांसारखा संपादक त्या संपादनकलेत किती प्रवीण असला पाहिजे हें काही आम्ही सांगावयास पाहिजे असें नाही. प्रत्येक चित्र, व्यंगचित्र, लेख, शब्द, ओळ, कानामात्रासुद्धा, प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीवर त्यांचें बारीक लक्ष असतें. त्यावर त्यांचा म्हणून अेक सफाअीचा हात फिरत असतो. लेखकांकडून आलेल्या कादंबऱ्या प्रबंधादिक लिखाणात मर्मस्थान कोणतें तें हुडकून काढून त्यावर अुद्बोधक चित्र वा व्यंगचित्र कोणतें कुठें नि कसें चितारावें यावर केव्हा केव्हा विचार करीत ते रात्ररात्र जागून काढतात असें तेच अेकदा अगदी सहजगत्या आम्हांस लिहून गेले होते. लेखानिमित्त त्यांचा आमच्याशी पुष्कळ पत्रव्यवहार होतो. त्यांतही त्यांचा मार्मिकपणा नि टापटीप किती असते म्हणून सांगावें! किर्लोस्करचा अेखादा अंक संपादताना जितका नीटनेटकेपणा करायचा, तितकाच लहानसहान पत्र लिहिताना सुद्धा ते करताना आढळतात. जें सांगायचें तें किती मनमिळाअू भाषेत पण तोललेल्या शब्दात, क्रमवार युक्तिसंगत असतें! अनेक जनिक (public) प्रश्नांवरही शंकररावांची साधकबाधक चर्चा करणारीं पत्रें आम्हांस केव्हा केव्हा येतात. त्यांवरून आणि त्यांच्या तिन्ही मासिकांतील त्या आरंभीच्या आटोपसर संपादकीयावरून त्यांची लेखनशैली किती मर्मज्ञ आहे तें दिसून येतें. नेमकें जें हवें तेंच, नेमक्या ज्या हव्या त्याच शब्दांत झटकन् सांगून मोकळे होण्यात शंकररावांचा हातखंडा आहे. क्वचित् त्यांच्या चित्रकलेच्या कुंचलीनेच ते त्यांची संपादकीय स्फुटेंही लिहितात कीं काय न कळे! त्यांच्याअितकेंच टापटिपीचें अुपसंपादक मंडळही त्यांना लाभलें आहे. नव्हे त्यांनी वेचून वेचून गुंफलें आहे. ते किर्लोस्करांचे श्री. ताम्हनकर आणि तो त्यांचा बापसे बेटा सवाअी 'दाजी'! अेक वेळ वाचक ताम्हनकरांना विसरतील, पण दाजीला नाही! अेकवेळ दाजीलाही विसरतील पण त्याचें ते शेंडा आंगठ्यासारखे पुढे दाखविणारें नाक! – आम्हीतरी त्या दाजीच्या नाकाला कधीही तोंड वेंगाडणार नाही.

संपादकाने लेखकवर्गाशी सलोख्याने, सौजन्याने, नि सचोटीने कसें वागावें याचें किर्लोस्कर हे अेक आदर्श आहेत. आमच्याशी तरी त्यांचा व्यवहार फारच सौजन्याचा नि सचोटीचा झालेला आहे. त्यांच्या किर्लोस्करादि तिन्ही मासिकांचे टापटीप, समयशीलता नि सचोटी हे विशेष गुण आहेत. पूर्वी मराठीत मासिक

म्हटलें म्हणजे महिन्याने निघतें तें असा अर्थ जो घेअी तो साफ तोंडघशी पडे. मासिक म्हणजे वर्षाच्या बारा महिन्यांतून कोणच्या तरी अेका महिन्यात निघणारें पुस्तक अशा अर्थीच काय तें त्यांना मासिक म्हणता येअी ! आताही थोडींच मासिकें वेळेवर निघतात. पण किर्लोस्कर, स्त्री, नि मनोहर हीं तिन्ही मासिकें अगदी त्या त्या महिन्यातच नव्हेत, तर त्या त्या ठराविक तारखेला वाचकांच्या हाती पडणार नाहीत म्हणजे काय !

संपादकाच्या अनेक गुणांत किर्लोस्कर हे जरी आजकालच्या बहुतेक संपादकांमध्ये अग्रेसर आहेत, तरी अेका गोष्टीत मात्र बहुतेक संपादकप्रकाशकांविषयी लोक जें बरेंवाअीट बोलतात तेंच किर्लोस्करांविषयीही बोलणें भाग आहे; हें जर आम्ही स्पष्टपणें न सांगितलें तर तोंडदेखलेपणाचा दोष पदरी पाडून घेतल्यासारखेंच होअील. आजकालचे बहुतेक संपादक, प्रकाशक हे लेखकवर्गाची वचनित लिखणावळ देण्यात हटकून जी खळखळ करतात त्याचा बोभाटा वृत्तपत्री देखील अनेक लेखकांना करावा लागतो. आमच्या स्वतःच्या अनुभवावरून आम्हांला किर्लोस्करांविषयीही निर्भीडपणे असेंच सांगणें भाग पडत आहे की, अितर बहुतेक संपादकांप्रमाणेच लेखकवर्गाची ठरलेली लिखणावळ देण्यात किर्लोस्करही हटकून खळखळ करतात ! फरक अितकाच की, अितर बहुतेक संपादकप्रकाशकांची लिखणावळ वेळचे वेळी न देण्यात खळखळ आणि किर्लोस्करांची लिखणावळ वेळचे वेळी हटकून देण्यात 'खळखळ' ! त्यांचा स्थानिक अडत्या (अेजण्ट) ताजा किर्लोस्करचा अंक हाती देअून जातो न जातो तोंच त्या अंकातील लेखाच्या लिखणावळीची मनीऑर्डर घेअून टपालवाला ती खळखळवीत दाराशी अुभा ! त्यायोगे आपल्या लेखाला प्रकाशणारें नियतकालिक हाती पडताच प्रथम धांदलीने आपला लेख काढून तो आपणच मिटक्या मारीत वाचण्याचा प्रत्येक लेखकाला होणारा अनावर मोहसुद्धा दूर सारून, किर्लोस्कराचा लेखक पहिल्याने त्या आपल्या लेखाच्या लिखणावळीचे ते बंदे रुपये हाती खुळखुळवीत त्या मनीऑर्डरीवर सही करण्याच्या सुखकारक संकटास आपण होअून तोंड देतो आणि मागचा लेख लिहून थकलेली त्याची बुद्धि तरतरीत होअून किर्लोस्करात पुन्हा दुसरा अेक लेख लिहिण्यासाठी अगदी कशी तलवारते !

अशा प्रवीण संपादकाच्या नेतृत्वाखाली सहस्रावधि वाचकांच्या ज्यावर अुड्या पडताहेत अशा किर्लोस्कर, स्त्री नि मनोहर ह्या तिन्ही मासिकांचा मतप्रसाराच्या कार्यी आम्हांस जसा उपयोग झाला तसा आमच्या लिखाणापासून त्या मासिकाच्या संपादकांनाही काही प्रत्युपयोग झाला आहे काय ?

याविषयी आम्ही अितकेंच सांगू अिच्छितो की, आमच्या लिखाणाचा अितर कोणत्याही दृष्टीने किर्लोस्करांना काही अुपयोग झाला असो वा नसो, पण त्या संपादकमहाशयांना अेका गोष्टीत तरी आमच्या लिखाणाचा अुपयोग झालाच झाला

ही गोष्ट आमच्या कट्टर शत्रूला देखील नाकारता येणार नाही. संपादकाला अत्यंत अवश्य अशी अेक कला तरी किर्लोस्करांना आम्हीच शिकविली !

पटाअीत संपादकाला वाटेल तें हस्तलिखित हां हां म्हणता अुलगडता आलें पाहिजे. किर्लोस्करांच्या दुर्दैवाने त्यांचा पूर्वीचा लेखकवृंद पुस्तीसारखें जपून रेखाट-लेलें हस्ताक्षर काढणाराच मिळाला. त्यामुळे हस्तलिखितें वाचण्याचा तेवढाच त्यांना सराव झाला होता – अुलगडण्याचा, deciphering चा नव्हता. पण आम्ही काही पुस्ती लिहिणारे प्राथमिक शाळेतील मूल नव्हतो. आम्ही पडलो पट्टीचे लेखक ! त्यामुळे आमचे तें फर्डेशाही पहिलें हस्तलिखित हाती पडताच 'किर्लोस्करा' च्या संपादकमहाशयांची बुद्धि नुसती गुंग होअून गेली ! त्यांना वाटलें, ह्या दुर्वाचनीय हस्तलिखिताचें कारण वाअीट कागद, चिरका टाक, पातळ शाअी असें काहीतरी असावें यासाठी त्यांनी आमच्या अक्षराच्या बरेवाअीटपणाविषयी चकारशब्द न काढता आम्हांस अुत्तम कागद, अखंड टाक (फाअुंटन पेन), फक्कड शाअी पाठवून देण्याची तत्पर आश्वासनें धाडलीं. तेव्हा शेवटी आम्ही मोठ्या अभिमानाने त्यांना कळविलें की, 'महाराज ! हा दोषच असेल तर अंगणाचा नाही ! नाचणाराचा आहे ! ' प्रत्येक पानात दहापांच ठिकाणी तरी वाक्यांची खाडाखोड नि शब्दांची घुसडाघुसड केल्यावाचून आणि ती समजावी म्हणून लालहिरव्या पेन्सिलींच्या रंगीत काकपदांनी तें हस्तलिखिताचें पान हिंदुस्थानच्या आलेखासारखें (नकाशा-सारखें) रंगविल्यावाचून आमचा लेख रंगावा तसा 'रंगला ' असें आम्हांस वाटतच नाही, त्यास काय अुपाय ? या रत्नागिरीतील साऱ्या कावळ्यांचे पाय कापले तरी आमच्या अेका हस्तलिखितास अवश्य तितक्या काकपदांचा पुरवठासुद्धा होणार नाही ! तिथे नुसते चांगले कागद नि फक्कड शाअी करणार काय ? असें जेव्हा आमचें दुराराध्य अुत्तर गेलें तेव्हा आमचें लिहिणें सुवाच्य होण्याची आशा सोडून देअून ' किर्लोस्करां 'चें संपादक मंडळ तें अुलगडण्याची कलाच शिकणें अधिक साध्य असें मानतें झालें. आताशी 'थोडें सुवाच्य लिहावें' अशी चेतावणी आम्हांस देण्याचा नाद ज्याअर्थी त्यांनी सोडून दिला आहे, त्याअर्थी आमचें हस्तलिखित अुलगडण्यात त्यांची बरीच प्रगति झाली असावी असें वाटतें. आणि आमचें हस्त-लिखित अुलगडण्याची कला ज्याला साधेल त्याला जगातील कोणत्याही आजकालच्या किडबिडचा हस्तलिखिताचा तर काय, पण साफ कुजून झिजून, गेलेल्या महाभारत-कालीन ताडपत्रावरील लिखितांचाही अुलगडा करता आलाच पाहिजे असा आम्हांस आत्मविश्वास वाटत ताहे !

किर्लोस्कर मासिकांनी चालविलेलें विचारक्रांतीचें महत्कार्य !

अेका लोखंडी कारखान्याचें मुखपत्र म्हणून निघालेलें मासिक म्हणजे नुसतें धुरकटलेलें नि ओबडधोबड असावें असें कोणासही वाटणें साहजिक होतें. पण

कोळशाची खाण खणता खणता त्यातच गुलाबांचें मनोहर अुद्यान सापडावें तसें लोखंडी कारखानदारांनी चालविलेल्या या तिन्ही सुंदर सजावटीच्या मासिकांना प्रत्यक्ष पाहताच वाटू लागतें !

परंतु ह्या साजसजावटीच्या सुंदर आराशीत जर ध्येयाची देवमूर्ति नसती तर ती शोभा अेका क्षणाची करमणूक काय ती होती. काही चिरंतन लोकहितकारक ध्येयासाठी झुंजण्यात नि झटण्यात जो आत्मिक आनंद अुपभोगिता येतो, जी माणुसकी असते, ती जीत नाही ती आरास म्हणजे प्रेताचें लावण्य, तिरडीवर अुधळलेला गुलाल, फोलकट फळ ! सुदैवाने किर्लोस्करी मासिकांनी अेका लोकहितकारक ध्येयास वाहून घेतलेलें आहे ! धार्मिक नि सामाजिक क्षेत्रांत बोकाळलेली धर्मभोळेपणाची नि रूढिपरत्वाच्या अंधळेपणाची रोगट साथ हटविण्यासाठी ही तिन्ही मासिकें विज्ञाननिष्ठ बुद्धिवादाचा अप्रतिहत प्रचार करीत आहेत.

या कामी त्यांच्या लोखंडी यांत्रिक कारखान्याचें साहचर्यच ह्या बौद्धिक मासिकांना अुपकारक होत असावेसें वाटतें. अितर धुरांत नि यंत्राच्या धुरात हाच फरक असतो. अितर धुरांनी डोळे धुरकटतात, विघडतात, पण यंत्राच्या धुराने मिटलेले डोळे अुघडतात, चिपडलेले निवळतात, दृष्टीला यथावत् निरीक्षू शकतात. प्रत्येक यंत्र अज्ञानयुगाचा अेक दिवस संपवून विज्ञानयुग अेका दिवसाने जवळ आणतें.

आपल्या राष्ट्राच्या डोळ्यांवर आलेली धार्मिक छापाची भंगडगुंगी घालवून त्याला प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानाची दूरदृष्टि देण्यासाठी आगरकरांच्या 'सुधारका'नंतर अितका नेटाचा, निर्भीड नि निकराचा प्रचार अितक्या मोठ्या प्रमाणावर आज तरी किर्लोस्कर मासिकांनीच चालविलेला आहे. त्यांतही जन्मजात जातिभेदाच्या, आम्ही सांगतो त्या सात स्वदेशी बेडयातरी तोडून टाकण्याच्या कार्यी, त्या तिन्ही मासिकांचें विशेषच साहाय्य होत आहे. हिंदुसंघटनाच्या महनीय राष्ट्रकार्यास ह्या विचारक्रांतीचा त्या प्रकरणी तरी अुपयोग झाल्यावाचून राहणार नाही !

—किर्लोस्कर, सप्टेंबर १९३६

✦ ✦ ✦

स्वा. सावरकरांचीं भाषणें

१. मध्यप्रांतीय हिंदु परिषद

अकोला येथे दि. २७ नोव्हेंबर १९३७ रोजी वऱ्हाड-मध्यप्रांत प्रांतिक हिंदुपरिषदेच्या अध्यक्षपदावरून स्वा. सावरकर यांनी केलेलें भाषण

'मी बदललो नाही; पूर्वीचाच आहे!'

पूर्वी स्वराज्याची – स्वातंत्र्याची जी चळवळ झाली ती केवळ शब्दाकरिता होती. तेव्हा स्वराज्याची मागणी करण्याचा आपला हक्क प्रस्थापित करणें व जनतेत त्या संबंधाची अुत्कटता अुत्पन्न करणें हेंच अुद्दिष्ट होतें. परंतु आज हें स्वराज्य नजरेच्या टप्प्यात आलें आहे. तेव्हा स्वराज्य म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना आपण ठरविणें अवश्य आहे. माझ्या भाषणात अलीकडे स्वराज्य–स्वातंत्र्य हे शब्द पदोपदी आढळत नाहीत, तेव्हा 'तो पूर्वीचा स्वातंत्र्यभक्त सावरकर आता राहिला नाही, आता जातिनिष्ठ बनला' असें लोक समजतात. परंतु ती चूक आहे. आज जनतेत पुरेशी जागृति होअून गेलेली असून सत्तेचा काही अंश आपल्या हाती आलेला आहे. तेव्हा स्वातंत्र्य–स्वराज्य यांच्या तात्त्विक विवेचनाची हद्द संपून व्यवहाराच्या पातळीवर राजकारण आज आलेलें आहे. नर्मदेतल्या बाणाप्रमाणे आम्ही ती शब्दपूजा त्या वेळी केली. त्याची त्या वेळी गरज होती. अिंग्रजांचें हिंदुस्थानावरील राज्य ही अीश्वरी देणगी म्हणून त्या काळात मानणारे लोक होते. 'नाविष्णुः पृथिवीपतिः' अशी त्यांची व आमच्या तत्कालीन पुढारी मंडळींची ही धारणा होती. तिला कलाटणी देण्यासाठी तरुणांच्या कैक पिढ्या. ही गारद झाल्या.

फ्रान्समधील क्रांति व यादवी

परंतु आता आपली प्रगति झाली असून आपण फार पुढे गेलो आहो. तेव्हा प्राप्त परिस्थितीत स्वातंत्र्याची व्याख्या करून तदनुसार आपलें धोरण ठरविणें अनिवार्य आहे. 'स्वातंत्र्य' शब्दाची जपमाळा घेअून बसणें आज निरुपयोगी आहे. स्वातंत्र्य म्हणजे काय हें आपण आता निश्चित ठरविणार, तेव्हा संघर्ष अपरिहार्यच आहे. स्वराज्य म्हणजे काय हें ठरविण्याच्या दृष्टीने सर्व लोकसमाज जेव्हा विचार करू लागले तेव्हा संघर्ष सुरू झाला हें आपण पाहतोच आहो. मागे फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी सनदशीर, सुधारक, क्रांतिकारक वगैरे जे भिन्न नरम-गरम पक्ष फ्रान्समध्ये होते त्यांच्या क्षोभाचें लक्ष्य राजा हा होता. त्यामुळे ते सारे पक्ष आपसातील सारे मतभेद विसरून जणू काही आपण अेकाच ध्येयाने प्रस्फुरित झालो आहो अशा भावनेने अुठावणी करून अुठले. राजा जोपर्यंत अुभा होता तोपर्यंतच हें

दृश्य टिकलें. परंतु राजा अेकदा त्या क्षोभाला वळी पडल्यानंतर राजावर सुऱ्या घेअून चोहोबाजूंनी धावलेल्या त्या लोकांच्या हातातील सुऱ्या समोरासमोर अुभ्या असलेल्या लोकांच्या मानांना भिडल्या. असें जें कार्लाअिलने म्हटलें आहे तें कोणत्याही देशाला लागू पडणारें आहे. आज अंशतः हिंदुस्थानात अशीच स्थिति आहे; पण तें क्रमप्राप्तच आहे. अर्थात् स्वराज्याची व्याख्या ठरविण्याचा प्रसंग येताक्षणीच देशाच्या नांवापासूनच झगडयाला प्रारंभ झाला.

संस्कृतिप्रेम याचेंच नांव राष्ट्रप्रेम

हिंदुस्थानचें स्वराज्य म्हटलें की नामोच्चारावरोबर हिंदूंचें राज्य असा अर्थबोध होतो. म्हणून हिंदुस्थान हें नांव नको! बरें, हिंदीस्थान, किंवहुना अिंडिया म्हटलें तरी त्यातून सिंधु–हिंदु ही परंपरा अजित्रात लुप्त नसल्यामुळे, हिंदुस्थानचें नांवच अजिवात बदललें पाहिजे, असा येथील अेका अल्पसंख्य समाजाने आग्रह चालविला असून, आपली बहुसंख्या असलेला हिंदुस्थानचा तुकडा अलग काढून त्याचें 'पाकस्थान' असें नामकरण त्यांनी करून टाकलें आहे. याप्रमाणे या देशातील अितर समाज आपल्या भविष्याविषयी अितके जागरूक असता आपण सुषुप्तीत राहून कसें चालेल? कित्येक लोक असेंही म्हणतील की नांवात काय आहे? पण मग त्यांना असा सवाल मी विचारतो की, 'स्वदेशाचें स्वातंत्र्य' असें जेव्हा तुम्ही बोलता तेव्हा त्या शब्दाचा अर्थ तरी तुम्हांस कळतो का? स्वदेशाचें स्वातंत्र्य म्हणजे काय हिंदुस्थानातील, दगड, धोंडे, माती, नद्या, पर्वत यांचें स्वातंत्र्य तुम्हाला अभिप्रेत आहे? आपल्या घरासंबंधीची आपली आत्मीयता काय त्या घराच्या भिंती, त्याच्या अंगणातील झाडें, घराचे वासे व विटा यांत गुंतलेली असते? 'माझें घर' असें जेव्हा मी आपुलकीने म्हणतो, तेव्हा त्या घराची माती-वासे-विटा या माझ्या मनात नसतात–तीत राहणारी माझी कुटुंबीय मंडळी माझ्या मनश्चक्षूंसमोर असतात. तें घर मला प्रिय असतें, कारण त्यात माझे वाडवडील नांदले—वाढले, माझ्या मुलाबाळांची ती क्रीडाभूमि होती, आहे व राहील, या कल्पनेने ना माझें माझ्या घरावर प्रेम असतें!

खरा हिंदुस्थान हा!

जी गोष्ट लहान प्रमाणात घराची, तीच मोठ्या प्रमाणात देशाची होय. आमच्या देशातील हिमालय, गंगा, यमुना, मथुरा वगैरे पर्वत, नद्या व शहरें हीं जगातील अितर पर्वत, नद्या व शहरें यांच्यापेक्षा आम्हांला प्रिय वाटतात. याचें कारण हें की हा हिमालय, ही गंगा, ही यमुना–यांच्या आश्रयाने माझ्या अभिमानाचें स्थान असलेली माझी संस्कृति जन्मली, नांदली व विकासली. मथुरेच्या वाळवंटाहून सुंदर वाळवंटें जगात पुष्कळ असतील. परंतु मथुरेचेंच वाळवंट मला

विशेष प्रिय का? तर येथे कृष्णाची बासरी वाजली म्हणून, माझ्या पूर्वजांची स्मृति या वस्तूंशी निगडित झाली आहे, माझें वेदवाङमय येथे जन्म घेतें झालें, माझे वाडवडील येथे जन्मले व मेले, माझ्या ऋषिभूमीच्या पदरवाने ही भूमि पुनीत झाली आहे, माझ्या संस्कृतीचा भूत तसाच भविष्यकाळही ह्या भूमीशी निगडित झाला आहे हेंच तिजसंबंधीच्या माझ्या प्रेमाचें कारण होय. हें तिचें वैशिष्ट्य माझ्या प्रेमाचें केंद्र होय. कारण देशाच्या भौगोलिक सीमा हें देशप्रेमाचें केंद्र कधीच नसतें.

हिंदु संस्कृतीचें वैशिष्ट्य

पण कित्येकांना मुळी हेंच कोडें पडतें की, आपल्या संस्कृतीचें वैशिष्ट्य तरी कोणतें? त्यांना अिंग्रजी संस्कृति समजते, जर्मन संस्कृति समजते, पण हिंदु संस्कृति मात्र अुमगत नाही. ते म्हणतात, 'तुमची कसली संस्कृति? तुमचें कसलें राष्ट्र?' अिंग्रजी किंवा जर्मन संस्कृतीचें किंवा त्यांच्या राष्ट्रत्वाचें गमक कोणतें? म्हणून विचारलें म्हणजे ते सांगतात की, त्यांचा देश, भाषा, अितिहास, वाङमय व वंश हीं अेक आहेत व त्यांच्या आजपर्यंतच्या संक्रमणात त्यांच्या संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. मग काय हीं सारीं गमकें आम्हांलाही लागू नाहीत? अिंग्रजांचा देश घ्या. त्यात काय आहे?–तर कोळसा! पण आमची भूमि तर सुवर्णभूमि म्हणून विख्यात. कोहिनुरासारखीं रत्नें ही भूमि प्रसवली आहे. जाअी, जुअी, मालती हीं पुष्पें, केळें, संत्रीं, आंबे, सिताफळें, हीं मधुर फळें, हत्ती, सिंह, हरिण, मयूरादि पशुपक्षी यांनी आमची भूमि समृद्ध आहे. अिंग्लंडात यांपैकी अेक तरी आहे का? त्यांचा नो फादर थेम्स? कोण अभिमान त्यांना त्याचा!! पण असले ओढे आमच्या कोकणात अनेक आहेत! आमच्या देशाची भव्यता, त्याची चारुता, समृद्धता यांपैकी अिंग्लंडात अेकही नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अेकाच वेदाने व अेकाच परंपरेने बद्ध असा आमचा देश जसा अभिमान-योग्य तसा अेकराष्ट्रही खास आहे.

अेक भाषा, अेक अितिहास

भाषेच्या दृष्टीने पाहिलें तर अिंग्लंडात तरी अेक भाषा कोठे आहे? खास लंडन शहरातच टांगेवाल्यांची भाषा लॉर्डाच्या मुलांना समजत नाही. स्कॉटलंड, वेल्स वगैरेंच्या भाषा तर स्वतंत्रच आहेत. परंतु आमच्या देशात अनेक भाषा आज बोलल्या जात असल्या तरी त्या साऱ्यांची मातामही संस्कृत ही अेकच आहे. साऱ्या भाषा संस्कृतनिष्ठ आहेत, आणि आता हिंदी ही अेक भाषा करण्याचा आमचा प्रयत्न चालूच आहे. तेव्हा देशाप्रमाणे भाषेच्याही दृष्टीने आम्ही अेकच आहो. अितिहासाविषयी तर बोलावयासच नको. जेथे अिंग्लंडला केवळ अेक हजार वर्षांचा अितिहास मोठ्या मेटाकुटीने सापडतो तेथे आमच्या मागे १० हजार वर्षांचा

अतिहास अुभा आहे. तुमचें वाङमय काय, तर येअून जाअून शेक्सपीयर. परंतु आमचें वाङमय किती भव्य–किती प्रचंड ! चार वेद, सहा दर्शनें, अठरा पुराणें, कालिदासादि कविश्रेष्ठांचीं काव्यनाटकें असें कितीतरी मोठें नि गौरवास्पद वाङमय आमच्याजवळ आहे; आणि वंश अेक म्हणावा तर तुमच्या अेका अिंग्लंडात सात राष्ट्रें व पंधरा वंश यांचें कडबोळें झालें आहे. अुलट अेका परंपरेने बांधलेले व अेका परंपरेचे अभिमानी असे आम्ही लोक आहोत. मग आमचें अेक राष्ट्र कां नव्हे व आमच्या संस्कृतीचें वैशिष्टय रक्षणार्ह कसें नाही ? अर्थात् आहे.

राष्ट्र म्हणजे भूप्रदेश नव्हे

आमच्यात अुणीव असेल तर आम्ही माणसें अधोगत झालो आहो, हीच काय ती आहे. वास्तविक आमच्याजवळ सामर्थ्य व समृद्धि आहे; अेक शस्त्रबळ असतें तर २५ वर्षांत आपल्याला युरोप पादाक्रांत करता येणें अशक्य नाही. खरी अुणीव आमच्यांत अिच्छाशक्तीची आहे. ती अिच्छा प्रबलतेने जागृत झाली तर आपणांला काय कठीण आहे ? ज्यू लोकांत ती अिच्छा प्रबळ होती म्हणूनच आपल्या भौगोलिक राष्ट्राला आंचवल्यावरही त्यांचें राष्ट्र जिवंत राहिलें व आज आपल्या वाडवडिलांच्या जुन्या पॅलेस्टाअिनमध्ये ते पुनः आपलें भौगोलिक राष्ट्रही वसवीत आहेत. आम्ही मात्र स्वतःचें स्वातंत्र्य गमावून वसून वर ज्यूंना त्यांचा देश आज परत मिळत असताना त्याला विरोध करीत आहो; व त्यांना तेथून अन्यायाने हाकून लावणाऱ्या अरबांचा पक्ष अुचलण्याचा वुळेपणा अंधळेपणाने करीत आहो. असे काय अुपकार या अरबांनी आमच्यावर केले म्हणून आपण त्यांचा पक्ष अुचलावा, हेंच मला कळत नाही ! त्यांच्या भाअिबंदांनी अितिहासकाळात आमच्यावर केलेल्या अनन्वित अत्याचारांची फेड आपण अशा रीतीने करीत आहो !

बहुसंख्याकत्व हेंच पाप बनलें !

आमची जी स्वराज्याची व्याख्या आहे तीत अेका नागरिकाला अेकच मत दिलें जाण्यावर भर आहे परंतु या देशातील काही अल्पसंख्य समाज, केवळ आपल्या अल्पसंख्याकत्वाच्या कारणासाठीच, अवास्तव सवलती मागत आहेत. जणू काय ते अल्पसंख्य आहेत हे त्यांचे आमच्यावर अुपकार असून, आम्ही बहुसंख्य आहोत हें आम्ही पापच केलें आहे ! त्यांनी स्वतः बहुसंख्य बनून आम्हांला अल्पसंख्य बनविण्याचे थोडे का प्रयत्न केले ? पण अेवढी त्यांनी पराकाष्ठा करूनही आम्ही जगलो हा आमचा दोष झाला का ? पण आज तसा तो ठरला आहे खरा! ख्रिस्ती, पारशी वगैरे या देशातील अितर अल्पसंख्यांकांनी असा जगावेगळा दुराग्रह धरला नाही. पण अेकट्या मुसलमानांनी धरला. त्यांच्या या अराष्ट्रीय दुराग्रहाला विरोध करण्याअैवजी आमच्यातले काही मोठे लोक अैक्याच्या भ्रामक कल्पनेने

अंध होऊन त्यांचे कोड पुरवायला तयार झाले आहेत! त्यामुळेच आता स्वातंत्र्यांची स्पष्ट व्याख्या सांगणें अपरिहार्य झालें आहे.

हिंदुस्थानाकरिता कोण मेले ?

वस्तुत: जो समाज देशात बहुसंख्य असतो त्यांचाच तो देश मानला जाण्याची प्रथा सर्व जगात आहे. या नात्याने तर हिंदुस्थान हिंदूंचा आहेच; पण त्याशिवायही तो हिंदूंचा असल्याचें आणखी अेक निश्चित गमक सांगता येअील. तें म्हणजे हिंदुस्थानाच्या अुद्धाराचा प्रयत्न कोणी केला हें पाहणें, हें होय. या देशाच्या स्वातंत्र्याच्या १८५७ पासून सुरू झालेल्या लढ्यात कोणी खरा त्याग केला ? – हिंदूंनी की मुसलमानांनी ? अंदमानात कोण गेले ? – हिंदु की मुसलमान ? ज्या बंगालचीं सत्तासूत्रें आज मुसलमानांच्या हातात आहेत त्या बंगालमध्ये जें स्वातंत्र्याचें होमकुंड अहोरात्र पेटलेलें असे त्यात वळी कोण गेले ? ते मुसलमान नव्हेत – तर हिंदुच ! सत्याग्रह-संग्रामात बळी गेले ते तरी कोण होते ? – मुसलमान ? छे: छे:, हिंदुच ! अंदमानातील भूमि खणून पहा व तेथे सापडलेलीं हुतात्म्यांचीं हडकें बघा म्हणजे तुम्हांला त्या साऱ्यांवर 'हिंदु' 'हिंदु' हींच अक्षरें लिहिलेलीं आढळतील ! यावरून काय सिद्ध होतें ? हेंच की, हिंदुस्थानाच्या अुद्धारार्थ आत्मार्पण हिंदूंनीच केलें आहे. अर्थात् हा हिंदूचाच देश आहे. ज्यांना अशी भीति वाटते की, मुसलमानांच्या सहकार्याशिवाय स्वराज्य मिळविता येणार नाही, ते ही गोष्ट दृष्टीआड करतात की, आजवर जें काही प्राप्त झालें तें अेकट्या हिंदूंनीच आपल्या बळावर मिळविलें आहे ! मग आजवर त्यांना करता आलें तें यापुढे करता येणार नाही असें मनोदौर्बल्य कां ? असें म्हटल्यावर लोक मला जातिनिष्ठ म्हणतील तर सुखेनैव म्हणोत. त्या तुमच्या मानीव राष्ट्रीयतेपेक्षा ही जातिनिष्ठा मी भूषणास्पद मानतो.

प्रयत्नांचें कृपाण हाती घ्या !

तेव्हा हिंदूंनी हें मनोदौर्बल्य टाकून देअून स्वत:च्या बळावर स्वराज्य मिळविण्याची हिंमत धरली पाहिजे. कारण मुसलमानांना हा देश स्वतंत्र झालेला पाहण्याची अुत्कटता नसून, त्याचें पाकस्तान बनलेलें पाहण्याची अिच्छा आहे. सरसीमेला भिडून अेकाशी अेक लागून असलेल्या मुसलमान राष्ट्रांचें संरक्षक व आक्रमक स्वरूपाचे तह झाले असून अुद्या अिंग्लंड अेखाद्या जागतिक युद्धात गुंतून हतबल झालें तर हे लोक अफगाणिस्तानाला हिंदुस्थानावर स्वारी करण्याला निमंत्रण करतील यात संदेह नाही. मग तें येणारें नवें राज्य हें स्वराज्य म्हणावयाचें काय? नाहीच मुळी ! ज्यात हिंदु संस्कृतीचें संरक्षण व वर्धन होअील तेंच स्वराज्य. असें स्वराज्य प्रस्थापित करण्याचें राष्ट्रीय सभेचें धोरण नसल्यामुळे हिंदुमहासभेला तें कार्य स्वत: करणें प्राप्त आहे. हें ध्येय यशस्वी होअील काय, अशी पापी

शंका मनात आणू नका. तें साध्य करण्याचा कृतनिश्चय करा! प्रयत्नांचें कृपाण हाती घ्या! यशापयशाचें महत्त्व काय आहे? यश न मिळालें तर ध्येयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करता करता प्राणार्पण केल्याचें समाधान तरी तुम्हांला लाभेल. ज्यांनी परिस्थितीपुढें मान वाकवून आपल्या कन्या-भगिनी परधर्मीयांच्या जनान्यात लोटल्या त्यांचीं नांवेंही दुनियेस विदित नाहींत. पण ज्या प्रतापाने स्वातंत्र्यासाठी राज्यत्याग करून वनवास पत्करला त्याचें नांव जगात चिरंजीव झालें. तें चिरंजीवित्व प्राप्त करून घेण्यासाठी, छलकांच्या अत्याचारांना बळी पडलेल्या पूर्वजांच्या समाधानासाठी तरी अेवढें कराच.

अनुक्रमांक ३८९७५ दि. निबंध
क्रमांक ७५९९ नोंद दिनांक 13/11/47

२. बंगाल हिंदु प्रांतीय सभा

खुलना येथे दि. १८ फेब्रुवारी १९३९ रोजी बंगाल हिंदु सभेचें आठवें अधिवेशन भरलें असता स्वा. सावरकरांनी अध्यक्षपदावरून केलेलें भाषण पुढे दिलें आहे. यात हिंदुमुसलमानांच्या अेकीसंबंधी त्यांनी आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत.

हिंदुस्थानातील मुसलमानबांधवांना हिंदूंशी अैक्य करावयास नको आहे ही गोष्ट आता स्पष्ट आहे. कारणें देऊन ती सिद्ध करण्याची गरज आहे असें मला वाटत नाही. अेक अेक दिवस अुगवतो तो काँग्रेसकडून मुसलमानांना जादा सवलती देऊन हिंदु-मुसलमानांतील फूट वाढवूनच मावळतो. अुदाहरणासाठी भाषेचा प्रश्न घ्या. पांचदहा वर्षांपूर्वी बंगालमध्ये अेकच भाषा चालू होती. हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही प्रांतापेक्षा बंगालमध्ये अैक्य अधिक होतें. पण आता मुस्लिम लीग अुघड अुघड असा प्रयत्न करीत आहे की, हिंदुस्थानची राष्ट्रभाषा अुर्दू हीच असावी. अितिहास वगैरे विषयांचीं क्रमिक पुस्तकें निम्मी बंगालीत व निम्मी अुर्दूत लिहिलीं जावींत असे प्रयत्न करण्यात आले. भाषांचें संमेलन घडविण्याची कोण ही विचित्र तऱ्हा! व्यक्तीव्यक्तीमध्ये अैक्य निर्माण झाल्याशिवाय त्यांच्या धर्मामध्ये व समाजामध्ये अेकी निर्माण करणें कधी शक्य आहे काय?

जिनांची शेखमहंमदी

बंगाली व अुर्दू यांचें असें संमेलन करणें म्हणजे माणसाने अेक पाय विजारीत व अेक पाय धोतरात घालून चालण्यासारखें आहे. पण अशा विचित्र वेषाचा ठराव

करून आपण तो मुस्लिम लीगकडे पाठविला तर ती काय म्हणेल माहीत आहे? दोन्ही पायात विजारच पाहिजे असा हट्ट ती धरील! आणि तो पुरवून घेण्यासाठी लढा खेळेल!! याचें बीज हें आहे की, हिंदुस्थानात आपलें असें अेक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचा हेतु लीगने मनाशी धरला आहे. अेखादा मौलाना, अेखादा मौलवी अशासारख्यांची ही शेखमहंमदी आहे असें समजू नका; तर बॅ. जिनासारखे पुढारी व मुस्लिम लीगसारखी जबाबदार संस्था यांची अिच्छा हिंदुस्थानाची दोन शकलें करावींत – अेक हिंदु फेडरेशन नि दुसरे मुस्लिम फेडरेशन! पिढ्यानुपिढ्या आपण आपल्या रक्ताचें शिंपण जिच्यासाठी घातलें, त्या मातृभूमीचीं शकलें करू पहाणाऱ्याशी तडजोडीचीं बोलणीं करणें शक्य आहे काय? प्रांत, धर्म, भाषा, राजकारण, सर्व बाबतीत 'सवता सुभा' स्थापण्याची त्यांची मनीषा आहे. पुढील शंभर वर्षांत ते असा प्रयत्न चालविणार याची खूणगाठ हिंदूंनी बांधली पाहिजे. काँग्रेसमधील हिंदु बांधव डोळे मिटून दुर्बिणीतून पाहत आहेत, त्यांनी हें भाकित ध्यानी घेणें जरूर आहे.

हिंदुत्वाची कसोटी लावा

याच्या अुलट, हिंदु मतदारांनी निवडलेले हिंदु मंत्री मात्र 'राष्ट्रीयत्वाच्या' नांवाखाली हिंदुत्वाला विरोधक व राष्ट्रीयत्वाला विघातक असें वर्तन करीत आहेत. ते हिंदु सभेचे सभासद होत नाहीत. हिंदु सभेच्या अध्यक्षाला काँग्रेसचा सभासद होणें शक्य नाही. 'तू पुरता अहिंदु कोठे झाला आहेस?' असें त्याला विचारलें जाअील. पण त्याला माझें अुत्तर असें की, माझ्या पूर्वजांचें हिंदु रक्त जोपर्यंत माझ्या शरीरांत वाहत आहे, तोपर्यंत मी हिंदुत्वाचा त्याग करून काँग्रेस-मध्ये प्रवेश करणार नाही. जिवात जीव असेतो मी हिंदु आणि हिंदुच राहणार! पुढील निवडणुकीचे वेळी अुमेदवार तुमच्याकडे मत मागण्यास येतील. तेव्हा त्यांना तुम्ही पहिला प्रश्न हा करा की, हिंदूंच्या हक्काचें तू रक्षण करशील ना? तो जर म्हणेल 'मी राष्ट्रीय आहे,' तर त्याला सांगा, 'तर मग तू राष्ट्रीय लोकांकडे जा; आम्ही हिंदु लोक हिंदु अुमेदवारच निवडतो!' राज्यघटनाच जर जातिनिष्ठ आहे तर राष्ट्रीय अुमेदवाराला निवडणें शक्य कसें आहे? मग असा चमत्कार लवकरच घडून येअील की, निवडणुकीच्या दिवशी प्रत्येक काँग्रेसवाला 'मी हिंदु' असें म्हणत सुटेल, त्या वेळी हिंदुत्वाचा खरा अभिमानी असाच अुमेदवार तुम्ही निवडा हीच माझी कळकळीची प्रार्थना आहे.

हिंदूंच्या राजवटीत

आम्ही हिंदु-मुसलमानांच्या अेकीविरुद्ध मुळीच नाही. त्यासाठी आमचा दरवाजा सदा खुला आहे. पण ती अेकी होअीपर्यंत हिंदूंचें राजकारण हिंदूंच्याच

नजरेतून पहा. हिंदूंच्या मतावर निवडून आलेल्या अुमेदवारांनी हिंदूंच्या हक्कांचें रक्षण न करणें हें दांभिकपणाचें आहे, विश्वासघाताचें आहे. जातिनिर्णयाचा निःसंदिग्ध धिक्कार कोणी केला असेल तर हिंदुसभेनेच केला, – काँग्रेसने नव्हे. 'ना स्वीकार, ना धिक्कार' असें धोरण काँग्रेसने जातिनिर्णयाबाबत जोवर ठेवलें आहे, तोवर हिंदुसमाज काँग्रेसपुढे कधीच मान लवविणार नाही, आणि काँग्रेसने जाति-निर्णयाचा अव्हेर केला, तरीही हिंदुसभा स्वतंत्रपणें राहिली पाहिजे.

हिंदुत्वाचा अभिमानी असा मंत्री ना. पंतांहून फार निराळ्या तऱ्हेने वागेल. मोहरमच्या वेळी हिंदूंना वाद्यवादनाला बंदी करा असें म्हणणाऱ्या मुसलमानांना तो बजावील, 'भाअी हो, हिंदूंच्या दिवाळीत तुम्ही कोणतीही मिरवणूक नेअू नका की वारा मैलांवर असलेल्या मशिदीतही प्रार्थना करू नका.' असा नेट हिंदूंनी दाखविला की, मुसलमान नमलेच म्हणून समजा. हिंदु मुसलमानांच्या अेकीचा खरा मार्ग हाच की, हिंदूंनी संघटित व सबल व्हावें आणि हिंदुत्वाचें रक्षण करण्याचें कंकण बांधलेल्या अुमेदवारांनाच निवडून द्यावें.

अंतर्गत भेद काढा

हिंदूंनी अस्पृश्यता काढून टाकली पाहिजे. व्यक्तीच्या खासगी जीवनात भेद-भाव राहू शकेल, पण सार्वजनिक जीवनात त्याला मुळीसुद्धा थारा नाही. नामशूद्र हा काही मुसलमानाप्रमाणे हिंदुस्थानच्या बाहेर आपलें ममत्व ठेवीत नाही. नामशूद्रापासून ब्राह्मणापर्यंत सर्व हिंदूंचे पूर्वज येथेच भस्मसात् झाले. त्या सर्वांची पुण्यभू, पितृभू, सर्व काही हाच भारतवर्ष आहे. सर्व हिंदु अेक दिलाने, अेक ध्येयाने, अेक विश्वासाने अेकत्र येतील, पुढे चालू लागतील, तर मायभूला संपूर्ण स्वातंत्र्य मिळणें ही गोष्ट दूरची खास नाही.

✦ ✦ ✦

३. बिहार प्रांतीय हिंदुसंमेलन

मुंगेर येथे ता. २३ मार्च १९३९ रोजी वरील संमेलनाच्या आठव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून स्वा. सावरकरांनी केलेलें भाषण.

हिंदुत्वातील राष्ट्रीयत्व

माझ्या भाषणाचे मी दोन भाग करणार आहे. पहिला म्हणजे हिंदूंची सांप्रतची दुरवस्था व दुसरा त्या दुरवस्थेतून हिंदूची सोडवणूक करण्याचा अुपाय दाखविणें. तुम्ही म्हणाल की हिंदूंच्या दुर्दशेचें चित्र आमच्या डोळ्यांसमोर रेखा-

टण्याची काय आवश्यकता आहे ? आम्हांला तर तिची पूर्ण कल्पना आहे. होय, तुमचें म्हणणें यथार्थ आहे. परंतु हिंदु महासभेविषयी काही लोकांचे मनात ज्या काही भलभलत्या कल्पना शिरल्या आहेत व जे विचित्र आक्षेप अुत्पन्न झाले आहेत, त्यांचा निरास करून त्याला योग्य अुत्तर देण्यासाठी हिंदूंच्या सांप्रतच्या दु:स्थितीचें चित्र रेखाटणें हें अत्यावश्यक व अपरिहार्य आहे. हिंदुधर्म व हिंदुत्व ही अेक नसून भिन्न आहेत. माझें असें ठाम मत आहे की, आम्हांला हिंदुधर्म अत्यंत प्रिय आहे व त्याच्यावर आघात होत असता तो आम्हांला पाहवणार नाही, अेवढेंच काय पण प्रसंगी आम्हांला त्याचे संरक्षणासाठी प्राणसुद्धा अर्पण करावे लागतील. परंतु हिंदुत्वाचें मोल त्याहीपेक्षा आम्हाला अधिक वाटतें. हिंदुत्वाचा अपमान झाल्यास, पाहिजे त्या प्रकारे, प्राणही पणास लावावे लागतील. आज जगभर ज्या राष्ट्रीयतेची ओरड चालू आहे, ज्या ' राष्ट्रीयतेवर ' अिटली, जर्मनी, अिंग्लंड अित्यादि देश तसेच आमची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस फिदा झाली आहे, त्याच राष्ट्रीयतेची भावना आमच्या हिंदुत्वातही भरलेली आहे.

आजचा प्रश्न

हिंदुत्वाचा ' हिंदुधर्म ' असा भ्रामक अर्थ नाही; तर हिंदुत्व हें ज्या राष्ट्रीयतेसाठी सगळें जग धडपडत आहे, त्या राष्ट्रीयतेचें प्रतीक आहे. जे लोक हिंदुधर्माला ' भ्रममूलक ' समजतात, त्यांनी मुसलमान, ख्रिस्ती आदि धर्मांनाही भ्रममूलक म्हटलें पाहिजे. परंतु तसें कोणी म्हणत नाही. म्हणूनच माझ्या मताप्रमाणे मुसलमान, यहुदी, ख्रिस्ती, यांना जर त्यांचा धर्म प्रिय आहे, तर मग आम्हा हिंदूंनाही आपला धर्म प्राणाहूनही प्रिय मानण्याचा पूर्ण हक्क आहे. परंतु सध्या आमच्या समोर हिंदुधर्माचा नव्हे तर हिंदुत्वाचा प्रश्न आहे. आणि हिंदुत्व म्हणजे तें की ज्यात आमचा धर्म, आमची भाषा, आमच्या जीवनाचीं निरनिराळीं अंगें, आमच्या 'भाकरीचा प्रश्न', आमचा गौरव, आमचा स्वाभिमान, 'राष्ट्रीयता' या शब्दात ज्यांचा समावेश होतो तें !! आणि याच हिंदुत्वासाठी मला हिंदु महासभेचें संघटन हवें आहे.

पूर्ण राजकीय ध्येय

दुसरी गोष्ट मला हिंदुसभेच्या ध्येयासंबंधी सांगावयाची आहे. आम्ही हिंदु २८ कोटी आहोत, तरीही आम्हांला हिंदुमहासभेचें ध्येय अजूनपर्यंत समजलें नाही. अितकेंच काय, काही लोक तर या ध्येयाचा भलताच अर्थ करितात. परंतु मी येथे आपणा सर्व लोकांना स्पष्टपणे दाखवून देअीन की, हिंदुमहासभेचें ध्येय पूर्ण ' राजकीय ' आहे. काँग्रेसला जें संपूर्ण स्वातंत्र्य हवें आहे, तेंच हिंदु महासभेलाही हवें आहे. भौगोलिक राष्ट्रीयतेच्या साच्यात भारतवर्षाला ओतणें हें हिंदु महा-

सभेचेंही ध्येय आहे. अितकेंच नव्हे तर हिंदु महासभेच्या दृष्टीने खरी राष्ट्रीयता तीच की, जिच्या छायाछत्राखाली प्रत्येक व्यवित समान असेल, जिच्या 'लोकसभेत' (पार्लमेंटात) तुम्ही कोणत्या धर्माचे आहा, हिंदु आहा, की मुसलमान आहा, ख्रिश्चन आहा की यहुदी आहा, हें कोणालाही विचारलें जाणार नाही. आम्ही सर्वांना हिंदुस्थानी म्हणू. सार्वजनिक क्षेत्रात, सरकारी नोकऱ्यातून हिंदुस्थानचा मनुष्य आहे की नाही व त्याची योग्यता आहे कीं नाही, अेवढेंच पाहू. याहून खरी राष्ट्रीयता ती दुसरी काय असते ? आणि जर हिंदुमहासभा याच राष्ट्रीयतेची पुरस्कर्ती आहे, तर मग तिच्यावर जातीयतेचा आरोप काय म्हणून लादला जातो ? आता राष्ट्रीयतेचा जर असाच अर्थ मानू लागले की, जो अधिक भांडखोर असेल त्याला अधिक वाटा मिळावा व जो येथीलच प्राचीन रहिवासी असेल, पण गप्प बसत असेल, सहनशील असेल, त्याला कमी अधिकार मिळावे, तर आमची हिंदुमहासभा अवश्य म्हणेल की, या राष्ट्रीयतेवर आमचा विश्वासच नाही. आम्ही समानतेच्या बाजूचे आहोत व याच दृष्टीने जर राष्ट्रीय असण्याचा काँग्रेसला अभिमान असेल, तर हिंदुमहासभेला पण त्यात तेवढाच अभिमान आहे. आम्ही तर छातीठोकपणे असें सांगू शकतो की, काँग्रेसअितकीच काय पण काँग्रेसपेक्षाही काकणभर अधिक हिंदुमहासभाच राष्ट्रीय आहे.

हिंदूंच्या दुर्दशेची सीमा

आता मी हिंदुस्थानात जन्मलेल्या हिंदुपुत्रांना असा सवाल टाकतो की, आता जें मी हिंदुस्थानच्या दुर्दशेचें चित्र रेखाटणार आहे, तें मान्य होअील काय? आपण सीमा प्रांतापासूनच प्रारंभ करू या. मी जें सागणार आहे तें सप्रमाण सांगणार आहे व त्याची जबाबदारी पूर्ण ओळखून सांगणार आहे. सीमा प्रांतात बन्नू व अितर शहरांत लुटारूंच्या टोळ्या आजही अस्तित्वात आहेत. दरोडे घालण्याचे आधी ते लोक तसें स्पष्ट जाहीर करतात नि आज आम्ही दरोडा घालणार आहोत असें सांगतात. तेथील शीख व हिंदु लोक काँग्रेसमंत्रिमंडळाला अशा प्रकारच्या धोक्याची सूचना देतात व सरकारी बंदोबस्ताची तेथील काँग्रेस सरकारजवळ मागणी करतात. पण काँग्रेस मंत्रिमंडळ काहीही बंदोबस्त करीत नाही. बंदोबस्त झालाच तर दरोडेखोरांची लुटालूट संपूर्ण होअून गेल्यानंतर!! पोलिसही जर आलेच तर अशा ठिकाणी येतात की, जेथे लुटालूटही झाली नाही नि जाळपोळही झाली नाही. त्यातही आश्चर्य हें की जेव्हा काँग्रेस मंत्रिमंडळावर असे आक्षेप घेतले जातात तेव्हा मंत्रिमंडळ म्हणतें की, यात 'जातीय दंग्याचा काहीच संबंध नाही. भुकेले पठाण गरिबीने चिडून जाअून असे हल्ले करतात.'

हिंदु कुमारिकांवर धाड !

परंतु मी असें विचारतो की 'काय हो ! जर हे भुकेल्या पठाणांचे हल्ले आहेत, तर मग श्रीमंत मुसलमानांच्या घरावर का बरे ते हल्ले होत नाहीत ?

बायका पळवितात त्या केवळ हिंदु व शीख यांच्याच कां बरें पळवितात ?' ते लुटारू जाहीरपणे सांगतात की ' आम्ही काफिर लोकांना लुटायला येत आहोत.' या गोष्टीची खात्री पटण्यासाठी मी अेक खरें घडलेलें अुदाहरणच सांगतो. अेका हिंदूच्या घरात चार मुली होत्या. दरोडेखोरांचा हल्ला होताच, त्यांपैकी अेका मुलीने विहिरीत अुडी टाकून जीव दिला, दुसरी पकडली गेली नि राहिलेल्या दोघीजणींनी शेजारच्या मुसलमानाच्या घरात आसरा घेतला. परंतु त्या घरातील मुसलमान स्त्रियांनी दरोडेखोरांना बोलावून आणून त्या मुली त्यांच्या ताब्यात दिल्या. नंतर त्यांपैकी अेक मुलगी कोणत्या तरी युक्तीने त्या लूटारूंच्या हातातून निसटली व शेजारच्या कोर्टातील मॅजिस्ट्रेटसमोर तिने आपली जबानी दिली. त्यात तिने सांगितलें की, कांदेबटाट्यांप्रमाणे मुली बाजारात विकल्या जातात. त्यांच्या किंमती ठरवून, तेवढ्या किंमतीचे बिल्ले त्यांच्या शरीरावर लटकावतात व रात्री जनावरांप्रमाणे गोठ्यात गळ्यात दोरी बांधून, त्यास खुंट्याला बांधून ठेवतात. तसेंच, ब्रिटिश फौजेच्या भीतीने त्यांना अेका जागेहून दुसऱ्या जागी नेअून ठेवण्यात येतें.'

काँग्रेसची राष्ट्रीयता !

असे प्रसंग पूर्वी तर अनेक घडून येत. परंतु काँग्रेसमंत्रिमंडळ आल्यापासून अशा गोष्टी पुष्कळच अधिक घडून येअू लागल्या आहेत. असे प्रसंग न घडावे म्हणून केंद्रीय सरकारने जेव्हा प्रांताचे संरक्षणार्थ अधिक रक्कम अंदाजपत्रकात लष्करी खर्चामध्ये घातली तेव्हा ' यामुळे पठाणांच्या स्वातंत्र्यावर गदा येअील ' या मुद्द्यावर अेका मुसलमानाने त्या गोष्टीला विरोध केला. हिंदु राष्ट्रीय सभा-सदांनीही या गोष्टीचें समर्थन केलें. याचेंच नांव राष्ट्रीय समानता आहे काय ? पण अेकदा अेलिस नांवाची अेक अिंग्रज मुलगी पळविली गेली, तेव्हा ज्या प्रधानाने पठाणांविरुद्ध कारवाअी करण्यास विरोध केला होता, त्याचें गांव तोफेने अुडविण्यात आलें, व लुटारूंच्या भुकेबरोबर त्यांची वासनाही जाळून टाकण्यात आली. आता कोणत्याही लुटारू टोळीच्या बापाचीही छाती होत नाही की, तो अिंग्रज स्त्रीच्या अंगाला हात लावील ! अेकदा शीख हिंदु यांनी जेव्हा काँग्रेसच्या मुख्य प्रधानाकडे शिष्टमंडळ नेलें नि सांगितलें की, बन्नू गावात हिंदु पोलिसांची सख्या जास्त ठेवा, तेव्हा मुख्य प्रधान खाँसाहेब म्हणाले, ' पोलिसांमध्ये हिंदु-मुसलमान असा भेद काय म्हणून ? ही अराष्ट्रीय वृत्ति आहे. तुम्हांला जर भय वाटत असेल, तर ज्या ठिकाणी हिंदु अधिक प्रमाणात राहतात, तेथे जाअून रहा.' अेकीकडे सीमाप्रांतात राष्ट्रीयतेचा डौल दाखविण्यात येतो, तर दुसरीकडे बिहार व संयुक्त प्रांतात नोकऱ्यांमध्ये मुसलमानांचा भरणा भरमसाट होत आहे. याचें नांव काँग्रेसची राष्ट्रीयता !!

पंजाब, काश्मीर, दिल्ली कोठेही पहा, हिंदूंच्या संपत्तीवर व प्राणावरच

संकट आहे असे नाही, तर हिंदूंचा स्वाभिमानही आज भयंकर धोक्यात आहे. मालमत्तेवर येणाऱ्या संकटाची आम्ही हिंदु तितकीशी पर्वा करीत नाही, परंतु स्वाभिमान व संस्कृति यांच्या संरक्षणासाठी प्राणदान करणेंही आम्ही श्रेयस्कर समजतो.

मुस्लिम लीगचा कांगावा

पहा ! आमच्या स्वाभिमानावर व संस्कृतीवर कशा प्रकारचे संकटाचे ढग गडगडत आहेत !! जेव्हा मुस्लिम लीगने 'काँग्रेस मुसलमानांच्या हिताची अपेक्षा करीत आहे' अशा तिजवर आरोप केला, तेव्हा ती गोष्ट काँग्रेसवाल्यांच्या कलिजाला जाऊन भिडली. त्यांनी मोठ्या काकुळतीने असें पटवून देण्याची शिकस्त केली की 'छे ! छे ! मुसलमानांवर आम्ही केव्हाही अन्याय केला नाही, अुलट त्यांचा फायदाच आम्ही करीत आलो आहोत.' आम्ही आमच्या कर्तव्यात केव्हाच कसूर केली नाही.' पण हिंदूंनी असा आरोप केलाच तर काँग्रेस सरकार त्याला कवडीचीही किंमत देत नाही, त्याकडे कानाडोळाच करते.

ना. पंतांची कबुली

मुस्लिम लीगच्या आक्षेपांना सर्व प्रांतिक सरकारांनी आपापला खुलासा करून, ते आक्षेप खोटे असल्याचें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. या खुलाशात संयुक्त प्रांताचे मुख्य प्रधान श्री. गोविंदवल्लभ पंत यांचा खुलासा लक्षणीय आहे. ते म्हणतात की, ' मुस्लिम लीगचा आक्षेप खोटा आहे. जेव्हा राष्ट्रीय प्रश्न येतो, तेव्हा आम्ही सदैव मुसलमानांच्या बाजूनेच मत देतो. (पण खरा राष्ट्रीय धर्म कोणत्याही जातीला अुचलून धरीत नसतो.) मोहरम हा मुसलमानांचा ' मातमदिन ' असल्याने आम्ही असें जाहीर केलें आहे की, 'मोहोरमात हिंदूंनी मशिदीसमोरच काय, पण कोठेही वाद्यें वाजवू नयेत, मंदिरातही घंटा वाजवू नयेत, अेवढेंच काय परंतु देवाच्या आरतीचे वेळीही घंटा वाजवू नयेत.' (हिंदूंनी याविरुद्ध तक्रार केली परंतु कोण अैकतो त्यांचें ! तक्रार व्यर्थ गेली.) 'आम्ही हिंदूंवर असाही निर्बंध घातला की, हिंदूंनी परवानगी घेतल्याशिवाय मिरवणूक काढू नये. मुसलमानांना मात्र आम्ही ही अट ठेविली नाही.' आपण विचार करा की हीच का राष्ट्रीयता ? हाँ ! जर हिंदूंच्या अेकादशीच्या दिवशी मुसलमानांनाही अुपवास करायला लावला तर मात्र थोड्या प्रमाणात समानता होअू शकेल !!

मुसलमानांच्या धार्मिक भावनांना मान द्यावयास लावण्याची जर हिंदूंवर सक्ती केली जाते, तर मग हिंदूंच्या धार्मिक भावनांना मान द्यावयास मुसलमानांवर दडपण टाकिलें पाहिजे. सवलती दोघांनाही सारख्या असाव्यात. अेकाची गैरसोय व दुसऱ्याची सोय असें का ? ही राष्ट्रीयताच नव्हे ! पंतप्रधानाने हें मान्य केलें

आहे की हिंदूंच्याच मतांनी मी मंत्री झालो आहे. पण अशा प्रकारचें वर्तन करण्याचा हिंदूंनी त्यांना कधी 'मँडेट' दिला होता ? अितकें असूनही पंतांच्या आमदानीतच अधिकांत अधिक जातीय दंगे झाले आहेत. संयुक्त प्रांतातील शौकत-अल्ली नांवाच्या मॅजिस्ट्रेटने 'मोहरमची मिरवणूक चालली असता हिंदूंनी त्या रस्त्याने जाऊ नये, होळीच्या वेळी वाद्यें वाजवू नयेत व रंग अुडवू नये' अशा तऱ्हेचें अेक व्यक्तव्य प्रसिद्ध केलें होतें.

ही मात्र जातिवंत जातीयता

तुमचा बिहार प्रांतच का घ्या ना ! येथील काँग्रेस सरकारने लीगच्या आक्षेपांना अुत्तर देण्याकरिता अेक वक्तव्य प्रकाशित करून असें दाखविलें आहे की, या प्रांती सुमारे शे. १३ मुसलमान असूनही त्यांना मुल्कीमध्ये शे. २८, शिक्षण विभागात शे. ४१ व स्थानिक स्वराज्यात शे. २६ पर्यंत नोकऱ्या दिल्या गेल्या आहेत. मद्रास सरकारचें कथन आहे की, तेथे जरी शे. ७ मुसलमान आहेत तरी त्यांना अबकारीमध्ये शे. १६, शिक्षणविभागात शे. १०, जंगलविभागात शे. १५ व न्यायखात्यात शे. १८ नोकऱ्या मिळाल्या आहेत. हीच का खरी राष्ट्रीयता आहे ? योग्यतेप्रमाणे जर नोकऱ्या मिळाल्या तर त्याला कोणी विरोध करणार नाही. योग्यता असेल तर शे. १०० नोकऱ्या द्या ! अहो, परंतु अेखाद्या जातीकरता विशेष सवलत म्हणून अितक्या नोकऱ्या काय म्हणून दिल्या जाव्या ? हिंदु महासभासुद्धा अल्पसंख्य जातींना त्यांच्या हक्काची गॅरंटी द्यावयास तयार आहे. परंतु बहुसंख्य जातीला प्राप्त झालेल्या हक्कावर कुऱ्हाड मारून, या तऱ्हेने थैमान घालण्याला मी अल्पसंख्यांकांची गॅरंटी म्हणणार नाही. आणि जर हिंदु महासभा या असल्या सर्व गोष्टींना विरोध करते म्हणून जातीय ठरविली जात असेल, तर मला त्या जातीयतेबद्दल अत्यंत अभिमान आहे ! मला त्याचा गर्व वाटतो !! वस्तुतः हिंदु महासभेच्या या ध्येयाला जातीयता म्हणणें हा अगदी अन्याय आहे. राष्ट्रीयतेच्या नांवावर भाषेची ही कत्तल होत आहे. राष्ट्रभाषा हिंदी होती, ती हिंदुस्थानी झाली. आणि अत्यंत शास्त्रीय व सर्वश्रेष्ठ देवनागरी लिपीशी विचित्र अुर्दू लिपीचें लग्न लावून देण्यात आलें. हिंदु मुलावर दोन लिप्या शिकण्याचा बोजा बळाने लादला जात आहे.

हें अुलटें चित्र पहा

तीच आता मुस्लिम-प्रधान प्रांतांची अवस्था पहा. पंजाब–बंगालमध्ये हिंदूंकडून जमीन हिसकावून मुसलमानांना दिली जात आहे. बंगाल्यातील अेका मुस्लिम प्रधानाने विधिमंडळात असा ठराव मांडला आहे की, मुसलमान योग्य असोत वा नसोत, त्यांना शे. ६० नोकऱ्या मिळाल्याच पाहिजेत. बंगालमध्ये

अधिकात अधिक मुसलमान शे. ५१ टक्के आहेत! आणि या सर्वांवर कळस म्हणजे हा ठराव पुढे आल्यावर तेथील काँग्रेसच्या सभासदांनी तटस्थ राहणेंच योग्य ठरविलें! श्री. शरच्चंद्रांसारख्या राष्ट्रीय कार्यकर्त्यांनी सुद्धा यावर आपलें मत प्रकट करताना म्हटलें आहे की, ' मुसलमान हे योग्य नाहीत. म्हणून ही अुणीव भरून काढण्यासाठी प्रत्येक खाऱ्याने अेक परीक्षा ठेवावी आणि ती पास झाली की मुसलमान बी. अे. झाले असें समजावें.' अशी ही काँग्रेसची राष्ट्रीयता आहे ! आज हैद्राबादमध्ये काय होत आहे ? हिंदूंना पूजा-अर्चा करू दिली जात नाही. मंदिराचा कळस मशिदीच्या अुंचीच्या खालीच असला पाहिजे, असा हुकूम निघाला आहे. जिकडे पहाल तिकडे हिंदूंचा धर्म, स्वाभिमान, गौरव, पोटाचा प्रश्न या सर्वांवर आघात होत आहे.

अशी अवस्था आहे ! आता आपणच विचार करा की, हिंदुसभा का अुगीचच ओरडत आहे ? आज ४० वर्षांनंतरही आमची काँग्रेसही तेंच रडगाणें गात आहे, त्याच दुःखाच्या गोष्टी सांगत आहे, तींच दुःखें आळवून सांगण्यासाठी संमेलनें भरविलीं जात आहेत. मुस्लिम राज्यातही तेंच दुःख व ब्रिटिशराज्यातही तीच रड आणि आज सात काँग्रेसी प्रांतांतही हिंदूंचें बहुमत असूनही थोडीशी सत्ता हाती आली आहे तरीही तीच रडकथा की, ' आमच्यावर अन्याय होत आहे.' आम्हांवर बलात्काराने अुर्दू लादली जात आहे. धिंग्रा आदि कितीतरी क्रांतिकारकांनी बलिदान केलें. असहकार आणि सत्याग्रह-युद्धात अपूर्व त्याग कित्येकांनी केले. त्यानंतर जी थोडी सत्ता आम्हांला मिळाली आहे, तिचा हा असला अुपयोग किती दुःखदायक होत आहे ! !

मुसलमानांनी साधलें

आता दुसरीकडे जिनासाहेबांकडे बघा ! पंजाब, बंगाल व सिंध यांमध्ये मुसलमानांचें बहुमत असल्याने त्यांनी तिन्ही प्रांतांत कट्टर मुसलमानांचें प्रधानमंडळ कायम करण्याचा असा प्रयत्न केला की, त्यांतील दोन प्रांत जे बंगाल व पंजाब त्यांत तर लीगचें प्रधानमंडळ कायम केलें तेव्हाच ते राहिले. आणि म्हणूनच तर पंजाबचे मुख्य प्रधान सर शिकंदर हयातखान यांनी प्रकटपणे आपल्या प्रांतात सर्व ठिकाणी मुस्लिम लीगच्या शाखा अुघडण्याचा आदेश दिला आहे. अितर सात प्रांतांत हिंदु प्रधानमंडळ होअू शकलें असतें – आमच्या हिंदुबांधवांनी निवडणुकीचे वेळी आपापल्या प्रांतातील लोकांना स्पष्ट शब्दात हें सांगितलें असतें की, ' हिंदूंचें हित पहाण्याचीच प्रतिज्ञा आपण करीत असाल, तरच आपणांस मत मिळेल.' असें झालें असतें तर – हिंदूंना हीच अुत्तम संधि होती की, ज्या प्रकारे पंजाब, बंगाल व सिंध यांमधील मतदारांनी मुसलमानांचें हित रक्षण करणाऱ्या मुस्लिम अुमेदवारांना टिपून मतें दिलीं, त्याच तऱ्हेने हिंदूंनीही हिंदु हित पाहणाऱ्या पुढाऱ्यांनाच मतें दिलीं असतीं तर ! !

निवडणुकीच जातिनिष्ठ आहेत

अशा रीतीने कमीत कमी सात प्रांतांत तरी हिंदु प्रधानमंडळ कायम झालें असतें, आणि मग आपणांस आपल्या प्रांतात नोकऱ्यांसंबंधी तक्रारी करण्याचा, भाषेसंबंधी रडगाणें गाण्याचा प्रसंग आला नसता. कानपूरमध्ये दंगा झाला. चौथ्या दिवशी लष्कर पाठविलें गेलें. हिंदु प्रधान मंडळ असतें, तर पहिल्याच दिवशी लष्कर गेलें असतें व अेका दिवसात दंगा शांत करून टाकला असता !! मुसलमान अिंग्रजांवर आक्रमण करीत नाहीत ! तेथे त्यांची गुंडगिरी चालत नाही.. आमच्या प्रधानमंडळाच्या राजवटीत मोहरमच्या दंगली, मशिदीपुढील वाद्यांचा प्रश्न अुत्पन्नच झाला नसता. आघातास प्रत्याघात करून आपण सर्व काही ताळ्यावर आणलें असतें. आज आमचेच प्रतिनिधि ज्या चुका करीत आहेत, त्या झाल्या नसत्या. कारण निवडणुकीचे वेळीच आम्ही त्यांच्याकडून प्रतिज्ञा करविली असती की, 'हिंदुहिताचें रक्षण कराल, तरच तुम्हांला मतें मिळतील.' जर निवडणुकीचे क्षेत्रात राष्ट्रीयतेचा वासही नाही, तर राष्ट्रीयतेचा टेंभा मिरवणारे काँग्रेस अुमेदवार अुभे तरी न राहते किंवा राहिलेच तर ते आपल्या जातीच्यासाठीच !!

काँग्रेसचा भ्रम

हिंदूंच्या अपूर्व त्यागामुळे थोडीबहुत सत्ता हाताला लागली तर तिचा अर्धा हिस्सा मुसलमानांच्या हाती गेला आणि अर्धा हिस्सा ज्या लोकांनी शब्दाचा दुरुपयोग केला व करीत आहेत असल्या लोकांच्या हाती आम्ही दिला. काँग्रेसवालेही बहुधा हिंदुच आहेत. परंतु काँग्रेस–घटनेमध्ये 'राष्ट्र' शब्दाची जी चुकीची व्याख्या आहे, तीमुळेच काँग्रेसवाले असल्या तऱ्हेच्या गोष्टी करीत आहेत. ते काही जाणूनबुजून करीत नाहीत. आम्ही 'हरीचा' अर्थ 'भगवान्' न करता 'माकड' केला आहे. परंतु याला अुपायही अद्याप हिंदूंच्याच हाती आहे. जिनांनी हिंदुस्थानाचे दोन तुकडे करा अेक मुसलमान संघ व अेक हिंदुसंघ – असें म्हणून आम्हा हिंदूंचे डोळे अुघडून दिले, हे त्यांचे अुपकारच आहेत. मुसलमान आमचे धाकटे भाअू आहेत, असें आम्ही म्हणतो. आम्ही लहान भावाला आधीच अर्ध्याहून अधिक हिस्सा दिला आहे. परंतु अितक्याने संतुष्ट न होअून आमचे धाकटे बंधू आअीचेच दोन तुकडे करावयास तयार झाले, तेव्हा आता या धाकट्या बंधूचे कान पिळण्याचा प्रसंग आला आहे.

पूर्ण स्वराज्य स्थापा

काँग्रेसवाले यापुढे आपले डोळे अुघडोत किंवा न अुघडोत, आपण हिंदु तरी सावध व्हा, आणि असा निश्चय करा की, पुढील निवडणुकीत 'आम्ही त्याच हिंदूला मत देअू की जो मत मागण्याचे वेळेसच नव्हे तर विधिमंडळात गेल्यावरही

स्वत:ला हिंदु समजणें ही लज्जेची गोष्ट समजणार नाही. हिंदुत्वाच्या तिकिटावर अुभे राहतील, त्यांनाच आम्ही पाठिबा देअू. या वेगडी राष्ट्रीयतेच्या लोकांना नव्हे.' या 'राष्ट्रीयतेच्या' मोहात पडून तर आम्ही हिंदूंनी हाती आलेली थोडी-बहुत सत्ताही जशी काही मिळालीच नाही असें समजून मुसलमानांना देअून टाकली. म्हणून हिंदूंनो ! आता सावध व्हा. आणि पुढील निवडणुकीत सातही प्रांतांत हिंदु प्रधानमंडळ स्थिर होअील, अितकेंच नव्हे, तर त्यास प्राप्त सत्तेच्या योग्य अुपयोगाने, हिंदुत्वाच्या जोराने ब्रिटनच्या हातातील राहिलेली सत्ताही प्राप्त करून देशात पूर्ण स्वराज्य स्थापन करण्याचा अुपाय करा.

हिंदुत्वाचा अक्षय्य वट

हजारो वर्षांपासून निद्रित असलेल्या या हिंदु जातीत अुत्साह संचरण्याचें हें पहिलेंच युग आलें आहे. या वेळी मुसलमान आम्हांला मिळोत वा न मिळोत, आम्ही सर्व मिळून हिंदुराष्ट्राच्या पुण्यमय प्रयत्नांत अेकत्र झालो आहोत. बस्स ! तुम्ही आता तयार व्हा आणि असे संघटित व्हा की, तुमच्या भावी स्वातंत्र्ययुद्धात विलक्षण जोर यावा ! ! जगातील कोणचीही शक्ति तुमच्यापुढे अुभी राहू शकणार नाही, असाही काळ येअील असा विश्वास बाळगा ! जोपर्यंत मुसलमान साहाय्य करीत नाहीत तोपर्यंत 'राष्ट्र' याचा अर्थ 'हिंदुराष्ट्र' असाच समजा. हिंदूंच्या हितावर दृष्टि ठेवूनच राजकारण खेळा, राष्ट्रीय हिताच्या गोष्टी बोलण्याचें ढोंग सोडून हिंदुहिताचें रक्षण करण्याच्या गोष्टी बोलण्यात लज्जा मानू नका. तुमच्या देशात हूण आले, ग्रीक आले, शक आले, यवन आले परंतु त्या सर्वांचें नाममात्रही राहिलेलें नाही. हिंदुत्वाचा नाश करायला आले व स्वत:च धुळीस मिळाले ! ! आणि आम्ही २८ कोटी हिंदु आजही जिवंत राहिलो आहो. औरंगजेबाने अक्षय्य वटाचा नाश करण्यासाठी काय करायचें ठेवलें होतें ! ! परंतु आमचा अक्षय्यवट आजही अुभाच आहे. सारांश जोवर आमच्यात हिंदुत्वाची भावना जागृत असेल तोपर्यंत जगातील कोणतीही शक्ति आमचा नाश करू शकणार नाही. हिंदुत्व विसरल्याने मात्र धुळधाण निश्चितपणे होअील हें ध्यानात ठेवा.

✦ ✦ ✦

४. प्रांतिक स्वराज्य कोणी आणलें ?

अकोला येथे दि. २६ नोव्हेंबर १९३७ रोजी स्वा. सावरकर यांचा सत्कार रा. ब. आठल्ये यांच्या अध्यक्षतेखाली झाला त्या वेळी स्वा. सावरकर याचें झालेलें भाषण.

आपण जो आज माझा सन्मान केला हा माझा सन्मान नसून मी ज्या कार्या-करिता मागे झगडलो त्या कार्याचा, त्या स्वातंत्र्याचा, त्या स्वराज्याचा हा सन्मान आहे. ज्या वेळेला स्वातंत्र्य शब्द अुच्चारणें मोठें भयंकर समजलें जात होतें त्या वेळी तो आम्ही अुच्चारला, अितकेंच नव्हे तर त्यासंबंधी खटपट करण्यास प्रारंभ केला, आणि त्या भानगडीत त्या काळच्या सरकारच्या रोषास आम्हांला बळी पडावें लागलें. अशाही वेळी, आम्हांला पोलिसच्या सशस्त्र पाहाऱ्यात शिक्षा झाल्यानंतर बंदिशाळेकडे नेत असताना काही मंडळी स्नेहार्द्र बुद्धीने पाहत होती. पण ती किती होती ? फक्त चारदोनच. पोलिसांच्या त्या गाडीतून मुंबअी ही आता शेवटचीच आपणांला दिसणार या आशेने चौफेर जेव्हा मी पाहिलें तेव्हा मैदाना-वर क्रिकेटची मॅच चाललेली होती. हजारो तरुण आनंदाने टाळ्या पिटीत खेळाची मजा पाहत होते ! आणि माझ्यासारख्या चारदोन व्यक्तिच स्वातंत्र्याच्या मागे लागल्यामुळे त्या तुरुंगाची, काळ्या पाण्याची हवा खाण्यास चालल्या होत्या. पण त्या काळात आणि आजच्या काळात जमीनअस्मानाचें अंतर पडलें. आज स्वातंत्र्य आणि स्वराज्य शब्द घरोघरी अुच्चारला जात आहे. आज त्या स्वातंत्र्याकरिता नि स्वराज्याकरिता हजारो देशबांधव मोठ्या आनंदात कारावास सहन करण्याला नि हालअपेष्टा भोगण्याला तयार झाले.

लक्ष्यावर झडप घाला

आज अितक्या हालअपेष्टांनंतर थोडेबहुत, का होअीना, अगदी किंचत् म्हटलें तरीसुद्धा चालेल, पण काही हक्क आपल्याला मिळाले. मला फ्रेंच राज्यक्रांतीचा काळ आठवतो. त्या काळात समाजसत्तावादी होते, राजाविरुद्ध बंड करून आपली सत्ता प्रस्थापित करू पाहणारे होते, लुटालुटीकरिता क्रांतीची वाट पाहणारे लोक होते व भांडवलदारांच्या मिराशीविरुद्ध चळवळ करणारे लोक होते; आणि हे सर्व लोक अेका लक्ष्यावर लक्ष ठेवून – राजा लुअी याच्या वधावर लक्ष ठेवून— कारण सत्तेचा, अधिकाराचा, सामर्थ्याचा, आपल्या शब्दाबरोबर सर्व राष्ट्र अिकडच्या तिकडे हलविण्याचा गठ्ठा त्याच्या हाती होता – कार्य करीत होते. त्याच्या-वर पक्षोपपक्षांनी आपल्या सुऱ्या, भाले, बरच्या नि तलवारी चोहोबाजूंनी अुगारल्या होत्या, पण त्याचा मानवी देह जो या सर्वांचें लक्ष्य होता, तो नाहीसा झाल्यानंतर त्या सुऱ्या, त्या बरच्या, ते भाले, त्या तलवारी अेकमेकांवरच आदळू लागल्या व

त्यातून स्फुल्लिंग निघू लागले. तशी काही अंशी आज आपली स्थिति झाल्यासारखी मला वाटते.

आपल्या दीर्घ परिश्रमानंतर जें काही थोडेंबहुत आपल्याला मिळालें–तें मिळालें हें नाकारण्यात अर्थ नाही–तें मिळाल्यानंतर ही नोकरशाही जी आज-पावेतो आपणा सर्वांचें लक्ष्य होती व अद्यापही आहे ती आपल्यामधून थोडीशी नाहीशी झाल्यानंतर, आपल्या स्थलापासून विचलित झाल्यानंतर, आपापसामध्ये आपण धुमसू लागावें, आपापल्यात पक्षोपपक्ष अुत्पन्न व्हावेत यात आश्चर्य नाही. पण अद्यापि आपल्याला जें साधावयाचें तें पुरतें साधलें नाही. जें आपल्याला मिळावयाचें तें पूर्णपणें आपल्याला मिळालें नाही. तें मिळेतो आणि मिळाल्यानंतर हे पक्षोपपक्ष, हा मतभेद, हा विचारातील निराळेपणा अेकमेकाला मारक न होता पूरक झाला पाहिजे. हे पक्ष आहेत खरे पण ते विपक्ष नाहीत. पक्षी ज्याप्रमाणे आपल्या दोन्ही अलग पक्षांच्या आधारे अुडून लक्ष्यावर झडप घालतो त्याप्रमाणे आपल्याला आपल्या लक्ष्यावर झडप घातली पाहिजे.

पक्ष नाहीत कोठे ?

पक्ष नाहीत कुठे आणि त्याबद्दल अेवढी खंत वाळगण्याचें कारण काय ? पक्ष आहेत तेथे जिवंतपणा आहे. प्रेतांच्या समुदायात पक्ष असत नाहीत. त्यांना जसें ठेवाल तशा स्थितीत ते राहतील. जेथे बुद्धि आहे, जेथे विचारशक्ति आहे, जेथे अीर्षा आहे, तेथे पक्ष आहेत. माझीं मतें तुम्हांला मान्य होण्यासारखीं नसतील. दुसऱ्याचीं मतें मला मान्य होण्यासारखीं नसतील. आज सनातन्यांना वाटतें जुन्या परंपरागत रूढि चालू ठेवून आपण आपलें वैशिष्ट्य राखू; सुधारकांना वाटतें, अनिष्ट अशा चाली नि रूढि बंद केल्या तरच आपला तरणोपाय आहे. साम्यवाद्यांना वाटतें, देशातील श्रमजीवी वर्ग सुधारला तरच खरी सत्ता हाती असल्याचें श्रेय आहे. राष्ट्रीय सभेची अशी दृढ श्रद्धा आहे की, आपल्याच मार्गांनी आपण या भारतवर्षाला ध्येयाच्या शिखरावर नेअू व हिंदुसभेची अशी खात्री आहे की, आपलेच मार्ग योग्य आहेत. हे सगळे आप१आपल्या दृष्टीने विचार करणारे आहेत. पण याच्या बुडाशी अेकच सूत्र आहे आणि तें हिंदुराष्ट्राची अुन्नति हें आपण विसरता अुपयोगी नाही. जो तो या अेकाच हेतूने प्रेरित होअून खटपट करीत आहे. ती खटपट करीत असता अमका चुकला किंवा अमका बरोबर आहे, हें वाटण्याचाही पण नैसर्गिक मनोधर्म आहे.

चुका झाल्या म्हणून बिघडलें नाही

ज्या वेळेला आम्ही अत्यंत अल्प, हाताच्या बोटांवर मोजण्याअितके स्वातंत्र्याची द्वाही पिटीत चाललो होतो आणि अितर अफाट जनसंमर्दाकडे पाहत

होतो त्या वेळेला आम्हांलाही मधून मधून वाटे, आम्ही चुकत तर नाही ? पण आज २५–३० वर्षांनी त्या वेळी शृंखलाबद्ध असलेलीं आमचीं शरीरें आज या मालांनी नि हारांनी सुशोभित होत आहेत. आम्हा चार-दोन क्रांतिकारकांकडे पाहणारे त्या वेळचे तुरळक जीव कोणीकडे आणि आज आमचें हर्षभराने स्वागत करणारे हजारो आणि लाखो लोक कोणीकडे ? काळ बदलतो. कालच्या चुक्या आज बरोबरशा वाटू लागतात. थोडे दिवसांपूर्वी महात्माजींनाच नव्हतें का वाटत की, आपण हिमालयाअेवढाल्या चुका केल्या ! परवा जवाहरलाल नेहरूंना हीं मंत्रिपदें स्वीकारण्यात आपण चूक करीत आहोत असें नव्हतें का वाटत ? चुका या चुकाशा वाटल्या तरी त्याची खरी कसोटी अनुभव हीच आहे. मी आज ज्या चळवळी हाती घेत आहे किंवा ज्या घेणार आहे त्यासुद्धा पुष्कळांना चुकत आहेत असे वाटण्याचा संभव आहे आणि तें अगदी बरोबर आहे. मला त्याबद्दल यत्किंचित्ही विषाद वाटत नाही.

राष्ट्राचें स्वत्वरक्षण

आज देशातील बहुजनपक्ष नामशेष होअू पाहत आहे. बहुजनपक्षाला अल्प-मतात खेचण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मी तें स्वराज्य समजतो की, जेथे स्वत्व शिल्लक आहे. घरच्या माणसांनां दारच्या ओटीवर बसावें आणि परकीयांनी, ज्यांची दृष्टि अिराण-अफगाणिस्तानकडे वळलेली आहे, ज्यांच्या दृष्टीला बलुचिस्तान व अरबस्तानच दिसत आहेत, अशांनी येथे कारभार करावा. आणि प्रसंगी त्यांच्याशी संगमनत करून 'या पुण्यभूच्या चिंधड्या' अुडविण्यासही मागेपुढे पाहू नये अशांनी किंवा त्यांच्याशी समरस झालेल्यांनी राज्याचीं राज्यसूत्रें चालविण्याला मी स्वराज्य समजत नाही. अिंग्लंडात अुद्या चार जर्मन असले व त्यांनी हट्ट धरला की सर्वाधिकार आमच्या हाती पाहिजे तर ही गोष्ट अिंग्लंडच्या लोकांना रुचेल काय ? ते म्हणतील 'बाबांनो ! येथे तुम्ही आपली संस्कृति, भाषा, मानवी हक्क हे सांभाळा; पण राज्यकारभाराचा दंडक अिंग्रजच चालवील.' अितकेंच नव्हे तर कोणी जर्मन जर्मनीशी संधान ठेवून अिंग्लंडच्या राज्ययंत्रात शिरू पाहील तर तो दंडच म्हणूनच समजला जाअील. तेव्हा देशातील बहुजन-समाजालाच आपल्या मताप्रमाणे देशाच्या नियतीचीं सूत्रें हलविण्याचा अधिकार असतो आणि जेथे राष्ट्राचें स्वत्व कायम राहतें तेंच स्वराज्य.

आत्मविश्वास

हें माझें मत आपल्याला चुकीचें वाटत असेल तर वाटू द्या. पण काल मी जी करीत होतो ती चूक नव्हे; तसेंच यापुढे दहा वर्षांनी मी आज जें म्हणत आहे तें चूक नव्हे असें वाटल्यावाचून राहणार नाही, असा माझा आत्मविश्वास आहे.

आपल्यापाशी या भावी कालाचा विसार म्हणून मागत नाही, पण आपण मला साथ द्यावयाची नसली तरी नुसता विश्वास माझ्यावर ठेवा अेवढेंच मी आपल्यापाशी मागतो.

हुतात्म्यांचा सत्कार

आजच्या या माझ्या स्वागतातील पहिला हार, ज्यांनी आपले देह या मातृभूमीच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यात रणांगणी ठेवले त्या हुतात्म्यांच्या चरणी, अर्पण केला आहे असें मी समजतो. त्या हाराने आपण त्या हुतात्म्यांचा सत्कार करीत आहा. जें राष्ट्र हुतात्म्यांचा सत्कार करतें त्याच राष्ट्रात हुतात्मे निर्माणही पण होतात. दुसरा हार अद्यापिही जे बंदिवासात अडकलेले आहेत व जे कारागृहाच्या अत्यंत हीन प्रतीच्या हालअपेष्टा भोगीत आहेत त्यांच्या चरणी अर्पण आहे असें मी समजतो. त्यांना स्मृतिसुमनांजलि दिल्याशिवाय माझें स्वागत स्वीकारणें हें मी अिष्ट समजत नाही. आणि त्यानंतर आपण जो हा माझा सत्कार केला हा माझा नसून ज्या स्वातंत्र्याकरिता मी काही थोडेंबहुत मागे केलें व यापुढेही करणार आहे, त्या स्वातंत्र्याचा गौरव समजून मी हा सत्कारस्वीकार केलेला आहे. आपल्या या अुपकारावद्दल, सौजन्यावद्दल, स्नेहार्द्रतेवद्दल व आपुलकीबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

✦ ✦ ✦

५. हिंदुसभेचें राष्ट्रीयत्व

अजमीर येथे दि. २० मे १९३८ रोजी स्वा. सावरकरांचें झालेलें भाषण

हिंदुमहासभा ही राष्ट्रीय आहे कीं जातीय आहे, याविषयी पुष्कळ लोकांचे मनात संदेह वसत असे. हिंदुमहासभेच्या अहमदाबाद येथील अधिवेशनात हिंदु महासभेचें ध्येय 'संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य' (Absolute Political Independence) आहे, असें स्पष्टपणें घोषित केलें आहे.

भारतीय लोकसभा कशी राहील

हिंदुस्थानात जितके लोक राहत आहेत त्या सर्वांना समसमान अधिकार मिळावेत असें हिंदु महासभेचें म्हणणें आहे. हिंदूंना जास्तीत जास्त अधिकार असावेत असें हिंदु महासभा कधीही म्हणत नाही. आमची तर अशी अिच्छा आहे की, स्वराज्य प्राप्तीनंतर जें हिंदुस्थानी पार्लमेंट किंवा हिंदी लोकसभा बनेल, त्यात हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी किंवा हिंदुस्थानवर प्रेम करणारा कोणीही मनुष्य

असो, त्या सर्वांना यथायोग्य अधिकार मिळावेत. हिंदी भाषेप्रमाणेच अितर भाषांचेंही संरक्षण केलें जाअील आणि आमचें भारतीय पार्लमेंट अशा स्वरूपाचें तयार होअील की, त्या पार्लमेंटात पाय ठेवताच हिंदु, मुसलमान व पार्शी या भेदांचा मागमूसही राहणार नाही ! सारेच्या सारे 'भारतीय' या नांवाने संबोधिले जातील. काँग्रेसने जर अशी प्रणाली रचली असती, तर मी प्रथम काँग्रेसचा सभासद झालो असतो व नंतर हिंदुमहासभेचा ! ! परंतु काँग्रेस राष्ट्रीयत्वाचा देखावा मात्र करीत आहे.

निम्मे पोलिस मुसलमान कां ?

स्वराज्यप्राप्तीनंतर सर्वांना ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे नोकऱ्या दिल्या जातील. संयुक्तप्रांतात मी पंडित गोविंदवल्लभ पंतांची भेट घेतली, तेव्हा त्यांनी मला काही आकडे दाखविले. त्यावरून मला असें दिसून आलें की, काही खात्यांत मुसलमानांची संख्या शे. २५ तर काही खात्यात शे. ३० होती. परंतु या सर्वांत पोलिस खात्यातील आकडे माझ्या पक्क्या स्मरणात आहेत. संयुक्त प्रांतात मुसलमानांची वस्ती शे. १४ च असूनही त्या प्रांतातील पोलिस खात्यात शे. ५१ लोक भरती झालेले आहेत. आणि तरीही मुसलमान अधिक जागांची मागणी करीत आहेत. हिंदु व मुसलमान हा भेदच नष्ट झाला पाहिजे अशी माझी अिच्छा आहे. योग्यतेप्रमाणेच नोकरी मिळाली पाहिजे याच तत्त्वाचा पुरस्कार हिंदु महासभा हिरिरीने करीत आहे. काँग्रेसच्या तत्त्वज्ञानात हें बसत नाही.

कराची येथील अधिवेशनात काँग्रेसने अल्पमतवाल्यांना संरक्षण देण्यासंबंधीचा अेक ठराव केला आहे. ठराव अुत्तम आहे. अल्पमतवाल्यांना संरक्षण दिलें पाहिजे, असें आम्हीही म्हणतोच की ! परंतु काँग्रेस बहुमतवाल्यांच्या संरक्षणाकडे लक्षच द्यावयास तयार नाही. सीमा प्रांताचीच गोष्ट घ्या ना ! त्या प्रांतातील सरकारने असें अेक परिपत्रक प्रसिद्ध केलें आहे की, 'सीमाप्रांतातील प्राथमिक शाळांतून हिंदी व गुरुमुखी या दोन भाषांची हकालपट्टी करून अुर्दू भाषा सक्तीने शिकविण्यात यावी ! !' सीमाप्रांतातील अल्पसंख्याक असलेल्या हिंदूंना व शिखांना त्यांच्या भाषेसाठी मुळीच संरक्षण मिळत नाही आणि अुलट आमचे मुलाबाळांना जबरदस्तीने अुर्दू शिकविलें जातें.

काँग्रेसविषयी ममत्व

अेकीकडे पाहिलें तर यू. पी., सी पी. आणि विहार यांमध्ये मुसलमान अल्पसंख्य आहेत. परंतु या प्रांतांत जेव्हा मुसलमान लोकांनी 'आमच्या भाषेला संरक्षण मिळालें पाहिजे' अशी मागणी केली, तेव्हा तेथील काँग्रेस सरकारांनी अुर्दू भाषेला प्रोत्साहन दिलें. ही जातीयता काँग्रेसची आहे, आमची नाही ! ! अशा तऱ्हेने वेळी

अवेळी काँग्रेस हिंदूंना दाबून टाकते व त्यांच्या अधिकारांविषयी बेपर्वा वृत्ति दाखविते ! मग अशा परिस्थितीत हिंदूंच्या अधिकारांचें रक्षण करणारी अेखादी संस्था असणें अत्यवश्य आहे. ती संस्था म्हणजेच हिंदुमहासभा होय. हिंदु महासभा काँग्रेसला केव्हाही विरोध करीत नाही. नव्वद टक्के ती काँग्रेसला अुचलून धरते. काँग्रेस ही आमचीच आहे. तिचें व आमचें अेकच ध्येय आहे. परंतु काँग्रेस जेव्हा जेव्हा हिंदूंचे अधिकार पायाखाली तुडविण्याचे अुद्योग करील, तेव्हा तेव्हा हिंदुमहासभा काँग्रेसला योग्य मार्गावर आणील, आणि जोपर्यंत काँग्रेस नीट रस्त्यावर येणार नाही, तोपर्यंत हिंदुमहासभा काँग्रेसला तीव्र व अप्रतिहत असा विरोध करीत राहील.

शिखांचा लढा

शहीदगंज गुरुद्वारचाच प्रश्न घ्या. १६० वर्षें तें शीखांच्या ताब्यात आहे. कायदा असा आहे की कोणत्याही मनुष्याचे ताब्यात १२ वर्षेपर्यंत अेखादी अिस्टेट असली, तर ती त्याचे मालकीची होते. परंतु तरीही गुरुद्वार लुबाडण्यासाठी मुसलमानांनी हरप्रयत्न केले. हायकोर्टपर्यंत ते लढले, पण तेथेही शीखांचाच जय झाला. पण तरीही शहीदगंजचा झगडा मुसलमानांनी चालूच ठेवला आहे. शहीदगंजसाठी ते अितके झगडताहेत, परंतु ज्या हजारो मंदिरांच्या त्यांनी मशिदी बनवून त्यावर आपला तावा बसविला आहे, तीं हिंदूंचीं मंदिरें ते कां परत देत नाहीत ? तसें करायला ते मुळीच तयार नाहीत. काँग्रेस तर या बाबतीत जीभ अुचलायलाही तयार नाही. मग अशा वेळी शिखांना कोणी साहाय्यकारी नको का ? तो साहाय्यकारी म्हणजेच हिंदुमहासभा ! !

हिंदुलोक बहुसंख्य आहेत. होय आहेत ! पण तें दुसऱ्या कोणाच्या बळावर किंवा मेहेरबानीवर आजवर टिकून राहिलेले नाहीत. हिंदुजाति ही हिंदूंची वीरता व आत्मत्याग यावरच आजवर टिकून राहिली आहे. पण आमची 'बहुसंख्याकता' खिळखिळी करण्यासाठी काही कमी प्रयत्न झाले नाहीत. सन १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धात व तदनंतरही ते आपल्या सामर्थ्यावर ब्रिटिश सरकारपर्यंत टकरा देत राहिले. या झगडयात अनंत हुतात्म्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला आहे.

हा शुद्ध अन्याय

आज आम्ही कायदेशीर अहिंसेचा मार्ग स्वीकारला आहे. काँग्रेसचा तर तो अेकमेव मार्ग आहे. परंतु आम्ही दुर्बल व शस्त्रहीन आहोत, म्हणूनच या मार्गाचा आम्ही आश्रय केला आहे. निःशस्त्र क्रांतीच्या मार्गाने काँग्रेसने फारच मोठी कामगिरी केली आहे. टिळक, गोखले, रानडे, म. गांधी, जवाहर, सुभाष यांच्या

त्यागामुळे स्वराज्य थोडें जवळ आलें आहे. सारांश काय की हिंदूंनीच आपल्या रक्ताचें सिंचन काँग्रेसला केलें आहे व म्हणूनच काँग्रेस अुच्च शिखरावर आज अुभी आहे. काँग्रेस ही हिंदूंचीच आहे. आम्ही कधीही तिला विरोध करीत नाही. आम्ही काँग्रेसला साहाय्यच करू ! परंतु काँग्रेस जेव्हा अन्याय करील, फलाण्याच्या मागणीवरून आमचे हक्क त्याला देअू लागेल, तेव्हा आम्ही तिला विरोध करू. काँग्रेस जेव्हा म्हणेल की आम्ही हें सारें राष्ट्रीय अैक्यासाठी करीत आहोत, तेव्हा मी म्हणेन की हें सारें झूट आहे. अेकाचा अधिकार छिनावून घेअून तो दुसऱ्याला बहाल करणें याला मी राष्ट्रीयता म्हणणार नाही. हा शुद्ध अन्याय आहे.

आमचा देश

दि. ११ मे १९३८ ला मला मौ. शौकतअल्ली भेटले होते. ते म्हणाले की "हिंदुस्थान जर गेलाच तर आम्ही मुसलमान आपापल्या देशात जाअू; परंतु हिंदूंना कोठेच जाता येणार नाही.' मी म्हणतो, 'तुम्ही अुद्या जाणार असला तर आज जा. जेथे तुम्हांला सुख मिळेल, तेथे जायला विलंब कां करता ? आम्हांला तर त्यात आनंद आहे. परंतु हिंदु लोक हिंदुस्थान सोडून कोठेच जाअू शकत नाहीत. हिंदुस्थान आमची मातृभूमि, पितृभूमि व पुण्यभूमि आहे. आम्ही तर हिंदुस्थान-साठी आजवर प्राण देत आलो आहोत व यापुढेही देअू.'

जर हिंदूंना पायाखाली तुडविलें नसते व त्यांचे हक्क छिनावून घेतले नसते, तर आज मुसलमानी मंत्रिमंडळाचा बंगालमध्ये बोलबाला झाला नसता. हिंदूंचें सरकार त्या ठिकाणी झालें असतें. काँग्रेसने अिकडे लक्ष दिलें नाही हिंदूंचे हक्क अेकसारखे हिरावले गेले. अशा वेळी मुसलमानांची जशी मुस्लिम लीग, तशी हिंदूंचीही अेक संस्था असणें अवश्य झालें.

कोणताही देश पहा. त्या देशात जे लोक वहुसंख्य असतात त्यांचेंच त्या देशात राज्य असतें. अिंग्लंड व जर्मनी हीं याचीं अुदाहरणें होत. तद्वतच आमच्या हिंदुस्थानात हिंदूंचेंच राज्य असणें अवश्य आहे.

✦ ✦ ✦

६. जातिनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा

कराची येथे ता. ४ सप्टेंबर १९३८ रोजी अमील इन्स्टिट्यूशनमध्ये स्वा. सावरकरांचें पुढील आशयाचें भाषण झालें.

जातिनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा यांमध्ये खरें पाहिलें असता महत्त्वाचा व मूलभूत असा भेद नाहीच. राष्ट्रीयत्व म्हटलें तरी त्याचा अर्थ जगातील अितर देशांपासून

आपलें राष्ट्र अलग मानणें असाच होत नाही काय ? जातीयत्व हें त्याहून अेक पायरी अलीकडचें आहे–अेका जातीचें हिताहित पाहण्याची ती वृत्ति आहे. राष्ट्रीयत्वावरही टीका करणारे विचारी लोक थोडेथोडके नाहीत. 'राष्ट्रीयत्व हा मानवजातीचा अेक खड्डा आहे.' असें टॉलस्टॉयने म्हटलें आहे. मनुष्याचें अंतिम ध्येय हेंच की, सर्व विश्व हें अेक कुटुंब आहे नि आपण त्याचे घटक आहो–त्यात राष्ट्राला नि देशाला स्थान कोठलें ? पण हें ध्येय जोवर हस्तगत झालें नाही तोवर आपला देश, आपलें राष्ट्र, आपली संस्कृति या दृष्टीने विचार करणें अपरिहार्यच आहे.

राष्ट्रीयत्व म्हणजे तरी काय ? अेक परंपरा, अेक संस्कृति, अेक भाषा, अेक रूढि याचेंच नांव राष्ट्रीयत्व. त्यामुळेच आपल्याला राष्ट्र प्रिय वाटतें. असें जर आहे तर हिंदुत्वावरील प्रेम पाहताच राष्ट्रीय म्हणविणाऱ्या लोकांच्या अंगावर काटा कां अुभा राहतो ? राष्ट्रनिष्ठा जितकी समर्थनीय तितकीच हिंदुत्वनिष्ठाही समर्थनीय खास आहे ! हिंदूंचा केवळ अेक वंश आहे, अेवढेंच नव्हे तर त्यांचें असें स्वतंत्र राष्ट्रही पण आहे.

फरक प्रमाणाचा; प्रकाराचा नव्हे

राष्ट्रनिष्ठेचें महत्त्व मी अणुमात्र कमी करू अिच्छीत नाही. जातिनिष्ठेच्या पुढे अेक पाअूल ती आहे हे मी मान्य करतोच. पण माझें म्हणणें असें की, दोन्ही-मधील फरक केवळ प्रमाणाचा आहे, प्रकाराचा नव्हे. हिंदुसभेचें ध्येय पूर्ण राष्ट्रीय आहे; राष्ट्रीय सभेचें जितकें आहे तितकें ! किंबहुना, अेका बाबतींत तर हिंदु सभा हीच राष्ट्रसभेहून अधिक राष्ट्रीय आहे. मुसलमानांना वश करण्याच्या नादी लागून त्या थोर संस्थेने मुसलमानांना पक्षपाती असें धोरण आखलें आहे. हिंदुसभा ही अल्पसंख्याकांना धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक असें स्वातंत्र्य देअून राजकारणात सर्वांना समानतेने वागवावें असें म्हणते. दोन्ही संस्थांचें ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य हेंच आहे. मात्र राष्ट्रसभेने 'अनत्याचारी व शांततापूर्ण' साधनांचें व्रत घेतलें आहे. हिंदु सभेलाही तीं साधनें मान्य आहेत, पण केवळ आज आपल्या दौर्बल्यामुळे त्याची जरुरी आहे असें ती मानते. आपल्या वैगुण्यालाच ती भूषण मानीत नाही आणि दुसरें साधन पेलण्याला आपण असमर्थ आहो अशी भलती कबुलीही पण ती देत नाही. तसेंच अल्पसंख्याकांना भरमसाट हक्क अन्यायाने देता देता बहुसंख्य असणाऱ्या हिंदु समाजाच्या न्याय्य हक्काकडे दुर्लक्ष होअू नये अशी तिची मागणी आहे. हिंदुस्थानात अल्पसंख्याकांच्या प्रश्नाचा अुगाच बागुलबुवा करण्यात आला आहे. युरोपात अेखाद्या देशात शेकडा दहा टक्केपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या समाजाला अल्पसंख्य मानलें जात नाही व विशेष हक्कही दिले जात नाहीत. त्यांनी जमेल तसें राहावें. जर्मनी

अिटली, पोलंड वगैरे युरोपियन राष्ट्रांनी अल्पसंख्याकांचा प्रश्न कसा सोडविला हें आपण पहा.

हिंदुस्थानची परिस्थिति अशी विचित्र आहे की, येथील राजकारण जाति-निष्ठेवरच चालणें शक्य आहे. अगदी कट्टर काँग्रेसवाला घेतला तरी त्याला निवडून यावें लागतें जातिनिष्ठ मतदार-संघातूनच. ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे हें खरें, पण ती तशी आहे तोवर आपण तिला तोंड दिलें पाहिजे, हेंही तितकेंच खरें. अितर समाज 'अेक राष्ट्र' या दृष्टीने वागण्यास तयार असतील तर हिंदुमहासभा तसें करण्यास अेका पायावर तयार आहे. पण अितर समाजांची तशी तयारी मुळीच नाही. मुस्लिम लीग सवत्या मतदार संघासाठी आक्रोश करीत आहे आणि म्हणूनच आपल्याला स्वत:च्या समाजाचा विचार स्वतंत्रपणें करणें प्राप्त झालें आहे.

✦ ✦ ✦

७. हिंदुत्वाचा अभिमान

अहमदाबाद येथील महाराष्ट्र समाजामध्ये दि. १–१–३८ या दिवशीं स्वा. सावरकर यांचा सत्कार झाला. त्याप्रसंगी त्यांनी केलेलें भाषण.

महाराष्ट्रात जन्माला घाल

आपण माझ्यावर प्रेम करणारे आहात म्हणून आपले प्रश्न हे मला अपमानार्ह वाटणार नाहीत. मी संकुचित प्रांताभिमान दाखवितो असा आपला समज आहे आणि देशाभिमानाच्या आड न येणारा प्रांताभिमान दाखविण्यात मला मुळीच कमीपणा वाटत नाही. आपण स्थापन केलेला महाराष्ट्रसमाज व अितर ठिकाणी सर्व हिंदुस्थानात असलेल्या महाराष्ट्रियांच्या वसाहती हे मराठ्यांचे चालते-बोलते अितिहास आहेत. १८४८ साली मराठ्यांचें राज्य गेलें आणि अवघ्या ९ वर्षांत ५७ सालचें स्वातंत्र्य-युद्ध मराठ्यांनी सुरू केलें; त्या युद्धाला तत्कालीन कारणें निराळीं असलीं तरी तें अुत्पन्न करणारे व चालविणारे मराठेच होते. त्या युद्धात लढून ज्या स्त्रीने अिंग्रजांनासुद्धा खडे चारले ती बाअी महाराष्ट्रातीलच होती. त्याच्यानंतर महाराष्ट्रात स्वातंत्र्ययुद्धाचा झेंडा फडकविणारे फडके, चाफेकर बंधु, लोकमान्य टिळक, महाराष्ट्रीय, अगदी आजपर्यंत ज्या लोकांनी स्वातंत्र्यसंगराची परंपरा कायम ठेविली असे अनेक वीर ज्या प्रांतात जन्मास आले त्या प्रांताचा अभिमान मी कां धरू नये ? मला ब्रह्मदेवाने सर्व हिंदुस्थानची माहिती सांगून यांतील कोणत्या भागात तुला जन्माला घालू असें

विचारलें असतें तर निरभिमान वृत्तीने मी महाराष्ट्राकडेच बोट दाखविलें असतें; मात्र हा प्रांताभिमान अितर प्रांतांची अवहेलना करण्यास प्रवृत्त होणार नाही अगर अितरांवर अन्याय करण्यास धजावणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे.

वीराचें लक्षण कोणतें ?

आपल्या दुसऱ्या प्रश्नाचेंही अुत्तर वरील अुत्तरात आहेच. हिंदुत्वाचा योग्य अभिमान न धरणें व राष्ट्रीयत्वाच्या पोकळ नांवाखाली त्याविरुद्ध विचार मांडणें हें मला केव्हाही सहन होणार नाही. आज जो अुठतो तो हिंदु समाजाला अन्याय करीत सुटतो. अुलट हिंदु-समाजाने कोणालाही अन्याय केलेला नाही. कै. दादाभाअी नवरोजी पार्शी असूनसुद्धा त्यांना राजकारणात अग्रस्थान होतें; कारण ते कट्टे राष्ट्रीय होते. हिंदु-समाज समर्थ असतासुद्धा त्याच्या आश्रयास आलेल्या पार्शी-समाजाला त्याने मानाने राहू दिलें. अुलट मुसलमान समाज अशा अुदारतेने कधीही वागला नाही. वायव्य प्रांताच्या असहाय हिंदु मुलींवर होत असलेले अत्याचार पहा ! अगदी आपली मुलगी अगर बहीण पळविली गेली आहे व तिच्यावर जुलूम होत आहे असें चित्र डोळ्यापुढे अुभें करा आणि मग या अत्याचाराविरुद्ध न बोलणाऱ्यांच्या किंवा या कृत्यांना मूक संमति देणाऱ्यांच्या मालिकेंत मी बसावें असें तुम्हांला वाटत असेल तर तें वीराचें लक्षण नव्हे. नुसतें होयबा करून येणारें मोठेपण मला नको.

टिळक व गोखले

मी अमेरिकेत गेलो असतो व तेथेच कायमचा राहिलो असतो तर कदाचित् तेथील अध्यक्ष झालो असतो, म्हणून मी तेथे जाणें हें काही वीराचें लक्षण नाही. त्याचप्रमाणे माझीं प्रामाणिक मतें बाजूला ठेवून केवळ राष्ट्रीय सभेत अेखादी मानाची जागा मिळविण्याकरिता मी जर तिच्या सूत्रचालकांपुढे मान तुकवीत राहिलो तर तें वीराचें लक्षण लक्षण नव्हे. हें करावयाचें असतें तर पूर्वीच लोकमान्यांकडे न जाता मी आंबराअीत गोखल्यांकडे गेलो असतो. माझे विचार लोकमान्यांनाही दिवसा कधीच पटले नाहीत. फक्त रात्री १२ वाजताच ते माझ्याशी सहमत असत. तरीही 'तूर्त हें नको' असाच त्यांचा आदेश असे. केवळ मानाकरिता त्यांच्या 'खारका' संपविण्यात व आता 'खजूर' खलास करण्यात शूरत्व नाही असें मला वाटतें. शिवाय आपलीं प्रामाणिक मतें बोलून आपला 'नरिमन' व्हावा असें मला वाटत नाही आणि तुम्ही म्हणता तो मान तरी कसला ? गुलामांच्या राष्ट्रातील राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष म्हणजे शेणाच्या ढिगात अेकावर अेक किड्यांचे थर असतात त्यांतील अगदी वरच्या थरांतील वरचा किडा झाला तरी तो

शेणकिडाच ना ? प्रत्यक्ष संग्राम सुरू होअील त्या वेळी मी मागे राहणार नाही याची तुम्हांला खात्री असली म्हणजे मग आज राष्ट्रीय सभेशी आमचा मतभेद असला तरी काय हरकत आहे ?

माझ्या मताप्रमाणे सर्व व्यक्तींना समान अधिकार हें खरें राष्ट्रीय गमक आहे. हिंदु महासभा ही हिंदूंना जास्त अधिकार मागणारी नाही. अतअेव तीच संपूर्ण राष्ट्रीय आहे आणि तू ख्रिस्ती म्हणून तुला अमुक जास्त, तू मुसलमान अतअेव तुला तें अधिक असें म्हणणाऱ्या राष्ट्रीय सभेपेक्षा अधिक योग्यतेची आहे ज्या क्षणी राष्ट्रीय सभा खरोखर राष्ट्रीय होअील त्या वेळी मी तिचाच आहे असें समजा !

✦ ✦ ✦

८. हिंदूंचें संघटन

पुणें येथे ता. २६–६–१९३७ रोजी श्रीशिवाजी आखाडचाच्या मैदानात स्वा. सावरकरांचें 'हिंदु-संघटन' या विषयावर झालेलें भाषण.

आज आपण अितक्या मोठ्या संख्येने येथे जमला आहात असे मला निरोपावर निरोप येत गेले, म्हणून मी खरोखर आजारी असताही अगत्याने येथे आलो. मनुष्याला चांगल्या किंवा वाअीट दोन्ही स्थितीत सतत असमाधानच वाटत असतें. पूर्वी अंदमानच्या तुरुंगात क्षणभर तरी कोणी दोन शब्द बोलायला मिळेल का म्हणून असमाधान वाटे; आज अुलट अितके हजारो लोक बोलायला मिळत असूनही जाता येणार नाही म्हणून असमाधान वाटत होतें. पण अुद्या माझें काय होअील हें माझेंच मला निश्चित सांगता येत नसल्याने आज तरी तुम्हा सर्वांना अेकदा पाहून घ्यावें, महाराष्ट्र कसा आहे तें निरखावें, म्हणून मी येथे आलो. आजचा हा प्रचंड समुदाय येथे अेका हिंदुत्वाच्या अभिमानानेच अेकत्र झाला आहे, याचे कारण त्या शब्दांत अद्यापहि काही मंत्रासारखें सामर्थ्य आहे हेंच होय. हिंदुसमाज चैतन्ययुक्त आहे कीं नाही तें प्रत्यक्षच पाहा. आज कुठे आहेत ते पक्षविपक्ष ! ते आज येथे प्रकट झालेले नाहीत. यावरूनच हिंदुत्वाच्या अेकाच धाग्याने मणिन् मणि ओवलेला आहे हें स्पष्ट होय !!

हिंदुत्व म्हणजे काय ?

मी आज फक्त दोनतीन विधेयें तुम्हांला थोडक्यात समजावून सांगणार आहे. हिंदुत्व म्हणजे काय ? जन्मावरून जातिभेद मानू नये असें म्हणणारे

लोकदेखील हिंदु-संघटन करा असें कसें म्हणतात ? भावडेपणा सोडा, जन्मजात अुच्चनीचपणा अुच्छिन्न करा, धर्माची सक्ती काढा असें मी म्हणतो तरी हिंदुसंघटन करा म्हणतो याचा अर्थ काय ? याचा अर्थ हिंदुत्व हें हिंदुधर्मापासून वेगळें नसलें तरी त्याहून जास्त व्यापक आहे. अीश्वर, जीव आणि जगत् हें पारमार्थिक धर्माचें तत्त्वज्ञान; प्रत्यक्ष परिस्थितीशी त्याचा संबंध नाही. पुष्कळजण असें म्हणतात की, हिंदूंचें अेक धर्मपुस्तक असेल तर बरें; पण त्यानेही निभाव लागत नाही. कारण अेकच कुराण असलें तरी त्याच्या शब्दागणीक निरनिराळे अर्थ करणारे भाष्यकार होअून मुसलमानांतही हाडवैऱ्यासारखे निराळे तट किंवा पंथ निर्माण झालेलेच आहेत. हिंदुधर्मविद्दल बोलावयाचें तर त्याला कोणत्याही अेका ग्रंथाचें अगर पुस्तकाचें नांव घेता यावयाचें नाही. कारण शंकराचार्यांनी अद्वैत प्रतिपादिलें ! रामानुजांनी द्वैत सांगितलें. माध्व, बुद्ध यांनी तिसरें काही सांगितले. हा प्रकार पाहिला म्हणजे धर्मपुस्तक अेक नसण्यातच हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे हें दिसून येअील. शिवाय अेकच पुस्तक असण्याने शास्त्रीय संशोधनाचे दृष्टीने प्रगति खुंटेल. म्हणून सर्व विश्व या बाजूपासून त्या बाजूपर्यंत हेंच या धर्माचें पुस्तक होय. तें तत्त्वज्ञान मानणें किंवा न मानणें हा व्यक्तीचा स्वतंत्र प्रश्न आहे.

हिंदुत्वाची कसोटी

पारलौकिक अर्थी धर्माचा प्रश्न ज्याच्या त्याच्या अनुभूतीवर किंवा श्रद्धेवर सोडल्यानंतर मनुष्याच्या आयुष्याचा दुसरा जो भाग प्रात्यक्षिक, त्याच्याकडे पाहिलें असता मग मात्र तेथे अेकवाक्यता होण्यास अडचण राहत नाही. हिंदु-संघटनास किंवा हिंदुत्वाच्या अेकीकरणास ज्या ठळक चारपांच गोष्टींच्या कसोट्या लावावयाच्या त्या अशा : पहिली भौगोलिक स्थान, दुसरी अेक भाषा, तिसरी अेक अितिहास, चौथी समान साहित्य, पांचवी समान शत्रुत्व. हिंदुस्थानच्या मर्यादा निसर्गाने स्पष्ट सीमांनी आखल्या आहेत. सिंधुनदापासून पूर्वेच्या सिंधूपर्यंत व काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हा अेक देश आहे. अनादि काळापासून या देशाची ही मर्यादा निश्चित आहे. संस्कृतीच्या अेकीकरणाचा दुसरा घटक म्हणजे अेक भाषा. आमच्या हिंदुस्थानमध्ये साऱ्या भाषा संस्कृतोत्पन्न किंवा संस्कृतनिष्ठ असलेल्या आढळतील. काही वेळेला अेक भाषा व अेक देश नसताही अेक राष्ट्र होअू शकेल, पॅनअिस्लामिझम् हा त्यातलाच अेक प्रकार. ज्यू लोकांना तर देशच नाही. वाळूची मूठ घेअून फेकावी त्याप्रमाणे ज्यू लोक जगाचे पाठीवर विखुरलेले आहेत. पण ते सर्व अेका धर्माने बांधले गेले आहेत; म्हणून अेक धर्म असणें हा राष्ट्रीयत्वाचा तिसरा महत्त्वाचा घटक आहे. हिंदु लोकांना धर्मग्रंथांचें बंधन आहेच. पण ज्यांना तें नको असेल त्यांना त्याची आवश्यकताही नाही.

अेक अितिहास असणें हा चौथा घटक. अिंग्लंडला फार फार तर एक

हजार वर्षांचा अितिहास असेल, तर हिंदुस्थानाला कमीत कमी दहा हजार वर्षांचा अितिहास सांगता येअील. हिंदुस्थानचा अितिहास अितका पुरातन आहे की, तो पुराणात लुप्त होअून गेला आहे. अलीकडेच कानामागून येअून तिखट झालेलें अमेरिकन राष्ट्र – त्याला २०० वर्षेंच फक्त निर्माण होअून झालीं; पण तें मारे आपला बडेजाव गाताना प्रौढीने म्हणतें की, या राष्ट्राच्या मागे २०० वर्षांच्या परंपरेचा अितिहास आहे व पुढे निदान २०० वर्षांचा तरी भविष्यकाळ आहे ! पण आमच्या २० हजार वर्षांच्या अितिहासाच्या मानाने त्यांचीं २०० वर्षें म्हणजे क:पदार्थ आहे. समान शत्रुत्व हा अेकराष्ट्रीयत्वाचा पांचवा घटक. प्रथम रावण, नंतर हूण, नंतर ग्रीक, नंतर शक, नंतर मुसलमान हे आपणा सर्वांचे समान शत्रुच होते. आजही आपणा सर्वांचा शत्रु अेकच आहे. अेका प्रांताचा जो शत्रु तोच दुसऱ्या प्रांताचा.

बीज अेकच असल्यामुळे आपण अेका जातीनेही अेकत्र बांधले गेलो आहोत. काही झालें तरी समाजाच्या तुकड्या वेगवेगळ्या असल्या तरी सबंध हिंदुमात्राचें रक्त मुळात अेकाच जातीचें आहे. वैदिक समाज प्रथम अेकाच वर्णाचा होता, मागाहून त्याचेच चार वर्ण झाले. पुढे अनुलोमप्रतिलोमाने जाती वाढत गेल्या. मनूची स्मृति खरी असेल तर चांडाळ हे ब्राह्मणांचे मावसभाअूच होतात ! तात्पर्य हेंच की, निर्भेळ चार वर्ण मानले आणि त्यापासून अनंत जाति-अुपजाति निर्माण झाल्या तरी मूळ जातिबीज अेकच.

आमचें साहित्यही अेकच आहे. मद्रासमधील आयंगार असो वा काश्मीरातील पंडित असो, तो अेकाच संस्कृतातून धर्मग्रंथ वाचील. महाभारत, रामायण हे ग्रंथ सर्वांस समान आहेत. विजेचा प्रवाह सुरू झाल्याबरोबर जसे सारे कण अेकत्र होतात, त्याप्रमाणे राम-कृष्णांच्या नुसत्या नामोच्चाराने सर्व हिंदुस्थान अेकत्र होअू शकतो.

हिंदुस्थान राष्ट्र आहे

हिंदुस्थान हें राष्ट्र कां आहे याचीं हीं अशीं कारणें आहेत. आमची भूमि नुसती पितृभूमि नसून पुण्यभूमि आहे. जपानचे राजे अजून ज्याकडे तोंड करून मरतात असें गयाक्षेत्र याच देशातलें आहे. काशीसारखें पवित्र क्षेत्रही याच देशांतलें आहे. अेवंच आम्हा हिंदूंना अभिमान बाळगण्यासारखें काही असेल तर तें हिंदुस्थानच आहे. ह्या देशाबाहेर आम्हांला कोणी वाली नाही; अमेरिकेत आम्ही पोरके आहोत, आफ्रिकेत आम्ही मजूर आहोत ! अशा स्थितीत आम्हा हिंदूंचा या हिंदुस्थानाशीच अेकजीव झाला पाहिजे. हिंदु हा हिंदु राष्ट्राकरिता झगडेल, तसा अितर कोणीही झगडणार नाही. पूर्वीचीच काय, पण गेल्या १०० वर्षांतील अितिहासाची अुजळणी केली तरी प्रत्येक बाबतीत हिंदूंचेच कष्ट आणि हिंदूंचेच प्राण खर्ची पडलेले

आढळतील. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता कोणी झटेल तर तो हिंदु. अंदमानात गेलेले सर्व हिंदुच होते. फासावर ज्यांना टांगलें ते हिंदुच होते. हिंदु हाच या देशाचा पाया आहे. तो संघटित झाला तरच देशाला स्वातंत्र्य मिळेल.

अनुक्रम ३८७५ वि. शिंदे .....
क्रमांक ७५११ नोंद दि: 13/11/45

९. हिंदूंची अेकजूट करा

सोलापूर येथे दि. ९–८–१९३७ रोजी स्वा. सावरकर यांचें झालेलें भाषण.

जेव्हा आम्ही पूर्वीचें काम केलें तेव्हा आमची अपेक्षा नव्हती की, आम्ही अशा सत्कारस्वीकारास हजर राहू शकू. परंतु ज्यांनी आजपर्यंत देशाच्या स्वातंत्र्याकरिता स्वार्थत्याग केला त्यांच्या पुण्याअीने हे दिवस आले आहेत. याकरिता मी आजच्या प्रसंगी त्या सर्वांचे आभार मानतो. आज संपूर्ण स्वातंत्र्याचा अुच्चार करण्याचा काळ आला आहे. आपल्या राष्ट्राची फार प्रगति झाली आहे.

त्या वेळी ' संपूर्ण स्वातंत्र्य ' हें रात्री सांगावें लागत होतें. आज तें आपण अुघड रीतीने बोलू शकतो. राष्ट्रीय सभेचें संपूर्ण स्वातंत्र्य हें ध्येय पाहून मला आनंद वाटतो. स्वातंत्र्य मागणें हें पुण्य आहे, पाप नव्हे असें वाटू लागलें आहे. हा सन्मान माझा अेकट्याचा नाही. या सोलापुरात लष्करी कायद्याच्या अमदानीत जे वीर पडले त्यांची व आज अंदमानातील अडीचशे कैद्यांनी जो अन्नत्याग आरंभिला आहे त्यांची आपण आठवण ठेविली पाहिजे. पं. जवाहरलाल यांनी या कैद्यांकरिता जो अेक दिवस पाळण्याकरिता घोषणा केली आहे, त्याबद्दल मला तर अत्यंत आनंद होत आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत कोणताही पक्ष झाला तरी आपण खांद्याला खादा लावून कार्य केलें पाहिजे. आपण जो माझा सत्कार केला तो माझीं सर्व मतें सर्वांना मान्य आहेत म्हणून केलेला नाही. मनुष्य मतें बदलीत असतो व काही काही वेळी तीं बदलणें अत्यंत आवश्यकही असतें. पटेल त्यांनी माझे विचार घ्यावेत, नाहीतर सोडून द्यावेत.

मी सांगतो तेंच बरोबर असें माझें म्हणणें नाही. मी आपल्यापुढे दोन मुद्दे ठेवणार आहे. आजच झालेल्या चर्चेच्या वेळी मजपुढे पन्नास प्रश्न आले होते. त्या सर्वच प्रश्नांचीं उत्तरें द्यावयास बसलो तर वेळ पुरणार नाही. सूत्ररूपाने मी दोन चार गोष्टी सांगणार आहे. संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हें आमचें ध्येय आहे. आज आपण त्या मार्गाने प्रगति केलेली आहे. आज विधिमंडळात आपलें प्रधानमंडळ

झालेलें आहे. मी आपलें प्रधानमंडळ हें खऱ्या अर्थानेच म्हणतो; कारण स्वतंत्र देशात प्रधानमंडळ हें राष्ट्राचें असतें. आपण फार पुढे गेलो आहोत. आज राष्ट्र-गीतास पोलिसांकडून मान दिला जात आहे. ही निःसंशय प्रगति झालेली आहे. परंतु जरी आपण प्रधान झालो असलो तरी अद्याप आपण राजे झालो नाही. प्रधानमंडळातून स्वतः राज्य चालवीत असतानाच पुढे आपण खरे राज्यकर्ते होऊ. त्याकरिता जे लढे होतील, त्यांच्याशी काम करण्यास मी तयार आहे. म. गांधींच्या विधायक कार्यक्रमाशी माझें पटतें. त्यांचा ग्रामोद्योग, अस्पृश्योद्धार या गोष्टी करा-व्यात व त्यांच्याशी माझा सहकार आहे. हिंदूना संघटित करून त्यांच्यात स्वातंत्र्याची ज्योत कायम राखणें हें माझें दुसरें सूत्र आहे. हिंदुस्थान ही आमची पुण्यभूमि व पितृभूमि आहे, असें ज्यांना वाटेल ते हिंदु – मग ते कोणीही असोत. काश्मीरच्या महाराजापासून रामेश्वरच्या महारापर्यंत सर्व अेक आहेत ही कल्पना ठेविली पाहिजे. माझे मुसलमान बंधु, पार्शी बंधु यांचेही देश स्वतंत्र करण्याचें कर्तव्य आहे. परतु देश स्वतंत्र झाला नाही तर अितर धर्मांच्या लोकांना पुण्यभूमि म्हणून दुसरीकडे पाहता येते.

मुसलमानांची पुण्यभू अरबस्थानात आहे. मुसलमान फार तर पितृभू म्हणून हिंदुस्थान मानतील; पण पुण्यभू म्हणून ते अरबस्थानाकडेच पाहतील. हा त्यांचा दोष नाही. ख्रिश्चन लोकांचीही पण तीच स्थिति आहे. त्यांची पुण्यभू सिरियात आहे. अेकदा चीन देशात पांच ख्रिश्चन लोकांना मारल्यावद्दल अेकवीस युरोपियन राष्ट्रांनी निर्वाणीचे खलिते धाडले. प्रत्यक्ष केमालपाशांनी खिलाफतीची खिरापत केली, धार्मिक बंड नाहीसें केलें; परंतु त्याच केमालपाशांनी अिस्लामसाठी लढाअी करावी लागेल असे नुकतेच अुद्गार काढले आहेत; परंतु त्यांना कोणी जातिनिष्ठ म्हणत नाहीत. हिंदुस्थान ही हिंदूंची पितृभूमि व पुण्यभूमि आहे ही भावना जागृत ठेवा, हिंदूंनी हिंदु म्हणवून घेणें हें पाप नाही. मुसलमान, ख्रिश्चन यांच्यामागे स्वतंत्र देश आहेत. म्हणून देशस्वातंत्र्याची भावना हिंदूंनीच जास्त ठेविली पाहिजे. अेकी करा, असें म्हणण्यास दुसऱ्याकडे जाअू नका. अेकीकरता अितरांनी आपल्या मागे लागलें पाहिजे अशी तयारी ठेवा. स्वराज्य अेकीशिवाय मिळणार नाही, असें वाद अैकू येतात, तसें वाटू देअू नका. लो. टिळकांनी काय दुसऱ्याकरिता थोडें दिलें ? दासबाबूंनी काय थोड्या सवलती दिल्या ? म. गांधींनी तर 'कोरा चेक' दिला ! परंतु पेढीवर पत नसल्यामुळे गांधींचा चेक वटला नाही. आम्हांला अेकी पाहिजे ती अुपकाराकरिता नको. तर तिची अितरांना जरुरी वाटली पाहिजे. मुसलमान व पार्शी या समाजाकडे मी निराळ्या दृष्टीने पाहतो. तुम्ही कधी पार्शी-हिंदु असा दंगा अैकला आहे काय ? पण हिंदु–मुसलमान दंगा नेहमीचाच प्रकार आहे. हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याकरिता पार्शी लोकांनी फार मोठा स्वार्थत्याग केलेला आहे. प. वा. दादाभाअी नौरोजी, वाच्छा, फेरोजशहा मेथा यांनी राष्ट्रकार्यकरिता

देह समर्पण केले व आजचें ताजें अुदाहरण वीर नरिमन यांचें आहे. सोन्यामारुति प्रकरणात अितर कोणत्याही गोष्टींचा विचार न करता सार्वजनिक हक्कसंरक्षणा-निमित्त नरिमन यांनी स्वतंत्र पत्रक काढिलें.

आम्ही जर्मनीमध्ये असताना राष्ट्रीय निशाण कोणतें असा प्रश्न विचारण्यात आला. त्या वेळी आम्ही दहा जणांनी अेके ठिकाणी जमून राष्ट्रीय निशाण कोणतें असावें याचा विचार केला. मिस कामा यांनी तीनरंगी फडक्याचें निशाण दाखविलें. त्या वेळी जर्मन राष्ट्राने त्याला सलामी दिली. पार्शी समाजात हिंदी स्वातंत्र्यवादी लोक निघाले. आजपर्यंतच्या राष्ट्रीय सभेच्या अितिहासात सर्व मुख्य पुढारी हिंदुच आहेत. मुसलमान म्हणून स्वतंत्र हक्क कोणी देअू शकणार नाही. अल्पसंख्याक म्हणून त्यांना योग्य ते हक्क मिळतील व त्याप्रमाणे अितर स्वतंत्र राष्ट्रात व्यवस्थाही केलेली आहे. मी राष्ट्रीय सभेत कां नाही, तर मला वाटतें की सध्या मी राष्ट्रीय सभेपेक्षा जास्त राष्ट्रीय आहे.

मुस्लिम लीग आहे तोपर्यंत हिंदूंची संघटना राहणारच. काँग्रेस ही राष्ट्रीय सभाच राहावी अशी माझी अिच्छा आहे. तिला हिंदुसभा करावयाचें नाही. मुसल-मानांना अल्पसंख्याकांचे योग्य ते हक्क द्यावेत, त्याला कोणीच विरोध करणार नाही. योग्य माणसाची निवड करावयाची तर त्याला अमुकच मनुष्य पाहिजे असें नाही. जातीचा प्रश्न अुद्भवता कामा नये. आजचे ना. मुनशी, ना. खेर व असें-ब्लीचे स्पीकर हीं चांगलीं माणसें आहेत. त्यांच्या अैवजी जातिविषयक तत्त्वाने जर कोणी असें म्हटलें की, अमक्या जागी अमक्या जातीचा नेमा तर तें कोण अैकून घेअील ?

✦ ✦ ✦

१०. हिंदु धर्म व हिंदु संस्कृति

पुणें येथे दि. २–८–३७ रोजी टिळक-स्मारक-मंदिरात स्वा. सावरकर यांचें झालेलें भाषण.

माझीं सर्व मतें मान्य असलेल्या विद्यार्थ्यांनो, माझा आपण सत्कार केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. याचें कारण असें की, हिंदु संघटनेला अनुकूल असलेले अितके विद्यार्थी पुण्यात असावेत याबद्दल मला आनंद झाला.

हिंदु हिताची दृष्टि

आपल्या राष्ट्राचा पाया असलेल्या हिंदुत्वाच्या दृष्टीने मी राजकारणाकडे पाहू अिच्छितो. त्या दृष्टीने अुपयुक्त तेंच माझें समाजकारण, राजकारण वगैरे

सर्व काही आहे. वेदकालापासून ग्रीक, बर्बर, मुसलमान, हूण यांचीं संकटें आपल्यावर आलीं; पण आत्मप्रतीति ठेवून हिंदूंनी परशत्रूंचा निःपात केला. गेल्या २५ वर्षांत हिंदुत्वावर अेक नवीन संकट येअू पाहत आहे. पूर्वी परधर्मीय लोकांपासून त्रास झाला, परंतु आता स्वधर्मीयांचा विरोध होत आहे. परमानंदांचे आजोबा मतिलाल यांचें डोकें करवतीने कापलें होतें. डोळे काढणें–फोडणें, शिर अुडवणें अशा प्रकारचे हाल व हत्या पूर्वी धर्मवर्चस्वाने होत असत, पण तें सर्व साहून हिंदूंनी संस्कृतीचें व स्वातंत्र्याचें रक्षण केलें.

आज घरचे वासेही अुलटले

हिंदु धर्मावरील गेल्या दहा वर्षांतील संकट पूर्वीपेक्षा विशेष विकट आहे. परधर्मीय लोकच हिंदुत्वावर अुलटले नसून हिंदुही स्वधर्मावर अुलटले आहेत व तो नामशेष करण्याचा प्रयत्न चालू आहे. याप्रकारें घरचे वासे घरावर अुलटले आहेत. पूर्वी मुसलमानांच्या राजवटीत ते शत्रूला अेकच प्रश्न करीत की, 'तू हिंदु की अहिंदु ?' मुसलमान धर्म स्वीकारल्याबरोबर त्याला सर्व गोष्टींची माफी मिळत असे. हिंदु या दोन शब्दांवर प्राणांचें मोल अवलंबून असे. ' मी हिंदु नाही, मी अहिंदु आहे' असें म्हटल्यावरोबर सर्व संपत्ति व अैश्वर्य त्याच्या चरणापाशी लोटांगण घालीत असे. पण असें असूनही या दोन अक्षरांकरता लक्षावधि लोकांनी, दुर्वासापासून तो वावा बंदीपर्यंत सर्वांनी प्राणदंड सहन केला. हल्लीच्या कालात दयार्द्र बुद्धीने फाशी जाणाराला क्लेश न व्हावे म्हणून विजेच्या धक्क्याने फाशी दिली जाते, पण पूर्वीच्या राजवटीत तसें नव्हतें. मला पहिल्या शिक्षेत जन्मठेप झाली होती व दुसरा फाशीच्या शिक्षेचा खटला माझ्यावर भरला होता. फाशी कशी देत असतील या सर्व गोष्टींचा अनुभव आम्ही जन्मठेपेची शिक्षा भोगताना घेतला होता. आमच्या मनाला समाधान हें वाटे की, फाशीत त्रास होणार नाही, कारण फासावर डोकें ठेवलें की झालें.

हिंदु ! हिंदु !! हिंदु !!!

पण विवेकानंदांचे आजोवा तेजवहादूर यांचें अुदाहरण पाहा. त्यांना त्यांच्या शिष्यांसह पकडून आणलें होतें व प्रत्येकाला विचारीत की, 'तू हिंदु धर्माचा प्रचार केलास काय ?' 'होय' म्हटलें की शिक्षा करीत. पण अहिंदु म्हटलें की, चंदनाची अुटी डोक्यावर घालीत व त्याला सरदार वनवीत. पण चमत्कार असा की तेजबहादुरांच्या सर्व शिष्यांनी ' मी हिंदु ' असें अुत्तर दिलें व त्या प्रत्येकाचा शेवटचा शब्द ' हिंदु ' हा असे. शेवटी त्यांनी गुरूंना विचारलें की, तुमचें अुत्तर काय ? ते म्हणाले की, ' अरे ! भ्याडांतल्या भ्याड शिष्यानेही हिंदु म्हणून अुत्तर दिलें, तेथे मी दुसरें अुत्तर देअीन असें तुला वाटतें कसें ?' मुलगा मरत असताना बाबा बंदाने

शब्द अुच्चारला नाही व हिंदुत्व सोडलें नाही. ते मेले असें समजून त्यांचें प्रेत गावाबाहेर फेकून देण्यात आलें. पुढे त्या रस्त्याने नाग-गोसावी जात असताना त्यांना बाबा बंदाच्या कलेवरात थोडी धुगधुगी आहे असें वाटलें व त्यांनी त्यांना जिवंत केलें; पुढे त्यांचें लग्न होअून त्यांना मुलें झालीं व तो वंश अद्याप जिवंत आहे. ह्या गोष्टी मी वनावट किंवा कादंबरीतल्या सांगत नसून त्या बखरीत नमूद आहेत.

सध्याचें संकट

या जुलुमाच्या प्रतिकारार्थ महाराष्ट्राने प्रथम आपला प्रदेश स्वतंत्र केला व अटकेपार झेंडा फडकविला. त्या वेळी महाराष्ट्रानेच पंजाबला स्वतंत्र केला, ही बहादुरी तुमच्या पूर्वजांनी केली. आता जें नवें संकट आपणावर येत आहे त्यालाही तोंड दिलें पाहिजे. हिंदूंनीच हिंदुत्वाला विरोध सुरू केला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला शपथ घालून मी सांगतो की, तू शपथ घे की, 'अिंद्रपद जरी माझ्याकडे येत असलें तरी पहिला अहिंदु म्हणून जगण्यापेक्षा शेवटचा हिंदु म्हणून मी मरण पत्करीन!' आअीबाप जरी हिंदुत्व विसरले, तरी तुम्ही हिंदुत्व सोडू नका.

सैनिक शिक्षण अवश्य घ्या

आपल्या संस्कृतीवर होणारे परकीयांचे हल्ले परतविणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. 'अभ्युत्थानाय हिंदूनाम्' हें वचन डोळ्यापुढे ठेवा. तुम्ही बौद्धिक शिक्षणाकडे लक्ष देता तितकेंच सैनिक शिक्षणाकडे लक्ष द्या. संघटन व लाठी यांचें शिक्षण महाराष्ट्रात फैलावलें पाहिजे. नाट्यसंशोधनमंदिरें, काव्यशास्त्रविनोद वगैरेंना मी पुरोगामी म्हणणार नाही. पण हवाअी बंदुकांचें शिक्षण देणाऱ्या संस्था यांना मी पुरोगामी संस्था म्हणतो. तुम्ही कॉलेजात यू. टी. सी. चें शिक्षण घ्याच. सर्वांनी हवाअी बंदुकीचें शिक्षण तरी जरूर घ्यावें. नाटकी तऱ्हेने का होअीना पण ५०० विद्यार्थी रांगांनी जाताना दिसले पाहिजेत. केव्हा केव्हा नाटकी वर्तनातूनच खरा मनुष्य तयार होतो. मुली बाहुलीचा खेळ खेळतात. त्या बाहुलीचा शेवटचा मुका घेताघेता पहिल्या मुलाचा मुका घेतात. खांद्यावर बंदूक टाकूनच वायकोचा मुका घेण्याचें दृश्य सुपरिचित आहे. शेक्सपियरचीं नाटकें विकत घेण्यास किंवा श्री. अत्र्यांचीं विनोदी नाटकें चारचार वेळा पाहण्यात जो खर्च विद्यार्थी करतात तेवढ्यात तुम्हांला हवाअी बंदूक मिळू शकेल. आजकाल काव्यशास्त्रविनोद, नाटक कादंबऱ्या या गोष्टी चालू आहेत. त्या हव्यातच; पण वेळ कोणती तें पाहिलें पाहिजे. आअी जर आजारी असेल तर त्या वेळी गच्चीवरून वारे व ग्रह पाहत राहणारा मुलगा मातृद्रोही ठरेल. आपल्या मातृभूमीस घोर लागला आहे. तुम्ही हिंदुत्व विसरू नका.

✦ ✦ ✦

११. माझें राजकीय धोरण

पुणें येथे दि. ४-७-३७ रोजी शिवाजी मंदिरात अध्यक्ष या नात्याने स्वा. सावरकर यांनी आपल्या भावी राजकीय धोरणाची दिशा दिग्दर्शित केली, त्या वेळचें भाषण.

आता लवकरच मला राजकीय कार्यात भाग घ्यावा लागणार आहे; आणि तसें कार्य सुरू झालें म्हणजे तुमच्या-माझ्यात विषमता अुत्पन्न होअील. जोपर्यंत मी काहीच काम करीत नव्हतो तोपर्यंत ठीक होतें; परंतु नंतर मात्र मी आपणांस नकोसा होअीन. निदान मी स्वस्थ होतो तो बरा होतो असें आपणांस वाटू लागेल. यात मी आपणांस दोष देत नाही; निसर्गप्रवृत्तिच तशी आहे. असें जरी असलें तरी राष्ट्रहिताची प्रामाणिक अिच्छा असेल त्याप्रमाणे त्याविषयी आपणांस जें सुचेल तें बोललें पाहिजे व त्याप्रमाणे केलें पाहिजे. त्यामुळे माझ्याविषयी वैषम्य निर्माण झालें तरीही मला राष्ट्रास जें अुपकारक ठरेल असें वाटतें, तें बोलून दाखविणें प्राप्त आहे. आता त्याविषयीचीं सर्वच मतें मला आज सांगता येणार नाहीत; तरी पण मी अेक दोन विधेयें सांगणार आहे.

खरी अेकी कोणती?

आता आपण प्रथम 'अेकी' हा विषय विचारात घेअू. अेकीमुळे राष्ट्राचें बळ वाढतें. अेक हाक, अेक आवाज, अेकजुटीचा प्रयत्न हें सर्व स्वातंत्र्येच्छु राष्ट्रास योग्य आहे यात शंका नाही. परंतु या ठिकाणी अेकीचा केवळ शब्दार्थ घेअून चालणार नाही. राजकीय क्षेत्रामध्ये आपण धर्माचा अर्थ, सत्याचा अर्थ, अहिंसेचा अर्थ ज्या पद्धतीने लावतो त्याच पद्धतीने या अेकीचा अर्थ लावावयाचा आहे.

अंधळा व काणा

ज्या अेकीमुळे आपल्या राष्ट्राचें अुत्तम धारण होणें शक्य असेल तेवढीच 'अेकी' सद्गुण या सदरात येअू शकेल. आपण अेक दृष्टान्त ध्यानी आणा. समजा की, काही अंध माणसांची अगदी पूर्ण अेकी आहे. ती सर्व मंडळी आपली प्रत्येक क्रिया अेकोप्याने करतात. ती सर्व मंडळी, अंधांची नी मालिका कोठे तरी जाण्यास निघाली. अेकोप्याने सर्व अंधळे रस्ता चालू लागले; पण पुढे मोठा खड्डा आहे, अशा वेळी त्या अंधांच्या मालिकेत जो अेक कोणी काणा आहे, त्याला संशय आला की या मार्गात खड्डा आहे. या वे ी अेकोपा मोडेल या भयाने आपण ओरडलो नाही तर आपणांसह सर्व या खड्डयात पडणार. अशा प्रसंगी अेकीची वेकीच होणें अिष्ट. या वेळी अैक्याला वाध येअील म्हणून न बोलता सर्वांनी खड्डयात पडणें हा

अेकीचा गुण नसून दोष होअील. मतैक्यापेक्षा अशा प्रसंगी मतभिन्नताच अिष्ट होय, श्रेष्ठ होय.

प्रत्येकाचा हक्क

आपल्या राष्ट्रात आजच्या स्थितीत अनेक पक्ष आहेत, हें तर साहजिक आहे. परंतु स्वतंत्र राष्ट्रातही खरी राजसत्ता गाजविणारी जी लोकांची प्रातिनिधिक संस्था पार्लमेंट, त्या पार्लमेंटने अेकमताने किंवा बहुमताने केलेला ठराव मान्य नसला, तर त्याविरुद्ध बोलण्याचा 'राअिट ऑफ रिव्होल्ट' म्हणून अेक हक्क ठेवण्यात आलेला असतो. मात्र अशा वेळी विरुद्ध बोलणाराने त्याबाबत ठरविण्यात आलेला दंड भोगण्यास तयार असलें पाहिजे. यात अेकच वारकावा आहे आणि तो म्हणजे अेकीतून राष्ट्रहितार्थ फुटल्यानंतर शत्रुपक्षास मिळावयाचें नाही.

आपणांस जीवनाची अेकी पाहिजे. देशातील ३५ कोटी लोकसंख्येपैकी ३४ कोटी ९९ लक्ष ९९ हजार ९ शे ९९ लोक अेका बाजूला असले आणि माझें मत त्यांच्याशी जमत नसलें तरीही मी अेकटा बाजूला निघून माझें देशहिताविषयीचें मत बोलून दाखवीन व त्याबाबत होणारी शिक्षाही भोगीन. जीझस ख्राअिस्ट हा प्रथम अेकटाच निराळ्या मताचा होता. मरेपर्यंत बारापेक्षा जास्त अनुयायी त्यास लाभले नाहीत. पण त्याने आपलें मत सोडलें नाही. आज अर्धें जग त्याच्या मताचें आहे. या पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूस अमेरिका खंड आहे. हें कोलंबसाने सर्वांच्या विरोधाला न जुमानता सांगितलें. त्या वेळी अेकमत बिघडू नये म्हणून तो स्वस्थ बसता तर त्यास आजचें श्रेय मिळालें नसतें. त्याच्या अेकट्याच्या मतानेच आज अमेरिकाखंडाचें अस्तित्व सिद्ध झालें आहे ना? अेकाच्या मनात अुपजलें तेंच आज बहुमतास मान्य झालें अशीं अनेक अुदाहरणें आहेत.

जनहित कीं जनस्तुति?

देशहिताकरिता जसा काही अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो, त्याचप्रमाणे लोकप्रियतेचा त्याग करण्याची तयारी असावी लागते. स्वजनांशी द्रोह करण्याची भीति नष्ट झाली पाहिजे. आपली लोकांतील प्रतिष्ठा कमी होअील या शंकेने काही लोक पटलेलें मतही बोलण्यास भितात. तसें अुपयोगी नाही. याबाबत मी स्वत: अेक ध्येयवाक्य ठरविलें, 'वरं जनहितं ध्येयं केवला न जनस्तुति:।' हें तें माझें ध्येयवाक्य. स्तुति कोणाला नको? कोपायमान शंकरसुद्धा स्तुतीला भाळत असतो, तेव्हा जनस्तुति हवीच; पण जनहित हें सर्वश्रेष्ठ आहे. अेवढें ध्यानी ठेवलें म्हणजे ठीक. जनस्तुति व जनहित हीं दोन्हीही ज्याला साधता येतात तो मनुष्य धन्य होय.

राष्ट्रसभा सर्व राष्ट्राची

राष्ट्रीय सभा ही देशातील सर्वात मोठी राजकीय संस्था असून त्या संस्थेने या देशावर फार मोठे अुपकार करून ठेवले आहेत. राष्ट्रीय सभा ही संस्था कोण्या अेका प्रांताची किंवा अेका व्यक्तीची नाही, तर ती सबंध देशाची आहे. न्यायमूर्ति रानडे यांच्यापासून सर्व प्रांतांतील निरनिराळ्या देशभक्तांच्या व राजकारणी पुरुषांच्या श्रमांचें खत या राष्ट्रीय सभारूपी वृक्षास लाभलें आहे. तेव्हा राष्ट्रीय सभेवर कोणा अेका व्यक्तीचा अगर प्रांताचा हक्क नाही. आता परतंत्र देशामध्ये बहुजनांची अशी ही संस्था जितकी प्रगत असणें शक्य आहे तितकीच ही संस्था, ही राष्ट्रीय सभा प्रगत आहे. परतंत्र देशांतील बहुजनसमाज हा थोडासा भ्याड असाच असतो. अर्थात् बहुसंख्य समाजाची संख्या तितकीच असणार. काही थोडे शूर लोक असतात. ते यातून फुटून बाहेर निघतात. असें त्यांना निघावेंच लागतें.

पूर्वीचे तीन पक्ष

पूर्वी ही राष्ट्रीय सभा नेमस्तांच्या हाती होती. मी नेमस्तांना कोणत्याही प्रकारे दोष देत नाही. त्यांनी त्यांच्या काळात देशहितकारक जें जें करणें शक्य होतें तें तें केलें होतें. आजच्या जहालांपेक्षा त्या काळचे नेमस्त कोणत्याही बाबतीत मागे नव्हते. त्या काळचे ते थोर जहालच होते. ना. गोखले वगैरे मंडळी तर आमच्या पितृस्थानी शोभतील अशी आहेत. लोकमान्य टिळक हे जास्त धडाडीचे होते आणि म्हणून ते त्या वेळी राष्ट्रीय सभेस विरोध करून बाहेर पडले व म्हणूनच देशाची प्रगति झाली. त्यानंतर आम्ही मंडळी आलो. लोकमान्य आमच्यापेक्षा धाडसी होते, पण त्यांना बहुजनसमाज की जो दुबळा होता, त्याला बरोबर घेअून जायचें होतें. म्हणून 'अभिनवभारत' या संस्थेच्या रूपाने आम्ही त्या वेळच्या लोकमान्यांच्या राष्ट्रीय सभेतून फुटून पुढे निसटलो.

पायोनियर्स–पुरस्सर–असतात ते मुख्य सैन्यापेक्षा पुष्कळच पुढे असावे लागतात; त्यामुळे हाल भोगण्याचें व साहसाचें कार्य किती करावें लागतें हें कळून आलें. आम्ही आमच्या कामगिरीने या देशातील साहसाचें तापमापन (थर्मामीटर) किती अुंच नेता येतें हें व्यक्त केलें. तेव्हा काही वेळा अेकीपेक्षा बेकी कशी श्रेष्ठ ठरते हें दिसून येअील.

अेकाच देवतेसाठी अनेक फुलें

राष्ट्रीयसभा ही बहुसंख्य लोकांची संस्था आहे म्हणून तिच्याविरुद्ध ब्रही काढणें किंवा तिच्याबाहेर राहून आपल्या मताप्रमाणे कार्य करणें म्हणजे पातक आहे ही कल्पना समूळ चूक आहे, म्हणून ती सोडून द्या. राष्ट्र ही अेकच सेव्य वस्तु आहे. राष्ट्रीय सभा, लो. स्व. पक्ष, हिंदुमहासभा वगैरे सर्व संस्था या राष्ट्राची

पूजा करण्याचीं केवळ फुलें आहेत. देवता अेक, देअूळ अेक पण प्रत्येकाने आपापल्या निरनिराळ्या साधनांनी ती पूजा करावयाची आहे. यात पूजकांनी किंवा भक्तांनी आपसांत त्या पूजेच्या साधनाविषयी भांडण्याचें काहीच कारण नाही.

राष्ट्रीय सभा झाली काय किंवा दुसरी कोणतीही संस्था झाली काय, तिच्या हातून कार्य करताना काही चुका होणारच. राष्ट्रीय सभेकडून तशा काही चुका झाल्या हें आता सिद्ध झालें आहे; पण चुका करता करता 'आम्ही काही चूक करीतच नाही' असें म्हणणें मात्र चूक आहे.

कार्य करा

राष्ट्रीय सभेशी पटत नसेल व आपण काही निराळें करून देशहित करू अशी आपली खात्री असेल तर त्यागपत्र देअून खुशाल आपला स्वतंत्र पक्ष काढावा. मात्र या दुसऱ्या पक्षाने राष्ट्रीय सभेपेक्षा जास्त कार्य, निदान तितकें तरी कार्य करून दाखवावें. तरच निराळा पक्ष काढण्याचें साफल्य आहे. आणि असें जास्त कार्य करणारे पक्ष निघत असल्यास राष्ट्रीय सभेनेही त्यांच्याविषयी वैषम्य न मानता स्पार्टन वीराप्रमाणे आपणापेक्षा चढाअी कार्य करणारे पक्ष देशात निर्माण व्हावेत अशी सदैव प्रार्थनाच करावी. कोणत्याही पक्षाची कसोटी तो राष्ट्रीयसभेत आहे किंवा नाही हें पाहून न ठरविता तो पक्ष कोणतें देशहितकारी कार्य करतो हें पाहून ठरविली जावी. लोकांनी केवळ प्रेक्षकाची भूमिका सोडावी. दोन मल्लांची कुस्ती पाहण्यास लोक जमतात, त्याप्रमाणे अेक पक्ष दुसऱ्याविरुद्ध कसें बोलतो किंवा अेक वक्ता दुसऱ्याची कशी हजेरी घेतो अेवढेंच पाहण्यासाठी तुम्ही सभेला येता. तसें न करता आपण प्रत्येकजण काही तरी कार्य करतो की काय हें मनाशी पडताळून पहात चला.

माझी कसोटी कोणी पहावी?

मी सुटल्यानंतर आता काय करणार, प्रतिगामी होणार कीं पुरोगामी होणार, याविषयी अहोरात्र चिंता बाळगणाऱ्यांना मला सांगायचें आहे की, तुम्ही काय देशकार्य करता त्याची तरी अेकदा यादी द्या. मी काय कार्य करणार या-विषयी चिंता कोणी बाळगावी की, ज्यांनी माझ्यापेक्षा जास्त किंवा निदान माझ्या-अितक्या तरी हालअपेष्टा सहन केल्या आहेत त्यांनी. या वेळी मी खोटा विनय सोडून बोलत आहे. अितर काही त्यागाप्रमाणे या वेळी मला विनयाचाही त्याग करावा लागत आहे. तसा खोटा विनय सोडून मी बोलतो की, श्रीशिवाजी महाराज किंवा त्यांच्यासारखे व त्यांच्यानंतर जे थोर देशभक्त झाले त्यांनाच माझा कान धरण्याचा अधिकार आहे. तसे थोर देशभक्त जितके जास्त निघतील तितका जास्त आनंद मला होअील. मी काय करणार याविषयी सध्या अेवढेंच सांगतो की, जीव

गेला तरी मी हिंदूंचा पक्ष सोडणार नाही. मी आज राष्ट्रीय सभेत नाही, किंवा दुसऱ्या कोणत्याही पक्षात नाही. पण मी कोणत्या पक्षात आहे किंवा नाही, हें मुख्य नसून माझें काम मुख्य होईल.

कार्य हें मुख्य चिन्ह आहे. म. गांधी हे तरी राष्ट्रीय सभेत आहेत काय? नाहीत. मग त्यांचा शब्द तेथे मानला जातो याचें कारण त्यांचें कार्य आहे. ते सभासद आहेत किंवा नाहीत, हें कोणी पाहणार नाही.

राष्ट्रीय सभा व लोकशाही स्वराज्यपक्ष यांच्या ध्येयामध्ये मुळीच अंतर नाही. ध्येय अेक आहे. तेव्हा त्या ध्येयप्राप्तीकरिता मी कोठेही कार्य केलें तरी तें ध्येयाप्रतच जाणार आहे. तुम्हांला करता येत नाही, तें मी करणार आहे, असें कोणी म्हणाला आणि तो तसें देशहितकारी कार्य करीत असला तर केवळ तुमच्यात नाही किंवा राष्ट्रीय सभेत नाही, म्हणून तो देशद्रोही होईल काय? तेव्हा जो कोणी देशहिताचें कार्य कोठेही राहून करील तें करण्यास त्यास पूर्ण वाव मिळणें अवश्य आहे. तो अमुक अेका संस्थेत नाही, म्हणून त्याचें कार्य हिणकस ठरत नाही. ज्या कार्यावर राष्ट्रीय सभेचा छाप नसेल तें अराष्ट्रीय ही कल्पना समूळ खोडून काढा आणि कार्याला लागा.

✦ ✦ ✦

१२. टिळक–पंथ

पुणें येथे दि. १-८-३७ रोजी लोकमान्यांच्या १७ व्या पुण्यस्मृतिदिनी टिळक-स्मारक मंदिरात झालेल्या प्रकट सभेत आपण लोकशाही स्वराज्य पक्षात समाविष्ट होत आहोत अशी घोषणा स्वा. सावरकरांनी केली. त्या वेळी केलेलें भाषण

आजच्या या पवित्र दिवशी लोकमान्यांचें काही वैशिष्ट्य वर्णन केल्यास तें आपणांस मार्गदर्शक व चिंतनीय होईल म्हणून मी माझ्या आजच्या व्याख्यानाचा विषय ' टिळकपंथ ' हा निवडला आहे. सध्या देशातील बहुतेक सर्वपक्ष ' आपण टिळकांचे अनुयायी आहोत ' असे सांगत आहेत. लोकशाही स्वराज्य पक्ष टिळकांच्या अनुयायांचा आहे. हिंदुमहासभा आपण टिळकांचींच तत्त्वें अनुसरतो असें म्हणते व राष्ट्रीय सभाही आपण टिळकांच्याच मार्गाने जात आहोत, असें मधून मधून मोठ्या अभिमानाने सांगते. टिळक हे माझे गुरु आहेत असें सांगण्यात बहुतेकांस अभिमान वाटतो. अशा प्रकारे सबंध राष्ट्राचें गुरुत्व लोकमान्यांकडे जातें. परंतु लोकमान्यांचें चरित्र सूक्ष्मपणे वाचील त्याला असें दिसून

येअील की, लोकमान्य हे त्यांच्या मृत्यूनंतर लोकमान्य झाले. त्यांच्या हयातीचीं शेवटचीं चारपांच वर्षें वगळल्यास त्यांचें सवंध कार्य अल्पमतातच झालें. तेव्हा आपण अल्पमतात आहोत याविषयी कोणी विषाद मानण्याचें कारण नाही. लोकमान्य हे जरी अल्पमतात काम करीत होते तरी पण टिळकांचें मत हेंच राष्ट्राचें मत असें त्यांचे शत्रु जेव्हा समजू लागले, तेव्हा त्यांच्या मित्रांनाही तें कबूल करावें लागलें.

बहुमत अचूकच असतें काय ?

टिळक हे कधीही काँग्रेसचे अध्यक्ष झाले नाहीत. अखेरपर्यंत त्यांना झगडावें लागलें. प्रत्येक पंथाचे स्थापक प्रथम अल्पमतातच असतात. जीझस ख्रिस्ताला फाशी जावें लागलें, महंमद पैगंवर पळून गेला, पण त्यांनी अल्पमतात राहून सत्यप्रकाशन केलें व अखेरीस बहुमत त्यांच्या वाजूला गेलें. आपण म्हणतो तें सत्य असून राष्ट्राला तेंच हितकारक आहे हें अेकदा आपल्या मनाला पटलें म्हणजे मग आपण अल्पमतात असलो तरी त्याची चिंता न धरता खुशाल आपल्या सत्यास अनुसरून अखेरपर्यंत कार्य करीत राहणें हेंच आपलें कर्तव्य होय. आपल्या बाजूस बहुमत नाही म्हणून आपलें काही चुकतें आहे असें समजण्याचें कारण नाही.

टिळकांचें विभूतिमत्त्व कशात आहे ?

राष्ट्राचें स्वातंत्र्य हें टिळकांनी आपल्या आयुष्याचें ध्येय ठरविलें होतें. त्यांचा व्यक्तिशः मोक्ष, धर्म, कर्म, व्रतपालन वगैरे गोष्टींवर विश्वास होता. व्यक्तिशः थोर संत, अुत्कृष्ट गणिती, अुच्च संपादक किंवा महान् तत्त्ववेत्ता होण्यासारखे मार्ग त्यांच्यापुढे मोकळे होते. त्यांनी तसें होण्याचें मनात आणलें असतें तर सहज तसें झालें असतें. पण त्यांनी वैयक्तिक मोठेपणाचा त्याग करून आपली सर्व वुद्धि व कर्तृत्वशक्ति राष्ट्राच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ कामी लावली यातच त्यांची महती व त्यांचें विभूतिमत्त्व आहे.

संकुचित ध्येय कोणतें ?

आजही राष्ट्राचें संपूर्ण स्वातंत्र्य हेंच ध्येय आपणांपुढे आहे. राष्ट्रीय सभेचें. हिंदुमहासभा व लोकशाही स्वराज्यपक्ष यांचेंही ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य हेंच आहे. असें असता हिंदूंचें मात्र तें ध्येय म्हणताच त्यात काहींना संकुचितपणा दिसतो. हिंदूंना संकुचित म्हणणारेसुद्धा सवंध मानवी समाजाच्या ध्येयाच्या दृष्टीने विचार करता संकुचितच ठरतात. कारण हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या भूभागाचेंच राजकीय स्वातंत्र्य ते आपलें ध्येय ठरवितात, म्हणजे ते संकुचित नाहीत काय ? पृथ्वीवरीलच काय पण अखिल विश्वातील मंगळावरील मनुष्यसमाजाच्या दृष्टीने राष्ट्रीय सभेचें ध्येयही आकुंचित ठरेल. पृथ्वीवरील मानव्याच्या दृष्टीने बोलावयाचें

झाल्यास मग अिंग्रजांनी हिंदुस्थानवर राज्य केलें म्हणून तरी काय विघडतें ? अिंग्रजाच्या अिंग्लंडमध्ये दगडी कोळशाशिवाय विशेष काही पिकत नाही. त्यांच्या हातचा जर हिंदुस्थान गेला, तर मग साहेबांना केळीं कोठून खाण्यास मिळतील ? आपल्या देशातून जाणाऱ्या सुवर्णावर निर्बंध कशास बरे घालता ? तसे निर्बंध घातले तर आंग्ल युवतींच्या कर्णभूषणांना सोनें कसें मिळेल ? सर्वव्यापक ध्येय सोडून आपलें सुवर्ण आपणच अडवून ठेवावें असें म्हणता ना ? तेव्हा विश्वरूपी ध्येयावरून खाली येअून आपल्या राष्ट्रापुरतें मर्यादित ध्येय आपणांस ठरवावें लागते ना ? मग राष्ट्राचा मोठा भाग जो हिंदु, त्या हिंदूंच्या ध्येयास तुम्हांस केव्हाही संकुचित ध्येय असें म्हणता येणार नाही.

रशियाच्या ध्येयालाही मर्यादा

'जगातील सर्व मानव सारखे' असे सांगणारे रशियन सोविअेट यांनीही आपली सोव्हिअेट युनियन रशियापुरतीच मर्यादित ठेवली आहे. जगात अितरत्र जोपर्यंत फ्रेंचांचा फ्रान्स; जर्मनांचा जर्मनी; अिंग्रजांचा अिंग्लंड; अिटालियनांचा अिटली हीं पृथक् राष्ट्रें आहेत तोपर्यंत त्यांना आपली सोव्हिअेट युनियन निराळी ठेवणेंच प्राप्त आहे. जगातील अखिल मानवसमाजास समान दर्जा मिळवून देण्याचें ध्येय ठेवणाऱ्या सोव्हिअेट रशियाने आज अिंग्रजांशी मैत्रीचा संधी (तह) केलेला आहे. स्वत:चें स्वास्थ्य राखण्यासाठीच ना हें त्यांनी केलें ?

" Workers of the World Unite " असें रशियातील मजूरसंघ जगाला ओरडून सांगतात ! मग मुंबअीचे अेक हजार बेकार कामगार अेका तारवात घालून मास्कोला घेअून जा बरें ! तेथील मजूर त्यांचें स्वागत करतात का तें पहा. जगात अितरत्र जोपर्यंत विशालवादित्व नसून संकुचितपणा आहे, तोपर्यंत आपणही आपल्या राष्ट्रापुरतें राष्ट्रातील बहुसंख्य समाजाचें ध्येय हेंच राष्ट्राचें ध्येय ठरविणें शहाणपणाचें होअील ही गोष्ट सिद्ध होते.

साधनांची भिन्नता

लोकमान्य टिळक ध्येयाच्या बाबतीत संपूर्ण स्वातंत्र्यवादी होते. परंतु हें ध्येय साध्य करून घेण्याच्याबाबत साधेल तें साधन हाताशी धरावें अशी त्यांची व्यवहारी दृष्टि होती. 'साधनानाम् अनेकता' असें टिळकांचें साधनांबाबतचें धोरण स्पष्ट होतें हें त्यांच्या चरित्रावरून दिसून येतें. वेळप्रसंगी त्यांनी अगदी विनंतीअर्जही करून पाहिले, पण अर्ज-विनंत्यांचें साधन वापरणारे टिळक व विष्णुशास्त्री चिपळूणकर हे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्यासारख्या क्रांतिकारकांबद्दल अभिमान धरीत. अेका प्रसंगी चिपळुणकरांच्या घरी चहापान-समारंभ होणार होता; परंतु त्याच दिवशीच्या 'टाअिम्स' पत्रात श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना धरल्याची बातमी आली तेव्हा शास्त्रीबुवांनी तो समारंभ रद्द केला.

अेकच साधन काय कामाचें ?

टिळक-पंथीय लोक देशाच्या स्वातंत्र्याकरिता शक्य असेल त्या साधनांचा योग्य त्या ठिकाणी योग्य तो अुपयोग करतील. नीती-अनीतीचा नसता बडेजाव करणार नाहीत. सत्याग्रह, बहिष्कार, स्वदेशी, जे जें साधन जेथे जेथे अुपयोगी, तेथे तेथे तें अुपयोजिणें हें टिळकांचें व्यवहारी राजकारण आम्ही समजतो. अेकाच साधनाशी आम्ही कायमचें लग्न कधीच लावून घेणार नाही. सत्याग्रहाने माझींच माणसें अेकसारखी कामास येत आहेत; प्रतिपक्षाचा ढेकूणसुद्धा मरत नाही, तेथे तो सत्याग्रह काय कामाचा ? पण असें असताही आपल्या लोकांच्या यातना प्रतिपक्षाच्या हृदयाला पाझर फोडतील हें धोरण टिळकांनी केव्हाही आखलें नसतें. कारण प्रतिपक्षाला पाझर फुटणें शक्य नाही हें अुघड आहे असें त्यांचें मत होतें. अक्रोधाने क्रोध जिंकणें हें संतलक्षण अुत्तम आहे, हें मला मान्य आहे. पण तें जेथे शक्य असेल तेथेच. आअीचा क्रोध अक्रोधाने जिंकता येअील, पण पूतना-मावशी आली तर तिचा क्रोध शमन कसा करावा ?

त्यांनी शक्य तेथे निरोधन केलें, सत्याग्रह केला व बहिष्कार घातला. जरूर तेथे सहकार व अर्जविनंत्याही केल्या.

राजनीति कोणती ?

आपलें बरेंच बळ खर्ची पडतें पण आपण प्रतिपक्षाचें काहीच नुकसान करू शकलो नाही; तरी पण माझाच विजय झाला या म्हणण्यात काय अर्थ आहे ? दुकानाचें सबंध दिवाळें निघालें तरी माझें दुकान छान चाललें आहे असें म्हणण्या-अितकेंच तें हास्यास्पद आहे. पण टिळक असे नव्हते. त्या वेळी टिळकांपेक्षाही खडतर मार्ग पत्करणारे माझ्यासारखे काही तरुण होते. आमचे मार्ग त्यांना सर्वस्वी पसंत नसले, तरी त्यांनी आमचे पाय मागे ओढण्याचें पातक केव्हाही केलें नाही. आजच्या पिढीच्या राजकारणापेक्षा मला त्या पिढीचें नेमस्तांचें राजकारण जास्त पसंत पडतें. त्यांच्यापैकी कोणीही साधनांमध्ये नीति आणि अनीति आणिली नव्हती. न्याय्य ध्येय लवकर ज्याने साध्य होअील ती नीति अशी त्यांची नीतीची व्याख्या होती.

मवाळांचा व्यापकपणा

सुरेंद्रनाथ बानर्जी हे नेमस्त समजले जात; पण अंदमानमधील क्रांतिकारक राजबंदींविषयी त्यांच्याअितके तळमळणारे तेच ! त्यांच्याच प्रयत्नाने आमची तेथून सुटका झाली. लढाअीच्या काळात अेक जर्मन सैन्याधिकारी ब्रिटिशांचा कैदी होअून अंदमानात आला. त्याच्याबरोबर सुरेंद्रनाथांनी मला धीराचा, प्रेमाचा निरोप धाडला होता. क्रांतिकारकांशी त्यांचा तीव्र विरोध होता, तरी पण ती

मंडळी त्यांना आपलीं पोटचीं लेकरें समजत. सुरेंद्रनाथांनी ब्रिटिश सरकारला स्पष्टपणे बजावलें की, 'हिंदुस्थानात तुम्हांला शांतता हवी असेल, तर प्रथम अंदमानमधील क्रांतिकारक सोडा.' या वेळी सुरेंद्रनाथाबरोबर त्यांच्याही पलीकडेच भूपेंद्रनाथ बसू हे होते. तरी पण त्यांनी आमच्यावर अनीतीचा शिक्का कधीही मारला नाही. माझ्या मताचा शिक्का घेऊन जे राजकारणात आले, तेवढेच राष्ट्रीय, असा आग्रह बानर्जी, टिळक किंवा गोखले यांनी केव्हाही धरला नाही. लंडनमध्ये सेनापति वापट यांची माझी भेट झाली. त्यानंतर मला ते आजच भेटले. त्या वेळचीं आमच्याबरोबरचीं काही माणसें आज विधिमंडळात जाऊन वसलीं आहेत.

'वंदेमातरम्' चें भूतभविष्य

आज या घटकेलाही शेकडो राजबंदी अंदमान येथील अंधारात तडफडत आहेत त्यांना आपणांस विसरता येत नाही. राष्ट्रीय सभेच्या अेकदा अध्यक्ष झालेल्या देवी सरोजिनी नायडू यांचे बंधु वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय हे अद्याप परदेशात अडकून पडले आहेत. वीरेंद्रनाथाप्रमाणे अनेक लोक परदेशांत अडकून पडले आहेत. त्यांना परत आणता आलें तरच आपली वेरीज-वजाबाकी बरोबर होअील. आम्हांला या देशाची प्रगति फार मोठी झाल्यासारखी दिसते; ज्या 'वंदे मातरम्' या गीताबद्दल आम्ही त्या काळी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या, तेंच 'वंदे मातरम्' गीत आज प्रकट रीत्या विधिमंडळामध्ये निर्भयतेने म्हणता येतें. 'वंदे मातरम्' हें अेकच राष्ट्रगीत ठरलें, ही फार आनंदाची गोष्ट आहे. निदान देशातील सर्व हिंदूंचें तें राष्ट्रगीत आहे यात शंका नाही. परवा डाक्का विश्वविद्यालयाच्या पदवीदानप्रसंगी तेथील मुसलमान विद्यार्थ्यांनी तें गीत म्हणण्याचें नाकारलें, यावरून तें हिंदूंचें आहे असें मी म्हणतो. मला अशीही भीति वाटते की, उद्या अेखाद्या मुसलमानाने गांधींना अेक पत्र लिहून कळविण्याचा अवकाश, की भूषणकवि ज्याप्रमाणे बहिष्कृत ठरला, त्याप्रमाणे या 'वंदे मातरम्' राष्ट्रगीतासही काँग्रेसमध्ये बंदी व्हावयाची! तसें न होवो म्हणजे झालें.

टोपीपेक्षा डोक्याचें महत्त्व

आज सर्व सभासद खादीचा पोषाख व गांधी टोप्या घालून विधिमंडळात गेले हीसुद्धा प्रगतिच आहे. जी टोपी घालू नये, म्हणून पूर्वी नोकरशाहीने आग्रह धरला तीच टोपी आज अधिकाराच्या ठिकाणी आहे, म्हणून टोपीला महत्त्व आलें नाही तर टोपीपेक्षा डोक्याचेंच महत्त्व अधिक आहे. लोकमान्य टिळक आज असते तर त्यांनाही ही प्रगति पाहून निःसंशय आनंद झाला असता. अितकें जरी झालें तरी हें काँग्रेस-राज्य झालें असें म्हणणें ही चूक आहे. हें काँग्रेसचें राज्य नव्हे. जर तुमचें राज्य झालें असतें, तर तुम्ही प्रधान झाला असता; खुद्द राजेच झाला असता.

प्रधान कीं राजा ?

आणि म्हणून पं. जवाहरलाल नेहरू यांनी या वेळी हें काँग्रेसचें राज्य नाही आणि स्वराज्य तर नाहीच नाही, अशी सावधगिरीची सूचना दिली ती अगदी योग्य होय. ही सूचना देऊन त्यांनी आपली राष्ट्रपतीची भूमिका बरोबर ओळखली. मला पं. जवाहरलाल नेहरू हेच त्यांतल्या त्यात जास्त जवळचे वाटतात. त्यांच्याशी माझें काही थोडेंबहुत जमलें तर जमेल. आज तुम्ही सर्व गव्हर्नरचे प्रधान आहात. परिस्थितीप्रमाणे तुम्ही त्यांच्या बंगल्यावर जाऊन व विधिमंडळात अुभे राहून राजनिष्ठेची शपथ घेतलीच ना ? ती शपथ घेण्याच्या वेळी तुमचा स्वाभिमान जो माझ्या सुटकेच्या अर्जावर सही करण्याच्या कामी आड येत होता, तो त्या वेळी कोठे होता ? स्वाभिमानाचें हें कारण खरें नाही. कोणत्याही गोष्टीचें कारण देताना तें निदान खरें तरी द्यावें, हें सत्यवादी माणसांना सांगण्याची वेळ यावी हा दैवदुर्विलास होय !

आज राष्ट्राची जी प्रगति झाली आहे त्यांत म. गांधींच्या विधायक कार्याचा फार मोठा भाग आहे हें मी मोठ्या आनंदाने कबूल करतो. लंडनमध्ये महात्माजी व मी काही दिवस अगदी अेकत्र राहत होतो; आज त्यांच्या-आमच्यांत जे मत-भेद आहेत, तेच अगदी तंतोतंत त्या वेळी तेथेही होते. म. गांधींच्या कार्याबरोबरच देशाच्या या यशस्वी प्रगतीमध्ये ज्यांचीं नांवें अितिहास नमूद करणार नाही असे अनेक आहेत. त्या सर्वांच्या पुण्याअीने आज किंचित् अंधुक असें अुजाडलें आहे. स्वातंत्र्याची संपूर्ण प्रभात होण्यास अद्याप बराच अवधि आहे.

दिल्ली तर अजून खूपच दूर आहे. मोठ्या लढाअीमध्ये अेखादा लहानसा विजय होतो तसा हा सध्याचा तात्कालिक विजय आहे. हा विजय अेका साधनाचा नसून अनेक साधनांचा हा विजय आहे. अेकाच पक्षाचा हा विजय झाला असें कोणासही म्हणता येणार नाही. हा जर अेकाच पक्षाचा विजय असता, तर कौन्सिलें 'हराम' म्हणणारे व आठ दिवसांपूर्वी ज्यांनी हाती अधिकार घेतला त्यांना काळी निशाणें दाखविणारे यांना, त्याच हराम कौन्सिलांत रंगीबेरंगी रेशमी निशाणें फडकावीत आत जाता आलेंच नसतें.

हिंदुत्वरहित स्वराज्याला लाथ

स्वतंत्रता हें या राष्ट्राचें ध्येय निश्चित आहे. हें ध्येय साधेल त्या साधनाने साध्य करावें असें टिळकांचें म्हणणें होतें. हेंच म्हणणें सूत्ररूपाने सांगण्यासाठी मी पुढील अनुष्टुप् तयार केलें आहे.

' राष्ट्रस्वतंत्रता ध्येयं । यथा साध्यं च साधनम् ॥
अभ्युत्थानाय हिन्दूनां । अयं पक्षः प्रवर्तितः ॥ '

या राष्ट्राचें स्वरूप ठरविताना या राष्ट्रातील बहुसंख्य जे हिंदु ते या राष्ट्राचा पाया आहे. त्या हिंदूंचें हिंदुत्व अविच्छिन्न नि अबाधित राहिलें पाहिजे हें टिळकांचें तिसरें ध्येय होतें. टिळक नेहमी ठासून सांगत की, मी हिंदु आहे. त्यांनी हिंदूंवर कुरघोडी केव्हाही सहन केली नाही. जर्मनीत जर्मन, फ्रान्समध्ये फ्रेंच, तसेंच हिंदुस्थानात हिंदु बहुसंख्य आहेत, व म्हणून हा देश हिंदुस्थान देश होय. हिंदुत्व सोडलें तर तुम्ही म्हणता तसें स्वराज्य देतो, असें त्यांना कोणी म्हटलें असतें, तर टिळकांनी हिंदुत्वरहित स्वराज्यावर लाथ मारली असती आणि आपलें हिंदुत्व रक्षण केलें असतें. या भारतभूमीसंबंधी आपलें मन अितकें कां तळमळतें ? या भूमींत आपली संस्कृति, आपला धर्म वाढला व नांदत आहे, म्हणूनच ना ?

दगड, पहाड व भूमि म्हणजे राष्ट्र नव्हे; तर संस्कृति, धर्म, भाषा यांनी राष्ट्राची बांधणी होत असते. पारशांची भूमि जी अिराण ती परकीयांच्या हाती गेली, तरी पण त्यांनी आपली संस्कृति व आपला धर्म, आपला तो पवित्र अग्नि व झेंदावेस्ताचें अेक पुस्तक बरोबर घेअून आपली भूमि सोडली व ते येथे आले. धर्म व संस्कृति त्यांची त्यांच्यावरोवर असल्यामुळे येथेही त्यांनी स्वदेशाप्रमाणे आपला अभ्युदय करून घेतला आहे ना ?

अनुयायांचें कर्तव्य

टिळक हिंदुत्वामध्ये राष्ट्र मानीत होते. हिंदुत्वाविषयी त्यांच्या ठिकाणी ममत्व होतें. अशीं टिळकांचीं तत्त्वें ज्या पक्षात आहेत, तो लोकशाही स्वराज्य पक्ष मला जास्त जवळचा वाटतो आणि म्हणून आजच्या पवित्र दिवशी मी त्या पक्षात समाविष्ट होत आहे. या पक्षाच्या हातून किंवा तात्याराव केळकरांच्या हातून जास्त कार्य झालें नाही म्हणून त्यांना हिणविण्यात काही अर्थ नाही. त्यांच्या हातून जास्त कार्य झालें नाही याचें कारण तुम्ही त्यांचे अनुयायी म्हणविणारांनी त्यांना वेळोवेळी तोंडघशी पाडलें हेंच होय हें आपण ध्यानी घ्या. गेल्या निवडणुकीच्या वेळी तुम्ही काय केलें ? हिंदु–मुसलमान हे भेद तर बाजूलाच, पण हिंदूमधील जातीजातींचे भेद वाढवून मराठ्याने मराठ्याला नि ब्राह्मणाने ब्राह्मणाला मतें द्यावीं म्हणून प्रचार करण्यास मागेपुढे पाहिलें नाही. खुद्द पं. जवाहरलाल यांनी आपलें मत हिंदूंच्याच पेटीत टाकलें ना ? अशा मंडळींनी ' न हिंदुर्न यवनः ' अशा तिसऱ्याच अेका पेटीत मतें टाकणें जरूर होतें.

या गोष्टीचा विचार करून हिंदु या नात्याने टिळकपंथीय म्हणून व राष्ट्राचें स्वातंत्र्यध्येय डोळ्यापुढे ठेवून आज मी लोकशाही स्वराज्य पक्षाचा मनःपूर्वक स्वीकार करीत आहे.

सहकार्याची मर्यादा

या लोकशाही स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमात मला अत्यंत प्रिय असलेलें हिंदुसंघटनेचें सर्व कार्य येऊ शकतें. या पक्षात राहूनही माझ्या हिंदुसंघटनेच्या कार्यास मी मोकळा आहे. राष्ट्राचें स्वातंत्र्य हें राष्ट्रीय सभेचें ध्येय येथे आहे. तें व अस्पृश्यतानिवारण, ग्रामोद्योग वगैरे महात्मा गांधींचीं कार्यें मला करता येतात. विधिमंडळामार्फत जें चांगलें कार्य चालू असेल त्याला बाहेरून मन:पूर्वक साहाय्य देण्याचें कार्य मला येथे राहून करता येअील. राष्ट्रीय सभेशी जुळेल तेथपर्यंत आमचें पूर्ण सहकार्य राहील. मात्र जेथे त्यांचा हिंदुत्वाला विरोध येअील, तेथे त्यांचा आमचा मार्ग निराळा ! तेव्हा टिळकांचीं सर्व लक्षणें ज्यात पूर्णत्वाने आहेत असा लोकशाही स्वराज्य पक्ष मी स्वीकारीत आहे.

✦ ✦ ✦

१३. आद्य राष्ट्रध्वज

१९०७ या वर्षी बर्लिन शहरी भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी मंडळींच्या संमेलनात मदाम कामा यांनी फडकविलेला आद्य हिंदी राष्ट्रध्वज दि. २६ आक्टोबर १९३७ रोजी पुणें येथील टिळकस्मारक मंदिरामध्ये स्वा. सावरकर यांच्या हस्तें अनावृत करण्यात आला, त्या वेळी त्यांनी केलेलें भाषण.

बंधुजनहो ! कालपर्यंत डॉक्टरांनी मला घराबाहेर पडण्याची बंदी केली होती. परंतु तीस वर्षांपूर्वी मदाम कामा यांनी फडकविलेला हिंदी स्वातंत्र्याचा आद्य तिरंगी झेंडा येथे आला आहे असें समजताच अिंग्रजांप्रमाणे डॉक्टरविरुद्धही बंड करून मी येथे आलो. पॅरिसहून जर ध्वज येथे येतो तर मग मुंबअीहून पुण्यास येणें माझें कर्तव्य नव्हे काय ? ज्या वेळी हा ध्वज तयार झाला त्या वेळी अिंग्लंड-मधील 'अिंडिया हाअुसमध्ये' जो काही आम्ही मंडळी जमत होतो, त्यांपैकी माझे मित्र सेनापति बापट हे आज येथे आहेत. म्हणून प्रथम त्यांची भेट घेअून त्या वेळच्या स्मृतींना अुजाळा दिला आणि नंतर येथे आलो.

प्रतिस्पर्धी नाही

सध्याच्या राष्ट्रीय सभेने जो राष्ट्रध्वज तयार केला आहे त्यास प्रतिस्पर्धी म्हणून हा ध्वज समजावा असा कोणाचा गैरसमज होणें शक्य आहे. म्हणून याच

ठिकाणी त्याचा खुलासा करतो. मनुष्याप्रमाणे देशाचें व वस्तूंचें स्वरूपही पालटत असतें. परंतु आतील आत्मा जिवंत आहे तोपर्यंत त्या वस्तूचीं वरचीं रूपें कितीही बदललीं तरी तिचें महत्त्व कमी होत नाही. त्याप्रमाणेच हिंदी राष्ट्रीय ध्वजाचें स्वरूप बदललें असलें तरी त्यामध्ये आत्म्याच्या रूपानें स्वातंत्र्यप्राप्तीचें तत्त्व जिवंत आहे, तोपर्यंत जो कोणता राष्ट्रीय ध्वज असेल तो आम्हांस वंदनीयच ठरेल.

ध्वजाची जन्मकथा

आता हा ध्वज जन्माला कसा आला तें सांगतो. १९०७ च्या सुमारास आम्ही अिंग्लंडमध्ये असलेले हिंदी क्रांतिकारक तरुण लंडनमधील 'अिंडिया हाअुसमध्ये' रात्रीच्या वेळी अेकत्र जमत असू. तेथे अेका खोलीमध्ये शेगडीच्या भोवती बसून अफिम्याप्रमाणे स्वराज्याचे मनातील मनोरे बांधणें हा आमचा अुद्योग असे. त्या माझ्या प्रिय मित्रांपैकी सेनापति बापट आज माझ्यावरोवर येथे आहेत. बाकीचे कित्येक फाशी गेले, काही दुर्धर रोगाने पछाडले गेले, वॅ. राणा-सारखे काही अद्यापि परदेशात पडून आहेत. त्या वेळी आमच्या प्रतिज्ञा अशा असत की,

१. अेकत्रित व अखंड हिंदुस्थान हाच आमचा देश.

२. शक्य त्या मार्गांनी मातृभूमि स्वतंत्र करू अशीच भावना आम्ही ठेवू. ब्रिटिश हिंदुस्थान, फ्रेंच हिंदुस्थान, पोर्तुगीज हिंदुस्थान अशीं नांवें अैकलीं की आमच्या अंगातलें रक्त अुसळत असे.

३. हिंदी ही आमची राष्ट्रभाषा.

४. देवनागरी ही आमची लिपी.

५. लोकसत्तात्मक ही आमची राज्यपद्धति.

प्रतीकांचा भावार्थ

भावी स्वराज्याचें निशाण कसें असावें यावरही आमची चर्चा होत असे. तेव्हा आम्ही या राष्ट्रध्वजाचा आराखडा आखला तो असाच होता. अमेरिकेतील संयुक्त संस्थानें ताऱ्यांच्या रूपाने अमेरिकेच्या निशाणावर असतात. तेव्हा त्याप्रमाणे अखंड हिंदुस्थान तयार करणारे हिंदुस्थानातील त्या वेळच्या परिस्थिती-प्रमाणे भापावार असे आठ प्रांत कल्पिले होते. त्या आठ प्रांतांचीं हीं आठ कमळें निदर्शक आहेत. अमेरिकन ताऱ्यांअैवजी कमलपुष्प हें हिंदुस्थानचें वैशिष्ट्य-निदर्शक असल्यामुळे त्याची योजना आम्ही केली. ज्याकरिता शेकडो तरुणांनी आपलीं डोकीं फोडून घेतलीं व फासावर लटकतानाही ज्याचा नामोच्चार केला तो 'वंदे मातरम्' हा राष्ट्रमंत्र म्हणून आम्ही या ध्वजावर योजला आणि 'यावच्चंद्रदिवाकरौ' आमचा हिंदुस्थान स्वतंत्र राहील हें दर्शविणारीं हीं

सूर्य व चंद्र यांचीं चिन्हें आहेत. यांतील हिरवा रंग राष्ट्राच्या तारुण्याच्या जीवनाचें निदर्शक आहे. केशरी रंग यश दर्शवितो. पण हें तारुण्य व यश ज्यावर अधिष्ठित करावयाचें तो रक्तरंग सर्वांच्या खाली योजला असून तो बलसामर्थ्य यांचा निदर्शक आहे.

वंदे मातरम् नि मुसलमान

वंदेमातरम् या पदास मुसलमानांकडून आक्षेप आल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरू यांनी कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांना दुसरें पद तयार करावयास सांगितलें असें मी वाचलें आहे. पण त्या दुसऱ्या पदानेही मुसलमानांचें समाधान होणार नाही. कारण टागोर हिंदु संस्कृतीचे असल्यामुळें त्यांनी दुसरें कोणतेंही गीत केलें तरी त्यात संस्कृत शब्द येणारच, आणि तें मुसलमानांना कसें पटणार ? कारण मुसलमानांना संस्कृत शब्दांचें भयंकर वावडें. त्यांना संस्कृत मान्य नाही, अुर्दू शब्द हवेत. क्रांति नको तर 'अिन्किलाव' हवें, अितका संस्कृतचा द्वेष करणाऱ्यांचें नव्या राष्ट्रगीताने समाधान होणार नाही. पं. नेहरू यांना मुसलमानांना पटेल असें पद हवें असल्यास त्यांनी तें मौलवी जाफर अल्लीखान, बॅ. जिना किंवा महंमद अिकबाल यांना सांगावें.

प्रामाणिकपणालाही बळाची जोड हवी

देशात अेकी नांदावी, सर्व काही समेटाच्या धोरणाने व्हावें अशी पं. जवाहरलाल नेहरू नि महात्मा गांधी यांची प्रामाणिक अिच्छा आहे. परंतु हें जग प्रामाणिक नाही त्याला ते तरी काय करणार ? हें जग प्रामाणिकपणावर-सत्यावर किंवा न्यायावर अधिष्ठित आहे असें म्हणणें चूक आहे. आपल्या प्रामाणिकपणाचाही अुपयोग होअील; पण तो केव्हा ? तर दुसऱ्यास प्रामाणिक बनविण्याअितका आपला प्रामाणिकपणा बलवान् असेल तेव्हाच. या प्रकरणात तडजोड झाली तर आनंदच आहे; पण तसा संभव नाही. जों जों तडजोडीच्या मागे लागावें तों तों ती दूर पळत असते. तडजोड ही लक्ष्मीसारखी आहे. तिला लाथ मारणाऱ्या विष्णूचे ती पाय चुरीत बसते; ख्रिश्चन किंवा पारशी यांचा या ध्वजास विरोध नाही नि वंदे मातरम् या गीतासही नाही. मादाम कामा या पारशी स्त्रीनेच परदेशात वंदे मातरम्चा पहिला अुच्चार केला. पारशी किंवा ख्रिस्ती हिंदूंजवळ तडजोड मागत नाहीत. हिंदु संस्कृतीशी त्यांचा मुसलमानांअितका विरोध नाही. धार्मिक मतें निराळीं असल्यामुळे ते आपल्या परमेश्वरास स्वतंत्र रीत्या पुजीत असले तरी हिंदु संस्कृतिनिदर्शक वस्तूस त्यांचा विरोध नाही.

तडजोडीचे दोन मार्ग

मुसलमानांशी तडजोड होण्याचे मार्ग दोनच आहेत. अेक तर ते म्हणतात त्याप्रमाणे आपलें सर्वस्व सोडून पूर्णत्वाने त्याच्यात सामील व्हावें; किंवा त्यांची

कोणतीही पर्वा न करता बरोबर आल्यास त्यांच्यासह, न आल्यास त्यांच्याशिवाय, स्वातंत्र्याचा लढा स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत पुढे रेटीत नेणें. आजपर्यंतच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात जास्तीत जास्त भाग हिंदूंनीच अुचलला आहे. तेव्हा तडजोडीची अिच्छा कितीही प्रामाणिक असली तरी तशी परिस्थिति नाही. परिस्थितीकडे कानाडोळा करून नुसत्या अिच्छेने कार्यभाग होत नाही. कित्येक वेळा खडकावर बांधलेल्या दगडी किल्ल्यापेक्षा हवेवर बांधलेले किल्ले जास्त भरभक्कम ठरतात, हें या ध्वजाच्या आगमनावरून दिसून येतें. आम्ही ज्या वेळी अिंडिया हाअुसमध्ये बसून या ध्वजाविषयी कल्पना बांधीत होतो तेव्हा आम्हांपैकी कोणाला कल्पनाही नव्हती की, पेशव्यांच्या पुण्यात हा झेंडा मोठ्या सन्मानाने नेला जाअील व तेथे त्याच्याखाली शेकडो स्वातंत्र्यवीर गोळा होतील. केवळ त्या वेळच्या मनोराज्यांतील त्या कल्पना होत्या.

ध्वजाचा जयजयकार

हें फडकें तीस वर्षांनी परत येथे आलें; पण तें तयार करणारीं माणसें मात्र परत येअू शकलीं नाहीत. मादाम कामा या नेमस्त पक्ष सोडून पुढे आम्हा क्रांतिकारकांत समाविष्ट झाल्या; त्या वेळी जर्मनीमध्ये आंतरराष्ट्रीय समाजवाद्यांचें अेक संमेलन भरावयाचें होतें. आम्ही अिंग्रजांचे शत्रु म्हणून आम्हांलाही त्या संमेलनाचें निमंत्रण आलें. प्रत्येकाने आपल्या राष्ट्राचें निशाण आणावें असें तारेने कळविण्यात आलें. तेव्हा आमचे मित्र श्री. हेमचंद्र दास यांनी रात्रभर जागून हें निशाण शिवून तयार केलें. मादाम कामा यांनी आपल्या पोलक्यात लपवून तें जर्मनीत नेलें व बर्लिन येथील प्रचंड जनसमुदायापुढें भाषण करून वंदेमातरम्‌च्या गर्जनेत हा ध्वज फडकाविला. त्या वेळी त्या म्हणाल्या 'स्वतंत्र हिंदुस्थानचा हा ध्वज आताच जन्माला येत आहे, याला वंदन करा.' त्याप्रमाणे तेथील जर्मनांनी 'वंदे मातरम्' असें म्हणून या ध्वजाला अभिवादन केलें आणि जर्मन राष्ट्राच्या वँडनेही सलामी दिली. तेव्हापासून अभिनव भारत संस्थेचा हाच ध्वज झाला.

भर दिवसा सूर्यप्रकाश असतो, परंतु अमावास्येच्या काळ्याकभिन्न रात्रीच्या अंधारात जेव्हा पाताळातील सूर्य प्रकाश पाठविण्यास असमर्थ असतो, अशा वेळी प्रकाश देणारा अेखादा क्षुद्र काजवाही बहुमोलाचा ठरतो; त्याचप्रमाणे हिंदुस्थानच्या त्या अंधकारमय परिस्थितीत हा ध्वज आम्हांला अंधाऱ्या रात्री चमकणाऱ्या चांदणीप्रमाणे आशादाता झाला होता. न फाशीला भिता, न अंदमानला भिता, आपला जीवनत्याग करण्याची तयारी ठेवून ज्यांनी हा ध्वज तेजरूप ठेविला, त्यांचे आपण सर्व ऋणी आहोत. त्यांच्यापैकी बॅ. राणा व श्री. वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय (सौ. सरोजिनी नायडूंचे बंधु) हे अद्यापि परदेशात

अडकून पडले आहेत. त्यांना स्वदेशी परत आणण्याची चळवळ करण्यास हीच योग्य वेळ आहे.

दुर्लक्षित देशसेविका

शामजी कृष्णवर्मा तर दिवंगत झाले, मादाम कामा या आपला देह ठेवण्यास येथे आल्या व अगदी दुर्लक्षित स्थितीत मरण पावल्या. क्षयाने आजारी असलेल्या कमला नेहरूंची प्रकृति सुधारण्यासाठी देशात ठिकठिकाणी सार्वजनिक प्रार्थना झाल्या हें योग्यच झालें. परंतु ज्या मादाम कामांनी तीस वर्षांपूर्वीच्या अंधारमय परिस्थितीत पाश्चात्य देशांत आपल्या राष्ट्राचा ध्वज अुभारला, त्या मादाम कामांच्या शवावर मुंबअीमध्ये अेकही पुष्पहार अर्पण केला जाअू नये हें समजताच अुद्विग्नता येते. या थोर बाअीच्या स्मृतीस म्हणून मी या ध्वजापुढे हा पुष्पहार अर्पण करतो. पूज्य अवशेषांचें प्रदर्शन म्हणून हा ध्वज सदैव सुरक्षित केला जाअील हें ध्यानात ठेवा. याचा कोणत्याही ध्वजाशी विरोध नाही.

आतापर्यंत मी सांगितलेला तो सर्व घडलेल्या गोष्टींचा अितिहास आहे. पण आजची परिस्थिति लक्षात घेअून त्या परिस्थितीशीं ज्याचा समन्वय होअील तेंच करा.

ध्वजाला काठी मिळवा

आज विधिमंडळें आपलीं आहेत; तोपर्यंत हत्यारांचा कायदा नष्ट करून घ्या निदान अिंग्लंडमध्ये ज्या अटींवर हत्यारें वाळगता येतात तेवढी तरी सवलत मिळविण्याची चळवळ करा. सध्या तशी चळवळ अगदी कायदेशीर पद्धतीने करता येण्यासारखी आहे. हा ध्वज येथे आला पण त्यास काठी नाही. ती काठी आपली शक्ति वाढवून मिळवून द्या म्हणजे तो अुंच अुच जाअून मोठ्या डौलाने फडकेल.

हा ध्वज पुनः पाहण्यास मी जिवंत राहिलो याबद्दल मी माझ्या दैवाचे आभार मानतो. मला पूर्ण आशा आहे की, हिंदुस्थान हिंदु-स्थानच राहणार व स्वतंत्र हिंदुस्थानचें राष्ट्रगीत 'वंदेमातरम्' हेंच कायम राहणार.

मराठा ग्रंथ [illegible]
अनुक्रम 38९७६ वि. निरंक
क्रमांक 9५९९ नोंद दि: 23/11/८५

१४. हिंदु सभेने काय केलें ?

पुणें येथे टिळकस्मारक मंदिराच्या आवारातील मंडपात दि. ३०–४–३८ रोजी स्वा. सावरकर यांचें 'हिंदुमहासभेने काय केलें ?' या विषयावर झालेलें भाषण.

मनोवृत्ति बदलली

हिंदुमहासभेने काय काय केलें असा प्रश्न नेहमी विचारण्यात येतो. राष्ट्रीय सभा स्थापन झाल्यापासून चाळीच वर्षें तिने, प्रथम चूल चांगली तापली म्हणजे ज्याप्रमाणे तिजवर जिन्नस शिजतो त्याप्रमाणे ४० वर्षें, तिने देशात अेक वृत्ति निर्माण केली व नंतर पुढील वर्षांत प्रत्यक्ष कार्याला प्रारंभ केला.

हिंदुमहासभा स्थापन झाल्यास वीस वर्षें झालीं. परंतु अितक्या अल्पावधीत तिने जें कार्य केलें तें राष्ट्रीय सभेला पन्नास वर्षांतही करता आलेलें नाही. जनतेची मनोवृत्ति वदलून त्या जागी ध्येयाची तळमळ अुत्पन्न करणें हें कार्य हिंदुसभेने केलेलें आहे. आणि ज्यांनी हें कार्य केलें त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वजनांकडून अपमान सोसून तें केलेलें आहे. त्यांनी आपल्या ध्येयास तोंड पाडलें व हिंदुत्वाचें कार्य पुढे रेटीत नेलें.

टोपी बदलली पण डोकें ?

आज राष्ट्रीय सभेत गेल्याने ज्यांचीं तोंडें बंद झालीं आहेत अशा कित्येकांना गांधींनी जिनांकडे जावें हा अपमान वाटला, म्हणून त्यांनी माझ्या घरी खेटे घालण्यास सुरवात केली. ४०–५० मोठे मोठे राष्ट्रीयसभेवाले मजकडे आले व या प्रकारास मी काही तरी आळा घालावा अशी विनवणी केली. मी जिनांकडे वा गांधींकडे यासंबंधाने कधीच जाणार नाही व बोलावल्याखेरीज तर नाहीच नाही असा माझा आग्रह. तिन्हाअीत ठिकाणी दोघांनीही भेटावें असें माझें मत आहे. परंतु माझ्यावरोबर तुमच्यापैकी कोणी आलें पाहिजे, असें म्हणताच 'कृपा करून तेवढें बोलू नका' आमचीं तोंडें वांधलीं गेलीं आहेत' असे अुद्गार त्यांनी काढले. यावरून टोपी वदलली तरी डोकीं वदललीं नाहीत अशी माझी खात्री पटली. अण्णाराव भोपटकर आले तर चालतील असेंही त्यांनी सुचविलें. तेव्हा मी म्हणालो 'आम्ही तुमच्यात अेकरूप झालो नाही म्हणून तुमच्या लज्जारक्षणार्थ दोघे तरी तुम्हांस दिसत आहोत. तुमच्यात मिसळलो असतो तर आमचीही तुमच्याचप्रमाणे स्थिति झाली नसती काय ?'

दु:खास वाचा फोडली

हिंदुत्वाचा अभिमान, जागृति कायम राखिली हें मोठें कार्य हिंदुसभेने केलेलें आहे. दुसरी अेक मोठी गोष्ट हिंदुसभेने केली. हिंदूंच्या दु:खांना तिने वाचा फोडली.

राष्ट्रीयत्वाच्या नांवाखाली राष्ट्रीय सभेने हिंदुत्वाची गळचेपी चालविली आहे तिची पक्कड हिंदुसभेने ढिली केली. सीमा प्रांतापासून कन्याकुमारीपर्यंत मुसलमानी आक्रमणें व अन्याय हिंदूंवर होत आले ते राष्ट्रीय सभेकडून छपविले जात, ते हिंदुसभेने चव्हाठ्यावर आणले. हिंदु सभा नसती तर विधर्मीयांच्या आक्रमणास वाचाच फुटती ना ! तुमच्या दुःखाने रडणारी अेक तरी संस्था या देशात आहे व ती आपल्या परीने कार्य करीत असता तिने काय केलें असा प्रश्न विचारणें हें कृतघ्नपणाचें आहे.

सीमाप्रांतात काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने अेका गुन्हेगाराला, ज्याला हायकोर्टाने शिक्षा केली त्याला, पारितोषिक देअून मुक्त केलें. ज्या सीमाप्रांतात हिंदु मुलें व मुली बाजारात १०–२० रुपयांस गुलामाप्रमाणे विकलीं जातात तेथे हा प्रकार घडला. या दुष्कृत्यास वाचा कोणी फोडली ? हिंदुमहासभेने ना ? मध्यप्रांतातील शरीफ प्रकरण घ्या. मुंबअीचे सटोडिया प्रकरण घ्या; यांना वाचा फोडणारे हिंदु सभेशिवाय कोण आहेत ?

काश्मीरमध्ये शे. ९० मुसलमान आहेत. तेव्हा पं. जवाहरलाल म्हणतात, बाकीच्या हिंदूंनीही मुसलमान व्हावें. गांधी म्हणतात, बहुसंख्य जर मुसलमान आहेत तर राज्ययंत्र त्यांनाच देणें अिष्ट. पण हाच नियम हैद्राबादला मात्र ते लागू करू अिच्छीत नाहीत ! या घातुक वृत्तीला आळा घातला असेल तर हिंदुसभेखेरीज कोणी घातला ?

राष्ट्रीय सभेची अशी स्थिति झाली आहे. राष्ट्रीय सभा आपणांस हिंदूंची प्रतिनिधीभूत संस्था म्हणून जिनांशी वाटाघाट करण्यास जात आहे. याचा अर्थ अेक तर राष्ट्रीय सभा पूर्ण राष्ट्रीय नव्हे असा होतो, नाही तर ज्या राष्ट्रीय सभेत हिंदु मुसलमान सर्वच असणार असा समज, त्या सभेने अेका जातीय संस्थेशी वाटाघाट करण्यास कां जावें ?

काँग्रेसवाल्यांना आव्हान

वरें, निवडणुकीच्या वेळी आम्ही हिंदु म्हणून आम्हांस मत द्या असें राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींनी न म्हणता आम्ही राष्ट्रीय म्हणून मत द्या अशी याचना केली व आता हिंदु म्हणून मुसलमानांची पायधरणी करू पाहतात, याचा अर्थ काय ? आम्ही जातीय निर्णयाला विरोध करू, आम्ही घटनाभंग करू अशी आश्वासनें दिलीं आणि आता त्यांचा चालला आहे भंग ! अशा स्थितीत प्रामाणिकपणा म्हणजे राजीनामा देअून त्यांनी कौन्सिलाबाहेर पडावें व असें आम्ही करणार असें सांगून पुन्हा निवडणुकीस अुभें राहावें !

राष्ट्रीय सभेचे अेक पुढारी पं. नेहरू प्रयागच्या दंग्यासंबंधाने म्हणतात, 'हं: ! त्यात काय विशेष; फक्त दोनच हिंदु मारले गेले, त्यात काय विशेष ?' जणू काय हे दोन हिंदु म्हणजे अुंदीरच; मेले काय आणि जगले काय !

मतें देताना चूक झाली

हिंदु सभेचे दोन पुढारी भाअी परमानंद व डॉ. मुंजे यांनी अत्यंत अपमान सोसून अुत्तर दक्षिण दिशांतून सभेचें अखंड कार्य चालविलें आहे. फाशीतून मुक्त झालेल्या लोकांनी फाशी जाणें वाअीट की चांगलें हें सांगावें ! या मोलाचीं माणसें काँग्रेस-पुढाऱ्यांचे थवेच्या थवे आज दिसतात त्यांत किती आहेत ? नाहीतच. तशी माणसें केवळ हिंदु सभेतच आहेत. आपण आपल्या मताचा नीट अुपयोग केला नाही. मुसलमानांनी केवळ कट्टया मुसलमानांस मतें दिलीं. तशीं हिंदूंनी दिलीं असतीं तर आज वेगळेंच रूप दृष्टीस पडलें असतें.

हिंदुसभेने शुद्धीकरणाची प्रचंड लाट अुत्पन्न करून विधर्मीयांच्या भ्रष्टीकरणास आळा घातला ही गोष्ट हिंदु सभेने काय केलें याचीच निदर्शक नव्हे काय ? असें असता हिंदुसभेने काय केलें असा प्रश्न विचारणारास मी असें विचारतों की, हिंदु सभा कोणाची आहे ? ती सर्वांची आहे. प्रश्न विचारून आपली निष्क्रियता का दाखविता ? ती आपली आहे असें म्हणा, तिचें बळ वाढवा म्हणजे हिंदूंचा हिंदुस्थान हें नांव सत्य होअील.

✦ ✦ ✦

१५. निजामाला पेशवाअीची आठवण

पुणें येथे दि. ११ ऑक्टोबर १९३८ रोजी शनिवारवाड्यापुढील पटांगणावर सेनापति बापट याचें व्याख्यान झालें. त्या वेळी स्वा. सावरकरांचें झालेलें अध्यक्षीय भाषण.

प्रतिकाराचे दोन मार्ग

हैद्राबाद येथे हिंदु नागरिकांवर जे अत्याचार होत आहेत, तेथे त्यांच्या स्वातंत्र्याच्या हक्कावर जे आघात होत आहेत, त्यांचा तेथे जो छळ होतो आहे त्याचा प्रतिकार करण्याचीं काही साधनें आपल्या हाती आहेत कीं काय हें पाहून त्यांचा अुपयोग आपल्या हैद्राबाद बंधूंच्या साहाय्याकडे कसा करता येअील याचा विचार से. बापट यांच्या बरोबर मी आताच खाजगी रीतीने केला. प्रतिकार करण्याचे दोन मार्ग असतात. अेक सशस्त्र प्रतिकाराचा व दुसरा निःशस्त्र प्रतिकाराचा. पैकी पहिला म्हणजे सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग सध्या तरी ठीक दिसत नाही. सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबणें हें पाप आहे असें मानणारा मी नाही व पापाच्या

भीतीने तो मी बाजूला करीत आहे असेंही नाही. असें असलें तरी तो मार्ग अवलंबणें हें आपल्या सध्याच्या स्थितीत झेपेल कीं नाही याचा विचार करावयास पाहिजे. आणि या दृष्टीने विचार करता हैद्राबादेस निःशस्त्र प्रतिकार म्हणजे सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारणें हें आज तरी योग्य ठरणार आहे. आजची सभा ही अनेक पक्षांतर्फे आहे असें मी मानतो. कारण हैद्राबादचा प्रश्न हा अेकाच पक्षाला वोचत आहे असें मुळीच नाही. महाराष्ट्रातील सर्व पक्षांनाच तो वोचतो आहे. कोणालाच तो सहन होत नाही. हैद्राबाद येथील अत्याचाराचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न हजारोंनी केला पाहिजे. अेकट्या दुकट्याने किंवा अेकट्या दुकट्या पक्षाने हैद्राबादेचा प्रश्न सुटणार नाही.

आता पुढाऱ्यांना त्रास देऊ नका

सेनापति वापट यांनी सत्याग्रहाच्या वाबतीत जो पुढाकार घेतला आहे तो त्यांच्या पदवीला शोभेसाच आहे. से. बापट यांनी प्रत्येक पक्षाचीं वेगवेगळीं पथकें असावींत ही जी अेक सूचना केली ती मलाही मान्य आहे. भागानगर अूर्फ हैद्राबाद येथील हिंदूंना आपणाप्रमाणेच नागरिक स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क मिळवून देणें हें महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. मग ती व्यक्ति कोणत्या अेका विशिष्ट पक्षाची असो वा नसो. काँग्रेस निष्ठावंतांनी, समाजवादी पक्षाच्या निष्ठावंतांनी हैद्राबाद सत्याग्रहात भाग घ्यावा. हैद्राबादच्याच प्रसंगी काय, पण पुढे अशा तऱ्हेचे दुसरे कसलेही प्रसंग आले, तरी त्या प्रसंगांना योग्य त्या प्रतिकाराने तोंड देण्याची तयारी प्रत्येकाने ठेवावयास पाहिजे. प्रत्येकाने आपल्या देशासाठी यथाशक्ति मेहनत घेतली पाहिजे. अुठल्या-सुटल्या साध्यासुध्या गोष्टीतही पुढाऱ्यांच्या मागे लागण्याची जुनी पद्धत आता तरुणांनी सोडली पाहिजे. जुन्या अनुभवी पुढाऱ्यांच्या अनुभवाचा अवश्य फायदा घ्यावा; पण ज्यांनी आपले देह देशकार्यार्थ तीन तीन चार चार तपें झिजवले, त्यांचीं मनें थकलीं नसलीं तरी, त्यांचे देह थकले आहेत हें लक्षात घेअून व त्यांच्या अनुभवांचा फायदा अधिक काळ आपणांस लाभावा म्हणूनही त्यांस त्रास देणें बरें नाही. आपण स्वतः काय काम करणार हें अगोदर मनाशी ठरवावें आणि मग आपल्या पुढाऱ्यांना विचारण्यास जावें. 'मी आहे अनुयायी, मी काय कार्य करणार ? आपण पुढारी. तेव्हा आपणच पुढाकार घेतला पाहिजे.' असें आता तरुण पिढीने म्हणू नये, नव्हे तसें म्हणण्याचा त्यांना अधिकारच नाही. ज्या देशभक्तांनी देशाकरिता देहदंड सोसले त्यांनी ते अुपकाराकरता सोसले नसले तरी ते त्यांचे आमच्यावर अुपकारच आहेत. हे त्यांचे अुपकार स्मरून व व्यक्ति-विषयक न्यायबुद्धि ठेवूनही त्यांना वेळोवेळां त्रास देणें बरें नाही.

हैद्राबाद प्रकरणीं अेकनिष्ठ व्हा

सेनापति वापट हे जसे हैद्राबादचा लढा लढण्यास कोणाचीही वाट न पाहता

मोठ्या धडाडीने अेकटे गेले तसेंच अितरांनीही करावयास पाहिजे. मी प्रास्ताविक भाषणात सांगितल्याप्रमाणे हैद्राबादचा प्रश्न हा प्रत्येकाने आपल्याला वोचणारा आहे असें मानलें पाहिजे व हजारोंनी या लढ्यात स्वयंस्फूर्तीने, अहमहमिकेने, भाग घेतला पाहिजे. पुष्कळजणांचीं मजकडे अशीं पत्रें आलीं आहेत की 'तुमची हिंदु-महासभा हैद्राबाद सत्याग्रहाच्या बावतीत काय करणार आहे?' अशी विचारणा करणाऱ्यांना हिंदुमहासभेची आताच कां आठवण झाली? ज्यांना काही करावयाचें नसतें त्यांना असले प्रश्न सुचतात. मी म्हणतो, हिंदुमहासभा हैद्रावाद सत्याग्रहाच्या बाबतीत काही करो किंवा न करो, पण त्याकरता तुम्ही आपलें कर्तव्य सोडण्याचें काय कारण?

संघटित दल तयार झाल्यावर मग त्यात सामील व्हावयाचें कीं नाही हें पाहू असें म्हणून वाट पाहण्यात अर्थ नाही. संघटित सैन्याने हल्ला केला तरच यश लाभतें, व्यक्तिशः केलेल्या चळवळीचा काहीच अुपयोग होत नाही असें समण्याचें मुळीच कारण नाही. ज्या क्रांतिकारकांनी स्वदेशाकरिता आपल्या देहाच्या आहुति दिल्या ते संघटनेकरता थोडेच थांबून राहिले होते? संघटनेची ते वाट वघत बसले अमते तर त्यांच्या हातून देशाची काहीच सेवा झाली नसती. तेव्हा सत्याग्रहदल स्थापन होअीपर्यंत थांवण्याची मुळीच गरज नाही. आर्यसमाजी, वर्णाश्रमी, हिंदुसभावाले, काँग्रेसवाले, समाजसत्तावादी, लोकँशाहीवाले व स्वतंत्र या सर्वांनी हैद्राबाद सत्याग्रहाच्या बाबतीत अेकाच भूमिकेवर यावयास पाहिजे

सत्याग्रहाची अेक योजना

आर्य समाज, हिंदु महासभा व लोकशाही पक्ष हे अेकच आहेत. अितरांनीही यांना येअून मिळावयास पाहिजे. से. बापट यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक पक्षाने आपापलें सत्याग्रहीदल जरी स्वतंत्रपणाने अुभें केलें तरी त्याचें कार्य अेकमेकांच्या आड मुळीच येअू नये. हैद्रावाद येथे सर्वांनाच बंदी आहे हें लक्षात घेअून प्रत्येकाने बंदी अुठविण्यासाठी सत्याग्रह करावा. आर्यसमाजाने सत्याग्रह करण्याचें निश्चित केलें आहे. आपण सर्वांनी त्यांना मदत केली पाहिजे. यापुढे अेक दिवस अखिल हिंदुस्थानभर हैद्रावाद दिन म्हणून पाळण्यात यावा. त्या दिवशी काळ्या निशाणांच्या मिरवणुकी काढाव्या व निषेधाच्या सभा भरवाव्या. प्रत्यक्ष सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी पंधरा दिवसांची निजामाला आगाअू सूचना द्यावी. या अवधीत जर संस्थानातील प्रजेला नागरिक स्वातंत्र्याचे हक्क निजामाने दिले नाहीत तर तेथे सत्याग्रह करण्याकरिता अेकामागोमाग अेक अशीं सत्याग्रही दलें पाठवावीं अशी योजना आहे.

से. बापटांच्या अुपऱ्याची लाज धरा

हैद्राबाद व पुणें यांचे संबंध आजकालचे नाहीत. हे संबंध पेशवाअीपासूनचे आहेत. पेशव्यांनी निजामाला अनेक वेळा दाती तृण धरून शरण यावयास लावलें

असल्यामुळे निजामाचें आपल्या पुण्यावर तेव्हापासून फार प्रेम (!) आहे. पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे हे अेकदा हैद्राबादेस निजामाच्या दरबारात पेशव्यांचें येणें वसूल करावयास गेले होते. त्या वेळी निजामाच्या वजिराने पेशव्यांच्या तसबिरी भर दरबारात आणून अपमान केला. हा अपमान गोविंदरावांच्या मनाला अतिशय झोंबला. तेथल्या तेथे, 'तुमच्या वजिराला पुण्यास भीक मागायला लावीन' अशी प्रतिज्ञा करून त्यांनी आपल्या अंगावरचें अुपरणें तेथेच टाकलें व ते तडक पुण्यास निघून आले. ही हकीकत पेशव्यांना कळताच नाना फडणीस व सवाअी माधवराव यांनी लगेच सैन्य जमा केलें व हैद्रावादेवर चाल केली. निजामाला किल्ल्यात कोंडलें, दाती तृण धरून शरण आणलें व त्याच्याकडून आपलें येणें वसूल करून घेतलें. त्याच्या वजिराला पुण्यास आणलें आणि त्याच्या हातापायांत वेडया घालून त्याची गांवभर धिंड काढली. हा अैतिहासिक दाखला देण्याचें कारण असें की निजाम हा काही आकाशातून या लोकी आलेला नाही. आपल्या पूर्वजांनी त्याच्या पितरांना पाणी पाजलें आहे. पेशव्यांच्या वकिलाने जसें आपलें अुपरणें दरवारात टाकलें होतें, तसेंच से. बापट यांनी आज हैद्राबादेत जाअून आपलें अुपरणें तेथे टाकलें आहे असें समजा आणि आपल्या वांधवांवर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचा निश्चय करा. कमीत कमी सहा महिनेपर्यंत पंचवीस-पंचविसांची टोळी अखंडपणें सत्याग्रहाकरता हैद्राबादेत जात राहील अशी व्यवस्था करून ठेवा. निःशस्त्र प्रतिकाराचा प्रभाव तत्काळ दिसणार नाही; पण त्याचा परिणाम झाल्यावाचून व शेवटी येशःप्राप्ति झाल्यावाचून राहणार नाही हें पक्कें लक्षात ठेवा. प्रत्येकाने तन-मन धनद्वारा यथाशक्ति या लढ्यात भाग घ्यावा. ज्यांना यांपैकी काहीच करावयाचें नसेल त्यांनी या कार्यास निदान विरोध तरी करू नये; स्वस्थ बसावें.

✦ ✦ ✦

१६. रडगाणीं नव्हेत, रणगाणीं

श्री. ल. ब. भोपटकर हे हैद्राबाद-सत्याग्रहास निघाले त्यावेळी दादर येथे दि. २३-४-३९ रोजी भवानी शंकर रोडवरील ब्राह्मण सेवा मंडळाच्या जागेत त्यांस निरोप देण्याचा समारंभ झाला, त्यावेळी स्वा. सावरकर यांनी अध्यक्षपदावरून केलेलें भाषण.

हिंदूंची सभा म्हटली की त्याला ठराविक स्वरूप असावयाचें. त्यातील भाषणें ठराविक, वहुतेक सर्व रडगाणीं गाणारीं; पण आजची सभा मात्र अगदी वेगळ्या

स्वरूपाची आहे. आजची सभा नेहमीप्रमाणे रडगाणीं गाण्याकरिता नाही. रणगाण्यांचें संगीत म्हणणारी आहे आणि हे दिवस आता देवदयेने वारंवार अुगवतील यात शंका नाही. आज आपण ज्यांना निरोप देणार आहो ते अण्णाराव हे काही अेखाद्या परिषदेला जात नाहीत; हैद्राबादेस सुरू होणाऱ्या संग्रामात भाग घेण्याकरिता जात आहेत. ते अेकटेच जात नाहीत तर बरोबर दोन-अडीचशे निःशस्त्र प्रतिकारक घेअून जात आहेत. निजाम राज्यात गुंडांकरवी निःशस्त्र प्रतिकारकांना किती प्रकारे हाल सोसावे लागतात हें प्रसिद्ध आहे. असें असूनही हे सैनिक मोठ्या धडाडीने लढ्यात भाग घेण्यासाठी जात आहेत हें अुत्साहवर्धक चिन्ह आहे. महाराष्ट्रात जें नवें चैतन्य निर्माण झालें आहे त्याला अधिक चेतना मिळावी म्हणून वयाच्या ६० व्या वर्षी अण्णाराव भोपटकर हे स्वतः जात आहेत. त्यांच्यामागून या लढ्यात असंख्य मंडळींनी भाग घेतला पाहिजे.

नुसती ठिणगी

आपण आता शाब्दिक ठराव करण्याच्या चाकोरीतून दूर जाअून प्रत्यक्ष कृति करावयास लागलो आहो. हीच वृत्ति आपण अशीच आणखी पांच वर्षें रेटीत नेली व आपण आपली बुद्धि दुसऱ्या कोणाजवळ गहाण टाकली नाही, त्याचप्रमाणे आपण आपला झेंडा दुसऱ्याच्या हाती सुपूर्त केला नाही तर माझी खात्री आहे, जर्मनीने जशी पांच वर्षांत क्रांति करून सोडली तशी आपण आपल्या देशात क्रांति करून सोडू. गांधीजी ज्या वेळी 'अीश्वर राजाचें रक्षण करो' असें म्हणत होते त्या वेळी आम्ही पांचजणांनी स्वातंत्र्याची घोषणा केली व ती आज सर्व देशभर घुमू लागली आहे. हैद्राबाद येथील निःशस्त्र प्रतिकाराचा लढा ही नुसती अेक ठिणगी आहे. ही ठिणगी जर चेतली तर अुद्या तिच्यातून ज्वाला निघू लागतील व परवा भडका अुडाल्याशिवाय राहणार नाही आणि त्या वणव्यात हिंदुस्थानचें पारतंत्र्य जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही.

गांधीजींना अुत्तर

डॉ. मुंजे हे गांधीजींच्या बोलावण्यावरून त्यांना भेटावयास गेले. त्या वेळी गांधीजी मोठा आव आणून म्हणाले की 'हे पहा डॉक्टर! सत्याग्रह हें अेक शास्त्र आहे व त्याचा प्रणेता मी आहे. तें अितरांना साधेलच असें नाही.' हें त्यांचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच डॉ. मुंजे म्हणाले, "हें पाहा महात्माजी, हैद्राबादचा जो हा लढा सुरू करण्यात आला आहे तो सत्याग्रह नाही. तो निःशस्त्र प्रतिकाराचा लढा आहे." हें शास्त्र अेखाद्या सोम्या-गोम्याने काढलेलें नाही. हें शास्त्र भगवान् श्रीकृष्णाचें आहे, श्रीछत्रपति महाराजांचें आहे.' तुम्ही आम्हांला शास्त्र काय शिकवावें? 'देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा' ही घोषणा अखिल भारतवर्षांत

झाली. त्याचें दृश्य फलही आपणांस दिसू लागलें आहे. आता 'हिंदु तितका मिळवावा, हिंदुधर्म वाढवावा' ही घोषणा भारतवर्षात दुमदुमली पाहिजे. आपण आज शस्त्रहीन आहो म्हणून आपणांला निःशस्त्र प्रतिकार करावा लागत आहे.

पांच वर्षें लढा चालवा

नागपूरला दिलेलें वचन महाराष्ट्राने दोन हजार निःशस्त्र प्रतिकारक पाठवून पुरें केलें; पण अद्याप प्राप्त कर्तव्य पुरें झालेलें नाही. तरी पण पेशवाअी गेल्यापासून निजामाने 'अरे' म्हटल्याबरोबर त्याला 'कारे' म्हणून छातीठोकपणाने विचारणारे हिंदु त्याला आताच भेटले, हें सुचिन्ह आहे. लढ्याला आर्ज प्रत्यक्ष यश जरी लाभलें नाही तरी या लढ्यामुळे सर्व भारतातून खऱ्या हाडामांसाचे जातिवंत हिंदु अेका भगव्या झेंडयाखाली अेकत्र झाले. त्यांच्यामध्ये स्वतंत्रपणाने कार्य करण्याची वृत्ति निर्माण झाली हा फायदा काही लहान सहान नाही. आपण हा लढा याच अुत्साहाने आणखी पांच वर्षें टिकवाल तर अेकट्या निजाम राज्यातलेच काय पण अितरत्र सुरू असलेले जुलूम पार नाहीसे होतील, अितकेंच नव्हे तर हिंदु जनतेला स्वतंत्र स्थान मिळेल. मी श्री. भोपटकर यांचे व त्यांच्याबरोबर जाणाऱ्या निःशस्त्र प्रतिकारकांचें अभिनंदन करतो व त्यांना सुयश लाभो असें अिच्छतो.

✦ ✦ ✦

१७. टीकाकारांना अुत्तर

पुणें येथे ता. १३-५-३९ रोजी शनिवारवाड्यासमोरील बाजीराव पटांगणात स्वा. सावरकर यांचें 'भागानगरचा निःशस्त्र प्रतिकार' या विषयावर झालेलें भाषण.

निःशस्त्र प्रतिकाराचा प्रारंभ करताना मी येथे सुमारे सहा सात महिन्यांपूर्वी भाषण केलें होतें. दरम्यानच्या काळात या संग्रामाची फारच झपाटयाने प्रगति झाली आहे. या प्रसंगी येथे अुभा राहिलो असताना निःशस्त्र प्रतिकाराच्या लढ्यात भाग घेतल्याने जे धर्मबांधव या ठिकाणी अुपस्थित राहू शकले नाहीत, त्यांचें मला प्रथम स्मरण होतें. या अनुपस्थित वीरांत धर्मवीर अण्णाराव भोपटकर यांचा नामनिर्देश मी मोठया अभिमानाने करतो. ते येथे अुपस्थित असते तर आनंद

वाटलाच असता, पण आज ते येथे अुपस्थित नसल्याने मला अधिकच आनंद व अभिमान वाटत आहे. या चळवळीत धर्मवीर भोपटकर यांनी जितक्या जोराने खाली अुडी घेतली, तितक्याच जोराने प्रतिकाराच्या संग्रामाची लाट अुंच अुसळली आहे.

रडगाणें संपलें, रणगाणें सुरू झालें !

आज या ठिकाणी अुभा राहून मी निजामशाहीविरुद्ध काही कांगाळ्या सांगू अिच्छीत नाही. कारण त्याची जरुरीच नाही. तेथील हिंदु बांधवांच्या अडचणी, हालअपेष्टा यांची केविलवाणीं रडगाणीं मी सांगत नाही. आता हीं रडगाणीं संपलीं असून रणगाणीं सुरू झालीं आहेत. हिंदूंच्या अभ्युदयाच्या अुषःकालाची सुखद झुळूक आता सुटू लागली आहे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापासून परवापर्यंत आपण हिंदूंच्या छळाचीं तींच तीं रडगाणीं अेकसारखीं सांगत आलो आहोत. आपल्या सुदैवाने ते दिवस आता संपले आहेत. मी आता भागानगरातील हिंदूंचीं दुःखें सांगत बसत नाही. तर त्या दुःखांचा परिहार करण्यासाठी हिंदुसभेच्या विद्यमाने हिंदूंनी काय प्रयत्न केले ते सांगतो. निःशस्त्र प्रतिकार ही अेक आपल्या सामर्थ्याची कसोटी आहे. आज आपल्याला अशा तऱ्हेची लढाअी खेळता येअू लागली हें यावरून सिद्ध होअू लागलें आहे. या लढ्याविरुद्ध आपलेच काही बांधव व काही परके टीकाकार आक्षेप घेत असतात.

काश्मीर व हैद्राबाद

प्रथम हिंदुस्थानातील मुसलमान समाजाचें धोरण या बाबतीत कसें विसंगत आहे तें आपण पाहू. हैद्राबादेत राजा मुसलमान तर बहुसंख्य प्रजा हिंदु. याच्या अुलट काश्मीरात राजा हिंदु तर बहुसंख्य प्रजा मुसलमान. वास्तविक राजा व प्रजा यांच्या अन्योन्य-संबंधाला अेकच न्याय दोन्ही ठिकाणी लावावयास हवा. पण आपल्या मुसलमान बांधवांचें धोरण पहा. काश्मिरात मुसलमान प्रजा बहुसंख्य आहे म्हणून तेथील राजाला मर्यादित सत्ता असावी अशी मागणी ते करतात, पण हैद्रावादमधील हिंदूनी नेमकी तीच मागणी केली तर तेच मुसलमान विरोध करीत अुठतात ! काश्मिरात बहुसंख्य म्हणून मुसलमानांना हक्क हवेत. याच्या अुलट हैद्राबादेत स्वतः अल्पसंख्य असले तरी राजा त्यांच्या धर्माचा म्हणून वर्चस्व हवें. काश्मीरला प्रजेची भाषा अुर्दू, म्हणून तेथे राजभाषा अुर्दू असावी अशी मुसलमान मागणी करतात, त्याच्या अुलट हैद्राबादमध्ये प्रजेची भाषा अुर्दू नसतानाही राजाची भाषा अुर्दू म्हणून ती प्रजेवर लादावयाची त्यांची अिच्छा आहे. सोयीचें म्हणून काश्मीरमध्ये प्रजासत्तेची मागणी करावयाची, पण हैद्राबादमध्ये मात्र राजसत्तेचाच अुदोअुदो करावयाचा ! आणि आश्चर्याची गोष्ट ही की, राष्ट्रीयत्वाच्या वृथा

वलगना करणारे काँग्रेसचे नेते काश्मीरच्या चळवळीला आशीर्वाद पाठवितात नि हैद्रावादच्या लढ्याला मात्र शिव्याशाप देत सुटतात. संस्थानातील प्रजेचा अुद्धार करावयाचा आहे ना? मग त्यात भेदाभेद कां करता? हिंदु राजा असलेल्या संस्थानातदेखील प्रजेवरील अन्याय हिंदुमहासभा सहन करणार नाही.

राजकोटच कां?

संस्थानी लढाच चालू करावयाचा तर गांधीजींनी सर्वांत मोठें संस्थान कां शोधू नये? राजकोटमध्येच असें काय विशेष आहे? कुठे राजकोट नि कुठे हैद्राबाद लोकसंख्येच्या प्रमाणात दोघांची तुलनाच होअू शकत नाही. राजकोटमध्येही प्रजेला त्रास होत असेल; पण हैद्रावादमध्ये चालू असलेल्या छळाच्या पासंगालाही तो पुरणार नाही. राजकोटमध्ये आपले वाडवडील नांदले असें गांधीजी सांगतात. पण या निजामी राज्यात आमच्या वडिलांचे वडील नांदत होते हें त्यांनी कां विसरावें? निजामी मुलूख ही आमची पितृभू वा पुण्यभू आहे; मग त्यासाठी लढण्याचा तुमच्याप्रमाणेच आम्हांला हक्क कां नसावा? हैद्राबाद संस्थान सर्वांत मोठें हें मी सांगितलेंच; पण सर्व संस्थानांत अत्यंत वाअीट संस्थान कोणतें असेल तर तें हैद्राबाद! स्वच्छता करावयाची तर सर्वांत गलिच्छ असेल तो भाग प्रथम सुधारावा! राजकोट तुम्हांला तुमचें माहेर वाटतें, तसें हैद्राबाद हें आमचें माहेर आहे. हैद्राबादपेक्षा राजकोट निवडण्याचें अेखादें तरी विशेष कारण आहे असें आपण बुद्धित्वाची कसोटी लावून दाखवाल का? 'आतल्या आवाजाची' मात्र गोष्ट निराळी! याही अुप्पर तुम्हांला मदत करावयाची नसेल तर करू नका. नुसती सदिच्छा दाखवा, किंवा तीही दाखवू नका. आम्ही तुमच्यापासून कशाचीच अपेक्षा करीत नाही. पण निदान विनाकारण शिव्याशाप देअून नि बोटें मोडून आपलें हंसें तरी करून घेअू नका! तुमचा हा विरोध पाहून हैद्राबादचा राजा मुसलमान आहे म्हणून तुम्ही हें धोरण स्वीकारीत आहा असें आम्ही स्पष्टच म्हणतो.

'परक्यांकरिता सहानुभूति कां'?

हैद्राबादच्या लढ्यात संस्थानाबाहेरचे हिंदु लोक भाग घेतात असा आक्षेप आणला जातो. हा आक्षेप काँग्रेसमधील काही पुढारी व त्यांचे नूतन मित्र अँग्लो-अिंडियन वृत्तपत्रकार पुढें मांडू लागले म्हणजे मला हसू येतें. सगळ्या जगाला सहानुभूतीच्या अश्रूंचीं पार्सलें धाडणाऱ्या लोकांनी असले आक्षेप पुढे आणावेत हें आश्चर्य आहे! चीनमध्ये लढाअी झाली की तुमचीं औषधें जाअू शकतात. पॅलेस्टाअीनच्या अरबांसाठी तुमचें कोवळें अंतःकरण भडभडून येतें. झेकोस्लाव्हाकियाचा नाश झाला की तुमची झोप नाहीशी होते. स्पेनमधल्या लोकांना अन्न पोचविण्यासाठी हिंदुस्थानातून तुम्ही धान्याची बोट पाठवू शकता. त्या वेळी तुम्हांला

आपण बाहेर राहणारे लोक आहोत, आपल्याला ही मदत करण्याचा काय हक्क आहे ही शंका स्वप्नात देखील येत नाही. तुर्कस्थानच्या खिलाफतीची आफत डोक्यावर घेऊन साऱ्या हिंदुस्थानभर वेडयापिशांसारखे नाचत सुटला होतात ते काय खलिफा तुमचा सगासोयरा होता म्हणून? परके असूनही तुम्ही हे सारे अुद्योग सुखेनैव करू शकता. मात्र आम्ही हिंदु आमच्या हाडामांसाच्या, आमच्या दाराशी राहणाऱ्या धर्मबांधवांच्या मदतीला धावून जाअू लागलो की, तुम्हांला ही परके-पणाची सवव आठवते! असलीच टीका करणाऱ्या टाअिम्ससारख्या अँग्लो-अिंडियन टीकाकारांना मी अितकेंच सांगतो की, 'आपण या देशात वाहेरूनच आला आहा, आपण आपला गाशा आधी गुंडाळा व चालते व्हा; म्हणजे तुमच्या या तक्रारीकडे लक्ष देण्याचा मी विचार करीन.'

अेक 'पोरकट' आक्षेप

नि:शस्त्र प्रतिकाराच्या या लढ्यात लहान मुलें पाठविलीं जातात असा आक्षेप आहे. हा आरोप खोडसाळपणाचा आहे. लढ्याचे चालक लहान मुलांना या लढ्यात भाग घेण्यापासून अेकसारखे परावृत्तच करीत असतात. परंतु काही हट्टी पण निधडया छातीच्या मुलांपुढे आमचे सारे प्रयत्न वाया जातात. लहान अर्भकांनी रणसंग्रामात अुडी घेण्याची आम्हा हिंदूंची परंपरा फारच जुनी आहे. भारतीय युद्धात वीरमरण पत्करणारा अभिमन्यु नि पानपतच्या रणमैदानावर प्रचंड पराक्रम करीत पतन पावलेला विश्वास हीं दोनही लहान मुलेंच होतीं. ब्रिटन-सारख्या देशात असल्या हट्टी मुलांचें कोडकौतुक करण्यात आलें असतें, पण अिथे मात्र त्याच गोष्टीवर आक्षेप घेण्यात येत असतो. नि:शस्त्र प्रतिकाराच्या लढ्यात लहान मुलांनी भाग घेणें वाअीट हा नियम गांधीजींनी तरी स्वत: सुरू केलेल्या लढ्यात स्वत: कधी पाळला का? असहकारितेच्या चळवळीत शाळांवर वहिष्कार घालण्याच्या आरोळ्या ठोकीत अुठलात तेव्हा लहान मुलांच्याबद्दलची ही सारी माया कुठें आटून गेली होती? तसला अुपदेश करताना त्या मुलांच्या भवितव्याची तरी काळजी आपण कधी केलीत का?

सर्वत्र अेकच भावना

भागानगर नि:शस्त्र प्रतिकाराच्या संग्रामात प्रत्यक्ष यशापयश काय येअील तें निराळें; पण त्यापासून अेक महत्त्वाचा लाभ आजच आपल्या पदरात पडला आहे. पूर्वी सारा हिंदु समाज विस्कळीत झाला होता. या लढ्याची हाक कानी आल्यापासून सारा हिंदु समाज अेकत्रित होअू लागला आहे. भागानगरातील हिंदूंच्या दु:खाची कळ साऱ्या भारतवर्षातील हिंदूंना येअू लागली आहे. अेरव्ही कलकत्ता ते द्वारका नि लाहोर ते मद्रासपासूनचे हिंदु स्वयंसैनिक या लढ्यात भाग

घेते ना ! हिंदुसभेच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानातील सारेच प्रांत या लढ्यात सहभागी होत असले, तरी या लढ्याला द्रव्यबळ व मनुष्यबळ पुरविण्याचा मोठा वाटा महाराष्ट्रानेच अुचलला आहे. तसें करणें महाराष्ट्राचें कर्तव्यच होतें नि तें बजावल्याबद्दल मी महाराष्ट्राचें मनःपूर्वक अभिनंदन करतो.

✦ ✦ ✦

१८. काँग्रेसचा विपर्यस्त दृष्टिकोन

अुमरखेड येथे दि. ७ जून १९३९ रोजी सत्याग्रही जथ्यांना निरोप देताना स्वा. सावरकरांचें झालेलें भाषण

आमच्यांवर सारखें आक्रमण सुरू असून आम्ही गेलीं ८० वर्षें सारखे झुंजत आहोत. कधीही स्वस्थ बसलो नाही. पण यापूर्वीची झुंज व आजची झुंज यांत महदंतर आहे. आज आर्यसमाज व हिंदुमहासभा यांनी चालविलेली झुंज म्हणजे निःशस्त्र का होअीना पण प्रतिकार आहे; व तो आमचा जिवंतपणा दर्शवितो. आम्ही यापूर्वीपर्यंत पाश्चात्त्यांच्या तत्त्वज्ञानाने भलत्याच मार्गावर होतो. आम्ही अग्नीवर दगडविटांचे ढीग रचून तो विझविण्याचा प्रयत्न करीत होतो व हेंच आमचें राष्ट्रकार्य असें समजत होतो. आजही कित्येक हिंदूंना हिंदु म्हणवून घेण्यास लाज वाटते.

आज माझें स्वागत करताना कित्येक घरांवर, हातात नि हृदयात जो भगवा झेंडा फडकताना दिसत आहे तो फार दिवसांनी राजकीय चळवळीच्या निमित्ताने बाहेर पडतो आहे. वास्तविक आमचा हा भगवा ध्वजच खरा राष्ट्रीयत्वाचा निदर्शक आहे.

आमचा झेंडा

अेकी दाखविण्यासाठी तीनरंगी व चरखा असलेला नवीन झेंडा अुत्पन्न करण्याची जरुरी नाही. तसें करणें हीनपणाचें आहे. आपल्या झेंड्याला अितिहास आहे. भगवान् श्रीकृष्ण, श्रीशिवाजी महाराज, दयानंद आदींनी हाच झेंडा फडकविला होता. आम्हांला चरख्याचें चित्र काढण्याची जरुरी नाही. भगवान् श्रीकृष्णाचें सुदर्शन चक्र त्यावर पुराणकालापासून चितारलेलें आहे. शिवाय ॐकार तर वेदकालापासूनच त्यावर कोरून ठेवलेला आहे. असा हा आमचा ध्वज अैतिहासिक आहे.

यापूर्वी आम्ही या झेंडयाखाली जमत असू तें आमचें रडगाणें गाण्यासाठी– आमच्या बायका मुसलमानांनी पळविल्या, आमच्यावर हल्ले होतात, आमचीं देवळें फोडलीं जातात, म्हणून आता आम्हांला वलिदान करावयास पाहिजे असें बोलण्यास आम्ही जमत असू. पण आम्ही आज म्हणत आहोत की, आता नुसतें बलिदान नको आहे, नुसते हुतात्मे नको आहेत.

रक्तातून अुसळणारें 'वंदेमातरम्'

निजामाने अमुक अपराध केला म्हणून आम्ही प्रतिकार केला हें सांगण्यासाठी आम्ही जमलो आहोत. आम्ही प्रतिकार करीत आहोत. पूर्वीही मराठ्यांनी असाच प्रतिकार केला होता. फरक अेवढाच की, तो सशस्त्र प्रतिकार होता तर हा निःशस्त्र आहे. गुरु गोविंदसिंगाचे दहा शिष्य मेले तर आज निझामच्या तुरुंगात १०००० प्रतिकारक आहेत. त्यांना वंदेमातरम् म्हटल्यावरोबर फटके मिळतात. पण त्याला न भिता प्रत्युत्तर म्हणून तो पुन्हा वंदेमातरम् म्हणतो. प्रत्येक फटक्याबरोवर अेक अेक रक्ताची चिळकांडी अुडते. अेकेका चिळकांडीवरोवर 'वंदे मातरम्!' 'वंदे मातरम्!' असा जयघोष तो करतो, १-२-२५ मोजत वसत नाही. फटकेच काय पण आमचे हातपाय तोडले तरी आम्ही माघार घेणार नाही हें आता सिद्ध झालें आहे. प्रतिकारापूर्वी संस्थानात अुघडपणे 'वंदे मातरम्' म्हणण्यास चोरी असे. आज त्या संस्थानातील तुरुंगातसुद्धा रोज वंदे मातरम्चा जयघोष अैकू येत आहे. संस्थानात पूर्वी पडलेलीं देवळें दुरुस्त करावयास परवानगी नसे. आज श्री. भोपटकरांनी तुरुंगातील मुसलमानांस जर नमाज पढावयास मशीद मिळते, तर हिंदूंस देअूळ असलेंच पाहिजे असें म्हणून आज औरंगावाद-तुरुंगात मारुतीच्या मूर्तीची स्थापना केली आहे. हा आमचा अपूर्व विजय आहे.

नवीन जागृति

सोलापुरात आर्यांनी व नागपुरात हिंदूंनी हैद्राबादच्या निःशस्त्र प्रतिकाराचे ठराव केले; परंतु त्या वेळेस वाटे की, गेल्या ८० वर्षांत ज्या आम्ही प्रतिकार म्हणून कधीच केला नाही त्यांचें कसें होअील? आम्ही प्रतिकार कसे करू शकू? पण आज हिंदु समाजात जागृति झाली आहे. पंजाव, सीमाप्रांत, युक्तप्रांत, बंगाल यांसारख्या दूरदूर प्रदेशातून येणारे प्रतिकारक पाहून कोण म्हणू शकेल की आम्ही विस्कळीत आहोत? या प्रतिकारात हिंदु आहेत, जैन आहेत, सनातनी आहेत सर्व लोक आहेत. आमच्यांत मतभेद असले तरी ते आम्ही प्रसंगविशेषी विसरून जातो हें आम्ही दाखवून दिलें आहे.

राजकारणातही आम्ही पुढेच!

काँग्रेसवाले हिंदुमहासभावाल्यांस म्हणतात की, 'की तुम्ही जातीय आहात,

राजकीय चळवळीत भाग घेत नाही.' पण त्यांना मी या सभेतलेंच अुदाहरण देतो. आजच्या प्रतिकाराचे पुढारी श्री. विष्णुशास्त्री केळकर आहेत. यांना 'अभिनव भारता'चे वेळी सशस्त्र क्रांति करण्याच्या आरोपावरून ५ वर्षांची शिक्षा देण्यात आली होती. असे कितीअेक क्रांतिवादी हिंदुमहासभेत आहेत हें काँग्रेसवाल्यांनी ओळखून असावें.

मुसलमान राजा असलेल्या संस्थानात जेवढी दडपशाही, अत्याचार होतात तेवढी अितर कोठेही होत नाही. असें असून काँग्रेसवाल्यांकडून मात्र त्यास 'राम-राज्य' म्हणून प्रशस्तिपत्रक देण्यात येतें. राजकोटसारख्या लहान व हिंदु संस्थानिकावर हात टाकून त्याला भीति घालण्याचा काँग्रेसचा डाव आहे. वास्तविक पाहता राजकोटला 'अखिल भारतीय प्रश्न' करण्याचें कारण काय? काय तेथे मुसलमानांच्या मुली पळविल्या जातात? का मशिदी बांधून देत नाहीत? का मुसलमानांच्या शाळा बंद केल्या आहेत? का आणखी काही विशेष जुलूम करण्यात येत आहे? असें काही नसताना हैद्राबाद, भोपाळसारख्या जुलुमी संस्थानांना सोडून गरीब हिंदु संस्थानिकांच्या मागे लागण्याचें कारण हेंच की, काँग्रेसला मुसलमानांची भीति वाटते.

आमची पुण्यभू

हैद्राबादचा लढा जातीय असून तो बाहेरच्या लोकांनी चालविला आहे असा आमच्यावर नेहमी आरोप करण्यात येतो. गांधीजी राजकोटमध्ये जाण्याचें कारण काय? तर त्यांचे 'नाना' राजकोटचे रहिवासी होते. मग त्यांना हें माहीत नाही काय की, आमचेही नानाचे नाना रामराय हरिहरराय बुक्क यांचीं हाडें याच जमिनीत आहेत. श्रीज्ञानेश्वर, अेकनाथ याच भूमीत नांदले, गोविंदसिंगाची समाधि येथेच आहे, आमचीं तीर्थें, आमच्या आयाबहिणी येथे आहेत. या सर्वांवर हल्ले करण्यात आले, जबरदस्ती झाली, नि आम्ही त्यांच्या मदतीकरिता गेलो तर काय परके झालो?

अेक न्याय पाळा

काश्मीरला शे. २० हिंदु असून राजाही हिंदुच आहे. मुसलमान जास्त म्हणून मुसलमान अुर्दू भाषा हीच राजभाषा व्हावी असें म्हणतात नि राजास Limited monarchy देअून नुसतें पेन्शन घ्या म्हणतात आणि संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मागतात. या चळवळीस पं. जवाहरलाल वगैरे लोक पाठिंबा देतात. अुलट हैद्राबाद संस्थानात मुसलमान शे. २० नि राजा मुसलमान आहे. तरी तेथे अुर्दू भाषा राजभाषा आहे. तेथील मुसलमानांसच बहुतेक मोठ्या नोकऱ्या मिळतात, हिंदूंना बिलकूल प्रतिनिधित्व मिळत नाही म्हणून तक्रार केली तर आम्ही जातीय ठरतो.

आमच्या काँग्रेसच्या पुढाऱ्यांना अबिसिनिया अिटलीने घेतला म्हणून, चीनवर हल्ले होतात म्हणून पुळका येअून ते त्यांस संदेश पाठवितात, पैसे पाठवितात, कवींद्र टागोर स्पेनला कवनें पाठवितात, परंतु अिकडे घरात चाललेला धुडगूस मात्र त्यांना दिसत नाही. हैद्राबाद सत्याग्रहात १० मृत्यु झाले. याविषयी अेकानेही अेक ओळ लिहिली नाही. प्रतिकारासाठी अेकट्या महाराष्ट्राने ५,००० सैनिक पुरविले असून ४५,००० रु. खर्च निव्वळ रेल्वे भाड्यासाठी केला आहे. अेकटी महासभा हा प्रतिकार कमीत कमी सहा महिने चालविण्यास समर्थ आहे.

दोघांशीही टक्कर देअू

काही दिवसांपूर्वी गांधी, हैदरी व व्हाअिसरॉय यांची मुलाखत झाली असता हैदरींनी ब्रिटिश हद्दीतील शिबिरें नि खालसातील हैद्राबादविषयक चळवळी बंद करण्यासाठी Princes Protection Act लावा अशी व्हाअिसरॉयसाहेबांना विनंति केली. त्यावर त्यांनी सांगितलें की, तो जर हैद्राबाद सत्याग्रहाला लागू केला तर अितरत्र ज्या संस्थानविषयक चळवळी सुरू आहेत त्यांनाही तो लागू करावा लागेल. त्यावर गांधींनी असें आश्वासन दिलें की, बाकीच्या संस्थानांतील सत्याग्रह मी थांवविते. आणि त्याचा परिणाम असा झाला की, अितर सर्व संस्थानांतील सत्याग्रह थांबले. आम्हांला हें पूर्वीपासूनच माहीत होतें की प्रिन्सेस प्रोटेक्शन अॅक्ट लागणार नि त्या दृष्टीने आम्ही तयार आहोत. ब्रिटिशांना आम्ही सांगू अिच्छितो की, जशी आजपर्यंत आम्ही निझामाशी टक्कर दिली तशीच अुद्या तुमच्याशीही देअू.

✦ ✦ ✦

१९. सन १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध

पुणें येथील १९३८ च्या वसंत-व्याख्यान-मालेत दि. १ मे रोजी स्वा. सावरकर यांनीं १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धावर बोलताना केलेलें भाषण

सत्तावन सालच्या युद्धप्रसंगाकडे आपलें दुर्लक्ष होतें; त्याचें कारण अिंग्रजांचें राज्य अद्याप येथे चालू आहे हें होय. तें नष्ट झालें असतें व स्वातंत्र्य स्थापलें गेलें असतें, तर शिवाजी महाराजांप्रमाणेच त्या युद्धातील नानासाहेब पेशव्यांचा आपण अुत्सव केला असता, गौरव केला असता, पुतळाही उभारला असता ! आजच्या क्रांतिकारक स्वातंत्र्यभक्तांना ' अत्याचारी ' ' माथेफिरू 'अशीं दुरुत्तरें लावलीं जातात, तशींच विशेषणें सत्तावनच्या युद्धाला व त्यातील नेत्यांना

लावलीं जात. पारतंत्र्याचा प्रभावच अितका जाचक असतो की, आपल्या अुद्धारकर्त्यांचा मोठेपणाही सर्वांना गाता येत नाही. कै. विनायक कोंडदेव ओक यांचें ' शिपायांचें बंड ' मी वयाच्या १२ व्या वर्षी वाचलें होतें. त्यात त्या नेत्यांची अितकी निंदा केलेली आढळली की, तशी अिंग्रज ग्रंथकारही करीत नाहीत ! कै. पारसनिसांनी ' झांशीच्या राणीचें चरित्र ' लिहिलें. त्यांतही ती स्वातंत्र्यलक्ष्मी वळाने बंडवाली बनवली गेली असें त्यांना, त्या वेळच्या परिस्थितीमुळे दाखवावें लागलें. न्यायमंदिरामध्ये राजद्रोहाच्या खटल्यात आपलें भाषण वा लेख राजद्रोही नाहीच असें जसें मांडण्यात येतें नि तें जसें राजनीतीमध्ये युक्तच आहे; त्याप्रमाणे झाशीच्या राणीने वुद्धघा अिंग्रजांवर हत्यार अुगारलें नाही, आपलें राज्य गेल्यामुळे ती तरुण कोमल मुलगी तुळशीच्या पूजेला लागली होती, पण बंडवाल्यांच्या लाटेत ती सापडली अशी कैफियत पारसनिसांनी देणें त्या कालाला धरूनच होतें.

पुस्तकांवर पोलिसांचा छापा

प्रो. बेहरे यांचें अलीकडचें पुस्तक पुष्कळच सत्यकथन करणारें असलें, तरी त्यातही विसंगति, मुरड वगैरे प्रकार आहेतच. अुलटपक्षी कै. प्रो. शिवरामपंत परांजपे यांनी आपल्या ' काळ ' पत्रातून नानासाहेब, लक्ष्मीवाअीप्रभृति क्रांतिकारकांचें गुणवर्णन प्रसंगाप्रसंगाने चालू ठेवलें होतें. निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना तर नानासाहेबांबद्दल अितका जाज्वल्य अभिमान होता की, त्यांना पकडल्याची बातमी कानी येताच त्यांनी आपल्या घरी होणारा समारंभ बंद ठेवला ! नानासाहेबांची दहशत अिंग्रजांना अितकी वसली होती की, कुंभमेळ्यासारख्या यात्रेच्या ठिकाणी दर ५-१० वर्षांनी त्यांच्यासारख्या कोणातरी सज्जनाला पकडून ते फासावर चढवीत !

सत्तावनच्या प्रसंगाची खरीखुरी राष्ट्रीय भूमिका समजावून घ्यावी अशी मला फार दिवस अिच्छा होती, ती पुरी झाली. अिंग्लंडात गेल्यावर तेथील ' अिंडिया ऑफिसात ' अेक प्रशस्तिपत्र घेअून, अितिहासाचा अभ्यास करणारा म्हणून मी प्रवेश केला. तेथे केवळ ' १८५७ ' ही चिठ्ठी लावलेलीं अनेक कपाटें मला दिसलीं. त्यांत निदान ५०० तरी ग्रंथ असावे. अिंग्रज शिपायांनी लिहिलेल्या पत्रांपासून तों पार्लमेंटच्या दप्तरापर्यंत त्या विषयाचे कागदपत्र मला अपरंपार मिळाले. ते वाचण्यात मी पांचसहा महिने घालविले. तेथील टिपणें घेअून त्यांवर ' अभिनव भारता 'त मी चर्चा केली व पुस्तक लिहिलें. तें प्रथम लिहिलें मराठींत. त्याची प्रत माझे बंधु श्री. बाबाराव यांजकडे पाठविली. ती सोलापूरचे श्री. लिमये यांच्या छापखान्यात छापण्याचेंही ठरलें, पण पोलिसांचा छापा आला म्हणून ती प्रत परत अिंग्लंडास सुखरूप गेली ! तेथे मराठी छापखाना कसा मिळणार ?

म्हणून जर्मनीतील संस्कृत मुद्रणालयात ती छापण्यास दिली. पण तेथेही पोलिसांची छाया पडली ! म्हणून आज सिव्हिलियन असलेल्या दोघा तरुणांकडून त्या पुस्तकाचें अिंग्रजी भाषांतर करून घेतलें.

जगातील पहिल्या ' प्रतीचा ' अन्याय

प्रश्न पडला त्याचें नांव काय ठेवावें ? National Rising of 1857 हें समर्पक होतें. पण हिंदुस्थान, त्याचें स्वातंत्र्य व त्यासाठी युद्ध ही शब्दत्रयी अेकत्र आणावी या हेतूने अमेरिकेप्रमाणें War of Independence हें नाव दिलें तें पुस्तक आमच्या गुप्त मंडळीत वाचलें जात असता त्यातील अेक प्रकरण चोरीस गेलें. हे चोर कोण असतील हें अुघड आहे ! पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या आधीच अिंग्रज सरकारने तें जप्त केलें. या अन्यायाविरुद्ध ' लंडन टाअिम्स 'मध्ये मी पत्र लिहिलें. त्यावर टाअिम्सनेही असें छापलें की, ' ही गोष्ट सरकारला लांछनास्पद आहे ! असा अन्याय जगात पहिल्यानेच होत आहे ! ' तें पुस्तक छापण्यासाठी फ्रान्सकडे धाव घेतली. पण तेथेही अिंग्रजांचें दडपण आलें. तेव्हा हॉलंडमध्ये खूप पैसे खर्च करून तें छापलें. या अवाढव्य खर्चाचा वाटा श्री. दादाराव करंदीकर व श्री. दादाराव खापर्डे यांनी प्रेमाने अुचलला हें लक्षात ठेवा. माझ्या त्या अिंग्रजी पुस्तकाच्या प्रती अिंग्रजी नाटककादंबऱ्यांच्या पुठ्यांतून अिकडे पाठविण्यात आल्या. त्यांपैकी अेक प्रत डॉ. मुंजे यांच्या घरी गेली व तिच्या पाठो - पाठ गेला पोलिसही ! अमेरिका, जपान वगैरे देशांत त्या पुस्तकाचा प्रसार झाला. ब्राझिलमध्ये तर २०० रुपयांना अेक प्रत विकली गेली. ५७ साली बंदुकीच्या ज्या गोळ्या अुडाल्या त्यांचें वर्णन करणाऱ्या पुस्तकातून जे पैसे आले, ते अर्थात्‌च नव्या गोळ्या झाडण्याकडेच खर्च झाले ! अलीकडे भगतसिंगाने दोन भागांत तें जप्त पुस्तक प्रसिद्ध केलें व त्याची दुसरी आवृत्तिही निघाली. ५-५,१०-१०, रु.स त्या प्रती खपल्या असें ' आनंद मंडळाच्या ' खटल्यातच अुघडकीस आलें आहे.

बंड कोणाचें ?

अिंग्रज लोक सत्तावनच्या क्रांतियुद्धाला बंड म्हणतात हें स्वाभाविक आहे, जसें औरंगजेबाने शिवाजीच्या कार्यास म्हटलें. पण रामदास म्हणतात त्याप्रमाणे ' प्रस्तुत यवनांचें बंड ' हीच वस्तुस्थिति होय. बंड असलेंच तर पेशवाअी बुडवून येथे तख्त बळकावणाऱ्या अिंग्रजांचें होतें, हिंदी शिपायांचें नव्हतें. दहा लक्ष रुपये पेन्शन देअून बाजीरावाकडून जो संधि शस्त्राच्या बळावर अिंग्रजांनी करून घेतला, त्याच तहाच्या कागदाच्या मागील बाजूस, फार काय, दोन ओळींमधील अंतरांत, असें अलिखितपणें लिहिलेलें आहे की, पुनः शस्त्र मिळेल तेव्हा माझ्या देशाचें स्वातंत्र्य मी पुनः मिळवीनच मिळवीन. यांत अनैतिक काहीच

नाही. परराष्ट्राने आक्रमण केलें की, त्याच क्षणी परतंत्र राष्ट्र स्वातंत्र्ययुद्धास सदैव सज्जच असतें असें समजा. या युद्धास शिपायांचें बंड कसें म्हणता येअील? नानासाहेब काय शिपाअी होते की तात्या टोपे अिंग्रजांचे जमादार होते? या युद्धात दिल्लीचे बादशहाही सामील होते. सर्व राष्ट्राने अुभारलेलें स्वातंत्र्य-युद्ध तें होतें; किती तरी संस्थानिक या युद्धांत समाविष्ट होते.

सामुदायिक अुठावणीचा विवेक

डलहौसीने स्वत: म्हटल्याप्रमाणे, रोमन साम्राज्याअेवढा मुलूख ५-६ वर्षात खालसा करून टाकला. यामुळे तेथले संस्थानिक हळहळत व चडफडत होते. अिनामदारी व तालुकदारी जप्त झाली होती. नानासाहेब पेशवे यांचें अंत:करण तर असंतोषाने पेटलेलें असे. पण गनिमी कावा लढवून त्यांनी रेसिडेंटाशी गोडी-गुलाबीचें वर्तन ठेवलें. खाने, नाच यांची रेलचेल त्यांनी केली व त्यांचा विश्वास संपादन केला. रशियाशी अिंग्लंडचें युद्ध सुरू झालें होतें. ही संधि साधून त्यांनी अजीमुल्लाखान याला अिंग्लंडास पाठविला. तो फ्रान्समध्ये जाअून आला. रशियाशीही त्याने संधान बांधलें. सातारकरांतर्फे रंगो बापूजी विलायतेस गेला होताच. हरद्वारची यात्रा करण्याचे मिषाने नानासाहेब लखनौस गेले नि त्यांनी तेथील बेगमेशी सख्य केलें. सर्व हिंदुस्थानातील वारें लक्षात घेअून त्यांनी दि. ३१ मे हा दिवस सामुदायिक अुठावणीचा म्हणून ठरविला. गावोगांव 'चपात्या' पाठवून क्रांतिकारकांच्या शपथा घेतल्या गेल्या. बाजाराबाजारात, घाटाघाटावर यात्रायात्रामध्ये या युद्धाच्या वार्ता व बाटाघाटी यांचें वारें वाहू लागलें.

नानासाहेबांचा गनिमी कावा

अशा तयारीचे काळात मीरत येथे मंगल पांडे नांवाच्या क्रांतिकारकाचा रेसिडेंटाला संशय आला. लगेच त्याने त्याला अटक केली, पण पांड्याने सेनापतीस ठार केलें. त्याला ता. १० मे रोजी फाशी देण्यात आलें. ही ठिणगी पडताच युद्धाने अेकदम पेट घेतला. तोफा अिंग्रजांवर रोखल्या गेल्या. जय क्रांतिकारकांचा झाला! बँड वाजवीत व निशाण नाचवीत ते नानासाहेबांकडे गेले. प्रत्येक क्रांतिकारकाला अिंग्रज लेखक 'पांड्या' म्हणतो यावरून मंगल पांडे याची कामगिरी लक्षात आणा. नानासाहेबांनी रेसिडेंटास गनिमी काव्याने पत्र लिहिलें, 'तुम्ही मजवर पूर्ण विश्वास ठेवा. मी अेकनिष्ठेने साहाय्य करीन. तुमचीं बायकामुलें मजकडे रक्षणार्थ पाठवा. सर्वत्र माझे शिपाअी असू द्या.' रेसिडेंटाने तें सारें मान्य केलें; पण दारूगोळ्यावर अिंग्रज ठेवले. 'याने लोकांचा गैरसमज वाढतो' असें म्हणून तेथेही नासासाहेबांनी आपलेच सैनिक ठेवले; व शेवटी मध्यरात्री १२ वाजता धडाधड् तोफा डागल्या. 'शिपाअी आपले अैकत नाहीत' असें त्यांनी लिहिलें नि 'माझा प्राण वचावण्याचा अेकच मार्ग म्हणजे शिपायांचें पुढारीपण घेणें हाच आहे' असें कलकत्त्याच्या

साहेबासही कळविलें; पण शिंदे किंवा निजाम किंवा शीख याप्रमाणे ते अिंग्रजांच्या बाजूने लढले नाहीत; यावरून त्यांचें वृकयुद्ध किंवा गनिमी कावा दिसून येतो.

अिंग्रजांचे अत्याचार

क्रांतिकारकांची लाट जोराने पसरली. 'अुद्या चंबुगवाळें आटोपलें पाहिजे' असें अिंग्रज बोलू लागले. वारुळातून भराभर मुंग्या निघाव्या त्याप्रमाणे ठिकाणाहून स्वातंत्र्य-योद्धे निघाले. तात्या टोपे हा तर मांत्रिकाप्रमाणे जणू मातीतूनच सैन्य निर्माण करी. तो जिकडे जाअी तेथून दहा-दहा हजार सैन्य आणि तुरुंग मोकळे होत. अिंग्रजांना कापीत रक्ताचे पाट वाहवीत हे स्वातंत्र्य-योद्धे विजयाच्या मार्गाने लखनौ, दिल्ली, आग्रा वगैरे गावोगावी अुत्साहाने चालले. अिटाव्याचा कलेक्टर ह्यूम याला तर देवळात लपून, तोंडाला काळें फासून, स्त्रियांप्रमाणे बुरखा घेअून पळ काढावा लागला. याची भीति वसत्यामुळेच, त्याने ३० वर्षांनंतर हिंदुस्थानच्या असंतोषाचें रक्षणद्वार (Safety-valve) म्हणून काँग्रेस स्थापन केली. मद्रासच्या तिसऱ्या अधिवेशनात बिपिनचंद्र पाल यांनी हत्याराचा कायदा रद्द करण्याचा ठराव आणला असता त्याला विरोध या ह्यूमनेच केला! यावरून त्याचा डाव अुघडकीस येतो. कानपूर येथे तर तीन दिवस प्रळय झाला. बनारसला अिंग्रजांनी अमानुष कत्तल केली. झाडाझाडाला हिंदी लोकांना अुलटें-सुलटें टांगून फाशी दिलें. झोपड्याझोपड्यांना आगी लावून कच्चीबच्चीं व म्हातारीकोतारीं यांना जाळून टाकलें. तेव्हा नानासाहेब खवळले. वचनभंग करून बनारसला हिंदी लोकांची कत्तल अिंग्रजाने केली नि ब्राह्मणांना जिभेने जमिनीवरील रक्त चाटावयास लावलें हें कळताच गंगेच्या अर्घ्या पात्रात नावेत वसून जाणाऱ्या अिंग्रजांची अेकसहा कत्तल करण्याचा हुकूम तात्या टोपे याने घाटावर बसून शंख फुंकून दिला!

समर्थ भावना अुत्पन्न करा

तात्या टोपेचा पुतळा अजून आहे. त्याच्यावर मी फुलें अुधळलीं! कोणी म्हणतात, अिंग्रजांवर दया दाखवावयास हवी होती. मी त्यांना विचारतो, अिंग्रजांनी नानासाहेबांवर दया दाखविली? माझ्यावर दया दाखविली? कान्हेऱ्यावर दया दाखविली? नानासाहेबांनी नेपाळच्या राण्याला कळवळून पत्र लिहिलें. पण त्याने फक्त 'तुम्हांला वैयक्तिक साहाय्य करू' असें अुत्तर दिलें! तेथे नानासाहेब गेले, त्यांचा अंत केव्हा झाला हें अज्ञात आहे. खुद्द महाराष्ट्रात कोल्हापुरास ज्वाला भडकली. नरगुंदकरांच्या संस्थानातही तीच स्थिति झाली. डॉ. मुंजे यांची आअी 'बंडा'त होती. अिंग्रजांनी नर्मदेच्या तीरावर कडक बंदोवस्त ठेवला होता, तरी तात्या टोपे यांनी चार वेळा नर्मदा ओलांडली. महादजी शिंद्याने दिल्लीच्या

शहाला तीन पिढ्या पेन्शनर बनविला होता हें विसरू नका. पानिपत नि ठाणेश्वर यांची आठवण देणाऱ्या फझलूल हक्कला मी महादजीची आठवण देतो. युद्धात पळून आलेल्या सैनिकांचा नाक्यावर धिक्कार करून कानपूर येथे वेश्यांनीही या युद्धात भाग घेतला. आजही निराळ्या रीतीने आपल्याला स्वातंत्र्ययुद्ध खेळावयाचें आहे, लाक्षणिक अर्थाने कानपूर गाजवावयाचें आहे. अेकटे हिंदुही स्वराज्य मिळविनील ही समर्थ भावना अुत्पन्न करा म्हणजे मुसलमानांचें अैक्य घडण्यासाठी बॅ. जिना म. गांधींना आपण होअून पत्र पाठवितील. आपल्या राष्ट्राचें भवितव्य अुज्ज्वल आहे. हिंदूंचा भूतकाल स्फूर्तिदायक आहे. स्वातंत्र्यसंपादनास हिंदु हे पूर्णपणे समर्थ आहेत ! !

(२)

अमरावती नगरात सुदर्शन नाटकगृहात स्वा. सावरकरांचा सन्मान करण्याकरिता सभा बोलावली होती. त्या सभेत त्यांचें '१८५७ सालचें क्रांतियुद्ध' या विषयावर झालेले व्याख्यान.

१८५७ पेक्षा १९५७ साली आपण काय केलें पाहिजे हा जर आज विषय ठेवला असता तर वरें झालें असतें. १८५७ सालच्या युद्धात जे अिंग्रज गेले त्यांचा स्मृतिदिन साजरा करण्याकरिता १९०७ साली लंडनमध्ये असताना अिंग्रजांनी अेक मोठा अुत्सव करण्याचें ठरविलें होतें. त्याचा प्रतिकार करण्यासाठी लंडनमध्ये आम्ही ६०-७० विद्यार्थ्यांनी 'हुतात्मा दिन' साजरा करण्याचें ठरविलें. 'अभिनव भारताच्या' आम्ही ६०-७० सभासदांनी त्या वेळी हुतात्मादिन साजरा करून १८५७ मध्ये बळी पडलेले हिंदी वीर हे हुतात्मे होते – बंडखोर नव्हते असें जाहीर केलें. नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाअी यांच्या स्मृतीला श्रद्धांजलि अर्पण करण्याकरिता त्या वेळी मी जें पत्रक लिहिलें होतें, त्यात 'जी वेळ गेली ती गेली. पण ज्या कार्यासाठी आपण आपले प्राण अर्पण केले तें ध्येय आम्ही १९५७ साली तुम्हांला पुरें करून दाखवू' असें म्हटलें होतें.

सरदार हरदामदास हे त्या वेळी (१९०७ साली) आमच्याबरोबर होते. ते मला म्हणाले, 'तुम्ही १९५७ साल काय लिहिता; १९१७ कां लिहीत नाही ?' पण आज १९१७ साल गेलें, ३७ साल गेलें, तरी आपला देश पारतंत्र्यातच आहे. मला असें वाटतें की, १९५७ साली जर आम्हांला आपलें ध्येय मिळविता आलें तर आम्ही आपणांला भाग्याचे समजू.

लाला हरदयाळांना श्रद्धांजलि

खरा हुतात्मा कोण हेंही आज आमच्या देशाला ओळखता येत नाही. तिकडे अेक हिटलर निघाला की अिकडे ' सवाअी हिटलर ' निघतो. नुकतेच फिलाडेल्फिया येथे लाला हरदयाळ निधन पावले. त्यांनी हिंदुस्थानच्या अुद्धारासाठी जें काम केलें त्याचा आपल्याला विसर पडू देअू नका ! पण किती लोकांना त्यांचें चरित्र माहीत आहे ? आता तरी घरी गेल्यावर या हुतात्म्याचें चरित्र पहा.

१८५७ पूर्वीची स्थिति

१८५७ सालच्या क्रांतियुद्धाच्या अितिहासाचें पान अुलटल्याबरोबर आपणाला काही आलेख आपणांसमोर ठेवावयाला पाहिजेत. तेराव्या शतकापासून शिवाजीमहाराजांच्या जन्मापर्यंतचा (१६२७ पर्यंतचा) अेक आलेख. या दरम्यान मुसलमानांचें आक्रमण व मोगल साम्राज्य हिंदुस्थानात प्रस्थापित झालें होतें. १७२७ ते १७७५ या दरम्यानचा दुसरा आलेख. या वेळी यावनी सत्ता अुरली नव्हती. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत हिंदुत्वनिष्ठ राज्य हिंदुस्थानात स्थापन झालें होतें, निजाम व लखनौचा नवाब अेवढींच काय तीं दोन मुसलमान संस्थानें राहिलीं होतीं. अितक्यात प्लासीची लढाअी होअून अिंग्रजी सत्ता अुदयाला येअू लागली. अेकजूट, देशप्रेम या दृष्टीने अिंग्रज लोक आमच्यापेक्षा संघटित होते. अिंग्रजांनी आमचा पराभव केला हें अैतिहासिक सत्य मानावयाला मी तयार आहे. पण त्याचबरोबर त्याचें अुट्टें घेण्याची शक्तिही आमच्यांत आहे हेंही पण मला सांगावयाचें आहे.

डलहौसीचा ब्रह्मदेवाशी करार

१८५४ ते ५६ पर्यंत डलहौसीने लहानसहान संस्थानें खालसा केलीं. डलहौसीने असें करण्यापूर्वी ब्रह्मदेवाशी करार केला असावा असें मला वाटतें ! कारण औरस संतति नव्हती तेथे त्याने संस्थानें खालसा केलीं. संस्थानिकांना औरस संतति देअू नका म्हणून त्याने ब्रह्मदेवाला आदेश दिला. यमाकडे त्या संस्थानिकांना मारून टाकण्याचें काम दिलें, नि डलहौसीने हीं संस्थानें खालसा केलीं. ही अेक प्रकारची अैतिहासिक कादंबरीच आहे. पांच वर्षांत छत्रपति गेले, पेशवाअीचें वतन खालसा झालें. तंजावर व नागपूरकर भोसले यांचीही हीच स्थिति. डलहौसी, ब्रह्मदेव व यम यांच्यात झालेला हा करार प्रत्येकाने पूर्णपणे पाळला. पाळेमुळें त्यांनी खणून काढलीं. अुरलीं-सुरलीं मुसलमानी संस्थानेंही त्यांनी बुडविलीं. डलहौसीच्या पूर्वजांनी जेवढा प्रदेश २०० वर्षांत लढाअी करून जोडला तेवढा त्याने या कारवायांनी ५ वर्षांत जोडला.

पुनः स्वराज्य स्थापण्याची स्फूर्ति

या काळात पुनः आपलें राज्य प्रस्थापित करावें म्हणून जी स्फूर्ति झाली तिलाच १८५७ चें क्रांतियुद्ध म्हणता येअील. हिंदुस्थान अिंग्रजांनी म्राठ्यांपासून घेतला. म्हणून ही जी स्फूर्ति प्रथम निर्माण झाली ती मराठ्यांच्या राजात, नाना-साहेबांच्या मनात निर्माण झाली. या घडामोडीवर प्रकाश पाडणारें चांगलें पुस्तक लवकरच निघणार आहे तें पहावें.

झाशीची राणी, तात्या टोपे व नानासाहेब हे वाजीरावाचे आवडते होते. ते अेकत्रच खेळले नि वाढले. वाजीरावाच्या वाड्यात शिवाजीपासून सर्वांचीं चित्रें ठेविलीं होतीं. अितिहास शिकवण्यासाठी त्यांना अेक शिक्षक ठेवला होता. हें प्रत्येक चित्र पाहताना त्यांना काय वाटत असेल नि अिंग्रजांविषयी द्वेष कसा वाटत असेल याची कल्पना करा. अिंग्रजांवर चढाअी करण्यापूर्वी परदेशांतून काही मदत मिळविता येणें शक्य आहे का हें पाहण्यासाठी अजीमुल्ला, रंगो बापू यांच्यासारखे वकील परदेशी पाठविण्यात आले. अजिमुल्लाने रशियात जाअून बोलणीं केलीं. तिकडे तुम्ही चढाअी करा, आम्ही अिराणच्या बाजूने हिंदुस्थानात येतो, असें रशियाने आश्वासन दिलें होतें.

नानासाहेब महायात्रेला निघाले

अशा रीतीने पूर्वतयारी करून नानासाहेब महायात्रेचें निमित्त करून बाहेर पडले. अिंग्रजांना वाटलें, बिचारा भाबडा तर आहे; जाअू द्या यात्रेला. नानासाहेब जे निघाले ते प्रथम लखनौला गेले. ही त्यांची प्रथम तीर्थयात्रा. तेथे ते बेगमेला भेटले. तेथून दिल्लीला गेले. लखनौ दिल्ली हीं काही तीर्थयात्रास्थळें नव्हेत. निदान अर्वाचीन काळातील तरी खात्रीने नव्हेत. या वाटाघाटीत असें ठरलें की, प्रथम सैन्यात प्रचार करावा. सैन्यातील प्रचाराला काडतुसाच्या प्रश्नाचा अुपयोग झाला. या काडतुसांना गाअीची व डुकराची चरबी अेकत्र करून लावली होती व ती दाताने कुरतुडून मग काडतुसांचा अुपयोग करता येअी. गाअीची व डुकराची चरबी होती ही गोष्ट खरी आहे. धर्मभावनांचा विचार न करता ही चरबी लावण्यात आली होती तथापि लढाअीला गेले ते या चरबीमुळे गेले ही गोष्ट खरी नाही. तो गाअी-डुकरांच्या चरबीचा प्रश्न नसून स्वातंत्र्याच्या चरबीचा प्रश्न होता. राज्य हातीं असलें म्हणजे हजारो गाअींचें रक्षण करता येअील हें त्यांना माहीत होतें. कारण हींच काडतुसें पुढे याच सैनिकांनी वापरलीं. तात्पर्य काय की, काडतुसें ही अेक आग लावण्याची काडी होती.

१० मेची पहिली अुठावणी

ता. ३१ मे या दिवशी अुठावणी करण्याचें ठरलें. त्या दिवशी जिल्ह्याच्या ठिकाणी चढाअी करावी असा निश्चय ठरला. परंतु क्रांतीचें काम हें घड्याळासारखें

नसून घोड्यासारखें असतें. मे १० लाच पहिली अुठावणी झाली. तत्पूर्वी सर्वत्र चपात्या वाटण्यात आल्या होत्या. अेका गावाहून दुसऱ्या गावाला चपात्या पाठविण्यात आल्या. ही चपाती म्हणजे घेतलेली शपथ – निमक खाल्लें – ही कल्पना तिच्या मुळाशी होती. काही कलेक्टरांनी या चपातीचें शास्त्रीय परीक्षण करून पाहिलें. पण त्यांना त्यात काही आढळून आलें नाही.

मंगल पांडे हा पहिला क्रांतिकारक होय. अुत्तर हिंदुस्थानातील पलटणीचा हा नायक होता. १० मे रोजी त्याने पहिली अुठावणी केली. दोन दिवसांच्या आत अिंग्रजांनी त्याला फासावर लटकावलें. या मंगल पांडेची अिंग्रजांना अितकी दहशत बसली की, जो कोणी क्रांतिकारक तो पांडे ! पांडे आले – पांडे लढले अशी त्यांनी कागदोपत्री भाषा वापरली आहे. मीरत येथे रात्री १२ वाजता अुठावणी झाली. तोफखाना ताब्यात घेअून व अधिकाऱ्यांना मारून क्रांतिकारकांचें सैन्य बँड वाजवीत दिल्लीकडे गेलें, पण बँडवर ते ' God save the king ' हेंच पद वाजवीत होते ! ६ महिने दिल्ली स्वतंत्र होती. ३-४ महिने दिल्लीचा वेढा अिंग्रज सैन्यालाच लढवावा लागला.

मराठी साम्राज्याचा पुनर्जन्म

कल्पना करा, अुद्या प्रसिद्ध झालें की ' दिल्ली स्वतंत्र झाली ,' दुसरी बातमी आली की, 'मीरत गेलें;' तर क्रांतीचें प्रमाण केवढें मोठें होअील! नानासाहेबांकडे-देखील अिंग्रज सेनानी गेले. ते त्या वेळी कानपूर येथे गेले. ' आपण आमचे राजे, आपण रक्षण करा ' म्हणून त्यांनी नानासाहेबांना विनविलें. नानासाहेबांनी त्यांना संरक्षणाचें आश्वासन दिलें. मात्र ' तुमचा तोफखाना माझ्या हाताखाली ठेवा, खजिन्यावर माझी शिवंदी असू द्या ' अशा अटी नानासाहेबांनी घातल्या. त्या अिंग्रज सेनानीने कबूल केल्या. कानपूर येथे बरोबर ३१ मे रोजी रात्री बाराला सुरवात झाली. रात्री २ वाजता नानासाहेबांचें राज्य सुरू झालें. अेका रात्रीच्या आत मेलेलें मराठी साम्राज्य जिवंत झालें. अेक दिवस जरी ' माझें साम्राज्य पुन्हा सुरू झालें' ही कल्पना आली तरी मी माझ्या जन्माचें सार्थक झालें असें समजेन.

मुसलमानांशी संगनमत करून चढाअी करण्यात आली. हातातली तरवारच स्वत:वर अुलटली अशी अिंग्रजांची स्थिति झाली. ३१ मे ते ३१ ऑगस्टपर्यंत सारखी धुमाकूळ सुरू होती. क्रिमियन युद्ध बंद करून अिंग्रजी फौज घेअून नवीन कमांडर अिकडे आले.

कानपूरला कत्तल कां झाली ?

या अिंग्रज फौजेने प्रत्येक गाव घटक समजून नि तोफा लाबून गावांना आगी लावून दिल्या. झाडांपाशी फाशीचे स्तंभ अुभारून गावकऱ्यांना फासावर लटकविण्यात आलें. या गोष्टी कानपूरला होअू लागल्या. युद्ध आहे तेथे सूड आहे. म्हणून

मी त्यांना दोष देत नाही. अिंग्रजांच्या कैद्यांना मात्र कानपूर येथे चांगल्या रीतीने वागविण्यात आलें होतें. पण त्या लोकांनी कबूतरांच्या गळ्यांत चिठ्ठ्या बांधून आपल्या सेनानींना कळविलें की, या ठिकाणी अमुक अमुक लोक पुढारी आहेत; आपण कानपूर घेतल्यानंतर त्यांना प्रथम फाशी द्यावें. अशा लोकांना त्यांच्या या देशद्रोहाबद्दल – अिंग्रजांच्या दृष्टीने तें देशप्रेम असेल—आजच्या युद्धनियमाप्रमाणे देखील ठार करण्यात येअील. तेव्हा अशा लोकांची कत्तल जर त्यांनी केली तर अिंग्रज लोक जसे 'कोर्ट मार्शल' करतात, तसें त्यांनी केलें असें म्हणता येअील.

अिंग्रजांनी भाकलेली करुणा

अिंग्रजी फौजेने चालविलेल्या कत्तलीचीं वर्णनें जेव्हा कानपूरला येअू लागलीं तेव्हा त्यांचा सेनानी नील याचें मन आम्ही वळवितो, आमची हत्या करू नका, असें अिंग्रजांनी सांगितलें. त्याप्रमाणे त्यांना नौकेवर चढविण्यात आलें. अितक्यात बनारसच्या कत्तलीची बातमी आली. या लोकांना आम्ही अितक्या चांगल्या रीतीने वागवितो, पण ते मात्र आमच्या बायकामुलांची कत्तल करीत आहेत हें हिंदी सैनिकांना कळताच त्यांना या लोकांवर सूड अुगविण्याची अिच्छा होणें मनुष्य-स्वभावाला सोडून नाही. सूड अुगविणाऱ्या नीलसारख्याचे जर पुतळे अुभारण्यात येतात, तर नानासाहेबांसारख्यांचे देखील पुतळे कां अुभारू नयेत ?

अशा कत्तलीच्या गोष्टी घडू नयेत तर त्या अुभय पक्षांकडून घडू नयेत. आमचें स्वातंत्र्य तुम्ही हिरावून घेतलें होतें म्हणून या कत्तलीचें आम्हांला समर्थन तरी करता येअील; पण तुम्हांला आमचीं हत्या करण्याच्या कृत्याचें समर्थन [illegible] येणार नाही. चोरांनी सावाला कुऱ्हाड मारली नि सावाने चोराला कुऱ्हाड मारली या कुऱ्हाड मारण्याचा गुन्हा जरी दोघांनी केला असला तरी चोराला आपल्या कृत्याचें समर्थन करता येअील का ?

नानासाहेब व टोपे यांचे पुतळे अुभारा !

जर लॉरेन्स, नील यांच्यासारख्यांचे पुतळे अुभारले जातात तर नानासाहेब, तात्या टोपे यांच्यासारख्यांचे पुतळे पुण्याला शनिवारवाड्यासमोर अथवा कानपूरला कां अुभारले जाअू नयेत ? ज्या ठिकाणी कानपूरला अिंग्रज लोकांची कत्तल झाली त्या ठिकाणी अेका स्तंभावर असें लिहून ठेवण्यात आलें आहे की, 'या ठिकाणी राक्षस लोकांनी यांची कत्तल केली आहे.' हें वाचून हिंदी लोकांनी लाजेने मान खाली घालावी असा लिहिणारांचा अुद्देश असेल. पण तें वाचून मान अुंच झाली. कारण सांडलेल्या रक्ताचा तो सूड होता !! म्हणून मी नुकताच कानपूरला गेलो असता सूड अुगविणारांच्या या स्मृतीला मी जवळचीं फुलें वाहिलीं. आपला देश स्वतंत्र होताच या लोकांनी अुभारलेले हे पुतळे काढून त्या जागी आपल्या देशा-साठी जे लढले त्याचे पुतळे अुभारले पाहिजेत.

झाशीची संग्राम देवता

कानपूरच्या कत्तलीचा सूड अिंग्रजांनी कसा घेतला, त्यांनी रक्त साफ कसें करून घेतलें, हें आपण वाचलें असेल. कानपूर अिंग्रजांनी ताब्यात घेतल्यावर नानासाहेबांनी गंगेत नाव टाकली. तीतून ते कोठे गेले याचा पत्ता लागत नाही. कानपूर अिंग्रजांनी घेतल्यानंतर तेथे विजयोत्सव सुरू असता व युरोपचा नामांकित कमांडर तेथे असता तीन दिवसांच्या आत तात्या टोपेने पुनः कानपूर घेतलें. झाशीच्या राणीला हें कळताच तिने अुठावणी केली. झाशीच्या राणीची हकीकत आपणांला माहीत आहेच. 'या वेळी जर शिंदे बंडाला मिळाले असते तर आम्हांला आपलें चंबूगवाळें सावरून स्वदेशी पलायन करावें लागलें असतें' अशी तार अिंग्रज सेनानींनी पाठविली होती. झाशीची राणी, तात्या टोपे हे खरे शूर. आपल्या तत्त्वाला शेवटपर्यंत चिकटून राहणारा तो खरा शूर. नेपोलियनचा पराभव झाला म्हणून तो शूर नव्हता असें म्हणावयास कोणाची माय व्याली आहे? तसेंच झाशीची लक्ष्मीबाअी व तात्या टोपे हे शूर नव्हते असें म्हणावयास कोणाची माय व्याली आहे?

सेनापति तात्या टोपे

तात्या टोपे यांच्या पराक्रमाचें वर्णन काय करावें? कमीत कमी दीडशे लढाया हा वीर लढला. दहा हजार अिंग्रज फौजेशी त्याने तीन वर्षें सामना दिला. अिंग्रजांचे दोन कसलेले सेनानी मारले. दक्षिणेकडे येण्याचा तात्यांचा डाव होता. निजामाने असें आश्वासन दिलें होतें की, आम्ही तुम्हांला मिळू. म्हणून अिंग्रजांच्या विरोधाला न जुमानता तात्या टोपेने आपल्या सैनिकांसह नर्मदा ओलांडली. पण निजामाने वचन मोडलें व सांगितलें की, 'याद राखा जर तुम्ही पुढे आलात तर अिंग्रजाच्या वतीने तुम्हांला ठार करावें लागेल.'

तात्यांचे सैनिक कामी आले होते. साथीदार त्याला सोडून गेले होते. तरीही 'मी पेशव्यांचा सेनापति आहे' हें तो शेवटपर्यंत विसरला नाही. मानसिंह नांवाचा अेक लहानसा संस्थानिक काय तो त्याला शेवटपर्यंत चिकटून होता. पण त्यानेच शेवटी फितुरी करून तात्याला पकडून दिलें! तात्याची न्यायासनासमोर चौकशी करण्याचा तमाशा करण्यात आला. 'तुम्ही बंडखोर आहात. तुम्ही मनुष्यहत्या केली,' असा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. तात्याने या प्रसंगी जें वक्तव्य केलें त्यात त्यांनी असें सांगितलें कीं, 'मी कधीच बंडखोर नव्हतो. मी पेशव्यांचा नोकर आहे. तुमचा शत्रु म्हणून मला गोळी घाला.' पण अिंग्रजांना न्यायाचा तमाशा करून त्यांना फाशी द्यावयाचें होतें. विष द्यावयाचें असलें तरी तें अमृत आहे असें सिद्ध करून तें देण्याचा अिंग्रजांचा रिवाज आहे. शेवटचें

मागणें काय म्हणून तात्याला विचारण्यात आलें. 'माझ्या वृद्ध वडिलांना त्रास देऊ नका' म्हणून त्याने सांगितलें.

आपल्या हातांनी तात्यांनी स्वतः फास लावून घेतला. मान आवळली गेली. धड खाली पडलें. तेव्हा या वीराला पाहण्याला तेथे हजर असलेल्या अिंग्रज-फ्रेंच बायका-माणसांची गर्दी लोटली. या वीराच्या केसाचे झुपके त्यांनी तिकडे नेले.

तात्यांची स्मृति कायम ठेवा

'तात्या टोपे हे मराठ्यांचे शेवटचे सरसेनापति होते' असें त्यांच्यासंबंधी अिंग्रज नि फ्रेंच बातमीदारांनी आणि अितिहासलेखकांनी लिहून ठेवलें आहे. शिवाजी महाराज यशस्वी झाले; त्यांची आपण पुण्यतिथि करतो. पण तात्या टोपे यांना जरी अपयश आलें तरी त्यांची स्मृति आपण कायम ठेवा अेवढेंच मला आपणांस सांगावयाचें आहे.

✦ ✦ ✦

(२)

स्वातंत्र्यलक्ष्मीचें पुण्यस्मरण

८० वर्षांपूर्वी ग्वाल्हेरच्या पायथ्याशी ज्या स्थली महाराणीचा देह पडला त्या ठिकाणी सांप्रत अेक सुंदर छत्री बांधली आहे. दि. १७ जून १९३८ रोजीं ग्वाल्हेर येथील नगरभवनात स्वा. सावरकरांचें झालेलें भाषण.

केवळ अैतिहासिक दृष्टीने सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या चार गोष्टी मी सांगणार आहे. त्याचा संबंध सांप्रतच्या राजकारणाशी नाही. सांप्रतच्या कालमानानुसारच सांप्रतच्या कार्यकर्त्यांनी वागलें पाहिजे. स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे 'काडतुसाला चरबी लावल्यामुळे झालेलें शिपायांचें बंड होय' अशी कल्पना प्रसृत करण्यात आली आहे, पण ती चूक असल्याचें अिंग्रज ग्रंथकारांच्या लेखांवरूनच सिद्ध होतें. केवळ काडतुसास गायीची व डुकराची चरबी लावल्याचें समजल्यामुळे—आणि ही गोष्ट खोटी नव्हती—शिपायांच्या धार्मिक वेडाने अुचल खाल्ली म्हणावें तर नानासाहेबादिकांच्या पक्षातर्फे तींच काडतुसे वापरलीं जात होतीं; तसेंच हें केवळ शिपायांचें बंड होतें तर त्यात नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाअी झाशीवाली, बिहारचे वीर कुंवरसिंह, लखनौचे नबाब, दिल्लीचे

वादशहा, अित्यादि सत्ताधारी कां मिसळले ? हें युद्ध सुरू होण्याचे पूर्वी तीन महिने नानासाहेब तीर्थयात्रा करीत हिंडत होते, त्या तीर्थयात्रेत दिल्ली-लखनौ-सारख्या राजकीय क्षेत्रांचा समावेश त्यांनी कशासाठी केला ? गावचे गाव लढू लागले ते कां ? अेवंच, हें केवळ शिपायांचें बंड नव्हतें, धर्मयुद्ध नव्हतें तर राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादनार्थ जाणून बुजून केलेला तो राजपुरुषांचा रणयज्ञ होता.

अलिखित करार

नानासाहेब पेशवे नि लक्ष्मीबाअी यांना लहानपणापासूनच असें शिक्षण मिळालें होतें की, त्यायोगे त्यांच्या अंत:करणात गतवैभव प्राप्त करून घेण्याची तीव्र नि दुर्दम आकांक्षा अुत्पन्न झाली होती आणि तिचें परिणत स्वरूप म्हणजे हें युद्ध होय. बाजीरावाचा व अिंग्रजांचा करारनामा झाला असला तरी त्याबरोबरच अलिखित करार असा होता की, आमचे किंवा आमच्या पुत्रपौत्रादिकांचे हात सबळ झाले की, आम्ही आपली सत्ता परत मिळवून घेअू. सत्तावन्नचा प्रसंग म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याप्रीत्यर्थ केलेलें युद्ध. या विधानास दुसरा अुत्तम पुरावा म्हणजे अिंग्लंड तिकडे क्रिमियन युद्धामध्ये गुंतलेलें पाहून हिंदुस्थानात संघटित प्रयत्नाने हें रणकुंड पेटविलें गेलें. ग्यारीबाल्डीसारखे स्वातंत्र्यार्थ रणकंकण हाती बांधलेले वीर हिंदुस्थानाच्या साहाय्यार्थ धावून येण्यास सिद्ध झाले होते. आपणांस माहीत आहे की, त्या वेळी अेका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चपात्या जात होत्या. त्या चपात्यांचा अर्थ त्या वेळच्या अिंग्रजांना कळला नाही. पण त्या चपात्यांच्या द्वारे सर्वत्र संघटन होअून अेकदम अुठावणी करण्याचा प्रयत्न झाला.

२१ मे हा अुठावणीचा दिवस प्रथम निश्चित झाला होता. पण कानपूरला १० मे रोजीच युद्धाची पहिली ठिणगी पडली आणि तेथील पुढारी मंगल पांडे हा त्याच दिवशी फाशी दिला गेला.

राणीचा समरयज्ञ

कानपूरच्या कत्तलीबद्दल नानासाहेबांच्या पक्षावर अिंग्रज ग्रंथकार मोठी आग पाखडतात. पण त्यात नानासाहेबांची चूक काय आहे ? परस्परांचे कैदी परस्परांस परत करण्याचें ठरलें असता वचनभंग करून कर्नल नील जर काशीपासून गावेंच्या गावें जाळीत नि तोफा डागून अुडवून देत सुटला तर पेशव्यांच्या पक्षाने काय स्वस्थ बसावें ? आणि कानपूरच्या अिंग्रज बाया साध्या नव्हत्या, तर कानपूरला कैदेत असता जी जी वातमी त्यांना मिळे ती ती नीलकडे पाठविण्याचा त्यांचा हरतऱ्हेचा प्रयत्न होता. त्या गुप्त हेराचेंच काम करीत होत्या. त्या पकडल्या गेल्या, मग त्यांना शासन करणें योग्य कीं अयोग्य ? देवी लक्ष्मीवाअींनी केलेला समरयज्ञ सर्वप्रसिद्ध आहे. दुर्दैवाने तिच्या प्रयत्नांस यश आलें नाही-

याच ग्वाल्हेरच्या पायथ्याची शत्रूच्या हातून निसटून जाण्याचा प्रयत्न करीत असता तिच्या स्वत:च्या तोंडावर वार झाला. जिवाला जीव देणाऱ्या दासीचें सर्व शरीर तलवारीच्या घावांनी भरून ती मरणाच्या दारी पडली. पाठीशी १।। वर्षाचें मूल बांधलेलें, अशा स्थितीत मर्दपणाने शत्रूंशी झुंज देत नि स्वत:च्या शरीरास परक्याचा अपवित्र स्पर्श होऊ नये म्हणून अुडी घेत असता दुर्दैवी नाला आडवा आला. तो नाला राणी लक्ष्मीबाअीलाच आडवा आला असें नव्हे, तर भारताच्या स्वातंत्र्यलक्ष्मीलाही तो आडवा आला. त्या नाल्याच्या काठीच राणीचा देहान्त झाला ! अेका साधूने तिच्या मुखात पाणी घालून शेवटी त्या पवित्र देहास अग्निसंस्कार केला.

सेनापति तात्या टोपे

या स्वातंत्र्ययुद्धातील दुसरें संस्मरणीय वीररत्न म्हणजे तात्या टोपे होत. तात्या टोपे म्हणजे पराभूत शिवाजी. शिवाजी महाराजांचे प्रयत्न यशस्वी झाले आणि त्यांच्या प्रयत्नांस यश आलें नाही अेवढाच काय तो फरक; बाकी सेनापतित्वा-मध्ये दोघेही सारखेच. तात्यांनी हा लढा सतत दोन वर्षें चालविला होता. पण दगाबाजीने ते पकडले गेले आणि अिंग्रज सरकारने आपल्या कायद्याप्रमाणे त्यांना फाशी दिलें. या वीरपुंगवाचें नित्यस्मरण आपणांस असलें पाहिजे.

हत्यारबंद मिरवणूक काढा !

या ठिकाणी महाराणीचा अश्वारूढ पुतळा अुभारण्याचा कोणाचा मानस असेल तर तेंही स्मारक करावें. पण खरें स्मारक तेंच की, ज्या योगे प्रत्येक व्यक्ति राणी लक्ष्मीबाअीसारखी तेजस्वी व वीरश्रीसंपन्न होअील. दगडी मंदिरापेक्षा जिवंत मंदिराने राणी लक्ष्मीबाअीचें स्मारक झालें पाहिजे. या समारंभाच्या व मिरवणुकीच्या प्रसंगाने सरकारी अधिकारी व सामान्य लोक हे सर्व अेकच आहेत हें येथे दिसून आलें ही आनंदाची गोष्ट आहे; पण त्याबरोबरच खेदाची गोष्ट अशी की, या संस्थानात हत्याराचा कायदा नसता अवघी अेखादी दुसरी तरवार अेवढ्या मिरवणुकीत असावी ! तरुणांनी नुसते नेकटाय घालून भांग सजविण्यातच भूषण मानावें ? लाहोर, अमृतसरला हत्यारबंद मिरवणुकी निघाल्या, त्याप्रमाणे येथील मिरवणुकीत कमीत कमी पांचशे तरवारी तरी हव्या होत्या. तरवार हाती घेतली की हिंसा होते, ही कल्पना चूक आहे. तरवारीचें प्रदर्शन म्हणजे आत्म-शक्तीचें प्रदर्शन होय. बंदूक घरात ठेवून हातात छडी घेअून बाहेर मिरवणें याला काय म्हणावें ? यापुढे तरुणांनी निशाणबाजीचें व तरवारीचें शिक्षण अवश्यमेव घेतलें पाहिजे; तरच भावी कालात तरणोपाय आहे.

✦ ✦ ✦

२०. लाला हरदयाळ

पुणें येथे दिनांक १४-५-१९३९ रोजी वसंत व्याख्यानमालेत स्वा. सावरकर यांचें 'कै. लाला हरदयाळ' यांच्या जीवनचरित्रावर सेनापति बापट यांच्या अध्यक्षतेखाली झालेलें भाषण.

आपल्या बंगल्यात थोडयाफार स्वार्थत्यागी माणसांच्या तजबिरी सापडतील पण तुमच्या बंगल्यात कान्हेऱ्यांची तसबीर सापडणार नाही की, वैद्याची तसबीर सापडणार नाही ! आणि याचें कारण हेंच ना की, त्यांनी अमोल असा स्वार्थत्याग केला? आमचीं चित्रें दिसतात याचें तरी कारण ? आज सरकारला आम्ही मोकळे असावे असें वाटतें हेंच की नाही ?

हिंदुस्थानच्या हिताकरता जगभर पसरलेल्या कित्येक देशभक्तांचीं तीन-पानीही चरित्रें नाहीत. हीच अपेक्षा 'हरदयाळ' यांच्या वाटचास आली. म्हणूनच काही आठवणी व अितर भाषांत जी काही प्रसिद्धि मिळाली त्या आधारे मी 'हरदयाळ' यांचें वृत्त निवेदन करणार आहे.

तीव्र बुद्धिमत्ता

त्यांच्या बाल्याचे बाबतीत नक्की माहिती अुपलब्ध नाही. पंजाबमध्ये त्यांचा कुठेसा जन्म झाला. त्यांच्या शालेय शिक्षणाबद्दलही माहिती अुपलब्ध नाही. पण कॉलेजच्या अूर्फ विश्वविद्यालयीन शिक्षणात मात्र त्यांचें तेज फाकू लागलें. त्यांच्या साध्यासुध्या बावळटपणाखाली असलेली बुद्धिमत्तेची तेजस्वी तरवार चमकू लागली. अेम्. अे. मध्ये अिंग्रजी भाषेत सबंध युनिव्हर्सिटीत पहिला क्रमांक मिळवून त्यांनी आपलें असामान्यत्व अितरांस पटवून दिलें; व म्हणूनच त्यांस सरकारी शिष्यवृत्ति मिळवून विलायतेस जावयास मिळालें.

ख्रिस्ती धर्माचा पगडा

आधीच तैलबुद्धि, तशात अंगी विभूतिमत्त्वदर्शक विक्षिप्तपणा व भोवताली ख्रिस्ती कॉलेजातील मिशनरी वातावरण, यामुळे त्यांच्या मनावर ख्रिस्ती धर्माचा पगडा बसू लागला. त्या भावनामय मनाची अशी खात्री होत चालली की, 'हिंदुस्थान ख्रिस्ती झाल्याशिवाय सुधारावयाचा नाही.' लजपतरायांवरही अिस्लामी धर्माचा पूर्ण पगडा बसला होता. त्यांच्या वडिलांचीही अिच्छा होती की, लजपतराय यांनी मुसलमानी धर्म स्वीकारावा. पण आमच्या सुदैवाने तो प्रसंग टळला. तसेंच हरदयाळांच्या बाबतीत झालें. ते हिंदु म्हणून जगले आणि हिंदु म्हणून मेले.

अिंग्लंडात

पुढे अिंग्लंडात जाअून त्यांनी ऑक्सफर्डमध्ये नांव दाखल केलें. लगेच आपल्या बुद्धत्तेची त्यांनी तेथील अध्यापकांवर पूर्ण छाप पाडली. त्यांचे आणि अध्यापकांचे

विचारविनिमय होऊ लागले. धार्मिक व तात्त्विक विचारांची चर्चा चालू असताच बंगाल्यातील वंगभंगाच्या चळवळीचे वृत्तान्त अिंग्लंडात अुमटू लागले. विपिनचंद्र पाल, लालाजी, टिळक, यांच्या नेतृत्वाखाली धुमधडाक्याने चालणाऱ्या चळवळीत भाग न घेणें म्हणजे जिवंत नसण्यासारखें ठरलें असतें. ह्याच चळवळी चालू असण्याचे सुमारास मी अिंग्लंडात जाअून दाखल झालो. तेथे पं. श्यामजीबरोबर 'अिंडिया हाअूस' मध्ये गेलो. हिंदु विद्यार्थ्यांची चौकशी करीत असता हरदयाळ यांचें नांव प्रामुख्याने माझ्यापुढे आलें.

त्यांच्या व माझ्या गाठीभेटी झाल्या. त्यांच्या अंगच्या असामान्य गुणांचा मला परिचय झाला. त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या विक्षिप्तपणाचा अनुभव येअू लागला व हळू हळू असें आढळून आलें की, त्यांची खिश्चन धर्मावरील श्रद्धा ओसरत जाअून हिंदी राजकारणाचे प्रश्न त्यांच्या डोक्यात घोळू लागले आहेत.

याच सुमारास गोखलेही पण तेथे होते. गोखले हे सरकारला अधिक जवळचे, म्हणजे सरकारला गोखले आवडत होते असें नव्हे. टिळकांपेक्षा हे बरे, असें सरकारचें म्हणणें. पण आमचें तसें नव्हतें! आम्ही क्रांतिकारक अिंग्रजांस भीतिदायक वाटत होतो. म्हणजे असें म्हणता येअील की, आम्ही मुळीच नकोत म्हणून टिळक चालतील, पण टिळकांपेक्षा बोलणें-चालणें करण्याच्या दृष्टीने गोखले बरे, म्हणून गोखले जवळचे असें सरकारास वाटे. सरकारास यांपैकी कोणीच आवडणारे नव्हते. आजही अशाच गोष्टी दिसून येण्यासारख्या आहेत. ज्यावर विश्वास ठेवला असता आपल्या पायास धक्का बसण्याचा संभव कमी असें सरकारला वाटतें, त्यास सरकार जवळ करतें व त्यासच भेटी-मुलाखती देतें.

क्रांतीची शपथ

क्रांतिकारक विचारसरणीचा हरदयाळांच्या मनावर पगडा बसला अिंग्लंडला जबरदस्त दहशत बसविणारी चळवळ झाल्याविना हिंदुस्थानवरील त्यांची पकड ढिली होणार नाही असें वाटून तशी परिस्थिति निर्माण करण्याच्या दृष्टीने हरदयाळने माझ्यासमोर, माझ्या घरी सशस्त्र क्रांतीची शपथ घेतली. अेखादा बेत ठरला म्हणजे मग तो पार पाडावयाचाच ही त्यांची वृत्ति! लगेच ते ऑक्सफर्डला गेले नि शिष्यवृत्ति आणि विद्यार्थिदशा यांचे राजिनामे देअून मोकळे झाले. अध्यापकवर्गाने त्यांचें मन वळविण्याचे नाना प्रकारचे प्रयत्न केले. त्यांच्या विद्वत्तेपासून होणारे फायदे त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणले. पण त्याचा त्यांच्या मनावर काहीच परिणाम झाला नाही.

अेकांतिक भावना

येथेच ते थांबले नाहीत. ज्यांचें पारतंत्र्य आपण झुगारून देण्यास निघालो आहोत त्यांचे कपडे आपण घालणें म्हणजे गुन्हा असल्याची त्यांची खात्री झाली.

तसल्या थंड प्रदेशात नुसती कफनी, धोतर वगैरेसारखा पोषाख वापरणें प्रकृतीच्या दृष्टीने हितावह नसल्याचें आम्ही त्यांना खूप सांगून पाहिलें, पण त्यांच्या अुदात्त विक्षिप्तपणापुढे आमचें चालेना नि अेका कपडयानिशी ते राहू लागले. त्यानंतर जेवणाचे बाबतीत. जो हिंदु नाही त्याच्या हातचें अन्न खावयाचें नाही असा त्यांनी संकल्प केला व हिंदु आचाऱ्याकडून हिंदु पद्धतीचें अन्न ते खाऊ लागले.

आमचा त्यांचा येथे मतभेद होता. 'जन्मभर आम्ही अिंग्रजांचे ववर्जी होअून हिंदुस्थानात वसलोच आहोत, आता तरी त्यांच्याकडून आपली सेवा करून घेअू या ! त्यांच्या वायकांना आपलीं भांडीं घासू द्या ! त्यांना आमच्याकरिता स्वयंपाक करू द्या !' असें आम्ही म्हणत असू. पण तें त्यांना रुचत नसे. असो ! याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. त्यांना ब्रॉंकेटाअीस्चा आजार झाला. पहिल्या पहिल्यांदा त्यांनी तो लपवून ठेवला; तरी पुढे तो त्यांना असह्य झाला; तेव्हा त्यांना औषधपाणी देणें जरूर होतें. थोडें बरें वाटल्यावर त्यांना पॅरिसमध्ये बॅं. राणा यांजकडे पाठविण्यात आलें. हे राणा अद्याप जिवंत आहेत. त्यांनी नि त्यांच्या जर्मन कुटुंबांनी त्यांची अुत्तम व्यवस्था ठेवली आणि ते बरे झाले. पण त्या जर्मन वाअीच्या हातचें ते खाअीनात की तिच्याशी बोलेनात.

क्रांतीचा जोर

बरे झाल्यावर 'अभिनव भारत' संस्थेच्या सल्ल्याने ते क्रांतीच्या तत्त्वांचा प्रचार करण्यासाठी हिंदुस्थानात दाखल झाले. लगेच त्यांनी पंजाबात अेक आश्रमवजा केंद्र अुघडलें. धुमधडाक्याने प्रचारकार्यास सुरवात झाली. पण नवभारताचें केंद्र हिंदुस्थान असून तेथे हरदयाळ काम करीत असल्याचा सुगावा लागल्यामुळे त्यांच्यावर सरकारी वारंट सुटलें. ही बातमी कळताच ते स्थलांतर करू लागले; पण आता निभाव लागत नाही असें पाहून हरदयाळ पुनः अिंग्लंडात आले. अिकडे अिंग्लंडातील क्रांतिकारक चळवळ अधिकाधिक जोराचू लागली होती. बाँब तयार होत होते. फ्रान्समधून वुटांच्या पार्सलमधून पिस्तुलें येत, तीं हिंदुस्थानात पाठविलीं जात होतीं.

गुप्त शिपायांच्या हातावर तुरी

आमच्यामागे गुप्तपोलिसांचा ससेमिरा लागून राहिला. आमचे ते सहचरच झाले. आम्ही कित्येक वेळेस त्यांच्या हातावर छत्री अडकवून मोकळ्या हाताने चालावें नि त्या विचाऱ्यांनी आमच्या छत्र्या घेअून मुकाट्याने आमच्या मागून चालावें ! आमच्यातला चारी नांवाचा अेक मद्रासी गुप्त पोलिसांत असे, हें कित्येक दिवस सरकारला माहीत नव्हतें. त्यामुळे आम्हांस माहिती कळे. असाच अेके दिवशी अेक गृहस्थ मजकडे आला. आम्ही त्यास ओळखलें. त्याचें स्वागत

केलें. तो म्हणाला, 'मला आपली खोली पाहावयाची आहे.' मी म्हणालो, 'ठीक आहे.' त्यास मी खोलीत नेलें. खोलीत चारदोन वर्तमानपत्रें होतीं. अेक आराम खुर्ची होती. आम्ही त्यास खुर्चीवर वसविलें. त्याच खुर्चीत बाँब होते! अुद्देश हाच की, बाँब अुडालाच तर तो आणि आम्ही सर्वच खलास.

आमच्या वातमीने ब्रिटिशांस दहशत बसली. धिंग्राने कर्नल वायलीचा वध केला. ब्रिटिशांना चांगलीच दहशत वसली. हजारो सह्यांनी जें काम झालें नसतें तें अेका घटनेने घडवन आणलें.

जर्मनीशी संधान

याच वेळेस हरदयाळ पॅरिस येथे परत गेले. तेथून मध्ययुरोपात संधान बांधण्याच्या कारवाया सुरू झाल्या. जर्मनीशी सख्य जोडणें हेंहि शक्यतो साधावें, हा हेतु; पण...पण... हा अितिहास पट्टाभिसितारामय्यांना अवगत नाही. त्यांच्या मतें राष्ट्राचा अितिहास १९२० नंतर सुरू झाला! मुलास आपल्या जन्मापासूनच जग सुरू झालें असें वाटत असेल तर वाटो; पण वापही माझ्यासमोर जन्मला असेंच तो म्हणेल काय? पट्टाभिसितारामय्यांना हा अितिहास माहीत नाही, म्हणून तो घडलाच नाही असें का म्हणावयाचें आहे? हेंच का 'सत्य'? असो.

अितिहास, सत्य सांगितलाच पाहिजे. त्यातलें काय घ्यावयाचें, काय सोडावयाचें तें आपण ठरवावें. सबंधच्या सबंध अैतिहासिक घटना अमलात आणा असें मी म्हणत नाही; मुळीच आणू नका असेंही मी सांगत नाही, मी फक्त अितिहास सांगत आहे.

अिंग्लंडमध्ये 'तलवार' पत्र सुरू झालें. मध्ये १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचें पुस्तक प्रसिद्ध झालें. हरदयाळने पॅरिसमध्ये 'वंदेमातरम्' पत्र चालू केलें. जिकडे तिकडे हिंदुस्थानचा बोलबाला सुरू झाला.

म. गांधींचें धोरण

म गांधी त्या वेळी युरोपातच होते. त्यांचा व हरदयाळांचा परिचय झाला. विस्तार सोडून बोलावयाचें म्हटलें तर असें म्हणता येअील की, त्यांचे आमचे खटके अुडू लागले. त्यांच्या आमच्या विचारांत फार अंतर होतें. कुठे God save the king म्हटलें गेलें की ते ताडकन अुभे राहत नि आम्ही वसून राहत असू. ते यावर टीका करीत. ते म्हणत 'राजा श्रेष्ठ आहे. अीश्वरी अंश आहे. त्याला मान देणें साम्राज्यातील प्रत्येक व्यक्तीचें काम आहे.' अर्थात ही विचारसरणी आम्हांस पसंत नसे. गांधींचा ओढा साम्राज्यरक्षणाकडे असे. आफ्रिकेत बोअरांचें स्वातंत्र्यहरण करण्यास ब्रिटिश साम्राज्यसत्तेस गांधींनी जी मदत केली ती काय अहिंसातत्त्वास धरून झाली! पण त्यांची ती वृत्तिच बनून गेली होती. त्या वेळेस

वादविवाद चालू असता आम्ही क्रांतिकारक टेबलाच्या अेका बाजूस बसत अमू व गांधी आणि त्यांचे आफ्रिकेतील अनुयायी टेबलाच्या दुसऱ्या बाजूस बसत. वाद-विवाद होअी ! दररोज अशी मौज होअी की, गांधीच्या बाजूचा अेक अेक शिष्य क्रांतिकारकांच्या बाजूस येअून बसू लागला. अखेर गांधी अेकटेच अेका बाजूस राहिले ! आमच्या पंथावद्दल ' मारो काटो पंथ ' असा अुल्लेख करून त्यांनी त्या नांवाचें अेक पुस्तकही प्रसिद्ध केलें.

मनाची द्विधा स्थिति

आमच्यावर अशी ही स्वकीयांची प्रखर टीका व परकीयांचा जुलूम चालू होता; तरी आमचें कार्य सुरूच होतें. हिंदुस्थानात पाठविलेल्या शस्त्रास्त्रांचा अुप-योग होअू लागला. धरपकड होअू लागली. सहोदर, आप्त यांना पकडण्यात येअू लागलें. आमचीं नांवें समजावींत म्हणून त्यांचे छळ होअू लागले. मी बेचैन झालो. दररोज बातम्या येत. रोज मनाची बेचैनी वाढे ! हरदयाळ माझी समजूत घाली· पण माझें मन द्विधा झालें. ' माझे सहोदर, माझे मित्र तुरुंगात हालअपेष्टा सोशीत असता मी मात्र फ्रान्समधील बागांतून फिरावे. अरे, हें कसलें जीवन ! ' हरदयाळ म्हणत, ' तू गेलास म्हणजे शक्ति गेली. तू पुढारी – तू चळवळीचा आत्मा – 'छे ! मला तें पटेना. मी म्हणालो ' मी पुढारी आहे किंवा नाही तें ठरावयाचें आहे. जे हाल माझे आप्तेष्ट सोशीत आहेत ते मी सोसल्याशिवाय कार्याची पूर्तता होणार नाही. मी जाणार...जेथे माझे सगेसोयरे तडफडत आहेत तेथे मी जाणार. त्यांच्यात मी जाणार.'

तत्त्वज्ञानाकडे कल

मी निघालो ! स्टेशनवर बरीच मंडळी जमली होती. पण दोन बाजूस दोन म्लान व वरून बावळट दिसणारे चेहरे मी पाहात होतो. अेक मॅडम कामा यांचा व दुसरा हरदयाळांचा. हरदयाळांचें तें शेवटचें पुण्यदर्शन. तेथून मी निघालो. अिंग्लंडात आलो नि पकडलो गेलो. आमच्या कारागृहामुळे चळवळीचा विचका झाला. हरदयाळांच्या कानावर गोष्टी गेल्या. नवभारताच्या मंडळींनी शपथा मोडून साक्षी दिल्याच्या बातम्या अैकून ते पूर्ण अुदास झाले. त्यांनी राजकारणाचा अभ्यास सोडून दिला व ते तत्त्वज्ञानाचा अभ्यास करू लागले !

अिंग्रजी, फ्रेंच, पर्शियन, अुर्दू, संस्कृत अित्यादि भाषा त्यांना चांगल्या अवगत असून युरोपातील अितर भाषांचेंही चालचलाअू ज्ञान त्यांना होतें. निरनिराळ्या भाषातून धर्म व तत्त्वज्ञान यावरील विचार त्यांनी समजावून घेतले नि शेवटी बौद्ध धर्म आचरणात आणण्याचें त्यानी ठरविलें.

नवा धर्म

पुढे त्यांनी होनोलुलू येथे जिवंत राहावयास लागणारें तेवढेंच खाऊन अत्यंत हालात दिवस काढण्यास सुरवात केली; पण अभ्यास सोडला नाही. हळुहळू नवा धर्म, की जो नवें व जुनें यांची सांगड घालील असा, स्थापन करण्याचा निश्चय केला. विचारांची चौकट वनत चालली. त्यांच्या विचारास मूर्त स्वरूप येऊ लागलें. त्या वेळेस भाअी परमानंद सरकारच्या रोषास पात्र होऊन देशत्याग करून तेथे गेले. त्यांची व हरदयाळांची गाठ पडली. भाअी परमानंदांनी त्यांस अध्यात्मवादापासून परावृत्त केलें. आधीच आपल्या देशात पुष्कळ आचार्य झाले आहेत. त्यांत आपली भर कशाला ? हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हातात घेण्यास हा काळ अनुकूल आहे. भाअी परमानंदांच्या कोटिक्रमाने हरदयाळांचें मन पुनः वदललें. हिंदी स्वातंत्र्याची कल्पना त्यांना पटली व लगेच आपल्या नेहमीच्या स्वभावास अनुसरून ते त्यात हिरिरीने पडले.

महायुद्धाची संधि

त्या वेळेस महायुद्धाचे ढग जमू लागले. अिंग्लंडचा जो शत्रु तो आपला मित्र ही भावना जागृत झाली नि जर्मनीत प्रयत्न करण्याच्या अिराद्याने हरदयाळ युरोपात गेले. पण जगायचें कसें? ज्या देशात जावें त्या देशात, त्या भाषेचा अेखादा लेख लिहावा व काय मिळेल त्यावर निर्वाह करावा ! त्या वेळचे त्यांचे हाल अवर्णनीय आहेत. आजच्या शेकडो काँग्रेसभक्तांचे हाल अेकवटले तरी 'अभिनव भारता'च्या अेकेका सभासदाच्या हालाची अन् त्यागाची वरोबरी होणार नाही. या गोष्टी पट्टाभिसीतारामय्यांना खऱ्या वाटणार नाहीत. पण अितिहास कोणाच्या वाटण्याबिटण्याचा विचार करीत नाही.

वीस सालापूर्वीचें राजकारण

आम्हांस जर्मनांशी संधान बांधण्याचे कामात हळूहळू यश येऊ लागलें. युरोपातील युद्धाचे प्रसंगी हिंदुस्थानात बंडाचा वणवा पेटला पाहिजे ही कल्पना जर्मनीला पटली. पैसाही येऊ लागला. जगभर पसरलेलीं हिंदी माणसें वाटेल ती मदत देण्यास तयार झाली. काय सांगावें ! अहो, जगभर ठिकठिकाणी हिंदी माणसें आहेत. ती तेथे तेथे थोडीफार सुखी आहेत. काटकसर, हिंदु संस्कृतीस पोषक अशी राहणी अित्यादि गुणांमुळे त्यांनी गाठीशी बांधलेला पैसा हिंदवी स्वराज्याकरता पुढे केला. हिंदूंनी मिळविलेलें स्वराज्य अुद्या साम्राज्य ठरणार आहे ! पण परराष्ट्रात या अशा तऱ्हेच्या चळवळी – वणवण फिरत केलेल्या चळवळी–विमानातून परराष्ट्रात फिरून आलेल्या चळवळयांच्या चळवळीपेक्षा आपणांस अत्यंत कमी वाटतात म्हणून का आपण १९२० नंतर खरें राजकारण सुरू झालें असें म्हणता ?

अरे, आम्ही जिवंत असताना तुम्हांला हें म्हणवलें तरी कसें ? अिकडे हरदयाळ जमवाजमव करीत अमेरिकेत गेले. तेथील शीख वगैरे मंडळींच्या मदतीने हिंदुस्थानातील पलटणींत भेद पाडण्याची खटपट सुरू झाली.

अमेरिकेच्या कैदेतून पलायन

याच वेळी ' गदर ' नांवाचें वर्तमानपत्र हरदयाळ सात भाषांत चालवू लागले. प्रत्येक अंकात ' १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध ' नांवाच्या माझ्या पुस्तकाचें भाषांतर प्रसिद्ध होअू लागलें. गदरचे अंक पाठ करण्यात येअू लागले व सर्वत्र ब्रिटिशांविरुद्ध क्रांतीचा प्रचार करण्यात येअू लागला. या व अशा तऱ्हेच्या वातम्या अिंग्रजांच्या कानावर जाअू लागल्या असल्या पाहिजेत. म्हणूनच त्यांनी अमेरिकेवर दडपण पाडून हरदयाळांना पकडण्याची खटपट केली. पण अमेरिकेस त्यापासून काडीचा फायदा नसल्यामुळे नि त्या वेळेस तिचें धोरण दारूगोळा व शस्त्रास्त्रें विकून पैसा मिळविणे हें असल्यामुळे तिने हरदयाळांस वरकांती कैद केलें असलें तरी आतून त्यांनी पळून जावें अशी व्यवस्था केली. त्याचा फायदा घेअून हरदयाळ पळाले नि मेक्सिकोत आले.

तेथून पुनः हालचाली सुरू झाल्या.

बंडाची तयारी

पॅसिफिक महासागरातून ब्रह्मदेशात यावयाचें, तेथील बंदर ताब्यात घेअून बंगाल्यात अुतरावयाचें आणि बंडाचा वणवा पेटवून द्यावयाचा–अंदमानावर हल्ला करून तेथील क्रांतिकारकांची मुक्तता करावयाची–असें झाल्यास फायदा घ्यावा म्हणून मद्रासच्या बाजूस अेम्डन जहाज अुतरलें. पण तसें व्हावयाचें नव्हतें. अेक नवीनच बातमी वातावरणात अुमटू लागली. हिंदुस्थानात अिस्लामी राज्य होणार! खलिपास हिंदुस्थानात राजा करण्याचें अभिवचन कैसरने दिलें ! हो–त्यांना काय? हिंदुस्थानात बंड झालें म्हणजे झालें ! मग तिकडे खलिफा राजा होवो नाही तर आणखी काही होवो. हरदयाळांचें तसें नव्हतें. त्यांना हिंदुस्थानात हिंदूंचें राज्य पाहिजे होतें. हें त्यांचें ध्येय. त्या ध्येयास धक्का बसल्याबरोबर त्यांनी आपलें अंग काढून घेतलें. पण मुसलमानांना अतिशय आनंद झाला. ते हजारोनी येणाऱ्या खलिपाच्या स्वागतार्थ सामोरे निघाले. त्यात कित्येक अुपाशी मेले ही गोष्ट वेगळी.

हिंदुस्थानात बंड अुभारण्याची कल्पना विलयास गेली. त्याबरोबर हरदयाळांचें भावप्रधान मन पुनः अुदास झालें. चळवळीतून अंग काढून घेतल्यावर त्यांची अनुकंपनीय स्थिति झाली. अन्नान्नदशा येअून वणवण फिरू लागणाऱ्या त्या थोर देशभक्ताची अिकडे आठवणही होअू नये ही केवढी शरमेची गोष्ट आहे !

अुपकारकर्त्यांची अुपेक्षा

ज्याच्या प्रयत्नाने वॉर्सला यशस्वी जर्मनांच्या तहाच्या वाटाघाटीकरिता तयार केलेल्या खड्यांत 'हिंदुस्थानास स्वातंत्र्य' अशी अट होती, त्या देशभक्ताच्या राजकारणास दडपून १९२० नतरच राजकारणास सुरवात झाली असें म्हणणें केवढें अन्यायाचें आहे ! आनंदाची गोष्ट ही की, ते गेले खरे, पण निदान ही गोष्ट सांगण्यास मी जिवंत राहिलो.

पुढे थोडी निवळानिवळ झाल्यावर हरदयाळांना अिंग्लंडात राहावयाची परवानगी मिळाली; पण ज्या मातृभूमीकरता त्यांनी जीवाचें रान केलें ती मातृभूमि डोळ्यांनी पाहावयाची त्यांना अनिवार अिच्छा झाली. त्यांनी तसे वरेच प्रयत्न केले. शेवटी त्यांस परवानगी मिळाली; पण अिकडे येण्यास तिकिटाचे पैसे नव्हते. कोणास कशी गोष्ट सांगायची ही ? शेवटी भाअी परमानंदांच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यांनी हरदयाळांना मनीऑर्डरने पैसे पाठविले आणि परत पावती हातात पडते न पडते तोंच हरदयाळांच्या मृत्यूची बातमी येथे आली !

त्या महान् देशभक्तास आपल्या मातृभूमीचें पुनः दर्शन झालें नाही ! !

या महान् देशभक्ताच्या मृत्यूच्या बातमीला वर्तमानपत्रात कोपऱ्यात स्थान मिळालें. अरे, तुमच्यातला अेखादा अुंदीर मेला तर तुम्ही स्तंभच्या स्तंभ भरून टाकता. ' प्रसिद्ध देशभक्त अुंदीर मरण पावले ' असें जाडच्या अक्षरांत छापता आणि हरदयाळसारख्या महान् देशभक्तास कोपऱ्यात जागा देता ? अगदी शरमेची गोष्ट आहे.

मराठी ग्रंथ
३८९.६
१५८९
निबंध
२३।११।४५

२१. आधी स्वदेशाचें दास्यमोचन

पुणें येथे दि. ११-१०-१९३८ रोजी रात्री श्री. ल. ब. भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वा. सावरकर यांचें झालेलें भाषण

मी यापूर्वी हिंदुयुवक संघातफें झालेल्या व्याख्यानात हिंदुस्थानाची परराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याची दृष्टि काय असावी याचें विवेचन केलें होतें. झेकोस्लोव्हाकियातील सुडेटन जर्मनांनी जर्मन राष्ट्राशी अेकरूप होण्याची प्रभावी अिच्छा प्रकट केल्यामुळे जर्मनीचा सर्वसत्ताधारी हेर हिटलर याने त्यांना झेकोस्लोव्हाकियातून ओढून स्वराष्ट्रात सामील करून घेतलें, याबद्दल आपल्या देशातील कवि व पुढारी झेकोस्लोव्हाकियाशी सहानुभूति दाखवून हिटलरला दोष देत आहेत, परंतु परराष्ट्रीय घटनांकडे पाहण्याची ही दृष्टि सदोष आहे, अेवढेंच नव्हे तर अंती हिंदु राष्ट्राला घातक होणारी आहे.

जगातील निरनिराळ्या राजकीय पंथांकडे पाहताना आपण त्या विशिष्ट पंथाने व विचारप्रणालीने त्या त्या राष्ट्राचें भाग्य अुदयाला आलें कीं नाही हें पहावें. तें जर अुदयाला आलें असेल तर त्या राष्ट्रापुरता तोच पंथ चांगला व अितर वाअीट असेंच आपण म्हटलें पाहिजे.

हिटलरची कर्तबगारी

महायुद्धानंतर जर्मनीवर शस्त्रनिर्बंध व सैनिकनिर्बंध घालण्यात आले. जर्मनीची लांडगेतोड करण्यात आली. जर्मनीने अमुक संख्येपेक्षा अधिक लष्कर ठेवू नये, अमुक लांबीच्या तोफांपेक्षा मोठ्या तोफा तयार करता कामा नयेत, अमुक तऱ्हेचींच आरमारी जहाजें ठेवावीं वगैरे निर्बंधांनी त्याला जखडण्यात आलें होतें. त्या असहाय स्थितीतून हिटलरने जर्मनीला वैभवाच्या शिखरावर चढवलें नि अशी परिस्थिति निर्माण केली की, हिटलरच्या कपाळाला किती आठ्या पडल्या यांचीही नोंद परराष्ट्रांतील मुत्सद्द्यांनी घ्यावी. कारण हिटलरच्या मनोरचनेवर युरोपातील राजकारणात आंदोलनें होत असतात. या हिटलरने 'नॅशनल सोशॅलिझम' अर्थात् नाझीझमचा पुरस्कार केला. त्या वेळी प्रारंभी त्याला फक्त तीन अनुयायी मिळाले. आज सर्व जर्मन राष्ट्र त्याच्या पाठीशी अुभें आहे. जर्मन राष्ट्र अेकजिनसी करण्याकरिता जर्मन आर्यवंशाच्या अेकीची त्याने घोषणा केली. ठिकठिकाणी विखुरलेले जर्मन त्याच्या निशाणाखाली अेकत्र झाले. या दृष्टीने पाहता जर्मनांना नाझीझमच चांगला असें म्हटलें पाहिजे. जर्मनीला तो वाअीट आहे असें आपण कसें म्हणणार? अेकाचें विष तें परिस्थितीप्रमाणे दुसऱ्याचें अमृत ठरतें. तद्वतच निरनिराळ्या राष्ट्रांत वाढलेल्या तत्त्वज्ञानांची स्थिति आहे. म्हणून सर्व परिस्थितीत अमुकच धोरण चांगलें व तमुकच वाअीट असें म्हणणें अदूरदर्शीपणाचें आहे.

दुबळ्यांची सहानुभूति

हिंदुस्थानातील कवीने झेकोस्लोव्हाकियाला म्हणे संदेश पाठविला नि हिंदुस्थानातील लोकांची त्यांना सहानुभूति आहे असें कळविलें. स्वत:चें स्वातंत्र्य गमावून बसलेल्या निर्बल लोकांनी झेकोस्लोव्हाकियातील वा अबिसिनियांतील लोकांना सहानुभूति दाखविणें म्हणजे अेका अंधळ्याने दुसऱ्या अंधळ्याला सहानुभूति दाखवून त्याच्याविरुद्ध असलेल्या समर्थ डोळसाचा स्वत:वर राग ओढवून घेण्यासारखें आहे. हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांतील लोकांनी स्वत:ची कोणतीही मदत दुसऱ्याला करता येण्यासारखी नसता त्याला सहानुभूति दाखविणें म्हणजे दुसऱ्या समर्थ राष्ट्रांची सहानुभूति अकारण घालविण्याप्रमाणे आहे. दुर्बलाबद्दल कोणी कितीही सहानुभूति दाखविली तरी स्वत:च्या हिताच्या आड ती सहानुभूति येते असें दिसताच ती सहानुभूति मावळते. हेर हिटलरने दरडावताच ग्रेट ब्रिटन व

फ्रान्स यांनी कसें तोंड फिरविलें यावरून हेंच स्पष्ट दिसून आलें आहे. झेकोस्लोव्हाकियाच्या प्रश्नापासून हा पहिला धडा हिंदूंनी घेतला पाहिजे.

खरें राष्ट्र कोणतें ?

हिंदुस्थान हें हिंदुराष्ट्र आहे. त्यातील लोकांनी असें स्पष्ट घोषित केलें पाहिजे की, आमचें जपानशी, जर्मनीशी वा अिटालीशी मुळीच भांडण नाही. हिंदुस्थानला जे जे मदत करतील ते ते आमचे, मग त्यांचें स्वराष्ट्रीय धोरण कोणतेंही असो. हिंदुमहासभेच्या कारभारी मंडळाकडून हिंदु राष्ट्रातर्फे मी अशी घोषणा करवून घेणार आहे.

झेकोस्लोव्हाकियाच्या प्रश्नापासून हिंदुस्थानाने दुसरा महत्त्वाचा धडा घेतला पाहिजे, तो 'राष्ट्र' व 'देश' यांमधील भेदाचा होय. व्हर्सायच्या तहाने सध्याचा झेकोस्लोव्हाकिया अनेक भिन्न राष्ट्रीयत्वांच्या लोकांचा बनविला नि त्यालाच राष्ट्र म्हटलें ! परंतु आज अनुभवाला असें आलें आहे की, तें राष्ट्र नसून अेका विशिष्ट क्षेत्रफळाचा तो अेक देश होता. सुडेटन जर्मन हे अनेक वर्षें जर्मनीपासून अलग राहत आले होते; परंतु हेर हिटलरने जर्मन आर्यवंशाच्या अेकराष्ट्राची घोषणा केल्यापासून, आपलें अंतिम हित हें जर्मन राष्ट्रांत सामील होण्यात आहे; त्यांची व आपली पुण्यभू व पितृभू अेकच असली पाहिजे; आपण अेकमेकांपासून अलग राहू शकत नाही या भावनेने सुडेटन जर्मनांच्या मनोभूमीची अशी पक्कड घेतली की, त्यांनी आपण जर्मन राष्ट्राशी अेकजीव होणार अशी घोषणा केली नि ते आज जर्मन राष्ट्राशी अेकरूप झाले.

झेकोस्लोव्हाकियाचीं झालेलीं शकलें पाहून आपण हिंदुस्थानवासीयांनी हिंदुस्थान हें राष्ट्र कोणाचें याचा खोल विचार करून आपले कोण नि परके कोण हें नीट ओळखलें पाहिजे. काश्मिरापासून कन्याकुमारीपर्यंत व कराचीपासून कामोरियनपर्यंत पसरलेल्या प्रदेशांतील हिंदु लोकांना हिंदुस्थानाशिवाय बाहेर आपलें म्हणून कोणी नाही. जे कोणी आपले आहेत ते याच देशात आहेत असें ज्यांना वाटतें त्यांच्यावरच आपली सारी भिस्त ठेवली पाहिजे.

मुस्लिम फेडरेशन

करावीच्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात मुसलमानांनी भावी फेडरेशनचें मुस्लिम फेडरेशन व हिंदु फेडरेशन असे दोन घटक असावेत असें घोषित केलें. बंगालचे मुख्य प्रधान फझलूल हक्क हे 'हिंदुओंको सताअेंगे' असें घोषित करतात. मुसलमान संख्याधिक्य असलेल्या प्रान्तात मुस्लिमनिष्ठांचेंच प्रधानमंडळ झालें पाहिजे असें ते स्पष्ट म्हणतात. ते स्वत:ला प्रथम मुसलमान व मग हिंदी समजतात. याचें कारण अुघड आहे. मुसलमानांची पुण्यभूमि हिंदुस्थानाच्या बाहेर आहे.

ते पवित्र मानतात त्या भाषा हिंदुस्थानाबाहेर प्रचलित आहेत. मुसलमानांचीं राज्यें व पादशहा हिंदुस्थानावाहेर असल्याने त्यांच्याशी आपला घरोबा असावा, आपले त्राते ते आहेत असा त्यांचा ग्रह आहे. आजपर्यंत हिंदु राष्ट्राचे पुरस्कर्ते मुसलमानांच्या याच मनोवृत्तीची ग्वाही देत असत; म्हणून त्यांच्यावर जातिनिष्ठेचा छाप मारला जात असे. परंतु आम्ही म्हणत होतो तेंच वरोवर होतें, असें मुस्लिम लीगने अंगीकारलेल्या धोरणावरून स्पष्ट होत आहे. हिंदुस्थानातील मुसलमान हिंदूंच्या रक्ताचे आहेत. फझलूल हक्कांचें घराणें हें काही पिढ्यांपूर्वी हिंदु असेल, परंतु आज त्यांची भावना काय आहे हा प्रश्न आहे.

आमचें राष्ट्र

राष्ट्र हें प्रादेशिक मर्यादांनी होत नाही, केवळ अेक भाषेनेही होत नाही, तर परस्परस्वत्वाच्या भावनेने होत असतें. ज्यांना आपल्या मायभूवाहेर धार्मिक वा आधिभौतिक विलोभन नाही अशाच लोकांचें राष्ट्र होत असतें.

मुसलमानांना अरवस्थानाबद्दल आपुलकी वाटते कारण त्यांची ती पुण्यभूमि आहे. त्यांना तुर्कस्तान, अिराण, अफगाणिस्तान हे जवळ वाटतात; कारण तेथे त्यांच्या संस्कृतीचीं राज्यें आहेत. अुद्या हिंदुस्थान विरुद्ध हीं राष्ट्रें असा लढा आला तर मुसलमान बावचळण्याचा संभव आहे, पण हिंदूंची स्थिति काय होअील ?

हिंदूंना हिंदुस्थानावाचून गति नाही

हिंदुस्थानात हिंदूंचे पूर्वज राहिले नि वाढले. त्यांचीं सर्व पवित्र स्थानें याच पुण्यभूमीत आहेत. त्यांना जिवंत राहण्याला व मरण्यालाही या देशाबाहेर दुसरी जागा नाही. त्यांना पृथ्वीतलावरच नव्हे तर स्वर्गात स्थान मिळवावयाचें असेल तरी हिंदुस्थानाविना दुसरी गति नाही. त्यांचे देव क्षीणपुण्य झाले तरी त्यांना हिंदुस्थानच्या कर्मभूमीवर येअून पुण्य करून स्वर्गपद प्राप्त करून घ्यावें लागतें. म्हणून हिंदुस्थान हें हिंदुत्वनिष्ठांचें राष्ट्र आहे. हिंदुस्थानातील हिंद्वेतरांशी आमचें भांडण नाही. परंतु त्यांना जर हिंदूंबद्दल अभेद्यपणा वाटत नसेल तर हिंदूंनी काय करावें ? मुसलमान हिंदूंवरोबर असले तर हवेच आहेत. परंतु ते नि हिंदु यांचें राष्ट्र आज अेक आहे असें त्यांच्या वृत्तीवरून म्हणता येत नाही. मुसलमानांचें राष्ट्र पाकस्तान आहे. अशा स्थितीत हिंदूंनी हिंदुत्वनिष्ठच राहिलें पाहिजे.

हिंदूंच्या हिताचा बळी

हिंदुस्थानात हिंदूंचें राष्ट्रीयत्व नि हिंदुत्व हीं विभिन्न असूच शकत नाहीत. ते हिंदु पहिल्याने व दुसऱ्याने हिंदुच; कारण हिंदुस्थान हें हिंदुराष्ट्र आहे. मुसलमान हे मात्र मुसलमान प्रथम व हिंदुस्थानवासीय नंतर होअू शकतात. मुसलमान ज्या प्रांतांतून बहुसंख्य आहेत त्या प्रांतांत मुस्लिमनिष्ठ मंत्रिमंडळें

आहेत व सरहद्द प्रांतासारख्या ठिकाणी जेथे काँग्रेसचें मंत्रिमंडळ आहे तेथेही तें मुसलमानाचेंच व्हावें असा त्यांचा आग्रह आहे. कारण त्यांची दृष्टि पाकस्तानाची आहे. याच्या अुलट हिंदूंकडे पहा. ज्या सात प्रांतांत हिंदु बहुसंख्य आहेत तेथील काँग्रेसचीं प्रधानमंडळें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेने भारलीं जाअून हिंदूंच्या हिताचा बळी देअून मुसलमानांची आराधना करीत आहेत. सोलापूरच्या कुळकर्णी वकिलांच्या खुनी माणसाला मुंबअी सरकारने कां सोडलें तर तेथील मुसलमान समाज खूष व्हावा म्हणून! परंतु हिंदुत्वाला जातीय मानणाऱ्या या काँग्रेस-राष्ट्रीयांना मला असें विचारावयाचें आहे की, तुमची मतदारांत असलेली गणना हिंदु म्हणून आहे: तुम्ही मतें हिंदूंचीं मागता, परंतु त्यांच्या हितसंबंधाच्या रक्षणाची वेळ आली म्हणजे मात्र हिंदुत्वाबद्दल तुम्ही नाकें मुरडून राष्ट्रीयत्वाच्या नांवाखाली हिंदूंची गळचेपी करता.

हिंदु तेवढा अेक

माझा असा सवाल आहे की, हिंदुत्वाची जर तुम्हांला अितकी चीड असेल तर हिंदु म्हणून स्वत:चें वर्णन केल्याविना जोपर्यंत स्वत:च्या निवडणुकी होत नाहीत तोपर्यंत तुम्ही निवडणुकीला अुभे कां राहता ?

आज जर हिंदूंच्या हिताची हिंदूचें मताधिक्य असलेल्या प्रांतांतून गळचेपी होत असेल तर त्याचा दोष तुम्हा मतदारांवर आहे. हिंदुस्थानातील हिंदु तेवढा अेक; मग कोणत्याही धर्मपंथाचा तो असो, अशी भावना ठेवून यापुढील सर्व निवडणुकीत तुम्ही हिंदुत्वनिष्ठ अुमेदवारांनाच निवडून द्या. हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व हीं अभेद्य आहेत, हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य हिंदूंच्या बळावर मिळेल व टिकेल.

✦ ✦ ✦

२२. त्यांचा शत्रु तो आमचा मित्र

पुणें येथे दि. १-१-३८ रोजी विजयानंद नाटकगृहात सकाळी ८॥ वाजता स्वा. सावरकर यांचें कै. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली 'हिंदुस्थानचें आंतरराष्ट्रीय धोरण' या विषयावर झालेलें भाषण.

अिंग्रज लोक हे जर हिंदुस्थानवरील राज्यकर्ते नसते तर जपानी, अिटालियन अगर जर्मन या परराष्ट्रीय भाषांहून अधिक महत्त्व अिंग्रजी भाषेला आपण खास दिलें नसतें. अिंग्रजी भाषेवरील प्रभुत्वामुळे अिंग्रजांच्या ठिकाणी आपणांबद्दल अधिक आदर अुत्पन्न होतो असें कित्येकांचें मत आहे, पण मला तसें वाटत नाही. हा आपला अेक न्यूनगंड आहे. मी आज अिंग्रजीत बोलणार आहे. माझें भाषण

चांगलें झालें तर त्याबद्दल शाबासकी देण्याची आवश्यकता नाही. तसेंच माझें अिंग्रजी भाषण चांगलें झालें नाही तर त्यामुळे वाटणारा आदर कमी होअील किंवा कार्यहानि होअील असेंही मला वाटत नाही. परराष्ट्रीय भाषांत प्रभुत्व संपादन करण्याच्या कामी हिंदी लोकांचें अभिनंदन केलें पाहिजे. हिंदी गृहस्थ परकीय भाषा तेव्हाच आत्मसात् करतात. परंतु परकीयांना आपली भाषा आत्मसात् करता येत नाही. सबंध जन्मभर संस्कृतचा अभ्यास करून, संस्कृत शब्दांचे अुच्चार नीट करता येत नाहीत असे परराष्ट्रीय विद्वान् आहेत.

प्रारंभीचे तीन प्रयत्न

चाणक्य-कालात आंतरराष्ट्रीयसंबंधाचें शास्त्र परिणत स्थितीस पोचलें होतें. त्यांच्या अर्थशास्त्रावरील ग्रंथात मित्रराष्ट्र, शत्रुराष्ट्र, मित्रशत्रु-राष्ट्र शत्रुमित्र-राष्ट्र वगैरे शब्दप्रयोग पहावयास मिळतात. परंतु तो काल गेल्यानंतर समुद्र-पर्यटन हें पातक समजण्याचा विपरीत काल आला; आणि हिंदुस्थानचे अितर राष्ट्रांशी असलेले संबंध तुटले. त्यामुळे आपलें फार नुकसान झालें आहे. १८१८ साली स्वराज्य गेल्यापासून आमच्या दास्याच्या नि अिंग्रज-प्रभुत्वाच्या युगाला प्रारंभ झाला. त्या वेळेपासून हिंदुस्थानच्या आंतरराष्ट्रीय संबंधात प्रगति कशी झाली तेंच मी सांगणार आहे. राजा राममोहन रॉय हे अिंग्रजांचा पेन्शनर बनलेल्या मोगल बादशहाच्या वतीने अिंग्लंडला गेले होते. राजा राममोहन रॉय प्रसिद्ध समाजधुरीण होते. त्यांच्या परराष्ट्रातील चळवळीत राजकीय हेतु असला तरी त्यांत आंतरराष्ट्रीय संबंध ठेवण्याचा हेतु नव्हता. त्यानंतर या दृष्टीने दुसरा मोठा नि महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे रंगो बापूजी यांचा. युरोपातील परिस्थितीचाही अभ्यास करण्याबद्दल त्यांना आदेश देण्यात आला होता.

तिसरा अुल्लेखनीय प्रयत्न प. वा. दादाभाअी नौरोजी यांचा होय. तेथे त्यांनी 'अिंडिया सोसायटी' नांवाची संस्था स्थापन केली. या संस्थेने बरेंच अुपयुक्त कार्य केलें. अिंग्रज लोक हे जात्या चांगले आहेत नि हिंदी लोकांचे किती हाल होतात, त्यांच्याकडून पैसा कसा देशाबाहेर नेला जातो हें त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यास ते ह्या परिस्थितीला आळा घालतील, असा त्या वेळी समज होता. पण तांबडा समुद्र नि अरेबियन समुद्र यांचें पाणीच वाअीट ! त्याचा परिणाम होताच अिंग्रज लोकांच्या विचारात अेकदम पालट होतो.

नवीन संस्था

त्या वेळी अिंग्लंडमधील वृत्तपत्रांत हिंदुस्थान-विषयक मजकूर येण्यासाठी, वृत्तपत्रांना पैसे द्यावे लागत. पण त्यानंतर 'अभिनव भारत सोसायटी' स्थापन झाल्यावर परिस्थिति पालटली. त्या वेळेपासून, अिंग्लंडमधील लोकांचें हिंदुस्थानकडे अधिक लक्ष वेधलें नि हिंदी वृत्त छापून आणण्यासाठी त्यांना पैसे द्यावे लागत.

ते अुलट हिंदी लोकांना त्यासाठी पैसे देअू लागले. हिंदी लोकांचें रक्त अगदीच थंड नाही, वेळप्रसंगी तें तप्त होअू शकतें याचा अिंग्रज लोकांना प्रत्यय आला. परंतु तत्पूर्वी ना. गोखले नि सुरेन्द्रनाथ बानर्जी यांच्यामुळे हिंदुस्थानच्या आंतरराष्ट्रीय धोरणात वाढ होअून, त्याला अिष्ट असें वळण लागलें. हिंदुस्थान दास्यत्वाचें जोखड भिरकावून देण्यास किती अुत्सुक झाला आहे हें या देशभक्तांनी अिंग्लंडच्या निदर्शनास आणून दिलें. तथापि आतापर्यंत राजकारणाच्या दृष्टीने विशेष परिणाम झालेला नाही. विवेकानंदानाही हाच अनुभव आला होता. भारताच्या वेदान्ताची वगैरे महती मान्य करून लोक सभेच्या शेवटी त्यांना विचारीत, 'हिंदुस्थानचा वेदान्त अेवढा मोठा आहे तर मग मूठभर अिंग्रज लोक त्यांना दडपून कसे ठेवू शकतात?' हा प्रश्न अर्थात्‌च त्यांना निरुत्तर करी.

प्रचाराचें महत्त्व

'अभिनव भारत' संस्थेच्या चळवळीमुळे हिंदुस्थानातील चळवळीकडे लक्ष देणें जरूर आहे असें अिंग्रजांना वाटू लागलें, अेवढेंच नव्हे तर अितर राष्ट्रांतही हिंदी राजकारणाला महत्त्व प्राप्त झालें. या चळवळीसंबंधात श्री. हरदयाळ, पं. श्यामजी, बॅ. राणा वगैरे पुढाऱ्यांचा प्रामुख्याने अुल्लेख करणें जरूर आहे. जर्मनी वगैरे राष्ट्रांत 'अभिनव भारत संस्थेच्या' शाखा स्थापन करण्यात आल्या. जर्मन कैसरने तर आपल्या अटींत हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे अशी अट घातली होती. त्यावरून या पुढाऱ्यांच्या प्रचारकार्याचें महत्त्व लक्षात येअील. त्यापूर्वी कोणतेंही राष्ट्र अिंग्लंडला असा प्रश्न विचारू शकलें नव्हतें. सिंगापूरला बंड अुद्‌भवलें तेव्हा अमेरिकेतून शेकडो हिंदी लोक तेथे जमा झाले होते. 'देशको आझाद करनेको चलो' या ध्येयाने ते प्रेरित झाले होते. मी आता जी माहिती सांगत आहे ती सरकारी रिपोर्टातीलच माहिती सांगत आहे. अंदमानात असतानाच मला तो रिपोर्ट पहावयास मिळाला. तेव्हा फक्त मी अितिहासाचा पुनरुच्चार करीत आहे.

गांधीजींचा अदूरदर्शीपणा

प. वा. लोकमान्य टिळकांनाही परराष्ट्रातील प्रचाराचें महत्त्व पटलें होतें नि त्यासाठी ते पैसा खर्च करावयासही तयार होते. आजच्या सभाध्यक्षांची त्यांनी त्या कामासाठी निवडही केली होती. आपला स्वातंत्र्याचा लढा आपण जर्मनी, जपान वगैरे राष्ट्रांतही चालविला पाहिजे असें त्यांचें मत होतें. पण अैन वेळी लोकमान्य गेले! त्यानंतर काँग्रेस आली. म. गांधींनी काही गोष्टी चांगल्या केल्या, परंतु काही बाबतीत त्यांचें धोरण अदूरदर्शी ठरलें आहे. आम्हांला आंतर-

राष्ट्रीय संबंधाशी कर्तव्य नाही असें म. गांधींनी जाहीर केलें आणि अशा रीतीने दादाभाअींपासून लोकमान्यांपर्यंत चालू असलेली नि ना. गोखले नि लाला लजपत-राय यांच्यासाख्या पुढाऱ्यांनी पुरस्कारिलेली ही परराष्ट्रीय प्रचाराची चळवळ थांबविण्यात आली. साम्राज्यांतर्गत स्वराज्य अशी पूर्वीची कल्पना नव्हती, परंतु नंतर 'अिंग्लंडचे शत्रु ते आमचे शत्रु व अिंग्लंडचे मित्र ते आमचे मित्र' असें जाहीर करण्यात आलें! कित्येक वर्षें काँग्रेसला आंतरराष्ट्रीय धोरणच नव्हतें. काँग्रेसमध्ये ती जाणीव अुत्पन्न करण्याचें श्रेय पं. जवाहरलाल यांना आहे. परराष्ट्रीय राजकारणात आपण काही तरी भाग घेतला पाहिजे असें त्यांचें मत आहे नि जवाहरलालांच्या या धोरणाला माझा पाठिंवा आहे.

हरींद्रनाथांची आठवण कोणाला आहे ?

परराष्ट्रात प्रचार करणारांनी किती हालअपेष्टा सोसल्या त्याची या लोकांना कल्पनाही नाही. बरोबरच आहे! ते अंदमानात गेले, त्यांचा या राष्ट्राच्या किनाऱ्यावरून दुसऱ्या राष्ट्राच्या किनाऱ्यापर्यंत पाठलाग करण्यात आला. त्यांची अन्नान्नदशा होअून त्यांना कल्पनातीत हाल सोसावे लागले; परंतु ते काँग्रेसचे अध्यक्ष कोठे झाले? काँग्रेसचे अध्यक्ष झालें की सर्व काही झालें! श्रीमती सरोजिनी नायडू, हिंदुस्थानच्या थोर सेविका (She-patriot) नि बंगालच्या बुलबुल यांचें नांव सर्वतोमुखी आहे; कारण त्यांनी काँग्रेसचें अध्यक्षस्थान अलंकृत केलें होतें! पण त्यांचा भाअू हरींद्रनाथ चट्टोपाध्याय यांचें नांव कोठेच अेकू येत नाही! त्याला हिंदुस्थानच्या बाजूने प्रचार करीत असता रशियात अटक करण्यात आली असें म्हणतात.

त्यांनी हिंदुस्थानसाठी सरोजिनी नायडूपेक्षा अधिक कष्ट नि हालअपेष्टा सोसल्या आहेत; पण ते सरोजिनी नायडू यांच्याप्रमाणे बुलबुल कोठे आहेत? युरोपातील हद्दपारीची शिक्षा किती तापदायक असते याचा अनुभव प्रत्यक्ष ते कष्ट सोसणारासच माहीत. अेका अर्थी अंदमान पुरविलें; पण युरोपातील हद्दपारी वाअीट! आजची दोन प्रहरची वेळ कोठे भागवावयाची हा प्रश्न रोज त्यांच्यापुढे दत्त म्हणून अुभा असतो; पण देशासाठी सर्व हालअपेष्टा सहन करून ते आंतरराष्ट्रीय चळवळ करीत आहेत.

जवाहरांना जगाच्या स्वातंत्र्याची काळजी

हिंदी तरुणांनी आंतरराष्ट्रीय धोरण निश्चित करून त्या दृष्टीने संघटित प्रयत्न केले पाहिजेत. प्रभावी आंतरराष्ट्रीय धोरणाची सध्या अत्यंत जरुरी आहे. हें धोरण कसें असावें याबद्दल तीन चार प्रमुख तत्त्वें मी आपणांस सांगणार आहे. अिंग्लंड अेखाद्या महायुद्धात गुंतलें म्हणजे तीच आपली योग्य संधि होय. अिंग्लंडशी

आज ज्यांचें शत्रुत्व आहे त्यांच्याशी सहमत करून आपण त्यांना सामील होऊ असा त्याचा अर्थ नाही. पं जवाहरलाल यांनी सध्या जी भूमिका स्वीकारली आहे तीमुळे गैरसमज होण्यास जागा आहे. 'अचल न्याय नि नीतितत्त्वें' यावर त्यांची भूमिका आधारल्यासारखी दिसते. दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राकडून आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या भूमिकेचा स्वीकार कधीतरी केला जाअील काय, याचा आपण विचार केला पाहिजे. जणू काय सर्व जगाला स्वातंत्र्य बहाल करायलाच आपण आज निघालो आहो! अबिसिनियाचें नि चीनचें स्वातंत्र्य नष्ट झालें म्हणून नेहरूंना हळहळ वाटते! परंतु तुमच्या स्वत:च्या स्वातंत्र्याची वाट काय?

प्रथम आत्मरक्षण करा

तथापि हिंदुस्थान स्वातंत्र्य-संपादनार्थ अुत्सुक झाला असून तें तो मिळविणारच हें अिंग्लंडात जाहीर करण्याच्या कामी पं. जवाहरलालजींनी दाखविलेली धडाडी अभिनंदनीय आहे यात शंका नाही. आम्हांला स्वातंत्र्यलाभ झाल्यानंतर आम्ही काय करू तें आता सांगण्यात येत आहे. पण मी स्वातंत्र्यसंपादनाच्या आधी आमचें काय धोरण राहील, तें सांगतो. अबिसिनियाबद्दल सहानुभूतीचा ठराव करून तो काँग्रेसकडून अबिसिनियन बादशहाकडे पाठविण्यात आला. परंतु तें पत्र त्यांना मिळालें काय? अबिसिनियन बादशहा हेलेसिलासी याच्या हातात पत्र नेअून देणारें अेकही पोस्ट आज जगात नाही. चीनसाठी फंड जमविण्यात येतो, परंतु चिमूटभर द्रव्याने त्यांचा काय कार्यभाग होणार आहे? 'दानधर्माचा अुगम स्वगृही झाला पाहिजे' ही अिंग्रजी म्हण लक्षात ठेवा. फॅसिझम व बोल्शेव्हिझम हे शब्द द्वैत-अद्वैत या शब्दांअितकेच अज्ञात आहेत. युरोपातील 'अिझम' आपला सर्वनाश करतील. त्यातील अमुक तत्त्व वाअीट नि अमुक तत्त्व चांगलें असें म्हणता येणार नाही. त्या त्या राष्ट्रातील परिस्थितीला तो तो ध्येयवाद योग्यच आहे.

हिटलर नि मुसोलिनी

मुसोलिनीने सत्ता हाती आल्यानंतर अवघ्या चार वर्षाच्या अल्पावधीत आपलें राष्ट्र अुन्नत स्थितीला आणलें. मग फॅसिझमला तुम्ही कशाच्या जोरावर नांवें ठेवता? बोल्शेव्हिझमचें तत्त्व रशियाच्या बाबतीत परिणामी ठरलें. जर्मनीला बोल्शेव्हिझम मान्य नाही, पण नाझी तत्त्वाच्या जोरावर हर हिटलरने जर्मनीचें स्वरूप पार पालटून टाकलें आहे. जर्मनी काही हिंदुस्थान नाही. जर्मनीने ज्यू लोकांना बाहेर घालविल्याबद्दल तुम्हांला वाअीट कां वाटावें? दुसऱ्याला पोसण्याचा काही त्याने मक्ता घेतलेला नाही. 'जर्मनीसाठी जर्मनी' हें हर हिटलरचें धोरण आहे. याच तत्त्वावर हर हिटलरने आज, अेका काळी सर्व जगाचें हसें झालेल्या जर्मनीत क्रांति घडवून आणली आहे. 'माझें राष्ट्र कसें जगेल?'

लटकले गेले, त्यांचें मी अशा प्रसंगी स्मरण न करणें हें अुचित होणार नाही. ज्या कार्यासाठी आम्हांला अपमानपत्रें मिळालीं त्याचसाठी आता आम्हांला मानपत्रें मिळत आहेत ! ही आपल्या देशाचीं खरोखर प्रगति आहे. तुम्ही स्वातंत्र्याच्या चळवळीची प्रगति केली यावद्दल आम्हांला मोठें समाधान वाटतें. आज जे काही हक्क आपणांला मिळाले त्यावरून आपणांला स्वराज्य मिळालें अशी भ्रामक कल्पना करणें मात्र चूक होअील.

आम्हांला अत्याचारी कां म्हणता ?

देशभक्तीने प्रेरित होअून क्रांतिकारक लहानसहान अत्याचार करतात म्हणून त्यांना वर्तमानपत्रें अत्याचारी म्हणतात पण तें बरोबर नाही. फार तर त्यांना 'शस्त्राचारी' म्हणा. जे लोक मोठमोठ्या युद्धसामग्रीने चुटकीसरशी लहान व निर्बल राष्ट्रें गिळंकृत करण्याचा सपाटा लावतात नि त्यांना अुपद्रव देतात तेच लोक खरोखरी अत्याचारी नाहीत काय ? संगिनीच्या नि विमानांच्या साहाय्याने जे लोक अितरांना अुपद्रव देतात – ते मग राजे असोत की आणखी अितर कोणी असोत – ते अत्याचारी होत. अखिल हिंदी लोकांचें जें ध्येय त्याच ध्येयासाठी जर आम्ही हातांत शस्त्र घेतलें तर आम्ही का अत्याचारी झालो ? तुमच्यासाठी जे लोक फासावर गेले त्यांना तुम्ही अत्याचारी व माथेफिरू म्हणता ! आमचा माथा फिरला म्हणून तर देश फिरला आहे !

सत्कार्यार्थि हिंसा ही अहिंसाच होय !

आमची क्रांति रक्तपूर्ण म्हणून जर दोषार्ह असेल तर तुमची क्रांति तरी रक्तशून्य कोठे आहे ? ज्या अिंग्रजांनी आपलें रक्त शोषण केलें आहे नि ज्यांच्या विरुद्ध तुम्ही चळवळ करीत आहा त्यांना तुम्ही दुखवीत आहातच कीं नाही ? तुमच्या स्वदेशीच्या चळवळीने मँचेस्टरच्या पोटावर पाय येतो, त्यामुळे त्यांचीं मनें तुम्ही दुखवीत नाही काय ? अेवढेंच नव्हे तर तुम्ही त्यांचें रक्त न सांडलेंत तरी तुम्हा निःशस्त्र सत्याग्रहींचें रक्त सांडावयाला तर अिंग्रज कमी करीत नाहीत ना ? मग काय अिंग्रजांचें रक्त सांडलें तर हिंसा नि हिंदी लोकांचें सांडलें तर अहिंसा होते ? अहिंसेची ही व्याख्या सर्वथैव चुकीची आहे. सत्कार्यासाठी केलेली हिंसा ही वस्तुतः अहिंसाच होय, ह्याची खूणगाठ आपण मनाशी बांधा. अर्थात् हिंसेचा अवलंब करा, असा याचा अर्थ नाही. अहिंसेचा भलताच बडिवार करून 'शस्त्राचारी' लोकांना दूषणें लावू नका, अेवढेच माझें म्हणणें.

जपान नि हिंदुस्थान

परराष्ट्रीय राजकारणाचें निरीक्षण करा. काही काळापूर्वी वामन विष्णु खरे याच्यासारखे अस्सल क्रांतिकारकदेखील पाहिजे तर होमरूल बोला पण संपूर्ण

स्वातंत्र्याची गोष्ट बोलू नका असें म्हणत. कारण 'नाविष्णुः पृथिवीपतिः' अशी त्यांची विचारसरणी होती. परंतु ती विचारसरणी आता काळाच्या ओघाबरोबर बदलली आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने आपण आता परकीय राजकारणाकडे बारकाईने लक्ष दिलें पाहिजे. जपान चीनला गिळंकृत करीतच आहे. तसें पाहिलें तर चीन हा आपल्या अत्यंत सन्निध आहे नि म्हणून आपण या घटनेकडे डोळ्यांत तेल घालून पहात बसलें पाहिजे. अखंड हिंदी राष्ट्र निर्माण करावें म्हणून आजपर्यंत आपण प्रयत्न केले आहेत. तरी पण या चीन-जपानच्या लढ्यामुळे आता किनाऱ्यावर ज्याप्रमाणे ब्रिटिश हिंदुस्थान, फ्रेंच हिंदुस्थान, डच हिंदुस्थान त्याप्रमाणेच 'जपानी हिंदुस्थान' असाही अेक भाग निर्माण होतो की काय अशी भीति मला वाटू लागली आहे.

जपानचा हिंदुस्थानावर डोळा

जपान अिंग्लंडचा नुसता पराभव करून थांबणार नाही, तर त्याचा डोळा हिंदुस्थानवर राहील. पश्चिमेकडे अिटलीने भूमध्य समुद्र रोखून धरला आहे नि अिकडे पूर्वेकडे जपानचा हिंदुस्थानवर डोळा आहे. याचा बाहेरून नाही तरी आतल्या आत तरी मंत्रिमंडळांनी विचार करणें अवश्य आहे. प्राचीन काळी रोमचें अिंग्लंडवर ५०० वर्षें साम्राज्य होतें. परंतु अिटलीवर जर्मनीने जेव्हा स्वारी केली नि अिटली धोक्यात आला, तेव्हा या संधीचा फायदा घेऊन अिंग्लंड आयतेंच स्वतंत्र झालें. तशीच स्थिति आज हिंदुस्थानच्या राजकारणाची आहे हें हिंदुस्थानच्या प्रजेने नि पुढाऱ्यांनी विसरून चालावयाचें नाही. पण त्या वेळीसुद्धा रोमन लोक गेल्यास आपलें कसें होअील या विवंचनेने अिंग्रज लोक रोमनांनी आपल्यास सोडून न जाण्याची याचना करू लागले! तसें येथे होता कामा नये. अिंग्रज लोकांविषयी आपल्या लोकांत ज्या काही भ्रामक कल्पना होत्या नि आजही आहेत त्या सर्व आतापर्यंत फोल ठरल्या आणि सुदैवाने आता हिंदुस्थानच्या लोकांना अिंग्रजांची राजनीति कशी आहे हें कळू लागलें आहे.

ते ठग, तर हे महाठग

परंतु जगांत नीति आहे, अिंग्लंडसारखीं नीतिमान् राष्ट्रें निःशस्त्रांवर कधीही शस्त्र अुगारणार नाहीत, ही जी गेल्या १०-१५ वर्षांपासून हिंदुस्थानात समजूत पसरली आहे ती अगदीच चुकीची आहे. आजच्या प्रबळ राष्ट्रांत असें कोणतें राष्ट्र आहे की, तें नि.शस्त्र राष्ट्रावर शस्त्र चालवू नये अशी नीतिमत्ता दाखवील? किंवा असें कोणी चालविल्यास त्याला विरोध करील? तेव्हा जगाचा नैतिक पाठिंबा मिळेल या खुळचा समजुतीत काय स्वारस्य आहे? अिटली, जर्मनी, जपान हीं राष्ट्रें जर ठग असतील तर अिंग्लंड, अमेरिका, फ्रान्स हीं राष्ट्रेंही महाठग आहेत.

म्हणजे थोडक्यात, राष्ट्रसंघ निर्माण करणारो राष्ट्रेंसुद्धा काही मोठ्या नैतिक बळावर अधिष्ठित नाहीत.

हबसाणाच्या वेळेला नीति कोठे लपली ?

याच राष्ट्रसंघनिर्मात्या राष्ट्रांनी ॲबिसिनियाला अिटलीबरोवर लढण्याची भर दिली; पण आज हा राष्ट्रसंघ त्या हतभागी ॲबिसिनियासाठी काय करीत आहे ? बिचारा ॲबिसिनिया गुलाम बनलाच की नाही ? ज्या वेळी अिंग्लंड अबिसिनियाची कड घेत होता, त्याच वेळी तो अिजिप्तमध्ये तेथील विद्यार्थ्यांची चळवळ दडपून टाकीत होता.

चीन–जपान लढ्यात चीनचा तरी काही अपराध आहे कीं नाही, हेंही आपण पाहिलें पाहिजे. १५० वर्षांपूर्वी चीन जपान हीं राष्ट्रें असंघटित होतीं. पण जपानने परिस्थिति ओळखून आपला असंघटितपणा तावडतोब घालविला; पण चीन अफूच्या गुंगींत तसाच झिंगत राहिला. नुसत्या जपानलाच दोष देण्यात काय अर्थ आहे ? परराष्ट्रीय राजकारणात अजून न्यायान्यायाचें मापन निघालें नाही. माझा जीव कसा वाचेल, हेंच प्रत्येकाने पाहिलें पाहिजे. तेव्हा निष्फळ न्यायाच्या गोष्टी न बोलता परराष्ट्रीय राजकारणाचा आपल्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. वस्तुतः जपानचें चीनवरील आक्रमण ही वाअीट गोष्ट तर खरीच; पण जपानला हीं पाश्चात्य राष्ट्रें तरी कोणत्या तोंडाने दोष देणार ? हीं सारींच राष्ट्रें चोर नाहीत काय ? जपानने चीन न गिळला तर पाश्चात्य राष्ट्रें त्याला गिळायला आ वासून बसलींच आहेत. तेव्हा जपानच्या निष्कारण निषेधाच्या भानगडीत हिंदुस्थानाने कां पडावें ? तुमच्या निषेधाने चीनला तर साहाय्य होत नाहीच, पण तुम्ही जपानचें शत्रुत्व मात्र विनाकारण संपादिता. त्यापेक्षा जपानच्या चीन-दिग्विजयानंतर त्याचा पुढील टप्पा साहजिकपणे पूर्व भारत राहणार हें लक्षात घेअून जपानच्या या आगमनाचा व अिंग्लंडच्या दुर्बलतेचा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने कसा अुपयोग करून घेता येअील याचा विचार हिंदुस्थानने करणें हेंच अधिक सयुक्तिक ठरणार नाही काय ?

निर्भेळ अहिंसा कोठे आहे ?

आत्मघात ही अेक हिंसाच आहे हें आपण विसरू नका. हें जर खरें तर निर्भेळ अहिंसा नि निर्भेळ सत्य कोठे आहे ? अत्यंत मोठी हिंसा टाळण्यासाठी ज्या लहानसहान हिंसा कराव्या लागतात त्या अहिंसाच होत हें लक्षात ठेवा. अत्याचाराच्या प्रतिकारासाठी जर लढावयाचें असेल तर ती काही हिंसा होत नाही, असें बुद्धाने अेकदा आपल्या शिष्यास सांगितलें होतें. जर आवश्यक अशी लहान हिंसा करण्याचें टाळलें तर आपण मोठी हिंसाच करतो असें समजा. अुदाहरणार्थ, मूल

आडवें आलें आणि जर ती लहान हिंसा डॉक्टरने टाळली तर मूल नि माता दोन्ही जीव मारण्याची हिंसा केल्याचें पाप त्या डॉक्टरावर येते.

हिंदुस्थानचें यापुढील कर्तव्य

अिटलीने भूमध्य समुद्र अडविला आहे ना? फार चांगली गोष्ट झाली. अिंग्लंडच्या पाठीचा कणाच त्याने आमच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने मोडला आहे. आता जर यापुढे महायुद्ध अुद्भवलेंच तर हिंदुस्थानला गप्प बसून चालावयाचें नाही. मागच्या महायुद्धाच्या वेळी हिंदुस्थानला त्यापासून काही भय नव्हतें; पण आता मात्र तशी स्थिति नाही. तेव्हा हिंदुस्थानच्या लोकांनी सावध राहून या संधीत आपले हात धुवून घेतले पाहिजेत. त्याने मागच्या महायुद्धासारखी अिंग्लंडला मदत करण्याची पुनः चूक करता कामा नये. त्या चुकीचें आता तरी हिंदुस्थानने परिमार्जन केलें पाहिजे. गेल्या महायुद्धामुळे आपल्याला अिंग्लंडने जे काय दिलें तें आपण पाहिलेंच आहे. तेव्हा या वेळी जर महायुद्धाची झळ अिंग्लंडला लागली, तर त्या वेळी अिंग्लंड तुम्हांला मदत मागेल हें अुघडच आहे. त्या वेळी त्याच्यावर जास्तीत जास्त अटी लादा. शस्त्रांचा कायदा आम्हांला नको ही पहिली अट त्याच्यावर लादा, हातात शस्त्र आल्याशिवाय तुमच्यांत वीरवृत्ति तरी कशी येणार? तेव्हा हा कायदा प्रथम रद्द झाला पाहिजे अशी चळवळ हिंदुस्थानने करणें हें त्याचें प्रथम कर्तव्य आहे.

✦ ✦ ✦

२४. परराष्ट्रीय धोरणाचें मर्म

कलकत्ता येथे आल्बर्ट हॉलमध्ये दि. २०-२-३९ रोजी श्री. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली स्वा. सावरकर यांचें झालेलें भाषण.

देशात जेव्हा जेव्हा नवा प्रश्न अुपस्थित होतो, तेव्हा तेव्हा महाराष्ट्राचे डोळे तुमच्या बंगालकडे लागून राहतात. बंगाली हिंदूंचें मत काय आहे हें आधी अजमावून पाहिल्याशिवाय महाराष्ट्रीय हिंदूंनी कोणत्याही प्रश्नास कधीही हात घातलेला नाही. न्या. रानडे यांच्यापासून लो. टिळकांपर्यंत ही परंपरा अविच्छिन्नपणे चालत आलेली आहे आणि आपणही मजकडे कानाडोळा करणार नाही अशी मला आशा आहे.

मराठ्यांनी दिल्ली कशी सर केली, शिखांनी अेकजुटीने स्वतंत्र राज्य कसें स्थापिलें आणि बंगालमधील प्रतापादित्याने मोगली फौजेचा कसा वारंवार धुव्वा अुडविला हें सारें आपण अितिहासावरून जाणतच आहा. हीं सर्व स्वातंत्र्ययुद्धें प्रचंड नि अेकसूत्र प्रमाणावर मात्र पूर्वी खेळलीं गेलीं नाहीत. आता अशी वेळ आली आहे की, मी हिंदु, मी बंगाली, मी मराठा, मी शीख अशा भावना टाकून आपण सर्वांनी हिंदुत्वाचा अभिमान धरून अुठलें पाहिजे. बऱ्याच लोकांची–विशेषत: हिंदूंची–अशी कल्पना आहे की, राजनीतिशास्त्रात वर्णिलेल्या लोकशाहीच्या तत्त्वावर आपण आपलें आंतरराष्ट्रीय धोरण आखणें हेंच युक्त. पण आपण हें लक्षात ठेवलें पाहिजे की, आंतरराष्ट्रीय नीति म्हणून काही आता जगात अुरलेली नाही. व्यक्तीव्यक्तींचे व्यवहार नीतीच्या तत्त्वावर कितीही चालत आले, तरी राष्ट्राराष्ट्रांचे कारभार नीतिनियमानुसार कधीही चाललेले नाहीत. राष्ट्रें म्हणजे समूह. त्यांच्यापुढे अेकच ध्येय असतें आणि तें म्हणजे स्वसंरक्षण नि स्वहितवर्धन. सध्या तरी आंतरराष्ट्रीय अुलाढालीत नीतीचा मागमूसही अुरलेला नाही. सत्य नि अहिंसा हीं तत्त्वें कानाला कितीही गोड लागोत, त्यांचा अुपयोग राष्ट्राचें धोरण ठरविताना काडीमात्र होत नाही. तसा अुपयोग झाल्याचा अेकाही राष्ट्राचा दाखला नाही.

मूळ तत्त्वें पहा

हिंदी लोक चीनची बाजू घेतात व चढाअी करणाऱ्या जपानला नैतिक दृष्टीने नांवें ठेवतात. चीनला अेक शुश्रूषा-पथकही धाडण्यात आलें. या सर्वांची फलश्रुति काय ? तर जपानला निष्कारण आपला वैरी बनविलें. चीन तर पूर्वी साम्राज्य-वादीच देश होता आणि तेथे लोकशाही आल्यावरही त्याचें साम्राज्यशाहीचें धोरण सुटलें नाही. चँक कै शेक याच्या नेतृत्वाखालीच साम्राज्यवादी लोकहितात्मक चीनने मंगोलियावर स्वारी केली – तिबेटवरही त्याने हल्ला केला होता. आता चीन जर्जर झाला आहे आणि जपानपुढे पराभूत होत आहे. जपानने चढाअी केली नसती तर अिंग्लंड नि रशिया यांनी चीनचे तुकडे पाडले असते आणि ते आपसांत वाटून घेतले असते. मी जपानी लष्करशाहीचें वर्तन योग्य आहे असें म्हणतो असा याचा अर्थ नव्हे. पण आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या बुडाशी कोणती नैसर्गिक तत्त्वें खेळत असतात हेंच मला दाखवावयाचें आहे.

हिंदुस्थानाने चीनला आपत्प्रसंगी शुश्रूषापथक पाठविलें, पण चीनने हिंदु-स्थानाला कधी मदत पाठविली आहे काय ? आज अिंग्लड जपानला नांवें ठेवीत आहे, त्याच्या जुलुमाचीं वर्णनें अिंग्रजी पत्रें तिखटमीठ लावून करीत आहेत; पण हें सारें लोकशाहीचा पान्हा फुटल्यामुळे होत आहे की जपान हिंदुस्थानच्या फार जवळ येत चालला या धास्तीने घडत आहे ?

चेंबर्लेन व गांधीजी

झेकोस्लोव्हाकियाचे बाबतीत हिंदुस्थानने जर्मनीचें निष्कारण वैर संपादिलें. झेकोस्लोव्हाकिया हा देश व्हर्सायच्या तहाने अस्तित्वात आणला. त्याचा हेतु अितकाच की, जर्मनी व ऑस्ट्रिया या दोन देशांच्यामध्ये अेक स्वतंत्र राष्ट्र असावें. तेव्हा जर्मन राष्ट्राचीं शकलें करण्यात आलीं. ती अेकत्र सांधण्याचा व जर्मन भाषा बोलणाऱ्या लोकांचे देश परत मागण्याचा हिटलरला पूर्ण हक्क आहे. या बाबतीत अिंग्लंडने आधी खूप दमदाटी देअून पाहिलें, पण तिला हिटलर धूप घालीत नाही असें जेव्हा दिसून आलें, तेव्हा अिंग्रज प्रधानाने, आतापर्यंत कधीही न केलेलें, म्हणजे स्वदेशाबाहेर जाण्याचें धाडस केलें, अेवढेंच नव्हे तर आपण स्वतः थोड्याच दिवसांपूर्वी झेक सरकारला काय आश्वासन दिलें याची आठवण बुजवून त्याने हिटलरच्या कृत्याला संमति पण देअून टाकली ! हिटलर म्हणजे काही मि. जिनाकडे हिंदु-मुस्लिम अैक्याची याचना करणारा म. गांधी नाही. ब्रिटिश प्रधानाने जें धोरण आखलें त्याच्या बुडाशी कोणतें तत्त्व खेळत होतें ? आत्मरक्षण !

जपान–जर्मनी–अिटलीशी वैर कां ?

अॅबिसिनियामध्येही असेंच दृश्य दिसून आलें. मुसोलिनीच्या नेतृत्वामुळे अिटली सामर्थ्यवान् बनला नि त्याने अबिसिनिया जिंकला. आमच्या हिंदी पत्रांनी मारे मुसोलिनीवर टीकेचा भडिमार केला. दुर्दैव अितकेंच की, तीं पत्रें मुसोलिनी वाचीत नाही ! अिंग्लंडने मुसोलिनीलाही आधी दमदाटी देअून पाहिलें, पण ती फोल ठरलेली पाहताच अबिसिनियावरील त्याच्या स्वामित्वाला त्याने संमति दिली ! अिटालीला राज्यविस्तार हवा होता व तो त्याने साध्य करून घेतला.

पाशवी म्हणा पण निसर्गाचा कायदा आत्मरक्षणाचाच आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात नीतीचा अंमल असेल अशा भ्रमात राहू नका. ती नीति केवळ पुस्तकातच सापडते. स्पेनमधील आपद्ग्रस्त जनतेच्या मदतीसाठी हिंदुस्थानातून तांदूळ पाठविण्याची योजना केली जात आहे. पण मी विचारतो हिंदुस्थानातील कोट्यनुकोटि अर्धपोटी, अुपाशी स्त्रीपुरुषांची दया येअून स्पेनने आजवरच्या प्रदीर्घ अितिहासात कधी धान्याचा अेक तरी कण आपल्याकडे पाठविला आहे काय ? या लढ्यात कोणतीही बाजू हिंदुस्थानने घेण्याचें कारण नव्हतें.

नैतिक बळ कोठे आहे ?

जगातील अितर राष्ट्रांची नैतिक बुद्धि जागी करावी म्हणजे तीं राष्ट्रें अिंग्लंडवर नैतिक दडपण आणतील आणि मग आपल्याला अिंग्लंड स्वातंत्र्य अर्पण करील असाही भ्रम काही हिंदी लोकांना आहे. नैतिक बळ, नैतिक दडपण हे शब्द कितीही श्रुतिमनोहर असले, तरी व्यवहारात ते कुचकामाचे आहेत. अिंग्लंडवर नैतिक दडपण कोण आणणार ? फ्रान्स ? अिटाली ? जर्मनी ? की अमेरिका ?

पण हीं सारीं राष्ट्रें स्वत:च चोरी, दरोडे नि फसवेगिरी यांच्या गाळात आकंठ बुडालेलीं आहेत. नैतिक हेतूने प्रेरित होऊन तीं हिंदुस्थानच्या काही अुपयोगी पडतील असें मानण्याअितका दुसरा मूर्खपणा कोणताच नाही. व्यक्तीव्यक्तींच्या व्यवहारात नीतीचा प्रश्न येतो, पण राष्ट्राराष्ट्रांच्या कारभारात नीतीला मुळीच स्थान नाही हें मी ठामपणे सांगतो. प्रत्येक राष्ट्र स्वार्थाच्या दुर्बिणीतूनच पाहत असतें. ज्याच्याशी मैत्री केली असता आपला लाभ होण्यासारखा असेल, त्याचेंच सख्य जोडण्याकडे हिंदुस्थानने लक्ष द्यावें. 'आत्मानं सततं रक्षेत्' हेंच आपल्या परराष्ट्रीय धोरणाचें सूत्र. आपल्या स्वातंत्र्यसंपादनाचे कामी जो कोणी अुपयोगी– मग तो नाझी असो, फॅसिस्ट असो की बोल्शेव्हिक असो–तो आपला मित्र, अुलट जो आपल्या स्वातंत्र्याचे आड येतो तो आपला शत्रु.

प्रथम आत्मरक्षण

हिंदु व मुसलमान यांनी अेक होऊन अिंग्लंडच्या हातून सत्ता हिसकावून घेतली पाहिजे हें खरें, पण समजा, अेखाद्या मुसलमान राष्ट्रानेच हिंदुस्थानवर स्वारी केली आणि येथले मुसलमान त्या मुसलमान राष्ट्राकडे खेचले गेले, तर आपण मुसलमानांशी कसें धोरण ठेवावें याचा पुन: विचार करावा लागेल. आत्मरक्षण हें आपलें सूत्र आपण आपल्या डोळ्यांपुढे ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानवर आक्रमण करू पाहणाऱ्या शत्रूच्या रक्ताने आपली मातृभूमि रंजित झाली, तर ती जशी राष्ट्रसेवा होअील, तशीच ती सत्य नि अहिंसा यांचीही सेवाच ठरेल !

✦ ✦ ✦

२५. सशस्त्र व संघटित व्हा

दि. १४-२-३८ रोजी स्वा. सावरकर यांनी नगर येथील रा. स्वा संघ शाखेला भेट दिली त्या वेळी झालेलें भाषण.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटनेचें जाळें आज नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतवर्षात पसरलेलें मला आढळलें. आतापर्यंत मी जेथे जेथे गेलो तेथे तेथे साधारणपणे या संघाच्या लहानमोठ्या प्रमाणात शाखा असल्याचें माझ्या निदर्शनास आलें आहे. या संघाच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धतीचें सानंद कौतुक वाटून माझा अूर भरून येतो ! यांच्या शाखांचे धागे पेशावर-लाहोरला आहेत, तसेंच कोल्हापूर-सांगलीला आहेत ! दिल्लीला तर परवाच त्यांच्या अेका कार्यक्रमाला मी अुपस्थित होतो. या संघाच्या द्वारे तरुण पिढीला लागत असलेल्या सैनिकवृत्तीच्या वळणाची आजकालच्या राष्ट्राला अत्यंत आवश्यकता आहे.

लढाऊ वृत्तीचा वध

अिंग्रजांनी आमच्यावर राज्य करण्यास सुरवात करण्यापूर्वी आमच्यातील लढाऊ वृत्ति पूर्णपणें जागृत होती. पण त्यांनी येअून आमच्यावर जर कोणता मोठा सुधारात्मक अुपकार (!) केला असेल तर तो हा की, आम्हांला निःशस्त्र करून आमची लढाऊ वृत्ति मारली. त्यांचें आतापर्यंतचें धोरण असेंच ठेवण्यात आलें आहे की, तुम्हांला त्याच गोष्टी करण्याला मोकळीक देण्यात यावयाची की, ज्या त्यांना त्यांचें येथील आसन अस्थिर करण्याचा धाक घालू शकणार नाहीत ! अुलट दयाळू अिंग्रज सरकार आपल्याला किती सुधारणा, किती प्रोत्साहन देतें आहे असेंच त्यांनी आम्हा लोकांना आमच्या मंदबुद्धीचा फायदा घेअून आतापर्यंत फसविलें ! आम्ही भोळे ! त्यांच्या या मायाजालात आपण बरोबर फशी पडलो नि आधीच मरू घातलेल्या आमच्या मनांना संपूर्णतया ठार करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यशच मिळत जाअून त्याची परमावधि म्हणजे आपल्या माथी बसलेला शस्त्रनिर्बंधाचा कायदा होय ! अितर राष्ट्रांत आत्मसंरक्षणार्थ शस्त्रें वापरण्याची व्यक्तिमात्राला जेवढी मोकळीक आहे तेवढा तरी कमीत कमी हक्क मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवाच.

बलवान् व्हा

'वळी तो कान पिळी' हा सिद्धान्त अजून तरी कायम आहे. आपल्याला कोणाचा कान पिळण्यासाठी नव्हे पण यापुढे आपल्याला कोणी दुसऱ्याने कानपिळी देअू नये म्हणून तरी निदान आपण 'वळी' व्हायला पाहिजे. अिटली–अॅबिसिनिया किंवा चीन–जपान या दोन जोड्यांमध्ये अॅबिसिनिया किंवा चीन या राष्ट्रांचा पाडाव तीं त्यांच्या प्रतिपक्षाहून कोणत्या बाबतीत कमी होती म्हणून झाला ? अिटालियन सैनिकांपेक्षा अॅबिसिनियन हबशी निःसंशय शूर होते. युद्धाच्या दृष्टीने निसर्गाचा वरदहस्त तर अॅबिसिनियावरच पूर्णपणे होता. लोकसंख्येने अॅबिसिनिया अिटलीपेक्षा जास्त होता ! बौद्धिक दृष्टया किंवा धार्मिक दृष्टया अिटलीहून अॅबिसिनिया जास्त सरस होता. पण अिटलीच्या रायफलचा आणि मशिनगन्सचा पल्ला हा अॅबिसिनियाच्या रायफलपेक्षा किंवा मशिनगन्सपेक्षा जास्त प्रभावी ठरला. वरील सर्व गोष्टींना धक्का मारून या अेकाच गोष्टीमुळे अिटलीने पाहता पाहता अॅबिसिनियाला धुळीला मिळविलें ना ?

चीनजवळ कमी काय होतें ?

चीनमध्ये जपानपेक्षा काय कमी होतें ? चीनच्या पासंगालाही न पुरण्याअितकी लोकसंख्या अन् क्षेत्र असणारा जपान ! चीन त्यापेक्षा प्रत्येक बाबतीत श्रेष्ठ होता. धर्माच्या दृष्टीने तर चीन जपानहून जास्त सनातनी आहे. दोनही

राष्ट्रें बुद्धधर्मीय ! अहिंसावादी !! आणि तसेंच बघितलें तर चीन जपानपेक्षा जास्त धर्मश्रद्धाळू. पण युद्धाच्या प्रत्यक्ष धुमश्चक्रीत चीनची धर्मश्रद्धा, अध्यात्मवाद, आस्तिक्यबुद्धि जपानचें काहीही वाकडें करू शकली नाही ! न्याय, अन्याय म्हणाल तर चीनने जपानची कोणतीही आगळीक केली नव्हती. अशा तऱ्हेने सत्याच्या दृष्टीने नि धर्माच्या दृष्टीने पूर्णपणे वरचढ असणाऱ्या चीनला टीचभर जपानने बाँबच्या वर्षावाखाली जाळून बेचिराख करून टाकलेंच की नाही !

कवितेपेक्षा तरवारीला जास्त मान

लहानसा अिटली आपलें पुरातन रोमन साम्राज्य पुनः स्थापण्याच्या निष्ठापूर्वक प्रतिज्ञेने आज सबंध युरोप हादरून सोडतो आहे नि जर्मनी सबंध जगाला कापरें भरायला लावतो तें कशाच्या जोरावर ? केवळ जाज्वल्य राष्ट्राभिमान नि त्याला पोषक असणाऱ्या लढाऊ वृत्तीचें पोषण नि वर्धन करूनच ना ! पांच वर्षांचा अिटालियन बालक अुगीचच का हवाअी बंदूक घेअून कवाअीत करतो ? जगाच्या बाजारात आज तरी कवितेपेक्षा तरवारीला जास्त मान आहे हें विसरू नका ! आणि ही स्थिति जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत तुम्हांला तरवार चालविता आलीच पाहिजे ! न आली तर तुमचा विपत्काल संपायची आशाच नको ! आमच्यावर अिंग्रज सरकारांनी जय कां मिळविला ? काय आमच्याकडे वाचनालयें नव्हती म्हणून ? की कविसम्राट आणि लेखक नव्हते म्हणून ? असें मुळीच नाही ! तर पेशव्यांजवळ यांच्यासारख्या तोफा नव्हत्या म्हणून ! आणि आजही ते टिकून आहेत ते देखील त्यांच्या रायफलच्या सामर्थ्यावर हें सूर्यप्रकाशाअेवढें लख्ख आहे. हिंदुस्थानचे लोक अिंग्रजांपेक्षा कुठे कमी असतील तर ते धूर्तपणात ! दुसरे कशातही कमी नाहीत हें अितिहास सांगेल. फक्त आमची रायफल अिंग्लिश रायफलीपेक्षा समर्थ झाली आणि आमच्या अंगी धूर्तपणा आला की आम्हांला कोणालाही भिण्याचें कारण नाही नि त्यांना आपलें बिऱ्हाड येथून अुठवावेंच लागेल हें निर्विवाद !

राष्ट्रसिंहाचीं नखें

वाघाचीं नखें जोपर्यंत तीक्ष्ण असतात तोपर्यंत गायीला त्याच्यापुढे गम खाअून मेलेंच पाहिजे ! मग ती जिवावर अुदार होअून त्याच्याशी टक्कर घेवो नाही तर सत्याग्रह करून त्याला म्हणो की, 'ये बाबा ! खा हं मला !! प्रतिकार करणें हा माझा धर्म नाही ! ती हिंसा होते !'–तसेंच राष्ट्रसिंहाचीं नखें जोपर्यंत तीक्ष्ण आहेत तोपर्यंत कोणत्याही शत्रूला त्याच्या पंजापुढे गाय बनायलाच हवें ! तुम्ही सत्याग्रही असा नाही तर शस्त्राग्रही असा, प्रबलाचाच जगात विजय व्हायचा हा अीश्वराचा न्याय आहे. आणि म्हणूनच आपण प्रबल नि स्वसंरक्षणक्षम बनायला

हवें ! अखिल भारतीय हिंदूंची अेकसूत्री प्रबल संघटना करण्याचें या संघाचें ध्येय याचमाठी अत्यंत व्यापक अन् अुच्च आहे हें कोणीही कबूल करील.

प्रथम रायफलसंघ काढा

मुसलमान लोक दांडगे असतात म्हणून किंवा अिंग्रज लोक लुच्चे असतात म्हणून हात चोळीत बसण्यात अर्थ नाही. त्यांच्या लुच्चेगिऱ्या तर बाहेर काढल्याच पाहिजेत ! पण हें करताना प्रसंगी आपण त्यांच्यापेक्षाही लुच्चे आणि दांडगे बनायला पाहिजे ! 'धटासि व्हावें धट । अुद्धटासि व्हावें अुद्धट ।'—शेरास सव्वाशेर हाच न्याय माणसाला वा समाजाला मानाने जिवंत राहण्यास सर्वथैव अुपयोगी पडतो हें लक्षात ठेवा, आणि याचसाठी सैनिक वृत्तीचें तरुणपिढीमध्ये पोषण होणें हें राष्ट्राच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीने सर्वतोपरी अगत्याचें आहे. अेक वेळ आमच्या तरुण लोकांत लेखक, कवि नसले तर चालतील, वाङ्मयावर व्याख्यानें न झालीं तरी चालतील, पण आमची लढाअू वृत्ति फिरून फोफावलीच पाहिजे. नाटकगृहें किंवा बोलपट गृहें यांची आज आम्हांला अेवढी जरुरी नाही. पण रायफल क्लब सगळीकडे स्थापन व्हायलाच हवेत. त्याही गोष्टी आम्हांला हव्याच आहेत, नकोत असें नाही. पण प्रथम हें आणि नतर अितर सर्व.

बॅट नको बंदूक हवी

सुदैवाने सध्या आपलीं मंत्रिमंडळें बऱ्याच प्रांतांतून अस्तित्वात आहेत. याचा फायदा घेअून आपण ही चळवळ नेटाने पुढे ढकलून शस्त्रांचा कायदा आपल्याला हवा तसा करून घेतला पाहिजे. वऱ्हाड मध्यप्रांताकडे मी हिंडलो त्या वेळी मुख्य मंत्री ना. डॉ. खरे, बॅ. रामराव देशमुख अि. वजनदार सद्गृहस्थांशी माझें या बाबतीत बोलणें झालें आहे. कागद्याच्या ठराविक कक्षेतल्या सर्व गोष्टींपर्यंत आपल्या हाती असलेल्या सर्व सवलतींचा संपूर्ण फायदा आपण जनतेला देअू शकतो असें त्यांनी मला आश्वासन दिलें आहे. तिकडे सध्या त्यामुळे नि डॉ. मुंजे यांच्या सारख्यांच्या प्रयत्नांमुळे ठिकठिकाणी रायफल क्लब स्थापन होत आहेत. तिकडील तरुणांच्यामध्ये सैनिक शिक्षणाकडे जास्त ओढा असलेला मला दिसतो. नगरसारख्या मोठ्या शहरात अेकदेखील रायफल क्लब नाही हें पाहून मला खेद वाटतो! अशा अेकेका संस्थेची तरी प्रत्येक शहराला आज अत्यंत आवश्यकता आहे. आपल्याकडील प्रतिष्ठित लोकांनी प्रयत्न केला तर मुंबअी अिलाख्यातही ही गोष्ट होणें अवघड नाही. प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना यापुढे क्रिकेटची बॅट घेअून देण्याअैवजी हवाअी बंदूक घेअून देअून संघासारख्या संस्थांमध्ये त्याला पाठवून लष्करी शिक्षणाच्या मदतीने त्यांच्यांतील सुप्त सैनिक जागा करण्याचे दिवस आज आले आहेत !

संघाचें यश

स्वयंसेवक संघाने या बाबतीत आज निम्मा प्रदेश व्यापला आहे. सांघिक संचलन, आज ते जरी नामधारी शस्त्रें घेऊन करीत असले तरी ५० टक्के यश त्यात आहे. अुद्या यांना रायफल दिली तर नेम मारण्याच्या शिक्षणात ते हां हां म्हणता प्रगति करून दाखवतील. शस्त्र वापरण्यापूर्वी तें व्यवस्थित हाताळण्याचा अभ्यास असणें ही गोष्ट कमी महत्त्वाची नाही. ती पुढील सबंध यशोमंदिराचा पाया आहे. रा. स्व. संघ आज तो रचीत आहे यातच त्याच्या यशाचें रहस्य आहे अशी माझी ठाम समजूत आहे. शिवाय यात तयार होणारें सांघिक मन ही गोष्ट तर अत्यंत महत्त्वाची आहे ! अेका आज्ञेबरोबर 'अुजवा' म्हटल्यावर 'अुजवाच' पाय अुचलणाऱ्या हजारो तरुणांची संघटनाच आज आमच्या गलित हिंदुराष्ट्राचा अुद्धार करू शकेल. त्या सर्व तरुणांमध्ये राष्ट्रप्रेमाची नि स्वातंत्र्याची दिव्य ज्योत प्रखरपणे तेवत ठेवून त्यासाठी अतुल स्वार्थत्याग करण्याची शिकवणूक स्वयंसेवकांना दिली जाते ही गोष्ट असामान्य आहे !

राष्ट्रोद्धाराचो प्रार्थना

आमच्या राष्ट्राचा अुद्धार जर कशाने होणार असेल तर याप्रमाणे सबंध राष्ट्र जागें करण्यानेच. ही गोष्ट या संघाचे जनक डॉ. हेडगेवार यांनी पुरेपूर जाणून सर्वस्वी प्रतिकूल अशा परिस्थितीतही आत्मविश्वासपूर्वक संघाची स्थापना करून ते या कार्याला लागले आहेत ही गोष्ट त्यांच्याबद्दल व त्यांच्या या कार्याबद्दल मला आणि प्रत्येक हिंदूला अत्यंत अभिमान वाटण्यासारखी आहे, यात शंका नाही. थोडक्यात म्हणजे आज आमच्या राष्ट्राचें अत्यंत अपरिहार्य असें पुनरुज्जीवन संघ करीत आहे व त्यात अेकदिलाने भाग घेणें हें प्रत्येक तरुणाचें कर्तव्य आहे असें मला वाटतें.

हिंदुत्वाचा प्रखर अभिमान ठेवून राष्ट्रकार्याला शपथपूर्वक वाहून घेणारे हे तरुण आज अखिल हिंदुस्थानभर अेकाच वेळी अेकाच आवाजात धीरगंभीरपणे 'हे प्रभो आमच्या राष्ट्राचा सर्वांगीण अुद्धार करण्यासाठी आम्हांस भरपूर सामर्थ्य दे !' अशा आशयाची प्रार्थना करतात. अितर तरुण ज्या वेळी नानातऱ्हेचे मनोरंजक खेळ खेळतात, गप्पा मारतात, फिरायला जातात, त्या वेळी रोज नेमपूर्वक तीच तीच लाठी, तेंच तेंच 'अुजवा – डावा' आणि तीच तीच प्रार्थना हें निष्ठापूर्वक करतात ही गोष्ट कोणाचें हृदय अुचंबळविणार नाही ?

✦ ✦ ✦

२६. सैनिक शिक्षण

सोलापूर येथे दि. १० ऑगस्ट १९३६ रोजी स्वा. सावरकर यांनी हरिभाई देवकरण हायस्कूलमध्ये केलेलें भाषण.

व्यायामशाळा आता सर्वत्र निघालेल्या आहेत; त्यामध्ये मुलें हौसेने व्यायाम घेत आहेत. मुलीसुद्धा लाठीशिक्षण घेऊ लागल्या आहेत. मुलींच्या हातचें लाटणें जाऊन त्या ठिकाणी लांठी आल्याने पुरुषांनी आता त्यांच्याशी जपून वागलें पाहिजे ! आता नुसत्या व्यायामाबद्दल बोलण्याचें कारण अुरलेलें नाही. बौद्धिक शिक्षण घेत असताना तुम्ही यापुढे सैनिक शिक्षण घेतलें पाहिजे. याच्यापुढे तुम्ही सैनिक शिक्षणाकडे लक्ष द्या. डॉ. मुंज्यांनी तिकडे नागपूरला सैनिकांचें कॉलेज काढलें आहे. त्या धर्तीवर सैनिक शिक्षण देणाऱ्या संस्था सर्वत्र निघाल्या पाहिजेत. माझी सूचना अशी आहे की, येथल्या शाळेने बंदूक चालविण्याचे वर्ग काढावेत. हवाअी बंदुकीचें शिक्षण लाठीशिक्षणाप्रमाणे देण्याजोगें आहे. लढाअीच्या दृष्टीने air guns हा पोरखेळ आहे हें मी जाणून आहे. पण प्राथमिक अवस्थेत तो आवश्यक आहे. नेम मारण्याचें तुम्हांला साधलें तर अेअरगन व रायफल यांमध्ये फक्त धक्का बसण्यापलीकडे जास्त फरक नाही.

राष्ट्रीय सैनिक

आता मी काही मुलांनी केलेलें संचलन पाहिलें. संचलन हा Drill करिता शब्द आहे हें लक्षात ठेवा. सम् = अेकत्र नि चलन म्हणजे हालचाल. Drill मध्ये अेकाच वेळी सर्वांची हालचाल होत असते म्हणून Drill म्हणजे संचलन होय. पण हें संचलन आता सैनिक पद्धतीने शिकविलें पाहिजे. सध्याच्या तरुण पिढीची अशी तयारी पाहिजे की जरूर लागेल तेव्हा तुतारी फुंकल्याबरोबर देशरक्षणार्थ आपले सैनिक तयार पाहिजेत. परचक्रापासून स्वसंरक्षण करण्यास देश असमर्थ आहे हें म्हणणें आपण फोल ठरविलें पाहिजे. तीन महिन्यांत रिक्रूट निर्माण होतात हें गेल्या महायुद्धावरून दिसून आलें. केस राखणें, भांग पाडणें, चित्रपट पाहणें हें जसें तुम्हांस आवश्यक वाटतें, तसें खांद्यावर बंदूक टाकून चालणें हें तुम्हांस भूषणास्पद वाटलें पाहिजे. मी सर्वच ठिकाणी व्यायामशाळांना या बाबतीत विनंती करीत आहे. ही रायफलची नाही तरी, अेअरगनची व्यवस्था पुढच्या वर्षापर्यंत अमलात येअील अशी मला अुमेद आहे.

जपान नि चीन

जपान देश गेल्या १५० वर्षांत सुधारला. चीन मात्र अफू खाअून स्वस्थ राहिला. जपानने नवीन नौका, नवीन विमानें अित्यादि सर्व नवीन यांत्रिक साहाय्य

घेऊन स्वत:ची कमालीची प्रगति केली. निव्वळ देशभक्तीने चीन पुढे येणें शक्य नाही. जेवढें सैनिक सामर्थ्य आवश्यक तेवढें चीनमध्ये नाही; आणि त्यामुळे जपान-सारख्या देशापुढे त्याचा टिकाव लागणें शक्य नाही. यापासून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे. देशभक्ताला विजयी व्हावयाचें असेल, तर त्याने सैनिक शिक्षण घेतलें पाहिजे. तुमच्या शाळेत १००० विद्यार्थी आहेत. पुढच्या वर्षी मी येथे आलो म्हणजे तुमच्यापैकी पांचशे, निदान शंभर विद्यार्थी तरी अेअरगन वापरणारे मला या ठिकाणी दिसतील अशी आशा आहे.

✦ ✦ ✦

२७. मराठी भाषेचें शुद्धीकरण

दि. २६-६-१९३७ रोजी पुणें येथे स्वा. सावरकर यांचें झालेलें भाषण

पराभवाचीं स्मारकें अुद्ध्वस्त करा

परक्या भाषेतील शब्द आमच्या भाषेत निष्कारण घुसून त्यांनी आमचे जुने शब्द मारू नयेत हा च काय तो शुद्धीकरणाचा अर्थ होय. नवीन वस्तु, नवीन कल्पना, नवीन विचार यांना व्यक्तविणारे परकी शब्द घेअू नयेत अशी आमची मुळीच भूमिका नाही. पण ज्या वस्तूना नि विचारांना द्योतक असे शब्द आपल्या भाषा-भांडारात भरलेले आहेत, त्यांनाही परके नवे शब्द योजणें हें मनोदास्याचेंच लक्षण आहे. बुटाला बूट म्हणा, पण जोडयाला 'शू' म्हणू नका म्हणजे झालें. जिलबी, गुलाब वगैरे परशब्दांचा यथेच्छ अुपयोग करा; पण निष्कारण आलेले परके शब्द टाळा. ते आपल्या पराभवाचीं स्मारकेंच नव्हेत काय? जेतें राष्ट्र काय करीत असतें? सापाने बेडूक गिळावा नि त्याचें हाडन् हाड, स्नायुन् स्नायु पिचून–पचवून टाकावा, त्याचप्रमाणे जेतें राष्ट्र जितांचें राजकारण, त्यांचा धर्म, त्यांची संस्कृति, त्यांची भाषा या सर्वांना आत्मसात् करू पाहतें – अितकें की, 'तेंच म्हणजे आपण' असा भ्रम जितांना व्हावा!

आयर्लंडचा कित्ता

बेडूक गिळल्याबरोबर सापाला ठार केलें तर तो बेडूक जशाच्या तसा सुरक्षितपणे बाहेर पडतो. त्याचप्रमाणे अद्याप आपल्याला मराठी भाषा सुखरूप ठेवता येअील अशी स्थिति आहे हें आपलें भाग्य समजा. नाही तर आयर्लंडमध्ये ग्रिफिथला जेव्हा स्वभाषेचा प्रसार करण्याची अिच्छा झाली तेव्हा त्याला कोण

प्रयास पडले ! आयरिश भाषेतील शब्दच मुळी अेकत्र नव्हते. तेव्हा खेडयाखेडयांत व घराघरांत हिंडून त्याने लोकगीतांतून नि लोककथांतून आयरिश शब्द जमविले आणि त्यांचा कोश निर्माण केला. आज डी व्हॅलेराने आपल्या राजसभेचें नांव बदलून 'आयर' असें आर्यत्वदर्शक नांव ठेवलें आहे हेंही स्वभाषाभिमानाचेंच अुदाहरण होय तेथे परवाच अेका अिंग्रजाचा पुतळा जसा अुडविला, तसेंच आपल्या पराभवाचें किंवा अंकितत्वाचें स्मरण करून देणारे परशब्दही अुडविले पाहिजेत हा त्यांचा निर्धार आहे. आपल्याकडे नीलचा पुतळा आंदोलनाच्या बळावर हलविण्यात आलाच की नाही ?

सोन्याची वाटी कां फेकता ?

केमालपाशानेही असेंच केलें. अरबी शब्दांना त्याने अर्धचंद्र दिला नि तुर्की शब्द रूढविले. त्यालाही शब्दांची वाणच पडली. पण रोज पांच पांच शब्द राजाज्ञेच्या द्वारा घोषित करून त्याने स्वभाषेचा सत्ताबळाने पुरस्कार केला. त्यांची लिपि मुद्रणाला अत्यंत अक्षम, म्हणूनच रोमन लिपी त्याने आपल्या भाषेत स्वीकारली. आपल्याला भाषा-दारिद्र्य नडणारें नाही. जिच्यापुढे ग्रीक, लॅटिन अित्यादि भाषांनीही आनतमस्तक व्हावें अशी आपली संस्कृत भाषा किती संपन्न आहे ! तिला अव्हेरून अिंग्रजी, फारसी अित्यादि दुसऱ्या परक्या भाषांतून शब्द घेणें म्हणजे घरातील सोन्याची वाटी फेकून चिनी मातीचे कप हाती घेण्यासारखेंच नव्हे काय ? सूर्य, चंद्र यांना अिंग्रजीत अेकअेकच शब्द; पण संस्कृतात किती पर्याय आहेत! आणि तेही असे की, अेकेक शब्द म्हणजे श्लोक, जणू काव्यच ! अशी बहुमोल खाण अंगणात असताना परक्यांच्या दारी भीक कां मागता ? आपल्या नित्याच्या व्यवहारात चार साडेचारशे शब्द परकी आहेत. त्यांचें अुच्चाटन करण्याचा निश्चय करा. वाटतें अितकें हें अवघड काम नाही. गेल्या वारा वर्षांत हुतात्मा, अुपस्थित, स्तंभ, बोलपट अित्यादि शब्द बोल बोल म्हणता रूढ झालेच कीं नाही ! आपण स्वभाषाभिमान टाकला असता तर, पुणें, नाशिक, काशी, वगैरे नगरांना मुसुलमानांनी दिलेलीं मुसुलमानी नांवेंच रूढ झालीं असतीं. आजही दौलताबाद, अहमदाबाद हे परके शब्द, परक्यांच्या वर्चस्वाचें स्मरण करून देणारे शब्द, आपल्या जिभेवर नाचत आहेतच कीं नाहीत? सिंहगडाला औरंगजेबाने 'बक्षिदा बक्ष' असें नांव दिलें; पण शिवाजीमहाराजांनी तें बदलून स्वदेशाबरोबर स्वभाषेचीही सेवा केली. आपण अशीच स्वाभिमानी वृत्ति ठेवली पाहिजे.

✦ ✦ ✦

२८. बडोदें साहित्य संमेलन

अध्यक्ष स्वा. सावरकर यांचें दि. १२-९-३७ रोजी भाषण झालें. त्यात त्यांनी पुढील सूत्रें सांगितलीं. आपली भाषा शुद्ध करण्यासाठी आपण आपल्या भाषेत ठाण मांडून बसलेल्या अनावश्यक अुर्दू नि अिंग्रजी शब्दांचें अुच्चाटन केलें पाहिजे. त्याप्रमाणे जुन्या मराठी शब्दांचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे आणि शक्य तेथे नवीन मराठी समर्पक शब्द बनविले पाहिजेत.

साहित्यासंबंधीची माझी भावना थोडी विशिष्ट स्वरूपाची आहे. साहित्य हें राष्ट्राच्या वुद्धीचें, सामर्थ्याचें, शौर्याचें, प्रतीक आहे अशी माझी भावना आहे. मी स्वतंत्र हिंदुस्थानात जन्माला आलो असतो किंवा पेशवाअीत जन्माला आलो असतो तर माझ्या खऱ्या साहित्याच्या कल्पनेचा अर्थ तुम्हांला अधिक चांगला पटवून देता आला असता. सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीत माझें साहित्य हें केवळ प्रचारात्मक स्वरूपाचें आहे. आजच्या माझ्या अध्यक्षीय भाषणात मी कोणतीच तात्त्विक चर्चा करणार नाही. तशी चर्चा करण्याला माझ्यापेक्षा लायक विद्वान् येथे किती तरी आहेत. यासाठी आजच्या प्रसंगाचा अुपयोग मी माझ्या प्रचारकार्याकडेच करणार आहे.

भाषाशुद्धीची दुसरी बाजू

आजच्या स्वागताध्यक्षांनी आपल्या भाषणात भाषाशुद्धीच्या प्रश्नावर आपले विचार प्रकट केले आहेत. त्यांनी घेतलेली या प्रश्नाची अेक बाजू असून दुसरी मी आता आपल्यासमोर माडणार आहे. प्रत्येक देशावर किंवा संस्कृतीवर जेव्हा परकीय देशाचा आणि संस्कृतीचा आघात होतो तेव्हा जित राष्ट्राची भाषा नि साहित्य यांवर जेत्या राष्ट्राची भाषा व साहित्य यांचें आक्रमण सुरू होतें. आपल्या हिंदुस्थानात प्रथम मुसुलमान नि नंतर अिंग्रज या दोन राज्यकर्त्यांच्या भाषांचें आपल्या भाषेवर आक्रमण झालें. आयर्लंडमध्ये अिंग्रजांनी आपली सत्ता प्रस्थापित केली तेव्हा तेथेही अिंग्रजी भाषेने आक्रमणच केलें. अेकाकाळी आयर्लंडात आयरिश भाषा बोलणें हा गुन्हा होता. शाळांतदेखील आयरिश भाषा शिकविण्याला अेका काळी बंदी होती. सुदैवाने आपल्या भाषेवर परकीय भाषांचे जे आघात झाले ते म्हणण्यासारखे तीव्रही नव्हते आणि आपण काही तत्काळ परतवूनही टाकले. त्यामुळे आपल्या भाषेची आयरिश भाषेसारखी गळचेपी झाली नाही ही गोष्ट खरी; तथापि परकीय भाषेचें स्वामित्व स्वाभिमानास केव्हाही दुःसहच होतें.

आयर्लंडमधील दु:स्थिति

आयरिश भाषा अस्तंगत होत चाललेली पाहून अेका पत्रकर्त्याने आपल्या पत्रात आयरिश भाषेचा अेक स्तंभ देण्यास प्रारंभ केला. आज त्या देशाचें आयर्लंड असें नांव आहे तोही अिंग्रजीच्या आक्रमणाचाच अेक पुरावा होय. पूर्वी त्या देशाचें आयरीन म्हणजे आर्यभू असें नांव होतें; परंतु जेत्या अिंग्रजांनी त्याला 'लँड' हा अिंग्रजी शब्द जोडून त्याचें आयर्लंड बनविलें. आपल्या सीमाप्रांताकडे तुम्ही दृष्टिक्षेप कराल तर तेथे अशीच परिस्थिति असल्याचें तुम्हांला आढळून येअील. त्या प्रांतात अुर्दू भाषेचें वर्चस्व अतोनात आहे. प. वा. लाला लजपतराय नि स्वामी श्रद्धानंद यांनी संस्कृतोद्भव हिंदी भाषा जगविण्याची तिकडे पराकाष्ठा केली. तिकडील शिक्षण अुर्दूमिश्रित हिंदीत मिळतें. खुद्द भाअी परमानंदांना देखील अंदमानातून सुटल्यावर निर्भेळ हिंदीचें शिक्षण घ्यावें लागलें.

केमालपाशाचें अुदाहरण पहा

परकीय राज्यसत्तेखाली असताना तुर्की भाषा व तुर्की लिपि यांचा तुर्कस्थानात पूर्ण लोपच झाला होता. परंतु केमालपाशाने तुर्की भाषा व तुर्की लिपि जिवंत केली. त्याने प्रार्थनादेखील तुर्कीतच झाल्या पाहिजेत असें फर्मान काढलें. कुराणाचें तुर्कीत भाषांतर करविलें व 'अल्ला' या देवनिदर्शक शब्दाच्या ठिकाणी त्या अर्थाचा 'तारी' हा तुर्की शब्द जारी केला. औरंगजेबाच्या कारकीर्दीत जिंकलेल्या गांवांचीं नांवें बदलून मुसलमानी करण्यात येत. अहमदनगर, अहमदाबाद, वगैरेसारखीं गांवांचीं नांवें अशींच पडलेलीं आहेत. फार काय पुण्यातील पेठांचीं नांवेंही पूर्वी मुसलमानी होती. आज तेथील पेठांचीं जीं नांवें आहेत तीं माधवराव पेशवे यांनी बदलून दिलेलीं नांवें आहेत; शिवाजीमहाराजांनी भाषाशुद्धीचें काम हाती घेण्यापूर्वी मराठी भाषेत अुर्दू भाषेतील शब्द खूपच बोकाळले होते. पंजाबात आज अुर्दूचें अितकें वर्चस्व आहे की, परमानंदांनाही आपलें पत्र अुर्दूतच काढावें लागतें. सिंधमध्ये आपण गेलात तर तेथील सिंधी भाषा अुर्दूमय आहे नि सिंधी लिपि अुर्दूसारखी आहे असें दिसून येअील.

अिंग्रजी वातावरण

सिंधीतील रामायण, भागवत अुर्दूप्रमाणे अुजवीकडून डावीकडे वाचावें लागतें. मराठ्यांच्या काळात भाषाशुद्धीच्या दृष्टीने बरेच प्रयत्न झाले. रघुनाथ पंडितांचा राज्यव्यवहारकोश, मोरोपंतांचें काव्य, रामदासांचा दासबोध वगैरे ग्रंथ या प्रयत्नांचेच निदर्शक होत. परंतु अिंग्रजी सत्तेबरोबर आपल्या भाषेवर अिंग्रजीचें आक्रमण सुरू झालें. या आक्रमणाचे परिणाम आज प्रत्यही आपल्या दृष्टीस पडत आहेत. आज कोठल्याही चौकात आपण जाअून जरा सभोवारच्या पाटयांवर नजर

टाका म्हणजे आपणांला टेलर, सलून वगैरे अिंग्रजी शब्दांचाच भरणा आढळून येअील. फार काय, शाळेतील मुलेंदेखील 'अरे, व्ही. डी.' 'अरे, अेम. के.' अशा हाका मारताना तुम्हांला दिसतील. आज जरी न. चिं. केळकर हा शब्दप्रयोग रूढ झाला असला तरी आमच्या वेळी ते अेन. सी. केळकर म्हणूनच प्रसिद्ध होते. लोकमान्य टिळकही अुत्तर हिंदुस्थानात बी. जी. टिळक म्हणूनच ओळखले जात असत. अिंग्रजी भाषा आपल्या बोलण्यात येते. त्याला आपण अितके सरावलो आहोत की, त्याचें आपणांस काहीच वाटत नाही. ! परवा फुगडी, सागरगोटे खेळणाऱ्या छोट्या मुलीसुद्धा अेकमेकींना 'रेडी का ग?' असा प्रश्न करीत असलेल्या पाहून मला आश्चर्य वाटलें.

भ्रष्टतेचीं अुदाहरणें

अिंग्रजी शब्दप्रयोग करणें हें अेक प्रतिष्ठितपणाचें लक्षण अशीही कित्येकांची कल्पना असते नि त्यामुळे कमी शिकलेल्या अिसमाची जास्तीत जास्त अिंग्रजी शब्द वापरण्याची प्रवृत्ति दिसून येते. घराची शाकारणी करून खाली अुतरलेल्या दोन कामगारांपैकी अेकाने दुसऱ्याला 'कसें काय केलें काम आज?' असा प्रश्न करताना दुसऱ्याने त्याला 'अगदी अपटुडेट' असें अुत्तर दिल्याचें मी अेकदा अैकिलें ! अप, टु, किंवा डेट यांपैकी अेकाही शब्दाचा अर्थ माहीत नसताना केवळ चांगल्या कामाच्या अर्थाने तो शब्द योजतात, अेवढ्या अनुमानावर त्या कामगाराने तो शब्द येथे योजला. मध्यमवर्गीय सुखवस्तु माणसांच्या घरी तुम्ही गेलात तर तो तुम्हांला 'वाअिफ' घरी आहे व 'सन्' बाहेर गेला आहे असें सांगेल. बायको शब्द वाटला तर नका वापरू; पण कुटुंब म्हणायला कां तुम्हांला लाज वाटते? पण नाही. वाअिफ म्हणणें शिष्टपणाचें लक्षण, अशी त्यांची कल्पना असते. जी पोझिशन' मी प्रथम 'रिझ्यूम' केली तीच मुळी 'फॉल्स' होती हें अशाच तऱ्हेचें वाक्य आहे. ही स्थिति लाजिरवाणी नाही काय?

दोन कारणें

मला भाषाशुद्धि हवी ती दोन गोष्टींकरिता हवी आहे. अेक आपली भाषा निर्भेळ राहावी यासाठी आणि दुसरी म्हणजे तिच्यावरील आक्रमण हें आपल्यावरील परकीयांच्या स्वामित्वाचें निदर्शक आहे यासाठी. आमचा पहिला कटाक्ष असा की मराठी भाषेत जे अनावश्यक परकीय शब्द घुसले असतील त्यांना हुसकावून लावा. पत्नी, जाया, भार्या असे अनेक शब्द तुमच्या भाषेत असताना 'वाअिफ' शब्दाची काय जरुरी? आमचा दुसरा कटाक्ष असा की, आपल्या भाषेत रूढ झालेल्या ज्या परकीय शब्दांना सुटसुटीत नवे शब्द बनविता येतील किंवा त्या अर्थाच्या जुन्या शब्दांचें पुनरुज्जीवन करता येअील तें करा.

हिंदी हीच राष्ट्रभाषा

यासाठी हिंदी राष्ट्रभाषा असली पाहिजे असेंही आमचें म्हणणें आहे. अुत्तर हिंदुस्थानात आजही अुर्दूचें आपल्यावर आक्रमण होत आहे, त्याचा आपण प्रतिकार केला पाहिजे. रेडिओत आजकाल 'मुंबअीचा समाचार' अेवजी 'सुनो मुंबअीकी खबर' असे अुर्दू शब्दप्रयोग अैकू येअू लागले आहेत. अुर्दू हीच राष्ट्रभाषा असली पाहिजे असा बॅ. जिना यांचा आग्रह आहे. बिहारमध्ये हिंदु मंत्रिमंडळ असताना तेथे तडजोड म्हणून अुर्दू ही राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आली, हें अैकून मला विस्मय वाटला! बंगालमध्ये हिंदु नि मुसलमान दोघेही बंगाली भाषा बोलतात. तेथील बंगाली लोकांनी मुसलमानांच्या आहारी स्वत: जाण्याअैवजी त्या मुसलमानांनाच संस्कृत पंडित बनविलें. भोपाळ नि निजाम या संस्थानांतून आज अुर्दू भाषेचा जोराने पुरस्कार केला जात आहे. पण मी त्यांना त्याबद्दल दोष देत नाही.

स्वामित्वाची स्मृति कशाला ?

दुसऱ्यांना दोष न देणें हें हिंदु संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. परंतु आपली भाषा शुद्ध करण्यासाठी आपण आपल्या भाषेत ठाण मांडून बसलेल्या अनावश्यक अुर्दू नि अिंग्रजी शब्दांचें अुच्चाटन केलें पाहिजे, त्याचप्रमाणे जुन्या मराठी शब्दांचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे, आणि शक्य तेथे नवीन मराठी समर्पक शब्द बनविले पाहिजेत. विशेषत: 'कायदा' हा अुर्दू शब्द आपण आधी काढून टाकला पाहिजे. कारण त्या शब्दाच्या मागे जी सूचकता आहे, ती आपल्या स्वाभिमानास धक्का लावणारी आहे. यासाठी त्या अर्थाचा 'निर्बंध' असा शब्द आपण योजल्यास बरें होअील. गुजराथी वगैरे भाषा आपल्या आहेत नि त्यांनी आपल्या भाषेत भर टाकली तर मला आनंद आहे; परंतु स्वामित्वनिदर्शक अुर्दू नि अिंग्रजी भाषांतील शब्दांवर माझा मोठा कटाक्ष आहे.

अनुक्रमांक ३८७५ दि: १३/११/४५
क्रमांक ७५९६ नों: दि: 13/11/45

२९. मध्यप्रांतीय साहित्य संमेलन

नागपूर येथे विद्यापीठाच्या स्नातक मंदिरात मराठी मध्यप्रांतीय साहित्य संमेलनाचे सभापति म्हणून स्वा. सावरकर यांचें दि.१२-१२-१९३७ रोजी पुढील आशयाचें भाषण झालें. 'हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा आणि देवनागरी हीच आमची राष्ट्रलिपि हा सिद्धान्त त्यात प्रतिपादिला आहे.

आता संमेलनाचें अुद्घाटन करताना आपल्या प्रांताचे प्रधान ना. डॉ. खरे यांनी हिंदीसंबंधी जें सांगितलें तें अत्यंत अुचित आहे. आपण प्रथम भारतीय आहो

व नंतर महाराष्ट्रीय आहो. नर्मदा नि कृष्णा या नद्यांनी परिवेष्टित अेवढाच केवळ महाराष्ट्र न मानता पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला सबंध भारत हा महाराष्ट्रच मानण्याला आपण शिकलें पाहिजे. अर्थात् त्या दृष्टीने हिंदी ही राष्ट्राची अेक राष्ट्रीय भाषा होणें हें केवळ अुचितच नाही तर आवश्यकही आहे. पूर्वकाली जरी संस्कृत हीच देशाची अेकमेव भाषा होती व सर्वदेशीय महत्त्वाचे असे ग्रंथ व काव्यें जरी संस्कृतमधून लिहिलीं जात तरी पुढे कालांतराने तिची जागा हिंदीने पटकाविली. मराठी संतकवि नामदेवाने हिंदी भाषेत रचना केली असून ती आजही पंजाबसारख्या दूरच्या विभागात प्रसिद्ध आहे आणि तुकारामाचेही काही अभंग हिंदीत आहेत. यावरून हिंदी ही त्या काळात सर्वराष्ट्रीय भाषा कशी होअून बसली होती तें बरोबर दिसून येअील. या प्राकृत भाषेचा प्रचार चारी धामांच्या यात्रा करणाऱ्या साधुबैराग्यांच्यामुळे वाढल्याने तिला साधूंची किंवा वैराग्यांची भाषा असें अभिधान त्या काळी प्राप्त झालें होतें. धर्माने मुसलमान असलेल्या कवींनीही आपली काव्यरचना त्या काळी व्रजभाषेतून केली आहे.

हिंदी ही जुनीच राष्ट्रभाषा

अर्थात् पंडितांची भाषा मात्र संस्कृत हीच राहिली. संस्कृत भाषेचा सामान्य जनांतून लोप होअून हिंदीचा प्रादुर्भाव होण्याला आपल्यावर परकीयांचीं आक्रमणें हीं जशीं कारण झालीं, तसें आपलें शैथिल्यही त्याला बऱ्याच अंशाने कारण झालें. तें कसेंही असलें तरी अेवढी गोष्ट खरी की, हिंदी ही राष्ट्रभाषा मानण्याची कल्पना नवी असली, तरी तिचा प्रचार मात्र नवीन नाही. तिने पूर्वीपासूनच राष्ट्रभाषेचें स्थान पटकाविलेलें आहे. यात पुढे अिंग्रजी राजवट सुरू झाल्यापासून खंड पडला. पण हा फरक नवीन अिंग्रजी शिक्षणाने अलंकृत झालेल्या म्हणजे वरच्या वर्गातच मुख्यतः पडला. आता हिंदी हीच आपली राष्ट्रभाषा व तिचा अधिकाधिक प्रचार होणें अवश्य आहे, ही गोष्ट ठरली. परंतु अलीकडे हिंदीचें जें भ्रष्टीकरण सुरू झालें आहे त्यामुळे राष्ट्रभाषा हिंदी हिचें स्वरूप कसें असावें यासंबंधी वाद अुपस्थित झाला.

राष्ट्रभाषेचें चाललेलें भ्रष्टीकरण

'हिंदी याने हिंदुस्थानी' हें नवें नांव तिला मिळू पाहत आहे. अुर्दू, पारशी वगैरे जे शब्द मूळच्या संस्कृतनिष्ठ हिंदीत शिरले ते तसेच कायम राहू देऊन जी भाषेची खिचडी होअील ती राष्ट्रभाषा मानावी, असें मानण्याकडे सध्या या देशातील काही बडया लोकांचा कल आहे. परंतु ही गोष्ट मात्र अनुचित आहे. राष्ट्रभाषा तीच होअू शकते की जी समन्वित राहील. आपला अितिहास आणि परंपरा

यात वसणारी ही भाषा नाही. शिवाय नवशब्दप्रसवाला जी भाषा समर्थ आहे तीच भाषा हिंदीची जननी असणें योग्य आहे. नव्या युगात अुद्भवणाऱ्या अभिनव कल्पना नि वस्तु यांचे निदर्शक अशा शब्दांचा पुरवठा करू शकेल अशी भाषा संस्कृत-शिवाय आज जगात दुसरी कोणती आहे? अरेबिक भाषा नि लिपि या दोन्हीही या कामी असमर्थ आहेत. अरेबिक लिपि तर या कामी अितकी निकृष्ट आहे की तुर्कस्थानातून तिचें अुच्चाटन करून रोमन लिपि केमालपाशाला तेथे प्रचारात आणावी लागली. जगात देवनागरीअितकी पूर्णतेस पोचलेली लिपि नि संस्कृतअितकी नवशब्दप्रसवक्षम भाषा जगात दुसरी नाही.

मुसलमानांचा हट्ट कोठवर पुरवाल ?

काव्य, शास्त्रें, विज्ञान या सर्वांना शब्दांच्या राशी पुरवू शकेल अशी संस्कृत ही अेकच भाषा आहे. ग्रीक व लॅटिन याही या कामी अपुऱ्या आहेत. निझाम सरकारने आपल्या अुस्मानिया विद्यापीठात अुर्दू भाषा या कामी लावण्याचा प्रयोग करून पाहिला होता; पण तो असफल ठरल्यामुळे तो नाद त्यांना शेवटी सोडून द्यावा लागला. शेवटी नाअिलाजाने त्यांना अिंग्रजी शब्दच जसेच्या तसे अुचलावे लागले. मग आता हा प्रयोग आपण करून पाहण्यात काय अर्थ ? आणि हें करावयाचें तरी कशासाठी ? तर मुसलमानांना खुश करण्यासाठी ! परंतु याने तरी ते प्रसन्न होतात का !

शब्दांची जातवार वाटणी !

आता तर त्यांनी अुर्दू हीच राष्ट्रभाषा नि अरेबिक हीच लिपि हिंदुस्थानात नांदली पाहिजे अशी घोषणा केली आहे. मग तुमच्या त्या त्यागाला काय फळ आलें ? तुम्ही जसजसें पाअूल मागे घ्याल तसतसें त्यांच्या दुराग्रहाचें अेकेक पाअूल पुढे पुढेच पडत जाणार हें दिसतच आहे. कलकत्ता विद्यापीठाचें प्रतीक श्रीयुक्त कमल हें त्यांच्या डोळ्यांना आता सलू लागलें असून 'वंदे मातरम्' हें आजवर सर्वमान्य झालेलें राष्ट्रगीत त्यांना अैकवेनासें झालें आहे. डाक्का विद्यापीठात क्रमिक पुस्तकांतून बंगाली शब्दांचें अुच्चाटन करून तिथे अुर्दू शब्द घुसडण्याची कारवाअी सध्या चाललेली आहे. अेका पुस्तकात बंगाली शब्द किती असावेत नि अुर्दू किती असावेत याची जणू काय वाटणी करून घेण्याचा प्रयत्न त्यांनी चालविला आहे. विधिमंडळातील जागांच्या वाटणीचें प्रमाण भाषेतही शिरलें तर कसा अनवस्थाप्रसंग अुद्भवेल याचा आपण विचार करा; पण ही त्यांची भूक तुमची भाषा सबंध गिळून टाकल्याखेरीज थांबणार नाही. सरसीमा प्रांतात हिंदी नि गुरुमुखी यांची चाललेली गळचेपी ही मुसलमानांच्या अेतद्विषयक वृत्तीचें अुत्तम प्रत्यंतर आहे. अर्थात् त्यांच्या ह्या हट्टापुढे सदाच मान वाकवीत राहूनही त्यांचें कधी तरी समाधान होअील का? अर्थात नाही, हें अुघड आहे.

ही गुळमुळीत भाषा सोडा !

मग त्यांची पत्राज कुठपर्यंत करावयाची ? आता गुळमुळीत भाषा वापरून निभत नाही. अेकदा हिंदूंनी हें स्पष्टपणे सांगून टाकलें पाहिजे की, या देशाची राष्ट्र-भाषा अुर्दू नाही, अुर्दूमिश्र हिंदी म्हणजेच 'हिंदी याने हिंदुस्थानी' नव्हे, तर संस्कृतनिष्ठ हिंदी हीच राहील. गुळमुळीत भाषेनेच आपण आजवर आपला घात करून अितरांच्या आक्रमक वृत्तीला जीवन पुरविलें आहे. अर्थात यापुढे आपण आपल्या राष्ट्रभाषेचें भ्रष्टीकरण सहन करता अुपयोगी नाही. अहो, 'हिंदी याने हिंदुस्थानी' ह्या नव्या भाषेच्या नांवातही संस्कृत नि अरबीचें मिश्रण आहे ! अुर्दू ही वस्तुत: बाजारू भाषा आहे. कायरोसारख्या शहरात देशोदेशींच्या प्रवाशांच्या सरमिसळी-पासून नि त्यांच्याशी व्यवहार करण्याच्या स्थानिक लोकांच्या गरजेतून तेथे अेक वेगळीच भाषा अुत्पन्न झाली. अुर्दू ही असलीच भाषा आहे.

अुर्दूची कुरघोडी हिंदीवर नको

पण बाजारातील भाषा हीच राष्ट्रभाषा झाली पाहिजे असाच तर आज कित्येकांचा आग्रह आहे! परंतु ते ही गोष्ट विसरतात की, यामुळे नवशब्दप्रसव-क्षमतेच्या व श्रुतिमंजुलतेच्या दृष्टीने आपल्या राष्ट्रभाषेची अपरिमित हानि होणार आहे आणि या दोन्ही गोष्टी भाषा सामर्थ्यशाली होण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहेत. अशी भाषा या देशात अेक संस्कृतनिष्ठ हिंदी हीच होअू शकते. आणि म्हणून आपण अेकदा अितरांना हें स्पष्टपणे सांगून टाकलें पाहिजे की, तुम्ही सुखेनैव आपली अुर्दू भाषा स्वत:पुरती ठेवा; पण आम्ही आपल्यावर तिचा जुलूम चालू देणार नाही. नाही तरी देवनागरीवरोवरच अुर्दू लिपिही दुसरी राष्ट्रीय लिपि म्हणून मान्य केलीच ना ? मुसलमानांच्या हट्टासाठी जर काही करणें आवश्यकच असेल तर लिपीप्रमाणेच त्यांच्यापुरती अुर्दू भाषाही मान्य करा; परंतु हिंदीवर तिला कुरघोडी करू देअू नका. त्याने अैक्यही साधणार नाही नि भाषेचा गौरवही वाढ-णार नाही. हें तुम्ही अेकदा केलेंत म्हणजे अुद्या असा प्रसंग आपोआपच येअील की तुमची हिंदी भाषा हीच त्यांना शिकावी लागेल. कारण, आपण बहुसंख्य आहोत नि आपल्याशी व्यवहार करावयाचा तर आपली भाषा शिकणें त्यांना प्राप्तच आहे. तुम्ही मात्र आपलें दौर्बल्य सोडून दिलें पाहिजे. म्हणजे खरी तडजोड घडून येअील.

अितिहासाचे हाल का ?

मुसलमानांच्या रागालोभाची पर्वा करण्यापायी अितिहास विकृत करण्या-पर्यंत आपली मजल गेली आहे. आमच्या वाजूची काही क्रमिक पुस्तकें माझ्या सहजगत्या अवलोकनात आलीं. त्यात देवगिरीच्या यादवांचें राज्य मुसलमानांनी घेतल्याचें नि त्या वेळी हरपाळदेवाला कैद केल्याचें लिहून पुढे हिंदु-मुस्लिम

ऐक्याचे गोडवे गायिले आहेत. या ऐक्याचा पुरस्कार करून मुलांचीं मनें पवित्र राखावीं हें युक्तच आहे. परंतु अितिहास त्यांना पूर्णपणे कां निवेदीत नाही ? त्या हरपाल देवाचें कातडें जिवंतपणी आपादमस्तक सोलून काढण्यात आलें हें त्यांच्यापासून कां लपवून ठेवता ?

संभाजीला नुसती अटक केली असेंही मी अेका क्रमिक पुस्तकात वाचलें! हा ढोंगीपणा कां ? त्याचे हालहाल करून मारण्यात आलें आणि शिर अेका ठिकाणी नि धड दुसऱ्या ठिकाणी बारा मैलांच्या अंतराने अुंटावरून लोटून देण्यात आलें. हें त्यांना कां निवेदीत नाही ? हें का ? तर ज्यांनी हे अनन्वित प्रकार केले त्यांना राग येतो म्हणून ! ! यापेक्षा निर्लज्जपणा कोणता हवा ? आता राष्ट्रीय सभेची राजवट बहुसंख्य प्रांतांतून सुरू झाली आहे; तेव्हा ही चूक सुधारता येणें शक्य आहे नि अवश्यही आहे. आपल्या प्रांताचे प्रधान डॉ. खरे यांनी या गोष्टीकडे अवश्य लक्ष द्यावें अशी माझी त्यांना सूचना आहे.

देवनागरीत मुद्रणसौकर्य आणा

आपल्या लिपि-सुधारणेची योजना आपण समजावून घेतली पाहिजे. प्रारंभी जगात हातवारे नि नेत्रसंकेत यांनी भावनांचें प्रकटीकरण पूर्णपणे होत नाही असा प्रत्यय आल्यामुळे जसा बोली भाषेचा जन्म झाला तशीच विचारांचा संग्रह करून ठेवण्याची आवश्यकता अुत्पन्न झाल्यामुळे लिपि जन्माला आली. प्राचीन काळातील प्रगत राष्ट्रात चित्रलिपि प्रचलित होती नि आजही चीन-जपान वगैरे देशांत ती प्रचलित आहे. परंतु तिजमुळे अक्षरसंख्या अितकी वाढली की, तिच्यात सुधारणा करण्याची आवश्यकता अुत्पन्न झाली. यातूनच ब्राह्मी म्हणजेच देवनागरी लिपीचा जन्म झाला. ही लिपि ज्या क्षणी जन्मास आली, तो मोठा युगप्रवर्तक क्षण समजला पाहिजे. ही लिपि अितकी विचारपूर्वक बसविली आहे नि तिची रचना अितकी शास्त्रीय आहे की, तिच्याशी जगातील कोणतीही विद्यमान लिपि स्पर्धा करू शकत नाही.

'अ'ची बाराखडी

अेका अुच्चाराला अेक अक्षर हें तिचें वैशिष्ट्य आहे. परंतु अितकी शास्त्रशुद्ध अशी जरी आपली लिपि असली तरी मुद्रणसौकर्याच्या दृष्टीने तीत काही फेरफार करणें आज आवश्यक झालें आहे. अिंग्रजी भाषेशी मुद्रणाच्या बाबतीत तोंड द्यावयाचें असलें तर तीत सुधारणा अनिवार्य आहे. देवनागरी लिपि सुटसुटीत नि कमी अक्षरांची करणें हाच त्यावर अुपाय आहे. या दृष्टीने माझ्या पद्धतीने जर देवनागरी लिपि लिहिण्यात आली तर 'अ'च्या बाराखडीतील ८ अक्षरें, १०० जोडाक्षरें नि २५ 'र'कारांचे प्रकार अितकीं अक्षरें वाचून सुमारे ५६ खणात मराठी

जुळाऱ्याची पेटिका पूर्ण होऊ शकते. सध्याचीं जोडाक्षरें लिहिण्याची पद्धति ही काही सर्वांशी पूर्वापार नाही. त्यात निरनिराळ्या काळी आवश्यकतेनुसार फरक पडलेला आहेच. मग आज मुद्रणसौकर्याच्या दृष्टीने आपण आणखी सुधारणा करावयाला काय हरकत आहे?

याने लिपि विद्रूप होत नाही.

या सुधारणांपैकी कित्येक तर प्राचीनांचें पुनरुज्जीवनच आहेत. शिवाय ही नवी लिपि मुलांना समजण्यास सोपी आहे. सौंदर्याच्या दृष्टीने या सुधारणेमुळे लिपीची हानि होते हें म्हणणेंही बरोबर नाही. हा फक्त दृष्टीला लागलेल्या सवयीचा परिणाम आहे. वृत्तपत्रकारांनी नि शिक्षणमंत्र्यांनी जर ही गोष्ट मनावर घेतली तर देवनागरी ही लौकरच अेक चांगली मुद्रणक्षम लिपि बनेल. 'अ'ची बाराखडी तर आता प्रचारात येऊ लागलीच आहे. परंतु माझ्याच साऱ्या सूचना स्वीकारा असाही माझा आग्रह नाही. अितरांनी वाटल्यास आपल्या सूचना पुढे मांडाव्यात आणि तज्ज्ञांनी सर्वांचा विचार करून ही सुधारणा घडवून आणावी.

✦ ✦ ✦

३०. महाराष्ट्र साहित्य संमेलन

[मुंबई येथे दि. १५ अेप्रिल १९३८ रोजी संमेलनाचें १२ वें अधिवेशन भरलें असता त्याच्या अध्यक्षपदावरून स्वा. सावरकर यांनी पुढील भाषण केलें. मराठी भाषेचें आणि लिपीचें शुद्धीकरण, राष्ट्रभाषा हिंदी आणि राष्ट्रलिपि देवनागरी यांचा पुरस्कार आणि त्यावरील आक्रमणाला जोराचा प्रतिकार, मराठीतील क्रियापदांचें आणि मराठी भाषिकांतील क्रियाशीलतेचें दारिद्र्य दूर करण्यासाठी 'सैनिक व्हा' असा संदेश अित्यादि विषयांचा प्रपंच करणारा अधिकृत प्रबंधच गणण्याअितकें हें भाषण महत्त्वाचें आहे.]

आपण मला महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें या वर्षाचें अध्यक्षपद देअून जो मान अर्पिला आहात आणि जो विश्वास व्यक्तविला आहात त्याविषयी मी आपला आभारी आहे. तो मान माझ्या साहित्यविषयक योग्यतेपेक्षा आपल्या ममत्वाचाच

अधिक द्योतक आहे हें मी जाणून आहे; आणि तो विश्वास अनाठायी पडल्या-सारखें होऊ नये यास्तव साहित्यविषयक काय काय सुधारणा केल्या पाहिजेत ह्यांचा जो कार्यक्रम मला आपल्या राष्ट्राचे हितार्थ पथ्य वाटतो तो, प्रिय असो वा अप्रिय असो, त्याची चिंता न करता, या निबंधात जितका शक्य तितका मी दिग्दर्शिणार आहे.

स्वागताध्यक्षांचेंच स्वागत

नेहमीचा शिष्टाचार म्हणजे अध्यक्षांचें स्वागत स्वागताध्यक्षाने करावयाचें; परंतु या वर्षी आपण अध्यक्षपदी मला नियोजून, स्वागताध्यक्षाचे पदी न्यायमूर्ति मुकुंदराव जयकर यांची योजना केल्यामुळे प्रथमारंभीच त्या शिष्टाचाराचा भंग करण्याचा प्रसंग माझ्यावर ओढवला आहे. असा हवा तोच गोड प्रसंग माझ्यावर आणण्यात आपण मला अुपकृतच केलें आहे. न्यायमूर्ति जयकरांसारखी थोर व्यक्ति जेव्हा स्वागताध्यक्षाचे पदी असते, तेव्हा कोणत्याही अध्यक्षाला शिष्टाचार बाजूस सारूनसुद्धा स्वागताध्यक्षांचेंच स्वागत केल्यावाचून कसें राहवेल? ज्या मुंबअी नगरात हें संमेलन भरत आहे त्या मुंबअी नगरातील अग्रगण्य नागरिक, नामांकित वक्ता, नामांकित विद्वान्, नामांकित राजकारणी, नामांकित समाज-सुधारक, महाराष्ट्रीय वाण्याचा अेकनिष्ठ अभिमानी असा हा स्वागताध्यक्ष मला लाभल्यामुळे अध्यक्षपद लाभल्यापेक्षाही माझा गौरव अधिक झाला आहे असें मी समजतो. बॅ. बाबाराव जयकरांना भारतीय संघराज्याच्या अत्युच्च न्यायालयाचे—Federal Court चे न्यायाधीश नेमण्यात सरकारने स्वत:च्या अभिज्ञतेचाच नव्हे, त्या थोर पुरुषाचाच नव्हे, तर आपल्या ह्या अवघ्या महाराष्ट्राचाच अुचित तोच गौरव केला आहे. पारतंत्र्यात म्हणून अितक्यावरच संतोष मानावयाचा; नाही तर जर आज आपलें भरतखंड स्वतंत्र असतें, तर न्यायमूर्ति जयकरांसारखे पुरुष युरोपा-तील प्रबळ राष्ट्रांमध्ये स्वतंत्र भारताचे राजप्रतिनिधि म्हणून Ambassador म्हणून जागतिक राजकारणेंही लढवू शकते.

सरदेसाअी यांना कृतज्ञ प्रणिपात

नैबंधिक क्षेत्रात आमच्या बाबाराव जयकरांनी जशी अखिल भारतीय कीर्ति संपादिली त्याचप्रमाणे ज्या आमच्या महाराष्ट्रीय विद्वानाने अैतिहासिक क्षेत्रात आपलें भारतीय महत्त्व प्रस्थापिलें आहे त्या आपल्या वयोवृद्ध नि ज्ञानवृद्ध रावसाहेब सरदेसायांना प्रथमत: कृतज्ञ प्रणिपात केल्यानंतरच काय तें मला या अध्यक्षपदी चढता येणारें आहे. बहुतेकांची थोरवी अशा अुच्च अध्यक्षपदावर चढल्यानंतरच अधिक अुठावदार दिसू लागते. पण काही पुरुषांची थोरवी अशी असते की, त्यांच्या आरोहणाने तें अध्यक्षपदच अधिक अुठावदार नि अुच्च दिसू लागतें. राव-

साहेब सरदेसाई यांची गणना साहित्यक्षेत्रातील या दुसऱ्या प्रकारच्या थोर पुरुषांतच केली पाहिजे. आपल्या हाडांचीं काडें करून जसा अेखादा शेतकरी कापसाच्या नि धान्याच्या राशींच्या राशी रचून ठेवतो, तशा अैतिहासिक साधनांच्या राशींच्या राशी ज्यांनी आपल्या परिश्रमाने रचून ठेवल्या त्या राजवाड्यांच्या आणि खऱ्यांच्या अैतिहासिक सेवेचे अुपकार तर आहेतच अमित! तथापि नुसत्या कापसाच्या राशी काही अंगावर घेता येत नाहीत, नुसतें धान्य कच्चेंच खाल्लें तर सहसा काही पचत नाही. बहुजनसमाजाला जें अन्नवस्त्र हवें तें वेळच्या वेळीं शिजवून नि विणून देणाऱ्याचे परिश्रम हेही त्याच कारणासाठी अत्यंत अुपकारक नि प्रशंसार्ह ठरल्याविना राहत नाहीत.

अिंग्रजीत महाराष्ट्राचा अितिहास लिहा

मुसुलमानी राजवटीपासून तो थेट ब्रिटिश राजवटीपर्यंत हिंदुस्थानचा आणि विशेषत: आपल्या प्रतापशाली महाराष्ट्रीय राजवटीचा अितका विस्तृत, अितका तरी साधार नि सुसंगत आणि अितका प्रचंड अितिहास अेकट्या सरदेसायांच्या ग्रंथाविना मराठीमध्ये दुसरा असा आजही झालेला नाही. ही अेक गोष्टसुद्धा त्यांच्या प्रदीर्घ परिश्रमाचें नि अैतिहासिक योग्यतेचें पुरेसें द्योतक आहे. मराठीतच काय पण, मी स्वानुभवाने सांगतो की, हिंदुस्थानाच्या नि विशेषत: मराठी साम्राज्याच्या अितिहासावर असा ग्रंथ बंगाली, हिंदी प्रभृति प्राकृत भाषांमध्ये वा अिंग्रजीमध्येही झालेला नाही. यास्तवच जाता जाता श्रीयुत सरदेसाअी यांना मी विनवितो की, त्यांनी आपलें सारें लक्ष अेकवटून नि अितर फुटकळ लिखाण बाजूस सारून निदान महाराष्ट्र-अितिहासावर तरी अितकाच व्यापक, असाच समग्र नि अधिक सुसंगत असा अेक अिंग्रजी ग्रंथही प्रवाही अिंग्रजी भाषेत शक्य तितक्या लवकर लिहून काढावा.

हिंदुस्थानातील अितर प्रांतांमध्ये आणि युरोपमध्ये मराठ्यांच्या अितिहासाची स्फूर्ति, वीरत्व नि महान् ध्येयें यांची ओळख किंमपिही झालेली नाही. त्या राष्ट्रीय अुत्थानाचें नि त्या हिंदु स्वातंत्र्ययुद्धाचें भव्य हृद्गत आपल्या परप्रांतीय हिंदु बांधवांच्या तरी ध्यानात यावें आणि महाराष्ट्र-अितिहासाविषयी त्यांची झालेली काहीशी अज्ञानी आणि काहीशी मत्सरी समजूत खोटी पाडावी, यास्तव मी लिहिलेल्या Hindupad Padshahi ह्या अिंग्रजी ग्रंथाचें मन:पूर्वक अभिनंदन ते रत्नागिरी येथे माझ्या भेटीस आले असता, राबसाहेब सरदेसायानी जेव्हा केलें, तेव्हा आपल्यालाही परप्रांतीय हिंदुसमाजाच्या नि युरोपीय अितिहासकारांच्या हचा अज्ञानाची नि मत्सराची तीव्र जाणीव आहे आणि अेक विस्तृत महाराष्ट्रीय अितिहास अिंग्रजीमध्ये लिहिण्याची आवश्यकताही पटलेली आहे असें त्यांनी बोलून दाखविलें. हें कार्य आज तरी तेच करू शकतील. तें कार्य त्यांच्या हातून पार पाड-

ण्यास अवश्य तें निरपवाद आरोग्य, अुदंड आयुष्य हीं त्यांना लाभोत हीच आम्हा सर्वांची प्रार्थना असणार.

भाषण की निबंध

आता अध्यक्षपदावरून जें साहित्यविषयक निवेदन मला आपणांस करावयाचें तें मी मनातल्या मनात जेव्हा प्रथम योजू लागलो, तेव्हा अेकदोन गमतीच्या गोष्टी घडल्या; त्या मी आपणांस प्रथमतः सांगतो. माझ्या मनात खरेखुरें असें अध्यक्षीय भाषणच करावयाचें होतें. भाषण म्हणजे अर्थात् जें आपण बोलतो तें; पण ह्या साहित्यसंमेलनाच्या अुत्साही चालकांनी माझी अध्यक्षपदी निवडणूक होताच मला भेटून सांगितलें की, हें पहा, तुम्ही साहित्यसंमेलनातून बडोदें-नागपूरकडे आयत्या वेळचीं भाषणें केलींत. तशी लटपटपंची अिथे चालणार नाही. अध्यक्षीय भाषण म्हटलें म्हणजे तें आधी लिहून, आधी छापून, त्याच्या छापील प्रती श्रोतृवृंदाच्या हाती आधी वाटलेल्या हव्यात. आणि मग तुम्ही त्याप्रमाणे तोंडी बोललें पाहिजे! असें त्यांनी मला हडसून-खडसून सांगताच माझ्या पोटात भीतीचा गोळाच अुठला! अेखाद्या साग्रसंगीत नाटकाच्या पुस्तकाअेवढें हें भाषण छापून तोंडपाठ करावयाचें नि विनचूक बोलून दाखवावयाचें! हें काम करू गेल्यास गणपतराव जोश्यांसारख्या कसलेल्या नटाचीही बोबडी वळावयाची! त्यातही छापील भाषणें तोंडपाठ म्हणून दाखविण्याच्या कलेची मला तर तोंडओळखही झालेली नाही!

हाही एक शिष्टाचारच

तेव्हा मी जर माझें भाषण छापून लोकांच्या हाती आधी दिलें आणि मग तें तोंडपाठ बोलू लागलो तर त्यात शब्द, वाक्यें, छेदक यांची भयंकर अुलटापालट नि गाळागाळी होणार. माझी अशी बोलता बोलता गाळागाळी चाललेली आहे आणि आपण हातात माझें छापील भाषण घेअून, नाटकाचें पुस्तक हातात घेअून बसलेले प्रेक्षक जसे त्या त्या पात्राच्या भाषणात चुका होताच अेकमेकांना कोपर-खळ्यांनी डिवचून 'टिंगल' करतात, तसें आपण माझी टिंगल अुडविता आहात असें दृश्य मला दिसू लागलें. छापलेल्या भाषणातील माझी बोलता बोलता जी गाळागाळ नि अुलटापालट चाललेली आहे, त्यायोगे आपल्या तोंडावर प्रथम हास्याच्या नंतर अुपहासाच्या आणि शेवटी तिरस्काराच्या लहरी अुसळताहेत नि मी त्यांत बुडून चाललो आहे, असें मला भासू लागलें! मला कासावीस झालेला पाहून ह्या संमेलनाचे परिश्रमी कार्यकर्ते श्री. अप्पाराव पेंडसे मला असें काहीसें म्हणाले 'भिअू नका तुम्ही त्या अडचणीला! तुम्ही छापून काढाल तें भाषणच तुम्ही बोललें पाहिजे असें नाही. आजपर्यंत अनेक संस्थांचे अध्यक्ष त्यांच्या छापील भाषणाप्रमाणेच बोलत आले की काय! अध्यक्षांचें भाषण म्हणून छापलें जावें अेक

आणि बोललें जावें दुसरेंच, हाही अेक शिष्टाचारच आहे अध्यक्षीय भाषणाचा! युरोपातही तसेंच होतें!

अखेर तोड काढली!

त्यांची युक्ति मला पुष्कळच सोयिस्कर होती. कारण, क्रांतिकारक आंदोलनात भाग घेत असता गुप्त पोलिसांना चकविण्यासाठी बोलावें कसें अेक आणि काय बोललों त्याचें प्रतिवृत्त म्हणून छापावें कसें दुसरेंच या दुटप्पी कलेत मी चांगलाच पटाअीत झालेला होतो. परंतु 'शठं प्रति शाठ्यं' हा न्याय तिथे जरी मला रुचला तरी बिचाऱ्या सज्जन साहित्यिकांच्या निरुपद्रवी श्रोतृवृंदाशी नि वाचकवृंदाशी वागताना तोच आचरणें मला कसेसेंच वाटू लागलें. शेवटी मी विनविलें की 'सज्जन हो! मी माझें अध्यक्षीय निवेदन तुम्ही सांगता तसें काढतो लिहून! हो, सापडलो आहे खरा आपल्या कचाट्यात! पण आता अितकेंच करू द्या मला, त्या माझ्या लिहिलेल्या नि छापलेल्या लिखाणास 'अध्यक्षीय भाषण' असें भलतेंच नांव न देता 'अध्यक्षीय निबंध' असें यथावत् नांव मला देअू द्या. आणि त्याची अेक प्रत चकचकीत हातात धरून मला तें आपलें वाचू द्या. अध्यक्ष जें खरोखरच बोलतो त्याच्या तिप्पट-चौपट अुलट-सुलट भाषेचें लिखाण अध्यक्षीय भाषण म्हणून प्रसिद्ध करण्याचा जुना शिष्टाचार आता ह्या सत्यअहिंसेच्या सुकाळात तरी अशिष्ट समजावा. अध्यक्ष जें काय बोलेल तेंच काय तें त्याचें अध्यक्षीय भाषण. तो जें लिहून वाचील तो अध्यक्षीय निबंध' अशी शेवटी आमची नवी नि यथावत् परिभाषा ठरली; आणि त्याप्रमाणे मी हा अध्यक्षीय निबंध लिहावयास घेतला.

तत्त्वात्मक नव्हे कार्यात्मक!

पण निबंध लिहू लागलो न लागलो, तो दुसरी अेक सांगण्यासारखी गंमत घडली. मला पहिल्या पायीच तत्त्वाचें मांजर आडवें आलें! मी निबंधात काय लिहावें याविषयी अिष्टमित्रांच्या नि अनिष्ट मित्रांच्यासुद्धा अनेक सूचनांचा माझ्यावर नुसता मारा चालू झाला. त्यात बहुतेकांनी व्यक्तविलेली आशा म्हणजे मी काही तात्त्विक अूहापोह करावा! आणि बहुतेकांनी व्यक्तविलेली भीति म्हणजे मी त्यात भाषाशुद्धीचाच काय तो प्रपंच थाटू नये. परंतु या आशेला कोणतेंही आश्वासन किंवा या भीतीला अभयदान मला देता आलें नाही. ही गोष्ट जितक्या खेदाची तितक्याच निरुपायाची होती. साहित्याविषयीही तात्त्विक नि बौद्धिक चर्चेचा अुपयोग आहेच आहे, यासंबंधी माझें दुमत नाही. साहित्यविषयक तात्त्विक प्रश्नासंबंधी माझींही काही मतें आहेत. अशी केवळ बौद्धिक करमणूक मलाही आवडते. चांदण्या रात्री मांडीवर मांडी ठोकून किंवा जेठा मारून बसल्याबसल्या मनोराज्यें जिंकीत चालण्याची सुखाची सोय ह्या जगात आहे हें मला

ठाअूक आहे. परंतु, केवळ अशा तात्त्विक नि केवळ बौद्धिक काथ्याकुटीत रुपून बसल्यामुळेच आपण क्रियादुर्बल होअून पडतो आहोत, आपलीं भौतिक राज्यें गमावून बसलो आहोत, याचें शल्य माझ्या हृदयात सारखें बोचत आहे त्याला काय करणार!

कार्यशक्तीचें दौर्बल्य

ज्या काळी अलंकारशास्त्रावर जगन्नाथपंडितांसारख्यांचे अुत्कृष्टातील अुत्कृष्ट ग्रंथ लिहिले जात होते, त्याच वेळी आपल्या राष्ट्रमातेच्या अंगावरील मुकुटकुंडलादि राणीपणाचे अलंकार अेकामागून अेक ओरबडून अकबर-औरंगजेब तिला बटीक बनवीत होते! आणि ज्या काळी स्मृतींच्या समन्वयास्तव निर्णयसिंधु-धर्मसिंधूसारखे प्रचंड ग्रंथ लिहीत, संध्येची पळी किती मोठी असावी याची तात्त्विक नि शास्त्रीय चर्चा करीत, नि गीतेच्या अेकेका शब्दावर पांचपांचशे श्लोकांत आपली बुद्धि तात्त्विक विवेचन करीत बसली होती, त्याच वेळी अनेक अल्लाअुद्दीन आणि मलिकंबर त्या स्मृतींच्या नि गीतेच्या लाखो अनुयायांवर अवघ्या दीड दोन हजार सैनिकांनिशी झडपा घालून त्यांना कापून काढीत होते–रामेश्वरापर्यंत आपलीं राज्यें पालथीं घालून बसले! ते कां? आपली तत्त्वप्रवणता किंवा बुद्धिशक्ति दुर्बल होती म्हणून नव्हे, तर आपली कृतिप्रवणता, आपली कार्यशक्ति दुबळी होती म्हणून! त्या अलंकार-शास्त्रावरील वा वेदान्तावरील ग्रंथांचा किंवा त्या आपल्या बुद्धिवैभवाचा मलाही अभिमान वाटतो. अलंकार, कविता, काव्य, तत्त्व, यांची मलाही अतिशय आवड आहे. पण जी अपथ्य आवड तेंच व्यसन! आणि **जें अप्रासंगिक तेंच अपथ्य**. हें कृतिदौर्बल्य आपल्या हाडीपेरी आजही मुरलेलें आहे. राजकीय, सामाजिक वा साहित्यिक अशा ज्या कोणत्या क्षेत्रात मी काम करीत आलो, त्या प्रत्येक क्षेत्रात मला, आम्हा सर्वांचें हें कृतिदौर्बल्य पाहून अत्यंत विषाद वाटत आलेला आहे. मीही आपल्यातीलच अेक! पण मला माझें मन या दोषासाठी जसें खात आहे तसेंच आमच्या सर्व राष्ट्राचें लक्षही या दोषाकडे वेधलें जावें अशी मला तळमळ लागली आहे. विशेष काही असेल तर अितकेंच काय तें!

न्यायमूर्ति रानड्यांच्या काळापासून ज्या सुधारणांचा काथ्याकूट सारखा चालालेला आहे, ज्या सुधारणा मनात येताच करून टाकणें बहुतांशी तरी आपल्याच हातात आहे, अशा शेकडो सुधारणा आपल्यापुढे अुभ्या असता, आपण त्या तडकाफडकी आजही करून टाकीत नाही! त्यांचा अजूनही नुसता तात्त्विक नि बौद्धिक काथ्याकूटच करीत बसलो आहोत. ज्यांना त्या पटल्या नाहीत त्यांचा प्रश्न वेगळा. पण ज्या लाखो लोकांना त्या राजकीय, सामाजिक वा साहित्यिक सुधारणा पटल्या आहेत तेही त्यांचे नुसते ठरावच पुनःपुनः करीत बसले आहेत! त्या आचरून

सोडण्याचा प्रसंग आला की मागे घेतात ! काही अपवाद वजा जाता, आपल्या लोकांत अेकंदरीत मुरलेली ही कृतिदुर्बलता आणि बौद्धिक चर्वितचर्वणाचें तत्त्वव्यसन नाहीसें झाल्यावाचून, आजच्या राष्ट्रीय पुनरुत्थानार्थ अवश्य असलेल्या कार्याचा अुठाव होणार नाही, अशी माझी कटुतम अनुभवानें निश्चिति पटल्यामुळे लहान वा मोठ्या ज्या कोणच्या सार्वजनिक क्षेत्रात मला पाअूल टाकण्याचा प्रसंग येतो तेथे तेथे, 'केल्याने होत आहे रे । आधी केलेंचि पाहिजे' 'हा 'सामर्थ्य'–डिंडिम निनाद-वीतच काय तें पुढें पाअूल टाकावेसें वाटतें आणि यास्तव या लहानशा साहित्य-क्षेत्रातही पाअूल टाकताना, त्यात ज्या काही क्रियात्मक सुधारणा करणें अवश्य आहे असें मला वाटतें, त्यांच्याकडेच आपलें लक्ष या निबंधात मी मुख्यत्वे करून वेधणार आहे. काही तात्त्विक चर्चा आली तरी ती असेल केवळ आनुषंगिक तेवढीच.

त्यातही या संमेलनाच्या पूर्वीच्या अनेक विद्वान् अध्यक्षांनी साहित्यविषयक अवश्य तो बहुतेक तात्त्विक चर्चा आधीच केलेली आहे. तेव्हा साहित्याच्या अुत्पति, अुपपत्ति, प्रतिपत्ति प्रभृति विषयांसंबंधी तीच ती घटपटादि तार्किक वा तात्त्विक खटपट पुन्हा एकदा करीत बसण्याची आवश्यकता अुरलेली नाही. यास्तव त्या तात्त्विक भागाकडे पाठ फिरवून ज्या ज्या लहान मोठ्या साहित्यविषयक सुधारणा किंवा जीं जीं लहानमोठीं साहित्यविषयक कार्यें आपण करून टाकावीं असें मला वाटतें, त्या क्रियात्मक भागाकडे मी वळतो.

या क्रियात्मक भागाकडे वळताना प्रथमपदीच मला क्रियापदाची आठवण व्हावी हें नामसादृश्यामुळे तरी अगदी स्वाभाविक आहे. आपल्या मराठीतच नव्हे, बंगाली, हिंदी, गुजराथी अित्यादि आपल्या सर्वच प्राकृत भाषांत क्रियापद-दारिद्र्य पदोपदी अनुभवावें लागतें. या सर्व भाषांमध्ये देणें, घेणें, असणें, करणें अशी काही मोजकीं क्रियापदें तेवढीं स्वतंत्र रुळलेलीं आहेत. आणि अुरलेल्या शतावधि क्रिया-पदांचें कार्य त्याच त्या मोजक्या क्रियापदांच्या मागे भिन्न भिन्न नामें किंवा अितर शब्द लावून साधावें लागतें. त्यामुळे एका शब्दाने जें काम व्हावयाचें त्यासाठी दोन तीन शब्द वापरावे लागतात. जसें संमति देणें, अुत्तेजन देणें, प्रचार करणें, निषेध, करणें, प्रकाशित करणें, अनुमोदन देणें, आशीर्वाद देणें, शाप देणें, वचन देणें, शोक करणें आनंद होणें, दुःख होणें, अुत्तर देणें, चिकित्सा करणें, उपहास करणें अित्यादि, या दुशब्दी क्रियापदांमुळे त्याच त्या देणें, करणें असणें अित्यादि शब्दांची कंटाळवाणी पुनरुक्ति करावी लागते. केव्हा केव्हा तर एकाच धातूची द्विरुक्ति हास्यापद वाटू लागते; जसें, प्रतिकार करणें, स्वीकार करणें, धिक्कार करणें, अंगीकार करणें अित्यादि. अशा ठिकाणी तरी आपण प्रतिकारणें, स्वीकारणें, धिक्कारणें, अंगीकारणें अित्यादि अेकेरी स्वतंत्र क्रियापदें वापरण्याची पद्धत अेक वैयक्तिक पर्याय म्हणून तरी पाडावी असें मला वाटतें.

इंग्रजीची प्रवृत्ति पहा

अिंग्लिशमध्ये अशा अर्थाची स्वतंत्र अेकेरी क्रियापदें असतात. जसें To consent, to encourage, to denounce, to publish, to bless, to curse, to reply, to decide, to lecture, to second, to propose, etc. etc. किंबहुना कोणतेंही नवीन नांव प्रचलताच त्या नांवाचेंच एक स्वतंत्र क्रियापदही बनवून टाकण्याची अिंग्लिशमध्ये रूढिच पडलेली आहे. Motor हें नाम प्रचलित होताच to motor हें त्याच नामाचें क्रियापदही लगोलग प्रचललें. Wire ह्या नामापासून to wire हें त्याच नामाचें क्रियापदही लगेच रुळलें. आपल्या भाषाशैलीस अगदीच विरुद्ध न जाईल अशा बेताने, आपल्याही नामविशेषणापासून अशी अेकेरी नि स्वतंत्र क्रियापदें बनविण्याची प्रवृत्ति असावी. जें जें चांगलें तें तें परकीय असलें तरी ग्राह्यच होय.

ग्राह्याग्राह्य विचार

कोणी म्हणेल अिंग्लिशचें हें अनुकरण तुम्हांला कसें खपतें ? इंग्लिश शब्द परकी म्हणून बहिष्कारावे अशा भाषाशुद्धीच्या तुमच्या अट्टहासास हें परकी भाषेच्या वाक्प्रचाराचें अनुकरण विसंगत नाही का! त्यांना आम्ही अितकेंच सांगतो की, आम्ही भाषाशुद्धीवादी मंडळी अिंग्लिश शब्दांना जें बहिष्कारतो तें ते केवळ परकी आहेत म्हणूनच नव्हे! तर ते परकी असून अनवश्यकही आहेत म्हणून. त्यापेक्षा वा तितकेच अन्वर्थक असे आपले व स्वकीय शब्द असताना परकीय शब्द वापरू नयेत. आपले तदर्थक शब्द मरू देअू नयेत, असें भाषाशुद्धीचें म्हणणें. आमच्यात नसलेली वा आमच्याहून चांगली असलेली अशी कोणतीही हितकारक नि अवश्य गोष्ट–मग तो शब्द असो वा शस्त्रअस्त्र, आचार वाक्प्रचार ज्ञान विज्ञान काही का असेना–तें परदेशात जेथे आढळेल तेथून आणून आत्मसात् करण्याची तर प्रतिज्ञाच आहे आमची !

संस्कृत भाषेची समृद्धि

कियापदाच्या या सुधारणेपुरते तरी आम्हांस कोणत्याही परकी भाषेच्या तोंडाकडे पाहण्याचें काहीच कारण नाही. आमची संस्कृत भाषा अितर शब्दसंपत्ती-प्रमाणेच धातुसंपत्तीतही समृद्धतम आहे. स्वतंत्र नि अेकेरी हवी तितकीं क्रियापदें तिच्यात आहेत. अितकेंच नव्हे तर नामादिक शब्दापासून 'नामायते' प्रमाणे वाटेल तितकीं क्रियापदें बनविण्याची सूत्रबद्ध सोय आहे. तेव्हा संस्कृत भाषेप्रमाणेच प्राकृतातही अशी स्वतंत्र क्रियापदें आपण हळुहळू योजावीं.

जुन्या काव्याचा आधार

त्यातही मराठी साहित्याला किंवा भाषेला तीं अगदीच नवखीं वा नावडतीं आहेत असेंही नाही. आजच्या मराठी गद्यालाच काय तें त्याचें वावडें आहे. परंतु

जुन्या अत्यंत सन्मत अशा काव्यांतून अशीं क्रियापदें आग्रहाने आदरलेलीं आढळतात. मुक्तेश्वरादि महनीय मराठी कवींचे हे दोन चार अुतारेही माझ्या म्हणण्यास समर्थितील.

"जरासंधे राज्यासनी अभिषेकिले सहदेवा। राज्य रक्षावें अतिविवेकें मध्यभागी कर्षिला गाढा॥" ज्ञानेश्वर तर सर्वांत अग्रणी. "अैशीं हें अवधारी। निरूपिति परी॥ अधिष्ठानलें अंगें॥" मोरोपंतांच्या अेकाच चरणात अशा अेकेरी क्रियापदांमुळे किती अर्थ, किती थोडक्या स्थलात सामावला आहे पहा! 'आलिंगुनि चुंबुनि शिर हुंगुनिया पुसुनि लोचनें पदरें।'

ग्रामीण वापर

या मराठी अभिजात पद्याप्रमाणेच दुसऱ्या टोकाला खेड्यापाड्यांतील मराठी जिवंत नि जातिवंत बोलीतही अशीं क्रियापदें आढळतात. "तू आंघोळलास का रे? शेती पाणवली, कोथिंबीर वासाळली, मका कणसाळला" अशीं किती तरी सुटसुटीत क्रियापदें कुणबाअू किंवा ग्रामीण लोक अुपयोजिताना आढळतात. तशींच शैली मराठीच्या आजच्या गद्यातही रुळवावी. अुदाहरणार्थ, वर्णिणें, परीक्षिणें, प्रतीक्षिणें, संतोषिणें, अुपकारणें, स्वीकारणें, शापणें, अभिनंदणें अभिवादणें, नमस्कारणें, चुंबिणें, आलिंगिणें, अुपहासिणें, अुल्लेखिणें प्रकाशिणें, संपादिणें, स्वागतिणें, आनंदणें, प्रार्थिणें, निवेदणें, अर्पिणें, चर्चिणें, विवेचिणें, इत्यादि क्रियापदें आजही प्रयोजू लागण्यास काही प्रत्यवाय नाही. आजच्या पद्धतीला अगदीच वावडी वाटतील अशीं क्रियापदें मात्र भरधाव योजीत जाअू नये. झेपेल तितकीच हळूहळू भाषेच्या अंगवळणी पाडावीत, सवयीने जशी पद्यात तशीच गद्यात रुळतील; आणि मराठीतीलच नव्हे तर साऱ्याच प्राकृतातील क्रियापद-दारिद्र्य घालविण्याचा मान महाराष्ट्रास मिळेल. कारण की ही सुधारणा पद्धतशीरपणे अशी प्रथमतः महाराष्ट्रानेच पुरस्कारिली आहे.

हरिभाऊंचा प्रारंभ

आमच्या लहानपणी कै. हरिभाअू आपटे यांनी त्यांच्या कादबऱ्यांतून 'अुत्तरणें' हें आणि अशीं दोनचार क्रियापदें वापरलीं तेव्हा त्यांवर पुष्कळ टीका नि विडम्बन झालें; पण ती सुधारणा मला तेव्हापासून पटत आली. हरिभाअूंनी काही फुटकळ क्रियापदें वापरलीं खरीं; परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्या प्रवृतीचा सोपपत्तिक असा अेक प्रश्नच करून त्याला वाचा अशी स्त्री मासिकांतील आणि प्रतिभेतील 'मराठीचे क्रियापद-दारिद्र्य घालवा' या माझ्या सन १९३५–३६ च्या निबंधातूनच फोडली गेली. मी आपल्या लिखाणात झेपेल तितक्या प्रमाणात ती सुधारणा प्रयोजीतही असतो. या विषयाची सविस्तर चर्चा जर कोणास हवी असेल तर माझ्या या दोन्ही निबंधांत मिळून सांपडेल.

वाक्यरचनेचें वैचित्र्य

नवी अेकेरी नि स्वतंत्र क्रियापदें रुळविण्याच्या सुधारणेप्रमाणेच आपल्या वाक्यरचनेत अर्थानुरोधानेच थोडेसें वैचित्र्य आणण्याची पद्धतही पाडावी असें मला वाटतें. आपल्या वाक्यरचनेची ठराविक धाटणी म्हणजे क्रियापद घालावयाचें तें शेवटीच, आणि शेवटी क्रियापद हें असलेंच पाहिजे. आजच्या गद्य लिखाणातच ही धाटणी ठराविक झाली आहे. परंतु बखरीतील मराठीत मी म्हणतो तशी क्रिया-पदें, अर्थात् वळकटी येत असेल तर शेवटी न घालता मध्ये घालून जो शब्द विशेष साभिप्राय असेल तोच शेवटी घातलेला आढळतो. जसें– आता तुमची–आमची गाठ पडेल रणांगणात ! होय, आहे, होते अित्यादि क्रियापदें जीं अेकसारखीं आजच्या गद्य लिखाणांत शेवटी येतात तीं बखरीतील लिखाणात बहुधा साफ गाळलेलींच असतात. जसें 'समर्थ परम तपस्वी, निश्चयाचे केवळ मेरु. त्या युद्धास अुपमा तर अेक कुरुक्षेत्राचीच ! म्हणतील तें प्रमाण! ' अित्यादि. बंगालीमध्ये शेवटची अशी अनावश्यक क्रियापदें गद्य लिखाणातून आजही गाळतात. संस्कृतमध्ये तर अर्थानुरोधें क्रियापद कर्ता, कर्म यांचीं स्थानें वाक्यरचनेत पालटण्याचा आहे संप्रदायच ! त्यायोगे संस्कृत वाक्यरचना किती वैचित्र्यपूर्ण असते तें बाणाच्या कादंबरी-सारख्या अभिजात ग्रंथांत पदोपदी आढळते.

तें आहे बखरीत व बोलीत

आपल्या बोलण्यात मात्र जो विशेष साभिप्राय तोच शब्द आपण शेवटी घालतो आणि क्रियापदें मध्ये टाकतो, आपण कुठ होतो हें स्थलावर बळ देअून सांगावयाचें तर आपण म्हणतो : त्या दिवशी होतो दिल्लीला,'उद्या जाणार लाहो-रला' 'दिवसावर बळ द्यायचें असेल तर म्हणतो, ' दिल्लीत काल होतो, ' 'लाहो-रला जाणार आज. ' तशीच घडण 'कुठे ग आहे ती माळ? आहेच तो शूर, 'गाणं गा पाहू एक छानसं!' या वाक्यातही आहे, तेव्हा बोलण्यात वा बखरीत आपल्या गद्यामध्ये अधिक साभिप्राय तो शब्द शेवटी घालून किंवा अनावश्यक क्रियापदें गाळून वाक्यरचनेत जसा आपण आटोपशीरपणा वा ठसकेबाजपणा आणतो तसें वैचित्र्य आजच्या आपल्या गद्य लिखाणातही आणावें अशी मला आहे हौस.

अर्थात् अशी अुलटपालट केवळ टूम म्हणून करता कामा नये. वाक्याची शोभा नि अर्थात् बळकटी वाढत असेल तरच वाक्यरचनेचें वैचित्र्य अुपयुक्त, प्रयो-जक; अुदाहरणार्थ, हें वाक्य पहा. 'जपानला का मिळाला विजय? चीनचा कां झाला पराजय? काय जपानचा पक्ष न्यायाचा होता? आणि चीनचा अन्यायाचा? नाही ! पण जपानचा विजय झाला! कारण, त्याची तलवार होती तिखट, दारू कोरडी, संघटना भक्कम, छाती निधडी! तेव्हा जयापजय हें न्यायन्यायावरच काय तें अव-लंबून असतात, अशी जी श्रद्धा तीच मुळात आहे भ्रामक ! मानपत्राचे शेवटी

आजकाल जें वाक्य लिहितात तेंही वाक्यरचनेच्या अनुकरणीय वैचित्र्याचें अुदाहरण सांगता येअील! जसें 'आम्ही आहो, आपले कृतज्ञ, दिल्लीचे नागरिक! '

लिपिशुद्धि

वरील दोन्ही सुधारणा अेक वेळ झाल्या नाहीत तरी चालतील. अेक वेळ सांस्कृतिक नि भावनिक दृष्टचा महत्त्वाची असलेली भाषाशुद्धीची चळवळही आजची अुद्यावर ढकलता येअील. परंतु जर आपल्या नागरी लिपीला राष्ट्रीय लिपि करून सोडावयाची असेल तर लिपिशुद्धीची सुधारणा मात्र आपल्याला शक्य तितक्या लवकर हातानिराळी करून टाकलीच पहिजे. कारण की आपल्या आजच्या लिपीत ह्या दोन चार लहानसहान सुधारणा करताच ती मुद्रणक्षमतेत नि शिक्षणसुलभतेत अिंग्रजीहून वरचढ ठरणारी आहे. आपली नागरी लिपि अिंग्रजीहून मुळचीच शास्त्रशुद्ध असल्यामुळे तिच्यात ज्या सुधारणा अवश्य आहेत त्या मुळातच आहेत अगदी थोड्या नि अगदी सहजसाध्य ! त्या अशा :—

(१) 'अ' ची बाराखडी सुधारणेमुळे सातआठ अक्षरें शिकण्यात अुणी होतील आणि सातआठ टंक टंकपेटीत कमी लागतील.

(२) **सलग जोडाक्षरें**:– आपल्या लिपीत शिकण्यात नि छापण्यात जें अवजड रूप आलेलें आहे तें मुख्यतः विक्षिप्त नि नियमबाह्य जोडाक्षरांमुळेच होय. क्त क्क, त्र, क्क, (जसें पक्का), ल्ल (जसे पल्ला) अित्यादि जोडाक्षरांचीं सध्याचीं रूपें स्वतंत्र टंकानेच छापावीं लागतात. अशीं रूपें ३०।४० तरी भरतात; पण जोडाक्षर म्हटलें की, काना गळून अुच्चाराप्रमाणे सरळ नि सलग लिहीत गेलें की हे ४०।५० टंक टंकपेटीतून अुडून जातील आणि मुलांना जोडाक्षरें अशीं शिकवावींच लागणार नाहीत. अेक नियम शिकविला की सारीं जोडाक्षरें आपोआप लिहिता येतील. व्यंजनांच्या मूळच्या थोडयाशा खिळ्यावरच छापता येतील. जसे :— क्त, क्व, ल्ला, क्वा, त्र अित्यादि.

(३) **क, फ, र**–हीं तीन अक्षरें कानायुक्त करणें. आज अेकटें ' र' हें अक्षर आपण पांच प्रकाराने लिहितो, जसें-र, र्‍या, ट्र, प्र, सर्व . . . परंतु 'र' हा कानायुक्त केला की हा घोटाळा मोडतो. तीच स्थिति 'क ची व फ' ची. त्यायोगे शिक्षण सुलभ होतें. दहा टंक तरी छापण्यात अुणावतात. रेफही वाचते. जसें- 'सर्प'.

(४) शेंडीवाल्याची पायमोड! –ट ठ ड ढ छ,ह, प्रभृतींना जोडाक्षरात व्यंजनरूप द्यायचें म्हणजे त्यांना पायमोड चिन्ह लावावें! जसें मोठ्या ह्या अित्यादि.

दुप्पट स्वस्त मुद्रण

झालें! या चार अगदी सोप्या सुधारणा केल्या की, आज मराठी टंकपेटिकेत जे न्यूनात न्यून २०० टंक तरी लागतात ते अुणावून अवध्या ६० अेक टंकांत

संस्कृतसुद्धा सारें लिखाण शास्त्रशुद्धपणे छापता येतें. लिपि शिकताना मुलांना ६० अेक अक्षरें कमी शिकावीं लागून शिक्षण सुलभतर होतें. छापखान्यात पूरणाचा (डिग्रीचा) जो अेक अिंग्रजीला नसलेला अुपसर्ग आपल्या लिपीला असतो तोही अगदी नाहीसा होतो. या चार अगदी सोप्या सुधारणा करताच आपल्या लिपीचें मुद्रण दुप्पट सुलभच नव्हे, तर दुप्पट स्वस्तही होअील. अर्थात् ही लिपिशुद्धीची सुधारणा नुसती भावनिक नाही, तर हा रुपये-आणे-पैचा अगदी व्यावहारिक नि त्वर्य (urgent) प्रश्न आहे.

ही योजना मी काही लहरीसरशी अुचलून धरली नाही. गेली पन्नास वर्षे कै. गजाननराव वैद्य, कोल्हापूरचे देवधर, श्री. शितूत प्रभृति अनेक गृहस्थांनी तिचा अुपक्रम चालविला होता. अुण्यापुऱ्या चाळीस पन्नास योजना पुढे आल्या होत्या. 'श्रद्धानंद' पत्रात मी त्या सर्वांचा नामोल्लेख करून त्यांना तोलून-पारखून जो न्यूनांत न्यून पालट आजच्या रूपात करावा लागतो अशी ही योजना अुचलून धरली. कै. डॉक्टर भांडारकर नि लोकमान्य टिळक यांनीही या योजनेस संमतिपत्रें दिलीं होतीं, तीं देवधरांकडे आहेत. लोकमान्य देवधरांना या प्रकरणी छेडीत: 'अहो योजना आहे अगदी ठीक! पण व्यवहारविणारा कोण आहे तो दाखवा!' आम्ही जर काही केलें असेल तर हेंच! त्या योजनेला स्वत: आचरून टाकली आणि महाराष्ट्राच्या मागे तिचे सारखें टुमणें लावून तिला अेका संघटित आंदोलनाचें स्वरूप आणून दिलें. त्यायोगे या साहित्यसंमेलनातही तिचें लोण येऊन मागेच पोहोचलें आहे. अेक समितिही साहित्याचार्य तात्याराव केळकर यांचे प्रमुखत्वाखाली नेमली गेली. तिने सर्व प्रश्न विवंचून प्रतिवृत्त लिहिलें आणि त्यात 'अ' ची बाराखडी नि सलग जोडक्षरें ह्या दोन सुधारणा तर तत्काल चालू कराव्या म्हणून अनुरोध (शिफारस) केला. अुरलेल्या दोनहीं संमतिल्या पण हळूहळू व्यवहाराव्या असें सुचविलें.

प्रत्यक्ष आचरण

मध्यंतरी हिंदी पत्रांतूनही आम्ही लेख लिहिले. हिंदी साहित्य संमेलनाचे वतीने श्री. काकाराव कालेलकर यांच्या प्रमुखत्वाखाली विचार होअून त्यांनीही बहुतेक योजना ग्राह्य ठरविली. रत्नागिरीच्या ज्या दोघा वृत्तपत्रांनी 'श्रद्धानंदाचे' मागोमाग ह्या सुधारणांप्रमाणे छापणेंही थोडचा फार प्रमाणात चालू केलें, ते 'बलवंत', नि 'सत्यशोधक' आणि सह्याद्रि, केसरी, साहित्यपत्रिका, सकाळ, स्वराज्य, गोरक्षण, निर्भीड, किर्लोस्करी मासिकें प्रभृति अनेक नियतकांतून 'अ' ची बाराखडी नि सलग जोडाक्षरें ह्या दोन प्रमुख सुधारणा बव्हंशी वा अल्पांशी आज व्यवहारिल्या जात आहेत. आमच्या समग्र लिखाणात नि ग्रंथात त्याचप्रमाणे सर्वांचे आधी रत्नागिरी हिंदुसभा, किरण मंडळ, दादर हिंदुसभा, प्रभृति

संस्था नि प्राध्यापक माधवराव पटवर्धनांसारखे लेखक वरील दोन मुख्य सुधारणा बव्हंशी नि अितर अुपांगेंही काही अंशी प्रयोजीत आहेत.

लिपिशुद्धीपासून जो लाभ होणारा आहे असें लिपिसुधारकांचें म्हणणें असतें, त्याविषयी आजवर पुष्कळ अुलट-सुलट चर्चा झाली आहे. आमच्या अनेक लेखांतून तिच्यावरील आक्षेपांचीं अुत्तरें आहेत. तथापि अितक्यावरही लिपि-सुधारणेची आवश्यकता ज्या कोणा साहित्यिक-मित्रांना अद्याप तत्त्वत:च पटली नसेल; त्यांना पुन.पुन्हा तोच तो अूहापोह करून ती पटविण्याचा यत्न करण्याचें हें स्थळ नव्हे. तो प्रचार अितरांत करूच आणि त्यांच्यापुरती, त्यांना ती पटेतो धीर धरून वाट पाहू. परंतु ज्या शेकडो मित्रांना ती पटली आहे त्यांना मात्र आम्ही विनवितो की, त्यांनी आता त्यांच्यापुरते अेक 'लिपिशुद्धिमंडळ' स्वतंत्रपणे स्थापून त्यांच्या स्वत:च्या वैयक्तिक नि सार्वजनिक लिखाणात शक्य तों तीच सुधारलेली लिपि वापरण्याचा संघटित प्रयत्न करावा.

महाराष्ट्र लिपिशुद्धि मंडळ

आजवर ह्या लिपिशुद्धीच्या आंदोलनाला जें वर दर्शविल्याप्रमाणे वरेंचसें यश आलें आहे तें तिचा नुसता तात्त्विक काथ्याकूटच जर आपण करीत बसतो तर आणखी पन्नास वर्षेंसुद्धा आलें नसतें. अशा सुधारणा सर्वांची अेकमुखी संमति मिळवून मग आचरू म्हणून म्हटलें, तर कधीच व्यवहारून टाकल्या जात नाहीत. यास्तव ज्यांना त्या पटल्या तेवढ्यांनाच सांगाती घेअून आपण स्वत: त्या आचरून टाकल्या पाहिजेत. तसा अुपक्रम रत्नागिरी लिपिशुद्धिमंडळासारख्या संस्थेने नि, व्यक्तींनी केला, म्हणूनच आज ही सुधारणा लोकांच्या दृष्टीस सवयीची होत चालली आहे; आणि सवयीची होता होता पटत चालली आहे. तरी येथे असलेल्या लिपिसुधारकांनी त्या 'रत्नागिरी लिपिशुद्धि मंडळाचे' धर्तीवर अेक महाराष्ट्र लिपिशुद्धिमंडळ याच मुहूर्तीं स्थापावें. त्याच्या शाखा प्रत्येकाने आपल्या गावोगावी अुघडाव्या. 'मी आजन्म स्वत: हीच सुधारलेली लिपि वापरीन' अशी प्रतिज्ञा केलेल्या सभासदांची नोंद ठेवावी. त्या प्रत्येकाने आपल्या मुलांबाळांतून, घराघरांतून आणि आपल्या हाती असलेल्या शाळा, वृत्तपत्रें, ग्रंथप्रकाशनें प्रभृति संस्थांतून तिचाच प्रचार करावा. सर्व व्यक्तिगत पत्रव्यवहारातून हीच लिपि प्रत्येकाने वापरली तर फार मोठा प्रचार सहजासहजी होअू शकतो हा आमचा ठाम अनुभव आहे.

ज्यांना आज ही लिपि पटत आहे तितक्यांनी जरी असा संघटित नि सरळ प्रचार आणखी पांच वर्षें केला, तरी हा लिपिसुधारणेचा एक प्रश्न आपल्यास हातानिराळा करता येअील! अुदय, महाराष्ट्र, सावधानप्रभृति वृत्तपत्रांच्या संपादक महाशयांनी आपण निदान 'अ' ची बाराखडी नि सलग जोडाक्षरें आपल्या

वृत्तपत्रांतून वापरू असें अभिवचन आम्हांस दिलें आहे. तसेंच ज्यांना ही लिपिशुद्धि पटली आहे ते ते संपादक जरी निदान ह्या दोन सुधारणांना व्यवहारवू लागतील तरी लिपिशुद्धीची हीं दोन मुख्य अपांगें तरी पूर्णपणे रुळून जातील, तोवर आम्ही क, फ, रचीं रूपेंही लोकांच्या दृष्टीस तरी अगदी संवयीची करून सोडू.

रोमन लिपीचा पुरस्कार ! ! !

आपल्या लोकांतील कृतिदुर्बलत्वाच्या ज्या दोषासंबंधी आम्ही या निबंधाचे प्रारंभीच खेद व्यक्तविला, त्याचेंच लिपिसुधारणेचा हा प्रश्नही अेक लज्जास्पद अुदाहरण आहे. तुर्क लोकांमध्ये शेकडो वर्षे अरबी लिपि धर्मलिपि म्हणून घर करून बसलेली; पण ती अगदी बोजड नि मुद्रणास अक्षम अशी वाटताच तुर्कांनी अेका वर्षांत ती अुखडून फेकून दिली; आणि अवघ्या चारपाच अक्षरांचीं रूपें पालटताच आपली नागरी लिपि अिंग्रजीहूनही शिक्षण-सुलभतेंत, मुद्रण-सुलभतेत नि स्वस्ताअीत वरचढ होअू शकते हें ज्यांना पटतें त्यांच्यातसुद्धा शेकडा पंचाहत्तर लोक ती स्वतः वापरून सोडण्यात अळंटळ करतात ! पण जितके आम्ही कृतीचे पंगु तितकेच नुसत्या योजना आखण्यात किती पटाअीत आहो पहा ! अिकडे चार अक्षरें पालटण्यास चाळीस वर्षें पुरत नाहीत ! तो तिकडे सुभाषबाबूंसारखे राष्ट्र-सभाध्यक्ष या देशात अेकदम रोमन लिपिच राष्ट्रलिपि करून टाकण्याची योजना आखून मोकळे आहेत !

हीही अेक राष्ट्रीय सुधारणाच

लिपिसुधारणेची चळवळ प्रथम काढली आपल्या महाराष्ट्राने. आता ती सहजसाध्य व्यवहारामध्ये रुळवून नागरी ही अितर कोणत्याही लिपीपेक्षा अधिक शिक्षणसुलभ नि मुद्रणसुलभ आहे हें प्रत्यक्षपणे साऱ्या हिंदुस्थानास पटवून दिलें पाहिजे महाराष्ट्रानेच ! लिपिशुद्धि ही महाराष्ट्राची कल्पित आहे. तिच्या प्रयोगाने आपली राष्ट्रलिपि अिंग्रजीहून वरचढ करून सोडण्याचा मानही महाराष्ट्राने पटकाविला पाहिजे ! लिपिशुद्धीचा प्रश्न म्हणजे अेक राष्ट्रीय सुधारणेचा प्रश्न ! कारण नागरी हीच लिपि होणार ! त्यातही हा प्रश्न अेका दमडीचाही व्यय न करता किंवा अेका दिवसाचाही बंदिवास भोगावा न लागता, केवळ मनात आलें की सुटण्यासारखा आहे. वापरीत चला की, लिपि सुधारणा रुळलीच म्हणून समजा. ही अेक राष्ट्रीय सुधारणा तरी हातानिराळी झालीच समजा !

शुद्धीकरणाचीं दोन सूत्रें

तीच गोष्ट भाषाशुद्धीच्या प्रकरणीही तंतोतंत लागू आहे. या विषयाचा यथास्थित अूहापोह आजवर झालेला आहे. प्रचार म्हणून आणखीही होत राहील. परन्तु, या निबंधात तो अूहापोह करण्याचें कारण वा स्थळही नाही. अितकें

सांगितलें म्हणजे पुरें आहे की, भाषाशुद्धीवर येणारे शेकडा नव्वद आक्षेप तरी अशा अेका गैरसमजाने आलेले असतात, की मराठीत कोणताही अुर्दू वा अिंग्रजी शव्द असा वापरावयाचाच नाही असें भाषाशुद्धीचें म्हणणें आहे ! परंतु असें तिचें म्हणणेंच नाही मुळी. भाषाशुद्धीचीं मुख्य सूत्रें दोनच :–

(१) आपल्या भाषेत ज्या अर्थाचे शव्द होते, आहेत किंवा अुद्भवणे सुसाध्य आहे अशा अर्थाने परकीय शव्द काय ते आपण वापरू नयेत. मग ते जुने असोत वा नवे. आपले तदर्थक शव्द मारून जे परशव्द रुळतात त्यांनी काही आपली शव्द-संपत्ति वाढत नाही.

(२) परंतु ज्या अर्थाचे शव्द, त्या वस्तुच पूर्वी आपल्यात नव्हत्या म्हणून आपल्या भाषेत मुळातच नाहीत किंवा अुद्भावणें दुर्घट आहेत असे परकी शव्द वापरण्यास आडकाठी नाही. त्या परशव्दांनी मात्र आपली शव्दसंपत्ति काही अंशी वाढेल. जसे–कोट, बूट, गुलाब, जाकीट, पेन्सिल अित्यादि.

हीं भाषाशुद्धीचीं दोन मुख्य सूत्रें जर ध्यानात ठेविलीं तर तिच्यावर गैर-समाजाने येणारे शेकडा नव्याण्णव आक्षेप गळून पडतील. ज्याच्या तोंडी जो येअील तो परशव्द–फादर, मदर, अिलेक्शन, हाअूस, डोअर, मुबारक, अफ्ताब, वाअिफ, मीटिंग, अिन्व्हिटेशन प्रभृति सरसकट नि रोखठोकपणे आपल्या बोलण्यात वा साहित्यात घुसू द्यावे असें म्हणणारा सद्गृहस्थ विरळाच! बाकी मतभेद जे आहेत ते फुटकळ प्रकरणीच अुरलेले आहेत. अमका शव्द स्वकीय वा परकीय, अमक्या शव्दात विशेष छटा आहे कीं नाही, तमका नवा शव्द सुटसुटीत आहे वा बोजड, हे मतभेद मुख्य धोरणाला बाध आणीत नाहीत. अेकाने काढलेला स्वकीय नवा शव्द बोजड वाटेल तर दुसऱ्याने दुसरा योजावा. जो तगेल तो जगेल. आपले शव्द मारून अनावश्यक परकीय शव्द भाषेत नि साहित्यात घुसू देअू नयेत या मुख्य धोरणाकडे आपण पाठ फिरविली नाही, म्हणजे झालें.

दोन आक्रमणें

आणि त्या दृष्टीने पाहता गेल्या दहाबारा वर्षांतील भाषाशुद्धीच्या आंदोलनाचें कार्य किती तरी यशस्वी झालेलें आहे. आज आमच्या भाषेवर मुख्यत: दोन परकीय भाषांचें प्रबळ आक्रमण चालू आहे. त्या दोन परकीय भाषा म्हणजे अुर्दू नि अिंग्रजी. ह्यामुळे आपल्या भाषेत त्या अुर्दू नि अिंग्रजी परशव्दाना निष्कारण घुसडू देअू नये, ह्यावरच भाषाशुद्धीचा विशेष कटाक्ष प्रथमपासूनच आहे. त्याचा अेक महत्त्वाचा परिणाम आज असा झाला आहे की, विवेकासाठी असो वा विडंबनासाठी, पण हा शव्द परकीय की स्वकीय, याची चालना शाळेतील मुलांपासून तो साहित्य-सम्राटांपर्यंत घरी दारी चालू आहे. शक्य तो अनावश्यक असा अुर्दू वा अिंग्रजी शव्द वापरावयाचा नाही, या धोरणाची छाप, या वा त्या प्रमाणात, मराठी

लिखाणावर पडली आहे. मुसलमानी राजसत्तेच्या काळात लब्धप्रतिष्ठितांच्या परधार्जिणेपणामुळे घरीदारी अुर्दू शब्द घुसून तदर्थक जे मराठी शब्द साहित्यातून नामशेषले; परंतु जे जुन्या ग्रंथांतून आणि विशेषतः आमच्या खेडयांपाडयांतून आजही कसेबसे जीव धरून राहिलेले आढळतात, त्यांना पुन्हा प्रचलविण्याकडे प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्यासारख्या लेखकांचा ओढा वाढत आहे. अशा स्वकीय, सुटसुटीत नि सकस जुन्या मराठी शब्दांची आम्हांलाही नव्या बोजड शब्दांपेक्षा अधिक आवड आहे. पुनः जे नवे स्वकीय शब्द भाषाशुद्धीच्या आंदोलनामुळे मराटीत भर टाकीत चालले आहेत, त्यांतही अनेक संग्रहणीय असेच ठरलेले आहेत; मराठी साहित्यातच नव्हेत तर बोलता बोलता सर्व हिंदुस्थानभरही काही काही रुळून जात आहेत.

काही शुद्ध शब्द

आमच्यापुरतेंच बोलावयाचें तर आम्ही काढिलेल्या वा अितरांनी रूढाविलेल्या अशा काही शब्दांचेंच अुदाहरण घ्या, अुपस्थित [हजर], विधिमंडळ [कायदे कौन्सिल], जुळारी [Compositor], स्तंभ [Column], दंडविधान [पिनल कोड], अुपमुद्रित [प्रूफ], विश्वस्त (ट्रस्टी), निक्षेप किंवा विश्वस्तपत्र (ट्रस्टडीड), परिपत्र (सर्क्युलर), व्ययसंकल्प (बजेट), प्रासिद्धिकें (जाहिरात) टंकलेखक (टाअिपरायटर), आजीवन किंवा आजन्म (तहाहयात), छेदक, (पॅरिग्राफ), संचलन (ड्रिल), अेकटंकक (मोनोटाअिप), पंक्तिटंकक (लिनो-टाअिप), अुच्चांक वा विक्रम (रेकॉर्ड), राजबंदी, स्थलबंदी (Interned), अखंड टाक वा झरणी (फाअुन्टन पेन), ग्रंथविक्रेते (बुकसेलर्स), घडयाळजी, (वाचमेकर) सैनिकाभिवादन (गार्ड ऑफ ऑनर), पुनर्न्याय (अपील), क्रमांक (नंबर), गृहांक (हाअुस नंबर), गण किंवा गणसंख्या (कोरम), अिच्छुक किंवा स्पर्धालु (कॅन्डिडेट्), अुत्तरदायित्व वा दायित्व (जबाबदारी), प्रतिवृत्त (रिपोर्ट), ध्वनिक्षेपक (लाअुड स्पीकर) कालादर्श किंवा मितिपट (कॅलेंडर), निश्चित (खात्री), पूर्वसिद्धता वा पूर्वसज्जता (तयारी)' हुतात्मा (Martyr), हुतात्मता (Martyrdom), निर्बंध (कायदा), निर्बंधपंडित (कायदेपंडित), निर्बंधशास्त्र (कायदेशास्त्र), बोलपट, अद्यवत् up-to-date अित्यादि !

भाषाशुद्धीचे प्रचारक

आता अशा दीडशे–दोनशे नव्या शब्दांमध्ये सगळेच काही टाकाअू आहेत असें म्हणवत नाही. कारण, त्यांतील बहुतेक शब्द अनेक साहित्यिक प्रत्यही अुपयोजीत आहेत. काही तर हिंदुस्थानभर प्रचलिले आहेत. प्राध्यापक माधवराव पटवर्धन, श्री. आठवले, श्री. भिडे, श्री. देवधर अित्यादि भाषाशुद्धीच्या अेकनिष्ठ

प्रचारकांची तर आम्हांवरही कडी आहे. त्यातही आता तर सुविख्यात आणि अक्षरशः दांडगा असा प्राध्यापक अत्रे यांच्यासारखा साहित्यिक भाषाशुद्धीच्या पक्षास मिळालेला ! ज्या भाषाशुद्धीच्या पारडयात प्राध्यापक अत्रे, तें पारडें आता जड झाल्यावाचून राहत नाही हें नक्की ! महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून परशब्दांनी अकलंकित असा पहिला विशुद्ध मराठी निबंध वाचण्याचा मान पटकविला प्राध्यापक पटवर्धनांनी! मी नव्हे! त्यांनी आणि अितर कित्येकांनी आज आणि कै. प्रो. भानु प्रभृति विगत साहित्यिकांनी पूर्वीपासूनच, जे शतावधि स्वकीय प्रतिशब्द अुद्भावून मराठी भाषा परिपुष्ट नि सुसंपन्न केली, तोही ह्या भाषाशुद्धीच्याच तत्त्वाचा विजय होय.

बडोद्यातील महत्कार्य

वहुतेक प्रकरणी स्वभावतःच प्रगतिप्रिय असणाऱ्या श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी स्वकीय अशा नैर्बंधिक प्रतिशब्दांचा संग्रह करणारा 'शासनकल्पतरु' हा प्रचंड कोश प्रसिद्धवून भाषाशुद्धीच्या कार्याला जी अमोल साहाय्यता दिली आहे, तीविषयी आम्ही महाराजांनाही अभिनंदितो. अितकेंच नव्हे तर वडोद्यास असताना असें आढळून आलें की, अनेक विभागांच्या (डिपार्टमेंटच्या) कारभारात हे स्वकीय प्रतिशब्दच रुळतही आहेत आणि त्या प्रमाणात अनावश्यक असताही स्वभाषेत घर करून वसलेल्या परशब्दांचें अुच्चाटनही होत आहे. श्रीशिवाजीमहाराजांनी परकीय शब्दांनी बुजबुजाटलेल्या स्वभाषेस विनिर्मुक्त करण्यास्तव पूर्वी राज्यव्यवहारकोश रचविला. त्यानंतर आपली नैर्बंधिक परिभाषा परशब्दांच्या ग्रहणापासून सोडविण्यासाठी अितका व्यापक कोश असा रचविला अेका श्रीमंत सयाजीराव महाराजांनीच.

संस्थानिकांना सूचना

अितर महाराष्ट्रीय संस्थानिकांनाही आमची अशी विनंति आहे की, त्यांनीही शक्यतो स्वकीय शब्दच आपल्या राज्यात रूढ करून परकीय शब्दांच्या आक्रमणा-पासून मराठी भाषेचें रक्षण करावें. या कामी कुठें कुठे कशी कशी अक्षम्य ढिलाअी होत आहे याचें अेक अुदाहरण म्हणून ग्वाल्हेरच्या पंचसभेचें आजचें नांव दाखविता येअील. लोकसभा, विधिमंडळ, पंचसभा किंवा गुजराथी–हिंदीत म्हणतात तसे धारासभा हे स्वकीय नि सोपे शब्द आपल्या भाषेत आज असताना, प्रत्यक्ष मुसुलमानांतही शेकडो लोकांना न समजणारा असा अेक परकीय शब्द ग्वाल्हेरच्या विधिमंडळास योजलेला आहे. लोकसभेचें नांव पाळण्यातच ठेवलें गेलें–'मजलिस-अि-आम !' मराठी भाषेच्या अभिमानी असलेल्या शिंदेसरकारांना आमची विनंती आहे की, असले अगदी अनावश्यक नि कठीण परकीय शब्द त्यांनी

आपल्या संस्थानात रुळवू नयेत. ते हिंदीस वा मराठीस सर्वस्वी विप्रकृत आहेत' हानिकारक आहेत, स्वाभिमानास शोभत नाहीत.

हा काय अतिरेक झाला ?

आयर्लंड हा अिंग्रजी शब्द आयर्लंड देशामध्ये मुलाबाळांचे तोंडी दहा शतकें स्वदेशाचें नांव म्हणून रुळलेला होता. पण तरीही आयर्लंडला संधि मिळताच त्यांनी तो बद्धमूल परशब्दही अुखडून टाकून त्यांचा त्यांनाही अपरिचित वाटणारा त्यांच्या मूळच्या गॅलिक भाषेतील जो 'आयरीन' शब्द त्याच शब्दाने आपल्या देशावें पुनः अेकदा नामकरण केलें. पार्लमेंट हा चिरपरिचित परकीय शब्द रद्द करून आपल्या पंचसभेस 'डेल' हा स्वकीय शब्द योजला आणि आम्ही लोकसभा पंचसभा, धारासभा, विधिमंडळ प्रभृति स्वकीय शब्द प्रचारात असताही आमच्या प्रतिनिधिसभेस नांव देतो 'मजलिस-अि-आम' ! असले अगदी अनावश्यक परकीय शब्द तरी आपण होअून स्वभाषेत घुसडू नका आणि त्या प्रमाणात आपले तदर्थक शब्द प्रचारातून लुप्तवू नका ! अितकें काय तें जें भाषाशुद्धीचें म्हणणें, तें अतिरेकाचें कसें म्हणता येअील ?

विरोधकांस विनंती

भाषाशुद्धीचें हें मुख्य सूत्रही जर कोणास अतिरेकी वाटत असेल तर त्यांच्या त्या मतभेदाचाही आम्ही शक्य तों आदरच करू. त्यांचें मत अनुकूल होअीतो त्यांचे प्रकरणी वाट पाहू. त्यांना तोपावेतो विनंती अितकी की, आम्हा भाषाशुद्धीच्या अभिमान्यांनी आमच्यापुरते जर नवे नवे स्वकीय प्रतिशब्द जुळविण्याचा यत्न चालविला आणि जुन्या वा नव्या अुर्दू, अिंग्रजी शब्दांना टाळा दिला तर भाषा-शुद्धीच्या तत्त्वासही प्रतिकूल असणाऱ्यांनी आमच्यावर रागावू नये. जर आमचे नवे शब्द जगण्यासारखे असले तर टिकतील; भाषेत परकीय शब्दांची ही भर टाकून तिला संपन्न वनविता येते असें मत असणारांना तिच्यात स्वकीय शब्दांची योग्य भर पडली असता त्याने मात्र तिची संपन्नता घटते असें तरी केव्हाही म्हणतां येणार नाही !

मंडळें स्थापा

भाषाशुद्धीची चळवळ तत्त्वतःच मान्य नसलेल्या माझ्या मित्रांना अितकें विनविल्यानंतर भाषाशुद्धीस अनुकूल असलेल्या माझ्या मित्रांना मला असें सांगावयाचें आहे की, त्यांनी आता वैयक्तिक प्रचार करीत न राहता त्यांनी आपलें अनुकूल असणारे अेक स्वतंत्र 'महाराष्ट्र भाषाशुद्धि मंडळ' स्थापावें आणि संघटित प्रचार चालू करावा. तत्काळ बहिष्कार्य अशा जुन्या तोंडी नि लेखी खिळलेल्या अुर्दू शब्दांचा अेक लहानसा कोश रत्नागिरीचे भिडे, बी. अे. बी. टी. यांनी

प्रसिद्धिला आहे. अनेक नवे प्रतिशब्द मराठीत घुसलेल्या इंग्रजी शब्दांना अुच्चाटण्यासाठी पुढे येत आहेत. त्यांना साकल्याने विवेचून बहिष्कार्य अुर्दू, अिंग्रजी शब्दांचा अेक अधिकृत नि आटोपसर असा कोश प्रसिद्धावा. प्रत्येक गावोगावी शाखा काढून 'मी अनावश्यक परकीय शब्द आजन्म तोंडी वा लेखी वापरणार नाही' अशा प्रतिज्ञा करणाऱ्या सभासदांच्या तालिका कराव्या. अधिकृत कोशातील शब्दच. आपआपल्या लिखाणांतून नि घराघरांतून वापरावे, म्हणजे ते त्या अर्थी रूढावतील शब्द वापरता वापरता त्याला तो अर्थ वा छटा आपसूक चिकटते हें मुख्य सूत्र ध्यानी धरावें.

नेट धरा

हिंदीमध्येही अशी अुठावणी विशेषतः आर्यसमाजी हिंदी लेखकांकडून होत आहे. त्यांच्या नि हिंदीभाषा संघातील अितर भाषाशुद्धिवाल्यांच्याही विचार-विनिमयाने शुद्ध स्वकीय शब्दांची देवाण-घेवाण करीत चलावें. प्रसंगी अेखादें 'अखिल भारतीय भाषाशुद्धि संमेलनही' भरवीत चलावें. काही झालें तरी भाषाशुद्धीचें आंदोलन हें महाराष्ट्रात तरी गेल्या बारा वर्षांच्या चिकाटीच्या प्रचाराने स्थायिक झालें आहे. आपण सर्वजण तें नेटानें नि संघटितपणे असेंच रेटीत राहू तर या टोकास अितकें ताणल्याने, महाराष्ट्रीय भाषेतील अुच्चाटिले जावे अितके परशब्द अुच्चाटिले गेले नाहीत तरी, सध्या जी परशब्दांची रोखठोक नि भरमसाट आवक वाढत आहे, तिला पायबंद तरी निश्चितपणे पडेलच पडेल. घरांच्या नि दुकानांवरच्या पाटयांवरून हेंगाडे मॅन्शन, Cloth Merchant सारख्या अनावश्यक परशब्दांचें अुच्चाटन करता येअील. नव्या कल्पनांना नवे स्वकीय प्रतिशब्द 'बोलपटा' सारखे प्रथमपासूनच रुळविता येतील.

आचार पाहिजे

वापरीत चला की आज परकीय अुर्दू–अिंग्रजी शब्दांना ज्या छटाविटा चिकटल्यासें वाटत वाहे, त्या झट साऱ्या स्वकीय शब्दांनाही चिकटल्यावाचून राहणार नाहीत. अितकेंच नव्हे तर अैकत अैकता नि वाचता वाचता ते स्वकीय शब्दच भाषाशुद्धीला आज मान्य नसलेल्या आपल्या मित्रांच्याही तोंडी, लेखी रुळून तेही अनुकूल होतील. तेव्हा ज्यांना भाषाशुद्धि मान्य त्यांना विनंती की, त्यांनी आता तात्त्विक विचाराचा काथ्याकूट पुष्कळसा सोडून देअून संघटितपणे व्यावहारिक आचारावरच मुख्य भर द्यावा आणि अेक 'महाराष्ट्र भाषाशुद्धिमंडळ' स्थापून या मताच्या शतावधि लोकांना अेकसूत्री नि प्रत्यक्ष आचरणात्मक कार्यक्रमात गोवून घ्यावें.

'कायदा' शब्द बहिष्कारा !

अितर सर्व शब्दांपेक्षा कायदा ह्या अुर्दू शब्दाची आम्हांस अत्यंत लाज वाटते. मराठीतच नव्हे तर साऱ्या भरतखंडात 'कायदा' ह्या शब्दाला आपला स्वकीय हिंदु प्रतिशब्द असा अेकही अुरलेला नाही ! ज्या तत्त्वावर सुसंस्कृत समाजाची प्रतिष्ठा त्याच तत्त्वाला, ज्यांनी जगातील विविध विज्ञानावरचा अत्यंत प्राचीन असा मनुस्मृतीसारखा ग्रंथ जस्टिनियनच्या शतकोशतकें आधी ग्रथिला, ज्यांनी चंद्रगुप्ताचीं साम्राज्यें चालविलीं, चाणक्याचें अर्थशास्त्र रचलें, त्या आमच्या जगतात शब्द अुरू नये याचा आम्हांस तीव्र विषाद वाटतो! कायद्याला 'निर्बंध' हा शब्दच अुत्तम. अटकाव याला 'प्रतिबंध' योजावा म्हणजे कायदेशीर, कायदे-पंडित, कायदेशास्त्र यांसारख्या धेडगुजरी, कर्णकटु नि करंटचा शब्दांना निर्बंधशील, निर्बंधपंडित निर्बंधशास्त्र नैर्बंधिक असे श्रुतिसुखद स्वकीय सामासिक शब्द हवे तितके अुद्भाविता येतील.

महाराष्ट्राने अेकदा निर्बंध शब्द सुचविला की, त्याची देणगी सगळ्या भारतवर्षातील काश्मिरी ते तामीळ तेलगूपर्यंतच्या आपल्या हिंदु भाषासंघास देता येअील. विधिमंडळ हा शब्द जसा आता सर्व वृत्तपत्रांनी अुचलला तसाच जर ते निर्बंध (कायदा) हा शब्द नेटाने वापरतील तर अवघ्या अेका वर्षात तो बद्धमूल होअील. अिंग्रजी नि मुसलमान या देशी येअीतो जणू काय आम्हांस 'Law'ची, 'कायद्या' ची कल्पनाच नव्हती असा जो लज्जास्पद ध्वनि, त्या कल्पनेस स्वतःचा प्रतिशब्द आज मुळीच नसल्याने निघतो, त्याचें यापुढे तोंडच बंद होअील. भाषा-शुद्धिवाल्यांनी तरी अगदी तत्काळ 'कायदा' वा 'Law' हे शब्द वहिष्कारून 'निर्बंध' हाच शब्द वापरण्याचा कृतनिश्चय करावा ! मतभेद असेल त्यांना आमचा आग्रह नाही. त्यांनी रुचेल तोवर कायदा हा शब्द वापरावा.

विज्ञानपरिभाषेसाठी समिति

भाषाशुद्धीच्या प्रश्नाविषयी आपल्यात मतभेद असला तथापि या साहित्य-संमेलनातील बहुतेक सभासदांचें याविषयी तरी अेकमत आहेच आहे की, आपल्या भाषेसाठी सर्व अर्वाचीन नि कित्येक प्राचीन विज्ञानातील पारिभाषिक ते ते शब्द अेकदा ठाम ठरले जावे. रसायन, वानस्पत्य, विद्युत् प्रभृति विज्ञानें (Sciences) आता आपल्या मातृभाषेतून संपूर्णतः शिकवावी लागण्याचा समय जवळ आला आहे. अंशतः तीं कोठे कोठे तशीं शिकविलींही जात आहेत. अशा पारिभाषिक निश्चित शब्दांची अुणीव आपल्या मराठीलाच नव्हे तर बंगाली, हिंदी ते तामीळ तेलगूपर्यंतच्या आपल्या सर्व प्राकृत भाषासंघांस आज नडत आहे. प्रत्येक प्रगत अशा प्रांतिक भाषेत संघशः नि व्यक्तिशः काही काही शास्त्रांतील परिभाषा निश्चिण्याचा यत्नही झालेला आहे. त्या यत्नामुळे पुष्कळसे सुरेख शब्द आधीच पाडले गेले आहेत, पुष्कळशा अडचणी ध्यानी आल्या आहेत आणि अखिल भारतीय

अशी संस्कृतनिष्ठ परिभाषा ठाम करण्याचें कार्य त्या मानाने आता सुसाध्य झालें आहे. राजशक्ति मागे असती तर अेक वर्षाचे आत हें कार्य पार पडतें. पण आहे त्या अडचणींतही अडून वसण्याचें कारण नाही. नुसत्या वार्षिक ठरावांचें नि योजना आखण्याचें काम आता पुरें झालें. या साहित्यसंमेलनाने नि आपल्या मराठी साहित्यपरिषदेने हें अेक कार्य अगदी आपल्याच हातून पार पडलें पाहिजे अशी ईर्षा धरून कामास लागावें.

परिभाषाकोश करा

प्रथमत: काश्मीरपासून रामेश्वरापर्यंतच्या आपल्या ज्या ज्या संस्कृतनिष्ठ प्राकृत भाषा आहेत, त्यांच्या त्यांच्यांत वैज्ञानिक परिभाषेचे आजवर निघालेले शब्द अेकत्र करावे. विज्ञानातही प्रथमत: केवळ बौद्धिक वा तार्किक शास्त्रें हाती घेऊ नयेत. ज्योतिष, तत्त्व, तर्क, काव्यप्रभृतींच्या परिभाषा आहेत त्या सुद्धा पुरे आहेत. प्रथमत: भौतिक अशा अर्वाचीन विज्ञानांनाच हात घालावा. व्यवहार जो आपल्या राष्ट्राला नडला आहे, तो मागासला आहे त्यामध्येच. नंतर प्राकृत भाषांमध्ये जितक्या साहित्यसंस्था आहेत, त्यांतील वा त्यांच्या वतीने नेमलेल्या प्रमुख परिभाषापटु पंडितांना आमंत्रून अेक अखिल भारतीय संस्कृतनिष्ठ परिभाषामंडळ स्थापावें, परिषदाही भरवाव्या. अेकंदर कार्य तीन वर्षांत संपवून 'भारतीय परिभाषाकोश' प्रसिद्ध करावयाचाच असा निर्धार केल्यास त्याच्या साहाय्यार्थ आपली महाराष्ट्रीय संस्थानें तरी पुढे आल्यावाचून सहसा राहणार नाहीत. आपल्या संस्थानिकांचे हातून जें होत नाही त्यापुरते त्यांच्यावर नुसतें जळफळत राहण्यापेक्षा, त्यांच्या हातून जें होण्यासारखें आहे तें तरी करून घेण्यात अधिक शहाणपणा आहे.

अितर साहित्यसंस्था परप्रांतांतून सहकार्य करनीलच. पण तें न घडलें तरी अेकटचा महाराष्ट्रीय साहित्य परिषदेस नि संमेलनासही हें कार्य स्वत:चे बळावर पार पाडता आलें पाहिजे. काही शब्दांविषयी जरी बैकल्पिक परिभाषा सुचवावी लागली, तरी एकंदरीत सहस्रावधि पारिभाषिक शब्द ठाम ठरवून टाकता येतील आणि निरनिराळ्या विश्वविद्यालयांच्या ठरावांनी शिक्षणातून नि ग्रंथांतून तेच मुख्यत: वापरविता येतील. असें अेक चिरंतन कार्य जरी साहित्यपरिषदेने नि संमेलनाने केलें तरी बारा वर्षांच्या केवळ काथ्याकुटीपेक्षा साहित्याची काही तरी म्हणण्यासारखी सेवा घडेल—आपल्या साहित्यसंस्थेचें स्थान अखिल भारतात अुंचावेल, नांव गाजेल.

अुर्दूचा समावेश नको

या प्रकरणी अेक चेतावणी मात्र दिलीच पाहिजे आणि ती ही की, ही परिभाषा ठरविण्यासाठी केवळ संस्कृतनिष्ठ त्या त्याच भाषांचें मंडळ नेमलें जावें.

हिंदुस्थानातील अेका अुर्दूवाचून खरें पाहता यच्चयावत् भाषा संस्कृतनिष्ठ आहेत. तामीळ, तेलगू, कानडी ह्याही संस्कृतोद्भव नसोत, पण संस्कृतनिष्ठ नाहीत असें कोणताही तद्भाषीय हिंदु मनुष्य तरी म्हणू शकणार नाही. वास्तविक अुर्दू ही कोटचवधि मुसलमानांनासुद्धा अपरिचितच, पण जर मुसलमान तिलाच आपली मातृभाषा समजणार असले आणि ज्या अर्थी तशी त्यांची अुघड अुघड प्रतिज्ञाच झाली आहे तर, नि त्या अर्थी त्यांना अुर्दू भाषेची रुचेल ती परिभाषा स्वतंत्रपणे ठरवू द्यावी. त्यांचा भर अरेबी, पर्शियनवर. त्यांना श्रीचासुद्धा विटाळ! मग सबंध श्रीगणेशाची तर गोष्टच सोडा! तेव्हा अखिल भारतीय या गोंडस नांवाखाली फसून, त्यांची नि आपल्या परिभाषेची अेकच मोट बांधण्यासाठी अेकच मंडळ नेमलें तर त्या कार्याचा श्रीगणेशासुद्धा आजन्मात होण्याची आशा नको.

असंगाशी संग

पुनः, आपल्या यच्चयावत् भाषा संस्कृतनिष्ठ, अर्थात् संस्कृतनिष्ठ परिभाषाच त्यांच्या प्रकृतीस मानवणार. त्यातही नवशब्दप्रसवक्षमतेत आपल्या संस्कृतचा हात धरील अशी भाषा जगात आजही दुसरी कोणतीही सापडणार नाही. लॅटिन, ग्रीकसुद्धा जिचे कालवे शोभावे, त्या संस्कृतच्या गंगौघाकडे पाठ फिरवून जर अेखादा करंटा तान्हेल्या पाण्याच्या शोधासाठी जाणूनबुजून अरबी वाळवंटात भटकू लागला तर त्याच्या नादी आम्ही काय म्हणून लागावें? यास्तव महाराष्ट्र साहित्यपरिषदेने नि संमेलनाने जें परिभाषामंडळ नेमावयाचें तें चकचकीत अखिल भारतीय संस्कृतनिष्ठ परिभाषा मंडळ म्हणूनच नेमावें. असंगाशी संग करण्याच्या वेडात, परिभाषेच्याच नव्हे तर स्वभाषेच्याही प्राणाशी गांठ पडेल. नागपूर प्रांतातील शिक्षणप्रधान श्री. शुक्ल यांनी विद्यामंदिराची अेक योजना आखली. त्या योजनेच्या त्या 'विद्यामंदिर' ह्या साध्या संस्कृत नांवानेसुद्धा चिडून जाअून मुसलमानांनी विधिमंडळावर चाल केली! विद्येशी अविद्येने ठाणलेलें हें वैर ओळखून, विद्येची विद्येपुरतीच परिभाषा आपण आखावी हेंच सद्यःपरिस्थितीत अुचित!

श्री. अकर्ते नि श्री. बघे

आणखी अेक साहित्यविषयक कार्य केवळ साहित्य परिषदेनेच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्र साहित्यिकांनी आजच्या आज हाती घ्यावयास हवें. साहित्य परिषद किंवा साहित्य संमेलन त्याच्या शक्तीप्रमाणे करता येईल तें प्रत्यक्ष कार्य काही करीत आहे, अधिकही करील. परंतु आपण सर्वांनी हें ध्यानात ठेवलें पाहिजे की, आपण सर्वांनी हातभार जर न लावला तर त्या संस्था तरी काय करणार? बहुजन समाजाला अेक मोठी वाअीट खोड आजकाल आपल्या अिकडे लागली

आहे. तो स्वतः काही अेक करणार नाही. त्याला जणू स्वतः काही अेक न करता, जो कोणी थोडेंवहुत करील त्याला, तू आणखी कामें कां करीत नाहीस असें हिणविण्याचेंच काम तेवढें विधात्याने नेमून दिलेलें असतें! येता-जाता साहित्य परिषद यंव् करीत नाही नि त्यंव् करीत नाही, म्हणून जेव्हा जेव्हा श्री. अकर्ते नि श्री. वघे हटकतात, तेव्हा तेव्हा त्यांनी हें विसरू नये की, साहित्य परिषदेला अनेक मोठमोठीं कार्यें हातीं घेता यावीं असें कोणचें साहाय्य या लक्षावधि अकर्त्यानी नि बघ्यांनी दिलें आहे ? जर समाज पाठिंवा देअील तरच संस्था काही करू शकणार !

मराठी ग्रंथांचे अिंग्रजी अनुवाद

मराठीतील अुत्तमोत्तम ग्रंथांचीं भाषांतरें अिंग्रजीत सिद्धवून मराठी साहित्याची योग्य ती थोरवी जगातील साहित्यात आज प्रस्थापिली जात नसेल तर तो दोष केवळ परिषदेचा नाही, संमेलनाचा नाही, तर अवघ्या महाराष्ट्राचा आहे. म्हणूनच हें कार्य हातीं घेण्याचें दायित्व अेकटचा परिषदेच्या माथी आहे असें मी मानीत नसून, आमच्या सर्वांच्याच–आम्हा वहुजनांच्याच–माथी आहे असें मानतो. अिंग्रजी भाषेच्या सजावटीत जगाच्या प्रमुख चौकांतून प्रदर्शविली गेल्यामुळेच काय ती आपल्या अितर काही प्राकृत भाषांतील अुपमोत्येंही (Cultured pearls) अवाच्या सवा भावाने विकलीं जात असता, मराठीच्या तिजोरीतच झाकून ठेवल्यामुळे आपल्या मराठींतील कित्येक पाणीदार जातिवंत मोत्येही मातीमोल होअून पडत आहेत. नेदर्लंडसारख्या लहान-सहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्ययुद्धांचे अितिहास मॉट्लेसारख्या अितिहासकारांनी अिंग्रजीत लिहिल्यामुळेच आज जगभर वाचले जातात. पण महाराष्ट्राने हिंदुस्वातंत्र्यार्थ जें प्रचंड धर्मयुद्ध लढविलें त्याचें नांवसुद्धा जर जगाच्या साहित्यात अेकू येत नसेल तर त्याचें अेक मुख्य कारण म्हणजे त्या अितिहासावरील मराठीतले ग्रंथ अिंग्रजीत कोणी अनुवादिले नाहीत हें होय. अितिहासाप्रमाणेच अितर काही विषयांतही मराठीत असे ग्रंथ आहेत आणि असे विद्वान् ग्रंथकार आहेत की, ज्यांच्या लिखाणाचा परिचय अिंग्रजीतून केला गेला असता, त्यांची कीर्ति युरोपभर व्हावी ! निदान त्यांना अखिल भारतीय प्रख्याति तरी मिळाल्यावाचून राहूच नये.

आमचा नवा विद्वद्वर्ग

जगाच्या साहित्यात नि ज्ञानात नवी भर टाकील असा अेक विद्वानांचा वर्ग आज आमच्यात अुपस्थित आहे. विज्ञानाची (Science) गोष्ट सोडली तर बहुतेक विषयांतील युरोपियन सर्वसामान्य विद्वान् मंडळींचें ज्ञान अेकदेशी असतें. कारण त्यांना आपल्याकडील माहिती नि आपल्या वाङ्मयाची ओळख आपल्या विद्वानांसारखी नसते. पूर्वीच्या आपल्या पंडितांचें ज्ञान जसें आपल्या अिकडील ग्रंथांपुरतेंच

नि अनुभवांपुरतेच अेकदेशी असे, तशी सापेक्षतः युरोपातील सर्वसामान्य ग्रंथकारांची स्थिति आहे. परंतु, सध्या संस्कृत वाङमयाचे नि भारतीय अनुभवाचे प्रगाढ पंडित नि मर्मज्ञ असूनही युरोपियन वाङमयात नि अनुभवातही जे मुरलेले आहेत असे ज्ञानकोशकारांसारखे जे पंडित आपल्याकडे होतात ते सापेक्षतः युरोपियनांपेक्षा अधिक बहुश्रुत असतात, सव्यसाची असतात. तत्त्व, काव्य, तर्क, पुराविज्ञान (Archaeology), अर्थशास्त्र, समाजशास्त्र, अितिहास प्रभृति विषयांमध्ये त्यांचे विचार, पौर्वात्य नि पाश्चिमात्य वाङमय नि अनुभव या दोघांचेंही परिशीलन त्यांनी केलेलें असल्यामुळे, पूर्वीच्या अेकदेशीय पंडितांपेक्षा किंवा आजच्या अेकदेशीय युरोपियनांपेक्षा अधिक तुलनात्मक, अधिक बहुश्रुत नि अधिक सप्रमाण असतात. त्यायोगे ज्याप्रमाणे पूर्वी अेकदा संस्कृत युगात वा पालीयुगात त्या काळच्या जागतिक साहित्यात नि ज्ञानात आम्ही नवीन नवीन मोलाची भर टाकू शकलो तशी आजही पुनः टाकू शकू.

भाषांतर-मंडळ स्थापा

अशी भर टाकण्यासाखे मराठी ग्रंथ आजही लिहिले जात आहेत. पण आपली भाषा संस्कृत वा पाली जशी पूर्वी अेकदा जागतिक भाषा झाली होती तशी पदवी पावलेली नसल्यामुळे, तशा पदवीस जी आज चढलेली आहे त्या अिंग्रजी भाषेत आपले ते मराठी ग्रंथ भाषांतरिले पाहिजेत. ते विचार अशा मराठी विद्वानांनी जसे मराठीत तसेच अिंग्रजीतही ग्रथिले पाहिजेत. हें काम काही अंशी ज्याचा तोच करू शकेल. साहित्य परिषदेनेही वर्षाकाठी अेक दोन ग्रंथ तरी अिंग्रजीत भाषांतरिले पाहिजेत. परंतु हें काम मुख्यतः साऱ्या महाराष्ट्रानेच आपलें समजून त्यासाठी अेक स्वतंत्र नि सधन मंडळच स्थापिलें पाहिजे. पूर्वी अिंग्रजीतून मराठीत महत्त्वाच्या ग्रंथांचीं भाषांतरें करण्याची जशी आवश्यकता होती आणि तें काम करण्यासाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, कै. दाभोळकर प्रभृति कार्यकर्त्यांनी मोठमोठ्या वा लहानसहान माला काढून जें कार्य केलें, तशीच आता मराठीतील ग्रंथ अिंग्रजीत अनुवादिण्याची अुलटी लाटही अुठली पाहिजे.

महाराष्ट्रातील विद्यापीठ

या निबंधात येथवर ज्या लहानमोठ्या कार्यात्मक योजना आम्ही अुल्लेखिल्या त्यांपैकी **क्रियापददारिद्र्य घालविण्याची, वाक्यरचना-वैचित्र्याची, लिपिशुद्धीची नि भाषाशुद्धीची सुधारणा** हया केवळ मनात येताच ज्याच्या त्याला पटतील तर लगोलग करता येणाऱ्या आहेत. 'संस्कृतनिष्ठ परिभाषा कोशाचें' अखिल भारतीय कार्यही करूच म्हटलें तर साहित्यपरिषद नि संमेलन यांना पार पाडता आलें पाहिजे. परंतु मराठीतील अुत्कृष्ट ग्रंथांचा नि विचारांचा अनुवाद अिंग्रजीत

करण्याचें कार्य मात्र अितकें व्यापक नि व्ययाचें आहे की, तें पूर्णपणे पार पाडावयास आजच्या परिस्थितीत तरी साहित्य-परिषद असमर्थच ठरेल. आणि वास्तविक पाहता अशीं अवजड कामें, तिने दिशा दाखविण्यापुरतें दहापांच ग्रंथ अिंग्रजीत अनुवादून प्रकाशिले तरी, पूर्णपणे नि सातत्याने करीत रहाण्याचा भार अशा साहित्यपरिषदांवर टाकणेंही अयोग्यच आहे. त्यासाठी आणि मराठी साहित्याच्या अेकंदर विवर्धनास्तव आपणांस महाराष्ट्र विद्यापीठच स्थापिलें पाहिजे. न्यायमूर्ति रानड्यांपासून हा विचार चालू आहे. आणि त्याविषयी आपण आपली नेहमीची कृतिपंगुता जर सोडली नाही तर तो विचार आणखी दहा वर्षें 'अेक विचार' म्हणूनच रेंगाळत राहील.

अनुकूल काळ

यास्तव माझें आपणां सर्वांना अत्याग्रहाचें सांगणें आहे की, या सम्मेलनाने आम्ही या दोन वर्षांच्या आत महाराष्ट्र विद्यापीठ प्रस्थापूच प्रस्थापू, असा कृत-निश्चय करून अुठावें. प्रत्येक वर्षाला पांचशे तत्त्वांचा काथ्याकूट, पांचशे ठराव, पांचशे वेत करीत बसण्यापेक्षा अेक कोणचें तरी विशिष्ट निकडीचें कार्य हाती घेअून तें पार पाडीत चलावें. असें केल्यावाचून आपल्या राष्ट्रापुढे सर्वच प्रकरणी जे कामाचे डोंगर पडलेले आहेत, प्रगतीची वाट अडवीत आहेत, त्यांचा अुठाव कसा होअील बरें? त्यातही आता काल थोडा अनुकूल आला आहे. करून टाकूच अशा अिरेने हात घातला तर कितीतरी तुंबलेलीं कार्यें आता करून टाकता येतील. साहित्यविषयक नव्हेत, तर राष्ट्रीय प्राबल्याच्या नि स्वातंत्र्याच्या प्रकरणीही अत्यंत अुपयुक्त अशा – प्राथमिक शिक्षण मुलांना आवश्यक करणें, नैतिक शिक्षण तरुणांना सक्तीने देणें, प्रभृति अनेक गोष्टी ज्या संस्थेच्या द्वारे सुसाध्य होणार आहेत तें महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्याचें कामही आता सहजी करून टाकता येणाऱ्या कार्यांतील अेक निकडीचें कार्य आहे. असें महाराष्ट्र विद्यापीठ लगोलग स्थापण्यासारखी भूमिका सर्व दृष्टीने योग्य अशी जर आपल्या हाती आजच्या आज कुठे असेल तर ती अेका पुण्यासच!

विद्यापीठ अद्यतन हवें

तें महाराष्ट्रीय विद्यापीठ जे स्थापावयाचें तें नुसतें सत्याचे प्रयोग करणारें नको. जगाच्या अनुभवाने जीं विद्यापीठें अद्यवत् म्हणून ठरलीं आहेत, अमेरिकेसारख्या वलाढ्य नि अद्यतन प्रगतीच्या देशांत जीं चालू आहेत, त्यांच्याअितकें तें प्रगत असलें आणि सिद्ध झालेल्या सत्यावरच काय तें अधिष्ठानिलेलें असलें, की सध्यापुरतें पुरें आहे. ह्या दोन गोष्टी ध्यानी ठेवून ह्या संमेलनाने वा साहित्य परिषदेने ह्या वर्षी आपला सर्व भर पुण्यास महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्याच्या

कार्यविर द्यावा. अेक व्यापक मंडळ नेमून महाराष्ट्रभर अेकच चळवळ अुडवून द्यावी. प्रत्येक नगरी सभांमागून सभा भरवाव्या. लाखो सह्यांचीं आवेदनें मुंबअी सरकारकडे धाडावीं. विधिमंडळातून प्रश्नांचा, ठरावांचा भडिमार करावा. प्रधान-मंडळाच्या दाराशी शिष्टमंडळाने सारखे ठोठावीत बसावें. जिकडे पहाल तिकडे भित्तिपत्रकांतून (Wall Posters) हस्तपत्रकांतून, वृत्तपत्रादि नियतकालिकांतून अेकच कंठशोष अैकू यावा. पुण्यास 'महाराष्ट्र विद्यापीठ' स्थापा! अशी चळवळ अेक वर्षभर सारखी करा नि पहा महाराष्ट्र विद्यापीठ दोन वर्षांचे आत प्रस्थापिलें जातें कीं नाही तें! हें कार्य साहित्यपरिषद नि संमेलन यांच्या शक्तीतलें आहे. कृतिदौर्बल्य झाडून अशीं काही विधायक नि प्रत्यक्ष कार्य करण्याची धमक तेवढी धरली पाहिजे!

ही वैयक्तिक मतें

येथवर आपण सर्व महाराष्ट्रीयांनी नि साहित्यपरिषद वा संमेलन यांनी आजच्या आज अशीं कोणतीं कार्यें करून टाकलीं पाहिजेत आणि तीं करून टाकणें शक्य आहे याची चर्चा मी केली. येथेच हेंही सांगून टाकणें अवश्य नसता अवश्य वाटतें की, हीं किंवा ह्या निबंधात पुढे येणारीं मतें हीं, जरी तीं अध्यक्षपदावरून सांगितलीं गेलीं तरी माझीं वैयक्तिक मतें आहेत. माझें अध्यक्षीय मत म्हणजे अर्थातच जें या संमेलनाचे ठरावात आपलें सामुदादिक मत व्यक्तविलें जाअील तें. माझीं सर्व मतें आपणां सर्वांना पटलींच आहेत वा पटतीलच असा अवास्तव भर-वसा मी केव्हाही बाळगणार नाही. हीं माझीं वैयक्तिक मतें असल्यामुळे आपल्या कोणाच्याही वैयक्तिक मतस्वातंत्र्यास त्यांच्यामुळे आळा बसण्याचें किंवा त्यांच्या विरुद्ध ठराव जरी आपणास संमतिणें योग्य वाटलें तरी ते संमतिण्याचे कामी कोणास संकोच वाटण्याचें काही अेक कारण नाही.

राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी होच

मी येथवर अेकंदरीत महाराष्ट्रातल्या साहित्यविषयक कर्तव्यांचा त्यातल्या त्यात स्वतंत्रपणे विचार केला असला तरी आपण हें नेहमी ध्यानात ठेविलें पाहिजे की, महाराष्ट्र हा जसा अखिल भारताचें अेक अुपांग आहे तसेंच नि त्याच कारणां-साठी महाराष्ट्र साहित्य हेंही अखिल भारतीय साहित्याचें अेक अुपांगच आहे काय तें. अुपांगाचा विकास वा संकोच हा जसा शरीराच्या आरोग्यावर अंती अवलंबतो तसेंच भारतीय साहित्यजीवनाचे बरे वा वाअीट परिणाम महाराष्ट्रीय साहित्यावर झाल्यावाचून राहणार नाहीत. या अवयवावयवी संबंधामुळे आपल्या राष्ट्रभाषेच्या भवितव्याशी आपल्या महाराष्ट्रीय साहित्याचा संबंध त्यातल्या त्यात अधिकच अुत्कटत्वाने निगडित आहे. ह्यामुळे महाराष्ट्र साहित्यास त्या प्रश्नाची अुपेक्षा

करून चालणार नाही. आपली राष्ट्रभाषा हिंदी हीच व्हावी असा आपल्या राष्ट्रातील फार मोठ्या वर्गाचा, निदानपक्षी हिंदु जगताचा, निर्धार झाल्यापासून बंगाल प्रभृति काही प्रांतांतील साहित्यिकात असा अेक वर्ग निघत आहे, की ज्याला आपापली बंगालीप्रभृति भाषाच राष्ट्रभाषा व्हावी–हिंदी होऊ नये असें वाटत आहे.

मराठी कां नको ?

त्या वृत्तीला अनुसरून आपल्या मराठी साहित्यिकांतही काही मित्राना असें वाटणें साहजिक आहे की, महाराष्ट्रीय साम्राज्य अटकेपर्यंत जेव्हा दिग्विजयी झालें होतें, तेव्हा भारतीय साम्राज्याच्या भाषेचा मान ज्या मराठीला मिळण्याची संधि जवळजवळ हाती आली होती आणि जी मराठी हिंदीहून साहित्यश्रीत काकणभर सरसच ठरेल, ती मराठीच राष्ट्रभाषा न करता हिंदीसच तो मान देण्यात मराठीची किंचित् तरी अन्याय्य अुपेक्षा होत आहे. परंतु आपण हें ध्यानी घेतलें असता आपणांस वा बंगाली प्रभृति अितर प्रांतिक भाषांना, असा अपमान वाटणार नाही की हिंदीला जी आपण राष्ट्रभाषेची पदवी अर्पीत आहो ती काही ती भाषा वा तिचें साहित्य बंगाली, मराठी, तेलगू, तामीळ यांहून समृद्धतर वा अुच्चतर आहे म्हणून नव्हे. अुलटपक्षी अगदी काल परवापर्यंत हिंदी साहित्य बंगाली-मराठीहून न्यूनतर होतें. परंतु, हिंदीलाच राष्ट्रभाषा करण्याचें मुख्य कारण हें आहे की, ती भाषा अेकंदरीत अखिल भारतात बहुजनसमाजात अितर कोणत्याही भाषेहून अत्यधिक प्रमाणात बोलली जाते, समजली जाते, लिहिली जाते, आणि ती अितर कोणत्याही रीतीने राष्ट्रीय विचारांच्या विकासाला वा प्रगतीला साहाय्यभूत होण्यास कोणत्याही प्रकारे अक्षम नाही. हीं दोन्ही लक्षणें हिंदीस अितर कोणत्याही प्रांतिक भाषेपेक्षा अधिक अंशी लागू आहेत.

हिंदीचा विस्तार

हिंदी ही तिच्या पोटबोलीसुद्धा आठ कोटी लोकांची मातृभाषाच आहे मुळात. त्यातही खरें पाहता हिंदुस्थानची ती आधीच राष्ट्रबोली तरी झालीच होती. रामेश्वरापासून काश्मीरपर्यंत, आज दोन सहस्र वर्षें झालीं, लाखो हिंदु प्रवासी, तीर्थयात्री, संतमहंत नि व्यापारी-व्यवसायी जे अव्याहतपणे जात-येत, दळणवळण ठेवीत आले ते या हिंदी बोलीच्याच बळावर काय तें! तुकाराम, नामदेव, चैतन्य नानक प्रभृति निरनिराळ्या प्रांतांतील संतमंडळें हिंदीत आपलीं काही कवनें तरी रचल्यावाचून राहिलीं नाहीत तें तिच्या पुरातन सार्वदेशिक स्वरूपामुळेच होय. अिंग्लिशने मध्येच आडवें येअून शिक्षित वर्गाला जर अिंग्लिशचें नवें माध्यम दिलें नसतें तर आज त्या शिक्षित वर्गापुढेही राष्ट्रभाषा ठरविण्याचा प्रश्नच बहुधा अुद्भवला नसता. कारण आजही शिक्षित वर्गाव्यतिरिक्त लाखो लोकांची अेक जी राष्ट्रभाषा नसली तरी, राष्ट्रबोली आहे ती हिंदीच होय! कुंभमेळ्यात जाअून

पाहा की आपणांस दिसेल – लाखो लोक तामील, तेलगू, काश्मिरी, सिंधी, बंगाली हिंदीत बोलत आहेत. हिंदुस्थानात येताच मुसलमानांनी जी हिंदी बोलीच अुचलली त्याचेंही कारण हेंच होतें की, तीच हाटाहाटातून नि घाटाघाटावर यच्चयावत् भरतखंडामध्ये निरनिराळ्या प्रांतांत त्यातल्या त्यात अत्यधिक प्रमाणात समजली जाअू शके.

हिंदीतील तेज नि विशालत्व

हिंदीचें पुरातन साहित्यही सर्वसामान्यतः अितर प्रांतिक भाषांच्या मानाने कमी विस्तृत किंवा कमी सरस नाही. चंदभाटाचें जुन्या हिंदीतील 'पृथ्वीराज-रासो' हें प्रचंड अैतिहासिक काव्य पहा. गुरुगोविंदसिंगाने रचलेलें जें त्यांचें आत्म-चरित्र तें विचित्र नाटक किंवा त्यांचा दशमग्रंथ पहा. हम्मीररासो, अलाअुदल, भूषणकाव्य, छत्रसालविजय प्रभृति हिंदुत्वाभिमानाने नि वीररसाने रसरसलेलीं वीरचरित्रें हिंदीच्या जुन्या वाङमयाचें तेज आणि सुप्रसिद्ध तुलसीरामायणासारखे अनेक धर्मग्रंथ त्याचें विशालत्व प्रस्थापीत आहेत. अर्वाचीन हिंदी साहित्यास अद्य-वत् बनविण्याचे कामी तर आपल्या महाराष्ट्रीय वाङमयाने नि हिंदीतच ग्रंथरचना करणाऱ्या अनेक महाराष्ट्रीय लेखकांनी किती तरी हातभार लावलेला आहे. तिचें साहित्य मराठी वा बंगाली यांच्याअितकें आज परिपुष्ट नसलें तरी ती त्यांच्या-अितकीच प्रगतिक्षम आहे. मराठीची ती सख्खी वहीणच आहे. संस्कृतनिष्ठा तिचेंही कुलव्रत. तेव्हा ती बहुसंख्य हिंदूंची आधीच राष्ट्रबोली असल्यामुळे त्या न्याय्य कारणासाठी ती राष्ट्रभाषाही झाल्यास मराठीला तें योग्यच वाटावें, हेवा तर वाटूच नये. मराठीचे हितासही अितर कोणती तरी राष्ट्रभाषा व्हावयाचीच तर हिंदीच होणें अधिक अनुकूल. कारण तिची वरचढ वृत्ति मुळातच नाही, महा-राष्ट्राच्या हाताचा प्रेमाधार घेअूनच ती राष्ट्रभाषा-पदावर चढत आहे.

अुर्दूची धोंड

पुनः आपण विसरता कामा नये की, जर कोणती राष्ट्रभाषा झाल्याने मराठी साहित्याचीच नव्हे तर अखिल हिंदुसाहित्याचीच भयंकर हानि नि अपमान होणार असेल तर ती हिंदी नव्हे – अुर्दू ! जों जों आपण हिंदीला राष्ट्रभाषा करून टाकण्याचे कामी टाळाटाळ वा दिरंगाअी करू, तों तों जर कोणा भाषेची धोंड राष्ट्रीय भाषेच्या प्रश्नावर आदळणारी असेल तर ती न मराठीची, न बंगालीची – तर अुर्दूचीच होय! कारण, जरी अुर्दू ही मूळची हिंदीचीच 'बबर्जी' प्रत असली तरी अेखाद्या श्रीयुत दळवीचा मेहेरबान देहलवी होताच तो गोतास काळ झाल्यावाचून राहत नाही, त्याप्रमाणेच ती अुर्दू हिंदीच्या, तिच्या गोताच्याच जिवावर अुठलेली आहे. तिची प्रकृति परसंस्कृतीच्या अन्नपाण्याने विकृत झाली आहे. वास्तविक ती

मुसलमानांची धर्मभाषा नाही – ती अरबी आहे. वास्तविक ती सात कोटी मुसलमानांपैकी पांच कोटींची मातृभाषाही नाही. त्यांची मातृभाषा तामील, तेलगू, बंगाली प्रभृति त्या त्या प्रांतांची मूळ भाषा असते. तीस-पस्तीस कोटी लोकांच्या ह्या देशात जी अुर्दू दोनकोटी लोकांचीसुद्धा मातृभाषा वा धर्मभाषा नाही आणि वीस कोटींवर लोकांच्या संस्कृतीशी, साहित्याशी वा भाषेशी बहुतांशी असंबद्ध, अपरिचित नि विरोधीही आहे, तिलाच त्या राष्ट्राची राष्ट्रभाषा करा असें नुसतें म्हणण्याचें धाडससुद्धा, अितर कोणत्याही देशात कोणीही अल्पसंख्याक करू शकले नसते. पण हिंदुस्थानात मुसलमान तें करू शकतात!

स्वतंत्र राज्याचें चिन्ह

बरें म्हणा, वाअीट म्हणा; पण आज मुसलमानांच्या मनात ज्या ज्या गोष्टीने त्यांचा समाज हिंदूंपासून अधिकात अधिक निराळा दिसेल, तें अेक हिंदूंपासून अगदी विभिन्न, अगदी अुलट, अगदी विरुद्ध, अगदी निराळें राष्ट्र भासेल असें स्वरूप त्यास देण्याचा दृढ निर्धार झालेला आहे. त्याच्या राजकीय कारणांची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. साहित्यापुरतें अेवढेंच सांगणें भाग आहे की, भिन्न राष्ट्राची अेक अत्यंत महत्त्वाची खूण जी विभिन्न भाषा तीही आपल्यात असावी यास्तव मुसलमानांनी अुर्दू ही निवडली आहे. अेवढ्याचसाठी संस्कृत हिंदुभाषासंघापासून तिला विलग करण्यासाठी तिची मूळची संस्कृत प्रकृतिही प्रयत्नेकरून, बलात्काराने ते अधिकाधिक विकृत करीत चालले आहेत. पंजाबकडच्या मुसलमानांनी अुर्दू आमची म्हटलें तर अेक वेळ शोभेल. पण बंगाली हीच ज्यांची मातृभाषा कालपर्यंत होती ते बंगाली मुसलमान, किंवा शेकडा दहाजणही तामीळवाचून दुसरी भाषा जे बोलत नव्हते, अूर्दूचें वाक्यही वाचू शकत नव्हते ते मद्रासी मुसलमान, मराठीत घरच्या वह्या नि पत्रें लिहिणारे कोकणी मुसलमान हे सुद्धा अुर्दूलाच राष्ट्रभाषा करा म्हणून जो अकस्मात् टाहो फोडू लागले आहेत, आम्हा सात-आठ कोटी मुसलमानांची तरी अुर्दू हीच राष्ट्रभाषा आहे म्हणून धडाधड ठराव संमतीत आहेत, अितकेंच नव्हे तर वीस-पंचवीस कोटी हिंदूंचा देखील तीच अुर्दू राष्ट्रभाषा झाली पाहिजे म्हणून मुस्लिम लीगनेच ठराव केला, अितकेंच नाहीं तर जिथे शेकडा पांच मुसलमान वस्ती नाही, त्या सुदूर तामीळभाषी मद्रासच्या भर विधिमंडळात अेक विगतप्रधान नामदार खवित्तअुल्ला यांनी गेल्या मार्च महिन्यात तेंच मत प्रतिपादण्यास सोडलें नाही – हें सर्व जमेस धरता, मुसलमान असा अरबीनिष्ठ अुर्दूसच अुचलून धरणार हें सत्य दृष्टीआड करून कसें चालेल?

हाती धुपाटणें येअील

अशा वेळी सर्व हिंदूंनी पण संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा असा अेकमुखी निर्धार केला पाहिजे. नाही तर मराठी, बंगाली, तामील वादात हिंदीचें

पाठवळ जर अुणावलें तर तेलही गेलें तूपही गेलें आणि हाती अुर्दूचें धुपाटणें मात्र आलें अशी आपल्या राष्ट्रभाषेची स्थिति होअून मराठी साहित्यालाही, त्या अरबी-निष्ठ अुर्दू मुसलमानी सत्तेत जसा हानिकारक नि अपमानकारक धक्का बसला, तसा बसल्यावाचून राहणार नाही ! बिहारमध्ये महाराष्ट्राप्रमाणेच हिंदु बहुसंख्य, जवळजवळ शेकडा नव्वद; पण तिकडे हिंदूंच्याच घरघालू प्रवृत्तीमुळे, मुस्लिमांच्या अतिक्रामक नेटामुळे, काँग्रेस सरकारनेच अेक भाषासमिति नेमून क्रमिक पुस्तकांतून घातलेल्या भाषेत अुर्दू शब्दांची अर्धीमुर्धी तरी रेलचेल असावी असें सरकारी धोरण ठरविण्याचा घाट घातला आहे! तीच दुर्दशा मराठी क्रमिक पुस्तकांचीही त्याच वेडापायी झाल्यावाचून राहणार नाही हें ध्यानात ठेवा! आता आतून आतून बोटें मोडीत बसण्याचा भ्याडपणा सोडून, आम्ही सर्व हिंदूंनी तरी मुसलमानांना नि काँग्रेसला रोखठोक बजावून सांगितलें पाहिजे, की आम्हा हिंदूंचीच तरी राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी ही, आणि हीच काय ती! मुस्लिमांना वाटेल तर त्यांनी त्यांची राष्ट्रभाषा अुर्दू करावी वा प्रत्यक्ष अरेबी ! राहतील राष्ट्रात दोन भाषा! स्विट्झरलंडमध्ये चार आहेत. पण म्हणून प्रत्येक क्रमिक पुस्तकात प्रत्येक वाक्यात अेक शब्द अिटालियन, अेक शब्द फ्रेंच, अेक जर्मन, अेक स्विस असावा अशी काही खिचडी करण्याची खुळचट तोड त्यांनी काढली नाही; आणि काढली असती तरी ती त्या स्वाभिमानी भाषिकांपैकी सर्वांनी झिडकारून तिचा बोजवारा अुडविला असता.

धर्मांतराचा भाषांतराशी संबंध नाही

येथे हें हेतुतः स्पष्टपणे सांगून ठेवतो की, या निबंधात मागे जे अुल्लेख आले वा पुढे येतील ते ज्या आमच्या मुसलमान देशबंधूंना नि भाषाबंधूंना मराठी ही आपलीच मायबोली वाटत आहे, आमचे ख्रिश्चन, यहुदी, पारशी देशबंधु जसे आपल्या मराठी, गुजराथी प्रभृति प्रांतिक नि त्यांच्याही मूळपासूनच असलेल्या मातृभाषांना जसे सावत्र भावाने न लेखता हिंदूअितक्याच ममत्वाने लेखतात, तसे जे मुसलमान त्या भाषांना आपलीच भाषा मानतात त्यांना ते अुल्लेख लागू नाहीत. परंतु मराठी-प्रभृति भाषा ह्या त्यांच्या पूर्वीच्या मातृभाषा असताही त्यांना परकी मानून आपली स्वतःची अशी अरबी, पर्शियन शब्दनिष्ठ अुर्दू हीच काय ती स्वकीय भाषा आहे अशी जी विकृत चळवळ मुसलमानांत चालली आहे तिला पाठिंबा देणाऱ्या मुसलमानांना काय ते ते अुल्लेख लागू आहेत. धर्मांतराचा भाषांतराशी संबंध असतोच असें नाही. हे आमचे ख्रिश्चन बंधु मराठी-हिंदींना किती प्रेमाने आपणावतात ह्यावरून दिसून येअील.

'याने'चा अरबी खिळा

भाषेच्या अैक्यासाठी हपापलेल्या 'हिंदी याने हिंदुस्थानी'च्या नव्या खुळाचाही बोजवारा अुडाल्यावाचून राहणार नाही; आणि शेवटी हा 'याने

हिंदुस्थानी ' अुर्दूच बनविल्यावाचून मुसलमान सोडणार नाहीत. महाराष्ट्रातील लोकांना ही ' हिंदी याने हिंदुस्थानी ' म्हणजे काय वस्तु आहे हें ध्यानी यावयास तो ' अेक सत्याचा प्रयोग ' आहे अितकें सांगणें पुरें ! हिंदी म्हणताच मुसलमानांचें माथें फिरतें ना ! ठीक तर तें हिंदी हें अेकेरी नांव वदलून त्यात 'याने म्हणजे अर्थात् ' हा अरबी शब्द घालू या; नांवातच हिंदुमुस्लिम अैक्य त्या ' याने'चा अरबी खिळा ठोकून खिळवून टाकू या ! आपल्या राष्ट्रभाषेचें नांव ' हिंदी याने हिंदुस्थानी ' असेंच ठेवलें, नुसतें हिंदी ठेवलें नाही. हिंदीत चिरफाड करून तिच्यात अर्धे संस्कृतीय नि अर्धे अरबी शब्द वापरीत गेलें की हिंदुमुस्लिमांची राष्ट्रभाषा अेक झाली पाहिजे अशी आहे ही योजना ! मागे अेका बुद्धिमान् मध्यस्थाने दोघा पक्षकारांत अेका जिवंत गायीची यथान्याय वाटणी करण्यासाठी तिचे मधोमध दोन तुकडे केल्याची गोष्ट सांगतात; आणि तरी देखील त्या भागातील तोंडाचा भाग न घेता दुधाच्या कासेचा भागच मला हवा म्हणून त्यातील भांडखोर पक्षकार भांडतच वसला (!) तीच गत ही! सरसीमेवरील पठाणांची टोळधाड हिंदुस्थानावर आल्यास, त्यांच्या प्रतिकारासाठी हिंदवी स्त्रियांचीच अेक नि:शस्त्र सेनाच तिथे धाडावी; म्हणजे वंदुक न झाडताच ते पठाण लोक लाजेने परत फिरतील असा अेक सत्याचा प्रयोग मागे सुचविला गेला होता ! त्याच्याच तोडीचा हा दुसरा ! पठाण लुटारू अशी स्त्रीसेना सामोरी आली तर बंदुकही न झाडता परततील, नव्हे पळत सुटतील हें अगदी खरें – पण ते लाजेने नव्हे – तर त्या स्त्रियांतील, पाठुंगुळी टाकवतील तितक्या स्त्रिया पाठीवर घालून! तसेंच या 'याने हिंदुस्थानी' च्या प्रयोगात हिंदीमध्ये अर्धे अरबी शब्द घालता घालता त्या हिंदीसच ते अुर्दू बनवून सोडतील ! त्यांची वटीक करून टाकतील !

आणि त्याचें मूलग्राही कारण हें की, जें राजकारणात, समाजकारणात तेंच साहित्यात नि भाषेत, की – मुसलमानांना तुमच्याशी एकमेकपणा, समाअीकपणा असा मुळातच नको आहे. त्याना त्यांचेपणा काय तो हवा; तुमच्या तुमचेपणाचा गंधही नको. त्यांना निराळेपणाच हवा आहे. अेकत्रपणा नको. अेकता हवी. तुम्हीच मुसलमान व्हा. तुम्हीच शिका अुर्दू हवें तर ! असा जोवर त्यांचा मानस, तोवर कसली तडजोड ? अर्धे शब्द अरबी मिसळले तरी हिंदी ते मानणार नाहीत. पुन्हा तुमचे कोणते शब्द ठेवणें, त्यांचे कोणते हा वाद आलाच ! त्यांना वंदेमातरम् नको, विद्यामंदिर नको, विकास नको, सरस्वती नको, श्रीयुत नको, श्रीसुद्धा नको. यांत अतिशयोक्त अक्षरसुद्धा नाही. घडत असलेल्या घटना आहेत ह्या ! त्यांच्या संस्थानांत ते शाळांतून मराठी, तामीळ, तेलगू, हिंदी शिकवूच देत नाहीत. अुर्दूच बळाने शिकवितात. आमच्या मुलाबाळांनासुद्धा ! तेथे ही कसली घेअून बसले आहात ' याने हिंदुस्थानी ' !

पुन्हा असें पहा की, आपल्यापुढे कोण्या चोर बाजारातील किंवा चौपाटी-वरील बाजारू भाषा काढण्याचा प्रश्न नाही; तर या भारतीय राष्ट्राची राष्ट्रभाषा बनविण्याचा प्रश्न आहे. आता अशा या आपल्या प्रौढ नि सुसंस्कृत राष्ट्राची राष्ट्रभाषा म्हटली की, ती तितकीच प्रौढ नि सुसंपन्न हवी. तिच्यात काव्य, कला, तत्त्व, शासन, विज्ञानप्रभृति सर्व विषयांची परिभाषा हवी. अशी परिभाषा आपल्या मराठी प्रभृति हिंदी भाषाप्रकृतीस मानवणार व पुरविली जाऊ शकणार त्या अेका देववाणीतूनच, त्या शब्दरत्नाकर संस्कृतातूनच! पण तिचाच तर मुसल-मानांना विटाळ! केमालपाशानेसुद्धा ज्या अरबीला नि तिच्या लिपीला अप्रगत नि टाकाऊ म्हणून झिडकारली तिच्या दाराशीच ते परिभाषेची भीक मागणार! तुमच्या मराठी वा हिंदीत अर्थशास्त्र म्हटलेत की ते म्हणणार अिलो-अिकतेसादियात्! भाषाशास्त्र म्हटलेत की ते म्हणणार अल्मून, अल्मना. खनिजशास्त्र म्हटलेत की ते म्हणणार अिल्म मदनियात्. प्रकृतिज्ञान म्हटलें की, ते म्हणणार अिल्म तबअियात साम्यवाद म्हटलें की ते म्हणणार अिल्ममसा वाम्. ग्रहाला सैयारा, विमानाला तैय्यारा, भाग्याला तकसीम, विकासाला तरक्की!

आता सांगा हे त्यांचे शब्द तुमच्या मराठीला जुळतात का? पण ते तर तेच वापरणार. त्यांना स्वतःला सुद्धा जरी हिंदी शब्दाहून ते कमी कळत असलें तरीही ते तेच वापरणार! त्यांच्या विद्यापीठांतून ते तेच आजही वापरीत आहेत. नव्हे, हिंदु मुलांनाही तेच वापरणें क्रमिक पुस्तकांतून भाग पाडीत आहेत. अशा त्यांच्या मनोवृत्तीत नुसतें 'ओपन सिसाम्' 'याने हिंदुस्थानी' म्हणताच राष्ट्रभाषा अेक होअील असें समजणें खूळ नव्हे काय? तो सत्याचा प्रयोग नसून आहे अेका जाणीव वा अजाणीव असत्याचा! असल्या दोन अगदी विभिन्न नि विरुद्ध प्रकृतीच्या नि संस्कृतीच्या भाषा अेकमेकांत घुसडून देण्याने अितरही अनेक दुष्परिणाम होतील. पण ते सांगण्यास अिथे स्थल नाही.

तेव्हा आमचें स्पष्ट मत असें आहे की, हा राष्ट्रभाषेचा प्रश्न आपल्या मराठी नि हिंदु साहित्याच्या हितार्थ सोडविण्याचा अेकच मार्ग असा आहे की, आम्ही हिंदूंनी आमच्यापुरतें असें ठाम ठरवावें की, आमची राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी हीच. मुसलमानांनी हवी ती निवडावी. दोन भाषा राहतील त्यांना परवडतील तर. बहुसंख्येची जी भाषा तीच राष्ट्रभाषा, हा जगाचा न्याय मुस्लिमांना रुचेल त्या दिवशीच काय ती अेक राष्ट्रभाषा होअील. नाही तर नाही होणार!

जी बहुसंख्येचीच नव्हे, तर अुत्तमातील अुत्तम आहे त्या आमच्या देव-वाणीला, आमच्या संस्कृत भाषेला आम्ही पारखे होणें म्हणजे आमच्या संस्कृतीला पारखें होणें होय.

मागचीं दोन वर्षें पं. जवाहरलाल नेहरू हे काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी हिंदु-मुस्लिम अैक्यास्तव आम्हा हिंदूंना आज्ञा सोडली की अुर्दूच राष्ट्रभाषा

करा. आता श्री. सुभाषबाबू सवाअी अध्यक्ष झाले, तेव्हा औदार्यात नेहरूंवरही थोडी मात करावयासाठीच कीं काय, त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणातच आम्हां हिंदु लोकांना दुसरी अेक आज्ञा सोडली की आपली लिपीही सोडून रोमन स्क्रिप्टच स्वीकारा, म्हणजे मुस्लिमांशीच काय पण जगाशीही आपलें अैक्य होण्याचा पाया घातला जाअील ! डी व्हॅलेरा आयरीनचा अध्यक्ष होताच त्याला चिंता लागली, मेलेली आयरिश भाषा पुनः अेकदा माझ्या आयरीनची राष्ट्रीय भाषा कशी करता येअील ? 'अिंग्लिश भाषा जगाची भाषा कशी होअील, आयर्लंडमध्ये ती आधीच राष्ट्रभाषा झालेली असल्यामुळे जगद्धिताच्या दृष्टीने आयरिश भाषा मेल्याचा आनंदोत्सव कधी करीन' अशी घाअी काही त्याला झाली नाही. तीच गोष्ट हिटलरची–जर्मन भाषा, जर्मन राष्ट्र, जर्मन संस्कृति हेंच त्याला वेड ! तीच गोष्ट मुसोलिनीची; तीच केमालची–आपल्या राष्ट्राचें स्वत्व कसें बलिष्ठ होअील हीच त्यांची चिंता. पण आमचे अध्यक्ष पहा–त्यांना जगाचें कसें होअील याची चिंता, त्या जगाहूनसुद्धा अधिक अुत्कटतेने सारखी तळमळवीत आहे ! म्हणूनच हिटलर हिटलर आहे, मुसोलिनी मुसोलिनी आहे नि आमचे अध्यक्ष आमचे अध्यक्ष आहेत ! म्हणूनच आयर्लंड, तुर्कस्थान, जर्मनी, अिटली स्वतंत्र आहेत. आणि हिंदुस्थान पाकस्तान वा आंग्लस्थान होअू घातला आहे !

ही तर आत्महत्त्या

परंतु, जगाच्या अैक्याचाच प्रश्न असेल तर आपली स्वतंत्र नागरी लिपि तेवढी सोडून रोमन स्क्रिप्ट स्वीकारल्याने तो सुटावा तसा सुटणार नाही. कारण आपली स्वतंत्र भाषा त्या अैक्याच्या वाटेत आडवी येणारच. तेव्हा तीही सोडून आणि मराठी, बंगाली, हिंदी आणि मुख्यतः तें संस्कृत साहित्य–त्या व्यासा-कालिदासांसुद्धा–समुद्रात बुडवून आपण अिंग्लिश भाषाच आपली म्हणून कां स्वीकारू नये ? जगातील केवढ्या तरी भागाची अेक भाषा होअील त्यामुळे, जर आपण पंचवीस कोटी हिंदु तरी अिंग्लिशलाच आपली मातृभाषा बनवू तर ! आणि नुसत्या भाषेपुरतेच जगाचें अैक्य साधण्यापेक्षा तें आपल्या अेकट्या हिंदूंच्याच वाट्यास आलेलें कर्तव्य, पूर्णपणे पार पाडण्यास्तव ह्या आपल्या स्वतंत्र राष्ट्रीय-त्वाच्या जाणिवेचें लोढणें तरी गळ्यात कां अडकवून बसा ? आपण अिंग्लिशच आहोत, आणि हिंदुस्थान कसा निराळा देश वा राष्ट्र जगात मुळी नाहीच असें कां मानू नये ? हो, जगाचें अैक्य साधण्याचा अुत्तम मार्ग म्हणजे भांडणातील अेका कोणत्या तरी समंजस पक्षकाराने आपल्या मुलांबाळांसुद्धा आत्महत्त्या करून घेणें हाच होय ! आणि तसा समंजस पक्षकार ह्या जगाच्या जीवन-कलहात आहे अेकच काय तो–हिंदुस्थान, आम्ही हिंदु ! !

महाराष्ट्र साहित्य संमेलन ४७७
अनुक्रम ...३८९५... दि: ..... नं.ब.
आदर्श लिपि ...१५९१... नो. दि: 13.11.47

अैक्याची सर्वाधिक झुरणी लागलेली असणार दुर्बलतमालाच. परंतु दुर्बलतमतेचें, आत्मदौर्बल्याचें हें कीट जर आमच्या मनावर चढलेलें नसतें, तर आमच्या राष्ट्रपति म्हणविणाऱ्या अध्यक्षाने जगालाच असें खडसावून विचारलें असतें की, जगाच्याच अैक्यासाठी तुम्ही तुमची अरबी, रोमन, लॅटिन लिपी सोडून आम्हा पंचवीसकोटी हिंदूंची ही नागरी लिपिच कां स्वीकारीत नाही ? जगाचे हितार्थच अुत्तम ती लिपि जागतिक लिपि होणें अिष्ट. म्हणून अरेबीची तर गोष्टच तुलनेत बोलावयास नको. शिलाछापाचे पुढे जी जाअू शकत नाही, अशी ती अरेबी लिपि म्हणजे लिपीचा अेक शिलास्थि, अेक Fossil होअून पडलेली ! पण रोमन लिपीसुद्धा तुलनेत नागरीहून किती तरी हीन आहे ! आज़ही जगताला देण्यासारख्या ज्या आदर्श वस्तु आम्हापाशी आहेत त्यांत जसें योगशास्त्र, तशीच ही नागरी !

शास्त्रशुद्ध व्यवस्था

तिची ती 'वर्णस्थान समीरिता' अशी नुसती अक्षरांची क्रमव्यवस्थाच पहा ! अनाहत असा जो आद्य ध्वनि मनुष्यास करता येतो तो 'अ' म्हणूनच तो प्रथम घातला. त्याच तत्त्वाने अितर स्वर ते ते त्या क्रमाने पुढे घातले. त्या स्वरांवर व्यंजनात्मक असा पहिला आघात कंठात होतो. म्हणून कंठ्य व्यंजनें निवडून, 'क' वर्गात घालून, त्यांना त्यापुढे घातलें. ओठ कापले तरी 'क' वर्ग अुच्चारता येणारच. दुसरा आघात तालूचा, पुढे दंतांचा, शेवटी ओठांचा. यास्तव तालव्य, मूर्धन्य दंत्य, ओष्ठ्य तीं तीं व्यंजनें निवडून, वर्गवून क्रमाने रचलीं. नाही तर अरेबी पहा, पहिलेंच अक्षर त्रिदली अुच्चाराचें–अलेफ् ! दुसरें अेकदम ओष्ठ्य–बे ! तिसरेंच अुलट जाअून पे ! अिंग्रजीचीही तिच गत ! पहिली अेकदम अे तर दुसरी अेकदम बी, तर तिसरी सी !!! ध्वनीच्या आघातानुवर्ती स्थानांचा क्रम असा नाहीच !

लिपिशुद्धतेचीं लक्षणें

लिपि शास्त्रशुद्ध असण्याचें दुसरें लक्षण, म्हणजे अक्षरांचें जें नांव तोच त्याचा अुच्चार हवा. नागरीत ज्या अक्षराचें नांव 'स' त्याचा अुच्चारही स; नांव 'क' तर अुच्चारही क; पण रोमनस्क्रिप्टमध्ये नांव बी तर अुच्चार ब, नांव सी तर अुच्चार क आणि नांव डब्ल्यू तर अुच्चार व ! तीच गत अरबीची.

तिसरें लक्षण म्हणजे अेका अक्षराचा अेक अुच्चार. नागरी क कुठेही आला तरी तो 'क'च, 'अ' आला की तो 'अ'च राहणार. पण रोमन लिपीत कोण अडाणीपणा ! सी कोठे स होअील तर कुठे 'क'; but मध्ये 'u' अ होतो, तर 'put' मध्ये 'अु' !!

शास्त्रशुद्ध लिपीचें चौथें लक्षण म्हणजे अेका अक्षराचें अेकच रूप. ह्या प्रकरणी आजच्या नागरीत चार-पांच अपवाद आहेत नि तेही लिपिशुद्धीच्या चळवळीने नष्ट केले आहेत. पुनः रोमन स्क्रिप्टप्रमाणे युरोपीय भाषा लिहिताना स्पेलिंगमध्ये जो लिपीचा विचका अुडतो तो विचारूच नये! नुसता 'कमिशन' हा चार अक्षरी शब्द लिहिताना अक्षरें लागणार दहा; commission काही अक्षरें पूर्वीच्या रावबहादुरांप्रमाणे सभेत नुसत्या खुर्च्या अडवून चूप वसणारी; त्यांना स्वतःचा ध्वनिच नाही. Through हा शब्द पहा! पुनः, आमच्या भाषेतले कित्येक 'थ, त' सारखे ध्वनि व्यक्तविणारीं अक्षरें रोमन स्क्रिप्टमध्ये मुळातच नाहीत.

सुभाषबाबूंच्या सूचनेप्रमाणे काँग्रेसकडून जेव्हा सारे वेद, वेदांगें, रामायण, महाभारत हे ग्रंथ A, B, C, D मध्ये छापले जातील, तेव्हा गीतेच्या पाठास असा श्रुतिमंजुळ आरंभ होईल—

ढर्म्यः क्शेट्रे कुरुक्शेट्रे शमवेटा युयुट्शवः ॥

मराठी क्रमिक पुस्तकांतून मी जातो हें mee jato असें छापलें जाअील आणि असें आमचें संस्कृतसुद्धा सारें प्रचंड साहित्य, जगाचे हितासाठी A B C D करून सोडावयाचें! काय वाखाणावी सुधारणा! जितकी विक्षिप्त तितकीच बाटगी!!

अशा प्रकारे नागरीहून सर्वतोपरी हीनतर असलेल्या रोमन स्क्रिप्टला आम्ही स्वीकारण्यापेक्षा युरोपानेच आमची नागरी स्वीकारावी. लिपिशुद्धीप्रमाणे दोनचार रूपें पालटलीं की ती नागरी शास्त्रशुद्धतेत मूळचीच अुत्तमोत्तम असल्याने, आजच्या आज मुद्रणसुलभतेत नि शिक्षणसुलभतेतही रोमन स्क्रिप्टहून वरचढ होणारी आहे.

फोल कारणें

रोमन स्क्रिप्टचे लाभ म्हणून जीं दोन कारणें पुढे आणण्यात येतात तीही अवास्तव आहेत. रोमन लिपि जगाची बहुसंख्य लिपि झालेली नाही. पस्तीस कोटींचा हिंदुस्थान तितकाच मोठा चीन, चार कोटींचा जपान, ह्या मोठमोठ्या राष्ट्रांतून नि अनेक अितर राष्ट्रांतून ती लिपि स्वीकारलेली नाही. केवळ युरोपियनांची ती मूळ लिपि म्हणून ते गेले तिथे ती गेली. अेका केमालपाशाने मात्र तुर्कस्थानात ती नव्याने चालू केली आणि त्याचें कारण असें होतें की, अरबी लिपि अगदी टाकाअू नि तुर्कांना परकी होती, आणि तुर्कांची स्वतःची अशी कोणचीच लिपि नव्हती! ज्याच्या घरी गायच नव्हती, त्याने अेखादी शेळीच पाळावी यात नवल नाही. पण अितर सारे शेळ्या पाळतात यास्तवच काय तें आपल्या घरची कामधेनु हुसकून अेखादा शेळीलाच तेथे बांधू लागला तर तें मात्र नवल खरें!

अर्थबोध अशक्य

दुसरें जगातील भिन्नभिन्न साहित्यांचा परिचय नुसत्या अेक लिपीमुळे सुलभ करता येअील हा हेतुही केवळ हेत्वाभास आहे. कारण ज्या भाषा परस्परांशी पुष्कळ प्रमाणात अेकरूप असतात त्या अेकाच लिपीत छापल्या तर थोडयाफार प्रमाणात परस्परांना गर्भितार्थी तरी समजू शकतात. युरोपच्या अिंग्लिश, फ्रेंच, जर्मनादि भाषांत अनेक शब्द समान; त्या अेका लिपीत छापल्या तर सारांश परस्परांना कळू शकेल. पण युरोपियन भाषांना सर्वतोपरी विभिन्न असणाऱ्या आपल्या भाषा, त्यांच्या रोमन लिपीत छापल्या तरी त्या युरोपियनांना त्यातल्या अर्थाचें अवाक्षरही कळणार नाही; साहित्याचा परस्परपरिचय सुलभ होणार नाही. 'रघुवंश' रोमन लिपीत छापला तरी 'वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ-प्रतिपत्तये' या पहिल्याच चरणाचा अर्थ लंडनच्या शाळांतील मुलांना वा शिक्षकांनाही लवलेश तरी कळेल काय ? त्यातली ABCD तेवढीच कळणार ! त्याचप्रमाणे 'आय काँग्रॅचुलेट यू अपॉन युवर सक्सेस' हें अिंग्लिश वाक्य अगदी देवनागरीत छापलें तरी आमच्या अिंग्रजी भाषा न जाणणाऱ्या शास्त्रीबुवांना त्यांतील अर्थाचा काही तरी बोध होअील काय ?

हें सारें कशासाठी ?

मला स्वत:ला ठाअूक आहे की, दे. भ. सुभाषबांबूंनी नागरी टाकून रोमन लिपि स्वीकारावी म्हणून जें म्हटलें, त्याचें खरें कारण त्यांनी वरवर हें जें सांगितलें तेंच नव्हतें. जें खरें कारण त्यांच्या मनात होतें, तें दुसरें कोणतें नसून हेंच होतें की, हिंदुमुलिस्म अैक्य संपादण्यासाठी मुसलमानांना जिचा अगदी तिटकारा येतो ती नागरी टाकून आम्ही रोमन लिपि स्वीकारली असता ते समाधानतील, तेही रोमनलिपि स्वीकारतील आणि अशा कोणत्या तरी अद्वातद्वा युक्तीने हिंदुस्थानची अेक लिपि होअील ! परंतु, तुम्ही नागरी सोडा अेवढेंच मुसलमानांचें म्हणणें नाही; तर तुम्ही अुर्दू लिपिच स्वीकारा हें त्यांचें म्हणणें आहे. तुम्ही रोमन लिपि तर काय, चीनची लिपि जरी स्वीकारलीत तरी ते, विशेषत: हिंदी मुसलमान, त्यांची धर्मलिपि जी अरबी आणि तिची प्रतीक जी अुर्दू ती सोडण्यास मान्य होणार नाहीत ही खूणगाठ बांधून ठेवा ! आणि जरी मुसलमानांनी रोमन लिपि त्यांची राष्ट्रलिपि म्हणून स्वीकारली असें अशक्य तें शक्य म्हणून क्षणभर गृहीत धरलें, तरी हिंदुत्वाचा यथान्याय तो आत्मसन्मान बाळगणारे आमच्या-सारखे लाखो हिंदु लोक, केवळ कोणा अहिंदूच्या दुराग्रहासाठी काय तें आमची नागरी लिपि त्रिकाळीही सोडू अिच्छणार नाहीत, हीही खूणगाठ बांधून ठेवा ! मग तो दुराग्रह धरणारे मुसलमान असोत वा अिंग्रज वा पोर्तुगीज !

हा डाव हाणून पाडा

कारण, अथेच हेंही सांगून ठेवतो की, अिंग्रज लोकांचा नि अमेरिकन मिशनरींचाही नागरी मारून रोमन लिपि रुळविण्याचा डाव फार दिवसांपासून चालू आहे. ख्रिस्तपुराण मराठी भाषेत पण रोमनलिपीत पोर्तुगीजांनी शेकडो वर्षांपूर्वी रचलें होतें. आजही नागा प्रभृति वन्य जातींत मिशनरी लोकांच्या शाळा ज्या आहेत त्यांतून सहस्रावधि मुलांना त्यांच्या भाषेचीं क्रमिक पुस्तकें मिशनरी रोमन लिपीतच छापून शिकवीत आहेत. अितकेंच नव्हे पण सैन्यासाठी सरकारने चालविलेल्या 'फौजी अखबार' प्रभृति वृत्तपत्रांतून हिंदी भाषा रोमन लिपीत छापण्याचा अुपक्रम झालेला आहे, तिकडेही कानाडोळा करून चालणार नाही. या सर्व कारणांसाठी राष्ट्रभाषेच्या प्रश्नाप्रमाणेच माझें असें निश्चित मत आहे की, राष्ट्रीय लिपीच्या प्रकरणीही आपण हिंदूंनी आणि त्यातही ज्यांच्या साहित्याची लिपि प्रत्यक्ष नागरी ही आजही आहे त्या आम्ही महाराष्ट्रीयांनी स्पष्टपणे असें अुद्घोषावें की, नागरी हीच आमची राष्ट्रीय लिपि राहणार !

दोन भाषा नि दोन लिपि

मुसलमानांनी हवी तर त्यांची अुर्दू भाषा नि साहित्य ठेवावें. ती त्यांच्या परीने चांगली आहे हें मी जाणतो. जशा आमच्या प्रांतिक भाषा त्या त्या प्रांतात राहतील, तशी अुर्दू भाषा नि लिपि मुसलमानांनी आपल्यापुरती वाटल्यास ठेवावी. भाषेच्या वा लिपीच्या अैक्यासाठी अेकमेकांच्या पायात पाय अडकविल्याने दोघांचीही प्रगति खुंटेल, वाद वाढेल, अुणावणार नाही. राष्ट्रांत दोन भिन्न प्रवृत्तींच्या हिंदुमुस्लिम संस्कृति जोवर आहेत तोवर दोन भाषा नि दोन लिपि राहणारच. त्याला अुपाय नाही, त्याची चिंताही नाही. हिंदूंनी मात्र चक्क निर्धार करावा की, आमची राष्ट्रलिपि नागरी !! आपण पंचवीस कोटी हिंदु जर अेकमुखाने हा निर्णय अुद्घोषवू आणि आपल्यापुरती अेकच राष्ट्रभाषा नि अेकच राष्ट्रलिपि करून सोडू, तर अितरांनी काय वाटेल तें केलें तरी ह्या हिंदुस्थानची अेकंदरीत अशी तीच राष्ट्रभाषा नि तीच राष्ट्रलिपि झाल्यावाचून राहणार नाही ही गोष्ट अगदी ठाम !

साहित्याचें ध्येय काय असावें ?

कार्यात्मक असें ह्या वर्षापुरतें महाराष्ट्र साहित्य संमेलनास मला जें काही सांगावयाचें होतें त्याचा शक्य तितका थोडा असा हा कार्यक्रम मी येथवर सांगितला. आता आपल्या अनेक साहित्यिक मित्रांनी मला जें काही तात्त्विक किंवा मतमतांतराचे प्रश्न विचारले त्यातील दोन चार प्रश्नांना अगदी त्रोटक अशी अुत्तरें देअून मी माझा हा निबंध संपविणार. पुष्कळांनी विचारलेला अेक मुख्य

प्रश्न म्हणजे 'साहित्याचें ध्येय काय असतें ?' तो प्रश्न तसा न मांडता 'साहित्याचें ध्येय काय असावें ?' असा मांडला असता तर त्याचें अुत्तर अधिक निश्चितपणे मला देता येअील.

ध्येय कोणतें ?

ध्येयाचा प्रश्न आला की, त्यात लहरीच्या, हौशीच्या, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षा कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यत: अनुस्यूत झालेला असणार. अर्थात् जीवनाच्या सामूहिक कर्तव्याची जी व्याख्या तीच, त्या जीवनाचें जें अेक अुपांग सारस्वत, त्याचीही व्याख्या, त्याचेंही ध्येय असलें पाहिजे. मानवी जीवनाच्या भौतिक ध्येयाची मला पटलेली व्याख्या ही आहे की, मनुष्यजातीचें अधिकांत अधिक हित ज्यायोगे साधता येतें तेंच मनुष्याचें अैहिक कर्तव्य होय. तात्कालिक कर्तव्यही त्याच न्यायाने असें की, प्राप्त परिस्थितीत त्या त्या काली मनुष्य जातीचें जें अधिकात अधिक हित साधता येअील तें तें साधावें. या दृष्टीने साहित्याच्या परम वा तात्कालिक ध्येयाचीही व्याख्या अशीच असणार की, मनुष्य जातीच्या अधिकात अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेंच साहित्य श्रेष्ठ, तेंच सुप्रासंगिक. आनंद नि करमणूक हीं मानव हितास काही प्रमाणात हितकारकच असल्यामुळे त्यांचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणात वरील ध्येयात होतोच. पण केवळ करमणूक हें काही कर्तव्य नव्हे. घरात आअी मरणान्तिक वेदनांनी अंथरुणास खिळली असता, जर अेखादा वहकलेला कलावंत बंगल्यात नायकिणीच्या नाचात रमू शकला तर त्यास कलावंत म्हटलें तरी कुलदीपक काही म्हणता यावयाचें नाही ! कारण खऱ्या कलावंताला तशा वेळी ती कलाच विकल केल्यावाचून राहणार नाही ! तशा स्थितींत ती त्याला केव्हाही आनंदविणार नाही, तर अुलट अेखाद्या कलाहीन माणसापेक्षा अधिक अुत्कटतेने व्याकुळवील !

वास्तव-वाङ्मय नि ललित-वाङ्मय

माझ्या सोयीसाठी मी वाङ्मयाचे वस्तुनिष्ठ नि रसनिष्ठ असे दोन भाग करतो. कारण मला विचारलेल्या अनेक प्रश्नांचीं अत्तरें त्यांत आपोआपच दिलीं जातील, वस्तुनिष्ठ वाङ्मयात तत्त्व, गणित, ज्योतिष, विद्युत् अितिहास अित्यादि विज्ञानांचा समावेश होतो. त्यात सत्य काय तेंच यथावत्पणे सांगितलें पाहिजे. त्यातही रस येअील, पण तो आणण्यासाठी कल्पनेस काही मुळात नसलेले कल्पित रंग भरता यावयाचे नाहीत. वस्तुनिष्ठ वाङ्मय हें वस्तूचें छायाचित्र; चित्र नव्हे. परंतु ललित वाङ्मय हें कल्पित रंग भरलेलें चित्र होय; रसोत्कर्ष हाच त्याचा विशेष. वस्तुनिष्ठ वाङ्मयात जो दोष तो, कल्पनेची मनसोक्त भरारी हा, रसनिष्ठ वाङ्मयाचा गुण होअू शकेल. वस्तुस्थितीत न सापडणारीं पात्रें, भूमिका,

रंग, यांची ने-आण रसनिष्ठ वाङ्मय आपल्या अभिप्रेत भावनांच्या अुत्कर्षास्तव कल्पनासृष्टीतून करू शकतें. नाट्य, काव्य, कादंबरी, कथाकल्पात्मक वाङ्मयाचा हा रसनिष्ठ प्रांत तेंच सारस्वत.

पावित्र्य विडंबनाची कसोटी

वास्तव वाङ्मयाचें कर्तव्य सत्यकथन. वस्तुस्थिति, वैज्ञानिक परिस्थिति यांचें यथार्थ ज्ञान मनुष्याच्या हितास अत्यवश्य. यास्तव हें वाङ्मय, साहित्याच्या आम्ही वर दिलेल्या ध्येयास सुसंगतच असणार. त्यायोगे जुन्या वा नव्या कल्पनांना आणि भावनांनासुद्धा धक्का वसला तरी चालेल. ज्या भावना वा कल्पना, मग त्या जुन्या असोत वा नव्या असोत, सत्यावर अधिष्ठित असतील त्याच टिकाअू ठरणार. पावित्र्यविडंवनाचा प्रश्नही याच दृष्टीने परीक्षिला पाहिजे. पूर्वी कित्येक पवित्र वा धर्म्य वाटणाऱ्या गोष्टी, आज सत्य वस्तुस्थिति अुमगल्यामुळे चुकीच्या ठरलेल्या आहेत. कुराणातील, पुराणांतील वा बायबलातील पृथ्वीच्या आकाराच्या, सूर्यचंद्रांच्या रचनेच्या, गतींच्या वा ग्रहणांच्या नि त्यावर आधारलेल्या धार्मिक रूढि पहा ! त्या असत्य आहेत म्हणून ज्यांनी प्रथम म्हटलें, त्यांचा ख्रिस्ती-धर्मीयांनी पावित्र्य-विडंवनाचे नांवे कसा छळ केला हें आपणांस माहीत आहे. पण आज त्या असत्य आहेत हें मुलाबाळांसही त्याच युरोपात शिकविण्यात येत आहे. या प्रकारच्या मागच्या अनेक अनुभवांवरून आपण सर्वांनी हा धडा शिकला पाहिजे की, सत्यजिज्ञासेने वा तथ्य-प्रतिपादनाचे हेतूने, जें मत कोणी प्रस्थापू पाहतो त्यास शक्य तो प्रतिबंध नसावा; लेखन वा अुपदेश यांचें स्वातंत्र्य असावें. त्यायोगे जर पावित्र्यविडंवन होतें असें कोणास वाटेल तर त्यांनी त्याचें तें मत चुकीचें आहे, असें अुलट बाजूने साधार प्रतिपादन करावें, म्हणजे त्याच्या विडंबनाची विटंबना झाल्यावाचून राहणार नाही. त्याचें म्हणणें सत्य वा तथ्य ठरेल तर आपण भलत्याच असत्य वा अतथ्य गोष्टीला पावित्र्य दिलेलें होतें हें आपल्या लक्षात येअील. सत्याकडे नि तथ्याकडे मनुष्याची अधिक प्रगति होअील.

नवमतवाद नि पुरोगामी वाङ्मय

तीच गोष्ट आज ज्याला नवमतवाद वा पुरोगामी साहित्य अित्यादि नांवें देण्यात येतात त्याविषयीही लागू आहे. कोणतीही गोष्ट केवळ नवी आहे म्हणूनच ग्राह्य वा त्याज्य ठरत नाही. नवें मूल जन्मास आलें म्हणजे तें आअीपेक्षा अनुभवी वा बापापेक्षा शहाणें असतें असें नाही. कोणतेंही वाङ्मय नुसतें पुरोगामी आहे म्हणूनच काही सत्य वा तथ्य ठरेलच, असें गृहीत धरता येत नाही. आअीच्या पुढे दुडदुड धावत जाणारें पुरोगामी मूल खड्ड्यातही पडण्याचा संभव असतो. लक्ष्याच्या पुढे निघून जाणारी गोळी पुरोगामी असली तरी चुकलेली ठरते. वास्तव-वाङ्मयाचें

जें साध्य तें सत्य वा तथ्य; त्याच्या कसोटीस तीं नवमतवादी वा पुरोगामी मतें कितपत अुतरतात, कोणत्या तरी नव्या सत्यास वा तथ्यास तीं आविष्कारीत आहेत किंवा नाहीत, या प्रश्नावरच त्यांचा चांगुलपणा वा टाकाअूपणा ठरणारा आहे. पण तें ठरवावयाचें तर त्यांना त्यांचा पक्ष यथावत् मांडू दिला पाहिजे. तीं नवीं वा पुरोगामी म्हणून हुरळूनही जाता कामा नये, किंवा जुन्याविरुद्ध वा अुच्छृंखल वाटतात म्हणून त्यांचीं अेकदम मुस्कटदाबीही करता कामा नये. जर तीं अशीं वाटतील तर त्यांच्यांतील तो अुच्छृंखलपणा वा अतथ्य अुघडकीस आणणारे नि जुन्यातील सत्य प्रस्थापित करणारें विरुद्ध साहित्य प्रतिपक्षाने निर्मावें, हाच त्यावर अुपाय. साहित्यात दोघांनाही स्थान हवें. कारण अनेक वेळा नवीं मतें हीं अुपद्व्याप न ठरता जुन्या अपायकारक अंधेरात घुसलेलीं प्रकाशाचीं नि आरोग्याचीं किरणेंही ठरलेलीं आहेत ! आज आपल्या साहित्यात नव्यानेच अुगवलेल्या साम्यवादी वा काम्यवादी मतांचेंही तसेंच स्वागत नि तशीच छाननी झाली पाहिजे. ही साम्य-वादी वा काम्यवादी नवमतें चांगलीं कीं वाअीट याविषयी जे प्रश्न मला विचारण्यात आले आहेत ते साहित्यविषयक असणाऱ्या या अशा निबंधाच्या कक्षे-बाहेर आहेत. तो प्रश्न अर्थ, समाज, काम नि मानस या शास्त्रांचाच होय.

साम्यवादी का काम्यवादी ?

त्यातील अेका प्रश्नाचा मात्र साहित्याशी संबंध पोचतो. मराठी वा कोणतेंही साहित्य हें केवळ अर्थशास्त्राचा वा केवळ कामशास्त्राचाच प्रपंच आहे, यच्चयावत् साहित्याचीं मुळें भांडवल सत्ता नि श्रमिक सत्ता यांच्या विरोधात वा सुप्त नि जागृत कामवासनांतच काय तीं रुतलेलीं असतात असा सिद्धान्त जर कोणा मांडू लागला तर तो मात्र अेकांगी नि अेककल्ली ठरल्यावाचून राहणार नाही, अितकें अिथे सांगितलें की पुरें. मनुष्य म्हणजे काही त्याचें पोट नव्हे. त्याला अनेक अिंद्रियें आहेत, अेकच अिंद्रिय नाही. त्या सर्व अिंद्रियांची, त्यांच्या विषयांची नि त्यांच्या रसांची क्रिया-प्रतिक्रिया, विरोध-विकास, मनुष्याच्या जीवनात साठविला जात आहे. तीच स्थिति, त्याच कारणासाठी, त्याच्या साहित्यातही प्रतिबिंबित झाली. साऱ्या साहित्याच्या विकसनाची फोड केवळ धनवान् नि निर्धन यांच्या किंवा अुत्पादन-साधनांच्या किंवा कामतृष्णेच्या दृष्टिकोनानेच तेवढी करता येणारी नाही. यद्यपि त्या विधेयांचे (Points) धागेदोरेही मनुष्याच्या जीवनात लांबवर विणलेले आहेत, तरी त्या अेकेरी अेकाच धाग्याने काही तें जीवन वा वाङ्मयीन व्यक्तीकरण जें साहित्य, तें विणलेलें नाही. ज्ञानेश्वरी हा भांडवलसत्तेचा अेक डाव काय तो होता, किंवा बुद्धाचा राज्यत्याग हा साम्यवादाचाच काय तो पुरस्कार होता; किंवा योगसूत्रें हीं श्रमिकाना धनिकांचा छळ कळू नये म्हणून जाणून-बुजून खाअू घातलेली अफूची गोळी होती किंवा शंकराचार्यांचें महाभाष्य हें

त्यांच्या अतृप्त कामवासनांची अेक विकृति काय ती होती, असें समजणें म्हणजे वेदकालातील अग्निपूजेच्या सर्व स्तोत्रांची अुपपत्ति, भाकरी भाजण्यास अग्नि अुपयोगी पडतो, या अेकाच अेकांगी सत्याची काय ती जाणीव होती, असें समजण्यासारखें अगदी अेकांगी नि अेककल्ली ठरल्यावाचून राहणार नाही.

तरी सुद्धा विरोधविकासवादाच्या दृष्टिकोनातून काही जुनीं सत्यें नव्या मांडणीत थाटण्याच्या वा नवीं सत्यें जुन्यांच्या दृष्टिपथात आणण्याच्या कामी, अशा अेकांगी प्रचाराचाही अुपयोग होत आहे आणि म्हणूनच वास्तव साहित्यात पडणारी त्यांची भर आपण सर्वांनी प्रथम स्वागतिली पाहिजे. आणि लगोलग त्यांची नीरक्षीरविवेकाने छाननी करणारें वाङ्मयही प्रसिद्धीत राहिलें पाहिजे. नुसतें पावित्र्यविडंवन म्हणून त्यास शापीत राहण्यात अर्थ नाही. कोणा व्यक्तीची वा समाजाची केवळ मानहानि, केवळ अुपमर्द वा केवळ हानि करण्याच्याच दुष्ट बुद्धीने ओंगळ वा असभ्य भाषेंत जें लिहिलें जाअील तेवढेंच वाङ्मय काय तें अनैबंधिक (बेकादेशीर) वा अप्रसिद्धेय समजलें जावें. या सर्वसाधारण सूचनेपेक्षा या विषयाची अधिक फोड करण्यास येथे वाव नाही.

रसनिष्ठ वा कल्पनानिष्ठ अशा वाङ्मयाच्या दुसऱ्या भागासही, ललित-वाङ्मयासही वरील चर्चाचि बहुतांशी लागू आहे.

सयमक नि निर्यमक काव्य

निर्यमक काव्याविषयी ज्या मित्रांनी मला कित्येक प्रश्न विचारिले आहेत त्यांना विनंती की, यासंबंधी माझीं मतें मी 'रानफुलें' या पुस्तकास अेक स्वतंत्र परिशिष्ट जोडून त्यात सविस्तर ग्रथिलीं आहेत, तीं जिज्ञासूंनी पहावीं. मला स्वत:ला अर्थास बाध न आणणाऱ्या प्रासांची नि यमकांची भारी हौस आहे. यमक हें रसाला प्रतिकूल न होअील अशा कौशल्याने जर सहजासहजीच्या ओघात योजता आलें तर तें कवितेची शोभा वाढवितें; रसोत्कर्षाला साहाय्यक होतें. काव्यशैलीचा तो विकास आहे; पूर्वीच्या निर्यमक कवितेला खुलविणारा तो अेक नवा अलंकार आहे. पण तरीसुद्धा काही सुविशाल गुंफणीच्या नि वक्तृत्वपूर्ण भावनांना वा विचारांना व्यक्तविण्यास Blank verse सारखी निर्यमक वृत्तेंच अुपयोगी. सयमक वृत्तांत येणारा अेकसुरीपणा पण अशा प्रसंगी टाळता यावा यास्तवच मी निर्यमक अशा 'वैनायक' वृत्ताची घडण केली आहे; मुक्तछंदादि वृत्तें हीं निर्यमकांचींच वृत्तान्तरें होत. ती सापेक्षत: दुय्यम चर्चा करण्याची मला संधि मिळती नि आजच्या स्थितीत त्यातच गुरफटून घेणें अप्रासंगिक वाटलें नसतें, तर मी वैनायक वृत्ताचा प्रचार करण्याची माझी हौस फेडून घेतली असती; पण आपल्या बहुमूल्य वृत्तभांडारात विशिष्ट प्रसंगांना अधिक अनुकूल अशा अाणखी अेका वृत्ताची भर,–अितकेंच काय तें मी त्या

वैनायक वा मुक्तछंदादि निर्यमक वृत्तांचें महत्त्व मानीत असल्याने आणि तें कार्य मला स्वतःपुरतें तरी आजच्या परिस्थितीत अगदी दुय्यम-तिय्यम वाटत असल्याने मी त्यात येथे अधिक वेळ घालीत नाही.

साहित्याचें सापेक्ष महत्त्व

आणि आता सरतेशेवटी मला हें सांगितल्यावाचून गत्यंतरच दिसत नाही की, केवळ यमक वा काव्य वा कादंबरीच नव्हे तर स्वतः सांगोपांग साहित्य हेंही आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितीत मला तरी दुय्यम-तिय्यम कर्तव्यच वाटत आहे. साहित्यिक सज्जनहो, विज्ञहो, सुज्ञहो ! राष्ट्रातील तुम्ही विज्ञ आहात, सुज्ञ आहात म्हणून मी तुम्हांसच विचारतो की, साहित्यासाठी जीवन आहे की जीवनासाठी साहित्य ? जर आपलें राष्ट्रीय साहित्य—आणि अशा सामुदायिक संमेलनात साहित्याचा सामूहिक अूहापोह मुख्य कर्तव्य असणार !— जर आपलें सामूहिक, आपलें राष्ट्रीय साहित्य हें राष्ट्रीय जीवनाचें अेक अुपांगच काय तें असेल, तर राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य-चिंता, मुख्य साध्य असलें पाहिजे. अगदी कलेसाठी कलेचा जो कलावन्त अुपासक आहे वा साहित्यासाठीच साहित्याचा जो साहित्यिक भक्त आहे, त्याच्याविषयीही मला आदरच वाटेल. पण असें कलेसाठीच कलेची अुपासना करणारे साहित्यिक अेखाद्या नाटचगृहात नाटच-नृत्यसंगीताच्या भर रंगात अगदी दंगले असतानासुद्धा जर त्या नाटकगृहास अकस्मात् आग लागली तर कलेसाठी कलेला झिडकारून ते तत्क्षणी त्या आगीतून जीव बचावण्याच्याच मार्गास तडकाफडकी लागतील, कां त्या संगीताचा तन्मय ताल धरीत तेथेच डुलत राहतील ? त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्राणावरच बेतली असता केवळ साहित्याची कथा काय ?

परराष्ट्राकडे पहा

आपल्या राष्ट्राची आजची मृत्युंजय मात्रा म्हणजे त्याचें शस्त्रबळ; साहित्य नव्हे ! जपानात प्रत्येक प्राथमिक शाळेत मुलामुलींना प्रथम सैनिक शिक्षण सक्तीने देण्यात येतें. अलंकारशास्त्राचें नंतर ! आजकाल आयर्लंडात प्रत्येक दैनिकात पहिल्याच पानावर डी व्हॅलेराच्या आज्ञेने मोठमोठ्या अक्षरांत प्रसिद्धकें फडकत आहेत — " Wanted recruits " ! सैनिक हवेत ! — साहित्यिक नव्हे ! ! अिटलीत तर पाळण्यांतील मुलांना काय तें सैनिक शिक्षण अद्याप आवश्यक केलेलें नाही ! बाकी बालक पायावर चालू लागलें की ' बालिरत्ना ' तुकडचांतून त्याला लहान बंदूक खांद्यावर घेअून सैनिक संचलन शिकविलें जाअू लागतें. तरुणांना मशीनगन्स प्रभृतींचीं सैनिक तंत्रें ! —लघुकथांचीं तंत्रें नव्हेत ! ऑस्ट्रियाची मरणाची किंकाळी अैकलीत ना गेल्या महिन्यातच ? शेवटच्या प्राणत्याग-पत्रांत त्याच्या

शेवटच्या अध्यक्षाने शेवटचें वाक्य अुच्चारलें ! 'We yield under German swords' — not under German sonnets ! आणि आपण ! जपानच्या, रशियाच्या, मुस्लिम राष्ट्रांच्या वाँबफेकीच्या वैमानिक हल्ल्याची आगलावी काळछाया ज्या मुंबअीवर दाट पसरत चालली आहे, त्या मुंबअीत या साहित्य-संमेलनातील नृत्यनाट्यगीतांत रंगून गेलो आहोत ! ज्या मुंबअीत गल्लोगल्लीत जीर्ण साहित्य, नव साहित्य, पुराण साहित्य, पुरोगामी साहित्य, सयमक मंडळें, निर्यमक मंडळें थाटून राहिलेलीं आहेत; लक्षावधि तरुण-तरुणी अेक आणा मालेपासून सोळा आणे मालेपर्यंतच्या कादंबऱ्या वाचण्यात गढून गेलीं आहेत, — त्या मुंबअीत म्हणण्यासारखा रायफल क्लब असा अेकही नाही. सबंध मुंबअी अिलाख्यात सैनिक कॉलेज औषधालासुद्धा नाही ! अेक हाताची गुप्ती अेका काँग्रेसवाल्याजवळ सापडली म्हणून पुण्याला परवा त्याला बंदिवासाची कडक शिक्षा काँग्रेसच्या सरकारने दिली ! सरकार अहिंसक म्हणावें तर, सरकारी लाठीमार नि गोळीवार प्रजेवर मात्र प्रत्यही चालू आहेत ! त्यावाचून सरकार चालू शकणार नाही असें तेच म्हणतात !

शस्त्रबळ प्रथम, शास्त्रबळ नंतर

चीन मेला तो त्यात वाङ्मयीन साहित्य नव्हतें म्हणून मेला नाही—तर सैनिक साहित्य नव्हतें म्हणून ! आपलें हें अेवढें विस्तीर्ण भारतीय राष्ट्र आज जगतात निर्माल्यवत् जें होअून पडलें आहे तें आपलें साहित्य अुणें म्हणून नव्हे – शस्त्रबळ अुणें म्हणून ! ही गोष्ट सगळ्या आधी, साहित्यिकहो, तुमच्या लक्षात आली पाहिजे ! सगळ्यांत साहित्यिक वर्गच सुज्ञ, विज्ञ असणार ! म्हणून सगळ्या आधी तुम्ही गर्जून अुठा की, आजच्या परिस्थितीत आमचें राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ ! शास्त्रचर्चा नव्हे ! जें थोडें साहित्य हवें तें तुम्ही–आम्ही जे चाळिशीच्या वर गेलेले लोक, ते काय तें हवें तर पुरवितील ! माझा हा साहित्यिक निबंधसुद्धा त्या पाठीचा कणा वाकलेल्या वाक्पीठ वृद्धांपुरताच आहे; शेष जे तरुण, ज्या तरुणी, जी पाठीचा कणा ताठ असलेली पुढची पिढी त्या साऱ्यांना माझा या साहित्यपदावरून हाच निर्वाणीचा आदेश आहे की,

राष्ट्रास आज साहित्यिक नकोत ! सैनिक हवेत ! !

तरुणहो, आमच्या दुर्बळ पिढीच्या देखोदेखी सुनीतें नि कादंबऱ्या लिहिण्याकरिता लेखण्या सरसावू नका. तर त्या जपान, अिटली, जर्मनी, अिंग्रज, आयरिश तरुणांच्या देखोदेखी आधी बंदुका सरसावा ! आज राष्ट्रीय शस्त्रबळ हें मुख्य कर्तव्य, राष्ट्रीय साहित्य हें तिय्यम ! राष्ट्रसंरक्षणार्थ प्रथम रायफल क्लबात घुसा; रडगाण्यांच्या नि रडकथांच्या साहित्यसंमेलनात नंतर, वेळ राहिल्यास !

जसें राष्ट्र तसें साहित्य

साहित्यासाठीसुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळलें पाहिजे. कारण जें राष्ट्र खुरटें, दुबळें, त्याचे साहित्यिक खुरटे नि दुबळेच असणार. ज्या दुबळ्या राष्ट्राला परक्यांची प्रबळ दारू आग लावते, त्याच्या साहित्यालाही कशी आग लागतें तें तक्षशिलेला विचारा, नालंदेला विचारा! मुस्लिम तवारिखा अैटीत सांगतात की, खिलजी राजवटीत नालंदा विध्वंसिली गेली तेव्हा त्या प्रचंड अेशियाटिक ग्रंथभांडारास त्यांनी जी आग लावली ती तीन महिने धुमसत होती–हजारो ग्रंथ जळत होते!! अुलटपक्षी, त्यांना लिहिता येत होतें की नव्हतें याचा पुरावा धुंडाळावा लागतो, अितके शिवराय होते अेक तुच्छ साहित्यिक! पण म्हणून जर ते युगधर्म न ओळखता सुनीतें रचीत बसते, किंवा नुसतीं रणगीतें खरडते तर आज मराठी साहित्याची दुर्गति सिंधी, पंजाबी साहित्यासारखीच होती कीं नाही तें ध्यानात आणा! तिकडे जसा गायत्रीमंत्र-सुद्धा 'अले पे बे 'मध्ये अुलटा लिहावा किंवा वाचावा लागतो, तसा महाराष्ट्रातही वाचावा लागता. 'ज्ञानेश्वऱ्या' ज्ञानेश्वराच्याच भाअुबंदांनी जाळून टाकून हाती कुराणें धरलीं असतीं. नेवाशाला ज्ञानेश्वराच्या भिंतीची मशीद करू पाहणारे आजचे कित्येक मुसलमान पूर्वीचे हिंदुच होते हें विसरू नका! पण युगधर्म ओळखून, शिवाजीने सरस्वतीचे रक्षणार्थंच सरस्वतीकडे काही काळ पाठ फिरवून शुंभ-निशुंभ-मर्दिनीचीच अुपासना केली; लेखणी टाकून भवानी अुचलली म्हणून तर आज महाराष्ट्र सारस्वत असा काही पदार्थ जिवंत राहिला आहे!

लेखण्या मोडा, बंदुका अुचला

तुमच्या डोळ्यांसमोर तुमच्या विद्यापीठातून श्रीची नि सरस्वतीची विटंबना कां? विद्यापीठाच्या दाराशी अष्टायुधधारिणी दुर्गा पहारा देत नव्हती म्हणून! सरस्वतीचा अेक अुपासक या नात्याने मी तुम्हांस सांगतो की, आपल्या तरुण पिढीने आता लेखणी मोडून टाकावी आणि बंदूक अुचलावी! साहित्यिक बनू नये तर आधी बनावें सैनिक! मी ज्या ज्या साहित्यसंमेलनात अध्यक्ष म्हणून गेलो, त्या त्या ठिकाणी जाताच शरीराच्या सनकड्या झालेलीं आमचीं तरुण मुलें, मुली–कोरीकरकरीत कोणती तरी कादंबरी, कथा, काव्य हातात घेअून जेव्हा शेकड्यांनी येता-जाता मला दिसत, त्यात दिवसरात्र तन्मय होताना आढळत, तेव्हा माझ्या हृदयाला खरोखरच चरका बसत आला; अध्यक्षपदी मान लाजेने खाली घालावी लागली. वाटे, आपणही या पापाचे वाटेकरी होत आहोत! यास्तव मी आपणांस स्पष्टपणे सांगतो की, राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत साहित्याचें सापेक्ष महत्त्व तिय्यम आहे आणि तरुण पिढीचें पहिलें कर्तव्य आहे सैनिक

संग्रहालय ना. स्मृतिग्रंथ
(९७५) वि: ...निबंध
.....४८८ समग्र सावरकर वाङमय – ४ वाङमयविभाग

शिक्षण—दुसऱ्याला अुपद्रव देणारें नव्हे, नुसतें वैमनस्य शिलगविणारें नव्हे पण स्वसंरक्षणाचें नैर्वधिक (कायदेशीर) कर्तव्य बजावणारें, असलेल्या वैमनस्यास आपल्याला अुपद्रव देण्याची छातीच ज्यायोगे होअू नये असें स्वराष्ट्रसंरक्षक शस्त्रबळ आम्हांस हवें आहे.

हें मला पाहवत नाही

पुढील दहा वर्षांत सुनीतें रचणारा अेकही तरुण न निघाला तरी चालेल. प्रत्यही साहित्य-संमेलनें न झालीं तरी चालेल, पण दहा दहा हजार तरुण सैनिकांच्या वीर-चमू आपल्या खांद्यावर नव्यातील नव्या रायफली टाकून, राष्ट्राच्या मार्गामार्गांतून, शिबिराशिबिरांतून टप्टप् करीत संचलन करताना दिसल्या पाहिजेत ! ग्रंथालयाअितकी तरी, बौद्धिक कॉलेजांअितकी तरी नगरा-नगरांतून सैनिक कॉलेजें गजबजलेलीं आढळलीं पाहिजेत ! मग अधूनमधून त्यांनी अेखादी कादंबरी वा प्रेमकथा वाचली वा सुनीत लिहिलें तरी चालेल नेपोलियनही रणांगणावर करमणूक म्हणून शीळ वाजवी. 'दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून' आल्यावर पहिले बाजीरावही मस्तानीच्या अंत:पुरात अेखादें पान खाताना आढळत ! पण जन्मभर नुसतीं झाडांचीं पानेंच चघळणाऱ्या आणि तमाशांतील तबलेच झडत राहिलेल्या दुसऱ्या बाजीरावाचें अेक ब्रह्मावर्तच या राष्ट्राने बनावें – हें मला पाहवत नाही.

साहित्यिक हो, आजच्यासारख्या प्रसंगी साहित्यिकांचेंही प्रासंगिक कर्तव्य तें हेंच होय असें मीच काही म्हणत नाही, तर साहित्यिकांचा सम्राट् जो व्यास तोही म्हणतो की, शास्त्री-साहित्यिकांचा म्हणजेच जो ब्राह्मणांचा वर्ग त्यासुद्धा —

अमर्यादप्रवृत्ते च शत्रुभिस्संगरे कृते ।
सर्वे वर्णाश्च दृश्येयु: शस्त्रवन्तो युधिष्ठिर ॥

कारण साहित्यापुरतें पाहिलें तरी हेंच खरें आहे की—

शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिन्ता प्रवर्तते ॥

✦ ✦ ✦

३१. युरोपीय महायुद्ध व हिंदु महासभा

"आज मला चुकल्याचुकल्यासारखें होत आहे. मी सुटल्यापासून पुण्याला दोनतीनदा आलो आणि त्या प्रत्येक वेळेला सेनापति बापट गायकवाडवाड्यापासून तों मी स्टेशनवर पोहोचेपर्यंत माझ्याबरोबर असत. अेखादे वेळी आम्ही जरा पुढे

गेलो तर ते मागून हाक मारून म्हणायचे 'अरे, अरे, मी राहिलो आहे ना! ज्या मोटारीत सावरकर आहेत, त्या मोटारीत माझी जागा राखून ठेवलेलीच आहे.' माझ्या व्याख्यानाचा विषय त्यांना अनुकूल असो अगर नसो, ते माझ्यावरोवर व्यासपीठावर हजर असावयाचेच, पण आज ते माझ्यावरोवर येथे नाहीत, आज मला पहिल्या प्रथम जर कोणाची आठवण होत असेल, तर ती सेनापति बापट यांची होय. त्यांना अेक वर्षाची सजा झाली आहे. अशा प्रकारच्या शिक्षा देऊन देशातील असंतोष कमी होईल अशी जर सरकारची समजूत असेल, तर ती चूक आहे. महासभेच्या कार्यकारी मंडळाने या वाबतीत ठराव करून स्पष्टपणे बजाविलें आहे की, अशा धरपकडीमुळे देशातील अशांतता जास्तच वाढेल. सेनापतींना पांच वर्षाची सजा द्यावी असें सांगण्यात आलें होतें. कारण काय तर त्यांना पूर्वीच्या शिक्षा आहेत. होय आहेत, आणि तेंच तर तें कारण आहे की, ज्यामुळे ते आज लोकांच्या अंत:करणात विराजमान झाले आहेत. त्या पुरुषाला स्वदेशासाठी कष्टत असता अनेकवार शिक्षा भोगाव्या लागल्या. त्यांचे माझे मार्ग भिन्न असतील; पण त्यामुळ त्यांचा आमचा विरोध नाहीं, दोघांचें अुद्दिष्ट एकच आहे. मी नाशिकच्या गाडीने निघालो तर ते कलकत्याच्या गाडीने निघाले. दोघांचेंही ध्येय अेकच आहे आणि अशा स्थितीत अेकाला अपघात झाला, तर दुसऱ्याचें हृदय तळमळल्या-वाचून रहाणार नाही."

वरील प्रास्ताविक अुद्गारांनंतर 'महासभा नि महायुद्ध' या विषयाकडे स्वातंत्र्यवीर वळले. ते म्हणाले: "हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितीत, या कोटी-कोटींच्या देशात, महासभा काय, राष्ट्रसभा काय किंवा महाराष्ट्र सभा काय यांनी काही योजना आखावी अशी परिस्थिति नाही. येअून जाअून काय तर कोणाचा कार्यक्रम पंगु याची तुलना करावयाची. जन्मजात अंधळ्यांनी आपल्या अंधत्वाची दुसऱ्याच्या अंधत्वाशी तुलना करण्यासारखेंच हें आहे. या पंगूपणाचे आपण सर्वच जण भागीदार आहोत. तो पंगूपणा घालविण्याचे प्रामाणिक प्रयत्न आपण सर्वांनी केले पाहिजेत, मग ते प्रयत्न फॉरवर्ड ब्लॉक म्हणून करा की बॅकवर्ड ब्लॉक म्हणून होअू द्यात. आपण पंगु आहोत याचा अर्थ आपण अुद्योग सोडले पाहिजेत असा नाही. 'पंगु लंघयते गिरिम्' असेंही घडू शकतें. हिटलरचेंच अुदाहरण घ्या ना. वीस वर्षांपूर्वी हाच हिटलर तुरुंगात पडला असताना, देशाची स्थिति पाहून ढसढसा रडत होता असें त्याने आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेविलें आहे. तो मनाचा अत्यंत हळवा आहे. अनेक वेळा त्याच्या आयुष्यात हें करू कीं तें करूं असे प्रसंग अुद्भवले आहेत आणि त्याला रडू कोसळलें आहे. त्याने आत्महत्येचेही तीनदा प्रयत्न केले होते. आजचा जर्मनी १२ वर्षांपूर्वी हिंदुस्थानप्रमाणेच पंगु होता. आज ज्याप्रमाणे महायुद्धाच्या राजकारणाची चर्चा करायची आपल्याला लाज वाटते त्याचप्रमाणे तेव्हाच्या जर्मनीला युरोपीय राजकारणाची चर्चा करायला लाज वाटत

असे. पण हिटलरच्या प्रयत्नांनी तें राष्ट्र आज वर आलें. जर्मनीच्या अुदाहरणाप्रमाणें हें राष्ट्र देखील तसेच प्रयत्न करीत गेलें तर आज ना अुद्या आपण गिरि लंघू शकू. आपल्या राष्ट्राची परंपरा पांच हजार वर्षें नुसती जिवंत नाही तर नांदत आहे; नांदत आली आहे.

हिंदुमहासभा वोलून चालून अेवढ्याचकरिता प्रवृत्त झाली आहे की, या राष्ट्रात नांदत असलेलें खरें राष्ट्र जें हिंदुराष्ट्र तें कायम राहिलें पाहिजे. हें धोरण कोणाला आकुंचित वाटो. पण हिंदुमहासभेचें धोरणच समजलें नाही असें मात्र यापुढे कोणालाही म्हणता येणार नाही.

मी जगाच्यापुढे मान ताठ करून हीच प्रतिज्ञा घेतली आहे. या जगात हिंदूंचा कोणी वाली असलाच पाहिजे.

जगाच्या सगळ्या राजकारणाची कसोटी, सत्याची कसोटी, असत्याची कसोटी, हिंसेची कसोटी, अहिंसेची कसोटी, ही अेकच असली पाहिजे. ती कसोटी म्हणजे हिंदूंचें कल्याण होअील तें सत्य, हिंदूचें अकल्याण तें असत्य. जगताचें काय होअील ? मानव्याचें काय होअील ? हे विचार मुख्य नाहीत ! तेही विचार आहेत पण ते विचार दुय्यम आहेत. सूर्य गेला तर काय होअील ! सूर्य विझला तर तो विझला म्हणून मला दुःख होणार नाही, तर हिंदूंना प्रकाश मिळणार नाही म्हणूनच मला दुःख होअील.

आजकाल आपलें कल्याण विसरणें हाच न्याय ठरला आहे ! स्वतःची माणुसकी विसरणें हेंच माणुसकीचें लक्षण ठरलें आहे !

महायुद्धाकडे हिंदुमहासभा अेकाच दृष्टिकोनाने वघते. तो म्हणजे महायुद्धामुळे हिंदूंचा किती लाभ होअील आणि किती हानि होअील हें पाहणें हा होय. राष्ट्रीय सभेच्या वतीने गांधी म्हणाले, लोकशाही राष्ट्रांवर संकट आलें असताना त्यांना अडविणें योग्य नाही, ते संकटात असताना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मला सोडवायचा नाही. What is even the freedom of India if Britain and France lose their freedom ? असें गांधी म्हणतात. नेहरूही चीनमधून नुकतेच परत आले होते. त्यांनीही नाझीझम प्रभृति हुकूमशाही वादांचा विरोध करणें हें हिंदुस्थानचें अेकमेव ध्येय असल्याचें घोषित केलें. या दोन प्रमुख पुढाऱ्यांनी प्रामाणिकपणाने हें धोरण प्रदर्शित केलें व त्याचेच प्रतिध्वनि अितरांच्या तोंडून दूरध्वनिक्षेपित झाले.

महासभेने निश्चित भूमिका मांडणारा पहिला ठराव या परिस्थितीत केला. चालू युद्ध हें अितर राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकरिता चाललें आहे, लोकशाहीकरिता चाललें आहे, हें युद्ध नैतिक आहे ही गोष्ट हिंदुमहासभा अमान्य करते सर्वंचजण स्वतःच्या संरक्षणासाठी, स्वतःच्या राष्ट्राच्या स्वार्थासाठी लढत आहेत. दहावा अवतार होअून जगाच्या अुद्धारासाठी काही कोणी लढत नाहीत.

जर्मनीने पोलंडवर स्वारी केली तेव्हा प्रे. रुझवेल्ट यांनी हिटलरला तार धाडून हें कृत्य योग्य नाही असें कळविलें होतें. मीही पण प्रे. रुझवेल्ट यांना तार करून, हिटलरप्रमाणेच हिंदुस्थानच्या बाबतीत तुम्ही इंग्लंडला तार करा असें कळविलें होतें. त्या तारेवरून तेथील पत्रांत अग्रलेखही आले होते. महासभेने या ठरावाच्या दुसऱ्या भागात आपलें धोरण काय असावें तें सांगितलें आहे. हिंदुस्थानाच्या बाबतीत व्हाइसरॉय, भारतमंत्री म्हणत आहेत की,तुम्ही अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवा म्हणजे आम्ही तुम्हांला स्वराज्य देतो—त्यांचें हें म्हणणें बांझेच्या मुलीच्या लग्नासाठी पैसे देतो म्हणण्यासारखेंच आहे. पोलंडच्या बाबतीत हिटलरनेही चेंबर्लेनला सांगितलें की, तुम्ही आधी हिंदुस्थान मुक्त करा, म्हणजे मी पोलंड मुक्त करतो. जगामध्ये प्रत्येक राष्ट्र आपल्या लाभासाठी सर्व काही करीत आहे. साम्राज्यें असलेलीं राष्ट्रें साम्राज्यरक्षणासाठी, साम्राज्यें नसलेलीं राष्ट्रें तीं संपादन करण्यासाठी लढत आहेत. नैतिक दृष्टीने तुम्हांला पाठिंबा देण्यास आम्ही बांधलेले नाही. तुम्ही तुमचे जीव वाचविण्याकरिता प्रयत्न करीत आहा, आम्ही आमचे जीव वाचविण्याकरिता या चौकटीत (ठरावाच्या) बसत असेल, तर काही सहकार्य करू.

मुसलमानांच्या पाकिस्तानच्या योजना आजच्या नाहीत, त्या १५-२० वर्षांपूर्वीपासूनच्या आहेत. किंबहुना त्या अहमदशहा अबदालीच्या काळापासूनच्या आहेत. या पाकिस्तानच्या कल्पनेला जें आजचें नित्याचें स्वरूप आलेलें आहे तें या युद्धामुळे आलेलें आहे. मी तुम्हांला सांगतो की, या बाबतीत इंग्लिश मुत्सद्द्यांशी बोलणीं चालणीं होऊन अलिखित करार झालेले आहेत. इंग्लिशांची हानि न होईल अशा बेताने व हिंदूंची कितीही हानि झाली तरी मुसलमानांच्या मागण्या पुरविण्यात येतील. यातून यादवीचें प्रकरण उद्भवण्याचाही संभव आहे.

हिटलर कॅलेपर्यंत येऊन पोचला आहे. अेक पत्र कॅले घेतलें म्हणतें, दुसरें पत्र कॅले घेतलें नाही म्हणून म्हणतें तर तिसरें पत्र कॅलेपर्यंत पोचला आहे असें म्हणतें. ब्रि. मुत्सद्दी लढाईच्या भयंकर पेचात सापडलेले आहेत. या वेळी गांधीजींनी सांगितलें, 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न दुय्यम आहे' I don't want to embarrass the British. कोणाची लढाअी आहे? ही काय गांधींची लढाअी आहे? He did not like to embarrass the Nizam. मग तिकडे हिंदूचें काहीही होवो. व्हाअिसरॉयसाहेबांनी आता नुकतीच विजयासाठी प्रार्थना करा असें सांगितलें आहे. प्रार्थना करायला मनुष्य केव्हा लागतो? प्रार्थना करायला सांगणें हें काही मोठें शुभ लक्षण नव्हे! आतापर्यंत ख्राअिस्टची आठवण कोणालाच नव्हती. मला तर ख्राअिस्टची ींव येते. कारण त्याचीं हीं दोन्ही कोकरें आपापल्याला विजयप्राप्ति व्हावी म्हणून त्याची प्रार्थना करीत आहेत. अेका कानाने तो हिटलरची प्रार्थना अैकत आहे, त्याच्या दुसऱ्या कानात अिंग्लिशांची प्रार्थना शिरत आहे. कोणाची प्रार्थना तो अेकणार! मला वाटतें या प्रार्थनेवर ख्राअिस्ट काहीच बोलणार नाही, तो स्वस्थ बसेल.

युद्धाच्या या परिस्थितीत व्यवहाराला धरून, व गडबडीत फसून जाऊ नये असें धोरण महासभेने आखलें आहे. तें बुद्धिप्रधान आहे. जवाहरलालनी अेकदा सांगितलें, या वेळी सत्याग्रह करता कामा नये आणि लगेच पुन्हा दुसऱ्या ठिकाणी ते सांगतात, अिंग्लिशांचें तें काहीही जरी असलें तरी, आमचा स्वातंत्र्यसंग्राम आम्ही सोडणार नाही. अशी स्थिति होता कामा नये.

केवळ हिंदुस्थानच्या संरक्षणापुरताच महासभेचा महायुद्धाशी संबंध आहे व या संरक्षणापुरता संधि करायला हरकत नाही. केवळ पोथीतले शब्द वाचून राजकारणातील कोडीं सुटत नाहीत. अेखादा मनुष्य काल शत्रु होता म्हणून आज तो शत्रु राहीलच असें नाही किंवा काल मित्र होता म्हणून आज तो मित्र राहीलच असेंही नाही. अशा स्थितीत सांभाळून वेताने मैत्री ठेवावयास हरकत नाही. गेल्या युद्धातील फरान्सचा दोस्त अिटली आज नाही फरान्सच्या विरुद्ध आहे? आणि १९३५ साली रशियाला रोग म्हणून संबोधणारा हिटलर पोलंडच्या प्रश्नावर अेका रात्रीत रशियाचा दोस्त नाही का बनला ?

महासभेने आपल्या सहकार्यासाठी पुढे मांडलेल्या अटींत युद्ध संपताक्षणीच वसाहतीचें स्वराज्य मिळालेंच पाहिजे अशी मागणी केली आहे. वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणें म्हणजे तुमच्या स्वातंत्र्याच्या बाष्कळ बडवडीला कलंकच नाही का असें कोणी म्हणतील. पण ध्येय व वास्तववाद यात फरक आहे, आणि यात कलंक असला तरी, राजनिष्ठेच्या प्रतिज्ञा घेअून मंत्रिमंडळ स्वीकारण्याच्या कलंकापेक्षा तो खास कमी आहे.

महासभेचें दुसरें मागणें म्हणजे हिंदुस्थानचें अखंडत्व कायम राहिलें पाहिजे. आज पाकिस्तानची चळवळ जिवंत चळवळ आहे. ती खंबीर आश्वासनावर आधारलेली आहे. याचा अर्थ खाकसारांच्या फावड्यांनी हिंदुस्थान अुकरला जाअील असा नाही. खाकसारांच्या फावड्यांनी हिंदुस्थान अुकरावयाचा प्रयत्न म्हणजे फावड्यांनी हिमालय अुकरण्याच्या प्रयत्नासारखा आहे. जोपर्यंत हिंदु राष्ट्र अशी कल्पना ज्याच्या मनात आहे असा अेक हिंदु जिवंत असेल तोपर्यंत पाकिस्तान होणें शक्य नाही.

काँग्रेसने आझाद मुस्लिम परिषद स्वतःच्या खर्चाने भरविली. काँग्रेस मुसलमानांना मुसलमान म्हणून मानते तर तेवढाच न्याय हिंदूना हिंदु म्हणून कां देत नाही ? तुम्ही राष्ट्रीय असाल तर कोणालाच बोलू देअू नका. अर्थात् तुमच्यात तेवढी शक्ति असेल तर ! आझाद परिषदेचे ठराव काँग्रेसने उचलून धरले आहेत. आझाद परिपदेने मुसलमानी हिंदुस्थान असा तुकडा न पाडता सर्वच हिंदुस्थान आमचा आहे असें म्हटलें आहे अेवढेंच. आणि अेवढ्या शब्दापुरतें मी त्यांचें अभिनंदन करतो. आझाद परिषदेने अेवढें मात्र सांगितलें आहे की, मुसलमानांना काय हवें आहे हें सांगण्याचा अंतिम अधिकार मुसलमानांचा असला पाहिजे आणि

मुसलमानांना काय पाहिजे हें सांगणारे मुसलमान गटातून निवडून येणार आहेत, तर हिंदूना मात्र काय पाहिजे हें सांगण्याकरिता स्वतंत्र मतदार संघ नाहीत. अशा स्थितीत घटनापरिषदेत हिंदूंची काय दुर्दशा होअील याची कल्पना करा. मुस्लिम लीगचे जे प्रतिनिधि येतील ते पाकिस्तानची मागणी करणार, तर आझाद परिषदेचे मुसलमान येतील त्यांचें म्हणणें काँग्रेसने मान्य केलें पाहिजे; कारण मुसलमानांना काय हवें हें ठरविण्याचा अंतिम अधिकार त्यांच्या हाती आहे.

या परिस्थितीचा, तुम्ही कोणीही असा, राष्ट्रसभावादी वा सुभाषवादी असा, तुम्हांला जर हिंदु म्हणून जिवंत रहावयाचें असेल, तर विचार केला पाहिजे.

आज सारखे काँग्रेस आणि लीग, लीग आणि काँग्रेस असें ऐकू येतें. याचें कारण अेकच, नि तें म्हणजे काँग्रेस आज सत्तेला विरोध करीत नाही. काँग्रेसने जेव्हा विरोध केला तेव्हा त्यांनी तिला दमडीचेंही महत्त्व दिलें नाही.

गांधींनी चार वेळेला स्पष्टपणें सांगितलें आहे की, मुसलमानांनी पाकिस्तान मागितलें तर अशी कोठली शक्ति माझ्याजवळ आहे की, मी त्यांना अडवू शकेन ! मी स्पष्टपणे सांगतो. मी गांधींना ती शक्ति दाखवितो. ती शक्ति हिंदुमहासभा आहे.

मुसलमानांची पाकिस्तानची कल्पना म्हणजे केवळ पंजाब स्वतंत्र करावयाचा अशी नाही तर या देशात पंजाब, सिंध, बंगाल, निझाम अशीं स्वतंत्र मुसलमान राज्यें स्थापन करावयाचीं अशी आहे. या पाकिस्थानासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची घोषणा हुबळीच्या मुस्लिम लीग परिषदेत मुसलमानांनी केली आहे.

मी कर्नाटकच्या दौऱ्यावर गेलो होतो तेव्हा तेथले लोक म्हणाले, आमच्याकडे हिंदुमुसलमान काही नाही, सर्व ठीक आहे. त्याच कर्नाटकाच्या मुसलमानांनी हा ठराव केला आहे. मी मद्रासमध्ये गेलो तेव्हा तेथेही मुस्लिम लीगची परिषद झाली आणि फझलुल हक्कांनी सांगितलें की, मलबार हा अरबस्थानचा भाग आहे तो त्याला जोडला गेला पाहिजे. असें आहे काय? होय तर मग मीही आव्हान देतो. We shall annex Arabia to Malbar. आम्ही अरबस्थानच मलबारला जोडून घेअू. वचने किं दरिद्रता ?

शब्दांनी मनुष्य कसा फसतो याचें अुत्कृष्ट अुदाहरण गांधींच्या शब्दांत सापडते. ते म्हणतात 'मी जिनांचे राज्यात सुखाने राहीन. कारण, त्यांचें राज्य झालें तरी तें हिंदी राज्य आहे. हिंदी या शब्दाने कशी फसगत होते याचें हें अुत्कृष्ट अुदाहरण आहे. येथे राज्य केलेले औरंगजेब वगैरे हिंदीच होते. मग त्यांच्याविरुद्ध शिवाजी महाराजांना कां अुठावें लागलें ? आज त्यांना कोणी मार्ग चुकलेले देशभक्त Misguided Patriot असें म्हणतात. पण महाराष्ट्रात तरी त्यांना Misguided Patriot म्हणणारा कोणी नराधम नाही. हिंदुस्थानात राहणारे म्हणजे हिंदी असें म्हटलें, तर येथले साप, विंचू, वाघ हेही सर्व हिंदीच होतील; पण आपण त्यांना तसें मानतो का?

गांधीजींनी सर सिकंदरांचे पूर्वज ब्राह्मण होते व त्यांना त्यांचा अभिमान वाटतो असें म्हटलें होतें. गांधींच्या या उद्‌गारांवरून मुस्लिम लीगच्या ईस्टर्न टाअीम्स या पत्राने त्यांच्यावर बदनामीची फिर्याद करण्याची चळवळ चालविली आहे. आपण आपल्यावरून भोळसटपणाने त्यांची कल्पना करतो. तसें बघितलें तर अिंग्लिशही आर्यच आणि हिटलरही स्वस्तिकाचीच पूजा करतो. प्राणिशास्त्रदृष्ट्या सिंह आणि गाय अेकच. पण गाय सिंहाच्या पोटात जाते!

अशा स्थितीत रक्ताच्या संबंधाचा काय अुपयोग! औरंगजेब तर रजपुतानीच्याच पोटचा होता आणि त्याने आपल्या भावाचा शिरच्छेद केला. तेव्हा यात रक्ताचा संबंध नाही. तसें म्हटलें तर आपण नाही का दत्तक घेअून त्याला सर्व मालमत्तेचा वारसा देत? तेथे त्यात रक्ताचा संबंध कोठे आहे? मानसिक भाव मानसिक महत्त्व, हेंच राष्ट्राचें खरें लक्षण आहे. तो मानसिक भाव, मानसिक महत्त्व हिंदूंत आहे. तें मुसलमानांत नाही. या परिस्थितीवर अेकच उपाय आहे तो म्हणजे हिंदूंच्या वतीने बोलण्याचा अधिकार हिंदूंच्याच प्रतिनिधींना द्या हें म्हणणें व्हाअिसरॉयसाहेबाकडून मान्य करवून घ्यावयाचें.

✦ ✦ ✦

३२. आत्यंतिक अहिंसा हें पाप होय

परवाच काँग्रेसचे अध्यक्ष आझाद यांनी असे उद्‌गार काढले आहेत की, शस्त्राखेरीज कोणतेंही राष्ट्र २० ताससुद्धा आपलें स्वातंत्र्य टिकवू शकणार नाही. मला आश्चर्य वाटतें त्यांनी ही २० तासांची अट कां घालावी? मी तर म्हणतो की, क्षणभर देखील टिकू शकणार नाही. परंतु वरील शब्द काँग्रेसच्या अध्यक्षाचे मुखातून बाहेर पडले आहेत, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

आज देशात गांधीवादी, रॉयवादी, फॉरवर्ड ब्लॉक वगैरे ब्लॉक्स आणि त्यांचे हेडस् आहेत. त्या सर्वांचें धोरण देशाचें बरें करावें हेच आहे; हीच खरी मनापासून सर्वांची अिच्छा आहे. परंतु, हें करताना आपलें धोरण व तत्त्व कोणतें असावें हा महत्त्वाचा भाग आहे, या दृष्टीने मी तर्ककर्कश चर्चा करणार आहे आणि त्या दृष्टीने मी जर व्याख्यानात थोडीफार टीका केली तर ती व्यक्तीवर नसून धोरणावर होय. या चर्चेचा अुद्देश व्यक्तीवर टीका करण्याचा नाही हा विवेक अैकणारांनी ठेवावा आणि मीही तो विवेक पाळीन.

शांतिब्रह्माचा पत्रव्यवहार

आज हिंदुस्थानात जे पक्ष आहेत त्यांत अेका बाजूला गांधींचा पक्ष आहे. त्यांनी युद्धाच्या सुरवातीला हिटलरला पत्र धाडून त्याला युद्ध करू नको म्हणून सांगितलें. पण त्या वेडचाने तें अैकलें नाही. ब्रह्मदेवाचीही बुद्धि तिरपी झाली आणि हिटलरने १५ राष्ट्रें पचनी पाडलीं. हिटलर हा राक्षस आहे असें आपल्याला वाटणें साहजिकच आहे.

साधें दूध पचविण्याची शक्ति आपल्या अंगात नाही तेथे हिटलरने अवघ्या वर्षाच्या आत देश घशात घातले, तर मग आपण त्याला दुसरें काय म्हणणार! परंतु, काही वर्षांपूर्वी याच पंधरा राष्ट्रांनी जर्मनीविरुद्ध कट करून जर्मनीचीं छकलें छकलें केलीं होतीं. त्या गोष्टीचा सूड म्हणून त्याने हीं १५ राष्ट्रें जिंकलीं आहेत. त्याला पत्र धाडण्याला तुम्हांला तोंड नाही. हिटलरला पाठविलेल्या पत्राचा अुपयोग न झाल्याने गांधींनी अिंग्लंडला पत्र पाठविलें व कळविलें की, आपलीं घरें दारें शत्रूच्या स्वाधीन करून मोकळे व्हा. अशी अहिंसा अिंग्लंडने आचरली असती तर हिटलरचीं सारीं शस्त्रास्त्रें निरर्थक ठरलीं असतीं असें ते म्हणतात, आणि अेका अर्थी त्यांचें हें म्हणणें बरोबरच आहे. हो, रेल्वेचा पास काढून हिटलरला अिंग्लंड घेता आलें असतें तर बरेंच झालें असतें.

अुधमसिंग पक्ष

हा झाला अेक पक्ष आणि दुसरा पक्ष म्हणजे सरदार अुधमसिंगांचा. मी पुण्याला यावयाला निघालो तेव्हाच ते फाशी गेल्याचें वाचलें.

पंजाबमधील २० वर्षांपूर्वीच्या ओडवायर यांच्या राज्यसत्तेच्या गोष्टी खरें म्हणजे हिंदूंनी विसरून जायला पाहिजे होत्या. पण ह्याने २० वर्षेंपर्यंत हा सूड डोक्यात ठेवून, अिंग्लंडला जाअून तेथे ओडवायर यांना मारलें.

रोगी मृत्युशय्येवर नि वाद डॉक्टर-वैद्यांचा !

बाकीचे आम्ही सर्वजण या दोन पक्षांच्या मध्ये घोटाळत आहोत ! अशा परिस्थितीत स्पष्ट कल्पना आल्यावाचून पुढचा मार्ग आक्रमिता येत नाही. खरें म्हणजे जिवावरचा प्रसंग आला असताना अशा प्रकारची तात्त्विक चर्चा करण्याची पाळी यावी ही गोष्ट लज्जास्पद आहे. 'अेकच प्यालातील तळीरामाचें अुदाहरण मला येथे आठवतें. रोगी मृत्युशय्येवर पडला असताना पाश्चात्य वैद्यक चांगलें कीं आर्यवैद्यक चांगलें असा डॉक्टर-वैद्य खल करीत बसतात. त्याचप्रमाणे सध्या हिंसा कीं अहिंसा असा खल चालू आहे! ही वेळ खल करण्याची नसून प्राप्त आपत्तीला तोंड दिलें पाहिजे.

अेक घाव नि दोन तुकडे करण्याची वेळ आलेली आहे.

कसोटी

हिंसे-अहिंसेबद्दल काही ठाम अशी सूत्रमय कल्पना आपल्यापुढे मांडावी हा माझा वऱ्याच दिवसांचा हेतु होता. हिंसा-अहिंसा, चांगलें-वाईट, धर्म-अधर्म, न्याय-अन्याय, नीति-अनीति हें सर्व ठरविण्याचा अेकच सिद्धान्त म्हणजे ज्या योगे मानवजातीचें हित होअील तो धर्म. ही कसोटी तात्त्विक दृष्टया खरी आणि व्यावहारिक दृष्टया सुसंगत अशी आहे.

मनुस्मृति, मार्क्स, लेनिन, या सर्वांनी हीच कसोटी धरली आहे. धर्मा-धर्माचें विवेचन या अेकाच सूत्रावर केलेलें आहे. मनुष्यजातीच्या हिताला अिष्ट ठरेल तो धर्म. सिंहाने माणसाला खाणें हा सिंहाचा धर्म. मग मनुष्याने स्वत:ला सिंहाला खाअू द्यावें असा धर्म कां नाही ?

धर्म-अधर्म, नीति-अनीति या सर्व गोष्टी मानवाच्या दृष्टीने ठरविलेल्या असतात. गाय पाळणें हा धर्म तर मग साप पाळणें हा देखील धर्म कां होअू नये ? गाय दूध देअून मानवाचें पोषण करते म्हणून आपण गाय पाळतो. अशा प्रकारे सर्व नीतिशास्त्रांचें केंद्र मानव हा आहे. या सर्व गोष्टींची कसोटी, निकष-पाषाण मानव जातीचें हित हाच आहे. या कसोटीवर कोठलेंही तत्त्व घासून व पारखून घेतल्याखेरीज मानवाचें अंतिम कल्याण होणार नाही.

विश्वारंभी

जग निर्माण झालें त्या वेळी सुरवातीस मानव प्राणी नव्हता. या जगाचे पहिले नागरिक म्हणजे सरपटणारे प्राणी सर्प होत. दोन दोन मैल लांबीचे देखील ते प्राणी असत. त्यांच्यांतही हिटलर, मुसोलिनी असत. अुत्क्रांतीचा पुढील टप्पा म्हणजे झाडांवर राहणारी व झाडपाला ओरवडून खाणारीं गोरिलासारखीं माकडें जन्माला आलीं. प्राणिशास्त्रदृष्टया बघितलें तर मानव जगायला अगदी असमर्थ आहे. शस्त्रांचें साहाय्य मानवानें घेतलें नसतें तर मानव हा पृथ्वीतलावर टिकलाच नसता. अितका मानव दुर्बल आहे.

आपण अगदी गरीब मनुष्याला गाय म्हणून म्हणतो; पण गाय आणि मनुष्य यांची जर झोंबी लावली, तर गाअीजवळ शिंगें असल्याने ती त्याला शिंगाने भोसकून ठार करू शकेल. हो, मात्र त्या मनुष्याजवळ काठी अगर चरखासुद्धा असता कामा नये. न जाणो जिवावर बेतलें म्हणजे तो चरखा फेकून मारावयाचा !

शस्त्रसाधनेला आरंभ

शरीरदृष्टया मानवाजवळ जें नव्हतें ते त्यानें अुत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. मानवाने निर्माण केलेली तलवार ही त्याच्या नखासारखी आहे. आणि तलवार हातात घेतल्यावर तो सिंहालासुद्धा भारी झाला. माकडसुद्धा धोंडा मारायला शिकून सिंह-हत्ती यांपासून अरण्यात आपला बचाव करते. म्हणजे धोंडा हें माकडाचें शस्त्र झालें.

माकड जर अहिंसक झालें असतें तर साप-हत्ती-व्याघ्र-सिंहांनी त्याचा केव्हाच फडशा पाडला असता. मग कोठला मानव-प्राणी निर्माण होता ? कारण मानव हा माकडापासूनच निर्माण झाला असें अुत्क्रांतिशास्त्र म्हणतें. परंतु, त्या माकडाला कोणी आत्यंतिक अहिंसक भेटला नाही, हें मानवजातीचें भाग्यच होय. धोंडयामुळे माकड संरक्षण करू लागलें; परंतु, मानव हा प्रगतीचा नैसर्गिक भोक्ता असल्याने त्याने निरनिराळे शोध लावले. त्याला कच्चें मांस पचेना म्हणून त्याने अुखळ, मुसळ, अग्नि वगैरे निर्माण केलीं; हीं अेका प्रकारें शस्त्रेंच होत. आपण जें अन्न खातो त्यामध्ये वनस्पतींची हत्या होतेच ना. म्हणून ब्राह्मणांनी वैश्वदेव करावा असा दंडक घातला गेला. कारण अुखळ, मुसळ यांमध्ये कांडताना अनेक जीव-जंतूंची हत्या झाली असेल त्या पापक्षालनार्थ वैश्वदेव केला. परंतु वैश्वदेव करताना अग्नि पेटविला त्या वेळीही अनेक जीवजंतु मेलेच असतील ना ? तेव्हा निर्भेळ व आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे हेंच सिद्ध झालें.

अहो, ढेकूण चावतात त्यांना मारल्याखेरीज गत्यंतर नाही. त्यांचेपुढे मनु-स्मृति वाचून चालणार नाही. आत्यंतिक अहिंसा हें खूळ जगात टिकणें अशक्य आहे असेंच सिद्ध होतें. हा प्रयोग गांधी नवीनच करतात असें नव्हे. अनेक महान् महान् थोर पुरुषांनी हे प्रयोग केले; परंतु, ते त्यांनी राष्ट्रावर केले नाहीत.

जैनांचे दंडक

'अहिंसा परमो धर्मः ' असा आदेश देणाऱ्या जैनांचींही राष्ट्रें होतीं. त्यांच्यात शूर पुरुष होते. त्यांनीही अहिंसेला बंधन घातलें होतें, आणि व्यवहारात राष्ट्ररक्षण व आत्मनाश टाळण्यासाठी हिंसेला परवानगी दिली होती. त्या सर्वांना हेंच आढळून आलें की, आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे. गांधींचा हा प्रयत्न पहिलाच नाही. त्यांच्या पूर्वीच्या लोकांनी तो अशक्य म्हणून ठरविला होता. अशा स्थितीत गांधींचा हा प्रयत्न वेडगळपणाचाच आहे. चुलीवर भात शिजतो हें माहीत असताना बुभुक्षित मनुष्य आला असताना त्याला सांगावयाचें की, थांब चंद्रज्योतीमध्ये तांदूळ शिजतात कीं नाहीत याचा मी प्रयोग करीत आहे. त्यांनी हे असले प्रयोग पाहि-जेत तर स्वतःवर करावे.

बुद्धि सुचते

परंतु, इतकें कशाला ? स्वतःवर प्रसंग आला म्हणजे बुद्धि सुचते. नुकताच वर्ध्याच्या आश्रमात कोल्हा पिसाळला तेव्हा त्याला गोळी घालण्यात आली. याच वेळी हिटलर पिसाळला म्हणून इंग्लंडला जें पत्र धाडण्यात आलें त्यात मात्र अहिंसापालनाचा उपदेश केला गेला !

साबरमतीच्या पांजरपोळात अेक कुत्रा पिसाळला. त्या कुत्र्याला मारा असाच सल्ला गांधींनी दिला; म्हणजे येथे तारतम्य आलें. दहा हिंसा टाळण्याकरिता अेक हिंसा करणें योग्य ठरलें.

प्रयोग-क्षेत्राची मर्यादा

आपण स्वत:वर हवे तेवढे प्रयोग करा; परंतु, प्रयोगाकरिता आपण जेव्हा अेक राष्ट्र घेता तेव्हा त्या गोष्टीचा समाचार घेतलाच पाहिजे. आपल्या प्रयोगाकरिता राष्ट्र निर्माण झालें नाही. तुम्ही प्रयोगाकरिता राष्ट्र घेता आणि तें हिंदुराष्ट्र घेता, अिंग्लंड किंवा अितर कोठलें राष्ट्र कां नाही घेत प्रयोगाकरिता ?

आपणांला प्रयोग करावयाचे असतील तर ते अवश्य करा. पण, त्याकरिता राष्ट्राचा खेळखंडोवा करू नका. असल्या या साहसाचें कौतुक करण्यापेक्षा तीव्र निंदा करणेंच श्रेयस्कर ठरतें.

रोजच्या खाण्यात आपण कितीतरी हिंसा करतो. पूर्वी श्राद्धाला मांस करावें अशी रूढि होती. पुढे ब्राह्मणांतही हिंसक आणि अहिंसक असे पक्ष पडले. आणि अेक गोष्ट आहे की, अेका अहिंसक ब्राह्मणाने श्राद्धाच्या दिवशी हिंसक पक्षाच्या अेका ब्राह्मणाला जेवायला बोलाविलें. पानावर मांस नाही असें पाहून तो म्हणाला श्राद्धाला मांस कोठे आहे ? तेव्हा अहिंसक पक्षाच्या ब्राह्मणाने अुत्तर दिलें 'आम्ही अहिंसक आहों ! खीर केली आहे.' तो ब्राह्मण म्हणाला, 'वरें आहे तर खीर आणा. खीर वाढली गेली आणि त्याने त्या खिरीवर पाणी शिंपडताच त्याच्या तप:सामर्थ्याने खिरीच्या प्रत्येक कणाकणातून आळ्या वाहेर निघाल्या. व त्या ओरडून म्हणू लागल्या 'आमची हिंसा होत आहे, आमची हिंसा होत आहे.'

वनस्पतीच्या प्रत्येक कणात चेतना व बीज आहे.

त्या बीजाचें झाड होअून त्याला फुलें यावीत हा निसर्गाचा हेतु आहे. आपण खातो तेव्हा देखील काय थोडी हिंसा होत असेल ! अन्न खात नसाल तर अरबस्थानातील खजूर आणि काश्मिरचीं द्राक्षें खात असालच ना, पण तरी देखील हिंसा झालीचना !

आत्यंतिक अहिंसा पाळावयाची म्हणजे मला श्वासोच्छ्वास करता येणार नाही, खाता येणार नाही, पिता येणार नाही, फार काय अुभें राहता येणार नाही, वसता येणार नाही. सचेतन देहाची कोठलीही हालचाल झाली तरी त्यात हिंसा झाल्याखेरीज राहणार नाही. अितकी ही आत्यंतिक अहिंसेची कल्पना हास्यास्पद आहे; अितकेंच काय पण पापण्या अुघड्या ठेवून जगणें देखील अशक्य होअील !

अनुक्रम ३८९०५ दि. १.१.५
क्रमांक ...१५२१... दि. २.३.११

अेक दृष्टान्त

देवळात देवाकडे पाय करून अेक संत निजले असताना देवाचा पुजारी तेथे आला. तो म्हणाला, 'अहो हें काय ? हा देवाचा धडधडीत अपमान आहे.' तेव्हा संताने पूर्व दिशेकडे पाय केले. तेव्हा दुसरा म्हणाला, अहो हा सूर्याचा अपमान आहे, त्याने तिसऱ्या दिशेकडे पाय केले तेव्हा असाच तिसऱ्या अेका देवाचा अपमान झाला. अखेरीस तो संत डोकें खाली करून पाय वर करून गरगरा चकरा मारू लागला. तेव्हा सर्वच जग ओरडलें, आता हा सर्वच देवांचा अपमान होत आहे ! अखेरीस तो संत म्हणाला, आता माझे पाय कापून ठेवा, त्याखेरीज दुसरा अुपाय मला दिसत नाही.

आपणांला काटेकोर अहिंसेने चालण्याचा प्रयोग करावयाचा असेल, तर या पुणें म्युनिसिपालिटीत ठराव करा की, पुण्यात वाघ, साप, विंचू काहीही मारावयाचें नाही. हा प्रयोग केलात तर १ वर्षाच्या आत पुण्यात मनुष्य दिसणार नाही. सर्वत्र वाघ. सिंह. साप. विंचच दिसतील आणि सांगतो जर का तुमच्या या [illegible] माहिती अेखाद्या वाघाला लागली तर तो येथे येअून दिवसाला अेक पेठ या हिशोबाने तुमच्या काय पेठा असतील तेवढ्या दिवसांत सारें पुणें साफ करून टाकील.

सृष्टीचें स्वरूप

अीश्वराने जगाची रचना करताना ती निव्वळ हिंसेवर केली नाही की आत्यंतिक अहिंसेवर केली नाही. या दोघांची गुंफण घालून त्याने सृष्टीची रचना केली आहे. आत्यंतिक अहिंसा ही जगाची स्थिति नव्हे व तत्त्व तर नव्हेच नव्हे. आअी मुलाला पाजते म्हणजे त्याला आपलें जीवन देतें. मूल आजारी असलें तर आपल्या जिवाची पर्वा न करता त्या मुलाची जपणूक करते, तेव्हा काही तिला हा मुलगा पुढे मोठा होअील आणि आपलें पांग फेडील अशी कल्पना नसते. हें प्रेमतत्त्वही जगात असतें.

मी स्वत: सृष्टि कशी आहे याची पुढीलप्रमाणे कल्पना करतो. मी जर चित्रकार असतो, तर मी सृष्टीचें चित्र असें रंगविलें असतें.

हरिणबालकाचा वध करून रक्ताने माखलेल्या जिव्हेने वाघीण आपल्या पिलांकडे येत आहे. तीं पिलें तिला बिलगून दुग्धप्राशन करीत आहेत, आणि वाघीण रक्ताने भरलेलें आपलें तोंड जिभेने साफ करीत आहे. सृष्टि ही अशी आहे. अेकीकडे ती वाघीण आपलें जीवन म्हणजे दूध पिलांना देता यावें म्हणून दुसरीकडे हरिण-बालकांची हत्या करून त्यांचें रक्त पीत आहे. अेकावर प्रेम करता यावें म्हणून दुसऱ्याची हिंसा करीत आहे. हिंसा व अहिंसा यांचा समन्वय साधणारें हें चित्र आहे.

भ्रामक समजूत

काँग्रेस म्हणते, गांधींना त्यांचा मार्ग आचरण्यासाठी आम्ही मुक्त केलें आहे. पण, याचा अर्थ असा होतो की, आपण काही तरी कमी आहोत आणि ते कोणी तरी मोठे आहेत. जो अव्यवहार्य, जगापेक्षा काही विपरीत सांगेल तो संत ही आपल्यातील कल्पना टाकून द्या. हें असें सांगणारे लोक महात्मे तर नाहीतच नाहीत; पण ते दुरात्मे तरी असले पाहिजेत नाहीतर भ्रांतात्मे तरी असले पाहिजेत. आज २० वर्षांत फाशी गेलेल्या देशभक्तांबद्दल सहानुभूतीचा शब्द उच्चारण्याची यांना छाती झाली नाही. शिवाजी, प्रताप यांना वाट चुकलेले देशभक्त म्हणून संबोधिलें. अुंदीर कुरडतील या आत्यंतिक अहिंसेने आम्ही वागलो असतो तर घरातील अुंदरांनी आम्हांला कुरतडून नाहीसें केलें असतें. आत्यंतिक अहिंसा हें पाप ज्या कसोटीवर ठरतें त्याच कसोटीवर आत्यंतिक हिंसाही पाप ठरणार आहे. तेव्हा सुज्ञांनी आत्यंतिक अहिंसेच्या व आत्यंतिक हिंसेच्या अुपदेशाची वृत्ति आता मारण्याची वेळ आली आहे. तुम्हीच हें अितके दिवस सहन करून गप्प बसलात, यापुढे वाअिटाला वाअीट म्हणण्याची धमक तुम्ही दाखविली पाहिजे.

ज्याप्रमाणे आत्यंतिक अहिंसा हें पाप आहे, त्याचप्रमाणे आत्यंतिक हिंसा हें देखील अेक पाप आहे. आत्यंतिक अहिंसेने मानवसमाजाने परस्परांना खालें नाही तरी अितर वन्यपशु मानवजातीला खाअून टाकतील, तर आत्यंतिक हिंसेने मानव समाजच राहणें कठीण होअील.

पुण्याला आल्यावर अक्कल सुचली

आता राष्ट्राच्या रक्षणाकरिता अहिंसेचा त्याग करण्यास काँग्रेस सिद्ध झाली आहे. पूर्वी हिंदुस्थानला बाहेरचा कोणीच शत्रु नाही असें सांगत होते आणि आता पुण्याला आल्याबरोबर हिंदुस्थानवर शत्रु तुटून पडायला लागलेले त्यांना दिसले! राजकारणात आत्यंतिक अहिंसा हें वेड आहे हें त्यांना आता पटू लागलें आहे. आत्यंतिक अहिंसा हा धर्म नसून तो अधर्म आहे. माझ्या राष्ट्राच्या, समाजाच्या व मानव्याच्या नाशास जें कारणीभूत होतें तें कधीच धर्म्य होअू शकत नाही.

खरा धर्म

आत्यंतिक अहिंसेने राष्ट्र जगू शकत नाही हें अेकदा मान्य केल्यावर, खऱ्या धर्माचें पालन करून अधर्म टाळता येअील. माझ्या राष्ट्राच्या, हिंदुस्थानातील हिंदूंच्या हितासाठी करावी लागणारी हिंसा ही केव्हाही अधर्म होअू शकत नाही.

मनुष्यजातीला जो हितकारक तो धर्म, व अहितकारक तो अधर्म. रामाने रावणाचीं दहा शिरें छाटलीं, त्याला आपण रावण-वध म्हणतो, ती हत्या नव्हे. हत्या ही गुन्ह्याच्या स्वरूपातली आहे. कृष्णाने कंसाला सिंहासनावरून ओढून

मारलें त्याला आपण कंसवध म्हणतो, ती काही कंसहत्या नाही. जेथे मरणें अिष्ट असतें तेथे मारून मरावें हेंच योग्य.

हें महात्मेपण नव्हे

आत्यंतिक अहिंसेची राष्ट्राला शिकवण देणें हें महात्मेपण नव्हे, हें मूर्तिमंत पाप आहे. लो. टिळकांनी गांधींना लिहिलेलें अेक पत्र आता प्रसिद्ध झालें आहे. या पत्रात लो. टिळक म्हणतात की, व्यवहारामध्ये आत्यंतिक अहिंसा ही शक्य नाही; पण, मी म्हणतो याच्याही पुढे गेलें पाहिजे. आत्यंतिक अहिंसा ही केव्हाही अिष्ट अशी अवस्था नाही, तें पाप आहे. आत्यंतिक अहिंसेचें खूळ पिकवून राष्ट्राला भ्रमात ठेवणें हें महात्मेपण नव्हेच; त्यांना पाहिजे तर दुरात्मा किंवा भ्रांतात्मा म्हणा.

अहिंसक अशा बुद्धाला सुद्धा मृतमांस खाण्यास हरकत नाही अशी परवानगी आपल्या शिष्यवर्गाला देण्याची पाळी आली आणि याच मृतमांस खाण्याच्या कल्पनेचा अवशेष मुसलमानांच्या हातून कोंवडें खाण्याच्या प्रथेच्या रूपाने कायम आहे. आपल्याकडील संत तुकाराम यांनीसुद्धा अहिंसेचे फार गोडवे गायिले आहेत. पण त्यांनीसुद्धा 'सर्प विंचू नारायण । परि वंदावें दुरून' असेंच सांगितलें आहे. ते-सुद्धा विंचवाची दया करीत नाहीत. आपल्याकडचे विंचू काळे असतात; पण रशिया वगैरे पाश्चिमात्य राष्ट्रांतील विंचू काही पांढरे, काही तांबडे असतील. असा विंचू जर राष्ट्राच्या देव्हाऱ्यात आला तर त्याच्याशी तुकारामबुवा म्हणतात त्याचप्रमाणे

विंचू देव्हाऱ्यासी आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथे पैजाराचें काम । अधमासी व्हावें अधम ॥

या न्यायाने वागलें पाहिजे.

—दि. २ ऑगस्ट १९४०, पुणें.

◆ ◆ ◆

३३. राष्ट्ररक्षणासाठी केली जाणारी हिंसा पुण्यकारक होय

ज्यांनी मला वचन देऊन येथे आणलें तीं वचनें शतपटींनी पुरीं झालीं आहेत असें मला वाटतें. सबंध हिंदुस्थानभर लक्ष लक्ष नागरिकांच्या सभा भरतात, कलकत्त्यासही विराट सभा भरतात. पण आजचा समाज पाहून मला अतिशय आनंद झाला. आपण माझ्या कार्याचा उत्साह वाढविला आहे. पैसे किती दिले हा महत्त्वाचा प्रश्न नाही. हिंदुमहासभेचा अध्यक्ष, हिंदु धर्मासाठी नि भगव्या ध्वजासाठी झुंजणारा अेक सैनिक म्हणून मी येथे आलो असताना आपण माझें भाषण अैकण्याम अगत्यपूर्वक आलात यातच मला लाखो रुपये मिळाल्यासारखे आहेत.

काँग्रेसमध्ये तरी हिंदुत्व कां असू नये ?

हिंदुस्थान हिंदूंचा राहिला पाहिजे व हें तत्त्व अढळ राहिलें पाहिजे असें मानणारेच लोक बहुंशी आजच्या सभेस अुपस्थित राहिले आहेत. कारण तसें त्यांना तें पूर्णांशाने किंवा बहुंशी पटलें नसतें तर माझें तोंड पाहण्यास ते आलेच नसते. हिंदुत्वाचें नांव घेणें तीन वर्षांपूर्वी पाप होतें. आज तें पुण्य आहे किंवा नाही हें जरी सांगता आलें नाही तरी पाप तरी खास नाही. आज काँग्रेस ही राष्ट्रीय संस्था म्हणतात. पण त्यात सुद्धा शेकडा ७५ लोक असे म्हणणारे आहेत की हिंदुस्थानात रहावयाचें तर हिंदु म्हणूनच राहू, नाही तर काँग्रेस सोडून जाअू. मुन्शींचें अुदाहरण आपल्या डोळ्यांपुढे ताजें आहेच. तत्त्वाच्या दृष्टीने गोष्टी अशक्य होअू लागल्या म्हणून त्यांनी सभासदत्वाचा त्याग केला. काँग्रेसमध्ये तरी हिंदुत्व कां असू नये ? हिंदु काही लोकसंख्येपेक्षा अधिक मागत नाहीत. पण आता मात्र आम्ही थोडेंही सोडणार नाही. राष्ट्रीयत्व सोडणें म्हणजे नामर्दपणा आहे. हिंदुमहासभेचें दुसरें काही म्हणणें नाही. काँग्रेस हिंदूंची आहे असें जिना म्हणतात; हें सत्य आहे. यात लाजावयाची गोष्ट कोटे आहे ? काँग्रेसची प्रतिष्ठा वाढविली हिंदूंनी, सत्याग्रह केला हिंदूंनी, स्वार्थत्याग केला हिंदूंनी, तुरुंग भोगले हिंदूंनी व आत्मयज्ञ केला हिंदूंनीच ! या वेळी दुसरा कोणी आला नाही ! !

हिंदुत्व असेल तरच सर्व ग्राह्य

आज नाही अुद्या आपण सर्व खाद्याला खांदा लावून लढू असा आत्मविश्वास वाटतो. काँग्रेस ही संस्था आहे, ती जात नव्हे, धर्म नव्हे. पण हिंदुत्वाची गोष्ट निराळी आहे. हिंदुत्व म्हणजे आई, वाप, नद्या, जीवन तत्त्व सर्व त्यात सामावलेलें आहे. हिंदुत्वाला काँग्रेस ही साहाय्यभूत झाली तर पुढेही काँग्रेस राहीलच. हिंदुत्वासहित आम्हांस काँग्रेस चालेल. हजारो काँग्रेसेस आम्ही सोडू, हजारो ब्रह्मदेव सोडू, पण हिंदुत्व सोडणार नाही असा आमचा अढळ निश्चय आहे !

हिंसा श्रेष्ठ की अहिंसा श्रेष्ठ

आजचा विषय करमणुकीचा किंवा तात्त्विक चर्चेचा म्हणून मी व्याख्यानासाठी घेतलेला नाही. राष्ट्राच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा असा विषय आहे. अहिंसेचा विचार जैनाचार्यांनी व बुद्धांनी सखोल रीतीने केला व तो आचारातही आणला आहे. जपानपासून मेक्सिकोपर्यंत तीन चार हजार वर्षांपूर्वीपासून याचा अभ्यास चालला आहे. मी काही नवीन सांगत नाही. विषय जुनाच आहे. सर्वांच्याच मताने आत्यंतिक हिंसा ही निंद्य असल्याने हा काही गूढ प्रश्न नाही. पण हिंदुस्थानात चांगल्या गोष्टींबरोबर वाईट गोष्टीही अुत्पन्न होतात असा अनुभव आहे. अहिंसा सत्य की हिंसा सत्य हा प्रश्न आज आपणांस भेडसावू लागला आहे. अर्जुनालाही मागे हा प्रश्न पडला होता. पण ती भावाभावांची लढाअी असल्याने असा प्रश्न पडणें साहजिक तरी होतें. पण आजची स्थिति तशी नाही. ज्याचा आपणांशी काहीच संबंध नाही अशा लोकांचा विचार करताना 'हिंसा श्रेष्ठ की अहिंसा श्रेष्ठ' हा प्रश्न अुत्पन्न करणें मूर्खपणाचें आहे. अनंतकाल याची चर्चा झालीच आहे. आज हिटलर, जपान हिंदुस्थानाजवळ येअू पाहत आहेत, इंग्लड तर आलेंच आहे, आपल्या देशातही डाक्का, अहमदाबाद व मुंबअीचे प्रकार होतच आहेत. आणि अशी स्थिति असताना 'हिंसा श्रेष्ठ कीं अहिंसा श्रेष्ठ' हा प्रश्न आता कां ? पूर्वी प्रभु रामचंद्राला असाच प्रश्न पडला होता पण वसिष्ठांनी तत्त्वबुभुक्षिततेबद्दल त्याचा धिक्कार केला. 'तुझी पट्टराणी शत्रूने पळवून नेली असता तुला हा भ्याडपणाचा विचार सुचतो कसा ?' असा वसिष्ठ मुनींनी प्रश्न केला. रामाला त्यामुळे चीड अुत्पन्न झाली, त्याची वीरवृत्ति जागृत झाली व रावणाला मारून आल्यानंतरच योगवासिष्ठ सांगण्याविषयी रामाने वसिष्ठाला सांगितलें. ही योगवासिष्ठाची भूमिका आहे. आज हीच हिंदुस्थानची स्थिति झाली आहे. तरुण देखील हिंसा श्रेष्ठ की अहिंसा श्रेष्ठ याची चर्चा करू लागले आहेत. रामाप्रमाणेच आपल्यातही वीरवृत्ति जागृत झाली पाहिजे. अशा परिस्थितीत तात्त्विक नव्हे पण व्यावहारिक ठाम निश्चय केला पाहिजे.

आत्यंतिक हिंसा अशक्य व पाप आहे

या बाबतीत माझा पहिला सिद्धान्त असा आहे की, आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे. दुसरा सिद्धान्त असा आहे की, आत्यंतिक अहिंसा पाप आहे. हा झाला माझा पूर्वपक्ष. आपल्या देशातले तीनही धर्मपंथ म्हणतात की, सापेक्ष अहिंसा पुण्य आहे. निरपेक्ष अहिंसा हें पाप आहे. मनुष्यजातीच्या एकंदर हितास जें कारणीभूत होतें तें चांगलें व पुण्य आणि जे अहितास कारणीभूत होतें तें पाप. या निकषावर आपण अहिंसा पुण्य कीं पाप हें पाहिलें पाहिजे व या दृष्टीने आत्यंतिक अहिंसा हें पाप आहे असें आपणांस सिद्ध करता येअील.

कृषि ही देखील हिंसाच आहे !

मनुष्य वन्य अवस्थेतून पुढे कृषि-अवस्थेत अुन्नत झाला. दयेला वाव सापडू लागला. अहिंसेचे नियम होअू लागले. पूर्वीच्या रानटी अवस्थेत हिंसा योग्य झाली असती. पण या वेळी हिंसा कां करावी असा प्रश्न अुद्भवणें साहजिक आहे. पण या अवस्थेत देखील आत्यंतिक अहिंसा आपण पाळली असती तर आपला नाश झाला असता. कारण तसें पाहिलें तर कृषि ही देखील हिंसात्मक आहे. धान्य काढीपर्यंत (नांगरणें वगैरे क्रियांमध्ये) लाखो जीवांचा संहार आपण करतो व तेंच अन्न आपण खातो व म्हणूनच पूर्वीच्या ऋषींनी 'हिंसाप्रायां पराधीनां कृषिं यत्नेन वर्जयेत्' असेंही सांगितलें होते. पण मनुष्याच्या हिताला आवश्यक अशी हिंसा आपण केली म्हणूनच आपण जगू शकलो. आत्महिंसा केली नाही.

आत्महत्या करणें म्हणजे हिंसाच

आता आपण पुढच्या अवस्थेचा विचार करू. मनुष्य असें म्हणेल की, मी मठात वसेन, कोणालाही त्रास देणार नाही, माझा जीव गेला तरी मी कोणाला प्रतिकार करणार नाही. मग तरी अहिंसा तत्त्व अमलात आणता येईल किंवा नाही ? पण याला अुत्तर असें की, जीव गेला हरकत नाही अशी प्रतिज्ञा करणें म्हणजेही आत्यंतिक अहिंसा गेलीच. कारण तो आत्मघात आहे. म्हणून आत्यंतिक अहिंसा अशक्यच आहे. अहिंसेचा सूक्ष्म विचार करणारे जैन साधु आपल्याच हिंदुस्थानात पूर्वी होअून गेले. पण त्यांनीही सापेक्ष हिंसेस परवानगी दिलीच आहे. आत्यंतिक हिंसा वैद्यशास्त्राच्या दृष्टीने देखील अशक्य आहे. शस्त्रक्रिया करणें किंवा औषध घेणें म्हणजे सुद्धा शरीरातील काही जंतूंचा नाश करण्यारखेंच आहे. न्यायाच्या दृष्टीने आपण किडयांना काय अुत्तर देअू शकू ? फक्त आम्ही मनुष्य आहो अेवढेंच आपणांस सांगणें शक्य आहे.

राष्ट्ररक्षणासाठी केलेली हिंसा पुण्यकारक

व्यक्तीव्यक्तींच्या हिंसे-अहिंसेचें हेंच तत्त्व आपणांस राष्ट्राच्या हिंसे अहिंसे-बाबत लागू करता येअील. दुसरें हें पहिलीचें वृद्धीकृत स्वरूप आहे. सज्जनाशी आपण सज्जनपणाने वागणें हें पुण्यकारक आहे. पण आपल्या देशावर शत्रु चाल करून आला तर त्याचा सशस्त्र प्रतिकार करणें हें पाप नाही. आपणांस स्वातंत्र्य मिळालें व तदनंतर आपण जर दुसऱ्याचा द्वेष केला नाही तर हिंसेचा प्रश्न येतो कोठे असें काही लोक म्हणतील. असें म्हणणें म्हणजे शुद्ध घावरटपणा होय. तुम्ही द्वेष केला नाही तर दुसरा करणार नाही हें कशावरून ? द्वेष केल्यानेच तो अुत्पन्न होतो असें समजणें चुकीचें आहे. स्वत: जगणें व राष्ट्र जगविणें हें आपलें कर्तव्य आहे. त्याकरिता हिंसा करावी लागली तरी ती पुण्यकारक होय. आजच्या स्थितीत

अक्षरशः आत्यंतिक अहिंसा पाप आहे. आततायी मनुष्य आक्रमण करून आला तरी त्याला मारावयाचें नाही असें म्हटलें तर नाश होअील. आत्यंतिक अहिंसा व्यवहारामध्ये पाप आहे. याचा राष्ट्रीय दृष्टचा विचार करावयाचा झाल्यास चोर-दरोडेखोर यांचा सुकाळ जास्त होईल. सत्प्रवृत्तांचा उच्छेद होअील. धार्मिक अुपदेशाने चोर जात नाहीत, अुलट सावांचा नाश होतो. जगातील चांगलीं राष्ट्रें वाअिटांकडून प्रथम मारलीं जातील व शेवटी सर्व समाज उच्छिन्न होतील. आज सर्व समाज अेकत्रित राहिला आहे याचें कारण म्हणजे दंडाची भीति. आत्यंतिक अहिंसेने हिंसा प्रबलतर झाल्याशिवाय राहणार नाही.

तत्त्वांचा अुपलक्षणात्मक अर्थ

श्री. मुनशींनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकाचा विचार करता 'सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह' हीं तत्त्वें अक्षरशः पाळणें पुण्यकारक आहे ही गोष्ट खरी. पण 'अपरिग्रह' कसा शक्य आहे, असा मी आमच्या मुलाखतीत त्यांना प्रश्न केला. कारण अपरिग्रह पाळणें झाल्यास अिंग्रजांपाशी मागावयाचें तरी काय ? सारांश वरील गोष्टी अुपलक्षणेने सांगितल्या आहेत. हा अर्थवाद आहे. आपल्याकडे सुद्धा गंगेच्या अेका स्नानाने सात जन्मांचें पातक नष्ट होतें असें म्हणत नाहीत काय ? पण तें सत्यार्थाने घेऊन कसें चालेल ? आत्यंतिक अहिंसा ही योग्यांना देखील अशक्य होअील. कारण त्यांना श्वासोछ्वासही करता येणार नाही.

अहिंसा दुर्बलांना प्रिय

मनुष्यजातीला, राष्ट्राला अुपकारक तितकी अहिंसा पुण्यप्रद होय. नाही तर आत्यंतिक अहिंसेने देव मरतील, दैत्य तगतील व शेवटी तेही मरतील. आत्यंतिक अहिंसा दुर्बलांना प्रिय वाटते. ती दुर्बलता आज सुचली आहे म्हणून 'हिंसा की अहिंसा' हे प्रश्न अुद्भवले आहेत. आत्यंतिक अहिंसेचा पुरस्कार करणारे बुद्धिभ्रष्ट किंवा दुष्ट असले पाहिजेत. पण आज आपल्या देशात पहिलाच प्रकार दिसतो. शस्त्रांनी क्रांतीचें तत्त्व आम्ही स्वीकारितो ते कमी साधु म्हणून नव्हे, तर त्यांच्यापेक्षा शहाणे म्हणून. आत्यंतिक अहिंसा पाप आहे हेंच आमचें तत्त्व आहे.

शस्त्रधारी देव आमचे गुरु !

अहिंसेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या जैनांनी देखील पूर्वी राज्यें केलीं आहेत. सापेक्ष अहिंसा हें पुण्य आहे असेंच जैनाचार्यांचेंही मत आहे. आपण आततायी मनुष्याला मारलें तर त्याचा दोष आपणांकडे नसून तो आपल्या पापाने मरतो अशी शिकवण आहे. बुद्धानेही हेंच सांगितलें आहे. तुम्ही आपण होअून कोणावर चालून जाअू नका, पण त्रास देणाऱ्याच्या जीवाविरुद्ध जा असाच

त्यांच्या सांगण्याचा आशय आहे. हिंदूंच्यासंबधी तर बोलावयासच नको. आमचा गुरु श्रीकृष्ण आहे. कोदंडधारी राम आहे. आम्हांला हिंसा-अहिंसेच्या शंकाच राहत नाहीत. आततायी माणसांचा नाश कर असेंच भगवान् श्रीकृष्णांनी सांगितलें आहे. 'यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः । धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ' असें म्हणणारा अर्जुन श्रीकृष्णाच्या अुपदेशाने 'करिष्ये वचनं तव ' म्हणून अेकदम युद्धास सन्नद्ध झाला. दशमुखी रावणाला मारणारा राम, वाघनखें खुपसून अफझुलखानाला ठार करणारा शिवाजी हेच आमचे गुरु आहेत. सर्व जगच जर पापावर जगतें तर आम्हीही पापच करणार !

आततायाला विचार न करता ठार मार, हें वचन परंपरेने वेदकालापासून चालू आहे. तो आपला धर्म आहे, त्यावर श्रद्धा ठेवा. ज्या देवांची पूजा करता त्यांचीं उदाहरणें डोळ्यांपुढे ठेवा. आपले देव सशस्त्र, आपले पूर्वज सशस्त्र, मग आपण असे नादान कां ?

✦ ✦ ✦

३४. पाकिस्तानरूपी रोगावर औषध योजना

हिंदुस्थानात पाकिस्तानची चर्चा करण्याचा प्रसंग यावा ही अत्यंत संताप-जनक गोष्ट आहे व माझ्यासारख्या अुच्छृंखल माणसास शांतपणा ठेवून ती करणें फार कठीण आहे. तथापि फार संयम राखून मी ती करणार आहे. पाकिस्तान हें काही तरी दुर्लक्ष करण्यासारखें बुजगावणें किंवा धूम्रपटल खासच नाही. त्याचा समग्र अभ्यास करून संपूर्ण समाचार घेण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. कारण मुसलमानांच्या सर्व हिंदुत्वनाशक आशा-आकांक्षांचें सार किंवा अर्कच पकिस्तान या छोट्या शब्दात साठला आहे. हिंदुमात्राला नष्ट करणारें नागाचें विषच या पाकिस्तानच्या छोट्याशा नलिकेत भरलेलें आहे असें समजा. मुसलमान कडवे व धर्मनिष्ठ असल्यामुळे ते प्रथम हिंदुस्थानात आले, तेव्हापासूनच पाकिस्तानची विषवल्ली अंकुरित झाली आहे. मुसलमानी धर्म सोडून परधर्माचा जो स्वीकार करील त्याला बेलाशक देहान्त प्रायश्चित्तच द्यावें असें मुसलमानांच्या शरीकांत सांगितलेलें आहे आणि याप्रमाणे वागावयास मुसलमान आजच्या काळातही कसूर करीत नाहीत. मी म्हणतो ती त्यांची शूराची निष्ठा आहे. मग ती बरोबर वा चूक कशीही असो. काही वर्षांपूर्वी अुत्तर हिंदुस्थानात अेका मुसलमानाला हिंदूची दीक्षा देण्यात आल्यामुळे दुसऱ्या अेका मुसलमानाने त्याचा

खून पाडला. तेव्हा चाललेल्या खटल्यात आज अिंग्रज राज्यातही मुसलमान बॅरिस्टरांनी मुसलमानी कायद्याप्रमाणे आरोपीने केलें तेंच वरोबर केलें असें प्रतिपादन केलें होतें ! मुसलमान काफीर झाला तर दुरात्मा म्हणून त्याचा निःपात करावा व अुलट काफिराचा जर मुसलमान झाला तर त्याचा पूतात्मा म्हणून गौरव करावा अशीही त्यांची धर्माज्ञा असल्यामुळे पाकिस्तानचें मूळ किंवा खूळ आजकालचें नसून पुरातनचें आहे हें लक्षात येईल. नुकतेच बंगाल्यात जे भीषण दंगे व हत्याकांड मुसलमानांनी केलें त्या वेळी हिंदूंना त्यांनी सक्तीने कसें वाटविलें, स्त्रियांचे केस कापून, त्यांना अर्धनग्न करून त्यांना विजारी चढवून लगेच कोणत्या ना कोणत्या मुसलमानाशी निका लावून देअून त्यांची कशी विटंबना केली तो प्रकार ताजाच आहे. शिवाय पाकिस्तानात मुसलमानांप्रमाणे अिंग्रजांचाही म्हणजे राज्यकर्त्यांचाही संबंध आहे हें लक्षात ठेवा.

कुराणात पाकिस्तान

पाकिस्तान मुसलमानांनी आजकाल निर्माण केलेलें नाही. तें जिनांनी निर्माण केलेलें नसून त्यांच्या कुराणानेच निर्माण केलें आहे. त्यांच्या कुराणात तशी धर्माज्ञाच केली आहे दारुल अिस्लाम व दारुल हर असेच दोन निःसंदिग्ध भाग मानून दारुल हरचा निःपात करावा अशी त्यात स्पष्ट आज्ञा आहे. दारुल अिस्लाम म्हणजे अिस्लामी जगत् व दारुल हर म्हणजे काफिरांचें जगत्. अिस्लामेतर जो जो कोणी असेल तो तो काफिर, दारुल हरचा समजून त्याचा निःपात करावा अशी धर्माज्ञा असल्यामुळे आणि मुसलमान हे कडवे असल्यामुळे ते त्या आज्ञेची अंमलबजावणी केल्याशिवाय सोडीत नाहीत. कुणी शहाणे म्हणतात की, काँग्रेसने केलेल्या छळामुळे प्रथम मुसलमानांनी ही पाकिस्तानची कल्पना काढली. पण तें खोटें आहे. काँग्रेसने अुलट मुसलमानांचे वाटेल तसे लाडच केले. साप असताही त्याला जवळ जाअून दूध पाजण्याचा अविवेकीपणा तिने केला आहे.

कृतघ्न होअू नका

सारांश पाकिस्तानचीं बीजें फार जुनीं आहेत. पाकिस्तान हा शब्द अलीकडला नवा असला तरी मागणी किंवा आकांक्षा किंवा महत्त्वाकांक्षा पुरातन आहे व ती साध्य करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न मुसलमानांनी केलेले आहेत. १९३० साली महमद अिकबाल यांनी आपल्या पुस्तकात या योजनेचा विचार केलेला आहे. मुसलमान दंगे करतात ते तात्कालिक स्फूर्तीने काही तरी निमित्ताने करतात असें नसून त्यामागे शिस्त आहे. खरे दंगे गुंड करीत नसून त्यांचे पुढारी करतात ! मुसलमान मशिदीत जमावाने जमतात पण बाहेर पडताच नेमके देवळेंच फोडावयास कसे जातात ? अर्थात् अशा वेळी त्यांना हिंदूंनीही पद्धतशीरपणेच

प्रतिकार केला पाहिजे. अशा प्रतिकार करणाऱ्या लोकांना 'गुंड' ही पदवी हिंदु वर्तमानपत्रकर्त्यांनी लावावी ही शरमेची गोष्ट आहे. मुसलमानी आक्रमकांचा प्रतिकार करण्यासाठी हिंदु 'गुंड' जिवावर अुदार होअून पुढे सरला होता म्हणूनच वर्तमानपत्राच्या ह्या लेखकाला सुखाने आपल्या कचेरीत बसून 'गुंड' ही शिवी त्याला देता आली ! हे 'गुंड' लढतात म्हणूनच अितर हिंदु जगतात ! म्हणूनच दंग्याच्या वेळी तुमचें संरक्षण करणाऱ्यांना 'गुंड' ही शिवी देण्याचा कृतघ्नपणा तरी करू नका ! डाक्क्यात मुसलमानांनी कहर केला, नंतर अहमदाबादेत केला, तेव्हा हिंदूंचे डोळे अुघडले. अेखादा पाअूस झाल्यावरोबर जसें गवत वाढतें त्याप्रमाणे हिंदुसंघटनाची वृत्ति अेकदम तेथे अंकुरित झाली. मी मुद्दाम गवताची अुपमा देतो. कारण महाराष्ट्राप्रमाणे ती तेथे अेखाद्या वट-वृक्षासारखी चिरंजीव व प्रचंड अद्याप झाल्यासारखी नाही; कारण तो गांधीजींच्या गुजराथी लोकांचा प्रांत आहे. पण गुजराथी झाले तरी हिंदुच, आमचेच भाअुबंद आहेत. त्यांच्या संरक्षणासाठीही हिंदुसभेने कष्ट केले. त्यानंतर मुंबईस मुसलमानांनी दंगे केले. पण अभिमानाची गोष्ट आहे की अेका हातात पिनल कोड घेअून व दुसऱ्या हातात प्रतिकारार्थ शस्त्र धरून हिंदूंनी पिनल-कोडाच्या मर्यादा न अुल्लंघिताही असा जोरकस प्रतिकार केला की, नेहमीच्या अुलट मुसलमानांनाच दंगा बंद होअू द्या अशी सभा भरवून ठराव करण्याची पाळी आली ! पठाण नुसता गुरकावून गेला तरी आसपास लोकांची पांगापांग व्हावयाची असा जुना दंडक. त्याच पठाणांनी मुंबअीत दंगा थांबू दे, आम्हांला जगू दे, म्हणून सभा केल्या !

संधिसाधु धोरण

आपल्या स्वार्थासाठी मुसलमान वाटेल ती परस्परविरोधी मागणी प्रसंग पाहून करीत असतात. डेमॉक्रसीमध्ये बहुमताला किंवा बहुसंख्येला केव्हाही मान असलाच पाहिजे. हिंदुस्थानात मुसलमान बहुसंख्य कधी तरी होणें शक्य आहे काय ? पण मूठभर मुसलमानांना हिंदूंच्या बहुमताखाली अल्पसंख्याकांचे योग्य ते हक्क घेअून राहणें नको आहे. त्यांना मुजोरी करून स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहावयाचें आहे आणि म्हणून जिनांनी डेमॉक्रसी हिंदुस्थानला अुपयोगीच नाही येथपासून सुरुवात केली आहे !

पाकिस्तान शब्दच चीड आणणारा

पाकिस्तान हा शब्दच मुळी चीड आणण्यासारखा आहे. पाक म्हणजे शुद्ध आणि नापाक म्हणजे अशुद्ध ! हे कृतघ्न मुसलमान आपलें पाकिस्तान स्थापून आम्हां बहुसंख्य हिंदूंस अशुद्ध ठरवू पाहतात काय ? जिनांनी काढलेलें जें

पाकिस्तान त्याची कल्पना अशी आहे की, वायव्य सरसीमाप्रांत, बलुचिस्तान, सिंध, पूर्व बंगाल, पंजाब यांचें स्वतंत्र मुसलमानी राष्ट्र व्हावें, त्यांना हिंदूंच्या सत्तेचा संपर्कही नसावा. आज अिंग्रज जबरदस्त असल्यामुळे आपला अिंग्लंडशी संबंध तोडून टाकावा असें जिनांना म्हणता येत नाही. म्हणून ते त्यांचें अधिराज्य मानावयास तयार आहेत अितकेंच! कारण तोफेपुढे मुसलमानांचें धर्मशास्त्रही लटपटतें! जिनांना वरिष्ठ सत्ता अिंग्रजांची असली तरी चालेल पण त्यांना हिंदूंचा संपर्कही नको. शिवाय पाकिस्तानच्या योजनेत नुसतेच अुत्तरेतील प्रांत नाहीत. त्यांना खाली दक्षिणेत असलेलें निजामचेंही संस्थान पाकिस्तानादाखलच हवें आहे मुसलमानांची हरामखोरी अशी आहे की त्यांना नुसता प्रदेशच पुरेसा नाही. त्यांना समुद्रकाठचीं बंदरेंही हवीं. यासाठी आसामही त्यांना पाहिजे.

परस्वापहाराची दुष्ट वासना

पूर्व बंगाल्यात मुसलमानांची बहुसंख्या आहे म्हणून तो प्रदेश मुसलमानांना अेक वेळ तर्कदृष्ट्या देता येअील. परंतु आसामात मुसलमानांचा काहीअेक हक्क-संबंध नसता केवळ मुसलमानांना पूर्व समुद्राचें द्वार खुलें हवें म्हणून त्यांनी त्याची मागणी करणें ही शुद्ध हरामखोरी आहे. हिंदूंनी अशी गोष्ट कालत्रयीही होअू देता कामा नये. मुसलमानांचें तर्कशास्त्र सोय पडेल तसें बदलतें. काश्मिरात राजा हिंदु आहे, पण बहुसंख्य प्रजा मुसलमान आहे म्हणून त्यांना तेथे मुसलमान राजा हवा आहे. राजा हिंदु असला तरी संस्थान मुसलमानांचेंच आहे असें ते प्रतिपादितात. पण तोच न्याय दक्षिणेतील निजामाला मात्र लावण्यास ते तयार नाहीत. निजाम राज्यात बहुतेक सर्व प्रजा हिंदूंची अमून राजा मात्र मुसलमान आहे. काश्मिरचा न्याय हैद्राबादेस लावावयास मुसलमान तयार नाहीतच. अुलट निजामालाही समुद्रद्वार नाही म्हणून आंध्र प्रांत निजामाला द्यावा अशी त्यांनी मागणी सुरू केली आहे! अेवढ्यानेही भागलें नाही. त्यांना हिंदुस्थानच्या मध्यावर अजमीरचेंही अेक स्वतंत्र पाकिस्तान निर्माण करावयाचें आहे. अजमिरास चिस्तीची कबर आहे. याच चिस्तीने पूर्वी तेथे गुपचूप फकिरासारखे राहून महंमद कासिमाला माहिती पुरवून त्याच्याकडून सिंधवर स्वारी करविण्याचें पुण्यकृत्य केलें! त्या चिस्तीच्या निमित्ताने तेथे मुसलमानांचें अेक यात्राक्षेत्रच निर्माण झालें आहे. तें अजमीर पाकिस्तानातच रूपांतरित करावें अशीही मुसलमानांची अेक मागणी आहे. या सर्वांत त्यांचा हेतु हिंदुस्थानच्या अुत्तर टोकापासून दक्षिण टोकापर्यंत मुसलमानी सेना वाटेल तशी खेळविण्यासारखी 'कॉरिडर' निर्माण करून ठेवावी असा आहे.

उपाय काय ?

पण मुसलमानांनी हें लक्षांत ठेवावें की, ही त्यांची योजना आम्ही कधीही सफल होऊ देणार नाही. आम्ही हिंदु बहुसंख्य आहोत. येथे आमचेंच बहुमत राहणार.

हिंदुस्थानात दोन मेजॉरिटी पार्टीज आहेत, असें कोणी शहाणे म्हणतात. पण तें अशक्य आहे. हिंदुस्थानात एक हिंदूचीच तेवढी मेजॉरिटी पार्टी असू शकेल. आज सातशें वर्षेंपर्यंत मुसलमानांशी झगडून आम्ही हिंदुच वहुसंख्य राहिलो आहो. आणि अगदी कमीत कमी आणखी सात पिढ्या तरी वहुसंख्यच राहू येवढें तरी निश्चित. पाकिस्तानचा प्रश्न सुटण्याकरिता कोणी काही आपापल्या बुद्धीप्रमाणे जो तो उपाय सुचवीत असतो. पण पाकिस्तानाचा हा रोग त्वग्रोग नसून रक्ताचा रोग आहे, हें लक्षात घेतलें पाहिजे. एकाने तर महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी गांधींकडे जाऊन सत्याग्रह थांबवावा म्हणजे पाकिस्तान चळवळ बंद पडेल अशी सूचना केली. त्याच्या विचाराच्या मौलिकतेची शिफारस करावी तेवढी थोडीच ! ! महाराष्ट्रातील पुढारी राहूच द्या, पण भिकारीही अशी गोष्ट करणें अपमानास्पद समजेल.

शाप तरी देऊ नका

पाकिस्तानावर उपाय एकच नि तो हा की, प्रचंड हिंदुसंघटना वनवून ती योजना खणून काढणें. आम्ही उदारपणाने मुसलमानांना सांगतो की, अल्पसंख्याकांचे जेवढे रास्त हक्क आहेत, तेवढेच तुम्हांस मिळतील. वेटेज् , स्पेशल रिप्रेझेन्टेशन यांचें नांवही काढू नका. पाकिस्तानचा प्रश्न तर्काने, तत्त्वज्ञानाने अथवा टीकेने सुटणार नाही, तो फक्त हिंदुसंघटनेनेच सुटणार आहे. यासाठी महाराष्ट्रातील हिंदुमात्राने प्रथम हिंदुसभेचे सभासद व्हावें व निवडणुकी येवोत, गोलमेज परिषद येवोत तेथे हिंदूंचें हितरक्षण करणारे हिंदुच पाठवावे. आज बंगाल किंवा इतर प्रांत बोलू शकत नाहीत ती गोष्ट महाराष्ट्र निर्भयपणे सांगत आहे. महाराष्ट्राने पडत्या काळातहि भगवा ध्वज व हिंदुत्व यांची भावना धगधगत ठेवली होती. ती जागृति आता अखिल भारतात पसरत आहे. कोनाकोपऱ्यात तिचा प्रभाव दिसत आहे. पंजाबापासून कन्याकुमारीपर्यंत हिंदुत्वाचे भावनेने जनता वेहोष झाली आहे. यावेळी मात्र एकच विनंती करावयाची आहे. तुम्ही कोठेहि जा, पण अंत:करणातील हिंदुत्वाची जागती ज्योत पेटलेली घेऊन जा व प्रत्येक ठिकाणी भगवा ध्वज डौलाने अुंच फडफडत ठेवा. ज्यांना हें पटत नसेल त्यांनी आमच्या या कार्याला आशीर्वाद द्यावा, निदान शाप तरी देऊ नये ! महाराष्ट्राची जगात प्रौढि झाली तर तुम्हांस काही सुतक तर येणार नाही ना ? आजच्या या मंगल दिनी आपण प्रत्येकजण अशी शपथ घ्या की, 'हिंदूचें हित तेंच आमचें राष्ट्रीयत्व' तें आम्ही अभेद्य ठेवू आणि प्राण पणाला लावून हा पूज्य भगवा ध्वज आम्ही भरतखंडात अखंड फडकत ठेवूच ठेवू.

—केसरी, ५ ऑगस्ट १९४१

✦ ✦ ✦

३५. अखंड भारताच्या स्वातंत्र्यार्थ लढण्याचा आम्ही निर्धार केला आहे.

मुस्लिम लीगचा कार्यक्रम, ध्येय आणि धोरण काय आहे, याविषयी त्यांनी अगदी स्पष्टपणे आपली बाजू मांडावी असें जें आम्हांला वारंवार वाटत होतें ती गोष्ट मद्रास येथे भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात घडली असल्याने आम्हांला फार समाधान वाटत आहे. यापुढे मुसलमानांच्या मनात काय चाललेलें आहे, याविषयी काँग्रेसभक्तांनाही शंका राहण्याचें काहीच कारण उरलेलें नाही. आणि आगामी संकटाला तोंड देण्याच्या सिद्धतेने त्यांनाही सज्ज राहिलें पाहिजे.

बॅ. जिना यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात काँग्रेसवर जोराचे कोरडे ओढले असून करडया वाणीने त्यांनी अखेर काँग्रेसला आज्ञा सोडली, 'अद्यापपर्यंत तुमच्या वर्किंग कमिटीने आमच्या पाकिस्तान योजनेचा विचार केला नसेल तर तिला तो करावयाला सांगा.' काँग्रेसनेही जिनांचें समाधान करील अशा प्रकारची मुत्सद्देगिरी आचरण्यास आपण सिद्ध आहों असें दाखवून दिलें आहे.

सिंहाचा निर्णय नि लांडग्यांची बकबक

हिंदुमहासभेच्या बाबतीत मात्र जिनाशहांना कोरडेही ओढण्याचें साहस झालें नाही किंवा तर्कवाद करण्याचीही भ्रांत उरली नाही. त्यामुळे अखेर निराशेने ते उद्गारले, 'हिंदुमहासभा ही एक ताठर आणि सहआचार-विचारास निरुपयोगी अशी संस्था आहे व मला तिच्याशी काही कर्तव्य नाही.' या उद्गारांनी आम्हांला पुढीलं गोष्टीची आठवण होते.

कोण्या एका वेळी देववनात राहणाऱ्या लांडग्यांना त्या वनात आपला सवता सुभा उभारण्याची आकांक्षा उत्पन्न झाली. या सवत्या सुभ्यात दुसऱ्या कोणाचेंही बोट शिरकता कामा नये, त्यावर सर्वस्वी लांडग्यांचीच अधिसत्ता चालली पाहिजे, असें त्यांना वाटू लागलें. म्हणून त्यांनी आपल्या प्रतिनिधींना त्याप्रमाणे सदर वनात घोषणा करण्याविषयी सांगितलें व आराधनेचें धोरण स्वीकारून किंवा धाकदपटशा दाखवून सर्वांची संमति या घोषणेला मिळविण्याविषयी आज्ञा सुटल्या.

काही काळाने पुनः सगळे लांडगे आपल्या योजनेचें काय झालें, याचा विचार करण्यासाठी एकत्र जमले, तेव्हा त्यांच्या प्रतिनिधींनी अशी माहिती सांगितली की, देववनातील बहुतेक सर्व पशूंनी त्या घोषणेला संमति दिली आहे.

बोकड, कोंबडया आणि गाढवें यांनी या योजनेला नुसती संमतीच दिली असें नाही तर या योजनेशी सहकार्य करून लांडग्यांच्या सवत्या सुभ्याप्रमाणेच स्वतःचाही एकेक सवता सुभा करण्याचे संकल्प सोडले. पण 'गजराजांनी काय केलें 'असा एकाने सवाल टाकला.

प्रतिनिधी उत्तरले–'गजराज हे प्रचंड आणि शक्तिमान् पशु आहेत खरे, पण ते सहजसुलभ रीतीने वनू शकतात व त्यामुळे थोडीशीं वळणें घेऊन किंवा थोडासा दम देऊन त्यांचेकडून ही योजना सहज मान्य करून घेता येईल.'

'पण सिंहाचें म्हणणें काय आहे? कारण त्यांच्याच म्हणण्याला विशेष महत्त्व आहे' असा आणखी एक सवाल आला. तेव्हा आपले खांदे उडवून लांडग्यांचा प्रतिनिधि म्हणाला, 'सिंहांचा प्रश्न काढूच नका. देववनांतील सगळ्या पशूंत हा प्राणी अगदी असहिष्णु आणि सहकार्याला किंवा सहविचारावावत निरुपयोगी आहे. तो आपल्या योजनेच्या तत्त्वालासुद्धा मान्यता देणार नाही. आराधना किंवा लपंडाव यांना तो केव्हाही दाद देणार नाही, म्हणून त्याचा विचारच करावयाचा नाही असें मी ठरविलें आहे.'

'पण त्याचा विचारच करायचा नाही असें तुम्ही ठरविलेत तरी जर सिंहाने यावावत उदासीन राहण्याचें नाकारलें तर?' पण या प्रश्नाला मात्र कोणालाही उत्तर देता येईना.

या गोष्टीपासून घ्यावयाचा बोध अगदी स्पष्ट आहे. आपलें पाकिस्तान सिद्ध करून घेण्यासाठी लीगने हिंदुमहासभेला तोंड देण्याचें नाकारण्याचें कितीही ढोंग केलें तरी अंतर्यामी लीगनें हें ओळखलें आहे की, हिंदुस्थानचें भवितव्य ठरविताना अखेर केवळ हिंदुमहासभेचाच विचार करणें त्यांना भाग पडेल. काँग्रेस ही मुसलमानांची प्रतिनिधि नाही हें जिनांनी मान्यच केलें आहे, उलट ती हिंदूचीही प्रतिनिधि नाही. त्यामुळे आता काँग्रेस हें एक राष्ट्रीय सामर्थ्य म्हणून गणले जाऊ शकणार नाही आणि तिची मान्यता म्हणजे राष्ट्राची मान्यता किंवा निदान हिंदूंची मान्यता असें तरी खचित होणार नाही.

लीगला असें वाटू लागलें की, लौकरच पाकिस्तानच्या योजनेला काँग्रेसची मान्यता मिळविता येईल आणि म्हणूनच बॅ. जिना यांनी हिंदुमहासभेवर वर उद्धृत केलेला ठपका ठेवला आहे. पण हा छाप मारण्यानेच हिंदुमहासभेच्या निर्भेळ आणि निर्दोष अशा राष्ट्रीय भूमिकेविषयी आपण एक प्रकारे मान्यता देत आहो, ही गोष्ट बॅ. जिना यांच्या ध्यानात आली नाही. आपला 'जन्मसिद्ध हक्क' विकण्यास काँग्रेस सिद्ध होवो अगर न होवो, पण जोपर्यंत हिंदुमहासभा अस्तित्वात आहे तोपर्यंत त्या हक्कांचें संरक्षण ती करीलच करील. तिचा तो अधिकारच आहे. सिंधूपासून तो समुद्रापर्यंत पसरलेल्या भरतभूचें स्वातंत्र्य आणि अविभाज्य सार्वभौमत्व रक्षिणें हा हिंदुराष्ट्राचा, हिंदुत्वाचा, 'जन्मसिद्ध हक्क' आहे. ही गोष्ट लक्षात घेऊनच सिंध, बंगाल, मुंबई किंवा मद्रास ज्या ठिकाणी अलीकडे मुस्लिम लीगच्या बैठकी झाल्या त्या त्या ठिकाणी त्यांनी असा दम भरला की, जर हिंदुसंघटनवादी लोक दाती तृण धरून आमच्या या योजनेला मान्यता देणार नाहीत तर अंतर्गत यादवीचा धोका आल्याशिवाय

राहणार नाही. मद्रासला जिनांनीसुद्धा सांगितलें की, हिंदूंनी हिंदुमहासभेचें नेतृत्व सोडून द्यावें, नाही तर त्याचे भयंकर परिणाम त्यांना सहन करावे लागतील.

ठीक तर, आता हिंदूंचें हृद्‌गत ऐका

या शब्दांनी आम्हांला मुसलमानांचीं हृदयें स्पष्टपणे कळून आलीं ही फार चांगली गोष्ट झाली. आम्हीही आता त्यांना थोड्याफार प्रमाणात आमचें हृद्‌गत स्पष्ट करून सांगू इच्छितो. मुसलमानांना आपल्या मर्जीप्रमाणे भारतभूचे तुकडे पाडता आले नाहीत तोपर्यंत ज्याअर्थी अंतर्गत यादवीची धमकी ते आम्हांला उघडपणे देत आहेत, तोपर्यंत मुसलमान हें अंतर्गत युद्ध आमच्यावर केव्हा, कोणत्या स्वरूपात लादतील याविषयी आम्ही आपसांत मोकळेपणाने चर्चा करण्यास मुक्त आहोत. या संभाव्य यादवीबाबत मुलिस्म लीगच्या छावणीतील काही उमदे वीर जर आम्हांला थोडेसें साहाय्य करतील तर तें आम्हांला उपयोगीच आहे. अर्थात् त्यांना स्वतःला त्याविषयी काही कल्पना असेल तर! मुसलमान सत्वरच हें युद्ध पुकारू इच्छितात तर मग त्या युद्धासाठी लागणारें सैन्य आहे तरी कोठे? लहर लागेल तेंव्हा हिंदुस्थानातील अनेक नगरांत शांतताभंग करणारे मुसलमान गुंड आणि मवाली तेवढेच या सैन्यात असूं शकतील काय? तर मग त्यांचीं हीं स्वप्नें फोल आहेत असें म्हणावें लागेल. शिवाय ठिकठिकाणच्या हिंदूंत आता स्वसंरक्षणाची जागृति इतकी उत्पन्न झाली आहे की, त्यामुळे अनेक ठिकाणी दंग्यातसुद्धा मुसलमानांना हिंदूंपेक्षा अधिक किंमत द्यावी लागली आहे. काही प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळें असताना हे दंगेखोर त्यांना नमवूं शकले असतील कदाचित्. पण लवकरच अनेक प्रांतांत हिंदुसंघटनवाद्यांची मंत्रिमंडळें अधिकारारूढ झालीं म्हणजे त्यांची काय वाट?

किंवा कदाचित् असें तर नसेल, की काही जागतिक धक्क्यामुळे हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता संपुष्टात येईल व मगच हिंदुस्थानात हिंदु व मुसलमान यांच्यामध्ये अंतर्गत यादवी व अराजकता माजल्यानंतर मुसलमान हे युद्ध पुकारून हिंदुराष्ट्राला नमविण्याचे मनोरे रचीत असतील. तसें जर असेल तर तुमच्या नुसत्या पाकिस्तानच्या प्रस्तावाने थोड्याच वर्षांत हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्य नाहीसें होईल असें मानणें हें फाजील विश्वासाचेंच नाही का? आणि समजा की, या वर्षाच्या आतच तशी अवस्था प्राप्त झाली तरी जर हिंदी मुसलमानांच्या साहाय्याला बाहेरच्या एखाद्या प्रबल राष्ट्राचा पाठिंबा मिळाला नाही व हिंदुस्थानातील मुसलमानांना हिंदूंशीच एकाकी सामना द्यावा लागला तर आपलीं स्वप्नें खरीं करता येतील अशी अपेक्षा मुसलमान बाळगतात काय?

तुमचा हुकमी एक्का म्हणजे फार तर हैद्राबादचा निजाम व सरसीमेवरचे टोळीवाले. पण तशी अवस्था येईल तर हिंदूंच्या बाजूला निर्विवादपणे प्रबळ असे पांचपन्नास हिंदु संस्थानिक खास एकत्र उभे राहू शकतील. शिवाय या सर्वांच्यावर स्वतंत्र आणि सामर्थ्यवान् असें नेपाळचें राज्य आहे तें वेगळेंच. तसा प्रसंग आलाच तर आपल्या सहस्रावधि, शिस्तीत वाढलेल्या अशा सशस्त्र सैनिकांसह हिंदुत्वाच्या रक्षणास नेपाळ केव्हाही उभें ठाकेल. म्हणून अशा परिस्थितीत जरूर ती लढाई हिंदु राष्ट्रावर लादण्याचीं स्वप्नें मुसलमान पाहत असतील तर आम्ही हिंदुसंघटनावादी लोक त्यांना असें आश्वासन देतो की, असा प्रसंग येईल तर घाबरून न जाता हिंदुराष्ट्राच्या इतिहासात जन्मोजन्मी न मिळणारी अशी सुवर्णसंधि आली असें म्हणून आम्ही त्या संग्रामाचें स्वागतच करू व परत गेलेलें हिंदुराष्ट्राचें वैभव आम्ही परत मिळवू.

हिंदु–बुद्ध संघटना दूर नाही

खिलाफत चळवळीच्या वेळी हिजरातच्या बाबतीत कडू अनुभव आला असताही तुम्ही कदाचित् असें मानीत असाल की, तुम्हां हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या साहाय्याला बाहेरच्या स्वतंत्र मुसलमान राष्ट्रांतील मुसलमान धावून येतील. पण ज्या राष्ट्राला स्वतंत्र आणि लष्करी दृष्टया सामर्थ्यसंपन्न राष्ट्र म्हणता येईल, असें एक तरी मुसलमान राष्ट्र उभ्या जगतात दाखविता येईल काय?

आणि घटकाभर वादविवादासाठी अशी मुस्लिम राष्ट्रांची फळी हिंदुत्वावर घाला घालण्यासाठी अुभी करता आली असें मानलें तरी या फळीचा प्रतिकार करण्यासाठी हिंदूंची नि बुद्धांची एकजूट निर्माण होण्याचाही बराचसा संभव आहे. तसा एखादा संधि घडवून आणता येईल अशीहि शक्यता निर्माण झालेली आहे. मुसलमानांना जर भरदिवसा इस्लाम राष्ट्रसंघाच्या फळीचीं स्वप्नें पहाता येत असतील तर अुलट जम्मूपासून तों जपानपर्यंत त्यांच्याविरुद्ध हिंदु-बुद्ध एकजुटीचीं स्वप्नेंही आपणांला पाहता येणार नाहीत काय? मुसलमान जर आपलीं स्वप्नें सत्यसृष्टीत आणण्याची अशी अपेक्षा करीत असतील तर हिंदु-बुद्धयुति घडवून आणण्याचा विचार करण्यास आम्हांस तरी प्रत्यवाय काय? पहिली योजना जर अस्तित्वात येणार असेल तर दुसरी घटना घडून येगेंही अशक्य नाही व दुसरी संघटना ही पहिल्या संघटनेला चिरडून टाकण्यास समर्थ होईल.

अशा प्रकारे स्वप्नसृष्टीत वावरण्याचें सोडून देअून मुसलमान जर वस्तुस्थितीचा विचार करतील तर पाकिस्तानयोजनेनुसार हिंदुस्थानात वेगवेगळीं लहान मुसलमान राष्ट्रें प्रस्थापित करणें हें अहिताचें आहे हें त्यांच्याही लक्षात

येईल. मुसलमानांच्या विश्वासघातांचीं प्रतीकें म्हणून राहणाऱ्या या लहान राष्ट्रांच्या भोवती असणाऱ्या प्रबळ हिंदुराष्ट्राचें सामर्थ्य एकाच दिशेने संघटित होत राहून त्यांच्या दडपणापुढे या राष्ट्रांना किती काळ व कशा प्रकारे तग धरता येईल ? घटकाभर तुमचें पाकिस्तान आलें तरी त्याचें चित्र कसें राहील तें पहा.

आणि हें पाकिस्तानचें चित्र पहा !

तिकडे पंजाबात शिखांचें कृपाण सदैवच तुमच्या छातीवर रोखलेलें राहील, बंगाल्यात चोहो बाजूंनी आसामपासून बिहारपर्यंत कोट्यवधि हिंदूंकडून तुम्ही घेरले जाल, भोपाळच्या भोवती प्रबळ हिंदुसंस्थानिकांचें कडें राहील आणि दक्षिणेत सदैव लढवय्ये मराठे, आंध्र आणि तामीळ हे निजामावर झेप घालण्याचा क्षण येण्याची वाट पाहत राहतील.

अशा स्थितीतील अवस्था हिंदूंच्यापेक्षा मुसलमानांच्या संरक्षणाच्या दृष्टीनेच अधिक तापदायक ठरणार नाही काय ? नकळतपणे बॅ. जिना यांनी आपल्या मद्रासच्या अध्यक्षीय भाषणातच हें चित्र रेखाटलेलें दिसतें.

पाकिस्तानचीं हीं घटक राष्ट्रें जणू काय लौकरच अस्तित्वात येणार आहेत, असें भासवून आपल्या श्रोत्यांना चढविण्यासाठी बॅ. जिनांनी जर्मनांनी निर्माण केलेल्या क्रोट राष्ट्राचा दाखला दिला. येवढेंच नव्हे, तर पुढे जिनांनी ब्रिटिशांनाही इषारा दिला की, ते जर पाकिस्तान राष्ट्राची प्रस्थापना करणार नाहीत तर दुसरें कोणीतरी येऊन तें कार्य करतील.

जिनांनी आपल्या पाकिस्तानाला क्रोट राज्याचा दाखला देऊन आपलीच बाजू लंगडी करून घेतली. आपल्या विशाल राष्ट्रीयत्वाला विसरून सवत्या सुभ्याचीं स्वप्नें अुराशीं बाळगल्यानेच शेजारच्या प्रबळ राष्ट्रांच्या सामर्थ्याखाली त्यांना सदैवच चिरडलें जावें लागेल हेंच नेमकें जिनाशहा विसरले.

अशा प्रत्येक लहान जमातीने क्रोट लोकांच्यापासूनच हा धडा घ्यावयास हवा की, जोपर्यंत हीं लहान लहान राष्ट्रें आपल्या शेजारच्या प्रबळ राष्ट्रात तादाम्य पावत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या दैवी सदैव वनवास आणि पारतंत्र्यच ठेवलेलें आहे ! जर्मनांची पाठ फिरताच दुसऱ्या प्रबल साम्राज्याने जोपर्यंत धाड घातली नाही तोपर्यंतच आजचें जर्मनदत्त स्वातंत्र्य क्रोट लोकांना अुपभोगता येईल. हिंदुस्तानात येणाऱ्या पाकिस्तानाच्या योजनेच्या कपाळी क्रोट जमातीचेंच भवितव्य येईल, ही गोष्ट बॅ. जिना यांनी नकळत सांगून टाकलेली आहे.

शिवाय असल्या पाकिस्तानाच्या पावसाळी छत्रीप्रमाणें असणारे जन्म हे काही हिंदुराष्ट्राला नवे नाहीत. गेलीं १०,००० वर्षें हिंदुराष्ट्राने आपलें संघटन आणि संवर्धन करताना अशा अनेक शकस्थानांना व हूणस्थानांना आपल्या बळकट मगरमिठीत कवटाळून नामशेष केलेलें आहे ! तुमचें अगदी जवळचें

असें मोंगली साम्राज्यसुद्धा मराठ्यांनी हां हां म्हणतां स्थानभ्रष्ट केलें. काय घडतें आहे हें लक्षात येण्यास पुरेशी अुसंतसुद्धा त्या साम्राज्याला मराठ्यांनी दिली नाही. तुमची पाकिस्तानची कल्पना यदाकदाचित् प्रत्यक्षात आली तरी अल्पकालीन जीवनानंतर तिचीसुद्धा वरीलप्रमाणेच गति झाल्याशिवाय राहणार नाही.

अशीं छपन्न पाकिस्तानें आम्ही पचविलीं आहेत

जिवंत अितिहास हीच गोष्ट अुद्घोषित करीत आहे की, अशी छपन्न पाकिस्तानें येतील आणि जातील पण हिंदुस्थान हें कायम आहे आणि राहीलही.

म्हणून हिंदुस्थानातील मुसलमानांना आपली जाति टिकवून शांतता व सुबत्ता अुपभोगण्याचा, अखंड हिंदुराष्ट्रात समाविष्ट होअून नांदण्याचा, हा एकच मार्ग आहे आणि त्यालासुद्धा पुढील शर्ती आहेत.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य त्यांना मान्य असलें पाहिजे; भरतखंडाचें व हिंदुराष्ट्राचें अविभाज्यत्व त्यांनी मान्य केलें पाहिजे; लोकसंख्येच्या प्रमाणातच प्रतिनिधित्व स्वीकारण्यास त्यांनी सिद्ध असलें पाहिजे; सरकारी नोकऱ्या या केवळ गुणनिविष्टच राहाव्यात हें त्यांनी मान्य केलें पाहिजे; व पूजास्वातंत्र्य, भाषा व लिपि स्वातंत्र्य हें सर्व नागरिकांना सारखेच अुपभोगिण्यास मिळावयाचे मूलभूत अधिकार आहेत याला त्यांची मान्यता मिळाली पाहिजे.

हिंदुस्थानची भावी घटना याच मुलभूत तत्त्वांचा आधार घेअून मग रचली गेली पाहिजे. भावी भारतीय शासनसंस्थेचीं हीं मूलभूत तत्त्वें होत. तीं सर्वांना सारखाच न्याय देणारींही आहेत.

केवळ या आणि याच अटींवर आम्ही हिंदुबांधव आपल्या मुसलमान बांधवांना मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी व प्रबळ अेकसंध भारतीय राष्ट्राच्या प्रस्थापनेसाठी आमच्या खांद्याला खांदा लावून लढण्यासाठी आमंत्रण देत आहोत.

केवळ या आणि याच अटींवर मुसलमान येणार असतील तर त्यांच्यासह, ते येत नसतील तर त्यांच्याशिवाय, आणि ते आडवे येतील तर त्यांचा प्रतिकार करून हिंदुस्थानच्या – अेकसंध अशा हिंदुस्थानच्या – स्वातंत्र्यासाठी झगडण्याचा निर्धार हिंदूंनी केला आहे !!

—केसरी ५ मे, १९४१

✦ ✦ ✦

३६. सावरकरांचा दक्षिणसंचार

माझ्या दक्षिणेकडील दौऱ्यात मी पाहिलेल्या सामाजिक व राजकीय परिस्थितीची तुम्हांस माहिती करून देण्याचा माझा विचार नाही. मला जे गमतीदार अनुभव आले ते सांगणार आहे. त्यांत येअील तितकेंच राजकारण.

यापूर्वी मी मद्रासला गेलो नव्हतो. नाही, अेकदा गेलो होतो खरा; तो म्हणजे सुमारे ३५ वर्षांपूर्वी. अंदमानाच्या यात्रेस जाताना आमचा मुक्काम मद्रासच्या तुरुंगात पडला होता. तेव्हा अेवढाच माझा व मद्रासचा पूर्वीचा संबंध होता खरा. मद्रासहून मदुरेस गेलो. मद्रासपासून मदुरेपर्यंत मधल्या प्रत्येक स्टेशनवर लोकांची प्रचंड गर्दी माझ्या सत्कारार्थ जमत असे व मदुरा येथून दौऱ्यास खरी सुरुवात झाली. तेथे काँग्रेसचें वजन दांडगें तर हिंदुसभेचें नांवसुद्धा परवापर्यंत कुणास माहीत नव्हतें. स्टेशनमध्ये गाडी शिरली तो आजूबाजूस प्रचंड जनसंमर्द पाहिला. तो पाहून मला वाटलें हे लोक माझा निषेध करण्यासाठी आले आहेत कीं काय ? मदुरा हें काँग्रेसप्रतिष्ठेचें आगर आणि मी तर हिंदु-सभेच्या कार्याचें 'पातक' करीत असलेला !

सत्यमूर्तींची धमकी वाया गेली

पण गाडी अुभी राहताच हिंदुसभेच्या जयजयकाराने सर्व प्रदेश दुमदुमून गेला. महाराष्ट्रातसुद्धा दिसला नाही अितका अुत्साह तेथे माझ्या नजरेस आला.

तेथे जमलेल्या लोकांना हिंदुसभेची व तिच्या कार्याची फारशी माहिती नव्हती. त्यांना अितकेंच ठाअूक होतें की हिंदूंचा कोणी तरी कैवारी येत आहे.

माझ्या पूर्वी अेकच आठवडा सत्यमूर्ति तेथे जाअून आले होते. या मुक्कामात त्यांनी हिंदुसभेविरुद्ध शक्य तेवढी हाकाटी केली होती व त्या संस्थेशी संबंध ठेवणाऱ्या अगर माझ्या सभा-समारंभात भाग घेणाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाअी केली जाअील अशी धमकीही दिली होती. तरी पण हा सर्व खटाटोप व्यर्थ गेला.

मदुरा हें क्षेत्र असून त्यास 'दक्षिण-काशी' म्हणतात; यावरून त्याचें स्वरूप तुमच्या लक्षात येअील.

अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाविरुद्ध झालेल्या सत्याग्रहामुळे तेथे हिंदु समाजात बरीच अंतर्गत तेढ निर्माण झाली होती. सनातनी, अस्पृश्य, काँग्रेस, जस्टिस आणि मध्यम अशा अनेक पक्षांत तेथील हिंदु समाजाची फाळणी झालेली. माझ्या स्वागतास आलेल्या व नंतर निघालेल्या माझ्या मिरवणुकीत सामील झालेल्या मंडळीत कोणकोणत्या पक्षाचे लोक आहेत असें मी डॉ. वरदराजलु नायडू यांना विचारलें. तेव्हा त्यांनी सांगितलें की,

कितीही तीव्र मतभेद असले तरी सर्व हिंदु समाज त्या दिवशी सत्कारात अेक दिलाने सामील झाला होता. काँग्रेसपक्षीय आमदारसुद्धा त्यात होते. अुत्तरेपेक्षाही तेथे हिंदु धर्माचा अभिमान अधिक जाज्वल्य आहे हें पाहून मला संतोष वाटला.

मदुरा येथील सत्कार

तीन चार मैल मिरवणूक झाली. ती संपली. पण स्नान व भोजन करण्यासाठी देखील फुरसत देण्याची लोकांची तयारी नव्हती. अितका त्यांचा अुत्साह. मिरवणुकीत अुतरतो तोंच मीनाक्षी-मंदिराचे पुजारी आले. (हें मंदिर अस्पृश्यांना खुलें करण्यात आल्यामुळे तेथे ब्राह्मणांनी अन्नसत्याग्रह केला होता.) या पुजाऱ्यांचें सोवळें फार कडक. अितकें की ते मला भेटावयास आले ते देखील सोवळीं नेसून ! मी अस्पृश्यता न मानणारा व जातपात तोडक व ते अेका पुरातन मंदिराचे विजयनगरच्या साम्राज्यापासून पिढीजात पुजारी. पण त्यांनी माझा कोण प्रेमाने सत्कार केला व मंदिरात चलण्याचें आमंत्रण केलें. मंदिरातर्फे आचार्यांना द्यावयाचा जो सन्मान तो त्यांनी मला दिला. त्याबाबतचे पीठावर बसविणें, समंत्रक जलसिंचन वगैरे सर्व विधि केले. याचें कारण मी हिंदु समाजाचा अेक कैवारी म्हणूनच. सनातन्यांनी हा सत्कार केला म्हणून मला अभिमान वाटला. मी सद्गदित झालो.

मराठ्यांच्या मर्दुमकीची स्मृति

मी मंदिरापाशी गेलो. माझ्या मागे हजारो लोक होते. प्रवेशद्वाराशी मंदिराच्या दोन हत्तींनी आपल्या सोंडा जुळवून माझ्यावर कमान केली. हा सत्कार देखील फक्त आचार्यांनाच देण्यात येतो. मी मंदिरात प्रवेश केला. माझ्यामागे हजारो लोक घुसले. त्या मंदिराचें वैभव काय वर्णावें ! हिंदु शिल्पाचा अत्युत्कृष्ट नमुनाच तो. त्याचा विस्तारही तितकाच प्रचंड. कित्येक स्तंभांवर पुराणातील भव्य चित्रें कोरलेलीं. तेथील अेकेक अंतर्गत मंदिर आपल्या अिकडील मोठ्या मंदिराहून मोठें. पण मुख्य मंदिराची भव्यता काय सांगावी ? तीन शतकांपूर्वी मराठ्यांनी छातीचा कोट करून मुसलमानांची लाट थोपवून धरली म्हणून हें व दक्षिणेतील अितर मंदिरें शाबूत राहिलीं. नाही तर सोरटी सोमनाथ अगर काशी विश्वेश्वराच्या मंदिरासारखी त्यांची गत झाली असती, त्यांच्या मशिदी झाल्या असत्या. महागणपति, पार्वती वगैरे अंतर्गत मंदिरांतसुद्धा मी नुसता नमस्कार करून भागलें नाही, तेथे आरती वगैरे झालीच.

लिंबांचा वर्षाव

सायंकाळी सभा झाली. तेथेही कोण प्रचंड अुत्साह ! सभेस जाताना वाटेत पाहुणा म्हणून जो तो मला लिंबें देअू लागला. कोकणात ज्याप्रमाणे गूळपाणी

देण्याची पद्धति असे त्यातलाच हा प्रकार. अुन्हामुळे श्रान्त होअून येणाऱ्या पाहुण्यास थंड पेय करता यावें म्हणून हें लिंबू द्यावयाचें. माझ्या मोटारीत लिंबांचा खच पडत असे. दोन वेळा मोटार अुभी करून लिंबें बाहेर काढून टाकावीं लागलीं; त्याचप्रमाणे चंदनाच्या अुटीचे व गुलाब पाण्याचे बंब आणण्यात आले व हें सर्व माझ्या अंगावर चोपडण्यात अगर ओतण्यात येत होतें.

त्रावणकोर कीं कोकण ?

मदुरेहून मी त्रावणकोरला गेलो. तो प्रदेश पाहून कोकणची आठवण झाली. परशुरामाची कथा कोकणाप्रमाणेच त्रावणकोरबद्दलही तिकडे सांगण्यात येते. समुद्र हटविण्याची कल्पना आज 'रेक्लमेशन' या नांवाने आपल्याला परिचित आहे. तेंच पशुरामाने त्या वेळी केलें असावें व प्रदेश लोकवस्तीला व शेतीला लायक बनविला असावा. परशुरामाची म्हणून जी कथा आपण वाचतो तें अर्थात् रूपक होय. पण अशा वीरपुरुषाला अवतार म्हणणें सयुक्तिकच आहे.

कोकण व त्रावणकोर यात निसर्गाचें साम्य फार. सृष्टीचें सौंदर्य, तसेंच केळीं, नारळी, पोफळीं यांचीं बनेच्या बनें. परंतु त्रावणकोर स्वकीयांच्या हाती असल्यामुळे तेथील निसर्गाचें सौंदर्य टिकवून ठेवण्यात आलें आहे. तर कोकण परकीय सत्तेखाली, तेथील शोभा गेली आहे. आपल्या हितासाठी म्हणून का असेना, पण त्रावणकोरच्या अधिकाऱ्यांनी तेथील नैसर्गिक सौंदर्य राखलें आहे. तो निसर्ग व्यवस्थित होता. त्रावणकोरमध्ये जंगलें तोडण्यात येत असलीं तरी तीं लावण्यातही येतात व वनश्रीची शोभा कायम राहते; तर कोकणात अुपऱ्या लोकांनी सर्व विकलित करून टाकलें आहे. मी गेलो होतो तेव्हा तेथे नुकताच पावसाळा सुरू झाला होता. तेथील मनोहर दृश्यें पाहून हिंदुस्थानात पूर्वी कालिदास कसे निर्माण झाले याचें कोडें सहजी अुलगडतें.

'दरबारी' पाहुणा–तेव्हा आणि आता

क्विलॉनला आल्यापासून राजकीय दौऱ्यास प्रारंभ झाला असें म्हणता येईल. तेथील स्टेशनवर माझ्या स्वागतार्थ प्रचंड गर्दी जमली होती. स्टेशनच्या बाहेर पडताच अेक पोलिस तुकडी माझ्या रोखाने आली व तिने मला सलामी दिली. माझ्या त्या मुक्कामात मी दरबारी पाहुणा म्हणून राहावें अशी महाराजांची अिच्छा असल्याचें मला अेका अधिकाऱ्याने सांगितलें. यावर डॉ. नायडू विनोदाने म्हणाले, 'पहा, तुमचा केवढा सन्मान होत आहे तो !' मी म्हणालो, 'अहो, यात काय आहे ? दरबारी पाहुणचाराला मी नवखा थोडाच ? ब्रिटिश साम्राज्याच्या बादशहाचा पाहुणचार मी पुरा चोवीस वर्षें भोगला आहे. ! '

बाकी या व विलायतेतील त्या वेळच्या सत्कारात अेक साम्य होतें. या वेळी पोलिस अधिकारी 'ते पहा सावरकर' असें म्हणत माझ्याकडे आला. त्या पूर्वीच्या वेळीही मला पकडण्यासाठी स्टेशनवर थांबलेले पोलिस मला पाहताच 'There he is' असें म्हणत माझ्यावर तुटून पडले होते. पण येथे माझ्या हातात गुच्छ पडले, तेथे वेडया पडल्या !

क्विलॉनचें तें दृश्य पाहून माझ्या मनात अेक विचार आला. संस्थानात चळवळ कमी असा समज आहे; परंतु काही संस्थानांतून अशी जागृति आहे की जरा अक्कल दाखविली तर केवढें तरी प्रचंड कार्य होतें.

महाराष्ट्राबद्दलची भावना

यापुढे मी चंगनवेरीपर्यंत पन्नास मैल मोटारीने प्रवास केला. वाटेत दर दोन मैलांवर गावें लागत व प्रत्येक खेडचाच्या अलीकडे अर्धा मैल व पलीकडे अर्धा मैल अशी दुतर्फा गर्दी माझ्या स्वागतार्थ अुभी असे. लोकांचा हा अुत्साह अपूर्व होता. मला विशेष अभिमानाची गोष्ट वाटली ती ही की, हे सर्व लोक महाराष्ट्राकडे डोळे लावून बसले आहेत. शिवाजीमहाराज व लोकमान्य टिळक ज्या महाराष्ट्रातून आले तेथून आपण आलात अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

स्त्रीप्रधान देश

पुराणात आपण ज्या स्त्रीराज्याविषयी गोष्टी वाचतो तें अंशत: येथे अस्तित्वात आहे. आपल्याकडे वारसा मुलाला जातो तसा तिकडे मुलीला जातो. त्रावणकोरच्या गादीचा वारसा पाहा. तेथे राजाचा मुलगा त्याच्यामागून गादीवर येत नाही तर भाचा येतो. म्हणजे राजाची बहीण ही स्वामिनी समजली जाते, तिचा मुलगा हा केवळ कार्यकर्ता होय. स्त्रियांना पुष्कळ स्वातंत्र्य व अधिकार आहेत. तिकडे लग्नाला 'संबंधम्' म्हणतात. म्हणजे स्त्रीला वाटेल तेव्हा हा संबंध तोडता येतो. पण आपल्याकडील पुरुषप्रधान पद्धतीत तरी काय स्थिति आहे? आपल्याकडे 'यशवंती' विवाह होतात, तिकडे 'यशवंत' विवाह होतात! समाजाची संख्या घटत चालली आहे. तिकडील अस्पृश्यांना अेझवा अगर अेरवा म्हणतात. त्यांच्यातही जातिभेद आहेतच आणि ते तीव्र स्वरूपाचे आहेत. अेक अस्पृश्य जाति दुसऱ्या अस्पृश्य जातीशी संबंध ठेवीत नाही अितके ते तीव्र आहेत.

त्रावणकोरमधील सुधारणा

त्रावणकोरचे महाराज हे हिंदुत्वाचे कट्टे अभिमानी आहेत. महाराणी थोर मनाच्या आहेत. दिवाणांचें कर्तृत्वही थोर आहे. हें संस्थान प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोचलें आहे. हें अर्थात् सापेक्ष बोलावयाचें. अितर संस्थानांच्या मानाने

त्रावणकोर फार पुढे गेलें आहे. सबंध हिंदुस्थानात साक्षरतेचें प्रमाण दहा टक्के सुद्धा नाही, तर या संस्थानात तें पाअुणशे टक्क्यांवर आहे. दुय्यम शिक्षणाची प्रगति अशीच आहे. सध्याचे महाराज व दिवाण हे सुधारणेचे प्रयत्न अहर्निश करीत असतात.

मागे केलेलीं पापें आज निस्तरावीं लागत आहेत. सध्याचे महाराज व दिवाण नसते तर त्या संस्थानात सर्व काही ख्रिस्तमय झालें असतें. ख्रिश्चनांची वस्ती चाळीस टक्के आहे. तिची वाढ होण्यास जर वेळीच प्रतिबंध करण्यात आला नाही तर थोडयाच काळात हिंदु येथे अल्पसंख्य होतील व पुढे नाश पावतील.

अुपकारांचें फळ

ख्रिश्चन समाजानेही माझा आदरसत्कार केला. हिंदु लोक आपल्याला चिरडून टाकतील म्हणून आपण महाराजाविरुद्ध चळवळ करीत असल्याचें ते सांगतात. काय कोटिक्रम हा? मी त्यांना विचारलें, 'तुम्ही या ज्या गोष्टी बोलता तें काय तुम्ही आमचे जेते म्हणून येथे आलात?' या लोकांना आमच्या पूर्वजांनी अनाठायी औदार्य दाखवून आसरा दिला. हे मूळचे सीरियन ख्रिश्चन्स. तेथे छळ होअून त्यांस पिटाळून लावण्यात आलें. तेव्हा ते त्रावणकोरच्या किनाऱ्यास येअून लागले व त्यांनी आसऱ्याची भिक्षा मागितली. त्या वेळच्या राजाने त्यांना वसाहतीला जागा दिली व त्यांना प्रार्थना करता याव्यात म्हणून आपल्या खर्चाने चर्चसुद्धा बांधून दिलें. त्यांना ग्रामपंचायतीत प्रतिनिधित्व दिलें! तसा ताम्रपट दिला. अिंग्लंडमध्ये ख्रिस्ती धर्माचा छळ झाला त्याच्या आधीपासून त्रावणकोरमध्ये ख्रिस्ती लोक आहेत हें अैकून तुम्हांला आश्चर्य वाटेल! मी तेथील ख्रिश्चन लोकांना विचारलें, 'ज्या हिंदूंनी तुम्हांला आसरा दिला व अितकीं वर्षे राहू दिलें ते काय आताच तुमच्यावर कुरघोडी करणार आहेत काय? त्या वेळी जे हिंदु तुम्हांला ठार करू शकते पण ज्यांनी तुम्हांला आश्रय दिला, तेच हिंदु काय आता तुमचा सत्यनाश करणार आहेत?'

निदान कृतज्ञता तरी दाखवा

यावर ख्रिस्ती समाजाचे पुढारी म्हणाले, 'तुम्ही हिंदूंना अुठावणी देता म्हणून आम्हांला भीति वाटते.'

त्यांचा हा कोटिक्रम पाहून मी थक्कच झालो. मी त्यांना स्पष्ट विचारलें, 'सत्तावीस कोटी हिंदूना तुम्ही तीस लाख ख्रिस्ती विरोध करणार काय! तुम्हांला त्यात काय मिळेल? त्यापेक्षा दोस्ती कां करीत नाही? आम्ही चिरडून टाकू शकू या भीतीने तरी सरळ वागा. तुम्ही निदान कृतज्ञता तरी दाखवा? सर्पाला दूध घातल्यासारखा प्रकार होअू देअू नका.' आणि म्हणूनच हिंदु

परिषदेत मी प्रतिनिधींना विनंती केली की, काही झालें तरी ख्रिस्ती समाजाला अितकें देतो, तितकें देतो असें कबूल करून त्यांची विनवणी करीत राहू नका.

अस्पृश्यांची प्रगति

संस्थानातील अेरवा म्हणजे अस्पृश्य समाजासाठी महाराजांनी पुष्कळच केलें आहे. संस्थानचीं देयालयें अस्पृशांना खुलीं करण्यात आलीं आहेत. अितकें झालें तेव्हा अस्पृशांचे धुढारी म्हणू लागले, 'मंदिरप्रवेशाचा अधिकार मिळाला, आता आम्हांला मंदिरांची आवश्यकता नाही. आम्हांला राजकीय हक्क हवेत कारण त्यायोगे आम्हांला आर्थिक स्थिति सुधारावयाची आहे.'

मी त्यांना स्पष्ट सांगितलें की, दारिद्र्याचा प्रश्न अस्पृश्यतेचा नाही. तो स्वतंत्र आर्थिक प्रश्न आहे. फक्त अस्पृश्यच दरिद्री आहेत हा समज चुकीचा आहे. स्पृश्यांत–ब्राह्मणांतसुद्धा–दारिद्र्य आहे. अस्पृश्यता या संस्थानातून गेलीच आहे. अस्पृश्य लोक बी.अे., अेम्.अे. वगैरे पर्यंत शिक्षण घेअून काही बाबतीत स्पृश्यांच्याही पुढे गेले आहेत.

विनवणी करू नका

अेरवा लोक ख्रिश्चन होण्याची भीति घालतात. हा त्रास सात वर्षें चालू आहे. मी हिंदूंना सांगितलें की, परधर्मात जाअू नका अशी त्यांची विनवणी मुळीच करू नका. या गोष्टींना कधीच अंत नाही. शुद्धीचीं द्वारें मात्र हिंदूंनी खुलीं ठेवावींत. हे अस्पृश्य परधर्मात जाअून मग परत हिंदु धर्मात येतील तेव्हा ते खरे हिंदु म्हणून येतील.

अछूतस्थान की हिंदुस्थान

आणि ख्रिश्चन होअून तरी हे अस्पृश्य काय मिळविणार! तेथील चर्चमध्येही अस्पृश्य ख्रिश्चनांसाठी बसण्याचीं निराळीं बाकें असतात व स्पृश्यांसाठी राखून ठेवलेल्या बाकावर अस्पृश्य बसला म्हणून तेथें मारामाऱ्या व रक्तपात झाले आहेत. ख्रिश्चनही म्हणे स्वतंत्र राष्ट्र मागणार. त्यांची संख्या मोजकी. येथे अेक घर तर दहा मैलांवर दुसरें. नॉर्वेसारख्या देशाचें काय झालें तें पहा. मग या विखुरलेल्या अछूत स्थानाचें काय होणार? बहुतेक मृत्युस्थानच! अशा गोष्टी अस्पृश्यांपुढे मांडल्या की, त्यांना वस्तुस्थिति व भविष्यकाळ यांची जाणीव होते व आम्ही मरेपर्यंत हिंदुच राहणार असें ते आपण होअून बोलू लागतात.

त्रावणकोरमध्ये अस्पृश्यता अक्षरशः नाहीशी झाली. हें सर्व कोणी केलें? अहमदाबादेत अगर नाशिकासारख्या ठिकाणी जें शक्य झालें नाही तें कुणी केलें? तर आपल्याचपैकी मातीमोल, लोक ज्यांना अगदी टाकाअू समजतात, अशा अेका

महाराजाने केलें ! आपलीं हिंदु संस्थानें ही अेक शक्ति आहे. दारूचें कोठार तेथे आहे. ठिणगी टाकण्याची जरुरी आहे की केवढें तरी कार्य होअू शकतें.

शुद्धीचें प्रचंड कार्य

महाराजांनी अस्पृश्यता नष्ट केली खरी; पण जे अस्पृश्य परधर्मात गेले त्यांचें काय ? त्यांना हिंदु धर्मात आणण्याचे प्रयत्न झालेच पाहिजेत. आनंदाची गोष्ट ही की, तसे नेटाचे प्रयत्न त्रावणकोरमध्ये होत आहेत; गेल्या तीन वर्षांत पन्नास हजार अेरवा शुद्ध होअून हिंदु धर्मात परत आले आहेत. त्रावणकोर संस्थानात हिंदु मिशन नांवाची संस्था आहे. या संस्थेला संस्थानच्या वार्षिक अंदाजपत्रकात वीस हजार रुपयांची दरसाल देणगी देण्याची तरतूद दिवाण सर सी. पी. रामस्वामी यांनी केली. हिंदुधर्माच्या प्रचारासाठी ही देणगी देण्यात येत आहे असें त्यांनी स्पष्ट नमूद केलें. त्याबद्दल त्यांच्यावर गहजब झाला. परंतु ते आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत.

मुसलमानांचा चांगुलपणा

त्रावणकोरमध्ये मुसलमानांचा प्रश्न नाही असें सांगण्यात येतें. तेथील मुसलमान फार चांगले वागतात असेंही म्हणतात. पण तें खरें असल्यास मुसलमान तसे कां वागतात ? कारण ते फक्त शेकडा दोन टक्के आहेत. परवाच बंगालचे मुख्य मंत्री ना. हक्क हे मलबारला जाअून आले. मलबार हा मुसलमानांचा प्रदेश आहे. तो अरबस्थानाचा भाग आहे अशीं मुक्ताफळें त्यांनी काढलीं. त्यांना अुत्तर अितकेंच की मलबार हा जर अरबस्थानचा भाग असेल तर आम्ही जाअून अरबस्थान घेअू. ही प्रवृत्ति पाहून मी धोक्याची सूचना देअून ठेवतो की, हिंदु जर वेळीच जागे झाले नाहीत तर मोपल्यांचें बंड फिरून झाल्याखेरीज राहणार नाही.

मुसलमानांच्या पाय पसरण्याच्या कल्पना अवश्य लक्षात घेतल्या पाहिजेत. प्रथम ते राहावयास जागा मागतील, मग मशिदीकरिता जागा मागतील, मग अेक मिनिटपर्यंत वाद्यें बंद करण्याची विनंती करतील नि पुढे चोवीस तास बंदी झाली पाहिजे असा हट्ट धरतील; मग वस्ती वाढली म्हणून जादा व राखीव प्रतिनिधित्व मागतील. हा अनुभव लक्षात घेअून मी त्रावणकोरच्या हिंदूना सांगितलें की मुसलमान चांगले वागत असतील तर तुम्ही त्यांच्याशी तसेंच वागा. पण ते सदैव तसेच वागतील यावर विश्वासून राहू नका.

मुसलमान दिवाणांचें वेड

सर महंमद हबीबुल्ला हे दोनच वर्षें त्रावणकोरचे दिवाण होते. आमच्या हिंदु महाराजांचें जणू मुसलमान दिवाणाखेरीज चालतच नाही. मुसलमान संस्थानि-

कांनी मात्र हिंदु दिवाण नेमला असें सहसा दिसत नाही. सर महंमद हबीबुल्ला यांनी आपल्या जातवाल्यांना जादा व राखीव प्रतिनिधित्व देऊन टाकलें ! • सर सी. पी. रामस्वामी अय्यर हे दिवाणपदावर येताच त्यांनी हें सर्व साफ तोडून टाकलें. प्रत्येक मनुष्याला अेक मत व सर्वांनी अेकत्र मतदान करावयाची पद्धति त्यांनी सुरू केली. ख्रिश्चनांच्याकरिता मात्र त्यांनी फक्त दोनच जागा तूर्त राखीव ठेवल्या आहेत. त्रावणकोरचा व महाराष्ट्राचा संबंध तसें पाहता जुनाच आहे. टिपूने स्वारी केली तेव्हा तेथील शिष्टमंडळ पुण्यास पेशव्यांकडे आले व ब्राह्मणांचें राज्य राहणार काय असें त्याने गाऱ्हाणें घातलें. पुढे श्रीरंगपट्टणाच्या वेढ्याच्या वेळी जो जय मिळाला तो मराठ्यांच्या मदतीवरच. मराठा लष्कर सर्व साधनसामग्रीसह अगदी आणीवाणीच्या वेळी येऊन पोचलें.

हिंदुसमाजाची धारणाशक्ति

आज शतकेच्या शतकें आम्हा हिंदु लोकांवर हल्ले होत आहेत. पण हिंदु लोक नाना संकटांना तोंड देऊन वर येतात. भोपळा पाण्यात कितीही दाबला तरी जसा वर अुसळी मारतोच तशातलाच हा प्रकार आहे. याचें कारण आमच्या अंगी टिकून राहण्याची शक्ति आहे. ज्या दिल्ली शहरात मुसलमानांचें राज्य अितकीं शतकें होतें तेथे देखील आज शेकडा पाअुणशे हिंदु आहेत. ही स्थिति काय दर्शविते ? अत्याचार झाला तरी हिंदु त्याला तोंड देअील व आपलें स्वत्व टिकवून धरील !

हिंदुस्थान हिंदूंचाच

आज मुसलमानांच्या भरमसाट मागण्या पुढे येत आहेत. जर्मनीत ज्यू अल्पसंख्य आहेत. त्यांनी राखीव व जादा जागा मागितल्या नाहीत. अिंग्लंडमध्येही मुसलमान आहेत म्हणून जर त्यांनी अिंग्लंडच्या निशाणावर अेका कोपऱ्यात आमचा चांद असला पाहिजे, पार्लमेंटात, निदान ब्रिटिश रेडियोवर दरमहा दोन भाषणें तरी अुर्दूत झालीं पाहिजेत, अशा मागण्या केल्या तर त्यांची काय गत होअील हें ते जाणून आहेत. पण हिंदुस्थानात मात्र ते तोंडास येअील तें मागत सुटले आहेत. त्यांनी हें लक्षात ठेवून असावें की, हिंदु हें राष्ट्र (Nation) आहे. कारण ते बहुसंख्य आहेत. मुसलमान व ख्रिश्चन हे दोन जातीय गट (Communities) आहेत अितकेंच. हा देश हिंदूंचा आहे व त्याचें भवितव्य हिंदूंच्याच हाती राहणार. मग कोणी कितीही व कसलीही ओरड करो.

—दादर, १ मे १९४०

✦ ✦ ✦

३७. हिंदु राष्ट्राच्या अुज्ज्वल भवितव्याचें स्फूर्तिदायक गान

' राष्ट्रस्वतंत्रता ध्येयम् '

' यथासाध्यं च साधनम् '

' अभ्युत्थानाय हिंदूनाम् '

हीं लोकमान्यांचीं तीन सूत्रें होतीं. लोकमान्यांची शिकवण म्हणजे त्यांनी तेव्हा जें सांगितलें त्याचप्रमाणे अगदी तसेंच आपण आता करणेंही नव्हे. लोकमान्यांनी अुच्चारलेला प्रत्येक शब्द न् शब्द आज आचरणात आणता येणें शक्य नाही आणि तें अिष्टही नाही. मनुस्मृति ही आम्हांला कितीही जरी पूज्य असली तरी त्यातील प्रत्येक श्लोकाचें बंधन आम्हांला त्रिकालाबाधित राहिलेंच पाहिजे असें नाही. आपणांला देशकालपरिस्थितीप्रमाणे आचारविचारात फरक करावा लागतो व हीच गोष्ट राजकीय आचारासही लागू आहे.

लोकमान्यांच्या व आजच्या राजकीय परिस्थितीत फार अंतर पडलें आहे. त्या वेळी होमरूल हा शब्द अुच्चारणें देखील गुन्हा होता म्हणून तेव्हा लोकमान्य असें म्हणत, "आम्हांला अिंग्रजांविषयी प्रेम आहे, पण येथील पद्धत वाअीट आहे."

आजही आपण तसेंच म्हणू लागलो तर, त्यामुळे लोकमान्यांच्या आत्म्याला शांति मिळणार नाही. त्याचा अर्थ लोकमान्यांची शिकवण आपल्याला समजली नाही असा होअील. परिस्थितीप्रमाणे नवे डाव हे काढावेच लागतात. आपणांला जें स्वराज्य मिळवायचें आहे तें हिंदु राहून व हिंदु म्हणवूनच मिळवायचें आहे. माझ्या हिंदु शब्दावद्दल कित्येकांना विषाद वाटतो; पण त्याला अिलाज नाही. मला भूक कां लागते याला शास्त्रीय कारणें असोत वा नसोत; पण भूक लागते म्हणजे लागते. लहान अर्भकाला भूक लागते. त्याला भूक काय हें समजत नाही. त्या वयात आअीच्या अंगावर जें दूध तें बालक पितें त्या दुधालादेखील दूध म्हणून तें ओळखत नाही. पण, त्याला भूक लागते आणि त्या दुधाने त्याचें समाधान होतें; त्याचप्रमाणे मला हिंदु म्हणवून घ्यावेसें वाटतें म्हणून मी हिंदु आहे. तुमच्यातल्या ज्यांना हिंदु म्हणून राहण्याची अिच्छा आहे, ज्यांना हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य म्हणजेच हिंदूंचें स्वातंत्र्य असें वाटत असेल त्यांनी आता मी जें बोलणार आहे त्याचा खोलवर विचार करून कार्यास लागावें. तुमच्यांतल्या ज्यांना हिंदु म्हणून राहिलो काय किंवा नाही राहिलो काय किंवा ज्यांना हिंदु म्हणून रहाणेंच नको असें वाटत असेल अशा अहिंदूंनी आमचें म्हणणें तरी काय आहे हें समजून घेण्याच्या दृष्टीने माझें भाषण ऐकावें.

गेल्या वर्षीच्या देशाच्या राजकीय परिस्थितीत गांधीजी, बाबूजी आणि भाअीजी असे तीन पक्ष अुत्पन्न झाले आहेत. गांधीजी म्हणजे गांधीआद, बाबूजी

म्हणजे सुभाषबाबूंचा फॉरवर्ड ब्लॉक व भाअीजी म्हणजे रॉय. या तिघांचा अुल्लेख व्यक्तिवाचक नसून तत्त्वनिदर्शक आहे हें लक्षात ठेवा. त्यांच्यावर मी टीका करतो तेव्हा ती व्यक्तीवरील टीका नसून तत्त्वावरील टीका आहे हें स्पष्ट करून सांगितलेलें बरें. गांधी, सुभाष व रॉय हे देशभक्त आहेत व त्यांच्याबद्दल मला आदर आहे. प्रथमच सांगितलेल्या टिळकांच्या सूक्तीप्रमाणे तुमच्यांतल्या ज्यांना हिंदु म्हणून राहावें असें वाटतें त्यांनी टिळकांच्या तीन तत्त्वांच्या कसोटीवर या पक्षांना लावून पाहावें व यातल्या कोठल्या पक्षात आपल्याला शिरता येअील, का यातला कोठलाच पक्ष आपल्याला घेता येणार नाही, हें ठरवावें.

या पक्षांतला पहिला पक्ष म्हणजे गांधीवाद. या पक्षाशी आमचें मुळीच जुळणार नाही. गांधीवादाचें मुख्य तत्त्व अहिंसा; पण हें लक्षात घेतलें पाहिजे की, शस्त्राचार म्हणजे हिंसा नव्हे. All force is not violence, force aggressive only is violence.

आमचें हिंदुतत्त्वज्ञान फार प्राचीन काळापासून गीतेपर्यंत हेंच सांगत आलें आहे की, शस्त्राचार हा सदाचारही किंवा दुराचारही असू शकेल.

सत्कारणासाठी केलेला शस्त्राचार हा सदाचार आहे, आणि दुराचरणासाठी केलेला शस्त्राचार हा दुराचार आहे; आणि या गोष्टीच्यासाठी रामकृष्णांपासून शिवाजीपर्यंतच्या काळातील अनेक दाखले देता येतील. म्हणून या मूलभूत तत्त्वातच गांधीवादाचें व आपलें जमण्याजोगें नाही.

गांधीवादाचें दुसरें तत्त्व सत्य. सत्य म्हणजे जसें आहे तसें बोल. यथास्थित तें सत्य; पण, त्यांच्या या सत्याच्या व्याख्यांना तर सीमाच नाही.

पृथ्वीसिंहासारखा १५-२० वर्षें ब्रिटिशांच्या हातावर तुरी देणारा क्रांतिकारक भेटीस आला असता मॅजिस्ट्रेटला दूरध्वनि करून त्याला त्याच्या स्वाधीन करणें हें सत्यच, आणि व्हाअीसरॉयांच्या बंगल्यावर वाटाघाटी करून आल्यावर वृत्तपत्रप्रतिनिधींना ' काही नाही, आम्ही वायुमानाच्या गोष्टी केल्या' हें सांगणेंही सत्यच !

शूर शीख क्रांतिकारक थोर मनुष्य म्हणून विचारावयास आले असताना सत्याची व्याख्या शौर्य हीच करण्यात येअून तुम्ही खरे शूर असाल तर पोलिसांच्या स्वाधीन व्हा, म्हणून गांधींनी काही शिखांना सांगितलें आणि त्यांना वाटलें खरेंच निसटून जाण्यात आपण भ्याडपणा करीत होतो व ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. त्यांना २०-२० वर्षांच्या शिक्षा होअून ते अंदमानात येअून गांधीना दोष देअू लागले. मी त्यांना सांगितलें यात गांधींचा दोष नाही. तेव्हा गांधींना तें सत्य वाटलें, आज त्यांना दुसरें काही सत्य वाटेल आणि आज तसें घडत आहे.

चरखा हें सत्य, आश्रमात घडलेल्या गोष्टी लपवून ठेवणें, हेंही सत्यच; आणि मौन धरून नैसर्गिक साधनांनी न बोलता कृत्रिम साधनांनी बोलणें हेंही

सत्यच! आपल्या सत्याच्या व्याख्येशी ही व्याख्या जमण्याजोगी आहे कीं नाही हें आपणच पाहा. न्याय्य सत्यापेक्षा गांधीच्या सत्यात नेहमी सत्यापलापच असतो.

त्यांचें जें निशाण आहे त्या निशाणावर चरख्याचें चिन्ह आहे. आमच्या म्हणून असणाऱ्या ध्वजावर चरख्याचें चिन्ह असायला, हिंदुस्थान काय कोष्टचांचा देश आहे ?

आजचें हें यंत्रयुग आहे. ह्या युगात आम्ही अेका गिरणीला चार गिरण्यांनी तोंड देअू अिच्छितो, तोफेला तोफेने, विमानाला विमानाने, यंत्राला यंत्राने तोंड देण्याचें आजचें युग आहे ! या युगात हे आम्हांला मागे नेअू अिच्छितात. शत्रु आगगाडीने चालला तर आम्ही बैलगाडीतून जावें, त्यांनी विमान काढलें तर आपण रेड्यांच्या गाडीतून जायचें काय ?

चरख्याने दिग्दर्शित होणाऱ्या या प्रतिगामी आर्थिक कार्यक्रमालाही आपल्याला मान्यता देता येणार नाही.

देशातला दुसरा पक्ष सुभाषबाबूंचा. त्यांचा आपण नुकताच महाराष्ट्रात गौरव केलातच. त्यांत माझाही भाग होताच; या पक्षाशी आमचे दोन बाबतीत जुळत आहे. तें म्हणजे 'स्वातंत्र्य' व 'यथासाध्यं च साधनम्' या सूत्राबाबत; पण या पक्षात गेल्याने हिंदूंचें स्वातंत्र्य, हिंदुराष्ट्राचें स्वातंत्र्य, हिंदुंचा अभ्युदय साधेल काय ?

गांधीजी जिनांच्या दाराशीच जाअून परत आले. पण. बाबूजींनी जिनांच्या खोलीत जाअून वाटाघाटी केल्या आहेत व त्यात त्यांनी गांधींनी मुसलमानांना देअू केलेल्या गोष्टीपेक्षाही जास्त गोष्टी देण्याची तयारी दर्शविली असली पाहिजे.

He went to outbid Gandhiji. सुभाषबाबू जिनांना जें द्यायला तयार झाले तें हिंदूच्याच खिशातून ना ? आम्ही हिंदु म्हणून आमच्यासाठी काहीही जास्त मागत नसून न्याय्य तेंच मागत आहो व आम्ही आमच्या खिशातून कोणालाही अवास्तव देण्यास तयार नाही. तेव्हा हिंदुत्वाच्या दृष्टीने गांधीपेक्षाही सुभाषांचा पक्ष जास्त अस्वीकार्य आहे.

सुभाषबाबूच राष्ट्रसभेचे अध्यक्ष असताना हिंदुमहासभेचे सभासद होण्यास बंदी झाली. ते मुंबईस आले असताना फॉरवर्ड ब्लॉक – परिषदेस हजर राहण्याबद्दल मला बोलावणें आलें होतें. मी कळविलें की,

फॉरवर्ड ब्लॉकचे सभासद होण्यास काँग्रेस-सभासदत्वाची अट नसावी व होणाऱ्या स्वातंत्र्यात दर डोअी अेक मत या गोष्टी कबूल असतील तर, मी यायला तयार आहे, पण त्या गोष्टी मान्य झाल्या नाहीत.

तिसरा पक्ष भाअी मानवेंद्रनाथ रॉय यांचा. पहिल्या दोन सूत्रांच्या बाबतीत याही पक्षाशी आमचें जमत आहे. माझ्यापासून रॉय यांना स्फूर्ति झाली असें ते

स्वतः सांगतात. रॉय यांचा आर्थिक कार्यक्रम आम्हांला पुष्कळसा मान्य आहे व हिंदुमहासभेतर्फे लवकरच तयार होणाऱ्या हिंदुमहासभेच्या आर्थिक कार्यक्रमात त्याचा योग्य तो समावेश होअील.

त्यांनी मुसलमानी धर्माबद्दल अेक पुस्तक लिहिलें असून, त्यात अशी ग्वाही दिली आहे की, 'मी मुसलमानी ग्रंथ वाचले असून, मी सांगतो हें सत्य आहे.' त्यांनी या ग्रंथात मुसलमान धर्म सर्व मानवांना बंधुभावाने वागविणारा, समानता देणारा आहे असें सांगितलें आहे व मुसलमानी धर्माचा प्रसार शस्त्राने केव्हाही झाला नाही, असें प्रमेय अैतिहासिक सत्य म्हणून त्यांनी मांडलें आहे. मीही काही वाचलेलें आहे.

मुसलमानी धर्म बंधुभावाने वागविणारा आहे! पण कोणाला? मुसलमानी धर्म मुसलमानांना बंधुभावाने वागविणारा, मुसलमानांना समानतेने वागविणारा आहे, मुसलमान नाहीत त्यांना नाही. त्यांच्या ग्रंथात मुसलमानी जगत् व विन-मुसलमानी जगत् असे दोन भाग पाडलेले आहेत.

विनमुसलमानी जगताला ते तरवारीचें जगत, म्हणजे ज्यांची गांठ तरवारी-नेच घ्यावी असें जगत्–शत्रूंचें जगत् म्हणून मानतात.

मी सांगतो हें खरें आहे व मुसलमानी धर्मातही असेंच सांगितलेलें आहे. मला हें सांगताना अैकून आता जर येथे अेखादा मौलवी असेल तर तो म्हणेल 'वा रे सावरकर, तू कुराण जाणतोस!' व तो मी कदाचित् मुसलमान होअीन म्हणून प्रतीक्षाही करीत असेल. रॉय यांचें म्हणणें तर मुसलमानांना अितकें द्यावें की, आता काय मागू याचीच त्यांना पचाअीत पडावी. तेव्हा —

हिंदु राष्ट्राच्या दृष्टीने बोसापेक्षाही रॉय यांचा पक्ष आपणांला मुळीच स्वीकारता येणार नाही.

याच दृष्टीने गांधीपेक्षा बोस वाअीट व बोसापेक्षाही रॉय वाअीट.

जवाहर, हे वाहेरदेशी जातात तेव्हा हिंदी प्रतिनिधि म्हणून वोलतात. तुम्हांला जर सर्वच मानव जात सारखी तर मग अुठून अॅबिसिनियात कां हो कार्याला जात नाही? तेथली जनताही अशीच गुलामगिरीत, दारिद्र्यात पडलेली आहे.

तर्कपद्धतीला ताणून, आरोपीला जसा कायद्याचा जास्तीत जास्त फायदा द्यावा, त्याप्रमाणे त्यांना तर्कपद्धतीचा जास्तीत जास्त फायदा दिला तरी ते या प्रश्नाला काय अुत्तर देतील? ते म्हणतील मी येथे जन्मलो म्हणून मला हिंदु-स्थानबद्दल जास्त आपलेपणा वाटतो!

जन्मस्थानावरून राष्ट्रीयत्व ठरण्यासंबंधी परवाच माझे अेका गृहस्थाशी बोलणें झालें. ते नागपूरचे गृहस्थ होते.

मी त्यांना म्हटलें तुम्ही नागपुरात जन्मलात तर तुम्हांला संबंध हिंदुस्थानची आपुलकी कां वाटावी ? नागपूर म्हणजे काही हिंदुस्थान नव्हे आणि जन्मस्थानावरून आपुलकीची भावना ठरवावयाची तर, नागपुरातल्या ज्या घरात तुमचा जन्म झाला त्या घराबद्दलच नव्हे, त्या घरातील ज्या खोलीत कुंची घालून तुम्ही पाळण्यात झोपला होता त्या पाळण्याबद्दलच फक्त तुम्हांला आपुलकी वाटली पाहिजे. तेव्हा आपुलकी ही जन्मस्थानावर नाही, ती भाषेवर, आचारावर, संस्कृतीवर निर्माण झालेली असते. येथले लोक माझी भाषा बोलतात, त्यांचे माझे आचारविचार, संस्कृति सारखी आहे म्हणून आपुलकी वाटते. लहानपणापासून या देहाला जी शिकवण मिळते, ज्या परिस्थितीत तो वाढतो त्या सर्वांचा नकळत परिणाम होअून ज्या भावना अुत्पन्न होतात, ज्या भावना वंशपरंपरा रक्तात येतात, ज्या रक्तारक्तांत नि हाडाहाडांत सळसळत असतात त्या भावना म्हणजे आपुलकी. अेका देशात राहिल्याने अेक राष्ट्र होत नाही. माझ्या घरात वाघ, डुक्कर, साप राहतात म्हणून मी त्यांना भाअू मानावें काय ? दोघांची अेकी व्हावयाची म्हणजे दोघाचीही अेकीची अिच्छा असली पाहिजे. अेकाचीच अेकीची अिच्छा आहे म्हणून तो जर दुसऱ्याच्या गळ्यास लपेटून बसू लागला तर, तो दुसरा अेक तर त्याला लाथाडून तरी देअील; नाही तर, त्याला आपला दास म्हणून बरोबर वागवील. साप चावतो म्हणून त्याला शिव्या देण्यात अर्थ नाही. त्यात सापाची चूक नाही. अेक तर आपण सापाचा दात तरी पाडला पाहिजे किंवा आपण भिअून पळून तरी गेलें पाहिजे.

कराचीला मुस्लिम लीगने अुघड अुघड दोन फेडरेशन्स करण्याचा ठराव केलेला आहे. तुम्ही स्वतःला राष्ट्रीय म्हणवता पण, त्या ठरावाचा तुम्ही निषेध केलेला नाही, तो निषेध हिंदुमहासभेने केला आहे, आणि तरी ती जातीयच !

ज्याच्या डोक्यावर मुसलमानाची लाठी बसते तो हिंदु अशी हिंदूंची सोपी व्याख्या झाली आहे. राष्ट्रीय म्हणविणारीं काँग्रेस सरकारेंच अराष्ट्रीय वृत्तीचीं आहेत ! मी हें पुराव्यानिशी बोलत आहे.

ना. पंत यांनी खास मुसलमानांकरिता म्हणून अुर्दूत पत्रक छापवलें होतें. हें पत्रक हिंदूंत वाटलें जाअू नये अशी खबरदारी घेण्यात आली होती. कारण त्यांना निवडून यावयाचें तें हिंदूंच्या मतांवर व मनधरणी करावयाची ती मुसलमानांची.

हिंदुमहासभेने हें पत्रक मिळवून त्याच्या हजारो प्रती संयुक्त प्रांतात वाटून टाकल्या.

या पत्रकात मुसलमानांना आपलें राष्ट्रीयत्व पटवून देताना पंत म्हणतात, संयुक्त प्रांतांत १२ टक्के मुसलमान असताना सरकारी नोकरीत त्यांचें प्रमाण कोठेही ३० टक्क्यांखाली नाही व पोलिस खात्यात तर ७५ टक्के त्यांचेंच प्रमाण आहे. पहा, आहो कीं नाही आम्ही राष्ट्रीय ! कोठल्याशा गांवी मुसलमानांनी

मोहरम म्हणून हिंदूंनी वाद्यें वाजवू नयेत असा अर्ज केला. आठ दिवसांपर्यंत त्या गांवी आम्ही हिंदूंना वाद्यबंदी केली. पहा, आहो कीं नाही आम्ही राष्ट्रीय? अेका गावी तर लग्नात बायकांनी ढोल बडवायची चाल आहे. मुसलमानी अर्जावरून त्या बायकांवर ढोल न वाजविण्याबद्दल आम्ही नोटीस बजाविली. पहा, आहो कीं नाही आम्ही राष्ट्रीय? बनारस शहरात तर मुसलमानांनी दंगा केला असताना यांनी कर्फ्यू ऑर्डर काढून हिंदूंना ४८ तासपर्यंत घराबाहेर पडण्यास बंदी केली होती आणि मुसलमान लाठ्या घेऊन रस्त्यांत धुमाकूळ घालीत होते.

हें तुमचें राष्ट्रीयत्व! आणि हिंदु नोकरांचें प्रमाण आम्ही काढलें की लगेच आम्ही जातीय ठरतो!

१२ टक्के मुसलमानांना ७५ टक्के जागा पोलिसांत आणि ३० टक्के जागा अितरत्र तुम्ही देता, ह्या कोणाच्या जागा तुम्ही देता, हिंदूंच्या हिरावूनच ना, तितक्या हिंदूंना बेकार ठेवूनच ना?

तुम्ही राष्ट्रीय म्हणविता तर, मग तुम्ही जातच ओळखता कामा नये. तुम्ही राष्ट्रीय तर ही मुसलमानांची गणतीच ठेवण्याची काय जरूर होती? तुम्ही जर राष्ट्रीय असता तर बनारसमध्ये हिंदूवर कर्फ्यू ऑर्डर बजावण्याअेवजी ती तुम्ही मुसलमान दंगेखोरांवर बजावली असती. तुम्ही दुर्बल राष्ट्रीय असता तर निदान-पक्षी ही कर्फ्यू ऑर्डर तुम्ही हिंदु व मुसलमान या दोघांवरही बजावली असतीत. अशीं पुष्कळ अुदाहरणें मी देअू शकेन.

ही राष्ट्रीयता नव्हे तर ही अत्यंत विकृत अशी जातीयता आहे. या अशा विकृत जातीयतेपेक्षा मी साधी जातीयता पत्करीन. मुसलमानांशी जर या प्रकाराने अेकी व्हावयाची असेल तर आम्हांला अशा संशयास्पद मैत्रीच्या अेकीपेक्षा वेकीच जास्त फायदेशीर होअील.

कोठल्याही पक्षाशी सहकार्य करावयाचें कीं नाही, हें ठरविण्याचें आमचें मुख्य सूत्र हिंदुत्व हेंच आहे.

त्या दृष्टीने या तीनही पक्षांचा आपल्याला अुपयोग नाही. त्या पक्षांचे जे कार्यक्रम चांगले असतील त्यात आम्ही सहकार्य करू; पण हिंदुत्व रक्षण्याकरिता म्हणून हिंदुमहासभेची जरुरी आहे व स्वातंत्र्य मिळालें तरी हिंदुमहासभा ही पुढेही कायम राहणें भाग आहे.

जिना काँग्रेसला हिंदुसंस्था म्हणतात म्हणून काँग्रेसमध्ये कसे तरी ४ मुसलमान आणण्यात येतात. बी अम्मा या काँग्रेसच्या अध्यक्ष केवळ मुसलमान म्हणूनच नाही का झाल्या? नाहीतर टिळकांच्या पत्नी काँग्रेसच्या अध्यक्ष कां होअू नयेत?

आज काँग्रेसमध्ये असे आणलेले मुसलमान असल्यामुळे तेथे हिंदूंचा प्रश्न हिंदु म्हणून बोलता येत नाही; कारण, आम्हांला जरूर म्हणून आम्ही त्यांना आणलें. त्यांना जरूर म्हणून ते आले असते तर काहीच हरकत नव्हती. पण आता

काँग्रेसमधल्या हिंदूंची तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी स्थिति झालेली आहे. स्वातंत्र्य मिळालें तरी देखील त्या घटनेत जे राष्ट्रद्रोही लोक जातील त्यांच्यावर नजर ठेवायला आमचे विश्वासाचे लोक हवेत. मुसलमानांच्या डोक्यात अजून पाकिस्थानची कल्पना घोळत आहे व हिंदुमहासभेचे लोक नसतील तर झेको-स्लोव्हाकियाच्या जर्मन नागरिकांनी जी गोष्ट केली तशी गोष्ट घडण्याचा संभव आहे.

तुम्हांला हिंदुध्वजाखालीच असलेलें असें हिंदुराष्ट्र स्थापावयाचें आहे काय असें कोणी मला विचारतील.

होय !

गटेच्या काळी प्रशियाचे तुकडे तुकडे होअून प्रशियाच्या राजवाड्यात गादीवर नेपोलियन बसला होता. तेव्हा गटेने कविता केली की :—

या सिंहासनावर माझा राजा परत बसलेला पाहीपर्यंत व हा परका राजा जाईपर्यंत मी असांच भीक मागत हिंडेन.

गटेची ती वल्गना—

आज चार पांच पिढ्यांनंतर सत्य ठरली आहे.

आज हिटलरच्या नेतृत्वाखाली सारें जर्मन राष्ट्र, सारे जर्मन लोक, अेका निशाणाखाली अेकत्र झालेले आहेत.

वटवृक्षाचें बीज मोहरीहूनही लहान असतें ; पण, त्या बीजात जी स्फूर्ति असते, जी वल्गना असते जी वाढता वाढता तिचा प्रचंड वटवृक्ष बनून त्या-खाली गाईचीं खिल्लारें विसावा घेतात, अुन्हाने श्रांत झालेल्यांना तो वटवृक्ष सावली देतो.

मलाही अेक वल्गना करू द्या ! माझें गाणें मला गाअू द्या !

या जगात आपणांला जर हिंदुत्वाचें मानाचें राष्ट्र म्हणून जगावयाचें असेल तर, तसा आपला अधिकार आहे आणि तें राष्ट्र हिंदुध्वजाखालीच स्थापन झालें पाहिजे. या नाही तरी पुढल्या पिढीत ही वल्गना खरी ठरेल.

माझी ही वल्गना खोटी ठरली, तर वेडा ठरेन मी.

माझी ही वल्गना खरी ठरली तर मी प्रॉफेट ठरेन.

माझा हा वारसा मी तुम्हांला देत आहे !

—पुणे, ऑगस्ट १९३९

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक 3693 दि. 1961
वर्ग क्रमांक 1521 ने. दि. 13.11.95

३८. तामीळनाड हिंदु परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें भाषण

मी या प्रांतात जेव्हा पहिल्याने आलो तेव्हा मला असा प्रश्न विचारण्यात आला की, दक्षिण हिंदुस्थानमध्ये हिंदूंवर कोणत्याही तऱ्हेचें आक्रमण होत नाही; मग हिंदुसभेची येथे आवश्यकता काय ? हा प्रश्न मुसलमान नि ख्रिश्चन विचारीत नाहीत; तर आमच्या हिंदूंमधीलच काही, विशेषत: काँग्रेसवादी विचारीत असतात. हा प्रश्न बरोबर आहे असें तात्पुरते गृहीत धरून मी अुत्तर देतो. अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंवर जसें आक्रमण होतें तसें येथें होत नाही असें म्हणण्यात ते अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंवरील आक्रमणाची जाणीव ठेवतात, अितकेंच नव्हे तर अप्रत्यक्ष रितीने हिंदुसभेच्या स्थापनेचें महत्त्व अुत्तर हिंदुस्थानापुरते कां होअीना कबूल करतात. जे वरील प्रश्न विचारतात ते कधी पायाला बोचलें तर डोक्याला कां वेदना होतात याचें अुत्तर देतील काय ? ज्याप्रमाणे हें शरीराचें त्याप्रमाणेच हिंदुसमाजाचें आहे. जर जगाच्या कोणत्याही भागात हिंदूंवर हल्ले झाले, तर दुसऱ्या भागात तावडतोब कळ अुठलीच पाहिजे. अुत्तर हिंदुस्थानात काय, पण अुत्तर ध्रुवावर जरी हिंदूंचा छळ होअू लागला तरी दक्षिण हिंदुस्थानातूनच नव्हे तर दक्षिण ध्रुवावरसुद्धा सहानुभूतीची संवेदना निर्माण झाली पाहिजे. जालियनवाला बागेत अत्याचार झाल्यावरोबर तुम्ही दक्षिण हिंदुस्थानातील लोक जालियनवाला बाग दिन पाळताच कीं नाही ! तुमची सहानुभूतीची संवेदना फक्त अुत्तर हिंदुस्थानापुरतीच मर्यादित राहिली नाही. तुम्हांला तुर्कस्थानची कीव आली. स्पेनमध्ये कोणी परकी राष्ट्र आक्रमण करीत नव्हतें. राष्ट्रातले दोन पक्ष आपआपसात लढत होते. परंतु तुम्ही त्यातल्या त्यात जो दलितांचा पक्ष वाटला त्याला तेथे धान्याच्या बोटी भरून पाठविल्यात. चीनवर आक्रमण झाल्यावरोवर थोड्याशा डॉक्टरांना त्यांच्या मदतीला पाठविलेत. तेव्हा हे दयाळू आत्म्यांनो, आपल्या अुदार हृदयाला जर या गोष्टी करणें आवडते तर त्यातल्या सहानुभूतीचा अल्पांश तरी हिंदूंकरिता कां राखून ठेवीत नाही ?

सिंधमधील अत्याचार

सिंधमध्ये काय चाललें आहे पहा ! या गोष्टी मी माझ्या पदरच्या सांगत नाही, किंवा तुमच्या भावना क्षोभ पावाव्यात म्हणून तिखटमीठ लावीत नाही. तर सत्य आणि जें अल्लाबक्षासारख्या मुसलमान मुख्य प्रधानाच्या तोंडून निघालें आहे तेवढेंच सत्य मी येथे सांगतो. दहा हिंदु पेट्रोल ओतून जाळण्यात आले.

१५० हिंदूंचे मुडदे पाडण्यात आले. लाखो लोकांची मालमत्ता लुटण्यात आली. तुम्ही आज जर हा अुत्तर हिंदुस्थानचा प्रश्न आहे म्हणून तिकडे दुर्लक्ष केलें तर आणखी शंभर अथवा दीडशे वर्षांनी मद्रासवरही तीच पाळी आल्यावाचून राहणार नाही. 'मला काय त्याचें' ही मनोवृत्ति आपल्याकडे पूर्वापार चालत आलेली आहे. मुसलमानांनी सिंधवर स्वारी केली, पंजाबावर हल्ले केले, विंध्य पर्वत ओलांडला तरी आपण गप्प बसलो आणि आजही अुत्तरेतील हिंदु व दक्षिणेतील हिंदु असा भेद माजवीत बसलो तर पुनः मागच्या अितिहासाची पुनरावृत्ति झाल्याशिवाय रहाणार नाही. शेजाऱ्याचें घर जळत असलें तर आपण तें शेजाऱ्याचें म्हणून कधी गप्प बसतो का ? तीच गोष्ट हिंदुधर्माची. आपण जर ही गोष्ट चांगल्या रितीने ओळखली तर आपलें अस्तित्व कधीही नाहीसें होणार नाही. अेका भागाला अिजा झाली तर सर्व जीव कळवळतो. आपलेंही तसेंच झालें पाहिजे. आपल्या दाराशी संकट येअीपर्यंत आपण गप्प राहून चालणार नाही. ही चूक आपण वेळीच ओळखली असती तर आपली आज शक्तिमान् साम्राज्यें दिसलीं असतीं आणि अल्पसंख्याकांचा प्रश्न कधीही अुपस्थित झाला नसता.

हिंदुस्थान हिंदूंचाच

हिंदु नसेल तर हिंदुस्थानची काय किंमत ? अिंग्रज नसतील तर अिंग्लंडची काय किंमत ? जर्मन नसतील तर जर्मनीची काय किंमत ? अिंग्लंडमध्ये अल्पसंख्याक आहेत म्हणून कोणीही अिंग्लंडचे तुकडे करण्याची मागणी करीत नाही. जर्मनीमध्ये जर्मन बहुसंख्याक आहेत व ज्यू अल्पसंख्याक आहेत म्हणून ज्यू काही अल्पसंख्याकांच्या हक्कांची मागणी करू शकत नाहीत. आणि जर अेखादवेळी तो प्रश्न अुपस्थित करण्यात आला तर तो कसा सोडविण्यात येतो हें तुम्हांला माहीत आहेच. आमच्या अंगात तशी शक्ति आली तर मग आम्हीही अल्पसंख्याकांच्या प्रश्नाचा भ्रमाचा भोपळा सहज फोडू. हिंदूंची प्रचंड बहुसंख्या जरा अर्थी येथे आहे त्या अर्थी हें राष्ट्र हें हिंदुराष्ट्रच–हिंदुस्थानच–राहणार.

मोपल्यांचें बंड मलबारमध्ये दक्षिण हिंदुस्थानातच झालें. नुकताच गेल्या वर्षी भागानगर निःशस्त्र प्रतिकार चालू होता. त्या भागानगरशी–हैद्राबादशी–तुमचा संबंध नव्हता काय ? आंध्र प्रांताचा अेक भाग या हैद्राबाद संस्थानातच आहे. पंजाब, बंगाल, महाराष्ट्र वगैरे प्रांतांतून १५००० निःशस्त्रप्रतिकारकांनी या संग्रामात भाग घेतला. तो 'हिंदु तेवढा अेक' या भावनेनेच नाही काय ?

अेकी कोणाची होते ?

अेकीच्या गोष्टी सांगण्यात येतात, खुनी नि खुनाला पडलेला बळी यांची कधी अेकी होअू शकते काय ? चोर जर न्यायाधीशाला म्हणू लागला की, 'अहो,

मला शिक्षा देऊ नका, त्यामुळे राष्ट्रीय अेकी बिघडेल, राष्ट्राला स्वराज्य पाहिजे, म्हणून मी चोरी केली असली तरी तुम्ही मला शिक्षा देऊन अेकी बिघडवता कामा नये. जर शिक्षा दिलीत तर माझें आणि या फिर्यादीचें वाकडें येअील व राष्ट्रीय अेकी होणार नाही.' तर तुम्ही त्या चोराला मोकळा सोडू अिच्छाल काय ?

निजामाला स्वातंत्र्य हवें

नुकतीच हैद्राबादमध्ये हजारों मुसलमानांची जाहीर सभा भरली. निजामाला 'हिज अेक्झाल्टेड हायनेस' म्हणण्याचे अैवजी 'हिज मॅजेस्टी' म्हणावें असा अेक ठराव पास झाला. खाकसारांचे पुढारी नबाब यारजंग वहादूर या सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी आपणांस अिद्र म्हणवून घेतलें तरी मला त्यात काहीच वाटणार नाही. नुसतें म्हणविण्यात काय आहे ! या म्हणण्यात मूर्खपणा असो वा गांभीर्य असो, मुसलमानांची मनोवृत्ति मात्र त्यावरून कळून येते. या मागणीचे मागे कोणत्या गोष्टी दडलेल्या आहेत त्या पहा. निजामाला 'हिज मॅजेस्टी' ही पदवी मिळाली म्हणजे तो स्वतंत्र होअील. हैद्राबाद संस्थान स्वतंत्र झालें म्हणजे त्याचें स्वातंत्र्य अबाधित राहण्याकरिता त्याला बंदर पाहिजे आणि तें बंदर म्हणजे मद्रास अगर मच्छलीपट्टण. पुन्हा त्या बंदराला जाण्याकरिता कॉरिडॉर पाहिजे. डॅझिग व त्याचा कॉरिडॉर यांचा अितिहास आपल्या डोळ्यांसमोर आहेच. तुम्हांला यांची पुनरावृत्ति पाहिजे काय ? त्यांची दुसरी मागणी अशी आहे की ज्याअर्थी अर्धा आंध्र प्रांत निजाम हद्दीत आहे त्याअर्थी अुरलेला अर्धा प्रांतही निजाम हद्दीत सामील करावा. मी म्हणतो की जर अर्धा आंध्र निजामचे बाहेर आहे नि अर्धा निजाम संस्थानात आहे तर निजामचा अर्धा आंध्र प्रांत काढून बाहेरच्या मद्रास अिलाख्याला कां जोडीत नाही ?

परोपदेशे पांडित्य

ज्या म्हैसूरचे मुख्य प्रधान सर मिर्झा अिस्माअील यांनी अेक संदेश पाठवून तुम्हांला अेक अुपदेशाचा घुटका पाजला, त्या म्हैसूर संस्थानामध्ये ज्या सुधारणा देण्यात आल्या आहेत त्यातील आकडे मी तुम्हांस दाखवितो. तिकडे आपण अवश्य लक्ष पुरवा. टिपू आणि हैदर यांनी राज्य केलें आणि हिंदूंचा छळ केला, तरीसुद्धा हिंदूंची लोकसंख्या तेथे ९३ टक्के आहे. परंतु त्यांना कौन्सिलमध्ये अवघ्या ८१ टक्के जागा मिळाल्या आहेत ! आणि मुसलमान ६ टक्के असूनसुद्धा त्यांना १० टक्के जागा मिळाल्या आहेत. वरिष्ठ कौन्सिलमध्ये तर हिंदूंना ४१ टक्के व मुसलमानांना १० टक्के जागा आहेत. ही हिंदु संस्थानची गोष्ट झाली. आता निजामची, अेका मुसलमान संस्थानची गोष्ट पहा, चांगल्या असोत वा वाअीट असोत त्यांनी

ज्या सुधारणा दिल्या आहेत-नव्हे ज्या देणें त्यांना भाग पडलें आहे, त्यांचा मसुदा छापताना सुरुवातीलाच त्यांनी तसें स्पष्टपणे घोषित केलें की, ज्याअर्थी हे मुसलमानी राज्य आहे, त्याअर्थी राज्यकारभारात मुसलमानांचेंच बहुमत राहणार ! आणि ज्याअर्थी हिंदु मुसलमान यांना मी सारखे मानतो त्याअर्थी हिंदु जरी ९० टक्के असले तरीसुद्धा कौन्सिलमध्ये दोघांनाही सारखेच म्हणजे ५० टक्के प्रतिनिधित्व देणार, हिंदूंना वाटवून हिंदु व मुसलमान यांची लोकसंख्या सारखी करून समानता दाखविण्याची घोषणा त्यांनी केली नाही याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आता नोकऱ्यांकडे पहा. म्हैसूर संस्थानात मुसलमानांना सैन्यात ६५ टक्के नोकऱ्या आहेत पोलिसमध्ये ५५ टक्के आहेत, आणि अितर नोकऱ्यांत कमीत कमी ५० टक्के मिळाव्यात अशी त्यांची चळवळ चालू आहे. म्हैसूरचे महाराज, हैदरअल्ली या सैन्यातील अेक शिपायी होता हें विसरलेले दिसतात. वास्तविक म्हैसूरच्या महाराजांनी ज्याअर्थी हैदरने आमच्याशी दगलबाजी केली त्याअर्थी आम्ही तुम्हांला सैन्यात मुळीच जागा देणार नाही, असें मुसलमानांस सांगावयास पाहिजे होतें.

एखाद्या सेंस्थानाचा मुख्य प्रधान मुसलमान असला तर लगेच जिना त्याला भेटावयास जातात. मुस्लिम लीगचें अधिवेशन असलें तर शिकंदर हयातखान वा फझलूल हक्क त्यात अुघड रीतीने भाग घेतात. ते राजे असोत, प्रधान असोत वा पुढारी असोत, अुघड रीतीने भाग घेण्यास त्यांस दिक्कत वाटत नाही. काँग्रेसचे हल्लीचे राष्ट्रीय म्हणविणारे मुसलमान अध्यक्ष पहा. ते परवाच्या अध्यक्षीय भाषणात स्पष्ट म्हणतात की, या हिंदुस्थानात मुसलमानांच्या हितसंबधांना धक्का लागणार नाही याची काळजी मी घेणार आहे. मुसलमानांना कोणी दुखावणार नाही ना याची चिंता वाहणार आहे. तुमचा एखादा राजा, प्रधान अशी भाषा बोलताना तुम्हांस कधी दिसतो का ?

स्वतंत्र हिंदुस्थान हें ध्येय

हिंदूंच्या बाबतीत मात्र प्रत्येक गोष्ट अुलट झालेली दिसून येईल. हिंदु संस्थांकडे तिरस्कृत रीतीने पाहण्यात येईल. त्यांना जातीय म्हणून काँग्रेसवाल्यांकडून हिणवण्यात येईल.

काँग्रेसवालेही देशभक्त आहेत. मी त्यांना मान देतो. परंतु त्यांचें धोरण चुकीचें आहे. मी त्याचा निषेध करतो. पण तेवढ्याकरिता त्यांच्याशी भांडत बसू नका. हिंदूंनी यापुढे हिंदु म्हणवून घेण्यात, हिंदुत्वाची वकिली करण्यात लाज वाटून घेऊ नये. हिंदुस्थान स्वतंत्र झालाच पाहिजे; मात्र तो जसा जॉर्ज व एडवर्ड यांचे हातून सुटला पाहिजे तसाच औरंगजेब नि टिपू यांचेही हातात राहता कामा नये.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असा मंत्र लोकमान्यांनी आपणांस दिला. आपण तो ऐकला. आता स्वराज्य म्हणजे काय हें पाहिलें पाहिजे. स्वराज्य म्हणजे समानता. या स्वराज्यात हिंदूंना इतरांइतक्याच मानानें नि हक्कानें वागविण्यात आलें पाहिजे. 'अेक मनुष्य अेक मत,' हाच न्याय अंमलांत आला पाहिजे. तीन हिंदूंना एक मत व अेका मुसलमानाला तीन मतें असला अन्याय होता कामा नये ! हिंदुस्थान हा अभंग राहिला पाहिजे, हिमालयाला आग लागली तर दक्षिण महासागराने ती आग विझविण्यास गेलें पाहिजे.

समानता व लायकी ध्यानी घ्या

जिनांनी काँग्रेस ही हिंदूंची संस्था आहे असें म्हटल्यावरोवर काँग्रेसवाल्यांना कोण राग आला ? परंतु त्यात खोटें काय आहे ? हिंदूंनीच काँग्रेस जगविली नि वाढविली. मुसलमानांनी तिच्या वाढीकरिता काहीही कष्ट केलेले नाहीत. आजच पाहा, निवडणुकीला काँग्रेसच्या तिकिटावर अुभा राहिलेला मुसलमान पडतो व लीगच्या तिकिटावर अुभा राहिलेला हटकून निवडून येतो. मुसलमानांची काँग्रेसबद्दल ही भावना आहे.

जर काँग्रेसला खरी राष्ट्रीय संस्था व्हावयाचें असेल तर तिने आजपर्यंत अवलंबिलेलें चुकीचें धोरण सोडून खरें राष्ट्रीय धोरण स्वीकारावें. निवडणुकीत अेक मनुष्य अेक मत ही घोषणा करावी. कोणी नोकरी मागण्यास आला तर त्याला तुझी लायकी काय हा प्रश्न विचारावा. जर तो बी. ए. असेल तर त्याला बी. ए. लायकी लागणारी नोकरी द्यावी. पण जर एखादा मुसलमान म्हणू लागला की, मी मुसलमान आहे म्हणून मला नोकरी दिली पाहिजे, तर तुला या राज्यात केवळ मुसलमान म्हणून नोकरी मिळणें शक्य नाही असें सांगावें.

हा पहा पक्षपात

बंगालमध्ये मुसलमान फक्त शेकडा ५० असून त्यांना कायद्याने शेकडा साठ नोकऱ्या राखून ठेवल्या गेल्या आहेत. बुद्धिमत्ता फक्त हिंदू लोकांच्या अंगी वसत असल्यामुळे तेथे या राखून ठेवलेल्या नोकऱ्यांना लायक मुस्लिम अुमेदवार मिळत नाहीत. त्यामुळे हिंदु व मुसलमानांच्या प्रश्नपत्रिकांत फरक केला जातो. जर बी.ए. ची परीक्षा असली तर हिंदूंना एम्. ए. चा पेपर त्या परीक्षेकरिता घातला जातो व मुसलमानांना मॅट्रिकच्या लायकीचा पेपर घातला जातो !

जे आर्थिक प्रश्नांवर भर देतात व आर्थिक बाबतीत धार्मिक मतभेद आड येत नाही असें मानतात त्यांनी रेल्वे वर्कर्स युनियनची गोष्ट लक्षात घ्यावी. सर्व मजुरांची रेल्वे वर्कर्स युनियन असताना मुसलमानांनी अेक मुस्लिम रेल्वे वर्कर्स युनियन काढली. त्यामुळे हिंदूंनाही अेक हिंदु रेल्वे वर्कर्स युनियन काढणें भाग पडलें.

पाकिस्तान होणार नाही

आता आम्ही मुळीच माघार घेणार नाही. अजिबात सवलती देणार नाही. जर आम्ही ९० टक्के असू तर ९० टक्के जागा आम्ही घेणार. आमच्या हक्कांकरिता आम्ही अेकही अिंच माघार घेणार नाही. जर ते मित्र म्हणून राहणार असतील तर त्यांनी तसें राहावें; पण त्यांना दुसरा कोणताही मार्ग चोखाळावयाचा असला तरी त्याला आमची तयारी आहे हें त्यांनी लक्षात ठेवावें. आम्ही हिंदुस्थान हें आंग्लिस्थान होऊ देणार नाही, पाकिस्तान तर नाहीच नाही.

मुसलमान ज्याप्रमाणे कट्टर मुसलमान निवडून देतात त्याप्रमाणे हिंदूंनी आता कट्टर हिंदूलाच निवडून दिलें पाहिजे. हिंदु अुमेदवाराने स्पष्टपणे सांगितलें पाहिजे की, मी हिंदूंच्या मतावर निवडून आलो आहे, मी त्यांचेंच म्हणणें आपल्यापुढे मांडणार आहे. यापुढे अेवढें लक्षात ठेवा की, जें जें हिंदूंच्या हिताचें आहे तेंच खरें राष्ट्रीय. यापुढे प्रत्येक गोष्टीची ही कसोटी लावून परीक्षा करा. ही भूमिका घ्या नि पांच वर्षांत काय चमत्कार होतो तें पाहा.

धाकट्या भावाचा कान अुपटा

म्हणे मुसलमान हे धाकटे बंधु आहेत त्यांना पाहिजे तें द्या. ते मागतात म्हणून वरची माडी दिली, खालचा सोपा दिला, स्वयंपाकघर दिलें, माजघर दिलें. पण आईचेच तुकडे करा असें ते सांगू लागले तर तें मी कधीही मानणार नाही. ते जर आमचे धाकटे भाअू असतील तर त्यांचे कान अुपटण्याचा थोरले भाअू म्हणून आम्हांला हक्क आहे ! भाअू असतील तर त्यांनी असला फाजीलपणा करू नये व शत्रु असतील तर शत्रुत्व फार गरम पडेल हें त्यांनी लक्षात ठेवावें.

आमचें बहुमत काही कोणाच्या अुपकारांमुळे राहिलें नाही; आम्ही प्राणपणाला लावून तें टिकविलें आहे. टिपू, हैदर, अल्लाअुद्दिन नि औरंगजेब यांनी तें नाहीसें होण्याकरिता फार प्रयत्न केले. हूण गेले, शकही गेले. ज्याप्रमाणे हिरण्यकशिपूने चोरलेले वेद आम्ही परत आणले, त्याप्रमाणेच आम्ही आपलें बहुमतही टिकवून धरलें आहे. आणि माझी अशी खात्री आहे की, आपल्या चुकीच्या धोरणाने जर हिंदु आत्मघात करून घेणार नसतील तर जगातील कोणतेंही शस्त्र त्यांचा नाश करू शकणार नाही.

समारोपाचें भाषण

दि. २४ रोजी सायंकाळी समारोपाचें भाषण करताना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, ' डॉ. वरदराजलू नायडू यांनी या हिंदुसभेच्या कार्यात पुढाकार घेतला त्यांचे आभार मानणें माझें आद्य कर्तव्य आहे. मद्रास अिलाख्याचे सुपुत्र

श्री. विजय राघवाचारिअर यांनी आपलें तनमनधन या कार्याकरिता वाहिलेलें आहे. हिंदुमहासभेच्या अकोला येथे भरलेल्या अ. भा. अधिवेशनाचे ते अध्यक्ष च होते. मी स्पष्ट बोलतो क्षमा करा, परंतु मद्रास अिलाख्यात गेल्या वीस वर्षांत हिंदुमहासभेचें अेकही अधिवेशन भरू नये किंवा अेखादी हिंदु सभेची शाखाही असू नये ही खरोखरच मद्रास अिलाख्याला काळिमा लावणारी गोष्ट आहे. ह्या दृष्टीने डॉ. वरदराजलू नायडू यांनी घेतलेल्या पुढाकाराचें फारच महत्त्व आहे. डॉ. नायडू हे पंजाब, बंगाल, किंवा भारताच्या अितर दुसऱ्या कोणत्याही प्रांतात जन्मास आले असते त्यापेक्षा मद्रास अिलाख्यात ते जन्मास आले याचें आमच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. हिंदु सभेचें कार्य मद्रास अिलाख्यात सुरू करणारे तेच पहिले पुढारी आहेत. ते ब्राह्मणेतर आहेत याचें आमच्या दृष्टीने फारच महत्त्व आहे. हीच संस्था जर अेखाद्या ब्राह्मणाने स्थापली असती तर खोटा का होईना पण ही सभा ब्राह्मणांची आहे असा आळ आला असता. परंतु डॉ. नायडू हे समोर आल्याकारणाने मी त्यांच्याकडे वोट दाखविलें की माझें काम संपलें. ते अननुभवी नाहीत किंवा शाळेत पढणाऱ्या विद्यार्थ्याप्रमाणे अेकांगी विचारसरणीचे नाहीत. त्यांचें आजपर्यंतचें चरित्र अुज्ज्वल आहे. त्यांनी ट्रेड युनियन्स चालविल्या आहेत, अस्पृश्यता दूर करण्याकरिता त्यांनी परिश्रम घेतले आहेत, मद्रास प्रांतिक काँग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष होते व त्या राजकारणाचाही त्यांनी पुष्कळ अनुभव घेतला आहे.

तुरुंगात जाणें यालाच केवळ मी देशभक्ति समजत नाही; परंतु देशभक्तीचा तोही अेक मार्ग त्यांनी आक्रमिला आहे. ते अजून कौन्सिलमध्ये गेलेले नाहीत. परंतु येत्या निवडणुकीत हिंदु सभेच्या तिकिटावर आम्ही त्यांना कौन्सिलात धाडू. वरील सर्व कार्याचा अनुभव घेअून ते आता आपल्या पन्नाशीच्या पोक्त वयात हिंदु सभेला येअून मिळाले आहेत. अनेक वर्षांचा राजकारणाचा अनुभव घेअून त्यामध्ये भाग घेअून नि त्याकरिता नानाविध कष्ट सोसून त्यांनी हिमालयावर प्रथम फडकलेलें, पंजाब, बंगाल, यांनी अुभारलेलें, महाराष्ट्राने शौर्याची कमाल करून रक्षिलेलें हिंदु निशाण – हिंदूंचा परमप्रिय भगवा ध्वज येथे फडकविला आहे.

धमक्यांना आम्ही भीत नाही

तुम्ही काँग्रेसमध्ये गेलात तरी तुमचें हिंदुत्व नष्ट झालेलें नाही. तुम्ही आपण होअून त्याचा त्याग करू नका. काँग्रेस जर त्याचा त्याग करावयास सांगत असेल तर हिंदु राहण्याकरिता असल्या शेकडो काँग्रेस संस्थांना धिक्कारा.

आज तुम्ही वृत्तपत्रांत जिनामहाशयांचें वक्तव्य वाचलें असेलच. जिनामहाशयांनी अेक नवीन शोध लावला आहे. आता त्यांचें अल्पसंख्याकांचें तुणतुणें जाअून मुसलमान हें बहुसंख्य आहेत असा त्यांचा नवीन शोध आहे! नुकतेच 'हरिजन' मध्ये मुसलमान हे हिंदी आहेत म्हणून त्यांच्या सत्तेखाली नांदण्यात मला कमीपणा

वाटणार नाही असें लिहिलें गेलें आहे ! ब्रिटिश लोक हे सुद्धा मानव कोटीतील असल्याकारणाने मनुष्यधर्माला जागून गांधी त्यांच्या वर्चस्वाखाली राहण्यास कां तयार नाहीत ? माझा या चुकीच्या तत्त्वाला मूलभूतच विरोध आहे. जर गांधी, मुसलमान हे हिंदी आहेत म्हणून जिनांच्या सत्तेखाली नांदू अिच्छितात तर मीही हिंदी असल्याकारणाने जिनांनी माझ्या सत्तेखाली कां नांदू नये ? मी मुसलमानांना वजावतो की, या धमक्यांनी तुम्ही काँग्रेसवाल्यांना घाबरवाल पण आम्हा हिंदु-सभावाद्यांवर या धमक्यांचा मुळीच परिणाम होणार नाही.

जशास तसें हें आमचें धोरण

आमच्यावर आजपर्यंत मुसलमानांनी काही थोडे अत्याचार केले नाहीत. नादिरशहा आले नि गेले. अहमदशहा अब्दालीला आम्ही हात दाखविला. दिल्लीच्या बादशहाचें तख्त फोडलें. जिनामहाशय अितिहासाच्या गोष्टी सांगून त्याच मार्गांचा अवलंब करू अिच्छतील तर आम्ही त्यांना वजावतो की, त्यांच्याशी आम्हीही ' जशास तसें ' असेंच वागू.

केवळ हिंदुस्थानात मुसलमान जन्मले म्हणून त्यांचें राज्य आपणांवर चालू द्यावयाचें ही कल्पनाच चुकीची आणि गर्हणीय आहे. हिंदुस्थानचें स्वराज्य हें असलें बेगडी राज्य नव्हे तर हिंदु हा ज्यामध्ये अत्यंत महत्त्वाचा घटक गणला जाअील तेंच खरें आपलें हिंदूंचें स्वराज्य.

हिंदुसभा असलें शिवाजीप्रणीत स्वराज्य आणू अिच्छते. आता सर्व युगें मागे पडून हिंदुयुग चालू झालें आहे. त्याची प्रभा दिसू लागली आहे. आपण या सुवर्णयुगाचें स्वागत करण्याची सिद्धता केलीच पाहिजे.

—सेलम, दि. २३-३-४०.

सरदार [illegible]
अनुक्रम ... ३८९७३ दि: [illegible]
क्रमांक ... १५९९ ... नोंद दि: ...

३९. महासभेचा त्याग नि काँग्रेसचा त्याग

तथाकथित राष्ट्रीय सभेच्या लोकांकडून जो अेक आक्षेप महासभेवर नेहमी घेण्यात येतो तो म्हणजे तौलनिक दृष्टया महासभेचा त्याग काँग्रेसच्या त्यागापेक्षा जास्त आहे काय ? दिल्लीच्या महासभेच्या कार्यकारी मंडळीच्या बैठकीला जाण्यापूर्वी माझ्या या शेवटच्या व्याख्यानात मी या आक्षेपाचा फोलपणा सिद्ध [illegible] दाखविणार आहे. ' क्रॉनिकल 'चें अेक कात्रण मला आज देण्यात आलें. Mischievous propaganda ' म्हणजे ' खोडसाळ प्रचार ' या नांवाच्या अेका

स्फुटामध्ये माझ्या ख्रिस्तीसभेतील व्याख्यानाविषयी मला त्यात दोष दिला आहे. या व्याख्यानामुळे मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत मुस्लिम वृत्तपत्रांत आग पाखडण्यात आली आहे. अितर अल्पसंख्याकांशी सख्य करून मुसलमानांना मारण्याचा महासभेचा प्रयत्न आहे असें 'क्रॉनिकल' पत्राच्या संपादकांच्या मताच्या लोकांना वाटतें. मी पण पुन्हा ठासून सांगतो की, महासभेच्या राष्ट्रीय तत्त्वांवर जे जे अल्पसंख्य येतील त्यांना आम्ही आमच्यावरोवर घेऊन जाऊ, मुसलमान येत नसले तर तो दोष त्यांचा आहे. त्यांच्यात कोणी शहाणे निघाले नाहीत, म्हणून अितर सर्वांना वेडे ठरविता की काय ?

पाश्चात्य देशांत मुसलमानांना, निर्गमन करा, आमचा धर्म स्वीकारा, नाही तर तुमची कत्तल केली जाअील असें अंतिमोत्तर विधर्मीयांनी दिलें होतें. आमच्याकडे मशिदींनाही देणग्या देण्याअितकी सहिष्णुता होती. म्हणूनच आज आमच्या देवळांच्या मशिदी होत आहेत !

मी सांगतो त्या महासभेच्या मार्गांचा दृश्य परिणाम म्हणून गांधींची ते भेटायला आले असताना ज्या जिनांनी चपराशाकडून स्वागत करून बोळवण केली, त्या जिनांचे नि हयातखानांचें मला भेटण्यासाठी, दोन बायका ज्याप्रमाणे अेका नवऱ्याला भेटण्यासाठी भांडत बसतात त्याप्रमाणे भांडण झालें. याच मार्गाने संघटित व्हाल तर जिनाच काय, पण व्हॉअिसरॉयही तुमच्या दाराशी येतीलच येतील. तुम्ही अमेरींना दोष देता; पण " No Swaraj without Hindu-Muslim Unity " ही घोषणा केली आहे गांधीनीच ! आज आम्हांला अेडवर्ड जाऊन जोसेफ नको आहे; अकबरही नको आहे ! कारण कुंभाराला अुडविणाऱ्या गाढवासारखें तें होअील. क्रांति कुंभाराची झाली, तुम्ही गाढवच राहिलात !

त्यागाच्याविषयी अितकेंच सांगतो की तुरुंग हीच अेक देशभक्तीची कसोटी नाही. शिवाजी तुरुंगात गेला होता, पण पळून आला. बाजीराव कधीच तुरुंगात गेला नाही. रामदासांची तीच गत. पण हे सर्व सारखेच देशभक्त होते. वास्तविक तुरुंगातील शिक्षेला, काँग्रेसवाल्यांच्या प्रपितामहांच्या दृष्टीनेही मी भिण्याचें कारण नाही. पण जर तशी कसोटी घेतच असाल, तर मी निक्षून सांगतो की, आमच्यातील अेका अेका नेत्याचा त्याग तुमच्या काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांचा त्याग कोळून घातलात, तरी अधिकच राहील ! ! आमच्यातील 'अ' वर्ग कोलूचा होता, मोसंब्याचा नव्हता ! नि 'ब' वर्ग काथ्या कुटण्याचा अत्यंत क्लेशदायक असा होता. तुमचा आहे तो त्याग मान्य करायला काहीच हरकत नाही. पण तुलनाच करू लागाल, तर आमच्या हालअपेष्टांच्या नि त्यागाच्या पासंगालाही तुमचा त्याग नि हालअपेष्टा पुरायच्या नाहीत ! !

प्रथम कार्यकारी मंडळापासूनच आरंभ करू; अितर सर्व भौतिक वैभवाप्रमाणेच विनयाचाही त्याग करून मला या वेळी सांगितलें पाहिजे की, माझीं

स्वतःचीं तेरा वर्षें अंदमानांत गेलीं आहेत. रात्रंदिवस तिथे अेकच गोष्ट दिसत होती नि ती म्हणजे आत्यंतिक कष्टाचा मृत्यु होय ! मी तेरा वर्षें स्थलबद्धतेंत काढलीं. याहीपेक्षा अपमानास्पद त्या अवधीतील स्वातंत्र्यमारक गळचेपी भासत होती. माझ्या मोठ्या बंधूंनीही स्वतःच्या सौख्यमय जीवनाचा नि पत्नीच्या कौटुंबिक सौख्याचा केवढा त्याग केला आहे! माझ्या धाकट्या बंधूनी अठरा वर्षांपासून आतापर्यंत बऱ्याच वेळा नि तुमच्या समवेतही पुन्हा तीन वेळा कारावास पत्करला आहे.

अेक साधारण सिद्धान्त सांगतो की, पूर्वीचे बहुतेक राज्यक्रांतिकारक आज महासभेत आहेत. तेव्हाही ते हिंदुत्वनिष्ठच होते. कान्हेरे–चाफेकर यांनी फासावर चढताना गीता घेतली होती हातात, कुराण नव्हे ! धिंग्रांनी तर स्पष्टपणे अुद्घोषिलें होतें की " मी हिंदु म्हणून मरतो आहे आणि भारत जोपर्यंत स्वतंत्र झाला नाही तोपर्यंत हिंदु म्हणूनच मी पुन्हा पुन्हा जन्म घेअून माझ्या देशासाठी पुन्हा पुन्हा मरेन ! " हातातील चेंडूप्रमाणे ज्यांनी आपले पंचप्राण राष्ट्राकरिता फेकून दिले, त्यांना भ्याड अहिंसकांनी त्यागाच्या गोष्टी त्या काय शिकवाव्या ! आशुतोष लाहिरींची जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा नैनी तुरुंगात तीन रात्री घालविणाऱ्यांनी कमी लेखावी ना ! आजच काँग्रेसच्या अिच्छुकाचा दणदणीत ८००० मतांनी पराभव करून ते बंगाल विधिमंडळात निवडून आले आहेत. रतनचंद हे फाशीच्या छायेतून परत आले आहेत. आज ते रामशरणदास हृदिराम यांच्यासह अुत्तर हिंदुस्थानात हिंदुत्वाचें राजकारण करीत आहेत. १९३० त तुमचें तत्त्वज्ञान मान्य नसूनही, तुमच्याशी खांद्याला खांदा लावून लढण्याअितक्या अुदात्त देशभक्तीचे कितीतरी स्वार्थत्यागी पुढारी महासभेत आज आहेत. त्या वेळीही प्रथम पकडलें भोपटकरांना ! आता तर काय, साठाव्या वर्षी निजामाचा तुरुंगवास धडाडीने स्वीकारून त्यांनी महाराष्ट्रीय हिंदुत्वनिष्ठेचें अेक अविस्मरणीय प्रतीक तरुणांपुढे अुभें केलें आहे. ते काही पोटदुखीने बाहेर आले नाहीत. निजामाचा तुरुंग नि येरवड्याचा तुरुंग यांची तुलना तरी होअू शकेल काय ? डॉ. मुंजे तुमच्यांत चार वर्षें प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष होते. मोपल्यांच्या अत्याचाराविषयी गांधींनी जें घरखाअू भ्याड धोरण स्वीकारलें त्यामुळे ते फिरले. जम्नादास मेहता तुमच्या प्रांतिकसभेचे अध्यक्षच होते. त्यांनीही कारावास भोगला नाही का? भाअी परमानंदानी आपल्या विद्वत्तेचा सर्वसाधारण जीवनातील अमोल फायदा त्यागून राष्ट्रकार्यार्थ काय कमी देहदंड सोसले ? चांदकिरण सारडा हेही अजमीर काँग्रेसमध्येच होते. डॉ. नायडू तुमच्या वर्किंग कमिटीचेच सभासद होते. त्यांचा त्याग नि कष्ट आता ते तुमच्यात नाहीत म्हणून का कमी लेखता ? आणि सर्वांत शेवटचें अुदाहरण; केवळ दोनच वर्षांच्या या प्रभावी तत्त्वज्ञानाच्या जागृतीने जे चार हजार प्रतिकारक निजामच्या नरकवत् तुरुंगात लाठीमार खात होते, समरांगणांत असह्य दुखापतीचीं बिरुदावळें मिरवीत

होते, जे अत्याचार अंकून शहारे यावे असे अत्याचार प्रतिकारीत होते त्यांना "I don't want to embarrass the Nizam" असली मुसलमानधार्जिणी वाक्यें अुच्चारणाऱ्यांनी त्याग तो काय विचारावा ?

आज हिंदुमहासभेत बरेच लोक असे आहेत की जे पूर्वी काँग्रेसमध्ये होते. हे लोक जोपर्यंत काँग्रेसमध्ये होते तोपर्यंत त्यांचा त्याग अपूर्व होता, ते देशभक्त होते ! पण हिंदुमहासभेत येताच तेच देशभक्त देशद्रोही नि स्वार्थी ठरले ! असली निषेधार्ह असहिष्णु वृत्ति काय कामाची ?

महासभेच्या त्यागाचा नि कष्टशीलतेचा वृक्ष फार भव्य आहे. रोपट्यांनी त्याच्याशी तुलनाही करू नये. त्यागाच्या जगात या रोपट्यांनाही थोडें स्थान आहे, तें आम्ही सादर मान्य करतो; पण तुलनाच करू लागलो तर काँग्रेसचा त्याग नि कष्ट हिंदुमहासभेच्या त्यागाच्या नि कष्टाच्या पासंगालाही पुरणार नाहीत.

—गंगाराम खट्याची वाडी, दि. ४–१०–४१

✦ ✦ ✦

४०. हिंदूंकरिता महासभेने काय केलें ?

आता पद्यातून जी स्तुति करण्यात आली ती शब्दशः नि व्यक्ति म्हणून मी खरी मानीत नाही. पण हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने पाहाल तर मात्र गेल्या तीन चार वर्षांत अेक तेजस्वी सूर्य निश्चित अुदय पावलेला आहे; नि तो म्हणजे हिंदु-संघटन सूर्य होय.

हिंदुमहासभेला जातीय चळवळ म्हणणें किती भ्रान्तपणाचें आहे हें आंग्रे-वाडीतील माझ्या व्याख्यानात मी स्पष्ट मांडलें होतें. हिंदूंना हिंदुस्थानात जातीय म्हणणें हें जर्मनांना जर्मनीत जातीय म्हणण्याअितकें मूर्खपणाचें आहे. आणि जातीय म्हणून तुम्ही म्हणता कोणाला ? पांच लोकांची जात होअू शकेल. सहस्र किंवा लाख लोकांची जात होअू शकेल. अेक कोटीला जात म्हणाल, पण तीस कोटी हिंदूंच्या जमातीला तुम्ही जात म्हणता कसे ? ती जात नसून तें अेक राष्ट्र आहे. आणि मुसलमान नि अितर अल्पसंख्याक या जाति आहेत. अेकदा राष्ट्रीय म्हणन तुम्ही स्वतःला म्हणवून घेतल्यानंतर मुसलमान म्हणून त्यांना तुम्ही निराळे ओळखताच कसे ? पण काँग्रेसने मुसलमान पुढाऱ्यांशी घरखाअू हिंदुमुसलमान अैक्यासाठी विचारविनिमय करून आपली जातीय दृष्टिच प्रकट केली आहे. वस्तुतः

हिंदुमहासभेला जातीय म्हणताना मुसलमानांना अवाच्या सवा अधिकार देणारी काँग्रेसच जातीय आहे !

हिंदूंकरिता हिंदु महासभेने काय केलें असा प्रश्न पुष्कळदा काँग्रेसमधील हिंदु विचारीत असतात. वास्तविक असें विचारणाऱ्यांना आमचा अुलट प्रश्न आहे की तू स्वतः हिंदूंकरिता काय केलें आहेस ? हिंदूंच्या हक्कासाठी प्रयत्न करणाऱ्यांचे पाय ओढणाऱ्यांना हा प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही. परंतु महासभेच्या आक्षेपकांच्या वरील प्रश्नाला सरळ अुत्तर असें आहे की, सिंधच्या विभक्तीकरणापासून परवाच झालेल्या शिरगणतीच्या प्रश्नापर्यंत हिंदूंचें हित साधण्याचे सर्व प्रयत्न अेकटया महासभेनेच केले आहेत. ती अधिक काही करू शकली नसेल, तर महासभेच्या बाहेर जे हिंदू आहेत त्यांचा तो दोष आहे.

महासभेने अल्पसंख्याकांतही दोन कोटींहून अधिक लोकांना न समजणाऱ्या अुर्दू भाषेची हिंदी भाषेवरील कुरघोडी थांबविली. हिंदी भाषेवरील अुर्दूच्या आक्रमणाविरुद्ध रान अुठवून संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा अशी घोषणा केली. वर्धा शिक्षणयोजनेनुसार जो शिक्षणक्रम आखण्यात आला आहे त्यात प्रत्येक पुस्तकात पांच नवे अुर्दू शब्द शिकविले जातात. भोळसट अैक्यसाधनाच्या मार्गाचा अवलंब करून शहाजादा राम नि बेगम सीता असले धेडगुजरी नि वाडगे शब्दप्रयोग त्या पुस्तकात करण्यात आलेले आहेत. मुसलमानांच्या आक्रमक प्रवृत्तीपुढे मान वाकविण्याच्या भ्याड वृत्तीतच हिंदी याने हिंदुस्थानी या अजब भाषेचा जन्म आहे. जातीय निवाडयाविषयी ना स्वीकार ना धिक्कार असलें पुळचट धोरण स्वीकारून अंती त्या अराष्ट्रीय निवाडयाचा काँग्रेसने स्वीकार केला आहे. या निर्णयाला प्रारंभापासून महासभेने विरोध केलेला आहे; त्या निवाडयाची कटु फळें आज बंगालमध्ये हिंदु जनतेला भोगावीं लागत आहेत.

सिंधविभक्तीकरणाला केवळ मुसलमान रागावतील म्हणून काँग्रेसने विरोध केला नाही. त्यामुळे आज सक्कर सारख्या प्रांतात हिंदूंचे गांवचे गाव बेचिराख होअून गेले आहेत. गांधींनी या वेळी हिजरात करण्याचा अुपदेश केला होता, पण त्या हत्याकांडात हिंदूंच्या जीविताचें, वित्ताचें नि अब्रूचें संरक्षण हिंदुत्वनिष्ठांनीच केलें.

पाकिस्तानच्या प्रश्नावरही काँग्रेसने मौन स्वीकारलें आहे. या अराष्ट्रीय योजनेचा अेका ठरावाने तरी काँग्रेस वर्किंग कमिटीने धिक्कार केला आहे का ? अुलट तुमची पाकिस्तानची योजना आहे तरी काय, असें मोठया सहानुभूतीने काँग्रेसचे पुढारी मुसलमानांना विचारीत आहेत. हिंदुमहासभेने अगदी रोखठोक शब्दात या योजनेला विरोध केला आहे, नि शेवटचा हिंदु जिवंत असेपर्यंत हिंदुस्थान अविभाज्य राखण्याचा आमचा निश्चय आहे !

अगदी अलीकडचा शिरगणतीचाच प्रश्न घ्या. कृपलानींनी सांगून टाकलें की, हा जातीय प्रश्न आहे, आणि म्हणून त्याच्यात काँग्रेस लक्ष घालू शकत नाही. पण आज या जातीय शिरगणतीला जातीय म्हणणारेच त्या गणतीवर आधारलेल्या मतदारसंघातून निवडून येण्याची धडपड करण्यास कचरत नाहीत. गेल्या शिरगणतीच्या वेळेस काँग्रेसच्या नादाने असहकार केल्यामुळे बंगाल अित्यादि प्रांतांत हिंदूंची संख्या मुसलमानांच्या संख्येपेक्षा कमी भरली नि अल्पसंख्य ठरून ते पोरके झाले ! या वेळी या बाबतीत सर्व हिंदुस्थानभर हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनीच मुसलमानांच्या स्वार्थी धोरणाला पायबंद घातला नि आदिवासी प्रभृति वस्तुतः हिंदु असणाऱ्या पण हिंद्वेतर गणल्या जाअू घातलेल्या लोकांची हिंदु म्हणूनच नोंद करून घेतली.

शुद्धीची चळवळ हिंदुत्वनिष्ठांनीच चालविली आहे. शुद्धीच्या चळवळीमागे मोठें राजकारण आहे. बळाने बाटवून तुम्हांला अल्पसंख्य करून सोडण्याचा डाव शुद्धी चळवळीने हाणून पाडला आहे. स्वतःचा समाज पद्धतशीरपणे वाढविण्याची मुसलमानांची प्रवृत्ति प्रसिद्ध आहे. त्या प्रकाराला शुद्धीच्या चळवळीने बराच आळा वसला आहे.

अगदी अलीकडचें हिंदुमहासभेचें हिंदुत्वरक्षणार्थ तेजस्वी आंदोलन भागानगर नि:शस्त्रप्रतिकाराचें युद्ध होय ! यांत पांच सहस्र हिंदु प्रतिकारकांनी निजामाच्या नरकवत् तुरुंगातील हालअपेष्टा सोसल्या ! पन्नास हजार रुपये अेकट्या महाराष्ट्राने या कार्यासाठी वेचले ! पण अशा भीषण परिस्थितीतून भागानगरचे नि वाहेरचे हिंदु जात असता काँग्रेसने काय केलें ? निजामला मला अडचणीत टाकावयाचें नाही अशा घोषवाक्याने गांधींनी आणि नि:शस्त्र प्रतिकाराच्या चळवळीला प्रत्यक्ष विरोध करून काँग्रेसमंत्र्यांनी आपल्या मुसलमानधार्जिण्या अराष्ट्रीय वृत्तीचा कळस केला ! हिंदूंच्या नागरिक हक्काचे बाजूने अेक फुकाचा शब्दही अुच्चारला नाही.

आज विशेषतः सक्कर, डाक्का अित्यादि ठिकाणी नि कर्णावती, मुंवअी नि अितर शेकडो ठिकाणी तुमच्या बाजूंनी मुसलमान गुंडांशी कोण लढले ? मुन्शी म्हणतात, गांधी नव्हते म्हणून कर्णावती येथील हिंदु पळून गेले ! मी म्हणतो गांधी होते म्हणूनच तसें झालें ! तोच मुंबअीत दंगा झाला, तरी अिथले कुत्रेसुद्धा पळाले नाहीत. कारण संघटित नि हिंदुत्वनिष्ठ असा अेक भाग अिथे होता. धमक्या मारपीट, खून, जाळपोळ या आपत्तींना तोड देअून, शंकराने जसें हालाहल पचविलें तसें हें दंग्याचें विष नष्ट करून टाकण्याअितके आज येथले हिंदु समर्थ बनले आहेत.

अुलट काँग्रेस अधिकारात होती त्या काळात हिंदूंच्या नागरिक हक्कांची धडधडीत पायमल्ली झाली. संयुक्त प्रांताच्या पं. पंतांनी त्यांनी स्वहस्ते छापलेल्या

पत्रकात ही कबुली देऊन टाकलेली आहे ! राजाजी नि मुनशी यांनी आपापल्या प्रांतांत तेच प्रकार केले होते !

हिंदुमहासभेचे सभासद किती आहेत असा प्रश्न पुष्कळदा विचारण्यात येतो. प्रथम प्रथम सरकारही काँग्रेसला हाच प्रश्न विचारून हिणवीत असे. त्या वेळेला काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें उत्तर असें असे की We among ourselves are the vocal India speaking on behalf of the dumb millions. ('हिंदुस्थानातील अितर लक्ष लक्ष मुक्या जनतेच्या वतीने बोलणारा भारत म्हणजेच आम्ही.') आज दुर्दैवाने भागानगर नि भोपाळ येथील असंख्य हिंदूंची नि काँग्रेसने ज्यांची अवहेलना केलेली आहे अशा आपद्ग्रस्त हिंदूंची हिंदु महासभा ही त्याच दृष्टीने प्रतिनिधित्व करीत आहे. वार्षिक अधिवेशनाचे वेळी अेक हॉल भरला तर ज्या काँग्रेसचे पुढारी ना. गोखले आनंदाने नाचत असत, त्या संस्थेनेच वरील प्रश्न विचारला आहे !

हिंदुमहासभा काँग्रेसप्रमाणेच वाढली तर हिंदूंना हिंदुस्थानात मानाने राहता येअील; न वाढली तर चिंता नाही. आम्ही आमचें कर्तव्य करीत आहोत. लाला लजपतराय प्रभृति काँग्रेसमान्य पुढाऱ्यांनीच महासभेची जोपासना केलेली आहे. आजही काँग्रेसमधील पुढाऱ्यांनाही आदर्शभूत असे नेते हिंदुमहासभेत आहेत ! सरकारच्या कुशीतूनच जन्मलेल्या काँग्रेसने हिंदुमहासभेला सरकारजमा तें काय म्हणावें ? या हिंदु ध्वजाखाली संघटित व्हाल, तर जगातील कोणत्याही शक्तीची तुम्हांला भीति बाळगण्याचें कारण नाही. स्वत:च्या सामर्थ्यावरच तुम्ही हिंदुराष्ट्र पुन्हा अेकदा वैभवसंपन्न करून सोडाल ! !

—शास्त्रीभुवन, दि. ४-१०-४१

✦ ✦ ✦

४१. हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व

आज तुम्ही हिंदुत्वाचा नुसता तोंडानेच जयजयकार केला नाहीत तर त्याच्या जोडीला रुपयांचाही छनछनाट केलात याविषयी तुमचे मी दुप्पट अभिनंदन करतो. अेक काळ असा होता की, पांचशे रुपये घ्या पण महासभेचें तत्त्वज्ञान अैका असें म्हणावें लागत असे. आज पांचशेच काय, पांच सहस्र रुपये देतो पण तुमचा युयुत्सु मंत्र अैकवा असा बदल हिंदूंत झालेला आहे. आजचेंच अुदाहरण घ्या ! विजयादशमीचा दिवस हा हिंदुराष्ट्रीय निधीचा शेवटचा दिवस ठरविला होता. संकल्पित निधीची टोचणी लागून वैयक्तिक पराकाष्ठा म्हणून बडोद्याहून

विष्णु कृष्ण अभ्यंकर या नांवाने अेक सहस्र रुपये माझ्याकडे आले आहेत. दुष्काळ, महागाअी अित्यादींनी ग्रस्त अशा विपरीत स्थितीतही दीड लाखापर्यंतचा निधि मध्य-महाराष्ट्राने जमविला आहे. आमचे काही गुजराथी बंधु आहेत. तेही हिंदुच आहेत. त्यांच्यांतील काही जणांनी मला विनंती केली आहे की, तुम्ही आमच्या प्रांतात या; तुमच्या विजिगीषु कार्यासाठी लक्ष लक्ष रुपयेही आम्ही मोजू ! त्यांच्यापुढेही या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला आहे. शरीरें नि घरेंदारें पेटलीं की मनेंही पेटू लागतात.

मागील प्रत्येक व्याख्यानात मी हिंदु-संघटनाचा अेक अेक पैलू सांगितला. यापुढे महासभेवरील तर्कांध लोकांच्या काही आक्षेपांचा फोलपणा सप्रमाण मी सिद्ध करणार आहे.

महासभेवरील पहिला नि प्रमुख आक्षेप म्हणजे ती जातीय असल्याचा होय. या आक्षेपाचें मूळ जातीयत्व नि राष्ट्रीयत्व याविषयीची आपल्याला मिळालेली चुकीची शिकवण होय. कारण जातीयत्व नि राष्ट्रीयत्व हीं सापेक्ष असतात. अेखादा लढा जर विविक्षित जातीवर होणारे अन्याय दूर करण्याकरिता असला तर केवळ तो अेका विशिष्ट जातीसंबंधी आहे म्हणूनच त्याला आपण संकुचित वृत्तीचा अशा अर्थाने जातीय म्हणू शकत नाही; अुदाहरणार्थ, तथाकथित अस्पृश्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी चाललेली अस्पृश्यतानिवारणाची चळवळच घ्या ! यात काँग्रेसचें नि महासभेचें धोरण वाअीट अर्थाने जातीय आहे असें कोणीही म्हणत नाही. मग राष्ट्रातील स्थायीभावच होअून राहिलेल्या बहुसंख्य हिंदु समाजावरील अन्यायांचा प्रतिकार हा वाअीट अर्थाने जातीय होअूच शकत नाही; आणि दुसरें असें की, जगातील रूढार्थानेही हिंदुस्थानात हिंदु ही जात नसून अेक राष्ट्र आहे नि अितर सर्व अल्पसंख्याक समाज या जाति आहेत. त्याच विश्वमान्य नियमामुळे, हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व हें आमचें घोषवाक्य अेक प्रस्थापित सत्य आहे.

काँग्रेसमधील जे लोक याला संकुचित मनोवृत्ति म्हणतात, त्यांना मी विचारतो, की मग हिंदी राष्ट्रीयत्व हेंही विश्वबंधुत्वापेक्षा संकुचितच नाही का ? नि अितकेंच कशाला, वेदांत्याच्या दृष्टीने पृथ्वी हेंही अेक संकुचितच क्षेत्र नाही का ! त्याला त्यांचें अुत्तर असें आहे की, अितर राष्ट्रें आपापल्या लोकांच्या पृथक् गटालाच राष्ट्र या संज्ञेने संबोधतात; यामुळे आम्हांलाही हिंदी म्हणूनच राहणें भाग आहे. गांधी किंवा नेहरू हे कदाचित् वैयक्तिक दृष्ट्या रूझवेल्टपेक्षाही श्रेष्ठ ठरतील. पण अमेरिकेत त्यांना हिंदी म्हणूनच ओळखतील. आतापर्यंत काँग्रेसने प्रादेशिक राष्ट्रीयत्वाच्या खोट्या कल्पनेवर हिंदु नि मुसलमान म्हणून अेक नि अेक दोन मिळून अेक राष्ट्र कल्पिलेलें होतें. त्यांपैकी मुसलमानांनी आता साफ सांगितलें की आम्ही निराळें राष्ट्र आहो ! मग आता काँग्रेसच्या मतानेही दोन अुणे अेक म्हणजे अेकच खाली अुरला, नि तेच हिंदु होत. भूमीचीं नांवें राष्ट्रावरून पडत असतात.

राष्ट्राचीं नांवें भूमीवरून क्वचितच पडत असतात. हिंदुराष्ट्राच्या अस्तित्वावरच हिंदुस्थान राहू शकेल नाही तर ॲबिसिनिया नि अिराण यांच्यासारखाच हा देश मला वाटेल. काँग्रेसचा महासभेवरील जातीयत्वाचा आरोप भ्रान्त कल्पनांच्या मागे लागलेल्या डोक्यातील आहे. तुमच्यावर आक्रमण झालें तरी, तुम्ही आणि आक्रमक यांचें अेक राष्ट्र आम्हांला बनवावयाचें आहे, म्हणून तुम्ही गप्प बसा, असें जर कोणाचें म्हणणें असेल तर ती राष्ट्रीयता आम्ही शतशः धिक्कारतो !

अल्पसंख्याकांच्या योग्य हक्कांवर आम्ही कधीच आक्रमण करू अिच्छीत नाही. त्यांनी गुडघे टेकावे, आम्ही अुभे राहून नमस्कार करू ! त्यांची भाषा, त्यांची संस्कृति, त्यांचा धर्म त्यांनी पाळावा. आमची भाषा, आमची संस्कृति, आमचा धर्म आम्ही पाळू; पण असें करताना राष्ट्रीयत्वाकरिताच आमच्या हक्कांवर कोणाचेंही आक्रमण आम्ही चालू देणार नाही.

' One man one vote ' ही आमची लोकशाही राज्यघटनेची बैठक आहे. गुणावर वा हवेंच असेल तर सर्वांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणातच सरकारी नोकऱ्या द्यावयाला आम्ही सिद्ध आहोत. पण ही सर्वस्वी लोकशाहीची तत्त्वप्रणाली काँग्रेस मंत्र्यांनी वेधडक लाथाडली ! अरे, हिंदु म्हणून नाही, पण राष्ट्रीय म्हणून तरी तुम्ही असें कसें करू शकता ? हिंदूंचे हक्क डावलून नि अल्पसंख्याकांना अवास्तव नोकऱ्या देअून, तुम्ही राष्ट्रीयत्वाला काळोखी फासलीत ! या काँग्रेसच्या घरखाअू तत्त्वज्ञानाला आम्ही कवडीचीही किंमत देत नाही.

या सर्वश्रेष्ठ तत्त्वांना, हिंदुमहासभेच्या राष्ट्रीयत्वालाच तुम्ही जातीय म्हणत असाल तर तर्कविरील भक्कम आसन सोडूनही मी सांगतो की, मग आता याच तत्त्वज्ञानाने आम्ही पुढे जाणार ! काँग्रेसमध्येही काही विचारवंत हिंदु आहेत; पण त्यांना बोलता येत नाही. मुनशींच्या तोंडाला काँग्रेसचें कुलूप होतें. तें निघताच तेच मुनशी आज देशद्रोही योजनांचा धिक्कार अुघड अुघड करीत आहेत ! पुढच्या दाराशी असलेल्या चोराशी लढताना मागच्या दाराशी असलेल्या चोराला चोरच म्हटलें पाहिजे ! त्याला मित्र म्हणून कसें चालेल ? नाहीतर ज्या घरासाठी तुम्ही पहिल्या शत्रूशी लढता तें घरच मागील दारचा शत्रू बळकावून बसेल ! म्हणूनच या देशाचें भवितव्य हिंदूंवर अवलंबून आहे. आतापर्यंत काँग्रेसमध्येही त्याग कोणी केला ? फांसावर कोण गेले ? सत्याग्रहातही कोणी भाग घेतला ? लोकमान्य कोण होते ? स्वतः गांधीही कोण आहेत ? हिंदु आअीबापांचेच ते पुत्र होत. जगातील अितर राष्ट्रें चिमुकल्या भूतकाळावरच अभिमानाने मिरवत आहेत. तुमच्या परंपरेचा प्रारंभ धुंडण्यासही किती सायास पडतील! काँग्रेसची परंपरा म्हणून दादाभाअींपासूनची मी म्हणतो. आमची काय, ' अुर्ध्वमूलमधः शाखं ' अितकी पुरातन आहे ! जिना म्हणतात काँग्रेस हिंदूंची आहे, तें खरें आहे; आतापर्यंत हिंदूंनीच काँग्रेसला बलवान् केली आहे !

आज जगामध्ये राष्ट्रीय स्वाभिमानाची केवढी ज्योत पेटली आहे. चार मिशनऱ्यांच्या अपमानाचा सूड म्हणून चीनवर स्वारी झाली होती. अेका जपान्याच्या बायकोच्या संबंधात जपान्यांनी केवढा कल्लोळ अुडविला ! हिंदूमधील प्रत्येक घटकाविषयी अशीच भावना निर्माण झाली पाहिजे. जिना पाकिस्तानची मागणी करीत आहेत. अेका विद्वानाने पंजाब देअून टाका म्हणून तोड सुचविली आहे. मी म्हणतो, देण्याचीच वृत्ति कां तुमच्यात ? घेण्याची मनीषा कां नाही ? अफगाणिस्तानही पूर्वी तुमचाच होता. द्रव्यात, सैनिकबलात, विद्वत्तेत नि सुदीर्घ तेजस्वी परंपरेत तुम्ही श्रेष्ठ आहात ! अशा बलिष्ठ हिंदु राष्ट्राचे घटक म्हणून या हिंदुत्वाच्या भूमिकेवर अुभे राहा. गतकालात शेकडो देशद्रोह्यांचा नि शत्रूंचा तुम्ही निःपात केलेला आहे. या तेजस्वी राष्ट्रीयत्वामुळे कोणी दुधखुळे म्हणतात आपण नष्ट होअू ! जर होणारच असू तर हिंदु राष्ट्रीय म्हणूनच रणांगणात मरून जाअू ! पण मरण्याकरिता हें राष्ट्र आज सहस्र वर्षे जगलेलें नाही. अितिहासाच्या नव्या पानावर जर्मनांकरिता जर्मनी, अिंग्लिशांकरिता अिंग्लंड त्याचप्रमाणे हिंदूंकरिता हिंदुस्थान हा देश निश्चितीने राखून ठेवा.

आंग्रेवाडी, दि. ३०–९–४१

✦ ✦ ✦

४२. भागलपूरचें विमल यश

हिंदु जगताच्या नागरिक हक्कांच्या संरक्षणार्थ भागलपूर येथे चाललेल्या विराट् लढ्यावर आता शेवटचा पडदा पडल्यानंतर, त्या सर्व घटनेचें सिंहावलोकन करण्याची वेळ आली आहे. हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळाने अपरिवर्तनीय म्हणून ठरविलेल्या महासभेच्या वार्षिक अधिवेशनाच्या त्या काळातील घटनांसंबंधी सर्व पत्रकें नि मतें पाहता सरकारचे निर्बंध धुडकावून भरलेल्या महासभेचें हें तेविसावें अधिवेशन आतापर्यंतच्या कोणत्याही अखिल भारतीय संस्थेने भरविलेल्या वार्षिक अधिवेशनात सर्वांत यशस्वी नि संस्मरणीय झालें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही

आता आपल्यापुढे जीं नांवें वाचलीं गेलीं त्यात काही नांवें राहिलीं असण्याचा संभव आहे. पण सर्व प्रतिकारकांचीं नांवें वाचावयाचें म्हटलें तर अेकवर्षपर्यंत अशा सभा होतील; भागलपूरला जे गेले त्यांचा सर्वांचा सत्कार प्रथम व्हावयास हवा होता. त्यामुळे व्याख्यान रद्द झालें असतें तरी हरकत नव्हती. या धर्मयुद्धातील

आपला वाटा अुचलणाऱ्यांत सत्तर पंचाहत्तर वर्षांचे वृद्ध होते. त्याचप्रमाणे सतरा अठरा वर्षांखालील मुलेंही होतीं. मीसुद्धा हा सन्मान तितकासा व्यक्तिविषयक घेत नाही. हिंदुत्वाचाच हा सत्कार समजतो. या आंदोलनात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेणाऱ्या सर्व प्रतिकारकांचे नि हिंदुसंघटकांचें, हिंदुध्वजाच्या मानाकरिता लढल्या गेलेल्या लढ्यात त्यांनी केलेल्या कामगिरीविषयी मी अभिनंदन करतो. ज्यांनी या लढ्यात आपले देह ठेवले, ज्या दुसऱ्या कित्येकांनी ब्रिटिश सत्तेचे प्रहार सहन केले त्यांना प्रस्तुत काळात हौतात्म्याचा काटेरी मुकुट आणि दुखापतीचीं बिरुदावलें यांवाचून हिंदुमहासभा काय पारितोषिकें देणार ?

भागलपूर अधिवेशनाचे बाबतीत बिहार सरकारबरोबर माझ्या वाटाघाटी २१ तारखेपर्यंत चालू होत्या. पण त्याच्या आधी आमच्या प्रतिकाराची सज्जताही आम्ही करीत होतो. व्हाअिसरॉयकडे दाद मागणार आहोत असें सांगून वाटाघाटी लांबविल्या, त्याही आम्हांला सिद्धतेसाठी अवधि हवा होता म्हणूनच होय. सरकारशी मी अेक गोष्ट बोलत होतो नि हिंदुत्वनिष्ठांशी दुसरी बोलत होतो. कार्यकर्ते शक्य तितका अधिक काळ बाहेर राहावे म्हणूनच आम्ही हें सर्व केलें, हें आता मला अुघड सांगावयाला हरकत नाही.

मात्र प्रतिकाराचा निश्चय हिंदुत्वनिष्ठांना कळताच सीमाप्रांतापासून मद्रासपर्यंत अितकी अहमहमिका हिंदुत्वनिष्ठांत लागली होती की, कोणी यावें यापेक्षा कोणी येअू नये हेंच मला सांगावें लागत होतें. तुरुंगभरती हें आमचें ध्येय कधीच नव्हतें. शत्रूलाच तुरुंगात टाकण्याची आमची आकांक्षा होती. आमची युद्धपद्धति कोणा मूर्खाने शोधून काढलेली नव्हती. शिवाजी नि प्रताप यांच्यापासून ती चालत आलेली आहे. स्वपक्षाची कमीत कमी हानि नि विपक्षाची जास्तीत जास्त हानि कशी होअील तें पाहण्याची आमची प्रवृत्ति होती. अणि भागलपूरचा मातीचा नि बांबूचा अेक मंडप अुद्ध्वस्त होताच अक्षरशः बिहारचे सहा जिल्हेच काय, पण सबंध बिहारप्रांतच या अधिवेशनाचा महामंडप बनला ! अधिवेशन अवघ्या हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यात पसरलें.

सरकार म्हणत होतें अधिवेशन भरू देणार नाही, मिरवणुका काढू देणार नाही, ध्वजारोपण करू देणार नाही; पण या चारही दिवसांत प्रभातफेऱ्या, सहस्रावधि समुदायाच्या सभा, घरोघरी भगवे ध्वज नि रात्री अडीच वाजल्यापासूनच रातफेऱ्या यांचा धुमधडाका चालू होता. मोंघीर, गया, बाराबंकीपर्यंत या अधिवेशनाचा विस्तार होता. अेकच जयजयकार भागलपुरात अैकू येत होता. तो म्हणजे " हिंदु धर्मकी जय " सरकारला वाटत होतें हा मामुली सत्याग्रह असेल. गाड्या भरभरून येतील, त्याच्या पूर्वसूचना मिळतील, स्टेशनवर पोलिसांनी गराडलें की सर्वांना अटक करू, संपलें अधिवेशन यांचें ! आमचा हा निःशस्त्र प्रतिकार, त्यांना अभिनव होता. भागानगर निःशस्त्र प्रतिकारात निजा-

माला वांकवून कित्येकजण भागलपूरला गेलेले होते. माझ्यावरोवर गेलेल्या प्रतिकारकाअितकेच स्वयंसेवक आधीच भागलपूरला पोचले होते. कोणी गोसावी म्हणून गेले, कोणी पिंडदानासाठी म्हणून गेले, कोणी वृत्तपत्रांचे प्रतिनिधि म्हणून गेले. माझ्या बरोबर असणाऱ्यांपैकीही कित्येकजण ठिकठिकाणी वाटेतच अुतरून निरनिराळ्या मार्गाने भागलपुरात पोचले होते. वेळोवेळी नवे प्रतिकारक येतच होते. त्यामुळे गाडीतील प्रतिकारकांची संख्या पुन्हा कायमच राहिली. वॉरंट वाचून मला अटक होताच हिंदु ध्वज हातात घेअून मी पोलिसांच्या मोटारीत जाअून बसलो. त्याचवेळेला मागच्या प्रतिकारकांना सांगितलें होतें की, आता प्रत्येक हिंदुसभेचा सभासद या अधिवेशनाचा अध्यक्ष आहे नि आपल्या हिंदु आअीबापांचे अभिमानी असे सर्व हिंदुमहासभेचे सभासद आहेत !!

पहिल्या दोन दिवसांत पोलिसांनी प्रतिकारकांवर लाठीमाराचा नि घोडदौडीचा कहर केला. पण आमची युद्धकला शिवाजीची होती. पाण्यावर पडलेल्या काठीने पाणी दुभंगावे त्याप्रमाणे जनसंमर्द दुभंगे, पोलीस मग मध्ये सापडत नि चोहोवाजूस हिंदुत्वाचा जयनिनाद अुमटे. काही वेळी घोडेही हलले नाहीत.. धर्मशाळेत आलेल्या अधिकाऱ्यांचे पायच लोकांनी धरून ठेवले. अटक करायला आलेलेच त्यामुळे अटकावले गेले.

भागलपूरच्या राजमार्गावर, कोपऱ्याकोपऱ्यावर, गल्ल्यागल्ल्यांतून, घरांच्या छपरांवरून हिंदुत्वनिष्ठांनी हिंदुध्वजाच्या चालविलेल्या या जयजयकाराने सरकारचा निर्बध कोठच्या कोठे धुडकाविला गेला. तेव्हा शेवटी आपली सर्व अब्रू बिहार सरकारने लजपतराय अुद्यानाच्या लहानशा जागेत आणून ठेवली. 'अितर सर्वत्र तुम्ही आम्हांला नमवलेत; पण या जागेत या तर खरे !' असें म्हणून सरकारने लजपतराय अुद्यानाभोवती कडेकोट बंदोबस्त केला होता. पठाणांच्या पहाऱ्याने सरकारच्या अब्रूला कुंपण घातलें गेलें होतें. हिंदूंवर त्यांचा विश्वास नसावा ! दोन हिंदु पोलिसांनी जागच्या जागी त्यागपत्रें दिलीं ! त्यांना तुरुंगात टाकण्यात आलें, तिथे मुंजेप्रभृतींनी त्यांचा सत्कार केला. दोन धनिक प्रतिकारकांनी त्या पोलिसांना त्यांचें नोकरीतील वेतन देण्याची व्यवस्था केली आहे.

पहिल्या दिवशी मुंबअीच्या श्री. तोडणकर नि थत्ते प्रभृति वीर तरुणांनी त्या अुद्ध्वस्त मंडपावर, पोलिसपहाऱ्यांतील लजपत अुद्यानात घुसून हिंदुध्वज फडकाविला ! भारत स्वतंत्र असता तर असली मर्दुमकी गाजविणाऱ्यांचा विजयचिन्हांनी सन्मान झाला असता ! त्यांतील काहींना बेशुद्ध पडेपर्यंत मारण्यात आलें. दुसरे दिवशी नागपूरचे बाळशास्त्री प्रभृति युवकांनी भगवा ध्वज त्याच ठिकाणी अुभारला. अेका तट्ट्याच्या आडोशातून त्यांनी अुद्यानात प्रवेश केला. पोलिसांना ध्वज लावला जाअीपर्यंत तें कळलेंसुद्धा नाही. तिसरे दिवशी अिंदूरचे. सरदार तारासिंगांनी नि कोल्हापूरचे किंकर प्रभृतींनी रात्रीच्या घनदाट काळोखातच

कुसवावरून आत अुड्या मारून हिंदुत्वाचा ध्वज त्याच अुद्यानात फडकाविला. अशा रीतीने तीनही दिवस सरकारच्या अिभ्रतीचा या वीरांनी वोजवारा अुडविला नि हिंदूंच्या मानाचा ध्वज अुंच फडकत ठेवला. विहारसरकारच्या कीर्तिसुंदरीचें वस्त्रहरण केलें !! योजिल्याप्रमाणे अधिवेशन भरलें, अध्यक्षीय भाषण वाचलें गेलें. ठराव पास झाले नि २०००० जनसमुदायांसमोर संपूर्ण 'वंदेमातरम्' म्हटल्यानंतर अधिवेशनाचें सूप वाजलें.

तुरुंगातही ते किती जणांना घालणार ! कोणीही यावें नि प्रतिकारकांना भेटावें अशी स्थिति होती. सायंकाळपर्यंत पुष्कळदा बाहेरचे आत राहत नि प्रतिकारक भटकून पुन्हा बंदिस्त होत असत. त्या तुरुंगातही अधिवेशन भरलें होतें. नेहमीप्रमाणे अधिवेशनातील भाषणें झालीं; ठराव सम्मत झाले, 'वंदेमातरम्' म्हणण्यात आलें.

या वेळी हिंदूंचा लढा लढविण्यास हिंदु महासभाच पुढे आली. प्रागतिकांपैकी सन्मान्य हिंदूंनीही आम्हांला पाठिंबा दिला, तसे ठराव केले. पण सात दिवसपर्यंत विचारविनिमय करणाऱ्या नि आम्ही नागरिक हक्कांसाठी लढतो म्हणणाऱ्या काँग्रेस वर्किंग कमिटीला त्याचा विचारही करवला नाही ! नागरिक स्वातंत्र्यसंघ प्रस्थापिणारे पं. नेहरूही त्यात होते ! दूरच्या चीन नि रशियाबद्दल मात्र हे जीव ढसढसा रडले ! स्वत:ला राष्ट्रीय समजणाऱ्या नि नागरिक स्वातंत्र्याचेसाठी लढतो असें म्हणणाऱ्या संस्थेला ही लज्जेची गोष्ट नव्हे का ?

किंवा असें तर नसेलना की, ज्याप्रमाणे ब्रिटिश लोक जगातील हिंदुस्थान सोडून अितर सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत त्याप्रमाणे नागरिक स्वातंत्र्याचे भोक्ते काँग्रेसवाले पुढारीही हिंदूंवाचून अितर सर्वांच्या नागरिक हक्कांसाठीच लढत असावेत !

मी काँग्रेसच्या या भ्याड धोरणाविषयी त्यांचा विशेष धिक्कार करतो. कांग्रेसच्या अधिकारस्थ काळात श्री. राजाजी प्रभृतींनी अवलंविलेल्या हिंदुविरोधी धोरणापेक्षा विहार सरकारची ही बंदी अधिक अपमानास्पद नव्हती. मुसलमानांनी दुकानें अधिवेशनकाळात बंद ठेवलीं होतीं. प्रीतीने प्रीति वाढते असें म्हणतात. पण भीतीनेही प्रीति वाढते.

भागलपूर मुस्लिम लीगच्या अध्यक्षांनीही या बंदीविरुद्ध पत्रक काढलें. विहार प्रांतातील मुसलमान पुढाऱ्यांनी असंदिग्ध शब्दांत विहार सरकारच्या धोरणाविरुद्ध प्रकट केलेल्या निषेधपत्रकांनी तर सरकारच्या मस्तकावर निर्णायक वर्मी प्रहार केला ! असेच संघटित व्हाल तर अेक दिवस असा येअील की, ऑल अिंडिया मुस्लिम लीगचे अध्यक्ष मि. जिना यांनाही पत्रक काढावें लागेल की, "आम्हांला पाकिस्तान नको. आम्हांला नुसते हिंदुस्थानात राहू द्या." या प्रकरणावरून आमच्या शत्रूनी त्याप्रमाणेच काँग्रेसमधील भ्रांत राष्ट्रीयांनीही बोध

घ्यावा की, हिंदुमुस्लिम अेकी हिंदुमहासभेच्या तत्त्वानेच लवकर होअील नि तीही मानाची असेल.

शिवाजी नि गुरु गोविंदसिंग यांच्याकाळी जी अखिल हिंदुत्वाची भावना नव्हती आणि जी निर्माण करण्यासाठी हिंदु महासभेने आतापर्यंत भगीरथ प्रयत्न केले ती भावना कोणत्याही हिंदुविरोधी शक्तीला अुच्छेदिण्याअितकी आता प्रबळ झाली आहे. तुरुंगातही सधन प्रतिकारक सर्व विशेष सोयींचा त्याग करून अितर सर्व हिंदूंप्रमाणेच समानतेने वागले. हिंदूंवरील अन्यायाची वार्ता अैकून संताळांची मोठी जमात भागलपूरकडे निघाली होती. पंथभेद, प्रांतभेद, हे सर्व नद्या ज्याप्रमाणे अेका समुद्राला मिळतात, त्याप्रमाणे हिंदुत्वाच्या मानासाठी या धर्मयुद्धात विलीन झाले होते. पण हें सर्व झाल्यानंतर आपण हें विसरता कामा नये की, असले लढे हे भविष्यकाळातील राजकीय रणांगणावर लढल्या जाणाऱ्या विराट् स्वातंत्र्ययुद्धाचे केवळ प्रातिनिधिक आहेत. आज आपण निःशस्त्र आहोत. अेक दिवस असा येअील –नि तो दिवस आंतराष्ट्रीय योगायोगामुळे तुम्हांला कल्पना करवणार नाही अितक्या त्वरेने जवळ येत आहे – की सशस्त्र होअून आजचे प्रतिकारक, सेनापति होअून सशस्त्र युद्धातही शत्रूचा पाडाव करतीलच करतील. जगाच्या नव्या नकाशावर अिंग्लिशांकरिता अिंग्लंड, जर्मनीकरिता जर्मनी त्याप्रमाणे हिंदूंकरिता हिंदुस्थान हा देश निश्चितीने राखला जाअील !

—चौपाटी, ता. १४-१-४२

✦ ✦ ✦

प्राचीन यहुदी योषिता

(लेखांक १ ला)

स्त्री मासिकात मागे आम्ही मनुस्मृतीतील महिला हा लेख लिहून त्यात सरासरी तीन हजार वर्षांपूर्वी आपल्या आर्य स्त्रियांची राहणी, समाजातील स्थान, अवस्था नि वागणूक कशी असे तें दाखविलें होतें.

त्याच प्राचीन काळी आपल्या आर्य स्त्रीप्रमाणेच भारताबाहेर पॅलेस्टाअीन, सिरिया प्रभृति प्रांतांतून निवसणाऱ्या दुसऱ्या अेका प्रख्यात जातीतील अिस्रायल वा यहुदी राष्ट्रातील स्त्रियांची वागणूक कशी असे, स्त्रीविषयी त्या तीन चार हजार वर्षांपूर्वीच्या भारताबाहेरील राष्ट्रांच्या काय कल्पना, भावना नि निर्बंध असत, स्त्रीविषयक त्यांची नीति कशा प्रकारची असे, ती माहितीही सामान्य महिला वाचकांना मनोरंजक नि विदुषी महिलांना तर अभ्यसनीयही वाटल्यावाचून बद्दधा राहणार नाही. त्याविना तीनचार हजार वर्षांपूर्वी आर्य महिला कशी असे, हें ज्यांनी वाचलें असेल, त्यांना त्याच काळी आर्येतर महिलांचीही भारताबाहेर काय अवस्था नि नीतिमत्ता होती तें जाणण्याची अुत्कंठा सहजच वाटणार. त्या दृष्टीने मनुस्मृतीतील महिला या लेखाचा हा 'यहूदी योषिते'वरील आजचा लेख अेक पूरक अुत्तरार्धच होणार आहे.

मनुस्मृतीतील महिलेची रूपरेखा आखताना ती तुटक तुटक निर्बंधाच्या रूपानेच आखणें भाग होतें. कारण, मनुस्मृति हें काही कथानक नसून तो अेक निर्बंध ग्रंथ (लॉ बुक) आहे. तीत नुसते निर्बंध, नियम, विधिनिषेध तेवढे क्रमवार दिलेले आहेत. परंतु ही यहुदी योषितेची जी रूपरेखा या लेखात आखावयाची आहे, तिला मुख्य आधार अेका कथानकमय धर्मग्रंथाचाच असल्यामुळे प्राचीन यहुदी योषिता कशी असे तें अेका मनोरंजक कथानकातून वर्णावयाचें. अेखाद्या आख्यानासारख्या सोप्या नि सरस गोष्टी सांगता सांगताच समजून देण्याची सोय अनायासेच होणारी आहे.

यहुद्यांचा हा प्राचीन धर्मग्रंथ आपल्या वेदांसारखाच अीश्वरी संदेश समजला जातो. अब्राहाम, मोझेस प्रभृति अीश प्रेषितांना देवाने स्वतः सांगितलेल्या आणि काही स्फूर्तविलेल्या आज्ञा त्यात दिल्या आहेत. तसाच सृष्टीच्या अुत्पत्तीपासूनचा अिस्रायल – यहुदी – लोकांचा नि ह्या त्यांच्या अीशदूतांचा अितिहासही त्यातच आहे. त्या अितिहासावरून नि त्या आज्ञांवरूनच प्राचीन यहुदी योषितेची मूर्ति आपणांस घडविता येते. ह्या धर्मग्रंथास जगातील आज अुपलब्ध असलेल्या यच्चयावत् धर्मग्रंथांमध्ये वेदाच्या खालोखालचें महत्त्व दिलें पाहिजे.

यहुद्यांचा हा 'जुना करार' नांवाचा धर्मग्रंथ त्यांच्या परंपरेच्या कालगणनेप्रमाणेच अि. स. पूर्वी ४००० वर्षांच्या अितिहासापासून तो ख्रिस्ती शकाच्या आरंभापर्यंतचा वृत्तान्त देणारा आहे, असें ते मानतात. अैतिहासासिक दृष्टयाही तो ३००० वर्षांचा तरी असलाच पाहिजे. त्यात अितर कोणत्याही प्राचीन धर्मग्रंथाप्रमाणे प्रक्षिप्त वा प्रलुप्त भाग हे असणाराच. पण अेकंदर ग्रंथ असा अितक्या प्राचीन कालाचाच आरसा आहे हें निःसंशय. अितक्या प्राचीन काळची यहुदी योषिता कशी असे नि स्त्रीजातिविषयक कल्पना नि वागणूक त्या प्रसिद्ध राष्ट्रात कोणती होती तें दाखविणारे मूळचे काही श्लोक नि त्यांच्या संदर्भापुरते कथानकातील वेचक श्लोक यांचें भाषांतर या लेखात देत आहोत. त्या कालच्या त्या राष्ट्राच्या अितिहासास हा अेकच ग्रंथ खास आधार आणि अनन्य असें मुख्य साधन आहे. जगातील अति प्राचीन धर्मग्रंथांतील अेका धर्मग्रंथांची तोंडओळखही त्यायोगे, अभ्यासू विदुषींना अनायासेच होअील.

ह्या 'जुन्या करारा'तील पहिला विभाग 'सृष्टयुत्पत्ति' (Genesis) हा होय. त्याच्या पहिल्याच अध्यायात स्त्रीची अुत्पत्ति कशी झाली त्याविषयीची दिलेली कथा अशी :—

स्त्रीची अुत्पत्ति

अगदी आरंभी अीश्वराने आकाश नि पृथ्वी निर्मिली. पृथ्वी आकार नसलेली अेक पोकळी होती. अगाध समुद्र अंधारात गुरफटलेला होता. त्या जलावर अीश्वरी तेज तळपलें. देव म्हणाला, 'प्रकाश पडो !' आणि प्रकाश पडला. देवाने पाहिलें नि प्रकाश त्याला आवडला. त्याने प्रकाशास अंधेरापासून वेगळें केलें, आणि देवाने प्रकाशाला दिवस म्हटलें नि अंधेराला रात्र. ती सकाळ नि संध्याकाळ **हाच** (जगाचा) **पहिला दिवस** ! आणि देव म्हणाला 'जलाच्या अगदी मध्ये अंतरिक्ष होवो !' तसें झालें. आणि देव म्हणाला 'त्या अंतरिक्षामुळे दुभंगलेल्या जलापैकी वरचीं जलाशयें वर नि खालचीं खाली वेगळीं राहोत !' तसेंच झालें. तो दुसरा दिवस. आणि देव म्हणाला, खालचीं सारीं जलें अेकवटोत नि कोरडी भूमि प्रकटो !' तसें झालें. देव तिला पृथ्वी म्हणाला नि त्या पाण्यांना समुद्र. देवाने तें पाहिलें नि तें त्याला आवडलें. आणि देव म्हणाला, 'पृथ्वी आता तृण, वृक्ष, वनस्पति बीज फलादिकांना निर्माण करो !' तसेंच झालें. देवाला तें आवडलें. तो तिसरा दिवस. आणि देवाने दोन मोठे तेजोदीप निर्मून अेकाला दिवस नि दुसऱ्याला रात्री पृथ्वीवर अुजेड असावा म्हणून प्रकाशण्यास सांगितलें. देवाने तारेही निर्मिले. हा चौथा दिवस. आणि देव म्हणाला, 'आता जलातून नाना प्रकारचे प्राणी, पक्षी मासे निर्माण होवोत !' तें तसें झालें. तो पांचवा दिवस. आणि देव म्हणाला, आता पृथ्वी, पशु, कृमि, सर्प, प्राणी यांना प्रसवो. तसेंच झालें. आणि देव म्हणाला,

'आता आपण मनुष्य निर्मूया ! अगदी आपल्याच मूर्तीप्रमाणे, आपल्याच सारखा! आणि देवाने मनुष्य तसा अगदी देवासारखाच निर्मिला. स्त्रीपुरुष दोघेही ! आणि देव त्यांना म्हणाला, या पृथ्वीवरील नि समुद्रातील सर्व पशुपक्षी, मत्स्य, वनस्पति, प्रभृति वस्तूंवर तुमची सत्ता चालो ! तुमचा वंश वाढवा, सुखाने नांदा ! ' तो सहावा दिवस.

(अध्याय दुसरा) – अशा प्रकारे स्वर्ग, पृथ्वी नि हें सारें निर्मिलें गेलें. आणि सहा दिवस हीं कामें करून सातव्या दिवशी देवाने विश्रांति घेतली. देवाने त्या दिवसाला सुटीचा दिवस म्हणून वरदान दिलें. (सरकारी शाळेतील मुलांना नि कचेऱ्यांना यासाठीच रविवारी सुटीचा हक्क आहे ! – लेखक)

असें सर्व निर्मिलें, पण कसें ? तर पृथ्वीवर कोणीही मनुष्य नांगरण्यास नसता आणि पाऊसही पडू लागण्याच्या पूर्वीच देवाने सारीं धान्यें, फळें, वृक्ष आपणच निर्मिलीं. '

आणि नंतर देवाने पृथ्वीच्या मातीपासून मनुष्य घडविला. त्या मातीच्या मूर्तीच्या नाकपुड्यांमधून देवाने चैतन्याचा श्वास आत घातला आणि मनुष्य जिवंत झाला. नंतर देवाने अेडनला अेक सुरेख अुद्यान लावलें. सुरेख नि रुचिर अशा प्रत्येक प्रकारच्या फळांही तें अुद्यान भरलेलें असून त्याच्या मध्यभागी जीवनाचा वृक्ष होता आणि दुसरा सदसद् ज्ञानाचा वृक्ष ! त्या बागेतून ज्या नद्या अेथिओपिया, नि असीरिया अिकडे वाहत जातात त्या सर्वच पाण्याचा पुरवठा करीत होत्या. अशा त्या बागेत देवाने मातीचा केलेला तो पहिला मनुष्य स्थापला नि त्याला सांगितलें, ' तू येथील सारीं फळें यथेच्छ खा ! पण ह्या सदसद् ज्ञानाचें फळ मात्र खाअू नकोस ! नाही तर जीवनास मुकशील ! '

आणि देवाला वाटलें की, ह्या मनुष्याने अेकटें असावें हें काही बरें नाही. त्याला अेक सहचर नि सवंगडी हवा. मी तो निर्मिणार ! देवाने पृथ्वीपासून अुत्पादिलेले सारे प्राणी, पशु-पक्षी त्या आदमच्या – आदि मानवाच्या – पुढे आणले त्यांना आदमने ज्या ज्या नांवाने संबोधिलें तीं तींच त्यांचीं नांवें पुढे पडलीं; पण त्या सर्वांमध्ये आदमला सवंगडी नि सहचर असा अेकही सापडला नाही.

तेव्हा प्रभूने आदमला झोपी घातलें. तो गाढ झोपेत असता देवाने त्याची अेक बरगडी काढली आणि तिथला घाव मांसाने भरून काढला. नराच्या त्या बरगडीचीच देवाने अेक नारी केली नि आदमच्या समोर आणली !

तिला पाहताच आदम म्हणाला, ' अहाहा, ही तर माझ्या अस्थीचीच अस्थि, रक्तमांसाचें रक्तमांस ! हिला नारी (Woman) हेंच नांव हवें. कारण ती नरापासूनच (out of man) घडविली गेली ! ' यासाठीच पुरुष हा आपल्या मातापित्यांना सोडून स्त्रीशीच संलग्न होअील. ती त्याची अर्धांगी. तो नि ती मिळूनच तें पूर्णांग ! '

'आणि तीं दोघेही अगदी नग्न होतीं तो पहिला पुरुष नि ती त्याची पहिली पत्नी. त्या दोघांनाही त्या नग्नतेत संकोचास्पद असें काहीच वाटलें नाही.'

जगातील पहिल्या पतिपत्नींचा संसार

(अध्याय तिसरा) – पण ओश्वराने निर्मिलेल्या त्या साऱ्या सृष्टीत जो पुरता लबाड होता, तो साप त्या पहिल्या स्त्रीला म्हणाला, 'अैक, देवाने ह्या अुद्यानातील सर्व वृक्षांचीं फळें खावयाची अनुज्ञा तुम्हांला दिली आहे ना?' ती स्त्री म्हणाली. 'पण ज्ञानवृक्षाचें फळ मात्र वर्ज्य, तें खाताच मराल! असें देव म्हणाला.' सर्प म्हणाला, 'छट् मराल कसलं! देवाला हें ठाअूक आहे की, ज्ञान-वृक्षाचें फळ का अेकदा मनुष्याने खाल्लें, की त्याचे डोळे अुघडतील आणि सदसद् तें काय हें सारें तुम्हांस समजू लागून तुम्ही माणसें देवासारखीं व्हाल.'

हें अैकताच त्या स्त्रीला त्या दृङ्मोहक नि रुचकर अशा ज्ञानवृक्षाचें फळ खावेसेंच वाटलें. ज्यायोगे सदसद्विवेकबुद्धि येते तें फळ शेवटी तिने स्वतः खाल्लें नि आदमलाही दिलें. तिच्या त्या पतीनेही तें खाल्लें.

त्यासरशी त्या दोघांचेही डोळे अुघडले आणि आपण नागवे आहोत याची त्यांना जाणीव झाली. त्या दोघांनीही लगेच अंजिराचीं पानें शिवून त्यांचीं अंग-वस्त्रें केलीं.

अितक्यात दुपारी त्या अुद्यानाची शीतलता अुपभोगीत हिंडणाऱ्या देवाची चाहूल लागून आदम नि त्याची पत्नी देवास दिसू नये म्हणून झाडाआड लपलीं. तेव्हा प्रभूने त्यांना हाक मारून विचारलें, 'तू कुठें आहेस?' आदम म्हणाला 'तुझा आवाज अैकून मी लपलो. कारण मी नागवा होतो, म्हणून तुमची मला भीति वाटली!' देव म्हणाला, 'काय, तुला कोणी सांगितलें की तू नागवा आहेस? तू त्या झाडाचें फळ खाल्लेंस की जे खाता कामा नये म्हणून मी बजावलें होतें.' तो पुरुष म्हणाला, 'ज्या स्त्रीला तुम्ही माझी सांगातीण म्हणून मला दिलीत तिनेच तें फळ मला दिलें नि मी खाल्लें.'

तेव्हा प्रभूने त्या स्त्रीला विचारलें, 'तू हें काय केलेंस? बोल!' स्त्री अुत्तरली, 'त्या सापाने मला भुलविलें नि मी तें खाल्लें.' तेव्हा देव त्या सर्पाला म्हणाला, 'हें जें तू केलेस, त्याचें प्रायश्चित्तही आता भोग. सर्व प्राण्यांत तू नीच नि नष्ट समजला जाशील. पोटावर फरपटत राहशील नि जन्मभर धूळ काय ती खात पडशील. स्त्रीत नि सर्पात ह्यापुढे सर्वदा वाकडे राहील. तिची संतति तुझ्या संततीचें डोकें चिरडील नि तुझी प्रजा तिच्या प्रजेच्या टाचा चावतील! हा घे शाप!'

आणि स्त्रिये, तुझे गर्भ नि तुझीं दुःखें मी शतगुणित करीन. मुलास जन्म देताना तुला वेदना होतील. नवऱ्याच्या अिच्छेत तुला राहावें लागेल, नि तुझा नवरा तुझ्यावर सत्ता गाजवील. हा घे तुला शाप!'

आणि हे आदम, ज्याअर्थी मी नको खाऊ म्हटलें तेंच तू या तुझ्या बायकोच्या नादी लागून खाल्लेस. त्याअर्थी तुझ्या प्रकरणी ही भूमिही अभिशप्त असो. काबाड-कष्टावाचून तिचें फळ तुझ्या हाती पडणार नाही. काटेरी झाडेझुडपें तिच्यावर वाढतील. तिचा झाडपाला तुला खावा लागेल. काबाडकष्टाच्या घामातच भिजलेली भाकर तुला खाल्ली पाहिजे आणि शेवटी ज्या भूमीतून तुला मी काढलें तीतच तू गाडला जाशील. कारण की, तू मातीच आहेस नि मातीलाच मिळशील!

नंतर आदमने आपल्या बायकोचें नांव ओव्ह असें ठेवलें. कारण ती यच्च-यावत् प्रजेची मूळ माता होय. मग देवाने आदमला नि त्याच्या बायकोला कातड्याचे कपडे शिवले नि त्यांना ते घातले. नंतर देव अुद्गारला, 'अहो, या ज्ञानवृक्षाचें फळ खाल्ल्यामुळे माणूस हा आता चांगलें काय नि वाअीट काय हें ओळखू लागला. तो आम्हांसारखाच झाला. कोणी सांगावें की, तो आता ह्या दुसऱ्या जीवनवृक्षाला सुद्धा हात लावणार नाही म्हणून? जर का त्याने तें जीवनवृक्षाचें फळही खाल्लें आणि देवासारखाच अमर झाला तर!' असें चिंतून देवाने आदमला नि त्याच्या बायकोला त्या अेडनच्या अुद्यानातून हाकून लावलें नि त्या अुद्यानाच्या पूर्वद्वारी अेक जळती तरवार लटकत ठेविली. ती अेकसारखी स दिशांनी फिरत राही. त्या जळत्या तरवारीचा नि देवदूतांचा त्या जीवनवृक्षा-भोवती असा खडा पहारा अुभा केला! आणि तेथून हुसकलेला तो माणूस त्या अुद्यानाबाहेर भूमि नांगरण्यास लावला.

(अध्याय ४ ते ९)–पुढे आदमचा त्याची पत्नी ओव्ह हिच्याशी संबंध होअून तिला गर्भ राहिला. तिचा तो पुत्र 'केन'. तिला दुसरा पुत्र झाला तो, 'अवेल'. त्या दोघा भावांत वितुष्ट येअून केनने अवेलला ठार मारलें. केनने आपल्या पत्नीशी संबंध केला नि तिला गर्भ राहून पुत्र 'अेनाक' हा झाला. (पण आदम नि ओव्ह हें जर मनुष्य जातीचें पहिलेंच जोडपें होतें आणि केन हा त्यांचा पुत्र तर त्याला बायको कोठून मिळाली? ती ही त्या पहिल्या जोडप्याचीच मुलगी, त्याची बहीण. कारण तिला अुजविणारें दुसरें जोडपेंच तोवर जगात नव्हतें.) पुढे आदमपासून ओव्हला तिसरा पुत्र झाला. तो 'सेथ'. त्या सेथला अेक मुलगा झाला. (कोणापासून?) त्याचें नांव 'अेनास'. त्यानंतर पुष्कळ मुलें नि मुली होअून आदम हा नअुशे तीस वर्षांचा होअून वारला.

जलप्रलय

पुढे वंश वाढता वाढता लामेक याला 'नोहा' हा पुत्र झाला. अनेक मुली-मुलें झाल्यानंतर ७७० वर्षांचा होअून लामेक वारला. नोहाला तीन पुत्र झाले. शेम, हेम, जाफेथ ... ही मनुष्य प्रजा वाढता वाढता त्यांच्यात फार पाप माजलें. अितकें की, देवाला वाटलें, मी कुठून ह्या पृथ्वीवर हा मनुष्य प्राणी अुत्पादिला! आणि

देव म्हणाला, 'मी ह्या मनुष्यांचा नि साऱ्या प्राण्यांचा आता सर्वनाश करून टाकणार!' पण नोहा तेवढा देवाला आवडत असल्यामुळे देव त्याला म्हणाला, 'ह्या पापी जगाचा मी नायनाट करणार, पण तुला वाचवीन. मी मोठा जलप्रलय घाडणार आहे. तर तू अेक नाव कर, नि त्यात तू, तुझी वायको, मुलें नि सुना अितके वसा.' त्याप्रमाणे नोहाने केलें. (या पुढे त्या अद्‌भुत जलप्रलयाचें सविस्तर वर्णन दिलें आहे. तो जलप्रलय फुगत फुगत जाअून त्यात पर्वतांचीं शिखरें, पदार्थ नि माणसें बुडालीं. पण नोहाची बंद नाव तरंगत होती) तो महापूर दीडशे दिवस पृथ्वीला वुडवून राहिला होता. तोच देवाला नोहाची आठवण झाली आणि त्याने पाणी अुतरविलें. समुद्राचे फुटलेले झरे आणि आकाशाच्या अुघडलेल्या खिडक्या पुन्हा बंद केल्या आणि अरारात पर्वताच्या शिखरावर ती नाव लागली. तेव्हा देवाच्या आज्ञेने नोहा पृथ्वीवर सहकुटुंब अुतरला. त्याने अेक स्थंडिल केलें. त्यावर मेध्य अशा पशुपक्ष्यांचें मांस हवन केलें. त्या होमिल्या जाणाऱ्या मांसाच्या सुवासाने प्रसन्न होत्साता देव म्हणाला, 'मी तुझ्याशी करार करतो की, मनुष्याच्या अपराधासाठी यापुढे मी अशी सारी पृथ्वीच दंडिणार नाही. मनुष्य स्खलनशीलच आहे! पुन्हा जलप्रलय केव्हाही होणार नाही! भिअू नकोस! याची खूण म्हणून मी आकाशात हें अिंद्रधनुष्य अुगवतो पहा! हेंच माझें आश्वासन...' (अध्याय ९)

नंतर नोहाने शेती केली. द्राक्षें लावलीं. अेक दिवस प्रमाणावाहेर द्राक्षाची दारू पिअून नोहा गुंग झाला. आपल्या तंबूत तो नागवा अुघडा पडला. हें त्याचा पुत्र हेम याने पाहिलें. त्याच्या अितर दोन्ही मुलांनी वस्त्र घेअून तिकडे तोंड न करता मागे मागे सरकत जाअून नोहाच्या अंगावर वस्त्र घातलें. नोहा शुद्धीवर आल्यानंतर त्याने आपल्या ज्या पुत्राने आपल्यास अुल्लग पाहिलें त्या हेमला शापिलें. वयाच्या ९५० व्या वर्षी नोहा वारला.

(यापुढे अध्याय दहाव्यात नोहाच्या मुलांचे वंशविस्तार दिले आहेत.)

भाषांची फाटाफट

(अध्याय अकरावा) –तेव्हा ही सारी पृथ्वी अेक भाषीच होती. सारीं माणसें अेकच बोली बोलत. शिनारच्या मैदानात तीं माणसें आल्यावर (ख्रिस्तपूर्व २५०० वर्षांच्या संधीस ही यहुदीय पुराणगणना) तीं माणसें म्हणालीं, 'चला, आपण विटा पाडूया, त्या भाजूया आणि स्वर्ग गाठील अितका अेक अुंच स्तंभ नि अेक नगर बांधू या!' जेव्हा देव तें नगर आणि कीर्तिस्तंभ पाहण्यास आला तेव्हा तो म्हणाला, 'अहो हीं सारीं माणसें अेक झालीं, अेकच बोली बोलतात. त्याचा हा परिणाम. त्यांनी आता हें करावयास आरंभिलें! असेंच चाललें तर मनुष्य घाटेल तें करू शकेल. छट्, आपण खाली जाअून त्यांची फाटाफूट केली पाहिजे

आणि त्यांची भाषा गोंधळून टाकली पाहिजे. अेकाची बोली दुसऱ्यास समजता कामा नये !' आणि देवाने तसेंच केलें. म्हणूनच त्या स्थळास 'बाबेल' म्हणतात. कारण तिथूनच देवाने पृथ्वीवरील अेक भाषा मोडून तिच्या परस्परांशी भिन्न अशा अनेक भाषा केल्या आणि साऱ्यांना देशोदेशी पांगून दिलें !

पैगंबर अब्राहाम नि त्यांची पत्नी सराअी यांची कथा

आतां तेराहची वंशावळ अशी : तेराहचे तीन पुत्र. अब्राहाम, नाहर, हारन. हारनने 'लॉटला' जन्म दिल्यानंतर तो वारला. अब्राहाम याने लग्न केलें. त्याच्या बायकोचें नांव सराअी. अब्राहामचा बाप २०५ वर्षांचा होअून वारला. तेव्हा प्रभु अब्राहामला म्हणाला, 'तुझ्या वडिलांच्या देशाला नि घराला सोडून दे नि मी सांगतो तिकडे चल ! मी तुझें अेक मोठें राष्ट्र बनवीन, तुझें नांव जिकडे तिकडे गाजेल. ज्याला तूं आशीर्वादिशील त्याला मी आशीर्वादीन, शापशील त्याला शापीन.' देवाच्या या सांगण्याप्रमाणे अब्राहाम हा आपली बायको सराअी नी पुतण्या लॉट ह्यांसह घर सोडून निघाला. नंतर फिरत फिरत बेथल येथे येअून त्याने तंबू ठोकला. तिथे स्थंडिल अुभारून त्याने प्रभूस प्रार्थिलें. आणखी पुढे प्रवासात अब्राहाम जातो तों दुष्काळात सांपडला, म्हणून शेवटी अिजिप्तकडे गेला.

बायकोला बहीण म्हटलें

आणि जसा तो अिजिप्तच्या अगदी जवळ आला तसा तो आपली बायको जी सराअी तीस म्हणाला, 'हें बघ, तू दिसायला अेक सुरेख स्त्री आहेस, हें मी ओळखून आहे. यामुळे मला वाटतें की, आपण अिजिप्तमध्ये जाताच जेव्हा ते अिजिप्शियन तुला पाहतील तेव्हा म्हणतील, ही तर ह्याची बायको ! आणि म्हणून ते मला मारतील पण तुला वाचवतील! तेव्हा हे भार्ये, कृपा कर, नि तू माझी बहीण आहेस असें सर्वांना सांग, म्हणजे तुझ्या रूपाच्या वशिल्याने माझे दिवस सुखात जातील नि तूच मला जीवदान दिल्यासारखें होअील.'

नंतर काय झालें की, ते अिजिप्तमध्ये जाताच तेथील लोकांनी पाहिलें की, ती स्त्री फारच सुरेख आहे. तेथील राजा जो फाराहो त्याच्यापर्यंत तिच्या रूपाची कीर्ति गेली आणि फाराहोने तिला आपल्या अंत:पुरात घेतलें.

'आणि तिच्या वशिल्याने फाराहोने अब्राहामलाही फार चांगलें वागविलें. शेळ्या, बैल, गाढवें, दासदासी अशी विपुल संपत्ति अब्राहामला राजाने दिल्यामुळे त्याची चंगळ झाली.

पण पुढे देवाने सराअीला अंत :पुरात घेणाऱ्या फाराहोच्या घरी दारी रोगाची साथ धाडली. तेव्हा अब्राहामला बोलावून फाराहो म्हणाला, 'अरे, हें तू काय केलेस ? ती तुझी बायको आहे हें कां सांगितलें नाहीस ? ती तुझी बहीण

आहे असें न फसवितास तर मी तिला माझी बायको करतो ना ! आता झालें तें झालें. तुझी बायको तू घे नि तुझी वाट धर. असें सांगून अब्राहामला त्याची बायको देऊन त्याला पूर्वी दिलेल्या विपुल संपत्तीसह फाराहोने धाडून दिलें. (अध्याय १२ वा)

(अध्याय तेरावा)–अब्राहाम, त्याचा पुतण्या लॉट ह्यासह अिजिप्त सोडून बाहेर पडला. ते दोघेही धनधान्य पशु यांही आता संपन्न होते. अेकदा लॉटच्या मेंढपाळांत नि अब्राहामच्या मेंढपाळांत तंटा झाला तेव्हा स्वसंतोषाने आपण निराळें होअू असें अब्राहाम म्हणाला आणि त्याला जी दिशा आवडली, त्या दिशेला लॉट दासदासी पशूंसह निघून गेला.

तेव्हा प्रभु अब्राहामला म्हणाला, 'अूठ नि या चारी दिशांना पाहा. तुला दिसतो तो सारा प्रदेश मी तुलाच नि तुझ्या संततीलाच सदोदितचा देणार ! आणि तुझी संतति मी धुळीचे कण जसे अगणित तशी असंख्य वाढविणार ! अूठ नि या साऱ्या प्रदेशाची रुंदी नि लांबी चालत जा. कारण तो सारा प्रदेश मी तुलाच देणार ! ' अब्राहामने तसेंच केलें नि माम्रेला तंबू ठोकला. देवाचें स्थंडिलही बांधलें. पण लॉटला बायकांमुलासुद्धा शत्रूने पकडलें हें अेकून अब्राहामने शत्रूवर हल्ला करून लॉटला बायकांसह सोडविलें (अध्याय १५)

नि:संतान अब्राहामची नि सराअीची चिंता

(अध्याय १५–१६) – नंतर अेके दिवशी प्रभु अब्राहामला म्हणाला, 'भिअू नकोस ? मी तुझी ढाल आहे ! ' अब्राहाम म्हणाला, 'पण हे प्रभो, मला संतान नाही ! माझा वारस दुसऱ्याचें संतान होणार ! ' प्रभु म्हणाला, 'नाही, तुझ्याच पोटी जन्मलेलें संतान तुझें वारस होअील ! मी तुला खाल्डीच्या 'अर' मधून आणून हा प्रदेश दिला. जा, नि मला अेक कालवड गाय, बोकड नि पक्षी मारून होमून बळी दे! तुझ्या संतानाला मी अिजिप्त ते युफ्रेटीस पर्यंतचें सारें राज्य सदोदितचें दिलें आहे. ..... नंतर सराअी आपला पति अब्राहाम याला म्हणाली, 'बघ देवाने मला वांझ केली. माझा कुसवा निष्फळ झाला ! आता असें तरी कर की, अिजिप्तमधून आणलेली ही जी माझी 'हगर, नांवाची सुरेख दासी आहे ती मी तुला देते. तू तिच्याशी संबंध कर. म्हणजे तरी तुझ्या पोटी संतान होअून आपला निर्वंश होणार नाही.'

आपल्या पत्नीने दिलेल्या ह्या दासीशी अब्राहामने संबंध केला. आणि तिला गर्भ राहिला. पण आपल्याला गर्भ राहिलेला पाहून ती दासी हगर आपली जी धनीण सराअी तिला तुच्छवू लागली.

तेव्हा सराअी अब्राहामला म्हणाली, 'माझ्या अपमानाचा दोष आता तुझ्याकडेच आहे ! मी माझी दासी तुझ्या शेजेस दिली, पण तिला गर्भ राहताच

ती मला पाण्यात पाहू लागली ! आता देवच आमचा न्याय करो ! ' परंतु अब्राहाम म्हणाला, ' हें वघ तुझी दासी तुझीच बटीक आहे ना ? तिचें काय करणें तें तुझ्या हातीच आहे. मग जेव्हा सराअी त्या हगरला कडकपणे वागवू लागली, तेव्हा ती पळून गेली. ती रानावनात भटकत असता तिला अेक देवदूत भेटला नि म्हणाला, ' भटकतेस कुठे ? तुझ्या पोटी पुत्र आहे. त्याचा वंश विस्तारेल. परत फीर ! ' तेव्हा ती परत घरी आली. हगरला पुढे पुत्रच झाला. अब्राहामने त्याचें नांव ,अिश्माअेल ' ठेवलें. तेव्हा अब्राहाम ८६ वर्षांचा होता.

प्रभु पुढे म्हणाला , ' आणि तुझी पत्नी जी सराअी तिला यापुढे तू ' सरा ' असें म्हणावेस. मी आता तिला देखील पुत्र देणार ! होय, तिलाही पुत्र होअील नि माझ्या आशीर्वादाने ती राष्ट्राची माता होअील, लोकाधीश राजे तिच्या पोटी येतील ! तेव्हा अब्राहाम दंडवत घालीत हसून मनात म्हणाला, ' काय ! शंभर वर्षें अुलटलीं त्यास पुत्र होणार, नी सराअी नव्वद वर्षांची म्हातारी तिला गर्भ राहणार ! देवा, माझा अेक पुत्र ' अिश्माअील ' आहे, त्यासच अुदंड आयुष्य दे ! ' तेव्हा देव म्हणाला, ' सराला पुत्र होअीलच होअील. त्याचें नांव अैझाक ठेव. आणि मी अिश्माअीललाही संभाळीन. त्यांचा वंश वाढेल. बारा राजे त्याच्या पोटी जन्मतील. '

पण ' सरा ' तर अगदी वृद्ध. ती मनात हसली की, या म्हातारपणात का आता मला तें गोड वाटणार ? माझा नवराही म्हतारा ! हें कळताच देव म्हणाला, ' सरा का हसली ? देवाला अशक्य असें काही आहे काय? ' हें अैकून सरा देवास भ्याली नि आपण हसलो हें तिने नाकारलें. देव म्हणाला, ' छट्, तू हसलीस !

देवप्रिय लॉटला स्वत:च्या कन्यांपासून पुत्र

(अध्याय १९ वा) ' अिकडे सोडम नगराचा देवाने नाश केल्यानंतर त्याने त्या नाशातून वाचवून बाहेर आणलेला अब्राहामचा पुतण्या नि देवाचा आवडता लॉट हा आपल्या दोन्ही कन्या तेवढयाच घेअून पर्वतातील अेका गुहेत राहात होता. त्या दोन्ही कन्या अुपवर असून त्यांना पुरुष असा माहीत नव्हता.

तेव्हा वडील कन्या आपल्या धाकटया बहिणीला म्हणाली, ' बघ, आपला पिता आता वृद्ध झाला, पण त्याच्या पोटी पुत्रसंतान नाही. आपण दोघी येथे अेकटया. जगाच्या रहाटीप्रमाणे आपल्यालाही शेजेस घेअील असा अेकही पुरुष दुसरा मिळणारा नाही. यासाठी चल, आपण आपल्या या बापाला दारू पाजू ये आणि नंतर आपणच आपल्या या थोर पित्याचें बीज आता जतन करू ये !,

' याप्रकारे लॉटच्या दोन्ही मुली आपल्या पित्यापासून गरोदर राहिल्या. त्या वडील कन्येचा मुलगा तोच ' मोआब. ' धाकटीला सुद्धा मुलगाच झाला. तो ' बेन आमी.' पहिला आजच्या मोआबाअीट जातीचा पूर्वज. दुसऱ्याचा वंश म्हणजेच आजची अॅमॉन जाति.' (अध्याय १९ श्लोक ३० ते ३८)

सराला पुत्र होतो. सराचा सवती मत्सर

अिकडे प्रभु सराला भेटला. देवाने म्हटलें तें तिच्या विषयी केलें. कारण ती गर्भवती झाली. अब्राहामच्या शंभराव्या वर्षी त्याची पत्नी सरा हिला हा पुत्र झाला. नांव अैझाक ठेवून आठवे दिवशी देवाच्या सांगण्याप्रमाणे त्या पुत्राची सुंता केली. पण सराला अितक्या म्हातारपणी झालेल्या त्या पुत्रास पाहून हगर दासीला जो अब्राहामपासून पुत्र झाला होता तो अिश्माअील हसला. हें पाहताच सरा रागावली नि अब्राहामला म्हणाली, ' या बटकीला नि तिच्या त्या दासी-पुत्राला आताच्या आता हुसकून दे. माझ्या मुलासह तो तुझा वारस होत्ता कामा नये. अब्राहामला हें अैकून फार दुःख झालें. पण देव म्हणाला, ' दुःख करू नकोस. कारण तुझेंच बीज असलेल्या त्या दासीपुत्राचेंही मी अेक राष्ट्र करीन ! ' तेव्हा मोठ्या पहाटेस अब्राहाम अुठला. अेक पाण्याची बाटली, भाकरीचा तुकडा, आणि तें मूल त्या हगरच्या स्वाधीन करून तिला त्याने घराबाहेर काढून दिलें.

हगर तेथून जी निघाली ती रानावनात भटकत चालली. तिच्याजवळचें पाणी संपलें. दुसरें कुठे दिसेना. तेव्हा तें तिचें मूल अेका झुडपाखाली टाकून ती दूर जाअून रडत बसली. तें मूल मरताना तिला पाहवेच ना. पण देवाने तिचें रडणें अैकताच देवदूत आला. तो म्हणाला, ' रडतेस कां ? काय होतें तुला ? तुझ्या मुलाला अुचल. देव तुझा साथी आहे. त्याचें अेक राष्ट्र होअील.' हे शब्द अैकून हगरने मुलाला अुचललें, तो देवाने तिचे डोळे अुघडले. पाहाते तो जवळच अेक पाण्याची विहीर. तिने पुन्हा आपली बाटली पाण्याने भरली नि पुढे चालली. तो मुलगा रानावनातच तिने वाढविला. तो मोठा धनुर्धर झाला. अिजिप्तमधल्या अेका मुलीशी त्याच्या आअीने त्याचें लग्न लावून दिलें.(अध्याय २१)

अब्राहाम पुत्राचें बलिदान करावयास जातो

पुढे असें झालें की, देवाने अब्राहामची कसोटी पाहावयाचें मनी आणलें. देवाने हाक दिली, ' अब्राहाम ' ' जी, हा मी ! ' अब्राहाम अुत्तरला. देव म्हणाला, ' तुझा पुत्र, तो अेकुलता अेक पुत्र अैझाक, तुझा आवडता, तोच घे. मोरियाच्या पर्वताकडे जा आणि त्याचें हवन करून मला बळी दे ! '

आणि अब्राहाम सकाळीच अुठला, आपल्या गाढवावर स्वारी भरली, हवनाची लाकडें घेतलीं, नि मुलासह त्या पर्वताकडे गेला. पर्वत येताच तो आपल्या मुलाला तेवढाच घेअून पुढे चालला. मुलगा अजाणपणे म्हणाला, ' बाबा बलिदानाला, चाक, लाकडें, आग घेतलीत, पण बोकड कुठे आहे ? ' अब्राहाम म्हणाला, ' देव देअील तो बोकड ! ' ठराविक जागी येताच अब्राहामने स्थंडिल उभारलें, लाकडें रचलीं आणि त्यावर आपल्या मुलाचा होम करण्यासाठी

त्यास बांधून टाकलें. आपला सुरा अुपसून त्या मुलाच्या कंठावर हाणण्यास त्याने हात अुगारला—तोच देवदूताचा ध्वनि आला, 'अब्राहाम !' अब्राहाम अुत्तरला, 'जी, हा मी अिथे !' प्रभुध्वनि म्हणाला, 'मारू नकोस त्या लेकराला. मी तुझी परीक्षा पाहिली. तुझ्या अेकुलत्या पुत्राला देखील तू बळी देत आहेस ! तुझी माझ्यावरची निष्ठा खरी आहे !' अितक्यात अेक बोकड दिसला, तेव्हा त्यालाच अब्राहामने त्या स्थंडिलावरील अग्नीत मुलाच्या बदली होमिलें. यासाठीच त्या स्थळास आजही 'जेहोवा-जिरें' असेंच म्हणतात. तेथून अब्राहाम बीरशेवा येथे गेला नि तेथेच राहू लागला. (अध्याय २२)

सरा साध्वीचा मृत्यु

तिथे सराच्या वयाला १२७ वें वर्ष लागलें. ती अब्राहामची बायको होती तशीच वहीणही होती. कारण अब्राहामच्या आअीच्या पोटी जरी ती झालेली नव्हती. तरी त्याच्या बापाच्या पोटचीच ती होती. म्हणून बापाच्या नात्याने ती त्याची सावत्र वहीणच होती. आणि तिलाच अब्राहामने आपली वायकोही केली होती. तिला जेव्हा १२७ वर्षें झालीं तेव्हा ती मृत्युशय्येवर पडली, आणि अब्राहामला दुःखात लोटून लौकरच मेली.

येथे सरा साध्वीची कथा संपली.

✦ ✦ ✦

लेखांक २ रा

(अध्याय २४ वा) अब्राहाम पैगंबराची पत्नी साध्वी सरा ही वारल्यानंतर त्याने आपल्या मुख्य कारभाऱ्याला बोलावून म्हटले, 'ये नि तुझा हात माझ्या मांडीखाली घाल, आणि शपथ घे की, माझ्या पुत्राला,अैझाक याला या कॅननाअीट लोकांची मुलगी करू देणार नाही; परंतु माझ्या वंशाच्या मूळस्थानी जा नि त्यातली मुलगी माझ्या मुलास कर. तुझ्यापुढे अेक देवदूत चालेल नि तुला वाट दाखवील. वायको मिळताच माझ्या मुलाला परत आण. जर ती वधू अिकडे यावयास नाकारू लागली, तर तुझ्याकडे बोल राहणार नाही. तू तिला सोडून दे; पण मुलाला मात्र परत आण.'

त्याप्रमाणे शपथ घेअून तो कारभारी अुंटावर सर्व सामान लादून नेहारच्या नगराला अब्राहामच्या मेसोपोटेमियातील मूळ स्थानाकडे निघाला. तिथे पोचताच गावाबाहेरच्या विहिरीवर संध्याकाळच्या वेळी आपल्या अुंटांना गुढघ्यावर टेकवून

तो अुतरला. तिथेच गावच्या स्त्रिया पाणी भरण्यास देत. तेव्हा त्या कारभाऱ्याने देवास विनविलें. ' हे अब्राहामच्या प्रभो, असेंच होवो की, ह्या नगरातील स्त्रिया जेव्हा पाण्यास अिथे येतील तेव्हा मी जीस म्हणेन की, तुझी घागर खाली ठेव नि मला पाणी पिअू दे, आणि जी मला म्हणेल, ' पी, तुझ्या अुंटांना सुद्धा पाणी पाजते – तीच मुलगी तू अैझाकला जी पत्नी म्हणून नेमलेली असशील ती असो!'

ही प्रार्थना संपते न संपते तोच, आश्चर्य की, रेबेका अब्राहामचा भाअू नेहार याची नात ही बाहेर आली. कोणत्याही पुरुषाचा स्पर्श न झालेली, कुवार नि दिसण्यात सुरेख अशी ती कन्या रेबेका आपल्या खांद्यावरचा घडा भरण्यासाठी विहिरीवर गेली आणि घडा पाण्याने भरून आली. त्यासरशी तो कारभारी भरा-भरा तिच्याकडे गेला नि म्हणाला, ' तुझ्या घडयातील थोडं पाणी मला प्यायला देशील का ?'

' प्यावें महाराज,' असें म्हणून तिने घडा हातावर घेतला नि पाणी दिलें. त्याचें पिणें होताच ती म्हणाली, ' तुमच्या अुंटांना पाजण्यासाठी सुद्धा मी पाणी ओढून देते.' झटकन तिने तो घडा गुरांच्या पाण डोणीत ओतला, विहिरीवर गेली आणि पाणी ओढून त्या अुंटांना पोटभर पाजलें. कारभारी तिच्याकडे आश्चर्याने पाहात होता की, देवाने हिलाच धाडलें असेल का ? अुंटांना पाजणें संपताच त्याने सोन्याची कानवाळी नि सोन्याच्या बांगडया हाती घेअून तिला विचारलें, ' कन्ये तू कोणाची मुलगी ? तुझ्या बापाच्या घरी आम्हांला अुतरायला मिळेल काय ?' रेबेका अुत्तरली, ' नेहारची मी नात आहे. आमच्या घरी अुतरा-यला जागा नि दाणावैरण पुष्कळ आहे !' आणि रेबेकाने पळतपळत जाअून आपल्या आअीच्या घरातील मंडळींना तें सारें सांगितलें. तितक्यात रेबेकाचा भाअू लेवन तिथे आला, आणि त्या सोन्याच्या बांगडया नि कानबाळया रेबेकाच्या अंगावर पाहिल्या आणि म्हणाला, ' ठीक आहे.' त्याने स्वत: पुढे जाअून त्या कार-भाऱ्याला त्याच्या साऱ्या मंडळींसह घरी आणिलें नि स्वागतिलें.

हातपाय धुतल्यावर त्या मंडळींना जेवावयास बोलाविलें. पानांवर रुचकर मांस वाढलें, पण कारभारी म्हणाला, ' माझ्या धन्याचा निरोप दिल्यावाचून मी घास घेणार नाही. सांगू का ? सांगावें म्हणताच तो सांगू लागला की, ' माझ्या धन्याने अब्राहामने त्याच्या सरा साध्वीपासून झालेल्या पुत्राचें लग्न तुमच्या घरा-ण्यातील कोणा मुलीशी लावावें म्हणून आज्ञापिलें आहे. अब्राहामच्या वडिलाचें घर म्हणजेच तुमचें. देवदूतानेच मला वाट दाखविली. विहिरीवर मी देवास विनविलें की, जी वधू तू या पुत्रास नियोजिली असशील तीच मला पाणी पिण्यास देवो. त्याप्रमाणे या कुमारिकेने मला पाणी दिलें आणि मी सोन्याचीं कंकणें तिच्या हातात घातलीं. तेव्हा माझा धनी जो अब्राहाम त्याच्या भावाची ही कन्या रेबेका अब्रा-हामच्या या मुलास तुम्ही द्याल तर आभार होतील. नसाल देणार तर तसें सांगावें.

हें त्याचें बोलणें अैकून लेबन म्हणाला, ' देवाची अिच्छा जर तशी, तर तुला तरी आम्ही काय म्हणणार ? ही पहा, रेबेका तुझ्या समोरच आहे. तिला न्या आणि अब्राहामच्या मुलाशी तिचें लग्न लावा; आमची हरकत नाही.'

हें अैकताच प्रभूला वंदून त्या कारभाऱ्याने रत्नजडित सोन्या चांदीचे दागिने रेबेकाला दिले आणि तिच्या भावाला नि आजीला मूल्यवान अुपहार अर्पिले. खाअून पिअून सुखात ती रात त्या सगळ्यांनी घालविली. सकाळीच अब्राहामचा तो कारभारी अुठला नि म्हणाला, ' आता आम्हांस निरोप द्यावा. आमची मुलगी घेअून आम्ही जातो. ' तेव्हा रेबेकाची आअी नि भाअू म्हणाले, ' अिथे थोडे दिवस तरी राहा, निदान दहा दिवस तरी ! मग मुलीला न्या ?' पण कारभारी म्हणाला, ' मला परत गेलेंच पाहिजे.' तेव्हा रेबेकाचीं माणसें म्हणालीं, 'आम्ही मुलीलाच बोलावतो नि तिच्याच तोंडून तिचें मत अैकू.' त्याप्रमाणे तिला त्यांनी बोलाविलें नि विचारलें, ' मुली तू ह्यांच्यासह आताच जाशील का ?' ती म्हणाली, ' हो, जातेच मी ! ' तेव्हा तिच्या माहेरच्यांनी रेबेकाला तिच्या दाअीस सोवत देअून सासरी धाडली. जाताना त्यांनी त्यांच्या त्या मुलीला आशीर्वादून म्हटलें, ' जा, बाळे, जा ! ' तू आमची जशी वहीण आहेस तशीच असंख्य मुलालेकरांची आअी हो ! आणि तुझ्या पुत्रपौत्रांचा द्वेष करणाऱ्यांवर त्यांना सदा विजय मिळो ! ' नंतर रेबेका जावयास निघाली. तिला तिच्या माणसांसह अुंटावर बसवून सामानसुमान घेअून तो कारभारी अब्राहामकडे परत निघाला.

अिकडे अैझाक, अब्राहामचा तो पुत्र, संध्याकाळच्या वेळी शेतात प्रार्थनेसाठी आला असता अुंटांचा जमाव परतलेला त्याने पाहिला. रेबेकानेही आपल्या सेवकांना विचारलें, ' हे कोण ?' ते म्हणाले, ' हाच तुझा धनी ! ' तेव्हा अुंटावरून ती खाली अुतरली, पदर घेतला, आणि तिने आपलें अंग झाकून घेतलें. नंतर कारभाऱ्याने अैझाकला सारी माहिती सांगितली. तेव्हा अैझाकने रेबेकाला आपल्या तंबूत नेलें नि पत्नी म्हणून स्वीकारिलें. तेव्हा अैझाकचें वय ४० वर्षांचें होतें.

अब्राहाम पैगंबराचा मृत्यु

(अध्याय २५ वा) सरा साध्वी मेल्यानंतर सव्वाशे वर्षांवर वय झालेल्या पैगंबर अब्राहामने केटूस नांवाच्या स्त्रीशी लग्न केलें. तिच्यापासूनही त्याला पुत्र झाले. त्यावाचून अब्राहामच्या ज्या रखेल्या होत्या त्यांनाही संतति झाली. त्या सर्वांना यथोचित देणग्या देअून अब्राहामने देशोदेशी धाडून दिलें. आणि मुख्य अुत्तराधिकार अैझाकलाच देअून वयाच्या १७५ व्या वर्षी अब्राहामने देह ठेविला.

पैगंबर अैझाक नि रेबेका यांची कथा

पुढे रेबेकाला संतान होअीना. तेव्हा अैझाकने देवास प्रार्थिलें. देवाच्या आशीर्वादाने रेबेकाला जुळें झालें. वडील पुत्र अीसा – तो फारच केसाळ होता.

धाकटा जेकब तो साध्यासिध्या स्वभावाचा होता. अैझाकची प्रीति अीसावर, पण रेवेकाची जेकववर होती.

पुढे मोठा दुष्काळ पडला. तेव्हा प्रभु त्या अैझाकच्या साक्षात् पुढे येअून म्हणाला, 'मी सांगतो त्या देशी जा. मी तुला नि तुझ्या वंशाला हे देश देअीन. मी अब्राहामशी केलेला करार सफळवीन. तुझा वंश आकाशातील तान्यांसारखा असंख्य वाढेल. तेव्हा पैगंवर अैझाक जेरार ह्या प्रांती गेला.

अैझाक पैगंबर सुद्धा बायकोला बहीण म्हणतो

पण जेरारमध्ये येताच (पूर्वी अब्राहामची गत झाली तशीच अैझाक पैगंबराची होअून) लोक विचारू लागले की, 'ही स्त्री तुझी कोण ? तेव्हा आपली ती बायको असें न सांगता अैझाकने सांगितलें, 'ही माझी बहीण !' कारण त्याला अशी भीति पडली की, रेवेका दिसण्यात सुरेख, तिला पत्नी म्हणावी, तर तिला नेता यावें म्हणून लोक मला टार मारतील !

पण पुढे अेकदा असें घडलें की, त्या देशाचा तो फिलिस्टाअिनांचा राजा अभिमलेक आपल्या खिडकीतून पाहात असता त्याला अकस्मात् रेवेकाशी लडिवाळपणे लगटताना अैझाक दिसला ! तेव्हा त्याने अैझाकला बोलावून विचारलें, 'हें काय, ही तुझी बायकोच असली पाहिजे. बहीण कशी म्हणालास ?' तेव्हा अैझाकने आपण जिवाच्या भयाने तसें खोटें बोललों असें सांगितलें. अभिमलेक म्हणाला,' माझ्या लोकांतून कोणी हिच्याशी संग केला तर ? हें पाप तू आमच्यावर ओढवून आणलें नाहीस का ?' असें म्हणून त्या राजाने प्रजेस समज दिली की, कोणीही रेवेकास वा अैझाकला त्रास देता कामा नये.' (अ. २६)

नंतर तेथेच शेतीभाती करून अैझाक भरभराट पावला. काही दिवसांनी त्याच्या वाढत्या शक्तीला पाहून फिलिस्टाअीनच्या राजाने त्याला तो प्रांत सोडून जाण्यास सांगितलें.

पुढे अैझाक काही काळानंतर वृद्ध होअू लागला आणि त्याची दृष्टि अंधूक झाली. तेव्हा आपल्या आवडत्या पुत्राला, अीसाला जवळ बोलावून तो म्हणाला, ' बघ, आता माझा काही नियम नाही. म्हणून आज अेकदा तू स्वत: पारध करून आणलेलें मांस मला पोटभर खावयाची आलेली हौस पुरवून घेअू दे. तर जा नि पारध करून अुत्तम मांस मला खाअू घाल नि माझा आशीर्वाद मी तुला देअीन ' त्याप्रमाणे त्याचा वडील पुत्र अीसा धनुर्बाण घेअून मृगयेस गेला.

वृद्ध अैझाकचें हें बोलणें रेबेकास आवडलें नाही. कारण तिची प्रीति तिच्या धाकट्या मुलावर होती. यासाठी तिने त्याला गुपचूप बोलावून घेतलें नि म्हणाली ' जेकब, तुझ्या वडील भावाला तुझ्या वडिलांनी मृगयेस धाडलें आहे आणि ते

त्यालाच संतोषून वरदान देतील. तेव्हा तू असं कर की, मी तुला शिजवून देते तें रुचकर मांस घेऊन तूच तुझा भाऊ ईसा आहे म्हणून पुढे होऊन अैझाकला दे. पोटभर जेऊ घाल म्हणजे हें वरदान देगें तें तुलाच दिलं जाईल !'

तेव्हा जेकव म्हणाला. ' बाबांना दिसत नसलं तरी स्पर्शता येतं. माझा वडील भाऊ ईसा केसाळ आहे. तेव्हा मी जर तोच म्हणून पुढे गेलो तर ते क्वचित् माझ्या अंगावरून हात फिरवून चाचपतील नि मी केसाळ नसल्याने माझंच कपट अुघडकीस येअील !'

रेवेका म्हणाली, ' भिअू नकोस, ईसाचा हा अंगरखा मी तुला घालते. वोकडाच्यां केसाळ कातडयाचे हातमोजे हातावर घाल. घे हें मांस, रोट नि तुझा भाअू ईसा मृगया करून येतो त्यापूर्वी वडिलांकडे जा.' त्याप्रमाणे जेकब गेला वृद्ध पैगंवर अैझाकला तो आला तसा ईसाच आला म्हणून वाटलें. त्या अंध पित्याने त्याला आनंदाने म्हटलें, ' ईसा, ये, मला भेट, ये मुला, ही मृगया अितक्या लौकर कशी सापडली ?' जेकव ईसारख्या आवाजात म्हणाला, ' देवाची. अिच्छा ! आता बाबा अुठा नि जेवा ' अैझाक म्हणाला, ' पण जवळ ये म्हणजे मी स्पर्शून बघतो तू ईसाच आहेस कीं नाहीस तें.' तसा जेकब त्या अंध वृद्धा-जवळ गेला, अैझाकने त्याला चाचपून पाहिलें नि म्हणाला, ' आवाज जेकबचा आहे पण हात तर ईसाचा आहे !' (कारण त्यावर केसाळ मोजे होते आणि ईसा केसाळ होता.) तेव्हा पैगंवर अैझाकची फसगत होअुन त्याने ईसाच समजून जेकबला कडकडून मिठी मारली, त्याचे मुके घेतले, त्याचीं वस्त्रं प्रेमभराने हुंगलीं, आणलेलें मांस पोटभर खाल्लें आणि त्याला वरदान दिलें की, ' जा, पुत्रा तुझे सारे भाअू तुझ्या अंकित होतील, तुझा द्वेष करतील ते नाश पावतील. तुझी भरभराट होअील. राष्ट्रं तुझ्यापुढे मान वाकवितील !'

वृद्ध अैझाकचा आशीर्वाद अुपटून जेकब परत जातो न जातो तोच ईसा स्वतः पारध करून शिजवून आणलेलें मांस घेअून त्या आपल्या पित्याकडे आला. तेव्हा जेकबने आधीच कपटाने आपल्या नावे पित्यास कसें फसविलें नि पित्याचें वरदान अुपटलें तें त्या ईसाच्या नि अंध पित्याच्या ध्यानात येअून दोघेही शोकाकुल झाले. पण जें वरदान देण्याची दैवी शक्ति पैगंवर अैझाकमध्ये होती तें वरदान तो जेकबला देअून चुकला होता, हें पाहून ईसा फार शोक करता झाला.

अशाच प्रकारे त्या दोघा भावांचें भांडण विकोपास जाअून ईसाने संधि सापडताच आपल्या धाकट्या भावाला, जेकबला ठार मारण्याचा बेत केला ! हें जाणून रेबेका घाबरली नि तिने ' आपल्या माहेरी जाअून तेथील कोण्या माहेरच्या मुलीशी लग्न लाव नि तिकडेच राहून संकट जाअीतो जीव वाचव ' असें जेकबला सांगून त्याला ईसाच्या नकळत दूर धाडून दिलें.

जेकबचा राशेलशी विवाह

आपल्या मामाच्या घरी निघून जात असता वाटेत दगडाची अुशी करून जेकब निजला असता त्याला स्वप्नात दिव्य दृश्य दिसलें. पृथ्वीवर ठेवलेली अेक शिडी थेट स्वर्गाप्रत पोहोचलेली आणि देवदूत तिच्यारून चढत अुतरत आहेत ! आणि अहो आश्चर्य ! प्रभु स्वतः वर अुभा राहून म्हणाला, 'जेकब मी अब्राहामचा देव, अैझाकचा देव, ज्या भूमीवर तू आहेस, ती सारी भूमि मी तुला नि तुझ्या वंशाला देणार ! तुझा वंश चारी दिशांना विस्तारेल !'

जेकब स्वप्नातून अुठताच म्हणाला, 'अहो आश्चर्य ! स्वर्गाचं दार तें हेंच. हीच पुण्यभूमि !' अुशी केलेला दगड त्याने तेथे त्या साक्षात्काराची स्मृति म्हणून अुभारला, आणि त्यावर तेल ओतलें. 'हा स्तंभच देवाचं गेह होअील ! असें भावून जेकव पुढे चालला. (अध्याय २८)

जाता जाता तो अेका विहिरीपाशी आला. तेथे मेंढपाळ मंडळी होती. झापले कळप ते तेथेच पाणवीत असत. त्यांना जेकब म्हणाला, 'गडयांनो, तुम्हो कुठले ?' 'हेरन गावचे' ते म्हणाले. 'मग तुम्हाला लेवन, जेहारचा पुत्र माहीत आहे काय ?' 'हो तर, आमच्या ओळखीचेच आहेत ते !' 'कुशल आहेत ना ती मंडळी ?' 'अगदी कुशल !' अशीं प्रश्नोत्तरें झालीं.

तोंच अेक मुलगी आपल्या शेळ्या घेअून तेथेच आली, तेव्हा ते म्हणाले, हीच राशेल, लेवनचीच मुलगी !'

त्यासरशी जेकवने राशेलला मिठी मारली, तिचा मुका घेतला नि आनंदाने अश्रु ढाळीत म्हणाला, 'मी तुझ्या वडिलांचा भाअूबंद आहे. अग मीच लेबनची वहीण जी रेवेका, तिचा मुलगा .' तें अैकताच राशेलने लगवग घरी जाअून तें सांगितलें. तेव्हा लेवन धावत तेथे आला, नि आपल्या बहिणीच्या त्या मुलाला त्याने कवटाळून त्याचें चुंवन घेतलें. त्याला घरी आणलें आणि अेक महिना ठेवून घेतलें. मग लेवन म्हणाला, 'जेकव, जरी तू माझा नातलग, तरीही माझ्या घरी तू जें काम करतोस त्याचें तुला मी काही तरी प्रतिमोल देणेंच योग्य. काय पगार घेशील ?'

आता लेवनला दोन मुली. वडील ली व धाकटी राशेल. ली सौम्य नयनांची साधी मुलगी. राशेल सुरेख व सुभग. जेकवला तीच आवडे.

यासाठी जेकब अुत्तरला, 'माझा पगार राशेल ! जर ती मला देशील तर मी सात वर्षें तुझी चाकरी करीन .' त्या प्रमाणे जेकबने सात वर्षें चाकरी केली. तीं सात वर्षें त्याला सात दिवसांप्रमाणे झटकन् गेल्यासारखीं वाटलीं. त्याची राशेलवर तशीच प्रीति होती.

मग जेकव लेबनला म्हणाला, 'आता माझी बायको राशेल मला दे. मी माझा करार पुरा केला. चाकरीचीं सात वर्षें भरलीं. आता राशेल माझी झाली. तिच्याशी संग करायला मला आता अनुज्ञा हवी.'

मग लेबनने साऱ्या मंडळींना जमवून मोठी जेवणावळ दिली. पण रात्री आपली मुलगी जी 'ली' तिलाच लेबनने जेकबच्या खोलीत धाडली, आणि त्यांचा-संग झाला. पण पहाटे दिसू लागलें तेव्हा जेकव पाहातो... तो ती 'ली' आहे! त्यासरशी जेकबने आपला मामा लेबन—त्याला विचारलें, 'तू हें काय केलेस? मी धाकटचा—राशेलसाठी चाकरी केली नाही काय? मग तू वडील मुलगी...रात्री माझ्या शेजेस देऊन असें कां फसविलेस?' तेव्हा लेबन म्हणाला, 'आमच्या देशी वडिलीला देण्याच्या आधी धाकटीला देत नाहीत. आता तू 'ली' चा आठवडा पुरा कर. मग राशेलसाठी आणखी सात वर्षें चाकरी केलीस की ती पण तुला मिळेल!'

तेव्हा जेकवने आपली वडील मामेबहीण जी 'ली' तिच्याशी ठरावाप्रमाणे आठ दिवस संग केला. मग आणखी सात वर्षें चाकरीच्या करारावर त्याची धाकटी मामेबहीण जी राशेल तीही त्याला देण्यात आली. तिच्यावर लीपेक्षाही जेकबची अधिक प्रीति असल्यामुळे तिच्या संग सुखाने त्याला त्या दुसऱ्या सात वर्षांच्या चाकरीचें तर काहीच वाटलें नाही.

बहिणींची बाळंतपणाची चढाओढ

पण देवाने जेव्हा पाहिलें की, जेकब 'ली'चा तिटकारा करीत आहे तेव्हा त्याने तिचा कुसवा सफळ केला. पण राशेल वांझच राहिली. 'ली' गरोदर होऊन तिला पुत्र झाला. तिने त्याचें नांव रुबेन ठेविलें, आणि समजू लागली की, 'देवाने मला पुत्र दिला' आता मात्र माझा पति मजवरच प्रेम करील.'

आणि 'ली' पुन्हा गरोदर राहिली. तिला दुसरा पुत्र झाला. आणि तिला पुन्हा गर्भ राहिला, नि तिला तिसरा पुत्र झाला आणि 'ली'ला पुन्हा दिवस लोटले नि तिला चौथा पुत्र झाला नंतर मात्र तिला दिवस गेले नाहीत.

आता जेव्हा राशेलने पाहिलें की, आपल्याला जो तो वांझ म्हणतो, तेव्हा ती आपल्या बहिणीचा हेवा करू लागली. ती जेकबच्या गळी पडली नि म्हणाली, 'मला मूल तरी दे नाही तर मी जीव देते!'

तेव्हा मात्र जेकबला राशेलचा संताप आला नि तो म्हणाला, 'तुझा कुसवा देवाने वांझ केला का मी?'

तेव्हा राशेल म्हणाली, 'ही बघ माझी दासी बिला. हिला भोग. ती माझ्या मांडीवरच बाळंत होओल म्हणजे तेंच मूल माझें (पूर्वी गुलामांची-दासदासींचीं जीं मुलें ती धन्याचीच मालमत्ता ठरे.)

त्याप्रमाणे जेकवने बिलाशी संग केला. बिलाला पण मुलगा झाला. तेव्हा राशेल हर्षून म्हणाली, देवाने माझी पण विनंती अैकली, मला पण मुलगा झाला. याचें नांव 'दान'. बिला पुन्हा गरोदर राहिली नि तिला दुसरा पुत्र झाला.

आता 'ली' घावरली. तिला मुलें होणें बंद झालें आणि राशेलला मुलें होऊ लागलीं तेव्हा 'ली'ने पण आपली दासी जी झिल्फा तिला जेकवच्या शेजेस धाडली. झिल्फालाही गर्भ राहून पुत्र झाला. तेव्हा 'ली' हर्षली, 'वघा, अेक सैन्यचें सैन्य येत आहे! पुत्रच पुत्र!

अेक दिवस काय झालें की, 'ली'च्या अेका मुलाने अेक कंद आणला. राशेलला तो हवा यासाठी तिने तो 'ली' जवळ मागितला. तेव्हा ली फणकाऱ्याने म्हणाली की, 'काय, तू प्रथमपासून माझ्या पतीची प्रीति छिनावून नेली आहेस तेवढी पुरेशी नाही की काय? तर आता हा कंदही नेऊ पाहतेस? तेव्हा राशेल उत्तरली, 'ह्या कंदासाठी मी त्याला अेक रात्र तुझ्याकडेच धाडीन. मला कंद दे.' त्याप्रमाणे ठरलें. गुराढोरांना नि शेळ्यामेंढ्यांना चारून जेकब संध्याकाळी शेतातून परतताच 'ली'ने त्याला हटकलें, 'आजची रात्र तुला मजकडेच राहिलें पाहिजे. कंदावारी मी आजची रात तुला खरीदलें आहे आणि अशा रीतीने देवाची 'ली'-वर पुन्हा कृपा होऊन वंद झालेला तिचा कुसवा पुन्हा सफल झाला. यथाकाल ती प्रसवली तो तिचा पांचवा पुत्र. 'ली' पुन्हा गरोदर झाली नि तिला सहावा पुत्र झाला. सातव्या वाळंतपणात 'ली'ला मुलगी झाली. तिचें नांव दीना.

पण शेवटी अीश्वराला राशेलचीही आठवण झाली. तिला स्वत:लाही गर्भ राहिला नि पुत्र झाला. तोच जोसेफा.

आता जेव्हा राशेललाही पुत्र झाला तेव्हा जेकब त्याचा मामा लेबन याला म्हणाला, 'वघ, आता माझी तुझ्या दोन्ही मुलींसाठी ठरलेली चाकरी पुरी होऊन गेली. आता मला माझी बायकामुलें घेऊन परत माझ्या वडिलधाऱ्यांकडे जाऊ दे. पण लेबन म्हणाला, 'मी तुला आता म्हणशील तें वेतन देअीन. अिथेच माझ्या गुराढोरांची नि शेळ्यामेंढ्यांची ही अपार संपत्ति सांभाळून राहा.' तेव्हा त्या कळपातील ठराविक भागाचीं नि प्रकारचीं गुरें नि शेळ्यामेंढ्या द्यावयाचा करार करून जेकब तीच चाकरी करीत राहिला. पण पुढे जेकव जसजसा पशुधन, दास-दासी, मुलेंमुली यांही संपन्न होत चालला, तसतसा लेबनला त्याचा मत्सर वाट लागला. लेबनची वृत्ति अशी पालटलेली पाहून जेकवला भीति वाटली. त्याने तेथून निसटून जाण्याचें ठरविलें.

तेव्हा त्याने राशेल आणि ली ह्या दोन्ही आपल्या भार्यांना बोलावून आणून आपला बेत सांगितला. तेव्हा त्या दोघी म्हणाल्या, 'आमची तरी आता हीं माहेरचीं माणसें कोण लागतात? आम्हांस ते परक्यांच्याच स्त्रिया लेखतात. त्यांच्या धनात आमचा वाटा नाही. अुलट, आमच्यासाठी जें धन तू त्यांना मिळवून

दिलेंस तें आमच्या बापाने नि भावाने स्वत:च सारें दावलें; आम्हांस थोडेच दिलें ! तेव्हा आम्हीही तुझ्याबरोबर येणार !'

हें ऐकताच जेकबने आपल्या साऱ्या मुलांलेकरांना, दासदासींना, धनधान्याला घेऊन आपल्या स्त्रियांना अुंटावर बसवून गुराढोरांच्या कळपांसह संधि सापडताच लेबनच्या गावातून गुपचूप य:पलाय केलें !

काही काळाने लेबनला तें कळताच तोही माणसें घेऊन जेकबचा पाठलाग करीत चालला. त्याने जेकबला शेवठी गाठलें. जेकब म्हणाला, 'मी आता परतणार नाही.' लेबन म्हणाला, 'तू जा, पण चोरासारखा पळून कां जातोस ? आणि माझ्या देवघरातील देव कां चोरलेस ?'

जेकब म्हणाला, 'हा आरोप मिथ्या आहे. माझ्या साऱ्या तळाची झडती घे.' त्याप्रमाणे लेबन जेकबच्या बायकामुलांच्या तंबूची सुद्धा झडती घेत चालला.

आता पळून येताना राशेलने आपल्या माहेरच्या देवांच्या मूर्ति खरोखरच चोरून आणल्या होत्या. झडती चालली तसें तिने त्या मूर्तींना अुंटावरच्या बोचक्यात लपविलें नि त्या बोचक्यांना भूमीवर टाकून ती त्यांवर बसून राहिली. लेबन तिच्या तंबूची झडती घ्यावयास येताच ती म्हणाली, 'या आणि हवें तें पहा. तुम्ही वडील माणसें, मीच अुठून अुभें राहावें, तुम्हांला वंदावें. पण मी आज बाहेरची बसले आहे म्हणून क्षमावें.' त्या लेबनच्या लोकांनी खूप शोधलें, पण देव सापडले नाहीत,

तेव्हा जेकब लेबनवर फार रागावला. लेबनही ओशाळला. शेवटी त्या दोघांनीही मागचें विसरून प्रेमाने अेकमेकांना निरोप दिला. अेक दगडाची रास करून तिला साक्ष ठेवून त्यांनी मैत्रीचा करार केला, जेवणावळ दिली आणि लेबनने जेकबला शपथ घातली की, त्याने लेबनच्या त्याला दिलेल्या त्या दोघी मुलींना छळू नये किंवा दुसऱ्या बायका करू नये. मग ते पुत्रांना व कन्यांना चुंबून दोघे दोन्ही दिशांना निघून गेले. (अध्याय ३१)

पुढे जेकब आपल्या घरी परत चालला. पण तो पूर्वी जेव्हा अीसाच्या भयाने घरून पळाला तेव्हा त्याच्या त्या वडील भावाने त्याला मारण्याचें मनात आणलें होतें त्याची जेकबला फार धास्ती पडली. तेव्हा त्याने आपल्या पुढे आपले निवडक दासदासी, पशु भावास भेट म्हणून धाडून त्याची मनधरणी केली आणि अीसा-सामोरा येताच भुअीवर सात वेळा डोकें टेकून वंदित जेकब अीसाला शरण गेला तेव्हा त्यांचें पुन्हा सख्य झालें.

कुमारी दीनाचें अपहरण

पुढे जेकब आपल्या बायकामुलांसह नि दासदासी गुराढोराकळपांसह शालेम नगराच्या मैदानाकडे गेला आणि तंब ठोकून त्याने तिथे तळ दिला.

जेकबची कन्या दीना, 'ली' ची मुलगी, हौसेने त्या गावच्या स्त्रिया कशा असतात हें पाहण्यासाठी त्या नगरात फिरावयास गेली.

पण तेथील राजपुत्र शेचेम ह्याने तिला पाहताच धरून नेली आणि तिच्याशी संग केला. राजपुत्रास ती जीव की प्यार झाली नि तो राजाला म्हणाला, 'ह्याच तरुणीशी मला लग्न लावायचें !'

ही वातमी जेकबच्या मुलामाणसांना कळताच आपल्या अिस्रायलांच्या कन्येस त्या हिटाअिट राजपुत्राने अशी भ्रष्टविली याचा त्यांना संताप आला पण ते बोलले नाहीत. अितक्यात जेकबकडे राजाची मागणी आली की, 'राजपुत्राला तुमची कन्या द्या. आपल्या दोन्ही जातींनी यापुढे अेकत्र राहावें. आम्ही आमच्या मुली तुम्हांस देअू, तुम्ही तुमच्या आम्हांस देत चला. वाटेल तो हुंडा नि दहेज नि देणगी तुम्ही या कन्येसाठी मागा, पण ही कन्या दीना माझ्या पुत्राला द्या !'

जेकबच्या पुत्रांनी त्या हिटाअिट राजाचें हें बोलणें अैकून राग न दाखविता अुत्तर दिलें, 'तें सर्व खरें; पण आमच्या जातीच्या नियमाप्रमाणे जे लोक सुंता करीत नाहीत त्यांना अिस्रायलांच्या कन्या देणें निषिद्ध आहे ! तेव्हा जर तुम्ही सारेचे सारे लोक सुंता कराल तरच आम्ही आमच्या मुली देअू घेअू.'

हें अैकून राजाने त्या नगरीतल्या सर्व लोकांना समजावलें की, करू या सुंता ! या लोकांना आपल्या जातीशी अेकजीव करून टाकल्यास आपलें सुद्धा बळ वाढेल !' हें अैकून ते नागरिकही म्हणाले, 'ठीक; त्यांच्या मुली आपण करू, आपल्या ते !' असें योजून त्या हिटाअिट लोकांतील साऱ्या पुरुषांनी आपली सुंता करविली. त्या दिवशी ते सारेचे सारे त्या सुंतेच्या घावाने आजारी पडले.

तिसऱ्या दिवशी त्या नगरीत जो तो घरी विव्हळत पडलेला होता. हें पाहताच दीनाचे भाअू जो तो तरवार अुपसून अकस्मात् राजवाडयात घुसले. राजा, राजपुत्र नि सैनिक यांना तरवारीच्या धारेने कापून काढलें, तें सारें नगर लुटून आणि आपली कन्या दीना हिला घेअून निघून गेले.

✦ ✦ ✦

(लेखांक ३ रा)

आपल्या दीना नांवाच्या मुलीला नेअून तिच्याशी संग करणाऱ्या हिटाअिट राजपुत्राला फसवून दंडिल्यानंतर जेकबचे पुत्र त्याच्याकडे दीनाला घेअून आले. तेव्हा जेकब घाबरला नि म्हणाला, 'तुम्ही हिटाअिट लोकांशी हें वैर कसें केलेत ? आता आपल्याला अिये दिवस कसे काढता येतील ? हें जिवावरचें संकट ! येथून

निसटून नाहीसे होऊ तरच बचाव ! असें योजून जेकव सर्व मुलामाणसांसह अेदर प्रांताकडे गुपचूप निसटून गेला. वाटेतच गरोदर असलेल्या राशेलचें पोट दुखू लागलें. वेदना फार झाल्या. बाळंत होऊन पुत्र झाला, पण राशेल त्या वेदनांपायी वारली. त्याच पुत्राचें नांव बेंजामिन.

पैगंबर जेकबच्या वडील पुत्राचा सावत्र आजीशी संबंध

याच प्रवासात असतांना पेगंबर जेकब याचा सर्वांत वडील मुलगा जो रुबेन त्याचा जेकबची स्त्री आणि रुबेनची सावत्र आजी जी विला तिच्याशी झालेला संग अुघडकीस आला. पुढे जेकबचा पिता अैझाक हा १८० वर्षांचा झाल्यावर मृत्यु-शय्येवर पडला. तेव्हा पैगंबर अैझाकच्या त्या मृत्युशय्येपाशी त्याचा वडील पुत्र अीसा नि धाकटा पैगंबर जेकब हे दोघेही होते. त्यांनी पैगंबर अैझाकला यथाविधि पुरलें.

विधवा सून तामर हिची कथा

जेकबचा सर्वांत वडील मुलगा रुबेन हें वर सांगितलेंच आहे. त्याच्याहून जो अेक धाकटा मुलगा जुडा त्याने शुआ नांवाच्या कॅनेनाअिट माणसाच्या मुलीशी लग्न केलें. तिच्यापासून जुडाला 'अेर' नि 'ओनन' असे दोन पुत्र झाले. त्याला पुढे तिसरा पुत्र झाला तो 'शेलाह.'

पुढे तिघांपैकी सर्वांत वडील पुत्र जो अेर त्याचें तामर नांवाच्या मुलीशी जुडाने लग्न लावलें. परंतु अेर हा देवास नावडता होऊन देवाने त्यास ठार मारलें; तेव्हा ती तामर विधवा झाली. अेरपासून तिला पुत्रही झालेला नव्हता.

आपला वडील मुलगा असा निपुत्रिक वारल्यामुळे जुडाला वाअीट वाटलें. यास्तव त्याने आपला दुसरा मुलगा जो ओनन त्याला सांगितलें की, 'तू तुझी विधवा भावजय जी ही तामर तिच्याशी संग करून तिची संतति वाढीव.' पण ओननने ती आज्ञा नीटशी पाळली नाही. हें पाहताच देवाला राग आला आणि देवाने त्या ओननलाही ठार केलें. तेव्हा त्या विधवा तामरचा सासरा तो जुडा तिला म्हणाला, 'आता तू सध्या तरी विधवाच राहा, आणि आपल्या बापाच्या घरी थांब. माझा सगळ्यात धाकटा मुलगा शेलाह हा अगदी लहान आहे. आजच मी घाअी केली तर त्याच्या भावाप्रमाणे न जाणो, तोही मरेल ! तेव्हा तो मोठा होअीतो तरी वाट पाहा. त्याप्रमाणे ती विधवा कामिनी तामर आपल्या बापाच्या घरी जाअून वाट पाहात राहिली.

पुढे काही दिवसांनी जुडाचीच बायको वारली तेव्हा तोच विधुर झाला. तिचें सुतक फिटताच तो आपल्या शेळ्यामेंढ्या भादरावयास टिमनाथ या स्थळी गेला. तामरला कोणी ती बातमी दिली की, 'बघ तुझा सासरा शेळ्या भादरावयास जात आहे.' हें अैकताच तिने विधवेचीं वसनें सोडून ठेविलीं, पदर ओढला नि

अंगाभोवती गुंडाळून जुडाच्या वाटेत अुघडया जागीं बसली. कारण जुडाचा तिसरा मुलगा जो शेलाह तो आता मोठा झाला असताही पूर्वी ठरल्याप्रमाणे त्याचें आपल्याशी लग्न करण्याचें जुडा टाळीत आहे हें ती जाणून होती.

जुडाने तिला जेव्हा पाहिलें तेव्हा त्याला वाटलें की, ती कोणी वेश्या आहे कारण तोंड पदरात झाकलेलें होतें. तिला पाहताच जुडा जवळ गेला नि म्हणाला, 'चल ये, मजशी संग कर.' ती बोलली, माझ्याशी संग करावयाचा? पण काय देशील?' जुडा म्हणाला कळपातील अेक कोकरू धाडीन तुला.' ती बोलली, 'पण तें तू धाडीतो गहाण ठेव काही वस्तु.' 'काय ठेवू गहाण?' ती बोलली, 'ही तुझी मुद्रा, ही सलकडी नि ही काठी!' जुडाने त्या वस्तु तिच्यापाशी ठेविल्या नि तिच्याशी संग केला. तिला गर्भ राहिला. मग ती लगेच अुठली, ती घरी गेली तो पदर काढला आणि विधवापणाचीं वस्त्रें पुन्हा ल्यालीं.

जुडाला ती कुणी तरी अनोळखी वेश्याच वाटली होती. म्हणून त्याने तें कोकरू तिच्याकडे आपल्या अेका मित्राच्या हाती धाडलें. पण तो मित्र तेथे येअून पाहतो तो तेथे वेश्या अशी कुणीच दिसेना. त्याने तेथील लोकांना विचारलें, 'कुठे आहे ती वेश्या? येथे अुघडपणे बसत असे नाही का?' लोक म्हणाले, 'छे बुवा, अिथे तर वेश्या बिश्या कोणी नसते!'

यानंतर तीन महिन्यांच्या आत जुडाला लोक म्हणू लागले की, 'तुझी सून व्यभिचारी निघाली! ती स्वैरिणी गर्भार आहे!' तेव्हा जुडा रागावला. 'तिला बाहेर आणा! जिवंत जाळून टाकली पाहिजे तिला!'

तामरला जेव्हा बाहेर काढली तेव्हा तिते आपला सासरा जो जुडा त्याच्याकडे त्या वस्तु धाडून त्याला म्हटलें, 'ज्या मनुष्याच्या ह्या वस्तु असतील त्याच्यापासूनच मला गर्भ राहिला. सांग मला, मी विनविते की, ह्या वस्तु कोणाच्या? ही मुद्रिका, ही सलकडी, नि ही काठी कोणाची?'

तेव्हा जुडाने ह्या वस्तु आपल्याच आहेत हें मानिलें नि तो म्हणाला 'तीच माझ्याहुन अधिक निर्दोषी आहे. कारण मी तिला कराराप्रमाणे धाकटा मुलगा जो शिलाह त्याची पत्नी केलें नाही. (तेव्हा तिने माझ्यापासूनच संतति अुत्पादिली,) पुढे सासऱ्याच्या त्या गर्भापासून त्या विधवा सुनेला जुळे मुलगे झाले. त्या पुत्रांचीं नांवें फारेस नि झाश. आणि हे दोन्ही जेकबचे नातू, जुडाचे पुत्र या नात्याने जेकबच्या कुटुंबात सामावले गेले.

(ज्या देवाने अेर नि ओनन ह्या दोघांना सापेक्षतः क्षुल्लक अपराधासाठी रागावून ठार मारलें म्हणून ही कथा सांगते, त्याच देवाने जुडाच्या ह्या कपटाचा वा या वेश्यागमनाचा वा त्या सुनेच्या श्वशुर संबंधाचा साधा निषेध सुद्धा वेळच्या वेळी कसा केला नाही? का त्याला तें कृत्य तितकेसें निषेधार्ह सुद्धा वाटलें नाही? जेकबला जो देव पदोपदी नित्य दिसे नि हितगुज सांगे, त्या देवाने सुनेशी

तिचाच सासरा जेकबचा पुत्र असा संग करू जात असता परमभक्त जेकबला वेळीच सावध कसें केलें नाही ? ह्या दोन्ही मुलांना जुडाचीं मुलें म्हणून जेकबच्या कुटुंबात देवाने कसें सामावलें ? याचा अुलगडा या कथेत सांपडत नाही; तें ठीकच. कारण अशा भक्तिविजय छापाच्या जेवढ्या कथा, तेवढ्या ज्यू लोकांत वा मुस्लिमांत वा आमच्यांत युक्तिसंगत अशा कधी नसायच्याच ! देवभोळेपणा हाच त्यांचा अलंकार !! फार काय, प्रत्यक्ष पैगंबर जेकबचा वडील मुलगा रुबेन हा आपल्या त्या बापाच्या दुसऱ्या पत्नीच्या शेजेस गेला तेव्हा देखील देवाने जेकबला ती आगाअू सूचना दिली नाही ! आणि लहानसहान प्रकरणी देखील वारंवार त्या भक्ताला देव म्हणे भेटून आगाअू सावध करी ! – लेखक)

समारोप

या यहुदी लोकांचा पवित्र धर्मग्रंथ, ज्याला ख्रिश्चन लोक जुना करार म्हणतात, त्याचा प्रथम खंड जो 'सृष्टचुत्पत्ति' (The Genesis) त्यातील स्त्रीविषयक माहिती देणारे मुख्य श्लोक अेकत्र गुंफून त्यांचा अनुवाद या तिन्ही लेखांकांत आम्ही दिला. या तिन्ही लेखांकांतील नाना कथांवरून न्यूनाधिक तीन सहस्र वर्षांपूर्वी पॅलेस्टाअिन ते अिजिप्तपर्यंत ये-जा करणाऱ्या अजपाल (धनगर) वृत्तीच्या प्राचीन यहुदी लोकांतील स्त्री अेकंदरीत कशी असे याचें अगदी यथावत् चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढे अुभें राहतें,

यहुदी लोकांचा हा धर्मग्रंथ अितिहास ह्या दृष्टीने अवघ्या मानव जातीची अेक अत्यंत मूल्यवान् ठेव आहे. अत्यंत प्राचीन अशा मानवी अितिहासाचे वेद-अवेस्ता नि हा जुना करार हे धर्मग्रंथ म्हणजे जिवंत बोलपटच आहेत.

परंतु ह्या ग्रंथांविषयी त्यांच्या धार्मिक अनुयायांची जी आजवरची निष्ठा असे की, ते धर्म त्रिकालाबाधित, सर्वज्ञानमय, त्रिकालदर्शी आणि अीश्वरोक्त होत, ती निष्ठा मात्र ह्या धर्मग्रंथांच्या तार्किक कसोटीत चुकीची ठरते. ह्या तीन लेखांकांत ह्या अेका धर्मग्रंथातील अगदी पहिला नि अग्रगण्य खंड जो सृष्टचुत्पत्ति, त्याच्यातील ज्या बहुतेक कथा नि कथानकें आम्ही अनुवादिलीं आहेत, त्यांवरूनही तेंच मत निर्विवादपणे स्पष्ट होतें. कारण त्यातील सृष्टिज्ञान आज प्रयोगान्ती अनेक प्रकरणी अगदी भ्रांत ठरत आहे. देवाच्या लीलांची वा देवपणाचीं वर्णनें भाकड ठरत आहेत, देवपणाला न शोभेशीं आहेत. अेका सर्वज्ञानमय धर्मग्रंथात अीश्वरोक्त म्हणून दिलेल्या आज्ञा वा ज्ञान तशाच अीश्वरोक्त म्हणविणाऱ्या दुसऱ्या तितक्याच प्राचीन धर्मग्रंथाशी अगदी विसंगत नि परस्पर विरुद्धही असलेलीं आढळत आहेत.

अुदाहरणार्थ, या यहुदी धर्मग्रंथातील लेखमालेत अनुवादिलेल्या भागात देव स्वत: प्रकटून अीशप्रेषितांना (पैगंबरांना) सांगतो की, मला गाअीचा वा वृषाचाच

वळी द्या. मोठेमोठे देवप्रिय कुलपति गाअीला मारून गोमांसाचीं पक्वान्नें ह्या ग्रंथातील माहितीप्रमाणे धार्मिक संस्कारात खात होते. पण आमच्या अिकडच्या त्याच काळच्या धर्मग्रंथांमध्ये गोवध हा कोणत्याही मनुष्याने काही केल्या करू नये, गोमांस खाणें हें पंच महापातकांप्रमाणे महापातक होय. कुठलेही असले तरी गोघ्न हे अत्यंत पापी नि बहिष्कार्य लोक होत, असें देव कंठरवाने आज्ञापीत आहे! अेकाच वेळी देव अत्यंत विरुद्ध अशा आज्ञा सार्वभौम धर्म म्हणून, सार्वकालिक, त्रिकालाबाधित कर्तव्य म्हणून, आपल्या मानवी वंशाच्या प्रजेला निरनिराळ्या देशांत पागून अशा दुटप्पीपणाने त्यांच्यात भयंकर तेढ माजवून ठेवील हें शक्य नाही. असा दुटप्पीपणा साध्या माणुसकीला देखील कलंक – मग देवाच्या देवपणाला, देवस्कीला तर तें अगदीच हीनविणारें कृत्य ठरतें !

दुसरें अुदाहरण याच प्रकरणातील भाषांच्या गोंधळाविषयीचें पहा. पूर्वी सारीं मनुष्यें अेकच भाषा बोलत. त्यामुळे त्यांच्यात अेकी होअून ते मोठमोठीं कामें पार पाडू लागत. त्यांनी अेक अत्युच्च मनोरा बांधण्यास आरंभिलें. तें काम पाहण्यास देव आला. पण तो अुच्च स्तंभ पाहताच देव म्हणाला, 'अरे, हें काय, हीं माणसें अशींच जुटीने वागू लागलीं, तर आकाशास पोचेल असा अुंच स्तंभसुद्धा हें बांधतील! छट्! हे अुद्या देवासारखे समर्थ होतील! मग मला देव म्हणून कोण विचारतो?' असें भिअून नि रागावून देवाने माणसांची भाषा गोंधळून टाकली! भाषांत फूट पाडली? त्यामुळे अेकाची भाषा दुसऱ्यास कळेनाशी होअून मनुष्यांत पृथक् भाषाभाषी जाती झाल्या, त्यांचें बळ घटलें! (अध्याय ११)

आता अेक भाषा ठेवली तर त्याचा परिणाम काय होअील हें प्रथमच कळण्याअितका देखील देव दूरदर्शी नव्हता की काय? 'देव तो स्तंभ बघण्यास आला तेव्हा त्याला तें कळलें हें देवाच्या सर्वसाक्षीपणास लांछन लावीत नाही काय? तिसरी विसंगति ही की, मनुष्यजातीत अेकी नि जूट झालेली पाहून ज्या देवास आनंद न वाटता अुलट मत्सर वाटतो, आपलें देवपण जाअू नये म्हणून जो मनुष्यांत फूट पाडतो तो देव, की कोणी 'फोडा नि झोडा' असें डुरकत प्रजेस पिळून काढणारा छळक कंस? नरास नारायण करील, मनुष्यास देव करील तो देव ही देवाची व्याख्या कुठे, आणि हा आपलें देवपण जाअू नये म्हणून मनुष्यांत फूट पाडणारा, आपल्या प्रजेस वेठीचे दास बनविणारा देवाचा दैत्यपणा कुठे!' अर्थात् अज्ञानी, भाबड्या, अजपाल अवस्थेतील त्या तीन सहस्र वर्षांपूर्वीच्या अेका धनगर जातीतील ही अेक दंतकथा होय! ज्याचें अक्षर नि अक्षर परम सत्य अीश्वरोक्त, त्रिकालदर्शी प्रेषितांनी प्रकटविलेलें आहे, अशा, कोण्या धर्मग्रंथातील सूक्त नव्हे. धनगरांतील शिळोप्याची अेक गोष्ट मनुष्याच्या भाषा भिन्न कशा झाल्या, ह्या विषयीच्या भाबड्या साध्यासीध्या धनगर मंडळींतील अेका शहाण्याचा अेक तर्क, ह्या दृष्टीने वाचू गेले असता ही कथा किती गमतीची नि छान वाटते! पण अस्खलनीय,

अशंकनीय, धार्मिक, ओश्वरी सूक्त, म्हणून ती वाचू लागताच तो निव्वळ वेडगळपणा वाटू लागतो. देवाची थोरवी वाढविण्याच्या ठायी देवाला दैत्याचें स्वरूप येतें !

आणि ह्या भक्तिविजय छापाच्या भावड्या कथा ओश्वरोक्त, परमसत्य नाहीतच नाही, हें दर्शविणारा प्रबळ पुरावा म्हणजे हा की, देवाने वेबलच्या ह्या स्तंभासाठी तोवर साऱ्या मनुष्यजातीची असलेली अेक भाषा गोंधळवून तीत फूट पाडली नि अनेक भाषा केल्या ती घटना, ह्या ओश्वरोक्त धर्मग्रंथात साडेचार हजार वर्षांपूर्वी घडली म्हणून निश्चित काळ दिलेला आहे. पण त्या काळी पॅलेस्टाओनपलीकडे प्राचीन चीन नि भारतासारख्या महाद्वीपांतून अनेक भिन्न भाषा शतकोशतकें आधीच प्रकर्ष पावलेल्या होत्या ! विचाऱ्या पॅलेस्टाओनच्या अजपाल जातींना त्यांचीं नांवेंसुद्धा माहीत नसावींत हें अगदी साहजिक आहे. पण 'देव'ही अितका गैरमाहितगार असावा हें मात्र साहजिक नाही. कारण सर्वसाक्षी, सत्यमूर्ति नि सर्वज्ञानमय तो देव ह्या देवाच्या व्याख्येशी हें अज्ञान पूर्णपणें विसंगत ठरतें.

तिसरें आणि सर्वांत निर्णायक अुदाहरण म्हणजे या लेखमालेच्या आरंभीच अनुवादलेला या धर्मग्रंथातील पहिलाच अध्याय पहा. त्यात सृष्टयुत्पत्तीची कथा आहे. आपल्या अिकडील धर्मग्रंथातही सृष्टीच्या अुत्पत्तीसंबंधी अगदी प्राचीन काळी त्या काळच्या ज्ञानी सज्जनांनी किंवा कवींनी केलेले तर्क नि रचलेल्या कथा आहेतच. त्या वेदादिक आपल्या अिकडच्या ग्रंथांत चंद्र, सूर्य, वायु, वीज, पृथ्वीप्रभृति पदार्थांच्या अुत्पत्ति नि व्यापार यांविषयी रचलेल्या कथा जशा आज विज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रयोगसिद्ध ज्ञानाने लटक्या पाडल्या तशीच ही या मुस्लिम, ख्रिस्ती नि यहुदी लोकांच्या धर्मग्रंथांतील सृष्टीच्या अुत्पत्तीची कथाही अक्षर नि अक्षर लटकी पाड़ली आहे ! अेक प्राचीन बुद्धिविकासाची चुणूक म्हणून, अेक प्राचीन गमतीची कल्पना म्हणून, अेक कथा, अेक कविता म्हणून, हें सृष्टीच्या अुत्पत्तीचें ह्या धर्मग्रंथाच्या अगदी आरंभीच हें ओश्वरोक्त म्हणून दिलेलें सूक्त अगदी वाचनीय, गमतीचें नि गोड सुद्धा आहे. पण तीच मनुष्याच्या अज्ञानाची, अेक कल्पित कथा आहे, विज्ञानाने तिला साफ चुकीची ठरविली आहे. तिला ओश्वरीय ज्ञानाची सत्यकथा, जिचें अक्षर नि अक्षर त्रिकालाबाधित सत्य आहे नि प्रत्यक्ष देवाने सांगितली आहे अशी ती अशंकनीय, पवित्र ओश्वरोक्ति आहे असें म्हणणें म्हणजे ओश्वरीय ज्ञानालाच अज्ञानग्रस्त ठरविण्यासारखें होतें.

थोडी चुणूक म्हणून खालील दोनतीन विधेयेंच ह्या दृष्टीने पाहू. ह्या सृष्टिकथेत म्हटलें आहे, देवाने प्रथम पाणी निर्मिलें, नंतर पृथ्वी, नंतर वनस्पति, आणि मग पृथ्वीवर अुजेड देण्यासाठी सूर्य नि चंद्र निर्मिले ! आता प्राचीन मनुष्याच्या सृष्टीचीं रहस्यें अुलगडण्याचा अेक आरंभीचा प्रयत्न, अेक कल्पना म्हणून हें सूक्त

विचारार्ह, मनोरंजक नि वाचनीय आहे. पण त्रिकालाबाधित ईश्वरी सत्य म्हणून त्याला मिरविलें म्हणजे त्याला किती हास्यास्पद नि टाकाऊ ठरविलें पाहिजे हें काय सांगावयास पाहिजे? आज विज्ञानाच्या प्रत्यक्षावगम्य पुराव्याने सिद्धिलेल्या ज्ञानाशी तें पूर्णपणे विसंगत आहे, अगदी लटकें आहे. सूर्य प्रथम झाला, आणि तो केवळ पृथ्वीवरील माणसांना अुजेड देण्यासाठीच काय तो झालेला नाही. वेळी सारी पृथ्वी, तिच्यावरील सारे धर्मग्रंथ, देवळें, मशिदी, चर्चेस सुद्धा क्षणार्धात भस्म करून टाकण्यासही तो सूर्य सोडणार नाही. मनुष्य केला तो म्हणे या साऱ्या पृथ्वीचा भोग घेण्यासाठी! पण हजारो माणसांनाच वाघ, सिंह गट्ट करून आजवर माणसांचा भोग घेत आले, त्याचें काय? प्रथम पुरुष केला, नि त्याची अेक बरगडी घेअून त्यावर रक्त, मांस थापून देवाने स्त्री 'केली'! ज्यांनी ह्या कथा रचल्या त्यांना जवळचा कोणी कुंभार मूर्ति, पुतळे, मडकीं मातीची बनवितो हें दिसत होतें; याच किल्लीने त्यांनी मनुष्य नि स्त्री 'करण्याचें' 'बनविण्याचें' हें कोडें सोडविलें! देव हा अेक महान् कुंभार. त्याला वाटलें, पुरुष 'केला' त्याचीच अेक बरगडी घेअून स्त्री 'केली!' स्त्रीची अैटीची ठेवण पाठीच्या बाजूने बरगडीसारखी बाकदार दिसतेही! जी सृष्टि केली ती सारीची सारी किडामुंगीसुद्धा अेका सहा दिवसांत करून टाकून थकलेला देव विसावा घ्यावयास ज्या दिवशी गेला, तो. रविवार! म्हणूनच आपण साऱ्यांनी आता देखील रविवारी कामकाज बंद केलें पाहिजे!

पृथ्वी अुत्पादिल्यानंतर तीन दिवसांतच मनुष्य बनविला असें ही कथा सांगते. पण विज्ञानाने भूगर्भाधारे सिद्धिलें आहे की, पृथ्वी प्रकटल्यानंतर लाखो वर्षें मनुष्य अस्तित्वातच नव्हता. तो अेका झटक्यासरशी कुंभाराने मडकें करावें तसा केला नाही, तर तो सर्पस्तन्यप्रभृति प्राणिवर्गाचा विकास होता होता विकसत आलेला आहे!

मुलें विचारतात, 'आजी, हें गडगडतें ग काय?' तेव्हा आजी सांगते, 'बाळा, अेक म्हातारी आकाशात आहे ती तिच्या घरच्या अेका मोठ्या जात्यात हरभरे भरडते आहे हो!'

आजीबाअीचें हें बालोपयोगी सृष्टिविज्ञान जसें गमतीचें तसेंच आपल्या वा मुस्लिम, ख्रिश्चन, यहुदी प्रभृति अनेक प्राचीन धर्मग्रंथांतील सृष्टीविषयीच्या या कल्पित कथा गमतीच्या आहेत! सृष्टिविज्ञान म्हणून त्यापेक्षा त्यांचा आज काही अुपयोग नाही.

परंतु त्यांना धर्मग्रंथातील त्रिकालाबाधित सत्यज्ञान समजलें गेल्याने त्यांच्यापासून हानि मात्र अतोनात झाली आहे. वरील आजीबाअीच्या गोष्टीतील गडगडण्याचें कारण अीश्वरोक्त सत्य म्हणून शाळेत मुलांना जर आपण शिकवीत राहिलो तर जितकी हानि होअील त्याच्या लक्षपट हानि वरील दंतकथांना

धर्मकथा म्हणून, अशंकनीय सत्य म्हणून शिकवीत राहिल्याने झालेली आहे, होणारी आहे. कसें तें पहा.

हया सूक्ताला ओश्वरोक्त सूक्त मानल्याने युरोप अणेपुरें अेक सहस्र वर्षें सृष्टि-विज्ञानविषयक अज्ञानाच्या अंधकारात गाडलें गेलें होतें. कोणी म्हटलें पृथ्वी गोल आहे, की तो या सूक्ताविरुद्ध बोलतो म्हणून ठार झालाच ! कोणी म्हटलें पृथ्वी फिरते, की तो हया सूक्ताविरुद्ध बोलतो म्हणून जिवास मुकलाच ! कुणी म्हटलें सूर्य पृथ्वीआधी होता, सात दिवसांत सारी सृष्टि, कोटयवधि प्राणी, कीडमुंगी मनुष्यप्राणीसुद्धा सायसंगीत केली ही या सूक्तातील क्लृप्ति भ्रम असून लक्षावधि वर्षांनी विकसत सृष्टि होत गेली ; आजही प्राणी, मनुष्य, पक्षी विकसत जात आहेत असें जेव्हा त्रिकासवादी (Evolutionists) म्हणू लागले तेव्हा पोपची पाखंडनाशक गदा त्यांच्या डोक्यावर आदळली ! सशस्त्र क्रान्त्या होअून बॅस्टील-चा बंदीगड फोडून टाकून जसे बंदिवान् सोडवावे लागले, तसे या सूक्ताचे तट फोडून सृष्टिविज्ञानास धर्मवेडाच्या बंदीतून सोडवावें लागलें ! तेव्हाच काय तें गेल्या तीनशे वर्षांमध्ये युरोपात सृष्टिविज्ञान बुद्धिवादाच्या पायावर अुभारलें गेलें, आणि त्यासरशी युरोप आज सृष्टिशक्तींना आपल्या सेवेस, गाडीला बैल जुंपावे तसे जुंपीत चालला आहे. युरोपात आज या कथेस अेक शिळोप्याची गप्प यापलीकडे कोणीही शिक्षित अधिक महत्त्व देत नाही.

ओश्वरकृत वा ओश्वरप्रेषित म्हणून मानले जाणारे सर्व धर्मग्रंथ हे मनुष्य-कृत आहेत हें वेदादिकांच्या बुद्धियुक्त निरीक्षणावरून जसें ठरतें, तसेंच मुस्लिम कुराण, ख्रिस्ती बायबल नि यहुदी धर्मग्रंथांचें मूळ जो हा जुना करार, हें 'बुक ऑफ मोझेस' त्यावरूनही सिद्ध होतें. त्या सर्व ग्रंथांचे अैतिहासिक, वाङ्-मयिक महत्त्व अपूर्व; मनुष्यजातीची ती अत्यंत आदरणीय, अभ्यसनीय वाक्-संपत्ति अितकेंच काय तें खरें. त्यातील शब्दन् शब्द खरा नाही. अनेक कथा निव्वळ कल्पना ! विज्ञानाच्या कसोटीस न टिकेल तें हया वेद, अवेस्ता, कुराण, बायबल, मोझेसोक्तादि ग्रंथांत असलें तरी तें टाकाअू हेंच सत्य. पूर्वीचें युग तें सत्ययुग नव्हे ! अतिप्राचीन तें तें अतिपूज्य, अतिध्येय, अतिपवित्र असलेंच पाहिजे ही गोष्ट खोटी आहे.

या लेखमालेत स्त्रीविषयक तेवढाच भाग जरी या धर्मग्रंथातून अनुवा-दिणें भाग पडलें असलें, तथापि तेवढयावरूनही आपल्या वेदांत वा यहुद्यांच्या जुन्या करारात जें वर्णिलें तेंच सत्ययुग ही आपली, वा मुस्लिम, ख्रिश्चन, पार्शी, यहुद्यांतील पौराणिकांची समजूत किती भ्रांत आहे हें स्पष्टपणे अुलगडून दाखविता येतें. स्त्रीविषयक कल्पना, आचार, वर्तन, व्यवहार जें हया लेखमालेत हया यहुद्यांच्या अतिप्राचीन ओश्वरोक्त ग्रंथांतून दिले आहेत, त्यांतील दोनचार अुदा-हरणांची छाननी केली असता हें सहज सिद्ध होतें.

पहिलें अुदाहरण म्हणून स्त्रीच्या अुत्पत्तीचीच कथा पहा ! स्त्रीनेच मनुष्य-जातीचा सर्वनाश केला ! स्त्री हीच मनुष्यजातीतील पहिला पापी ! तिसऱ्या अध्यायात सांगितलें आहे की, आदम नि त्याच्या बरगडीपासून निर्मिलेली स्त्री अीव्ह हया जगातील पहिल्या स्त्रीपुरुषांना देवाने सांगितलें की, 'ज्ञानवृक्षाचें फळ खाअू नका !' कारण, नाही तर मनुष्य देवासारखा ज्ञानी होअील अशी देवाला भीति पडली ! ! ('न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।' हें सांगणारा गीते-तील भगवान् कुठे आणि मनुष्यांनी अज्ञानी राहावें म्हणून जिज्ञासेसच निषेधिणारा हा जेनेसिसमधला देव कुठे !) परंतु देवाचा डोळा चुकवून सापाने अीव्हला म्हटलें, 'तें ज्ञानफळ खा.' म्हणून तिने तें खाल्लें, आदमने पण खाल्लें, आणि त्यामुळे देव रागावला ! शिक्षा काय दिली अीव्हला ? तर स्त्रीला यावच्चन्द्र-दिवाकरौ प्रसूतिवेदना भोगाव्या लागतील ! आता या गोष्टीवरून हें अुघड होतें की, पहिली स्त्री नि पहिला पुरुष हे खोटें बोलणारे, देवाधर्माला न जुमानणारे, पहिले पापी होते ! तेव्हा सत्ययुगात जिकडे तिकडे देवप्रिय, पुण्यवान् धर्मभीरु, संयमी स्त्रीपुरुषांची रेलचेल अुडालेली होती, ही समजूत आपल्या पुराणांतील वर्णनाप्रमाणेच या यहुदी पुराणांवरूनही लटकी पडते.

आदम आणि अीव्ह – मनुष्यांची अगदी आद्य मातापितरें – अगदी नग्न असत. देवाला तेंच फार आवडे ! पण पुढे तीं दोघे ज्ञानफळ खाअून देवापुढे नागवे-पणी यावयास लाजू लागलीं; तेव्हा देव त्यांच्यावर या त्यांच्या संकोचाविषयी भयंकर रागावला ! नागवेपणाच्या संकोचामुळेच आदम नि अीव्ह हीं देवमाणसें नागवलीं गेलीं हें वाक्य कोणत्याही अर्वाचीन नग्न संघाच्या द्वारावर कोरून ठेव-ण्यास हरकत नाही ! सत्ययुगात नग्नसंघांना प्रतिबंध नव्हता. सत्ययुग ज्यांना चांगलें म्हणावयाचें त्यांना नग्नसंघास अेकदम वाअीट म्हणता येणार नाही ! नग्नसंघ ही काही नवमतवादाची संस्था म्हणता येणार नाही !

अीव्ह नि आदम ह्यांना नग्नतेची जाणीव झाली, त्यांनी ज्ञानफळ खाल्लें, या त्यांच्या अपराधासाठी देवाने त्यांना नंदनवनातून हुसकून देण्याची शिक्षा दिली. अपराध अीव्हचा, तिला प्रसूतिवेदनांचा दंड झाला तोही चालेल; पण त्या अेका अीव्हच्या अपराधासाठी साऱ्या स्त्रियांना वंशपरंपरा, सीतेसारख्या साध्वीस सुद्धा जो त्या प्रसूतिवेदनांचा दंड देवाने दिला म्हणून ही कथा सांगते तो खरा असल्यास आदम, अीव्ह ह्या सत्ययुगातील माणसांप्रमाणे सत्ययुगातील तो देवही अगदी अविचारी होता असें तरी म्हटलें पाहिजे, नाही तर ही कथा अीश्वरोक्त, परमप्रमाण त्रिकालाबाधित धर्मकथा नसून अेक कुतूहलप्रिय साध्याभोळ्या माणसाची दंतकथा आहे असें तरी म्हटलें पाहिजे. पुन्हा अीव्हसाठी प्रसूतिवेदनांचा शाप मानवी स्त्रियांना दिला म्हणून ही कथा म्हणते. पण पशूंतील माद्यांनाही प्रसूतिवेदना होतात त्या कां ? अीव्ह स्त्री होती म्हणून केवळ मानवी स्त्रियांनाच नव्हे,

त्तर अवघ्या स्त्रीलिंगालाच तो शाप भोवला असेल तर ती अन्यायाची परमावधि झाली म्हणावयाची ! ख्रिश्चन साधूंच्या मठात पूर्वी ब्रह्मचर्याचा असा कडक नियम असे की, मठात स्त्रीच काय, पण स्त्रीलिंगी मांजरी, कुत्री, हरिणी, अुंदरी, घुशी सुद्धा कोणताही प्राणी फिरकता कामा नये ! त्यातलीच ही अेक गोष्ट म्हणावयाची ! अुद्या अेखादी स्त्री चोरी करताना पकडली की, तिच्या अपराधासाठी अवघ्या स्त्री जातीलाच नव्हे तर स्त्रीलिंगी, त्या त्या पशुपक्ष्यांतील साऱ्या माद्यांना सुद्धा वंशपरंपरा पंचवीस पंचवीस फटके मारण्याचा दंड जर कोण्या वेड्या महंमद तघलकाने दिला, तर त्याला आपण काय म्हणू ? परंतु ही कथा खरी धरल्यास सत्य युगात हाच न्याय होता असें म्हणणें भाग पडेल !

सत्ययुगातील स्त्रीपुरुष संबंध

आपल्या पुराणांतून प्राचीन स्त्रीपुरुषांच्या आणि मोठमोठ्या ऋषिपत्न्या, राजकन्या, महर्षि, राजर्षि यांच्याच चरित्रांतून नव्हे, तर देवदेवतांच्या चरित्रांतूनही काही काही प्रसंगी आजच्या बोल्शेव्हिक रशियातील स्त्रीपुरुषसंबंधांनाही मागे सारणारीं वर्णनें जशीं आढळतात, तशीं या यहुदी देशातही आढळतात. ही गोष्ट त्या ग्रंथातील स्त्रीविषयक जीं जीं चरित्रें या मालेत वानगीदाखल अनुवादिलीं आहेत, त्यावरून वाचकांच्या ध्यानी आलीच असेल. यासाठीच 'न देवचरितं चरेत्।' किंवा ऋषीचें कूळ नि नदीचें मूळ शोधणें कठीण असें म्हणण्याचा शिष्टसंप्रदाय पडला आहे व तो योग्यही आहे. परंतु सत्ययुगात जिकडे तिकडे न्याय, नीति, शील, संयम यांचेंच राज्य होतें, पापाची प्रवृत्तिच माणसात नसे,नव्हे माणसें, माणसें नसून देवच होतीं ही जी पौराणिकांची कल्पना असते, ती आमच्या पुराणांप्रमाणेच ह्या यहुदी पुराणांवरूनही साफ चुकीची आहे हें कोणी विसरू नये. अेवढ्यासाठीच या गोष्टीस अुल्लेखिणें भाग आहे.

त्यातही आमच्या हिंदु पुराणांतील काही घटना घेअून त्यांचाच तेवढा पक्षपाती बोभाटा करणाऱ्या आणि आपल्या पायाखाली वा पदराखाली काय आहे तें मात्र लपवून ठेवू पाहणाऱ्या पोटभरू मिस मेयो प्रभृति अहिंदु विदूषकांचीं तोंडें बंद पाडण्यासाठी निर्भेळ न्यायाच्या दृष्टीनेही खालील अुल्लेख आवश्यकच आहेत.

बहीणभावांचीं लग्नें (अ. ४ ते ५); देवप्रिय कुलपति नोहा मद्यातिरेकाने बेशुद्ध होतो (अ. १०) देवप्रिय साक्षात्कारी अब्राहाम लोक आपणांस मारतील ह्या भयाने आपल्या बायकोला बहीण म्हणून म्हणतो, नि तिला तिच्यावर लोलुपलेल्या परपुरुषाच्या घरी राहू देतो; सावत्र बहिणीशी लग्नें, अनेक स्त्रियांशी लग्नें, दासीशी संबंध, सख्या बहिणी सवती होतात, चुलतबहीण, मामेबहीण, आतेबहीण ह्यांशी लग्नें; सवती सवतींचा साध्वी स्त्रियांतही माजलेला भयंकर मत्सर यांचीं अुदाहरणें तर पानोपानी आहेत. देवप्रिय थोर लॉट निपुत्रिक मरू नये यासाठी

त्याच्या दोन्ही कन्यांनी त्या पित्यापासूनच धारण केलेले गर्भ (अ. १९), देवप्रिय जेकब आपल्या पित्याला फसवितो (अ. २७) लेबन हा जेकबला धाकटी मुलगी देतो असें सांगून रात्री त्याच्या शेजेस कपटाने वडील मुलीलाच धाडतो, दिराचा विधवा भावजयीशी नियोग; याच लेखात दिलेल्या विधवा तोमरने आपल्या सासऱ्याशीच केलेला कपटसंभोग; त्यापासून झालेलें संतान कुलीन ठरविणें; भाऊ भावाला ठार मारण्यास सोडीत नाहीत; बायकांना कोणत्याही प्रकारचें विवाह-स्वातंत्र्य नसणें, जेकब कुलपतीच्या दुसऱ्या स्त्रीचा त्याच्याच मुलाने (रुबेनने) संभोग घेणें अित्यादि अनेक घटना या लेखमालेत ह्या ग्रंथांतून ज्या आधारांसह अनुवादिल्या आहेत त्यावरून आमच्या अिकडील सत्ययुगाप्रमाणेच यहुद्यांच्या, ख्रिस्त्यांच्या, मुस्लिमांच्या या सत्ययुगातही माणसें कितीही थोर झालीं तरी माणसेंच होतीं हेंच सिद्ध होत नाही काय ? सत्ययुग पूर्वी होऊन गेलें. त्या काळचे हे धर्मग्रंथ अीश्वरोक्त, अीशप्रेषित आहेत, सत्ययुगातील ऋषि, राजे, पैगंबर, स्त्री-पुरुष, सारेच सारे अतिमानुष होते; ते सत्याचे, संयमाचे, ब्रह्मचर्याचे, पुण्याचे निरपवाद आदर्श होते, ह्या आमच्या अिकडच्या पौराणिकांच्या प्रमाणेच यहुदी ख्रिस्ती, मुस्लिम पौराणिकांच्या समजुतीही त्यांच्या या ग्रंथाधारेच पूर्णपणे भ्रामक ठरतात हें दाखविण्यासाठीच काय तो वरील घटनांचा अुल्लेख करावा लागतो. ज्या ख्रिस्ती सोवळ्या चर्चांमधून आजचें रशियन बोल्शेव्हिक वाङ्मय अनैतिक म्हणून निषेधिलें जातें त्यात ह्या कथा धर्मकथा !

परंतु समारोपातील ह्या सर्वसामान्य विधेयांचा अुल्लेख केल्यानंतर, ह्या साऱ्या आज भ्रामक ठरणाऱ्या समजुती वजा घालताही या धर्मग्रंथांची जी थोरवी अुरते तीही अितकी मोठी आहे की, ज्यांनी तो ग्रंथ वेळोवेळी रचून संग्रहिला, त्यांनी अवघ्या मनुष्यजातीवर अेक अुपकारच केला आहे. त्याची भाषा नि वर्णनशैली अितकी साधी नि चटकदार आहे की, त्या कथा कितीही वाचल्या तरी वाचाव्याशाच वाटतात. त्या वेळच्या समाजाचें चित्रच त्या डोळ्यापुढे अुभें करतात. ज्या अब्राहाम, अैझाक, जेकब, जोसेफ, मोझेस प्रभृति थोर थोर कुलपतींच्या कथा त्यात गोविल्या आहेत त्यांत, आणि ज्या घटना त्यांत अुल्लेखिल्या आहेत त्यांत अेकंदरीत अैतिहासिक तथ्य पुष्कळच आहे. अीश्वरोक्त म्हणताच त्याची थोरवी जरी कितीही अुणावत असली, तरी मनुष्यकृत म्हणताच ती किती तरी दुणावते ! अशा या जागतिक महत्त्वाच्या ग्रंथास आणि अत्यंत कर्त्या अशा हिब्रू जातीच्या, यहुदी कुलाच्या अब्राहाम, जेकब, मोझेस प्रभृति प्राचीनतम कुलपतींना वारंवार वंदून आम्ही ही लेखमाला पुरी करतो.

—(स्त्री मासिक, मार्च, अेप्रिल व मे १९३६)

✦ ✦ ✦

भारताच्या अितिहासातील
पहिलें सोनेरी पान

१– चंद्रगुप्त-चाणक्य

आपल्या भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या अुषःकालाचा आरंभ न्यूनतः पांच सहस्र वर्षांपासून दहा सहस्र वर्षांपर्यंत तरी आजच्या संशोधनानुसार प्राचीन आहे. चीन, बाबिलोन, ग्रीस प्रभृति कोणत्याही प्राचीन राष्ट्राच्या जीवनवृत्तान्ताप्रमाणे हा आपला प्राचीन राष्ट्रीय वृत्तान्तही पुराणकालात मोडतो. म्हणजे त्यात असलेल्या अितिहासावर दंतकथेची, दैवीकरणाची आणि लाक्षणिक वर्णनाचीं पुटेंची पुटें चढलेलीं आहेत. तरीही हीं आपलीं जुनीं 'पुराणें' आपल्या प्राचीन अितिहासाचे आधारस्तंभच आहेत हें विसरता कामा नये. हें प्रचंड 'पुराण-वाङ्मय' आपल्या साहित्याचें, ज्ञानाचें, कर्तृत्वाचें नि अैश्वर्याचें जसें अेक भव्य भांडार आहे तसेंच तें आपल्या प्राचीन जीवनवृत्तान्तांचेंही असंगत, अस्ताव्यस्त नि संदिग्ध असलें तरी अेक अमर्याद संग्रहालय आहे.

परंतु आपलीं 'पुराणें' म्हणजे निर्भेळ 'अितिहास' नव्हे.

यास्तव मी त्या पुराणकालाचा विचार या प्रसंगापुरता बाजूस ठेवणार आहे. कारण मी ज्या सोनेरी पानांचा निर्देश करणार आहे तीं सोनेरी पानें भारताच्या 'पुराणातील' नसून 'अितिहासातील' आहेत.

भारतीय अितिहासाचा आरंभ

अितिहासाचें मुख्य लक्षण म्हणजे त्यातील वर्णनांतील नि घटनांतील स्थल नि काल हीं जवळ जवळ निश्चितीने तरी सांगता आलीं पाहिजेत आणि त्यातील घटनांना परकीय वा स्वकीय अवांतर पुराव्यांचें शक्यतों पाठबळ मिळत असलें पाहिजे.

अशा कसोटीस बहुतांशी अुतरणारा आपला प्राचीन काळचा वृत्तान्त हा बुद्ध कालापासून मोजता येतो. यास्तव अनेक भारतीय नि पाश्चात्य प्राच्यविद्यावेत्ते आपल्या भारताच्या 'अितिहासा'चा आरंभ ह्या बुद्धकालापासूनच सध्या समजत आहेत. ह्या प्राच्यविद्यावेत्त्यांच्या सतत चालणाऱ्या परिश्रमामुळे आज आपण ज्याला पौराणिक काल म्हणतो त्यातलाही काही भाग नवीन संशोधन झाल्यास ह्या अितिहासकालात समावेशिता येअील. पण तोपर्यंत तरी बुद्धकाल हाच आपल्या 'अितिहासा'चा आरंभ म्हणून समजणें भाग आहे.

त्यातही कोणत्याही प्राचीन राष्ट्राचा निर्भेळ अतिहास निश्चितपणे ठरविण्याच्या कामी तत्कालीन जगातील तदितर राष्ट्रांच्या साहित्यादिक लिखाणांत सांपडलेल्या अुपोद्बलक अुल्लेखांचा फार अुपयोग होतो. आज अुपलब्ध असलेल्या आणि निश्चितार्थ ठरलेल्या जगातील अैतिहासिक साधनांमध्ये भारताच्या ज्या प्राचीन कालखंडाला असा भारतेतर राष्ट्रांच्या सुनिश्चित साधनांचा पाठिंवा मिळतो तो आपल्या अितिहासाचा कालखंड सम्राट् चंद्रगुप्ताच्या काळाच्या आगेमागेच चालू होतो. कारण अलेक्झांडरची स्वारी भारतावर जेव्हा झाली तेव्हापासूनच्या ग्रीक अितिहासकारांच्या नि पुढे पुढे चीन देशातील प्रवाशांच्या प्रवासंवर्णनांच्या लेखांतून भारतातील त्या त्या पुढील घटनांचे अैतिहासिक कसोटीस वव्हंशी अुतरणारे असे अनेक अुल्लेख सापडतात.

सोनेरी पान कोणतें ?

ह्या आपल्या अैतिहासिक कालातील ज्या सोनेरी पानांविषयी मी चर्चा करणार आहे तींच पानें काय तीं सोनेरी म्हणून निवडण्यासाठी मी कोणची कसोटी वापरीत आहे ? तसें पाहता आपल्या ह्या अैतिहासिक कालात काव्य संगीत, प्रावल्य, अैश्वर्य, अध्यात्म प्रभृति अवांतर कसोटींना अुतरणारीं शतावधि गौरवार्ह पानें सापडतात. परंतु कोणत्याही राष्ट्रावर पारतंत्र्यासारखें प्राणसंकट जेव्हा गुदरतें, आक्रमक परशत्रूच्या प्रबळ टाचेखाली तें स्वराष्ट्र जेव्हा पिचून गेलेलें असतें किंवा जाअू लागतें तेव्हा तेव्हा त्या प्रबळ शत्रूचा पाडाव करून नि पराक्रमाची पराकाष्ठा करून स्वराष्ट्रास त्या पारतंत्र्यातून मुक्त करणारी, त्या पारतंत्र्यातून सोडविणारी आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचें आणि स्वराज्याचें पुनरुज्जीवन करणारी जी झुंझार पिढी, तिच्या नि तिला झुंजविणारे जे धुरंधरवीर नि विजयी पुरुष त्यांच्या त्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वृत्तान्ताचें जें पान त्या पानास मी अिथे सोनेरी पान म्हणून संबोधीत आहे. कोणत्याही राष्ट्रात त्याच्या अशा परंजयी स्वातंत्र्ययुद्धाचीं अैतिहासिक पानें अशींच गौरविलीं जातात. अगदी अमेरिकेचेंच अुदाहरण पहा. रणांगणात अिंग्लंडला चीत करून ज्या समयी अमेरिकेने आपलें स्वातंत्र्य छिनावन घेतलें त्या विजयी दिवसालाच अमेरिकेच्या अितिहासातील सोनेरी दिवस म्हणून सणासारखें गौरविलें जातें, आणि त्या युद्धाच्या अितिहासाचें पान हें अमेरिकेच्या अितिहासातील सोनेरी पान गणलें जातें.

प्रत्येक मोठ्या नि प्राचीन राष्ट्रावर पारतंत्र्याचें संकट केव्हातरी कोसळलेलेंच असतें

त्यांतही अमेरिकेच्या राष्ट्राचा जन्मच मुळी कालचा! म्हणून त्यांच्या टीचभर अितिहासात त्यांच्यावर अेकच काय तें प्राणसंकट गुदरावें आणि तें निवारणारें अेकच

काय तें सोनेरी पान असावें ह्यांत काही विशेष नाही. परंतु चीन, बाबिलोनियन, पर्शियन, अिजिप्शियन, प्राचीन पेरू, प्राचीन मेक्सिको, ग्रीस, रोमन प्रभृति जीं पुरातन राष्ट्रें सहस्रावधि वर्षें नांदत राहिलीं त्यांच्या त्या विस्तृत राष्ट्रीय जीवनात प्रबलतर परकीयांच्या आक्रमणाखाली चेचले जाण्याचे अनेक प्रसंग त्यांच्यावर साहजिकपणेच येअून गेले. तशा प्राणसंकटातून त्यांतील काही राष्ट्रांनी आपल्या पराक्रमाने पुन्हा पुन्हा सुटकाही करून घेतली. आणि त्यांच्या त्या त्या परशत्रूंना दाती तृण धरावयास लावलें. सहस्रावधि वर्षें आपलें राष्ट्रीय अस्तित्व नि प्रावल्य टिकवून धरणाऱ्या अशा राष्ट्रांच्या अितिहासात वेळोवेळो पुनः पुन्हा स्वातंत्र्यसंपादनार्थ केलेल्या रणांगणांचीं नि त्यांत मिळविलेल्या विजयाचीं अेकाहून अधिक अशीं सोनेरी पानें सन्मानिलीं गेलेलीं आहेत. भारताचा अितिहास तर त्या प्राचीनतम कालापासून आजपर्यंत अखंडपणे चालत आलेला! त्याच्या प्राचीन काळात भरभराट असलेलीं वरील बहुतेक राष्ट्रें नि राज्यें आज नामशेषसुद्धा होअून गेलेलीं आहेत. अेक चीनचें महान् राष्ट्र तेवढें भारताच्या महनीयतेचें पुरातन साक्षी म्हणून आज अुरलेलें आहे.

चीन आणि भारत हीं दोन्हीही राष्ट्रें अति विस्तृत असल्यामुळे आणि अतिप्राचीन कालापासून सततपणे आजपर्यंत आपलें स्वातंत्र्य आणि सामर्थ्य टिकवून नांदत आलेलीं असल्यामुळे त्यांच्यावर अनेक वेळा अितर अल्पजीवी राष्ट्रांपेक्षा अधिक प्रसंगी परदास्याचीं प्राणसंकटें कोसळलेलीं आढळतात यांत काही आश्चर्य नाही. चक्रनेमिक्रमाचा अटळ नियम त्यांनाही होताच. हिंदुस्थानावर ज्याप्रमाणे शक, हूण, मोंगलादिकांच्या अनेक चढाया झाल्या त्याचप्रमाणे चीनवरही त्या आणि अितर परराष्ट्रांच्या अनेक चढाया झालेल्या आहेत. हूणांच्या प्रलयापासून बचाव करण्यासाठी तर चीनने त्यांच्या राष्ट्राभोवती ती जगत्प्रसिद्ध तटबंदी, ती Chinese Wall बांधली होती. पण तिलाही वळसे घालून किंवा अुल्लंघून चीनच्या शत्रूनी त्याला पादक्रान्त करावयास सोडलें नाही. बहुधा अंशतः परंतु काही वेळा तर सपूर्णतः चीनही परकीय राजसत्तेच्या जोखडाखाली संत्रस्त होअून पडलेला होता. तथापि त्या त्या वेळी तें महान् राष्ट्र पुनःपुन्हा नवतेजाने नि चैतन्याने अनुप्राणित होअून त्या परकीय सत्तेला अुलथून पाडू शकलें, आपलें जीवित, सत्त्व नि स्वातंत्र्य राखू शकलें आणि आजही पुन्हा अेक स्वतंत्र नि सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून नांदत राहिलें आहे. हेंच खरें अैतिहासिक आश्चर्य होय! भारताच्या अितिहासाचें मूल्यमापन करताना या प्रकरणी तोच मानदंड वापरला पाहिजे. परंतु विशेषतः अिंग्रजांच्या परकीय सत्तेखाली जेव्हा हिंदुस्थान दबला होता तेव्हा अनेक अिंग्रजांनी भारताचा अितिहास अशा विकृत पद्धतीने लिहिला आणि त्यांनी काढलेल्या शाळामहाशाळांतून तरुणांच्या दोनतीन पिढ्यांकडून त्या विकृत अितिहासाचीं अितकीं पारायणें करून घेतलीं की, जगाचाच नव्हे तर आपल्या स्वतःच्या

लोकांचाही त्या प्रकरणी बुद्धिभ्रंशच व्हावा. हिंदुस्थानचें राष्ट्र हें सतत ह्या वा त्या परसत्तेखालीच दडपलेलें होतें; हिंदुस्थानचा अितिहास म्हणजे हिंदूंच्या पराभवामागून पराभवांचीच काय ती अेक जंत्री आहे, अशीं धडघडीत असत्य, अुपमर्दकारक आणि दुष्ट हेतूंनी केलेलीं विधानें चलनी नाण्यांसारखीं परकीयांकडूनच नव्हे तर काही स्वकीयांकडूनही बेखटक व्यवहारिलीं जात आहेत. त्यांचा प्रतिकार करणें हें स्वराष्ट्राभिमानाच्या दृष्टीनेच नव्हे तर अैतिहासिक सत्याच्या दृष्टीनेही अत्यंत आवश्यक आहे. ह्या कार्यी जे काही प्रयत्न अन्य अितिहासज्ञांकडून होत आले आहेत, त्यांत ह्या प्रसंगानिमित्ते प्रचाराची शक्यतो अधिक भर घालणें हें अेक कर्तव्यच आहे. यासाठी ज्या ज्या परकीय आक्रमकांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या किंवा राज्यसत्ता गाजविली त्या त्या परकीयांचा अंती धुव्वा अुडवून देअून आपल्या हिंदुराष्ट्रास ज्यांनी ज्यांनी विमुक्त केलें त्या त्या हिंदुराष्ट्रविमोचक पिढ्यांचें आणि त्यांचें प्रतीक म्हणून त्या त्या संग्रामातील काही युगप्रवर्तक वीरवरांचें अैतिहासिक शब्दचित्रण करण्याचें मी येथे योजिलें आहे.

अलेक्झांडरची स्वारी

पूर्वी अुल्लेखिलेल्या भारताच्या अैतिहासिक कालातील भारतावर झालेली परराष्ट्राची पहिली प्रसिद्ध स्वारी ही अलेक्झांडरची होय. अिसवी सन पूर्व ३२७ मध्ये ही स्वारी झाली. त्या प्राचीन काली युरोपमधली सध्यांची अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी प्रभृति राष्ट्रें जन्मलीं सुद्धा नव्हतीं. रोमन साम्राज्याची पायाभरणीही झालेली नव्हती. युरोपात अेक ग्रीक लोक तेवढे गाजत होते. ग्रीकांचीं लहान लहान नगर राज्यें (City States) स्वतंत्रपणे नांदत असत. त्यांत स्पार्टा, अथेन्स हीं नगरराज्यें पुढारलेलीं. परंतु ह्या फुटकळ नगरराज्यांवर जेव्हा संघटित, विस्तृत, अेककेंद्रित नि बलाढ्य अशा त्या वेळच्या पारसिक साम्राज्याच्या अधिपतीने स्वारी केली तेव्हा त्या स्पार्टा, अथेन्स प्रभृति फुटकळ नगरराज्यांचा काहीच टिकाव लागला नाही. त्या लहान लहान ग्रीक प्राजकांनी (Republics नी) लढण्याची पराकाष्ठा केली; पण पारसिक साम्राज्याच्या सेनासागरापुढे त्यांचें काहीच चालेनासें झालें. ह्यामुळे पारसिकांप्रमाणेच आपल्या साऱ्या फुटकळ नगरराज्यांचें मिळन अेक प्रबळ ग्रीक राज्य स्थापावें नि शत्रूशी अेकमुखी सामना द्यावा अशी ग्रीक लोकांत तीव्र अिच्छा अुत्पन्न झाली. त्यांच्यातील मॅसिडोनियाचा राजा फिलिप याने त्या महत्त्वाकांक्षेने लहानसहान ग्रीक प्राजकें जिंकलीं. परंतु त्याचें अेकमुखी राज्य वाढत चाललें असताच तो मृत्यु पावला. तथापि त्याच्यामागे त्याच्या राज्यावर बसलेला त्याचा पुत्र हा त्याच्यापेक्षा शतपटीने महत्त्वाकांक्षी, विजयिष्णु आणि शूर निघाला. त्याचेंच नांव अलेक्झांडर. साऱ्या ग्रीक राष्ट्रात त्याने अेकाराष्ट्रीयत्वाचे नवचैतन्य संचारविलें. बलाढ्य सैन्य अुभारलें, आणि ग्रीकांच्या राष्ट्राचा शत्रु जो

पारसिक सम्राट् दरायस त्याच्यावरच अलेक्झांडर चालून गेला. ग्रीकांच्या त्या संघटित सैन्यापुढे दरायसच्या बहुसंख्य पण असंघटित साम्राज्यसेनेचा धुव्वा अुडाला. अलबेला येथील लढाअीत तर पारसिक राजसत्ताच अुखडून पडल्यासारखी झाली. अलेक्झांडर आपल्या विजयोद्दीप्त सैन्यासह पारसिक सम्राटाच्या थेट राजधानी-वर चालून गेला, आणि ती जिंकून त्याने स्वत:चीच पारसिकांचा सम्राट् म्हणून घोषणा केली. ह्या अपूर्व विजयाने अलेक्झांडरची राज्यतृष्णा अधिकच वाढली. ग्रीसच्या नि पारसिकांच्या सुविशाल साम्राज्याचें सम्राट्पद हाती येताच अलेक्झांडरला स्वर्ग दोन बोटें अुरल्यासारखा वाटू लागला. आपण मनात आणू तर आपण साऱ्या जगास जिकू शकू आणि अितिहासात आपलें नांव जगज्जेता म्हणून गाजवू शकू अशा प्रबळ आत्मविश्वासाचा अुन्माद त्याला चढला. पारसि-कांचे नि त्यांच्याही पूर्वीचे तें बाबिलोनियाचें महाराज्य जसें अेका धडाक्यासरशी तो पादक्रान्त करू शकला तसेंच त्याला लागूनच असलेलें आणि ज्याची कीर्ति ग्रीक लोक पिढ्यानपिढ्या अैकत आलेले होते तें भरतखंडही मी सहज पादाक्रान्त करू शकेन अशा दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने अलेक्झांडरने भरतखंडावरही स्वारी करण्याचें ठरविलें. त्या धाडसी योजनेप्रमाणे त्याने लवकरच ग्रीकांचें अगदी निवडक, ताज्या दमाचें नि कोऱ्या करकरीत शस्त्रानिशी सज्ज असें नवीन सैन्य अुभारलें. त्यात अेक लक्ष वीस सहस्र पायदळ नि पंधरा सहस्र घोडेस्वार होते. आजपर्यंत विजयामागून विजय मिळवीत आलेल्या आपल्या महासेनानी नि सम्राट् अलेक्झांडरवर, ह्या त्याच्या पराक्रमी नि विजयिष्णु सैन्यसंभाराची अितकी श्रद्धा बसलेली होती की तें ग्रीक सैनिक त्याला अेक अलौकिक असा दैवी पुरुषच समजत. अलेक्झांडर स्वत:सही 'झ्यू' (द्यु:) देवतेचा पुत्र म्हणून म्हणवी.

भारत राष्ट्राची तत्कालीन व्याप्ति

त्या दोन अडीच सहस्र वर्षांपूर्वीच्या काली सिंधु नदीच्या पलीकडे अगदी अिराणच्या सीमेला भिडलेल्या प्रदेशापर्यंत भारतीयांची वस्ती नि राज्यें पसरलेलीं होतीं. आज ज्याला हिंदुकुश पर्वत म्हणतात त्याला ग्रीक लोक 'परोपनिसस' (Paropnisus) असें म्हणत. आज ज्याला अफगाणिस्थान म्हणतात त्याला त्या काळी गांधार म्हणत. 'अहिगणस्थान' हें अफगाणिस्थानचें आपलें प्राचीन नांव आहे. काबूल नदीचें आपलें त्या वेळचें प्राचीन नांव 'कुभा' असें होतें. त्या हिंदु-कुश पर्वतापर्यंतच्या हचा सर्व प्रांतांत भारतीयांचीं लहान मोठीं राज्यें होतीं. हचा भागातील राज्यांपासून तो सिंधुनदी समुद्राला जेथे मिळाली आहे तेथपावेतो तिच्या दोन्ही काठांना लागून वैदिक धर्मानुयायी असलेल्या भारतीयांच्या लहान मोठ्या स्वतंत्र राज्यांची मालिकाची मालिका पसरलेली होती. हचा राज्यांतील बहुतेक राज्यें हीं प्राजकें होतीं. त्यांना त्या काळी गणराज्यें म्हणत. त्यांची घटना अर्थातच

लोकसत्ताक पद्धतीची असे. राजसत्ताक राज्यें म्हणण्यासारखीं अशीं दोनतीनच होतीं. त्यांत ज्याला ग्रीक लोक पौरस असें म्हणत त्या पौरव राजाचें राज्य सगळ्यांत मोठें होतें.

डॉ. जयस्वाल ह्यांचा Hindu Polity ग्रंथ

'अभिनव भारत ह्या क्रांतिकारक संस्थेचे लंडनमध्ये सन १९०७ ते १९१० च्या कालात अेक प्रमुख सदस्य असलेले आणि पुढे प्राच्यविद्याविशारदांत जागतिक कीर्ति पावलेले डॉ. जयस्वाल ह्यांनी लिहिलेल्या Hindu Polity ह्या सुप्रसिद्ध ग्रंथात सिंधु नदीच्या अुभय तटांवर तिच्या समुद्रसंगमापर्यंत पसरलेल्या ह्या भारतीय 'गणराज्यांच्या' निरनिराळ्या लोकसत्ताक राज्यघटनांचें संशोधनपूर्वक विस्तृत वर्णन केलेलें आहे.

ग्रीक लोकांच्या पुराणांप्रमाणेच त्यांचे पूर्वज फार प्राचीन काळी भारताच्या सिंधूपलीकडील गांधारप्रभृति प्रांतांतूनच मूळच्या आर्यवंशाच्या जानपदाची अेक तुटक शाखा होअून ग्रीसकडे गेले होते अशी त्यांची पुरातन भावना असे. अलेक्झांडरचें सैन्य प्राचीन भारताच्या त्या भागात प्रवेशलें तेव्हा तेथे त्यांना अकस्मात् अेक लहानसा समूह स्वतःला मूळचा ग्रीक समजणारा असा आढळला. तो जरी भारतीयांत मिसळून गेलेला होता तरी त्याने तें ग्रीक सैन्य पाहताच आपणही त्यांचेच पुरातन कालाचे भाअूबंद आहोत असें सांगितलें. अलेक्झांडरलाही आपल्या प्राचीन पूर्वजांचें हेंच मूळ ठिकाण असलें पाहिजे असें वाटलें. त्याला नि त्याच्या ग्रीक सैन्याला त्यांच्या ह्या प्राचीन पितृभूमीचें दर्शन झाल्याविषयी अितका अत्यानंद झाला की, त्या साऱ्या सैन्याने काही दिवस युद्ध बंद ठेअून अेक महोत्सव साजरा केला. ग्रीक लोकांनी ग्रीक देवतांच्या संतोषास्तव यज्ञ करून हवनें अर्पिलीं.

ग्रीक लोकांच्या देवतांचे वैदिक लोकांच्या देवतांशी अत्यंत सादृश्य होतें. त्यांच्या देवतांच्या नांवांचे अुच्चार तेवढे अपभ्रंशानुसार पालटलेले होते. ग्रीक लोकही यज्ञ करीत, हवनें देत. ग्रीकांना आयोनियन्स असेंही म्हणत.

आयोनियन्स नांवावरून 'यवन' शब्द पडला

क्वचित् ययातीचा पुत्र अनु ह्याचेच हे ग्रीक लोक वंशज असतील काय ? अन्वायन = अयोनियन अशीं अपभ्रष्ट रूपें होत गेलीं असतील काय ? पण तो विषय संशोधकांकडे सोपविला पाहिजे. अितकें मात्र खरें की, ग्रीक लोकांना अगदी आरंभापासून आपले भारतीय लोक 'यवन' या नांवानेच ओळखीत आलेले आहेत. ही गोष्ट संस्कृत साहित्यावरून अुघड आहे. ग्रीकांच्या 'अयोनिअन्स' ह्या नांवावरून त्यांना भारतात 'यवन' किंवा 'योन' हें नांव पडलेलें असावें.

त्या काळी गांधार पंचनद ते सिंधपर्यंत बुद्धाचा पत्ता सुद्धा नव्हता

आणखी अेक गोष्ट अिथेच सांगून टाकण्यासारखी आहे की, पूर्वी अुल्लेखिलेल्या गांधारापासून तो पंचनद (पंजाब) प्रांतापर्यंत आणि तेथून सिंधु नदीच्या अुभय तटांवरील प्रदेशांपासून तो ती नदी समुद्रास मिळते तेथपर्यंत भारताच्या ज्या भागात अलेक्झांडरने संचार केला त्या त्या भागातील लोकस्थितीचें विविधांगी वर्णन त्या वेळच्या ग्रीक लेखकांनी दिलेलें आहे. परंतु त्या सर्व वर्णनात वैदिक धर्मानुयायी भारतीयांचे अनेक अुल्लेख असताही बुद्धाचा किंवा बुद्धपंथाचा चुकूनसुद्धा अेखादा अुल्लेख आढळत नाही. ह्यावरून आणि अर्थातच अितर सर्व तत्कालीन पुराव्यावरून हें स्पष्ट होतें की त्या कालापर्यंत भारताच्या शतद्रू पलीकडील भागात तरी बुद्धपंथाच्या अस्तित्वाचा पत्तासुद्धा नव्हता. म्हणजे बुद्धाच्या मृत्यूनंतर अडीचशे तीनशे वर्षें अुलटून जाअीतोपर्यंत केवळ मगध प्रांतातच बुद्धपंथाचा यत्रतत्र जो प्रसार झाला त्यापलीकडे काही त्याचें पाअूल पडलेलें नव्हतें. पुढील अितिहासाच्या अनुरोधासाठी ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे.

ग्रीक म्हणजे 'यवन'; मुसलमानांना यवन म्हणणें हें चूक !

परराष्ट्रीय, आक्रमक आणि अंशत: परधर्मीय अशा ग्रीकांना आपले तत्कालीन भारतीय लोक 'यवन' म्हणून ओळखीत. परंतु त्यामुळे सर्वच परराष्ट्रीय आक्रमकांना यवन असें म्हणणें ही अर्थातच चुकीची गोष्ट होते. विशेषत: मुसलमानांना आपले लोक जे यवन म्हणूनच म्हणू लागले ती तर घोडचूक होती. कारण ग्रीक लोक आक्रमक नि परराष्ट्रीय जरी असले तरी सापेक्षत: ते त्या वेळच्या विद्याव्यासंगी सुसंस्कृत नि सभ्य जगतातच मोडत होते. परंतु भारतावर ज्या मुसलमानांच्या टोळधाडी शतावधि वर्षांनंतर पुढे चालून आल्या त्या धर्मांध, रानटी नि विध्वंसक अशा राक्षसी वृत्तीच्या होत्या. तशा राक्षसी वृत्तीच्या मुसलमानांना 'मुसलमान' म्हणून ओळखणेंच अवश्य होतें. त्यांनाही 'यवन' म्हणण्यात त्यांचा नसता गौरव करण्याची आणि 'यवन' शब्दाची नसती पायमल्ली करण्याची अशी दुहेरी चूक आपल्या हातून घडत आली. मुसलमानांना 'म्लेंच्छ' म्हणता येअील, यवन नव्हे.

वेडगळ मुसलमान समजतात तसा शिकंदर हा काही कुणी मुसलमान नव्हता

बहुसंख्य मुसलमानांतील अेक वेडगळ समजूतही येथे सांगण्यासारखी आहे. अलेक्झांडर ह्या नांवाचें पर्शियन भाषेत शिकंदर असें रूपांतर झालें होतें. ग्रीकांचें साम्राज्य पर्शियावर होतें तोपर्यंत अनेक पर्शिअन लोक अलेक्झांडरच्या अलौकिक

पराक्रमामुळे मोहित होऊन आपल्या मुलांनाही शिकंदर हेंच नांव ठेवू लागले. पुढे पर्शियांतील लोक मुसलमान झाल्यानंतरही त्यांच्यात मुलांना शिकंदर हें नांव ठेवण्याची प्रथा चालूच राहिली. भारतातील बाटग्या मुसलमानांनीही तीच प्रथा अुचलली. त्या शिकंदर ह्या शब्दाची ही मूळ कथा ठाअूकच नसल्यामुळे हिंदुस्थानातील सहस्रावधि मुसलमानांची अशी दृढ समजूत झालेली असते की, ज्या अर्थी महंमद अल्ली, कासिम अित्यादि त्यांच्या नांवांप्रमाणे 'शिकंदर' हेंही त्यांच्या मुसलमानी नांवांतच मोडतें, त्याअर्थी हा पराक्रमी शिकंदरही मुसलमानांतीलच कोणीतरी महापुरुष असला पाहिजे! किंवहुना तो मुसलमान होता म्हणूनच तो अेवढा पराक्रमी नि दिग्विजयी निपजू शकला! असल्या कित्येक धर्मवेड्या, अडाणी नि आत्मप्रशंसक मुसलमानांना जर कोणी सांगितलें की 'शिकंदर' हा मुसलमान नव्हता. तो मुसलमान होअू तरी कसा शकेल? शिकंदराच्या मृत्यूनंतर अुण्यापुऱ्या अेक सहस्र वर्षांनी महंमद पैगंबराचा जन्म, तर तसले गांवढळ मुसलमान त्या सांगणाऱ्यालाच वेड्यात काढतील!

अलेक्झांडरच्या साम्राज्याची त्या वेळची सरसीमा हिंदुकुश पर्वत ही होती- अलेक्झांडर त्याच्यापुढे आपल्या तुंवळ ग्रीक सेनेसह भारतावर जो चालून आला तो तक्षशिलेला येअून पोचला. तक्षशिलेचा राजा अंबुज (अंभी) याने युद्ध न करताच अलेक्झांडरचें मांडलिकत्व मान्य केलें. काही ग्रीक लेखक म्हणतात की ह्या तक्ष. शिलेच्याच राजाने आपला प्रतिस्पर्धी जो पौरसराजा त्याचा मोड करण्यासाठी अलेक्झांडरला आपण होअून बोलाविलें होतें. तसें असेल तर ह्या स्वजनद्रोहाचें प्रायश्चित्त अंभी राजाला ग्रीकांशी दोन हात न करताच त्यांना शरण जाअून हौसेने भोगावें लागलें हें क्रमप्राप्तच झालें.

तक्षशिलेतील विद्यापीठ आणि अेक विलक्षण योगायोग

तक्षशिलेला तत्कालीन जगतात सुप्रसिद्ध असलेलें अेक भारतीय विद्यापीठ होतें. त्या विद्यापीठात देशोदेशीचे विद्यार्थी येअून अनेक शास्त्रांचें नि कलांचें अध्ययन करीत. अितकेंच नव्हे तर देशोदेशींच्या राज्यातील राजपुत्रही तेथे येअून, तेथील अनुशासन पाळून, राज्यशास्त्र नि युद्धशास्त्र यांचें शिक्षण घेत असत.

कोण्या विलक्षण योगायोगाने, तिकडे अलेक्झांडर तक्षशिलेचें राज्य पाडाव करून भारतात ससैन्य चाल करून जात असता, अिकडे त्याच तक्षशिला विद्यापीठात तेजस्वी, तरतरीत आणि भारताच्या अितिहासात अेक देदीप्यमान असें सोनेरी पान ज्याच्या हातून भवितव्यता लिहविणार होती असा अेक तरुणही राज्यशास्त्राचें नि युद्धशास्त्राचें शिक्षण घेत होता किंवा तें शिक्षण घेअून अलीकडेच वाहेर पडला होता. त्याचें नांव चंद्रगुप्त आणि ह्या तक्षशिला विद्यापीठाच्या परिसरातच विविधशास्त्रपारावारपारंगत नि राजकारणधुरंधर असा अेक प्रौढ

पंडित त्या तरुणाला राष्ट्रीय क्रांतिकार्याचे नि राज्यशास्त्राचे धडे देत होता, त्याचें नांव चाणक्य !

परंतु शिकंदरच्या स्वारीने अुडालेल्या हलकल्लोळात ह्या दोन सामान्य व्यक्ति कोणाच्याही डोळ्यांत असामान्यपणें भरलेल्या नव्हत्या. त्या दोन व्यक्ति मात्र शिकंदरच्या त्या साऱ्या प्रचंड परचक्रीय हालचालींकडे डोळ्यात तेल घालून बघत होत्या. भारतातील साऱ्या रावरावळ, राजा महाराजांचे ते फुटकळ फुटकळ मुकुट अेकत्र वितळवून शिकदर स्वत:च्या शिरावर धारण करण्यासाठी जो भारतीय सम्राट्पदाचा महामुकुट रणांगणात घडवीत होता तो आयताचे आयता त्या परशत्रूच्या हातून हिसकून घेअून आपल्या त्या तरुण शिष्याच्या मस्तकावरच ज्यायोगे वसविता येअील अशा अेका महान् क्रांतिकारक कार्याची योजना तो प्रौढ आचार्य मनोमन आखीत होता.

पौरवराजाशी युद्ध

तक्षशिलेचा राजा अंबुज हा ग्रीकांच्या म्लेंच्छ सैन्याशी युद्ध न करताच त्याचें आधिपत्य मानता झाला. ह्या त्याच्या कृत्याची जो तो छी थू करू लागला. अंबुज राजाच्या ह्या क्षात्रधर्माला कलंक लावणाऱ्या कलैव्याचा वचपा काढण्यासाठी आपण आपापल्यापरी ग्रीकांशी प्रखर सामना द्यावयाचा निर्धार आजूबाजूच्या राजसत्ताक असलेल्या भारतीय राज्यांनी नि गणराज्यांनी केला. दुर्दैवाची गोष्ट अितकीच की त्या सर्व फुटकळपणे स्वतंत्र असलेल्या भारतीय राज्यांना त्या ग्रीक युद्धापुरतें का होअीना, पण अेकत्र येअून अेकाच सैनिक नेतृत्वाखाली तें युद्ध लढण्याची बुद्धि झाली नाही म्हणा किंवा समय सापडला नाही म्हणा. अलेक्झांडरने वेळ न दवडता तक्षशिलेला येताच आजूबाजूच्या सर्व भारतीय राज्यांना शरण येण्याची आज्ञा सोडली आणि तक्षशिला राज्याला लागूनच असलेल्या पौरव (पौरस) राजाने ती आज्ञा धिक्कारून युद्धाचें आव्हान स्वीकारताच त्याच्यावर चाल केली.

पौरव राजाच्या बळाचा मुख्य भर त्याच्या लढाअू रथांवर नि हत्तीच्या बळावर होता. तर अलेक्झांडरचा मुख्य भर ग्रीकांच्या रणनिष्णात घोडदळावर होता. ह्या दोन्ही सैन्यांच्यामध्ये वितस्ता (झेलम) नदी होती. अितक्यात त्या सैन्याचें तोंड लागायच्या आधीच अकस्मात् मोठा वादळी पाअूस पडू लागला. त्यामुळे नदीला मोठा पूर आला. तथापि अलेक्झांडरने थोड्याच दिवसांत दूरवर शोध करीत नदीच्या वरच्या बाजूला असलेला अेक अुतार शोधून काढला नि झटपट त्याच्या त्या रणनिष्णात घोडदळासह नदी अुतरून पौरवाच्या पार्श्वावर चाल केली. त्यामुळे पौरवाचा व्यूहच ढासळला. तरीही राजा पौरवाने तुंबळ लढाअी दिली. परंतु पावसामुळे त्या रणभूमीत जिकडे तिकडे चिखलच चिखल

झाल्यामुळे पौरवाचे रथ नि हत्ती हीं दोन्हीही रणसाधनें निकामी झाल्यामुळे अलेक्झांडरच्या घोडदळाच्या चढाऊ माऱ्यापुढे पौरवाच्या सैन्याचा टिकाव लागला नाही. त्या रणधुमाळीत हत्तीवर आरूढ झालेला पौरव राजाही जिवावर उदार होऊन लढत असता स्वतःच घायाळ झाला आणि अलेक्झांडरच्या हाती सापडला. अशा प्रकारे अंशतः पौरवाच्या दुर्दैवामुळे नि अंशतः अलेक्झांडरच्या रणचापल्यामुळे ग्रीकांचा पूर्ण विजय झाला.

कौतुकाने नव्हे राजकारणासाठी !

पौरव राजाला बंदिवान् करून अलेक्झांडरपुढे नेलें असता अलेक्झांडरने त्यास विचारलें 'मी तुला कसें वागवावें अशी तुझी अिच्छा आहे ?' तेव्हा पौरवाने उत्तर दिलें, 'राजासारखें !' आपल्या अिकडच्या नि युरोपीय अितिहासकारांनीही बहुधा असेंच लिहिलें आहे की 'पौरव राजाच्या धिटाअीच्या उत्तराचें अलेक्झांडरला मोठें 'कौतुक' वाटलें आणि म्हणून त्याने पौरवाला न मारता केवळ अंकित करून पुन्हा राज्यावर बसविलें. परंतु हें वर्णन चुकीचें आहे. विशेषतः शालेय पुस्तकांतून तरी अशी भोंगळ स्तुतिवाक्ये घालू नयेत.

कारण, स्वप्नात राज्य देण्याचें वचन दिलें म्हणून जागें झाल्यावरही त्या वचनाप्रमाणे राज्य देऊन टाकणारा अलेक्झांडर हा कोणी भावडट भारतीय राजा नव्हता. जर पौरवाला त्याने ठार मारलें असतें किंवा त्याचें राज्य छिनावून घेऊन ग्रीक जातीचा अेखादा 'क्षत्रप' अलेक्झांडरने त्या राज्यावर नेमला असता, तर त्या राज्यांतील स्वाभिमानी भारतीय जानपद ग्रीकांच्या द्वेषाने अधिकच खवळलें असतें. अलेक्झांडरला अनेक शत्रूंशी लढत भारताची मुख्य राजधानी जी पाटलीपुत्र तेथपर्यंत जावयाचें होतें तें केवळ त्याच्या समवेत असलेल्या जातिवंत ग्रीक सेनेच्या काय त्या बळावर थोडेंच साधणार होतें ! त्यापेक्षा तक्षशिलेच्या अंबुज राजाप्रमाणेच पौरवालाही दिखाऊ दयेने जिंकून आपला अंकित नि पाठीराखा केल्यानेच अलेक्झांडरचा भारतविजयाचा हेतु सुलभतेने साधण्याचा अधिक संभव होता. यास्तव पौरवाच्या धीरोदात्त उत्तराने अलेक्झांडरला जें कौतुक वाटलें तेवढ्यासाठी नव्हे तर या राजकीय डावपेचासाठीच त्या राजकारणपटु अलेक्झांडरने पौरवाचें राज्य त्याला परत दिलें, अितकेंच नव्हे तर आजूबाजूचीं जिंकलेलीं काही छोटींछोटीं संस्थानेंही पौरवाच्या राज्यात समावेशिलीं आणि त्याला आपल्या त्या विस्तृत भारतीय प्रांतावरचा 'क्षत्रप' (Governor) म्हणून नेमिलें. पौरवानेही प्रसंग पडला बाका ह्या न्यायाने तें अलेक्झाडरचें बोलणें मान्य केलें. परराष्ट्रीय शत्रूशी पौरवाने क्षात्रधर्माप्रमाणे झुंजण्याचें कर्तव्य बजावलेलेंच होतें, आणि 'तावत् कालं प्रतीक्षेताम्' हाही राजनीतीचाच दंडक आहे ! हें जाणून राजा पौरवाने अलेक्झांडरचें नांवापुरतें आधिपत्य मानून राज्य वचावलें. याचा भारतीयांना

विषादही वाटला नाही. संधि येताच 'क्षत्रप' पौरवाने अलेक्झांडरचा हा डाव त्याच्यावरच कसा अुलटविला तेंही पुढे दिसेलच.

ग्रीसहून अलेक्झांडर नवें ग्रीक सैन्य भरीस मागवितो

पौरवाचें युद्ध संपताच अलेक्झांडरने आजूवाजूच्या लहानसहान संस्थानांना जिंकून त्या प्रदेशाची व्यवस्था लावण्याची आणि तेथील नि त्यापुढील प्रदेशातील लोकस्थितीची चौकशी केली. हिंदुकुशपासून तेथपर्यंत देश जिंकीत येण्यात त्याच्या मूळच्या ग्रीक सैन्याची जी हानि झालेली होती ती भरून काढण्यासाठी त्याने त्याच्या बाबिलोन नि ग्रीसमधील प्रांताधिपांकडून नव्या ग्रीक सैन्याची मागणी केली. जुन्या सैन्यातील जे ग्रीक सैनिक घायाळ, अधू नि अंगचुकार किंवा निकामी झालेले होते त्यांना परत धाडलें.

भारतीय यतींची नि योग्यांची चौकशी

भारताच्या त्याने जिंकलेल्या आणि जिंकावयाच्या प्रदेशातील लोकस्थितीचा वृत्तान्त समजून घेण्याकरिता अलेक्झांडरने जे चौकस लोक चहूकडे धाडले होते त्यांनी आणलेल्या समाचारात तेथील अरण्यांत वसत असलेल्या तपोवनांची, तपस्व्यांचीं, निःसंग नि अेकअेकटेच विचरणाऱ्या तत्त्वचिंतक यतींची, योग्यांची नि प्रव्रजितांची वर्णनेंही होतीं. स्वतः सम्राट् अलेक्झांडरला विद्वत्तेची नि तत्त्वज्ञानाचीही अभिरुचि असे. अलेक्झांडर हा स्वतःस तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलचा शिष्य म्हणवी. ग्रीस देशामध्ये अशा यति, योगी, तत्त्वज्ञानी नि संन्यासी ब्राह्मणांची प्रख्याति असे. ती अलेक्झांडरच्याही कानांवर पडलेली होतीच. त्यामुळे त्याला त्या भारतातील संन्यासी ब्राह्मणांना, ज्यांना ग्रीक भाषेत 'Gymnosophist' म्हणून संबोधीत, त्यांपैकी काहींना प्रत्यक्ष पाहण्याची नि त्यांच्याशी संभाषण करण्याची प्रबळ जिज्ञासा होती. अरण्यातील तपोवनांतून अलेक्झांडरने अशा काही संन्याशांना बोलावून घेतलें आणि काहींची त्यांच्याकडे जाअून भेट घेतली. अशा प्रसंगाच्या काही कथा ग्रीक लेखकांनीच दिलेल्या आहेत. त्यांमधून अेक दोन कथा ग्रीक लोकांच्या नि अलेक्झांडरसारख्या अलौकिक सम्राटाच्या भावना व्यक्तविण्यापुरत्या ग्रीक कथानकांच्याच शब्दांत सांगतो.

अशा अेका यतीची भेट झाली असता अलेक्झांडरने विचारलें, 'माझ्या ह्या दिग्विजयाच्या कार्यास यश येअील कीं नाही ?' अशा अर्थाच्या त्याच्या प्रश्नास त्या यतीने शब्दांमध्ये काहीच अुत्तर न देता अेक मोठें चामडें ज्याच्या दोन्ही बाजू अगदी सुकून वातड होअून धनुष्यासारख्या वक्र झालेल्या होत्या तें आणविलें आणि नंतर तो यति अलेक्झांडरला म्हणाला, 'हें चामडें नीट सपाट पसरून याच्यावर अेकटा बैस.' त्यावर अलेक्झांडरने किंवा त्याच्या आज्ञेने त्याच्या कोणा अधिका-

ऱ्याने त्या चामड्याच्या अेका टोकास बळाने दाबून त्यावर बसण्याचा प्रयत्न केला. तोंच तें दुसरें वातड टोक खाडकन वर आलें. तें दुसरें टोक खाली दाबून त्यावर बसू पाहावें तों पहिलें वातड टोक खाडकन अुभें राहावें. अर्थात् तें चामडें सपाट अंथरता येअीना नि त्याच्या मधोमध चपखल बसता येअीना! तें दाखवून तो यति म्हणाला, 'तुझ्या भारतावरील स्वारीची अशी स्थिति होअील. तू अेका बाजूला पुढे जिंकीत जाशील तर तुझीं मागचीं जिंकलेलीं राज्यें पुन्हा तुझ्याविरुद्ध अुठून तुझें जोखड फेकून देतील. तू मागे वळशील तर तुझीं पुढचीं जिंकलेलीं राज्यें तुझें जोखड फेकून देतील. तुला अखिल भारताच्या केंद्री सम्राटपदावर बसणें हें असें अशक्य आहे.'

'डंडामिस'चा दंडक

ग्रीक लेखक ज्याला Dandamis (डंडामिस) म्हणतात आणि ज्याचें शुद्ध संस्कृत नांव मला तरी आढळलें नाही अशा अेका संन्यस्त ब्राह्मणाची ख्याति तक्षशिलेकडे अैकून त्यालाही बोलावून त्याच्याशी संभाषण करावें अशी अलेक्झांडरला अुत्कट अिच्छा झाली. तो वयोवृद्ध नि ज्ञानवृद्ध ब्राह्मण संन्यस्त नि अुल्लिग अवस्थेत विचरत असे. निरोपावारी तो संन्यस्त ब्राह्मण अलेक्झांडरकडे जाअीना. तेव्हा अलेक्झांडरने आपल्या 'सेक्रेटस' नांवाच्या अधिकाऱ्याला त्या सर्वसंगपरित्यागी ब्राह्मणाकडे धाडून आज्ञापिलें की, 'जे प्रत्यक्ष 'झ्यूज' देवतेचे (संस्कृत 'द्युः' चे) पुत्र आहेत त्या जगज्जेत्या सम्राट् अलेक्झांडरने तुला बोलाविलें आहे. जर तू येण्यास पुन्हा नकार देशील तर तुझा आताच्या आता शिरच्छेद केला जाअील.' ही धमकी अैकताच तो संन्यासी ब्राह्मण खदखदून हसला, आणि अुत्तरला की 'अलेक्झांडर हा जसा नि ज्या अर्थी 'झ्यूज' देवतेचा पुत्र आहे तसा नि त्याअर्थी मीही पण त्या द्युःचाच पुत्र आहे! अलेक्झांडरची जगज्जेतेपणाची बढाअी ही व्यर्थ आहे. त्याने व्यास नदीचें परतीरही अजून पाहिलेलें नाही. त्यापुढे ज्या शूर भारतीयांचीं राज्य आहेत आणि त्यांच्याही पुढे जें मगधाचें प्रबळ साम्राज्य आहे त्यांच्याशी तोंड दिल्यानतर जर अलेक्झांडर अुरला तर मग तो जगज्जेता आहे कीं नाही याचा विचार करता येअील! मला अलेक्झांडर भूमिदान देअू म्हणतो, धन देअू म्हणतो, परंतु त्याला जाअून सांग की अशा वस्तूंना माझ्यासारखे संन्यस्त ब्राह्मण तुच्छ मानतात. ही माझी मातृभूमि मला जें हवें तें, आअी लेकराला देते तितक्या मायेने, मला पुरविते आहे. अलेक्झांडर जर माझें शिर छाटीत असेल तर फार तर माझें शिर नि पिंड ज्या ह्या मातीतून घडलें गेलें तींतच तें मिसळून जाअील. पण त्याला माझा आत्मा काही छाटता येणार नाही. तो अच्छेद्य, अमर आहे. अलेक्झांडरला सांग की जे सत्तेचे नि सुवर्णाचे दास असतील आणि जे मृत्यूला भीत असतील त्यांना अशा धमक्या दे! आमच्यापुढे अलेक्झांडरसारख्या अेका मर्त्य मनुष्याच्या अशा धमक्याच पांगुळतात! कारण खरा संन्यासी ब्राह्मण सुवर्णाने वश होत नाही आणि मरणाला भीत नाही!! मी येत नाही जा!'

डंडामिसने अलेक्झांडरच्या अधिकाऱ्याला दिलेल्या अुत्तरातून काही वाक्यें तेवढीं वर दिलीं आहेत. ग्रीक लेखकांनी त्याचें तें वाणेदार अुत्तर सविस्तर दिलें आहे. Plutarch नेही ह्या कथा वर्णिल्या आहेत. विशेषत: 'डंडामिसची' वरील कथा देअून काही ग्रीक लेखकांनी त्याच्या ह्या निर्भय नि वाणेदार अुत्तराने थक्क होअून म्हटलें आहे, 'ज्या अलेक्झांडरने अनेक राष्ट्रें जिंकलीं त्या जगज्जेत्या अलेक्झांडरलाही धूळ चारणारा जर कोणी ह्या जगात भेटला असेल तर तो हा वृद्ध नि नागवा अुघडा भारतीय ब्राह्मण संन्यासीच होय!!'

अलेक्झांडर ब्राह्मणांना क्रांतिकारक म्हणून फाशी देतो !

ह्या चौकशीत अलेक्झांडरला असेंही आढळून आलें की, हे संन्यासी, योगी नि यति जरी फटिंगासारखे अेकटे भटकत असले तथापि त्यांच्या नि:संग, निर्भय नि निःस्पृह वृत्तीमुळेच भारतीय गणराज्यांच्या काय किंवा अेकसत्ताक साम्राज्यांच्या काय राज्यचालकांवर त्यांच्या राजकीय मतांचा अत्यंत प्रभाव पडत असे. भारतीय क्षत्रियांच्या खड्गाच्या धारेअितकीच ह्या संन्यस्त ब्राह्मणांच्या जिभेची धारही तीक्ष्ण असून परकीय ग्रीकांच्या अन्याय्य आक्रमणाची ती तीव्र प्रतिकार करीत होती. आणि अलेक्झांडरविरुद्ध भारतीय जनतेत प्रकटपणे वा गुप्तपणे प्रक्षोभ पेटवीत चाललेली होती. हें ध्यानी येताच ह्या 'Gymnosophist' तत्त्वज्ञानी वर्गाविषयी अलेक्झांडरला प्रथमप्रथम वाटणाऱ्या जिज्ञासेचें रूपांतर अशा संन्यस्त ब्राह्मणांच्या द्वेषात झालें. तेव्हा अलेक्झांडर अशा काही ब्राह्मणांना पकडून फाशी देअू लागला. अशा अेका ब्राह्मणाचा शिरच्छेद करण्याआधी त्याला जेव्हा विचारण्यात आलें, 'तू अमक्या अेका भारतीय संस्थानिकाला ग्रीकांविरुद्ध कां चिथविलेंस?' तेव्हा त्याने ठासून सांगितलें की, 'कारण माझें असें व्रीद आहे की जगायचें तर मानाने जगावें, अन्यथा मानानेच मरावें!' (Plutarch LXIV)

पौरव राजाचा पराभव केल्यानंतर अलेक्झांडरला साहजिकच असें वाटलें होतें की त्याच्या त्या डोळे दिपविणाऱ्या जयामुळे आजूबाजूच्या गणराज्यांचेंही धैर्य आपोआपच खचून जाअील आणि तीं प्राजकें (Rpublics) आपण होअून पटापट शरण येतील. परंतु ही त्याची समजूत बहुतांशीं भ्रामक ठरली. तो विस्तता (झेलम) अुतरून जसजसा पुढे जाअू लागला तसतशी त्याच्या वाटेतील बहुतेक लहानमोठीं गणराज्यें त्याच्याशी लढाअी देत चाललीं. रणदेवतेचा निर्णय घेतल्यावाचून तीं त्याचें स्वामित्व सुखासुखी मानीनात. ह्यामुळे त्यांतील बहुतेकांना ग्रीकांचें बहुसंख्य नि प्रबळ सैन्य जरी जिंकीत चाललें होतें तरी त्या सतत लढत राहण्याचा ताण ग्रीकांवरही पडल्यावाचून राहिला नाही.

अशा अनेक झुंजार भारतीय गणराज्यांशी झालेल्या लढायांचीं वर्णनें ग्रीक ग्रंथकारांनीं दिलेलीं आहेत. परंतु तीं सविस्तरपणे किंवा संक्षेपानेही सांगण्याचा

हा प्रसंग नाही. तथापि सारें भारत पादाक्रांत करून थेट मगध सम्राटाचा मुकुट आपल्या डोक्यावर मिरविण्यासाठी आलेल्या त्या प्रबळ लक्ष लक्ष ग्रीक सैन्याशी आणि त्यांच्या त्या असामान्य नि जगत्प्रसिद्ध 'देवसेनानीशी'– अलेक्झांडरशी भारतीय स्वातंत्र्यार्थ ज्या ज्या गणराज्यांनी फुटकळपणे का होईना, पण आपापल्यापुरता तुंबळ नि भीषण लढा दिला नि शेवटी अलेक्झांडरला अंगणातूनच परत जाणें भाग पाडलें त्यांच्यांतील काही गणराज्यांची नि राज्यांची वेचक अुदाहरणें केवळ कृतज्ञतेसाठी तरी सांगितलींच पाहिजेत.

सौभूति नि कठ गणराज्यें

ह्या दोन्ही गणराज्यांची राज्यघटना प्रजासत्ताक होती नि तीं स्वतंत्र होतीं. डायोडोरस हा ग्रीक ग्रंथकार लिहितो की, त्यांच्या हाताखालील सर्व नगरांतील राज्यव्यवस्था नि निर्बंध हे अत्यंत हितकारक नि प्रशंसनीय होते. (They were governed by laws in the highest degree salutary and their political system was admirable.) ह्यांचें अेक वैशिष्ट्य असें होतें की, आपली प्रजा अधिकाधिक बलिष्ठ नि सुंदर निपजत जावी म्हणून प्रजनन हें व्यक्तिविषयक लहरीवर न सोपविता ते अेक राष्ट्रीय कर्तव्य जाणून त्यावर राजसत्तेचें नियंत्रण ठेवलेलें होतें. ते शारीरिक सौंदर्याचे भोक्ते होते. यास्तव त्यांच्यात विवाहाचे वेळी हुंडा घेण्याची चाल नसे. वधूवरांचे शरीरसौष्ठव, सुंदरता आणि निकोप नि बलिष्ठ संतति अुत्पन्न करण्याची पात्रता हे गुण जुळल्यासच तो विवाह श्रेयस्कर मानला जाअी. त्यांच्या गणराज्यांचे धुरंधर पुढारी निवडण्यातही शरीरसौष्ठव नि बळ ह्या गुणांचाही विचार केला जाअी. हें सुप्रजननाचें तत्त्व अितकें कठोरपणे त्यांच्या निर्बंधांत अनुस्यूत केलेलें असे की, मुलें जन्मल्यानंतर तीन महिन्यांचे आत त्यांची राज्याधिकाऱ्यांकडून शारीरिक परीक्षा केली जाअी. जर अेखादें मूल जन्मतःच अत्यंत व्यंग, दुर्धर रोगाने पछाडलेलें वा विकृत असलें तर त्यास राज्याज्ञेने निर्दयतेने मारलें जाअी !

ग्रीसमधल्या 'स्पार्टा' ह्या प्राजकातही आनुवंश (Heredity) सुधारण्यासाठी असेच निर्बंध असत हें ज्ञात्यांस ठाअूकच आहे.

ह्या सौभूति नि कठ गणांप्रमाणे अगदी कठोरपणे नसलीं तरी बलिष्ठ नि सुंदर प्रजा व्हावी म्हणून जपणारीं आणखी गणराज्यें भारतात असत. वृष्णीगणांतही त्यांचे धुरंधर पुरुष बलिष्ठ नि देखणे असावे असा कटाक्ष ह्या काळच्या फार पूर्वीपासून असे. त्या वृष्णीगणाचा जगद्विख्यात नेता जो श्रीकृष्ण त्याच्या शरीरसौष्ठवाची नि बलिष्ठतेची ख्याति तर अजरामरच झाली आहे ! श्रीकृष्णाचे पुत्रही अतिशय देखणे होते असें पुराणांतून सांगितलें आहे.

'आयुधजीवी' गणराज्यें:– पंचनद प्रांतात (पंजाबात) नि सिंधु नदीच्या तटाला लागून थेट तिच्या मुखापर्यंत पसरलेल्या भारतीय गणराज्यांतील अनेक गणराज्यांना आयुधजीवी किंवा शस्त्रोपजीवी म्हणत. त्यांचें वैशिष्ट्य हें असे की, त्या सर्व पुरुषांनाच नव्हे, तर बहुसंख्य स्त्रियांनाही सैनिक शिक्षण अनिवार्यपणे घ्यावेंच लागे. युद्धाचे काळी तें सारें राष्ट्र लढाईवर जाऊ शके. निरनिराळ्या प्रकारची असली तरी त्यांची राज्यघटना मूलतः प्रजासत्ताक असे हें सांगणें नकोच. तीं लहानमोठीं असलीं तरी स्वतंत्रपणें नांदत.

यौधेय गणराज्य:– या आयुधजीवी वर्गाच्या गणराज्यांत ज्याचें राज्य विस्तृत नि सुपीक प्रदेशावर पसरलेलें होतें, १८ ते २१ वर्षें वयाच्या प्रत्येक तरुणाने शस्त्रविद्या शिकलीच पाहिजे असा निर्बंध (Law) असल्यामुळे ज्याचा पुरुषवर्ग तर काय, पण बहुसंख्य स्त्रियाही शस्त्रसज्ज असत, ज्याला 'A nation in arms' म्हणून परके अितिहासकारही संबोधितात आणि आपल्या स्वातंत्र्यास्तव जिवावर अुदार होअून लढण्याच्या ज्याच्या कीर्तीमुळे ज्याच्या पराक्रमाचा सर्वांना दरारा वाटत असे तें यौधेय गणाचें राज्य प्रमुखत्वे गणलें जाअी. तें पंचनद प्रांतातील व्यास नदीच्या खाली पसरलेलें होतें.

पौरव राजाचा पराभव करून आजूबाजूचीं गणराज्यें नि डोंगराळ टोळ्यांशी लढत नि तीं जिंकीत अलेक्झांडर वितस्ता (झेलम) नि चंद्रभागा (चिनाब) ह्या नद्या अुतरून व्यास नदी ओलांडण्यासाठी झपाटयाने पुढे येत आहे हें पाहून तिच्या खालच्या तीराला निवसणाऱ्या या पराक्रमी यौधेय गणानेही अलेक्झांडरचें 'शरण येण्याचें' आव्हान धिक्कारून युद्धाची जय्यत सिद्धता चालविली! अितकें झालें, तरी मगध साम्राज्याचा 'सम्राट्' म्हणविणाऱ्या पराक्रमशून्य धनानंद महाराजाच्या डोळ्यांवरील गुंगी अुतरली नाही. त्या भेकडाने या शूर यौधेय गणाशी शिकंदरला (अलेक्झांडरला) तिकडेच्या तिकडेच पादाक्रांत करण्यासाठी कोणतेंही सामरिक सहकार्य केल्याचें आढळत नाही. तरीही यौधेयगण आपल्याच बळावर शिकंदराशी लढण्यास सज्ज झाला.

शिकंदराच्या सैन्याने धास्ती खाल्ली!

पंचनदांतील सिंधु, वितस्ता, चंद्रभागा ह्या नद्या ओलांडून अलेक्झांडरचें सैन्य लढत लढत जेव्हा ह्या व्यास नदीच्या काठापर्यंत आलें तेव्हा त्यांना त्या नदीच्या पलीकडे असलेलें हें यौधेय गणाचें प्राजक ग्रीकांशीं आपल्या स्वातंत्र्यरक्षणार्थ लढण्यास सज्ज होअून ठाकल्याचें कळलें. त्याच्या पराक्रमी सैन्यशक्तीची ख्यातिही ग्रीकांच्या कानांवर गेली. त्या यौधेय गणाच्या पुढेच गंगेकांठचीं मोठमोठीं राज्यें लढण्यास सिद्ध आहेत ही वार्ताही त्यांच्या कानावर आलेलीच होती.

यामुळे आजवर पंचनदात भारतीयांशी लढत लढत आधीच थकवा नि कंटाळा आलेल्या ग्रीक सैन्याची व्यास नदी ओलांडून ह्या पराक्रमी यौधेय गणादिक भारतीय राज्यांशी युद्धें करीत पुढे घुसण्याची छाती होईना !

परंतु त्यांच्या त्या जयिष्णु नि धैर्यमेरु सम्राटाची नि सेनापतीची, त्या अलेक्झांडरची राज्यतृष्णा नि युद्धपिपासा लेशमात्र अुणावलेली नव्हती ! व्यास नदी ओलांडून, यौधेय गणास जिंकून थेट मगधापर्यंत पुढे घुसायचेंच अशी त्याने ग्रीक सैन्यात घोषणा केली. ह्या त्याच्या हट्टामुळे लढाअीस कंटाळलेल्या त्याच्या अगदी निवडक सैन्यात सुद्धा असंतोष माजला. त्या ग्रीक सैन्यातील सैनिक टोळ्याटोळ्यांनी गुप्तपणे पुढे जाण्यास स्पष्टपणे नकार द्यावयाचा म्हणून ठराव करू लागले. अलेक्झांडरला ते अर्जिक्य नि प्रत्यक्ष 'झ्यू' देवतेचा पुत्र म्हणून मानीत आले. पण त्याच्या राज्यतृष्णेचा त्यांना आता अगदी अुबग आला. ही ग्रीक सैन्यातील असंतोषाची जाणीव अलेक्झांडरला होताच त्यांना अुत्तेजविण्यासाठी त्याने त्यांच्यासमोर अेक भाषण केलें तो म्हणाला, 'ग्रीसचें सैन्य अर्जिक्य आहे ही तुमची जगभर गाजणारी कीर्ति ! तिला अशी काळोखी ! भारतात शिरल्यानंतर तुम्ही आजवर ज्या लढाया लढलेत नि जय मिळविलेत ते लहान-सहान शत्रूंशी गांठ पडली तेव्हा होते. आता मोठमोठ्या शत्रूंना तोंड द्यावयाचें आहे. व्यास नदीच्या पलीकडेच हें अेक आयुधजीवी गणराज्य शरण न येता तुमच्याविरुद्ध दंड थोपटून रणांगणात अुतरलें आहे ! त्यांची खोड मोडून पुढे असलेल्या गंगेच्या काठच्या अत्यत सुपीक राज्यांना जिंकून, आपल्या ग्रीसच्या दिग्विजयाचा डंका साऱ्या जगात गाजविलाच पाहिजे !'

पण अशा आशयाच्या चेव आणणाऱ्या अलेक्झांडरच्या भाषणाचा परिणाम त्याने अपेक्षिला होता तसा न होता अगदी अुलट झाला. आज आपण लढलो त्यापेक्षा अधिक भीषण संग्राम आपणांस लढावे लागणार आहेत हें स्वत: अलेक्झांडरनेच सांगितल्यामुळे त्याच्या ग्रीक सैन्याच्या हृदयात धडकीच भरली. डॉ. जयस्वाल आपल्या 'Hindu Polity' ग्रंथात लिहितात : The 'Greek army refused to move an inch forward to face the (Bharatiya) nations whose very name, according to Alexander struck his soldiers with terror.'

आपलें ग्रीक सैन्य थकल्यामुळे यौधेयगणाशी तत्काळ लढण्याच्या भयामुळे नि पुढील सर्वच कटकट टाळण्यासाठी व्यास नदी अुतरण्यास स्वच्छ नकार देत आहे हें पाहताच प्रत्यक्ष आपली अवज्ञा केल्याविषयी अलेक्झाडर संतापला. पण तो जसा धुरंधर योद्धा होता तसा धूर्त कारस्थानीही होता. काळवेळ ओळखून संतापाचे भरात काही अेक झटकन् न करता अलेक्झांडर वैतागासरशी अेकदम आपल्या तंबूत गेला. कोणाशीही बोलेनासा झाला. तीन दिवसपर्यंत तो तंबूबाहेर आलाच

नाही. विचारपूर्वक त्याने अेक निराळीच योजना मनातल्या मनात ठरविली. नंतर त्याने सर्व ग्रीक सैन्यास अेकत्र जमविलें आणि तंबूबाहेर येअून त्याला म्हणाला, व्यास नदी अुतरून पुढे जायचा वेत मी सोडून दिला आहे. आता ग्रीसला परत जावयाचें!' या वाक्यासरशी शिकंदरच्या सैन्यास अर्थातच 'आनंदीआनंद' झाला! शिकंदर पुढे म्हणाला 'पण मागे परत फिरायचें कसें? सरळ पाठ फिरवून आल्या मार्गे जाअू लागलो तर आपण जिंकलेलेंच हें सारें भारतीय जानपद जितं जितं करीत बंड करून अुठेल. आपण घाबरलो आहोत असें समजतील! तेव्हा पाठ दाखवून, आलेल्या भूमिमार्गे परत न फिरता आपण किंचित् तिरपें वळावें. सिंधु नदीतून वाट काढीत समुद्राकडे जावें नि मग समुद्रमार्गे अिराणास परत जावें. पुन्हा पुन्हा जेव्हा भारतात आपण येअू तेव्हा गंगेकडील राज्येंही जिंकून आपण आपला भारताचा दिग्विजय पुरा करू!!'

अलेक्झांडर म्हणाला खरा की 'पुन्हा जेव्हा आपण भारतावर चालून येअू' –पण हे ग्रीक सेनापते, पुढे म्हणजे केव्हा? गंगेकडील राज्यें जिंकण्याचें तर राहोच, पण आज तू ही भारताची सीमारेषा जिंकली आहेस तीच मुळी तोवर तुझ्या साम्राज्याचें जूं झुगारून देअून स्वतंत्र झालेली नसेल तर? नव्हे, त्या तुझ्या 'पुढे' च्या आधीच तूच मुळी वेपत्ता झालास तर! 'झ्यू' चें कुलसुद्धा बोलता बोलता काळाचे ग्रास होअू शकतें मग तें ग्रीसचें का असेना!

भारतावर पुन्हा चालून येणाच्या अलेक्झांडरच्या धमक्यांची जर त्या भारतीय 'Gymnosophist'' यतीनीं नि योग्यांनी अशी टिंगल अुडवली असेल तर ती काही अस्थानी ठरत नाही!

अलेक्झांडरची पीछेहाट

तोंडाने काहीही वल्गना करीत राहिला तरी व्यास नदीपलीकडील यौधेयादि भारतीय दळभारांच्या पराक्रमास ग्रीक सैन्य भ्यालें म्हणून व्यास नदी अुतरण्याची अलेक्झांडरची छाती झाली नाही! भारतीय पराक्रमाने त्याच्या चढाअीची रग जिरविली म्हणून अलेक्झांडरला मागे फिरणें भाग पडलें. तें स्वेच्छेने मागे परतणें नव्हतें तर ती भारतीयांपुढे हतबल झालेल्या ग्रीकांची पीछेहाट होती. हें अैतिहासिक सत्य छपविण्यासाठी जे काही ग्रीक किंवा युरोपियन अितिहासकार लिहितात की 'जर शिकंदर व्यास नदी अुलटून पुढे गेला असता तर यौधेय गणाचाच काय पण मगधाचा ही पराभव करू शकता. यौधेयांनी किंवा मगधादिकांनी शिकंदराच्या ग्रीक सैन्याचा प्रत्यक्ष रणांगणांत लढून काही कुठे पराभव केलेला नाही.' अशा जर-तरच्या वल्गनांनी यौधेयादिकांच्या भारतीय रणप्रतापाच्या वतीने ह्या प्रकरणी तरी असें प्रत्युत्तरता येअील की,

का कथा वाणसंधाने ज्याशब्देनैव दूरतः ।
हुंकारेणैव धनुषः स हि विघ्नान्यपोहति ॥

जो शत्रु आमच्या नुसत्या धनुष्यांच्या टणत्कारासरशीच भयभीत होऊन पळ काढतो त्याच्याशी लढायचें काय कपाळ !

पुन्हा अलेक्झांडरच्या ह्या ग्रीक सैन्याची प्रत्यक्ष रणांगणांत लढण्याची खुमखूमही मगधादिक भारतीयांचा रणप्रताप पुढे जिरविणार आहे ! युद्धाच्या आखाड्यांत अुत्तरतोच आहे तो चंद्रगुप्त. थोडें थांवा.

अलेक्झांडर अेक बलाढ्य नौदल अुभारतो

व्यास नदीवर त्याच्या सैन्याची पीछेहाट होताच सिंधुनदीतून समुद्राकडे ससैन्य निघून जाण्यासाठी शिकंदरने पांचशे सहाशे रणतरी बांधून अेक बलाढ्य नौदल (आरमार) अुभारलें. त्यावर त्याचें सहस्रावधि ग्रीक सैन्य शस्त्रास्त्रांनिशी सज्ज करून त्याने चढविलें आणि तो सिंधु नदीतून परतू लागला. या जलप्रवासाच्याच आगेमागे शिकंदरने बाबिलोनिया येथून मागविलेलीं त्याचीं नव्या दमाचीं दोन ग्रीक सैन्येंही त्याला येअून मिळालीं त्यामुळे त्याचें थकलेलें जुनें ग्रीक सैन्यही अुल्हसित झालें.

परंतु अिकडे शिकंदरची पीछेहाट झालेली पाहून त्याने जिंकलेल्या गांधार ते व्यास नदीपर्यंत भारतीय जानपदात आतून आतून ग्रीस सत्तेविरुद्ध मोठें षड्यंत्र चालू झालें. पण त्याचा अुल्लेख पुढे येअील. अिथे अितकें सांगणें पुरें आहे की, 'मी परत येणार आहे तेव्हा पाहून घेअीन ! ' ह्या अलेक्झांडरच्या धमकीला अेक राजकारणी बागुलबोवा समजून शिकंदर सिंधु नदीच्या ज्या मार्गाने परत जाणार होता त्याच्या अुभय तीरावर पसरलेल्या लहान मोठ्या भारतीय गणराज्यांनी त्या ग्रीक सैन्याचा शक्यतों सशस्त्र सामरिक प्रतिकार करावयाचें ठरविलें. पण तो ज्या त्या स्वतंत्र गणराज्याने ज्याच्या त्याच्या पुरता फुटकळपणे घेतलेला निर्णय होता. सर्वांनी मिळून संघटितपणे अेकाधिपत्याखाली शिकंदरशी लढलेलें तें संयुक्त युद्ध नव्हतें. त्यामुळे मागे गांधार नि पंचनदात झालें तसें अेकेका भारतीय गणराज्याला गाठून शिकंदरचें संघटित सैन्य लढत लढत पुढे जाअू शके. ह्या भारतीय सैन्याजी या फुटकळ लढाया झुंजवीत राहण्याने जरी शिकंदरचीं हाडें खिळखिळीं होत तरी त्याचा निःपात असा होअू शकत नसे. ज्या त्या स्वतंत्र गणराज्याने आपल्यापुरतें लढण्याच्या ह्या फुटीर प्रवृत्तीला काही तुरळक अपवादही घडले. त्यांपैकी शत्रुपक्षाकडील ग्रीक अितिहासलेखकही ज्यांची तोंड भरून प्रशंसा करतात आणि ग्रीक अितिहास जन्मभर विसरणार नाही असा अेक तडाखा ज्याने समरांगणांत शिकंदरला लगावला त्या दोन गणराज्यांना तरी येथे अुल्लेखिलें पाहिजे.

मालव आणि शूद्रक गणराज्यें

हीं दोन्ही गणराज्यें सिंधूच्या तटावर प्रत्येकी स्वतंत्रपणे नांदत होतीं. दोन्हीही संपन्न, शूर, लोकसत्ताक नि अत्यंत स्वाभिमानी असत. त्यांतही मालव गण हा प्राचीन कालापासून विख्यात असे. त्याचें राज्य विस्तृत होतें. ह्या गणांत केव्हा वैरही येअी. तथापि जेव्हा शिकंदराचें वलाढ्य नौदल वाटेत आडवें येअील त्या त्या फुटकळ भारतीय संस्थानाशी लढत सिंधु नदीतून वाट कापीत चाललें, तेव्हा त्या दोन्ही गणांतील राजकारण्यांनी तोंवर फुटकळपणे लढण्यात स्वतंत्र भारतीय गणराज्यांची जी राष्ट्रघातक भूल होत होती ती सुधारण्याचा निर्धार केला. त्यांनी स्वतंत्रपणे न लढता दोन्ही गणराज्यांचें सैन्य अेकत्र करून अेकाच नेतृत्वाखाली लढण्याचें ठरविलें. केवळ सैन्यच नव्हे तर आपलीं जुनीं वैरें विसरून त्या गणराज्यांतील नागरिकांनी आपले राष्ट्रीय नि सामाजिक जीवनही अेकात्म करण्यासाठी परस्परांत शरीरसंबंध घडवून आणले. जातींत जात मिसळून जावी, अेकरक्त, अेकबीज व्हावी, ह्यासाठी परस्परांत त्यांचा मोठा सामुदायिक विवाहसमारंभ झाला, न्यूनतः अेक सहस्र मुली अेकमेकांत देअून घेअून परस्परांतील वरांशी त्यांचीं लग्नें लागलीं गेलीं !

मालव शूद्रकांच्या ह्या संयुक्त सैन्याचा ग्रीकांशी तुमुल संग्राम चालू असता ह्या गणराज्यांतील अेका महत्त्वाच्या नगराला शिकंदराने वेढा घातला. त्या नगराचें नक्की नांव निश्चितपणे आढळत नसलें तरी तें राजधानीचें किंवा तशाच महत्त्वाचें नगर असलें पाहिजे. तें गणराज्यीय नगर अटीतटीने लढत राहिल्याने ग्रीक सैन्याचा वेढा रेंगाळत राहिला. तापट स्वभावाच्या अलेक्झांडरला हें सहन झालें नाही. त्याने शिडया लावून शत्रूच्या तटावर सरळ चढून जाण्याची आज्ञा ग्रीक सैन्यास देण्याचें योजिलें.

पण मागे व्यास नदी ओलांडण्याचे वेळी झालें त्याप्रमाणे याही वेळी ग्रीक सैन्यांत शिकंदराविषयी असंतोष माजत चाललेला होता. नवीं युद्धें टाळण्यासाठी पीछेहाट पत्करून ग्रीक सैन्य सिंधु नदीतून घरी जाण्यासाठी परतलें होतें पण त्या सिंधुनदीच्या जलमार्गाने ठिकठिकाणी त्यांना भारतीयांशी लढे द्यावे लागले. आणि शिकंदरने राज्यतृष्णेपायी धरलेलें आक्रमक धोरण सोडलें नाही तर जिवावरच्या लढाया आणखी पुढे लढाव्या लागणारच ! ह्या प्रबळ अशा मालव शूद्रकांशी छेडलेल्या युद्धामुळे तर ग्रीक सैन्याची सहनशक्ति तुटेतो ताणली गेली होती. म्हणून त्यांच्यातील असंतोष शिगेला पोचून शिकंदरची अुघड अुघड अवज्ञा करावी अशी बंडखोरीची कुजबूज होअू लागली.

'When the Macedonian soldiers found that they had still on hand a fresh war in which the most warlike nations (गण),

would be their antagonists, they were struck with unexpected terror and began again to upbraid the king in the language of sedition. (Curtius as quoted in 'Hindu Polity')

तथापि शेवटी शत्रूच्या वेढ्यास भीक न घालणाऱ्या त्या भारतीय नगरावर त्याच्या तटास शिड्या लावून शत्रूच्या माऱ्यास न भिता सरळ आत अुडी घेण्याची धाडसी आज्ञा अलेक्झांडरने सोडली. आपलें ग्रीक सैन्य तसें साहस करण्यास अळंटळं करतें आहेसें पाहून तटास लावलेल्या अेका शिडीवर तो ग्रीकांचा अतुल पराक्रमी सेनापति शिकंदर स्वत: चढू लागला. त्या दृश्यासरशी तें सारें ग्रीक सैन्यही अकस्मात् अुत्तेजित होअून शिड्यांवर भरभर चढू लागलें. तट चढून जाताच स्वत: अलेक्झांडरने तटावरून जी अुडी घेतली ती थेट खाली त्या नगराचे आतल्या रणभूमीतच होय! मागोमाग ग्रीक सैन्यही तटावरून अुड्या घेत नगरात घुसलें. भारतीय सैन्यात नि ग्रीक सैन्यात अेकच रणधुमाळी अुसळली!

अितक्यात –

अितक्यात अेका भारतीय वीराने भात्यातून अेक विषारी शर काढून धनुष्याच्या प्रत्यंचेस जोडला, आणि जिथे सेनापतिपदाचें सोनेरी शिरस्त्राण घालून, तुंबळ रण घुमवीत, पुढे घुसणाऱ्या ग्रीक सैन्यात त्यांचा सम्राट्–सेनापति अलेक्झांडर तळपत होता तें लक्ष्य साधून त्या भारतीय वीराने (ज्याचें नांवही अुपलब्ध नाही त्याने) तो अमोघ शर सोडला.

तो शर नव्हता तर भारताचा मूर्तिमंत सूडच होता! पंताचे आर्येत किंचित् जुळवून बोलावयाचें तर

तो शर गरधरवरसा पविसा रविसा स्मरारिसायकसा।
म्लेंच्छहृदंतरीं घुसला वल्मीकामाजि नागनायकसा॥

त्या बाणाने घायाळ होअून
अलेक्झांडर रक्ताच्या थारोळ्यात कोसळला

भारतीय वीराने प्रबळपणे सोडलेला तो बाण नेमका शिकंदरच्या वक्ष:स्थळी घुसला. त्यासरशी मूर्छित होअून शिकंदर खाली कोसळला. हें पाहताच अेका ग्रीक सैनिकानें आपल्या ढालीखाली त्यास झाकून घेतलें. अलेक्झांडर रणात पडला, मूर्छित झाला, असा अेकच विसंगत हाहाकार ग्रीक सैन्यात अुडाला. कडोनिकडीने ग्रीकांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अलेक्झांडरला रणातून तसाच बाहेर काढून आपल्या शिबिरात नेलें. तिथे मोठ्या प्रयासाने त्याच्या वक्ष:स्थलात घुसलेला त्या भारतीय वीराचा ती भीषण बाण अुपटून काढला गेला. अलेक्झांडर जसजसा शुद्धीवर येअू लागला तसतसा ग्रीक सैन्याच्या जिवात जीव येअू लागला. कित्येक दिवस तो घाव भरून येण्यास लागले. तोपर्यंत शिकंदर अथरुणास खिळून होता.

पण तिकडे हा हा म्हणता बाबिलोन ते ग्रीसपर्यंत या घटनेची पहिली बातमी हीच गेली की, युद्धात भारतीय बाण लागून शिकंदर ठार झाला ! नि यामुळे गांधार नि अिराणच्या काही भागात बंडेंही झालीं. पुढे 'शिकंदर घायाळ झाला नि आता बरा आहे' ही बातमी पोचल्यावर स्थिरस्थावर झालें.

आणि त्या वृत्तासरशी भारतात नि विशेषतः त्या वीर्यशाली मालव शूद्रक गणराज्यांत कृतकृत्यतेची धन्यता वाटली असल्यास तें साहजिकच होतें. भारतीय पौरव राजाला लढाअीत ग्रीकांनी जेव्हा घायाळ केलें हांतें तेव्हा त्याचा अलेक्झांडरला अितका गर्व झाला होता की त्याने तें चित्र ठसविलेलें अेक नवें नाणें स्वतःचे दर्पाचें स्मारक म्हणून पाडलें होतें. तें आजही पहावयास मिळतें. भारताच्या त्या अपमानाचें अुट्टे आज त्या ग्रीकांच्या राजालाही रणांगणात अक्षरशः लोळवून भारतीय वीरांनी काढलें ! भारताचें रक्त सांडणाऱ्या त्या म्लेंच्छ सम्राट् अलेक्झांडरला त्याचें स्वतःचें रक्त सांडून भारतीय वीरांनीही वैयक्तिक दंड भोगावयास लावला !

भारतीय बाण ज्याच्या वक्षःस्थळास भेदून आत रुतलेला आहे नि त्यामुळे जो रणांगणात स्वतःच्या रक्ताच्या थारोळ्यात मूर्छित पडलेला आहे अशा अलेक्झांडरचें चित्र ठसविलेलें अेखादें नवें सोनेरी नाणें मालव शूद्रक गणानेही पाडावयास हवें होतें ! असेलही पाडलें क्वचित् !

अलेक्झांडरच्या आजवरच्या अत्याचारी रणनीतीप्रमाणे जीं त्यास विरोधतील त्या त्या संस्थानांचा तो बहुधा निर्दयपणे निःपात करीत आला होता. पण अरेस कारे म्हणून हटकणारा प्रतिवीर भेटताच आपलें काम साधून घेण्यासाठी सुतासारखा सरळपणा दाखविण्याचे कलेतही तो निष्णात होता ! त्याची प्रकृति बरी होताच मालवशूद्रकांच्या संयुक्त सेनापतीशी अुद्दंड भाषा न योजता त्याने शस्त्रसंधीचें बोलणें लावलें. हा संधि करण्यासाठी त्या संयुक्तगणाचे शंभर प्रतिनिधि निवडले गेले होते. त्या सर्व भारतीय प्रतिनिधींच्या सन्मानार्थ अलेक्झांडरने आपल्या शिबिरात अेक मोठ्या थाटाचा समारंभ करण्याचें ठरविलें. मालवशूद्रकांचे ते शंभर प्रतिनिधि ग्रीकांचे शिबिरात येताच त्यांचें भव्य स्वागत करण्यात आलें. त्या प्रसंगाचीं मोठीं सुरस नि सविस्तर वर्णनें निरनिराळ्या ग्रीक अितिहासकारांनी दिलेलीं आहेत. पण स्थलाभावी अिथे त्यांचा अगदी संक्षिप्त अुल्लेख तेवढा केला आहे. ग्रीकांनाही असाधारण (Uncommon) वाटावे असे भरपूर अुंचीचे, धष्टपुष्ट नि डौलदार शरीराचे, भरजरी मूल्यवान वेष नि रत्नामोत्यांचे अलंकार परिधान केलेले असे ते शंभर भारतीय वीर पुरुष प्रत्येकी आपल्या सुदृढ नि सालंकृत सोनेरी रथांत बसून आलेले होते. त्यांचे समवेत अुत्तम नि मूल्यवान् साज चढविलेले हत्तीही होते. ग्रीकांना हत्तींचें नेहमीच मोठें आकर्षण वाटे.

ह्याच प्रतिस्पर्ध्यांनी आपल्या स्वतःवर प्राणसंकट आणलेलें होतें याची जाणीव मनात सलत असताही त्या समारंभात अलेक्झांडरने वीरोचित अुदारमनस्कता

दाखवून त्या समारंभात आपल्याही राजवैभवाचें प्रदर्शन केलें. त्या प्रतिनिधि-मंडळातील शंभर प्रतिनिधींसाठी भोजन समारंभाचे वेळी सोन्याचीं शंभर पीठें हारीने मांडलीं होतीं. अुंची मद्यांचीं नि पक्वान्नांची रेलचल अुडाली. निरनिराळ्या क्रीडोत्सवांची आणि गायनवादननर्तनादि समारंभांची लयलूट झाली. शेवटी अलेक्झांडरचा नि त्या मालवशूद्रकांच्या संयुक्त गणराज्यांचा संयुक्त संधि झाला.

त्या काळच्या ग्रीक लेखकांच्या या संधिसंबंधात विसंगत वर्णनांतून जो काही समन्वय लागतो तो अितकाच की, या संयुक्त गणराज्यांशी चाललेलें युद्ध ग्रीकांनी नि भारतीयांनी अुभयपक्षी बंद ठेवण्याचें मान्य केलें आणि ह्या मालवशूद्रकांच्या गणराज्यांनी सिंधुनदीतून परतणाऱ्या अलेक्झांडरच्या नौदलाला कोणताही अुपद्रव देअू नये हें त्या संयुक्त गणराज्यांनी मान्य केलें. या दोन गणराज्यांपैकी मालवगणराज्याच्या पराक्रमी अस्तित्वाचा अुल्लेख भारताच्या पुढच्या अितिहासात शकयूचींच्या म्लेंछ सत्तेशी झालेल्या युद्धातही वारंवार येणारा आहेच. त्यावरून तें मालवगणराज्य पुढे अनेक शतकें भरभराटीत होतें हें सिद्ध करीत वसण्याचें कारणच अुरत नाही.

भारतीय प्रतिकारकांच्या आणखी काही वीरकथा, त्या प्रकरणीच्या स्थल-कालाचा स्पष्ट अुल्लेख नसताही ग्रीक लेखकांनाही वर्णिल्यावाचून राहवलें नाही. त्यांपैकी दोन तीन तरी येथे अुदाहरणार्थ देअू.

'मासागा' येथील छापा – मासागा येथे अलेक्झांडरच्या हाती सात सहस्र भारतीयांची अेक सशस्त्र टोळी सापडली. तीत अनेक स्त्रियाही होत्या. अलेक्झां-डरने त्यांस सांगितलें की, जर तुम्ही माझ्या सैन्यात भरती व्हाल आणि माझ्या स्वारीत माझ्या भारतीय शत्रूंशी लढत चलाल तर मी तुम्हांस जीवदान देतो. नाहीतर सर्वांना कापून काढीन किंवा दासदासी म्हणून धरून नेअीन. त्या टोळी-तील पुढाऱ्यांनी ती अट मान्य केली. पण विनंती केली की त्या सर्वांचें अेकमत व्हावें म्हणून विचारविनिमयासाठी त्यांना अेक रात्र अवधि द्यावा. त्याप्रमाणे शिकंदराने त्यांना अवधि दिला. आणि ग्रीकांच्या शिबिरासमोर नअू अेक मैलांच्या अंतरावरील टेकडीवर रात्रभर वसती करण्यास जाअू दिलें. व्हिन्सेंट स्मिथ आपल्या अितिहासात लिहितो की " The Indians being unwilling to aid the foreigners in the subjugation of their country-men desired to evade the unwelcome obligation. " ह्यामुळे स्वत:चा जीव वाचावा म्हणून ग्रीकांसारख्या परराष्ट्रीय शत्रूना मिळून आपल्या राष्ट्राला पारतंत्र्यात ढकलण्यासाठी लढण्याचें पापी कृत्य केव्हाही करावयाचें नाही असें त्या भारतीयांनी त्या रात्रीच्या गुप्त बैठकीत ठरविलें आणि भल्या पहाटेसच ग्रीकांचा डोळा चुकवून तिकडच्या तिकडे निसटून जाण्याचा त्यांनी कट केला. विसाव्यासाठी मग ते थोडा वेळ निजले. पण त्यांच्या त्या कटाची वातमी तत्काल शिकदंरला कळली. त्या

सरशी त्याने ग्रीक सैन्यास घेऊन त्या निद्रिस्त भारतीय दलावर अकस्मात् छापा घातला आणि अेकदम कापाकापीस आरंभ केला. तेव्हा त्या सात सहस्र भारतीयांत अेकच हाहाकार झाला ! पण थोडयाच वेळात ते सावध झाले. त्यांनी आपापलीं शस्त्रें अुपसलीं. मध्ये पोकळ असा अेक गोल व्यूह रचला, त्या पोकळीत स्त्रिया नि मुलें घातलीं आणि ते सारे भारतीय वीर शत्रूवर तुटून पडले. अनेक स्त्रियाही आघाडीवर राहून ग्रीकांशी बेभान झुंजताना आढळत होत्या. शेवटी ग्रीकांच्या बहुसंख्य सैन्याकडून ठार मारलें जाअीतो ते भारतीय वीर आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यास्तव झुंजत राहिले !

'The gallant defenders met a glorious death which they would have disclaimed to exchange for a life with dishonour.'
(Early History of India by V. D. Smith, Page 51)

अग्रश्रेणी :—ह्या भारतीयांच्या लहानशा पण स्वतंत्र प्राजकानेही शरण न जाता शिकंदराचें प्रचंड नौसैन्य सिंधुनदीतून परत जात असता क्षात्रधर्मानुसार त्याच्याशी प्राणांतिक संग्राम केला. त्यांच्या राजधानीवरच ग्रीक सैन्य चालून आलें तेव्हा त्या भारतीय लढवय्यांनी मार्गोमार्गी आडोसे अुभारून मार्‍याचीं स्थलें निर्मिलीं आणि पावलोपावली अशी लढत दिली की शिकंदरला त्याच्या स्वत:च्या ग्रीक सैनिकांचे वळी दिल्यावाचून त्या नगरात प्रवेश करता आला नाही. शेवटी "According to Curtius when those brave fellows could not further resist the odds, they (the Agrashrenees) set their houses on fire and their wives and children and all threw themselves into the flames !" कर्टिस हा युरोपियन ग्रंथकार लिहितो की, ग्रीकांच्या बहुसंख्य सैन्याला हटविणें जेव्हा अशक्य झालें तेव्हा त्या झुजार अग्रश्रेणींनी आपल्या साऱ्या घरादारांना आग लावून दिली आणि त्यांच्या शूर स्त्रिया, मुलें मुली–सर्वजण त्या ज्वालाकल्लोळात अुड्या घेअून भस्मसात् झाले ! म्हणजे आजच्या भाषेत त्यांनी जोहार केला.

हाच तो जोहार ! ! –जय हर !

आपल्याकडे सर्वसामान्यपणे असें समजलें जातें की 'जोहाराची' ही तेजस्वी चाल रजपुतात तेवढी प्रचलित असे. परंतु ग्रीक लेखकांनी वरील अग्रश्रेणीसारख्या पराक्रमी लोकांचीं जीं अुदाहरणें आश्चर्यचकित होअून दिलीं आहेत त्यावरून हें अुघड होतें की, रजपूत ह्या नांवाचाही अुदय होण्यापूर्वीपासून आपल्या भारतीय योद्धयांच्या वर्गातून ही '**जोहाराची**' तेजस्वी परंपरा चालत आलेली आहे. जोहार हा शब्द अलीकडचा. तो 'जय हर !' ह्या रणघोषणेपासून निघाला असावा. विलय, मरणमारणाचें थैमान चालत असलेलें रणांगण,

याची भारतीय देवता हर ! महादेव ! म्हणूनच 'जय हर' ही तुमुल रणगर्जना करीत भारतीय सैन्यें वेभानपणे लढत. मराठ्यांचीही युद्धगर्जना होती 'हर हर महादेव' हीच ! लढण्याची पराकाष्ठा केली असताही जेव्हा जेव्हा परधर्मीय वा परराष्ट्रीय अशा आततायी शत्रूच्या हातून सुटण्याची सारी शक्यता नष्ट होअी, तेव्हा पाडाव होऊन त्या परशत्रूच्या सत्तेखाली त्यांच्या दासदासी होऊन किंवा परधर्म स्वीकारून जिवंत राहण्यापेक्षा स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वत्व यांच्या सन्मान-रक्षणास्तव–स्वयं-हौतात्म्य पत्करणारें असें आमच्या भारतीय युद्धतंत्राचें हें अग्न्यस्त्र, हा जोहार, हेंच अंतिम नि अमोघ अस्त्र असे ! लढाअू वयाचे सर्व वीर पुरुष रणांगणात शत्रूस मारीत मारीत मारले जाताच त्यांच्या शतावधि वीरांगनांनी आपलीं मुलेंबाळें छातीशीं कवळून आपणच पेटवून दिलेल्या अग्नि-नारायणाच्या ज्वालाकल्लोळात जयहर ! जयहर ! गर्जत पटापट अुड्या टाकून भस्मसात् होऊन जायचें ! यांचें नांव जोहार! ही तोंडाची गोष्ट नाही. वीरश्रीची, पराक्रमाची, स्वत्वरक्षक क्षात्रधर्माची प्राणांतिक पराकाष्ठा आहे ती !

ज्यांनी ज्यांनी अशा जोहाराच्या अग्निकल्लोळांचीं कवचें धारण केलीं त्यांना त्यांना वाटविण्याची, दास करण्याची, स्पर्श करण्याची सुद्धा शक्यता त्यांचा पाठलाग करीत येणाऱ्या अेखाद्या शिकंदराला, अल्लाअुद्दिनाला, सेलिमला तर काय पण सैतानाला सुद्धा अुरलेली नसते ! त्या अग्निकल्लोळाच्या कक्षेत येताच त्या चटक्यासरशी तो शत्रु हतबल, हताश, हिरमुसला होतो!

भारतात लढत असता काही ठिकाणी ग्रीक सैन्याच्या हाती पडण्याची मानहानि सोसण्यापेक्षा जेव्हा भारतीय वीर वीरांगनांनी असें अंतिम रणकंदन करून सांघिक अग्निप्रवेश केले तेव्हा तें अद्भुत दृश्य पाहून ग्रीकांचीं सैन्यें आश्चर्य-चकित झाल्याचीं जीं वर्णनें आहेत, त्यातच वरील 'अग्रश्रेणी' ह्या शूर जन-पदाचीही गणना होते.

ब्राह्मणक जनपद—शेवटी अलेक्झांडरचें नौदल असें लढत लढत जेव्हा सिंधु नदाच्या मुखापाशी आलें तेव्हा तिथे असलेल्या भारतीय स्वतंत्र गणराज्याशी त्याची गाठ पडली. हीं गणराज्यें किंवा 'जनपदें' स्वतंत्र नि शूर असलीं तरी लहान लहान होतीं. अलेक्झांडरच्या बहुसंख्य नि बलाढ्य सैन्याशी समबलाने लढू शकेल असें त्यांच्यात कोणीही नव्हतें. तथापि त्याच्यातील 'ब्राह्मणक' जनपदाने शरण न जाता ह्या परराष्ट्रीय शत्रूशी दोन हात करावयाचें ठरविलें. पाणिनि ज्या 'ब्राह्मणको नाम जनपदः'चा अुल्लेख करतो, तेंच हें जनपद होय असें डॉ. जयस्वाल म्हणतात. मागे पंचनदात लढत असतानाच या 'Philosophers' वर्गावर अलेक्झांडरने कसा डंख धरलेला होता तें वर सांगितलेलेंच आहे. त्याच ब्राह्मण वर्गाचें हें छोटेसें राज्य आहे हें अैकताच अलेक्झांडरने त्यांच्यावर विशेष कडकपणे सूड अुगविण्याचें ठरविलें. अलेक्झांडरवर लिहिलेल्या आपल्या चरित्रात

Plutarch म्हणतो; " (These philosophers were specially marked down for revenge by Alexander as) they gave him no less troubles than the mercenaries, they reviled the princes who declared for Alexander and encouraged free states (in India) to revolt against his authority.' त्या छोट्याशा जानपदानेही स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्यास्तव मोठ्या वाणेदारपणाने ग्रीकांशी शेवटपर्यंत झुंज दिली.

पट्टनप्रस्थ — ज्याला आज मुसलमान सिंध हैद्राबाद म्हणतात त्या नगराला त्या काळी पट्टनप्रस्थ म्हणून म्हणत. संस्कृतमध्ये समुद्रकाठच्या किंवा मोठ्या नदीमुखांचे काठी असलेल्या नगरांना बहुधा पट्टन म्हणत. पट्टन म्हणजे अंग्लिश 'Port'. क्वचित् हा अंग्लिश Port शब्द त्या संस्कृत शब्द पट्टन शब्दापासून आलेला असावा. शिकंदर अगदी समुद्राचे सन्निध येऊ लागला तेव्हा हें पट्टनप्रस्थाचें लहान राज्य शिकंदराला शरण जाण्यासही मान्य नव्हतें आणि त्याच्या बलाढ्य सेनेशी लढण्याचें सामर्थ्य आपल्यात नाही हेंही तें जाणून होतें. यास्तव त्या जनपदाने तिसरी अेक तोड काढली. त्या साऱ्या जनपदाने सामुदायिक देशत्याग केला नि घरदार, मत्ता नि मातृभूमि अशा सर्वस्वास अत्यंत दुःखित हृदयाने सोडून ते स्वातंत्र्यप्रिय जनपद देशांतरी जाऊन निवसू लागलें.

सिंधुसागरास पोचताच शिकंदर स्वदेशास परतला

सिंधु नदी समुद्रास मिळते त्या समुद्रभागास 'सिंधुसागर' हें नांव देणें उचित होय. जसें तिकडे आपल्या पूर्वेस 'गंगासागर' हें परंपरागत नांव आहे तसेंच अिकडे आपल्या पश्चिमेस 'सिंधुसागर' हें जोडनांव खुलून दिसतें.

शिकंदराचें नौदल सिंधु सागरात पोचताच शिकंदराने आपल्या सैन्याचे दोन भाग केले. अेक भाग आज ज्याला बलुचिस्थान म्हणतात त्या बाजूने भूमार्गाने अिराणकडे परत धाडला. शिकंदराचें सारेंच सैन्य भारताच्या स्वारीत दमून भागून त्रासून गेलेलें होतें. त्यातही त्या काळी बलुचिस्थानाकडील हा भाग अतिबिकट, अरण्यमय नि त्या ग्रीकांना अज्ञात असल्यामुळे शिकंदराचें तिकडून गेलेलें सैन्य कसें तरी पडत झडत अिराणास जाऊन पोचलें. अिकडे आपल्या सैन्याचा दुसरा भाग स्वतःसमवेत घेऊन अि. स. पू. ३२५ व्या वर्षी शिकंदर समुद्रमार्गाने अिराणास जाऊन पोचला. पूर्वीचें सारें अिराणी साम्राज्य अलेक्झांडरच्या साम्राज्यातच आता मोडत असल्यामुळे तेथील आपली राजधानी जी बाबिलोन तिथे तो परत गेला – पण तेथून दोन वर्षांपूर्वी भारतावर चालून येण्यासाठी जेव्हा तो वीरश्रीच्या अवसानात 'भारतीय सम्राट्' म्हणून मिरवीत परत येण्यासाठी निघाला होता तसा काही बाबिलोनला परत येऊ शकला नाही! भारत सम्राटासारखा तर नव्हेच पण सम्राटासारखासुद्धा नाही. तर तो परत आला अेखाद्या दमून भागून मनोभंग होऊन अर्ध्याच स्वारीवरून परत आलेल्या अेखाद्या सेनापतीसारखा!

अिराणी साम्राज्यासारखें भारतीय साम्राज्य कोपराने खणता आलें नाही !

अलेक्झांडरच्या या मनोभंगाचें कारण असें होतें की ग्रीक लोकांना त्या वेळचें त्यांच्या स्वतःपेक्षा अत्यंत विस्तृत असलेलें अिराणी साम्राज्य हेंच काय तें सर्वश्रेष्ठ साम्राज्य म्हणून परिचित होतें. जेव्हा अलेक्झांडरसारख्या आपल्या अलौकिक सेनापतीसह त्या साम्राज्यावर ते चालून गेले आणि दोन तीन लढायांतच तें दरायसाचें सारें विस्तृत साम्राज्य पत्त्यांच्या तंबूसारखें कोसळून ग्रीकांच्या पायाशी पडलें, तेव्हा त्या अद्भुत विजयासरशी ग्रीकांना वीरश्रीच्या अुन्मादात असें वाटू लागलें की आपला सेनानी हा देवसेनानीसारखाच अजिंक्य आहे. अलेक्झांडरही त्या 'ग' च्या बाधेपासून अलिप्त राहू शकला नाही. त्याला त्या आपल्या विजयी ग्रीक सैन्याचे बळावर जगज्जेता होण्याची हाव भरली. अिराणचे पुढेच भारत म्हणून तो भारताला अिराणप्रमाणेच लगोलग जिंकून भारतसम्राट् होण्यासाठी चालून आला. त्याला वाटलें दिसण्यात विस्तृत नि अवाढव्य दिसणारीं हीं भारतीय राज्यें नि साम्राज्येंही या अिराणी साम्राज्यासारखींच आतून पोकळ नि भुसभुशीत असणार ! अिराणप्रमाणेच त्यांनाही आपण कोपराने खणू शकू !

पण अनुभव अगदी अुलटा आला ! भारतात त्याला पदोपदी कट्टर विरोध झाला. झालेल्या लढायांत जरी तो लढाअी अशी हरला नाही तरी जिंकता जिंकताच तो नि त्याचें ग्रीक सैन्य हैराण झालें. अिराणप्रमाणे सारें भारत चुटकीसारखें पादाक्रान्त करण्याचे ग्रीकांचे चढेल बोल फोल ठरले. आणि शेवटी भारताच्या अेका सिंधुसीमेवरील पट्टी तेवढी जिंकून त्याला परत स्वदेशी फिरावें लागलें.

अलेक्झांडरचा असा मनोभंग नि काही अंशी मानभंगही झाला होता. पण त्या पराक्रमी सम्राटाचा धैर्यभंग मात्र झाला नव्हता. जें जिंकलें आहे त्याची नीट व्यवस्था लावून, ते विजित भारतीय प्रदेश आपल्या साम्राज्यात सीरिया, अिराण, बाबिलोनप्रमाणेच पचवून, रिचवून, मग भारतावर कालांतराने पुन्हा चालून जावें अशी खुमखूम शिकंदरला वाटतच होती.

भारताच्या जिंकलेल्या भागात शिकंदर आपले क्षत्रप नेमतो

हिंदुकुशपासून गांधार नि तक्षशिलेपर्यंतचा प्रदेश, व्यास नदीपर्यंतचा अर्धा पंचनद नि वितस्तेच्या संगमापासून तो सिंधूपर्यंतचा सिंधुकाठचा प्रदेश अितका भारताचा भाग शिकंदराने आपल्या साम्राज्यात जोडण्याची घोषणा केली. तक्षशिलेचा भारतीय राजा अंबुज ह्याला शिकंदरने हिंदुकुश भागाचा आपला क्षत्रप (Governor) नेमलें. पंचनदाचा आपला क्षत्रप म्हणून राजा पौरव ह्याची नियुक्ति केली. तिसरा जो सिंधु-वितस्तासंगमापासून सिंधुसागरापर्यंतचा भाग होता

त्यावर आपल्या विश्वासाचा फिलिप आणि निकियान ह्या दोन ग्रीक सेनापतींची नेमणूक केली. त्यांच्या हाताखाली त्याने फिरतीं ग्रीक सैनिक पथकेंही ठेवलीं होतीं. ग्रीकांचीं काही गावेंही भारतीय प्रदेशात त्याने वसविलीं होतीं आणि त्याच्या अितरत्रच्या पद्धतीप्रमाणे ' अलेक्झांड्रिया ' नांवाचें ग्रीकादिक नागरिकांचें अेक नगरही तक्षशिलेच्या दिशेकडे वसविलें होतें.

शिकंदरचा मृत्यु

भारतातील जिंकलेल्या प्रदेशांची ही व्यवस्था लावण्याचें शिकंदर ठरवितो न ठरवितो तोंच त्याला कुणकूण लागली की, त्या प्रदेशातील अनेक भारतीय जनपदें आपण ' जिंकलेलीं ' आहोत हेंच मानावयास सिद्ध नाहीत! शिकंदर सिंधमध्ये असतानाच त्याच्या सत्तेविरुद्ध गांधारप्रांतात भारतीयांचें बंड झाल्याची वार्ता आली होती. तो गांधारकडे नवी नि भरपूर ग्रीक सेना धाडण्याचे वेतातही होता. पण पंचनदामध्ये शिकंदराची सत्ता झुगारून देण्याचा भारतीयांचा कट शिजतो आहे अशीही चिंताजनक कुणकूण सिंध देशातून शिकंदर ससैन्य परत फिरण्याचे आधीच कानावर आली असताही शिकंदरला झटपट काही करता येअीना. त्याच्या भारतावरील स्वारीत झालेल्या दगदगीने त्याचें सैन्यच काय तें थकलेलें होतें असें नाही, तर स्वत: त्याच्याही प्रकृतीवर ताण पडलेला होता. त्यातच त्याचें अतिरिक्त मद्यपानाचें व्यसनही बळावलें होतें. त्यामुळे अकस्मात् प्रकृति बिघडून अि. सन पूर्व ३२३ व्या वर्षी, म्हणजे तो हिंदुस्थानातून ससैन्य परत गेल्यावर अवघ्या दीड दोन वर्षांचि आतच ग्रीकांचा तो पराक्रमी सम्राट् नि सेनापति अलेक्झांडर बाबिलोन येथे मरण पावला.

भारतीय राजकारण्यांचें राष्ट्रीय षड्यंत्र

अलेक्झांडरची पीछेहाट होअून तो सिंधु नदीचे मार्गे परत फिरू लागला त्याच वेळी पंचनदात ग्रीकांविरुद्ध काही भारतीय राजकारणी पुरुषांचें राष्ट्र-स्वातंत्र्यार्थ अेक षड्यंत्र रचलें जात होतें. त्या षड्यंत्राचा अुद्देश ग्रीकांच्या हातात पडलेला सीमाप्रदेश मुक्त करण्यापुरताच काय तो नव्हता. तर साऱ्या भारताचा राजकीय कायापालट करण्याचा आणि त्याप्रीत्यर्थ अेका प्रचंड अंतर्गत राज्यक्रांतीचाच सूत्रपात करण्याचा होता. शिकंदर मेला नसता तरीही तें षड्यंत्र, हातीं घेतलेलें तें राष्ट्रीय राज्यक्रांतीचें भव्य, भीषण साहस करणारच होतें. तथापि शिकंदराच्या या अकस्मात् झालेल्या मृत्यूमुळे त्या भारतीय राजकारण्यांना अेक अनपेक्षित सुवर्णसंधिच मिळाल्यासारखें होअून त्यांनी त्या ग्रीकांची राज्यसत्ता अुखडून टाकण्यासाठी तत्काल अुठावणी केली.

ग्रीक गव्हर्नरांचा शिरच्छेद

ग्रीक सत्तेचे मुख्य राजप्रतिनिधि म्हणून शिकंदराने निकियान नि फिलिप या दोघांना भारतात ठेवलेलें होतें. हें वर सांगितलेंच आहे. शिकंदरच्या मृत्यूची बातमी येताच अश्विनी नांवाच्या गणराज्यात त्या दोघा ग्रीक गव्हर्नरां-पैकी फिलिप ह्याला अकस्मात् गाठून भारतीयांनी त्याचा शिरच्छेद केला आणि त्याच्या लहानशा ग्रीक पथकाचीही तीच वाट लावली. अतक्यात दुसरा अुरलेला ग्रीक गव्हर्नर जो निकियान त्यालाही कोणा भारतीयाने अकस्मात् झेप घालून ठार मारलें. त्यासरशी सिंधूच्या या तीरास असलेल्या ज्या ज्या भारतीय पंथांनी गण-राज्यांनी, राज्यांनी शिकंदराचें आधिपत्य मानलें होतें त्यांनी त्यांनी तें झुगारून देअून आपापलें राजकीय स्वातंत्र्य पुन्हा घोषित केलें ! ग्रीकांच्या वसती, ग्रीकांचे ध्वज, ग्रीकांच्या राज्याचें चिन्ह म्हणून जें जें जिथें दिसलें त्याचा त्याचा तिथेच नायनाट करून टाकण्यात आला. पंचनदापासून तो सिंधप्रांतसुद्धा सिंधुनदीच्या सीमापट्टीचा सिंधुसागरापर्यंतचा अिकडचा जो भारतीय भाग ज्याला शिकंदराने ' जिंकलेला ' म्हणून ग्रीक साम्राज्यात ' यावच्चंद्रदिवाकरौ ' म्हणून समावेशिलेला होता तो असा चुटकीसारखा स्वतंत्र झाला शिकंदराचा मृत्यु होताच अवघ्या सहा महिन्यांच्या आत !

शिकंदराने ग्रीस, सिरिया, पर्शिया, बाबिलोन, अिजिप्त असे देश, राज्यें नि साम्राज्यें जिंकलीं. तेथे आपल्या नांवाचीं नगरें स्थापिलीं, ग्रीकांच्या वसती (Colonies) वसविल्या. त्याच्या साम्राज्याच्या वाटणीनंतर त्याच्या ग्रीकाधि-कारी वर्गाचीं राज्यें बाबिलोनप्रभृति त्या त्या प्रदेशात शतकानुशतकें चाललीं. अजूनही अितर देशांत ' अलेक्झांड्रिया ' नांवाचीं त्याचीं नगरें अस्तित्वात आहेत, त्याचें नांव तर साऱ्या युरोपच्या प्राचीन अितिहासांतून ' दी ग्रेट ' या पदवीस पोचलेलें आहे ?

पण भारतात ? सतत दोन वर्षें अनेक संगरांत लढून, झुंजून, झगडून, लाखो ग्रीकांचें नि भारतीयांचें रक्त सांडून ज्या काही भारतीय प्रांतांना आपण आता नित्याचें जिंकलें असें समजून अलेक्झांडरने त्याच्या ग्रीक साम्राज्यास जोडून टाकले त्या प्रांतांनी शिकंदरची सत्ता, त्याचा ध्वज, त्याच्या ग्रीकांच्या वसती (Colonies), त्याच्या विजयाचें चिन्ह नि चिन्ह अुखडून दिलें–अवघ्या वर्ष सहा महिन्यांच्या आत ?

शेवटी त्याने स्थापिलेल्या अलेक्झांड्रिया नगराचा तर काय पण अलेक्झांडरच्या स्वत:च्या नांवाचा सुद्धा कोणताही थांगपत्ता भारतीय अितिहासात सापडेनासा झाला. जणू अलेक्झांडर या नांवाच्या कोण्या युरोपमध्ये ' दी ग्रेट ' म्हणून गाजू शकणाऱ्या म्लेंच्छ राजाची स्वारी भारतीय सीमेवर झालीच नव्हती ! वैदिक वा

मराठा ग्रंथ संग्रालय, ठाणे. स्थलप्रत
१ – चंद्रगुप्त चाणक्य ३८९५ वि: ६११
क्रमांक ५५१२

जैन वा बुद्ध अशा कोणत्याही भारतीय प्राचीन ग्रंथांतून अलेक्झांडरचा उल्लेख) ३।। सुद्धा अजून आढळलेला नाही.

व्हिसेन्ट स्मिथ हा आपल्या सुप्रसिद्ध 'Early History of India' या ग्रंथात लिहितो.

'All these proceedings prove conclusively that Alexander intended the permanent annexation of those (Indian) provinces to his empire . . . . . But within three years of his departure from India (from 325 B. C, to 322 B. C.) his officers in India were ousted, his garrisons destroyed and all traces of his rule had disppeared. The colonies which he founded in India, unlike those established elsewhere in Asiatic provinces took no root. His campaign, though carefully designed to secure a permanent conquest was in actual effect no more than a brilliantly successful raid on a gigantic scale which left upon India no mark save the horrid sears of a bloody war. India remained unchanged. She continued her life of splendid isolation and soon forgot the passing of the Macedonian Storm. No Indian author Hindu, Buddhist or Jain makes even the faintest allusion to Alexander or his deeds.' (Page 110)

भारतीय राजकारणाच्या ज्या राष्ट्रीय षड्यंत्राच्या स्फोटासरशी अलेक्झांडरच्या परराष्ट्रीय पारतंत्र्यातून पंचनद ते सिंधूपर्यंतच्या भारतीय प्रदेशांना असें अवघ्या वर्ष सहा महिन्यांच्या आत स्वतंत्र करण्यात आलें त्या षड्यंत्राचे प्रमुख नेते कोण कोण होते त्यांचीं नांवें अितिहासास ठाअूक नाहीत. तथापि त्यांतील दोघा पुरुषांचीं नांवें मात्र भारतीय अितिहासात अजरामर झालेलीं आहेत. अलेक्झांडर तक्षशिलेपर्यंत जेव्हा आला तेव्हाचें जें वृत्त वर सांगितलें आहे तिथे ज्या दोघा पुरुषांचा नामनिर्देश आम्ही केलेला आहे तेच ते दोघे पुरुष होत. पहिला म्हणजे तक्षशिलेच्या विद्यापीठात युद्धशास्त्राचें शिक्षण घेअून नवथरच बाहेर पडलेला तो तरतरीत तरुण चंद्रगुप्त आणि दुसरा म्हणजे त्या विद्यापीठात पूर्वी आचार्य असलेला नि नंतर त्या तरुण चंद्रगुप्ताला राज्यक्रांतीचे नि राज्यशास्त्राचे वस्तुपाठ सक्रिय रीत्या शिकविणारा – आर्य चाणक्य ! यापुढचें साऱ्या भारताचें प्रकट नेतृत्व तेच महापुरुष करणार असल्यामुळे त्यांचा पूर्वपरिचय अिथेच करून दिला पाहिजे.

चंद्रगुप्ताची कुलकथा

जगाच्या प्राचीन अितिहासातील बहुतेक थोर पुरुषांप्रमाणेच चंद्रगुप्त नि चाणक्य यांच्या चरित्रांवर दंतकथांची नि कल्पितांचीं दाट पुटें चढलेलीं आहेत

त्यांपैकी अनेक कथा निदान मनोरंजनासाठी तरी ज्यांना वाचाव्याशा वाटतील त्यांनी राधाकुमुद मुकर्जी यांचें ' Chandragupt Maurya & His Time ' हें पुस्तक वाचावें. वैदिक, जैन, बौद्ध, यांच्या प्राचीन वाङमयात विखुरलेल्या ह्या चंद्रगुप्त चाणक्याविषयीच्या अनेक कथांतून जें आमच्या मते या दोन महापुरुषांच्या पूर्वचरित्राविषयी ऐतिहासिक असें वृत्त वाटतें तेवढेंच अिथे देत आहो.

ज्या जातीत गौतमबुद्ध जन्मला त्या शाक्य जातीवर काही संकट गुदरल्यामुळे अेके काळी त्यांच्या काही टोळ्या दूर प्रांतात जाऊन निवसल्या. शाक्य आपणांस क्षत्रिय समजत. तथापि आपत्काल समजून ती निर्वासित झालेलीं शाक्य कुटुंबें तिकडे अुपजीविकेसाठी अितर व्यवसाय करू लागलीं. त्या रानात मोर फार असत. त्यांना पाळण्याचा नि विकण्याचा व्यवसाय ही मंडळी करू लागली. म्हणून त्यांना ' मोरिया ' असें नांव पडलें. त्यांची अेक पोटजातच बनली. ह्या 'मोरिया' जातीतील अेक कुटुंब पुन्हा पाटलीपुत्र नगराच्या आसमंतात परतलें होतें. त्यातील ' मुरा ' (मथुरा) नांवाच्या अेका महिलेचा पाटलीपुत्राच्या राजवाड्यातील अंत:पुरात कोणच्या तरी कारणाने प्रवेश झाला आणि त्या वेळचा नंदसम्राट् महापद्मनंद अुपाख्य धनानंद ह्याची दासी म्हणून ती नांदू लागली. त्या नंदसम्राटापासून त्या मुरा दासीला जो पुत्र झाला तोच पुढे प्रख्याति पावलेला सम्राट् चंद्रगुप्त होय.

तथापि ही कुळकथा चंद्रगुप्त पुढे जेव्हा सम्राट् झाला तेव्हा त्याला हीनपणा देणारी आहे असें वाटूनच की काय काही ग्रंथांतून पुढे कोणीतरी तीत अशी सुधारणा केली आहे की मुरादेवी ही नंदसम्राटाची दासी नव्हती, तर ती त्याची एक विवाहबद्ध राणी होती. म्हणजे चंद्रगुप्त हा दासीपुत्र नसून राज्ञीपुत्र होता.

परंतु काही ग्रंथांतून दिलेल्या तिसऱ्या अेका दंतकथेने तर ह्या दोन्ही मूळ कथांवर ताण करून लिहिलें आहे की, मुरेचा आणि नंदसम्राटाचा कोणताच संबंध नव्हता. तिला तिच्या जातीच्या यजमानापासून अेक पुत्र झाला तोच चंद्रगुप्त. पुढे आर्य चाणक्याच्या स्फूर्तीने नि साहाय्याने नि स्वत:च्या पराक्रमाने त्याने ह्या आपल्या निर्धन, सामान्य नि अप्रसिद्ध मातापित्यांचे पांग फेडले आणि नंदवंशाचे हातून सम्राट्पद छिनावून मौर्य राजवंशाची स्थापना केली.

कोणत्याही मनुष्याचें महत्त्व वा लघुत्व त्याच्या स्वत:च्या प्रकट गुणांवरून न ठरविता तो कोणत्या वंशात, जातीत, वा कुळात जन्मला ह्यावरून ठरविण्याची खोड सर्वच समाजांमध्ये या वा त्या प्रमाणात आढळून येते. त्यामुळेच काळ लोटत जातो तशा त्याच्या कुलवृत्तान्ताविषयी अशा लोककथा नाटक, काव्य, कादंबऱ्यांतून किंवा तोंडोतोंडी प्रसृत होतात. चंद्रगुप्ताला हीनत्व वा महत्त्व देण्यासाठी वर दिल्या आहेत त्यावाचून अितरही दंतकथा आहेत. पण वरील कारणांसाठी त्यांना अुल्लेखिण्याचें सुद्धा अिथे कारण नाही, स्थलही नाही.

चंद्रगुप्त दासीपुत्र होता ? तो क्षत्रिय नव्हता? तरी काय झालें? 'सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् । दैवायत्तम् कुले जन्म मदायत्तम् तु पौरुषम् ॥' हें अुत्तर ज्या वाण्याने महावीर कर्णाने त्याचा सूतपुत्र म्हणून अुपमर्द करणाऱ्यांना दिलें, त्याच यथार्थ स्वाभिमानाने चंद्रगुप्तही अुत्तरू शकता की, म्लेंच्छांच्या, त्या ग्रीकांच्या सम्राटाची नि सेनापतीची पायधूळ मस्तकी धारण करणाऱ्या तुम्हा केवळ नामधारी अशा 'जातिवंत' राज्ञीपुत्रांपेक्षा नि क्षत्रियांपेक्षा त्या म्लेंच्छांची रणांगणात धुळधाण अुडविणारा खड्गधारी असा मी 'गुणवंत' चंद्रगुप्तच खराखरा क्षत्रिय आहे !

मुरेचा पुत्र तो मौर्य. म्हणूनच चंद्रगुप्ताला मौर्य म्हणत. त्याच आपल्या मातृकुलागत अुपपदाचा अभिमान धरून चंद्रगुप्ताने सम्राट्पद मिळताच आपल्या राजवंशाला मौर्य वंश म्हणविलें आणि आपल्या जन्मदात्रीचें, मुरादेवीचें नांव भारतीय अितिहासात चिरंतन करून ठेविलें. त्याच्या आअीची जी जात मोरिया (मोर पाळणारी) म्हणून वर सांगितलेंच आहे तीच मौर्य सम्राटही आपली जात मानीत. मौर्य सम्राटाचें कुलदैवतही मोर हेंच मानलें जात असे. ह्याला आता शिलालेखांचा पुरावाही सापडला आहे. नंदनगडला सापडलेल्या अशोकस्तंभावर त्याच्या तळाशी मोराचें चित्र खोदलेलें आहे. त्याचप्रमाणे सांचीच्या सुप्रसिद्ध स्तूपावरही सम्राट् अशोकाच्या ज्या चरित्रकथा खोदलेल्या आहेत त्यांतून अशींच मोराचीं चित्रें खोदलेलीं आढळतात.

मगध सम्राट् महापद्मनंद

त्या वेळी मगधाच्या विस्तृत साम्राज्यावर महापद्मनंद हा राज्य करीत होता. त्याच्या अंगच्या अनेक दुर्गुणांमुळे तो लोकांना अत्यंत अप्रिय झालेला होता. त्याच्या अनावर धनतृष्णेपायी ती तृष्णा पुरविण्यास द्याव्या लागणाऱ्या करांच्या भाराखाली प्रजा रडकुंडीस आली होती. तिच्यात असंतोष माजलेला होता. ह्या त्याच्या धनतृष्णेचा अुपहास करण्यासाठी त्याला 'पद्मनंद' न म्हणता लोक त्याला 'धनानंद'च म्हणत. सम्राट्पदाला शोभेल असा अेकही गुण त्याच्यात नव्हता. केवळ मागच्या सम्राटाचा भाअू म्हणून तो राज्यपदावर चढला होता. जेव्हा अलेक्झांडर भारतावर चालून आला नि मगधावर स्वारी करून मी भारतसम्राट् होणार म्हणून अुघड अुघड घोषणा करू लागला, तेव्हाच जर ह्या मगधाचा सम्राट् म्हणविणाऱ्या महापद्मनंदाने तें आव्हान स्वीकारून अलेक्झांडरला पंचनदातच गाठला असता आणि आपल्या तेथील भारतीय प्रदेशांना ग्रीकांचा पाडाव करून मुक्त केलें असतें, निदान तसा बलवत्तर प्रयत्न तरी केला असता, तर त्याच्या सम्राट्पणाला काही अर्थ अुरला असता ! पण त्याने हूं कीं चूं केलें नाही. अलेक्झांडरने केलेला अुपमर्द निमूटपणे गिळला. या त्याच्या भित्रेपणाचा स्वाभिमानी

नि स्वराष्ट्राभिमानी अशा प्रत्येक भारतीयाला तिटकारा आला होता. तो भित्रा असे म्हणूनच तो कपटीही होत गेला. निःस्वार्थी नि राष्ट्राभिमानी अशा राजकारण्यांचा तो द्वेष करी. लोकांत त्यांची पत अुतरावी म्हणून अशा राष्ट्राभिमानी पुढाऱ्यांचा तो अुपमर्द करी. कर्ता मनुष्य पाहिला की त्याच्या कपाळास आठ्या पडत.

ह्याच सम्राट् महापद्मनंदापासून मुरा दासीला चंद्रगुप्त हा पुत्र झाला होता. चंद्रगुप्ताच्या लहानपणाच्या काही कथा आहेत. पण त्या थोडक्या नि केवळ दंतकथा आहेत. निश्चित जें दिसतें तें अितकेंच की तरुण चंद्रगुप्तासारखा तेजस्वी, तरतरीत, साहसी, महत्त्वाकांक्षी, दासीपुत्र असताही राजपुत्राचे अधिकार गाजवू पाहणाऱ्या आपल्या ह्या पुत्राचा त्या भेकड पण धूर्त अशा सम्राट् महापद्मनंदाला असा धाक वाटू लागला की न जाणो आपल्या विरुद्ध असणाऱ्या प्रबळ राजकारण्यांचा गट ह्या आपल्या अुच्छृंखल दासीपुत्राला हाती धरून आपल्यालाच सिंहासनावरून खाली ओढण्यास कचरणार नाही ! त्याच्या नंदवंशाने मगधाच्या मूळच्या शिशुनाग राजवंशाचा कसा अुच्छेद करून राज्य बळकावलें तें वृत्त त्या महापद्मनंदाच्या डोळ्यांसमोरच होतें. अशा कोणच्यातरी भयावह कारणामुळे खटका उडून त्या तरुण चंद्रगुप्ताला सम्राट् महापद्मनंदाने मगधराज्यातून सीमापार होण्याची शिक्षा दिली. यापुढचा वृत्तान्त अगदी अज्ञात आहे. तरुण चंद्रगुप्त जो पुन्हा प्रकट होतो तो तक्षशिलेच्या विद्यापीठात राज्यशास्त्र नि युद्धशास्त्र प्रभृति विद्यांचें शिक्षण घेत असलेला अेक राजकुमार म्हणूनच होय. तिकडे महापंडित म्हणून ख्याति पावलेल्या आर्य चाणक्याच्या पाठिंब्यानेच त्याला त्या विद्यापीठात शिरता आलें अशी जी कथा ग्रंथांतरी आहे तीत काहीतरी तथ्य असावें. चंद्रगुप्ताने काही सहा सात वर्षें तक्षशिलेत शिक्षण घेतल्यानंतर तिकडे अलेक्झांडरची पूर्वी वर्णिलेली स्वारी झाली. त्या वेळी ग्रीकांनी आपल्या भारतीय राष्ट्राच्या केलेल्या अुपमर्दाचें अुट्टें काढून त्यांनी जिंकलेला प्रदेश पुन्हा स्वतंत्र करण्यासाठी जें भारतीय राष्ट्रभक्तांचें नि राजकारण्यांचें आर्य चाणक्याच्या नेतृत्वाखाली मोठें षड्यंत्र रचलें गेलें म्हणून वर सांगितलें आहे त्यात आर्य चाणक्याचा हा पट्टशिष्य, हा तरुण चंद्रगुप्त, प्रथमतः आपल्या तेजाने तळपू लागला.

अितिहासातील अेक अद्भुत अर्धी घटका !

ग्रीकांच्या सैन्यरचनेतील, व्यूहातील, शस्त्रागारातील वैशिष्ट्यें तरी कोणतीं आहेत ती पाहणी स्वतः करावी ह्या हेतूने तरुण चंद्रगुप्त ग्रीकांच्या शिबिरात छद्मीपणे हिंडत असावा. कारण अेकदा तो त्यांच्या प्रत्यक्ष राजशिबिरातच असा लपत छपत टेहेळणी करीत असता ग्रीक पहारेवाल्यांनी त्यास संशयावरून पकडलें. स्वतः अलेक्झांडरपर्यंत तें वृत्त पोचून त्या ग्रीक सम्राटाने त्या अज्ञात तरुण

भारतीयास आपल्या समोर बोलाविलें. क्वचित् आधी भेट ठरवूनच तो तरुण अलेक्झांडरला भेटावयास गेला असेल असेंही काहींना वाटतें.

चाळिशीकडे झुकलेला तो प्रतापी ग्रीक सेनापति नि सम्राट् अलेक्झांडर आणि विशीच्या वेशीत शिरणारा तो भावी भारतीय सेनापति नि सम्राट् पण त्या वेळचा अेक भटकता तरुण चंद्रगुप्त अेकमेकांना काही क्षण न्याहाळीत राहिले! मध्यान्ह अुतरू लागलेला अेक सूर्य–अुषःकालाचे आवरणातून अजून पुरता बाहेर न आलेला तो अपर अुदयोन्मुख सूर्य जणू परस्पर सन्मुख आले !

अेक अर्धी घटकासुद्धा त्यांची ती भेट टिकली नसेल. पण अितिहासात चिरंतनपणे विस्मयावह वाटावी अशी ती अर्धी घटका अद्भुत ठरली खरी.

त्या भेटीचा अुल्लेख बहुतेक ग्रीक लेखक करीत असताही तिथे अलेक्झांडरशी त्या तरुण चंद्रगुप्ताचें काय बोलणें झालें याविषयी कोणीच नक्की काही सांगत नाही. 'मगधाच्या राजवंशाशी माझा संबंध आहे' असें काहीसें चंद्रगुप्त पुटपुटला, अेवढें अेकदोघांनी लिहिलें आहे. अेकंदरीत नक्की असें अितकेंच सांगता येतें की, अलेक्झांडरच्या प्रश्नांना चंद्रगुप्ताने बाणेदारपणे अुत्तरें दिलीं. त्या अुत्तर-प्रत्युत्तरात काही विकोप अुत्पन्न होअून शिकंदरने त्या तरुणाला तत्काळ शिबिराबाहेर काढून देण्याची आज्ञा सोडली. त्याप्रमाणे तो तरुण तेथून तत्क्षणी बाहेर पडला. पण मध्यंतरी अलेक्झांडरला काय वाटलें कोणास ठाअूक, त्याने काही वेळाने त्या तरुणास पुन्हा आपल्यासमोर घेअून येण्यास आज्ञापिलें. पण तो तरुण अितक्या वेगाने निसटला होता की, त्याचा शोध ग्रीक सैनिकांना पुन्हा कुठेच लागला नाही.

आर्य चाणक्याची कुलकथा

आर्य चाणक्य हा ब्राह्मण कुळात जन्मलेला होता. त्याचें मूळचें नांव विष्णु-गुप्त असें होतें. चाणक्य हें नांव त्याच्या मूळच्या चणक नांवाच्या गावावरून पडलें असावें. परंतु त्याचें आर्य चाणक्य हेंच नांव सुप्रसिद्ध आहे. त्याचें तिसरें कौटिल्य हें नांवही लोकप्रिय आहे. त्याचा महनीय नि मौलिकग्रंथ कौटिलीय अर्थशास्त्र ह्याच नांवाने विख्यात आहे. त्याचें गोत्र जें कुटल त्यावरून हें नांव पडलेलें असावें. त्या-वेळच्या बहुतेक शास्त्रांत तो पारंगत झालेला असून तक्षशिलेच्या विद्यापीठात नि भारतीय पंडितमंडळात महापंडित म्हणून त्याची कीर्ति दुमदुमत होती. दिसण्यात तो कुरूप होता. पुढे मगधात झालेल्या साम्राज्यीय राज्यक्रांतीत जेव्हा त्याचें नांव अखिल भारतातच नव्हे तर त्या वेळच्या ग्रीस प्रभृति जागतिक राज्यमंडळातही सम्राट् चंद्रगुप्ताचा लहानपणीचा मार्गदर्शक नि नंतरचा भारतीय साम्राज्याचा महामात्य म्हणून जगप्रसिद्ध झालें तेव्हा त्याच्या पूर्वचरित्राविषयीही चंद्रगुप्त किंवा अलेक्झांडरप्रमाणेच अनेक भाकड दंतकथा लोकांत प्रचलित झाल्या. चंद्रगुप्त नि चाणक्य हे दोघेही दिवंगत झाल्यानंतर शतकांचा काळ लोटल्यावर लिहिल्या गेलेल्या

अनेक ग्रंथांतून, नाटकांतून, लोककथांतून साधार असोत वा निराधार असोत पण अनेक अुल्लेख आलेले आढळतात. जैन, बौद्ध किंवा वैदिक वाङ्मयातील हे अुल्लेख सर्वस्वी विश्वसनीय नाहीत. अेका संस्कृत नाटकातही त्याची रंगविलेली भूमिका नाट्यप्रसंग रंगविण्यासाठी अवास्तवपणे वर्णिलेली आहे. यास्तव त्याच्या कुरूपते-विषयीची नि दाताविषयीचीं विक्षिप्त वर्णनें किंवा त्याने मागति खेळणाऱ्या अजाण नि ग्राम्य मुलांतून चंद्रगुप्त हया अेका हूड मुलाची भारताचा भावी सम्राट् करण्या-साठी केवळ लहर लागली म्हणून किंवा हस्तसामुद्रिकावरून निवड केली अशा गप्पा त्या प्राचीन ग्रंथांत दिलेल्या असल्या तरी, त्यांना ' गप्पां 'पलीकडे कोणतेंही अैति-हासिक मूल्य देअू नये. तथापि त्यांच्या मुळाशी काही अैतिहासिक तथ्यकणिका आहेत कीं काय याचा छडा अवश्य लावावा.

आर्य चाणक्याच्या प्रतिज्ञेची विकृत आख्यायिका

चाणक्याविषयीच्या अशा अेका आख्यायिकेची चर्चा, अुदाहरण म्हणून तरी अिथे केली पाहिजे. कारण ती आजच्या शालेय अितिहासांतून सुद्धा त्याच विकृत रूपात शिकविली जात आहे. ती आख्यायिका थोडक्यात अशी : "तक्षशिलेच्या विद्यापीठात नि तिकडच्या प्रदेशात महापंडित म्हणून प्रसिद्धि पावल्यामुळे पाटली-पुत्रात आर्य चाणक्याला सम्राट् महापद्मनंदाच्या प्रासादांत 'दानाध्यक्ष' पदावर नियुक्त करण्यात आलें. त्या अुच्चपदावर तो कार्य करीत असता अेक दिवस नंद-सम्राट् पहाणी करता करता तिथे आला. परंतु आर्य चाणक्याचें दातांवाचून विद्रूप झालेलें तोंड नि मूळचेंच कुरूप शरीर पाहून त्याने त्याची कुचेष्टा केली. तें न साहून चाणक्य संतापला. तेव्हा नंदाने त्यास तत्काळ खाली खेचून आणि काही ग्रंथांत लिहिलें आहे तशी त्याची शेंडी अुपटेतों ओढून त्यास राजप्रासादाबाहेर हुसकून पदच्युत करण्याची आज्ञा सोडली. तेव्हा त्या तेजस्वी ब्राह्मणाने ताडकन् अुत्तर दिलें की ' तुझ्या सिंहासनावरून तुलाही असाच खेचून तुझा नि तुझ्या नंदवंशाचा नायनाट करीन तेव्हाच पुन्हा शेंडीला गांठ बांधीन ! ' अशी प्रतिज्ञा करून तो राजवाड्यातून निघून गेला.

परंतु, सम्राट् नंद दानविभागाची पहाणी करण्यास तिथे आला होता, सौंदर्यविभागाची नव्हे ! तेव्हा ज्या महापंडिताला त्या नंदराजाने, स्वत:च दानाध्य-क्षाच्या अुच्चपदी नेमलें होतें तो केवळ कुरूपतेमुळे त्या अुच्चपदास अयोग्य आहे असें नंदराजा म्हणेल तरी कसा ? त्या कार्याध्यक्ष पदाला धर्मशास्त्रादिक पांडित्याची आवश्यकता होती. दैहिक सौंदर्याची नव्हे ! परंतु हया आख्यायिकेचा भाकडपणा ठरविण्यास अशा किरकोळ आक्षेपांपेक्षा जो खऱ्या महत्त्वाचा आक्षेप आहे तो असा की, चाणक्याच्या हया झालेल्या वैयक्तिक अपमानामुळेच काय तो चाणक्य नंद-सम्राटाविरुद्ध बंड करून अुठला असें ती आख्यायिका सूचित करते. म्हणजे जर

त्याचा हा वैयक्तिक अपमान झाला नसता तर तो नंदसम्राटाचा अेक राजनिष्ठ सेवकचा सेवक म्हणूनच राहिला असता ! त्याने जी भारतव्यापी प्रचंड राज्यक्रांति केली ती भारतीय राष्ट्राला म्लेच्छांच्या दास्यातून सोडवून स्वतत्र करण्यासाठी नव्हे तर केवळ आपल्या वैयक्तिक अपमानाचा सूड अुगविण्यासाठी होय ! म्हणूनच ही आख्ययिका विकृत आहे.

जेव्हा शिवाजी, राजकारणातील अेक हूल म्हणून औरंगजेबाचें आधिपत्य मानून आग्र्यास त्या मोंगल बादशहाच्या 'दरबारात' गेला, तेव्हा औरंगजेबाने त्याचा अपमान केला. त्यांत खटका अुडून शिवाजी बंदीत पडला. पण तेथून चातुर्याने निसटून जाअून त्याने औरंगजेबाशी अुघड युद्ध मांडलें आणि स्वत:चें स्वतंत्र राज्य स्थापलें. अशी कथा सांगून जर कोण्या शहाण्याने निष्कर्ष काढला की स्वत:चा वैयक्तिक अपमान केला म्हणूनच काय तें शिवाजीने औरंगजेबाशी वैर केलें नि आपलें स्वत:चें राज्य स्थापलें, त्यात स्वधर्माच्या नि स्वराष्ट्राच्या राजकीय मुक्ततेचा हेतुबितु नव्हता, तर तें जितकें विकृत नि वेडगळ कथन होअील तितकीच आर्य चाणक्याचा तो वैयक्तिक अपमान नंदराजाने केला म्हणूनच काय ती चाणक्याने नंदवंशाचें अुन्मूलन करून ती भारतीय राज्यक्रांति केली असें सुचविणारी ही आख्यायिकाही अगदी असत्य नसली तरी विकृत नि अर्धवट आहे.

ती आख्यायिका अशी अुलगडून शिकवावी

शिवाजीचा अपमान झाला म्हणून त्याने औरंगजेबाविरुद्ध बंड केलें असें नसून औरंगजेबाची परधर्मीय सत्ता अुलथून टाकण्यासाठी हिंदुत्वाच्या अभिमानाने शिवाजी बंड करतो आहे अशी धास्ती औरंगजेबाने खाल्ली होती म्हणून त्याने शिवाजीस अपमानून बंदीत टाकलें असा खरा कार्यकारणभाव आहे. त्याचप्रमाणे आर्य चाणक्य हा आपणांस दुबळे लेखून मगध साम्राज्याची सत्ता आपल्या हातून छिनावून घेण्यासाठी अेक राष्ट्रीय षड्यंत्र रचीत आहे असें गुप्त वृत्त महापद्मनंदाला आधीच ठाअुक झाल्यामुळे नंदाने त्याचा राजवाडयात असा कोणता तरी अुपमर्द केला आणि त्यासरशी त्या तेजस्वी ब्राह्मणाने 'तुझ्या प्रपीडक सत्तेचें अुन्मूलन करून भारताचा अुद्धार करीन तरच मी खरा चाणक्य' अशा आशयाचें प्रत्युत्तर दिलें असा कार्यकारण भाव प्रतिपादिला पाहिजे. तोच सर्व वस्तुस्थितीशी जुळतो.

कारण ह्याचा बळकट पुरावा स्वत: चाणक्याने रचिलेल्या 'कौटिलीय अर्थशास्त्र' ह्या ग्रंथातच आपणांस सापडतो. त्या ग्रंथात स्वत: ग्रंथकाराचा परिचय करून देताना म्हटलें आहे.

चाणक्य इति विख्यात: श्रोत्रिय: सर्वधर्मविद् ॥
येन शस्त्रं च शास्त्रं च नंदराजगता च भू: ।
अमर्षेणोद्धृतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम् ॥

'नंदाचा अुच्छेद करून त्याच्या सत्तेत अधःपात होत चाललेल्या राष्ट्रीय शस्त्रशक्तीचें, शास्त्रशक्तीचें नि ह्या भारतभूमीचें अुद्धरण ज्याने केलें त्याने हा ग्रंथ लिहिला आहे.' आपल्या वैयक्तिक अुपमर्दाचा सूड म्हणून त्याने नंदाचा निःपात केला अशा आशयाचा चकार शब्दही त्या परिचयाच्या श्लोकात अुल्लेखिलेला नाही. स्वराष्ट्राच्या आणि मातृभूमीच्या अुद्धारार्थ नंदाचा निःपात केला असें स्वतः चाणक्याचा ग्रंथच सांगत आहे !

चाणक्याच्या ह्या राष्ट्रमूलक नंदद्वेषास नंदाने मागाहून केलेल्या वैयक्तिक अुपमर्दाने अधिक धार चढली असेल अितकाच काय तो त्या अतथ्य अशा नाटकी पणाच्या भागेत सांगितलेल्या आख्यायिकेत सत्याचा अंश असावा.

शिकंदरच्या स्वारीच्या पूर्वीपासूनच चाणक्याच्या राजकारणाचा आरंभ

तक्षशिलेच्या परिसरात चाणक्याचें वास्तव्य शिकंदराच्या स्वारीच्या आधी कितीतरी वर्षें होतें. भारताच्या तिकडील सिंधूपर्यंतच्या सीमाप्रदेशांच्या राजकीय परिस्थितीचा त्याने प्रत्यक्ष परिचय करून घेतलेला होता.

भारताच्या या सीमाप्रदेशाला लागूनच अिराणचें प्रचंड, संघटित, अेककेंद्र नि अेकराष्ट्र असें शत्रुराष्ट्राचें साम्राज्य पसरलें होतें. तशा कोण्या भारतविद्वेषी संघटित साम्राज्याने स्वारी केली असता त्या सीमेवरील हिंदुकुश ते पंचनद नि सिंधपर्यंत पसरलेली आमचीं भारतीय स्वतंत्र शूर पण लहान लहान विलग नि विघटित गणराज्यें नि राज्यें रणांगणात कधीच अेकअेकटी पुरी पडणार नाहीत हें चाणक्याचें ठाम मत झालेलें होतें.

ग्रीकांचीं गणराज्येंही ह्यामुळेच बुडालीं

अितक्यात ग्रीसमध्ये वरील सिद्धान्ताचें समर्थन करणारें अेक प्रात्यक्षिकच घडलें. अिराणच्या सम्राटाने ग्रीसवर स्वारी करताच भारताप्रमाणे पसरलेल्या ग्रीकांच्या लहान लहान गणराज्यांचीं हाडें नि हाडें घुसळून निघालीं. शेवटी त्या सर्व फुटकळ ग्रीक संस्थानांना जिंकून जेव्हा फिलिफने नि अलेक्झांडरने ग्रीकांचे अेक संघटित नि बलाढ्य साम्राज्य बनविलें तेव्हा काय ती त्यांना अिराणी साम्राज्यावर मात करता आली. हेंही चाणक्याच्या चाणाक्ष दृष्टिक्षेपातून सुटलें नाही.

त्याने निर्धार केला की भारताचें स्वातंत्र्य रक्षिण्याचा आणि त्याची राज्यशक्ति बलाढ्य नि अजिंक्य करण्याचा, शत्रुस्थानी असलेल्या या विस्तृत साम्राज्याच्या अस्तित्वामुळे नि शत्रुत्वामुळे, त्या परिस्थितीत अेकच अुपाय होता नि तो हाच की हीं सारीं लहान सहान राज्यें नि गणराज्यें चितळवून टाकून त्यांचें अेकात्म, अेककेंद्र नि प्रबळतम असें अखिल नि अखंड भारताचे अेकछत्री साम्राज्य

स्थापिलें पाहिजे. परंतु ह्या त्याच्या निर्धाराचा गांधार, पंचनद, सिंध प्रभृति तिकडच्या प्रांतांतून जें पाठपुरावा करू शकेल असें अेकही भारतीय गणराज्य किंवा राज्य तिकडे नव्हतें. चाणक्याने त्यांची सर्वांची शक्ति नि प्रवृत्ति मोजून मापून पाहिलेली होती. त्यामुळे साऱ्या अुत्तर भारतात साम्राज्य ही पदवी ज्याने आधीच संपादिलेली होती अशी जी अेकच राज्यसंघटना, राज्यशक्ति, साम्राज्यसंस्था अुरलेली होती त्या मगधसाम्राज्याकडे चाणक्याची दृष्टि वळली. ह्या नियोजित भारतीय राज्यक्रांतीच्या प्रेरणेने भारावलेला आर्य चाणक्य मगधराज्याची झोपडी-पासून तो सम्राटाच्या राजवाड्यापर्यंत गुप्तपणे छाननी करण्यासाठी मगधास पुन्हा आला. त्याप्रमाणे तो काही मिषाने राजप्रासादात वावरण्याच्या प्रयत्नात होता. तोपर्यंत चाणक्य हा महापंडित आहे अेवढेंच काय तें नंदसम्राटाला ठाअूक होतें. त्यामुळे तसा प्रश्न निघताच दानाध्यक्षपदाच्या अुच्च स्थानावर आर्य चाणक्याची नियुक्ति करण्यास नंदाने आक्षेप घेतला नाही. तें पद स्वीकारल्यामुळे चाणक्यालाही त्याच्या षड्यंत्रास हवें तें साहाय्यच मिळालें.

परंतु काही काळानंतर चाणक्य हा नुसता अेक महापंडित काय तो नसून अेक कूटनीतिज्ञही आहे आणि आपल्याविरुद्ध त्याचे काहीतरी भयंकर कट चालू आहेत अशी कुणकूण कानावर आल्यावरून सम्राट् नंदाने त्याचा चारचौघांत कसा अुपमर्द केला, त्याला पदच्युत करून राजवाड्यातून काढून देअून मगधराज्यातून कसें सीमापार केलें तो वृत्तान्त वर दिलाच आहे. सीमापार झाल्यामुळे चाणक्य पुन्हा तक्षशिलेकडे गेला.

मध्यंतरी त्या राष्ट्रभक्ताच्या अखिल भारतीय साम्राज्य स्थापण्याच्या महान् कार्याला अत्यंत अनुकूल अशी अेक घटना घडली. ती ही की मागे, सांगितल्याप्रमाणे नंदसम्राटाने त्याच्या दासीपुत्र असलेल्या तरुण चंद्रगुप्तालाही सीमापार केल्यामुळे तोही तक्षशिलेकडे जाअून आर्य चाणक्याला मिळाला.

चंद्रगुप्तालाच चाणक्याने कां पाठिंबा दिला ?

दुबळ्या नि दुष्ट नंदाला पदच्युत करून त्याचे स्थानी कोण्या तरी अुपटसुंभ पुरुषाला तो गुणवंत असला तरी केवळ बळाने मगध सम्राटपदावर स्थापू गेले असता सामत मंडळातील, भारतीय राजमंडळातील, नि जनतेतील परंपराप्रिय अशा अनेकांचा फार मोठा विरोध झाला असता. परंतु चंद्रगुप्त हा दासीपुत्र असला तरी राजपुत्रच असल्यामुळे त्याचा त्या सिंहासनाशी काहीतरी जन्मसिद्ध रक्तसंबंध होताच होता. त्यातही पराक्रमादिक गुणांनी तो संपन्न होता. त्यामुळे वरील परंपरा-प्रिय शक्तीचाही त्यास तितका तीव्र विरोध होण्याचा संभव फार थोडा होता हें कूटनीतिज्ञ चाणक्याच्या तेव्हाच ध्यानात आलें, आणि त्याने चंद्रगुप्ताचाच पक्ष घेअून त्याला मगधसम्राट्-पदावरच नव्हे, तर भारतीय सम्राट्पदावर अधिष्ठित करण्याचा दृढ निश्चय केला.

चाणक्य चंद्रगुप्ताच्या भारत साम्राज्य स्थापण्याच्या षड्यंत्राचें असें सूतोवाच होत आहे तोंच चाणक्याने तर्किली होती ती अशुभ घटना तिकडे अिराणकडे घडून आली. ग्रीकांच्या नवसाम्राज्याचा जो नेता अलेक्झांडर त्याने अिराणचें साम्राज्य बुडवून भारतावर स्वारी केली. मागे वर्णिल्याप्रमाणे त्या संकटात भारतीयांच्या प्रतिकाराने शिकंदराची पिछेहाट करून त्याला जरी स्वदेशी परत फिरणें भाग पाडलें, तरी त्या संघटित नि साम्राज्यीय म्लेंच्छशक्तीचा निर्णायक पराभव असा आपणांस करता आला नाही.

वाअिटातूत चांगलें अितकेंच झालें की चाणक्यादिक राष्ट्रीय द्रष्टे जें सांगत होते की शत्रूचें साम्राज्य जसें अेककेंद्रित, विस्तृत पण संघटित नि अेकराट् झालेलें आहे तसें भारतीय साम्राज्य स्थापिल्यावाचून त्या परिस्थितीत भारतीय स्वातंत्र्य रक्षिणें अशक्य आहे हें त्या सीमाप्रदेशीय गणराज्यांतील लोकसत्ताप्रिय भारतीयांनाही, त्यांनाच ती ठेच खावी लागल्याने, पटू लागलें.

ह्या क्रांतिकारक वृत्तीच्या प्रसाराचें पहिलें प्रसादचिन्ह म्हणजे हें होतें की सिंधपर्यंत जे जे भारतीय प्रांत शिकंदरने जिंकून त्याच्या साम्राज्यात समाविष्ट केलेले होते त्यांच्यांत शिकंदर परतताच सामुदायिक अुठावणी होअून मागे वर्णिल्या-प्रमाणे शिकंदरच्या मरणाच्या वर्ष सहा महिन्यांचे आत ते सारे भारतीय प्रांत ग्रीकांचें दो दिवसांचें आधिपत्य झुगारून देअून स्वतंत्र झाले. ह्या आश्चर्यकारक नि अभिमानास्पद सामुदायिक अुठावाचें श्रेय जस्टिन (Justin) हा प्राचीन नि प्रसिद्ध ग्रथकार स्पष्टपणे चंद्रगुप्ताच्याच पुढारीपणाला देतो. "India after the death of Alexander had shaken as it were, the yoke of servitude from its neck and put his governors to death. The author of this liberation was Sandrocottus" या अुतार्‍यातील 'स्यान्ड्रोकोटस' म्हणजेच चंद्रगुप्त. ग्रीक लेखक चंद्रगुप्त नांवाचा अुच्चार नि अुल्लेख असाच करीत नि लिहीत.

ग्रीक साम्राज्यीय सेना भारतावर पुन्हा स्वारी करणार हें नक्की; त्याचा प्रतिकार असा :

वर दिलेल्या सीमाप्रांतीय भारतीयांची चंद्रगुप्त-चाणक्यादिकांच्या नेतृत्वा-खालील सामुदायिक अुठावणी अशी यशस्वी झाली तरीही तिने भारतीय स्वातंत्र्य ग्रीकांच्या आक्रमणापासून अगदी निर्भय झालें असें नव्हे असें चाणक्याचे हस्तक सर्व राजमंडळाला वजावू लागले. त्यांनी सर्वत्र अशा प्रचाराचा धुमधडाका चाल-विला की, स्वत: शिकंदरच भारत विजयासाठी मी पुन्हा स्वारी करणार आहे म्हणून मरेतो प्रतिज्ञा करीतच होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या प्रमुख सत्ताधिकाऱ्यांत नि सेनाधिकाऱ्यांत सध्या ग्रीक साम्राज्याच्या विभागणीविषयी लढा चालू झाला आहे, त्यात जो कोणी ग्रीक सेनापति भारताच्या सीमेस भिडलेल्या बाबिलोनचा

राज्याधिकारी होअील तो भारतावर पुन्हा पहिल्याहून प्रबळतर स्वारी केल्यावाचून राहणार नाही. आणि तिला पहिले बळी पुन्हा तुम्ही पडाल, जर असेच फुटकळ फुटकळ राजकें, प्राजकें बनवून असंघटित रहाल तर ! पण जर ग्रीक साम्राज्यात चाललेल्या या ग्रीकांच्या यादवीची संधि आपण साधली आणि सिंधुसागरापासून गंगासागरापर्यंत सारा भारत अेका प्रबळ साम्राज्यात विलीन करून अेकछत्र करू शकलो तर त्या ग्रीकांच्या म्लेंच्छ साम्राज्याहून प्रबळतर असें आपलें भारतीय साम्राज्य, ते म्लेंच्छ पुन्हा स्वारी करून आलेच तरीही, त्यांची हड्डी न् हड्डी नरम केल्यावाचून राहणार नाही ! तरी सारें भारत अेकाराष्ट्र करा !

चंद्रगुप्तचाणक्यांची मगधावर स्वारी

ग्रीकांत चाललेल्या वरील यादवीच्या संधीचा अेक क्षणही वाया न दवडता चाणक्याच्या राज्यक्रांतीच्या आराखड्याप्रमाणे प्रथम मगधावर चालून जाण्यासाठी त्याचे चंद्रगुप्तादिक अनुयायी अुघडपणे सैन्य अुभारू लागले. त्याविषयी काही स्पष्ट पण अगदी मोजके अुल्लेख ' महावंश ' टीकेसारख्या अगदी थोड्या ग्रंथांत सापडतात. त्या नि अितर आधारांवरून असें दिसतें की, त्या सैन्यात बहुतेक भरणा अेकराष्ट्र असें भारतीय साम्राज्य अुभारण्याच्या चाणक्याच्या प्रचाराने अुद्दीपित झालेल्या पंचनदीय, पार्वतीय नि गणराज्यीय सैनिकांचाच होता. ह्या आपल्या विकट कार्याला पाठिंबा मिळविण्यासाठी स्वतः चाणक्य ' पर्वतेश्वरास ' म्हणजे तिकडील अेक प्रस्थ असलेल्या पौरव राजासही गुप्तपणे जाअून भेटल्याचा अुल्लेख आहे. अलेक्झांडरची राजसत्ता भारतातून अुखडली गेल्यामुळे राजा पौरव हाही आता क्षत्रप म्हणून ग्रीकांचा अंकित राहिलेला नव्हता. चाणक्याचे कार्यास राजा पौरवाचा पाठिंबाच नव्हे, तर काही धनिजनांचें प्रत्यक्ष साहाय्यही मिळालें असें ग्रंथांतरीच्या अुल्लेखावरून दिसतें. चाणक्य हा ह्या सर्व सैन्याचें सेनापतित्व चंद्रगुप्तास देत गेला. पंचनदातील शक्य त्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापून ते वेगाने मगधावर चालून गेले. नंदाच्या प्रपीडक नि दुबळ्या राजवटीची चीड आलेली, आणि चाणक्याने प्रचारिलेल्या अेकछत्री नि अखंड अशा भारतीय साम्राज्याच्या ध्येयाने अुत्स्फूर्त झालेली भारतीय जनता नि सत्ताकेंद्रें चंद्रगुप्ताच्या सैन्यास, तें लढत लढत जसें पुढे चाललें तशीं तशीं मिळत गेलीं.

ह्या झंझावाती अभियानात चंद्रगुप्त नि चाणक्य ह्यांना कित्येक वेळा अगदी जिवावरच्या संकटांनाही तोंड द्यावें लागलें. अेकदा तर त्यांचें सारें सैन्य विरोधी सैन्याच्या निकराच्या माऱ्यामुळे अुधळून गेलें. जीव बचावण्यासाठी स्वतः चंद्रगुप्त नि चाणक्य हे रानावनात पळून गेले. अेक रात्र त्यांना नुसत्या अुघड्या भूमीवरच निजावें लागलें. पण अशा कोणत्याही संकटाने हतोत्साह न होता स्वकीय सैन्याची

पुन:पुन्हा जुळणी करून चंद्रगुप्त नि चाणक्य सारखे पुढे घुसत पाटलीपुत्राच्या, त्या प्रत्यक्ष राजधानीच्या, परिसरात येऊन थडकले.

कूटनीतिपटु चाणक्याच्या गुप्त कारस्थानांनी नंदाचें सैन्य नि राजधानी आधीच पोखरून ठेवलेली होती. त्या आधारावर साहसी चंद्रगुप्त अेखाद्या तीरासारखा पाटलीपुत्रावर तुटून पडला.

महापद्मनंदाचा शिरच्छेद

राजधानीच्या चारी बाजूंनी कडक नाकेबंदी करीत चंद्रगुप्ताचें सैन्य पाटलीपुत्र नगरात घुसताच त्या राजधानीत जिकडे तिकडे अेकच गोंधळ अुडाला. स्वतः चंद्रगुप्त राजवाड्यात शिरला. परंतु महापद्मनंद त्या सार्वत्रिक गोंधळात राजवाड्यातून आधीच वाहेर पडला होता. तो गुप्तपणे राजधानीबाहेर निसटून जाअू लागला असताना मार्गातच धरला गेला. तत्काळ तेथे त्याचा शिरच्छेद करण्यात आला.

सम्राट् चंद्रगुप्तकी जय !

लगोलग चंद्रगुप्ताची मगधाचा सम्राट म्हणून सर्वत्र घोषणा करण्यात आली. त्याने आपल्या मातेच्या मुरा ह्या नांवास अनुसरून मौर्य हें अभिधान धारण केलें. त्यामुळे तो नि त्याचा राजवंश अितिहासात मौर्य ह्या नांवानेच चिरंतन प्रख्याति पावला. सम्राट्पदावर अधिष्ठित होताच त्यानें आपल्या साम्राज्याच्या मुख्य प्रधानपदी आर्य चाणक्याची नियुक्ति केली. ही घटना अि. सनपूर्व ३२१ व्या वर्षाचे जवळपास घडली.

शिकंदर अिसवी सनपूर्व ३२३ मध्ये मरण पावला. तेव्हा सर्वत्र विस्कळीत नि हतोत्साह झालेल्या ह्या अुत्तर भारताचें स्वातंत्र्य नि राज्यशक्ति पुन्हा प्रस्थापित करणारी ही प्रचंड राज्यक्रांति सम्राट् चंद्रगुप्त नि आर्य चाणक्य ह्या दोघा भारतीय महापुरुषांनी अवघ्या दोन वर्षांचे आत, अिसवी सनपूर्व ३२१ व्या वर्षाचे जवळपास, अितक्या यशस्वीपणाने घडवून आणली ! तिकडे शिकंदराच्या ग्रीक साम्राज्यात मात्र ग्रीक सामंत आपआपसातल्या यादवी युद्धातच लढत बसले होते ! या अनुकूल संधीचा लाभ घेण्यासाठी चाणक्याने अेक क्षणही विसावा न घेता साऱ्या साम्राज्यात अंतर्गत शांति नि सुव्यवस्था स्थापण्यास तत्काल आरंभ केला.

चाणक्य नीतीचा मूळ दंडक 'प्रथम शस्त्रबळ'

परंतु अेकछत्र साम्राज्याची शांतता नि सुव्यवस्था ही सुद्धा शेवटी त्या साम्राज्याच्या मूलाधार असलेल्या दंडशक्तीवरच अवलंबून असते. हा तर चाणक्य राजनीतीचा मूलदंडक होता. क्षात्रतेज, शस्त्रशक्ति, हीं समाजाच्य

केवळ राजकीय अंगाचाच नव्हे, तर साऱ्या समाजजीवनाचा प्राण होय. क्षात्रधर्म दुबळा झाला तर सारे धर्म, सारीं शास्त्रें, साऱ्या कला, राष्ट्राचें जीवनचें जीवन बुडालेंच म्हणून समजा ! 'सर्वे धर्माः प्रक्षयेयुर्विवृद्धाः । क्षात्रे त्यक्ते राजधर्मे पुराणे ।। पायावाचून भव्य भवन, तसें सैन्यशक्तीवाचून साम्राज्य नुसत्या वाऱ्याच्या वादळानेही कोसळणारच.' हें ज्याच्या राजनीतीचें सूत्र त्या आर्य चाणक्याने सर्वांआधी त्या नूतन साम्राज्याच्या रक्षणार्थ प्रबळ, विनियंत्रित, जयिष्णु वृत्तीने भारलेलें असें प्रचंड सैन्य अुभारण्याचें कार्यही कडोनिकडीने चालविलें. अितक्या झपाट्याने की अवघ्या तीन चार वर्षांच्या आत सम्राट् चंद्रगुप्ताच्या बलाढ्यतेचा विश्वास त्याच्या प्रजाजनांना नि दरारा भारताच्या शत्रूंनाही वाटू लागला.

अशा कटाक्षाने नि कडोनिकडीने अुभारलेल्या ह्या चंद्रगुप्ताच्या प्रचंड सैन्यबळाची संख्या किती होती ?

अवघ्या चार पांच वर्षांपूर्वी चंद्रगुप्तचाणक्यांनी पंचनदात जेव्हा अखंड नि अखिल भारताच्या अेकछत्री साम्राज्याचा नि स्वातंत्र्याचा गुप्त संकल्प केला तेव्हा त्यांचें सैन्यबळ होतें अक्षरशः शून्य ! त्या शून्यापासून प्रारंभ करणाऱ्या त्याच सम्राट् चंद्रगुप्ताचें आज शस्त्रसज्ज नि कटिबद्ध सैन्य बळ आहे सहा लक्ष पायदळ, तीस सहस्र घोडेस्वार, दोन सहस्र लढाअू हत्ती आणि चार सहस्र रथ!!

ह्या बलाढ्य सैन्यशक्तीच्या प्रभावाने चाणक्याने अुत्तर भारतातील लहानसहान पण फुटकळपणे स्वतंत्र राहू अिच्छिणाऱ्या राजकांची, प्राजकांची नि संघांची बजबजपुरी मोडून टाकून शांतता नि अेककेंद्रित सुव्यवस्था प्रस्थापिली. शेवटी सिंधुनदीच्या अिकडल्या तटापर्यंतचे पंचनद, पार्वतीय भाग आणि सिंध हे प्रदेशही सम्राट् चंद्रगुप्ताच्या मौर्य साम्राज्यात समाविष्ट करून टाकले.

याप्रमाणे आमच्या अैतिहासिक काळातील सिंधु नदीपर्यंतचें अेकसंध असें भारतीय साम्राज्य प्रथमच प्रस्थापित झालेलें पाहून कोणाही राज्यधुरंधराला नि भारतीय सम्राटाला कृतकृत्यता वाटली असती तर तीही शोभून दिसली असती. पण–

सिंधु नदी नव्हे : भारताची नैसर्गिक नि सामरिक सीमा आहे हिंदुकुश !

पण चंद्रगुप्त चाणक्यांना सिंधुनदीच्या तटापर्यंतच काय ती भारतीय साम्राज्याची सीमा भिडविण्यात काही केल्या तशी कृतकृत्यता वाटेना. त्यांची प्रतिज्ञा होती अखिल नि अखंड अशी भारतीय साम्राज्याची प्रस्थापना आणि अुद्दंड म्लेंच्छांचें पारिपत्य ! परंतु त्या काळी भारतीय राष्ट्राची सीमा सिंधुनदीच्या अिकडच्या तटापुरतीच काय ती मानली जात नसे. तर सिंधुनदीच्या तिकडच्या तटाच्याही पलीकडे गांधार प्रभृति प्रदेशांना नि कुभा (आजची काबूल), क्रमू

(आजची कुर्म) सुवास्तु (आजची स्वात), गोमती (आजची गुमल) प्रभृति आज अफगणिस्थानात गेलेल्या पण पूर्वी आपल्या भारतीय सीमेत असलेल्या सिंधूपलीकडील वेदविख्यात नद्यांना सामावून हिंदुकुश पर्वताच्या शिखरापर्यंत विस्तारलेली असे; तेथपर्यंत आमची वैदिक धर्मानुयायी किंवा भारतवंशीय जनपदें निवसलेलीं असत. त्यावर परंपरागत भारतीय राजे राज्य करीत आलेले होते. भारताच्या त्या हिमशीतल प्रदेशातील आमचे लोक सापेक्षत: गौरवर्णाचे असल्यामुळे या प्रांताला कोणी कोणी 'श्वेतभारतही' म्हणत. यास्तव सिंधुनदीच्या या अिकडच्या तटापर्यंत थडकलेल्या आपल्या साम्राज्याच्या संरक्षक सैन्याचा कडेकोट प्रबंध करून चाणक्य-चंद्रगुप्तांची राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा अखिल भारताची नैसर्गिक सीमा असलेल्या हिंदुकुश पर्वताच्या शिखरांवर त्या साम्राज्याचा ध्वज कसा रोवता येअील या चिंतेत नि चिंतनात, योजनेत नि साधनेत व्यग्र होअून गेली. 'यत्कांक्षन्ति तपोभिरन्यमुनय: तस्मिन् तपस्यन्त्यमी ।'

ग्रीकांच्या साम्राज्यातील यादवी नि विभागणी

अितक्यात तिकडे ग्रीकांच्या यादवी युद्धाचा तात्पुरता का होअीना पण शेवट झाला. त्यांच्या शिकंदरी साम्राज्याची वाटणी झाली. तीत भारतीय सीमेस लागून असणाऱ्या बाबिलोनकडील ग्रीक साम्राज्याचा विभाग, शिकंदरचा अेक शूर कसलेला सेनापति नि सत्ताधिकारी जो सेल्युकस निकेटर त्याचे वाटचास आला· त्यावर त्याचें संपूर्ण नि स्वतंत्र आधिपत्य स्थापिलें गेलें. अितकेंच नव्हे तर त्याच्या त्या राज्यास लागून असलेल्या हिंदुकुशपासूनच्या शिकंदरने पूर्वी जिंकलेल्या भारतीय प्रदेशांचें स्वामित्वही सेल्युकसच्याच वाटचास आलें.

म्हणून भारतीय प्रदेशांपैकी पंचनद ते सिंध देशासुद्धा जो भाग मध्यंतरी स्वतंत्र करून सम्राट् चंद्रगुप्ताने आपल्या भारतीय साम्राज्यात समाविष्ट केलेला होता तो आमचा आम्हांस परत द्या अशी मागणी त्या ग्रीकांचा राजा सेल्युकस ह्याने चंद्रगुप्ताकडे केली ! अर्थात् सेल्युकसच्या हें ध्यानात आलें नाही की, ग्रीकांची गाठ आता मागच्याप्रमाणे कोण्या तक्षशिलेच्या अंबुज राजाशी किंवा कोण्या महामात्य नेभळूशी नव्हती ! – तर ती होती राजा चंद्रगुप्ताशी नि महामात्य आर्य चाणक्याशी ! त्यांनी सेल्युकसची ती वाष्कळ मागणी तर धुडकावून लावलीच, पण अुलट मागणी केली की, सिंधूपार असलेला गांधार ते हिंदकुशपर्यंतचा जो भारताचा भूभाग ग्रीक बळकावून बसलेले आहेत तोही सेल्युकसने तत्काळ भारतास परत दिला पाहिजे !

तुंबळ ग्रीक सेनेसह राजा सेल्युकसची भारतावर स्वारी !

त्यामुळे चवताळून सेल्युकस हा शिकंदराच्या हाताखाली कसलेल्या ग्रीक सैन्यानिशी, अिसवीसन पूर्व ३१५ च्या जवळपास, सिंधु नदी ओलांडून भारतावर

स्वारी करता झाला. शिकंदरची पहिली न गाजलेली अि. सन पूर्व ३२९ ची गांधार-कडील लहानशी स्वारी सोडून दिली असता त्याने सिंधु ओलांडून अि. सनपूर्व ३२७ त केलेल्या नि मागे सविस्तर वर्णिलेल्या त्या पहिल्या स्वारीनंतर सिंधु ओलांडून आलेली ग्रीकांची भारतावरील ही दुसरी स्वारी होय!

परंतु या वेळी सिंधु नदी अुतरून सेल्युकस पुढे येताच त्याला तीं पूर्वीचीं शिकंदरच्या वेळचीं भारतीय राज्य-गणराज्यांची फुटकळ फुटकळ सैन्यें कोठेच दिसेनात! मध्यंतरीच्या काळात चंद्रगुप्त-चाणक्यांच्या प्रयत्नामुळे नि पराक्रमामुळे भारताचा जो राजकीय नि सामरिक कायाकल्प झालेला होता तो पाहून सेल्युकस चकित झाला, गोंधळला! सिंधुनदीच्या पंचनदाच्या या टोकापासून तो अगदी थेट सिंधुसागरापर्यंत भारतीय राष्ट्राच्या संघटित, अेकछत्री, अेककेंद्री, अेकसंचालित अशा चतुरंग नि प्रबळ सैन्याची पोलादी भिंतची भिंत त्याला अडविण्यास शस्त्र-सज्ज अुभी असलेली आढळली! आणि तिचा सेनापति स्वयं चंद्रगुप्त!

त्या दोन्ही युयुत्सु सैन्यांची गाठ पडताच निकराच्या रणकंदनास आरंभ झाला. ग्रीकांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली पण शेवटी त्यांची भारतीय सैन्याने कोणत्या तरी सिंधुपरिसरातील दोन तीन रणांत (त्या स्थलाचें वा स्थलांचें नांवही अुपलब्ध नाही!) अितकी दाणादाण अुडवून दिली की, सेल्युकसला त्या निर्णायक पराजयामुळे विजयी चंद्रगुप्तास शरण जाण्यावाचून गत्यंतर उरलें नाही.

राजा पौरवाच्या पराभवाचा सूड!

शिकंदराच्या वेळेस ग्रीकांनी केलेल्या पौरवाच्या पराजयाचा, अितर अत्याचारांचा नि अपमानाचा, चंद्रगुप्ताच्या ह्या निर्णायक विजयामुळे पादाक्रान्त झालेल्या ग्रीकांवर भारताने असा पुरेपूर सूड अुगविला! तेव्हा – विजयी सम्राट् चंद्रगुप्ताच्या सर्व अटी पराजित सेल्युकस मुकाटचाने मानता झाला.

या अटींप्रमाणे यवनसम्राट् सेल्युकसने सिंधुनदीच्या अिकडल्या बाजूच्या पंचनद ते सिंधप्रभृति भारतीय प्रदेशांवर ग्रीक जो अधिकार सांगत होते तो अधिकार सोडून दिला. अितकेंच नव्हे, तर सिंधूच्या पलीकडला जो गांधार ते हिंदुकुश प्रभृति भारतीय प्रदेश ग्रीकांच्या हातात पडला होता आणि जो भारतास परत दिल्यावाचून युद्ध थांबणार नाही म्हणून महामात्य चाणक्याने दरडावलें होतें तो सारा भारतीय प्रदेशही विजयी चंद्रगुप्तास राजा सेल्युकसने हूं का चू न करता परत देअून टाकला. आणि भारतावर चढाअी करण्यासाठी सिंधु अुतरताना छाती वर काढून नि खड्गें अुपसून चालून आलेल्या त्या सहस्रावधि ग्रीकांच्या शिकंदरी सेना, शस्त्रें खाली ठेवून नि मस्तकें अधोमुख करून सिंधूपार, हिंदुकुशपार चालत्या झाल्या.

भयबिन होय न प्रीत

चंद्रगुप्ताच्या ह्या विजयामुळे त्याच्या भारतीय साम्राज्याची सीमा सेल्युकसच्या ग्रीक राज्याशी भिडून गेली होती. आणि त्या दोन्ही राज्यांच्या मधली सीमारेषा होती हिंदुकुश पर्वताची पंक्ति ! या भारतीय साम्राज्याच्या वलाढ्यतेची आणि चाणक्यचंद्रगुप्तांच्या व्यक्तिमत्त्वाची अशी काही छाप यवनाधिपति सेल्युकसच्या मनावर पडली की, अशा साम्राज्याशी विरोध करण्यापेक्षा त्याच्याशी मनःपूर्वक स्नेह जोडण्यातच आपल्या ग्रीक राज्याचें कल्याण आहे अशी त्याची निश्चिति पटली. दुसरें असें की, सेल्युकसच्या अितर सीमांवर जीं राज्यें होतीं तीं ग्रीकांचींच असतानाही त्याची प्रतिस्पर्धी शत्रुस्थानें होतीं. त्यांनाही धाक पडावा ह्यासाठी चंद्रगुप्तासारख्या वलाढ्य सम्राटाशी दृढ मैत्री संपादिणें हें सेल्युकसला हितावहच होतें. या कारणामुळे त्या यवनाधिप सेल्युकसने सम्राट् चंद्रगुप्ताशी मनःपूर्वक चिरंतन मैत्रीचा संधि केला.

अितकेंच नव्हे, तर त्या राजकीय नि राष्ट्रीय स्नेहसंबंधाला त्या दोन राजकुलांतील शरीर संबंधाचा वैयक्तिक जिव्हाळाही लाभावा अशासाठी त्या ग्रीक नरेशाने आपल्या कन्येचा सम्राट् चंद्रगुप्ताशी विवाह करून दिला.

त्या सालंकृत ग्रीक राजकुमारीच्या कन्यादानाने सम्राट् चंद्रगुप्ताच्या देदीप्यमान यशोमंदिरावर रत्नजडित सोन्याचा कळसच चढविला गेला !

महामात्य चाणक्याचा प्रभावी प्रबंध

त्या स्वतंत्र, सुविशाल नि अखंड साम्राज्याचा सारा प्रबंध महामात्य चाणक्याने पात्रापात्र विवेकानुसार किती कठोरपणे, किती प्रबळपणे नि तरीही किती कनवाळूपणे ठेवला होता हें स्वतः त्या राज्यकार्यधुरंधर पुरुषानेच लिहिलेल्या 'कौटिलीय अर्थशास्त्र' ह्या विख्यात ग्रंथावरून नि त्या भारतीय साम्राज्याच्या पुढे पुढे न्यूनतः शंभर वर्षें तरी वाढत गेलेल्या नि दूरवर पसरत गेलेल्या अंजिक्य प्रभावावरून दिसून येतें. त्याचप्रमाणे चाणक्याच्या त्या प्रभावी प्रबंधामुळे साऱ्या राष्ट्रात शांतता, सुव्यवस्था नि सुखसंपन्नता कशी नांदत होती तेंही, सेल्युकसने चंद्रगुप्ताच्या राज्यसभेत ठेवलेला ग्रीक राजदूत मेगॅस्थिनीस ह्याने लिहिलेल्या प्रतिवृत्तावरून परस्परेच प्रत्ययास येत आहे.

केव्हा केव्हा अेका दिवसात घडलेल्या अेखाद्या अैतिहासिक घटनेचा प्रभाव अेकेक सहस्र वर्षांचें अैतिहासिक भवितव्य ठरवून टाकतो. चंद्रगुप्ताने ग्रीकांच्या केलेल्या पराभवाचा परिणामही तसाच किती दूरवर प्रभाव पाडू शकला ह्याविषयी अिंग्रजी अितिहासकार व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो की, शिकंदर-सेल्युकसच्या वाऱ्यांचा बोजवारा अुडवून 'चंद्रगुप्ताने केलेल्या ग्रीकांच्या ह्या निर्णायक

पराभवामुळे पुढे जवळ जवळ १५०० वर्षेंपर्यंत तरी युरोपमधील कोणतेंही राष्ट्र हिंदुस्थानवर स्वारी करू शकलें नाही.'

सेल्युकसशी झालेल्या संधीप्रमाणे हिंदुकुश, हिरात ते बलुचिस्थानलाही सामावणारी भारताची त्या दिशेची जी नैसर्गिक सामरिक नि म्हणूनच शास्त्रोक्त (Scientific)सीमारेषा आहे—जी सीमारेषा गाठावयासाठी पुढे अिंग्लिश सत्तेच्या तोंडास सारखें पाणी सुटत असताही ती त्यांना जिंकता आली नाही, किंवा मोंगल बादशहांनाही जी पुरतेपणी हाती ठेवता आली नाही—त्याच अखंड भारताच्या शास्त्रीय सीमारेषेला अैतिहासिक कालातील, भारताचा पहिला सम्राट् चंद्रगुप्त हा दोन सहस्र वर्षांच्याही पूर्वी, अशा रीतीने पादक्रान्त करता झाला[1] !'

अलेक्झांडर हा जगज्जेता तर नव्हताच
पण तो भारतविजेताही नव्हताच

त्या प्राचीन काळी साऱ्या युरोपमध्ये ग्रीक संस्कृति हीच पुढारलेली असल्याने तिला आजचीं बहुतेक युरोपियन राष्ट्रें आपआपल्या संस्कृतीच्या मातृस्थानीच मानतात. त्या प्राचीन काळच्या अलेक्झांडरसारख्या पराक्रमी ग्रीक सम्राटाचें नांव त्यामुळेच आजच्या युरोपियन राष्ट्रांतील जनतेला आपआपल्याच कोणा पराक्रमी पूर्वजाच्या नांवासारखें आपुलकीचें स्फूर्तिस्थान वाटत आहे. युरोपियन अितिहासातून त्याला 'अलेक्झांडर दि ग्रेट' या नांवाने संबोधिलें जात असून त्याच्या विषयीच्या अनेक पौराणिक पद्धतीच्या आख्यायिकाही त्यांच्या शालेय पुस्तकांतून रंगवून रंगवून त्यांच्या तरुणांना शिकविल्या जातात. परंतु त्या शिकंदराचा नि त्याच्या त्या ग्रीक साम्राज्याचा त्या काळचा भारतीय प्रतिद्वंद्वी जो सम्राट् चंद्रगुप्त किंवा चाणक्य ह्यांच्या नांवाचा, काही तज्ज्ञ अितिहासकार सोडले तर, सामान्य युरोपियन शिक्षित जनतेला पत्ताही नसतो. अेक वेळ युरोपातील जनतेपुरती ह्या अैतिहासिक विपर्यासाकडे डोळेझाकही करता येअील. परंतु ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानात स्थापिलें गेल्यानंतर आमच्या शाळाप्रशाळांमध्येही ब्रिटिशांनी लिहिलेल्या शालेय पुस्तकांतून आणि साहित्यातूनही अलेक्झांडरची हीच वरील अवास्तव महती गायिलेली असे. तीन चार पिढ्या आमच्या अिकडे हेंच अिंग्रजी शिक्षण दिलें गेल्यामुळे आमच्या शिक्षित वर्गावरही अलेक्झांडर दि ग्रेट हें नांव घेताच अेक रोमहर्षक छाप पडे. परंतु चंद्रगुप्त किंवा चाणक्य हा कोणच्या

१. '.....The first Indian Emperor, more than two thousand years ago thus entered into possession of that 'Scientific frontier sighed for in vain by his English successors and never held in its entirety even by the Monghul Monarchs of the 16th and 17th century.' (Early History of India by V. Smith)

झाडाचा पाला ह्याचाही बहुधा त्यांना पत्ता नसे. हा ऐतिहासिक विपर्यास आणि त्यामुळे झालेली आमच्या जनमनाची दिशाभूल आता यापुढे तरी होऊ देता कामा नये. शिकंदराविषयीच्या पौराणिक अशा प्रचलित दंतकथा सोडून दिल्या तरी प्रत्यक्ष भारतीय अितिहासाशी संबंध असलेल्या आणि शिकंदराची नसती बडेजावी करून भारतास हीनपणा आणणाऱ्या आख्यायिका तरी आमच्या शालेय पुस्तकांतून किंवा साहित्यातून काढून टाकल्या पाहिजेत. अुदाहरणार्थ युरोपमधल्या शालेय पुस्तकांतून नि अितर साहित्यातूनही रंगवून सांगितली जात असलेली आणि आमच्या अिकडेही ब्रिटिशांनी प्रचलित केलेली खालील ग्रीक आख्यायिका पहा :–

ग्रीकादिक युरोपियन जनतेत अशी समज प्रचलित असे की 'अलेक्झांडर' हा गज्जेता होता आणि त्याने सारें भारत जिंकलें होतें. तो पराक्रमी पुरुष जेव्हा सारें जग जिंकून स्वदेशी परत आला तेव्हा जगात जिंकावयास असा आता देशच अुरला नाही ह्या निरुत्साहक जाणिवेने त्या युयुत्सु सम्राटाला रडू कोसळलें !' आणि अशी ही अलेक्झाडरच्या दिग्विजयाविषयीची आख्यायिका युरोपातच नव्हे तर हिंदुस्थानातही अैटीने सांगितली जाते ! आता ती किती खोटी नि हास्यास्पद आहे हें या पुस्तकात शिकंदरच्या दिलेल्या त्रोटक वृत्तान्तावरूनही दिसून येअीला त्या काळच्या चीनसारख्या ज्या बलाढ्य राष्ट्रांकडे तो वळलाच नाही त्यांची गोष्ट सोडून दिली तरी अलेक्झांडर दिग्विजय करीत भारतापर्यंत जेव्हा पोचला आणि मगधासुद्धा सारें भारत जिंकून भारताचा सम्राट् म्हणवून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्याने जेव्हा धरली तेव्हा त्याच्या त्या भारतावरील स्वारीची आणि त्या महत्त्वाकांक्षेची कोण दुर्दशा अुडाली हें ह्या पुस्तकात वर दाखविलेलेंच आहे. अलेक्झांडर हा पराक्रमी होता, विजेता होता, पण जगज्जेता नव्हता ! भारतविजेता तर तो नव्हताच नव्हता ! जर त्या पराक्रमी पुरुषाला खरोखरी असें रडू कोसळलें असेल तर तें 'आता जिंकावयास जगात देशच अुरला नाही' अशा जाणिवेने कोसळणें अशक्य होतें. कारण तशी जाणीव खोटी आहे हें त्याचें त्यालाच ठाअूक होतें तर तें रडू अशा जाणिवेने कोसळलें असलें पाहिजे की, 'ज्या भारताचा मी सम्राट् होअू अिच्छीत होतो त्या अखिल भारताला मी मरेतो जिंकू शकलो नाही अितकेंच नव्हे तर त्याचा जो अेक लहानसा कोना मी जिंकला आहे म्हणून मी समजत होतो तोही ते बंडखोर भारतीय माझ्या हातून हिसडून घेतील असें दिसतें !"

'गोमांतक' काव्यात म्हटलेंच आहे की,

अन्य कुणाचा असो शिकंदर परंतु भारत जेता ना ।
अंगणहि ना तयें देखिलें कळलाहि ना कुणा कुणा ॥

सवाअी शिकंदर

थोर पुरुषांची तुलना सहसा कोणी करू नये. ते निरनिराळ्या परीने थोर असतात. पण जर कोणी अशा पुरुषांची तुलना करताना अेकाचीच नसती

बडेजावी केली तर ती हाणून पाडणें भाग आहे. जोवर युरोप अलेक्झांडरलाच तेवढें 'दि ग्रेट' म्हणून गौरवीत आहे आणि त्याचा नि त्याच्या ग्रीक साम्राज्याचा यशस्वी प्रतिद्वंद्वी जो सम्राट् चंद्रगुप्त त्याची अनुल्लेखाने अवहेलना करीत आहे तोवर आम्हां भारतीयांना हें सांगणें अवश्य आहे की, तुलनाच करावयाची तर, जर शिकंदर अेक शिकंदर आहे तर चंद्रगुप्त हा सवाअी शिकंदर आहे! शिकंदरला त्याच्या बापाने आधीच मिळविलेल्या प्रबळ राज्याचें नि सैन्याचें अुदंड भांडवल आयतेंच लाभलेलें होतें. त्या आधारावर स्वतःच्या पराक्रमाने त्याने ग्रीकांचें साम्राज्य अुभारलें. परंतु चंद्रगुप्ताला तसा कोणताही आधार नव्हता, पदरी अेकही सैनिक नव्हता, त्याच्या बापानेच त्याला राज्याबाहेर हुसकून दिलेलें होतें. अेकच पुरुष तेवढा त्याच्या पाठीशी अुभा होता, तो म्हणजे आर्य चाणक्य! अशा स्थितीत शून्यापासून आरंभ करून चंद्रगुप्ताने स्वतःचें बलाढ सैन्य अुभारलें. स्वतः शिकंदरच्या आणि त्याचा सेनापति सेल्युकसच्या भारतावर झालेल्या स्वाऱ्यांचा बोजवारा अुडवून दिला आणि शिकंदराच्या साम्राज्याहूनही महत्तर असलेल्या भारतीय साम्राज्याची अुभारणी केली!

काळाच्या ज्या पानावर ह्या यवनविजेत्या सम्राट् चंद्रगुप्ताची, ह्या सवाअी शिकंदराची, राजमुद्रा अंकिलेली आहे, तेंच आहे आमच्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सोनेरी पान पहिलें!

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३८५५६ दि. ...
क्र. वि. ...

सोनेरी पान दुसरें

२–यवनान्तक सम्राट् पुष्यमित्र

सम्राट् चंद्रगुप्त मौर्य अिसवी सनपूर्व २९८ व्या वर्षी वारला. त्याच्या सिंहासनावर त्याचा पुत्र बिंदुसार हा बसला. तोही पराक्रमी होता. त्याने स्वतः 'अमित्रघात' (शत्रूंचा कर्दनकाळ) ही पदवीच धारण केली होती. चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतरही मौर्यसाम्राज्याचें महामात्यपद आर्य चाणक्याच्याच हाती काही काळ तरी होतें. त्यामुळे सम्राट् विंदुसाराने चाणक्य-चंद्रगुप्ताच्या भारतीय साम्राज्याच्या, मागे पृष्ठें ६१८ ते ६१९ मध्ये अुल्लेखिलेल्या भव्य ध्येयाचें जें अेक अुपांग चंद्रगुप्ताच्या मृत्यूसमयी अर्धवट राहिलेलें होतें तेंही पूर्ण करण्याचें कार्य लगोलग हाती घेतलें. त्यांच्या वरील भव्य ध्येयानुसार म्लेंच्छांचें अुदंड पारिपत्य झालें होतें, अखिल भारत स्वतंत्र झाला होता, आणि अुत्तर भारतापुरतें अेक अखंड, बलाढ्य नि अेकछत्री भारतीय साम्राज्य प्रस्थापित झालें होतें. परंतु त्यांची प्रतिज्ञा सर्वच भारत अेकछत्री करण्याची होती. यासाठी त्या अुत्तरेच्या मौर्य साम्राज्यात, अुरलेलें दक्षिण भारतही विलीन करून घेणें हें प्राप्त कर्तव्यच होतें.

यद्यपि दक्षिण भारतातली त्या काळचीं पृथक् पृथक् राज्यें हीं आमचींच होतीं, आपआपल्यापरी स्वतंत्र होतीं, कोणत्याही परकीयांच्या, म्लेंच्छांच्या अुपद्रवापासून विमुक्त होतीं, तथापि अखिल भारतीय राष्ट्र जर अेकात्म, अेकतंत्र नि अेकराष्ट्र करावयाचें तर या दाक्षिणात्य पृथक् पृथक् स्वतंत्र राष्ट्रांनी त्या अुत्तर भारतीय साम्राज्यांत समाविष्ट होअून जाणें हें त्यांचेंही त्या परिस्थितीतील राष्ट्रीय कर्तव्यच होतें.

दक्षिण विजयावर निघाल्यानंतर सम्राट् बिंदुसाराने साम-दाम-दंड-भेदे-करून तेथील बहुतेक राज्यांकडून आपलें आधिपत्य मान्य करविलें. 'पूर्व नि पश्चिम समुद्राच्या मध्यंतरीच्या सतरा राजधान्या त्याने मौर्याच्या राज्यात समाविष्ट केल्या' असें ग्रंथांतरी अुल्लेखिलेलें आहे. अेकंदरीत चंद्रगुप्तचाणक्यांच्या अखिल भारतीय साम्राज्याच्या ध्येयाचें हें अुरलेलें दुय्यम अुपांगही पूर्ण करून सम्राट् विंदुसाराने अुत्तर दक्षिण पूर्व पश्चिमेसुद्धा सारें भारतवर्ष अेकछत्री नि अेकराट् केलें ! ह्या वैशिष्ट्याप्रमाणेच त्या मौर्य साम्राज्याचें आणखी अेक वैशिष्ट्य हें की, अैतिहासिक पद्धतीने अगदी मोजून मापून म्हटलें तरी त्या काळच्या जगातील ग्रीससुद्धा साऱ्या राष्ट्रांमध्ये सैनिक बळातही भारत बलिष्ठतम होतें.

चाणक्याच्या प्रबळ प्रबंधाप्रमाणे अुभारलेल्या नि शस्त्रसज्ज राखलेल्या ह्या चतुरंगदलाच्या अजेय बळामुळेच चंद्रगुप्ताच्या राज्यारोहणापासून तो अशोक बौद्ध

झाल्यानंतरही त्याच्या मृत्यूपर्यंत, अुणींपुरीं शंभर वर्षें, त्या मौर्यकालीन अखिल भारतीय साम्राज्यास भूमिमार्गे वा समुद्रमार्गे, कोणतीही सीमा अुल्लंघून, जगातील कोणताही शत्रु काहीही अुपद्रव देअू शकला नाही !

पुण्यश्लोक अशोक

सम्राट् बिंदुसार अि. सन पूर्व २७३ व्या वर्षी वारला. त्याच्या सिंहासनावर त्याचा पुत्र अशोक हा स्वत:च्या वडील भावास वाजूस सारून, आरूढ झाला. आपल्या अितिहासातच नव्हे तर जगाच्या अितिहासात ज्याचें संकीर्तन 'पुण्यश्लोक नृपावलींत' केलें जावें अशी सम्राट् अशोकाची योग्यता होती. तथापि मागे पृष्ठ ५८४ ते ५८५ पर्यंत ह्या पुस्तकातील सोनेरी पानांची जी कसोटी आणि विषय-क्षेत्र आखून घेतलेलें आहे त्यात सम्राट् अशोककालीन पान बसत नाही. ह्यास्तव त्याच्या राजवटीचा अधिक अुल्लेख करता येत नाही.

तथापि अशोकाने बुद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर त्या धर्मातील अहिंसाप्रभृति काही तत्त्वांचा नि आचारांचा जो अतिरेकी पुरस्कार केला त्याचा भारतीय राजकारणावर, राजकीय स्वातंत्र्यावर, साम्राज्यावर अितका हानिकारक परिणाम झालेला आहे की, सम्राट् अशोकाच्याच नव्हे तर मुख्यत: बौद्ध धर्माच्याही त्या तत्त्वांविषयी नि प्रवृत्तींविषयी अिथे नि ह्या पुस्तकाच्या पुढच्या भागातही अवश्य ती चर्चा केली पाहिजे.

नमो भगवते बुद्धाय !

बौद्ध धर्मातील राष्ट्रविघातक अशा काही प्रवृत्तींची नि परिणामांची ही चर्चा करण्याच्या आधी, माझ्या मतांचा विपर्यास होअू नये म्हणून, अिथे आरंभीच हें सांगणें मी माझें कर्तव्य समजतो की, स्वत: बुद्धदेवाविषयी किंवा त्यांच्या बौद्धधर्माविषयी अेकंदरीत मला अत्यंत आदर वाटत आहे. भारतीय अितिहासात अेकाहून अेक अुत्तुंग अशीं महान् नि जागतिक विभूतींचीं जीं हिमालयीन शिखरें आहेत त्यांतील अेका अुत्तुंग शिखराचें नांव आहे भगवान् बुद्ध ! ह्या आदरापुरता त्यांच्या शिष्याप्रमाणेच त्यांच्या मूर्तीपुढे नम्र होअून मीही म्हणतो, 'नमो भगवते बुद्धाय !' ज्या हिंदुराष्ट्राने त्यांना जन्म दिला तें हिंदुराष्ट्रही आज त्यांना श्रीविष्णूचा नववा अवतार मानीत आहे तेंही अेवढ्यासाठीच !

बौद्ध धर्म भारतातून नामशेष कां झाला ?

बौद्ध धर्म हा अशोकाच्या आधी तीनशे वर्षें तरी मगधाचे आजूबाजूला अुपदेशिला जात होता. त्याचा प्रचार तोपर्यंत बहुश: मतपरिवर्तनाने होअी. त्यामुळे त्याचा प्रसारही मंदगतीने चाले. मागे पृष्ठ ५८९ वर सांगितलेंच आहे की, शिकंदर सेल्युकसच्या कालापर्यंत पंचनद (पंजाब), सिंध, गांधारप्रभृति प्रांतांत बौद्ध

धर्माचें नांवही फारसें अैकिवात नव्हतें. ग्रीकांना तर त्याचा पत्ताही नव्हता. बहुतेक अितिहासकारांचा असा समज झालेला आहे की, बौद्धधर्म हा वेदांचें प्रामाण्य न मानणारा आणि अेकंदरीत निरीश्वरवादी असल्यामुळे त्या वेळच्या वैदिक धर्माभिमानी जनतेने त्याचा प्रबळ विरोध केला आणि त्यामुळे शेवटी तो धर्म भारतातून नामशेष होअून गेला. परंतु आजपर्यंतची दृढावलेली ही समजूत सर्वाशी सत्य नाही. कारण गौतमबुद्धानेच अवैदिक किंवा निरीश्वरवादी किंवा शून्यवादी धर्मपंथ काढला हेंच मुळात अतथ्य आहे. स्वत: बुद्ध जन्मला त्याचे आधी अुणेपुरे अवैदिक नि निरीश्वरवादी पन्नास साठ धर्मपंथ भारतात प्रचलित होते. हें बुद्ध ग्रंथांनासुद्धा मान्य आहे. वैदिक नि अवैदिक तत्त्वज्ञानाचे नि प्रचारकांचे बौद्धिक वादविवाद होत. मतपरिवर्तनाने ज्याला जो धर्मपथ रुचेल तो त्या धर्मपंथात जाअी. बुद्धकालापासून शंकराचार्याच्या कालापर्यत तत्त्वज्ञानाच्या आणि बौद्धिक संघर्षाच्या आघाताने बौद्ध धर्मास काही अंशी हार खावी लागली ही गोष्ट जरी सत्य असली तरी वैदिक धर्माभिमानी ब्राह्मण क्षत्रियादिक जनतेला बौद्धधर्माचा नि विशेषत: त्याची पुढे पुढे जी विकृति होत गेली तिलाच अनुसरणाऱ्या बौद्धांचा जो अगदी तिटकारा आला त्याचें मुख्य कारण तात्त्विक किंवा बौद्धिक हेंच काय तें नसून तें राष्ट्रीय नि राजकीयही आहे. तें कसें तें ह्या पुस्तकाच्या कक्षेत मावेल त्या प्रमाणात पुढे यथाप्रसंगी सांगण्यात येअील.

अशोकाने वदिक धर्मीयांवर बौद्धधर्म बळाने लादला

अशोकाने बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर त्याच्या राजवटीच्या अुत्तरार्धात त्याच्या अंगी त्या बौद्ध धर्माचा अभिनिवेश अितका संचारला की, तोपर्यत केवळ अुपदेशाने त्या मताचा जो प्रचार होत होता तो पुरेसा नाही असें वाटून त्याने आपल्या सर्व साम्राज्यात वैदिक धर्मातील अत्यंत मूलभूत परंतु बौद्ध धर्मात निषिद्ध मानलेल्या अशा धर्माचारांना अेखाद्या अपराधाप्रमाणे दंडय ठरविलें. अुदाहरणार्थ दोन तीनच गोष्टी स्थलाभावामुळे येथे देअू. यज्ञयागांना ते हिंसाप्रधान म्हणून आपल्या साऱ्या साम्राज्यात त्याने बंदी केली. यज्ञसंस्था ही वैदिक धर्माचें आद्य केंद्र. त्या यज्ञसंस्थेच्या केंद्राभोवती वेदकालापासून भारतीयांची महान् संस्कृति विकसून भरभराटलेली होती. ते यज्ञ राजदंडाच्या बळाने अकस्मात् दंडय ठरविल्यामुळे अशोकाच्या साम्राज्यात ८० टक्के असणाऱ्या ब्राह्मण क्षत्रियादिक वैदिक धर्मीयांत केवढा क्षोभ माजला असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशोकाने मृगयाही निषिद्ध, दंडय ठरविली. वैदिक धर्मात क्षत्रियांचें मृगया हें अेक मुख्य कर्तव्य होतें. त्यातही लक्षावधि लोकांच्या आहारासाठी मासे, कोंबड्या मारणें हें निषिद्ध ठरविलें गेलें तें तर राहोच पण घनघोर अरण्यांतून वावरणाऱ्या आणि वारंवार मनुष्य वस्तीत शिरून माणसांनाही गट्ट करणाऱ्या सिंहव्याघ्रादि क्रूर पशूची

मृगयाही 'प्राणिहिंसा करू नये' ह्या निरपवादपणे आचरू गेल्यास अगदी दुबळ्या नि मनुष्यघातक ठरणाऱ्या बुद्धमतासाठी अशोकाने दंडय ठरविली. ब्राह्मण क्षत्रियादिक वैदिक धर्मीयांच्या धर्माचरणावर अशोक अिकडे अत्याचारी बंदी घालीत असताना तिकडे त्याच्या मोठमोठ्या स्तंभांवरून अुपदेश कोरून ठेवीत असे की, 'सर्व धर्मीयांशी सहिष्णुतेने वागावें! श्रमणांचा आणि ब्राह्मणांचा सत्कार करावा!' ह्या त्याच्या कृत्यातील धडधडीत विसंगति त्याच्यासारख्या संयमशील नि विवेकी सम्राटाच्याही ध्यानात येअू नये हें आश्चर्य आहे,

बौद्ध धर्माच्या काही शिकवणींचा राष्ट्रीय शक्तीवर नि समाजधारणेवर घातक परिणाम झाल्यावाचून राहणार नाही हें आर्य चाणक्याने अशोकाच्या आधीच पन्नास वर्षें हेरून ठेवलेलें होतें. ह्यास्तव मौर्य साम्राज्याचा सारा राज्य-प्रबंध ज्या 'अर्थशास्त्रावर' आधारलेला होता त्या आपल्या 'अर्थशास्त्र' ह्या ग्रंथात संसार सोडन भिक्षु होअू अिच्छिणाऱ्यांसाठी काही राष्ट्रीय दृष्टीने अुपयुक्त असे प्रतिबंध त्याने घातलेले होते. अुदाहरणार्थ, चाणक्याचा अेक दंडक असा आहे की, 'अल्पवयी स्त्रीने तिच्या मातापित्यांच्या नि राजसत्तेच्या अनुज्ञेवाचून संसार सोडून भिक्षुसंघात प्रवेश करू नये.' दुसऱ्या अेका दंडकाप्रमाणे कोणाही पुरुषास त्याचेवर अवलंबून असलेल्या स्त्रिया-मुलांची व्यवस्था लावण्यापूर्वी भिक्षु होण्यास मज्जाव केलेला आहे! परंतु अशोकाचे काळात नि नंतर हे प्रतिबंध लुप्त झाले. आणि कोणत्याही लहानमोठ्या माणसास संसार सोडून भिक्षुसंघात जाण्यास सरळ मोकळीक झाली. ह्या भिक्षुसंघात शिरलेल्या सहस्रावधि लोकांना अन्न-वस्त्र-शय्या-निवासादिकांच्या सोयी धर्मार्थ फुकट केल्या जात असत आणि त्याचा सारा व्यय राजकोषातूनच होअी. अशोकाने त्याच्या साम्राज्याच्या कोषा-तील कोटचनुकोटी रुपयांचा व्यय अशा भिक्षुसंघाकरिता मोठमोठे विहार बांधण्यासाठी आणि त्यांतून निवसणाऱ्या लक्षावधि भिक्षूंची अुपजीविका चाल-विण्यासाठी चालविला होता. परंतु साम्राज्याचा हा सारा राज्यकोष बहुतांशी साम्राज्यातील वैदिक धर्मीयांच्याच करातून, संपत्तीतून भरला जात होता. आणि त्याचा विनियोग त्यांच्या विरुद्ध जाणाऱ्या बुद्ध मताच्या सार्वत्रिक प्रचारावर होत होता! ही त्यांच्याच संपत्तीची त्यांच्याच विरुद्ध पक्ष बलवान् करण्यासाठी केलेली अुधळपट्टी त्या वैदिक धर्मीय जनतेस असह्य होअून त्यांच्यात तीव्र असंतोष वाढत जावा हें साहजिकच होतें.

साम्राज्याच्या शस्त्रबळाच्या मुळावरच घाव!

परंतु राजदंडाच्या बळाने अशोकाने साऱ्या साम्राज्यात आणि बाह्य देशीही चालविलेल्या बौद्ध धर्मातील अतिरेकी अहिंसेच्या प्रचाराचा भारतीय साम्राज्याच्या मुळावरच जो घाव पडत होता, तो वरच्या अितर कृत्यांहूनही राष्ट्रीय अस्तित्वास-

नि स्वातंत्र्यास अधिक हानिकारक होता. सर्वच शस्त्रबळ हें हिंसामय आणि पापकारक आहे, क्षात्रधर्म आचरणारे हे हिंसक नि अधर्म्य वर्गाति मोडणारे असून जे जे कोणी अहिंसेची शपथ घेऊन, शस्त्रत्याग करून, संसार सोडून, भिक्षु होऊन विहाराविहारांतून बौद्ध धर्मानुसार जगत राहतील त्यांचा वर्ग हा राष्ट्राच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या नि हताहत होणाऱ्या क्षत्रिय, सैनिक वीरांपेक्षाही अुच्चतर, पुण्यकर नि पूजार्हतर आहे असा बौद्ध धर्मोपदेश जिकडे तिकडे अशोकाने नेमलेल्या नि पोसलेल्या सहस्रावधि भिक्षूंकडून चालू झाल्यामुळे सामान्य समाजातसुद्धा शस्त्रधारी नि वीरवृत्ति अशा कोणाही सैनिकापेक्षा कोणीही अैतखाअू भटकता भिक्षु हा मानार्ह आणि धर्माचरणी समजला जाअू लागला.

अशोकाने त्याच्या स्तंभावर अितर धर्मांतूनही आढळणारें अेक ठराविक वाक्य कोरलें आहे की, 'शस्त्रविजयापेक्षा धर्मविजय हा श्रेष्ठ आहे.' पण तो धर्मविजय हचा अैहिक जगात शक्य आहे काय? व्यवहार्य आहे काय? अमृत प्यायलें असता मनुष्य अमर होतो; होत असेल पण तें अमृत हचा अैहिक जगात कोणत्या दुकानात मिळतें त्याचा पत्ता कोणी सांगू शकत आहे का? बोलाचीच कढी बोलाचाची भात। जेवूनिया तृप्त कोण झाला!

ज्या साम्राज्यीय अपार साधनांच्या, सत्तेच्या नि संपत्तीच्या आधारामुळे, सम्राट् अशोक साऱ्या भारतात आणि त्या वेळच्या परराष्ट्रांतही धर्मविजय हा शस्त्रविजयापेक्षा श्रेष्ठ आहे असें अुपदेशीत होता तें त्याचें साम्राज्यच त्या चाणक्य चंद्रगुप्तांनी अुभारलेल्या प्रबळ नि अजेय अशा चतुरंग सैन्याच्या शस्त्रबळानेच काय तें संपादिलेलें नव्हतें काय? आणि अशोक सिंहासनावर येताच जर तें चतुरंग सैन्यबळ सारेंच्या सारें बुद्धधर्मी होअून, शस्त्रत्याग करून आणि अैतखाअू भिक्षु होअून विहाराविहारांतून घोरत पडतें तर स्वतः अशोकच सम्राट् म्हणून अेक क्षणभर तरी टिकू शकला असता का? भारताच्या अवतीभोवती तेव्हाही जीं ग्रीक राष्ट्रें आणि त्यांच्याही पलीकडे अत्यंत कडवीं, हिंसक नि केवळ शस्त्राचारी शक-कुशान-हूणादिक राष्ट्रें भारताच्या चतुरंग नि अजिंक्य सेनेच्या भयानेच काय तीं तोवर दूरदूर दडून बसलेलीं होतीं, तीं सारींच्या सारीं त्या भिक्षुमय बनलेल्या भारतावर सिंहासारखी झडप घालून त्यांच्या क्रूर नखानी अशोकाच्या त्या त्यक्त-शस्त्र धर्मविजयाचाच गळा घोटून त्याचें रक्त प्यायलीं नसतीं का?

पण ही 'जर तर' ची चर्चाच करण्याचें कारण नाही. भारतीय क्षात्रवृत्तीचा नायनाट करू पाहणाऱ्या केवळ अशोकाच्याच नव्हे तर माझ्या 'संन्यस्त-खड्ग' नाटकात वर्णिल्याप्रमाणे स्वतः बुद्धाच्याच अुपदेशाचा वस्तुतः तसा परिणाम भारताच्या दुर्दैवाने त्या काळीच भारताला भोगावा लागला आहे. तोच दुर्दैवी परिणाम आणि त्याचा वैदिक धर्मीयांनी केलेला यशस्वी प्रतिकार आता वर्णावयाचा आहे.

धर्माची नव्हे तर त्यांच्या राजकारणविषयक परिणामांची चर्चा

हें वर्णन करताना वैदिक किंवा बौद्ध धर्मातील तत्त्वांची किंवा त्यांच्या कर्म-कांडातील यज्ञ-याग-संन्यासादिक आचारांची पारलौकिक दृष्ट्या छाननी करण्याचा हेतु तर नाहीच नाही, पण ऐहिक दृष्ट्यासुद्धा सर्वांगीण पाहणी वा तुलना करण्याचा आमचा मानस नाही. त्या तत्त्वांपैकी आज कायकाय विश्वासार्ह आहे किंवा त्यांच्या आचारांपैकी आज अनुकरणीय काय आहे हा प्रश्नसुद्धा अप्रस्तुत म्हणून अुपस्थित केला जाणार नाही. ह्या पुस्तकात, त्या त्या काळी ह्या नि अितर धर्मां-तील मतांचे नि त्यांच्या अनुयायांच्या कृत्यांचे भारताच्या त्या त्या काळच्या राजकीय जीवनावर जे राष्ट्रीय नि राजकारणविषयक परिणाम घडले त्यांची चर्चा काय ती करण्याचा आमचा मानस आहे. कारण तसें अैतिहासिक विश्लेषण केल्यावाचून त्या अितिहासाचे धागेदोरे अुलगडता येणेंच अशक्य आहे.

अशोकाच्या मृत्यूनंतर

स्वत:च्या धर्मनिष्ठेप्रमाणे लोककल्याणार्थ शेवटपर्यंत झटणारा हा पुण्यश्लोक सम्राट् अशोक अि. स. पूर्व २३२ मध्ये वारला. त्याचा अन्त हाच त्या भव्यतम भारतीय मौर्य साम्राज्याच्या अन्ताचा आरंभ ठरला! अशोकाच्या शेवटच्या २५ वर्षांत त्याने आपलें सारें तनमनधन बुद्धमताच्या प्रचारार्थ वाहिलें. अशोकानंतर त्याच्या राज्यासनावर जे त्याचे वंशज अनुक्रमे बसले तेही सारे प्रामाणिक बौद्धधर्मीय आणि म्हणूनच शस्त्रशक्तीने दुबळे असे केवळ नामधारी राजे निघाले. त्या अहिंसाप्रवण अशा बौद्धधर्माच्या अतिरेकी अनुयायांकडून नि राज्यकर्त्यांकडून ह्या चाळीसपन्नास वर्षें झालेल्या सांम्राज्यीय शस्त्रबळाच्या राष्ट्रघातक अुपेक्षेमुळे मौर्य साम्राज्याच्या विशेषत: त्या वायव्य प्रांताकडची (सरसीमेकडची) सारी सैन्यसंघटना अगदी विस्कळीत झालेली होती. तें पाहून तोवर केवळ मौर्य साम्राज्याच्या नांवाच्या दराऱ्यानेच दबून राहिलेल्या भारताच्या बाहेरील शत्रूंनी अशोकाच्या मृत्यूनंतर अवघ्या तीसअेक वर्षांच्या आतच भारतावर चढाअी करण्याचें धाडस पुन्हा केलें.

ब्याक्ट्रियन ग्रीकांची भारतावर स्वारी

सम्राट् चंद्रगुप्ताने सेल्युकस निकेटरचा पराभव करून अिसवी सन पूर्व ३१५ च्या जवळपास ग्रीकांना हिंदुकुशच्या पलीकडे पिटाळून लावलें होतें. (पृ. ६२४ पहा) त्या काळी भारताची सरसीमा असलेल्या ह्या हिंदुकुशच्या त्या पलीकडच्या बाजूला लागूनच जो ब्याक्ट्रिया नांवाचा प्रांत होता त्यात सेल्युकस निकेटरने आपलें स्वतंत्र ग्रीक राज्य प्रस्थापिलें होतें. तें स्वतंत्र असल्यामुळेच तेथून सुदूर असलेल्या मूळच्या युरोपियन ग्रीक राज्याशी त्याचा काही संबंध अुरलेला नव्हता. जर असलाच तर तो संबंध परस्पर वैराचा काय तो होता. त्यामुळे ह्या

ब्याक्ट्रियन ग्रीकांना आशियाअी ग्रीक असेंच म्हणत. शिकंदरच्या मूळच्या जातिवंत ग्रीकांपेक्षा मधल्या शंभर अेक वर्षांतील तुटत गेलेल्या पिढ्यान् पिढ्यांनी हे ब्याक्ट्रियन ग्रीक हीन अवस्थेस पोचले होते. त्यांच्या शिकंदरी पूर्वजांचें तें पहिलें तेज आता त्यांच्यात अुरलेलें नव्हतें. पण जी अेकच गोष्ट त्यांच्यातही अद्याप जीव धरून अुरली होती ती भारत जिंकण्याची शिकंदरी महत्त्वाकांक्षा! मौर्य साम्राज्याच्या शस्त्रशक्तीची वर सांगितल्याप्रमाणे वाताहत झालेली पाहताच त्या ब्याक्ट्रियन ग्रीकांच्या हृदयात ती भारतद्वेषी महत्त्वाकांक्षा पुन्हा अुसळून आली आणि त्यांचा त्या वेळचा राजा जो डेमेट्रियस त्याने हिंदुकुश ओलांडून भारतावर धाड घातली. भारतीय सैन्याचा कोणचाही म्हणण्यासारखा प्रतिकार होतच नसल्यामुळे डेमेट्रियस हा काम्बोज, गांधार प्रभृति प्रांत घेअून सिंधुनदी अुतरला. पुढे सारा पंचनदही (पंजावही) हस्तगत करून तो यवनाधिप प्रत्यक्ष मगधावर चाल करण्यासाठी ससैन्य पुढे सरसावला. साऱ्या ग्रीक सैन्यात मोठा वीरोत्साह संचरून ते अशी घोषणा करू लागले की, 'शिकंदरचें जें स्वप्न होतें की, पाटलीपुत्र जिंकून तेथे भारतीय सम्राट् म्हणून स्वत:ची घोषणा करीन तें अलेक्झांडरचें भारत-साम्राज्य जिंकण्याचें स्वप्न आम्ही आता खरें करून दाखवितोच!'

पंचानदादिक प्रांतांत भारतीय वीरवृत्तीचा ऱ्हास अकस्मात् कां झाला ?

हें केवढें आश्चर्य आहे की, ज्या हिंदुकुशापासून पंचनदसिंधादि प्रांतांत शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी शिकंदर सेल्युकससारख्या जगद्विख्यात ग्रीक सेनानींच्या नि सैन्यांच्या स्वाऱ्यांचा त्या त्या प्रांतातील भारतीय क्षत्रियांनी, गणराज्यांनी, सैनिकांनी आणि जनतेने बोजवारा अुडवून त्यांना मागे पिटाळून दिलें त्याच पराक्रमी भारतीय प्रांतांना ह्या ब्याक्ट्रियन ग्रीकांसारख्या दुर्बलतर नि अध:पतित अशा आशियाअी ग्रीकांनी असें केवळ चालता चालता जिंकून घ्यावें! पदोपदी लढाया देणाऱ्या भारतीय वीरवरांच्या धास्तीमुळे शिकंदर, सेल्युकसला ह्याच प्रांतांमध्ये लढत असता स्वत:च्या तंबूतही स्वस्थ झोप घेता येत नसे. पण हे दुर्घट प्रतीचे ब्याक्ट्रियन ग्रीक सेनानी विजयाच्या सुरक्षिततेत आज अयोद्धेच्या प्रासादा-मध्ये मुखाने झोपत आहेत.

अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर तीस चाळीस वर्षांतच डेमेट्रियसची ही ग्रीक स्वारी झाली. त्या मध्यंतरीच्या ह्या तीस चाळीस वर्षांतच त्या गांधार पंचनदादि झुंजार प्रांतांतील भारतीय प्रतिकारशक्तीचा नि वीरवृत्तीचा अितक ऱ्हास अकस्मात् कसा झाला? अशी कोणची विशेष घटना ह्या तीसचाळीस वर्षांत घडली की जिच्यामुळे हा भारतीय वीरवृत्तीचा ऱ्हास अपरिहार्य ठरावा?

शिकंदर सेल्युकसच्या ग्रीक सैन्यापेक्षा हें डेमेट्रियसच्या सेनापतित्वाखाली चालून आलेलें व्याक्ट्रियन ग्रीक सैन्य काय अधिक पराक्रमी होतें? मुळीच नव्हे. अुलट ते स्वत:च मानीत असत की, त्यांचे शिकंदर सेल्युकसच्या वेळचे पूर्वज त्यांच्यापेक्षा अधिक पराक्रमी आणि जवळजवळ दैविक योग्यतेचे होते. म्हणजे अशा हीनतर आणि दुर्बलतर यवनांनी त्या त्या प्रांतांतून भारतीयांना नुसते चालता चालता जें या वेळी जिंकलें तें शिकंदराच्या कालापेक्षा भारतशत्रु ग्रीकांचें बळ वाढलें म्हणून नव्हे तर तिकडच्या भारतीयांच्याच प्रतिकारशक्तीचा नि वीरवृत्तीचा भयंकर ऱ्हास झाला असला पाहिजे म्हणूनच होय.

अर्थात्, शिकंदरच्या अिसवी सनपूर्व ३२७ व्या वर्षाच्या स्वारीपासून डेमेट्रियसच्या ह्या साधारणत: अिसवी सनपूर्व २०० व्या वर्षाच्या स्वारीच्या मध्यंतरी भारतीयांच्या परशत्रुप्रतिकारशक्तीचा नि वीरवृत्तीचा ऱ्हास करण्यासारखी मुख्यत: अेकच अेक घटना जी घडली ती अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर आपल्या राजदंडाच्या बळाने जो अप्रतिकारी, अहिंसक, शस्त्रबळनिंदक बुद्धमतांचा अतिरेकी प्रचार त्या त्या प्रांतांतून केला तीच असली पाहिजे. कारण दुसरी अशी महत्त्वाची नि अशा प्रकारची घटना घडलीच नाही. त्याविषयीची तुलनात्मक अशीं दोनतीन विधेयें (Points) स्पष्टीकरणार्थ घेंअू.

अलेक्झांडरच्या वेळची भारतीय मनोवृत्ति आणि डेमेट्रियसच्या वेळची भारतीय मनोवृत्ति

शिकंदरच्या वेळी काम्बोज, गांधार, पंचनद ते सिंध प्रभृति प्रांतांत बौद्ध धर्माचें नांवसुद्धा जनतेस माहीत नव्हतें. (मागील पृष्ठ ५८९ पहा) ती भारतीय जनता वीरपूजक वैदिक धर्मावलंबी होती. क्षात्रवृत्तीचा अभिमान धरणारी यौधेयांसारखीं गणराज्यें स्वत:स आयुधजीवी (Nation in Arms) हीं अभिधानें अेखाद्या बिरुदावलीसारखीं अभिमानाने लावून घेत. (पृष्ठ ५९७ पहा.) केवळ क्षत्रियवर्णच नव्हे तर काही काही 'संघां'तून सारेच्या सारे भारतीय नागरिक, स्त्रीपुरुषसुद्धा, परराष्ट्राचें आक्रमण होताच समरांगणात सशस्त्र होअून लढावयास जात. दुर्दैवाने जेथे कोण्या 'जनसंघांचा' पराभव होअी तेथे तेथे यवनांच्या हाती जिवंतपणी पडण्यापेक्षा भारतीय वीरांगना वीरशिशूंसह जोहार करून अग्निप्रलयांत अुड्या घेत, भस्म होत! हें सर्व वर्णन ह्या पुस्तकात मागे ठें ५९७ ते ६०८ मध्ये आलेंच आहे. आणखी अेकच गोष्ट त्या चाणक्य-चंद्रगु ंच्या काळच्या वैदिकधर्मीय भारतीयांच्या स्वराष्ट्रसंरक्षक वीरवृत्तीचें द्योतक म्हणून देअू म्हणजे झालें.

'अर्थशास्त्र' ह्या वैदिकधर्मीय आर्यचाणक्याच्या ज्या ग्रंथातल्या राज्यप्रबंधाप्रमाणेच चंद्रगुप्ताच्या भव्यतम भारतीय साम्राज्याचा प्रबंध बहुश: चालत असे त्या

ग्रंथात भारतीय स्वातंत्र्य नि भारतीय साम्राज्यरक्षणार्थं अवश्य असलेल्या क्षात्र-वृत्तीचा केवढा गौरव केलेला आहे तो पहा. चाणक्याच्या प्रबंधाप्रमाणे सैन्यामध्ये ब्राह्मणांसुद्धा साऱ्या वर्णांच्या नागरिकांना प्रवेश मिळत असे. 'अमर्यादप्रवृत्ते च शत्रुभिस्संगरे कृते। सर्वे वर्णाश्च दृश्येयुः शस्त्रवन्तो युधिष्ठिर ॥' ही वैदिक धर्मीयांची परंपराच होती. जेव्हा हें असें साम्राज्यीय महासैन्य परशत्रूंवर चाल करण्यासाठी रणांगणात अुतरे तेव्हा, चाणक्य आज्ञापितो, स्वतः सम्राटाने त्या चतुरंग दलभारास संबोधून असें भाषण करावें :–

'वेदेष्वप्यनुश्रूयते समाप्तदक्षिणानाम् यज्ञानामवभृथस्नानेषु या सा गतिः शूराणामिति। क्षणेन तामाप्यतियान्ति शूराः प्राणान् सुयुद्धेषु परित्यजन्ति। तुल्य-भोगोस्मि भवद्भिः सह भोग्यमिदं राज्यम् । परान् हन्तव्यम् ।

भावार्थ की 'जी यज्ञाने सद्गति तीच शूरांना सद्गति रणात मिळते! न्याय्य युद्धात (सुयुद्धे) प्राणार्पण करणाऱ्या शूरांना तत्क्षणी स्वर्ग प्राप्त होतो. हें राज्य जसें मी तसेंच तुम्हीही अुपभोगिणारे आहात. मग पहाता काय! शत्रूंवर तुटून पडा, त्याचा वध करा!'

कोणी सांगावें! ह्याच ज्वलंत शब्दांत सेल्युकसवर चढून जाणाऱ्या आपल्या अजिंक्य भारतीय दलभाराला स्वतः सम्राट् चंद्रगुप्तानेही अुत्तेजिलें असावें!

आक्रमक, अन्याय्य, परित्राणाय साधूनाम्, विनाशाय च दुष्कृताम्, असें जें सशस्त्र युद्ध लढावें लागतें तशा युद्धास वैदिक धर्म 'हिंसक' हें विशेषण लावीतच नाही. त्यास तो धर्मयुद्धच म्हणतो.

शिकंदराच्या वेळेस भारतीय स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ यवनशत्रूंशी असें धर्मयुद्ध लढण्यासाठी तिकडच्या साऱ्या प्रांतांत वैदिकधर्मीय प्रचारक वीरश्रीची आग पेटवीत चालले होते. त्यांपैकी कित्येक ब्राह्मणादिक राष्ट्रीय प्रचारकांना धरून शिकंदर फाशीही देत चालला होता! (पृष्ठ ५९५ नि ६०६ पहा.)

अशा वीरश्रीने रसरसलेल्या चंद्रगुप्ताच्या भारतीय सैन्याने यवनाधिप सेल्युकसचा पराभव केल्यानंतर त्या हिंदकुशपर्यंतच्या भारतीय साम्राज्याचे नि स्वातंत्र्याचे संरक्षणार्थ चंद्रगुप्त-चाणक्यांनी त्या वेळच्या सर्व जगांतील बलाढ्यतम अशा आपल्या चतुरंग सैन्याचा पोलादी तट अुभारून ठेवला. त्या त्याच्या शस्त्र-बळाचे भीतीनेच हिंदकुशपलीकडील व्याक्ट्रियामध्ये दबलेल्या नि दडलेल्या ग्रीकाच्या राज्याने साधारणतः १२५ वर्षेंपर्यंत भारताविरुद्ध चकारशब्द काढला नाही. सम्राट् अशोक ह्या वीरवृत्तिपूजक वैदिक धर्माचा अनुयायी म्हणवीत होता तोपर्यंत म्हणजे साधारणतः अिसवी सनपूर्व २५२ पर्यंत भारतीय मौर्य साम्राज्याच्या ह्या वायव्य सरसीमेकडचा हा सैन्यसंभार तसाच्या तसाच शस्त्रसज्ज नि अजिंक्य होता. परंतु –

परंतु, अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारताच ही सारी सुरक्षितता अकस्मात् कोसळली. स्वतः गौतम बुद्धाने त्याचें अिवलेसें शाक्य राज्य सोडून जसें स्वतःच भिक्षुपण स्वीकारलें तसें अशोकाने बौद्धधर्म स्वीकारताच आपलें सम्राट्पद जर सोडून दिलें असतें आणि भिक्षु होअून तो बौद्ध धर्माचा प्रचार करीत हिंडता तर भारतीय राष्ट्रावर मोठेसें संकट कोसळलें नसतें. अशोकाच्या बौद्धधर्मनिष्ठेचीही खरी कसोटी लागती. पण मरतोपर्यंत अशोकास भारतीय महाराज्याचें सम्राट्पद काही सोडवलें नाही. अुलट त्याने त्या साम्राज्यासच बौद्धधर्माचा अेक प्रचारक मठ बनवून टाकला ! अर्थात् ह्या वायव्येकडच्या पर्यंतीय प्रांतांत (सरसीमेकडच्या प्रांतांत) 'धर्मविजय हा शस्त्रविजयापेक्षा श्रेष्ठ आहे.' 'अक्रोधेन जियेत् क्रोधम्' 'अहिंसा परमो धर्मः' 'मा हिंस्यात्सर्वभूतानि' प्रभृति देशकालपात्रानुसार आचरलीं गेलीं असता हितकारक असणारीं आणि वैदिक धर्मातच ज्यांचें मूळ आहे अशीं सूक्तें देशकालपात्रांचा विवेक सोडून नि निरपवाद सत्यें म्हणून बौद्ध धर्मात जशीं प्रचारिलीं जात तशीं प्रचारिलीं जाअू लागलीं. अशोकाच्या साम्राज्यकोषातून पोसलेले नि पाळलेले बौद्धभिक्षूंचे तांडेच्या तांडे त्या प्रांतांत 'शस्त्रबळ हें पाप आहे' असा प्रचार करीत हिंडू लागले. जे बौद्धधर्मीय असतील त्यांनाच साम्राज्यातील 'धर्ममहामात्र', प्रांतीय अधिकारी, 'रज्जुक' नांवाचे अशोकाचे विश्वासू राजकर्मचारी म्हणून अुच्चपदी नेमलें जाअू लागलें. ह्या सर्वांना अशोकाच्या आज्ञेप्रमाणे बौद्धधर्मप्रचारास नि आचारास शक्य तें तें राज्यीय प्रोत्साहन द्यावें लागे. गांधार पंचनदप्रभृति प्रांतांतही बौद्धधर्मीय प्रचार नागरिकांतच नव्हे तर सैनिकांतूनही चालू लागला. अर्थात् ज्या प्रमाणात वरील अहिंसादिक बौद्ध मतांचा अतिरेकी प्रचार जिकडे तिकडे राजदंडबळाने होअू लागला त्याच प्रमाणात त्या भारताच्या वायव्यपर्यंताकडील प्रांतांतही क्षात्रवृत्ति नि शस्त्रबळ अुणावत गेलें. वीस वर्षें असा वीरवृत्तिविरोधक नि अराष्ट्रीय प्रचार केल्यानंतर अशोक वारला. त्याच्या राज्यासनावर आलेल्या दुबळ्या बौद्धधर्मीय वंशजांनी तर त्या पर्यंतीय प्रांतांच्या संरक्षणार्थ चंद्रगुप्तापासून शस्त्रसज्ज ठाणात अुभ्या असलेल्या भारतीय सैन्यसंभाराच्या त्या अजिंक्य पोलादी कोटाची अशोकाहूनही अितकी अुपेक्षा केली की, तो कोट, पायाच ढासळल्यामुळे दुर्ग ढासळावा त्याप्रमाणे, ढासळून गेला.

सारांश

बौद्ध धर्माच्या शस्त्रबळनिंदक आणि राष्ट्रस्वातंत्र्यासाठी झुंजणाऱ्या वीरवृत्तीची अक्षम्य अुपेक्षा करणाऱ्या मतांचा अेकांगी नि अतिरेकी प्रचार भारतीय जनतेत राजदंडाच्या बळाने अशोक नि त्याचे वंशज यांनी साम्राज्यभर जो केला, साऱ्या साम्राज्याचेंच बौद्धमठीकरण आणि सैनिकांचें बौद्धभिक्षुकीकरण जें केलें त्यामुळे भारताच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा वायव्येकडील पर्यंतीय प्रांतांतील

जनतेत वीरश्रीचा ऱ्हास, भारत राष्ट्राच्या दुर्दम्य अभिमानाचा नायनाट आणि चंद्रगुप्ताच्या वेळेपासून त्या वेळच्या साऱ्या जगात बलिष्ठतम असलेल्या शस्त्रसज्ज सैन्यव्यूहाची ह्या अंतर्गत क्षयाने धुळधाण झाली म्हणूनच शिकंदर-सेल्युकसच्या मानाने अगदी दुय्यम असणाऱ्या डेमेट्रियसचें ग्रीक सैन्य हिंदुकुशपासून पंचनदा-सुद्धा सारे भारतीय प्रांत चालता चालता जिंकून मगधाच्या दिशेने पुढे सरसावलें.

सारी साम्राज्यसत्ता बौद्धांच्या हाती असताही त्यांचा कोणताही प्रांताधिप, राज्याधिकारी किंवा बौद्धीय जानपदसमूह क्षुब्ध होऊन भारतीय स्वातंत्र्य छिना-वण्यास येणाऱ्या ह्या यवनशत्रूशी रणांगणात झुंजण्यास सबळपणे पुढे आला नाही. भारताच्या ह्या राष्ट्रीय अपमानाची त्यांना चीड आली नाही, लाज वाटली नाही. प्रत्यक्ष मगधात जो अशोकाचा वंशज स्वतःस अजून सम्राट् म्हणवून घेत राज्या-सनावर बसलेला होता तो बौद्धधर्मीय बृहद्रथ राजा तर या यवनशत्रूच्या प्रतिकारासाठी पायही पुढे टाकीना.

क्वचित् असेंही असेल की अशा निरपवाद 'अप्रतिकाराने' तो बौद्ध राजा 'अक्रोधेन जियेत् कोधम्' ह्या धम्मपदातील सूक्ताचा प्रयोग, बसल्या बसल्याच ग्रीकांचें मन जिंकून, यशस्वी करू पाहत होता !

वैदिक धर्मीयांचा राष्ट्रीय प्रक्षोभ !
कलिंगाचा प्रतापी राजा खारवेल ग्रीकांवर चालून जातो

परंतु ग्रीकांचें परचक्र भारतीय स्वातंत्र्याला आणि राष्ट्रीय सन्मानाला ग्रासीत आहे ह्याची राष्ट्रीय चिंता, लाज किंवा चीड भारतीय बौद्धधर्मीयांना जरी वाटली नाही तरी भारतीय वैदिक धर्मीयांत मात्र त्या राष्ट्रीय अपमानाने आणि त्या राष्ट्रीय संकटाने जिकडे तिकडे संतापाची आग पेटली. त्या संकटाचा तत्काल प्रतिकार करण्याअितकें वैदिक धर्मीयांचें समर्थ राज्यकेंद्र अुत्तर भारतात अुरलेलें नव्हतें. परंतु सुदैवाने अशोकाच्या मृत्यूनंतर दहा अेक वर्षांतच दक्षिण भारतातील कलिंग (ओरिसा) आणि आंध्र ह्या दोन्ही दाक्षिणात्य राज्यांनी बौद्ध-धर्मीय मौर्य सम्राटाचें आधिपत्य झुगारून देअून आपआपलीं स्वतंत्र राज्यें स्थापि-लेलीं होतीं. ते दोघेही पराक्रमी राजे वैदिक धर्माभिमानी आणि म्हणूनच भारत राष्ट्राभिमानी होते. दोघांनीही प्रबळ सैन्यें अुभारून शस्त्रसज्ज ठेवलेलीं होतीं. अुत्तर भारत ग्रीक म्लेंच्छांनी पादाक्रान्त केलें आहे आणि मगधाचा दुबळा बौद्धधर्मीय राजा त्याचा काहीही प्रतिकार करू शकत नाही ह्या घटना अैकून ह्या दाक्षिणात्य राज्यांतील वैदिक धर्माभिमानी जनतेत मोठाच प्रक्षोभ माजला. शेवटी त्या स्वतंत्र कलिंग राज्याचा पराक्रमी अधिपति जो खारवेल त्याने डेमेट्रियसच्या ग्रीक सैन्यावर स्वतः चालून जाण्याचें ठरविलें.

यवनांची दाणादाण नि भरधाव पीछेहाट

प्रथम प्रबल सेनेसह त्याने मगध हस्तगत करून मग अयोद्धेच्या आसपास डेमेट्रियसच्या यवन सैन्याला गाठलें. कलिंगाच्या त्या प्रबल भारतीय सैन्याने यवनांची रणांगणात अितकी दाणादाण अुडविली की, डेमेट्रियस पाठ फिरवून भरधाव माघार घेत आपल्या अुरलेल्या सैन्यासह थेट पंचनदापलीकडे चालता झाला.

राजसूय यज्ञ

यवनांना भारताच्या पर्यंताकडे (सरसीमेकडे) असें हटविल्यानंतर त्याचा पाठलाग करण्यास किंवा त्या अुत्तरेकडच्या सर्व प्रदेशाची पक्की व्यवस्था करण्यास खारवेलला फार वेळ मिळाला नाही. राजकारणामुळे त्याला लगोलग कलिंगास परतावें लागलें. मगधाचा बौद्ध राजा बृहद्रथ मौर्य यासही त्याने पदच्युत केलें नाही. कलिंगास परत येताच भारताचें स्वातंत्र्य आणि सन्मान ह्यांचे रक्षणार्थ यवन शत्रूवर रणांगणात त्या पराक्रमी खारवेल राजाने जो विजय मिळविला होता, त्याच्या घोषणेप्रीत्यर्थ वैदिक धर्मीय राजश्रेष्ठांच्या परंपरेप्रमाणे त्याने राजसूय नांवाचा मोठा यज्ञसमारंभ केला. ह्या राजसूय यज्ञाचें वैशिष्टय हें असे की, तो यज्ञ मुख्यत: राष्ट्रीय आणि राजकीय स्वरूपाचा असे. त्यातही अशोकाने सर्व यज्ञयागांवर बलपूर्वक बंदी घातल्यानंतर चाळीस पन्नास वर्षेपर्यंत जवळजवळ साऱ्या भारतात वैदिक धर्मीयांना प्रकटपणे यज्ञसमारंभ असा करताच आला नाही. परंतु कलिंगात आणि आंध्रात वैदिक धर्मीयांची स्वतंत्र नि बलिष्ठ राज्यें प्रस्थापिलीं जाताच आज अशोकाचा तो वैदिक धर्माचरणावरील बलात्कारी प्रतिबंध अुघडपणे झुगारून देअून आणि भारताचे राष्ट्रीय शत्रु असणाऱ्या यवनांसारख्या म्लेंच्छांचा रणांगणात पराजय करून हा वैदिकधर्मीयांचा राजसूय यज्ञाचा समारंभ पन्नास वर्षानंतर पहिल्यानेच साजरा होत होता !

चार अेक वर्षांतच ग्रीकांची पुन्हा स्वारी

प्रतापी राजा खारवेल दक्षिणेत परत गेला आहे हें पाहताच काम्बोज आणि गांधार ह्या प्रांतांत ठाण मांडून बसलेल्या आणि डेमेट्रियसच्या मगधावरील स्वारीची जी दुर्दशा झाली तिच्यामुळे चिडून गेलेल्या मिन्यांडर ह्या ग्रीक सेनापतीने चार अेक वर्षांतच ताज्या दमाच्या सैन्यानिशी भारतावर पुन्हा चाल केली. डेमेट्रियसच्याच स्वारीप्रमाणे ग्रीकांच्या ह्या स्वारीलाही त्या बौद्धबहुल नि म्हणूनच प्रतिकारशून्य झालेल्या पंचनदादि प्रांतांचा किंवा मगधाच्या दुबळ्या अशोकवंशीय राजाचा म्हणण्यासारखा असा काही अेक प्रतिकार झाला नाही.

बौद्ध भारतीयांची भारतशत्रु ग्रीकांना सहानुभूति

अुलट, यवनसेनापति मिन्यांडर ह्यास ह्या भारतावरील स्वारीत अनेक बौद्ध धर्मीयांची सहानुभूतिही मिळू लागली! कारण बौद्ध धर्मातील अनेक मतें आपणांस आवडतात आणि आपण लवकरच बौद्धधर्म स्वीकारू असें तो अुघडपणे बोलून दाखवी. त्यामुळे हे ग्रीक लोक केवळ वैदिक धर्मीयांविरुद्धच काय ते लढावयास आलेले आहेत आणि ह्यांचें राज्य भारतावर झालें तर तें आपल्याच बौद्धधर्मीयांचें होणार आहे. आता ग्रीक लोक परकीय परराष्ट्रीय आहेत हें खरें, पण आपल्यास राष्ट्राबिष्ट्राशी काय कर्तव्य आहे ? बौद्धधर्म जाति, राष्ट्र, वंश मानीत नाही, अशी राष्ट्रघातक भारतविद्रोही नि दुर्बुद्ध विचारसरणी त्या बौद्ध म्हणविणाऱ्या भारतीय जनतेत अनेक भिक्षुप्रचारक अुपदेशू लागले ! त्यांच्या सहानुभूतीच्या साहाय्याचा भारतशत्रु मिन्यांडरलाही परिणामकारक अुपयोग होअू लागल्यामुळे त्याच्या ग्रीक प्रचारकांकडून त्यानेही असा प्रचार भारतीय बौद्ध जनतेत चालविला की, 'आपली स्वारी' ही बौद्धांच्या अगदी दुबळ्या मगध राजाचे हातून भारतीय साम्राज्यसत्ता छिनावून घेण्याचा जो भारतीय वैदिक धर्मीयांचा कट होत आहे तो हाणून पाडण्यासाठी तेवढी काय ती आहे ! मिन्यांडर पंचनदादि प्रदेश पुन्हा यवनांकित करीत अयोध्येपर्यंत आला. अपक्ववेळी घाअी केल्यामुळे डेमेट्रियसची झाली तशी आपलीही दुर्दशा होअू नये म्हणून हातात आलेला भारतीय प्रदेश नि राज्य संघटित करून नि अधिक सैन्याची भरती करून मग मगधावर झडप घालावी अशा सावधपणे तो अयोध्येकडे स्थिरस्थावर झाला आणि अनुकूल संधीची वाट पाहत बळकट ठाण मांडून बसला.

पण तिकडे पाटलीपुत्रात !

कलिंगाच्या प्रतापी खारवेल राजाच्या विजयामुळे अुत्तर भारतातील वैदिक-धर्मीय नेत्यांत नि जनतेत वीरश्रीची लाट आधीच अुसळली होती. त्यातच मिन्यांडरचें ग्रीक सैन्य पुन्हा मगधावर चालून येत आहे ही बातमी आली. त्यातही भारतीय बौद्ध जनतेत स्वदेशद्रोही प्रवृत्ति बळावत असून राष्ट्रशत्रु ग्रीकांचें राज्य भारतात स्थापिलें जावें म्हणून ती मिन्यांडरला अनुकूल होत आहे अशीं स्पष्ट चिन्हें दिसू लागलीं. तेव्हा ग्रीकांचा अेकदाचा निःशेष निःपात करण्यासाठी प्रथमतः मगधाचा तेव्हाचा बौद्धधर्मीय राजा जो वृहद्रथ मौर्य त्यालाच सिंहासनावरून खाली ओढून कोण्या अेखाद्या चंद्रगुप्तासारख्या पराक्रमी वैदिकधर्मीय पुरुषासच सम्राट्पदी स्थापावें या हेतूने अुत्तरेत राष्ट्राभिमानी भारतीय नेत्यांचें अेक मोठें राज्यक्रांतिकारक कारस्थान रचण्यात आलें. पण त्या सर्वांसमोर मुख्य प्रश्न जो होता तो हा की, यवनांचा निःपात करणारा आणि ह्या राज्यक्रांतीचें धुरंधरत्व पत्करणारा असा पराक्रमी पुरुष आहे कोण ?

पुष्यमित्र

मगधाच्या अुपर्युक्त बृहद्रथ मौर्य ह्या राजाचें जें काही 'सैन्य' म्हणून अुरलेलें होतें त्यात पुष्यमित्र नांवाचा अेक सैनिक होता. पुष्यमित्र हा जन्माने ब्राह्मण होता. वैदिक धर्माचा नि भारतीय राष्ट्राचा तो कट्टर अभिमानी होता; आणि त्यातही निष्ठावंत शिवभक्त होता. त्याच्या कुलाचें नांव शुंग होतें. मगधाच्या त्या सैन्यामध्ये तो आपल्या क्षात्रतेजानेही अितकें वर्चस्व पावलेला होता की, त्या बृहद्रथ मौर्य राजाने ग्रीकांनी केलेल्या स्वारीच्या प्राणसंकटात पुष्यमित्रालाच निरुपायाने मुख्य सेनापतिपदावर नेमलें. सेनापतित्व हाती येताच त्याने मगधाच्या सैन्याचें शस्त्रबळ नि संख्याबळ वाढविण्यास लगोलग आरंभ केला. ह्या योगायोगाने साऱ्या वैदिकधर्मीय राष्ट्रभक्त जनतेचे डोळे आपण होअून सेनापति पुष्यमित्र ह्याचेकडे लागले. ज्याला त्याला अशी अुत्कट आशा वाटू लागली की, जर सेनापति पुष्यमित्रच ह्या क्रांतीचें नेतृत्व घेअील तर? तर त्या पराक्रमी पुरुषाहून आज भारतीय साम्राज्याच्या परंपरागत सिंहासनावर बसण्यास ह्या पिढीत तरी त्याच्याहून अधिक योग्य कोण आहे?

केव्हा केव्हा अितिहासामध्ये 'फलानुमेयाः प्रारंभाः संस्काराः प्राक्तना अिव' ह्या न्यायाने पुढे प्रकटपणे घडलेल्या घटनांवरूनच काय तें कूटनीतिज्ञांनी त्यापूर्वी आणि त्या घडवून आणण्यासाठी काय काय गुप्त कट आणि कारस्थानें रचलीं असलींच पाहिजेत त्यांचा छडा लावता येतो. मगधातील ह्या राज्यक्रांतीत पुढे लवकरच वर्णिल्या जाणाऱ्या अितिहाससिद्ध घटनांमुळे हें स्पष्ट होतें की, स्वतः सेनापति पुष्यमित्राने आधीपासूनच ह्या भावी राज्यक्रांतीच्या कटाचें नेतृत्व गुप्तपणे स्वीकारलेलें असलें पाहिजे. अितकेंच नव्हे तर त्याच्या हाती असलेल्या राज्यीय सैन्याची आणि त्यातील प्रमुखांचीही त्याने ह्या क्रांतीला प्रत्यक्षाप्रत्यक्ष संमति मिळविली असली पाहिजे.

बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद

ही सर्व पूर्वसिद्धता चालली असता अेके दिवशी पाटलीपुत्र ह्या राजधानीच्या भव्य पटांगणात सर्व सैन्याचा शस्त्रसज्ज संचलनसमारभ करण्याचें योजिलें गेलें. त्याप्रमाणे त्या सैनिक समारंभाचें निरीक्षण करण्यासाठी सम्राट् बृहद्रथ मौर्य हा स्वतः अुपस्थित होता. सेनापति पुष्यमित्राच्या आज्ञेनुसार त्या चतुरंग सैन्यांतील विविध शस्त्रविभागांचे कायंक्रम मोठ्या गाजावाजाने चालू असता, ज्याचा अितिहासात अुल्लेख सापडत नाही अशा कोणत्या तरी कारणाने राजा बृहद्रथ बसला होता त्या बाजूला काहीतरी अुत्क्षुब्ध कटकट चालू झाली. त्या अुत्क्षोभातच स्वतः

"सेनापति पुष्यमित्र ह्याने नांवानेच काय तो सम्राट् असलेल्या बृहद्रथ मौर्यावर चालून जाऊन त्याचा तेथल्या तेथेच शिरच्छेद केला !

ह्या शिरच्छेदातच अशोकाच्या वंशाचा राजकीय अंत झाला ! बौद्धधर्मीय मौर्यराज्य लयाला गेलें !!

ह्या अकस्मात् घडलेल्या भीषण घटनेसरशी तेथे जमलेल्या जनसागरात मोठी खळबळ अुडाली. परंतु त्या साऱ्या शस्त्रसज्ज दळभारातील किंवा बृहद्रथाभोवती वसलेल्या राजपुरुषातील कोणी बृहद्रथाच्या वतीने सेनापति पुष्यमित्रावर तुटून पडला का ? नाही. अुलट त्या शस्त्रसज्ज दलभारातून सेनापति पुष्यमित्राच्या नांवाचा जयघोष अुठू लागला.

कारण सैनिकांसुद्धा अनेकांच्या मनात जें करावयाचें होतें, परंतु जें महासाहसी कृत्य करण्याचें अुत्तरदायित्व स्वतःकडे घेण्यास साऱ्या अुत्तर भारतात कोणीही धजत नव्हता, तेंच भारतीय साम्राज्याच्या स्वातंत्र्यसंरक्षणास अपात्र ठरलेल्या अशोकवंशज बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद अशोकाचे भर राजधानीतच करण्याचें अपरिहार्य राष्ट्रीय कर्तव्य सेनापति पुष्यमित्राने केलें होतें !

भारतीय स्वातंत्र्यरक्षणार्थ जें पूर्वी चंद्रगुप्तास करावें लागलें तेंच साहसी कृत्य पुष्यमित्राने केलें.

शिकंदराच्या अगदी पहिल्या स्वारीच्या वेळी ग्रीकांचा प्रतिकार करण्यास असमर्थ ठरलेल्या नामधारी सम्राट् महापद्मनंदाचा शिरच्छेद, भारतीय स्वातंत्र्याच्या आणि भारतीय साम्राज्याच्या संरक्षणार्थ ज्याप्रमाणे आर्य चाणक्य नि सम्राट् चंद्रगुप्त ह्यांना राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच करावा लागला, अगदी त्याच कारणासाठी मगधाच्या ह्या बौद्धधर्मीय नामधारी सम्राट् बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद सेनापति पुष्यमित्रास राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच करावा लागला.

सम्राट् पुष्यमित्र शुंग

ही घटना अिसवी सन पूर्व १८४ व्या वर्षाच्या आसपास घडली. वैदिक विधीनुसार पाटलीपुत्रात भारतीय सम्राट्पदाचा अभिषेक होअून पुष्यमित्र अशोकाच्या सिंहासनावर आरूढ झाला. मौर्य राजवटीचा अंत होअून सम्राट् पुष्यमित्राच्या शुंग वंशाची राजवट चालू झाली.

सम्राट् पुष्यमित्राची ग्रीकांवर चढाअी

प्रथमतः राजधानीतील नि आसपासच्या प्रदेशातील सारा राज्यप्रबंध व्यवस्थित नि बळकट करून आणि चतुरंग, प्रबळ नि रणोत्सुक असें भारतीय सैन्य अुभारून सम्राट् पुष्यमित्राने अयोध्येस ठाण मांडून वसलेल्या मिन्यांडरवर स्वारी

केली. भारतीय शस्त्रबळापुढे रणांगणात टिकाव धरणें अशक्य झाल्यामुळे यवन सेनापति मिन्यांडर, मागे पंचनदाकडे सैन्यासह पण झुंजत हटू लागला. परंतु पूर्वी डेमिट्रियसचा पिच्छा पुरविण्याचें जसें राहून गेलें तशी ढिलाई ह्यावेळी न करता सम्राट् पुष्यमित्राने ग्रीकांच्या सैन्याचा कडोनिकडीने पाठलाग केला. पराभवामागून पराभव खाल्ल्यामुळे नि त्याच्या ग्रीक सैन्याचा सारा व्यूह ढासळून गेल्यामुळे अगदी हतवीर्य झालेल्या मिन्यांडरला पुष्यमित्राने सिंधूपार हुसकून दिलें. सारें सिंधूपर्यंतचें भारत ग्रीकांच्या राजकीय दास्यातून मुक्त झालें.

ग्रीकांची तलवार तोडून टाकली, ढाल फोडून टाकली, त्यांच्या राजसत्तेचा कंदच अुपटून टाकला.

भारतावरील ग्रीकांची हीच शेवटची स्वारी ठरली सम्राट् पुष्यमित्राने केलेल्या ग्रीकांच्या ह्या पराभवामुळे त्यांची शस्त्रशक्ति अितकी क्षीण झाली की, पुन्हा सिंधुनदी ओलांडून भारतावर स्वारी करण्याची धमकच त्यांच्यात अुरली नाही. शिकंदरापासून भारतास अुपद्रव देत आलेल्या ह्या यवनशत्रूचा भारताने असा नित्याचा निःपात केला !

ग्रीकांच्या हातून सोडविलेला सारा प्रदेश पुष्यमित्राने आपल्या साम्राज्यास जोडला. अुज्जयिनीला तिकडच्या राज्यविभागाचा मुख्य राजप्रतिनिधि म्हणून त्याने आपला पुत्र सेनापति अग्निमित्र यास नेमलें. सेनापति अग्निमित्र हाही बापाप्रमाणेच शूर आणि कर्ता पुरुष होता. त्याने दक्षिणेकडील विदर्भ देशापर्यंत आपल्या साम्राज्याचें आधिपत्य मान्य करविलें. परंतु पुढे विदर्भाचा राजा तें आधिपत्य मानीना. यास्तव अग्निमित्राने त्याच्यावर स्वारी केली. तीत विदर्भ राजाचा पराभव झाला. त्याच घडामोडीत विदर्भ राजाची कन्या मालविका अग्निमित्राच्या पराक्रमादि गुणांनी मोहित होअून त्याच्याशी विवाह करावयास अुत्सुक झाल्यामुळे बिदर्भ राजाने पुष्यमित्राच्या संमतीने अग्निमित्राशी मोठ्या समारंभपूर्वक तिचें लग्न लावन दिलें. ह्यामुळे त्या दोन्ही राजकुलांचा केवळ स्नेहसंबंधच नव्हे तर रक्तसंबंधही जुळून आला. ह्या रमणीय कथेवरच कालिदासाने आपलें ' मालविकाग्निमित्र ' हें नाटक लिहिलें आहे.

अशोकच्या पाटलीपुत्रातच अश्वमेध यज्ञ !

ग्रीकांसारख्या पुरातन परकीय शत्रूंचा निःशेष निःपात करून भारतीय साम्राज्याचें पुनरुज्जीवन करणाऱ्या सम्राट् पुष्यमित्रास आपल्या वैदिक परंपरेनुसार आता अश्वमेध यज्ञ करण्याचा अधिकार स्वपराक्रमानेच प्राप्त झालेला होता. सम्राट् पुष्यमित्राच्या ह्या अधिकाराविषयी व्हिन्सेट स्मिथही त्याच्या The Early History of India ह्या ग्रंथात गौरवपूर्वक लिहितो की :' The

Yavanas and all other rivals having been disposed off in due course, Pushyamitra was justified in his claim to reign as the paramount power of North India and straightway proceeded to announce his success by a magnificent celebration of tbe Ashwa-medha sacrifice at his capital' (Page 189)

सम्राट् पुष्यमित्राने अश्वमेघ यज्ञाचा सोडलेला संकल्प अैंकताच साऱ्या भारतवर्षात, अत्यंत अल्पसंख्य असलेली बौद्ध जनता सोडून दिली असता, भारतीय राष्ट्राभिमानाची नि विजयानंदाची लाट अुसळली. ज्या अशोकाने वैदिक धर्मीयांचें धार्मिक आचारस्वातंत्र्य राजदंडाचे बळाने छिनावून घेतलेलें होतें त्याच बौद्ध अशोकाची राजधानी असलेल्या पाटलीपुत्रात वैदिक धर्माभिमानी सम्राट् पुष्यमित्राचा हा अश्वमेध यज्ञ होणार होता. वैदिक धर्मीयांच्या धर्माचारस्वातंत्र्या-वरील अशोकाने लादलेले सारे प्रतिबंध काढून टाकलेले आहेत अशी सम्राट् पुष्यमित्राने केलेली, तो अश्वमेध यज्ञ म्हणजे अेक प्रकट सम्राटीय घोषणाच होती!

सम्राट् पुष्यमित्राचा पुत्र युवराज अग्निमित्र हा जसा पराक्रमी, रणधुरंधर नि कर्तृत्ववान् राजपुरुष होता तसाच त्या युवराज अग्निमित्राचा पुत्र, म्हणजे पुष्यमित्राचा नातू, वसुमित्र हाही अेक तरुण नि तेजस्वी राजकुमार होता. सम्राट् पुष्यमित्राने जेव्हा आपला अश्वमेधीय घोडा विजययात्रेप्रीत्यर्थ सोडला तेव्हा त्याच्या मागेमागे त्याच्या रक्षणासाठी ससैन्य राहण्याचें कार्य ह्याच त्याच्या तरुण नातवावर, सेनानी वसुमित्रावर सोपविलें. त्या विजयाश्वाच्या स्वेच्छ संचारात सिंधु नदीच्या तीरापर्यंत कोणीही अडथळा केला नाही. परंतु सिंधुतीरी कोण्या यवनराजाने त्याला अडथळा केला. म्हणजेच त्या वेळच्या संकेताप्रमाणे सम्राट् पुष्यमित्राच्या आधिपत्यास आव्हानिलें. तेव्हा त्या तरुण सेनानी वसुमित्राने त्या यवन राजाशी लढून त्याचा पुरता पराभव केला आणि आपला विजयाश्व सोडवून आणला. जेव्हा अेक वर्षानंतर ह्या अश्वाला घेअून सेनानी वसुमित्र विजयासह पाटलिपुत्रास परत आला तेव्हा जिकडे तिकडे केवढा आनंद झाला तें वृत्त स्वत: सम्राट् पुष्यमित्राने युवराज अग्निमित्रास धाडलेल्या आमंत्रणपत्रिकेत लिहिलेलें आहे. ह्या पत्राचा बह्वंशी त्या सम्राटाच्या भाषेतच प्रतविलेला मूळ लेख सुदैवाने आजही आपणांस वाचावयास मिळतो. कारण कालिदासाने वर अुल्लेखिलेल्य 'मालविकाग्निमित्र' नाटकात तो बह्वंश जशाचा तसाच दिलेला आहे. त्या नाटकातील तें पत्र अितकें मनोवेधक आहे की, शक्यतो तें प्रत्येकाने वाचावें. त्या विजयशील काळातील प्रत्यक्ष सम्राट् पुष्यमित्राच्या विचारांचें आणि सर्वसामान्य जनभावनाचेंही तें अेक जिवंत चित्रण आहे.

राष्ट्रीय विजयोत्सव

भारतवर्षातील मोठमोठे जपी, तपी, वेदविद्यापारंगत, क्षत्रिय कुलोत्तंस राजवृंद, साम्राज्यातील प्रमुख राज्याधिकारी, नगरश्रेष्ठी नि ग्राममुख्यजन त्या

अश्वमेधयज्ञाच्या महान् समारंभास अुपस्थित होते. त्या काळचा पंडितांतील पंडित म्हणून गाजलेला आणि आज तर ज्याला पाश्चिमात्यादिक परकीय विद्वद्वर्गातही जागतिक मान्यता मिळाली आहे तो पतंजलिही त्या अश्वमेधास अुपस्थित होता. असल्या असल्यांच्या आशीर्वादांनी नि सहभागित्वाने त्या अश्वमेधाच्या समारंभास म्लेंच्छांचें मर्दन करणाऱ्या भारतीय विजयोत्सवाची प्रतिष्ठा नि शोभा प्राप्त झाली.

आशियाअी ग्रीकवंशाचाच नायनाट

वर वर्णिल्याप्रमाणे सम्राट् पुष्यमित्राने साधारणतः अिसवीसनापूर्वी १९० ते १८० वर्षांच्या मध्यंतरी ग्रीक आक्रमकांना नित्याचे सिंधूपार हुसकून देअून भारत स्वतंत्र केल्यानंतर ग्रीकवंशाच्याच अितिश्रीस आरंभ झाला. सिंधूपलीकडे गांधारात नि व्याक्ट्रियात (बाल्हिक देशात) त्यांचीं काही दुर्बळ होत चाललेलीं लहान सहान फुटकळ राज्यें टिकाव धरून होतीं. परंतु अिसवीसनाच्या पहिल्या शतकाच्या आरंभाचे आगेमागे जेव्हा मध्यआशियातील शक जातीचा प्रचंड लढाअू लोंढा व्याक्ट्रिया (बाल्हिक), अिराण नि गांधार ह्या प्रांतांवर येअून आदळला, तेव्हा त्या कडव्या नि रानटी शकांच्या खड्गापुढे तिकडील साऱ्या ग्रीक जनतेस पळता भुअी थोडी झाली. पुरुष स्त्रीमुलाबाळांसुद्धा ते पुढे पळत, थांबत, पुन्हा पुढे पळत, आपला जीव वाचविण्यासाठी शेवटी सिंधु अुतरून भारतीय साम्राज्यात शिरले, पण आता केवळ आश्रयार्थी म्हणून, शरणार्थी म्हणून ! – कुठे ते अिसवीसनपूर्व ३२९ ते ३२७ मध्ये 'युद्धं देहि' म्हणून गर्जत भारतावर चढून आलेले, शिकंदर सेल्युकसचे विजयार्थी ग्रीक आणि कुठे हे भारतीय पराक्रमापुढे शेवटी हतवीर्य झालेले अिसवीसनाच्या आरंभी आरंभीचे 'भिक्षां देहि' म्हणत भारतीयांच्या दारोदार हिंडणारे त्यांचे वंशज शरणार्थी ग्रीक !

पण अशा दुर्दशेतही जुनें वैर विसरून भारताने त्यांना आश्रय दिला. भारतीयांच्या अुदारतेचा त्यांच्या त्या टोळचांपैकी जिला जिथे आश्रय मिळाला त्या त्या नगरात, प्रांतात ती ती ग्रीकांची टोळी फुटकळपणे वसत गेली. त्यांच्यापैकी काही बौद्ध झाल्या. काही वैदिक धर्मीय झाल्या. परंतु त्या काळी वैदिक धर्मीयांचींच राज्यें असल्यामुळे ह्या ग्रीक समाजातील व्यक्तीव्यक्तीचा धर्म बौद्ध असला काय, वैदिक असला काय, तरी कोणच्याही प्रकारचा राजकीय अुपद्रव देणें त्यांना शक्य झालें नाही. हळूहळू ते स्वतःची ग्रीक भाषाही विसरले. भारतीय भाषा, चाली-रीती हीं सारीं आत्मसात् करून भारतीय समाजात ते झपाट्याने अेकरूप होत गेले. त्यांच्यात भारतीयांपासून आपण अलग आहोत, अन्य राष्ट्र आहोत अशी प्रेरणा देणारी जी अहंकारी ग्रीकपणाची भावना तीच मुळी त्यांचे विवाहादि संबंधही भारतीयांत होत गेल्याने अेक दोन शतकांच्या आत नष्ट झाली. गंगौघात मिठाचा खडा विरून जावा तसें त्यांचें ग्रीकपणच भारतीय जीवनौघात विरून गेलें

म्लेच्छांना प्रथम संगरांत जिंकू शकलो म्हणूनच त्यांना संस्कृतीत आत्मसात् करू शकलो

तथापि ह्या प्रकरणी बहुतेक अितिहास लेखकांचें आणि आपल्या लोकांचें अेका महत्त्वाच्या विधेयाकडे लक्ष आकर्षिलें गेलेलें नाही. त्यासाठीच तें विधेय अिथे अुल्लेखिणें अवश्य आहे. ती गोष्ट ही की, भारतावर चढाअी करून आलेले विजयार्थी यवन काय किंवा पुढे आणखी जे जे कोणी म्लेंच्छ भारतावर चालन आले ते परशत्रु काय, त्यांच्यापैकी ज्यांना ज्यांना शतकव्यापी संघर्षानंतर का होअीना, पण भारतीयांनी जिंकून, गिळून, पचवून आपल्या संस्कृतीत, समाजात आत्मसात् करून टाकलें, नाहीसें करून टाकलें, त्या त्या प्रत्येकाच्या प्रकरणी हेंच सिद्ध झालेलें आहे की, त्या त्या आक्रमकांची ती चढती तलवार भारतीय पराक्रमाने प्रथम जेव्हा तोडून टाकली, त्यांना सशस्त्र सगरातही जेव्हा चारी मुंड्या चीत पाडलें, तेव्हाच काय तें, ते ते परकीय सशस्त्र आक्रमक आमच्या भारतीय संस्कृतीत नि समाजात आत्मसात् करून टाकण्याअितके चर्वणीय नि पचनीय होअू शकले. केवळ शांतिपाठाने नव्हे, तर बलवत्तर शस्त्रपाठाने!!

धर्मच्छळ केला नाही, राष्ट्रद्रोहाच्या पापाचा योग्य तो दंड दिला !

सम्राट् पुष्यमित्राने बौद्ध भिक्षूंचा फार छळ केला, काहींना ठार मारलें, काही मठ अुद्ध्वस्त केले असे पौराणिक पद्धतीने रंगविलेले अुल्लेख जुन्या बौद्धग्रंथांतून सापडतात. युरोपियन अितिहास लेखकांनी सुद्धा ह्या अुल्लेखांना अतिशयोक्तिपूर्ण म्हणूनच बाजूस सारलें आहे. तथापि काही जणांनी ह्या अतिशयोक्तीच्या वुडाशी थोडेंतरी तथ्य असलें पाहिजे, पुष्यमित्राने कवळ धर्मद्वेषाने बौद्धांवर अन्याय्य सूड अुगविण्यासाठी थोडाफार छळ केला असला पाहिजे असें प्रतिपादिलें आहे. आमच्या मतेही बौद्धांपैकी अनेकांना सम्राट् पुष्यमित्राने धारेवर धरलें असलेंच पाहिजे. परंतु तें केवळ तात्त्विक नि धार्मिक मतभिन्नतेसाठी नव्हतें.

बौद्ध लोक शून्यवाद किंवा अज्ञेयवाद मानीत किंवा त्यात कोणी नास्तिक होते किंवा अहिंसक होते किंवा वेदनिंदक होते किंवा त्यांच्या जपजाप्याच्या पद्धति वैदिकांहून वेगळ्या होत्या म्हणून काही बौद्धांचा सामुदायिक 'धर्मछळ' झालेला नव्हता. स्वत: गौतम बुद्धाला त्याच्या धर्माचा प्रचार करताना कोणाचीही आडकाठी झालेली नव्हती ! तेंही राहो. पण पुढे चंद्रगुप्ताच्या अखिल नि अखंड भारतवर्षीय साम्राज्यात नि वैदिक धर्मनिष्ठ अशा स्वत: आर्य चाणक्याच्या प्रधानपदीत, बौद्ध धर्माला अुणीपुरीं ३०० वर्षें अस्तित्वात येअून झालीं असताही त्यांचा छळ होत असल्याची कुणकूणही, त्या वेळचा प्रख्यात ग्रीक राजदूत जो चंद्रगुप्ताच्या राजसभेत वर्षानुवर्षें राहिलेला होता त्या मेग्यास्थिनीसने आपल्या अितिहासप्रसिद्ध प्रतिवृत्तात नोंदलेलें नाही. मेग्यास्थिनिसच्या प्रतिवृत्तात बुद्धधर्माचें नांवसुद्धा आलेलें

नाही ! कारण तेव्हा शिकंदर किंवा सेल्युकस ह्या बलाढ्य ग्रीक सेनानींशी किंवा त्यांच्या सैन्याशी बौद्धांनी राजद्रोहात्मक किंवा राजकीय असे देशघातक संबंध ठेवलेले नव्हते. त्यांना तें शक्यच नव्हतें. म्हणूनच तशा अितर अनेक पंथांप्रमाणे बौद्धांनाही चंद्रगुप्ताच्या नि आर्य चाणक्यासारख्याच्या वैदिक धर्मीय साम्राज्यात आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करता आलें. अितकेंच नव्हे तर त्याचा अुपदेशाने जो काही प्रचार करता येअील तो प्रचारही करता आला.

परंतु शिकंदर सेल्युकसनंतर ग्रीकांची जी दुसरी चढाअी डेमेट्रियस मिन्यांडरच्या वेळी भारतावर झाली नि ते राष्ट्रशत्रु थेट अयोध्येपर्यंत येअून मगधाच्या सम्राट् पीठावरच ग्रीक सम्राटाचा राज्याभिषेक करण्याच्या बेतात आले तेव्हा अशा भारताचें राष्ट्रीय स्वातंत्र्य धोक्यात आणणाऱ्या राजकीय संकटात भारतीय बौद्धांनी मागे वर्णिल्याप्रमाणे धडधडीत राष्ट्रद्रोह केला. अिथेच हेंही सांगणें विषयानुकूल होणार आहे की, मिन्यांडर – ज्याला बौद्ध 'मिलिंद' म्हणतात – स्वतः बौद्धधर्म स्वीकारता झाला, तेव्हा त्या ग्रीक राजालाच भारतीय बौद्धांनी आपली राजनिष्ठा विकली. त्याला त्या त्या भारतीय प्रदेशाचा राजा मानलें. त्या ग्रीकांच्या भारतीय प्रदेशातील राजसभेत बौद्ध पंडित नि बौद्ध भिक्षु कोण्या स्वराष्ट्रीय राजाच्याच राजसभेत मिरवावे तसे मानाने मिरवू लागले अशी ही भारतीय बौद्धांची भयंकर देशद्रोहक कृत्यें, मठामठातील स्वराज्यघातक कट नि राष्ट्रस्वातंत्र्यविरोधी अुठावण्या करण्याचा जनतेत केलेला प्रचार हाणून पाडण्यासाठी ग्रीकांशी प्रत्यक्ष युद्ध चाललेल्या काळात सम्राट् पुष्यमित्राला नि त्याच्या सेनाधिकाऱ्यांना अशीं राष्ट्रद्रोही कृत्यें नि प्रचार करणाऱ्या भारतीय बौद्धांना देहान्त शासन देणें, नि अशा भारतद्रोही कटांचीं केंद्रें असणाऱ्या बौद्ध मठांना अुद्ध्वस्त करून टाकणें भागच होतें. भारतीय स्वातंत्र्याचे नि साम्राज्याचे संरक्षणार्थ स्वदेशद्रोह्यांना नि परराष्ट्रास मिळणाऱ्या स्वराष्ट्रघातक्यांना दिलेला तो न्यायोचित राजकीय दंड होता. तो त्यांचा केलेला धार्मिक छळ नव्हता. भारतीय साम्राज्याचे प्रमुखतम दंडधारक असणाऱ्या सम्राटाने अशा राष्ट्रघातक पाप्यांना, मग ते वैदिक असोत वा बौद्ध असोत, दंड करणें हें पुष्यमित्राच्या वैदिक धर्मीय दंडनीतीप्रमाणे त्याचें राजकर्तव्यच होतें, धर्मकर्तव्यच होतें.

कोण धर्मसहिष्णु ? अशोक की पुष्यमित्र ?

गतानुगतिक अितिहास लेखकांत अशोकाला परधर्मसहिष्णु म्हणून गौरविण्याचा जो परिपाठ पडून गेला आहे आणि पुष्यमित्राच्या धर्मस्वातंत्र्य प्रस्थापिणाऱ्या महत्कृत्याविषयी अुल्लेख करण्याचे भानही कोणा स्वदेशीय वा परदेशीय अितिहासकाराला न राहता अुलट त्याने बौद्धांचा 'धर्मच्छळ' केला असल्याच्या बौद्ध पौराणिक कथा मात्र अुल्लेखिण्याचा नि त्यामुळे पुष्यमित्र हा काही परधर्म-

सहिष्णु नव्हता असें सुचविण्याची किंवा ठासून सांगण्याची जी परंपरा चालू आहे तिचाही वीमोड केला पाहिजे. जर कोणी धार्मिक असहिष्णुतेचा अधिक दोषभागी असेल तर तो अशोकच होय. कारण नुसत्या प्रचाराने नव्हे तर राजशक्तीच्या बळाने त्याने साऱ्या भारतवर्षभर वैदिक धर्मीयांचे म्हणजेच भारतीय राष्ट्रातील त्या काळच्या अधिकाधिक जनतेचे यज्ञयाग मृगयाप्रभृति अनेक मूलगामी धर्माचार सर्व भारतभर दंडय ठरविले होते. पण अशोकाचें अुट्टें काढण्यासाठी सुद्धा सम्राट् पुष्यमित्राने काही अशी राजाज्ञा काढली नाही की, ' बौद्धांनी मठामठातून सामुदायिक यज्ञ वैदिक पद्धतीनेच केले पाहिजेत ! ' किंवा ' निदान प्रत्येक गृहस्थाश्रमी बौद्धाने घरोघर वैश्वदेव केलाच पाहिजे ! ' राष्ट्रशत्रूंशी कोणताही राजकीय संबंध न ठेवता आपआपला धर्माचार किंवा धर्मप्रचार करणाऱ्या पण वैदिक धर्मीय नसलेल्या अनेक पंथांचे समूहांना भारतात त्या काळीही जसें धर्मस्वातंत्र्य नि सुरक्षितता अुपभोगिता येत होती तशीच ती तितक्या निरुपद्रवीपणे वावरणाऱ्या बौद्धांनाही अुपभोगिता येत होती. आता हें शक्य आहे की, भर युद्धकालात देशद्रोह करणाऱ्या बौद्धांची अवश्य ती ससेहोलपट चालली असता सुक्याबरोबर ओलेंही काही प्रकरणीं जळलें गेलें असेल. पण तो नियम नव्हे – अपरिहार्य अपवाद.

पुष्यमित्राने केलें तें हेंच सत्कृत्य होतें की, अशोकाने बळाने अुच्छेदिलेलें धर्मस्वातंत्र्य भारतीय साम्राज्यात पुन्हा प्रस्थापिलें. धार्मिक असहिष्णु किंवा पक्षपाती म्हणावयाचेंच तर अशोकास म्हणावें, पुष्यमित्रास नव्हे.

या प्रकरणी वैदिकाशी कोणत्याही प्रकारे विशेष सहानुभूति न बाळगणाऱ्या पण त्यातल्या त्यात तारतम्य राखून लिहिणाऱ्या व्हिन्सेंट स्मिथसारख्या परकीय अितिहासकाराने काढलेले अुद्गार वाचनीय आहेत.

यद्यपि अितर अितिहासकारांप्रमाणेच स्मिथसारख्या विद्वान् अितिहासकाराच्याही हें मुळीच ध्यानात आलेलें नाही की, भारतीय बौद्धांची केव्हा केव्हा ससेहोलपट भारतीय वैदिकांकडून झाली तिचे आणि बौद्ध धर्माविषयी भारतीय जनतेत जी चीड नि अप्रियता अुत्पन्न होअून बौद्धधर्माचा शेवटी नायनाट झाला त्याचें अेक मुख्य कारण भारतीय बौद्धांनी भारतीय स्वातंत्र्य नि भारतीय साम्राज्य याशी वारंवार केलेलें राष्ट्रद्रोही वर्तन हेंच होतें. तथापि हें मुख्य कारण लक्षात नसताही व्हिन्सेंट स्मिथने आपल्या प्रसिद्ध ग्रंथात बौद्धांच्या अितर अैतिहासिक कृत्यातून धार्मिक असहिष्णुतेच्या प्रश्नी विशेषत: बौद्धांनाच दोषी ठरविलें आहे. त्याच्या ह्या प्रकरणीच्या लेखातील काही वाक्ये अशीं –

The memorable Horse Sacrifice of Pushyamitra marked the beginning of Brahmanical (Vaidik ?) re-action which was fully developed by centuries later in the time of Samudragupta & his successors . . . . . Its credit may be given to semi-mythological

stories of Buddhist writers. Pushyamitra was not contented with the peaceful revivals of Hindu rites, but indulged in a savage persecution of Buddhism .... It will be rash to reject this tale as wholly baseless, although it may be exaggerated .... That such outbursts after all should have occurred is not wonderful if you consider the extreme oppressiveness of the Jain and Buddhist prohibition when ruthlessly enforced as they certainly were by some Rajas and probably by Ashok. The wonder rather is that persecutions were so rare. And that as a rule the various sects managed to live together in harmony and in the enjoyment of fairly impartial official favour.' (Early History of India Page 190-91)

शिकंदरच्या वेळेपासून भारताला वेळोवेळी अुपद्रव देत असलेल्या यवनांच्या राजसत्तेला, शस्त्रशक्तीचा आणि म्हणूनच परिणामी त्यांच्या वांशिक अस्तित्वाचा ज्याच्या प्रतापी खड्गाने शेवटी शिरच्छेद करून टाकला आणि अेतदर्थच ज्यास **'यवनांतक'** ही पदवी यथार्थपणे शोभते आहे त्या सम्राट् पुष्पमित्राने, त्यानेच मुक्त केलेल्या आपल्या भारताच्या स्वातंत्र्याचें नि साम्राज्याचें संरक्षण, संगोपन नि संवर्धन ३६ वर्षेपर्यंत केल्यानंतर अिसवी सन पूर्व १४९ व्या वर्षाच्या आगेमागे आपला देह ठेवला.

ज्या अर्थी **यवनविजेत्या** सम्राट् चंद्रगुप्ताच्या राजमुद्रेने अंकित झालेलें पान आपल्या भारतीय अितिहासातील 'पहिलें सोनेरी पान' ठरतें, त्याच अर्थी **'यवनांतक'** सम्राट् पुष्यमित्राच्या राजमुद्रेने अंकित झालेलें आपल्या भारतीय अितिहासातील जें पान तें ठरतें सोनेरी पान दुसरें.

✦ ✦ ✦

सोनेरी पान तिसरें

शककुशाणांतक विक्रमादित्य

ग्रीकांचा समूळ अुच्छेद केल्यानंतर भारतावर अितिहासात मोजलें जावें असें आणि काही अंशी शिकंदरादिक यवनाधिपतींच्या सैन्यांच्या आक्रमणाहूनही भयंकर नि व्यापक असें जें परचक्र चालून आलें तें शककुशाणांचें होय.

शक आणि कुशाण हे जरी काही अंशी परस्परभिन्न लोक होते आणि त्यांचें आपापसात तुमुल वैरही होतें, तथापि अेकंदरीत भारतीयांसारख्या विभिन्न नि अपरिचित राष्ट्रास ते जवळजवळ अेकच वाटावेत अितकें त्यांच्यांत साम्यही होतें. त्यामुळे त्यांच्या ज्या रानटी टोळ्या अेकामागून अेक भारतावर येअून आदळल्या त्या सर्वांना सर्वसामान्य भारतीय लोक शक ह्या नांवानेच ओळखीत. काही स्थानी कुशाणांचा अुल्लेख कुश ह्या नांवानेही भारतीय ग्रंथांत केलेला आहे. अेवढ्यासाठीच ह्या पुस्तकातही साधारणतः शक ह्या नांवानेच त्या दोघांनाही अुल्लेखिलें आहे.

बाल्हिक (व्याक्ट्रिया) या प्रांताच्या पलीकडे मध्यआशियाच्या भागात शक हे लोक रानटी अवस्थेत मोठ्या मोठ्या टोळ्या करून राहत असत. त्यांच्याही पलीकडला विस्तीर्ण प्रदेश कुशाण ह्या तशाच रानटी अवस्थेत राहणाऱ्या लोकानी व्यापलेला होता. आणि त्याच्याही पलीकडे थेट चीन देशाच्या काही भागांना व्यापून हूण हे तसेच टोळ्याटोळ्यांनी भटकते, सदैव अितरांशी वा आपापसांत लढत राहणारे, रानवट, क्रूर पण शूर असे लक्षावधि लोक राहत असत. ह्या शक, कुशाण, हूण लोकांच्यामध्ये तीव्र वैमनस्य असे आणि अेकमेकांच्या प्रदेशांत त्यांची वारंवार आक्रमणें नि युद्धे चाललेलीं असत.

अिसवीसनाच्या शेदीडशे वर्षांपूर्वी ह्या लोकांतील वरील परस्पर वैमनस्याचा भयंकर वणवा पूर्वी कधीही भडकला नसेल अितक्या व्यापक प्रमाणावर भडकला. त्यांच्यापैकी अत्यंत कडव्या आणि चीनकडे असलेल्या हूण लोकांनी मध्य आशियात त्यांच्या पुढे असणाऱ्या कुशाण लोकांवर चाल केली नि त्यांच्या प्रदेशातून त्यांना पश्चिमेकडे रेटलें. तेव्हा त्या कुशाण लोकांनी त्यांना लागूनच बाल्हिक (व्याक्ट्रिया) प्रांताच्या वर राहणाऱ्या शक लोकांवर धाडीमागून धाडी घालीत त्या शकांना त्यांच्या प्रदेशातून खाली ढकलून त्या प्रदेशात आपलें राज्य स्थापलें. त्यामुळे शक लोकांनी त्यांना लागूनच असलेल्या बाल्हिकावर स्वारी केली. या बाल्हिक म्हणजे व्याक्ट्रियापासून तो थेट ग्रीसपर्यंत मागे सांगितल्याप्रमाणे, शिकंदराच्या वेळेपासून ग्रीकांचीं लहान मोठीं राज्यें चालू होतीं. परंतु ह्या कडव्या, रानवट आणि ज्यांच्यातील पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही प्रत्येकी शस्त्र घेअून घोड्यावर बसून रणांगणात अुतरत असत, अशा असंख्य लोकांच्या धाडीमागून धाडी जेव्हा त्या ग्रीक राज्यावर

कोसळल्या तेव्हा त्या सर्व ग्रीक राज्यांची दाणादाण अुडून गेली. तीं ग्रीक राज्यें बुडविलीं गेलीं, आणि तो सारा प्रदेश शकांनी व्यापून टाकला. परंतु तेथेही शंभर अेक वर्षांच्या आतच त्या शकाचा पाठलाग करीत, त्यांचे शत्रु जे कुशाण लोक, ज्यांचीं जीवनें शकांच्या वर दिलेल्या वर्णनाप्रमाणेच स्थायी नगरग्रामांपेक्षा धावत्या घोड्यांच्या सशस्त्र नि लढत्या शिबिराशिबिरांतूनच व्यतीत होत असत, त्या कुशाणांनी शकांवर पुन्हा स्वारी केली आणि शकांना व्याक्ट्रियाप्रभृति प्रदेशांतूनही हुसकून देअून तेथे आपली सत्ता स्थापिली. खाली रेटून दिलेल्या ह्या असंख्य शकांना मागे किंवा तिरपें वळण्याचा मार्गच न अुरल्याने ते खालच्या वलुचिस्थानच्या प्रदेशात घुसले आणि बोलनखिंडीच्या मार्गाने अेक वर्षाच्या आतच भारताच्या सिंध, काठेवाड, नि गुजराथ प्रांतांवर, टोळधाडीच्या लाटांमागून लाटा येतात तसे अनावर वेगाने कोसळले. लुटमार, वायकामुलांसुद्धा नगरग्रामांचें सरसकट शिरकाण करीत प्रवेगाने पुढे घुसणाऱ्या त्यांच्या असंख्य घोडेस्वारांनी ते भारतीय प्रदेश आपल्या टापेखाली नुसते तुडवून टाकले. तिकडे त्या वेळी भारतीय राज्यें कोणचीं होतीं किंवा नव्हतीं किंवा त्यांना ह्या अनावर म्लेंच्छांच्या धाडीचा काही प्रतिकार करवला किंवा नाही ह्याचा अितिहासाला निश्चित पत्ता नाही. आणि अिथे त्याचा खल करण्याचें, ह्या पुस्तकाच्या पृष्ठ ५८४ वर आखलेल्या क्षेत्रात प्रयोजनही नाही. अिथे अितकें सांगणें पुरें आहे की अिसवीसनाच्या आरंभाच्या आसपास भारतातील बलुचिस्थान, सिंध, काठेवाड, गुजराथ नि खाली अपरांतकाचा (कोकणचा) किंचित् भाग व्यापून ह्या शकांनी वर अुज्जयिनीपर्यंतच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापिली होती. नि त्यांच्यामागून प्रवेगाने पाठलाग करीत येणाऱ्या मध्य आशियातील कुशान नि हूण यांच्या दडपणामुळे ते शक लोक भारताचा आणखी किती भाग पायदळी तुडवीत सहकुटुंब व्यापून टाकू शकतात ह्या चिंतेने सारें भारत संत्रस्त होअून गेलें होतें !

अितिहासकालात न्यूनाधिक अेक सहस्र वर्षे तरी दक्षिणभारत, म्लेंच्छांच्या आक्रमणापासून अलिप्त, स्वतंत्र, समर्थ नि संपन्नपणे नांदत होता !

परकीय शत्रूंच्या स्वाऱ्या बहुधा, ह्या आपल्या अितिहासाच्या प्राचीन खंडात तरी, वायव्येकडूनच होत गेल्यामुळे त्यांचा प्रतिकार करण्याचा मुख्य भार आपल्या अुत्तर भारतातील राष्ट्रबांधवांनाच सोसावा लागला; नि त्याप्रमाणे त्यांनी तो सोसून त्या काळी राष्ट्रशत्रूना अंती दाती तृण धरावयास लावलें. त्यामुळे कोणताही परकीय शत्रु विंध्याचल अुतरून ह्या कालखंडात दक्षिण भारतात येअूच शकला नाही. पुरातन, अनिश्चित नि क्षणभंगुर अशा अेका अिराणी आक्रमणाची कथा सोडली तर साधारणत. अिसवी सनपूर्व ५०० व्या वर्षापासून तरी

विंध्य ओलांडून अुत्तरेकडून कोणीही म्लेंच्छ शत्रु येअू न शकल्यामुळे सारा दक्षिण भारत स्वातंत्र्य नि साम्राज्य, सत्ता नि संपत्ति ह्यांना अखंडपणे अुपभोगीत होता. कलिंगापासून ते पांड्य, चेल, चोल प्रभृति आमच्या दक्षिण भारतीय प्रांतांतील भारतीय राज्यसत्ताधिकाऱ्यांनी दक्षिण भारताच्या तिन्ही बाजूंना पसरलेल्या पश्चिमसमुद्र, दक्षिणसमुद्र नि पूर्वसमुद्र ह्या समुद्रसीमांचें परचक्रापासून संरक्षण करू शकतील अशीं सिंधुसैन्यें नि नाविकदलें सज्ज ठेवलेलीं असत. त्यामुळे त्या समुद्रसीमांवरही त्या काळी कोणत्याही परकीय म्लेंच्छ शत्रूच्या नौदलांचें आक्रमण होअू शकलें नाही. अितकेंच नव्हे तर अुलट ह्या भारतीय सामुद्रिक राजसत्तांनी आपलीं प्रबळ नि जयिष्णु नाविक सैन्यें घेअून ब्रह्मदेश सयामपासून तो फिलिपाअीन्सपर्यंत आपल्या राजसत्तेचा, संस्कृतीचा नि वाणिज्याचा जयिष्णु प्रसार सतत चालविला होता.

वायव्येकडून झालेल्या परराष्ट्रीय आक्रमणांचा यशस्वी प्रतिकार आमच्या अुत्तरभारतीय वीरवरांनी वारंवार तिकडच्या तिकडेच केल्यामुळे ते ते परशत्रु नर्मदेपर्यंत पोचूच शकले नाहीत. परंतु ह्या शकशत्रूचें अनावर आक्रमण बलुचिस्थानातील वोलन खिंडीतील मार्गे झाल्यामुळे पश्चिमेलगतच्या सिंध, काठेवाड गुजराथ प्रांतांतून घुसून नर्मदा अुतरणें त्यांना सापेक्षतः लगोलग साध्य झालें नि दक्षिण हिंदुस्थानावर परचक्राची पहिली छाया पडली, ती या म्लेंच्छ शकांची होय. पण तीही किती क्षणिक! कारण,

आंध्रांचा हुंकार

सुदैवाने याच वेळी दक्षिणेकडे कलिंग नि आंध्र ह्या दोन वैदिकधर्मीय नि भारतनिष्ठ प्रबळ शक्तींचा अुदय झालेला होता. सिंधपासून अुज्जयिनीपर्यंतच्या भारतीय प्रांतांत शकांसारख्या म्लेंच्छ राष्ट्राने धुमाकूळ घालून त्यांची राजसत्ता स्थापन करावी नि त्यांचा प्रतिकार करण्याची कोणतीही शक्ति अुत्तर भारतात पुढे येअू नये ह्याची लज्जा नि विषाद सर्व भारतनिष्ठ जनतेप्रमाणेच आंध्रांनाही संतप्त करता झाला. त्यातही शकांच्या काही टोळ्या नर्मदा अुतरून अपरांतकात पोचल्यामुळे तर स्वतः आंध्रांच्या तेथपर्यंत पसरलेल्या विस्तृत राज्यालाही धोका अुत्पन्न झालेलाच होता. ह्या सर्व कारणांमुळे आंध्र राजशक्तीने शकांचा पुरता मोड करण्यासाठी त्यांच्यावर प्रबळ सैन्यासह स्वारी केली, आणि त्या शत्रूंना भारताच्या वतीने समरांगणात पहिल्याने हुंकारून धडाक्यासरशी नर्मदापार हुसकून दिलें. ह्याच वेळी अुत्तरेत अुज्जयिनीपर्यंत चढून गेलेल्या शकांची गाठ यौधेय नि मालव गणांशी पडली. ह्या दोन्हीही गणराज्यांनी प्रत्यक्ष शिकंदरच्या स्वारीच्या वेळीही भारताच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ किती दुर्दम्य शौर्याने लढा दिलेला होता तें मागे वर्णिलेलेंच आहे. अशा प्रकारे खालून दक्षिणेकडून आंध्रांनी नि वरून अुत्तरेकडून

यौधेयांनी नि मालवांनी शकांवर प्रबळ चढाया केल्यामुळे शकांच्या आक्रमक वृत्तीची नांगीच चिरडली गेली. त्यांची प्रगति खुंटली. साऱ्या शकांची मिळून कोणतीही संयुक्त अेककेंद्रित नि सर्वसमर्थ अशी राजसत्ता त्यांना भारतात आधीच स्थापन करता आलेली नव्हती. त्यांचीं जीं फुटकळ स्वतंत्र राज्यें वर दिलेल्या पण भारतीय प्रांतांत स्थापिलीं गेलीं होतीं तीं ह्या भारतीय प्रतिकाराचा दुहेरी अुठाव होताच त्याच्या कैचीत सापडल्यामुळे त्याला यशस्वीपणे तोंड देअू शकलीं नाहीत.

मालवांचा विजय

अुज्जयिनीच्या आजूबाजूला पसरलेल्या शकराज्यावर वरील यौधेय नि मालव गणांनी स्वारी केली होती. अिसवीसन पूर्व ५७ व्या वर्षाच्या आसपास 'अुत्तम-भद्राला' मालवांनी वेढा घातल्याचा अुल्लेख सापडतो. शकांचा त्या वेळचा नांवाजलेला राजा जो 'नहपान' त्याच्या सैन्याने तो वेढा अुठविणें मालवांना भाग पाडलें होतें. परंतु त्याच्या मागोमाग मालवांच्या सैन्यांनी नहपानालाच त्याच्या शक सैन्यासह चारी बाजूनी कोंडलें. अर्थातच दोन्ही सैन्यांची तुंबळ लढाअी झाली. तीत मालवगणाच्या सैन्याने शौर्याची पराकाष्ठा केली. आणि रणात आजवर दुर्दम्य म्हणून नांवाजलेल्या त्या शक सैन्याचाच काय तो संहार करून न थांवता त्यांचा रणधुरंधर म्हणविणारा राजा जो नहपान त्यालाच त्या लढाअीत मालवांनी ठार मारलें.

मालव संवत

मालवांनी म्लेंछ शकांवर मिळविलेल्या ह्या विजयाने शकांची लढाअू शक्ति आणि धैर्य अितकें क्षीणता पावलें की सुसंघटित भारतीय सैन्याशी ठाण मांडून लढाअी देण्याची त्यांनी धास्तीच खाल्यासारखे झालें. ह्या लढाअीचा दुसराही अेक अुल्लेखनीय विशेष आहे. तो म्हणजे म्लेंच्छांवर मिळविलेला आणि ज्याची कीर्ति भारतभर पसरली अशा ह्या आपल्या मालव गणाच्या विजयाचें चिरंतन स्मारक रहावें ह्यास्तव मालवगणांनी त्या विजयाच्या वर्षी अेक नवा संवत चालू केला. त्याचें नांव त्यांनी 'कृत' असें ठेवलें. तथापि त्या निमित्ते त्याने त्या संवताचीं जीं नाणीं पाडलीं त्या नाण्यांवर ब्राह्मी लिपीत 'मालवजयः' 'मालवानाम् जयः' 'मालव गणस्य' असे अुल्लेख अंकिलेले आहेत.

हाच आजचा आपला विक्रम संवत् होय.

आपल्या राष्ट्रात अनेक विख्यात सम्राट् आपापल्या नांवाचे संवत त्यांच्या काळी चालू करीत असत. दिग्विजय करणाऱ्या राजाची किंवा 'गणाची' स्वतःस 'शककर्ता' म्हणवून घेणें ही अेक परंपराप्राप्त हौस नि अधिकारही असे. अगदी अलीकडचें अुदाहरण म्हणजे शिवाजी महाराजांचें पहा. त्यांनीही 'शिवशक'

प्रचलविला होताच. ह्या अनेक संवतांपैकी बहुतेक संवत त्या त्या राजवंशाच्या अंतासहच अंतर्धान पावत. तथापि त्या अनेक संवतांपैकी ज्या दोन तीन संवतांना राष्ट्रीय मान मिळाला आणि ज्यांना विभागशः का होअीना पण आपल्या हिंदु जगताने अंगीकारलें, आजपर्यंत आपली व्यावहारिकच नव्हे तर धार्मिक कृत्यांचीही कालगणना त्याच संवतांत गेलीं अुणींपुरीं दोन सहस्र वर्षें चालू ठेवली आहे, त्या संवतांत या मालव संवताची गणना प्रामुख्याने केली पाहिजे. कारण हाच मालव संवत पुढे विक्रम संवत म्हणून प्रख्याति पावलेला आहे.

सुप्रसिद्ध अितिहासज्ञ डॉ. जयस्वाल ह्यांनी आपल्या Hindu Polity ह्या ग्रंथात 'मालव संवत' हाच 'विक्रम संवत' होय हेंच मत समर्थिलें आहे. तथापि त्यांच्या मते मालव संवताला प्रथमपासूनच 'विक्रम संवत' (विजयाचा संवत) असें अभिधान दिलेलें होतें. परंतु ह्यापुढे आम्ही ज्या घटना देणार आहोत त्याप्रमाणे शककुशाणांचें भारतातून समूळ अुच्चाटन करणारा गुप्तवंशीय सम्राट विक्रमादित्य पुढे जेव्हा अुज्जयिनीस राज्य करू लागला तेव्हा त्या अखिल भारतीय राष्ट्रीय पराक्रमाचा गौरव करण्यासाठी ह्या मालव संवतालाच 'विक्रम संवत' अशी अभिधा देण्यात आली. हें दुसरें मत ग्राह्यतर दिसतें. तो संवत 'विक्रमसंवत' ह्या नांवानेच अितका राष्ट्रपरिचित आणि राष्ट्रप्रियही होत गेला की, साऱ्या अुत्तर भारतातील कोट्यवधि हिंदु आज तोच विक्रम संवत आपल्या धर्मकृत्यांतही पाळीत आहेत.

विक्रम संवत व शालिवाहन शक ह्यांच्या उत्पत्तीत मतभेद

अथेच हेंही सांगितलें पाहिजे की विक्रम संवताच्या ह्या अुत्पत्तीविषयी अितिहासकारांचें अेकमत नाही. आपल्या अितिहासाच्या ह्या प्राचीन कालखंडात अनेक महत्त्वाच्या घटनांच्या कालक्रमाविषयी जसे मतभेद आहेत तसेच ह्या प्रश्नीही आहेत. बुद्धजन्मासारख्या प्रश्नीसुद्धा शेपन्नास वर्षांचें अंतर भिन्नभिन्न अितिहासकारांनी मानलेल्या कालांत पडते. कनिष्काच्या कालावधीचीही तीच गोष्ट. कोणी तो अि. स. ७८ व्या वर्षी राज्यावर आला असें समजतात तर कोणी तो अि स. १२० मध्ये राज्यावर आला असे समजतात. ह्या विक्रम संवताविषयीही काही अितिहासकारांचें तिसरें मत असें आहे की विक्रम संवताचा संबंध मालवगण संवताशी नाही. भारतात शिरलेल्या शकांचा अेक क्षत्रप राजा जो ओझीझ पहिला त्याने अिसवी सनपूर्व ५८ व्या वर्षी त्याचा म्हणून अेक संवत चालू केला. त्यालाच पुढे जेव्हा गुप्तवंशीय सम्राट् विक्रमादित्याने शककुशाणांचा अुच्छेद केला तेव्हापासून लोक विक्रम संवत म्हणून म्हणू लागले. चौथेही अेक मत आहे की अिसवी सनपूर्व ५८ व्या वर्षी विक्रमादित्य नांवाचा अेक पराक्रमी

सम्राट् जो त्या काळीच तिकडे राज्य करीत होता त्याने शकांवर मोठा विजय मिळविला आणि त्या विजयाच्या स्मारकार्थ हा आपल्या नांवाचा विक्रम संवत चालू केला. त्याचा मालव गणाच्या मालव संवताशी किंवा शक राजा ओझीझच्या संवताशी काही अेक संबंध नाही. परंतु अशा कोणत्या काळी होऊन गेलेल्या विक्रमादित्याचा अुल्लेख शिलालेख प्रभृति साधनांत नसल्यामुळे किंवा त्याने विक्रम संवत म्हणून पाडलेल्या कोणत्याही नाण्यांचा शोध न लागल्यामुळे ही पौराणिक आख्यायिका अद्याप तरी निश्चितपणा पावू शकत नाही.

तथापि ह्यापुढे जर नवीन नाणक, शिलालेखादिक साधनें अुपलब्ध होऊन विक्रम संवताची दुसरी अेखादी अुत्पत्ति अधिक विश्वासार्ह ठरेल तर ती आम्ही ग्राह्य मानू.

जी गोष्ट विक्रम संवताची तीच गोष्ट शालिवाहन शकाची. ह्याविषयी पहिल्या मताचे पुरस्कर्ते म्हणतात की, हिंदुस्थानातील कुशाणांचा पहिला राजा विमा क्याड्फाअिसेस, ज्यास आपले लोक शकच म्हणत, हा अि. स. ७८ त राज्यावर बसला तेव्हा त्याने हा 'शक' चालू केला. परंतु दुसऱ्या पक्षाच्या मते अि. स. ७८ मध्ये विमाक्याड्फाअिसेस हा राज्यावर बसलेला नसून कुशाणांचा त्याच्या पुढचा राजा कनिष्क हा राज्यावर बसला होता. त्या सम्राट् कनिष्काने आपल्या राज्यारोहणाच्या स्मृत्यर्थ ही शक कालगणना चालू केली. पुढे पैठणच्या शालिवाहन सम्राटांनी जेव्हा शकांना पादाक्रान्त केलें तेव्हा आपल्या विजयाचे स्मारकार्थ ह्याच 'शकाला' शालिवाहन शक असें नांव दिलें. परंतु हीं दोन्ही मतें न मानणाऱ्या अितिहासकारांचें तिसरें मत असें आहे की, शालिवाहन शकाचा कनिष्क प्रभृति कोणाही कुशान राजाशी काहीअेक संबंध नाही. अिसवी सन ७८ च्या आसपास शालिवाहनांतील गाथा सप्तशती लिहिणाऱ्या हाल नांवाच्या राजाने स्वत:च गुजराथ सौराष्ट्राकडील शक क्षत्रपावर अेक मोठा विजय मिळविला आणि त्याचें स्मारक म्हणून हा शालिवाहन 'शक' चालू केला.

अिथे ह्याविषयीची अधिक चर्चा करण्याचें कारण नसल्यामुळे शक संवताच्या विषयी केलेल्या वरील त्रोटक अुल्लेखावरून प्रस्तुत विषयापुरत्या दोन तीन महत्त्वाच्या गोष्टी तेवढ्या प्रामुख्याने अुल्लेखिल्या की पुरें आहे. त्या अशा —

(अ) शक संवत्सराविषयीच्या अितिहासज्ञांच्या मतभेदांतील कोणतेंही मत ग्राह्य घेतलें तरी हें सत्य वादातीत ठरतें की, ह्या दोन्ही कालगणना शककुशाणांवर भारतीयांनी समरांगणांत मिळविलेल्या निर्णायक विजयांच्याच द्योतक आहेत.

(आ) शक शब्दापेक्षा संवत् हाच शब्द आपल्या भारतीय कालगणनेत अधिक स्वीकार्य आहे – वेदकालापासून संवत्सर नि संवत् हे शब्द कालगणनेसाठी आपण योजीत आलेलो आहोत. शक शब्द त्याअर्थी सहसा योजलेला आढळत नाही. अर्थात् तो शब्द शककुशाणादिक त्याकाळच्या आक्रमक म्लेंच्छ शत्रूंच्या

नांवांचीच विकृति असली पाहिजे. विक्रम संवत् हें नांव जसें शुद्ध संस्कृतनिष्ठ आहे तसें 'शालिवाहन शक' हें नांव संस्कृतनिष्ठ नाही. ह्यासाठी म्लेंच्छशत्रूंचें शक हें नांव गाळून टाकून शालिवाहन संवत् असें अभिधान आपल्या धर्मकृत्यादिक सर्व प्रसंगी ह्यापुढे तरी योजलें जावें. आणि आजच्या धर्मकार्यांत दोषार्ह रूढीमुळे 'शालिवाहन शके' किंवा केवळ 'शके' हे जे म्लेंच्छ शब्द अुपयोजिले जातात ते बहिष्कारले जावेत.

(अि) विक्रम सवत् नि शालिवाहन संवत् ह्या दोन्ही राष्ट्रीय संवतांचा संबंध भारतीयांनी शककुशाणांवर जे विजय मिळविले त्यांच्याच स्मृतिगौरवाशी आहे ही गोष्टही केवळ चमत्कारिक योगायोगाची नसून अर्थगर्भही आहे. गुप्त सम्राटांसारख्यांचे अनेक संवत् आपल्या अितिहासात त्या त्या काळी गाजले पण ते सारे लुप्त झाले. केवळ शककुशाणांवर मिळविलेल्या भारतीय विजयांचे हे दोन संवत् तेवढे चिरंतनत्व पावले. ह्यावरून आपल्या त्या काळच्या वैदिक धर्मीय भारतनिष्ठ राष्ट्रीय जनतेला शककुशाणांच्या अनावर टोळधाडींपासून दीड दोन शतकें तरी किती अुत्पात नि अुपद्रव सहन करावा लागला असेल ह्याची कल्पना करता येते. कारण अन्यथा त्या शत्रूंच्या राक्षसी अुपद्रवांपासून नि राजकीय दास्यापासून भारतीयांची मुक्तता करणाऱ्या ह्या आमच्या शालिवाहन नि गुप्त सम्राटांच्या शककुशाणांवरील विजयाच्या स्मृत्यर्थ चालू झालेल्या 'विक्रम संवत्' नि 'शालिवाहन संवत्' ह्या दोन संवतांना अितर अनेक विजयी संवत् लुप्त झाले असताही – अितकें भारतीय महत्त्व येतें ना आणि ते दोनच आज अुणीपुरीं दोन सहस्र वर्षें अुलटलीं असताही आम्हा हिंदूंचे राष्ट्रीय संवत् म्हणून मुख्यतः पाळले जात राहते ना !

शस्त्रविजयामागोमाग शकांवर भारताने मिळविलेला धर्मविजय !

मालव गणांनी शकांच्या नहपान राजास ठार मारून वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या माळव्याच्या पुढे होणाऱ्या अनावर आक्रमणास पक्का पायबंद जसा घातला तसा त्याच वेळी वर अुल्लेखिलेल्या आमच्या दाक्षिणात्य आंध्र सैन्याने दक्षिण भारतातून अुत्तरेकडे स्वाऱ्या करून शकांच्या गुजराथ, सौराष्ट्र, सिंध ह्या प्रदेशांत असलेल्या राज्यांची समरांगणांत धुळदाण अुडवून दिली. शालिवाहन वंशांतील विलीनयांकुर, गौतमी पुत्र शातकर्णी, वसिष्ठ पुत्र पुलमाअी ह्यांच्यासारख्या पराक्रमी राजांनी अुज्जयिनीपर्यंतच्या शक राजांवर ह्या ज्या चढायांमागून चढाया केल्या त्या समरांगणीय प्रतिकारामुळे संत्रस्त झालेल्या त्या त्या शक राज्यांनी शेवटी शालिवाहन सम्राटांचें आधिपत्य मान्य केलें. असाही अेक शिलालेख आहे की त्यांच्यापैकीं रुद्र नांवाच्या अेका शक राजाने आपली मुलगीही शालिवाहन राजाला दिली – जशी पूर्वी ग्रीक राजा सेल्युकस याने आपली मुलगी सम्राट् चंद्रगुप्ताला दिली होती.

हेंही ध्यानात घेतलें पाहिजे की, भारतीयांशी रणांगणात अेक सारखे लढत राहिल्यामुळे या शेपन्नास वर्षांत शकांच्या भारतामध्ये मूळ आलेल्या लढाअू लोकांतील सहस्रावधि सैनिकांचा जो संहार होत चाललेला होता, त्यामुळे शकांचें संख्याबळही क्षीणतर झालेलें होतें.

अशा प्रकारे जसजशी शकांची शस्त्रशक्ति भारतीय प्रतिकारापुढे क्षीण होत गेली तसतशी भारतीयांच्या त्या प्रबळ संस्कृतीची छापही त्या परराष्ट्रीय शकांवर अधिकाधिक पडत चालली. शक शत्रूशी भारतीयांचा हा जो संघर्ष शंभर अेक वर्षें तरी चाललेला होता त्याच्या परिणामी शकांनी भारतीय संस्कृतीला शरणागतीची वचनचिठ्ठीच लिहून दिल्यासारखें झालें. शकांतील सामान्यजनांपासून तो त्यांच्या राजवंशापर्यंत त्यांनी आपली मूळची शकभाषीय व्यक्तिनामें सोडून सत्यसिंह रुद्रसेन ह्यासारखी भारतीय नांवेंसुद्धा स्वीकारलीं. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की बहुसंख्य शकांनी वैदिक धर्म स्वीकारला ! तसें पाहता हिंदुकुश ओलांडून शक लोक बलुचिस्थान नि सिंध प्रभृति प्रांतांत अुतरून तेथें वास्तव्य करून राहिले तेव्हापासून तिकडील अशोकाच्या नि मिन्यांडरच्या कालापासून प्रचार करीत आलेल्या बौद्ध भिक्षुकेंद्रांशी आणि बौद्ध जनतेशी त्या शकांचा सतत सबंध आलेला होता. त्यांतही त्यांच्याशी निकराने लढून त्या काळी त्यांचा पाडाव करणारीं मालव यौधेयादिक गणराज्यांचीं नि शातवाहनांचीं पराक्रमी सैन्यें हीं वैदिकधर्मीयच होतीं. बौद्धांनो असा त्यांचा सशस्त्र वा निःशस्त्र प्रतिकार केलेला नव्हता. अशा स्थितीत शकांचे शत्रु जे वैदिक त्यांच्या वैदिक धर्माचा द्वेष वाटणें आणि शकांची सत्ता मुकाटयाने आपल्यावर चालवून घेणाऱ्या बौद्धांचा बुद्धधर्म शकांनी स्वीकारणें हें अगदी संभवनीय होतें. पण जें घडलें तें ह्या अपेक्षेच्या अगदी अुलट घडलें. शकांतील बहुसंख्य जनतेपासून तो त्यांच्यांतील प्रमुख राजवंशीयांपर्यंत त्यांनी वैदिक धर्माचाच आपण होअून मोठया आवडीने स्वीकार केला ! बहुधा ह्या चमत्काराचें कारण असेंही असू शकेल की, शक हे मुळातच अंगात लढाअू रक्त संचारणाऱ्या जातीचे लोक, त्यांच्याशी लढणाऱ्या पराक्रमी वैदिक वीरांविषयी, ते त्यांचे शत्रु असले तरी, शकांच्या मनात सभय आदर अुत्पन्न होत असावा आणि त्या वैदिकांत तसें क्षात्रतेज अुत्स्फूर्त करणारा त्यांचा तो वैदिक धर्मच त्या शकांना स्वभावानुसार स्वीकार्य वाटला असावा.

सस्कृत भाषेवरही शकांची कौतुकास्पद भक्ति जडली. त्यांच्या हाती जी दोनतीन प्रांतांचीं मांडलिक राज्यें राहिलेलीं होतीं त्यांतील शकराजांनी संस्कृत विद्येस शक्य तें तें अुत्तेजन दिलें. अेका शकराजाने तर आपल्या राजसभेची आणि राज्यकारभाराचीं सर्व कार्यें नि लेखन-व्यवहार संस्कृत भाषेतूनच चालू केला. भारतातील अितर सर्व लहानमोठ्या राज्यांशी त्यांचा राजकीय पत्रव्यवहारही संस्कृतमध्येच होअू लागला. त्यांचे सामाजिक आचारविचारही झपाटयाने भारतीय समाजजीवनाशी अेकरूप होत चालले.

कुशाणांच्या स्वाऱ्या

सामरिक क्षेत्रात नि सांस्कृतिक क्षेत्रात शकांवर असे विजय मिळवीत, शकांच्या आक्रमणाचा नायनाट करीत असताच भारताच्या हिंदुकुशकडील सरसीमेवर कुशाणांची टोळधाड येऊन आदळली. ह्या कुशाण लोकसमूहाला त्यांच्या प्रदेशांतून हूणलोकांनी मुलांमाणसांसुद्धा हुसकून दिलें होतें. त्यामुळे त्यांच्या लक्षावधि स्त्रीपुरुषांच्या लढाऊ टोळधाडी आशियाच्या खालच्या प्रदेशात रक्तपात, लुटमार, जाळपोळ करीत अनावर वेगाने शिरल्या. हिंदुकुश पलीकडील चीनच्या सीमेपासून तो ग्रीसच्या सीमेपर्यंतच्या आशियाच्या साऱ्या प्रदेशांत त्यांनी भयंकर धुमाकूळ घातला. त्यांच्यांतील काही टोळ्या त्यांचे जुने वैरी जे शक त्यांचा पाठलाग करीत शकांचे ब्याक्ट्रियांतील राज्य घेऊन आणि हिंदुकुश ओलांडून गांधार प्रभृति वायव्येकडील प्रांतांत घुसल्या. तेथील त्या वेळेस असलेल्या शकांच्या लहानसहान राज्यांना बोलता बोलता अुखडून ते पंजाबात घुसले आणि त्यांनी तेथे आपलें अेक राज्य स्थापिलें. हिंदुस्थानातील त्यांच्या या पहिल्या राजाचें नांव 'विमा क्याडफाइसेस' हें होतें.

शकांच्या आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार करण्यात अुणींपुरीं शंभर वर्षें लढत नि झगडत राहिलेल्या अुत्तरेकडील यौधेय, मालव प्रभृति भारतीय गणांची नि दक्षिणेतील शालिवाहनांची शक्ति आधीच पणास लागली असता शकांहूनही क्रूर, शूर नि रक्तपिपासू असलेल्या ह्या कुशाणांच्या आक्रमणाचें संकट भारतावर कोसळल्यामुळे त्यांचा पंजाबपर्यंत लगोलग प्रतिकार होअू शकला नाही. तथापि तशा संकटातही ह्या अनावर कुशाणांच्या टोळधाडींनाही आवर घालण्याअितका प्रतिकार पुढे पुढे भारतीयांकडून केला गेल्यामुळे पंजाबच्या अलीकडील भारतीय प्रांतांत कुशाणांच्या ह्या टोळधाडी घुसू शकल्या नाहीत.

सम्राट् कनिष्क

विमा क्याडफाअिसेस वारल्यानंतर कुशाण राजपीठावर कनिष्क हा अिसवी सन ७८ व्या वर्षी (काही अितिहासज्ञांच्या मते अि. १२० मध्ये !!) आरूढ झाला. त्याची महत्त्वाकांक्षा जितकी असीम तितकाच त्याचा पराक्रमही त्या काळी अतुल होता. त्याच्याविषयीचा सविस्तर वृत्तान्त देण्याचें अिथे काहीच प्रयोजन नाही. ह्या पुस्तकातील विषय-क्षेत्रापुरत्या काही घटना मात्र दिल्या पाहिजेत. शककुशाणांच्या हिमालयापलीकडील आणि अलीकडील सर्व भटकत्या लुटारू टोळ्या आणि पंजाबपर्यंतचीं सर्व लहानसहान राज्यकेंद्रें हीं कनिष्काने मोडून काढून त्यांचें अेक विस्तृत साम्राज्य घडविलें. कुशाणांचा सम्राट् म्हणवून घेऊन त्याने पुरुषपुर (आजचें पेशावर) येथे त्या साम्राज्याची राजधानी स्थापिलीनंतर त्याने माळवा ते सिंधपर्यंत शकांनी जीं राज्यकेंद्रें स्थापिलीं होतीं आणि

ज्यांनी आंध्रांपुढे हार खाऊन त्यांचें आधिपत्य मान्य केलें होतें त्या शकांवर चढाओ केली. परंतु शकांना पादाक्रान्त करताना आधीच अुणेपुरें अेक शतक अेकसारखीं युद्धें झुंजविण्यात ज्यांचें रणसामर्थ्य व्यय होत गेलेलें होतें, त्याच भारतीय राज्यांवर कुशाणांचें हें नवीन संकट अकस्मात् कोसळल्यामुळे त्याला तोंड देणें दुर्घट झालें. अेकदोन लढायांत प्रत्यक्ष शालिवाहनाच्या सैन्याचा मोठा पराभव झाल्यामुळे नर्मदेच्या अुत्तरेकडील सर्व सैन्यें दक्षिणेत आणून कनिष्काच्या आक्रमणापासून आपल्या स्वत:च्याच राज्याच्या संरक्षणार्थ कडेकोट सिद्धता करणें शातवाहनांना भाग पडलें. तोवर कनिष्काने मालव, गुजराथ, सौराष्ट्र, सिंध येथील शकांचीं सर्व राज्यें जिंकून घेतलीं. त्यामुळे त्या शकराजांनी आंध्रांचें आधिपत्य झुगारून देअून कनिष्काचें आधिपत्य स्वीकारलें. त्यापुढे जाअून आंध्रावरच स्वारी करण्यासाठी कनिष्काचीं सैन्यें नर्मदा अुतरलीं आणि अपरांतकाचा (अुत्तर कोंकणचा) अेक कोपराही त्यांनी जिंकला. परंतु शातवाहनांच्या केंद्रित झालेल्या सैन्यशक्तीचें सामर्थ्य पाहून त्यांच्यावर चालून जाण्याचें धाडस न करता कनिष्काने आपलें दक्षिणेकडील आक्रमण तेथेच थांबविलें. नंतर हिमालयापलीकडे पसरलेल्या त्याच्या राज्यावर चीनच्या सेनापतीने केलेल्या स्वारीचा प्रतिकार करण्यासाठी कनिष्क फार मोठें सैन्य घेअून चालून गेला. अनेक लढायांनंतर त्याने चीनच्या सेनापतीचाही पराभव केला आणि आशियांतील काशगर, चासकंद, खोतान हे चीनच्या साम्राज्यांतील प्रांत जिंकून घेतले.

राष्ट्राच्या पौरुषाची नि जीवनपात्रतेची खरी कसोटी ?

हा प्रसंग येथे सांगण्याचें मुख्य कारण हें की, शक कुशाणांच्या आशियात अुसळलेल्या ह्या प्रळयामुळे केवळ भारतालाच हादरा बसलेला नव्हता तर त्या लक्षानुलक्ष शस्त्रधारी समूहांच्या अुत्पातापुढे चीनसारख्या त्या काळच्या बलिष्ठ नि संघटित साम्राज्याचीही काही काळ समरांगणात त्रेधा अुडाल्यावाचून राहिली नाही. परंतु केवळ शककुशाणांच्या स्वारीत किंवा अितर प्रसगी झालेल्या चीनच्या तशा अनेक तात्कालिक अपजयामुळे 'चीनचें राष्ट्र सदोदित दुबळेंच होतें आणि परदास्यांतच सदा सर्वदा खितपत राहण्यापेक्षा त्यांची अधिक पात्रताच नव्हती' हें म्हणणें जसें मत्सरी मूर्खपणाचें होअील, तसेंच भारतावरही आलेल्या परचक्रातून 'भारताचें राष्ट्रीय जीवन म्हणजे पराजयांचाच अेक पाढा आहे' असें आमच्या शत्रूपैकी जे कोणी म्हणतात त्यांचें तें म्हणणेंही मत्सराने अंधळ्या झालेल्या त्यांच्या दृष्टीला अितिहास सम्यक् दृष्टीने वाचता येत नाही हेंच सिद्ध करीत असतें.

कोणत्याही राष्ट्रावर किती परचक्रें आलीं ही त्या राष्ट्राच्या पौरुषाची अंतिम कसोटी नसून त्या परकीय आक्रमकांच्या आघातासरशी तें राष्ट्र नष्ट झालें का त्या राष्ट्रीय संघर्षाच्या अंतिम रणात त्या परकीय आक्रमणाला त्या राष्ट्राने पादाक्रान्त केलें, यावरच त्या राष्ट्राच्या पौरुषाची नि जीवनपात्रतेची खरी कसोटी अवलंबून असते.

ह्या कसोटीस शक कुशाणांच्या नि भारतीयांच्या या संघर्षात कोण कोण उतरतो ? कोण जगातून वेपत्ता होतो ? वघू या.

कनिष्क बुद्ध धर्म स्वीकारतो, पण त्याचें कनिष्कीय नवें संस्करण काढून !

चीनपर्यंत स्वाऱ्या करण्यात नि युद्धें लढण्यात गुंतलेला असताही कनिष्काचें लक्ष आध्यात्मिक नि सांस्कृतिक विषयाकडे वेधलेलें असे. त्याने मध्यंतरी बौद्ध धर्म स्वीकारल्याची घोषणा केली होती. तिच्या अनुरोधे त्याने अनेक स्तूप नि विहार आपल्या साम्राज्यात ठिकठिकाणी बांधले. त्या वेळी अशोकाच्या वेळेप्रमाणेच बौद्ध धर्मात अनेक पंथांचें खूळ माजलें होतें. त्यांचें परस्परात जें वैमनस्य होतें तें मोडून काढून बौद्ध मतांची अेकवाक्यता व्हावी म्हणून अशोकाप्रमाणेच त्याने यच्चयावत् बौद्ध पंथांची अेक महापरिषद बोलाविली. परंतु तीत अेकमत होण्याचें बाजूसच राहून बौद्ध धर्माचें स्वरूपच बहुशः पालटून टाकणारा अेक नवा 'महायान' नांवाचा पक्ष निघाला. कनिष्काला जीं आवडत पण जीं मूळच्या बुद्धमतांत नव्हतीं अशीं सर्वसंग्राहक मतें ह्या नव्या महायान पंथात समाविष्ट केल्यामुळे जे अल्पसंख्य बौद्ध ह्या मतास मिळाले नाहीत त्यांनी हीनयान नांवाचा दुसरा बौद्ध पक्ष स्थापला. कनिष्काने आपल्या हिमालयापलीकडील विस्तृत राज्यातूनही ह्या महायान बौद्ध पंथाचा पुष्कळ प्रचार करविला. ह्या महापरिषदेत संस्कृत भाषेलाही धर्मभाषा म्हणून मोठी मान्यता मिळाल्यामुळे पूर्वी पाली-प्राकृतातच लिहिल्या गेलेल्या बौद्ध ग्रंथांचें संस्कृतमध्ये रूपांतर करण्यात आलें, अितकेंच नव्हे तर बुद्ध चरित्रासारखे अनेक नवे ग्रंथ अनेक विषयांवर कनिष्काच्या आश्रयास असलेल्या पंडितांनी संस्कृतमध्ये रचिले. त्यामुळे केवळ भारतातीलच नव्हे तर कनिष्काच्या आशियाअी साम्राज्यातील शककुशाण प्रभृति जनतेतही जुन्या नव्या संस्कृत वाङ्मयाचा आणि संस्कृतीचा प्रचार चालू झाला. ह्याप्रमाणे भारतीय संस्कृतीने शक जगताला ज्याप्रमाणे भारतीय धर्म, भाषा, आचार विचार प्रभृति अुपांगांसह आत्मसात् केलें होतें त्याचप्रमाणे जेते म्हणून आलेले हे कुशाण जगतही ह्या भारतीय संस्कृतीच्या आपण होअून अंकित झालें.

बौद्धधर्म हाही अेक भारतीय धर्मच असल्यामुळे सम्राट् कनिष्काने तो स्वीकारताच भारताला हा सांस्कृतिक विजय मिळविता आला. हें जरी अिष्ट तेंच घडलें तरीही हें ध्यानात ठेवलें पाहिजे की, कनिष्काने जो बुद्ध धर्म स्वीकारला तो मूळचा बुद्धाचा किंवा अशोकाचाही निर्भेळ बुद्ध धर्म नव्हता. तर तो बुद्ध धर्माचें कनिष्कीय संस्करण होतें. अुदाहरणार्थ स्वतः सम्राट् कनिष्काने बुद्ध धर्माची दीक्षा घेतली तरी तो रुद्रासारख्या वैदिक अुपास्यांची अुपासनाही करीतच असे. 'प्राणिहिंसा करू नये, शस्त्रविजय हा खरा विजय नसून धर्मविजय हा खरा विजय आहे' असें अुद्घोषून शस्त्रसंन्यास करणाऱ्या सम्राट् अशोकाच्या आत्यंतिक

अहिंसेला सम्राट् कनिष्काच्या बौद्ध धर्मात लवलेशही थारा मिळाला नाही. त्याने अेका वाजूला त्या महायान पंथी बौद्ध धर्माचा प्रचार चालविला असताच तो बौद्ध म्हणविणारा कनिष्क त्याच्या शत्रूवर मोठमोठीं सैन्यें घेअून स्वाऱ्यावर स्वाऱ्या करीत होता. त्याने स्वतःस चोनचा सम्राट् म्हणवून घेण्यासाठी सशस्त्र रणांगणाच्या शिबिरातच दहादहा वर्षें लढत घालविलीं. शेवटी त्याच्या ह्या युद्धपिपासेला कंटाळून त्याच्या सैनिकांनीच बंड केलें आणि त्या बौद्ध सम्राटाला ठार मारलें तेव्हाच काय ती त्याची युद्धपिपासा शमली !

हेंही ध्यानात ठेवलें पाहिजे की, हिमालयापलीकडील चीनच्या प्रांतात कनिष्काने बौद्ध धर्माचा प्रसार केला तो कसा शक्य झाला ? प्रथम शस्त्रविजयाने त्याने ते प्रांत जिंकून घेतले म्हणूनच त्याला तो धर्मविजय तेंथे अितक्या शीघ्रतेने संपादिता आला. तिकडे त्याने शेकडो प्रचारक धाडले, विहार बांधले, सहस्रावधि भिक्षूंना पाळलें, पोसलें तें हातीं प्रबळ राज्य होतें, म्हणजेच शस्त्रबळ होतें, म्हणून ना ?

सारांश शस्त्रविजयच श्रेष्ठ किंवा धर्मविजयच श्रेष्ठ असलीं अेकान्तिक विधानें अवास्तव असतात.

शस्त्रबळावाचून धर्मविजय पंगु असतो. धर्मबळावाचून नुसता शस्त्रविजय पाशवी असतो, हेंच खरें.

भारतीय बौद्धांचा पिढीजात राष्ट्रद्रोह

सम्राट् कनिष्क हा धर्माने बौद्ध वा वैदिक कोणीही असला तरी तो अभारतीय अशा कुशाण जातीचा परराष्ट्रीय आक्रमक होता आणि भारताच्या पश्चिमोत्तर भागावर त्याने बळाने राज्य स्थापिलेलें होतें. त्याचें साम्राज्य हें भारतावर आलेलें परचक्रच होतें. तें भारतीय राज्य नव्हतें. ह्यासाठी तें अुलथून पाडून कुशाणांच्या राजकीय पारतंत्र्यात सापडलेल्या त्या त्या भारतीय प्रांतांना स्वतंत्र करण्यासाठी भारतातील वैदिक धर्मीय राष्ट्रभक्त जनता शकांशी प्राणपणाने लढली तशीच कनिष्काशीही लढत होती. परंतु भारतीय बौद्ध त्या वेळी काय करीत होते ? तर ते त्या म्लेंच्छ शत्रु कुशाण सम्राटाला त्याने बौद्ध धर्म स्वीकारताच आपलाही सम्राट् मानून, आपली राजनिष्ठा त्याला विकून, भारतीय राष्ट्राचा आणि त्याच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या वैदिकधर्मीय स्वराज्यनिष्ठ वीरजनतेचा द्रोह करीत होते. मागे मिन्यांडर प्रभृति जे ग्रीक राजे बौद्ध झाले त्यांना मिळून भारतीय बौद्धांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सम्राट् पुष्यमित्राचे काळी मागे पृष्ठ ६४८ ते ६५१ ह्यात वर्णिल्याप्रमाणे जसा राष्ट्रद्रोह केला तसाच भारतीय बौद्धांनी ह्या कुशाणांच्या परचक्राचें संकट आलें तेव्हाही स्वराष्ट्रद्रोह करण्यास मागेपुढे पाहिलें नाही.

जर भारतीय बौद्धांनी म्लेच्छ शकांचा पाडाव करून आपलें अेखादें भारतीय बौद्ध राज्य स्थापन केलें असतें तर भारताला स्वतंत्र करण्याचें श्रेय त्या बौद्ध राज्यालाही वैदिक राज्याप्रमाणेच मिळालें असतें आणि वैदिक धर्मीय सम्राट् पुष्यमित्र किंवा शालिवाहन यांच्याप्रमाणेच आम्ही त्या भारतीय बौद्ध राज्याचाही गौरव केला असता. परंतु भारतीय बौद्धात तसली राष्ट्रीय धमक कुठली असणार ! शककुशाणांशी त्या वेळचीं भारतीय राष्ट्राभिमानी यौधेय–शातवाहन प्रभृति वैदिक गणराज्यें नि राज्यें शेसव्वाशे वर्षें युद्धांवर युद्धें लढत असता ह्या भारतीय बौद्धांनी म्लेंच्छांविरुद्ध भारताच्या स्वातत्र्यामाठी अिकडची काडीही तिकडे केली नाही. पण त्याच म्लेंच्छ शत्रूंतील प्रबळतम अशा कनिष्क सम्राटाने अर्धवट का होअीना पण बौद्ध धर्म स्वीकारल्याची घोषणा करताच त्या परशत्रूला ही सारी बौद्ध जनता प्रेमपूर्वक आपण होअून शरण रिघाली. अेखाद्या देवासारखा त्यांनी त्याचा अुदो अुदो केला. तें म्लेंच्छ शककुशाण राज्य चिरकाल टिकावें म्हणून बौद्ध विहारा-विहारांतून प्रार्थना केल्या. अर्थात् अशा भारतद्रोहाने अशा भारतीय वैदिक जनतेत बौद्धांविषयी जी चीड अुत्पन्न झाली तीमुळे सम्राट् कनिष्कासारख्याचा पाठिंबा मिळाला असताही भारतात बौद्ध धर्मास सम्राट् पुष्यमित्राच्या काळापासून लागलेली ओहोटी तशीच चालू राहिली यात काही आश्चर्य नाही.

सम्राट् कनिष्काचा नातूच वैदिक धर्म स्वीकारतो !

त्यातही वर सांगितल्याप्रमाणे कनिष्काला तो चीनमध्ये लढत असता जेव्हा त्याच्याच सैन्यांतील बंडखोरांनी ठार मारलें तेव्हा तर त्या भारतीय बौद्धांची अतोभ्रष्टस्ततो भ्रष्टः अशी दुर्दशा झाली. कारण कनिष्कामागून त्याच्या राज्यावर बसलेला त्याचा पुत्र सम्राट् हविष्क हा बौद्ध धर्माविषयी सापेक्षतः अुदासीन राहिला आणि हविष्काच्या मृत्यूनतर कनिष्काचा नातू जो त्या शक कुशाण राज्याचा अधिपति झाला त्याने तर चक्क समारंभपूर्वक बौद्धधर्माचा परित्याग करून वैदिक धर्म स्वीकारला ! त्याने आपलें नांवसुद्धा पालटून सम्राट् वसुदेव अशी शुद्ध संस्कृतनिष्ठ अभिधा धारण केली ! शिवाची नि नंदीची प्रतिमा असलेलीं आपल्या नांवाचीं नाणीं पाडलीं !

कनिष्क मरताच त्याच्या साम्राज्याचे तुकडे तुकडे अुडतात !

सम्राट् कनिष्काचा मृत्यु होताच त्याच्या भारतातील साम्राज्याच्या चिंधड्या अुडाल्या. कनिष्काचें भारतातील राज्य अुत्तर भारतातही फारसें विस्तारू शकलें नव्हतें. तें प्रबळ असें नव्हतेंच नव्हतें. पंजाब, माळवा, सौराष्ट्र आपण आज ज्यास गुजराथ म्हणतो तो गुजराथ नि अुत्तर कोकणाची लहान पंट्टी असा भारताचा जो पश्चिमोत्तर भाग पूर्वी शकांच्या हाती पडलेला होता तेवढ्यावरच काय तें

आंध्रांचें आधिपत्य जाऊन कनिष्काचें आधिपत्य प्रस्थापित झालेलें होतें. आता कनिष्कानंतर ह्या भागात असलेलीं जीं तीनचार शक राज्यें होतीं तीं कुशाणांचें तें आधिपत्य झुगारून देऊन पुन्हा स्वतंत्रपणे राज्य करू लागलीं. शालिवाहन राजांनी ह्या शककुशाणांच्या शतकव्यापी युद्धात साऱ्या दक्षिण भारताचें स्वातंत्र्य अबाधित राखलें होतेंच. आणि आता अुत्तरपूर्व भारतातील कनिष्काचें नाममात्र आधिपत्य मानलेल्या लहान मोठ्या भारतीय राज्यांनीही तें आधिपत्य झुगारून देऊन आपापलें स्वातंत्र्य संपादन केलें. ह्याच पूर्व भारतातील राज्यात पाटलीपुत्राचेंही लहानसें राज्य त्या गडबडीत स्वतंत्र झालें.

पाटलीपुत्राचा मावळलेला सूर्य पुन्हा अुगवला !

वरच्या ओळीत पाटलीपुत्राचें 'लहानसें राज्य' असे म्हटलें आहे. कोणास वाटेल की, पाटलीपुत्रास 'लहानसें' असें चुकून म्हटलें गेलें असावें, पण तें चुकून म्हटलेलें नाही. कारण ज्या पाटलीपुत्रातील सिंहासनावर सम्राट् चंद्रगुप्त, सम्राट् अशोक, सम्राट् पुष्यमित्र असे सम्राट् विराजमान होअून गेले, आणि आसेतु-हिमाचल अशा भारतीय साम्राज्याचें नियंत्रणनेतृत्व शतकानुशतके जेथून केलें गेलें तें पाटलीपुत्राचें सिंहासन सूर्य जसा दिसता दिसता अस्तास जातो तसेंच ह्या शक-कुशाणांच्या अिसवी सनाच्या आरंभी आरंभी आलेल्या प्रलयाचे काली दिसता दिसता अस्तंगत झालें होतें. त्यापुढे शक कुशाणांशी शेदीडशे वर्षें चाललेल्या भारतीयांच्या महायुद्धात पाटलीपुत्राचें किंवा मगधाचें स्वतंत्र असें अस्तित्वही कोठे भासमान झालें नाही. कोणीतरी नि कुठलातरी नामधारी राजा तेथे पाटलीपुत्राच्या चार भिंतीत वसत असे वा नसे.

अि. सन ३०० च्या आसपास ह्याच पाटलीपुत्राच्या लहानशा राज्यावर लिच्छवी नांवाच्या बुद्धापासून मगधात प्रख्यात असलेल्या गणराज्याची सत्ता स्थापिली गेली.

ह्या लिच्छवी गणाच्या प्रमुखाची मुलगी कुमारदेवी हिचें अेका नामांकित सामन्त घराण्यातील चंद्रगुप्त नांवाच्या तरुणाने अि. स. ३०८ मध्ये पाणिग्रहण केलें. त्याच लिच्छवी गणाच्या पाठिंब्याने त्याने आसपासच्या प्रदेशावर स्वामित्व स्थापलें आणि अि. स. ३२० मध्ये त्याने पाटलीपुत्रात आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. ह्या चंद्रगुप्ताचा प्रख्यात सम्राट् चंद्रगुप्त मौर्याशी नामसादृश्यामुळे, कोणचाही घोटाळा होअू देअू नये. सम्राट् चंद्रगुप्त हा मौर्य कुळाचा होता. परंतु हा तरुण नि अुदयोन्मुख चंद्रगुप्त गुप्त कुलातील होता. त्याचा पराक्रम मात्र सम्राट् चंद्रगुप्ताच्या कुळाला शोभेल असाच होता. त्याने आपल्या १०।११ वर्षांच्या राजवटीत आपलें तें पाटलीपुत्रातील लहानसें राज्य मगध, प्रयाग नि अयोध्या हे प्रांत आपल्या राज्यास जोडून अितकें वाढविलें की त्यास महाराज ही अभिधा-

यथायथपणे शोभावी. म्लेंछ शकांच्या राजसत्तेचें अुन्मूलन करण्याची नि भारतीय साम्राज्यपदाची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या आपल्या समुद्रगुप्त नांवाच्या मुलाचे हाती आपलें राज्य सोपवून चंद्रगुप्त अि. स. ३३० मध्ये मरण पावला. हें गुप्त घराणें वैदिक धर्माचें नितांत अभिमानी असून श्रीविष्णु ही त्याची अुपास्य देवता होती.

सम्राट् समुद्रगुप्त

राज्यावर येताच समुद्रगुप्ताने भारतात त्या वेळी अुत्तरेत आणि दक्षिणेत जीं अनेक निरनिराळीं भारतीय राज्यें स्वतंत्रपणे पण फुटकळपणे नांदत होतीं त्यांना जिंकून, मौर्यकालीन चंद्रगुप्त चाणक्याप्रमाणे प्रथमतः अेक प्रबळ भारतीय साम्राज्य स्थापण्याचा आणि नंतर त्या बलाढ्य शक्तीच्या आधारे शक कुशाणांच्या हाती भारताचा जो पश्चिमोत्तर प्रदेश अद्याप राहिला होता तो स्वतंत्र करण्यासाठी त्या म्लेंछावर चालून जावयाचा संकल्प सोडला. त्याप्रमाणे त्याने कामरूप, समतट, नेपाल प्रभृति पूर्वोत्तर सीमाराज्यांपासून विंध्यपर्वतापर्यंतचा प्रदेश जिंकून घेतला. नंतर विंध्य ओलांडून पूर्व बाजूने सदलबल तो दक्षिणेत अुतरला. दक्षिणेतील प्रमुख प्रमुख अशीं बारा राज्यें त्याने जिंकलीं. कित्येक राजांना लढाअीत पाडाव करून पकडून आणविल्यानंतर त्यांनी त्याचें आधिपत्य स्वीकारताच त्यांचीं राज्यें तो परत करी नि त्यांना सोडून देअी. त्याच्या ह्या अुत्तरदक्षिण दिग्विजयातील पराक्रमाविषयी नि यशाविषयी अनेक पाश्चिमात्य अितिहासलेखकांनीही धन्योद्गार काढले आहेत आणि त्यांच्यांत प्रचलित असलेल्या भव्यतम अुपमांपैकी अेक अुपमा देअून समुद्रगुप्ताला 'The Hindu Napoleon' (हिंदु नेपोलियन) म्हणून मनःपूर्वक गौरविलें आहे. अितक्या विस्तृत दिग्विजयानंतर समुद्रगुप्त पाटलीपुत्रास परत आला. त्याने जिंकलेल्या ह्या नव्या भारतीय साम्राज्याची वैदिक धर्मानुसार घोषणा करण्यासाठी त्याने मोठ्या समारंभाने अश्वमेध यज्ञ केला नि तो सम्राट्पदाचा अधिकारी झाला नंतर त्याने शक कुशाणांवर स्वारी करण्याची जय्यत सिद्धता चालविली.

कुशाणांची अंतिम शरणागति

सम्राट् समुद्रगुप्ताच्या ह्या आगामी स्वारीची वार्ता अैकताच वायव्य दिशेकडील गांधार प्रभृति भारतीय भागात कुशाणांचीं जीं लहानसहान राज्यें जीव धरून राहिलेलीं होतीं त्यांनी आपण होअून समुद्रगुप्ताचें आधिपत्य मान्य केलें. कुशाणांना त्या वेळी आपले लोक 'कुश' असेंही म्हणत. आपल्या शरणागतीचें प्रतीक म्हणून त्या कुशांनी आपआपल्या दूतांकरवी सम्राट् समुद्रगुप्तास अनेक पुरस्कारही (नजराणेही) धाडून दिले. अशा प्रकारे दीड दोन शतकांच्या अव्याहत लढ्यानंतर भारतीय कृपाणाने कुशाणांच्या भारतातील राजसत्तेचें मूळच शेवटी कापून काढलें. कुशाणांचा प्रश्न येथेच निकालात निघाला.

परंतु मागे पृष्ठ ६६० नि ६६७ ह्यांत सांगितल्याप्रमाणे कनिष्काशी युद्ध चालू असता जे माळवा ते सिंधपर्यतचे शकराजे आंध्रांचें आधिपत्य झुगारून देऊन स्वतंत्र म्हणून मिरवू लागले होते त्यांनी मात्र आपण होऊन शरणागतीचें बोलणें काढलें नाही.

सम्राट् समुद्रगुप्ताचा मृत्यु नि नंतर

त्या शकांच्या म्लेंछ राज्यांवर चढाओ करण्याच्या वेतात असताच हा पराक्रमी सम्राट् समुद्रगुप्त अि. स. ३७५ मध्ये मरण पावला. त्याने आपल्यामागे त्याचा धाकटा पण तेजस्वी नि तरुण पुत्र जो चंद्रगुप्त (दुसंरा) त्यासच सम्राट्पद द्यावें असें सांगितलें होतें. परंतु ही त्याची आज्ञा न मानता त्याचा ज्येष्ठ पुत्र जो रामगुप्त तोच आपल्या ज्येष्ठत्वाचा अधिकार सांगून सिंहासनावर बसला. परंतु तो अितका दुबळा होता की, त्याच्या मंत्रिमंडळातील नि सैन्यमंडळातील बहुतेक कर्तृत्ववान् प्रमुखाधिकारी मनातून त्याचा तिटकारा करू लागले. अितक्यात ह्या रामगुप्ताच्या दौर्बल्याविषयी साऱ्या जनतेतही क्षोभ अुत्पन्न व्हावा अशी अेक घटना घडून आली. यद्यपि काही अितिहासकार ह्या घटनेस केवळ आख्यायिका म्हणून समजतात तथापि ज्या अर्थी विशाखदत्त नि बाणभट्ट ह्यांसारख्या प्राचीन ग्रंथकारांनी तिला सत्य मानलेलें आहे, अमोघवर्षराजाच्या दानपत्रातही ज्याअर्थी तिचा अुल्लेख सापडतो आणि अर्वाचीन अितिहासातील अल्लाअुद्दिनाविरुद्ध पद्मिनीच्या प्रकरणी आपल्या राजपुत वीरांनी तशाच अेका प्रसंगाशी तसेंच तोंड दिलेलें आढळतें त्या अर्थी रामगुप्ताविषयीच्या या आख्यायिकेच्या मुळाशी असलेली ती घटना बव्हंशी सत्य असावी असें काही अितिहासकारांचें जें मत आहे तेंच ग्राह्यतर दिसतें. ती घटना अशी.

सम्राट् समुद्रगुप्त मृत्यु पावल्यामुळे आणि त्याच्या मागे रामगुप्तासारखा दुर्बळ पुरुष सम्राट् झाल्यामुळे शक राजे निर्भय होअून त्यांच्या शत्रुस्थानी असलेल्या त्या भारतीय साम्राज्याशी अुद्दामपणे वागू लागलेले होते. त्यांच्यापैकी अेका अुर्मट नि अधम म्लेंछ राजाने सम्राट् रामगुप्ताचा अुपमर्द करण्यासाठी त्यास 'आज्ञा' केली की, 'तू तुझी सुंदर नि तरुण पत्नी गृहदेवी हिला माझ्याकडे धाडून दे, नाही तर युद्धास सिद्ध हो!' हा अुपमर्दकारक नीचपणाचा निरोप अैकताच मगध राज्यातील सारें राजकीय वातावरण क्षुब्ध होअून अुठलें. परंतु सम्राट् म्हणविणाऱ्या रामगुप्ताच्या नेभळेपणाची नि निर्लज्जपणाची अितकी परमावधि झाली होती की, त्याने 'केवळ युद्ध टळावें' म्हणून आपल्या राणीस, गृहदेवीस त्या शक क्षत्रपाकडे धाडण्याची सिद्धता केली. हें पाहताच त्याचा वर अुल्लेखिलेला धाकटा भाअू जो चंद्रगुप्त तो संतापाने लाल झाला. रामगुप्ताच्या आज्ञेला भीक न घालता त्याने गृहदेवीला आपल्या संरक्षणाखाली घेतली. नंतर कूटनीतीचा अवलंब करून

चंद्रगुप्ताने त्या शक राजाला परत निरोप धाडला की आपल्या आज्ञेप्रमाणे राणी गृहदेवीला आपल्याकडे धाडण्यात येत आहे. पण स्त्रीसुलभ लज्जेमुळे ती पडदे सोडलेल्या मेण्यातून येऊ अिच्छिते. तिच्या समवेत तिच्या दासींचा परिवारही तशाच मेण्यांतून येत आहे. हा संदेश अैकताच तो शकराजा अगदी हुरळून गेला. आणि त्या योजनेप्रमाणे राणीस धाडून द्यावें असें त्याने कळविलें. अिकडे चंद्रगुप्त स्वत: स्त्रीवेष धारण करून राणीच्या मेण्यात वसला. समवेत येणाऱ्या दासींच्या अनेक मेण्यांतूनही त्याचे निवडक सैनिक वीर स्त्रीवेष घेऊन वसले. तो झाकलेल्या मेण्यांचा मेळावा त्या शक राजाच्या राजधानीशी येताच आनंदाने अुल्लू झालेला तो शकराजा राणीच्या स्वागतार्थ स्वत: तिच्या मेण्यापाशी आला. अितक्यात दासी वेषातील चंद्रगुप्ताने त्याच्यावर झडप घालून आपल्या तरवारीने त्या असावध राजाचा तत्काळ शिरच्छेद केला. अितर मेण्यांतूनही चंद्रगुप्ताच्या त्या सशस्त्र सैनिकांनी शस्त्रें अुपसून खाली अुड्या घेतल्या. शकराजाच्या शिरच्छेदाची भयंकर बातमी आजूवाजूला पसरते न पसरते तोंच चंद्रगुप्तासह तें सारें सशस्त्र पथक शत्रूच्या आटोक्यातून पाहता पाहता भरधाव निसटून गेलें.

हें अद्‌भुत साहसाचें कृत्य करून आणि आपल्या राष्ट्राचा अुपमर्द करणाऱ्या शकराजास स्वहस्ते देहान्त प्रायश्चित्त देअून राजपुत्र चंद्रगुप्त पाटलीपुत्रास परत आला आहे ही वार्ता पसरताच सारी राजधानी आणि राष्ट्रच चंद्रगुप्ताच्या जयजयकाराने दुमदुमून गेलें. दिवंगत सम्राट् समुद्रगुप्ताच्या आज्ञेचें अुल्लंघन करून सिंहासनावर चढलेल्या त्या भेकड रामगुप्ताला खाली ओढून चंद्रगुप्तालाच सम्राट् पद दिलें पाहिजे, म्हणून मोठी अुठावणी झाली. त्या अुत्क्षोभात रामगुप्त ठार मारला गेला. लगोलग चंद्रगुप्त साम्राज्यपदावर आरूढ झाला. शत्रूकडून होणाऱ्या विटंबनेपासून जिला त्याने आपल्या अद्‌भुत पराक्रमाने मुक्त केली होती त्या राणी गृहदेवीशीच चंद्रगुप्ताने विवाह केला. नंतर आपली बलाढ्य सेना सुसज्ज करून सम्राट् चंद्रगुप्ताने शकक्षत्रपांवर स्वारी केली.

शकांशी शेवटचें युद्ध
शक क्षत्रप रुद्रसिंह ह्याला ठार मारलें

गुजराथ ते माळवा ह्या शकराज्याच्या सीमेशी युद्धाला तोंड जुंपताच शकराजांनी ठिकठिकाणी प्रतिकार केला. परंतु भारतीय सैन्याने शत्रु सैन्याची ठिकठिकाणी धुळधाण अुडविली. शेवटच्या लढाअीत तर शकांचा अुरला सुरला राजा जो शक क्षत्रप सत्यसिंहाचा पुत्र, त्या क्षत्रप रुद्रसिंह ह्यालाच रणांगणावर गाठून सम्राट् चंद्रगुप्ताने स्वहस्ते त्याचा शिरच्छेद केला.

येथेच शकांच्या राजसत्तेचा अंत झाला

शकांचा असा पूर्ण मोड होताच त्यांच्या हाती त्या वेळी असलेल्या सिंध, कच्छ, सौराष्ट्र, गुजराथ, माळवा इत्यादि प्रांतांना स्वतंत्र करून सम्राट् चंद्रगुप्ताने आपल्या भारतीय साम्राज्यात समाविष्ट केले. शक राजांचा असा समूळ अुच्छेद केल्यानंतर त्यांची तोंवर जी राजधानी होती त्या प्राचीन नि प्रख्यात अुज्जयिनी नगरात सम्राट् चंद्रगुप्ताने जेव्हा विजयप्रवेश केला तेव्हा तेथे मोठा राष्ट्रीय महोत्सव साजरा करण्यात आला. सम्राट् चंद्रगुप्ताने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली, पूर्वीपासून तिकडे चालत आलेल्या मालव संवतालाच शकांचा समूळ अुच्छेद करणाऱ्या ह्या महान् विजयाच्या स्मरणार्थ आपलें नांव देअून 'विक्रम संवत्' चालू केला तें मागे ६५५।६५६ या पृष्ठांत सांगितलेंच आहे. त्याने अुज्जअिनीलाच आपल्या भारतीय साम्राज्याच्या पश्चिम भागाची राजधानी केली. आणि तेथेच तो सिंहासनरूढ होअून वास्तव्य करू लागला.

विक्रमादित्याने म्लेंछांवर मिळविलेल्या ह्या विजयामुळे साऱ्या भारताला जी धन्यता वाटली ती काय वर्णावी? परकीयांच्या हातून सारा भारत स्वतंत्र होअून तो आपल्या अेकछत्र साम्राज्यात 'अेकराट्' झाला. शक कुशाणांचा नाश करण्यासाठी १५०।२०० वर्षे लढत आलेल्या यौधेय, मालव, विलिनयांकुर, शातवाहन प्रभृति अनेक वीरवरांच्या आणि त्यांच्या स्वत:च्या पितृपितामहाच्या पराक्रमाचें, यशापयशाचें नि राष्ट्रीय आशाआकांक्षांचें शेवटी सार्थक झालें; तें पाहून स्वत: विक्रमादित्यालाही किती धन्यता वाटली असेल!

ह्याविषयी व्हिन्सेंट स्मिथसारखा अिंग्लिश अितिहासकारही कण्हत कुंथत का होअीना पण म्हणतो ' We may feel assured that differences of a race, creed and manner supplied the Gupta monarch with special reasons for desiring to suppress the impure foreign (म्लेंच्छ) rulers of the Western India. Chandragupta Vikramaditya although tolerant of Buddhism and Jainism was himself an orthodox Hindu, especially devoted to the cult of Vishnu, and as such could not but have experienced peculiar satisfaction in 'Violently uprooting foreign chieftains.'

शेवटी कुशाणांप्रमाणेच शकही नामशेष झाले ?

पूर्वी पृष्ठ ६५८।६५९ मध्ये सांगितलेंच आहे की, शकांनी वैदिक धर्म, संस्कृत भाषा आणि भारतीय आचार विचार ह्यांना अंगीकारलें होतें. विक्रमादित्याने त्यांच्या राजसत्तेचेंही आता आपल्या खड्गबळाने अुन्मूलन केल्यामुळे त्यांच्या ' शकपणाचें ' असें भारतीयांपासून भिन्न अस्तित्व मुळातच नाहीसें झालें. दोनतीन

पिढ्यांच्या आतच शक असा कुशाणांप्रमाणेच त्या भारतीय जगतात कोणीही अुरला नाही.

भारतवर्षात अैतिहासिक कालामध्ये अनेक सम्राट् होअून गेले पण शक-कुशाणांचा अंत करणाऱ्या ह्या सम्राट् विक्रमाअितका लोकप्रिय असा सम्राट् क्वचितच कोणी झाला असेल. त्याच्या राजवटीत फायिआन नांवाचा जो चिनी प्रवासी आला होता त्या परकीयानेही त्याच्या साम्राज्यात भारतीयांच्या वैभवाचा सुखाचा, संपन्नतेचा नि संतोषाचा कसा कळस झाला होता तें वर्णिलेलें आहे. भारताच्या सर्व भागांतील खेड्यापाड्यांतून सुद्धा आख्यायिकांतून नि लोकगीतांतून आजही 'राजा विक्रमाचें' नांव नि त्याची न्यायप्रवीणता मोठ्या प्रेमाने संकीर्तिली जात आहे, अुणींपुरीं पस्तीसअेक वर्षें अेकछत्र अशा त्या बलाढ्य भारतीय साम्राज्याचें संरक्षण नि संगोपन केल्यानंतर सम्राट् विक्रमादित्य अिसवी सन ४१४ मध्ये दिवंगत झाला.

भारतीय अितिहासाचें जें पान ह्या शक कुशाणान्तक सम्राट् विक्रमादित्याच्या राजमुद्रेने अंकित झालेलें आहे तेंच होय आपल्या भारतीय अितिहासातील सोनेरी पान तिसरें.

✦ ✦ ✦

सोनेरी पान चौथें

हूणांतक यशोधर्मा

हूणांची जगावरच धाड

ह्या पुस्तकात पूर्वी हूणांचा अुल्लेख आलेलाच आहे. ह्यांनीच शककुशाणांच्या झाडून साऱ्या लोकांना त्यांच्या प्रदेशातून हुसकून देअून ते प्रदेशचे प्रदेश व्यापून टाकले होते. पण आता त्या शक कुशाणांहूनही अधिक भयंकर अशा ह्या हूणांच्या प्रळयाने सारा आशियाच नव्हे तर सारा युरोपही हादरवून त्या वेळच्या ज्ञात जगातील जीं जीं स्थायी, सुसंस्कृत नि संघटित अशीं राष्ट्रें नि राज्यें होतीं तीं सर्वच्या सर्व चीनपासून ते रोमपर्यंत चळचळा कापावयास लावलीं. त्यांच्या संख्यावळाला अंतच नव्हता. त्यांची धाड ह्या वा त्या अेका प्रदेशापुरतीच नव्हती तर ती त्या काळच्या साऱ्या ज्ञात जगावर पडलेली होती !

त्यांची सैन्यें जेव्हा बाहेर पडत तेव्हा सहस्रावधि स्त्रीपुरुषांसुद्धा घोड्यावर स्वार होअून हाती भाले नि तलवारी परजीत, जीं समोर दिसतील त्या त्या नगरांना, ग्रामांना आग लावीत मुलामाणसांसुद्धा सगळ्यांचीं शिरकाणें करीत, दिवसाचें नव्हे तर रात्रीवेरात्रीसुद्धा हिंस्र श्वापदांच्या थव्याप्रमाणे मोठमोठ्या कर्कश किंकाळ्या नि डरकाळ्या फोडीत चळचळ कापणाऱ्या शत्रुप्रदेशातूनच सारखी धावत सुटत. जेथे जेथे लढाअी होअी तेथे लढाअी संपताच शिरकाण केलेल्या स्त्रीपुरुषांच्या डोक्यांच्या कवट्या काढून त्यांच्या वाट्या करून त्या वाट्यांतून ते मद्य पीत, नित्याचे जयोत्सव साजरे करीत.

हूणांचा मूळचा प्रदेश चीनच्या साम्राज्याला लागून असल्यामुळे त्यांच्या अशा भयंकर अुपद्रवाने चीनचे प्रांतचे प्रांत अुजाड झाले. वर्षानुवर्षें हूणांच्या टोळधाडींना निवारता निवारता टेकीस आल्यामुळे चीनच्या साऱ्या देशाभोवतीच हूणांच्या टोळधाडीपासून संरक्षील अशी प्रचंड तटबंदी बांधण्याची योजना चीनच्या सम्राटाचे मनात आली, – तीच होय आजची 'चीनची भिंत' ! जगातील अेका आश्चर्यासारखी अुभी असलेली, ही चीनची प्रचंड भिंत म्हणजे हूणांची ती मूर्तिमंत भीतिच होय !

अिकडे हूणांची जीं अनेक घोडदळें मध्य आशियास तुडवीत चालली होती त्यांना त्यांच्या 'आटिला' नांवाच्या अेका सेनापतीने संघटित करून, आशिया ओलांडून, युरोपकडे धाव मारली. त्या असंख्य घोडदळाच्या भिन्न भिन्न सैन्याने सापडेल त्या दिशेने युरोपियन रशियात घुसून नुसता हलकल्लोळ माजवून दिला. विद्यापीठें, कलापीठें, घरें, देवघरें, झोपड्या नि राजवाडे, ग्रामें नि नगरें जें दिसेल

तें तें हूण पेटवीत चाललेल्या आगीच्या डोंबाळ्यात भस्स होऊन गेलें. जो जो दिसेल त्याला ते कापीत सुटले. रशिया तुडवून ते पोलंडमध्ये घुसले तेथून त्या हूणांच्या धाडी पुढच्या गाथ लोकांवर तुटून पडल्या. रोमन साम्राज्याच्या सैन्यामागून सैन्याचा त्यांनी धुव्वा अुडविला. विजयापेक्षा हूणांच्या क्रूरतेला विध्वंसाचीच अधिक आवड असे. त्यामुळे सारें युरोप नुसतें पराभूत झालें अितकेंच नव्हे तर सारें युरोप रक्तात न्हाअून निघालें, वैराण झालें. हूणांनी केलेल्या युरोपच्या दुर्दशेचें भीषण विवरण (तपशील) ज्याला पाहावयाचें असेल त्याने गिबनचा Decline and Fall of the Roman Empire हा अितिहास वाचावा. बहुतेक युरोपियन भाषांतून कोणा दुष्टाला शिवी हासडायची तर आजही त्याला 'अे हूण' असेंच म्हणतात जसें आपण 'पिशाच्च' म्हणतो. अितकी ह्या हूणांची धास्ती युरोपने खाल्ली होती.

मध्य आशियातून हूणांचा अेक महापूर जसा वर सांगितल्याप्रमाणे युरोपवर कोसळला तसाच त्यांच्या घोडदळाचा दुसरा महापूर काही काळ हिमालयाभोवती घोटाळत घोटाळत आणि हिमालयाच्या पलीकडल्या शक कुशाणांच्या अुरल्या सुरल्या राज्यांचा नि लोकांचा नाटनाट करीत शेवटी भारताच्या वायव्येकडील गांधारप्रभृति प्रदेशांवरही कोसळला. चीनच्या, रशियाच्या, रोमच्या साम्राज्याची नि राज्यांची जशी दुर्दशा अुडविली त्याच आवेशाने नि आवेगाने भारतासही ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत तुडवून टाकू अशा अुतावीळ अीर्षेने ह्या हूणांच्या टोळधाडी गांधारप्रांत तुडवीत सिंधूकडे घुसू लागल्या.

परंतु

परंतु भारताच्या सुदैवाने ह्या काळी भारतावर पूर्वीच्या ग्रीकांच्या स्वारीच्या वेळप्रमाणे कोण्या भेकड धनानंदाचें नामधारी साम्राज्य नव्हतें. तर तें होतें शक-कुशाणांतक सम्राट् विक्रमादित्याच्या पुत्राचें. क्षत्रियकुलावतंस सम्राट् कुमारगुप्ताचें! भारतात त्या काळी शतकव्यापी गुप्तकालीन सुवर्णयुग नांदत होतें. मौर्यकालीन सुवर्णयुगात शेवटी शेवटी सम्राट् अशोकाने आत्यंतिक अहिंसेच्या खुळापायी शस्त्रसन्यास केल्यामुळे भारताचें सैन्य बळ जसें विस्कळीत नि दुर्बळ झालें होतें तसें वैदिकधर्मीय सम्राट् कुमारगुप्ताने कोणताही आत्मघातक शस्त्रसंन्यास केला नसल्यामुळे त्याच्या त्या भारतीय साम्राज्याचें शस्त्रबळ दुबळें झालेलें नव्हतें. साऱ्या जगात अुत्पात माजविणाऱ्या हूणांसारख्या भयंकर शत्रूची धाड भारतावरही कोसळण्याचा प्रसंग आज वा अुद्या येणार आहे हें अुघड दिसत असल्यामुळे आपल्या भारतीय साम्राज्याच्या पर्यंतांचें (सरसीमांचें) संरक्षण करण्यास समर्थ असा युयुत्सु नि संघटित सैन्यसंभार सम्राट् कुमारगुप्ताने सुसज्ज ठेवलेला होता.

हूणांच्या पहिल्या स्वारीचा बोजवारा अुडविला !

हूणांचें परचक्र गांधारप्रांतावर कोसळल्याचें अैकताच सम्राट् कुमारगुप्ताने आपल्या चतुरंग सैन्यासमवेत आपला पराक्रमी पुत्र जो स्कंदगुप्त त्यास हूणांवर स्वारी करण्यास धाडून दिलें. हूणांच्या अगणित संख्याबळाच्या आधारावर त्यांचें जें तोवर अजिंक्य ठरलेलें अेक विशेष युद्धतंत्र होतें, त्याप्रमाणे त्यांनी भारतीय सैन्याची लांडगेतोड करण्यास आरंभ केला. त्यांच्या चाल करून येणाऱ्या सहस्रावधि घोडेस्वारांच्या अेका टोळधाडीचा भारतीय सैन्याने फडशा पाडला न पाडला तोंच त्यांच्या नव्या टोळधाडी, फुटलेल्या वारुळातील मुंग्यांच्या रांगांसारख्या चहूबाजूंनी चालून येत असलेल्या दिसत. त्यांचा नाश होतो न होतो तोंच पुन्हा नव्या टोळ-धाडी दत्त म्हणून साऱ्या प्रदेशात धुमाकूळ घालू लागत. पण अशा या अनिवार म्लेंच्छ शत्रूंशी कुमार स्कंदगुप्ताच्या भारतीय सैन्याने लढाया मागून लढाया देत आणि त्यांचा संहार करीत वर्षानुवर्षें तें युद्ध अितक्या सातत्याने चालविलें की, शेवटी हूणांचें तें अमित संख्याबळही क्षीण होअून त्यांच्यात गुप्त साम्राज्याच्या सीमेत अेक पाअूलही पुढे सरकण्याची धमक अुरली नाही, किंवा त्यांना ते अुभे होते तेथेही स्कंदगुप्ताच्या चढाअू माऱ्यापुढे अुभें राहणें अशक्य झालें. तेव्हा त्यांच्या त्या अुरलेल्या टोळचांनी मागे पळ काढला आणि पडतझडत आल्या वाटेने ते भारतीय सीमेच्या बाहेर निघून गेले. हूणांच्या ह्या पराभवाने त्यांना अितकी धास्ती बसली की, पुढे अुणीपुरीं ४० वर्षे भारताकडे पुन्हा वळण्याची त्यांची छाती झाली नाही.

हूणांना पिटाळून लावणारा विजयी वीर स्कंदगुप्त !

वर्षानुवर्षें समरांगणात लढत राहून आणि हूणांसारख्या जगातील मोठमोठ्या साम्राज्यांना पाणी पाजणाऱ्या म्लेंच्छ शत्रूचा असा निर्णायक पराभव करून हा विजयी युवराज स्कंदगुप्त जेव्हा आपल्या पित्याला भेटावयास पाटलिपुत्रास परतला तेव्हा त्या भारतीय साम्राज्याच्या राजधानीत नि साऱ्या राष्ट्रात त्याचा अपूर्व गौरव झाला. त्याचा वृद्ध पिता सम्राट् कुमारगुप्त ह्याच्या आनंदाला पारा-वार अुरला नाही. त्याने भारताच्या ह्या असामान्य विजयाची राष्ट्रीय अुद्घोषणा करण्याकरता वैदिकधर्मीय परंपरेप्रमाणे अेक मोठा अश्वमेध यज्ञ केला.

सम्राट् कुमारगुप्ताचा मृत्यु; स्कंदगुप्त सम्राट् होतो

ह्यानंतर तो कृतकृत्य झालेला वृद्ध सम्राट् कुमारगुप्त काही वर्षांनी अि. स. ४५५ त वारला. त्याच्या मागे त्याचा हूणांस पिटाळून लावणारा पराक्रमी पुत्र जो स्कंदगुप्त तोच सम्राट् झाला. त्याच्या जीवनातील त्याच्या कर्तृत्वाविषयीच्या

लवलेशही नव्हतें. स्कंदगुप्त मरताच त्याच्या पराक्रमाच्या नि नांवाच्या दराऱ्याने वायव्येसच घुटमळत राहिलेल्या हूणांच्या टोळधाडी त्यांचा राजा खिंखिल याच्या आधिपत्याखाली पुढे सरकल्या. खिंखिलाच्या मृत्यूनंतर त्याचें राज्यपद तोरमाण नांवाच्या पराक्रमी पुरुषाने पटकाविलें. त्याच्या राजवटीत हूणांच्या विध्वंसक नि अत्याचारी प्रवृत्ति मोकाट सुटून, कम्बोज, गांधार नि पंजाब ह्या प्रांतांत लुटालुटीचा नि जाळपोळीचा धुमाकूळ माजला. तक्षशिलेच्या जगत्प्रख्यात विद्यापीठाचाही विध्वंस झाला. तेथील सहस्रावधि मूल्यवान ग्रंथांची हूणांनी होळी केली.

राष्ट्रीय शस्त्रबळाचा पाठिंबा नसला म्हणजे राष्ट्रीय साहित्य नि संस्कृति ह्यांचीही परशत्रूकडून कशी धुळधाण अुडविली जाते त्याचें हें आणखी अेक प्रात्यक्षिक पहा !

मध्यंतरी तिकडे अिराण देशावर तुटून पडलेल्या हूणांच्या सैन्याने सारा अिराण पादाक्रांत करून अि. सन ४८४ मध्ये अिराणचा राजा फिरोज ह्यास पकडलें आणि त्याला जिवे ठार मारिलें. अिराणचा प्रश्न असा निकालात निघाल्यामुळे तिकडे लढत राहिलेले हूणांचे सहस्रावधि सैनिक त्यांच्या तावडीत तोपर्यंत न सापडलेल्या भारताचीही तीच दुर्दशा करण्यासाठी भारतात घुसून तोरमाणाच्या सैन्यात शिरले. त्यांचें बळ असें अकस्मात् वाढताच तोरमाणाने ५११ च्या आगे मागे पंजाबातून पुढे घुसून माळवा प्रांत, अुज्जयिनी नगरासह जिंकून घेतला. तोरमाणाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र मिहिरगुल हा हूणांचा राजा झाला. तो आपल्या बापापेक्षाही सवाअी पराक्रमी नि सवाअी क्रूर होता.

मिहिरगुल रुद्रदेवतेचा अुपासक बनला ?

आश्चर्याची गोष्ट अशी की निदानपक्षी भारताच्या वायव्य प्रांतात शिरल्यापासून हूणांमध्ये वैदिक धर्मातील रुद्र ह्या देवतेची अुपासना वेगाने फैलावू लागली होती आणि बुद्धधर्माचा तर त्यांना पहिल्यापासूनच मोठा तिटकारा होता. त्यांचा नवा राजा मिहिरगुल हाही त्याला अपवाद नव्हता. तो वैदिक रुद्र देवतेचा अेकनिष्ठ भक्त होता. आणि बुद्ध धर्माचा नि बौद्धांचा कट्टर द्वेष्टा होता. त्याच्या विषयी व्हिन्सेंट स्मिथ लिहितो 'The Savage Invader who worshipped as his patron deity Shiva, the God of Destruction, exhibited ferocious hostility against the peaceful Buddhistic cult and remorselessly overthrew their Stupas and Monasteries which he plundered of their treasuries.'

वैदिकांचा स्वराष्ट्राभिमान आणि बौद्धांचा राष्ट्रद्रोह

अिथे या पुस्तकाची मागील पृष्ठें ६४१ ते ६५१ आणि ६६३ ते ६६४ मध्ये आम्ही वैदिकांच्या राष्ट्राभिमानी आणि बौद्धांच्या राष्ट्रद्रोही प्रवृत्तीविषयी जीं

विधानें केलेलीं आहेत तीं वाचकांनी संदर्भासाठी पुन्हा अेकदा वाचावीं. बौद्धांची ही राष्ट्रद्रोही प्रवृत्ति आणि वैदिकांची ही राष्ट्राभिमानी प्रवृत्ति ह्यामधला विरोध स्पष्ट करण्यास आणि आमच्या विधानांचें सत्यत्व पटविण्यास हूणांचा राजा जो मिहिरगुल त्याचें हें प्रकरण अत्यंत अुपयुक्त आहे. कसें तें पहा.

मिहिरगुल हा भारतावर आक्रमण करणारा हूण राजा वैदिक धर्मीय रुद्रदेवतेचाच अुपासक होता आणि त्याने वैदिकांना पाण्यात पाहणाऱ्या भारतीय बौद्धांचा अनन्वित छळ चालविला होता. पण अेवढ्यासाठी वैदिक धर्मीय राजांनी किंवा जनतेने त्या परकीय हूण राजाचें राजकीय दास्यत्व स्वीकारलें नाही किंवा त्यास मिळून भारतीय बौद्धांच्या छळास हातभार लावला नाही. तर, तो मिहिरगुल स्वधर्मीय असला तरी राजकीय दृष्टीने तो परकीय असल्यामुळे त्याला भारताचा राष्ट्रशत्रुच मानलें, आणि भारताचा जो प्रदेश त्याच्या हातात सापडला होता त्या प्रदेशास राजकीय दृष्ट्या मुक्त करण्यासाठी त्याच्याशी वैरच मांडलें. वैदिकांत तक्षशिलेचा अंबुज किंवा जयचंद ह्यासारख्या काही राष्ट्रद्रोही व्यक्ति पूर्वी किंवा नंतर निघाल्या नाहीत असें नाही, परंतु अेकंदरीत वैदिक समाज अशा म्लेंच्छ राजाचें कट्टर शत्रुत्वच करीत आला आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या नि साम्राज्याच्या संरक्षणासाठी घनघोर युद्धें लढत आला. वैदिकांच्या ह्या स्वराष्ट्राभिमानी बाण्याचा स्मिथसारख्या अिंग्लिश अितिहासकारासही, किंचित् कुत्सित भाषेत का होअीना, पण वारंवार अुल्लेख केल्यावाचून राहवलें नाही. वैदिक धर्मीय हिंदु हे कोणत्याही म्लेंच्छ राजसत्तेचे अुपजत शत्रु असतात असा सर्वसाधारण अुल्लेख करताना तो लिहितो. 'These foreign tribes Shakas, Pahlavas & Yavanas at the time settled in Western India as the lords of a conquered native population were the objects of hostility of the Vaidik King Vilivayankur II .... He recovered the losses which his kingdom had suffered at the hands of the intruding foreigners and utterly destroyed the power of (the Shaka king) Nahpan. The hostility of the Andhra (Vaidik) monarch was stimulated by the disgust felt by all Hindus, and especially by the followers of the orthodox Bramhanical system at the outlandish foreign barbarians.''

क्वचित्, भारतावरील ह्या अितिहासकार स्मिथच्या अिंग्लिश साम्राज्याचेही कट्टर शत्रु हिंदु हेच होते ह्या त्याच्या स्वानुभवाचें शल्यही त्याच्या वरील वाक्यात व्यक्तविलें गेलें असावें.

राजा यशोधर्म

मगधातील गुप्त साम्राज्यपद पुरगुप्तासारख्या कुपात्र नि दुबळ्या पुरुषाच्या हाती जाताच त्याचें आधिपत्य कोणीही मानीनासें झालें. गुप्त साम्राज्याचे

मांडलिक असलेले बहुतेक राजे नि प्रदेश स्वतंत्रपणे राज्य करू लागले. यद्यपि त्या निरनिराळ्या स्वतंत्र भारतीय राज्यांतील प्रत्येकाला म्लेंच्छ हूणांच्या माळव्यापर्यंत वाढलेल्या राजसत्तेची भीति वाटत होती, प्रत्यक्ष अुज्जयिनीला विक्रमादित्याच्या सिंहासनावर हा मिहिरगुलासारखा म्लेंच्छ राक्षस वसत असलेला पाहून बहुतेकांच्या अंगाची जरी लाही लाही होत असली आणि हूणांचा अुच्छेद कधी होईल अशी प्रत्येक स्वराष्ट्राभिमानी वैदिक भारतीयाला जरी संचित अुत्कंठा लागली होती तरी हूणांविरुद्ध स्वत: नि अेकटयाने चढाअी करण्याची त्या फुटकळ राज्यांतील अेकालाही छाती होअीना. तो प्रश्नच कोणी काढू धजेना.

अशा वेळी तोच कठीण प्रश्न सोडविण्याची प्रकट प्रतिज्ञा करून अेक साहसी वीरपुरुष पुढे आला. तो कोणी नामधारी महाराजाधिराज नव्हता. तो महाराजही नव्हता. तो होता मालव प्रांतातील यशोधर्म नांवाचा अेक सापेक्षत: लहानसा राजा. परंतु त्याची महत्त्वाकांक्षा, राष्ट्राभिमान नि साहस हें म्लेंच्छांच्या 'राजाधिराज' म्हणून मिरविणाऱ्या बलाढ्य मिहिरगुलाला अुज्जयिनीच्या सिंहासनावरून खाली ओढून हूणांचा नि:पात करण्यासाठी स्वत: रणांगणात अुतरण्याअितकें अुत्तुंग होतें !

वैदिक राजांची संयुक्त आघाडी

त्याने प्रथमत: आजूबाजूच्या स्वतंत्र अशा बहुतेक भारतीय राज्यांना हूणांविरुद्ध युद्ध करण्यासाठी अेका संयुक्त योजनेत संघटित केलें. या संयुक्त युद्धयोजनेस मगधाच्या बालादित्य राजानेही अुचलून धरलें. तेव्हा यशोधर्म राजाच्या नेतृत्वाखाली त्या सर्व राजांनी हूणांविरुद्ध चहू बाजूंनी अुठावणी केली. जें साहस त्या वेळचा कोणताही अेकअेकटा राजा करू धजत नव्हता तें साहस करण्याचा आवेश ह्या संयुक्त भारतीय सैन्यात अुत्पन्न होअून हूणांच्या प्रबळ सैन्याची रणांगणात लांडगेतोड चालू झाली.

हूणांचा निर्णायक पराभव ! स्वत: मिहिरगुल जिवंत पकडला जातो ! !

शेवटी सेनापति यशोधर्म ह्याने आपल्या हाताखालील सैन्यासह हूणांचा राजा जो मिहिरगुल त्याच्या मुख्य सैन्यावरच चाल केली. या दोन्ही सैन्यांची गाठ मंदोसर येथे किंवा कोरूर येथे अि. सन ५२८ च्या आसपास पडली. त्यांच्यामध्ये झालेल्या हटातटाच्या लढाअीत भारतीय सैन्याच्या माऱ्यापुढे हूणांच्या सैन्याची फळी फुटून त्याची दाणादाण अुडाली आणि आजवर कर्दनकाळासारखा मातलेला त्यांचा राजा जो मिहिरगुल तो स्वत: जिवंत पकडला जाअून विजयी सेनापति जो यशोधर्म त्याच्या हाती सापडला.

राजा यशोधर्म ह्याच्या पराक्रमाने मिळविलेल्या हूणांवरील ह्या अभूतपूर्व विजयाच्या दुंदुभी साऱ्या भारतवर्षभर निनादू लागल्या. हूण जातीने नि स्वत:

मिहिरगुलाने भारतीयांवर केलेल्या आजवरच्या अत्याचारांचा भारतीय सूड अुगविण्यासाठी आणि त्याच्या पापाचें त्याला प्रायश्चित्त देण्यासाठी यशोधर्म राजाने पाडाव केलेला हूण राजा जो मिहिरगुल ह्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली.

बालादित्याचें राष्ट्रघातक औदार्य का स्वार्थपरायणता ?

परंतु त्या दुष्ट मिहिरगुलाला ठार मारण्याची आज्ञा राजा यशोधर्म ह्याने दिली आहे हें कळताच त्या संयुक्त आघाडीतील अेक घटक असलेला मगधाचा राजा जो बालादित्य ह्याने महिरगुलाला ठार न मारता आपल्या स्वाधीन करावें असा अत्याग्रह धरला. त्यामुळे बालादित्यास दुखवू नये म्हणून त्या अत्त्याचारी हूण राजाला राजा यशोधर्म याने मिहिरगुलाला स्वत: ठार न मारता बालादित्याचे हाती सोपविलें. मिहिरगुलाचे हस्ते काही स्वार्थ साधण्याच्या गुप्त अटीवर असो किंवा वधार्ह राष्ट्रशत्रूलाही परत जीवदान देणें, सापाला दूध पाजणें, हेंच अलौकिक औदार्याचें कृत्य होय असें मानण्याचें जें दुष्ट व्यसन आपल्या भारतीयांच्या हाडी मांसी खिळलेलें आहे, तशा राष्ट्रघातकी औदार्यापायी असो पण बालादित्याने त्या राष्ट्रशत्रु नि दुष्टात्मा असलेल्या मिहिरगुलाला जीवदान दिलें, अितकेंच नव्हे तर त्याला सन्मानपूर्वक वायव्येकडे अुरलेल्या हूण राज्यात जाण्याची मोकळीक दिली! जशी अगदी अर्वाचीन काळी पृथ्वीराजाने महंमद घोरीला दिली !

' पय:पानम् भुजंगानाम् केवलं विषवर्धनम् '

तेथून जीव घेअून मिहिरगुल जो निसटला तो काश्मीरमध्ये गेला. तेथे हूण सैन्याची पुन्हा गुप्तपणे जमवाजमव करून त्याने काश्मीरच्या राजास ठार मारलें. गांधारचें राज्यही जिकून तिकडील प्रजेचा त्याने अनन्वित छळ केला. विशेषत: त्याला जें जें 'बुद्ध प्रस्थ' आढळलें तें तें त्याने धुळीस मिळविलें. अनेक बौद्ध धर्मीयांचें त्याने शिरकाण केलें.

'शस्त्र विजयापेक्षा धर्मविजय हा श्रेष्ठ आहे' अशा भंगड गुंगीत राहणाऱ्या भारतीय बौद्धांना, स्वकीय शस्त्रबळाच्या पाठिंब्यावाचून शत्रूच्या शस्त्रबळापुढे 'धर्माला' जिवंत राहणेंसुद्धा असें अशक्य होतें ह्याचा वस्तुपाठच शिकविण्यासाठी नियतीने मिहिरगुलाला जन्माला घातला होता की काय नकळे !

तथापि मिहिरगुलावर सूड अुगविण्याचें जें अेकमेव साधन ह्या विचाऱ्या दुबळ्या नि संत्रस्त बौद्धांच्या हाती होतें त्याचा मात्र त्यांनी अुपयोग करण्यास सोडलें नाही. मिहिरगुल जेव्हा शेवटी अेकदाचा आपल्या मरणानेच मेला तेव्हा त्या क्षणाचें वर्णन बौद्धांनी आपल्या पुराणातूनच असें केलें आहे : 'जेव्हा तो हूण राक्षस मिहिरगुल गेला आणि बुद्धद्वेषाच्या अपराधास्तव अनंत यातना भोगण्यासाठी तो क्रूरकर्मा अक्षय्य नरकात पडला. तेव्हा त्या धडाक्यासरशी पृथ्वी दुभंग झाली. प्रलयकालासारखा पर्जन्य कोसळला. पशुपक्षी संत्रासाने हंबरत नि किंचाळत

रानोमाळ पळू लागले, अितरही अनेक अुत्पात झाले !' या अिहलोकात त्या बौद्धांना त्याचा केसही वाकडा करता आला नाही. त्याला शेवटी परलोकात अक्षय्य नरकाच्या अनंत यातना भोगणें आम्ही भाग पाडलें असा सूड अुगविल्याचें काल्पनिक समाधान मानण्यावाचून तसल्या दुबळ्या लोकांना गत्यंतरच नसतें ! पण त्या अहिंसक बौद्धांचें हें समाधानही 'हिंसक'च नव्हतें का ? हें 'कारुण्य' की दारुण क्रूरता ?

अुज्जयिनीत विजयप्रवेश

हूण राजा मिहिरगुल याचा पूर्ण पराभव केल्यानंतर यशोधर्माने, पंचनदातून हूणांचें सारें प्रस्थ अुलथून पाडलें. पंचनदाला विमुक्त करून आणि तेथे भारतीय राजसत्ता स्थिरस्थावर करून राजा यशोधर्म आपल्या विजयी सैन्यासह माळव्यास परतला. विक्रमादित्यापासून भारताच्या राजधानीचा मान मिळत आलेल्या आणि हूणांच्या म्लेंच्छ सत्तेच्या हातून आता त्याने स्वत: मुक्त केलेल्या अुज्जयिनी नगरात त्याने मोठ्या समारंभाने विजयप्रवेश केला. आता तो 'राजा' राहिला नसून 'महाराजाधिराज' झाला होता. भारतीयांनी हूणांवर मिळविलेल्या ह्या विजयाच्या स्मरणार्थ त्याने दोन कीर्तिस्तंभही अुभारले. ते अद्यापिही, त्या विजयाची तत्कालीन भारतीयांना केवढी धन्यता वाटली त्याची साक्ष देत आहेत.

हूणांचे पुढे काय झालें ?

दुसरें काय व्हावयाचें ? यवन, शक, कुशाण, पार्थियन आदि पूर्वीच्या परकीय आक्रमकांची जी गत झाली तीच शेवटी हूणांचीही झाली. मिहिरगुल अि. स. ५४० च्या आसपास मेल्यानंतर हूणांची सिंधु नदीच्या पलीकडच्या वायव्य भागात असलेलीं संस्थानेंही अेकदोन पिढ्यांतच नष्ट झालीं. त्यांच्या हातून राजसत्ता हिरावून घेअून हिंदुकुशपर्यंत बैदिक धर्मीय हिंदुराजांचीं राज्यें पुन्हा नांदू लागलीं. त्यांच्यापेक्षा शस्त्रबळातही हिंदुराष्ट्राचें शस्त्रबळ अधिक प्रभावी ठरल्यामुळे त्यांच्या हातातील राजसत्ता छिनावून घेतली जाताच तेच हूण नुसते गोगलगाय बनले. डॉ. जयस्वाल लिहितात, 'The Huns were fully crushed within a century by the successive (Hindu) dynasties.' हिंदुराष्ट्राशी अुणींपुरीं शंभर वर्षें लढता लढता चाललेल्या महायुद्धात हूणांचा जो संहार झाला त्यामुळे त्यांचें पूर्वीचें संख्याबळही घटलें होतें. जे अुरले त्या हूण लोकांनी आपण होअून भारतीय धर्म, भाषा नि आचार अंगीकारून ते अेक दोन पिढ्यांत भारतीयांत विलीन झाले, अितके पूर्णपणे की त्यांना त्यांच्या हूणपणाची सुद्धा जाणीव अुरली नाही.

हूणांवर भारतीयांनी रणसंग्रामात मिळविलेल्या ह्या निर्णायक विजयाच्या दूरगामी परिणामाविषयी व्हिन्सेंट स्मिथने असा आशय व्यक्त केला आहे की,

After the defeat of Mihiragul and the extinction of the Hun Power on the Oxus, India enjoyed immunity from foreign attack for nearly five centuries ' अर्थात् मिहिरगुलाचा यशोधर्म राजाने निर्णायक पराभव केल्यानंतर आणि हूणांच्या राजसत्तेचा तिकडे वक्षु नदीकडेही (ऑक्ससकडेही) अंत झाल्यानंतर हिंदुस्थानवर पुढे जवळजवळ पांचशे वर्षेंपर्यंत परचक्र असें येऊ शकलें नाही. म्हणजे जवळजवळ पांचशे वर्षे पारियात्र पर्वतापासून (हिंदुकुशपासून) गांधार, काश्मीर, पंजाब, सिंध तो थेट कन्याकुमारीपर्यंत जिकडे तिकडे वैदिक हिंदूंचीं राज्यें स्वतंत्रपणे नांदत होतीं. सारा भारत स्वतंत्र,संपन्न,समर्थ नि सुखी होता.

ऐतिहासिक प्राचीन खंडाचा समारोप

अिसवी सन पूर्व ६०० वर्षांपासून तो अि. सन ७०० पर्यंतच्या वर्षांतील साधारणत: १३०० वर्षांच्या सुदीर्घ ऐतिहासिक कालखंडाला जर प्राचीन खंड असें संबोधिलें आणि त्या पुढच्या काळाला अर्वाचीन खंड असें म्हटलें तर या पुस्तकातील विषयक्षेत्रापुरता त्या प्राचीन खंडाचा येथेच समारोप करणें युक्त आहे. या प्राचीन कालखंडातील जीं ऐतिहासिक विधेयें (Points) ठसठशीतपणे आपल्या तरुणांच्या नि सर्वसामान्य वाचकांच्या मनावर अंकिलीं जाणें अवश्य आहे. परंतु जीं अद्याप तशीं ठसविलीं जात नाहीत त्या विधेयांपैकी काही विधेयें या समारोपात सुटसुटीतपणे खाली देत आहो.

(१) या प्राचीन खंडात कोणतेंही परचक्र सारा भारत असा केव्हाही जिंकू शकलें नाही. ही वस्तुस्थिति बहुतेक परकीय किंवा स्वकीय लोकांच्या ध्यानात आलेली नसते. काहीजणांनी तर तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलेलें असतें. 'भारतावर अलेक्झाडरची स्वारी' 'भारतावर शकांचें आक्रमण' अशा प्रकारचीं वाक्यें वाचताच सर्व सामान्य परकीय वा स्वकीय वाचकांचीही अशी अेक विपरीत समजूत होते की ह्या परकीय शत्रूंनी जणू काही साऱ्या भारतावरच स्वारी करून त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें होतें. अशा आभासमय समजामुळें अनेक शत्रूंनी नि हितशत्रूंनी असे आक्षेप घेतलेले असतात नि सिद्धान्त ठोकलेले असतात की, भारतीय राष्ट्राचें, अर्थात् हिंदुराष्ट्राचें, सारें जीवन परकीयांच्या दास्यातच व्यतीत झालेलें आहे.' हा त्यांचा मूर्ख किंवा दुष्ट आरोप नि अुपसिद्धान्त सर्वतोपरी अेकतर अहेतुक अज्ञानाचा किंवा सहेतुक मत्सराचा असतो हें अुघडकीस आणण्यासाठीच हें पुस्तक हेतुत: लिहिलें आहे. त्यात येथपर्यंत केलेल्या वर्णनावरून हें स्पष्ट होअील की :—

(२) नेपाळपासून पूर्व समुद्रापर्यंतचा सारा पूर्वोत्तर भारत आणि दक्षिण भारत, म्हणजे आपल्या भरतखंडाचा सुविशाल असा साधारणत: ३।४ भाग ह्या १३०० वर्षांच्या प्रदीर्घ कालात पूर्णपणे स्वतंत्र होता. त्याच्यावर भूमार्गाने वा सिंधुमार्गाने कोणतेंही परचक्र येअू शकलें नाही.

(३) अुरलेल्या पश्चिमोत्तराच्या साधारणतः अेक चतुर्थांश भागात जी परचक्रें आलीं त्यांपैकी यवनशत्रु अेकदा पंजाव ते अयोध्येपर्यंत पुढे सरकला होता आणि पंजाब ते गुजराथपर्यंतचा पश्चिमोत्तर पट्टा शककुशाणांनी काही काळ जिंकून घेतला होता. हूण तर पंजाव ते अुज्जयिनीपर्यंत जेमतेम येअू शकले. या सर्व शत्रूंची हिंदुराष्ट्राने शेवटी काय दुर्दशा केली हें येथे संक्षेपतः वर्णिलेलेंच आहे.

(४) त्या काळच्या जगातील आशियन वा युरोपियन राष्ट्रांपैकी आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य नि अस्तित्व भयंकर परशत्रूंचा निःपात करून अितक्या प्रदीर्घ कालापर्यंत नि अितक्या यशस्वीपणे हिंदुराष्ट्राने जसें अबाधित राखलें तसें राखू शकलेलें अेकाददुसरेंच समकालीन राष्ट्र त्या काळच्या अितिहासात सापडू शकेल !

(५) ह्या प्राचीन कालात जीं यवन, शकहूणादिकांचीं परचक्रें आलीं तीं केवळ हिंदुराष्ट्रावरच काय तीं आलीं होतीं असें नाही. त्यांच्यातील काहींनी तर त्या त्या कालातील जगामधील बहुतेक राज्यें अुद्ध्वस्त करून टाकलीं. अितकेंच नव्हे तर अितर लोकांचीं राष्ट्रें च्या राष्ट्रें नामशेष करून टाकलीं ! हें त्यांच्या हिंदुस्थानवर झालेल्या आक्रमणांशी तुलना करताना ध्यानात घेतलें पाहिजे.

(६) हिंदुराष्ट्रासही तसेंच नामशेष करण्याच्या ओर्षेने त्या त्या काळी ते ते आक्रमक प्रचंड शस्त्रबळासह नि संख्याबळासह तुटून पडले. पण या साऱ्या यवन-शककुशाणहूणादिक सशस्त्र आक्रमकांच्या शस्त्रवळास हिंदुराष्ट्राने प्रथम रणाग्नीत भस्मसात् केलें आणि मग त्यांच्या म्लेंच्छीय बर्वरतेस यज्ञाग्नीत शुद्ध करून आत्मसात् करून टाकलें. अितक्या पूर्णपणें की, भारतास नामशेष करण्यासाठी आलेल्या ह्या शत्रूंचें अस्तित्व तर काय पण 'नाम' सुद्धा 'शेष' अुरू दिलें नाही.

क्षणभर अशी कल्पना करूया की वरील प्राचीन कालखंडात आकाशातून पृथ्वीस निरीक्षित असलेला पण त्यानंतर आजवर पृथ्वीकडे न आलेला कोणी देवदूत पुन्हा आज हिमालयाच्या शिखरावर येअून हिंदुस्थानचें निरीक्षण करू लागला आहे, पण मधली माहिती काहीही नसल्याने तो जर त्या शिखरावरून विचारू लागला, 'अहो, पूर्वी अेकदा ह्या हिंदुस्थानात यवन (ग्रीक) नांवाच्या लोकांचें एका कोनात राज्य होतें. आज त्यांच्यापैकी कोणी यवन लोक येथे अुरले आहेत काय ?' तर 'होय, त्या यवनांचाच मी अेक वंशज हा येथे अुभा आहे' असें सांगणारा अेकही मनुष्य ह्या हिंदुस्थानात आज अुरलेला नाही ! जर त्या देवदूताने पुन्हा विचारलें की, 'अहो ! ह्या हिंदुस्थानातील अेका भागात शककुशाणांचीं राज्यें नि लोकसमूह त्या काळी अेकदा नांदत होते. त्यांच्यातील कोणी शककुशाण आज येथे आहेत का ?' तर 'होय, होय, त्यांचाच वंशज हा मी शक, हा मी कुशाण आजही येथे नांदत आहे' असें सांगणारा अेकही मनुष्य आज ह्या हिंदुस्थानात सापडणें अशक्य

आहे ! जर त्या देवदूताने पुन्हा विचारलें, 'अहो पण त्या काळी साऱ्या जगास संत्रास देणारे जे हूण नांवाचे क्रूर लोक ह्या हिंदुस्थानात येथील लोकांशी लढत अुज्जयिनीपर्यंत पुढे सरसावले होते त्या हूणांपैकी तरी कोणी सज्जन येथे अुरलेले असलेच पाहिजेत ! तसे कोण कोण येथे आहेत ?' तर 'होय होय, त्यांचाच वंशज हा मी हूण येथे आहे' असें छातीवर हात मारून सांगण्यास पुढे येणारा अेकही मनुष्य आज ह्या हिंदुस्थानात अुरलेला नाही !

पण आश्चर्यचकित होअून त्या देवदूताने शेवटी विचारलें, 'अहो पण त्या प्राचीन काळी ह्या यवन—शक—हूणादिक प्रबळ आक्रमकांशीं लढणाऱ्या आणि ह्या देशाचें स्वामित्व गाजविणाऱ्या त्या हिंदु लोकांपैकी तरी कोणी हिंदु येथे अुरल आहे काय ?' तर 'होय ! होय ! मी हिंदु, मी हिंदु' असें प्रत्येकी अभिमानाने गर्जत तीस कोटींचें लोकारण्यचें लोकारण्य, हिंदुराष्ट्रचें राष्ट्र आजही ह्या हिंदुस्थानात अुभें राहील !

ह्या प्राचीन कालखंडाच्या अंतिम शतकात बव्हंश जगास चळवळ कापावयास लावणाऱ्या हूणांनाही पादाक्रान्त करून निःपात करणाऱ्या हूणांतक, यशोधर्म राजाच्या पराक्रमाने जें झगझगाटलेलें आहे तेंच होय हिंदुराष्ट्राच्या अितिहासांतील सोनेरी पान चौथें.

✦ ✦ ✦

सोनेरी पान पांचवें

महाराष्ट्रीय पराक्रमाचा अुच्चांक अटकेवर जरीपटका फडकतो ! !

(पूर्वार्ध)

प्रकरण १ लें

प्रास्ताविक

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील 'सहा सोनेरी पानें' हा जो ग्रंथ आम्ही लहीत आहोत, त्याचें विषयक्षेत्र ह्या ग्रंथाच्या प्रसिद्ध झालेल्या पृष्ठें ५८४ ते ५८६ ह्या पृष्ठांत व्यक्तविलेलें आहे. त्याच अनुरोधाने हें सूचित होतें की, सामान्यत: अिसवीसनाच्या आठव्या ते अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत चालू राहिलेल्या, संतत प्रदीर्घ नि प्रचंड हिंदु-मुस्लिम संघर्षाचा विगतवार (तपशीलवार) अितिहास देणें हा या ग्रंथाचा मूळ हेतु नाही. तर आमच्या मते त्या महायुद्धाचें नि त्या कालखंडाचें हिंदु राष्ट्रीय दृष्टया जितकें मर्मज्ञपणे, यथार्थपणे नि निर्भयपणे समीक्षण व्हावयास हवें आहे, पण जें आजवर बहुधा कोणाकडूनही झालेलें नाही तसें समीक्षण तेवढें करण्याचा आमचा येथे मुख्य अुद्देश आहे.

कारण हिंदुराष्ट्राच्या हितार्थ तें आजही अत्यंत आवश्यक आहे, हितप्रद आहे.

आपल्या अितिहासाचे दोन भाग : प्राचीन नि अर्वाचीन

आमच्या मते आपल्या निर्भेळ अितिहासाचे जे दोन कालखंड घटनांच्या ओघामुळेंच पडतात ते म्हणजे साधारणत: अिसवी सनाच्या सातशेव्या वर्षांपर्यंतचा प्राचीन भाग आणि सातशेव्या वर्षानंतरच्या वृत्तान्ताचा अर्वाचीन भाग हे होत. ह्या कालखंडाच्या अनुसारे आम्ही आपल्या प्राचीन अितिहासाची साधारणत: अिसवी सन सातशेपर्यंतच्या कालखंडाची समीक्षा करणारा आणि त्यातील चार सोनेरी पानें दिग्दर्शविणारा हा प्राचीन काल होय. आणि आता त्यानंतरच्या अर्वाचीन कालखंडातील आपल्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासाची समीक्षा करणारा काल हा अर्वाचीन काल होय,

हें समीक्षण करताना त्याला आधारभूत असलेल्या फुटकळ घटनांचा नि घडामोडींचा अवश्य तेथे विगतवार अुल्लेखही केला जाअील, आणि कालक्रमाचाही अनुबंध यत्रतत्र अनुसरला जाअील. परंतु कालक्रमादिक गोष्टी अितर कित्येकांनी लिहिलेल्या लहानमोठ्या अितिहासग्रंथांतूनही सहजासहजी अुपलब्ध होणाऱ्या

असल्याने ह्या ग्रंथात त्यांच्यासाठी अनावश्यक स्थल अडविण्याचें काही कारण नाही. यास्तव या समीक्षणात सन-शक-संवतादि कालानुबंधाच्या क्रमापेक्षा, परंतु कालानुबंधास न तोडता, जीं जीं विधेयें (Points) चर्चिलीं जातील, त्या त्या महत्त्वपूर्ण विधेयातील विषयानुबंधाच्या क्रमाकडेच मुख्य लक्ष पुरविलें जाईल.

हिंदुमुसलमानांच्या महायुद्धातील अभूतपूर्व दुतोंडी संघर्ष

हया अर्वाचीन अितिहासाच्या आरंभीच भारतावर मुसलमानांनी केलेल्या आक्रमणामागून आक्रमणामध्ये हिंदुराष्ट्राशी जीं जीं सशस्त्र युद्धें छेडलीं गेलीं त्यांतील दुतोंडी संघर्ष ही हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील अेक अभूतपूर्व दुर्घटना होती. कारण की, अैतिहासिक कालात मुस्लिमांच्येपूर्वी हिंदुस्थानावर यवन, शकादिक जीं जीं परराष्ट्रीय आक्रमणें झालीं त्या सर्वांचा प्रमुख हेतु हिंदुस्थानात त्यांची त्यांची राज्यसत्ता स्थापिण्याचाच काय तो होता. हा राजकीय हेतु सोडून त्यांच्या आक्रमणांना अितर कोणतेंही सांस्कृतिक किंवा धार्मिक वैर मुख्यत्वें कारणीभूत झालेलें नव्हतें. परंतु हया नव्या अिस्लामी शत्रूची अेक महत्त्वाकांक्षा त्या प्राचीन शत्रूप्रमाणेच हिंदुराष्ट्राची राजसत्ता अुखडून टाकून साऱ्या हिंदुस्थानात मुस्लिम साम्राज्य करण्याची तर होतीच होती, परंतु या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या जोडीला त्या कोणत्याही प्राचीन शत्रूच्या स्वप्नातसुद्धा जी आली नव्हती अशी अेक भयंकर धार्मिक महत्त्वाकांक्षाही अिस्लामच्या हया आक्रमणाच्या मागे धगधगत होती. त्यांच्या आक्रमणाला सतत चेतविणाऱ्या आणि त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेहूनही अनेक पटींनी राक्षसी असलेल्या या दुसऱ्या धार्मिक महत्त्वाकांक्षेच्या अुन्मादात हिंदुराष्ट्राचा जीवनभूतच असलेला जो हिंदुधर्म, त्याचें हिंदुत्व, तेंच नष्ट करण्यासाठी आणि त्या आक्रमकांचा मुस्लिम धर्म खड्गाच्या बळाने या हिंदुजगतावर लादण्यासाठी साऱ्या आशिया खंडातील हे लक्षावधि मुस्लिम आक्रमक अनेक राष्ट्रांतून बाहेर घुसून हया हिंदुस्थानवर शतकोशतकें तुटून पडत आले.

ख्रिश्चनांचेंही अत्याचारी आक्रमण

ती मुस्लिम संकट परंपरा कोसळत असताच दुष्काळात तेराव्या महिन्याची भर पडावी त्याप्रमाणे पहिल्या ख्रिस्ती शतकातच मलबारप्रांतात घुसलेल्या सीरियन ख्रिश्चनांचा प्रश्न सोडला तरी साधारणत: पंधराव्या शतकाच्या आगेमागे युरोपातून पोर्तुगीज, डच, फ्रेंच, ब्रिटिश अित्यादि ख्रिश्चन राष्ट्रेंही पश्चिमेकडून सागरी मार्गाने हिंदुस्थानवर तुटून पडलीं ! त्यांची ती ख्रिश्चन चढाअीही मुसलमानांच्या आक्रमणाप्रमाणेच राजकीय आणि धार्मिक अशा दुहेरी स्वरूपाची आणि तितकीच राक्षसी होती. त्यांनीही लाखो हिंदूंना वेयोनेटांनी बाटवून त्यांच्यावर ख्रिश्चन धर्म बळाने लादण्याचा कसा प्रलय मांडला होता तें वृत्त यथास्थल पुढे अुल्लेखिलें जाअीलच.

येथे प्रथम हिंदु-मुस्लिम संघर्षाचाच अूहापोह केला जाअील

मुसलमानी आक्रमणाच्या ह्या दोन्ही आघाड्या जरी अेकाच महायुद्धाचीं अुपांगें होत्या तरी त्यांची मूळचीच राजकीय नि धार्मिक अशीं रूपें, त्यांच्या लढ्यांचीं साधनें आणि त्यांचीं अंतिम फलाफलें हीं पुष्कळांशी भिन्न भिन्नच होतीं. अर्थात त्यांची चिकित्साही काहीशी स्वतंत्रपणे करणें आवश्यक आहे.

यास्तव प्रथमतः त्या महायुद्धातील मुस्लिमांच्या आणि तदितर म्लेंच्छांच्या धार्मिक आक्रमणांचें समीक्षण आम्ही करणार आहोत आणि नंतर मुस्लिमांच्या राजकीय आक्रमणांच्या आघाडीचें समीक्षण करू.

✦ ✦ ✦

प्रकरण २ रें

केवळ हिंदुनिंदक अितिहास

विदेशी अितिहासकारच काय, किंवा आमच्या प्रत्यक्ष शत्रूंनी लिहिलेले अितिहासच काय, पण आमच्या स्वतःच्या लोकांनी लिहिलेले बहुतेक अितिहासही, हिंदुत्वाच्या निर्भेळ नि निर्भय दृष्टिकोनातून ते केव्हाही लिहिले गेले नसल्यामुळे, हिंदूंच्या यथार्थ गौरवाच्या गाथा कशा वारंवार गाळतात आणि हिंदूंवर कोसळलेल्या आपत्तींचींच तेवढीं टाचणें अेकत्र करून आमचा हिंदूंचा अितिहास म्हणून तेवढाच कसा प्रदर्शितात त्याविषयीच्या अनेक अुदाहरणांना आम्ही मागेच अुल्लेखिलें आहे. पुढेही अुल्लेखू. ज्या कालखंडाविषयी आम्ही येथे आता लिहीत आहोत त्या कालखंडाचें अुदाहरण तेंच सत्य विशदिणारें असल्यामुळे आम्ही त्याचा खाली विशेष निर्देश करतो.

सर्वसाधारण अितिहासग्रंथांमध्ये आणि विशेषतः गेल्या दीडशे वर्षांतील शालेय अितिहासांतून हूणांच्या नंतर अेक-दोन ओळीही मध्यंतरातील हिंदूच्या परिस्थितीविषयी न लिहिता अेकदम हिंदूंवर मुसलमानांची झालेली जी सिंधवरील पहिली स्वारी तिचाच वृत्तान्त दिला जात असे. आणि त्यानंतर अेकामागून अेक मुसलमान आक्रमकांचे वृत्तान्त वर्णिले गेले असत. त्यामुळे सामान्य हिंदु वाचकांवर नि विशेषतः विद्यार्थ्यांवर असाच संस्कार होअी की, हिंदूंचा अितिहास म्हणजे परकीयांनी त्यांच्यावर केलेल्या स्वाऱ्यांचा, हिंदूंच्या पराजयाचा आणि त्यांच्य

संतत दास्याचाच अितिहास होय. हया मिथ्या संस्कारांचा अेक प्रस्थापित सत्य म्हणून गेलीं दोन-तीन शतकें तरी आपल्या हितशत्रूंनी साऱ्या जगभर मोठा गाजा-वाजा केला होता. अुदाहरणार्थ, हिंदुत्वाच्या द्वेषाने डोकें फिरून गेलेले डॉ. आंबेडकरांसारखे गृहस्थ लिहितात :–

"..... The Hindus' has been a life of a continuous defeat. It is a mode of survival of which every Hindu will feel ashamed."

हूणांनंतर हिंदूंनी केलेला हिंदुकुशापलीकडील खोतानपर्यंतचा दिग्विजय

हया प्रसंगापुरतेंच बोलावयाचें म्हणजे खरा अितिहास असा आहे की, हूणांचा नि:पात केल्यानंतर म्हणजे साधारणत: सन पांचशेपन्नासाव्या वर्षानंतर हिंदु राजांनी अनेक मार्गानी सिंधु नदीस पुन्हा ओलांडून आज ज्यांना सिंध, बलुचिस्थान अफगाणिस्थान, हिरात, हिंदुकुश, गिलगीत, काश्मीर अित्यादि नांवें आहेत, जे प्रदेश अशोकाच्या मृत्यूनंतर वैदिक हिंदूंच्या हातून यवन, शक, हूणादिक म्लेंच्छांनी छिनावून घेअून अुणींपुरीं पांचशे वर्षें तरी आपापल्या हाती ठेवलेले होते, ते सिंधू-पलीकडील भारतीय साम्राज्याचे सारे प्रदेश त्या सर्व म्लेंच्छ शत्रूंची राखरांगोळी करून वैदिक हिंदूंनी त्या काळात पुन्हा जिंकून घेतलेले होते. अितकेंच नव्हे तर चंद्रगुप्ताच्या साम्राज्याच्या पलीकडे अुत्तर कुरूपर्यंत वैदिक धर्माचा नि राज्याचा ध्वज हिंदूच्या विजयी सैन्यांनी पुनरपि नेअून रोवलेला होता! अेकदा तर काश्मीर पलीकडे मध्य आशियातील खोतानमध्ये हिंदुराजे राज्य करीत असत. आणखी अेक त्या काळची चटकदार आठवण दिली म्हणजे पुरे की, कित्येक अिति-हासकारांच्या मते प्रत्यक्ष गझनीला राजा शिलादित्य राज्य करीत असे.

हिंदुराष्ट्राची पुनरुत्थानक्षमता

हिंदूच्या राष्ट्रीय पुनरुत्थानक्षमतेची ही आश्चर्यकारक चिकाटी पाहून स्मिथसारखे परकीय अितिहासकारही क्षणभर तरी आश्चर्याने तोंडात बोट घालतात. सोनेरी पान चौथें याविषयीची माहिती आणि स्मिथचे हिंदूंच्या त्या काळच्या विजयशाली स्वातंत्र्याची वाखाणणी करणारे मूळ अुद्गारही दिले आहेत ते जिज्ञासूंनी पहावेत. या स्थळी लागू तेवढें वाक्य त्यातून अुतरून खाली देत आहे. 'After the defeat of Mihirgul (by the Hindoos and the extinction of the Hun power, India enjoyed immunity) from foreign attack for nearly five centuries.'

डॉ. आंबेडकरांच्या पूर्वी दिलेल्या हिंदु अितिहासावरील पिसाट नि भरमसाट आक्षेपांचें परस्पर स्मिथनेच असें सणसणीत खंडण केलेलें आहे.

ठा
क्रम.....६८८
क्रांक .....

मुसलमानांचा हिंदुस्थानशी झालेल्या प्रचंड संघर्षाचा प्रारंभ

साधारण समजून अशी आहे की, सिंधवर महंमद कासमने जी स्वारी केली तीच हिंदुस्थानावरील अरबी किंवा कोणत्याही मुसलमानाची पहिली स्वारी होय. परंतु वस्तुतः तसें नाही. त्या स्वारीच्या आधीपासून ते पन्नास वर्षें तरी अरबी मुसलमान, सिंधमध्ये राज्य करीत असलेल्या ब्राह्मण वंशीय राजांशी अधूनमधून तंटे करीत होते. सैनिक चढाओचाही प्रयत्न करीत. तथापि मुसलमानांच्या परकीय तुकड्यांपासून तों सैन्यापर्यंत हिंदुस्थानात चंचुप्रवेश नाना दिशांनी करीत चाललेल्या या सव मुसलमानी आक्रमणांचा क्रमवार अुल्लेख करण्याचा काही येथे संकल्प नाही. अेकंदरीत या सर्व प्रयत्नांची हिंदूंनी डाळ शिजू दिली नाही. शेवटी अरबांच्या मुख्य खलिफाचा ओमान येथील गव्हर्नर जो अुस्मान त्याने सिंधच्या हिंदुराज्यावर अुघड अुघड स्वारी केली. परंतु सिंधचा त्या वेळचा ब्राह्मण राजा चाचा ह्याने त्या अरब सैन्याचा पराभव करून त्याचा प्रत्यक्ष सेनापति जो अबदुल अजिज त्यालाच ठार मारलें. साधारणतः ६४० पर्यंतच्या या अुलाढालीनंतर अरबांनी कोणतीही महत्त्वाची अुचापत केली नाही. केवळ अेकाकी पडलेला दूरचा मकराणी नांवाचा लहानसा प्रदेश तेवढा जिंकून घेअून तेथील हिंदूना त्यांनी बळाने मुसलमान करून टाकलें. तेच हे पुढे कट्टर मुसलमान झालेले त्या काळचे रानवट वलुची लोक होत.

मुसलमानांची सिंधवरील पहिली मोठी स्वारी

त्यानंतर अिसवी सन ७११ मध्ये महंमद कासम नांवाच्या अरबी मुसलमान सेनापतीने पन्नास सहस्र सैन्यासह हिंदुस्थानच्या सिंध प्रांतावर पहिलें मोठ्या प्रमाणावरचें असें आक्रमण केलें. त्या काळी सिंधवर दाहीर नांवाचा वैदिक धर्माभिमानी ब्राह्मण राजकुळातील राजा राज्य करीत होता. अर्थात् सिंधमध्ये बहुसंख्य जनता वैदिक धर्माभिमानी हिंदूंचीच होती. अुरलेली अल्पसंख्य जनता बुद्धधर्मीय होती. पूर्वी जेव्हा सिंधप्रांत हूणांचा शेवटचा अुग्र राजा जो मिहिरगुल याचे सत्तेखाली होता तेव्हा त्याने बुद्धांचा पुष्कळ छळ केलेला होता. त्याचा अुल्लेख सोनेरी पान चौथें यात केलेला आहे (पृष्ठें ६७८ ते ६८०) कारण हा अुग्र स्वभावी मिहिरगुल जरी वंशाने हूण आणि म्लेंच्छ होता तरी धर्माने तो वैदिकांच्या रुद्र देवतेचा अेकनिष्ठ अुपासक असल्यामुळे वैदिक धर्माभिमानी होता. आणि तो बुद्ध धर्माचा त्याच्या 'बुळगेपणासाठी' अत्यंत तिटकारा करी. परंतु, मिहिरगुलाच्या मृत्यूनंतर सिंधप्रांत वैदिक हिंदुराजांच्या राजसत्तेखाली जेव्हा आला तेव्हापासून त्या वैदिक हिंदु राज्यात बुद्धांना तसा कोणताही त्रास होत नव्हता. त्यांना त्यांचा धर्म त्यांच्यापुरता निर्वेधपणे पाळता येत होता.

बौद्धांचा राष्ट्रद्रोह

तथापि वैदिक हिंदूंच्या राज्यावर कोणीतरी मुसलमान नांवाचे परधर्मीय नि परकीय लोक चालून येत आहेत हें पाहताच ह्या भारतीय बौद्धांना आनंद वाटू लागला ! त्या मूळच्या हिंदुद्वेषी लोकांना क्वचित् असें वाटलें असेल की, पूर्वी यवनांच्या (ग्रीकांच्या) मिन्यांडर प्रभृति परकीय राजांनी किंवा परकीय कुशाणांच्या कनिष्काने जसा बौद्ध धर्म स्वीकारून भारतात बौद्ध राज्य स्थापन केलें होतें तसेंच हे नवे परधर्मीय मुसलमान लोकही करतील. अरब मुसलमानांच्या त्या सेनापतीने पहिल्या तडाख्यासरशी सिंधचें देवल हें महत्त्वाचें सिंधुद्वार (बंदर) दाहीर राजाच्या हातून जिंकून घेताच तेथील बौद्धांच्या पुढाऱ्यांनी त्या परकीय सेनापतीचें पुढे जाऊन स्वागत केलें. 'दाहिराच्या वैदिकधर्मीय राज्याशी नि लोकांशी आमचा संबंध नाही. आमचा धर्म निराळा, त्यांचा निराळा. आमच्या गुरूने (बुद्धाने) आम्हांस अहिंसा व्रताची कडक दीक्षा दिलेली आहे. आम्ही शस्त्र धारण करून राज्यांच्या चुलाढालीत भाग घेत नसतो. ज्याचा विजय होऊन राज्य होअील त्या राजाची – मग तो कोणीही असो – त्याची आज्ञा आम्ही अैहिक व्यवहारात मानतो. आता आपण विजय मिळविलात, आता आमचे राजे तुम्ही ! तेव्हा आम्ही बौद्ध लोक दाहिराच्या सशस्त्र सैन्यात शिरू किंवा त्यास मिळू अशी शंका सुद्धा मनात आणू नये आणि आपणांपासून आम्हा बौद्धांना कोणताही अुपद्रव होअू नये.' अशा आशयाची त्या बौद्धांची शरणागतीची विनंती अैकून त्यांना राजकारणपटु महमद कासमने त्या वेळेपुरतें अभय दिलें.

तिकडे देवल सिंधुद्वार मुसलमानांच्या हाती पडलें आहे हें कळताच राजा दाहीर आपलें सारें सैन्य सज्ज करून मुसलमानांशी लढाअी देण्यास स्वतः रणांगणात अुतरला. महमद कासिमही देवलच्या आजूबाजूचा सिंधचा प्रदेश जिंकीत पुढे घुसला. ज्या मुसलमान तवारिखकारांनी (वृत्तान्त लेखकांनी) ह्या अरबांच्या स्वारीचें वृत्त लिहिलें आहे तेच लिहितात की, सिंध प्रांत जिंकीत जाताना त्यातील दुर्गम वाटा दाखविण्यात, अरब सैन्यास ठिकठिकाणी दाणागोटा पुरविण्यात, दाहिरराजाची बित्तंबातमी देण्यात, सिंधमधील बौद्ध लोकांनी आणि त्यांच्या भिक्षूंनी मुसलमानांना शक्य तें साहाय्य दिलें ! काही वैदिकांनीही देशद्रोह केला, पण तो वैयक्तिक, अपवादात्मक.

राजा दाहीर रणात झुंजत असता ठार होतो

शेवटी मुसलमानांच्या नि हिंदूंच्या मुख्य सैन्याची गाठ ब्राह्मणावाद येथे पडली. हिंदूंनी हटातटाने लढाअी दिली. मुसलमानांपाशी त्या वेळी तोफा नव्हत्या तरी, अेका नवीन प्रकारची दुरून मारा करणारी भडिमार यंत्रें होतीं. तीं हिंदूंकडे नव्हती. त्यामुळे त्यांचें बळ तोकडें पडू लागलें. दाहिराच्या सैन्यात अरब मुसल-

मानांचीं काही सैनिक पथकें पगारावर लढाऊ चाकरीत असत. कासमशी दाहीरच्या सैन्याचें तोंड लागताच ह्या भाडोत्री मुस्लिम सैन्याने अकस्मात् बंड करून दाहीरला कळविलें की, 'सेनापति कासम अरब मुस्लिम ! हें धर्मयुद्ध आहे. आम्ही मुस्लिम यास्तव तुम्हा हिंदु काफरांचे पक्षाने महमद कासमशी आम्ही लढणार नाही.' असें म्हणून त्यांनी हिंदु सैन्यावरच चाल केली ! हिंदूंच्या शत्रूवरही विश्वासणाऱ्या भोंगळसुतीपणाचें प्रायश्चित्त यापुढेही ज्या ज्या हिंदुराजाने मुस्लिम सैन्य पदरी ठेवलें त्याला त्याला असेंच भोगावें लागलें. भर रणात हिंदु सैन्याचा व्यूहच ढासळे !

तरीही झुंज न विघडविता हत्तीवर चढून स्वतः दाहीर राजा शौर्याची पराकाष्ठा करीत भर रणधुमाळीत लढत होता. पण जेव्हा तोच रणात ठार झाला, तेव्हा हिंदु सैन्याची दाणादाण अुडाली. मुसलमानांच्या सेना लगोलग पाठलाग करीत नगरात घुसल्या.

पण दाहीर राजा रणात ठार झाल्याची वातमी कळताच त्याच्या तेजस्वी राणीने आणि तिच्यासह शतावधि हिंदुवीरांगनांनी अेका भडकलेल्या प्रचंड चितेत अुड्या घेअून जोहार केला ! क्षात्रधर्माची सीमा झाली ! त्या राणीला नि श्रेष्ठ वर्गातील कुलीन स्त्रियांना पकडून दासी करण्याचे शत्रूचे मनोरथ बव्हंशी धुळीस मिळाले.

तथापि त्या कोलाहलात दाहीर राजाच्या सूर्यादेवी आणि परिमलादेवी ह्या नांवाच्या दोन राजकन्या मात्र, नगरात घुसलेल्या मुसलमानांच्या हाती लागल्या महंमद कासीमने पाडाव केलेल्या सर्व सैनिकांना आणि नागरिकांनाही सरसकट कापून काढलें. परंतु दाहीरच्या त्या दोन राजकन्या आणि अितर ज्या शतावधि हिंदु स्त्रिया त्यांच्या हातात पडल्या त्यांना त्याने दासी बनवून नेलें. हिंदूंची लुटमार, जाळपोळ नि कापाकापी तर वेखटक चाललीच होती. ही दुर्दशा त्या अेका नगराचीच अुडाली नाही तर मुसलमान सिंधमध्ये पुढे घुसत असता वाटेत आलेल्या नगर ग्रामांचीही तशीच दुर्दशा अुडत चालली.

पण ह्या भयंकर राष्ट्रीय संकटात बौद्ध काय करीत होते ?

राजा दाहीर रणांगणात ठार होअून मुसलमानांचा विजय झाला आहे असें कळताच नगरानगरांत असलेल्या विहारांतून हे बौद्ध लोक मुसलमानांच्या स्वागतार्थ मोठमोठ्या घंटा बडवीत होते ! आणि मुसलमानी राजाचा अुत्कर्ष व्हावा म्हणून सामुदायिक प्रार्थना करीत होते !

बौद्धांच्या पापाचें हातोहात प्रायश्चित्त !

पण जें त्यांनी अज्ञानवसाने मागितलें तेंच त्यांच्या मुळावर आलें ! शेवटची लढाअी जिंकताच जेव्हा मुसलमान सिंधमध्ये वादळासारखे घुसले तेव्हा वैदिक हिंदूंचें

जसें शिरकाण होत चाललें त्याहूनही निष्ठुरपणें मुसलमानांनी बौद्धांचें शिरकाण केलें! कारण वैदिक हिंदु गटागटाने नि व्यक्तिशःही अिथे तिथे लढत तरी होते. त्यामुळे त्यांचा काहीतरी वचक मुसलमानांस बसे, परंतु बौद्ध विहारांतून नि बौद्ध वस्तींतून तर तसा सशस्त्र प्रतिकार करणारा कोणीही भेटण्याची चिंताच नसल्यामुळे भाजी कापावी तशी बौद्धांची मुसलमानांनी कापाकापी केली. जे बौद्ध मुसलमान झाले, तेच काय ते वाचले. साऱ्या सिंधमध्ये पसरलेले त्यांचे विहार नि त्यांतील भाराभर मूर्ति 'बुद्धपरस्तीचा' म्हणजे मूर्तिपूजेचा भयंकर तिटकारा असलेल्या मुसलमानांनी तोडून फोडून टाकल्या.

'बुद्धपरस्त' हा मुसलमानांत शिरलेला शब्दच मुळी 'बुद्धप्रस्थ' या बौद्धांच्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश' आहे. मुसलमानांना हिंदुस्थानात घुसताना प्रथम प्रथम ब्याक्टिरिया, पार्थिया अित्यादि प्रांतांत मूर्ति अशा बुद्धांच्या विहाराच्या 'प्रस्था'तूनच बहुसंख्येने आढळल्या. त्यामुळे मूर्तिपूजकांना ते बुद्ध परस्त' म्हणजे 'बुद्धप्रस्थी' असें म्हणू लागले. अशा बुद्धप्रस्थाचा म्हणजे मूर्तिपूजकांचा विध्वंस करणें ही मुस्लिमांची धर्माज्ञाच होती.

मुसलमानांच्या आततायी हिंसेने बौद्धांच्या आततायी अहिंसेचा केलेला शिरच्छेद !

पृष्ठ ६३१ ते ६३३ मध्ये बौद्धधर्म हिंदुस्थानातून नामशेष कां झाला ह्या प्रश्नाचा जो ऊहं केला आहे त्याचा या पुस्तकांतील विषयास अवश्य तितका समारोप करण्याचें कालप्राप्तस्थान हेंच आहे. ज्या अिसवी सन ७०० च्या कालाविषयी आता आम्ही अिथे लिहीत आहोत, त्या काळी म्हणजे मुसलमान भारताच्या सीमेत सिंधकडे पाअूल टाकण्याच्या आधीच, भारतामध्ये चहूंकडे बौद्धांची संख्या सारखी घटत जाअून तो पंथ क्षयाच्या मार्गास लागलेला होता. मागील प्रकरणातून हें दाखविलेंच आहे की, बुद्ध तत्त्वज्ञानाचें नि धर्ममताचें वैदिक धर्मधुरंधरांनी जें वैचारिक खंडन यशस्वीपणे केलें तें काही भारतातून बौद्धांच्या झालेल्या समूळ अुच्छेदाचें अेकमेव कारण नाही. त्या अुच्छेदास अनेक राजकीय नि सामाजिक घटनाही कारणीभूत झालेल्या होत्या. त्यांपैकी ज्या घटनांकडे यापूर्वीच्या बहुतेक अितिहासकारांचें लक्ष गेलेलें नाही, किंवा ज्यांना त्यांनी द्यावें अितकें प्रामुख्य दिलेलें नाही, अशा काही अिथे अवश्य त्या त्या घटनांचा नि कारणांचा अुल्लेख ठसठशीतपणे ह्या संक्षिप्त समारोपात करीत आहो.

पहिलें कारण म्हणजे बौद्धांचा राष्ट्रद्रोह

बौद्ध संघाने परचक्रांच्या राष्ट्रीय संकटात सांघिक रीत्या वारंवार केलेल्या भारताच्या ह्या राष्ट्रद्रोहाविषयी ह्या पुस्तकाच्या ६३१ ते ६३६

६४१ ते ६५१, ६६३ ते ६६४, ६७६ ते ६७७ ह्या पृष्ठांतून पर्याप्त खल केलेलाच आहे. बौद्धांच्या ह्या राष्ट्रद्रोही प्रवृत्तीमुळे सारी राष्ट्राभिमानी नि राजधुरंधर जनता त्यांचें अुच्चाटन करण्यास प्रवृत्त झाली. बौद्धसंघ म्हणजे अुपजत राष्ट्रद्रोह्यांचा संघ होय अशी अनुभवान्ती राष्ट्रभक्त नि राज्यधुरंधर भारतीय जनतेची निश्चिति होअून चुकल्यामुळे त्या बौद्ध संघाला राज्यसत्तेचा असा लवलेश पाठिंबा अुभ्या भारतवर्षात कोठे सहसा मिळेनासा झाला. त्यातही ह्या अिसवी सन ७०० च्या काळात अुत्तर भारतामध्ये तरी जीं वैदिकधर्माचीं अत्यंत कट्टर पुरस्कर्ती नि अभिमानी असत अशीं नवोदित रजपूत राज्यें जिकडे तिकडे भरभराटत असल्यामुळे तो बौद्धसंघ, तो बौद्ध संप्रदाय भारतभर अनाथासारखा, बहिष्कृतासारखा, दुर्बळ नि पंगु होअून पडला होता.

दुसरें कारण म्हणजे बौद्धांची आततायी अहिंसा

त्यांच्या राष्ट्रद्रोहाने ज्याप्रमाणे राष्ट्राभिमानी नि राज्यधुरंधर भारतीय वर्ग ह्या बुद्धधर्मास विटून गेला, त्याचप्रमाणे राष्ट्रातील सर्वसामान्य जनता जी पूर्वी अेकदा त्या बौद्ध संप्रदायाच्या भजनी लागली होती – तीही त्यांच्या आततायी अहिंसेच्या अुपद्रवाने त्रस्त होअून त्या बौद्धधर्मास विटून गेली. अशोकाच्या किंवा श्रीहर्षाच्या राजवटीप्रमाणे ज्या अिनमिन साडेतीन प्रसंगी बौद्धांचे हाती अफाट राजसत्ता आली त्या वेळी राजदंडाच्या बळाने त्यांनी आपलीं बौद्ध मतें वैदिक जनतेवर लादलीं होतीं. बौद्धांनी केलेल्या त्या वेळच्या धार्मिक अत्याचारांचे अनेक अुल्लेख नि अुदाहरणें त्या वेळच्या ग्रंथांतून आढळतात. तथापि त्यांपैकी वैदिक ग्रंथातील अुतारे दिले असता ते परपक्षीय म्हणून कोणा शंकेखोरालासुद्धा संदेहास्पद वाटण्याचा संभव अुरू नये ह्यास्तव परदेशीय नि अवैदिक अशा अनेक अितिहासकारांनीही त्याविषयी किती कडकपणे लिहिलें आहे त्याची अेक वानगी म्हणून व्हिन्सेंट स्मिथ यांच्या The Early History of India ह्या ग्रंथातील अेक अुतारा तेवढा खाली देत आहो.

It is recorded by contemporary testimoney that in the seventh century king Harsh, who obviously aimed at copying closely the institutions of Ashok did not shrink from inflicting capital punishment without hope of pardon on any person who dared to infringe his commands by saying anything or using flesh as food in any part of his dominion. Kumar Pal, a jain king of Gujrath imposed savage penalties upon violators of his (similar) rules. An unlucky merchant who had committed the atrocious crime of cracking a louse was brought before a special court at Anilhawada and punished by the confiscation of his whole property.

Another wretch who had outraged the sanctity of the capital by bringing in a dish of raw meat was put to death. The special court constituted by Kumar Pal, (for this purpose) had functions similar to those of Ashoka's censors. And the working of the later institutions sheds much light on the unrecorded proceedings of the earlier ones.'

याचा भावार्थ असा :–तत्कालीन पुराव्यावरून हें सिद्ध होतें की, अशोकाप्रमाणेच श्रीहर्षनेही राजाज्ञा सोडली होती की, जो कोणी कोणत्याही प्राण्याची हिंसा करील किंवा मांसाशन करील, त्याला वधदंड देण्यात येअील. त्याला राजदयेचासुद्धा आधार मिळावयाचा नाही. आणि त्याप्रमाणे त्याच्या साम्राज्यात (मासे, पशु, पक्षी, हिंस्र श्वापदांसुद्धा) कोणताही प्राणी असा मारणाऱ्यांना किंवा मांसाशन करणाऱ्यांना वधदंडाची शिक्षा देण्यात येत असे. कुमारपाल हा गुजराथेतील राजा जरी जैन मताचा होता, तथापि प्राणिहिंसेच्या प्रकरणी त्याने बौद्ध अशोकाचाच कित्ता पुढे ठेवून त्याच्या राज्यात अशा प्राणिहिंसक किंवा मांसाशनी अपराध्यांना हुडकून काढण्यासाठी गुप्त हेरांचें जाळेचें जाळें पसरलेलें होतें. अशा निष्ठुर राजाज्ञांपायी अशा 'अपराधी' लोकांना किती रानटी शिक्षा होत ह्याची केवळ वानगीसाठी अेकदोन प्रमाणित अुदाहरणें दिलीं म्हणजे पुरें. अेका अभागी व्यापाऱ्याने अेक अू, अंगावरची अू, टिचून मारली. ह्या घोर अपराधासाठी त्याला पकडून अनहिलवाडा येथील विशेष न्यायालयापुढे खेचून त्याची मत्ता, शेतीवाडीसुद्धा राजहृत (जप्त) करण्याची शिक्षा देण्यात आली. अेक माणूस कच्च्या मांसाचा अेक खाद्य पदार्थ राजधानीत आणताना पकडला गेला. ह्या घोर अपराधासाठी त्याला मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाअून ठार करण्यात आलें.

पण त्या हुतात्म (Martyred) 'अू' चें काय झालें ?

ज्या मनुष्याने आपल्या डोक्यातली ती अू टिचून मारली त्याच्या राजहृत मत्तेच्या विक्रीतून आलेल्या सहस्रावधि रुपयांच्या व्ययाने त्या 'अू'चें स्मारक करण्यासाठी अेक मोठें स्मृतिभवन जैन आचार्यांच्या सांगण्यावरून त्या जैन राजाने बांधलें आणि त्याचें नांव ठेवलें 'यूकविहार'! (अुवेचें मंदिर)!

ही कथाही अितर कोणी लिहिलेली असती तर जैन मताचें विडंबन वाटलें असतें. परतु स्वत: जैन ग्रंथकारच ती कथा गौरवाने सांगतात आणि अशा अितरही अनेक घटना त्या ग्रंथकारांनी दिलेल्या आढळतात. यास्तव वरील घटना विश्वसनीय म्हणून दिली आहे.

डोक्यातील अुवा वाचाव्यात म्हणून डोकेंच अुडवावयाचें ! माशाचा जीव वाचावा म्हणून माणसाचा जीव घ्यायचा ! ही म्हणे अहिंसा ! जणू काय माणसाला

मारणें म्हणजे हिंसा नव्हे, मनुष्याला काही प्राण नव्हता! हिंसेहून आततायी झालेल्या हया अहिंसेच्या राक्षसी छळाने भारतातील व्याध, मच्छीमार, कोळी, खारवी, पारधी अित्यादि हिंसात्मक व्यवसाय करणाऱ्या लक्षावधि लोकांच्या अुपजीविकेचें साधनच नष्ट झालें.

त्या त्या जातींच्या लक्षावधि लोकांना या राज्याच्या हया अहिंसात्मक आज्ञेमुळे त्यांची नि त्यांच्या मुलाबाळांची मात्र अुपासमारीने कशी हिंसा होणारी आहे त्याविषयी वरीच चळवळ केल्यानंतर त्या गुजराथेतील धर्मपाल राजाने कृपाळू होअून अशी दुसरी आज्ञा सोडली की ह्या हिंसात्मक धंदे करणाऱ्या लक्षावधि लोकांनी ते धदे सोडलेच पाहिजेत, तथापि त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या पोटगीसाठी तीन वर्षेपर्यंत शासन संस्थेकडून त्यांना पैसे, देण्यात येतील.

अर्थात् तीन वर्षानंतर पुन्हा अुपासमारीने त्या लक्षावधि लोकांचे हाल काही बंद होणारे नव्हते. कारण मांसान्न हेंच त्यांचें मुख्य अन्न होतें. आणि त्यांना तें बहुधा फुकट मिळू शके. पण हया आततायी अहिंसेच्या छळापायी तेंच मृत्युदंडार्ह ठरल्यामुळे त्या सर्वसामान्य जनतेतही बौद्ध धर्माविषयी नि बौद्ध राजवटीविषयी अत्यंत चीड अुत्पन्न होअून त्या त्या जातींतील लक्षावधि जनतेनेही बुद्ध धर्माचें जू झुगारून दिलें! आणि देशकाल पात्रानुसारी नि मानवी हितकारी अशा सापेक्ष अहिंसेचाच काय तो पुरस्कार करणाऱ्या वैदिक, म्हणजेच त्या काली अधिक समावेशक स्वरूप असलेल्या 'सनातन धर्मास' लक्षानुलक्ष लोक पुन्हा शरण रिघाले.

अस्पृश्यतेची रूढी बुद्ध धर्मामुळे बळावली, अुणावली नाहीं.

आजही पुष्कळ लोकांची, प्रचारकांची नि कित्येक अितिहास लेखकांचीही अशी अेक समजूत झालेली दिसते की, भारतीय बौद्ध अस्पृश्यता पाळीत नव्हते. आणि बुद्ध धर्मामध्ये बुद्धांच्या राजवटीत कोणीही अस्पृश्य समजले जात नसत. परंतु हा समज भ्रामक आहे. अिये कोणाच्या पोथीत काय सांगितलें आहे हा प्रश्न दुय्यम आहे. प्रत्यक्ष व्यवहारात काय घडत होतें हा प्रश्न खऱ्या महत्त्वाचा आहे. बौद्धांनी अहिंसा तत्त्वाचा वापर करताना जो वर वर्णिल्याप्रमाणे आततायीपणा केला आणि विशेषतः बौद्ध राजवटीत प्राणिहिंसा नि मांसाशनही वधार्ह ठरवून तशा अपराध्यास जेथे तेथे हुडकून काढून प्राणदंडाच्या शिक्षा देण्याचा प्रत्यक्ष सपाटा चालविला, त्या त्यांच्या आततायीपणाचा हा परिणाम अपरिहार्यच होता की, अस्पृश्यतेची रूढि व्यवहारात नाहीशी होण्याचे ठायी बौद्ध कालात ती अधिकच तापदायक, विस्तृत नि दृढमूल झाली. स्थलाभावामुळे अिथे हयाविषयी अधिक खल करणें शक्य नाही, आणि त्याचें कारणही नाही. निःसंदिग्ध पुरावा म्हणून भारतीय वैदिक किंवा भारतीय बौद्ध हयांतील कोणाचेंही तत्कालीन मत न देता त्या त्या वेळेस बौद्ध धर्माचे अभिमानी असलेले जे त्रयस्थ चिनी प्रवासी

भारतात येअून जात त्यांचेंच मत अिथे दिलें की पुरें आहे. ते लिहितात : 'ज्या ज्या जातींनी काही केल्या त्यांचे हिंसात्मक धंदे काही सोडले नाहीत आणि बौद्ध धर्माप्रमाणे अहिंसापालन केलें नाही, अशा चंडाल प्रभृति जातींना त्या अपराधासाठी गावावाहेर बहिष्कृत समजून काढून दिलें जाअी. महारोग्याप्रमाणे गावापासून दूरच्या ठिकाणी त्यांना वस्ती करावी लागे. जर कधी बाजाराच्या दिवशी किंवा अितर कामासाठी त्यांना गावात प्रवेश देण्यात आला तर अितर ग्रामस्थांना त्यांचा विटाळ होअू नये म्हणून त्या अस्पृश्यांनी हातात अेक खुळखुळा वांधलेली काठी किंवा टिमकी घेअून मार्गाने ती वाजवीत जावें, असा कडक दंडक आहे. म्हणजे तसा आवाज अैकताच मार्गस्थ लोक सावध होअून त्यांच्या विटाळापासून दूर राहत.'

अस्पृश्यांना गावात येताना जी वाअीट वागणूक पेशवाअीत मिळे, त्यासाठी जे कोणी अज्ञानाने किंवा मत्सराने पेशव्यांच्याच नांवाने काय ते खडे फोडतात त्यांनी प्राचीन कालाचा हा प्रत्यक्ष पुरावा पाहून ह्या अपराधासाठी अशोक, श्रीहर्ष प्रभृति बौद्धराजांच्या नि विक्रमादित्यापासून राजपुतांपर्यंतच्या क्षत्रिय राजांच्या नांवानेही खडे फोडले पाहिजेत. कारण अस्पृश्यतेची ही अपराधी रूढी पेशव्यांनीच काय ती प्रथम चालू केलेली नसून ती फार प्राचीन काळापासून भारतामध्ये वैदिक काय, बौद्ध काय, किंवा जैन काय सर्वांच्याच राजवटीमध्ये चालू होती. आणि त्यांतही बौद्धकालात ती नष्ट केली जाण्याचे ठायी, अधिकच निष्ठुरपणे नि कटाक्षाने पाळली जाअी. अितकेंच काय पण अस्पृश्यही त्यांच्या खालच्या जातींना असेच अस्पृश्य मानीत आले आहेत. जी काही अस्पृश्य मंडळी बौद्धांत अस्पृश्यतेला थारा नाही असें चुकीने समजून त्या बौद्ध संप्रदायाचें अवास्तव स्तोम माजवू पाहत आहेत त्यांनी हें ध्यानात ठेवावें की, वैदिक धर्मीयांच्या सापेक्ष अहिंसेपेक्षा बौद्धांच्या या आततायी अहिंसेपायीच चांडालादि अस्पृश्यांची अधिक दुर्दशा होत गेली. बौद्ध संप्रदायाने अस्पृश्यता वाढविली, अुगावली नाही. वरील अितिहासाच्या रोखठोक पुराव्याने हें पडताळून घेअून मग त्यांना काय परवडेल तें त्यांनी करावें.

त्यांनी हें ध्यानांत ठेवावें की, वर वर्णिलेल्या कारणासाठीच बौद्धकाळी मासेसुद्धा मारण्यास नि कोणतेंही मांस खाण्यास वधदंड देणाऱ्या ह्या आततायी बौद्धराजवटीपेक्षा त्या व्याध चांडालादिक अस्पृश्य लोकांनाही, लक्षावधि मनुष्यांच्या चरितार्थाला नि सापेक्ष प्राणी हिंसेला दंडार्ह न समजणाऱ्या वैदिक राजवटीच तुलनेने अधिक सुखावह वाटू लागल्या. आणि त्यांच्यांतील ज्यांनी पूर्वी स्वेच्छेने वा निरुपायाने बौद्ध धर्म अंगीकारलेला होता ते सहस्रावधि अस्पृश्यही बौद्ध धर्माचा त्याग करून पुन्हा वैदिक धर्माचेच अनुयायी झाले. अशा प्रकारे मुसलमानांचा सिंध प्रांतात पाय पडण्यापूर्वीच साऱ्या हिंदुस्थानात अुच्च वर्णापासून तो सामान्य जनते-

पर्यंत बौद्ध धर्माच्या लक्षानुलक्ष अनुयायांची संख्या, सारखी घटत गेल्यामुळे तो संप्रदाय त्याच्या अंगभूत असलेल्या रक्तक्षयानेच ऱ्हास पावत आलेला होता. अितका की त्या काळीं ती दुर्दशा प्रत्यक्ष पाहिलेल्या बौद्ध धर्मीय चिनी प्रवाशांनी सुद्धा हळहळून लिहलें आहे की, बुद्धाच्या प्रत्यक्ष निवासाने पवित्र समजलीं गेलेलीं आणि अेका काळी भरभराटीत असलेलीं बुद्धगया, मृगदाव, श्रावस्तीनगर, कुशीनगर, बुद्धाचें जन्मस्थान असलेलें कपिलवस्तु अित्यादि बौद्धांचीं जागतिक तीर्थक्षेत्रेंही त्या काळी अुजाड झालेलीं होतीं. आणि तेथे जिकडे तिकडे रान माजलेलें होतें.

तथापि ऱ्हास पावत असला तरी बौद्ध संप्रदाय मुसलमान येण्याच्या आधी हिंदुस्थानातून अगदी नामशेष झालेला नव्हता. सिंध, कांबोजकडे त्यांच्या अनुयायांची बरीच संख्या होती. पूर्व बंगालमध्येही तो टिकून होता. हिंदुस्थानातील अितर सर्व प्रांतांत अत्यल्प प्रमाणात कां होअीना, पण बौद्ध लोक निवसत होते. अशी अेक आख्यायिका आहे की, बौद्धांच्या विहारांची नि अर्थात् भिक्षूंची अितकी मोठी संख्या आजच्या विहार प्रांतांत फार पूर्वी होती की त्या प्रांतासच विहार हें नांव पडलें. परंतु मुसलमान येण्याचे आधी तशी स्थिति जरी तेथे नसली तरी स्तूपादिक काही बुद्धप्रस्थें आणि बौद्ध लोक त्या प्रांतांतही त्या काळी निवसत होते. त्या काळी जिकडे तिकडे वैदिक राजवटीच भरभराटीत असल्यामुळे राष्ट्रद्रोही अुपद्व्याप करण्याचा किंवा आपले धर्माचार दुसऱ्यावर बळाने लादण्याची, अिच्छा असो वा नसो पण, शक्ति तरी हिंदुस्थानातील त्या बौद्ध संप्रदायात अुरलेली नव्हती. आणि ते जोवर आपापल्या परी आपला धर्माचार पाळून असत, तोवर त्यांच्या विहारांना, भिक्षुसंघांना किंवा अितर अनुयायांना वैदिक राजवटीत कोणत्याही प्रकारचा अडथळा करीत नसत. त्यांचें धर्मस्वातंत्र्य अबाधित होतें, हें चिनी प्रवासी मनमोकळेपणाने मान्य करतात.

मग मुसलमान येण्याच्या आधी प्रांता-प्रांतांतून बौद्धांची वसत असलेली ही लक्षावधि लोकांची संख्या आणि तीं बुद्धप्रस्थें हींही हिंदुस्थानातून अगदीच नामशेष कशीं झालीं ?

अगदी पूर्वी विशेषत: पाश्चात्य अितिहासकारांचा असा अेक ठाम पूर्वग्रह झालेला असे की, केव्हातरी किंवा अधून मधून वैदिक धर्मीय राजसत्तांनी खड्गाच्या बळावर बौद्धांचें गिरकाण करून त्यांना निर्मूल केलेलें असावें, किंवा त्यांच्यावर बळाने वैदिक धर्म लादलेला असावा. या पूर्वग्रहास अैतिहासिक आधार मिळावा म्हणून त्यांनी त्या त्या काळाचा भारतीय अितिहास चाळणीतून पीठ गाळावें तसा अगदी चाळून चाळून पहिला. परंतु किरकोळ अपवाद जमेस धरूनही हिंदुस्थानातील बौद्धांचें असें बलपूर्वक नि योजनाबद्ध निर्मूलन झाल्याचा त्यांना कोणताही पुरावा मिळू शकला नाही. शेवटी त्यांच्यापैकी कित्येक अितिहासकारांनी आपला पूर्वग्रह चुकीचा असल्याचें आणि असें बलपूर्वक निर्दालन झाल्याची कल्पना मूलत:च मिथ्या असल्याचें मनमोकळेपणे मान्य केलेलें आहे.

तर मग हिंदुस्थानातून बौद्धांचें हें आमूलात् निर्दालिन शेवटी कोणी केलें ? ह्या प्रश्नाचें अुत्तर मात्र परदेशी नि स्वदेशी अशा वहुतेक अितिहासकारांना सापडलेलें दिसत नाही. किंवा त्यांनी तें स्पष्टपणे सांगितलेलें नाही. हिंदुस्थानातून बौद्धांचा धर्म जवळ जवळ नामशेष होण्याचें – हें तिसरें कारण म्हणजे बौद्धांची मुसलमानांशी पडलेली गाठ !

बौद्धांनी सिंध प्रांतात मुसलमानांची स्वारी होताच कसा स्वराष्ट्रद्रोह केला, कशी मुसलमानांची मनधरणी केली आणि तरीही 'वुद्धप्रस्थी' म्हणजेच मूर्तिपूजक असणाऱ्या आणि आत्यंतिक अहिंसेचा अुदो अुदो करणाऱ्या वुद्ध धर्माविषयी मुसलमानी धर्मातच असलेल्या तीव्र द्वेषापायी मुसलमानांनी सिंधमध्ये बौद्धांचा कसा निःपात केला तें वर संक्षेपतः सांगितलेलें आहेच. अगदी त्याच कारणासाठी आणि त्याच पद्धतीने मुसलमान जसजसे हिंदुस्थानात प्रांतामागून प्रांत जिंकीत पुढे घुसले तसतसा बुद्धप्रस्थांचा आणि बौद्ध जनतेचा त्यांनी शस्त्रबलाने निःपात केला. अेका हातात कृपाण नि दुसऱ्या हातात कुराण अशा आततायी हिंसेलाच स्वधर्म मानणाऱ्या त्या मुसलमानांच्या अेकामागून अेक सेनापतीने नि सैन्याने साऱ्या हिंदुस्थानातील बौद्धांचे स्तूप, संघाराम, विहार, वुद्धमूर्ति, स्तंभ, तोडून मोडून पाडून अुद्ध्वस्त केले. बहुतांश बौद्ध मृत्यूच्या भीतीपायी मुसलमान होण्यास सिद्ध झाल्याने त्या सर्वांना त्यांनी मुसलमान करून टाकलें. गांधार, कांबोज प्रभृति ज्या वायव्येकडील प्रांतांत बौद्धांची वरीच वस्ती असे तेथे बौद्ध असा अुरला नाही. सारे मुसलमान झाले. बिहार प्रांतात बखत्यार खिलजी चालून येतो आहे असें कळताच कित्येक बौद्ध आपले ग्रंथ नि आपला जीव वाचविण्यासाठी तिबेट, चीनकडे अनेक ग्रंथ घेअून पळून गेले. अुरले ते बाटविले गेले. कोणी कोणी हुतात्मेही झाले असतील. पण लढले असे कोणीच नाहीत. संघटितपणे भारतीय बौद्धांच्या अेखाद्या सैन्याने वा समुदायाने मुसलमानांशी सशस्त्र समरात म्हणण्यासारखी लढाअी वा झुज दिली असें काही कुठे आढळत नाही !

पूर्व बंगाल्यातच मुसलमान बहुसंख्य कसे ह्या कोड्याचा अुलगडा

तीच स्थिति पूर्वबंगालची ! तेथे बौद्धांची बरीच संख्या होती. पण तुरळक अपवाद सोडता सारेच्या सारे मुसलमान झाले. ज्या दिल्लीत पांचशे वर्षे तरी अेकाहून अेक कडवे मुसलमानी सुलतान नि बादशहा राज्य करून गेले त्या प्रत्यक्ष दिल्लीत वैदिक हिंदूंची तेव्हाही नि आजही बहुसंख्याच आहे. सारा अुत्तर प्रदेश तो थेट पश्चिम बंगाल यातही मुसलमानी राज्यात काय किंवा आज काय वैदिक हिंदूंचीच बहुसंख्या आहे. कारण मुसलमान प्रथम जिंकीत आले तेव्हाही त्या प्रांतांतून बौद्धांची संख्या होती नव्हती अशीच असे. अगदी पूर्व टोकास असलेल्या

ह्या अेका पूर्वबंगाल्यातच मुसलमानांनी तो प्रांत जिंकल्यानंतर हिंदूंची अल्पसंख्या झाली; तो कशी ? ह्या कोडयाचा अुलगडा ह्या घटनेमुळेच होतो की, त्या पूर्वबंगाल्यात बौद्धांची वरील प्रांतांपेक्षा पुष्कळ अधिक वस्ती होती. आणि ते, अपवाद सोडता सारेच्या सारे मुसलमान झाले. म्हणून तेव्हापासून त्या प्रांतातच काय ती मुसलमानांची अेवढी मोठी संख्या अेकत्र सापडते.

अशा प्रकारे बौद्धांच्या संप्रदायाचें सामाजिक अस्तित्व जें हिंदुस्थानातून अकस्मात् नामशेष झालें तें मुसलमानांच्या आततायी शस्त्रबलाने नि हिंसेनेच होय. त्या अेकमेकांची गाठ पडताच मुसलमानांच्या आततायी हिंसेने बौद्धांच्या आततायी अहिंसेचा शिरच्छेद केला.

पण बुद्धधर्माची नि स्वतः बुद्धदेवांची भारतात अंती काय गति झाली ? भागीरथीतून फुटलेला अेखादा जलप्रवाह जसा अलगपणे अनेकयोजनें वहात वहात पुढे कुठे तरी भागीरथीसच मिळावा तसा भारतीय बुद्धधर्म हिंदुधर्मात विलीन झाला. आणि हिंदूंच्या अवतारमालिकेत बुद्धदेवांची प्रतिष्ठापना होअून त्यांचेंही हिंदूकरण करण्यात आलें !

३०० वर्षें, म्हणजेच निदान पाच पिढ्या मुस्लिम राजसत्तेला हिंदूंनी सिंधप्रांतावाहेर पाअूल टाकू दिलें नाही. अितकेंच नव्हे तर वरचेवर अुलट चढाया करून सिंधप्रांत हिंदूंनी परत दोनशे वर्षें तरी जिंकूनही घेतला होता.

मागे सांगितलेंच आहे की, सिंधप्रांत अि. सन ७११ मध्ये अरबांनी हिंदुराजाच्या हातून जिंकून घेतला. बहुतेक स्वकीय वा परकीय अितिहास ग्रंथांतून मुसलमानांच्या सिंधच्या स्वारीनंतर त्यांच्या हिंदुस्थानवर झालेल्या पुढील स्वाऱ्या अितक्या दाटीवाटीने दिलेल्या असतात नि हिंदूंचे प्रांतामागून प्रांत जिंकीत सारें हिंदुस्थान मुसलमानांनी पादाक्रान्त केल्याचें वृत्त अितकें अेका श्वासासरसें सांगून टाकलेलें असतें, विशेषतः शालेय अितिहासातील २०–२५ पानांच्या आकुंचित स्थलात तर तें वृत्त अितकें त्रोटकपणे लिहिलेलें असतें की, सामान्य वाचकांवर नि विशेषतः विद्यार्थ्यांवर त्याचा असा अेक विपरीत परिणाम होतो की, हिंदूंनी मुसलमानांचा प्रतिकार असा कोठे केलाच नाही. मुस्लिमांना डांबून असें कोठे धरलेंच नाही.

जणूकाय सिंधप्रांत जिंकताच मुस्लिम जेते जे कोणा जादूच्या घोडयावर स्वार झाले ते सारें हिंदुस्थान जिंकीत जिंकीत थेट कन्याकुमारीला पोचले, तेव्हाच कायते ते खाली अुतरले ! पण हा समज अगदी विपरीत आहे !

मध्यंतर कालाचा जाणीव

असा विपरीत समज होअू नये म्हणून अितिहास लेखकांनी मुसलमानांच्या स्वाऱ्या स्वाऱ्यातील मध्यंतराचा काल नि त्या त्या काली हिंदूंनी केलेला यशस्वी

प्रतिरोध किंवा अयशस्वी असला तथापि केलेला प्रतिकार यांचा स्पष्ट ठसा वाचकांच्या मनावर बिंबेल अितक्या प्रमाणबद्ध नि परिणामकारक ठळकपणे त्या त्या घटना वर्णिल्या पाहिजेत. हें सिंधचेंच अुदाहरण घ्या. अरबी मुसलमानांनी सिंधप्रांत जिंकल्यानंतर साधारणत: ३०० वर्षेंपर्यंत हिंदुराज्यांनी त्याच्या पुढचा हिंदुप्रदेश मुसलमानांना व्यापू दिला नाही. परंतु ह्या महत्त्वाच्या घटनेचा ठसा सर्वसाधारण जनतेच्या मनावर मुळीच अुमटलेला नसतो. कारण बहुतेक अितिहासग्रंथांत त्याचा ठसठशीत अुल्लेखच केलेला नसतो.

अशा कालखंडाच्या दीर्घत्वाची यथार्थ जाणीव होण्याची सोपी युक्ति

अशा मध्यंतरातील कालखंडाचा ठसा मनावर न बिंबण्याचें अेक कारण असें आहे की, ' ३०० वर्षें ' किंवा ' तीन शतकें ' हे शब्द आपण अवघ्या तीन विपलांत लिहून किंवा वाचून पुढे जातो. त्यामुळे ह्या कालखंडाच्या प्रदीर्घत्वाची यथाप्रमाण कल्पना आपल्या मनावर विशेषत्वाने सांगितल्यावाचून बिंवत नाही. अशा वेळी तें दीर्घत्व मापण्याची सोपी युक्ति म्हणजे त्याची अटकळ त्यातील पिढ्या मोजून करावी. तीनशे वर्षें म्हणजे त्यात न्यूनत: पाच पिढ्या तरी अुलटून गेलेल्या असतात ! अिंग्रजांचें राज्य आपल्या चालू पिढीला कितीतरी दीर्घकाल टिकलें आहे असें वाटत होतें ! पण तें शतकात मोजलें तर, दीड शतकच काय तें भरलें ! त्या मापाने मोजलें म्हणजे हिंदूंनी मुसलमानांना ३०० वर्षें म्हणजे तीन शतकें, म्हणजेच ' न्यूनत: ' दहा–पाच पिढ्या अुलटून जाअीतोपर्यंत सिंधबाहेर जें पाअूल टाकू दिलें नाही त्या घटनेचें अैतिहासिक महत्त्व मनावर यथाप्रमाण ठसतें ! हीच गोष्ट अशा अितर मध्यंतरांनाही लागू आहे.

ह्या मध्यंतराच्या काळात मुसलमानी राष्ट्राचा आवेश किंवा विजिगीषा सुन्न होअून गेली होती असें तर मुळीच म्हणता येत नाही. अुलट तो काळ मुसलमानांच्या भर आवेशाचा होता. ह्याच तीनशे वर्षांत त्या अरबी मुसलमानांनी बगदादपासून भूमध्य समुद्रापर्यंत, तेथून अुभ्या आफ्रिका खंडाचा सारा अुत्तर तट आणि तेथून आज ज्याला जिब्राल्टर म्हणतात ती सामुद्रधुनी अुतरून आजचा पोर्तुगाल नि स्पेन जिंकून दक्षिण फ्रान्सपर्यंतचा युरोपचा प्रदेश हस्तगत केलेला होता ! आजचें जिब्राल्टर हें नांवच मुसलमानांच्या ह्या अमोघ दिग्विजयाची साक्ष देत आहे. ' जेबल अि तारिक ' म्हणजे अरबी विजेता तारिक ह्या सेनानीने जिंकलेली सामुद्रधुनी. अरबांनी तिला दिलेल्या ह्या अरबी नांवाचेंच आजचें ' जिब्राल्टर ' हें नांव अेक अपभ्रष्ट रूप आहे. पण शेवटी फ्रान्सचा शूर राजा ' चार्ल्स ' ' मार्टेल ' म्हणजे ' घणाधारी ' चार्ल्स ह्याने प्रबळ प्रतिकार करून आपल्या ' घणा'च्या घावाखाली अि. स. ७३२ मध्ये मुसलमानांच्या त्या आक्रमणाचें डोकेंच ठेचून त्यांना नित्याचें परत फिरविलें. त्यामुळेच काय तो पुढचा–

सारा युरोप वाचला ! मुसलमानांनी ह्या दिग्विजयात त्या आशिया आफ्रिका खंडांतील राज्येंच काय तीं जिंकलीं नाहीत तर त्यांतील राष्ट्रांनाच तलवारीचे पाण्याने बाटवून मुसलमान करून टाकलें ! आजच्या स्पेन पोर्तुगाललाही त्यांनी वळाने मुसलमान करण्याचा सपाटा चालविला होता. त्यांच्याही स्त्रियांचें अपहरण केलें होतें. पण तीं दोन राष्ट्रें त्यांच्या तडाख्यातून अनेक शतकानंतर पुढे मुक्त झालीं. कशीं तें पुढे सांगण्यात येअील. तथापि आफ्रिका खंडातील अुत्तर पट्टीचीं सारींचीं सारीं त्या वेळचीं बाटविलेलीं राष्ट्रें आजही मुस्लिमचीं मुस्लिमच राहिलेलीं आहेत!

बरें; तशाच आवेशाने नि राक्षसी धर्मांधतेने हिंदुस्थानचाही नायनाट करण्यासाठी सिंधप्रांतातून बाहेर पडून हिंदूंच्या शेजारच्या प्रांतांवर तुटून पडण्याचा प्रयत्न मुसलमानांनी त्या सन ७०० ते १००० च्या काळात केला नाही असेंही नाही ! अुलट ते सौराष्ट्राकडून आणि वर गांधार प्रांताकडून अनेकवेळा तसें तुटून पडले होते. पण हिंदूंकडून परत पिटाळले गेले होते.

त्या काळी सिंधच्या पूर्वसीमेपासून तो अुत्तर हिंदुस्थानातील प्रांताप्रांतापर्यंत प्रतापी राजपूत राज्यांची सलग मालिकाची मालिकाच अेखाद्या अनुल्लंघ्य नसली तरी दुर्लंघ्य पर्वतासारखी सिंधमधल्या मुस्लिम सत्तेला प्रतिरोधीत पसरलेली होती. त्यामुळे सिंधप्रांतातून पुढे स्वाऱ्या करून येणाऱ्या मुसलमानांच्या टोळधाडी वायव्येकडे नि सौराष्ट्राकडे हिंदूंच्या निकराच्या प्रतिकाराने पुन्हा पुन्हा मागे पिटाळल्या गेल्या, नि सिंधमध्ये डांबून टाकल्या गेल्या. चितोडच्या बलशाली बाप्पारावळने तर अेकदा सिंधवरच अुलट स्वारी करून, मुसलमानांना सिंधमधून हूसकून देअून, तो प्रांत परत जिंकून घेतला होता. पुढे अरबांनी तो पुन्हा जिंकला. पण शेवटी सुमेर रजपुतांनी सिंधवर आपली राजसत्ता स्थापन केली.

ज्या तीनशे वर्षांत वर सांगितल्याप्रमाणे मुसलमान पश्चिम आशिया, आफ्रिका खंड नि दक्षिण फ्रान्सपर्यंतचा युरोप पादाक्रांत करू शकले, त्याच तीनशे वर्षांत ते सिंध प्रांताबाहेर पुढे पाअूल टाकू शकले नाहीत. या अेका गोष्टीवरूनच हिंदूंनी त्या तीनशे वर्षांत केलेल्या चिकाटीच्या प्रतिकाराची यथार्थ कल्पना येअील.

तरीही ह्याच कालात हिंदूंना अेखाद्या चंद्रगुप्ताप्रमाणे सारी भारतीय शक्ति अेकवटून, मुसलमानांना पिटाळून लावता आलें नाही हें आमचें त्या काळचें वैगुण्यही मनास वोचल्यावाचून राहत नाही.

✦ ✦ ✦

प्रकरण ३ रें

ह्या शतकव्यापी हिंदु मुस्लिम महासंघर्षातील मुस्लिम धार्मिक अत्याचाराचें वैशिष्टय

गझनीचे सुलतान

सिंधमध्ये अुण्यापुऱ्या तीनशे वर्षें डांबून ठेवलेल्या अरब सत्तेने सिंधप्रांत जरी पूर्णपणे असा सोडला नाही तरी अरबी मुसलमानांचे पहिल्यासारखें मोठ्या प्रमाणावर असें आक्रमण हिंदुस्थानवर पुन्हा केव्हाही झालें नाही. शेवटी तर सिंधमध्ये सुमेर रजपुतांचेंच राज्य झालें. परंतु गांधारपलीकडच्या गझनी या प्रांतात निराळ्या जातीच्या मुसलमानांची सत्ता स्थापन झालेली होती. तेथील सुलतान सबक्तगीन ह्याने गांधारातील त्या वेळी राज्य करीत असलेल्या हिंदु राज्यावर स्वारी करून त्या वायव्य दिशेने हिंदुस्थानात घुसण्याची जय्यत सिद्धता चालविली होती. पंजाव आणि गांधार ह्या प्रांतांवर हूणांना पादाक्रांत केल्यावर हिंदकुशपर्यंत हिंदूचेंच स्वामित्व स्थापन झालेलें होतें. आणि ब्राह्मणवंशीय राजसत्ता त्या प्रांतावर नांदत होती. त्याच ब्राह्मणवंशीय राजकुलात सबक्तगीनच्या वेळी जयपाल नांवाचा राजा राज्य करीत होता.

धर्मवीर राजा जयपाल आणि धर्मवीर अनंगपाल

राजा जयपालाने सबक्तगीनाचें हें आक्रमक धोरण दूरदर्शीपणे आधी हेरून आपण होअून सवक्तगिनावर स्वारी केली. पण त्या लढाअीत जयपालाचा मोड झाला. त्यायोगे अुत्तेजन पावून सुलतान सबक्तगीन जयपालावर तुटून पडला. त्या मुसलमानी संकटाला पुन्हा पहिल्यापेक्षाही निकराने तोंड देता यावे यासाठी राजा जयपालाने आजूबाजूच्या हिंदु राज्यांमध्ये मुसलमानांविरुद्ध चेव अुत्पन्न करून त्या हिंदु राज्यांची अेक संघटित आघाडी निर्मिली. आणि गांधारप्रांतात चढाअी करून आलेल्या सवक्तगिनाशी निकराची लढाई दिली. परंतु तीतही जयपालाचा पराभव झाला. आणि गांधारसह त्या सिंधूपलीकडील वायव्य प्रांतातील हिंदुराजसत्तेचा अुच्छेद होअून तो सारा प्रांत सुलतान सबक्तगिनाने आपल्या गझनीच्या राज्यास जोडून टाकला. त्यानंतर थोडयाच दिवसांत सुलतान सबक्तगीन मरण पावला आणि त्याचे गादीवर धर्मोन्मादात, हिंदुद्वेषात आणि पराक्रमातही शतपटीने कडवा नि क्रूर असलेला त्याचा पुत्र सुलतान महंमद हा गझनीच्या गादीवर बसला. हाच होय तो ' वुतशिकन् ' मूर्तिभंजक अशी धर्मांध पदवी स्वत:स लावून घेणारा महंमद गझनी ! त्याने राज्यावर येताच मुसलमानांचा त्या वेळचा सर्वश्रेष्ठ धर्माधीश आणि सत्ताधीश जो खलिफा त्याचे सन्मुख भरराज्यसभेत अुठून प्रकट

प्रतिज्ञाच केली की, साऱ्या हिंदुस्थानातील काफरांचा नायनाट करीन तरच मी खरा सुलतान ! आणि त्या प्रतिज्ञेप्रमाणे लगेच त्याने सिंधु अुतरून हिंदुस्थानावर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करण्याचा धुमधडाका चालविला.

येथून म्हणजे न्यूनाधिक अेक सहस्राव्या सनापासून, पुढे शतको शतके चालणाऱ्या हिंदु-मुसलमानांच्या महायुद्धांमागून महायुद्धांना खरेंखुरें तोंड लागलें.

आधीच दोन वेळा राजा जयपालाच्या नेतृत्वाखालील संयुक्त हिंदुसैन्याचा पराभव केल्यामुळे मुसलमानांच्या सैन्यात प्रवळ आत्मविश्वास अुत्पन्न झालेला होता. अुलटपक्षी वायव्यप्रांत हातातून गेल्यामुळे आता केवळ पंजाववरच ज्याचें स्वामित्व अुरलेलें होतें त्या राजा जयपालाने मागील दोन पराभवांनीही खचून न जाता मुसलमानांशी पुन्हा अेकदा टक्कर देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा खऱ्या वीराला नि राजाला शोभेल असा अढळ निर्धार केला. महंमद गझनी पंजाववर स्वारी करून येताच अि. स. १००१ मध्ये जयपालाने त्याच्याशी सिंधु नदीच्या आसमतात पुन्हा अेकदा लढाई दिली. परंतु आपलें स्वराज्य नि स्वधर्म हयांच्या रक्षणासाठी जे जें राजाचें नि वीराचें कर्तव्य तें तें अढळपणे करीत आलेल्या हया राजा जयपालाचा हया तिसऱ्या लढाअीतही महंमद गझनीने पराभव केला. तेव्हा असें अयशस्वी जिणें जगण्यापेक्षा किंवा म्लेंच्छाना शरण रिघण्यापेक्षा राज्यत्याग करून मरणेंच वरें असें वाटून त्या मानधन राजा जयपालाने आपला पुत्र जो अनंगपाल त्याचे हाती राज्य सोपविलें आणि भडकलेल्या चित्तेत अग्निप्रवेश करून आपल्या प्राणांचें वलिदान केलें !

राजा अनंगपाल हयानेही सुलतान महंमदाच्या आक्रमणास ताठरपणाने विरोध करण्याचें आपल्या शूर पित्याचें व्रत तसेंच पुढे चालविलें. अि. सन १००६ मध्ये महंमदाने मुलतानवर स्वारी करण्यासाठी अनंगपालाच्या राज्यातून वाट मागितली. पण अनंगपालाने त्याची ती मागणी झिडकारली. तेव्हा महंमदाने अनगपालावर स्वारी केली. त्या लढाअीतही अनंगपालाचा पराभव झाला. त्यास मागे हटावें लागलें पुढे महंमद मुलतानकडे गेला आहे असें पाहून अनंगपालाने पुन्हा अेकदा आजूबाजूच्या हिंदुराजांची स्वधर्मरक्षणासाठी अेकजूट केली आणि सुलतान महंमद अि. सन १००८ मध्ये अनंगपालावर पुनश्च चालून आला असता या संयुक्त हिंदु सैन्यानें त्याच्याशी लढाअी दिली. सिंधु नदीच्या आसपास ह्या दोन्ही सैन्यांची गाठ पडली. हया युद्धात हिंदु अितक्या निकराने लढले की, दोन प्रहरच्या संधीस मुस्लिम सैन्याचा व्यूह ढासळून तें अस्ताव्यस्त होअून गेलें. तेव्हा सुलतान महंमदही रण सोडून माघारी फिरू लागला. अितक्यात, त्यापूर्वी नि त्यानंतरही हिंदूंनी परशत्रूशी दिलेल्या अनेक लढायात जी हानिकारक घटना आकस्मिकपणे हटकून घडत असे आणि तरीही जी टाळण्याचा आगाअू सावधपणा हिंदूंच्या ढिलाअीने सहसा केलेला नसे, तीच नेमकी घटना अकस्मात् घडली !

जळत्या बाणांच्या माऱ्यामुळे राजा अनंगपालाचा हत्ती हिंदूंच्या चढाओत भर रणात अेकाअेकी भडकला आणि तोंड फिरवून पळू लागला. त्यामुळे हिंदूंच्या सैन्यात गोंधळ अुडाला. रणांगणात माघार घेत असलेल्या महंमदाच्या ध्यानात ती गोष्ट येताच हिंदूंच्या माऱ्यामुळे अस्ताव्यस्त झालेल्या त्याच्या मुसलमानी सैन्यापैकी काही निवडक पथकें तत्काळ समवेत घेअून फळी बांधून पुन्हा अेकदा त्याने हिंदु सैन्यावर निकराची चढाअी केली. त्या शेवटच्या धुमश्चक्रीमुळे हिंदूंचा पराभव झाला. तेव्हा मुसलमानांचीही पुष्कळ प्राणहानि झाली असल्यामुळे अनंगपालाचा पाठलाग करण्याच्या भरीस न पडता सुलतान महंमद मिळाला तेवढा जय पदरात पाडून घेअून गझनीस माघारी गेला. परंतु राजा अनंगपाळाचा नायनाट केल्यावाचून पंजाबात आपली मुस्लिम सत्ता प्रस्थापित होणें शक्य नाही हें अुघड झाल्यामुळे दीड अेक वर्षानंतर सुलतान महंमद अनंगपालावर तिसऱ्यांदा चालून गेला. ह्या वेळी अनंगपालाला कोणीच सहाय्यक नव्हता. तरीही त्याच्या अुरलेल्या अेकनिष्ठ सैन्यासह त्याने महंमदाशी लढाअी दिली. त्याच रणधुमाळीत लढत असताना तो शूर हिंदु राजा अनंगपाल ठार मारला गेला.

अशा रीतीने पंजाबवर मुसलमानांच्या झालेल्या पहिल्या पहिल्या अनेक आक्रमणांना राजा जयपाल, त्याचा पुत्र राजा अनंगपाल आणि त्याचे सहस्रावधि वीर सैनिक यांनी आपलें हिंदुराज्य आणि हिंदुधर्म यांच्या रक्षणासाठी अनेक लढाया देअून नि मुसलमानांचेही सहस्रावधि सैनिक मारून जिवात जीव असेतो स्या परशत्रूला रोखून धरलें, त्यांचें वीर कर्तव्य ते करून गेले !

राजा अनंगपालाच्या मृत्यूनंतर वायव्य प्रांताप्रमाणेच सुलतान महंमदाने पंजाब प्रांतालाही आपल्या गझनीच्या साम्राज्यास अि. सन १०१० चे आसपास जोडून टाकलें. पंचनद प्रांतात हिंदूंच्या राजसत्तेचें अुच्चाटन होअून मुसलमानांची राजसत्ता प्रथमच स्थापन झाली. हा विजय मिळताच सुलतान महंमद ठाणेश्वर येथील हिंदु राज्यांवर आणि हिंदूंचें धर्मक्षेत्र गाजत असलेल्या मथुरा नगरावर लगोलग चालून गेला. हीं नगरें जिंकून मुसलमानांच्या प्रत्येक धर्मांध आक्रमणाचा जो ठराविक कार्यक्रम असे त्याप्रमाणे तेथील हिंदुमंदिरें पाडून व जाळून टाकून, हिंदु स्त्री-पुरुष नागरिकांचें करवेल तितकें शिरकाण करून शतावधि हिंदु स्त्रियांना पळवून नेअून आणि अपार धनाची लूट घेअून महंमद पुन्हा गझनीस परत गेला. त्या मागोमाग अि. सन १०१९ मध्ये प्रतिहारांची राजधानी असलेल्या कनोज नगरावर स्वारी करून महंमदाने तेथेही जाळपोळीचा, रक्तपाताचा नि धर्मांध अत्त्याचारांचा कहर करून सोडला. त्यामुळे आजूबाजूच्या हिंदु प्रांतांवर त्याचा अितका दरारा बसला की, अि. सन १०२३ मध्ये तो जेव्हा ग्वाल्हेर नि कलिंजर येथील हिंदुराज्यांवर चालून आला तेव्हा तेथील हिंदु राज्यें निरुपायाने त्याचें आधिपत्य पत्करून त्याची मांडलिक बनलीं.

महंमदाची सोमनाथावर स्वारी

त्यानंतर अि. सन १०२६ मध्ये सुलतान महंमदाची सौराष्ट्रातील सोमनाथ मंदिरावरील सर्वांत अधिक गाजलेली स्वारी आली. त्या वेळी त्याने अितक्या प्रबळ सैन्यासह अगदी अटीतटीच्या घोषणा करून हिंदूंच्या त्या सुप्रसिद्ध मंदिरावर चाल केली होती की, सौराष्ट्राच्या सीमेला भिडताच गुजरात-सौराष्ट्रावर त्या वेळी राज्य करीत असलेला राजा भीम हा त्याच्या भीम नांवालाही कलंकित करून अेखाद्या भ्याडासारखा राज्य सोडून पळून गेला. त्यामुळे त्या संघटित मुसलमानी सैन्याशी तोंड देण्यास हिंदूंचें कोणतेंही शस्त्रसज्ज नि व्यूहबद्ध असें सैन्य अस्तित्वातच अुरलें नाही. तथापि अशा विकट प्रसंगीही आपल्या हातून होअील तितकें तरी संरक्षण करण्यासाठी सोमनाथाच्या पुजारी मंडळानेच पुढाकार घेतला. आजूबाजूच्या सर्व हिंदु जनतेला आपल्या देवस्थानाच्या नि आपल्या धर्माच्या रक्षणार्थ म्लेंच्छ शत्रूच्या प्रतिकारास्तव मिळेल तें शस्त्र घेअून धावून या असें अुच्चेतक आव्हान धाडलें गेलें. त्यासरशी लांबून लांवून सहस्रावधि हिंदुलोक धावून आले. हें युद्ध कोण्या राजासाठी लढावयाचें नव्हतें. त्यात लढणाऱ्यांपैकी कोणत्याही हिंदु स्वयंसैनिकाला वैयक्तिक राज्यलाभ होणारा नव्हता तें निर्भेळ धर्मयुद्ध होतें. त्यातही ते सहस्रावधी हिंदु म्हणजे अेखादें व्यूहबद्ध, रणशिक्षित, असें सैन्य नव्हतें. तो आयत्या वेळी अेकवटलेला हिंदु धर्मवीरांचा अेक समुदाय होता. तरीही ' देव मस्तकी धरून ' जिवावर अुदार होअून, महंमदाच्या संघटित नि कसलेल्या मुस्लिम सैन्याशी ते अहोरात्र झुजले. मुस्लिम सैन्य चढून येताना तटापर्यंत, देवालयाच्या तटावरून, शत्रु देवालयात घुसल्यानंतरही हिंदुधर्मवीरांचा सशस्त्र प्रतिकार चालूच होता. मुसलमानांच्या रक्ताचाही सडा पडतच होता. शेवटी सुलतान महमदाने जेव्हा देवालयाचा पूर्णपणे पाडाव केला तेव्हा तो त्वेषासरशी थेट गाभाऱ्यात शिरला आणि सोमनाथाची मूर्ति त्याने स्वहस्ते फोडून टाकली ! ह्या आपल्या धर्मांध शतकृत्याचें प्रसिद्धयर्थ महंमदाने ' बुतशिकन् ' (मूर्तिभंजक) ही पदवी धारण केली.

पन्नास सहस्र हिंदुवीरांचें झुंजार बलिदान

मुस्लिम अितिहासकारही लिहितात की, आपल्या देवालयाच्या संरक्षणार्थ लढत असता त्या संग्रामात पन्नास सहस्र हिंदु तरी ठार मारले गेले ! त्या पन्नास सहस्रांपैकी कोणीही हिंदु म्हणाला असता की ' मी मुसलमान होतो ' तर त्याला मुसलमानांनी जीवदान दिलें असतें. कारण त्यांच्या धर्माची ती रणनीतीच होती. पण तशा वाटग्या जीवनास धिक्कारून अेक नव्हे, अेक सहस्र नव्हे, तर पन्नास सहस्र हिंदु स्वयंसेवकांनी लढत लढत धारातीर्थात आपल्या प्राणांचें बलिदान केलें !

ग्रीकांच्या प्राचीन अितिहासात अशाच अेका प्रसंगी परकीय शत्रूशी झुंजणाऱ्या होरेशिअस नांवाच्या अेका प्रख्यात ग्रीक धर्मवीराचा गौरव करताना अेक अिंग्लिश कवि म्हणतो,

" Thus outspake brave Horatius
the Captain of the gate,
To every man upon this earth,
death cometh soon or late,
And how can a man die better than
by facing fearful odds
For ashes of his fathers and
the temples of his Gods."

वरील वीर कवनातील गौरवार्ह भावनेनेच आपल्याही देवालयाच्या आणि स्वधर्माच्या संरक्षणार्थ रणात झुंजत पडलेल्या ह्या हिंदूंच्या पन्नास सहस्र धर्मवीरांच्या स्मृतीस कोणता हाडाचा हिंदु आपली कृतज्ञ श्रद्धांजलि वाहणार नाही !

परंतु अुद्वेगाची गोष्ट अशी की, सोमनाथावरील ह्या महंमदाच्या स्वारी-विषयी लिहिताना केवळ परकीय अितिहासकारांनीच नव्हे तर अनेक कृतघ्न हिंदु अितिहासकारांनीही त्या पुजारी मंडळाच्या आणि हिंदु समुदायांच्या आपल्या देवावरील भावडया भक्तीचा अुपहास काय तो केलेला आहे. परंतु आपल्या राष्ट्रीय सन्मानार्थ आणि आपल्या धर्माच्या संरक्षणार्थ झुंजत त्या सहस्रावधि हिंदु धर्मवीरांनी आपल्या प्राणांचें जें भव्य बलिदान केलें त्यांचा मात्र काडी-अितकाही गौरव केलेला नाही. तथापि रत्नांची पारख गाजरपारख्यांना झाली नाही तर तो दोष काही त्या रत्नांचा नसतो.

त्या हिंदूंच्या भाबडया भक्तीविषयी योग्य तें दूषणही देणें जरी अपरिहार्य असलें तरीही ज्यांना त्या दूषणासाठी अुपहास करावासा वाटतो त्यांना हेंही पण तेथेच वजावून सांगावयास पाहिजे की आपल्या देवतेच्या जाज्वल्यतेविषयी आणि सामर्थ्याविषयी हिंदूंची जी श्रद्धा होती ती फार फारतर भाबडी होती अितकेंच काय तें म्हणता येअील. पण दुसऱ्याच्या धर्मावर अत्याचारी शस्त्रबळाने आक्रमण करून अनागस स्त्री-पुरुष बाल-वृद्धांना 'माझ्या देवाची – अल्लाची – भक्ति करतोस, मुसलमान होतोस की ठार मारू !' अशी प्रत्येकी धमकी देअून जो जो मुसलमान होण्यास नाकारी त्याचा त्याचा शिरच्छेद करीत पिसाळल्याप्रमाणे धावणाऱ्या मुसलमानांच्या अधर्मभक्तीसारखी, ती हिंदूंची त्यांच्या देवावरील भक्ति, राक्षसी, धर्मांध, रक्तपिपासू आणि आपल्या देवालाच दैत्य बनविणारी तरी नव्हतीच नव्हती ! पण तसें ठणकावून सांगण्याचें धैर्य मात्र, केवळ हिंदूंच्याच

भक्तीचा तेवढा अुपहास करणाऱ्या ह्या अुथळ नि भित्र्या लेखकांना झालें नाही ! पुन्हा, सोमनाथादिक हिंदूंच्या मूर्तींचा नि देवालयांचा जेव्हा जेव्हा महंमदासारख्या मुस्लिम सेनानींनी विध्वंस केला तेव्हा तेव्हा ज्या मुसलमान तवारिखकारांनी नि मुल्ला मौलवींनी वलगना केल्या आहेत की, "पहा ! ह्या तुमच्या मूर्ति आम्ही फोडल्या, पण तुमच्या देवाची आमचा हात धरण्याची छाती झाली नाही ! म्हणून तुमचा देव खोटा ! आम्हा मूर्तिभंजक मुसलमानांचा देव, 'अल्ला 'च काय तो खरा !" पण ह्या वलगनांचीच कसोटी खरी मानायची तर मुस्लिम धर्म न मानणाऱ्या नि 'अल्लास धिक्कारणाऱ्या चेंगीझखानाने नि त्याच्या अुत्तराधिकारी पुरुषांनी जेव्हा प्रत्यक्ष खलिफाच्या राजधानीत घुसून, ती अुद्ध्वस्त करून, त्याला ठार मारून, ज्याला 'अल्लाचें घर' म्हणून मुसलमान समजतात त्या त्यांच्या कित्येक मशिदींना जाळून टाकलें, वायवलांची राख केली, अितरांना आपल्या घोडशाळा बनवून सोडलें आणि कुराण ग्रंथांना तर घोड्यांच्या पायाखाली तुडविलें तेव्हा अल्लाही त्या चेंगीझखानादिकांचा हात धरू शकला नाही ! अशा शेकडो प्रसगांवरून आपला अल्लाही दुवळा नि खोटा आहे असें मानावयास त्या वलगना करणारे ते मुसलमान सिद्ध आहेत काय ? अितकें लांव तरी कशाला जा ! सोमनाथासारख्या अनेक हिंदु देवतांच्या मूर्ति मुसलमानांनी फोडल्या आणि ते विजयी झाले म्हणून जर मूर्तिपूजक (बुतपरस्त) धर्म खोटा नि मूर्तिभंजक (बुत्शिकन) धर्म खरा असें मानावयाचें तर बुतशिकन असणाऱ्या अफझुलखान नांवाच्या अेका मुस्लिम सेनानीचें मस्तक कापून तें तुळजापूरच्या भवानीच्या मूर्तीस 'बत्तीस दातांच्या बोकडाचें मुंडकें' नैवेद्य म्हणून जेव्हा शिवाजीने अर्पिलें तेव्हा त्याचाही हात अल्ला धरू शकला नाही ! अशा अनेक प्रसंगांच्या आधारे मूर्तिपूजक धर्मच खरा असेंही कां म्हणू नये ?

सोमनाथाचें मंदिर फोडल्यानंतर तेथील अपार लूट अुंटांवर लादून सुलतान महंमद गझनीस परत जाण्यास निघणार तोच त्यास वातमी कळली की, सोमनाथाच्या विध्वंसामुळे भिअून जाण्याचे ठायी हिंदुजनता अुलट अधिकच चवताळली आहे. आणि त्याचा परतण्याचा अपेक्षित मार्ग अडवून माळव्याचा राजा हा आपले सैन्यासह त्याच्याशी लढाअी देण्यास रणात अुतरलेला आहे. ह्या नव्या संग्रामाचा धोका ओढवून घेण्यास महंमद या वेळेस सिद्ध नव्हता. म्हणून तो आधीच मिळविलेला जय पदरात पाडून घेअून नि माळव्याकडील अपेक्षित मार्ग टाळून सिंधच्या वाळवंटातील दुर्गम पण अनपेक्षित अशा मार्गाने परतला. त्या वाळवंटातून जाताना त्याच्या सैन्याला पुष्कळ दुर्दशा नि कष्ट सोसावे लागले. गझनीस पोचल्यानंतर तीनचार वर्षांतच सन १०३० मध्ये सुलतान महंमद मरण पावला.

गझनीच्या ह्या पराक्रमी पण धर्मोन्मत्त सुलतानाने हिंदुस्थानवर मोठमोठ्या अशा पंधरा तरी स्वाऱ्या केल्या. हिंदूंनीही त्याच्या त्या स्वाऱ्यांत त्याला रणांगणा-मध्ये वारंवार निकराचे सामने दिले; पण त्याचा पराभव असा कोणीही हिंदु राजा करू शकला नाही. तथापि महंमदाच्या ह्या स्वाऱ्यांमुळे नि नुसत्या राजकीय विजयांमुळे हिंदूंची अितकी चिरकालीन हानि झालेली नव्हती की, जितकी त्याने जें लक्षावधि हिंदूंचें वायव्य प्रांतात नि पंजाबात बलात्काराने धर्मान्तर घडवन आणलें. जीं हिंदुराज्यें जिंकलीं तीं हिंदूंनी लवकर वा अुशिरा पण पुन्हा जिंकून घेतलीं, हें पुढच्या अितिहासावरून स्पष्टच आहे. परंतु त्याने लक्षावधि हिंदूंना जें मुसलमान करून टाकलें त्यांना मात्र हिंदूंना पुन्हा धार्मिक दृष्टीने जिंकता आलें नाही. आम्हांला आमच्या राष्ट्राचा प्रदेश स्वतंत्र करून आमचें गेलेलें राज्यबळ परत जिंकता आलें, पण हिंदुराष्ट्राची झालेली **संख्याबलाची हानि** काही आम्हांला भरून काढता आली आही.

धर्मान्तर म्हणजेच राष्ट्रान्तर

त्या काळच्या हिंदुसमाजाच्या व हिंदुधर्माच्या धुरीणांच्या मते कोणकोणते आचार शास्त्रशुद्ध असत आणि कोणकोणत्या दुराचारांमुळे किंवा सदाचारांच्या लोपामुळे हिंदु हा धर्मभ्रष्ट समजला जाअी याविषयीच्या आणि त्या भूतकालीन हिंदु-मुस्लिम महायुद्धामध्ये मुसलमानांनी बलात्काराने केलेल्या हिंदूंच्या भ्रष्टी-करणाशी ज्यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे, अशा काही त्या वेळच्या हिंदूंच्या धार्मिक समजुतींसंबंधी आम्ही पुढे थोडी चर्चा करणार आहोत. येथे अितकेच सांगतो की, त्या हिंदुराष्ट्राला परिणामी अत्यंत घातक ठरलेल्या तत्कालीन हिंदु-समाजाच्या जातिभेद, विटाळवेड, धर्मसहिष्णुतेची विकृति अित्यादि विक्षिप्त धर्मभ्रमामुळेच मुसलमानांनी बळाने वाटविलेले लक्षावधि हिंदु मुसलमानचे मुसल-मानच राहिले. अितकेंच नव्हे तर त्या बाटविलेल्या हिंदूंची संख्या पिढीमागून पिढीने वाढत गेली. त्यातही त्या पुढच्या पिढ्या जन्मतःच मुस्लिम संस्कारांत वाढल्या गेल्यामुळे कट्टर मुसलमान बनत गेल्या ! अितके कट्टर मुसलमान की पुढे हिंदुस्थानावर अिराणी, तुर्क, मोंगलादि परकीय मुसलमानांच्या या वायव्य दिशे-कडून ज्या टोळधाडी वारंवार येत गेल्या त्यांच्या सैन्यांत याच बाटग्या मुस्लि-मांच्या नव्या नव्या पिढीतील सहस्रावधि लोक भरती होत गेले आणि त्या परकीय मुसलमानांअितक्याच त्वेषाने नि द्वेषाने 'हिंदु काफिरांचा' समूळ विध्वंस करण्या-साठी आणि त्यांना बळाने बाटवून मुसलमान करण्यासाठी हिंदुराष्ट्रावर तुटून पडू लागले. वानगीसाठी अेकच अुदाहरण शतावधि अशा घटनांतून देअू. ज्या काळाची नि प्रदेशाची आम्ही चर्चा करीत आहोत त्या सिंधूपलीकडच्या भागातच धुरी नांवाची हिंदु जात अशाच परिस्थितीच्या पेचात बाटून मुसलमान केली गेली.

पण पुढे काही काळाने तीच जात हिंदूंची कट्टर वैरी वनली. कुख्यात हिंदुद्वेषी सुलतान महंमद घोरी ह्याच धुरी जातीचा होता. वस्तुत: अफगाणिस्थान, पठाणिस्थान, बलुचिस्थान येथील मुसलमान जनतेतील वहुसंख्य मुसलमान हे त्या त्या प्रांतांतील मुळचे निवासी जे हिंदुलोक त्यांचेच बाटविलेले वंशज होते. पण आपले पूर्वज कधी काळी हिंदु होते याची लवलेश जाणीव त्यांना पुढे पुढे अुरलेली नसे. अितकेंच नव्हे तर ती जाणीव कोणी दिली तर त्याची त्यांना चीड येअी 'मागचे काय असेल तें असेल, आज तरी आम्ही जन्मत:च अिस्लामचे पाअीक आहोत, मुसलमान राष्ट्राचेच अंगभूत आहोत. हिंदु काफिरांशी आमचा आता तरी हाडवैरावाचून कोणताही संबंध नाही,' अशा धर्मान्ध दुर्भाविनेने ते भारावून गेलेले असत. त्यांचें नुसतें धर्मान्तरच झालेलें नव्हतें. तर अशा धर्मान्तराचा जो अपरिहार्य परिणाम पिढीमागून पिढीने बाटग्या लोकांवर होत जातो तो होअून त्या बाटग्या हिंदूंच्या वंशजांचें राष्ट्रांतरही होत गेलें. हिंदुस्थानावरील थेट रामेश्वरापर्यंत झालेल्या पहिल्या पहिल्या मुसलमानी आक्रमणाच्या ज्या पांच सहा शतकांविषयी आम्ही येथे लिहीत आहोत त्या काळाच्या परिस्थितीत अेकंदरीत आजचें धर्मान्तर म्हणजेच अुद्याचें राष्ट्रांतर ठरत गेलें.

पण येथे धर्म शब्दाचा अर्थ तरी कोणता ?

पण धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर ह्या वरील सूत्रात धर्म नि धर्मान्तर शब्द काय अर्थी योजलेले आहेत तें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे. निरनिराळ्या धर्मांतील किंवा स्वतंत्र दर्शनांतील तत्त्वज्ञानाचें तुलनात्मक चिंतन करणें किंवा त्यांत जें स्वीकार्य वाटेल असें दर्शन आपल्या व्यक्तीपुरतें स्वीकारणें अशा अर्थी काही वरील सूत्रांत धर्म आणि धर्मान्तर हे शब्द योजले नाहीत. अमुक पुस्तक अीशप्रेषित आहे, त्याच्या दोन पुठ्ठ्यात जें काही सांगितलेलें आहे तें तें आणि तें तेंच काय तें धर्म्य आहे आणि अितर सर्व असत्य नि पापमय आहे अशा अभिनिवेशाने जी धर्मसंस्था त्या धर्मग्रंथातील तथाकथित तत्त्वज्ञानच नव्हे तर आचार विचार, निर्बंध (कायदे), व्यवहार, भाषा अित्यादि गोष्टी तदितर धर्मसंस्थांच्या अनुयायांवर अुपदेशाने न साधलें तर कपटाने, क्रौर्याने नि वलात्कारानेही लादण्यास अनमान करीत नाही, त्या धार्मिक बलात्कारासही धर्म्यच समजते, अशा आक्रमक संस्थांच्या धर्मास अुद्देशूनच काय तो वरील सूत्रांत धर्म शब्द वापरलेला आहे. अशा आततायी धर्मसंस्थांनी तदितरांचें केलेलें जें धर्मान्तर तेंच परिणामी त्या तदितरांचें राष्ट्रांतर ठरतें.

जातीय बहिष्काराचें प्रत्यस्त्र

मुस्लिमांच्या त्या धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार करील असें रामबाण प्रत्यस्त्रच हिंदूना सापडेना ! जें 'जातिवहिष्कारा'चें प्रत्यस्त्र म्हणून त्यांनी

ऱ्या मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणांचा प्रतिकार करण्यास सोडलें तें त्यांच्याच अंगावर अुलटलें !

ह्या ' जातिबहिकारा'च्या प्रत्यस्त्राची त्या हिंदुमुस्लिम धर्मयुद्धाशी संबद्ध असलेल्या स्वरूपापुरती तरी कल्पना येण्यासाठी आणि त्याचा स्वधर्मरक्षक अुपयोग होण्याच्या ठायी स्वधर्मघातक अपायच कसा होत गेला, तें लक्षात यावें म्हणून प्रथमतः जन्मजात जातिभेदाचीच कहाणी, अगदी संक्षिप्ततपणे का होअीना, पण सांगणें हें हिंदूंच्या मुसलमानांनी केलेल्या भ्रष्टीकरणाची फोड करावयाची तर अपरिहार्य आहे.

जन्मजात जातिभेदाची प्रथा आणि जातिबहिष्काराचा राष्ट्रीय दंड

मुसलमानांच्या स्वाऱ्या हिंदूंवर होअू लागल्या त्याच्या पुष्कळ आधीपासून म्हणजे हिंदूंनी हूणांचा नायनाट केल्यापासून हिंदु समाजाची आणि राष्ट्राची राजकीय, सामाजिक आणि धार्मिक स्थिरस्थावरता पुन्हा एकदा करण्याचा राष्ट्रीय प्रमाणावर मोठा सर्वांगीण प्रयत्न हिंदूंच्या शतावधि नेत्यांनी चोहो बाजूंनी भरतखंडभर चालू केला होता. त्या वेळी हिंदुराष्ट्राचें राजकीय नेतृत्व त्या काळीच उदयास येअू लागलेल्या आणि वैदिक हिंदुधर्माचे कट्टर भक्त असलेल्या रजपुतांच्या प्रतापशाली राजघराण्यांकडे आलेलें होतें. त्या नवचनेच्या प्रयत्नातच ह्या विशाल हिंदु समाजाची घडी जातिभेदाच्या चौकटीत चोपून बसविली जात होती. हळूहळू पण अपरिहार्यपणे त्या जातिभेदाच्या प्रथेलाच जन्मजात जातिभेदाचें स्वरूप प्राप्त झालें. पूर्वीच्या चार वर्णांतच नव्हे, तर त्या चार वर्णांच्या पोटातून आणि अवांतर जातिप्रवाहाचीही त्यांत भर पडत पडत शेवटी बळकटपणे नि शास्त्रसंमतपणे, अितकेंच नव्हे तर जवळ जवळ सर्वसंमतपणे चार सहस्र जन्मजात जातींत हें हिंदुजगत् सामाजिक नि धार्मिक दृष्ट्या अंतर्गततः विभागलें गेलें. अेक प्रकारे हें त्या वैदिक हिंदुराष्ट्राचें सामाजिक स्थित्यंतर, त्या कालाच्या अैतिहासिक आवश्यकतेमुळेच घडलें गेलें.

जो ज्या जातीत जन्मला तोच काय तो त्या जातीत राहू शकेल, हें ह्या जन्मजात जातिभेदाचें अेक मूळ सूत्र होतें. दुसऱ्या जातीशी अन्नव्यवहार करणें वा दुसऱ्या जातीचें पाणी पिणें हीं कृत्यें सुद्धा बहुतेक जातींमध्ये दंडनीय समजलीं जात. मग जातीजातीत मुली देण्याघेण्याची अत्यंत कडक बंदी होती हें काय सांगावयास पाहिजे ? त्या काळातील ह्याच निरनिराळ्या जातिसंस्कार म्हणून मानलेल्या ' धर्माचारांना ' आम्ही लोटीबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी, आणि ज्याविषयी आम्ही आता पुढे सांगणारच आहोत ती शुद्धिबंदी, सिंधुबंदी अित्यादि सात नांवें आमच्या जातिभेदावर लिहिलेल्या अनेक लेखांतून दिलेलीं आहेत. हिंदूंच्या प्रगतीलाच नव्हे तर गतीला सुद्धा पायबद घालणाऱ्या या सात बंद्या

म्हणजे सात बेडयाच होत्या. त्या बेडया आपल्या हिंदुराष्ट्राच्या पायात ख्रिश्चन किंवा मुस्लिम किंवा इतर कोण्या परराष्ट्रीय म्लेंच्छाने बळाने ठोकलेल्या नव्हत्या तर त्यांना हिंदूंनीच आपण होऊन अेका बुद्धिभ्रंशाच्या लहरीत, स्वधर्मरक्षक तोडगा म्हणून आपल्या पायात ठोकून घेतलेल्या होत्या ! म्हणून तर आम्ही त्यांना विदेशी बेडया न म्हणता ' सात स्वदेशी वेडया ' म्हणून आमच्या लेखनातून नि भाषणांतून संबोधीत आलेलो आहोत.

जन्मजात जातिभेद या संस्थेसंबंधी सर्वांगीण चर्चा येथे करण्याचें काहीच कारण नाही, स्थलही नाही. ज्यांना या संस्थेविषयी आमचे विचार जाणावयाचे असतील त्यांनी " जन्मजात जात्युच्छेदक निबंध " या नांवाचा आम्ही लिहिलेला या विषयावरील समग्र प्रबंध वाचावा. येथे आमच्या परधर्मीय शत्रूच्या धार्मिक आक्रमणाविषयी चर्चा करताना जितका आवश्यक तितकाच ऊहापोह खाली करीत आहोत.

प्रथमतः हिंदुसमाजाच्या विशाल संघटणास नि आश्चर्यकारक स्थैर्यास ती जन्मजात जातिभेदाची प्रथा काही परिस्थितीत नि काही प्रकरणी कारणीभूत झालेली असली पाहिजे हें विसरता कामा नये. या संस्थेचें महत्त्वमापन करताना शेवटी शेवटी तिच्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांनाच तेवढें दाखविणें निव्वळ कृतघ्नपणाचें होअील.

आपलें सामाजिक बीज, रक्त, जातिजीवन नि परंपरा शुद्ध रहावी, संकराने विकृत होअू नये, यासाठी त्या त्या काळच्या हिंदुधर्मीयांनी हिंदुराष्ट्राच्या हिताच्याच बुद्धीने ही जन्मजात जातिभेदाची प्रथा निर्मिली किंवा स्वयंप्रेरणेने निर्मू दिली हेंही मान्य केलें पाहिजे.

अनुवंश विज्ञान, श्रमविभागात्मक अर्थकारण, सामुदायिक सहजीवन नि सामुदायिक नीति अित्यादि तत्त्वांचाही त्या काळी स्मृतिकारांना आकळला तेवढा दूरदूर विचार त्या संस्थेच्या रचनेत अनुस्यूत केला होता. सहस्रावधि वर्षें होअून गेलीं, सहस्रावधि संकटें येअून गेलीं, पण तथाकथित स्पृश्य काय किंवा अस्पृश्य काय, कोटयनुकोटी हिंदूंच्या मनावर ह्या जातिभेदाच्या संस्थेने जो प्रभाव, जो मोह पाडलेला होता आणि अगदी परिया, भगी, कोळी, भिल्ल, वैश्य, जाट, क्षत्रिय ब्राह्मण अित्यादि हिंदूंच्या जातींच्या आणि त्यांच्या सहस्रावधि पोटजातींच्या श्रद्धेप्रमाणे त्यांचे ते मर्यादित जातिधर्म हेच आपलें अैहिक नि पारलौकिक कल्याणा साधणारे, देवाची कृपा संपादणारे नि आपापल्या संसारास पवित्र करणारे सदाचार आहेत, असा जो अेकनिष्ठ विश्वास हिंदुजगतात अुत्पन्न झालेला होता तो ह्या जातिभेदाच्या संस्थेचीं पाळेंमुळें शतकानुशतकें हिंदुराष्ट्राच्या ह्या सर्वजातिजीवनक्षेत्रांतून अत्यंत खोल शिरलेलीं असल्यावाचून आणि त्यांतून संचरत राहिलेल्या जीवनरसाने त्या असंख्य भिन्न जातिसमूहामुळे विछिन्न दिसणाऱ्या ह्या

राष्ट्राला आतून कोणत्या तरी अेकात्म सत्त्वाच्या आणि स्वत्वाच्या अदम्य भावनेने अस्फुरित केलेलें असल्यावाचून, तसा कदापि अुत्पन्न होअू शकता ना. ह्या वरवर विभिन्न दिसणाऱ्या जातिभेदाच्या स्वायत्त पण संयुक्त संघाला ज्या आंतरिक, अंतर्यामी नि अनावर अशा अेकात्म भावनेने असें अेकजीव केलेलें होतें, त्या राष्ट्रीय भावनेचेंच नांव होतें—**हिंदुत्व ! हिंदुधर्म !**

ज्या स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी अित्यादि त्या काळच्या मुख्य धर्माचारांना आम्ही आज 'सात स्वदेशी बेड्या' म्हणतो आहोत, ते धर्माचार मुसलमानांची धार्मिक आक्रमणें चालू झालीं त्या काळच्या अनेक शतकें पर्यंत हिंदुसमाजास त्याला जखडून टाकणाऱ्या 'बेड्या' वाटत नव्हत्या तर स्वतःच्या राष्ट्रदेहाने धारण केलेलीं रत्नखचित नि अभिमंत्रित रक्षाबंधनें वाटत असत. प्रत्येक जात, मग ती ब्राह्मणाची असो वा भंग्याची असो, आपल्यापुरता आपल्या जातीचा पूर्ण अभिमान धरीत असे.

हिंदूंच्या ह्या जातीजातींत जर कोणाकडून काही जातीय आचारांचा कळत न कळत भंग झाला, कोणी दुसऱ्या जातीच्या हातचें पाणी प्याला किंवा दुसऱ्या जातीच्या व्यक्तीशी शरीरसंबंध जाणूनबुजून किंवा अजाणपणे केला तर अशा कोणत्याही जातिधर्माविरुद्ध जाणाऱ्या अपराधी हिंदूला त्या काळी जो कडकातला कडक दंड देण्यात येअी तो म्हणजे जातिबहिष्कार हा होय.

हा जातिबहिष्कार शब्द आज आपण सहजगत्या निर्भयपणे अुच्चारू शकतो. पण त्या मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणांच्या काळी आणि त्यानंतर अनेक शतकें हिंदुसमाजातील कोणत्याही व्यक्तीला, कुटुंबाला वा वर्गाला जातिबहिष्काराच्या दंडाचें नांव काढताच धसका बसल्यावाचून राहत नसे. आणि ज्या हिंदूला जात पंचायतीकडून किंवा शंकराचार्यादिकांच्या धर्मपीठाकडून जातिबहिष्कार झाल्याचा दंड देण्यात येई तो हिंदु राजमुकुटधारी असला तरी चळचळा कापत असे ! जात अंतरणें म्हणजे जग अंतरणें, जीवन अंतरणें, अितका दुःसह परिणाम भोगावा लागे. प्रत्यक्ष आअी-बाप, रक्ताचे बंधु-बांधव सुद्धा त्या जातिबहिष्कृतास अकस्मात् अंतरले जात. संक्षेपतः येथे अितकें सांगणें पुरें आहे की, कोणत्याही देहदंडापेक्षा किंवा आर्थिक दंडापेक्षाही त्या काळच्या स्वधर्मानिष्ठ हिंदूंना जातिबहिष्काराच्या दंडाची भीति अधिक असे. आणि त्यामुळेही जातीजातींचे शास्त्रस्मृतिमर्यादित आणि व्यवस्थित असे जे रूढ झालेले आचार असत ते आपण होअून काटेकोरपणे पाळण्याची प्रवृत्ति हिंदु समाजात पिढ्यान्पिढ्या अगदी अंगी मुरत असलेली होती.

जातिभेदप्रथेच्या हिंदु जगताला बळकटी आणणाऱ्या नि त्यांच्या जीवनावर दूरवर प्रभाव पाडणाऱ्या स्वरूपाविषयी वरील प्रकारचे आणखी कितीही अुल्लेख

जरी आम्ही कृतज्ञपणे करू शकलो तरीही मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाचा आरंभ होताच त्या जातिभेदांच्या प्रथेमुळे नि तिच्या विषयीच्या हटवादी अभिमानामुळे हिंदुजगताची जी अपरिमित हानि झाली त्याविषयी त्या जातिभेदाच्या प्रथेवर अवश्य तितकी कडक टीका न करणें म्हणजे त्यांत आमच्या हिंदुजगताशी कृतघ्नपणा करण्यासारखें होणारें आहे.

मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणाला हाणून पाडणारें धार्मिक प्रत्याक्रमण करण्याच्या कार्यी ह्या जातिभेदाच्या बोथट साधनांचा आम्हां हिंदूंना काहीही उपयोग झाला नाही; अितकेंच नव्हे तर ह्या जातिभेदाच्या धर्माचारापायीच हिंदुधर्मावर नि हिंदुराष्ट्रावर ह्या धर्मांतराच्या संघर्षात मोठी अनर्थपरंपरा कोसळून कोटी कोटी हिंदूंना बाटविणें हें मुसलमानांस अत्यंत सोपें गेलें; आणि मुसलमानांना हिंदु करून घेणें हें तर हिंदूंना सर्वतोपरी अशक्य होऊन बसलें, हें सत्य काही नाकारता येणार नाही.

हिंदुस्थानात येण्याच्या आधी अरबादिक मुसलमानांनी अिराण, तुराण, मध्य आशियातील राष्ट्रें, आफ्रिकेतील अिजिप्तपासून स्पेनपर्यंतचीं राष्ट्रें ह्यांमधील ज्या ख्रिश्चन, अिझरायेल, पारसिक अित्यादि अिस्लामेतर धर्मीयांच्या लक्षावधि अनुयायांना सशस्त्र बलात्काराने मुसलमान होणें भाग पाडलेलें होतें, त्यांच्याकडूनही त्यांनी अत्याचारी नि बलात्कारी साधनांनीच धर्मांतर करविलें होतें. तथापि नुसतें मुसलमानांबरोबर अन्नव्यवहारादिक संपर्क घडला म्हणून काही ते लोक मुसलमानी धर्मांत आपण गेलो, आपण वाटलो, आपला मूळचा ख्रिस्ती वा अिझरायेल वा अितर स्वधर्म भ्रष्ट झाला आहे, असें मानीत नसत. त्या लोकांच्या डोक्यावर अिस्लामचें खड्ग शतकोंशतकें सतत टांगत ठेवून त्यांच्याकडून वर दिलेले सर्व मुसलमानी धर्माचार बळाने करून घ्यावे लागत. आणि त्यांच्यावर शंभर शंभर वर्षें राजसत्तेचा कडक, सशस्त्र आणि क्रूर पहारा ठेवावा लागे जर क्वचित् त्या काळात त्यांतील अेखाद्या स्थानातून वा प्रांतातून मुस्लिम सत्ता अितर काही कारणाने नष्ट झाली तर ते बळाने मुसलमान केलेले ख्रिश्चनादिक परधर्मीय लोक त्यांच्या मनातच आलें तर अेका हुल्लडीसरशी परत मुसलमान धर्माचें हिरवें फडकें फेकून देऊन आपल्या पूर्वीच्या धर्माचा ध्वज अुभारू शकत. या परिस्थितीमुळे अशा ख्रिस्ती, अिझराअेल प्रभृति धर्मांच्या बाटविलेल्या लोकांना मुस्लिम धर्मातच डांबून ठेवणें हें मुस्लिम राजशक्तीलाही फारच कठीण गेलें. आणि शतकोशतकें त्या बाटविलेल्या लोकांची मुसलमानी धर्मविरुद्ध हालचाल होते कीं नाही आणि ते स्वधर्मात परत जाण्यासाठी बंडबिंड करतात कीं नाही, हें डोळ्यांत तेल घालून मुसलमानांच्या सशस्त्र सैन्यांना पाहत बसावें लागे.

अलटपक्षी जेथे स्वतः मुस्लिमांवर असाच धर्मांतराचा प्रसंग ओढवला आणि स्पेन, ग्रीस, सर्व्हिया अित्यादि देशांप्रमाणे, 'ख्रिश्चन धर्म स्वीकार ! नाही तर मुसलमान जातची जात सरसकट शिरच्छेद करून नष्ट करून टाकू !' अशी धमकी देऊन लाखो मुसलमानांना बळाने ख्रिश्चन करण्यात आलें, तेव्हा त्या धर्मांतरित मुसलमानांवरही त्या त्या ख्रिश्चन राजसत्तांना असाच सक्त आणि प्रसंगी सशस्त्र पहारा ठेवावा लागत असे. कारण मुसलमानही केवळ ख्रिश्चनांच्या हातचें अन्न खाल्लें किंवा त्यांच्याशी शरीरसंबंध जोडला गेला म्हणजे आपण नित्याचे वाटलो, ख्रिश्चन झालो असें मानणारे नव्हते. ते ख्रिश्चनांनी बळाने बाटविलेले मुसलमान ख्रिश्चनांची राजसत्ता कुठे ढिली झाली आणि त्यांची शस्त्रशक्ति नष्ट झाली तर तत्काळ बंड करून, दिसेल त्या हिरव्या फडक्याचा ध्वज अुभारून ख्रिश्चन धर्माचें जूं झुगारून देत आणि मुसलमानी धर्म परत स्वीकारीत. अितकेंच नव्हे तर तेथील अितर ख्रिश्चनांना शक्य तर अिस्लामी धर्मांत बळाने कोंबून त्यांनी केलेल्या अत्याचाराचा सूड घेत.

ह्याच अनुभवामुळे हिंदूनाही बळाने मुसलमान केल्यानंतर आपणांला सैन्यशक्तीनेच काय तें शतक दोन शतक तरी त्या हिंदूना मुसलमानी धर्मांत डांबून ठेवावें लागेल असें अरबादिक प्रारंभिक मुसलमान विजेत्यांना प्रथम प्रथम भय वाटत होतें.

परंतु जेव्हा सिंधवर मुसलमानांनी स्वारी केली आणि हिंदू लोकांना सशस्त्र आक्रमणें करून बाटविण्याचा, मुस्लिम करण्याचा प्रारंभ केला, तेव्हा त्यांच्या लवकरच लक्षात आलें की, ह्या हिंदु लोकांचा स्वधर्माभिमान आणि स्वधर्मनिष्ठा हीं जरी जगातील कोणत्याही धर्माच्या अनुयायांअितकी किंबहुना काही प्रकरणी त्याहूनही कट्टर असली, अदम्य असली आणि त्यामुळेच हिंदूना मनाने मुसलमान करणें हें जरी अत्यंत कठीण काम असलें तरी त्यांना शरीराने मुसलमान करणें हें कार्य अतिशय सोपे आहे.

ही गोष्ट केवळ मुसलमानांच्याच धार्मिक आक्रमणाचे काळाला लागू होती असें नव्हे तर मुस्लिम धर्माच्या जन्मापूर्वीही ज्या सिरियन ख्रिश्चनांना मलबार-मध्ये हिंदु राजांच्या औदार्यामुळे, म्हणजेच घरवुडवेपणामुळे अिसवी सनाच्या पहिल्या चार शतकांचे आत आश्रय दिला गेला आणि ज्या ख्रिश्चनांनी हिंदूना बाटविण्याचा आरंभ केला त्या ख्रिश्चनांनाही ही गोष्ट कळून चुकली होती की, हिंदूंना नुसते अन्नाचा घास तोंडात कोंबूनही 'बाटविणें' शक्य आहे. किंवा विहिरीवर पाणी भरतात त्या जलाशयात ख्रिश्चनांचे अुष्टे पाव, बिस्किट, गोमांसाचे खंड (तुकडे) असे पदार्थ टाकले की, तें पाणी प्यालेले सारेचे सारे हिंदु त्या अन्न-जल-सहवास-संपर्काने जन्माचे बाटले जातात. त्यांना पुन्हा हिंदुधर्मांत कोणी घेत नाही.

पुढे पंधराव्या सोळाव्या शतकात पोर्तुगीजादि युरोपियन ख्रिश्चन, सैनिक सामर्थ्यसिह हिंदुस्थानात समुद्रमार्गे घुसले तेव्हा त्यांनाही हिंदूंच्या वर दिलेल्या सर्व विटाळवेडाच्या रूढी नि धर्मभोळेपणा पाहताच मोठा आनंद झाला. आणि अशा या वेडगळ हिंदूंचें सारें हिंदुस्थान आता बोलता बोलता ख्रिश्चन करून टाकू अशा निर्धाराने ते हुरळून गेले.

बाटविलेल्यांच्या पायात शुद्धिबंदीची बेडी ठोकली !

परराष्ट्रांचीं राजकीय आक्रमणें हाणून पाडणारीं अमोघ शस्त्रें हिंदूंच्या शस्त्रागारात पूर्वीपासूनच सज्ज असत. शत्रूच्या खड्गास खड्ग भिडवून हिंदूंनी तशीं राजकीय आक्रमणें यशस्वी रीतीने अनेकदा हाणूनही पाडलेलीं होतीं. परंतु परकीयांच्या ह्या धार्मिक भ्रष्टीकरणाच्या आक्रमणास हाणून पाडणारा खड्ग हिंदूंच्या शास्त्रागारांत त्या काळी तरी मुळातच नव्हता. त्यामुळे त्यांच्या त्या शास्त्रागारात त्यांना त्या काळी अेकमेव काय तो अुपलब्ध असणारा हा जाति-बहिष्काराचाच खड्ग अुपसून ते हिंदु ह्या धार्मिक भ्रष्टीकरणाच्या अभूतपूर्व मुस्लिम आक्रमणावर तुटून पडले. ज्या ज्या हिंदूंना मुसलमान बलात्काराने बाटवीत चालले त्यांच्या त्यांच्यावर हिंदूंनी जातिबहिष्काराच्या त्यांच्यातल्या त्यांच्यात चालू असलेल्या रूढीप्रमाणेच कडक बहिष्कार घातला. बळाने बाटविलेल्या हिंदूंची संख्या मुसलमान पंजाबपर्यंत चढाअी करून येअीतो लक्ष लक्ष झाली असताही आणि त्यांपैकी अनेकांना परत हिंदुधर्मात येण्याची अिच्छा असताही हिंदूंच्या ह्या जातिबहिष्काराच्या कठोर दंडविधानात हिंदुधर्मात किंवा समाजात शुद्ध होअून परत येता येण्याचा कोणताही मार्ग, कोणताही प्रायश्चित्ताचा पर्याय हिंदुसमाजाने अुघडा ठेविला नव्हता, अुपलब्ध ठेवला नव्हता. ही गोष्ट त्यांच्या या काळच्या आपापसातील जातीय प्रकरणांच्या रोटीबंदी, बेटीबंदी अित्यादि बेड्यांतील विचारसरणीला इतकी धरून होती की, जो हिंदू 'बाटून' अेकदा मुसलमान झाला त्याला आजन्म पुन्हा शुद्ध होअून परत हिंदुधर्मात येणें अशक्य करणारी ही 'शुद्धिबंदी मानवी बेडीही अगदी सहजपणे आणि तिच्या परिणामांची कोणतीही छाननी न करता त्या पूर्वीच्या बेड्यांप्रमाणेच त्या जाति-बहिष्कृतांच्या पायात हिंदुसमाजाकडूनच ठोकण्यात आली. त्याचाच अर्थ असा की, हिंदुसमाजाच्या स्वतःच्या पायातही ती शुद्धिबंदीची बेडी आपसूकच ठोकली गेली. बाटविलेल्यांना जातिबहिष्काराचा दंड देअून हिंदूंनी हिंदुराष्ट्राच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली ! ! !

मुसलमानांच्या हिंदूंना बळाने बाटविणाऱ्या भयंकर आक्रमणास पायबंद घालण्यासाठी हिंदुसमाजाने जातिबहिष्काराचा दंड देण्यास आरंभ केला. अर्थात जे कोणी हिंदु स्वार्थासाठी, सत्तेसाठी, संधिसाधूपणाने आपण होअून स्वधर्मद्रोहाचें

महापातक करावयास सिद्ध झाले आणि मुस्लिम धर्म स्वीकारून बाटले, तशा बाटग्या हिंदूंनाच काय तो जातिवहिष्काराचा हा कठोर दंड देणें अुचित आणि अुपयुक्त होतें. कारण जातिबहिष्काराच्या भयामुळेही सामान्यत: कोणी हिंदु बाटण्यास आपण होअून सहसा सिद्ध होता ना. जातिवहिष्काराच्या दंडाचा प्रतिबंधक साधन म्हणून अितका अुपयोग कांही अंशी होणारा होता. परंतु तितका अुपयोगही जे आपण होअून मुस्लिम व्हावयास सिद्ध झाले त्या धर्मद्रोह्यांच्या प्रकरणी होता ना. कारण त्यांचीं हिंदुजातीशी असणारीं सारीं बंधनें त्या पाप्यांनी स्वच्छेनेच तोडून टाकिलीं होतीं. पुन्हा अशा बाटग्या हिंदूंच्याही प्रकरणी शुद्धबंदीची अगदी अपरिवर्तनीय शिक्षा जी दिली जाअी ती देणें आत्मघातकच होतें. कारण पुढे मागे त्या पतितांतील काही हिंदूंच्या मनांत पुन्हा परत स्वधर्मात येण्याचें आलें असतें तर त्यांनाही शुद्ध करून घेण्याची काहीतरी संधि ठेवावयास हवी होती.

काही अर्थी स्वत: होअून जे हिंदु बाटले त्यांना तेवढा हा दंड योग्य होता.

परंतु अशा स्वेच्छेने मुसलमान झालेल्या हिंदूंची संख्या अत्यंत अल्प असे. लाखांत अेखादा अितकेंच; आणि म्हणूनच अत्यंत खेदाची गोष्ट ही की, ज्या असंख्यात लक्षानुलक्ष हिंदूंना केवळ सशस्त्र अत्याचारांनी नि बलात्कारांनीच काय ते मुस्लिम प्रपीडक बाटवू शकले त्या निरापराध लक्षानुलक्ष हिंदूंवरही ह्या जातिबहिष्काराचा नि शुद्धिबंदीचा क्रूर, कठोर नि स्वधर्मघातक दंडाचा वज्राघात केला गेला. मुसलमानांच्या अत्याचाराने आधीच विव्हळत असलेल्या आणि स्वधर्महानीने मरणासही कवटाळू पाहणाऱ्या त्या लक्षावधि हिंदु स्त्रीपुरुषांना हा आणखी अेक भुर्दंड दिला गेला ! त्यांना जातिवहिष्कृत केलें ! त्यांचे आअीबाप, पतिपुत्र, सर्व आप्त त्यांना पुन्हा केव्हाही या मृत्युलोकात तरी 'आपले' म्हणून आता स्वीकारणार नाहीत. आपल्याला ' शुद्ध होअून ' पुन्हा हिंदु होण्याचा कोणताही मार्ग अुघडा नाही !

जे चोर ते सोडून दिले आणि सावांना फाशी दिलें !

जे लक्षावधि हिंदु स्त्रीपुरुष मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारास नि बलात्कारास बळी पडले त्यांना, त्या निरापराधी लोकांनाही जातिबहिष्काराचा हा असह्य दंड दिला गेला. पण – ज्या अत्याचारी नि बलात्कारी मुसलमानांनी हे राक्षसी अपराध केले त्या अपराध्यांना मात्र हिंदूंनी मोठें भयंकर म्हणून फेकलेल्या त्या जातिबहिष्काराच्या प्रत्यस्त्राचा लवलेश अुपसर्ग झाला नाही, त्या खऱ्या अपराध्यांचा हिंदूंच्या जातिबहिष्काराने अेक केसही वाकडा झाला नाही. चोराला सोडून दिलें आणि सावाला फाशी दिलें ! ! अुलट जातिबहिष्काराची म्हणजेच

ह्या शुद्धिबंदीची शिक्षा बळाने मुसलमान केलेल्या हिंदूंना दिली गेल्यामुळे मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणास अगदी प्रत्यक्ष आणि प्रभूत साहाय्यच दिलें गेलें.

मागे पृ. ७१२ वर सांगितल्याप्रमाणे ज्या ख्रिश्चन, यहुदी अित्यादि अहिंदु लोकांना मुसलमानांनी अितर राष्ट्रांत बाटविलें होतें त्यांना मुसलमानी धर्मात डांबून ठेवण्यासाठी शंभर शंभर वर्षें सशस्त्र पहारा ठेवावा लागला. परंतु अिकडे हिंदुस्थानात येताच लाख लाख हिंदु स्त्री पुरुषांना अत्यंत क्रूरतेने मुसलमान बनविलें असताही त्यांना मुसलमानी धर्मात डांबून ठेवण्यासाठी – मुसलमानांना अवघे अेक दिवसच काय ते कष्ट पडत !

लढाअीत किंवा नगरानगरावरील सबळ सशस्त्र आक्रमणात अेका दिवसात जे सहस्रावधि हिंदु स्त्री-पुरुष बाटविण्याचे वा बलात्कारिण्याचे कष्ट घ्यावे लागतील तेवढे काय ते त्या दिवसापुरते घेअून मुसलमानांनी ते शतावधि वा लक्षावधि हिंदु अेकदा अन्न, जल, संभोग, सहवासाने अेका दिवसात बाटवून टाकले की पुन्हा त्या अेका वा लक्षावधि हिंदूंना आजन्मच नव्हे तर वंशपरंपरा मुसलमानी धर्मातच डांबून टाकण्याचें अत्यंत विकट काम ते हिंदु लोक स्वत:च स्वत:चें धर्मकर्तव्य म्हणून करीत ! ! कारण जातिबहिष्कृतांची शुद्धिबंदी ! ! ! जो हिंदु अेकदा बाटला तो जन्माचा बाटला !

पण अेका हिंदूचें बाटणें, मुसलमान होणें म्हणजे अेका माणसाचें राक्षस होणें होतें. अेक देवाचें दैत्य होणें होतें. हिंदु-मुसलमानांच्या त्या प्रलयभीषण महायुद्धाच्या सहस्रवर्षीय कालातील ही अगदी वस्तुस्थिति होती. कोणच्या प्रक्रियेने त्या बळाने बाटविलेल्या हिंदूंचें असें दैत्यीकरण किंवा राक्षसीकरण होअी तें अगदी थोडक्यात मागे पृष्ठ ७०८ वर दिलेलेंच आहे.

तरीही हिंदु समाजाचे डोळे अुघडले नाहीत. सामुदायिक प्रमाणात बोलावयाचें म्हणजे हिंदु लोकांतील ह्या शुद्धिबंदीच्या धार्मिक रूढीमुळे, आपण बाटवून मुस्लिम करून घेतलेल्या लक्षानुलक्ष लोकांना हिंदु लोकच केव्हाही परत हिंदु करून घेणार नाहीत, अशी मुस्लिमांची निश्चिति झालेली होती आणि म्हणून मुस्लिम धर्म-रक्षणाची त्यांना चिंताच अुरलेली नसे. जात्यंतर आणि धर्मांतर ह्यांतील राष्ट्रघातक प्रभेद हिंदुसमाजाच्या शतकोशतकें लक्षातच आला नाही !

हिंदुसमाजांतील कोण्या अेका जातीच्या – अुदाहरणार्थ वैश्य जातीच्या मनुष्याने त्या काळच्या जातीच्या कोष्टकाप्रमाणे वैश्याहून कनिष्ठ समजल्या गेलेल्या दुसऱ्या अेखाद्या हिंदुसमाजातीलच जातीच्या – अुदाहरणार्थ शहरातील शिंपी, भंडारी अित्यादि – कोण्या मनुष्याशी रोटीव्यवहार केला किंवा बेटीव्यवहार

केला तर वैश्य हिंदूला त्याची जात जशी 'वाळीत' टाकी, त्याच्यावर जाति-बहिष्कार टाकी, त्याचप्रमाणे कोण्या हिंदूला ह्या नवीनच आलेल्या निधर्मी नि मूलत:च पतित असें मानल्या गेलेल्या म्लेंच्छ जातीच्या कोणा मनुष्यासह बळाने रोटीव्यवहार करावा लागला, पाणी प्यावें लागलें किंवा पत्नीला त्या दुष्ट म्लेच्छांनी बळाने बलात्कारून बाटविलें असता, तिच्यासह स्वत:च मुसलमानांचा गुलाम केला गेल्याने राहावें लागलें, अन्न-पाणी व्यवहार करावा लागला तर त्या हिंदूलाही त्याची मूळची जातच नव्हे तर हिंदूंतील कनिष्ठांतील कनिष्ठ जातही त्या वरील वैश्याप्रमाणेच वाळीत टाकी, तो वाटला असें समजून त्या वैश्याप्रमाणेच जाति-बहिष्काराचा कठोरांतील कठोर दंड देअी. म्हणजे, हिंदुसमाजातील आपसाआप-सातल्या जातीमध्ये कोण्या हिंदूचें वाळीत पडणें ही गोष्ट आणि कोण्या हिंदूचें मुसलमानाशी हिंदूंच्या जातिधर्माविरुद्ध रोटी व्यवहार, बेटीव्यवहार अित्यादि संव्यवहार घडल्यामुळें जातिबहिष्कृत होत्साता तो मुसलमान होअून जाणे ही गोष्ट, हीं दोन्ही कृत्येंही हिंदूंना सारखींच वाटत. त्या दोन घटनांत असणारा आणि हिंदूंच्या सामुदायिक संख्यावलावर दूरवर हानिकारक परिणाम करणारा राष्ट्रीय विभेद त्या काळच्या हिंदुसमाजाच्या ध्यानातच आला नाही.

अेक हिंदु-हिंदुसमाजातल्याच अेका जातीने खाण्यापिण्याच्या दोषापायी वाळीत टाकला, तरी तो हिंदुसमाजाला मुकत नसे; हिंदुसमाजांतील अितर अनेक जातीत तो मिसळून जाअी किंवा त्याला अनुकूल अशा समदु:ख्यांची स्वतंत्रच अेक जात बनवी, पण ती जात हिंदु समाजांतच राहणारी असे, त्याचें जात्यंतर होअी, परंतु त्या पोटी सहसा धर्मांतर होत नसे, समाजांतर सुद्धा होत नसे, राष्ट्रांतर होत नसेच नसे. आपसा-आपसांत रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृति जातीय धर्माचारांच्या घडणाऱ्या भंगापायी वाळीत पडणारे, जातिबहिष्कृत होणारे, ते सहस्रावधि हिंदु, हिंदुसमाजाच्या कक्षेबाहेर पडत नमत. वरचेंच अुदाहरण घ्यावयाचें तर त्या जाति-बहिष्कृत वैश्याचें वाणीपण पालटलें तरी त्याचें हिंदुपण तसेंचें तसेंच अखंड राही. अक्षुण्ण राही. अर्थात् तशा आपसातील जातिबहिष्कारामुळे **अेकंदर हिंदुसमाजाच्या संख्याबळाची हानि होत नसे.**

परतु जेव्हा त्याच रूढीप्रमाणे मुसलमानाने बाटविलेल्या कोणाही हिंदु स्त्री-पुरुषांना तोच जातिबहिष्काराचा दंड देअून हिंदु जाति त्या बाटलेल्या हिंदुलोकांना शुद्धिबंदीची वेडी ठोकून जातीबाहेर टाकी, तेव्हा त्यांचें हिंदुपणच हिरावलें जाअी. अशा सहस्रावधि हिंदु स्त्री-पुरुषांना वारंवार होणाऱ्या धार्मिक आकमणांतून मुसलमान लोक सारखे वाटवीत गेल्याने त्या त्या 'बाटविलेल्या' हिंदु स्त्री-पुरुषांना हिंदुसमाज हिंदु जातीतूनच बहिष्कृत करीत गेल्याने आणि त्यामुळे त्यांना मुसलमानांच्या धर्मात नि समाजात राहणें भाग पडत गेल्याने – **हिंदुराष्ट्राच्याच संख्याबळाची भयंकर हानि होत गेली !**

मुसलमानाच्या धार्मिक आक्रमणाला आणि अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी म्हणून ज्या जातिबहिष्कार आणि शुद्धिबंदी ह्या प्रत्यस्त्रांचा हिंदूंनी आघात केला त्यांनी मुसलमानांचा केसही वाकडा न होता अुलट हिंदूंवर ते करीत चाललेल्या अत्याचारांना नि बलात्कारांना केवढें अुत्तेजन मिळत गेलें हें साधारणतः महंमद गझनीच्या काळापर्यंतच्या वरील विवेचनावरून स्पष्टच होत आहे. परंतु तरीही त्यावेळच्या वाटविलेल्या हिंदूंची कोण दुर्दशा होत असे याविषयी अनेक तत्कालीन मुसलमानांच्याच तवारिखांतून केलेल्या वर्णनांपैकी केवळ वानगीसाठी अेक घटना खाली देत आहो.

ज्या हिंदूंना शेकड्यांनी गुलाम करून अिराण, तुराण, अरबस्थानाकडे गझनीच्या स्वाऱ्यांच्या काळी धरून नेत त्यांपैकी काही हिंदु लोक व्यक्तिशः वा टोळ्याटोळ्यांनी मुसलमानांना झुकांड्या देअून कालांतराने पंजाबात पळून येत. त्या वेळी म्हणजे महमंद गझनी मेला त्या वेळी आणि पुढे शंभर एक वर्षें मुसलमानी सत्ता पंजाबपर्यंतच येअून थांबली होती, निदान पंजाबपुढे १०० वर्षें तरी हिंदूच्या सशस्त्र विरोधाने घुसू शकली नव्हती.

पुढे मुसलमानांच्या तावडीतून सुटलेल्या हिंदु गुलामांच्या टोळ्या मुस्लिमांच्या सत्तेखालील पंजाबातूनही निसटून पंजाबला लागूनच असलेल्या आपल्या राजपुतान्याच्या हिंदुराज्यांत आश्रयार्थ येत, आणि मनांत आनंद मानीत की, सुटलो अेकदाचे मुसलमानांच्या कचाट्यातून; आता पुन्हा आपआपल्या हिंदु कुटुंबांतून, हिंदुदेवालयांतून, हिंदुसमाजातून सुखाने नांदू !

हाय ! हाय ! परंतु ही त्यांची अिच्छाही केवळ मृगजळच ठरे ! कारण शुद्धिबंदी ! त्या टोळ्या त्या हिंदुराज्यांत येताच त्यांची पूर्वीची स्वतःची जातच नव्हे, पण कोणतीही हिंदुजात त्यांना जातीत घेण्यास म्हणजेच हिंदुधर्मात घेण्यास सिद्ध नसे. कारण त्यांना जातिबहिष्काराचा कठोर दंड टोठावलेला – जो हिंदु अेकदा वाटला तो नित्याचाच वाटला – ह्या शुद्धिबंदीच्या मूळ सूत्राच्या आधारे ! त्या टोळ्यांतील स्त्री-पुरुषांना त्या हिंदूंच्या राज्यांतही जगायची अिच्छा असल्यास मुसलमान म्हणूनच जगावे लागे ! पुढे जेव्हा शंभर अेक वर्षांनी मुसलमानांच्या नव्या नव्या स्वाऱ्या यशस्वी होअून शेवटी दिल्लीपर्यंत, मध्यप्रांतापर्यंत, अशा पुढे पुढे घुसत चालल्या तेव्हा तेव्हा त्यांना ह्या अनेक वर्षांपूर्वी पळून आलेल्या हिंदु गुलामांच्या तुकड्या मुसलमान म्हणूनच त्या त्या हिंदुराज्यात नांदताना पाहून मोठें आश्चर्य वाटे ! कारण मुसलमानाच्या राज्यात अशी हिंदूंची अेखाद दुसरी टोळी आढळली तर त्या काळी हिंदु म्हणून कधी जिवंत राहूच शकली नसती. बळाने वा छळाने केव्हाच मुसलमान केली जाती. हा मुसलमानांचा अनुभव ! हा मुसलमानी धर्म !

पण अिथे हिंदुराज्यात बाटलेल्या आणि परत हिंदुधर्मात येअू अिच्छणाऱ्या हिंदूंना सुद्धा मुसलमान म्हणूनच राहावे लागे कारण शुद्धिबंदी ! हा हिंदुधर्म ! !

अशा मुसलमानी धर्माशी लढण्याचा प्रसंग ज्यांच्यावर कोसळला त्या ह्या अशा हिंदुधर्माचे लाखो अनुयायी ह्या विषम संघर्षात भ्रष्टीकरण करून मुसलमानांनी बाटविले आणि हिंदूंच्या प्रचंड संख्याबळाची अपरिमित हानि केली यात काय आश्चर्य ?

आश्चय असेल तर हेंच की, अितक्या हानीवरच कसें निभलें !

✦ ✦ ✦

प्रकरण ४ थें

सद्गुणविकृति

मुसलमानांच्या त्या महान् संघर्षात धार्मिक काय किंवा राजकीय काय दोन्हीही आघाड्यांवर हिंदूंचा जो घात मुसलमानांनी केला नाही तितका घात हिंदूंतीलच जन्मजात जातिभेदाच्या रोटीबंदीपासून शुद्धिबंदीपर्यंतच्या रूढींनी केला हें वरील काही प्रकरणांतून विशद केलेलेंच आहे. परंतु या जन्मजात जातिभेदाच्या धार्मिक खुळाप्रमाणेच हिंदूंच्या आक्रमक नि प्रत्याक्रमक सामर्थ्यास अगदी लुळें करून सोडणारी दुसरी अेक आत्मघातक मानसिक व्याधि हिंदूंच्या नाशास कारणीभूत झालेली होती. मुसलमानांच्या शस्त्राने जें त्यांना करता आलें नाही असे असे हिंदूंचे पराजय हिंदूंच्या अंगी मुरलेल्या व्याधीच्या वेशुद्धीत हिंदूंनी स्वत:चे स्वत:च करून घेतले होते. या बुद्धिभ्रंशाच्या व्याधीला वास्तविक पाहता तिच्यामुळे हिंदूंची जी प्रचंड हानि होत गेली, त्या मानाने त्यांतल्या त्यांत सौम्य असणारे नांव शोधायचें झालें तरी ' सद्गुणविकृति 'अितकें तरी म्हटलेंच पाहिजे.

परोपकार, दया, अहिंसा, पररधर्मसहिष्णुता, शरणागताला अभय देणें, शत्रूवर अुपकार करणें, परस्त्री अपहार न करणें, शत्रु-स्त्रीदाक्षिण्य, आपल्या जिवावर अुठलेल्या अपराध्यासही क्षमा करणें अित्यादि

वस्तुत: सद्गुण किंवा दुर्गुण हे मूलत: केवळ गुण असतात

मनुष्याची माणुसकी म्हणून अुपदेशिले गेलेले सर्व सद्गुण हे वस्तुत: केवळ सारे गुणच असतात. कोणताही अेक गुण सर्व परिस्थितीत सद्गुणच असतो असें

नाही. संक्षेपत: येथे अितकेंच सांगणें पर्याप्त आहे की, व्यवहारात नि नीतिशास्त्रात तरी गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास अुपकारक ठरतो तेव्हा तितक्याच मर्यादेपर्यंत तो सद्‌गुण समजला गेला पाहिजे. आणि जेथून तोच गुण मनुष्यजातीच्या घातास किंवा अध:पातास कारणीभूत होतो, तेथून त्याचें दुर्गुणांत रूपांतर होतें, तो त्याज्य ठरतो.

अगदी संक्षेपत: का होअीना परंतु काही गुणांचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन भेद केलेले आहेत. म्हणूनच देशकालपात्राच्या विवेकाची कसोटी फार महत्त्वाची आहे. हिंदूंच्या संस्कृतीने मनुष्याला देवत्वाप्रत पोचविण्याची आकांक्षा बाळगून मनुष्याच्या अंगात सात्त्विक भाव अुत्पन्न करण्याची पराकाष्ठा केली. परंतु हें जग हें केवळ सत्त्वाच्या अेकाच धाग्याने विणलेलें नाही, हें त्रैधातुक आहे; सत्त्व, रज, आणि तम ह्या तीन धाग्यांनी तें विणलेलें आहे. आणि म्हणूनच जर आणि ज्याला या जगात जगावयाचें असेल, जिंकावयाचें असेल, निदानपक्षी अन्यांकडून, अन्यायांकडून जिंकलें जावयाचें नसेल, त्याला सत्त्व, रज आणि तम ह्या तिन्ही परिस्थितीतील अवस्थांना यशस्वीपणे तोंड देता येअील असें त्रिशूली साधनच वापरलें पाहिजे. परंतु त्या हिंदु-मुस्लिमीय महायुद्धाच्या काळी हिंदुराष्ट्राला त्या सद्‌गुणांच्या सापेक्षतेचा अुपदेश करणाऱ्या गीतेची सुद्धा विस्मृति झाली. नव्हे गीतेतील धर्माचाच त्या काळच्या हिंदूंनी विपर्यास केला. गीतेतील मुख्य जें मर्म आहे तें म्हणजे पात्रापात्राविवेक–त्याची ओळखही त्या हिंदूंना राहिली नाही.

अर्थातच हें ध्यानात ठेवलें पाहिजे की, हें सारें विवरण त्या वेळच्या कोटचनुकोटि हिंदु राष्ट्रास अेकंदरीत नि सामुदायिक अर्थी लागू पडणारें आहे. अशी कोटि कोटि जनांच्या विसदृश, विरोधी समाजक्रांतिकारक असे सहस्रावधि अपवादात्मक जनसमूह किंवा प्रतापी पक्षही निघत गेले. त्यांचे अुल्लेख यथास्थली दिग्दर्शनार्थ आले आहेत. पुढेही प्रसंगोपात्त येतीलच.

शरणागताला जीवदान देणें, हा सद्‌गुण म्हणून काही पोथ्यांतून सांगितलेला आहे. यासाठी महमंद घोरी, नजीबखानासारख्या अनेक दुष्टांना ते हाती लागले असताही जिवंत मोकळे सोडून दिलें. भुकेल्याला किंवा तान्हेल्याला पेय पाजावें, हा सद्‌गुण आहे, येवढेंच काय तें पाठ करून ठेवल्यामुळे नागांनाही आणि दुष्ट सापांनाही दूध पाजीत राहिले. स्वत:चीं देवमंदिरें ते मुस्लिम राक्षस धडाधड पाडीत असताही आणि सोमनाथासारख्या पूज्य मूर्ति भग्न करीत असताही

दिधलें दु:ख पराने अुसने फेडू नयेचि सोसावें।
शिक्षा देव तयाला करिल म्हणोनि अुगेच बैसावे ॥

असा साधुसंतांनी सद्गुण म्हणून सांगितलेला असतो, त्यासाठी अनुकूल परिस्थिति आली असताही त्या दुष्ट मुसलमानांचा वचपा न काढता त्यांच्या मशिदीचा अेक चिराही काही कोणी अुखडला नाही.

ज्या 'सद्गुणांपायी' असे असे दुराचार आणि पंचमहापातकांहूनही भयंकर पापें घडतात, अशा सद्गुणापेक्षा पोथीतल्या कोष्टकाप्रमाणे ठरलेल्या दुर्गुणांतील दुर्गुणही अधिक मानवहितघातक, राष्ट्रहितघातक आणि धिक्कारार्ह असू शकणार नाहीत. म्हणून ज्या विवेकशून्य नि बुद्धिभ्रष्ट मनुष्यांच्या हातून तसा गुण सद्गुण म्हणून पोथीनिष्ठपणे आचरला जातो, धर्म म्हणून हटातटाने आचरला जातो, त्यांचा व्यक्तिशः आणि राष्ट्रशः आमूलात् विध्वंस झाल्यावाचून राहणार नाही. असे गुण सद्गुण नसून ते सद्गुणांची विकृति होत. देशकालपात्राचा विवेक न करता जो जो सद्गुण केवळ वरीलसारख्या बुद्धिभ्रंशापायी आचरला जातो तो तो सडलेला सद्गुण असतो आणि सडलेल्या अन्नासारखें त्याचेंच प्राणघातक विष बनतें.

'परधर्म सहिष्णुता हा सद्गुण आहे,' हें बोधामृत प्रत्येक हिंदूला अगदी आअीच्या दुधासहच पाजलेलें असतें. परंतु त्या वाक्याचें मर्म मात्र त्याला कोणी विशद केलेलें नसतें. जर तो 'परधर्म' आपल्या स्वधर्मांशीही सहिष्णुतेने वागणारा असेल तर तशा परधर्मांशी आपणही सहिष्णुतेने वागणें, हा सदगुण होअू शकेल. परंतु हा देशकालपात्राचा विवेक न करिता, हिंदुधर्माचा निर्दय विनाश, काफरांचा भयानक अुच्छेद हाच आमचा धर्म होय, असें म्हणणाऱ्या मुस्लिमांच्या किंवा ख्रिश्चनांच्या धर्मास ती परधर्मसहिष्णुतेची व्याख्या लागू पडत नाही. तिथे त्या 'परधर्माचा' त्याच्या असहिष्णु कृत्यांचा प्रतिकृत्याने आणि अत्याचारांचा अत्याचाराने प्रतिशोध घेणारी संक्रुद्ध असहिष्णुता हाच खरा सद्गुण होय.

अगदी या चालू अितिहास प्रकरणापुरतेंच बोलायचें झालें तर प्रत्येक मुस्लिम आक्रमक मथुरेचीं किंवा काशीचीं हिंदु मंदिरें अुद्ध्वस्त करीत गेला. सबध हिंदुस्थानातील अत्यंत पूज्य नि भव्य अशा रामेश्वरापर्यंतच्या अनेक मंदिरांतील मूर्ति जाणून बुजून दिल्ली प्रभृति मुस्लिम राजधान्यांस नेअून पालथ्या घालून त्यांच्या प्रासादांच्या पायऱ्यात चिणून टाकल्या गेल्या. अितकेंच नव्हे तर केवळ हिंदूंच्या भावनांना कुचलून टाकण्यासाठीच तशा पवित्र मंदिरांतील त्या मूर्ति आणि अनेक अितर अवशेष मलमूत्रोत्सर्जनार्थ अुभारलेल्या ठिकाणांची फरशी करण्यासाठी अुपयोग केला गेला. ह्या आणि अशाच अितर अनेक अमानुष अुत्पातांनाच आपला 'धर्म' मानणाऱ्या मुस्लिमांशी सहिष्णुतेने वागणें हा सद्गुण नसून सद्गुणविकृति होय – नव्हे, हिंदूंनी तशी सहिष्णुता पाळणें हें अेक नारकीय पाप करण्यासारखें होतें, पण तेंच पाप पुण्य म्हणून त्या हिंदूंनी आचरिलें! मुसलमानांची तीं तीं राज्यें अधूनमधून हिंदूंनी अुखडून टाकिलीं असताही म्हणजेच हाती

राजसत्ता आल्यावरही हिंदूंनी काशी, मथुरा ते रामेश्वर येथील मुसलमानांनी बांधलेल्या मशिदींना भरडून काढून त्यांच्या अवशेषांना अशाच मार्गामार्गातील फरशांमध्ये चिणवून टाकून सद्गति दिली नाही. फारफार तर हिंदूंनी आपलीं मुसलमानांनी पाडलेलीं मंदिरें पुनः पुन्हा अुभारावींत अितकेंच काय तें ! या अुलट अशीं आश्चर्यकारक अुदाहरणें आढळतात की, ज्यांत हिंदूंच्या अशा सत्ताकालात त्यांनी त्या मुस्लिम आक्रमकांनी बांधलेल्या अशा मशिदींना नवीन अुत्पन्नें लावून दिलीं आणि त्यांचें रक्षण करण्याचें दायित्व आपणांकडे घेतलें ! या प्रकरणी अेक फुटकळ असें अुदाहरण त्या काळच्या हिंदूंच्या या धार्मिक बुद्धिभ्रष्टतेचें, सद्गुणविकृतीचें अत्यंत लज्जास्पद प्रदर्शन करणारें, असें येथे देत आहोत. म्हणजे याविषयी आणखी चकार शब्दसुद्धा देण्याचें कारण अुरणार नाही.

सोमनाथाचें देवालय हें प्रथम महंमद गझनीने पाडल्यानंतर तो प्रदेश पुन्हा हिंदूंनी जिंकून घेतला. हिंदूंनी तें सोमनाथाचें देवालय पुन्हा बांधिलें, पुन्हा मुसलमानांची स्वारी होअून त्यांनी तें देअूळ फोडून तोडून टाकिलें अशी अुलाढाल त्या देवळाची होता होता जेव्हा तेथे अेका प्रबल हिंदु राजाची सत्ता त्या प्रदेशावर स्थापन होअून तें देवालय पुन्हा विधिपूर्वक बांधलें गेलें, आणि त्या क्षेत्राचीही चांगली भरभराट झाली. त्या सागरतटावर पूर्वीपासून येती जाती अरबी नाविक व्यापाऱ्यांचीं तारवें प्रवासाचा अेक टप्पा म्हणून अुपयोग करीत असत. वस्तुतः त्या हिंदुराजाने हया अरबानांच त्या समुद्रात येणें बंद करावयास पाहिजे होतें. कारण असेच अरबी व्यापारी येता येता अरबी सेनाही त्याच्यासह मागे आलेल्या होत्या. असा कटु अनुभव त्या हिंदुराजांना वारवार आलेला होता. परंतु स्वतःच्या परधर्मसहिष्णुतेचें आणि औदार्याचें प्रदर्शन करण्यासाठी त्या हिंदुराजाने त्या अरबी व्यापाऱ्यांचें त्या तटास येणें जाणे बद केलेंच नाही तर अुलट त्यांना अगदी आपल्या घरीच आल्यासारखें वाटावें अितक्या सौजन्याने वागविलें. तेव्हा त्या अरबी व्यापाऱ्यांच्या मनात त्यांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे राजकीय कपटाने असो किंवा धार्मिक दंभाने असो – असें आलें की, या सोमनाथ नगरातच, त्या काफरांनी पुन्हा अुभारलेल्या देवळासमोरच आपली मुसलमानांची अेक मशीद आव्हानाप्रमाणे अुभारावी. पण ती गोष्ट त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे दडेलीने करणें त्यांना शक्यच नव्हतें. यास्तव त्यांच्या नेहमीच्या कपटपटुत्वाप्रमाणे त्यांनी मोठ्या नम्र भाषेत त्या हिंदुराजाला मशीद अुभारण्याविषयी अनुज्ञा असावी असें आवेदन सादर केलें. आणि कोण आश्चर्य! त्या भोळसट हिंदुराजाने मुसलमानांची ती विनंती मोठ्या आनंदाने मान्य केली. आणि सोमनाथ मंदिरासमोरच अेक नवी मशीद – हिंदुधर्माला मूर्तिमंत आव्हानासारखी ताठ मान करून अुभी राहिली.. वस्तुतः महमद गझनीने त्या सोमनाथ मंदिराची जी दुर्दशा केली ती आठवून त्या हिंदुराजाने तो प्रदेश मुसलमानांच्या हातून परत घेताच त्यांतील यच्चयावत्

मशिदींवर नांगर फिरवावयास हवा होता. आणि मग सोमनाथाचें मंदिर पुन्हा बांधावयाचें होतें. पण हिंदूंनी मशीद तितकी न पाडता अेक नवीन मशीद बांधण्याची अनुज्ञा दिली. आणि तिच्या वर्षासनाची सोय केली. हया हिंदूंच्या आत्मघातक परधर्मसहिष्णुतेचें (सद्गुण विकृतीचें ?) फळही त्यांना या हाताचें त्या हाती भोगावें लागलें. कारण काही काळानंतर जेव्हा अल्लाअुद्दिनादिक मुस्लिम आक्रमकांनी गुजराथवर स्वाऱ्या करून सहस्रावधि हिंदु पुरुषांची सरसकट कापाकापी केली, सहस्रावधि स्त्रियांवर बलात्कार केले आणि शतावधि हिंदु मंदिरें पाडीत फोडीत अत्याचारी मुसलमानांचीं सैन्यें त्या सोमनाथ नगराजवळ आली तेव्हा हिंदुराजांनी ज्या अरबी व्यापाऱ्यांना मशीद अुभारू दिली त्या हिंदूंच्या परधर्मसहिष्णुतेची फेड कशी केली ? तो हिंदूंचा अुपकार कसा फेडला ?

तर तो अुपकार हिंदूंच्या वावळटपणाचें, दुधखुळेपणाचें लक्षण समजून, त्या अुपकाराच्या फेडीकरिता पुन्हा अुभारलेलें सोमनाथ मंदिर तरी सुरक्षित राहू दिलें कां ? नाही ! त्या अल्लाअुद्दिन प्रभृतींच्या मुस्लिम सैन्याने तें सोमनाथ मंदिर पुन्हा छिन्नविच्छिन्न करून टाकलें आणि महंमद गझनी जें करावयास विसरला होता तें विटंबन करण्यासाठी त्याने सोमनाथाच्या मूर्ति आणि गाभाऱ्यातील शिला दिल्लीला नेअून तेथील अेका मशिदाच्या पायऱ्यांत चिणून टाकल्या.

पुढेही हिंदूंची सत्ता अेकदा आली, काही देवळें पुन्हा अुभारलीं गेलीं. पुन्हा मुसलमानांची स्वारी झाली आणि गुजराथवर म्लेंच्छांचें चिरकालीन सार्वभौमत्व स्थापिलें गेलें. सुलतान अहमदशाह, अित्यादि मुसलमानी सुलतानांनी सशस्त्र धार्मिक अत्याचारांनी, स्त्रियांवरील बलात्कारांनी आणि मंदिरांच्या विध्वंसांनी गुजराथमधील यच्चयावत् हिंदु समाजाला त्राहिभगवन् केलें. सहस्रावधि हिंदु स्त्रीपुरुषांना धरून गुलाम करून नेलें नि देशोदेशीं विकलें. सोमनाथाचा पत्ता पुन्हा नाहीसा झाला–पण ती मशीद नि तिचें महत्त्व वाढतच गेलें. जुन्या मशिदी तर सुरक्षित राहिल्याच, हिंदु राजांनी त्या पाडल्या नाहीत, मुसलमान सुलतानांनी अुलट त्या जुन्या मशिदींचें वैभव तर वाढविलेंच पण नवीनही अेकाहून अुंच नि विस्तृत अशा मशिदी अुभारल्या.

हिंदूंच्या धार्मिक बेशुद्धीचें, सद्गुण विकृतीचें, अंधळ्या परधर्मसहिष्णुतेपायी स्वधर्माचाच बळी देणाऱ्या आत्मघातकीपणाचें हें अेक अुदाहरण झालें. अशीं सद्गुणविकृतीचीं अुदाहरणें काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत, पावलोपावली आणि शतकोशतकें त्या मुस्लिम आक्रमणाच्या काळी घडत होतीं, तीं कुठवर सांगावीं ? तथापि आणखी अेक अुदाहरण हिंदूंच्या ' औदार्यसद्गुणाच्या ' सद्गुणविकृतीची वानगी म्हणून सांगू. सिद्धराज हा गुजराथेतील अनहिलवाडचाचा अेक पराक्रमी राजा म्हणून समजला जाअी. तो न्यायान्यायाचा मोठा भोक्ता असे. पण तो ' हिंदुराजा ' होता. अर्थात् न्याय आणि अन्याय, स्वधर्म आणि परधर्म, औदार्य

आणि अकुंचितत्व अित्यादि सर्व गुणांना देशकाल, पात्रापात्रविवेकाचा स्पर्शही न करता ते गुण स्वयमेवच सद्गुण अशा भ्रांतीने वेडावलेला होता हें सांगणें नकोच. त्याच्या राज्यात खंवायत (कँबे) जवळ अेकदा हिंदुमुसलमानांमध्ये झगडा अुत्पन्न झाला. स्वत महंमद औफी हा मुसलमान लेखक आमजवामी-अुल-हिकायत या पुस्तकात लिहितो की,

' अनहिलवाडच्याच्या राज्यात अेकदा मुसलमानांवर काफर हिंदूंनी चढाअी केली. आणि त्या दंगलीत जवळ जवळ अैंशी मुसलमान ठार मारले गेले आणि तेथील त्यांची मशीद जाळून टाकून तिचा मिनारही पाडून टाकला. तेव्हा तेथील अिमाम खतीव अल्ली याने त्या हिंदुराजाच्या स्तुतिपर अेक मोठी कविता रचून तीमध्ये मुसलमानांवर हिंदूंनी केलेल्या त्या अत्याचाराची माहिती गोविली आणि हिंदूपासून आमचा वचाव व्हावा म्हणून विनंती केली. ह्या कवितेचा आणि आवेदनाचा हिंदुराजावर अेवढा प्रभाव पडला की, तो स्वत: गुप्तरीतीने त्या दंगलीचे गांवी गेला आणि अेकंदर चौकशीनंतर त्याला मुसलमानांना हिंदूंकडून मारहाण झाली ही गोष्ट खरी आहे असें वाटलें आता राजाने अुदार असावें, न्यायदानात स्वपक्ष परपक्ष काही पाहू नये, त्यातही आपल्या हिंदुराज्यात जे बिचारे अल्पसख्य परधर्मीय राहतात त्यांना अधिक सवलती देअूनही परधर्मसहिष्णुतेचें ब्रीद पाळावें, हा राजधर्म आहे ही पोथ्यापुराणातील सर्वसाधारण वाक्यें त्याची पाठ झालेलीं होतीं. पण त्या वाक्यांना देशकालपात्राच्या कोणत्या अुपनेत्रांतून वाचलीं पाहिजेत हा गुरुमंत्र राजांना सांगणारीं चाणक्यसूत्रें मात्र त्या राजाच्या सात पिढ्यांत कोणी वाचलीं नसतील असें दिसतें. कारण त्या तथाकथित अत्याचारांविषयी हिंदूना कठोर दंड देअून त्या हिंदु राजाने मुसलमानांना अेक लक्ष बलोत्रा नाण्यांची मोठी रक्कम दिली आणि ती मशीद आणि तो मिनार पुन्हा बांधवून दिला.'

ह्या राजा जयसिंगाने पुनरुद्धार केलेल्या सोमनाथाची स्वत: पायी यात्रा केली होती. तो शिवभक्त होता आणि हिंदुधर्मावर त्याची नितान्त भक्ति असे. म्हणूनच वहुधा मुसलमानांसारख्या कट्टर नि कपटी शत्रूंना आपल्या राज्यातून हुसकून लावण्याच्या ठिकाणी किंवा त्यांना वळाने हिंदु करून घेण्याच्या ठिकाणी त्याने त्या मुसलमानांच्या मशिदी, सोमनाथाचें मंदिरच नव्हे तर गुजराथेतील शतावधि मंदिरें आणि हिंदुस्थानातील सहस्रावधि मंदिरें फोडून तोडून टाकणाऱ्या मुसलमानांच्या मशिदी हिंदूंच्या खर्चाने पुन्हा बांधून दिल्या आणि त्यांना आपल्या राज्यात परधर्मसहिष्णुतेच्या आणि औदार्याच्या हिंदुब्रीदाप्रमाणे विशेष संरक्षण दिलें.

जर महंमद गझनीच्या, महंमद घोरीच्या किंवा त्याच काळी दिल्ली माळव्यापर्यंत हिंदूंचा अुच्छेद करीत आलेल्या सुलतानांच्या राज्यातील हिंदूना त्यांचें अेखादें मंदिर पाडल्याविषयी त्या मुस्लिम अधिकाऱ्याकडे चकार शब्दाने तरी गाऱ्हाणें

सांगणें शक्य होतें का ? तसें गान्हाणें करणें हाच मुसलमानी धर्माप्रमाणे त्या काळी त्या 'काफरांचा' भयंकर अपराध ठरता आणि त्या हिंदूंतील यच्चयावत् स्त्री-पुरुषांना मुसलमानांविरुद्ध 'ब्र' अुच्चारल्यासाठी गुलाम करून आशियातील काबूल-कंदाहारच्या बाजारात विकलें गेलें असतें. अशा ह्या परधर्मीय मुसलमानांच्या मोठमोठ्या वसतींना हिंदु राजे परधर्मसहिष्णुतेचें आपलें ब्रीद म्हणून आपापल्या राज्यांतून विशेषादराने निवसू देत. आणि त्या काळच्या अितिहासात सहस्रावधि प्रकरणी हेच अल्पसंख्य, शरणार्थी म्हणून हिंदुराज्यांतून निवसलेले मुसलमान बाहेरच्या कोण्या मुसलमानांची स्वारी त्या राज्यावर येताच आतून बंड करून किंवा अितर प्रकारे त्या हिंदुराजाचा घातपात केल्यावाचून सोडीत नसत. हें त्यांच्या डोळ्यांना धडधडीत दिसत असून देश-काल-पात्राचा लवलेश विचार न करता, राजाने परधर्मसहिष्णु असावें, निःपक्षपाती असावें, अुदार असावें, हे सद्‌गुण आहेत, अितकीच ठोकळ वाक्ये पाठ करून हिंदुराजे त्या त्या सद्‌गुणांच्या फशी पडले. सद्‌गुणविकृति ती हीच !

हिंदूंच्या लक्षावधि स्त्रियांच्या मुसलमानी अपहरणाचें आणि भ्रष्टीकरणाचें भयंकर संकट

मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाच्या भयंकर संकटाचेंच अेक अुपांग असणारें आणि हिंदूंच्या संख्याबळास सारखी भीषण ओहोटी लावणारें आणखी अेक नवें संकट हिंदूवर त्या काळी जें कोसळलें तें म्हणजे त्या आक्रमक मुसलमानांची, परधर्मीय स्त्रियांचें अपहरण करणें आणि त्यांना मुसलमानी धर्मात ओढून स्वतःचें संख्याबळ वाढविणें ही अिस्लामची धर्माज्ञा आहे अशी जी राक्षसी श्रद्धा होती, ती होय. मुसलमानांच्या ह्या त्यांच्या कामविकारांना हव्यासाच वाटणाऱ्या धर्मश्रद्धेमुळे त्यांचें संख्याबळ अत्यंत वेगाने वाढत गेलें आणि हिंदूंचें त्याच प्रमाणात घटत गेलें, ही धडधडीत वस्तुस्थिति होती. शिष्टपणाच्या शेंदाड संकोचाने ही वस्तुस्थिति अुघडी करून दाखविण्यास कचरणें म्हणजे शस्त्रक्रियेच्या भयाने वैद्यापासून खरा रोग लज्जेने वा भयाने लपवून दुसऱ्याच असत्या नसत्या साध्यासुध्या रोगावर औषधोपचार घेण्यासारखी वालीश आत्मवंचना होय. हिंदूंच्या लक्षावधि स्त्रियांचें मुसलमानांनी अपहरण करण्याचा जो त्या कालखंडातील शतकोशतकें धुमाकूळ घातलेला होता त्याला नुसतें धर्मवेड म्हणून हेटाळण्याअितकी किंवा त्यास अनुल्लेखाने दुर्लक्षण्याअितकी ती गोष्ट तुच्छ नव्हती. तें वेड म्हटलें तरी त्या वेडाला अेक वळण होतें. मुसलमानांच्या धर्मवेडातील तें वळण अितकें भयंकर होतें की, त्याची अेक धर्मवेड म्हणून अुपेक्षा केल्यानेच हिंदुराष्ट्राला त्या काळी रक्तक्षयाच्या दुःसाध्य व्याधीने ग्रासून टाकलें. कारण वस्तुतः मुसलमानांचें तें 'धर्मवेड' अेक वेड नव्हतें, तर ती अेका अटळ सृष्टिक्रमाला अनुसरून अंगीकारलेली राष्ट्रीय संख्याबळ वाढविण्याची परिणामकारक पद्धति होती.

पशूच्या कळपातूनच हा सृष्टिक्रम माणसात अुतरला. गोवंशाच्या कळपात वळूंचीच संख्या जर गाअींपेक्षा मोठ्या प्रमाणात अधिक असेल तर त्या कळपाची संख्यावृद्धि झपाटयाने होणार नाही. पण ज्या कळपात गाअींची संख्या वळूंच्या संख्येहून पुष्कळ प्रमाणात अधिक आहे त्या कळपाची संख्या झपाटयाने पिढीमागून पिढी वाढत जाणारच. तोच सृष्टिक्रम मनुष्याच्या कळपाला, मनुष्य हाही मूलत: पशूसारखा अेक प्राणीच असल्याने, अितर गोष्टी समान असता, लागू आहे. अगदी प्राक्काळात, ज्याला आपण आज रानटी म्हणतो त्या वन्य अवस्थेतील मानवी टोळयांनाही संख्यावृद्धीचा हा क्रम चांगला माहीत होता. आफ्रिकेत आजही अशा तग धरून राहिलेल्या मनुष्य प्राण्यांच्या रानटी टोळया अस्तित्वात आहेत. त्या टोळयांत जेव्हा युद्धें होतात तेव्हा शत्रुपक्षीय टोळीतील पुरुष तेवढेच मारण्यात येतात. पण शत्रूच्या स्त्रियांना न मारता त्यांना विजयी टोळी हस्तगत करून आपसात वाटून घेते, आणि त्यांच्यापासून आपली संख्यावृद्धि करणें हा आपला धर्म मानते. नागा लोकातील निदान अेका टोळीविषयी तरी अशी माहिती सांगतात की त्या टोळीतील लोक त्यांच्या शत्रूपक्षीय टोळीवर जेव्हा तुटून पडतात तेव्हा तीमधील पुरुषांवर त्यांच्या धर्मयुद्धाच्या कल्पनेप्रमाणे साधे वाण मारतात पण जर त्या शत्रुपक्षीय टोळीत काही स्त्रियाही लढताना आढळल्या तर त्यांच्यावर विषारी बाण मारून त्यांना ठार मारतात. याचें कारण विचारता ते सांगतात की, शत्रूची जी स्त्री पकडता येत नाही अशी अेक स्त्री ठार मारणें हें कृत्य त्यांचे पांच पुरुष मारण्याअितकी त्या टोळीची संख्याहानि करते.

ह्याच सृष्टिक्रमाचा अवलंब अगदी सांगून सवरून अरब मुसलमानांच्या आक्रमक पण अल्पसंख्य सैन्यांनी नि सेनापतींनी अुत्तर आफ्रिकेच्या वहुसंख्य लोकांवर तुटून पडताना केला. त्या काफर लोकांना जिंकताच त्यांच्यापासून जी खंडणी घेण्यात येअी ती अर्धी पैशात आणि अर्धी स्त्रियांत मोजून घेण्यात येअी. आणि त्या खंडणी म्हणून घेतलेल्या आफ्रिकेतील स्त्रियांना मुसलमान करून आपल्या अिमानदार' सैनिकांत दहा दहा पांच पांचांनी वाटून देण्यात येअी त्या आफ्रिकी दासीपासून झालेली संतति जन्मत:च मुसलमानी वंशाची समजली गेल्याने आणि मुसलमानी वातावरणातच वाढली गेल्याने ती कट्टर मुसलमान वनत गेली. अशा प्रकारे अुत्तर आफ्रिकेत अिस्लामच्या अनुयायांची संख्या झपाटयाने वाढवीत जाणाऱ्या मुस्लिम सेनापतींना त्यांच्या धार्मिक पुढाऱ्यांनीही 'गाझी' म्हणून वहुमानाच्या पदव्या अर्पण कराव्या. विजित काफरांच्या स्त्रियांवर, त्या विजित काफराच्या, जड संपत्तीप्रमाणेच विजयी मुस्लिम सैन्याचा सर्वाधिकार स्थापन होतो हें मुसलमानांच्या धर्मयुद्धाचें अेक शासनसंमत सूत्रच ठरून गेलेलें होतें.

रावणाने सीतेला वळाने अपहरून पळवून नेल्यानंतर जेव्हा रामचंद्राने त्याच्यावर स्वारी केली तेव्हा प्रत्यक्ष युद्धाच्या आधी रावणाला त्याचे काही

हितचिंतक अुपदेश करू लागले की,'तुझ्या ह्या अन्यायापायी हें युद्धाचें भयंकर संकट ह्या आपल्या राक्षस राज्यावर ओढवलें आहे. परक्याच्या स्त्रीचें अपहरण करणें हा अधर्म आहे. तरी तू तसा अधर्म करू नकोस ! सीतेला सन्मानाने रामचंद्रांकडे परत धाड !' तेव्हा रावण रागाने अुफाळून अुत्तरला 'काय म्हणता ? परकीयांच्या स्त्रियांना अपहारिणें, बलात्कारिणें हा अधर्म आहे ? अहो– राक्षसानांम् परो धर्मः परदारविघर्षणम् ॥ दुसऱ्यांच्या स्त्रियांना पळवून बलात्कारिणें हाच तर आपणा राक्षसांचा धर्म आहे ! ' परो धर्मः ' श्रेष्ठ धर्म आहे !'

अशाच रावणी निर्लज्जतेने आणि धर्मोन्मादाने त्या काळातील हिंदुस्थानवर तुटून पडत चाललेले सारे मुसलमानी आक्रमक, हिंदु स्त्रियांचें अपहरण करणें त्यांची जडवस्तूप्रमाणेच 'लूट' करून आणि त्यांना बाटवून मुस्लिम सुलतानापासून तो सैनिकांपर्यंत त्यांना यथाप्रमाण वाटून देणें, हें आपल्या अिस्लामी धर्माचें पवित्र कर्तव्यच आहे असें समजत असत. अिस्लामचें संख्याबळ वाढविणारें तें अेक शतकृत्य आहे असें मानीत. ज्या ज्या हिंदूंच्या प्रांतावर मुस्लिम सत्ता नित्याची किंवा तात्पुरती स्थापन होअी, त्या त्या प्रांतावरील सुलतानांनी आणि निजामांनीच, नबाबांनीच तर काय, पण गावोगावच्या फाटक्या मुसलमानांनीसुद्धा तेथील हिंदूंवर जिझिया कर जसा द्रव्यासाठी लादलेला असे त्याचप्रमाणे हिंदूंच्या राजघराण्यापासून तो गावोगावातील कुलीन घराण्यांपर्यंत त्यांच्या कन्यकांना आणि प्रसंगी विवाहित स्त्रियांनाही धडधडीतपणे मागण्या घालण्याचा, नाही तर बलात्काराने पकडून नेण्याचा हा अेक अपहरण करही सांगून सवरून लादलेला असे!

त्या कालखंडात सिंधच्या स्वारीनंतर अरबांची स्वारी अशी जरी हिंदुस्थानवर झालेली नसली तरी अरबांच्या टोळ्या अितर जातींच्या मुसलमानी आक्रमकांच्या सैन्यात मिसळून हिंदुस्थानवर येतच होत्या. त्या अरबांप्रमाणेच मुसलमानांनी वाटवून टाकलेल्या अिराण, तुराण, अफगाण, तुर्क, मोंगल अित्यादि साऱ्या आशियातील राक्षसी जातींच्या जाती हिंदुस्थानवर तुटून पडलेल्या होत्या. त्यांच्या त्यांच्या सहस्रावधि सैन्यासह त्यांच्या जातीच्या तितक्या स्त्रिया काही घेअून ते हिंदुस्थानात घुसलेले नव्हते. परंतु हिंदुस्थानवर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्यांतून आलेल्या ह्या सुलतानांपासून सैनिकापयंत नि वाजारबुणग्यांपर्यंत मुसलमानांतील सहस्रावधि मुस्लिम पुरुषांनी लुटून किंवा अपहृत करून ज्या सहस्रावधि हिंदु स्त्रियांना बळकावलें होतें त्यांच्याशीच लग्नें करून किंवा त्यांना दासी करून ते मुसलमान हिंदुस्थानातच नित्याचे निवसत गेले. त्यांच्या बादशहांच्या, सुलतानांच्या किंवा नबाबाच्या 'जनानखान्यात' राजस्त्रियांपासून तो वटकीपर्यंत शतावधि हिंदु स्त्रिया ज्या कोंडलेल्या असत त्यांची तर गोष्टच सोडा, पण गावगन्ना पसरलेल्या सर्वसामान्य मुसलमानांच्या अेकेका घरी प्रत्येक पुरुषामागे तीन चार बाटविलेल्या हिंदु स्त्रिया बहुधा बाळगलेल्या असत. अशा रीतीने ह्या आक्रमक मुसलमानी समाजात

पुरुषांपेक्षा स्त्रियांचीच अशी बहुसंख्या झाल्यामुळे आणि त्यांच्यात बहुपत्नीकत्वाची धार्मिक प्रथा चालू असल्यामुळे ह्या वाहेरून आलेल्या परकीय मुस्लिमांची संख्या वाढत वाढत पिढीपिढीने सहस्रावधींची लक्षावधि झाली आणि लक्षावधींची कोट्यवधि होऊ शकली.

हेंही ध्यानात घेण्यासारखें आहे की, हिंदूंच्या ह्या वाटविलेल्या स्त्रियांच्या पोटीच सुलतान घियासुद्दीन तघलक, सुलतान फिरोझशहा तघलक, सुलतान शिकंदर लोदी अशा अनेक हिंदुद्वेषी नि राक्षसी राज्यकर्त्यांचा जन्म झाला!

मुस्लिमांनी हिंदु स्त्रियांवर केलेल्या अत्याचारात मुस्लिम स्त्रीसमाजही हिरिरीने भाग घेअी.

हिंदु-मुस्लिमांच्या शतकोशतकें चाललेल्या त्या युद्धपरंपरेच्या कालखंडात ज्या लक्षावधि हिंदु स्त्रियांना मुस्लिमांनी बळाने बाटविलें, त्या हिंदु स्त्रियांच्या तशा अघोर छळात मुस्लिम स्त्रीसमाजही शक्य त्या त्या प्रकारे हिरिरीने भाग घेत असे. येथे वैयक्तिक प्रश्न प्रस्तुत नाही, समुदायदृष्ट्या हें विधान सत्य आहे. त्या काळच्या मुस्लिम स्त्री समाजाच्या ह्या राक्षसी क्रूरतेचा स्पष्ट नि विशेष अुल्लेख निर्भीडपणे कोणत्याही अितिहास लेखकाने केलेला आमच्या आढळात आलेला नाही; यास्तव तो येथे ठळकपणे सांगणें आमचें कर्तव्य आहे.

हिंदु स्त्रिया म्हणजे काफरांच्या स्त्रिया, अुपजत बटकी, त्यांना मुस्लिम धर्मांत बळाने ओढून आणण्याच्या कार्यी शक्य तें साहाय्य देणें हें प्रत्येक मुस्लिम स्त्रीचें धार्मिक कर्तव्य आहे, अशीच राक्षसी शिकवणूक त्या काळच्या मुस्लिम स्त्रियांना मिळालेली असे. मुस्लिम पुरुषांच्या हिंदु स्त्रियांवरील अत्याचाराचा निषेध तर त्या मुस्लिम स्त्रियांतील बेगमांपासून भोकमाग्या स्त्रियांपर्यंत कोणी करीत नसेच नसे, पण मुस्लिम पुरुषांना त्या अशा प्रकरणी अुलट अुत्तेजन देत असत, गौरवीत असत, त्या स्वतः हिंदु स्त्रियांचा त्यांच्या हाती असे तो तो छळ करीत असत. मुस्लिम सुलतानांच्या, शिपायांच्या, मुल्ला मौलवींच्या किंवा गावोगावच्या मुस्लिम गावगुंडांच्या हातात सापडलेल्या हिंदु स्त्रियांना आपल्या राजमहालातील जनानखान्यात काय किंवा गावोगावच्या झोपड्यांतून काय, दडवून ठेवण्याचें, त्यांना बळाने मुस्लिम करण्याचें, दासी वा बटकीप्रमाणे रावबून घेण्याचें, मारहाण करून मुस्लिम समाजातच कोंडून ठेवण्याचें, त्यांच्या मुलीबाळींना त्यांची निर्दयपणे ताटातूट करून मुस्लिम पुरुषांत वाटून देण्याचें अशीं सारीं पुढचीं क्रूर नि दुष्ट कार्यें करण्यात त्या मुस्लिम समाजातील स्त्रीवर्गही मुस्लिम पुरुषांअितक्याच हिरिरीने झटत असे. हिंदु मुसलमानांच्या लढ्याच्या धामधुमीतच नव्हे तर अधल्यामधल्या शांतता काळातही आणि हिंदुराज्यात निवसत असतानासुद्धा, खेड्यापाड्यातील मुस्लिम स्त्रियांपर्यंत आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या हिंदु मुलीबाळींना भुलवून वा

पळवून आणून, आपल्या घरी बळाने डांबून ठेवून, किंवा गावच्या मशिदीतील मुस्लिम अड्यात पोचवून देऊन मुस्लिम समाजात त्यांना पचवून टाकणें, हें आपलें अेक अिस्लामधर्मीय नित्य कर्तव्यच आहे असें साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेला तो मुस्लिम स्त्रीसमाज समजत असे.

'स्त्रीत्वाची ढाल' हिंदूंचें शत्रुस्त्रीदाक्षिण्य

ह्या अधम राक्षसी कृत्यांसाठी कोणी हिंदु केव्हातरी त्यांचें पारिपत्य करील ह्याची लेशमात्र भीति त्या मुस्लिम स्त्रियांना बाळगण्याचें कारणच नसे. लढायांत मुस्लिमांचा जय होअून मुस्लिम राज्य आलें तर हिंदुस्त्रियांना बाटविण्याच्या ह्या कार्यासाठी त्या मुस्लिम स्त्रियांचा गौरवच होअी. पण जरी अधूनमधून हिंदु सैन्याचा जय झाला नि त्या त्या स्थळी हिंदुराज्य स्थापलें गेलें–त्या कालखंडात अशा घटना अनेकदा घडून येत–तरी फार तर मुस्लिम पुरुष समाजाला काय तो अुपद्रव होअी. लढायांत मुस्लिम पुरुषच पाडाव केले जात. पण हिंदूंनी जिंकलेल्या लढायांच्या भर धुमःकुळीतही कोणीही हिंदु सेनानी, सैनिक वा नागरिक अशा आततायी मुस्लिम स्त्रियांच्या केसासही धक्का लावणार नाही हें तो मुस्लिम स्त्रीसमाज पूर्णपणे जाणून होता. कारण शत्रुपक्षातल्या असल्या तरी आणि आततायी असल्या तरी त्या 'स्त्रिया' आहेत. यासाठी लढाअीत पाडाव झालेल्यासुद्धा मुस्लिम राजस्त्रियांना काय किंवा बटकींना काय, त्या कालच्या हिंदु विजेत्यांनी त्यांच्या त्यांच्या मुसलमानी घरी सुरक्षितपणे परत धाडून दिल्याचीं अुदाहरणें वारंवार घडत होतीं! आणि त्या कृत्याला सारा हिंदुसमाज 'पहा हो आमचा परस्त्रीदाक्षिण्याचा मद्गुण! आमच्या हिंदुधर्माचा अुदारपणा!!' म्हणून गौरवी. अुदाहरण द्यावयाचें झालें तर वानगीसाठी म्हणून अेक दोन अुदाहरणें येथे देत आहोत.

शत्रुस्त्रीदाक्षिण्यासारखी राष्ट्रघातक आणि कुपात्री योजिलेल्या प्रकाराच्या सहस्रावधिं अुदाहरणांपैकी दोन ठळक अुदाहरणें येथे दिल्यास तें अप्रस्तुत होणार नाही. छत्रपति शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सालंकृत तिच्या नवऱ्याकडे पाठविलें आणि पोर्तुगीज किल्लेदाराच्या पाडाव झालेल्या शत्रुस्त्रीसही चिमाजीअप्पाने वरील प्रकारे गौरवून तिच्या पतीकडे परत पाठविलें. ह्या दोन गोष्टींचा गौरवास्पद अुल्लेख आजही आपण शेकडो वेळा मोठ्या अभिमानाने करीत असतो. पण शिवाजी महाराजांना किंवा चिमाजीअप्पांना महंमद गझनी, घोरी, अल्लाअुद्दीन खिलजी अित्यादि मुसलमानी सुलतानांनी दाहीरच्या राजकन्या, कर्णावतीच्या कर्णराजाची कमलदेवी नि तिची स्वरूपसुंदर मुलगी देवलदेवी अित्यादि सहस्रावधि हिंदु राजकन्यांवर केलेले बलात्कार, आणि लक्षावधि हिंदुस्त्रियांची केलेली विटंबना यांची आठवण पाडाव झालेल्या मुस्लिम स्त्रियांचा गौरव करताना झाली नाही हें आश्चर्य नव्हे काय?

त्या विटंबना केलेल्या हिंदु राजस्त्रियांच्या नि बलात्कारिल्या गेलेल्या लक्षावधि हिंदुस्त्रियांनी फोडलेल्या करुण किंकाळ्यांनी नि टाहोंनी हें हिंदुस्थानचें सर्व वातावरण सूक्ष्म ध्वनीने सतत कंपित होत होतें. त्याचे प्रतिध्वनि शिवाजी किंवा चिमाजीअप्पांच्या कानावर येत नव्हते काय? त्या बलात्कारिल्या गेलेल्या लक्षावधि स्त्रिया असें म्हणत असतील की, 'आम्हांवर मुस्लिम सरदार आणि सुलतानांनी केलेले अत्याचार आणि बलात्कार, शिवाजीराजे आणि चिमाजी-अप्पा, कदापिही विसरू नका. त्या मुस्लिम सुलतानांना तुम्ही अशी दहशत बसवा की, हिंदूंचा विजय होताच मुसलमानांनी आमची ज्या प्रकारे विटंबना केली त्याच प्रकारची विटंबना मुसलमान स्त्रियांचीही केली जाअील. अशा प्रकारे हिंदु विजयी होताच मुस्लिम स्त्रियांवरही प्रत्याचार केला जातो अशी दहशत मुसलमानांना बसली की, मग पुढील मुसलमान विजेते हिंदु स्त्रियांवर अत्याचार करण्यास धज-णार नाहीत.' पण शत्रुस्त्रीदाक्षिण्याच्या सद्गुण-विकृतीपायी शिवाजी महाराज किंवा चिमाजीअप्पा तसा प्रत्याचार मुस्लिम स्त्रियांवर करू शकले नाहीत.

हिंदूच्या त्या काळच्या ह्या स्त्रीदाक्षिण्याच्या धर्मघातक धर्मसूत्रामुळेच मुस्लिम स्त्रियांनी केलेल्या लाखो हिंदु स्त्रियांच्या अनन्वित छळाचे पारिपत्यापासून त्यांचें संरक्षण करण्यास त्या मुस्लिम स्त्रियांचें 'स्त्रीत्व' ही अेकच ढाल काय ती पुरेशी ठरली !

त्यातही मुस्लिम स्त्रीला हिंदु करून घरात घेणें हें कृत्य स्वत: ते हिंदुच पाप समजत. मुस्लिम स्त्रीच्या संबंधामुळे आपण बाटून हिंदूंचे मुसलमान होअून वसू अशी हिंदूंचीच बुळगी समजूत असल्याने प्रत्यक्ष हिंदु राज्यांतून निवसत असतांना सुद्धा मुस्लिम स्त्रियांना हिंदूंकडून पळविलें जाण्याचें किंवा बळाने हिंदु केलें जाण्याचें लेशमात्र भय अुरलेलें नसे. अपवाद अगदी विरळा.

अशा परिस्थितीत शतकोंशतकें हिंदु स्त्रियांवर अनन्वित अत्याचार कर-ण्याच्या आणि त्यांना बाटविण्याच्या अधम अपराधाचा यथोचित दंड त्या मुस्लिम स्त्री समाजास केव्हाही देण्यात आलेला नव्हता. आणि म्हणूनच हिंदु स्त्रियांना बळाने बाटविण्याचा मुस्लिम स्त्री समाजाचा दुष्ट खटाटोप निर्बंधपणे त्या शतको-शतकांच्या प्रदीर्घ कालखंडात साऱ्या हिंदुस्थानात सारखा चालत राहिला.

परंतु जर मुसलमानांचीं आक्रमणें चालू झालीं त्या वेळेपासूनच मुस्लिम स्त्री-समाजाने केलेल्या हिंदु स्त्रियांच्या राक्षसी विटबनेच्या निष्कृतीसाठी हिंदु लोकही, त्यांना जे रणांगणांत मुस्लिमांवर प्रभावी जय मिळत त्या त्या वेळी तरी, त्या मुस्लिम स्त्रीसमाजाचेंही पारिपत्य कठोरपणे करीत जाते, हिंदु स्त्रियांची त्या मुस्लिम शत्रूंनी जी जी दुर्दशा केली तशी तशी दुर्दशा त्या मुस्लिम स्त्रियांचीही करते,

मुस्लिम स्त्रियांना प्रसंगी वळाने सुद्धा हिंदु करून हिंदु समाजात घरोघर पचवून टाकते तर – ? तर ह्या हिंदूच्या प्रत्याक्रमणाच्या नि प्रत्याचाराच्या संभवनीय भयाने मुस्लिम स्त्रिया मुस्लिमांचे विजय होत तेव्हा सुद्धा हिंदु स्त्रियांवर अत्याचार करण्यास कदापि धजत्या ना. भयाने चळवळ कापू लागल्या असत्या. 'आज आम्ही हिंदु स्त्रियांना बाटविल्या, छळल्या, बटकी केल्या तर अुद्या वा परवा हिंदूंना विजय मिळताच आमची नि आमच्या मुलीबाळींचीही तीच ताटातूट, विटंबना नि दुर्दशा करण्यास हिंदुसमाजही गावोगावी नि घरोघरी सोडणार नाही, सोडीत नाही, हिंदुस्त्री-पीडनाच्या भीषण दंडापासून आमची 'स्त्रीत्वाची ढाल' सुद्धा आमचें लवलेशही सरंक्षण करू शकत नाही' अशी धास्ती मुस्लिम स्त्रीसमाजाने हिंदु-मुस्लिम युद्धकाळच्या पहिल्या दोन तीन शतकांतच जर खाल्ली असती तर आमच्या लाखो निरपराध हिंदु-भगिनी-माता – कन्यकांना जी दुर्दशा पुढे शतको-शतकें भोगावी लागली ती केव्हाही भोगावी लागली नसती. आमची स्त्रीसंख्या – म्हणजेच त्यांच्या अुदरी अुत्पन्न होणाऱ्या आमच्या राष्ट्रीय संततीचें संख्याबळ घटतें ना ! अुलट, आमच्या त्या काळच्या कट्टर शत्रूंची – मुस्लिमांची स्त्रीसंख्या वाढती ना. म्हणजेच त्यांच्या अेकंदर समाजाचें संख्याबळ ठिकठिकाणी आटून गेल्यावाचून राहतें ना ! ते कां ? नि कसें ह्याचें समाजशास्त्रीय स्पष्टीकरण पृष्ठें ७२५ ते ७२६ मध्ये केलेलेंच आहे. परंतु पात्रापात्र विवेकशून्य अशा शत्रु-स्त्रीदाक्षिण्याच्या भ्रमिष्ट कल्पनेने पछाडलेल्या त्या कालखंडातील हिंदूंनी मुसलमानांच्या लाखो स्त्रिया अवश होअून त्यांच्या हाती अनेकदा आल्या असताही त्यांना त्यांच्या अत्याचारास्तव तसातसाच प्रत्याचाराचा असा कडक अुपाय योजिला नाही.

ह्या शत्रु-स्त्री-दाक्षिण्यापायीच हिंदूंची मुस्लिमांनी केलेली अधिकाधिक दुर्दशा !

पुन्हा, हिंदूंच्या ह्या देशकालपात्रविवेकशून्य शत्रु-स्त्री-दाक्षिण्याचा मुस्लिमांवर काहीतरी अनुकूल परिणाम झाला होता का ? हिंदूंच्या त्या धार्मिक 'अुदारपणामुळे' मुसलमानांना त्यांच्या परस्त्री विटंबनाच्या पापाची काहीतरी लाज वाटली का ? मुसलमानांच्या राजकन्यादिक पाडाव झालेल्या सहस्रावधि स्त्रियांना हिंदूंनी सुरक्षितपणे वारंवार त्यांच्या घरोघर परत पोचवून दिलें याविषयी मुसलमानांनी त्यांचे कधी अुपकार मानले का ? मुळीच नाही, केव्हाही नाही ! अुलट, हिंदु आपल्या ह्या शत्रु-स्त्री-दाक्षिण्याचा जेव्हा जेव्हा सद्गुण म्हणून बेजाव करू पाहात तेव्हा तेव्हा मुसलमान फिरून फिरून तेच अत्याचार करून त्यांची सक्रिय टर अुडवीत.

'जर स्त्री-दाक्षिण्याची हिंदूंना प्रतिष्ठा वाटत असती तर त्या त्यांच्या स्त्री-दाक्षिण्याच्या सद्‌गुणावर प्रथम अधिकार त्यांच्या स्वतःच्या माता, भगिनी, पत्नीचाच होता. पण आम्ही मुसलमान त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या अशा बहिणींना, बायका-मुलींना शतकोशतकें सहस्रावारी बलात्कारीत नि बाटवीत येत असताही त्या हिंदु स्त्रियांना स्त्री-दाक्षिण्यासाठी तरी आमच्या हातून सोडविण्याची छाती हिंदूंना झाली नाही. ज्याच्या अंगी आपल्या स्वतःच्या स्त्रियांना दाक्षिण्य दाखवण्याअितकेंही पौरुष नाही ते हे बुळगे हिंदु आम्हा कडव्या मुसलमानांच्या स्त्रियांना म्हणे केवळ परस्त्रीदाक्षिण्याच्या पवित्र भावनेने छळीत नाहीत, स्पर्श करीत नाहीत ! त्यांना म्हणावें प्रत्यक्ष हिंदुराज्यात निवसत असणाऱ्या कोणत्याही मुस्लिम स्त्रीकडे सुद्धा वाकड्या दृष्टीने पहा तर खरें ! कोणत्याही मुस्लिम स्त्रीकडे डोळा अुघडून पाहणाऱ्याचे ते डोळेच मुसलमान तत्काळ फोडून बाहेर काढतील, ह्या भीतीसाठी हे बुळगे हिंदु आम्हा मुस्लिमांच्या स्त्रियांना स्पर्श करू शकत नाहीत—त्यांच्या परस्त्रीदाक्षिण्याच्या व्रतामुळे नव्हे ! ' असा हिंदूंच्या ह्या स्त्रीदाक्षिण्याच्या अैटीचा अुलटा अन्वयार्थ लावून मुसलमान अधिकच शेफारत गेले. आणि त्यांचे हिंदु स्त्रियांवरील अधमाधम अत्याचार आणि लक्षावधि हिंदु स्त्रियांचीं अपहरणें हिंदूंची ह्या प्रकरणीची प्रत्याचारशून्यता पाहून अधिकच चेकाळत गेलीं.

मुस्लिम पूर्वकाळी आमचे पूर्वज शत्रु-स्त्री-दाक्षिण्याचा असा राष्ट्रघातक नि बुळगा अर्थ करीत नसत !

जो चावायला आला तो साप ठेचलाच पाहिजे मग तो नाग असो किंवा नागीण (ज्या शत्रूच्या स्त्रियांनी आमच्या माता भगिनींना बळाने वाटवून वटकी करून सोडलें त्यांचें स्त्रीत्व त्या आततायी कृत्यानेच नष्ट होत होतें. स्त्री-दाक्षिण्यावरचा त्या आततायी मुस्लिम स्त्रीसमाजाचा अधिकार तिथेच संपून आततायीपणाच्या कठोर दंडावाचून दुसऱ्या कशावरही त्यांचा अधिकार अुरत नसे. यास्तवच जेव्हा ऋषिजनांच्या हत्या करणाऱ्या नि यज्ञयाग विध्वंसिणाऱ्या राक्षसांसह ग्राटिका रामावर चालून आली. तेव्हा रामचंद्राने तत्क्षणात तिला ठार मारून टाकिली. शूर्पणखा राक्षसीण सीतेला कोवळ्या काकडीसारखी खाअून टाकण्यास जेव्हा धावली तेव्हा लक्ष्मणाने तिचें नाक कान कापून तिला परत धाडून दिली. परस्त्री-दाक्षिण्यासाठी तिची खणानारळांनी ओटी भरून नव्हे. नरकासुराने आर्यांच्या सहस्रावधि स्त्रिया पकडून त्यांच्या असुर राज्यांत (आजच्या असिरिया-मध्ये) नेल्या हें पाहताच श्रीकृष्णाने त्या असुरावर स्वारी करून त्याला युद्धात ठार मारलें. आणि हा सामरिक आणि राजकीय सूड अुगवूनच काय तें ते थांबले नाहीत तर ज्या सहस्रावधि आर्य स्त्रिया त्या असुराच्या बंदीत बळाने कोंडून राबविल्या

जात होत्या त्यांना सोडवून परत आपल्या राज्यांत आणून, सामाजिक सूडही अुगविला. त्या आर्य स्त्रिया असुरांनी बळाने बाटविल्या, भ्रष्टविल्या, अेवढ्यासाठी त्या आपल्या सहस्रावधि राष्ट्र भगिनींना 'त्याही बाटल्या' असें समजणाऱ्या पौरुषशून्य दुधखुळेपणापायी त्यांना असुरांच्याच हाती सोडून काही श्रीकृष्णाचें सैन्य परत फिरलें नाही तर अुलट त्या सहस्रावधि स्त्रियांना आपल्या राष्ट्रात परत आणून प्रतिष्ठेने स्वसमाजात संस्थापून, स्वतः 'भूपति' या नात्याने त्यांच्या पालनपोषणाचा नि संरक्षणाचा सारा भार श्रीकृष्णाने स्वतः आपल्याकडे घेतला. आपल्या राष्ट्राचें स्त्रीवर्गीय संख्याबळ घटू दिलें नाही. श्रीकृष्णाच्या ह्या 'भूपतित्वा'च्या कर्तव्यासच आपल्या पौराणिक वर्गाने लाक्षणिक अद्भुत तत्त्वाचे पूट चढवून श्रीकृष्ण त्या सहस्रावधि स्त्रियांचा 'पति' झाला, म्हणजे त्याने त्यांच्याशी लग्न लावलें अशी लोककथा पुढे वर्णिली असावी हें अुघड आहे.

वरील पौराणिक काळापुढच्या यवन, शक, हूणांच्या काळी तर त्या परकीय शत्रूच्या कोणाही सेनानीचा, राजाचा किंवा महाराजाचा लढाअीत पराजय करताना त्या परशत्रूच्या राजकन्यकांशी आमचे तत्कालीन पौरुषशाली विजेते हटकून प्रकटपणे विवाह करीत. ती परंपरा सम्राट् चंद्रगुप्त मौर्यापासून तो गुप्त सम्राटापर्यंत अव्याहत चाललेली दिसते. शालिवाहन राजेही विजित शक राजकन्यांशी विवाह करीत असत. नुसते आमचे विजेते राजेच नव्हेत तर आमच्या त्या कालच्या भारतीय सामंतांपासून तो सामान्य नागरिकापर्यंतही आमचे लोक यवन, शक, हूणांच्या परकीय स्त्रियांशी बेखटकपणें लग्नें लावीत. कारण त्या परकीय स्त्रियांना आणि त्यांच्यापासून झालेल्या संततीलाच नव्हे तर ते परकीय समाजचे समाज आमच्या धर्मात नि आमच्या संस्कृतीत आत्मसात् करून टाकण्याअितकें आमच्या राष्ट्राचें पौरुष, पचनशक्ति आणि पराक्रम हीं त्या काळापर्यंत प्रखर होतीं.

शुद्धिबंदीचे दुष्परिणाम

आपली जात नि धर्म शुद्ध रहावी ह्या भ्रामक कल्पनेने त्या काळचा हिंदु-समाज रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृति आचार आपण होअून आणि स्वधर्म म्हणून ते आचार हिंदूंना हानिकारक असूनही स्वकर्तव्य म्हणून पाळीत होता. त्याचप्रमाणे आणि त्या कार्यासाठी म्हणजे आपली जात शुद्ध रहावी याच कारणासाठी ही शुद्धिबंदी आणि तीतूनच अुद्भवलेली सिंधुबंदी, हे दोन नवीन धर्माचारही हिंदु समाज आपल्या स्वतःच्या अिच्छेने धर्मकर्तव्य म्हणून कट्टरपणे पाळू लागला. जो हिंदु अेकदा मुसलमानांकडून बळाने का होअीना पण बाटविला गेला त्यास तर काय, परंतु त्याच्या वंशजांनाही परत हिंदु धर्मात घेणें नाही. त्या पापास शुद्धीचें प्रायश्चित्तच नाही. हीच आपल्या हिंदुधर्माची आज्ञा आहे अशी भावना हिंदु

समाजाच्या रक्तातच पिढ्यान्‌पिढ्या भिनून राहिली होती. अत्यंत तुरळक अपवाद सोडता भंगी जातीपासून ब्राह्मण जातीपर्यंत, छत्रपतीपासून पत्रपतीपर्यंत शंकराचार्यांपासून ते शंखाचार्यांपर्यंत, प्रबुद्ध काय किंवा निर्बुद्ध काय हिंदुमात्रांचें ह्या शुद्धबंदीच्या धर्माचाराविषयी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अेकमत झालेलें होतें.

ह्या पायीच आपला हिंदुधर्म मुसलमानांकडून भ्रष्टविला जाऊ नये म्हणून आमच्या सहस्रावधि हिंदु स्त्रियांनी शतकोशतकें ज्या जोहाराच्या चिता धगधगत्या ठेवल्या, परधर्मीयाकडून आपले देह भ्रष्टविले जाऊ नयेत म्हणून लक्षावधि हिंदु स्त्री-पुरुषांनी निरुपाय म्हणून देशातील सर्व नद्यांतून, तळ्यांतून नि विहिरींतून अुड्या घेअून जीव दिले, स्वत:चीं लहान लहान लेकरें अुराशी धरून स्वत:स जाळून घेतलें आणि या लक्षलक्ष हिंदूनी नाना प्रकारे मुसलमानांच्या हाती सापडण्यापूर्वीच आपल्या हातानें आपले प्राणनाश करून घेतले किंवा मुसलमानांच्या हाती सापडल्यानंतरही 'मी मुसलमान होत नाही जा !' म्हणून वीर गर्जना करीत छत्रपति संभाजीसारखे गुरु तेगबहादर प्रभृति आमच्या शीख धर्मबंधूच्या अनेक गुरुवर्यांसारखे, धर्मवीर बाबावदा बैराग्याप्रमाणे मुसलमानांनी देहाच्या मांसाचे लचके तोडून तोडून हाल हाल करून ठार मारलें तरी ज्यांनी स्वधर्म सोडला नाही, त्या सर्व अपूर्व बलिदानाचें कृतज्ञ स्मरण आम्हांस झाल्यावाचून कसें राहील ? मुसलमानांच्या राक्षसी अत्याचारांच्या पायी हिंदुजातीने स्वधर्मासाठी अशा प्रकारे जें बलिदान केलें, या बलिदानानेही जातिभेद शुद्धिबंदी, सद्‌गुणविकृति अित्यादि भ्रामक कल्पनांपायी का होअीना पण बलिदान केलें, त्याहून जगताच्या अितिहासात अधिक संख्येने किंवा अधिक कट्टरपणाने क्वचितच कोण्या जातीने त्यांच्या धर्मासाठी केलें असेल ! त्या लक्षावधि हिंदूंचें बलिदानही मुसलमानांचे हातून हिंदुधर्म रक्षिण्याच्या कार्यी काही साहाय्य केल्यावाचून व्यर्थ गेलें असें नाही. त्यांच्या बलिदानाच्या त्या गाथाही आमच्या हिंदुराष्ट्राच्या पिढ्यान्‌पिढ्यांना धर्मरक्षणार्थ प्राणार्पण करण्याची स्फूर्ति देत राहिल्या हेंही काही थोडें नाही !

ह्या शुद्धिबंदीच्या नि जातिबहिष्काराच्या धर्माचारांचे राष्ट्रीय परिणाम कितीही अहितकारक ठरले असले आणि त्यासाठी त्या रूढींवर कितीही कठोर टीका करणें अवश्य असलें तरी आम्ही हिंदूंनी हें विसरता कामा नये की, त्या काळच्या हिंदु जगताने स्वजातीचें नि स्वधर्माचें पावित्र्य विटंबिलें जाऊ नये या सद्धेतूनेच ते धर्माचार अवलंबिले होते. ह्या शुद्धिबंदीपायी नि जाति बहिष्कारापायी लक्ष लक्ष हिंदूंनी अपरंपार यातना पिढ्यान्‌पिढ्या भोगल्या. पण त्यांनी जें ब्रीद स्वकीय धर्म म्हणून प्रामाणिक निष्ठेने अंगीकारलें होतें तें सोडलें नाही. मुस्लिमांच्या हातचें अन्न खाल्लें, पाणी प्यायलें, शरीरसंबंध घडला – मग तें सर्व मुस्लिमांच्या अत्त्याचाराने बलपूर्वक घडविलें का असेना – की त्या हिंदूला

आपआपल्या कुटुंबातून, समाजातून जें बहिष्कृत केलें जाअी, जन्माचें हुसकून दिलें जाअी, तें काही सुखासमाधानाने थोडेंच होतें ? जिवापलीकडे जतन करून वाढविलेलीं तीं आपलीं मुलेंलेकरें, लेकीसुना, रक्ताचे बंधुबांधव त्या अत्याचारी परशत्रूंच्या तावडीत सापडून आज बाटविले जाताच दुसऱ्या दिवशी जरी ते परत घरी आले तरी त्यांना त्यांचे आअीवाप, आप्तअिष्ट धडाधड दारें बंद करून आपला तरो धर्म बाटू नये म्हणून निरुपायाने हुसकून देत तेव्हा त्या आअीवापांच्या नि आप्तेष्टांच्या जिवास कोण यातना होत असतील, मन कसें मायेने व्याकूळ होत असेल, अेकमेकांच्या वियोगाच्या दुःखाने झुरून झुरून कितीक आअीवाप, पतिपत्नी, बंधुबांधव मरणी मरून गेले असतील तें कुठवर वर्णावें ! पण

त्यजेदेकं कुलस्यार्थे । ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ॥
ग्रामं जनपदस्यार्थे । धर्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥

अशा वीरोदात्त बुद्धीनेच काय त्या मूलतः प्रचलविलेल्या शुद्धिबंदीचे नि जातिबहिष्काराचे धर्माचार त्या काळचे कोटिकोटि हिंदु पाळीत राहिले. त्यापायी ज्या अनंत यातना त्यांनी भोगल्या त्याविषयी आम्ही हिंदूंनी कृतज्ञताच वाळगिली पाहिजे. त्या रूढींना 'स्वधर्म' मानण्यात त्यांची बुद्धि चकली, पण निष्ठा चकली नाही. औषध म्हणून चुकून विषाचा प्यालाच पाजला गेला. पण हेतु औषध देण्याचा होता, हिंदुजातीचें जीवन रक्षिण्याचा होता. अशा स्वधर्म-रक्षणाच्या प्रामाणिक हेतूने त्यांनी जीं दारुण दुःखें भोगिलीं त्याविषयी कृतज्ञतेचे दोन शब्द तरी लिहिल्यावाचून आम्हांस राहवत नाही.

राष्ट्रघातकी, भ्रमिष्ट नि भोंगळ घोषणा !

मुस्लिमांची धर्मसत्ता अुखडून टाकू शकतें असें जें साधन त्या काळी हिंदूंना केव्हा केव्हा अुपलब्ध होअू शकतें, तें म्हणजे मुसलमानांनी केलेल्या शतावधि धार्मिक आक्रमणात त्यांनी जशी सहस्रावधि हिंदूंची सरसकट कापाकापी करून अनेक नगरें नि ग्रामें निर्हिंदु करण्याचे अत्याचार केले त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा हिंदूंची शस्त्रशक्ति बलवत्तर होअी तेव्हा तेव्हा हिंदूंनीही तशीच सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणें करून मुस्लिमांचे सरसकट शिरकाण करीत साधेल तितका प्रदेश, निर्मुस्लिम करून टाकणें, हें होतें. जर हिंदूंनी असें सशस्त्र प्रत्याक्रमण केलें असतें तर त्यांना शुद्धिबंदीचा धर्माचार सुद्धा आडवा येता ना ! कारण तेथे मुसलमानांसमवेत खाण्यापिण्याचा किंवा जातिसंव्यवहाराचा प्रश्नच नव्हता. मुसलमानांना नामशेष करून टाकण्याचा काय तो प्रश्न होता. पण— ! पण शुद्धिबंदीचा हिंदुधर्माचार त्या त्या मार्गाति आडवा आला नसता तरी परधर्म सहिष्णुतेचें हिंदूंचें आत्मघातक ब्रीदच आडवें येतें ! 'सर्वधर्म समान आहेत', 'रामरहीम अेक है', 'ज्याचा धर्म त्याला पाळू द्यावा,' 'परधर्म सहिष्णुता, हीच आमची धर्माज्ञा,

हाच आमच्या हिंदु जातीचा अनन्यसामान्य गौरव ! ' अशी प्रौढी मारण्याची खोड अगदी प्राचीन कालापासून स्वत: हिंदूंनाच जडलेली होती.

पराभूत आणि हतवल अशी लक्ष लक्ष मुस्लिम प्रजा प्रवळ झालेल्या हिंदूंच्या सत्तेखाली जेव्हा केव्हा अधून मधून येत असे त्या वेळी त्या मुस्लिमांवर हिंदूंवर पूर्वी झालेल्या अत्याचारांचा सूड अुगविण्यासाठी मुसलमान हिंदूंची करीत – त्याप्रमाणे त्यांचा सरसकट शिरच्छेद करून टाकण्याची तर गोष्टच दूर, पण ते परधर्मीय आणि अल्पसंख्यांक म्हणूनच त्या मुस्लिम प्रजेला काडीअितकाही धार्मिक अुपद्रव हिंदूंकडून होत नसे. अुलट त्यांना आपल्या धर्माचा व्याप नि वैभव सुखाने वाढविता येअी; हिंदु नागरिकाप्रमाणेच नव्हे तर अधिक सौम्यपणे नि सवलतीने मुस्लिम नागरिकांना त्या त्या काळच्या हिंदूंच्या राज्यात नैर्बंधिक अधिकार भोगता येत. त्या वस्तुस्थितीलाही अितिहासाच्या पानापानाचा आधार आहे.

आणि ह्याच वस्तुस्थितीकडे मोठ्या अभिमानाने बोट दाखवून, 'पहा आमचा हिंदुधर्म किती परधर्मसहिष्णु आहे; ' सहिष्णुता हा आमच्या हिंदुधर्माचा भूषणास्पद नि विशेष सद्गुण आहे ! ' म्हणून त्या काळचे ते ते हिंदुराजे आणि सारें हिंदुजगत् मोठ्या प्रौढीने आत्मस्तुति करीत असत. ह्या गोमुखी हिंदुधर्माच्या परधर्मसहिष्णु अनुयायांकडून त्या व्याघ्रमुखी मुस्लिम धर्माच्या अनुयायांवर धार्मिक प्रत्याक्रमण होण्याची आणि त्या मुस्लिम समाजाचें नि:शेष निखंदन केलें जाण्याची लवलेशही शक्यता नव्हती हें काय सांगावयास हवें ?

परधर्मसहिष्णुता ! आणि हा सद्गुण ! जेथे तो परधर्म आपल्या स्वधर्माशी सहिष्णुतेने वागत असेल तेथे त्या परधर्माशी सहिष्णुतेने वागणें हा सद्गुण असू शकेल; परंतु ज्या मुस्लिमांचे महंमद गझनीपासूनचे सुलतानामागून सुलतान, शहा, बादशहा आपल्या ' तक्तावर ' वसताना आपल्या गौरवार्थ काफरांच्या हिंदुधर्माचा अुच्छेद करून टाकणें हाच माझा धर्म आहे, हीच माझी प्रतिज्ञा आहे, अशी शपथ घेअूनच ' तक्तावर ' वसत आले; आणि अशी अत्याचारी धार्मिक आक्रमणें हिंदूंवर अेक सहस्र वर्षे करीत आले अशा राक्षसी धर्मीयांशी परधर्मसहिष्णुतेने वागणें म्हणजे स्वधर्माच्या गळ्यावर स्वहस्ते सुरा चालविणें होतें ! ती परधर्म सहिष्णुता नसून अधर्मसहिष्णुता होती ! ती सहिष्णुता नसून षंढपणा होता ! पण हें सत्य अेक सहस्र वर्षांच्या अघोर अनुभवानंतरही त्या काळच्या हिंदूंच्या ध्यानी आलें नाही. ते तशा धर्माशीही सहिष्णुतेनेच वागणें, हा स्वधर्म समजत हिंदुजातीचा भूषणभूत नि विशिष्ट ' सद्गुण ' समजत !

हे हिंदुजाति ! तुझ्या अध:पतनास कारणीभूत झालेल्या दुर्गुणांपैकी प्रमुख दुर्गुण जर कोणते असतील तर हे तुझे ' सद्गुणच ' होत ! !

अहिंसा, दया, शत्रुस्त्रीदाक्षिण्य, शरणागत शत्रूला अभयदान, क्षमा वीरस्य भूषणम्, परधर्मसहिष्णुता अित्यादि सद्गुणांच्या देशकालपात्राचा विवेक न करता तू केलेल्या नेभळ्या नि अंधळ्या अवलंबनानेच तुझ्या त्या सहस्रवर्षव्यापी हिंदुमुस्लिम महायुद्धामध्ये धार्मिक क्षेत्रात असा भयंकर पराभव झाला. कारण

पात्रापात्र विवेकशून्य । आचरिला जरी सद्गुण ॥
तों तोचि ठरे दुर्गुण । सद्धर्म घातक ॥ १

✦ ✦ ✦

प्रकरण ५ वें

मुसलमानांच्या ह्या राक्षसी धार्मिक अत्याचारांवर रामबाण अुपाय होता अेकच ! तो म्हणजे सवाअी राक्षसी प्रत्याचार ! प्रत्याक्रमण !

मुसलमानांनी आक्रमणावर आक्रमणें करून हिंदुधर्माचा केवढा अुच्छेद मांडला आणि हिंदूंच्या लाखो स्त्रीपुरुषांना बाटवून त्यांच्या संख्याबळाची केवढी हानि केली आणि ती भरून काढण्यास हिंदुसमाज त्यांच्या जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृति अित्यादि नेभळट, धर्मभोळ्या आणि राष्ट्रघातक आचारांमुळे कसा असमर्थ झाला हें वृत्त वरील प्रकरणांतून दिलेलें आहे. जर हिंदूंच्या संख्याबळाची हानि करणाऱ्या त्यांच्या त्या शुद्धिबंदी, सद्गुणविकृति अित्यादि आत्मघातक रूढींना, ज्यांना त्या काळचा सारा हिंदु समाज आपला प्रत्यक्ष धर्म तो हाच म्हणून मानी आणि त्या आचारांना शिकविणाऱ्या त्या वेळच्या पोथ्यांनाच आपलीं 'शास्त्रें' म्हणून सन्मानी, त्या सर्व पोथीजात जंजाळाचा अुच्छेद करण्याचें धैर्य या वा त्या प्रमाणात अंगी असणारे दूरदर्शी सुधारक, राजनीतिज्ञ, धर्मज्ञ, मोठमोठे विचारवीर आणि कृतिवीर अधूनमधून का होअीनात, पण हिंदुसमाजात तसल्या अंधळ्या युगातही निघते ना आणि आपल्या प्रभावाने राष्ट्राला धर्मरक्षणाचा पराक्रमी मार्ग दाखविते ना आणि आपल्या म्लेंछ शत्रूवर त्या धार्मिक समरात मात करते ना, तर हिंदुधर्माच्या संख्याबळाचा आणि म्हणूनच त्या हिंदुराष्ट्राचाही संपूर्ण ऱ्हास झाल्यावाचून राहिला नसता.

महर्षि देवल आणि भाष्यकार मेधातिथि

अशा विचारवीरांपैकी त्या काळच्या अुपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे अगदी आज जे आपल्या तेजाने दृष्टि अचूकपणे स्वत:कडे आकर्षून घेतात ते म्हणजे महर्षि देवल आणि मनुस्मृतीचे भाष्यकार मेधातिथि हे होत. त्यांचे ग्रंथ जे आज अुपलब्ध आहेत त्यांवरून हें स्पष्टपणे सिद्ध होतें की, मुसलमानांनी सिंधमध्ये केलेल्या धार्मिक अत्याचारांच्या आणि मुसलमान पंजाबपर्यंत हिंदूंचीं राज्यें जिंकीत गेल्याच्या मध्यंतराच्या काळात हे दोन्ही ग्रंथ हिंदुराष्ट्राला त्या आपत्प्रसंगीही पराक्रमी आणि विजिगीषु असे नवीन आचार, नवीं शास्त्रें आणि नवीं शस्त्रें पुरविणारे रचिले गेले.

त्या वेळच्या स्मृत्यांतून दिलेले आचारधर्म मुसलमानांनी सिंधवर स्वारी करून हिंदु स्त्रीपुरुषांना सशस्त्र बळाने मुसलमान करण्याचें जें भयंकर आक्रमण चालू केलें त्याला तोंड देण्यास किंवा त्याचा प्रतिकार करण्यास सर्वतोपरी असमर्थ आहेत असें पाहून मुसलमानांनी हिंदुधर्मीय संख्याबळाची केलेली हानि भरून काढण्याअितका तरी आपला आचारधर्म सुधारलाच पाहिजे म्हणजेच धार्मिक अत्याचाराला धार्मिक प्रत्याचाराने तोंड दिलेंच पाहिजे असा तेजस्वी निर्धार करणारा ब्राह्मण क्षत्रियादिक कर्त्या हिंदु पुरुषांचा अेक वर्ग सिंधमध्येच प्रथमत: सघटित झाला असला पाहिजे हें देवल स्मृतीमधल्याच श्लोकांवरूनच अुघड दिसतें.

सिंधुतीरमुपासन्नम् देवलं मुनिसत्तमम् ॥

ह्या चरणावरून चालू होणाऱ्या धर्मभ्रष्टीकरणाच्या प्रकरणातूनच स्पष्ट दिसतें. सिंधुनदीचे काठी असलेल्या श्रीदेवलऋषींच्या आश्रमातील समुपस्थित हिंदु पुढाऱ्यांनी देवल ऋषींना प्रश्न केला की, 'म्लेंछांनी जो सशस्त्र धर्मछळ चालविलेला आहे, त्याला बळी पडलेल्या, बाटवून मुसलमान झालेल्या हिंदूच्या सहस्रावधि स्त्री-पुरुषांना काहीतरी प्रायश्चित्त देअून परत मुसलमानांचे हिंदु करून घेता येअील काय?' अशा त्या त्या वेळी झालेल्या चर्चेचा आणि देवल ऋषींनी आपल्या स्मृतीमध्ये अंतिमत: अधिकारयुक्तपणे दिलेल्या नव्या शुद्धीकरणाच्या अनुकूल असलेल्या आचारांचा देवल स्मृतीतील श्लोकांमधून स्पष्ट अुल्लेख केलेला आहे. त्या काळी अगदी सनातन म्हणून मानल्या गेलेल्या शुद्धिबंदीच्या हिंदूंच्या आचारांमुळे हिंदूंच्या संख्याबळाचें भयंकर नुकसान होत आहे हें पाहून तो शास्त्रीय आचारच आपत्काली शास्त्रबाह्य म्हणून ह्या नवीन स्मृतिग्रंथाच्या प्रेरकांनी, लेखकांनी नि अनुयायांनी ठरवून टाकला.

आपद्धर्म म्हणून अेक प्रगतिशील आणि केव्हाही प्रतिकूल परिस्थिति येताच तिला चटकन तोंड देअू शकणारें अेक अप्रतिम शस्त्रच आमच्या धर्म-शास्त्राच्या शस्त्रागारात ससिद्ध असे.

त्या शस्त्राचा वेळचे वेळी अुपयोग करणारा नेतृवर्ग तेवढा निघणें अवश्य असे. या हिंदु-मुस्लिम धर्मसंघर्षाच्या आपदेत सामुदायिक प्रमाणातच ते आपद्धर्म प्रथमच पुनरुज्जीवियले असते तर हिंदुधर्मच मुसलमानी धर्माचा भारतातून आमूलात् अुच्छेद करून टाकता! – जसा पराक्रमी (म्हणजे शत्रूवर आक्रमण करणाऱ्या) दिग्विजिगीषु देवांनी, आर्यांनी राक्षसांचा करून टाकला. तथापि त्या मानाने जरी तशी धार्मिक तेजस्विता हिंदुसमाजाकडून सामुदायिक रीत्या दाखविली गेली नाही तरी सिंधमधील या देवल ऋषींच्या क्रांतिकारक धर्मसुधारकांत मात्र तशी काही अंशी आढळून आली खरी. देवल ऋषींचा काळ सन ८०० ते ९०० असा मानण्यात येतो.

त्या तशा धार्मिक तेजस्वितेमुळेच देवल स्मृतीत शुद्धिबंदीच्या रूढीस वा शास्त्रास ठोकरून देअून त्यावर प्रायश्चित्तांची तोड काढली. मुसलमानांनी बळाने बाटविल्यानंतर त्या हिंदु स्त्री-पुरुषाने अमुक अेका वर्षाच्या आत जर आपण प्रायश्चित्तपूर्वक हिंदुधर्मात परत येण्याची अिच्छा प्रदर्शित केली तर त्याला अुपासादिकांची साधी व्यवहारी प्रायश्चित्तें देअून समाजाने त्यांना परत हिंदु धर्मात घ्यावें असें देवल स्मृतीत आज्ञापिलें आहे. स्त्रियांविषयी तर या स्मृतीतील अुदारता त्या कालमानाने प्रशंसनीय आहे. मुसलमानांपासून बलात्काराने बाटलेल्या किंवा त्यांच्या घरी बटकी म्हणून राबविलेल्या हिंदु स्त्रियांनाही केवळ त्यांचें मासिक ऋतुदर्शन पुन्हा झालें की त्यांना शुद्ध समजून हिंदुसमाजात पूर्णपणे सामावून घ्यावें. मुस्लिमांच्या हातून सोडविलेल्या अशा गर्भवती हिंदुस्त्रीलासुद्धा तिचें पोटातील तें 'शल्य' प्रसूतीनतर निघून जाताच तिलाही हिंदूंनी तसेंच शुद्ध मानावें की जसें अग्निपरीक्षेच्या कसोटीस अुतरलेल्या सुवर्णाच्या लगडीला समजलें जातें!

बाटलेली हिंदु स्त्री आपल्या जातीचें संख्याबळ घटू नये म्हणून शुद्ध करून परत घेण्याची अितकी आतुरता असणाऱ्या या देवलस्मृतीतही तिच्या पोटी अुत्पन्न झालेलें तें म्लेंछबीजाचें मूल मात्र शुद्ध करून हिंदु जातीत घेण्याची काहीही व्यवस्था कशी केली नाही आणि कां केली नाही, याचें मात्र आश्चर्य वाटतें. आम्हांला जेव्हा बंगालमधील हिंदूची ही अेक चाल कळली की, कुटुंबात बहिष्कार्य अशी बाल-विधवा-प्रसूतीची किंवा कुमारिका-संकराची अेखादी घटना जर घडली तर त्या कुटुंबाची प्रकट विटंबना होअू नये आणि हिंदुजातीलाही काही त्या पापाचा संपर्क भोवू नये, या सदिच्छेने शास्त्रीवर्गाने अशी तोड काढली होती की, त्या कुटुंबाने त्या गावाच्या नदीच्या पल्याड असलेल्या गावात जो मुसलमानांचा वाडा असेल त्यातील काही मुसलमानांना बोलावून आणून त्यांच्या ओटीत तें त्या हिंदु महिलेला झालेलें अधर्म्य मूल घालावें आणि त्याला नीट सांभाळावा म्हणून 'आता हें तुमचेंच मूल झालें,' असें निवेदून अर्पावें. मुसलमानांनीही आनदाने त्यांचें संख्याबल अशा हिंदुमुलाने वाढतें असें हेरून अशीं मुलें आनंदाने स्वीकारावीत. पण आपलें

बळ त्याच मानाने घटतें हें मात्र त्या बावळट, पापभीरूपणाच्या आहारी पडलेल्या हिंदूंना कळत नसे! ही रीत बंगालमध्येही देवलस्मृतीतील हें संकरज अपत्य मुसलमानांस देऊन टाकण्याच्या धर्माचारास आज्ञापिणाऱ्या असल्या कोण्यातरी स्मृतींनीच रुळविलें होतें, असें देवल स्मृतीचें हें उदाहरण पाहिल्यानंतर आमच्या ध्यानात आलें.

जातिभेद, शुद्धिबंदी किंवा शुद्धिकरणाला अनुकूल असलेल्या धीट सुधारकांचाही हा, 'संकरज मूल तेवढें म्लेंछास देऊन टाकावें' असा भ्याड पर्याय या सर्वांचें कारण म्हणजे जातीची बीजशुद्धि, काही झालें तरी, जातिक्षय झाला तरी, शुद्ध राहावी, हें आपल्या हिंदुसमाजाच्या हाडीमाशी खिळलेलें वेड होय! परंतु त्या हिंदुसमाजाला अेवढेंसुद्धा कळलें नाही की, तीच त्यांची जातिशुद्धि विपर्यासाच्या अर्थी त्यांच्याच त्या धर्माचाराने आपल्या लक्षावधि स्त्रिया जेव्हा मुसलमानांच्या हाती पडत तेव्हा तर हटकून नष्ट होअी. अितकेंच नव्हे तर ते शुद्धिबंदी आचार तसेच चालले असते तर ती हिंदु जातची जातच नष्ट होऊन गेली असती.

दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट की, देवलस्मृतीचा आज जो भाग अुपलब्ध आहे त्यात शुद्धीकरणाची जशी काहीतरी सुधारणा केली आहे तशीच जन्मजात म्लेंछांनाही हिंदु करून घेण्याची काही स्पष्ट अशी आज्ञा दिलेली नाही. त्याचेंही कारण हेंच असावें की, दुसऱ्या जातीला आपल्या जातीत घेण्याचें हिंदूंना भयंकर पाप वाटे. हिंदूंच्या आपसाआपसांतील जातीसुद्धा 'संकर' होअू नये म्हणून गीताकारांपर्यंत शास्त्रकर्ते चिंतातुर झालेले आढळतात.

सारांश असा की, देवलऋषींच्या आश्रमातील धाडसी सुधारक वर्गाने काही प्रमाणापर्यंत बळाने बाटविलेल्या हिंदु स्त्री-पुरुषांना परत हिंदु करून घेण्याची काहीतरी सोय केली. अितकी सुधारणा काय ती त्यांनी घडवून आणली. परंतु मुसलमानांच्या अत्युग्र अशा धार्मिक आक्रमणाला तसेंच अत्युग्र असें हिंदुप्रत्याक्रमण प्रतिपदी आणि प्रतिप्रकारी करण्याचें साहस त्या काळच्या स्मृतिकारांनी किंवा समरधुरंधरांनी केलेलें आढळत नाही. तथापि त्या वेळच्या परिस्थितीत मुसलमानांची राजसत्ता स्थापन झालेली असताही अितकी तरी धार्मिक क्रांतीची अठावणी देवलादिक शतावधि हिंदुनेत्यांनी केली, हेंही काही थोडें नाही.

मुसलमानांच्या सिंधवरील धार्मिक आक्रमणाला हिंदूंचा परिणामकारक अटकाव!

वर दिलेल्या देवलादिक हिंदु पुढाऱ्यांनी मुसलमानांकडून बळाने बाटविलेल्या हिंदु स्त्री-पुरुषांना परत हिंदु करण्याचा जो धर्माचार पुरस्कारिला, त्याला हिंदुसमाजाचाही आश्चर्यकारक पाठिंबा मिळाला. मूळच्या जातिवेडच्या असणाऱ्या त्या हिंदु समाजाने सहस्रावधि भ्रष्टीकृत हिंदु स्त्री-पुरुषांना परत हिंदु

करून आपल्या समाजात सामावून घेतलें. अिकडे मुसलमानांच्या धार्मिक युद्धाच्या आघाडीवर अितकी तरी अुलट चढाओ करून त्यांची दाणादाण अुडविली असताच तिकडे सिंधमध्ये मागे (पृष्ठ ६९७-६९९ वर) दिल्याप्रमाणे मुसलमानांना राजकीय समरातही हिंदूनी झोडपून काढलेलें होतें. हिंदुंनी मुसलमानांवर सिंधमध्ये हा जो विजय मिळविला आणि दोनशे अेक वर्षें तरी कासमच्या स्वारीनंतर सिंध हिंदूंच्या हातात ठेवला, ही घटना आपल्या आजपर्यंतच्या भारतीय अितिहासात कुठेही यथाप्रमाण स्पष्टपणे नि गौरवाने वर्णिलेली नाही, नुसती सुचविलेली देखील नाही. अेवढ्यासाठी देवलादिकांच्या पतितपरावर्तनादिक धार्मिक नि राजकीय चढाओचा येथे हा विशेष अुल्लेख करावा लागला.

हिंदूंच्या या धार्मिक नि राजकीय विजयाला आपल्या अितिहासाचा जरी अगदी पुसटसा आधार असला तरीही नि त्यापेक्षाही महत्त्वाचा आधार त्याला आहे नि त्यातही तो शत्रूच्याच लेखाचा आहे, तोच अुद्धृत केला म्हणजे झालें. त्या वेळेस हिंदूंनी सिंध परत जिंकून घेताना मुसलमानांची जी दाणादाण अुडविली तिने वैतागलेले मुसलमान लेखकच त्या त्यांच्या दुर्दशेचें वर्णन करताना म्हणतातः–

'सिंधमध्ये आम्हां अरबांचीं मुलें-माणसें स्त्री-पुरुष शिरजोर झालेल्या या हिंदु काफरांच्या भयाने रानोमाळ पळतात. आम्ही जिंकलेला सिंधप्रांत या काफर हिंदूंनी बहुतेक परत जिंकून त्यांचें राज्य स्थापन केलें आहे. अेक अलचाह फुजाह हा किल्ला तेवढा आमच्या पराभूत आणि निराश्रित अरब स्त्री-पुरुषांना आश्रयाचें स्थल अुरलेलें आहे, आमच्या हाती अरब झेंड्याखाली अजून तग धरून अुभा आहे. राजकीय आघाडीवरच काय ती आम्हां अरबांची अशी धुळधाण अुडाली नाही तर ज्या सहस्रावधि हिंदु काफरांना आम्ही हिंदूंच्या दाहीर राजाचा शिरच्छेद केल्यानंतरच्या शंभरअेक वर्षांत बाटविलें होतें आणि हिंदु स्त्रियांना बटकी करून मुसलमानांच्या घरोघर राबविलें होतें, त्या धार्मिक आघाडीवरही आमची अशीच धुळदाण अुडून ह्या हिंदूंत अुत्पन्न झालेल्या क्रांतिकारक नव हिंदूंच्या प्रभावी बंडाळीमुळे ते सारे अिस्लामने बाटविलेले हिंदु स्त्री-पुरुष आपल्या काफर हिंदुधर्म–मतास स्वीकारते झाले आहेत.'

भाष्यकार मेधातिथि

देवल ऋषींचा काळ साधारणपणे सन ८०० ते ९०० असा मानण्यात येतो. त्या कालाच्या आगेमागेच म्हणजे सुमारे ८५० ते ९५० या काळात मुसलमानांच्या त्या दुष्ट, धार्मिक सशस्त्र आक्रमणास हाणून पाडणारी तशीच सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण करणारी जी क्रांतीची लाट त्या काळात हिंदु समाजात अुसळली होती तिला सर्वतोपरी अुचलून धरणारा, हिंदूंना अत्यंत प्रभावी असें मार्गदर्शन, चाणक्याच्या अर्थशास्त्राने वीरवर चंद्रगुप्ताच्या पिढ्यांना जसें केलें, तसें अखिल

आर्यावर्तालि पुनरपि प्रसरणशील आणि जगत् विजिगीषु साम्राज्यवादाचो दीक्षा देअू पाहणारा अेक महनीय शस्त्रपूजक शास्त्रकार हिंदूंच्या सुदैवाने त्याच वेळी अुदय पावला, तो म्हणजे प्रत्यक्ष मनुस्मृतीवर नवभाष्य लिहिणारा भाष्यकार मेधातिथि हा होय. मेधातिथि हा हिंदूवर शत्रूंच्या चहूबाजूंनी होणाऱ्या स्वाऱ्यांमुळे गोंधळून मार्गहीन झालेल्या त्या वेळच्या म्हणजे नवव्या दहाव्या शतकातील हिंदु समाजापुढे नेटाने घुसून त्यांना प्रत्याक्रमणाचें धैर्य देअून, त्यांच्यापुढे मुसलमानांपूर्वीच्या आर्य साम्राज्यवादी विस्तारशील प्रचंड पराक्रमी चाणक्याच्या अुपदेशाचा प्रकाशस्तंभ पुन्हा उभा करू पाहणारा त्या काळातील अेकच अेक आणि क्वचित् अंतिम स्मृतिकार, धर्मपुरुष आणि लोकनेता होता. त्याचा हेतु मुसलमानांनी त्याच्या काळी हिंदूंवर केलेलीं सशस्त्र धार्मिक आक्रमणें पूर्वीच्या आर्यसाम्राज्याच्या तेजस्वी नि पराक्रमी राक्षसांशी अवलंबिलेल्या रणनीतीनेच तत्काळ हाणून पाडलीं पाहिजेत आणि पूर्वीचें आर्यावर्ताचें साम्राज्य स्थापून आर्यावर्ताबाहेरचेही दिग्विजय करून, म्लेंछराज्यें जिंकून, त्यात प्रसंगी शस्त्रबळाने आर्यधर्म संस्थापून तीं म्लेंछराज्यें आर्यावर्तीय साम्राज्यात समाविष्ट करून टाकावीत, हे ध्येय पुन्हा आपल्या समाजात जिवंतपणे सळसळविण्याचा होता. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही आर्याची वेदकालीन गर्जना त्याच्या मनुस्मृतीवरील भाष्यातून सारखी निनादत आहे.

त्या काळाचे न्यूनाधिक अेक सहस्र वर्षें आधीपासून हिंदूंच्या स्मृतीतील जातीपातींच्या, दयादाक्षिण्याच्या, विटाळवेडाच्या, आम्ही या भागातून वर अनेक वेळा अुल्लेखिलेल्या आणि पुढेही अुल्लेखू अशा, श्रुत्युक्त म्हणून सोंग घेतलेल्या आणि स्मृत्युक्त म्हणून अधिकार गाजवू पाहणाऱ्या धार्मिक आणि सामाजिक अशा ज्या नेभळट, राष्ट्रीयदृष्टिशून्य आचारांनी आमच्या हिंदुसमाजात नुसता गोंधळ घातलेला होता, तो पाहून त्या अधोगतीला रोखून ह्या नेभळट आणि बुद्दू झालेल्या हिंदुसमाजाला पुन्हा अेकदा त्या 'आर्यावर्ताचें' त्याचें मूळचें स्वरूप प्राप्त करून द्यावें ही महत्त्वाकांक्षा धरणारा हा मेधातिथि अेवढाच काय तो भाष्यकार त्या काळी झाला. म्हणून त्यानी सर्व स्मृतींचा मूळ आधार म्हणून मानल्या गेलेल्या मनुस्मृतीवरच भाष्य रचण्याचें ठरविलें. आणि विशेषत: राजकारणीय आचार म्हणून जे सांगितले आहेत त्यांना चाणक्याच्या निकषाच्या धारेवर धरलें. अशा प्रकारे अेका हातात मूळची आर्यावर्तीयांची मनुस्मृति आणि दुसऱ्या हातात चाणक्याचें साम्राज्यपूजक, दिग्विजयवादी आणि दिग्विजयक्षम अर्थशास्त्र धरून मेधातिथीने त्या काळच्या झालेल्या हिंदुसमाजाच्या नेभळट आणि बुद्दू अहिंसेमुळे पंगु झालेल्या सर्व आचारविचारांना धर्मबाह्य ठरवून टाकिलें. अशा सर्व जातीपातींच्या वेडाने पछाडलेल्या आचारांनाच नव्हे तर त्यांना जातिधर्म म्हणून सांगणाऱ्या स्मृतींनासुद्धा.

या वेदबाह्याः स्मृतयः याश्च काश्च कुदृष्टयः ।
सर्वास्तान् विपरीतार्थान् वेदविद् न समाचरेत् ॥

या अेका निषेधाच्या घावासरशी निर्माल्यवत् नि निर्जीव करून टाकलें.

बहुधा त्याच अेक दोन पिढ्यांत मुसलमानांनी धार्मिक अत्याचारांचा नि आर्यस्त्रियांवरील भ्रष्टाचारांचा निदान सिंध आणि पंजाबपर्यंत तरी जो हिंदूचा राक्षसी छळ केला आणि हिंदूंच्या कोणत्या कोणत्या पंगूपणामुळे धार्मिक नि सामाजिक जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृति प्रभृति आम्ही सविस्तरपणे वर वर्णन केलेल्याप्रमाणे, धर्मवेडामुळे आणि अप्रतिकारी नेभळटपणामुळे त्या मुसलमानांच्या धार्मिक प्रत्याचाराच्या आघाडीवर तरी मुसलमानांचा सूड घेतला नाही, नुसता प्रत्याचारसुद्धा केला नाही, हें सर्व राष्ट्रीय वृत्त मेधातिथीच्या डोळ्यांसमोर घडलें होतें. आर्यावर्त जेव्हा त्याच्या प्रगतिध्वजावर 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' अशी प्रतिज्ञा करून देशोदेशी दिग्विजय करीत चाललेला होता, तेव्हाच्या, ते त्यांच्या स्मृतीतले प्रतिध्वनि पुन्हा त्याच्या काळच्या क्षीण, पतित, पराजित आर्यराष्ट्राच्या अंगात संचारवावेत अशाच शस्त्रवादी, युद्धवादी, साम्राज्यवादी धर्माचारांच्या आज्ञा मेधातिथीने त्याच्या तेजस्वी भाष्यातून अगदी स्पष्टपणे मनूच्या मूळच्या आज्ञा म्हणून अुचलून धरिल्या. अितर सर्व 'वेदवाह्याः स्मृतयः।' त्याचीं वाक्यें त्याच्या काळच्या निर्जीव हिंदु राजांच्या तोंडी झेपणारींसुद्धा नव्हतीं, शोभणारीं नव्हतीं. सम्राट् चंद्रगुप्ताला, सम्राट् पुष्यमित्राला शोभणारीं नि पेलणारीं तीं आज्ञावचनें, शास्त्रवचनें होतीं.

मेधातिथि स्पष्टपणे सांगतात की, दुसऱ्यांच्या आणि विशेषतः संभाव्य शत्रूच्या राज्यावर स्वारी करणें हा राज्यशास्त्रात अन्याय होत नाही. किंबहुना राजाचें हेंच कर्तव्य आहे की, जोवर तो शत्रु आपल्यावर स्वारी करण्यास समर्थ झालेला नाही, तोवरच त्या म्लेंछ शत्रूवर झडप घालून, त्याला चिरडून टाकावा. अशा राजकारणात आपल्या आर्यावर्तीय राज्याचें संरक्षण हाच मुख्य राजधर्म होय! येवढ्यासाठी जे अर्धवट भाष्यकार म्हणतात की, 'परराज्यावर आणि त्यातही म्लेंछ राज्यावर स्वारी करताना आर्यराजांनी त्यांच्या हातून काहीतरी अपराध घडेतो स्वारी करू नये हें सर्व,' मेधातिथि म्हणतो, 'आत्मघाताचें, कालव्ययाचें आणि म्हणूनच राजधर्माच्या विरुद्ध आहे. शेजारचा शत्रु राजा शत्रु आहे. हाच त्याचा अपराध ! संधि सापडताच झडप घालून त्यास चिरडून टाकावा ! अितकेंच नव्हे तर जर शेजारचें अनार्य म्लेंछ राष्ट्र आपल्या आर्य राष्ट्रापेक्षा बलवत्तर होत आहेसें दिसलें तर त्याचा दिखाअू अपराध घडो वा न घडो आजूबाजूच्या शत्रुमित्रराष्ट्रांचा व्यूह रचून यशाची निश्चिति वाटताच त्या शेजारच्या अनार्य राष्ट्राविरुद्ध आपण होअून युद्ध करावें.'

त्या काळी म्हणजे नवव्या दहाव्या शतकात म्लेंछांचा प्रतिकार करण्यासाठी अुत्तर भारतात त्या वेळी श्रीमान् भोजराजा, राजपूत आणि अितर हिंदु राजांची जीं राज्यें होतीं त्या साऱ्यांची राजशक्ति अेकवटून पुन्हा अेखादें त्या पूर्वीच्या बलिष्ठ साम्राज्यासारखें, नवें अजिंक्य आणि विजिगीषु भारतीय साम्राज्य स्थापलें जावें अशी प्रबळ अिच्छा मेधातिथीच्या भाष्यातून पदोपदी व्यक्त होत आहे. या दृष्टीने त्याने राजकर्तव्यें म्हणून जीं सांगितलेलीं आहेत त्यांत स्पष्टपणे लिहिलें आहे की, म्लेंछांनी 'आर्यावर्तावर' स्वारी करण्याचे अगोदरच राजाने त्या शत्रूवर चढाअी करून गेलें पाहिजे. युद्धामध्ये अेकदा शत्रूशी शत्रु म्हणून झुंज लागली की, मग राजाने दया, माया काही अेक पाहता कामा नये. शत्रूचा चेंदामेंदाच केला पाहिजे. हवें तें निमित्त काढून त्या परकीय कपटी शत्रूला कपटानेच हाणून पाडलें पाहिजे. युद्धात नेभळेपणा, भावडेपणा आणि चालण्या-बोलण्यातील सुसंगति नि सभ्यपणा हे तथाकथित 'सद्गुणच' राष्ट्रनाशक दुर्गुण ठरतात. म्हणून राजाने त्यांच्या आहारी जाअू नये.

अशा प्रकारच्या कठोर राजनीतीचा मेधातिथीने प्रबल पुरस्कार केलेला आहे. कारण त्या काळच्या हिंदु राजांच्या भोळसट स्वभावाचा कपटी म्लेंछांनी जो वारंवार लाभ घेअून हिंदु लोकांचा अुच्छेद मांडलेला होता त्या भोळसटपणा-पासून हिंदूंना निवृत्त करण्यासाठी ती चाणक्य कूटनीति राष्ट्रास पुन्हा अेकदा शिकविणेंच अवश्य होतें मेधातिथि त्याच्या या मनूवरील भाष्यात स्पष्टपणे सांगतो की, आर्यांनी आर्यावर्तातच स्वत:ला कोंडून घेतलें पाहिजे, असें आर्यधर्म कुठेंच सांगत नाही. तर अुलट शास्त्राज्ञेचें मर्म असें आहे की, आर्यावर्ताच्या बाहेरही बल-संपन्न आर्य राजांनी म्लेंछ देशांवर स्वाऱ्या करून जर ते जिंकिले आणि तेथे आर्य धर्माचाच सर्वत्र प्रचार केला आणि आपलें आर्यराज्य स्थापिलें तर तो पूर्वीचा म्लेंछ देशही त्यापुढे आर्यदेशच मानला गेला पाहिजे आणि आर्यावर्तीय साम्राज्यातच त्याचा समावेश करून टाकला पाहिजे.

मेधातिथीच्या ह्या भाष्याप्रमाणें त्या काळी हिंदुराष्ट्रातील काही हिंदुराज्यें तरी ह्या चंद्रगुप्तकालीन चाणक्याच्या आदर्शाप्रमाणेच भरतखंडाच्या सीमांबाहेर पडून म्लेंच्छदेशांवर अशा दिग्विजयी स्वाऱ्या अक्षरश: करीत होतीं. अुत्तरेला मुसलमानांच्या आक्रमणामुळे तिकडच्या हिंदु सीमाराज्यांना यद्यपि सीमा ओलांड-ण्याचें तर बाजूसच राहो, सीमासंरक्षणाचीच निकड लागली होती, तथापि तोवर म्हणजे महंमद गझनी, हिंदुस्थानावरील त्याच्या स्वाऱ्यांनंतर मरून गेल्यावरही दीडशे वर्षें तरी दक्षिणेतील हिंदुराज्यांचें स्वातंत्र्य आणि सामर्थ्य अक्षुण्णच राहिलें होतें. त्यामुळे आर्यांच्या चंद्रगुप्तकालीन विजिगीषु राजकारणाचे प्रयोग मेधा-तिथीच्या वर दिलेल्या भाष्यातील धार्मिक प्रेरणेनुसार दक्षिणेतील हिंदुराज्यें करण्यास समर्थ होतीं. आणि म्हणूनच कलिंग, पांड्य, चेल, चोल अित्यादि

हिंदुराज्यें सिंधु ओलांडून पश्चिम समुद्रातून, दक्षिण समुद्रातून आणि पूर्व समुद्रातून मोठीं मोठीं सिंधुसैन्यें आजूबाजूच्या म्लेंछ राज्यांवर धाडून तिकडे चीनच्या आणि अिकडे आफ्रिकेच्या सागर तटापर्यंत सिंधु-दिग्विजय करीत चालले होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, अुत्तरेला महंमद गझनी आणि महंमद घोरी हिंदूंची राजधानी-मागून राजधानी, क्षेत्रांमागून क्षेत्रें, आणि देवालयामागून देवालयें अुद्ध्वस्त करीत हिंदुराजसत्तेचा पाडाव करीत असताना तिकडे दक्षिणेत अगदी त्याच कालात भुवनेश्वरासारखीं प्रचंड देवालयें अुभारलीं जात होतीं आणि राजेंद्र चौलासारखा दिग्विजयी हिंदु सम्राट् ब्रह्मदेश, पेगू, अंदमान, निकोबारसारख्या पूर्व समुद्रातील द्वीपपुंजांना आणि देशांना मोठमोठ्या जलसेनांसह आक्रमून त्या पलीकडे जाव्हा-पासून हिंदुचीन (सध्याचा अिंडोचीन) पर्यंत पूर्वी स्थापन झाल्या असलेल्या हिंदु राज्यसंघाला भेट देअून अिकडे पश्चिम समुद्रामध्ये असलेल्या लखदीव नि मालदीव द्वीपपुंजांना जिंकून सिंहलद्वीपावरही आपलें राज्य स्थापिता झाला आणि दक्षिण महासागरावर हिंदूंचा अजिंक्य ध्वज फडकविता झाला.

हीं हिंदूंचीं दिग्विजयी नौसैन्यें सिंधु नि महासिंधु ओलांडून जीं परतीरावरील देशोदेशी दिग्विजय करीत गेलीं आणि त्या देशांना आर्य साम्राज्याच्या कक्षेत आणीत गेलीं, तीं वर सांगितलेल्या मेधातिथीसारख्या चाणक्याच्या स्फूर्तीने तेजाळ-लेल्या भाष्यकाराच्या शास्त्राधारेच होय! त्यापुढच्या शंभर दोनशे वर्षांनंतरच प्रचलित झालेल्या हिंदूंच्या दुर्दिनातील सिंधुबंदीच्या पांगुळगाड्या शास्त्राधारे नव्हत.

✦ ✦ ✦

प्रकरण सहावें

अधून मधून कां होअीना, पण हिंदूंनीही मुसलमानांवर अुगविलेला धार्मिक आक्रमणाचा सूड !

मागील अेका प्रकरणाच्या शेवटी आम्ही आश्चर्य प्रकट केलें होतें की, जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृति अित्यादि हिंदुसमाजात मुरलेल्या आत्मघातक दोषांपायी हिंदुसमाज संपूर्णपणे नष्ट कसा झाला नाही? केवळ लक्षावधि हिंदूंच्या भ्रष्टीकरणावरच कसें निभलें? कारण अशा प्रकारचें मुसलमानांचें धार्मिक आक्रमण हिंदुस्थानच्या सीमेपलीकडे जेथे जेथे झालें तेथे तेथे त्या भागातील मूळ निवासीयांचा धर्म संपूर्णपणे नष्ट झालेला आहे. स्पेनपर्यंतचा अफ्रिकाखंडाचा

अुत्तर भाग आणि हिंदुस्थानाच्या सीमेपर्यंतच्या आशिया खंडातील प्रदेशात मुसलमान जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी संपूर्ण प्रदेश मुस्लिममय करून सोडले. पण हिंदुस्थानमध्ये मात्र त्यांच्या प्रयत्नास संपूर्णपणें यश आलें नाही. महंमद कासीमची आठव्या शतकातील पहिली स्वारी सोडली तरी अकराव्या शतकापासून म्हणजे महंमद गझनी नि घोरीच्या आक्रमणापासून तो अठराव्या शतकात पेशव्यांनी मोगली सत्तेचा नायनाट करीपर्यंत अेक सहस्र वर्षें मुस्लिम आक्रमकांनी हिंदूवर राक्षसी सशस्त्र आणि धार्मिक अत्याचार करून, लक्षावधि स्त्री-पुरुषांना बलात्काराने वाटवून आपलें संख्याबळ वाढविण्याचा प्रयत्न चालविला. ही वाटवाबाटवी करण्यास या भूमीतील परिस्थितीसुद्धा त्यांना अनुकूल होती. अशी हिंदूंना प्रतिकूल परिस्थिति असताही हिंदुसमाज संपूर्णपणे नष्ट करण्यात मुसलमानांना यश कां आलें नाही ?

वर जी शंका आम्ही प्रकट केली आहे तिचें निवारण्याचें प्रथम कारण हें की, हिंदूनी मुसलमानांचा राजकीय आघाडीवर केलेला पराभव. प्रथम भीम, राणाप्रताप अित्यादि राजपूत राजांनी नंतर विजयनगरच्या हिंदुराजांनी मुसलमानांची राजकीय सत्ता सशस्त्र प्रतिकार करून खिळखिळी करून टाकली होती. आणि शेवटी मराठ्यांनी पेशव्यांच्या नेतृत्वाखाली अटकेपर्यंत हिंदूंचा विजयध्वज फडकवून मुस्लिम सत्तेचा अंत केला आणि त्यामुळे राजकीय पाठिंब्यामुळे हिंदु समाज वाटविणें अशक्य झालें. मुस्लिमांच्या राजकीय आघाडीवर झालेल्या पराभवाचा अितिहास सर्वविश्रुत आहेच.

पण मुस्लिमांच्या सशस्त्र धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार करणारे आणि महर्षि देवल आणि विशेषत: भाष्यकार मेधातिथि यांनी प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानाचें आचरण प्रत्यक्षात आणणारे आणि मुस्लिमांच्या धार्मिक अत्याचारास सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणाने प्रत्याचार करणारे वीर आणि कृतिवीर पुरुष अधून मधून का होअीना, हिंदुसमाजात अुत्पन्न झाले हें दुसरें महत्त्वाचें कारण होय. नि त्यामुळेच हिंदुसमाज संपूर्णपणें नष्ट होअू शकला नाही. हिंदूंनी मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणास तशाच प्रकारे धार्मिक प्रत्याक्रमण करून कसें तोंड दिलें त्यातील वानगीसाठी शेकडों अुदाहरणांपैकी काही अुदाहरणें या प्रकरणात देण्याचें योजिलें आहे.

(१) मुसलमानांनी सिंध जिंकल्यानंतर सिंधप्रांतावर आणि त्याच्याही पलीकडच्या मुसलमानांच्या हातातील प्रदेशांवर स्वाऱ्या करून ते प्रदेश परत जिंकून घेणारा मेवाडचा प्रख्यात राणा बाप्पा रावळ याने. रजपुतांच्याच रासोंग्रथातून सांगितलें आहे त्याप्रमाणे लढाअीत पाडाव केलेल्या मुसलमान राजकुमारीशी विवाह केला होता. तिला आपल्या अंत:पुरात अितर राण्यांसहच सरमिसळ ठेविलें

होतें. अितकेंच नव्हे तर त्या गुद्धीकृत राणीपासून झालेल्या वाप्पारावळाच्या संततीला राजपुती समाजातही सूर्यवंशी म्हणूनच सन्मानिलें गेलें. पुण्याच्या परम-प्रतापी बाजीरावांना मस्तानीपासून झालेल्या संततीला स्वतः बाजीरावाचे अिच्छे-प्रमाणे हिंदुधर्मात न घेता जसें वळें वळें मुसलमानी समाजात ढकलून दिलें गेलें, तसला धार्मिक अुल्लूपणा काही या मेवाडच्या महाराण्याच्या संततीच्या प्रकरणी त्या वेळच्या हिंदूनी केला नाही.

(२) जेसलमीरच्या रावतचेचकांनी सुलतान हैबतखानाच्या सोमलदेवी नांवाच्या मुलीशी लग्न केलें आणि तिला आपल्या यादव कुलातच प्रस्थापिलें.

(३) मारवाडच्या राव मल्लीनाथ राठोडाचा ज्येष्ठ पुत्र जो कुंवर जगमल त्याने आपल्या पराक्रमाने जेव्हा माळव्याच्या मुस्लिम सुलतानाचा पराभव केला आणि माळवा परत जिंकून घेतला तेव्हा त्याने त्या मुस्लिम सुलतानाची रूपवती म्हणून जी नांवाजलेली राजकन्या होती त्या शिदोली नांवाच्या मुस्लिम तरुणीशी प्रकटपणे विवाह केला आणि तिच्यापासून झालेल्या संततीला मारवाडातील श्रेष्ठ 'जहागिरदारी' रजपुतात निर्विशेषपणे समावेशिलें गेलें.

(४) याच्याही पुढे जाअून मुस्लिम आक्रमक शतावधि हिंदु स्त्रियांचे समुदायचे समुदाय बाटवून आमच्या स्त्री समाजातील संख्याबळ भयानक प्रमाणात जें घटवीत चालले होते त्या संकटाला तशाच सामुदायिक प्रत्याक्रमणाने आळा घालणारे साहसी नि प्रसंगावधानी प्रत्याघातही साधताच हिंदुवीरांनी यत्र तत्र का होअीना, पण केलेले आढळतात. अुदाहरणार्थ मारवाडच्या रायमल राजाने ६०० मुस्लिम स्त्रियांना पाडाव करून त्या स्त्रियांना सामुदायिकपणे शुद्ध करून घेअून आपल्या निरनिराळ्या सरदारांशी त्यांचीं लग्नें प्रकटपणे लावून दिलीं.

(५) मेवाडच्या कुंभराण्यानेही मुसलमानांना परास्त करून पाडाव झालेल्या मुसलमानांतील कित्येक स्त्रियांना आपल्या राज्यात नेअून, त्यांना शुद्ध करून, त्यांची स्वराज्यांतील हिंदु सरदारासह यथारुचि लग्नें लावून दिलीं.

(६) प्रसिद्ध अितिहासकार टॉड याने लिहिलेल्या राजस्थानच्या अितिहासात अशा आणखीही घटना वर्णिलेल्या आहेत.

(७) राजपूतांच्या 'रासो' नांवाच्या काही कविताबद्ध अितिहासग्रंथांतून परत हिंदु करून घेतलेल्या मुस्लिम स्त्रियांशी लग्नें लावून त्यांच्या संततीला आपल्या हिंदु समाजात अंतर्भूत करून घेतल्याच्या घटना अुल्लेखिल्या आहेत.

(८) नेपाळचा राजा जयस्थिति ह्यानेही मुसलमानांच्या धार्मिक सशस्त्र आक्रमणाचा सूड घेतला होता. तोही मेधातिथीच्या वृत्तीचाच म्हणजे परकीय दुष्टांची नांगी ठेचून टाकावी, ह्याच घोरणाचें अवलंबन करणारा होता. जेव्हा बंगालचा नबाब शम्सुद्दीन ह्याने नेपाळवर सन १३६० च्या आगेमागे स्वारी

करून मोठा प्रलय मांडला होता, त्याने शेकडो हिंदु, बौद्ध देवळें पाडलीं आणि शेकडो हिंदु-बौद्ध लोकांस तलवारीच्या धारेने बाटविलें तेव्हा हिंदूंचा हा रणशूर राजा राज्यावर येताच त्याने मुसलमानांना नेपाळातून दे माय धरणीठाय करून घालवून दिलें, अितकेंच नव्हे तर खऱ्या हिंदु बाण्यास शोभेल असा मुसलमानांवर सूडही अुगविला. मुसलमानांनी पाडलेलीं सर्व हिंदुबौद्धांचीं देवळें पुन्हा बांधिलीं आणि बाटविलेल्या सर्व हिंदूंना आणि बौद्धांना सामुदायिकपणे शुद्ध करून घेतलें.

(९) तत्कालीन मुसलमानांनी लिहिलेल्या तवारिखादिक अितिहास ग्रंथांमध्ये तर 'आमच्या मुस्लिम स्त्रियांनाही हे काफर लोक संधि सापडताच हिंदु करून घेतात आणि त्यांचीं हिंदु समाजात लग्नें लावून देतात' म्हणून कुठे कुठे 'चोराच्या अुलट्या' या न्यायाने अगदी आक्रोश केलेला आढळतो. आमच्या हिंदूंच्या अितिहास ग्रंथांत अशा प्रकारच्या ज्या घटनांचा मागमूसही सहसा सापडत नाही, अशा काही घटना ह्या मुस्लिम ग्रंथांतूनच अवगत होअू शकतात.

(१०) अुदाहरणार्थ, 'तवारिख-अि-सोना' या मुस्लिम ग्रंथात तो लेखक म्हणतो की, 'अगदी महंमद गझनीच्या स्वाऱ्यांचा धुमाकूळ जेव्हा चाललेला होता तेव्हा सुद्धा अनहिलवाडच्या राजाने संधि सापडताच मुसलमान सैन्यातून मागे रेंगाळलेल्या अनेक तुर्की, मोंगल नि अफगाण स्त्रियांना पकडून नेलें आणि हिंदूंनी त्यांच्याशी निःशंकपणे लग्नें लाविलीं.' या ग्रंथकाराने असेंही ग्रंथिलें आहे की, 'संधि सापडताच मुसलमानी स्त्रियांचे समूहचे समूह पकडून हिंदु लोक त्यांना हिंदु करून घेतात.' अितकेंच नव्हे तर त्याने त्या हिंदूंच्या मुस्लिम महिला-शुद्धीकरण विधीविषयीही काही चटकदार माहिती दिलेली आहे.

तो म्हणतो, मुस्लिम स्त्रियांना सामुदायिकपणे हिंदु करून घेताना त्यांच्या मस्तकावर हिंदु पुरोहित काही थोडेसे जव जाळीत. नंतर त्यांना गोमय मिश्रित पाणी (अर्थात् पंचगव्य) प्यावयास देत आणि मग त्यांना संव्यवहार्य समजून त्यांच्याशी हिंदु लोक यथारुचि लग्नें लावीत काही ठिकाणी मुस्लिम स्त्रियांच्या अशा सामुदायिक हिंदुकरण प्रसंगी हे हिंदु लोक त्या स्त्रियांना अुलटी आणि रेच देत. नंतर त्यांना निरनिराळ्या हिंदु जातीत किंवा वर्गात योग्यतेप्रमाणे वाटून देत. अुत्कृष्ट स्त्रिया अुत्कृष्ट हिंदूंच्या वाट्याला येत. कुलीन स्त्रियांशी सरदार लोक लग्नें लावीत आणि बटकी किंवा मोलकरणी असलेल्या स्त्रियांशी त्या त्या वर्गाचे हिंदु लग्नें लावीत. त्या सर्व स्त्रियांची संतति त्या त्या जातीतील नि वर्गातील हिंदूत संपूर्णपणे विलीन होअून जाअी.

(११) अजमीरच्या अरुणदेवरायाने मुसलमानांचा पराभव करून त्यांना जेव्हा त्या प्रदेशातून हाकलून लाविलें तेव्हा त्यांच्या संसर्गाने अपवित्र झालेली ती भूमि शुद्ध करण्यासाठी त्याने तेथे अेक मोठा यज्ञ केला. त्याच पवित्रीकृत स्थळी

अेक विस्तीर्ण मंदिर आणि 'अनासागर' नांवाचें अेक सरोवर बांधिलें. आजूबाजूचे जे जे स्त्री पुरुष मुस्लिमांच्या सत्ताकाळी बाटलेले होते त्या सर्वांना ह्या सरोवरात स्नान घालून शुद्ध करण्यात आलें. त्या सरोवरात जो जो बाटलेला हिंदु संकल्पपूर्वक नि संस्कारपूर्वक स्नान करील तो तो शुद्ध होअून हिंदुधर्मात पुन्हा प्रवेश करू शकेल अशी स्थायी शास्त्रव्यवस्थाही लावून दिली होती.

(१२) जेसलमीरच्या अमरसिंग महाराजानेही असाच अेक मोठा यज्ञ करून अमरसागर नांवाचें सरोवर बांधिलें होतें. त्या यज्ञाच्या प्रतापे पवित्र झालेल्या त्या सरोवरात पूर्वी सिंध प्रांतात जे सहस्रावधि हिंदु स्त्री पुरुष बाटविले गेले होते त्यांचे समुदाय येअून संकल्पपूर्वक नि समंत्रक स्नान करीत आणि त्यांना शुद्ध होअून पुन्हा हिंदु धर्मात आल्याचीं धर्माधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्रें देण्यात येत.

(१३) या विषयानुरोधाप्रमाणे स्मृतिकार देवल, भाष्यकार मेधातिथि यांच्यासारखे त्या काळी मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारी आक्रमणांना रोखण्यासाठी, हिंदूंतही प्रत्याचारी प्रत्याक्रमक शक्ति संचरविणारे, क्रांतिकारक शास्त्राधार अुद्भविणारे, प्रसंगी आततायी शत्रूंचा नायनाट करण्यास अपरिहार्य असे नवे शास्त्राचारही शिकविणारे आणि प्रत्यक्ष शंकराचार्यांच्या पीठावर आरूढ होण्याचा ज्यांना सर्वोच्च अधिकार प्राप्त झाला होता त्या विद्यारण्यस्वामींचाही अुल्लेख करणें हें क्रमप्राप्त आहे. श्री विद्यारण्यस्वामींनी शृंगेरीच्या धर्मपीठाचेंच नव्हे तर स्वधर्मरक्षणार्थ मुसलमानी राज्य अुलथून स्वतंत्र हिंदुराज्य स्थापणाऱ्या सशस्त्र क्रांतिपीठाचेंही आचार्यत्व स्वीकारलें होतें. त्यांनी हिंदुराष्ट्रहितार्थ धार्मिक शुद्धीची नुसती शास्त्रोक्त व्यवस्थाच सांगितली नाही. तर तदनुषंगाने मुस्लिमांनी बळाने बाटविलेल्या हरिहर नि बुक्क ह्या तरुण वीरबंधूंचा शुद्धिसंकार प्रकटपणे घडवून आणला आणि जेव्हा त्या वीर बंधूंनी स्वपराक्रमाने शस्त्रसंगरात मुसलमानांचे पराभवामागून पराभव करून तें अिप्सित स्वतंत्र हिंदुराज्य अिसवी सन १३३६ मध्ये स्थापिलें तेव्हा त्या शुद्धीकृत हरिहराला हिंदु सम्राट् म्हणून स्वतः राज्याभिषेक करविला.

याच विद्यारण्य माधवाने गोमांतकामध्ये मुस्लिम राजसत्तेचा अुच्छेद करून धर्मभ्रष्ट केल्या गेलेल्या हिंदूंना शुद्ध करून घेण्यासाठी अेका क्षेत्रस्थळी माधवतीर्थ नांवाचें सरोवर बांधलें आणि धर्मभ्रष्ट केल्या गेलेल्या हिंदु लोकांना त्यांत समंत्रक स्नान घालून त्यांचें सामुदायिक शुद्धीकरण केलें पुढेही त्याच स्थळी तशींच शुद्धिकरणें चालावींत अशी शास्त्रव्यवस्थाही लावून दिली.

(१४) श्रीरामानुजाचार्य, त्यांचे शिष्य श्री रामानंद आणि बंगालमधील श्री चैतन्यप्रभु – अशा प्रभावी धर्मवेत्त्यांनीही म्लेंछांनी बाटविलेल्या शतावधि हिंदूंना वैष्णव धर्माची दीक्षा देअून शुद्ध करून घेतलें होतें.

(१५) मुसलमानांनी हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा सूड घेऊन स्वतंत्र हिंदूंचें राज्य स्थापन करणारे परम प्रतापी श्रीशिवछत्रपति यांनीही वजाजी निंबाळकर आणि नेताजी पालकर यांना ते वाटून मुसलमान झाले असताही शुद्ध करून परत हिंदु धर्मांत घेतलें, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे.

याला म्हणतात प्रत्याक्रमण !

(१६) औरंगजेबाने शेवटी शेवटी हिंदु धर्मावर जी अगदी निकराची नि चतुरंग दलासह चढाओ केली त्या वेळी, मराठ्यांवर स्वारी करण्यासाठी दक्षिणेकडे प्रचंड सैन्य घेऊन तो निघाला असता वाटेतील रजपुतांचा काटा समूळ काढावा म्हणून त्याने राजपुतांवर धार्मिक आक्रमण केलें. परंतु तो पुढे दक्षिणेकडे निघून जाताच त्याचा वचपा अगदी तशाच प्रत्याचाराने मुसलमानांवर काढून हिंदूंच्या मानहानीची नि विशेषत: संख्याबळाच्या हानीची झालेली भरपाओ करून घेतल्याचें अेक नांवाजण्यासारखें अुदाहरण जोधपूर संस्थानात राठोडांनी केलेल्या मुसलमानांवरील धार्मिक प्रत्याक्रमणाचें देता येतें. जोधपूरचा प्रबल महाराणा जसवंतसिंग आणि वीर दुर्गादास राठोड यांच्या नेतृत्वाखाली, औरंगजेबाने मंदिरें पाडून अुभारलेल्या मशिदीच्च काय त्या नव्हेत, तर साऱ्या मशिदी पाडून टाकून तेथे हिंदु मंदिरें अुभारण्यात आलीं. नवीनच बाटविलेल्या हिंदूंना तर काय, पण संस्थानातील शक्य तितक्या मुसलमानांना राठोडांनी सामुदायिक शुद्धि संस्काराने हिंदु करून घेतलें. मुसलमान सैन्यें मंदिरा-मंदिरांतून गोमांस फेकीत पुढे जाताच राठोडांचीं सैन्येंही मशिदीमशिदींतून डुकरें कापून जशास तसें या न्यायाने त्याचा वचपा काढीत होतीं. मुसलमानांच्या शतावधि स्त्रियांना हिंदु करून रजपूत लोकांशी त्यांचीं लग्नें लावण्यात आलीं; किंवा मुसलमान हिंदु स्त्रियांना ठेवीत त्याप्रमाणे राजपुतांच्या घरी त्यांना दासी करून ठेवण्यात आलें. हिंदूंच्या ह्या प्रत्याक्रमणाचें रौद्र स्वरूप पाहून राजपुतान्यातील सारा मुस्लिम समाज गर्भ-गळीत झाला. मुस्लिमांशी खाण्यापिण्याने तर काय पण त्यांच्या स्त्रियांना घरात घेतल्यासाठीही कोणा हिंदूवर सामाजिक बहिष्कार पडेनासा झाला. जवळ जवळ तीस चाळीस वर्षेंपर्यंत तरी हिंदूंचें हें धार्मिक प्रत्याक्रमण राजस्थानातील ह्या हिंदु संस्थानांतून वेगाने गावोगावपर्यंत चालत राहिलें, गाजत राहिलें. अर्थात् वीर दुर्गादास राठोडाची सत्ता ओसरताच हिंदुसमाजाचें हें रौद्ररूपही त्या काळी पुन्हा ओसरून गेलें हें सांगणें नकोच ! **कारण ?** कारण हेंच की त्या काळच्या जातिबद्ध हिंदुसमाजाचा स्थायीभाव धार्मिक प्रत्याक्रमण हा नसून जातिबहिष्कार हा होता.

हिंदूंच्या पडत्या काळातीलही हिंदुराष्ट्राच्या मूलभूत पुनरुत्थान-शक्तीची अेक आश्चर्यकारक घटना !

अेका वाजूला ज्या काळी हिंदूंवर महंमद गझनी, महंमद घोरींच्या आक्रमणासारखीं हिंदुधर्माला अुत्सन्न करून टाकणारीं आक्रमणें अेकामागून अेक होत होती आणि ज्या वेळी हिंदु जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुण-विकृति यांसारख्या स्वत.च्या आत्मघातक रूढीमुळे स्वत:च्याच संख्याबळाचा क्षय करीत होते, अशा वेळीही हिंदुराष्ट्राची जी युगोयुगाची अंगात मूळ धरून राहिलेली प्रचंड प्रचारशक्ति होती, (Missionary spirit and urge) तिचा स्फोटही अन्य बाजूस कसा होत राहिलेला होता आणि हिंदु राष्ट्राची राज्य-सत्ताच नव्हे तर नवीन नवीन सहस्रावधि लोकांच्या जाति हिंदुराष्ट्र, हिंदुधर्म कसा कसा आत्मसात् करीत चाललेला होता याचें अेक अुदाहरण म्हणून आसामच्या 'अहोम' जातीचें येथे देत आहोत. याच वेळी हिंदुसाम्राज्याचा विस्तार हिंदु-चीन (अिंडोचायना) पर्यंत कसा झालेला होता हें मागील प्रकरणात शेवटी अुल्लेखिलेलें आहे.

गंगासागर (बंगालचा अुपसागर), सिंधुसागर (मुंबअीचा अुपसागर) आणि तेथून दक्षिणेस पसरलेला सारा हिंदुमहासागर, आफ्रिकेच्या दक्षिण टोकापासून तो चीनच्या किनाऱ्यापर्यंत दिग्विजयी लढाअू आणि व्यापारी नौदलांतील शतावधि मोठमोठ्या हिंदुजलतरींनी आणि हिंदु जलनौकांनी जेव्हा व्यापून टाकला होता, तेव्हा सिंधुबंदीची करटी कल्पनासुद्धा आमच्या स्मृतीस सुचणें अशक्य होतें. त्याच या सिंधुविजयाचाही अुल्लेख मागे केलेलाच आहे त्याचप्रमाणे अुत्तरेकडेही महमद गझनी, महमद घोरीच्या अुत्पातांनी हिंदूंचें संख्याबळ घटत असताच अितर देशांकडे हिंदूना नवीन धार्मिक विजय मिळून हिंदुधर्मांत सहस्रश. लोकांचे समुदाय कसे समाविष्ट करीत हिंदुधर्माचा प्रचारही त्याच काळी कसा वाढत चाललेला होता ह्याविषयीही अेक तरी आश्चर्यकारक अुदाहरण म्हणून येथे आसाममधील अहोम जातीचें देत आहोत.

आसामला लागून वर्मन्, सालस्तम् आणि पाल घराण्यातील हिंदुराजांवर त्या वेळच्या आसामपलीकडच्या ज्या अनेक टोळ्या विखुरलेल्या होत्या त्यांतील शान टोळीतील अेक शाखा असलेली आणि पिढ्यान् पिढ्या लढाअूपणाचें जीवन घालविणारी 'अहोम' नांवाची जी अेक जात होती, त्या अहोमाचें दडपण आठव्या शतकापासून येअू लागलें. अखेरीस या राज्यावर १२२८ मध्ये चुकूक राजाचा अंमल चालू झाला. स्वत:स आणि आपल्या प्रजेस 'अहोम' म्हणजे अजोड– म्हणवून घेणारा हा पहिलाच राजा होय. या नव्या राज्यकर्त्यांनी मोंगलांच्या सत्तेस यशस्वी रीत्या तोंड दिलें. अहोम हें नांव त्याने आपल्या राज्याला दिलें

आसाम हें त्याचेंच भ्रष्टरूप होय असें काही विद्वानांचें मत आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, हूणांप्रमाणे किंवा शकांप्रमाणे त्या पर्वतीय अनेक टोळ्यांतून हिंदु-धर्माचीं तत्त्वें आणि आचार त्या वेळेस तरी तिकडे जिवंत असलेल्या हिंदुधर्माच्या मठपतींनी नि मठप्रचारकांनी (मिशननी आणि मिशनऱ्यांनी) अितके खोलवर रुजविले होते की त्या पर्वतीय टोळ्यांनी अितर काही टोळ्यांप्रमाणे या लढाअू शान टोळीच्या आसाम विजेत्या राजानेही आसामच्या राज्यावर येताच सन १५५४ मध्ये आपल्या टोळीतील अनेक लोकांसह हिंदु धर्माचा स्वीकार केला. हळूहळू ती सहस्रावधि लोकांची टोळीच्या टोळीच हिंदुधर्म स्वीकारती झाली. त्या राजाने आपलें पूर्वीचें शान भाषेतील नांव बदलून 'जयध्वजसिंग' हें क्षत्रि-यांतील नांव धारण केलें. त्यापुढे आलेल्या सर्व अहोम राजांनीही अशीं हिंदु नांवेंच धारण केलीं.

अटकबंदी नि सिंधुबंदी केव्हा झाली आणि कां झाली ?

वरील अहोमासारख्या शूर जातींच्या जाति जेव्हा त्या हिंदूंच्या पडत्या काळातही हिंदु धर्माचा आपणहून स्वीकार करीत होत्या, तेव्हा त्यांना हिंदु जाति संघात घेण्यास शुद्धिबंदीचा किंवा जातिभेदाचा काही अेक विरोध होण्याचा त्या काळी संभव नसे. कारण जशा अनेक हिंदूंच्या जाति हिंदुराष्ट्रात आपआपल्या शिबिरांतून पण हिंदुराष्ट्राच्या अेकाच ध्वजाखाली नांदत, त्यांतच अशा आणखी अेका जातीच्या शिबिराची नवी भर पडे. त्यांचे काही व्यवहार, काही आचार त्याच जातीत त्यांच्या पुरते पाळीत, बाकी सर्व व्यवहार हिंदुस्मृतीप्रमाणे आणि निबंधांप्रमाणे सर्वांचे मिळून मिसळून चालत. शुद्धिबंदी, मुसलमानांच्या आततायी-पणाने त्या वेळी प्रथम अुत्तरेकडेच पंजाबपर्यंत काय ती अगदी कडक अशी होत चाललेली होती. अितरत्र साऱ्या हिंदुस्थानात मुसलमानांच्या वर्चस्वाचें संकट नव्हतेंच. मुसलमान पुढे घुसलेलेच नव्हते. म्हणून शुद्धिबंदीचा प्रश्नही हिंदु-समाजापुढे तीव्रतेने आला नव्हता. अिथेच हें सांगून टाकतो की, शुद्धिबंदीतूनच अुत्पन्न झालेली अटकबंदी म्हणजे सिंधुनदी ओलांडून मुस्लिम देशात (म्लेंछ देशात) जाणें, ही हिंदु धर्मप्रमाणे अत्यंत निषिद्ध गोष्ट होय, जातिबहिष्कार्य गोष्ट होय, अशी जी आज्ञा पुढे आपल्या स्मृतींतून घुसली तीही त्या वेळच्या परिस्थितीत सनातन वर्गांनी हिंदुधर्माचें संरक्षण व्हावें, म्हणूनच साधारणतः याच काळी घातलेली असली पाहिजे. कारण महंमद गझनवीनंतरही सिंधूपलीकडचा सारा प्राचीन भारताचा भाग अगदी पारियात्र पर्वतापर्यंत (हिंदुकुश पर्वत) हिंदु राजांनी परत जिंकून घेतलेला होता, खोतानपर्यंत हिंदुराज्यें पूर्वी पसरलेलीं होती, हें आता अितिहाससिद्धच झालेलें आहे. तेव्हा सिंधुनदी ओलांडून जाणें म्हणजे हिंदु धर्मच (वैदिक अित्यादि पंथ) ओलांडून, सोडून जाणें होय, स्वतःच बाटणें होय, अशी

समजूत असणें शक्यच नव्हतें. अगदी त्या वेळपर्यंत ' कृण्वन्तो विश्वमार्यम् ' ही प्रतिज्ञा आपल्या ध्वजावर कोरलेली होती. 'आर्यधर्माच्या प्रचारार्थ साऱ्या जगभर संचार करा,' अशी स्वधर्माची अनिर्बंध आज्ञा होती.

पण पुढे जेव्हा मुसलमानांच्या आक्रमणामुळे सिंधुपलीकडचीं हिंदुराज्यें बुडालीं आणि मुसलमानांसारख्या परधर्मीयांचा अघोर छळ करणाऱ्या राक्षसी समाजाकडून सहस्रावधि हिंदु शस्त्रबळाने बाटविले जाअू लागले तेव्हाच स्वकीय शस्त्रबळाचा कोणताही आधार न अुरलेल्या अगतिकपणामुळे तेवढ्यापुरता काही तत्कालीन स्मृतींमध्ये हा अटक न ओलांडण्याचा निर्बंध मागून घालण्यात आला असला पाहिजे, हें वर दिलेल्या अितिहासावरून सिद्धच होतें. याचें आणखी अेक अत्यंतर म्हणजे आपल्या स्मार्तव्यवस्थेतच, कालाप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे राष्ट्राला हानिकारक न होतील असे धर्माचार घालण्याची, निषिद्ध करण्याची, सोय असे.

अन्ये कृतयुगे धर्माः त्रेतायां द्वापरे परे ।
अन्ये कलियुगे नृणां युगह्रासानुरूपतः ॥

त्याप्रमाणे त्या व्यवस्थेनुरूपच जेव्हा मुसलमानांच्या आक्रमणामुळे सिंधूपलीकडचीं हिंदुराज्यें बुडालीं आणि हिंदु-पारसीक अित्यादि मुस्लिमेतर धर्मीयांचा अघोर छळ करून बलात्काराने त्यांना मुसलमान करून घेणाऱ्या आततायी धर्माची राजसत्ता तिकडे स्थापन झाली आणि त्यायोगे सिंधु ओलांडून तिकडे जाणें हें स्वधर्मत्यागाअितकेंच भयंकर झालें तेव्हा कोण्याही हिंदूने सिंधुनदी ओलांडून पलीकडे जाणें हें पाप आहे, सिंधु पलीकडील भूमि ही म्लेंछस्थान समजली जावी असा आपत्कालीन नवा धर्माचार तत्कालीन स्मृतींना सांगावा लागला. येथूनच अटकबंदी चालू झाली असली पाहिजे.

भविष्य पुराणात हिंदुस्थानची नवीन सीमानिश्चिति ज्या श्लोकांत सांगितली आहे त्यात निर्दिशिलेला प्रदेश म्हणजे 'सिंधूअलीकडचा देश हेंच खरें सिंधुस्थान होय ' असें सांगणारा आम्हीच प्रथमतः हुडकून काढून प्रामुख्य दिलेला हा खालचा अैतिहासिक श्लोक–

सिंधुस्थानमिति प्राहुः राष्ट्रमार्यस्य चोत्तमम् ।
म्लेंच्छस्थानं परं सिधोः कृतं तेन महात्मना ॥

हा श्लोक ह्याच काली म्हणजे महंमद घोरीनंतरच्या कालातच स्मृतीत घातला गेला असला पाहिजे. आणि त्यातही त्या श्लोकात त्याचा हा काळही निर्देशित केला गेला आहे. ज्या त्या काळच्या हिंदुमहाराजाने ती सीमा निश्चित ठरविली आणि ज्याचा अुल्लेख 'तेन महात्मना' म्हणून श्लोकात केलेला आहे तो त्या वेळचा हिंदूंचा सर्वांत प्रमुख असा राज्यकर्ता म्हणजे महाराजा भोज हाच बहुधा असला पाहिजे.

त्या काळी सिंधुबंदीची आज्ञा मात्र स्मृतिकारांनी सोडलेली नव्हती

सिंधुनदीकडील आमच्या भरतखंडाच्या अुत्तर नि वायव्य सीमेचें असें आकुंचन करण्याचा दुःखद प्रसंग मुसलमानांच्या शस्त्रविजयामुळे जरी हिंदु-राष्ट्रावर कोसळला तरी तो त्या सीमेपुरताच काय तो मर्यादित राहिला. बाकी पंजाबच्या अलीकडील सारें भरतखंड, सारें सिंधुस्थान तिकडे नवीन नवीन जातींच्या जाति हिंदुधर्मात समाविष्ट करणाऱ्या सुदूर आसामपर्यंतच्या आणि तेथून पूर्व, पश्चिम आणि दक्षिणमहासागरावर समुद्रदलाचें स्वामित्व संपादन करून हिंदुचीनपर्यंत (अिंडोचायना) साऱ्या ओशान्य पश्चिम सीमेपर्यंत हिंदु-राष्ट्राची अप्रतिहत सत्ता गाजतच होती, नवीन नवीन विजय मिळतच होते. सिंहलद्वीप हेंही भरतखंडाचेंच अेक लहानसें बालराज्य (Baby India) होतें. कारण सिंहलद्वीपावर बहुधा भारतीय राजवंशच राज्य करीत आले होते. तीच गोष्ट लखदीव, मालदीव अित्यादि पश्चिम समुद्रातील, त्या 'रत्नाकरातील' आफ्रिकेपर्यंत पसरलेले सारे द्वीपपुंजही त्या कालापर्यंत हिंदूंच्याच सामुदायिक सत्तेखालीच होते. अशा काली सिंधुबंदी ही वैदिक धर्मानुगामी म्हणविणाऱ्या स्मृतींनी निषिद्ध ठरविलेली होती, अशी कल्पना करणें सुद्धा वेडेपणा आहे. कारण त्या भारताच्या पूर्व, पश्चिम आणि दक्षिण अशा तिन्ही समुद्रसीमांवर आधिपत्य गाजविणारे सम्राट् राजेंद्र चौलासारखे दिग्जेते वैदिक धर्मानुयायीच होते. आणि स्वतःस 'त्रिसमुद्रेश्वर' ही अुत्तरेकडील सम्राट् पदवीप्रमाणेच सर्वश्रेष्ठत्वं गाजविणारी पदवी धारण करीत असत.

मग सिंधुबंदीची बेडी हिंदूंनी स्वतः होअून स्वतःच्या पायांत ठोकून घेतली ती केव्हा आणि कां ?

ज्या कारणामुळे अुत्तरसीमेवर सिंधुनदीपलीकडच्या प्रदेशात जाणें हें धर्म-बाह्य कृत्य आहे, असें सांगणारी अटकबंदी झाली त्याच परधर्मीय लोकांच्या छळामुळे दक्षिणेकडेही आपल्या सीमेवरील तिन्ही समुद्रांतून प्रवास करणें हेंही धर्मबाह्य कृत्य आहे, असा निषेध पुढच्या पुढच्या स्मृतींतून त्या काळच्या राजकीय प्रदास्याखाली पंगु बनलेल्या हिंदुशास्त्रकारांना करणें भाग पडलें हें कारण स्मृतीं-तल्या वर दिलेल्या 'अन्ये कृतयुगे' अित्यादि श्लोकांत अप्रत्यक्षपणे गोविलेलें आहे. हिंदूंच्या मूळच्या स्मृतींत पुढच्या पुढच्या परिस्थितींना तोंड देण्यासाठी जे जे काही नवे विधिनिषेध घालावे लागले, ते घालता यावे यासाठी 'युगऱ्हासाची' आणि कलिवर्ज्य प्रकरणाची प्रयुक्ति अंगीकारली गेली. अर्थात् 'पूर्वीच्या स्मृति अपरिवर्तनीय आहेत' ह्या तत्त्वास त्या युगऱ्हासाच्या आणि कलिवर्जाच्या गृहीत

कृत्यामुळेही तसें पाहता वाध आणल्यासारखें होअीच होअी. पण तसें अप्रत्यक्षपणे न बोलता वाध आणणें हें त्या त्या काळच्या समाजहितदृष्टीने जुन्या विधिनिषेधात अवश्य ते पालट करणाऱ्या शास्त्रकारांना अपरिहार्यच होअी.

अन्ये कृतयुगे धर्माः त्रेतायां द्वापरे परे ।
अन्ये कलियुगे नृणां युगह्रासानुरूपतः ॥

हें आम्ही ह्या प्रकरणातच वर अुल्लेखिलेल्या वहुतेक स्मृतींत सापडणाऱ्या वचनावरून अुघडच होत आहे. त्या स्मार्त (Legal) पद्धतीनुसार मेधातिथीच्या किंवा देवलांच्या कालानंतरही रचलेल्या किंवा संशोधिलेल्या अगदी अर्वाचीन स्मृतीमध्येच काय ती

समुद्रयातुः स्वीकारः कलौ पंच विवर्जयेत् ॥

अशी समुद्रप्रवासाचा निषेध करणारी, समुद्रप्रवास करणाऱ्या व्यक्तीस आपल्या धर्मात, जातीत परत घेअू नये, त्याला परत घेणारा प्रायश्चित्तविधिच नाही, अशी कडक मर्यादा घातलेली आढळते. हा काल म्हणजे आपल्या पश्चिम सिंधूमध्ये ख्रिश्चनांचा आणि त्यातही विशेषतः पोर्तुगीजांचा प्रभाव जेव्हा पडू लागला आणि विशेषेकरून गोमांतकांत त्यांनी हिंदु लोकांवर सशस्त्र आक्रमणें करून त्यांच्या सहस्रावधि स्त्रीपुरुषांना अगदी मुसलमानांप्रमाणेच वलात्काराने वाटवून ख्रिश्चन करण्याचा धुमधडाका चालविला होता आणि ज्या काळी विशेषतः अरव लोकांनी आपापलीं नाविक सैन्यें अुभारून हिंदी महासागरातून पुढे जाअून जावा, सुमात्रा ते हिंदुचीन (अिंडोचायना) पर्यंत स्वाऱ्या केल्या आणि तिकडच्या हिंदुबौद्ध धर्मीय राज्यांवर मुसलमानी धर्माच्या अितरत्र झालेल्या धार्मिक आक्रमणांप्रमाणेच सशस्त्र आक्रमणें करून तिकडील त्या हिंदुबौद्ध देशांतील लोकांवर त्यांना मुसलमान करण्यासाठी राक्षसी बलात्कार केले, आणि हिंदुस्थानातील जीं चोल, पांड्य यांसारखीं पराक्रमी सिंधुसैन्यें पूर्वी तिकडील हिंदु बौद्ध राज्यांच्या साहाय्यास जात तीं समुद्रगामी सारीं हिंदुराज्येंही, सारें दक्षिण हिंदुस्थानही, मुसलमानांनी जिंकून घेतल्यामुळे अुद्ध्वस्त होअून गेलीं आणि त्या जावाप्रभृति प्रांतांकडे जाअीनाशीं झालीं तेव्हा त्या हिंदूंच्या राजकीय, सैनिक नि धार्मिक अशा अत्यत दुर्दशेने ग्रस्त झालेला, तोच हा काळ, हा आमच्या स्मृतींमध्ये सिंधुबंदीची कडक आज्ञा घालणारा असला पाहिजे. आणि त्या काळाच्या अगदी अर्वाचीन स्मृतीमध्ये हे अटकबंदीचे आणि सिंधुबंदीचे श्लोक आढळतात.

ह्यावरून आपणांला हेंही मानलेंच पाहिजे की, आपले तीनही समुद्र ओलांडून जाणाऱ्या हिंदूला जेव्हा बलात्काराने मुस्लिम किंवा ख्रिश्चन करणाऱ्या मानवी नक्राच्याच तोंडात पडावें लागे आणि त्या संकटातून त्यांची सुटका करील अशी समुद्रावरच वर्चस्व गाजविणारी हिंदुशक्ति अुरली नव्हती अशा काळी आपल्या

काही समाजधुरीणांनी निरुपायाने समुद्र ओलांडून हिंदूंनी मुळी जाऊच नये, अशी धर्माज्ञा सोडावी, हें कृत्य हिंदुसमाजाचें रक्षण करण्याच्या सद्हेतूनेच त्यांना करावें लागलें असलें पाहिजे.

ज्या देशात आपल्या धर्माच्या किंवा राष्ट्राच्या लोकांची अवहेलना होते, मुसलमान, ख्रिश्चनांसारख्या परधर्मांना आपल्या लोकांवर सशस्त्र बळाने लादलें जातें आणि अशा संकटास पायबंद करण्याचें सैनिक सामर्थ्य त्या राष्ट्रात नसतें, अशा वेळी कोणत्याही राष्ट्राला स्वहितार्थच त्या शत्रुदेशात आपल्या नागरिकांनी जाऊच नये अशी बंदी करण्यावाचून काही परिस्थितीत गत्यंतरच नसतें.

मग शुद्धिबंदी, अटकबंदी, सिंधुबंदी अित्यादि रूढींच्या बेडया हिंदूंनी आपल्या पायांत ठोकून घेण्यात चुकलें तें काय ?

ज्या भयंकर चुकीमुळे अटकबंदी, सिंधुबंदीसारखी त्या त्या काळी लाभदायक असलेलीं बंधनें स्मृतीमध्ये घातलीं जात त्या त्या काळी त्या बंधनांच्या नवीन प्रक्षिप्त श्लोकांवरही, ते श्लोक त्या स्मृतिकारांनी अितर श्लोक जसे त्या स्मृतीत सनातन धर्म म्हणून घातलेले होते त्यांचा सनातनत्वाचा अधिकार, ती पवित्रता आणि ती अनुल्लंघनीयता ह्या नवीन घालाव्या लागणाऱ्या धर्मबंधनांनाही, त्या प्रक्षिप्त श्लोकांनाही, प्राप्त व्हावी ह्या हेतूने हया 'नवीन बंदीवरील' श्लोकांपुढेही 'अेष धर्मः सनातनः' ही ठाम, परंपरागत नि स्मृतिशास्त्राची अधिकृत मुद्राही हटकून मारली जाअी—ग्रथिली जाअी. त्यामुळे ती सिंधुबंदी किंवा अटकबंदी ज्या परिस्थितीत हिंदूंना हितावहच होती, ती राष्ट्रनाशक परिस्थिति बदलल्यानंतरही तीच अटक ओलांडून अफगाणिस्थान, अिराणवर पुन्हा स्वारी करण्याअितकें हिंदूंचें सैनिक सामर्थ्य अेखाद्या प्रौढप्रताप पेशव्यांच्या किंवा रणजितसिंगाच्या काळी वाढलें असताही त्या पालटलेल्या परिस्थितीत हिंदुहितघातक ठरणारा हा बुळा धर्मभोळेपणा मात्र नष्ट होअू शकला नाही. तो जसाच्या तसाच त्या धर्मवेडया समाजाला अटक ओलांडणें म्हणजे पाप करणें ही भीति सोडू देत नसे ! म्हणजे प्रथम हितावह असलेली धार्मिक रूढी पुढे राष्ट्रास अनर्थावह झाली तरी समाज तिला तत्काल तोडण्यास शास्त्रभयाने सिद्ध होत नसे ! जेव्हा ती रूढी तोडणें हेंच राष्ट्रहिताचें म्हणजे धार्मिक दृष्टचाही पुण्यप्रद होतें तेव्हासुद्धा ती रूढी तोडणें हें पापप्रद आहे, असा अंधळा धर्माभिमान हट्ट धरीत राही ! तेव्हा हा जो 'अेष धर्मः सनातनः' चा बाअू तेवढा असले प्रक्षिप्त श्लोक लिहिताना आमचे अर्वाचीन स्मृतिकार दाखवीत, ती तेवढी भयंकर चूक झाली.

सिंधुबंदीचेंच अुदाहरण घ्या ! ह्या अर्वाचीन शास्त्रकारांनी जर स्पष्टपणे सांगितलें असतें की, "पूर्वी 'कृतयुगे' आपलें आर्यराष्ट्र समुद्र ओलांडून अनेक

द्वीपांतरांवर राज्य करण्याअितकें समर्थ होतें. अगदी राजेंद्र चौलापर्यंत आम्ही ' **त्रिसमुद्राधीशत्व** ' मिळविलें होतें. तेव्हा समुद्र ओलांडणें हें आमच्या धर्मप्रसारास नि राज्यप्रसारास अवश्यच होतें, म्हणून पुण्यप्रदच होतें; पण पुढे आता आजकाल दुर्दैवाने आपल्या राष्ट्राची नौसैन्यशक्ति आणि तें सिंधुस्वामित्व नष्ट झालें, आहे. यासाठी तें आम्हांला पुन्हा मिळविता येअील तोवर–आणि तोवरच–आमच्या लोकांनी समुद्रापलीकडील शत्रु राष्ट्रांत आणि शत्रुधर्मीय समाजात दुर्बलपणाने जाणें हें आपल्या राष्ट्रास घातक म्हणूनच पापप्रद असल्यामुळे त्या कालापुरतीच ही सिंधुबंदी आहे. 'युगह्रासानुरूपतः' याचा खरा अर्थ 'शक्तिह्रासानुरूपतः' असाच घेतला पाहिजे. 'अेष धर्मः सनातनः' या वचनाचा बागुलबुवा येवढ्यापुरताच काय तो खरा समजावा. " असें त्या कालच्या स्मृतिकारांनी स्पष्टपणें सांगितलें असतें तर ह्या अटकबंदीचे किंवा सिंधुबंदीचे जे भयानक दुष्परिणाम हिंदुराष्ट्रास भोगावे लागले, ते फार मोठ्या प्रमाणात तरी टळले असते !

परंतु कलिवर्ज्याच्या प्रकरणातच ह्या जातिभेद, शुद्धिबंदी, अटकबंदी नि समुद्रबंदी अित्यादि वस्तुतः त्या काळच्या शास्त्रकारांनी स्वतःच घातलेले परंतु त्या मुख्य स्मृतिकारांच्या नावावर ठोकून दिलेले श्लोक घातले गेल्यामुळे, त्या सर्व बंद्या कलियुग संपेपर्यंत म्हणजेच 'सनातनीपणाच्या' अर्थात् सदोदितच्या होअून बसल्या. पुढे हिंदुराष्ट्रहिताला त्या बंद्या तोडून टाकणें हेंच जरी हितावह झालें असतें आणि त्यामुळे त्या तोडून टाकण्याची शक्ति जरी हिंदूंत पुढील काळी प्रत्यक्षपणे आलीही होती, तरी त्या बंद्या 'कलौ पंच विवर्जयेत्' अशी स्मृतीची आज्ञा असल्याने कलियुग संपेपर्यंत म्हणजेच प्रलयकालापर्यंत तोडण्यास भाविक असा प्रचंड हिंदु-समाज सिद्ध होणें शक्यच नव्हतें ! पुन्हा कलियुग केव्हा चालू झालें ? किती दिवस राहणार ? नि कधी संपणार ? आणि तें कधी संपून प्रलयोत्तर सत्ययुग पुन्हा केव्हा चालू होणार ? याविषयी आपल्या शास्त्रकारांमध्ये जे विक्षिप्त मतभेद आहेत त्या ब्रह्मघोटाळ्याचा प्रश्न निराळाच आहे!

ख्रिश्चनांनी हिंदूंवर केलेल्या सशस्त्र धार्मिक आक्रमणांचा प्रारंभ !

वर ह्या ग्रंथाच्या पृष्ठ ७१३ वर ख्रिश्चन लोकांशी आम्हा हिंदु लोकांचा धार्मिक संबंध किती पूर्वीपासून आलेला होता, हें अुल्लेखिलेलेंच आहे. जेव्हा ख्रिश्चन कथांप्रमाणे सिरियामध्ये ख्रिश्चन धर्माचा त्याच्या अगदी पहिल्या अिसवी सनातच प्रचार होअू लागला, तेव्हा स्वतः जीझसला फांशी देणाऱ्या ज्यू धर्मीयांकडून त्या मूठ मूठ ख्रिश्चन लोकांचा फार छळ होअू लागला. त्या वेळीच काही ख्रिश्चन लोक टोळ्या करून ज्यांना हिंदुस्थानचे जलमार्ग माहीत होते, ते पळून हिंदुस्थानांत मलबारकडे झामोरीन (हा शब्द सामुद्रीय या शब्दाचा अपभ्रंश आहे) या हिंदुराजाच्या आश्रयार्थ आले. वस्तुतः या परकीय लोकांना त्या

'हिंदुराजाने आपल्या समुद्रतटावर विनाअट पाअूलही टाकू द्यावयाचें नव्हतें ! पण सद्गुणविकृतीच्या व्याधीने ग्रस्त झालेल्या त्या हिंदुराजाने त्या सिरियन ख्रिश्चनांना आश्रय दिला ! त्यांना अेक भूभाग वसति करावयास दिला ! ! अितकेंच नव्हे तर त्यांना ग्रामपंचायतीत अेक स्वतंत्र जाति म्हणून समान हक्काचा ताम्रपट दिला ! ! ! परंतु पुढे पुढे त्या सिरियन ख्रिश्चन लोकांना असें आढळून आलें की, आपल्या-समवेत हिंदूंना बळानेही नुसतें खाण्यापिण्यास लावलें तरीही हे हिंदुलोक वाटून ख्रिश्चन होअू शकतात ! आणि त्याप्रमाणे त्या अगदी पूर्वीच्या सिरियन ख्रिश्चन लोकांनी हिंदुस्थानात ख्रिश्चन धर्मप्रचाराची मुहूर्तमेढ रोविली ! ज्या ख्रिश्चनांच्या पहिल्या शतकात प्रत्यक्ष अिंग्लंडमध्ये ख्रिश्चन धर्माचें नांवही अैकू आलेलें नव्हतें त्या वेळी या हिंदुस्थानात हिंदु लोकांना वळाने ख्रिश्चन करण्यात येअू लागलें होतें, त्या वेळचा ख्रिश्चन प्रचाराचा अितिहास प्रत्येक हिंदूने वाचण्यासारखा आहे. आणि तसें धर्मांतर शत्रूला अगदी सोपें करणाऱ्या रूढी अिसवी सनाच्या त्या पहिल्या शतकात आमच्यांत अगदी मूलधर्माचार म्हणून रूढ झालेल्या होत्या. असें दिसतें. पण याविषयी स्थलाभावी आणि या ग्रंथातील मुख्य विषयाला तो भाग आवर्जून देणें अवश्य नसल्यामुळे तो सोडून देअू.

तथापि अेकच अत्यंत बोलकें अुदाहरण देतो. अेका गावात अेका तळ्यात पुष्कळसे हिंदुलोक तीर्थ म्हणून स्नान करीत असतात, हें पाहून त्या सिरियन ख्रिश्चनांतील काही प्रचारक (मिशनरी) पाद्र्यांच्या मनात आलें की, 'ख्रिश्चनांच्या हातचें अन्न खाताच किंवा पाणी पिताच आपण वाटतो,' असें मानणाऱ्या या हिंदूना बाटविण्याची युक्ति येथेही वापरून पाहू या ! असें मनात योजून हे ख्रिश्चन पाद्री हिंदु लोक ज्या मोठमोठ्या तळ्यांत स्नानाला जात आणि पिण्याचें पाणी भरीत अशा काही तळ्यांत अप्रसिद्धपणे जाअून त्या लोकांसह स्नानें करीत आणि पाणी पीत. नंतर काही दिवसांनी तेच पाद्री आपणहून सार्वजनिक प्रार्थनेत मोठ-मोठ्याने ओरडून सांगत कीं, 'अहो हिंदु लोकहो ! आम्ही क्रिस्ताव येशूच्या या धर्माचे अनुयायी ! हिंदु नव्हे ! त्या तुमच्या तळ्यात आम्ही तुम्हांसहच स्नानें करीत आलो आहोत, आमची पूजा प्रार्थना करून तें अिसाअी धर्माचें तीर्थ आम्ही पितो आणि तेंच तीर्थ आम्ही तुम्हा लोकांना आजवर देत आलो आणि तुम्ही तें भक्तिभावाने प्यालेले आहात. तुमच्या हिंदुधर्माप्रमाणे अिसाअी धर्माचें पाणी जो पितो, तो हिंदु जन्माचा अिसाअी होतो, अशी तुमची धर्माज्ञा आहे. तेव्हा आता तुम्ही सर्व लोक अिसाअी झालेले आहात ! तुमच्या अितर हिंदु बांधवांची फसगत होअू नये, म्हणून आम्ही सत्चरित्र लोक हें सत्य अुद्घोषित करीत आहोत !' ही बातमी हां हां म्हणता निरनिराळ्या खेडेगावांतील ख्रिश्चन आणि हिंदूंत पसरली ! मोठा गोंधळ अुडाला ! ते हिंदु बाटले, म्हणून त्यांच्यावर बहिष्कार पडू लागला. ठराविक पद्धतीने तीं तीं गांवेचि गांवें हळूहळू क्रिस्तावांचीं गांवें म्हणून अितर हिंदु समाजाकडून बहिष्कृत झालीं !

आता येथे आणखी अेक त्या वेळच्या मानव जातीलाच धर्मवेडाची व्यथा कशी निरनिराळ्या प्रकारे जडलेली होती, याचा अेक गंमत–पण प्राणघेणी गंमत म्हणून पुढीलही थोडा प्रकार सांगतो. तो असा की, हिंदुस्थानात आलेल्या त्या पहिल्या ख्रिस्ती शतकातील ख्रिस्ती लोकांतही त्यांचे निरनिराळे पंथ होतेच. त्यांची अितर देशांत खरा ख्रिस्ती प्रचार कोण अधिक करतो, याविषयी स्पर्धाही असे. त्यामुळे ज्या पंथाने नीं हिंदु गांवें वाटविलीं होतीं, त्या पंथाचा अितर पंथांच्या ख्रिश्चनांनी निषेध केला आणि त्यांच्याविषयी मत्सर वाटल्यामुळे त्यांच्या युरोप-मधल्या आचार्यांना कळविलें की, 'ते अन्यपंथीय लोक हिंदुस्थानांत मूर्ख नि वेडगळ हिंदूंना अगदी ढोंगबाजीने फसवून किरिस्ताव करतात आणि दक्षणा अुकळतात. ख्रिस्ताचीं तत्त्वें म्हणून काही अेक प्रचार ते करीत नाहीत ! येवढ्यासाठी त्यांच्या प्रचाराची संख्या खरी मानू नये ! आणि त्यांना आम्हा प्रचारकांची पत अशी बुडवू देअू नये ! ' ह्या त्या दुसऱ्या ख्रिस्ती पंथाच्या सतत कागाळीने कित्येक वर्षें ते बाटविलेले हिंदु स्वतःस किरिस्ताव म्हणवीत, परंतु तो दुसरा ख्रिस्ती पंथ त्यांना हिंदुच समजे ! त्यांच्या चर्चमध्ये त्यांना घेअीनात ! त्यांची दक्षणाही घेअीनात ! शेवटी हा प्रश्न त्या 'दक्षिणेनेच' सोडविला असावा ! कारण काही दिवसांनी युरोपमधून त्या आचार्यांची आज्ञा आली की, 'त्या सर्व बाटलेल्या हिंदूंना आता ख्रिश्चनच समजावें आणि त्या सर्वांपासून 'दक्षणा' म्हटली की ती अवश्य घ्यावी ! ' पुढे तर अगदी स्पष्टपणे सर्वच ख्रिस्ती पंथांच्या प्रचारकांनी हव्या त्या युक्तिप्रयुक्तीनेच काय पण बळाने सुद्धा–शस्त्रबळाने सुद्धा हिंदूंना ख्रिस्ती करून घणें, हेंच हिंदुस्थानांत ख्रिस्ती चर्चचें पवित्र धर्मकर्तव्य आहे, म्हणून घोषित केलें. तेव्हा पाणी पाजून हिंदूना बाटविणें, अन्न खाअू घालून त्यांना बाटविणें, अित्यादि प्राथमिक प्रयत्नांना नि वादांना अर्थच अुरला नाही !

पुढे सिरियन ख्रिश्चनांचे आणि सर्वसाधारण ख्रिश्चनांचे त्यांच्या देशातच पंथापंथाच्या अुलाढालीत वैमनस्य माजलें. युरोपातील मोठमोठ्या ख्रिश्चन पंथांतच लढाया सुरू झाल्या, त्यामुळे दोन तीन शतकें तरी ख्रिश्चन पंथाच्या प्रचारकांचें (मिशनरी) हिंदुस्थानातील कार्य जवळ जवळ बंदच पडलें. पण अिथेही ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे जे हिंदु वर सांगितल्याप्रमाणे आधीच गावोगाव बाटले होते त्याना हिंदु लोकात परत घेण्याची कोणतीही चळवळ न निघाल्यामुळे ते स्वतःला 'किरिस्ताव'च म्हणवीत राहिले आणि त्यांचा हिंदु लोकांशी असलेला नाममात्र संबंधही नष्ट झाला !

या संक्षिप्त वृत्तान्तांत यानंतर सांगण्यासारखी ख्रिश्चन धर्माच्या प्रचाराची चळवळ म्हणजे साधारणतः पंधराव्या शतकात पोर्तुगीज लोकांनी गोमांतक जिंकून घेतल्यानतर आणि समुद्रमार्गे मलबार येथेही ख्रिस्ती केंद्रें अुघडल्यानंतर वेगाने अुसळली. त्यांचा हिंदु लोकांना वाटेल ते अत्याचार करून ख्रिस्ती करणारा हिंदु-

स्थानातील पहिला प्रबळ मठपति म्हणजे सेंट (संत) झेव्हिअर हा होय. तो १५४० चे संधीस गोमांतकात आला. त्याने ख्रिस्ती धर्मप्रचाराचा अटोकाट प्रयत्न काही वर्षं केल्यानंतर त्याच्या त्या प्रचाराच्या आड येणाऱ्या अडथळ्याविषयी पोर्तुगालच्या बादशहाला अनेक पत्रें लिहिलीं. त्यातील अेका पत्रात तो म्हणतो की—

'तुमचे हिंदुस्थानांतील शासनीय अधिकारी स्वतः ख्रिस्ती असताही आपल्या धर्मप्रसाराच्या आज्ञांना ते धाब्यावर वसवीत आहेत. ते आपल्या चैनीत दंग असून साधेल त्या अुपायाने लक्षाधीश होअू पाहत आहेत. द्रव्य हाच त्यांचा देव आहे. खऱ्या देवाच्या सेवेस ज्या आम्ही मिशनऱ्यांनी सारें आयुष्य वाहून दिलेलें आहे, त्यास ते लवलेशही साह्य करीत नाहीत. हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्मप्रचारास आम्हांला जो मुख्य अडथळा होतो आहे तो येथील ब्राह्मण लोकांचा होय! ते आमच्या धर्मप्रचारास पुढे जाअू देत नाहीत. सहस्रावधि सामान्य हिंदु लोक आम्ही वाटवीत जातो, पण मागे वळून पाहतो तों हे ब्राह्मण गुप्तपणे मांडवी नांवाच्या नदीच्या तीरावर त्या सर्वांना नेअून त्यांस सांगतात की 'या नदीत स्नान करून आम्ही सांगतो ते श्लोक म्हणा, म्हणजे तुमचें ख्रिश्चन होण्यातलें पाप धुअून जाअून तुम्ही पुन्हा हिंदूंचे हिंदु व्हाल!' अशा थापा मारून हे ब्राह्मण लोक त्या बाटलेल्या हिंदूंपैकी अनेकांना वरील स्नानाप्रमाणेच अितरही अनेक प्रकारे फसवून शुद्ध करून घेतात. या ब्राह्मणांना वचक घालण्याचा प्रयत्न आम्ही करतो. पण त्यास ते भीक घालीत नाहीत. आणि तुमचे अिकडचे शासनिक पोर्तुगीज अधिकारी त्या ब्राह्मणांना आम्ही सांगतो तशा अत्यंत कडक शिक्षा देत नाहीत.'

सेंट झेव्हिअर प्रभृति ह्या ख्रिस्ती पाद्र्यांच्या सतत हाकाटीला कंटाळून पोर्तुगालच्या बादशहाने आपल्या शासनीय अधिकाऱ्यास ख्रिस्ती धर्मप्रचाराच्या कार्यात लवलेशही हयगय होता कामा नये, नाहीतर तुमचीच सगळी संपत्ति छिनावली जाअील, अशा कडक आज्ञाही मधून मधून सोडल्या; तरीही तेवढ्याने समाधान न होता हा सेंट झेव्हिअर आपल्या पोर्तुगालच्या बादशहाला धाडलेल्या दुसऱ्या अेका पत्रात लिहितोच की, "आमचे हिंदूंना ख्रिस्ती करण्याचें कार्य अतिशय वेगाने फैलावत आहे, आमच्या प्रचारकाला पाहताच हिंदूच्या खेड्यापाड्यांत आमच्या भयाने पळापळी सुरू होते, अितके कडक अुपाय आम्ही जे हिंदु ख्रिस्ती होणार नाहीत त्यांना दंड करताना योजतो! सामान्य हिंदु खेडवळांचीच गोष्ट काय! पण आम्ही पकडून, बंदिगृहात टाकून, सैतानाने पछाडलेल्या त्या हिंदूच्या मोठमोठ्या देवस्थानांच्या आचार्यांची, मठाध्यक्षांची आणि नगरातील श्रीमंत हिंदूची शारीरिक माराखाली जी लांडगेतोड करतो, तिच्या भयामुळे अनेक ठिकाणचे हे हिंदूंच्या देवालयांचे पुजारी, त्यांच्या मूर्ति घेअून गुप्त रूपाने गोमांतकाबाहेर पळून जात आहेत! त्यांची सारी संपत्ति आम्ही हिरावून घेतो, मूर्ति फोडून टाकतो, देवालयें पाडून टाकतो, चाबकांच्या फटकाऱ्याखालीं त्यांचीं

शरीरें सोलून काढतो, आम्हांला त्या कामात आता अुदंड यश येत चाललें आहे ! फार काय ! जर का हे ब्राह्मण लोक तेवढे माझ्या मार्गात आडवे येते ना, तर मी साऱ्या हिंदुस्थानभर बोलता बोलता ख्रिश्चन धर्माचा प्रसार करू शकलो असतो !" सेंट झेव्हिअरची त्यानंतरची अितर अनन्वित कृत्यें आणि हिंदु लोकांवर त्याने आणि त्याच्या नंतरच्या आलेल्या शेकडो पोर्तुगीज पाद्र्यांनी त्याच-प्रकारच्या हिंदूंच्या केलेल्या अनन्वित धार्मिक छळाची माहिती स्थलाभावी येथे देता येत नाही.

अुत्तरेकडील सर्व प्रांतांतून हिंदु समाजाला केवळ मुसलमानांच्याच काय त्या धर्मच्छलांना तोंड द्यावें लागलें आहे. पण विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील रामेश्वरा-पर्यंतच्या हिंदूंना मुसलमानांच्या ज्या पांच स्वतंत्र पादशाह्या या दक्षिणेत नांदत राहिल्या, त्यांच्या सतत भ्रष्टीकरणाच्या प्राणघातक जाचासच काय तें तेवढें बळी पडावें लागलें नाही, तर मुसलमानांहूनही क्रूर असणाऱ्या पोर्तुगीजांनी हिंदूंच्या ख्रिस्तीकरणासाठी जो हिंदूंचा भयंकर छळ केला, त्यासही बळी पडावें लागलें, तोंड द्यावें लागलें. तो सर्व हृदयद्रावक वृत्तान्त समजावून घेण्याची ज्यांना अिच्छा असेल त्यांना तो सर्व वृत्तान्त Os Hindus De Goa Republica Portuguesa' ह्या नांवाच्या थेट पोर्तुगीझ ग्रंथात ग्रंथिलेला सापडेल. ह्या ग्रंथाचें भाषांतर अिंग्रजीमध्ये झालेलें आहे आणि मराठीमध्येही होत होतें अशी माहिती मिळते. ह्याच ग्रंथाचें नांव अशाकरिता दिलें की, ख्रिस्ती धर्म-प्रचारासाठी पोर्तुगीजांनी केलेल्या हिंदूंच्या धार्मिक छळाची मुसलमानांनाही लाजविणारीं अत्याचारी कृत्यें आणि त्यांचा हिंदुस्थानातील अेकंदरीत अितिहास अनेक लहान मोठ्या ग्रंथांत वर्णिलेला आहे. पण वर दिलेल्या पोर्तुगीज अिति-हासाचें वैशिष्ट्य हें आहे की, तो सर्व अितिहास डॉक्टर Patonio Noronhva ह्यांनी लिहिलेला असून हे गृहस्थ पोर्तुगीज सरकारच्या सुप्रीम हायकोर्टाचेच न्यायाधीश होते. पोतुगीज लोकांना आपल्या अितिहासाविषयीची अुलटसुलट सर्व राजकीय कागदपत्रें प्राचीन कालापासून जतन करून ठेवण्याची अेक प्रामाणिक-पणाची सवय आहे. आणि तें वृत्तभांडार अभ्यासूंना वाचावयास देण्याची त्यांची पुरातन रीत आहे. आणि त्यांतही ते स्वत: पोर्तुगीज ! यास्तव त्यांना तेथील सर्व ग्रंथ पूर्णपणे नि प्रकटपणे अभ्यासण्याची विना अट मोकळीक मिळाली! त्या वेळच्या पोर्तुगीज बादशहांच्या, हिंदुस्थानातील पाद्र्यांच्या नि रोमच्या ख्रिस्ती पोपच्या मूळ पत्रव्यवहारासुद्धा सर्व कागदपत्रें अभ्यासून ह्या पोर्तुगीज सुप्रीम हायकोर्टाच्या न्यायाधीशाने हा ग्रथ लिहिलेला आहे. हें त्याचें अनन्य वैशिष्ट्य आहे.

ह्या ग्रंथास सोडलें तर अगदी अर्वाचीन काळी गोमांतकात पूर्वी बाटून ख्रिश्चन झालेल्या दहा हजारांवर हिंदुलोकांना शुद्ध करून घेण्याचें महान् कार्य

ज्यांनी केलें त्या दिवंगत श्री. मसूरकर महाराजांच्या निरीक्षणाखाली लिहविलेला जो ग्रंथ 'गोमांतकातील शुद्धीकरणाचा अितिहास' या नांवाने मराठीत प्रसिद्ध झालेला आहे तो तर अवश्य वाचावा. आम्ही प्रस्तुत लिहीत असलेला 'सहा सोनेरी पानें' हा ग्रंथ काही हिंदुस्थानचा अितिहास नव्हे, तर त्याचें अेक समीक्षण आहे. यास्तव ती सर्व माहिती येथे देणें स्थलाभावी अशक्य आहे. त्यातही पूर्वी मुसलमानांच्या सिंधवरील आक्रमणापासून हिंदूंचें जें सशस्त्र, आक्रमक आणि अभूतपूर्व असें धर्मयुद्ध मुसलमानांशी शतकोशतकें चालत आलें, त्याच्या वृत्तान्ताची चर्चा या ग्रंथाच्या पूर्वीच्या प्रकरणांतून यथेच्छ केलेली आहे. रोटीबंदी, लोटीबंदी, स्पर्शबंदी, बेटीबंदी आणि विशेषतः शुद्धिबंदी अित्यादि आमच्या त्या वेळच्या धार्मिक वेडगळपणाच्या अनेक राष्ट्रहितघातक रूढींचे हानिकारक परिणाम आधीच दाखविलेले आहेत. ह्या पोर्तुगीजांच्या आगमनानंतर त्यांच्याशी आणि अेकंदर ख्रिस्तीधर्म प्रचारकांशी नि ख्रिस्ती राष्ट्रांशीही जी तशीच अत्याचारी नि सशस्त्र धर्मयुद्धें झालीं, त्यांनाही तीच सारी चर्चा शब्दन्‌शब्द लागू पडते, अितकें सांगितलें म्हणजे पुरें.

येथे हेंही ध्यानात ठेविलें पाहिजे की, याच वेळी अरब आणि ख्रिस्ती राष्ट्रें यांनी दक्षिण समुद्रावर आपली सत्ता स्थापून हिंदुचीनपर्यंत पसरलेल्या पूर्वीच्या आमच्या हिंदु बौद्ध साम्राज्यावरही राजकीय नि धार्मिक आक्रमणे करून तिकडील कोटयवधि हिंदूंना धर्मभ्रष्ट केलें, व त्यांचीं राज्यें हीं ह्या अत्याचारी शत्रूंनी हरण केलीं. त्यामुळे समुद्रबंदीची नवी बेडी हिंदूंनी आपल्या पायांत आपणहून ठोकून कशी घेतली, 'याचें समुद्रबंदी केव्हा झाली?' यात विवेचन केलेंच आहे. त्यामुळे अेकंदर हिंदुराष्ट्राच्या राजसत्तेची नि धर्मसत्तेचीच काय ती हानि झाली असें नव्हे, तर हिंदूंच्या विशाल सामुद्रिक दृष्टीचीही हानि झाली ! हिंदूंचा सारा व्यापार, सारें नौदल नष्ट झालें ! नौकानयनाची कला सुद्धा केवळ नष्ट झाली अितकेंच नव्हे तर तसें समुद्रगामी नौदल ठेवणेंही पापमय होऊन बसलें ! हिंदुधर्माला नि हिंदुराष्ट्राला बहुधा स्वतःच्याच चुकीमुळे अगदी अक्षरशः कूपमंडूकत्व आलें ! कोणी साहसी हिंदु त्या कूपाच्या बाहेर जाण्याचा पराक्रम करू लागला तरी, पूर्व समुद्र, पश्चिम समुद्र (रत्नाकर) आणि दक्षिण महासागर या तिन्ही समुद्रांच्या तटावर 'मज्जाव' (मत जाव)! 'समुद्रयातुः स्वीकारः कलौ पंच विवर्जयेत् ॥' अशी पाटी लावलेली अनुल्लंघनीय तटबंदी हिंदूंकडूनच अुभारली गेली होती !

येथपर्यंत मुसलमान ख्रिश्चनादिक शत्रूंनी हिंदूंवर जी सशस्त्र धार्मिक आक्रमणें केलीं त्यांना तशाच सशस्त्र वा निःशस्त्र मार्गांनी अधून मधून का होअीना पण निकराने कसें तोंड दिलें आणि हिंदूंनीही या हिंदु-मुसलमानांच्या भयंकर नि शतकव्यापी महायुद्धात मुसलमानांवरही सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणें करून त्यांनी

केलेल्या धार्मिक अत्याचारांचा कसा सूड घेतला त्या काही वेचक घटना स्थाली-पुलाक न्यायाने या प्रकरणात दिलेल्या आहेत.

वास्तविक पाहता वैयक्तिक वा सामुदायिक शुद्धीकरणाचा आणि मुसलमानांवर केलेल्या धार्मिक आघाडीवरही हिंदूंनी केलेल्या सशस्त्र प्रत्याक्रमणाचा अुपक्रम विद्यारण्यासारख्या शंकराचार्यांनी, शिवछत्रपति, दुर्गादास राठोड, जोधपूरचे जसवतसिंग महाराज ह्यांच्यासारख्या राष्ट्रवीरांनी आणि रामानंद, श्रीचैतन्य अशा अशा संतमहंतांनी करून त्यांचें पुढारीपण स्वीकारलें असता धार्मिक शुद्धीकरण आणि सशस्त्र प्रत्याक्रमणादिक अुठाव हिंदुसमाजाने सारखे करीत रहावयास पाहिजे होते आणि मुस्लिम स्त्री-पुरुषांनाही वळाने हिंदु करून घेण्याचा धुमधडाका अुडवीत जुन्या रूढींना तिलांजली देअून, हाच त्या काळचा हिंदूंचा 'युगधर्म' करून सोडला पाहिजे होता ! तसेंच हिंदूंना विभूतिपूजेची आवड नव्हती असेंही नाही. हिंदु समाजातील अनेक पथ, अनेक धार्मिक रूढी आणि धार्मिक सिद्धान्तही अशाच विभूतींनी स्थापन केले होते आणि हिंदुसमाजाने जुने आचार त्या त्या प्रकरणी सोडून देअून ह्या नवीन आचारांना हिंदुधर्माचे सदाचार म्हणून त्या त्या विभूतीच्या अनुयायांपुरते तरी हिंदुधर्माच्या चौकटीत वसवून दिलेले होते. त्यांच्या त्यांच्या पुरते ते त्या विभूतींनी प्रतिपादिलेल्या आचारांचेंच प्रतिपालन करीत राहिलेले होते. परंतु विभूतिपूजेची अितकी आवड अितर धार्मिक प्रकरणी असणाऱ्या हिंदुसमाजाने, शुद्धीकरण, परधर्मीयांवर सशस्त्र आक्रमण, आपल्या देवमंदिरादिक धर्मप्रस्थांच्या आणि विशेषत: हिंदूंच्या स्त्रियांच्या मुसलमानांनी केलेल्या अवहेलनेचा त्यांच्या धर्मप्रस्थांचीं आणि स्त्रियांचीही तशीच अवहेलना करून त्या धार्मिक शत्रूवर सूड अुगविण्याचा हा नवीन युगधर्म तेवढा वरीलसारख्या हिंदुराष्ट्राला अत्यंत पूजनीय वाटणाऱ्या विभूतींच्या मागे काही जिवंत ठेवला नाही! त्या विभूति जाताच त्या त्या पंथांतील हिंदूनी त्या विभूतीचें धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणाचें तें तें सक्रिय, आचरण किंवा तो अुपदेश सुद्धा चक्क धाब्यावर बसविला ! अितकेंच काय, पण त्या चैतन्यासारख्या विभूतीचे पंथ अितर प्रकरणांपुरते आजही जिवंत असता आणि त्यांच्या स्तुतीने भरलेले भक्तविजया-सारखे ग्रंथ वाचीत असता त्या ग्रंथांतून या विभूतींनीच मुसलमानांवर जो सशस्त्र धार्मिक सूड अुगविला, त्याचा अुल्लेख सुद्धा या ग्रंथात आढळत नाही ! किंवा या विभूतींनी मुसलमानांवर केलेल्या सशस्त्र धार्मिक आक्रमणाचा किंवा मोठमोठ्या शुद्धीकरणांचा गौरव करणारा अेखादा पोवाडासुद्धा त्या काळच्या वीर भटांनी किंवा चारणांनी रचलेला आढळत नाही ! हिंदूंच्या बहुजन समाजास तर त्या प्रसंगाची नुसती तोंडी तोंडी आठवणसुद्धा ठेवण्याअितकी त्याची आवड किंवा आवश्यकता वाटली नाही ! कारण–

अर्वाचीन हिंदु समाजाच्या मनाचा स्थायीभाव सहिष्णुता म्हणजेच प्राकृत भाषेत बोलायचें म्हणजे कोडगेपणा हाच स्वभावसिद्ध झालेला आहे!

ह्या सर्व पूर्वार्धातील प्रकरणांमध्ये येथपर्यंत चर्चिलेल्या विधेयांना आणि संदर्भांना ऐतिहासिक बळकटी आणि आधार देणारें त्या काळचें अेका अर्वाचीनतम घटनेचें पान !

ह्या चालू प्रकरणात हिंदूंनी मुसलमानांवर केलेल्या धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणांचीं जीं तुरळक अुदाहरणें आम्ही दिलेलीं आहेत तीं अर्थातच त्या अनेक शतकव्यापी हिंदु–मुस्लिम महायुद्धाच्या कालावधीच्या मानाने अगदी अपवादात्मक होतीं. फाटलेल्या आकाशास ठिगळ लावण्यासारखें तें होतें. पण तसें काही तरी हिंदुराष्ट्राच्या शौर्याला साजतील असे प्रत्याक्रमणाचे पराक्रम हिंदूनी केले म्हणूनच धार्मिक आघाडीवरील युद्धातही हिंदूंचा पक्ष अगदीच अुद्ध्वस्त झाला नाही! हिंदुही प्रसंगोप्रसंगी धार्मिक सूड घेअू शकतात अशी धास्ती त्या मुस्लिम शत्रूला सारखी वाटत राहिली. त्या अपवादात्मक हिंदु वीरांच्या प्रत्याक्रमणाप्रमाणे जर सारी हिंदुजाति त्याच रणनीतीस धार्मिक आघाडीवरही सर्वत्र अवलंबिती, तर या देशा त्या काळी तरी अेकही मुसलमान–मुसलमान म्हणून कसा रहाता ना, हें आम्ही ह्या चालू पूर्वार्धात अनेक वेळा दिग्दर्शिलें आहे.

परंतु अितर सर्व हिंदु तसें करण्यास कां धजले नाहीत–कां भ्यायले किंवा त्यांना तसें मुस्लिमांवर सशस्त्र प्रत्याक्रमण करणें हें हिंदु धर्माच्याच विरुद्ध आहे, असें कां वाटलें, शुद्धिबंदी, सिंधुबंदी, रोटीबंदी अित्यादि वेडयाच हिंदु धमाचे खरे आचार–अिष्ट आचार आहेत, अशी बुद्धि कां झाली? अशा सर्व प्रश्नांच्या अुत्तरी मुख्य समर्थन जें त्या वेळचे हिंदु करीत असत आणि मुसलमानांनी हिंदूंवर किती धार्मिक आक्रमणें केलीं तरी आम्ही हिंदूंनी त्यांच्यावर तसें तसेंच सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण करणें हें हिंदु हिताला का अिष्टही होणारें नाही, आणि हिंदु सभ्यतेला शोभणारें नाही, असें जे प्रतिपादन करीत असत, त्याचा आशय असा की, मुसलमानांचीं अेकामागून अेक भयंकर आक्रमणें होणाऱ्या त्या काळी जर त्या वेळच्या हिंदु राजाने आणि समाजाने, अेखादी तुरळक अनुकूल परिस्थिति येताच, आपल्या बाटलेल्या हिंदूंना परत शुद्ध करून घेतलें जसतें किंवा मुस्लिमांवर आम्ही म्हणतो तसें धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमण करून त्यांच्या स्त्री–पुरुषांना बळाने हिंदु करून घेतलें असतें, तर मुसलमान अधिकच चिडले असते आणि त्यांच्या त्या वारंवार होणाऱ्या नव्या नव्या सशस्त्र धार्मिक आक्रमणांत ते हिंदूंचा पुन्हा पुन्हा अधिक भयंकर सूड घेत जाते ! या भीतीने हिंदूंनी आपद्धर्म म्हणून, निरुपाय म्हणून, त्या काळी शुद्धिबंदी. प्रत्याचारबंदी, बेटीबंदी, रोटीबंदी, सिंधुबंदी, सदगुणविकृति, अित्यादि शरणागतीच्या धमाचारांना अवलंबिलें ! आता या आणि अशा सर्वच

तर्कटांचें निरसन करण्यासाठी आणि ह्या वर लिहिलेल्या सर्व पूर्वार्धातील आम्ही केलेल्या अनेक अुल्लेखांना, संदर्भांना आणि मतांना बळकटी देणारी शेवटची अशी अेक घटना देत आहोत की जिच्यामुळे धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणाची हिंदूंत शक्ति होती, पण अिच्छाच नव्हती हें आमचें विधान निर्विवादपणे सिद्ध होअील. ती घटना म्हणजे टिपू सुलतानाचा नायनाट करून टाकणाऱ्या मराठ्यांच्या मुसलमानांशी झालेल्या संघर्षाची होय !

✦ ✦ ✦

प्रकरण ७ वें

हिंदुप्रपीडक क्रूरकर्मा टिपू सुलतान

ज्या काळी महाराष्ट्र साम्राज्याचा विस्तार होता होता, मराठ्यांनी आपल्य पराक्रमाने प्रत्यक्ष दिल्लीची मोंगल बादशाही वस्तुतः (De facto) अुलथून पाडलेली होती आणि हिंदूंची राजसत्ता साऱ्या हिंदुस्थानात अितकी प्रबळ झाली होती की तिला परिणामकारक विरोध करू शकेल अशी अेकही मुस्लिम सत्ता हिमालया-पासून तो कन्याकुमारीपर्यंत अुरलेली नव्हती, अशा काळीही म्हैसूरला जें लहानसें हिंदुराज्य होतें त्या राज्यात असलेला हैदरअल्ली नावाचा अेक मुसलमान त्या हिंदुराजाच्या हाताखाली अधिकारावर चढत चढत त्याच्या सैन्यातील अेक प्रस्थ होअून बसला होता. महंमद गझनीच्यापासून हिंदुराज्याचा घात, हिंदुराजांनीच विश्वास टाकून वाढविलेल्या त्यांच्या मुस्लिम सेवकांनी वारंवार कसा केला ह्याचा शतकोशतकांचा अनुभव आलेला असताही ह्या म्हैसूरच्या हिंदुराजाने 'सर्व धर्मांना समान' मानणाऱ्या सर्वसामान्य हिंदुसमाजाच्या नेहमीच्या 'अुदार' भोंगळसुती-पणापायी हैदरअल्लीसारख्या कडव्या मुसलमानाचे हाती आपल्या सैन्याचें आधिपत्य जाअू दिलें. परिणाम व्हायचा तोच झाला. हैदरने त्या हिंदुराजास शेवटी बाजूस सारून सारी राजसत्ता आपल्या हाती घेतली. त्याने मराठ्यांवरही चढाअी केली. परंतु समरांगणात मराठ्यांनी त्याची रग जिरून जाअीतो त्याला चांगला चोपून काढल्यामुळे तो पुढे पाअूल टाकू शकला नाही. त्याने अिंग्रजांवरही अेकदा यशस्वी चढाअी केली होती. परंतु अिथे हैदरच्या ह्या अितर वृत्तान्ताशी चालू विषयाचा काही संबंध नसल्यामुळे अितकें सांगणें पुरें आहे की, हा हैदर अिसवी सन १७८२ ह्या वर्षी जेव्हा मरण पावला तेव्हा त्याचे मागे त्याचा त्याच्यासारखाच पराक्रमी पुत्र टिपू ह्याचे हाती तें म्हैसूरचें मूळचें हिंदु संस्थान आलें.

सत्ता हाती येताच टिपूने मूळच्या हिंदुराजाचें नांवगावही पुसून टाकून म्हैसूरच्या स्वतंत्र मुस्लिम राज्याचा सुलतान म्हणून आपल्या नांवाची द्वाही फिरविली. मुसलमानांचें अेक नवें स्वतंत्र राज्य स्थापून स्वत:स 'सुलतान' म्हणवून घेणारा त्या हिंदु-मुस्लिम महायुद्धाच्या अेक सहस्र वर्षीय कालखंडातील हिंदुस्थान-मधील टिपू हा शेवटचा सुलतान होय!

कोणत्याही मुस्लिम 'सुलतानाचे' त्याच्या मुस्लिम परंपरेनुसार जें पहिलें कर्तव्य त्या काळी समजलें गेलेलें असे त्याप्रमाणे टिपू सुलतानाने सर्व 'काफरांना मी मुसलमान करून सोडीन अशी प्रतिज्ञा प्रकटपणे भरविलेल्या त्याच्या दरबारात केली आणि लगोलग त्याच्या राज्यातील सर्व हिंदूंना मुसलमान होण्याची आज्ञा सोडली! आपल्या गावोगावच्या मुस्लिम अधिकाऱ्यांना लेखी कळविलें की, 'झाडून साऱ्या हिंदु स्त्री-पुरुषांना मुस्लिमधर्माची दीक्षा द्या. जे हिंदु स्वेच्छेने मुसलमान न होतील त्यांना वळाने मुसलमान करा, नाहीतर हिंदु पुरुषांना ठार करा आणि पकडून आणलेल्या हिंदु स्त्रियांना वटकी करून मुसलमानांत वाटून टाका!'

या भ्रष्टीकरणाची कार्यवाही टिपूने, अितक्या निकराने अितक्या मोठ्या प्रमाणावर चालू केली की, त्या म्हैसूर संस्थानातील साऱ्या हिंदुसमाजात अेकच हाहाकार अुडून गेला. टिपूच्या सैनिक पथकातील काय ती नव्हे, तर गावो-गावच्या मुस्लिम मुल्लामौलवींनी स्थानिक मुस्लिम गावगुंडांना जमवून हिंदूंची ससेहोलपट चालविली, पुढे स्वत: टिपूने मलबारवर स्वारी करून सपाट्यासरशी त्या अेका मलबारात अेक लक्ष हिंदु स्त्री-पुरुषांना बळानं वाटवून टाकिलें! त्याने कर्नाटकावर स्वारी करून मराठ्यांच्या राज्यावरही चढाअी केली. धारवाडपासून खाली त्रावणकोरपर्यंत पसरलेल्या लक्षावधि हिंदु स्त्री-पुरुषांना टिपूच्या सैनिक पथकांच्या आणि गावगन्ना मुस्लिम स्त्री-पुरुषांच्या ह्या अेखाद्या वणव्याप्रमाणे अकस्मात् भडकत चाललेल्या हिंदु भ्रष्टीकरणाच्या अुठावामुळे त्राहि भगवन् करू सोडलें!

सर्व जातींच्या आणि पथांच्या शतावधि हिंदु स्त्री-पुरुषांनी टिपूच्या ह्या सशस्त्र आक्रमणास तोंड देणें अशक्य होअून मुस्लिम सैन्याचे तावडीत सापडण्याचें आधीच धर्मरक्षणार्थ कृष्णा, तुंगभद्रेसारख्या मोठमोठ्या नद्यांतून मुलालेकरांसह अुड्या घेअून जीव दिले! शतावधि हिंदु स्त्री-पुरुष आगीत अुड्या घेअून भस्मसात् झाले! —पण बाटून मुसलमान झाले नाहीत!!

टिपूची अुन्मत्त घोषणा!

आपल्या त्या राक्षसी अत्याचाराच्या, विजयी आक्रमणाच्या आणि त्यामुळे नि:सहाय्य हिंदूच्या अुडालेल्या दुर्दशेच्या आनदाने नि अुन्मादाने फुगून जाअून

टिपूने भर दरबारात अेकदा मोठ्या आढ्यतेने स्वत:च घोषणा केली की, 'काफर हिंदूंच्या सामुदायिक मुस्लिमीकरणाच्या ह्या माझ्या सशस्त्र आक्रमणास अपेक्षेहूनही अधिक यश आलेलें आहे. अेके दिवशी तर २४ तासांच्या आत माझ्या राज्यात ५० सहस्र हिंदूना बाटविलें गेलें ! पूर्वीच्या कोणत्याही मुस्लिम सुलतानाला असलें महत्कृत्य करवलें नसेल ! पण अिस्लामच्या प्रचाराचें आणि काफरांच्या अुच्छेदाचें तें महत्कृत्य अल्लाच्या कृपेने मी आज करू शकलो आहे !'

आपलें 'हिंदु काफरांच्या अुच्छेदाचें हें महत्कृत्य' शक्य तितक्या नेटाने नि त्वरेने पार पाडण्यासाठी त्या धर्मोन्मत्त टिपूने आततायी क्रौर्यांत अितर मुस्लिम सैनिकांसही मागे टाकणाऱ्या अशा अेका नवीन सैन्याचीही अुभारणी केली होती. मुस्लिमांतील कडव्यांतील कडवे असे शेकडो तरुण निवडून निवडून टिपू सुलतानाने हें आपलें विशिष्ट सैन्य अुभारलें होतें. त्या सैन्यास तो आपल्या मुलांचें सैन्य म्हणून लाडिकपणाने संबोधी. हिंदु स्त्री-पुरुषांना बळाने बाटविण्यात, हिंदूची लुटालूट करण्यात, त्यांची घरेंदारें जाळून टाकण्यात आणि विरोध करतील तर त्यांचा अनन्वित छळ करून त्यांना सरसकट कापून काढण्यात ह्या सुलतानाच्या 'लाडक्या सैन्यातले' जे तरणेबांड मुस्लिम सैनिक विशेष पराक्रम करतील त्यांना त्यांना प्रत्येकी त्यांचें पारितोषक म्हणून ठिकठिकाणी पाडाव केलेल्या सहस्रावधि हिंदु स्त्रियांतील तरुण तरुण नि सुंदर मुली निवडून यथारुचि वाटून देण्यात येत !

टिपू सुलतानाच्या ह्या अिस्लामी प्रचारामुळे नि पराक्रमामुळे हिंदुस्थानातील सारें अिस्लामी जगत् कृतज्ञ भावनेने भारावून गेलें. त्याला सुलतान, गाझी-अिस्लामचा कर्मवीर, ह्या पदव्या मुसलमानांकडून देण्यात आल्या. हिंदुस्थानातच नव्हे, तर थेट तुर्कस्थानातील मुसलमानी खलिफाकडूनही त्याला ती मान्यता मिळाली. अर्थात् हिंदुधर्मीयांवर त्याने चालविलेल्या धर्मोन्मादी अत्याचारांमध्ये 'सारें' मुस्लिम जगत् अशा रीतीने भागीदार झालें होतें. विशेषत: कर्नाटक ते त्रावणकोर पर्यंत ज्या मुस्लिम समाजाने सामुदायिकपणे त्याच्या त्या अत्याचारात प्रत्यक्ष भाग घेतलेला होता तो मुस्लिम समाज तर स्त्री-पुरुषांसुद्धा हिंदूच्या दृष्टीने तरी टिपूसारखाच दंडनीय ठरला होता.

अिकडे पुण्यात

टिपूचें हिंदूंच्या सामुदायिक नि बलपूर्वक मुस्लिमीकरणाचें हें अत्याचारी अभियान (मोहीम) जेव्हा चालू झालें तेव्हाच तिकडील हिंदु समाजात अुडालेल्या हलकल्लोळाचे आर्त निनाद अैकून हिंदुधर्म संरक्षणाचें ब्रीद धारण केलेल्या मराठी साम्राज्याच्या राजधानीत, पुण्यात क्रोधाची लाट अुसळली आणि ह्या म्हैसूरच्या नव्या महिषासुराचें पारिपत्य करण्यासाठी त्याच्यावर चढाअी करून जाण्याचा मराठ्यांच्या राजधुरंधरांनी निश्चय केला. पेशव्यांचे मुख्य श्रीकरणाधिप (फडणीस)

नाना ह्यांनी दक्षिणेतील हाताशी असलेल्या सर्व मराठी सरदारांना निरनिराळ्या बाजूंनी टिपूच्या राज्यावर ससैन्य चालून जाण्याची आज्ञा दिली.

टिपूशी युद्ध

मराठ्यांचीं सैन्यें आपल्या राज्यावर चालून येत आहेत, ही बातमी समजताच टिपू नुसता चवताळून गेला. मराठी मुख्य प्रदेशापासून तुटक अंतरावर असलेलीं मराठ्यांची नरगुंद आणि कित्तूर हीं जीं दोन लहान संस्थानें त्याच्या राज्याच्या अगदी लागून होतीं त्यांच्यावरच टिपूने त्यांना मराठ्यांच्या मुख्य सैन्याचें साहाय्य येण्याच्या आधीच अेक अेकटें गाठण्यासाठीच त्वेषाने चाल केली.

टिपू सर्व हिंदूचा तर द्वेष करीतच असे; पण त्यातही हिंदुसमाजात स्वत्वाचा आणि हिंदुत्वाचा जाज्वल्य अभिमान संचरवून त्यांना मुस्लिमांविरुद्ध चेतविण्याचें कामी जो वर्ग अग्रेसर असे त्या ब्राह्मणवर्गावर तो सुलतान टिपू विशेषच जळफळत असे. अितरांपेक्षा ब्राह्मणाचा छळ करण्यात त्याने क्रौर्याची सीमा गाठावी. अितिहासाचार्य सरदेसाअीसुद्धा लिहितात, ' Brahmins were singled out for special indignities by Tippu. नरगुंदचे आणि कित्तूरचे संस्थानिक हे दोघेही ब्राह्मणच होते. त्यातही तत्काल शरण येण्याची टिपूने केलेली मागणी त्या दोघांनीही तिरस्काराने झिडकारून टाकिली होती. त्यामुळे अधिकच चिडलेल्या टिपूने प्रथम नरगुंदवर आपल्या प्रवळ सैन्यासह चाल केली. संस्थानिक भावेही शक्य तो वीरोचित निकराने लढले. परंतु पुण्याहून येणारें साहाय्य वेळीच न आल्याने त्या संस्थानच्या छोट्याशा सैन्याचा पाडाव टिपू सहज करू शकला. नरगुंद नगर पडताच टिपू ससैन्य जाळपोळ आणि लूटमार करीत जो आत शिरला तो सरळ राजवाड्यात घुसला. तेथे त्याने संस्थानिक भावे आणि त्यांचे झुंजार कारभारी पेठे ह्या दोघांना पकडून वेड्या ठोकविल्या. त्यांचा नि त्यांच्या सर्व संबंधीयांचा असह्य छळ केला गेला. त्यांच्या अंत:पुरात शिरून तेथील सर्व राजस्त्रियांची टिपूने जी विटंबना केली नि त्याच्या मुस्लिम हस्तकांकडून करविली, ती वर्णवत नाही. त्या स्त्रियांतील ज्या तरुण त्या त्या मुलींना प्रथम क्रूरपणे छळीत छळीत शेवटी त्यांच्यावर बलात्कार करण्यात आला. राजस्त्रियांतील जी अत्यंत सुंदर तरुणी होती तिला टिपूने स्वत:च्या जनानखान्यात बंद केलें नि जाताना तिला आपल्या राजधानीस घेअून गेला. आपल्या सुना लेकींची ही अमानुष विटंबना तिच्या डोळ्यादेखत चाललेली पाहून पेठ्यांच्या वृद्ध मातेचें हृदय यातनांनी फाटून गेलें आणि ती तेथेच गतप्राण झाली.

टिपूच्या सैन्यानेही साऱ्या नरगुंद नगरात हिंदु स्त्री-पुरुषांची करवेल तितकी तशीच विटंबना केली. हिंदूंतील लिंगायत वर्गासारख्या धनिकांच्या वाड्यापासून तो सामान्य हिंदु नागरिकांच्या घराघरापर्यंत मनसोक्त लूट केली. त्यांच्या

घरादारांना आगी लावून आणि शतावधि निवडक हिंदू स्त्री-पुरुषांना आणि सैनिकांना पाडाव करून बंदिवान करून त्यांना जाताना टिपू आपल्या समवेत घेऊन गेला.

नरगुंदचा असा पाडाव करून टिपू त्या कित्तूरच्या दुसऱ्या लढत राहिलेल्या छोट्याशा हिंदु संस्थानावर तुटून पडला. कित्तूरच्या त्या संस्थानाचीही नरगुंद-प्रमाणेच त्याने धुळधाण केली. संस्थानिकावर, त्याच्या कुटुंबीयावर आणि त्या संगरातील सर्व हिंदु स्त्री-पुरुषांवर टिपूने स्वतः आणि आपल्या सैन्याकरवी नरगुंदला जे जे राक्षसी अत्याचार त्याने तेथील हिंदूंवर केले होते तसेच अत्याचार कित्तुरलाही त्याने केले आणि करविले.

अेवढ्या अवधीत मराठ्यांचीं मुख्य सैन्यें कर्नाटकात टिपूने जिंकलेल्या प्रदेशास नि ठाण्यास परत जिंकीत झपाट्याने पुढे घुसत होतीं. अिथे प्रत्यक्ष संबंध नसलेल्या त्या युद्धातील अितर घटना सोडून देऊन अितकें सांगणें पुरें आहे की, शेवटी सरदार पटवर्धन, फडके, बेहेरे, होळकर, भोसले प्रभृति मराठी सेनानायकांनी टिपूच्या ठिकठिकाणच्या मुस्लिम सैन्यांना झोडपीत सारा कर्नाटक त्याचे हातून छिनून घेअून टिपूला म्हैसूरपर्यंत रेटीत पक्क्या कोंडीत घेतला. त्याच वेळी टिपूच्या भयंकर अडचणीची ही संधि साधून अिंग्रजही टिपूवर चढून आलेले होते. मराठ्यांच्या खड्गाचे वार जसजसे त्या टिपू सुलतानाच्या सैतानी मुस्लिम धर्मोन्मादाच्या पाठी सपासप बसू सागले तसतसा त्या सैतानाचाही तो मुस्लिम धर्मोन्माद अुतरू लागला. टिपूचा दम अुखडून गेला आणि कोण आश्चर्य, तोच हिंदुधर्मद्वेष्टा टिपू हिंदु देव-देवतांच्या भजनी लागला!!

हिंदुधर्मसंरक्षक मराठ्यांची मनधरणी करण्यासाठी आणि त्याच्या धर्मछळाने कावून गेलेल्या लक्षावधि हिंदु जनतेला पुन्हा आपल्या कच्छपी लावून घेण्यासाठी का होअीना पण टिपूने अकस्मात् हिंदूंच्या देवालयांना देणग्या देण्यास आरंभिलें. पूर्वी मुस्लिमांनी विच्छिन्न केलेल्या काही मोठमोठ्या मंदिरांत नव्या मूर्तींचीही त्याने पुन्हा प्राणप्रतिष्ठा करविली. आपल्याला ह्या युद्धात यश मिळावें यास्तव टिपूने देवालयांतून ब्राह्मणांकरवी प्रार्थना करविल्या आणि ज्या ब्राह्मण वर्गाचा तो सर्वांहून अत्यंत द्वेष आणि छळ करीत असे—त्याच ब्राह्मणवर्गाला प्रसादविण्यासाठी त्याने दक्षिणासमारंभ करविले, अनुष्ठानें बसविलीं, स्वतः शंकराचार्यांचा मोठा सन्मान करून आपल्या राज्यावरचें हें संकट टळावें म्हणून आशीर्वाद मागितले! आणि शंकराचार्यांनीही समारंभपूर्वक ते दिले! स्थलाभावी आणखी अेकच गोष्ट सांगणें पुरें आहे की, कांची क्षेत्रातील हिंदूच्या प्रख्यात दैवतांच्या रथोत्सवाचे वेळी सुलतान टिपू व्यक्तिशः अुपस्थित राहून रथापुढे अितर भक्तांसमवेत त्या मिरवणुकीत चालू लागला. आपल्या हाताने त्याने शोभेची दारू अुडवून तो दीपोत्सव आपल्या व्ययाने साजरा केला. ज्या देवतांच्या हातात तीक्ष्ण धारेचें शत्रुघ्न खड्ग अुपसलेलें असतें त्या देवास दैत्यही भजू लागतात ते असे!

परंतु न देव न दैत्य – कोणीही त्या क्रूरकर्म्या टिपूला त्या दारुण संकटातून बचावण्यास पुढे येऊ शकला नाही. शेवटी दोन तीन स्वाऱ्यांत मिळून त्याचें सारें राज्य मराठ्यांच्या नि अिंग्रजांच्या सैन्याने जिंकून घेतलें. स्वतः टिपूही पुढे ठार मारला गेला. टिपूच्या राज्याची वाटणी होऊन त्यातील त्रावणकोरच्या हिंदु राज्याचा जो लहानसा भाग टिपूने हिसकावला होता तो त्या राजास परत देण्यात आला. ज्या मूळच्या हिंदु राजवंशास टिपूने पदच्युत करून तें म्हैसूर संस्थान बळकावलें होतें त्यावर त्याच हिंदु राजवंशाला पुन्हा स्थापन करण्यात आलें. अुरलेल्या राज्यातील काही वाटा अिंग्रजांनी घेतला आणि कर्नाटक ते तुंगभद्रेपर्यंतचा टिपूने जिंकलेला सारा विस्तृत प्रदेश मराठ्यांनी आपल्या राज्यास जोडून टाकला. स्वत:स 'सुलतान' म्हणवून घेताना ज्या हिंदुराज्याचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा टिपूने केली होती तीं सारीं हिंदुराज्यें पुन्हा स्वस्थानी नांदू लागलीं. त्या युद्धात संपूर्ण नायनाट जर कोणाचा झाला असेल तर तो 'सुलतान टिपूच्या मुस्लिम राज्याचाच काय तो होय !'

असे राजकीय नि रणांगणीय क्षेत्रात हिंदु विजयी ठरले. पण तरीही अशा रीतीने ह्या सन १७८० च्या मागच्या पुढच्या मिळून वीस अेक वर्षांत टिपूच्या नेतृत्वाखालील दक्षिणेतील मुसलमानांनी जी सामुदायिक नि सशस्त्र अुठावणी केली होती आणि हिंदुविद्रोही अत्याचारांचा प्रलय मांडला होता त्याचा रणांगणीय नि राजकीय क्षेत्रात त्या मुस्लिम राजसत्तेचा नि सैन्य शक्तीचा धुव्वा अुडवून देण्यात हिंदु पूर्णपणे विजयी ठरले. परंतु धार्मिक नि सामाजिक क्षेत्रांत मात्र ते आक्रमक मुस्लिमच विजयी ठरले.

कारण की टिपूशी झालेल्या त्या युद्धात मुस्लिमांनी हिंदुधर्माचाच अुच्छेद करण्यासाठी जी धार्मिक नि सामाजिक सशस्त्र चढाअी केली होती, हिंदूंचे जे लक्षावधि लोक बळाने बाटविले होते, हिंदूंच्या सहस्रावधि स्त्रियांवर अत्याचार करून त्यांना मुस्लिम दास्यात नि गोषात गावागावातून डांबून टाकलें होतें, हिंदुराष्ट्राच्या पौरुषाचीच जी लांछनास्पद मानखंडणा केली होती, आणि त्या सर्वांमुळे मुस्लिम धर्माची नि समाजाची सत्ता, संख्याबळ नि शक्ति जी वेगाने वाढत जात होती तिचाही धुव्वा अुडवून देण्यासाठी, त्या धार्मिक नि सामाजिक मानखंडनेचा सूड अुगविण्यासाठी, त्या बलात्कारी नि अत्याचारी सहस्रावधि मुस्लिम पुरुषांतील नि मुस्लिम स्त्रियांतील अघोरी अपराध्यांना तसतसाच कठोर दंड देण्यासाठी हिंदुधर्मरक्षणाचें ब्रीद मिरविणाऱ्या नि रणांगणात मुस्लिमांच्या शस्त्रशक्तीचा नि राजशक्तीचा वर वर्णिल्याप्रमाणे धुव्वा अुडवून देणाऱ्या मराठ्यांच्या विजयी वीरांनी – मुस्लिमांवर लगोलग अेकही धार्मिक प्रत्याघात केला नाही ! त्यांच्याही अिस्लाम धर्मावर सशस्त्र प्रत्याक्रमण केलें नाही !! त्या प्रकरणी अिकडची काडी तिकडे केली नाही !!!

तसें प्रत्याक्रमण न झाल्यामुळे ते बळाने बाटविलेले अुणे पुरे दोन तीन लक्ष हिंदु–पुरुष-स्त्रिया, बाल–बालिका त्या दक्षिणेतील मुसलमानी समाजाच्या कचाट्यात, दास्यात, गोषात तशाच पिचत राहिल्या. टिपूने स्थापिलेली अिस्लामी राजसत्ता मराठ्यांच्या प्रत्याघाताखाली चक्काचूर होअून गेली; पण टिपूने लाखो हिंदूंवर बळाने लादलेली अिस्लामी धर्मसत्ता मात्र तशा प्रत्याघाताभावी अुलट भरभराटत राहिली !

तें कसें घडे तो क्रम पूर्वीच सांगितला आहे. त्या बळाने बाटविलेल्या हिंदु स्त्री-पुरुषांची संतति, त्यांना लगोलग शुद्ध करून न घेतल्यामुळे, मुस्लिमातच मोडली जाअून पिढीमागून पिढी त्या काळच्या त्या हिंदुधर्मशत्रूंचें संख्याबळ दक्षिण प्रांतातून सवाअी दिडीदुपटीने वाढवीत चालली आणि आजन्म मुस्लिम संस्कारांतव वाढल्यामुळे हिंदुधर्माची नि हिंदुराष्ट्राची कट्टर वैरी बनत गेली. ह्या बाटग्या मुस्लिमांच्या पुढील पुढील पिढ्यांत, स्वतः हिंदुधर्मात परत येण्याची अिच्छा तर सोडाच पण अुलट ' अिसाप 'च्या गोष्टीतील लांड्या कोल्ह्याचीच मनोवृत्ति वळावत जाअून अुरलेल्या हिंदूंनाही आपल्याप्रमाणे बळाने बाटवून मुसलमान करणें हेंच आपलें धर्मकर्तव्य आहे अशी आसुरी आकांक्षा मात्रा अधिकाधिक अुफाळत चालली.

पण जर टिपूवरील राजकीय प्रत्याक्रमण यशस्वी होताच मराठ्यांनी मुस्लिमांवर धार्मिक प्रत्याक्रमणही लगोलग केलें असतें तर ?

तर त्या टिपूच्या युद्धात अवघ्या चार पांच वर्षांचे पूर्वीच बळाने बाटविले गेलेले ते दोन तीन लाख हिंदु स्त्री-पुरुष नुसते ' या ' म्हणताच हिंदुधर्मामध्ये नि आपापल्या हिंदु कुटुंबांत प्रेमविव्हल होअून बहुशः परत आले असते ! अवघ्या चार पांच वर्षांचे पूर्वीच अंतरलेल्या त्यांच्या हिंदु धर्मावरील त्यांची भक्ति नि आसक्ति, त्यांच्या हिंदु माता-पिता, पुत्र-कन्या, आप्त-अिष्ट अित्यादिक प्रियजनांविषयींची माया ममता त्यांना अजून अितकी कासावीस करीत असलीच पाहिजे की त्यांची आठवण येताच त्यांचे डोळ्यांत चटकन् आसवें अुभीं रहावीं !

अशा वेळीच त्या दोन तीन लक्ष हिंदु बांधवांना शुद्ध करून हिंदुधर्मांत परत समाविष्ट करून घेणें किती सोपें होतें !

त्यातही त्याच वेळी टिपूच्या मुस्लिम राज्याला मूठमाती देअून सरदार पटवर्धन, होळकर, रास्ते अित्यादि अेकाहून अेक अधिक सेनानींची विजयी सैन्यें त्यांच्या रणांगणातील निरनिराळ्या आघाड्यांवरून महाराष्ट्राकडे वेगवेगळ्या मार्गांनी परतू लागलीं होतीं, तेव्हा त्यांच्यातील सहस्रावधि घोडेस्वारांच्या, शिलेदारांच्या, पायदळांच्या भिन्न भिन्न सेना, पृतना (पलटणी), पथकें, भगवे ध्वज फडकावीत, ' हर हर महादेवाचे ' रणघोष करीत म्हैसूर, कर्नाटक, महाराष्ट्र

या प्रांतांतील ज्या नगरानगरांतून नि गावागावांतून सैनिक संचलनाचा दणका अुडवीत पृथक् पृथकपणे परत चाललेलीं होतीं, त्याच नगरानगरांत नि गावा-गावांत अनेक ठिकाणी, त्या पांचसहा वर्षांतच धार्मिक आक्रमणें करून बाटविलेले दोन लाख हिंदु स्त्री-पुरुष मुस्लिम समाजात कोंडलेले होते. विशेषत: ज्या सहस्रावधि हिंदु स्त्रियांना मुस्लिमांनी त्या आक्रमणात पळवून नेअून आपल्या बटकी करून टाकल्या होत्या, त्यांपैकी अनेक पतिता, दीना, दु:खिता, हिंदुकन्यका, कुमारिका, कांता त्या त्या नगरग्रामांतील तुरळक महालांपासून तो गांवगन्ना पसर-लेल्या मुस्लिम गुंडांच्या शेकडो खोपटयाखोपटयापर्यंत असलेल्या गोषांतून राबविल्या जात होत्या ! हिंदूंचा विजय झाल्याच्या नि मुस्लिम राज्याचा सत्यनाश झाल्याच्या वार्ता त्यांच्या कानांवर जातात न जातात तोंच त्या हिंदु वीरांचीं सशस्त्र पथकें वा सैन्यें आपल्याच गावातून मिरवत येत आहेत हें त्यांना त्या हिंदुवीरांच्या दूरवरून अैकू येणाऱ्या ' हर हर महादेव 'च्या जयघोषांनी चटकन लक्षात आलें असेल. त्यासरशी त्या अभागी बाटविलेल्या हिंदु स्त्रिया अनावर वेगाने आपापल्या त्या मुस्लिम कोंडवाडयाच्या खिडक्याखिडक्यातून नि खोपटया-खोपटयांच्या दारातून त्या हिंदु वीरांच्या मिरवणुकी जवळ जवळ येताच, त्यांच्या रणवाद्यांचे ते रणघोष दुमदुमू लागताच त्या राक्षसांच्या बंदिवासात पडलेल्या आमच्या शेकडो मायभगिनींच्या हृदयात अशा अुत्कट अपेक्षेच्या असह्य कळा आपसूक अुठल्या असतील ! ' आले ! आमच्या–माझ्या–हिंदुधर्माचे भाअू ह्या अत्याचारी मुस्लिमांच्या अुरावर नाचत आमची सुटका करण्यास शेवटी आले ! ! ' अनेक प्रसंगी त्या कोंडवाडयातील हिंदु महिलांपैकी कोणाकोणाचा प्रत्यक्ष बाप, नवरा, भाअू, भाअुबंद, शेजारीपाजारी हे त्या विजयी हिंदु पृतनातून डौलाने गर्जत चाललेले त्यांना समक्ष दिसले असतील !

जर केवळ मनात आलें असतें तर –

जर अशा वेळी त्या गावोगावातील संचलन करीत चाललेल्या निरनिराळ्या हिंदु सैनिक दलांच्या केवळ मनात आलें असतें तर त्यांना टिपूच्या युद्धकाळात मुसलमानांच्या बंदिवासात पडलेल्या ह्या आपल्या सहस्रावधि हिंदु अबलांना वाटेने चालता चालता मुक्त करता आलें असतें.

कारण त्या वेळी त्या विजयी हिंदुदलभाराला आडवे येण्याचें सामर्थ्य वा धैर्य कोणाही मुस्लिमात वा मुस्लिम गटात अुरलेलें नव्हतें. मराठयांचीं सैनिकदलें येत आहेत हें अैकताच त्या त्या गावातील नि नगरातील मुल्लामौलवींची नि गुंडापुंडांची स्वत:च्या जिवाच्या भयाने बिळाबिळातून लपतांना त्रेधा अुडत होती. त्या हिंदु सैनिकदलांच्या रणशृंगातून असें आश्वासिणारी अेकेक ललकारी जरी सणसणत, खणखणत गावोगाव फुंकली गेली असती की, ' या ! मुसलमानांच्या

घरांघरांतून बाटवून आजपर्यंत मुसलमान म्हणून राबविल्या जाणाऱ्या हिंदु माता भगिनींनो, बाहेर पडा नि आमच्या रक्षणाखाली या ! तुम्हांला मुक्त करण्यासाठी नि तुमच्या घरोघर पोचवून देण्यासाठी हे आम्ही तुमचे धर्माचे भाऊ तुमच्या दाराशी आलेलो आहोत ! जी कोणी मुसलमान व्यक्ति तुमच्या आड येअील ती ती तिथेच कापली जाअील. मग तो मुस्लिम पुरुष असो वा स्त्री ! त्याचप्रमाणे मुसलमानांनी बाटविलेल्या हिंदु बांधवांनो, तुम्हीहां जेथे असाल तेथून येअून या आमच्या सैन्यविभागांना मिळत चला ! हिंदु धर्माच्या ह्या भगव्या ध्वजाखाली येताच तुम्हा सर्वांना हें विजयी हिंदु खड्ग सर्व प्रकारचें नि संपूर्ण संरक्षण देअील!' तरी अशा आश्वासक सशस्त्र आवाहनासरशी त्या चार पांच वर्षांतच बाटविलेल्या आणि विकल अुत्सुकतेने मुक्ततेची वाट पाहणाऱ्या त्या त्या गावातील मिळून सहस्रावधि हिंदु माता-भगिनी आणि सहस्रावधि बाटविलेले हिंदुबांधव अत्यानंदाच्या अुद्रेकाने आपण होअून त्या त्या सैन्य विभागांना मिळाले असते ! त्यांना सहजासहजी शुद्ध करून हिंदुराष्ट्रात परत घेता आलें असतें आणि त्या टिपूच्या युद्धात मुस्लिमांना मिळालेल्या धार्मिक विजयाचेंही नाक कापलें जातें !

पण धर्मशत्रूने बळाने बाटविलेल्या हिंदूंचें असें साधें शुद्धीकरण करण्याचेंही कोणाच्या मनातच आलें नाही ! मनासच आलें नाही ! !

परंतु त्या मराठी सैनिकांच्या, सेनापतींच्या, सरदारांच्या, शंकराचार्यांच्या, प्रत्यक्ष पुण्याच्या पेशव्यांच्या किंवा साताराकोल्हापुरातील छत्रपतींच्या कोणाच्याही तसें साधें शुद्धीकरण करण्याचें सुद्धा मनातच आलें नाही ! मुस्लिम राक्षसांच्या बंदिवासात पडलेल्या त्या आपल्या सहस्रावधि अत्याचारित माता-भगिनींकडे ढुंकूनही न पाहता त्यांना तशाच सोडून पुढे जाण्याची कोणालाही लाज वाटली नाही ! मुसलमानांवर मिळविलेल्या रणांगणीय नि राजकीय विजयांचे तेवढे नगारे पिटीत नि रणशृंगें वाजवीत गावोगावात तीं सैनिक पथकें जशीं शिरलीं तशींच त्या त्या गावातून डौलाने पुढे आपापल्या शिबिराकडे चालतीं झालीं. त्या अुण्या-पुऱ्या दोन लाख बाटलेल्या हिंदु स्त्री-पुरुषांपैकी संघतः बोलायचें म्हणजे, अेकालाही त्यांनी शत्रूच्या तावडीतून सोडवून हिंदु धर्मांत परत आणलें नाही.

फलतः, मुसलमानांच्या खोपटयाखोपटयांतून ज्या सहस्रावधि बाटविलेल्या आमच्या हिंदु माता-भगिनी, बाल-बालिका, ' आता आपणांला हीं आपलीं हिंदूंचीं सशस्त्र विजयी दलें मुसलमानांच्या ह्या नरकतुल्य कोठडयातून मुक्त करतील ' अशा असह्य अपेक्षेने दारादारांतून दाटून अुभ्या राहिल्या होत्या त्या साऱ्या 'तीं स्वधर्मीय विजयी सैन्यदलें गावात आलीं तशींच मिरवत गाव सोडून पुढे निघून गेलीं, आमची कोणासही दया आली नाही, आमची सुटका तर राहोच पण आम्हांशी कोणी ओळख सुद्धा दिली नाही, मायेचा शब्दही बोललें नाही !' असें पाहताच त्या क्रूर अपेक्षाभंगाने मुळूमुळू रडत पुन्हा त्या मुस्लिमांच्या कोंडवाडयामध्ये

अवशपणे परत फिरत ! आणि त्या स्वधर्मशत्रूंची वीण वाढवीत मरेतो तेथे तशाच पिचत पडत !

त्याचप्रमाणे त्या गावागावातून वर सांगितल्याप्रमाणे स्वत:च्या जिवाच्या भीतीने लपून बसलेल्या मुस्लिम मौलवी मुल्लांना नि गुंडपुंडांना थोडयाच दिवसांत कळून चुके की तीं हिंदूंचीं विजयी सैन्यपथकें किंवा राज्याधिकारी हिंदूंवर केलेल्या धार्मिक अत्याचारांसाठी कोणत्याही मुस्लिम अपराध्याला व्यक्तिश: वा गटागटाने पकडून काही अेक दंड करीत नाहीत आणि म्हणून आपल्या जिवास आता कोणतेंही भय अुरलेलें नाही, तेव्हा ते सगळे अत्याचारी मुस्लिम आपआपल्या बिळातून बाहेर पडून गावोगाव पुन्हा अुजळ माथ्याने वावरू लागले. अितकेंच नव्हे तर हिंदूंच्या बळाने वाटविलेल्या त्या सहस्रावधि स्त्रियांना आणि लुटून आणलेल्या संपत्तीला अगदी वैधरीतीने (कायदेशीरपणे) आपापली मत्ता मानून आपापल्या संसारात रावबून घेअू लागले. अशा घटना घडत की, गावागावातील हिंदूंना त्यांच्या बळाने वाटविलेल्या सुना लेकी त्या त्याच गावातील मुस्लिमांच्या घरांतून बटकी वा बिवी म्हणून अुघडपणे जन्मभर रावविल्या जात असता तें दृश्य चुपचाप पहावें लागे ! परंतु तीं तीं गावें हिंदु राज्याच्या संरक्षणाखाली आलेलीं असताही तेथील हिंदु जनतेने वा हिंदु राज्याधिकाऱ्यांनी तें दृश्य पाहताच मुसलमानांवर तुटून पडून त्या आपल्या लेकी सुनांची सुटका मुसलमानांच्या हातून केली, अशीं अुदाहरणें सहसा आढळत नाहीत. कारण शतकांच्या तशा आपद्धर्मीय संवयीमुळे तशीं हृदयविदारक मानखंडनेचीं दृश्यें जसें काही त्यात काही विशेष झालें नाही अशा निर्लज्ज निर्विकारपणे पहात राहण्याची हिंदूंना अेक सामुदायिक संवयच झालेली होती. ज्याला समाजात कोणीच नाव ठेवीत नाही अशा निर्लज्जपणाची कोणाला काही लाजही वाटत नाही अेका ' शुद्धिबंदी'च्या विषबाधेपायी साऱ्या हिंदुसमाजाचा ह्या प्रकरणी असा बुद्धिभ्रंश झालेला होता !

ह्याचा लेखी पुरावा ?
हा पहा तत्कालीन कागदपत्रांचा ढीग !

टिपूशी झालेल्या मराठ्यांच्या युद्धांचा अितिहास आता कितीतरी सविस्तरपणे अुपलब्ध झालेला आहे. मार्शमनसारख्या अिंग्रजी अितिहासकारांचे ग्रंथ; आपल्या अितिहासाचार्य सरदेसायांसारख्यांचे ग्रंथ; मॅलेट प्रभृति तत्कालीन अिंग्रजी कारस्थान्यांचे नि राजदूतांचे मूळ पत्रव्यवहार; अितिहाससंशोधक राजवाडे, पारसनीस, खरे प्रभृतींनी अुजेडात आणलेले त्या काळच्या मराठी राजधुरीणांच्या, त्यांच्या हस्तकांच्या, त्या काळच्या व्यापाऱ्यांच्या, नगरश्रेष्ठींच्या, हिंदुसमाजातील धार्मिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व थरांतील अनेक नागरिकांच्या पत्रव्यवहारांचे ढीगच्या ढीग आता प्रसिद्ध झालेले आहेत. लॉर्ड कॉर्नवॉलीस

आणि टिपूवरील स्वाऱ्यांचे सेनापति हरिपंत फडके यांच्यासारख्या त्या काळातील प्रमुख आणि थोरांतील थोर पुरुषांच्या श्रीरंगपट्टण येथील युद्धकालीन साहचर्याचे वेळी हरिपंत फडके यांनी पुण्यास नानांना धाडलेल्या अत्यंत वाचनीय आणि संधिविग्रहादिक अुच्च पातळीवरील राजकीय महत्त्वाच्या पत्रांपासून तो त्या काळच्या दरोडेखोरांच्या लुटालुटीचे, भाविकांच्या धार्मिक यात्रांचे, प्रवासांचे तत्कालीन बाजारभावांचे, ' माझा मठ लुटला गेला ' अशीच काय ती रडारड करीत बसलेल्या शंकराचार्यांच्या रुसव्याचें वर्णन करणाऱ्या पत्रापर्यंत अितके मूळ कागदपत्र या ढिगाऱ्यांत पाहता येतात की, त्या काळच्या हिंदुसमाजाच्या हालचालींचे, आचारांचें, विचारांचें नि व्यवहारांचें वाचणाऱ्याच्या मनापुढे मूर्तिमंत चित्र अुभें राहतें.

परंतु ह्या सहस्रावधि कागदपत्रातून अेकंदरीत पाहता मुसलमानांनी केलेल्या धार्मिक अत्याचारांचा आणि त्यांनी हिंदूंवर मिळविलेल्या अुपर्युक्त धार्मिक विजयाचा बचपा काढण्याची तळमळ कोणालाही लागल्याचें सहसा आढळत नाही. टिपूशी झालेल्या युद्धाचे कालावधीत आपल्या ज्या सहस्रावधि मायभगिनींना मुसलमानांच्या गोषामध्ये त्या अधमांनी कोंडून टाकलेल्या आहेत, त्यांची मुक्तता केली नाही तर धिक्कार असो आमच्या ह्या पौरुषाला, असा तीव्र विषाद वाटून मुसलमानांवर कोणताही हिंदु सेनापति वा सैनिकपथक वा जनसमूह आपल्या पुरता तुटकपणे का होअीना पण तलवार अुपसून चालून गेला आहे आणि त्याने अेखाद्या गावी वा नगरी तरी अशा बळाने बाटविलेल्या हिंदु स्त्रियांना सोडवून त्या मुसलमानांना कापून काढलें आहे असें कोणतेंही मोजण्यासारखें अुदाहरण घडलेलें आढळत नाही. कोणत्याही कागदपत्रात मुसलमानांच्या ह्या धर्मविजयामुळे हिंदु धर्माचें नि राष्ट्राचें सत्ताक्षेत्र नि भूमिक्षेत्र दिवसेदिवस कसें संपुष्टात येत चाललें आहे याची चिंता तर काय, पण जाणीवसुद्धा त्या काळच्या हिंदु समाजाला अेकंदरीत नव्हती, असें ह्या तत्कालीन शतावधि कागदपत्रावरून स्पष्ट होतें. ही कितीही आश्चर्याची नि खेदाची गोष्ट वाटली तरी वस्तुस्थिति ही अशी होती. कोणीही, मुसलमानांनी हिंदुधर्मावर केलेल्या आक्रमणांचा बचपा काढण्यासाठी मुस्लिमांवरही तसेंच सशस्त्र नि संघटितपणे धार्मिक प्रत्याक्रमण केलें पाहिजे असें अवाक्षरही बोलल्याचें वा लिहिल्याचें सहसा आढळत नाही – मग तसें स्वतः करण्याची गोष्ट दूरच !

ह्या त्या काळच्या मूळ कागदपत्रांच्या सर्व ढिगाऱ्यास जरी स्थलाभावी बाजूस सारलें तरी आम्हांस त्यांतील अेका पत्राचा तेवढा अुल्लेख करण्याचा मोह टाळवत नाही. मागे ' सद्गुणविकृतीच्या आपल्या हिंदु समाजास नेभळें नि लुळें बनविणाऱ्या प्रवृत्तींविषयी बरीच सविस्तर चर्चा ७१६ ते ७३६ पृष्ठांवर केलेली आहे. त्याच सद्गुणविकृतीच्या आमच्या हाडीमासीं खिळलेल्या दुर्गुणांवर

झगझगीत आणि अद्यतन शोधाप्रमाणे 'क्ष' किरण टाकण्याचें कार्य त्या पत्रातील घटनेचा आणि त्याच्याच जोडीला टिपूच्या मृत्यूनंतरही मराठ्यांच्या हिंदुसत्तेने मुस्लिमांच्या राजसत्तेचा जो अंतिम अुरुभंग करून टाकला त्या खडर्याच्या विजय-समरात घडलेल्या घटनेचा अुल्लेख करणें आम्ही अपरिहार्य समजतो.

वर अुल्लेखिलेल्या पत्रात मराठी राजसत्तेचे सेनापति हरिपंत फडक्यांनी मराठी साम्राज्याचे श्रीकरणाध्रीप नानांना टिपूने त्याच्या पराजयानंतर केलेल्या करारातील वचनें पाळलीं जातील याविषयी आश्वासक म्हणून आपले स्वत:चे दोन लहान पुत्र अिंग्रज-मराठ्यांच्या विजयी सेनापतींचे हाती तारण (ओलिस) म्हणून सोपवून दिले होते. तें वृत्त आपल्या शत्रूला आपण किती हीनदीन केलें होतें, तें क्वचित् सहजासहजी अुल्लेखण्यासाठी देअून पुढे लिहिलें होतें, 'टिपूचीं तीं दोन्ही मुलें लॉर्ड कॉर्नवालीसने माझ्याकडे धाडलीं होतीं. मी (हरिपतांनी) त्यांना पाहिलें तेव्हा तीं दोन्ही मुलें म्हणत होतीं की, आम्ही भुकेले आहोत.' मी त्यांना अेका शेजारच्या तंबूत धाडलें आणि त्यांना पोटभर जेवू घालण्यास सांगितलें. नंतर काही वेळाने त्यांना कॉर्नवॉलीसकडे अिंग्लिश शिबिरात पोचविलें !

ही गोष्ट ह्या ग्रंथात देत असता आमच्या मनापुढे दुसरी अशीच अेक घटना अुभी राहत आहे. तीही येथे देणें हें पृष्ठ ७१६ ते ७३६ वर केलेल्या सद्गुण-विकृतीच्या प्रकरणाचें हृदयविदारक अेक यथावत् चित्रच देण्यासारखें होणारें आहे म्हणून ती घटना सांगतो. पूर्वी सन सतराशेच्या आरंभीच्या दहा अेक वर्षाच्या आस-पास पंजाबातील आम्हां हिंदु शिखांचे परम प्रतापी धर्मवीर श्रीदशमगुरु गोविंद-सिंग यांना मोगली सत्तेपुढे युद्ध चालू ठेवणें अशक्य झालें. चंदनगडच्या वेढ्यात शेवटी गुरु गोविंदसिंगजी त्यांच्या पुत्रांसह अटकले गेले. अगदी प्रतिज्ञाबद्ध अशा त्यांच्या केशधारी शीख सैन्यातसुद्धा मुसलमानांची धास्ती खाअून गुरुजींना सोडून जाण्याचा आणि शीख धर्माचा त्याग करण्याचा कट होअून त्यांतील अनेक शीख किल्ला सोडून शिष्यत्वाचें त्यागपत्र देअून निघून गेले. गुरुजींचे दोन वडील पुत्रही त्यांच्या समक्ष युद्धात ठार मारले गेले. शेवटी अशा अडचणीतून प्राण सोडून वाट फुटेल तिकडे ज्यांनी त्यांनी आपला जीव वाचविण्यास निघून जावें असें गुरुजींनी सांगितलें आणि अेक गुप्त सधि सापडताच ते स्वत:ही गड सोडून अज्ञातमार्गे निघून गेले. त्या घालमेलीत त्यांचे बारा वर्षाच्या आत वय असलेले दोन लहान पुत्र चुकामूक होअून मुसलमानांच्या हाती सापडले. त्यांना मुसलमानांनी त्यांच्या धर्म-बुद्धीप्रमाणे कसें वागविलें ?

सुलतान टिपूच्या अशाच दोन लहानग्या राजपुत्रांना मराठ्यांच्या हाती तीं मुलें पाडाव होअून पडल्यानंतर त्यांना मराठी धर्माचाराप्रमाणे किती दयेमायेने वागविलें, तें वर सेनापति फडके यांच्या पत्रात दिलेलेंच आहे.

अिकडे शिख गुरु गोविंदसिंगाचे ते दोन लहान छावे मुसलमानांच्या हाती पाडाव होऊन पडताच त्यांना सेनासभेत आणून प्रश्न करण्यात आला, 'तुम्ही मुसलमान होता का? होत असाल तर तुम्हांला जीवदान आणि हवें तें देण्यात येअील, नाही तर नाही.' मुलांनी अुत्तरिलें, 'आम्ही मुसलमान होणार नाही, आम्हांस जीवदान न मिळालें तरी चालेल.' त्यासरशी त्या मुसलमानांच्या राक्षस न्यायाने हुकूम दिला गेला की, त्या मुलांना तत्काल जिवंतपणी भिंतीत चिणून काढावें. तसे ते चिणले जात असता नवी नवी वीट ठेवते वेळी त्यांस पुन्हा पुन्हा विचारलें जाअी 'मुसलमान होता का?' ते हिंदु छावे पुनः पुनः म्हणत, 'मुसलमान होन नाही.' शेवटची वीट दोघांवर चढली, श्वास बंद झाला! आजही कोणीही हाडाचा हिंदु त्या स्थली बलिदानाच्या वातावरणात शिरला असता, 'मी मुसलमान होत नाही! होत नाही!! होत नाही!! हिंदु मी, शीख आम्ही, मरण मी वरी ॥' हे स्वर तेथे घुमू लागतात!

परंतु घटनाव्यत्यय होअून क्रूरतापूजक मुस्लिम टिपूच्या हाती आमच्या पेशव्यांचीं अशीं दोन अर्भकें रणधुमाळीत पाडाव होअून पडलीं असतीं तर? त्यांना तो टिपू आमच्या हिंदुहृदय सेनापति फडक्यांप्रमाणे त्या अर्भकांना जेवू घालून, आश्वासून पेशव्यांकडे कधीही परत धाडता ना! तसें कृत्य तो त्याच्या 'धर्म' समजुतीप्रमाणे धर्मबाह्य आणि कापुरुषत्वाचें लक्षण समजता! त्याच्या परपरागत धर्मप्रवृत्तीप्रमाणे तो क्रूरकर्मा टिपू त्या आमच्या पेशव्यांच्या अर्भक राजपुत्रांस भिंतीतच जिवंत चिणून टाकता – नाहीतर हत्तीच्या पायाखाली चिरडून टाकता! आणि हिंदु मात्र त्या राक्षसीपणाचा कोणत्याही प्रकारचा सूड, शक्ति असूनही सवाअी राक्षस होअून घेते ना! कारण त्यांच्या हाडीमासी खिळत चाललेल्या सद्गुणविकृतीच्या रोगाने ते पछाडलेचे पछाडलेले राहिले होते!

हेंही येथे सांगून टाकतो की संकटात सापडलेल्या शत्रूवर तुटून पडू नये, रथ्यांनी रथ्यांशीच लढावें, खड्गीनी खड्गीशी, निःशस्त्र शत्रुशी तो सशस्त्र होअीतो लढू नये, बेशुद्ध शत्रूवर शुद्धीत येअीतो आघात करू नये अित्यादि प्रकारची रणनीति महाभारतकाली समुचित असेल. कारण युध्यमान दोन्ही पक्ष तेच नियम पाळीत, अेकाच रणनीतीचे ते अुभयता पूजक होते. परंतु या सद्गुणविकृतीमुळे पात्रापात्रविवेकानुसारच ती रणनीति वापरली पाहिजे, ही गीतेतील शिकवण विसरली गेल्यामुळे सद्गुणविकृतीने नेभळट आणि बुद्धिभ्रष्ट झालेल्या हिंदूंनी मुसलमानांसारख्यांच्या राक्षसी रणनीतीशीही त्याच मूलतः सात्त्विक असलेल्या पण असमयज्ञतेने केवळ आत्मघातक ठरणाऱ्या रणनीतीने लढण्याचें व्यसन काही सोडलें नाही! वर दिलेल्या टिपूच्या अुदाहरणानंतरही मराठ्यांची आणि त्या दिल्लीच्या अेक सहस्र शतकांच्या मुस्लिम राजसत्तेचा अगदी शेवटचा केवळ

वळवळत अुरलेला जो अंश निजामशाहीत अुरलेला होता त्या निजामाशी हिंदु-मुस्लिम संघर्षातील शेवटची टक्कर अुडून ती मुस्लिम सत्ताही रणांगणात हिंदूंच्या पायाखाली चिरडून गेली तरीपण त्या लढाअीतही ह्या सद्गुणविकृतीचें अेक लाजिरवाणें अुदाहरण जें घडलें तेंही येथे या विषयाचा शेवटचा निरोप घेतांना सांगून टाकतो.

खर्ड्याच्या लढाअीचे प्रसंगी घडलेलें सद्गुणविकृतीचें अुदाहरण !

हिंदु मुसलमानांच्या ह्या सहस्रवर्षीय महायुद्धातील सामान्यत: अगदी शेवटची निर्णायक लढाअी सन १७९५ मध्ये खर्डा येथे झाली. त्या लढाअीत हिंदु-छत्रपतींच्या मराठ्यांनी निजामच्या मुस्लिम सत्तेचा अगदी चेंदा-मेंदा करून टाकला. पण या सद्गुणविकृतीच्या असाध्य रोगाचा असा अेक झटका या तुंबळ लढाअीमध्येच मराठ्यांना आला होता की, जर तो किंचित् अधिक काळ टिकता तर बाजू हिंदूंवरच अुलटून मुसलमान त्या लढाअीत मराठ्यांचीच दाणादाण करायला सोडते ना ! रणांगणावर हिंदु-मुस्लिम सैन्ये भिडताच रणनीतीच्या डाव-पेचात मराठ्यांनी निजामाला पकडून अशा निर्जन नि निर्जल स्थली कोंडलें की, त्याच्या अत्राढ्य सैन्याला दाणावैरण मिळेनाशी झाली. विशेषत: त्याच्या सैन्यात पाण्याच्या अभावी ज्याच्या त्याच्या तोंडचें पाणी पळालें ! त्याचे शेकडो मुस्लिम सैनिक पशुही पिणार नाहीत अशा डबक्यांतलें पाणीही पिअू लागले ! स्वत: निजाम 'बहादुराच्या' डोळ्यास पाणी आलें पण प्यावयास पाणी मिळेना ! अशा दुर्धर पेचात मुस्लिम सेना सापडली असता मराठ्यांच्या तोफांच्या गडगडाटाने सारें आकाश दणाणू लागलें !

परंतु याच वेळी संकटग्रस्त शत्रूला, तो शत्रु दुष्ट असताही आणि मूर्छित पडला असताही, रणांगणात त्याला थोडा सावध होअू देण्यास आपण हत्यार आवरून त्या शत्रूसही अवश्य तें साहाय्य द्यावें, ह्या हिंदूच्या पुरातन, अुदार वेडाच्या लहरीने पेशव्यांच्या मंत्रिमंडळास अकस्मात् झपाटलें ! आपले मुख्य शत्रु जे 'निजाम साहेब' ते स्वत: तहानेने कासावीस होत असता त्यांना जिवंत पकडण्याची आणि मुस्लिमांची सर्व सेना नष्ट करण्याची संधि आली असताही त्या शत्रूवर शास्त्रोचित दया करणें, हेंच खरें वीरभूषण होय, अशा कळवळीने पेशव्यांनी मंत्रिमंडळाच्या संमतीने स्वत:च्या सैन्यासाठी पराकाष्ठेने संरक्षिलेल्या पिण्याच्या पाण्यातून त्या निजाम बहादरांच्या राजकुटुंबीयांसाठी पुरेल अितक्या पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था केली ! आणि हें भर लढाअीत ! ! निजामाचें सर्व मुस्लिम सैन्य हिंदूनी त्या स्वत: निजामासुद्धा पक्के कैचीत पकडलें असता '**क्षमा वीरस्य भूषणम्**' या सद्गुणविकृतीच्या सूत्रान्वये ! ! !

वदतो व्याघाताचें अुदाहरण !

मुसलमानांचा पाडाव होअून वलवत्तर अनुकूल संधि मिळाली तरी प्रथमपासूनच हिंदूना अशी भीति वाटत आलेली असे की, जर आपण वाटविलेल्या हिंदूना किंवा जन्मजात मुसलमानांना आज हिंदु करून घेतलें, तर त्यायोगे अधिकच चवताळून देशातील आजूवाजूचीं मुस्लिम राज्यें नि लोक अुद्या आपल्यावर सशस्त्र स्वारी करतील किंवा सीमा प्रांतापलीकडून त्यांची अेखादी नवी टोळधाड आपल्यावर तुटून पडेल आणि ते आपणा हिंदूंचा दसपट अधिक अत्याचार नि छळ करतील ! ह्या मुसलमानांच्या सतत भीतीमुळेच हिंदु लोकांनी वाटविलेल्या हिंदूना पुन्हा शुद्ध करून स्वजातीत परत घेअू नये असा कडक जातिनियम केला. भंग्यापासून ब्राह्मणांपर्यंत सर्व जातींनी आपण होअून जी ही 'शुद्धिबंदीची' धार्मिक बेडी आपल्या पायांत ठोकून घेतली ती मुस्लिमांच्या वारंवार होणाऱ्या सशस्त्र आक्रमणांना नि अत्याचारांना भिअूनच होय !

ही वरील समजूत किती असमंजस, अधुरी नि अवास्तव आहे हें दाखविण्यासाठी आणि या ग्रंथाच्या सर्वच प्रबंधांतून हिंदु-मुसलमानांच्या या महायुद्धाची चिकित्सा करताना आम्ही जीं विधानें केलीं आहेत त्यांनाही अैतिहासिक पाठिंबा किती भरपूर मिळू शकतो तें दिग्दर्शिण्यासाठी या चालू ग्रंथात टिपूशी झालेल्या युद्धामधील कालावधीत घडलेल्या मराठ्यांच्या अितिहासातील काही वृत्त पृष्ठ ७६५ ते ७६९ पृष्ठापर्यंत अेक अुदाहरण म्हणून विस्तारश: दिलेलें आहे.

तेंही अुदाहरण क्षणभर बाजूला ठेवलें तरी त्याच्याही आधी अितका साधारण प्रश्न विचारणें पुरें आहे की, जर 'मुसलमान अधिक चवताळतील' अशा सदोदित आणि सरसकट भीतीने हिंदु लोक खरोखरीच ग्रस्त झालेले असते तर मुस्लिमांवरील धार्मिक प्रत्याक्रमणाचा प्रश्न सोडाच, पण हिंदूंनी मुळातच आपल्या राजकीय स्वातंत्र्यासाठीसुद्धा मुस्लिमांवर राजकीय प्रत्याक्रमण कधीच केलें नसतें ! त्यांचा प्रतिकारसुद्धा केला नसता ! कारण मुस्लिमांनी सशस्त्र स्वाऱ्या करून हिंदूंची जेथे जेथे राज्यें घेतलीं किंवा ते घेअू शकले तेथे तेथेच काय ते त्यांना हिंदूंवर धार्मिक अत्याचार करणें शक्य झालें किंवा शक्य होणारें होतें. भीतिच वाटायची तर हिंदूंना प्रथम मुस्लिमांच्या राजकीय आक्रमणांची वाटावयास पाहिजे होती. परंतु किरकोळ घटना सोडून त्या अितिहासाकडे अेकवटपणे पाहता अगदी महंमद गझनीच्या नि घोरीच्या अघोरी स्वाऱ्यांपासून आपआपल्या स्वराज्याचे नि स्वधर्माचे संरक्षणार्थ हिंदूंनी रणांगणामागून रणांगणें लढविलीं होतीं. राज्यें गेलीं, पुन्हा मिळविलीं, आज हार, तर अुद्या जीत, आज जीत तर अुद्या हार, पण सतत सहाशे सातशे वर्षें मुस्लिमांशी जो हिंदु साऱ्या हिंदुस्थानभर सशस्त्रपणे सारखा लढत राहिला, हिंदुस्थानची अंगुली न अंगुली भूमि लढवीत राहिला आणि शेवटी

मुस्लिम राजसत्तेला दानी तृण धरावयास ज्या हिंदूने भाग पाडलें, तो हिंदु मुसलमानांच्या 'अधिक चवताळण्याला' भीक घालणारा होता असें म्हणणें हें वदतो व्याघाताचेंच अेक अुत्कृष्ट अुदाहरण होय !

मुसलमानांना हिंदु करून घ्यायचें नाही किंवा मुसलमानांनी हिंदुस्थानात स्थापिलेल्या अिस्लामी धार्मिक सत्तेवर कोणतेंही प्रत्याक्रमण करावयाचें नाही, त्यांना धार्मिक प्रश्नो कोणताही अुपसर्ग द्यावयाचा नाही, कारण तीं कृत्यें आपल्या हिंदु धर्माच्या सर्वस्वी विरुद्ध आहेत, अशी हिंदूंची ठाम प्रवृत्ति पाहून मुसलमानांना अिस्लामी धर्मसत्तेच्या संरक्षणासाठी कोणतीही चिंता करण्याचें कारण अुरलें नाही. त्यांना अेकच काय ती चिंता अुरली होती आणि ती म्हणजे आपलें धार्मिक आक्रमण अेकसारखें वाढवून आपल्या हातून हिंदूंनी राजसत्ता जरी हिरावून नेली असली तरी निदान आपल्या अिस्लामी धर्मसत्तेची कक्षा भरतखंडभर वाढविण्याचे अटोकाट प्रयत्न करण्याची काय ती होती. मुसलमानांच्या या धर्मसत्तेपायी हिंदु जगताची केवढी हानि झालेली होती याची चर्चा आम्ही ह्या ग्रंथात वर अधून मधून केली आहे. आता येथे काही ठोकळ आणि अेकवट आढावा देत आहो. आणि तोही त्या मुस्लिम धर्मसत्तेपायी झालेल्या दुय्यम अशा अनेक हानिकारक गोष्टींविषयी नव्हे तर तिच्यामुळे जे दोन सर्वांहून अधिक हिंदुविघातक परिणाम झाले त्या दोन गोष्टींविषयीच होय.

संख्याबळाची हानि

पहिली गोष्ट म्हणजे हिंदूंच्या संख्याबळाची झालेली प्रचंड नि राष्ट्रव्यापी हानि. साधारणतः त्या अेक सहस्र वर्षांत दोन ते तीन कोटी हिंदूंना मुसलमानांनी बाटविलें !

हिंदूच्या संख्याबळाचा जो रक्तशोष चाललेला होता तो त्या काळच्या हिंदुसमाजालाही कळत होता. परंतु त्या रक्तक्षयाच्या रोगावर शुद्धिबंदीच्या बुद्धिभ्रंशामुळे त्यांना दुसरा अुपचारच सुचत नव्हता. असाध्य रोगाची प्राणांतिक व्यथा रोगी जशी अगतिकपणे केवळ सोशीत राहतो तसें त्या काळचें हिंदुजगत् ही रक्तक्षयाची प्राणांतिक व्यथा अगतिकपणे केवळ सोशीत राहिलें !

भूक्षेत्राची हानि

परंतु 'संख्याबळाच्या' ह्या हानीहूनही भयंकर अशी दुसरी जी अेक हिंदुराष्ट्राची हानि होत होती ती म्हणजे हिंदुस्थानच्या विस्तृत भूमीला खंडखंडशः मुस्लिमांची ही अिस्लामी धार्मिक सत्ता हिंदूंच्या हातून न कळत छिनावीत चालली होती ही होय.

हिंदूंशी लढून जितकी भूमि मुसलमानांना साऱ्या हिंदुस्थानभर जिंकता आली नाही तितकी भूमि मुस्लिमानी हिंदुस्थानभर हिंदूंना बाटवून जिंकली !

कारण जे दोन ते तीन कोटी हिंदु त्यांनी वाटवून मुसलमान केले आणि जे लक्षावधि मुसलमान वाहेरून हिंदुस्थानात आले त्या अुभयतांचें वास्तव्य हिंदुस्थानातच स्थायिकपणे झालेलें होतें. त्यांच्या ह्या कोटीकोटींच्या वसतीखाली नि वसतीसाठी हिंदुस्थानातील गावें, नगरें, प्रदेश यांतून जितकी भूमि व्यापली गेली तितकी वस्तुतः मुसलमानांच्याच सत्तेखाली गेली. त्या विस्तीर्ण भूमीवर मुसलमानांची धर्मसत्ता प्रभुत्व गाजवीत होती, त्यांचा हिरवा चांद हिंदूंच्या देशाच्या त्या विस्तीर्ण भागावर अप्रतिहतपणे फडकत होता. मुसलमानांच्या हातची राजसत्ता हिंदूंनी विशेषतः मराठ्यांनी, त्या महायुद्धाचे शेवटी साऱ्या हिंदुस्थानात हिरावून घेतली असली तरीही वैयक्तिक नि सामुदायिक सत्ता नांदत होती मुसलमानांची. ती मत्ताही (Property) होती मुस्लिम नागरिकांचीच.

पुन्हा मुस्लिमांची ती लोकसंख्या त्यांच्या वहुपत्नीकत्वामुळे आणि प्रच्छन्न धर्मप्रसारामुळे सारखी वाढत होती आणि त्या प्रमाणात हिंदुस्थानची अधिक अधिक भूमिही त्यांच्या वसतीखाली जाअून मुसलमानो धर्मसत्तेच्या हातात पडत चालली होती. ह्या वस्तुस्थितीची काही कल्पना येण्यासाठीं अितकें सांगितलें तरी पुरें आहे की, हिंदूंची, विशेषतः मराठ्यांची राजसत्ता वस्तुतः (De facto) प्रस्थापित झाल्यावरही प्रत्येक लहान मोठ्या गावातून, मुसलमान वाडा किंवा 'मुसलमान मोहल्ला' म्हणून अेक निराळा भाग वसलेला असे. प्रत्येक नगरातून तर सोडाच पण प्रत्यक्ष पुणें, सातारा, कोल्हापूर, नागपूर, वडोदें, देवास, धार, अिंदूर, ग्वालियार, जोधपूर, अुदयपूर आणि पुढे पुढे शिखांचे अमृतसर, लाहोर ते थेट श्रीनगर-सारख्या हिंदूंच्या मोठमोठ्या स्वतंत्र राजधान्यांतूनही प्रत्येकी सहस्रावधि मुसलमानांनी व्यापलेले निरनिराळे विभागचे विभाग 'मुस्लिम पुरा', 'मुस्लिम आबादी' अशा नांवांनी तुटकपणे वसलेले होते. आणि त्या त्या विभागावर मुसलमानांची धर्मसत्ताच नव्हे तर भूस्वामित्वही (जमीनमालकीपण) प्रस्थापित झालेलें होतें.

आणि विशेष हें की त्या लक्ष लक्ष मुसलमानांच्या धार्मिक सत्तेचें आणि वैयक्तिक मत्तेचें नैर्बंधिक (कायदेशीर) संरक्षण, 'आपली प्रजा' ह्या भ्रमाने तेथील स्वतः हिंदु राजेच, त्या मुसलमान नागरिकांना हिंदु नागरिकांच्या समान पातळीवर लेखून करीत होते. त्यातही त्या काळच्या मुस्लिमांच्या प्रकरणी **'धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर'** हें सूत्र शंभर टक्के लागू होत असल्याने आणि त्या काळी हिंदु आणि मुसलमान ह्या दोघांमध्ये कट्टर वैराचाच काय तो अेकमेव संबंध अस्तित्वात असल्यामुळे मुसलमानांच्या हाती गेलेले हे सारे भूमिखंड राष्ट्रशत्रूच्याच हाती सोपवून दिल्यासारखे होते.

अशा रीतीने हिंदुस्थानातील गावागावांतून, नगरांनगरांतून आणि प्रदेशांतून त्या काळापासूनच लहान मोठीं 'मस्लिम स्थानें' निर्माण होत चाललेलीं होतीं.

म्हणजेच हिंदु विभाग नि मुस्लिम विभाग अशा दोन भागांत अखंड हिंदुस्थान देशाची वाटणी त्या काळापासूनच प्रच्छन्नपणे होत चाललेली होती.

हीं लहान-मोठीं मुस्लिमस्थानें म्हणजे प्रस्थापित हिंदु-राज्यसत्तांच्या बांधकामाच्या पायात त्या छुप्या अिस्लामी धर्मसत्तेने पेरलेले जिवंत कालध्वम्, टाअिम बाँबच होते !

तथापि त्या भूहानीच्या विद्यमान् नि संभाव्य अशा भयंकर परिणामांची तीव्र जाणीव किंवा नुसती जाणीवसुद्धा त्या काळच्या हिंदुराज्य सत्ताधिकाऱ्यांना, सामान्यजनांना किंवा त्या काळच्या अितिहासलेखकांना सुद्धा नव्हती, असें दिसतें. कारण शुद्धिबंदी प्रभृति धार्मिक खुळापायी हिंदु राष्ट्रावर त्या काळी झालेल्या नि होणाऱ्या संख्याहानीच्या नि भूमिहानीच्या दुष्परिणांमाची आम्ही येथे करीत आहो अशी स्पष्ट, सडेतोड, दूरदर्शी नि अैतिहासिक अुकल अन्यत्र कोणी कोठे केल्याचें आढळत नाही. ती चर्चा कोठे आढळली तरी केवळ अपवादभूतच ठरणार !

दुसरें असें की जर मुस्लिम धर्मसत्तेच्या ह्या वरील दुष्परिणामांची तीव्र जाणीव हिंदूंना त्या काळी झालेली असती तर आम्ही पूर्वी वर्णिल्याप्रमाणें टिपू सुलतानाच्या राजसत्तेला धुळीस मिळविताच महाराष्ट्रीय राजमंडळाने लगोलग टिपूच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांनी स्थापलेल्या अिस्लामी धर्मसत्तेलाही धुळीस मिळविण्यासाठी मुस्लिमांवर शस्त्रसज्ज नि बलवत्तर धार्मिक प्रत्याक्रमणही केलें असतें ! कारण तसें प्रत्याक्रमण करण्याची जितकी अनुकूल संधि हिंदूंना पूर्वी कधीही मिळाली नव्हती तितकी सर्वस्वी अनुकूल संधि त्या वेळी मिळाली होती. त्या वेळी साऱ्या हिंदुस्थानात मराठ्यांचा हात धरील किंवा त्यांच्याकडे वाकड्या दृष्टीने नुसतें पाहील अशी कोणचीही मुस्लिम शक्ति अुरलेली नव्हती, हें आम्ही वर सांगितलेंच आहे. आमचा त्या काळचा वीरभाट आपल्या पोवाड्यात हिंदुत्वाच्या रसरशीत अभिमानाने म्हणतो की –

जलचर हैदर निजाम अिंग्रज रण करिता थकले ॥
ज्यानि पुण्याकडे विलोकिलें ते संपत्तिला मुकले ॥

राक्षसाशी लढायचें आणि जिंकायचें तर सवाअी राक्षस होअूनच लढलें पाहिजे

वरील अनुकूल संधि येताच टिपूच्या युद्धात लढलेले आणि त्या वेळी दक्षिणेत असलेले भोसले, होळकर, पटवर्धन, रास्ते अित्यादि मराठी राज्यमंडळाच्या सरदारांनी, कारभाऱ्यांनी, पेशव्यांनी आणि छत्रपतींनी प्रमुख प्रमुख धर्माधिकाऱ्यांसह विचारविनिमय करून खालील भाषेत जरी नसली तरी खालील आशयाची राजाज्ञा महाराष्ट्र राज्यातील हिंदुमात्रांना तत्काल सोडली असती की :–

'महाराष्ट्रीय वीरांच्या पराक्रमाने जशी 'सुलतान टिपूची अिस्लामी राज्य-सत्ता धुळीस मिळविली तशीच त्या 'सैतान' टिपूच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांनी हिंदूंवर राक्षसी अत्याचार करून स्थापलेली त्याची अिस्लामी धर्मसत्ताही धुळीस मिळविण्यासाठी आणि त्या अत्याचारी अपराध्यांचें कठोर पारिपत्य करण्यासाठी मुस्लिमांवर धार्मिक प्रत्याक्रमण करण्याचें आमच्या राज्यमंडळाने निश्चित केलें आहे.

'आद्य श्री शंकराचार्यांच्या खालोखाल ज्यांचें धुरंधरत्व अखिल हिंदुजगत् मानीत आलें आहे त्या विजयनगरच्या–हिंदु साम्राज्य-संस्थापक श्री शंकराचार्य विद्यारण्य स्वामी यांनी दिलेला शास्त्रार्थ नि शास्त्राचार शिरोधार्य मानून, मुस्लिमांच्या अत्याचारी धर्मसत्तेवर प्रत्याक्रमण करण्याचे कार्यी ज्या राष्ट्रघातक रूढीच्या बेडीने हिंदु समाजास आजपर्यंत पगु करून सोडलें होतें ती शुद्धिबंदीची मानसिक बेडी आज आम्ही प्रथमतः तोडून टाकीत आहोत. आणि आमच्या महाराष्ट्रीय राज्यात झाडून साऱ्या अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे कडक व्यवस्था करण्याची आज्ञा सोडीत आहोत –

'प्रत्येक ग्रामधिकाऱ्यांना नि नगराधिकाऱ्यांना आपआपल्या कक्षेत ज्या ज्या हिंदु स्त्री-पुरुषांना मुस्लिमांनी बाटविल्याचें आढळून येअील त्यांना त्यांना अेका 'निरोधन शिविरात' शासनीय संरक्षणाखाली अेकत्र जमवन ठेवावें. त्यांना चरितार्थाची कोणतीही अुणीव पडू देअू नये.

'प्रत्येक गावातील ज्या ज्या मुस्लिमांच्या घरात हिंदु स्त्रिया, मुली नि मुलें बळाने बाटवून रावविलीं जात असतील त्या त्या घरातील सर्व मुस्लिम स्त्री-पुरुषांना तत्काळ वेडचा ठोकून कारागृहात बंद ठेवावें आणि तेथील हिंदु स्त्रियांना आणि मुलांना तत्काळ मुक्त करून नि ममतेने वागवून वरील निरोधन शिबिरातील समुदायात पोचवून द्यावें.

'त्याचप्रमाणे टिपूने अुभारलेली जी क्रूरातील क्रूर मुस्लिम तरुणांची निवडक अिस्लामी पृतना (पलटण) होती आणि जिला तो माझ्या लाडक्या मुलांचें सैन्य म्हणून कुरवाळीत, असे, तिच्यातील मुस्लिम सैनिक महाराष्ट्रात, कर्नाटकात किंवा अितरत्र ज्या ज्या ठिकाणी सापडतील त्यांना त्यांना तत्काल पकडून नि वेडचा ठोकून वरील कारागृहांतून डांबून ठेवण्यात यावें. हिंदूंतील तरुण नि सुंदर अशा ज्या अनेक निरागस स्त्रियांना पकडून टिपूने या अिस्लामी पृतनेतील तरुणांस त्यांच्या हिंदूंवरील अत्याचारांचें पारितोषक म्हणून वाटून वाटून दिल्या होत्या, त्या सर्व हिंदु तरुणींना मुक्त करून नि ममत्वाने वागवून वरील निरोधन शिबिरात धाडून द्यावें.

'अितकी व्यवस्था होताच अेक राष्ट्रीय शुद्धिसप्ताह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नेमण्यात येअील. त्याच्या आधी वरील निरोधन शिबिरांतील जे सहस्रावधि

बाटविलेले हिंदु स्त्री-पुरुष अेकत्र केलेले असतील त्या सर्वांना, मोठमोठ्या गटाने त्यांच्या त्यांच्या मूळ वसतीला लागून असलेल्या पवित्र क्षेत्रस्थानात किंवा धारवाड, बदामी अित्यादि ज्या नगरांत त्या रणधुमाळीत टिपूच्या अत्याचारी मुस्लिम सैन्याचा मराठ्यांनी मोड केलेला होता त्या त्या नगरांत सामुदायिक शुद्धिकरणासाठी सैनिक संरक्षणाखालो पोचवून देण्यात यावें. तेथे तेथे त्या मुस्लिमांनी बाटविलेल्या लक्षावधि हिंदु स्त्री-पुरुषांचे शुद्धीप्रीत्यर्थ मोठमोठे यज्ञ केले जावेत आणि मोठ्या समारंभाने प्रचंड समुदायांच्या हिंदु धर्माच्या जयघोषात त्या सर्वांची शुद्धि करण्यात यावी. त्यांच्यापैकी ज्यांना त्यांची मूळचीं हिंदु कुटुंबें आपल्या स्वगृही ममतेने नि ममतेने परत घेअू अिच्छीत असतील त्यांना त्यांना आपापल्या घरी पोचवून द्यावें. परंतु ज्या सहस्रावधि शुद्धीकृत हिंदूंना त्यांच्या मूळच्या पोट जातीत तसा ममत्वपूर्वक प्रवेश होअू शकत नसेल त्या सर्वांचा, आपल्या राजपुतातील पौराणिक कथेप्रमाणे 'अग्निकुल' नांवाची अेक नवीन क्षत्रिय जाति हिंदु जगताच्या परिघातच निर्माण करून त्या जातीत सरमिसळ समावेश करण्यात यावा. त्याना हिंदुत्वाचे सर्व अधिकार अितर हिंदूंसह समानतेने अुपभोगिता आले पाहिजेत, असें राज्याधिकाऱ्यांना आणि धर्माधिकाऱ्यांना आज्ञापिण्यात यावें.

'पूर्वी टिपूच्या आज्ञेने मुसलमानांनी जितक्या कुलीन नि सुंदर हिंदु तरुणींना पकडून, बाटवून त्यांच्या विशिष्ट 'अिस्लामी पृतनेतील' सैनिकांना वाटून दिल्या होत्या निदान तितक्या तरी मुस्लिमांतील सुंदर नि तरुण स्त्रियांना पकडून आणून वरील शुद्धि समारंभातच हिंदु करून, त्या युद्धामध्ये ज्या ज्या मराठी वीरांनी विशेष पराक्रम केला होता त्यांच्या त्यांच्याशी त्यांचीं लग्नें लावून देण्यात यावींत

'नंतर टिपूशी झालेल्या युद्धकाळात ज्या आततायी मुस्लिमांनी हिंदूंवर धार्मिक अत्याचार केले, हिंदु स्त्रियांवर बलात्कार केले, हिंदु देव-देवतांचा अुच्छेद केला त्या सहस्रावधि मुस्लिम अपराध्यांचें पारिपत्य करण्यासाठी त्यांना वर अुल्लेखिल्याप्रमाणे ज्या ज्या कारागारांतून बंद करण्यात आलेले होते तेथून तेथून काढून सशस्त्र पहाऱ्यात, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आयत्या वेळी कळविण्यात येअील अशा चार पांच मुख्य मुख्य नगरस्थानी नेण्यात यावें. विशेषतः ज्या नरगुद आणि कित्तुर या राजधान्यांत हिंदु स्त्री-पुरुषांवर जे अनन्वित अत्याचार स्वतः टिपूने आणि त्याच्या मुस्लिम सैन्याने केले, त्या अत्याचारांचा सूड त्या मुस्लिम आततायांना कठोर प्रायश्चित्त देअून त्या नगरातील त्याच हिंदु स्त्री-पुरुष समाजाच्या डोळ्यांसमोर पुरेपूर घेतला जावा यासाठी त्या त्या कारागारांतून पकडून आणलेल्या मुख्य मुख्य मुस्लिम आततायांना आणि विशेषतः टिपूच्या त्या 'अिस्लामी पृतने'तील सैनिकांना त्या नरगुंद आणि कित्तूर येथे नेण्यात यावें. त्या शुद्धिसप्ताहातील ठराविक दिवशी ह्या शतशः आततायी मुस्लिमांना त्या त्या नगरातील विस्तीर्ण पटांगणात सहस्रो हिंदु प्रेक्षकांच्या समोर सशस्त्र सैनिकांच्या नि तोफांच्या कडेकोट

पाहन्यात अुभें करून त्यांना त्यांनी केलेल्या हिंदूवरील अत्याचारांचा पाढा वाचून दाखवून अेकजात तोफांच्या तोंडी देण्यात यावें.

हिंदु हुतात्म्यांच्या स्मृतीस राष्ट्रीय मानवंदना

'शेवटी ह्या अपूर्व शुद्धिसप्ताहाच्या सांगतेच्या दिवशी पूर्वी टिपूच्या सहस्रावधि मुस्लिम सैन्याने हिंदूंचीं गावेंचो गावें वेढून त्यांना बळाने मुसलमान करण्याचा किंवा त्यांचा असह्य छळ करण्याचा प्रलय मांडला होता त्या वेळेस त्या पाठलाग करणाऱ्या मुस्लिम पिशाच्च्यांच्या हाती पडून आपला धर्म बाटला जाअू नये यासाठी दुसरा कोणताही मार्ग सापडेना, तेव्हा ज्या सहस्रावधि हिंदु स्त्री-पुरुषांनी कृष्णा, तुंगभद्रा ह्यांसारख्या नद्यांच्या प्रवाहातून अुड्या घेअून किंवा अन्य प्रकारे स्वत:चे प्राण दिले, पण हिंदु धर्म सोडला नाही त्या सहस्रावधि हिंदु हुतात्म्यांना राष्ट्रीय मानवंदना देण्यासाठी साऱ्या महाराष्ट्र राज्यातील नगरानगरांतून आणि गडागडांवरून आणि सहस्रावधि हिंदुलोकांच्या, हिंदुधर्माच्या जयघोषात तोफांच्या तीन तीन फैरी सोडण्यात याव्यात.'

धार्मिक प्रत्याक्रमणांच्या ह्या हिंदु तोफांच्या गडगडाटाचे प्रतिध्वनि

जर मुस्लिमांच्या धार्मिक सत्तेवर मराठ्यांनी त्या काळी असें धार्मिक प्रत्याक्रमण केलें असतें तर त्याच्या वर दिलेल्या सांगतेच्या दिवशी महाराष्ट्रभर गडागडांवरून सुटणाऱ्या तोफांच्या ह्या प्रचंड गडगडाटाचे प्रतिध्वनि केवळ गोदा, कृष्णा नि तुंगभद्रा ह्या नद्यांच्या परिसरातच काय ते दुमदुमले नसते, तर गंगा, यमुना, सिंधु आणि तिच्याही पलीकडे वक्षु (ऑक्सस्) नदीच्या दऱ्याखोऱ्यापर्यंतच्या साऱ्या मुस्लिम जगतामध्ये दणाणून गेले असते! 'हिंदु लोकही बाटलेल्या लक्षावधि मुसलमानांसही परत हिंदु करून घेत आहेत! – हिंदु लोकांच्या पायातील शुद्धिबंदीची बेडी त्यांनी स्वत:च तोडून टाकली आहे!!" या नुसत्या बातमीसरशी सहस्रावधि तोफांच्या दणक्यांनी बसला नसता अितका हादरा त्या काळी निदान हिंदुस्थानातील मुस्लिम जगताला तरी बसला असता. त्यांचें अस्तित्वच कोलमडू लागलें असतें. हा नुसता अैतिहासिक तर्क नाही, तर अैतिहासिक संभाव्यतेची ही हमी आहे.

परंतु ती संभाव्यता संभाव्यताच राहिली. हिंदूंनी आपल्या पायातील शुद्धिबंदीची बेडी नाही तर नाहीच तोडली, न तोडू दिली. अर्थात् मुसलमानांनी हिंदुस्थानात त्या काळी स्थापलेली अिस्लामी धर्मसत्ताही अुखडून टाकता आली नाही.

परंतु मुस्लिमांचीं हिंदु धर्मावरील अघोर आक्रमणें होण्याच्या आधीपासूनच ज्या जन्मजात जातिभेदाचें राष्ट्रघातक विष हिंदु जगताच्या अंगात भिनू लागलेलें होतें त्यामुळे नि नंतर त्या मुस्लिमांच्या अघोर नि सतत आक्रमणांचा परिणाम

म्हणून त्या जातिभेदाच्या कचाटचात सारा हिंदु समाज अधिकाधिक पक्केपणी जखडला जात चालल्यामुळे हिंदुधर्मातील, संस्कृतीतील नि सामाजिक आचार-विचारातील ती मूळची प्रसरणशीलता, पचनशक्ति नि धार्मिक प्रांतातसुद्धा प्रखर असलेली प्रत्याक्रमक प्रवृत्ति अगदी क्षीण होऊन गेली. त्यामुळे म्लेंछासारख्या परधर्मीयांवर आक्रमण करून त्यांना हिंदु धर्मात नि हिंदु समाजात आत्मसात् करून घेणार तरी कसे !

'जो जन्मजात हिंदु नाही त्यास गंगेत जरी स्नान घातलें तरी तो जातिवंत हिंदु कसा होणार ? कारण जात जन्माने ठरते !

रासभ धुतला महा तीर्थामाजी ।
नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥

आणि अशा जन्मजात म्लेंच्छांना हिंदुत्वाचें गंध फासलें म्हणून त्यांस आम्ही आमच्या जन्मसिद्ध जातीत घ्यायचें ? त्यांच्यासह आम्ही पंगत करायची ? आणि ती जन्मजात म्लेंछ स्त्री असली तर ? तिला नुसतें हिंदूच्या करंडचातलें कुंकू लावलें म्हणून तिच्याशी आम्ही लग्न लावायचें ? आणि तेंही अगदी अुघड अुघड ! ! अशक्य ! अशक्य ! ! अधर्म्य ! अधर्म्य ! ! अशा धर्मभावना केवळ ब्राह्मण क्षत्रियांच्याच नव्हेत तर हिंदु जगतातील मांग, ढोर, भिल्ल अित्यादि तथाकथित अंत्यज वा वन्य जातीतही रोमरोमातून खिळलेल्या होत्या. त्यांना हाच खरा हिंदुधर्म वाटे. या जन्मजातपणाच्या मूळ सूत्राचेंच मुख्य सूत्र होतें – जो हिंदु स्वेच्छेने म्हणा, बळाने म्हणा, म्लेंछसंपर्काने अेकदा बाटला, तो बाटला ? जन्माचा बाटला ! वंशपरंपरेने बाटला !' अशा धार्मिक बुद्धिभ्रशाने पछाडलेल्या त्या कालातील कोटी कोटी हिंदूंचा शुद्धिकरणास किंवा म्लेंछावर धार्मिक प्रत्याक्रमणें करण्यास तीव्र विरोध होता, त्यात काय आश्चर्य !

सुदैव अितकेंच की –

सुदैव अितकेंच की, हिंदुस्थानावरील मुस्लिम आक्रमणाच्या प्रारंभकाळी रोटीबंदी, बेटीबंदी, शुद्धिबंदी, सिंधुबंदी अित्यादि बंद्यांप्रमाणे अेखाद्या बृहस्पतीने कुठल्यातरी स्मृतीत आणखी अेक अनुष्टुप घुसडून 'राज्यबंदी'चीही वेडी हिंदु-जातीच्या पायात ठोकण्याची आज्ञा सोडली नाही ! जसा मुस्लिमांनी बळाने बाट-विलेला हिंदु पुन्हा हिंदु होअू शकणार नाही, मुसलमान आणि त्यांच्याशी व्यवहार करणारा हिंदुही मुस्लिम होअून जातो, असें आज्ञापिणाऱ्या या 'शुद्धिबंदी'च्या धर्मज्ञेच्या चालीवर 'कोणतेंही हिंदुराज्य अेकदा मुसलमानांनी जिंकलें की तें बाटलेलें राज्य पुन्हा केव्हाही हिंदुराज्य होअू शकणार नाही, जो कोणी हिंदु तें राज्य परत घेण्याचा प्रयत्न करील तो स्वत:च बाटून मुसलमान होअील; पण तें राज्य काही हिंदु होअू शकणार नाही !' असें आज्ञापिणारी 'राज्यबंदी'चीही

धर्माज्ञा जर अेखाद्या हिंदु बृहस्पतीने सोडली असती तर मुसलमानांची धर्मसत्ता अुखडून देणारें धार्मिक प्रत्याक्रमण करणें हें जसें शुद्धिबंदीमुळे हिंदूंना मुळातच अशक्य नि अधर्म्य झालें, त्याचप्रमाणे मुसलमानांची राजसत्ताही अुखडून टाकणारें राजकीय प्रत्याक्रमण करणेंही ह्या राज्यबंदीच्या बेडीमुळे पंगु झालेल्या हिंदूंना अधर्म्य म्हणून अशक्य झालें असतें. आणि अफगाणिस्थान, अिराण, बाबिलोन, पुरातन अिजिप्त, तुर्कस्थान ते थेट मोरोक्कोपर्यंत जशीं पूर्वीचीं सारीं राष्ट्रें मरून जाअून मुस्लिममय झालीं, तसेंच हें हिंदुस्थानही त्याच काळी मुस्लिममय होतें! धार्मिक नि राजकीय दृष्ट्याही केवळ मुस्लिमस्थानच होअून जातें! हिंदुराष्ट्राच्या अितिहासाची शेवटची ओळ तिथेच लिहिली जाती. परंतु हिंदुराष्ट्रावरील तें अरिष्ट तरी शेवटी टळलें, अितकेंच नव्हे तर हिंदु पराक्रमाच्या देदीप्यमान तेजाने अुजळलेला हिंदु जातीच्या पुनरुज्जीवनाचा अेक पुढचा अध्याय लिहिला गेला.

त्या काळी हिंदुस्थानातच नव्हे तर जगाच्या ज्या बऱ्याच मोठ्या भागावर मुस्लिमांनी आपली राजकीय नि धार्मिक सत्ता स्थापिली होती त्या भागातील सर्व राष्ट्रांच्या अितिहासावरून हीच गोष्ट सिद्ध होते की, मुसलमानांची राजसत्ता आणि धर्मसत्ता ही दोन्हीही जीं बहुसंख्य राष्ट्रें अुखडू शकलीं नाहीत तीं तर आमूलात् नष्ट होअून मुसलमानमय झालींच. परंतु ज्या काही अमुस्लिम राष्ट्रांनी मुस्लिमांची राजसत्ता अुलथून पाडली परंतु त्यांनी स्थापलेली अिस्लामी धर्मसत्ता मात्र तशीच अबाधित ठेवली तीं राष्ट्रेंही मुस्लिमांच्या सतत नि भयावह अुपद्रवांपासून सुटू शकलीं नाहीत. केवळ तींच दहा पांच राष्ट्रें काय तीं त्या काळी मुसलमानांच्या ग्रासातून मुक्त होअू शकलीं, अितकेंच नव्हे तर अुलट मुसलमानांचा ग्रास करू शकलीं की ज्यांनी त्यांच्यावरील मुसलमानांची राजसत्ता अुखडून पाडताच मुस्लिम धर्मसत्तेवरही लगोलग दारुण प्रत्याक्रमण करून आपआपलें राष्ट्र धार्मिक प्रकरणीसुद्धा निर्मुस्लिम करून सोडलें. ह्या अुदाहरणाच्या स्पष्टीकरणार्थ स्थलाभावामुळे त्या काळचें अेकच अुदाहरण तेवढें अिथे देअू. तें म्हणजे स्पेनचें.

मुस्लिमांनी पादाक्रांत केलेला स्पेन निर्मुस्लिम कसा झाला ?

हिंदुस्थानवर मुस्लिमांचीं आक्रमणें चाललीं होतीं त्याच कालखंडात स्पेनदेशासही पादाक्रांत करून त्या देशात अरब विजेत्यांनी ओमियेड खलिफांच्या अधिपत्याखाली अेक प्रबळ मुसलमानी राजसत्ता स्थापन केली होती. अर्थातच युरोपातील अितर भागात चालू होतीं तशींच मुस्लिमांचीं धार्मिक आक्रमणें स्पेन देशातील ख्रिश्चनांवरही चालू होअून अनन्वित अत्याचारांचा कहर अुसळला. अगणित ख्रिश्चन स्त्री-पुरुषांना बाटविण्यात आलें किंवा ठार मारण्यात आलें. पुढे काही शतकांनंतर मुसलमानांतच आपआपसात यादवी माजली. तेव्हा युरोपातील बळावत चाललेल्या फ्रान्ससारख्या ख्रिश्चन राष्ट्राच्या साहाय्याने आणि पोपच्या प्रबळ प्रोत्साहनाने, मुस्लिमांच्या राजकीय नि धार्मिक प्रपीडनामुळे गांजून गेलेल्या स्पेनमधील ख्रिश्चन लोकांनी आपल्या अेका जुन्या राजवंशाचे नेतृत्वाखाली मुसलमानी

राजसत्तेविरुद्ध मोठें बंड अुभारलें. अनेक वर्षांच्या लढायांनंतर शेवटी अिसवी सनाच्या पंधराव्या शतकात स्पॅनिश ख्रिश्चनांनी मुसलमानी राजसत्तेचा पुरा मोड करून टाकला. परंतु हिंदुस्थानप्रमाणेच स्पेनमध्येही मुसलमानांच्या हातून जरी राजसत्ता छिनावली गेली होती तरीही मुसलमानांनी बाटविलेल्या अगणित स्पॅनिश ख्रिश्चनांवर आणि त्यांच्या वसतीखाली असलेल्या भूक्षेत्रावर मुसलमानांनी जी अिस्लामी धर्मसत्ता स्थापलेली होती ती तशीच अबाधित राहिली होती. अितकेंच नव्हे तर स्पॅनिश राष्ट्राला पुढे मागे दुभंगून टाकण्यासही कारणीभूत होण्याअितकी ती स्फोटक नि भयावह होती. हें संकट ज्यांना डोळ्यापुढे धडधडीत दिसत होतें आणि मुसलमानांनी पूर्वी केलेल्या धार्मिक अत्याचारांचा संधि सापडताच सूड घेण्यासाठी जे नेहमीच टपलेले असत त्या स्पॅनिश ख्रिश्चनांनी मुसलमानी राजसत्ते-प्रमाणेच वरील मुसलमानी धर्मसत्तेलाही धुळीस मिळविण्याचा निर्धार केला.

त्यातही ख्रिश्चन लोकांच्या पायात काही हिंदु लोकांप्रमाणे रोटीबंदी, बेटी-बंदी, शुद्धिबंदी, सिंधुबंदी अित्यादि 'धर्माचारांच्या' बेड्या ठोकलेल्या नव्हत्या.

त्यामुळे मुसलमानानी बाटविलेल्या त्यांच्या अगणित ख्रिश्चन स्त्रीपुरुषांना 'बाप्तिस्मा' देअून, शुद्ध करून, ख्रिश्चन धर्मात परत आणण्याचें कार्य राजकीय रणात विजयी झालेल्या स्पॅनिश लोकांना मनात येताच पार पाडण्याअितकें सुलभ होतें. अडचण जी होती ती मुस्लिमांच्या राजसत्तेची नि शस्त्रबलाची. तिचा नायनाट होताच स्पॅनिश ख्रिश्चन लोकांनी साऱ्या स्पेन देशातून मुस्लिम धर्माचा अुच्छेद करण्यासाठी अेकच धुमाकूळ मांडला. मुसलमानांनी बाटविलेल्या सहस्रा-वधि ख्रिश्चनांना पुन्हा 'बाप्तिस्मा' देण्याचीं अखंड सत्रें चालू झालीं. मुसल-मानांकडून यत्रतत्र सशस्त्र संघर्ष होतो असें दिसताच स्पेन अधिकच चिडून गेलें. स्पेनच्या ख्रिश्चन राजसत्तेने, ख्रिश्चन धर्मसत्तेने आणि ख्रिश्चन जनतेने प्रकट प्रतिज्ञा केली की स्पेनमध्ये मुसलमान म्हणविणारा कोणताही मनुष्य किंवा मशीद म्हणविणारें कोणतेंही बाधकाम यापुढे अस्तित्वात राहता कामा नये !

स्वतंत्र झालेल्या स्पेनच्या राज्यशासनाने अेक निश्चित अवधि ठरवून दिला आणि साऱ्या राज्यभर घोषणा करविली की या अवधीच्या आत झाडून साऱ्या मुसलमान स्त्री-पुरुषांनी अेकतर आपण होअून ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला पाहिजे, नाहीतर त्यांनी त्या अवधीमध्ये सहकुटुंब सहपरिवारे देशाच्या बाहेर नित्याचें निघून गेलें पाहिजे. पण जे कोणी मुसलमान त्या अवधीत ख्रिश्चनही होणार नाहीत किंवा स्पेन देशही सोडणार नाहीत त्या सर्व मुस्लिम स्त्री-पुरुषांचा अेकजात शिरच्छेद करण्यात येअील !!

काय म्हणता ? कोण घोर ही ख्रिश्चन राजाज्ञा ? होय ! पण हेंही ध्यानात ठेवा की स्पेनला जेव्हा मुसलमानांनी जिंकलें तेव्हा त्यांनी ह्याहूनही अघोर असे अत्याचार ख्रिश्चन जनतेवर तेथे बळाने धर्मांतर घडवून आणण्यासाठी केलेले होते. त्या वेळी ख्रिश्चन रक्ताचे पाट मार्गोमार्गी मुसलमानांनीही वाहांवले होते !

आज मुसलमानी रक्ताचे पाट मार्गोमार्गी ख्रिश्चन वाहविणार होते. वर दिलेली अवधि संपताच स्पॅनिश ख्रिश्चनांनी ठिकठिकाणी अुठाव करून स्पेनमध्ये अुरलेल्या मुस्लिमांचे, त्या अिस्लामी स्त्री-पुरुषांचें, आबाल-वृद्धांचें सरसकट शिरकाण केलें. मुस्लिम रक्तात न्हाअून स्पेनचें ख्रिश्चन चर्च 'शुद्ध' झालें! स्पेन निर्मुस्लिम झालें म्हणून स्पेन 'स्पेन' राहिलें! त्याचें 'मोरोक्को' झालें नाही!

मुसलमानांची तीच दुर्दशा पोलंड, सर्व्हिया, बल्गेरिया, ग्रीस अित्यादि ख्रिश्चन देशांत होअून त्या त्या देशांनी मुसलमानी राज्याच्या नि धर्माच्या पंजा-खाली पिचलेले आपले देश स्वतंत्र करून निर्मुस्लिम करून टाकले.

✦ ✦ ✦

प्रकरण ८ वें

पूर्वार्धाचा समारोप

या सर्व पूर्वाधात जीं अनेक विधेयें चर्चिलीं गेलीं आहेत त्या चर्चेचा मुख्य आशय ह्या समारोपात संक्षिप्ततः अेकसूत्रीपणे असा सांगता येअील की—

अैतिहासिक काली अितर कोणत्याही महान् राष्ट्राप्रमाणे भारतावरही मुख्यतः यवन, शक नि हूण या परकीय म्लेंच्छांचीं जीं सशस्त्र नि भयंकर आक्रमणें झालीं आणि ज्यांच्याशी भारताला शतकोशतकें झुंजावें लागलें त्या सर्व म्लेंच्छ आक्रमणाचा समरांगणात शेवटी पूर्णपणे पराभव करून हिंदुस्थानने त्यांच्या राज-सत्तेचा समूळ अुच्छेद केला आणि आपलें राजकीय स्वातंत्र्य पुन्हा पुन्हा प्रस्थापित केलें. अितकेंच नव्हे तर यवनशकहूणादिक म्लेंच्छ राष्ट्रांच्या ज्या लक्षावधि लोकांनी त्या त्या राजकीय संघर्षाच्या काळात हिंदुस्थानातील अनेक प्रांत व्यापून टाकून नित्याचीच वसती केली होती त्यांना आपल्या वैदिक धर्माची, देवदेवतांची, सस्कृत-संस्कृतीची दीक्षा देअून आपल्या समाजात अितके पूर्णपणे संव्यवहार्य करून घेतलें की, त्यांच्या मूळच्या म्लेंच्छीय गोत्रांचाच काय पण नांवांचासुद्धा त्याग करून आमच्या हिंदुजातीत ते बहुतांशी स्वेच्छेने नि पूर्णपणे अेकरस नि अेकजीव होअून गेले.

परतु मुसलमानी आक्रमणांचें 'अभूतपूर्व संकट' जेव्हा हिंदुस्थानवर कोसळलें, तेव्हा त्या संकटाला हाणून पाडण्यासाठी अेक सहस्र वर्षे हें हिंदुराष्ट्र त्या मुस्लिम आक्रमकांशी जरी झुंजत राहिलें आणि शेवटी मुस्लिमांनी हिंदुस्थानात स्थापिलेली अिस्लामी राजसत्ता जरी यवनशकहूणादिक परकीयांच्या सत्तेप्रमाणे अुखडून टाकून हिंदूंनी आपलें राजकीय स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित केलें, तरी मुस्लिमांच्या धर्मसत्तेखाली गेलेलें हिंदूंचें संख्याक्षेत्र आणि मुसलमानांच्या त्या वसतीखाली मुस्लिमांनी बळकावून टाकलेलें भूक्षेत्रही सोडवून यवन शकादिकांचें केलें तसें मुसलमानांचें संपूर्ण हिंदूकरण ते त्या काळचे हिंदु कां करू शकले नाहीत?

या ग्रंथाच्या आरंभी प्रस्ताविलेल्या वरील मुख्य प्रश्नांची चिकित्सा ऐतिहासिक आधारे ह्या वरील पूर्वार्धात मुख्यतः केलेली आहे. त्या त्या काळच्या परिस्थितीप्रमाणे केलेल्या ह्या ऐतिहासिक चिकित्सेचा निष्कर्ष असा आहे की, मुसलमानांची राजसत्ता अुलथून पाडताच किंवा पाडीत असता ज्या अनेक अनुकूल संधि सापडल्या त्या त्या वेळी शस्त्रबळाने बलवत्तर असताही आणि राजकीय क्षेत्रात मुसलमानांची धुळधाण अुडवून दिली असताही हिंदुजनतेने किंवा हिंदुराज्य मंडळाने अत्याचारी मुसलमानांनी स्थापिलेल्या धर्मसत्तेवर प्रत्याचारी प्रत्याक्रमण केलें नाही. झाडून साऱ्या मुसलमानांना, अवश्य तर बळाने सुद्धा, हिंदु करूनघेतलें नाही !

पूर्वी जसें यवनशकहूणादिक पादाक्रांत परराष्ट्रीयांना ते स्वधर्मात येअू पाहताच त्या काळच्या हिंदुजगताने सहासन – सहवास – सहविवाहादिक सामाजिक जीवनाच्या सर्व अुपांगांत, पात्रापात्रविवेक न सोडताही, सामावून घेतलें, त्याचप्रमाणे मुसलमानांची हिंदुस्थानातील राजसत्ता आपल्या पराक्रमाने पादाक्रांत करून टाकताच जर त्या काळच्या विजयी हिंदुजगताने, रोटीबंदी, बेटीबंदी, शुद्धिबदी, सिंधुबंदी अित्यादि सामाजिक रूढीच्या बेडया ताड ताड तोडून टाकून यच्चयावत् मुसलमानांना शुद्ध करून हिंदुसमाजाच्या त्या काळच्या जातिपरंपरेत पात्रापात्र विवेक न सोडता, सामावून घेतलें असतें तर त्याच काळी हें हिंदुस्थान, स्पेनप्रमाणेच, निर्मुस्लिम होअून गेलें असतें; 'हिंदूंचें स्थान' अशा अगदी अन्वर्थकपणे हिंदुस्थान झालें असतें.

ह्या ग्रंथात साधारणतः अिसवी सन ७०० ते अिसवी सन १८०० पर्यंतच्या कालखंडातील मुसलमानांच्या हिंदुस्थानवर झालेल्या आक्रमणांच्या आणि त्यामुळे संतत चाललेल्या हिंदु-मुस्लिम महायुद्धमालिकांच्या अितिहासाची चिकित्सा केलेली आहे. अर्थातच त्या चिकित्सेतील विधानांचा संबंध त्या कालखंडातील परिस्थितीलाच काय तो लागू आहे. अशीं ऐतिहासिक समालोचनें वाचताना वाचकांनी हें नेहमीच ध्यानात ठेवलें पाहिजे की, त्या ऐतिहासिक परिस्थितीत देशकालपात्राच्या अनुषंगाने जें कृत्य अवश्य, अिष्ट वा हितावह ठरलें असेल किंवा ठरण्यासारखें होतें तें अन्य परिस्थितीतही किंवा अन्य कालखंडातही तसेंच अवश्य, अिष्ट अथवा हितावह ठरतेंच असें नाही. अितकेंच नव्हे तर क्वचित् तें देशकालपात्रभेदांनी अनवश्यक, अनिष्ट नि अहितकारकही ठरू शकेल. मग तो राजकारणातील प्रश्न असो, धर्मकारणातील असो किंवा जीवनातील अितर अेखाद्या क्षेत्रातील असो. राजकारणात नि धर्मकारणात मुरलेल्या समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या खालील ओवीमध्ये हेंच मर्म निक्षून सांगितलेलें आहे की :–

समयासारखा समयो ये ना । नेम अेकचि चालेना ॥
नेम धरिता राजकारणा । व्यत्ययो घडे ॥१॥

— पूर्वार्ध समाप्त —

✦ ✦ ✦

अनुक्रमांक ३८९७ वि. निबंध
क्रमांक ... नोंद दि. २३/१/५५

सोनेरी पान पांचवें (उत्तरार्ध)

प्रकरण १ लें

विषयानुबंध

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील 'सहा सोनेरी पानें' हा जो ग्रंथ आम्ही लिहीत आहो, त्याच्या प्राचीन अितिहासाच्या पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागाच्या आरंभी आम्ही ह्या ग्रंथाची रूपरेषा अवश्य तितकी आखली आहे. त्यात वर्णिल्याप्रमाणे आम्ही आता ह्या दुसऱ्या भागाचा अुत्तरार्ध लिहिण्यास आरंभ करीत आहोत.

आताच संपविलेल्या पूर्वार्धात हें स्पष्ट केलेलें आहे की, मुसलमानांशी हिंदूंचा जो धार्मिक आणि राजकीय अशा दोन प्रचंड आघाड्यांवर शतकोंशतकें युद्धसंघर्ष चाललेला होता, त्यातील धार्मिक आघाडीवर मुसलमानांच्या आक्रमणांचा पूर्ण प्रतिकार करून त्यांचा पाडाव करण्याअितकी हिंदूंची धार्मिक समरनीति सबळ नव्हती. अितकेंच नव्हे तर मुसलमानांच्या त्या धार्मिक आधाडीच्या राक्षसी समरनीतीपुढे ती हिंदूंची धार्मिक समरनीति अगदी दुर्बल नि आत्मघातक ठरली. कारण आततायी शत्रूच्या नीतीहून अधिक कठोर, क्रूर नि धारदार अशी समरनीति ज्याची असेल तेंच राष्ट्र त्या शत्रूचा पाडाव करू शकतें, हें कोणत्याही स्वरूपातील युद्धाचें मुख्य धोरण असावें लागतें, ही गोष्ट हिंदुराष्ट्र धार्मिक आघाडीपुरतें तरी त्या काळी पार विसरून गेलें होतें.

अगदी वैदिक नि पौराणिक काळी आपल्या हिंदुराष्ट्राच्या त्या काळच्या पूर्वजांना ज्या दैत्य, दानव, राक्षस अित्यादि अघोरी, मायावी, क्रूर, अगदी नरमांस भक्षक अशा शत्रूंशी लढावें लागलें, त्या त्या शत्रूहून स्वत: ते आपले त्या वेळचे पूर्वज देव, सम्राट्, युद्धस्तोत्रांचे अुद्गाते वैदिक ऋषि किंवा पौराणिक महाकाव्यकार, हे युद्धात सक्रिय भाग घेणारे आपले सर्व पूर्वजही त्या राक्षसादिक शत्रूंहून अधिक अघोरी, अधिक मायावी, अधिक क्रूर, राक्षसांहूनही सवाअी राक्षस धार्मिक समरांगणात बनू शकले, तसतसें युद्धधोरण आखू शकले, आचरूही शकले, ह्यामुळेच त्या त्या काळी त्या त्या युद्धात आपले पूर्वज यशस्वी होत गेले, आणि आपलें राष्ट्र अधिकाधिक प्रबळतर नि विस्तारशील होत गेलें. हें वेदकाळच्या किंवा पौराणिक काळच्या कथांतून दिसून येतें.

त्या वेळेस राजकीयच नव्हे तर धार्मिक आघाड्यांवरही शत्रूंशी सामना द्यावा लागे. श्रीरामाला ऋषींचें रक्षण करण्यासाठी विश्वामित्राने जेव्हा वनात नेलें

तेव्हा राक्षसांनी आमच्या त्या वेळच्या यज्ञयागादिक धर्मकृत्यांचा केवढा विध्वंस मांडला होता, आमच्या ऋषिकन्यांचें कसें अपहरण केलें जाअी, तें तें वर्णन करून सांगितलें आहे. पुढे दंडकारण्यात तर श्रीराम गेले असता रावणाच्या राक्षस सैन्याने तेथील अल्पसंख्य ऋषींच्या आश्रमांची, यज्ञयागांची, अुपनिवेशांची आणि प्राणांची कोण दुर्दशा अुडवून दिली होती ती रामचंद्रास सांगितलेली आहे. आणि ऋषींच्या रक्तमांसांना त्या नृशंस राक्षसांनी खाअून पिअून जीं त्यांचीं हाडकें फेकून दिलीं होतीं त्या अस्थींचे ढीगचे ढीग ठिकठिकाणी पडलेले दाखवून दिले. यावरूनच स्पष्ट होअील की, राक्षसांचा आपल्या पूर्वजांशी दीर्घकाल झालेला पौराणिक काळचा संघर्ष धार्मिक आघाडीवरही होता; आणि तेव्हा धार्मिक युद्धआघाडीवरही राक्षसांच्या क्रौर्यास हाणून पाडणारें सवाअी क्रौर्य, राक्षसास जिंकण्यास सवाअी राक्षस बनणें, हें देवही आणि ते देवतुल्य सम्राटही आमच्या धर्माचें अेक पवित्र कर्तव्य मानीत. याची चर्चा या पुस्तकात पूर्वीही ७३२–७३३ या पृष्ठांवर केलेली आहे. तरीही निर्देशासाठी अिथे अितका अुल्लेख केला तरी पुरें आहे की, अगदी भक्त संप्रदायी प्रल्हादाचें संरक्षण करण्यासाठी जो नृसिंहाचा अकाळविकाळ अवतार प्रकट झाला आणि ज्याने आमच्या धर्माचा द्वेष करणाऱ्या हिरण्यकश्यपूचें आपल्या सिंहीय नखाग्रांनी पोट फाडून आतडीं बाहेर काढलीं, तो नृसिंह आमच्या राष्ट्राचें दैवत होता, पुढारी होता. कचाच्या आख्यानासारखीं आख्यानेंही हेंच दाखवितात की देवांनीं युद्धामध्ये –

व्रजन्ति ते मूढधियः पराभवम् । भवन्ति मायाविषु ये न मायिनः ॥

हेंच धोरण धर्म्य मानलेलें असे. कपटी शत्रूंशी सवाअी कपटाने, क्रूर शत्रूंशी सवाअी क्रौर्याने लढणें हाच अशा शत्रूंना निर्दाळिण्याचा अेकमेव मार्ग होय, हे धार्मिक युद्धातूनही पौराणिक काळच्या अंतापर्यंत तरी आमच्या पूर्वजांचें अभिमानास्पद धार्मिक युद्धसूत्र असे

तथापि जेव्हा देवादेवात किंवा आपल्या आपापसांतील जातींत युद्धें जुंपत – जशीं कौरव पांडवांत – तेव्हा तेव्हांची युद्धनीति ही अगदी निराळ्या प्रकारची होती. कोण्या अेका रथ्यावर अनेक रथ्यांनी तुटून पडू नये, शरण आलेल्यास जीवदान द्यावें, अितका बारीक न्यायान्यायविवेक प्रत्यक्ष रणावरही आचरला पाहिजे, असें सांगणारी युद्धनीति अुपदेशिली जाअी, कारण ती अुदार युद्धनीति युद्धातील अुभय पक्ष मानीत असे.

परंतु पौराणिक काल संपून आम्ही भाग १ (पृष्ठ ५८३) मध्ये सांगितल्याप्रमाणे जेव्हा आपला अितिहासकाल चालू झाला तेव्हापासून आपल्या हिंदुस्थानावर पारसिकांची, यवनांची, ग्रीकांची, शककुशाणांची, हूणांची अित्यादि जीं लहानमोठीं परचक्रें चालू झालीं तीं सर्व मूलतः धार्मिक शत्रुत्वाने झालेलीं नव्हतीं. त्यांचा मूळ आणि केवळ हेतु राजकीय सत्ता हाच होता. त्यांचा स्वतःचाच धर्म न्यूनाधिक

प्रमाणात वैदिक धर्माच्याच अुपांगाप्रमाणे होता. पुढे तर ते सर्व आक्रमक आपणां हिंदूकडून पराभूत झाल्यानंतर त्यांच्यापैकी जे लक्षावधि लोक हिंदुस्थानातच राहिले ते हिंदुराष्ट्रातच पूर्णतः सामावून गेले. अशा परिस्थितीत त्या ऐतिहासिक काळात त्या परकीय आक्रमकांचा आपल्या धर्मावरही कोणचाही घाला पडला नसल्यामुळे त्यांच्याशी झालेल्या केवळ राजकीय युद्धात आपल्या पूर्वजांनी जशास तसें अशीच नीति अवलंबून त्या त्या डावपेचांनी त्यांना अंती चारी मुंड्या चीत केलें. तीं युद्धं केवळ राजकीयच असल्याने तिथे आत्यंतिक दया, माया, सत्य, अहिंसा इत्यादि धर्माधर्मादिक भावनांचा वा तत्त्वांचा धार्मिक स्वरूपाचा कोणताही प्रश्न मूलतः संभवत नव्हता. त्यामुळे कोण्या परधर्मीय शत्रूने आपल्या धर्मावर सशस्त्र आक्रमणें केलीं असता त्यांचाही प्रतिकार राजकीय आक्रमणाप्रमाणेच जशास तसें, क्रौर्यास सवाअी क्रौर्य, कपटास सवाअी कपट, हिंसेस सवाअी हिंसा आचरून करणें हेंच धर्म्य आहे, शूरांचें कर्तव्य आहे, ही जी वृत्ति, तिचा अुपयोग करण्याचा प्रसंगच राक्षसांदिकांशी झालेल्या धार्मिक युद्धानंतर शतकानुशतकें न आल्यामुळे, आपल्या राष्ट्रीय मानसात निश्चेतन होअून पडली.

त्यातही त्याच मध्यंतराच्या काळात आजीवक, जैन, बुद्ध अित्यादि वैदिक धर्मातूनच फुटून निघालेल्या संन्यासप्रवण नि आत्यंतिक अहिंसाप्रधान धर्ममतांनी आत्यंतिक अहिंसा, दया, माया हाच काय तो खरा धर्म आहे, अशी शिकवणूक समाजास दिली. अुरलेल्या वैदिकांमध्येही वर्णभेदातूनच जातिभेदाच्या, खाण्यापिण्याच्या, स्पर्शास्पर्शाच्या, समाजातल्या व्यावहारिक अेकजीविताचीही खांडोळी करणाऱ्या धार्मिक रूढी वळावून त्यांनाच व्यावहारिक धर्म म्हणून समजण्यात येअू लागलें. पुढे पुढे तर आपल्या यज्ञयागातही मांसभक्षण निषिद्ध ठरविलें गेलें. सत्यादिक सद्गुणांचीं आत्यंतिक रूपेंही बहुधा दुर्गुणच ठरतात ही जाणीवसुद्धा आपल्या त्या काळच्या धर्मसमजुतीत लोपून गेली, आणि तसा राष्ट्राचा आत्मघात करणारा सद्गुणांचा आत्यंतिक अप्रासंगिक आणि आत्मघातक अवलंबच मोठा अुच्चतम सद्गुण समजण्यात येअू लागला. साधारणतः सत्य तेंच वदावें हा सद्गुण हें ठीक; मान्य केलेलें दान किंवा वचन पूर्ण करावें, हा सद्गुण हेंही ठीक; पण या सद्गुणाचा बढाअी करता करता आणि करण्यासाठी हरिश्चंद्राने विश्वामित्र ऋषीला स्वप्नामध्ये 'माझें राज्य मी तुला देतो' म्हणून दिलेलें वचन नि दान जागे झाल्यानतरही खरें करण्यासाठी विश्वामित्र ऋषीला आपल्या राष्ट्राचें राज्य त्याने देअून टाकलें आणि म्हणून तें कृत्य सत्याच्या सद्गुणाचें अुत्कृष्ट अुदाहरण होय, अशा आत्यंतिक 'सद्गुणांच्या' बाष्कळ कथा पुराणांतून वर्णन करून राष्ट्रीय युद्धनीतीला भाबडट, मेंगळें नि आत्मघातक वळण देण्यात आलें, याची मात्र निंदा करावी तितकी थोडीच. सत्याचा जसा हा राष्ट्रद्रोही अतिरेक पूजनीय ठरला त्याहूनही अहिंसेच्या अतिरेकाचा सर्वोत्तम सद्गुण म्हणून

जो आचारधर्म त्या काळच्या बहुतेक जैन, बौद्ध, काही अंशी वैष्णव ग्रंथातही गौरविला आहे आणि अुपदेशिला आहे, त्याने तर आमच्या मुसलमानादिक शत्रूंनी आमचा पुढे घात केला नसेल, अितका भयंकर घात आमचा आम्ही आधीच करून घेतलेला होता. पौरुष, पराक्रम हे दुर्गुणातले दुर्गुण समजून अधर्म्य मानले जाअू लागले. आणि जो जितका पौरुषहीन, पराक्रमशून्य, राष्ट्रीय अन्यायाचा सवाअी सूड घेण्याची शक्ति तर राहोच, पण अिच्छाही अंगी नसलेला बुळगा तो तितका धार्मिक दृष्टया मोठा महंत, संत, मुक्त, महात्मा असें आमच्या धार्मिक व्यवहारात मानण्यात येअू लागलें.

या विषयाचा अवश्य तितका सविस्तर खल पूर्वार्धांत 'सद्गुण-विकृति' अित्यादि प्रकरणातून (पान ७१९) सोदाहरण आणि साधार करण्यात आलेलाच आहे, आणि या अुत्तरार्धांतही अनेक राजकीय आघाडीवरील वर्णनात तो न सांगता होणारच आहे. येथे हा अुल्लेख येवढयासाठीच केला की, पौराणिक कालानंतरच्या आमच्या राष्ट्रावर झालेली परकीयांचीं सर्व आक्रमणें राजकीय स्वरूपाचींच काय तीं असल्याने आणि आमच्या धर्मासच अुच्छेदिणारीं सशस्त्र आक्रमणें आमच्यावर राक्षसकाळानंतर मोठ्या प्रमाणावर मुळीच झालेलीं नसल्यामुळे तथा धार्मिक सशस्त्र आक्रमणांचा प्रतिकार करणारी युद्धनीति आम्ही पार विसरून गेलो होतो. सद्गुणांची नि धर्माची आमची व्यावहारिक व्याख्या आणि आचारही पार पालटून गेले होते. त्यांची नरसिंहावताराची जशास तशी अुग्र धर्मयुद्धनीति पालटून ती शाकाहारी, गवतखाअू, सहिष्णु आणि कोडगी झालेली होती.

त्यामुळे पूर्वार्धांत आवश्यक तितक्या सविस्तरपणे वर्णन केल्याप्रमाणे मुसलमानांनी जेव्हा त्या काळात आमच्या धर्मावरही त्या पौराणिक काळाच्या राक्षसांहूनही अत्युग्र, हिंसक नि सशस्त्र आक्रमण केलें तेव्हा आमच्या त्या सन सातशेच्या कालखंडातील पूर्वजांनी हिंदूंची त्या काळची जी मेंगळी, धर्मरक्षक नीति होती तिनेच त्या मुसलमानांच्या आक्रमणाला तोंड दिलें. सापाला दूध पाजणाऱ्या त्या अतिरेकी, भावडट, आत्मघातक आणि स्वधर्मरक्षणास असमर्थ असणाऱ्या, तथापि स्वत:स स्वधर्मरक्षक समजणाऱ्या धार्मिक आचारनीतीनेच तोंड देण्याचा प्रयत्न केला. लांडग्याशी लढण्यासाठी शेळीने आपली मान आपणहून पुढे केली. हें सर्व पूर्वार्धांत विशद केलेलें आहेच. त्यामुळे धार्मिक आघाडीवर आमची जी प्रचंड हानि झाली तीही वर्णिलीच आहे. म्हणून आता धार्मिक आघाडीवरील मुसलमानांशी झालेल्या सशस्त्र संघर्षाचा विषय आटोपता घेअून त्यांच्याशी झालेल्या राजकीय आघाडीवरील महायुद्धाच्या समीक्षणाचा अुत्तरार्ध प्रारंभ करू.

✦ ✦ ✦

प्रकरण २ रें

हिंदुस्थानचे नि अरबांचे पूर्वापार संबंध

हरिवंशादिक अुपपुराणांपैकी अेका अुपपुराणामध्ये मौसल पर्वाची कथा आलेली आहे. त्यातील 'मुसल' शब्द माझ्या अगदी विद्यार्थिदशेत मी जेव्हा वाचला आणि त्या समुद्रकाठची मोठमोठी शेवाळीं यादवांनी आपसात लढण्यासाठी अुपटताच त्यांचीं मोठमोठालीं 'मुसळें' होअून त्यांचाही अुपयोग यादवांनी अेकमेकाना झोडपून काढण्यात मारक शस्त्रासारखा केला ह्या तेथील वर्णनाचा जेव्हा मला अचंबा वाटू लागला तेव्हा, मला अकस्मात् सुचलें की, हा मौसल शब्द मुसल शब्दापासून पौराणिकांच्या अद्भुत रूपकांच्या परंपरेप्रमाणे त्या मुसल शब्दावर केलेली अेक कोटी असावी आणि त्या सौराष्ट्र–गुजराथच्या सिंधुतीराला व्यापारासाठी अगदी प्राचीन काळापासून येणाऱ्या जाणाऱ्या आज ज्यांना आपण अरब म्हणतो, त्या देशांतील लोकांनी मुसलमानी धर्म स्वीकारल्यानंतर त्यांना मिळालेल्या मुसलमान ह्या नांवावरून सुचली असावी, असें मला वाटू लागलें. परतु या शंकेला कालाचा किंवा अितर घटनांचा कोणताही आधार तेव्हा मिळण्यासारखा नव्हता.

त्यानतर अदमानात असताना मी वंगाली वाङ्मय जेव्हा पुष्कळसें वाचू लागलो तेव्हा मला आज असें आठवतें की, वंगालचे सुप्रसिद्ध अमित्राक्षर छंदाचे प्रवर्तक आणि मेघनाद काव्याचे कर्ते श्रीयुत मधुसूदन दत्त यांनी किंवा वंदेमातरम् राष्ट्रगीताचे कवि बंकिमचंद्र यांनी भगवान् श्रीकृष्णाच्या देहोत्सर्गासंबंधी कोणता तरी अेक निबंध लिहिला आहे, त्यात भगवताच्या देहावसानानंतर बलराम आपलें मूळचें शेषाचें रूप घेअून समुद्रात आपल्या अनुयायांसह निघून गेले, अशी जी कथा आहे, तिचें त्यांनी अेक संभवनीय स्पष्टीकरण असें केलें की, आपल्या अनुयायांसह नौयानांच्या समूहातून वलराम हे द्वारकेजवळील पश्चिम समुद्रात शिरले आणि कोणच्या तरी परद्वीपांत नौकांच्या सर्पाकार व्यूहाने समुद्रमार्गे निघून गेले. या अर्थाशी जुळेल अशी आणखी अेक वस्तुस्थिति अेका आर्यसमाजी प्रचारकाच्या प्रवासवृत्तात मी जी वाचली होती, ती मला आठवली. ती अशी की, हे आर्यसमाजी गृहस्थ न्यूनाधिक आजपासून पन्नास अेक वर्षांमागे अरबस्थानातील हिंदु प्रवाशांची काय स्थिति आहे, हें पाहण्यास गेले होते. तेथे त्यांना शोध करता असा अेक लहानसा गट आढळला की ते लोक शेंडी ठेवीत असत. त्यांनी सांगितलें की, आमच्यात जी अेक पूर्वापार दतकथा पवित्र भावनेने आमचे वाडवडील सांगत आलेले आहेत तीवरून आम्ही केव्हातरी अगदी पुराणकाळी भारतातून अिकडे आलेले आहोत. भारतात अेक महायुद्ध झालें होतें. त्यावेळेस आम्ही तो देश सोडून समुद्रमार्गे अिकडे येअून नवीन अुपनिवेश (वसाहत) स्थापिला. त्यानंतर अिकडच्या

कोणत्याही अुलाढालीत येथील लोकांच्या भानगडीत आम्ही पडलो नाही. म्हणून अजून आपल्या मूळच्या स्वरूपात आम्ही टिकून आहोत. ह्यावरून त्या प्रवाशांनी जो तर्क केला की ते लोक महाभारताच्या शेवटी केव्हातरी अिकडे आलेले हिंदुच असावेत.

ह्या काही विधानांवरून जर हें गृहीत धरलें की, यादवांचा बलरामाच्या नेतृत्वाखाली अेक मोठा नवीन अुपनिवेश अरबस्थानात जाअून तिथे निवसला, तर आणखी अेकदोन गोष्टी त्या तर्काला पुष्टि देतात. पहिली ही की, तामीळ भाषेला तिचें मुळचें नांव 'अरवी' हें आहे आणि अरबस्थानाच्या मूळच्या लोकांत जो लिंगपूजाप्रधान शैव धर्म प्रचलित होता असें अनेक अैतिहासिक मानतात, त्या धर्माच्या पुजाऱ्यांना Druid द्रुअीड (द्रविड) म्हणून अिंग्लिशमध्ये म्हणतात. हाच द्रुअीड पुजारीवर्ग प्राचीन ब्रिटन नि आयर्लंडमध्येही विद्यमान असल्याच्या परंपरागत दंतकथा अितिहासकार सांगतात.

ह्या सर्व दंतकथा आणि अशाच याविषयीच्या अितर अैतिहासिक दंतकथा विस्ताराने सांगत बसण्याचें हें स्थळ नव्हे. त्यावरून 'अरबस्थान'चा आणि भारताचा पूर्वापार अगदी पुराणकाळापासून निकटचा संबंध असावा आणि त्या द्वीपकल्पातही भारतीय अुपनिवेश स्थापन झालेले असावेत. पूर्व समुद्रातील जावा प्रभृति भूप्रदेशांप्रमाणेच पश्चिम समुद्रातील ह्या, आज ज्याला अरबस्थान अित्यादि नांवें पडलेलीं आहेत, त्या प्रदेशातही विशेषत: दक्षिण भारतीयांची वसति, राज्यें, संस्कृति तेथे नांदत असावी, असें अनुमान काढता येअी. पण अिथे आम्ही कोणत्याही प्रकारे तो सिद्धान्त म्हणून अद्याप मांडू शकत नाही. केवळ त्याला सुचविणारीं अनेक विभिन्न गमकें तेवढीं संक्षेपाने सांगून टाकलीं आहेत. अितर कोण्या संशोधकाचें चित्त या प्रश्नाकडे आकर्षित झाल्यास त्यांना अुपयोगी पडाव्यात या दृष्टीने आम्हांस महत्त्वाच्या वाटणाऱ्या वरील सूचना टिपून ठेवलेल्या आहेत.

या ग्रंथाशी लागू असणारा अर्वाचीन काळातील हिंदुस्थानचा आणि अरबस्थानचा संबंध त्या काळी काय होता, तेवढ्यापुरतें काय तें येथे पाहिलें पाहिजे. तो काळ म्हणजे त्या अरबांनी मुसलमानी धर्म स्वीकारल्यानंतरचा म्हणजे सातव्या शतकातला होय. मुसलमानी धर्माचा जन्मच अि. स. ५७० मध्ये महंमद जन्मला त्यानंतर झाला. त्यातही प्रत्यक्ष अरबस्थानात अरब लोकांनी मोठ्या प्रमाणात तो धर्म स्वीकारण्यास चाळीस पन्नास वर्षें लागलीं. त्यांच्या आपसात याच प्रश्नावर लढाया झाल्या. तरीही साधारणत: मुसलमानांचा पळपुटा हिजरी सन अिसवी सनाच्या ६२२ मध्ये चालू झाला. तेव्हापासून मुसलमानी धर्माचा आरंभ ते धरतात तोच आपणही धरू.

त्या काळी हे नवे आक्रमक मुस्लिम अरब लोक अरबस्थान सोडून प्रथम त्यांच्या शेजारच्या अिराणी साम्राज्यावर तुटून पडण्याचे आधीही हिंदु लोकांचीं

राज्यें सिंधु नदीच्या पलीकडे हूणांचा नाश केल्यानंतर पुन्हा जवळ जवळ चंद्रगुप्ताच्या काळच्या सीमांपर्यंत कशीं पसरलीं होतीं याचा त्या काळच्या अेका प्रख्यात त्रयस्थाचाच पुरावा आधारभूत धरू. ह्युअेनत्संग हा चिनी प्रवासी अि. सन ६२९ च्या संधीस हिंदुस्थानात वायव्येकडून जेव्हा आला तेव्हा त्याने केलेल्या चक्षुर्वेसत्यम् वर्णनाप्रमाणे हिंदुराज्यांची वायव्य सीमा आज ज्याला काबूल, गझनी, कंदाहार असें म्हणतात. त्या सर्व प्रदेशाला व्यापून अुरलेली होती. त्या काळी भारतात येणारे बहुतेक चिनी यात्रिक मध्य आशियातून याच हिंदु राज्यांतून सिंधु ओलांडून हिंदुस्थानात येत.

हिंदु लोकांना चीनमध्ये त्या वेळी 'शिन्त्सु' असें संबोधीत

ह्यामुळेच हिंदुस्थानाला ते हिंदूंच्या प्राचीनतम सिंधु ह्या नांवानेही निर्देशीत. म्हणूनच ते हिंदु लोकांना चीनमध्ये 'शिन्त्सु' असें संबोधीत. ह्या शिन्त्सु शब्दाचें हें रूप 'सिंधु' ह्या शब्दाचा चिनी अपभ्रंश आहे हें अुघड आहे. हिंदु शब्दाची अुत्पत्ति मूळ सिंधु शब्दापासून आहे या विधानाचा अगदी तत्कालीन हाही अेक चीनकडचा भक्कम पुरावा आहे.

सिंधमधील हिंदूंवर अरबी मुसलमानानी केलेली पहिली स्वारी आणि तीत हिंदूंनी केलेला अरबांचा सपशेल पराभव

आजच्या बहुतेक अितिहासातून अरबांची हिंदूंवरील पहिली स्वारी म्हणजे दाहीर राजावरची स्वारी आणि जीत हिंदूचा पूर्ण पराभव झाला, ती होय असें अुल्लेखिलें जातें. पण ही गोष्ट धादान्त खोटी आहे. अरबांची सिंधवरील पहिली स्वारी जी झाली ती सन ६४० मध्ये आणि तीत अरबांचा हिंदूंनी सपशेल पराभव करून त्यांचा सेनापति कसा ठार मारला होता, हें या भागाच्या पृष्ठ ६८८ वर दिलेलेंच आहे.

अरब मुसलमानांची सिंधवर दुसरी मोठी स्वारी

परंतु अिसवी सन ७११ मध्ये मात्र महंमद कासम नांवाच्या अरबी मुसलमान सेनापतीने पन्नास सहस्र सैन्य समवेत घेअून हिंदुस्थानच्या सिंध प्रांतावर दुसरी मोठी चढाअी केली. ह्या वेळी महाराजा दाहीर हा हिंदु राजा सिंधवर राज्य करीत होता. त्याने महंमद कासमशी मोठा निकराचा लढा दिला. पण त्यांत महाराजा दाहीरचा कसा पराजय झाला तें सर्व वर्णन या भागाच्या पृष्ठ ६८८ वर केलेलेंच आहे

पण त्यानंतर न्यूनाधिक पन्नास वर्षाच्या आतच राजपुतांच्या आणि विशेषतः चीरवर बाप्पा रावळ ह्या चितोडच्या पुढाऱ्याने आणि राण्याने सिंधमधल्या मुसलमानांपासून तें हिंदुराज्य छिनावून घेतलें, अितकेंच नव्हे तर ह्या चितोडच्या महाराणा बाप्पाने आणि अितर हिंदु राजांनी आपापली सत्ता शक्य तो पुढे पुढे

महंमद गझनी १०३० मध्ये मृत्यु पावल्यानंतरच्या शेसवाशे वर्षांच्या काळात म्हणजेच जवळजवळ पांच पिढ्यांच्या काळात काश्मीरपासून तो आसाम ब्रह्मदेशापर्यंत सारा हिंदुस्थान राजकीय आघाडीवर पूर्वीप्रमाणेच स्वतंत्र, समर्थ आणि वैभवशालित्वात नांदत होता. शंकराचार्यांनंतरही मोठमोठे आचार्य, मठस्थापक, संत, महंत, देवलांसारखे स्मृतिकार, मेधातिथीसारखे भाष्यकार ह्याच कालात अुत्पन्न होअून साऱ्या भरतखंडभर आणि बृहत्तर भारतात सांस्कृतिक नेतृत्व करीत होते. संस्कृत भाषा हीच साऱ्या भारताची प्रचलित देवभाषा होती. काशी हीच साऱ्या भारताची सांस्कृतिक राजधानी होती. महंमद गझनीच्या अुत्पातात जे आमच्या राष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक जीवनावर खोल घाव झाले होते ते आमच्या राजमंडळाने याच काळात बुन्हा भरून काढले. अिकडे सोमनाथाचे देवालय पुन्हा अुभारलें गेलें, तर तिकडे ओरिसा ते आसामादिक भागापर्यंत भुवनेश्वरासारखीं नवीन प्रचंड देवालयें आणि नवीन धर्मकेंद्रें अुभारलीं जात होतीं. पूर्व, पश्चिम आणि दक्षिण समुद्रांवर हिंदूंची सत्ता, व्यापार आणि सहस्रावधि सैनिकांची, राजकारण्यांची येजा पूर्वकडे थेट मेक्सिकोपर्यंत आणि पश्चिमेकडे आफ्रिकेपर्यंत पूर्वकालाप्रमाणेच अप्रतिहतपणे चालू होती आणि त्यामुळे तिकडच्या द्वीपांतरातील हिंदुराज्यांना त्यांचा सतत पुरवठा होअून त्या बृहत्तर भारताचा या मूळ मातृभूमीशी, भरतखंडाशी या काळातही अविच्छिन्न संबंध भरभराटलेलाच होता.

अर्थात् ह्या काळाविषयी साराही हिंदुस्थान पारतंत्र्यात, परकीय, राजकीय दास्यात 'गुलामगिरीत' खितपत पडलेला होता असें म्हणण्याची कोणा हिंदुनिंदक अितिहासलेखकाचीही छाती आहे का ?

✦ ✦ ✦

प्रकरण ३ रें

अिसवी सनाच्या बाराव्या शतकापासून तो तेराव्या शतकाच्या शेवटाशेवटापर्यंतचा कालखंड

महमद गझनीच्या मृत्यूनंतर गझनीच्या मुसलमानी सत्तेला अगदी अुतरती कळा लागली. कारण त्या प्रदेशात निवसत असलेल्या निरनिराळ्या जातींनी मुसलमानी धर्म बळाने व छळाने अलीकडेच स्वीकारला होता. मोंगल नि तुर्क या आशियातील मोठ्या जाती मात्र तोपर्यंत अेकंदरीत मुसलमान झालेल्या नव्हत्या. अुलट त्यांनी आशिया ते युरोपपर्यंत स्वाऱ्या करून अरब मुसलमानांच्या राज्यांचा चक्काचूर अुडविला होता.

गझनीच्या ह्या आजूवाजूच्या अशा लहानमोठ्या 'जातींपैकी घुरी' नांवाची अेक हिंदुधर्म पाळणारी जात असे. वर सांगितलेलेंच आहे की, त्या काळापर्यंत तिकडे हिंदूंच्या अनेक जातींची आणि राजवंशांचीच राजसत्ता चालत होती. त्यांपैकीच ही घुरी नांवाची अेक जात होती. ही जातची जात, मुसलमानांच्या तिकडील धार्मिक नि राजकीय आक्रमणांच्या रगाडयात मुसलमान केली गेली. मुसलमानी धर्माचार या जातीकडून प्रत्यही पिढ्या दोन पिढ्या वळाने करून घेतल्याने ती मूळची घुरी ही हिंदुजात अगदी कट्टर मुसलमान बनली गेली. अितकी की, अितर मुसलमानांवर गझनी राज्यांत आपली स्वत:ची सत्ता स्थापण्याची आकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली. त्याच जातीत गझनीच्या सुलतान महंमदाच्या मृत्यूनंतर अुद्भवलेल्या मुसलमान जातीजातींतील यादवीत प्रबल ठरून स्वत:सच गझनीचा सुलतान म्हणून घोषित करणारा महंमद घोरी हा अुदयास आला. त्याने मुसलमानांचें निस्सीम पाठबळ मिळविण्याची त्यांची जी अेक ठरीव मात्रा असे तिचा अुपयोग करून 'हिंदुस्थानातील सर्व काफरांस (अर्थात् हिंदूंना) मी वळाने मुसलमान करून सोडीन आणि मुस्लिमांची राजसत्ताही साऱ्या हिंदुस्थानात स्थापन करीन' अशी तो सारा प्रदेश आणि हिंदुस्थानचाही अुत्तर पश्चिम भाग दणाणून सोडणारी घोषणा ठिकठिकाणी केली.

तथापि मागे महंमद गझनीने ज्या धडाक्याने हिंदुस्थानावर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या प्रवळपणे केल्या, तसें काही या महंमद घोरीला अिच्छा असूनही परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळे करता आलें नाही. सन ११७६ मध्ये घोरीने पंचनद व सिंधुनद यांचे संगमाजवळ अूच म्हणन जो अेक बळकट दुर्ग होता त्यावर स्वारी करून तो दुर्ग प्रथम जिंकला. त्या दुर्गातील राणीने तिच्या पक्षाचा पराभव झालेला पाहताच आपल्या नवऱ्याच्या दुबळेपणाची चीड येअून त्यास ठार मारलें. विजयी महंमदाशी आपल्या मुलीचें लग्न लावून दिलें आणि त्या प्रदेशाची सारी राजसत्ताही महंमदाच्या हाती दिली !

नंतर हिंदुराजांची चाचणी घेण्यासाठी महंमदाला त्यातल्या त्यात जो आक्रमणीय हिंदु शत्रु दिसला त्या गुजराथच्या राज्यावर राजस्थानच्या कोपऱ्याकोपऱ्याने पुढे सरकत घोरीने चाल केली. कारण गुजराथचा मुख्य राजा मृत्यू पावल्यामुळे राणीने आणि सैनिक कारभाऱ्यांनी त्या मृत राजाच्या अगदी अल्पवयी मुलास गादीवर बसविलें होतें. त्यामुळे महंमदाला तें राज्य दुबळें झालेलें आहे असें वाटलें, म्हणून त्याने त्या राज्यावरच स्वारी केली. परंतु ह्या दिसण्यात दुबळ्या परिस्थितीने महंमदास चांगलेंच ठकविलें. कारण महंमदाची स्वारी येत आहे हें पाहून गुजराथचें हिंदु सैन्य आपणहून पुढे सरकत, त्यांच्याशी सहानुभूति असणाऱ्या काही हिंदुराजांच्या साहाय्याने अबू पहाडाच्या आजूबाजूपर्यंत पुढे चालून गेलें.

तेथे त्या राणीने त्या प्रसंगी अत्यंत शूरपणाने लढाअीस तोंड दिलें. आणि त्या अल्पवयी राजपुत्रास आपल्या हिंदु सैन्यासन्मुख आणून 'तुमच्या ओटीत हा तुमचा बालराजा मी घालीत आहे. याचें रक्षण तुम्ही आता प्राणपणाने करा.' अशा आशयाचें आवाहन सर्वांना केलें. त्यासरशी पेट घेअून तें सारें हिंदु सैन्य आणि आजूबाजूचे साहाय्यक हिंदु राजेही महंमदाशी अितक्या आवेशाने लढले की त्याचें सारें सैन्य हिंदूंच्या मान्यापुढे पाडाव होअून दशदिशा फुटून गेलें. मोठ्या कष्टाने महंमद घोरी जीव बचावून जो पळाला तो थेट त्याची सत्ता असलेल्या सीमेकर्डाल प्रदेशात गेला.

महंमद घोरी संकटांनी डगमगणारा पुरुष नव्हता. हिंदूंनी केलेल्या त्याच्या वर अुल्लेखिलेल्या पराजयाने खचून न जाता त्याने हिंदुस्थानवर पुन्हा सन ११९१ मध्ये स्वारी केली, आणि पृथ्वीराजाच्या राज्यात तो घुसला. हें पाहताच दिल्लीच्या त्या वीरवर पृथ्वीराजानेही घोरीशी लढण्यासाठी शक्य त्या अितर हिंदुराजांनाही अेकत्र केलें, आणि तो घोरीवर चालून गेला. त्यांची गाठ पानपतजवळ कर्नाळ्याच्या उत्तरेस तरायण गावी पडली. येथे त्या हिंदु मुसलमानी सैन्यांची मोठी निकराची लढाअी झाली. पण शेवटी मुसलमानी सैन्याचा धीर सुटून हिंदूंनी त्याचा मोठा पराभव केला. स्वतः महंमद घोरी पृथ्वीराजाच्या हाती जिवंत सापडला. या लढाअीस तलावडीची लढाअी असेंही म्हणतात.

सम्राट् पृथ्वीराज आणि त्याचें सारें सामंत मंडळ जातीचे हिंदु आणि त्यांतही राजपुतांचे मुकुटमणि ! आपल्या स्वदेशाच्या आणि स्वधर्माच्या शत्रूला सुद्धा तो हाती पडला असता त्याला जिवंत सोडून, गौरवून त्याचें राज्य त्याला परत देणें हयासारखा पुण्यप्रद आणि प्रशंसनीय दुसरा वीरोचित सद्गुण नाही, ही त्यांची अेखाद्या धर्मभावनेसारखी अुपजत भावना त्या काळी असे.

साप विखारी देशभूमिचा ये घेअू चावा ।
अवचित गांठुनी ठकवूनी भुलवुनि कसाही ठेचावा ॥

हें श्रीकृष्णाच्या नि चाणक्याच्या रणनीतीचें सूत्र जरी हिंदूंनाच शिकविलेलें असलें तरी त्या काळी हिंदूंना तें अेखाद्या पंचमहापातकासारखें वाटू लागलें होतें. कारण आम्ही पूर्वाघात सांगितलेल्या पृष्ठ ७१२ ते ७३० वरील 'सद्गुण विकृतीच्या' बुद्धिभ्रंशाने त्या काळी हिंदुजगत् पूर्णपणे झपाटलें होतें; पण मुसलमान मात्र तें सूत्र त्यांच्या अेखाद्या धर्मसूत्राप्रमाणे कटाक्षाने आचरीत असत !

कसें तें पहा : महंमद घोरीच्या ठिकाणी पृथ्वीराजाने गझनीवर स्वारी केली असती आणि तेथील मुसलमानांनी, महंमद घोरीचा हिंदूंनी केला तसा, रजपुतांचा संपूर्ण पराभव केला असता तर त्यांनी हाती सापडलेल्या पृथ्वीराजालाच काय तें ठार केलें नसतें, तर पाडाव केलेल्या त्या सर्व हिंदु सैन्याला बळाने मुसलमान केलें

असतें, गुलाम करून त्यांच्या वरोवरच्या बायकामुलांसुद्धा जन्मभर राबविलें असतें, आणि त्यांतील हाती पडलेल्या सुंदर सुंदर हिंदु स्त्रियांना स्वतः महंमद घोरीने अंतःपुरात नेऊन अुपभोगिल्या असत्या ! अशा या अुद्दंड आणि राक्षसी धर्मशत्रूला पृथ्वीराजाच्या सर्व राजपूत मंडळाने कोण्या धीरोदात्त शत्रूसाठीच काय ते अुपयोजिले जावे म्हणून अुपदेशिलेलें जें पुस्तकी सूत्र 'क्षमा वीरस्य भूषणम्' त्या सूत्राप्रमाणे देशकालपात्राचा लवलेश विवेक न करता महंमद घोरीला क्षमा केली! अेकट्या महंमद घोरीलाच नव्हे, तर त्या सर्व मुसलमानी सैन्यास, शरणागताला अभयदान देण्याचा हा रजपुती बाणा पाळण्याचें शतकृत्य करण्यासाठी, क्षमा केली. 'पुन्हा हिंदुस्थानवर स्वारी करून मी येणार नाही' अेवढें काय तें महंमद घोरीकडून तोंडी वचन घेअून त्याला जिवंतपणे सोडून दिलें ! त्याचें गझनीचें राज्यही त्याला परत दिलें ! आणि महंमद घोरीच्या त्या मुस्लिम सैन्याचा पराभव केल्याच्या अभिमानापेक्षाही या आत्मघातक नि धर्मभोळ्या 'औदार्याच्या' अभिमानानेच अधिक फुगून ते राजपूत वीर दिल्लीला जाअून आपला विजयोत्सव साजरा करिते झाले !!

पण महंमद घोरीने सुटून गझनीला परत जाताच काय केलें ?

पृथ्वीराजाच्या हया औदार्यामुळे घोरीने हिंदूचें वैर सोडून दिलें का ? नाही! तर त्याच्या राक्षसी धर्ममताप्रमाणे हिंदूच्या त्या बुळग्या 'औदार्याविषयी' लवलेश कृतज्ञता न बाळगता डिवचून जिवंत सोडून दिलेल्या सापाप्रमाणे महंमद घोरी नि त्याच्या राज्यातले सारे मुसलमान अधिकच खवळून गेले. आणि पृथ्वीराजावर पुन्हा स्वारी करून हिंदूंचा चक्काचूर करण्याचा निश्चय करिते झाले. निवडक मुसलमानांचें मोठें सैन्य बरोबर घेअून घोरीने पृथ्वीराजावर सन ११९३ मध्ये पुन्हा स्वारी केली.

राजपुतांचे 'रासो' ग्रंथ आणि त्यांचा मुकुटमणी चांद भाटाचा 'पृथ्वीराज रासो'

राजपुतांच्या काळचा हिंदूंचा अितिहास खरें पाहिलें असता, हया राजपूत भाटांनी नि चारणांनी त्या वेळेसच लिहिलेले, वीररसाने रसरसलेले, काही अंशी काव्यात्मक असलेले कवितावद्ध अितिहास ग्रंथ, जे तिकडे रासो या नांवाने सुप्रसिद्ध आहेत त्यांच्या अभ्यासावाचून लिहिणें अयोग्य आहे. परंतु आपल्या अिकडे या रासो ग्रंथांची माहिती आणि त्यांचें साधें वाचनसुद्धा ज्यांनी केलें आहे असे अितिहासकार दहा पांच तरी निघतील कीं नाही याची शंका आहे. त्यामुळे आपल्या अिकडे लिहिले गेलेले राजपुतांचे अितिहास, राजपुतांचे किंवहुना त्या काळच्या हिंदु समाजाचे खरे अितिहास गणले जाण्यास, अेक टॉड या अितिहासकाराचा

अपवाद सोडता, पात्र नाहीत. ते केवळ मुसलमानी नि अिंग्रजी लेखकांच्या वहुधा विपर्यस्त अशा तुटपुंज्या अुल्लेखांचीं भाषांतरें काय ते असतात. सर्व शूर धर्माभिमानी राण्यांच्या चरित्रांवर स्वतंत्र रासों रचलेले आढळतात. जसे हमीर रासो, बुंदेलखंडाच्या छत्रसालावरील छत्रसाल रासो अित्यादि. हे रासोग्रंथ निर्भेळ अितिहास नव्हेत. परंतु त्यांच्यातील वर्णनें आणि घटना, आवेश आणि त्या काळच्या अनेक महत् कृत्यांमध्ये त्यांच्या स्वत: लेखकांनी घेतलेला भाग, ह्यामुळे त्यांच्या वाचनामुळे ते ते अैतिहासिक भव्य प्रसंग जसे जिवंत होअून आपल्या समोर अुभे राहतात, तसे वरील तुटपुंज्या वृत्तान्ताच्या शकावली सनावलीच्या चार ओळींनी मुळीच राहत नाहीत. ही गोष्ट पृथ्वीराजाच्या वेळी हिंदूंचा आणि वायव्येकडून प्रथम प्रथमच येणाऱ्या मुसलमानी टोळधाडींच्या स्वाऱ्यांचा पृथ्वीराजाच्या पदरी असलेल्या सुप्रसिद्ध चांदभाटाच्या 'पृथ्वीराज रासो' या ग्रंथातून त्या कालखंडातील वीर, शांत, करुण अित्यादि रसाने रसरसलेल्या भव्य नि अुदात्त वर्णनावरून प्रत्ययास येते.

अग्निकुलाचा कथा

ह्याच पृथ्वीराज रासोमध्ये काही राजपूत कुलांच्या अुत्पतीविषयी असलेल्या अग्निकुलाची प्रख्यात कथा दिलेली आहे. त्या कथेप्रमाणे म्लेंच्छ दैत्यांचा अुपद्रव अतिशय वाढला तेव्हा वसिष्ठ ऋषींनी अबू पहाडावर अेक मोठा यज्ञ केला. या यज्ञाच्या ज्वालाकल्लोळातून चार देदीप्यमान वीर पुरुष वैदिक धर्माच्या रक्षणार्थ प्रादुर्भूत झाले. चितोडचे गुहिलोत, कनोजचे प्रतिहार, सांब्राचे चौहान आणि धारचे परमार ह्या चार राजपूत वंशांचे तेच मूळ पुरुष होत. ह्या कथेचा भावार्थ आम्हांला तरी अितिहासाला धरून आहे असें वाटतें. कारण हिंदूंनी केलेल्या हूण राजवटीच्या पराजयानंतर ते जेव्हा सर्वतोपरी हिंदुधर्म स्वीकारून हिंदुराष्ट्रात विलीन झाले तेव्हा कोणच्या तरी महान् शुद्धियज्ञांत त्यांच्यापैकी काहींचा शुद्धिसंस्कार ऋषिजनांनी करविला असावा आणि त्याची ही स्मृति पौराणिकांच्या परंपरेप्रमाणे काव्यमय रूपकांत चांदभाटांनी वर्णिली असावी.

ह्या पृथ्वीराज रासो ग्रंथाचा नागरी प्रचारिणी सभेने पुनरुद्धार करण्याचें जें महत्कृत्य हाती घेतलेलें होतें त्या वेळी सन १९२२-२३ व्या वर्षी आम्ही रत्नागिरीच्या तुरुंगात असताही हिंदुत्वावरील निबंधाकरिता आम्ही मागितल्यावरून आम्हांला आमच्या बंधूनी त्या ग्रंथाचे काही सुटे भाग धाडले होते. पण पुढे तो ग्रथ समग्र प्रसिद्ध झाला आहे कीं नाही याची काही माहिती मिळाली नाही.

निर्लज्ज म्लेंच्छ लजे नहीं हम हिंदु लजवान् ॥

वरील पृथ्वीराज रासोमध्ये या हिंदु-मुसलमानांमधील लढायांची अगदी महाभारतीय शैलीचीं वर्णनें दिलीं आहेत. त्या कवींनीही हिंदूंनी महंमद घोरीचे

पराभव करून अनेकदा त्याला जिवंत परत सोडलें, ही गोष्ट हिंदूंच्या वीरधर्माच्या परम गौरवाची होती म्हणून हिंदूंची फार स्तुति केलेली आहे. परंतु महंमद घोरीने 'हिंदुस्थानावर मी पुन्हा स्वारी करणार नाही, परम स्नेहाने वागेन', असें दिलेलें वचन भंगून जेव्हा पृथ्वीराजावर वर दिल्याप्रमाणे सन ११९३ मध्ये पुन्हा स्वारी केली तेव्हा चांदभाट रागारागाने लिहिता झाला, 'आम्हा हिंदूंना धर्माधर्माची, सत्यासत्याची चाड आहे, दुष्कृत्यांची आम्हांला लाज वाटते, परंतु हें म्लेंच्छ मूळचेच 'निर्लज्ज आहेत. निर्लज्ज म्लेंच्छ लजै नहीं, हम हिंदु लजवान'.

पण पृथ्वीराजासारख्या काफरांचें राज्यचें राज्य ज्या वचनभंगाने मुसलमानमय करून टाकता येअील तो वचनभंगच मुस्लिमांचें धर्मकर्तव्य असे. महंमद घोरीने असा वचनभंग वारंवार केला म्हणून तर तो मुसलमानांचें गाझीपद पावला – हें सत्यही हिंदूंनी हृदयावर कोरून ठेवलें पाहिजे! ज्या मुस्लिमांनी चांदभाट म्हणतात असा हा 'अधर्म्य' वचनभंग केला त्यालाच अीश्वराने यश दिलें आणि ज्यांनी तसा कोणताही वचनभंग न करिता तें शत्रूला जीवदान देण्याचें भोंगळ औदार्य दाखविलें त्या हिंदूंचा मात्र त्या नामधारी धर्मापायीच चक्काचूर अुडविला.

महंमद घोरीला पृथ्वीराजावर स्वारी करण्यास हीच संधि अनुकूल वाटण्याचें आणखी अेक कारण हें होतें की, पृथ्वीराजाशी वैर असणारा कनोजचा राजा जयचंद याने महंमद घोरीला पृथ्वीराजाविरुद्ध साहाय्य करण्याचें गुप्त नि आत्मघातक आश्वासन दिलेलें होतें. ह्या सन ११९३ मध्ये पृथ्वीराजावर महंमद घोरीने केलेल्या स्वारीत त्यांची गांठ स्थानेश्वर येथे पडली. दोन्ही पक्षांची मोठी तुंबळ लढाअी झाली. त्या हातघाअीत राजपुतांचे चामुंडराय, हमीर, हाडा आणि अितर पुष्कळ योद्धे आणि राजे मारले गेले किंवा मुसलमानांच्या हाती पडले. मुसलमानांचीही प्राणहानि भयंकर प्रमाणात झाली. तीं वर्णनें चांदभाटाच्या पृथ्वीराज रासोमधूनच ज्याला शक्य जसेल त्याने अवश्य वाचावीत. कारण मुसलमानांनी लिहिलेल्या अितिहासात काफरांच्या निंदेवाचून दुसरें काही मिळणें शक्य नाही, आणि रासो ग्रंथातील काव्यमय भाषेत सांगितलेलीं का असेनात, पण हीं अैतिहासिक वर्णनें सोडता हिंदूंनी लिहिलेले अितिहास मुळी अुपलब्धच नाहीत. शेवटी त्या लढाअीत पृथ्वीराज लढता लढता मारला गेला आणि मुसलमानांचा संपूर्ण विजय झाला, असें मुसलमान अितिहासकार लिहितात. महंमद घोरी तो जय होताच लगोलग दिल्लीवर चालून गेला. मुसलमानांच्या राक्षसी युद्धनीतीप्रमाणे पराजित पृथ्वीराजाच्या अंत:पुराचा शीलभंग, हिंदूंच्या देवालयांचा विध्वंस, हिंदूची सरसकट कापाकाप, लूट आणि विशेषत: पृथ्वीराजाची त्या वेळीही विख्यात झालेली सुंदर नि तरुण पत्नी जी संयोगिता, राजा जयचंदाची कन्या, तिचा अभिलाष, ही मुसलमानी धर्मातील राक्षसी 'पुण्यकृत्यें' अद्याप पार पाडावयाचीं होतीं. परंतु कितीही त्वरेने महंमद घोरीचीं सैन्यें दिल्लीवर चालून गेलीं तरी पृथ्वीराजाचा

झालेला पराभव आणि तो मुसलमानांच्या हातात सापडला किंवा मारला गेला हें वृत्त दिल्लीच्या राजवाडयात त्या सम्राज्ञी संयोगितेला आधीच कळलें होतें. तें कळताच बहुधा आधीच्या योजनेप्रमाणेच त्या संकटास बिनतोड तोंड देण्याचें राजपूत वीरांगनांचें कर्तव्य करण्यास तिने अेक क्षणाचाही विलंब लावला नाही. तर ती वार्ता कानी पडताच अैश्वर्याचा, मातापित्यांचा, भावाबहिणींचा, साऱ्या जगाचा आणि जिवाचा मोह तत्क्षणी सोडून देअून तिने राजवाडयाच्या अत्युच्च तळावरून 'जयहर' गर्जून खाली अुडी घेतली आणि प्राणत्याग केला–जयहर केला–जोहार केला! सम्राज्ञीची गोष्ट तर काय, पण शतावधि हिंदु स्त्रियांनी म्लेंच्छांनी त्यांना बळाने वाटविण्याचे आधीच यमुनेत घडाधड अुडया घेअून प्राणत्याग केला!

महंमद घोरीने दिल्लीत घुसतांच राजवाडयाची आणि त्या साऱ्या नगरातील हिंदु नागरिकांची मनसोक्त लूटमार, जाळपोळ कापाकापी केली. नंतर तेथे मुसलमानी सत्तेची घोषणा केली आणि आपला मुख्य कारभारी म्हणून कुतुबुद्दीन नांवाच्या त्याच्या अेका विश्वासू गुलामास तेथील मुख्य अधिकारी नेमिलें आणि तो गझनीला परत गेला, पुढे महंमद घोरीने जयचंदावरही दोन वर्षांच्या आत ११९५ मध्ये स्वारी केली. दिल्लीला त्याचा कर्ता कारभारी कुतुबद्दीन होता, त्याला संगतीं घेअून तो कनौजवर चालून गेला. तेथे झालेल्या निकराच्या लढाअीत जयचदाचा पराभव होअून तो जिवे मारला गेला. अेका अर्थी त्याने केलेल्या हिंदुराष्ट्राच्या विश्वासघाताचें योग्य तेंच प्रायश्चित्त त्याला मिळालें.

सोमनाथादिक पूर्वीच्या महंमद गझनीच्या भयंकर धार्मिक स्वाऱ्यांना त्या काळी शंभरावर वर्षें अुलटून गेलीं होतीं. ती स्मृति अेखाद्या क्षणिक दुष्ट स्वप्नाच्या स्मृतीसारखी हिंदूंच्या मनातून मावळत चालली असल्यामुळे, महंमद घोरीच्या या दोन स्वाऱ्यांमुळे साऱ्या अुत्तर हिंदुस्थानातील हिंदुमात्र, राजे, महाराजे, संतमहतापासून तो झोपडीतल्या माणसामाणसापर्यंत अेकंदर हिंदु समाजात हिंदूंच्या मनोधैर्याची नि सैनिक सामर्थ्याची अशी वाताहत अुडालेली पाहून अेकच हलकल्लोळ अुडाला. महंमद घोरीही त्याच्या या अनपेक्षित यशामुळे कनोजच्याही पुढे हिंदूंचें अत्यंत पवित्र असें काशी नांवाचें अेक महाक्षेत्र आहे असें अैकताच काफर हिंदुधर्माचें अुच्चाटण करण्यासाठी सरळ काशीवरच चालून गेला.

काशी क्षेत्रांत सहस्रावधि मुसलमानांच्या अशा धर्मोन्मत्त आणि रक्तपिपासू स्वारीस तोंड देण्याची काहीच व्यवस्था नव्हती. अर्थात् महंमद घोरीने काशी क्षेत्र तत्काळ पाडाव केलें, तेथील हिंदु स्त्री-पुरुषांचा रक्तपात, लुटमार, स्त्रियांवरचे बलात्कार, विशेषतः शक्य तितक्या हिंदु स्त्रीपुरुषांना बाटविण्याचा आणि गुलाम करण्याचा धुमधडाका अुडवून दिला आणि या सर्व धर्मछळांच्याही वर मात

करण्यासाठी काशीला असणाऱ्या यच्चयावत् लहान मोठ्या हिंदूंच्या देवळांतील देवमूर्तींचे त्या मुसलमानी सैन्याने तुकडे तुकडे करून टाकले !

परंतु अितक्यात पुढे असलेल्या हिंदूंच्या संघटित नि प्रबळ राज्यात आणि विशेषतः राजस्थानात महंमद घोरीवर चालून जाण्याचे नि त्याला वेढून टाकण्याचे कट चाललेले आहेत, ही बातमी त्याने अैकली. घोरीवरही संघटित हिंदु सैन्याच्या खड्गाचें पाणी चाखण्याचा हिंदूंनी त्याच्या केलेल्या मागच्या दोन तीन पराजयांत प्रसंग गुदरलेला होता. म्हणून कनोज ते काशीपर्यंत या अेका स्वारीत साधलें तें पुरें आहे असें समजून तो धूर्त मुस्लिम सुलतान महंमद घोरी हा परत गझनीकडे वळला. मागे सांगितल्याप्रमाणे त्याचा अत्यंत विश्वासू लढवय्या नि राज्यधुरंधर गुलाम कुतुबुद्दिन यालाच त्याने कनोजपर्यंत जिंकलेल्या हिंदुस्थानातील प्रदेशाचा राज्यप्रशासक नेमलें.

आणि हाय हाय ! ह्याच कुमुहूर्ती युधिष्ठिराच्या काळापासून हिंदूंच्या साम्राज्याची अेक राजधानी असलेलें आमचें जें अिंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, दिल्ली, ह्या हिंदूंच्या युगायुगांच्या सत्ताकेंद्राचा अुच्छेद होअून तेथे म्लेच्छांच्या, मुस्लिमांच्या अधिराजसत्तेचा पक्का पाया घातला गेला ! दिल्ली ही परदास्याची गुलाम झाली! तीं अुणीपुरीं पांचशे सहाशे वर्षें त्या परदास्यातच अनेक मुसलमानी सुलतानांच्या आणि बादशहांच्या राजवटीखाली (मधले मधले अल्पकालीन अपवाद सोडता,) खितपत पडली होती—जोवर शेवटी मराठ्यांनी थेट अटकेपर्यंत आणि अटकेपलीकडे मुसलमानी साम्राज्यसत्ता अुलथून पाडून तिला वस्तुतः हिंदुसाम्राज्याची आपली बटीक बनविली नव्हती !

गझनीला गेल्यावर महंमद घोरी थोडयाच दिवसांत मारला गेला. काही मुसलमानी अितिहासकारांच्या मते घोरीच्या सैन्यातील अेका तुकडीने बंड करून त्याला ठार मारलें असें लिहिलें आहे. पण चांदभाटाच्या पृथ्वीराज रासोमध्ये पृथ्वीराजाने आपल्या पराजयाचा सूड घेण्याची अेक अलौकिक संधि साधून घोरीला ठार मारलें, असें त्या प्रसंगाचें रसभरीत आणि विवृत (Detailed) वर्णन केलेलें आहे. यद्यपि राजपुतांमध्ये विश्वसनीय म्हणून प्रचलित असलेल्या या लोककथेला दुसरा अैतिहासिक आधार अद्याप मिळत नसला तथापि ती येथे अुल्लेखिण्याअितकी महत्त्वाची नाहीच असें नाही. पृथ्वीराज रासो या काव्यातील या अतिशय हृदयंगमपणे वर्णिलेल्या लोककथेचा सारांश असा की, पृथ्वीराज घोरीच्या हाती जिवंत सापडला, लढाअीत ठार मारला गेला नाही. महंमद घोरीने त्यास बंदिवान करून गझनीला नेलें आणि तेथे त्याचे डोळे काढून त्याला बंदिगृहात टाकलें. हें वृत्त चांदभाटाला कळताच आपल्या सम्राटाच्या जिवाला जीव देण्याचें जें राजपूत भाटांचें कर्तव्य समजलें जात असे, तें पूर्ण करण्यासाठी तो आपण होअून घोरीच्या

राजसभेत गेला. चारण, भाट हे त्या काळी अवध्य समजले जात. हा त्यांचा अधिकार मुसलमान राजांनाही सहसा नाकारवत नसे. सुलतान महंमद घोरीनेही चांदभाटाला काय म्हणावयाचें आहे तें कथिण्यास सांगितलें. चांदभाट हा प्रख्यात शीघ्र कवि होता. त्या शूर भाटाने त्याच्या त्या अुच्च पहाडी नि सरस सुरात वीर वृत्तांतून गात सांगितलें की, 'माझा स्वामी हा तुमच्या हाती पडलेला आहे. त्याचा अंत तुला हवा तसा तू करशीलच. पण माझी विनंती अितकीच की मलाही त्याच्या-सहच त्याच प्रकारे किंवा अितर प्रकारे ठार करावें. दुसरें असें की त्याआधी आमच्या भारतीय धनुर्विद्येतील अेक शब्दवेधाची जी अद्भुत कला आहे, तीत माझा स्वामी किती प्रवीण आहे त्याचा अेक प्रयोग सुलतानाने स्वत: पहावा.' ह्या त्याच्या विनंतीने सुलतानासही त्या विद्येचें कौतुक वाटलें. तरीही शक्य त्या सावधपणे तो प्रयोग करण्याची व्यवस्था करण्यात आली. अेकवीस तवे अेका हारीने बांधण्यात आले. सुलतान महंमद त्याच्या निवडक परिवारासह आणि सरदारांसह राजसभेत अुच्च स्थळी तो प्रयोग पाहण्यासाठी आतुरतेने बसला होता. नंतर चांदभाट आणि अंध झालेला तो दिल्लीचा भूतपूर्व हिंदुसम्राट् पृथ्वीराज ह्यांना सैनिकांच्या पहाऱ्यात त्या तव्यांच्या सन्मुख बसविण्यात आलें. नंतर प्रत्येक तव्यावर आघात करून त्याचा ध्वनि काढण्यात आला. तो ध्वनि निवताच त्या अनुसंधानाने पृथ्वी-राजाच्या बाणाने अचूकपणे त्या तव्याचा वेध घेतला. अशा रीतीने अेकवीसही तव्यांचा शब्दवेध अचूक रीतीने तो अंध पृथ्वीराज करीत जात अमता कौतुकाने आणि आश्चर्याने त्या साऱ्या राजसभेत टाळ्यांचा गजर होत गेला. आणि सुलतान घोरीही शेवटी शेवटी प्रत्येक अचूक वेधास 'शाबास! शाबास!' म्हणून मोठ्याने ओरडला. अितक्यात पृथ्वीराजाजवळ बंदिवान् अवस्थेत असलेल्या चांदभाटाने तत्काल रचलेल्या 'दोह्यात' पृथ्वीराजाला सांगितलें की, 'येथून अमुक अंतरावर 'शाबास, शाबास,' गर्जणारा सुलतान बसलेला आहे. तेव्हा आता क्षणाचाही विलंब न करता, हे वीरवरा! तू शब्दवेधानेच त्या शत्रूचा वध कर.' हे शब्द अैकताच पृथ्वीराजाने त्या शाबास शब्दाच्या अनुरोधाने तीक्ष्ण बाण सोडून महंमद घोरीस ठार मारलें. तत्क्षणी सारा हाहाकार झाला. पण पृथ्वीराजावर पहारा देणारे ते सुलतानाचे सैनिक त्याच्यावर तुटून पडण्याचे आधीच पृथ्वीराजाने आणि चांद-भाटाने आपापलें खड्ग अुपसून आपलीं शिरें स्वत:च छाटून घेतलीं!

गुलाम घराणें

वर सांगितल्याप्रमाणे महंमद घोरीचा मृत्यु होताच त्याने हिंदुस्थानातील प्रदेशावर नेमलेला त्याचा प्रतिनिधि कुतुबुद्दीन ह्याने स्वत:च सुलतानपद धारण करून दिल्लीस मुस्लिमांची स्वतंत्र 'सलतनत' (महाराज्य) स्थापन केली. कुतुबुद्दीन हा जातीने तुर्क होता. पण महमद घोरीचा तो गुलाम असल्याने त्याच्या या राज-वंशास गुलाम घराणें असेंच म्हणतात.

कुतुबमिनारची बनावट कथा

त्याने दिल्लीत असलेला सुप्रसिद्ध स्तंभ, ज्यास आज कुतुबमिनार म्हणून म्हणतात तो, आपल्या विजयाचें स्मारक म्हणून बांधला अशी जी समज आहे ती मुळीच यथार्थ नाही. हा स्तंभ फार प्राचीन काळी विष्णुस्तंभ या नांवाने कोण्या हिंदुसम्राटाने (सम्राट् समुद्रगुप्त याने बहुधा) अुभारलेला होता, आणि श्रीविष्णूस तो अर्पण केलेला होता. ह्या कृत्याची सत्यता स्थापिणारी अेक महत्त्वाची गोष्ट अलीकडेच अुत्खननात अुघडकीस आली आहे. ती ही की, त्या स्तंभाला लागून श्री विष्णूची ती मूळची प्राचीन मूर्तिही सापडली आहे. नतर सम्राट् पृथ्वीराजाच्या राजवटीत त्याने त्या जयस्तंभाची पुष्कळ सुधारणा केली. त्यामुळे त्याला राजपूत कालात 'पृथ्वीस्तंभ' ही कुठे कुठे म्हटलेलें आहे. मुसलमानांना जी चटकच लागलेली असे की ते जेथे जातील तेथे पूर्वीच्या स्मृतीचें नांवगावसुद्धा पुसून टाकून त्यावर अिस्लामी छाप मारावयाचा, त्याप्रमाणे हिंदुस्थानातही त्यांनी जिंकलेल्या सर्व राजधान्यांचीं, तीर्थक्षेत्रांचीं. महत्त्वाच्या स्थलांचीं, कलाकृतींचीं मूळचीं हिंदूंचीं नांवें पालटून आपलीं मुसलमानी नांवें बळाने प्रचलित करावयाचीं. त्या खोडीप्रमाणे या प्रचंड विष्णुस्तंभास किंवा पृथ्वीस्तंभासच सुलतान कुतुबुद्दिनने कुतुबमिनार हें नांव दिलें. त्या स्तंभावर अनेक ठिकाणी कुराणातलीं वाक्येंही अरेबीत कोरलीं. त्याने त्या स्तंभाची थोडीशी यत्रतत्र नवीन बांधणीही केली. परतु त्या शिल्पकामास लागलेले दगड त्या दुष्ट कुतुबुद्दिनाने जाणूनबुजून ठिकठिकाणी फोडलेल्या हिंदूंच्या मूर्तींचे दगड आवश्यकतेनुसार तासून घेतलेले होते.

चितोडवर झालेल्या स्वाऱ्या आणि हिंदूंनी मिळविलेले विजय

सुलतान कुतुबुद्दीन पंजाब, दिल्ली, कनोज अित्यादि हिंदु प्रांतांत विजय मिळवीत असताच त्याच्या डोक्यात स्वतंत्र राजपूत हिंदुराज्यांचीं राज्यें सतत सलत होतीं. अितक्यात चितोडचा राणा समरसिंह याचा मृत्यु झाला आणि त्याचा धाकटा अल्पवयी मुलगा कर्ण हा राज्यावर बसला. तो अल्पवयी असला तरी त्याची आअी वीरांगना करुणदेवी मोठी कर्तृत्वशाली महिला होती. ही संधि साधून कुतुबुद्दीन याने चितोडवर स्वारी केली. परंतु त्या तरुण राणीने सैन्याचा स्वतः पुढाकार घेअून आणि आजूबाजूच्या हिंदुराजांमध्ये अवसान संचरवून मुसलमानांशी लढाअी दिली. अंबरजवळ झालेल्या या लढाअीत हिंदूंनी कुतुबुद्दिनाच्या मुस्लिम सैन्याचा पराजय केला. तेव्हा कुतुबुद्दिनाने आपला पूर्ण विनाश टाळण्यासाठी तत्काल माघार घेतली आणि तो दिल्लीला निघून गेला. पुढे कर्णानंतर हूप हा चितोडास गादीवर बसला. तेव्हा पुन्हा त्याचेंही पाणी जोखण्यासाठी कुतुबुद्दिनाचें मुस्लिम सैन्य चितोडवर चालून गेलें. पण राजपुतांनी पुन्हा लढाअीस सज्ज होअून त्या मुस्लिम सैन्याची रणांगणात गाठ पडताच धुळधाण अुडवून दिली. राजा हूप

हा मोठा कर्ता निघाला. त्याच्या राज्याची बळकटी पाहून तो होता तोवर मुसलमानांनी चितोडकडे पुन्हा तोंड दाखविलें नाही.

येथे हेंही लक्षात ठेवलें पाहिजे की असे वारंवार जय मिळत असताही मुसलमान चालून येअीतोपर्यंत हिंदु त्यांच्यावर आक्रमण असें काही करीत नसत किंवा पराभूत मुसलमानी सैन्याच्या पाठलागही फारसा करीत नसत, किंवा मागे अुरलेल्या मुस्लिम वसतीस कोंडीत पकडून नष्ट करीत नसत, किंवा मशिदी पाडून टाकीत नसत. ह्या 'सद्गुण-विकृतीमुळेच' मुस्लिम अत्याचारांचा सूड अशा प्रत्याचारांनी संधि सापडली असताही, हिंदु घेत नसत म्हणूनच मुसलमान पुनःपुन्हा, त्यांना शक्य होताच हिंदूवर अत्याचार करीत!

कुतुबुद्दीन हा सन १२१० त मृत्यु पावल्यानंतर अेक दोन असमर्थ सुलतान गादीवर बसून लगेच पदच्युत केले गेल्यामुळे शेवटी कुतुबुद्दिनाची मुलगी सुलतान रेझिया ही राज्यकारभार पाहू लागली. तिला राज्यकारभाराचें सर्व शिक्षण कुतुबुद्दिनाने दिलें होतें. ती पुरुषवेष चढवून राजसभेत किंवा सैन्यात जात असे. पुढे तिची प्रीति तिच्या दरबारात मुख्य चालक असलेला तिचा विश्वासू गुलाम जलालुद्दीन याच्यावर बसली आणि ती अुघडपणे त्याच्या सहवासात राहू लागली. ही गोष्ट मात्र तिच्या तुर्क सरदारांस असह्य झाली. कारण जलालुद्दीन हा अेक हबशी (निग्रो) होता. आणि तुर्कासारख्या स्वतःस अुच्च कुलःतील समजणारे मुसलमान निग्रोंना अत्यंत हीन जातीचे लेखीत असत. यावरून हेंही वाचकांच्या ध्यानात येअीलच की साऱ्या मुस्लिम अितिहासामध्ये तुर्क, मोंगल, अरब, पठाण, हबशी अित्यादि सर्व जरी स्वतःस मुसलमान म्हणवीत आणि आम्हा मुसलमानांत जातिभेद असा नाहीच असा समतेचा टेंभा पाजळीत, तरीही त्यांच्यातील ह्या जाति-जातींच्या श्रेष्ठ कनिष्ठ भावनेने जिकडे तिकडे धुमाकूळ माजविलेला असे.

अधिक स्थल या ग्रथात नसल्याने ती गोष्ट येथे अेकदाच सांगून टाकली आहे. ज्यांना याविषयी विशेष माहिती हवी असेल त्यांनी आमचा 'मुस्लिमांतील पंथोपपंथ' हा अैतिहासिक लेख पहावा.

शेवटी हबशी जलालुद्दिनाच्या आणि सुलतान रेझियेच्या विरुद्ध तुर्कादिक सरदारांनी अुघड अुघड बड पुकारलें. सरहिंदचा सुभेदार अल्तुनिया याने बंडाचें पुढारीपण घेअून सुलतान रेझियाशी लढाअी दिली. तीत रेझियाचा पराभव झाला. परंतु तिने चपळाअीने त्या अल्तुनियावरच मोहपाश टाकून त्याच्याशीच लग्न लावलें. त्यांनी दिल्लीवर पुन्हा चाल केली. पण तेथील सरदारांच्या आणि सैन्याच्या हातून त्यांचा पराभव होअून अल्तुनिया आणि रेझिया दोघेही ठार मारले गेले. पुढे काही अुलाढाली होअून सरदार बलबन ह्याने सर्व सत्ता सन १२२६ मध्ये बळकाविली आणि तोच सुलतान झाला.

मोंगलांच्या स्वाऱ्या – चेंगीजखान

दिल्लीमध्ये हें गुलाम वंशाचें राज्य चालू असतानाच मोंगल लोकांच्या स्वाऱ्यांचा धुमाकूळ हिंदुस्थानच्या सरसीमेकडे मध्य आशियातून सारखा चालू होता. मंगोलियातून मोठमोठालीं सैन्यें अेखाद्या वावटळीसारखीं त्या काळात आपापल्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पॅसिफिक समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत सारे देश आणि सारीं राष्ट्रें तुडवीत नि बुडवीत चाललेलीं होतीं. त्या काळात त्यांचा जगप्रसिद्ध पुढारी चेंगोझखान हा होता. ह्या मोंगलांनी त्या वेळी काही मुसलमानी धर्म स्वीकारलेला नव्हता. चेंगीझखानाने तर मरतोपर्यंत मुसलमानी राज्यांची, धर्माची आणि अरबादिक मुसलमान राष्ट्रांची शक्य ती ती विटंबना केलेली होती. अल्लाचा धार्मिक नि राजकीय प्रतिनिधि म्हणून ज्या खलिफाला मुसलमान लोक अत्यंत सन्मान देत त्या बगदादच्या खलिफाला तर चेंगीझखानाने सिंहासनावरून खाली ओढून ठार मारविलें, आणि बगदादची राजधानी अुद्ध्वस्त करून टाकली. पण अल्लाने त्याचा केसही वाकडा केला नाही ! विध्वंसाचा नांगर चेंगीझखानाने रशियापर्यंत असाच अप्रतिहतपणे फिरवून रशियाचें कीव्ह येथील राज्यही अुखडून दिलें आणि आशियातील काळ्यासमुद्रापर्यंत कापाकापी, लुटमार यांचा धुमाकूळ घालून तो सारा प्रदेश आपल्या महाराज्यास जोडला. पण चेंगीझचा हात धरण्यास येवढ्या विस्तीर्ण जगात कोगतीही शक्ति धजली नाही. रशियाहून परतताना चेंगीझचीं हीं मोगलीं सैन्यें हिंदुस्थानावर आदळणार हें अुघड दिसू लागलें. परंतु योगायोगाने चेंगीझखान, गझनीचें मुसलमानी राज्य अुलथून टाकल्यानंतर, अकस्मात् मंगोलियाकडे निघून गेला आणि तिकडेच तो सन १२२७ त मरण पावला. पुढे चेंगीझखानाचा जो मोंगल वंशाचाच सर्वांत बलाढ्य सरदार कुब्लाअीखान त्याच्या हाती सर्व मोंगलांची राजसत्ता आली. सारा चीन नि कोरिया हाही ह्या मोंगलांनी आधीच जिंकलेला होता कुब्लाअीखान याने आपली राजधानीच त्याने पादाक्रांत केलेल्या चीनमधील पेकिंग ह्या चिन्यांच्या राजधानीतच आणून स्थापन केली.

ह्या मोंगलांचा आशियातील तुर्क लोकांशी जो संघर्ष झाला त्याचा अेक परिणाम असा झाला की तुर्कांचो आणि मोंगलांचो अेक संमिश्र प्रजा अुत्पन्न झाली. त्या मिश्र प्रजेला नुसतें मोंगल किंवा मुघल म्हणत. हे मोंगल लोक वारंवार हिंदुस्थानात घुसण्यासाठी स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करीत असत. शेवटीशेवटी ते दिल्लीपर्यंत पुढे सरसावले. त्यांच्यापैकी काहींनी मुसलमानी धर्माचा स्वीकार केला परतु जुने मुसलमान त्यांना समानतेने न वागविता अेक 'हीन जात' म्हणूनच लेखीत. हे लोक दिल्लीत अेक मोगलपुरा नांवाची स्वतंत्र वसति करून राहू लागले. त्यांच्या त्यांच्यापैकी काही तर जुने मुसलमान त्यांची हेटाळणी करीत म्हणून राजपुतांच्या आश्रयालाही गेले. विशेषत: रतनभोरच्या शूर हिंदुराजाच्या पदरी ह्या नवमुसलमानांतील दोन अेक हजार लोक सैन्यामध्ये नोकरीस राहिले.

गुलाम वंशातला सुलतान बलबन हा अेका अर्थी अत्यंत प्रबळ कर्ता, आणि स्वत:ला अल्लाचा प्रतिनिधि म्हणून समजणारा सुलतान होअून गेला. पण मुसलमानांच्या प्रत्येक सुलतानापासून तो फडतूस शिपायापर्यंत जो हिंदु धर्माचा आणि लोकांचा निव्वळ द्वेष केला जाअी त्यात मात्र हा सुलतान बलबनही अगदी अग्रेसर होता. त्याने नाना प्रकारचे कर हिंदु लोकांवर लादले. त्यांच्या तीर्थयात्रासुद्धा बंद करविल्या. हिंदूंचीं बलाने धर्मांतरें नि कापाकापी गावोगाव चालूच होती !

बलबन हा अगदी म्हातारपणी सन १२८६ त मरण पावला. त्याच्यामागे गुलाम वंशातील कोणीही कर्ता पुरुष न निघाल्यामुळे दोन चार वर्षांतच जलालुद्दीन नांवाच्या खिलजी घराण्यातील अेका बलाढय सरदाराने बलबनच्या मुला-नातवांना ठार मारवून अि. सन १२९० मध्ये स्वत:चीच दिल्लीचा सुलतान म्हणून घोषणा केली तेथे गुलाम घराण्याचा शेवट झाला.

खिलजी घराणें

हें जलालुद्दिनाचें खिलजी घराणें पूर्वी कधी तुर्की असलें तरी तें आता स्वत:ला पठाण (अफगाण) म्हणून म्हणवून घेत असे. जलालुद्दीन हाही अितर सर्व सुलतानांप्रमाणे किंवा मुसलमानांप्रमाणे हिंदुसत्तेचीं नि हिंदुधर्माचीं पाळेंमुळें खणून काढण्याच्या अीर्षेने भारावलेला होता. राज्यव्यवस्थेच्या अितर सर्व गोष्टीत तो न्यायी होता. मुसलमानांविषयी मात्र मनाचा हळवा असे. रजपुतांच्या रतनभोर नांवाच्या प्रख्यात दुर्गाला मुसलमानांचा जो वेढा अटीतटीने चाललेला होता त्यात शेवटी अितक्या मुसलमानांच्या प्राणांची आहुति पडली की ती पाहून तो वेढा जलालुद्दिनाने अुठवून माघार घेतली आणि म्हणाला, 'असल्या शंभर दुर्गांपेक्षा मुसलमानांच्या अेका केसाचें मूल्य मला अधिक आहे'! पण हें शहाणपण त्याला अितक्या अुशिरा जें सुचलें त्याचें खरें कारण राजपुतांचें दुर्दांत शौर्य हेंच होय ! ह्या पराभवानतर तो पुन्हा राजपुतांच्या वाटेस गेला नाही.

अगदी वृद्ध झालेल्या जलालुद्दिनाच्या मनात त्याच्यामागे त्याचा अेक जो महत्त्वाकांक्षी, शूर आणि कट्टर मुस्लिम असा अल्लाअुद्दिन नांवाचा पुतण्या होता त्यासच आपल्यामागे सुलतान पदावर अुत्तराधिकारी म्हणून स्थापण्याचें निश्चित झालेलें होतें. त्याप्रमाणे त्याने अल्लाअुद्दिनाच्या हाताखालीच मोठे सैन्य देअून त्याला राजपुतांशी तोंड देण्यास धाडलें होतें. परंतु अल्लाअुद्दिनाच्या धाडसी आणि हिंदुद्वेषी महत्त्वाकांक्षेस तेवढें क्षेत्र अपुरेसें वाटून ज्या दक्षिणेतील हिंदु राज्याच्या अपरंपार संपत्तीविषयी वृत्त तो अेकत आला होता त्या दक्षिणेलाच पादाक्रांत करण्यासाठी आपला वृद्ध चुलता जो सुलतान जलालुद्दिन त्यासही न विचारता अल्लाअुद्दिनाने परस्परे विंध्याद्रि ओलांडून दक्षिणेवर अचानक छापा घातला. दक्षिणेतील ज्या पहिल्या राज्यावर अल्लाअुद्दीन धडाक्यासरशी तुटून पडला तें राज्य देवगिरीच्या यादवांचें होतें.

ह्या अल्लाअुद्दिनाच्या दक्षिणेवरील स्वारीचें अेक महत्त्वाचें वैशिष्टय आहे. निदान अर्वाचीन अितिहासकालात तरी त्या अर्वाचीन अितिहासाच्या अगदी आरंभापासूनच म्हणजे अिसवी सनापूर्वी पांचशे सहाशे वर्षांपासून तो त्या तेराव्या शतकाच्या शेवटाशेवटापर्यंत म्हणजे जवळजवळ दोन हजार वर्षें संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य, संपन्नता आणि सामर्थ्य दक्षिण हिंदुस्थानातील हिंदुजगत् अुपभोगीत आलेलें होतें. त्या दक्षिण हिंदुस्थानावर कोणत्याही परधर्मीय वा परराष्ट्रीय अहिंदु शत्रूचें यशस्वी आक्रमण असें ह्या दोन हजार वर्षांत झालेलें नव्हतें. ज्यांनी तसा आक्रमणाचा अपवादात्मक यत्न केला त्या त्या परकीयांना सीमा अुल्लंघिताच या दक्षिण हिंदुस्थानातील हिंदु वीरांनी तिथल्या तिथेच ठेचून टाकलें होतें. अशा ह्या दक्षिण हिंदुस्थानातील हिंदुजगतावर अल्लाअुद्दिनाने अकस्मात् केलेली ही स्वारी म्हणजे परधर्मीय आणि परराष्ट्रीय शत्रूची अितिहासकालातील पहिलीच स्वारी होती आणि ती यशस्वीही होणारी होती! तिचा परिणामही दारुण नि दूरवर होणारा होता! ह्या त्या स्वारीच्या राज्यक्रांतिकारक नि विघ्नसंकुल वैशिष्ट्यामुळेच त्या पुढच्या वृत्तान्ताचें समीक्षण स्वतंत्र प्रकरणातून करणें भाग आहे!

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९४ वि: निबंध
क्रमांक ... २५९९ ... नों. दि. 13/1/64

प्रकरण ४ थ

दक्षिण भारतावर मुसलमानांच्या स्वाऱ्या
चौदाव्या शतकाच्या आरंभापर्यंतचा नि आरंभीचा काळ

हिंदुस्थानातील अैतिहासिक काळाच्या प्रारंभापासून, म्हणजे साधारणतः अिसवी सनपूर्व पांचशे सहाशेपासून तो ह्या अिसवी सन चौदाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत दक्षिण हिंदुस्थानावर सिंधुमार्गाने किंवा भूमार्गाने परकीय अहिंदूची व्यापक स्वारी अशी कधी झालीच नाही. दक्षिण भारतातील हिंदुराज्यांचें स्वातंत्र्य आणि सामर्थ्य अितक्या दीर्घकालपर्यंत बहुधा अक्षुण्णपणे अुपभोगिलें जात होतें. अितकेंच नव्हे तर तिकडील कलिंग, पांड्य, चेर, चोल, आंध्र, राष्ट्रकूट, चालुक्य यादव,–द्वारकेपर्यंत लक्षावधि, हिंदु सैन्यांनी आणि समूहांनी आपलीं राज्यें आणि व्यापार, ज्ञान, विज्ञान, कला, शिल्प यांचा अिकडे मेक्सिको तो तिकडे निदान आफ्रिकेच्या मध्यापर्यंत दिग्विजयी प्रचार केलेला होता.

पण अितक्या दीर्घकालापर्यंत आमच्या हिंदुस्थानच्या दाक्षिणात्य हिंदु-राज्यांनी आणि लोकांनी आपलें स्वातंत्र्य टिकवून धरलें, ही गोष्ट अितक्या स्पष्ट-पणे आणि ठामपणे अितिहासात कुठेही सांगितलेली नाही !

आम्ही अुलट आव्हानपूर्वक असें म्हणू शकतो की, आमच्या या दाक्षिणात्य खंडप्राय हिंदु द्वीपकल्पाप्रमाणे आपलें स्वातंत्र्य, सामर्थ्य, साम्राज्य अितक्या दीर्घ-कालापर्यंत टिकवून धरणारें आणि भूमिमार्गें वा सिंधुमर्गे राजकीय परदास्याचा विटाळ ज्यांनी स्वतःस बहुधा होअू दिला नाही असे देश नि राष्ट्रें आजच्या ज्ञात अितिहासात तरी शोधू जाताही अगदी तुरळकच आढल्यास आढळतील !

आणि असा गौरवार्ह भूतकाळ ज्या भरतखंडाचा अर्धा आणि अितका विस्तृत भूभाग अितक्या दीर्घकालापर्यंत आपल्या स्वतःच्या पराक्रमाने अुपभोगीत आला होता – त्या भरतखंडाला आजच्या परकीय नि स्वकीयही अितिहासात काही पिसाट, मत्सरग्रस्त किंवा डॉ. आंबेडकरांसारखे हिंदुद्वेषी आणि काही केवळ अज्ञानी लेखक अेकजात विटंबितात की, "साऱ्या हिंदुस्थानचा अितिहास म्हणजे प्रथमपासून परक्यांच्या दास्यात रुतलेल्या नि सतत पायदळी तुडविल्या गेलेल्या लोकांचाच काय तो अितिहास आहे ! 'गुलामीचें जिणें'च काय तें शतकोशतकें जगलेल्या हिंदूंचें तें अितिवृत्त आहे ! "

यापुढे तरी प्रत्येक भारतीय किंवा अभारतीय अितिहासकाराने दक्षिण हिंदु-स्थानच्या या स्वतंत्र नि गौरवार्ह वैशिष्ट्याचा सुस्पष्ट अुल्लेख सत्यासाठी तरी केलाच पाहिजे ! तरच त्यांच्या त्या लिखाणाला अितिहास हें नांव शोभेल ! !

अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंचें श्रेय

अर्थात् दक्षिणेच्या ह्या प्रदीर्घ राजकीय स्वतंत्रतेच्या आणि साम्राज्याच्या श्रेयात, अुत्तर हिंदुस्थानातील हिंदु राष्ट्रवीरांनी जो मुसलमानांशी सहाशे सातशे वर्षें घनघोर रणसंग्राम अखंडपणे चालू ठेवून या अरब, पठाण, तुर्क, मोंगल–जवळ जवळ साऱ्या आशियातील अनेक राष्ट्रांच्या आणि जातींच्या लक्षलक्ष लुटारू आक्र-मकांना अितका दीर्घकाल तिकडे अुत्तरेतल्या अुत्तरेतच थोपवून धरलें आणि ज्या लक्षलक्ष हिंदु धर्मवीरांनी हिंदुधर्मरक्षणासाठी पेटलेल्या अग्नीच्या डोंवांत, नद्यांच्या पुरांत, शत्रूंनी केलेल्या सरसकट कापाकापीत आपलें प्राणदान केलें, पण त्यांच्या त्यांच्या श्रद्धेनुसार हिंदुधर्मास सोडलें नाही, त्यांच्या त्या पराक्रमाचा नि हौतात्म्याचा फार मोठा वाटा आहेच आहे ! ! याविषयी हिंदुराष्ट्राच्या अुत्तरेतील त्या त्या हिंदु पिढ्यांचे कधीही न फिटू शकणारे अुपकार अखिल हिंदुराष्ट्रावर झालेले आहेत, हें हिंदूच्या अितिहासाने कधीही विसरता कामा नये !

तथापि अितक्या प्रदीर्घ काळाने का होअीना पण जगामध्ये प्रत्येक मोठ्या-तल्या मोठ्या राष्ट्रावर सुद्धा केव्हाना केव्हा तरी पारतंत्र्याचें संकट कोसळल्यावाचून

राहत नाही, असें जगाच्याच अतिहासात आढळतें, त्याप्रमाणे ह्या सन तेराव्या शतकाच्या अगदी अंताला ह्या दक्षिण भरत खंडावरही परकीय मुसलमानांच्या स्वाऱ्यांचें संकट कोसळलें.

पण येथे हेंही ध्यानात ठेवलें पाहिजे की, त्याच्याही आधी त्या काळच्या जगात हिंदुस्थानाशी विस्तृततेत आणि महत्तेत ज्याची तुलना करता येअील असें जें चीनचें अेकच राष्ट्र होतें तें, चौदाव्या शतकाच्या जवळजवळ शंभर वर्षें आधीच चेंगीझखानाने आणि नंतर कुब्लाअीखानाने पूर्णपणे जिंकून घेतलें होतें आणि ज्या वेळी दक्षिण हिंदुस्थानावर अल्लाअुद्दिन खिलजी आम्ही आता पुढे सांगणार आहोत ती पहिली स्वारी करीत होता, तेव्हा सारें चीन राष्ट्र या परकीय मोंगल बादशाहाच्या – कुब्लाअीखानाच्या परकीय सिंहासनाचें पादपीठ आधीच होअून राहिलें होतें ! पण म्हणून काही चीनचें राष्ट्रही सदोदितच दुसऱ्याचे गुलामीत पिचत आलेलें आहे असें म्हणण्याची छाती कोण्या करंट्या, शिवराळ, निंदक टीकाकाराची आहे काय ?

दक्षिण हिंदुस्थानचा अर्वाचीन अितिहास

दक्षिण हिंदुस्थानच्या प्राचीन अितिहासाचा आवश्यक तितका अुल्लेख या ग्रंथाच्या प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागात केलेलाच आहे. साधारणत: असें समज की, शालिवाहन वंशाची सत्ता जेव्हा समाप्त झाली त्या सन ३३६ च्या आसपास दक्षिण हिंदुस्थानच्या अर्वाचीन अितिहासाचा आरंभ झाला. त्यानंतर चालुक्यांच्या वंशांतील प्रतापी सम्राट् पुलकेशी हा दक्षिण देशाच्या अितिहासात अेखाद्या कालमापक दीपस्तंभासारखा शोभून गेला. त्याचाही अुल्लेख पहिल्या भागात आलेलाच आहे. त्याच्याच राजसभेत आलेला चीनचा प्रख्यात प्रवासी हयूअेन्त्संग ह्याने पुलकेशीच्या प्रदेशास अनुलक्षून महाराष्ट्र हा शब्द योजिलेला आहे. तोच त्या शब्दाचा अितिहासातील महत्त्वाचा असा पहिला अुल्लेख होय. सम्राट् पुलकेशी हा दक्षिणेतीलच पल्लवराजा नरसिंह वर्मा ह्याच्याशी लढताना सन ६४२ त मारला गेला आणि त्याचें राज्य पल्लवांनी जिंकलें. पण त्याचा मुलगा पहिला विक्रमादित्य याने तें राज्य थोड्याच वर्षांत पुन्हा युद्ध करून सोडवून घेतलें.

याच चालुक्य घराण्यातील दुसऱ्या विक्रमादित्याने पुढे आठव्या शतकात नवसारीकडे सैन्य धाडून तिथे स्वारी करून आलेल्या परकीय अरबी मुसलमानांचा पराभव केला.

हिंदूंनी मुसलमानांचे केलेले असे कित्येक पराभव आजकालच्या अितिहासात अुल्लेखिलेच जात नाहीत. हा आजकालचा अितिहासच अडाणी आणि पक्षपातीही आहे. वर अनेक ठिकाणी असे प्रसंग आणि हिंदुपक्षाच्या वरचढ हालचालींच्या घटना ज्या दिलेल्या आहेत, त्यासुद्धा त्या काळच्या मुसलमानांनी लिहिलेल्या अितिहासात

चुकून माकून सापडल्यास सापडतात. यापुढे तरी असे हिंदूच्या पराक्रमी कर्तृत्वाचे प्रसंग हिंदूंनी आपल्या अितिहासात स्वत: संशोधून लिहिले पाहिजेत.

वर अुल्लेखिलेला पल्लव राजवंशही दक्षिणेतील पराक्रमी आणि वैभवशाली राजवंशातील अेक होता. त्यांची राजधानी कांची (कांजीवरम्) येथे काही काल होती. नवव्या शतकाच्या अंती दक्षिणेतीलच चौलवंशीय राजा आदित्य याने अपराजित पल्लवांचा पराजय करून त्याचें हें राज्य सततचें जिंकून घेतलें

राष्ट्रकूट

चालुक्यानंतर दक्षिणेत प्रमुख राज्य असें राष्ट्रकूटांचें झालें. राष्ट्रकूटांनी जवळ जवळ सारा दक्षिण देश आपल्या राज्यात आणला होता. गुजराथचाही दक्षिण भाग त्यांनी जिंकून घेतला. मुख्य गोष्ट म्हणजे वेरूळचे सुप्रसिद्ध कैलास लेणें हें राष्ट्रकूटांनीच बांधलें. त्यांची राजधानी काही काल मालखेड येथे होती.

अिसवी सनाच्या दहाव्या शतकानंतर अगदी दक्षिणेत तंजावरचे चौल आणि मदुरेचे पांड्य हींच प्रमुख राज्ये होतीं. सुदैवाने दक्षिण हिंदुस्थानची त्या वेळचीं स्वातंत्र्य, वैभव आणि पराक्रम यांचीं अेका त्रयस्थाने चक्षुर्वैसत्यं अशीं केलेलीं वर्णनें आपल्याला आज अुपलब्ध आहेत. मार्कोपोलो हा सुप्रसिद्ध विवेचक, विद्वान् आणि चीन देशामध्येसुद्धा जाअून कुब्लाअीखानाच्या पदरी वर्षानुवर्षें राहिलेला लेखक नि युरोपियन प्रवासी या काळातच मदुरेच्या पांड्य राज्यास भेट देअून काही दिवस राहिलेला होता. त्याने स्वत: त्या वेळचें हें वर्णन आपल्या प्रवासवृत्तात दिलेलें आहे. त्यातही हिंदु लोकांनी समुद्रावर आणि समुद्रपार प्रदेशावरही राजसत्ता कशा स्थापलेल्या असत, याविषयीही मार्कोपोलोची साक्ष महत्त्वाची आहे. कारण तो हिंदुस्थानात चीनमधून जेव्हा आला तेव्हा हिंदु-चीनच्या मार्गाने आला आणि तेथे त्याने सुमात्रा अित्यादीकडील हिंदुराज्यांना भेट दिलेली होती. सुमात्रा प्रदेशात त्याचें वास्तव्य जेव्हा होतें तेव्हा तेथे श्रीविजय हा हिंदु राजा राज्य करीत होता. तो राजा बौद्ध धर्मीयांचाही प्रतिपाल करीत असे. मार्कोपोलो सन १२९५ च्या संधीस त्याची जी जन्मभूमि होती त्या व्हेनिसला परत गेला. आणखीही दोनतीन परद्वीपस्थ प्रवासी त्या वेळी दक्षिण हिंदुस्थानात राहून गेले, त्यांचींही लहानसहान प्रवासवर्णनें आहेत त्यातही त्या काळी सारें दक्षिण हिंदुस्थान राजकीयदृष्ट्या पूर्णपणे स्वतंत्र होतें, अितरही आजूबाजूच्या अनेक देशांत त्या हिंदुराष्ट्राचीं साम्राज्यें नि धर्म नांदत होता. आजूबाजूच्या पूर्व, पश्चिम आणि दक्षिण या तिन्ही समुद्रांवर त्यांचेंच स्वामित्व असून त्यांचीं मोठमोठीं सिंधुसैन्यें, प्रचंड नौदलें आणि नौवणिक्दलें अखंड ये जा करीत होतीं. आणि ते दाक्षिणात्य हिंदुराजे स्वत:स 'त्रिसमुद्रेश्वर' ह्या पदवीस अप्रतिस्पर्धित्वाने मिरवीत होते, ही डोळ्यांनी पाहिलेली वस्तुस्थिति मार्कोपोलोच्या प्रवासवर्णनाप्रमाणेच अुल्लेखिलेली आहे.

त्रिसमुद्रेश्वर सम्राट् राजेंद्र चौल हा सन १०४२ त मरण पावला. त्याच्यानंतर चौल राजवंशात अेकदोन तसेच पराक्रमी राजे निघून नंतर तो वंश आणि तें राज्यही तेराव्या शतकाचे अंती नष्ट झालें.

शंकराचार्यादिक धर्मप्रवर्तक

याच काळात दक्षिणेमध्ये राजेंद्र चौलासारखे केवळ राजकीय धुरंधरच अुत्पन्न झाले नाहीत, तर वैदिक धर्माविरुद्ध जीं अनेक तथाकथित पाखंडें साऱ्या हिंदुस्थानभर अुत्पन्न झालेलीं होतीं, त्यांचा पाडाव करून वैदिक धर्माचें वर्चस्व पुन्हा स्थापन करणारे मोठमोठे धर्मधुरंधरहि दक्षिणेत अुदय पावले. त्यांचे अग्रणी म्हणून अेका श्रीमत् शंकराचार्यांचा अुल्लेख केला तरी पुरें आहे. केरळ प्रांतात कालडी या गावी अि. सन ७७८ त ही शंकराचार्यांची अलौकिक विभूति नंबुद्री ब्राह्मण कुलात जन्मली. त्यांनी सोळाव्या वयाच्या आधीच सर्व वेदाध्ययन पुरें करून संन्यास घेअून धर्मोपदेश करण्यास आणि धार्मिक दिग्विजय करण्यास संचार चालू केला. प्रख्यात कर्ममीमांसक आणि बुद्धधर्माचे अुच्छेदक कुमारील-भट्टही याच काळाच्या किंचित् आगेमागे भरतखंडव्यापी प्रचार करून राहिलेले होते. दुसरे धर्मोपदेशक दिग्गज मंडनमिश्र हेही या तरुण शंकराचार्यांचेच समकालीन होते. श्रीमत्शंकराचार्यांनी आपला अद्वैत सिद्धान्त स्थापन करण्यासाठी आणि वैदिक विजयाचा ध्वज अखिल भरतखंडात रोवण्यासाठी या सर्व केवळ कर्मवाद्यांचा किंवा अितर वैदिक मतवाद्यांचा आणि बुद्ध धर्माचे जे कोणी महंत त्या काळी यत्र-तत्र गाजत होते त्यांना हुडकून हुडकून त्या मताचाही पूर्ण अुच्छेद केला. नंतर वैदिक धर्माची पताका आणि अधिकारी पीठें भरतखंडाच्या दक्षिणेस शृंगेरी, पश्चिमेस द्वारका, पूर्वेस जगन्नाथ पुरी, आणि अगदी अुत्तरेस काश्मीर अशा चार दिशांस प्रस्थापिलीं. या पीठांना राजदंडाचाही पाठिंबा हिंदुराज्य जेथे असे तेथे तो मिळाला. हें सर्व अघटित प्रचारकार्य करून आणि शांकरभाष्यासारख्या अद्वितीय ग्रंथाची रचना करून अवघ्या बत्तीस वर्षांच्या आत श्रीशंकराचार्यांनी गुहाप्रवेश केला – जिवंत समाधि घेतली !

पाशुपतादिक शैव पंथाचा राजकीय प्रपंच

ह्या काळाच्या आधीपासूनच पाशुपतांचा जो शैव पंथ, त्या हिंदूंच्या लढवय्या धार्मिक संप्रदायातील शाक्य पंथाप्रमाणेच असलेल्या, अत्यंत अुग्र संप्रदायाचें पुनरुज्जीवन झालेलें होतें. हा पाशुपतांचा पंथ, बुद्ध आणि जैन यांच्या मिळमिळीत आणि सोसाळू 'अहिंसेचा' नि संसारनिवृत्तीचा अत्यंत तिटकारा करी. त्या पंथाने हिंदूमध्ये म्लेंच्छादिक परधर्मीयांचा प्रतिकार करण्याची प्रबळ प्रवृत्ति नि युद्धोन्मुखता अप्रत्यक्षपणे तरी चांगलीच चेतविली होती. श्री लकुलेश नांवाचा

त्यांचा गुरु गुजराथेतच जन्मला होता. त्याचें प्रचंड कार्य आणि प्रभाव ह्यामुळे त्याला अितर हिंदु प्रत्यक्ष ' हराचाच ' (शिवाचाच) अवतार समजत असत. शंकराचार्यांनीहि त्यांचा अुल्लेख केलेला आहे.

ह्याच काळातील बंगाल

सन ७०० ते ८०० पर्यंत बंगालमध्ये पालवंशाचे राजे राज्य करीत होते. त्या राज्याचा पहिला राजा गोपाल हा होता. हा वंश बुद्धधर्मीय होता. ह्या गोपाल राजाच्या राणीचें नांव देड्डादेवी असें होतें. तिच्या पोटी राजा धर्मपाल हा जन्मला. त्याने सन ८०० ते ८२५ पर्यंत राज्य केलें. हाही बुद्धधर्मीयच होता. ह्यालाच दक्षिणेतील प्रख्यात राष्ट्रकूट वंशांतील राजा गोविंद याची मुलगी रणदेवी ही दिलेली होती. अि. सन १०९५ च्या संधीस बंगालमध्ये या बुद्धधर्मीय पालराजांचा अुच्छेद करून दक्षिणेकडील सेन नांवाच्या वंशाने आपलें राज्य स्थापन केलें. हे सेन राजे कर्नाटकातून आलेले होते आणि ते क्षत्रिय होते. क्वचित् दक्षिणेकडून गेलेल्या राष्ट्रकूट वंशातील वर अुल्लेखिलेल्या राणी रणदेवी हिच्या सबंधानेच ह्या सेन वंशाचा चंचुप्रवेश या बुद्धधर्मीय पालांच्या राजमंडळात झाला असावा. काही असलें तरी हे सेन राजे वैदिक धर्माचे कट्टर अनुयायी असल्यामुळे त्यांनी बंगालमधील बौद्ध धर्माचा पाडाव केला आणि त्या बौद्धकालात संकराने खिळखिळी झालेली वर्णव्यवस्था, अितरही वैदिक धर्मसंस्था आणि वेदविद्या पुन्हा प्रबळपणे चालू केल्या. बोपदेवाच्या मुग्धबोध या संस्कृत व्याकरणाचा प्रचार याच कालात बंगालमध्ये झाला.

याच काळातील गुजराथ

गुजराथवर याच काळात कर्णराज या नांवाचा प्रख्यात राजा सन १०६३ ते १०९३ पर्यंत राज्य करून गेला. त्याने कृष्णसागर नांवाचें अति विस्तृत सरोवर बांधलें. त्याच्या राजवंशाची मूळ राजधानी पट्टण येथे असे. परंतु त्याने पुढे आपल्या नांवाची नवीन राजधानी बांधून तिला ' कर्णावती ' असें नांव दिलें. आणि तीच गुजराथ राज्याची सततची राजधानी झाली.

परंतु पुढे गुजराथ मुसलमानांनी जिंकल्यानंतर तेथील हिंदूचा असह्य छळ करणारा सुलतान अहमदशहा याने त्या कर्णावतीचें तें अैतिहासिक हिंदू नांव पालटून आणि त्यालाच जोडून आणखी एक अुपनगर बांधून त्या दोन्ही मिळून झालेल्या महानगरास मुसलमानांच्या नेहमीच्या हिंदुद्वेषी रीतीप्रमाणे सन १४१२ मध्ये अहमदाबाद असें स्वत:चें नांव दिलें. त्या काळच्या हिंदूंच्या मेंगळ्या आणि सोसाळू वृत्तीमुळे त्यांनीही तें अहमहाबाद हेंच नांव पुढेही स्वकीय नांवासारखेंच गोंजारीत चालविलेलें आहे.

दक्षिण मुस्लिम हिंदुस्थानावर परधर्मीयांची आणि परकीयांची पहिली स्वारी ! १२९४

सुलतान जलालुद्दिन खिलजीचा पुतण्या अल्लाअुद्दिन ह्याने त्या वृद्ध सुलतानास न कळविताच मोठें सैन्य घेअून ज्या दक्षिणेच्या अैश्वर्याविषयी तो अैकत आला होता, त्या दक्षिणेवर अि. सन १२९४ मध्ये विंध्याद्रि ओलांडून स्वारी केली. ते वृत्त तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटी पृष्ठ ८१३ वर दिलेंच आहे. ती स्वारी अितकी अकस्मात् होती आणि दक्षिणेतील त्या काळच्या हिंदु राज्यांची राजकीय असावधानता आणि कूपमंडूक वृत्ति अितकी निंदास्पद होती की, जवळजवळ अल्लाअुद्दिनाची ही स्वारी झाल्यावरच तेथील मुख्य महाराज। देवगिरीचा रामदेवराव यादव हा त्याची लढाओची काहीही सिद्धता किंवा कल्पनाही नसल्याने अगदी गांगरून गेला. अुत्तर हिंदुस्थानात मुसलमानांचीं राज्यें जिकडे तिकडे स्थापन झाली असता, त्यांनी हिंदुधर्माचा आणि राज्यांचा भयानक अुच्छेद दोन तीन शतकें मांडला असता, सहस्रावधि मंदिरें सारखीं पाडलीं जात असता, काशीची ज़वळ जवळ मक्का केली गेली असता, ज्ञानदेव, नामदेव असले असले संत, त्यांची मंडळें आणि लक्षावधि प्रवासी हिंदु यात्रेकरू यात्रेसाठी पंजाबपर्यंत सारखे जात येत असता आणि हिंदुधर्माचा हा अुच्छेद पाहून येत असता, दक्षिणेवरही चालून जाअून दक्षिणेसही मुसलमानमय करून सोडण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा मुसलमानाकडून अुघड अुघड बोलून दाखविली जात असता, अल्लाअुद्दिन या देवगिरीच्या राज्यात शिरेतो तेथील हिंदुराज्यकर्ते अितके असावध होते की, त्यांचें सारें सैन्य अेकत्र करून मुस्लिमांच्या या स्वारीला तोंड देण्यासाठी अुत्तरेकडे राजपुतादिक हिंदूंना साहाय्य देण्यासाठी चाल करून जाण्याचे ठायी रामदेवरावाचें सैन्य त्याच्या काही सरदारांच्या हाताखाली दूरवर दक्षिणेकडे गेलेलें होतें तर स्वतः राजे रामदेवराव हे मृगया अित्यादि अगदी निष्काळजीपणातल्या काळज्या वहात राजधानी सोडून ससैन्य भटकत होते. पण ! !—

अेकट्या रामदेवाचेंच राज्य नव्हे, पण त्या वेळेस दक्षिणेत राज्य करीत असलेलीं चार पांच मोठमोठीं जीं हिंदुराज्यें होतीं त्यांच्या हेर विभागातील अेका मनुष्याने तरी अुत्तरेकडून हिंदूंचा हा अेवढा आक्रोश आकाश पाताळ करून सोडीत असता अुत्तरेत फेरफटका करून त्या राज्यांना ते भयंकर वृत्त कळविलें नाही की काय ? पण ! !—

अशा परिस्थितीत रामदेवाचा पूर्ण पराभव झाला हें सांगणेंच नको ! अल्लाअुद्दिनाने रामदेवरावापासून अपार खंडणी घेअून, त्याला मांडलिक करून, आपण स्वतः दिल्लीकडच्या काही निकडीच्या राजकारणाच्या ओढीने दिल्लीस निघून गेला. म्हणून रामदेवरावाचें राज्यच मुस्लिम रीतीप्रमाणे तत्काल बुडवून टाकलें गेलें नाही, हा केवळ योगायोगच !

कारण, दिल्लीस जाताच अल्लाअुद्दिनाचें सारें लक्ष त्याच्या वृद्ध चुलत्याला, सुलतान जलालुद्दिन याला नाहींसें करून स्वत:च सुलतानपद पटकविण्याकडे वेधलें होतें. त्याप्रमाणे त्याने मोठा कट करून जलालुद्दिनास ठार मारविलें आणि सन १२९६ त तो स्वत:च सुलतान झाला.

अल्लाअुद्दिनाने स्वत: सुलतान झाल्यानंतर सन १२९८ मध्ये गुजराथवर स्वारी केली. तेथील हिंदुराजाचा पराभव करून त्याची राजधानी जी अनहिलवाडा तीं जिंकून घेतली. त्या लढाअीत गुजराथच्या हिंदु राजाची राणी लावण्यवती कमलदेवी ही पळून जात असता मुसलमानांनी पकडली. परंतु तेथील पराभूत हिंदुराजा मात्र त्याची मुलगी जी देवलदेवी तीसह पळून जाअू शकला. अल्लाअुद्दिन तेथून थेट सौराष्ट्रात गेला आणि हिंदूंनी पुन्हा बांधलेलें सोरटी सोमनाथाचें नवें भव्य मंदिर पुन्हा पाडून तेथील मुख्यमूर्ति जी होती तिला दिल्लीस नेली; हिंदूंचा भयंकर मानभंग करण्यासाठी त्या मूर्तीचा सिंहासनाच्या पायरीप्रमाणे त्याने अुपयोग केला !

दिल्लीस गेल्यावर राणी कमलदेवीशी बहुधा तिच्याच अनुमतीने अल्लाअुद्दिनाने लग्न लाविलें. अल्लाअुद्दिनासह सुखाने नांदूनच ती कुलटा थांवली नाही; तर तिने तिची तरुग मुलगी जी राजकुमारी देवलदेवी तिलाही पकडून मुसलमानांच्या गोटात दिल्लीस आणण्यासाठी आपल्या दक्षिणेवरील स्वारी करणाऱ्या मुसलमान सरदारांना कळविलें.

अल्लाअुद्दिनाने गुजराथवर केलेल्या या स्वाऱ्यांत तेथील अेका सावकाराच्या पदरी अेक देखणा, तरतरीत नि तरुण मुलगा गुलाम म्हणून होता; त्याला अल्लाअुद्दिनाने अेखाद्या मुलीला मागणी घालावी तशी मागणी घातली. परंतु तो सावकार त्या तरुण गुलामाला देअीना म्हणून अल्लाअुद्दिनाने त्या मुलास बळाने खेचून आपल्याबरोबर नेलें. त्या काळच्या मुस्लिम समाजात सुंदर मुलाशी सुंदर मुलीप्रमाणेच संबंध ठेवण्याचे जे लैंगिक समसंभोगाचे(Sodomy)व्यसन अरब लोकांतून अनुकारलेलें होतें आणि जें अेकंदर मुसलमानी समाजातच धर्मबाह्य न समजलें जाता पुढे रूढ झालें, त्याप्रमाणे अल्लाअुद्दिनानेही त्या तरुग, सुरूप गुलामाशी लैंगिक संबंध ठेवला. पण तो तरतरीत मुलगा राजकारणातसुद्धा अितका कर्ता निघाला की प्रत्यक्ष रणांगणात सैन्याचें नेतृत्व तो अगदी अल्लाअुद्दिनाप्रमाणेच कौशल्याने आणि प्रभावीपणे करू लागला. वृद्ध होत चाललेला अल्लाअुद्दिन त्या तरुणाला मलिक काफूर हया नांवाने संबोधी. पुढे आपला अत्यंत विश्वासू सरदार म्हणून सुलतान अल्लाअुद्दिन सर्व राज्याचीं सूत्रें त्याच्याच तंत्राने हाकू लागला.

रनतभोरवर मुसलमानांची दुसरी स्वारी

जलालुद्दिन खिलजीचा रतनभोरच्या हिंदूंनी पराभव केला होता हें मागे दिलेंच आहे. त्याचा वचपा काढण्यासाठी अल्लाअुद्दिनाने सन १३०१ मध्ये रतन-भोर दुर्गावर दुसरी स्वारी केली. तेव्हाही मरेतो लढण्याची सीमा करून त्या रतनभोरचा राजा हमीर सहस्रोगणती रजपूत सैनिकांसुद्धा तुंबळ लढाअी देत ठार मारला गेला, आणि रजपूत वीर पुरुषांचा रणांगणात नि:पात झाला हें पाहताच त्या दुर्गावर अुभ्या असलेल्या हमिराच्या राणीसुद्धा शतावधि रजपूत स्त्रियांनी पूर्व संकेतानुसार पेटलेल्या प्रचंड चितेत अुड्या घेअून जोहार केला ! स्वधर्मास्तव हिंदु-वीरांनी आणि वीरांगनांनी असे दिव्य पराक्रम नि प्राणदान प्रसंगोप्रसंगी केलें म्हणूनच हें हिंदुराष्ट्र त्या काळी परधर्मीय शत्रूशी लढत जिवंत राहिलें!

रतनभोर दुर्ग असा जिंकून घेतल्यानंतरच्या मुसलमानांच्या चितोडवरील लगोलगतच्या स्वाऱ्या

सिंहलद्वीपच्या राजपूत राण्याची अत्यंत रूपवती कन्या पद्मिनी ही चितो-डच्या राणा भीमसिंगाला दिलेली होती. अशा रूपसंपन्न परस्त्रियांचा अगदी अुघड अुघडपणे अपहार करणें हें आपलें अेक भूषणभूत मुस्लिम धर्मकृत्यच आहे अशी निर्लज धारणा त्या काळी मुसलमान समाजाचीच असल्यामुळे सुलतान अल्ला-अुद्दिनाने राणा भीमसिंगाकडे त्याच्या या रूपवती राणीची अुघड मागणी केली. राजपुतांनी ती धिक्कारताच अल्लाअुद्दिन सन १३०२ च्या आसपास चितोडवर चालून गेला. या वेळच्या लढायांना वर्णिताना रजपूत अितिहासात, अल्लाअुद्दि-नास ठकविण्यासाठी राजपुतांनी, ' आम्ही पद्मिनी तुमच्या भेटीस धाडतो ' असें आमिष दाखवून राजपूत सैन्यच स्त्रीवेषात अनेक मेण्यांतून अल्लाअुद्दिनाच्या शिबिरात घुसविण्याचा जो अेक अत्यंत धाडसाचा कट केला आणि पारही पाडला त्याची अेक कथा सांगितलेली आहे. पण स्थलाभावास्तव ती येथे गाळणें भाग आहे. त्या अटीतटीच्या लढाओतही राजपूत शौर्याचा पाडाव करणें अशक्य होअून अल्लाअुद्दिनास दिल्लीस परत फिरावें लागलें. राजपूतही प्रसंगी कपट नीतीचा अवलंब करीत हें ह्यावरूनही अुघडच आहे

हिंदूंनी ह्या स्वारीत केलेल्या पराभवाचा सूड घेण्यासाठी आणि पद्मिनी-साठी लगेच सन १३०३ मध्ये अल्लाअुद्दिनाने चितोडवर दुसरी स्वारी केली. या वेळीही यच्चयावत् राजपुती झुंजार पुरुषांनी केशरी वेष धारण करून रणांगणात मरेतो लढत लढत शेकडों मुसलमानांना कापून काढलें, परंतु शेवटी विजय मुसलमानी सेनेचाच झाला आहे आणि केशरीवेषांतील सर्व राजपूत रणात मारले गेले आहेत हें तटावरून पाहताच राणी पद्मिनीसह जवळ जवळ दहा हजार

राजपूत स्त्रियांनी लेकरें अुराशी घेअून पेटत्या चितांमध्ये अुड्या घेतल्या ! जोहार केला ! ! अल्लाअुद्दिनाने चितोड घेतलें खरें, पग पद्मिनीची राख काय ती त्याला गोळा करावी लागली ! जेव्हा हिंदु वीर आणि वीरांगना लढल्या तेव्हा अशा लढल्या ! !

येथेच हेंही सांगून टाकतो की अल्लाअुद्दिन वृद्ध होअून मरून जाण्याच्या आधीच हिंदूंच्या हया पराभवाचा सूड घेअून अल्लाअुद्दिनाच्या डोळ्यांदेखत हमीर नांवाच्या चितोडच्या अेका सुप्रसिद्ध राजपुत्राने सन १३१३ मध्येच मुसलमानांचा पाडाव करून चितोड पुन्हा जिंकून घेतलें. अल्लाअुद्दिनाचा अेक मुलगाही त्यांनी जिवंत पकडला—पण जशास तसें या न्यायाने त्यास प्रसंगी वलानेही हिंदु करून मात्र घेतलें नाही. हिंदूंचें आत्मघातक औदार्य तें हेंच !

सन १३०७ मध्ये अल्लाअुद्दिनाचा हा वर अुल्लेखिलेला सरदार मलिक काफूर हयाला अल्लाअुद्दिनाने दक्षिणेवर स्वारी करण्यास धाडलें. रामदेवरावाचा पुन्हा पराभव झाला. पण त्याने अल्लाअुद्दिनाची तुंबलेली खंडणी देअून संधि केला. याच घालमेलीत रामदेवरावाचा मुलगा जो शंकरदेव त्याला गुजराथची पळून आलेली जी राजकुमारी देवलदेवी दिलेली होती तिलाही मलिककाफूरने पकडून दिल्लीस धाडून दिली. लगेच सन १३०८ मध्ये मलिक काफूर दक्षिणेत तिसरी स्वारी करून स्वत: वरंगळवर चालून गेला. वरंगळचा वीराग्रणी राजा प्रतापदेव ह्याने मागे मुसलमानांचा अेकदा पराभव केला होता. ह्यामुळे मलिक काफूरने अटीतटीने लढाअी दिली. शेवटी राजा प्रतापदेव ह्याचा पराभव झाला. आणि त्याला दिल्लीच्या सुलतानाचें मांडलिकत्व मानावें लागलें.

मलिक काफूर त्या विजयाने अुत्तेजित होअून हिंदूंचें दक्षिणेकडील जें तिसरें राज्य म्हैसूरच्या होयसाल वंशाचें होतें, त्याच्यावरही तसाच चालून गेला आणि त्या हिंदुराज्याचाही त्याने पराभव केला. तेथून त्याने पुढे मदुरेच्या हिंदुराज्यावरही स्वारी करून त्या राज्याचाही पराभव केला.

याप्रमाणे बहुतेक दक्षिण देश, आमच्या दोन सहस्र वर्षांच्या अितिहास-कालात तरी, प्रथमच परकीय नि परधर्मीय शत्रूंचा अंकित झाला ! दक्षिणेचें स्वातंत्र्य आणि सौभाग्य हया वर्षी नष्ट झालें ! मलिक काफूरने दक्षिणेच्या अगदी टोकाला ह्या मुसलमानी दिग्विजयाचें स्मारकच अशी अेक भव्य मशीद बांधली ! पण लगोलग त्याची प्रतिक्रिया होअून दाक्षिणात्य हिंदूंचे ह्या मुस्लिम दिग्विजया-विरुद्ध अुठावणी करण्याचे अेकामागून अेक यशस्वी कट चालू झाले.

रामदेवरावाच्या मागे त्याचा मुलगा शंकरदेव हा देवगिरीचा राजा झाला. त्याने सुलतान अल्लाअुद्दिनाचें स्वामित्व पुन्हा झुगारून दिलें. तेव्हा मलिक काफूरने दक्षिणेवर पुन्हा स्वारी केली. राजा शंकरदेव हा शरण न जाता हटातटाने या लढाअीत ठार मारला जाअीतो लढला.

अल्लाअुद्दिनाने आणि मलिक काफूरने स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करून हें जें दक्षिणेतील सर्व मोठमोठ्या हिंदुराज्यांचें निर्मूलन केलें त्याचप्रमाणे दक्षिणेतील मोठमोठीं अनेक देवालयें पाडून टाकलीं, त्यांचे कळस भंगून टाकले, आणि बहुतेक ठिकाणी त्या त्या स्थानी मोठमोठ्या मशिदी अुभारल्या. सहस्रावधि हिंदूंना बळाने बाटविले ! ते असंख्य बाटे मुसलमान दक्षिणेतच शेतीवाडी, जहागिरी करून राहिले ! ! पण त्यांचे मात्र, हिंदूंनी मुसलमानांनी हिंदु राज्यांचें जसें निर्मूलन केलें तसें सरसकट कापाकापी करून निर्मूलन केलें नाही ! ' परधर्मसहिष्णुते 'ची सद्गुणविकृति ती हीच !

हिंदु तत्कालीन युद्धशास्त्राप्रमाणे बहुधा जशास तसे लढत होते

धार्मिक आघाडीवर हिंदूंचा असा पाडाव मुख्यतः त्यांच्याच मूर्ख रूढीपायी होत असताही राजकीय आघाडीवर मात्र हिंदु मुसलमानांशी लढावे तसे लढत होते, पराभवही झाले तरी पुन्हा अुठून मुसलमानांचे पराभवही करीत होते ! कूट युद्धाला बहुधा कूटयुद्धानेच तोंड देत होते !

अल्लाअुद्दिनाने हिंदूंचा धार्मिक छळ करण्यात मागील कोणत्याही सुलतानापेक्षा अधिकच क्रूरता दाखविली. त्याने हिंदुधर्माची, हिंदुराज्यांची आणि हिंदु लोकांची अधिकच दुर्दशा केली असती, परंतु त्याला अेकसारखे दुसऱ्या अेका सरसीमेवर सारख्या स्वाऱ्या करणाऱ्या मंगोलियातील आणि मध्य आशियाभर धुमाकूळ घालणाऱ्या मोंगल लोकांशीही सारखें लढावें लागलें. त्यांच्यापैकी काही थोडक्यानी मुस्लिम धर्म स्वीकारून प्रत्यक्ष दिल्लीत नव मुस्लिम वसाहतही केली होती. शेवटी अल्लाअुद्दिनाने क्रोधाविष्ट होअून त्या दिल्लीतील नव मुस्लिमांच्या मोगलपुऱ्याची सरसकट कापाकापी केली !

अल्लाअुद्दिनाचा मृत्यु

अल्लाअुद्दिन हा चितोडसारखी काही काही हिंदुराज्यें सोडता बहुतांश भरतखंडावर अेकछत्री स्वामित्व गाजविणारा मुस्लिम सुलतान, पहिला आणि शेवटचा असा, अेवढाच काय तो झाला. अकबराला आणि औरंगजेबालाही तें स्थान देता येणार नाही. त्यांची सत्ता हिंदुस्थानच्या अेवढ्या मोठ्या भागावर केव्हाही प्रस्थापित झालेली नव्हती.

परंतु वृद्धपणी अल्लाअुद्दिनाचे त्याच्या दैहिक व्यसनांमुळे शारीरिक व्याधींनी फार हाल झाले. तो सर्वतोपरी पंगु झाला. त्यायोगे तो मलिक काफूरच्या अगदी मुठीत राहू लागला. आणि त्याच स्थितीत जलोदराच्या विकाराने हा पराक्रमी पण हिंदुद्वेष्टा सुलतान सन १३१६ मध्ये अत्यंत दुःखात मरण पावला किंवा मलिक काफूरने त्याला मारविला किंवा मारला असेंही म्हणण्यात येतें. हिंदु

द्वेषाच्या 'पुण्याओने' त्याला काही सुखाचें मरण 'अल्ला'ही देऊ शकला नाही. थोडयाच दिवसांत अल्लाअुद्दिनाची सारी सत्ता जो त्याचा अेका काळचा गुलाम मलिक काफूर त्यानेच बळकाविली. त्याचीही अल्लाअुद्दिनानंतरच्या माजलेल्या बेबंदशाहीत लवकरच हत्या झाली. आणि नंतरच्या घालमेलीत कोणी अेक खुश्रूखान नांवाचा अेका अर्थी अलौकिक असलेला पुरुष, जो आधीच दिल्लीच्या राजकारणात तळपू लागलेला होता, तो सर्वप्रमुख पदावर चढला. त्याचें वृत्त स्वतंत्रपणेच देण्याअितकें हिंदुस्थानच्या अितिहासात हिंदुत्वाच्या दृष्टीने महत्त्वाचें असल्यामुळे पुढच्या स्वतंत्र प्रकरणातूनच सांगणें अुचित होणार आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण ५ वें

खुश्रूखान आणि देवलदेवी

हिंदुस्थानातील सर्व प्रांतांमध्ये आज अितिहास शिकत असणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना जर असें विचारलें की, 'हिंदुत्वाच्या दृष्टीने गौरवार्ह नि अविस्मरणीय असलेल्या आणि दिल्लीच्या मुसलमानी राजवटीत सुलतानांचा सुलतान म्हणून गाजलेल्या, अेका अर्थी अलौकिक अशा, खुश्रूखान नांवाच्या पुरुषाविषयी तुम्हांला काही माहिती आहे काय?' तर त्या आजच्या लक्षावधि विद्यार्थी वर्गातील शेकडा नव्याण्णव टक्के तरी साश्चर्य अुत्तरतील की, 'खुश्रूखान? नाही बोवा! तुम्ही म्हणता तशा पुरुषाचा आमच्या शालेय अितिहासात ठळक असा अुल्लेखसुद्धा आम्हांला आढळला नाही!' विद्यार्थिवर्गाची गोष्ट तर सोडाच पण शिक्षकवर्गाला, संपादकवर्गाला, अेकंदर सुशिक्षित वर्गालाही जरी हाच प्रश्न विचारला तरी शेकडा पंचाहत्तर टक्के लोक तसेंच अुत्तर देतील की, 'कोण काढलात हा अेवढा मोठा खुश्रूखान? आम्ही अशा खुश्रूखानाचें नांवसुद्धा कधी अैकलें नाही!'

येवढ्यासाठीच ह्या हिंदुस्थानच्या अर्वाचीन अितिहासातील अेका अलौकिक असलेल्या, परंतु त्याने हिंदुराष्ट्राच्या अपमानाचा सूड घेण्यासाठी मुस्लिम सुलतानशाहीचें नाकच कापून टाकलें, येवढ्या 'अपराधासाठी' काय तें मुस्लिम अितिहासकारांनी आणि अर्थातच त्यांना अंधळेपणाने अनुसरणाऱ्या अिंग्रजी आणि हिंदूंतील पूर्वीच्या ते आजकालच्या शालेय अितिहास लेखकांपर्यंतच्या बहुतेक अितिहासकारांनी ज्याचें नांव जवळ जवळ नाहीसें करून टाकलें आणि ज्याचा अुल्लेख केला तिथे 'हलकट', 'पाजी', 'नरकगामी', अशा विशेषणांनीच काय तो मुसलमान

लेखकांनी यत्रतत्र केलेला आहे, त्या 'खुश्रूखानाचा' साधार देता आला तितका परिचय आम्ही या प्रकरणात देत आहोत.

खुश्रूखानाचें पूर्ववृत्त

सुलतान अल्लाअुद्दिनाच्या राजवटीत गुजराथवर सन १२९८ पासून ज्या मुसलमानांच्या अगदी पहिल्या स्वाऱ्या झाल्या आणि तेथील हिंदूंचो राजसत्ता अुच्छेदिली गेली, त्या घालमेलीत जसा मागे अुल्लेखिल्याप्रमाणे मलिक काफूर ह्या पुढे अत्यंत प्रसिद्धीस आलेल्या पुरुषाला त्याच्या तरुणपणीच गुलाम म्हणून दिल्लीला पकडून नेलेला होता, त्याचप्रमाणे आणि त्याच रूपगुणासाठी दुसऱ्या अेका अत्यंत कोमल, आकर्षक परंतु तेजस्वी दिसणाऱ्या मोहक हिंदु मुलास मुसलमानी सरदारांनो पकडून गुलाम करून अल्लाअुद्दिनाच्या सेवेस सादर केलें होतें. हा मुलगा मूळचा हिंदु. त्यातही गुजराथेतील परिया किंवा परवार (भंगी) जातीच्या अस्पृश्य वर्गातील. अेक दोन मुसलमान लेखक त्याची जात भंग्याची नव्हती, रजपूत होती, असेंही लिहून गेले आहेत. त्याला पकडून मुसलमान केल्यानंतर त्याचें नांव प्रथम हसन असें ठेवलें गेलें. त्याला दिल्लीस थेट अल्लाअुद्दिनाच्या सेवेत घेतल्यानंतर त्याच्याशी मुसलमान समाजातील जें व्यसन या भागातील पृष्ठ ८२० वर सांगितलें आहे, त्याच व्यसनापायी काही मोठमोठ्या सरदारांनी, लैंगिक संबंध ठेवले. त्यामुळे दरबारातील तीं मोठमोठीं माणसें त्याच्या लोभाने त्याच्या अगदी मुठीत वागू लागलीं ! अल्लाअुद्दिन सन १३१६ त मेल्यानंतर मलिक काफूर हा राज्यप्रमुख झाला. त्याचाही याच्या कर्तृत्वावर मोठा विश्वास बसलेला होता. थोड्याच दिवसांत हसनला खुश्रूखान अशी पदवी मिळाली. कारण अल्लाअुद्दिनाच्या अस्ति वातच त्याच्या हाताखाली सैन्यें देअून त्याला लहान सहान स्वाऱ्यांवर स्वतंत्रपणे धाडण्यात येअू लागलें होतें. पण हसनच्या लगोलग खुश्रूखान आणि नंतर सेनापति होण्यास त्याचे स्वत:चे असाधारण गुण जसे कारणीभूत झाले, त्याहीपेक्षा सुलतान अल्लाअुद्दिनाचा मुलगा जो मुबारीक त्या राजपुत्राचें अपरंपार प्रेम या मोहक नि कोवळ्या तरुणावर जें बसलें होतें तेंच अधिक कारणीभूत झालें, त्यायोगे अल्लाअुद्दिन नि मलिक काफूर हे दोघेही मारले गेल्यानंतर अल्लाअुद्दिनाचा मुलगा मुबारीक याच्या हाती खुश्रूखानाच्या साहाय्यानेच सुलतानपद झटकन आलें. आणि त्याचा अत्यंत लाडका, कर्तृत्ववान् आणि विश्वासू सरदार जो हा तरुण खुश्रूखान त्याच्या हाती ओघानेच सुलतानपदाचा बहुतेक कारभारही चालत आला. पण तो तरुणही तो कारभार चालविण्यास पूर्णपणे समर्थ निघाला. मुबारीक मूळचा व्यसनी आणि विलासी. त्यामुळे तर खुश्रूसारखा सर्व राज्यकारभार संभाळणारा आणि त्यातही त्याच्या अंत:पुरातील विश्वासू वाटणारा समर्थ हस्तक त्याला लाभला, हें स्वत: मुबारीकही अेक वरदानच समजे.

देवलदेवी : – दिल्लीच्या राजसभेत प्रमुख म्हणून पूर्वाश्रमीचा हिंदु का असेना पण मलिक काफूर हा अल्लाअुद्दिनाने बाटविलेला आकर्षक हिंदु मुलगा पुढे सेनापति आणि राज्यधुरंधर असा ज्या काली झाला, आणि जवळ जवळ त्याच काली खुश्रूखान – हसन – हा देखणा नि कोवळा दुसरा अेक पूर्वाश्रमीचा हिंदु मुलगाही मलिक काफूर मारला जाताच सारी सलतनत् आपल्या मुठीत ठेवणारा जसा निघाला, त्याचप्रमाणे त्याच काली दिल्लीच्या कारभारी मंडळात त्या दोघा हिंदुवंशीय व्यक्तीअितकीच राजकीय महत्त्वाची, कर्ती आणि राज्यचालन आपल्या केवळ भ्रूसंकेताने चालविणारी आश्चर्यकारक तिसरी व्यक्ति म्हणजे पूर्वाश्रमीची गुजराथची हिंदु राजकन्यका, हिंदुवंशीय महिला देवलदेवी हीच होय.

या तीन हिंदु व्यक्तींपैकी मलिक काफूर हा पुढे मनानेच मुसलमानमय झाला होता, असें दिसतें. आपल्या हिंदु रक्ताची किंवा त्याच्या बापाच्या हिंदु बीजाची लवलेश आपुलकी तर काय, पण जाणीवसुद्धा त्याच्या मनात अुरली नव्हती हें अुघड आहे. पण खुश्रूखान आणि ही गुजराथची राजवालिका यांच्या मनात मात्र ती हिंदुत्वाची, हिंदु रक्ताची, हिंदु बीजाची केवळ जाणीवच नव्हे तर ओढ, आवड आणि केवळ हिंदु म्हणून त्यांच्या मुसलमानांनी केलेल्या छळाची चीडही अधून मधून म्हणा किंवा सतत म्हणा, चेतलेली होती. त्यांच्या कृत्यांतून ती अुफाळून बाहेर येअी आणि शेवटी त्या त्यांच्या हिंदुत्वाच्या सूड घेण्याच्या वृत्तीतूनच भर दिल्लीत अुभ्या हिंदुस्थानभर नांदू लागलेली मुस्लिम सुलतानशाहीची सुलतानशाही औट घटका का होअीना, पण जाळून टाकणारा भडका, अेखाद्या खांडववनीय आगीच्या कल्लोळासारखा अुसळला !

अल्लाअुद्दिनाच्या गुजराथवरील पहिल्या स्वारीतच गुजराथचा राजा पराभूत झाल्यानंतर त्याची पट्टराणी कमलदेवी अल्लाअुद्दिनाच्या हाती, मार्गनि पळत असताना सापडली. परंतु तो हिंदुराजा मात्र त्याची राजवालिका ही देवलदेवी, ही अगदी किशोरी असतानाच तिला, स्वत:च्या जिवाला आणि स्वधर्माला वाचविण्यासाठी तिच्यासह रानावनात पळून गेला. राजविलासात कालपर्यंत नांदलेल्या ह्या कोमल नि सुदर राजकिशोरीला त्या रानोमाळी भटकण्याच्या आणि तिचा पाठलाग करणाऱ्या मुसलमानाच्या सतत भयाच्या यातना किती दु:सह झाल्या असतील ! त्या लहानपणीच मुसलमानांविषयी तिरस्कार नि द्वेष तिच्या आप्तांच्या कथांवरून आणि स्वत:च्या अनुभवाने तिच्या मनात खोलवर अंकिले गेले असलेच पाहिजेत. तिची आअी राणी कमलदेवी दिल्लीला मुस्लिम सुलतान अल्लाअुद्दिनची आवडती पट्टराणी झाली. आणि ती तिची प्रत्यक्ष आअीच तिला धरून मुसलमान करण्याच्या प्रयत्नात आहे, हें अैकून तिला किती दु:ख झालें असेल ? त्या जाचातून सुटण्यासाठी हिंदु धर्माच्या अभिमानाने काही अंशी आपल्या वडिलांच्या कलास बाजूस सारून तिने राजा रामदेवरावाच्या हिंदुधर्माभिमानी नि शूर मुलगा शंकरदेव

याच्याशी लग्न लावलें. पण तिचें दुर्दैव तिथेच संपलें नाही. मालिक काफूरने केलेल्या हिंदूवरील स्वाऱ्यांत ती शेवटी धरली गेली. आणि तिला मुसलमानांनी बंदिवान् करून दिल्लीला नेली. त्या वेळी तिच्या मनाला अपमानाच्या कालकूट-विषाने भरलेल्या नांगीने वारंवार मूर्छित केलें असलेंच पाहिजे! शेवटी दिल्लीला पोचल्यावर तिला अल्लाअुद्दिनाच्या थोरल्या मुलाशी – खिजरखानाशी लग्न लावावें लागलें. देवलदेवीचें आणि खिजरखानाचें मोठें प्रेम होतें, असें काही मुस्लिम लेखक म्हणतात. पण ती केवळ त्या 'दरबारी' लेखकांची चाटुलता (खुषमस्करी) असली पाहिजे, हें देवलदेवीच्या पुढील प्रत्यक्ष कृतीवरून अुघड होतें! पण अनुकूल संधि मिळेतो तरी त्या धूर्त हिंदुराजकन्यकेने वरवर मुसलमानी धर्म स्वीकारल्या-सारखें केलें! पण—

अेवढ्या अत्याचारांतून आणि जाचांतूनही तिच्या मनाच्या देव्हाऱ्यात असलेल्या हिंदुत्वाच्या देवतेची पूजा गुप्तपणे अखंड चालू होती, हें तिच्या चरित्राच्या अुत्तरार्धावरून स्पष्ट होतें.

अल्लाअुद्दिनाच्या वडील मुलाशी बळाने लग्न लागल्यानंतरही तरुण देवल-देवीचा मानसिक छळ थांबला नाही. कारण अल्लाअुद्दिनाच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत पुन्हा राज्यक्रांति होअून अल्लाअुद्दिनाचा दुसरा मुलगा मुबारीक ह्याने आपल्या त्या सुलतान झालेल्या वडील भावाला आणि त्याच्या काही पक्षीयांचे डोळे काढून त्यांना ठार मारलें. आणि स्वतः मुबारीकच सुलतान झाला. त्यानेही त्याच्या भावाशी लग्न लावलें गेलेल्या देवलदेवीला छिनावून तिच्याशी स्वतःच लग्न लावलें!

मुसलमानी सुलतानांची आणि बादशहांची 'सभ्य परंपरा' हीच होती असें दिसतें की मागच्या मेलेल्या किंवा मारलेल्या सुलतानाच्या किंवा बादशहाच्या अुत्तमोत्तम बायकांशी आपण पुन्हा लग्न लावायचें!

अशा प्रकारे ती हिंदुराजकन्यका देवलदेवी त्या वेळच्या अत्युच्चपदी चढून सुलताना झाली खरी! पण मुबारीकविषयी अत्यंत तिरस्कार असलेल्या, त्या मना-तून हिंदु असलेल्या, त्या राजकन्येस मुबारीकशी बळाने शरीरसंबंध ठेवावा लागला. तिच्या सोनेरी देहाची अशी सारखी विटंबना चाललेली असताही या विवाहामुळे तिला अेक अत्यंत अनुकूल गोष्ट मात्र घडून आली. ती अशी :—

सुलतान मुबारीकला हें सुलतानपद देण्याच्या खटपटीत मुख्य आधार पूर्वाश्रमीचा हिंदु गुलाम आणि नंतर बळाने मुसलमान केला गेलेला नि आता वास्तवात साऱ्या सुलतानी साम्राज्याचाच सेनापति नि प्रमुख झालेला खुश्रूखान हाच होता. त्यातही सुलतान मुबारीक ह्याने सर्व कारभार आपण होअून खुश्रू-खानाच्या हाती दिला. कारण मुबारीकला त्याच्या अत्यंत घाणेरड्या विषय-व्यसनातून दुसरीकडे लक्ष देण्यास वेळच मिळत नसे. त्याची अेक खोड सांगितली

तरी पुरे. त्याला स्त्रियांचा वेष घेऊन कलावंतिणींच्या संचासह त्याच्या मोठमोठ्या सरदारांच्या घरी जाऊन स्वत:च नाचण्याचा, तमाशे करण्याचा अनावर छंद लागला होता. ह्यामुळे विषयी मुबारक हा त्याच्या व्यसनात गढून गेला असता त्याचा मुख्य प्रधान आणि मनातून आपल्या पूर्वाश्रमीच्या हिंदुत्वाची स्मृति जिवंत असलेला खुश्रूखान आणि तशीच मनोवृत्ति आणि चरित्रकथा असलेली ही गुजराथच्या राजाची कन्यका आणि आताची मुस्लिम सुलताना देवलदेवी ह्या दोन मूळच्या गुजराथी हिंदु मनस्वी व्यक्तींचा साक्षातच नव्हे तर घनिष्ठ परिचय, लोभ नि अन्योन्य विश्वास अुत्पन्न व्हावा अितका सहवास घडण्याची संधि अुभयतांना मिळाली प्रत्यहीचीं राजकारस्थानें त्यांना अगदी अेकांतात अधिकृत रीत्या सुलतानाच्या अंतरंग कक्षातसुद्धा करता येअू लागलीं.

तिथे त्यांचें हिंदुत्वाच्या दृष्टीने काहीतरी महत्त्वाचें कारस्थान जमलें असलेंच पाहिजे हें पुढे दिलेल्या वृत्तावरून अितिहासालासुद्धा गृहीत धरणें भाग आहे!

याचें पहिलें निदर्शक असें की खुश्रूखानाने त्याचा मूळचा प्रांत जो गुजराथ त्यावर आपला स्वत:च्या पूर्वाश्रमीच्या हिंदु परिया किंवा परवार हिंदु जातीच्या सख्ख्या भावालाच मुख्याधिकारी नेमलें होतें.

दुसरें अत्यंत महत्त्वाचें निदर्शक त्या त्याच्या स्वत:च्या पूर्वाश्रमीच्या हिंदु जातीचे लढाअू व्यवसाय करणारे असे सहस्रावधि लोक, निदानपक्षी वीस ते तीस हजारांपर्यंत तरी, खुश्रूखानाच्या स्वत:च्या आज्ञेखाली असणाऱ्या सुलतानी सैन्य विभागात स्वत:च्या संरक्षणासाठी म्हणून अुघड अुघडपणे दिल्लीत त्याने आधीच नियुक्त केले होते.

तिसरें निदर्शक :–ह्या त्याच्या हालचाली अनेक मुसलमान सरदारांना आवडल्या नाहीत. परंतु त्यांनी आपला अंतर्गत हेतु अितका गुप्त ठेवलेला होता की, तो अितर कोणाला तर काय, पण प्रत्यक्ष देवलदेवीला आणि खुश्रूलासुद्धा स्पष्टपणे काही तोपर्यंत मनात दृग्गोचर झालेला होता कीं नाही, हें निश्चितपणे सांगता येत नाही. या हेतूची धूसर आकृति मात्र त्यांच्या हृदयात हळू हळू साकारत चाललेली होती.

चौथें निदर्शक :–सुलतान मुबारीकसारख्या अगदी कुचकामी सुलतानाला सुद्धा अुत्साह देअून खुश्रूखानाने दक्षिणेत झालेल्या विजित हिंदूंच्या अुठावण्या वेळीच दडपून टाकण्यासाठी म्हणून दक्षिणेत मोठी स्वारी करण्यास अुद्युक्तविलें. आणि आपण स्वत: ससैन्य त्याच्या हाताखाली स्वारीवर गेला. या स्वारीत हिंदूंची अपार हानि झाली. त्यांच्या अपार लुटीची सुलतानी कोषात भर पडली. बहुधा याच स्वारीत देवगिरीच्या शंकरदेवाच्या मृत्यूनंतर त्यांचाच नातलग राजा हरपाळ देव याने देवगिरीचें राज्य बंड करून पुन्हा प्रस्थापित केलें होतें; त्यासाठी त्याचा पराभव करून जिवंतपणी त्याचें कातडें सोलून त्याला सुलतानाकडून

ठार मारण्याची अत्यंत क्रूर शिक्षा दिली गेली!! आणि स्वधर्मरक्षणासाठी त्या राजकुलोत्पन्न हिंदुवीराने ती भोगली!

नंतर मुबारीक ससैन्य दिल्लीस परत गेला. खुश्रूखानाने मुसलमानी सुलतानासाठी आणि मुस्लिम राज्यासाठी केलेल्या ह्या प्रत्यक्ष पराक्रमामुळे आणि हिंदूंच्या विध्वंसामुळे त्याच्याविरुद्ध असलेल्या मुसलमानी सरदारांनासुद्धा खुश्रूखानाच्या कट्टर मुस्लिमपणाविषयी चकार शब्द काढण्याचें धाडस करवलें नाही. अधिकात अधिक ते अितकेंच कुजबुजत की, हा खुश्रूखान सुलतान मुबारीकला अुखडून देअून स्वतःच सुलतान होण्याचें भय आहे. पण तो मुस्लिम सुलतानच असणार याविषयी मात्र त्याच्या शत्रूलाही लवलेश शंका त्या वेळेस आलेली असल्याचें संभवनीय वाटत वाही.

पण जर त्या वेळीही खुश्रूखानाच्या आणि देवलदेवीच्या मनात पुढील अचाट नि अद्भुत अशा हिंदुराज्यक्रांतीचे बेत अुद्भवलेले असतील तर तो गुप्त कट अितक्या अपूर्व दक्षतेने गुप्त ठेवला गेला असला पाहिजे.

पुढे लवकरच मुबारीकने खुश्रूखानाला दक्षिणेवर आणखी अेक प्रचंड स्वारी करावयास धाडलें. पण मुबारीक त्याच्याबरोबर गेलासुद्धा नाही. अितका अपार विश्वास खुश्रूखानावर त्याचा बसला होता. या स्वारीत खुश्रूखानाने मलबारच्या हिंदुराजालाही जिंकून अपार लूट मिळविली आणि ती सुलतान मुबारीकच्या नांवाने! परंतु याच स्वारीत दक्षिणेत आम्ही वर लिहिल्याप्रमाणे मुस्लिम साम्राज्याविरुद्ध अुठावण्यांचे अुघड वा अुघड-गुप्त कट हिंदूंच्या अनेक बाजूंनी शिजू लागले होते. चरंगळचे राजकुल, गुजराथेतील पराजित हिंदुराजकुलें, चितोड परत जिंकून घेणारा वीर राणा हमीर अित्यादिक हिंदु राज्यप्रमुख, मोठमोठ्या शंकराचार्यांसारख्या हिंदूंच्या मठसंस्थांतून वावरणारे प्रचारक धर्मप्रमुख यांच्यात आणि सामान्य हिंदु समाजातही अेक मुस्लिमविरोधी लाट आणि काहीतरी खळवळ अुडविणारी अस्वस्थता स्पष्टपणे अुसळू लागली होती. या राष्ट्रीय अस्वस्थतेशी खुश्रूखानाचा काहीतरी अत्यंत भुयारी संबंध असावा अशा दिल्लीच्या सुलतानापर्यंत खुश्रूखानाच्या शत्रूंनी निनावी कागाळ्याही पोचविलेल्या होत्या.

या वेळच्या मलबार विजेत्या खुश्रूखानाच्या आणि अेकंदर मुसलमानी साम्राज्याच्या हालचालीविषयी अितकी अपुरी आणि अुलटसुलट माहिती तत्कालीन तुटपुंज्या मुस्लिम ग्रंथकारांनी दिलेली आहे की, त्यातील संगति पुढे घडलेल्या कृत्यांवरूनच काय ती लागेल तितकी लावावी लागते! अेकदा तर दिल्लीत सुलतानाच्या भर राजसभेत अशी भुमका अुठली की, खुश्रूखान हा त्याला मिळालेली दक्षिणेतील अपार संपत्ति घेअून दिल्लीस त्याच्या शत्रूच्या गोटात परत येण्याच्या बेठकाणी मलबारातूनच परस्परे कोण्यातरी परद्वीपात सिंधुमार्गे निसटून जाण्याच्या

वेतात आहे ! अेका मुस्लिम ग्रंथकाराने तर लिहिलें आहे की खुश्रूखानाला वेड्या ठोकून दिल्लीला आणलें !

ह्या सर्व शत्रूंच्या जाळ्यांना अेका मुसंडीसरशी तोडून टाकण्याची धमक अंगी असणाऱ्या खुश्रूखानाने अकस्मात् दिल्लीस ससैन्य दक्षिण विजेत्याच्या अैश्वर्याने परत जाण्याचें अुद्घोषिलें. कारण दिल्लीचें खडान्खडा वृत्त तेथेच टपून बसलेली त्याची गुप्त सहकारिणी पूर्वीची हिंदु राजकन्यका आणि आता मुस्लिम सम्राज्ञी म्हणविणारी देवलदेवी त्याला कळवीत असलीच पाहिजे !

या त्या वेळच्या मुस्लिम ग्रंथांची अिंग्लिश भाषांतरें जीं थोडीबहुत झालेलीं आहेत त्यांवरून पर्शियन वा अरेब्रियन न जाणणाऱ्यांनाही काही माहिती मिळू शकते. बहुतेक मुस्लिम लेखक खुश्रूखानाचा अुल्लेख अत्यंत तिरस्काराने आणि अगदी चार पांच ओळींत करून मोकळे होतात. कारण अुघडच आहे. खुश्रूखानाने पुढे जें मुसलमानी सत्तेचें नाकच कापलें होतें तें शल्य मुसलमान अितिहासकारांना अर्थातच असह्य होतें. तथापि अेकदोन त्या वेळच्या मुस्लिम अितिहासकारांनाही खुश्रूखाना-विषयीचें सत्य तें वृत्त अगदीच विपर्यस्त करणें वा दडपून ठेवणें अिष्ट वाटलें नाही. त्यांच्या, विशेषत: अलीकडेच अुपलब्ध झालेल्या हस्तलिखितांचा वराच अुपयोग होतो. अगदी अर्वाचीन हिंदु अितिहासकारांनी वरील मुसलमानी जुन्या ग्रंथांना स्वत: वाचून दिलेलें वृत्तही तसेंच टाकाअू आहे. मुसलमानी लेखकांनी खुश्रूला दिलेल्या 'हलकट', 'पाजी' अित्यादि शिव्यांचाच काय तो या हिंदु लेखकांनी पुनरुच्चार केलेला आहे. पण या गोष्टीला दोन अपवाद सुदैवाने सापडतात. अेक अितिहास-महर्षि रियासतकार सरदेसाअी आणि दुसरे श्रीयुत मुनशी. या दोघांनी मात्र खुश्रू-खानाच्या नि देवलदेवीच्याही विषयी तुलनात्मक वृत्त देअून त्यांनी शेवटी केलेल्या हिंदुसाम्राज्यस्थापनेच्या महान् क्रांतीची पुसट नि ओझरती वाखाणणी करण्याचा काही प्रयत्न केला आहे. पण तो प्रयत्न स्वत:च्या निर्णयाला स्वत:च भिणारा, त्या क्रांतीचें खरें स्वरूप अेसें ठामपणे मुळीच न समजणारा किंवा सांगू धजणारा असा अर्धवटच आहे ! त्या वेळची हिंदूंची बाजू सांगणारा असा लेखक तर कुणीही मिळणें शक्य नाही. कारण त्या काळी कोण्या हिंदूचीं स्वतंत्र मतें मांडण्याची छातीच होणें शक्य नव्हतें.

अशा स्थितीत वर अुल्लेखिलेल्या मुसलमानी मूळ ग्रंथांतून त्यांचीं वृत्तें अंशत: परस्परविरोधी असताही जें काही सामंजस्य काढता येतें त्यावरून आणि खुश्रूखानादिक प्रमुख व्यक्तींच्या त्या काळी प्रत्यक्ष घडलेल्या निर्विवाद कृत्यांवरून जे निष्कर्ष पटतात तेवढे देणें अितकेंच ह्या अितिहाससमीक्षणासारख्या प्रबंधात गोवणें शक्य आहे.

वर सांगितल्याप्रमाणे खुश्रूखानही आपल्या विजयी सेनेसह दक्षिणेतील अपार संपत्ति समवेत घेअून दिल्लीस गेला. परंतु तो कशाला गेला ? दिल्लीलाच नव्हे,

पण दक्षिणेतसुद्धा अशी अेक राजकीय भूमिका हिंदुराजकारणी मंडळात अंत:स्थपणे प्रसृत झालेली होती की, दक्षिणेत मुसलमानांविरुद्ध अुठावणी करू पाहणाऱ्या हिंदु-प्रमुखाचें आणि खुश्रूखानाचें काही गुप्त राज्यक्रांतिविषयक संगमनत चाललेलें आहे. गुजराथेत खुश्रूखानाचा भाअूच वस्तुत: राज्यकर्ता होता. साऱ्या राजपुतांना मुसलमानांचें भरतखंडावर त्या कालापुरतें तरी अगदी प्रथमच स्थापन झालेलें अेकछत्री साम्राज्य अुलथून टाकून तेथे अेकछत्री हिंदु साम्राज्य स्थापण्यास राणा हमीरने प्रोत्साहित केलेलें होतें. आणि महदाश्चर्य हें की सम्राज्ञी देवलदेवीच्या अधिकाराखाली सर्वांत प्रमुख असलेला सुलतान (सम्राट) मुबारीकचा सेनापति नि कारभारी खुश्रूखान ह्यालाच त्या राजपुत प्रमुखांनी त्या हिंदु साम्राज्यविषयक अत्यंत धाडसी कटाच्या प्रकरणी आपल्या विश्वासात घेतलेलें होतें! असला विरोधमय योगायोग अितिहासालासुद्धा क्षणभर तरी चकित केल्यावाचून राहत नाही! विश्वसनीय तर, तसें काही अद्भुत घडेतो, वाटत नाही!

पण तसें काही घडू लागलें खरें. त्या वेळेस सम्राज्ञी देवलदेवीच्या आणि खुश्रूखानाच्या डोक्यात खरोखरच हिंदु साम्राज्याची अशी काही तरी अचाट आणि जवळ जवळ मूलत:च असंभवनीय पण कोणा नृसिंहीय कारस्थानाला नि पराक्रमालाच काय ती शक्य वाटणारी कल्पना नि योजना घोळू लागली खरी!

पण बाह्यत: त्याच्या शत्रूला वा मित्राला कोणालाही तिची अुघड वाच्यता करण्याचीसुद्धा सोय नव्हती! कारण साऱ्या दक्षिणेतील हिंदुराज्ये ज्याने वुडवून मुसलमानांचीं मांडलिक बनविलीं, ज्याने अलीकडेच मलवारचें संपन्न हिंदुराज्य उद्ध्वस्त करून तिथे मुस्लिम सुलतानाचा हिरवा चांद फडकविला आणि जो त्याच सुलतान मुबारीकच्या मुस्लिम सिंहासनापुढे तें सारें यश, अुपायन (नजराणा) म्हणून अर्पिण्यासाठीच दिल्लीस आला होता, तो साऱ्या भरतखंडामध्ये अितिहासकालात अगदी प्रथमच परधर्मीय नि परकीय साम्राज्यचें साम्राज्य, अेकछत्र, तोलून धरणारा, जन्माने हिंदु असूनही मुसलमान झालेला बाटगा, मुस्लिम सुलतान मुबारीकचा सरसेनापति, अेकदम अशी कोणची यक्षिणीची कांडी फिरवून त्या मुस्लिम साम्राज्याचें हिंदुसाम्राज्य करून टाकू शकणार होता? तशी अुघड शंका घेण्याचें धाडससुद्धा कोणा कट्टर मुसलमानासही करवलें नाही! स्वत: कट्टरातील कट्टर मुसलमान असण्याचें आणि मुस्लिम साम्राज्याशी सगळ्यात अधिक सुलतान-निष्ठ (राज्यनिष्ठ) असल्याचें सोंग अितक्या न कळेशापणें खुश्रूखानाने आणि देवलदेवीने अगदी शेवटच्या क्षणापर्यंत धारण केलें होतें. त्याचे शत्रु असलेल्या, हिंदुराजांशी त्याचे काही अत्यंत भुयारी लागेबांधे असल्याची दाट शंका असलेल्या कट्टर मुसलमानी अुच्चाधिकाऱ्यांनाही भय वाटे की आपल्या नांवाने अुघडपणे तसा आरोप खुश्रूखानावर आपण दिल्लीत भर कारभारी मंडळात सुलतानासमोर केला तर

वरील अुलट पुराव्याकडे बोट दाखवून सुलतान आपलेच दात पाडावयास सोडणार नाही. ही भीति ज्या त्या अुच्चाधिकारी मुसलमानास मनातून चळचळा कापावयास लावीत होती. जीं काही गाऱ्हाणीं दिल्लीस जनतेत पसरलीं किंवा सुलतानाच्या कानापर्यंत गेलीं तीं अितकीं निराधार आणि पूर्णपणे निनावी असत की तीं केवळ विघ्नसंतोषी लोकांनी केलेल्या कागाळ्या किंवा अुठविलेल्या 'अफवाच' काय त्या कोणासही वाटाव्यात

तो दिल्लीला येताच त्याच्या मुस्लिम शत्रूंच्या तर्काप्रमाणे त्याला सुलतान मुबारीकने वेडचा तर ठोकल्या नाहीतच; पण त्याने वाहिलेल्या साऱ्या संपत्तीने आणि सत्तेने अत्यंत संतुष्ट होअून साम्राज्याच्या कारभाराचे सैनिकी आणि नागरी नि अुरलेसुरले अधिकारही त्याला देअून टाकले, आणि जर कोणाला वेडचा ठोकल्याच असतील तर त्या खुश्रूखानाच्या विरुद्ध ज्यांनी हव्या तशा कागाळ्या केल्या होत्या, त्या मोठमोठ्या मुस्लिम खानांना आणि खानखानांना पदच्युत करून त्यांनाच काय त्या होत्या ! अिकडे अल्लाअुद्दिनाच्या वेळेस त्याने जे अत्यंत कडक निर्बंध हिंदूंविरुद्ध केलेले होते ते खुश्रूखानाच्या कारभारात आधीपासूनच ढिले होत होत आले होते; हिंदुमुस्लिम शेतकऱ्यांचो आणि नागरिकांची अल्लाअुद्दिनी पिळवणूकही बंद झालेली होती; हिंदूंना धार्मिक प्रकरणींही हायसें वाटू लागलें होतें ! आणि सर्वसामान्य प्रजाजनातील राज्यकारभाऱ्यांविषयीचा स्वाभाविक असंतोषही अुणावत आला होता ! आणि त्या सर्व सापेक्ष सुस्थितीचें श्रेय साम्राज्यीय राज्यकारभाराचा त्या वेळचा मेरुमणीच असणारा जो खुश्रूखान त्यालाच लोक देअू लागले. हळूहळू सुलतान म्हणताच लोकांच्या डोळ्यांसमोर व्यसनग्रस्त आणि कुचकामी मुबारीक राहत नसे; तर त्याचा सर्व कर्ताधर्ता असलेला हा पराक्रमी नि प्रजाप्रिय खुश्रूखानच अुभा राही. आणि जिच्या अंतःस्थ आणि प्रकट पाठिंब्याने तो हा अधिकार गाजवू शके, ती सुलताना, सम्राज्ञी देवलदेवी !

ज्याने आपल्या राज्यकारभारात हिंदूंना अल्लाअुद्दिनाच्या अत्यंत जाचक धार्मिक करपाशातून, नि अपमानातून अितक्या पुष्कळ अंशी मुक्त केलें त्या खुश्रूखानाला सर्व राज्यांतील हिंदु लोक, तो अद्याप मुसलमान असला तरी आपला कोणी अेक त्राताच अुदय पावत आहे असें समजू लागले. मुसलमान शेतकरी, नागरिक अित्यादि वर्गातही करांच्या ढिलाअीपणामुळे खुश्रूखान लोकप्रिय होअू लागला. आणि मुख्य गोष्ट म्हणजे त्याच्या सर्व भरतखंडभर गाजलेल्या सैनिकी पराक्रमामुळे आणि राज्यसंचालन कौशल्यामुळे मोठमोठ्या मुसलमान सरदारांतील अनेकजण खुश्रूखानाच्या पक्षास मिळाले होते.

अितकी अनुकूल परिस्थिति पाहताच आपले अचाट कारस्थान आणि अत्यंत साहसी महत्त्वाकांक्षा फलद्रूप करण्याचा मुहूर्त असल्यास तो हाच !–अितक्या अनुकूलतेतही जो हें साहस करण्यास धजणार नाही तो बुजरा पुरुष कधीही धजू

शकणारा नसलाच पाहिजे ! असें मनात ठरवून खुश्रूखानाने आणि देवलदेवीने आपल्या त्या अचाट राज्यक्रांतीच्या योजनेची अुघड अुघड घोषणा करण्याचें ठरविलें ! **ती राज्यक्रांति नव्हती तर साम्राज्यक्रांति होती !** मृत सुलतान अल्ला-अुद्दिनाच्या आणि विद्यमान सुलतान मुबारीकच्या भरतखंडावरील अेकछत्री, अकुतोभय मुसलमानी साम्राज्यास अुलथून पाडून त्याचे ठायी अेका दिवसात साऱ्या भरतखंडभर अकस्मात् हिंदु साम्राज्य स्थापन करणारी ती महान् साम्राज्य-क्रांति होती ! धार्मिक क्रांति होती !

अशी क्रांति पांचशे वर्षें जरी रणांगणात हिंदुमुसलमानांत महायुद्धें लढत ठेविलीं गेलीं असतीं तरीही साध्य होणें दुर्घट होतें, हें सिंधच्या सातव्या शतकातील अरब स्वाऱ्यांपासून तो ह्या चौदाव्या शतकातील सुलतान अल्लाअुद्दिनाच्या काल-खंडापर्यंतच्या अितिहासावरून सिद्ध होतें! परंतु खुश्रूखानाच्या आणि देवलदेवीच्या अलौकिक प्रतिभेने त्यांच्या हाती दिलेल्या त्या यक्षिणीच्या कांडीनेच काय ती, ती साम्राज्यक्रांति नि धार्मिक क्रांति अेकदाच का होअीना, शक्य नि यशस्वी करून दाखविली !

सर्व साम्राज्य, प्रथम शतकोशतके लढत हिंदूंना पूर्णपणे जिंकून ह्या मुस्लिम सुलतानशाहीने मुसलमानमय करून सोडलें आहे ना? तर मग त्या अेकट्या मुस्लिम सुलतानासच जिंकून, ती सुलतानशाही नष्ट करून त्याचें सिंहासन मी हिंदुधर्माच्या नांवेच जर बळकावून बसलो, तर तें सारें साम्राज्यच अेका झटक्या-सरशी हिंदुसाम्राज्य झालें पाहिजे ! मुस्लिम सुलतानाचा हिंदुसम्राट् झाला पाहिजे ! हीच गोष्ट काय ती जितकी अचाट साहसाची होती तितकीच सापेक्षतः त्या परिस्थितीत सुघड होती; शक्य होती ! मूळची हिंदुराजकन्यका देवलदेवी आणि मूळचा हिंदू परियाचा मुलगा आणि आताचा खुश्रूखान यांनी भरतखंडा-च्याच नव्हे तर अेकंदर अितिहासातीलच अेक अद्भुत चमत्कार घडविणारी यक्षिणीची कांडी फिरविली ती हीच!

आधी सगळी अशा राज्यक्रांतीला आवश्यक ती कडेकोट व्यवस्था गुप्तपणे करून सुलतान मुबारीकला, ज्याच्या मुठीत तो मुबारीक आपण हून पूर्णपणे सामावलेला होता, त्या खुश्रूखानाने विनम्र आविर्भावाने विनविलें की, "मी गुजराथहून जे सहस्रावधि माझ्या जातीचे हिंदु लोक आणून दिल्लीत ठेवलेले आहेत त्यांच्या मनात संस्कारपूर्वक आज मुसलमान व्हावयाचें आहे. पण नगरातून अुघडपणे तसें करण्यास कित्येक संकोचत आहेत; कित्येक भीत आहेत. तरी आज रात्री त्यांतील अेका मोठ्या निवडक गटाला मी अिथे सुलतानाच्या राजवाड्यात आणून ठेवून मुसलमानी दीक्षा हळूहळू देवविणार आहे." या निमित्ताने खुश्रू-खानाने त्याच्या हिंदुजातीच्या दिल्लीत असलेल्या शतावधि निवडक लढाऊ लोकांना

राजवाडयातील सैन्यागारात आणून ठेविलें. सन १३१९ च्या अंती अेक दिवस रात्रीचा भर चालू होताच दिल्लीच्या त्या राजवाडयात अेकाअेकी मोठी गडवड चालू झाली, आणि त्या कोलाहलात प्रत्यक्ष सुलतान मुबारीक याला ठार मारण्यात आलें!

परंतु त्या दिल्लीच्या राजवाडयात मागेही असेच क्रांतीचे अनेक कोलाहल झालेले होते. सुलतान अल्लाअुद्दिन असाच ठार झाला होता, सुलतान मलिक काफूर याची ह्याच सुलतान मुबारीकने अशीच भयंकर वाट लावली होती! अशा रक्त-पातांना परिचित असलेली ती दिल्लीची राजधानी त्या सकाळी जागी होताच कुजबुजू लागली, 'काल रात्री असा भयंकर प्रसंग राजवाडयात कोसळला तरी कोणता!'

थोडयाच अवधीत अेका राजकीय घोषणेसरशी अेखाद्या भूकंपासारखा साम्राज्यक्रांतीचा आणि धार्मिक क्रांतीचा धक्का साऱ्या राजधानीला गद्‌गदा हलवू लागला की, काल रात्री खुश्रूखानाच्या लोकांनी राजवाडयात मोठें बंड करून सुलतान मुबारीकला ठार केलें ! त्या मागोमाग दुसरी घोषणा झाली की, खुश्रूखानाने स्वत:च सुलतानपद धारण केलें आहे !

ह्या घोषणेच्या धक्क्यासरशी अुघड किंवा संघटित अशी प्रतिक्रिया मात्र जनतेत तत्काळ कुठेही झाली नाही. सुलतान मुबारीक ठार मारला जाताच त्याची सुलताना देवलदेवी हिच्याशी ह्या नवीन सुलतान खुश्रूखानाने विवाह लावला. ही घटनाही लोकांच्या क्रांतिमय कुतूहलाचा विषय झाली, तरी सभय आश्चर्याची झाली नाही ! कारण तीही रूढि दिल्लीच्या पूर्वीच्या सुलतानाच्या परंपरेची होती. कुतुबुद्दिनाच्या विधवांशी त्याच्या नंतरच्या सुलतानांनी आणि सुलतान अल्ला-अुद्दिनाचा थोरला मुलगा खिजरखान याच्या विधवेशी म्हणजे ह्याच सम्राज्ञी देवलदेवीशी ह्याच सुलतान मुबारीकनेही स्वत: लग्न लावलें होतें. त्याच परंपरेस धरून मुबारीकची विधवा जी सम्राज्ञी देवलदेवी तिच्याशी प्रथमपासून अत्यंत घनिष्ठ संबंध असलेल्या आणि ह्या राज्यक्रांतीतील जी भागीदारीण होती त्या देवलदेवीशी ह्या नव्या सुलतान खुश्रूखानानेही विवाह लावावा, यात काही अधिक क्रांतिकारक आहे असें सुलतानी राज्यातील कोणासही तत्काल वाटल्याचें आढळत नाही, हें साहजिकच होतें !

परंतु ह्या घोषणांच्या पुढची जी घोषणा या राजवाडयांतील राज्यक्रांतीला अकस्मात् अेका अद्‌भुत, धार्मिक महाराज्य क्रांतीचें स्वरूप देणारी सुलतान खुश्रू-खान आणि 'सुलताना' देवलदेवी ह्यांच्याकडून अधिकृत रीत्या आणि राजकीय समारंभपूर्वक मोठ्या गाजावाजाने करण्यात आली, तिने मात्र साऱ्या हिंदुस्थाना-तील राजामहाराजांपासून तों परिया-परवारापर्यंत, महार मांगांपर्यंत केवळ हिंदूनाच नव्हे, तर मुसलमानांनाही, पहिल्या वर्गास अत्यानंदाचा तर दुसऱ्या वर्गा-

तील कित्येकांना अति भयदायित्वाचा, परंतु सगळ्यांना सारख्याच अत्याश्चर्याचा धक्का बसल्यावाचून राहिला नाहीं ! ती अशा आशयाची घोषणा दिनांक १५ अेप्रिल सन १३२० ला सुलतानाच्या तख्तावरून, सिंहासनावरून स्वत: सुलतान खुश्रूखानाने केली की,

"आजपर्यंत मला केवळ बलात्काराने मुसलमानाप्रमाणे बाटगें जीवन कंठिणें जरी भाग पडलें होतें, तरी मी मूळचा हिंदूचा मुलगा आहे. माझें बीज हिंदुबीज आहे! आणि माझें रक्त हिंदु रक्त आहे ! यास्तव आज मला 'सुलतान' म्हणून समर्थ असें स्वतंत्र जीवन लाभलें असल्यामुळे मी ती माझ्या पायांतील बाटगेपणाची परधर्मीय बेडी तोडून टाकीत आहे, आणि अुद्घोषीत आहे की मी हिंदु आहे! आणि आता अुघडपणे या विस्तीर्ण नि अविच्छिन्न भरतखंडाचा हिंदु सम्राट् म्हणून सिंहासनावर चढलों आहे! त्याचप्रमाणे कालपर्यंत 'सुलताना' म्हणवून घेणारी देवलदेवी, जी हिंदुराजकन्यका असताही बलत्काराने मुसलमानी सैन्याने रानावनात भटकत असता तिच्या त्या राजजनकापासून आणि तिचा पति देवगिरीचा राजा त्याला मारून तिला छिनावून दिल्लीला आणलें आणि सुलतानाच्या अंत:पुरांत खिजरखानाची बायको म्हणून जिची विटंबना केली गेली आणि पुढे जो सुलतान कालच्या राज्यक्रांतीत ठार मारला गेला त्या मुबारीकनेही जिच्याशी बळाने लग्न लावून अेक बाटगी सुलताना म्हणून रावविली, तो आजची माझी सम्राज्ञी जन्माने, बीजाने आणि रक्ताने मूळची राजकुलीन हिंदुवंशाचीच कन्या असल्यामुळे तीही यापुढे आपल्या बाटग्या मुसलमानीपणास धिक्कारून आजपासून आपलें जीवन हिंदुधर्माप्रमाणेच व्यतीत करणार आहे! ही आमची दोघांची प्रतिज्ञा आमच्या विगत आणि बलात्कारजनित बाटगेपणाच्या पापाचें परिमार्जन करो! "

अशा आशयाच्या ह्या घोषणेचा तत्काल प्रतिवाद करणारा कोणीही बलवत्तर हिंदु तर काय, पण मुसलमानही निघाला नाहीं.

अेतदर्थ हिंदु सुलतान खुश्रूखानाला आता आम्ही 'हिंदुसम्राट्' आणि देवलदेवीला 'हिंदुसम्राज्ञी' संबोधणार!

या हिंदु सम्राटाने त्याचें मूळचें अगदी लहानपणचें हिंदु नांव मात्र घोषित केलें नाहीं! बहुधा त्याला तें आठवतच नसेल; आज तर तें मुळीच लुप्त झालेलें आहे. आता त्यानें जें सम्राटीय अभिधान घेतलें तें 'नासिरुद्दिन' हें मुस्लिम भाषेतीलच होतें! त्याचें कारण बहुधा असेंही असेल की साऱ्या मुसलमानांना काय किंवा पिढ्यान पिढ्या सुलतानांच्या मुसलमानी पदव्यांनाच सरावलेल्या लाखो हिंदूंनासुद्धा सर्वच गोष्टींत अेकदम बिचकल्यासारखें होअू नये. नासिरुद्दिन म्हणजे धर्माचा रक्षक असा काहीसा अर्थ होतो. अेतदर्थ या हिंदु सम्राटाने त्या घोषणेतच अितकें मात्र स्पष्ट केलें होतें कीं 'ज्या 'दीनाचा' म्हणजे धर्माचा मी संरक्षक होत आहे

तो धर्म मुसलमानी धर्म नव्हे ! अर्थात् तो हिंदुधर्मच असला पाहिजे ! यास्तव त्याचें नांव 'हिंदुधर्मरक्षक' असें भाषांतरिलें तरी पुरें !

ही अद्भुत राज्यक्रान्ति

तें सबंध विशाल भरतखंडातील मुस्लिम साम्राज्यचें साम्राज्य अेका दिवसात जिंकून त्याचें हिंदु साम्राज्य करून सोडणारी धार्मिक नि राजकीय क्रांति, अशी घडविताच त्या हिंदुसम्राटाने मागे मलबारच्या स्वारीत हिंदुराज्य बुडवून जी अपार संपत्ति सुलतान मुबारकाच्या राज्यकोपात आणून ओतली होती ती आणि त्या सुलतानाच्या पूर्वीच्या अपार संपत्तीचीहि त्यात भर घालून ती बहुतेक त्याचें जें सहस्रावधि, स्वजातीय सैन्य अुभारलेलें होतें त्यांच्यातील सैनिकांत वाटून दिली! त्याचप्रमाणे अेकंदर साम्राज्यातील हिंदुमुस्लिम अशा अुभय जातींच्या सैनिकांचेंही वेतन वाढविलें. सैनिक वर्ग अशा प्रत्यक्ष लाभामुळे संतुष्ट करून त्याने साम्राज्यात पूर्वीच्या कोणत्याही सुलतानाने ज्या सवलती आणि सुधारणा शेतकरी आणि सामान्य हिंदुमुस्लिम नागरिकांना अुपभोगू दिल्या नव्हत्या, त्या त्याने चालू केल्या. त्याचप्रमाणे त्याने धार्मिक छळापायी बंदिवासात टाकलेले सहस्रावधि हिंदु बंदिवान आणि पूर्वीच्या सुलतानास अप्रिय वाटले म्हणूनच केवळ बंदिगृहात टाकलेले शतावधि मुसलमान बंदिवानसुद्धा, बंदिगृहातून सताड मुक्त केले. या सर्व कृत्यांमुळे साम्राज्यातील हिंदूंत तर काय, पण मुसलमानांतही हा हिंदुसम्राट 'धर्मरक्षक' लोकप्रिय झाला.

त्याचप्रमाणे प्रत्येक मुस्लिम सुलतानामागून सुलतानाने हिंदूवर जिझिया, त्यांच्या यात्रांना बंदी, तीर्थस्नानांना बंदी अित्यादि ज्या ज्या धार्मिक अपमानास्पद अटी लादलेल्या होत्या, त्यांपासून त्याने हिंदूंची तत्काल मुक्तता केली, हें सांगणें नकोच! अर्थात् यच्चयावत् हिंदु जनतेत आपला कोणीतरी त्राताच अवतरला आहे, अशी मुक्ततेची नि आनंदाची भावना अुचंबळली यात काय आश्चर्य!

हा हिंदुसम्राट् मलबारमध्ये साऱ्या दक्षिणेचा विजेता म्हणून पण खुश्रूखान या नांवाने मुस्लिमपणाच्या पांघरुणाखाली जेव्हा लढत होता, तेव्हापासूनच या राज्यक्रांतीची नियोजना त्याच्या डोक्यात रूळू आणि जुळू लागलेली असल्यामुळे केवळ त्याच्याच आधारावर अवलंबिणारे मुसलमानी राज्याधिकारी नि सैन्याधिकारी जे त्यानेच अुदयास आणविले होते, ते सर्व अर्थातच तो हिंदुसम्राट धर्मरक्षक (नासिरुद्दिन) सुलतान म्हणून अुद्घोषित झाल्यानंतरही आपल्या स्वार्थासाठी आणि त्यांचा मत्सर नि द्वेष करणारे पुरातन मुस्लिम खान, निजाम, नबाब जे होते त्या स्वधर्मीय मुसलमानांच्यापासून आपलें रक्षण करण्याच्या बुद्धीनेही, या हिंदुसम्राटाच्या, धर्मरक्षकाच्या स्वामित्वाशी राजनिष्ठ राहिले! कारण, अनेक हिंदुराज्यांतून ज्या त्या हिंदुराजांच्या सैन्यात किंवा सरदारक्यांत अेकनिष्ठ सेवा करण्याची सवय

गेल्या दोन चार शतकांमध्ये राजकीय संमिश्रणामुळे मुसलमानांनाही लागलेली होती! हिंदु राजांची राजकीय सेवा ही अगदी पूर्वी मुसलमान हिंदुस्थानात आले तेव्हा जी अिस्लामी धर्मबाह्य गोष्ट समजली जात असे, ती या काळापर्यंत मुसलमानांतून नष्ट झालेली होती आणि तीही मुसलमानी धर्मास धरूनच असू शकते, अशी राजकीय समजूत मुसलमानांतही दृढ होत आलेली होती! याचीं अुदाहरणें या ग्रंथात पूर्वी येअून गेलेलीं आहेत आणि पुढेही येतील. अर्थात् हिंदुराजांच्या हाताखाली कितीही मोठा राजकीय अधिकार घेणें जरी मुसलमानी धर्मबाह्य नसलें तरी अनेक कट्टर मौलाना मौलवी त्या कृत्यास आपद्धर्मीय आणि मुसलमानी राजसत्तेखाली ठेवलेल्या अेखाद्या सुरुंगाप्रमाणे समजून मनात जळत असत! हिंदु तर अगदी पूर्वीपासूनच मुसलमानांच्या सैन्यात मुसलमानांच्या बाजूने लढण्याने हिंदुधर्म बुडतो असें मानीतच नसत! केवळ मुसलमानांबरोबर खाणेंपिणें केलें, किंवा मुसलमान स्त्रियांशी शरीरसंबंध ठेवले म्हणजे काय तो त्यांचा हिंदुधर्म बुडतो, अशी त्यांची हिंदुत्वाची आत्मघातक व्याख्या असे.

आपलें हिंदुत्व घोषित करताच ह्या हिंदु सम्राटाने तिथेच विसावा घेतला नाही, तर तें प्रत्यक्ष मुसलमानांच्या समक्ष निर्भयपणे कार्यवाहीत आणण्यास आरंभिलें. सम्राटाच्या राजवाडयातील, म्हणजे दिल्लीच्या बादशहाचा दिवाण–अी–आम आणि दिवाण–अी–खास यांसारख्या मुस्लिम संस्कृतीच्या गाभाऱ्यातील पवित्रस्थानीही आता हिंदु मूर्तींची आणि हिंदु देवांची लगोलग स्थापना करण्यात आली. राजवाडयातील सर्व पूजाअर्चा आणि सम्राटाचे धार्मिक विधि हिंदुधर्मप्रमाणे होअू लागले! कुराणातील आयतें लुप्त होअून हिंदूंचे मंत्रघोष नि भजनें दुमदुमू लागलीं! स्वतः हिंदुसम्राट् आणि त्याच्या त्या पूर्वीपासून हिंदूच राहिलेल्या नि राजवाडयात पहारा देत असलेल्या शतावधि स्वजातीय सैनिकांच्या सशस्त्र पृतना त्या हिंदूच्या नव्या देवमूर्तींचें पूजन आणि संरक्षण करीत होत्या. राजधानीतून तर हिंदु नागरिकांच्या आणि विशेषतः हिंदु सैनिकांच्या अुत्साहाला पारावार नव्हता! पूर्वी अेखादी हिंदु राजधानी जिंकताच ज्याप्रमाणे आक्रमक मुसलमान तेथल्या मंदिरांतील मूर्ति फोडून टाकून त्यांच्या मशिदी बनवीत त्याचप्रमाणे आणि त्याच न्याये प्रत्याक्रमण करून ह्या प्रत्याक्रमक हिंदूंनी मशिदीमशिदीतून नवीन नवीन देवमूर्ति स्थापित केल्या, आणि मशिदींची मोठ्या समारंभाने मंदिरें बनविलीं आणि तीं मंत्रघोषांनी दुमदुमून जाअू लागलीं! हिंदूंचें मंदिर मुसलमानी आक्रमक त्यांत गायी मारून जेव्हा भ्रष्टवीत, त्यांच्या मशिदी बनवीत, तेव्हा परधर्मसहिष्णुतेच्या व्याधीने क्लीब बनलेल्या अेकंदर हिंदुसमाजाच्या मनातल्या मनात अपमानाच्या नि दुःखाच्या अिंगळ्या कशा दंश करीत असतील, याची काही कल्पना त्या सुलतानशाहीच्या राजधानीतील लाखो मुस्लिम धर्मोन्मत्त मुसलमानांनाही या हिंदु परवारांच्या धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणामुळे तेव्हा येअू शकली असलीच पाहिजे!

अशा हिंदूंनी केलेल्या अपवादात्मक सशस्त्र धर्मक्रांतीच्या खवळलेल्या उत्साहात काही मुसलमान लेखक आरोपितात त्याप्रमाणे कुराणादिक मुस्लिम धर्मग्रंथांचीही 'विटंबना' झाली असल्यास असेलही. नालंदेच्या साऱ्या विद्यापीठाला आग लावून हिंदूंचें सहस्रावधि धर्मग्रंथ जळत राहिलेले असता जे मुसलमान काफरांच्या धर्मग्रंथांच्या त्या होळीला फिदीफिदी हसत तेथे शेकत बसलेले होते, त्यांना 'गाझी' समजणाऱ्या मुसलमानांना तरी दिल्लीच्या त्या मुस्लिम धर्माच्या विध्वंसक कृत्यांना दोषिण्याचा लवलेश अधिकार उरलेला नव्हता ! त्याचे जे हिंदु परिया अनुयायी होत त्यांची, त्या हिंदुसम्राटाने, पूर्वीच्या सुलतानांच्या तरुण पत्नी, मुलीबाळी इत्यादि ज्या मुस्लिम स्त्रिया होत्या त्यांना त्यांच्या अिच्छेने हिंदु करून त्यांच्याशी लग्नें लावून दिलीं.

परंतु ह्यापुढे जाऊन, मुसलमान आक्रमक जसें कोणतेंही हिंदुराज्य पादक्रांत करताच लक्षावधि हिंदूना शस्त्रबळाने वाटवीत असत, मंदिरें धडाधड पाडीत वा जाळीत असत, सहस्रावधि हिंदु स्त्रियांना बलात्कारून गुलाम करीत असत, हिंदूंची लूटमार आणि सरसकट कापाकापी करीत असत, तसले धार्मिक वा आर्थिक शस्त्राचार या 'धर्मरक्षकाने' राज्यात तर काय पण दिल्लीतही मुसलमान जनतेवर केले, असें मुसलमान अितिहासलेखकांनीही काही अुल्लेखिलेलें नाही.

अर्थात्, जर त्याने मुसलमानांच्या वरील नेहमीच्या अत्याचाराचा सूड घेण्यासाठी हिंदुत्वाचा अभिमान धरून मुसलमानांवर तसेतसे प्रत्याचार केले असते तर ते त्या क्रांतिकारक हिंदु सम्राटाला अधिक गौरवास्पदच ठरले असते ! त्याच्या हिंदु जातीचा दरारा अहिंदु आक्रमकांना पूर्वी कधीही वसला नव्हता अितक्या बलवत्तरपणे वसला असता ! अत्याचारांची नांगी तसतसे प्रत्याचारच काय ते ठेचू शकतात, हें आम्ही 'पूर्वाघात' पूर्वी स्पष्ट केलेलेंच आहे.

परंतु त्या 'धर्मरक्षकाने (नासिरुद्दिनने) हेही शस्त्राचार मुसलमानांवर जे केले नाहीत त्याचें मुख्य कारण स्व-परपक्ष-वलाबलाची जाणीव न विसरणारी त्याची राजनीति-पटुता हेंच काय तें असलें पाहिजे ! जर त्याला हिंदुस्थानातील अुभ्या हिंदु समाजाचा आणि त्या काळी विद्यमान असलेल्या हिंदु राजांचा लगोलग नि सक्रिय पाठिंबा मिळाला असता; जर त्याने दिल्लीला जशी बाटलेल्या सहस्रावधि हिंदूचीं त्यांच्याच अिच्छेने सामुदायिक शुद्धिकरणें केलीं; मशिदींचीं मंदिरें बनविली, अित्यादि धार्मिक क्रांतिकारक घटनांपुरता तरी अुघड पाठिंबा देणारी अुठावणी हिंदुस्थानातील राजपुतान्यापासून दक्षिणेपर्यंतच्या राज्यकेंद्रीय नगरांनगरांतून नि तीर्थक्षेत्रांतून हिंदूनी अुघडपणे केली असती; आणि हिंदु साम्राज्याचा द्वाही फिरविली असती तर मुसलमान आक्रमक जशी हिंदूंची ससेहोलपट अत्याचारांनी करीत, तशीच हिंदूंचा सूड अत्याचारांनी साऱ्या राज्यात ठिकठिकाणी त्या 'धर्मरक्षका'नेही शस्त्रबळाने अुगवीत लाखो मुसलमानांचीही ससेहोलपट केली असती !

परंतु हिंदुस्थानभर हिंदुराजांनी आणि लोकांनी या हिंदुराज्यक्रांतीला तसा उघड अुघड सक्रिय पाठिंबा दिला नाही. त्यांना मनांतून मात्र साभिमान नि अपार हर्ष झालेला होता, आणि मुसलमानी सुलतानशाहीचें नाकच कापून टाकलें याविषयी 'हिंदुरक्षकाला' सर्व हिंदुसमाज आणि हिंदुराजे जरी धन्यवादच देत होते तरी प्रत्यक्ष अुठावणी अशी कोणीही केली नव्हती. हिंदुसाम्राज्यस्थापनेला अशा अत्यंत अनुकूल असलेल्या संधीचाही हा जो अवसानघातकीपणा केला गेला त्याचें अेक कारण हें होतें की, हिंदूंना सभय शंका वाटे की अद्भुत क्रांति झाली खरी, पण ती टिकेल का? नाहीतर ती कोलमडल्यास तिला आम्हां सक्रिय पाठिंबा देणाऱ्यांचाही सत्यानाश झाल्यावाचून राहाणार नाही! म्हणून हिंदुसमाज नुसता वाट पाहत राहिला. दुसरी गोष्ट अशी की, दिल्लीकडे चालेलीं मुसलमानांचीं सामुदायिक शुद्धिकरणें ही तरी हिंदुसमाजाला धर्म्य म्हणून कुठे वाटत होतीं? त्या काळच्या हिंदूंचा धर्म 'शुद्धिबंदी' हा होता! 'शुद्धीकरण' हा नव्हता! परधर्मसहिष्णुता' हा त्यांचा सद्गुणविकृतीच्या व्याधिग्रस्ततेमुळे धर्म होता! मशिदी पाडणें किंवा मुसलमानांना बळाने शुद्ध करणें हा नव्हता! अशा प्रत्याचारांना हिंदूच अेकंदरीत महापाप समजत! तेव्हा हिंदुसमाजच ह्या धर्मक्रांतीच्या विरुद्ध अठाव करणार नाही हें तरी कुठे निश्चित होतें? मग मुसलमानांच्या विरोधाची गोष्टच बोलायला नको!

अशा स्थितीत दिल्लीमध्ये त्याने केलेली धर्मक्रांति आणि राज्यक्रांति हीच मुळी अितकी धाडसाची आणि मुसलमानी राजसत्तेचें नाकच कापून टाकणारी घटना होती की अखिल भारतीय हिंदुसमाजात तितकी तरी अुठावणी सक्रियतेने पचविण्याची शक्ति आणि धाडस आहे, अितकें जरी सिद्ध झालें तरी प्रस्तुत पुष्कळ साधलें! मग पुढचें पाअूल पुढची संधि मिळताच यशस्वीपणे घेअूच घेअू. सध्याच तुटेल अितकें ताणणें श्रेयस्कर नाही, अशा विवेकानेच काय तें त्या 'धर्मरक्षकाने' (नासिरुद्दिनने) दिल्लीतील किंवा राज्यांतील मुसलमानांवर कोणचाही अधिक धार्मिक शस्त्राचार केला नाही.

अुलट त्याने पृष्ठ ८३६ वर सांगितल्याप्रमाणे त्याच्या राज्यातील मुसलमानी सैन्याला, शेतकऱ्यांना, नागरिक प्रजाजनांना, हिंदु प्रजेप्रमाणेच नवीन सवलती आणि कराची सूट समानतेने दिली. त्यातही जे मुसलमान राज्याधिकारी किंवा मुसलमान धर्माधिकारी मनातून या हिंदु पक्षीय धर्मक्रांतीविषयी चडफडत असावेत असा त्यास संशय येअी त्यांना तो, त्यांच्याशी राजनिष्ठ असलेल्या मुसलमानी अधिकाऱ्यांसारख्याच अत्यंत मूल्यवान भेटी वारंवार धाडून आणि सन्मानाने वागवून आपले मिंधे करून ठेवी.

या राजनीतिपटुत्वामुळे अेवढी मोठी धर्मांध मुसलमानांविरुद्ध हिंदु धर्मक्रांति आणि राज्यक्रांति झालेली असताही त्या हिंदुसम्राटाचे राज्यात प्रथम प्रथम

महिनोगणती कोणतेंही मुसलमानांचें बंड तर सोडाच, पण दंगेधोपे सुद्धा झाले नाहीत. तें त्या हिंदु सम्राटाचें सारें राज्ययंत्र मुसलमान सुलतानांच्या वेळेप्रमाणेच सुरळीतपणे चाललें होतें. राजस्व (महसूल) किंवा कर किंवा खंडण्या प्रांताप्रांतातून दिल्लीस बिनबोभाट येत होत्या. प्रत्यक्ष दिल्लीमध्ये राजमंडळाच्या राजसभासाठी (दरबारासाठी) मोठे मोठे मुसलमान सामंत, सेनानी, सरदार नि अधिकारीही ह्या हिंदु सम्राटाच्या आज्ञेसरशी राजवाडयात येऊन त्या छत्रचामरादिक हिंदुराजचिन्हांच्या देदीप्यमान प्रभावळीत सिंहासनावर आरूढ झालेल्या हिंदु सम्राटाच्या राजसभांत (दरबारात) आपापल्या नियत मर्यादेप्रमाणे अुपस्थित राहत असत. ह्या मोठमोठ्या मुसलमान सरदारांपैकी, त्या वेळच्या मुसलमान अितिहासकारांनीच दिलेल्या नांवातून केवळ बानगीसाठी खाली काही नावें देत आहो. अैन-अुल्-मुल्क मुल्तानी, युसुफ साफी, हतीम खान, कमलुद्दिन सूफी, फकिरूद्दिन तघलख, मुगलटी महंमद शाह, बहराम अनय्या, युकलाखी, होशंग, काफूरसाहेब असल्या त्या काळच्या मुसलमान बंडांची अुपस्थिति आणि बहुतेक प्रांतांच्या सुभेदारांची, प्रशासकांची आणि मुस्लिम सैन्याच्या ठिकठिकाणच्या शिबिरांतील मुस्लिम सेनानींची लेखी मान्यतापत्रें हीं त्या हिंदु सम्राटाच्या सेवेस सादर झालेली असल्यामुळे साऱ्या राज्यात मुसलमानी समाजात अशांतता अशी कोणतीच कुठे महिनोगणती प्रादुर्भवली नाही !

अिकडे, हिंदुराजांनी राजपुतान्यापासून तो मदुरेपर्यंत, बहुधा पूर्वीच्या गुप्त करारप्रमाणे, त्या हिंदुसम्राटाच्या ह्या क्रांतीविरुद्ध कोठेही चकार शब्द काढला नाही. अितकेंच नव्हे तर ह्या दिल्लीच्या हिंदुक्रांतीचा लाभ घेअून आपआपलीं हिंदुराज्यें ठायी ठायी पुन्हा स्वतंत्रपणे चालविण्यास आरंभ केला. त्यांचा मुख्य दोष हा घडला की त्यांनी अशा अत्यंत अनुकूल संधीस अेकत्रपणे नि अेकमुखाने अेककेंद्रीय हिंदुस्वातंत्र्याची आणि साम्राज्याची घोषणा नि प्रस्थापना केली नाही !

ह्या परिस्थितीत त्या हिंदुसम्राटाचें राज्ययंत्र प्रथम प्रथम जरी सुरळीत चालू लागलें तथापि तो चाणाक्ष सम्राट् 'धर्मरक्षक' हें पक्कें जाणून होता की, त्या हिंदुसाम्राज्यक्रांतीचा मुख्य आधार अितर कोणत्याही अुपांगांवर अवलंबून नसून तो अवलंबत होता केवळ त्याच्या बाहुबलावरच काय तो ! यास्तव त्याने त्याचें जें सहस्रावधि निवडक हिंदु सैन्य राजधानीत आणवून ठेविलेलें होतें त्याची जय्यत सिद्धता ठेवली होती आणि राज्यातीलही मुख्य मुख्य संरक्षण केंद्रांवर त्याच्या अत्यत विश्वासू हिंदु सैन्यांच्या आणि विश्वासाच्या शपथा घेतलेल्या मुस्लिम सैन्याच्याही पृतना (पलटणी) युद्धाच्या सिद्धतेत सज्ज ठेवलेल्या होत्या. कारण सम्राट् 'धर्मरक्षक' (नासिरुद्दिन) हा मनातून पुरतेपणी जाणून होता की आज जरी राज्यातील मुसलमान सर्वत्र आपल्या कह्यात वागत असले आणि आपल्याशी राजनिष्ठा व्यक्तवीत असले तरी आज ना अुद्या त्यांच्यातील कोणचा तरी विद्रोही

मुसलमानी गट अुत्पन्न होअून ह्या आपल्या हिंदुक्रांतीविरुद्ध सशस्त्र प्रतिक्रांति करण्याचा अुठाव केल्यावाचून राहणार नाही !

स्थलाभावामुळे मध्यंतरीच्या अितर घटना गाळून अितकें सांगणें पुरें आहे की, अेकही दिवस जें राजयंत्र सुरळीत चालू शकेल असें कोणालाही वाटणें दुर्घट होतें, तेंच मुसलमानांचो सुलतानशाही अुलथून देअून त्या 'तरुता'सच हिंदुसम्राटाचें सिंहासन बनविणाऱ्या आणि जवळजवळ साऱ्या भरत खंडावर फडकत असलेला मुस्लिम हिरवा चांद अुखडून टाकून त्या साम्राज्यावर हिंदुध्वज फडकविणाऱ्या ह्या अद्भुत नि अतर्क्यपणे यशस्वी झालेल्या हिंदुधर्मक्रांतीचें आणि राज्यक्रांतीचें राज्ययत्र अेक दिवस, नव्हे, अेक महिना नव्हे, तर न्यूनाधिक अेक वर्षपर्यंत सुरळीतपणे चालत राहिलें ! साम्राज्यातील लक्षावधि, 'अमीर' असो, वा गरीब असो; यच्च यावत् मुसलमान त्या हिंदुसाम्राज्याचें प्रभुत्व निमूटपणे मानीत राहिला, वर्षभर तरी त्या हिंदु सम्राटाच्या राजाज्ञा मोठमोठे मुस्लिम प्रांताधिप आणि त्या हिंदुसम्राटाचीं आज्ञापत्रकें सारो मुस्लिम जनता शिरसावंद्य मानीत राहिली. हेंच त्या काळच्या हिंदु अितिहासाला भूषणभूत असणारें अविस्मरणीय असें अेक महदाश्चर्य होतें.

आणि त्या काळच्या आणि आजपर्यंतच्या हिंदु अितिहासाला दूषणास्पद असणारें दुसरें महदाचर्य जें होतें तें हें की, अितक्या भूषणास्पद असणाऱ्या हिंदु साम्राज्यक्रांतीचा, धर्मक्रांतीचा आणि त्यांच्या निर्मात्या त्या हिंदुसम्राट् 'धर्मरक्षका'चा अुल्लेख सुद्धा हिंदु अितिहासात कृतज्ञपणे तर सोडाच, पण ठळकपणेही केला जाअू नये ! आणि जे काही दहापांच शब्द मुसलमानी अितिहासाच्या अनुकरणाने अुल्लेखिले गेलेले आहेत, ते त्याच्या गर्ह्य निंदेनेच काय ते बरबटलेले असावेत !

घियासुद्दिन तघलख

परंतु हें आश्चर्याचें पहिलें वर्ष गेलें न गेलें तों मुसलमानांतील अुच्चाधिकारावर असणाऱ्या अेकदोन व्यक्तींनी या हिंदुसम्राटाच्या सत्तेचें जोखड मुसलमानांच्या मानेवरून फेकून देण्याचें कारस्थान रचण्याचें धाडस केलें. मुसलमानांचा सुलतान हा अेक धर्मानि अुघड अुघड हिंदु म्हणून सिंहासनावर असावा, मुसलमानांचें बादशाही तख्त कोण्या हिंदुसम्राटाचें सिंहासन व्हावें, हा साऱ्या जगातील अिस्लामचा असह्य अुपमर्द आहे, अेका 'काफरापुढे' आम्हां मुसलमानांना मान लववून, गुडघे टेकून सलाम करणें भाग पडावें. ह्या अिस्लामच्या विटंबनेचा अंत करण्यासाठी आपण साऱ्या मुसलमानांनी जिहाद, धर्मयुद्ध पुकारलेंच पाहिजे, अशी चिथावणी गुप्त पत्रकें धाडून नि तोंडोतोंडी काही धर्मांध मौलवी मशिदीमशिदीतून मुस्लिम समाजाला गुप्तपणे देतच होतें. पण अुघड अुघड बंडाच्या नेतृत्वाचें धाडस

करणारा कोणीही बलवत्तर मुसलमान अमीर, सेनापति वा अधिकारी असा पुढे येअीना, तें धाडस करण्याचें दायित्व शेवटी घियासुद्दीन नांवाच्या दिल्लीच्या सुलतानाच्या हाताखालील पंजाव प्रांतावर नेमलेल्या प्रशासकाने नि प्रांतसेनापतीने स्वतःच्या अंगावर घेण्याची महत्त्वाकांक्षा धरली. सुलतान नासिरुद्दिनाच्या हाताखाली असलेल्या मोठमोठ्या मुस्लिम सेनानींना नि प्रांताधिकाऱ्यांना त्या अर्थाची गुप्त पत्रकें धाडण्याचा त्याने प्रयत्न चालविला. स्वत: घियासुद्दिन ह्याने सम्राट् 'धर्मरक्षक' (नासिरुद्दिन) ह्याला आपला सुलतान म्हणून मान्यता दिलेली होतीच. आणि त्या सुलतानी सेवेतच तो सुलतानी सैन्याच्या अेका विभागाचा सेनानी म्हणून पंजाबवर प्रांताधिकारी नेमलेला होता. त्याचा अेक मुलगा दिल्लीलाच नासिरुद्दिनाच्या हाताखाली अधिकारी होता. घियासुद्दिनाने त्या आपल्या मुलाला काही निमित्त काढून भेटीस बोलाविलें. तो पंजाबमध्ये घियासुद्दिनाला अंत:स्थपणे भेटताच दिल्लीतील सारी बारीक माहिती त्याने विचारून घेतली. सुलतान अल्लाअुद्दिनाची हत्या झाल्यानंतर त्याच्या मुलांनातवांना ठार मारलें गेल्यामुळे किंवा डोळे काढून निकम्मी केल्यामुळे अल्लाअुद्दिनाचा राजपदार्ह वंशज असा कोणीही कुठेही अुरलेला नाही, हें घियासुद्दिनास नक्की कळलें तेव्हा त्याला अधिकच अवसान चढून त्याने अुद्घोषिलें की, ज्याअर्थी सुलतान अल्लाअुद्दिनाचा कोणीही वंशज अुरलेला नाही, त्याअर्थी त्याच्या तख्तावर कोणत्या तरी समर्थ अशा मुसलमान पुरुषाचाच अधिकार असू शकतो ह्या काफर हिंदु परियाचा तर त्या तख्तास स्पर्शही होता कामा नये. या काफराने मागच्या सुलतानाच्या राजवाडचात असलेल्या सगळ्या विधवा, आणि मुलीवाळी प्रभृति मुस्लिम स्त्रियांची केवळ मुसलमानांवर सूड घेण्यासाठी त्याच्या जातीच्या ज्या परियांना (भंग्यांना) मोठमोठे अधिकार त्याने दिलेले आहेत, त्यांच्याशी लग्नें लावून दिलीं आहेत आणि त्या सर्व राजकुटुंबीय मुस्लिम महिलांना हिंदु करून घेतलेलें आहे, अशा या पापी हिंदु काफराला मुसलमानांच्या सुलतानी तख्तावरून खाली खेचण्याचें साहस ज्या अर्थी कोणीही मुसलमान करीत नाही, त्याअर्थी मीच तो अधिकार गाजविण्याचें दायित्व आपणावर घेत आहे.

त्याच्या या वडाच्या गुप्त पत्रिकांना प्रथम बहुतेक मुसलमान अुच्चाधिकाऱ्यांनी निषधिलें, काहींनी तर सम्राट् 'धर्मरक्षका'च्याच (नासिरुद्दिनच्या) हाती तीं पत्रकें नेअून दिलीं पण आधीपासूनच अशा बंडांचा संभव ओळखून असणाऱ्या त्या हिंदु सम्राटाने न डगमगता घियासुद्दिनाच्या ह्या अुठावणीला तत्काळ चिरडून टाकण्याची सैनिक सिद्धता केली त्याला सुलतान म्हणून मानणाऱ्या अनेक मुस्लिम सेनानींनी त्यांचीं मुस्लिम सैन्यें त्याच्याच सेवेस सादर केलीं. त्या 'बादशाही' सैन्यातील हिंदु विभाग तर त्याच्या ध्वजाखाली प्राणपणे लढण्यास सिद्ध होताच.

शेवटी घियासुद्दिनाने त्याच्या स्वत:च्या हाताखालील जो सुलतानी सैन्याचा विभाग सरसीमेच्या नि पंजाबच्या संरक्षणासाठी ठेवलेला होता, त्या मुख्यत: मुस्लिम सैन्याच्या बळावरच दिल्लीवर चालून जाण्याचें ठरविलें. त्यात काही हिंदु सैनिकही होते. घियासुद्दीन दिल्लीवर चालून येतो आहे हें कळताच हिंदुसम्राट् 'श्री धर्मरक्षक'ही (सुलतान नासिरुद्दीन हाही) आपलें सारें सुलतानी सैन्य घेऊन त्याच्यावर चालून गेला. हिंदुसम्राटासह मोठमोठे मुस्लिम सेनानीही आपापल्या मुस्लिम सैन्यासह रणांगणात त्याच्या आज्ञेखाली लढण्यास निघाले होते. सुलतानाच्या सैन्याची आणि घियासुद्दिनाच्या सैन्याची गाठ पडताच पहिल्या दिवशी सुलतान नासिरुद्दिनाच्या सुलतानी सैन्याचा विजय झाला. घियासुद्दिनाला रणांगण सोडावें लागलें. पण त्याने धीर सोडला नाही. आता कचरलो तर माझा सत्यनाश ठरलेलाच आहे; जयाची नि जिवाची काही आशा धारिष्ट्यातच आहे, अशा निर्वाणीचा निश्चय करून घियासुद्दिन पुन्हा लढाओची फळी बांधून उभा राहिला. न्याच दिवशी घियासुद्दिनाच्या सुदैवाने सुलतानाच्या सैन्यातील अेक दोन मुसलमान सेनानींनी हिंदुसम्राटाचा आयत्या वेळी विश्वासघात करण्याचा कट करून तें आश्वासन घियासुद्दिनाला गुप्तपणे दिलें. तेव्हा अधिकच अुत्तेजित होअून घियासुद्दिन आपण होअून सुलतान नासिरुद्दिनाच्या (हिंदुसम्राट 'श्री धर्मरक्षका'च्या) सैन्यावर तुटून पडला. त्या रणधुमाळीत सुलतानाच्या हाताखालील वर अुल्लेखिलेल्या काही मुस्लिम सैन्यविभागांनी आयत्या वेळी विश्वासघात केल्यामुळे सुलतान नासिरुद्दिनाच्या सैन्याचा पूर्णपणे पराभव झाला. तेव्हा रणांगणातून तो सम्राट् 'श्री धर्मरक्षक' (नासिरुद्दिन) निसटून दिल्लीस निघाला. परंतु घियासुद्दीनही विजयोन्मादाने सरळ दिल्लीवरच चालून गेला. त्या पाठलागात अशरण अवस्थेत हा सम्राट् 'श्री धर्मरक्षक' शेवटी शत्रूच्या हाती सापडला!

विजयी घियासुद्दिनाने बंदिवान केलेल्या सुलतान नासिरुद्दिनाला आपल्या समोर आणविलें आणि सुलतान मुबारिकचा खून केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवून त्याला ठार मारण्याची शिक्षा देण्याचा चंग बांधला. तेव्हा त्याला घियासुद्दिनाने शेवटचा प्रश्न म्हणून विचारलें की 'राजकारणाचा अथवा सुलतानपदाचा प्रश्न सोडला असता अेक व्यक्ति या नात्याने मुबारिकचा व्यक्तिश: खून करण्यासारखा त्याने तुझा अेखादा वैयक्तिक अपराध केला होता की काय?' तेव्हा त्या बंदिवान नासिरुद्दिन खुश्रूखानाने अशा आशयाचें अुत्तर दिलें की, 'अर्थात्! माझ्या कोवळ्या वयापासून त्या नीच नि व्यसनग्रस्त दुष्टाने माझ्या शरीरावर जे असह्य असे समसंभोगादिक लैंगिक बलात्कार केले आणि माझ्या जीवनाची विटंबना केली त्याची चीड येअूनच मी प्रतिज्ञा केली होती की ह्या वैयक्तिक अत्याचारांचा संधि सापडताच सूड अुगविण्यासाठी मी या दुष्टाचा जीव घेतल्यावाचून सोडणार नाही!'

यानंतर घियासुद्दिनाने त्या बंदिवान हिंदुसम्राटाला – नासिरुद्दिनाला तत्काल ठार करविलें ! !

हिंदु सम्राट् 'श्री धर्मरक्षक' (नासिरुद्दीन) याचा असा शोकपर्यवसायी अंत झाला ! पण हिंदूंचा पूर्वपरंपरागत दिल्लीचा शेवटचा हिंदुसम्राट जो वीरवर पृथ्वीराज त्यालाही शेवटी लढाईत मुसलमानांचे हातून पराजय झाल्यानंतर शत्रूंनी असेंच ठार मारलें होतें !

आणि पंजाबचा श्री गुरु वीरवर बंदा ? त्याने मुसलमानांना धारेवर धरून अनेक विजय मिळविल्यानंतर तो असाच लढाईत मुस्लिम बादशहाच्या हातात जेव्हा पडला तेव्हा त्याला पिंजऱ्यामध्ये हिंस्र पशूप्रमाणे बंद केलें गेलें आणि तापलेल्या सांडसाने त्याच्या देहाचें मांस मांस अुपसून काढून त्याचा मुसलमानांकडून अनन्वित छळ केला गेला नाही का ?

पण असे अनेक हिंदुवीरावतंस शेवटी पराजित झाले म्हणून त्यांचें तें तें हिंदुधर्मार्थ केलेलें बलिदान आणि त्याविषयीची त्यांच्या संबंधीची कृतज्ञता विसरेल असा कोणीही हाडाचा हिंदु निघेल काय ? कारण अशांच्याच स्मृति राष्ट्राची स्फूर्तिस्थानें युगोयुगे होअू शकतात !

हे हिंदुसम्राट् 'श्री धर्मरक्षक'! तुझेंही हें बलिदान हिंदुराष्ट्राचें असेंच अेक स्फूर्तिस्थान आहे ! तुझ्याविषयी तुझ्या काळच्या किंवा त्यानंतरच्या हिंदु पिढ्यांनी कृतज्ञतेचा अुच्चार अेका शब्दानेही केला नाही, तुझी स्मृतिसुद्धा ठेविली नाही, या आम्हां हिंदूंच्या कृतघ्नतेचें प्रायश्चित्त घेण्यासाठीच या ग्रंथात तुला हें स्वतंत्र प्रकरण आम्ही वाहिलेलें आहे ! !

जर तू मुसलमान सुलतान म्हणूनच राहिला असतास तर कुतुबुद्दिनासारखें किंवा घियासुद्दिनासारखें तें बहुतांश भरतखंडाचें मुस्लिम सुलतानपद त्यांच्या गुलाम घराण्याप्रमाणे किंवा खिलजी घराण्याप्रमाणे तुला आपल्या घराण्यात वंश-परंपरा ठेवता आलें असतें. पण तू हिंदुधर्माचा आणि हिंदुराष्ट्राचा अभिमान धरून त्या मुस्लिम सुलतान पदाचीच 'शुद्धि' केलीस, तख्ताचें 'सिंहासन' केलेस आणि मुस्लिम सुलतानपदावर थुंकून हिंदुसम्राट् अशीच आपली स्वतःची पदवी अुद्-घोषिलीस.

सम्राट् पृथ्वीराजानंतर प्रत्यक्ष दिल्लीच्या सिंहासनावर हिंदुसम्राट् म्हणून चढण्याचें धाडस तूच केलेस ! अत्यंत हीनदीन हिंदु कुटुंबात जन्म झाला असता, मुस्लिम शत्रूनी तुला लहानपणीच बाटवून मुस्लिमांचा गुलाम करून टाकलें असता तू आपल्या शौर्याने, कर्तृत्वाने, सैनिकी पराक्रमाने आणि कारस्थानपटुत्वाने सुल-तानांचा सुलतान झालास आणि हिंदुधर्माचा डिमडिम साऱ्या भरतखंडात दुमदुम-विलास ! हें तुझें अेका दृष्टीने अलौकिक असलेलें चरित्र हिंदुराष्ट्रास आणि जगतासही

अतिहासक्षेत्रामध्ये 'साधार' सांगण्याचें कर्तव्य या प्रकरणात आम्ही यथाशक्य तितकें केलें आहे !

ह्या हिंदुराज्यक्रांतीचें खरें वैशिष्टय तें हेंच की हिंदु–मुसलमानांच्या शतकोशतकें चाललेल्या महायुद्धमालिकेत सशस्त्र राजकीय आघाडीवर हिंदुराष्ट्र जरी अेकंदरीत जशास तसें लढत मुसलमानांना पुरून अुरलें आणि शेवटी त्याने मुसलमानी राज्यसत्तेचें पूर्ण अुच्चाटन केलें, त्याप्रमाणेच त्या महायुद्धाची जी दुसरी आघाडी, म्हणजे हिंदुधर्मावरील मुस्लिमांनी केलेलीं सशस्त्र आक्रमणें होती, त्या सशस्त्र धार्मिक आघाडीवर मात्र हिंदुराष्ट्राला अेकसारखी हार खावी लागली. त्याचें कारण आम्ही पूर्वार्धात सविस्तरपणे विवरिलेंच आहे. शुद्धिबंदी इत्यादि आत्मघातकी रूढींच्या शृंखला आणि सद्गुणविकृतीसारख्या व्याधी ह्यांच्यापायी हिंदु मुसलमानी धर्मावर सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण करू शकले नाहीत ! पण, हिंदुसम्राट् 'श्री धर्मरक्षक' ह्याने राजकीय आघाडीप्रमाणेच मुसलमानी धर्मावरही जशाच तसें या न्यायाने सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण केलें ! पृष्ठें ८३८ ते ८३९ यात वर्णिल्याप्रमाणे हिंदूना मुसलमान जसे बळाने बाटवीत तसेंच मुसलमानांनाही भर दिल्लीत श्री धर्मरक्षकाने (नासिरुद्दीनने) सशस्त्र बळाने शेकडो मुसलमानांना हिंदु करून घेणारे सामुदायिक शुद्धिसमारंभ केले. हिंदूंच्या स्त्रियांना बलात्कारून जसे मुसलमान वेधडक बाटवीत त्याचप्रमाणे हिंदूंनीही मुसलमानी सुलतानाच्या भर अंत:पुरात शिरून, त्याच्या अनुकूल झालेल्या मुस्लिम स्त्रियांना हिंदु करून घेअून आपल्या हिंदु अनुयायांशी त्यांचीं लग्नें लावून दिलीं ! मुसलमान बळाने मंदिरें पाडीत, तर श्री धर्मरक्षकाने या क्रांतीच्या विजयोत्साहात मशिदींचींच मंदिरें बनविलीं ! अशा अनेक प्रकारे सशस्त्र बळाने हिंदूंवर जसे जसे धार्मिक अत्याचार पूर्वी आणि नंतरही मुसलमान करीत असत त्यांचा सूड घेण्यासाठी तसेतसेच सशस्त्र प्रत्याचार मुसलमानी धर्मावर करून ह्या क्रांतिकारक धार्मिक आघाडीवरही मुसलमानांची धुळधाण कशी अुडवून द्यावी हें सक्रियपणे हिंदूना श्री धर्मरक्षकाने अितक्या मोठ्या प्रमाणावर आणि अितक्या यशस्वीपणे पहिल्यांदाच दाखवून दिलें. मुसलमानांना जर पहिल्यापासून धार्मिक आघाडीवर असे रट्टे खावे लागते तर ते शस्त्रबळाने हिंदु धर्मावर घाव घालतेच ना ! अितके ते या हिंदूंनी मुसलमानी धर्माला दिल्लीस हाणलेल्या पहिल्या सशस्त्र फटकाऱ्यासरशी हादरून गेले होते ! हेंच या हिंदुसम्राट् श्री धर्मरक्षकाने (खुश्रूखानाने) केलेल्या हिंदु राज्यक्रांतीचें खरें वैशिष्टय होय !

अर्थात् ह्या चित्रिलेल्या चरित्राला 'साधार' म्हणून आम्ही जें वर म्हटलें आहे तें हेतुत:च म्हटलें आहे. यद्यपि आम्ही पृष्ठ ८३० वर तुझ्याविषयी बरा शब्द असा अेखादा अपवाद सोडता, कोणीही लिहिलेला नाही असें दाखविलें आहे, तथापि तुझ्याविषयीच्या त्या विसंगत अुल्लेखातूनच जें सुसंगत वृत्त अनु-

मानिता येतें तेंही तुझ्या धर्मवीरत्वाला पोषकच आहे. यास्तव तुझ्या ह्या प्रकरणात आम्ही चित्रिलेल्या चरित्राला यद्यपि लेखी वा तोंडी असा तत्कालीन 'आधार' नसला, सबळ पुरावा नसला तरीही अितिहासातील अशा प्रश्नी आणि दैनंदिन न्याय-निर्णयांतूनसुद्धा लेखी वा तोंडी पुराव्यांनाही प्रसंगी खोटा पाडणारा असा जो पक्का नैर्बंधिक पुरावा मानला जातो त्या पुराव्याचा तुझ्या या चरित्राला आम्हांस निःशंक असा आधार मिळालेला आहे. तो पुरावा म्हणजे 'परिस्थितीचा पुरावा' (Circumstantial evidence)!!

परिस्थिति–प्रामाण्य

प्रत्यक्ष अनुमान, आप्तवाक्य, अुपमान अित्यादि जीं प्रमाणें तर्कशास्त्रात आधार म्हणून मानलेलीं आहेत त्या सर्वांपेक्षा काही प्रकरणी परिस्थितिप्रामाण्य हें श्रेष्ठ समजलें जातें. विशेषत: अैतिहासिक कारस्थानें आणि कट याविषयी कर्त्याचा हेतु नि भावना अनुमानिण्यास परिस्थितीचें प्रामाण्य – Circumstantial evidence – हाच प्रबळतम आधार मानला जातो आणि मानला गेला पाहिजे. आरोपितांच्या स्वत:च्या स्वाक्षरीने लिहून दिलेल्या स्वीकारोक्तीही (confessions) परिस्थिति-प्रामाण्याने त्या छळबळाने लिहून घेतल्या आहेत, असें जर अनुमानिता आलें तर तें त्या लेखांचें प्रत्यक्ष नि लेखी प्रामाण्यही खोटें पाडलें जातें!

हें तुझें चरित्र तुझ्या तोंडच्या शब्दापेक्षा किंवा तुझ्याविषयीच्या समकालीन किंवा तदनंतरच्या अितिहासलेखकांच्या लेखांपेक्षाही ह्या सर्वतोपरी तर्कशुद्ध असलेल्या परिस्थिति-प्रामाण्यावरच मुख्यत: आधारलेलें आहे, अेतदर्थ तें साधार आहेच आहे! तुझे बोल नसले तरी तुझी प्रत्यक्ष कृति, कार्यच अधिक बोलकीं आहेत.

ह्या हिंदुसम्राट् श्री धर्मरक्षकाचा भाअूही मोठा लढवय्या नि कर्तृत्ववान् होता. त्याचेंही हिंदु नांव अुपलब्ध नाही. कारण तोही लहानपणीच मुस्लिमांकडून बाटवून गुलाम केला गेला होता. जेव्हा या हिंदुसम्राटाने त्याला गुजराथचा प्रांताधिप म्हणून नेमला तेव्हापासून त्यानेही हिंदुत्वाचा अुघड स्वीकार नि पुरस्कार केला. गुजराथेत मुसलमानी राज्य अुलथून पाडण्यासाठी हिंदूंचा मोठा अुठाव त्याने केला. त्याने हिंदूंकी लढाअू असे वीस पंचवीस सहस्र स्वत:च्या परवार जातीचे लोक दिल्लीस आपल्या भावाच्या, हिंदुसम्राटाच्या सैनिक साहाय्यासही धाडून दिलेले होते, त्याचा शेवट कसा झाला तें कळत नाही. त्यालाही हिंदूंच्या अितिहासात मानाचें स्थान मिळालें पाहिजे.

आणि या परिस्थिति-प्रामाण्याच्या आधारेच या हिंदु सम्राटाच्या वरील राज्यक्रांतीच्या गुप्त कारस्थानातील जी कर्तृत्वशाली सहकारिणी होती हें सिद्धच होतें आणि जी दिल्लीची ती हिंदु राज्यक्रांति यशस्वी झाल्यानंतर प्रत्यक्ष हिंदु सम्राज्ञी झाली, त्या यादवराज-पत्नी महाराणी देवलदेवीलाही भिन्न परिस्थितीत

भिन्न प्रकारच्या असह्य यातना जरी हिंदुत्वासाठी सोसाव्या लागल्या, तरी शेवटी म्लेंछ शत्रूंच्या अत्याचारांचा प्रत्याचारांनी तिने सूड घेतला, यासाठी तिलाही, अेखाद्या जोहार करणाऱ्या देवी पद्मिनीसारखीच हिंदु जातीतील अेक वीरांगना मानिली गेली पाहिजे !

तिचा शेवट काय झाला हें कळत नाही. अेक्या त्या काळच्या मुस्लिम लेखकाने अितकें काय तें लिहिलेलें आढळतें की घियासुद्दीन सुलतान झाल्यानंतर त्याने तिची चरितार्थापुरती काही स्वतंत्र सोय करून दिली होती.

पण हें बलिदान व्यर्थ गेलें नाही !

याप्रमाणे हिंदु सम्राट् धर्मरक्षक आणि त्याचे वर वर्णिलेले दोन झुंजार साहाय्यक ह्यांचें त्या आश्चर्यकारक हिंदुराज्यक्रांतीत बलिदान झालें खरें ! — पण त्या बलिदानाने हिंदुराष्ट्राचें त्या काळी तितकेंच आश्चर्यकारकपणे मनोबळही वाढलें. कारण प्रत्यक्ष दिल्लीत हिंदुसाम्राज्य धार्मिक दृष्ट्यामुद्धा स्थापन होअून अुणेंपुरें अेक वर्षपर्यंत साऱ्या भरतखंडातील मुस्लिम राज्यांना, नबाबांना आणि मुस्लिम जनतेला आपल्या तरवारीच्या कह्यात ठेवू शकलें. ही वस्तुस्थिति पाहून भरतखंडभर पसरलेल्या हिंदुराजांच्या नि हिंदुजनतेच्या मनावर जें मुस्लिम राजकीय श्रेष्ठत्वाच्या आभासाचें दडपण गेलीं कित्येक शतकें पडलेलें होतें, त्याचा अकस्मात् चक्काचूर झाला. आपण सर्वांनीही अेसंच थोडेसें साहस केलें तर मुसलमानांची राजसत्ता ठोकरीने अुडवून देअू शकू अशी प्रबळ स्वजातीय निष्ठा आणि स्वधर्मनिष्ठा हिंदुराष्ट्रात अकस्मात् संचरली. श्री धर्मरक्षकाचें (नासिरुद्दीनचें) बलिदान १३२१ व्या सनात झालें – आणि लगोलग साऱ्या राजस्थानातील हिंदुराज्यें आणि दक्षिणेतील हिंदुराज्यें अुघडपणे मुस्लिमांच्या साम्राज्यसत्तेविरुद्ध बंड करून अुठलीं. अितकेंच नव्हे तर दिल्लीचे कित्येक स्थानिक मुस्लिम सुभेही त्या त्या प्रांतात आपापलीं स्वतंत्र मुस्लिम राजघराणीं स्थापण्यास्तव मुस्लिमांच्याच दिल्लीच्या साम्राज्याविरुद्ध युद्धें करू लागलीं. अंती मुस्लिम साम्राज्यसत्ता दुर्बळ होअून, श्री धर्मरक्षकाच्या बलिदानानंतर अवघ्या पंधरा सोळा वर्षांच्या आत हिंदूचा हा प्रचंड राष्ट्रीय अुठाव यशस्वी होअून हिंदूचें अेक बलिष्ठ नि पूर्णपणे स्वतंत्र असें विजयनगरचें हिंदुराज्य कसें स्थापन झालें, हें सर्व वृत्त पुढील प्रकरणातून दिग्दर्शिलें जाअीलच.

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ...३८९३... दि. ...१९५...
क्रमांक ...१८५५... दि. ...13/11/६७

प्रकरण ६ वें

मुस्लिम साम्राज्यसत्तेच्या अंतिम अतिश्रीची अथश्री

हिंदुसम्राट् श्रीधर्मरक्षकाला ठार मारल्यानंतर लगेच घियासुद्दिन तघलखाने स्वत:च सुलतान पदावर सन १३२१ त आरोहण केलें आणि तशी द्वाही साम्राज्य-भर पसरविली. येथून खिलजी राजवट संपून तघलख सुलतानांची राजवट चालू झाली.

घियासुद्दिन हा सुद्धा वृद्धच होता. त्याने राज्यकारभारात मुसलमानांना सौम्यतेने वागविलें. पण आश्चर्य अमें की, तो स्वत: अेका हिंदु जाठ स्त्रीच्या पोटी जन्मलेला असताही मागील प्रत्येक मुस्लिम सुलतानांअितकाच हिंदूंचा धार्मिक छळ करण्यात त्याने अुणें पडू दिलें नाही. हा घियासुद्दिन सन १३२६ मध्ये मेला.

घियासुद्दिनाचे मागून त्याचा मुलगा महंमद तघलख, जो ' विक्षिप्त ' या नांवाने अितिहासात प्रसिद्ध आहे, तो सुलतान झाला. त्याला अेकदा दक्षिणेस देवगिरी येथे आपली राजधानी आणण्याची लहर आली. तकाल त्याने देवगिरीचें नांव पालटून मुसलमानी परंपरेप्रमाणे तिला दौलतावाद असें नांव दिलें. वरंगळला मुस्लिमांनी आधीच सुलतानपूर असें नांव दिलेलेंच होतें. परंतु दिल्लीहून देवगिरीस राजधानी आणताना त्याला अितका त्रास झाला, त्याच्या राज्याच्या राजस्व विभागाची (महसूल विभागाची) आधीच अितकी दुर्दशा अुडालेली होती आणि दक्षिणेत आम्ही गेल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे हिंदु राजघराण्यांतून आणि जनतेतून मुस्लिम राज्याविरुद्ध अुठावाचे अितके सक्रिय कट चालू झाले होते की, त्या सर्व आर्थिक आणि राजकीय पेचांनी संत्रस्त होअून ह्या महंमद 'वेडयाला' पुन्हा राजधानी दिल्लीलाच परत नेण्याची लहर आली. या असल्या अुलाढालीत कोटयवधि रुपयांचा आणि सहस्रावधि जीवांचा चुराडा अुडाला. त्याने राजस्व (महसूल) विभागाची व्यवस्था लावण्यासाठी मध्येच तांब्याचीं नाणीं चालू केलीं. त्यायोगे तर त्याच्या राज्यकोषाची धुळधाणच झाली. शेतकरी आणि अितर जनता कर देत नाही, असें त्याच्या मनाने घेतलें आणि सैन्याकडून सक्तीने करांची अुगराणी (वसुली) करण्याच्या आज्ञा त्याने सोडल्या. पण मुसलमानी प्रजेला सौम्यतेने वागवून हिंदुप्रजेकडून तेवढी ती अुगराणी अत्यंत अमानुष क्रूरतेने चालू केली. मृगयेत रानांतील सर्व पशूंना हाकारून जसें कोंडून धरतात आणि त्यांची सरसकट पारध करतात अगदी तसेच अनेक हिंदु गावांना सशस्त्र मुस्लिम सैन्याचा गराडा घालून हिंदूंची सरसकट कापाकापी केली गेली ! या अमानुष छळाने हिंदूंची गांवेंचीं गावें आणि कनोजसारखे समृद्ध प्रांतही ओस पडले!!

तथापि मुस्लिम सुलतानांमागून सुलतानांच्या शतकोशतकें चालत आलेल्या ह्या अशा हिंदूंवरील रावणीय अत्याचारांचा तात्पुरता का होअीना पण नायनाट करणारा अेक ' रामबाण 'ही हिंदुराष्ट्राच्या भात्यातून याच वेळी सुटला !

साऱ्या भरतखंडाचें अेकछत्री मुस्लिम साम्राज्य स्थापन करण्याची जी रावणीय मुस्लिम महत्त्वाकांक्षा पृष्ठ ८२२ वर सांगितल्याप्रमाणे अल्लाअुद्दिनाच्या सन १३०८ ते १० च्या थोड्या आगेमागे सफल होत आली होती ती अशी सफल होताहोताच अकस्मात् विफल झाली. कारण, हिंदुसम्राट् श्री धर्मरक्षकाने मागच्या प्रकरणी सांगितल्याप्रमाणे त्या अखिल भारतीय अेकछत्री मुस्लिम साम्राज्याच्या छत्रदंडावरच पहिला प्रबळ प्रहार जो केला त्यासरशी तें मुस्लिम अेकछत्र कोलमडू लागलेंच होतें. अितक्यात हिंदूंच्या, विशेषतः दक्षिणेतील हिंदु राजशक्तींच्या ज्या अुठावाचा अुल्लेख मागच्या प्रकरणात शेवटी केलेला आहे, त्या अुठावाचा प्रबळ स्फोट होअून त्यासारशी तें परधर्मीय नि परकीय मुस्लिम दास्याचें अखिल भारतीय कोलमडू लागलेलें छत्र पुरतेपणी कोसळून छिन्नविच्छिन्न होअून गेलें !!

नवें हिंदुराज्य

कारण सन १३३६ त मुसलमानी सत्तेच्या अुरावर पाय देअून विजयनगरचें स्वतंत्र, समर्थ आणि अेक नवें हिंदुराज्य या वेडच्या सुलतान महंमदाच्या डोळ्यांसमोरच त्याच्या मुस्लिमीय सम्राटसत्तेला प्रत्याव्हान देत स्थापन झालें !!! त्याचें सविस्तर वृत्त पुढील प्रकरणात येणार आहेच.

आणि या वरील घटनेच्या किंचित् कालानंतर मुसलमान-मुसलमानांत राजसत्तेसाठी ज्या आपसांत अगदी त्यांच्या पैगंबराच्या काळापासून यादवी युद्धें अेकसारखीं चालत आलेलीं असत, त्या फुटीरपणाच्या वृत्तीमुळे दक्षिण हिंदुस्थानातील मुसलमानांनी हसन बहामनी या नांवाच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या मुस्लिम साम्राज्याविरुद्ध बंड केलें. हसन बहामनीस या बंडांत यश मिळालें आणि तो स्वतःच सन १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना करून आपणांसच स्वतंत्र सुलतान म्हणवू लागला.

आपल्याकडील ज्या असंख्य अर्धवट लोकांत अशी अेक समजूत आहे की, मुसलमान लोक राजकीय किंवा धार्मिक लढ्यात नेहमी अेकजुटीने असतात, त्यांच्यात आपसांमध्ये किंवा मुस्लिमेतरांशी लढताना यादवी अशी कधी माजतच नाही, फुटीरपणा हा दुर्गुण मुसलमानांत मुळीच नसतो—ती समज किती खुळी, परक्यांचें नसतें स्तोम माजविणारी आणि स्वकीय हिंदुजातीला नसता अुणेपणा देणारी असतें, ती किती बिनबुडाची आहे, हें या अुदाहरणांवरून स्पष्ट होतें ! ह्या ग्रंथातही अशीं अनेक अुदाहरणें मागे आलेलीं आहेत आणि पुढेही येणारीं आहेत. मुसलमान जातीच्या जागतिक अितिहासातून तर तीं पावलोपावली आढळून येतात.

अखंड साम्राज्यसत्तेच्या मुस्लिम स्वप्नाचें भयंकर अध:पतन आणि विध्वंस

अेखाद्या अतिसाहसी गिर्यारोहकाने अशक्यप्राय असणाऱ्या महत्त्वाकांक्षेच्या भरात हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर सर्वांआधी आपला ध्वज रोवण्यासाठी चढत चढत 'हेंच तें अत्युच्च शिखर' म्हणून मोठ्या विजयोन्मादाने भलत्याच अुच्च शिखरासारख्या दिसणाऱ्या स्थलीं पाय ठेवावा आणि विजयाचा अेकछत्रीय असा तो ध्वज रोवू जावा, तोंच अत्युच्च शिखरासारखें दिसणारें तें शिखर कोण्या अचल शिलास्तंभाचें बनलेलें नसून केवळ अेका हिमराशींचा साचतसाचत गोठलेला मूळचा अेक ठिसूळ हिमस्तंभच काय तो असल्यामुळे त्या गिर्यारोहकाच्या महत्त्वाकांक्षेच्या भारानेच खळदिशी कोसळावा आणि तो गिर्यारोहक त्या महत्त्वाकांक्षेसह हिमालयावरून अकमात् घसरून घरंगळत घरंगळत त्या अेकछत्री विजयाच्या तुकडयातुकडयासुद्धा कोण्या खोल विनाशाच्या गर्तेत कोसळावा ! – त्याचप्रमाणे, सबंध हिंदुस्थानवर मुस्लिमांची अेकछत्री राजसत्ता स्थापन करण्याच्या मुसलमानी महत्त्वाकांक्षेची फसगत होअून दुर्दशा अुडाली ! साऱ्या आशियातील मुसलमानांच्या अरब ते मगोलियापर्यंतच्या राष्ट्रांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करून शतकानुशतकें घनघोर नि क्रूरतम संग्राम सतत चालविला आणि शेवटी सुलतान अल्लाअुद्दिनाच्या राजवटीत सन १३१० च्या आगे मागे बहुतांश हिंदुस्थान जेव्हा त्या सुलतानाच्या अेकछत्री राजसत्तेखाली आला तेव्हा असें वाटलें की ती मुसलमानी महत्त्वाकांक्षा आता सफल होणारच होणार ! पण मागे सांगितल्याप्रमाणे सात आठ वर्षांच्या आत सुलतान अल्लाअुद्दिनाने गाठलेल्या महत्त्वाकांक्षेच्या शिखरावरून हिंदूंच्या पुनरुज्जीवित पराक्रमाच्या प्रत्याघातासरशी ती मुस्लिम राजसत्ता कोसळून जी खाली पडली ती पुन्हा काही त्या शिखरापर्यंतसुद्धा केव्हाही वर चढू शकली नाही ! हिंदूंचें बळ 'प्रतिपत् चद्ररेखेव वर्धिष्णू'च होत गेलें ।!

महंमद तघलखाचा मृत्यु आणि नंतर

हा 'वेडा' महंमद सन १३५१ मध्ये मरण पावला. त्याच्या मागे त्याचा चुलतभाअू फिरोजशहा तघलख हा त्या छिन्नविछिन्न झालेल्या दिल्लीच्या सुलतानी सत्तेचा अधिपति झाला. त्याची आअी दीपलपूर येथील राजपूत राजा मलभट्टी याची मुलगी होती. जेव्हा फिरोजशहाच्या बापाने त्या राजपूत कन्येस मागणी घातली तेव्हा राजा मलभट्टीने तिला देण्याचें नाकारलें. त्यामुळे त्या राजा मलभट्टीवर फिरोजशहाच्या बापाने स्वारी केली, आणि तेथील हिंदूचा अतोनात छळ मांडला. हा आपल्या राज्यातील हिंदुबांधवांचा छळ आणि आपल्या जनकाचा, राजा मलभट्टीचा छळ केवळ आपल्यासाठी व्हावा हें त्या राजकन्येलाच पहावेना तेव्हा तिने

स्वतः होऊन त्या मुस्लिम फिरोझच्या बापाशी लग्न लावलें. हा तिचा कनवाळूपणा जरी वाखाणण्यासारखा असला तरी तो तिच्या पितृकुळाला कलंक लावणारा होता. जर तिने अेखाद्या पद्मिनीसारखा धर्मार्थ बळी जाण्याचा मार्ग चोखाळला असता तर तिचें जीवन आणि तिचें कुलव्रतही धन्य झालें असतें !

मुसलमानांतील धर्मभ्रम

मुसलमानांतही धर्मभोळेपणा कुठवर गेलेला असे आणि त्या धर्मच्या स्थापनेच्या वेळेस अरबस्थानाकडील लोकांत ज्या ज्या धर्मभोळेपणाच्या किंवा धर्मवेडेपणाच्या लोकसमजुती प्रचलित होत्या त्यांचीं प्रतिबिंबें मुसलमान लोकांत त्या वेळेपासूनच कशी अढळ पडत गेलेली होती याची कल्पना येण्यासाठी अितिहासात नोंदलेली या तघलखांच्या काळातील ही अेक गोष्ट अिथेच जाता जाता सांगू. वर अुल्लेखिलेल्या वेडचा महंमदाच्या हातून जीं जीं विक्षिप्त धर्मकृत्यें आणि प्रजेचा छळ झाला होता (हिंदु प्रजेचा जो हिंदु म्हणून धार्मिक छळ झाला तो अर्थातच मुसलमानी धर्मसंमत मानला तरी) त्या अन्यायी भूमिका, दड अित्यादि सर्व अपकृत्यांविषयी त्यांची भरपाअी करून ते मूळ कागदपत्र किंवा त्यांच्या शासनीय मूळच्या नोंदी अित्यादि पुरावा महंमदाच्या स्वतःच्या तशा कागदपत्रांसह महंमदाच्या शवपेटिकेत त्याची मृत्यूनंतरची अुत्तरक्रिया करताना फिरोझशहाने महंमदाच्या थडग्यातच पुरून टाकला. कारण त्या लेखांना पाहून आणि त्यांची भरपाअी केल्याच्या पात्रत्या पाहून महंमदाच्या दुष्कृत्यांविषयी अीश्वराने शेवटच्या न्यायालयाच्या दिवशी महंमदाला क्षमा करावी ! फिरोजशहासारख्या त्या वेळच्या सुशिक्षित आणि सुलतान असणाऱ्या मुसलमान समाजाच्या अुच्च व्यक्तींपासून तो सामान्य जनतेपर्यंत मुसलमानांची ही अशी परलोकविषयक अेक धार्मिक म्हणविणारी अढळ श्रद्धा होती !

फिरोजशहाने स्वतःस जरी हिंदुस्थानचा सुलतान म्हणून आरंभी म्हणवून घेतलेलें होतें तरी दिल्लीच्या आसपासच्या काही प्रदेशांना सोडून जिकडे तिकडे हिंदु आणि मुसलमान समूहचे समूह त्या सुलतानाची सत्ता झुगारून देत चालले होते. दक्षिणेकडे तर दिल्लीच्या सुलतानांचें जोखड अुघडपणें फेकून देअून विजयनगरचें विख्यात हिंदुराज्य स्वतंत्रच झालें होतें. अशा स्थितीत सारीच सलतनत गमावून बसण्यापेक्षा अगदी आटोक्यात येअू शकेल अितका तरी प्रदेश वळकट धरून ठेवावा आणि जें हातांतून निसटलें त्याचें राजकीय वैर शमविण्याकरिता त्याचें स्वातंत्र्य मान्य करून टाकावें, असा पक्का निश्चय करून सुलतान फिरोजशहा तघलख याने शेवटी दक्षिणेतील बहामनी राज्य आणि मुसलमानी सत्तेचें हाडवैर करणाऱ्या आणि तिला थेट हिंदुस्थानच्या बाहेर हाकलून देण्याचा मनोमय निर्धार केलेल्या हिंदु नरवीरांनी त्या कालींच स्थापन केलेलें जें विजयनगरचें हिंदुराज्य, त्याचेंही राजकीय स्वातंत्र्य मान्य केलें !

अशा रीतीने सुलतान अल्लाअुद्दिनाच्या काळी सन १३१०–१३३२ च्या संधीस बहुतांश भरतखंडावर तीनशे वर्षांच्या सतत चाललेल्या हिंदुमुस्लिम महा-युद्धाचा परिणाम म्हणून मुसलमानांची स्थापन होत आलेली साम्राज्यसत्ता तशी स्थापन होताहोताच स्वत: त्या सुलतानाच्या वंशजालाच हिंदूंच्या प्रबळ प्रतिरोधास शरण जाअून त्या यावनी सत्तेचा अंत करावा लागला ! मुस्लिमांच्या होत आलेल्या अखिल भारतीय साम्राज्याची पुन्हा केव्हाही न साधू शकण्याअितकी तोडमोड होअून आता हिंदूंच्या तत्कालीन स्वातंत्र्यसत्तेची पुढे केव्हाही न हटू शकणारी मुसलमानांवरील राजकीय चढाअी चालू झाली !

खरें पाहिलें असता मुस्लिमांच्या साम्राज्यसत्तेचा, या फिरोझ तघलखाने दक्षिणेचें राजकीय स्वातंत्र्य स्पष्टपणें जेव्हा वर दिल्याप्रमाणे मान्य केलें, तेव्हाच खरा अंत झाला ! मुस्लिम साम्राज्याच्या महत्त्वाकांक्षेलाच फिरोजशहाने मूठमाती दिली !

हाच प्रत्यक्ष पुरावा

मागे पृष्ठ ८४५–८४७ वर आम्ही आजवरच्या हिंदु अितिहास लेखकांच्या लक्षात न आलेलें जें सत्य सांगितलें आहे की हिंदुसम्राट् श्री धर्मरक्षक (नासिरुद्दिन) ह्याने भर दिल्लीत जी हिंदूची धार्मिक आणि राजकीय अशी मुसलमानी सत्तेवर दुहेरी चढाअी केली आणि विशेषत: हिंदूंवरील धार्मिक अत्याचारांचा मुसलमानां-वर तसेतसेच धार्मिक प्रत्याचार करून सूड अुगविला, त्या मुसलमानांना धाक बसविणाऱ्या हिंदु क्रांतीमुळे मुस्लिमांच्या अखिल भारतीय साम्राज्यसत्तेच्या महत्त्वाकांक्षेस धुळीस मिळविण्याची प्रत्यक्ष कामगिरी करणारी ही राजकीय अुठा-वणी झाली ! हें सत्य ह्या प्रत्यक्ष दिल्लीच्या सुलतानानेच, फिरोजशहा तघलखानेच मान्य केलेल्या ह्या विजयनगरच्या नवीन स्थापन झालेल्या हिंदु राज्यासह साऱ्या दक्षिणेच्या स्वातंत्र्यावरून सप्रमाण सिद्ध होत आहे !

सुलतान फिरोझ तघलखाने निरुपायाने दक्षिणेकडील आपल्या राजसत्तेची शरणचिठी लिहून दिली खरी ! तरी त्याच्या हाती दिल्लीसारखीं जीं मोठमोठीं नगरें होतीं त्यांत हिंदूचा धार्मिक छळ त्याने अतोनात चालविलेलाच होता. हिंदूंनीही पण हीतात्म्यासही न भिणारी स्वधर्मरक्षणार्थ प्रतिरोधाची कशी चिकाटी चालविली होती त्याचें अनेक प्रकारच्या अनेक अुदाहरणांतील हें अेक त्या काळचें म्हणून अुदाहरण तरी स्थालींपुलकन्यायाने दिल्यावाचून राहावतच नाही. तें मुस्लिमांनीही सांगितलेलें अुदाहरण असें:–सुलतान फिरोझ हा हिंदूतही ब्राह्मणांचा विशेष द्वेष करी. तो म्हणे, 'ब्राह्मण हे हिंदुधर्माच्या दुर्गाची किल्ली आहेत.' ब्राह्मणांनी फिरोझने पुन्हा बसविलेल्या जिझिया करविरुद्ध मोठी चळवळ करून प्रतिवाद केला. त्यांनी राजवाड्यासमोर बसून सामुदायिक अुपोषणें केलीं

आणि अग्निप्रवेश करून आत्महत्या करण्याचा निश्चय प्रकट केला, पण सुलतानाने त्यांचेकडे लक्षच दिलें नाही. तेव्हा पुष्कळ ब्राह्मण त्रस्त होऊन तसा त्रागा करून मृत्युमुखी पडले. शेवटी अितर जातींच्या हिंदु लोकांनी अशा स्वधर्माभिमानी ब्राह्मणांसाठी कर भरला आणि त्यांच्या जिवांचें रक्षण केलें !

परंतु अेका ब्राह्मणाची गोष्ट त्याहूनही हौतात्म्याने रसरसलेली आहे. दिल्ली नगरात हा वृद्ध ब्राह्मण अुघडपणे मूर्तीची पूजा करीत असे. आता फिरोझ तघलखाच्या राक्षसी राजधर्माप्रमाणे त्याच्या राज्यात मूर्तीची पूजा करण्याची सक्त बंदी असे. पण त्या आज्ञेचा निषेध करण्यासाठी त्या ब्राह्मणाने आपल्या घराच्या अंगणात अगदी प्रकटपणे सर्व हिंदूंना बोलावून आपल्या मूर्तीचा मोठा अुत्सव करावा. शेवटी अनेक मुसलमान बायामुलेंही त्या मूर्तीचे भक्त झाले. ह्या ब्राह्मणाचा देव भक्तास पावतो अशी कथा दूरवर पसरली. अेका लाकडी फळीवर रंगीत चित्रें काढून त्यांची तो त्या प्रकट स्थलीही पूजा करी. ही बातमी थेट सुलतानाच्या कानावर गेली. शेवटी त्या ब्राह्मणास त्याच्या त्या मूर्तीसुद्धा पकडून सुलतानाने आपल्यासमोर आणविलें. नंतर त्याने सर्व अुलेमांना (मुसलमानी धर्मशास्त्र्यांना) जमविलें आणि विचारलें, 'या ब्राह्मणास काय शिक्षा द्यावी !' त्यांनी अुत्तर केलें, 'या ब्राह्मणाने मुसलमान झालें पाहिजे. नाही तर त्यास जिवंत जाळून टाकावें.' ब्राह्मणास ती आज्ञा मिळताच त्याने मरण पत्करलें ! भर दिल्लीत राजसभेच्या अगदी समोर अेक लाकडाचा ढीग रचून त्या ब्राह्मणाचे हात पाय बांधून त्यास त्या ढिगावर ठेविलें आणि त्यावर ती चित्रित मूर्तीची फळीही ठेविली. मुसलमानी राक्षसांनी त्या ढिगाऱ्यास चहू बाजूंनी आग लावून दिली. तरी तो ब्राह्मण मुसलमान होण्यास मान्य होअीना. थोड्याच निर्दय क्षणांत ती आग चहूकडून भडकली. पण 'अुस्सऽ'ही न म्हणता तो ब्राह्मण त्या मूर्तीला नमस्कार करीतच राहिला ! क्षणार्धात ज्वालांनी त्या धर्मनिष्ठ ब्राह्मणास स्वाहा केलें ! !

हा हिंदुद्वेषी सुलतान फिरोझ तघलख सन १३८८ मध्ये मरण पावला. फिरोझच्या मृत्यूनंतर त्याच्या अुरल्यासुरल्या राज्यात अेकच अंदाधुंदी माजली. अेकदा तर अेकाच वेळी राज्यावर अधिकार सांगणाऱ्या फिरोझच्या दोन नातवडांत कलह होअून दिल्ली नगरात दोन टोकांना फिरोझचे दोन नातू महमूदशहा नि नसरतशहा अेकाच वेळी दोन स्वतंत्र सुलतान म्हणून राज्य करू लागले. अर्धी दिल्ली अेकाची राजधानी आणि अर्धी दिल्ली दुसऱ्याची राजधानी ! !

तैमूरलंगाची स्वारी

अशा स्थितीत दूरच्या समरकंदचा सुलतान आणि अितिहासात कुख्यात असलेला तैमूरलंग ह्याची हिंदुस्थानवर धाड पडली.

तैमूरलंग हा तुर्क होता. तो धर्माने प्रथमत: मुसलमान नव्हता. त्याने बगदाद जिंकल्यानंतर तेथील मुसलमानी ग्रंथसंग्रह साफ जाळून टाकला होता आणि अनेक ठिकाणी मशिदीही जाळल्या होत्या. तो सन १३६९ त समरकंदचा राजा झाला. त्याने चेंगीजखानाचा आदर्श पुढे ठेवून मॉस्कोपासून आग्नेयेस अफगाणिस्तानपर्यंतचे जगताच्या विस्तीर्ण प्रदेशातील सत्तावीस राजमुकुट जिंकून घेतले. अेका स्वारीत त्याचा पाय मोडल्यामुळे त्याला 'लंग' (लंगडा) हें टोपण नांव मिळालें. नंतर त्याची दृष्टि हिंदुस्थानकडे वळली. पण ती अितर प्रदेशाप्रमाणे नुसती राजसत्तेच्या नि विजयोन्मादाच्या लोभानेच काय ती नव्हे तर हिंदुस्थानविषयी त्याच्या मनात अेक दुसऱ्या प्रकारचा दीर्घ द्वेष अुत्पन्न झाला होता म्हणून! कारण मध्यंतरी त्याने मुसलमानी धर्म स्वीकारला होता. त्याच्या मूळच्या विध्वंसक स्वभावात त्या नवीन धर्माचें अेक नवें भूतच संचरल्यासारखें झालें! तो आपल्या आत्मचरित्रात म्हणतो, 'भारतावर स्वारी करण्याचा माझा अुद्देश तेथील काफर हिंदु लोकांना ठार मारावें, त्यांच्या मूर्तींचा विध्वंस करावा, त्यांना अिस्लामी धर्माची दीक्षा द्यावी नि अल्लाच्या दरबारात 'गाझी' हें पद मिळवावें असा आहे.'

तेव्हा लगेच अि. सन १३९७ त त्याने भारतावर स्वारी केली. त्याचे हाताखाली अेकंदर नव्वद सहस्र सैन्य होतें. तो पानपतपर्यंत येअून थडकला. तथापि त्याच्याशी लढण्यास कोणीही आलेलें नाही असें पाहून तो थेट दिल्लीवर चालून गेला. तेथे दिल्लीच्या सुलतानाचें नांवे काही सैन्य लढावयास आलें. परंतु त्याचा बोलता बोलता पराभव झाला. अेक मनोरंजक गोष्ट मात्र येथे सांगण्यासारखी आहे की अध्यांअर्ध्या जगताला जिंकीत आलेलें तैमूरचें हें निर्ढावलेलें प्रचंड सैन्य त्याच्याशी लढावयास आलेल्या त्या सुलतानाच्या य:कश्चित् सैन्यात हिंदुस्थानातील हत्ती हे प्रचंड प्राणी प्रथमच सामोरे आलेले पाहून काही वेळ भयभीत होअून गेलें होतें. अर्थात् लौकरच तें सावरलें. सुलतानाच्या सैन्याची दाणादाण होताच तैमूरचें सैन्य दिल्लीत भयंकर लुटालूट नि कापाकापी करीत सुटलें त्यामुळे लक्षावधि लोक प्राणास मुकले. तैमूरची हिंदुरक्ततृष्णा दिल्लीस अशी थोडीशी शांत होताच तो पुढे मिरत नि हरिद्वारकडे वळला. वाटेत त्याने ठिकठिकाणी मूर्तींचा विध्वंस केला. हरिद्वारास त्याने हिंदूंच्या सरसकट कापाकापीची पराकाष्ठा केली. केवळ हिंदुधर्माचा त्याग न करण्याच्या कठोर नि पवित्र निश्चयापायी त्या हिंदु जातीवर कित्येकदा आणि किती अघोर प्रसंग गुदरले त्याचीं अुदाहरणें कोठवर द्यावीं! थोडक्यात अितकेंच सांगून टाकू की हरिद्वारहून हा नरराक्षस तैमूर शिवालिकपहाड, नागरकोट, जम्मू ह्या अुत्तरेच्या मार्गाने हिंदुरक्ताचा असाच सडा पाडीत आणि हिंदु देवस्थानांचा असाच विध्वंस करीत जात असता त्यास वातमी कळली की त्याची मूळची राजधानी जो समरकंद तिकडे त्याच्या विरुद्ध मोठी बंडाळी माजलेली आहे. ह्या वृत्तामुळे तो रागाने नि चिंतेने वेडावून जाअून अेकदम त्याला त्याच्या प्रचंड सेनेसह भारत सोडून समरकंदकडे जाणें भाग पडलें.

तैमुरलंगाच्या ह्या प्रलयात अुरलीसुरली तघलख घराण्याची सत्ता बुडून गेली. नंतर अुत्तर हिंदुस्थानात केवळ अंदाधुंदी काय ती अुरली. या अंदाधुंदीत सय्यद नांवाच्या घराण्याने दिल्लीच्या नामधारी सुलतानाचें पद बळकाविलें होतें.

तेव्हा ह्या वेळेस मुसलमानी सत्तेची ही दुर्गति पाहून राजस्थानचे हिंदुधर्माचे चिरंतन संरक्षक जे स्वतंत्र राजपुत राजे, त्यांनी चांगलाच अुठाव केला, आणि विशेष म्हणजे त्यांना नेहमी जें करावें लागे त्याप्रमाणे आपल्या राजपुतान्यातीलच गडकोटांचें स्वातंत्र्य संभाळून स्वस्थ न बसता या वेळी त्यांचे काही धुरंधर पुढारी हिंदूंचा मुसलमानांच्या निरनिराळ्या सुलतानांनी वळकाविलेला प्रदेशही मुक्त करीत चालले. तसें पाहिलें असता पूर्वीही त्यांच्यापैकी काहींनी हिंदूंची काशी, प्रयाग अित्यादि मोठमोठीं क्षेत्रस्थानेंही मुसलमानांच्या हातातून जिंकून घेतलीं होतीं पण! —मुसलमानी सत्ता जशी त्यांनी हुसकून दिली त्याचप्रमाणे त्या त्या क्षेत्रांतून वसलेलीं मुस्लिम वसतिस्थानें आणि त्यांचीं मशिदी प्रभृति मोठमोठीं धर्मकेंद्रें यांचें काही निर्बीजीकरण करून टाकलें नाही! —जसें हिंदूंच्या मुसलमानांनी जिंकलेल्या स्थानात मुसलमानी जेते हिंदूंची सरसकट कापाकापी करून आणि हिंदूंचीं तीर्थक्षेत्रें यांचा विध्वंस करून तेथे तेथे हिंदूंचें निर्बीजीकरण करीत! पण हिंदु तसें करीत नसत, म्हणूनच जेव्हा जेव्हा मुसलमानी आक्रमणें पुनःपुन्हा अुत्तरेकडून खाली येत, तेव्हा तेव्हा स्थानिक जिवंत सोडलेले आणि नांदत ठेवलेले हे मुसलमान, घरात बाळगून ठेवलेल्या सापाप्रमाणे पुन्हा त्या मुस्लिम आक्रमकांचें साहाय्य बोलावून त्या त्या तीर्थातील, क्षेत्रातील, नगरातील हिंदूंची दुर्दशा अुडवून देत! पण तसें न करण्याच्या ज्या आत्मघातकी अुदारपणाच्या व्याधीने रजपूत विजेते ग्रस्त झालेले होते ते तसेच होते! (ह्या विषयावरील सविस्तर चर्चा ह्या ग्रंथांच्या ७६६–७६७ पृष्ठांवर आणि ७७० ते ७७४ पृष्ठांवर आलेली आहे. ती वाचकांनी पुन्हा अवश्य पहावी.)

राणा कुंभ

ह्या काळातील राजपुतांचा धुरंधर पुढारी राणा कुंभ हा विशेष अुल्लेखनीय आहे. चितोडच्याच काय, पण हिंदुस्थानातील पराक्रमी नि यशस्वी हिंदु धुरंधरांपैकी हा राणा कुंभ अेक तेजस्वी नेता होअून गेला. त्याने त्याच्या शेजारच्याच बलवान् आणि दिल्लीच्या साम्राज्यातून फुटून निघालेला माळव्याचा मुसलमानी सुलतान महमद खिलजी याच्याशी युद्ध छेडून सुलतानपूरजवळच्या लढाअीत त्याची रग पुरती जिरविली. राणा कुंभाच्या हाती शेवटी तो माळव्याचा सुलतान महंमूद खिलजी हा जिवंत सापडला. पण 'सद्गुणविकृती'च्या व्याधीने पछाडलेल्या अितर हिंदु वीरांप्रमाणेच राणा कुंभाने तें कृत्य क्षत्रियांचें भूषण आहे असें समजून त्या माळव्याच्या सुलतानाला पुन्हा जिवंत सोडून दिलें! जर क्वचित् राणा कुंभ त्या

मुस्लिम सुलतानाच्या हाती जिवंत सापडला असता तर? पृथ्वीराजाप्रमाणे राणा कुंभाचेही डोळे काढून त्या मुस्लिम राक्षसी राजनीतीप्रमाणे त्याला ठार मारलें गेलें असतें! आणि खरें पाहिलें असता अशा राक्षसी लढ्यात अशी राक्षसी राजनीतिच हितप्रद असते आणि म्हणूनच धर्म्य असते!

त्या वेळच्या हिंदूंच्या अितिहासात ही लढाअी अितकी लोकोत्तर मानली गेली की तिच्यातील यशाच्या गौरवार्थ राणा कुंभाने चितोडला अेक भव्य आणि कलावान् असा 'कीर्तिस्तंभ' अुभारला, तो अद्याप अवशिष्ट आहे. त्याचप्रमाणे गुजराथचा सुलतान कुतुबुद्दिन याने कुंभलगडावर स्वारी केली, तेव्हा त्याचाही राणा कुंभाने पूर्ण पराभव केला. शेवटी सुलतान कुतुबुद्दिन याला राणा कुंभाशी संधि करून जीव वाचवावा लागला.

कुंभाच्या मागेही राजपुतान्यात अितके कर्ते आणि वीर पुरुष गाजून गेले की त्यांच्या पिढ्यांचे स्वतंत्र अितिहासच लिहिले जावेत! पण आमचे आजकालचे परधार्जिणे अितिहास मुसलमानांच्या आणि युरोपीय परकीय राष्ट्रांच्यासुद्धा अितिहासानेच काय ते पछाडलेले असतात. त्यांना त्यात हिंदु गौरवाच्या अितिहासाचीच तेवढी अडचण वाटते! – वस्तुतः तें त्यांच्या स्वतंत्र संशोधनाच्या अभावाचें नि अज्ञानाचेंच द्योतक असतें. सुदैवाने त्या काळच्या हिंदूंच्याच वीरश्रीने रसरसलेले प्रामाणिक नि प्रासादिक 'रासो' मात्र यत्रतत्र अुपलब्ध आहेत. पृथ्वीराज रासो, हमीर रासो, छत्रसाल रासो, असे अनेक रासो – पदबद्ध लहानमोठीं अैतिहासिक हिंदु कवींनी लिहिलेलीं वीरकाव्यें आजही अुपलब्ध आहेत. पण त्यांचीं नांवेंसुद्धा या अितिहासकारांना माहिती असतील-नसतील! त्यातही आजकालच्या शिलालेखांच्या संशोधनात राजपुतान्यातीलच नव्हे, पण अनेक ठिकाणच्या गिरिकुहरांतून अैतिहासिक शिलालेख सापडत आहेत. त्यांचाही या हिंदु वीर पुरुषांचा अितिहास लिहून काढण्यास मोठा अढळ आधार मिळण्यासारखा आहे. पण तें कार्य अेखाद्या मोठ्या शासनसस्थेय प्रमाणावर करण्याचा काळ सध्याचा तरी दिसत नाही! तसा तो येअीतो निदान लहानमोठ्या संस्थांनी तरी किंवा व्यक्तींनी तरी तें संशोधनकार्य नसलें तरी संकलनकार्य, हाती घेअून पुष्कळ अंशी पार पाडणें शक्य आहे. या आशेला पर्वतासारखा अढळ पाठिंवा द्यावयास अेकटच्या राजवाड्यांचें नांव अुच्चारणें पुरें आहे!

लोदी घराणें

सय्यद घराण्याचा शेवट सन १४५० मध्ये झाल्यावर पुढे काही दिवस लोदी या अफगाण वंशाच्या घराण्यातील स्वतःस सुलतान म्हणवून घेणारे काही पुरुष दिल्लीला नांवाचें राज्य करून गेले. त्यांत शिकंदर लोदी ह्याने अि. सन १४८८ ते १५१७ पर्यंत राज्याची काहीशी सावरासावर केली. हा शिकंदर लोदी अेका

हिंदु स्त्रीच्या पोटी जन्मलेला होता. तथापि प्रत्येक मुस्लिम अधिकाऱ्याप्रमाणे त्याने हिंदूंवर मात्र अगदी करडी दृष्टि ठेवली होती. मध्यंतरीच्या अंदाधुंदीत हिंदूंनी पुन्हा चालू केलेल्या त्यांच्या मोठमोठ्या यात्रा शिकंदरने पुन्हा बंद केल्या, अितकेंच नव्हे तर साध्या पर्वणीच्या दिवशी नदीतीर्थावर स्नानें करण्याचीही बंदी केली. तरीहो हिंदु लोकांचें प्रतिरोधक बलिदान अितरत्र जसें चालत आलें होतें तसेंच चालू राहिलें. अुदाहरणार्थ ह्या खालील अेका प्राणत्यागी महापुरुषाचें वृत्त सांगणें पुरें आहे.

लखनौकडील अेका गावी वुद्ध नांवाचा अेक ब्राह्मण राहत असे. कोणताही न्याय्य नि सदाचारी धर्म मनापासून आचरला असता ओश्वरास सारखाच मान्य आहे, असें त्याने प्रतिपादिलें. यासाठी मुसलमानांनी त्यास फार त्रास दिला. त्या ब्राह्मण प्रचारकाने स्वत:चा मतप्रचार अितक्या प्रभावीपणे चालविला की लखनौच्या काझीनेही हात टेकले. शेवटी अधिकाऱ्यांनी तो तंटा सुलतानाकडे पाठविला. तेव्हा शिकंदरखानाने नअू विद्वान् मौलवींकडून त्या ब्राह्मणाशी वाद करविला. पण तो स्वधर्मनिष्ठ सत्यप्रतिज्ञ ब्राह्मण आपलें मत सोडीना. तेव्हा स्वत: सुलतानाने 'मुसलमान हो, नाही तर शिरच्छेद होअील', अशी धमकी दिली. तीही त्या हिंदु धर्मवीराने धुडकावून दिली. तेव्हा त्याला ठार मारण्यात आलें!

राणा संग

हा शिकंदर लोदी सन १५१७ मध्ये मेला आणि त्याचेमागून त्याचा मुलगा अिब्राहिम लोदी हा त्या नाममात्र अुरलेल्या दिल्लीच्या सुलतानपदावर वसला. त्या काळी विस्कळीत झालेल्या मुस्लिम राजसत्तेला राजपुतांनी मरणप्राय करून सोडलें होतें. त्या वेळी त्यांचा पुढारी चितोडचा पराक्रमी राणा संग हा होता. राणा संगाचा विक्रम पाहून लहानसहान मुस्लिम संस्थानिकांच्या पायाची आग मस्तकात जात असे. त्यांपैकी अीडरच्या मुसलमान ठाणेदाराने आपल्या दारात अेक कुत्रा बांधून त्याचें नांव संगराणा असें ठेविलें. त्या नांवाने तो त्या कुत्र्यास हाक मारी. मुसलमानांच्या अनेक माकडचेष्टा कानावर आल्यामुळे संगराण्याने त्यांची सरसकट खोड मोडून टाकण्यासाठी मोठ्या सैन्यासह अीडर प्रांतावर चाल केली. ठिकठिकाणी मुसलमानांचा खरपूस समाचार घेतला आणि हिंदूवर केलेल्या अत्याचारांचा पुरेपूर सूड अुगविला. या साऱ्या आजूबाजूच्या प्रदेशातील हिंदु लोकांना मात्र ह्या स्वारीचा कोणताही त्रास झाला नाही. अुलट अीश्वरानेच ह्या राणासंगाच्या रूपाने आपला त्राता धाडला आहे अशा भक्तिभावाने सारे हिंदु लोक त्याच्यावर प्रसन्न झाले. मुसलमानांवर ठिकठिकाणी असे विजय मिळवून आपला यशोदुंदुभि वाजवीत नि कीर्तिध्वज फडकवीत संग राणा चितोडास सन १५१९ ला परत गेला. रतनभोर, गागरोन, काल्पी, भिलसा नि चंदेरी हे भाग मुसलमानांच्या हातून सोडवून राणा संगाने आपल्या राज्यास जोडले.

खानोलीच्या लढाओत सुलतान अिब्राहीम लोदीचा राणा संगाने केलेला पराभव

अशा प्रकारे विस्कळीत झालेल्या मुस्लिम राजसत्तेला राजपुतांनी अगदी मरणप्राय करून सोडलें होतें. ही स्थिति पुन्हा सुधारावी म्हणून सर्व बळ अेकवटून सुलतान अिब्राहिम लोदीने सर्व राजपुतांचा त्या काळी पुढाकार घेतलेला पराक्रमी चितोडचा राणा संग ह्याचेवर आपण होअून स्वारी केली. राणा संगाच्या सैन्याची गाठ सुलतान अिब्राहिमच्या सैन्याशी खानोली येथे पडली; आणि त्या खानोलीच्या निकराच्या लढाओत राणा संगाने सुलतान अिब्राहिमच्या सैन्याची दाणादाण अुडविली आणि अिब्राहिम पराभव पावून दिल्लीस परत गेला.

बाबरची स्वारी

अशा संकटात लाहोरचा सुभेदार दौलतखान लोदी अितर अनेक मुस्लिम पुढाऱ्यांसह स्वत:च्या अस्तित्वाविषयीच भयभीत झाला होता. त्यांनी शेवटचा अुपाय म्हणून अफगाणिस्थानात त्या वेळी राज्य करीत असलेल्या शक्तिशाली बाबराला हिंदुस्थानात राणा संगाचें पारिपत्य करण्यास साहाय्य देण्याची प्रार्थना केली. बाबरालाही अशीच संधि हवी होती. कारण बाबर तैमुरलंगाचा वंशज म्हणवीत असून हिंदुस्थानवर आपला औरस अधिकार आहे असें समजे. तेव्हा बाबर हा सन १५२६ मध्ये ससैन्य सुभेदार दौलतखान लोदी याच्या साहाय्यास धावून आला.

अिकडे हें संयुक्त मुस्लिम सैन्य आपणावर चालून येत आहे हें पाहताच गर्भगळीत झालेला सुलतान अिब्राहिम लोदी ह्याने, हिंदुस्थानातील सर्व हिंदु-मुसलमान सुलतानांत नि राजांत विजयी झालेल्या राज्यधुरंधर चितोडचा हिंदु महाराजा राणा सग ह्यास आपल्या साहाय्यास बोलाविलें. वस्तुत: सुलतान अिब्राहिम लोदीचाही राणा संगाने अलीकडेच मोठा पराभव केला होता. पण प्रसंगी हवा तो अपमान गिळून हिंदूंनाही प्रसंगी शरण जाण्याची मुसलमानांना केव्हाच लाज वाटत नसे. दुसरें, आपल्याकडे असलेली जी बाजारी समज की मुसलमान मुसलमानांशी कधी लढत नाहीत किंवा त्यांच्या आपसात राजसत्तेसाठी लढाअी झालीच तर त्यांतील कोणताही मुसलमान पक्ष दुसऱ्या मुसलमानी पक्षाशी लढण्यासाठी हिंदूंचें साहाय्य काही मागत नाही, ह्या दोन्ही बाजारी समजुती किती खोटच्या आहेत, हें आम्ही मागे या ग्रंथात दाखविलेंच आहे आणि पुढेही दाखविलें जाअील. त्याचेंच हें सुलतान अिब्राहीम लोदीचें कृत्यही अेक अत्यंत ठळक अुदाहरण आहे. हिंदु राणा सगाचें साहाय्य घेअून सुलतान अिब्राहिम लोदी त्याच्या राज्यावर चाल करून आलेल्या मुस्लिम बाबराशी पानपत येथे सन १५२६ मध्ये लढला. परंतु रणांगणात अिब्राहिम लोदीच ठार झाला आणि त्याचें सैन्य

अधळलें. तेव्हा निरुपायाने राणा संगानेही रणांगण सोडून दिलें आणि आवतीभोवती सांगाती येतील त्या राजपुतांसह भटकत भटकत रानावनातून रजपूत सैन्याची पुन्हा अभारणी करून बाबरावर फिरून तुटून पडावें अशा कष्टसाध्य प्रयत्नात तो मनस्वी योद्धा महाराणा संग खटपटत असता त्या वनवासातच सन १५३० मध्ये दुःसाध्य रोगांना बळी पडला ! हिंदूंचा त्या काळचा मुकुटमणीच निखळला ! !

मोंगल वंशाची दिल्लीस स्थापना

अिकडे बाबराला विजय मिळताच त्याने त्याला हिंदुस्थानात बोलाविणाऱ्या पंजाबच्या मुसलमान सुभेदाराचीही दिल्लीचें सुलतानपद बळकविण्याची अिच्छा धुळीस मिळवून स्वतः आपणच दिल्लीचें सुलतानपद सन १५२६ मध्ये बळकाविलें. तेथूनच दिल्लीच्या मोंगल बादशाहीचा आरंभ झाला.

या काळच्या अुत्तर हिंदुस्थानातील अुरल्या सुरल्या प्रांतांमधील काही समीक्षणीय घटना

सिंध – अरबांच्या हातून सिंधला हिंदूंनी परत जिंकून घेतल्याचा अुल्लेख पूर्वी केलेलाच आहे (पृष्ठ ६९८). त्या हिंदु सुमेर रजपुताच्या हाती सिंधची सत्ता सन १३३६ पर्यंत होती. सन १३३६ त जामआफरा नामक त्या रजपुतांचा राजा स्वतंत्रपणे तेथे राज्य करीत होता. दिल्लीच्या सुलतानांच्या आणि ह्या हिंदु राजकुलाच्या लढाया सारख्या चाललेल्या असत. सन १३६७ ते १३८० पर्यंत तेथील हिंदु राजा जाम तिमाजी ह्याने राज्य केलें. त्यानंतर त्याचाच राजपूत भाअू राज्यावर बसला. पण अनेक विकृतींमुळे त्याचा मतिभ्रंश होअून तो आपण होअून मुसलमान झाला !

बंगाल – महंमद घोरीने जेव्हा दिल्लीचें सिंहासन नित्याचें असें सन ११९२ मध्ये जिकलें तेव्हा त्याने त्याचे अनेक पराक्रमी सरदार आजूबाजूचे हिंदु प्रदेश जिंकावयास धाडले. त्यांतील बख्त्यार खिलजी ह्या त्याच्या सरदाराने बिहार नि बंगाल या प्रांतांवरील हिंदुराजसत्ता अुलथून टाकून मुसलमानी राज्य त्या प्रांतांत सन ११९५ च्या आसपास प्रथमच स्थापलें. बिहारमध्ये त्याने हिंदूंचा विशेषतः त्यातील बुद्ध संप्रदायाचा जो छळ केला आणि त्यांना बलात्काराने बाटविलें त्याचा अुल्लेख या ग्रंथात पृष्ठ ६९७ वर केलेलाच आहे. ह्या प्रसंगीच जें जगत्प्रसिद्ध नालंदा विद्यापीठ तेथे पांच शतकांहून अधिक काळ नांदत होतें त्या पवित्र विद्यापीठाचा सत्यनाश या रानटी, अघोरी नि विध्वंसक वृत्तीच्या मुसलमानी सेनापतीने केला. तेथील त्या विशाल, अमूल्य, असंख्य अशा प्रचंड ग्रंथसंग्रहालयास त्या मुसलमानांनी आग लावून दिली. असें म्हणतात की ती आग सहा महिनेपर्यंत जळत होती ! ती भस्मसात् होअीतो मुसलमानांनी कोणालाही ती विझवू दिली नाही !

शस्त्रबळ नसलें तर शास्त्रबळच काय पण धर्मबळही किती पंगु ठरतें याचें हें आणखी अेक हृदयद्रावक उदाहरण आहे !

त्या जळत असलेल्या प्रचंड ग्रंथसंग्रहालयात वैदिक, बुद्ध, जैन अित्यादि धर्मांचे असंख्य पूज्य ग्रंथ होते. पण त्यांचें रक्षण करण्यास न वैदिक देवता आल्या, न प्रत्यक्ष बुद्ध, न जिन ! भक्तांचें प्रत्यक्ष शस्त्रबळ हेंच देवांचें शस्त्रबळ असतें !

शेवटी बंगालमध्ये त्या वेळेस राज्य करीत असलेल्या हिंदूंच्या शेवटच्या सेनवंशीय राजाचा पाडाव करून बखत्यार खिलजीने बंगाल हस्तगत केला आणि तिकडेही हिंदूंना वळाने वाटविण्याचें अभियान (मोहीम) चालविलें.

दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाच्या बंगालवर चालत असलेल्या हया सत्ते-विरुद्ध दिल्लीचे मुस्लिम सुभेदारच मधून मधून बंडें करून स्वत:सच बंगालचे सुलतान म्हणून स्वतंत्रपणे राज्य करीत. त्यापैकी सन १३४७ त फकरुद्दिन नामक सरदाराने बंड करून बंगालवर आपलें स्वतंत्र मुस्लिम राज्य स्थापन केलें. तेव्हा-पासून १५७६ पर्यंत हे अफगाण सुलतानच राज्य करीत होते. मध्यंतरी सन १३८६ च्या आसपास हें अफगाणी राज्य कंस नामक अेका हिंदु जमीनदाराने पादाक्रांत केलें आणि बंगालवर हिंदुसत्ता स्थापन केली. तो राजा कंस सन १३९२ मध्ये मरण पावल्यावर त्याचा मुलगा जितमल्ल हयास बंगालचें राज्य प्राप्त झालें. पण तत्रस्थ हिंदूंच्या त्या काळच्या अकर्तेपणाची गोष्ट अशी की त्या हिंदु जितमल्ल राजास विपरीत बुद्धि होअून त्याने स्वत:च मुसलमानी धर्म स्वीकारून जलालुद्दिन असें नांव धारण केलें ! आणि हेंही ध्यानात ठेवण्यासारखें आहे की, या दुष्कृत्या-साठी त्याला शासन देणारा अेकही हिंदु त्या सबंध बंगाल प्रांतात निघाला नाही! तें मुसलमानी राज्य त्यांनी निमूटपणे स्वीकारलें.

आणखी अेका वेळी अेका कर्तृत्ववान् आणि धर्माभिमानी हिंदु जमीनदारानेही अशीच क्राति जवळ जवळ घडवून आणली होती. पण तिचाही शेवटी असाच विचका झाला. बंगालमध्ये ज्या मोजक्या हिंदुवीरांनी म्लेंछाविरुद्ध अशा निकराच्या अुठावण्या केल्या त्या सर्वांत हिंदु स्वातंत्र्यधुरंधर योद्धा आणि राणा प्रताप, बाबा-बंदा अित्यादि भारतीय हिंदुवीरांच्या मालिकेत सन्मानिला जावा असा अेकमेव पुरुष म्हटला म्हणजे जशोधरचा महाराजा प्रतापादित्य हा होय ! त्याचें कार्यक्षेत्र विस्तीर्ण नव्हतें तरी आणि शेवटी त्यासही तिकडील हिंदुसमाजाच्या प्रबल पाठिंब्याच्या अभावी जरी अपयश आलें असलें तरी हिंदुस्वातंत्र्याच्या अितिहासात त्याचें नांव संस्मरणीय आहे !

काश्मीर– हया समीक्षणाच्या ग्रंथात हया प्रकरणाच्या कालखंडात काश्मीरच्या अितिहासासंबंधी स्थलाभावामुळे अितकेंच सांगणें पुरें आहे की, खाली अुत्तर हिंदुस्थानातल्या गुजराथ प्रभृति प्रांतांतून मुसलमानांचे कितीही अुपद्व्याप चालू असले, आणि ज्यांचीं वृत्तें या ग्रंथात अवश्य तितकीं अुल्लेखिलेलींच आहेत,

तथापि काश्मीरमध्ये अि. सन चौदाव्या शतकापर्यंत हिंदुराज्यच कधी प्रबळपणे तर कधी मंदतेने पण स्वतंत्रपणे नांदत होतें. तेथील शेवटचा हिंदुराजा सेनदेव या नांवाचा होता. ह्या काश्मिरच्या हिंदुराज्याचा राजतरंगिणी या नांवाचा अितिहास कल्हणपंडित या विद्वानाने लिहिलेला आहे. येथे अितकेंच काय तें अुल्लेखिलें पाहिजे की, ह्या सेनदेवाने शहामीर किंवा मिर्झा नांवाचा कोणी मुसलमान आपल्या राजसभेतील अधिकारावर नेमता नेमता त्याला मुख्य प्रधान केला होता. सेनदेवाच्या मृत्यूनंतर, अनेक हिंदुराज्यांच्या अितिहासात घडलें त्याप्रमाणे येथेही घडून ह्याच मुसलमानाने आधीपासून रचलेल्या कारस्थानाच्या बळावर काश्मिरच्या हिंदुराज्याचा विश्वासघाताने अंत केला. आणि शेवटी शमसुद्दिन नांवाची पदवी धारण करून तो त्या राज्याचा स्वामी झाला !

अर्थात्, शेवटी सगळें हिंदुस्थान जसें हिंदूंनी मुसलमानांच्या हातून परत हिसकावून घेतलें, त्याचप्रमाणे आम्हा हिंदूंच्या शिखांनी आणि डोग्रांनीं केवळ काश्मिरच मुसलमानांच्या हातून परत हिसकावून घेतलें अितकेंच नाही तर त्यापुढे अेका बाजूला लडाख आणि दुसऱ्या बाजूला गिलजितपर्यंत चढाया करून तेथेही हिंदुध्वज रोविले ! — पण ते अनेक रणांगणें गाजविल्यानंतर यथासमय काही शतकें पुढे !

✦ ✦ ✦

प्रकरण ७ वें

विजयनगरच्या विजयशाली नव्या स्वतंत्र हिंदुराज्याची स्थापना

वाचकांच्या अनुसंधानासाठी मागील प्रकरणातील काही घटनांचे कालदर्शक सन आरंभीच अुल्लेखिणें आवश्यक आहे. दक्षिणेवर परकीयांची आणि विशेषत: परधर्मीयांची पहिली स्वारी अशी जी झाली म्हणजे सुलतान अल्लाअुद्दिनाने केलेली सन १२९४ मध्ये देवगिरीवर जी केली तीच स्वारी होय. त्यानंतर अत्यंत कटोविकट त्वरेने अेकामागून अेक अशा मुसलमानी सुलतानांच्या मलिक काफूर आणि खुश्रूखान ह्या पराक्रमी, क्रूर आणि सहस्रावधि हिंदु लोकांना बळाने बाटविणाऱ्या सेनापतींच्या प्रचंड अशा सन १३१८ पर्यंत तीन चार स्वाऱ्या दक्षिणेत झाल्या. या पंचवीस वर्षांच्या आत मुसलमानांनी सारा दक्षिण देश पादाक्रांत करून टाकला आणि पांच सहा मोठमोठीं प्राचीन आणि प्रबळ म्हणून गाजत

आलेली देवगिरी ते मलबारपर्यंतचीं हिंदुराज्यें रसातळाला नेलीं!—हें गेल्या प्रकरणात वर्णिलेलें ऐतिहासिक सत्य हिंदुराष्ट्राच्या स्वाभिमानास जितकें हिणविणारें आहे आणि आपल्या अितिहासातील अेक लांछनीय आश्चर्य आहे तितकेंच ह्या राक्षसी म्लेंच्छ शत्रूंच्या प्रलयासारख्या अनावर वेगाने अुफाळलेल्या सेनासागरास अगस्तीप्रमाणे अेका आचमनात पिअून टाकून ज्या दाक्षिणात्य हिंदुवीरांनी दिल्लीच्या सुलतानी सत्तेच्या पुढील अवघ्या दहा वारा वर्षांतच चिंधड्या अुडवून टाकल्या आणि हिंदुराष्ट्राचें दक्षिणेत तरी पुनर्निर्माण करणारे अेक विजयशाली असें विजयनगरचें नवें हिंदु साम्राज्य अुभारलें! —ही अैतिहासिक घटनाही अितकी भूषणास्पद आहे की तिचा आपलें हिंदुराष्ट्र जितका अभिमान वाहील तितका थोडाच होणार आहे!

कारण मुसलमानांनी सारी दक्षिण सन १३१८ त पादाक्रांत करण्याच्या आधीच त्या काळीं मलबारवर स्वारी करून आलेल्या त्यांच्या प्रबळ सेनापतीशी —खुश्रूखानाशीच दक्षिणेत पुन्हा हिंदुसत्ता लगोलग स्थापन करण्याची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा धारण करणाऱ्या काही हिंदु पुढाऱ्यांनी लागेबांधे बांधण्यास प्रारंभ केला होता. सेनापति खुश्रूखानाचे मनात दिल्लीस जाअून तेथील सुलतानास ठार मारून स्वत:च सुलतानपद घेण्याचे गुप्त बेत चालले होते. पण या साहसी नि भयंकर कारस्थानात त्याला सुलतानाच्या कट्टर अिस्लामनिष्ठ सरदारांचें साहाय्य मिळणें अशक्य होतें. पण हिंदु संस्थानिकांचें नि सरदारांचें सक्रिय वा निष्क्रिय साहाय्य मिळणें मात्र शक्य होतें. कारण खुश्रूखान हाच त्या वेळी त्याला स्वत:ला बळाने मढविण्यात आलेल्या मुस्लिमपणाच्या कातडयास फाडून तोडून अुघड अुघड आपल्या मूळच्या हिंदुपणात प्रकट होण्यास आतुर झालेला होता. त्यामुळे दक्षिणेतील तेवढयातच मुसलमानांनी पादाक्रांत केलेल्या हिंदुसमाजाच्या धुरंधरांशी त्याचें काहीतरी सहकार्याचें अत्यंत गुप्त खलबत चाललेलें होतें, अशा चुगल्या थेट दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाच्या दरबारापर्यंत आतून आतून पोहोचत होत्या. ह्या सर्व प्रकरणांचें संभवनीय, शक्य आणि सिद्ध तें वृत्त समन्वित करून तो सुसंगत अितिहास गेल्या ५ व्या प्रकरणातच आम्ही सांगितला आहे, तो वाचकांनी वाटल्यास पुन्हा पहावा. (पृष्ठ ८२८ ने ८३४) स्थलाभावी येथे खालील त्रोटक वृत्त देणें त्या काळच्या अितिहासाच्या समीक्षणापुरतें पर्याप्त आहे.

यादव कुळातील संगम नावाच्या अेका गृहस्थाचे मुलगे हरिहर नि बुक्क हे अनागोंदी राजाच्या पदरी होते. देवगिरि आणि वरंगळवरील अल्लाअुद्दिनाच्या राजवटीतील मागे अुल्लेखिलेल्या मुसलमानी स्वाऱ्यानंतरच्या धुमाकुळीत अनागोंदीच्या राजाचाही मुसलमानांनी पराभव केला. अनागोंदी हीच किंवा तिच्या जवळपास वालीची किष्किंधा नगरी होती अशी दंतकथा आहे. अनागोंदीच्या राजाचा पराभव केल्यानंतर हरिहर नि बुक्क या तरुणांना धरून मुसलमानांनी

दिल्लीला सन १३२७ मध्ये नेलें आणि त्यांना बाटवून मुसलमान केलें. पुढे त्या मुलांचें वृत्त आणि तेज पाहून स्वतः सुलतान महंमद तघलखने हिंदूंशी लढण्यासाठी जी नवी स्वारी दक्षिणेत जाण्यास धाडली त्या मुस्लिम सैन्यासह त्यांनाही प्रमुख पदें नि अधिकार देऊन पुढे सन १३३१ मध्ये धाडलें. पण दक्षिणेत येताच—

बहुधा पूर्वसंकेताप्रमाणे

त्यांची त्या वेळचे संकेश्वराच्या शंकराचार्य पीठाचे अधिकारी असताही राज्यकार्यधुरंधर असलेले श्री विद्यारण्यस्वामी यांची भेट झाली. तेव्हा स्वतः त्या शंकराचार्यांच्या हस्तेच त्यापूर्वी बळाने मुसलमान केलेल्या तेजस्वी तरुणांना शुद्ध करून परत हिंदुधर्मात घेण्यात आलें. त्या तरुणांनी नवें हिंदु सैन्य उभारून, जी मुस्लिम सेना त्यांच्या हाताखाली हिंदूंशी लढण्यासाठी म्हणून दक्षिणेत आलेली होती, तिच्यावरच उलटून तिला धुळीस मिळविलें. नंतर विद्यारण्यस्वामी–संकेश्वरचे हे शंकराचार्य यांच्या नि त्या वेळचे अितरही धुरंधर हिंदु पुरुषांच्या अेकमताने तुंगभद्रेच्या काठी, दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाची किंवा कोणत्याही मुस्लिमाची सत्ता नसलेलें संपूर्णपणे स्वतंत्र नि सार्वभौम असें नवें हिंदुराज्य स्थापण्याचें ठरलें. त्याची राजधानी तुंगभद्रेच्या काठी हिंदूंच्या विजयाचें द्योतक असें विजयनगर नांवाचें नवे नगर वसवून तेथे स्थापण्यात आली. त्या राज्याचें आधिपत्य श्री हरिहर यांनाच सन १३३६ त देण्यात आलें आणि स्वतः श्री विद्यारण्यस्वामी त्याचे मुख्य प्रधान झाले.

या सर्व घटनांविषयी अितिहासकारांना आजपर्यंत बहुधा न अुकललेलें अेक कोडें येथे अुलगडून सांगितलें पाहिजे. तें हें की, महंमद तघलख हा जरी वेडा म्हणून अितिहासात अुल्लेखिला जातो तरी तो वेडा नसून फार तर त्याला वेडसर म्हणता येअील. त्याने दिल्लीहून देवगिरीस राजधानी आणण्याचा जो बेत केला तो सुद्धा अगदी वेडाची अेक लहर म्हणून सांगितला जातो तसा नव्हता. तर दक्षिणेत सुलतानांनी जे नवीन विजय संपादन केलेले होते ते पुरतेपणी पचवून टाकण्यासाठी मध्यवर्ती राजधानी आणि तीही दक्षिणेत त्या विजित प्रदेशाजवळ असेल तर तिकडे सुलतानाची सत्ता अधिक प्रबळपणे नांदविता येअील, या मुख्य विचाराने त्याने राजधानी दक्षिणेत देवगिरीला नेण्याची विलक्षण धडपड केली– त्याला केवळ वेडाची लहर आली म्हणून नव्हे! आता देवगिरीला राजधानी आणल्यानंतर लवकरच पुन्हा दिल्लीला राजधानी नेण्याची त्यास जी 'लहर' आली आणि त्यापायी लोकांचे अतोनात हाल झाले तीही महंमद तघलखाची केवळ लहर नव्हती. खरी गोष्ट अशी होती की सुलतानाची सार्वभौम सत्ता, जी दक्षिणेस अलीकडेच दहावीस वर्षें स्थापन झाल्यासारखी वाटली होती, ती तेथील हिंदूना असह्य नि मानहानीची वाटून ती अुलथून टाकण्यासाठी सर्व हिंदुराजांची,

धर्मगुरूंची आणि हिंदु जनतेची मोठी सिद्धता गुप्त रीतीने चाललेली होती, आणि त्या सशस्त्र अुठावणीचा धाक मुसलमानांच्या सैन्यालासुद्धा पडलेला होता. अशाच स्फोटक परिस्थितीत आपण स्वतः त्या वंडखोर हिंदूच्या जाळ्यात जाणून बुजून गुंतून रहावें हें प्रसंगी प्राणघातकही ठरणारें आहे, ही खरी वस्तुस्थिति सुलतान महमंद तघलखाच्या ध्यानात आली आणि म्हणूनच त्याने देवगिरि सोडून राजधानी परत अुत्तरेकडे लांव नेण्याचा वेत तडकाफडकी सिद्धीस नेला.—केवळ त्याला 'लहर' आली म्हणून नव्हे! हिंदूंच्या वाढत्या शस्त्रशक्तीची भीति ही त्याच्या ह्या अुलटसुलट वेडाच्या लहरींच्या गोंधळास आणि घावरगुंडीस कारण झालेली होती!

आणखी अेका महत्त्वाच्या घटनेचें कोडें या प्रकरणी वहुतेक अितिहासकारांच्या लक्षातच आलेलें नाही. पण तें न डावलण्याअितकें आश्चर्यकारक आहे. तें हें की सगम नांवाच्या यादवकुलीन ज्या गृहस्थाचे हरिहर नि वुक्क हे तरुण पुत्र मुसलमानांनी पकडले ते गृहस्थ अनागोंदीच्या नि वरंगळच्या राजांचे निकटवर्ती संवंधी होते. त्यामुळे हे त्यांचे पुत्रही त्या राजघराण्याशी संलग्न होते. त्यांना धरून दिल्लीस नेअून जे मुसलमान करण्यांत आले ते महंमद तघलखाने त्यांचें हें राजकीय महत्त्वही विचारात घअूनच होय. अनेक हिंदु राजांवर असा वळाने मुसलमान केले जाण्याचा प्रसंग आलेला होता. पण अशा भयंकर संकटांतून त्यापैकी कोणी सुटले तरी त्यांना परत हिंदु होण्याची काही आशा नसे. कारण शुद्धिवंदी! याविषयी चर्चा या पुस्तकाच्या पूर्वार्धांत पृष्ठें ७०९ ते ७१४ वर केलेलीच आहे. तरीही हरिहर आणि वुक्क या दोन हिंदु तरुण वीरांमध्ये वळाने मुसलमान केल्यावरही परत हिंदु होण्याची जी धमक निर्मिली गेली आणि विद्यारण्यासारख्या शंकराचार्यांनी शुद्धीविरुद्ध तत्कालीन जनमत नि कलियुगवर्जादिक प्रक्षिप्त पण रूढ शास्त्रें अगदी ताठ विरुद्ध असताही या दोघांना शुद्ध करून घेण्याचें जें धाडस केलें आणि अनेक हिंदु धुरंधरांनी त्या नवीन अुपक्रमाला अुचलून धरलें, त्याची प्रेरणा हिंदूमध्ये कोणत्या कारणाने अशी दूरवर संचरली?

याचें सरळ अुत्तर त्याच घटनेच्या केवळ दहावारा वर्षांच्या आधीच हिंदुसम्राट् धर्मरक्षकाने (नासिरुद्दिनाने) जी अभूतपूर्व राज्यक्रांति नि धर्मक्रांति भर दिल्लीत केली, तीतच सापडतें! कारण सुलतान नासिरुद्दिन हाही मूळचा हिंदु! वळाने बाटवून मुसलमान केलेला! पण अल्लाअुद्दिनाचा नि त्याच्या मुलाचा त्याच्यावर विशेष लोभ जडून त्याला खुश्रूखान ही पदवी देअून चढवीत चढवीत शेवटी त्याचे हाताखाली मोठें मुस्लिम सैन्य देअून सेनापति म्हणून दक्षिणेवर स्वारी करण्यास सुलतानाने धाडलें, अितकें सामर्थ्य हाती येअीतो त्या खुश्रूखानाने बाह्यात्कारी मुसलमानीपणच पाळलें, पण स्वारीहून दिल्लीत परतताच त्याने अकस्मात् मुस्लिम सुलतानाला ठार मारून स्वतः आपण मुळचे हिंदु होतो आणि तोच धर्म

परत स्वीकारीत आहोत, असें अुद्‌घोषून 'हिंदुसम्राट्' म्हणून दिल्लीच्या सिंहासनावर आरोहण केलें! अितकेंच नव्हे तर शतावधि बाटविलेल्या हिंदूची शुद्धि केली, मशिदींचीं मंदिरें केलीं! मुसलमानी साम्राज्य आणि मुसलमानी धर्म या दोहोंवरही हिंदुत्वाची अशी अपूर्व चढाअी करणाऱ्या या हिंदुसम्राटाच्या साऱ्या भारतभर खळबळ अुडविणाऱ्या ह्या क्रांतीच्या बातम्या आधीच पसरलेल्या होत्या. अर्थात् जेव्हा हरिहर नि बुक्क यांना मुसलमान करून दिल्लीस तीन चार वर्षें सुलतान महमदाने निबद्ध करून ठेविलेलें होतें तेव्हा दिल्लीस घरोघर त्या हिंदुसम्राटाच्या हिंदुधर्मक्रांतीच्या अवघ्या दहावारा वर्षांपूर्वी घडलेल्या या अपूर्व घटनेची चर्चा चाललेली त्यांनी अैकली असलीच पाहिजे, आणि तिच्याच प्रेरणेने त्यांनाही मुसलमानांच्या हातून पुन्हा सुटून दक्षिणेस ससैन्य परतण्याची अशक्यप्राय घटना शक्य करण्याचा हाच गुप्त मार्ग आपणही अनुसरावा असें वाटलें असलें पाहिजे! त्याप्रमाणे त्यांनी मुस्लिम सुलतान महंमद तघलख याचा विश्वास पूर्णपणे संपादून आपण दोघेही कट्टर मुसलमान आहोत, असें त्यास भासविलें असलें पाहिजे! म्हणूनच सुलतान महंमदाने त्या हरिहर-बुक्कांना मुस्लिम सैन्याच्या त्या विभागाचें सेनापतिपद दिलें! ज्या वेळी महंमद तघलख देवगिरीहून राजधानी दिल्लीस परत आणता झाला तेव्हा त्याने दक्षिणेत आपल्या मागे सुलतानी सत्ता संभाळणारें असें पुरेसें मुस्लिम सैन्य ठेवलेलें नव्हतें. त्यातही दक्षिणेकडच्या संभाव्य हिंदु अुठावाच्या बातम्या आल्या. तेव्हा या दोघा दक्षिणेकडच्या राजकुटुंबाशी निकट संबंध असणाऱ्या तरुणांनाच ते आता कट्टर मुस्लिम झाले असल्याने मुस्लिम सैन्यासह दक्षिणेत मुस्लिम सत्ता पुन्हा प्रबळ करण्यास धाडावें, असें योजिलें. त्या हरिहर-बुक्कांना हवी होती तीच संधि मिळाल्याने त्या दोघांनीही तें कार्य पार पाडण्याचा विडा अगदी आवेशाने अुचलल्याचें बाह्यात्कारी भासविलें. बाटलेल्या हिंदूंना मुस्लिम सत्ता वाढविण्यास धाडण्याचा दिल्लीच्या सुलतानांचा हा प्रघातच होता आणि तसे प्रयोग मलिककाफुरादिक अनेक अुदाहरणांत यशस्वीही होत असत. सुलतानाच्या या वरील आज्ञेप्रमाणे मुस्लिम सैन्य घेअून दक्षिणेतील हिंदुराजांचें बंड मोडून काढण्यासाठी म्हणून दक्षिणेकडे हरिहर नि बुक्क जे गेले ते थेट त्यांच्या मूळ वरंगळ ते अनागोंदी या प्रदेशातच येअून अुतरले.

बहुधा दक्षिणेत येण्याच्या आधीच त्या बंधूंनी त्यांच्या गुप्त बेताची नि मनीषेची सूचना श्रीस्वामी विद्यारण्य नि अितर हिंदुराजमंडळ यांना कळविलेलीही असली पाहिजे. सुलतानाच्या हातावर तुरी देअून निसटून दक्षिणेत ते जे आले आणि पुन्हा हिंदुधर्मात जे अुघडपणे प्रवेश करणार होते, ती प्रेरणा प्रत्यक्ष हिंदुसम्राट् धर्मरक्षक (सुलतान नासिरुद्दिन) याच्या दिल्लीतील धर्मक्रांतीमुळे दक्षिणे-

तील राजमंडळात आणि शंकराचार्यादि धर्मगुरूंतही आधीच संचरलेली होती. त्यामुळे हरिहर आणि बुक्कांनाही समारंभपूर्वक शुद्ध करून घेण्याचें स्वामी विद्यारण्य प्रभृति हिंदुधर्म धुरंधरांनी वीरवर हरिहर आणि बुक्क यांच्या संमतीने ठरविलें.

हिंदुसम्राट् श्री धर्मरक्षक (नासिरुद्धिन) याने दिल्लीस केलेल्या राज्यक्रांतीच्या प्रचंड प्रयोगाचे परिणाम दूरवर झाले असें जें आम्ही मागे पांचव्या प्रकरणाचे शेवटी म्हटलें आहे तें किती यथार्थ आहे, हें त्या महान् घटनेच्या विजयनगरच्या या राज्यक्रांतीवर झालेल्या या परिणामांवरूनही सिद्ध होईल. आणि तरीही त्या महान् घटनेचा अुल्लेख आजवर अितिहासकारांनी काही तुच्छ लांछनास्पद शब्दांनीच काय तो केलेला असावा ही गोष्ट आजचे अितिहास ग्रंथ हिंदुदृष्टि नसल्यामुळेच असे काही प्रकरणी तरी अगदी अंधळे झालेले आहेत, हेंच सिद्ध करते !

विजयनगरचें हें नवें हिंदुराज्य स्थापणाऱ्या हिंदु पिढीच्या कर्तृत्वाचा जितका गौरव हिंदु अितिहासात व्हावयास हवा आहे तितका अजूनही झालेला नाही. श्री माधवाचार्य अर्थात् संकेश्वरचे शंकराचार्य श्री विद्यारण्य स्वामी यांचेंच अुदाहरण घ्या ! हा अलौकिक पुरुष महान् राज्यक्रांतिकारक कसा होता हें वर सांगितलेंच आहे. परंतु तितकाच तो धर्मक्रांतिकारकही होता, हें त्यांनी त्या वेळच्या रूढ 'शास्त्रास' झिडकारून केलेल्या हरिहर नि बुक्क यांसारख्या राजपुरुषांच्या शुद्धीवरून स्पष्ट होतें. त्याचप्रमाणे ज्ञानातही तो त्या काळच्या विद्वानांचा मुकुटमणि होता. त्यांनी संस्कृत भाषेत अनेक विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्यांतील सर्व-दर्शनसंग्रह आणि पंचदशी हे सुविख्यात आहेत. खरोखर आद्यशंकराचार्यांनंतर असा शंकराचार्य शृंगेरीपीठावर तर काय, पण कोणत्याही धर्मपीठावर आरूढलेला आढळत नाही ! त्यातही नवीन स्थापन झालेल्या या हिंदुराज्याचा राजा जो पराक्रमी वीर हरिहर त्याचें मुख्य प्रधानत्व स्वीकारून तें राज्य प्राथमिक अवस्थेत असलेल्या अत्यंत कठीण परिस्थितीत साऱ्या मुसलमानांच्या छातीवर वाढवून दाखविण्यात त्यांनी जें राज्यव्यवहारी नैपुण्य नि कूटनीति प्रकट केली त्यास तर दुसरी तोडच सापडणार नाही ! ज्याप्रमाणे राणा प्रताप, राजा छत्रसाल, गोविंदसिंह, चैतन्य, बंदाबैरागी अित्यादि हिंदुराष्ट्रातील त्या काळच्या महापुरुषांचीं नांवें आपणा हिंदूच्या तोंडी रुळलेलीं आहेत, त्याप्रमाणे या विजयनगरच्या राज्यकालातील वरील विद्यारण्य स्वामी, वीरवर हरिहर, बुक्क, महाराजाधिराज पदवी धारण करणारे दुसरे हरिहर, आणि त्यांचे प्रधान सायणाचार्य – जे विद्यारण्य स्वामींचे बंधु होते आणि ज्यांनी वेदांवर आजही अधिकृत मानलें जाणारें महाभाष्य लिहिलें, महाराजाधिराज कृष्णदेवराय, आणि त्या वेळच्या आदिलशाही, निजामशाही अित्यादि मुसलमानांच्या महाराष्ट्रातील पांची सुलतानांचा वारंवार पराभव

करणारा, पण अंती सर्व मुसलमान सुलतानांनी अेकत्र होअून केलेल्या स्वारीतही, राक्षसतंगडीच्या संग्रामात त्यांच्याशी शेवटपर्यंत अभिमुख लढत असता शत्रूकडून ज्याचा शिरच्छेद केला गेला तो, 'दन्तच्छेदो हि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे' या न्यायाने, महाराजाधिराज रामरायही – ह्यांचीं नांवेंही आमच्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील महापुरुष म्हणून सर्वतोमुखी रुळलीं पाहिजेत ! परंतु आज अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंना या नांवाचा बहुधा पत्ताही नसतो. आणि अिकडे दक्षिणेत सुद्धा सहस्रांत अेकाद्या हिंदूलाच ती पुसटपणे अैकल्यासाररखें वाटतें, ही लज्जास्पद स्थिति पालटली पाहिजे.

बहामनी राज्याची स्थापना

विजयनगरचें हिंदुराज्य स्थापन होअून दिल्लीच्या सुलतानाच्या सार्वभौम सत्तेचे तुकडे तुकडे दक्षिणेत पाडण्यात आले, हें पाहताच सुलतान महंमद तघलखाने पूर्वी देवगिरीहून दिल्लीला राजधानी परत नेताना दक्षिणेकडच्या मुस्लिम सत्तेचा कारभार पाहण्यासाठी हसन गंगू नांवाचा जो अेक प्रबळ सुभेदार मागे ठेवला होता, त्यानेही त्याचा धनी असलेल्या त्या दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाविरुद्धच बंड केलें आणि नर्मदेखालच्या कृष्णेपर्यंतच्या प्रदेशाचा सुलतान म्हणून आपली स्वत:चीच घोषणा करून अेक 'बहामनी' नांवाचें स्वतंत्र मुस्लिमराज्य सन १३४६ मध्ये स्थापलें आणि गुलबर्गा येथे आपली राजधानी केली. विजयनगरच्या हिंदुराज्य स्थापनेनंतर अवघ्या दहा-अकरा वर्षांनी हें बहामनी मुस्लिम राज्य स्थापन झाल्यामुळे साऱ्या दक्षिणेतील दिल्लीच्या सुलतानाची सत्ता अुखडली जाअून दक्षिणेत दोन प्रमुख राज्यें काय तीं अुरलीं, अेक हें बहामनी राज्य, व दुसरें विजयनगरचें. बहामनी हें नांव त्या हसन गंगूने जें धारण केलें त्याच्या दोन अुपपत्ति अितिहासात प्रचलित आहेत. हा हसन पूर्वी गुलाम असताना दिल्लीच्या अेका गगू नांवाच्या ब्राह्मणाच्या घरी चाकर म्हणून राहिलेला होता. त्या गंगू ब्राह्मणाने त्याच्या अेकनिष्ठ सेवेवर संतुष्ट होअून आणि त्याची कुंडली पाहून त्याला आशीर्वाद दिला होता की, 'तू केव्हा तरी राजा होशील !' तें अैकताच हर्षभरित होअून हसन आपणा स्वत:ला हसन गंगू म्हणून म्हणवून घेअू लागला आणि खरोखरीच दक्षिणेचें राजपद हाती येताच तो आपल्या ब्राह्मण धन्याचा प्रसादच आहे असें भावून त्याने त्या आपल्या राज्याचें नांव **'बहामनी राज्य'** असें ठेवलें. दुसरी अुपपत्ति काहीजण सुचवितात तो ही की अिराणातल्या बहमनी नांवाच्या अेका राजकुलाशी आपला संबंध आहे असें हसन गंगूला वाटत असावें म्हणून त्याने आपल्या या राज्यास बहामनी असें म्हटलें. पण मग तो स्वत:च्या नांवात हसन गंगू असा त्या ब्राह्मणाच्या नांवाचा अुल्लेख मात्र शेवटपर्यंत जो करीतच राहिला तो कां ? आणि त्याचा अिराणतल्या बहमनी राजकुलाशी संबंध होता याला तरी पुरावा असा काहीच नाही!

ह्या बहामनी राज्याची सीमा विजयनगरच्या तुंगभद्रा नदीच्या सीमेशी भिडलेली होती. त्यामुळे या दोन्ही राज्यांत सारखीं युद्धें चालू राहिलीं. पण ज्यांना विजयनगरच्या हिंदुराज्याचा आणि तदनुषंगे या बहामनी राज्याशी त्याच्या झालेल्या युद्धांचा, त्यांच्या अतिवृत्ताचा अतिहास अधिक सविस्तरपणे वाचावयाचा असेल त्यांनी पुढील दोन पुस्तकें अवश्य वाचावीत. (१) The Forgotten Empire (२) The Never to be Forgotten Empire, पहिला ग्रंथ अेका ब्रिटिश विद्वानाने लिहिला असून दुसरा त्याला काही अंशी प्रत्युत्तर देणारा संशोधनात्मक ग्रंथ दुसऱ्या अेका विद्वानाने लिहिलेला आहे.

कारण हा सर्व अितिहास सांगण्याचें स्थळ हा ग्रंथ नव्हे. हा ग्रंथ अितिहास-ग्रंथ नसून अितिहासाचें अेक समीक्षण आहे, हें आम्ही प्रथमपासूनच सांगत आलो आहोत. तथापि समीक्षणापुरत्या तेवढ्या काही अुल्लेखनीय घटनांचें कथन येथे करीत आहोत.

विजयनगरची बांधणी

विजयनगर ही राजधानी ज्या स्थली स्थापण्याचें विद्यारण्य प्रभृति धुरंधर हिंदु नेत्यांनी ठरविलें तें तुंगभद्रेच्या काठचें स्थळ स्थापत्यशास्त्राच्या नि सैनिकी दृष्टीनेही अशा वळकट परिसरात निवडलें गेलें होतें की परकीय तज्ज्ञप्रवासीही त्या संस्थापकांच्या सैनिकी शिल्पशास्त्रीय दृष्टीची प्रशंसा करतात. या स्थळाच्या तिन्ही बाजूंनी अुंच टेकड्या आहेत आणि चौथ्या बाजूस खोल नदी आहे. त्यामुळे तेथे स्थापलेल्या या राजधानीच्या विशाल नगरास अेक प्रकारे निसर्गानेच प्रचंड तटबंदी अुभारल्याप्रमाणे सुरक्षितता आणलेली होती. ह्या नगराभोवती अेकाच्या आत दुसरा असे अनुक्रमे सात वळकट तट बांधलेले होते. त्या प्रत्येक विभागात अेकाहून अेक अशीं भव्य नि शोभिवंत मंदिरें, भवनें, प्रासाद आणि जलाशय निर्मिलेले होते. त्या सर्व भवनांवर, मंदिरांवर आणि मुख्य राजप्रासादावरही मोठ-मोठे सुवर्ण कलशमंडित भगवे ध्वज फडकत. कारण विजयनगर राज्याचा अधिकृत ध्वज, जो हिंदुराष्ट्राचा परंपरागत भगवा ध्वज होता, तोच भगवा ध्वज होता!

या सर्व मंदिरांमध्ये जे अत्यंत भव्य, प्रकांड आणि विस्तीर्ण मंदिर होतें तें श्रीनृसिंहाचें मंदिर होय! विजयनगरच्या सिंहासनाचें कुलदैवतच नृसिंह हें होतें! हिंदुस्थानात नृसिंहाचीं देवालयें क्वचितच आढळतात. परंतु विजयनगरच्या ज्या ज्या राजांनी आपलें कुलदैवत, आपलें अुपास्य, आपला आदर्श अनेक देवांतून आणि दैवतांतून नृसिंह अवतार हाच निवडला, त्यांची प्रतिभा नि समयज्ञता ही निःसंशय वाखाणण्यासारखी होती.

कारण त्या काळातील हिंदूचा बुद्धकालापासूनच अतिरेकी अहिंसेच्या खुळा-पायी सौम्य, नेभळट नि सोसाळू होत आलेला समाज आणि त्यांच्यावर तुटून

पडलेल्या मुसलमानांचा धर्मांध, क्रूर नि नृशंस राक्षसी समाज, यांच्या संघर्षांत प्रसंगोचित प्रत्याघातक कूटराजनीति आणि शत्रूस थरकापविणारा क्रूर पराक्रम ह्यांना हिंदूंच्या अंगी स्फुरविणारें जागृत दैवत जर आम्हा हिंदूंच्या पुराणांतरी कोणतें अेखादें आढळणारें असेल तर तें श्रीनृसिंहाचेंच होय!

व्रजन्ति ते मूढधियः पराभवम् । भवन्ति मायाविषु ये न मायिनः ॥
साध्वाचारो साधुना प्रत्युपेयः । मायाचारो मायया बाधितव्यः ॥

नृसिंहाची कथाच सांगते की प्रल्हादाच्या सद्गुणविकृतीने नव्हे,
तर तो क्रूर राक्षस क्रूर कूटनीतीनेच मारला गेला!

हिरण्यकश्यपूला श्रीशंकराने, 'तुला दिवसा किंवा रात्री, ना आत ना बाहेर, आकाशात वा पृथ्वीवर, शस्त्राने वा अस्त्राने, पशु वा मनुष्य कोणीही मारू शकणार नाही,' अित्यादि जे वर दिले होते, त्या सर्वांवर जशास तशा पुढील अनुक्रमें विस्मयकारक तोडी काढून हिरण्यकश्यपूला संध्याकाळी, अुंबऱ्यावर, ओढून मांडीवर अुतागा पाडून, स्वतःच्या करकच नखाग्रांनी त्याचें पोट फाडून, ना पूर्ण नर ना पूर्ण पशु असें नृसिंह स्वरूप घेअून त्या देवाच्या शत्रूला ठार केलें ! त्या दुष्ट दैत्याच्या अंगातून अुडणाऱ्या रक्ताच्या कारंजाने ज्याच्या साऱ्या देहास रक्त-स्नान घडलें आहे, ज्याच्या भयंकर सिंहगर्जनांनी सारा ब्रह्मांडकटाह गडबडून गेला आहे आणि ज्याच्या क्रोधाविष्ट, अुभारलेल्या नि अुगारलेल्या आयाळाच्या सटाने अक्राळविक्राळ दिसणाऱ्या सिंहस्वरूपास पाहून देवही भयाने थरथर कापत, 'शांत हो ! शांत हो !' म्हणून प्रार्थना करू लागले आहेत अशी ती नृसिंहाची अक्राळ-विक्राळ मूर्तीच ह्या संघर्षसंकुल राक्षसी जगात ज्या राष्ट्राला जगावयाचें असेल त्याने आपलें अुपास्य दैवत म्हणून आणि राष्ट्रीय पराक्रमाचा आदर्श म्हणून आपल्या राष्ट्रमंदिरात पुजिली पाहिजे!

या कथेत आणखीही अेक अत्युदार मर्म अनुस्यूत आहे. तें हें की वरील सिंहा-सारखा निर्दय नि अनिवार्य पराक्रम करणाऱ्या ह्या नृसिंहावताराचें मूर्त स्वरूप जरी असें अक्राळविक्राळ असलें तरी त्याचें अंतःकरण हें नराचें आहे, मानवतेचें आहे. त्याचा तो क्रूर पराक्रमही मानवतेच्या विकासाला अत्यंत आवश्यक असाच आहे, अनिवार्य म्हणूनच आहे. कारण देव, दैत्य, दानवांचाही थरकाप अुडविणारें त्या अन्यायी, लोकप्रपीडक नि देवद्रोही हिरण्यकश्यपूचें पोट फाडून त्याला ठार करणारें अत्युग्र कृत्यही देवपूजक म्हणून दैवी, न्यायी अशा प्रल्हादासारख्या सज्जनांच्या रक्षणासाठीच अपरिहार्य म्हणूनच काय तें आचरिलें गेलें होतें! मानवी सद्गुणांच्या विकासासाठीच मानवांना जी दुबळेपणाच्या शापाने पंगु बनविते अशा अहिंसेचा प्रसंगी क्रूर हिंसेनेही बळी घेतला पाहिजे—तेंच मानवी विकासार्थ अशा प्रसंगी सत्कर्म, सद्धर्म असतें ! जगातील मनुष्यजातीच्या त्या काळच्या अपूर्ण

विकासाच्या पातळीवर. राक्षसी हिंसेने आणि स्वार्थी महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या राष्ट्राराष्ट्रांच्या – शत्रुधुमाळीच्या परिस्थितीत हिंदुराष्ट्रालाही आपलें अस्तित्वच नव्हे तर अजिंक्यत्वही स्थापित करण्यासाठी नृसिंहासारखेच अुपास्य दैवत असलें पाहिजे होतें !

विजयनगरच्या राजांनी निवडलेल्या ह्या श्रीनृसिंहाच्या अुपास्य दैवताचें जें भव्य मंदिर विजयनगर ह्या राजधानीत अुभारलें होतें असें जें आम्ही सांगितलें आहे, तें जसेचे तसें आज अस्तित्वात नाही. मुसलमानांनी विजयनगर जेव्हा अुद्ध्वस्त केलें तेव्हाच त्या रानटी विध्वंसकांनी तें नृसिंहाचें राजमंदिरही पाडून तोडून नष्टप्राय करून सोडलें. तथापि अशा अत्यंत भग्नावस्थेतही त्या देवालयातील श्रीनृसिंहाच्या मूळ मूर्तीचा जो अवशेष आजही दिसतो आहे त्यावरूनही त्या मूर्तीच्या मूळच्या भव्य, भयंकर नि प्रचंड स्वरूपाची कल्पना येते. तें श्रीनृसिंहाचें देअूळही त्याच्या मूळ स्वरूपांत आणि मूळ वैभवात किती प्रकांड, स्फूर्तिदायक आणि हिंदुस्थानातील मोठमोठ्या देवालयांतही आपल्या अप्रतिमतेने अुठून दिसणारें असलें पाहिजे, हें ध्यानात येतें !

विजयनगरच्या राजाने बहामनी सुलतानाचा केलेला पराभव

वीरवर हरिहर याच्या मृत्यूनंतर वीरवर बुक्क हा विजयनगरच्या सिंहासनावर बसला. हा बुक्करायही पराक्रमी आणि प्रत्याक्रमक होता. त्याने स्वत:च्या घरात बसून घराचें नुसतें संरक्षणच केलें नाही तर मुसलमानांवर प्रत्याक्रमणें करून सन १३७४ चे आगेमागे बहामनी राज्याचा सुलतान मजाहिदशाह याचा मोठा पराभव केला.

ह्या वीरवर बुक्काने चीनच्या राजाकडेही शिष्टमंडळ पाठविल्याचा अुल्लेख सापडतो. सन १३७९ मध्ये हा पराक्रमी राजा बुक्क मरण पावला. त्या वेळी त्याची गर्भवती असलेली राज्ञी गौरी हिच्या पोटी जन्मलेला त्याचा मुलगा हरिहर दुसरा हा आपल्या पैतृक सिंहासनावर बसला. त्याच्या राजवटीत मुसलमानांवर हिंदूंनी वारंवार विजय मिळवून विजयनगरचे राज्याचा विस्तार केला तेव्हा हरिहराने मोठ्या समारंभाने 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली. माधवाचार्यांचे (विद्यारण्य स्वामींचे) बंधु श्री सायणाचार्य, हेच ह्या महाराजाधिराज हरिहराचे मुख्य प्रधान होते. सुद्द, अिसग, गुण्ड ह्या नांवाचे त्याचे प्रसिद्ध सेनापति होते. हरिहराच्या पट्टराणीचें नांव मल्लंबिका असें होतें. महाराजाधिराज हरिहराच्या राजवटीत विजयनगरच्या राज्याचा विस्तार पुष्कळच वाढलेला होता. गोमंतकही त्याच्याच राजसत्तेखाली नांदत होता. ह्या हरिहर महाराजाच्या सन १३९१ तील अेका ताम्रपटात 'गोवाभिधां कोकणराजधानीम्' असा अुल्लेख केलेला आहे.

ह्या ग्रंथामध्ये विजयनगरच्या किंवा कोणत्याही राजकुलातील पुत्रपौत्रादिकांच्या नामावली किंवा सविस्तर वृत्तान्त देणें अशक्य नि अनवश्यक आहे. म्हणून येवढेंच सांगतो कि दुसऱ्या हरिहराच्या मागून जे राजे झाले तेही विजयनगरचे वैभव टिकविणारे नि वाढविणारेच झाले. त्यांमध्ये अेक अपवादास्पद नि काही अंशी खुळचट नि दुर्बळ राजा झाला त्याचा दुर्दैवी अुल्लेख केला पाहिजे. त्याचे नांव देवराय असें होतें. तो सन १४०६ त गादीवर आला. मुसलमानांविरुद्ध तो जळफळतच असे. पण मुस्लिमांना हाणून पाडण्यासाठी त्याने जी विक्षिप्त तोड काढली ती अशी की मुसलमानी सुलतानांच्या हाताखाली जशीं हिंदू सैन्यें त्यांचे चाकर म्हणून लढतात त्याप्रमाणे आपणही आपल्या सैन्यात मुसलमानी सैनिकांची भरती करून आपलें सैन्यबळ वाढवावें ! त्याप्रमाणे त्याने अनेक मुसलमानांची सैन्यात भर केली पण त्याचा दुर्बळ स्वभाव पाहून ते मुसलमान अितके शेफारले की, भर राजसभेत ते रीतीप्रमाणे महाराजांना मुजरा करीतनासे झाले आणि अुद्दामपणे म्हणाले " आमच्या धर्माप्रमाणे अेका ' अल्लाला ' सोडून कोणापुढेही आम्ही मान वाकवीत नाही. " तेव्हा त्यांच्या समाधानासाठी देवरायाने आपल्या सिंहासनापुढे अेका अुंच पीठावर कुराणाचें पुस्तक ठेविलें. त्यामुळे स्वतःचा मान राहून मुस्लिम कुराणास मुजरा करतात, राजास नव्हे, असें बाह्यतः दिसे. त्याचप्रमाणे मुसलमानांना प्रसन्न करण्यासाठी त्या राजाने विजयनगरला अेक मशीदही बांधली. अशा शेफारून ठेवलेल्या मुस्लिम सैनिक चाकरांनी भर लढाअीत देवरायाचा विश्वासघात केला हें सांगणें नकोच.

याचें प्रत्यंतर लगेच थोडचा दिवसांत दिसून आलें. त्या वेळी फिरोजखान हा बहामनी सुलतान त्या मुस्लिम राज्यावर होता. त्याच्याशी झालेल्या अनेक युद्धांत शेवटी देवरायाचा पराभव झाला आणि मुसलमानांच्या राक्षसी रूढीप्रमाणे फिरोझखानाने संधि करताना देवरायाने आपली मुलगी फिरोझला दिली पाहिजे, ही अट घातली. निरुपायाने देवरायाने ती मान्यही केली. ही रजपुती कन्यादानीय शरणागतीची खोड सुदैवाने दक्षिणच्या अितिहासात दहापांच दुर्बळ राजांनीच काय ती त्या दोनशे तीनशे वर्षांत अनुसरलेली आढळते. अर्थात् हेंही ध्यानात ठेविलें पाहिजे की मुसलमानांवरही हिंदूंनी जे मोठमोठे विजय त्या काळात मिळविले त्या वेळी शरण आलेल्या कोणत्याही मुस्लिम सुलतानाला वा बादशहाला त्याची मुलगी त्या विजेत्या हिंदु राजाला दिली पाहिजे, अशी अट काही कोणत्याही हिंदु राजाने घातली नाही ! कारण अुघडच आहे ! कोणी मुसलमानाच्या मुलीशी लग्न करता तर तो हिंदुराजाच मुसलमान होअून जाता ! हिंदूंच्या ह्या धार्मिक दुर्गुणाचे, ह्या ' सद्गुणविकृतीचे ' दुष्परिणाम हिंदूंना कसे भोगावे लागले तें शुद्धीबंदीविषयक प्रकरणातून या ग्रंथाच्या पूर्वार्धात सविस्तरपणे सांगितलेलें आहे. (पृष्ठे ७१८ ते ७३६.)

हिंदूंनी मुस्लिमांचा केलेला पराभव नि अुगवलेला सूड !

तथापि देवरायाच्या मृत्यूनंतर सिंहासनावर आरूढ झालेल्या राजांनी या पराभवाचें अुट्टें काढून हिंदु राज्याचा प्रभाव सर्व मुसलमानी राज्यांवर पुन्हा पाडला. विशेषत: सन १४१७ साली फिरोजखानाने तेलंगणच्या प्रदेशावर जी स्वारी केली तीत मुसलमानांच्या मुख्य वझिरालाच ठार मारून मुसलमानांची हिंदूंनी अगदी दाणादाण अुडवून दिली आणि पूर्वीच्या वैराचा सूड अुगविला !

अि. सन १४६० च्या आसपास विजयनगरच्या राजकुलांत सत्तेविषयी तंटे वखेडे माजले. ती संधि साधून विरूपाक्ष या नांवाच्या राजाच्या राजवटीत शाल्व नरसिंह नांवाच्या त्याच्या प्रबल सरदाराने त्याला गादीवरून काढून टाकून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली आणि राज्याची घडी नीट बसवण्यासाठी प्रयत्न केले. मूळच्या यादवकुलीन सगम घराण्याचा ह्या प्रकारे शेवट झाला.

युरोपियन राष्ट्रांची हिंदूंवर धाड पडते

याच कालखंडात यूरोपातील पोर्तुगीझ लोकांना हिंदुस्थानचा जलमार्ग सापडून त्यांचा हिंदुस्थानात राजकारणीय प्रवेश झाला ! तो प्रवेश विजयनगरच्या राज्यात जरी नव्हता तरी हिंदुस्थानच्या दक्षिण टोकाला सामुद्रीन (झामोरीन) राजाच्या प्रदेशात झाला. त्या काळी अगदी क्षुल्लक भासणारी ही घटना येथे कालक्रमणासाठी नुसती अुल्लेखून ठेवलेली आहे. पण तिच्याच मागोमाग अनेक युरोपियन राष्ट्रांची नवी टोळधाड हिंदुस्थानावर पडणारी होती. त्या समग्र प्रकरणाचा परामर्ष नि समीक्षण यथासमय स्वतंत्र प्रकरणातून या ग्रंथात पुढे केलें जाओलच.

महाराजा नरेश

येथे विजयनगरच्या कथानकाचा धागा हाती घ्यावयाचा म्हणजे हें सांगितलें पाहिजे की अेक दोन पिढ्यांतच वरील शाल्व नरसिंहाच्या दुसऱ्या राजकुलाचाही अंत होअून नरेश नांवाच्या त्याच्या सेनापतीने अि. सन १५०७ मध्ये त्या वेळच्या राजाचा वध करून विजयनगरच्या सिंहासनावर आपल्या तिसऱ्या घराण्याची सत्ता चालू केली या तिन्ही राज्यकर्त्यांत अेक त्यांतल्या त्यात समाधानाची गोष्ट आढळून येते ती ही की, मुस्लिम सुलतानांचीं राज्यें चारी बाजूंना या हिंदु महाराज्याचा प्राण घेण्यास टपून बसलेली असताही आणि या दोघा मुस्लिम पक्षांत युद्धेंही सतत चाललेलीं असताही विजयनगरच्या ह्या राज्यक्रान्त्या हिंदु-हिंदूंतच होत राहिल्या. त्यांत परकीय मुसलमानांना हिंदूंतील या वा त्या पक्षास आपलें साहाय्य देण्याच्या मिषाने मुस्लिम सत्तेचें बोट या हिंदूंच्या घरगुती कलहात

शिरकविण्याची संधिसुद्धा या मुस्लिम सुलतानांना मिळाली नाही किंवा तें साहसही त्यांना करवलें नाही !

बहामनी मुस्लिम राज्याचे तुकडे पडतात

वरील तिसरी राज्यक्रांति विजयनगरच्या राज्यांत होण्यापूर्वीच विजयनगरच्या शत्रुस्थानी असणारें बहामनी मुस्लिम राज्य भंगून जाऊन त्याचे पांच तुकडे पडले. बहामनी सुलतानांनी नर्मदेखाली तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश प्रथम जिंकून घेतलेला होता. पण विजयनगरच्या प्रबळ हिंदुराज्याशी त्या मुस्लिम सुलतानांच्या राज्याची सीमा कृष्णा तुंगभद्रा यांतील दुआबात अगदी खेटून असल्याकारणाने त्यांच्यात वारंवार युद्धें होत. त्यात विजयनगरच्या हिंदुराजांनी मुस्लिमावर जे वारंवार विजय मिळविले त्यायोगे गोमंतकासारखे अनेक प्रदेश जिंकून आपल्या हिंदुराज्यास जोडले. ओरिसापर्यंत विजयनगरच्या 'रायांची' सत्ता वाढत गेलेली होती, यामुळे तर ती बहामनी मुस्लिम सुलतानशाही आधीच दुबळली होती. त्यांतही तिचे शेवटचे सुलतान टाकाऊच निघाले. तथापि महंमद गवान नांवाचा त्याचा शेवटचा वझीर जो झाला तो त्यांच्या दृष्टीने कर्तबगार नि लढाऊ असा होता. त्याच्या प्रामाणिक सेवेने, पराक्रमाने नि शहाणपणाने तें मुस्लिम राज्य कसेंबसें सन १४८४ ते १५२६ पर्यंत टिकलें. परंतु त्या मुसलमानी सुलतानाच्या दरबारातील महंमद गवानाचें शत्रुत्व करणाऱ्या मुस्लिम सरदारांनीच अगदी वृद्धपणी महमद गवानाला ठार मारलें. हें ध्यानात ठेवण्यासारखें आहे की महंमद गवान हा कितीही थोर पुरुष असला तरी जवळ जवळ सर्व मुस्लिम सत्ताधाऱ्यांप्रमाणे त्याने बहामनी राज्यात हिंदूंचा छळ करण्यात काही हातचा राखून ठेवला नाही. तथापि तो जो ठार मारला गेला तो हिंदूंच्या हातून नव्हे, तर त्याच्या मुस्लिम सहकाऱ्यांकडूनच होय !

महमद गवानाच्या मृत्यूपूर्वीच बहामनी सुलतानाची राजधानी बिदर येथे गेलेली होती. महमद गवानाच्या मृत्यूच्या आगेमागेच ती दुर्बळ बहामनी मुस्लिम सत्ता पुरती कोसळून पडली आणि तिचे अेकामागून अेक असे पांच तुकडे झाले. ते असे :—

(१) विजापूरचें आदिलशाही राज्य
(२) बऱ्हाडचें अिमादशाही राज्य (१४८४–१५०३)
(३) गोवळकोंड्याचें कुतुबशाही राज्य
(४) अहमदनगरचें निजामशाही राज्य (१४८९ ते १६३७)
(५) बेदरचें बेरीदशाही राज्य.

ह्या मूळ बहामनी सुलतानशाहीचे पांच तुकडे जे पडले त्यांत हिंदूनी विशेष लक्षात ठेवण्यासारख्या दोन घटना तरी सांगितल्या पाहिजेत. पहिली घटना म्हणजे

ही की वर दुसऱ्या क्रमांकाच्या वऱ्हाडच्या अिमादशाहीच्या जो अुल्लेख केलेला आहे तिचा संस्थापक हा मूळचा अेक तेलंगी ब्राह्मणच होता ! ह्याचा बाप विजयनगरात रहात असे. विजयनगराशी मुसलमानांच्या झालेल्या अेका लढाअीत त्या तेलंगी ब्राह्मणाचा हा मुलगा मुसलमानांच्या हाती लागला. मुस्लिमांनी त्यांच्या दुष्ट रूढीप्रमाणे त्या ब्राह्मण मुलास बंदिवान करून त्यास बाटवून मुसलमान केलें आणि आपल्याबरोबर नेलें. तो पुढे महंमद गवानच्या कृपेने हळू हळू मोठ्या योग्यतेस चढला. शेवटी त्याने सन १४८४ मध्ये बहामनी राज्यातून फुटून स्वतंत्रपणे – पण मुसलमान म्हणून–अिमादशहा असें नांव धारण केलें आणि त्याची नेमणूक ज्या सुभ्यावर झालेली होती त्या वऱ्हाडचा सुलतान म्हणून तो स्वतंत्रपणे राज्य करू लागला – पण मुसलमान म्हणूनच!

दुसरी लक्षणीय घटना म्हणजे बहामनी राज्याच्या पडलेल्या तुकड्यांपैकी वर अुल्लेखिलेल्या चौथ्या क्रमांकाच्या नगरच्या सुलतानशाहीची स्थापना ही होय. विजयनगरास तिम्मप्पा बहिरू (भैरव ?) नामक अेक ब्राह्मण होता. तिम्मप्पाच्या मुलाला अहमदशहाचें विजयनगराशी युद्ध चाललें असता मुस्लिमांनी बंदिवान करून आणलें आणि त्यास मुसलमान केलें. त्याचें नांव अहमद असें ठेवलें. ह्या बाटग्या अहमदची अेका मोठ्या मुस्लिम सैन्याच्या विभागावर पूढे नेमणूक होताच त्याच्या आधारे सन १४८९ त बहामनी राज्यातून फुटून अहमदनगर येथे त्याने स्वतंत्र मुस्लिम सुलतानशाहीची स्थापना केली. त्याच्या निजाम या पदवीमुळे ती सुलतानशाही निजामशाही या नांवानेच प्रसिद्धि पावली. त्याने जिंकलेल्या प्रदेशातच सुप्रसिद्ध शिवनेरी गड हा होता. त्या प्रदेशातच दौलताबाद नि जुन्नर ह्यांचे मध्यंतरी विकर म्हणून अेक खेडें होतें. तें त्यास राजधानी करण्यास सोयीचें वाटल्यावरून तेथे त्याच्याच अहमद या नांवावरून त्या खेड्यास अहमदनगर असें नांव त्याने दिलें आणि तेथे सन १४९४ त राजधानी केली.

ह्या मुस्लिम राज्याचे हे जे तुकडे पडले ते मुस्लिमांच्या आपसांतील यादवीमुळेच मुख्यतः पडले हें लक्षात घेण्यासारखें आहे. मूळच्या बहामनी सुलतानशाहीने विजयनगरच्या हिंदुराज्याचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञाच केलेली होती. पण लढता लढता बहामनी सुलतानशाहीचेच मुस्लिमांच्या स्वतःच्या दौर्बल्याने आणि कलहापायी पांच तुकडे पडलेले पहाण्यास हिंदूंचें तें विजयनगरचें महाराज्य टिकून राहिलें आणि त्यानतरही त्या पांची मुस्लिम राज्यांच्या तुकड्यांशी रणांगणात ठाण मांडून हिंदु पक्षाचे वतीने अनेक वर्षें झुंजत राहिलें होतें ! निदान पुढची पाअुणशे वर्षें तरी त्या पांचही मुस्लिम सत्तांना पुरून अुरलें होतें !

मूळ बहामनी मुस्लिम सुलतान शाहीतील कोणीतरी मुस्लिम सरदार प्रबळ होअी आणि मूळच्या सुलतानाविरुद्ध बंड करून आपणा स्वतःसच सुलतान म्हणवून

चेअी, आणि आपलें वेगळें राज्य स्थापी. अशाच क्रमाने ते पांची मुस्लिम सुलतान नि त्यांचीं मुस्लिम राज्यें निर्मिलीं गेलीं होतीं. मुसलमान लोक आपसात लढत नाहीत, ही अनेकांची हिंदुविरुद्ध म्हणून मिरवली जाणारी प्रौढि किती वायफळ आहे, ह्याचें हें बहामनी राज्यातील यादवीचें आणखी अेक ढळढळीत अुदाहरण आहे ! अितकेंच नव्हे तर त्यांच्यातील कलहात काही मुस्लिम सुलतान दुसऱ्या मुस्लिम सुलतानांना हाणून पाडण्यासाठी त्या हिंदूंच्या प्रबळ अशा विजयनगरच्या राज्याचें साहाय्यही अनेक प्रसंगी घेत असत, ही वस्तुस्थिति आम्ही खाली अुल्लेखिणारच आहोत. मुसलमान आपसांआपसांतील कलहांत हिंदूंचें साहाय्य घेत नाहीत ही आढयताही किती निर्मूल आहे, हें विजयनगरच्या साहाय्यासाठी मुस्लिम सुलतान अनेकदा कसे भीक मागत असत ह्यावरूनही तें स्पष्ट होतें !

महाराजाधिराज कृष्णदेवराय

वर अुल्लेखिलेल्या विजयनगरच्या नरेश राजाच्या 'तुळुवी' घराण्यातच कृष्णदेवराय हा प्रभावशाली नि पराक्रमी महाराजा अि. सन १५०९ ते अि. सन १५३० पर्यंत राज्य करून गेला. तो विद्वान् असून त्याचें भाषण चतुर नि लाघवी असे; म्हणून मोठ्या पंडितांवर सुद्धा तो आपला प्रभाव पाडू शकत असे. संस्कृत, तेलगू, तामीळ नि कन्नड विद्यांना त्याच्या राजसभेत अुदार आश्रय मिळत असे. त्याच्या राजसभेत आठ कविश्रेष्ठ होते, त्यांना अष्टदिग्गज असें म्हणत. तो स्वतः ग्रंथकार होता. त्याने लिहिलेला 'आमुक्तामाल्यदा' हा तेलगू ग्रंथ प्रसिद्ध आहे. महाराजा कृष्णदेवराय हा विद्वत्तेप्रमाणेंच शिल्पाचाही मोठा भोक्ता होता. विजयनगर येथील प्रख्यात राममंदिर त्यानेच बांधिलें. अितकेंच नव्हे तर त्याच्या साऱ्या राज्यात ठिकठिकाणी शेकडो गड, कोट, मंदिरें, गोपुरें, मठ नि धर्मशाळा त्याने बांधविल्या होत्या. त्याने ब्राह्मणांना नि देवालयांना अुदारहस्ते दानें दिलीं. वागणुकीत सभ्यता, संभाषणात पटुत्व, राजकारणात सुविचार नि दूरदर्शित्व, तसेंच शत्रूच्या प्रकरणी शौर्य नि कठोरता या गुणांनी त्याचें चरित्र विभूषित झालें होतें. पाश्चात्य नि अितर परकीय अितिहासकारांनी अेकमुखाने महाराजाधिराज कृष्णदेवरायाची अेक थोर नि अनन्यसाधारण राज्यकर्ता अशी प्रशसा केलेली आहे.

महाराजा कृष्णदेवराय हा सज्जानांशी जसा सौम्यपणाने वागे त्याचप्रमाणे त्याच्या धर्मशत्रूंशी आणि राष्ट्रशत्रूंशी तो युद्धात कठोरपणे आणि पराक्रमाने झुंज देअी! त्याला विजापूरच्या आदिलशहाशी झालेल्या निकराच्या युद्धामध्ये विजयश्रीने माळ घातली. आदिलशहाचा पराभव केल्यानंतर महाराजा कृष्णदेवरायाने संधि करताना ज्या संधीच्या अटी मान्य करावयास भाग पाडले त्या म्लेंच्छांच्या तोपर्यंतच्या मिरविल्या जाणाऱ्या डोलाचा अितका चक्काचूर करणाऱ्या आणि हिंदूंचें वर्चस्व स्थापणाऱ्या होत्या की मुसलमानांनी ती शरणागति मोठ्या कष्टाने स्वीकारली !

त्याचें सैन्यबळही प्रचंड नि शक्तिमान् होतें. त्यात सात लक्ष पायदळ, बावीस हजार घोडेस्वार नि पाचशे अेक्कावन्न हत्ती सदोदित सज्ज असत.

महाराज कृष्णदेवरायाच्या राजवटीत विजयनगरच्या राज्याच्या वैभवाचा आणि सामर्थ्याचा कळस झाला. त्याच्या राजसभेत आलेल्या अनेक परदेशी प्रवाशांनी लिहिलेल्या त्याच्या नि त्याच्या राज्याविषयीच्या विस्तृत वर्णनावरूनच हें निर्विवादपणे सिद्ध होतें. त्याच्या स्वरूपाविषयी सुद्धा कित्येक प्रवाशांनी अुल्लेख केलेले आहेत. तो दिसण्यातच देखणा, कर्तृत्वशाली आणि पाहणाऱ्यांचा मनावर छाप पडावी असा तरतरीत दिसत असे.

तो स्वत: वैष्णव असूनही अितर सर्व हिंदूंतील बहुसंख्य वैदिक पक्षाला आणि अल्पसंख्याक जैन, लिंगायत, महानुभाव अित्यादि अितर सर्व पंथीयांना सहिष्णुतेने आणि परस्परांचा येणारा विरोध शक्य तो टाळून टाकण्याच्या कुशल सामंजस्यवृत्तीने साऱ्या हिंदूंमध्ये अेकात्मतेची भावना जोपासीत असे. विजयनगरच्या राज्याच्या स्थापनेपासूनच शंकराचार्य विद्यारण्य स्वामी, सायणाचार्य अित्यादि धुरंधर नेत्यांनी हिंदूंतील सर्व पंथांना परस्परांत कोणताही कलह सहसा येणार नाही, अशीच समतेची आणि सहिष्णुतेची नैर्बंधित राजनीति अंगीकारिलेली होती. लोकात धर्मप्रचारानेही आपण सर्व हिंदु आहोत अशा स्वधर्माभिमानाच्या आणि राष्ट्राभिमानाच्या अैक्य भावनेला बळकटी आणली जात होती. परदेशी प्रवासीही या धर्मसहिष्णुतेचा आणि समतेचा अुल्लेख मोठ्या कौतुकाने करतात.

विजयनगरच्या हिंदुराज्याचें वैभव

विजयनगरच्या नागरिक आणि धार्मिक स्वातंत्र्याविषयीच नव्हे तर त्या राज्याच्या अेकंदर वैभवाविषयी आणि पराक्रमी प्रभावाविषयीही राजकीय प्रवाशांनी असेच गौरवाचे अुद्गार काढले आहेत. अुदाहरणार्थ पोर्तुगीज प्रवासी दुआर्ते वार्बोसा हा जेव्हा विजयनगरच्या राज्यात काही दिवस राहून गेला तेव्हा तो त्या राज्याचें अेकंदर वैभव पाहून थक्क झाला. तो लिहितो, " विजयनगरच्या मार्गांतून सर्व राष्ट्रांच्या नि सर्व धर्मांच्या असंख्य लोकांचा घोळका चाललेला दृष्टीस पडतो. नाना देशातील अनेक व्यापारी नि देशातील अत्यंत अुच्चवर्णीय लोक येथे गोळा होतात. अगदी मूरदेशासारख्या दूरच्या नि परकीय लोकांपासून तो अनेक देशांतील ज्यांना ज्यांना येथे व्यापार करणें आणि राहणें आवडतें असे असंख्य लोक येथील पेठापेठांतून अतिशय मोकळेपणाने आणि सुरक्षित रीतीने रहातात. कोणापासूनही त्यांना कसलाही अुपद्रव होत नाही, किंवा ते कोठून आले, ते कोणता पंथ पाळतात, किंवा ते मुस्लिम, यहुदी वा ख्रिस्ती वा अुच्चवर्णीय दूरवरून आलेले हिंदु आहेत याविषयीही कोणी आक्षेप घेत नाहीत. तथापि त्या सर्वांच्याच संबंधात नैर्बंधिक दृष्टीने कडक न्याय पाळण्यात येतो आणि संरक्षण देण्यात येतें."

अिराणच्या शहाने पाठविलेला वकील अब्दुल रझक याने तर 'अशा प्रकारचें नगर पृथ्वी धुंडाळली तरी पहावयास मिळणार नाही' असें स्पष्टपणे म्हटलें आहे. राजाच्या प्रासादास लागूनच चार विस्तीर्ण रत्नांच्या नि मोत्यांच्या पण्यवीथिका (बाजारपेठा) होत्या. सुवर्ण-रत्न-मौक्तिकांनी त्या नगरातील येते-जाते सहस्रावधि नागरिक अलंकृत झालेले असतात, असेंही परकीय प्रवाशांनी लिहिलेलें आहे. पोर्तुगीझ प्रवासी पोअेस म्हणतो, 'विजयनगरचा विस्तार रोम नगराअितका मोठा आहे.'

विजयनगरचें हिंदु साम्राज्य हें महाराजाधिराज कृष्णदेवरायाच्या राजवटीच्या आधीपासूनच साऱ्या दक्षिणेत अत्यंत प्रबळ म्हणून गाजू लागलें होतें. दक्षिणेत नर्मदेपासून कृष्णा नदीपर्यंत मुस्लिमांचे अेक सोडून पांच सुलतान जरी राज्य करीत होते तरीही त्या सुलतानांच्या बहुतेक कुलांत प्रत्येकी भावाभावांचे तंटे चालूच असत आणि प्रत्येकाच्या घरातील ही घरची गादी कोणी घ्यावी याविषयी तटेवखेडे चालत असतानाच त्या मुस्लिम सुलतानांचीं आपसाआपसांतील युद्धेंही चालूच असत मुस्लिमांची आपसाआपसात माजलेली ही यादवी विजयनगरच्या वळकट नि रणशक्तिशाली हिंदुसाम्राज्याच्या पथ्यावरच पडली आणि सुदैवाने त्या सुवर्णसंधीचा हिंदुसाम्राज्यविस्ताराकडे आणि मुस्लिमांची खोड मोडण्याचे कामी अुपयोग करून घेण्याची बुद्धिसुद्धा त्या वेळच्या हिंदु राजकारणी नेत्यांमध्ये प्रज्वलित होती. यामुळे मुस्लिम सुलतानांना विजयनगरच्या या 'रायांच्या' साहाय्यावाचून वा अनुमतीवाचून दक्षिणेतील राजकारणात स्वतंत्रपणे पाअूल टाकता येत नाहीसें झालें होतें. मुसलमानी राजांच्या आपसाआपसांतील भांडणात विजयनगरच्या हिंदुराजांचें आपल्यासच साहाय्य मिळविण्यासाठी जो तो मुस्लिम गट धडपडत असे. पूर्वी अेकदा वर अुल्लेखिलेल्या त्या दुर्बळ नि किंचित् वेडसर असणाऱ्या राजा देवरायाच्या वेळेस विजयनगरच्या भर राजसभेत अुच्च पीठावर कुराण ठेवण्यासारखीं जीं मुस्लिम अनुनयाचीं भीतिगंडजन्य स्तोमें माजलीं होतीं तीं यच्चयावत् झाडून टाकून हिंदु मन मुसलमानांस महाराजा कृष्णदेवरायापासून कःपदार्थ लेखू लागलें होतें. बहुधा मुसलमानांच्या अनुनयासाठी नि स्वतःच्या परधर्मसहिष्णुतेचा टेंभा मिरविण्यासाठी पूर्वी हिंदुराजे आपण होअून मुसलमानांना आपल्या राजधानीत मशिदी बांधून देत असत! पण आता तशा सहिष्णुतेची कापुरुषता झिडकारून हिंदु सैन्ये मुसलमानी प्रदेशावर स्वारी करून मुसलमानी राजधान्यातील बांधलेल्या मशिदी प्रत्याचार म्हणून, सूड म्हणून धडाधड पाडीत चालले होते! सद्गुणविकृतीचा 'सोसाळू'पणा सोडून जशास तसेंचा 'ठोसाळू'पणा चा खरा सद्गुण प्रदर्शंवू लागले होते!

महाराजा कृष्णदेवरायाचा मृत्यु सन १५३७ मध्ये झाला. याचे आधी थोड्या वर्षांपूर्वी दिल्लीत बाबराचा प्रवेश झाला होता. राणा संगही याचा समकालीन होता.

त्याच्यामागे त्याचा भाऊ अच्युतदेव हा राजा झाला. अच्युतदेवरायाचा सालुव तिम्म या नांवाचा प्रधान होता, तोच पुढे राज्याचीं सारीं सूत्रें हालवीत होता. अच्युतदेवराय सन १५४२ त मरण पावला. त्यानंतर त्याचा अेक मुलगा अल्पवयातच मरण पावल्याने त्याचा पुतण्या सदाशिवराय हा राज्यावर आला. पण या सदाशिवरायास तें राज्य मिळवून देण्याचे कामी मुख्य प्रधान आणि राज्यचालक जो तिम्म त्याचा मुलगा रामराय याचे प्रयत्न अितक्या मोठ्या प्रमाणावर कारणीभूत झालेले होते की थोड्याच दिवसांत सर्व सत्ता प्रबळ नि राज्यकर्ता होण्यास योग्य असलेल्या रामरायाच्या हाती पूर्णपणे गेली. ह्या रामरायासच 'रामराजा' असें म्हणतात.

वीरोत्तंस धर्मवीर राजा रामराय

ह्या रामरायाच्या पराक्रमी राजवटीतही महाराष्ट्रातील पाची मुसलमान सुलतान त्याच्या प्रतापी सैन्याचा लाभ त्यांच्या आपसाआपसांतील सदोदित चालणाऱ्या भांडणांत आपापल्या पक्षास घेण्याचा प्रयत्न वारंवार करीत असत. जरी श्री रामरायाची प्रवृत्ति कट्टर हिंदुत्वनिष्ठ आहे आणि सर्वंच मुसलमानांना ते विश्वासघातकी आणि हिंदुद्रोही समजून साऱ्या मुसलमानी सत्तांचा सारखाच द्वेष करतात आणि त्यांना (मुस्लिमांना) तुच्छपणे वागवितात हें ह्या साऱ्या मुस्लिम सुलतानांना मनातून माहीत होतें, तरीही त्यांना ह्या हिंदु धुरंधराचें पाठबळ मिळविल्यावाचून आपले अेकट्या कोणाचेंही चालणार नाही हें पक्कें अनुभवास आलेलें होतें.

सन १५४३ मध्ये नगरचा निजामशहा नि गोवळकोंड्याचा कुतुबशहा या दोघा सुलतानांच्या मनांत त्यांचें शत्रुत्व करणाऱ्या विजापुरच्या सुलतान आदिलशहाची खोड मोडण्याचें आलें. तेव्हा त्यांनी या श्रीरामराजालाच त्या कामी पुढाकार घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे या त्रिवर्गाने जूट करून विजापुरावर स्वारी केली. या स्वारीमध्ये हिंदु सैन्याने विजापूर राज्यातील मुसलमानांची नुसती लांडगेतोड केली. विशेष गोष्ट म्हणजे ही की आम्ही या ग्रंथात ठिकठिकाणी हिंदूंच्या ज्या घातक दुर्गुणांची निंदा केलेली आहे (पृष्ठ ७२५ ते ७३६ पहावें) त्या सद्गुणविकृतीच्या व्याधीपासून हिंदु मनाची मुक्तता झालेली आहे, हें मुसलमानाच्याही चांगलेंच प्रत्ययास आलें. कारण युद्धाच्या धार्मिक आघाडीवरही हिंदूंनी मुस्लिमांवर चढाअी करून मुस्लिमांनी जीं हिंदु मंदिरें पूर्वी पाडलीं होतीं त्यांचा बचपा घेण्यासाठी अनेक ठिकाणी अनेक मशिदीही अुद्ध्वस्त केल्या. ज्या मुस्लिम वस्तीतून पूर्वी हिंदूंचा छळ होत असे किंवा मुस्लिमांकडून हिंदूंच्या स्त्रियांना बटकी म्हणून वागविलें जात असे तसल्या वस्तीतील मुस्लिमांचीं घरेंदारें जाळून पोळून भस्मसात् केलीं. हिंदूंच्या अशा धार्मिक प्रत्याचारानी मुसलमानी समाजात अेक

नवीनच धाक अुत्पन्न झाला! पूर्वीप्रमाणे मुस्लिम समाज हिंदूंना किड्यामुंगीप्रमाणे बेधडक तुडवीनासा झाला – तर अेखाद्या जिवंत सापाप्रमाणे हिंदु समाजाला वचकू लागला. ह्या युद्धात थोडयाच अवधीत विजापूरच्या आदिलशहाने निजामशहा आणि त्याच्या साहाय्यास आलेल्या सर्वांची काहीतरी समजूत काढून शरणागति पत्करली.

तथापि या तात्पुरत्या तडजोडीने मुसलमानी सुलतानांतील भांडणें काही सदोदितचीं मिटलीं नाहीत. सन १५५७ मध्ये विजापूरच्या आदिलशहाचे मनात त्याचे कल्याणी नि सोलापूर हे दोन दुर्ग नगरच्या निजामशहाने जे गिळले होते त्याचें शल्य डाचतच होतें. ते दुर्ग परत घेण्यासाठी निजामावर स्वारी करण्याचें नक्की करून या कामी आपणांस साहाय्य द्यावें म्हणून विजयनगरच्या श्री राम-राजास आदिलशहाने गळ घातली. त्याप्रमाणे आता विजापूरचें मुस्लिम सैन्य आणि विजयनगरचें त्याच्या साहाय्यास म्हणूनच गेलेलें हिंदु सैन्य अेकत्र होअून नगरच्या निजामी प्रदेशावर चालून गेलें. आपलें साहाय्य घेताजाता या चारी पांची मुस्लिम सुलतानांनी त्यांचीं भांडणें लढविण्यासाठी मागावें या कल्पनेनेच ज्यांच्या मनात मुस्लिमांहून वरचढपणाची भावना आणि भुजांमध्ये वीरश्री संचरलेली असे अशा त्या वेळच्या विजयनगरच्या हिंदु सैन्याचाच नव्हे तर तिकडील अेकंदर हिंदु समाजाच्याच मनातील मुसलमानांविषयीचा पूर्वीचा भीतिगंड नष्ट झालेला होता, हें सांगणें नकोच. त्यामुळे वर अुल्लेखिलेल्या मागच्या विजापूरकरांशी झालेल्या युद्धाप्रमाणेच या निजामशहाशी छेडल्या गेलेल्या युद्धातही हिंदु सैन्याने निजामाच्या प्रदेशातील मुस्लिमांचे, त्यांनी केलेल्या हिंदूंवरील पूर्वीच्या अत्याचारांचें अुट्टें धार्मिक आघाडीवरही अधिकच कठोरपणे नि विस्तृत प्रमाणावर काढलें! केवळ मुस्लिम सैन्याशी लढतानाच नव्हे तर वाटेने जाताना त्या साऱ्या प्रदेशात मुस्लिम समाजाच्या पूर्वीच्या त्यांच्या हिंदूंशी वागण्यात येणाऱ्या अरेरावी वागणुकीचा वचपा काढून त्यांची यथेच्छ लुटालूट केली. त्यांनी जशीं हिंदु मंदिरें ठिकठिकाणीं पाडलेलीं होतीं तशाच त्यांच्या मशिदीही ठिकठिकाणी हिंदूंनी पाडून धुळीस मिळविल्या. लढायांतही मुस्लिमांच्या सैन्यांना आपल्या पराक्रमाने हिंदूचीं सैन्यें अुधळून देत चालला.

या चाळीस पन्नास वर्षांतील हिंदूंच्या ह्या मुसलमानांवर धार्मिक प्रत्याक्रमण करणाऱ्या कठोर वर्तनामुळें तिकडील अेकंदर मुस्लिम समाजच भयभीत होअून गेला. आता त्या मुस्लिम समाजाच्या मनात हिंदूविषयी भीतिगंड अुत्पन्न झाला – तेच अुलट हिंदूंना भिअू लागले! आणि हिंदुलोक आमच्यावर मोठा अत्याचार करीत चाललेले आहेत, क्रूरपणे वागत आहेत, आमच्या धर्माचीसुद्धा नाही ते विटंबना करीत आहेत, असा अेकच आक्रोश मुसलमानांनी हिंदुस्थानभर करण्यास आरंभ केला!

विजयनगरचा विध्वंस

वर वर्णिलेल्या राजा रामरायाने निजामशहाच्या केलेल्या पराभवानंतर आणि विशेषत: हिंदूनी मुसलमानी धर्मावरही अंशत: चढविलेल्या नवीनच प्रत्याक्रमणानंतर दक्षिणेतील त्या चारी पांची सुलतानांचा आणि अेकंदर मुस्लिम समाजाचा थरकाप अुडाला. आणि भीतिजन्य संतापाने ते अत्यंत क्षुब्ध झाले. आपल्याला आपलीं राज्यें टिकवावयाचीं असतील आणि मुसलमान म्हणून जगावयाचें असेल तर आपण सर्व सुलतानांनी आपलीं सर्व वैरें विसरून विजयनगरच्या या मदोन्मत्त हिंदुराजावर सर्वांनी मिळून निकराची चढाअी केली पाहिजे, कारण आपणांपैकी कोणाही अेकटच्या दुकटच्या सुलतानी सैन्याला हें हिंदूंचें माजलेलें राज्य हार जाणार नाही, हें अनेक वेळा आपल्या प्रत्ययास येत आहे. असा विचार करून ह्या धाडसी कार्याचें पुढारीपण स्वत: विजापूरचा आदिलशाहा नि त्याचा वजीर खिझरखान यांनी स्वीकारलें. खिझरखानाने स्वत: निजामशहा, कुतुबशहा ह्या सुलतानांच्या भेटी त्यांच्या राजधानीत जाअून घेतल्या. साऱ्या महत्त्वाच्या मुसलमान सरदारांनी, सेनापतींनी, मुल्लामौलवींनी सर्वत्र जिहादचा (धर्मयुद्धाचा) प्रचार करून सर्वांना अेकत्रित केलें. या मुस्लिम सुलतानाचें अैक्य शक्य तो अगदी हार्दिक नि अभेद्य व्हावें म्हणून त्या सुलतानांनी आपल्या मुली अेकमेकांस देअून आपसांत रक्तसंबंधही जोडले आणि अशा कडेकोट सिद्धतेनंतर या संयुक्त सुलतानांचीं सैन्यें विजयनगरवर चालून गेलीं.

अिकडे राजा रामरायही काही स्वस्थ बसला नव्हता. त्याला मुस्लिमांच्या या कटाचें वृत्त सारखें कळतच होतें. त्या राजपुरुषाचें वय त्या वेळी सत्तर वर्षांचें होतें. तरीही त्याची मुस्लिमांशी लढण्याची खुमखूम त्याच्या भर तारुण्यात होती तितकीच तेव्हाही तीव्र होती. त्यानेही न डगमगता आपल्या सैन्याची कडेकोट सज्जता केली. त्याच्या तिरुमल्लराय नि व्यंकटाद्रि ह्या दोन शूर बंधूंच्या हाताखाली दोन मोठ्या सेना सज्ज करून आपल्या दोहो बाजूचे संरक्षणार्थ अुभ्या केल्या. आणि आपण स्वत: सेनाधिपत्य स्वीकारून तो सैन्याच्या मध्यभागी अुभा ठाकला.

ह्या हिंदु-मुसलमानांच्या अटीतटीच्या सैन्याची गाठ तोलिकोटजवळ राक्षसभुवनला शुक्रवार दि. २ जानेवारी सन १५६५ ह्या दिवशी पडली. दोन्ही पक्षांकडे पुष्कळ तोफा होत्या. सैन्याच्यापुढे साखळीने बांधून त्या साऱ्या तोफा अुभ्या केल्या होत्या. लढाअीस तोंड लागल्यानंतर काही वेळ घनचक्कर युद्ध माजून मुसलमानांची फारच धांदल अुडाली, असें मुस्लिम अितिहासकारही म्हणतात. तें पाहून चिडून गेलेला आणि आता किंचित् जरी कोणचाही अंगचुकारपणा झाला तरी आपल्यासुद्धा साऱ्या मुस्लिमांचें मरण ओढवलेंच आहे असें पाहून सुलतान हुसेन निजामशहा हा मध्यभागाच्या राजा रामरायाच्या फळीवर वेधडक कोसळला आणि

हिंदूंची फळी फोडून राजा रामरायाच्या अंगावर धावला. या निकराच्या प्रसंगी नक्की काय झालें याविषयी अितिहासकारांत अेकमत नाही. कोणी म्हणतात, राजा रामरायाच्या पदरीच असलेल्या अेका मुस्लिम सैनिकाने विश्वासघात करून राजा रामरायाचा शिरच्छेद केला. कोणी म्हणतात, राजा रामराय पालखीतून अुतरून सैन्याच्या मध्यभागी रत्नखचित सिंहासनावर वसून सैनिकांस त्यांच्या शूरत्वा-प्रमाणे मोठमोठीं सुवर्णाचीं नि रत्नाचीं पारितोषकें वाटीत होता आणि सैन्यास सारखें अुत्तेजन देत होता. कोणी म्हणतात की, लढाअी हातघाअीवर येताच मुसल-मानांनी राजा रामरायाच्या पालखीवर अेक मदोन्मत्त हत्ती घातला नि त्यास पाडाव केला. तें काही असलें तरी हें पुढील वृत्त मात्र अेकमते मान्य आहे की, राजा रामराय मुसलमानांच्या गराड्यात सापडताच त्यांनी राजा रामरायाचा शिरच्छेद केला आणि निझामशहाच्या आज्ञेने महाराजांचें तें रक्तबंबाळ मस्तक अेका मोठ्या भाल्याच्या टोकावर खोचून साऱ्या सैन्यात मुसलमानांनी मिरवीत नेलें. तें भयंकर दृश्य पाहताच हिंदूंचा धीर खचला आणि मुसलमानांनी तुमुल जयजयकार करून चोहो वाजूंनी मोठ्या हातघाअीचे अेकच चढाअी केली.

तथापि त्या भयंकर गोंधळातही राजा रामरायाचे बंधु नि सेनापति तिरु-मल्लराय याने राजकुटुंबातील अनेक पुरुषांसह त्वरा करून राज्याची राजधानी जी विजयनगर ती गाठली, आणि मुस्लिम सैन्यें तेथे पोचण्याच्या आधीच होती नव्हती तेवढी सारी राज्यसंपत्ति साडेपांचशे हत्तींवर लादून आणि अितर अुरलें सुरलें, सैन्य घोडेस्वार अित्यादि वळ सांगाती घेअून थेट दक्षिणेकडे धाव घेतली. थोड्याच काळाने त्या हिंदु सैन्याचा पाठलाग करीत विजयाने धुंद झालेले सुलतानही सैन्यासह विजय-नगरात घुसले. विजयनगरचा मुस्लिमांनी नुसता पाडावच नव्हे तर मुस्लिम क्रौर्याच्या परंपरेस धरून केवळ विध्वंस करून टाकला. मोठमोठीं मंदिरें, गोपुरें, प्रासाद, शोभिवंत अुद्यानें, पण्यवीथिका, प्रचंड पुतळे मुस्लिमांनी क्रौर्याने धडाधड धुळीस मिळवून दिले. ग्रंथागारांची जाळून पोळून राख करून टाकली. कोटी कोटी रुपयांची लूट केली. मुस्लिम लेखकच मोठ्या तोऱ्याने सांगतात की, जी प्रलयंकारी आग हिंदूंच्या त्या अमरावतीतुल्य राजधानीस मुस्लिमांनी लावली ती पांच-सहा महिने जळत होती. असा त्या विजयनगरचा विध्वंस त्या मुस्लिम राक्षसांनी केला!

तरीही येथे ही गोष्ट पुन्हा प्रामुख्याने अुल्लेखिली पाहिजे की, ह्या विजय-नगरच्या हिंदु सैन्याने वर दिल्याप्रमाणे काही वर्षें आधीच या मुस्लिम सुलतानांचे जे पराभव केले होते आणि त्यांच्या प्रदेशात धार्मिक आघाडीवरही मुस्लिमांनी हिंदूंवर केलेल्या धार्मिक अत्याचारांचा सूड अुगविण्यासाठी मुस्लिम धर्मावरही काही यथायोग्य असे जे प्रत्याचार केले होते त्यांची प्रतिक्रिया म्हणून विजयनगरचा मुस्लिमांनी अशा क्रूरपणे विध्वंस केला, असें जे काही अुथळ लेखक लिहितात

किंवा सद्‌गुणविकृतीच्या व्याधीने ग्रस्त झालेला हिंदु समाजाचाच अेक भ्याड विभाग अशा चाकीवरचें जें रडगाणें नेहमीच गात असतो, तें मुळीच समर्थनीय ठरत नाही.

अगदी आजकाल जो अितिहास शाळेतील मुलांना शिकविला जातो त्याचे हिंदु लेखक जें म्हणतात त्याचा सारांश असा की, 'विजयनगरच्या रामरायाने बिचाऱ्या मुस्लिमांचा, त्यांच्या सुलतानांवर स्वाऱ्या करून जो धार्मिक छळ केला, त्यांच्या मशिदी पाडल्या, त्यांचीं घरेंदारें जाळलीं त्या हिंदु सैन्याच्या अत्याचारांनी सारे मुसलमान चिडून गेले आणि म्हणूनच काय तो मुस्लिमांनी विजयनगरचा असा भयंकर विध्वंस केला.'

परंतु ह्या सद्‌गुणविकृतीने भ्याड झालेल्या हिंदु लेखकांना अितकें दिसेना कीं स्मरेना की, महंमद गजनी, महंमद घोरी, तैमुरलंग, बाबर अित्यादि जे अनेक अत्याचारी मुस्लिम आक्रमक हिंदुस्थानवर चालून आले त्या सर्वांचे हिंदूंनी आधी काय वाकडें केलें होतें ? हिंदुस्थानबाहेर जाअून हिंदूंनी त्यांच्या किती मशिदी गजनीला जाळल्या होत्या ? त्यांच्या किती मुस्लिम राजस्त्रियांना बलात्कारिलें होतें ? आणि किती लक्ष मुस्लिम बायकांना हिंदूंनी बटकी बनविल्या होत्या ? मुसलमानी धर्मावर कोणते अत्याचार हिंदूंनी त्या त्या काली प्रथम आक्रमणें करून केले होते, की ज्यांचा सूड अुगविण्यासाठी म्हणूनच काय ते ते चिडलेले मुसलमान प्रत्येकी त्या त्या वेळी धार्मिक आक्रमणें करण्यासाठी हिंदुस्थानावर चालून आले ? अहो ! त्या महंमद गझनवी, त्या तैमुरलंगासारख्या प्रत्येकाने त्यांच्या भरराजसभेत स्वतः प्रतिज्ञा केल्या नव्हत्या का की 'आम्ही हिंदु काफरांचा समूळ नाश करण्यासाठीच, त्यांचा वांशिक शिरच्छेद करण्यासाठीच, किंवा त्यांना बळाने मुस्लिम करण्यासाठीच काय तें मुख्यतः हिंदुस्थानवर चालून जात आहो !'

या विजयनगराच्या विध्वंसाच्या चालू प्रकरणी सुद्धा अितकें पाहिलें की पुरे की, मूळ जेव्हा अल्लाअुद्दिन, मलिक काफूर आणि त्यांचीं मुस्लिम सैन्यें चीं सैन्यें दक्षिणेवर चालून आलीं त्याचे आधी तर दक्षिणेच्या हिंदूंनी त्यांच्यावर अुत्तरेत जाअून कोणतेही धार्मिक अत्याचार केल्याचा अुल्लेख मुस्लिम लेखकांनाही करण्याची छाती झालेली नाही ना? मग ते सारे मुस्लिम आक्रमक दक्षिणेतील हिंदूंवर स्वाऱ्या करून देवगिरी, वरंगळ ते मदुरेपर्यंत आमच्या साऱ्या राजधान्यांचा विध्वंस अगदी विजयनगरच्या विध्वंसासारखाच करीत कां गेले ? हिंदुधर्माची विटंवना आणि असंख्य हिंदु स्त्री-पुरुषांचा धार्मिक छळ त्या मुस्लिम नरराक्षसांनी कां केला ? –अर्थात् हिंदूंनी त्यांचा काही आधीच धार्मिक आगळीक केली होती म्हणून नव्हे, तर हिंदूंचा अुच्छेद करणें हाच आपला 'मुस्लिम धर्म' होय, अशी त्यांची त्या वेळची 'धर्मनिष्ठाच' होती म्हणून होय !

त्या वेळच्या, त्या काळच्या आधीच्या आणि नंतरच्याही मुस्लिम लेखकांचे अगदी निःसंकोचपणे, म्हणजे निर्लज्जपणे घेतलेलें ठाणच मुळी असें आहे की,

"काफरांचा अुच्छेद करणें हें आम्ही आमचें मुख्य धर्मकर्तव्य समजतो. काफर हिंदूंचीं राज्यें जिंकणें, त्यांच्या राजस्त्रियांना वलात्कारिणें, अितर लक्षावधि काफर स्त्रियांना वटकी वनविणें, आम्हांस वाटतील तितक्या हिंदूंना गुलाम वनविणें, वाकी-च्यांना सरसकट कापून टाकणें, हिंदूंच्या राजधान्या, मूर्ति, ग्रंथ, देवालयें हीं सर्व जाळून पोळून भस्मसात् करणें अित्यादि प्रकारचीं जीं सत्कृत्यें आमचे मुसल-मानी 'गाझी'-धर्मवीर करीत आले तीं कृत्यें त्या काफरांना त्यांच्या अक्षम्य पापासाठी धर्मन्यायाप्रमाणेच' केलेले दंड होते! त्या पुण्यकृत्यांनाच हे काफर जेव्हा अत्याचार म्हणून म्हणतात तेव्हा स्पष्टपणे सांगावें लागतें की ते दंड अत्याचार नव्हतेच! तर सदाचार होते! अिस्लामच्या प्रत्येक अेकनिष्ठ अनुयायाचें काफरांना शक्य तेव्हा असा दंड देणें हें आद्य धर्मकर्तव्य आहे! पण—

"पण, या काफर हिंदूंनी त्या आमच्या न्याय्य दंडकृत्यांना अत्याचार म्हणावें आणि आम्हां मुसलमानांच्या विरुद्ध त्या अत्याचारांसाठी आमच्या सत्धर्मावरही तसे तसेच प्रत्याचार करावयास धजावें, आम्ही त्यांचीं पापी मंदिरें जाळलीं म्हणून त्यांनी आमच्या पाक मशिदी जाळाव्यात, हा कोण राक्षसी क्रूरपणा आहे! हा मात्र खरा अत्याचार आहे!"

त्या काळच्या मुसलमानांची 'धर्मनिष्ठाच' अशी असल्याने ते विजय-नगरच्या हिंदुराज्यावर जे चालून गेले ते मुख्यतः तें हिंदूंचें राज्य होतें आणि ते लोक मुसलमान होण्यास नाकारीत होते म्हणूनच काय तें होय! जरी विजय-नगरच्या हिंदु सैन्यांनी त्या काळी मुसलमानांवर वारंवार स्वाऱ्या करून मुस्लि-मांनी हिंदुधर्मावर केलेल्या अत्याचारांचा सूड घेण्यासाठी, त्यांच्या मशिदी पाडून, घरेंदारें जाळून त्यांची लुटालूट करून तसे तसे प्रत्याचार आणि प्रत्याघात मुसल-मानांवर केले तसे केले नसते – तरीसुद्धा ते हिंदु होते वा अपराधासाठी म्हणूनच कायते ते सर्व मुस्लिम सुलतान, जर त्यांना तशी अनुकूल संधि सापडली असती तर विजयनगरावर तसेच चालून जाते, विजयनगराचा तसाच विध्वंस करते!

मुस्लिम सैन्यें विजयनगराहूनच मागे कां फिरलीं?

खरी वस्तुस्थिति ही होती की, राजा रामरायाचे राजवटीत त्या काळच्या हिंदु सैन्याने आणि अेकदंर हिंदु समाजाने परकीयांचीं आक्रमणें सोसाळूपणाने सोसण्याचे सोडून अुलट त्या मुस्लिम आक्रमकांवरच तशीं तशीं धार्मिक प्रत्याक्रमणें करण्याची 'ठोसाळू वृत्ति' स्वीकारल्यामुळेच विजयनगरचा विध्वंस केल्यानंतर ते मुस्लिम सुलतान दक्षिणेत पुढे जाण्यास धजले नाहीत!

वर सांगितल्याप्रमाणे राजा रामरायाचा भाअू जो सेनापति तिरुमल्लराय तो आधीच विजयनगराहून ससैन्य निसटून दक्षिणेत गेला होता आणि तेथे समरां-गणाचें ठाण मांडून बसला होता. मुसलमान पुढे येतेच, तर त्यांची गाठ

सेनापति तिरुमल्लच्या सैन्याशी पडनी ! अंशतः ह्या धास्तीनेच मुस्लिम सुलतान मिळालें तेवढें पदरात पाडून घेऊन विजयनगरहूनच ससैन्य परत फिरले.

दुसरें कारण असें होतें की विजयनगरला त्यांना हा विजय मिळाला न मिळाला तोंच त्या मुस्लिम सुलतानांचीं आपसांतील जुनीं भांडणें पुन्हा विकोपास गेलीं. आपसाआपसांत त्यांचे शिया नि सुनी या मुस्लिम धर्मपंथांच्या कलहाने नेहमीच वैमनस्य माजलेलें असे. ह्यामुळे हिंदूविरुद्ध ही क्षणमात्र झालेली त्यांची अेकी भंगून ते आपसांत पुन्हा लढू लागले. थोडयाच काळाने त्या मुस्लिम सुलतानांचे अुत्तरेकडील प्रबल शत्रु जे मुस्लिम मोंगल बादशाह त्या शहाजहानाने नि औरंगजेबाने त्यांच्यावर स्वाऱ्या केल्या. तेव्हा ह्या नगरच्या, विजापूरच्या, गुलबुर्ग्याच्या अित्यादि सर्व सुलतानांना महाराष्ट्रात त्या काळीच बलवान् होत चाललेल्या मराठ्यांचें साहाय्य घेण्यावाचून गत्यंतर अुरलें नाही. अुत्तरेकडून मुस्लिम मोंगल बादशहांच्या बलवत्तर सैन्याने जर्जर करीत आणलेल्या आणि आतून स्वतःच्या साहाय्यास म्हणूनच त्या मुस्लिम सुलतानांनी बोलविलेल्या हिंदूंच्या मराठी सरदारांनी पोखरून काढलेल्या महाराष्ट्रातील ह्या सर्व मुसलमानी सुलतानांच्या सत्ता अेकामागून अेक नष्ट होत चालल्या !

प्रतापशाली शहाजी

त्या सर्व मराठी सरदारांत अत्यंत प्रमुख म्हणजे भोसल्यांच्या कुळातील प्रतापी आणि हिंदूंची सत्ता स्थापण्याची गुप्त महत्त्वाकांक्षा ज्याच्या हृदयात सदैव तळपत राहिलेली होती तो शहाजी हा होय. विजयनगरच्या पाडावानंतर जे सेनापति तिरुमल्ल प्रभृति हिंदु राजपुरुष दक्षिणेकडे निसटून गेले होते त्यांनी सन १५६७ त पेनुकोंड्याम स्वतंत्र हिंदुराज्य स्थापन केलें. तिरुमल्लाच्या पश्चात् त्याचा मुलगा श्रीरंग ह्याने सन १५७९ त आपली राजधानी चंद्रगिरि येथे नेली.

वस्तुत विजयनगरच्या मुख्य हिंदु साम्राज्याचींच हीं त्या रणधुमाळीत अुडालेलीं शकलें होतीं. त्या साम्राज्याचे ठिकठिकाणचे जे 'नायक' (सुभेदार) होते, त्यांपैकीच अेकदोन नायक स्वतंत्रपणे राज्य करू लागले. काहींनी 'पाळेदार' म्हणून जिंजी, तंजावरकडे लहान सहान हिंदु संस्थानें स्थापिलीं होतीं अेकंदरीत विजयनगरच्या विध्वंसानंतरही विजयनगरच्या खालचा रामेश्वरपर्यंतचा सारा प्रदेश स्वतंत्र हिंदु सत्तेच्याच हाती होता. पुढे त्या सर्वांवर विजापूरकर सुलतानाचे नांवापुरतें नांव घेऊन विजापूरचा सेनापति म्हणून, शहाजी राजांनी वस्तुत आपली स्वतःचीच अधिसत्ता स्थापिली आणि त्यांना हळूहळू अेकसूत्रित केलें. अहमदनगर ते अगदी रामेश्वरपर्यंतच्या प्रत्येक मुस्लिम राजसत्तेत गाजविलेल्या पराक्रमामुळे दिल्लीच्या मोंगल सत्तेपासून ह्या बुडत्या विजापूरकरासारख्या मरणोन्मुख सुलतानापर्यंत शहाजीचा राजकीय प्रभाव, हिंदूचा पक्षपाती म्हणून लौकिक आणि धाक सर्वत्र

पसरलेला होता. साऱ्या दक्षिणेत तर राजकारणामध्ये तो करील ती पूर्वदिशा ठरत असे. अेका तत्कालीन हिंदी कवीने केलेल्या कवितेचा पुढील अर्थाचा चरण सर्वतोमुख झालेला होता की, पृथ्वीचें नियमन दक्षिणोत्तरचे हे दोन दिक्पाल करीत आहेत. 'अुत शाहजहां अित शाहजी है।' अुत्तरेत शहाजहान आणि दक्षिणेत शहाजी !

अशा रीतीने शहाजीने दक्षिणेतील विजयनगरच्या विध्वंसानंतरची लहान सहान पण स्वतंत्र हिंदु संस्थानें जीं अुरलीं होतीं तीं मुसलमानी सुलतानांच्या नांवे जिकावीं ही गोष्ट हिंदुमनाला प्रथमदर्शनी कितीहि खटकली तरी हें कठोर सत्य ध्यानी घेतलें पाहिजे की, त्या परिस्थितीत ह्या सर्व मुस्लिम सुलतानांना अुच्छेदून अेकत्रित असें अेक मोठें हिंदुराज्य पुन्हा स्थापिण्यासाठीच ती सारी विजित नि विखुरलेलीं हिंदु संस्थानें आपल्या हाती शहाजीने अेका मुठीत जीं आणलीं त्यामुळेच ज्या मुस्लिम सुलतानांचा तो नांवापुरता सेवक म्हणवीत गेला त्यांनाही दरारा वाटावा अितका तो प्रबळ होअू शकला आणि सुलतानाचा अंकित म्हणवीत असताही अेखाद्या स्वतंत्र हिंदुराजाच्या थाटाने म्हैसूर येथे राहून राज्यकारभार चालवू लागला. त्याच्या हाती अेकत्रित झालेल्या या हिंदुबळाच्या आधारामुळे थोड्या काळानंतर पुढे अेका स्वतंत्र, समर्थ आणि दिग्विजयी हिंदु साम्राज्याची संस्थापना करणाऱ्या पण अेक अुपद्रवी तरुण हिंदु पुंड म्हणूनच काय ते मुस्लिम सुलतानांना अप्रिय झालेल्या शहाजीच्या अेका पुत्राला, त्या अुपेक्षित 'पुंडाअी' चे अेका अर्जिक्य 'बंडाअीत' रूपांतर करण्याअितकें साहाय्य तो शहाजी गुप्तपणे देअू शकला. शहाजीच्या ह्या पुत्राचें नांव कालक्रमासाठी येथेच आगाअू न सांगताही वाचकांच्या हृदयात विजेसारखें चमकून गेल्यावाचून रहाणार नाही हें निश्चित.

अगदी अशाच परिस्थितीमुळे मागे पांचव्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे सन १३१६ ते १३२२ मध्ये स्वत:चें हिंदुबल सिद्ध नसल्यामुळे खुश्रूखानाने दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाच्याच सर्व सैन्याचें आधिपत्य स्वत: मुस्लिम म्हणूनच चालवून, दक्षिणेतील आपण होअून सहसा अेकत्र न होणाऱ्या मोठमोठ्या हिंदुराज्यांना जिंकून मुस्लिम सुलतानाच्या राज्याचाच भाग म्हणून बळाने अेकत्र केलें, आणि मग स्वत:च्या हिंदु अुठावणीची गुप्त सिद्धता पुरी झाल्यावर त्या मुस्लिम सुलतानाचा दिल्लीला रातोरात वध करून, दिल्लीच्या तख्तावरील 'मुसलमानी' अेवढी पाटी तेवढी अुखडून टाकून, त्यावर 'हिंदुसम्राट्' म्हणून स्वत:च आरोहण केलें ! आणि खिलजी सुलतानांचें तें अखिल भारतीय होत आलेलें मुस्लिम साम्राज्यचें साम्राज्य अेका दिवसात हिंदु साम्राज्य करून सोडलें. पुन्हा, पुढे थोड्याच अवधीत वीरवर हरिहर नि बुक्क हे मुसलमानांच्या हातात पडून, बाटविले जाअून, दिल्लीत बंदिवासात सडत असता, कट्टर मुस्लिमपणाच्या बुरख्याखाली ह्याच कौटिल्यनीतीने प्रथम दिल्लीच्या सुलतानाचा त्यांनी विश्वास संपादिला. त्याच्याच मुस्लिम सैन्यासह आणि संपत्तीच्या आधाराने त्याचेच मुस्लिम सेनापति

म्हणून दक्षिणेच्या बंडखोर हिंदूंवर मुस्लिम साम्राज्य स्थापण्यासाठी दक्षिणेवर चाल करून आले ! परंतु दक्षिणेत येताच योग्य संधि साधून त्या हिंदु बंडखोरांनाच मिळून, शुद्धिकरणाने स्वतः हिंदु होऊन त्यांना तें विजयनगरचें प्रबळ नि स्वतंत्र हिंदु साम्राज्य स्थापिलें ! ह्याच कौटिल्य नीतीने आता शहाजीनेही विजापूरकरांच्या सैन्याच्या आणि राज्यकोषाच्या बळावर जिंजी तंजावरपर्यंतचीं हिंदु संस्थानें जिंकून विजापूरच्या मुस्लिम सुलतानाचीं अंकित म्हणूनच अेकत्र केलीं, आणि हळूहळू हिंदूंची सैन्यसंख्या वाढवीत वाढवीत संधि सापडताच विजयनगरच्या पाडावाच्या पाठोपाठ अेका नव्या, पूर्वीच्या सर्व हिंदुशक्तींच्या पेक्षा प्रबळतर. आणि अंतिम हिंदुविजयाचें भाग्य जिच्या ललाटीं विधाता सुवर्णाक्षरांनी अंकित करीत होता अशा त्या अुदीयमान महाराष्ट्रीय हिंदुशक्तीच्या संभवाची त्या संकटसमयकाली शक्य ती ती पूर्वसिद्धता शहाजी करीत होता !

ह्या सर्व घटनांच्या प्रभावामुळे विजयनगरच्या विध्वंसाचा आघात दुर्धर असताही हिंदुराष्ट्राच्या दुर्दम्य नि महत्त्वाकांक्षी अिच्छाशक्तीने तो पचवून टाकला. मुसलमानांच्या पदरीं तर त्या विजयनगरच्या पाडावामुळे कोणताही भवितव्य पालटण्यासारखा लभ्यांश मुळीच पडला नाही.

✦ ✦ ✦

प्रकरण ८ वें

अिसवीसनाच्या सोळाव्या शतकाच्या अंतापर्यंत आणि नंतर

येथपर्यंत हिंदुदृष्टीने हिंदुराष्ट्राच्या अितिहासाचें समीक्षण वर दिलेल्या काळापर्यंत केलें. तथापि त्या सोळाव्या शतकातील काही समीक्षणार्ह अशा आनुषंगिक घटना अुरलेल्या आहेत. त्यांचा आणि नंतरच्या काही संबद्ध घटनांचा परामर्ष या प्रकरणात घेत आहोत.

हिंदुस्थानवर युरोपियन जलदस्यूंची (चाच्यांची) टोळधाड

हिंदुस्थानवर जें पहिलें युरोपियन ख्रिश्चन राष्ट्र चालून आलें तें पोर्तुगीजांचें होय. समुद्राने हिंदुस्थानात येण्याचा सरळ मार्ग प्रथमतः 'केप ऑफ़ गुडहोप'ला वळसा घालून पोर्तुगीझांच्या वास्को ड गामा ह्या सिंधुपर्यटकाने शोधून काढला. त्याला सुद्धा हा सिंधुमार्ग, तेथपर्यंत जे हिंदु व्यापारी समुद्रमार्गे जात येत असत त्यांच्यापैकी अेका नौयान पुढाऱ्याने दाखविला होता. सन १४९८ त वास्को ड

गामा हिंदीमहासागरातून हिंदुस्थानच्या पश्चिम तटावरील कालिकत ह्या सिंधु-द्वारास (बंदरास) पोचला. त्याने प्रथमतः व्यापाराचें निमित्त पुढे केलें. परंतु पोर्तुगीझ किंवा त्यांच्या मागोमाग आलेल्या सर्व युरोपियन राष्ट्रांचा, 'आम्ही व्यापार करावयास आलो आहोत,' असें सांगण्याचा प्रघात हा केवळ बहाणा असे; व्यापाराच्या बुरख्याखाली शक्यतर हिंदुस्थानातील प्रदेशांवर आपापल्या राजसत्ता स्थापण्याचा त्यांचा अंतर्गत हेतु असे. त्या धोरणाने लगोलग सन १५०० व्या वर्षी पेद्री अल्वारिस कॅब्रल हा पोर्तुगीझांचा अेक सिंधुसेनानी तेरा लढाअू जल-यानांचें नौदल घेअून हिंदुस्थानवर सशस्त्र स्वारी करून आला. प्रथम कोचीनकडे जाअून तेथील हिंदुराजाशी त्याने सख्य केलें. कारण तेथे पोर्तुगीझांच्या आधीपासूनच मुस्लिम व्यापाऱ्यांनी आपलें प्रस्थ स्थापलेलें पाहून पोर्तुगीझांनी आधी त्यांच्याशीच लढण्यास प्रारभिलें. पोर्तुगीझांचे मुसलमानांशी मूळचेंच हाडवैर होतें. पूर्वी स्पेन पोर्तुगालवर मुसलमानांनी जें भयंकर धार्मिक आणि राजनैतिक आक्रमण केलेलें होतें त्याचा या ग्रंथाच्या पूर्वार्धात ७८८, ७८९ पृष्ठांवर अुल्लेख केलेला आहे. पुढे सन १५०९ मध्ये अल्बुकर्क याची हिंदुस्थानातील पोर्तुगीझांच्या सत्तेवरचा मुख्य गव्हर्नर म्हणून पोर्तुगालच्या राजाने पाठवणी केली. त्यानेच सन १५१० त विजापूरच्या मुस्लिम सुलतानाच्या हातून गोवें आणि त्याच्या आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. ह्याच अल्बुकर्कने पोर्तुगीझांचें नित्याचें वास्तव्य हिंदुस्थानात व्हावें म्हणून पोर्तुगीझ लोकांना हिंदु मुलींशी प्रसंगी बळानेही विवाह करण्यास अुत्तेजन दिलें. याच काळात हिंदु लोकांना बळानेही बाटवून ख्रिस्ती करणें हें आपलें मुख्य धर्मकर्तव्य आहे, असा पोर्तुगीझांच्या धर्माधिकाऱ्यांनी आग्रह धरून पोर्तुगालच्या राजाकडून तशी आज्ञा सोडविली. राजसत्तेच्याच बळावर पोर्तुगीझांनी तेथील हिंदु स्त्रीपुरुषांवर त्यांना बाटविण्यासाठी कोणकोणते भयंकर अत्याचार, बलात्कार, छळ केले त्यांचा निर्देश याच ग्रंथाच्या ७५३ ते ७६१ या पृष्ठांवर केलेला आहे, तो वाचकांनी पुन्हा अेकदा अवश्य वाचावा.

या पोर्तुगीझांच्या धार्मिक अत्याचारांना मुख्य पुरोगामी नि पुरोहित जो सेंट झेव्हिअर त्याला त्या काळचे प्रपीडित हिंदु लोक सैतानालाही लाजविणारा 'सेंट' म्हणत ! तो सन १५४० मध्ये हिंदुस्थानात आला होता. हा सेंट झेव्हिअर आपल्या ह्या हिंदूंना छळण्याच्या राक्षसी पराक्रमाविषयी स्वतःच अेका पत्रात लिहितो की, 'आमचें हिंदूना ख्रिस्ती करण्याचें कार्य अतिशय वेगाने फैलावत आहे. आमच्या प्रचारकाला पाहताच हिंदूंच्या खेड्यापाड्यांत आमच्या भयाने पळापळी चालू होते. अितके कडक अुपाय आम्ही जे हिंदु ख्रिस्ती होणार नाहीत त्यांना दंड करताना योजतो . . . नगरातील श्रीमंत हिंदूची शारीरिक मारासाठी लांडगेतोड करतो. त्यांची संपत्ति हिरावून घेतो, मूर्ति फोडून टाकतो, देवालयें पाडून टाकतो, चाबकाच्या फटकाऱ्याखाली त्यांचीं शरीरें सोलून काढतो . . .' ज्यांना अशीं

विषयात पुष्कळ अुपयोग झाला. कारण अिंग्लिश लोक त्यांचें युरोपियन संचलन आणि नवीन तोफा प्रभृति शस्त्रास्त्रें कोण्या हिंदी राज्यास शिकविण्यास किंवा देण्यास अुत्सुक नसत. पण ती विद्या नि साधनें फ्रेंच लोक मात्र हिंदी राज्यांना यथास्थित द्रव्यलाभ किंवा भूमिलाभ झाला तर, आणि त्यातही तें हिंदी राज्य ब्रिटिशांच्या विरुद्ध लढत असेल तर, अुत्सुकतेने देत असत. विशेषतः मराठ्यांनी ह्या युरोपियन संचलनाच्या आणि तोफाबंदुकादिक अुत्कृष्ट शस्त्रनिर्मितीच्या विद्येचें अपरिहार्यत्व आणि श्रेष्ठत्व लवकरच लक्षात घेअून अनेक फ्रेंच सेनानींना त्यांच्या वैयक्तिक संबंधाने आपल्या सेवेत ठेविलेलें होतें. अिब्राहिमखान गारदी हा मराठ्यांच्या अुद्गीरच्या आणि पुढे पानिपतच्या लढाअीतील प्रचंड तोफखान्यावरील अधिकारी फ्रेंचांच्या तोफखान्यातच शिकून त्या विद्येत प्रवीण झालेला होता. पुढे महादजी शिंदे यांनी तर डी बॉंयने आणि पेताँव प्रभृति फ्रेंच अधिकाऱ्यांसच आपल्या पलटणीचे आणि तोफखान्याचे मुख्य अधिकारी नेमून युरोपियन पलटणी सारखेच आपल्या स्वदेशी लढाअू पलटणींना शिक्षण देअून अेक आपलें चतुरग सैन्यच अुभारलें. ह्या सैन्याच्या दराऱ्यामुळेच महादजीला सारे विपक्षीय अुत्तर हिंदुस्थान वचकून राहिलेलें होतें आणि कित्येक लढायांत महादजीला शत्रूवर मात करता आली. परंतु काही काळाने हिंदुस्थानात वावरणाऱ्या लढाअू युरोपियन राष्ट्रांनी आपसांत अेक हिंदुस्थानपुरता अलिखित करार केला की कोणाही देशी राज्याचा कोणाही युरोपियन राज्याशी युद्धप्रसंग अुद्भवल्यास त्या वेळी त्या देशी राज्याचा पक्ष घेअून कोणाही युरोपियनाने आपल्या पलटणीचें साहाय्य त्या हिंदी राज्यास देअू नये. ह्यामुळे पुढे अिंग्लिशांशी शिंद्यांची लढाअी जुंपली असता, शिंद्याच्या सेवेमध्ये सहस्रावधि रुपयांचा पगार खात असलेल्या ह्या डी बॉंयनेच्या हाताखालील पलटणींना नि तोफखान्याला घेअून डी बॉंयने याने शिंद्याचे वतीने लढण्याचें स्वच्छपणे नाकारिलें. मराठ्यांनाहीं आपला असा विश्वासघात हे मराठी सैन्यातील पगारी युरोपियन अधिकारी केव्हातरी करतीलच हें कळत होतें. यासाठी मराठ्यांनीही स्वतः युरोपियनांसारख्या अुत्तम तोफा नि बंदुका ओतण्याची निर्माणालयें (कारखाने) आणि त्यांचे 'पलटणीचें' विशिष्ट संचलनाचें प्रशिक्षण देणारे स्वतःचे स्वदेशी अधिकारी सिद्ध करण्यासाठी यथाशक्ति प्रयत्न चालविलेलेच होते. पण त्यासारख्या युद्धसंकुल काली अशा सगळ्याच आनुषंगिक गोष्टींकरिता अगदी अडून बसणें मूर्खपणाच झाला असता. जाटासारख्या दुय्यम राज्यांतूनही फ्रेंचांनी शिकविलेल्या संचलनदक्ष पृतना (पलटणी) ठेवू लागले होते. शिखांनीही पुढे पलटणी अुभारल्या. अेवीतेवी हिंदुस्थानात फ्रेंचांच्या लढाअू अस्तित्वाचा अुपयोग ब्रिटिशांच्या राजसत्तेचें घोडें ठिकठिकाणी अडवून ठेवण्यास पुष्कळच झाला आणि फ्रेंचांचा तसा उपयोग करून घेण्यात मराठे, टिपू, शीख प्रभृति स्वदेशी राज्यानीही फारशी हेळसांड केली नाही.

दक्षिणेवर अेकसहाच जगातील झाडून साऱ्या लुटारू अहिंदु राष्ट्रांचा दुहेरी मारा

ज्या काळी वर दिलेल्या अनेक युरोपियन राष्ट्रांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानवर झाल्या त्या काळी त्या समुद्रमार्गेच झाल्या. त्यामुळे त्यांचे प्रचंड आघात पहिलीं दोनशे वर्षें तरी दक्षिण हिंदुस्थानलाच आणि त्यातही केवळ मराठी सत्तेलाच सोसावे लागले आणि प्रतिकारावे लागले. त्याच्यापूर्वी अेकटया अुत्तर हिंदुस्थानला सहा सात शतकें साऱ्या आशियातील मोंगल, तुर्क, अफगाण, अरब अित्यादि सर्व लुटारू आक्रमकांच्या आणि धर्मांधतेच्या राक्षसी अुन्मादाने फुरफुरलेल्या मुसलमीन राष्ट्रांचे प्रलयंकर आघात सहावे लागले होते. आणि शतकोशतकें प्राणपणाने प्रतिकारावे लागले होते. पुढे आशियातील तीं सारीं मुस्लिम राष्ट्रें नि बर्बर जाती दक्षिणेलाही पादाक्रांत करण्यासाठी तिच्यावर कोसळलीं. ते सारे शत्रु स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करीत असतानाच आणि त्यांच्याशी दाक्षिणात्य हिंदु राज्यें रक्तबंबाळ युद्धें झुजत असतानाच त्या मुस्लिम धर्मच्छळापायी अुत्तरेप्रमाणे सहस्र सहस्र हिंदु स्वधर्मरक्षणार्थ प्राणार्पण करीत असतानाच – ह्या दक्षिण हिंदुस्थानवर समुद्राकडून ही नवी युरोपियन राष्ट्रांचीही भयंकर टोळधाड पडली ! केवळ अुत्तरपश्चिम व अुत्तरपूर्व दिशेनेच नव्हे तर त्यासमवेतच पश्चिम दिशेच्या आक्रमक ख्रिश्चन जगताचीही या दक्षिण हिंदुस्थानवर प्रचंड टोळधाड येअून कोसळली ! भूमार्गानेच नव्हे तर सिंधुमार्गानेही जगातील सारीं लढाअू, लुटारू, आक्रमक, धर्मोन्मत्त मुस्लिम आणि ख्रिश्चन राष्ट्रें अेकसमयावच्छेदेकरून दक्षिणेतील हिंदु राज्यांचा आणि हिंदुधर्माचा नायनाट करून टाकण्यासाठी आपापल्या आसुरी प्रेरणेनेच त्या क्षणी तुटून पडलेलीं होतीं ! ! !

अुत्तर हिंदुस्थानला केवळ आशियायी मुस्लिम राष्ट्रांनाच तोंड द्यावें लागलें. तेंही कार्य तोंडाचें नव्हतें ! राक्षसांशी झुंज देणाऱ्या देवांनीही थकून जावें अितकें तें अुत्तरेतील हिंदुधर्म, हिंदुत्व नि हिंदुराष्ट्र रक्षणाच्या कार्यासाठी प्राणांतिक नि शतक शतक व्यापी युद्ध, जें अुत्तरेकडच्या हिंदूनी झुजत ठेविलें, तें अद्भुत नि संकटसंकुल होतेंच होतें ! – पण त्या सगळ्या मुस्लिम राष्ट्रांशी आणि त्या समवेतच या समुद्रमार्गे चालून आलेल्या दुराधर्ष, मुस्लिमांहूनही हिंदुधर्माचा द्वेष करणाऱ्या आणि हिंदु लोकांना ख्रिस्ती बनविण्यासाठी कृपाणाची नि क्रूरतेची पराकाष्ठा करणाऱ्या पोर्तुगीझादिक समुद्रमार्गे तुटून पडलेल्या युरोपियन ख्रिश्चन राष्ट्रांशीही अेकाच वेळी तें दुहेरी महायुद्ध लढत ठेवण्याची पाळी केवळ दक्षिण हिंदुस्थानवरच पडली आणि दक्षिणेतील हिंदूंनी, त्यातही विशेषतः हिंदूंच्या संग्रामातीलही अध्वर्यूपद धारण केलेल्या मराठ्यांनी त्या सर्व दिशांनी अुसळलेल्या

शत्रूंच्या लाटांना अेकाकी थोपवून धरणारी वीरश्री आणि दुर्दम्य साहस दाखविलें! मुस्लिम आणि पोर्तुगीझांच्या सशस्त्र धार्मिक आघाडीवर सहस्रावधि हिंदु स्त्री-पुरुष बालकांचे धर्मार्थ प्राणदान होत असतानाच युद्धाच्या राजकीय आणि सांग्रामिक आघाडीवरही दक्षिणेतल्या ह्या हिंदुवीरांनी आशियाअी, युरोपियन नि शिद्दीसारख्या आफ्रिकन अशा जगातील झाडून साऱ्या आक्रमक अहिंदु राष्ट्रांशीही हें जें सशस्त्र महायुद्ध झुंजत ठेविलें तें जागतिक अितिहासातही विशेषत्वाने अुल्लेखनीय आहे !

हिंदु विक्रमादित्य हेमू

राणा संगाच्या नेतृत्वाखालील अनेक रजपूत आणि काही मुसलमान राज्यांचीं सैन्यें अेकत्र होअून, राणा संगाचीच नव्हे तर चितोडच्या राजवंशाचीच जी दिल्लीच्या सिंहासनावर हिंदु साम्राज्याची पुनः प्रतिष्ठा करण्याची चिरंतन महत्त्वाकांक्षा स्फुरत आलेली होती तिच्या ओर्षेने कनवाह येथे बाबराशीं तुंबळ युद्ध होअून धर्मवीर राणा संगाचा अंतिम पराभव झाला आणि बाबराने दिल्लीस मोंगल बादशाहीची स्थापना केली. पुढे बाबर सन १५३० मध्ये मरण पावला. त्याचा पुत्र हुमायून हा बादशहा झाला. परंतु त्याच्यावरही लवकरच सूर घराण्याचा संस्थापक शेरशहा याने विजय मिळवून दिल्ली पादाक्रांत केली. त्यामुळे हुमायून हा कित्येक वर्षे अिराणादिक देशांत वनवासात फिरत होता. ह्या सर्व घडामोडींचें सविस्तर वृत्त देण्याचें या समीक्षणात्मक ग्रंथात काही कारण नाही, स्थळही नाही. अिथे अितकेंच सांगितलें म्हणजे पुरे आहे की, बादशहा शेरशहाच्या वंशातही बंडें, हत्या अित्यादि मुस्लिम राजवंशाच्या ठराविक घालमेली होअून शेवटी महमद आदिलशाह हा बादशहा झाला

ह्या महंमद आदिलशहाने आपला सर्व कारभार हेमू नांवाच्या अेक कर्तृत्ववान् हिंदु वझिराचेच हाती सोपविला ! हेमूनेही आपल्या हिंदुधर्मास लवलेशही धक्का लागू न देता बादशाहीची सर्व सत्ता आपल्या हातीच गुंडाळून घेअून सक्षमपणे चालविली.

परंतु हुमायनच्या मोंगलपक्षाच्या अितर मुसलमान सरदारांना ती घटना शल्याप्रमाणे बोचू लागली. मध्यंतरी सन १५४२ त हुमायूनला वनवासात असताच अकबर हा पुढे भावी सम्राट् होणारा मुलगा झाला. हुमायूनने अिराणच्या राजाचें सैनिक साहाय्य घेअून हिंदुस्थानवर स्वारी केली. त्याच्याविरुद्ध गेलेल्या त्याच्या भावाचे डोळे काढून आणि अितर शत्रूंनाही कडक शासन करून हुमायूनने दिल्लीही परत जिंकून घेतली. परंतु बादशाहीपद असें त्याच्या हाती येतें न येतें तोच अि. सन १५५६ मध्ये हुमायून राजवाड्यातील संगमरवरी सोपानावरून (जिन्यावरून) पाय घसरून मरण पावला. त्यामुळे हिंदुस्थानात पुन्हा जिकडे तिकडे अराजकता

बळावली आणि दुष्काळही पडल्यामुळे सर्वत्र वैराण झालें. या वेळी सूर घराण्यातील हुमायूनने पराभूत केलेला शेवटचा बादशहा जो महंमद आदिलशहा तो वायव्येकडे पळून गेलेला होता. पण त्याने ज्या कर्तृत्वशाली हिंदु वजिराच्या हाती साऱ्या राजसत्तेचा कारभार पूर्वी दिलेला होता तो हेमू मात्र ह्या संधीचा काहीतरी लाभ घेण्यासाठी दिल्लीच्या प्रदेशातच टिकून होता.

ह्या हिंदु वीर पुरुषाच्याविषयी त्याचें पूर्वीचें किंवा नंतरचें अगदी अल्पस्वल्प तेवढेंच वृत्त मुसलमानी अतिहासांतून लिहिलेलें आहे. हिंदु अतिहासकार असा त्या वेळेस होणेंच दुर्घट होतें आणि जे पुढे झाले त्यांनीही स्वतंत्रपणे असें ह्या हेमू-विषयी काहीच सांगितलेलें नाही. परतु मागे पाचव्या प्रकरणात हिंदुसम्राट् धर्मरक्षक (नासिरुद्दिन) ह्याचेविषयी ज्याप्रमाणे त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कृत्यांचीच साक्ष अतर कोणत्याही कागदी लेखांपेक्षा अधिक प्रमाणार्ह धरलीच पाहिजे हें आम्ही दाखविलें आहे, तशाच अखंडनीय प्रमाणांहीं ह्या वीरवर हेमूचाही जो अतिहास देता येतो तो आम्ही देत आहो.

या कामी हेमूची ओर्षा हिंदुसाम्राज्याची असतानाही त्याला मोंगल मुसल-मानांच्या आणि विशेषतः बाबर पक्षीयांच्या विरुद्ध गेलेल्या अनेक अफगाणी मुस्लिम सरदारांचें साहाय्य मिळत गेलें.

ह्या नियोजित हिंदू स्वातंत्र्ययुद्धाचा आराखडा आखण्यात आणि ती मूळ स्फूर्ति हेमूच्या मनात जागृत होण्यातही पूर्वी होऊन गेलेल्या हिंदुसम्राट् श्री धर्मरक्षकाच्या (नासिरुद्दिनच्या) चरित्राचाच आदर्श हेमूच्या पुढे असला पाहिजे. श्री धर्मरक्षकाच्या त्या महाव् प्रयत्नात यद्यपि त्याला स्वधर्मासाठी लढत असता मोठें अपयश आलें, प्राणही गमवावे लागले, तरीही त्या अपयशामुळे किंवा त्याचे नंतर राणा संगादिक रजपूत महावीरांच्या ह्याच महत्त्वाकांक्षेपायी कनवाह येथे बाबराशी लढता लढता झालेल्या पराभवामुळे किंवा त्याच्याही आधी शतशत समयी ह्याच हिंदुसाम्राज्यसत्तेच्या महत्त्वाकांक्षेपायी लक्षावधि हिंदु स्त्री-पुरुषांना भोगाव्या लागलेल्या भयंकर यातनांपायी, झुंजाव्या लागलेल्या भयंकर लढायापायी किंवा आत्मार्पणार्थ पेटलेल्या जोहाराच्या चितांमुळे,–हिंदुजातीच्या अंतरात्म्यात ती मुस्लिम सत्ता अुलथून टाकून हिंदु साम्राज्यसत्ता सर्व भारतात स्थापन कर-ण्याची जी साहसी ओर्षा, पुनःपुन्हा विझून जात असताही पुनः पुन्हा भडकून अुठणाऱ्या जिवंत ज्वालामुखीप्रमाणे सळसळतीच सळसळत राहिलेली होती !– तीच ह्या समयी ह्या वीरवर हेमूच्या महत्त्वाकांक्षी हिंदु मनात अुफाळून आली. वर सांगितल्याप्रमाणे अप्रकटपणे युद्धाची सज्जता करून जे मुसलमान सरदार त्याला मोगलांविरुद्ध मिळणार होते त्यांचें आणि त्याच्या हिंदु सैन्याचें अेकसूत्रीकरण करून अकस्मात् तो हेमू दिल्लीवर स्वारी करून आला. दिल्लीस तो पूर्वी वझीर

असता त्याच्याच हाताखाली राबलेले सारे हिंदु-मुस्लिम अधिकारी, राजकारणी आणि विशेषत: हिंदु लोक कोणताही म्हणण्यासारखा विरोध न करता त्याच्या पूर्वीच्या वझिरातीच्या दराऱ्याच्या प्रभावानेच त्याला शरण गेले. मोगल साम्राज्याची मुख्य राजधानी जी दिल्ली तीच त्याने जिंकल्यामुळे जिकडे तिकडे खळबळ अुडाली.

हेमू हा जन्मजात हिंदु होता. तो सुलतानाच्या राजवटीत आपल्या पराक्रमाने चढतचढत अधिकारपदावर गेला. शेवटीही आपल्या वैयक्तिक हिंदुधर्मास लवलेश धक्का लागू न देता त्याने हिंदु म्हणूनच त्या दुर्बल सुलतानाचें वझीरपद पटकाविलें नि सारी बादशाही मुठीत ठवली. आता तर त्याने अुघडपणे हिंदुत्वाचा ध्वज अुभारला होता! साऱ्या मुस्लिम सुलतानशाहीस अुच्छेदून हिंदुसाम्राज्याची अुघड अुठावणी केली होती! त्यामुळे साऱ्या कट्टर मुस्लिम जगतात 'अिस्लामी सलतनत बुडाली!' 'तोबा तोबा!' निव्वळ काफरशाही झाली!!' असा अेकच हाहाकार झाला!

दिल्ली जिंकताच स्वस्थ न वसता वीरवर हेमूने लगोलग दिल्लीच्या 'बादशाही' तख्तावर अुघडपणे आणि गाजावाजाने स्वत:च्या हिंदुत्वाची घोषणा करीत आरोहण केलें. आणि त्याने स्वत: 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली! थोडी स्थिरस्थावर करून तो ससैन्य पुढील प्रदेश हस्तगत करण्यास बाहेर पडला त्याने पूर्वी मुस्लिम सुलतानाचा वझीर असता मुस्लिम सुभेदारांचीं किंवा अितर बंडें मोडण्याचे कार्यी पधरा सोळा लढाया जिंकलेल्या होत्या. त्यामुळे त्याचा समरपटुत्वाचा आत्मविश्वास दुर्दम्य झालेला होता. तो निर्भयपणे दिल्लीहून जो निघाला तो साम्राज्यातील अगदी दुसरा जो दुर्जिक्य दुर्ग म्हणून समजला जाअी त्या आग्रचावरच स्वारी करून त्याने तो आग्रचाचा दुर्ग आणि तें नगर सपाटयासरशी जिंकून घेतलें!

या वेळी बादशहा अकबर हा तेरा चौदा वर्षांचा होता. त्याचें पालकत्व आणि राज्यचालकत्व बहिरामखान हा मुख्य 'वझीर' करीत होता. त्या बहिरामखानाने हेमूची बातमी अैकताच प्रथमत: या हिंदूच्या प्रबळ अुठावणीचाच नाश केला पाहिजे असें ठरविलें. पण राजपुतान्यापासून तो दक्षिणेपर्यंत अनेक लहान मोठीं हिंदु नि मुस्लिम राज्यें दिल्लीच्या या नवीन स्थापल्या गेलेल्या मोंगल बादशाहीच्या विरुद्ध बडें करून अुठलेलीं होतीं. म्हणून त्यांचा नि:पात प्रथम करावा आणि तोवर बाल बादशहाला अकबराला लांब काबूलला नेअून ठेवावें, असा बहिरामखानाला अितर मुस्लिम कारभाऱ्यांचा आग्रह होता. पण त्या धूर्त बहिरामखानाने स्पष्ट सांगितलें की हेमूने अुद्घोषित केलेल्या हिंदु साम्राज्याच्या प्रबळ अुठावणीचा प्रथम नायनाट केला पाहिजे. त्याप्रमाणे बहिरामखान अेक सुसज्ज सैन्य घेअून हेमूवर चालून आला. त्याने बाल अकबरास काबूलला न घाडता सैन्या-

सह स्वतःचे समवेत घेतलें होतें. विक्रमादित्य हेमूच्या नि बहिरामखानाच्या बादशाही सैन्याची गाठ पानपतजवळ पडली. विक्रमादित्य हेमूचें सैन्यही मोठ्या वीरश्रीने लढलें. लढाअी हेमूनेच जिंकली, असाही रंग दिसू लागला. पण अितक्यात हत्तीवरून लढत असलेल्या विक्रमादित्य हेमूच्या डोळ्यांत बहिरामखानाच्या सैन्यातून सुटलेला अेक बाण सूऽसूऽ करीत शिरला. त्या आघातासरशी हेमू बेशुद्ध होअून अकस्मात् हत्तीखाली कोसळला. त्याच्या सैन्यात जे मुसलमानी विभाग होते ते जवळ जवळ भाडोत्रीच होते. आणि स्वतः विक्रमादित्य हेमू कोसळताच हिंदु सैन्यातही अेकच गोंधळ अुडाला. बहिरामखानाने तें पाहताच निकराचा हल्ला केला आणि हेमूच्या सैन्याची वाताहत करून घायाळ हेमूस जिवंत पकडला. विक्रमादित्य हेमूला अकबर बादशहापुढे अुभा करून बहिरामखानाने सांगितलें की बादशहानेच ह्या काफराचा स्वहस्ते शिरच्छेद करावा, पण बाल अकबराचें मन तसें करण्यास धजेना. तेव्हा संतप्त झालेल्या बहिरामखानानेच स्वतःचें खड्ग अुपसून हेमूचें शिर तत्काळ धडापासून वेगळें केलें.

विक्रमादित्य हेमूचें हें बलिदान अितर कोणत्याही हिंदु हुतात्म्याप्रमाणेच हिंदु धर्माच्या आणि हिंदुराज्यलक्ष्मीच्या गौरवासाठीच, सौभाग्यासाठीच होतें ! हिंदु राष्ट्राने त्याच्या गौरवस्मृतीपुढे आपलें मस्तक कृतज्ञतेने सदोदित लवविलें पाहिजे. दुर्दैवाने त्याचें नांव हिंदुराष्ट्रात आज प्रचलित असलेल्या अिनमिन साडेतीन हुतात्म्यांच्या आणि वीरात्म्यांच्या ज्ञात असलेल्या पावननामावळीत राष्ट्रवीर म्हणून मुळीच स्मरलें जात नाही ! ठीक आहे. नाही तर नाही ! पण अशा या कृतघ्न हिंदुजातीतील कोटी कोटी आत्मविस्मृत जीवांनी नसलें तरी हिंदुजातीने, हिंदुराष्ट्राने सामुदायिक रीत्या तरी हें ध्यानात ठेविलें पाहिजे की मुसलमानांच्या हातून हिंदुराष्ट्राला मुक्त करून हिंदुसाम्राज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा जी पिढ्यान्-पिढ्या जिवंत राहिली, आणि शेवटी मुसलमानी राज्यसत्तेच्या चिंधड्या चिंधड्या अुडवून तिच्या प्रेतावर आपला यशस्वी भगवा झेंडा अुभारू शकली, ती हिंदुराजसत्तेच्या विजयाची महत्त्वाकांक्षा या विक्रमादित्य हेमूसारख्या आज विस्मृत असलेल्या अनंत धुरंधर धर्मवीरांच्या आणि धाडसी 'दिल्लीन्द्रपदलिप्सवां'च्या रणयज्ञात झुंजत पडलेल्या प्राणाहुतींच्याच अन्नावर सतत पुष्ट होत राहिली म्हणूनच होय !

येथेच आम्ही आमची ही श्रद्धांजलि विक्रमादित्य महान् हेमूच्या स्मृतीला वाहतो ! आणि स्थलाभावामुळे पुढचें कथासूत्र हाती घेतो.

वीरांगना राणी दुर्गावती – बहिरामखान अकबराला घेअून थेट दिल्लीस गेला. बहिरामखान आणि अकबराने मिळून खाली ग्वाल्हेरपर्यंत सर्व बंडखोर प्रदेशांना पुन्हा अंकित केलें. लवकरच बहिरामखानाचें आणि अकबराचें पटेनासें होअून अकबराने सर्व राज्यकारभार आपल्या हाती घेतला. (सन १५६०). तेव्हा बहिरामखानाने अकबराविरुद्ध बंड केलें. परंतु त्यात त्याचा पराभव झाला.

अकबराने तरीही त्यास जिवें न मारता मक्केस धाडून दिलें. पण वाटेतच बहिराम-खानाच्या अेका जुन्या शत्रूने त्यास ठार मारलें.

अि. स. १५६४ त गोंडवनातील नावाजलेला स्वतंत्र रजपूत राजा वीर नारायण याजवर अकबराने स्वारी केली. राजा वीर नारायण अल्पवयी होता. पण त्याची आअी राणी दुर्गावती हिने शरण न जाण्याचें ठरवून अकबराच्या वादशाही चतुरंग सैन्याशी युद्ध ठाणलें. त्या शूर हिंदू राणीने शक्य तोवर वादशहाच्या सैन्यास पुढे सरकू दिलें नाही. आपल्या राजदुर्गात सशस्त्र झुंज देत तिने आपल्या हिंदु स्वातंत्र्याचें रक्षण केलें. शेवटी जेव्हा अकबराच्या अनेक पटीने मोठ्या असलेल्या सैन्यापुढे आपला निभाव लागणार नाहीं असें तीस वाटलें तेव्हा तिने काय केलें? शरण गेली? स्त्री म्हणून क्षमेची भिक्षा मागितली? किंवा अितर काही राजपूत स्त्रियांनी अधूनमधून केलें तसें अकबराकडे राखी धाडून मला भगिनी माना आणि जीवदान द्या, अशी हताश नि कोडगी लगट केली? नव्हे! नव्हे! मुसलमानांच्या हाती पडलेल्या हिंदु राजस्त्रियांच्या शीलाची लाडगेनोड करून ते राक्षस कशी निर्लज्ज आणि निर्दय चिरफाड करतात तें शेकडो अुदाहरणावरून ठाअूक असलेल्या त्या वीरांगना दुर्गावती राणीने तसें काहीअेक न करता शेवटच्या पेटलेल्या रणकुंडातच आपल्या अनेक सहकारी स्त्रियांसह देहाचा होम केला! तरीही राजा वीरनारायण यानेही मुसलमानांशी लढाअी चालूच ठेविली. पण शत्रूच्या प्रचंड वलापुढे काही कालानंतर लढणें त्याला अशक्य होअून बसलें. शेवटी त्याचें राज्य मोंगल राज्यास जोडण्यात आलें.

अकबराने नंतर राजपुतातील लवचीक स्वभावाचे जे जे राजे आढळले आणि मुसलमानांशी पिढ्यानपिढ्या लढण्याचा ज्यांना अुवग आलेला होता अशा काही हिंदु राजांशीं अत्यंत स्नेहाचीं आणि त्यांना मोंगल साम्राज्यात गौरवाने वागविलें जाअील अशा अभिवचनांचीं मिठ्ठास बोलणीं चालू केलीं. या अकबराच्या धोरणाला अनुकूल असताही हे लवचीक रजपूत राजे चितोडच्या राण्याचा परंपरागत वाणे-दारपणा पाहून पुनःपुन्हा आपला मोंगल सत्तेशी स्नेहसंबंध जुळविण्यास कचरतात, लाजतात आणि चितोडचे महाराणा तर आपलें अस्तित्व मान्य करण्यास कट्टर विरोध करण्याचें सोडीत नाहीत, असें पाहून अकबराने प्रथमतः चितोडचाच चिच्छा पुरविण्याचें योजिलें. पण काही केलें तरी सामदामाने चितोड आपलें स्वातंत्र्य गमा-विण्यास सिद्ध होत नाही हें पाहून सन १५६७ त अकबराने चितोडवर स्वारी करून त्यास वेढा दिला. त्या वेळी बाबराशी लढलेल्या विख्यात राणा संगाचा मुलगा अुदयसिंह हा चितोडचा राणा होता; परंतु त्याचे अंगी आपल्या पूर्वजाच्या पराक्रमाचा लेशसुद्धा नसल्याने तो रानावनात पळून गेला. पण चितोडची सारी राजसत्ता त्याच्या ज्या अेका नायकिणीच्या हातात अेकत्र झालेली होती, तिने

साऱ्या राजपुतांत पराक्रमाचें स्फुरण संचरविलें. चितोडच्या मोठमोठ्या सरदार जयमल्ल, पट्टे आणि अितर राजपूत पुढाऱ्यांनी अुदयसिंह पळून गेला तरी मोंगलांशी तुंबळ युद्ध चालूच ठेविलें. पुढे जयमल्ल नि पट्टे हे दोघे रणात मारले गेले. तेव्हा पराभव निश्चित होणार हें जाणून हताश न होता ती राजपुतांची हिंदू वीरजाति अधिकच चिडून अुठली. सर्व सैनिकांनी रणात प्राणांवर अुदार होअून अेकच 'हरहर महादेव' केला! मुसलमानांच्या मुंडक्यांच्या राशी पडल्या. त्या रणनिकरात आपले राजपूत योद्धे बहुतेक कापले गेले असें दिसताच चितोडच्या वीरपरंपरेप्रमाणे सर्व राजपूत स्त्रियांनी आधीच रचलेली प्रचंड चिता पेटवून दिली आणि आपल्या स्वधर्माचा जयजयकार करीत जिवावर अुदार होअून मुलालेकरांसुद्धा तटावरून त्या चितेत पटापट अुड्या घेतल्या! हिंदु वीरांगना भस्म होअून गेल्या, पण दुष्ट म्लेंच्छांचा त्यांनी स्वतःस स्पर्श होअू दिला नाही! हा चितोडचा तिसरा जोहार होय.

पण हिंदुपक्षात अेवढा हाहाकार अुडालेला पाहूनही आजच्या लचाळ हिंदु अितिहासकारांनाही, जो परम अुदार, हिंदुमुसलमानांच्या अेकीसाठी तळमळणारा हिंदूंना पूर्वी कोणच्याही मुसलमानी राजाने वागविलें नसेल अितक्या अुदारतेने वागविणारा, केवळ मुसलमानी 'रामराजा'च असा जो मोंगल बादशहा वाटतो तो हिंदूंमध्ये हाहाकार अुडवून देणारा अकबर हाच होय!

परंतु चितोडच्या स्त्री-पुरुष-बालकांच्या ह्या हत्याकांडानेही समाधान न पावलेला अकबर चितोडच्या रक्तबंबाळ नगरात शिरून जे अुरलेसुरले हिंदु नागरिक आकांत करीत होते त्या सर्व हिंदु पुरुषांची, आणि ध्यानात ठेवा! – हिंदु स्त्रियांचीही त्याने सरसकट कापाकापी केली. तीस सहस्र राजपूत हिंदु या अेका चितोडच्या युद्धात मृत्युमुखी पडले! नंतर माणसांप्रमाणेच चितोडचे दगडधोंडे अित्यादि निर्जीव पदार्थही मुसलमानांचे शत्रुच आहेत असें वाटून की काय त्या राक्षसी विध्वंसकाने, बादशहा अकबराने, हिंदूंचीं देवळें, मंदिरें, राजवाडे, घरेंदारें अित्यादि अुभें दिसेल तें तें धडाधड पाडवून मातीला मिळवून दिलें. चितोडच्या नगरदेवीच्या देवळाचा, मूर्तीचा आणि सर्व परिसराचाही तसाच विनाश करून तेथील नगारे, दिवे, दुदुंभि (नौबती), दागिने, द्वारें अित्यादि सर्व प्रचंड वा मूल्यवान् वा हिंदुप्रिय पदार्थ तिकडे आग्र्यास धाडून देण्यात आले. चितोडच्या हिंदु राजधानीच्या अशा अमानुष नायनाटाने त्याची धर्मोन्मत्त पिपासा थोडीशी शांत झाल्यावर तो मुस्लिम बादशहा अकबर त्या 'सत्कृत्या'ने स्वतःस गाझी म्हणवीत दिल्लीस परत गेला!

आणि अिकडे ह्या आपल्या राजधानीच्या आणि राज्याच्या विध्वंसाचा परिशोध घेता न आल्याने चार वर्षें रानावनात भटकत राहिलेला राणा अुदयसिंह राज्यभ्रंशाच्या दुःखाने सन १५७२ त मरण पावला!

हिंदुकुलभूषण राणा प्रतापसिंह

अुदयसिंहाचा मुलगा राणा प्रतापसिंह. तो लगोलग चितोडच्या अस्तित्वात नसलेल्या काल्पनिक सिंहासनावर बसला ! तथापि झाडून साऱ्या जातिवंत राजपुतांच्या हृदयातील धर्मवीरत्वाचें नि अदम्य पराक्रमाचें सिंहासनच त्याला अर्पिलें गेल्यामुळे तो राणा प्रताप अेखाद्या सत्यसत्य राणा प्रतापाप्रमाणेच सिंहासनाधीश्वर शोभू लागला ! तो राणा राजपुतांचा परंपरागत राणेपणाचा बाणा प्राण गेला तरी न सोडणारा असाच निघाला. अनेक यातना सोसून, त्याने अकबराशी अपमानास्पद मित्रत्व न करता, त्या अत्यंत प्रबल मुस्लिम बादशहाचें स्वधर्मस्वातंत्र्यासाठी शत्रूत्व करणेंच भूषणास्पद नि हिंदुजीवनाचें नि हिंदुनृपत्वाचें खरें साफल्य आहे असें तो मानता झाला !

त्याने मुसलमानांच्या हाती चितोड नगर पडलेलें असल्यामुळे अितर नगरग्रामांतून आपली फिरती राजधानी त्या संकटकालात आपल्या समवेत भटकवीत नेली आणि मुस्लिम सैन्याच्या सत्तेखालून हळूहळू पुष्कळ प्रदेश मुक्त करून स्वत:चें अेक जिवास जीव देणारें सैन्यही अुभारलें. त्याच्या ह्या काळातील पराक्रमाचें आणि रणप्रसंगाचें वर्णन रोमहर्षक असताही स्थलाभावी येथे देता येत नाही.

शेवटी त्याचा प्रभाव अितका वाढला की प्रत्यक्ष अकबरालाच आपलें बादशाही सैन्य राणा प्रतापचा नायनाट करण्यासाठी धाडावें लागलें. त्या वेळी अकबरास शरण गेलेला जयपूरचा राजा मानसिंग नि बाटलेला रजपूत सरदार महावतखान ह्या सरदारांसह स्वत राजपुत्र सेलीम हा अकबर बादशहाचे आज्ञेवरून राणा प्रतापावर चालून गेला. ह्याच वेळी ती अत्यंत निकराची गाजलेली हळदीघाटची लढाअी झाली. लढण्याच्या आवेशात राणा प्रतापने आपला घोडा सरळ सेलीमच्या हत्तीवर घातला आणि त्या अितिहासप्रसिद्ध चेतक घोड्यानेही न डगमगता सेलीमच्या हत्तीच्या सोंडेवरच झेप घेअून आपल्या टाचा रोविल्या. बिजलीच्या चमकेप्रमाणे अेका क्षणात सेलीमच्या कंठाच्या अितक्या जवळून राणा प्रतापाचा तेजस्वी खड्ग चमकून गेला – अितका जवळून की सेलीमला अंधेरीच यावी, आणि त्याने मागे घ्यावें. आपल्या वारातून शत्रु निसटला असें पाहताच क्षणार्धात राणा प्रताप घोडा परत घेअून पुन्हा रणांगणात घुसून दिसेनासा झाला.

राणा प्रतापसिंह या अनिर्णीत लढाअीतून जो निसटला तो त्याच्या समवेत त्याच्या अितक्याच निकराने आणि त्याच्याच ह्या पराक्रमाने अुद्युक्त झालेल्या चितोड राज्यातील सहस्रावधि राजपूत वीरांच्या समूहासह साऱ्या मेवाडभर मुसलमानांचा नायनाट करीत वृकयुद्धाचा (गनिमी काव्याचा) धुमाकूळ घालीत चालला. अेक चितोड नगर तेवढें सोडून त्याने मेवाडचें सारें राज्य स्वतंत्र केलें. शेवटी राणा प्रतापने आपली फिरती राजधानी अुदेपूर येथे स्थिरस्थावर केली, ती

मात्र शेवटपर्यंत अकबराच्या हाती पडली नाही. अकबराने राणा प्रतापशी मैत्री करण्याचेही अनेक धूर्त प्रयत्न केले, पण राणा प्रताप काही केल्या त्यांना बळी पडला नाही. त्याच्या राजवटीत अितके अद्‌भुत, रोमहर्षक, स्वदेशाभिमान नि स्वधर्माभिमान यांनी रसरसलेल्या आणि सामान्य मेवाडी राजपूत नागरिकांपासून तो त्या मेवाडच्या अलौकिक महाराण्यापर्यंतच्या कृत्यांपर्यंतचे प्रसंग घडलेले आहेत की ते आमच्या हिंदु तरुणांनी रामायणातील किंवा महाभारतातील वीरोत्तंसांच्या आख्यानांप्रमाणेच धर्मबुद्धीने पाठांतर केले पाहिजेत. सुदैवाने राजपूत वीरभाटांचे असे रसरसलेले रासो अगदी भूषण कवीच्या काळापर्यंतचे अद्यापि अुपलब्ध आहेत. त्यांना माध्यमिक शाळांतून तरी अपरिहार्य वाचनीय पुस्तकें म्हणून नेमलें गेलें पाहिजे. अशा या आमच्या 'समीक्षणात्मक' ग्रंथात त्यांचे अुतारे देण्यालासुद्धा स्थल नाही. – आणि आता माझ्या या सरत्या नि मावळत्या जीवनात वेळही अुरला नाही. हा थोर हिंदुकुलभूषण राणा प्रतापसिंह लवकरच सन १५८१ त मरण पावला.

(३) पंजाबात अेका नवीन हिंदुशक्तीचा — शीख संप्रदायाचा अुदय

पंजाबमधल्या श्री गुरुनानक ह्या नांवाच्या अेका साधु पुरुषाने पंधराव्या शतकाच्या शेवटी शेवटी अेक धर्मपंथ स्थापला. त्याचे जेवढे अनुयायी होते, शिष्य होते, त्यांचा लवकरच अेक संघ बनला. ते स्वत:ला श्रीगुरु नानकाचे शिष्य म्हणून 'शीख' असें म्हणवून घेत. श्रीगुरु नानक हा स्वत: गृहस्थाश्रमीच असून अीश्वराची आराधना आणि जनसेवा ही भक्तिमार्गानेच सुसाध्य असते, असें तो सांगे. मनुष्यमात्र हा भक्तिमार्गाचा अधिकारी आहे, त्या काळी पंजाबात काय किंवा भरतखंडभर काय, मुसलमानांनी हिंदु धर्माचा अेकच अुच्छेद मांडलेला होता आणि स्वतंत्र मुसलमानी साम्राज्य स्थापण्यासाठी लढाया नि युद्धें यांचा मुसलमानांनी धुमाकूळ मांडला होता. त्यांना भरतखंडभर हिंदुराज्यकर्त्यांनी आणि जनतेने समरांगणात नेटाचा प्रतिकारही चालविला होता. अल्लाअुद्दिनासारख्याच्या होअू घातलेल्या साम्राज्याचे तुकडे तुकडे अुडवून हिंदूंनी विजयनगरसारखे स्वतंत्र नि प्रबळ हिंदुराज्यही पुन्हा स्थापन केलें होतें, हें सर्व पूर्वी कथन केलेलेंच आहे. राजपुतान्यांत, गोंडवनात हिंदुराजांच्या पराक्रमी सैन्यांनी मुसलमानांची वारंवार धुळधाण अुडवून दिली होती.

श्री गुरुनानक :– पंजाबात मात्र मुसलमानांच्या राजसत्तेला प्रबळ आव्हान देणारा हिंदु असा कोणी अुरला नव्हता. अशा परिस्थितीत श्री गुरुनानक पंजाबात अुपदेश देअू लागला की हिंदु आणि मुसलमान हे दोघेही अीश्वराच्या दृष्टीने सारखेच आहेत, दोघेही माझ्या या भक्तिमार्गाने गेले असता मोक्ष पावू शकतात. दोघेही भाअू भाअूच आहेत. माझ्या पंथात हिंदु आणि मुसलमान असा भेद मी

मानीत नाही, असें जरी श्री गुरु नानक जीव तोडतोडून सांगत होता, तरी त्याच्या शिष्यवर्गात सहस्रांतून अेखाददुसराच मुसलमान शिष्य आढळून येअी. अितर सर्व हिंदूच हिंदु त्याच्या पंथांत होते. स्वतः श्री गुरु नानक हा जातीने वैश्य (बनिया) होता. श्री गुरु नानक सन १५३८ मध्ये मरण पावला. त्याला जरी स्वतःचे पुत्र होते तरी ते त्याच्या मताला अनुकूल नव्हते. त्याने (गुरु नानकाने) आपला शिष्य अंगद याचोच आपल्या मागून आपल्या पंथाच्या गुरुपदावर स्थापना केली. तथापि त्याच्या मरणापर्यंत श्री गुरुनानकाच्या पंथास अेक भक्तिपंथ, भजनी संप्रदाय अेवढेंच प्रमुख स्वरूप होतें आणि त्यांची संख्याही राजकारणाच्या दृष्टीने अगदी अुपेक्षणीय होतो. तथापि त्याच्या काही वचनांतून हिंदु लोकांच्या त्या वेळच्या दुःस्थितीविषयी शोकमय अुद्गार निघालेले आहेत. अुदाहरणार्थ,

क्षत्रियांही धरम छोडियां, म्लेच्छ भाखा गही ।
सृष्टी सब अिकवर्ण हुअी, धर्मकी गति रही ।
नीलवर्णके कपडे पहिने, तुरक पठाणी अमल भया ।।

अशीं अनेक चरणें त्याच्या नांवावर त्याची म्हणून लोकांत रूढ आहेत. अितर हिंदु संतांप्रमाणेच गुरु नानकानेही समाजातील अनेक भावडचा नि वेडगळ चालीरीतींचा निषेध केलेला आहे.

गुरु अंगदानंतर तिसरा गुरु अमरदास नि सन १५७४ त चौथा गुरु रामदास हे झाले. त्याची नि अकवर बादशहाची भेट झाली असें म्हणतात. बादशहाने गुरु रामदास यांना अेक विस्तीर्ण भूमि 'अिनाम' म्हणून दिली. त्याच भूमीवर गुरु रामदासने अेक सुंदर सरोवर आणि त्याचे काठी अेक मंदिर बांधलें. तेंच आजचें 'अमृतसर' होय! गुरु रामदास सन १५८१ त वारला. पांचवा गुरु अर्जुनमल्ल हा झाला. त्याच्याच राजवटीत शिखांची वाढ झपाट्याने होअू लागली. कारण त्यांना अमृतसर येथे अेक सार्वजनिक केंद्र मिळालें होतें. त्यातही गुरु अर्जुनाने आपल्या ह्या वाढत्या पंथाला अेक पंथाचा मुख्य ग्रंथ असावा अेवढचासाठी श्री गुरु नानकाचीं शक्य तीं वचनें अेकत्र करून आणि त्यासह तत्कालीन अितरही काही संतांचीं वचनें गोवून सर्व शीखांना प्रमाण व्हावा असा अेक ग्रंथ निर्माण केला, आणि त्यासच 'गुरुग्रथ' किंवा आदिग्रंथ ही पदवी दिली. ह्या ग्रंथात कबीराचीं वचनें आहेत, महाराष्ट्रातील संत नामदेव तीर्थयात्रेस पंजाबात गेले असता त्यांच्या भक्तिमार्गाचा आणि अभंगांचा तिकडे पुष्कळ प्रचार झाला होता. श्री गुरु नानकांची शिकवण नि संत नामदेवांची शिकवण ही समानच आहे असें पाहून संत नामदेवांचीही काही मराठी कविता गुरु ग्रंथात गोविलेली आहे. हा ग्रंथ प्राकृतात आहे. ह्याच प्राकृतास सध्या पंजाबी म्हणतात. त्या काळी केवळ शास्त्रीय विषय लिहिण्यासाठीच जिचा विद्वान् वर्ग बहुधा पंजाबकडे अुपयोग करीत नि त्यामुळे जिला 'शास्त्री लिपी'

असेंच म्हणत, त्या देवनागरीत मुळातच तो ग्रंथ लिहिलेला नव्हता. आपल्या अिकडे ज्याप्रमाणे अगदी कालपरवापर्यंत मोडी लिपी वापरीत त्याप्रमाणे, पंजाबांत त्या पत्रव्यवहारादिक सामान्यजनांच्या व्यवहारांत जी लिपी वापरली जाअी त्या प्राकृत लिपीतच तो ग्रंथ लिहिला गेला. तिला साधारण लोकांत लुंडोमुंडी असें म्हणत. परंतु गुरुग्रंथ त्या लिपीत लिहिला गेल्यानंतर शीख लोकांनी गुरूनी स्वीकारलेली लिपी म्हणून तिचा विशेष गौरव व्हावा यास्तव 'गुरुमुखी' असें त्या लिपीला म्हणण्यास आरंभ केला.

जहांगीर बादशहा झाल्यानंतर त्याचा वडील मुलगा खुश्रू ह्याने बादशहा-विरुद्ध बंड केलें. खुश्रू पंजाबात पळून गेला. त्या वेळेस शीख गुरु अर्जुनदेवाने त्यास आपल्याकडे अुतरू दिलें. त्यामुळे चवताळून जहांगीर बादशहाने अर्जुनदेवास पकडून त्याचा वध केला. शिखांच्या अितिहासात मुसलमानांशी लढताना स्वधर्मासाठी आपल्या प्राणांचें बलिदान करणारा गुरु अर्जुन हाच पहिला वीर गुरु होय ! याच गुरु अर्जुनदेवाच्या काळी शीख लोकांत अेक स्वतंत्र संघटना बांधण्याची अीर्षा अुत्पन्न होअून प्रत्येक शीख पंथीयाने अेक ठराविक धार्मिक कर गुरूस दिलाच पाहिजे अशी पद्धति चालू केली गेली आणि पंथात सैनिक शक्तिही वाढावी म्हणून सैनिक आघाडीही अुघडण्यात आली.

त्या गुरूच्या वधामुळे शिखांत मुसलमानांविरुद्ध त्वेषाची लाट गुप्तपणे वाढत चालली. त्यांच्या अनुयायांत विशेषतः लढवय्या हिंदु जाट जातीच्या शेतकरी लोकांचाच त्या काळी आणि शेवटपर्यंतही भरणा झालेला होता. हे हिंदु जाट त्या पंथांत सामावलेले आणि सबळ असल्याने त्या पंथाविषयी पंजाबच्या सर्वच हिंदु लोकांत ममतेची आणि अेकात्मतेची भावना होती. शिखात जसजसा मोंगलाच्या धार्मिक छळापायी हिंदु म्हणून, हिंदु धर्माचे संरक्षक म्हणून, शीख पंथाचे कट्टर अनुयायी म्हणून सैनिक प्रवृत्तीचा नि संघटनेचा प्रसार होत गेला, तसतसा त्यांच्या पंथाला अेक अुपद्रवी हिंदु सैनिक केंद्र या दृष्टीने मोंगल सरकार कटाक्षाने पाहू लागलें.

अर्जुनाचा पुत्र गुरु हरगोविंद याने लवकरच बादशहास कर देण्याचें नाकारलें. तेव्हा त्याला धरून बादशहाने बारा वर्षेपर्यंत कारागृहात कोंडून टाकलें. पुढे सुटका होताच त्याने त्या वेळचा मोगल बादशहा जो शहाजहान त्याचे विरुद्ध अुघड बंड केलें तरीही त्याकडे मोठेसें महत्त्वाचें विरोधी केंद्र म्हणून न बघता अेक लहानसें बादशाही सैन्य शहाजहानने धाडलें. परंतु संग्राम येथे अकस्मात् शीख अितक्या त्वेषाने लढले की त्या मुस्लिम सैन्यपथकाचा पराभव झाला. त्यामुळे पंजाबातील हिंदूंना जरी आश्चर्य आणि आनंद वाटला तरी बादशहाने काही तिकडे विशेष लक्ष दिलें नाही गुरु हरगोविंद सन १६४५ त मरण पावला. त्याच्यानंतर हरराय, हरकिशन नि तेज बहादुर असे गुरु झाले. पण ह्या गुरुपीठाला खरें तेज आणि

नैतिक सामर्थ्य असें वस्तुतः गुरु तेज बहादुराच्या धर्मकार्यी केलेल्या देदीप्यमान बलिदानानेच चढलें. गुरु तेजबहादुर हा आनंदपूर येथे वास्तव्य करी. हिंदूंना बळाने मुसलमान केलें जाण्याचा अत्याचार पंजाबात ठिकठिकाणी वारंवार घडत असे. अशा वेळी गुरु तेजबहादुराने आणि त्याच्या शीख सैनिकांनी मुसलमानांचा प्रतिकारही अनेकदा केलेला होता. अितक्यात नरराक्षस औरंगजेबाने सर्व हिंदु जगतासच मुळापासून अुपटून काढण्याचा अघोर निश्चय केला. साऱ्या भरतखंडभर त्याच्या त्या दुष्कार्याचा हिंदु जगतानेही घोर विरोध मांडला. तोंच काश्मिर येथील समग्र ब्राह्मणवर्गावर औरंगजेबाने धर्मांतराच्या तलवारीची धार धरून आज्ञा सोडली की काश्मिरच्या श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या सर्व ब्राह्मणांनी अेक तर मुसलमान व्हावें, नाही तर काफरांवर औरंगजेबाने लादलेला असह्य कर त्यांना द्यावा लागेल. तेव्हा तिकडे हाहाकार अुडाला. अशा प्रसंगी 'गुरु तेजबहादुराने अेखाद्या धैर्यमेरूसारखें हिंदूंना सांगितलें, 'देअू नका!' स्वधर्मासाठी प्राण सोडा, पण स्वधर्मास सोडू नका!' हिंदु लोकांनी अशीं बाणेदार अुत्तरें देण्यास प्रारंभ करताच औरंगजेब चिडून गेला आणि त्याने श्री गुरु तेजबहादुराला पकडून आणून शिक्षा सांगितली की 'तू अेक तर मुसलमान हो नाही तर मृत्युदंडास सिद्ध हो!' तेव्हा धर्मवीर गुरु तेजबहादुराने 'हिंदुधर्माचा त्याग मी केव्हाही करणार नाही, तुला वाटेल तें कर, जा,' असें बाणेदार अुत्तर दिलें. तेव्हा अधिकच क्रुद्ध होअून औरंगजेबाने शीखगुरु तेजबहादुराचा तत्काल शिरच्छेद केला. ती गोष्ट सन १६७५ त घडली. ह्याच बलिदानप्रसंगी गुरु तेजबहादुरासमवेत त्याचे कित्येक हिंदु शिष्यही धरले गेले होते, त्या सर्वांनीही मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें नाकरल्यामुळे त्यांचेही भयंकर हाल करून कित्येकांचा शिरच्छेद करण्यात आला, तर काही ठळक हिंदु वीरात्म्यांना करवतीने त्यांची मस्तकें दुभंग करून ठार मारण्यात आलें. ह्या हिंदु हुतात्म्यांतच श्री भाअी मतिदास हेही मारले गेले, ह्या मतिदासांच्या कुलास भाअी ही प्रेमळ पदवी शीख गुरूकडून अर्पिलेली होती. ह्या हुतात्मा भाअी मतिदासांच्या कुलात आपले पंजाबमधले अर्वाचीन हिंदुराष्ट्रभक्त भाअी परमानंद हे जन्मलेले होते. ह्याच वीर गुरूचा पुत्र म्हणजे पुण्यप्रताप हिंदुराष्ट्रवीर श्री गुरु गोविंदसिंह हा होय!

हिंदुराष्ट्रवीर श्री गुरु गोविंदसिंह:–शीख संप्रदायास अक्षरशः खड्गाचें पाणी चढवून त्याचा अेक पोलादी लढाअू नि दुर्भेद्य हिंदु दुर्ग करण्याचें महत्कार्य जें केलें आणि त्यायोगे शीखांच्या पंजाबातील महाराजा रणजितसिंगांच्या काळची प्रबळ नि स्वतंत्र अशी हिंदुराज्यसत्ता नि धर्मसत्ता स्थापण्याच्या हिंदुराष्ट्रकार्याची मूळ प्रेरणा जर कोणी अितक्या बलवत्तरपणे दिली असेल तर ती श्री गुरु गोविंदसिंह ह्यानेच होय! हें सत्य विशदविणाऱ्या श्री गुरु गोविंदसिंहाच्या – ज्याला शीखच नव्हेत तर सारे पंजाबीय हिंदु त्या काळी सुद्धा प्रमाने दशम बादशहा म्हणत, कारण तो गुरु नानकापासून दहावा गुरु होता – जीवनांतील अनेक पराक्रमी आणि

रोमांचकारी घटनांपैकी स्थलाभावी अेकच घटना जरी येथे सांगितली तरी पुरे आहे.

गुरु नानकानंतर प्रत्येक मोठ्या धार्मिक संप्रदायाच्या प्रकरणी जें घडतें तसें घडून गुरु नानकाच्या शिष्यांमध्ये अनेक पंथोपपंथ पडले. पण ते सर्व शिष्य हिंदु समाजाचें जीवनच जगत होते. लग्नें, कार्ये अित्यादि सर्व सामाजिक व्यवहारांत ते हिंदु समाजापासून कोणत्याही प्रकारे विलगलेले नव्हते. हिंदु समाजातील प्रत्येक संप्रदायाप्रमाणे त्यांची म्हणून काही धार्मिक मतें असत. गुरु ग्रंथात नामदेव कबीरसुद्धा अनेक हिंदु संतांच्या वाणी (वचनें) स्वतः नानकाच्या वाणी-समवेत अेकत्रच दिलेल्या आहेत; आणि गुरु नानकापासून तो त्यांचा आद्य ग्रथ वाचताना शिखांच्या धर्मपीठांतून त्या सर्व वाणींना सारखेंच पवित्र समजून अद्यापपर्यंत तसाच वाचला जातो. गुरु नानकाच्या अेका पुत्रानेच अेक पंथ काढलेला होता. असे अुपपंथ निघता निघता जेव्हा शिखांवर हिंदु धर्माच्या रक्षणासाठी म्हणजेच शीख धर्माच्या रक्षणासाठी मोगलांशी लढताना वर सांगितल्याप्रमाणे शिखांचेंच अेक शस्त्रसज्ज दल अुभारावें लागलें तेव्हा काही काळाने गुरु गोविंदांच्या मनात स्वराज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा जागृत होताच त्याला अेक 'गुरूच्या' जिवास जीव देणारे, सशस्त्र युद्धालाच वाहून घेणारे आणि अत्यंत संघटित असे अेक शिखांतूनच निवडलेले स्थायी सैन्य स्थापावें, असें वाटू लागलें.

तेव्हा गुरु गोविंदसिंहाने सर्वसामान्य शिखांची अेक मोठी महासभा बोलाविली. अशा प्रसंगाविषयीची त्या प्रसंगाच्या आगेमागे शिखांनी लिहिलेल्या पद्यमय ग्रंथातून हिंदूंच्या पुराणातील रसभरित वर्णनाच्या पद्धतीवर वर्णनें केलेलीं आहेत. पण त्यांतील अितिहासास धरून असलेला तेवढाच सारांश येथे देतो.

शिखांची महासभा भरविल्यानंतर गुरु गोविंदाने विचारलें की, स्वधर्मासाठी प्राणत्याग करण्यास केव्हाही सिद्ध असणाऱ्या आणि सैन्यातच आपलें जीवन व्यवसाय म्हणून सुद्धा घालविण्यास सिद्ध असणाऱ्या शिखांचे अेक स्थायी सैन्य मला अुभारावयाचें आहे. तरी या कडक व्रतास अंगीकारणाऱ्या शिखांनी मला आपलीं नांवें कळवावीत. पुढे तशा शिखांतून गुरूंनी स्वतः प्रथमतः पांच शिखांची निवड केली. त्यांपैकी प्रत्येक शिखाची प्रवृत्ति पोलादाप्रमाणे तेजस्वी नि धारदार असली पाहिजे. हें तत्त्व त्यांच्यात बिंबविण्याकरिता त्या निवडक पांचांचा पहिला संकल्प जो करण्यात आला तो म्हणजे अेका धारदार पोलादी खंड्यास (लहान खड्गास) पाण्यामध्ये काही मंत्र म्हणत ढवळून ते मंत्रित पोलादी पाणी त्या शिखाच्या डोक्यावर शिंपडलें जाअी. नंतर आपल्या कटीला त्याने सदोदित कृपाण बांधलेंच पाहिजे हा दुसरा नियम त्याला पाळावा लागे. त्याने आपल्या शरीरावरचे केश केव्हाही कापता कामा नयेत; त्याचप्रमाणे त्याने

सदोदित लंगोटबंद (कच्छधारी) असलें पाहिजे आणि हातात त्याने घेतलेल्या लढाऊ व्रताचें प्रतीक म्हणून अेकेक पोलादी कडें आणि केसात अेक कंगाही (फणी) धारण केला पाहिजे. केश, कंगा, कच्छ, कडें आणि कृपाण हीच अशा प्रत्येक व्रतस्थ लढाऊ शिखाला धारण करावीं लागणारीं पांच चिन्हें होत. यांनाच पांच ककके म्हणतात. शीख समुदायातून ह्या विशिष्ट वीरदलात ज्या वरील प्रकारच्या व्रतस्थ शिखांना गुरूंनी त्या वेळेपासून स्वत: निवडून घेतलें त्याच शीख दलास ' खालसा ' हें पुढे भारतभर प्रसिद्धीस आलेलें नामकरण प्राप्त झालें. खालसा हा शब्द अुर्दू आहे. त्याचा मूळ अर्थच ' निवडलेले ' असा आहे.

ह्या खालसा सैनिकांची वाढ अिष्टांकापर्यंत होताच गुरुगोविंदाने पंजाबात लहान लहान हिंदु मुसलमान संस्थानिकांना नि प्रदेशांना जिंकून किंवा लुटून घेण्याचा अुपक्रम चालविला. अर्थातच जो त्या वेळचा मोगल बादशाह आणि गुरु गोविंदाच्या पित्याला, श्री गुरु तेजबहादुरांना हिंदु धर्म न सोडण्यासाठी ठार मारणारा दुष्ट शत्रु औरंगजेब त्याने गुरु गोविंदालाही पकडून आणण्यासाठी मोंगल सैन्य पंजाबात धाडलें. त्याच्याशी ज्या चकमकी ' खालसा ' सैन्याच्या झाल्या त्यामुळे गुरूने स्वत:सच आनंदपुरच्या गडात कोंडून घेतलें. मोंगलांनी तत्काल गुरूला वेढा घातला. गुरूसमवेत जें खालसा सैन्य गडातून लढत होतें त्यांतच गुरूचे दोघे अठरा वर्षाच्या वरील व दोन आतील वीरपुत्र होते. आपल्या सैन्यास अुत्तेजण्यासाठी नि पुत्रांचीही परीक्षा पाहण्यासाठी त्या पराक्रमी गुरूने अेके दिवशी आपल्या त्या दोन पुत्रांस ससैन्य गडाबाहेर पडून मोंगलांशी लढण्यास धाडलें. त्या असम लढाअीत त्याचे दोन्ही पुत्र मारले जात असता या अलौकिक वीर पित्याने ' वाह ! वाह ! ' म्हणून सारखा जयध्वनि चालू ठेवला होता. रात्र होताच लढाअी नित्याप्रमाणे थांबली आणि तें आलेलें खालसा सैन्य चोरून मारून गडात पुन्हा घुसलें. पण त्या खालसा (निवडक) सैन्यातील अनेकांचा धीर मात्र बाहेर रणांगणावरच सुटलेला होता. तें पाहून गुरूने सर्वांना स्पष्टपणे सांगितलें की, ज्यांना आपला जीव वाचविण्यासाठी मला सोडून खालसातून बाहेर पडायचें असेल त्यांनी तत्काल तसें करावें. मी मात्र क्वचित् या गडावाहेर पडून लढाअी अशीच चालविणार आहे. तेव्हा त्या अगदी ' निवडलेल्या 'तीलही (खालसांतीलही) अनेक शीख गुरुसेवेचीं त्यागपत्रें देअून गुरु गोविंदाला सोडून रातोरात गडाबाहेर निघून गेले. लवकरच रात्री काळोखात गुरु गोविंदसिंह त्याच्या अुरलेल्या दहाबारा वर्षाच्या आतील दोन मुलांसह सपत्नीक त्याच्या समवेत राहिलेल्या प्रामाणिक खालसा वीरांनाही निरोप देअून, मुसलमानी वेढ्यातून किल्ल्याबाहेर निसटला.

गडातून त्या दुर्दैवी रात्रीच्या गाढ अंधारात आपल्या त्या दोन लहान मुलांसह श्रीगुरु गोविंदसिंह सपत्नीक जंगलात भटकत चालले असता शेवटी त्यांची नि

त्यांच्या त्या दोन मुलांची ताटातूट होऊन तीं लेकरें मुसलमानांच्या हाती पडलीं. त्या दुष्टांनी त्या दहाबारा वर्षांच्या आतील लेकरांनाही 'तुम्ही अेकतर हिंदु धर्म सोडून मुसलमान व्हा, नाही तर आम्ही तुम्हांला भयंकर हाल करून मारून टाकू अशी धमकावणी दिली. तेव्हा सिंहाच्या छाव्याप्रमाणे निर्भयपणे गर्जत त्यांनी हिंदुधर्माचा त्याग करण्याचें अमान्य करून 'आम्ही स्वधर्मार्थ मरण्यास सिद्ध आहोत' असें अुत्तर दिलें. संक्रुद्ध मुसलमानी अधिकाऱ्यांनी शिक्षा दिली की या काफराच्या मुलांना भितीत चिणून 'ठार मारा.' अर्थात् त्या दोघा ताठ अुभे राहिलेल्या वीर कुमारांच्या भोवती विटांवर विटा रचून गळ्यापर्यंत चुनेरी पक्की भित अुभारण्यात आली आणि गळा दाबून प्राण घेणाऱ्या शेवटच्या शिळा ठेवण्याच्या आधी पुन्हा अेकदा विचारण्यात आलें, 'अे काफर, हिंदुधर्म छोडते हो या नहीं।' 'नहीं, नहीं कदापि नहीं' दाबलेल्या आवाजात जितकें अुंच गर्जता येअील तितक्या अुंच स्वरात ते दोन छावे हिंदुधर्माचे जयजयकार करीत असतानाच चुन्यामध्ये त्यांच्या मुखमस्तकांना गाडून टाकणाऱ्या शेवटच्या विटा मुस्लिम दैत्यांनी रचून टाकल्या.

हिंदु अितिहासातील हिंदुधर्मार्थ केलेल्या बलिदानाचे जे अमर भूषणास्पद प्रसंग आहेत त्यांतच गणना करण्यासारखा हाही प्रसंग आहे! शिखांच्या हृत्पटलावर तो प्रसंग जसा ज्या भाषेत रक्ताच्या रंगाने चित्रिला गेला आहे, असें त्यांनी लिहिलेल्या अितिहासात नि काव्यात आढळतें त्याचेच वर दिलेलें संक्षिप्त वर्णन ही अेक पुसट छाया आहे. अितिहास या दृष्टीने ती क्रूर घटना सत्य आहे. पण ती वरील काव्याच्या रंगातच वर्णिलेली काय ती आढळते.

कुमार हकीकतराय :—याच कालात कुमार हकीकतराय नांवाच्या अेका हिंदु मुलाने शाळेतील पाटीपूजेच्या दिवशी देवीचें अेक चित्र पाटीवर काढलें होतें. तें पाहताच त्या घोर अपराधासाठी (!) मुस्लिम अधिकाऱ्यांनी त्या लहान मुलास मुसलमान होण्याची शिक्षा दिली. त्याने ती नाकारताच त्याला ठार मारण्याचा धाक दाखविण्यात आला. तोही त्याने धाब्यावर बसविल्यामुळे आणि आपला हिंदुधर्म सोडण्याचें नाकारल्यामुळे त्यास ठार मारण्यात आलें. त्या वीर हिंदु-कुमाराचो स्मृति हिंदुलोकांत पंजाबभर आजही प्रतिवर्षी अेखाद्या धार्मिक सणासारखी पाळली जाते.

गुरु गोविंदांचा अंत :—गुरु गोविंद सिंहाच्या मुलांना वर अुल्लेख केल्याप्रमाणे ठार मारल्यानंतर पंजाबच्या रानावनात भटकत असता गुरु गोविंदाने औरंगजेबास अेक त्याची काहीशी मनधरणी करणारें पत्र लिहिलें. राजकारणात हे डावपेच चालायचेच. बादशहानेही त्याचें अुत्तर दिलें, शेवटी काही तडजोड होअून गुरु गोविंदसिंहाने पंजाब सोडून बाहेर जावें असें काहीसें ठरलें. तेव्हा गुरु गोविंदसिंह हिंडत हिंडत महाराष्ट्रात नांदेड येथे जाअून राहिले. तेथे त्यांचेच

कर्मचारी असणाऱ्या दोघा पठाण युवकांनी कट करून ते निजले असता त्यांच्यावर खड्ग चालविला. त्या झटापटीत जे प्राणघातक घाव गुरु गोविंदाला लागले त्यातच त्यांचा अंत झाला.

गुरु गोविंदसिंह हयाचें लहानपण पंजाबात गेलें नसून त्यांच्या सुरक्षिततेसाठी बिहारात पाटणा येथे व्यतीत झालें होतें. त्यामुळे त्यांना तिकडील हिंदी भाषेचा लळा लागलेला होता, नि तीत त्यांनी पुढे विद्वत्ताही संपादन केली होती. त्यांनी त्यांचे लिहिलेलें 'विचित्र नाटक' या नांवाचें आत्मवृत्त हा महत्त्वाचा ग्रंथ त्या हिंदीतच लिहिलेला आहे, गुरुमुखी म्हणजे पंजाबी भाषेत नव्हे. त्यांनी चंडिकेवरही अनेक वीररसपूर्ण कविता लिहिलेली आहे. प्रत्यक्ष 'खड्गाला' तर त्यांनी चंडिकेचें प्रतीक म्हणून गौरवून त्यावर अेक लहानसें स्तोत्र रचलें आहे. त्याचें आमच्या अितर ग्रंथांतूनहि आम्ही वीररसप्लुत काही अुतारे 'जय तेगम्' (जय खड्गम्) या मथळ्याखाली दिलेलेही आहेत. या दशम गुरूची म्हणजे वीर गुरु गोविंद सिंहाची वाणी हिंदीमध्ये असल्यामूळे आणि त्यांनी खालसा पंथाला दिलेली दीक्षाही नानक परंपरानुगत शीख सनातन्यांना तितकीशी रुचत नसल्यामुळे सर्व शीखांचा मिळून मागे जो अुल्लेखिलेला आदि ग्रंथ आहे त्यात अितर नअू गुरूंची वाणी अेकत्र केलेली असताही या दशम गुरु गोविंदसिंहाचे तेवढे ग्रंथ समाविष्ट केलेले नाहीत. या अंतर्गत कलहामुळेच खालसा पंथाने 'दशम ग्रंथ' म्हणून गुरु गोविंदांची वाणी तेवढी अेकत्र केलेली आहे.

दुसरी अेक महत्त्वाची गोष्ट तेवढी हिंदुत्व दृष्टीने येथे सांगितली पाहिजे की खालसा पंथाच्या अुत्पत्तीमुळे शिखांत सहजधारी नि केशधारी असे दोन पंथ प्रचलित झालेले आहेत. सहजधारी हे केवळ नानकपंथी आचार पाळतात. ते केस ठेवीत नाहीत. अितर 'कक्के'ही पाळतातच असें नाही. सहस्रावधि हिंदु लोक, जे शीख आचारही पाळतात ते, याच सहजधारी पंथात मोडतात. परंतु हें ध्यानात ठेविलें पाहिजे की शीखांना वीरवृत्तीचें पोलादी रसायन पाजून जर कोणी त्यांना जिवंत, लढाअू नि पंजाबातील प्रबळ मुस्लिमसत्तेचेंही शस्त्रबळाने पूर्ण अुच्चाटन करणारें हिंदु अुराप्ट्र घडविलें असेल तर तें श्रीगुरु गोविंदसिंहानेच होय!

श्री वीर बंद बैरागी :– हिंदुराप्ट्राच्या अितिहासात अमर झालेल्या वीरात्म्यांत आणि हुतात्म्यांत ज्याचें नांव केव्हाही गाळता कामा नये तो पंजाबात अत्याचारी मुसलमानांवर हिंदूंचा सूड घेणारा पहिला प्रत्याचारी आणि नुसता पराक्रमीच नव्हे तर प्रत्याक्रमी असा हिंदु पुरुष म्हटला म्हणजे वीर बंदा बैरागी हा होय! श्री गुरु गोविंदसिंह पंजाब सोडून गेल्यानंतर महाराप्ट्रात नांदेड येथे जेव्हा स्थायिक झाला तेव्हा तिकडे प्रख्यात असलेला जो अेक वैष्णव साधु बाबा बंदा बैरागी त्याची नि गुरु गोविंदाची अेकदा भेट झाली. पुढे हळू हळू गुरूने

पंजाबमध्ये हिंदूंच्या अुडालेल्या दुर्दशेचे, मुसलमानांनी बलात्काराने चालविलेल्या हिंदूंच्या मुस्लिमीकरणाचें, गुरु गोविंदसिंहाच्या स्वत:च्या कुलावर कोसळलेल्या अनर्थाचें आणि त्यांनी स्वत: केलेल्या युद्धांचें मर्मभेदी वृत्त बैरागी बंदाला विवरून सांगितलें. आपल्या चार पुत्रांचा जो सूड घेअील असा हिंदु पंजाबात कोणीच अुरला नाही, ही गुरु गोविंदसिंहाची दु:खद गाथा अैकून बैरागी बंदाचें रक्त तापून गेलें. त्याने आपले पूर्वाश्रमीचे धनुष्यबाण हाती घेतले. गुरु गोविंदसिंहाने आपल्या सर्व शिष्यांना चिठ्ठी दिली की बंदाचें सर्वतोपरी साहाय्य करा. ती चिठ्ठी घेअून हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा, मुसलमानांवरही तसेच प्रत्याचार करून, सूड घेण्याचा कृतनिश्चय केलेला हा हिंदु वीर पंजाबकडे गेला.

पण काय करावें ! स्थलाभावासाठी आणि आता अधिक लिखाण लिहिणें आम्हांला कोणत्याही प्रकरणी अशक्य झाल्यामुळे जें काही लिहिलें आहे त्याच्या समारोपापुरतेंच लिहून आता हा ग्रथ संपविणें भाग आहे. नाही तर बाबा बंदाने मुसलमानांची पंजाबात अुडविलेली ससेहोलपट, त्याने केलेले शिरच्छेद, मुसलमानांनी हिंदु स्त्रियांच्या केलेल्या विटंबनेचा घेतलेला जशास तसा सूड, ज्या सरहिंदला गुरु गोविंद सिंहाचे लहान दोन पुत्र मुसलमानांनी भिंतीत चिणून मारले, त्या सरहिंद नगराला जिंकून घेअून त्यातील मुसलमानी वस्ती जाळून टाकून मुसलमानी सरदारांच्या बायकामुलांसुद्धा भर अुन्हात अनवाणी काढविलेल्या धिंडी, आणि मुसलमानांनी स्वधर्म न सोडण्यासाठी हिंदूंचे केले होते तसेतसेच मुसलमानांचेही केलेले असह्य छळ, ह्याचें आणि साऱ्या पंजाबात हिंदु राजसत्तेची त्याने पिटलेली यशस्वी ग्वाही याचें संक्षिप्त वर्णन तरी आम्ही केलेंच असतें. ह्या ग्रंथाच्या पूर्वार्धात प्रकरण सहामध्ये हिंदूंनीही तुरळक प्रसंगी मुसलमानांवर धार्मिक स्वरूपाच्या केलेल्या प्रत्याचारांनी मुसलमान समाजाचाही भयाने कसा थरकाप अुडे, तें दाखविलेंच आहे. बाबा बंदानेही पंजाबात तशाच प्रत्याचारांनी मुसलमानांचा थरकाप अुडविला. शेवटी दिल्लीच्या बादशहाने पंजाबवर मोठें सैन्य धाडलें. वृकयुद्धाच्या (गनिमी काव्याच्या) पद्धतीने वीर बंदाच्या सैन्यपथकांनी त्या मुसलमानी सैन्याचा अनेक ठिकाणी पराजय केला. पण त्या धुमाकुळीत वीर बंदा बैरागी स्वत:ला हिंदूचा सेनापति असें जें म्हणवी त्याचें 'खालसा' पंथातील शीख लढवय्यांना मोठें वैषम्य वाटू लागलें. तें वाढता वाढता वीरबंदाने अेकत्रित केलेल्या हिंदूंच्या सैन्यात फाटाफूट होअून खालसा पंथाचे शीख त्या प्रतापी सेनानीला, वीर बंदा बैराग्याला सोडून गेले. पण त्या अेकटचा खालसा पंथात काही मुसलमानांना जिंकण्याची धमक नव्हती. त्यामुळे मोगलांच्या सैन्याचें बळ वाढून अेका निकराच्या लढाअीत तो पराक्रमी सेनानी वीर बंदा बैरागी, त्याच्या अेकुलत्या पुत्रासह आणि निकटच्या सहकाऱ्यांसह मुसलमानांच्या हातात सापडला. वीर बंदाच्या अंगात काही अद्भुत जादू भरलेली आहे अशी भाबडी भीति बहुतेक मुसलमानांना भेदरवीत असे. बंदा

वीराला पकडून बेडया ठोकल्या तरी या जादूने तो वेळी अवेळी मांजर बनून भर-सैन्यातून निसटून जातो अशी समजसुद्धा मोठमोठ्या मुस्लिम अधिकाऱ्यांची झालेली असे. त्यामुळे त्या जादूपायी पहाता पहाता तो पळून जाओल या भीतीने भला मोठा लोखंडी पिंजरा करून त्यात त्यास अितर अनेक पाडाव केलेल्या हिंदु बंदिवानांसह कोंडून मोठ्या मुस्लिम सैनिक पथकासह दिल्लीस धाडून देण्यात आलें. दिल्लीला त्याला बादशहासमोर जेव्हा आणण्यात आलें तेव्हाचा तो भयंकर प्रसंग ! ! वीर बंदा, त्याचा अेकुलता अेक लहानसा पुत्र आणि त्याचे शंभर अेक शिष्य यांचे, ते हिंदुधर्म सोडीनात म्हणून झालेले असह्य छळ नि हत्या, ते वाहिलेले रक्ताचे पाट ! बंदा वीराला तर शिरच्छेद न करता केवळ छळापायी ठार मारण्याच्या हेतूने लाल लाल तापलेल्या सांडसाने भोसकून भोसकून त्याच्या शरीरातील मांसाचे अुपसलेले लचके ! हें सर्व अघोर वर्णन करण्यास येथे स्थळ नाही; पण प्रत्येक कृतज्ञ नि अभ्यासू हिंदूने तें वर्णन शिखांच्या आणि स्वतः मुसलमानांच्या तत्कालीन लिहिलेल्या ग्रंथांतून आहे तितकें तरी अवश्य वाचावें !

आम्ही लिहिला होता तो शिखांचा अितिहासः– आम्हांला दु.ख वाटतें की आम्ही लिहिलेल्या शिखांच्या अितिहासातूनच तें वाचावें, असें आज आम्हांस सांगता येत नाही. त्याचें कारणही येथे थोडक्यात सांगितलें पाहिजे. अिंग्लंडमधून साधारणतः सन १९०९ मध्ये राजक्रांतीच्या अुलाढालीत आम्ही फ्रान्समध्ये जेव्हा गेलो तेव्हा श्रीमती मॅडम कामा यांच्या घरी अेक दोन महिने होतो. तेवढ्या वेळात आमच्यापाशी संग्रहिलेल्या साधनाना अुपयोजून आम्ही शीखांचा दोनशेअेक पानांचा साधार नि रक्त सळसळविणारा अितिहास मराठीत लिहिलेला होता. शीखांच्या वाङ्मयातील अगदी प्रथम लिहिलेलें पुस्तक म्हणून जें समजलें जातें त्या 'भाअी वाळाकी जनमसाखी' म्हणजे गुरु नानकाच्या प्रत्यक्ष जीवनाची भाअी बाळा नांवाच्या शिष्याने लिहिलेली गाथा ह्या पुस्तकापासून तो दशम गुरूच्या दशमग्रंथापर्यंत बहुतेक मूळ लिखाणांचा अभ्यास केलेला होता, शिखांचे कनिंगहॅम प्रभृति अिंग्रजी अितिहास तर वाचलेलेच होते. महाराजा रणजितसिंगाने पंजाबातून मुसलमानांचें राज्य अुखडून देअून जें शतद्रू (सतलज) ते सिंधुपर्यंत आणि वर जम्मू काश्मीरपर्यंत विस्तारलेलें नवें हिंदुराज्य स्थापलें आणि जयपाळ नि अनंगपाळ यांच्या प्राचीन पराभवांचा सूड अुगविला, त्या महाराज्याच्या स्थापनेपर्यंतचा वृत्तान्त आमच्या ग्रंथात आम्ही आणलेला होता. पण आम्हांस आजही ही गोष्ट मनात बोचत आहे की त्या अितिहासाचें तें हस्तलिखित बहुधा अिंग्रजांच्या हातात पडून आज नष्ट झालेलें असावें ! नाहीतर ज्याच्या हाती आम्ही तें लिखाण छापण्यासाठी गुप्तपणे हिंदुस्थानात धाडलें होतें त्यांनी येता येता अिंग्लिश आरक्षकांच्या (पोलिसांच्या) झडतीच्या भीतीने ते समुद्रास्तृप्यंतु केलेलें असावें ! अर्थातच तो आमचा मराठी ग्रंथ प्रकाशित होण्याचे आधीच लुप्त झालेला आहे. नष्टच झालेला आहे ! !

तरीही ज्याला श्री. बंदा वीराच्या नि त्याच्या त्या हिंदु सैनिक पथकाच्या अमर हौतात्म्याची ती भीषण कथा वाचावयाची असेल त्याने आमची त्या प्रसंगावरची अंदमानात लिहिलेली जी अेक कविता आजही अुपलब्ध आहे, ती तरी वाचावी.

वीर बंदाच्या शिष्यांमधील आख्यायिकेप्रमाणे बंदा वीराला तो मेला असें समजून शेवटी त्याचा देह त्या मुस्लिम राक्षसांनी अेका अुकिरड्यावर दिल्लीबाहेर फेकून दिलेला होता. पण त्याच्या काही शिष्यांनी अद्भुत वनस्पति त्यास खावविल्यामुळे तो शुद्धीवर आला आणि त्या शिष्यांनी त्यास लगोलग गुप्तपणेच पंजाबात नेलें. पुढे त्याचें अेक गुरुपीठच स्थापन झालें आणि शेकडो शीख त्याचे अनुयायी म्हणून 'बंदअी' या नांवाने तें गुरुपीठ बंदा वीराच्या वंशाकडे अजूनही नांदवीत आहेत. पुढील रामसिंग गुरूंच्या कुका शीख संप्रदायाप्रमाणेच ते स्वत:ला कट्टर हिंदु समजतात

बंदा वीराच्या मृत्यूनंतर खालसा शीखातील आणि खालसा या अुपपंथाच्या बंदअी, सहस्रधारी अित्यादि अितर शीखांतील कोणाही शीख संप्रदायाचे पंजाबात राजकीय किंवा सैनिक बळ असें काही वर्षें अुरलें नाही. जिकडे तिकडे फाटाफूट ! परंतु अुलटपक्षी बंदा वीरापर्यंत लढता लढता मुसलमानांचीही राजकीय सत्ता मोडकळीसच आल्यासारखी झाली होती. दिल्लीसही तीच स्थिति होती. परंतु साऱ्या हिंदुस्थानात त्या वेळी बळावत चाललेल्या हिंदूंच्या नव्या धुरंधर शक्तीची– मराठ्यांची सैनिक नि राजकीय महत्त्वाकांक्षा मात्र बळावत चाली होती. मात्र प्रत्यक्ष दिल्लीहून पंजाब ते मुलतान, काश्मीर, कंदाहार प्रांतापर्यंत मोगल बादशाही नांवापुरती तेवढी अुरलेली होती. ठिकठिकाणचे पुण्डगुण्ड आपापल्या टोळ्यांसह पुंडाअी तेवढी माजवीत होते.

त्यानंतर शीखांच्या सत्तेची वाढ कशी कशी होत गेली आणि शेवटी महाराजा रणजित सिंगाच्या पंजाब ते काश्मीरपर्यंतच्या साऱ्या प्रांतात मुसलमानी राज्याचा अंत होअून हिंदु स्वातंत्र्याचा पुनरुदय कसा झाला, तें सर्व वृत्त याच स्थळी नुसतें सूचित करणें काय तें शक्य आहे. कारण या 'समीक्षक ग्रंथा'चा जो संकल्पित काळ आहे त्यापुढील काळात त्या अैतिहासिक घटना पडत आहेत.

तथापि दोन तीन विधेयें मात्र या पंजाबी अितिहासातील काळाविषयी येथे सूत्ररूपाने काय तीं सांगणें शक्य आहे नि अवश्यही आहे.

(अ) पंजाबमधील मुसलमानांची राजसत्ता अुलथून टाकून त्याला स्वतंत्र करण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न मराठ्यांनी केला. शीखांच्या अितिहासात काय किंवा अेकंदर अुथळपणे लिहिलेल्या भारतीय अितिहासांतून काय, शीखांनी पंजाबातून मुसलमानी सत्ता प्रथमत: अुखडून दिली असा जो ढिला समज प्रचलित आहे तो चुकीचा आहे. शिखांची राजसत्ता जेव्हा अगदी उत्कर्षास पोचली होती तेव्हाही ते शेजारच्या दिल्लीलासुद्धा पूर्णपणे जिंकून घेअू शकले नाहीत. हें निक्षून सांगण्यात

शिखांचा अुणेपणा दाखविण्याचा मुळीच अुद्देश नाही. पण मराठ्यांच्या खऱ्या राष्ट्रीय पराक्रमाला खोट्या वढाया मारून अुणेपणा आणू पहाणाऱ्या निंदकांचीं तोंडें तेवढीं बंद करण्याचा हेतु आहे. पंजाबातल्या पंजाबात तरी मुसलमानी बादशाही अुलथून पाडून महाराणा रणजितसिंगाच्या राज्यासारखें स्वतंत्र हिंदुराज्य स्थापण्याचें श्रेय अेकंदरीत मुख्यत्वेकरून आमच्या शीख संघटनेलाच आहे, हें निर्विवाद. पण पुण्याहून निघून खाली तंजावरपर्यंत आणि वर सिंधु नि सिंधूच्याही पलीकडे हिंदुराष्ट्राचा लढता नि चढता ध्वज नेअून रोवणाऱ्या आणि दिल्लीच्या मुस्लिम बादशहाला तथाकथित बादशहा करून सोडणाऱ्या मराठ्यांच्या प्रचंड पराक्रमाला त्या सात शतकांच्या कालखंडाच्या हिंदु अितिहासात तरी तोड नाही, हेंही पण निर्विवादच आहे!

(आ) **नेपाळचें स्वतंत्र हिंदुराज्य** :– आपल्याकडे लिहिल्या गेलेल्या बहुतेक भारतीय म्हणविणाऱ्या अितिहासग्रंथांतून किंवा शालेय पुस्तकांतून अितर अभारतीय प्रदेशांचा अुल्लेख असतो. पण आश्चर्य असें की नेपाळच्या प्रदेशाचा नव्हे तेथील शूर हिंदुराज्याचा नांवापुरता सुद्धा अुल्लेख नसतो. जणू काय नेपाळ हा भारतीय हिंदुराष्ट्राचा कोणीच लागत नाही! पण वस्तुतः जितका महाराष्ट्र, पंजाब किंवा मद्रास हे प्रदेश हिंदु राष्ट्राचे अविच्छेदनीय अंश आहेत तितकाच नेपाळ हाही अविच्छेदनीय अंशच आहे. या प्रांताच्या किंवा अुपप्रांताच्या राजसत्ता प्रसंगी निरनिराळ्या असतील, परंतु राष्ट्र असे, हे सर्व अुपभाग ह्या हिंदुराष्ट्राचेच अंगभूत आहेत, हिंदुराष्ट्राशी ते अेकजीव झालेले आहेत. हिंदुस्थानातील अितर प्रांतांवर आशियातील मुसलमानांची आणि युरोपियन म्लेंच्छांची त्या गेल्या नअूदहा शतकांत अनेक आक्रमणें आणि सतत युद्धें झालीं. पण सुदैवाने नेपाळमध्ये मात्र त्या म्लेच्छांचा राजकीय किंवा धार्मिक स्वरूपाचा तितका अुपद्रव होअू शकला नाही. अेकंदरीत हिंदूधर्म नि हिंदुस्वातंत्र्य, म्लेच्छांचे तमले अुपद्रव हाणून पाडून नेपाळमध्ये स्वतंत्रपणे नांदू शकलें. ह्यामुळे, खरें म्हटलें असता हिंदुराष्ट्राचा नेपाळ हा भाग अेक अुत्तमांशच समजला गेला पाहिजे. आणि आपल्या हिंदु राष्ट्राच्या अितिहासात नेपाळला मानाचा नि प्रतिष्ठेचा पहिला प्रणाम केला गेला पाहिजे! पण वस्तुतः आपल्या विवेकशून्यतेमुळे परिणाम अुलटच झालेला आहे आमच्या अितर भारतीय प्रांतांतील पारतंत्र्याच्या विव्हलात नेपाळ रुतला गेला नाही, त्याचा ह्या अुलाढालीशी फारसा संबंध आला नाही म्हणूनच आपल्या ह्या अुथळ भारतीय अितिहासग्रंथात नेपाळचें नांवही चुकत माकतच येतें किंवा येतही नाही!

हा स्वाभिमानशून्य विपर्यास निरस्त करण्यासाठी आम्ही नेपाळच्या आंदोलनाची अेक हिंदुसंघटनीय स्वतंत्र चळवळच सन १९२४ त अंदमानहून सुटताच हिंदुस्थानभर चालविली होती, हें प्रसिद्धच आहे. त्याच वेळी 'नेपाळी आंदोलनाचा

अतिहास ' हें स्वतंत्र पुस्तकही आम्ही लिहिलें आहे आणि त्यात नेपाळच्या पराक्रमी अतिहासाचें आणि त्यांनी केलेल्या अखंड नि यशस्वी हिंदुस्वातंत्र्य संरक्षणाचें वृत्त दिलेलेंच आहे. ह्या समीक्षणात्मक ग्रंथात मात्र स्थलाभावी तें वृत्त देण्याची शक्यता आता अुरली नाही. आवश्यकताही तितकीशी नाही. गेल्या दहा शतकांच्या प्रारंभी नेपाळात प्रथम आमच्या **नेवारी हिंदूंचें** राज्य होतें. त्यानंतर जिकडे तिकडे राजपुतान्यांतून मुस्लिमांच्या अुपद्रवाने जे पराक्रमी राजपुरुष मेवाडातून अितरत्र भाग्योदय करण्यास निघून गेले त्यांतीलच अेक पराक्रमी राजपूत नेता आपल्या अनुयायांसह हिमालयाच्या नेपाळकडच्या प्रांतात शिरला. त्याने अेक छोटेसें स्वतंत्र हिंदुराज्य स्थापलें. पुढे होता होता ह्या राजपुतांनी खाटमांडूपर्यंत प्रदेश व्यापला व तें नगर आपली राजधानी केली. जे प्रबळ हिंदुराज्य त्यांनी स्थापन केलें तेंच आजचें हें नेपाळी राज्य होय. भारतीयांचें चित्त नेपाळच्या महत्त्वाकडे आणि हिंदुराष्ट्राचें नेपाळातील हिंदूंशी असलेल्या अैक्यात्म्याच्या नि अेकजीवित्वाच्या नात्याकडे वेधण्यासाठी अितका काय तो नेपाळच्या अितिहासाचा नामोल्लेख अिथे पुरे आहे ! हे राजपूत कट्टर गोरक्षक असल्यामुळे त्यांना हळूहळू गोरखा हेंच जातिवाचक नांव पडलें.

येथे कालाक्रमाने पुढचें असलें तरी हेंही सांगून टाकतो की भारतावर अिंग्रजांचें राज्य असताना सर्व जगात जे सहस्रावधि गुरखा सैनिक अिंग्रजांच्या सैन्यांत सेवेस राहिलेले होते त्यांनी युरोपांतील दोन्ही महायुद्धांमध्ये शौर्य गाजविलें आणि अिंग्लंडातील, अमेरिकेतील आणि जर्मनीतीलही अुत्कृष्ट सैनिकांना चकित करावें असें सैनिक नैपुण्य नि पराक्रम दाखविला. त्यामुळे आज साऱ्या जगात गुरखा सैनिक म्हणजे अुत्कृष्ट सैनिक अशी म्हणच पडल्यासारखी झालेली आहे.

(अि) **अकबराचें अुत्तर जीवन** :—अकबराने त्याच्या पूर्वजीवनांत हिंदुधर्माचा नि राज्यांचा अुच्छेद करण्यासाठी जी क्रूरता नि जे अत्याचार केले त्यांचें वर या ग्रंथांतच पृष्ठ ८९७ वर केलेले अगदी संक्षिप्त अुल्लेखसुद्धा हें सिद्ध करावयास पुरेसे आहेत की राक्षसी धर्मवेडाने नि हिंदुद्वेषाने अकबरही तितकाच पछाडलेला होता, जितका अेखादा अल्लाअुद्दिन वा औरंगजेब पिसाळलेला होता.

अकबर हा अितर मोंगल किंवा मुस्लिम आततायांप्रमाणे नव्हता, तर तो हिंदुधर्माचा द्वेष न करणारा, न्यायप्रिय, हिंदु किंवा मुसलमान असा क्षुद्र भेदाभेद न मानणाऱ्या समतेने राज्यकारभार चालविणारा, असा अेक थोर मोंगल बादशहा होअून गेला आणि म्हणून हिंदु लोकांनी त्याच्याविषयी अपार आदर नि कृतज्ञता मानली पाहिजे असा युरोपियनांनी नि हिंदु लोकांनी लिहिलेल्या आजपर्यंतच्या अितिहासग्रंथांतून अेक सुराने अकबराविषयी जो जयघोष सतत चालत आला आहे तो केवळ परकीय अितिहासकारांनी मायावीपणे आणि स्वकीयांनी दास्यप्रवण

लांगूलचालक नि विवेकशून्यरीतीने चालविलेला आहे. आम्हा हिंदूंना अेकतर आदर, पूज्यभाव राणा प्रतापाशी दाखविता येअील किंवा त्याचा शत्रु जो अकबर त्याच्याशी दाखविता येअील. आम्हांला त्या दोघांचेंही सारखेंच ममत्व कसें मानता येअील? देवाची आणि दैत्याचीही पूजा अेकत्रच कशी बांधता येअील ? राणा प्रतापासारख्या हिंदुराजांचें स्वातंत्र्य हिरावून त्यांच्यावर आपल्या दास्याचें जोखड बळाने लादणारा आणि हिंदुधर्माचा मानभंग करण्यासाठी त्या हिंदु राजांनी आपल्या मुलीसुद्धा मला दिल्या पाहिजेत, माझ्या जनानखान्यात कोंबल्या पाहिजेत, अशा अुघड अुघड अत्याचारी मागण्या करून त्यांचा क्रूर अुच्छेद करणारा धर्मांध मुस्लिम अकबर कुठे आणि आपल्या हिंदुराष्ट्राचे, राज्याचे आणि धर्माचे रक्षणार्थ लढत लढत प्राणत्याग करणारे आमचे राणा प्रताप, राणी दुर्गावती यांच्यासारखे सहस्रावधि हुतात्मे आणि वीरात्मे कुठे !

दुसरेंही महत्त्वाचें विधेय (Point) आमच्या भाबड्या नि लांगूलचालक बहुतेक हिंदु लेखकांच्या अद्याप ध्यानात आलेलें नाही. तें हें की, अकबर हा सर्व प्रजाजनांना समतेने वागविणारा आणि अेकंदर मनुष्यमात्रातील समतेचा मोठा पुरस्कर्ता बादशहा होअून गेला, असें जें ते शाळांतूनसुद्धा शिकवितात तेंही अगदी अतथ्य आहे. मुसलमानांची वाह्यात स्तुति करण्याच्या खोडीचा तो परिणाम आहे. कारण अकबर हा मोंगल सम्राट् होता. मोंगल साम्राज्याचा जो जो दास होणार नाही त्याचा त्याचा क्रूरपणेसुद्धा नायनाट करण्यास तो कचरत नसे, मग तो मुसलमान का असेना. आता सारे मुसलमान काही मोंगल नव्हते. अुलट अफगाण नि तुर्क सुलतानांच्या हिंदुस्थानात असलेल्या सुलतानशाहयाच अकबराने विनाशून मोंगल बादशाही वाढविली. त्यामुळे ते मोंगलांचा कट्टरपणे द्वेष करीत. म्हणजे हिंदुराज्याच्या विरुद्धच नव्हे तर अकबर हा त्याच्या स्वतःच्या मोंगल बादशाहीकरता अितर कोणत्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षी बादशहाप्रमाणे लढत होता. राज्य विस्तारीत होता. अर्थात् तो सर्व मुसलमानांनासुद्धा समतेने वागवीत नव्हता. अनेक मुसलमानांचीं राज्येंसुद्धा त्याने बुडविलीं, तुडविलीं. केवळ स्वतःची अेकट्याची बादशाही टिकावी ह्याच अुद्देशाने काय तें अकबराने त्याच्या अुत्तरजीवनात हिंदूंवर जिझियासारखे अगदी अुत्क्षोभक धार्मिक कर लादले नाहीत किंवा सशस्त्र लाखो हिंदूंना सरसकट मुसलमान करण्याचीं अभियानें (मोहिमा) काढलीं नाहीत. हिंदु मुसलमानांना समतेने वागवावें हा त्यामागे मुख्य अुद्देश मुळीच नव्हता. पण हिंदूंवर असे प्रत्यक्ष धार्मिक अत्याचार जेव्हा जेव्हा मुसलमानी सुलतानांनी मागे केले तेव्हा तेव्हा त्यांचे झालेले भयंकर परिणाम त्याच्या डोळ्यांसमोर होते. तशा प्रपीडक नि धर्मांध मुस्लिम सुलतानशाह्याच्या शाह्याच केव्हा केव्हा हिंदु असंतोषाच्या आगीत भस्म झाल्या होत्या ! ह्यासाठी अकबराने त्याच्या अुत्तर जीवनात

त्याची ती जवळ जवळ साऱ्या अुत्तर हिंदुस्थानवरची स्वत:ची अेकटयाची बादशाही शांतपणे नांदावी म्हणून, हिंदु काय–मुसलमान काय, अशा अेकंदर प्रजेस, कर, वैयक्तिक न्याय अित्यादि प्रकरणी अेखाद्या औरंगजेबापेक्षा पुष्कळ अधिक सौम्यपणे नि निरुपद्रवीपणाने वागविलें. हिंदु मुसलमानांच्या धर्मनिरपेक्ष अेकात्मकतेच्या आणि समतेच्या भावनेने नव्हे, किंवा मनुष्यमात्राच्या स्वतंत्रतेला आदरण्यासाठीही नव्हे! किंवा हिंदुधर्म हा 'काफरधर्म' होता अशी त्याची अंतर्गत भावना नव्हती म्हणून तर नव्हेच नव्हे!

पण अैहिक राजसत्तेत स्वत: सर्वसत्ताधीश, सम्राट्, अगदी अरेराव झाल्यानंतर अकबराची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा त्याहीपुढे धाव घेअू लागली. लोकांचा अैहिक सम्राट् झालो, पण पारलौकिक मीच आहे, मी जगाचा पैगंबरही झालो पाहिजे, हीही अिच्छा त्याच्या मनात जागृत झाली. त्या दृष्टीने त्याने 'दीने अिलाही' नांवाचा अेक हिंदु नि मुसलमान या दोन्ही धर्महून वेगळा असा धर्म काढण्याचा घाट घातला. पण त्यातही ध्यानात ठेवण्यासारखें असें की हिंदूंना मागच्या मुस्लिम सुलतानांनी किंवा पुढे औरंगजेबाने जसें बलात्काराने मुसलमान बनविलें तसें तें करणें अशक्य वाटून कारस्थानाने अकबराने या दीने अिलाही द्वारे हिंदु धर्माचा अुच्छेद करण्याचाच प्रयत्न केला. कारण या धर्माचा मुख्य 'पैगंबर' अकबर हाच मानावा लागे. नुसतें जयगोपाळ तर सोडाच पण नमस्कार म्हणूनही भागत नसे, तर त्या अकबरी धर्मात गेलेल्या हिंदूंना प्रथम वंदनेतच 'अल्ला हो अकवर' असेंच म्हणावें लागे! त्या धर्माची भाषाही पर्शियन अरेबिकच होती. अेकंदरीत अितकें सांगणें पुरें आहे की अकबराची, मनुष्य जातीचा पारलौकिक सम्राटही बनण्याची ही सवाअी शेख महंमदी महत्त्वाकांक्षाही धुळीस मिळाली. कारण त्याच्या या नव्या धर्मात आधी कोणी फारसे हिंदु मुसलमान गेलेच नाहीत आणि जे तोंडपुजेपणापुरते अकबराचा धर्म मानीत तेही अकबर मरताच कुठेच्या कुठे बेपत्ता झाले!

तथापि त्या काळच्या जगतामध्ये जे जे थोर बादशहा, सम्राट्, राज्यकर्ते युरोपात, आफ्रिकेत वा आशियात होअून गेले, त्यांमध्ये अेवढा कारस्थानी, नियंत्रक, पराक्रमी, साम्राज्याचा विजेता नि नियंता, विद्येचा, कलाकौशल्याचा भोक्ता, काही अितिहासकारांच्या मताप्रमाणे ज्याला स्वत: अेक अवाक्षर लिहिता वाचता येत नव्हतें, पण ज्याने मोठमोठ्या ग्रंथकारांना पदरी बाळगून नामांकित ग्रंथांची रचना करविली असा अकबर हाही अेक थोर बादशहा होअून गेला. अितकी त्याची सापेक्ष स्तुति अितिहास करू शकेल. तो जितका मोठा होता तितका त्याला आम्हीही मोठा म्हणतो; पण त्यापुढे जाअून आम्हा हिंदूंच्या दृष्टीने तो परकीय, परधर्मीय, अत्याचारी नि अधम होता, यासाठी आम्हां हिंदूंना त्याचा धिक्कारही केला पाहिजे.'

✦ ✦ ✦

प्रकरण ९ वें

आले ! मुसलमानी राज्यसत्तेचे कर्दनकाळ मराठे आले !

वस्तुतः अितिहास म्हटला म्हणजे तो घडल्या तशा घटनांना अगदी हडकुळ्या गद्यासारख्या रोकडया, नि रूक्ष भाषेत सांगितला गेला पाहिजे, अशी सर्वसाधारण समज आहे. ती बहुतांशी सत्यही आहे. जें केवळ काल्पनिक नि काव्यमय आणि जें केवळ घटित नि अक्षरशः घडलेलें त्याचें वर्णन हें भिन्नभिन्न प्रकारचें असलेंच पाहिजे. त्याचें अुत्कृष्ट व्यक्तीकरण सालंकृत काव्य किंवा हडकुळें कथन ह्या भाषा-प्रकारानेच होअू शकतें केवळ घटनांचे संवत देणें, अमुक मनुष्य मेला, अमुक जन्मला, अमकी लढाअी झालो, ह्या 'संवतात' मोठें अवर्षण (दुष्काळ) पडलें अित्यादि नुसत्या घटितांचें, घटनांचें रोकडें टिपण हा अितिहासाचा मूलाधार असला तरी तें टिपण म्हणजेच काही अितिहास नव्हे. त्याला संवतावली (सनावली) म्हणता येअील. परंतु निर्भेळ अितिहासात आणि काव्यातही काही प्रदेश असा असतो की तो अितिहास नि काव्य यांच्या संयुक्त मिश्रणानेच यथार्थपणे व्यक्तविला जाअू शकतो. त्यावाचून त्या प्रसंगाच्या वर्णनाला जिवंतपणाच येत नाही. अशा प्रसंगी अितिहास हा अकस्मात् आपण होअूनच काव्यमय होतो. अशा प्रसंगी अगदी पुराणातील अद्भुत रूपकांचा, दैविक वर्णनशैलीचा अवलंब केल्यावाचून त्या घटनांचें अलौकिकत्व यथाप्रमाण अशा रसरशीतपणे रंगविलें जातच नाही. मनुष्याला साध्या घटना जशाच्या तशा गद्य भाषेत सांगता येतात. पण मनुष्याची प्रकृति नि स्वभावच असा घडविला गेला आहे की अुत्कट, भव्य, दिव्य, अलौकिक अशा कोणच्याही भावनांना रसरसून सोडणारी घटना, ती अगदी यथावत् घटना असली तरी, साध्या शब्दांत, रूक्ष गद्यात, सांगवतच नाही. त्यांत ती मावतच नाही. तेव्हाच तर मनुष्य अकस्मात् खदखदून हसतो, कळवळून रडतो आनंदाने नाचतो, संतापाने खवळून जातो, म्हणजेच अुत्कट भावनेच्या भाषेतच तो बोलू लागतो. अशा अुत्कट भावनेची नैसर्गिक भाषा म्हणजेच काव्य ! मग तें प्रसंगी गद्यातही असू शकेल. पण अुपमा, अुत्प्रेक्षा, रूपकें अित्यादि अलंकार आभूषणांही अेखाद्या राज-राजेश्वरासारखें तें गद्यही बहुधा विनटलेलें असतें.

निषादविद्धाण्डजदर्शनोत्थः श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः ॥

ही त्या आद्य कवीचीच साक्ष नाही का की मूळ श्लोकाचा, काव्याचा, जन्मच मुळी साध्या शब्दात न मावणाऱ्या अत्युत्कट भावनेत झाला !

पण अैतिहासिक, अलौकिक घटनांच्या भावनात्मक वर्णनातही अेवढी सावधानता मात्र अवश्य पाळली पाहिजे की त्यायोगे त्या मूळ घटितांचें स्वरूपच विकृत

न झालें पाहिजे. साधार अितिहासाचें स्वरूप त्या यथोचित भावनात्मक आरशा-तूनही स्पष्ट दिसलें पाहिजे.

ज्या भारतीय अितिहासाच्या काळाविषयी ह्या ग्रंथात आपणांस आता चर्चा करावयाची आहे तो काळही हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने अशा काही अलौकिक हृदय हलवून सोडणाऱ्या घटितांनी बहरलेला आहे की त्यांना वर्णिताना भावनांची काव्यमय भाषाच काय ती जिवंतपणे नि यथार्थपणे त्यांचें व्यक्तीकरण करू शकेल!

ह्या ग्रंथाच्या गेल्या आठव्या प्रकरणात हिंदु-मुसलमानांचें सहा शतकें चाल-लेलें महायुद्ध साधारणत: अिसवी सन सोळावें शतक अुलटून जाअून सतराव्या शतकात प्रवेशलें होतें. पण तीं शतकें अुलटून गेलीं तरी साऱ्या आशियातील अरब, अफगाण, पठाण, तुर्क, मोंगल अित्यादि साऱ्या मुसलमान जातींच्या त्या भीषण धार्मिक नि राजकीय आक्रमणांनी वारंवार जर्जर झालें असताही हिंदुराष्ट्र त्या सतराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत अुत्तरेत काय किंवा दक्षिणेत काय नामशेष झालें नव्हतें ! नव्हे, तर रणांगणातच घायाळ स्थितीत का होअीना, पण झुंजत राहिलें होतें ! ! अुलट सन सातशेपासून तो सन १६०५ मध्ये अकबर मरेतोपर्यंतचीं हीं दहा शतकें हिंदुराष्ट्राशी सारखें झुंजता झुंजता साऱ्या आशियातील वरील शत्रु-पक्षीय मुस्लिम राष्ट्रांचेंच आक्रमक बळ क्षीण होत चाललें होतें. आम्ही मागे पृष्ठ ८४८ ते ८६१ वरील प्रकरण सहामध्ये भारतभर पसरू पाहणाऱ्या ' मुसलमानी सत्तेच्या अितिश्रीची अथश्री ' या मथळ्याखाली अुल्लेखिलेली ती अथश्री अिसवी सनाच्या चौदाव्या शतकापासूनच कशी होत चालली होती आणि विजयनगर-सारख्या विजयशाली नवनव्या हिंदुराज्यांच्या स्थापना होण्याची शक्यता कशी निर्माण होत चालली होती, हें सत्य वर दाखविलेंच आहे.

हिंदूंचें तेंच पुनरुज्जीवन सामर्थ्य वाढत जाता जाता शेवटी आम्ही आता ज्या अिसवी सनाच्या सतराव्या शतकाला पोचलो आहोत त्या क्षणास हिंदूंच्या त्या वर्धिष्णु सामर्थ्याचें धुरंधरत्व अंतिमत: यच्चयावत् भारतभर जो करू शकेल असा अेक अपूर्व नि अलौकिक हिंदुवंश, अितिहासगर्भ पौराणिक भाषेतच बोलावयाचें तर प्रादुर्भवण्याची भारताच्या अधिष्ठात्री देवतेलाच निकड लागली ! प्राचीन काळी शकहूणादिक म्लेंच्छांचा नि:पात करण्याची अशीच निकड भारताच्या अधि-ष्ठात्री देवतेला जेव्हा लागली तेव्हा तिने अबू पहाडावर अेक महायज्ञ करून चार भारतीय वीर पुरुष निर्माण केल्याचें चांदभाट आपल्या महाकाव्यात 'अग्नि-कुलाची कथा ' या कथेत सांगतात. परंतु दुर्दैवाने ह्या आम्ही ज्या कालाविषयी लिहितो आहोत त्या सन सतराव्या शतकाच्या काळात भारतावर गुदरलेल्या हिंदु-मुस्लिम महायुद्धात मुस्लिम राजसत्तेच्या समूळ अुच्छेदनासाठी केवळ चार दैवी वीरपुरुष अुत्पन्न करून भागण्यासारखें नव्हतें. त्या कार्यासाठी अेक दैवी वीर

पुरुषांची जातीची जाति अुत्पन्न करावयास हवी होती. यास्तव महाकवि चांद-भाटाच्या पौराणिक पण अितिहासगर्भ रूपकातच बोलावयाचें म्हणजे भारताच्या अधिष्ठात्री देवतेने साऱ्या भरतखंडावर दृष्टि टाकली. दहा शतकांवर चाललेल्या या हिंदु-मुस्लिम महायुद्धाचा अेकदाचा अंत करून मुस्लिमांच्या राजसत्तेचें अंतिम निर्दालिन करून टाकण्यास बहुतांशी समर्थ अशी हिंदु राष्ट्रवीरांची जातीची जाति अुत्पन्न करण्यास जाज्वल्य यज्ञभूमि ती हीच होय, अशा कार्यास अवूचें तें लहानसें यज्ञकुंड कसें पुरणार! असें मनात आणून त्या भारताच्या संक्रुद्ध अधिष्ठात्री देवतेने मंत्रोदकाचें सिंचन दक्षिणेत सह्याद्रीवरच केलें! आणि अकस्मात् सह्याद्रि पर्वतचा पर्वत पेटून अुठला! अग्निकल्लोळावर अग्निकल्लोळ भडकत चालले! आणि त्यांतून शतावधि-सहस्रावधि-लक्षावधि सशस्त्र वीर पुरुषांचे समूहचे समूह, जातीची जाति, राष्ट्रकुलचें राष्ट्रकुल प्रादुर्भवलें! त्यातील ज्याने त्याने त्या ज्वालांच्या मालिकांतूनच अेकेक ज्वाला अुपटून, तिचाच आपल्या हातात भगवा ध्वज करून, मुसलमानी राजसत्तेच्या समूळ निर्दालिनासाठी ते साऱ्या भारतभर 'हरहर महादेवा'चा रणघोष करीत चढून चालले! ह्या राष्ट्रकुलाचें नांव **'शिवकालोत्पन्न महाराष्ट्र'**!

साऱ्या जगातील अहिंदु शत्रूंशो अेकटा हिंदु महाराष्ट्र झुंजला!

ह्याच काळी ह्या दशशतकव्यापी हिंदुमुस्लिम महायुद्धाच्या रणघाअीतच असा प्रसंग भारतावर आणि त्यातही महाराष्ट्रावर गुदरला होता की तसा जिवावरचा प्रसंग जगांतीलही तुरळक राष्ट्रांवरच काय तो गुदरल्याचें अितिहासांतून आढळतें! साऱ्या आशियातील अत्याचारी मुस्लिम राष्ट्रें भारतावर अेकाच वेळी अुत्तरेकडून कशीं तुटून पडलीं होतीं तें सांगितलें आहेच. पण त्या आशियातील अरब, पठाण, तुर्क, अफगाण, मोंगल प्रभृति मुस्लिम राष्ट्रांच्या समवेतच ह्या काळी विशेषत: दक्षिणेवर समुद्रातून पोर्तुगीझ, डच, फ्रेंच, अिंग्लिश ह्या प्रबल नि आक्रमक युरोपियन राष्ट्रांचीही धाडची धाड हिंदुराष्ट्राचा नि हिंदुधर्माचाही अुच्छेद करण्याच्या प्रतिज्ञेने येअून कोसळली होती आणि जवळजवळ अेकटचा त्या 'यज्ञोत्थित शिवकालोत्पन्न महाराष्ट्राला'च ह्या जगातील सर्व लुटारू अहिंदु राष्ट्रांच्या भयंकर आक्रमणांना अेकाकी तोंड देणें भाग पडलें! त्यातूनही जगाच्या अितिहासातील अेक दुर्मिळ आश्चर्यकथा म्हणजे ही की, ह्या 'यज्ञोत्थित महाराष्ट्रा'ने त्या जगातील सर्व अहिंदु राष्ट्रांच्या सर्व भीषण आक्रमणांना यशस्वीपणे टक्कर दिली! आणि तें त्या सर्व परशत्रूंना पुरून अुरलें!! दिल्लीच्या बादशाही तख्ताचे तुकडे तुकडे अुडवून त्या वेळच्या मुस्लिम राजसत्तेची सगळ्या हिंदुस्थानात अंतिम अितिश्री केली!

महाराष्ट्राच्या ह्या अलोकसामान्य पराक्रमाची गाथा तिच्या सत्य स्वरूपात आता महाष्ट्रातील लोकांना तरी साधारणतः परिचित झालेली आहे. रानडे, राजवाडे, खरे, अितिहासाचार्य सरदेसाअी अित्यादि थोर अितिहाससंशोधकांना नि लेखकांना मराठ्यांच्या अितिहासाचें हें सत्य, दिव्य नि भव्य भारतीय स्वरूप प्रकटविण्याचें श्रेय आहे. पण अेका रानड्यांचा अपवाद सोडला तर अितरांचे ग्रंथ मराठीत आहेत. मराठीवाचून जगातील अिंग्रजी अित्यादि अितर भाषांतून मराठ्यांचे अितिहास लिहिलेले आहेत पण ते मुसलमान, पोर्तुगीझ, अिंग्रजादिक आमच्या पूर्वीच्या शत्रूंनी जाणूनबुजून, आणि भारतातील आमच्या भिन्नप्रांतीय देशबंधूंनी बहुतांशी अज्ञानाने, अगदी विकृत स्वरूपात लिहिलेले आहेत.

यास्तव मला तरी अगदी विद्यार्थिदशेपासून महाराष्ट्राचा हा शिवोत्तर कालीन अितिहास त्याच्या आतापर्यंतच्या संशोधित झालेल्या स्वरूपात अिंग्रजीत लिहिला जावा, म्हणजे जगाचेही डोळे अुघडतील, असें अुत्कटतेने वाटत होतें. पण प्रथमपासून आमचें स्वतःचें कार्यक्षेत्र कर्तव्य म्हणून आम्ही अितिहासकालापेक्षा वर्तमानकालच्या कालक्षेत्रातील स्वराष्ट्राच्या शत्रूशी झुंजणें हेंच ठरविल्यामुळे ब्रिटिशविरोधी राज्यक्रांतीच्या कल्लोळात आम्ही गुरफटून गेलो. यास्तव आम्हांला अंदमानातून सुटून येअीतों महाराष्ट्राच्या जुन्या अितिहासाविषयी तसें काही लिहिण्यास वेळच मिळाला नाही. पुन्हा, केवळ अितिहासच वाहून घेतलेल्या सरदेसायांसारख्या श्रद्धेय अितिहासकारांनीच हें काम हाती घेणें अधिक श्रेयस्कर नि श्रमविभागाच्या दृष्टीने सोयिस्कर असेंही वाटून तशी खटपट आम्ही अधून मधून करीत होतो.

सरदेसाअी स्वतःच मला भेटतात

अुल्लेखानुरोधे अगदी तोंडीच आली म्हणून याविषयीची अेक आठवण येथेच सांगून टाकतो. आम्हांला सरदेसायांना भेटण्याची अगदी तरुणपणापासून अिच्छा असे. कारण त्यांचेच अितिहास आम्ही सारखे वाचीत होतो. पण आम्ही राज्यक्रांतिकारक; ते अेक अुच्चपदस्थ राजसेवक, मग ते बडोद्याच्या संस्थानिका-सारख्याचे का असेनात ! पुन्हा ते प्रौढ; आम्ही लहान. पुढे आम्ही अंदमानात गेलो आणि सन १९२४ मध्ये तेथून सुटूनही आलो. आमच्या क्रांतिकालातील अनेक कृत्यांना सरदेसाअी पराक्रम म्हणून गौरवितात, असें आम्ही तोंडोतोंडी अैकत होतो. तेव्हा रत्नागिरीस आम्ही होतो तोपर्यंतही सरदेसायांनी अिंग्रजीमध्ये मराठ्यांचा अितिहास लिहावा अशी आम्हांला तळमळ वाटे. तसे तोंडोतोंडी निरोपही आम्ही त्यांना अनेक वेळा धाडले. पण लेखी पत्र असें काही धाडवेना. कारण आमचें अक्षर म्हणजे विस्तवाची ठिणगी. अेखादवेळी त्यांच्यासारख्या सरकारी अधिकाऱ्याच्या घराला ती आगच लावून द्यावयाची ! अशीं अुदाहरणें

आमच्या क्रांतिकारक चळवळीत घडतही होतीं. म्हणून आपले चुप वसलो. अेके दिवशी रत्नागिरीस आमचे घरी, श्रीयुत नाना पटवर्धन यांचें जें घर आम्ही भाड्याने घेतलें होतें त्या घरी, दार अुवडून अेक वृद्धसे गृहस्थ आत आले. 'कोण?' म्हणून विचारीत आम्ही आदरार्थी थोडें अुत्थापनही दिलें. ते म्हणाले, ' मी, तो बडोद्याचा सरदेसाअी. अितिहास लिहितो म्हणून आपणांस ठाअूक असलेला.' आम्ही अेकदम चमकलो. ' म्हणजे ? रियासतकार की काय ?' ते म्हणाले, 'होय.' तेव्हा मी, ' विद्यार्थी असतानाच त्यांचे प्रसिद्ध झालेलें मुसलमानी रियासत हें मोठें पुस्तक कसें वाचलें आणि तेव्हापासून आपल्याविषयी कसा आदर वाटत आला आहे ' हें सांगितलें. ' आपलीं आजपर्यंतचीं सगळीं पुस्तकें मी वाचून काढलीं आहेत. पण माझी आपणांस आग्रहाची अेक विनंती आहे. मी अनेक देशांत नि मराठी नसलेल्या हिंदी विद्वानांत वावरलो आहे. पण त्यांना मराठ्यांच्या अितिहासाची थोरवी तर काय, पण पुरती जाणीवसुद्धा नसते, असें पाहिलें आहे. अनेकांमध्ये तर मराठ्यांविषयी अेक प्रकारचा द्वेषही आढळतो. म्हणून आपण लिहिलेल्या मराठी अितिहासाचें संकलन केलेला, अधिकृत, अेकटाकी, साधार नि आटोपसर असा अितिहास आपण स्वत: अिंग्रजीत लिहावा, म्हणजे महाराष्ट्रीय नसलेल्या जगालाही तो सत्य स्वरूपात कळेल.' त्यावर त्यांनी ' तें कार्य आता दुसऱ्यांनी कोणी करावें ' असें म्हटलें. मी म्हटलें, 'नाही. आजतरी तसें कार्य करणारे आपणच अेक अधिकारी लेखक मला दिसता. वयोमानाने आपणांस जड गेलें तरी हें शेवटचें कार्य सुवर्णकलश म्हणून तरी हाती घ्यावें. होअीलही पुरें; आपणास दीर्घायुष्याची देणगी दिलेली दिसतेच आहे ! पण असा अिंग्रजी अितिहास लिहिण्यास आरंभ तरी तत्काल करावा.' नंतर साध्या औपचारिक गोष्टी झाल्यावर मी त्यांना जाताना गौरवून म्हटलें की, ' अशा थोर अितिहासलेखकाचें दर्शन आज मला झालें याचा मला आनंद वाटतो.' तेव्हा माझें वाक्य पुरें होतें न होतें तोंच ते म्हणाले, ' छे छे, खरा आनंद वाटतो मला ! आम्ही काही झालें तरी अितिहासलेखक. पण आपण अितिहासकार, अितिहास घडविणारे ! आपण अितिहास घडविल्यावर तो टिपून ठेवणारे आम्ही. मी खरोखरच आज आपणांस अितिहासकर्ते म्हणून भेटावयास आलो !' नंतर आम्ही अेकमेकांचा साभार निरोप घेतला.

ही गोष्टही येथेच सांगणें अुचित होअील की आमच्या वरील भेटीनंतर अितिहासकार सरदेसाअी ह्यांनी पंधरावीस वर्षांनी का होअीना, पण त्यांच्या जीवनाचें अेक परिपक्व फल म्हणून शेवटी मराठ्यांचा विस्तृत अितिहास तीन खंडामध्ये अिंग्रजी भाषेतच लिहिला !

अंदमानातून अि. सन १९२४ व्या वर्षी सुटून येताच मला राजकारणात काही प्रत्यक्षपणे करण्याची बंदी झाली आणि स्थलबद्धतेमुळे संचारबंदीही पाळणें

अनिवार्य झालें. तेव्हा रत्नागिरीतल्या रत्नागिरीत डांबलेल्या आमच्या त्या अस्तित्वात ग्रंथादिक साधनें जवळ नसलीं तरी हें शिवोत्तर महाराष्ट्राच्या असामान्य पराक्रमाचें आणि मुसलमानी राजसत्तेला निर्दाळून त्यांनी केलेल्या हिंदुराष्ट्राच्या विमोचनाचें वैशिष्ट्य साधारपणे महाराष्ट्राबाहेरच्या प्रांतीय आणि परराष्ट्रीय जगतास निवेदावें यास्तव अिंग्रजी भाषेतच, मराठ्यांच्या विस्तृत आणि विवृत (detailed) अितिहासावर नसला तरी त्या अितिहासाची आमच्या दृष्टिकोनातून चिकित्सा करणारा अेक तसा समीक्षक ग्रंथ स्वत:च लिहिण्याचें आम्ही ठरविलें, अितकेंच नव्हे तर १९२५ फेब्रुवारीच्या आत तो ग्रंथ पूर्णपणे लिहूनही टाकला.

HINDUPAD PADSHAHI

हिंदुपद पादशाही

त्या अिंग्रजी ग्रंथाचें नांवच मुळी ' मराठ्यांचा अितिहास ' असें न ठेवता ' हिंदुपद पादशाही ' हें ठेविलें. अशासाठी की आमच्या मतें अेकंदरीत मराठे जे लढले ते केवळ महाराष्ट्रासाठी लढले नाहीत, आपल्या घरकुलाच्या परसूसाठी किंवा शेतीवाडीसाठी केवळ लढले नाहीत, तर त्यांचा ओढा, मूलत:च हिंदुधर्म आणि हिंदुराष्ट्र – ज्याचा महाराष्ट्र हा अेक भाग म्हणूनच काय तो तो शब्द त्यांच्या तोंडी रुळला होता – यांना मुसलमानांच्या दास्यातून मुक्त करून साऱ्या हिंदुस्थानभर हिंदुराज्य, ' स्वराज्य ' स्थापणें हाच होता ! दिल्लीच्या मुस्लिम बादशाहीला धुळीस मिळवून तिथे हिंदुपद पादशाहीचें हिंदुधर्म महामंदिर अुभारणें, हीच त्या नव महाराष्ट्राच्या अितिहासाची प्रमुखतम नि प्रबलतम अंतर्गत प्रेरणा होती ! श्री समर्थांनी व्यक्तविलेल्या —

या सकल भूमंडळाचे ठायी ।
हिंदु अैसा अुरला नाही ॥

ह्या मूळच्या पोटतिडिकेतूनच पुढचा सगळा मराठ्यांचा अितिहास अुद्भवला ! रामदासोक्त —

प्रस्तुत यवनांचें बंड । हिंदु अुरला नाही चंड ।
बहुता दिसांचें मुंड । शास्ता न मिळे तयासि ॥

हिंदु मनातील ह्याच व्यथेने नि आर्ततेने सारें महाराष्ट्र खवळून अुठलें ! त्या शतकातील हिंदुस्थानभर विस्तारलेल्या सहस्रश: महाराष्ट्रीय चळवळींच्या, कारस्थानांच्या, स्वाऱ्यांच्या, लढायांच्या, पाठलागांच्या नि पिछेहाटींच्या, सुसंगत आणि विसंगत अशा यच्च यावत् अैतिहासिक वृत्तान्ताचा, घटितांचा, आजपर्यंतच्या मोठमोठ्या अितिहासकारांना गोंधळात टाकणारा आणि न साधणारा समन्वय, ह्या ' हिंदुराष्ट्र ' नि ' हिंदुपद पादशाही ' ह्या दोन मंत्रमय शब्दांनीच सांधला जातो.

ह्यास्तवच ह्या हिंदुमुस्लिम संघर्षाच्या दशशतकव्यापी अितिहासावर तें युद्ध जिंकून समाप्तीची हिंदुविजयमुद्रा ठोकणारा हा हिंदुपद पादशाही ' शब्दच त्या आमच्या मराठ्यांच्या अितिहासाच्या समीक्षक ग्रंथाचें नांव आम्ही ठेविलें.

ह्या आमच्या ग्रंथातही मराठ्यांचा सगळा अितिहास संपूर्ण विवरणासह (in all details) असा दिलेला नाही. कारण अितिहासकारांनी ते परिश्रम फार मोठ्या प्रमाणावर आधीच घेतलेले होते. अिंग्रजी लेखक जदुनाथ सरकार, मराठी अितिहासकार सरदेसाअी ह्यांनी त्या विस्तृत साधनसंशोधक परिश्रमांचें संकलन नि त्यांच्या ध्यानात जसा आला तसा समन्वयही करणारे महत्त्वाचे ग्रंथ आधीच लिहिलेले होते. यास्तव मराठ्यांचा सविस्तर अितिहास असा लिहिण्याचा यत्न पुनरुक्ति टाळण्यासाठी आम्ही केला नाही. पुन्हा रत्नागिरीजवळच्या ज्या लहानशा शिरगाव येथील खेडयात आमचे स्नेही श्रीयुत विष्णुपंत दामले यांनी आम्हांस तशा स्थलबंदीच्या प्रसंगातही जी अेक लहानशी खोली राहावयास दिली होती तीत बसून तसा विस्तृत ग्रंथ संदर्भ पुस्तकादिक साधनांच्या अभावी लिहिताही येता ना !

हिंदुराष्ट्र

अेखाद्या अंधाऱ्या रात्री वाट चुकून रानात शिरू लागलेल्या वाटसरूने त्याच्या जवळची प्रवासातील मोठी विजेरी (electrical battery) काढून तिचा प्रकाशझोत चहूकडे फेकताच त्याला सर्व वस्तुजात लख्कन यथास्थित दिसू लागतें आणि त्याच्या मनाच्या त्या प्रकाशमय स्थितीत त्याची वाट त्याला स्पष्टपणे अुमगता येते. त्याचप्रमाणे आमच्या महाशालेय (collegian) कालातच आम्ही त्या वेळच्या मराठी अितिहासाच्या विस्तृत पण विस्कळीत पसाऱ्यावर हिंदुराष्ट्रदृष्टीच्या विद्युल्लतेचा प्रकाशझोत टाकताच आमचें मनही अकस्मात् प्रकाशमय झालें. त्या हिंदुराष्ट्राच्या दीप्तिमय दृष्टिकोनातून पाहताच तो मराठी अितिहासाचा विस्कळीत, विसगत नि विखुरलेला प्रपंच, सुसंगत नि सुसमन्वित दिसू लागला त्याचें खरें अलोकसामान्यत्व तेव्हाच काय तें आमच्या प्रत्ययास आलें. केवळ मराठ्यांचा अितिहास म्हणून तो वाचू जाता तसा अेकेरी, स्वार्थी लुटारू, भांडकुदळ आणि भुक्कड असा जदुनाथ सरकारासुद्धा बहुतेक अितिहासकारांना वाटत होता, तसा तो नाहीच नाही ! हिंदुराष्ट्रासारख्या आपल्या महान् राष्ट्रावर सारा आशिया, युरोप, आफ्रिका अशा तिन्ही खंडातील म्हणजेच तत्कालीन साऱ्या ज्ञात जगातील–परधर्मीय नि परकीय अहिंदु शत्रू जे तुटून पडले होते आणि ज्यांना निर्दालिण्यासाठी दहा शतकांवर हिंदुजातीने तुटकपणे महायुद्ध लढत ठेवलें असताही अितर कोणाही हिंदुराज्याकडून किंवा गटांकडून तें महायुद्ध जिंकून समाप्त होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हा तें महायुद्ध जिंकण्याचें महान् दायित्व आता आपण अेकटयाने स्वीकारलें पाहिजे अशा निर्धार करून अुठलेल्या महाराष्ट्राचें आम्हांस तेव्हा सम्यक् दर्शन झालें !

हिंदुस्वातंत्र्य युद्ध

ह्या हिंदुराष्ट्रीय दृष्टिकोनातून साधारणत: सतराव्या शतकापासूनच्या मराठ्यांच्या हिंदुस्वातंत्र्य युद्धाच्या ह्या अितिहासावरील आम्ही लिहिलेले वरील ' HINDUPAD PADSHAHI ' (हिंदुपद पादशाही) हें पुस्तक प्रत्येक हिंदुत्व निष्ठाने वाचावें, अशी आम्ही, राष्ट्रीय कर्तव्यासाठी दांभिक विनय बाजूस सारून स्वत:च अुत्कट विनंती करतो. कारण शक्य तितक्या तिऱ्हाअीत दृष्टीने बघितलें तरी आमचें आम्हांसच तें पुस्तक मराठ्यांच्या तत्कालीन अितिहासावरील अितर आज अुपलब्ध असलेल्या कोणत्याही पुस्तकापेक्षा अत्यंत मार्मिक आणि हिंदुत्वाच्या त्या ओसंडत भरलेल्या राष्ट्रीय जीवनरसाने रसरसलेलें आहे, असें वाटतें. मराठ्यांच्या राजाराम कालीन अितिहासाला ' बाजारबुणग्यांचा धुडगूस ' म्हणणाऱ्या परकीयांचीं नि स्वकीयांचींही तोंडें बंद करून रानड्यांनी ' महाराष्ट्राचें स्वातंत्र्य-युद्ध ' असें त्याला म्हटलें.

पण त्याच्या पुढचें हें जें अक्षरश: महाभारतीय युद्ध मराठे राजारामाच्या कालानंतर जवळ जवळ अेक शतकभर लढत राहिले तें केवळ ' महाराष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्ध ' नव्हतें तर तें ' महाभारतीय हिंदुस्वातंत्र्ययुद्ध ' होतें. त्या महायुद्धाचें हें आम्ही लिहिलेलें हिंदुपदपादशाही ' हें समीक्षक पुस्तक म्हणजे अेक ' सुवर्ण मंदिर ' आहे ! त्या महायुद्धदेवतेची अेक अंजिठ्यातील रंगशिल्पासारखी मनोवेधक मूर्ति आहे.

आणि तरीही त्या पुस्तकातील छेदक नि छेदक साधार आहे. अितर अधिकारी अितिहासकारांच्या वाक्यांचे अुतारे त्यात आहेत म्हणून तें साधार आहे अितकेंच काय तें नव्हे, तर त्या प्रत्यक्ष रणांगणात लढत असलेल्या आणि तीं राजकारणें लढवीत असलेल्या वीरपुरुषांचीं त्या त्या वेळी अुच्चारलेलीं स्वत:चीं वाक्येंच त्यात आहेत, त्यांच्या स्वत:च्या हाताने लिहिलेल्या ताज्या ताज्या पत्रांचे अुतारे त्यात आहेत. म्हणून तें पुस्तक जितकें वाचनीय तितकेंच विश्वसनीय आहे. महाराष्ट्राच्या त्या अितिहासाची ही अखिल भारतीय हिंदुस्वरूपाचो जाणीव प्रतिभाशाली अितिहास लेखक राजवाड्यांना अगदीच नव्हती असें नाही. पण त्यांच्या लिखाणात तिचा सर्वांगीण समन्वय व्हावा तसा झालेला नव्हता. क्वचित् त्यांचा ग्रंथसंभार तसाच प्रचंड होता. म्हणून त्याचें अेका दृष्टीत साकल्याने सप्रमाण अवलोकन करणें त्यांच्यासारख्या विशाल बुद्धीलाही साधलेलें दिसत नाही. अधूनमधून त्या अितिहासाचें त्यांचें समीक्षण अधुरें किंवा विसंगत भासतें. अितर अिंग्लिश, मुस्लिम प्रभृति शत्रुपक्षीय अितिहासकारांचें तर ह्या प्रकरणी नांवच काढावयास नको. अेवच आहे या परिस्थितीत मुसलमानी राजसत्तेचा नायनाट करून तें महाभारतीय युद्ध जिंकणाऱ्या अितिहासाचें हिंदुराष्ट्रीय दृष्टीतून केलेल्या समीक्षणाचें आमचें

'हिंदुपदपादशाही' हेंच पुस्तक अद्वितीय आहे. यासाठी प्रत्येक हिंदुत्वनिष्ठाने तें वाचावें असें आमचें आग्रहाचें सांगणें आहे.

अेवढचाचसाठी आम्ही, आमच्या सध्याच्या प्रकृतिक्षीणतेमुळे, तें समीक्षण-सुद्धा आता पुन्हा येथे देत नाही. तें जिज्ञासू वाचकांनी हिंदुपदपादशाही ह्या अिंग्लिश ग्रंथातून वाचावें. ह्या ग्रंथाचें मराठी भाषांतरही श्री. ग. पां. परचुरे यांनी प्रसिद्ध केलेलें आहे. ह्या चालू 'सहा सोनेरी पानें' ह्या ग्रंथात आता ह्या दशशतक-व्यापी हिंदुमुस्लिम महायुद्धात शेवटी हिंदूंनी मुसलमानी राजसत्तेचा नायनाट करून जो अंतिम महान् विजय मिळविला त्या अुत्कर्षबिंदूला पोचविणाऱ्या घटना-क्रमाच्या केवळ अनुक्रमणिकेच्या सोनेरी साखळीचेंच काय तें प्रदर्शन करण्याची आवश्यकता आहे. तेंच खाली करीत आहोत.

अलोकसामान्य घटनांच्या मालिकांची अनुक्रमणिका

ज्या सन सतराव्या शतकापर्यंत आम्ही ह्या हिंदुमुस्लिम महायुद्धाचें समीक्षण ह्या ग्रंथात प्रकरण ८ पर्यंत वर केलेलें आहे त्यापुढची त्या सन सतराव्या शतकातली, त्या वेळेस यःकश्चित् भासगारी पण आज आता अितिहासाच्या अुलट दुर्विणीतून महान् ठरणारी पहिली घटना म्हणजे सन १६२७ किंवा १६३० मध्ये झालेला—

शिवाजीचा जन्म !

शिवाजीचे वडील शहाजीराजे हे त्या काळातील मराठ्यांच्या राजकारण-कर्त्या आणि लढत्या मोठमोठ्या तुरळक सरदारांत गणले जात होते. पण त्या साऱ्यांना त्या वेळी महाराष्ट्रात राज्य करणाऱ्या पांच मुस्लिम सुलतानशाहयांचे अंकित म्हणूनच सरदारक्या गाजविणें भाग पडलेलें होतें. हिंदूंचे स्वतंत्र असे अेक टिचभरसुद्धा स्थल साऱ्या महाराष्ट्रात अुरलेलें नव्हतें. पण वर अुल्लेखिलेल्या त्या शहाजी राजांना झालेल्या लहान मुलाच्या दैवी मात्र पुढे, त्याच्याच नेतृत्वाने मुस्लिम राजसत्तेच्या शिरच्छेदासाठी सांडलेल्या अुष्ण रक्ताचा हिंदुस्वातंत्र्य-निर्घोषक स्वराज्यतिलक लागावयाचा होता !

आश्चर्यकारक योगायोग

दैवाने म्हणा, देवाची अिच्छा म्हणून म्हणा, काकातालीय न्यायाने म्हणा, किंवा पेरलेल्या प्रयत्नांचें अेकसमयावच्छेदेकरून वहरून वर आलेलें पीक म्हणून म्हणा; पण जिजामातेच्या गृहांगणातील शिवाजीच्या ह्या जन्मापासून अेक आश्चर्यकारक परिवर्तन हिंदु मुसलमानांच्या युद्धसंघर्षातील राष्ट्रीय रणांगणांतही घडून आलें.

साधारणतः सन सातशेपासून सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत जेथे जेथे म्हणून मुसलमानांची आणि हिंदूंचीं प्रचंड सैन्यें लढलीं, जेथे जेथे म्हणून राज्यांवर

नि राष्ट्रावर निर्णायक परिणाम करणारें युद्ध समरभूमीवर हिंदु-मुसलमान लढले तेथे तेथे तुरळक अपवाद सोडता, काही तरी निमित्त होऊन – कोणी हत्तीवर बसला म्हणून, तर कोणी पालखीत वसला म्हणून; कुठे अकस्मात् विश्वासधात झाला म्हणून तर कुठे विजय हिंदूंच्या अगदी हाती आला असता केवळ योगायोगाने – पण हिंदू सैन्याचा पूर्ण पराभव व्हावा आणि मुस्लिम पक्षाचा पूर्ण विजय व्हावा, हा निष्ठुर रणदेवतेचा शेवटचा निर्णय बहुधा ठरलेला असे! वीर दाहीरची लढाओ, वीर जयपालची लढाओ, वीर अनंगपालची लढाओ, वीर पृथ्वीराजाचा शेवटचा संगर, महाराणा संगाने झुंजविलेला संग्राम! हया सर्व शतकोशतकांतील निकराच्या युद्धांपासून तो थेट विजयनगरच्या वीर रामराजाच्या सन १५६५ मध्ये झालेल्या तालिकोटच्या लढाओपर्यंत प्रत्येक निर्णायक युद्धात वरील निष्ठुर रणदेवतेचा कौल हिंदु पक्षासच बाधक ठरला, हिंदुपक्षाचाच पराभव त्या त्या संग्रामात अटळपणे होत गेला!!

पण सतराव्या शतकाच्या आरंभापासून

म्हणजेच साधारणत: शिवाजीच्या जन्मापासून हिंदुमुस्लिमांच्या संघर्षात त्याच निष्ठुर रणदेवतेच्या निर्णयात अेक अत्यंत आश्चर्यकारक प्रभेद अकस्मात् दिसून येअू लागला. तो हा की, पूर्वी जसा हिंदुमुसलमानांच्या झुंजीत हिंदूंचा पराभव हटकून व्हावयाचाच हें अटळ दिसे, तसें हया पुढच्या काळात जेथे जेथे हिंदुमुसलमानांची रणांगणात गाठ पडे तेथे तेथे हिंदूचा विजय हटकून व्हावा आणि मुसलमानांचा पराजय होत जावा हेंही अटळ ठरू लागलें! ह्या सतराव्या शतकापासून जेथे जेथे रणात मुसलमान भेटला, तेथे तेथे हिंदूनी त्यास पिटला! राष्ट्रावर किंवा राज्यावर आमूलात् परिणाम करणारे रणसंगर असोत किंवा अगदी धावत्या लढाया असोत, हिंदु सैन्याचा विजय आणि मुस्लिमांचा पराजय हा बहुधा ठरलेलाच असे! महाराष्ट्र भूमीवरीलच नव्हे तर पंजाब ते दक्षिण समुद्रापर्यंत नि पश्चिम ते पूर्व समुद्रापर्यंतच्या शेकडो लढायांत मराठ्यांनी मुस्लिमांच्या केलेल्या पराभवांची हिंदूंची छाती गर्वभराने अुंचविणारी विजयजंत्री आमच्या हिंदुपदपादशाही या पुस्तकातून प्रत्येक हिंदु तरुणाने अवश्य वाचावी.

नव्या मराठी रणनीतीचें सूत्र 'आक्रमण' –केवळ 'संरक्षण' नव्हे!

साऱ्या हिंदुराष्ट्राचें नेतृत्व मराठ्यांनी स्वीकारल्यापासून वर दाखविल्याप्रमाणे जेथे तेथे हिंदुमुस्लिम संग्रामात बहुधा हिंदूंचाच विजय आणि मुसलमानांचा पराजय भरतखंडभर जो होत गेला त्याचें अेक मुख्य कारण हें होतें की, शत्रूवरसुद्धा सैनिकी आक्रमण करणें हें नैतिकदृष्टया अश्लाघ्य आहे, पाप आहे, तो हिंदूंचा धर्म नव्हे, अशी जी क्षत्रत्वाची विकृत निष्ठा, सद्गुणविकृतीची साथ, बहुतांश

हिंदुसमाजात मध्यंतरी फैलावली होती, तिच्या तावडीतून मराठ्यांनी आपल्या धाडशी पराक्रमाने हिंदुमनाची झपाटचासरशी सुटका केली.

वस्तुतः राष्ट्रीय शस्त्रबलाचें मुख्य ब्रीद शत्रूवर तो चालून येण्याच्या आधीच आपण त्याच्यावर चालून जाणें – आक्रमण करणें – हेंच होय. अशी आक्रमक प्रवृत्ति हिंदु लोकांत पुन्हा संचरविण्याचा सक्रिय प्रयोग मराठ्यांपूर्वी विजयनगरचें राज्य स्थापिलें त्या वेळीच हिंदूंनी मुस्लिमांविरुद्ध यशस्वीपणे केलेला होता. पण तो दक्षिणेतल्या दक्षिणेतच राहिला; आणि तालिकोटच्या भयंकर पराभवाने हिंदु मन मुसलमानांवर आक्रमक चढाया करण्यास पुन्हा कचरू लागलें होतें. अशा वेळी मराठ्यांनी मुस्लिमांवर यशस्वी आक्रमणें करून हिंदूंमध्ये पुन्हा रणचैतन्य संचरविलें.

शत्रूंवर सैनिक आक्रमण करणें हेंच राष्ट्रीय शस्त्रबलाचें मुख्य ध्येय, मुख्य धर्म आहे. राष्ट्राच्या केवळ संरक्षणापुरतेंच शस्त्रबल जें राष्ट्र बाळगतें – पण आक्रमणक्षम होईल अितकें वाढवीत नाही, तसें करणें अधर्म समजतें, त्या राष्ट्राची ती निष्ठा अेक तर भ्रांत असते, नाही तर आतून भेकड असते. हा अंतर्गत भेकडपणा छपविण्याकरिता केलेली ती अेक वल्गना असते. ज्या राष्ट्राचें सैन्य-बल अुघड अुघडपणे आक्रमणक्षमतेच्या पायावर नि प्रमाणावर रणसज्जतेत अुभें असतें त्या राष्ट्रात संरक्षणक्षमता असतेच असते.

पुन्हा, त्या वेळच्या मुसलमानांच्या आततायी राजसत्तेस अुखडून टाकण्यासाठी हिंदूंनी केलेलें आक्रमण हें मुळातच अन्याय्य आक्रमण नव्हतें. खरें अन्याय्य आक्रमण हिंदूंच्या देशावर मुसलमानांनी ज्या स्वाऱ्या केल्या तें होतें, त्या आततायी मुस्लिमसत्तेविरुद्ध हिंदूंनी केलेले आक्रमक अुठाव ह्याला हिंदूंनी मुसलमानांविरुद्ध केलेलें 'बंड' म्हणता येत नाही. कारण हिंदुराष्ट्राच्या स्वातंत्र्याविरुद्ध — न्याय्य सत्तेविरुद्ध मुस्लिमांनी केलेलें आततायी अभियान, हेंच खरें बंड होतें. धन्याविरुद्ध चोरांनी केलेल्या अतिक्रमणाला बंड म्हणतात येअील. चोराला दंडिण्यासाठी धन्याने केलेला अुठाव ह्याला काही 'बंड म्हणता येणार नाही. म्हणूनच त्या काळी अुभ्या भारतातील हिंदु समाजाचा जो बहुतांश भाग भीतिग्रस्त झालेला होता, त्याच्यात पुन्हा धैर्य संचरविण्यासाठी रामदासांनी सह्याद्रीच्या शिखरा-शिखरावरून रणघोषणा केली की, 'प्रस्तुत यवनांचें बंड।' बंड यवनांचें आहे – हिंदूचें नव्हे. त्या म्लेच्छांच्या बंडाचा अुदंड दंड त्यांना देण्यासाठी त्यांच्यावर चोहो बाजूंनी आक्रमण करा!

"धर्मासाठी मरावें। मरोनि अवघ्यांसि मारावें।
मारिता मारिता घ्यावें। राज्य आपुलें॥"

मराठ्यांनी अवलंबिलेल्या ह्या आक्रमक रणनीतीचें प्रमुख हत्यारही त्या वेळच्या हिंदूंना तोपर्यंत नवेनवेसेंच होतें. पूर्वी त्यांच्या हाती तें रुळावें असें रुळलेलें नव्हतें.

तें हत्यार म्हणजे वृकयुद्ध हें होय. ह्यालाच त्या वेळी गनिमी कावा म्हणून म्हणत. ह्या वृकयुद्धाच्या माराखाली मराठ्यांनी असंख्य सेनेसह केलेल्या मोठमोठ्या मुसलमानी स्वाऱ्यांनाच दाती तृण धरावयास लावलें. शत्रूच्या चतुरंग सेनेशी सहसा आपल्या अल्पसंख्याक सैन्याच्या टोळ्यांसह सन्मुख युद्ध अमें मराठ्यांनी या वृकयुद्धाच्या नीतीप्रमाणे मराठी सैन्य अल्पसंख्य असेल तेव्हा तेव्हा देअूच नये; तर मागून, उजवीकडून, डावीकडून सारखें तुटून पडावें.

तथापि हेंही ध्यानात ठेविलें पाहिजे की, मराठ्यांच्या अशा लहान लहान सैन्यांनी प्रचंड मोंगली सैन्याची लांडगेतोड करता करता त्या मराठी सैन्याचीही संख्या नि शक्ति कुठे कुठे जर वाढत गेली तर मराठे ह्याच वृकयुद्धाचा अुत्तरभाग म्हणून मोंगलांच्या अेखाद्या अगडबंब सैन्यावरही अकस्मात् अुघड अुघड आक्रमण करून सन्मुख लढाया देण्यास कचरत नसत. मराठी सैन्यें जेव्हा वाढत गेलीं, त्यांच्या हाती पडलेलीं लहान मोठीं राज्यें, दुर्ग प्रदेश अित्यादिकांचा व्याप वाढत गेला, तेव्हासुद्धा त्यांचीं निरनिराळीं सैन्यें आपलीं स्थानें संभाळून आपल्या लहान मोठ्या राजधान्यांतूनच काही लोळत पडलेलीं नसत. तर त्यांतील प्रत्येकजण शेजारच्या वा दूरच्या मोगली सत्तेखालील पुढच्या प्रदेशावर सारखा टपून राहून पावसाळा संपलारे संपला की स्वारी करण्यास, छापे घालण्यास, मुस्लिम शत्रु आपल्या छोट्या संस्थानावर, जहागिरीवर, गडावर चालून येण्याच्या आधी त्या पुढच्या मुस्लिम प्रदेशात घुसे ! आपल्यावर चालून येणाऱ्या मुस्लिम निजाम नबाबादिक शत्रूंनासुद्धा हुडकून हुडकून घराबाहेर काढून त्यांच्यावरही मराठी सैन्यें तुटून पडत. त्या मराठ्यांच्या लहान मोठ्या राजधान्या, गडगुहा ह्या त्यांच्या वास्तव्याच्या स्थली काही त्यांचा खरा पत्ता सापडत नसे. मुसलमानांवर स्वाऱ्या करीत निघताना तीं मराठी वृकयुद्ध-कुशल सैन्यें त्या आपल्या राजधान्या जणू आपल्या घोड्यांच्या पाठीवर घेअूनच मोगलांच्या हातातील प्रदेशात, दूरच्या प्रातात हाणमार करीत निघून गेलेले असत. ह्या अनेक मराठी सेनानींचा नि लढवय्यांचा खरा पत्ता त्यांचीं स्वतःचीं घरें किंवा गढ्या हीं नसत, तर त्यांचा नक्की पण फिरता पत्ता म्हणजे मोगलांच्या प्रदेशात पडलेलीं त्यांचीं लढाअू शिबिरें,—त्यांचे सारखे हलते तळ.

मराठ्यांच्या ह्या लांडगेतोडीने जर्जर झालेल्या मुस्लिमांच्या अगडबंब स्वाऱ्यांची काय दुर्दशा होअी तें राजारामकालीन औरंगजेबाच्या अेका अुदाहरणावरूनही स्पष्ट होअील. औरंगजेबाचीं मोठमोठीं सैन्यें मराठ्यांचा पाठलाग करीत नि त्यांचे प्रदेश घेत अेका बाजूला थेट खाली जिंजीपर्यंत गेली; पण ?— तीं मुस्लिम सैन्यें मागे वळून जों पहातात तों तिकडे मराठ्यांचीं लहान मोठीं सैन्यें नर्मदा अुतरून गुजराथ प्रांतात घुसलीं असून तेथील मुस्लिम सुभेदाराची हबेलंडी अुडवून देत आहेत ! त्याच्या पुढच्या मध्यप्रांतातूनही अितस्ततः मराठे

तुटून पडत असल्याची नवीनवी वातमीही प्रत्यही त्या गोंधळलेल्या मोंगल बादशहाच्या कानावर आदळतच होती ! शेवटी जळत्या निखाऱ्याप्रमाणे हातात धरलेल्या महाराष्ट्रास खाली टाकून देऊन ते होरपोळून निघालेलें अगडबंब मुस्लिम मोंगल सैन्य शक्य तितक्या त्वरेने आपण होऊन पाठीमागे दिल्लीकडे निघून गेलें.

जोवर मराठ्यांचें सैन्यबल किंवा राजसंस्था स्थावर, प्रबळ नि विस्तृत झालेली नव्हती तोवरच काय तें हें आक्रमणाचें रणशास्त्रीय तंत्र मराठ्यांनी अंगीकारलेलें होतें असें नाही, तर जेव्हा त्यांच्या अनेक सरदारांपैकी अेकेकाच्या हाताखाली दहा दहा वीसवीस सहस्रांसारखी चतुरंगदलें रणांत झुंजत आणि जिंजी ते गुजराथ, मध्यप्रांतापर्यंत मराठ्यांचीं राज्येच स्थापन झालीं तेव्हा तर अधिक ओर्षेने हिंदुपदपादशाहीच्या ध्येयसिद्धीस्तव पहिल्या बाजीरावासारख्या धुरंदर सेनापतीच्या नि राज्यचालकाच्या आधिपत्याखाली मराठे अुरलेल्या मुस्लिम प्रांताप्रांतावर आपण होअून आक्रमणें करीत चाललेच होते ! साऱ्या भरतखंडात हिंदुपदपादशाही स्थापावयाची तर नुसतें ' आहे तितुकें जतन करूनच ' भागणारें नव्हतें, तर महाराष्ट्राबाहेर पडून, ' पुढे आणिक मेळवावें ' ह्या सूत्राप्रमाणे मराठ्यांना आक्रमक रणनीतीचाच अवलंब करणें भाग होतें. धर्मशत्रूंवर तसें तुटून पडण्याची वीरश्रीने रसरसलेल्या त्या वीरांना अनिवार हौस पण होती !

मराठ्यांच्या ह्या आक्रमक रणनीतीने हिमालयाकडील शत्रूंच्या स्वाऱ्या बंद पडल्या

पहिल्या बाजीरावाने दिल्लीपर्यंत मारलेल्या धडकांनी मोगली बादशाही गदगदा हलून खिळखिळी झाली आहे आणि मराठ्यांचीं मोठमोठीं सैन्यें दिल्लीपुढेही पंजावात आक्रमणें करण्याच्या बेतात आहेत, ही वार्ता हिमालयापलीकडील मुस्लिम राज्यांतही पोहोचल्याने काबूल, गजनी, अिराण, तुराण, बल्क, बुखार, अरवस्थानादिक मुस्लिम राजसत्तांनाही मराठ्यांच्या शक्तीचा हादरा बसल्यावाचून राहिला नाही !

मराठ्यांचा अुदय होण्यापूर्वी हिमालयापलीकडील ह्याच अरब, अिराणी, दुराणी, तुर्क, मोंगल अित्यादिक मुस्लिम जाति हिमालय अुतरून हिंदुस्थानवर कशा राक्षसी स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करीत होत्या तें ह्या ग्रंथात अनेकवार सांगितलेंच आहे. हिंदूंचीं राज्यें बुडवीत, हिंदुधर्माचा अुच्छेद करीत आणि हिंदूवर अमानुष धार्मिक अत्याचार करीत हे मुस्लिम आक्रमक कोणी दक्षिणेपर्यंत चालून येअी तर कोणी दिल्लीलाच आपली स्वतंत्र नि स्थायी राज्यें स्थापून अल्लाअुद्दिनासारख्या थेट दक्षिणेच्या टोकापर्यंत स्वाऱ्या करून हिंदु धर्माचा अुच्छेद करीत जात.

तथापि त्या काळचे हिंदुराजे, हे राक्षसी मुस्लिम आक्रमक हिमालय अुतरून हिंदुस्थानवर स्वारी करण्याआधीच, प्रथम आपणच हिमालय ओलांडून अिराण, तुराण अरबस्थानावर स्वाऱ्या करू शकले नाहीत. ह्या मुस्लिम आक्रमकांना त्यांच्या घरीच ठेचून टाकू शकले नाहींत !

नादिरशहा आणि अबदाल्ली

पण ह्या दशशतकव्यापी हिंदुमुस्लिम महायुद्धात मराठ्यांनी अखिल हिंदूंचें रणनेतृत्व हिंदुस्थानात सर्वत्र स्वीकारल्यानंतर त्यांच्या ह्या प्रबल सैनिकी आक्रमणांनी दिल्लीचे तटही जेव्हा कोसळू लागले तेव्हापासून मात्र वरच्या छेदकात सांगितल्याप्रमाणे आशियातील मुस्लिम आक्रमक जातींची आणि राज्यांची ती पूर्वीची. महंमद गझनीप्रमाणे हिंदूंचा निःपात करण्याच्या प्रकट डरकाळ्या फोडीत अुठल्या बसल्या स्वाऱ्या करण्याची खोडच मोडली गेली. मराठ्यांच्या सैन्यांनी दिल्ली हाती घेअून तेथील कारभार पहिल्या बाजीरावासारख्या पराक्रमी पेशव्याच्याच तंत्राने चालू ठेवला. तेव्हापासून हिमालयापलीकडील अेक अिराणचा नादिरशहा आणि दुसरा अहमदशहा अब्दाली हे दोघेच काय ते पूर्वीच्या मुस्लिम आक्रमकांसारख्या डौलाने हिंदुधर्माचा आणि लोकांचा अुच्छेद करून टाकण्यासाठी आणि हिंदुस्थानचे बादशहा बनण्यासाठी म्हणून आले. परंतु वस्तुतः ते दोघेही पूर्वीप्रमाणे केवळ स्वतःच्याच खुमखुमीने नि प्रेरणेने चालून आलेले नव्हते. दिल्लीपर्यंत साऱ्या हिंदुस्थानात आपली हिंदुसत्ता स्थापीत मराठे येअून थडकले आहेत किंवा थडकू शकतात या जाणिवेने नादिरशहा काय किंवा अहमदशहा अब्दाली काय ह्या दोघांच्याही मनात धास्ती वाटू लागलेली होती. परंतु हिंदुस्थानातील दिल्ली नि पंजाब येथील मुसलमानी सरदारांच्या नि कधी बादशहांच्याही गुप्त निमंत्रणावरून नादिरशहा नि अहमदशहा हिमालयापलीकडून हिंदुस्थानावर चालून येण्याचें धैर्य करू शकले. 'मराठ्यांनी आम्हांस खाअून टाकलें. सर्व हिंदुस्थानात काफरशाही होत आहे. तरी दिल्लीची मुस्लिम बादशाही रक्षण करण्यासाठी आपण अिस्लामचे त्राते म्हणून आम्ही आपणाकडे धाव घेत आहो. आपण सत्वर स्वारी करून यावें आम्ही आपणांस दिल्लीस बादशाही तक्तावर बसवितो.' रोहिले, पठाण, मोंगल अशा अनेक मुस्लिम सरदारांनी असा गुप्त आग्रह केल्यामुळे त्यांच्या हिंदुस्थानातील बळावर नि साहाय्यावर अवलंबूनच काय ते हे हिंदुस्थानापलीकडचे दोघे अत्याचारी पण बलिष्ठ आक्रमक हिंदुस्थानवर स्वारी करू शकले.

नादिरशहाची स्वारी

नादीरशहाला गुप्तपणे मराठ्यांचा नायनाट करण्यासाठी ज्यांनी बोलावलें त्यात निजाम-अुल-मुल्क हा प्रमुख होता. भोपाळच्या लढाअीत बाजीरावाने ह्या

निजामाला यथेच्छ पिटला होता. परंतु त्यालाही ही आशा होती की, नादिरशहाकडून मराठ्यांचा काटा समूळ अुपटला जाअील. पुढे जें होअील तें होअील, नादिरशहा सन १७३९ त अटक ओलांडून लाहोरला आला. दिल्लीच्या बादशहाने ससैन्य त्याच्याशी लढण्याचा डौल घातला. पण पहिल्याच लढाअीत त्याची धुळधाण अुडाली. नादिरशहाने बादशहाला बोलावून अटकेत ठेविलें; निजामलाही त्याने दरडावून विचारलें की 'तुम्ही अेवढाले सरदार असता तुम्हांला मराठ्यांना कसें हुसकता आलें नाही?' आणि त्याने मान्य केलेले कित्येक कोटी रुपये दिले नाहीत म्हणून त्यालाही अटकेत ठेवलें. नंतर नादिरशहा सरळ दिल्लीवर चालून गेला. सन १७३९ च्या मार्चला नादिरशहाने मोंगल सत्तेचा अंत करून अुघडपणे दिल्लीच्या सिंहासनावर आपल्या स्वत:च्या अिराणी बादशाहीची घोषणा केली. लगोलग त्याने मुस्लिम बादशाहीच्या कुळधर्माप्रमाणे दिल्लीस अत्याचारांचा कहर केला. लुटालूट नि सरसकट शिरच्छेद यांचें थैमान मांडलें. तथापि सगळ्या मुसलमानांना ही आशा होती की नादिरशहा मराठ्यांचा तरी नायनाट करील. नादीरशहाने मराठ्यांची आपण होअून कोणतीही आगळीक केली नाही. अितकेंच नव्हे तर दिल्लीतील हिंदूंच्या लुटालुटीत आणि सरसहा शिरच्छेदात तिकडील मुसलमानांचाही अपवाद ठेवला नाही. नाहीरशहाने स्वत: निजामाची त्याला खेचरावर वसवून धिंड काढविली.

अितक्यात दिल्लीला वातमी पोचली की मराठ्यांनी पोर्तुगीझांवर मोठा विजय मिळविलेला असून वसअीचा प्रसिद्ध जलदुर्ग पोर्तुगीझांच्या हातून जिंकून घेतला आहे. आणि तेथील पोर्तुगीझ सेनानी मराठ्यांना ससैन्य शरण गेला आहे. त्यामुळे निष्कंटक होअून स्वत: बाजीराव फार मोठ्या मराठी सैन्यासह दिल्लीवर चाल करून येत आहे.

अरे बघता काय! चला दिल्लीवर चाल करून!
हिंदुपदपादशाहीस आता काय अुशीर?– बाजीराव

अुत्तरेकडील मराठे सरदार आणि बाजीरावाने सर्वत्र पेरून ठेवलेले लहान मोठे राजकारणी मराठी हस्तक ह्यांच्याही अंगात नादिरशहाची पुरती खोड जिरवून टाकावी, असेंच वारें संचरलें होतें. त्यांनो ठिकठिकाणाहून बाजीरावाला अुत्तरेकडील नादिरशहाचो आणि हिंदुराज्यांची स्थिति कळविली. त्या प्रतिवृत्त लेखकांतील अेक लेखक लिहितो, 'तहमास्प कुलीखान (नादिरशहा) काही देव नाही, जे पृथ्वी कापून काढील. जबरदस्ताशी सुलुख करील, म्हणून मातबर फौजेनिशी यावें. आधी जबरदस्ती नि मग सुलुख. आता सारे राजपूत नि स्वामी (बाजीराव) अेक झालीया निकाल पडेल. समस्तांस बुंदेले वगैरे अेक जागा करून मोठा भाव दाखविला पाहिजे. नादीरशहा तसा माघार जात नाही, हिंदुराज्यांवरी

निघेल. रायाचे (सयाजी जयसिंग) मनी राणाजी (अुदेपूरचा महाराणा) दिल्लीचे बादशाही तक्तावर बसवावें असें आहे. हिंदुराजे सवाअी आदिकरून स्वामींचे स्वारीची मार्गप्रतीक्षा करतात ! स्वामींचें पुण्टिबल होताच जाट वगैरे फौज दिल्लीवरी पाठवून सवाअीजी आपण दिल्लीस जाणार ...

अशा अवसानाचींच अुत्तर हिंदुस्थानातील मराठी पुढाऱ्यांचीं अनेक प्रतिवृत्तें येत होतीं. त्यांच्या आधारे शाहूच्या मंत्रिमंडळात जे जे मराठ्यांचे पाय मागे खेचणारे आणि बाजीरावाच्या आक्रमक वीरश्रीस अपशकून करणारे लोक बसलेले असत, त्यांना बाजीराव आवेशाने म्हणाले, 'वीरहो, विचार करीत नि शंका घेत काय बसला ! अेकीने चाल करून निघा, हिंदुपदपादशाहीचा दिवस अुगवलाच म्हणून समजा ! मी तर नर्मदा अुतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार, मग पाहू या नादिरशहा कसा खाली येतो तो !'

मराठे आपल्यावर प्रत्याक्रमण करून अुत्तरेत येत आहेत अशी बातमी येताच नादिरशहाचा हिंदुस्थानात दक्षिणेपर्यंत पूर्वीच्या अिराणी, तुराणी, तुर्क अित्यादि मुस्लिम आक्रमकांसारखा पुढे घुसण्याचा अुत्साहच ढासळून गेला आणि मराठ्यांच्या सेना दिल्लीकडे पोचण्यापूर्वीच आपला गाशा गुंडाळावा अशा धोरणाने त्याने स्वतः होअून बादशहाचें पद सोडून दिलें. आपण होअून दिल्लीच्या पूर्वीच्या मोंगल बादशहास पुन्हा तख्तावर स्थापलें. सर्व राजेरजवाड्यांना त्या मोंगल बादशहाची आज्ञा मानण्याचा कडक आदेश त्याने दिला. नादिरशहाने दिल्लीस मिळविलेली जवळ जवळ पन्नास साठ कोटींची लूट नि मयूर सिंहासनादिक अनर्घ्य कलावस्तु समवेत घेअून अिराणास प्रयाण केलें. केवळ मराठ्यांच्या आक्रमणाच्या भयाने !

हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांना नादिरशहाने जीं पत्रें पाठविलीं होतीं त्यांतच शाहू छत्रपतींना लिहिलेल्या पत्रात लिहिलें होतें की,'सर्व हिंदूंनी दिल्लीच्या मोंगल बादशहाच्या आज्ञेत राहावें; नाहीतर जे ही आज्ञा मोडतील त्यांना भयंकर शासन करण्यात येअील.' अशा आशयाचें पत्र त्याने मूर्खपणाने लिहिलें आणि शहाणपणाने आपला पाय मागे काढला. अर्थातच नादिरशहाचें तें आज्ञापत्र केराच्या टोपलीत फेकलें गेलें. आणि मराठ्यांच्या शाहू छत्रपतीने सन १७३९ मध्ये भरविलेल्या राजसभेत,'मराठ्याच्या भीतीने नादिरशहा हिंदुस्थानातून पळून गेला' अशी स्पष्ट घोषणा केली.

अहमदशहा अब्दाल्ली काबूलचा बादशहा होतो

नादिरशहाच्या सैन्यात त्याचा अंकित म्हणून अहमदशहा अब्दाल्ली नांवाचा अेक अफगाण सरदार आपल्या कर्तृत्वाने वाढत वाढत नादिरशहाचा अुजवा हातच बनला होता. नादिरशहाच्या वर दिलेल्या हिंदुस्थानावरोल स्वारीत अब्दाली त्याचे बरोबर होताच. नादिरशहा हा अिराणकडे परत गेल्यानंतर लवकरच सन १७४७

मध्ये मारला गेला. त्याच्या मरणानंतर त्याच्या सैन्यात अुडालेल्या धांदलीत सारी सत्ता आपणच त्रळकावून अहमदशहाने तो पठाण जातीचा असल्यामुळे काबूल येथेच आपली राजधानी केली आणि स्वतःसच अफगाणी बादशहा म्हणून घोषित केलें. (सन १७४७).

रोहिले पठाण

हिंदुस्थानात पंजाव, दिल्ली, फरुकाबाद ते रोहिलखंडापर्यंतच्या पट्ट्यात प्रमुखत्वें मुस्लिम राजसत्तेचें संचालन करीत असलेल्या मुस्लिमांमध्ये मोंगल नि अफगाण (पठाण) ह्या दोन मुस्लिम जातींमध्ये अंतर्गत द्वेष नि बादशाही पदाविषयी तीव्र स्पर्धा, कधी प्रकटपणे तर कधी गुप्तपणे सारखी चालत आलेली होती. दिल्लीच्या पूर्वीच्या सुलतानशाह्या ह्या अफगाणांच्या होत्या. त्या सुलतानशाहीतील शेवटच्या अफगाण वंशाचा अुच्छेद करूनच मोंगलांचा विजेता आक्रमक बाबर ह्याने दिल्लीची बादशाही जिंकून घेतली होती, हें ह्या ग्रंथातही मागे सांगितलेंच आहे. तरीसुद्धा ह्या मोंगल बादशाहीतही अनेक अफगाण सरदारांचें वर्चस्व चालूच होतें. त्या अफगाणी वर्गात रोहिले आणि पठाण ह्यांचीं लहानमोठीं संस्थानें होतीं. पुढे थोड्याच दिवसांत मराठ्यांचीं विजयी सैन्यें अुत्तर हिंदुस्थानात हिंदुराज्यें ठिकठिकाणी स्थापीत जेव्हा दिल्लीला येअून पोचलीं आणि दिल्लीच्या राजकारणात त्यांच्या साहाय्यावाचून जवळजवळ पानही हालेनासें झालें, तेव्हापासून ते सारे मुसलमानी पक्ष मराठ्यांचें बादशाहीतून अुच्चाटन करण्याचे कार्यी मात्र प्रथम प्रथम अेकजीव होअून जात. परंतु तरीही पुढे पुढे त्या मुसलमानांतील फुटीर नि कारस्थानी नेते आपापल्या पक्षासच मराठ्यांचें साहाय्य गुप्तपणे घेअून अेकमेकांचा पाडाव करण्याचा प्रयत्न करू लागले.

अहमदशहा अब्दाल्लीची हिंदुस्थानावरील स्वारी

दिल्लीतील ह्या अुलाढालीकडे अब्दालीचें पूर्ण लक्ष होतें. तिकडील रोहिले पठाणही मराठ्यांच्या द्वेषाने आणि मोगल बादशहाला अुलथून पाडून पूर्वीची आपली पठाणी बादशाही सर्व हिंदुस्थानावर स्थापावी, नाहीतर आपलेंही अस्तित्व मराठे अुरू देणार नाहीत अशा विवंचनेत होते, हें तो जाणून होता. ह्या संकाटतून वाचण्याचा त्यांना अेकच मार्ग काय तो सुचत होता. त्याप्रमाणे त्या पठाण रोहिल्यांच्या पुढाऱ्यांनी पठाणांचा नवीनच झालेला स्वजातीय बादशहा आणि जो आजवर त्यांच्या ह्या राजकारणास पाठिंबाही देत आलेला होता त्या अहमदशहा अब्दाल्लीला पत्रें धाडलीं की, 'हिंदुस्थानात अिस्लामास जिवंत ठेवावयाचें असेल तर आता आपण धावून या!' अहमदशहा अब्दाल्लीच्या मनातही हिंदुस्थानात चालू असलेली मरणोन्मुख मोंगलसत्ता नष्ट करून पूर्वीप्रमाणे तेथे पठाणी बादशाही

स्थापन करावी ही अुत्कट महत्त्वाकांक्षा होती. पण तो पूर्वी नादिरशहाच्या स्वारीत त्याचे समवेत हिंदुस्थानात आलेला होता आणि मराठ्यांच्या वाढत चाललेल्या प्रावल्याची त्याला चांगली कल्पना होती. म्हणून तो सावधपणे अेकेक पाअूल पुढे टाकीत चालला. आतून आतून दुआबातील रोहिले पठाणांना यथेच्छ सैनिक साहाय्य पोहोचवून अब्दाल्ली स्वत: सन १७४८ च्या जानेवारी महिन्यात लाहोरपर्यंत चालून आला आणि त्याने लाहोर हस्तगत केलें. हीच त्याची स्वत:ची हिंदुस्थानावरील पहिली स्वारी होय.

पण मोंगल बादशहाच्या सैन्याने लाहोरजवळच त्याच्या आघाडीच्या सैन्याचा पराभव केला आणि त्याचा दिल्लीचा मार्ग रोखन धरला. तिकडे त्याच्या पिछाडीवर त्याचा शत्रु जो अिराणचा बादशहा तोही काबूलवर स्वारी करण्याच्या बेतात आहे असें त्याला कळलें. मोंगल बादशहानेही त्याच्या प्रतिकारासाठी मराठ्यांना तत्काल बोलाविलें आहे आणि ते मराठे ससैन्य दिल्लीकडे येण्यासाठी निघाले आहेत हें वृत्तही त्याला कळलें. तेव्हा दिल्लीवर चालून जाण्यास ही वेळ ठीक नाही हें त्या धूर्त सेनापतीने ओळखून अहमदशहा अब्दाल्ली परत काबूलकडे निघून गेला. पण जाण्याआधी 'सारा पंजाब हा माझ्या अफगाण राज्याच्या सत्तेखाली आहे' ही घोषणा मात्र त्याने पुन्हा सर्व हिंदुस्थानभर करविली.

मरणोन्मुख मुस्लिम बादशाहीच्या शरणागतीचा मराठ्यांशीं पहिला करार

मध्यंतरी, दिल्लीच्या मोंगल बादशाहाने मराठ्यांशी अत्याग्रहाने करार करून त्यांच्याकडे हिंदुस्थानातील बंगाल, बिहार, ओरिसा ते सिंध (मुलतान सुभा) सारा पंजाब, रोहिलखंड, दुआबसुद्धा दक्षिणेतील सर्व सुभ्यांसह साऱ्या हिंदुस्थानचा राज्यकारभार मराठ्यांकडेच सोपविला होता.

ह्या कराराप्रमाणे त्या दिवसापासून बादशहाच्या ह्या कागदी वचनाने तरी मराठे हेच वस्तुत: हिंदुस्थानचे राज्यसत्ताधीश झाले होते. आणि बादशहा हा केवळ अेक नामधारी पुतळा अुरला होता!!

मराठ्यांना वरील बादशाहीच्या राजसत्तेच्या मिळालेल्या सर्व अधिकारांचे परिवर्तनात जें प्रचंड दायित्व अंगीकारावें लागलें तें अर्थातच हें होतें की मराठ्यांनी कोणत्याही अंतर्गत किंवा सरसीमेच्या पलीकडील बाह्यदेशीय शत्रूंच्या स्वाऱ्यांपासून वा अुपद्रवापासून बादशाहीचें संरक्षण केलें पाहिजे. हें दायित्व प्रचंड असताही स्वीकारण्याचें सामर्थ्य हिंदुपदपादशाही स्थापन करीत आणलेल्या हिंदूंमधील अेका मराठ्यांच्या मनगटात होतें. म्हणूनच त्यांनी ही अट अेखाद्या वरदानासारखी तत्परतेने स्वीकारली.

अब्दाल्लीची हिंदुस्थानावर दुसरी स्वारी

ह्या कराराची कुणकूण आधीच वर्ष सहा महिन्यांपासून अब्दाल्लीला कळलेली होती. त्यासाठी त्याने अि. सन १७४९ मध्ये मराठ्यांना केवळ प्रतिरोध करण्यासाठी म्हणून हिंदुस्थानवर दुसरी स्वारी केली. तेव्हा पंजाबचा मोंगल बादशहाचा अधिकारी जो मीर मन्नु होता त्यानेच निरुपाय म्हणून अब्दालीला ठट्ठा, सिंध (मुलतान), पंजाब हे सुभे आणि त्याच बाजूचे अितर किरकोळ प्रदेश देऊन टाकले आणि अब्दाल्लीची त्या प्रदेशांवरील अधिसत्ता मान्य केली. पण ह्याच प्रदेशांवरची राज्यकारभाराची सारी सत्ता मराठ्यांना बादशहाने दिल्याचें वरील करारात जें लिहिलें आहे तें या मोंगल बादशाहीचा अधिकारी असलेल्या मीरमन्नूच्या शरणागतीने पुसून टाकलें गेलें. अितकेंच समाधान सध्या पुरें आहे, अधिक प्रसंग करण्याची ही वेळ नव्हे, असें पाहून अब्दाल्ली पुन्हा काबूलकडे निघून गेला.

पण बादशहाच्या अधिकाऱ्याच्या या दुटप्पीपणामुळे आणि बादशहानेही त्यास गुप्त संमति दिली ह्या विश्वासघाताने मराठे चिडून गेले. सापाच्या शेपटीवर जाणूनबुजून पाय द्यावा, त्याप्रमाणे मराठ्यांशी झालेला बादशाही करार तुच्छ मानून त्याच सिंध, ठट्ठा ते पंजाबपर्यंतच्या प्रदेशाचें स्वामित्व अब्दाल्लीने हिसकावून घेतलें, ह्याचा सूड घेण्यास मराठे चवताळून अुठले. त्या वेळेस दक्षिणेमध्येही मुस्लिमांच्या, पोर्तुगीझादिक पाश्चिमात्यांशी आणि साताऱ्याच्या गृहकलहाच्याही राजकीय संघर्षांत मराठे गुंतले होते. यास्तव नानासाहेब पेशवे यांनी पहिली आघाडी म्हणून अुत्तरेकडे सतत झुंजलेल्या आणि म्हणून तिकडचा पूर्ण अनुभव असलेल्या मल्हारराव होळकर आणि जयाजीराव शिंदे या मराठी प्रमुख वीरांनाच तिकडची व्यवस्था लावण्यास आज्ञापिलें. त्याप्रमाणे लागलीच त्या दोघा मराठा वीरांनी यमुना नदी ओलांडली आणि पन्नास साठ सहस्र पठाण रोहिल्यांचें सैन्य जें कादरगंज येथे तळ देऊन बसलें होतें त्याच्यावरच सन १७५१ मार्च २० ला अकस्मात् चाल केली. पठाणांनी अत्यंत चिकाटीने ठाव धरला. पण शेवटी मराठ्यांनी त्या 'अस्सल' पठाण रोहिल्यांच्या संयुक्त सैन्याची धुळधाण अुडविली. ह्या विजयामागोमाग अहंमदखान बंगश हा पठाण फरुकाबादेला सशस्त्र चालून आला होता, त्यावरही मराठे तसेच चालून गेले. अहमदखान फरुकाबादेत घुसला; तेवढ्यात त्याच्या साहाय्यास येणारें रोहिल्यांचें दुसरें बलवत्तर सैन्यही त्याला येअून मिळालें, पण मराठी सैन्याने त्या अेकत्र झालेल्या दोन्ही 'अस्सल' पठाण रोहिल्यांच्या प्रचंड सैन्यास सन १७५१ च्या अेप्रिलमध्ये अेकत्रच वेढून टाकून रणांगणात खेचलें आणि त्यांच्या त्या प्रचंड सैन्यावर तुटून पडून दिनांक २८ अेप्रिल १७५१ ह्या दिवशी घनघोर संग्रामात त्यांचा पूर्ण पराभव केला! वीस पंचवीस सहस्र पठाण अुभे कापून काढले! त्यांचें शिबिरसुद्धा झाडून सारें लुटून घेतलें!

सहस्रावधि घोडीं, हत्ती, अुंट नि तोफखाना पाडाव केला. जयाप्पा शिंदे आपल्या पत्रात लिहितात 'ती सारी लूट हरिभक्तांनी घेतली.'

ह्या लढायांचें वर्तमान पेशव्यास कळताच स्वतः नानासाहेबासारख्यांना सुद्धा मराठ्यांच्या ह्या पराक्रमाची स्वत:ची स्वत:ला सुद्धा धन्यता वाटू लागली. त्यांनी सरदारांस नि सैन्यास अुत्तेजन देणाऱ्या अुत्तरात स्वत: लिहिलें की, 'शाबास तुमच्या हिंमतीची नि दिलेरी रुस्तुमीची ! दक्षिणच्या फौजांनीं गंगा यमुना पार होअून, पठाणांशी युद्ध करून फत्ते पावावें. हें कर्म लहान सामान्य नव्हे ! तुम्ही अेकनिष्ठ कृतकर्मे, दौलतीचे स्तंभ आहात ! अिराण तुराण पावेतो लौकिक झाला. वझीर पळाला असता फिरोन फत्तेच्या मसनदीवर बसविला.'

त्या 'अस्सल नि अव्वल' मुस्लिमांचाही गर्व मराठ्यांनी वारंवार धुळीस मिळविला

हिंदूंच्या नि त्यातही मराठ्यांच्या पराक्रमाला शक्य तें तें वैगुण्य आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुस्लिम, अिंग्रज, पोर्तुगीज अित्यादि मराठ्यांच्या शत्रूंनी लिहिलेल्या अितिहासांतच नव्हे तर आपल्या हिंदु लोकांच्याही दास्यसुलभ वृत्तीने देखोदेखी लिहिलेल्या अितिहासांतूनही असें अेक ठराविक विधान करण्यात येतें की, "पुढे पुढे हिंदुस्थानात मुसलमानांचे जे पराभव होत गेले आणि त्यांचें राज्य मराठे खिळखिळे करू शकले, त्याचें अेक महत्त्वाचें कारण म्हणजे हिंदुस्थानात पूर्वी स्वाऱ्या करणारे मूळचे अरब, मोंगल, तुर्क, अिराणी, तुराणी, अफगाण, हे लोक त्या त्या वंशांचे—जातीचे अस्सल रक्ताचे नि अवसानाचे होते. हिमालयापलीकडील देशांतील सकस वायुमान, मोठमोठ्या नद्या, पर्वताळ नि बर्फाळ प्रदेश, अेकसारखी लढायांतच जीवनें गेल्यामुळे त्यांचीं बनलेलीं कंटक शरीरें आणि मूळचेच असलेले धिप्पाडं देह अित्यादि परिस्थितीमुळे त्या कडव्या नि रानवट लोकांच्या स्वाऱ्यांतून त्यांपुढे हिंदुस्थानातील सापेक्षत: सुसंस्कृत पण म्हणूनच सौम्य प्रवृत्तीच्या नि 'दुबळ्या' हिंदूंचा लढायांतून टिकाव लागत नसे. परंतु शतकाशतकांनी हिमालयापलीकडील ते अुग्र जातीचे नि पराक्रमी वृत्तीचे मुसलमान लोक हिंदुस्थानात वंशपरंपरा राहत गेल्यामुळे आणि त्यांच्यातील अनेक वश राज्य करीत गेल्यामुळे त्या हिंदुस्थानातील मुसलमानांतही अैदीपणा, सौम्यपणा, सुखलोलुपता शिरली रंणांगणांत टिकाव धरणारी कंटकता नि कडवेपणा पहिल्याप्रमाणे अुरला नाही. हिंदुस्थानातल्या 'निकस' वातावरणाचा त्यांच्या मूळच्या धटिंगण शरीरप्रकृतीवर परिणाम होत गेला. अेकंदरीत त्याच जातीचे मुसलमान लोक हिंदुस्थानात राहिल्यामुळे 'कमअस्सल नि कमकुवत' होत गेले. म्हणूनच काय ते पुढे पुढे विशेषत: मराठ्यांना त्याच मुसलमानांचे पराभव करता आले."

हें विधान किती अर्धवट नि अवास्तव आहे हें सिद्ध करण्यास वर दिलेल्या दुआबातील रोहिले-पठाणांशी झालेला मराठ्यांचा संग्राम आणि त्यांत मराठ्यांनी वीस वीस सहस्र पठाणांना जे अभे कापून काढले ती अेक घटनाही पुरेशी आहे. हे दुआब ते रोहिलखंडापर्यंत त्या वेळी राज्य करीत असलेले पठाण रोहिले स्वत:ला अगदी 'अस्सल अफगाण' समजत असत. मोंगल बादशाहीला आणि तुर्क सरदारांना सुद्धा त्यांचा सारखा दरारा वाटत असे. ह्या अफगाणांचा मूळच्या हिमालयापलीकडील पठाणांशी रक्तसंबंधही त्या वेळी अविच्छिन्नपणे होत होता. तिकडच्या 'अस्सल नि अव्वल' पठाणांतून शेकडो लोक या दुआबातील पठाणिस्थानाकडे प्रतिवर्षी येऊन वसत. हे अिकडचे अनेक अफगाणही तिकडे जात. म्हणजे दुआब ते रोहिलखंडापर्यंतच्या प्रदेशातील सहस्रावधि पठाण रोहिले तोपर्यंत अस्सल पठाणच होते—अफगाणच होते ! पण मराठे तर हिंदुस्थानचे शत्रु ज्याला 'निकस' म्हणतात त्या देशात मूळचे वंशानुवंश वाढलेले तरी त्यांनी त्या 'अस्सल' म्हणविणाऱ्या पठाण रोहिल्यांना रणांगणातील पराक्रमाच्या अंतिम परीक्षेत वारंवार 'कमअस्सल' ठरविलेंच की नाही ? जेव्हा नादिरशहा सहस्रावधि अस्सल पठाणांचें सैन्य घेऊन दिल्लीवर तुटून पडला, स्वत: बादशहा झाला आणि महंमद गझनीप्रमाणे दक्षिणेपर्यंत चालून जाण्याच्या वलगना करू लागला, तेव्हा आता गझनीचा काळ अुरला नाही—आता गाठ मराठ्यांशी आहे, हें सप्रमाण अनुभवास आल्यामुळेच तो 'अस्सल अिराणी आक्रमक'ही हिंदुस्थानाबाहेर त्वरेने निघून गेला नाही का ? – केवळ मराठ्यांच्या भयाने ! ! ह्यापुढें अहमदशहा अब्दाल्लीने अगदी अस्सल तुर्क अिराणी, दुराणी, पठाणांच्या संमिश्र अशा पन्नास पन्नास सहस्रांच्या सैन्यासह हिंदुस्थानवर तीन चार स्वाऱ्या केल्या, पण प्रत्येक वेळी त्याला मराठ्यांच्याच प्रत्याक्रमणामुळे हिंदुस्थानातून शेवटी कसें निघून जावें लागलें, जय पराजयांच्या अुलथापालथीत पानिपतनंतरही शेवटी दिल्लीच्या साऱ्या मुस्लिम बादशाही सत्तेचें संपूर्ण संचालन मराठ्यांच्याच हाती राहावें, आपण त्यांत लवलेशही हात घालणार नाही, असा संधि करून अहमदशहा अब्दाल्लीसच शेवटी स्वत: दिल्लीचा अनियंत्रित बादशहा बनण्याच्या महत्त्वाकांक्षेवर पाणी सोडून मराठ्यांच्या पुढे कसें शिर झुकवावें लागलें, तें वर्णन आमच्या हिंदुपदपादशाही या ग्रंथातून प्रत्येक हिंदूने अवश्य वाचावें. त्याचा काही अुल्लेख या ग्रंथात खालीही करण्यात येणार आहे.

वैयक्तिक द्वंद्वात शारीरिक अुंचीरुंदीच्या घटकालाही काही महत्त्व असतें. तरीसुद्धा तो निरपवाद नियम नाही, याची साक्ष प्रतापगडच्या पायथ्याखाली असलेलें त्या धिप्पाड अफझुलखानाचें थडगें सुद्धा देअील. पण राष्ट्राराष्ट्रांच्या द्वंद्वांत तर व्यक्तींचा शारीरिक धिप्पाडपणा नि कंटकता यांच्या मोजमापाने काही जयापजयांचें प्रमाण ठरविता येत नाही. ते 'अस्सल' पठाण सुद्धा ज्यांच्यापुढे खुजे

ठरतात अशा अशा अुंच नि धिप्पाड गोऱ्या रशियन सैनिकांच्या राष्ट्रास 'बुटक्या' जपानने पहिल्या युद्धात रणांगणात चारी मुंड्या चीत केलें नाही का ? आमचे हिंदु गुरखे म्हणजे मराठ्यांच्याच शारीरिक बांधणीचे ! पण ह्याच गुरख्यांनी अिटा-लियन, ऑस्ट्रियन, ते प्रत्यक्ष जर्मनीच्या अुंच अुंच हिटलरी सैन्यांनाही अनेक प्रसंगी महायुद्धातील रणांगणात पाणी पाजलें नाही का ? साऱ्या जगात 'हिंदु गुरखा' म्हणजे 'शूर सैनिक' हा लौकिक गाजतो आहे ! साऱ्या अुंच, धिप्पाड म्हणून नांवाजलेल्या जर्मन, रशियन, अित्यादि युरोपियन राष्ट्रांचा अपराजेय सम्राट् म्हणून अेकदा कोण गाजत होता ? – बुटका नेपोलियन नि त्याचें बुटकें फ्रेंच सैन्य !

अब्दाल्लीची हिंदुस्थानावरील तिसरी स्वारी

बादशहाने गाझीअुद्दीनला मुख्य वझीर नेमलें होतें. गाझीअुद्दीनने सन १७५६ च्या फेब्रुआरीत पंजाबमध्ये सरहिंदपर्यंत जाअून तेथे अदिनाबेगला मोगल बादशहाचा कारभारी म्हणून नेमलें. गाझीअुद्दीनला प्रबळ आधार मराठ्यांचाच होता. गाझीअुद्दीनचें हें कृत्य म्हणजे अब्दाल्लीने बळकाविलेला पंजाबप्रांत मोंगल बादशहाने पुन्हा हिसकावून घेतल्याचेंच द्योतक होतें. दिल्लीतही अफगाणपक्षाचें अस्तित्व नामशेष होअून मराठ्यांच्या बळावर गाझीअुद्दीन वजिराचा शब्द म्हणजे मोगल बादशाहीचा शब्द झालेला होता. ह्या वेळी अगदी घाबरून जाअून मलिका झमानी ह्या बादशाही अंत:पुरातील मुख्य नि वृद्ध राजवंशीय कुटिल स्त्री संचालिका हिने स्वत: आणि हिंदुस्थानातील सर्व रोहिले पठाणांचा त्या वेळचा अत्यंत प्रमुख, मराठ्यांचा हाडवैरी, केवळ अुलट्या काळजाचा असा जो नजीबखान रोहिला ह्या दोघांनी मिळून अहमदशहा अब्दाल्लीस गुप्त पत्रें धाडलीं की, 'जर हिंदुस्थानात अिस्लामी सत्ता राखावयाची असेल तर आता आपणच अेक ती राखू शकाल. तरी पत्रदेखत जय्यत सिद्धतेनिशी हिंदुस्थानवर स्वारी करून यावें. मराठ्यांचीं मोठमोठीं सैन्यें दक्षिणेत गुंतलीं आहेत. दिल्ली मोकळें मैदान पडलें आहे. पण मोगल बादशहाकडून दिल्लीस निघून येण्याचा अत्यंत त्वर्य संदेश मराठ्यांना आधीच गेला आहे जर का आपल्या स्वारीस थोडाही विलंब लागेल तर मराठ्यांची राजसत्ता त्यांच्या बादशहाशी झालेल्या पक्क्या कराराप्रमाणे पंजाब, ठट्ठा नि मुलतान (सिंध) पर्यंत प्रत्यक्षपणे चालू झालीच म्हणून समजा ! फार मोठ्या सैन्यानिशी ते मराठे दिल्ली पंजाबवर तुटून पडणार आहेत.'

ही बातमी अैकतांच अहमदशहा अब्दाल्ली चवताळून गेला. मराठ्यांना पंजाबादिक प्रदेशांच्या राज्यकारभाराची सत्ता मोगल बादशहाने मागे करार करून दिली त्याचा वचपा काढण्यासाठीच अब्दाल्लीने लाहोरपर्यंत स्वारी करून अलीकडेच मोंगल बादशहाकडून त्या सर्व प्रदेशाची सत्ता छिनावून आपल्या हाती घेतली होती.

ती सत्ता पुन्हा गाझीअुद्दिनाने मोंगल बादशहाचे नांवाने मोगली राज्यात परत समाविष्ट केली आणि आपणास अेका अक्षरानेसुद्धा विचारलें नाही. ह्या आपल्या झालेल्या अुपमर्दाची अब्दाल्लीला साहजिकच चीड आली. त्यामुळे शाह अब्दाल्ली हिंदुस्थानवर स्वारी करण्याकरिता १७५६ च्या नोव्हेंबरमध्ये स्वत: पेशावरला आला. त्याने आपला मुलगा तैमूरशाह आणि सेनापति जहानखान यांना ससैन्य लाहोरवर धाडलें. मोंगल सेनापति अदिनावेग ह्याने तैमूरशहाशी लढाअी दिली, पण अदिनाबेगचा पराभव झाला. अफगाणांचीं सैन्यें रागारागाने लटमार करीत लाहोरपासून सतलजपर्यंत पोचली तरी त्यांचा कोणी प्रतिरोध केला नाही. दिल्लीच्या बादशाही सत्तेची ही दुर्बलता ध्यानात येताच शहा अब्दाल्लीने पेशावरहून त्वरेने त्याच्याबरोबर असलेल्या अैंशी सहस्र सैन्यासह मध्ये कुठेही न थांवता सरळ दिल्लीवर स्वारी केली. (सन १७५७ जानेवारी) जवळ जवळ कोणचाही प्रतिकार न होता दिल्ली त्याच्या हाती पडली. त्याने तत्काळ तेथील बादशाहीचा अधिकार आपल्या हाती घेतला आणि बादशहा अहंमदशहा अब्दाल्ली ह्या नांवेच सर्व राज्यकारभार चालू केला.

पण प्रत्येक नव्या मुस्लिम बादशहाचें जें पहिलें बादशाही कृत्य असलेंच पाहिजे असा मुस्लिम धर्मशास्त्राचा त्या काळचे पठाणी मुसलमान जो अर्थ समजत असत, तें प्रथम धर्मकृत्यही त्याने लगेच पार पाडलें. तें नव्या मुस्लिम बादशहाचें पहिलें धर्मकृत्य आपल्या प्रतिष्ठेस शोभेशा रीतीने साजरें व्हावें म्हणून बादशहा होताच अगदी य:कश्चित् कारणाकरता तो रागावलासुद्धा आणि त्यानिमित्त आपण बादशाहीची राजसत्ता हाती घेतली आहे हें घोषित करण्यासाठी दिल्लीच्या जनतेचा सरसकट धरून सामुदायिक शिरच्छेद करण्याची आज्ञाही त्याने सोडली आणि काही तासांच्या अवधीत अठरा सहस्रांहून अधिक लोकांना त्याच्या त्या 'अस्सल नि अव्वल' हिमालयापलीकडील अफगाणांनी रक्तस्नान घातलें, सरसकट कापून काढलें ! नंतर लगेच तितकेंच महत्त्वाचे जें दुसरें मुस्लिम बादशहाचें 'शास्त्रोक्तपणे' राज्याभिषेक करून घेण्याचें त्या काळचें मुस्लिम धर्मकृत्य असे तेंही त्याने पार पाडलें आणि, 'मी अिस्लामचा अेक नम्र भक्त असल्याकारणाने काफरांचा आणि त्यांच्या देवालयादिक धर्मसंस्थांचा विध्वंस हिंदुस्थानातून आमूलाग्र करणार आहे,' अशी जितकी भयकर तितकीच अवाच्च घोषणा केली !

त्या घोषणांना त्याने लगोलग कार्यवाहीतही आणलें. तत्काल त्याच्या आज्ञेने दिल्लीतील देवळें, मदिरें, देवमूर्ति, हिंदूचीं घरेंदारें धडाधड कोसळू लागलीं, पेटून भडकू लागलीं.बादशहा अब्दाल्लीचा मुख्य 'घुस्सा' मराठ्यांनी मथुरा,प्रयाग अित्यादि जीं अनेक लहान मोठीं हिंदूचीं तीर्थक्षेत्रें मुसलमानांच्या हातून अलीकडेच हिसकावून घेतलीं होतीं त्या त्या स्थलांवर होता. म्हणून त्याने तीं तीं पुन्हा भ्रष्ट करण्याचा सपाटा चालविला. अशा प्रसंगी या राक्षसी, क्रूर नि आक्रमक विजेत्यांची दिल्ली

घेताच बहुधा पहिली धाड पडे ती दिल्लीपासून जवळ असलेल्या विचाऱ्या मथुरेवर पडे; आणि त्या धन्य पुण्यनगरीनेही, अेखाद्या चितोडच्या जोहारातील वीरांगने-प्रमाणे किंवा मूर्तिमंत चितोड नगरीप्रमाणेच त्या त्या अग्निदिव्यात आपला वारंवार बळी दिला. परंतु या वेळेस तिने पूर्वीप्रमाणे अगदी न लढताच मुसलमानांच्या क्रूर धर्मच्छळापुढे स्वत:चें बलिदान केलें नाही. विवरित (detailed) वर्णन स्थला-भावी देता येत नसताही अितकें तरी सांगणें अवश्य आहे की जवळ जवळ पांच सहस्र हिंदु जाट नागरिकांनी मुसलमानांच्या त्या अगणित नि संघटित सैन्यास प्राणांतिक लढाअी दिली. प्रत्येकी मरेतोपर्यंत तो तो हिंदु धर्मवीर म्लेच्छांस मारता मारता मेला ! मथुरेला रक्तस्नानाचा सडा घातल्यानंतर आणि देवालयांच्या पाडलेल्या ढिगाखालीच तिला गाडून टाकल्यानंतर तो दुष्ट अब्दाल्ली जवळच असलेलें हिंदूंचें दुसरें पवित्रक्षेत्र जें गोकुल वृंदावन त्यावर जाअून आदळला. या क्षेत्रावर त्याचा विशेष राग तोच होता की तें मराठ्यांनी मुस्लिमांच्या हातून अलीकडेच छिनावून घेतलें होतें. या आकस्मिक राक्षसी आक्रमणास तोंड देण्यासाठी, स्वधर्मासाठी मरेतो लढण्याच्या प्रतिज्ञा घेअून तेथील 'नंगे गोसाव्यांच्या' सुप्रसिद्ध आखाड्यातील दोन सहस्रांवर शूर गोसावी अब्दाल्लीच्या मुस्लिम सैन्यावर सहसाच तुटून पडले. त्या वैराग्यांचा हा मारा अितका आकस्मिक, संघटित आणि भयंकर होता की अब्दाल्लीचें सैन्य अेकदम मागे कोसळलें. मुसलमानांचे सहस्रावधि सैन्य ठार मारलें गेलें, आणि त्या धर्मवीर गोसावी वीराचें पण ! दिवसभर अशी रण-धुमाळी चालल्यानंतर मुसलमान तें नगर सोडून मागे परतले आणि त्यांच्या गोकुलनाथाचें संरक्षण केल्याविषयी स्वकीय धन्यतेच्या जयघोषाने त्या नंग्यावैरागी संप्रदायाने सारें गोकुल वृंदावन गर्जवून दिलें. नंगा गोसावी असावा तर असा !

तेथून अब्दाल्ली सरळ आग्रयावर चालून गेला आणि त्या बळकट दुर्गास त्याने वेढा घातला. याच दुर्गात पठाण पक्षाचा हिंदुस्थानातील परमद्वेषी आणि म्हणून मोगल बादशाही टिकविण्यास मन:पूर्वक झटणारा जो वझीर गाझीअुद्दीन तो लढत होता. आणि क्षणाक्षणाने त्याचे मुख्य संरक्षणकर्ते नि साहाय्यक जे मराठे त्यांच्या येण्याची वाट पहात होता !

पण अशा हिंदुधर्मावरील आणीबाणीच्या वेळी जयपूर, जोधपूर, अुदयपूर आणि तिकडील अितर प्रांतांतील लक्षावधि–कोटयवधि हिंदुराजे रजवाडे, लढव्यये नि लोक काय करीत वसले होते ? त्यांच्या डोळ्यांसमोर अब्दाल्ली सहस्रावधि गाअींना, हिंदु स्त्रियांना, स्वधर्म वाचावा म्हणून सरसकट शिरच्छेदात पहाता पहाता कापले जाणाऱ्या सहस्रावधि हिंदूंना कापीत चालला असता, हिंदूंच्या वरील हुतात्मरक्ताच्या पावसाने सारीं तीर्थक्षेत्रें लालभडक करीत चालला असता ह्या साऱ्या वर दिलेल्या लक्षावधि कोटयवधि हिंदु लोकांपैकी सामान्य जनता जेवढी होती तेवढी मराठे केव्हा येतात नि या मुस्लिम अत्याचाऱ्याच्या हातून आमची नि आमच्या धर्माची

सुटका केव्हा करतात याची केवळ अनिमिष वाट पहात होती ! आणि जे अितर हिंदुराजे, रजवाडे, जहागिरदार लढवय्यांचीं सैन्ये होतीं, तीं बसलीं होतीं केवळ मराठ्यांचा द्वेष करीत ! सारे रजपूत मराठ्याचा नायनाट अब्दाल्लीने परस्पर केला तर टाळी वाजविण्यासाठी हात अुभारून अुभे होते ! त्या तिकडील हिंदूपैकी अनेक लहानमोठे संस्थानिक तर अब्दाल्लीशी आतून अनुसंधान बांधून होते ! पण मराठ्यांचे सिंधु-मुलतानपासून अुत्तर हिंदुस्थानात थेट रोहिलखंडाच्या अंतापर्यंत नि नेपाळच्या सीमेपर्यंत वाढत गेलेले राजकीय प्रभुत्व ह्या अुत्तरेतील हिंदु-मुसलमान राजेरजवाड्यांच्या अिच्छेप्रमाणे अब्दाल्लीने नष्ट केलें असतें तर काय ? हा प्रश्न काही त्या हिंदूंच्या बधिर मनाला डवचळून गेला नाही ! मराठ्यांचे मागून त्या साऱ्या प्रदेशात पुन्हा हिंदु प्रभुत्व स्थापन करणारा मुसलमानी सत्तेचा काळ नि विजेता होणारा अेक तरी हिंदु मायेचा पूत त्या हिंदूत होता का ? नाही ! म्हणजे मग मराठ्यांचें प्रभुत्व जर अब्दाल्लीने नाहीसें केलें असतें आणि त्याची मुस्लिम बादशाही साऱ्या हिंदुस्थानात पुन्हा प्रस्थापित झाली असती तर या हिंदुराजपूत प्रभृति मराठ्यांचा द्वेष करणाऱ्या अुत्तरेच्या नाकर्त्या हिंदूंच्या पदरांत काय पडलें असतें ? केवळ कोण्या नव्या अल्लाअुद्दिनाचें किंवा नव्या औरंगजेबाचें मुस्लिम साम्राज्य आणि हिंदुधर्मावरील आणि राज्यावरील भयंकर अत्याचार नि लाखो हिंदूंचा रक्तपातच ना ?

पण मुसलमानी सत्तेचा सत्यानाश व्हावा अशी गुप्त तळमळ ज्यांच्या हृदयात होती आणि तसा नाश करण्यास समर्थ असे अेक हिंदु मराठे तेवढेच आहेत अशी मनातून निश्चिति असल्यामुळे चातकाप्रमाणे मराठ्यांच्या येण्याची गुप्तपणे वाट पाहणारी, तथापि स्वतः काहीही करू न शकणारी अशी जी लक्षावधि असंघटित हिंदूंची जनता तिकडे होती म्हणून वर सांगितलें आहे त्या जनतेच्या अिच्छाशक्तीमुळें म्हणा अथवा अेकंदर हिंदुराष्ट्राच्या मूळ जीवनयोजनेमुळे म्हणा, पण तसें काही अेक घडलें नाही.

कारण रघुनाथराव दादा यांच्या नेतृत्वाखाली मल्हारराव होळकर ह्यांना दक्षिणेतून नानासाहेबाने वरील प्रकारचीं मराठे सरदारांचीं नि गाझीअुद्दिनादिकांचीं पत्रें आल्यावरून तत्काल अुत्तरेत ससैन्य धाडलें. अुत्तरेकडील गोविंदपंत बुंदेले, बवें अित्यादि सरदारसुद्धा सर्व मराठी पुढाऱ्यांनाही रघुनाथरावाला साहाय्य देण्याचा निकडीचीं पत्रें गेलीं. रघुनाथराव अिंदोरच्या पुढे जातात न जातात तोंच बातमी आली की अहमदशहा अब्दाली आग्र्यापासून मराठ्यांच्या प्रत्याक्रमणाची वार्ता अैकताच त्याने घेतलेलीं मथुरा, वृंदावन प्रभृति सब हिंदुक्षेत्रें नि हिंदु प्रदेश सोडून दिल्लीला गेला, आणि तेथून त्याने मिळविलेली सगळी लूट तेवढी बरोबर घेअून काबूलकडे चालता झाला. पण ! जाताना हिंदुस्थानातील त्याची सत्ता चालविण्यासाठी त्याचा मुलगा जो तैमूरशहा त्याला तिकडील प्रदेशाचें प्रभुत्व

दिलें, आणि त्याच्या हाताखाली दशसहस्र सैन्य सरहिंदला ठेवलें. त्याचप्रमाणे पंजाबात पुढे जाता जाता महत्त्वाच्या ठिकाणी आपले अधिकारीही ठेवले.

अिकडे जीं मराठी सैन्यें रघुनाथराव याच्या सैनापत्याखाली अुत्तर हिंदुस्थानातील निरनिराळ्या मराठी सेनानींच्यासह अेकत्र झालीं होतीं त्यांना घेअून त्यांनी अुत्तर हिंदुस्थानात ज्यानी ज्यांनी मराठ्यांविरुद्ध अब्दालीच्या आधारावर बंडाळी मांडली होती त्यांचीं त्यांचीं डोकीं ठेचून टाकण्यास प्रारंभ केला. सखाराम भगवंत, गंगाधर यशवंत, आणि अितर मराठे सरदारांनी दुआवमध्ये शिरून रोहिल्यांना आणि पठाणांना पुन्हा चोपून काढलें. वझीर गाझीअुद्दिन अब्दाल्लीच्या पक्षाच्या हाती बंदिवान झालेला होता त्यास सोडवून आपल्या कह्यात आणलें. स्वतः विठ्ठल शिवदेवाने दिल्लीवर चाल केली. आणि जवळ जवळ पंधरा दिवसांच्या निकराच्या लढाअीत अब्दाल्ली पक्षाचा धुव्वा अुडवून देअून त्या राजधानीत पुन्हा प्रवेश केला. आणि सगळ्यांत मुख्य गोष्ट जी केली ती म्हणजे मराठ्यांचा कट्टर शत्रु आणि अब्दाल्लीचा अुजवा हात जो नजीबखान रोहिला त्याला जिवंत पकडला. यामुळे अब्दाल्लीने त्या प्राताचा स्वतःला बादशहा समजून जी व्यवस्था केली होती ती सारी अकस्मात् कोसळून पडली. दिल्लीपुढे सरहिंदला अब्दाल्लीने दहा सहस्र पठाणी सैन्य जें त्याच्या प्रभुत्वरक्षणासाठी अब्दुल समद नांवाच्या सेनानीच्या नेतृत्वाखाली ठेवलेलें होतें, त्याचें धैर्य डळमळीत झालें. अितक्यात दिल्लीहून मराठेही सरहिंदवर चालून आले. तेव्हा मुसलमानी सैन्याचा रीतसर लढाअी देण्याच्या आधीच गोंधळ अुडून लहानमोठ्या चकमकीत मराठ्यांनी धुव्वा अुडवून दिला आणि त्यांचा सेनानी जिवंत पकडला. ही बातमी हा हा म्हणता बादशहा अब्दाल्लीचा पुत्र नि पंजाबवर त्याने नेमलेला त्याचा प्रमुख प्रतिनिधि (गव्हर्नर) तैमूरशहा आणि त्याचा सरसेनापति जहानखान ह्याना कळताच लाहोर निकराने लढविण्याचाही त्यांचा बेत त्यांनी सोडून दिला, आणि मराठ्यांच्या ह्या प्रभावी नि वेगवान् प्रत्याक्रमणामुळे मराठ्यांना तोंड देण्याचेंसुद्धा धाडस न करता ते दोघेही लाहोर सोडून मराठे लाहोरात घुसतात न घुसतात तोंच काबूलकडे ससैन्य माघार घेते झाले. अब्दाल्लीने त्यांना निक्षून सांगितलें होतें की कोटयवधि रुपयांची लूट अजून तुमच्या हाती आहे ती शत्रूच्या हाती पडू देअू नका. यासाठी त्यांनी ती सांभाळून नेण्याची आणि माघारही व्यवस्थितपणे चालविण्याची पराकाष्ठा केली. पण मराठ्यांच्या सेनेने लाहोरच्या पुढेही घुसून मुस्लिमांच्या केलेल्या पाठलागात तैमूरची अितकी लांडगेतोड केली की त्याचे हत्ती, घोडे, अुंट, रोकड यच्चयावत् संपत्ति ठिकठिकाणी टाकून देत जेव्हा अटक ओलांडून तैमूर त्याच्या प्रदेशात पळून गेला तेव्हा त्याच्यापाशी भारतातील लुटीचा अंश असा त्याचा अेक जीव तेवढा राहिलेला होता ! बाकीचें त्याचें म्हणून जेवढें वस्तुजात होतें तें सर्व मराठ्यांनी लुटून अफगाण सैन्य त्याच्यासारखेंच स्वतःचा जीव काय तो

बचावून काबूलला परत गेलें तेवढेंच काय तें जगलें ! अब्दाल्लीच्या मागे त्याने हिंदुस्थानात साऱ्या हिंदुधर्माचा आणि हिंदुलोकांचा विध्वंस करण्याकरता म्हणून ठेवलेलें जें पंधरावीस सहस्र ' अस्सल पठाणादिक ' मुस्लिमांचें सैन्य दिल्ली पंजाबात होतें तें तुकड्यातुकड्यांनी टोळ्याटोळ्यांनी व्यक्तिव्यक्तिशः गाठून मराठ्यांनी झुंजीत ठार केलें. (१७ मार्च १७५८)

वादशहा अहमदशहा अब्दाल्ली ह्याचा असा लांछनास्पद पराभव करून मराठ्यांनी त्याच्या अफगाण बादशाहीतील परत जिंकून घेतलेल्या सिंध ते मुलतानपर्यंत आणि मुलतान ते सरहिंदपर्यंतच्या साऱ्या विस्तृत प्रदेशाची राजसत्ता आणि राज्यकारभार हा पूर्वी ठरलेल्या मोगली बादशहाच्या कागदी कराराप्रमाणे जिंकला होता तो आज आता मराठ्यांनी आपल्या पौरुषाने प्रत्यक्ष जिंकून हाती घेतला ! पण त्या वेळेस दिल्लीचा मोगली बादशहा आणि त्याचा वझीर जो गाझिअुद्दिन त्यांच्याही हितासाठी हीच गोष्ट अवश्य होती हें ते जाणून होते; म्हणून रघुनाथराव साऱ्या पंजाबची राजधानी जो लाहोर तेथे पुन्हा राजधानीचा सर्व थाट नि राज्यकार्य चालू करण्यासाठी प्रकटपणे जाण्याच्या प्रसंगी मोठा बादशाही अुत्सव करावा अशी दिल्लीच्या बादशहानेच आज्ञा सोडली. सारा पंजाब नि आजूबाजूचेही प्रदेश जिंकून घेणाऱ्या मराठ्यांच्या पराक्रमाने, त्या काळापूर्वी पंजाबात नुसताच स्थानिक धुमाकूळ घालीत असलेले हिंदूंचें काश्मीर, डोग्रादिक रजवाडे, शिखांच्या ' मिसली ' आणि मुसलमानांचे तथाकथित अमीर अुमराव, निजाम, नवाव अित्यादि प्रस्थें आश्चर्याने नि भयाने चकित होअून गेलीं होतीं, दवून गेलीं होतीं आणि सेनापति रघुनाथराव यांना अंकितभावाने येअून मिळू लागलीं होतीं. पंजाबात त्या वेळी शिखांचें प्रस्थ हळूहळू वाढत चाललें होतें. त्यात अहमदशहा अब्दाल्लीने मराठ्यांच्या भयाने अलीकडेच काबुलास माघारे जाताना वाटेत शिखांचें मुख्य क्षेत्र जें अमृतसरचें सुवर्णमंदिर तें पाडून टाकलें होतें आणि तेथील तें पवित्र सरोवर चिखल मळ माती दगडांची भर घालून बुजवून टाकलें होतें. यामुळे अब्दाल्लीचें शीखांशी हे अुभें शत्रुत्व ठाणलें होतें. म्हणून शिखांतील त्या वेळच्या अेका प्रबळ मिसलीचा मुख्य जो आलासिंग जाठ (ज्याला त्या वेळच्या मराठी पत्रव्यवहारातून आला जाठ म्हटलेलें आहे तो) सरहिंदच्या लढाअीत तर मराठ्यांना अुघडपणे येअून मिळाला होता. ह्या सर्व पंजाबातील राजकीय अुठाढाली करणाऱ्या पक्षांतील आणि पुढाऱ्यांतील बहुतेकांची अनुकूलताही रघुनाथरावाचा असा मोठा सन्मान करण्यास असल्यामुळे हा बादशाही सभारंभ मराठी सैन्यासह रघुनाथराव ज्या दिवशी सिंधूकडच्या प्रदेशाकडे स्वारी करून परत येतील आणि पंजाबची राजधानी जो लाहोर तेथेच काही कालाकरिता तरी वास्तव्य करण्यासाठी लाहोरात प्रवेश करतील त्यानंतर थोड्याच दिवसांत साजरा करावा असें ह्या सर्वांनी ठरविलें.

पंजाबात रघुनाथराव पेशव्यांचा विजयप्रवेश

तैमूर लाहोर सोडून सरसीमेपलीकडे पळून जात असता त्याच्या सांगाती जी प्रचंड लूट पळविली होती ती पण छिनावून घेण्यासाठी रघुनाथरावही लाहोर सोडून त्या धूम पळत सुटलेल्या पठाणी सैन्याचा पाठलाग करीत पंजाबात पुढे घुसला. अर्धाअधिक पंजाब जिंकीत आणि अब्दाल्लीच्या त्या सैन्यास 'दे माय धरणी ठाय' करीत सीमेकडे हुसकून दिल्यानंतर पुढचें अुरलेलें सीमाविजयाचें काम मराठ्यांच्या अनेक सैनिक पथकांकडे सोपवून रघुनाथराव जिंकलेल्या प्रदेशात मराठी सत्तेची घडी पक्की बसविण्यासाठी पंजाबची मुख्य राजधानी जी लाहोर तिकडे परतला आणि ११ अेप्रिल १७५८ ला लाहोरात मराठी सैन्यासह विजय-प्रवेश करता झाला.

त्याच्या या विजयप्रवेशाचें अभिनंदन नि गौरव करण्यासाठी लाहोरला मोठा अुत्सव करण्यात आला. स्वतः रघुनाथराव बादशाही राजवाड्यातच अुतरले होते. मराठी सैन्याचे प्रमुख प्रमुख अधिकारीही लाहोरातील मोठमोठ्या वाड्यांतून किंवा लाहोरच्या परिसरात आपापले तळ ठोकून राहिले होते. जिकडे तिकडे शेकडो शृंगारलेले हत्ती, घोडे, अुंट, पुष्ट वृषभ मिरवत होते. ठिकठिकाणचे हिंदु मुसलमान अधिकारी, अमीर, अुमराव, तथाकथित नबाव, निजाम, राव, राजे राजवाडे हे त्या दिवशींच्या दुपारी भरविलेल्या भव्य राजसभेत अुपस्थित राहिले होते. त्या सर्वांकडून पंजाबातील बादशाही सैन्यासुद्धा सर्व राजसत्तेचें आणि राज्य-कारभाराचें आधिपत्य ज्या पेशव्यांना अर्पिलें होतें त्यांचे विजयी प्रतिनिधि म्हणून रघुनाथराव पेशवे यांचा सर्वांनी मोठा गौरव केला. सर्वांकडून आपापल्या परीनी रघुनाथरावांना अंकित भावाने नाना प्रकारचे पुरस्कार (नजराणे) अर्पण करण्यात आले. रात्रौ नगरात जिकडे तिकडे मोठा लखलखाट करण्यात आला. प्रेक्षणीय दारूकामही सर्वत्र अुडविण्यात आलें. लाहोर नगराच्या लगतच्या नगरातूनही असेच मोठे दीपोत्सव नि दारूकाम प्रदर्शिलें गेलें !

ही हिंदूंच्या–मराठ्यांच्या, विजयोत्सवाची राजसभा आणि हे दीपोत्सव कुठे साजरे झाले ? तर मोगल घराण्यातील अकबर, औरंगजेब असले असले मुस्लिम बादशहांचें जे विलासस्थान होतें त्या सुप्रसिद्ध लाहोरच्या शालिमार बागेच्या भव्य पटांगणात ! ! मुसलमानांच्या राजसत्तेची मराठ्यांनी अशी वटीक बनविली!

मराठ्यांनी मिळविलेल्या ह्या विजयाचें वृत्त अैकून दक्षिणोत्तर नि पूर्व-पश्चिम हिंदुस्थानात मराठ्याच्या हिंदुपदपादशाहीच्या जिवापाड पराक्रमाविषयी जे जे स्वतःही अत्युत्कट प्रयत्नशील होते किंवा अत्युत्सुक शुभचिंतक होते अशा लक्षावधि राजेरजवाड्यांच्या, लहान मोठ्या सरदारांच्या, शास्त्रीपंडितांच्याच काय पण निरिच्छ साधुवर्गीयांच्या कडूनही अभिनंदनपत्रांचा रघुनाथराव

पेशव्यावर नुसता पाऊस पडत होता ! आम्ही या ग्रंथात मागे ९१४ पृष्ठावर वर्णिल्याप्रमाणे त्या पत्रलेखकांच्या भावना ह्या कल्पनातीत हिंदूंच्या विजयामुळे अितक्या अुत्कट झाल्या होत्या की, त्या साध्या गद्यमय वर्णनाच्या कक्षेत मावूच शकल्या नाहीत ! तर, काही दैवी पुराणांतरीच्या वर्णनातूनच त्या व्यक्त होअू शकल्या. याचें अेक अुदाहरण म्हणून पेशव्यांच्या दिल्लीमधील सेनापति अंताजी माणकेश्वरासारख्या केवळ साधी प्रतिवृत्तें (Political reports) लिहिण्याची सवय असलेल्या आणि अेक अुच्च अधिकारी असलेल्या पुरुषाचें रघुनाथरावांना ५ मे १७५८ ला जें पत्र गेलें तेंच पहा !

'सेवकास स्वामींनी कृपा करून पत्र (१८ अेप्रिलचें) पाठविलें तें पावलें. वर्तमान लाहोरच्या पत्तेचें शत्रूच्या पारिपत्याचें व तिकडील मुलुख काबीज केल्याचें लिहिलें तें सविस्तर वाचून परम आनंद झाला तो पत्री कोठवर लिहावा. हिंदुस्थानात कीर्त लौकिक मातबर झाली. कुलराजे, अुमराव, सुभे यांस दहशत पडली. सारे हिंदुस्थानचा मूड अब्दाल्लीपासून अेक स्वामींनी घेतला. तेणें करून यशाचे पर्वत झाले. स्वामी यशस्वीच आहेत. याचा विस्तार सेवकास लेखन करावयास सामर्थ्य कैचें? हें वर्तमान वजिरांनी अैकोन बहुतच हर्ष मानिला. स्वामी अवतारी पुरुष आहेत. त्यांची स्तुत मनुष्यांनी काय करावी! सेवकास आश्रय स्वामीचे पायाखेरीज दुसरा कोठेही नाही. जरी स्वामींची छावणी लाहोर प्रांती जाली, तरी वजीर पादशहास घेअून छावणीस आपल्याजवळ येतो. वजीर व लहानमोठे सर्व म्हणतात कीं खासा छावणी न जाली तर पठाण मागती लाहोर प्रांती पावमाळा येतील. अुगेच लोक म्हणतात तें सेवेशी लिहिलें. करणें न करणें अख्त्यार खावंदांचा. वजीर व पादशहा यावयाचा निश्चय कोणे प्रकारचा तो निवडून सेवकास आज्ञा लिहावी, त्याप्रमाणे त्यास घेंअून विठ्ठल शिवदेव सेवेशी येतील. त्याप्रमाणे कृष्णराव (काळे) ही येतील. सर्व विनंती करतील.'(५–५–१७५८)

सेनापति रघुनाथराव पेशवे यांनी पंजाब विजयाचें स्वत: धाडलेलें प्रतिवृत्त

आता रघुनाथरावांना दक्षिणेत पावसाळ्याआधी ससैन्य परत येण्यासाठी श्रीमंत नानासाहेब यांचीं पुण्याहून पत्रांवर पत्रें येअू लागलीं होतीं. परंतु पंजाबातील जो विस्तीर्ण प्रदेश मराठ्यांनी अलीकडेच जिंकला होता त्याची पक्की राज्यव्यवस्था लावण्याचें काम लगोलग करून टाकणें हें अवश्य असल्याने रघुनाथरावाने ससैन्य पंजाबातच आणखी चार महिने तरी दाबून रहाणें अत्यंत अिष्ट होतें. रघुनाथरावाने दक्षिणेत मल्हारराव होळकरासह सध्याच परत जाअू नये असा अुत्तर हिंदुस्थानात सगळ्याच मराठी कर्त्या मंडळींचा नि सेनानींचा आग्रह पडला होता. परंतु स्वत: रघुनाथरावाच्या नि मल्हारराव होळकराच्या मनाचा कलही दक्षिणे-

कडे जावें असा होता. त्यात आता नानासाहेब पेशव्यांनीच 'परत या' अशी आज्ञा सोडल्याने रघुनाथरावाने, मराठ्यांनी या स्वारीत जो अपूर्व विजय मिळविला त्याचें अधिकृत प्रतिवृत्त (official report) स्वत: लिहून श्रीमंत नानासाहेबांना धाडलें आणि ढाला परत फिरविल्या. मल्हाररावासह अनेक मराठे सरदारही रघुनाथरावासह दक्षिणेकडे निघाले. पंजाबात शक्य तितकी सेना निरनिराळ्या स्थानी मराठी सत्ता पक्की करण्यासाठी रघुनाथरावाने काही सरदारांसह अर्थातच मागे कामावर ठेवलेली होती.

या पंजाबवरील स्वारीतील मराठ्यांच्या पराक्रमाचें वर्णन अेखाद्या वीरकाव्यातील सर्गासारखे भव्योदात्तपणे करता येण्यासारखें असताही रघुनाथरावाने त्याचें जें प्रतिवृत्त पुण्यास धाडलें म्हणून वर सांगितलें आहे तें किती सैनिकी बाण्याचें, लवलेश पाल्हाळ वा आत्मस्तुति किंवा मिथ्या स्तोम नसलेलें, केवळ घटना नि अपरिहार्य राजकीय चर्चा तेवढीच काय ती अुल्लेखिणारें आहे तें वघण्यासारखें आहे. यास्तव तें प्रतिवृत्त जसेचें तसें रघुनाथरावाच्या शब्दांमध्येच खाली देत आहो.

ता. ४–५–१७५८ रोजी रघुनाथराव पेशव्यास लिहितो : 'लाहोर, मुलतान, काश्मीर वगैरे अटकेअलीकडील सुभ्यांचा वंदोवस्त करून अंमल बसवावा, त्यास, काही जाला, काही होणें तोही लवकरच करितो. तयमूर सुलतान व जहानखान यांचा पाठलाग करून फौज लुटून घेतली. थोडीशी झडत पडत अटकेपार पिशावरास ते पोचले. अब्दाली अिराणवर चालून गेला, त्याची फौज पादशहाने लुटून घेतली. अब्दाली कंदाहरास आला. अिराणची फौज पाठलाग करीत आली आहे. जबरदस्तखान व मुकरवखान या प्रांतीचे सरदार व जमिनदार अब्दालीच्या जबरदस्तीमुळे त्यास रुजू होते, तेही बदलोन हगामा करितात. हल्ली रफीक होअून सेवा करून दाखवू, अब्दालीस तंबी भरू अशा त्याच्या अर्ज्या आल्या आहेत. अब्दालीचा धीर सुटला आहे. सारांश त्याचा जोम तिकडून होतो अैसे नाही. तिकडून अिराणचे शहाने जेरबस्त केलें, तिकडून जोरा पोचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. त्याचा पुतण्या नि दौलतेचा वारस स्वामींपाशी देशाला आला. तो स्वामींनी आम्हांकडे पाठविला होता. त्यास अटकेअलीकडे थोडीशी जागा बसावयास देअून अटकेपार काबूल पिशावरचा सुभा देअू. अब्दालीच्या फौजेवर अब्दुल समदखान सरहिंदेत होता, तो सरकारात पाडाव आहे. तोच आणखी या प्रांतीची फौज, अिराणी, मोंगल देवून मशारनिल्हेची रवानगी करितो. हे तिकडील पैरवी करतील, स्वामींचें पुण्यप्रतापें अब्दालीस जोरा पोचवून तंबी करितील, पारिपत्य अुत्तम प्रकार करून अटकेपार अंमल बसवतील, लाहोर प्रांती रेणके अनाजी व रायजी सखदेव असे ठेविले. गोपाळराव गणेश (बर्वे) यांचाही पैगाम आहे, तेही राहतील. अिराणचे पादशहाचे स्वदस्तुरचे कागदही आम्हांस व मल्हारबास आले

होते, की लौकर कंदाहारास यावें आणि यांचें पारिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आम्ही तरी काबूलचा अब्दुल रहिमखान स्वामींनी पाठविला, त्यास देतो, फौज वगैरे थोडे बहुत साहित्यही करितो. काबूल नि कंधार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानकडे अकबरापासून अलमगीर पावेतो होते, ते आम्ही विलायते कां द्यावे. अिराणचा अंमल बसवून तूर्त त्यास गोडच जाव पाठविणार आहो. जंबू, काश्मीर वगैरे तमाम वकील आले आहेत. मामलत थोडीबहुत अटके अलीकडील करीत आहो. पलीकडील तूर्त होत नाही. खटपट मात्र होअील. तूर्त तातडीमुळे जें होअील तें करितो. पुढील स्वारीस जो कोणी मातबर येअील तो बंदोवस्त करील. मुलूख दोचौ करोडींचा वसुली, परंतु जमिनदार मवास मोठमोठे आहेत. आम्ही नांवास मात्र खंडणी करितो. जेथे पंचवीस लक्षांचा मुलुख तेथे अेक दोन लक्ष येणेंच कठीण आहेत. तूर्त माघारी फिरावयाचा डौल स्वामींचे आज्ञेवरून धरिला आहे, याचमुळे जें होतें तेंच करितो, तटी लावीत नाही. तूर्त अदिना वेगावरच सारा यखतियार दिल्हा आहे; त्यासच कमाविसीने लाहोर मुलतान दिल्हें आहे. यंदा तर सारे शिबंदी खालीच जाअील, शिबंदी करताच कठीण पडेल, दोन तीन वर्षांणी काही सोअीस लागेल. स्वामींस कळावें.'

लांछनास्पद गोष्ट ही की, मराठ्यांनी दक्षिणेत परतताना मुस्लिमांवर धार्मिक सूड मात्र अुगविला नाही !

ह्या ग्रथाच्या ह्या दुसऱ्या भागाच्या पूर्वार्धात हिंदुसमाजाला सद्गुण-विकृतीच्या दुष्ट व्याधीने कसें पछाडलेलें होतें आणि त्यामुळे हिंदु धर्मावर मुसलमानांनी जे असह्य नि अपरिमित अत्याचार केले त्या धार्मिक अत्याचारांचा मात्र हिंदूंनी, शक्ति पुन्हा अंगी आली असताही, कसा लवलेश सूड अुगविला नाही, त्या वेळच्या मुसलमानांसारख्या राक्षसी धार्मिक अत्याचारांनाच स्वधर्म समजणाऱ्या शत्रूवरही त्यांनी हिंदुधर्मावर केले तसेतसेच किंबहुना त्याहून जास्त कठोर प्रत्याचार त्या मुसलमानांवरही करून त्या वेळेसच हिंदूंनी हिंदुस्थानाला निर्मुस्लिम केलें नाही, जसें स्पेनने, पोर्तुगालने, बल्गेरिया–ग्रीस अित्यादि देशांनी त्यांच्या त्यांच्या देशांना निर्मुस्लिम करून ख्रिश्चन धर्माला संकटमुक्त केलें,–हें सविस्तरपणे सांगितलेलेंच आहे. परधर्मीयांनी आपल्या धर्मावर काहीही अत्याचार केले तरी आपण त्यांचा प्रतिकार करण्यासाठी सुद्धा त्यांच्या त्या आक्रमक परधर्मावर प्रत्याक्रमणें न करणें अशी परधर्मसहिष्णुता हाच निदान आपला तरी स्वधर्म आहे –सद्गुण आहे–अशी जी परधर्मसहिष्णुतेची आत्मघातक नि विकृत व्याख्या हिंदूंच्या रोमारोमांतून भिनलेली होती, तीमुळेच मुसलमानांवर राजकीय क्षेत्रात अतुल विजय मिळविला असताही हिंदूंनी धार्मिक आघाडीवर मुस्लिमांचा लवलेश प्रतिकार न केल्यामुळे धार्मिक आघाडीवर मात्र हिंदुस्थानातून मुसलमानी

धर्माचें आणि त्या लोकांचें अस्तित्व त्या वेळीच अुखडून टाकलें गेलें नाही – जसें ग्रीकांचें, शकांचें, हूणांचें अस्तित्वच त्या त्या वेळी हिंदूंनी अुखडून टाकलें होतें!

हिंदुराष्ट्राला त्या वेळी अत्यंत घातक ठरलेल्या ह्या सद्गुणविकृतीच्या व्याधीचें आणखी अेक अुदाहरण हिंदूंच्या मुसलमानांवर पंजाबात मिळविलेल्या राजकीय विजयाच्या ह्या अुत्कर्षबिंदूच्या प्रसंगीच घडलें तें तरी या स्थली दाखविल्यावाचून पुढे जाणें ही कर्तव्यच्युतिच होअील.

ज्या वेळी रघुनाथराव पुण्याहून ससैन्य अब्दाल्लीवर चालून आला आणि १४ फेब्रुवारी १७५७ च्या आसपास अिंदूरपर्यंत पोचला त्याच वेळी अत्याचारी अब्दाल्लीने दिल्लीला हिंदुधर्माची नि हिंदुस्त्रियांची अत्यंत विटंबना करून मराठ्यांनी बादशहाच्या हातून मथुरा, वृंदावन, कुरुक्षेत्रादिक हिंदूंचीं क्षेत्रें छिनावून घेतलीं होतीं हें पाहून त्याचा वचपा काढण्याकरिता त्या क्षेत्रांवर आपल्या क्रूरांतील क्रूर मुस्लिम सेनानींना धाडून दिलें. त्या मुस्लिम सेनानींना अब्दाल्लीने सक्त नि स्पष्ट आज्ञा सोडली की, मथुरादिक जीं जीं हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें म्हणून समजलीं जातात त्या सर्वांना अुद्ध्वस्त करून तेथील शक्य तितक्या हिंदूंना ठार मारून टाकणें त्यांच्या कापलेल्या शिरांच्या राशीच्या राशी रचणें, हें तुमचें मुसलमान म्हणून धर्मकर्तव्य आहे! तुमच्यापैकी जो जो हिंदूंचीं शिरें तो काफर आहे म्हणून छाटून टाकील त्या त्या 'अिमानी' मुसलमानाला हिंदूंच्या छाटलेल्या प्रत्येक शिरामागे मी पांच रुपये 'बक्षिशी' देअीन.

अब्दाल्लीच्या ह्या आज्ञेप्रमाणे हे चवताळलेले मुस्लिम लांडगे ह्या मथुरादिक क्षेत्रांवर कसे तुटून पडले तें मागे ३५६–३५७ पृष्ठांवर वर्णिलेलेंच आहे. त्याप्रमाणे मुस्लिमांनी त्या अगदी निरपराध हिंदूंच्या मथुराक्षेत्रावर अकस्मात् घाला घालून तेथील हिंदूंचें सरसकट शिरकाण आरंभिलें, मोठमोठीं देवळें धडाधड पाडून टाकलीं, हिंदु स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध यांच्या रक्ताचे मार्गामार्गांनी आणि घराघरांतून अक्षरशः पाट वाहविले, तरुण स्त्री अशी दिसताच पळविल्यावाचून सोडली नाही. गाय अशी जिवंत ठेवली नाही! तें गोरक्तही पाण्यासारखें वहात होतें. एवढ्यावरही त्या मुस्लिम पिशाच्यांना त्या क्रूरतेची किळस किंवा कंटाळा आला नाही. अुलट त्या क्रूरतेला कलेच्या करमणुकीची झालर लावण्याची हौस वाटून त्याच वेळेस पडलेल्या हिंदूंच्या रंगपचमीच्या सणाची विटंबना करण्यासाठी त्यांनीही रंगपंचमी साजरी केली ! पण ती कशी ? तर हिंदूंच्या सांडलेल्या रक्ताने मोठमोठ्या कढया नि हंडे भरभरून ठिकठिकाणी ठेवले आणि मोठमोठ्या पिचकाऱ्या हाती घेअून तें मुस्लिम सैन्य मार्गामार्गांनी नि घराघरांतून घुसून हिंदूंना ह्या त्यांच्याच रक्ताच्या रंगाने भिजवून चिंब करीत चालले ! ! ! जी दुर्दशा मथुरेची त्यांनी केली तीच त्या पुढच्या गोकुळ वृंदावनाचीही केली ! पण अितक्यात रघुनाथरावाचें प्रबल मराठी सैन्य त्यांचा निःपात करण्यासाठी अिंदूरहून पुढे

सरकलें आहे अशी बातमी येताच स्वतःस शहानशहा म्हणविणारा अब्दाल्ली त्याच्या त्या साऱ्या सैन्यासह जीव घेऊन मागे दिल्लीला परतला – तिथून लाहोर कडे पळाला नि तेथून थेट काबूलकडे !

पण अब्दलीला ज्यांनी स्वपराक्रमाने असें रणांगणात चोपीत चोपीत सरसीमेपलीकडे पळवून लावलें त्याच मराठ्यांचीं सैन्यें आता पंजाब विजयानंतर सन १७५० मध्ये परत दक्षिणेकडे चाललीं असता त्याच मथुरा, गोकुळ, वृंदावन अित्यादि क्षेत्रांना भेट देत, तेथे तीर्थस्नानें, व्रतें, वैकल्यें करीत चालली असताही आणि अवघ्या अेक वर्षापूर्वी मुस्लिमांनी तेथे केलेल्या हिंदुधर्मावरील क्रूर अत्याचारांची कहाणी अैकत असताही, मुस्लिमांनी सांडलेल्या हिंदु रक्ताने भिजलेले मथुरेचे घाट पुरते सुकले नसताही आणि गोरक्तार्चीं साचलेलीं डबकीं मार्गामार्गातून तशींच कुजत पडलीं असताही आपल्या क्षेत्रांवर मुस्लिमांनी केलेल्या ह्या धार्मिक अत्याचारांनी त्या हिंदु सैन्याचीं माथीं संतापाने पेटलीं नाहीत. कोणाच्याही तळपायाची आग मस्तकापर्यंत पोचली नाही. धार्मिक सूड घेण्यासाठी ते अुन्मत्त झाले नाहीत ! मुसलमानांनी हिंदुधर्मावर जे जे अत्याचार केले तसेतसेच प्रत्याचार तुम्हीही मुसलमानांवर करा – मुसलमानांना सरसकट कापून टाका, मार्गोमार्गी पडलेल्या ह्या देवळांच्या ढिगाऱ्याप्रमाणे मुसलमानांच्या झाडून साऱ्या मशिदी पाडून टाकून त्यांचेही ढिगारे मार्गोमार्गी पडू द्यात–हिंदूच्या स्त्रियांची जशी मुसलमानांनी विटबना केली तशीतशीच मुस्लिमांच्या स्त्रियांचीही विटंबना करा ! हिंदु म्हणून असा हिंदुधर्माचा सूड घेणें हेंच तुमचें कर्तव्य आहे ! ! ! अशी कचकचीत आज्ञा विजयी सेनाधुरंधर रघुनाथरावाने हिंदुसैन्यांना सोडली नाही! जशी अब्दलीने मुस्लिम सैन्याला सोडली होती!

या सद्गुणविकृतीच्या प्राणघातक व्याधीने हिंदुसमाजाची किती भयंकर हानि केली ते आम्ही या भागाच्या पूर्वार्धात अितकें विशद केलें आहे की आता अिथे त्याची द्विरुक्ति करण्याचें काही अेक कारण नाही. प्रत्येक वाचकाला आमचा असा आग्रह आहे की त्याने या ठिकाणी या भागाच्या पूर्वार्धातील सद्गुणविकृतीचें ४ थे प्रकरण पृष्ठें ७१९ ते ७३६ आणि पृष्ठें ७८० ते ७९० हीं अवश्यमेव पुन्हापुन्हा वाचावीत.

हिंदूंच्या परमभाग्याची गोष्ट अितकीच की त्यांच्या ह्या धार्मिक आघाडीवरील धर्मभोळेपणापायी, हिंदुधर्माच्या, हिंदुराष्ट्राच्या प्राणावरच जें बेतणार होतें तें संकट त्यांच्या नि विशेषतः मराठ्यांच्या राजकीय आघाडीवरील प्रत्याघातक पराक्रमामुळे शेवटावरच निभावलें, धर्मभोळेपणापायी मुसलमानांवर मथुरा-वृंदावनाचा सूड मराठ्यांनी या पंजाब विजयाहून परतताना जरी न घेण्याचा प्रमाद केला असला, तरीही हिंदूच्या मुसलमानांशी ठाणलेल्या अेक वर्षाच्या अतूट महायुद्धात त्यानी मुसलमानाना चारी मुंड्या चीत करून शेवटी मराठ्यांनी संपा-

दिलेल्या ह्या पंजाबवरील स्वारीतील विजयात मुस्लिम साम्राज्यसत्तेचा जो समूळ अुच्छेद केला आणि हिंदुराष्ट्राचें राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापिलें, त्यायोगे आशियातील अितर प्राचीन राष्ट्रें जशीं मुसलमानांनी समूळ नष्ट करून टाकलीं तशीं काही हिंदुस्थानची दुर्दशा त्यांना करता आली नाही! बाबिलोनचें जसें बगदाद झालें तशी काही मथुरेची मक्का झाली नाही. दहा शतकें अव्याहत झुंजत राहून मथुरा हिंदूंचीच राहिली. मुसलमानांच्या राजसत्तेचें मात्र ठावठिकाण सुद्धा पुसून गेलें ! पण लाखो हिंदु यात्रेकरूंच्या कंठातून श्रीकृष्णाचा जयजयकार यमुनेच्या घाटावर आणि मंदिरामंदिरातून अव्याहतपणे घुमतच राहिलेला आहे!

✦ ✦ ✦

अनुक्रम वि
क्रमांक ... दि: .....

प्रकरण १० वें

अटकेवरच नव्हे–तर अटकेपलीकडेही !

सरदार पदरचे कसे कुणी सिंह जसे कुणी शार्दुल गेंडे ।
अरे ज्यांनी अटकेत, पाव घटकेत रोविले झेंडे ॥

—प्रभाकर

पंजाब दिग्विजयानंतर, गेल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे मराठी सेनाधुरंधर रघुनाथराव हे आपल्या अनेक सरदारांसह आणि सैन्यासह दक्षिणेकडे परतत असता ते महाराष्ट्रात पोचण्यापूर्वीच त्यांच्या विजयाच्या वातम्या वेळोवेळी महाराष्ट्रात आलेल्या होत्या. आज काय अिंदूरला सर्व मराठी सैन्यें अेकत्र झालीं आहेत; अुद्या काय राजपुतान्यात सर्वत्र खंडण्या अुगराणी (वसूल)करीत आहेत; पुढे अंतर्वेदीत घुसून रोहिल्ले पठाणांना अब्दालीस मिळाल्यासाठी चोपून काढीत आहेत; नंतर प्रत्यक्ष दिल्ली जिंकून घेअून, अब्दाल्लीने अुद्घोषिलेल्या त्याच्या बादशाहीपदाचे मार्तिक साजरें करून, मोगल बादशहास पठाणांच्या बंदिवासातून सोडवून, दिल्लीच्या सिंहासनावरील मराठ्यांचें अेक बाहुलें म्हणून त्यास पुन्हा स्थापीत आहेत; लगोलग पंजाबवर स्वारी करून अब्दाल्लीने सरहिंदला संभाळण्यास ठेवलेल्या काबुली पठाणांच्या दहासहस्र सेनेची रघुनाथरावाच्या मराठी सैन्याने दाणादाण अुडवून दिली आहे; अब्दाल्लीचा पुत्र तैमूरशहा आणि सेनापति जहानखान हे मराठ्यांच्या हातून जीव वाचविण्यासाठी पुढची लढाअी न देताच लाहोर सोडून काबूलकडे धूम पळत सुटलेले आहेत आणि रघुनाथरावाने ससैन्य त्यांची लांडगेतोड करीत त्यांना पंजाबबाहेर हुसकीत नेलें आहे; नंतर पंजाबची राजधानी जी

लाहोर तीत रघुनाथरावांच्या ससैन्य प्रवेशाचा अपूर्व विजयोत्सव साजरा होत आहे, अशा प्रत्यही आणि प्रतिपावली मिळणाऱ्या विजयाच्या आणि सर्व शत्रूंचें दमन करणाऱ्या मराठ्यांच्या पराक्रमाच्या वातम्या महाराष्ट्रात येत गेल्याने सारा महाराष्ट्र गर्वभराने डोलत राहिलेला होता! जगातील जे नामवंत नि दिग्विजयी सेनापति होऊन गेले त्यांच्या मालिकेत शोभावें असें नांव सेनापति रघुनाथरावाने या त्याच्या पुण्यापासून थेट सिंधुनदीपर्यंतच्या अप्रतिहत अशा अेका झेपेत केलेल्या विजयी अभियानाने (मोहिमेने Compaign ने) पटकावलें होतेंच होतें! त्या अप्रतिहत विजयी झेपेविषयी, सह्याद्रीच्या गरुडाच्या ह्या हिमालयीन भरारीविषयी, वाटणारें आश्चर्य आणि त्याविषयी वाटणारी धन्यता व्यक्तविताना सारा महाराष्ट्र, कळत न कळत, रघुनाथरावांना लाडिकपणे राघोबा भरारी या नांवाने संबोधू लागला! सेनापति रघुनाथरावाची अितिहासात तीच पदवी चिरंतन झाली.

हिंदूंच्या सुवर्ण यशोमंदिरावर रत्नजडित कळस चढविणारी वार्ता

सेनापति रघुनाथरावाने पंजाबातून दक्षिणेत परतताना काही सरदारांना मराठी सैन्यासह पंजाबात, विशेषत: सिंधुनदीच्या परिसराकडे साऱ्या सरसीमेवर जे मुस्लिम अमीर अुमराव, गुंडगुंड, फकीर फ़ुकडे, अव्यवस्था नि लुटालूट माजवीत राहिले होते त्यांचा पूर्ण समाचार घेअून मराठ्यांच्या सत्तेची घडी तिकडे चोपून चापून वसविण्यासाठी आणि मराठ्यांच्या राजस्वाची (महसुलाची) विनबोभाट अुगराणी (वसूल) करण्यासाठी ठेवलेले होते, त्यांतील सरदार तुकोजी होळकर, सावाजी शिंदे आणि गोपाळराव बर्वे यांच्या हाताखालील मराठी सैन्याने सिंधुनदीच्या परिसराचें नाकच असलेला जो अटक नगरचा गड त्यावर चढाअी करून तो मुसलमानांच्या हातून त्या सन १७५८ च्याच जुलै महिन्यात जिंकून घेतला! मुसलमानांचा हिरवा ध्वज अुखडून फेकून देअून हर हर महादेवाच्या गर्जनेत मराठ्यांचा हिंदूचा, भगवा जरिपटका सरसर करीत अटकेवर चढला!! मराठ्यांचे हिंदूचे, घोडे सिंधूचें पाणी पुन्हा प्याले !!

अटकेची हिंदूंना दहा शतकें पडलेली हिंदूंचीच शास्त्रीय अटक सुद्धा हिंदूंच्या शस्त्राने, खड्गाने, त्या दिवशी शेवटी तोडून टाकली! अितकेंच नव्हे तर मराठ्यांची सैन्यें सिंधु ओलांडून पलीकडे कंदाहारपर्यंत म्लेंच्छांचा पाठलाग करीत गेलीं!

ह्या नगराला हें अटक नांव कां नि केव्हा पडलें तें दुर्दैवी वृत्त ह्या भागाच्या ७५२ ते ७६३ पृष्ठांवर दिलेलेंच आहे.

मराठ्यांनी अटक जिंकून तीवर जरिपटका फडकविला ही वार्ता महाराष्ट्रात येताच मराठ्यांचा विजयानंद गगनात मावेनासा झाला. दहा शतकांनंतर हिंदूंचा सूड, मराठ्यांनी प्रत्यक्ष काबूल कंदाहारपर्यंत मुसलमानांची दाणादाण अुडवीत, साऱ्या हिंदुस्थानची वास्तविक (de facto) साम्राज्यसत्ता त्या मुस्लिमांच्या हातून छिनाअून घेअून अुगविला!

हेंच पाचवें सोनेरी पान होय !

ही अटक विजयाची अलौकिक घटना घडून हचा हिंदु-मुस्लिमांच्या दश-शतकव्यापी महायुद्धात शेवटी हिंदूंचा हा अंतिम महान् विजय झाला आणि हिंदुस्थानावरील मुस्लिम साम्राज्यसत्ता हिंदूंनी पादाक्रांत केली, हें वृत हिंदु-राष्ट्राच्या अतिहासाच्या ज्या पानावर अंकित झालें, तेंच होय हिंदुराष्ट्राच्या अतिहासातील सोनेरी पान पांचवें ! !

यद्यपि––

ज्याप्रमाणे मरणोन्मुख पडलेला मनुष्यही मरता मरता काही काळ आचके देतच असतो नि क्वचित् वायूच्या झटक्याने अेखादी अुसळीही घेतो, पण शेवटी मरतो; किंवा अरण्यातून वावरणारे प्रचंड वीस वीस वाव लांब असणारे आणि वटवृक्षाच्या बुंध्यासारखे जाडजूड सर्प त्यांचे डोकें ठेचून टाकलें गेलें तरीही त्यांचें सर्व शरीर पहिल्याच क्षणात पूर्ण निश्चेतन होअून पडत नाही, तर सारखें काही काळ वळवळत रहातें नि क्वचित मधूनच अुसळी घेअून पुढे झेप घेअू पहातें, परंतु शेवटी तें मरू घातलेलें धूड मरतेंच मरतें; त्याचप्रमाणे यद्यपि सिंधूच्या परिसरात मराठ्यांनी मुसलमानी साम्राज्यसत्तेचें डोकें ठेचून तिला मरणोन्मुख करून रणां-गणात पाडलें, तरी तिची वळवळ काही अितस्ततः होत होती; अेखादी पानपत सारखी अुसळीही तिच्या त्या मरू घातलेल्या धुडाने घेतली होती; तथापि शेवटी गतप्राण होअून मरणी मरून गेली ती गेलीच !

आणि अंततः साऱ्या हिंदुस्थानावर स्वतंत्र हिंदुसाम्राज्यसत्तेचा ध्वज फडकू लागला ! सिंधूपासूनच नव्हे तर काबूल नदीपासून सारा पंजाब जम्मू ते थेट काश्मिरच्या सरसीमेपर्यंत महाराणा रणजितसिंगाचें निर्मुस्लिम हिंदुशीख महा-राज्य, पुढे दिल्लीपासून ते थेट रामेश्वरपर्यंत साऱ्या अुर्वरित हिंदुस्थानात दिग्वि-जयी हिंदुमराठ्यांचें निर्मुस्लिम अधिराज्य आणि वर नेपाळचें स्वतंत्र हिंदुराज्य ! ! ! अशी साऱ्या हिंदुस्थानात जिकडे तिकडे हिंदुसत्ता पुन्हा नांदू लागली; मुस्लिम राज्यसत्ता मेली ती मेलीच!

म्हणूनच अटकेवर ज्या दिवशी मुस्लिमांच्या राजसत्तेचा ध्वज अुखडून मरा-ठ्यांनी फेकून दिला आणि आपला विजयी भगवा जरीपटका तेथे रोवला त्याच दिवशी मुस्लिम राजसत्तेला हिंदूंनी खरा प्राणांतिक प्रहार करून तिचा अत केला.

सरदेसायांसारखे हात राखून सावधपणे लिहिणारे अितिहासकारसुद्धा लिहितात की, 'All Maharashtra felt electrified with the proud per-formance of Raghunathrao and his bands having reached the extreme frontier of India and bathed their horses in Indus. (New History of Maharashtra Vol. I page 401)

ह्या हिंदु मुस्लिम महायुद्धात मुस्लिमांवर मिळविलेल्या अंतिम विजयाची वार्ता महाराष्ट्रात येताच त्या काळी अत्युत्कट अशा राष्ट्रीय भावनांचे जे प्रमुख प्रवक्ते असत त्या चारण, भाट, गोंधळी अित्यादि कवींनी आपापल्या वीररसाने मुसमुसलेल्या वीर काव्यांच्या आणि पोवाडयांच्या निनादाने महाराष्ट्राच्या खेडया-खेडयांतील वातावरण विजयानंदाने भरवून सोडलें! ज्यांचे बाहु त्याच्या सैन्याचे हे पराक्रम अैकून थरारले नाहीत असा स्वाभिमानी मराठा अुरला नाही. महाराष्ट्रातील त्या दिवसाच्या मानसाचें हें रोमहर्षक चित्र मानसाच्या भाषेतच यथावत् व्यक्तविणें शक्य असल्यामुळे तें आम्ही गोमंतक काव्यात तत्कालीन भाट–चारण–गोंधळी याचें अेक प्रतीक म्हणून कल्पिलेल्या 'महाराष्ट्र' भाटाच्या तोंडून व्यक्तविलें आहे, तेच विजयगीत (काही चरण[1]) आम्ही खाली देत आहो !

महाराष्ट्रभाटाचें विजयगीत

अैका अैका हिंदुमात्रहो! वार्ता विजयाच्या आल्या;
अुभ्या दहा शतकांचा अुगवे सूड जिंकिलें जेत्याला १
करा महोत्सव हिंदुमात्र हो! तुमच्या हौतात्म्यें आला
विजय तयाच्या महोत्सवाचा हक्कचि आहे तुम्हाला ११२
तथापि अजुनी कार्य न सरलें अिच्छित; हाता तट आला
परंतु अजुनी चढुनि दुर्ग हा कुशल पोचणें असे घरा! ११६
आज हिंदुपदपादशाहिचा योग सत्यची हा आला
तथापि अजुनी समारंभ तो संपूनि निर्विघ्न न गेला! ११७
शक्कत्यांसम सत्यचि आम्ही धन्य विजय हा अुपार्जिला
शक्कत्यांसम परंतु विजया करी पाहिजे राखियला! ११८
आज दहा शतकाने विजयी मिरवित सोनेरी तोडा
पिअी सिंधुचें पाणी पुनरपि हिंदु सैनिकाचा घोडा १२७
सागरसंगत भागीरथि ये कावेरीच्या पूतजला
सिंधु, शतद्रु, त्रिवेणि, यमुने, गोदे, कृष्णे या सकला १२८
हे तीर्थांनो, हे क्षेत्रांनो, अखिल भारती भूमितल्या
हरिद्वार, कैलास, काशिके, पुरी द्वारके या सान्या १२९
अैका अैका लोमहर्षणा वार्ता विजयाच्या आल्या
अुभ्या सात शतकांचा अुगवे सूड जिंकिलें जेत्याला १३०
हिंदूवीरांचा की श्रीशे असें यशस्वी हट केला
आज हिंदवी जरिपटका की पुन्हा पोचला अटकेला १३१

✦ ✦ ✦

१. मूळ ग्रंथात हें 'महाराष्ट्राभाटाचें विजयगीत संपूर्ण दिलें आहे; परंतु या ग्रंथमालेतील सातव्या 'काव्य–नाटक' खंडात संपूर्ण गोमंतक काव्यच येणार असल्याने तें येथे द्विरुक्त केलें नाही; फक्त काही चरण येथे अुल्लेखिले आहेत.

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील
सोनेरी पान सहावें

इंग्रजही गेले; हिंदुराष्ट्राचें स्वातंत्र्य सिद्ध झालें.

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील 'सहा सोनेरी पानें' हा जो ग्रंथ आम्ही लिहीत आहोत त्याचें हें सहाव्या सोनेरी पानाचें प्रकरण शेवटचेंच होय.

ह्या ग्रंथाच्या, आधीच प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागाच्या प्रारंभी ह्या समग्र ग्रंथाचें विषयक्षेत्र व्यक्तविलें आहे. त्या अनुरोधाने सूचित होतेंच आहे की, ह्या सहाव्या सोनेरी पानांतही अिंग्रजांनी हिंदुस्थानावर आपलें साम्राज्य स्थापित केलें असता त्या प्रबल परदास्यातूनही हिंदु राष्ट्राने आपली मुक्तता कशी करून घेतली आणि आज तें हिंदुराष्ट्र पुन्हा अेक स्वतंत्र नि सार्वभौम प्रजासत्ताक महाराज्य अशा प्रतिष्ठेने जगात कसें नांदू लागलें आहे, ह्याचा सविस्तर अितिहास देण्याचें काही अेक प्रयोजन नाही. त्या अिंग्रजांशी झालेल्या हिंदुराष्ट्राच्या स्फूर्तिदायक स्वातंत्र्ययुद्धातील हिंदुत्वाच्या दृष्टिकोनांतून महत्त्वाच्या असताही अितर बहुतेक परकीय वा स्वकीय अितिहासकारांपैकी पुष्कळांनी जाणून बुजून गाळलेल्या आणि काहींनी अज्ञानाने अुपेक्षिलेल्या वैशिष्ट्यांचें तेवढें समीक्षण करण्याचेंच काय तें ह्या ग्रंथाचें अुद्दिष्ट आहे.

परंतु तें कार्य बहुतांशी मी माझ्यापुरते ह्यापूर्वीच माझ्या अितर ग्रंथांतून आवश्यक तितकें आधीच केलेलें आहे. तें असें :–

(१) गेल्या प्रकरणाच्या शेवटी हें अुल्लेखिलेलेंच आहे की हिंदुस्थानातून मुसलमानांच्या परकीय अधिसत्तेचें हिंदूंनी शेवटी पूर्ण अुच्चाटन केलें होतें आणि अटकेपासून आसामपर्यंत आणि काश्मिर, लडाखपासून रामेश्वरापर्यंत जिकडे तिकडे पुन्हा हिंदुराज्येंच स्थापिलीं गेलीं होतीं. हिंदुस्थानच्या अेक अंगुलमात्र भूमीवर सुद्धा मुसलमानाची अधिसत्ता वस्तुत: अुरलेली नव्हती, परंतु मुसलमानी अधिसत्तेचा असा पूर्ण नायनाट करण्यासाठी जें दशशतकव्यापी प्रचंड महायुद्ध हिंदूंना लढवावें लागलें त्यातच हिंदुराष्ट्राचें सर्व बळ नि जीवन व्यग्र झालेलें असताच अिकडे युरोपातील पोर्तुगीज, फ्रेंच, डच आणि मुख्यत्वे करून अिंग्लिश ह्या राष्ट्रांनीही हिंदुस्थानात आपापली सत्ता स्थापण्याचे चोरटे वा प्रकट प्रयत्न चालविलेच होते. हिंदुराष्ट्राचें त्या काळी धुरीणत्व करणाऱ्या मराठ्यांनी अेकसमयावच्छेदे करून रणांगणात तोंड दिलें आणि शेवटी डच, पोर्तुगीज, फ्रेंच ह्या तिघा युरोपियन राष्ट्रांच्या आक्रमणांचा जरी पुष्कळ यशस्वी प्रतिकार केला तरी अिंग्लिशांनी मात्र, मराठे मुसलमानांशी

तशा प्राणांतिक युद्धात गुंतलेले असतांना ती संधि साधून, बंगालच्या बाजूने तिकडे असलेल्या दुर्बल मुस्लिम नबाबांना पायाखाली तुडवीत हिंदुस्थानच्या त्या भागात हळुहळू आपली राजसत्ता स्थापिली. त्या बळावर त्यांनी त्यांचें सशस्त्र आक्रमण पुढे चालवीत दिल्लीपर्यंतच्या भूभागावरही त्याचें स्वामित्व नांवाने नसलें तरी वस्तुत: स्थापन केलें. अर्थातच हिंदु राष्ट्राचें राजकीय धुरीणत्व करणाऱ्या मराठ्यांचें नि त्यांचें लवकरच प्रत्यक्षत: युद्ध जुंपलें. त्यापैकी पहिल्या नि दुसऱ्या अिंग्रज-मराठ्यांच्या युद्धात मराठ्यांनी अिंग्रजांचाही कसा नि कितपत मोड केला त्याचें हिंदुदृष्टिकोनातून अवश्य तितकें समालोचन आम्ही आमच्या 'Hindupad Padshahi' ह्या अिंग्रजी ग्रंथात केलें आहे. त्याचें मराठी भाषांतरही झालेलें आहे. जिज्ञासू वाचकांनी तें वृत्त त्या पुस्तकांतून वाचावें.

त्या समालोचनावरून खालील दोन ठळक विधेयं स्पष्ट होतील. पहिलें विधेय हें की, अिंग्रज हिंदुस्थानात आले तेव्हापासून हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी मुसलमान असे अिंग्लिशांशी लढलेच नाहीत. अेक म्हैसूर संस्थानचा हैदर-टिपूचा अल्पकालीन नि आंशिक अपवाद सोडला असता हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वासाठी अिंग्रजांना लढावीं लागलेलीं सारीं युद्धें हिंदूंशीच लढावीं लागलीं. ह्यावरूनही हेंच सिद्ध होतें की हिंदूंनी हिंदुस्थानावरील मुस्लिम राजसत्तेचा वस्तुत: संपूर्ण अुच्छेद करून ती सार्वभौम सत्ता परत आपल्या हाती घेतलेली होती. दुसरें विधेय हें की राजकारणातील त्या परिस्थितीत सोयिस्कर असलेला अेक डावपेच म्हणून मराठ्यांनी दिल्लीला असलेल्या त्या जुनाट मोंगली बाहुल्याला 'हिंदुस्थानचा बादशहा' असें नांवापुरते तेवढें म्हणू देत असावें तसेंच दिल्ली मराठ्यांच्या हातून अिंग्रजांनी जिंकून घेतल्यानंतर आणि हिंदुस्थानभर वस्तुत: (de facto) त्यांचेंच आधिपत्य स्थापिल्यानंतरही अिंग्रजांनीही नांवापुरते त्याच जुनाट मोगल बाहुल्याला 'बादशहा' म्हणून पुढे पन्नास वर्षेंपर्यंत राहू दिलें होतें हें लक्षात घेण्यासारखें आहे.

कारण त्यामुळे त्या 'बादशहाला' मराठ्यांनी तसें नांवापुरते ज्या राजकीय डावपेचासाठी राहूं दिलें होतें त्यासाठी मराठ्याना जे अिंग्रजाळलेले लोक हसतात त्यांच्या अज्ञानाचें पितळ सहजच अुघडें पडतें. कारण अिंग्रजांनाही तोच राजकीय डावपेच वर दाखविल्याप्रमाणे योजणें सोयिस्कर वाटलें. परंतु अिंग्रजांना मात्र त्या दुबळेपणासाठी ते अदूरदर्शी अिंग्रजाळलेले लोक हसत नाहीत !

अिंग्रजांचें शीख हिंदूंशी झालेलें युद्ध

(२) मराठ्यांची हिंदुस्थानावरील राजकीय अधिसत्ता अि. सन १८१८ नंतर मोडून काढून, अुरलेल्या मराठी संस्थानांना आपलें मांडलिकत्व मानावयास लावून अिंग्रजांनी हिंदुस्थानवर वस्तुत: आपलें आधिपत्प स्थापन केलें न केलें तोंच

त्यांना ज्या अेका नवोदित हिंदुशक्तीशी युद्ध करावें लागलें ती शक्ति म्हणजे पजाबात सन १८१८ नंतर अुदयास आलेल्या **महाराजा रणजितसिंह** याचें शीख हिंदु महाराज्य हें होय ! महाराजा रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर काबूल नदीपामून ते शतद्रू (सतलज) नदीपर्यत आणि वर काश्मिर ते लडाखपर्यत पसरलेल्या शीख, जाठ नि डोग्रा या पराक्रमी हिंदु जातीच्यां समाअीक राजशक्तीशी अिंग्रजांनी युद्ध छेडलें, त्यात शेवटी अिंग्रजांचा विजय झाला आणि पंजाब ते काश्मिरपर्यतही अिंग्रजांची अधिसत्ता अिसवी सन १८५० चे आसपास स्थापन झाली.

माझा नष्ट केला गेलेला शिखांचा अितिहास ग्रंथ

हिंदुपदपादशाही या अिंग्रजी ग्रंथात ज्याप्रमाणे आम्ही मराठी साम्राज्याच्या कालखंडाचें समालोचन केलें होतें, त्याचप्रमाणे 'शिखांचा अितिहास' या मराठीत लिहिलेल्या आमच्या ग्रंथात आम्ही मराठी कालाखंडानंतरच्या ह्या शीख हिंदुमहाराज्याच्या कालखंडाचेंही समीक्षण केलें होतें. पण अिंग्रजाविरुद्ध केलेल्या ज्या राज्यक्रांतीच्या अुठावात आम्ही पॅरिसमध्ये सन १९०९–१० च्या आसपास व्यग्र झालेलो होतो, त्याच्याच धामधुमीत ह्या 'शीख अितिहासा'च्या ग्रंथाचें हस्तलिखितच अिंग्लिश गुप्त टपाल विभागाच्या हाती पडून, प्रकाशनापूर्वीच नष्ट झालें! तथापि रणजितसिंगाचें तें हिंदुमहाराज्य ज्या १८५० च्या आसपास संपूर्णपणे नष्ट झालें त्या कालखंडापर्यतच्या सर्व शीख हिंदु दृष्टिकोनातून अुल्लेखनीय असणाऱ्या बहुतेक घटनांविषयीची चर्चा आम्ही आमच्या 'पृष्ठभूमि' आणि ह्या 'सहा सोनेरी पानें' अशा ग्रंथातून केलेलीच आहे. ती जिज्ञासू वाचकांनी वाचावी.

नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराज्याशी अिंग्रजांचें युद्ध

(३) अिंग्रजांना त्यांची अधिसत्ता साऱ्या हिंदुस्थानवर स्थापण्यासाठी ज्या तिसऱ्या हिंदु शक्तीशी लढावें लागलें ती शक्ति म्हणजे नेपाळचें स्वतंत्र हिंदु राज्य ही होय. त्या काळात स्वतंत्र नि बलिष्ठ असलेल्या नेपाळच्या महाराजांशी झालेल्या अिंग्रजांच्या ह्या लढचात शेवटी अिंग्रजांचाच जय झाला. पण तो जय नेपाळचें हिंदुराज्य नष्ट करण्याअितका प्रबळ नव्हता. नेपाळच्या हिंदुराज्याला अिंग्रजांचें मांडलिकत्व तेवढें मानावें लागलें. तें सोडल्यास सर्व प्रकारची त्याची अंतर्गत स्वतंत्रता अबाधित राहिली. पुन्हा, नेपाळच्या हिंदुराज्याच्या अशा अस्तित्वाची अिंग्रजांच्या हिंदुस्थानावरील साम्राज्यसत्तेसाठी पुढे बऱ्याच काळपर्यंत आवश्यकताही होती. कारण अिंग्रजांच्या सैन्याला अत्यंत शूर नि कडव्या हिंदु गुरखा सैनिकांचा पुरवठा करणारें नेपाळ हें सर्वात सुपीक क्षेत्र होतें. हें हिंदु गुरख्यांचें सैन्य हिंदुस्थानातच नव्हे तर युरोपादिक परखंडातही, फ्रेंच, जर्मन अित्यादि अिंग्र-

जांच्या समबल अमणाऱ्या गोऱ्या शत्रूंशीही तोंड देण्यास समर्थ ठरे. त्यातही अिंग्रजाला हिंदी साम्राज्याच्या अुत्तर सीमेवर चढाअी करून येअू शकणाऱ्या आणि अिच्छिणाऱ्या त्या काळच्या बलाढ्य अशा रशियाच्या आक्रमणाची सदोदित भीति वाटत असल्यामुळे त्या रशियन साम्राज्याचा आणि हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा हा संभाव्य संघर्ष शक्यतों अकस्मात् नि सहज घडू नये म्हणून त्या दोघांच्या मध्ये नेपाळसारखी अेक लढाअू शक्ति, कीलक राज्य (Buffer State) म्हणून अस्तित्वात असणें हें अिंग्लिशांनाच त्या काळी अभिप्रेत होतें.

वर सांगितल्याप्रमाणे मराठा, शीख आणि नेपाळ ह्या तिन्ही हिंदु राज्यशक्तींचा असा पराभव झाल्यानंतर त्या संघर्षात अंतिम विजय पावलेल्या अिंग्रजांचें हाती हिंदुस्थानचें राजकीय प्रभुत्व संपूर्णपणे गेलें.

अीस्ट अिंडिया कंपनी ही जी अेक लहानशी व्यापारी मंडळी अिंग्लंडमध्ये, अिकडे हिंदुस्थानात शिवाजी महाराजांचा अुदय होण्याच्या आसपास, स्थापन झालेली होती त्याच अेकदोन वखारी काय त्या हाती असलेल्या यःकश्चित् कंपनीचा व्याप वाढता वाढता, अशा रीतीने अिसवी सन १८५० च्या आसपास, तीच हिंदुस्थानच्या साऱ्या महाराज्याचें स्वामित्व संपादिती झाली ! मूलतः अेका क्षुल्लक दहाबारा प्रमुख अिंग्लिश गृहस्थांची असलेली व्यापारी मडळी जी अीस्ट अिंडिया कंपनी तीच अवघ्या दोनअडीचशे वर्षांच्या आत अेका साम्राज्याची स्वामिनी बनली ! त्याच कालावधीत आमच्या अिकडे हिंदुस्थानच्या आधिपत्यासाठी स्पर्धा करणारे अनेक राजवंश अुदय पावले आणि नष्ट झाले. अनेक चिल्लर राज्यें स्थापन झालीं, त्यांचीं आपआपसांत त्याच हिंदुस्थानच्या राजसत्तेसाठी युद्धामागून युद्धें जुंपलीं आणि संपलीं, पण शेवटी ती हिंदुस्थानची सार्वभौमसत्ता, ह्या सर्व संघर्षांत लढून, झगडून, टिकून शेवटी सर्व स्पर्धाळूंवर मात करणाऱ्या प्रभविष्णु अशा त्याच अीस्ट अिंडिया कंपनीने जिंकून घेतली ! अगदी पहिल्या दिवशी ही अीस्ट अिंडिया कपनी स्थापन झाली तेव्हा किती क्षुद्र, केवळ मूठभर भागधारकांची अेक व्यापारी मंडळी होती. पण तिची त्या पहिल्या वर्षाच्या आयव्ययपत्रकापासून पुढचीं सगळीं वार्षिक आयव्ययपत्रकें, अगदी प्रत्येक विगत वर्षाच्या शेवटी शेष (बाकी) म्हणून दाखविलेल्या रकमेला पुढच्या वर्षीच्या आयव्ययपत्रकास जोडीत, काटेकोरपणे आणि सलग रीतीने लिहीत लिहीत दोन अडीचशे वर्षांनंतर जेव्हा ती हिंदुस्थानच्या साम्राज्याचेंच 'भांडवल' करून तो व्यवसाय करीत आली तेथपर्यंत या साऱ्या आयव्ययपत्रकांच्या वह्या सुसंगतपणे तिच्या लंडनच्या कार्यालयात लावून ठेवलेल्या होत्या ! आणि जेव्हा १८५८ व्या अिसवी सनात त्या अीस्ट अिंडिया कंपनीचें विसर्जन झालें आणि स्वत ब्रिटिश सरकारने तें हिंदुस्थानचें साम्राज्य स्वयं व्हिक्टोरिया सम्राज्ञीच्या नावें करून घेतलें तेव्हा त्या अीस्ट अिंडिया कंपनीची अगदी पहिल्या वर्षाच्या त्या क्षुद्र आयव्ययपत्रकापासून संततपणे ठेवलेल्या गणनाप्रमाणे ह्या शेवटच्या १८५८ च्या विसर्जनाच्या दिवसापर्यंतच्या तिच्या आयव्यय-

पत्रकाप्रमाणे तिच्या सर्व भागधारकांच्या भागांच्या रकमा देऊन नि
देणें मिटवून ती अगदी अेखाद्या व्यावहारिक नि व्यावसायिक व्याप
प्रमाणे (कंपनीप्रमाणे) पद्धतशीर रीतीने विसर्जित केली गेली !

अिंग्लिश कारभाराची ही शतकानुशतकें टिकून राहणारी संतता, टापटीप, प्रशासनशीलता नि संघटनक्षमता कुणीकडे – आणि आमच्या अिकडची त्याच काळातील वर वर्णिलेली बजबजपुरी, अव्यवस्था, राजकीय अस्थैर्य नि संघटनशून्यता कुणीकडे ! त्या वेळचें तें ब्रिटिश राष्ट्र आणि आमचें हें हिंदुराष्ट्र यांच्यातील साम्य किंवा वैषम्य हीं यद्यपि अशा अेकेरी नि सापेक्षतः यःकश्चित् अुदाहरणावरून स्थापणें हें असमर्थनीय होणारें आहे, तथापि शितावरून भाताची परीक्षा या चालचलाअू न्यायाने तें साम्य नि वैषम्य दर्शविण्यापुरतें हें, मूलतः क्षुल्लक अशा ओस्ट अिंडिया कंपनीने हिंदुस्थानची साम्राज्यसत्ता चालवणारी ' दि ऑनरेबल कंपनी सरकार बहादुर ' म्हणून शेवटी मिरवू लागावें हें अुदाहरण अेक लहानसें पण परिणामकारक प्रतीक म्हणून अुपयोगी आहेच आहे.

आमच्या हिंदुराष्ट्राचा ब्रिटिशांनी असा जो संपूर्ण पराभव केला तो आमच्या हृदयात शिरलेल्या अेखाद्या विषारी शल्याप्रमाणे सलत राहिलेला होता. तरीही आम्ही त्यासाठी ब्रिटिशांना खोटेनाटे शिव्याशाप देअून त्यांनी आमच्यावर मिळविलेला विजय केव्हाही नाकारलेला नव्हता ! किंवा आमचा रणांगणात झालेला पराभवही नाकारला नव्हता, लपविलेला नव्हता. कारण आमच्या अंगात आमच्या हिंदुराष्ट्राच्या पराभवाचें अुट्टें काढण्याची धमक होती – ती काही मेली नव्हती. अुलट आम्ही प्रांजलपणे हें समजून होतो की ब्रिटिशराष्ट्र आणि हिंदुराष्ट्र यांच्यात हें जे तुमुल मल्लयुद्ध जुपलें होतें त्यात अेकंदरीत जो मल्ल नियुद्धाच्या (कुस्तीच्या) डावपेचात नि सामर्थ्यांत त्या काळी निपुणतर होता त्या ब्रिटिश राष्ट्राचा विजय व्हावा हें साहजिकच होतें, रणांगणात होणारे जयापजय न्यायान्यायाच्या पोथीप्रमाणे होत नसतात हें आम्ही जाणून होतो.

यासाठीच रणांगणात विजयी झालेल्या ब्रिटिश राष्ट्राला रणांगणातच गाठून चारी मुंड्या चीत करण्यासाठी पुन्हा कोणतातरी नृसिंहीय आक्रम नि पराक्रम करण्याचें रणकंकण ब्रिटिशांची साम्राज्यसत्ता हिंदुस्थानात स्थापित होते न होते तोंच हिंदुस्थानातील अंतस्थ वीरवृत्तीने हाती बांधलें !

हिंदुस्थानचें साम्राज्य ब्रिटिशांनी हिंदुराष्ट्राच्या हातून छिनावून घेतल्यानंतर पराभूत झालेलें तें हिंदुराष्ट्र काही काल हतप्रभ नि निष्प्राण होअून पडलें होतें. ज्वालामुखीचा कोणताही स्फोट होअून गेल्यानंतर तोही काही काल हतप्रभ आणि थंडगार होअून पडतो. परंतु जर त्या ज्वालामुखीचा तो स्फोट शेवटचाच नसेल तर त्याच्या पोटातील भयंकर स्फोटक घटक आतल्याआत सळसळत राहिल्याने त्याचीं दाहक रासायनें पुनःपुन्हा कढू लागतात तसेंच ब्रिटिशांकडून तें हिंदुराष्ट्र केवळ

पराभूत झालेलें होतें–मेलें नव्हतें, अेतदर्थ त्याच्या अंतरंगात त्या विजेत्या ब्रिटिश शत्रूशी पुन्हा टक्कर देण्यासाठी अनेक वीरात्म्यांचे स्फोटक घटक लवकरच सळसळू लागले – कढू लागले.

ब्रिटिश सत्तेविरुद्ध हिंदुस्थानचा पहिला प्रचंड स्फोट

रणजितसिंगाचें पंजाबातील शेवटचें स्वतंत्र हिंदुराज्य ब्रिटिशांनी जिंकून पुरतीं दहाबारा वर्षेंही अुलटलीं नव्हतीं तोंच हिंदुस्थानावरील त्या ब्रिटिश साम्राज्याला अुलथून पाडण्यासाठी हिंदुस्थानातील हिंदु-मुसलमानांचा अेक प्रचंड असा संयुक्त अुठाव झाला, आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या क्रांतियुद्धाचें रणकुंड अि. सन १८५७ मध्ये भडकलें ! ! !

या क्रांतियुद्धाचें अेक प्रमुख वेशिष्ट्य हें होतें की आपसांतील शतकोशतकांचें धार्मिक वैर त्या प्रसंगापुरतें विसरून हिंदु आणि मुसलमान ह्या दोघांनीही अेका संयुक्त राजकीय आघाडीत संघटित होअून हें देशव्यापी महायुद्ध ब्रिटिशांविरुद्ध लढविलें !

परंतु ह्या प्रचंड क्रांतियुद्धाचा अितिहास आम्ही सविस्तरपणे आमच्या 'Indian War of Independence of 1857' – हिंदुस्थानचें १८५७ चें स्वातंत्र्य समर' ह्या जवळ जवळ पांचशे पृष्ठांच्या मौलिक नि सुप्रसिद्ध ग्रंथात अि. सन १९०८–०९ मध्येच लिहिलेला आहे. त्यात हिंदुराष्ट्राच्या दृष्टिकोनातून त्या क्रांतियुद्धाचें समीक्षण संपूर्णपणे केलेलें असल्याने आता येथे त्याची पुनरुक्ति करण्याची काहीच आवश्यकता नाही.

त्या क्रांतियुद्धात अवघ्या दोन तीन वर्षांच्या घनघोर संग्रामात अिंग्लिशांची अितकी भयंकर हानि झाली की, हिंदुस्थानच्या साम्राज्यासाठी मराठे, शीख नि नेपाळी ह्या तिघांशीही झालेल्या युद्धामध्ये जितके ब्रिटिश सैनिक मारले गेले नाहीत तितक्या ब्रिटिश सैनिकांचा नि गोऱ्या लोकांचा क्रांतिकारकांनी बळी घेतला. अितक्या ब्रिटिश शत्रूंना ठार मारलें ! अिंग्लिशांचे लहानलहान कॅप्टन, लेफ्टनंट कलेक्टर, मॅजिस्ट्रेट अित्यादि दुय्यम अधिकारी तर सोडाच, पण जनरल व्हाअीट, जनरल नील, सर हेन्री लॉरेन्स, जनरल आउट्रॅम, कमांडर अिन चीफ अॅन्सन अित्यादि अिंग्लिशांच्या अनेक धुरंधर अधिकाऱ्यांचे नि पुढाऱ्यांचेही त्या संग्रामात बळी पडले. क्रांतिकारकांनी त्या बहुतेकांना रणांगणात निवडून टिचून टिचून ठार मारलें ! हिंदी क्रांतिकारक पक्षाचेही जवळजवळ अेक लक्ष झुंजार पुरुष अिंग्लिशांनी ठार मारले असें नानासाहेबांसारख्या क्रांतीच्या धुरंधराने स्वत:च सांगितलें आहे.

या क्रांतियुद्धाचा शेवट क्रांतिकारकांना जी प्रत्यक्ष अिंग्रज सरकारच वाटे आणि म्हणून जिचा हिंदी लोक अतोनात द्वेष करीत त्या 'दि ऑनरेबल अीस्ट अिंडिया कंपनी सरकार बहादुर' हिचाही ब्रिटिशांनी शेवटी प्रत्यक्षपणे बळी दिला !

ब्रिटिशांना वाटलें की, ह्या कंपनीचें विसर्जन करून तिची सत्ता नाहीशी केली की क्रांतिकारकांचें पुष्कळ समाधान होअील आणि त्यांच्या मनासारखें अेक महत्कृत्य आपण केलें असें क्रांतिकारकांना वाटेल. यास्तव ब्रिटिश सरकारने मोठ्या डामडौलाने नि गाजावाजाने प्रसिद्ध केलें की, यापुढे हिंदुस्थानचा सारा राज्यकारभार ओस्ट अिंडिया कंपनीच्या हातातून काढून घेअून, तिला पदच्युत करून, तिचें विसर्जन करण्यात आलें आहे, आणि ब्रिटिशांची राणी जी व्हिक्टोरिया तीच यापुढे स्वतः हिंदुस्थानची सम्राज्ञी, Empress of India, (हिंदुस्थानची बादशाहीण) हें पद धारण करून हिंदुस्थानची सार्वभौम राजसत्ता प्रत्यक्षपणे हाती घेत आहे. ह्याप्रमाणे क्रांतिकारकांच्या तीन वर्षें चालविलेल्या रणधुमाळीने शेवटी 'दि ऑनरेबल ओस्ट अिंडिया कंपनी सरकार बहादुर' म्हणून मिरवणाऱ्या त्या ओस्ट अिंडिया कंपनीचा तरी बळी घेतला!!

याहीपुढे जाअून त्या नवीन हिंदुस्थानची सम्राज्ञी झालेल्या व्हिक्टोरियाच्या नांवें अेक घोषणापत्रकही ब्रिटिशांनी हिंदुस्थानभर प्रसिद्ध केलें. त्यात क्रांतिकारकांना अुद्देशून आणि अर्थातच त्यांचें काहीतरी समाधान करण्यासाठी असें प्रसिद्धिलें की या पत्रकानंतर अिंग्रजांशी चालविलेलें युद्ध बंद करून जे जे 'बंडखोर' आपलीं हत्यारें प्रकटपणे किंवा अप्रकटपणे खाली ठेवतील आणि काही अेक अुपद्रव न देता आपापल्या घरी जाअून शांततेने आयुष्यक्रम चालवू लागतील त्या सर्वांना, मागच्या कोणत्याही बंड प्रकरणीच्या हालचालीविषयी विचारपूस न करता त्यासंबंधी पूर्ण राजक्षमा केली जाअील.

क्रांतिकारकांपुढे वरील दोन प्रकरणी अप्रत्यक्ष असली तरी धादांत शरणागति पत्करल्यानंतर सर्व हिंदुस्थानातील लोकांना शांत करण्यासाठी आणि क्रांतीची आग पूर्णपणे शमविण्यासाठी हिंदुस्थानच्या 'बादशाहिणी'च्या ह्या घोषणापत्रकात पुढील महत्त्वाचें अभिवचन दिलें होतें की, "ब्रिटिश सरकार किंवा कोणचाही स्थानिक गोरा अधिकारी किंवा मिशनरी ब्रिटिश हिंदुस्थानातील 'नेटिव्हांच्या' धर्मांत कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू शकणार नाही. हिंदुस्थानची बादशाहीण आणि तिचें सरकार तिच्या हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती अित्यादि प्रजाजनांच्या सर्व धर्मांना समानतेने वागवू अिच्छितात. त्यांतील कोणत्याही धर्मीयांना अन्य कोणाकडूनही ही सम्राज्ञी अुपद्रव होअू देणार नाही." क्रांतीच्या मूळ कारणांपैकी अेक महत्त्वाचें जें कारण होतें की कंपनी राज्य आम्हां हिंदु-मुसलमानांचा धर्म बुडवून आम्हांस बळाने ख्रिश्चन करणार आहे, अशी भीति हिंदी लोकांना पडलेली होती, तें कारण यापुढे अुरू नये म्हणूनच हें अभिवचन 'त्या राणीच्या जाहिरनाम्या'त (घोषणापत्रकात) दिलेलें होतें आणि हीही क्रांतिकारकांपुढे ब्रिटिशांनी अेक शरणागतीच पत्करलेली होती.

तशीच न बोलता पण आणखी अेक महत्त्वाची शरणागति ब्रिटिशांनी या घोषणापत्रकात जी गुपचूप स्वीकारली होती ती ही होय की ओस्ट अिंडिया कंपनीने संस्थानिकांचा दत्तक घेण्याचा अधिकार अमान्य करून त्यांना ब्रिटिश साम्राज्यात गिळंकृत करण्याचा जो सपाटा चालविला होता तो या घोषणापत्रकाने तसें प्रत्यक्ष काहीही न बोलता बंद केला. कारण त्या घोषणापत्रकात असें स्पष्टपणे प्रसिद्धिलें होतें की संस्थानिकांचा दत्तक घेण्याचा पूर्वापार अधिकार सन्मानिला जाअील. त्यांनी घेतलेल्या दत्तकांना पूर्वपरंपरेप्रमाणे राज्यविषयक जे अधिकार मिळत होते ते मिळत राहतील.

या सर्व प्रकरणी या घोषणापत्राने क्रांतिकारकांचा हा भयकर अुठाव होण्यास जीं जीं कारणें निमित्तभूत झालीं होतीं असें ब्रिटिशांना वाटलें तीं तीं ब्रिटिशांनी निस्तरलीं होतीं. तरीही त्या घोषणापत्रातील सर्वांत महत्त्वाचें आणि ब्रिटिशांच्या मते जें सर्व हिंदी लोकांचें पूर्ण समाधान करील असें वाटलें तें अभिवचन असें होतें की, सम्राज्ञी व्हिक्टोरिया हिच्या सर्व हिंदी प्रजाजनांना ब्रिटिश प्रजाजनांच्या-सारखेंच, अगदी समानतेने वागविलें जाअील. त्यांना सम्राज्ञीच्या साम्राज्यातील सारे अधिकार जाति-धर्म-रंग निर्विशेषपणे वैध रीतीने अुपभोगिता येतील ! !

पण या घोषणापत्रकाचा क्रांतिकारकांवर काही अेक परिणाम झाला नाही !

अितकेंच नव्हे तर ब्रिटिश राणीच्या ह्या घोषणापत्रकाला क्रांतिकारकांच्या वतीने अेक खरमरीत प्रत्युत्तर म्हणून प्रतिघोषणापत्रही प्रसिद्धिलें गेलें होतें. तें किती मार्मिक होतें तें आमच्या सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या अितिहासात आम्ही चर्चिलेंच आहे. त्यातलें सूत्रवाक्यच मुळी असें होतें की, " आम्ही हें जें क्रांतियुद्ध लढत आहो तें काही केवळ ब्रिटिश ओस्ट अिंडिया कंपनीची हिंदुस्थानावरील अधिसत्ता जाअून ब्रिटिश राणीची साम्राज्यसत्ता आमच्यावर यावी म्हणून काही नव्हतें ! तर आम्हांला कोणचीही परसत्ता, ब्रिटिशांचें राज्यच नको असून सर्व राजकीय दास्यातून निर्मुक्त झालेलें, स्वतंत्र असें स्वराज्य हवें आहे. म्हणून आम्ही ह्या राज्यक्रांतीच्या रणांगणात लढत आलो आहोत." यद्यापि हें राणीचें घोषणा-पत्रक साऱ्या हिंदुस्थानभर भिंतीभिंतीवर चिकटविलेलें होतें तथापि त्याचा लाभ न घेता सहस्रावधि क्रांतिकारक आणि सेनापति तात्या टोपे, श्रीमंत नानासाहेब, बाळासाहेब, रामभाअू, अमरसिंह, फेरोझशाह अित्यादि क्रांतीचे धुरंधर सेनानी पुढे महिनो गणती लढतच राहिलेले होते ! त्या बहुतेकांचा लढत लढत त्या क्रांतीच्या अग्निज्वालात प्रत्येकी बळी पडल्यानंतर काय तें तें यज्ञकुंड हळूहळू विझत गेलें !

तथापि सहस्रावधि हिंदी लोकांची जी तरुण पिढी अिंग्रजांच्या पुढे लवकरच निघालेल्या शाळाकॉलेजांतून शिकत गेली तिच्यावर आणि अिंग्रजी सरकारच्या पगारावर पोसली जाणारी सहस्रावधि हिंदी अधिकाऱ्यांची नि सेवकांची जी पिढी तिच्यावर मात्र या हिंदुस्थानच्या सम्राज्ञीच्या घोषणापत्रातील या शेवटच्या दोन तीन अभिवचनांचा ब्रिटिशांना अनुकूल असा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. विशेषत: कलकत्ता, मुंबअी, मद्रास अशा ज्या मुख्य नगरांत ब्रिटिश सुधारणांचें मायावी जाळें १८५७ च्या बऱ्याच आधीपासून पसरलें होतें तेथे तर ह्या व्हिक्टोरिया राणीच्या जाहिरनाम्यात 'ती राणी आपल्या हिंदी नि ब्रिटिश प्रजाजनांना राज्यातील सर्व अधिकार समानतेने अुपभोगू देणार आहे' ह्या अभिवचनाने त्या वेळचे हिंदी पुढारी अितके हुरळून गेले की आता ब्रिटिश साम्राज्य हें जितके ब्रिटिशांचें तितकेंच आमचेंही साम्राज्य झालेलें आहे, असे अुद्गार त्यांनी 'बंडाचा' बीमोड झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ भरविलेल्या प्रकट सभांमधून काढले ! हें घोषणापत्रक खरें पाहता केवळ क्रांतिकारकांचा बीमोड करण्यासाठी जसा ब्रिटिशांनी 'दडाचा' भयंकर अुपयोग केलेला होता, तसाच हा अेक 'सामाचाही' अुपयोग करण्यासाठी वस्तुत: काढलेलें होतें. त्याचप्रमाणे भविष्यात ब्रिटिश राजनीति चालवावी असा लवलेशही हेतु ब्रिटिशांच्या मनात नव्हता ! हें माझ्या ह्या पुढील काळच्या अितिहासावर लिहिलेल्या पुस्तकांतून मी ब्रिटिशांच्याच अुद्गारांवरून सिद्ध केलेलें आहे. पण ह्या वर अुल्लेखिलेल्या त्या काळच्या अिंग्रजी शिक्षित नि आंग्लसेवानिरत हिंदी लोकांचा जो वर्ग होता त्याच्या भावडया नि बाटग्या ध्यानांत ब्रिटिशांचा हा कूट हेतु मुळीच आलेला नव्हता. अितकेंच नव्हे तर त्या हिंदुस्थानचे सम्राज्ञी पदावर स्वत:च विजयोन्मत्त आरोहण करणाऱ्या व्हिक्टोरियाच्या घोषणापत्रकामुळे त्या भुरळलेल्या हिंदी पुढाऱ्यांनी त्या घोषणापत्रकाला, 'हा पहा आमचा मॅग्नाचार्टा' म्हणून त्यांच्या त्यांच्या सभांतून आणि वृत्तपत्रांतून गौरविण्याचा धुमधडाका चालविला ! कुठे तो अिंग्लिश लोकांनी त्यांच्या स्वत:च्याच राजाशी लढून त्याच्याकडून स्वत:चे लोकसत्ताक अधिकार मान्य करून घेणारा अिंग्लंडच्या अितिहासातील खरा 'मॅग्नाचार्टा' आणि कुठे आपल्या देशाच्या पारतंत्र्याच्या शृंखला आपल्या स्वदेशाच्या पायांत लोखंडी खिळयांनी पूर्वीहून अधिक वळकटपणे जखडून टाकून त्यावर केवळ सोनेरी पाणी चढविणारें आणि त्यांना अलंकार म्हणून अुल्लेखिणारें ते राणीचें छद्मी घोषणापत्रक !

परंतु सन १८५७ च्या क्रांतीचा तात्कालिक अुपशम झाल्यानंतर आणि ब्रिटिश साम्राज्यसत्ता हिंदुस्थानभर निर्वेधपणे अधिष्ठित झाल्यानंतर हिंदुस्थानच्या राजकीय अितिहासाचें समीक्षण हिंदुदृष्टिकोनातून आम्ही लिहिलेल्या आमच्या आत्मवृत्ताची 'पूर्व पीठिका' ह्या पुस्तकात अवश्य तितक्या समग्रपणे केलेलेंच आहे. ह्यास्तव तेंही येथे देण्याचें प्रयोजन नाही.

ह्या कालखंडाचें वैशिष्ट्य : ब्रिटिशनिष्ठ राजकारण

१८५७ च्या क्रांतियुद्धाचा अुपशम जेव्हा १८६० पर्यंत झाला तेव्हापासून तो साधारणत: सन १९०० पर्यतच्या कालखंडाचें हिंदुस्थानातील राजकीय अितिहासाचें वैशिष्ट्य मुख्यत: ब्रिटिश साम्राज्यात राहूनच आपला भाग्योदय पुन्हा होअील आणि तसा तो आपण करून घेतला पाहिजे अशा मताच्या राजकीय पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या देशव्यापी चळवळींचें प्रस्थ हें होय. या कालखंडाला साधारणत: ब्रिटिशनिष्ठ राजकारणाचा काळ असें नांव देता येअील. अर्थात्, ह्या कालखंडातही जी ब्रिटिशांच्या परदास्यातून मुक्त होण्यासाठी सशस्त्र क्रांति केलीच पाहिजे अशा वीरवृत्तीची परंपरा तीही काही अगदीच अस्तंगत झालेली नव्हती. गुप्तपणे वा केव्हा केव्हा धाडसी अुठावातून ती पेट घेत होतीच. अितकेंच नव्हे तर तिचे असे तात्कालिक स्फोट सुद्धा हिंदुस्थानातील राजसत्तेला हादरा दिल्यावाचून आणि भारतीय जनतेत तेवढ्यापुरता तरी क्षोभ नि स्फूर्ति निर्मिल्यावाचून राहिले नाहीत. अशा सशस्त्र क्रांतीच्या अुठावाच्या वानगीसाठी दोन अुदाहरणांचा अुल्लेख केला तरी पुरें आहे. रामसिंग कुका याचे नेतृत्वाखाली पंजाबात सन १८७० ते ७४ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध आणि मुसलमानांविरुद्ध स्वराज्यासाठी नि स्वधर्मरक्षणासाठी झालेली हिंदुत्वनिष्ठ अुठावणी हें अेक प्रमुख अुदाहरण होय; आणि दुसरें म्हणजे त्याहूनही अधिक व्यापक प्रमाणावर आणि अधिक परिणामकारक असें महाराष्ट्रातील वासुदेव बळवंत फडके यांचे नेतृत्वाखाली ब्रिटिशांविरुद्ध हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी झालेला धुमधडाक्याचा सशस्त्र अुठाव हें होय !! ह्या घटनांचेंही समीक्षण आमच्या वर अुल्लेखिलेल्या 'आत्मचरित्राच्या पूर्वपीठिकेत' केलेलें आहे.

ह्यापुढेच टिळकपर्वाचा अुदय झाला. आणि क्रांतिवीर चाफेकर बंधु यांचें अिंग्रजी अधिकाऱ्यांवर झालेलें सशस्त्र आक्रमण आणि स्वराज्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या गुप्त संघटनांचें पर्व सुरू झालें.

सन १९०० नंतरचें हिंदुस्थानातील राजकारण

वर अुल्लेखिलेल्या सन १९०० च्या अंताचे आसपास ब्रिटिश राजनिष्ठ राजकारणाचा काळ संपला आणि ज्याला जहालांचें राजकारण असें त्या वेळी संबोधीत असत त्या टिळकांच्या प्रत्यक्ष क्रांतिमय नसलें तरी क्रांतिप्रवण राजकारणाचा आणि पूर्ण स्वातंत्र्य संपादनार्थ सशस्त्र क्रांतिकारक संघटनांचा आणि सशस्त्र क्रांतिकृत्यांचा काळ चालू झाला. ह्याच काळाशी हुतात्मा चाफेकरांच्या अुठावापासून माझ्या बालपणीच माझ्या जीवनाचे धागेदोरे गुंफले गेले आणि पुढे तर माझें सारें जीवन त्याच क्रांतिकार्याला अर्पिलें गेलें. त्यायोगे माझें चरित्र म्हणजेच ह्या अिंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्ययुद्धाचें अेक महत्त्वाचें प्रदीर्घ पर्वच झालें ! अर्थात्

ह्या कालखंडातील देशव्यापी घटनांचें समीक्षण हिंदुत्वाच्या दृष्टिकोनातून जें काही करणें अवश्य आहे तें तें माझ्या 'आत्मवृत्ता'च्या लिहिलेल्या आणि पुढे शक्य झाल्यास कदाचित् लिहिल्या जाणाऱ्या विस्तृत ग्रंथातून आलें आहे आणि येणारच आहे. माझा संबंध या पारतंत्र्यविमोचनाच्या चळवळीत माझ्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या बहुतेक नामांकित पुढाऱ्यांशी मी अगदी विशीच्या आत होतो तेव्हापासूनच येत गेला.

अगदी जुन्यातील जुन्या अशा या 'ब्रिटिशनिष्ठ' राजकारणाच्या आद्य संस्थापकांपैकी, ज्यांना राष्ट्रीय पितामह म्हणून मागून गौरविलें गेलें, त्या दादाभाई नौरोजी यांच्याशी सुद्धा त्यांच्या वयाच्या अैंशीव्या वर्षी, अिंग्लंडमध्ये मी अगदी तरुणपणी गेलो असताना माझा तेथल्या राजकीय चळवळीत संबंध आलेला होता अितकेंच नव्हे तर त्यांच्या तिकडील 'ब्रिटिशनिष्ठ' पक्षाशी माझ्या सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाचा प्रत्यक्ष संघर्षही अिंग्लंडमधील भारतीय राजकारणाचें धुरीणत्व कुणाकडे असावें याविषयीच्या रस्सीखेचीत घडलेला होता. या राष्ट्रपितामह दादाभाअींच्या मागोमागच्या पिढीत भारतीय राजकारणी पुढाऱ्यांपैकी बंगालचे माननीय नि धुरंधर नेते श्रीयुत सुरेंद्रनाथ बॅनर्जी, रमेशचंद्र दत्त, अित्यादिकांशीही अिंग्लंडमध्येच माझा प्रत्यक्ष संबंध आलेला होता. त्याच कालखंडातील पण त्यांच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या आणि ब्रिटिशनिष्ठ राजकारणाविरुद्ध झुंजणाऱ्या 'जहाल' किंवा राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांपैकी तर बहुतेकांशी माझा वैयक्तिक आणि वैचारिक संबंध आलेला होताच होता. पंडित श्यामजी कृष्ण वर्मा, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, नामदार गोखले अशा अखिल भारतीय पुढाऱ्यांपासून तो शतावधि अितर प्रांतोप्रांतीच्या पुढाऱ्यांपर्यंत माझा व्यक्तिशः संबंध आणि राजकीय दृष्टचा अनेक प्रकरणी संघर्षही घडत गेला. लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, श्रीमंत दादाराव खापर्डे, डॉ. मुंजे आणि महाराष्ट्रातील त्या प्रभावळीतले अनेक नेते हे तर मला वैयक्तिक रीत्याही अितके परिचयाचे झालेले होते की, त्यांच्यापैकी काहींचे आणि परप्रांतीय 'जहाल' पुढाऱ्यांचेही मजवर व्यक्तिशः पितृतुल्य प्रेम असे. अुदाहरणार्थ बिपिनचंद्र पाल अिंग्लंडमध्ये असताना त्यांच्या घरीच त्यांचे चिरंजीव निरंजन पाल यांच्यासह मी काही काळ रहात होतो. बिपिनबाबूनी स्वतः आपल्या हातांनी बंगाली पद्धतीप्रमाणे मांसाची नि माशांचीं पक्वान्नें करून मला आग्रहाने वाढलेलीं आहेत आणि माझ्यासारख्या अेका महाराष्ट्रीय शाकाहारी ब्राह्मणाला बाटविण्याचें पुण्य जोडलेलें आहे! अहिंसात्मक सत्याग्रहाच्या नि असहकाराच्या चळवळीचे धुरंधर आचार्य म्हणून पुढे विख्यात झालेले 'महात्माजी' हे जेव्हा अिंग्लंडमध्ये केवळ 'बॅरिस्टर गांधी' या साध्या नांवानेच लोकांना माहीत होते तेव्हा ते अिंग्लंडमध्ये आलेले असता

त्यांच्याशीही माझा वैयक्तिक नि स्नेहशील परिचय तिकडेच झालेला होता आणि पुढे हिंदुस्थानामध्ये राजकारणाच्या आखाड्यात त्यांच्याशी त्यांच्या जन्मभर माझा संबंध आणि संघर्ष घडत राहिलेला होता ! सशस्त्र राज्यक्रांतिकारक पक्षाविषयी तर बोलावयासच नको, हिंदुस्थानातील हुतात्मा नि वीरात्मा चाफेकरांनंतर सशस्त्र राज्यक्रांतीचें भारतीय धुरंधरत्व करण्याचें महत्कार्य प्रथम महाराष्ट्रात नि नंतर अिंग्लंडमध्ये असताना आरंभी आरंभी योगायोगाने माझ्याकडेच आल्यामुळे त्या पक्षातील सहस्रावधि हुतात्मे, वीरात्मे आणि क्रांतिकार्यरत तरुण यांच्याशी माझा दाट परिचय झाला हें सांगणें नकोच. शामजी कृष्णवर्मा, मॅडम कामा, बॅ. राणा ह्यांसारख्या माझ्याहून वडिलधाऱ्या असणाऱ्या परंतु ज्यांनी सशस्त्र क्रांतिकार्याची दीक्षा माझ्या प्रेरणेने आणि प्रचाराने माझ्या हातूनच घेतली होती अशा अुभ्या भारतातील अनेक महनीय व्यक्तींशी माझा नुसता परिचय नव्हे तर वैयक्तिक लोभही जडलेला होता. माझ्या अभिनव भारत संस्थेतल्या अगदी भगूरनाशिकपासूनच्या तो पुढे पुढे अनेक परकीय देशांतूनही पसरलेल्या शाखांतल्या लहान मोठ्या सहस्रावधि सभासदांना तर मी बहुधा व्यक्तिशःच क्रांतिदीक्षेची शपथ दिलेली होती. हुतात्मा मदनलाल डिंग्रा, लाला हरदयाळ, चट्टोपाध्याय, सेनापति बापट, अितिहासकार डॉ. जयस्वाल, भाअी परमानंदजी, त्रिमलाचार्य, 'ऋषि' अय्यर,–अशीं नांवें कुठवर सांगावीत ! पुढे आम्हांस अंदमानात जन्मठेपेवर जावें लागलें तेव्हा तर बंगालमधील अनुशीलन समितीचे प्रमुख पुलिन विहारीदास, युगांतर समितीचे वारिंद्र घोष, अुपेंद्रनाथ बानर्जी, आशुतोष लाहिरी, हेमचंद्रदास, अित्यादि अनेकानेक बंगाली क्रांतिकारक; पंजाबातील अुणेपुरे शंभरअेक गदर पक्षातील आणि अितर पक्षांतील ज्या क्रांतिकारकांना प्रथम फाशीच्या शिक्षा होअून नंतर त्या जन्मठेपेच्या करण्यात आल्या ते शीख नि शीखेतर हेही अंदमानातील बंदिवासात माझ्या समवेत देशाच्या स्वातंत्र्यासाठी अतोनात कष्ट भोगीत वर्षानुवर्षें अेकत्रच राहिलेले होते. त्यानंतर अंदमानातून परतल्यावर त्या ब्रिटिशविरोधी सशस्त्र क्रांतिकारक कार्यासहच त्याचाच अेक अपरिहार्य परिणाम आणि भाग असलेल्या अिस्लामविरोधी अशा अखिल भारतीय हिंदुसंघटनाच्या प्रचंड आंदोलनातही अुभ्या भारतातील लक्षावधि हिंदुत्वनिष्ठांशी माझा दृढ संबंध आला. अिथे केवळ स्थलाभावामुळे त्यांचीं त्यांचीं नांवें दिग्दर्शनापुरती सुद्धा अुल्लेखिणें अशक्य होय ! तरीही अितकें आवर्जून सांगावेसें वाटतें की, ज्यांचीं नांवें गाळावीं लागताहेत त्यांचीं त्यांचीं कार्यें, ज्यांचीं नांवें अुच्चारिलीं आहेत त्यांच्या अितकीं महत्त्वाचीं नव्हतीं म्हणूनच काय तीं गाळलीं गेलीं असें कोणीही समजू नये !

अठराशे सत्तावनच्या क्रांतिसमरातील पराजयानंतरच्या हिंदुस्थानी राजकारणाचे जे तीन चार महत्त्वाचे टप्पे वर अुल्लेखिलेले आहेत त्यांत ब्रिटिशनिष्ठ

(नेमस्त), निःशस्त्र राष्ट्रनिष्ठ (जहाल), सशस्त्र क्रांतिनिष्ठ आणि हिंदुत्वनिष्ठ, अशा सर्व पक्षांशी मी साधारणतः वयाच्या सोळाव्या वर्षी सक्रिय राजकारणात भाग घेऊ लागल्यापासून माझा वर सांगितल्याप्रमाणे अगदी व्यक्तिशः निकट संबंध आणि काहींशी केव्हा केव्हा कडाक्याचा संघर्षही घडलेला असल्यामुळे हिंदुस्थानच्या ह्या कालखंडातील साऱ्या अितिहासाचें संकलन नि समीक्षण मी गेल्या पन्नास साठ वर्षे तरी क्षणाक्षणाला जें माझ्या लेखांमध्ये वा भाषणांमध्ये माझ्या हिंदुत्वनिष्ठ दृष्टिकोनातून करीत आलो त्या मी लिहिलेल्या साहित्यात परिपूर्ण रीतीने अंकित झालेलेंच आहे. त्यांपैकी माझीं शतावधि भाषणें, संभाषणें वा लेख सोडून दिले तरी, विस्मृतीत गेलेलें लिखाणही सोडून दिलें तरी, आज माझ्या त्या साहित्याची न्यूनतः जीं सात आठ सहस्र पृष्ठें अुपलब्ध आहेत किंवा ग्रंथरूपाने प्रचलित आहेत, त्यांपेक्षा अधिक अेक अक्षरही या विषयावर लिहिण्याची मला आवश्यकता वाटत नाही,– आणि आता या माझ्या अैशीव्या वर्षी नि क्षीणतेने रुग्णशय्येस खिळलेल्या अवस्थेत त्याची पुनरुक्ति करीत बसण्याची मला शारीरिक शक्तिही अुरली नाही !

समारोप

ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या पूर्ण ग्रासांतून सुटून स्वतंत्र होण्यासाठी हिंदुस्थानने विशेषतः १८५७ सनाच्या पहिल्या प्रचंड क्रांतियुद्धापासून तो दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या सन १९४६ मध्ये झालेल्या अंतापर्यंत निःशस्त्र आणि सशस्त्र मार्गांनी ब्रिटिशांशी जो हा निकराचा लढा शंभर अेक वर्षें सारखा दिला त्यात शेवटी आमच्या हिंदुराष्ट्राला आपलें राजकीय नि राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादिण्यात महान् विजय मिळण्याची सुवर्णसंधि त्या दुसऱ्या जागतिक महायुद्धाचें रणशिंग फुंकलें जाताच अेकदाची आली ! !

ह्या संग्रामात आम्हांला जर कोणा परराष्ट्राचें अत्यंत परिणामकारक साहाय्य मिळालें असेल तर तें जर्मनीचा सर्वेसर्वा जो हिटलर आणि जपानचा रणधुरंधर प्रमुख नेता जो टोजो त्यांचेंच होय ! ब्रिटिशांशी लढत राहिलेल्या हिंदुस्थानच्या सशस्त्र क्रांतिकारक पक्षाला अगदी प्रथमपासून म्हणजे अभिनव भारताच्या युरोपातील सशस्त्र आंदोलनापासून तों दुसऱ्या जागतिक महायुद्धातील हिंदी सेनापति सुभाषचंद्र बोसांनी ब्रिटिशांविरुद्ध घोषित केलेल्या महायुद्धापर्यंत, भूदल नौदल–नभोदलापर्यंतच्या सर्व अद्ययावत् शस्त्रास्त्रांचें साहाय्य ह्या जर्मनीने आणि जपाननेच दिलें ! म्हणूनतर ब्रिटिशांच्या विरुद्ध सिंगापूर-मलायाकडील अुणेपुरें चाळीस पन्नास सहस्र हिंदी सैन्य बंड करून अुठू शकलें आणि सेनापति सुभाष-बाबूच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठी 'चलो दिल्ली !' अशी रणगर्जना करीत हिंदुस्थानवर चालून आलें ! त्याच वेळी हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या

हाताखाली असलेल्या भूदल-नौदल नि वायुदलातील हिंदी सैन्यानेही स्वातंत्र्य-रणात अुडी घेण्याचा कट केलेला आहे हें ब्रिटिशांच्या स्पष्टपणे ध्यानात आलें. हिंदुस्थानातील कोट्यवधि नागरिक तर ब्रिटिशांविरुद्ध अुठाव करण्यास आधी-पासूनच तरवारलेले होते. कोणी भूमिगत होअून क्रांतिकारक अुठाव करीत होते तर कोणी ब्रिटिशांच्या शस्त्रागारावर अकस्मात् अुघड अुघड चढाया करून तीं लुटून नेत होते, तर कुणी लहानलहान प्रतिसरकारेंच स्थानी स्थानी स्थापून ब्रिटिश राजवट तेवढ्यापुरती अुखडून देत होते ! अशा सर्व बाजूंनी सतावल्या गेलेल्या आणि युरोपातील दोन जागतिक महायुद्धांत लढून लढून शक्तिक्षय झालेल्या, क्षतविक्षत झालेल्या, ब्रिटिश साम्राज्यसत्तेची हिंदुस्थानवरील पकड सुटली. त्यांच्या साम्राज्यमदाची धमकच तुटली. अवसान गळून गेलें. शेवटी सन १९४७ मध्ये ' हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आम्ही मान्य करून आमची राजसत्ता सोडून देतो ' असें बोलणें ब्रिटिश व्हॉअिसरॉयने हिंदुस्थानातील पुढाऱ्यांशी चालू केलें !

अर्थात् अिंग्रजांना त्यांतल्या त्यात ज्या ज्या हिंदी पक्षांचें राजकीय धोरण प्रथमपासूनच तत्त्वतः भ्रांत, स्वभावतः भेकड, साधारणतः ब्रिटिशधार्जिणें, मुसल-मानांपुढे चळचळ कापणारे आणि कशीतरी नि हाती येअील तितकीच राजसत्ता का होअीना पण आपल्या पक्षाच्या पदरात पाडून घेण्यास आतुर झालेलें आढळलें, त्या पक्षांनाच हिंदुस्थानचे पुढारी म्हणून ब्रिटिशांनी मान्यता दिली आणि सारीं राजकीय सत्तांतराविषयींचीं बोलणीं त्यांच्याशीच काय तीं केलीं !, अर्थात् हे पक्षही देशभक्तच होते. वैध नि निःशस्त्र मार्गांनी का होअीना, पण त्यांनीही कष्ट केले होते.

परंतु अिंग्रजांनी अुपक्रमिलेल्या ह्या सत्तांतराच्या वाटाघाटीत अेक कपटी नि भयावह अट मात्र घालून ठेवलेली होती. ती अशी : ब्रिटिशांना हिंदूविरुद्ध ब्रिटिश अशा ह्या स्वातंत्र्यसंग्रामात, सन १८५७ नंतर ज्या मुसलमानांनी देशद्रोही साहाय्य केलेलें होतें आणि त्याचें पारितोषिक म्हणून जे मुसलमान हिंदुस्थानचे दोन तुकडे करून मुस्लिम बहुसंख्य असलेल्या भागाचें राज्य आम्हांस स्वतंत्रपणे तोडून द्यावें म्हणून हट्ट धरून बसलेले होते, त्या मुसलमानांना त्यांच्या त्या हिंदुद्रोही नि देशद्रोही मागणीला पाठिंबा देअून त्यांनी दिलेल्या साहाय्याचें अुतराअी व्हावें यासाठी आणि भावी स्वतंत्र हिंदुराष्ट्राला अेक नित्याचा शत्रु अुत्पन्न करून ठेवावा या दुष्ट नि कूट बुद्धीने हिंदुस्थानची विभागणी केली पाहिजे असा ब्रिटिशांनी आग्रह धरला.

हा ब्रिटिशांचा आग्रह म्हणजे मूलतः मुसलमानांचीच मागणी होती की हिंदुस्थानचे दोन तुकडे पाडून आमचा मुस्लिम बहुसंख्य प्रदेश आम्हांला आमचें स्वतंत्र राज्य स्थापण्यासाठी मिळाला पाहिजे. मुसलमानांच्या ह्या हट्टाला भारता-तील यच्चयावत् मुसलमानांनी कट्टरपणे अुचलून धरलें. परंतु हिंदुस्थानातील सर्व

हिंदूंचा मात्र या मुसलमानांच्या पाकिस्तानच्या मागणीला कट्टर विरोध नव्हता!! अेक अपवाद वगळला तर हिंदुस्थानातील सर्व पक्षांच्या मतें मुसलमानांना पाकिस्तान तोडून द्यावें आणि कटकट मिटवावी असेंच होतें ! म्हणजे सर्व पंजाब नि बंगाल पाकिस्तानात द्यावा. ह्यावरही मुसलमानांची तिसरी निकराची मागणी होतीच की, पंजाब नि बंगालमधील त्यांचीं हीं दोन मुस्लिम राज्यें जोडण्यासाठी अेक 'कॉरिडॉर', थेट पंजाबपासून तो बंगालपर्यंत जाणारा अुत्तर हिंदुस्थानमधल्या प्रदेशाचा अेक पट्टाचा पट्टाही मुस्लिमांना देण्यात यावा !!

ह्या मुस्लिमांच्या मागण्यांना कट्टर विरोध साऱ्या हिंदुस्थानात ज्या अपवादात्मक अशा अेका पक्षाने काय तो शेवटपर्यंत केला तो पक्ष म्हणजे हिंदुत्वनिष्ठ पक्ष होय ! हिंदुस्थानच्या विभागणीविरुद्ध त्यांनी हिंदुमहासभेच्या नेतृत्वाखाली अखंड भारताचें निकराचें आंदोलन अुभारलें. करवेल तितका तीव्र प्रतिकार केला. हिंदुद्रोह्यांनी, मुस्लिमांनी, ब्रिटिश सरकारने त्या हिंदुत्वनिष्ठांच्या प्रबल आंदोलनास हाणून पाडण्यासाठी त्यांचा छळ केला, त्यांना बंदिवासात कोंडलें, स्थानी स्थानी रक्तपात झाले. पण साऱ्या देशभर त्या हिंदुत्वनिष्ठांनी, अल्पसंख्य असताही, त्या शत्रूंच्या अत्याचारांना प्राणपणाने तोंड दिलें, शक्य तेथे हिंदूच्या रक्तपाताचा सूड हिंदूंच्या शत्रूंचाही रक्तपात करून घेण्यास आणि प्रसंगी हिंदुद्रोह्यांचे शिरच्छेद करण्यासही सोडलें नाही !

सुदैवाने हिंदुत्वनिष्ठांचा हा प्राणपणाने केलेला प्रतिकार अगदी विफलही झाला नाही. कारण हिंदुस्थानची विभागणी करण्याचे आमच्या मताविरुद्ध ब्रिटिश सरकारने ठरविलें तरी निदान मुसलमानांनी मागितल्याप्रमाणे सबंध पंजाब आणि सबंध बंगाल त्यांना न देता त्यांतला मुस्लिम बहुसंख्य भाग तेवढाच काय तो यांच्या भावी पाकिस्तानात समावेशिला जावा आणि हिंदु बहुसंख्य असा पूर्व पंजाब आणि पश्चिम बंगाल हे हिंदूंचे भाग भारतात समाविष्ट व्हावे, ही हिंदुत्वनिष्ठांची न्यूनतम मागणी सरकारला मान्य करावी लागली. 'Let us vivisect their proposed Pakistan before they vivisect our Hindusthan.' ही हिंदुत्वनिष्ठांची मागणी यशस्वी झाली. त्याच्याही पुढे जाअून मुसलमान जी अधिक भयंकर मागणी करीत होते की, पंजाबपासून तो बंगालपर्यंतच्या सलग मार्गासाठी अुत्तर प्रदेशाचा अेक पट्टाचां पट्टा मुस्लिमांच्या पाकिस्तानास देण्यात यावा, ती त्यांची अघोरी मागणी तर सत्तांतराच्या चर्चेत हिंदुत्वनिष्ठांच्या विरोधामुळे विचारास सुद्धा घेण्यात आली नाही !

त्यांतही हिंदुस्थानच्या विधिमंडळाच्या प्रांतीय आणि केंद्रीय अशा दोन्ही प्रातिनिधिक सभांसाठी म्हणून ज्या सार्वजनिक निवडणुकी झाल्या त्यांत पाकिस्थान देण्यास अनुकूल असणाऱ्यांसच बहुसंख्य मतदारांनी निवडून दिलें तेव्हा

अखंड भारताचा घात करण्याच्या घोर राष्ट्रीय महापातकाचे हेच बहुसंख्य मतदार खरे अपराधी ठरले !

त्यांतही स्वत: हिंदुत्वनिष्ठ पक्षही मनोमन हें जाणून होता की, हें पाकिस्थान म्हणजे हिंदूंनी, पूर्वजन्मी केलेल्या सद्गुणविकृति, शुद्धिबंदी अित्यादि सामाजिक नि धार्मिक महापापांचा अवश्यंभावी परिपाकच होता. ह्या रूढीपायीच हिंदूंनी नगरोनगरी आधीच आपल्या हाताने जीं छोटीं मोठीं पाकिस्थानें निर्मून ठेवलीं होतीं त्या सामाजिक पापांचा हा परिपाक केव्हातरी भोगणें प्राप्त होतें. ह्याचा सविस्तर अुलगडा पूर्वाधात केलेलाच आहे.

ह्या सर्व अुलाढाली हिंदुस्थानात चालल्या असताना त्यांचा मथितार्थ विचारात घेअून ब्रिटिश पार्लमेंटमध्ये Independence of India Act चें विधेयक स्वत: ब्रिटिश मंत्रिमंडळाने मांडलें आणि तें अेकमताने पार्लमेंटने संमत केलें. त्या प्रमाणे शेवटी १५ ऑगस्ट सन १९४७ ला दिल्ली येथे ब्रिटिश गव्हर्नर जनरल वरील सार्वजनिक निवडणुकीत निवडून आलेल्या हिंदुस्थानच्या प्रतिनिधींच्या संमतीने घोषणा केली, " ब्रिटिशराष्ट्र हिंदुस्थानवरील त्याची साम्राज्यसत्ता सोडून देअून साऱ्या हिंदुस्थानास राजकीय स्वातंत्र्य देत आहे. हिंदुस्थानात मुस्लिम बहुसंख्य असे जे पश्चिम पंजाब नि पूर्व बंगालचे भाग आहेत त्यांचे 'पाकिस्तान' नांवाचें अेक मुस्लिम स्वतंत्र राज्य स्थापिलें जाअील आणि अुरलेल्या साऱ्या हिंदुस्थानचें स्वतंत्र ' भारतीय राज्य ' स्थापलें जाअील ! ! "

अशा प्रकारें शेवटी ब्रिटिश साम्राज्याच्या दास्यातून भारताची मुक्तता होअून हें भारतीय महाराज्य स्थापन झालें ! तेव्हा राजनीतिपटु हिंदुत्वनिष्ठांनीही विचार केला की, सद्य:स्थितीत अितकें जें साधलें हेंही काही थोडकें नाही. अगदी अखंड भारत नाही तरी तीन चतुर्थांश भारत सलगपणे आज स्वतंत्र होत आहे हेंही महद्भाग्य होय ! अुण्यापुऱ्या अेक सहस्र वर्षांनी आमच्या हिंदु अितिहासात हें महान् राष्ट्रीय पर्व अुगवलें आहे ! तरी आता आज प्रथम हें संपादिलेलें भारतीय महाराज्य आत्मसात् करून टाकणें हीच हिंदुत्वहिताच्या आणि हिंदुत्वगौरवाच्या दृष्टीने खरी राजनीति आहे. मग अुरलेल्या अेक दोन तुकडया तांकडयांच्या प्रश्नासही अुद्या बघून घेता येअील !

लगोलग दिल्लीच्या लालकिल्ल्यावर शंभर दीडशे वर्षें साम्राज्यमदाने धुंद झालेला जो ब्रिटिश यूनियन जॅकचा ध्वज भारताच्या छातीवर फडकत होता तो परकीय ध्वज अुखडून टाकला गेला आणि तेथे भारतीय स्वातंत्र्याच्या तुमुल जयजयकारात या भारतीय सर्वतंत्रस्वतंत्र महाराज्याचा सुदर्शन चक्रांकित ध्वज फडकविण्यात आला !

ज्या आमच्या पश्चिमसमुद्रांतून ' आम्ही खड्गानेच साम्राज्य जिंकू आणि खड्गानेच चालवू ' अशी मदोन्मत्त गर्जना करीत ब्रिटिश साम्राज्य सत्ता आमच्या

हिंदुस्थान देशावर चढून आली आणि थेट दिल्लीच्या सिंहासनावर आरूढ झाली, त्याच दिल्लीच्या सिंहासनावरून तिला पुन्हा खाली ओढून आणि तिच्या त्या गर्विष्ठ खड्गाचे तुकडे अुडवून त्याच आमच्या पश्चिम समुद्राच्या तटापर्यंत आम्ही परत पिटाळीत नेली आणि त्याच पश्चिम समुद्रात बुडविली ! पराभूत ब्रिटनचा शेवटचा सोजिर आम्हांला पाठ दाखवीत आणि मान खाली घालीत त्या पश्चिम समुद्रात परत जाताना आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिला !

ह्याप्रमाणे हिंदुस्थानावर अैतिहासिक काळाच्या दोन सहस्र वर्षांमध्ये जीं परचक्रें चालून आलीं त्यांतील ह्या सर्वांत महाबलाढ्य अशा ब्रिटिशांच्या सहाव्या परचक्राचीही हिंदुस्थानने दाणादाण अुडविली—त्यांच्या राजकीय दास्याचे तुकडे तुकडे केले !

असें अिंग्लिशांचें महाबलाढ्य राज्य गेलें आणि गेलें तेव्हा अितक्या त्वरेने नि संपूर्णपणे गेलें की अेका प्रचंड साम्राज्याचें सत्तांतर—सत्तांतर न वाटता अेखादें केवळ स्वप्नांतर वाटावें ! अगदी परवा परवापर्यंत अिंग्रजांच्या आज्ञेवाचून या हिंदुस्थानात अेक पानही हालत नव्हतें – आज अिंग्रज अधिकारी असा – अिंग्रज असा, औषधालाही ह्या हिंदुस्थानात अुरला नाही !

अिंग्लिशांवर मिळविलेला हा अश्वमेधीय विजय ज्या ह्या पानावर आम्ही आता अंकीत आहोंत हें पान होय –

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सहावें सोनेरी पान !

REFBK-0015915

मराठा ग्रंथ [illegible] ठा स्थलांक
अनुक्रमांक 3८९७८९ वि: निबंध
प्रा.क्र. १५९९ नों: दि: १३/११/१९५५